TEXT DARK AND LIGHT

महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

(शरीरखंड.)

हा ग्रंथ

श्रीधर व्यंकटेश केतकर; एम्. ए. पीएच्. डी.

यांनीं

मंडळांतील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केला.

विभाग बारावा.

——:*:——

खतें—ग्वेर्नसे

—*—

ज्ञानं राष्ट्रधनं महत्तममिदं ब्राह्मण्यसंरक्षकम् ।
लोके क्षत्रियवैश्यकार्यघटनासौकर्यसंस्थापकम् ॥
कर्तृत्वागमबोधको ननु भवेज्ज्ञानार्थयत्नोऽधुना ।
ज्ञात्वा नागपुरे सुपण्डितजनैः संघः शुभो निर्मितः ॥

———

१९२५

मुद्रक—डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं ज्ञानकोश छापखाना ८४१ सदाशिव पेठ पुणें येथें छापिला.

प्रकाशकः—महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लिमिटेड नागपूर, तर्फे श्रीधर व्यंकटेश केतकर, ८४१ सदाशिव पेठ, पुणें.

या विभागांतील विशिष्ट लेख व लेखकः—खळ—रा. पांडुरंग सदाशिव केळकर खार पाडणें—रा. सुं. दि. नवलकर.

——:*S*:——

अंतरंग परिचय.

प्रस्तुत विभागांत 'ख' चीं पृष्ठें २३ ते १५०, आणि 'ग' चीं १ ते ३१६ आलीं आहेत. या विभागांत 'ग' संबंध आला आहे. विषयांचें वर्गीकरण असें:—

खतें—ख्रैस्त्य

हिंदुस्थान—

इतिहास, पौ रा णि क.—खर, खरोष्ठ्र ऋषि, खांडववन. जै न.—खरतरगच्छ. हिं दु.—खिळिंगिला, खोम्माण. मु सु ल मा नी.—खानखानान, खानजहान, खानजहान कोकल्ताश, खानजहान लोदी, खालसादिवाण, खिलजी, खुश्रू सुलतान. म रा ठे.—खासगीवाले, खुश्रुशेट मोदी, खेम सावंत, खेळोजी भोंसले, खोलेश्वर. इ ति हा स सा हि त्य.—खरे.

जातीतिहास—खत्तर, खत्री, खवास, खाटीक, खानझादा, खारल, खारवा, खारिया, खारुपा, खालसा, खासी, खैरवार, खोरवार, खोजा, खो जात, खोंड.

प्रादेशिक इतिहास व भूगोल—

मुंबई इलाखा, म हा रा ष्ट्र.—खर्डे, खांदेरी, खानदेश, खानापूर, खेड. सिं ध. खिसो. गु ज रा थ.—खाराघोडा, खेडा, खेरावाड. का ठे वा ड.—खंबायत, खंभलाव, खंभाळ, खंभालिय, खांडिया, खिजरिया, खिराली. ब डो दे.—खेरालु. व ऱ्हा ड. खर्जी, खामगांव, खोलापूर. म ध्य प्रां त.—खांडवा, खापा, खारगवान, खुईखदान संस्थान, खुटगांव, खुरई, खुरिया, खैरागड, खैरी. इं दू र.—खरगोण. है द्रा बा द.—खम्ममेट्ट, खुलदाबाद. बं गा ल.—खरकपूर, खरार, खर्डा, खानाकुल, खिरपई, खुंटी, खुर्दा, खुलना, खेत्री, खैतूर, खोनोम. बि हा र ओ रि सा.—खरगपूर, खरसावन, खिचिंग, खोंडमाल्स. आ सा म.—खमटी डोंगर, खासपूर, खासी आणि जैंटिया डोंगर, खोवई. सं यु क्त प्रां त.—खागा, खुताहन, खुदागंज, खुर्जा, खेका, खेरी, खैर, खैरागड, खैराबाद. पं जा ब.—खन्ना, खरर, खानगड, खानगाडोग्रान, खानपूर, खुदियन, खेमकरन, खैरपूर, खैरीमूरत. म ध्य हिं दु स्था न.—खनियाधान, खाच्रोड, खानुआ, खिचलीपूर, खेत्री. वा य व्य स र ह द्दी चा प्रां त.—खायबर, खैरागली.

आशिया, हिंदुस्थानेतर, ऐ ति हा सि क.—खाल्डून, खैरुद्दिन. प्रा दे शि क.—खरप्रांत, खारान, खीवा, खुझदार, खोकंद, खोतान, खोरेयाबाद. जा ती ति हा स.—खिलजी.

यूरोप, ऐ ति हा सि क.—खिश्चिआना. प्रा दे शि क—खोल्म, ख्रिश्चिआना.

आफ्रिका, प्रा दे शि क.—खरगा, खार्टुम.

प्राचीन जग—खरोष्ठ्र, खाल्डिया.

शास्त्रें—

वनस्पती—खरबूज, खसखस, खिरणी–रायण, खिरा, खुरासणी, खैर.

कृषिशास्त्र—खतें, खार पाडणें.

औद्योगिक—खळ.

खनिजविज्ञान—खनिखोदनशास्त्र, खनिजविज्ञान.

ज्योतिष—ख्रिस्तीशक. च रि त्रें—खानापूरकर.

सामाजिक—खोत, खानेसुमारी.

वाङ्मयं—उ र्दू.—खुशतर, खुश्रुअमीर. हिं दी—खत्री. अ र बी.—खन्सा, खलील, खुर्दोदभाई. फा र सी.-खोंडमीर.

खेळ—खेळ, खोखो.

सांप्रदायिक—खलीफ, खाकी, खादिजा, खुदवा, ख्रिस्त येशू, ख्रैस्त्य.

अर्थनिश्चय—खान, खानगी, खिलात.

ग—ग्वेर्नेसे

हिंदुस्थान—

इतिहास, वै दि क—गणेश किंवा गणपति, गंधर्व, गय, गर्ग, गांधार, गायत्री, गार्गी, गुरु, गौतम. पौ रा णि क.—गंधमादन, गरुड, गांधारी, गाधि, गालव, गिरिव्रज, गुरुहा नदी, गुह, गोपीचंद, गोवर्धन, गोशीर्ष, गौरी. र ज पू त.-गुहिलोट. हिं दु.-गंगघराणें, गजपती, गजबाहु, गणपति नागराज, गणपतिराजे, गर्दभील, गहरवार, गांगेयदेव, गुप्त गुप्तघराणें. मु सु ल मा नी.-गाजीउद्दीनखान, गाजीउद्दीनहैदर, गिरिधर, गुलामकादर, गुलामघरोंण, गोकुळजाट, ग्यासबेग. म रा ठे.—गणेश वेदान्ती, गणोजी शिर्के, गदाधरपंत प्रतिनिधी, गागाभट्ट, गायकवाड, गोखले घराणें, गोखले बापू, गोपिकाबाई पेशवे, गोपीनाथपंत बोकील, गोविंदपंत काळे. गोविंदपंत बुंदेले. शी ख.—गुरुगोविंद. इं ग्र जी अ म दा नी.-गोखले गोपाळ कृष्ण, गोपीनाथ दीक्षित, गौरीशंकर उदयाशंकर.

जातीतिहास—गंडा, गदरिया, गदी, गद्दी, गंधमाळी, गरोडा, गवंडी, गवळी, गाम्रा, गानिगा, गाबती,

गामवक्कल, गारपगारी, गारुडी, गावड, गिधिया, गुजर गुरखा, गुरव, गोंड, गोंड-गोवारी, गोंधळी, गोप, गोला, गोवर्धन ब्राह्मण, गोसावी, गौड ब्राह्मण, ग्रहविप्र.

प्रादेशिक इतिहास व भूगोल, मुंबई इलाखा.—महाराष्ट्र.—गारोडी, गांळणा, गुणवंतगड, गोवर्धन-गंगापूर. गुजराथ.—गुजराथ, गोघा, गोध्रा. काठेवाड.—गंधका, गधाड, गधाली, गधिया, गधुला, गधोल, गरगली, गाबत, गिगासारण, गिरनार, गुंडयाली. गुंडा, गेडी, गोंडल, गोरखमठी, गोहिलवाड. सिंध.—गढीयासीन, गुणि. कर्नाटक.—गदग, गंधर्वगड, गलगनाथ, गलगली, गुत्तल, गुळदगुड, गेळीहुळ्ळी, गोकर्ण, गोकाक, गोळीहुळ्ळी. कोल्हापूर.—गडहिंग्लज, गिरसप्पा. बडोदे.—गणदेवी. ग्वाल्हेर.—गारिसपूर, गुना, गोह्द, ग्वाल्हेर. वऱ्हाड.—गाविलगड, गेरुमाटरगांव. इंदूर.—गरोठ, गौतमपुरा. मध्यप्रांत.—गंगाझरी, गंगालूर, गडचिरोळी, गडिया पहाड, गढकोटा, गवररा, गाडरवाडा, गिलगांव, गुर्दा, गेवर्धा, गोंड-उमरी, गोंदिया. हैद्राबाद.—गंगाखेर, गंगापुर, गंगावती, गडवाल, गुरमतकाल, गुलबुर्गा, गेवराई, गोवळकोंडा. म्हैसूर.—गंगवाडी, गुंडुलपेठ, गुब्बी, गोरीबिदनूर, गोवर्धनगिरी. बंगाल.—गंगटोक, गंगासागर, गाऱ्हालिया, गुमला, गुरुंग, गोपालगंज, गोपालपूर, गोलुंदो, गौड, गौडीपूर. बिहार व ओरिसा.—गया, गरवा, गरुडस्तंभ, गिधौर, गिरीदीह, गोड्डा, गोविंदपूर. आसाम.—गंगपूर, गरभूर, गारो टेंकड्या, गोलपाडा, गोलाघांट, गौहत्ती. संयुक्त प्रांत.—गंगानदी, गंगाकालवा, गंगोत्री, गंगोह, गंडकी, गढमुक्तेश्वर, गढवाल, गरौथा, गाझिआबाद, गाझीपूर, गिरीथा, गुन्नौर, गुलावथी, गोकुल, गोप्रा, गोंडा, गोमती, गोरखपूर, गोला, गोवर्धन, गौराबऱ्हाज. पंजाब.—गडशंकर, गढी इख्तीआरखान, गढीवाल, गुगेरा, गुजरखान, गुजराणवाला, गुरगांव, गुरुदासपूर, गोलेर, गोहान, ग्रे कॅनॉल. काश्मीर.—गिलजित. मद्रास.—गंगैकोंडपुरम्, गजपतीनगरम्, गंजम, गंडीकोट, गंतूर, गुंटकल, गुडियात्तम, गुडीवाडा, गुडूर, गुणुपूर गुंतुपल्ली, गुदलूर, गुमसूर, गुर्रमकोंडा, गोदावरी, गोदीचेट्टी, गोपिचेट्टिपालैयम्, गोळकोंडा. ब्रह्मदेश.—गंगाव, ग्योविंगाक, ग्वा. सीलोन.—गॅले. मध्य हिंदुस्थान.—गढेमंडल, गढौली, गऱ्हा, गाम्रौन, गोगुंडा, गोविंदगड, गौरीहर. पोर्तुगीज हिंदुस्थान.—गोवें, नेपाळ.—गौरीशंकर.

आशिया हिंदुस्थानेतर, ऐतिहासिक.—गझनी-घराणें. प्रादेशिक.—गझनी, गॅलिली, गॅलिलीचा उपसागर, गॅलेशिया, गाझा, गिरिश्क, गोमलघांट, गोर्डियम, ग्वादर. जातीतिहास.—गख्खर.

आफ्रिका, प्रादेशिक.—गँबिया, गिनी, गोंडार, गोरी, गोल्डकोस्ट, ग्वाडा. जातीतिहास.—गल्ल.

यूरोप, ऐतिहासिक.—ग्वीलोटीन. चरित्रें.—गॅम्बेटा लीऑन, गॅरिबाल्डि, गीझो, गुस्टाव्हस, ग्लॅडस्टन, ग्रिब्हो, ग्वीचिआर्डीनी, ग्वेनेव्हीअर, ग्वेरिकऑटोव्हान. प्रादेशिक.—गर्गोव्हिया, गॅलॅट्झ, गॅलिपोली, गॅलिशिया, गॅल्वे, गॉटिंजेन, गार्डो, गॉल, गोझो, गोथा, ग्रॉडनो, ग्रीनलंड, ग्रीनिच, ग्रीस, ग्रेटनाग्रीन, ग्रेटब्रिटन, ग्लासगो, ग्लूस्टर, ग्वाडलक्विव्हर नदी. ग्वेनेसे. जातीतिहास.—गॉथ लोक.

अमेरिका, चरित्रें.—गारफील्ड. प्रादेशिक.—गालापागास बेटें, ग्रेनाडा, ग्रेनाडाइन्स, ग्वाटिमाला, ग्वाडेलोपी, ग्वाम, ग्वायना, ग्वायना बॅकोआ.

शास्त्रें—प्राणिशास्त्र—गरुडपक्षी, गवा गाई व म्हशी, गोगलगाय, गोचीड.

वैद्यक—गजकर्ण, गंडमाळा गर्भधारण, गर्भविज्ञान, गलग्रंथिदाह, गात्रसंकोचन, गात्रोपघात, गालगुंड, गुडघेमोडीचा ताप, (डेंग्यू) गुल्म, गोंवर, ग्रंथिरोग.

वनस्पती—गरमल, गवत, गवती चहा, गवार, गव्हला, गहूं, गांजा व भांग, गुग्गुळ, गुलछबु, गुलतुरा, गुलबाशी, गुलाब, गुळवेल, गेळ, गोकर्णी, गोखरु, गोमाटी, गोरखचिंच, गोराडू, गोराण.

रसायन—गंधक, गंधकाम्ल, गंधकिलाम्ल, गंधकिसल. चरित्रें.—गऱ्हार्ट, गिब्ज, गुईम, गेबर, गेलुझॅक, ग्मेलिन, ग्राहाम, ग्लॅडस्टन, ग्लॅसर, ग्लाबर.

पदार्थविज्ञान—गुरुत्वाकर्षण, गोलमापक. चरित्रें.—गिलबर्ड, गेस्लर, ग्रुव्ह, ग्रे.

गणितशास्त्र—गणितशास्त्र. चरित्रें.—गौस.

खनिजविज्ञान—गोमेद, ग्रॅफाइट, ग्रानाइट.

औद्योगिक—गटापर्चा, गालिचे, गंगावन, गुलाल, गूळ, गोंद, ग्लिसरिन. चरित्रें.—गणपत कृष्णाजी.

तत्त्वज्ञान, चरित्रें. ग्रीन.

ज्योतिष—गुरु, ग्रह, ग्रहण. चरित्रें.—गंगाधर, गणेश दैवज्ञ, गॅलिलीओ, ग्रँट रॉबर्ट.

सांस्कृतिक व सामाजिक—गुलामगिरी, गोंदणें.

सांप्रदायिक—गणेशचतुर्थी, गर्भाधान, गाणपत्य, गुरुकुल, गृहस्थाश्रम, गैबीनाथ, गोकुलाष्टमी, गोत्रें, गोरखनाथ, गोरक्षण, गोराकुंभार, गोसावीनंदन.

वाङ्मय, संस्कृत.—गंगाधरकवि, गणेशपुराण, गरुडपुराण, गीता, गृह्यसूत्रें, गोपथब्राह्मण, गोवर्धनाचार्य, गोविंद ठक्कुर, गौडपादाचार्य, गौतमधर्मसूत्र. मराठी.—गंगाधर सरस्वती, गिरिधर रामदासी, गुंजीकर, गुणे, गोडबोले, गोखले. गुजराथी.—गुजराथी वाङ्मय. पोर्तुगीज.—गॅरेट. गॉथिक.—गॉथिक वाङ्मय. पैशाच.—गुणाढ्य. जर्मन.—गोएटे. यहुदी.—गोल्डस्टकर आंग्ल.—गोल्ड स्मिथ, ग्रीन, ग्रे. **नाट्यशास्त्र**, चरित्रें.—गॅरिक.

इतिहास, चरित्रें.—गार्डिनर, गिबन, ग्रीन, ग्रोट. ग्रँटडफ.

कायदा—गहाण, ग्रंथप्रकाशनाचा मालकी हक्क (कॉपीराइट)

शासनशास्त्र—गणसत्ताक राज्यपद्धति.

अक्षरविकास—ग.

तो येणेंप्रमाणेः—खनिज द्रव्यांची झाडांच्या वाढीला अति अवश्यकता असून ऊन, पाऊस, वारा व हवा वगैरेंचा निद्रित (डॉर्मेंट) असलेल्या पोषक द्रव्यांवर मोठा परिणाम होऊन तीं झाडांस मिळण्याजोगीं होतात. पोटॅश, फॉस्फेट्स् व नायट्रोजन यांची झाडाच्या पोषणास फार अवश्यकता आहे या कल्पनांचें महत्व पहिल्यानें जर्मन लोकानां समजून आलें; व त्यांनीं लिपूझिग्जवळ मोकर्न येथें १८५१ सालीं एका प्रयोगक्षेत्राची स्थापना केली. व आतां तेथें असलीं क्षेत्रें १०० वर आहेत. सर्व जगभर प्रसिद्ध असलेलें रॉदेमस्टेड् प्रयोगक्षेत्र हें सन १८४३ सालीं स्थापन झालें. सर लो यानें आपल्या प्रयोगांस त्याच्यापूर्वी १० वर्षें सुरुवात केलेली होती. इ. स. १८४३ सालीं त्यास गिल्बर्टचें साहाय्य मिळालें. इ. स. १८८९ सालीं सर जेलॉज यानें हें प्रयोगक्षेत्र ब्रिटिशसरकारच्या स्वाधीन केलें. इ. स. १८४७ पासून या प्रयोगक्षेत्रामार्फत सुमारें ८०–९० निबंध प्रसिद्ध झाले आहेत. याप्रमाणें पाश्चात्य देशांतील खतासंबंधी शोधांची पूर्वपीठिका झाली. आपल्याकडे वेदकालापासून जरी खताचें महत्व अवगत आहे तरी अशा तऱ्हेचे शोध पूर्वी केलेले आढळून येत नाहींत.

हल्लीं झाडात अनेक मिश्र जातीचे पदार्थ कार्बन्, हायड्रोजन्, ऑक्सिजन व नायट्रोजन यांच्या मिश्रणानें झालेले आढळतात. हे वाळलेल्या झाडपाल्याच्या पदार्थांत सुमारें शेंकडा ९५ या प्रमाणांत आढळतात; व बाकी राहिलेलें शेंकडा ५ हें प्रमाण खनिज द्रव्याचें असून तें जमिनींतून मिळतें. हीं द्रव्यें झाडाच्या वाढीला अत्यावश्यक आहेत. हीं जर नसतील तर वातावरणांतील कार्बन्, पाण्यांतील हायड्रोजन् व ऑक्सिजन् व जमिनींतील अगर वातावरणांतील नायट्रोजन् हे झाडांत जाऊं शकणार नाहींत. एकंदरींत असें दिसून येतें कीं, जगांतील वाढणाऱ्या वस्तूंतील सर्व पदार्थ वातावरण, पाणी व जमीन यांतून येतात.

वर निर्दिष्ट केलेल्या द्रव्यांपैकीं वातावरणांतील मिळणाऱ्या वस्तूंचा सांठा इतका प्रचंड आहे कीं, तो कितीहि वर्षे पिकें घेतलीं तरी संपावयाचा नाहीं; परंतु जमिनींतून निघणाऱ्या पदार्थांचा सांठा हा पुरेसा नसून तो सर्वस्वी शेत करणाऱ्या मनुष्याच्या मेहनतीवर अवलंबून असतो; याकरितां शेतकऱ्याला जमीन ही आवश्यक व फार महत्वाची आहे.

आपण जर एखाद्या चांगल्या एक एकर जमिनींत ८ इंच खोल थर खणला व त्यांतील मातीचें पृथक्करण केलें तर त्यांत दर एकरीं ४०० पौंड नायट्रोजन, ६००० पौंड फास्फेरिक् ॲसिड् व २०,००० पौंड पोटॅश सांपडतो, व खालील थरांत इतकींच आणखी पोषक द्रव्यें सांपडतात. अशा परिस्थितीचा विचार केल्यास आपल्याला हजारों वर्षेपर्यंत बिन खतानें चांगलीं पिकें आलीं पाहिजेत असें वाटतें, परंतु तसें होत नाहीं. याचें कारण हीं वरील सर्व द्रव्यें ग्राव्य स्थितींत नसतात; तीं जमिनीची मशागत केल्यानें मातीच्या कणांवर हवा, उष्णता व पाणी यांचा परिणाम होऊन दरवर्षी थोडथोडीं निद्रित द्रव्यें विद्राव्य (जागृत) होऊन पिकांस घेतां येतात. या द्रव्यांनां भर घालण्याकरितां जमिनीला दर वर्षी थोडथोडें खत दिलें पाहिजे. पिकें पोषक द्रव्यें कोणत्या प्रमाणांत घेतात याचा खुलासा खालें दिलेल्या आंकड्यांवरून सहज होईल.

एकरीं उत्पन्न.	पौंड	नायट्रोजन्.	फास्फेरिकॲसिड	पोटॅश्
गहूं धान्य	१८००	३३	१६	९·८
” काड.	......	१५	४·७	२५·९
वाल धान्य	१८००	७७	२२·८	२४ ३
” पाला	......	२९	६·३	४२·८
बटाटे	१३४४०	४७	२१·५	७६·५

वरील आंकड्यांवरून असें सिद्ध होतें कीं, निरनिराळ्या वर्गांतील पिकांनां निरनिराळ्या प्रकारचीं पोषक द्रव्यें कमी जास्त प्रमाणांत लागतात व तीं जमिनींत असणाऱ्या पोषक द्रव्यांच्या सांठ्यांच्या मानानें फारच थोडीं असतात. गव्हासारख्या तृण धान्यांनां नायट्रोजन जास्त लागतो; वालासारख्या द्विदल धान्यांनां पोटॅश व नायट्रोजन् जास्त लागतो; परंतु या वर्गांतील पिकांनां हवेंतून नायट्रोजन घेतां येतो. बटाट्यांच्या वर्गांतील पिकांस पोटॅश जास्त लागतो.

झाडाच्या राखेंत पोटॅश, चुना, मॅग्नेशिया, फॉस्फेट्स वगैरे अनेक पदार्थ सांपडतात; परंतु त्यांपैकीं मुख्य नऊ आहेत. झाडें हे पदार्थ दोन तऱ्हेनें घेतात. पाणी, नायट्रेट्स, पोटॅश्, फॉस्फेट्स, चुना, मॅग्नेशिया, व लोखंड हीं पानांतून घेतात. वरील अनेक पदार्थ जरी झाडांत सांपडतात तथापि जमिनींत पिकाच्या वाढीसाठीं मुख्यत्वेंकरून कमतरता नायट्रोजन्, फॉस्फरिक् ॲसिड् व पोटॅश या तिहींची भासते. याकरितां ज्या पदार्थांत हीं तीन पोषक द्रव्यें सांपडतात. मग तीं सर्व पदार्थांत सांपडोत किंवा वेगवेगळालीं निरनिराळ्या पदार्थांत सांपडोत. या सर्व पदार्थांनां खत ही संज्ञा द्यावी. याप्रमाणें जे पदार्थ जमिनींत घातले असतां जमिनीची सुपीकता वाढते त्यांनाहि खत म्हटलें तरी चालेल. खतें पाण्यांत विरणारीं किंवा कांहीं विवक्षित स्थितींत असलेलीं झाडांच्या उपयोगी पडतात. खतांपासून जमिनीचा पोत सुधारण्यास किंवा ओलावा राखून ठेवण्यास अथवा जमिनींत असलेलीं द्रव्यें झाडांच्या उपयोगीं पडतील अशा स्थितींत आणण्यासहि मदत होते. वर जीं मुख्य तीन द्रव्यें सांगितलीं त्यांपैकीं नायट्रोजन हें द्रव्य झाडांचा मुख्य जीव आहे. फॉस्फरस व गंधक हीं ओषट द्रव्य तयार होण्यास लागतात. पोटॅश हा पदार्थ पिष्टमय पदार्थ तयार होण्यास लागतो व झाडाचा हिरवा रंग हा जमिनींत भरपूर लोखंडाचा पुरवठा असल्याशिवाय यावयाचा नाहीं. एकंदरींनें पहातां पिकें चांगलीं जोरांत वाढण्यास व भरपूर पीक होण्यास खत हें पिकांचें मुख्य

साधन आहे. शरीरास जसें अन्न तसें वनस्पतींच्या पोषणास खत होय. खतांतील द्रव्यें मात्र पिकांस सुलभ रीतीनें मिळतील अशा स्थितींत असलीं पाहिजेत. जमिनीचा सुपीकपणा एकसारखीं पिकें करीत गेल्यामुळें नाहींसा होतो व कांहीं वर्षांनीं त्या जमिनींत फायदेशीर पिकें घेणें दुरापास्त होतें. या करितां जमिनीचा सुपीकपणा कायम राखण्यास जमिनींत खत घातलें पाहिजे. कोणी असें म्हणेल कीं, खत घातल्याशिवाय व जमिनीची मशागत केल्याशिवाय रानावनात मोठमोठीं झाडें कशीं होतात, त्याचीं कारणें वेगळीं आहेत. बहुधा डोंगराळ प्रदेशांत पाऊस पुष्कळ पडतो; त्यामुळें जमीन हलकी असली तरी झाडें वाढतात, बीं येतें, फळें येतात व वाढ पुरी झाल्यावर हीं झाडें जमिनीवर मरून पडतात, झाडपाला कुजतो व जास्त चांगल्या तऱ्हेचीं झाडें होण्यास जमीन तयार होते. या रीतीनें रानांतील जमिनीची सुपीकता नाहींशी होत नाहीं. परंतु ज्या जमिनींत शेती करून पिकें काढून घेतात त्या जमिनीची गोष्ट निराळी पडते. पिकें काढल्यानें कांहीं खनिज द्रव्यें व इतर पोषक द्रव्यांचा सांठा कमी होतो. या करितां प्रत्येक प्राण्याचा व वनस्पतीचा भाग जर जमिनींत मिसळून टाकिला तर जमीन सुपीक राहील. किंवा माणसाची व जनावराची विष्ठा, शेण व मूत हीं जर पुन्हां जमिनींत मिळवून टाकिलीं तरीसुद्धा जमिनीचा सुपीकपणा फारसा कमी होणार नाहीं. परंतु ज्या ठिकाणीं पीक उत्पन्न होतें त्याच ठिकाणीं धान्य व चारा जनावरांस चारून त्यांचें शेत व मूत त्याच जमिनींत टाकितात, असें उदाहरण क्वचितच आढळून येईल.

सर्व सुधारलेल्या देशांत प्राण्यांचें व वनस्पतींचें उत्पन्न फार लांबपर्यंत विक्रीला जातें. विष्ठा तर बहुतेक नाल्यांत, ओढ्यांत, अगर नदीच्या पाण्यांत मिसळून सरते शेवटीं समुद्रांत जाऊन पडते. याकरितां विष्ठा, शेण, व मूत हीं सर्व काळजीनें राखून जमिनींत घातलीं तर जमिनीची सुपीकता कायम राहील. जे प्राणी पिकावर पोसले जातात त्यांच्याकडून आपण दूध दुभतें, लोकर, कातडीं, मांस वगैरे घेतों व त्याचा उपयोग विक्रीकडे, खाण्याकडे, वस्त्रप्रावरणाकडे वगैरे करतों. त्यापैकीं जमिनींत फारच थोडा भाग जातो. वनस्पतींच्या उत्पन्नाकडे पाहिलें तर, गहूं, जोंधळा, बाजरी भाजीपाला, फळफळावळ इत्यादि पदार्थ माणसें खातात; जनावरें ताटांवर पोसलीं जातात; यांपैकीं जमिनीला परत जाणारें म्हणाल तर थोडेंसें शेण होय; व तेंहि बऱ्याच प्रमाणावर गोवऱ्या लावून विकण्यांत, सर्पणाप्रमाणें उपयोग करण्यांत जमिनी सारविण्यांत व घरें व कणगी लिंपण्यांत खर्चिलें जातें. प्रेतें जाळण्यासहि गोवऱ्यांचा किती खर्च होतो हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मुताची काळजी कोणी घेतच नाहीं. याकरितां खताच्या अभावीं जमिनी निकस होत चालल्या आहेत.

ज्या खतांपासून झाडांस लागणारीं पोषक द्रव्यें मिळतात त्यांस पोषक खतें म्हणतात व कांहीं पदार्थ जमिनींत घातले असतां त्यांपासून पोषक द्रव्यें न मिळतां त्यांचा परिणाम जमिनीचा पोत सुधारण्यांत, ओलावा राखण्यांत वगैरे होतो, त्यांना उद्धारक खतें म्हणतात.

खतांचे प्रकार.—खतें मुख्यत्वेंकरून तीन प्रकारचीं असतातः प्राणिजन्य, वनस्पतिजन्य व कृत्रिम अगर रासायनिक. प्राणिजन्य खतांत शेणखत, मूत व इतर प्रवाही खतें, बकऱ्यामेंढ्यांचें खत, सोनखत, पक्ष्यांची विष्ठा, अस्थिजन्य खत, मासळी, कसाईखान्यांतील रक्त वगैरे मोडतात. वनस्पतिजन्य खतांत झाडांचीं पानें व फांद्या, ताग, उडीद, मूग, हुलगे, गवारी, खुरासनी वगैरेंची हिरवाळ खतें, पाचटाचें खत, निरनिराळ्या प्रकारची पेंड वगैरेंचा समावेश होतो. कृत्रिम खतांत नायट्रोजन, पोटॅश व फॉस्फेरिक ॲसिड असणारे क्षार मोडतात. यांशिवाय कांहीं कांहीं ठिकाणीं राख, चुना, मीठ, भाजलेली माती, तळ्यांतील गाळ वगैरे पदार्थांचा खतांकडे उपयोग करतात. ज्या मोठमोठ्या शहरांत ड्रेनेजची पद्धत चालू आहे, त्या शहरांतील सांडपाणी लांब नेऊन त्या पाण्यावर निरनिराळ्या प्रकारचीं पिकें करण्यांत येतात. अशीं सांडपाण्याचीं शेतें पुणें, अहमदाबाद, कराची, अमृतसर, अलाहाबाद वगैरे ठिकाणीं आहेत.

याखेरीज मुंबई इलाख्यांतील पुष्कळ पावसाच्या भागांत (कोंकणपट्टींत) भात, नाचणी व वरी यांचीं रोपें टहाळ, गोंवऱ्या व गवत वगैरेंनीं भाजून तयार करतात त्याला राब असें म्हणतात. शेणखत, लेंड्यांचें खत व सोनखत हीं मुख्य प्राणिज खतें होत. त्यापैकीं हिंदुस्थानांत शेणखताचाच जास्त प्रमाणानें उपयोग करतात व तें प्रत्येक शेतकऱ्याला सर्वांत सुलभ रीतीनें मिळण्याजोगें आहे. हें खत प्रत्येक खेड्यांत दरएक शेतकऱ्याचे घरीं गाई, म्हशी, बैल, रेडे व कांहीं कांहीं ठिकाणीं मेंढ्याबकऱ्या ठेवितात तेथें उपलब्ध होतें. हें खत शेतीच्या जनावरांचें शेण, मूत, गळाठा व थोडीशी घरांतील राख या पदार्थांचें बनलेलें असतें. परंतु हें खत तयार करण्याच्या कामीं शेतकरी लोक फार निष्काळजी असतात. जनावरें गवत, सरकी, पेंड, चूण, कांहीं धान्यें व कडबा खातात; यामुळें धान्यांस अवश्य अशा पदार्थांचा त्यांच्या शेणमुतांत भरपूर अंश असतो. प्रत्येक पिकवाढीस नायट्रोजन, पोटॅश व फॉस्फरिक ॲसिड यांची आवश्यकता असते व हीं पोषक द्रव्यें सर्व शेणखतांत असतात. नायट्रोजन पैकीं $\frac{1}{3}$ शेणांत असतो व $\frac{2}{3}$ मूत्रांत असतो. सर्व पोटॅशपैकीं $\frac{1}{5}$ हिस्सा शेणांत व $\frac{4}{5}$ हिस्सा मुतांत व फॉस्फरिक ॲसिड सर्व शेणांत असून मुतांत फारच थोड्या प्रमाणांत सांपडतें. त्यापैकीं मुतांतील सर्व पोषक द्रव्यें पाण्यांत तात्काळ विरघळणारीं असल्यामुळें तें शेणाबरोबर सांठविण्याची तजवीज केल्यास शेणखताची किंमत जास्त वाढेल.

शेणखतापासून नुसतीं पोषक द्रव्येंच मिळतात इतकेंच नसून त्यांत वनस्पतिजन्यहि बराच भाग असतो. त्याच्या योगानें जमिनीचा पोत सुधारतो. चिकण जमीन भुसभुशीत होते, व पोकळ जमिनीच्या अंगीं ओलावा धारण करण्याची शक्ति येते. असे अनेक गुण शेणखतांत असल्यामुळें तें सांठवून ठेवण्यांत हल्लींपेक्षां विशेष खबरदारी घेतली पाहिजे. शेतकऱ्याची सांपत्तिक स्थिति खताच्या सांठयावर अवलंबून असते. 'जर खताचा सांठा तर पैशाला काय तोटा?' अशी एक म्हण आहे, ती खत चांगलें काळजीनें सांठवून ठेवल्यास सर्वस्वी लागू पडते.

बहुतेक शेतकरी मुताची मुळींच काळजी घेत नाहींत; तें बहुतेक सर्व वाया जातें. ते शेणहि व्यवस्थेशीर ठेवीत नाहींत. बहुतेक भागांत गोवऱ्या अगर शेणी करून विकण्याची किंवा जाळण्याची पद्धत आहे. मोठमोठया शहरांशेजारील गांवांत तर गोवऱ्या करून विकण्याचा स्वतंत्र धंदा झालेला आहे. ही पद्धत ज्या ठिकाणीं सर्पणाचा तोटा अगर अति महर्घता असते त्या ठिकाणीं जास्त प्रमाणावर आढळून येते. गोवऱ्या जाळल्यावर जी राख राहते ती सुद्धां राखून जमिनींत घातल्यास जमीन भुसभुशीत होते व पोटॅशचा सांठा वाढतो. राखेचें खत लवकर विरघळतें व त्याचा पिकांस ताबडतोब उपयोग होतो.

हल्लीं शेणखत ठेवण्याची पद्धत पाहिली असतां तिच्यापासून पुष्कळ नुकसान होत आहे असें आढळून येतें. ताज्या खताचा पिकावर तात्काळ व हवा तसा उपयोग होत नाहीं. शिवाय खत तयार होतांक्षणींच शेतास घालणें अनेक वेळां गैरसोयीचें असतें. यामुळें खत साठवून ठेवणें फार अगत्याचें आहे. खत जितकें कुजवून पिकवावें तितकें चागलें. परंतु तें कुजत असतांना जीं पोषक द्रव्यें तयार होतात त्यापैकीं कांहीं हवेंत उडून जातात व कांहीं जमिनींत झिरपून जातात. याकरितां तें अशा रीतीनें सांठविलें पाहिजे कीं त्यांतील अतिशय महत्त्वाचे पदार्थ नाहींसे न होतां ते पिकाच्या उपयोगीं पडतील अशा स्थितींत ते राखले पाहिजेत. खेडयांत शेतकरी लोक घराच्या मागें अगर गांवाबाहेर एखादा लहान खड्डा करून त्यांत शेण, काडी, कचरा वगैरे नेऊन टाकतात. तेथें तें खत उन्हानें वाळतें व पावसाच्या पाण्यानें धुपून जातें. खत कुजत असताना जीं द्रव्यें तयार होतात त्यापैकीं बरींच उन्हाच्या तापानें हवेंत उडून जातात व कांहीं पावसाच्या पाण्यांत मिसळून वाहून जातात. ही गोष्ट खतांच्या ढिगांतून येणाऱ्या उग्रट वासावरून सहज लक्षांत येईल. अशा दोन्ही बाजूंनीं होणारें नुकसान थोडासा खर्च व जराशी मेहनत घेतल्यास टाळतां येईल.

बहुतेक शेतकरीलोक गुरांचें मूत वायां दवडतात; हे मूत शेणाइतकेंच महत्त्वाचें आहे. गुरांच्या गोठ्याची जागा उंच व टणक जाग्यावर असावी. गोठयांतील जमीन मुरूम टाकून ठोकून घट्ट करावी. गुरें बांधण्याच्या मागील बाजूस जमिनीला थोडा ढाळ द्यावा व लहानसें गटार करावें व त्याच्या शेवटीं एक लहानसा हौद बांधावा. असें केल्यानें गुरांचें सर्व मूत गटारांतून वाहून हौदांत जमा होईल. हें मूत रोजच्यारोज खताच्या खड्ड्यावर नेऊन ओतावें. गटार वगैरे बांधण्याची सोय नसल्यास गोठ्यांतील जमीन तयार झाल्यावर तिजमध्यें बाहेरच्या बाजूनें चार फळ्या बसवाव्या व कोपऱ्यांत मेखा मारून त्या मजबूत कराव्या. फळ्या मारून झाल्यावर रस्त्यावरील बारीक धूळ अगर शेतांतील भुसभुशीत माती किंवा वाळू व माती यांचें मिश्रण करून तिचा थर या फळ्यांच्या आंत द्यावा. अशा गोठ्यांत जनावरें बांधल्यास त्यांचें सर्व मूत मातींत राहील व त्यांतील अति महत्त्वाच्या पोषक द्रव्यांचा संचय वाढेल. ही माती घट्ट झाल्यास रोजच्यारोज जनावरें बाहेर गेल्यावर खुरप्यानें अगर दांताळयानें वरचा थर भुसभुशीत करावा. असें केल्यानें मातीची मूत शोषून घेण्याची शक्ति वाढेल. ही मुताची माती दोनतीन आठवड्यांनीं काढून खताच्या खड्ड्यांत टाकावी व पुन्हां गोठयांत नव्या मातीचा थर द्यावा. मातीच्या बदली शेंगाऱ्या टरफलांचा चांगला उपयोग होतो. खत सांठविण्यास खड्ड्याची आवश्यकता आहे. खड्डा आजूबाजूच्या जागेपेक्षां थोडा उंचवटयावर असावा. तो पांच सहा फूट खोल असावा; परंतु त्याचा आकार शेतकऱ्याजवळ असणाऱ्या जनावरांवर अवलंबून आहे. एकंदरींत खड्डा सहा महिन्यांत भरेल अशा आकाराचा असावा. दोन खड्डे असल्यास बरें. ते आळीपाळीनें भरता येतील. खताचा खड्डा कठिण जागेंत खणावा. त्याचा तळ व बाजू कठीण मुरमाच्या असाव्या. तशी सोय नसल्यास तळ व बाजू शेण व चिकणमातीनें लिंपाव्या; परंतु सवडीनुसार तळाला व बाजूला चुनेगच्ची करावी. चुनेगच्ची करण्यास थोडा खर्च येईल परंतु तो खर्च एकदोन वर्षांत भरून येईल. कारण खत कुजत असताना जीं पोषक द्रव्यें तयार होतात तीं जमिनींत झिरपून जाऊन त्यांचा नाश होणार नाहीं. ज्याप्रमाणें पोषक द्रव्यें जमिनींत झिरपून जातात त्याचप्रमाणें कांहीं हवेंतहि वायुरूपानें उडून जातात. याकरतां ज्या ठिकाणीं वार्षिक पावसाचें मान ५० इंचाहून जास्त असेल त्या ठिकाणीं खड्ड्याला लहानसें छप्पर करावें. छपराची पश्चिमेकडील बाजू जमिनीस टेंकावी व इतर बाजू मोकळ्या ठेवाव्या. ज्या ठिकाणीं २० ते ३० इंच पर्यंत पाऊस पडतो त्या ठिकाणीं उघड्या हवेंत खड्डा करण्यास हरकत नाहीं. अशा ठिकाणीं दर आठ दिवसांनीं खतावर सुमारें चार इंच जाडीचा मातीचा थर दिल्यास पोषक द्रव्यें उडून जाणार नाहींत; तीं मातींत राहतील. खड्ड्यांतील खत कुजत असतांना फार उबून त्यांतील द्रव्यें उडून जाऊं नयेत म्हणून खत दडपून ठेवावें व खताच्या अंगीं कुजण्यास जेवढा ओलसरपणा पाहिजे असेल तेवढाच ठेवावा. एखादे

वेळीं खड्ड्यांतील खताची फार घाण सुटत आहे असें वाटल्यास खड्ड्यांत थोडें पाणी ओतावें. या पद्धतीनें खत व मूत राखल्यास शेतकऱ्याजवळ असलेल्या जनावरांपासूनच दुप्पट खताचा पुरवठा होण्याचा संभव आहे. या पद्धतींत थोडा जास्त त्रास व अंगमेहनत आहे.

कांहीं ठिकाणीं दिपवाळीपासून पुढें शेतावर आलटून पालटून जनावरें बांधण्याची चाल आहे. प्रत्येक ३–४ दिवसांनीं तळ बदलतात. या पद्धतींत मुताचा पूर्ण फायदा मिळतो. ज्यांचीं शेतें गांवाजवळ आहेत त्यांनाच ही पद्धत अनुकरणीय आहे. मेंढ्या शेतांत बसविल्यापासून अशाच तऱ्हेचा लेंड्या व मूत यांचा फायदा मिळतो. खानदेश, नाशिक, मध्यप्रांत येथें व कोंकणांत कांहीं कांहीं ठिकाणीं ही पद्धत प्रचलित आहे. ह्या पद्धतींत गुरांचा पालट केल्यावर ती जमीन कुळवून टाकावी म्हणजे तींतील पोषक द्रव्यें उन्हाच्या तापानें हवेंत उडून जाण्याला प्रतिबंध होईल.

याशिवाय खत तयार करण्याची दुसरी एक पद्धत आहे. तीस इंग्रजींत बॉक्स सिस्टिम म्हणतात. याचा प्रयोग मद्रास येथील सरकारी प्रयोगशाळेंत (सैदापेट) करून पाहिला आहे. या पद्धतींत थोडीशी जास्त जागा व शेज लागते. सर्व खत व मूत एकाच ठिकाणीं रहातें. या पद्धतींत पाहिल्यानें जमिनीच्या सपाटीपेक्षां सुमारें २॥ फूट खोल सारखा खड्डा करावा व त्याचा तळ व बाजू गच्ची करून बाजूच्या जमिनीपेक्षां एक फूट उंच बांधून काढावा;आणि वर लोखंडी गजांचा पिंजरा करून बसवावा किंवा बाजूला बांबूच्या अगर लांकडाच्या दांड्या माराव्या. कोणीकडून जनावरें बाहेर निघून जाऊं नयेत अशी तजवीज करावी. एका बाजूला जनावरांस आंत जाण्याला दार ठेवावें व वर छप्पर करावें. असा खड्डा एका जोडीला १० फूट लांब व सुमारें ८ फूट रुंद असला पाहिजे. ह्या खड्ड्यांत बैल बांधावयाचे नसून ते मोकळे ठेवावयाचे असतात. प्रत्येक जोडीला पडद्या घालून वेगवेगळाले गोठ्याचे भाग केले पाहिजेत. या खड्ड्यांत एका बाजूला गवाण करून जनावरास चारा वगैरे घालावा. रोजचें खत व मूत जें पडतें तें तेथेंच सारखें करून त्याजवर रोज नवीन शेज पसरावी. जनावरें आंत मोकळीं असल्यामुळें त्यांच्या पायाखालीं केरकचरा व शेण चांगलें तुडवून दडपून बसतें. असा खड्डा तळापासून वरपावेतों म्हणजे दोन फूट भरून येण्यास चारपासून सहा महिने लागतात. खड्डा भरला म्हणजे हें खत एकदम काढून टाकण्यास तयार होतें; पुन्हां कुजत ठेवण्याची जरूरी नाहीं. या पद्धतींत प्रत्येक जोडीमागें १० ते १२ गाड्या पावेतों दरवर्षी खत तयार होतें.या पद्धतींत खर्च जास्त असून गोठ्याला जास्त जागा लागते. मुबलक जागा असून चाऱ्याची टंचाई नाहीं अशा शेतकऱ्यांनीं ही पद्धत घेण्यासारखी आहे. नेहमींच्या पद्धतीनें खत सांठविल्यास एका जोडीपासून एका वर्षात सुमारें पांच गाड्या खत मिळतें; तें या पद्धतीनें दुपटीहून जास्त मिळूं शकतें.

मुंबई इलाख्यांतील कारवार जिल्ह्यांत शिरसी, सिद्धापूर वगैरे तालुक्यांत सुपारीची व वेलदोड्याची लागवड बरीच आहे. तेथें एक एकर बागाईत करणारास ९ एकर फॉरेस्टांतील जमीन दिलेली असते. या जमिनीला बेत्ता जमीन अशी संज्ञा आहे. या जमिनींतील वाळलेला झाडपाला व झाडांच्या डहाळ्या तोडून नेण्याची शेतकऱ्याला मुभा असते. येथील बागाईती लोक झाडपाचोळा व शेण यापासून तयार केलेलें खत वेलदोड्यांना व सुपारीच्या झाडांस देतात. तिकडील खत तयार करण्याची रीति पुढील प्रमाणें:जनावरें बांधण्याचे गोठे इतर ठिकाणांप्रमाणेंच असतात. परंतु चरण्याला मुबलक असल्यामुळें प्रत्येक शेतकरी बरींच जनावरें पाळतो. गुरांना शेज डाहाळ्यांची घालतात व तींतच खत व मूत रोज पडतें. हे डहाळ व खत दर दोन दिवसांनीं शेणखळींत नेऊन टाकितात व गुरांच्या खालीं नव्या डाहाळ्यांची शेज घालतात. शेणखळी दहा बारा फूट खोल असते. हें खत एक वर्षानें उपसतात व दोन झाडांना एक पाटी (४० पौंड) या हिशेबानें वुडख्यांना खत देतात.खत खड्ड्यांतून काढितात तेव्हां तें अगदीं ओलें असतें. या पद्धतींत खड्ड्यावर आच्छादन करून बाजूनें चर खणून पावसाचें पाणी काढून दिल्यास खत जें अगदीं चिखलासारखें होतें व कांहीं भाग पाण्याबरोबर वाहून जातो तो जाणार नाहीं.

शेणखतास जास्त महत्व देण्याचें कारण त्यांत सर्वप्रकारचीं पोषक द्रव्यें असतात; तथापि सर्व जनावरांचें शेण खत सारखें नसतें. इतर गाईबैलांपेक्षां ज्यांनां पेंड, धान्य वगैरे चारतात त्यांचें खत जास्त सत्वशील असतें. दुभत्या जनावरांचें खत कमी दर्जाचें असतें. कारण दुधामध्यें महत्वाचीं द्रव्यें जातात. यावरून असें दिसून येईल कीं, शेणखताची किंमत जनावरांच्या वयावर, त्यांच्या खुराकावर व त्याच्या उपयोगावर अवलंबून असते; इतकेंच नव्हे तर खत चीं किंमत तें सांठविण्यावर व कुजत असतांना काळजी घेण्यावरहि आहे.

प्र वा ही ख त—प्रवाही खत देण्याची चाल मालवण तालुक्यांत व महाबळेश्वर येथें आढळून येते. मालवण (जिल्हा रत्नागिरी) येथें कांद्याच्या पिकाला प्रवाही खताचा उपयोग करतात. एक चार फूट औरस चौरस व तितकाच खोल खड्डा करून (तो चुनेगच्ची असल्यास चांगला) त्यांत नासक्या माशाचे तुकडे तुकडे करून घालितात. नंतर खड्ड्यांत पाणी सोडून तें मिश्रण हालवून तयार करितात. हें पाणी रोज घड्यानें कांद्याच्या पिकास घालतात. महाबळेश्वरास भाजीपाल्याला गुरांच्या मुतांत पाणी मिसळून थोडथोडें वर खत प्रत्येक झाडाला तीन चार वेळ देतात. मिलिटरी दुधाच्या कारखान्यांत जेथें पाण्याचा पुरवठा मुबलक आहे तेथें गुरांच्या मागील गटारांत सारखें पाणी सोडून शेण व मूत दोन्हीहि प्रवाहांत मिसळून तें पाणी शेतावर नेऊन त्यावर कडबळाचीं पिकें करितात. असा

प्रघात खडकी (पुणें) येथील मिलिटरी डेअरी फार्मांत चालू आहे.

मेंढ्या बकऱ्यांचें खत.— हें खत सुद्धां शेतकरी लोकांच्या आटोक्यांतलि आहे.सर्व शेतकरी मेंढ्या ठेऊं शकत नाहींत. कारण त्यांनां चरण्यास व फिरावयास मुबलक जागा लागते. यासाठीं बकऱ्या मेंढ्यांचे कळप बहुतकरून धनगर लोकच ठेवितात व उन्हाळ्याच्या दिवसांत कळप घेऊन जेथें खताची वाण असेल तेथें जातात व ज्यांनां खताची जरूरी असेल त्यांच्या शेतांत आलटून पालटून रात्रीं जाळीं लावून तळ देतात. त्यांचे तळ शेतांत बसविले असतां त्यांच्या लेंड्या पडून उत्तम खत होतें. लेंड्यांपेक्षां त्यांच्या मुतांत विशेष गुण आहे. एक जमीनीचा तुकडा खतावून झाला म्हणजे दुसऱ्या तुकड्यांत जाळीं लावून बकरीं बसवितात. याप्रमाणें सर्व शेत संपेपावेतों क्रम चालतो. या बसविण्याबद्दल शेताच्या मालकास निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या दरानें धनगरास धान्य किंवा रोकड पैसे द्यावे लागतात. गुजराथेंत ५०० मेंढ्या एक रात्रभर बसविण्यास ४८ शेर बाजरी द्यावी लागते. साताऱ्याकडे ८००मेंढ्या २४ दिवस बसविण्यास पांच मण ज्वारी द्यावी लागते व तिची किंमत सुमारें ३० रुपये होते. मेंढ्यांचें खत व मूत जागच्या जागींच पडत असल्यामुळें त्याचा परिणाम पिकावर चांगला होतो. शेणखतापेक्षां हें खत जास्त पोषक असतें. शेतांत मेंढ्या बसविल्या म्हणजे रात्रींतून त्यांना दोन तीन वेळ उठवितात. असें केल्यानें दर खेपेस मेंढ्या मुततात; व अशा योगानें द्राव्य खताची जमीनींत जास्त भर पडते. एक एकर जमीन चांगल्या तऱ्हेनें खतावण्यास ३०० मेंढ्यांचा कळप सुमारें १० दिवस पावेतों बसवावा लागतो. मेंढ्यांचा तळ जसजसा हालेल त्या प्रमाणें जमीन नांगरणें चांगलें. नांगरटीनें खत जमीनींत चांगलें मिसळलें जातें व पोषक द्रव्याचा नाश होत नाहीं. एका मेंढीच्या एका रात्रीच्या लेंड्यांचें वजन १ पौंड ४ औंस होतें व एका रात्रीच्या मुताचें वजन १३ औंस भरतें.

घोड्याची लीद.—या खताचा पाश्चात्य देशांत उपयोग करितात. कारण तिकडे आउतें ओढण्याला मुख्यत्वेंकरून घोडेच लावितात; यामुळें हें खत तिकडे जास्त प्रमाणावर उपलब्ध असतें.

डुकरांची विष्ठा.—पाश्चात्य देशांत डुकरें त्यांच्या मांसाकरिता पाळितात व त्यामुळें त्यांची विष्ठा तिकडे विशेष मिळत असून तिचा खताकडे उपयोग करितात, हिंदुस्थानांतून खेड्यांपाड्यांत वडार जातीचे लोक डुकरें पाळितात व तीं दक्षिण हिंदुस्थानांत विशेष आढळतात. मद्रास इलाख्यांत कॉइल पट्टीकडे डुकराची विष्ठा गोळा करून खतासाठीं वापरतात. पाश्चात्य देशांत घोडा, गाय, डुकर व मेंढ्या यांचें खत वापरतात. त्यांच्या पोषक द्रव्याचें तुलनात्मक आंकडे उपयुक्त असल्यामुळें पुढें दिले आहेत. हे आंकडे डॉ. विल्यम् पी. ब्रुक्स यांच्या शेतकी विषयावरील दुसऱ्या भागांतील पृष्ठ २२५ यांतून घेतलेले आहेत. (आंकडे पौंडांचे आहेत.)

हजार पौंड ताज्या विष्टेचें पृथक्करण

प्राणी	पाणी	नायट्रोजन	फास्फे. असिड	अल्कली (पोटॅश)
घोडा	७६०	५.०	३.५	३
गाय	८४०	३.०	२.५	१.०
डुकर	८००	६.०	४.५	५.०
मेंढी	५८०	७.५	६.०	३.०

हजार पौंड ताज्या मुताचें पृथक्करण

प्राणी	पाणी	नायट्रोजन	फास्फे. असिड	अल्कली (पोटॅश)
घोडा	८९०	१२.०	...	१५.०
गाय	९२०	८.०	...	१४.०
डुकर	९७५	३.०	१.२५	२.०
मेंढी	८६५	१४.०	०.५	२०.०

सोनखत.—हें प्रत्येक गावांत मिळण्याजोगें आहे. याच्यावर बागाइत पिकें फार उत्तम येतात व कोरडवाहू जमिनीसहि याचा उपयोग करतां येतो. माणसें चांगलें अन्न खातात म्हणून त्यांचें खत जास्त कसदार असून ते व्यवस्थित असतें सरासरी एका मनुष्याची विष्ठा रोज सहा औंस धरल्यास एक वर्षाचें उत्पन्न १३५ पौंड भरेल व त्यात सुमारें एकपूर्णांक तीनदशांश पौंड नायट्रोजन सांपडेल. हें खत कोरडवाहू जमिनीस दर एकरीं सुमारें २६ पौंड नायट्रोजन (सुमारें शेणखताच्या पांच गाड्याइतकें) असणारें द्यावयाचें असल्यास २७०० पौंड द्यावें लागेल. म्हणजे वीस माणसांची एक वर्षाची विष्ठा द्यावी लागेल. यांहि हिशोबानें मुंबई इलाख्याच्या १,४५,६८,६७१ लोकसंख्येपासून उत्पन्न होणारें खत ७,२८,४३४ एकरांना पुरेल असा अजमास आहे. या हिशोबांत फक्त मैलाच धरलेला आहे. मूत्र वगैरे धरलेलें नाहीं. दोन्ही धरल्यास हें खत जवळ जवळ दीडपट क्षेत्रास पुरेल. या आंकड्यांवरून सोनखताची किंमत किती आहे हें सहज लक्षांत येईल.

सोनखत तयार करणें—पूर्वी जेव्हां लोकवस्ती पातळ होती व जमीन मुबलक होती तेव्हां लोक जेथें राहात तेथेंच त्यांची विष्टा पडे. पुढें वस्ती जास्त होऊन लोक खेड्यांपाड्यांत व शहरांत एकजुटीनें राहूं लागले तेव्हां विष्टेची घाण कशी काढावी हा प्रश्न पुढें आला. ती घाण नाहींशी करण्याचे प्रयत्न हरतऱ्हेनें झाले. विष्टेशीं माती मिसळणें, राख मिसळणें, गांवांतील केरकचरा मिसळणें वगैरे प्रयत्न झाले.मुंबई इलाख्यांत व त्याप्रमाणेंच मध्यप्रांतांत विष्टेचा खताकडे उपयोग माहीत नव्हता. पूर्वी भंगी लोक विष्टा (मैला) शेतकऱ्यांस विकीत असत. ही गोष्ट म्युनिसिपालिटी स्थापन होण्याच्या पूर्वीची झाली. परंतु सोनखत तयार करून वाळवून वगैरे विकणें हें अलीकडील आहे.

पुणें जिल्ह्यांत कालव्याचें पाणी मुबलक असल्यामुळें ऊंस व इतर बागाईत पिकांचा पुष्कळ पेरा होतो व हें खत उंसाला मानवत असल्यामुळें सोनखताची मागणी पुण्याजवळ फार आहे. जसजसा शेतकऱ्याला सोनखताचा उपयोग कळूं लागला तसतसा या मैल्याच्या खताविषयीं तिटकारा कमी होऊं लागला. चीन व जपान देशांत शेतकरी लोक या खताची व्यवस्था स्वतः हातानें करतात. तेथें जमिनींची सुपीकता कायम राखण्यास मुख्य हेंच खत आहे असें तें समजतात. खेड्यांपाड्यांत लोक बहुतकरून शौचास गांवाच्या आसपास बसतात व पाऊस पडल्याबरोबर हें खत जवळच्या शेतांत वाहून जातें. यामुळें अशा शेतांतून पिकें फार जोरानें येतात. या गोष्टी शेतकऱ्यांस माहीत नाहींत असें नाहीं. परंतु सोनखतासारखें घाणेरडें खत हातानें वापरणें हलकेपणाचें आहे अशी त्यांची समजूत आहे. सोनखत घातलेल्या जमिनीस भरपूर पाणी पाहिजे, नाहींपेक्षां पहिल्यानें पीक जोरानें वाढूं लागतें व पुढें पावसाच्या अभावामुळें लवकर करपून जातें. सोनखत घालण्यापूर्वी जमिनीची चांगली मशागत केली पाहिजे. सोनखत तयार करण्याच्या रीती आहेत त्याः—(१) वाफ्यांत अगर खड्ड्यांत मैला टाकून तो केर कचरा अगर माती यांत मिसळणें व कांहीं दिवसानीं तो बाहेर काढून शेतांत घालणें. (२) शेतांत उथळ वाफोळ्या करून त्यात कच्चा मैला टाकून तो बारीक मातीनें झांकून टाकणें, ही रीत लहान म्युनिसिपालिटी व सॅनिटरी कमिटी यानां फार उपयोगाची आहे. (३) सबंध शेतांत खोल सऱ्या (चर) पाडून आंडोशाकरितां तट्टे बांधणें व सऱ्या जसजशा मैल्यानें भरतील तसतसे तट्टे बदलणें, या रीतीचा उपयोग दुष्काळी कामावर आढळून येतो. जपानांतलि रीती दोन तऱ्हेच्या आहेत एकींत रोजच्यारोज मैल्यात कोरडी माती मिसळून तो शेतांत नेऊन टाकणें, ही पद्धत इंग्लंडांत खेड्यांपाड्यांत व सीलोनां(लंका) तहि कांहीं ठिकाणीं प्रचलित आहे. दुसऱ्या रीतींत मैला शेतात नेऊन तो टिपात टाकणें व पाण्यांत मिसळणें. पाणी मिसळल्यानंतर सुमारें १० दिवसांनीं मिश्रण तयार झाल्यावर त्यांत दोन ते दहा पटीनें पाणी मिसळून पिक उभें असताना प्रत्येक झाडाला दोन तीन वेळ थोडथोडें मिश्रण घालणें. पहिल्यानें एक वेळ बी पेरण्याच्या पूर्वी व शेवटचा हप्ता पिक फुलूं लागलीं म्हणजे यावयाचा.

पुण्यांत सोनखत दोन तऱ्हेनें तयार करीत असत. गांवापासून डेपो सुमारें दोन मैलांवर होता. गांवांतील केरकचरा बाहेर नेऊन तो जाळीत व झालेली राख गाळीत. डेपोंत १८ फूट लांब, १५ फूट रुंद व १ फू. खोल असे वाफे केलेले होते. वाफ्याचा तळ मुरुम घालून ठोकून चोपून घट्ट केला होता. मैला टाकण्यापूर्वी या वाफ्यांत एक इंच जाडीचा राखेचा थर देत. त्यावर ५ इंच जाडीचा मैल्याचा थर देत व पुन्हा एक इंच राखेचा थर देऊन चोवीस तास पावेतों तसेंच उन्हांत वाळूं देत. दुसऱ्या दिवशीं हे थर दांताळ्यानें हालवून सर्व मिसळीत व आणखी एक इंच राखेचा थर देऊन उन्हाळ्यांत तीन दिवस व पावसाळ्यांत ८ दिवस वाळूं देत. चवथ्या दिवशीं सर्व मिश्रण एक वेळ दांताळ्यानें हालवून तेंवाफ्याच्या बाहेर काढून उन्हांत पसरीत. आणि वाळल्यानंतर ढीग मारून ओटा करून विकण्यास ठेवीत. पावसाळ्यांत हें खत छायेखालीं वाळवावें लागतें. प्रत्येक ओट्यांत बारा ते पंधरा गाड्या भरतात. व एका गाडीची किंमत पांच ते सात रुपये येते. दुसऱ्या रीतींत चार फूट खोल व तीन फूट रुंद चर खणून प्रथम त्यांत कचऱ्याचा थर तळाशी देऊन वर मैल्याचा थर व पुन्हां कचरा असे आळीपाळीनें खड्डा भरेपावेतों थर देतात. हें मिश्रण चार ते सहा महिने तेथेंच राहूं देऊन नंतर उसपून ओटा मारला म्हणजे तें विकण्यास तयार होतें. नाशिक येथील म्युनिसिपालिटीची रीत अशीच असून तेथें चर मात्र लहान असतात. तेथें चरांतील खत कुजून जसजसें खालीं बसेल तसतसें त्याच्यावर कचऱ्याचा थर देतात. व कोठेंहि व केव्हांहि खत उघडें न पडूं दिल्यामुळें बिलकूल माशा होत नाहींत. या शिवाय शेतकरी लोकांस खतास मुळींच हात लावण्यास नको अशी एक रीत आहे ती अशीः—प्रथम जमीन दोनतीन वेळ कुळवून सुमारें तीन चार इंच खोल माती मोकळी होईल अशी तयार करावी. नंतर कुळवाच्या दिंडानें खत देण्याच्या शेतांत लांब वाफोळ्या पाडाव्या. त्यांची रुंदी सुमारें साडेपाच फूट असावी म्हणजे त्यांत मैल्याची गाडी सहज मावते. वाफोळ्या तयार झाल्यावर मैल्याची गाडी आंत नेऊन त्यांत थोडथोडा मैला सोडीत जावा व भंगी लोकांकडून तो चांगला पसरवावा व वाफोळीच्या कडेस असलेल्या सरींची माती खोऱ्यानें त्यावर उडवावी म्हणजे घाणीवर माशा फार होत नाहींत. अशा रीतीनें खतावलेल्या जमिनींतील खत पंधरा दिवसांत वाळून जातें व पुन्हां आडव्या उभ्या दोन पाळया घातल्या म्हणजे मातींत खत चांगलें मिसळतें व एकदोन महिन्यांनीं जमीन पेरण्यास तयार होतें.

ज्या ठिकाणीं मैला मिळण्यासारखा असेल व जेथें म्युनिसिपालिटीमार्फत तो जमा केला जातो अशा शहराजवळ या पद्धतींचा उपयोग करणें इष्ट आहे. ज्या ठिकाणीं पावसाळ्याचे दोन महिने चांगला भरपूर पाऊस पडतो तेथें या खताचा जास्त चांगला उपयोग होतो. हें खत उन्हाळ्यांत द्यावें. सुरत, जळगांव व रत्नागिरी येथील प्रयोगक्षेत्रांत ताजा मैला व सोनखत हीं खतें देऊन कापूस, ज्वारी, भात वगैरे पिकें करण्यांत आलीं त्यांचा तपशील पुढें दिला आहे. सुरत येथें प्रयोग १९०४ सालीं सुरू झाले व त्याच भागांत दहा अकरा वर्षे पुन्हां खत न घालतां कापूस व ज्वारी हीं पिकें फेरपालटानें घेण्यांत येत असत.

सुरत फार्म वरील दर एकरीं खत व उत्पन्न
(६ वर्षांची सरासरी)

खत.	एकरीं गाड्या	ज्वारी पौंड	कडबा पौंड	कापूस पौंड
मैलाखत	८४॥	१४१८	३५६२	५६२
शेणखत.	४०	१०९१	२४७६	४१६
ताजा मैला	४०	१८०८	७२००	३७४
बिनखती	...	१०५५	१२८६	१९१

रत्नागिरी फार्म वरील दर एकरीं खत व उत्पन्न

खत	एकरी गाड्या	भात पौंड	भातेण पौंड.
सोनखत	३०००	३१६०	३०२०
बिनखती	...	२६८०	२३८५

जळगाव फार्म वरील दर एकरी खत व उत्पन्न

खत	एकरीं गाड्या	कापूस पौंड
ताजा मैला	३४॥	९९८
बिनखती	...	२१३

कित्येक मांसाहारी पक्ष्यांची विष्ठा.—हें खत म्हणजे जलचर पक्ष्यांचें मलमूत्र मिळून झालेली विष्ठा होय. या विष्टेचे ढीगच्या ढीग पेरू देश (दक्षिण अमेरिका) व त्याच्या आसपासच्या बेटांच्या सर्व किनाऱ्यावर आढळतात. हे ढीग तयार होण्यास कित्येक पिढ्या गुदरल्या असल्या पाहिजेत. या ठिकाणीं पाऊस बिलकुल पडत नाहीं. यामुळें त्यांतील द्रव्यें वाहून जात नाहींत. हें खत गव्हास चांगलें मानवतें. हें दर एकरीं दोन तीन हंड्रेड-वेटपर्यंत द्यावें. हिंदुस्थानांत अशा तऱ्हेचें खत करनूल येथें गुहांत सांपडतें व असलें खत आसामांतील मळेवाले लोक निकोबार बेटांतून आणितात.

हिंदुस्थानांत कोंबडीं, बदकें, कबुतरें वगैरे पक्ष्यांची विष्ठा इकडे तिकडे पडून वाया जाते. ती मिळेल त्या ठिकाणीं सांठवून ठेऊन खताकडे तिचा उपयोग केल्यास फायदा होईल. एका कोंबडीपासून एका वर्षांत सुमारें १२पौंड एका टर्कीपासून सुमारें २५ पौंड व एका बदकापासून १८ पौंड खत मिळूं शकतें.या खताच्या पृथक्करणाचे शेंकडा प्रमाणाचे आंकडे पुढील प्रमाणें आहेत.

पक्ष्यांच्या ताज्या विष्टेचें पृथक्करण.

प्राणी	पाणी	नायट्रोजन	फॉस्फेरिक ॲसिड	अल्कली पोटॅश वगैरे
कोंबडी	५६	१.६०	१.५० २.००	०.८–०.९०
टर्की	७७.१०	५५	०.५४	०.३५
बदक	५६-६०	१.००	१.४०	०.६२०
कबुतर	५२-००	१-७५	१.७१.२.००	१.००ते १-२५

कसाईखान्यांतील उरफ वगैरे.—हें रक्त हल्लीं वाळवून परदेशीं रवाना होतें. ह्यांत शेंकडा सुमारें पांच ते १० टक्के नायट्रोजन असतो. ह्या रक्ताचा उंसाला वर खत दिल्यास चांगला उपयोग होतो.

हाडाचें खत.-हिंदुस्थानांतील प्रत्येक मोठमोठ्या ठिकाणाहून शेंकडों खंडी हाडें परदेशीं जातात व त्यामुळें या देशांतील एक मोठें उपयोगी असें खताचें द्रव्य नाहींसें होतें. मेलेलीं गुरें व दुसरीं बहुतेक सर्व जनावरें यांचीं हाडें दऱ्याखोऱ्यांत पडलेलीं असतात, हींच हाडें बाहेर देशीं जातात. हाडांचा व्यापार करणारे बहुतेक मुसुलमान, महार, यूरोपियन हेच असतात. ते लोकांकडून आसपासच्या ठिकाणाहून हाडें वेंचून आणवितात. अशा जमा करून आणलेल्या हाडांचे ढीग कांहीं स्टेशनांवर दृष्टीस पडतात. हा व्यापार फायद्याचा असल्यामुळें दिवसें-दिवस वाढतच आहे. पूर्वी खेडेगांवानिहाय हाडकी आणि हाडवळा (मेलेलीं गुरें फाडण्याच्या जमिनी) या नांवाचीं शेत असत. या शेतांत इतर शेतापेक्षां पीक चांगलें येऊन सकस व जोरदार उत्पन्न येत असें. हल्लीं शेतकरी लोक प्रत्यक्ष हाडांचा शेतीस खरा उपयोग करीत नाहींत. कांहीं कांहीं ठिकाणीं आपोआपच हाडें कुजून जें काय खत मिळत असेल तेवढेंच. कारण जातिभेद व देवभोळेपणाच्या जुन्या समजुतीमुळें हिंदू लोकांच्या हातून हाडांच्या पुडीचा दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें खत तयार करण्याच्या प्रयत्न झाले नाहींत. हिंदुस्थानांत हाडें पुष्कळ आहेत. हाडांत नायट्रोजन व फॉस्फरस असतो. या द्रव्याचा इकडील जमिनीस फार उपयोग होतो. हल्लीं कोंकणांत व बंगाल्यांत या खताचा भातशेतींत थोडा थोडा उपयोग दिसून येऊं लागला आहे. बंगाल्यात हें खत भात, बटाटे, ऊंस या पिकांस चांगलें मानवतें. त्याचप्रमाणें या खताचा नारळीच्या बागांना फळ झाडांना, त्याप्रमाणेंच चहा व काफीच्या मळ्यांत जास्त उपयोग होतो असें अनुभवास येत आहे परंतु हाडांना बाहेर जास्त भाव येत असल्यामुळें तीं येथें देणें परवडत नाहीं.

जमिनींत हाडांचें खत घालावयाचें असल्यास हाडांचीं जितकी बारीक पूड होईल तितकी चांगली; कारण ती लवकर कुजते. युरोप, अमेरिका व इतर सुधरलेल्या देशांत हाडांचें खत करावयाचें असल्यास त्याच्यावर गंधकाम्ल ओतून तीं विरवतात. या मिश्रणानें झालेल्या खतास सुपरफास्फेट ऑफ लाइम म्हणतात. हा पदार्थ पाण्यांत फारच लवकर विरघळतो; कारण हाडांतील सेंद्रियद्रव्यें गंधकाम्लानें लवकर द्रवतात. या रीतीनें तयार केलेल्या हाडांच्या खताचा जसा उपयोग होतो तसा दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें केलेल्या हाडांच्या खताचा उपयोग होत नाहीं. हिंदुस्थानांत गंधकाम्ल तयार करण्याचे कारखाने फार थोडे आहेत व यामुळें येथें हें अम्ल फार महाग पडतें. जों जों हें खत येथें पुष्कळ तयार होईल. व स्वस्त मिळेल तों तों त्याचा खप जास्त जास्त होत जाईल हाडांचें पीठ व सुपरफॉस्फेट ऑफ लाइम या दोनहि द्रव्यांचें खत

जमिनीस दिलें असतां त्यापासून जमिनीवर सारखाच परिणाम होतो. परंतु हा परिणाम जमिनीवर होण्यास दोन प्रकारच्या खतास वेळ मात्र कमी जास्त लागतो. सुपरफॉस्फेट्चा परिणाम पिकांवर त्वरित होतो. या खताची पूड भरड असते व ती बीं पेरतांना त्या बियांत मिसळावी म्हणजे त्यापासून पिकांस चांगला उपयोग होतो. हाडांच्या पिठाची स्थिति सुपरफॉस्फेटच्या खताच्या उलट आहे. हें खत जमिनीस दिल्यापासून एक दोन वर्षांनंतर त्याचा उपयोग पिकांस होऊं लागतो. याकरतां हें खत फळ झाडांस चांगलें.

हा डां चें ख त त या र क र ण्या ची सोपी री त.—दोन टोपल्या हाडांचा चुरा, तीन टोपल्या ताजा भाजलेला चुना व सहा अगर आठ टोपल्या लांकडांची अगर गोवऱ्यांची राख याप्रमाणें घेऊन एका मोठया खड्ड्यांत थरावर थर क्रमानें घालावेत. खड्डा भरत आला म्हणजे वर गवताचा चुरा व मातीचा एक थर घालावा. नंतर त्या खड्ड्यांत पाणी सोडून द्यावें. असें केल्यानें खत सुमारें सहा महिन्याच्या आंत तयार होतें.

मा स ळी चें ख त.—खताचे मासे मुंबई इलाख्यांत कोंकण, कारवार, रत्नागिरी, कुलाबा आणि ठाणें व मद्रास, बंगाल वगैरे समुद्रकिनारी भागांत मुबलक सांपडतात. या खताचा कोंकण प्रांतीं भात, नाचणी, नारळ व इतर बागाईत पिकें करण्याच्या कामीं जास्त उपयोग करितात. मासळीचें खत उसांकरता घाटावर जास्त प्रमाणांत जातें. घांटावर उंसाला इतर खतें देऊन मासळीचें खत पावसाळीं दर एकरीं एक टन पावेतों वरखत (टॉपड्रेसिंग) देतात. हें खत दिल्यावरोबर ताबडतोब जमिनींत मिसळून टाकिलें पाहिजे, नाहींपेक्षां कोल्हे, कुत्रे, पांखरें, रानडुकरें वगैरेंपासून अति त्रास होतो. हल्लीं मद्रास इलाख्यांत मलबार किनाऱ्यावर माशांचें तेल काढण्याचे शेंकडों कारखाने निघाले आहेत. त्या कारखान्यांत तेल काढून तें बाहेर पाठवितात व मासळीचा बाकी राहिलेला कुटा 'फिश गुऑनो' या नांवाखालीं विकला जातो.याचा खतांकरितां चांगला उपयोग होतो. मासळीचें खत लवकर द्राव्य स्थितींत येतें व त्यांत पिकांस लागणारीं सर्व पोषक द्रव्यें कमीजास्त प्रमाणांत असतात. या खतांत नायट्रोजन, पोटॅश, फॉस्फरिक ॲसिड आणि चुना हीं सर्व द्रव्यें असून तीं सर्व द्राव्य स्थितींत असतात. बाजारांत पांच प्रकारचें मासळीचें खत मिळतें. ढोमा, सुकट, टारली, चिंगळी व पंचभेळ या प्रत्येक जातीच्या खताचा वेगवेगळा भाव असतो. त्या सर्वांत चिंगळी जास्त पोषक असून ती जास्त महाग विकली जाते. मि. मिगेट यांनीं केलेलें पृथक्करण पुढें दिलें आहे.

माशाचें नांव	नायट्रोजन शेंकडा	फॉस्फरिक ॲसिड शेंकडा	पोटॅश शेंकडा
ढोमा	८.२४	६.२५४	१.८८
सुकट (पिवळा वारीक)	६.०२	३.१७५	१.१६
भुईमासा (टारली)	६.०३	५.७३०	२.१२
चिंगळी	७ ६७	४.४२१	१.६८
पंचभेळ	४.५४	२.९७४	१.३१

हि र व ळ ख तें, तागः—ताग हें पीक इतर पिकांपेक्षां जमिनींत नांगरून टाकण्यास फार उपयोगी आहे. अशा पद्धतीस कोठें कोठें बेवड करणें असें म्हणतात. ताग इतर पिकांपेक्षां लवकर वाढतो, वजनांत पुष्कळ भरतो व लवकर कुजतो साधारणपणें हें पीक दोन महिन्यांनीं तयार होतें व त्याचें ओलेपणीं दर एकरीं १८००० ते २८००० पौंडपर्यंत वजन भरतें. यांत आठ ते पंधरा शेणखताच्या गाड्यांत सांपडतील इतकीं पोषक द्रव्यें जमिनींत परत बुजविलीं जातात. शिवाय या खतानें जमिनीचा पोत सुधारतो. तागाचें पीक करून त्याचा खता ऐवजीं उपयोग करणें कमीजास्त प्रमाणानें सर्वत्र आढळतें. परंतु त्याच्या बुजवणींत अनेक प्रकार आढळून येतात. उदाहरणार्थः—कोणी भातखाचरांत एक महिन्याचा ताग झाला म्हणजे बैलांकडून तो पाण्यात तुडवितात. कोणी रब्बीच्यापिकासाठीं ताग करितात तेव्हां उभ्या पिकांत नांगर घालितात, कोणी ताग काठयानीं झोडून पाडून त्याच्या मागें नांगर घालितात. कोणी उभें पीक कुळवाच्या दिंडानें पाडून मग तें नांगरानें मोडितात. कोणी अगोदर ताग कापून अगर उपटून मग तो नांगराच्या तासांत टाकितात. या सर्व प्रकारांपैकीं कापून अगर उपटून मग तासांत मूठमूठ टाकणें फायदेशीर आहे. अशा रीतीनें ताग गाडल्यास बाहेर काडी कुडी उघडी रहात नाहीं, तो लवकर कुजतो व त्याचा त्याच्या मागून पेरलेल्या पिकास जास्त उपयोग होतो. ही बुजवणी लांकडी नांगरानें करितात, व त्याला खर्च बराच येतो. याकरिता बुजवणी लोखंडी नांगरानें केल्यास खर्च कमी येऊन बुजवणीहि उत्तम प्रकाराची होते.

हलक्या जमिनींत बेवड करण्यास मूग, कुळीथ, खुरासणी यांसारखीं पिकें चांगलीं समजतात. भारी जमिनींत गाडण्यासाठीं ताग, उडीद, नीळ, गोवारी यांसारखीं पिकें, पसंत करावीं. मद्रासेकडे भात खाचरांत धईंन नांवाची शेवरीची जात आहे, तिचें पीक करून तें गाडतात.

उं सा क रि तां पा च टा चें ख त.—उंसाच्या वाळलेल्या पानांस पुण्याकडे पाचट म्हणतात. याचा उंसाच्या रानांत जमिनीचा पोत सुधारण्याकडे भरीच्या खताऐवजीं चांगला उपयोग होतो तागाचें पीककरून तें गाडण्याचीहि वहिवाट आहे; परंतु हें पोत सुधारण्याचें काम पाचट गाडल्यानें बऱ्याच कमी खर्चांत भागतें. ऊंस चांगला असल्यास दर एकरीं सुमारें पांच टन पावेतों पाचट निघतें.

याकरितां गूळ रांधून जें पाचट शिल्लक राहील तें शेतांत जाळून न टाकतां त्याचा भरीच्या खताप्रमाणें उपयोग केल्यास शेणखताची कांहीं अंशीं तरी उणीव भरून येईल. याचे तुलनात्मक प्रयोग भरीच्या खताऐवजीं पांच वर्षें पावेतों मांजरी फार्म (पुणें जिल्हा) येथें करून पाहिले त्यांची पांच वर्षांची सरासरी पुढें दिल्याप्रमाणें:—शेणखत ३० गाड्या घातलें तर गूळ दर एकरीं ९९५० पौंड वजनी होतो. व पाचटीचें खत पाच टन (एक एकरांतून निघालेलें) घातल्यास एकरी गूळ ९६०० पौं. वजनी होतो. पाचट हें साधारणपणें शेणखताची बरोबरी करितें. वरील उत्पन्न नुसतें भरीच्या खतावर झालेलें नव्हतें. शिवाय इतर वरखतें दिलेलीं होतीं.

पाचट गाडण्यापूर्वी खताच्या खड्यांत एक थर पाचट व एक थर माती अशा प्रमाणें घालून तें एक पावसाळा कुजूं द्यावें व दुसऱ्या वर्षी शेतांत पसरावें अगर उंसापूर्वी खरिपाचें पीक काढल्याबरोबर त्याची ताागाप्रमाणें लोखंडी नांगरानें गाडणी करावी. जमिनींत भरपूर ओलावा असल्यास हें सर्व एक दोन महिन्यांत कुजून जातें.

तेलाची पेंड:—शेणखत, सोनखत, लेंड्या वगैरेशिवाय प्रत्येक शेतकऱ्यास मिळण्याजोगीं दुसरीं खतें म्हटलीं म्हणजे सर्व तऱ्हेच्या पेंडी होत. पेंडींचीं खतें बागाईत पिकांनां चांगलीं. या खताची किंमत जास्त असल्यानें अशा महागाईच्या पेंडी घेऊन त्या कोरडवाहू पिकांनां घालणें पुरवणार नाहीं. पेंडींत तेल जितकें कमी असेल तितकी ती खताला चांगली. पेंडींत तेल असल्यानें ती कुजत नाहीं. पेंड जितकी जुनी असेल तितकी चागली. गुजराथ, पुणें व ठाणें जिल्ह्यांत जेथें जेथें बागाईत आहे तेथें तेथें एरंडी व करंजीच्या पेंडीचा जास्त उपयोग करितात. बाजारांत दोन तऱ्हेच्या पेंडी मिळतात. एक देशी घाणीच्या व दुसऱ्या यंत्राच्या. या दोहोंपैकीं घाणीच्या पेंडीचा पिकावर लवकरच परिणाम होतो. यंत्रांतील पेंड तयार करितांना पहिल्यानें बीं भरडून तें वापरतात, यामुळें त्यांतील अल्ब्युमिनाइड्स अद्राव्य स्थिति पावतात; सबब त्यांचा पिकांवर परिणाम होण्याला दिरंगाई लागते. पेंडी दोन तऱ्हेच्या आहेत. गुरांनां खाण्यालायक व खाण्यास नालायक. या दोहोंचा खताकरितां चागला उपयोग होतो. करडई, कारळे, भुईमूग, तीळ, सरकीची पेंड वगैरे गुरांच्या खाण्यालायक पेंडी उंसाला नेहमीं वापरण्यात असलेल्या एरंडी व करंजी यांच्या पेंडीपेक्षां जास्त फायदेशीर पडतात असा अनुभव मांजरी येथील सरकारी शेतावर आलेला आहे. याशिवाय रायन (खिरणी), मोहा, उंडी, निंब वगैरे पेंडी खताला चांगल्या आहेत. गुजराथेंत एरंडीची पेंड स्वस्त मिळते. खानदेशांत सरकी स्वस्त मिळते. देशावर करडई, कारळा, भुईमूग वगैरेंच्या पेंडी माफक दरानें मिळतात. याकरितां जेथें जेथें जी पेंड स्वस्त मिळत असेल तेथें ती वापरावी. पेंडीचे प्रकार व गुणधर्म पुढे दिले आहेत.

एरंडी:—ही स्वस्त असते. हिचा पिकावर परिणाम करडईच्या पेंडीप्रमाणेंच लवकर होतो. ही पेंड कडू असल्यामुळें वाळवी कमी होते. करंजी:-हिचाहि गुण एरंडीप्रमाणेंच होतो. करडई:—दोन तऱ्हेच्या पेंडी मिळतात. एकींत बीं भरडून टरफलें काढून मग पेंड करतात; ही पेंड जास्त जोमदार असते. टरफलासहित केलेली पेंड कमी दर्जाची असते. ही लवकर खंवट होत नाहीं. व ती टिकाऊ असून गुरांनां चारतात. खुरासणी अगर रामतीळ:—ही गुरांना चारतात. हिला लवकर बुरसा चढतो. एरंडीपेक्षां परिणाम पिकांवर लवकर होतो. तिळाची पेंड:—ही गुजराथ, खानदेश वगैरे ठिकाणीं गुरांनां जास्त चारतात. भुईमूग:-ही पेंड सर्व पेंडींत जास्त पोषक असते. ही सर्व ठिकाणीं गुरांनां चारतात. तेल काढतांना शेंगदाण्यांत करडई मिसळतात. या पेंडीला बुरसा लवकर चढतो. सरकीची पेंड:—ही सर्व पिकाना चागली असते. गुरांनां सरकीपेक्षां सरकीची पेंड उत्तम. खोबऱ्याची पेंड:—ही बहुतेक गुरांनां चारतात; पण ती खंवट झाली म्हणजे खताकडे उपयोग करण्यास हरकत नाहीं. हींत शेंकडा तीन नायट्रोजन असतो. निंबाची पेंड:—ही गुजराथेंत व सातारा जिल्ह्यांत मिळते. ही कडू असते. या पेंडीनें वाळवी कमी पडते.या पेंडींत शेंकडा५पर्यंत नायट्रोजन असतो. उंडी-ही कोंकणात मिळते. हिचा खताकडे जुजबी उपयोग होतो. मोहा:—ही गुजराथेंत मिळते. पंचमहाल जिल्ह्यांतहि थोड्या प्रमाणानें गुरानां चारतात. ही पेंड देऊन ताबडतोब ऊंस लावल्यास पेराचे डोळे मरतात. ऊंस उगवून आल्यावर ती दिल्यास वाईट परिणाम होत नाहीं.

पेंडींतील मुख्य पोषक द्रव्य नायट्रोजन हें होय. त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे. तुलनेकरितां शेणखत, सोनखत, मेंढ्याचें खत, घोड्याची लीद व कृत्रिम खतें वगैरेंचे आंकडे दिले आहेत.

खताचें नांव	नायट्रोजन	बाजारभाव दर टनास	नायट्रोजन दर पौंडास
	शेंकडा	रु. आ. पै	रु. आ. पै
शेणखत	०.७	६- ८-०	०- ५-६
सोनखत	१.०	११- ४-०	०- ८-०
मेंढ्यांचें खत	१.०	११- ४-०	०- ८-०
घोडेखत	०.५	५- ८-०	०- ८-०
एरंडीची पेंड	४.०	६५- ४-०	०-११-८
करडई	६.५	९३- ४-०	०-१०-३
भुईमूग पेंड	७.०	६५- ४-०	०- ६-८
कारळा पेंड	५.०	४२-१२-०	०- ६-८
सरकी ,,	५.०	४६-१२-०	०- ६-८
करंजी ,,	४.०	३७- ४-०	०- ६-८

खताचें नांव	नायट्रोजन	बाजारभाव दर टनास	नायट्रोजन दर पौंडास
मासळी	७. ०	८४– ०–०	०– ८–७
कसाईखान्यांतील रक्त वगैरे	१०. ०	१६०– ०–०	०–११–५
सल्फेट ऑफ अमोनिया	२०. ०	२६५– ०–०	०– ९–७
नायट्रेड ऑफ सोडा	१४. ०	२८०– ०–०	१– ०–०
नायट्रेड ऑफ पोटॅश	१२. ०	१६८– ०–०	०–१०–०
नायट्रेड ऑफ लाईम	१३. ०	२००– ०–०	०–११–०

कृत्रिम खतें.—सर्व तऱ्हेच्या पिकांस मुख्यत्वेंकरून तीन पोषक द्रव्यांची जरूरी असते. तीं नायट्रोजन, पोटॅश व फॉस्फेरिक ॲसिड हीं होत. या तिन्हींपैकीं हिंदुस्थानांतील जमिनींत नायट्रोजन द्रव्याचा फार तुटवडा आहे. अशीं एक किंवा दोन पोषक द्रव्यें असणारीं खतें यांस कृत्रिम खतें म्हणतात. अशा खतांचा उपयोग यूरोप, अमेरिका वगैरे ठिकाणीं फार प्रमाणानें होत असून तिकडील शेतीचें उत्पन्न बरेंच वाढलें आहे. आपले इकडे जेथें यूरोपियन मळेवाले आहेत अशा ठिकाणींच फक्त कृत्रिम खताचा उपयोग होऊं लागला आहे. अशीं ठिकाणें सीलोन, म्हैसूर, कूर्ग, आसाम, बहार, बंगाल वगैरे होत. हल्लीं सर्वमान्य जें शेणखत त्याचा फार तुटवडा भासूं लागला आहे आणि ज्या ठिकाणीं पाऊस पुरेसा पडतो किंवा कालव्यावर पिकें करतात तेथें हें खत फारच महाग होत चाललें आहे. नीरा कालव्यावर जेथें जास्त बागाईत आहे तेथें तर वाळलेलें शेणखत व मेंढ्याबकऱ्यांच्या लेंडया या बाहेर गांवांतून पोत्यांत भरून विकण्यास येतात. दर पोत्यास ४ ते ६ आणे किंमत पडते. ज्या ठिकाणीं उंसाच्या पिकाला दर एकरीं ५०।६० गाड्या खत द्यावें लागतें तेथें खत देणें फार खर्चाचें झालें आहे. पैसे असले तरी सुद्धां खत मिळत नाहींसें झालें आहे. शेणाच्या बऱ्याच गोवऱ्या सर्पणाकरितां लावतात. व जेथें सर्पणाचा तुटवडा आहे तेथें हें सर्पण वापरणें बंद होणें शक्य नाहीं.जेव्हां शेणखत मिळेनासें झालें तेव्हां लोक सहजच पेंड, मासळी, हाडाची पूड, खाटकाच्या येथील रक्त वगैरेचा उपयोग करूं लागले.पण जसजसा पेंडीचा,मासळीचा वगैरे जास्त खप होऊं लागला तसतशीं खतें महाग होऊं लागलीं गळिताच्या धान्याच्या पेंडी येथें जास्त प्रमाणांत होऊं लागल्याशिवाय पेंडीचे भाव उतरत नाहींत. ज्या अर्थी शेणखताची महर्घता होऊं लागली आहे, पेंडीचा व मासळीचा भाव वाढूं लागला आहे, हाडांनां परदेशांत जास्त किंमत येऊं लागली आहे त्याअर्थी हिंदुस्थानांत कृत्रिम खतांचा प्रसार झाल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. या खतांकरितां हिंदुस्थान देश सर्वस्वी यूरोपवर अवलंबून राहील; कारण हिंदुस्थानांत सांपडणारीं खतें म्हणजे उत्तरहिंदुस्थानांत सांपडणारा हलक्या दर्जाचा सुराखार, मध्यप्रांतांत फारच थोड्या प्रमाणावर तयार होणारें सल्फेट ऑफ अमोनियाचें खत व दक्षिण हिंदुस्थानांत सांपडणारें फॉस्फरिक ॲसिडचे खनिज पदार्थ होत. (असें जरी आहे तरी नायट्रेट तयार करण्याचे कारखाने इकडे निघण्यासारखे आहेत). बाकी सर्व खतें बाहेरूनच येतात, व पुढें दिलेल्या आंकड्यांवरून हें प्रमाण वर्षानुवर्ष वाढतच आहे असें दिसून येईल.

सन.	टन.
१९०९।१०	८६३
१९१०।११	१३३९
११९।१२	३७७४
१९१२।१३	५४००
१९१३।१४	८२३४

कृत्रिम खतांची आयात बहुतेक कलकत्ता व मद्रास या बंदरांतच झालेली आहे. सन १९१३।१४ सालची कृत्रिम खतांच्या आयातीची छाननी केली तर खालीं नमूद केलेलीं खतें आलीं असें दिसून येईल. (१) सल्फेट ऑफ अमोनिआ २२६टन; पैकीं शेकडा ८० मद्रासेस खपला. (२) नायट्रेट ऑफ सोडा २८० टन; (३) नायट्रेट ऑफ लाईम ६०३ टन; हें सर्व मद्रास इलाख्यांत खपलें.(४) नायट्रोलिम १२३॥ टन. (५) फॉस्फेट्स् (बेसिक स्ल्याग खेरीज); सुपर फास्फेट्स् ८५० टन; (६) बेसिकस्ल्याग १८७४॥ टन. हें बहुतेक मद्रासेस खपलें. (७) पोटॅश खतें १८७९ टन बहुतेक मद्रासेंत खपलीं. (८) मिसळलेलीं वगैरे खतें २३९० टन; सर्व कलकत्यांत उतरलीं गेलीं. वरील खतांपैकीं पहिलीं चार नायट्रोजन द्रव्य पुरविणारीं आहेत. सल्फेट ऑफ अमोनिया या खताचा हिंदुस्थानांत जास्त उपयोग होण्याचा संभव आहे. हें खत कोळशाच्या खाणी व धुराचे कारखाने वगैरे जेथें आहेत तेथें तयार करतां येतें. मुंबई इलाख्यांत हें खत तयार होण्याची सोय दिसत नाहीं. मुंबई येथील गॅसवर्क्समध्यें प्रयत्न करण्यांत आले होते परंतु खत तयार करण्यास लागणारा खर्च परवडत नसल्यामुळें हें खत करण्याचें काम बंद झालें. मध्यप्रांतांत सांकची येथें टाटाच्या लोखंड व पोलादाच्या प्रचंड कारखान्यांत सल्फेट ऑफ अमोनियाचें खत तयार होऊं लागलें आहे; परंतु माल फार थोडा तयार होतो. बंगाल्यांत सुद्धां हें खत तयार होतें, तथापि याचा खप जसजसा वाढेल तसतसें या खताकरितां सर्वस्वी बाहेरील देशांवर अवलंबून रहावें लागेल. मद्रास इलाख्यांत याचा प्रसार बराच झाला आहे व मुंबई इलाख्यांतहि कांहीं पिकें या खतानें फायदेशीर पडूं लागलीं आहेत. नायट्रोजनयुक्त खतांपैकीं हें खत जास्त महत्त्वाचें आहे. चांगल्या नमुन्यांत शेकडा २० अकेपावेतों नायट्रोजन

असतो. याचा परिणाम हें खत स्वतंत्र रीतीनें अगर इतर खतांशीं मिसळून दिल्यास तीन चार आठवड्यांत पिकांत फरक दिसून येतो. पिकें हिरवीं गार दिसूं लागून जोरांत वाढूं लागतात. ज्या जमिनींत चुना व फॉस्फेट्स भरपूर आहेत तेथें हें खत देणें चांगलें. तृणधान्यासारख्या पिकांनां हें खत दर एकरीं ½ हंड्रेडवेट पुरें आहे. हल्लीं हें खत इतर खतांशीं मिसळून वहाचे मळेवाले जास्त प्रमाणांत उपयोगांत आणितात. हें उंसाला पेंडी वगैरे इतर खतांबरोबर मिसळून दिल्यास उत्पन्न जास्त येतें, असें साधारणपणें मुठा व नीरा कालव्यांवरील प्रयोगांत सिद्ध झालें आहे.

उंसाला या खताचें दर एकरी प्रमाण पुढीलप्रमाणें आहे. ३०–३५ गाड्या शेणखत सरी काढण्यापूर्वी देणें. ३३६ पौंड सल्फेट ऑफ अमोनिया.यापैकीं ११२ पौंड पहिली खुरपणी झाल्यानंतर व २४ पौंड ऊसबाधणीच्या वेळीं. १२०० पौंड करडीची अगर २४०० पौंड एरंडीची पेंड हें खत ऊस बांधणीच्या वेळीं देणें.

देशावरील मिरच्या वगैरे इतर बागाईत पिकांनाहि हे खत इतर खतांबरोबर मिसळून दिल्यास चांगला परिणाम होतो.

मिरच्याः—मिरच्या लावण्यापूर्वी ३ टन शेणखत व मागाहून दर एकरीं सल्फेट ऑफ अमोनिआ ६० पौंड, सुपरफॉस्फेट २२४ पौंड, सल्फेट ऑफ पोटॅश १८० पौंड. या खताचें मिश्रण करून पीक उभें असतांना थोडें तीन वेळ द्यावयाचें.

कांदे.—प्रथम दर एकरीं १० टन शेणखत; मागाहून दर एकरीं ३७५ पौंड सल्फेट ऑफ आमोनिया; तीन वेळ वरखत द्यावयाचें. नायट्रेट ऑफ सोड्याचा उपयोग सल्फेट ऑफ आमोनियासारखाच होतो.

लसूणघासः—प्रथम दर एकरी ४ टन शेणखत व मागाहून सुपर फॉस्फेट २४३ पौंड व सल्फेट ऑफ आमोनिया १५ पौंड यांचें मिश्रण दिल्यास पीक चांगलें येतें.

केळीः—रेताड जमीन, रहाटाचें पाणी (जि. ठाणें). १०० केळींच्या झाडांना खालील प्रमाणांत खत फायदेशीर आहे. एरंडीची पेंड ४०० ते ४५०पौंड. सल्फेट ऑफ पोटॅश ७० पौंड. सुपर फास्फेट ८० पौंड या सर्वांचें मिश्रण करून पहिले तीन महिने दरमहा थोडथोडें देणें.

नायट्रेट ऑफ पोटॅश—यात नायट्रोजन व पोटॅश हीं दोन्ही पोषक द्रव्यें आहेत. हें उत्तर हिंदुस्थानांत व बहार, संयुक्तप्रांत व मद्रास इलाख्यांत तयार करितात. यांत शेंकडा १३ आणि १४ नायट्रोजन. ४०–४६ पावेतों पोटॅश असतो. याचा स्फोटकद्रव्यें तयार करण्याकडे विशेष उपयोग होत असल्यामुळें तें महाग विकतें.

नायट्रेट ऑफ सोडा.—हें खत दक्षिण अमेरिकेंत चिली प्रांतांत सांपडतें. यांत शेंकडा १५.५ नायट्रोजनचें प्रमाण असतें. हल्लीं चार पांच वर्षें याचा उपयोग बंगाल व आसाम येथें वाढत्या प्रमाणावर होऊं लागला आहे. लडाइपूर्वी मुंबई येथें याचा भाव दर टनीं २१० रुपये होता. नायट्रोजन देणाऱ्या व सर्वांत लवकर द्राव्य स्थितींत येणाऱ्या खतांपैकीं नायट्रेट ऑफ लाइम खेरीजकरून याचा पहिला नंबर लागतो खत दिल्यापासून८–१०दिवसांनीं पीक हिरवेंगार दिसूं लागतें. व जोरास लागतें. या खतांत दोन अवगुण आहेत. पहिला हें खत दमट हवेंतील ओलावा तात्काल शोषण करून घेतें व दुसरा हें खत दिल्याबरोबर जर जोराचा पाऊस पडला तर तें पाण्याबरोबर वाहून जातें. याकरितां खत दिल्यावर चार दोन दिवस पाऊस पडणार नाहीं अशी उघाडी पाहून खत द्यावें.

ज्या पिकांस सल्फेट ऑफ अमोनियाचा उपयोग होतो त्या सर्वांस हें खत उपयोगाचें आहे. हें खत बंगाल्यांत भाताला फायदेशीर पडतें. या खताचा इतर खतांशीं मिसळून काळ्या जमिनींत बागाइतांत व तंबाखूला चांगला उपयोग झाला आहे. दर एकरीं मिश्रणाचें प्रमाणः—

नायट्रेट ऑफ सोडा २८५ पौंड. सुपर फॉस्फेट ३३६ पौंड. सल्फेट ऑफ पोटॅश २२४ पौंड. बटाट्यालाहि याचा चांगला उपयोग होतो.

ज्या ठिकाणीं पाऊस खात्रीचा आहे व जेथें पाण्याची सोय आहे अशा ठिकाणीं कापसाला पुढील खताचा चांगला उपयोग होतो. शेणखत; दर एकरीं १५ गाड्या-कृत्रिम खत–दर एकरीं नायट्रेट ऑफ सोडा १७० पौंड, सुपर फास्फेट ११२ पौंड, सल्फेट ऑफ पोटॅश १५० पौंड.

नांगरटीच्या पूर्वी दर एकरीं दोन टन शेणखत, नंतर बीं पेरण्याच्या वेळीं २०० पौंड सुपर फास्फेट व पीक दोन महिन्याचें झालें म्हणजे १३५ पौंड नायट्रेट ऑफ सोडा द्यावा. या खतानें पीक लवकर तयार होतें असा अनुभव आहे.

नायट्रेट ऑफ लाइम.—हें खत विजेच्या योगानें हवेंतील नायट्रोजन घेऊन तयार करितात. या खताचा नायट्रेट ऑफ सोड्याप्रमाणेंच उपयोग होतो. हें खत हवेंतील ओलावा लवकर शोषण करून घेतें. या खतांत शेंकडा ११.५ नायट्रोजन असतो. या खताला दर टनाला १४० रुपये पडतात. खतांत भेसळ पुष्कळ असते म्हणून खात्रीशिवाय हें खत घेऊं नये. याचा अद्यापि फारसा प्रसार झालेला नाहीं.

नायट्रोलिम.—(कालशियम सायनामाइड) हें कृत्रिम खत अगदीं नवीन आहे. हें इ. स.१९०८ सालीं पहिल्यानें प्रचारांत आलें. हें खत हवेंतील नायट्रोजन घेऊन तयार करितात. यांत चुना बराच असतो. या चुन्याचा जेथें जास्त पाऊस पडतो, अगर जेथें जमीनींत ओलावा रहातो अशा ठिकाणीं जास्त उपयोग आहे. या खताचा सल्फेट ऑफ अमोनियापेक्षां पिकांनां जरा उशिरा उपयोग होतो. या खतांत शेंकडा १०,१२ टक्के व कित्येक वेळीं १५

पावेतों नायट्रोजन असतो. लढाईपूर्वी कलकत्त्यास या खतास दर टनीं २०० रुपये किंमत होती. यांत कित्येक वेळां भेसळ असते. या खताचा खप हिंदुस्थानांत झपाट्यानें होत आहे. इ. स. १९१३-१४ सालीं मद्रास बंदरांत हें खत १२३ टन आलें. इ. स १९१५ सालीं कलकत्त्यास हें खत १३०० टनावर चहाच्या मळेवाल्यांत खपलें. या खताचा बरखताच्या कामीं फारसा उपयोग होत नाहीं. तें झाडांच्या भोंवतालची जमीन खोल खणून त्यांत घालावें व खड्डा परत भरून टाकावा. इतर पिकांकरितां हें खत सुमारें एक महिना बी पेरण्यापूर्वी घालावें. हें खत दर एकरीं १५० पौंड घालावें. याचें मिश्रण सुपरफॉस्फेटबरोबर दिल्यास पिकांना चांगलें मानवतें.

फॉस्फेट्स.- फॉस्फेट व बेसिक याचा उपयोग हल्लीं सिलोन, दक्षिणहिंदुस्थान, बंगाल व आसाम येथें युरोपियन मळेवाले चहा, कॉफी वगैरे पिकांना करतात. हें खत इतर पिकांना देण्याची अद्यापि फार वहिवाट नाहीं. तथापि मुंबई इलाख्यांत सुपरफॉस्फेट जेव्हां इतर कृत्रिम खतांशीं मिसळून तंबाखू, बटाटे, मिरच्या, कांदे, लसूणघास व केळी या पिकांना दिलें तेव्हां त्याचा चांगला परिणाम झालेला आहे. काळया जमीनींत नायट्रोजनच्या खालोखाल फॉस्फेट व नायट्रोजनयुक्त खतें जेव्हां मिळून वापरण्यांत येतात तेव्हां त्यांचा चांगला उपयोग होतो.

फॉस्फेरिक ॲसिड पुरविणारीं खतें.—सुपर फॉस्फेट ऑफ लाईम.—हें खत फॉस्फरिक खडकाचा भुगा करून त्यावर सल्फ्युरिक ॲसिड घालून तयार करतात. हे खडक इतर देशांत पुष्कळ सांपडतात. हिंदुस्थानांत यमुना नदीच्या कांठीं कांहीं भागांत हे आढळतात.

डिझॉल्व्हड् बोन्स :—हें खत वरच्याप्रमाणेंच आहे. पण यांत हाडांच्या ५ भाग पिठावर एक भाग ॲसिड घालून तयार करितात. हें एकरीं १ ते २ हंड्रेडवेट्स् द्यावें.

हाडें:—यांत शेंकडा चार नायट्रोजन, पन्नास फॉस्फेट ऑफ लाइम व चोवीस फॉस्फरिक ॲसिड असतें.

बेसिक स्लॅग-बेसिक स्लॅग नांवाचें फास्फरिक ॲसिड पुरविणारें खत लोखंडापासून पोलाद तयार करीत असतां जो फास्फरस् बाहेर पडतो तो चुन्यांत धरतात. नंतर त्याचें खत तयार करितात. हें एकरी ५ हंड्रेडवेट्सपावेतों द्यावें. यांत शेंकडा १५ ते १७ पावेतो फॉस्फरिक ॲसिड असतें.

पोटॅश खतें:-आपल्याकडे पोटॅश मिळणारें खत म्हटलें म्हणजे चुलींतील, गिरण्यांतलि, रेल्वेंतील (लांकडें जाळतात तेथील) व गुऱ्हाळांतील राख होय. परंतु ही राख फारच थोडी उपलब्ध असते. या खतापासून बटाटे, मिरची, वांगीं टमाटे वगैरे पिकांना जास्त फायदा होतो. हें खत एकरीं २ते४ हंडेडवेट्सपर्यंत द्यावें. जगामध्यें पोटॅश खताचा मोठा सांठा म्हणजे जर्मनींतील स्टॅस्फर्ड येथील खाणी होत. लढाई सुरू झाल्यापासून हें खत येणें बंद झालें आहे. इ. स. १९१४ सालीं दक्षिण हिंदुस्थानांत हें खत १९०० टन आलें. हें खत इतर खतांशीं मिसळून दिल्यास चांगला उपयोग होतो. देशावर तंबाखूला व रेताड जमीनींत वसई वगैरेकडे केळींच्या पिकाला या खताचा चांगला उपयोग होतो. गोवा प्रांतांत नारळींच्या झाडांना हें खत मानवतें.२५ पौंड शेणखत,२पौंड पेंड, २॥ पौंड हाडांची पूड, १ पौंड सल्फेट अगर म्यूरिएट ऑफ पोटॅश व अर्धा पौंड साधें मीठ या सर्वांच्या मिसळीचें खत दर झाडास द्यावें.

हीं जर्मन खतें निरनिराळया नांवांखालीं मिळतात. कायनीट, यांत शेंकडा १२-१२॥; म्यूरिएट ऑफ पोटॅश, यांत ५० ते ५७; सल्फेट ऑफ पोटॅश, यांत ४४ ते ५२; सिल्व्हानाईट पोटॅश, यांत १६ ते १७ टक्के पोटॅश असतो.

अलीकडे पोटॅश खताची खाण ॲबिसीनिया येथें सांपडली आहे. त्या खाणींत ८५००९० टन खत मिळेल असा अंदाज आहे. त्यांत पोटॅशचें शेंकडा प्रमाण ५५ असतें.

एक टन केळीच्या खुंटांत १८८ पौंड घनपदार्थ असतो व त्यांत पोटॅश शेंकडा १३.७ अगर अजमासें पॅसिफिक किनाऱ्यावर सांपडणाऱ्या केल्प नामक तणाच्या ½ असतो. केळयाच्या सालींत सर्व पोटॅश शेंकडा १.०५ असून घनपदार्थांत ९.०३ पौंड पोटॅश असतो.

समुद्रांतील शेवाळ.-या खताचा त्यातील पोटॅशकरितां विलायतेकडे जास्त उपयोग करितात. लढाई सुरू झाल्यापासून पोटॅश तयार करण्याचे तिकडे मोठमोठे कारखाने उभारण्यांत आले आहेत. कांहीं कांहीं शेवाळीच्या जातींत तर शेंकडा ५·२० पावेतों पोटॅश व थोडा नायट्रोजन सांपडतो. शिवाय त्यात फास्फेट्स, चुना, मॅग्नीशिया व साधें मीठहि असतें. हें खत बीट, असपरागस् वगैरे पिकांना चांगलें मानवत असून शिवाय त्याच्या अंगीं कृमिनाशक गुण आहे. आपल्याकडील समुद्रकिनारीं कांहीं भागांत शेवाळ सांपडतें.

केल्प नांवाच्या शेवाळीच्या जातींत पोषकद्रव्यें जास्त प्रमाणावर असतात. केल्पच्या एक टन खतांत ४·६ पौंड नायट्रोजन, १·२ पौंड फास्फेरिक ॲसिड व ६·२ पौंड पोटॅश असतो.

राख:—प्रत्येक शेतकऱ्याला मिळण्याजोगें दुसरें खत म्हटलें तर 'राख' होय. राखेंत फॉस्फेटस, पोटॅश, चुना, मॅग्नेशिया व गंधक हे पदार्थ कमी जास्त प्रमाणानें असतात. यात पोटॅश हा महत्वाचा आहे. उंसाच्या रानांत खंडोगणती राख मिळण्याजोगी असते. खतांतील खड्ड्यांत राख न मिसळतां ती जर वेगळी ठेविली तर त्या खतापासून साधारण सर्व पिकांस फायदा होतो. यांतील द्रव्यें द्राव्यस्थितींत असतात. राखेंत क्षार असल्यामुळें पिकांस नुकसान करणाऱ्या किड्यांचा नाश होतो. राखेच्या खताचा द्विदल धान्यांस त्याप्रमाणेंच बटाटे, मिरच्या, वांगी, टमाटे वगैरे पिकांस

चांगला फायदा होतो. लोकडाच्या राखेंत शेकडा १ ते ५ भाग पोटॅश असतो.

काजळीः—मोठमोठ्या कारखान्यांत उंच चिमण्यांतून काजळी धरते, ती गोळा करून तिचा खताकडे परदेशात उपयोग करितात. या काजळींत शेकडा २ ते ३ पावेतों अमोनिया असतो. या खताचा पोषक द्रव्याऐवजा कृमींचा नाश करण्यांत जास्त उपयोग होतो. हें खत कांद्याच्या तरवांत तिकडे मुद्दाम वापरतात. दर एकरीं सुमारें १० हंड्रेडवेट पावेतों हें खत द्यावें.

चुनाः—आपलेकडील जमिनींत चुन्याचा अंश पिकांना पुरेसा आहे. चुना जमिनीस दिला असतां तो पिकांस पोषक द्रव्य पुरवून शिवाय त्याचा परिणाम जमिनींतील झाडपाल्यावर व तिच्या पोतावर होतो. चिकण जमिनी ढिसूळ होतात. व रेताड जमिनी बांधल्या जातात. चुना दरएकरीं १ ते २ टनपावेतों द्यावा.

शिरगोळे (जिप्सम् लॅंडप्लास्टर).—यांत गंधक व चुना हे दोन पदार्थ असतात. जिप्सम् कच्छ, काठेवाड व पंजाब प्रांतांतील कोहाट जिल्ह्यांत विशेष आढळतो. पुणें जिल्ह्यांतहि हा थोड थोडा आढळतो. इकडे याचे खडे भाजून त्याचा चुना भिंतीला लावण्यास उपयोगांत आणितात. अमेरिकेंत व कानडांत हें खत कडदण धान्यांच्या पिकांना देतात. शिवाय याची पूड गुरांच्या मागें गोठ्यांत टाकितात. या पुडीच्या अंगीं मुतांतील अमोनिया ओढून घेऊन तो राखून ठेवण्याची शक्ति आहे.

मीठः—आपण मीठ खातों तेंच कांहीं जातींच्या पिकांना अगदीं अवश्य आहे. ताड, माड, आंबे, कोबी इत्यादि पिकांना जमिनींत मीठ घातल्यास पीक जास्त येतें. गोवा प्रांतांत दर दोन वर्षांनीं भातखाचरांत मिठाचें खत देतात. या देशांत मिठावर कर असल्यामुळें शेतकऱ्यांनां खताप्रमाणें याचा उपयोग करणें फारच अशक्य आहे. कोंकणप्रांतात चांगल्या मिठांत कांहीं दुसरे पदार्थ मिळवून तें खाण्याच्या नालायक बनवून माफक दरानें शेतकऱ्यांनां खताच्या उपयोगाकरितां विकलें जातें. मिठाच्या योगानें झाडाची वाढ खुंटते व देंठ बळकट होऊन पीक जोमदार येतें. याच्या योगानें कीटक मरतात व तणे कमी होतात. दर एकरीं भाताच्या पिकास ४००–८०० पौंड पावेतों मीठ द्यावें.

भाजलेली मातीः—कारवार जिल्ह्यांत कांहीं कांहीं ठिकाणीं माती भाजून तिचा खताकडे उपयोग करितात. या मातीचें खत ऊंस व भाजीपाला याला देतात.

मिश्र खतः—हें खत म्हणजे अठरा धान्यांचें कडबोळें होय. या खतांत प्राणिजन्य व वनस्पतिजन्य जें जें कांहीं मिळेल तें एकवट करून खत तयार केलेलें असतें. कोंबडीं, बदकें यांची विष्टा, झाडपाला तणें, शेतांतील व गांवांतील केरकचरा, शिंपा, हाडें, राखुंडा जें काय सांपडेल तें एकवटून ढीग करावा. पहिल्यानें जमिनीवर मातीचा थर द्यावा. त्यावर झाडपाल्याचा थर आंथरून त्याच्यावर वरील प्रकारचे थराआड थर देऊन ढीग झाला म्हणजे त्याजवर मुतारी अगर पुरेसें पाणी टाकून तो ओला ठेवावा; व तो ढीग दर दोन महिन्यांनीं दोन तीन वेळ परतावा. अशा रीतीनें तो चांगला कुजला म्हणजे शेतांत घालण्याला योग्य होतो. ढिगाची रुंदी ४ फूट, लांबी ७ फूट व उंची सुमारें ३–४ फूट असावी.

सांडपाणीः—मैलामातींत, कचऱ्यांत वगैरे मिसळून त्याचा शेताकडे उपयोग करणें हें शेतकी दृष्टया फार चांगलें आहे. परंतु शहरांतील घाण काढून त्याचा चांगला उपयोग कसा करावा हा मोठा महत्वाचा प्रश्न आहे. हल्लीं बहुतेक सर्व शहरांतील सर्व घाण धुवून नदींत, ओढयांत अगर समुद्रांत जाते. समुद्रांत जाते त्याचा जास्त विचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु नदींत अगर ओढ्यांत सोडणें फार धोक्याचें आहे. कारण लोक त्यांतील पाणी पितात व म्हणून त्यापासून नानातऱ्हेचे रोग होण्याचा संभव आहे. असें होऊं नये म्हणून शहरांतील सांडपाणी स्वच्छ करून तें लांब नेऊन त्या पाण्यावर पिकें करावी.

या शुद्ध पाण्यावर पुणें येथें प्रयोगक्षेत्रांत ऊंस, लसूणघांस, गिनीगवत, कडवळ, सुरण, हळद, कांदे व इतर भाजीपाला उत्तम येतो, असा अनुभव आला आहे. या पाण्यांत खताचा अंश असल्यामुळें केव्हां केव्हां नुसतें साधें पाटाचें पाणी द्यावें लागतें. अहमदाबाद व कराची येथें सांडपाणी शुद्ध न करितां तसेंच शेतावर नेऊन सोडिलें जातें व तेथेंहि कडवळ, उत्तम भाजीपाला, वगैरे पिकें रेताड जमिनींत चांगलीं येतात. कराचीला मका, गिनीगवत, हरळी, वगैरेंचें उत्पन्न फारच येतें. पुणें येथील म्युनिसिपालिटीकरितां सांडपाण्यावर पिकें करण्याचे प्रयोग शेतकीखात्यानें सन १९०५।३, १९०३।४ व १९०४।५ या सालीं पुणेंनजीक मांजरी येथें केले. या प्रयोगांत मिक्सिंग् टॅंक सॅप्टिक टॅंक, बॅक्टीरिया बेड्स् व सॅंड फिल्टर्स हीं बांधलीं होतीं. या प्रयोगाला लागणारा मैला व मूत पुण्यापासून सात मैलांवर शेत होतें तेथें नेण्यांत येई. मुंबई येथील प्रयोगावरून असें टरविण्यांत आलें होतें कीं, एक मनुष्यापासून रोज ६ औंस मैला व ४० औंस मूत उत्पन्न होतें. या आंकड्यांवरून व प्रत्येक माणूस रोज २० गॅलन पाणी वापरतो असें धरून खत मिक्सिंग टॅंकमध्यें तयार करीत. दर खेपेस १४ गॅलन मैला, १७० गॅलन मूत हीं तलावांत टाकून एकंदर मिश्रण ५००० गॅलन होईल इतकें पाणी मिसळीत. हें पाणी तयार झालें म्हणजे तें सेप्टिक तळयांत सोडून तेथें तें २४ तास ठेऊन नंतर पिकाला देण्याकरितां सोडीत. परंतु या पाण्याला थोडीशी घाण येई. दुसऱ्या प्रयोगांत सेप्टिक तळयांतील पाणी २४ तासानंतर पुन्हां बॅक्टीरिया बेडसमध्यें २ तास राहूं देत व नंतर शेतांत

सोडीत. यांतील पाणी जास्त स्वच्छ होई व त्याला घाण येत नसे. सेप्टिक टँकमध्यें आल्ब्युमिनाइड नायट्रोजनचा अमोनियाकल नायट्रोजन बनतो. तेंच पाणी बॅक्टीरिया बेड्स्मध्यें ठेविलें म्हणजे अमोनियाचे नायट्रेटस् तयार होतात. सन १९०५ सालीं प्रसिद्ध झालेल्या सुवेझ फार्मच्या रिपोर्टावरून खालीं दिलेले आंकडे फक्त सेप्टिक-टँकमधून एकदम शेतांत पाणी नेऊन त्यावर केलेल्या पिकांचे आहेत. या आंकड्यावरून मुतारीच्या पाण्यावर बहुतेक सर्व तऱ्हेचीं पिकें होतात असें सिद्ध होतें.

सुवेझ फार्म-सांडपाण्यावरील पिकें

साल.	सांडपाणी एफ्लुअंट दर एकरीं गॅलन्स.	एफ्लुअंट किती वेळा दिलें.	साधें पाणी किती वेळां दिलें.	दर एकरीं उत्पन्न वजन पौंड	दर एकरीं उत्पन्न रुपये.	दर एकरीं खर्च रुपये.	पिकाचें नांव.
१९०२।०३	२०,५८,०००	३०	७	७९८८८ ऊं. ९६७८गूळ	४८७	२९१	नवा उंस
१९०३·०४	१५,०७,४९५	२६	१२	५९१२४ ,, ७५२३ ,,	३८०	१५७	खोडवा उंस.
१९०४·०५	५,६१,९३५	१०	९	३५१७ २९३०	१३८	९४	½ मिरची ½ आलें.
१९०२·०३	११,९५,१००	१३	३	३१६०७	१५१	१६५	कांदे.
१९०२·०३	४,३७,५००	५	२	३६४७	१२२	११०	भुईमूग.
१९०३·०४	९,३८,८७०	१२	३	२८४७०	१२२	१२५	हळद.
१९०३·०४	१४,५१,०६४	१६	६	२३९२७	१५२	८१	रताळीं.

याशिवाय चाऱ्याचीं पिकें या पाण्यावर करण्यांत आलीं. त्यांचें दर एकरीं उत्पन्न(पौंडांत) पुढें दिलें आहे:—

लसूण घास, ४१३३०; गिनी गवत, ५६३०८; निळवा (कडवळ), ४४८१६; सॉरगम (कडवळ), ५५३३२; (मका) कडवळ (उतावळी), ५५१९२;

राब व त्याच्या ऐवजीं खतें.—भाताचें रोप तयार करण्याच्या दोन पद्धती आहेत. एक राब भाजून रोप तयार करणें व दुसऱ्यात राबाऐवजीं तरव्यात खत घालून रोप तयार करणें. ज्या ठिकाणीं रोप तयार करण्याकरितां शेण, डहाळ (झाड झुडपाच्या लहान लहान फांद्या),गवत, पाचोळा वगैरे पसरून जमीन भाजतात त्यास राब करणें असें म्हणतात. ही राब करण्याची पद्धत कोंकण, मावळ, डांग वगैरे ज्या ठिकाणीं पाऊस पुष्कळ पडतो तेथें प्रचलित आहे. कित्येक ठिकाणीं शेळया व मेंढ्या बसवून त्यावर रोप तयार करितात. दक्षिण व उत्तर कोंकणांत कोठें कोठें तरव्याच्या ठिकाणीं उन्हाळयांत गुरें बांधितात. सुरत, अमदाबादजवळ फक्त शेणखतावर रोप तयार करण्याची चाल आहे. कर्नाटकांत व उत्तर गुजराथ प्रांतांत जेथें जेथें 'परभात' करण्याची पद्धत आहे तेथें सबंध शेतालाच शेणखत देतात. दक्षिण कोंकणांत वेंगुर्ले, मालवणकडे कांहीं ठिकाणीं मासळीवरहि रोप तयार करण्याची पद्धत आहे. दिवसानुदिवस भाजावळीकरितां पुरेसा राब मिळेनासा झाला आहे. उत्तरकोंकणांत राबाच्या उपयोगाकरितां मालकीचे नंबर असत. ते तोडून उध्वस्त झाले व जंगलाचा नाश झाला. राबाकरितां पुरेसा टहाळ मिळेनासा झाला. कुमरी अगर दाली पद्धतीच्या लागवडीमुळें बरींचशी रानें जागोजागीं नाहींशीं झालीं. राब करण्याचे चारपांच प्रकार आहेत, त्याच्या पैकीं मुख्य दोन आहेत. एक टहाळाचा व दुसरा शेणाचा. शेणाचा राब सर्वांत उत्तम. परंतु शेण जाळल्यानें एक अतिउपयुक्त अशा पोषक द्रव्याचा नाश होतो. भातशेतीकरितां राब करणें अवश्यक व फायदेशीर आहे असें प्रत्ययास आलें आहे. डॉ. मॅन साहेब पुणें शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपाल यांनीं दोनतीन वर्षें यासंबंधीं प्रयोग करून पाहिले. ते म्हणतात राब भाजण्यापासून तरव्यावर मुख्य परिणाम म्हटला म्हणजे अर्ध्या इंचापासून एक इंचापर्यंत जमीन भाजणें हा होय. ती चांगली तापल्यामुळें तिचा पोत सुधारतो व पोषक द्रव्यें जास्त द्राव्य स्थितींत येतात. भाजावळीचा शेंकडा ६० हिस्से परिणाम पोत सुधाण्याकडे होतो. पोत सुधारला म्हणजे जमिनींतून पाण्याचा झिरपा होऊन रोपट्यांनां त्यापासून अपाय होत नाहीं. राब न मिळेल तर जमीन भाजण्यास उपाय डॉ. मॅन साहेब सुचवितात तो असा:—ज्या ठिकाणीं रोप तयार करावयाचें असेल तेवढ्या सर्व तुकड्यांत राब पसरण्याच्या ऐवजीं ठिकठिकाणीं मातीचे ढीग करून ते भाजून काढिले असतां बरीचशी फुकट जाणारी उष्णता वांचवितां येईल व तेणेंकरून कार्यभाग साधून राबहि कमी पुरेल. हल्लींची तरवे भाजण्याची पद्धत पाहिली तर ती मार्च महिन्यापासून ते मे महिनाअखेर (फाल्गुन, चैत्र, वैशाख) पावेतों चालू असते. डॉ. मॅन म्हणतात, रोपांवर चांगला परिणाम होण्यास तरवे भाजल्यापासून निदान सहा आठवड्यांच्या आंत त्यांत बीं टाकलें पाहिजे. जसजसे जास्त दिवस होत जातील तसतसा भाजावळीचा उपयोग कमी होत जातो. हल्लींची भाजावळ पाहिली तर ती नांवाला राहिली आहे. कारण टहाळ किंवा गोवऱ्या पुरेशा मिळत नाहींत व भाजावळहि फार निष्काळजीनें करतात. राबाच्या पूर्वी कित्येक ठिकाणीं जमीनहि हालवीत

नाहींत व जळल्यावर राखहि इकडे तिकडे वाऱ्यानें उडून जाते. एकदा जमीन भाजून काढिली पाहिजे म्हणून ती पाहिजे त्यावेळीं वेळ सांपडेल तेव्हां भाजून काम उरकून घेण्याची पद्धत पडली आहे.

शेतकी खात्यानें १० वर्षेपर्यंत राब करून व राबाऐवजीं इतर खतें वापरून भाताचें आवण तयार करण्यासंबंधानें प्रयोग लोणावळें (पुणें जिल्हा), रत्नागिरी व अलिबाग येथें केले, व अनुभवानें असें ठरलें कीं, रोपट्याला राबाची जरूरी आहे. परंतु ज्या ठिकाणीं राब मिळत नाहीं त्या ठिकाणीं राबाइतक्या, किंबहुना त्यापेक्षां कमी खर्चांत इतर खतें वापरून राबाइतकींच कित्येक वेळां राबाहून अधिक जोमदार रोपें तयार करतां येतात. अशा तऱ्हेचीं उपयुक्त खतें, तीं वापरण्याचें प्रमाण व त्यांचा राबाशीं तुलनात्मक खर्च खालील कोष्टकांत दिला आहे.

खताचा प्रकार	गुंठ्यास खत पौंड.	गुंठ्यास खर्च किती रु. आ. पै.	एक गुंठ्यांतील रोप गुंठ्यांस पुरेल.
मासळी.	३०	१-४-०	७
पेंड	५०	१-४-०	७ ३/४
सल्फेट ऑफ अमोनिआ.	१२	१-८-०	८ १/५
सोनखत.	२ गाड्या.	२-०-०	६
शेणावा राब	१००० शेण. ४०० ताजें गवत १०० बारीक गवत	× ३-०-०	६ १/३
टहाळ	५०० टहाळ ३५० जाडें गवत ८० बा० गवत	× २-२-०	५

[×]यांत गुसती वाहून आणण्याची मजुरी धरली आहे. राखशेण व टहाळ यांना किंमत द्यावी लागत नाहीं.

जमिनीला खत देण्याच्या पद्धती.—जमिनीस जें खत घालावयाचें तें फार विचार करून घातलें पाहिजे. सर्व जमिनी एकाच प्रकारच्या नसतात. कांहीं कठीण, कांहीं मऊ, कांहीं चिकण, कांहीं रेताड, कांहीं चुनखडीयुक्त तर कांहीं दलदलीच्या अशा असतात. जमिनींमध्यें अनेक प्रकार असल्यामुळें त्यांत निरनिराळीं द्रव्यें निरनिराळ्या प्रमाणांत असतात. याकरितां खत देणें तें जमिनीस व व तिजवर होणाऱ्या पिकांस योग्य असें व पाहिजेल तेवढेंच दिलें पाहिजे. असें न केल्यास जमिनीस अगर तिजवर होणाऱ्या पिकास बिलकुल फायदा होणार नाहीं. हिंदुस्थान-देशांत उन्हाचा ताप विशेष असल्यामुळें जमिनींतील सेंद्रिय द्रव्यें हलुहलु नाहींशीं होतात. तीं वनस्पतींच्या वाढीस व पोषणास जरूर असल्यामुळें तीं जेणेंकरून जमिनींत जतन होतील असे उपाय अवश्य योजले पाहिजेत. चिकण जमीन असल्यास तिच्यांत सेंद्रिय द्रव्यें फार हलुहलु कुजतात; कारण अशा जमिनींत हवेचा प्रवेश लवकर होत नाहीं. तसेंच असल्या जमिनीच्या अंगीं कोणतेंहि शोषून घेतलेलें द्रव्य राखून ठेवण्याची विशेष ताकद असते; रेताड अगर खडे असलेल्या जमिनींत राखून ठेवण्याची शक्ति फारच कमी असते; म्हणून अशा जमिनींत खत थोडथोडें पुष्कळ वेळां दिलें पाहिजे. परंतु ज्या जमिनीच्या अंगीं दिलेलें खत पुष्कळ काळपर्यंत राखून ठेवण्याची शक्ति असते. अशा जमिनीस एकदां खत दिलें म्हणजे तें लागोपाठ तीन वर्षें होणाऱ्या पिकांस उपयोगीं पडतें. याकरितां काळ्या (चिकण) व मध्यम काळ्या जमिनीस तिची लागवड करण्यापूर्वी बरेच दिवस अगोदर जरी शेणखतासारखें खत दिलें तरी त्यापासून तोटा होत नाहीं. शेणखत शेतांत नेण्यापूर्वीं तें बाहेर काढून त्याचा खड्ड्याजवळ ढीग करावा. तें चांगलें कुजलें असेल तर त्याचा ढीग घट्ट दाबून ठेवावा, म्हणजे त्यातील पोषक द्रव्यें हवेंत वायुरूपानें उडून जाणार नाहींत. जर तें चांगलें कुजलें नसेल तर तो ढीग न तुडवितां पोकळ ठेवावा व कुजण्यास सुरुवात झाली म्हणजे तो तुडवावा. तो कोरडा असल्यास त्यांत थोडें पाणी टाकावें. जर १०० पौंड शेणखत घेतलें तर त्यांत पंच्याहत्तर पौंड पाणी असतें व बाकी राहिलेल्या वाळलेल्या २५ पौंड खतांत दीड पौंड सत्वांश असतो; यामुळें हें खत तयार करण्याला, वाहून नेण्याला, पसरण्याला व जमिनींत मिसळून टाकण्याला जास्त खर्च लागतो. परंतु हा खर्च व्यर्थ होतो असें समजूं नये. कारण या खताच्या अंगीं दुसरे गुण असल्यामुळें चिकण जमिनींत हें खत घातल्यास ती भुसभुशीत होते व हलक्या जमिनींत ओलावा राहतो. शेणखतांतील पोषक द्रव्यें पिकांना ताबडतोब मिळत नसून तीं थोडथोडीं लागतील त्याप्रमाणें मिळत असतात. शेणखताचा उपयोग दोन तीन वर्षेंपर्यंत होत असतो.

जमिनीला शेणखत दर एकरीं ४०।५० गाड्या दिल्यास तें कुजत असतांना जमिनीची उष्णता १०।१५ अंशापर्यंत वाढते व ही उष्णता सुमारें महिना, दीड महिन्यापर्यंत टिकते. यामुळें एखाद्या वर्षी पेरणीच्या वेळीं जमीन खताऊन जर वेळेवर पुरेसा पाऊस पडला नाहीं तर पीक जळूं लागतें, व बिनखतावलेल्या जमिनींत तें बरें येतें. असें होऊं नये म्हणून कोरडवाहू जमिनींत खत द्यावयाचें असल्यास तें उघाडीच्या दिवसांत पीक पेरण्याच्या अगोदर सुमारें तीन महिने खत देऊन जमीन नांगरून टाकावी. म्हणजे खताचा परिणाम पिकावर वाईट होणार नाहीं. सोनखत ऊंस, विलायती गवत (घास), भाजीपाला वगैरे पिकांस फार मानवतें. या खताचें साधारणपणें दर एकरीं प्रमाण १५

गाड्या असावें. उसाला तें ८० गाड्यांपर्यंत देतात. एका गाडीला सरासरीनें ३.४ रुपये पडतात. पेंडीचें खत द्यावयाचें असेल तेव्हां पेंड चुन्याच्या घाणींत घालून मळावी व नंतर सरीखत द्यावें. हें खत उंस, केळीं, आलें, हळद, मिरच्या, कांदे वगैरे पिकांना चांगलें मानवतें. उंसाला हें खत दर एकरीं शेणखताशिवाय एक ते दीड टनपावेतों देत असून इतर पिकानां अर्धा टनपर्यंत देतात.

पाण्यांत त्वरित विरघळणारीं खतें—नायट्रेट ऑफ सोडा, सल्फेट ऑफ अमोनिआ व सुपरफॉस्फेट हीं होत. हीं खतें बारीक करून फक्त जमिनीवर पसरून टाकण्याची काय ती मेहनत आहे. ज्या खतात द्राव्य होण्याची शक्ति कमी आहे तीं खतें (सल्फेट ऑफ अमोनिया व सुपरफॉस्फेट) पेरणीपूर्वी सुमारें एक महिना शेतभर पसरून कुळवावीं. केव्हा केव्हा जमिनींत पीक उभें असतांना खत देतात त्याला 'उपरीखत' 'वरखत' असें म्हणतात अशीं थोडीं खतें जमिनींत घालणें असल्यास तीं दुप्पट तिप्पट राखेंत, रेतींत अगर मातींत मिसळून घालावीं. म्हणजे थोडें खत पुष्कळ जमिनीला पुरेल. नायट्रेट ऑफ सोडा व नायट्रेट ऑफ पोटॅश हीं खतें जमिनींत लवकर विरघळणारीं असल्यामुळें पीक उभें असतांना जेव्हां पाहिजे तेव्हांच द्यावीं. बाकी पोटॅश व फॉस्फेटिक खतें यांतील द्रव्यें जमिनीला शोषण करून राखून ठेवण्याची शक्ति असते. याला अपवाद हलकी जमीन, अति पाऊस अगर पाटाचें अतिशय पाणी हे आहेत.

इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत फार करून कृत्रिम खताचा जास्त उपयोग करतात. कारण ते देश थंड आहेत व जीं खतें पिकांना तत्काळ शोषून घेतां येतील अशीं खतेंच त्यांनां तेथें उपयोगांत आणावीं लागतात. शेणखत, केरकचरा वगैरे खतांचें रूपांतर होण्यास जास्त वेळ लागतो, यामुळें हीं खतें देऊन शिवाय कृत्रिम खतांचा जास्त उपयोग करतात. याशिवाय शेतांत फेरपालटीनें गुरें बांधणें, मेंढ्या बसविणें, सरीखत देणें, बुडकें खत देणें वगैरे खत देण्याचे अनेक प्रकार आहेत.

खत देण्याचें प्रमाणः—हें प्रमाण जमीन, हंगाम, पिकें, पाणभरती किंवा कोरडवाहू यांजवर अवलंबून असते. चिकण जमिनीला ताजें शेणखतहि चालतें. रेताड असल्यास कुजलेलें खत असावें. पावसाळ्यांत शेणखत, सोनखत वगैरे चांगलीं. रब्बी पिकांनां पेंडी वगैरे चांगल्या. पाणभरती पिकांनां जास्त खत चालतें.

पिकें व त्यांनां घालावयाच्या शेणखताचें दर एकरीं प्रमाणः—

पीक	खताच्या गाड्या.
गोंधळा, बाजरी	५
गहूं	५–१०
भात	१५–२०
(पुढें चालू)	
बागाईत पिकें	१०–४०
ऊंस	४०–६०

वरील पिकांना कृत्रिम खतें घालावयाचें दर एकरीं प्रमाण (हंड्रेडवेट):—

खतें	हंड्रेडवेट
सल्फेट ऑफ अमोनिया	१–१।
नायट्रेट ऑफ सोडा	१–१॥
सल्फेट ऑफ पोटॅश	१–२
सुपरफॉस्फेट	२–३

खत्तर—पंजाबांतील एक जात. लो. सं. (१९११) १४,८१७. हे सर्व मुसुलमान असून अटक व रावळपिंडी जिल्ह्यामध्यें आढळतात. खत्तर शब्दाची व्युत्पत्ति संशयित आहे. या लोकांच्या व हिंदूच्या चालीरीतींत बरेंच साम्य आहे. यावरून ही जात मूळची हिंदुस्थानातली असून नंतर बाटली असावी [रोझची ग्लॉसरी; सेन्सस रि.१९११ पंजाब].

खत्री—एक कोष्टी जात. ख्यांत एक क्षत्रियखत्री व एक छत्री (कोष्टी) खत्री असे दोन पोटभेद असून पहिल्याची लो. सं. ५,९९,१५९ इतकी असून दुसऱ्याची ११९,१८४ इतकी आहे (१९११).या नांवाखालीं हिंदु, शीख, मुसुलमान, जैन इतक्या जाती येतात त्यांची मुख्य वस्ती बंगाल, बहार, ओरिसा, पंजाब, संयुक्त प्रांत, काश्मीर, मुंबईइलाखा इकडे आहे हे लोक पंजाबात ४। लाख तर मुंबई इलाख्यांत १॥ लाख आहेत. महाराष्ट्रात यांची संख्या बरीच असून याचा इकडील मुख्य व्यवसाय जर व कलाबतू काढणें व पितांबर वगैरे रेशमी वस्त्रें तयार करणें हा होता. परंतु हल्लीं परदेशांतून जर कलाबतू येऊं लागल्यानें त्यांचा हा धंदा बसला आहे. रेशमी वस्त्रेंहि हल्लीं कमी निघूं लागलीं आहेत. त्यामुळें हे हल्लीं सावकारी करतात. यांच्यांत मौंजीबंधन करितात; विधवाविवाह यांच्यांत निषिध आहे. खालीं मद्रासकडे यांच्या चालीरीति तिकडील पटवेगार जातीप्रमाणें असून, त्यांच्यांत रोटीव्यवहार चालू आहे. हे खत्री आपल्यास रेणुकापुराणाच्या आधारानें क्षत्रिय म्हणवितात. परशुरामाच्या भयानें क्षत्रियांच्या गर्भवती स्त्रिया कालीमातेच्या आश्रयास गेल्या. त्यांनां संतति झाल्यावर कालीनें तिच्या हातीं चरखे दिले. तेव्हांपासून ही जात विणकामाचा धंदा करूं लागली अशी दंतकथा सांगतात. तिकडे हिला पटनूलकर व भुजराज क्षत्रिय (सहस्रार्जुनाचे वंशज) अशींहि दुसरीं नांवें आहेत. यांची कुलदेवता रेणुका असून यांच्या पोट जातींचीं नांवें सुलेगार, पोवार, मुद्गल, बोजागिरी वगैरे आहेत, आणि त्यांच्यांत गोत्रेंहि आहेत. यांच्यांत लग्नविधी सात दिवस चालून त्यावेळीं ब्राह्मण अवश्य लागतो. लग्नसमाप्तिनंतर हे गोंधळ घालतात. आणि या सात दिवसांत

मांसाहार वर्ज करितात. यांच्या पंचायतींतील पुढाऱ्यास ग्रामणी व कुटुंबमास वेजा म्हणतात. हे शैवपंथी आहेत.

जयपूर एजन्सींतील खत्री हे शेती करितात. यांच्यांत सूर्य, भाग, कोच्चिमो व नाग अशा चार पोटजाती आहेत. यांची मुंज लग्नाच्याच वेळीं होते. यांना पात्री असें दुसरें नांव असून, यांची भाषा उडिया आहे. गुजराथेंत यांची मुख्य वस्ती भडोच, सुरत, अहमदाबाद इकडे आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, आपण मूळचे सिंधमधले असून १६ व्या शतकाच्या सुमारास गुजराथेंत व्यापारानिमित्त उतरलों व आपण ब्रह्मक्षत्रिय आहों. त्यांचा नीटस चेहरा व गौरवर्ण यांवरून त्यांचें म्हणणें खरें असावें असें १९११ च्या खाने-सुमारीच्या रिपोर्टांत म्हटलें आहे.यांचें मुख्य दैवत सिंधच्या पश्चिमसरहद्दीवरील हिंगळजदेवी होय. हे बहुतेक शाकाहारी आहेत. हे मद्यसेवन करितात. व दक्षिणेकडे कांहीं खत्री मांस खातात. यांचा धंदा लहंगे, ओढण्या वगैरे सुती कापड विणण्याचा आहे. परंतु परदेशी कापडाच्या आयातीमुळें हल्लीं हा हातमागाचा धंदा बसत चालला आहे. सुरत जिल्ह्यांत हे लोक जर व कलाबतू काढतात. या कामांत यांच्या बायकाहि त्यांनां मदत करतात. हे वैष्णवपंथी असून मंत्रतंत्रावर भरंवसा ठेवणारे आहेत. यांच्या बऱ्या-चशा चालीरीती इकडील वाण्यांप्रमाणें आहेत. यांच्यात शिक्षणाचा अभाव फार असून नवीन उद्योगधंदे काढ-ण्याची धमकहि नाहीं. सुरत जिल्ह्यांत यांच्या दोन पंचा-यतीं आहेत. त्यांतील सभासदांनां शेटिया किंवा कारभारी म्हणतात. दंड व जातिबहिष्कृति या यांच्या शिक्षा होत. ज्ञातीच्या पट्टीची व्यवस्था धाकट्या पंचायतीकडे असते. काठे-वाडांत यांच्या कायमच्या मध्यवर्ती पंचायती,जामनगर, भाव-नगर, पोरबंदर व गोंडळ येथें आहेत. पंचायतींतील निकाला-विरुद्ध पंचायतींचे मुख्य जे पटेल त्यांच्या मेळ्यांत (पटेल-मेळा ही एक पंचायतींच्या वरची सभा असते) अपील दाखल करतां येतें. येथील निकाल मात्र कायम व शेवटचे समजले जातात. पंजाबांत हे हिंदु व शीख या दोन्हीं धर्मांचे असून तिकडे त्यांना वरिष्ठ दर्जाचे मानतात. यांचा मुख्य धंदा व्यापार आहे; परंतु हल्लीं सरकारी अगर खाजगी नौकरींत हे शिरूं लागले आहेत. हिंदु खत्र्यांत सोधी, बेदी वगैरे पोटजाती आहेत.

काश्मीरांतहि हे लोक असून तेथें ते हिंदु, शीख, जैन या धर्मांचे असून वर्णानें वैश्य आहेत. यांचा धंदा व्यापार व सावकारी असून हल्लीं संस्थानच्या मुलकी खात्यांतून नौकरीच्या निमित्तानें यांचा भरणा बराच होत चालला आहे. मध्यप्रांतांत यांची वसती ५ हजारांपर्यंत असून ती तुरळक तुरळक सर्व प्रांतांत पसरलेली आहे. हेहि आप-ल्यास क्षत्रिय म्हणवितात. क्रूकसच्या मतें यांच्या गौर वर्णा-वरून व घाऱ्या डोळ्यांवरून हे क्षत्रियोत्पन्न असावेत. यांच्या स्त्रिया सुरेख असतात. परशुरामाच्या सपाट्यांत एक गर्भ-वती क्षत्रिय स्त्री एका सारस्वत ब्राह्मणाच्या आश्रयास राहिली होती व त्यानें परशुरामाची खात्री करण्याकरितां ही मुलगी माझी आहे असें सांगून तिच्याबरोबर तो एका ताटांत जेवला अशी एक कथा हे सांगतात व तिच्या मुलापासून खत्री जन्मले असें म्हणतात. अद्यापि सारस्वतब्राह्मण हे यांच्या हातची कच्ची रसोई खातात; त्यावरून ही ब्राह्मण अगर क्षत्रिय यांची संतति असावी असें म्हणतात. सर क्यांबेल म्हणतो कीं, हे पंजाब, अफगाणिस्तान व तुर्कस्तान इकडे व्यापार करतात. शिखांचे गुरु नानक व गुरु गोविंद हे खत्री होते असें म्हणतात. रणजितसिंगाचे बरेचसे अधि-कारी, दिवाण सावनमल, मूलराज हेहि खत्री होते. शिखांचे गुरू जरी खत्री होते तरी ही जात साधारण हिंदूच राहिली. फारच थोड्यांनीं शीखधर्म स्वीकारला.यांच्यांतील शेर अगर शेरा नांवाची जात गोळकांची आहे असें ते मानितात. तथापि त्यांचें रंगरूप यांच्याच सारखें आहे. यांच्यांत विधवा-विवाह व घटस्फोट निषिद्ध आहे. अनेक बायका करण्याची जरी यांच्यांत चाल नाहीं तरी दासी म्हणून अनेक स्त्रिया हे पदरीं बाळगूं शकतात व यांच्यापासून होणाऱ्या संततीलाच गोळक म्हणतात. नेमाडांत हे लोक विणकाम व रंगाऱ्याचें काम करतात आणि बऱ्हाणपुरास कलाबतू व जरीचें काम करतात.

यांच्यांतील लग्नांत पुढील विधि लक्षांत ठेवण्यासारखा आहे. वर हा वधूमंडपांत आला म्हणजे एका बंद केलेल्या पालखीला सात प्रदक्षिणा घालतो व प्रत्येक प्रदक्षिणेला वधूचा भाऊ कण्हेरीच्या फांदीनें त्याला फटका मारतो. या पालखींत आधींच मुसुलमानी पद्धतीचा (पायजमा वगैरे) पोषाख घालून वधू बसलेली असते या सबंध दिवसांत वधू आपले डोळे घट्ट मिटून ठेवते व जेव्हां बोहोल्यावर तिला आणतात तेव्हांच वराला पाहण्यासाठीं म्हणून ती डोळे उघडते. सोमवारीं, गुरुवारीं व शुक्रवारीं १ ला शेजारी-पाजारीं लपवितात व तिला वरानें शोधून काढावें लागतें. तिला धुंडाळून लग्नमंडपांत आणल्यानंतर तीं दोघें परस्परांचे केस विंचरतात.सुतकांत छाती पिटण्याची गुजराथी पद्धत (एक वर्षपर्यंत) यांच्यांतहि थोड्याफार फरकानें असून विधवेनें वर्षभर फक्त वरण व राळ्याची भाकर खावी लागते. [ठाणें ग्याझे; सेन्सस ऑफ इंडिया. १९१ व्हॉ. ७,१४, २०; थर्स्टन–कास्ट्स् अँड ट्राइब्ज् ऑफ सदर्न इंडिया; रोझ–ग्लॉसरी. व्हॉ. २; क्रूक्स–कास्ट्स अँड ट्राइब्ज इन यू. पी. आणि रसेल व हिरालाल–कास्ट्स् अँड ट्राइब्ज् इन सी. पी.]

खत्री, बाबू कार्तिक प्रसाद (१८५२–१९०४)— एक हिंदी पंडित व ग्रंथकार. यांचे आजे बाबू गोविंदप्रसाद फार नांवाजलेले वैद्य होते. वडील बलदेवप्रसाद हेहि वैद्य असून शब्दकल्पद्रुम नांवाचा वैद्यकावरील संस्कृत कोश त्यांनीं प्रथित केला. कार्तिक प्रसादजींनीं लहानपणीं वैद्यक-ग्रंथ मुखोद्गत केले. बंगाली भाषा त्यांनां चांगली अवगत

होती व इंग्रजीहि सात इयत्तापर्यंत शिकले होते. यांनां सर्वांत जास्त आवड हिंदी भाषेची होती. 'प्रेमविलासिनी' व 'हिंदी-प्रकाश' हीं दोन हिंदी पत्रें कांहीं दिवस यांनीं चालविलीं होतीं. हिंदी गद्य लेखनाचा प्रघात यांनींच घालून दिला. हिंदी नंदकोश व केशवसेनकृत वैद्यकनिघंटु अकारादि वर्णानुक्रमें त्यांनीं जुळविला व सारस्वतदीपिका प्रसिद्ध केली. त्यांनीं आसामांत कांहीं दिवस राहून तेथें हिंदीचा थोडाबहुत प्रसार चालविला. सर्व हिंदी पत्रांनां त्यांची मदत असे. ते 'भारतजीवन' पत्राचे कांहीं दिवस संपादक होते. १९०० सालीं इंडियन प्रेस(प्रयाग)मधून 'सरस्वती' पत्रिका निघूं लागली. तिच्या संपादकसमितींत बाबू महाशय होते. काशी येथील नागरीप्रचारिणी सभेचे ते एक सभासदहि होते. उषाहरण, जया, प्रमिला, दीनानाथ, मधुमालती, कुलटा, दलितकुसुम, शिवाजी, पाकराज, विक्रमादित्य, अहल्याबाई, मीराबाई, ईला, प्रातःस्मरण, सतीसत्वरक्षा, शृंगारदान, वणिग्बंधु इत्यादि स्वतंत्र पुस्तकें कार्तिक प्रसाद बाबूंनीं लिहिलीं आहेत. याप्रमाणें हिंदी भाषेची अखंड सेवा करून बाबूजी १९०४ सालीं काशी येथें वारले. वेंकटेश्वर समाचार, नागरी प्रचारिणी सभा वगैरे संस्थांकडून त्यांचें चरित्र लिहिलें गेलें आहे [वि. विस्तार पु. ४४].

खनिखोदनशास्त्र---जमीनीच्या पोटांतील खनिजद्रव्यें शोधून व खणून काढण्याचें शास्त्र. या शास्त्राची व्याप्ति केवळ भूगर्भांतील खनिज पदार्थ शोधून काढण्यापुरतीच नसून भूपृष्ठावरील पदार्थांचें खनन करण्याचाहि या शास्त्रांत अंतर्भाव होतो. खननशास्त्राचे मुख्यतः तीन पोटभाग पडतात. (१) खनिजपदार्थ शोधून काढणें (२) खनिजपदार्थांचें शास्त्रीय संशोधन करणें व खनिखोदनाची सामग्री जमविणें व (३) खाणी चालविणें. या तिसऱ्या पोटभागांत खनिजपदार्थ खणून वर काढण्याचीं साधनें व पद्धति, खनिजपदार्थ काढणाऱ्या लोकांसाठीं सरकारनें केलेले कायदे, खाणी खणतांना होणारे अपघात व तन्निवारणार्थ उपाय इत्यादि बाबींचा समावेश होतो.

खनिज पदार्थ शोधन---खनिज पदार्थांचा शोध काढणें हें काम फार अवघड आहे. कोणत्या ठिकाणीं कोणता खनिज पदार्थ सांपडूं शकेल याचा अंदाज करण्याला भूस्तरशास्त्राचें खोल ज्ञान असावें लागतेंच. पण त्या बरोबरेंच रसायनशास्त्राचेंहि ज्ञान आवश्यक आहे.खनिज पदार्थांचा शोध काढण्याचें काम साहसी संशोधकाशिवाय दुसऱ्याच्या हातून होणें अशक्य आहे. अशा प्रकारच्या साहसी संशोधकाला डोंगरांतील खडकांचें सूक्ष्म अवलोकन करावें लागते व जमीनींतील मातीचें पृथक्करण करावें लागतें. कांहीं विशिष्ट प्रकारच्या जमीनींत विशिष्ट प्रकारचीं झाडें उगवतात. त्या झाडांवरून त्याला त्या जमीनीच्या गर्भांत कोणती खनिज संपत्ति असूं शकेल याचाहि विचार करावा लागतो. पाण्याच्या तळाशीं सांचलेल्या गाळावरूनहि त्याला एखाद्या खनिज पदार्थांच्या स्थानाविषयीं तपास लागण्याचा संभव असतो. तात्पर्य खनिज पदार्थांचा अंदाज काढणें हें अतिशय सूक्ष्म बुद्धीचें व प्रयासाचें काम आहे.

खनिज पदार्थांचें संशोधन व सामग्री---अशा रीतीनें खनिज पदार्थ अमक्या ठिकाणीं सांपडूं शकेल असा अंदाज काढल्यानंतर त्या स्थानाची संपूर्ण माहिती मिळविणें हें दुसरें काम होय. यासंबंधीं खालील प्रकारची माहिती मिळविणें जरूर आहे. (१) खनिजसंपत्ति असलेल्या स्थानाचें क्षेत्रफळ; खनिज द्रव्याची व्याप्ति व त्याचें मूल्य, (२) खनिज पदार्थांच्या स्थानापैकीं खणण्याला योग्य असलेला भाग, (३) खननकामाला लागणारा खर्च व खननासाठीं स्वीकारावयाच्या पद्धती.खनिजपदार्थांचें संशोधन करण्याची सर्वांत सुलभ पद्धति म्हणजे संशोध्य स्थानाचा पृष्ठभाग बारकाईनें तपासणें होय. जमीनीचा पृष्ठभाग थोडासा खणून पाहिला असतां क्वचित् प्रसंगीं पुष्कळ महत्वाचा शोध लागण्याचा संभव असतो. निदान संशोध्य स्थान हें खणण्याला योग्य आहे किंवा नाहीं ही तरी माहिती बहुतेक मिळूं शकते. पण कांहीं वेळां या भूपृष्ठखननाचा बिलकुल उपयोग होत नाहीं. अशा वेळीं भूगर्भखननाची जरूरी उत्पन्न होते. उदाहरणार्थ कांहीं खनिज पदार्थांच्या अगर धातूंच्या शिरा चटकन लागत नाहींत. त्या जमिनीच्या खालीं बऱ्याच खोल असतात. अशा वेळीं जमिनींत बरेंच खोल भोंक पाडून नंतर तेथील थर तपासणें अधिक उपयुक्त असतें. उदाहरणार्थ मीठ, लोखंडाचे दगड इत्यादि पदार्थांचें संशोधन करावयाचें असल्यास, जमिनीच्या गर्भांत भोंक पाडणें जरूर असतें. संशोध्य स्थानांमध्यें निरनिराळ्या ठिकाणीं भोकें पाडून त्यावरून खनिज पदार्थांचें संशोधन करावें. म्हणजे साधारणतः अंदाज चुकत नाहीं. भूपृष्ठखननानें जेव्हां आपल्याला खनिज पदार्थासंबंधीं पूर्ण माहिती मिळते अशा वेळींहि भूपृष्ठखननाचा मार्ग स्वीकारला असतां त्याचा उपयोग अधिक होतो. एखादे वेळीं असें घडतें कीं, नुसत्या भूपृष्ठखननाच्या योगानें आपल्याला धातूंच्या शिरा लागतात; त्यावरून आपण अंदाज करतो. पण तो अंदाज एखाद्या वेळीं चुकीचा ठरण्याचा संभव असतो. कारण भूगर्भांत या धातूंच्या दगडांबरोबरच दुसरे कांहीं अवशेष मिसळलेले असतात; व हे आपल्याला केवळ भूपृष्ठखननानें कळून देत नाहीं. अशा वेळीं भूगर्भखननाचाच अधिक उपयोग होतो. कांहीं प्रसंगीं हे भूगर्भखनन फार खोलपर्यंतहि न्यावें लागतें.

अशा रीतीनें खनिज पदार्थांचें संशोधन झाल्यानंतर, त्या भागापर्यंत जाण्यासाठीं खड्डे, अगर बोगदे खणण्याच्या कामाला सुरुवात होते. ज्या ठिकाणीं खाणीच्या क्षेत्रांत पुष्कळशा खोल दऱ्या असतात अशा ठिकाणीं बोगदे खणण्यापासून उपयोग होतो. पण खाणीच्या पृष्ठभागाच्या खालीं खनिज पदार्थ असतो त्या वेळीं खड्डा खणणें जरूर होतें. जेव्हां खनिज पदार्थांच्या शिरा बरवर लागतात त्या वेळीं

आडवा खड्डा खणणें अधिक सोईचें पडतें. इतर वेळीं मात्र उभा खड्डा खणावा लागतो. खनिज पदार्थांच्या थरांची जाडी बरीच असेल तर पायऱ्याच्या भिंतींमध्यें खड्डा अगर बोगदा खणणें आवश्यक होतें. खाणीचा मुख्य भाग सुरक्षित रहाण्याकरितां मध्यंतरीं खनिज पदार्थांचे खांब सोडण्याची पद्धत आहे.

अशा रीतीनें खाणी खणण्यापूर्वीची सर्व तयारी झाल्यावर मग प्रत्यक्ष खाणी खोदून खनिज पदार्थ काढण्याला सुरवात होते. खनिखोदनाचे पुष्कळ प्रकार आहेत. पुष्कळ प्रकारांपैकीं कोणता प्रकार अंमलांत आणावयाचा हें खनिज पदार्थांचे गुणधर्म, खडकाची जाडी,इत्यादिकांची तपासणी करून ठरवावें लागतें. जो प्रकार कमी खर्चाचा होईल तोच प्रकार अमलांत आणणें अत्यंत जरूर आहे. खाणी खोदण्याच्या बाबतींत खाणी खोदणाऱ्या मजुरांवर होणारा खर्च महत्वाचा आहे. याशिवाय खनिज पदार्थ वर नेण्यासाठीं लागणारे श्रम व खर्च याहि गोष्टी महत्वाच्या आहेत.या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन कमी खर्चाची पद्धति स्वीकारणें अत्यंत अगत्याचें आहे.

खाणी खोदण्याची जागा शक्य तितकी विस्तृत असणें जरूरीचें आहे. पण खडकाची जाडी व खालील भागाची वरचें वजन तोलून धरण्याची शक्ति यांवरून खाणी खोदण्याच्या जागेची मर्यादा ठरवावी लागते. खडक जर फार जाड व कठिण असतील तर खाणींतील काम करण्याचें क्षेत्र १०० ते २०० फूट रुंदीचें असावें लागतें. खडक पातळ असतील तर क्षेत्राची रुंदी २० ते ३० फूट असते. क्षेत्राच्या लांबीची मर्यादा, ही खाणी खोदण्यास लागणारा वेळ, खाणी खोदण्याचा वेग व खनिज पदार्थ वर नेण्याला लागणारा वेळ यांवरून ठरविली जाते. ' लॉंगवॉल ' अथवा मोठीं दालनें ठेवून खणण्याच्या पद्धतींमध्यें व ज्या खाणींमध्यें खांब मध्यें ठेवून मधून मधून खणण्यांत येतें अशा खाणींमध्यें काम करण्याचें क्षेत्र बरेंच लहान असतें.

खाणींतील खनिज पदार्थ पूर्णपणें खोदून काढणें हें जरी इष्ट आहे तरी तसें करण्याला अतिशय खर्च येतो. ज्या खाणींत खनिज पदार्थ विपुल असतो अशा खाणींत खाणीचा वरचा भाग तोलून धरण्यासाठीं बराचसा खनिज पदार्थांचा भाग खांब ठेवण्यासाठीं वगळावा लागतो. खनिखननाचा पूर्वेतिहास पाहिला असतां खनिखोदन हें पद्धतशीर रीतीनें होत असल्याचें आढळून येत नाहीं. पण हल्लीं पद्धतशीर रीतीनें खाणी खणण्याची पद्धत अस्तित्वात आली आहे व त्यामुळें श्रम व खर्च या दोन्ही दृष्टींनीं खाणी खोदण्याचें काम अधिक किफायतशीर झालें आहे. हल्लींची खनिखोदनाची पद्धत फार सोपी आहे. एखादी मोठी खाण खोदावयाची असल्यास हल्लीं खाणीच्या क्षेत्रात अनेक ठिकाणीं एकदम खणण्यास सुरुवात करतात. खाणींचा वरचा भाग तोलून धरण्यासाठीं मध्यंतरीं मोठमोठे खांब उभारलेले असतात व बाकींची सर्व खाण खोदून झाली कीं नंतर मध्यंतरीं सोडलेले खांब खोदण्यांत येतात. उथळ खाणींमध्यें हे खांब लहान आकाराचे असतात. ते पाडण्याला व त्यांतील खनिज पदार्थ काढण्याला फारसा त्रास पडत नाहीं पण, खोल व विस्तृत खाणींतील खांब फार मोठे असल्यानें ते पाडणें फार जोखमीचें असतें. अशा वेळीं सागवानी लांकडाचे भले मोठे खांब उभारून वरचा भाग तोलून धरून नंतर मग खनिज पदार्थांचे खांब पाडण्याचें काम करतात.

खनिज पदार्थ जर फारसा कठिण नसेल तर अशा खनिज पदार्थांच्या खाणींत मोठमोठे खांब असावे लागतात. उदाहरणार्थ कोळशाची खाण. अशा खाणी खोदण्याच्या कामांत ' रूम ॲन्ड पिलर ' अथवा खोलीपद्धत अंमलांत आणावी लागते (या पद्धतीविषयींची माहिती ' कोळसा ' या लेखात दिली आहे). लोखंडाच्या खाणींत देखील साधारणतः हीच पद्धत स्वीकारण्यांत येते. धातूंच्या खाणी खोदण्याची सर्वसामान्य पद्धत म्हणजे ' स्टूप ' अथवा जिन्याची पद्धति होय. या पद्धतीप्रमाणें निरनिराळ्या मजुरांच्या तुकड्यांनां निरनिराळीं खणण्याचीं क्षेत्रें नेमून देण्यांत येतात. पण तीं क्षेत्रें विषम उंचीवरचीं देण्यांत येतात; म्हणजे कांहीं मजुरांनां अगदीं खाणीच्या तळाशीं, तर कांहीं मजुरानां त्यापेक्षां थोड्याश्या उंचीवरची जागा खोदण्यासाठीं देण्यात येते. अशा रीतीनें जिन्याच्या पायऱ्याप्रमाणें खाणी खोदण्यांत येतात. खनिज पदार्थांचे थर ज्यावेळीं फार जाड असतात, त्यावेळीं खालच्या व वरच्या भागांमध्यें निरनिराळे आडवे भाग पाडण्यांत येतात. हे दिसण्यांत मजल्याच्या आकारासारखे दिसतात. या मजल्यांच्या मधील जागा खणून झालेली असते. अशा रीतीनें भाग पाडण्यांत आल्यावर मग खालून अथवा वरून खोदण्याचें काम सुरू होतें. मजले खणताना देखील ' रूम ॲन्ड पिलर ' ची पद्धत स्वीकारण्यांत येते. खनिज पदार्थ जमीनीच्या पृष्ठभागापासून फारसे खोल नसतील तर, भूगर्भपद्धतीप्रमाणें वर आच्छादन राखून नंतर खाणी खोदण्यांत न येतां, एकदम भूपृष्ठापासूनच खनिखोदनाला सुरुवात होते. खनिज पदार्थ मृदु असेल तर पहारीनें व कुदळीनें खडक फोडण्यांत येतात व प्रसंगीं सुरुंगांचाहि उपयोग करण्यांत येतो.

खाणींतील खनिज पदार्थ खणून काढतांच तो डब्यांमध्यें अगर गाड्यांमध्यें घालून वर आणण्यांत येतो. या गाड्या जनावरांकडून अगर माणसांकडून ओढल्या जातात. गाड्यांचा आकार खाणींतील रस्त्यांच्या लांबीरुंदीवर अवलंबून असतो. यूनायटेड स्टेटसमध्यें दोन ते चार टन माल मावूं शकेल अशा गाड्या असतात. यूरोपमध्यें १००० ते १५०० पौंड वजन नेऊं शकणाऱ्या गाड्या वापरण्यांत येतात. तांबे, शिसें अगर इतर मौल्यवान् धातूंच्या खाणींत १२०० ते ३००० पौंड माल नेणाऱ्या गाड्या

वापरण्यांत येत असून त्या माणसांकडून ओढल्या जातात. या गाड्या रुळांवरून ओढण्यात येतात व अतिशय मोठ्या धातूंच्या खाणींत जनावरांच्या साहाय्यानेंहि गाड्या ओढण्यांत येतात. मोठमोठ्या खाणींतून वाफेच्या साहाय्यानेंहि गाड्या चालविण्यांत येतात. पण विजेच्या साहाय्यानें चालणाऱ्या गाड्या किफायतशीर असल्याचें आढळून आल्यावरून हल्लीं त्यांचा बराच प्रसार होऊं लागला आहे. अशा प्रकारच्या गाड्यांची गति ताशीं सहा ते सात मैल असते. खाणींतील मार्गांत ज्यावेळीं भयंकर चढउतार असतो त्यावेळीं विजेच्या गाड्यांच्यापेक्षां दोरानें अगर साखळीनें गाड्या ओढण्याचा उपाय अमलात आणणें जरूरीचें होतें. दोन रुळांच्यामध्यें एक साखळी असून ती सांखळी रुळांवर ठेवलेली असते व ही साखळी एका एंजिनाला बांधण्यांत येते व हें एंजिन ही साखळी गुंडाळूं लागलें कीं गाडी हळू हळू वर येऊं लागते. अशा प्रकारच्या साखळीनें ओढल्या जाणाऱ्या गाड्या कोळशाच्या खाणीमध्यें हल्लीं सरसहा वापरण्यात येऊं लागल्या आहेत.

खड्ड्याच्या द्वारा ज्या खाणी खोदण्यात येतात अशा खाणींतील माल नेण्यासाठीं व तसेंच माणसें व उपकरणें यांचीं नेआण करण्यासाठीं पाळण्यांच्या आकारांचीं यंत्रें उपयोगात आणावीं लागतात. या यंत्रांची रचना अशी असतेः— दोन आडवीं पंचपात्रें (सिलिंडरें) एका दांड्याशीं जोडण्यांत येतात. या दांड्याच्या खालच्या भागाशीं एक अगर दोन पडघमाच्या आकाराचीं पंचपात्रें असतात. यांचा व्यास बराच मोठा असतो. हीं पंचपात्रें वाटोळीं फिरविण्याकरितां जे पेंच असतात त्याच्या योगानें एंजिन वाटेल तेवढें ओझें सहज वर ओढूं शकतें. दातांचीं चक्रें जेव्हां पाळण्याला असतात त्यावेळीं हीं पडघमच्या आकाराचीं पंचपात्रें एका स्वतंत्र दांड्याला जोडलेलीं असतात. जितका अधिक वेग पाहिजे असेल तितक्या प्रमाणात हीं पंचपात्रें कांहीं ठिकाणीं कोनाकृति अशीहि असतात. एंजिन चालूं झालें कीं दोरी गुंडळावयास सुरवात होते व या पंचपात्रांच्या साहाय्यानें खालील माल वर नेण्यांत येतो. या एंजिनाला चांगले ब्रेक ठेवलेले असतात अगर उलट्या दातांचीं चक्रें लावलेलीं असतात.

या पाळण्यांच्या दोऱ्या पूर्वी तागाच्या करण्यांत येत असत. पण मोठ्या वजनांचे पाळणे उचलण्याच्या कामीं या दोऱ्या कुचकामाच्या ठरूं लागल्यामुळें लोखंडाच्या सांखळ्या वापरण्यांत येऊं लागल्या. खोल खड्ड्यांतून वर माल काढतांना या साखळ्यांवर फार भार पडत असे. तो कमी करण्याकरितां त्या सांखळ्यांभोंवतीं अतिशय लवचिक अशी पोलादी तार गुंडाळण्यांत येऊं लागली. या सांखळ्या वाटोळ्या व चपट्या अशा दोन्हीं प्रकारच्या असतात. कांहीं ठिकाणीं वाटोळ्या व कांहीं ठिकाणीं चपट्या सांखळ्या वापरण्याचा प्रघात आहे. पण चपट्यापेक्षां वाटोळ्या सांखळ्या अधिक टिकाऊ असतात असें आढळतें.

खनिज पदार्थ जसजसा खणून काढण्यांत येईल तसतसा तो लवकर वर नेणें अत्यंत जरूरीचें असतें. मालाच्या गाड्यांमध्येंच तो पुष्कळ वेळ ठेवणें खर्चाच्या दृष्टीनें फार महाग पडतें. कारण मालानें भरलेल्या या गाड्यांची पुन्हां खालचा माल वर नेण्यासाठीं जरूरी असते. यामुळें खनिज पदार्थ बाजारांत विक्रीला जाण्यापूर्वी, एके ठिकाणी सांठविण्यासाठीं मोठमोठीं कोठारें बांधलेलीं असतात.

खाणींतील मजुरांनां खालींवर येण्यासाठीं पूर्वी साध्या शिड्यांचा उपयोग करण्यांत येत असे. पण यंत्राच्या साहाय्यानें मजुरांनां खाणींत उतरविणें व वर आणणें हें अधिक सोईस्कर पडूं लागल्यामुळें हल्लीं हीच पद्धत अंमलांत आली आहे. ही पद्धत उथळ खाणींत जितकी उपयुक्त आहे तितकी खोल खाणींत उपयोगीं पडत नाहीं. ज्या खाणी खोदण्यासाठीं उभे खड्डे खणण्यात आलेले असतात अशा खाणींमध्यें, मजुरांनां खालींवर आणण्याकरतां पिंजरे तयार केलेले असतात. या पिंजऱ्यांत १५।२० माणसें मावतात. अशा प्रकारचे पिंजरे यूरोपमध्यें व यूनायटेड स्टेट्समधील बऱ्याच खाणींत अद्यापिहि प्रचारांत आहेत. पण ज्या खाणी खणण्यासाठीं आडवे खड्डे खणण्यांत येतात, अशा ठिकाणीं या पिंजऱ्यांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. अशा वेळीं बॉबिन्सच्या साहाय्यानें लोकांनां वरखालीं नेण्यांत येतें. पण खाणी अतिशय खोल असल्यास या बॉबिन्स उर्फ पाट्यापेक्षा २०।३० माणसें मावतील अशा गाड्या उपयोगांत आणतात. 'लेक सुपीरियर कॉपर डिस्ट्रिक्ट' मधील खाणीमध्यें अशा प्रकारच्या गाड्या अद्यापिहि वापरण्यांत येत आहेत.

खाणींतील पाणी वर नेण्याची पद्धतिः— पुष्कळ खाणींमध्यें साचलेलें पाणी आपोआप वाहून जावें यासाठीं पूर्वी लांबलचक बोगदे खणीत. पण हल्लीं ही पद्धत त्याज्य ठरविण्यात आली आहे. यांत्रिक साहाय्यानें खाणींतलि पाणी वर नेण्यानें खर्चामध्यें पुष्कळ बचत होते असें आढळून आल्यामुळें हल्लीं बहुतेक खाणींमधून याच पद्धतीचा अवलंब होऊं लागलेला आहे. जमीनीच्या पृष्ठभागापासून खाणींत पंप नेऊन या पंपाच्या योगानें पाणी वर नेण्यांत येतें. या पंपाच्या योगानें जें पाणी वर काढण्यांत येतें तें सांठविण्यासाठीं एक पाण्याचा हौद तयार केलेला असतो. खडक जर सारख्या उंचीचे नसतील तर पंपाचा उपयोग न करितां वक्र नलिकेच्या द्वारानें पाणी वर काढण्यांत येतें. खाणीमध्यें येणारें पाणी बहुधा जमीनीच्या पृष्ठभागावरूनच येत असल्या कारणानें हें पाणी खाणीमध्यें जाऊं नये यासाठीं हे पाणी सांठविण्याकरितां खळगे खणण्यांत येतात. पाणी वर काढण्यासाठीं पंप, बादल्या अगर टांकी या तिन्हीं प्रकारांचा अवलंब करण्यांत येतो. ज्या ठिकाणीं उथळ खड्डे असतील

त्या ठिकाणीं ३५ ते २०० गॅलन पाणी वर टाकण्यांत येतें. पण खोल खड्ड्यांमधलि पाणी काढण्याकरतां टाक्यांचा उपयोग करण्यांत येतो. खाणीमध्यें ज्यावेळीं अतिशय पाणी साचूं लागतें अशा वेळीं या टाकीचा जलदीनें पाणी काढण्याच्या कामीं फार उपयोग होतो.

खाणींतून पाणी काढण्याच्या पंपाचे दोन प्रकार आहेत. (१) कॉर्निश पद्धतीचा पंप व (२)वर्दिंग्टननें तयार केलेला पंप. पहिल्या प्रकारात पंप चालू करण्यासाठीं जें एंजिन असतें तें जमीनीच्या पृष्ठभागावर ठेवलेलें असतें व दुसऱ्या प्रकारांत पंप व एंजिन हीं स्वतंत्र नसून पंपामध्येंच तो आपोआप चालूं होण्याची योजना केलेली असते. कॉर्निश पद्धतीचा पंप खर्चाच्या दृष्टीनें सोईचा आहे. पण आरंभीं तो खाणींत बसविण्यासाठीं बराच खर्च करावा लागतो. वर्दिंग्टनचा पंप हा वाफेवर चालणारा असतो व कॉर्निश पंपापेक्षां या पंपानें पाणी वर जलद काढतां येतें. हल्लीं विजेच्या साहाय्यानें पंप चालू करण्याची पद्धत सर्वत्र रूढ झाली आहे. सेंट्रिफ्यूगल अगर केंद्रोत्सारी पंपहि क्वचित वापरण्यांत येतात. खाणींतील पाण्यांमध्यें अम्लाचा बराच भाग असल्यास, पंपाचे भाग हे ब्रांझ धातूचे अगर दुसऱ्या लवकर न गंजणाऱ्या धातूचे केलेले असतात, अगर पाणी सांठविण्यासाठीं केलेल्या हौदांत चुन्याची निवळी घालून अम्लाचा परिणाम नाहींसा करण्यांत येतो.

खाणींत हवा खेळविण्याची पद्धत.—खाणीमध्यें पुष्कळ माणसें व जनावरें असल्यामुळें, तसेंच असंख्य दिवे लावावे लागत असल्याकारणानें खाणींतील हवा दूषित होते. सुरुंगांतील दारूमध्येंहि विषारी वायू असल्यामुळें त्या वायूच्या अल्पांशानेंहि शरीरांवर फार अनिष्ट परिणाम घडतात. याशिवाय खडकांच्या फटींतून अगर इतर खनिज पदार्थांतून निघणाऱ्या वायूंमुळें या अनिष्ट परिणामांमध्यें भरच पडते. दगडी कोळशाच्या खाणींत स्फोटापेक्षा अग्निजन्य प्राणघातक वायूमुळें व अनूप(मार्श)वायूमुळेंच प्राणहानि अधिक होते असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे. अशी स्थिति असल्यामुळें खाणींतील हवा शुद्ध राखण्याची अतिशय जरूर असते व त्याकरितां खाणीमधून शुद्ध हवा खेळविण्याचीं साधनेंहि निर्माण करण्यांत आलीं आहेत. पण धातूंच्या खाणींमध्यें कृत्रिम हवा खेळविणेंहि अतिशय जड होतें. हवा खेळविण्यासाठीं शुद्ध हवा आंत येण्यासाठीं एक व दूषित हवा बाहेर येण्यासाठीं एक अशा दोन जाळ्या करण्याची पद्धत असते.

भूगर्भांतील खाणींमध्यें हवामान बहुतेक सर्व ऋतूंत सारखेंच असतें. बाहेरील हवेपेक्षा उन्हाळ्यांत या खाणींमधील हवा अधिक गार व हिंवाळ्यांत अधिक उष्ण असते. अशी स्थिति असल्यानें खाणींत हवा खेळण्याकरतां केलेली धुराडीं निरनिराळ्या उंचीवर असतील तर, आंतील हवा व बाहेरील हवा यांच्या उष्णमानामध्यें बरेंच अंतर पडून प्रापणप्रवाह सुरू होऊन खाणीमध्यें हवेचा प्रवाह आपोआपच लागेल. याप्रमाणें हिंवाळ्यांत तर पुष्कळच हवा खेळत असते. उन्हाळ्यांत मात्र हवा साहजिकच कमी खेळत असते.

खाणींतील हवा उष्ण करून तीं खाणींत खेळविण्याचा एक उपाय आहे. हवा येण्याच्या द्वाराच्या तळाशीं एक भट्टी करून हवा उष्ण केली म्हणजे खाणींत हवा खेळूं लागते. पण हा उपाय फारसा उपयुक्त नाहीं. शिवाय ज्या खाणींत अग्निजन्य प्राणघातक वायु पसरण्याचा संभव असतो त्या ठिकाणीं हा उपाय अमलांत आणणें धोक्याचें असतें. कारण एखाद्या वेळीं हवेचा प्रवाह उलट दिशेनें वाहूं लागल्यास खाणींत कर्बद्विप्राणिद (कार्बानिक ॲसिड गॅस) मोठ्या प्रमाणांत पसरून खाणींत आग लागण्याचा संभव असतो. अशा प्रकारचा उपाय बराच घातुक असल्यानें पुष्कळ देशांत कायद्यानें हा उपाय बंद करण्यांत आला आहे.

वरील मार्ग टाकाऊ ठरल्यानें हवा खेळविण्याचे कृत्रिम उपाय निर्माण करण्यांत आले आहेत. १८५० च्या सुमारास केन्द्रोत्सारी (सेंट्रिफ्यूगल)हवा खेळविणारीं यंत्रें प्रथम उपयोगांत आलीं. पंख्याच्या द्वारें खाणींत हवा खेळण्याची दुसरीहि एक युक्ति अमलात आली आहे. या यंत्राची रचना असते तीः—खाणींत जाण्याच्या खड्ड्यामध्यें आच्छादनयुक्त असे अनेक वातकुक्कुट (एक प्रकारचा पंखा) एकावर एक बसविलेले असतात. वरून येणारी हवा या पंख्यावर आदळताच हे पंखे फिरूं लागतात व सर्वत्र हवा खेळूं लागते. आच्छादनविरहित पंख्यामुळें हवा अधिक खेळते. या पंख्याचा खाणींत हवा पसरविण्याच्या कामीं व खाणींतली दूषित हवा नाहींशी करण्याच्या कामींहि उपयोग होतो. खाणींतील दूषित हवा नाहींशी करणाऱ्या पंख्यांत गुइबल पंखा हा विशेष वापरण्यांत येतो. याशिवाय रेट्यू, शीलें, पेल्सर वगैरे अनेक नावाचे पंखे हल्लीं वापरण्यांत येतात. आच्छादनरहित पंख्यात वॅडेलचा पंखा प्रसिद्ध आहे. भंदर्गांत पंख्याचा व्यास तीस ते पंचेचाळीस फूट असतो व त्याच्या योगानें दर मिनिटाला एक लाख घनफूट हवा खेळविता येते. कोळशाच्या खाणीसारख्या भयंकर खाणींतील खड्ड्यामध्यें दोन पंख्याची योजना करून ठेवण्यात आली असते. वेळेस अपघाताच्या बाबतींत एखादा पंखा बंद पडला तर दुसरा पंखा चटकन सुरू करता येतो.

हवेचा प्रवाह खाणीमध्यें खेळविणारी ही जी यांत्रिक प्रवर्तक शक्ति असते तिला खाणींतील घर्षणात्मक प्रतिबंधामुळें बराच अडथळा होतो. हा अडथळा नाहींसा करण्याकरतां हवेचा कांहीं भाग खर्ची घालावा लागतो. या प्रतिबंधाचें मान कमी करण्यासाठीं निरनिराळ्या भागांत निरनिराळे मार्ग करण्यात येतात. निरनिराळे मार्ग केल्यानें हवा अधिक खेळूं लागते. पण त्याबरोबरच हवेचा प्रवाह एखाद्या वेळीं उलट्या दिशेनें वाहून स्फोट होण्याचा संभव असतो. अशा वेळीं खाणीच्या ज्या भागांतील हवा उलट्या

दिशेनें वाहते तेवढ्याच भागांचा नाश होतो. बाकींच्या भागाला फारसा उपसर्ग पोहोंचत नाहीं.

खाणी खणण्याचें काम किती खोलपर्यंत नेतां येईल यासंबंधीं खनिशास्त्राचे तर्क चालू आहेत. खाणी खोल खणण्याच्या कामीं खाणींतून पाणी वर काढण्याच्या बाबतींत होणारी गैरसोय व खाणींतून खनिज पदार्थ वर नेण्याची अडचण या बाबी प्रमुख आहेत. पण त्याशिवाय खडकाचें उष्णमान व वरील थराचें वजन याहि बाबी लक्षात घेणें अपरिहार्य आहे. जगातील सर्वांत खोल खाण म्हणजे मिचिगन संस्थानांतील हुटन परगण्यातील टमरकची खाण होय. ही खाण ५२०० फूट खोल आहे. या टमरक कंपनीच्या इतर तीन व त्यानजीकच असलेल्या कॅलुमेट व हेलका येथील खाणींची खोली ४००० ते ५००० फुटांच्या दरम्यान आहे. हूटन परगण्यांतील क्विन्सी येथील खाणींची खोली ४००० फुटांपर्यंत गेली आहे. इंग्लंडमधील व बेल्जममधील कांहीं कोळशाच्या खाणी तीनचार हजार फूट खोल आहेत. ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरिया काटेझ खाण ही ४३०० फूट खोल आहे. ट्रॅन्स्व्हाल येथील कांहीं सुवर्ण खाणींची खोली ४००० फूट पर्यंत गेली आहे. या वरील खाणी अद्यापि पुष्कळ खोल खणतां येतील असा तज्ज्ञाचा अभिप्राय आहे. खाणींतून खनिज पदार्थ वर काढण्याची व पाणी वर नेण्याची अडचण दूर करता येणें शक्य आहे असें तज्ज्ञांनीं ठरविलें आहे. फक्त खडकाचें उष्णमान व खाणीच्या वरच्या भागांतील थरांचें वजन यासंबंधीं काय तजवीज करतां येईल यासंबंधीं हल्लीं प्रयत्न चालू आहेत. दर ५० ते १०० फूट खोलीला एक डिग्री उष्णता वाढते असें प्रयोगानें सिद्ध झालेलें आहे. मिचिगन व रँडमधील खोल खाणींमध्यें २०० अगर त्याहीपेक्षा अधिक फूट खोलीला एक डिग्री प्रमाण वाढतें असा तेथील अनुभव आहे. व्हर्जीनिया शहरांतील कामस्टाकच्या खाणी १३० फारनहीट डिग्रीपर्यंत खोल खणतां येणें शक्य आहे असे विद्वानांचें मत आहे. पण अतिशय खोलीपर्यंत खणण्यात आलें असतां, मृत्यूचें प्रमाण वाढत जातें असें दृष्टोत्पत्तीस येतें. आल्प्स पर्वतांतील खाणींतील हवा दमट असल्यानें ९० डिग्रींपर्यंत खणणें देखील कठिण होतें. साधारणतः खडकांचें उष्णमान ५०° फारनहीट धरलें व १०० ते २०० फूट खोलीला एक डिग्री उष्णमान अधिक वाढतें असें मानलें तर १३०° उष्णमान होण्याला ८००० ते१६००० फूट खोल खणावें लागेल. पण इतक्या खोलीपर्यंत खाणी खणावयाच्या म्हटलें तर वरील भाग तोलून धरण्यकारितां जे खांब मध्यें उभारलेले असतात त्यांना वरील भागाचें वजन असह्य होतें व हे खांब वांकूं लागतात. अशी स्थिति असल्यामुळें, खडकाचें उष्णमान व वरील वजन या दोहोंच्या कारणानें खाणींची खोली पुष्कळ ठिकाणीं ८००० ते १०००० फुटांपुढें नेतां येणें अशक्य होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

खाणी विषयक कारभार.—खाणी खणण्याचा धंदा हा कायमचा नसून तो कांहीं काळपर्यंत टिकणारा आहे. खाणींतील खनिज-पदार्थांचें पूर्ण खनन झालें कीं त्या खाणीचा कारभार संपला. ही गोष्ट खाणी खोदण्याकरतां कंपनी स्थापन करतांना लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे. शिवाय खाणी खोदण्याचा धंदा हा इतर धंद्यापेक्षां अधिक धोक्याचा आहे. ही गोष्ट विसरतां उपयोगी नाहीं. कांहीं खाणी खणण्यांत फायदा होण्याऐवजीं नुकसानच होतें. कांहीं खाणी फारशा फायदेशीर होत नाहींत. शिवाय खाणी खणतांना स्फोट होऊन पुष्कळ नुकसान होतें. यासाठीं जें कर्जाऊ भांडवल उभारावें लागतें त्यांतून दरवर्षी कर्जाची रक्कम फेडण्याकरतां स्वतंत्र कर्जफेडीचा फंड सांठविण्यांत आला पाहिजे. खाणी खणण्यांत जें नुकसान येण्याचा संभव असेल त्यासाठीं बुडीत भांडवलहि निराळें काढून ठेवलें पाहिजे. या सर्व गोष्टी खाणी खणण्याकरतां स्थापन झालेल्या कंपनीनें पूर्णपणें लक्ष्यांत ठेवल्या पाहिजेत.

खाणीची अंदाजी किंमत.—साधारणतः एखाद्या जिंदगीचें मूल्य ठरवावयाचें तें वार्षिक नफ्यावरून ठरवावयाचें असतें. पण खाणींच्या बाबतींत नफ्याचें प्रमाणच अनिश्चित असल्यानें वार्षिक नफ्यावरून खाणीची अंदाजी किंमत ठरविता येणें अशक्य असतें. शिवाय खाणी खोदण्याला सुरुवात करण्याच्या अगोदरच खाणी उघडण्याच्या कामीं पुष्कळ पैसा खर्च करावा लागतो. अशी परिस्थिति असल्यामुळें, खाणीची अंदाजी किंमत ठरवितांना खालील गोष्टी विचारांत घेणें जरूर आहे. (१) खनिज पदार्थांचे नमुने व त्यांची अंदाजी किंमत. (२) खाणीचा जेवढा भाग उघडला असेल त्याचें परिमाण. (३) उघडलेल्या भागांतील खनिज पदार्थांचें अंदाजी परिमाण. (४) खाणी खणण्याला लागणारा वेळ, त्यांतील खनिज पदार्थांची अंदाजी किंमत व त्यावर होणाऱ्या फायद्याचें अंदाजी प्रमाण. खाणींतील खनिज पदार्थ खाणींतील सर्व भागांत सारखा पसरला असेल तर थोडेच नमुने घेऊन त्यांवरून खाणीची अंदाजी किंमत साधारणतः निश्चितपणें ठरवितां येते. पण कांहीं खाणींत हा खनिज पदार्थ सर्व भागांत सारखा पसरत नाहीं. अशा वेळीं खाणींतील निरनिराळ्या भागांतील नमुने जमवून त्यांची पारख करून नंतर त्यावरून अंदाजी मोल ठरवावें लागतें.

खाणीविषयक शिक्षण.—या खाणींच्या धंद्यांत खाणीविषयक शिक्षण हें प्रमुख अंग आहे. खाणी खणण्याच्या बाबतींत पुढाकार घेणारे लोक त्या शास्त्रांत तज्ज्ञ असले पाहिजेत. या शास्त्राच्या अभ्यासकाला भूस्तरशास्त्राची पूर्ण माहिती असली पाहिजे. निरनिराळ्या देशांत खाणी खणण्याचा ज्या पद्धती अंमलांत असतील त्या सर्वांशीं यानें परिचय करून घेणें आवश्यक आहे. याशिवाय खनिज पदार्थांचे गुणधर्म भूगर्भांतील खाणी उघडण्याकरितां

लागणारें सर्व साहित्य, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र इत्यादिकांचेंहि ज्ञान त्याला जरूर असलें पाहिजे. यासाठीं ज्या ज्या भागांत बऱ्याच खाणी असतील अशा भागांत या शास्त्राचें ज्ञान देण्याकरितां शाळा उघडण्यांत आल्या आहेत. याखेरीज खाणींत काम करणाऱ्यांच्यासाठीं म्हणूनहि शाळा स्थापन झालेल्या आहेत. या लोकांनां रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र, 'खननशास्त्र' भूस्तरशास्त्र यांची मूलतत्त्वें शिकवण्यांत येतात. पण अशा रीतीनें या शास्त्रांचा पूर्ण अभ्यास केलेल्या विद्वानांनां देखील अनुभवासाठीं म्हणून कांहीं वर्षे काम करण्यात घालावीं लागतात.

खाणींतील अपघातः— खनिखोदनाचा धंदा अतिशय धोक्याचा आहे, व त्यामुळें अपघात होण्याचा संभव असतो. हे अपघात कमी करण्यासाठीं कायदे करण्यांत आले आहेत. हे कायदे सकृद्दर्शनीं कडक आहेत असें वाटतें पण सर्वसाधारणतः हे कायदे जरूरीचे व उपयुक्त आहेत. खाणींवर देखरेख करण्याकरितां अधिकारी नेमण्यात आले आहेत. इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड येथील खाणींमधील अपघातांचें प्रमाण पाहिलें असतां या कायद्यामुळें ते अलीकडे कमी होत चाललें आहेत असें दिसून येईल. १८७८ मध्यें या अपघाताचें प्रमाण हजारीं २.७८ होतें तर सन १८०९ मध्यें हजारीं २ हें प्रमाण होतें. १९०० मध्यें हेंच प्रमाण हजारीं १.२५ इतकें पडलें. खाणींतील अपघात ज्वालाग्राही पदार्थांच्या स्फोटापेक्षां खाणींतील खडक अगर खनिज पदार्थ एकदम ढांसळून पडल्यामुळें अधिक होतात असें आढळून आलें आहे. याशिवाय कामकऱ्यांच्या हलगर्जीपणामुळेंहि अपघात घडून येतात. खाणीविषयक कायदा अमलांत आल्यानें खाणींत शुद्ध हवेचा पुरवठा, करणें, सुरक्षित कंदिलांचा सार्वत्रिक प्रचार गोष्टींकडे विशेष लक्ष्य देणें खाणीवाल्यांनां भाग पडूं लागलें आहे.

खाणींतील अनूप वायूमुळें खाणींत प्राणघातक वायू उत्पन्न होतात व खनिजपदार्थांच्या कणांशीं त्यांचा संयोग होतांच स्फोट होतो. कित्येक वेळां दगडी कोळशांच्या कणांमुळेंच स्फोट होतो. खाणींतील दिवे जर सुरक्षित असे नसतील तर अनूपवायु व साधी हवा यांच्या संयोगामुळेंहि स्फोट उत्पन्न होतो. कोरड्या व कणविहीन खाणीमध्यें जिकडे तिकडे पाणी शिंपून अपघातांचें प्रमाण कमी करतां येतें. ज्या ठिकाणीं अग्निमुळें प्राणघातक वायु पुष्कळ उत्पन्न होण्याचा संभव असतो अशा ठिकाणीं सुरक्षित दिव्याचा उपयोग करणें अत्यावश्यक आहे. खाणीमध्यें आगपेट्या व साधे दिवे वापरणें अत्यंत घातुक आहे.

खाणीमध्यें अगदीं साध्या कारणामुळें सुद्धां आग लागण्याचा संभव असतो. पण त्याशिवाय अग्निमुळें उत्पन्न होणाऱ्या प्राणघातक वायूमुळें, अगर दिव्यांतील गॅस सोडण्याकरतां केलेल्या नळीशीं दगडी कोळशाच्या कणाचा संयोग झाल्यामुळेंहि आग लागते. कांहीं खाणींत केवळ कोळशाच्या कणांच्या घर्षणानेंच आग लागतें. भूगर्भांतील खाणींत आग लागली असतां ती पाण्यानें विझवणें पुष्कळवेळां अतिशय अवघड जातें. अशा वेळीं आग विझेपर्यंत खाणी बुजविण्याशिवाय गत्यंतरच नसतें. पण ज्यावेळीं हेंहि शक्य नसतें त्यावेळीं खाणींच्यावर पाण्याचा सांठा करून तो खाणीमध्यें सर्व मार्गांनीं सोडून देण्याची युक्ति अंमलांत आणावी लागते. म्हणजे खाणी जलमय करून टाकणें हा अगदीं शेवटचा उपाय होय.

कांहीं वेळां खाणीमध्यें एकदम पाणी येऊन खाणी पाण्यानें भरून जातात व खाणीचें फार नुकसान होतें. भयंकर पर्जन्यवृष्टीमुळें अगर नद्यांनां पूर आल्यामुळें असे प्रकार घडून येतात. भूगर्भांत पाण्याचे संचय पुष्कळ असले तरी देखील खाणीमध्यें पाणी येण्याचा संभव असतो. भूपृष्ठावरील पाणी खालीं शिरूं नये यासाठीं ठिकठिकाणीं पाणी सांचवून तें खाणीच्या क्षेत्राच्या बाहेर सोडण्याची सोय केलेली असते. नद्यांच्या अगर समुद्राच्या खालीं खाणी खणण्याचें काम शक्य असतें असें प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध झालें आहे.

ज्या वेळीं खाणी खणण्याचें क्षेत्र विस्तृत असतें पण वरचा भाग तोलून धरण्याकरतां मधून मधून ठेवलेले खांब बारीक असून वरील वजन तोलून धरण्याला असमर्थ असतात त्यावेळीं वरचे खडक कोसळून विवर पडतें. एखादेवेळीं खाणींत माणसें काम करीत असतांनाच वरून कांहीं भाग कोसळून पडतो व खाणींतल्या वाटा बुजल्या जातात. पण अजीबात सर्व वाटा बंद झाल्याचे प्रसंग फारच क्वचित येतात.

खा णी वि ष य क आ रो ग्य शा स्त्र.—खाणींतील हवा मूळच्या व आगंतुक कारणांनीं दूषित होत असल्यानें अगर ज्या प्रदेशात खाणी खणण्याचें काम चालू असतें त्या प्रदेशातील हवामानामुळें खाणींत काम करणाऱ्या लोकांनां कांहीं रोग होतात. कॉर्नवाल, दक्षिण आफ्रिका इत्यादि ठिकाणच्या खाणींत काम करणाऱ्या लोकांत क्षयाचें प्रमाण उत्तरोत्तर वाढत चालल्याचें आढळून आलें आहे. खाणींत काम करतांना जी धूळ उडते तिच्यामुळें हा रोग मुख्यत्वेंकरून जडतो. खाणी उघडण्याचें काम शक्य तितक्या लवकर व्हावें या हेतूनें अनेक ठिकाणीं यंत्रांच्या योगानें खड्डे खणण्याची जी प्रवृत्ति खाणीवाल्यांत दिसून येते त्यामुळें सुरुंग उडतांच दारू व धूळ पूर्णपणें नाहींशी होण्याच्या पूर्वीच मजुरांना काम करणें भाग पडतें. त्यामुळें वाईट श्वासोच्छ्वास केल्यामुळें शरीरावर वाईट परिणाम घडून येतो. कर्बएकप्रणिदा(कार्बन मॉनॉक्साइड)मुळें मजुरांच्या शरीरावर फार घातुक परिणाम होतो असें अनुभवास आलें आहे. खालील दमट हवेंत काम करून वर येतांच एकदम गार हवा लागली असतां शरीरप्रकृतीला तें अत्यंत अपायकारक

होतें. कांहीं खाणींमध्यें, ' अँकीलास्टोमियासिस ' हा रोग अतिशय फैलावला आहे.

अर्थातच अशा प्रकारच्या रोगाला प्रतिबंध करण्याकरितां शक्य ते उपाय अंमलांत आणण्यांत आले आहेत. खाणीविषयक आरोग्यशास्त्रांत पारंगत असे वैद्य प्रत्येक खाणींत नेमण्यांत आलेले आहेत खाणींत काम करणाऱ्यांनां आरोग्य शास्त्राचें थोडेसें शिक्षण देण्याची व त्यांनां आरोग्यशास्त्राचें महत्त्व समजावून देण्याची कल्पना हल्लीं खाणीवाल्यामध्यें पसरत चालली आहे.

खाणीविषयक कायदा.—खाणी या स्थावर मालमत्तेंत मोडत असल्याकारणानें स्थावर जिंदगीला जो कायदा लागू तोच खाणींतहि लागू आहे. इंग्लंडांतील ' कॉमन लॉ 'प्रमाणें जमिनीच्या मालकाची जमिनीच्या गर्भांतील खाणींवरहि मालकी असते. पण प्राचीन काळापासून सोन्यारुप्याच्या खाणीवर मात्र राजाची सत्ता होती. सार्वजनिक अगर सरकारी जमिनीच्या खालीं असलेल्या खाणीवर सरकारची मालकी असते व अशा प्रकारची जमीन दुसऱ्याला विकत देताना जमिनीखालील खाणींचा हक्क आपल्याकडे सरकारनें ठेऊन घेतल्याचीं उदाहरणें आहेत. खाणींतील खनिज पदार्थ बाहेर न काढतां तसेंच राहूं देणें हें लोकहितानें नसतें हें तत्व प्राचीन काळापासूनच सर्वमान्य असल्याचें दिसतें; व यासाठीं खनिखोदनाला उत्तेजन देण्यासाठीं मुद्दाम सवलतीचे कायदेहि सर्व देशांत करण्यांत आलेले आहेत. पुष्कळदां खनिखोदनाच्या कार्यांत सरकारनें अगर एखाद्या राजानें आपला हिस्सा ठेवल्याचीं उदाहरणेंहि आढळतात. पण खाणीवाल्यांनांच त्यांनीं खणून काढलेल्या संपत्तीचा उपभोग घेऊं देणें हें सरकारच्या व लोकांच्या दृष्टीनें फायदेशीर असते असें अनुभवास आलें आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतील खाणीविषयक कायद्यांचें पर्यालोचन करतां हल्लीं बहुतेक सर्व राष्ट्रांत वरील तत्व अमलांत आल्याचें दिसून येतें व याचा परिणामहि चांगला झाल्याचें रॉकी माउंटनमधील खाणींच्या व आस्ट्रेलिया व अलास्का येथील खाणींच्या इतिहासावरून आढळून येतें.

हिंदुस्थानात फार प्राचीन काळापासून खनिखोदनाचा धंदा चालू होता असें दिसतें. ख्रि. पू. चौथ्या शतकामध्यें कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्र नामक ग्रंथांत खनिखोदनाच्या संबंधीं एक स्वतंत्र प्रकरण घातलें आहे. त्यांत खनिज पदार्थांचे गुणधर्म, खनिज पदार्थांच्या जाती वगैरेसंबंधानें विवेचन आलें असून राजानें आपले अधिकारी नेमून खनिखोदनाचें काम चालू करावें असें कौटिल्यानें म्हटलें आहे.त्यावरून त्याच्यापूर्वीपासूनच खाणी खोदण्याचा धंदा हिंदुस्थानांत चालू असावा असें दिसून येतें.खनिखोदनाच्या कामीं राजानें जो अधिकारी नेमावयाचा तो ' शुल्बधातुशास्त्र ' तांबें व इतर धातु यासंबंधींच्या शास्त्राची माहिती असणारा, अशुद्ध धातू शुद्ध करणें, दगडांची परीक्षा करणें इत्यादि शास्त्रांत पारंगत असणारा असला पाहिजे असें कौटिल्यानें म्हटलें आहे. तसेंच या अधिकाऱ्यानें आपल्या हाताखालीं खोदन शास्त्रपारंगत अशा तज्ज्ञांना नेमून नंतर कोणत्या ठिकाणीं कोणत्या खाणी उपलब्ध होतील यासंबंधाचा शोध केला पाहिजे असेंहि त्यानें म्हटलें आहे. पुढें त्यानें आपल्या ग्रंथांत खाणी शोधून काढण्याचे निरनिराळे प्रकार सांगितले आहेत. त्यावरून खनिखोदनासंबंधीं पूर्वी हिंदुस्थानांत बरीच प्रगति झाली होती असें दिसून येतें. अशोकाच्या कारकीर्दींत खनिखोदनाचें स्वतंत्र खातें होतें अशी आपल्याला माहिती मिळते.

हिंदुस्थानांत आलेले चिनी प्रवाशी, अशोकाच्या खनिखोदन खात्यासंबंधानें फार चांगले उद्गार काढतात. अशोकानें या खात्यांत उत्तम प्रकारचे खनिशास्त्रज्ञ व खाणीवर देखरेख करणारे अधिकारी नेमले होते. खनिखोदनाला लागणारी प्रयोगशाळाहि त्यानें स्थापन केली होती. खनिखोदन खात्यांतील आपल्या अधिकाऱ्यांच्या उपयोगार्थ अशोकानें एक चोपडें तयार केलें होतें. हें चोपडें हल्लीं सांपडलेलें आहे व त्याचें भाषांतर म्हैसूर सरकाराच्या मार्फत होत आहे. चिनी प्रवाशाच्या हकीकतीवरून असें दिसून येतें कीं अशोकाच्या वेळीं ओरिसांत पुरी हें बंदर फार प्रसिद्ध असून, त्या ठिकाणीं चिनी व्यापारी येत असत व त्या ठिकाणीं सोन्याचांदीची देवाणघेवाण होत असे.

[संदर्भ ग्रंथः—गॅलोवे–लेक्चर्स ऑन माइनिंग (कार्डिफ १९००); ह्यूझेस–कोल माइन (लंडन १९०४); इलसेंग–ए मॅन्युअल ऑफ माइनिंग (न्यूयॉर्क १९०५); लॉन–माइन ॲकाउंटस् अँड माइन बुक कीपींग (लंडन १८९७); लप्टन–माइनिंग (लंडन १८९९); टी. ए. रिकर्ड–दि सँपलिंग अँड एस्टिमेशन ऑफ ओअर इन माइन (न्यूयॉर्क१९०४); एंजीनिअरिंग अँड माइनिंग जर्नल (न्यूयॉर्क वीकली); माइन्स अँड मिनरल्स (मासिक–स्क्रँटन, पेन्सिलव्हानिया); दि माइनिंग अँड सायंटिफिक प्रेस (साप्ताहिक सान–फ्रान्सिस्को).].

खनिजविज्ञान.—पृथ्वीच्या पाठीवर सांपडणाऱ्या खनिज द्रव्यांच्या जाती व वर्गीकरण, तीं सांपडण्याचीं स्थानें, त्यांचे गुणधर्म व उपयोग यासंबंधींच्या सामान्य तत्वांचें या शास्त्रांत विवेचन केलेलें असतें. हीं खनिज द्रव्यें कोणत्या घटकांचीं (किंवा मूल द्रव्यांचीं) बनलेलीं असतात हा रसायन शास्त्राचा विषय आहे. खनिजद्रव्यांच्या ठिकाणीं असणारे पारदर्शकत्व व दुसरे तत्सदृश गुणधर्म यांच्या संबंधाची माहिती पदार्थविज्ञानशास्त्राच्या सहाय्यानें प्राप्त होते. खनिज स्फटिकासंबंधानें स्फटिकशास्त्रां(क्रिस्टलोग्रफी)त माहिती संगृहीत केलेली असते; हीं खनिज द्रव्यें कशीं तयार होतात व त्यांच्याजवळ सांपडणारीं इतर द्रव्यें व त्यांचे निरनिराळे प्रकार (पर्याय) इत्यादिकांसंबंधीं माहिती भूस्तरशास्त्रांत दिलेली असते आणि विशिष्ट द्रव्यें पृथ्वीच्या कोणत्या भागांत

१–२. कोळशाच्या खाणीचा उभा व आडवा छेद

खनिखोदनशास्त्र.

३. खनिखोदन

(१) वर इंजिनची खोली आहे. या इंजिनानें पाळणे चालतात, कोळसा वर ओढून घेतात व खाणींत वारा खेळवितात. खाणींत बांगड्यांप्रमाणें एकावर एक रस्ते आहेत.

(२) सर्वत्र कोळसा एका भागांत नसतो, त्यामुळें ठिकठिकाणीं पोखरावें लागतें. बरेचसे थर एकावर एक समांतर असून त्यांमध्यें दगडमातीचे थर असतात. यामुळें कोळशाची खाण एका विस्तीर्ण शहरासारखी दिसते; तींत रस्ते व त्यांवर वाहतूक असते. रस्ते एकावर एक पांच सहा मजलेपर्यंत सुद्धां असतात.

(३) कोळशाचे थर कोणत्या जातीचे व किती खोलीवर आहेत हें समजण्यासाठीं जमीनींत छिद्र पाडावें लागतें [खनिखोदनशास्त्र, पृ. ४० पहा].

सांपडतात यासंबंधाची माहिती भूगोलशास्त्रांत दिलेली असते. हे पदार्थ कोणत्या रीतीनें खणून काढावेत, अशुद्ध धातूपासून शुद्ध धातु कसे तयार करावेत, त्या धातूंचा इमारती, अलंकार इत्यादिकांकडे उपयोग व त्यांचा निरनिराळ्या देशांत खप वगैरेसंबंधानें खनिखोदनशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादि शास्त्रांत विवेचन केलेलें असतें. प्रस्तुत स्थलीं खनिज पदार्थासंबंधीं ठोकळ माहिती दिली आहे.

इतिहासः—कित्येक खनिज द्रव्यांचा अनेक प्रकारें मनुष्यास उपयोग होत असल्याकारणानें व अलंकारांत यांतील कांहीं वापरले जात असल्यानें फार प्राचीन काळापासूनच मानवी प्राण्यांचें लक्ष्य या पदार्थांकडे वेधलें आहे. पाषाणाचीं आणि ब्रॉंझ (पंचरसी) धातूचीं शस्त्रें हल्लीं उपलब्ध झालीं आहेत; व हीं शस्त्रें प्रागैतिहासिककालीन मनुष्यांचीं आहेत असें तज्ज्ञांचें मत आहे. यावरून फार प्राचीन काळापासून मनुष्यांस खनिज विज्ञानाचें थोडें फार ज्ञान होतें असें दिसून येतें. या शास्त्रावर सर्वांत जुना व सध्या उपलब्ध असलेला असा एक ग्रंथ थिओफ्रेस्टस यानें इसवी. स. पूर्वी ३१५च्या सुमारास लिहिला; या ग्रंथाच्या कांहीं भागाचें इंग्रजीत भाषांतर झालें आहे. त्या काळीं खनिज द्रव्याचें तीन भाग केले होते ते पाषाण, धातु आणि मृत्तिका हे होते. इ. सन ७७ च्या सुमारास प्लिनी या नांवाच्या प्रसिद्ध ग्रंथकर्त्यानें हिस्टोरिआ न्याचऱ्यालिस या नांवाचा एक महत्त्वाचा ग्रंथ तयार केला; या ग्रंथाचीं अनेक खंडें आहेत. त्यांतील शेवटच्या पांच खंडांत धातु, अशोधित धातु, रत्नें आणि मृत्तिका यांच्या संबंधाची माहिती दिली आहे. अरबी सत्ता त्रिखंड पसरली असतां अरब लोकांनीं जुन्या ग्रीक आणि रोमन ग्रंथांचें भाषान्तर करून अनेक शास्त्रांचा अभ्यास सुरू केला व त्यांनीं शास्त्रीय ज्ञानांत बरीच भर घातली. सन १२६२ च्या सुमारास अल्बर्टस म्याग्नस यानें या विषयावर एक ग्रंथ लिहिला या ग्रंथाचें नांव डी मिनरॅलिबस असें आहे. १६ व्या शतकात जार्जिअस अग्रिकोला यानें याच्या संबंधानें कित्येक ग्रंथ प्रसिद्ध केले. यांत खाणी, धातु, अशोधित धातु, इत्यादिकांसंबंधानें बरीच माहिती दिली होती. याच सुमारास (१५६५) के. गेस्नर यानें एक ग्रंथ लिहून खनिज द्रव्यांसंबंधानें पद्धतशीर माहिती दिली आहे. सन १६०९ सालीं अॅन्सेल्म बोइथस डी बूट यानें मौल्यवान खड्यासंबंधानें ग्रंथ लिहिला आहे. इरास्मस बार्थोलिनस यानें आइस लंड-स्पारसंबंधानें शोध करून त्यासंबंधाची माहिती देणारें पुस्तक प्रसिद्ध केलें. सन १७२५ सालीं जे. एफ हेन्केल यानें आणि सन १७३५ सालीं सी. लिनिअस यानें प्रत्येकीं एकेक पुस्तक प्रसिद्ध करून या शास्त्रासंबंधानें जास्त माहिती उपलब्ध केली. हा काळपर्यंत खनिज द्रव्यांच्या बाह्य आकारावरून त्यांचें वर्गीकरण केलें जात असे. जे. जी. वालेरिअस या स्वीडिश शास्त्रज्ञानें रासायनिक गुणधर्मांकडे लक्ष्य(१७४७) पुरविलें. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत रासायनिक पद्धतीकडे लक्ष्य पुरविलें गेलें नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभास स्फटिकशास्त्राचा पाया घालण्यांत आला. रोमे डील आइल्ले आणि आर. जे. हाउये यांनीं स्फटिकशास्त्रास सुरवात केली. त्या योगानें रसायन शास्त्राचा खनिजविज्ञानांत मोठ्या प्रमाणांत प्रवेश झाला. सन १८०९ सालीं डब्ल्यू. एच्. वॉल्यास्टन यानें परावर्तक कोनमापक (रिफ्लेक्टिंग गॉनिओमीटर) शोधून काढल्यापासून स्फटिकाचे कोन अगदीं बरोबर मोजतां येऊं लागले व त्या योगानें स्फटिकशास्त्रास अत्यंत मदत झाली. समाकारत्व (इसोमॉर्फिझम) आणि द्व्याकारत्व (डायोमॉर्फिझम) यांच्या संबंधानें इ. मित्सशर्लिश यानें अनुक्रमें १८१९ आणि १८२१ सालीं सिद्धान्तस्वरूपानें माहिती प्रसिद्ध केल्यापासून या शास्त्रांतील बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला व त्या योगानें या शास्त्राचें पाऊल पुढें पडण्यास पुष्कळ मदत झाली. याच सुमारास इ. एल्. मालूस यानें असें दाखवून दिलें कीं, कांहीं खनिज स्फटिकांच्या योगानें प्रकाशाचें ध्रुवीभवन होतें व सन १८६७ सालीं ए. डेस्. क्लॉइझो यानें स्फटिकाचे अति पातळ छेद सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं तपासण्याचें काम करून त्या त्या द्रव्यांचे प्रकाशगुणक (ऑप्टिकल कॉन्स्टंट) निश्चित केले. या पोटविषयासंबंधानें जरूर तेथें ऐतिहासिक माहिती देण्याचें योजिलें आहे.

खनिज द्रव्यांचे विशेष गुणधर्म.—प्रथमतः आपणांस खनिज पदार्थांमधील महत्त्वाचे गुणधर्म कोणते आणि गौण गुणधर्म कोणते याबद्दल विवेचन केलें पाहिजे. महत्त्वाच्या गुणधर्मांत रासायनिक घटना, स्फटिकाचा विशेष आकार व स्फटिकविशिष्टगुणधर्म आणि गुरुत्वविशिष्टत्व यांचा समावेश होतो. एकाच जातीच्या निरनिराळ्या नमुन्यांत हे गुणधर्म बहुतेक सारखे असतात व त्यांत फरक पडल्यास विशिष्ट मर्यादेपेक्षां जास्त प्रमाणावर फरक पडत नाहीं. गौण गुणधर्मांत रंग, तेज, काठिण्य, आकार (अर्थात् स्फटिकरहित आकार) इत्यादि गुणधर्मांचा समावेश होतो. हे गुणधर्म त्या पदार्थांत असणाऱ्या अशुद्ध द्रव्यावर अवलंबून असतात. अगदीं शुद्ध स्वरूपांत व पारणत स्फटिकरूपांत खनिज द्रव्य घेतल्यास (किंवा तयार करविल्यास) हे सारे गुणधर्म एकसारखे असतात. परंतु अगदीं शुद्ध असें खनिज द्रव्य नैसर्गिकरीत्या सृष्टींत सांपडणें बरेंच अशक्य असतें व असले स्फटिक ज्या रीतीनें तयार झाले असतील त्या रीतीवरहि हे गुण कांहीं प्रमाणावर अवलंबून असतात.

आकारवैशिष्ट्यः—जर द्रव्य स्फटिक स्वरूपांत असेल तर आकारवैशिष्ट्य गुण दिसून येतो; परंतु कोणत्याहि द्रव्याच्या ठिकाणीं स्फटिकत्व असेलच असें नाहीं. ज्यांची रासायनिक घटना एक आहे त्या द्रव्यांचे स्फटिक अगदीं सारखे असतात. परंतु दोन स्फटिकांच्या ठिकाणीं समाकारत्व असल्यास त्या दोन स्फटिकांची रासायनिक मूळ

द्रव्यें एकच असतात असें यावरून कोणीहि समजूं नये. उदाहरणार्थः–सिल्व्हर आयोडाइड, झिन्क आक्साइड आणि झिंक सल्फाइड स्फटिक अगदी सारखे असतात परंतु त्याचे रासायनिक घटकावयव अगदीं भिन्न आहेत हे उघड आहे. स्फटिक मोठे आणि उत्तम प्रकारें विकास पावलेले असे असल्याखेरीज त्याचा आकार किंवा त्याच्या बाजवाचा कोन यथायोग्यपणें समजत नाहीं. असो. स्फटिकाच्या आकारावरून ठोकळ मानानें खनिज द्रव्याच्या सहा जाती केल्या आहेत.

प दा र्थ वि ज्ञा न शा स्त्र दृ ष्ट्या गु ण ध र्म.—खनिज द्रव्यांतून प्रकाश गेला असता त्या प्रकाशावर जो परिणाम होतो तो शास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे. जें खनिज द्रव्य अपारदर्शक असतें त्या खनिज द्रव्याचे अगदीं पातळ पापुद्रे (थर) घेऊन त्यातून प्रकाश पाठवितात व प्रकाशावर काय परिणाम होतो हें पहातात. वक्री भवनाचा गुणक (रिफ्रॅक्टिव्ह इंडेक्स) द्विवक्रीभवनाचें (डबल रिफ्रॅक्शन) सामर्थ्य, प्रकाश-अक्षाचा(ऑप्टिक ॲक्शल अँगल) कोन व द्रव्याच्या कांहीं बाजूवर प्रकाशकोनाचा अभाव इत्यादि गुणधर्मांचें अगदीं बरोबर रीतीनें मोजमाप करतां येतें. पारदर्शकत्व या गुणाचें मापन करून त्या योगानें खनिज द्रव्याच्या जातीसंबंधीं अनुमान काढतात. रंगाकडेहि विशेष लक्ष पुरवावें लागतें. परंतु रंग हा महत्वाचा गुणधर्म नसून त्याची गौण गुणधर्मात गणना केली आहे; कारण रंगाचे प्रकार आणि छटा अनेक आहेत व एकाच द्रव्याच्या अंगीं भिन्न भिन्न रंग व छटा असूं शकतात. एखाद्या द्रव्यांत भिन्न भिन्न जातीचीं विभिन्न द्रव्यें अति सूक्ष्म प्रमाणांत असतात व या सूक्ष्म द्रव्याच्या योगानेंहि पदार्थास निरनिराळे रंग व छटा येतात. द्रव्यास रंग आणणारे पदार्थ इतक्या सूक्ष्म प्रमाणात असतात कीं, त्याचे पृथक्करण करून ते निश्चित प्रमाणात ठरविणें कठिण असतें. हिरे आदीकरून मौल्यवान वस्तूंची किंमत त्यांच्या रंगावर आणि पाण्यावर अवलंबून असते. वर सांगितलेंच आहे कीं, रंग हा खनिज द्रव्यांच्या संबंधानें क्षुल्लक गुणधर्म गणला आहे, म्हणजे रंगावरून खनिज द्रव्याची योग्य पारख होऊं शकत नाहीं. पारदर्शक स्फटिकाकडून निरनिराळ्या दिशेनें येणारे प्रकाशकिरण भिन्न भिन्न प्रमाणांत अपशोषण केले जातात, यामुळें स्फटिकाकडून निरनिराळ्या दिशेनें भिन्न भिन्न रंगांची किरणें बाहेर पडतात; याला द्विवर्णत्व (डायक्रोइझम) किंवा बहुवर्णत्व (प्लिक्रोओइझम) असें नांव दिलें गेलें आहे. खनिज द्रव्याचा खरा रंग कळण्याकरिता त्या द्रव्यांवर घर्षणानें चरा (रेघ) पाडून त्याचा रंग पहाण्याचा प्रघात आहे. एखाद्या खनिज द्रव्याची चकाकी किंवा तेज पाहून त्यावरूनहि त्या द्रव्याच्या विषयीं अनुमान काढता येतें. परंतु या योगानें शास्त्रीय परीक्षा योग्य प्रकारें होईलच असें नाहीं. कित्येक खनिजद्रव्यें लोहचुंबकाकडून जोरानें आकर्षिलीं जातात. तसेंच भिन्न भिन्न खनिज द्रव्यें भिन्न भिन्न प्रमाणांत विद्युत्प्रवाहास विरोध करितात. ज्या द्रव्यांच्या अंगीं धातूप्रमाणें तेज असतें. त्या खनिज द्रव्यांपैकीं बऱ्याच द्रव्यांच्या अंगीं विद्युद्ग्राहक गुण असतो; इतरांच्या अंगीं बहुतकरून विद्युद्विरोधक गुण असतो. उदाहरणार्थ ग्राफाइटच्या अंगीं विद्युद्ग्राहक गुण आहे, परंतु हिऱ्याच्या अंगीं विद्युद्विरोधकत्व आहे. कित्येक खनिज स्फटिक उष्णतेच्या किरणांस आपल्यांतून अव्याहत जाऊं देतात. कांहीं खनिज द्रव्यांचे वितळण्याचे बिंदू पुढें दिले आहेतः—

	°	
स्टिब्नैट	५२५	शतांश
नाट्रोलैट	९६५	,,
आल्मान्डाइन	१२६५	,,
आक्टिनोलाइट	१९९६	,,
आर्थोक्लेज	११७५	,,
ब्रान्झाइट	१३००	,,
क्वार्टझ	१४३०	,,

यांपैकीं पहिला स्टिब्नैट हा मेणबत्तीच्या ज्वालेंत वितळूं शकतो; परंतु शेवटचा क्वार्टझ हा अति प्रखर ज्वालेंत सुद्धा (भट्टीच्या ज्वालेंत) सुद्धां मोठ्या कष्टानें वितळूं शकतो.

अ ण्वा क र्ष णा व र अ व लं बू न अ स णा रे गु ण ध र्म.—कित्येक खनिज द्रव्यांच्या अंगीं उत्तम प्रकारची स्थितिस्थापकता असते;असलीं द्रव्यें वांकविलीं असतां वांकतात परंतु त्यांच्यावरील दाब काढून घेतला असतां ती मूळचा आकार धारण करितात. अभ्रक हें अशा प्रकारचें द्रव्य आहे. दुसरीं कांहीं द्रव्यें सहज वांकवितां येतात; परंतु हीं परत पूर्वस्थितीला जात नाहींत. अशा प्रकारच्या द्रव्यांना लवचीक द्रव्यें म्हणतात. टाल्क हें या वर्गातील द्रव्य होय. क्लोरार्गिराइटसारखीं कांहीं द्रव्यें सुरीनें कापतां येतात. कांपतां कपतां हीं द्रव्यें फुटत नाहींत. या छेदनशीलतेच्या गुणाशीं संबद्ध असे दुसरे गुण म्हणजे घनवर्धनीयता (उदाहरण आर्जेन्टाइट) व तन्तुभवनयोग्यता (उ० चांदी) हे होत. निरनिराळ्या खनिज द्रव्यांच्या चिवटपणांत अथवा ठिसूळपणांत पुष्कळच फरक दिसून येतो. खनिज द्रव्य फुटलें असतां फुटलेल्या तुकड्यांचें छेदांग द्रव्यभेदाप्रमाणें भिन्न स्वरूपाचें दिसतें. या कारणानें छेदांगाच्या स्वरूपावरून द्रव्य कोणतें तें निश्चित करण्यांत मदत होते. स्फटिकीभूत खनिजांचा असा एक महत्वाचा नैसर्गिक धर्म आहे कीं, त्यांनां फोडल्यानें जे त्यांचे खंड होतात त्यांचा प्रत्येकाचा कांहीं विशिष्ट निश्चित आकार असतो व द्रव्यभेदाप्रमाणें तो भिन्न भिन्न असतो. उदाहरणार्थ गलीना द्रव्याचे खंड नेहमीं घनाकार पडतात. या खंडधर्मावरून खनिज द्रव्यें ओळखण्यास फार मदत होते. खनिजांचा आणखी एक महत्वाचा गुण म्हणजे टणकपणा, दार्ढ्य किंवा काठिण्य होय.

खनिजपरीक्षणाच्या कामीं या कमी अधिक गुणाचा उपयोग करण्याचा फार प्रघात आहे. द्रव्याचें कमीअधिक काठिण्य एका पदार्थानें दुसऱ्या पदार्थावर चरा उठण्याच्या क्रियेवरून ठरविलें जातें. एका स्फटिकाचें काठिण्य व त्याच जातीच्या मृत्तिकायुक्त स्फटिकसमूहांचें काठिण्य वेगवेगळें असतें. ही गोष्ट परीक्षण करतांना लक्षांत ठेवावी लागते. एफ् मोह् यानें १८२० मध्यें एक काठिण्यक्रमपत्रक तयार केलें. या पत्रकावरून खनिजांचें कमीअधिक काठिण्य आंकड्यांनी सांगतां येतें.

मोह् यांचें काठिण्यक्रमपत्रकः—१ टाल्क (संगजिरा) २ जिप्सम (शिरगोळा), ३ काल्साइट (चुना, खडू इत्यादि), ४ फ्लुअर स्पार (गारगोटीसारखें एक द्रव्य), ५ ॲपाटाइट, ६ आर्थोक्लेज, ७ क्वार्ट्झ (चकमकी वगैरे), ८ टोपॅझ (पुष्पराग) ९ कोरंडम (नीलमणि), १० हिरा. या यादींत टाल्क सर्वांत नरम (काठिण्य = १), जिप्सम त्याहून कठिण (काठिण्य = २) व या क्रमानें हिरा सर्वांत कठिण (काठिण्य = १०) समजावा. जिप्समच्या तुकड्यानें टाल्कला खरवडलें तर चरा उठतो. याप्रमाणें प्रत्येकासंबंधानें समजावें. शेवटचा हिरा हा सर्वांत जास्त कठिण आहे हें उघड आहे. या यादीप्रमाणें एखाद्या खनिजानें जिप्समवर चरा पडत असला व काल्साइटचा या खनिजावर चरा पडत असला तर त्याचें काठिण्य २ व ३ यांच्यामध्यें म्हणजे अडीच आहे असें मानतात.

विशिष्टगुरुत्वः—घनत्व किंवा विशिष्टगुरुत्व हा गुण फार महत्वाचा आहे. खनिज द्रव्याची (रासायनिक) घटना सारखी असेल तर विशिष्टगुरुत्व मापून त्यायोगानें पदार्थाविषयीं अनुमान काढतां येतें. हें विशिष्टगुरुत्व मापण्याच्या मुख्य तीन रीती आहेत. जलाचा उपयोग करून मापण्याची पद्धत, पिक्नामिटर नांवाचें गुरुत्वमापक यंत्र व जड द्रवरूप पदार्थांचा उपयोग करून विशिष्टगुरुत्व काढण्याची रीत. खनिज द्रव्याचा तुकडा मध्यम आकाराचा असेल तर जलाचा उपयोग करून विशिष्टगुरुत्व काढतां येतें. जर खनिज द्रव्याचे अगदीं बारीक तुकडे असतील तर पिक्नामिटरचा उत्तम उपयोग होतो. द्रवरूप जड पदार्थांच्या योगानें लवकर आणि अतिसुलभतेनें विशिष्टगुरुत्व काढता येतें. हें कसें काढतात याविषयीं थोडक्यांत पुढें माहिती दिली आहे. मिथिल आयोडाइड नांवाचें स्वच्छ, प्रवाही जड द्रव्य आहे. याचें विशिष्टगुरुत्व ३.३३ आहे. यांत बेन्झिन नांवाचा द्रव थेंबथेंब घालून त्याचें विशिष्टगुरुत्व वाटेल तितकें कमी करतां येतें. खनिज द्रव्याचा एक लहानसा तुकडा घेऊन तो मिथिल आयोडाइडमध्यें घालतात. जर त्या तुकड्याचें विशिष्टगुरुत्व मिथिल आयोडाइडपेक्षां कमी असेल तर तो तुकडा त्या द्रवावर तरंगतो, परंतु त्या द्रवांत बेन्झिन थेंब थेंब घालून त्या द्रवाचें गुरुत्व योग्य तितकें कमी केलें तर तो तुकडा त्या मिश्रणांत बुडूं शकतो. अशा प्रकारें त्या मिश्रणांत बेन्झिनचे किती थेंब मिळविले असतां योग्य त्या प्रकारचें विशिष्टगुरुत्व येतें हें काढतात व त्यावरून त्या मिश्रणाचें विशिष्टगुरुत्व काढतां येऊन त्या योगानें खनिज द्रव्याचें विशिष्ट गुरुत्वहि निश्चित करता येतें. मिश्रणाचें गुरुत्व निश्चित करण्याची दुसरी एक पद्धत आहे; त्या मिश्रणाचें वजन करितात व त्यांतून मिळविलेल्या बेन्झिनचें वजन वजा करितात; त्या योगानें मिथिल आयोडाइड आणि बेन्झिन यांचें प्रमाण कळतें व त्यावरून त्या मिश्रणाचें विशिष्टगुरुत्व कळतें. याखेरीज ज्याचें विशिष्ट गुरुत्व निश्चितपणें माहीत आहे असे कांहीं तुकडे जवळ ठेवलेले असतात. उदाहरणार्थ पुढील द्रव्याचे तुकडे विशिष्ट गुरुत्व निश्चित करणारे शास्त्रज्ञ बहुधा जवळ ठेवितात.

द्रव्याचें नाव	विशिष्ट गुरुत्व
जिप्सम	२.३२
कोलेमानाईट	२.४२
आर्थोक्लासे	२.५६
क्वार्ट्झ	२.६५
काल्साईट	२.७२
आरागोनाईट	२.९३
फ्रुबेलाइट	३.०२
अपाटाईट	३.२०
डायोटासे	३.३२

वरील द्रव्याचे तुकडे बुडण्याइतकी मिथिल आयोडाइडची स्थिति प्राप्त झाली असतां त्या तुकड्याच्या विशिष्टगुरुत्वाइतकें विशिष्टगुरुत्व किंवा जवळ जवळ तितकें विशिष्टगुरुत्व त्या मिश्रणाचें असतें हें उघड आहे.

स्पर्श चव आणि वास.—खनिज द्रव्याचा स्पर्श, चव किंवा वास घेऊन कित्येकदा त्याची पारख करतां येते. उदाहरणार्थ टाल्क म्हणजे संगजिरा हा हातास मऊ लागतो. परंतु ट्रिपोलाइट व टाकाइट हे हातास खरखरीत लागतात. कित्येक सच्छिद्र खनिज द्रव्यें जिभेस चिकटतात. या प्रकारच्या खनिज द्रव्यांत वाळलेला चिखल आणि हायड्रोफेन हे येतात. रत्नें चकाकतात, व त्यांचा स्पर्श कांचेच्या रत्नांपेक्षां जास्त थंड असतो. बिटुमेन आणि कांहीं चिखल हे पाण्यांत भिजविले असतां त्यांचा एक विशिष्ट वास येतो व त्या योगानें त्यांची पारख करतां येते. पायराइट्स आणि दुसरीं कित्येक खनिज द्रव्यें घांसलीं असतां गंधकमय वास येतो. जीं खनिज द्रव्यें पाण्यांत विरघळूं शकतात त्यांस चव असते.

रा सा य नि क वि शे ष गु ण ध र्म.—रासायनिक गुणधर्म हे फार महत्वाचे आहेत या रासायनिक गुणधर्मांच्या सहाय्यानें आधुनिक खनिजविज्ञानांतील द्रव्यांचें वर्गीकरण बसविलें आहे. तथापि केवळ रासायनिक घटनेच्या योगानें कोणत्याहि द्रव्याची वर्गवारी लावतां येणार नाहीं. कारण

असे कित्येक खनिज पदार्थ आहेत कीं, ज्याच्यांतील रासायनिक घटकावयव अगदीं सारखे आहेत. परंतु त्यांना एकाच वर्गांत घालतां येत नाहीं. उदाहरणार्थ ग्राफाइट (म्हणजे कार्बनची एक जात) आणि हिरा यांचे रासायनिक घटकावयव अगदीं एकच आहेत; परंतु त्या योगानें त्यांचा एकच खनिजवर्ग होऊं शकत नाहीं. कॅल्साइट आणि अरागोनाइट हे दोन्हीहि कॅल्शिअम कार्बोनेट नावाच्या द्रव्यापासून तयार झाले आहेत. परंतु हे दोन्ही पदार्थ भिन्नभिन्न वर्गांत मोडतात. अशा ठिकाणीं खनिजद्रव्याच्या स्फटिकाविषयीं कांहीं माहिती असणें जरूर असतें. खनिज द्रव्याचे घटकावयव एक असतांना सुद्धां तो पदार्थ किती निरनिराळ्या स्फटिकाकृती धारण करूं शकतो याची माहिती असावी लागते.

रसायनशास्त्रास आतापर्यंत उपलब्ध झालेलीं सर्व मूल द्रव्यें खनिजद्रव्यांत सांपडलेलीं आहेत व या मूल द्रव्यांपैकीं कांहीं मूलद्रव्यें आपणास खनिज द्रव्यांतूनच काढून घ्यावीं लागतात कारण तीं द्रव्यें आपणास सेंद्रिय द्रव्यांतून मिळूं शकत नाहींत. नैट्रोजन हा सेंद्रिय द्रव्यांत फार विस्तृत प्रमाणांत आढळतो, परंतु हाच नैट्रोजन खनिजद्रव्यांत सांपडणें अत्यंत दुर्मिळ आहे. कार्बोनेट या नांवाखालीं मोडणाऱ्या खनिज द्रव्यांत कार्बन हा विस्तृत प्रमाणावर सांपडतो. पृथ्वीच्या कठिण कवचांत(खाणी खणत असतांना आपण जों जों पृथ्वीच्या पोटांत जावें तों तों पृथ्व्यन्तर्गत भागाची उष्णता वाढत गेलेली आढळून येते. यावरून शास्त्रज्ञांनीं असें अनुमान बसविलें आहे कीं, पृथ्वीचा पृष्ठभाग घनावस्थेंत असून अंतर्भाग प्रवाही स्वरूपात असावा). कोणकोणतीं द्रव्यें काय प्रमाणांत असावींत याच्या संबंधानें शास्त्रज्ञांनीं प्रायोगिक व इतर प्रमाणाच्या सहाय्यानें पुढील आंकडे प्रसिद्ध केले आहेत. पृष्ठभागांपैकीं शेंकडा ४७ भाग (वजनी) ऑक्सिजन आहे शेंकडा (वजनी) २७ भाग सिलिकान आहे. शेंकडा आठ भाग अल्युमिनम आहे. सिलिकेट किंवा अल्युमिनो सिलिकेट नांवाचीं द्रव्यें खडकासारख्या द्रव्यांतून फार मोठ्या प्रमाणावर आढळतात.

खनिजद्रव्याचे रासायनिक घटकावयव काढण्याकरितां रसायनशास्त्राच्या नेहमींच्या पद्धतीनें पृथक्करण करतात. खनिज द्रव्यांत भिन्न भिन्न प्रकारचीं द्रव्यें मिसळलेलीं असण्याचा बहुधा संभव असतो. म्हणून त्या त्या जातीचें शुद्ध स्वरूपाचें खनिज द्रव्य शोधून काढणें बरेंच कठिण असतें. याच कारणामुळें कित्येक खनिज द्रव्यांची अगदीं बरोबर अशी रासायनिक घटना अद्यापपर्यंत कळली नाहीं. याकरितां प्रथमतः शुद्ध अशा प्रकारचा स्फटिक घेऊन त्याच्या थोड्याशा अंशाचें रासायनिक पृथक्करण करून पहाण्यापूर्वीं त्या स्फटिकाच्या आकारादिकांची उत्तम प्रकारें परीक्षा करून ठेवितात. जेव्हां खनिज पदार्थ अल्प प्रमाणांत उपलब्ध असेल आणि त्याचें गुणविषयक पृथक्करण करावयाचें असेल त्या वेळेस सूक्ष्म रासायनिक पृथक्करणपद्धति आणि वाहकज्वाला याच्या सहाय्यानें पृथक्करण करतात.

समाकारत्वाच्या तत्वाकडे विशेष लक्ष्य दिल्याखेरीज या शास्त्रांशांतील वर्गीकरण कळणार नाहीं. क्वार्ट्झसारख्या खनिज द्रव्यांत समकारत्व दिसत नाहीं म्हणजे त्यांतील भस्म किंवा आम्ल यांची दुसऱ्या खनिज द्रव्यांतील अनाम्ल किंवा आम्ल यांच्याशीं अदलाबदल होऊं शकत नाहीं. परंतु बहुतेक सर्व खनिज द्रव्यांत अशा प्रकारची अदलाबदल नेहमींच होते किंवा झालेली असते. अशा प्रकारच्या अदलाबदलींत बहुतकरून अनाम्लाचीच अदलाबदल होते. कित्येक खनिज द्रव्यांत ही पूर्णपणें न होता फक्त कांहीं अंशानें होते तसेंच ही अदलाबदल किती प्रमाणानें व्हावी याच्या संबंधानें कांहींत निश्चित मर्यादा असते, परंतु कांहींत अशी मर्यादा असत नाहीं न्हांबोहेड्रल कार्बोनेट या नांवाखालीं मोडणाऱ्या खनिज द्रव्यांत अनाम्लाची अदलाबदल विशिष्ट प्रमाणांत होते. परंतु सिलिकेटसारख्या द्रव्यांत अनाम्लाची अदलाबदल अनियमित प्रमाणांत झालेली दिसून येते.

या वरील प्रकाराशिवाय द्विलवण म्हणजे डबलसॉल्ट नांवाचीं खनिज द्रव्यें असतात. द्विलवणत्वविशिष्ट द्रव्यांत डोलोमाइट आणि बारिटो कॅल्साइट हीं दोन द्रव्यें मोडतात.

खनिजद्रव्यांत जल हें कोणत्या प्रकारानें संयुक्त झालें असतें हें ठरवितां येणेंहि कठिण आहे. झिओलाइट नांवाच्या द्रव्यांतील पाणी कमी उष्णमानावर उडून जातें; व हा पदार्थ सल्फ्युरिक ॲसिडाच्या पात्रांत असला तर तें ॲसिड त्यांतील जलाचें शोषण करून घेऊं शकतें व हा पदार्थ अनार्द्र करून (अनाहायड्रस) हवेंत ठेविला तर त्यांत फिरून जलाचा प्रवेश होऊं शकतो. या साऱ्या प्रकारामुळें झिओलाइट किंवा एतत्सदृश द्रव्य यांच्यांतील जलास " स्फटिकीभवनाचें जल " अशी संज्ञा आहे. दुसऱ्या कित्येक द्रव्यांतील जल काढून घेण्यास अति उष्णता लागते म्हणून त्या द्रव्यांतील जलास ' घटनेचें जल ' अशी संज्ञा आहे. कित्येक द्रव्यांत असलेल्या जलापैकीं कांहीं जलांश स्फटिकीभवनाचें जल असतें व कांहीं जलांश घटनेचें जल असतें. खनिज द्रव्यांच्या रासायनिक घटनेसंबंधानें पृथक्करण करून निश्चित असें कांहींच सिद्ध झालें नाहीं. प्रत्येक शास्त्रज्ञाच्या पृथक्करणांत भिन्न भिन्न प्रमाणांत मूलद्रव्यें सांपडलीं आहेत; त्यामुळें यांत अजून पुष्कळ परिश्रम व्हावयास पाहिजेत हें उघड आहे

खनिज द्रव्यें तयार करणें.—प्रयोगशाळेंत खनिज द्रव्यें तयार करण्यांत रसायनशास्त्रज्ञांस बरेंच यश आलें आहे; व या बाबतींत फ्रेंच शास्त्रज्ञ सर्व जगांत सध्यां अग्रेसर आहेत. त्यांनीं बरींच खनिज द्रव्यें तयार केलीं आहेत. या कृत्रिम खनिज द्रव्यांपैकीं बहुतेक सारीं द्रव्यें स्फटिक स्वरूपांत असलेलीं अशीं आहेत. या कृत्रिम स्फटिकांचा आकार

नैसर्गिक स्फटिकापेक्षां थोडासा लहान असतो. परंतु त्यांच्या अंगीं नैसर्गिक स्फटिकांचे सारे गुणधर्म आढळून येतात.

खनिज द्रव्यांचीं मूलस्थानें आणि उत्पत्ति.— कित्येक खनिज द्रव्यें अग्निजन्य खडकांत सांपडतात. या अग्निजन्य खडकांत हीं खनिज द्रव्यें नाना प्रकारांनीं तयार होतात. या अनेक प्रकारांत दाब, उष्ण, वायुरूप द्रव्याचें घनरूप द्रव्यांत रूपांतर होणें, उष्णतेच्या सहाय्यानें रासायनिक क्रिया घडणें, द्रव्य शीत होत असतांना त्याचे स्फटिक तयार होणें इत्यादि अनेक प्रकारांचा समावेश होतो. ज्वालामुखाचा उद्रेक किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें पृथ्व्यंतर्गत द्रव्य बाहेर पडणें किंवा शीत होणें इत्यादि कारणांनीं अग्निजन्य खडक तयार होतात व त्यायोगानेंच हीं द्रव्यें तयार होतात.

आकारवैशिष्ट्यजन्य खडकांत तयार झालेलीं खनिज द्रव्यें:—पृथ्व्यन्तर्गत दाहाच्या योगानें सभोंवतालच्या खडकावर परिणाम होतो व त्यायोगानें सभोंवतालचे खडक भाजून निघतात; या भाजण्याच्या क्रियेनें अनेक प्रकारचीं रूपांतरें होतात.

गाळाच्या थरानें तयार झालेले खडकः—पाऊस, द्रव, हिम, उष्णता, वारा इत्यादि अनेक नैसर्गिक कारणांनीं पृथिवीच्या पृष्ठभागावरील खडक झिजतात व पावसानें हे झिजलेले भाग धुवून जाऊन खोलगट भागांत गाळाच्या रूपानें जमतात; हे एक प्रकारचे खडकच होत. समुद्रादिकांत विद्राव्य झालेलीं खनिज द्रव्यें पाण्यांतून खालीं बसतात व त्यांचे कठिण किंवा मृदु खडक होतात.

रेषास्वरूपाचीं खनिज द्रव्यें:—निरनिराळ्या खडकांतून पाणी पाझरतें. हें पाणी निरनिराळ्या द्रव्यातून फिरत असतांना त्याबरोबर अनेक द्रव्यें विद्रुत होतात किंवा नुसतीं मिश्रित होतात. नंतर हीं विद्रुत झालेलीं किंवा मिश्रित झालेलीं द्रव्यें खडकाच्या भेगांतून बसतात व त्या योगानें अनेक प्रकारच्या खनिज द्रव्यांची उत्पत्ति होते.

खनिज द्रव्यांच्या पोटजाती.—वरील प्रकारांपैकीं कोणत्या तरी एखाद्या प्रकारानें खनिज द्रव्यें उत्पन्न झाल्यानंतर त्यांवर, दाब, उष्णता व विद्रुत स्वरूपांत विशिष्ट द्रव्यें यांच्या योगानें त्या खनिजद्रव्यांच्या स्फटिकाकारांत फेरफार होतात किंवा त्यांच्या रासायनिक घटनेंत बरेच बदल होतात, किंवा मूळचीं खनिज द्रव्यें किंवा त्यांतील कांहीं भाग विद्रुत होतात व नवीन खनिज द्रव्यें तयार होतात.

खनिज द्रव्यांचें नामकरण आणि वर्गीकरण.— खनिज द्रव्यांचा स्फटिकाकार आणि रासायनिक घटना यांच्यावर खनिज द्रव्यांचें वर्गीकरण अवलंबून असतें. ज्या खनिजद्रव्यांची रासायनिक घटना निश्चित असते त्यांच्या जाती थोड्या असतात; परंतु ज्या ठिकाणीं खनिज द्रव्यांच्या घटकावयवांची अदलाबदल झालेली असते त्या ठिकाणीं त्या अदलाबदलीच्या योगानें इतक्या जाती उत्पन्न होतात कीं, खनिज द्रव्यांतील भिन्नभिन्न द्रव्यांचें वैशिष्ट्य दाखवून त्यांचें स्पष्ट वर्गीकरण करणें बरेंच कठिण जातें व कित्येक ठिकाणीं हे बहुतेक अशक्य आहे.

कांहीं स्फटिकांचीं नांवें—चौरस (घन), चतुष्कोण, सरल चतुष्कोण, एकवलनात्मक, षट्कोनाकृति, विषमपार्श्व, असमभुज चतुष्कोण इत्यादि.

खनिज द्रव्यांचें वर्गीकरण.—निसर्गसिद्ध मूलतत्त्वे (अ) अधातुवर्गः—हिरा, ग्रफाइट, गंधक. (आ) अर्धधातुवर्ग — आर्सेनिक, ॲन्टिमनी, बिस्मथ. (इ) धातुवर्गः—सोनें, रुपें, तांबें, प्लाटिनम. या प्रकारानेंच सल्फाईड, ऑक्साईड वगैरेंचें वर्गीकरण करतात.

[संदर्भग्रंथः-डाना—मिनरल्स ॲंड हौ टु स्टडी देम; ग्रौन्स-दि मिनरल्स किंगडम; इडिंग्स—रॉक मिनरल्स, दि मिनरॅलॉजिकल मॅगेझाइन ॲंड जर्नल ऑफ दि मिनॅरॅ सोसायटी; लंडन, ग्रेटब्रिटन, आयर्लंड, फ्रान्स, जपान वगैरे मोठमोठ्या देशांतील खनिज द्रव्यासंबंधीं विवेचनात्मक ग्रंथ स्वतंत्र लिहिलेले आहेत.]

खनियाधान—मध्यहिंदुस्थान एजन्सींतील एक सनदी संस्थान. क्षेत्रफळ सुमारें ६८ चौ. मै. याच्या पूर्वेस झांशी जिल्हा व बाकीच्या बाजूंस ग्वाल्हेर संस्थानचा प्रदेश येतो. ग्वाल्हेरचा रेसिडेंट ब्रि. सरकारतर्फे यावर देखरेख ठेवितो. प्रथम खनियाधान ओर्च्छाचा एक भाग म्हणून असे, पण १७२४ त ओर्च्छाचा महाराजा उदोतसिंग यानें आपला मुलगा अमरसिंग याला हें जहागीर म्हणून देऊन टाकिलें. मराठ्यांनीं ओर्च्छा संस्थान उध्वस्त केल्यावर १७१५त पेशव्यांनीं अमरसिंहाला सनद देऊन जहागिरीवर कायम केलें. तेव्हांपासून झांसी व ओर्च्छा संस्थान यांमध्यें याच्या स्वामित्वाविषयीं तंटे माजूं लागले. १८५४ त झांशी खालसा झाल्यावर त्या वेळच्या खनियाधानच्या संस्थानिकानें निर्भेळ स्वातंत्र्याची मागणी केली; पण पेशव्याचे राजकीय वारसदार म्हणून ब्रिटिशांनीं आपलें स्वामित्व प्रस्थापित करून १८६२ त एक सनद करून दिली. दत्तक घेण्याचा हक्कहि यावेळीं देण्यांत आला. संस्थानिक बुंदेला रजपूत असून त्यांनां जहागीरदार म्हणतात.

संस्थानची लो. सं. (१९ १) १५५२८. लोकसंख्या चांगली वाढती आहे असें मागील खानेसुमारीवरून दिसून येतें. मुख्य भाषा बुंदेलखंडी आहे. शिक्षणाचें प्रमाण शेंकडा एक आहे. मुख्य जाती ठाकुरी व रजपुती असून या सर्व शेतकीवर उपजीविका करतात. संस्थानांत ४९ खेडीं आहेत. जमीन खडकाळ असून दऱ्यांतून मात्र चांगली जमीन आहे. संस्थानचें उत्पन्न सुमारें २५००० आहे. संस्थानिक स्वतः सर्व राज्यकारभार पहातात. खनियाधान हें मुख्य ठिकाण असून त्याची एक किल्ला आहे. लो.सं.(१९०१) २१९२. गावांत एक शाळा व दवाखाना आहे.

खन्ना—पंजाब. लुधियाना जिल्ह्याच्या समराळ तहशिलींतील एक शहर. उ. अ. ३०°४२ व पू. रे. ७६°१३'. लो.सं.(१९०१)३८३८. भोंवतालच्या गांवीं होणाऱ्या शेतकीवस्तूंच्या सांठ्याचें हें ठिकाण म्हणतां येईल. सरकी काढण्याच्या व दळण्याच्या गिरण्या, एक इंग्रजी-संस्कृत शाळा व एक सरकारी दवाखाना येथें आहे. १८७५ त येथील म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. तिचें अबकारी उत्पन्न सर्वांत अधिक असतें.

खन्सा—ही कवयित्री अरब लोकांतील सुलैम जातीची असून सहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जन्मली. ती वयांत येतांच दुरैद इब्न अस सिम्म नांवाच्या एका राजपुत्रानें तिला मागणी घातली. पण तिनें ती झिडकारिली व मीरदास नांवाच्या एका गृहस्थाशीं तिनें लग्न केलें. मीरदासापासून तिला तीन मुलगे झाले. मीरदास वारल्यानंतर तिनें पुन्हां दुसरें लग्न केलें. इस्लामी धर्माच्या प्रसारापूर्वी सख्र व मोआविया असे तिचे दोघे भाऊ मरण पावले त्यांच्या व आपल्या बापाच्या निधनाविषयीं तिनें फारच सुंदर अशीं शोकगीतें लिहिलीं व त्यामुळें तिचा चोहोंकडे बोलबाला झाला. युकाझ नांविच्या जत्रेच्या प्रसंगीं धुबियानीनें अश या कवीला कवींमध्यें पहिला मान देऊन त्याच्या खालोखाल तिला दुसरा मान दिला. आपल्या जातीबरोबरच तिनेंहि इस्लामी धर्म स्वीकारला.पण इस्लामाच्या आज्ञांविरुद्ध तिनें मूर्तिपूजक लोक सुतकाची जी खूण धारण करतात ती धारण केली. इस्लामच्या धर्मप्रसाराच्या कामीं झालेल्या लढायांत तिचे चारी मुलें कामास आले. तिच्या मुलांनी गाजविलेल्या शौर्याबद्दल अभिनंदनपर असें पत्र ओमरनें तिला लिहिलें व तिला तनखा तोडून दिला. ती ६४५ त मरण पावली. तिची मुलगी अमरा हीहि कवयित्री होती. अरब लोकांतील दुसरी एक कवयित्री जी लैला ती व खन्सा यांच्यामध्यें कोण अधिक श्रेष्ठ आहे यासंबंधीं विद्वानांत मतभेद होत असे. हिच्या आख्यायिका किताब उल् अघानीमध्यें दिलेल्या आहेत. हिचें काव्य छीको यानें संपादित केलें असून त्याचें भाषांतर डि कोपियर यानें फ्रेंच भाषेंत केलें आहे.

खंबायत—मुंबई इलाख्यांत खेडा पोलिटिकल एजन्सीमधील संस्थान. हें गुजराथच्या पश्चिम भागांत खंबायतच्या आखातालगत आहे. उत्तरअक्षांश २२° ९' ते २२° ४१' आणि पूर्वरेखांश ७२° २०' ते ७३° ५'. क्षेत्रफळ ३५० चौरस मैल. उत्तरेस खेडा जिल्हा, पूर्वेस खेडा व बडोदें संस्थान. दक्षिणेस खंबायतचें आखात व पश्चिमेस साबरमती नदी. ह्या संस्थानाची चतुःसीमा निश्चित नाहीं. प्रदेश सपाट असून जागोजाग आंबराई आहेत. हवा समशीतोष्ण आहे. पाऊस ३१ इंच पडतो. अकराव्या व बाराव्या शतकामध्यें खंबायत हें अनहिलवाडच्या राज्याचें मुख्य बंदर होतें. मुसलमानांनीं जेव्हां १२९८ सालीं हें राज्य काबीज केलें तेव्हां खंबायत हें एक हिंदुस्थानांत फार धनसंपन्न शहर होतें असें म्हणतात.

गुजराथच्या राज्याची भरभराट झाल्यावर खंबायतलाहि चांगले दिवस आले व १५ व्या शतकाच्या प्रारंभीं पश्चिम हिंदुस्थानांत हें शहर व्यापाराचें केंद्र होतें. सन १५३८ मध्यें पोर्तुगीज लोकांनीं हें शहर लुटलें व तदनंतर १५७३ पावेतों एकंदर प्रांतांत अव्यवस्था माजली होती. पण अकबरानें तो प्रांत काबीज केला. पुढें सुरतेस व्यापाराच्या दृष्टीनें महत्व मिळूं लागल्यामुळें खंबायत अगदींच मागें पडलें. पण तेथें जुने कारखाने असल्यामुळें १६१५ त इंग्रजांनीं व १६१७ त डच लोकांनीं येथें वसाहती स्थापिल्या. औरंगझेबाच्या मरणानंतर जेव्हां मोंगल सत्तेस उतरती कळा लागली तेव्हां मराठ्यांनीं ह्या प्रांतावर स्वाऱ्या करून लोकांकडून बराच पैसा नेला. १७३० सालीं खंबायत हें एक वेगळें स्वतंत्र संस्थान बनलें. सध्यां राज्याधिकार हातीं असलेला राजा गुजराथच्या मोमिनखानचा वंशज आहे. ज्या वेळीं मोमिनखान गुजराथच्या गादीवर होता तेव्हां त्याचा जावई निझामखान ह्याच्या हातीं खंबायतचें राज्य होतें. परंतु मोमिनखानचा पुत्र मुफ्ताखीर ह्यानें निझामखानास ठार मारून खंबायतचें राज्य बळकाविलें. वसईच्या तहामुळें खंबायत इंग्रजांच्या हातीं गेलें. येथील राजा शिया जातीचा एक मुसलमान आहे. तो सरकारास २१,९२४ रु. खंडणी देतो. मुसलमानी कायद्यान्वयें त्याला दत्तक घेण्याची किंवा कायदेशीर वारसहि नेमण्याची सनद मिळाली आहे.

ह्या संस्थानांत एकंदर लहान मोठीं ८७ गांवें आहेत. १९११ सालीं येथील लोकसंख्या ७२,६५३ होती. शेंकडा ८० लोक हिंदू आहेत. महत्वाचें शहर असें खंबायतच आहे. कोळी, कुणबी, रजपूत वगैरे जातीचे लोक आहेत व बहुतेक सर्व शेतकीवर उदरनिर्वाह करणारे आहेत. उत्तरेस व पश्चिमेस जमीन काळी, कापूस व गहूं पिकविण्यास उत्तम अशी आहे. पूर्वेस दोन पिकें निघतात. एकंदर ९०३ एकर जमीन पाण्याखालीं आहे. तांदूळ, गहूं, कापूस, नीळ, तंबाखू व बाजरी हीं मुख्य धान्यें होतात. आतां नीळ काढीनातसे झाले आहेत. नरेश्वर नांवाचा एक मोठा तलाव आहे. पिण्यास पाणी बहुतेक विहिरींचेंच वापरतात. खंबायत शहराजवळ माही व साबरमती नद्यांच्या काठीं मोठ्या खारी आहेत. मीठ, कापड, सतरंज्या, कलाबतूचें काम सुंदर गुलाबी दगड घोरणें हीं कामें या संस्थानांत होतात. कांहीं कापसाचे जीन असून विणकाम शिकविण्याकरितां कांहीं शाळा आहेत.

१५ व्या शतकांत व त्यापूर्वीच्या दोन शतकांत खंबायतची व्यापारी दृष्टीनें फार ख्याति होती. आणि १६ व्या शतकाच्या आरंभीं तर हिंदुस्थान, इराण, अरबस्तान आणि पूर्व आफ्रिका इत्यादि देशांचे खंबायतशीं व्यापारी दळणवळण होतें. नंतर मात्र सुरतेची भरभराट होऊं लागल्यामें

इकडे उतरतो कळा लागली व १८०२ साली खंबायत एक सर्वसामान्य शहर बनलें. ५० टनांपेक्षां जास्ती वहनशक्तीचीं जहाजें धक्क्याला लागत नाहींत. १९०७ सालीं सर्व संस्थानांत एकच पोष्ट व एक टेलिग्राफ ऑफिस होतें. नबाबाला राज्यव्यवस्थेचा व न्याय करण्याचा सर्व अधिकार आहे. पण संस्थानांतील गोरे लोकाचा इनसाफ पोलिटिकल एजन्टच्या परवानगीशिवाय करण्याचा अधिकार नाहीं. अक्टोबर १९२२ सालीं विजेचा पुरवठा करण्यांत आल्यामुळें खंबायत संस्थानांतील औद्योगिक व्यापारास मोठी चालना मिळाली. तेथील विजेचा पुरवठा करणाऱ्या कंपनीनें व औद्योगिक कंपनीनें, तीन पिठाच्या गिरण्यास व एका विणकाम - कारखान्यास विद्युत्‌शक्ति पुरविण्याचें काम घेतलें असून १९२३ सालीं विजेनें चालणारा बर्फाचा कारखाना व काड्याऱ्या पेटीचा कारखाना सुरू करण्यात आला. अगेट व कॉर्नेलियन नावांच्या दगड-कामामुळें हजारों मजुरास साधारणतः नेहमी वेतन मिळे. परंतु १९२२ मध्यें हा कारखाना बंद करावा लागला; कारण वरील दगड--कामास बाहेरून मागणी येण्याचें बंद झालें.

बी. बी. व सी. आय रेल्वे कंपनी चालवीत असलेली 'तारापूर कॅम्बे रेल्वे' ही बंद हेडपर्यंत गेली असून संस्थानच्या मालकीची आहे. तिला सुमारें २ लक्ष रु. खर्च आला. १९२२--२३ सालीं जलमार्गानें होणारा संस्थानचा व्यापार वाढला व खाडीहि जास्त खोल केल्यामुळें नाविकाना सवलत मिळून सोयीचें झालें. माही नदी मिळते त्या ठिकाणी खाडीच्या मुखांनजीक सृष्टिक्रमानुसार एक इष्ट फरक घडून आला आहे व त्यामुळें त्या नदीचा प्रवाह बंदरहेडकडे वळला आहे १९२२ त बंदरहेडपासून अर्ध्या मैलाच्या आत संगम झालेला आहे. पण पूर्वी तो दोन मैलावर होता. अशा रीतीनें खाडींतील नौकासंचाराच्या अडचणी बऱ्याच कमी झाल्या आहेत. संस्थाननें एक विहीर खणून पाणी काढण्याचें यंत्र २५००० रुपयास घेतलें आहे. पश्चिमेकडील खेड्यांत पिण्याच्या पाण्याबद्दल नेहमींचीच जी तक्रार असते ती दूर करून पाणीपुरवठा करण्याचा त्यात हेतु आहे. तारापुरास त्या यंत्राचा प्रथम प्रयोग करण्यांत आला.

आखात.—मुंबईच्या उत्तरकिनाऱ्यास काठेवाडपासून वेगळें पाडणाऱ्या एका समुद्राच्या त्रिकोनी आकृतीस हें नांव आहे. येथें पूर्वी अरब व्यापारी फार येत असत. आखाताच्या मुखाच्या पूर्वेस सुरत असून पश्चिमेस पोर्तुगीज लोकाचें दीव नांवाचें ठाणें आहे. खंबायत शहर उत्तर भागांत वसलेलें आहे.

ह्या आखातांत पूर्वेकडे तापी व नर्मदा ह्या नद्या येऊन मिळतात. उत्तरेकडून मही व साबरमती येऊन मिळतात व पश्चिमेकडून काठेवाडांतून बऱ्याच लहान लहान नद्या येऊन मिळतात. किनाऱ्यावर असलेल्या भडोच व सुरत ह्या प्रसिद्ध बंदरांत आतां परदेशांतून माल येणें बंद झालें आहे.

शहर.—मुंबई इलाख्यांतील खंबायत नामक संस्थानाचें राजधानीचें शहर. हें उत्तर अक्षांश २२°८' व पूर्व रे. ७२°४०' यांवर महीच्या उपनदीच्या उत्तरेस वसलेलें आहे. हें अहमदाबादपासून ५० मैल दूर आहे. लोकसंख्या १९११ सालीं २८०९८ होती व त्यांत हिंदू लोकांचाच भरणा अधिक आहे. शहराभोंवती तीन मैल घेराचा तट आहे. ह्यांवर तोफा डागण्याचीहि व्यवस्था आहे. महमदशहाच्या वेळची १३२५ सालांतील येथें एक जामा मशीद आहे.

आखाताच्या चिंचोळ्या भागात मुखाशीं समुद्राच्या भरती ओहोटीनें त्याचप्रमाणें नद्यांच्या जोराच्या प्रवाहानें, वाळू जमल्यामुळें मालाचीं जहाजें बंदरात येण्यास अडचण पडूं लागली व हळूहळू ह्या बंदराचें महत्व कमी झालें. खंबायत येथें सुंदर रंगीत दगडावरचें काम फार सुंदर होतें. येथें म्युनिसिपालिटी आहे. येथें एक लॉर्ड रे नावाचें पुस्तकालय आहे. एक विणकाम शिकविण्याची शाळा असून दोन इस्पितळें व एक हायस्कूल आहे.

खंभलाव—काठेवाड. भोइका टाण्यांतील एक स्वतंत्र खंडणी देणारें संस्थान. खंभलाव व नमाडी हीं गावें तालुक्यांत आहेत. खंभलावपासून सात मैलावर लिंबडी स्टेशन आहे. तालुकदार लिंबडी घराण्यांतील भायाद व झाल रजपूत आहेत.

खंभाल—काठेवाड. गोहिलवाड जिल्ह्यातील एक स्वतंत्र खंडणी देणारें संस्थान. यात चार गावें असून खंभाल हें सर्वांत मोठें आहे. तालुकदार खाचर जातीचे काटी आहेत. संस्थान सर्व डोंगराळच आहे.

खंभालिय--काठेवाड नवानगरच्या हद्दींतील नवानगरच्या खालोखाल महत्वाचें शहर. उ. अ. २२°१२' व पू. रे. ६९°४४'. शहराजवळच घी व तेली या दोन नद्यांचा संगम होतो. सलाय बंदर येथून दहा मैलावर आहे. येथें न्यायाधीश व वहिवाटदार कचेऱ्या आहेत. व मुलांमुलींच्या शाळा व दवाखाने आहेत. लो. सं. (१९११) ९३८७. गावाला म्युनिसिपालिटी आहे. पूर्वी हें शहर वाघेलांच्या ताब्यांत असून जाम रावळानें तें जिंकून घेतलें. यात बरींच जुनीं देवळें आहेत. याच्या हद्दींतील पिंडतारक देवस्थान फार प्रसिद्ध आहे.

खमटी डोंगर--आसामाच्या सरहद्दींवरील एक डोंगराळ प्रदेश. हा ब्रह्मपुत्रा खोऱ्याच्या पूर्व टोंकाशीं पसरला आहे. यांत शानवंशातील खमटी जात राहाते. ८ व्या शतकाच्या मध्यकाळांत जेव्हां ब्रह्मी राजानें मोगोंग जिंकून घेतलें तेव्हां खमटी लोक उत्तरेकडे सरकले. यांच्यापैकीं कांहीं आसामांत गेले व सदियाजवळ वसाहत करून राहिले. तेथें त्यांच्या पुढाऱ्यानें भोंवतालच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित करून ब्रिटिशांनीं अहोम राजाचा मुलूख घेतल्यावेळीं त्याकडून आपल्या राज्याला मान्यता मिळविली.

पण त्याच्या मुलाला गादीवरून काढल्यावेळीं खमटी लोकांनीं इंग्रजांविरुद्ध बंड केलें (१८३९). पण तें लवकरच मोडलें.

खमटी लोकांचें मुख्य ठिकाण बोरखमटी आहे. पुटौ हुंच मोठें बोरखमटी गांव असून सदियापासून १९७ मैल दूर आहे. याच्या शेजारीं एक विटांचें देऊळ आहे.त्यांतील कांहीं बुद्ध मूर्ती सुरेख घडविलेल्या आहेत. आसामांत खमटींची संख्या (१९११) १८६८ आहे. कर्नल डाल्टनच्या ' एथ्नॉलॉजी ऑफ बेंगाल ' या ग्रंथांत यांची विशेष माहिती सांपडेल.

खम्ममेट्ट—हैद्राबाद संस्थान. वारंगळ जिल्ह्याचा दक्षिण तालुका. क्षे. फ.७००चौ.मै. जहागिरी धरून लो. सं.(१९११) १,३५,९७५ आहे. तालुक्यांत १६१ गांवें असून १३ जहागीर गांवें आहेत. खम्ममेट्ट हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. या प्रदेशांत तांदूळ बराच पिकतो. संस्थानची रेल्वे तालुक्यांतून दक्षिणोत्तर जाते.

खर—रावणाचा सापत्न भ्राता. शूर्पणखेची रामाकडून विटंबना झाल्यामुळें हा रामावर चालून गेला व त्याच्या हातून मरण पावला. [वा. रा. अरण्यकांड स. १९].

खर प्रांत.—इराणमधील एक छोटा पण अत्यंत सुपीक प्रांत. याला छोअर अगर छोअरेन असें नांव होतें. १९१० मध्यें याची लो. संख्या सुमारें १०,००० होती. या प्रांताचा सुभेदार तेहरानपासून ६२ मैलांवर असलेल्या किशलख खर या खेड्यात अगर त्याच्याच जवळ असलेल्या अर्दन या खेड्यांत रहातो. या प्रांतांत पाण्याचा मुबलक पुरवठा असल्यानें गहूं, तांदूळ इत्यादि धान्यें खूप पिकतात. इराणच्या बादशहाला हा प्रांत ६००० पौंड खंडणी देतो. त्यापैकीं ४००० पौंड धान्यरूपानें देण्यांत येतात.

खरकपूर—बंगाल. मिदनापुर जिल्ह्यांतील एक गांव. उ. अ. २२ ° २०' व पू. रे. ८७ ° २१'. लो. सं. (१९११) ३५२६. हें बंगाल नागपूर रेल्वेवरचें महत्वाचें जंक्शन आहे. मिदनापूरपासून खरकपूर ८ मैल आहे. गावात पीर लोहानीची कबर असून हिंदू व मुसुलमान दोघेहि याला भजतात.

खरगपूर—बिहार ओरिसा. मोंघील जिल्ह्यांतील एक गांव. उ. अ. २५ ° ७' व पू रे. ८६ ° ३३'. लो. सं. (१९०१) २४४२. खरगपूर परगणा दरभंगा संस्थानांत मोडतो. पाटबंधाऱ्याच्या कामासाठीं हें गांव प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं मान नदीला बंधारा घातला आहे.

खरगा—ईजिप्तमधील वालुकामय प्रदेशांतील सर्वांत मोठी ओलवणीची जागा. ही जागा अगर हें स्थान लिबियाच्या वालुकामय प्रदेशांत आहे. नाईल नदीच्या खोऱ्यांतील खरगा जंक्शनपासून या ओलवणीच्या स्थानाकडे छोट्याशा रेल्वे लाइननें जातां येतें. या स्थानाची दक्षिणोत्तर लांबी शंभर मैल व पूर्वपश्चिम १२पासून ५० मैल आहे लो. सं. (१९०७) ८३४८. पूर्वी या स्थानाच्या मोठ्या भागांत सरोवर होतें. हल्लीं या ठिकाणीं पाऊस पडत नाहीं किंवा एकहि सरोवर नाहीं पण विहिरी मात्र पुष्कळ आहेत. खजुरीच्या बऱ्याच बागा या ओलवणींत आहेत. तांदूळ, गहूं, बार्ली हीं मुख्य पिकें होत. येथील लोकांचा शेतकीशिवाय टोपल्या व चटया करण्याचा धंदा चालतो. प्राचीन काळीं फारोहांच्या अमदानींत या ठिकाणीं बरीच वस्ती होती. आज त्या काळचे कांहीं अवशेष सांपडतात. त्यांपैकीं ॲमोनचें देऊळ मुख्य असून त्याची लांबी १४२ फूट, रुंदी ६३ फूट व उंची ३० फूट आहे.येथें एका रोमन किल्ल्याचा कांहीं भाग दिसतो व इतर रोमन व ख्रिस्ती अवशेषहि आढळतात. खरगा शहर ताडीच्या बनामध्यें वसलें असून फार टुमदार दिसतें. लो. सं. (१९०७) ५३६२. [बुरे-जिऑलाजिकल अँड टोपोग्रॉफिकल रिपोर्ट ऑन खरगा ओॲसिस (१८९९)].

खरगोण—इंदूर संस्थान. निमार जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. उ. अ. २१ ° ५०'. व पू. रे. ७५ ° ३७'. नर्मदेला मिळणाऱ्या कुंदी नदीवर हें वसलें आहे. लो. सं. (१९११) ९४२३. मोंगलांच्या अमदानींत हें गाव प्रसिद्धीस आलें असावें. प्रथम माळवा सुभ्यातील बिजागड सरकारच्या एका महालाचें हें मुख्य ठिकाण होतें. नंतर बिजागड सरकारचें मुख्य ठिकाण बनलें. त्यावेळचीं कांहीं घरें व कबरी अद्याप दिसतात. जिल्हा व परगणा यांच्या कचेऱ्याखेरीज शाळा, तुरुंग, दवाखाना, लायब्ररी वगैरे या गांवांत आहेत. स्थानिक कारभार म्युनिसिपालिटी पहाते.

खरतरगच्छ—एक जैन गच्छ. जैन गच्छांची कल्पना उपकेशगच्छाच्या आरंभीं दिली आहे. खरतरगच्छ व तपागच्छ यांमधील भेद अंचलगच्छांत सांगितला आहे. (उपकेशगच्छ व अंचलगच्छ पहा.)

ख र त र ग च्छा ची प ट्टा व ली—हींत पहिला महावीर याचा पहिला शिष्य गौतम होता. त्याच्या नंतरः—

२ सुधर्माः—हा कोल्लाक ग्रामांत जन्मला. गोत्र अग्निवेश्यायन. हा धम्मिल्ल व भद्दिला यांचा पुत्र. वीरानंतर २० वर्षांनीं व वयाच्या १०० व्या वर्षी निर्वाणाप्रत गेला.

३ जंबूः—हा राजगृहांत जन्मला. गोत्र काश्यप. श्रेष्ठी ऋषभदत्त व धारिणी यांचा पुत्र. वीरानंतर हा ६४ वर्षांनीं वयाच्या ८० व्या वर्षी निर्वाणाप्रत गेला.तो शेवटचा केवलिन् होता.

४ प्रभवः—कात्यायन गोत्र. जयपूरच्या विंध्य राजाचा पुत्र. वयाच्या ८५ (अथवा १०५) व्या वर्षी वीरनिर्वाणाब्द ७५ मध्यें मृत्यु पावला.

५ शय्यम्भवः- वात्स्य गोत्रोत्पन्न. ' शांतिदेवी 'चा साक्षात्कार होऊन यानें धर्माची दीक्षा घेतली.त्याचा मुलगा मनक याकरितां त्यानें दशवैकालिकसूत्र नांवाचा ग्रंथ रचला.वयाच्या ६२ व्या वर्षी वीरनिर्वाणाब्द ९८ मध्यें हा मृत्यु पावला.

६ यशोभद्रः—तुंगयायन गोत्र. वयाच्या ८६ व्या वर्षी वीरनिर्वाणाब्द १४८ मध्यें मृत्यु पावला.

७ संभूतिविजयः—माटरगोत्रीय. वयाच्या ९० व्या वर्षी वी .नि. १५६ मध्यें मृत्यु पावला.

८भद्रबाहुः—प्राचीनगोत्रीय. त्यानें उपसर्गहरस्तोत्र, कल्पसूत्र आणि आवश्यक, दशवैकालिक वगैरे दहा शास्त्रांवरील निर्युक्ति रचल्या. वयाच्या ७६ व्या वर्षी वी. नि. १७०मध्यें मृत्यु पावला.

९ स्थूलभद्रः—गौतम गोत्र बाप नवव्या नंदाचा मंत्री शकडाल. आई लाच्छलदेवी. वैश्यकोशाचें यानें रूपांतर केलें.

१० आर्य महागिरिः—ईलापत्यगोत्रीय. तो गृहांत ३०, व्रतांत ४०, व सूरीपणानें ३० वर्षे राहून वयाच्या १०० व्या वर्षी वी. नि. २४९ मध्यें मरण पावला.

११ सुहस्तिन्ः –वासिष्ठगोत्रीय. वयाच्या १०० व्या वर्षी वी. नि. २६५मध्यें मरण पावला. त्यानें संप्रति राजाला धर्मदीक्षा दिली. सुहस्तीनें अवंतिसुकुमाल व दुसरे पुष्कळ लोक यानां धर्मदीक्षा दिली.

१२ आर्यसुस्थितः—याला कोटिशः सूर्यमंत्राचा जप केला म्हणून कोटिक व काकंदा नगरीत जन्मला म्हणून काकंदिक अशीं दोन बिरुदें होतीं. हा व्याघ्रापत्य गोत्राचा होता. ९६ व्या वर्षी वीरनिर्वाणाब्द ३१३ त मरण पावला यापासून कोटिकगच्छ उत्पन्न झाले. सुप्रतिबुद्ध त्याचा लघुभ्रातर होता.

१३ इंद्रदिन्न. १४ दिन्न.

१५ सिंहगिरि, जातिस्मरणज्ञानवान्–त्या काळीं पादलिप्ताचार्य, वृद्धवादिसूरि व त्याचा शिष्य कुमुदचंद्र हें दीक्षानाम मिळालेला सिद्धसेन दिवाकर हे जिवंत होते. सिद्धसेन दिवाकरानें उज्जयिनी येथील महाकालेश्वराच्या देवळांतील रुद्राचें लिंग फोडिलें व कल्याणमंदिरस्तवनामक ग्रंथानें पार्श्वनाथाच्या एका मूर्तीचा स्तव केला. वी. नी. ४७० मध्यें विक्रमादित्याला त्यानें धर्मदीक्षा दिली.

१६ वज्र—गौनमगोत्रीय. धनगिरि व सुनंदा तुंबवन ग्रामांत रहात होते. त्यांचा हा पुत्र होता. हा वी. नि. ४९६ त जन्मला. वयाच्या ८८ व्या वर्षी वी. नि. ५८४ मध्यें तो मरण पावला. सिंहगिरीनें त्याला ११ अंगें शिकविलीं. त्यानंतर दृष्टिवादांग नांवाचें १२ वें अंग शिकण्यासाठीं अवंती (उज्जयिनी) ला भद्रगुप्ताकडे दशपुराहून वज्र गेला. पूर्ण १० पूर्वे माहित असलेला शेवटचा मनुष्य तो होता. त्यानें बुद्धांच्या राज्यांत दक्षिणेकडे जैन धर्माचा विस्तार केला. त्याच्यापासून वज्र शाखा निघाली.

१७ वज्रसेनः—उत्कौशिक गोत्र श्रेष्ठी. जिनदत्त व ईश्वरी ह्यांचे चार पुत्र चार कुलांचे स्थापक होऊन गेले. त्यांचीं नांवें गेंद्र, चंद्र, निवृत्ति, आणि विद्याधर अशीं होतीं. त्या चार पुत्रांना सौपारक येथें वज्रसेनानें धर्माची दीक्षा दिली.

१८ चंद्रः—याच काळीं आर्यरक्षित जिवंत होता. दशपूर येथें रहाणारे पुरोहित सोमदेव व रुद्रसोमा ह्यांचा तो पुत्र होता. वज्रापासून तो ९ पूर्वें व दहाव्याचा कांहीं भाग शिकला व तीं पूर्वें आपला शिष्य दुर्वलिकापुष्पमित्र ह्याला शिकविलीं.

१९ सामंतभद्रः—ह्याला वनवासिन् म्हणतात. २० देवः—ह्याला वृद्ध म्हणतात. २१ प्रद्योतन. २२ मानदेवः—शांतिस्तवाचा कर्ता. २३ मानतुंगः—भक्तामरस्तोत्र व भयहरस्तोत्र ह्यांचा कर्ता.

२४ वीरः—लोहित्यसूरीचा शिष्य देवर्द्धिगणिक्षमाश्रमण. यानें वी. नि. ९८० मध्यें वलभीच्या दरबारीं सिद्धांत ग्रंथाचा लेख केला. देवर्द्धीच्या वेळीं फक्त एक पूर्व शिल्लक राहिलें.

२५ जयदेव, २६ देवानंद, २७ विक्रम, २८ नारसिंह, २९ समुद्र, ३० मानदेव, ३१ विबुधप्रभ, ३२ जयानंद, ३३ रविप्रभ, ३४ यशोभद्र, ३५ विमलचंद्र ३६ देवः—हा सुविहितपक्षगच्छाचा संस्थापक होता. ३७ नेमिचंद्र.

३८ उद्योतनः—याच्या शिष्यांपासून हल्लीं अस्तित्वांत असलेले ८४ गच्छ उत्पन्न झाले. ऋषभाची पूजा करण्याकरिता मालवक देशाहून शत्रुंजयाकडे यात्रा करीत असतां तो मरण पावला.

३९ वर्धमानः—हा पहिला सूरि असून चैत्यवासिन् जिनचंद्राचा शिष्य होता परंतु उद्योतनाकडे गेला. सोमब्राह्मणाचे शिवेश्वर व बुद्धिसागर नांवाचे दोन पुत्र व कल्याणवती नांवाची कन्या ह्यांनां धर्माची दीक्षा दिली त्यानें शिवेश्वराला दीक्षेच्या वेळीं जिनेश्वर हें नांव दिलें. वर्धमानसूरि विक्रम संवत १०८८ मध्यें होऊन गेला.

४० जिनेश्वरः—चैत्यवासिन् लोकांबरोबर वादविवाद करण्यास मरु देशाहून गुर्जर देशाप्रत जिनेश्वर आपला बंधु बुद्धिसागर याबरोबर गेला. विक्रम संवत् १०८० मध्यें अनहिल्ल पुराचा राजा दुर्लभ याच्या राजसभेंत त्यानें चैत्यांचा पराभव केला व खरतर हें बिरुद नांव मिळविलें.

४१ जैनचंद्रः-हा संवेगरंग शाळाप्रकरणाचा कर्ता होय.

४२ अभयदेवः-हा जिनचंद्राचा लघुगुरुभ्राता धारानगरचा श्रेष्ठी धन व धनदेवी यांचा पुत्र होता. त्याचें मूळ नांव अभयकुमार होतें. शरीराला त्रास दिल्यामुळें त्याला कुष्ठरोग झाला, परंतु दैवी चमत्कारानें तो बरा झाला जयतिहूयण स्तोत्रानें त्यानें स्तम्भनकाजवळील पार्श्वमूर्तीचा स्तव केला. नऊ अंगांवर त्यानें टीका लिहिल्या व गुर्जर देशांतील कप्पडवाणिजग्रामांत मरण पावला.

४३ जिनवल्लभः—जिनेश्वर सूरींना पहिला शिष्य, कूर्चपुरगच्छाचा एक चैत्यवासिन्. नंतर हा अभय देवाचा शिष्य झाला. पिंडविशुद्धिप्रकरण, गणधरसार्धशतक, षडशीति वगैरे त्याचे ग्रंथ आहेत. संवत् ११६७ मध्यें देवभद्राचार्यानें त्याला सूरि म्हणून अभिषेक केला. त्यानंतर ६ महिन्यांनी तो मरण पावला. त्याच्या (धार्मिक व्यवस्थेच्या) कारकीर्दीत

मधुखरतरशाखा विभक्त झाली, आणि हा पहिला गच्छभेद होय.

४४ जिनदत्तः—वाछिगमंत्री व वाहड देवी यांचा पुत्र. संवत् ११३२ त जन्मला. गोत्र हुंवड. याचें मूळ नांव सोमचंद्र होतें. संवत् ११४१ मध्यें त्याला दीक्षा मिळाली. संवत् ११६९ वैशाख वद्य प्रतिपदेच्या दिवशीं चित्रकूट येथें देवभद्राचार्यापासून त्याला सूरिमंत्र मिळाला. पुष्कळ शहरांत दैवी चमत्कार करून त्यानें जैनधर्माचा विस्तार केला. संदेहदोलावली व दुसरे पुष्कळ ग्रंथ त्यानें रचिले. तो आषाढ शुद्ध ११ संवत् १२११ रोजीं अजमेर येथें मरण पावला. संवत् १२०४ मध्यें रुद्रपल्ली येथें जिनशेखराचार्यानें खरतरशाखा स्थापिली. हा दुसरा गच्छभेद होय.

४५ जिनचंद्रः—भाद्रपद शुद्ध ८ संवत् ११९७ रोजी हा जन्मला. साह रासल व देल्हणदेवी यांचा पुत्र फाल्गुन वद्य ९ संवत् १२०३ रोजीं अजमेर येथें दीक्षा मिळाली. वैशाख शुद्ध ६ संवत् १२११ (वयाच्या १४ व्या वर्षी) रोजीं विक्रमपूर येथें त्याला जिनदत्तानें आचार्य केला. भाद्रपद वद्य १४ संवत् १२२३ रोजीं दिल्ली येथें मरण पावला. याच्या स्मरणार्थ दिल्ली येथें एक स्तूप उभारला आहे. त्याच्या डोक्यांत एक रत्न होतें असें मानतात.

४६ जिनपतिः—संवत् १२१० त जन्मला. साहयशोवर्धन व सुहवदेवी यांचा पुत्र. दिल्ली येथें संवत् १२१८ त दीक्षा घेतली. संवत् १२२३ त जयदेवाचार्यानें त्याची पदस्थापना केली. संवत् १२७७ त वयाच्या ६७ व्या वर्षी पाल्हाणपुरात तो मरण पावला. चित्रावालगच्छाच्या जगच्चंद्र सूरीपासून स. १२१३ त आंचलिकमत व सं. १२८५ त तपागण उत्पन्न झाले.

४७ जिनेश्वरः—मरोटा येथें सं. १२४५ त जन्मला. भांडागारिक नेमिचंद्र व लक्ष्मी यांचा पुत्र होय. मूळचें नांव अंबड.सं. १२५५ त खेडनगरात दीक्षा घेतली तेव्हां वीरप्रभ नांव यास मिळालें. सर्वदेवाचार्यानें जालोर नगरांत सं. १२७८ पदस्थापना केली. तो सं. १३३१ त मृत्यु पावला. त्याच वर्षी लघुखरतरशाखा जिनसिंहसूरीनें स्थापिली. हा तिसरा गच्छभेद होय.

४८ जिनप्रवोधः—दुर्गप्रबोध व्याख्येचा कर्ता साह श्रीचंद्र व सिरियादेवी यांचा पुत्र. हा सं. १२८५ तजन्मला. मूळ नांव पर्वत. सं. १२९६ त धीरापद्रनगरांत दीक्षा व प्रबोधमूर्ति हें नांव घेतलें. सं. १३३१ त पट्टाभिषेक झाला व त्याच वर्षी पदमहोत्सव झाला. मृत्यु सं. १३४१

४९ जिनचंद्रः—समीयाणाग्रामात सं. १३२६ त जन्मला. छाजहडगोत्राचा मंत्री देवराज व कमलादेवी यांचा पुत्र. मूळ नांव शंभराय. जालोरा येथें सं. १३३२ त दीक्षा घेतली. सं. १३४१ त पदमहोत्सव. यानें चार राजांना दीक्षा दिली. कलिकालकेवलिन् हें बिरुद (उपपद) त्याला होतें. तो कुसुमाणाग्रामांत सं. १३७६ त मृत्यु पावला.

५० जिनकुशल—हा दादोजी ह्या नांवानें प्रसिद्ध होता. समीयणाग्रामांत सं. १३३७ त जन्मला. छाजहडगोत्राचा मंत्री जिल्हागर व जातिश्री यांचा पुत्र. सं. १३४७ त दीक्षा. सं. १३७७ राजेंद्राचार्यापासून सूरिमंत्र घेतला. सं. १३८९ त मृत्यु पावला.

५१ जिनपद्मः—छाजहडवंशातला होय. पंजाबांत जन्मला. तरुणप्रभाचार्यापासून सूरिमंत्र घेतला व पाटणा येथें सं. १४०० मध्यें मृत्यु पावला.

५२ जिनलब्धि—नागपुरात सं. १४०६ मृत्यु पावला.

५३ जिनचंद्रः—स्तम्भतीर्थात १४१५ मध्यें मृत्यु पावला.

५४ जिनोदयः-पाल्हणपुर येथें राहणारा. साह-रुद्रपाल व धारलदेवी यांचा पुत्र. सं १३७५ त जन्मला. मूळ नांव समरऊ. स्तम्भतीर्थे येथें तरुणप्रभाचार्यानें त्याची पदस्थापना सं. १४१५ त केली. त्याच स्थळीं त्यानें अजिताला एक चैत्य स्थापिला. आणि शत्रुंजयावर पांच प्रतिष्ठा केल्या. तो पाटण येथें संवत. १४३२ मध्यें मरण पावला. त्याच्या काळात स. १४२२ मध्यें धर्मवल्लभगणीनें स्थापिलेल्या वेगडखरतरशाखेचा उदय झाला. हा ४ था गच्छभेद होय.

५५ जिनराजः—पाटण येथें सं. १४३२ त सूरिपद मिळालें व देवलवाड येथें सं. १४६१ त मृत्यु पावला.

५६ जिनभद्रः—सं. १४६१ त प्रथम जिनवर्धनसूरि. हा जिन राजाच्या पाठीमागून गादीवर बसणारा म्हणून नेमला गेला होता. परंतु त्यानें चतुर्थ व्रत मोडलें म्हणून तो अयोग्य गणला जाऊन त्याची जागा सं. १४७५ त जिनभद्राला दिली गेली. जिनभद्र हा भणशालिक गोत्राचा होता. त्याचें नांव भाडो होतें. त्यानें पुष्कळ मूर्ती बसविल्या. पुष्कळ देवळें व ग्रंथसंग्रहालयें स्थापन केली. कुंभलमेर येथ सं. १५१४ त तो मृत्यु पावला. वर निर्दिष्ट केलेला जिनवर्धनसूरि ह्यानें सं. १४७४ त पिप्पलक खरतरशाखा स्थापिली. हा पांचवा गच्छभेद होय.

५७ जिनचंद्रः—चम्मगोत्राचा साह वच्छराज व वाहलादेवी यांचा पुत्र. जेशलमेर येथें सं. १४८७ मध्यें जन्मला सं. १४९२ त दीक्षा. सं. १५१४त सूरिपद. जेशलमेरू येथें सं. १५३० त मृत्यु.

५८ जिनसमुद्रः—पारखगोत्राचा देको-साह व देवलदेवी यांचा पुत्र. बाहडमेरु येथें सं. १५०६ मध्यें जन्मला. दीक्षा सं. १५२१. पदस्थापना सं. १५३०. अहमदाबाद येथें सं. १५५५ मध्यें मृत्यु.

५९ जिनहंसः—चोपडागोत्राचा साहमेघराज व कमलादेवी यांचा पुत्र सं. १५२४ त जन्मला. दीक्षा सं. १५३५. अहमदाबाद येथें सं. १५५५ त पदस्थापना. पाटण येथें सं १५८२ त मृत्यु. मेरुदेशांतील आचार्य शांतिसागर ह्यांनीं स्थापन केलेली आचार्यीय खरतर शाखा सं. १५६४ त निर्माण झाली. हा ६ वा गच्छभेद होय.

६० जिनमाणिक्यः—कुकडचोपडा गोत्राचा साह जीवराज व पद्मादेवी यांचा पुत्र सं. १५४९ त जन्मला. सं. १५६० त दीक्षा. सं. १५८२ त पदस्थापना. सं. १६१२ त मृत्यु.

६१ जिनचंद्रः—रीहड गोत्राचा साह--श्रीवन्त व सिरीयादेवी यांचा पुत्र. तिमरीनगराजवळील वडली ग्रामांत सं. १५९५ त जन्मला. सं. १६०४ मध्यें दीक्षा. जेशलमेरू येथें सं. १६१२ त सूरिपद. असें म्हणतात कीं ह्यानें अकबर बादशहाला जैनधर्माची दीक्षा देऊन त्याचें धर्मांतर करविलें. समयराज, महिमराज, धर्मनिधान, रत्ननिधान, ज्ञानविमल वगैरे त्याचे ९५ शिष्य होते. तो वेणातट येथें सं. १६७० त मृत्यु पावला. भावहर्षोपाध्यायानें स्थापिलेली भावहर्षीय खरतर शाखा सं. १६२१ मध्यें निर्माण झाली. हा ७ वा गच्छभेद होय.

६२ जिनसिंहः—गणधर चोपडा गोत्राचा साह--चांपसी व चतुरंददेवी याचा पुत्र. खेटासर ग्रामांत सं. १६१५ त जन्मला. मूळ नांव मानसिंह. बिकानेर येथें सं. १६२३ त दीक्षा घेतली. जेशलमेरू येथें सं. १६४० त वाचकपद मिळालें. लाहोर येथें सं. १६४९ त आचार्यपद मिळालें. वेणातट येथें सं. १६७० त सूरिपद मिळालें. मेडटा येथें सं. १६७४ त तो मृत्यु पावला.

६३ जिनराजः—बोहिथ्थरागोत्राचा साहधर्मसी व धारलदेवी याचा पुत्र. सं. १६४७ त जन्मला. बिकानेर येथें सं. १६५६ त दीक्षा घेतली. दीक्षानाम राजसमुद्र असें होतें. सं. १६६८ त वाचकपद मिळालें. सं. १६७४ त मेडटा येथें सूरिपद मिळालें. त्यानें पुष्कळ प्रतिष्ठा केल्या. उदाहरणार्थ, शत्रुंजयावर ऋषभ व दुसऱ्या जैनांच्या ५०१ मूर्ती सं. १६७५ त स्थापन केल्या. त्यानें जैनराजी नांवाची नैषधीय काव्यांवर एक वृत्ति लिहिली व दुसरे ग्रंथ रचिले. तो पाटण येथें सं. १६९९ त मृत्यु पावला. सं. १६८६ त आचार्य जिनसागरसूरीपासून लघ्वाचार्यीय खरतरशाखा निर्माण झाली. समयसुंदराचा शिष्य हर्षनंदन (ऋषिमंडल टीकेचा कर्ता) ह्यानें ती शाखा स्वतः निमित्तभूत होऊन उपस्थित केली होती. हा आठवा गच्छभेद होय. स. १७०० त रंगविजयगणीपासून रंगविजयखरतरशाखा निर्माण झाली. हा नववा गच्छभेद होय. आणि ह्या शाखेपासून श्रीसारोपाध्यायानें स्थापिलेली श्रीसारिय खरतरशाखा उत्पन्न झाली. हा दहावा गच्छभेद होय. अकरावा गच्छ भेद बृहत्खरतर नांवाचा मूलगच्छ आहे. याप्रमाणें खरतरगच्छाचे अकरा भेद आहेत.

६४ जिनरत्न.—लुणीया गोत्राचा साह तिलोकसी व तारादेवी यांचा पुत्र. मूळ नांव रूपचंद्र सं. १६९९ त सूरिमंत्र घेतला. अकब्बराबाद येथें हा सं. १७११ त मरण पावला.

६५ जिनचंद्र.—गणधर चोपडा गोत्राचा साह—आसकरण व सुपियारदेवी यांचा पुत्र. मूळ नांव हेमराज. दीक्षानाम हर्षलाभ. सं. १७११ मध्यें पदस्थापना झाली. हा सुरत येथें सं. १७६३ त मृत्यु पावला.

जिनसौख्य.—लेचावुहरा गोत्राचा साह रूपसी व सुरूपा यांचा पुत्र. फोगपट्टण येथें सं १७३९ त जन्मला. पुण्यपालसरग्रामात सं. १७५१ मध्यें दीक्षा घेतली. दीक्षानाम सुखकीर्ति. सं. १७६३ त सूरिपद मिळालें. सं १७८० त ऋणी येथें मरण पावला.

६७ जिनभक्ति.—सेठगोत्राचा साह हरिचंद्र व हरिसुखदेवी यांचा पुत्र. इंद्रपालसर ग्रामांत सं. १७७० मध्यें जन्मला. मूळ नांव भीमराज. सं १७७९ मध्यें दीक्षा घेतली. दीक्षानाम भक्तिक्षेम. सं. १७८० त (वयाच्या दहाव्या वर्षी) ऋणी येथें सूरिपद मिळालें. सं. १८०४ मध्यें कच्छ देशांतील मांडवी येथें मृत्यु पावला.

६८ जिनलाभ.—बिकानेर येथें राहणारा बोहिथ्थरा गोत्राचा साह पचायणदास व पद्मादेवी यांचा पुत्र. सं. १७८४ त वापीउ ग्रामात जन्मला. मूळ नांव लाडचंद्र. जेशलमेरू येथें सं १७९६ त दीक्षा घेतली. दीक्षानांव लक्ष्मीलाभ. माडवी येथें सं. १८०४ मध्यें पदस्थापना झाली. त्यानें पुष्कळ यात्रा व प्रतिष्ठा केल्या. तो गुडा येथें सं १८३४ त मृत्यु पावला.

६९ जिनचंद्र.—बिकानेर येथें राहणारा वच्छावत मुम्हता गोत्राचा रूपचंद व केसरदेवी यांचा पुत्र. कल्याणसर ग्रामांत सं १८०९ त जन्मला. मूळ नांव अनूपचंद्र. मंडोवर येथें सं १८२२ त दीक्षा घेतली. दीक्षानाम उदयसागर. गुढा येथें सूरिपद सं. १८३४ त मिळालें. सुरत येथें सं. १८५६ त मृत्यु पावला.

७० जिनहर्ष.—मिथाडियावहुरा गोत्राचा साह—तिलोकचंद्र व तारादेवी याचा पुत्र. वालीग्रामांत जन्मला. सं. १८४१ त औग्रामांत दीक्षा घेतली. सुरत येथें सं. १८५६ त सूरिपद मिळालें. मृत्यु सं. १८९२.

७१ जिनमहेंद्र.—जन्म सं. १८६७ दीक्षा सं. १८८५ सूरिपद सं. १८९२. मृत्यु सं १९१४.

७२ जिनमुक्ति,—जन्म सं. १८८७. दीक्षा सं. १९०७ सूरिपद सं. १९१५.

[माइल्स—ट्रॅन्झॅक्ट. आर. ए. सो. पु. ३ टाड्र राजस्थान; वेबर—र्बालिन ॲकॅ. १८८२; किलहॉर्नचा रिपोर्ट १८८०—८१ इं. ॲ. पु. ११ (अनु). याकोबी—क्षेड्. डी. एम्. जी. पु. ३३; पीटर्सनचा रिपोर्ट ४. (जॉ. ब्र. आर. ए. सो. १८९४)]

खरबूज—याला खरबूज, करबूज, खरमूज, टरबूज इत्यादि नांवें आहेत.

इतिहास—खरबुजाचे वेल मूळचे हिंदुस्थानांतील नाहींत, त्यांचें बीं परदेशांतून आलेलें आहे.. ऐन इ अकबरीमध्यें बदकशान अथवा काबुली खरबुजांची तारीफ केलेली

आहे. हिंदुस्थानांतील खरबुजें हीं इराणमधील बियांपासून झालेलीं आहेत. सदा नांवाचें खरबूज सर्वांत उत्तम असून तें काबुलमध्यें होतें; हें हिंदुस्थानांत पिकत नाहीं. इतर खरबुजापेक्षां सदा खरबूज पिकायाला फार वेळ लागतो. सफेदा किंवा पांढरीं खरबुजें हीं लखनौ प्रांतांत वाळवंटावर होतात. ह्यांचा रंग पांढरा असून आकार मोठ्या नारिंगासारखा असतो डॉ. बोनाव्हियानें लखनौच्या चिटल खरबुजाविषयीं उपयुक्त माहिती दिलेली आहे.

कृषिकर्मशास्त्रदृष्ट्या खरबुज हीक्युक्युमिस (काकडी)वर्गाची एक महत्त्वाची जात असून या वर्गांत २८ जाती आहेत. त्यापैकीं फक्त ३–४ हिंदुस्थानांत वाढतात. हिंदुस्थानात वाढणाऱ्या जातीपैकीं खरबुज व काकडी ह्या दोन मुख्य आहेत. खरबुजाची लागवड हिंदुस्थानात नद्यांच्या कांठच्या वाळवंटात करतात. गंगेचे व यमुनेचें पाणी ओसरून गेल्यावर त्यांच्या वाळवंटावर खड्डे खणून त्यांत खत भरतात व नंतर खरबुजाचें बीं पेरतात. वेलांचा बचाव करण्याकरितां खड्ड्याच्या सभोंवतीं गवत लावितात व काटेरी कुंपणें करतात. नदीच्या गाळांत कसदार माती आलेली असल्यास खत फार कमी लागतें. अहमदाबादमध्यें व इतर कांहीं ठिकाणीं खड्याच्या ऐवजीं चर खणून त्यांत हीं झाडें लावितात. ह्या वेलांना एप्रिलपासून जूनपर्यंत फळें येतात.

ह्या वेलाचें बीं चपटें असून त्यांपासून गोडें तेल काढतात. बियात तेलाचा अंश शेकडा ३० असतो. चीनच्या चेफू बंदरावर याचा मोठा व्यापार चालतो. बियांचें तेल पातळ व हलकें असतें. हें तेल खाण्याच्या पदार्थांत घालतात. साबण करण्याकरतांहि याचा उपयोग करतात. पूर्वी सायरालिओन व लॅगॉस येथून हें तेल परदेशीं जात असे. दाहहारक औषधी म्हणून याच्या बियांचा उपयोग होतो. भांगमताहगामध्यें खरबुजाच्या बिया टाकितात.

काकडीच्या वर्गातील इतर फळाप्रमाणें खरबुजालाहि किडा लागतो. किडा लागूं नये म्हणून झाडावर राख फेंकतात परंतु त्यापासून नुकसान होत असलें पाहिजे. हे फळ पिकल्यानंतर खातात. हिरवेपणीं भाजी करतात ती काकडी भोंपळ्याप्रमाणें करतात. फार कोंवळें असतांना त्यास कडूपणा असतो तो नाहींसा झाल्यानंतर भाजी करतात.

मो मा र डि खा.—याचीं फळें काकडीसारखीं असून तीं लांबट व गुळगुळीत असतात. फळांवर हिरवे व पिंवळे ठिपके असतात. ह्याचे निरनिराळे प्रकार असतात. त्यापैकीं कांहीं उन्हाळ्यांत व कांहीं पावसाळ्यांत तयार होतात. हे वेल कापूस व मका याच्या शेतांत पेरतात. याचीं फळें पिकलीं म्हणजे तीं फुटतात. त्याचा गीर पिठुळ असून त्यास गोडी नसते. कच्च्या फळाची भाजीहि करतात.

ट र का क डी.—ही जात काकडीप्रमाणेंच असते. हिचीं फळें कांहीं अर्धवतुलाकार असतात व कांहीं लांबट असतात. कांहींचा लांबी तीन फुटापर्यंत असते. कच्ची फळें हिरवटसर असून त्यावर लव असते. हीं फळें वाढत चाललीं म्हणजे ती हिरवीं होतात व पिकलीं म्हणजे नारिंगी होतात. बंगाल, संयुक्तप्रांत, पंजाब, पश्चिमहिंदुस्थान इत्यादि भागांत याची लागवड उन्हाळ्यात व पावसाळ्यांत करतात कोरड्या व भुसभुशीत जमिनींत हे वेल चांगले होतात. जमिनींत खत टाकून वाफे करतात व प्रत्येक वाफ्यांत तीन फुटाच्या अंतरावर ३–४ बिया टाकितात. काकडीपेक्षां याच्या फळाची गोडी कमी असते. उन्हाळ्यांत गरीब लोक ह्या फळांवर राहतात. मध्यम वाढीचीं फळें लोणच्याच्याच उपयोगी असतात. याच्या बिया वाळवून त्यांचें पीठ करतात, बियांचें तेल खाण्याच्या पदार्थांत घालतात व दिव्यांतहि जाळतात. हें तेल औषधी असतें. [वॅट].

खरर.—पंजाब. अंबाला जिल्ह्यांतील एक तहशील. ही हिमालयाच्या पायथ्याशीं वसलेली असून हिचें क्षेत्रफळ ३७२ चौ. मै. आहे. लो. सं. (१९११) १,३३,२८३. हींत २ शहरें व ३७३ खेडीं आहेत. राज्यव्यवस्थेसाठीं कसौली व कालका हीं शहरें या तालुक्यांत घेतलीं आहेत. मध्यभागची व पश्चिमेकडील जमीन पिकाला बरी आहे. १९०३–४ साली जमीन महसूल व इतर कर वसुली ३०१ लाख रुपयांची होती. खरर हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे.

खरसावान—बिहार–ओरिसा. छोटा नागपूर संस्थानापैकीं एक. उ. अ. २२° ४१' आणि २२° ५३' व पू. रे. ८५° ३८' आणि ८५° ५५' यांमध्यें हें संस्थान पसरलें असून त्याचें क्षेत्रफळ १५३ चौ. मै. आहे. उत्तरेस रांची व मानभूम जिल्हे, पूर्वेस सरईकेला संस्थान व दक्षिण आणि पश्चिम या बाजूंस सिंधभूम जिल्हा आहे. सोनई नदी वायव्य-आग्नेय वहाते. हिच्या उत्तर व दक्षिण बाजूंस जंगलांनीं झाकलेले डोंगर आहेत. मुख्य पीक तांदुळाचें आहे. बहुतेक डोंगरातून लोखंड सांपडतें. सोनई नदींतील वाळूंत थोडेसें सोनें सापडतें. मार्गे तांबें सांपडत असावेंसें दिसतें. संस्थानचा सुमारें ४० चौरस मैलाचा प्रदेश जंगलानें व्यापिला आहे; त्यांत साल, आसन, गम्हार, कुसुम, विजासाल, जामुन व बांबू हीं मुख्य झाडें आहेत. वाघ, चित्ते, अस्वल हरिण, ससे वगैरे जनावरें जंगलांत आहेत. निरनिराळ्या जातीचे साप सर्वत्र आहेत.

खरसावानचा संस्थानिक पोराहाट राजघराण्याच्या धाकट्या पातींतील आहे. मूळ पुरुष विक्रमसिंग. त्याचा वडील मुलगा सरईकेलाच्या गादीवर व धाकटा खरसावानच्या गादीवर बसला. १७९३ त प्रथम ब्रिटिशांशीं संस्थानचा संबंध आला. ब्रिटिश सरकाराला संस्थानाकडून खंडणी जात नाहीं. तरी प्रसंगविशेषीं ब्रिटिश सरकारला मदत द्यावी लागते. १९१७ त संस्थानिकाला ब्रिटिश सरकारनें नवी सनद दिली. छोटा नागपूरचा कमिशनर व सिंधभूमचा डेप्युटी कमिशनर यांची संस्थानावर देखरेख

असते. संस्थानची लो सं (१९२१) ३७,३०५ आहे. यांत पुरुषांपेक्षां बायका बऱ्याच जास्त आहेत. संस्थानांत एकंदर १८६ गांवें आहेत. सर्वांत खरसावान मोठें आहे. शेतकी हा लोकांचा प्रमुख धंदा आहे. तांदूळ, मका, कडधान्यें, ऊंस व तंबाकू हीं मुख्य पिकें होत जाड कापड व स्वयंपाकाचीं लोखंडी भांडी या ठिकाणीं तयार होतात. संस्थानच्या हद्दींत १२ मैल लांबीची बंगाल-नागपुर रेल्वे आहे. संस्थानचें उत्पन्न सुमारें ४५ हजार आहे. एक दुय्यम शाळा, कांहीं प्राथमिक शाळा, दवाखाना हीं संस्थानच्या खर्चानें चालतात.

खरार—बंगाल. मिदानापुर जिल्ह्याच्या घाटाळ पोटविभागांतील एक शहर. उ. अ. २२° ४०' व पू. रे. ८४°-४४'. लो. सं. (१९११) ८८३९. कांशाचीं व पितळेचीं भांडीं येथें फार होतात. १८८८ त येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली मालमत्तेवरील कराचें उत्पन्न बरेंच मोठें आहे.

खरे, वासुदेव वामन शास्त्री—(१८५८-१९२४) महाराष्ट्रीय ग्रंथकार. इतिहाससंशोधक. हे कोंकणांतील गुहागरचे रहिवासी असून याचा जन्म ८ आगष्ट १८५८ रोजीं झाला. यांचें घराणें शास्त्रविद्येविषयीं प्रसिद्ध आहे. हे घाटावर आल्यानंतर यांनीं सातान्यास अनंताचार्य गजेंद्रगडकर यांच्या जवळ संस्कृत विद्येचा अभ्यास केला. नंतर ते पुण्यास येऊन त्या वेळीं निघालेल्या कै चिपळूणकरांच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें संस्कृत शिक्षक म्हणून राहिले. या वेळीं त्यांचा व कै. लो. टिळक याचा दृढ परिचय व स्नेह जमला. केसरी-मराटा संस्थेशीं शास्त्रीबुवाचा संबंध संस्थेच्या जन्मापासूनच जडला होता. पुढें मिरजेस नवीन हायस्कूल निघाल्यामुळें लो. टिळकांच्या सांगण्यावरून शास्त्रीबुवांनां तेथें संस्कृत शिक्षक म्हणून नेमण्यांत आलें. तेथेंच शास्त्रीबुवांनीं ३० वर्षें नोकरी करून विश्रांति घेतली. मिरजेस गेल्यावर त्यांनीं इंग्रजी भाषेचा अभ्यास स्वतः मेहनत करून केला. तेथें असतांना त्यांनीं इतिहाससंशोधनाचा उद्योग हातीं घेतला आणि सतत २७ वर्षें खपून पटवर्धनी दप्तरांतील अमूल्य इतिहाससामुग्री बाहेर काढून, ऐतिहासिक लेखसंग्रह नांवाच्या पुस्तकांच्या द्वारा महाराष्ट्राच्या हातीं दिली. या कामीं त्यांना अतिशय त्रास होऊन झीजहि सोसावी लागली. त्यांत त्यांना पैशाची मदत अशी फारशी कोणाकडून झाली नाहीं. नौकरी संभाळून त्यांनीं हें काम केलें. अशा अडचणींतहि त्यांनीं श्रेष्ठ इतिहाससंशोधक व उत्तम ग्रंथकार म्हणून नांव कमविलें हेंच त्यांच्या बुद्धिमत्तेचें व ध्येयनिष्ठेचें लक्षण होय. त्यांनां लहानपणापासून कविता करण्याचाहि नाद होता. त्यांची फुटकळ कविता बरीच असून यशवंतराव नांवाचें एक महाकाव्यहि प्रसिद्ध आहे. शाळेंत संस्कृत श्लोक वगैरे शिकवितांना तेथल्या तेथें त्यांचें समवृत्त मराठी भाषांतर ते करीत असत. शिक्षक या नात्यानें ते जरा कडक असत. ऐतिहासिक पत्रांच्या भाराभर गठ्ठ्यांतून नेमकीं पत्रें वेंचून काढून तीं ते प्रसिद्ध करीत व अशा पत्रांचा प्रकरणवार सारांश ते प्रारंभीं देत. त्यामुळें त्यांचे ऐ. ले. सं. हें मासिक लोकप्रिय झालें. मासिकाचें रूपांतर पुढें खंडांत झालें. आतांपर्यंत याचे एकंदर १२ भाग प्रसिद्ध झाले आहेत. आणि त्यात स. १७६१ पासून १८०० पर्यंतचा मराठ्यांचा इतिहास आलेला आहे. शास्त्रीबुवा हे रसिक व विद्वान् असल्यानें त्यांच्या तोंडून प्रसंगीं बरीच नवीन माहिती ऐकण्यास सांपडे. त्यांनीं कांहीं नाटकेंहि लिहिलीं आहेत. गुणोत्कर्ष, शिवसंभव, तारामंडळ, उग्रमंगल, वगैरे त्यांचीं ऐतिहासिक व सामाजिक नाटकें प्रसिद्ध आहेत. याशिवाय नानाफडणीस यांचा अधिकारयोग, हरिवंशाची बखर, इचलकरंजीचा इतिहास वगैरे पुस्तकेंहि त्यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत.

त्यांनां बहुतेक आयुष्य गरिबींत काढावें लागलें. त्यांनीं दोन तपें जें इतिहाससंशोधनाचें भरीव व सुव्यवस्थित आणि सूत्रबद्ध काम केलें तें कोणत्याहि उच्च प्रतीच्या विद्वानाला शोभण्यासारखें व अभिमानास्पद होतें. त्यांची विवेचक व सारग्राही बुद्धि अत्यंत प्रखर होती व मोठ्या पायावर ते लहान इमारत रचीत, त्यामुळें त्यांचीं विधानें नेहमीं अबाधित रहात. दीर्घ परिश्रमामुळें त्यांची प्रकृति ढासळून त्यांनां क्षयाची व्यथा जडली आणि शेवटीं ता. ११ जून सन १९२४ रोजीं मिरज येथें त्यांना देवाज्ञा झाली.

खरोष्ट्र—एका चिनी लेखांत काशगरला जुनें नांव खरोष्ट्र होतें असा आधार मिळतो. खरोष्ट्री लिपि काशगारियापासून उत्पन्न झाली असावी असें विधान लेव्ही करितो. त्यास पिशेल व फ्रांके आक्षेप घेतात. अधिक माहिती मिळवून व विचार करून हेडव्हाय असें सांगतो कीं, काशगर, खोतान इत्यादि प्रदेशाच्या आसपासच्या बऱ्याच भागाला खरोष्ट्र हें नांव होतें व त्या देशाची लिपि तीच खरोष्ट्री होय.

अवतंसक सूत्राच्या चिनी भाषांतरांत या देशास 'पिएनयि' व 'चैले' अशीं नांवें आढळतात व 'चैले' याबद्दल सूर्यगर्भसूत्रांत 'यूतइएं' (खोतान) हें नांव येतें. यावरून खरोष्ट्र हें नाव पूर्वी हल्लींच्या खोतान प्रांतास व आजूबाजूच्या डोंगरी मुलखास लावीत असावें. खरोष्ट्र याचा अपभ्रंश खोतान या शब्दामध्यें होणें स्वाभाविक आहे.

आतां सूर्यगर्भाच्या तिबेटी रूपांतरावरून पहातां असें दिसतें कीं, खोतान हा प्रांत खश देशामध्यें होता. खश हें नांव संस्कृत वाङ्मयांत व महाकाव्यांमधून व धर्मशास्त्रावरील ग्रंथांतून आढळतें. नेपाळ देशांतील गुरखे लोक आपणास 'खश' म्हणवून घेण्यांत भूषण मानतात. व त्यांची भाषा खश अथवा पर्वतीय या नांवानें प्रसिद्ध आहे. खास अथवा खश हीं नांवें हल्लीं हिंदु लोक हिमालय पर्वतांतील प्रदेशांत

रहाणाऱ्या अर्धवट हिंदु लोकांस सरसकट लावतात असे लेव्ही आपल्या नेपाळवरील ग्रंथांत म्हणतो.)

ललितविस्तरावरून खश देश हा सिंधु नदीच्या खालच्या भागाच्या तीरावरील दर्दिस्तान व चीनची सरहद्द यांच्या दरम्यान असला पाहिजे. तेव्हां सूर्यगर्भ सूत्रांवरून शोर्शापे खश प्रांतांत आहे व या प्रांतालाच काशगर म्हणत असत. यावरून आपणांस असें दिसतें की खोतान व काशगर हीं दोन्ही प्रांतनामें खरोष्ठ प्रांताबद्दल असावीं. आतां बुद्ध भद्राचें भाषांतर आपल्या मदतीस घेतलें असतां असें दिसून येईल कीं, खोतान व काशगर हे दोन्ही प्रांत, 'पिएन थि' यानें दर्शविला जाणारा हिंदुस्थान व चीन याच्या सरहद्दीवरील रानटी लोकाचा जो प्रदेश, ज्याला हल्लीं भूगोलांत टर्किस्तान असें म्हणतात, त्या प्रदेशांत येतात. हा प्रदेश हिंदुस्थान, चीन व इराण यांचें सर्वसाधारण अधिकारक्षेत्र होतें. हा सर्व प्रदेश म्हणजेच खरोष्ठ देश होय.

बौद्ध प्रदेशाचे मुख्य तीन भाग म्हणजे हिंदुस्थान, खरोष्ठ व चीन असे होते. यावेळीं तीन लिपी प्रचारात होत्या. ब्राह्मी (फान), डावीकडून उजवीकडे लिहिली जाणारी; खरोष्ट्री (किआ–लो अथवा किआ–लौ–चो–ति), उजवीकडून डावीकडे लिहिली जाणारी; व चिनी, वरून खालीं लिहिली जाणारी. अशा प्रत्येक लिपीला एक उत्पादक महात्मा होता. ब्राह्मीचा ब्रह्मा, खरोष्ट्रीचा खरोष्ठ (किआ–लौ– अथवा किआ–ले–चो–त्चा) व चिनाचा 'त्सग–हिए' या तीन लिपींचा व उत्पादकाचा उल्लेख प्रथम 'सेंग येओयु' यानें इ. स. ५२० मध्यें लिहिलेल्या त्रिपिटक ग्रंथाच्या यादीमध्यें (त्चौ–सान–त्संग–कि–त्सि) आढळतो. जिदम् सांप्रदायांमध्येंहि या तीन लिपींचा उल्लेख असून ते हा भेद कायम ठेवितात. याशिवाय दुसऱ्या ग्रंथातूनहि याबद्दलचा उल्लेख आढळतो. यावरून खरोष्ट्री लिपी ही खरोष्ठ देशाप्रमाणेंच हिंदुस्थान व चीन यांच्या दरम्यान होती असें दिसतें.

खर व उष्ट्र हे दोन शब्द पुष्कळ ठिकाणीं एकाशेजारीं एक वापरलेले दृष्टीस पडतात. व हे दोन्ही प्राणी पुष्कळ प्रदेशात एका ठिकाणीं आढळतात. गर्दभाचा प्रदेश म्हटला म्हणजे इजिप्त्यापासून गोबीच्या मैदानापर्यंतचा आहे.व उंटाचा ओसाड मैदानें हा ठरलेलाच आहे. हिंदुस्थानांत उंटाचा प्रदेश सिंधुनदीच्या मुखापासून सतलज नदीपर्यंत येतो. गर्दभाचा प्रांत मात्र पश्चिम हिंदुस्थानांत दक्षिणेकडे बराच लांबपर्यंत पसरला आहे. खर व उष्ट्र हे इराणातील मुख्य प्राणी होत. त्यांच्या पैकीं झरथुष्ट्र व त्याचा सासरा फ्रशौष्ट्र या नांवावरूनहि त्यांनीं उंट व गर्दभ यांस दिलेलें महत्व दिसून येतें. अवेस्ता ग्रंथ मध्येंहि उष्ट्रास बरेंच महत्व दिलें आहे. ८४२.९,३७. उष्ट्राचा उल्लेख ऋग्वेदामध्येंहि दानस्तुतींमध्यें विशेषतः आढळतो. ८,६,४८; वायव्य हिंदुस्थानाचा जेथें संबंध येतो. तेथें आपणास उष्ट्र व खर हीं दोन्ही नांवें एका ठिकाणीं आढळतात. महाभारतामध्येंहि मद्रक व बाल्हीक यांचें वर्णन करतांना व त्या देशाचा उल्लेख करतांना खरोष्ट्र हा शब्द वापरलेला दिसतो.

आतां हिंदु लोकांनीं जर खरोष्ठ हा शब्द नुसता प्राणिवाचक वापरला असता तर त्याचें व्याकरणशुद्ध रूप उष्ट्रखर हें त्यांनीं वापरलें असतें पण त्यांच्या कानावर खरोष्ठ हें नांव वारंवार पडल्यामुळें त्यांनीं खरोष्ठ हा शब्द सवयीनें बरोबर समजून प्राणिवाचकहि तेंच रूप वापरलें. यावरून महाभारतकालीं व मनुस्मृतीच्या कालीं हिंदु लोकांस खरोष्ठ देश ऐकून ठाऊक होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. यासंबंधीं निश्चित सत्य एवढेंच आहे कीं इ. सनाच्या पहिल्या शतकात खरोष्ठ हें नांव हिंदु लोक वायव्येकडील सरहद्दीवरील मुलुखास लवीत असत. हा प्रदेश म्हणजे ब्राह्मणी राज्याच्या पलीकडील रानटी लोकांचा पश्चिमेकडे पसरलेला देश होय. कांग्रा खोऱ्यांतील द्वैभाषिक शिलालेखावरून व त्यांतील ब्राह्मी व खरोष्ट्री लिपीवरून सतलज नदीचा वरचा भाग म्हणजे या दोन्ही लोकांचें मिश्रण असलेला प्रदेश होय.याच्या पूर्वेकडील भाग ब्राह्मणांचा होता. व पश्चिमेकडील रानटी लोकांचा होता. [लेव्ही—इं. अँ. १९०६]

खरोष्ठ ऋषि—या ऋषीबद्दल सूर्यगर्भसूत्रामध्यें असा उल्लेख आहे कीं, "भद्रकल्पाच्या प्रारंभीं कंपा नामक नगरात एक 'त–सन्. मो. भो.तो' (महासम्मत) नांवाचा देवपुत्र रहात असे. त्याच्या स्त्रीनें विलक्षण कामेच्छेनें एका गर्दभाशीं संभोग केल्यामुळें तीस गर्दभाचें शिर व मनुष्याचें शरीर असलेला एक विचित्र मुलगा झाला. त्याचा तिनें त्याग केल्यावर एका खरी राक्षसीनें त्यास नेऊन त्याला अमृत वगैरे दैवी खाद्य पदार्थ दिले. देवांनीं त्यास खरोष्टमहर्षि (चिनी–किआ. लौ. चे. त्वा ता. सि. एं.) असें नांव दिलें. त्यानें दैवी आहार व वनस्पती खाल्ल्यामुळें व तपश्चर्या केल्यामुळें त्याचें मुख सुंदर झालें. मात्र ओंठ तेवढे गर्दभासारखे राहिले. यानें पूर्वजन्मात कांहीं पाप केल्यामुळें त्यास या जन्मात अशी अवस्था झाली. याला ग्रह, तारे, नक्षत्र वगैरे ज्योतिषाचें फार ज्ञान असून तें त्यानें सर्व देव, यक्ष, उरग, नाग, असुर वगैरेनां दिलें."

झोरो अॅस्टर (जरथुष्ट्र) यालाहि फलज्योतिषाचें ज्ञान होतें असें म्हणतात. त्याच्या ग्रीक नांवामध्येंहि हाच अर्थ निघतो. तेव्हां खरोष्ठ हें झरथुष्ट्र यासच दिलेलें दुसरें एखादें नाव तर नसेलना अशी सि लेव्ही हे शंका प्रदर्शित करतात.आपणास हिंदु सिथियन नाण्यांवरून वगैरे अवेस्ता भाषेतील अक्षरें आढळतात,व झरथुष्ट्र यास हे लोक पूज्य मानीत असत. यावरून कदाचित खरोष्ठ व झरथुष्ट्र याचा संबंध जोडणें शक्य आहे.व त्यामुळें झरथुष्ट्राच्या लिपीचा व खरोष्ट्री

लिपींचाहि संबंध जोडणें शक्य आहे असेंहि ते म्हणतात. [सं. अँ. १९०६]

खर्जी.—वऱ्हाड-मध्यप्रांत. भंडारा जिल्हा. अर्जुनीच्या उत्तरेस ही एक लहानशी जमीनदारी आहे. हींत दोन खेडीं असून एकंदर क्षेत्रफळ ४३०० एकर व लोकसंख्या १३०० आहे. देवगडच्या बख्तबुलंदनें प्रतापगड किल्ल्याचा किल्लेदार अमरसिंग यास इनाम दिली पुढें राघोजीरावानें त्याच्या नातवाकडेच ही जमीनदारी टेवली. उत्पन्न २००० रुपये. टाकोळी ६०० रुपये. येथें एक मोटा तलाव नुकताच बांधण्यांत आला आहे.

खर्डा.—बंगाल, चोवीस परगणे जिल्हा. बराकपूर पोट-विभागांतील एक गांव. ईस्टर्न बंगाल स्टेट रेल्वेचें हें स्टेशन असून हुगळी नदीच्या डाव्या तीरावर वसलें आहे. उ. अ. २२° ४४' व पू. रे. ८८° २२', लो. सं. (१९०१) १७७७ चैतन्याचा शिष्य नित्यानंद याचें हें क्षेत्र असून वैष्णवभक्त येथें यात्रेला येतात. नित्यानंदाच्या वंशजांना गुरु म्हणून मान देण्यांत येतो. श्यामसुंदरचें येथील देऊळ फार सुरेख आहे. दक्षिण बराकपूरच्या म्युनिसिपालिटींत हें गांव येतें.

खर्डे—मुंबई, अहमदनगर जिल्हा जामखेड तालुक्यांतील एक गांव. उ. अ. १८° ३८' व पू. रे. ७५° २९, लो. सं. (१९११) ७१३३. अहमदनगरपासून हें आग्नेयेस ५६ मैलांवर आहे. इ. स. १७९५ त निजाम व मराठे यामध्यें येथें मोठी लढाई झाली. येथें ५०० वर मोठे व्यापारी, दुकानदार व सावकार आहेत. निजामाचा सरदार निंबाळकर याकडे हा गांव होता. त्याचा सुंदर वाडा अद्याप गावच्या मध्यभागीं मोडकळीस आलेला दिसतो. गांवाच्या आग्नेयेस निंबाळकरानीं बांधलेला एक किल्ला आहे किल्ल्याभोंवती एक खंदक आहे. मंगळवारीं येथें भरणारा गुरांचा बाजार सबंध जिल्ह्यांत फार मोटा असतो. येथील म्युनिसिपालिटी १८९० त स्थापन झाली.

खर्ड्याची लढाई—बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनीं व्यवस्था केल्याप्रमाणें, हैद्राबादकर निजामच्या मुलुखांत चौथसरदेशमुखीचा वसूल सालदरसाल घेण्याचा हक्क मराठ्यांनां प्राप्त झाला होता; हें पेशव्यांनीं लादलेलें ओझें कसेंहि करून निजामला झुगारून द्यावयाचें होतें. पेशवाईच्या स्थापनेपासून थोरल्या माधवरावांच्या अखेरीपर्यंत मराठे व निजाम यांच्यांत जीं जीं युद्धें झालीं, त्या सर्वांचें मूळ कारण हेंच होय. स. १७९४ पर्यंत या चौथसरदेशमुखीची बाकी जवळ जवळ दोन कोटींवर होऊन गेली. या वेळीं टिपूकडील भांडण मिटलें होतें; तेव्हां मराठ्यांनीं आतां आपल्या मागणीचा लकडा निजामकडे लावला. या कामांत इंग्रजांनीं पडून बाकी देण्याची कांहीं तडजोड करावी असा निजामअल्लीचा हेतु होता, पण इंग्रजांनीं तें नाकारलें. तेव्हां निजामअल्लीचा दिवाण मैंतुद्दौला उर्फ मशीरउल्मुल्क यानें त्याला युक्ति सुचविली कीं, मराठे हे तीन कोटी तीस लक्षांचा मुलुख मागतात, तो त्यांनां निमूटपणें देण्याऐवजीं तेवढ्या रकमेंत फौज जमवून मराठ्यांशीं लढाई देऊन कां पाहूं नये? ही मसलत निजामास आवडली व त्यानें मराठ्यांच्या कुरापती काढण्यास सुरुवात केली. वऱ्हाडच्या उत्पन्नाची वाटणी नागपूरकर भोसल्यास देण्याचें त्यानें मना केलें; पुण्यास त्याचे लोक येऊन मराठी फौजेंत फितूर करूं लागले; त्यानें आपल्या कवायती पलटणींची संख्या दोन होती ती वाढवीत वाढवीत तेवीसवर आणून ठेविली; पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यानीं दोन कोटी साठ लक्षांच्या बाकीची मागणी केली असतां हैदराबादच्या दरबारांत निजामनें श्रीमंतांची व नानांची सोंगें आणवून त्यांचा व नानांस उपमर्दकारक भाषा वापरली व त्यांचा उघड उपमर्द केला. याच सुमारास महादजी शिंदे व हरिपंत तात्या फडके हे वारल्यानें, निजामनें लढाईची तयारी अधिक जोरानें व निर्भयपणें चालविली. तरी पण दुतर्फीकडून त्यानें पुणेंदरबारशीं समेटाचीं बोलणीं शेवटपर्यंत चालविलींच होतीं. निजाम अल्लीनेंच प्रथम युद्धास तोंड लाविलें; बेदर येथें त्यानें स्वतःच्या देखरेखीखालीं सैन्याची तयारी चालविली. (८ नोव्हेंबर १७९४). त्याची एकंदर फौज १ लक्ष १० हजार जमली; तिच्यासह तो बेदरहून निघून मांजरानदीच्या कांठाकांठानें मराठ्यांच्या सरहद्दीकडे डिसेंबरांत येऊं लागला. इकडे पेशव्यांनींहि तयारी चालविली. दौलतराव शिंदे पुण्यांत होते; त्यांची फौज हिंदुस्थानांतून आणविण्यास पेशव्यांनीं त्यांनां हुकूम सोडला.

नागपूरकर भोसले, होळकर, रास्ते, पटवर्धन, विंचूरकर, मालेगांवकर, राजेबहाद्दर, घोरपडे, पाटणकर, प्रतिनिधि वगैरे प्रत्येक सरदार आपापल्या पथकांसह पुण्यास येऊन दाखल झाले. मुसा रेमू यानें निजामाकरितां कवायती पायदळाची पलटणें तयार केलीं होतीं त्याच धर्तीवर पेशव्यांनींहि मि. बॉइड नांवाच्या इंग्रज नोकराकडून कांहीं पलटणें उभारलीं होतीं. शिंद्यांचीं कांहीं पलटणें पुण्यास होतीं, तीं डिबाईनच्या नजरेखालीं तयार झाल्यामुळें त्यांची तयारी उत्तम प्रकारची होती. त्यांची कवायत गुलटेकडीजवळ शिंद्यांनीं करून दाखविली, ती पाहून श्रीमंत व नाना हे खूष झाले. गोविंदराव गायकवाडानेंहि आपली फौज पाठविली होती. या खेपेस खुद्द श्रीमंतांची स्वारी नानांच्या सह मोहिमेवर निघावयाची होती. यामुळें रावबाजी आनंदवल्लीस होते, ते कांहीं मसलत करतील म्हणून त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यांनां चिमाजी आप्पा व अमृतराव यांच्यांसह तेथून हालवून शिवनेरीस आणून ठेविलें. प्रथम हुजरात गारपिरावर डेरेदाखल झाल्यानंतर ८ डिसेंबरास नाना व १४ डिसेंबरास खुद्द श्रीमंत डेरेदाखल झाले. तुकोजी होळकर हे खानदेशांत बाडनेरास होते, ते १० हजार फौजेसह

११ तारखेस पुण्यास आले. परंतु त्यांची फौज साधारणच होती. परशुरामभाऊ म्हणतात " फौजेंत जीव नाहीं. गवगवा भारी ऐकण्यात येतो. " स्वारीस निघण्यापूर्वी श्रीमंतानीं जवाहिरखाना, जामदारखाना वगैरे सर्व कारखाने व आपले कुटुंब पुरंधर व सिंहगड या किल्ल्यांवर नेऊन ठेविलें. गारपीर, वडगाव, थेऊर या बाजूस श्रीमंताचा मुक्काम दीड महिना होता. नंतर सर्व लष्कर एकाच मार्गानें न जातां दाणावैरणीच्या सोयीकरिता निरनिराळ्या वाटानीं कूच करीत चाललें होतें. नानानीं प्रत्येक सरदाराचा सल्ला या मोहिमेंत विचारला होता. तिकडे निजाम बेदराहून धारुरास येऊन तेथून परांड्याच्या बाजूनें कूच करून येऊं लागला. त्याच्या एका टोळीनें जोगाईचें आंबें या क्षेत्राचा विध्वंस केला; दुसरीनें बार्शी, पानगाव वगैरे गावें लुटिलीं. तेव्हां मराठ्याचें पेंढारीहि निजामाचा मुलूख लुटूं लागले. शत्रूचा रोख पाहून श्रीमंत नगरहून निघून सीनेकडे चालले. वाटेंत खडकत येथें जिवबादादा बक्षी हे हिंदुस्थानातील शिंद्यांची फौज घेऊन आले. दहा हजार कवायती कंपूवर ते मुख्य असून त्यांच्या हाताखालीं मुसा पेरु (पेरों) होता. शिंद्याचें घोडदळ १५ हजार असून तें देवजी गवळ्याच्या हाताखालीं होतें. पुढें रघोजी भोंसले हे १५ हजार सैन्यासह येऊन मिळाले. तेव्हां एकंदर मराठी सैन्याची संख्या १ लाख १३ हजार झाली. याशिवाय शिंदे होळकर वगैरे सरदाराचें पेंढार होतें तें निराळेंच. विंचरणेवरील मुक्काम होईपर्यंत शिमगी पौर्णिमा आली; त्या पूर्वीच निजामअल्ली वीस पंचवीस कोसांवर येऊन टेपला. तेव्हां हुजरात व शिंदे, होळकर, भोंसले, पटवर्धन वगैरे सरदारांची मिळून ६०।७० हजार फौज १५० तोफांसह एक मजल आघाडीस जाऊन राहिली; याप्रमाणें ही फौज दररोज श्रीमंताच्या मुक्कामापासून एक मजल आघाडीस असे. या फौजेचे मुख्य बाबा फडके होते इतक्यांत निजामानें सल्ल्याचा निरोप गोविंदराव काळ्यामार्फत पाठविला, त्यांत चौथाईबाकी व ३० लक्षाच्या जहागिरीचे मुद्दे होते. परंतु श्रीमंतानीं एकच उत्तर केलें कीं, मशीरउल्मुल्क यास कारभारावरून काढून कैदेंत टेवून, नबाबानें आमच्या विचारानें कारभार करावा; याशिवाय बाकीच्या कलमांचा फडशा कसा तरी होईल. परंतु या दोन गोष्टी निजामानें साफ नाकारल्या व तो मोहरीचा घाट उतरून खर्ड्याच्या किल्ल्यानजीक खैरा नदीवर येऊन उतरला. तेव्हा शिंदे व भोंसले यांचा श्रीमंतांस निरोप आला कीं, नबाब खैरा नदीवरून उठून परांड्याच्या रोखें निघुन जाणार. तसें झाल्यास मसलत लांबणीवर पडेल. तरी त्यास अडविण्यास आम्ही सडे त्याजवर जातों. ही मसलत श्रीमंत व नाना यांनां पसंत पडून त्यांनीं परशुरामभाऊबरोबर आणखी फौज व तोफा देऊन त्यांस आघाडीवर पाठवून,फौजेच्या हालचाली व मसलत सर्व भाऊंच्या आज्ञेनुसार करावी असा आघाडीच्या सर्व सरदारांनां हुकूम सोडला. फाल्गुनी पौर्णिमेच्या दिवशीं भाऊ बाबा फडक्यांनां येऊन मिळून त्यांस**ह** वद्य २ स (७ मार्च १७९५) २०।२५ हजार स्वारासह सज्ज होऊन घोडगावास दाखल झाले. नवाब तेथून ३ कोसावर असल्यानें भाऊ आणखी दीड कोस पुढें गेले. तिकडे निजामहि तयार झाला. येथेंच शिंदे भोंसल्यानीं येऊन भाऊंस मिळावें व मग तिघानीं निजामावर चढाई करावी असा बेत टरला होता, परंतु सायंकाळपर्यंत ते दोघे आले नाहींत, तेव्हां भाऊ परत निघाले. तें पाहून निजाम त्यांच्या पाटीवर निघाला. भाऊंनीं त्याला पाटीवर घेत घेत घोडगांवापर्यंत आणलें; तों दिवस बुडाला. इतक्यात शिंदे आले व त्यांनीं निजामावर तोफांचा मारा केला; त्यामुळें तो परत आपल्या गोटात गेला. सर्व रात्र घोड्यावर जिनें टेवून भाऊ हे त्यांच्या टेहळणावर उभे होते. पुढें वद्य ४ रोजीं (९ मार्च) निजाम १ कोस पुढें आला, परंतु मराठ्यांनीं तोफा सुरू करताच त्यानें मुक्काम केला. तेव्हा त्याच्या लष्कराभोंवतीं अंतराअंतरावर मराठी फौजा रात्रंदिवस टेहेळणीवर राहिल्या. ता. ११ रोजीं बाबा फडके यांनीं निजामावर हल्ला केला परंतु निजामानें तो परतविला, तेव्हा हा आपण मोठाच जय मिळविला असें समजून निजामानें रात्रीं दरबार भरवून नजराणे स्वीकारले. दुसऱ्या दिवशीं बुधवारीं खर्ड्याची मोटी लढाई झाली. निजाम खर्ड्याहून निघून परांड्याकडे जाण्यास निघाला, तें पाहून भाऊ हे फडके, शिंदे, होळकर व भोंसले यांच्यासह त्याच्यावर चालून गेले. त्याचें बुणगें जात होतें इतक्यात यांनीं त्याला गाटलें. शिंदे हे भाऊंच्या डावीकडे होते व भोंसले हे उजवीकडे होते. उभयताकडील सैन्यें सज्ज होऊन उभीं राहिलीं. जवळ एक टेंकडी होती, तिच्यावर जाऊन भाऊ टेहेळणी करूं लागले. इतक्यात नबाबाकडील सरदार असदअलीखान व भारामल्ल हे रेमंडच्या १७ हजार कवायती सैन्यासह भाऊंवर चालून आले. त्यांचा व भाऊंची झटापट झाली. त्यांत भाऊंस उजव्या बाहुट्यावर व कपाळास तरवारीची जखम झाली. त्यांच्यावर लालखान नांवाच्या एका मुसलमान सरदारानें त्यांना घोडा मारून पट्याचे वार चालविले. भाऊंनीं पहिले दोन वार आपल्या पट्यानें चुकविले, पण लालखानाच्या तिसऱ्या वारानें त्यांच्या पट्याचा खोवळा तुटला व ते निःशस्त्र झाले. इतक्यांत भाऊंचे चिरंजीव आप्पा यांनीं लालखानास, तो भाऊंवर चवथा वार करीत असतांना ठार केलें. परंतु त्याच्या सैन्याच्या मदतीस अफिलखान कर्नूळकर व सलाबतखान एलिचपूरकर हे आले व त्यांनीं मराठ्यांस मागें रेटलें व भाऊ उभे होते ती टेंकडी काबीज केली.या लढाईत विठ्ठलराव पटवर्धन ठार झाले. इकडे मुसा रेमूची पलटणें व मोंगलाची इतर फौज यांनीं भाऊंच्या डाव्या बाजूस शिंदे होते, त्यांवर चाल केली. त्यावेळीं शिंद्यांनीं मोंगलांवर तोफांचा भयंकर

भडिमार केला. पेरो यानें आपल्या ३५ तोफा एका टेंकडीवर ठेवल्या होत्या. तेथून त्यांची सरबत्ती मोंगलांवर केली. त्याच वेळीं भोसल्यांकडूनहि बाणांची वृष्टीवर वृष्टी रेमूवर होऊं लागली. असा दोहींकडून मारा होऊ लागतांच तो मागें हटूं लागला. शिद्यांकडील लोकांनीं नबाबाचें तोंड माघारें सारलें. तेव्हां मराठे सर्व एक होऊन नबाबावर चालून गेले. 'सरकारची हुजरात सुद्धां चाळीस हजार तरवार उठली! करोली (बंदुकीचा भडिमार) बहुत अपूर्व झाली. नबाबाचे लोक बहुतेक मेले.' जीवबादादा यांनीं 'तीनशें तोफांचा खटारा पुढें लावला. आणि बावीस हजार नळी पलटणानी उभी राहिली. एकच तडाखा तोफांचा उसळला. संध्याकाळचा दिवस ६ घटका राहिला. इतक्यांत त्याला (निजामाला) वारा सोईचा होता. धूर आमच्या (मराठयाच्या) लष्करांत येऊं लागला. भाऊंनीं श्रीमंतांचें स्मरण करून वाऱ्याची प्रार्थना केली, तेव्हां वारा तिकडे सरला. मग पानसे यांनीं थोरल्या सतरा तोफा पुढें आणल्या. त्या बहुत मोठया; एक एक तोफेस दोनशें बैल ओढावयास लागत. त्या सुरू झाल्यावर दणाण झाला. तों अस्तमान झाला. मग मशाला व हवाया लागल्या. मग विठ्ठलपंत सुभेदार यांनीं बाणाचें छत करून सोडलें आणि सर्वांनीं एकदाच हरहर महादेव करून एकदांच उड्या घेतल्या! मोठी लढाई मातबर झाली. मोठी ख्याति झाली! पठाण मागें पाय घेऊं लागले प्रहर रात्र झाली असें पाहून नबाब मागें फिरला, मशीरुल्मुल्कहि पळाला.' याप्रमाणें निजामाचा मोड झाला. अंधारामुळें त्याच्या सैन्यांत अधिक गोंधळ माजला. मराठयांनीं त्याचा पाठलाग करून पांचसातशें घोडे पाडाव केले. 'श्रीमंतांच्या प्रतापें मोठें यश सरकारच्या फौजेस आलें. शिद्यांनीं शर्थ केली. सकाळच्या चारसहा घटका दिवसापासून शिद्याकडील कंपूची मारगिरी होत होती. ती बारा घटका रात्रीपर्यंत.' इतक्यात मराठयांच्या पेंढाऱ्यांनीं निजामाचें लष्कर चोहोंकडून घेरून लुटून फस्त केलें. 'नबाबाचीं ओझीं लादलीं होतीं तीं उतरूं पावलीं नाहींत.' तेव्हां निजाम घाबरून खडर्याच्या गढींत शिरला. त्याच्या तोफा, दारूगोळ्याचे २१४ शें छकडे, बाजार वगैरे सर्व लष्कर मराठयांनीं रात्रभर लुटलें 'मोठी दौलत समयानुसार श्रीमंताचे प्रतापेंकरून पेंचांत आली'. दुसऱ्या दिवशीं मराठयांनीं गढीस वेढा दिला. आंत निजामाचे अन्नपाण्याशिवाय हाल होऊं लागले. वर सांगितल्याप्रमाणें त्याचा बाजार वगैरे लुटल्यामुळें एक रुपयास अच्छेर धान्य व बारा रुपयांस एक पखाल पाणी मिळूं लागलें. मराठयांनीं पुन्हां त्या किल्ल्यावर तोफा डागण्यास प्रारंभ केला. तेव्हां निजामाकडून बोलणें आलें कीं, आम्ही तोफा मारीत नाहीं. तुम्हीहि मना कराव्या. तुमच्या मर्जीप्रमाणेंच तहाचा जाबसाल उलगडा देण्यांत येईल. पुढें श्रीमंतांनीं तहाच्या वाटाघाटीच्या वेळीं पुढील मागण्या केल्या. (१) पूर्वी सदाशिवराव भाऊसाहेबांनीं उदगीरच्या लढाईत जिंकलेला मुलूख होता. त्यांपैकीं परांड्यापासून तहत तापी नदीपर्यंतचा जितका मुलूख गेल्या ३५ वर्षांत निजामास परत देण्यांत आला असेल तो सर्व त्यानें पेशव्यांना परत द्यावा. (२) गंगथडीमध्यें घासदाण्याचा भोसल्यांचा हक्क आहे, त्याबद्दल भोसल्यास निजामानें ३ लाख १८ हजार रुपये उत्पन्नाचा मुलूख निराळा तोडून द्यावा. तसेंच भोसल्यांची वऱ्हाडच्या वांटणीपैकीं बाकी तुंबली आहे, तीबद्दल त्यांस निजामानें २९ लक्ष रुपये द्यावे; व पुढें वऱ्हाडांत भोसल्यांचा अंमल पूर्ववत् चालू ठेवावा. (३) चौथसरदेशमुखीच्या बाकीबद्दल निजामानें पेशव्यांना तीन कोटी रुपये द्यावे. (४) मशीरुल्मुल्क यांस पेशव्यांच्या हवालीं करावें. याप्रमाणें कलमें पाठविलीं. तीं शेवटच्या कलमाखेरीज बाकीचीं सर्व निजामानें कुरकूर न करतां मान्य केलीं. मशीरास हवालीं करणें त्याच्या जिवावर आलें. तेव्हां तो दिवाणच आपण होऊन श्रीमंतांच्या लष्करात आला. श्रीमंतांनींहि त्याचा योग्य तो सत्कार करून कराराप्रमाणें त्यास इतमामानें नजरकैदेंत ठेवलें. मग तहाच्या यादीवर परस्परांची मखलाशी होऊन निजाम भागानगरास गेला व श्रीमंत पुण्याकडे वळले.

मराठयांच्या इतिहासांत सवाई माधवराव साहेबांच्या कारकीर्दींत जिच्यामध्यें साऱ्या मराठे सरदारांनीं भाग घेऊन शत्रूचा पूर्ण पराभव करून मराठ्यांचें शौर्य सर्वत्र गाजविलें अशी ही शेवटची लढाई होय. या प्रसंगावर त्या वेळीं शाहीर लोकांनीं बरीच कवनें केलीं आहेत. ॲक्वर्थ व शाळीग्राम यांनीं तीं ऐतिहासिक पोवाडे या पुस्तकांत छापिलीं आहेत. अद्यापपर्यंतहि हे वीरसोत्पादक पोवाडे पुणें, सातारा, सोलापूर या भागांत गोंधळ्यांच्या तोंडून ऐकण्यांत येतात.

या लढाईचें वर्णन ग्रांट डफनें आपल्या इतिहासांत दिलें आहे. त्यांत, निजाम उगीचच्या उगीच पळून गेला, जय मिळाल्याबद्दल मराठयाची फुशारकी अगदीं व्यर्थ होती, साऱ्या लढाईत उभयपक्षीं दोनशें सुद्धां माणूस दगावलें नसेल असें म्हटलें आहे. याबद्दल कै. वासुदेवशास्त्री खरे म्हणतात कीं, "डफ साताऱ्यास होता, त्या वेळीं खर्ड्याच्या लढाईत लढलेल्या पुष्कळ लोकांशीं त्याच्या गांठी पडल्या होत्या. परंतु त्यांची हकीकत साहेबाला खरी वाटली नाहीं. आणि लढाईच्यावेळीं इंग्रजांचा वकील हैदराबादेस होता, त्यानें लिहून ठेवलेली हकीकत त्यानें अक्षरशः खरी मानली, त्याचा हा परिणाम होय. मराठे व मोंगल या दोघांविषयीं त्या हैद्राबादेच्या इंग्रज वकिलाच्या मनांत तुच्छबुद्धि होती, तीच डफाच्या लिहिण्यांतहि प्रतिबिंबित झालेली दिसते. [ग्रांट डफ; खरे–ऐति. लेखसंग्रह भा. ९; खर्ड्याच्या स्वारीची बखर.]

खलीफ—या अरबी शब्दाचा अर्थ, धर्मगुरु किंवा 'मागून येणारा' असा होतो. धार्मिक व्यावहारिक व राजकीय बाबतींत मुसुलमान लोक ज्याची आज्ञा मानितात त्या

पुरुषाला खलीफ असें अभिधान आहे. महमद पैगंबरानंतर चार पुरुषांनाच केवळ नव्हे तर उमईद व आब्बासी वंशांतील राज्यकर्त्यांनाहि खलीफ म्हणत या खलीफांचा इतिहास बुद्धोत्तर जग या विभागांत (प्र. १७ वे खलीफत व इस्लामाचा प्रसार) दिलाच आहे. केमालिस्टांनीं सध्याचा खलीफ जो तुर्कस्थानचा सुलतान त्याची राजकीय सत्ता काढून घेतली एवढेंच नव्हे तर त्यालाहि तुर्कस्थानांतून पार हांकलून दिला तेव्हां सध्यां राजसत्ताधारी किंवा अवांतर खलीफ देखील राहिला नाहीं.

खलील इब्न अहमद—(७१८–७९१) हा अरबी भाषाशास्त्रज्ञ ओमनचा रहिवासी होता. अरबी भाषेचा कोश यानेंच पहिल्यानें तयार केला. तसेंच अरबी काव्यांतील वृत्तांचें यानेंच प्रथमतः शास्त्रीय पद्धतीनें वर्गीकरण करून छंदःशास्त्राचे नियम तयार केले. यामुळें तो प्रसिद्धीस आला. हा स्वतः कवीहि होता. याची रहाणी फारच साधी असे. व्याकरणशास्त्रासंबंधीं त्यानें मार्मिक अभ्यास केला होता. किताब अल ऐन हा कोश करण्याला यानेंच सुरवात केली असें म्हणतात. पुढें हा कोश त्याच्या एका शिष्यानें पूर्ण केला. या कोशांतील शब्द अक्षरविल्हेनें दिले नसून इंद्रियविज्ञानशास्त्रविषयक तत्वांच्या आधारें दिलेले आहेत. या कोशाला 'ऐन' या शब्दानें प्रारंभ झाला असून, 'य' शब्दानें त्याची समाप्ति झाली आहे. हा ग्रंथ १४ व्या शतकापर्यंत उपलब्ध होता. पण हल्लीं तो पूर्ण उपलब्ध नाहीं. खलीलाच्या नांवावर पुष्कळ व्याकरणविषयक ग्रंथ मोडतात पण त्याच्याबद्दल अद्यापि खात्री दायक पुरावा सांपडत नाहीं.

खलीलाबाद—संयुक्त प्रांत बस्ती जिल्ह्याची आग्नेय तहसील. क्षेत्रफळ ५६४ चौ. मै. लो. सं. ३९४६७५. या तालुक्यांत १३८८ गांवें व मेहंदाबल शहर आहे. एकंदर उत्पन्न ४॥ लाखावर आहे. सर्व जमीन चांगली सुपीक आहे. तळीं व विहिरी यांच्या पाण्यावर पिक निघतें.

खवास—खवास हा आरबी शब्द असून त्याचा अर्थ चाकर किंवा अंगरक्षक असा आहे. या जातीस खवाज, हजुरी, वजीर, गोल, लुंद अशींहि नांवें असून त्यांची वस्ति बहुतेक काठेवाडाकडे आहे आणि त्यांची लो. सं. २७ हजारांवर आहे. यांचा धंदा सेवेकऱ्याचा. हे रजपुत राजे व जहागीरदार यांचे घरीं नौकर असतात. या खवासांत कोळी मुसुलमान वगैरे सर्व जातीचे लोक असतात. यांना पूर्वींच्या गुलामांप्रमाणें विकतां अगर बदलतां येत. थोडे मण धान्य देऊन हे लोक पूर्वीं विकत घेता येत असत. खवास व गोळ हे पूर्वीं एकाच दर्जाचे असत. हल्लीं गोळांपेक्षां खवास हे उच्च दर्जाचे मानले जातात. परंतु परिस्थितीनें गोळ हा खवास होऊं शकतो. खवासांनीं आपल्या बुद्धीच्या व धाडसाच्यामुळें आपली स्थिति इतकी सुधारून घेतली आहे कीं, अलीकडे त्यांच्या मुली रजपुतसरदार करूं लागले आहेत. कच्छ प्रांतांत असल्या रजपुतखवासांचे वंशज आहेत; परंतु रजपुत मात्र आपली मुलगी खवासास देत नाहींत. खवास पुरुषांप्रमाणें बायकाहि सेवावृत्ति करतात; त्यांना खवासान अथवा गोळी म्हणतात. यांच्या मुलींना छोकरी किंवा दारन हें नांव असून त्याहि नौकरीच करतात. मात्र यांच्यावर आईबापांचा ताबा असतो. स. १८७८ पर्यंत भाट व चारण लोक असल्या मुली विकत घेऊन त्या रजपुत सरदारांस विकण्याचा धंदाच करीत होते. अशासाठीं ते मुली चोरण्याचा, फुसलावून आणण्याचा अगर कर्जबाजारी आईबापांपासून थोड्या किंमतींत घेण्याचा प्रयत्न करीत. त्या वेळीं असल्या मुली पुष्कळ खपत. जाडेजा रजपुतात नवरीबरोबर आंदण म्हणून दासी देण्याची चाल असल्यानें यांचा फार खप होई. परंतु पुढें सरकारी कायद्यानें ही खरेदी विक्रीची चाल बंद पाडली. तरीहि अद्याप या गोळींवर धन्याचा हक्क असतो. गोळ हे सहसा विवाह करीत नाहींत, कदाचित् केल्यास त्यांचे विवाहबंधन फार शिथील असतें. धन्यानें गोळास नौकरीवरून काढल्यास त्याला आपल्या बायकोस नेतां येत नाहीं; ती धन्याकडेच रहाते. गोळी स्त्रीशीं संबंध ठेवणाऱ्यास फार हलके मानतात. गोळीणीस गोळाविरहीत इतर जातीच्या पुरुषापासून संतती झाल्यास तिला दोष लागत नाहीं, मात्र त्या पुरुषास दंड देणें वगैरे शिक्षा मिळते. परंतु अशा रीतीनें गोळांची संख्या वाढत जाते. खवास स्त्रीपुरुष हे दिसण्यांत रजपूत व गिरासियासारखे असून कांहीं स्त्रिया तर रजपूत स्त्रियां इतपत सुरेख असतात. यांची भाषा गुजराथी व कच्छी असून हे मांसाहारीहि आहेत (अहमदाबादेकडील खवास निवृत्तमांस आहेत). हे दारू पितात व अफीणबाजहि आहेत. यांचा पोषक रजपुतासारखा असतो. मालकाचे कपडे ठेवणें, चिलीम भरणें वगैरे कामें हे करतात. हल्लीं शेती व मजुरीहि हे करूं लागले आहेत. पूर्वीं गोळ हा आपल्या धन्याच्या प्रेताबरोबर स्वतःस जाळून घेई व गोळीण ही आपल्या विधवा धनिणीबरोबर स्वतःच्या बांगड्या फोडी. यांना धन्याच्या घरीं अन्नवस्त्र, दागदागिने वगैरे सर्व मिळत असल्यानें त्यांची स्थिति चांगली असते. स. १८१४ चे सुमारास नवानगरचा जाम मेल्यावर त्याच्या खवासांनीं बंड केलें होतें. खवासांत मेरू, मावजी, राघो, लद्दो वगैरे नामांकित पुरुष होऊन गेले. [बॉम्बे ग्याझे. व्हॉ. ९ भा. १; व्हॉ. १. भा. १.].

खसखस—हें अफूच्या झाडाचें बी आहे. हें उत्तम खाण्याच्या पदार्थांमध्यें गणलें जातें. याचा अनरशांना लावण्यासाठीं, मिठाई करण्यासाठीं व इतर रीतीनें स्वयंपाकांत उपयोग करितात. यांत मादकपणा मुळींच नसून उलट एक प्रकारची चव असते. खसखशीचें तेल काढतात. ज्या बोंडांतून अफू काढलेली नसते, त्यांतील खसखशींतून जास्त तेल निघतें. खाण्याचे पदार्थ करण्यासाठीं, तेल जाळण्यासाठीं, ऑगण व साबण तयार करण्यासाठीं हें तेल उपयोगी पडतें. याची पेंड गोड व पौष्टिक असते.

व गरीब लोकांनां व गुरांनां उपयोगी पडते. हें तेल उन्हांत ठेविल्यानें अगदीं स्वच्छ पांढरें होतें. म्हणून रंगांत टाकण्यास हें विशेष उपयोगी पडतें. पण हें महाग असल्यामुळें खप विशेष होत नाहीं. यांत केलेला सफेद्याचा रंग लवकर विटत नाहीं. गंधकाम्लांत मिळविलें असतां उष्णमान ८० पासून ९० पर्यंत चढतें. हिंदुस्थानांत इराणांतूनहि खसखस येते पण अलीकडे कमी येऊं लागली आहे. खसखसीची निर्गतहि बरीच होते. १९०६—७ सालीं ८०२६१५ हंड्रे. किं. रु.६५७७२३१ची खसखस परदेशीं गेली. खसखसीच्या किंमतींत बरेच फेरबदल होतात असें दिसतें. फ्रान्स, बेलजिअम आणि जर्मनी या देशांत बराच माल जातो. निर्गत बहुतेक मुंबईहून व कांहीं कलकत्त्याहून होते. ('अफू' पहा).

खळ—खळीचा उपयोग कागद चिटकविण्याकडे, कपड्याला जिल्हई येण्याकरितां कपड्यास लावण्याकडे व विणकामांत सूत ताण सहन करण्याइतकें मजबूत व्हावें म्हणून त्यास लावण्याकरितां करतात. मुख्यतः हा शेवटचाच उपयोग जास्त महत्वाचा आहे. सुतास खळ लावण्याच्या क्रियेस सायझिंग (खळ देणें) म्हणतात. कापड विणण्याच्या कामांत स्पिनिंग (कातणें), वाइंडिंग (गुंडाळणें), वॉरपिंग (ताणा लावणें) साइझिंग (खळ देणें), ड्राइंग (सुकविणें), वीव्हिंग (विणणें), फिनिशिंग (जिल्हई देणें), फोल्डिंग (घड्या करणें) या ज्या मुख्य मुख्य क्रिया असतात त्यांतील साइझिंग अथवा खळ देण्याची क्रिया ही एक महत्वाची क्रिया आहे. म्हणून तिचें विस्तृत विवेचन पुढें दिलें आहे. बाकीच्या क्रियांचें वर्णन विणकाम या लेखांत येईल.

पांजण.—पांजण अथवा साइझिंग. कापड विणण्यास जें सूत लागतें त्याला खळ दिल्याशिवाय तें विणण्याच्या कामालायक मजबूत होऊं शकत नाहीं. या कारणासाठीं सुतास खळ देण्याच्या क्रियेस मूळ सुरुवात झाली. पूर्वी सर्व कापड हातानें विणला जात असे. तेव्हां हातमागावर विणारांमध्यें पांजण करण्याची जी तऱ्हा होती व हल्लींहि प्रचारांत आहे. तिचें आधीं वर्णन देऊन मग मिलमध्यें वाफेच्या शक्तीनें चालणाऱ्या साईझिंग मशीनचें (पांजणीचें यंत्र) वर्णन करूं. हातानें विणणाराच्या कामास मिलपेक्षां कमी मजबूत सूत चालू शकतें. व त्यामुळें तें नेहमीं मिलमधील सुतापेक्षां कमी पिळाचें व कमी मजबुतीचें असतें. व त्यास खळहि पण थोडीशी दिली म्हणजे तें विणण्याच्या लायक होते. ही खळ अनेक तऱ्हेची करण्याची हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळी रीति आहे. कांहीं ठिकाणीं जमिनींत एक प्रकारचे कंद उगवतात, ते शिजवून त्यांची खळ करतात. परंतु जोंधळे, मका, तांदूळ व गहूं हीं धान्यें सामान्य उपयोगांत आहेत. यांपैकीं कोणत्याहि धान्याच्या पिठाची खळ सर्वत्र करतात. ही चांगली पातळ करून फडक्यांतून गाळून घेतात. हातमागवाले आपला ताणा पसरून दोन्हीकडे तो ताणून धरतात. मग एक प्रकारच्या गवताच्या मुळ्या असतात त्यांचा मोठा कुंचला (ब्रश) बांधलेला असतो. हा कुंचला खळींत बुडवितात व ताण्यावरून तो फिरवितात. ताणा चांगला ओला झाला म्हणजे मग तो वाळेपर्यंत तुसताच त्यावर कुंचला फिरवीत असतात. अर्धा हिस्सा वाळत आला म्हणजे सांधीच्या तळावर मधून मधून तारी सुट्या करतात व मधून मधून कुंचला फिरवितात. अशा रीतीनें तारीहि सर्व सुट्या होतात व कुंचलाहि फिरतो. कुंचला नेहमीं एकाच दिशेंत फिरवितात त्याच्या योगें करून सुताच्या अंगावर असलेले सर्व तंतू त्याच्या अंगावर चिकटतात व ताण्याच्या सुतास एक प्रकारचा तुळतुळीतपणा व चकाकी येते. ब्रश मारीत असतां पाऊण हिस्सा ब्रश मारून झाला म्हणजे ब्रशाला थोडासा तेलाचा हात मारून मग ब्रश मारतात. त्यायोगें सुतें एकमेकांपासून लवकर सुटीं होतात. व चकाकीहि जास्त येते. कांहीं ठिकाणीं हातमागावर खादी वगैरेसारखें कापड विणतात, तेव्हां त्याचा ताणा रात्रभर कांजीत भिजवून ठेवतात. म्हणजे खळ सुताच्या पोटांत शिरते. व सकाळीं त्याला लाकडाच्या मोगरीनें बडवून मग तो ताणा पसरून कुंचल्यानें त्याला साफ करून वाळवून मग विणण्यास घेतात. यायोगें सुतांत थोडी कांजी जास्त शिरते. व खादीसारखें कापड जास्त भरदार दिसतें. हातमागवाले हें पांजणीचें काम बहुधा पहाटेस अगर संध्याकाळीं करतात.. कारण ताणा लवकर न वाळून कुंचला जेवढा जास्त फिरेल तेवढा त्यांनां पाहिजे असतो. मिलमध्यें सुताच्या पोटांत कांजी भरण्याचें काम वाफ करते. व सूत सुकविण्याचें कामहि वाफच करते. त्यायोगेंकरून त्यांचें पांजणीचें यंत्र सारा दिवस चालू असतें. आतापर्यंत हातानें पांजण करण्याची माहिती दिली. आता मिलमध्यें पांजण करितात त्याला साइझिंग म्हणतात, त्याकडे वळूं.

मिलमध्यें पांजणीचा विषय फारच महत्वाचा आहे. कारण मालकाचें सर्व नफानुकसानच त्यावर अवलंबून आहे. मिलचा बहुतेक कपडा वजनानें रतलाच्या भावावर विकण्याची वहिवाट आहे. त्यामुळें ज्या कापडांत सर्वांत जास्त खळ असेल तें कापड स्वस्त भावांत पडतें. उदाहरण— एक दहा रत्तल वजनाचा तागा आहे. तो एका मिलनें ८ रत्तल सूत व २ रत्तल कांजी घालून बनविला. एकानें ९ रत्तल सूत व १ रत्तल कांजी घालून बनविला तर कोणता तागा स्वस्त पडतो तें पाहूं. त्या कापडांत २० नंबर सूत लागतें असें हिशेबाला धरलें व त्याचा भाव ८ आ. रत्तल आहे असा धरला व कांजीचा भाव १ आ. रत्तल धरला तर पहिल्या कापडाची किंमत ४ रु. २ आ. झाली व दुसऱ्याची ४ रु. ९ आ. झाली. यामुळें जो कारखानदार सुतावर जास्त खळ चढवून कापड काढील तो जास्त फायदा कमवूं लागेल. सुमारें ३५—४० वर्षांपूर्वी मुंबईस जेव्हां नवीनच गिरण्यांची स्थापना झाली त्यावेळीं

ताण्याच्या सुतावर २०-२२ टक्के कांजी चढविली म्हणजे बस होत असे. आतां मुंबईचें कांजीचें प्रमाण ४०-५० टक्के झालें आहे व सोलापूरकडे तर हेंच प्रमाण ६०-७५ पर्यंत गेलें आहे व अहमदाबादनें कमाल करून हें प्रमाण १०० पासून १५० पर्यंत नेलें आहे. व विलायतेंत क्वचित् कापडावर २०० टक्के कांजी चढवितात. कापड वापरते वेळीं तें धुवूनच वापरलें जातें. व त्यामुळें धुतल्यानंतर कांजी सर्व निघूनच जावयाची. पण पहिल्यानें घेतांना कापड जाड दिसलें पाहिजे ही पुष्कळशा अडाणी लोकांची समजूत असते. व शिवाय कपडा स्वस्त मिळावा अशीहि लोकांची इच्छा असते. त्यामुळें जास्त खळ घालण्याचें प्रचारात आलें. नाहींतर मूळ जो उद्देश कीं कापड विणतां येईल इतकें सूत मजबूत व्हावें त्याला १० टक्क्यापासून २० टक्यापर्यंत खळ पुरेशी होते. पुष्कळ वेळा चागली मनुष्यें कापडाची परीक्षा नसल्यामुळें बाहेरच्या स्वरूपावर जाऊन फसतात.

हें वर्णन कापड विणण्याच्या पूर्वी सुतावर चढविण्याच्या खळीचें झालें. पण कापड विणल्यानंतरहि त्या कापडावर जास्त खळ चढवून त्याला जास्त जाड दिसेल असें करितात. या कृतीला फिनिशिंग असें म्हणतात. अशा रीतीनें फिनिश केलेला कपडाच कांहीं लोक पसंत करतात. हें त्यांचें अज्ञानच होय. पण याला इलाज नाहीं. गिरणीवाल्यांनीं ही तऱ्हा आधीं सुरू केली; व ती लोकाना पसंत पडली व ते तशाच तऱ्हेचा कपडा मागूं लागले. पुढें ती तऱ्हा रूढ झाली व इतरांहि गिरणीवाल्यास तसें करणें भाग पडलें. वऱ्हाडांत ही तऱ्हा बरीच प्रचारात आहे. धोतरजोडा हातात घेतला असता ताठ उभा राहिला पाहिजे, जाड दिसला पाहिजे, उचलून पाहिले तर हाताला वजन लागलें पाहिजे व पुन्हां स्वस्त पाहिजे. अशा तऱ्हेचा माल वऱ्हाडात पुष्कळ प्रचारात आहे. असा माल खालच्या वर्गाच्या अशिक्षित लोकात फार खपतो.

आता आधीं साइझिंगच्या यंत्राबद्दल थोडी माहिती सागून मग कांजी तयार करण्याविषयीं माहिती सागूं. साइझिंगच्या यंत्राचे मुख्य तीन भाग केले जातात. एक भाग सिलेंडराच्या (पंचपात्राच्या) पुढचा, ज्याला 'हेडस्टक' असें म्हणतात. दुसरा भाग दोन्ही सिलेंडर्स मिळून व तिसरा भाग कांजीच्या टाकीचा. यापैकीं पहिल्या भागाचें वर्णन आधीं देऊं. पुढच्या भागाच्या मध्यावर एका शाफ्टिंग (लाट)वर एक कोन (शंक्वाकृति ढोल) बसविलेला असतो व याच शाफ्टिंगच्या एका तोंडावर साचाला चालविणाऱ्या पुल्या बसविलेल्या असतात. या पुल्या तीन असतात. बाहेरच्या बाजूस फास्ट (शीघ्रगति) पुली असते. ही शाफ्टिंगवर पक्की बसविलेली असते. व हिच्यावर पट्टा आला असतां साचा जोरानें चालूं लागतो. मध्यें एक कमी रुंदीची पुली असतें तिला स्लो मोशन (मंदगति) पुली म्हणतात. यावर पट्टा आला असतां सांचा फार हळू हळू चालूं लागतो त्याच्याच बॉसवर आंतल्या बाजूस लूज (सुटी) पुली असते. हिच्यावर पट्टा आला असतां सांचा बंद रहातो व पट्टयाबरोबर लूज पुली नुस्ती फिरत रहाते. याच शाफ्टिंगवर मध्यें एक कोनड्रम बसविलेला असतो म्हणून वर सागितलें आहे. त्याच्याच समोर सांच्याच्या पुढच्या बाजूस दुसरी एक शाफ्टिंग (लाट) बसविलेली असून तिच्यावरहि याच मापाचा एक कोनड्रम बसविलेला असतो. मात्र तो या कोनड्रमच्या उलट दिशेनें असतो. कोनड्रम म्हणजे ज्याचें एक तोंड मोठें आहे व दुसरें तोंड लहान आहे असा एक ढोल. याची कल्पना यावयास पाहिजे असल्यास पखवाज मध्यें जाड असतो व तो दोन्ही तोंडाम बारीक असतो. तेव्हां जर मध्यंतरीं सर्वांत जाड भागावर त्याला कापून दोन तुकडे केले तर त्या तुकडयांना जो आकार येईल त्याला कोनड्रम म्हणतां येईल. याच आकाराचा पण सुमारें ३॥-४ फूट लांब असा हा बिडाचा ढोल वोल्ट मारून या शाफ्टिंगवर घट्ट बसविलेला असतो. व त्याच्या समोर दुसऱ्या शाफ्टिंगवर असाच कोन-ड्रम उलट दिशेनें बसविलेला असतो. व या पहिल्या ड्रमवरून पट्टा दुसऱ्या ड्रमवर नेलेला असतो. पहिला ड्रम फिरूं लागला कीं या पट्टयाचें योगें दुसराहि ड्रम फिरूं लागतो. त्यामुळें हे कोन उलट सुलट समोरासमोर बसविण्याचा मतलब हाच कीं पट्टा ड्रमवर कोणत्याहि ठिकाणीं असला तरी तितकाच घट्ट रहातो, ढिला पडूं शकत नाहीं. या दुसऱ्या कोनड्रमच्या एका तोंडावर एक लहानसें दातांचें चाक बसविलेलें असतें. व त्यावर मध्यें एक कॅरिअर व्हील (गतिवाहकचक्र) देऊन त्याच्यावर मोठें चक्र असतें. कोनशाफ्ट फिरूं लागल्याबरोबर मधलें 'कॅरिअर व्हील' फिरतें व त्याच्याबरोबर हें वरचें चाकहि फिरूं लागतें. याच्याच एका तोंडावर वाकडया दाताचें एक (बेव्हील) चक्र दिलेलें असतें. व त्याच्या योगें सायझिंगच्या एका अंगवर एक लाबच लांब साइड शाफ्ट नांवाचा शाफ्ट असतो तो फिरूं लागतो. वरती हें मोठें चाक फिरूं लागतें म्हणन सागितलें तें चाक पुढें एक बिडाचा सुमारें १ फूट जाडीचा रूळ असतो त्याच्या अंगावर कायम बसविलेलें असतें. त्यामुळें हें मोठें चाक फिरूं लागल्याबरोबर हा बिडाचा रूळहि फिरूं लागतो. या बिडाच्या रूळाचे आंगावर बनात गुंडाळलेली असते व हा रूळ मागाहुन कांजी लागून आलेल्या सुताला पुढें ओढून नेण्याचें काम करितो. याच्याच आंगावर वरच्या बाजूस बिडाचा आणखी एक रूळ असतो त्याला टिनरोलर हें नांव आहे. व पुढच्या बाजूस आणखी एक बिडाचा रूळ असतो. या तिन्ही रुळांच्या मधून सूत येऊन तें पुढें साच्यावर लागणाऱ्या रुळावर गुंडाळलें जातें. वरती जें मोठें चाक फिरतें म्हणून सांगितलें तें पुढच्या बाजूला घर्षणपट (फ्रिक्शन प्लेट) म्हणून जी

रचना बीम भरण्याकरितां केलेली असते त्याला चालवितें. या फ्रिक्शनप्लेटमधील मुख्य तत्व हेंच आहे कीं बीम ज्या वेळीं नवीन लावतात त्यावेळीं त्याच्या मधल्या रुळाची जाडी लहान असते. त्यामुळें बीम लवकर फिरून पुढें येणारें सर्व सूत त्यावर गुंडाळलें जातें. व सूत गुंडाळून बिमाची जाडी जशी वाढत जाते तशी त्याची गति सावकाश व्हावी लागते व ती रचना या फ्रिक्शनप्लेट मोशनमध्यें साधलेली आहे. तसेंच बिमावर गुंडाळणारें सूत जास्त घट्ट (टाइट) भरावयास पाहिजे असेल तर या फ्रिक्शनप्लेटच्या रचनेशीं जोडलेली एक तरफ असते. तीवरील वजन जसजसें पुढें सरकवावें तसतसें सूत घट्ट भरतें. कारण त्या वजनाच्या योगें फ्रिक्शनप्लेटवर जोर येऊन बीम लवकर फिरण्याचा प्रयत्न करिते. बीमावर भरलें जाणारें सूत जास्त घट्ट भरलें जाऊन त्याची जाडी सर्व ठिकाणीं सारखी व्हावी म्हणून खालच्या बाजूनें दोन फिरते लोखंडी रूळ. बीम भरणें सुरू झालें म्हणजे त्याला दाबूं लागतात व या रुळाच्या बैठकीला वर खालीं करणारी तरफ खालीं एका आडव्या शाफ्टवर बसविलेली असते व याच शाफ्टच्या दुसऱ्या टोंकाला उलट दिशेला दुसरी एक लांब लिव्हर लावून त्याच्यावर एक वजन आडकविलेलें असतें. त्याच्या योगानें या खालच्या दाबणाऱ्या रुळावर वजन पडून ते रूळ वरील बिमाच्या अंगावर जोरानें टेंकून रहातात व बीम फिरूं लागलें म्हणजे हे रूळहि फिरूं लागतात. आता वरती जे तीन रूळ असतात म्हणून सांगितलें—कीं ज्याच्यामधून सूत दबून पुढें ओढलें जातें—त्यामध्यें, व ज्याचें नांव टिनरोलर म्हणून सांगितलें त्याच्याच एका तोंडावर एक चक्र दिलेलें असून या चक्राच्या योगें दुसरीं चक्रें चालून त्याच्यावर, बिमावर जितक्या वारावर खूण पाहिजे तितक्या वारावर खूण करणारी एक 'मार्किंग मोशन' लाविलेली असते. या टिनरोलरवरील चक्र व त्याच्या खालीं एक स्टड व्हील म्हणून असतें, हीं दोन चक्रें काहीं हिशेबानें बदलून आपणास वाटेल तितक्या अंतरावर रंगाची खूण पाडतां येते. त्या योगेंकरून साच्यावर विणताना साचेवाला ही खूण पाहून तीवर रंगीत आडवीं सुतें घालतो. ह्या कृतीला हेडिंग असें म्हणतात. हीं चक्रें काय हिशेबानें बदलावयाचीं त्याचा हिशेब असा:—

$$\frac{\text{स्टडव्हील} \times \text{बेलव्हील} \times \text{टिनरोलराचा घेर}}{\text{टिनरोलर व्हील}} = \text{खुणेची लांबी.}$$

गतीमध्यें रोलरव्हील असतें म्हणून सांगितलें; त्याखालीं एक स्टड व्हील असतें. व या दोहोंचा संबंध जोडणारें एक बाजूला कॅरिअर (गतिवाहक) चक्र असतें. स्टडव्हीलच्या आंसावर एक 'वर्म' असून तो वर्म एका चक्रास चालवितो. त्याला बेलव्हील (घंटाचक्र) म्हणतात. कारण या चक्रावरूनच खूण पडण्याच्या पूर्वी एक घंटाहि वाजत असते. हें बेलव्हील बहुधा ४५ दांतांचें असतें. आतां या टिन रोलरच्या मागच्या बाजूचे दोन फिरते रूळ असतात-ज्यांना टेनशनबार्स (ताणदंड) असें म्हणतात–त्यातील मागच्याच्या वरून व पुढच्याच्या खालून सूत पुढें येतें. हे सुताच्या ओढीनें फिरतात. याच्या मागें एक फणी बसविलेली असते, तिचे दांत वरून उघडे असतात. मागून काजी लावून येणारीं सुतें सिलेंडर्सवर वाळून पुढें साळयांच्या योगें सुटीं झाल्यानंतर मग तीं या फणीमध्यें सारखीं वाटून भरलेलीं असतात त्याच्या योगें पुढें ज्या मापाचें बीम लाविलेलें असेल तितकाच सुताचा पन्हा या फणीच्या योगें ठेवितां येतो. साइझिंगच्या पुढच्या बाजूला दोन्ही हाताला दोन दांडे असतात. एक दांडा फिरविला असतां फणी लहान मोठी होते. दुसरा फिरविला असतां फणी उजव्या अगर डाव्या बाजूस सरकूं शकते; हें फणीचें वर्णन झालें. आतां त्यांच्या मागें थोड्या अंतरावर सिलेंडर्सच्या पुढें दोन्ही बाजूला लहान लहान ब्रॅकेट्स बसविलेले असतात. त्यांच्यामध्यें लोखंडी नळाच्या शिगा बसविण्याची योजना केलेली असते. हे नळ दोन्ही बाजूंनीं चपटे केलेले व अतिशय गुळगुळीत केलेले असे असतात. त्यायोगें कोठेंहि न अडकतां हे सुतामधून आरपार घालतां येतात. यांचा उपयोग मागून काजी लागून येणारीं सुतें चिकटलेलीं असतात तीं एकमेकांपासून सुटीं करण्याच्या कामीं चांगला होतो. यामध्यें एक नळ सुमारें २ इंच जाडीचा असतो व बाकीचे १ इंच जाडीचे असतात. मागें क्रीलवर जितकीं बिमें लाविलीं असतील त्यापेक्षा हा एक कमी लागतो. याचें कारण यांचा उपयोग प्रत्येक बिमांच्या तारी एकमेकापासून सुटया करण्यासाठीं असतो. तेव्हां जर मागें दोन बिमें असतील तर त्यांच्या तारी वेगळया करण्यास एकच शीग (बाट) पुरे आहे. तीन बिमें असल्यास दोन शिगा पुरे होतील. आपल्या हाताला पांच बोटें आहेत. पण त्या बोटांच्या मधील खांचा चारच आहेत. या शिगाच्या बैठकांच्या मागें एक टिनचा रूळ असतो. पूर्वी मार्किंग मोशन या रुळाला लावलेली असल्यामुळें या रुळावर बसविल्या जाणाऱ्या चक्रास टिनरोलर व्हील असें म्हणण्याची चाल पडली. आतां या रुळावरील मोशन काढून पुढच्या बिडाच्या रुळावर नेली तरी त्या रुळावर लागणाऱ्या चक्राला टिनरोलर व्हील म्हणण्याचीच वहिवट पडली आहे. या रुळाच्या खालच्या बाजूस एक अगर दोन पंखे बसविलेले असतात व ते कोनडूम शाफ्टवरून पट्टा घेऊन फिरविले जातात. ताणा जो लहान सिलेंडराच्या खालून येतो तो या दोन्ही पंख्यांच्या खालून येऊन मग बाजूनें थोडा वर जाऊन मग उलट मागच्या बाजूला वर सांगितलेल्या टिन रुळावरून पुढें जातो.

येथपर्यंत वर्णन पुढील हेड स्टॉकचें झालें. आतां मधले दोन सिलेंडर्सविषयीं पाहूं. हे सिलेंडर्स दोन असतात. एक मोठा असतो व दुसरा लहान असतो. मोठा सिलेंडर वर जो टिनरोलर सांगितला त्याच्याच मागें बसविलेला असतो व याच्या मागें व कांजीच्या टांकीच्या पुढें

असा लहान सिलेंडर बसविलेला असतो. कांजीच्या टांकींतून जें सूत बाहेर पडतें तें अर्ध्या मोठ्या सिलेंडरवर येतें व त्याला फेरा देऊन मग लहान सिलेंडरावर जातें. । लहान सिलेंडरांला सबंध फेरा देऊन मग खालच्या बाजूनें मोठ्या सिलेंडराच्या पुढें पंख्यांच्या खालून त्याच्या पुढच्या रुळावर जाऊन मग वरच्या दिशेस जातें हें वर सांगितलेंच आहे. या सिलेंडराच्या बाजूस जाड लोखंडी पत्रा असून मध्यें त्याला आधारासाठीं लोखंडी टायबार्स (जोडदांडे) दिलेले असतात. व या लोखंडी पत्र्यावर दोन्हा बाजूला चिकटून सबंध फेरावर तांब्याचा पत्रा बसविलेला असतो. पूर्वी तांब्याच्या जागीं कल्हईच्या टिनचा पत्रा बसवीत असत, पण त्यावर वाफेचा दाब हल्लीं इतका घेता येत नसे. शिवाय त्याला लवकर भोकें पडून सिलेंडर खराब होई. म्हणून अलीकडे तांब्याचा पत्रा बसवूं लागले. त्यायोगें सिलेंडर जास्त दिवस चालतो व दाब जास्त घेता येतो. हे सिलेंडर २५ ते ३० पौंडापर्यंत दाब सहन करतील अशी परीक्षा करून घेतात. व कामासाठीं १२ पासून १५ पौंड पर्यंत दाब घेतां येतो. या सिलेंडर्समध्यें जेथून वाफ येते त्या नळीवर वाफेचा प्रेशर दाखविणारें घड्याळ बसविलेलें असतें. काहीं दुरुस्ती करण्याकरितां सिलेंडरच्या आत जाण्याचा प्रसंग आल्यास त्यासाठीं प्रत्येक सिलेंडरला एक मॅनहोल (मोठें भोंक) ठेविलेलें असतें. या सिलेंडर्सवर कांजींत भिजलेलें सूत वाळण्यासाठीं येत असतें व या सिलेंडर्सच्या आंतील वाफेच्या उष्णतेच्या योगानें सिलेंडर तापलेला असतो व त्यामुळें हें सूत सुकतें. पण यामुळें या सिलेंडरच्या एका तोंडातून आत वाफ सोडलेली असते. त्या वाफेचें या वरील ओल्या सुतामुळें वरचेवर पाणी होऊन तें या सिलेंडरमध्यें जमा होत असतें. तें बाहेर काढून टाकण्याची योजना या सिलेंडरात केलेली असते. या सिलेंडरच्या दुसऱ्या तोंडाकडे टिनाचीं अगर तांब्याचीं बकेट्स (वाटल्या) बसविलेलीं असतात. त्यायोगें रहाटगाडग्यानें जसें विहिरींतील पाणी वर काढावें त्या प्रमाणें ही बकेट्स खालीं आलीं म्हणजे त्यांत पाणी भरतें व तीं वर गेलीं म्हणजे तें पाणी दुसऱ्या बाजूच्या तोंडात उतरतें व बाहेर पडूं लागतें. त्याबरोबर वाफ येऊं लागतें. म्हणून बाजूला एक पेटी बसवून तिच्याशीं एक नळी या सिलेंडरच्या तोंडापासून जोडलेली असते. या पेटींत एक खालींवर होणारा गोळा बसवून अशी योजना केलेली असते कीं, तिच्या योगें वाफ बाहेर जाऊं शकत नाहीं. फक्त पाणी मात्र बाहेर जातें. हिला स्टीमचेस्ट (बाष्पपेटिका) म्हणतात. सूत जितकें जाड असेल व त्यावर कांजी जितक्या जास्त प्रमाणानें चढविलेली असेल त्या मानानें सूत सुकण्यास वेळ लागतो व वाफहि सिलेंडरमध्यें जास्त ठेवावी लागते. सत जितकें बारीक असेल त्या मानानें त्यावर कांजीहि पण कमी चढवितात. व त्यामुळें तें सुकण्यास वाफ कमी पुरतें व सूत लवकर सुकल्यामुळें यंत्रहि जोरानें चालवितां येतें ४० ते ५० नंबरचें सूत असल्यास सिलेंडरमध्यें २-३ पौंड दाबाची वाफ पुरते. बारीक सुताला ५ पौंडांवर दाबाची वाफ कधीं घेऊं नये. उन्हाळ्याचे दिवस असल्यास लहान सिलेंडरचा स्टीम व्हाल्व (बाष्प पडदा) बंद ठेवावा. म्हणजे सूत जास्त सुकून कडक होणार नाहीं. आतां याच्या मागला भाग जी कांजीची टांकी (साइझ बॉक्स) तिची माहिती देऊं. या कांजीच्या टाकीच्या दोन्ही बाजू बिडाच्या ओतलेल्या असतात व या मधील टांकी लांकडाची केलेली असते व सबंध टांकीला बहुधा आंतून तांब्याचा पत्रा बसविलेला असतो. व टांकी मजबूत रहाण्यासाठीं टांकीच्या दोन्हीं बाजूला व खालीं बाहेरून टायबार्स लावून टांकी मजबूत केलेली असते. या टांकीच्या आंत एक लोखंडी पडदा लावून या टांकीचे दोन भाग केलेले असतात. एक भाग लहान असतो व एक भाग मोठा असतो. लहान भागांत नवीन येणारी कांजी पडण्याची व्यवस्था केलेली असते. मोठ्या भागांत मध्यें तांब्यानें मढविलेले दोन रूळ बसविलेले असतात. व याच्याच वर कांजी पिळून काढणारे बिडाचे वजनदार स्क्वीझिंग रोलर्स असतात. या रुळाच्या बाजूला सुताला कांजींत बुडविणारा (इमर्शन रोलर) रूळ असतो. हा रूळ पाहिजे तेव्हां कांजींत बुडवितां येतो व पाहिजे तेव्हां कांजीच्या बाहेर काढितां येतो. ज्यावेळीं यंत्र चालू असतें त्यावेळीं त्याला कांजींत बुडवितात. ज्यावेळीं यंत्र बंद असतें त्यावेळीं याला कांजीच्या बाहेर उचलून ठेवितात. हा इमर्शन रोलर केव्हा केव्हा तांब्याच्या नळीचा बनविलेला असतो व केव्हां केव्हां एका गोल रहाटाचा बनविलेला असतो. कांजी जास्त चढविणें असल्यास रहाट असलेला बरा. हे जे दोन तांब्याचे रूळ आंत असतात म्हणून सांगितले त्याच्या तोंडावर बेव्हल व्हील्स दिलेलीं असून पूर्वी पुढच्या भागाच्या वेळीं बाजूला एक लांबच लांब शाफ्ट असतें म्हणून सांगितलें. त्या शाफ्टवर बेव्हील चक्रें असून तीं या रूळांना चालवितात. म्हणजे मागें क्रीलवर जी वॉर्पिंगचीं विमें ठेविलेलीं असतात त्याच्या वरील तारी उलगडल्या जाऊन त्यांना कांजी लागून, याच रुळावर स्क्वीझिंग रोलर्स असल्यामुळें याच्या योगें ओढून पुढें दिल्या जातात. त्यामुळें यांनां डिलिव्हरी रोलर्स म्हणावयास हरकत नाहीं. मागून जितकें सूत पुढें दिलें जाईल तितकें पुढें घेण्याचें काम पुढें जे तीन रूळ असतात म्हणून सांगितलें आहे ते करीत असतात. मागल्या रुळापेक्षां या पुढच्यांतील खालचा रूळ ज्याला मूळ गती मिळते त्याची जाडी (डायमेटर) सुमारें एक द्वितीयांश इंच कमी असते व ती मागच्याच्याबरोबर करण्याकरितां या रुळावर बनात गुंडाळतात. ती पक्की रहावी म्हणून या बिडाच्या रुळांत एका ओळींत मध्यें मध्यें लहान लहान भोंकें पाडून त्यांत लांकडाच्या खुंट्या बसविलेल्या असतात.

बनातीच्या पहिल्या फेऱ्यावर या खुंटयांच्या ठिकाणीं बारीक टेकस मारून मग बनात लपेटली जाते. पहिल्यानें सरासरी तीन फेरे बनात गुंडाळून मग साचा चालू करून पहातात.साइझिंगचा मोठा सिलेंडर व तांब्याचा रूळ यांमध्ये सूत ढिलें पडूं लागल्यास बनात अजून पाहिजे असें समजावें व जर तेथें सूत टाइट येऊं लागलें तर बनात जास्त झाली असें समजून ती कमी करावी. सूत जास्त ढिलें न पडतां जरा जरा झोले खात चालूं लागल्यास बनात बरोबर आहे म्हणून समजावें. या ठिकाणीं सूत ओलें असतां तीवर जर तें टाईट राहून ओढ बसेल तर तें विणताना जास्त तुटेल. कारण ओलेपणीं सूत ओढलें असता जास्त लांबेल. आणि तसेंच ओढलें असता, न तुटतां लांब होण्याची जी शक्ति (स्थितिस्थापकता)–जशी रबराच्या अंगीं असते त्या प्रकारची–सुताच्या अंगीं रहाणार नाहीं. ओव्या वरती खालती होताना त्या ठिकाणीं सुतावर ताण पडत असतो. त्यावेळीं जर ही ताणण्याची शक्ति त्याच्या अंगीं नसेल तर तें अर्थात जास्त तुटणार, म्हणून ही सुताच्या आगची शक्ति त्याच्यांत कायम राखावी लागते. तांब्याचे जे रूळ सांगितले त्याच्यावर जे स्क्वीझिंग रोलर्स असतात ते जड बिडाचे सरासरी ६ इंच जाड पत्र्याचे असतात. यांच्या अंगीं मऊपणा यावा म्हणून याच्यावर बनात गुंडाळतात. ती त्याच्यावर रहावी म्हणून आधीं रुळाला व्हाइट लेड म्हणून सफेत रंग असतो तो लावितात. त्याचे एक दोन थर वाळले म्हणजे त्यावर पुन्हा एक थर देऊन त्यावर साध्या कापडाचा तुकडा चिकटवितात. या कापडाच्या तुकड्याचे सुमारें दोन फेरे व्हाइट लेडनें चिकटवून झाले म्हणजे मग त्यापुढें सुमारें ६ इंच कपडा नुसता सुटा ठेवितात व या कपड्यास वाळूं देतात. रंग चांगला वाळला म्हणजे या सहा इंच कपड्याच्या खालीं बनातीचें टोंक घालून बनातीचा एक फेरा लपेटून घेतात व मग चालूं यंत्रांमध्यें हा रूळ तांब्याच्या रुळावर ठेवून सांचा हळू हळू चालवून बनात त्यावर जास्त गुंडाळीत जातात. बनातीचा पहिला फेरा सरासरी चार वारांच्या तुकड्याचा घेतात व मग त्याच्यावर दोन दोन वाराचे तुकडे गुंडाळतात. अशा रीतीनें त्याची जाडी ९ इंचाची करतात. चालू केल्यावर सांचामध्यें बनात खराब झाल्यास वरचा एक तुकडा काढून त्या जागीं दुसरा एक नवा तुकडा गुंडाळतात. आतां या टांकीबद्दल एकच गोष्ट सांगावयाची राहिली ती ही कीं, सांचा चालू असतां कांजी चांगलीच गरम म्हणजे उकळती राहिली पाहिजे व यासाठीं या टांकीमध्यें वाफेचा नळ बसवितात. कांजी उकळती असली म्हणजे ती सुताच्या पोटात भिनते. ही एक गोष्ट जर उपयोगांत आणली नाहीं, तर सूत विणण्याच्या कामांस निरुपयोगी होईल, इतकी ही गोष्ट महत्त्वाची आहे. टांकीच्या आंत जी नळी असते ती तांब्याची असते व बाहेरून तिला लोखंडी नळी जोडतात. आंतल्या तांब्याच्या नळीला सुमारें तीन तीन इंचांच्या अंतरानें बारीक भोकें पाडलेली असतात. वाफ सोडली म्हणजे या भोकांवाटे बाहेर पडून ती कांजींत मिसळते व त्यायोगें कांजी गरम होत असल्यामुळें गरम होताना ती आटून कमी होत नाहीं. केव्हांहि पाजण सुरू करण्याच्या पूर्वी मात्र आधीं वाफेच्या नळातलें पाणी नीट काढून टाकावें लागतें व मग वाफ कांजीच्या टाकींत सोडावी लागते; नाहींपेक्षां वाफेचें पाणी कांजींत शिरून कांजी पाहिजे त्यापेक्षा पातळ होते. त्याच प्रमाणें सकाळीं आल्याबरोबर कांजी गरम करून त्यातली पांच सात बादल्या कांजी काढून तेवढीच त्यात नवी कांजी घालावी व मग काम सुरू करावें म्हणजे बीम वजनाला हलकें येत नाहीं. वरती स्क्वीझिंग रोलर्स असतात म्हणून सांगितलें त्याच्या वरचा बनातीचा एक तुकडा रोज संध्याकाळीं काम बंद केलें म्हणजे काढून पाण्यात भिजत घालावा व सकाळीं त्यातील पाणी नीट पिळून मग तो त्या रुळावर गुंडाळावा. ही बनात गुंडाळतेवेळीं त्या रुळावरील बनातीचा वरचा थर थोडें पाणी घालून भिजविण्याची चाल आहे. यायोगें वर लाविलेल्या बनातींत नरमपणा राहून कांजी कमी पिळून निघते म्हणजे सुतावर कांजी जास्त बसते. व बनात धुतल्याच्या योगें जास्त टिकते. असें न केल्यास बीम हलकें येऊं लागतें व हलकें बीम आलें कीं बनात नवी लावावी लागून शिवाय बनातीचा खर्च जास्त वाढतो. गिरणीच्या कामात प्रत्येक लहान सहान बाबतींतहि शक्य तेवढी काटकसर करणें हें वरच्या अधिकाऱ्यांचें काम आहे. मात्र ही काटकसर फाजील होऊन कामाच्या चांगलेपणास धक्का बसता कामा नये. साच्याला घालण्याच्या तेलांत पुष्कळ लोकांची काटकसर करण्याची चाल आहे. पण ही नेहमीं घातुक होते. साच्याचे भाग लवकर झिजून सांचाचें आयुष्य कमी होतें. व पुष्कळ वेळां सांच्याचे भाग गरम होऊन आग लागण्याचाहि संभव असतो. येथें मुख्य पांजणीच्या यंत्राचें (साइझिंग मशीन) वर्णन संपलें. आतां या यंत्राचें मागें वॉर्पिंगच्या सांच्यावरील बिमें ठेवण्याची क्रील असते तिचें थोडें वर्णन देऊं. ही क्रील म्हणजे बिमांची बैठक यंत्राबरोबर येते ती. ही बहुधा सहा बिमें ठेवण्याची असते. नेहमीं बहुधा सहा बिमांच्या आंतच काम भागतें.परंतु केव्हा केव्हां सहाच्या जागीं आठ अगर नऊहि बिमें लावावीं लागतात. त्यासाठीं मशीन आणणाराकडून एक लहान तीन बिमांपुरती क्रील मागविली असल्यास बरें; नसलीच तर मग एक लांकडी क्रील तयार करून घेऊनहि पण काम भागतें. या क्रीलची रचना अशी असते कीं, एक बीम खालीं बसावें तर त्याच्या मागचें बीम वरच्या बाजूला बसावें. पहिलें, तिसरें व पांचवें बीम खालीं बसलें तर दुसरें, चौथे व सहावें हीं बिमें वर बसतात. हीं बिमें वरखालीं बसविण्यांत मुख्य हेतु कमी जागा लागावी हा होय. नाहींतर एका ओळींत एका मागें एक बिमें ठेवूनहि काम भागूं शकेल. हीं

बिमें अशा रीतीनें क्रीलवर ठेवितात कीं, पहिलें बीम पुढच्या बाजूनें खालून वर उलगडावें तर दुसरें बीम वरून खालीं व मागून पुढें असें उलगडत जावें. तिसरें बीम पुनः पहिल्या सारखें उलगडतें तर चौथें बीम दुसऱ्या सारखें उलगडतें. त्यायोगें चौथ्या बिमाच्या तारी तिसऱ्या बिमाच्या खालून घेऊन पुढें घेतल्या म्हणजे चौथ्या व तिसऱ्या दोन्ही बिमाच्या तारी एक जागीं होऊन सारख्या उलगडूं लागतात. या दोन्ही बिमाच्या तारी पुनः दुसऱ्या बिमाच्या वरून घेऊन त्या बिमाच्या तारी मिळून पहिल्या बिमाच्या खालून पुढच्या बाजूस येतात व अशा रीतीनें चारी बिमाच्या तारी एका जागीं येऊन त्या सर्व पहिल्या बिमाच्या पुढच्या बाजूनें पुढें येऊन उलगडत असतात. नवीन बिमें क्रीलवर ठेविलीं म्हणजे पहिल्या बिमाच्या तारींची व दुसऱ्या बिमाच्या तारींची गाठ मारतात. आणि तिसऱ्या बिमाच्या तारींची चौथ्या बिमाच्या तारींशीं गाठ मारतात. या गाठी नेहमीं चार मारण्याची पद्धत आहे. याप्रमाणें वार्पिंगवरून एकंदर तारींचे चार भाग करून पाठविले जातात. त्यामुळे सर्व तारींचा मध्यभाग आपो-आप वेगळा होतो. त्या योगें पुढें साइझिंगची फणी भरतांना मध्यावरून सुरुवात केली म्हणजे अर्ध्या तारी इकडे व अर्ध्या तिकडे अशा सारख्या भरल्या जातात. वर सांगितल्याप्रमाणें गाठी मारून झाल्या म्हणजे एक लांब काठी घेऊन ती दोन माणसें तिसऱ्या व चौथ्या बिमाच्या गांठीवर धरून त्या दोन्ही बिमाच्या तारी खालीं दाबतात व दोन्हीं बिमाच्या तारी तिसऱ्या बिमाच्या खालून पुढें वर घेतात व ती काठी त्या तारीसकट पुनः पहिल्या व दुसऱ्या बिमाच्या गांठीवर दाबतात व पहिल्याप्रमाणेंच सर्व तारी पहिल्या बिमाच्या खालून घेऊन पुढच्या बाजूनें वर घेतात त्यायोगें चारी बिमाच्या तारी एकत्र होऊन पुढून उलगडूं लागतात.त्या तारींची पहिल्या तारींचीं जीं शेवटें साच्यावर असतात त्याच्याशीं गाठ मारून मग यंत्र सुरू करितात. सहा बिमें अगर आठ बिमें असलीं तरी कृति हीच करावी लागते. यंत्र चालूं केलें म्हणजे गाठी तांब्याच्या रुळाच्या पुढें जाऊं देऊन मग स्क्वीझिंग रोलर्स वर उचलेले असतात ते खालीं ठेवितात व कांजींतील रहाट हा वर घेतलेला असतो तो कांजींत बुडवितात. या वेळीं तो फारच थोडा कांजींत बुडवावा. गांठी आणखी थोड्या पुढें जाऊं देऊन मग रशा टाकण्यास सुरुवात करावी. या रशा टाकावयाच्या त्या अशासाठीं कीं, प्रत्येक दोन बिमाच्या तारी एकमेकांपासून वेगळ्या करतां याव्या. या रशा टाकून झाल्या व त्या कांजीच्या टांकींतून बाहेर पडल्या म्हणजे इमर्शन रोलर कांजीच्या टांकींत थोडासाच बुडलेला असतो तो जास्त खालीं घ्यावा. ह्या वेळीं सिलिंडर्स गरम केलेले असावेत. मग सिलिंडरमधील वाफ बंद करावी व साइझिंग हळूहळू चालवून सूत सुकूं द्यावें. रशा 'लीज् रॉडस्'च्या जागीं आल्या म्हणजे कांजींतील रूळ वर घेऊन सांचा बंद करावा. मग पुढील फणी भरून रशांच्या जागीं लीज रॉडस् टाकून व जितक्या वारावर खूण पाहिजे असेल (याला कामवाले लासन असें म्हणतात) त्या हिशेबानें चक्र लावून कांजीच्या टाकींतील कांजी गरम करून यंत्र सुरू करावें. लीज रॉडस् टाकण्याचा क्रम असा कीं सर्व रशा एके ठिकाणीं असतात व पाहूं गेलें असतां एका रशीखालीं दुसरी, तिच्या खालीं तिसरी, तिच्या खालीं चौथी असा क्रम असतो. या लीजरॉडस्मध्यें टिनरोलरच्या जवळ असणारा लीजरॉड आकारानें मोठा असतो म्हणून सांगितलें. हा नेहमीं मधल्या रशी-वर टाकावा. पहिल्यानें सर्वांत वरच्या रशीमध्यें लीज रॉड टाकून तो पुढच्या बाजूस ठेवावा. तीनच रशा असल्यास मग खालच्या रशींत रॉड घालून तो त्याच्या मागें ठेवावा व मधल्या रशींत मोठा रॉड घालून तो त्याच्या जागीं ठेवावा. चार रशा असल्यास वरच्या दोन रशांत आधीं रॉड घालावा, मग खालच्या रशींत व मग तिसऱ्या रशींत मोठा रॉड घालावा.या ज्या तारी एकाखालीं एक येतात त्या पैकीं कोणत्या बिमाची कोणती तार हें सांगतों.सर्वांत वर असणारी तार पहिल्या बिमाची होय. तिच्या खालीं तिसऱ्या बिमाची येते. तिच्या खालीं पांचव्या बिमाची येते. तिच्या खालीं सहाव्या बिमाची येते. तिच्या खालीं चौथ्या बिमाची येते व तिच्या खालीं दुसऱ्या बिमाची तार येते. याचा उपयोग रंगीत कपडा काढणें असल्यास कोणतें बीम कोठें ठेवावें या बाबतींत होतो.

आतां फणी कशी भरतात तें पाहूं. बहुधा फणीला ३०० दांत असतात. फणी एकदां अगदीं लहान करून पहावी व एकदां मोठी करून पहावी व दोन्ही वेळां एका इंचांत फणीचे दांत किती बसतात तें पहावें व दोन्हींच्या मधली संख्या घ्यावी. ही पुष्कळशा फण्यांत सहा ही येते. या संख्येनें जितक्या इंचाचें बीम साइझिंगवर लावावयाचें असेल त्या इंचास गुणावें व त्या संख्येनें एकंदर तारींच्या संख्येस भागावें. जो भागाकार येईल तितक्या तारी प्रत्येक फणीच्या घरांत घालाव्या, हा ठोकताळा झाला. आतां साइझिंगचें बीम वजनाला हलकें अगर भारी करणें असल्यास कसें करावें तें पाहूं. इमर्शन रोलर कांजीच्या जितका आंत घ्यावा तितकें बीम भारी येईल व इमर्शन रोलर जितका वर ठेवावा तितकें बीम हलकें येईल. बीम हलकें येत असल्यास स्क्वीझिंगरोलरवर नवीन बनात लावावी.भारी येत असल्यास नवी बनात असल्यास ती काढून टाकावी. कांजी पातळ असल्यास बीम हलकें येईल व कांजी घट्ट असल्यास बीम भारी येईल. कांजी घट्ट असून बीम भारी येत असल्यास कांजींत थोडें पाणी घालावें. तसेंच कांजी पातळ असल्यामुळें बीम हलकें येत असल्यास थोडी पातळ कांजी काढून घेऊन नवी घट्ट कांजी घालावी. स्क्वीझिंग रोलरच्या बनातीवर साधा कपडा गुंडाळला असतांहि बीम

थोडें हलकें येतें. या सर्व गोष्टी रोजच्या काम करणाऱ्या नेहमींच्या परिचयांतल्या आहेत. व जो निर्मे वजनांत बरोबर काढून देईल त्यालाच हुशार सायझर समजतात. आतां कांजी तयार करण्यासंबंधी थोडी माहिती सांगून हें प्रकरण संपवूं.

कांजी तयार करणें.—मिलमधील कांजीचें यंत्र प्रचारांत आल्यापासून कांजीचें एक शास्त्रच बनून बसलें आहे. हातमागवाला सूत विणता येईल अशी पांजण तयार करितो व विणावयास बसतो. येथें ५० टक्के कांजी चढीव, ६० टक्के चढीव, १०० टक्के चढीव, १५० टक्के चढीव व २०० टक्के चढीव अशी चढाओढ होऊन बसली आहे. व त्यासाठीं कांजी बनविण्याचे निरनिराळे पदार्थ शोधणें व निरनिराळ्या कृती शोधून काढणें असे शोध नित्य चालू आहेत. कांजी बनविण्याच्या जिनसांचे पुढीलप्रमाणें भाग करितां येतीलः–

(१) कांजीमध्यें चिकटपणा देणारेः—या सदराखालीं इंग्रजींत ज्याला स्टार्च म्हणतात म्हणजे धान्याचें सत्व अशा तऱ्हेचे पदार्थ येतात. २ कांजीमध्यें नरमपणा आणणारे, या सदराखालीं चरबी वगैरे जिन्नस येतात. ३ कांजीमध्यें वजन देणारे, या सदराखालीं चायनाक्लेसारखे जिन्नस येतात ४ इंग्रजींत ज्याला ॲंटिसेप्टिक म्हणतात ते म्हणजे कापडावर खळ चढविल्यानंतर त्यावर बुरशी येऊं नये यासाठीं वापरावयाचे जिन्नस. या चार सदरांखालीं कांजमिध्यें घातले जाणारे सर्व जिन्नस येतात.

या विषयावर इंग्रजींत स्वतंत्र ग्रंथ आहेत. पण आपणाला नेहमींच्या प्रचारांत काय आहे येवढेंच येथें पहाणें आहे. १ कांजीमध्यें चिकटपणा देणारे पदार्थ या सदराखालीं पुढील जिन्नस येतातः—गव्हाचें सपीठ, फरीना (बटाट्याचें सत्व) सॅगो फ्लोअर (साबूदाण्याचें पीठ), मेझ स्टार्च (मक्यासारख्या एका धान्याचें सत्व), साइझिंग कॉंपोझिशन (हा एक चिकट पदार्थ फरीन्यापासून तयार करितात.). वरील सर्व जिन्नस नेहमींच्या उपयोगांत आहेत. त्यापैकीं गव्हाचें पीठ वापरतांना तें आधी भिजवून ठेवून मग वापरावें लागतें. यासाठीं लांकडाच्या टांक्या बनविलेल्या असतात. सरासरी ४ फूट लांब, ४ फूट रुंद व ४ फूट खोल येवढ्या टांकींमध्यें गव्हाच्या पिठाचीं आठ पोतीं मावतात. हें पीठ कमींतकमी १५ दिवस तरी भिजावें म्हणजे त्यात आंबूसपणा उत्पन्न होतो व तें फुगून वर येतें. इंग्रजींत या कृतीला फरमेंटेशन म्हणतात. या योगें गव्हाच्या पिठाचे सर्व बारीक कण फुगून त्यायोगें ते जास्त चिकटपणा देतात. हें पीठ भिजविण्याची कृति पुढीलप्रमाणें आहे. टांकीच्या प्रमाणानें जितके थैले टांकींत भिजत घालावयाचे असतील त्याच्या निमे थैले पहिल्या दिवशीं घालावे. टांकीच्या एकद्वितीयांश उंचीइतकें पाणी आधीं घ्यावें व त्यांत १० पौंडापर्यंत झिंक टाकून मग त्यात पिठाचे थैले टाकण्यास सुरुवात करावी. या टांकींत एक पंखा सतत फिरत रहावा. पीठ अशा तऱ्हेनें पसरून थोडें थोडें टाकावें कीं त्याचा एकच ठिकाणीं गोळा होऊन बसूं नये. आधीं एक थैला टाकावा मग मध्यें तासभर जाऊं देऊन मग दुसरा थैला टाकावा. अशा रीतीनें दिवसभरांत ते थैले टाकावे. एकंदर आठ थैले टाकावयाचे टांकींत पहिले दिवशीं चार, दुसऱ्या दिवशीं दोन, तिसऱ्या दिवशीं एक व चौथ्या दिवशीं एक या प्रमाणांत आठ थैले टाकावेत. मोठी टांकी बहुधा सोळा थैल्यांच्या पेक्षां मोटी असत नाहीं. पहिले चार थैले टाकून झाल्यावर मग पुढील थैले टाकतांना पंखा फिरूं शकेल. अशा बेतानें थोडें थोडें पाणी घेत जावें. ४८ इंच उंचीच्या टांकींत, सर्व थैले टाकून झाले म्हणजे ४० इंच पाणी व आटा मिळून उंची करावी म्हणजे पंखा फिरतांना पीठ वर उडत नाहीं. खळ वापरण्याच्या पूर्वी टांकींत आणखी ४ इंच पाणी घेऊन ४४ इंच करावें म्हणजे प्रत्येक थैल्यामागें ५ इंच उंची वापरण्यास येते. व शेवटीं ४ इंच पीठ टांकींत रहातें. हें चार इंच पीठ टांकींत नेहमींच राहूं देऊन पुनः तींत नवीन पीठ घालावें. फरीना सॅगो हे वापरतांना आयत्या वेळीं पाण्यांत कालवून कांजींत घालतात. साइझिंग काम्पोझिशन वापरणें झाल्यास ज्या टांकींत चायना क्ले शिजवितात त्या टांकींत आधीं थोडें पाणी घेऊन त्यांत साइझिंग कॉम्पोझिशन घालून अर्धापाऊण तास शिजवावें.

(२) कांजामध्यें नरमपणा आणणारे पदार्थः-चरबी (टॅलो), मेण, एरंडेल तेल, खोबरेल तेल, सॉफ्ट सोप, पामीन, मॅग्निशिअम् क्लोराइड इत्यादि पदार्थ येतात. चरबी व एरंडेल तेल पुष्कळ लोक वापरतात. खोबरेल तेल महाग असल्यामुळें कोणी वापरीत नाहीं. मेण प्याऱ्याफिन वॅक्स म्हणून असतें तें अलीकडे फार वापरतात. सॉफ्ट सोप शिजवितांना जास्त वाफ झाल्यास उतूं जातो म्हणून तो क्वचित कोणी वापरतात. पामीन वगैरे नांवाखालीं अलीकडे बऱ्याच जिनसा प्रचारांत आल्या आहेत. पण त्यात मूळ द्रव्य तेल असतें. त्यामुळें ते कोणी वापरीत नाहींत. असले जिन्नस वापरणाऱ्यास जिन्नस बनविणाराकडून पुष्कळ वेळां भरपूर कमिशन मिळतें. मॅग्निशिअम् क्लोराइड हा खार आहे. याला कामवाले लोक थंडा खार म्हणतात. याच्यामध्यें हवेंतील पाणी शोषून घेण्याची फार मोठी शक्ति आहे. व त्या योगें याचा कांजीच्या कामात विशेष उपयोग होतो. हा खार जास्त प्रमाणांत वापरून त्यापासून कापडाचें वजन वाढविण्याच्या कामांत याचा उपयोग होऊं लागला आहे. मात्र हा खार वापरला असता हवेंत पाणी असलें पाहिजे तर हा तें शोषून घेईल. यासाठीं हवेंत पाणी सोडून हवा थंड करण्याचे पुष्कळ प्रकार प्रचारांत आले आहेत.

(३) कांजींत वजन वाढविणारे या सदराखालीं चायना क्ले नांवाची माती येते. ही विलायतेंत जमीनीच्या पोटात सापडते. अलीकडे अहमदाबादेकडेहि हिच्या खाणी सापडल्या

आहेत. हा जिन्नस वापरतांना येवढेंच पहावयाचें कीं यांत रेतीचा अंश कमी असावा. याचा लहानसा खडा तोंडांत टाकून लाळेबरोबर विरघळूं दिल्यास रेती असल्यास आपोआप समजून येते. अगर पाण्यांत कालविल्यास जास्त पाणी घालून पातळ केलें असतां रेती बुडीं रहाते. वर सांगितलेल्या मॅग्निशियम क्लोराइड खाराचाहि समावेश या सदरात होईल.

(४) ॲन्टिसेप्टिकः-या सदराखालीं क्लोराइड ऑफ झिंक हा पदार्थ मुख्यत्वेंकरून येतो. कॉस्टिक सोडाहि याच सदराखालीं येतो. त्याचा उपयोग थोड्या ठिकाणीं होतो. आतां हे पदार्थ मिसळून कांजी कशी तयार करितात तें पाहू. कांजी तयार करण्यास मुख्यतः तीन टाक्या लागतात. एकामध्यें चायना क्ले शिजवितात ती, एकीमध्यें गव्हाचें सपीठ भिजत घालतात ती व तिसरी जींत कांजी शिजवून तयार करावयाची ती. कांजी शिजविण्याची टांकी निदान जमीनीपासून सात आठ फुटांच्या उंचीवर बसविलेली असते. व जीमध्यें चायनाक्ले शिजवितात ती याच्याहीवर ७-८ फुटांवर या वरील टांकीच्या डोक्यावर बसविण्याची योजना केलेली असते. म्हणजे शिजविलेला चायना क्ले सहजीं या खालच्या टांकींत नळ उघडल्याबरोबर पडावा. पिठाच्या टाक्याहि या चायनाक्लेच्या टांकीच्या उंचीलाच बसविलेल्या असल्या म्हणजे ठीक. म्हणजे पीठ घेतांना आपोआप नळ उघडल्याबरोबर टाकींत पीठ पडूं शकेल. ज्या ठिकाणीं पिठाची टांकी कांजीच्या टांकीच्याच उंचीवर असते. त्या ठिकाणीं पीठ या टांकींत पडावें म्हणून पिटाच्या टांकीला एक पंप लावलेला असतो. परंतु वर दिलेली पहिली योजनाच बरी. तयार कांजी साइझिंग मशीनमध्यें पडण्यासाठींहि असाच नळ लावून योजना केलेली असते. कांहीं ठिकाणीं बादल्या भरून हातानें कांजी टाकण्याची रीत आहे. कांहीं ठिकाणीं कांजीच्या टांकीलाहि पंप लावून त्या पंपाच्या योगें कांजी साइझिंगच्या टाकींत येऊन पडावी अशी योजना केलेली असते. चायनाक्लेच्या टांकींत साईझिंग काम्पोझिशन वापरीत असल्यास तें आधीं शिजवून घ्यावें. नंतर त्यांत चायनाक्ले घालावा व पुनः शिजवावें. चायनाक्ले सरासरी दोन तास शिजवावा. नंतर त्यात चरबी, मेण, तेल वगैरे जे कांहीं जिन्नस घालावयाचे असतील ते घालावेत व सुमारें एक तास शिजवावें. या योगेंकरून सर्व जिन्नस एकरस होऊन त्याला पांढरा सफेत रंग येतो. नंतर पंखा चालू ठेवून स्टीम बंद करावी. ज्या टांकींत तयार कांजी शिजवावयाची असेल तिच्यांत गव्हाचा आटा (चांगला भिजवून फरमेंट झालेला) जितका घेणें असेल तेवढा घ्यावा. तीमध्यें वरील टांकींत शिजलेले चायनाक्ले चरबी वगैरेंचे मिश्रण सोडावें. नंतर त्यांत क्लोराइड ऑफ मॅग्निशिया व क्लोराइड ऑफ झिंक हे घालावेत. तसेंच सॅगोफ्लोअर व फरीना यापैकीं जें घालणें असेल तें घालावें. हें सुसतें पाण्यांत कालवून घालावयाचे असतात. व नंतर त्यांत निळा रंग घालावा. हा " सोल्युबल ब्लू ' म्हणून विरघळणारा निळा रंग मिळतो तो वापरतात. त्या योगें करून कांजीला सफेतपणा येऊन साइझ झालेल्या सुताला देखील सफेतपणा येतो व कापडहि त्यामुळें सफेत दिसतें. ब्लू रंग टाकून झाला म्हणजे एकंदर मिश्रण किती इंच करावयाचें तें टांकीच्या प्रमाणानें ठरलेलें असतें. ते एक इंचाच्या खुणा केलेली कांठी असते, तिनें मापून पाहून जर कमी असेल तर आणखी पाणी घेऊन तेवढे इंच उंचीबरोबर करून मग कांजींत स्टीम सोडून शिजवावी. हें शिजविण्याचें प्रमाणहि प्रत्येक वीव्हिंग मास्तरचें निराळें असतें. कोणी थर्मामिटर हातांत घेऊन त्यानें कांजीची उष्णता पहातो; कोणी त्या बरोबरच तिची जाडी (ट्वाडल पहातो. दुसरी एक पद्धत अशी आहे कीं, कांजी आधीं एकदम घट्ट शिजवावयाची व मग पंखा बंद झाला म्हणजे पट्टा अर्धा फास्ट व अर्धा लूज पुलीवर ठेवावयाचा व कांजींत थोडीशी स्टीम ठेवावयाची. याच्या योगें कांजी हळू हळू पातळ होऊन पंखा आंत फिरूं लागतो. पंखा फिरूं लागला कीं स्टीम बंद करावयाची. ही पूर्ण शिजविलेली कांजी होय. कोणी वरील टाकींत कांजी अर्धवटच शिजवितात व मग ती पुढें कांजीच्या टाकींत मध्यें जो पडदा असतो म्हणून वर सांगितलें त्याच्या बाजूच्या लहान टाकींत ती कांजी घ्यावयाची व तेथें स्टीम ठेवून तेथें ती शिजवावयाची. या पार्टिशनला म्हणजे पडद्याला बुडाला भोकें असतात त्यातून कांजी दुसऱ्या बाजूला येत असते. कांजीमध्यें तीन प्रकार आहेत. लाइट साईझ, मीडियम साईझ व हेवी साईझ. ही वर सांगितलेली कांजी अर्धवट शिजविण्याची पद्धति पहिल्या तऱ्हेच्या व दुसऱ्या तऱ्हेच्या कांजीला ठीक पडेल. पण ही हेवी साइझिंगला उपयोगी नाहीं. निदान तसा अनुभव नाहीं असें लेखकाचें मत आहे. पण हें मत प्रत्येक वीव्हिंग मास्तर आप आपल्या अनुभवावर बनवीत असतो. तेव्हां चांगली अगर वाईट न म्हणता दोन पद्धती आहेत असें म्हणणें हेंच बरें. लाइट साइझ म्हणजे ५ टक्क्यापासून १५ टक्क्यापर्यंत, मध्यम साइज म्हणजे २० टक्क्यापासून ४० टक्क्यापर्यंत व हेवी साईझ म्हणजे ५० टक्यापासून वर. याशिवाय प्युअर साईझ म्हणून आहे ती लाइट साईझच्याच वर्गांत येतें म्हणजे पांच टक्यापासून पंधरा टक्यापर्यंत ही चढवितात. ही धुवट मालाला व रंगीत मालाला वापरतात. हिनें सुताला ताकत चांगली येते. हिच्यामध्यें फक्त सॅगो फ्लोअर व चरबी आणि कॉस्टिक सोडा येवढेच जिन्नस असतात. त्याचें साधारण प्रमाण पुढीलप्रमाणें आहे:-१०० रत्तल सॅगो, १ रत्तल कॉस्टिक सोडा व ५ पौंडापासून १० पौंडापर्यंत चरबी. आपणाला जेवढी जाडी पाहिजे असेल त्या प्रमाणांत पाणी घ्यावें कांजीच्या प्रमाणाविषयीं प्रत्येक ग्रंथकारानें हेंच म्हटलेलं आहे कीं प्रत्येक कारखान्यांतील कांजीचें प्रमाण निराळें

असतें. तेव्हां ज्याला जें अनुभवानें आवडेल तें त्यानें वापरावें. हें स्वयंपाक करणाऱ्याप्रमाणें आहे. मुख्य तत्त्व कापड विणताना सूत तुटूं नये. चढविलेली कांजी सुतावर रहावी, गळून पडूं नये. त्याला ड्रॅपिंग म्हणतात. कापडावर कांजी सारवल्याप्रमाणें न दिसतां ती कापडाच्या अंगांत भिनून जावी म्हणजे कापडावर खुमास चांगली येते. याला कव्हर म्हणतात. आतां कांजीचीं प्रमाणें दोनचार सांगून हें प्रकरण संपवूं.

लाइट साइझ (पातळ कांजी.)

मिश्रण नं. १	मिश्रण नं. २.
१०० पौंड गव्हाचा आटा	५० पौंड सॅगो फ्लोअर
५ ,, चरबी	५० ,, फरीना
	१० ,, चरबी

मिडिअम साइझ (मध्यम कांजी.)

१०० पौंड गव्हाचा आटा	मिश्रण नं. ३
५० ,, चायनाक्ले	
२० ,, चरबी	
२५ ,, क्लोराईड ऑफ मॅग्निशिया	
५ ,, झिंक क्लोराईड	
२ ,, पेनिवेट ब्लू	

हेवी साइझ (भारी कांजी.)

१०० पौंड गव्हाचें पीठ	मिश्रण नं. ४.
१२५ ,, चायनाक्ले	
१५ ,, साइझिंग कॉम्पोझिशन	
६० ,, चरबी	
६० ,, मॅग्निशिया क्लो.	
१० ,, झिंक क्लो.	
३ ,, पेनिवेट ब्लू रंग	

पाण्याचें प्रमाण टांकीच्या आकारावर, कांजीच्या जाडीवर व किती परसेंटेज चढवावयाचें त्यावर अवलंबून राहील. नेहमीं काम करणाराला हें तेव्हांच समजतें.

ख ळी ची मा ती (फुलर्स अर्थ)—ही हिरव्या रंगाची माती आहे. ती वाळल्यावर तिचा रंग पिंगट होतो. कापडाला खळ लावणारे लोक, कापडावरील तेलकटपणा काढून टाकण्याकरितां हिचा उपयोग करीत असत व कोठें कोठें अजूनहि करतात. ही विशेष चिकट नसते. हिची सुकी भुकटी जिभेवर टाकल्यास ती चिकटतें. पाण्यांत घालतांच हिचे बारीक तुकडे होतात. हे बाकीचे गुणधर्म पुष्कळ प्रकारच्या मातींत आढळतात. परंतु स्निग्धपणा काढून टाकण्याचा गुण याच मातींत आढळतो. हिचें वि. गु. १.७ते २.४ पर्यंत असतें. हिची जमिनीवर ओढलेली रेघ चकाकते. ही हातास स्निग्ध लागते. हिच्या रासायनिक पृथक्करणावरून असें दिसतें कीं, स्निग्धपणा काढून टाकण्याचा गुण हा तिचा खरखरीतपणा व थोडासा चिकटपणा यावरच अवलंबून आहे. हिचें पृथक्करण केलें असतां अनेक प्राणिदें तींत सांपडतात.

खळीची माती पृथ्वीवर पुष्कळ ठिकाणीं सांपडते. विशेषतः इंग्लंड व अमेरिकेंत ही पुष्कळ सांपडते. कॅरोलिना येथें सांपडते ही माती यंत्रानें किंवा कुदळीनें खणून सुकवितात. कांहीं ठिकाणीं तिची वाळल्यानंतर पूड करतात. मग ती पाण्यांत घालून त्यांतील जाडीभरडी माती काढून टाकतात. म्हणजे बाकीच्या मऊ मातीची चिक्की बनते. ही चिक्की साफ केलेल्या जमिनीवर पसरून वाळवितात. मग त्याचे तुकडे करून परदेशीं पाठवितात. सध्या कापडाला व लोकरीला खळ देण्याकरितां हिचा आजकाल फार उपयोग करीत नाहींत. परंतु खनिज तेलें गाळण्याकरितां व वनस्पतिजन्य तेलांना ओपविण्याकरितां हिचा आजकाल फार उपयोग होतो. साबण करण्याकरितां व भांडीं साफ करण्याकरितांहि हिचा उपयोग होतो. कांहीं ठिकाणीं विटा व गिलावा करण्याकरितां हिचा उपयोग करतात.

खाकी—हा उत्तर हिंदुस्थानांतील एक वैष्णव पंथ आहे. रामानंदाचा शिष्य अनंतानंद, त्याचा शिष्य कृष्णदास पयअहारी, त्याचा शिष्य कील्ह, यानें या पंथाची १६ व्या शतकात स्थापना केला असें म्हणतात. खाकी हें नांव फारशी 'हाक'(खाक) = राख या शब्दापासून बनलें आहे. रामचंद्र वनाला जाण्याच्या वेळीं लक्ष्मणानें दुःखी होऊन अंगाला राख फांसली व म्हणून त्याला 'खाकी' हें नांव पडलें; त्याच्या अनुयायांनीं हेंच नांव धारण केलें व तेव्हांपासून हा पंथ अस्तित्वांत आहे असें कोणी म्हणतात. या लोकांचें आदिपीठ अयोध्येला असून नवाब सुजाउद्दौलाच्या कारकीर्दींत तेथें चित्रकूट(बुंदेलखंड)च्या कोणी दयाराम नांवाच्या पुरुषानें याचा एक अखाडा स्थापिला. १९०५ सालीं या आखाड्यांत १८० लोक असून त्यांपैकीं ५० स्थानिक होते. त्या वेळचा महंत संस्थापकापासून ओळीनें आलेला अकरावा गुरु होता. याच शहरातील हनुमानगढीच्या देवळाचें पुजारीपण खाकी वैराग्याकडे असतें. दुसरा एक अखाडा रेवाकांठा संस्थानांत लुनावाडा येथें आहे. त्याचें नाव 'नाथ बावानो अखाडो' असें असून त्याची त्या ठिकाणीं बरीच प्रसिद्धि आहे. याची अहमदाबादेस 'नीलकंठनो अखाडो' नावाची एक मोठी शाखा आहे. हे मुख्यतः रामभक्त असतात. तथापि भस्म लावणें, जटा राखणें, दिगंबर रहाणें, आपल्या संस्थापकाच्या गादीला 'समाध' अशी संज्ञा योजणें, यासारख्या बाबतींत शैवाचार पाळीत असल्याचें दिसून येतें. जे एका जागीच रहातात ते बहुधा इतर वैष्णवाप्रमाणें पोषाख करतात; पण सदोदित भटकणारे खाकी नग्न, पुष्कळ वेळां कमरेभोंवतीं जाड काळा दोरा बांधून व अंगाला राखमाती फांसून फिरतात. [रिलिजिअस सेक्टस ऑफ दि हिंदूज. शेरिंग-हिंदू ट्राइब्स अँड कास्टस ३ (कलकत्ता १८८१.)].

खागा—संयुक्त प्रांत. फत्तेपूर जिल्ह्यांतील पूर्व तहशील. क्षेत्रफळ ४८४ चौ. मै. लो. सं. (१९११) २,२३,१७७.

हींत एक शहर (किशनपुरा) व ४९३ गांवें आहेत. उत्पन्न ४॥ लाखावर आहे. तहशिलीच्या उत्तर व दक्षिण बाजूस गंगा व यमुना वहातात. पण त्याशेजारील जमीन पिकांना निरुपयोगी ठरते. तहशिलीचा मध्य भाग फार सुपीक आहे

खाचरोड—मध्यहिंदुस्थान. ग्वाल्हेर संस्थानच्या उज्जन जिल्ह्यातील एक शहर. उ. अ. २३° २६' व पू रे. ७५° २०'. लो.सं. १९११मध्यें ६४९६ व १९०१सालीं९१८६ होती. बॉंबे-बरोडा रेल्वेच्या रतलाम-गोध्रा फांट्यावरचें हें स्टेशन असून समुद्रसपाटीपासून १७०० फूट वर आहे उज्जन सरकारांतील एका महालाचें मुख्य ठिकाण म्हणून ऐने इ-अकबरींत याचा उल्लेख आहे. रेल्वेमुळें याचें महत्व वाढत आहे. रंगीत लांकूडकाम व तंबाखू याविषयीं खाचरोड गाव प्रसिद्ध आहे.

खाटिक—यांची वस्ती संयुक्तप्रातात सुमारें दोन लक्ष आहे. खट्टिक या संस्कृत शब्दावरून खाटिक हा शब्द झालेला असून त्याचा अर्थ कसाई अथवा व्याध असा आहे. शेती करणारी, मजुरी करणारी व भाज्या विकणारी ही एक जात आहे. हिचा पासी नांवाच्या जातीशीं निकट संबंध असूनहि त्याची एक पोटजात आहे असेंहि म्हणतात. अयोध्यावासी, संखर बकरकसाब, चलनमहाराव व घोरचराव अशा याच्या मुख्य पोटजाती आहेत. यापैकीं बकरकसाब अथवा कसाई हे मास विक्रयाचें काम करतात. चलन महाराव हे कातड्याचे काम करतात व घोरचराओ, हे पोतदार असतात.

खानेसुमारीच्या एकंदर अहवालावरून पहाता ८१६ हिंदूंच्या व सात मुसुलमानांच्या अशी खाटिक जातीच्या पोटविभागांची संख्या आहे. त्यापैकीं बऱ्याच स्थानिक आहेत. एकाच कुटुंबांत चार पिढ्यांपर्यंत अंतर्विवाह करण्याची चाल नाहीं. लग्नसंबंध जुळवून आणण्याच्या वेळीं, दुसरा पक्ष धंद्यानें कसाई, चांभार, किंवा खताची गाडी हांकणारा असल्यास ती गोष्ट गौण मानली जाते. त्यांची पंचायत असून तिचा मुख्य असा एक चौधरी असतो. पंचायतींत अपराध्यास शासन करून दंड करण्यांत येतो. विधवेस दिराशीं विवाह करण्याची मोकळीक आहे. परंतु सक्ती नाहीं. विधवाविवाह या जातींत रूढ आहे. लग्न ठरवितांना उभय पक्ष सुरापान करितात. मिरवणूक, कलशपूजा, वराचे पाय धुणें व सीमान्त पूजन वगैरे समारंभ करण्यांत येतात. करारबीर ही मुख्य देवता असून जोनपूर हें तिचें स्थान आहे. हा करारबीर अहीर जातीचा होता. व मुसुलमानी धर्मांत जाण्यापेक्षां त्यानें प्राणत्याग पत्करला असें सागतात. जोनपूरच्या कराकत परगण्यात व अन्यत्र करारकोट व करार मोहल्ला यांवरून नावें मिळालीं आहेत असें सागतात. बामट, बाभण अथवा ब्राह्मण नांवाच्या देवाचीहि पूजा ते करितात. त्यांनां मद्यमांस व यज्ञोपवीत अर्पण्यांत येतें. कित्येक भवानीची पूजा करितात व बिरतिया नांवाच्या राक्षसीला भजतात. देवीची सांथ उद्भवतांच सीतळा माईला पूजितात चैत्र नवरात्राच्यावेळीं भवानीची पूजा करून तिला डुकरपुरी व हलवा अर्पिण्यात येतो. गंगा, देवी व अमरोहाचा मिरान साहेब यांना खाटिक लोक अत्यंत पूज्य मानतात.

स्त्रिया बाहूवर गोंदून घेतात त्या नथ आणि चुडे घालीत नाहींत. तरीपण कानांतील अलंकार, काकणें व मळ इत्यादि अलंकार त्या वापरतात. चांभार, डाम, धारकर, मुसाहर, पासी व धोबी यांच्या हातच्या अन्नास ते स्पर्श करीत नाहींत. नाओवारी व अहीर यांनीं स्पर्श केलेलें अन्न त्यांस चालतें. त्यांचा मुख्य धंदा म्हणजे डुकरांची खरेदी विक्री करणें व कोइरी लोकांपासून खरेदी केलेलीं फळें विकणें हा असतो. एकंदरींत हे लोक फार निरुपद्रवी व सुस्वभावी आहेत.

मध्यप्रांतात सुमारें १३००० खाटिकांची वस्ती आहे. हे मांस विक्रय करितात. मराठी जिल्ह्यांत वऱ्हाडी व झाडींतील असे खाटिकांत दोन भेद आहेत. जबलपुराकडे डुकरें पाळणाऱ्यांस हलके समजून त्यांस लेंडा म्हणतात. एकाच आडनांवाच्या लोकांत लग्नव्यवहार होत नाहींत. यांच्यांत देवकेंहि आहेत. वर लग्नास निघाला म्हणजे त्याची आई त्यास स्तनपान करविते. उच्च जातीशीं व्यभिचारापासून झालेल्या संततीस जातींत घेतात नीच जातींची संतति घेत नाहींत. विजातीय रखेली ठेवल्यास जातीबाहेर टाकतात.

काश्मीर व पंजाबांतहि हिंदु व मुसुलमान खाटीक असून हिंदु डुकरें पाळतात व मुसुलमान कातडीं कमावितात. ('कसाई' पहा) [क्रूक; रसेल व हिरालाल; सेन्सस रिपोर्ट].

खांडववन-वनविशेष. हें अर्जुनानें अग्नीस भक्षणार्थ दिलें होतें. हें जळत असतां तक्षकाचा पुत्र अश्वसेन त्यांतून कसा तरी वांचला. मयासुर शरण येऊन वांचला व शार्ङ्ग पक्ष्याचीं चार बालकें अग्नीनें वाचविलीं. (भार. आदि. अ. २२४). हें वन कोठें असावें याविषयीं तर्क पुष्कळ आहेत. हें यमुनेच्या तीरावर असून पाडवांनीं या वनांत इंद्रप्रस्थनगर वसविलें असें भारतावरून दिसतें.

व्युत्पत्तीवरून प्रत्येक ठिकाणचा छडा लावूं पाहणाऱ्यांनीं त्याविषयीं खालील विचार व्यक्त केले आहेत.

सध्यां हिंदुस्थानच्या पूर्वेकडील देशांत खांड म्हणून लोक आहेत. त्यांचें पूर्वीचें म्हणजे भारतकालीं तरी खांडव असें नांव असावें. ह्या खांडववनात सध्याचे खांडवा शहर आहे. भीमाशंकराच्या पायथ्याशीं तळकोंकणांत कर्जतपासून सहा कोसांवर खांड म्हणून गांव आहे. तेथें सध्यां कोळी उर्फ कोळ लोक रहातात. ह्या कोळ लोकांच्या प्रदेशाला 'कोळवन' म्हणतात. कोळांवरून जसें कोळवन तसे गोंडावरून 'गोंडवन'. कोळवन, गोंडवन व खांडवन अशीं वनशब्दांत नामें ह्या कोळ, गोंड व खांड लोकांच्या प्रदेशाला फार पुरातन कालापासून असलेलीं दिसतात.

वह उत्तरपद लागून खांडवह त्यानें प्राकृत खांडवा (ग्रामनाम) प्रस्थपुरवहन्ताच (४. २-१२२) मुंडवा सैंधवा, हीं रूपेंहि अशाच मासल्याचीं होत. (भा. इ. सं. मं. १८३२).

तथापि खंड, व खांडव यांचें ऐक्य सिद्ध करू पहाणारें हें सर्व विवेचन स्थलनिर्णायक होत नाहीं. खांडाची वस्ती अनेक ठिकाणीं अनेक काळीं असावी एवढाच पुरावा वरील विवेचन देईल. पण त्यापैकीं अर्जुनकालीन खाडव स्थान हें कळण्याजोगें नाहीं.

खांडवा, त ह शी ल.–मध्यप्रांतांतील निमार जिल्ह्याच्या वायव्य भागांतील एक तहशील. या तहशिलीचें क्षेत्रफळ १९११ सालीं १८७१ चौ. मै. होतें. लोकसंख्या १८३७४४ होती.

या तहशिलींतील मुख्य शहर खांडवा हें होय. या तहशिलींत १९११ सालीं ४७३ खेडीं होतीं.सरकारच्या ताब्यांत असलेला ६७१ चौरस मैलांचा जंगलवजा टापू सोडून देतां १९०३-४ सालीं या तहशिलींत ७१२ चौरस मैल पेराऊ जमीन होती. १९०३-४ सालीं जमीनीचें उत्पन्न १६७००० रुपये होतें. व १८०९० रुपये सरकारी सान्याचें उत्पन्न होतें या तहशिलींत उंचसखल अशी बरीच जमीन असून उत्तरेस व पश्चिमेस बऱ्याच टेंकड्या आहेत.या तहशिलींतून अल्ना ध सुक्ता या दोन नद्या वहात गेल्या आहेत.

श ह र—खाडवा तहशिलीचें व निमार जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. मुंबईहून हें ३५३ मैल असून या ठिकाणाहून राजपुताना माळवा रेल्वेचा फाटा महूकडे गेला आहे. हें शहर समुद्रसपाटीपासून १००७ फूट उंचीवर वसलेलें आहे. या शहराच्या आसपास बॅसाल्ट पाषाण मुबलक सांपडतो. अर्थातच या ठिकाणीं झाडेंझुडपें फारच थोडीं आहेत. या शहराची लोकसंख्या इ. स. १९११ सालीं २१६०४ होती.

खाडवा हें पुराणप्रसिद्ध शहर आहे. या ठिकाणीं उत्तर हिंदुस्थानातून व पश्चिम हिंदुस्थानांतून दक्षिणेकडे जाण्याचे रस्ते मिळाले असल्याकारणानें या ठिकाणा स पूर्वीपासूनच फार महत्त्व आहे. टॉलेमी व अलबेरुणी यानीं याचा आपल्या ग्रंथांत उल्लेख आढळतो.१२व्या शतकांत जैनधर्माचें हें केंद्र होतें. व या ठिकाणीं जैन शिल्पकलेचे नमुने अद्यापीहि पहावयास सापडतात. या शहरांत चार मोठे तलाव असून या चारी तलावांनां चांगले दगडी घाट बांधलेले आहेत. १५१६ मध्यें खांडवा हें माळव्याच्या सुभेदाराचें राजधानीचें शहर होतें असें फेरिस्तानें म्हटलें आहे. . यशवंतराव होळकरानें १८०२ सालीं हें शहर जाळून टाकलें व व १८५८ मध्यें तात्या टोपीनें पुन्हां या शहराच्या बऱ्याच मोठ्या भागाला आग लावून दिली.

इ. स. १८६७ सालीं खांडव्याला स्वतंत्र म्युनिसिपालिटी देण्यांत आली. इ. स. १९०३-४ सालीं या म्युनिसिपालिटीचें उत्पन्न १०७००० रुपये व खर्च १०४०२० रुपये होता. या शहराच्या जवळ मोह घाटाचा तलाव आहे. तेथून या शहराला पाण्याचा पुरवठा होतो. या ठिकाणीं कापसाची मोठी बाजारपेठ आहे. या ठिकाणीं ९ जिन (कापसांतील सरकी काढण्याचें यंत्र) व ५ गठ्ठे करण्याच्या गिरण्या आहेत. येथें गांजाची मोठी वखार आहे. खांडवा हें लष्कराचें विश्रांतिस्थान आहे. येथें १९०३-४ सालीं एक हायस्कूल व सहा प्राथमिक शिक्षणाच्या शाळा होत्या. रोमन कॅथॉलिक धर्मोपदेशकांनीं व मेथॉडिस्ट एपिस्कोपल धर्माच्या उपदेशकांनीं या ठिकाणीं शाळा व अनाथगृह स्थापन केलें. १९०३ सालीं येथें तीन दवाखाने व एक गुरांचा दवाखाना होता.

खांडिया—काठेवाड. स्वतंत्र खंडणी देणारा एक तालुका. यांत खांडिया हें एकच गांव आहे. हें झालावाडमध्यें भोइका ठाण्यांत आहे. लिमडीच्या आग्नेयेस ८ मैलांवर खांडिया वसलें आहे. तालुकदार लिमडीचे भायाद व झाल रजपुतांपैकीं आहेत.

खादिजा—महंमदाच्या पहिल्या बायकोचें नांव. ती विधवा असून व्यापार करी. आपले उंट हांकण्याकरतां म्हणून काहीं काळ तिनें महंमदास आपल्या नोकरींत घेतलें व नंतर त्याच्याशीं लग्न लावलें. तिच्यापासून महंमदास पुष्कळ मुलें झालीं. परंतु तीन कन्यांशिवाय सर्व मुलें अल्पवयांत मरण पावलीं महंमदाच्या या तिन्हीं मुलींपैकीं फातिमेचें लग्न अलीशीं झालें. महंमदाशीं लग्न झाल्यानंतर खादिजा बावीस वर्षे जगली. हिज्री शकाच्या आरंभापूर्वी तीन वर्षे इ. स. ६१९ ऑगस्टमध्यें ६२ वर्षांची होऊन ती मक्का येथें मरण पावली. अलीचा बाप व महंमदाचा चुलता अबु तालिब याच्या मरणानंतर तीनच दिवसांनीं खादिजाचा मृत्यु झाला.खादिजाचें थडगें अजून कायम असून यात्रेकरू त्या ठिकाणीं नियमानें जातात. हें थडगें एका चौरस भिंतीनें परिवेष्टिलेलें असून थडग्याच्या शिलेशिवाय अद्भुत प्रेक्षणीय अशी दुसरी वस्तु या ठिकाणीं नाहीं. या शिलेवर क्यूफिक लिपीमध्यें सुरत्-अल्-करमी नावाचें कुराणमधील सर्ग कोरलें आहे.

खांदेरीः—मुंबई. कुलाबा जिल्ह्यांत, अलिबाग तालुक्यांतील एक लहानसें बेट. उ. अ. १८ ° ४२' आणि पू. रे. ७२ ° ४९' कुलाब्याच्या मध्यभूमीपासून हें बेट अडीच मैल दूर असून उंदेरी बेटापासुन सव्वामैलाच्या अंतरावर आहे. लोकसंख्या (१९०१) १३० होती. खांदेरी बेटाची लांबी सरासरी दीड मैल व रुंदी अर्धा मैल आहे.१८६७सालीं बांधलेलें एक दीपगृह बेटाच्या अत्युच्च भागीं आहे. १८ मैलांइतक्या अंतरावरून हें दीपगृह दृष्टीस पडतें. इ. स. १६७९ सालीं शिवाजीनें या बेटांत तटबंदीचें काम सुरू करण्याकरितां ३०० शिपाई व तितकेच मजूर लोक पाठविले. तत्पूर्वी या बेटांत वस्ती नव्हती. परंतु जेव्हां शिवाजीनें तटबंदी करण्यास सुरवात केली असें इंग्लिश व पोर्तुगीज लोकांस सम-

जलें तेव्हां दोघेहि खांदेरी बेटावर आपला हक्क सांगू लागले. इंग्लिशांच्या सरदारानें तें बेट सोडून जाण्याविषयी मराठयास निरोप पाठविला. परंतु मराठयांनी त्याला दाद दिली नाहीं. नंतर शिवाजीचा सरदार दौलतखान हा मोठें आरमार घेऊन चौलाहून येत आहे असें वर्तमान इंग्लिशांस कळतांच त्यांनीं आपलें आरमार वाढविलें. स. १६७९ च्या आक्टोबरमध्यें मराठयांनीं इंग्रजांचें एक व्यापारी जहाज पकडलें. परंतु पुढें मराठयांच्या आरमारचा पराभव होऊन त्यांचीं कांहीं जहाजें शत्रूंनीं पकडलीं. तथापि खांदेरीच्या तटबंदीस इंग्लिशाकडून कांहींहि अडथळा आला नाहीं. पुढें जंजिऱ्याचा शिद्दी मोठें आरमार घेऊन इंग्लिशास येऊन मिळाला. परंतु खांदेरी बेट इंग्लिशास देण्याचा शिद्दीचा बेत नाहीं असें दिसून येताच इंग्लिशांनीं शिद्दीला मदत करण्याचें नाकारलें. पुढें शिद्दी व मराठे यांच्यामध्यें दुही माजून यांच्यामधील झगडा फार वर्षेपर्यंत चालला होता. इ. स. १७०६ सालीं मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर स्ट्रट लिहितो कीं "आंग्र्यानें खांदेरीची तटबंदी बांधली असून आत कांहीं घरें आहेत." इ. स. १७१३ त हा किल्ला शाहुमहाराजांनीं कान्होजी आंग्रे यास दिला. इ. स. १७८० त इंग्लिश व शिद्दी यांच्यांत तह होऊन त्यात असें ठरलें कीं "दोघांनीं मिळून खांदेरी किल्ला घ्यावा व शिद्दीनें पुढें तो इंग्लिशांस द्यावा." इ. स १७७५ त राघोबा दादा व इंग्लिश यांच्या मध्यें सुरतेचा तह झाला, तेव्हां खांदेरी इंग्लिशांस मिळाली. परंतु पुढें लवकरच पुरंदरच्या तहात तो किल्ला मराठयांनीं परत घेतला. १७८७ त किल्ला रघोजी आंग्र्याच्या ताब्यांत होता असा लेख सांपडतो. स. १७९९ च्या सुमारास जयसिंग आंग्र्याची बायको सकवारबाई हिनें हा किल्ला घेतला. पुढें दौलतराव शिंद्याच्या सेनापतानें सकवारबाईस असें कळविलें कीं, "तुम्ही हा किल्ला माझ्या स्वाधीन कराल तर मी तुमचे नवऱ्यास बंधमुक्त करतो." परंतु किल्ला हातीं येताच त्यानें जयसिंगास ठार मारलें व सकवारबाईस कैदेंत टाकलें. इ. स. १८१३ त मानाजी आंग्र्यानें हा किल्ला पेशव्यांनां देऊन टाकला. इ. स. १८१८ त पेशव्याचें राज्य इंग्लिशांनीं खालसा केले तेव्हां तो इंग्लिशाच्या हातीं आला.

खान—मुसुलमानांमधील ही एक बहुमानाची पदवी आहे. मोंगलांमध्यें तुर्कस्तानमधील रानटी जातींत, 'खाखान' हा शब्द 'बादशहा' या शब्दाचा वाचक आहे. या खाखानचें खान हें संक्षिप्त स्वरूप आहे. मोंगलांचा मुख्य जो चेंगिझखान हा खान ही पदवी आपल्याला लावून घेत असे. पुढें त्याच्या वंशजानांहि युरोपमध्यें मोठे खान असें नांव देण्यात आलें. हल्लींहि स्वतंत्र अशा लहान लहान राजांनां खान हा शब्द लावण्यांत येतो. उदाहरणार्थ रशिया तुर्कस्तानचे खान. त्याचप्रमाणें तुर्कस्तानचा सुलतान हाहि आपल्याला खान म्हणवून घेतो. हल्लीं तर 'खान' ही पदवी इराण व अफगाणिस्तानांतील कोणत्याहि सभ्य मुसुलमान गृहस्थाला लावण्यांत येते. हिंदुस्थानांत पठाणांच्या जातींतील प्रत्येकाला खान हा शब्द लावण्यांत येतो. तात्पर्य हल्लीं खान हा शब्द आपल्याकडील श्रीयुत अगर राजमान्य राजश्री अगर इंग्लिश भाषेंतील 'एस्क्वायर' या अर्थी वापरला जात आहे. ब्रिटिश सरकारकडून हल्लीं पारशी अगर मुसुलमान लोकांतील सरकारच्या हितकर्त्या मोठ्या माणसांना खानसाहेब, खानबहादुर अशा पदव्या देण्यात येतात.

खानखानान—मीर्झा अब्दुर्रहीम हा बहारामखानाचा मुलगा व एक दिवाण होता. अहमदनगरावर स्वारी केल्यानंतर अकबरानें याची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक केली होती. तो तीस वर्षे दक्षिणेंत होता. मलिकंबरानें खानखानाचा पाडाव करून अहमदनगर घेतलें तेव्हां हा बऱ्हाणपुरास परत आला. दक्षिणचा कारभार याच्या हातून नीट होत नाहीं, हा शत्रूंत सामील होतो अशा प्रकारचे वाजवी संशय जहांगिरास येऊन त्यानें खानखानाला दक्षिणेंतून परत बोलाविलें. १६२७ त हा लाहोर येथें मरण पावला. खानखानान फार विद्वान् असून संस्कृत उत्तम जाणत असे. खानखानान या पदवीचा अर्थ श्रेष्ठ खान असा असून ही पदवी पुष्कळ मुसुलमान सरदारांस मिळाली होती.

खानगड—पंजाब. मुझफरगड जिल्हा व तहशिलींतील एक शहर. उत्तर अक्षांश २९° ५५' व पूर्व रे. ७१° १०'. मुझफरगड शहरच्या दक्षिणेस ११ मैलांवर हें शहर आहे. १९११ सालीं लोकसंख्या २३४९ होती. खानबिबी नामक मुझफरखानाच्या बहिणीनें हें शहर वसविलें. शहराचा विस्तार अलीकडे बराच झाला आहे. १८४९ सालीं हें शहर मुझफरगड जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होतें. परंतु चेनाबच्या महापुरामुळें शहराचें नुकसान होऊं लागलें म्हणून १८५९ सालीं राजधानी बदलण्यांत आली. १८७३ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. उत्पन्न मुख्यतः म्युनिसिपल करापासून होतें. शहरांत कापसांतील सरकी काढण्याची एक गिरणी आहे.

खानगा डोग्रान, तहसील.—पंजाब प्रांत. गुजराणवाला जिल्ह्यातील तहशील. उ. अ. ३१°३१' ते ३१°५९' आणि पू. रे. ७३°१४' ते ७४°५'. हिचें क्षेत्रफळ ८७३ चौरस मैल आहे. हाफिझाबाद या अधाळव्य तहशीलींतून स. १८९३ सालीं ही तहशील विभागण्यांत आली. १९०१ सालीं तहशीलीची लोकसंख्या २,३७,८८२ होती. या तहशीलींत २३९ गांवें आहेत. खानगाडोग्रान (लोकसंख्या ५३४९) हें मुख्य शहर आहे. १९०३—०४ सालीं जमीनमहसूल ३४१००० रुपये होता. तहशीलींतील जमीन विकण मातीची आहे.

गांव.—पंजाब प्रांत. गुजराणवाला जिल्ह्यांतील खानगा डोग्रान तहशीलीचें मुख्य ठिकाण. उ. अ. ३१°४९' व प. रे. ७३° ४१'. महंमदी लोकांच्या देवळाकरितां फक्त

हल्लीपर्यंत या गांवाची प्रसिद्धि होती. कारण जून महिन्यांत येथें जत्रा भरते. इ. स. १८१३ सालीं हें गांव नवीन बसविण्यांत आलेल्या तहशिलीचें मुख्य ठिकाण झालें व तहसिलीचेंच नाव या गांवास देण्यांत आलें. चेनाब कालव्याच्या पाण्यामुळें लागवडीस आलेल्या प्रदेशाच्या मध्यवर्ती भागांत हें गांव असल्यामुळें दिवसें-दिवस गांवास अधिक महत्व प्राप्त होत आहे. १८८१ सालची लोकसंख्या ८७७, १८९१ सालची १६४६ व १९०१ सालीं ५३४९ होती. यावरून लोकसंख्येचें प्रमाण वाढत आहे असें दिसून येईल. येथें एक कापसातून सरकी काढण्याची गिरणी आहे.

खानगी—राजाच्या स्वतःच्या खाजगी कामासाठीं जें खातें असतें त्याला खानगी (खाजगी) खातें म्हणतात. या खात्याकडे मुख्यतः राजाच्या वार्षिक नेमणुकीची व्यवस्था असते. राजाच्या वसनागार, पाकशाळा (मुदरबखाना), आप्तवर्गाचें पालनपोषण, देवघर वगैरे निरनिराळ्या कामकाजाचा कारभार हेंच खातें पहातें. अष्टप्रधानांत या खात्याचें काम सचिवाकडे असे. तो आपल्या हाताखालीं खानगी कारभारी नेमी. रामायणांत सुमंत नावाच्या प्रधानाकडे हें काम होतें असें तेथील वर्णनावरून दिसतें. रूलर्स ऑफ बडोदा या पुस्तकात खंडेराव गायकवाडाच्या कारकीर्दीतील बडोदें राज्याच्या जमाखर्चाचें पत्रक दिलें आहे; त्यात खानगी खात्याच्या पोटीं पुढील बाबी आलेल्या आहेत. (१) सरकारखर्च(२)आप्तवर्ग(३)हत्तीखाना(४)गाडीखाना (५)अश्वशाळा (६)मर्जीतले लोक व गुप्त सल्लामसलत देणारे लोक(७) नोकरचाकर (८)आप्तवर्गांतील पेनशनर लोक(९)शिपाई प्यादे १० गवळी व गोशाळा ११ बागबगीचे व माळी १२ खोटखर्च (राजवाड्याकरता आणलेल्या कापड वगैरे सामानांतील तोटा) (१३) सणवार(१४)नर्तक कंपनी वगैरे(१५)लग्नसमारंभ (१६) फरासखाना (१७) दानधर्म.

सारांश खानगी खात्याच्या नांवाखालीं राज्यांतील उत्पन्नापैकीं बरेंचसें उत्पन्न खर्च करितां येतें. ही रीत एकमुखी राजसत्तेंत सर्वत्र प्रचारात आहे. प्रजासत्ताक राज्यात अध्यक्षाची अगर प्रतिनिधींची खानगीची नेमणूक लोकसभा ठरवीत असते. या रीतीनें प्रजेचा पैसा अनाठायीं खर्च होत नाहीं. वरील बडोदें येथील जमाखर्चाच्या तक्त्यांत राज्याच्या जमाबंदीपैकीं जवळजवळ एक चतुर्थांश रकम खानगी खात्याच्या नावावर पडलेली आढळते.

खान जहान—हा अकबराच्या वेळीं पंचहजारी असून याला १५७६ मध्यें बंगालचा सुभेदार नेमला होता. याचें मूळ नांव हुसेनकुली बेग असून खान जहान ही त्याची पदवी होती. बंगालचा नबाब दाऊदखान यानें अकबराविरुद्ध बंड केल्यामुळें यानें त्याचा पराभव करून व त्याला ठार मारून त्याचें डोकें आग्र्यास अकबराकडे पाठविलें. हा टंडा येथें १५७८ त मेला [बील-ओरिएं बायो- डिक्श.].

खान जहान कोकलताश-याचें खरें नांव मीर मलिक हुसेन असें असून हा औरंगझेबाचा दूधभाऊ होता त्यानें याला प्रथम बहादुरशहा ही पदवी दिली होती आणि बहादूरशहा याच नावानें तो मराठ्यांना माहीत होता. तो आपल्या वेळच्या सर्व सरदारात स्वतःस श्रेष्ठ समजत असे. तो प्रथम ७०० घोडेस्वाराचा सरदार होता. त्याची बढती होत होत तो १६७४ त साहहजारी बनून त्याला त्या वेळीं खानजहान बहादुर कोकलताश झफरजंग हा किताब मिळाला. याला प्रथम दक्षिणची सुभेदारी १६७० त मिळाली. या वेळीं शिवाजी महाराजांनी थेट औरंगाबाद व नगरपर्यंत स्वारी करून मुसलमानाचा मोड केला होता, म्हणून त्याच्या पारिपत्यास हा मुद्दाम औरंगझेबानें इकडे नेमिला होता. यानें १६७१ च्या उन्हाळ्यात चार महिने साल्हेरीस वेढा दिला, पण किल्ला न पडतां उलट याची फजिती होऊन याला परत फिरावें लागलें. त्यामुळें याला औरंगझेबानें परत बोलावून शहाजाद्यास सुभेदार नेमिलें. परंतु त्यानें १६७२ त महाराजांशीं तह केला. त्यानंतर ह्याला पुन्हां सुभेदार केलें व शहाआलमनें केलेला तह मोडून महाराजांशीं युद्ध करण्यास त्यास औरंगझेबानें फर्माविलें, व त्याच्या हाताखालीं सत्तर हजार फौज दिली. तरीहि याच्यानें महाराजांशीं टिकाव धरवेना. तेव्हां यानें त्याच्याशीं गुप्तपणें तह केला. पुढें १६७६ त यानें विजापुरकराचा हलगी येथें पराभव करून १६७७ त त्यांचें कलबुर्गें घेतलें. नंतर १६७८ त त्याला इकडून दुसरीकडे बदललें. परंतु पुन्हा १६८० त इकडे सुभेदार नेमलें. इकडे येतांच पुन्हा तो मराठ्यांच्या राशीस लागला. यावेळीं संभाजी गादीवर होता. यानें अहिवंतगडास वेढा दिला. परंतु याचा तेथें पराभव झाला. शेवटीं त्यानें मराठ्यांचा नाद अजिबात सोडला आणि भीमाकांठीं पांडेपेडगाव येथें एक भुईकोट किल्ला बाधून त्याचें नांव बहादूरगड ठेवलें व तेथेंच त्यानें आपली कायमची छावणी केली. या ठिकाणीं यापुढें चाळीस वर्षें मोंगलानीं छावणी केली होती. पुढें सन. १६८५ त यानें हैद्राबादेवर हल्ला करून तें लुटलें. स. १६९० त जंजिऱ्याचा किल्ला तेथील फत्तेखान सिद्दी आपण होऊन शिवाजी महाराजांना देत होता. पण यानें जंजिरेकरास मदत करून जंजिरा राखला. हा स. १६९७ त मेला. तारीख-ई-आसाम या बखरीचा हा कर्ता असावा असें म्हणतात. [जेधे शकावली; बील-ओरि. बायॉ. डिक्श.]

खान जहान लोदी—हा मोंगलकालीन अफगाण सरदार दौलतखान लोदीचा मुलगा असून त्याचें मूळचें नांव पीरखान होतें. जहांगिरनें त्याला खानजहान ही पदवी दिली. जहांगीर बादशहाच्या कारकीर्दीत तो लष्करावरचा मोटा अधिकारी असून त्याला ५००० ची मनसबी होती (१६०९). शहाजहान बादशहा गादीवर आला तेव्हां त्यानें माळव्याची सुभेदारी याला देऊं करून दिल्लीस बोलाविलें. त्याला दिल्लीस आपल्या नाशाविषयी

बादशहाचा कट कळतांच तो दक्षिणेंत येऊन शहाजी भोंसल्यास मिळाला. पण शहाजहानच्या फौजेनें त्याचा पराभव केला. महंमद अदिलशहा किंवा मूर्तजा निजामशहा यांच्याकडून आश्रयाची निराशा झाल्यावर तो बादशाही फौजेस चुकवून बुंदेलखंडांत शिरला. पण तेथेंहि त्यास मदत न मिळतां कलिंजर किल्ल्यानजीक लढत असता मारला गेला (१६३१). त्याच्या पाठलागाचा व वधाचा वृत्तांत फार हृदयद्रावक आहे. हैबतखानानें 'तारीख खानजहान लोदी ' नावानें त्याच्या आठवणीचा ग्रंथ लिहिला आहे (१६१६). [डफचा इतिहास-बील. मुसलमानी रियासत].

खान झादाः--मुख्यतः यांची वस्ती संयुक्त प्रांतांत आढळते. खानाचे वंशज व गुलामाचे वंशज अशा दोन्ही नांवानीं हे लोक ओळखले जातात. ते मूळचे जादोन रजपूत असून, भरतपुरांतील तहानगड येथील लखनपाल व सुमित्रपाल हे त्याचे पूर्वज फिरोझशहाच्या कारकीर्दीत इस्लामधर्मानुयायी झाले होते. फिरोझशहानें त्यांना अनुक्रमें नाहरखान व बहादुरखान अशीं नावें दिलीं. त्यांचें उच्च कुल लक्षांत घेऊन त्यांना मेवाडचे अधिपति केले, व त्यास खानझादा म्हणून नाव ठेविलें. अकबरच्या वेळेपर्यंत ते मेवाडचे अधिपति होते यांत शंका नाहीं. मेओ लोकांशीं त्यांचा निकट संबंध असल्याबद्दल संशयास जागा आहे. कित्येक खेड्यांतील मेओ लोक आपण पूर्वी खानझादे होतो पण प्रत्युद्वाहामुळें पुनः मेओ झालों असें सांगतात. मेओ हे धर्मांतर केलेले मिना आहेत हें सिद्ध असल्यास खानझादा हे उच्चवर्णीय होते यांत शंका नाहीं. जनरल कनिंगहॅम म्हणतो कीं मेवाडचे पूर्वी एकदा राजे असलेले खानझादा हे जादोन(जाधव, यादव)राजा तहनपाल याला आपला मूळ पुरुष मानतात. आलवार व भरतपूर येथील हिंदूच्या हातात मेवाड प्रांत गेल्यापासून खानझादाच्या जादोन वंशासंबंधीं शंका उपस्थित करण्यात येत असते व खानझादाचा गुलामाकडे संबंध जोडण्यात येत असतो. परंतु हिंदुराजाशीं त्यांचा असलेला संबंध केवळ तर्कावर ठरावून घेणें म्हणचे वस्तुस्थितीचा अपलाप करण्यासारखे आहे. राजसाहू वंशातील जूरासिंहाचा मुलगा जयचंदसिंह म्हणून एक सरदार होता. त्याचा मुलगा तिलोकचंद हा बाबरच्या समकालीन असून कांहीं तंटयावरून बाबरानें त्यास कैद केलें. त्यावेळीं नाइलाजानें त्यास धर्मांतर करावें लागलें व बाबरानें त्याचें नांव लातरखान असें ठेविलें. त्याचे मुलगे बरीदखान व जलालखान यांनीं खानझादा अशी पदवी स्वीकारली अशी स्थानिक दंतकथा आहे. खानझादाचें धर्मांतर मोंगल घराण्यापूर्वीच होऊन गेलें असें सर एच्. एम्. इलियट म्हणतो. शिकंदर लोदीच्या धामधुमीच्या कारकीर्दीत त्यांचें धर्मांतर झालें असावें असाहि तर्क आहे. प्रतापगड येथील खानझाद्यांमध्यें कित्येक रजपुत पंथाचाहि समावेश होतो. शेख व खानझादा यांच्यांत बरेच मुसलमानी रिवाज रूढ झाले आहेत. बिलखरिया व भालेसुलतान खानझादा हे आपल्या ज्ञातींत लग्नें लावणारे असून इतर पंथ भिन्नगोत्रविवाह लावणारे आहेत. बहुतेक लोक स्वतःस ' शेख ' म्हणवितात ते सुनी पंथाचे आहेत तरी त्यांच्या कित्येक स्त्रिया देवीची उपासना करतात. यांची पंजाबांतहि थोडी वस्ती आहे.

खानदेश जिल्हाः— हा मुंबई इलाख्याच्या मध्यभागांतील एक जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा पर्वत व नर्मदा नदी असून पूर्वेस वऱ्हाड प्रांत व निमारचा जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या दक्षिणेस सातमाल चांदोर व अजंठा हे डोंगर असून पश्चिमेस बडोदें संस्थान व रेवाकांठा जहागीर आहे. नैर्ऋत्येस नाशिक जिल्हा आहे.

भौगोलिकवर्णन—दख्खनच्या पठाराचा खानदेश हा अगदीं उत्तरेकडील भाग होय खानदेशांतील मुख्य नदी तापी ही होय. ती सातपुडा पर्वतांत बैतुलाजवळ उगम पावून, पूर्वखानदेश व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांतून वहात जाऊन सुरतेजवळ खंबायतच्या आखातास मिळाली आहे. या शिवाय गिना, बोरी, पाजरा या लहान लहान नद्या खानदेशांत आहेत. निमारपासून नंदुरबारपर्यंतचा १५० मैलाचा टापू सपाट मैदान असून त्यांतील जमीन उत्तम मळीची आहे या टापूंत पुष्कळ संपन्न शहरें व खेडीं आहेत. या शहराच्या व खेड्याच्या सभोंवार अंबराया व बागा आहेत या टापूच्या उत्तरेकडील प्रदेश उन्नत आहे. खानदेशाचा मध्यभाग व पूर्वभाग बहुतेक सपाट असून तो सुपीक नाहीं. उत्तर भाग व पश्चिम भाग डोंगराळ असून त्यांत गर्द अरण्यें आहेत. या भागात भिल्लाची वस्ती असून ते आपला उदरनिर्वाह जंगलांतील कंदमुळांवर करतात. खानदेशमध्यें मुख्यतः चार डोंगराच्या रांगा पसरलेल्या आहेत. उत्तरेस सातपुडा पर्वताची रांग नर्मदा व तापी याच्या मधून गेली आहे. या पर्वतावर तोरणमालचें इतिहासप्रसिद्ध पठार असून त्याची उंची ३३०० फूट आहे. तसेंच पंचपंडु नावाचें एक शिखर असून तें समुद्रसपाटीपासून ३००० फूट उंच आहे. आग्नेयेस हत्ती डोंगराची रांग आहे. दक्षिणेस सातमाल, चंडोर अगर अंजरा या डोंगराची पसरली असून या रांगेमुळें खानदेश व दख्खनपठार हीं अलग झालीं आहेत. पश्चिमेस खानदेश व गुजराथ यांना विभक्त करणारी पश्चिमघाट पर्वताची उत्तर टोकाकडील रांग आहे. अर्व व गाला या टेंकड्यामुळें खानदेश व नाशिक हे पृथक झाले आहत. सातपुडा पर्वत व तापी नदी याच्या मधील टापूंतील जमीन पुळणी आहे. याशिवाय टेंकड्यावर व तापी नदीच्या दऱ्याखोऱ्यात बॅसाल्ट पाषाण सापडतो.बऱ्हाणपुराहून पांच मैलावर चुलखन खेड्याच्या ईशान्येस,एक मैलावर खडूचे दगड सांपडतात. पण या ठिकाणाशिवाय खानदेशांत दुसरीकडे कोठेंहि खडूचा दगड सापडत नाहीं. खानदेशांत चार ऊन पाण्याचे झरे असून

त्यांपैकीं तीन चोपडें गांवांत व एक शिरपूर गांवांत आहे.

खानदेशमध्यें अनेक प्रकारचीं झाडें झुडपें होतात. तापी नदीच्या खोऱ्यांत मोठमोठीं जंगलें असून त्यात वृक्षांची समृद्धि आहे.त्याचप्रमाणें सातपुडा पर्वतामध्येंहि प्रचंड अरण्यें आहेत.या ठिकाणीं अंजन व शाल झाडाचें वैपुल्य आहे. शिरपूर व चोपड्याच्या आसपासच्या भागांत साग मुबलक सांपडतो. शाहड्याच्या जंगलांत खैरांची झाडें विपुल असून अक्राणीमध्यें अंजन झाडांची समृद्धि आहे. पश्चिम घांटाच्या माथ्यावरहि अंजन वृक्षांची रेलचेल असून, सावळ्याच्या आसपास गर्द वृक्षराजी आहे. खानदेशात सामान्यतः वड, पिंपळ, पळस, महू, आम्र, उंबर व टेंभुर्णी इत्यादि झाडें आहेत.

खानदेशमध्यें हिंस्र पशूंची समृद्धि आहे. वाघ, चित्ता, अस्वल, लांडगा, गवा, सांबर, हरिण, नीलगाय, गझेल इत्यादि पशू पुष्कळच सांपडतात. खानदेशच्या उत्तर भागांत पूर्वी हत्ती फार सांपडत असत. ब्रिटिशराज्य सुरू झाल्यापासून खानदेशमधील वाघांची संख्या हल्लीं फारच कमी झाली आहे.

ह वा मा न.—खानदेशांतील प्रदेश उंचसखल असल्याकारणानें, ठिकठिकाणचें हवामान भिन्न आहे. पश्चिम भागांतील टेंकड्याच्या टापूंत व सातपुड्याच्या पर्वतांत पर्जन्य खूप पडतो. पण खानदेशच्या मध्य व दक्षिण भागात पर्जन्याचें मान फार कमी आहे. तरी पण खानदेशात दुष्काळ फारच क्वचित पडतो. खानदेश जिल्ह्यात वार्षिक पर्जन्यमान २०–४५ इंच आहे. आक्टोबर ते जानेवारी महिन्यापर्यंत खानदेशची हवा फार चांगली असते. पण उन्हाळ्यात हवा फारच उष्ण असते. खानदेशांतील पूर्व व मध्य भागांतील हवा चांगली आहे पण पश्चिमेकडील हवा अधिक उष्ण असल्यानें त्या भागातील लोकांना हवेचा त्रास फार होतो.

क्षे त्र फ ळ व लो क सं ख्या—खानदेश हा १९०६ पूर्वी एकच जिल्हा होता पण १९०६ सालापासून खानदेशाचे पूर्व व पश्चिम असे दोन जिल्हे करण्यांत आले आहेत. पूर्व खानदेशाचें क्षेत्रफळ १९१५ सालीं ४५२५ चौरसमैल व पश्चिम खानदेशचें क्षेत्रफळ ५५२५ चौरस मैल होतें. १९२१ सालीं पूर्व खानदेशची लोकसंख्या १०,७५,८३७ व पश्चिम खानदेशची ६४१८४७ होती.

मु ख्य श ह रें—पूर्वखानदेशमध्यें अमळनेर, भुसावळ चाळिसगांव, चोपडा, एरंडोल, जळगांव, जामनेर, पाचोरा रावेर व यावल असे १० तालुके व पारोल, एदलाबाद, व भडगांव हे तीन पेटे आहेत. पश्चिमखानदेशांत धुळें, नंदुरबाद, पिंपळनेर, शाहाडा, शिरपूर, सिंदखेड व तळोदें असे ७ तालुके व नवापूर पेटा आहे. पूर्वखानदेशचें जळगांव व पश्चिम खानदेशचे धुळें हें मुख्य ठिकाण आहे. पूर्व खानदेशांत अमळनेर, भुसावळ, चाळीसगांव, चोपडा, धरणगांव, एरंडोल, जळगाव, पारोल, नसिराबाद रावेर इत्यादि प्रमुख शहरें व पश्चिम खानदेशात धुळें, नंदुरबार, तळोदें, शाहाडा इत्यादि शहरें आहेत.

खानदेश जिल्ह्यांत शेंकडा ९० लोक हिंदू असून मुसलमान, जैन व ख्रिश्चन लोक फार थोडे आहेत मुसलमानांची संख्या १९११ सालीं खानदेशात सव्वालाख होती.

भा षा.—तापीच्या उत्तरेकडील खानदेशी मुलखांत शेतकरी लोक गुजराथी भाषा बोलतात; व सर्व जिल्ह्यात हीच व्यापारी भाषा आहे. पण खानदेशाच्या पश्चिम व दक्षिण भागात मराठी भाषा प्रचारात आहे. कचेऱ्यांतून व शाळांतून मराठी भाषा प्रचारांत आहे. खानदेशांतील लोकांची घरगुती भाषा खानदेशी असून ती मराठी, गुजराथी, नेमाडी, हिंदुस्थानी इत्यादिकांचें मिश्रण आहे. खानदेशी भाषेला अहिराणी असेंहि नांव आहे.

जा ती—खानदेशातील मुख्य जाती म्हणजे कुणबी, भिल्ल महार, मराठा, माळी, कोळी, ब्राह्मण, वाणी, तेली, सोनार, रजपूत, धनगर, वंजारी, न्हावी, चांभार, सुतार, शिंपी व मांग या होत. ब्राह्मणाच्या १३ पोटजाती आहेत. त्यांतील १० जाती मराठी भाषा बोलतात. बाकीच्या तीन जातींना मराठी कळतें पण ते ती बोलत नाहींत. या पोटजातींत बेटीव्यवहार होत नाहीं.

कुणबी, गुजराथी व वाणी या जातींचे लोक मुख्यतः शेतकीवर आपला उदरनिर्वाह करतात बहुतेक व्यापारी लोक मारवाडी, गुजराथी अगर भाटियाहे आहेत. खानदेशात अनार्य लोकांची संख्या पुष्कळ आहे हे लोक एके ठिकाणीं कायमची वस्ती करून कधींच रहात नाहींत. पोलीस शिपायांत व खेडेगांवांतील शिपायांत भिल्लांचा भरणा आहे. महार लोकांचा धंदा मजुरीचा आहे. निरधी लोकांची वस्ती सातमाल टेकडीच्या आसपास असून ते फार भयंकर व क्रूरकर्मी लोक आहेत. वंजारी लोकांपैकीं कांहीं लोक व्यापारी आहेत पण बहुतेक लोक नेहमीं टोळ्याटोळ्यांनी भटकत असतात. त्यांचा धंदा गवत अगर लाकडें विकण्याचा असतो. खानदेशांतील पुष्कळसे मुसलमान हे मूळचे हिंदूच असून ते मुसलमानांनीं जुलमानें बाटविल्यामुळें जे पूर्वी मुसलमान झाले त्यांचे वंशज आहेत. याशिवाय पठाण लोकांचीहि येथें बरीच वस्ती आहे. या मुसुलमानांतील पुष्कळ लोक शतकीचा धंदा करतात. ख्रिश्चन लोकांपैकीं रोमन कॅथॉलिक व अँग्लिकन या दोन पंथांचे लोक खानदेशांत आहेत. त्यांचीं धुळें, भुसावळ व धरणगाव या ठिकाणीं ख्रिस्तालयें आहेत. नंदुरबाद येथें स्कँडिनेव्हियन अमेरिकन मिशनरीची संस्था असून धुळ्यास चर्च मिशनरी सोसायटीची संस्था आहे. अमेरिकन अलायन्स मिशनच्या संस्था भुसावळ, जळगांव,पाचोरा व चाळिसगांव या ठिकाणी आहत. याशिवाय तापी व्हॅली रेल्वे इंडस्ट्रियल मिशनचा संस्था नवापूर येथें असून पेनियल निशनची संस्था धरणगांव येथ आहे.

शिक्षण.—१९११ च्या खानेसुमारींत पूर्व खानदेशामध्यें ५०२९३ लोक साक्षर असलेले आढळून आले. त्यांपैकीं ३१२८ लोकांना इंग्रजी लिहितां वाचतां येत होतें. पश्चिम खानदेशमध्यें साक्षर लोकांची संख्या २८२७० असून त्यांपैकीं १३७३ लोकांना इंग्रजी लिहितां वाचता येत होतें. मुंबई इलाख्यांतील सर्व जिल्ह्यांतील साक्षरतेच्या दृष्टीनें खानदेशचा बारावा नंबर लागतो. १९०३-४ त ५३८ शाळा असून त्यांपैकीं १ हायस्कुल, १२ माध्यमिक शाळा व ४०१ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा होत्या धुळें येथें ट्रेनिंगस्कूल व औद्योगिक शाळा आहे. १९०३-४ सालीं खानदेशांत शिक्षणावर एकंदरींत सवादोनलाख रुपये खर्च झाले. १९०३-४ सालीं खानदेशमध्यें २० दवाखानें, एक इस्पितळ व दोन वैद्यकीशिक्षणाच्या संस्था होत्या.

जमीन.— खानदेशांतील जमीनींचे काळी, पाढरी, खारन व बर्की असे चार प्रकार आहेत. तापीच्या खोऱ्यातील जमीन काळी आहे. खानदेशात बहुतेक सर्व भागात रयतवारी पद्धत अमलात आहे. इनाम जमीनींचें प्रमाण शेंकडा २ आहे. खानदेशात ज्वारी, बाजरी व कापूस हीं मुख्य पिकें आहेत त्यांच्या खालोखाल गव्हाचे उत्पन्न आहे. विशेषतः तापीच्या खोऱ्यात गव्हाचें पुष्कळ उत्पन्न आहे याशिवाय तूर, हरभरा, उडीद, कुळीथ, मूग इत्यादि धान्येंहि येथें पिकतात. तीळ व जवस याचा तेल काढण्याच्या कामीं उपयोग करतात. उंसाचें पीक फारच थोड्या ठिकाणीं होतें.

पाळीव जनावरें.—खानदेशांतील गाई व बैल फार सुरेख असतात. वऱ्हाड व निमार जिल्ह्यांतून यांची पैदास होते. पश्चिम खानदेशांतील खिलारी बैल दख्खनमध्यें फार प्रसिद्ध आहेत. उन्हाळ्यात या गुराढोरांचे फार हाल होतात व त्यामुळें तीं अगदीं रोडकीं बनतात. खानदेशातील घोडे अगदींच खुजे असतात. घोड्यांची चांगली निपज व्हावी यासाठीं धुळें, चाळिसगांव येथें सिव्हिल व्हेटरनरी खात्यानें दोन वळू मुद्दाम ठेवले आहेत.

पाणीपुरवठा.—जमीनीला पाणी मिळण्याची सोय मुख्यतः कालव्याच्या द्वारें केलेली आहे. गिर्ना व पाजरा या नद्यांना बांध घालून तेथून कालवे नेण्यांत आले आहेत. याशिवाय पुष्कळशा तलावांचें पाणीहि कालव्याच्या द्वारें नेण्यात आलें आहे. खानदेशांत अशा प्रकारचे चार कालवे असून त्यामुळें जवळ जवळ २०,००० एकरांना पाणी मिळतें. तरीपण कालव्यांचें पाणी फारच थोड्या जमीनीला मिळतें. बहुतेक सर्व जमीन पावसावरच अवलंबून असते. खानदेशांत १९०३-४ सालीं विहिरींची संख्या २७०३१ इतकी होती.

जंगल.—जंगलाच्या बाबतींत कानडाच्या खालोखाल मुंबई इलाख्यांत खानदेशचा नंबर लागतो. पूर्वी जंगल संरक्षणाचा कायदा नसल्यानें भिल्ल लोकांनीं या जंगलांची बरीच नासाडी केली पण हल्लीं जंगलसंरक्षणाचा कायदा सुरू झाल्यानें जंगलाची वाढ बरीच झाली आहे. १९०३-४ सालीं सरकारच्या ताब्यांत २५६८ चौरस मैल जंगल होतें व गुरानां चराऊ रानें २८४ चौरस मैलाचीं होतीं. मोहाच्या फुलांचें उत्पन्न या जंगलांत फार होतें याशिवाय साग, बाभूळ, इत्यादि झाडेंहि मुबलक आहेत. १९०३-४ सालीं खानदेशांतील जंगलाचें उत्पन्न २.३ लाख रुपये झालें. खानदेशांतील जंगलखात्याचे दोन भाग पाडण्यांत आले असून प्रत्येक भागावर एक एक अधिकारी नेमण्यांत आला आहे.

खनिजसंपत्ति.—खानदेशांतील खनिज संपत्ति फारच अल्प आहे. इमारतीला लागणारे दगड चोहोंकडे सांपडतात. वाघूर नदीच्या पात्राजवळ एक इमारतीला उपयोगी दगडाची खाण आहे. कंकर हा खनिज पदार्थ पुष्कळ ठिकाणीं सांपडतो. याच्यापासून चांगला चुना तयार करतां येतो. विटा तयार करण्याला लागणारी मातीहि या जिल्ह्यांत मुबलक सापडते.

उद्योगधंदे.—खानदेशांतील उद्योगधंदे विशेष महत्वाचे नाहींत. पूर्व व पश्चिम खानदेशांत सरकी काढण्याच्या व गठ्ठे बांधण्याच्या १७५ गिरण्या आहेत. जळगांव येथें ८७४ सालीं स्थापन झालेली एक कापडाची गिरणी आहे. लोखंडी गाडी भरडी ब्लँकेटें खानदेशांत सर्वत्र तयार होतात. भुसावळ येथें रेल्वेचे मोठमोठे कारखाने आहेत. अंमळनेर येथेंहि एक सुताची गिरणी आहे. अंमळनेर, फैनपूर व जळगांव हीं शहरें विणकामाबद्दल प्रसिद्ध आहेत.

आयात निर्गत—खानदेशांतून कापूस, धान्य, लाख, ओणी, नीळ इत्यादि माल बाहेर जातो. विशेषतः कापूस तर मोठ्या प्रमाणांत बाहेर जातो. आयात मालांत मीठ, मसाला, धातू, साखर हे जिन्नस प्रमुख होत. पश्चिमखानदेशांत धुळें व पूर्वखानदेशांत जळगांव व भुसावळ या व्यापाराच्या मुख्य पेठा आहेत. याशिवाय जत्रांमध्यें व धार्मिक उत्सवप्रसंगीं मोठे बाजार भरतात.

दळणवळणाचे मार्ग.—ब्रिटिश अंमलापूर्वी खानदेशांत बांधीव रस्तो नव्हते म्हटले तरी चालेल. पण ब्रिटिश अंमलानंतर मुंबई ते आग्रा हा रस्ता बांधण्यांत आला. हा रस्ता मालेगांव, धुळे व शिवापुर या गांवावरून गेला आहे. या सडकेच्या बाजूनें झाडें लावण्यांत आलेलीं आहेत. जी. आय. पी. रेल्वेचा फांटा नायडोंगरी ते भुसावळपर्यंत असून तेथून जबलपुराकडे एक व नागपूरकडे एक असे दोन फांटे फुटलेला आहेत. या शिवाय चाळीसगांव ते धुळे, जळगांव ते अमळनेर असे दोन छोटे फांटे गेले आहेत. तापी नदी व्हॅली रेल्वेचा फांटा सुरत ते अमळनेरपर्यंत गेलेला आहे.

राज्यव्यवस्था.— खानदेशाची व्यवस्था तीन सिव्हिलियन व दोन डेप्युटी कलेक्टर यांच्या मार्फत चालविली जाते. जिल्हा न्यायाधीश व जज्जाची कचेरी धुळें येथें

आहे व सर्व जिल्ह्यांत १० सबार्डिनेट न्यायाधीशांचीं कोर्टें फौजदारी गुन्हे चालविणारीं ५० मॅजिस्ट्रेट कोर्टें आहेत. चोरी, दरवडा व घरफोड हे गुन्हे या जिल्ह्यांत विशेष घडतात. या जिल्ह्यांतील २१ शहरांस म्युनिसिपालिट्या आहेत. जिल्ह्यांत पोलिसठाण्यांची संख्या १९०३-४ सालीं ३० होती. शिपायांची संख्या १६३६ होती. या शिपायांच्यावर चार इन्स्पेक्टर, तीन असिस्टंट व एक जिल्हापोलिससुपरिंटेंडंट असे अधिकारी असतात.

धुळें येथें मोठा तुरुंग असून त्यांत ४५० कैद्यांची सोय होऊं शकते. या शिवाय या जिल्ह्यांत २३ लहान तुरुंग व २१ अंधारकोठड्या आहेत.

सन १८६६ मध्यें खानदेशमधील जमिनीच्या मोजणीचें काम सुरू झालें व तें १९०४ सालीं संपलें. याच्या पूर्वी १८५२ मध्यें एकदां जमीनीची मोजणी झाली होती. त्यापेक्षां या मोजणीच्यावेळीं शेंकडा ४ प्रमाणानें लागवडीची जमीन वाढली असें आढळून आलें व त्यामुळें दर वर्षी ३१ ते ४० लाखापर्यंत अधिक उत्पन्न येऊं लागलें. १९०३-४ मध्यें खानदेशातील जमीनमहसूल ४८,६०,००० रुपये होता व एकंदर उत्पन्न ६७,१९,००० इतकें होतें.

इतिहास.—खानदेशाच्या प्राचीन इतिहासाला ख्रि. पू. १५० या वर्षापासून सुरवात होते. याच्यापूर्वी एके ठिकाणीं खानदेशांतील तोरणमाल व अशीरगड यांचा उल्लेख आलेला आहे. तोरणमाल व अशीरगड येथें अश्वत्थाम्याचें स्थान आहे. ख्रिस्ती शतकापूर्वी अंधकच्या रजपूत राजघराण्याचे वंशज खानदेशावर राज्य करीत होते ही गोष्ट निःसंशय आहे. ख्रि. पू. १५० सालच्या एका शिलालेखावरून वरील विधानाला ऐतिहासिक पुराव्याची जोड मिळाली आहे. रजपूत घराण्यांनीं दोन तीन शतकें खानदेशवर आपलें स्वामित्व गाजविल्यावर आंध्रांनीं खानदेश जिंकून घेऊन तो आपल्या ताब्यांत आणला. नंतर कांहीं काळानीं पश्चिमकडील क्षत्रपांनीं आंध्र राजाला येथून हुसकावून लावलें. पांचव्या शतकामध्यें चालुक्यवंशीय राजांचा खानदेशवर अंमल बसला. अल्लाउद्दीन खिलजीनें १२९५ सालीं खानदेशवर स्वारी केली. त्यावेळीं खानदेश हा चव्हाणवंशीय राजाच्या ताब्यांत होता.

अल्लाउद्दीन खिलजीनें खानदेशवर स्वारी केल्यापासून तो १७६० मध्यें अशीरगडचा किल्ला मराठ्यांनीं जिंकापावेतों, खानदेश हा मुसुलमानी वर्चस्वाखालीं होता. दिल्ली येथें जें मुसुलमानी घराणें राज्य करीत असे त्या घराण्यांतील राजे खानदेशवर आपला सुभेदार नेमीत असत. महंमद तघलकाच्या कारकीर्दीत, खानदेशाची व्यवस्था एलिचपूर येथें असणाऱ्या सुभेदाराकडून पाहिली जात असे. इ. स. १३७०–१६०० यांच्या दरम्यान खानदेश हा फरुकी घराण्यांतील राजांच्या ताब्यांत होता. हे फरुकी राजे जरी आपल्याला गुजराथच्या सुलतानाचे मांडलीक म्हणवीत तरी ते जवळ जवळ स्वतंत्रच असत. इ. स. १५९९ सालीं अकबरानें जातीनें खानदेशवर स्वारी केली व अशीरगड जिंकून घेऊन तेथील शहा बहादूरखान यास कैद करून किल्ल्यांत पाठविलें. खानदेश हा या वेळेपासून अकबराच्या राज्यांत मोडूं लागला. अकबरानें या प्रदेशाचा कारभार पहाण्याकरितां आपला मुलगा दानियाल यास सुभेदार नेमलें. याच्या नांवावरून कांहीं काळपर्यंत खानदेशाला दानदेश हें नांव पडलें. १७ व्या शतकाच्या मध्यकालांत खानदेशची भरभराट झाली होती. दख्खनमधून वर हिंदुस्थानांत जाण्याचा व्यापारी मार्ग खानदेशमधून जात असल्यानें खानदेश सधन बनला होता.

१६७० मध्यें शिवाजीमहाराजांनीं आपला अधिकारी खानदेश येथें पाठवून चौथाई वसूल केली. पुढें त्यांनीं साल्हेरचा किल्ला जिंकला. शिवाजी, संभाजी व औरंगझेब या तिघांनींहि आपल्या अमदानींत खानदेशवर स्वारी केली. इ. स. १७२० मध्यें निझामउल्मुल्क यानें खानदेश आपल्या राज्याला जोडला. १७६० मध्यें निजामाला मराठ्यांनीं हांकलून लावलें व पेशव्यांनीं खानदेश आपल्या ताब्यात घेऊन त्या मुलखापैकीं कांहीं भाग शिंदे व होळकर यांना जहागीर दिला. इ. स. १८०२ मध्यें होळकराच्या सैन्यानें खानदेश लुटण्यास आरंभ केला. रावबाजी याच्या बेबंद कारभारामुळें खानदेशांत जिकडे तिकडे अव्यवस्थेचें साम्राज्य माजलें होतें. पुढें १८१८ मध्यें खानदेश हा ब्रिटिशांच्या ताब्यांत आला. पुढें कांहीं वर्षांनीं भिल्ल लोकांनीं बंडाचें निशाण उभारलें पण अलफिन्स्टन साहेबानें तें मोडून टाकलें. औटराम यानें भिल्लांना पोलीसखात्यांत नोकऱ्या देऊन त्यांचीं पथकें बनविलीं. १८५२ व १८५७ मध्यें पुन्हां भिल्लांनीं बंडें केलीं पण तीं ताबडतोब मोडण्यांत आलीं.

खानदेशमध्यें 'हेमाडपंती' पद्धतीचीं दगडी देवालयें, तळीं, विहिरी जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. 'हेमाडपंत' याला खानदेशमध्यें गवळीराजा असें म्हणतात. अशा हेमाडपंती इमारती खानदेशमध्यें ३९ असून त्यांपैकीं ३१ देवळें, ६ पायऱ्याच्या विहिरी व २ तळीं आहेत. या इमारती १३ व्या शतकातल्या किंबहुना कांहीं त्याच्या पूर्वीच्याहि आहेत असें वाटतें. या हेमाडपंती इमारती मोठमोठ्या दगडाच्या असून हे दगड चुना न लावतां जोडण्यांत आलेले असतात. कांहीं कांहीं इमारतींचे दगड तर फारच मोठे असतात. या हेमाडपंती इमारतींशिवाय खानदेशमध्यें कांहीं मुसुलमानाच्या वेळच्या इमारतीहि आहेत. त्यांमध्यें सर्वांत प्रसिद्ध म्हणजे फरकांडे येथील हलते मनोरे होत. चाळिसगांव तालुक्यांतील पितळखोऱ्यामध्यें बौद्धकालीन एक चैत्य व कांहीं विहार आढळतात. पण ते हल्लीं जीर्णावस्थेंत आहेत. हा चैत्य व हे विहार ख्रि. पू. २ शतकांमधील असावे असें दिसतें. खोऱ्याच्या पायथ्याशीं पाटण नांवाचें

एक ओसाड खेडें आहे. या खेड्यांत कांहीं देवालयें व शिलालेख आहेत. प्रसिद्ध भास्कराचार्य ज्योतिषाचा नातू येथें रहात असे त्याचें ज्योतिषविषयक विद्यापीठ येथें होतें. वाघळी येथें दहाव्या शतकांतील एक महादेवाचें मंदिर असून त्या मंदिराच्या भिंतीवर तीन शिलालेख आढळतात.

खानदेशाला कन्ह (कृष्ण) देश असेंहि प्राचीन नांव आहे. अश्मक म्हणून जो प्रांत महाभारतांत येतो तोच खानदेश असें कांहींचें म्हणणें आहे. खानदेशात ख्रिस्ताच्या पाहिल्या शतकात अहीर नांवाचे राजे होते. यांनांच हल्लीं तिकडे गवळी राजे म्हणतात. प्रख्यात अजिंठ्याचीं लेणीं खानदेशात खानदेशवऱ्हाडच्या सरहद्दीवर आहेत.

खानपूर, त ह शी ल.—पंजाब प्रांत. बहावलपूर संस्थान. खानपुर निझामतींतील मुख्य तहशील. ही तहशील सिंधु-नदीच्या डाव्या तिरावर आहे. उ. अ. २७ ° ४३' ते २९ ° ४' व पू रे. ७० ° २७' ते ७० ° ५३'. क्षेत्र-फळ २४१५ चौरस मैल. १९११ सालीं या तहशिलीची लोकसंख्या ९२९७५ होती. खानपूर हें राजधानीचें शहर आहे. गऱ्ही इख्तयारखान आणि धाडसपुर हीं दोन शहरें व ५२ लहान गावें या तहशिलींत आहेत. तहशिलीच्या उत्तरेस सिंधु नदीकांठच्या सुपीक जमिनी आहेत. अलाहाबाद तहशीलीच्या खालोखाल हीच तहशील सर्वांत अधिक सुपीक असून खजुरीच्या झाडांकरितां विशेषतः प्रसिद्ध आहे. १९०५-०६ सालीं जमीनमहसूल व पट्टी मिळून वसूल १०८ लाख रुपये होता.

श ह र.—खानपुर निझामत आणि तहशिलींतील मुख्य शहर. उ. अ. २८ ° ३९' व पू. रे. ७० ° ४१'. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेवर बहावलपूर शहराच्या नैर्ऋत्येस ६३ मैलांवर हें शहर आहे. १९११ सालीं लोकसंख्या ९१९२ होती. इ.स. १८०६ मध्यें नवाव बहावलखानानें या शहराची स्थापना केली. या संस्थानातील शेतकीपासून निर्माण झालेल्या पिकाचा व्यापार या शहरीं मुख्यत्वेंकरून चालतो. येथें तीन भात सडण्याच्या व भाताचें फोलकट काढण्याच्या वाफेनें चालणाऱ्या गिरण्या आहेत. त्यांपैकीं एका गिरणींत कापसातील सरकी काढण्याचेंहि काम चालतें. येथें एक शाळा व दवाखाना आहे.

खानाकुल—बंगाल इलाखा. हुगळी जिल्ह्यांत आराम-बाग पोटविभागांतील एक खेडें. कान नदीच्या पश्चिम तीरावर हें खेडें वसलें आहे. उ. अ. २२ ° ४३' व पू. रे. ८७ ° ५२'. १९०१ सालीं येथील लोकसंख्या ८८६ होती. पितळेच्या भांड्यांचा येथें बराच व्यापार चालतो. आस-पासच्या प्रदेशात उत्तम प्रतीचें सुती कापड तयार होतें. कलकत्ता शहरांतील मार्केटकरितां येथ मोठ्या प्रमाणावर भाजीपाल्याची लागवड होते. नदीच्या कांठांवर शिवाचें प्रचंड देवालय आहे.

खानापूर ता लु का—मुंबई इलाखा. बेळगांव जिल्ह्यांतील अगदीं दक्षिणेकडील तालुका. उ. अ. १५° २२' व १५°४७' आणि पू. रे. ७४°५' व ७४°४४'. क्षेत्रफळ ६३३ चौ. मै. तालुक्यांत २१९ खेडीं आहेत. नंदगड (लोकसंख्या ६२५७) हें त्यांपैकींच एक होय. १९११ सालची या तालुक्याची लोकसंख्या ७२३०४ होती. बेळगांव जिल्ह्यां-तील अतिशय विरळ लोकवस्तीचा हाच तालुका आहे. मुख्य कचेऱ्या खानापूर येथें आहेत. तालुक्याचा दक्षिण व नैर्ऋत्यभाग टेंकड्या व दाट अरण्य यांनीं व्यापला आहे. या भागात रहिवासी फार थोडे आहेत. वायव्येकडे उंच पर्वत आहेत. तालुक्याच्या मध्य, ईशान्य व पूर्व भागांत सपाट व सुपीक मैदानें असून, पुष्कळ लोकवस्तीचीं सधन शहरें याच भागात विशेषेंकरून आहेत. उन्हाळ्यांत येथील हवा समशीतोष्ण व आरोग्यकारक असते. हिंवाळ्यांत हवा किंचित् रोगट असते. वार्षिक पर्जन्याचें मान सरासरी ७१ इंच असून, इतर तालुक्यांपेक्षां या तालुक्यांत पर्जन्य जास्त पडतो.

श ह र—उ. अ. १५°३७' व पू. रे. ७४°३४'. बेळगां-वच्या दक्षिणेस सुमारें १६ मैलांवर मलप्रभा नदीच्या तीरावर हें खानापूर तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. इ. स. १७२० च्या सुमारास येथें गोव्याशीं मोठा व्यापार चालत असे. हा व्यापार इ. स. १८२० सालीं किनुरकर देसायांनीं नंदगड येथें नेल्यामुळें येथील व्यापार बंद झाला. हा गांव वांटेपासून १० मैल अंतरावर आहे. याच्या जवळच भोपाळगड असल्यामुळें पूर्वी हें राजकारभार पहा-ण्याचें एक मुख्य ठिकाण असावें. येथील जमीन कृष्णा दरीच्या पेक्षां सरासरी २५० फूट उंच आहे. पूर्वेस मान दरी ५०० खोल आहे. पश्चिमेस व नैर्ऋत्येस उथळ दऱ्या व ओहोळ आहेत. खानापूर तालुक्याच्या इतर ठिकाणां पेक्षा यात पावसाचें मान चांगलें असल्यामुळें गहूं बरा पिकतो.

खानापूर, ता लु का.—मुंबई इलाखा. सातारा जिल्ह्यांतील एक तालुका. उ. अ. १७° ८' व १७° २७' आणि पू. रे. ७४° १४' व ७४°५१'. क्षेत्रफळ ५०२ चौ. मै. तालुक्यांत एकंदर ९० खेडीं असून त्यातच खानापूर आणि विटें यांचा समावेश होतो. १९११ सालीं तालुक्याची लो. सं. ८३९२१ होती. १९०३-०४ सालीं जमीन महसूल १.६ लक्ष रुपये होता. पश्चिमेकडील कऱ्हाड खोऱ्याच्या सपाटीपासून खानापूर तालुका २०० फुटापेक्षां अधिक उंच आहे. हवा समशीतोष्ण आहे. वार्षिक पर्जन्यमान फक्त २४ इंच असून पर्जन्य अनियमित असतो. त्यामुळें उन्हाळ्यांत अनेक वेळां पाण्याची फार तूट पडते; कारण पाणी क्वचित् मिळतें. जमीन काळी व मुरुमाचीहि आहे. दुसऱ्या कांहीं प्रकारच्याहि जमिनी आहेत.

खानापूरकर विनायक पांडुरंग—एक महाराष्ट्रीय ज्योतिष गणितग्रंथकार. यांचा जन्म शके १७८० त झाला. हे जामदग्न्य गोत्री ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण सातारा जिल्ह्यांतील खानापूर येथें राहणारे. यांचें संस्कृतभाषा, ज्योतिष इत्यादिकांचें अध्ययन जुन्या पद्धतीनें झालेलें असून शिवाय यूरोपियन गणित आणि ज्योतिष यांचेंहि अध्ययन केरोपंत छत्रे व रावजी मोरेश्वर देवकुळे याजपाशीं त्यांनीं केलेलें होतें.

वैनाकीय द्वादशाध्यायी नांवाचा ताजक ग्रंथ वर्षफल करण्यास फार सोयीचा असा त्यांनीं केला आहे. तसेंच कुंडसार, अर्धकांड, युक्लिडच्या दोन भागांतील सिद्धांताच्या प्रतिज्ञांचा वृत्तबद्ध संस्कृत अनुवाद, सिद्धांतसार हे संस्कृत ग्रंथ त्यांनीं केले आहेत. भास्करीय लीलावती, बीज गोलाध्याय, गणिताध्याय यांचें मराठींत भाषांतर यांनीं सोपपत्तिक केलें आहे. आणखी यांनीं बरेच ग्रंथ रचिले पण ते हस्तलिखितांतच अद्याप असल्यानें लोकांसमोर नाहींत. ज्ञानकोशांत त्यांनीं आर्यज्योतिषशास्त्रशाखेचें संपादकत्व पत्करून आर्य ज्योतिषांतील अनेक अंगांवर लेख लिहिले आहेत. इ. स. १९१९ त यांचा काल झाला.

खानुआ—राजपुताना. भरतपूर. रूपबास तहशीलींतील एक गाव उ. अ. २७° २' व पू. रे. ७७° ३३'. बाणगंगा नदीच्या डाव्या तीरालगत हें गाव वसलें आहे. भरतपूर शहराच्या दक्षिणेस १३ मैलांवर हें गाव आहे. १९०१ सालीं या गावची लोकसंख्या १८५७ होती. याच गांवीं स. १५२७ च्या मार्चमध्यें बाबर व मेवाडचा राणा संग्रामसिंह व त्याचे रजपूत सैनिक यांच्यामध्यें मोठी लढाई झाली. प्रथम प्रथम ज्या चकमकी झाल्या त्यांत रजपूत विजयी होत. तेव्हां रजपुतापुढें आपला निभाव लागणें कठिण असें पाहून बाबरानें मद्य पिण्याचें अजिबात सोडून दिलें. १५२७ च्या मार्चच्या १२ व्या तारखेस झालेल्या अखेरच्या लढाईत रजपुतांचा पूर्ण पराभव होऊन स्वतः राणा जखमी झाला. धारातीर्थी पतन पावलेल्या लोकांत डुंगरपुरचा रावळ उदयसिंग हा एक होता.

खानेसुमारी—अलीकडील काळांत नियमित कालावधीनें केवळ लोकसंख्या मोजण्याचें किंवा इसमवार उद्योगधंदे व शेतकीचीं साधनें मोजण्याचें किंवा मागील काळांत करविभागणी करण्याच्या हेतूनें घरदार, गुरेढोरें, शेतवाडी वगैरे सर्व प्रकारची मालमत्ता मोजण्याचें जें काम सरकारतर्फे करण्यांत येत असतें त्याला खानेसुमारी हा शब्द लावतात.

पूर्वेतिहास.—अशी खानेसुमारी करण्याचे उद्देश निरनिराळे असल्याचें प्राचीन काळापासून दिसून येतें. जमाबंदीच्या अधिकाऱ्यानें कर देणारीं व न देणारीं अशीं घरें वेगळीं मोजून प्रत्येक गांवांतील चारहि वर्णांच्या लोकांची संख्या मोजावी. शेतकरी, गुराखी, व्यापारी, कसबी, मोलकरी, गुलाम, द्विपाद व चतुष्पाद प्राणी यांची नक्की मोजदाद करावी; प्रत्येक घरांत तरुण व वृद्ध माणसें किती, त्यांचें चरित्र, धंदा, उत्पन्न व खर्च यांची माहिती काढावी. त्याचप्रमाणें भ्रमणशील लोकांच्या स्थलांतराचीं कारणें वगैरे शोधावीं असें कौटिलीय अर्थशास्त्रांत ५४-५५ व्या अधिकरणांत सांगितलें आहे. या गणतीचा हेतु मुख्यतः राज्याचें उत्पन्न वाढविण्याचा असे. पूर्वी एकदां इस्रायल लोकांतील वीस वर्षांवरील सर्व पुरुषवर्गाची खानेसुमारी करण्यांत आली होती, तिचा उद्देश त्यावेळीं त्या समाजांत युद्धोपयोगी माणसें किती आहेत तें ठरविण्याचा होता. डेव्हिडच्या आज्ञेवरून जोआबनेंहि याच उद्देशानें एकदा खानेसुमारी केली होती; आणि त्यामुळें जे अनिष्ट परिणाम भोगावे लागले त्यांचा उच्चार १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत खानेसुमारीविरुद्ध असणारे लोक करीत असत. इराणच्या प्राचीन राज्यात खंडणी ठरविण्याच्या कार्याकरितां प्रत्येक प्रांताची खानेसुमारी घेण्याची योजना अमलांत होती असें दिसतें. चीनमध्येंहि प्रांतवार करवसुलीच्या व सैन्यभरतीच्या कार्याकरितां लोकसंख्येची व मालमत्तेची गणना करण्याची पद्धति पूर्वापार चालू होती. ईजिप्तमध्यें प्रत्येक मनुष्याचा धंदा नोंदून ठेवण्याची वहिवाट असे. त्याचा उद्देश अनीतीच्या मार्गांनीं उदरंभरण करणाऱ्यानां आळा घालून सार्वजनिक नीतिमत्ता सुधारावी असा होता. आणि हीच पद्धति पुढें सोलननें आपल्या राज्यपद्धतींत समाविष्ट केली असें हिरोडोटसचें म्हणणें आहे. तथापि पुढें उपर्युक्त उद्देश मागें पडून मतदारांची नोंद करणें हा खानेसुमारीचा उद्देश बनला.

प्राचीन रोममध्यें खानेसुमारी करण्याची व्यवस्थित पद्धति प्रथम सुरू झाली. अगदीं पहिली खानेसुमारी प्राचीन रोमन राजा सर्व्हियस टयुलियस यानें केली आणि त्यानें केलेल्या एका कायद्यावरून असें दिसतें कीं, सर्व लोकांची त्यांच्या मालमत्तेसुद्धां-जमीन, गुरेंढोरें, गुलाम व इतर नोकर यांसुद्धां—खानेसुमारी दर पांच वर्षांनीं करावी असा नियम त्यानें घातला. पुढें पुढें या खानेसुमारीला कर वसुलीचें साधन इतकेंच आर्थिक स्वरूप आलें. आगस्टस बादशहाच्या वेळेपासून खानेसुमारी सर्व साम्राज्याची होऊं लागली. सेंट ल्यूकच्या गॉस्पेलमध्यें तर असे शब्द आहेत कीं, त्यानें (आगस्टसनें) "सर्व पृथ्वीवरील मनुष्यमात्रांवर कर बसवावा व त्याकरतां सर्वांची खानेसुमारी करावी" असा हुकूम सोडला होता. एवढें अवाढव्य गणनेचें काम पार पाडण्याच्या कार्यांत मरेपर्यंत तो बादशहा व्यग्र झालेला होता, परंतु तें कार्य त्याच्या हातून पुरें झालें नाहीं. त्यानंतरच्या मध्ययुगांत इंग्लंडमध्यें पहिल्या वुइल्यमचें डूम्स डे बुक व शार्लमेनचें ब्रेव्हियरी हीं नोंदबुकें तयार झाली. तीं रोमन खानेसुमारीच्या पद्धतीवरच हुबेहुब होतीं.

आ धु नि क प द्ध ति.—खानेसुमारीच्या प्रचलित पद्धतीचा पाया यूरोपांत १७ व्या शतकाच्या उत्तरार्धांत घातला गेला. या कामांत पुढाकार स्वीडननें घेतला. त्याकरतां पॅरिसमध्यें (खेड्यांत) क्लर्जी (पुरोहित) लोकांनीं जन्म, मृत्यु व विवाह यांची नोंद करून ठेविली पाहिजे असा सक्त नियम करण्यांत आला. पुढें याच नोंदबुकांत खेड्याच्या हद्दींतील सर्वच रहिवाशांची नोंद करून ठेवावी असा कायदा करण्यांत आला. फ्रान्समध्यें कोलबेरनें १६७० त पॅरिसमध्यें जन्म-मृत्यूची नोंद करून ती माहिती ठराविक मुदतीनें प्रसिद्ध करण्याची फार वर्षें चालू असलेली पद्धति गांवोगांवीं सुरू केली. या सालच्या पूर्वींच पांच वर्षे नियतकालिक कुटुंब व लोक गणनेची पद्धति न्यू फ्रान्स नामक वसाहतींत सुरू करण्यांत आली होती. क्विबेकमध्यें १६६५ पासून ती सुरू झाली. याप्रमाणें आधुनिक खानेसुमारीची पद्धति अस्तित्वांत आली.

खानेसुमारीच्या वेळीं कोणकोणत्या बाबींसंबंधीची माहिती पुष्कळशी बिनचुकपणानें मिळवितां येईल व अशा माहितीची प्रांतवारीनें परस्पर तुलना करतां यावी म्हणून ती कोणत्या स्वरूपांत नोंदून ठेवावी, या दोन मुद्यांसंबंधानें आंकडेशास्त्रांतील पंडितांत १८७२ पासून बरीच भवति न भवति झालेली आहे. यांपैकीं पहिल्या मुद्यासंबंधानें असें ठरलें आहे कीं, कुटुंबांतील प्रमुखांवर या बाबतींत भिस्त न ठेवतां जर सरकारनें लायक अधिकारी नेमून माहिती मिळविली तर पुष्कळ प्रकारची माहिती मिळविणें शक्य आहे. हें ध्येय साधण्याकरितां प्रत्येक खानेसुमारीच्या वेळीं अधिकाधिक दक्षता ठेवण्याचे प्रयत्न अलीकडे करण्यांत येत आहेत. राष्ट्राराष्ट्रांची व देशादेशांची तुलना करणाऱ्या दृष्टीनें वय, स्त्रीपुरुषभेद, सांपत्तिक स्थिति, जन्मठिकाण, शारीरिक व्यंगें, धंदा इतक्या गोष्टींचा खानेसुमारीच्या माहितीपत्रकांत समावेश करणें जरूर आहे. याच नमुन्यावर जर्मनी, फ्रान्स, बेल्जम, कानडा व युनायटेड स्टेट्समध्यें खानेसुमारी करण्यांत येत असते. धार्मिक पंथ किंवा संप्रदाय कोणता हें कलमहि घालण्याची कित्येक देशांत जरूरी असते. तसेंच राष्ट्रजाति किंवा मातृभाषा कोणती हें कलम पुष्कळ ठिकाणीं घालतात. याप्रमाणें बहुतेक मुद्यासंबंधानें हल्लीं सर्वत्र एकवाक्यता झालेली आहे.

ग्रे ट ब्रि ट न व आ य र्लं ड.—१९व्या शतकापर्यंत येथील लो. सं. किती याबद्दल केवळ अंदाजी माहिती असे. १७५३ मध्यें लोकसंख्येची वार्षिक गणना करावी अशाबद्दल एक सूचना कामन्ससभेंत मांडली गेली होती, परंतु 'यानें इंग्रज रयतेचें उरलेंसुरलें तेंहि सर्व स्वातंत्र्य जाईल' तसेंच या गणतीमुळें 'कांहीं तरी मोठें अरिष्ट किंवा रोगाची सांथ खास उद्भवेल.' असले आक्षेप घेऊन कित्येक सभासदांनीं सदर्हू सूचनेला जोराचा विरोध केला. तथापि कामन्ससभेनें सूचना मंजूर केली पण लॉर्डांच्या सभेंत ती साफ फेटाळून लावण्यांत आली. या सूचनेला महत्त्वाचा आक्षेप असा होता कीं, असल्या गणतीमुळें इंग्लंडजवळ युद्धोपयोगी मनुष्यबळ किती आहे हें शत्रूंनां कळेल. पुढें लवकरच माल्थसचे लोकसंख्येसंबंधाचे निबंध प्रसिद्ध होऊन लोकसंख्या व अन्नाचा पुरवठा यांचें परस्पर प्रमाण काय आहे तें मधून मधून नक्की समजणें जरूर आहे असें मत लोकांत उत्पन्न झालें. आणि १८०० मध्यें खानेसुमारीसंबधानें एक सूचना पार्लमेंटांत येऊन ती बिलकुल विरोध न होतां पास झाली. त्याअन्वयें ग्रेटब्रिटनची खानेसुमारी पुढील सालच्या मार्चे महिन्यांत करण्यांत आली. त्या कामाकरितां इंग्लंडांत जस्टिसेस ऑफ पीस, कान्स्टेबल्स व स्कॉटलंडांत शाळामास्तर, शेरीफ यांची मदत घेण्यांत आली होती. शिवाय प्रत्येक खेड्या (पॅरिस) मधील जन्म, मृत्यु व विवाह यांचे आंकडे उपाध्यायांनीं (क्लर्जींनीं) पार्लमेंटकडे पाठवावे असें ठरलें. पुढें १८११, १८२१, १८३१, १८४१ याप्रमाणें दहा दहा वर्षांनीं खानेसुमारीचें काम करण्यांत येऊन प्रत्येक वेळीं माहितीच्या सदरांत कामाच्या पद्धतींत आणि बिनचुकपणांत सुधारणा होत गेली. १८५१ ची खानेसुमारी सर्व बाजूंनीं व्यवस्थित होऊन तीच व्यवस्था अद्याप चालू आहे. १८७१ मध्यें मेंदू बिघडलेल्या पण वेड्याच्या इस्पितळांत नसलेल्या लोकांच्या नांवांची स्वतंत्रपणें नोंद करण्यांत आली. इ. स. १८९१ मध्यें वडिलोपार्जित इस्टेटीवर निर्वाह करून निरुद्योगी रहाणाऱ्या लोकांची स्वतंत्र नोंद केली गेली. याप्रमाणें प्रत्येक वेळीं एखादुसरी माहिती स्वतंत्रपणें नोंदविण्याची सुधारणा होत असते. स्कॉटलंडमध्यें खानेसुमारी इंग्लंडबरोबरच व त्याच पद्धतीवर होत आलेली आहे. एखादे वेळीं एखादुसरें सदर अधिक दाखल करण्यांत येतें. उदा. १८६१मध्यें एक किंवा एकाहून अधिक खिडक्या असलेल्या खोल्या किती आहेत याची नोंद करविण्यांत आली व त्यावरून मनुष्यवस्तीस योग्य अशी जागा किती व दर खोलीस माणसाचें प्रमाण किती वगैरे सरासरी ठरविली गेली.

आयर्लंडमध्यें १६७२ त व नंतर १७१२मध्यें शिरगणति करण्यांत आली पण तिचा मुख्य उद्देश शेगडा-पट्टी (हार्थ-मनी) जमा करण्याला मदत हा होता. खरा व्यवस्थित प्रयत्न १८११ व १८२१ मध्यें करण्यांत आला पण काम नीट झालें नाहीं. १८३१ मध्यें गणतीदारांनां नोंदीच्या संख्येच्या मानानें मेहेनताना देण्याचा नियम केल्यामुळें आंकडेवाढ लबाडीनें दाखविण्यांत आली. यामुळें तीन वर्षांनीं पुन्हां गणति व दुबार खर्च करावा लागला. १८४१तील खानेसुमारी मात्र नीट व्यवस्थितपणें पार पडली. तेव्हांपासून इंग्लंडपेक्षांहि अधिक सदरें घालून विस्तृत माहिती मिळविण्यांत येत असावी. धार्मिक पंथ, शिक्षणमर्यादा, वसतिस्थानाचा तपशील वगैरे अधिक सदरें ऐरिश नोंदबुकांत असतात.

ब्रि टि श व सा ह ती व ब्रि ट न शा सि त दे श.—ब्रिटिश साम्राज्याच्या सर्व विभागांत एकाच वेळीं एकाच

पद्धतीवर खानेसुमारी व्हावी अशी पुष्कळांची इच्छा आहे. परंतु त्या कामीं अडचणी फार येतात. उदा. वेळेसंबंधानें पाहतां ब्रिटिशसाम्राज्य भूपृष्ठावरील सर्व भागांत असल्यामुळें इंग्लंड, कानडा, आस्ट्रेलिया व आफ्रिका येथें एकाच वेळीं सारखे ऋतु व हवामान नसतें. त्यामुळें इंग्लंडांत खानेसुमारीला सोयीची जी तारीख ती उष्णकटिबंधांतील किंवा दक्षिण गोलार्धांतील साम्राज्यविभागांत गैरसोयीची ठरते. शिवाय राज्यकारभारपद्धति प्रत्येक विभागांत निरनिराळी असल्यामुळें नोंदणीबुकांतील सदरेंहि थोडीफार बदलावीं लागतात. तथापि १९०५ मध्यें स्त्रीपुरुषभेद, वय, सांपत्तिक स्थिति, जन्मठिकाण, धंदा व शक्य तेथें शिक्षण, धार्मिक पंथ व शारीरिक व्यंग इतकीं सदरें भरून सर्व साम्राज्यविभागाची माहिती प्रसिद्ध करण्यांत आली.

का न डा.—या भागात पहिली खानेसुमारी १६६५ त झाली होती. त्यावेळीं कुटुंबवार नोंद करून कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीबद्दल लिंगभेद, वय, सांपत्तिक स्थिति व धंदा यांबद्दल माहिती घेतलेली होती. पुढें ब्रिटिश सत्तेखालीं कानडा आल्यावर १७६५ व १७८४ मध्यें खानेसुमारी करण्यांत आली. १८२४ ते १८४२ पर्यंत दरसाल गणना करण्यांत येत असे. १८७१ त संयुक्त कानडयाची पहिली खानेसुमारी झाली. व तेव्हांपासून दशवार्षिक गणना चालू आहे. कोष्टकांचा नमुना युनायटेड स्टेटसच्या पद्धतीवर व विशेष तपशीलवार असतो. व प्रत्येक गृहस्थाला ५६१ प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागतात. ही माहिती भरून देण्याचें काम घरवाल्यावर न सोंपवतां स्वतंत्र नोंदणीदारांकडून करविण्यांत येतें. येथें अंतर्गमन नेहमीं चालू असल्यामुळें खानेसुमारीच्या वेळीं प्रत्येक व्यक्तीची आई व बाप यांचें जन्मठिकाण, राष्ट्रजाति व अंतर्गमनाची तारीख, सन वगैरे नमूद करण्यांत येत असते.

आ स्ट्रे लि या —येथें प्रथम मोठी वसाहत गुन्हेगारांचीच असल्यामुळें थोड्याशा स्वतंत्र वसाहतवाल्यांपुरती १७८८ पासून खानेसुमारी होऊं लागली. पण १८२० पर्यंत त्यांत पद्धति व बिनचूकपणा मुळींच नव्हता. १८२८ मध्यें प्रथम सर्व लोकांची व्यवस्थेशीर खानेसुमारी करण्यांत आली. १८४१ मध्यें न्यूझीलंड व टॅस्मानिया यांची पृथक् खानेसुमारी झाली. १९०१ पासून आस्ट्रेलियांतील प्रत्येक स्टेटची खानेसुमारी पृथक्पणें होते.

द क्षि ण आ फ्रि का.—केप-ऑफ-गुड-होप व आसपासचा प्रदेश हस्तगत केल्यापासून 'नेदर्लंड्स ईस्ट इंडिया कंपनी' ही तेथील लोकसंख्या गुरेंढोरें व शेतीचें उत्पन्न यांची दरसाल गणती करीत असे. १६८७ पासून पुढील शंभर वर्षांचे असले रिपोर्ट उपलब्ध आहेत. पुढें ब्रिटिशांनीं ताबा घेतल्यावर तीच पद्धत चालू ठेवली. १८६५ पासून दशवार्षिक गणनापद्धति सुरू झाली. बोअर युद्धाच्या गडबडीमुळें १९०१ ची खानेसुमारी १९०४ साली करण्यांत आली. माहितीपत्रकांतील सदरें आस्ट्रेलियांतील पद्धतीवर असतात. नाताळची खानेसुमारी १८९१ पासून स्वतंत्र होत असते. त्यांत प्रथम काफीर लोकांची गणती करीतच नसत; पुढें करूं लागले. पण काफीर व हिंदी मजूर यांची गणती गोऱ्या वसाहतवाल्यांपासून पृथक् व त्यांची माहिती थोडक्या सदरांत दिलेली असते. शिवाय इकडे अडाणी मजुरांची वस्तीच पुष्कळ असल्यामुळें खानेसुमारीच्या कामाला भरपूर माणसेंच मिळत नाहीं. म्हणून उत्तरऱ्होडेशिया, ब्रिटिश पूर्व आफ्रिका, नायगेरिया, गँबिया, सीरा लिऑन व लॅगॉस येथील खानेसुमारी १९०६ पर्यंत मुळींच करण्यांत आली नव्हती.

दि वे स्ट इं डी ज.—या द्वीपसमुदायापैकीं प्रत्येक पृथक् राजकीय विभागाची खानेसुमारी पृथक् होत असते. १८७१ पासून ती साधारणपणें एका ठराविक तारखेच्या सुमारास मात्र होते. माहितीचीं सदरें प्रत्येक विभागांत भिन्न असतात. काळेगोरे असा भेद क्वचित आहे. हिंदी मुदतबंदी मजुराची माहिती बरीच तपशीलवार जमवितात.

इ त र दे श.—करवसुलीच्या कामाकरितां म्हणून स्थानिक अधिकाऱ्यांकडून देशांतील लोकांची गणति करण्याची पद्धति यूरोपखंडांत इ. स. १४ व्या शतकापासून अस्तित्वांत असल्याचा पुरावा आहे उदा. फ्रान्समध्यें चूलपट्टी (हार्थ टॅक्स) निमित्त अशी गणती करीत असत. राज्यकारभारविषयक कामानिमित्त लोकगणना करीत असल्याचें उदाहरण यूरोप खंडाबाहेर दूर चीनदेशांत आढळतें. येथें शिरपट्टी वसूल करण्याकरितां म्हणून लोकांची गणति १७११ मध्यें केली; तेव्हां लोकसंख्या अवघी २८० लक्ष भरली. पुढें चाळीस वर्षांनीं दुष्काळपीडित देश झाला. त्या वेळीं दुष्काळमदत देण्यास लायक अशा लोकांची मोजदाद करण्याकरितां गणति केली. आणि आश्चर्य असें कीं त्यावेळीं लोकसंख्या १०३० लक्ष भरली. करवसुली इत्यादि राजकीय हेतूव्यतिरिक्त नियतकालिक लोकगणना करण्याची कल्पना प्रथम १६८६ मध्यें स्वीडन देशांत उद्भवली, तथापि तेथेंहि प्रथम खेड्याच्या उपाध्याया(पॅरिशच्या क्लर्जी)मार्फत जन्ममृत्यु नोंदीच्या स्वरूपांत गणति होत असे. तेथें स्वतंत्र अशी खानेसुमारी प्रथम १७४९ मध्यें झाली. पुढल्या सालीं स्वीडनचें अनुकरण फिनलंडनें केलें व त्यानंतर वीस वर्षांनीं नार्वेनें केलें. १८ व्याच शतकांत दुसऱ्या अनेक देशांनीं खानेसुमारी केली. यापैकीं स्पेन हा एक होता. पण येथें भरवंशालायक आंकडे १८८७ पर्यंत सुद्धां मिळत नसत. इटालींतील कांहीं लहान लहान संस्थानांत १७५० च्या सुमारापासून खानेसुमारी करीत असत. पुढें इटली स्वतंत्र होऊन सर्व इटलीचें एक राज्य बनल्यावर १८६१ पासून सर्व इटलीची खानेसुमारी होऊं लागली. आस्ट्रियांत १७५४ मध्यें पॅरिशच्या क्लर्जीकडून गणती करण्यांत आली. पुढें वीस वर्षांनीं हंगेरीच्या कांहीं भागांत करण्यांत आली. तथापि १८५७ पर्यंत व्यवस्थित खानेसुमारी आस्ट्रियाहंगेरींत होत नव्हती. सर्व

साधारणपणें असें म्हणतां येईल कीं, १८२५ ते १८६० च्या दरम्यान यूरोपांतील सर्व देशांत नियमित खानेसुमारी होण्यास सुरवात झाली. सर्व जर्मन संस्थानचें एक साम्राज्य बनलें. त्या वेळेपासून पंचवार्षिक गणति तेथें होऊं लागली. खानेसुमारी सुरू करण्याच्या बाबतींत शेवटचा नंबर रशियाचा आहे. १७२१ पासून रशियांत सैन्यभरती, करवसुली किंवा पोलीसभरती वगैरे राजकीय कारणाकरितां लोकांची गणति नियमित कालावधीनें करण्यांत येत असे. १८९७ सालीं प्रथम सर्व देशांत खानेसुमारी करण्यांत आली. त्या वेळीं रशियाची लोकसंख्या हिंदुस्थानच्या खालोखाल आहे असें निदर्शनास आलें. चीनचा नंबर लोकसंख्येंत पहिला आहे, पण त्या वेळीं चीनची लोकसंख्या नक्की कळली नव्हती. हिंदुस्थानांतल्याप्रमाणें रशियांतहि भाषा अनेक असल्यामुळें खानेसुमारीचीं नोंदबुकें अनेक भाषांत छापावीं लागतात. याशिवाय बाकी राहिलेले तुर्की साम्राज्य, अफगाणिस्तान, इराण, चीन, इंडोचायना हे आशियांतील देश, मं. आफ्रिकेचा भाग आणि दक्षिण अमेरिकेचा बराचसा भाग या प्रदेशांतील लोकसंख्या किती आहे हें अद्यापहि निश्चितपणें सांगण्याची सोय झालेली नाहीं.

युनायटेड स्टेट्स्.—खानेसुमारीची अर्वाचीन पद्धति युनैटेट स्टेटस्मध्यें निघाली असें म्हणावें लागतें. स्वीडन व नार्वे देशांत १७४९ पासून पॅरिशमधील क्लर्कांकडून सक्तीनें जन्ममृत्यूची नोंद करवीत असत व नोंदबुकांतील माहिती खानेसुमारीच्या माहितीप्रमाणें विश्वसनीय असे. तथापि १८१५ पर्यंत नार्वेमध्यें खऱ्या स्वरूपाची खानेसुमारी झाली नव्हती. नार्वे, स्वीडन व युनायटेड स्टेटस् या तीन देशांपैकीं खानेसुमारीचा आद्यप्रवर्तक कोण असा प्रश्न आहे युनायटेड स्टेटस् मध्यें १७९० त पहिली खानेसुमारी करण्यांत आली हें निश्चित असल्यामुळें अग्रमान या देशालाच देणें भाग आहे. खानेसुमारीचा प्रश्न निश्चित स्वरूपांत या वेळीं युनायटेड स्टेटस्मध्यें उपस्थित होण्याचें कारण असें कीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लवकरच त्या देशांचो राज्यघटना निश्चित करण्याच्या वेळीं कायदेमंडळांतील प्रतिनिधींच्या संख्येसंबंधानें प्रश्न निघाला. लोकसंख्येच्या मानानें प्रतिनिधी असावे असें मोठाल्या संस्थानांचें म्हणणें पडलें. त्याला छोट्या संस्थानांनीं विरोध केला. तेव्हां तडजोड अशी झाली कीं, काँग्रेसचे दोन भाग असावे व त्यांच्या पैकीं प्रतिनिधिसभेचे सभासद लोकसंख्येच्या मानानें पाठविण्याचा हक्क संस्थानांना असावा असा ठराव झाल्यामुळें अर्थातच लोकगणना करणें जरूर झालें. यामुळें १७९० मध्यें पहिली खानेसुमारी करण्यांत आली. त्या वेळीं गुलाम व स्वतंत्र असे लोकांचे दोन मुख्य वर्ग पाडून नंतर स्वतंत्र लोकांचे गोरे व इतर असे भेद, नंतर स्वतंत्र गोऱ्या लोकांत स्त्री–पुरुष, आणि स्वतंत्र गोऱ्या पुरुषांमध्यें सोळा वर्षांच्या वरचे व आंतले असे वर्गीकरण करण्यांत आलें. १८०० च्या खानेसुमारींत वयोमानानुसार स्त्री व पुरुष यांचे पांच वर्ग मांडण्यांत आले. १८१० च्या गणतीमध्यें कला व उद्योगधंदे यांच्यासंबंधानें सविस्तर माहिती नोंदण्यांत आली. १८२० मध्यें शेतकी, उद्योगधंदे व व्यापार अशा सदराखालीं पृथक् नोंद करण्यांत आली. १८३० मध्यें परके लोक, बहिरे, मुके व आंधळे यांची पृथक् नोंद झाली. १८५० च्या खानेसुमारीकरितां कायद्यानें एक स्वतंत्र सेन्ससबोर्ड स्थापण्यांत आलें. १८५० सालची खानेसुमारी फार विस्तृत प्रमाणावर झाली. या वेळीं स पृथक् तक्ते करून एका तक्त्यांत स्वतंत्र रहिवाशी, दुसऱ्यांत गुलाम, तिसऱ्यांत गतसालचे मृत्यू, चवथ्यांत शेतकी, पांचव्यांत औद्योगिक कारखाने व सहाव्यांत सामाजिक गोष्टींसंबंधानें आंकडे अशी माहिती जमविण्यांत आली. १८६० ची खानेसुमारी पूर्णपणें मागील नमुन्यावर झाली. १८७० ची खानेसुमारी गुलामांच्या स्वातंत्र्यानिमित्त झालेल्या युद्धानंतर झाली पण ती बरीच सदोष झाली. १० व्या खानेसुमारीच्या वेळीं खानेसुमारीच्या कायद्याची दुरुस्ती करण्यांत आली व स्वतंत्र सेन्सस ऑफिस उघडण्यांत आलें. यावेळेची एकंदर सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्यास वीस पुस्तकें लागलीं. हा सेन्सस-रिपोर्ट म्हणजे एक मोठा ज्ञानकोशच झाला. पुढील खानेसुमाऱ्या याच नमुन्यावर होत गेल्या. तथापि १८९० ची गणती चुकीची झाली असा प्रथम फार गवगवा झाला. कारण त्या गणतींत लोकसंख्या अनुमानाच्या मानानें फार कमी भरली. १८८०, १८६०, १८५० वगैरे मागील आटदहा खानेसुमाऱ्यांत लोकसंख्या दर वेळीं शेंकडा २५ ते ३० पर्यंत वाढत असल्याचें सिद्ध झालें होतें, आणि १८९० सालीं ही वाढ फारच अल्प झाल्याचें खानेसुमारींत दिसून आलें, आणि वाढ मागील प्रमाणाच्या मानानें न होण्याचीं कांहीं विशिष्ट कारणेंहि सेन्ससच्या अधिकाऱ्यांना दाखवितां आलीं नाहींत. अर्थात गणतींत चुका झाल्या अशी ओरड झाली. सदरहू रिपोर्टांत दहा वर्षांखालील मुलांचा आकडा स्वतंत्र दिलेला असल्यामुळें व हा आंकडा मागच्यामानानें फार कमी भरल्यानें १८८० ते १८९० च्या दहा वर्षांत जन्म फार कमी झाले व त्यामुळें लोकसंख्या मागील मानाप्रमाणें वाढली नाहीं असें ठरलें. १९०० च्या खानेसुमारींतहि लोकसंख्येंत फारशी वाढ झाल्याचें आढळलें नाहीं. तेव्हां गणती चुकली हा आक्षेप फोल ठरला व वाढ मागील प्रमाणांत न होण्याचीं कारणें निराळींच असलीं पाहिजेत असें निश्चित झालें.

युनायटेड स्टेट्समध्यें लोकसंख्येनुसार प्रतिनिधी पाठवावे असा कायदा असल्यामुळें लोकसंख्येचे आंकडे मुद्दाम वाढवून सांगितले जाण्याचा संभव होता; तो टाळण्याकरितां प्रत्यक्ष करांचा बोजा लोकसंख्येनुसार बसविण्याचें काँग्रेसनें त्याच वेळीं ठरविलें. या दोन परस्परविरुद्ध अशा हितसंबंधांमुळें लोकांची वृत्ति समतोल राहून लोकसंख्या कमीअधिक न

होतां बरोबर नोंदली जाईल अशी योजना करण्यांत आली होती. सेन्ससचें स्वतंत्र ऑफिस व तज्ज्ञ अधिकारी नेमून खानेसुमारीचें काम बिनचूक व निर्दोष होण्याबद्दल पूर्ण खबरदारी घेण्यांत येऊं लागली.

खानेसुमारीच्या वेळीं जमविलेल्या विविध व विस्तृत माहितीची संकलित मांडणी वीस पंचवीस पुस्तकांत करण्याच्या एकंदर कामाला कालावधि बराच लागू लागल्यामुळें एकंदर कामाचे मुख्य व दुय्यम असे भाग करण्यांत आले व मुख्य माहिती ताबडतोब प्रसिद्ध करून दुय्यम माहिती दहा वर्षांत प्रसिद्ध व्हावी असें ठरलें. दुय्यम भागांतील माहिती सदोष व चुकीची असण्याचा फार संभव असतो. उदा० शेतकीविषयक माहितींत मुख्य मुख्य पिकें शेतांत किती पिकतील व त्याची किंमत काय येईल हें पुष्कळशा शेतकऱ्यांना बिनचूक सांगतां येणें शक्य नसतें. कारखान्यासंबंधानें माहितीहि चुकीची असण्याचा संभव फार असतो.कारण अशी माहिती लोकांत जाहीर प्रसिद्ध झाल्यानें इतरांना चढाओढ करण्यास सोईचें होईल अशा भीतीमुळें तसेंच हिशोब ठेवण्याची पद्धति सर्व कंपन्या व कारखानदार यांची एकच नसल्यामुळें बरोबर माहिती मिळत नाहीं. सेन्सस–कामगाराच्या मार्गांत या अडचणी आहेत. तथापि उत्तरोत्तर बिनचूक माहिती मिळविण्याची खटपट चालू आहे. आणि अनेक महत्वाच्या बाबतींत आकडेवार माहिती पुष्कळ देशांत मुळींच उपलब्ध नसते त्या मानानें पाहतां अमेरिकेला असल्या ठोकळ आंकड्यांनीहि पुष्कळ व्यावहारिक उपयोग करून घेतां आला आहे.

खानेसुमारीच्या कामांत आंकड्यांचे तक्ते भरणें व ते तपासून पाहणें हीं कामें फार त्रासदायक व फार वेळ खाणारीं असतात; हीं कामें विद्युद्यंत्राच्या साहाय्यानें सुलभ रीतीनें करण्याची युक्ति अमेरिकेनें काढून सेन्ससच्या कामांत मोठी सुधारणा केली आहे. या युक्तीनें विद्युत्प्रवाहाच्या साहाय्यानें आकडे ताबडतोब तपासून पाहतां येतात व फार वेळ वाचतो. युनायटेड स्टेट्समधील खानेसुमारीसंबंधानें दुसरी महत्त्वाची गोष्ट ही कीं, सदरहु कामाला खर्च इतर देशाच्या मानानें फार अधिक लागतो व हा खर्चाचा आंकडा १७९० मध्यें ४४,३७७ डॉलर होता तो १९०० मध्यें १,६१,१६,९३० डॉलरवर गेला. इंग्लंडमध्यें १९०० च्या खानेसुमारीबाबत माणशी खर्च २.२४ सेंट व युनायटेड स्टेट्समध्यें २१.१६ सेंट आला. म्हणजे इंग्लंडचा खर्च अमेरिकेच्या खर्चाच्या अजमासें एकदशांश पडला. या खर्चाचें मुख्य कारण असें कीं, युनायटेड स्टेट्स मधील गणति पगारी नोकराकडून करवितात तर इंग्लंडमध्यें बहुतेक काम कुटुंबातील प्रमुख माणसाकडून बिन मोबदल्यानें करून घेतात. शिवाय युनायटेड स्टेट्समध्यें सेन्सस ऑफीस कायमचें असून त्यामार्फत अनेक प्रकारचीं माहितीपुस्तकें सरकार प्रसिद्ध करवितें. सरकी काढण्याच्या गिरण्या, त्यांतील मजुरांची संख्या व मजुरीचे दर यांची माहिती देणारे रिपोर्ट त्या त्या हंगामांत या आफीसकडून प्रसिद्ध होतात. रस्त्यांतील व विजेच्या आगगाड्या, धातूच्या व दगडांच्या खाणी, विजेच्या शक्तीनें व उष्णतेनें तयार होणारीं झाडें व वनस्पती, धर्मार्थ संस्था, वेड्यांची व भिकाऱ्यांची संख्या वगैरे अनेक प्रकारची माहिती याच आफीसकडून प्रसिद्ध होत असते. अलीकडे काँग्रेसनें आणखीहि कित्येक आंकडेविषयक माहिती प्रसिद्ध करण्याचें काम या आफीसकडे सोंपविलें आहे. तात्पर्य, बर्लिनमध्यें सर्व जर्मन साम्राज्यासंबंधी आकडेविषयक माहिती पुरविणारें जसें आफीस आहे तशाच प्रकारचें हें सेन्सस आफीस आहे.

सी लो न.—एकाच वेळीं सीलोनांत व हिंदुस्थानांत खानेसुमारी होत असते, कारण या दोन देशांत लोकांची परस्पर जा ये सारखी चालू असते. सीलोनमध्यें कोष्टकांत जात या सदराऐवजीं वंश सदर असतें. शिवाय १९०१ पर्यंत सीलोनांत स्वतंत्र गणतीदारांकडून गणती न करवितां ग्रेटब्रिटनमधील पद्धतीप्रमाणें ठरलेल्या तारखेच्या पूर्वी तक्ते घरोघर वाटून कुटुंबातल्या प्रमुख माणसाकडून ते भरवून घेत असत. हल्लीं स्वतंत्र गणतीदारांकडून तक्ते तयार करविले जातात.

हिं दु स्था न.—एका वेळीं व एकाच प्रकारच्या पद्धतीनें गणती केली जाणारा सर्वांत अत्यंत मोठा लोकसमुदाय हिंदुस्थानांतला होय. ब्रिटिश साम्राज्यांतील एकंदर लोकसंख्येपैकीं ३/४ लोकसंख्या हिंदुस्थानांत आहे. आणि पृथ्वीच्या पाठीवरील एकंदर लोकसंख्येचा १/५ एकट्या हिंदुस्थानांत आहे. १८५३ आणि १८८१ याच्या दरम्यान प्रत्येक प्रांतांत पृथक् खानेसुमारीचें काम करण्यांत येत असे. १८८१ मध्यें वरिष्ठ सरकारमार्फत खानेसुमारीचें काम करण्यांत आलें व तीच पद्धति तेव्हांपासून चालू आहे. दर खानेसुमारीच्या वेळीं नवा नवा प्रदेश समाविष्ट होत असतो. तसेंच रानटी व मागासलेल्या जातींमध्यें गणतीचे तक्ते विशेष तपशीलवार नसत, ते उत्तरोत्तर लोकांची समजूत पटूं लागून तपशीलवार होऊं लागले आहेत. काम करणारीं माणसेंहि अधिकाधिक वाकबगार मिळूं लागलीं असून काम अलीकडे बरेंच चोख होऊं लागलें आहे. हिंदुस्थानांत ज्यांना लिहितां वाचतां येतें असे कुटुंबी शेंकडा ५ हून अधिक सांपडत नाहींत, आणि खानेसुमारीचा तक्ता सर्व नीट भरून देतां येईल असे इसम त्याहूनहि कमी आहेत. यामुळें सुशिक्षित असलेल्या अत्यंत अल्प वर्गांतून या कार्याला लागणारे इसम मिळवावे लागतात. उपलब्ध होणाऱ्या थोडक्या गणतीदाराकडून एका रात्रींत सर्व नोंद होणें शक्य नसल्यामुळें कामाचे दोन भाग पाडतात. ठरलेल्या रात्रीच्या पूर्वी थोडे दिवस सर्व तक्ते कच्चे भरून घेतात आणि ठराविक रात्रीं पुन्हा प्रत्येक घरीं जाऊन त्यांत कमजास्त करून तक्ता पुरा करतात. प्रत्येक गणतीदाराकडे अजमासें

३०० इसमांची नोंद करण्याचें काम येतें. याप्रमाणें १९०१ च्या खानेसुमारींत जवळ जवळ १० लाख गणतीदार लागले होते. शिवाय गणतीदारांच्या मदतीला, त्यांच्यांवर देखरेखीला, सर्व तक्ते गोळा करून खानेसुमारीच्या स्थानिक कचेरीकडे रवाना करण्याला आणखी एक लाखापर्यंत माणसें लागतात. तथापि येवढे इसम हल्लीं मिळूं शकतात. या कार्याला सरकारी आफिसें, म्युनिसिपालिटया, शाळा, कालेजें वगैरे संस्थांतील नोकरांची मदत होते. शिवाय विद्यार्थी व सुशिक्षित यांची स्वखुषीनें फुकट मदत मिळते. खानेसुमारीच्या तक्त्यात स्त्रीपुरुष, वय, सांपत्तिक स्थिति, जन्म ठिकाण, धंदा शरीरव्यंग, मातृभाषा, धर्म व धार्मिक ग्रंथ, जात व पोटजात इतकीं सदरें असतात. हे तक्ते निरनिराळ्या वीस भाषांत छापविलेले असतात.

खानेसुमारीची तारीख चांदणी रात्र असेल, धार्मिक उत्सव, जत्रा, यात्रा वगैरे गोष्टी नसतील असें पाहून नेमावी लागते. खानेसुमारीच्या कामाच्या नियमांचें स्वतंत्र पुस्तक छापून वांटण्यांत येतें. तरी गणतीदाराच्या प्रत्यक्ष कामांत चमत्कारिक अडचणी येतातच. गणतीच्या रात्रीं बाहिरेमुके व वेडे इसम भटकतांनां आढळल्यास त्याच्यांजवळून तक्त्यातील सर्व माहिती कशी विचारून घेणार ? दुसरी अडजण ही कीं कित्येक प्रांतांत मौनव्रत धारण केलेले कित्येक संन्यासी असतात त्यांचें व्रत कोण व कसें मोडणार? भिल्ल वगैरे रानटी जातींचे लोक गणती करणाऱ्या इसमास घरांत येऊंच देत नसत. दुष्काळांत मदत मिळेल वगैरे फायदे दाखवून त्यांची गणति करण्यास संमति मिळवावी लागते. इतर अडचणी म्हटल्या म्हणजे आगगाड्यांतील प्रवासी, कित्येक दिवस बंदरास न लागणाऱ्या बोटींतून प्रवास करणारे लोक किंवा झाडें तोडण्याकरितां कित्येक दिवस जंगलांतून जाऊन राहणारे लांकूडतोडे वगैरे लोकांची ठराविक रात्रीं गणति कशी करावयाची ? या सर्व अडचणींवर सेन्सस अधिकाऱ्यांनीं उपाय काढलेले आहेत. उदाहरणार्थ, खानेसुमारीच्या दिवशीं संध्याकाळीं ७ वाजल्यानंतरच्या सर्व गाड्या स्टेशनावर थांबवून तेथें गणति करण्याची व्यवस्था करतात.

गणतीच्या कामाकरितां ३० ते ५० घरांचा एक गट करून त्या ब्लॉकच्या गणतीकरितां एक गणतीदार नेमतात. असे १० ते १५ गट मिळून एक सर्कल बनवितात. त्यांत सुमारें ५०० घरें असून त्यावर सुपरव्हायझर नेमतात. तालुक्यांतील किंवा तहशीलींतील सर्व सर्कलांवर अधिकारी चार्ज सुपरिंटेंडेंट म्हणून असतो. गणतीच्या दुसऱ्या दिवशीं गणतीदार फक्त लोकसंख्येचा आंकडा सुपरव्हायझरला ताबडतोब कळवितात. सुपरव्हायझर सगळे आंकडे बेरीज करून चार्ज सुपरिंटेंडेंटकडे व ते तशीच बेरीज करून जिल्ह्याधिकाऱ्यांकडे कळवितात. जिल्ह्यांतील सर्व आंकड्यांची बेरीज करून ती एकूण संख्या तारेनें प्रॉव्हिन्शियल सुपरिंटेंडेंट व सर्व हिंदुस्थानचा कमिशनर यांजकडे कळवितात. याप्रमाणें आठ दहा दिवसांत सर्व हिंदुस्थानांतील आंकडे एकत्र होऊन गणतीच्या दिवसापासून पंधरा दिवसांत लोकसंख्येचे आंकडे लोकांच्या माहितीकरितां प्रसिद्ध केले जातात. इतक्या जलदीनें काम होऊनहि शिवाय .०३ इतक्या अल्प प्रमाणांत म्हणजे २९,४२,६६,७०१ या लोकसंख्येच्या एकूण आकड्यांत ९४,३५५ इतकीच चूक १९०१ सालीं सांपडली होती. हें पहिलें काम झाल्यावर प्रत्येक प्रांतांत स्त्री-पुरुष, विवाह, वय, शिक्षण वगैरे प्रत्येक सदराचे आंकडे एकत्र करून त्यांचे स्वतंत्र तक्ते तयार करणें व प्रत्येक सदरासंबंधानें चर्चात्मक माहिती लिहून सर्व रिपोर्ट तयार करण्याचें काम प्रांतोप्रांतांचे सुपरिंटेंडेंट करतात. निरनिराळ्या सदरानुसार तक्ते तयार करण्यांत १९०१ पूर्वी एक जुनी 'टिक' पद्धति म्हणून प्रचलित होती. ती फार भानगडीची असल्यामुळें चुका होण्याचा संभव फार असून कालविधीहि फार लागत असल्यामुळें १९०१ च्या खानेसुमारीच्या वेळीं एच. एच. रिस्ले सेन्सस कमिशनर यांनीं 'स्लिप' (चिठ्ठी) पद्धति सुरू केली. या स्लिप्स (चिठ्या) धर्म दर्शविण्याकरितां निरनिराळ्या रंगांच्या घेऊन स्त्रीपुरुषभेद व सांपत्तिक स्थिति (सिव्हिल कंडिशन) दर्शविण्याकरिता विवक्षित चिन्हें केलीं असतात. यामुळें ही माहिती लिहावी लागत नाहीं. शिवाय इतर माहितीकरितां संक्षेप उपयोगांत आणतात. यामुळें एक मनुष्य एका दिवसात ५०० स्लिप्स लिहून तयार करूं शकतो. स्लिप्सवरील माहिती तपासूनहि लवकर पहाला येतें. यामुळें काम लवकर व बिनचूक होतें. आंकडे तपासण्याकरिता हॉलेरिथ यंत्र वगैरे अमेरिकेंतील साधनें येथें वापरीत नाहींत. कारण हलक्या स्वरूपाचें कारकुनी काम करण्याला हिंदुस्थानात थोडक्या पगारावर भरपूर लोक मिळतात. उलटपक्षीं तज्ज्ञ लोक अल्प असल्यामुळें 'स्लिप्स' पद्धतीनेंच काम थोडक्या खर्चांत व बरेचसें बिनचूक होतें. इ. स. १९११ सालच्या खानेसुमारीला हिंदुस्थान सरकारला २०.३ लाख रुपये (१,३५,००० पौंड) खर्च आला. म्हणजे माणशीं प्रमाण सरासरी हजारास पांच सहा रुपये पडतें. हिंदस्थानच्या खानेसुमारींत ब्रिटिश बलुचिस्तान, वायव्य सरहद्दीवरील प्रांत, ब्रिटिश ब्रह्मदेश, अंदमान निकोबार बेटें, सर्व देशी संस्थानें यांचाहि समावेश होतो.

१९०१ सालच्या रिपोर्टांत धर्मानुसार व मानवजातिवर्णनशास्त्रानुसार फार बारकाईनें माहिति देण्याचा प्रयत्न केलेला आहे. बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांसंबंधानें मिस्टर गेट यांचा रिपोर्ट, मिस्टर रसेल यांची मध्यप्रांतातील जाती व रानटी लोकांसंबंधींची चर्चा, मिस्टर एन्थॉवेन यांची मुंबईतील विविध समाजाबद्दलची माहिती व मिस्टर रोज यांचा पंजाबांतील विविध धर्मप्रसार व पोटजातींतील मिश्रविवाह या संबंधाचा उहापोह फार वाचनीय झालेला आहे.

खापा—मध्यप्रांतातील नागपूर जिल्ह्याच्या रामटेक तहशिलींतील एक शहर. उत्तर अक्षांश २१° २५' व पूर्व रेखांश ७९° २'. हें नागपूर शहराच्या उत्तरेस २२ मैलांवर कन्हान नदीवर वसलेलें आहे. हें नदीच्या काठीं उंचवटयावर वसलेलें असून त्याच्या तीन बाजूंनी गर्द झाडी आहे. इ. स. १८६७ मध्यें या शहराला म्युनिसिपालिटी देण्यांत आली. तीस चाळीस वर्षांपूर्वी हें शहर संपन्नस्थितींत होतें, पण हल्लीं त्याला उतरती कळा लागली आहे. जिकडे तिकडे गिरण्या निघूं लागल्यामुळें येथील हातमागांचा धंदा अगदींच बसून गेला आहे. अद्यापिहि या ठिकाणीं बायकांना लागणारीं रंगीत लुगडीं तयार होतात. याठिकाणीं आठवड्यातून दोन वेळा बाजार भरतो. येथें एक माध्यमिक शिक्षणाची व एक मुलींची शाळा असून एक दवाखाना आहे. पाटणसावंगीपासून खाप्यास जाण्यास खाडीचा रस्ता आहे

खामगांव, तालुका.—इ.स १९०५ पर्यंत हा तालुका अकोला जिल्ह्यात होता, पण नंतर हा तालुका बुलठाण्यात गेला. उ.अ. २०° २६' ते २०° ५५' व पू.रे. ७६° ३२' ते ७६° ४८'. क्षेत्रफळ ४४२ चौरस मैल. अकोला जिल्ह्यांतील बाळापुर तालुक्यात हा तालुका होता. परंतु इ. स. १८७० सालीं १४४ खालसा आणि ४ जहागिरीचीं गावें निराळीं करून त्याचा खामगांव तालुका केला. इ. स १८७२ सालीं आणखी एक सरकारी गाव जहागिरींचें केलें. त्यामुळें हल्लीं या तालुक्यात १४३ खालसा आणि ५ जहागिरीचीं गावें आहेत. याच्या उत्तरेस जळगाव तालुका, पश्चिमेस मलकापूर तालुका, दक्षिणेस चिखली तालुका व पूर्वेस बाळापुर तालुका आहे. लोकसंख्या(१९११)१,०१,०६८. बुलठाणा जिल्ह्यातील याच तालुक्यांत फक्त लोकसंख्येची वाढ झालेली दिसते. बरेच लोक व्यापारानिमित्त या तालुक्यांत आल्यामुळें ही वाढ झाली आहे.

जमीन खरीप आणि रबी पिकांस योग्य आहे. महत्वाचीं पिकें कापूस, ज्वारी इत्यादि. या तालुक्यांत जलंबपासून खामगांवपर्यंत रेल्वेचा फांटा आहे.

शहर.—खामगांव तालुक्याचें मुख्य ठिकाण. उ. अ. २०° ४३' व पू. रे. ७६° ३८. जी. आय. पी. रेल्वेच्या जलंब स्टेशनापासून खामगावपर्यंत ८ मैल रेल्वेचा फांटा आहे. लोकसंख्या १९०१सालीं १०,१२३होती. इ. स.१८७०त येथील कापसाचा बाजार हिंदुस्थानांत सर्वांत मोठा होता, परंतु हल्लीं ती स्थिति नाहीं. येथें बरेच सरकी काडण्याचे व रुई दाबण्याचे कारखाने आहेत. आठवड्याचा बाजार दर गुरुवारीं भरतो. गावाच्या आसपास झाडी बरीच असून गांव बराच चांगला दिसतो. सिव्हिलकोर्ट,दवाखाना, पोष्टऑफीस इंग्रजी शाळा वगैरे येथें आहेत. येथें एक देशमुखांचा किल्ला आहे. गांवाबाहेर एक वेस असून ती पूर्वी गांवाभोवती असलेल्या तटापैकीं असावी. या तटापैकीं कांहीं अवशेष अजून आहेत. इ.स. १८६७ सालीं येथें म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. गांवांत अलीकडील तऱ्हेनें बांधलेल्या इमारती फारशा नाहींत. जरी व्यापार पुष्कळ आहे तरी दुकानें व्यवस्थित रीतीनें बांधलेलीं नाहींत. गांवाच्या दक्षिणेस सुमारें २॥ मैलांवर एक तलाव आहे. त्याचें पाणी गांवांत आणलें आहे. गांवाला पाण्याची टंचाई आहे. तलावाजवळच म्युनासिपालिटीचा एक मोठा बाग आहे.

खायबर—हिंदुस्थान आणि अफगाणिस्तान यांमधील एक अतिशय महत्वाचा मार्ग. हा वायव्य सरहद्द प्रांतांतल्या पेशावर जिल्ह्यांतून सुरू होतो. याचा मध्य उ. अ. ३४° ६' व पू. रे. ७१° ५' यांवर आहे. हा मार्ग ज्या डोंगराच्या रांगांमधून जातो त्यांनांहि हेंच नांव लावितात. वाटेंत अली मस्जीद (पहा), लंडी कोटल व तोरखमल हीं मुख्य स्थळें लागतात.ही वाट फार चढउताराची व बिकट आहे. पुरातन काळापासून हें हिंदुस्थानचें महाद्वार म्हणून प्रसिद्ध आहे. इराणी आणि ग्रीक सेल्जुक, तार्तर मोंगल आणि दुराणी विजेते याच द्वारांतून शिरले.अलेक्झांडर, गझनीचा महमद, बाबर, हुमायून, नादिरशहा आणि अहमद शहा अब्दाली याच मार्गानें इकडे आले. हा ऐतिहासिक मार्ग आतांप्रमाणें मागेंहि आफ्रिडी पठाणांकडे असे. मोंगल बादशहांनीं आपल्या कह्यांत हा मार्ग ठेवण्याचा फार प्रयत्न केला होता. पण त्यानां त्यांत फारसें यश आलें नाहीं.१८३९ त ब्रिटिशानीं प्रथमच हा मार्ग चोखाळला. त्यावेळीं शाहा सुजाचा पुत्र शाहा तीमूर झादा याला काबूलला नेऊन सोडण्याचं काम कॅप्टन वेडनें केलें. अफगाणयुद्धांत या मार्गानें जाणाऱ्या ब्रिटिश सैन्याला आफ्रिडी लोकांनीं चांगलाच हात दाखविला. १८७९ त ब्रिटिश सरकार व अमीर याकुबखान यामध्यें जो तह (गंडमक) झाला त्या अन्वयें खायबर मार्गाचा ताबा ब्रिटिशांकडे गेला व त्यांनीं आफ्रिडी लोकांनां याची व्यवस्था ठेवण्यासाठीं दरसाल द्यावयाची रक्कम (रु. ८८५४०) ठरवून टाकिली. १८९७ सालीं आफ्रीडीनीं बंड केल्यावरून त्याचा सैन्य पाठवून मोड करण्यांत आला व पुन्हा नवा करार करून घेतला. [सर रॉबर्ट वारबर्टन—एटीन ईयर्स इन् दि खायबर]

खारगवान—कोरिया संस्थानांतील ७२ खेड्यांची दक्षिणेकडील जमीनदारी.जमीनदार जुन्या गोंड घराण्यांतील असून ७७२ रु. संस्थानास राखोळी देत असतो. येथील जंगलांतील उत्पन्नावर जमीदाराचा हक्क असून चराईपैकीं फक्त ½ उत्पन्न संस्थानचें असतें. खारगवात गांवाभोंवतीं बांबूचें रान असून गांवात पोलीस चौकी व शाळा आहे.

खार पाडणें—खार पाडणें म्हणजे समुद्राच्या भरतीच्या पाण्यानें खराब झालेल्या जमीनीचा पुनरुद्धार. मुंबई इलाख्यांत कोंकणपट्टींत रत्नागिरी. कारवार, कुलाबा व ठाणें वगैरेंच्या समुद्रकिनाऱ्यावरील वऱ्याचशा भागांत खारी पाडण्यास योग्य अशा जागा आढळतात. कुलाबा जिल्ह्यांतील

पेण तालुक्यांत व ठाणें जिल्ह्यांतील साष्टी व वसई तालुक्यांत बऱ्याच खारी पाडलेल्या आहेत. अशा तऱ्हेच्या खारी कोंकणपट्टींत खाड्याच्या आजूबाजूस पूर्ण भरतीच्या खालीं असलेल्या जमिनींना बांध घालून तयार केलेल्या असतात. अशा खारींचा शेतीच्या अगर मीठ तयार करण्याच्या कामीं उपयोग करितात.

खारी पाडण्याचें काम सुरू करण्यापूर्वीं बऱ्याच गोष्टींचा विचार करणें अत्यंत अवश्य आहे. जसें:—(१) थोडक्या खर्चांत काम होणें शक्य आहे किंवा कसें; (२) खर्चाच्या रकमेवर व्याज सुटेल किंवा नाहीं, (३) खार पाडल्यावर जमिनींत पीक होईल किंवा कसें. या गोष्टींचा पूर्ण विचार करून मग त्या जमिनीची मोजणी करावी व नकाशा काढावा. पूर्ण भरतीचें पाणी कोठपावेतों येतें तें पाहून त्याप्रमाणें लेव्हल्स घ्याव्या व बांध घालण्याची नक्की दिशा नकाशावर दाखवावी.

बां ध घा ल णें.—बांधाची रुंदी व उंची किती ठेवावयाची वगैरे गोष्टी भरतीचें पाणी किती उंचीपर्यंत पोंचतें, लाटा जोराच्या अगर कमजोराच्या असतात; यावर अवलंबून असतात लाटा जोरानें धडकत असल्यास बांधाची रुंदी जास्त ठेवावी लागते, कारण तशी न ठेविल्यास बांध वाहून जाण्याचा संभव असतो. साधारणपणें बांधाची तळची रुंदी १८ फूट व वरची ६ फूट असावी व तसेंच उंचीहि ६ फूट असावी. बांधाला खाडीकडील बाजूला जास्त उतार दिल्यास माती वाहून जाण्याचा संभव कमी असतो.

बांध असा आंखावा कीं त्यांत लहानमोठीं खाड्यांचीं टोंकें येऊं नयेत व भरतीचें पाणीहि खारींत फार वेळ राहूं नये. बांधाची लांबी मात्र बऱ्याच अंशीं जमिनीच्या ठेवणीवर अवलंबून राहील, व मध्यें खाडी आल्यास बांधास वळण द्यावें. असें करणें शक्य नसल्यास खाडीचीं मध्यें आलेलीं खोलगट तोंडें मातीनें भरून काढावींत. बांध घालणें सुरू करण्यापूर्वीं दोरीनें लाइन मारावी व बांधापासून सुमारें २५ ते ३० फुटांच्या अंतरावर दहावीस फुटांचे औरस चौरस खाड करून पेंडसानें (खणण्याचें हत्यार) चिखलाचे गोळे काढून ते आखलेल्या ठिकाणीं टाकून ते पायानें सारखे तुडवावे व ह्याच पद्धतीनें बांध पुरा करावा.

ओहटीच्या वेळीं कोरडया होणाऱ्या मोठया खाडीच्या भागांत खार पाडण्याचा असल्यास बांध घालण्याचें काम महिन्याच्या पहिल्या व दुसऱ्या पंधरवड्यात षष्ठीपासून द्वादशीच्या आत केलें पाहिजे कारण या तिथींत आमावस्येपौर्णिमेच्या ताणाइतकें पाणी चढत नाहीं.

मोठ्या व उथळ खाड्यांना बांध घालण्यापूर्वी पाया दगडांनीं भरून काढावा. हे धोंडे काढतानां खालची रुंदी अजमासें चार फूट ठेवावी व वर चढवितांना पाण्याच्या बाजूला थोडा ढाळ द्यावा व वरची दगडाची रुंदी दोन फूट असली तरी बस्स होते. असे धोंडे टाकून मग चिखलाचे गोळे टाकिल्यास पाण्यानें माती वाहून जात नाहीं. नंतर, त्याला लागूनच तिवरीचें (खाऱ्या पाण्यात होणारें एक झाड) अगर वेळूचें कुंपण करावें व ताण येण्यापूर्वीं बांध घालण्याचें काम पुरें झालें नसल्यास जागजागीं सुमारें चार फूट रुंदीची जागा ठेवून द्यावी. धोंडे टाकून झाल्यावर चिखल टाकण्याचें काम दोन्ही बाजूंनीं सुरू करावें. चिखलाचे खड्डे मात्र बांधापासून ५० फूट अंतरावर असून दोन फुटांपेक्षां खोल करूं नयेत. केव्हां केव्हां मातीनें पोतीं भरून बांधाच्या दोन्ही बाजूंला त्यांची भिंतीसारखी एकावर एक ठेऊन थडी मारितात व त्यांमध्यें मातीचे गोळे टाकतात. हे गोळे पोत्यांच्या आधारामुळें विरघळत नाहींत व पाण्यातील काम भरती आली तरी फकट जात नाहीं. आतांपावेतों उथळ पाण्यात बांध घालण्याबद्दल विचार झाला. परंतु ज्या खाडींत आठ पासून दहा फूट खोलीचें नेहमीं पाणी राहतें तेथें बांध घालणें झाल्यास पूर्वीं वर सांगितल्याप्रमाणें धोंडे टाकून शिवाय मोडक्यातोडक्या होड्या घेऊन त्यात माती, धोंडे भरावे व त्या आंखलेल्या लाईनीवर ठेऊन द्याव्यात. अशा रीतीनें बांध भरून काढिला म्हणजे टाकिलेला चिखलाहि पाण्यात विरघळत नाहीं व बांधहि मजबूद होतो.

बांध घातल्यानंतरचें काम पावसाचें पाणी काढून देण्याकरिता मोऱ्या करणें हें होय. मोऱ्या किती व कोठे ठेवावयाच्या हें जमिनीच्या ठेवणीवर अवलंबून राहील त्याचा आकार जमिनींतील पाणी सर्व निघून जाईल एवढा असावा कारण जास्त वेळ पाणी राहिल्यास जमीन दलदलीत होऊन बांधहि पाण्याच्या जोरानें जागजागीं फुटण्याचा संभव असतो. बांध एक वेळ फुटूं दिल्यास पिकाचा अतोनात नास होतो व बांध नीट करण्यास बराच खर्च येतो.

ज्या ज्या ठिकाणीं जमिनींतील पाण्याचा आपोआप निकाल होतो तेथेंच मोऱ्या ठेवाव्यात. दीनानाथखारींतील बऱ्याच वर्षांच्या अनुभवावरून असें ठरतें कीं, मोऱ्यांना झडपें लावावयाचीं तीं आपोआप उघडणारीं असलीं पाहिजेत. तीं अशीं असलीं म्हणजे भरतीच्या पाण्यानें बंद होतील व पावसाळ्यांत डोंगरातील पाण्याच्या लोंढ्यासरशीं तीं सहज उघडूं शकतील. झडपाचा आकार ४॥ फूट लांब व ३॥ फूट रुंद असा असावा. त्याना वरच्या बाजूला बिजागरें लावून तीं पडतीं ठेवावीं. अशी तजवीज केल्यास स्क्रूच्या उघड्या(दारें)साठीं जसीं पावसाळ्यात मुद्दाम उघडझांप करण्यासाठीं मनुष्य ठेवावा लागतो, तसा ठेवण्याची जरूरी नाहीं. खारींच्या बांधाला स्क्रूचीं झडपें ठेविलीं व त्यांवरील रखवालदार एखाद्यावेळीं हजर न राहिला किंवा त्यानें पुराच्या वेळीं आळस केला तर जागजागीं बांध फुटून जाऊन सर्व खारीचा नाश होण्याचा संभव असतो. परंतु आपोआप उघडझापाचे दार ठेविल्यास असें नुकसान होणें संभवनीय नाहीं. मात्र ह्या दाराची चौकट बिजागरें वगैरे मजबूद करून ती

मजबूत कॉंक्रीटांत बसवावी .नाहींपेक्षां खाम लेचेपेचें असल्यास पावसाच्या पाण्याच्या जोरानें सहज निघून जाईल. अशा दाराला वार्षिक खर्च सुमारें एक दोन रुपये येतो. तो फक्त वर्षांतून एक वेळ डांबर लावण्याचा होय. बांध व मोऱ्या बांधून झाल्यानंतर पुढचें काम म्हणाल तर, मोठया बांधाच्या आंतल्या बाजूला सुमारें १० ते १५ फूट अंतरावर आणखी एक लहानसा सुमारें खालीं ३फूट व वर १॥ फूट रुंदीचा व सुमारें २ ते २॥ फूट उंचीचा बांध घालणें होय. ह्या बांधाच्या योगानें भरतीचें पाणी जरी थोडया-बहुत प्रमाणानें मोठया बांधांतून झिरपून आत आलें तथापि तें सुधारलेल्या जमिनींत येण्याचा संभव या बांधाच्या योगानें अजीबात नाहींसा होतो. हें भरतीचें पाणी आंत आल्यास पुनः जमीन खारट बनते.

खा च रें पा ड णें.—यानंतर जमिनींतील तिवराचीं झाडें तोडून काढून पीक करण्याचें असेल त्या मानानें खाचेचे लहान लहान चौकोनी तुकडे पाडावे. ही जमीन पिकाला लायक होण्यास दोन तीन वर्षें लागतात. कारण पाण्याची वाफ होतांना जे मिठाचे बारीक कण रहातात ते सर्व पीक करण्याच्या पूर्वी पावसाच्या पाण्यानें धुवून जाणें अवश्य आहे. नवीन काढलेल्या जमिनींत जर बरेच खोल खाड्यांच्या पाण्यानें खाचखळगे झालेले असतील, तर ते भरून काढून जमीन सारखी करणें जरूर आहे. अशा खोलगट जमिनींत सुमारें शंभर शंभर फुटावर लहान लहान बांध घालावेत म्हणजे पावसाळ्यात पाण्याबरोबर जी खळमळ वाहून येते ती यात बसते व थोडक्याच वर्षांत ही जमीन भरून येऊन बाकीच्या जमिनीसारखी होते. उलट या खळमळीनें ती जास्तच सुपीक होते.

लागवड—अशा या सुधारलेल्या जमिनींत कांहीं वर्षेंपावेतों खारें भात पिकवितात. याचें तूस खारट लागतें व आतील तांदूळ तांबड्या रंगाचा असतो. अशा जमिनींत कांहीं वर्षें जमिनीची नांगरट न करताहि पिकें घेता येतात. पुढें पुढें या जमिनींत गोडें भातहि पिकूं लागतें. यात भाताचा पेरा पावसाळा सुरू होण्यापूर्वी हातानें बी फेंकून अगर रोहू करून तो दोन तीन चांगले पाऊस झाल्यावर फेंकितात; परंतु जास्त वहिवाट रोहू करून पेरण्याचीच आहे. पेरिल्यानंतर भाताची निगा करणें म्हणजे पिकांतून तण उपटून काढणें व बांध फुटून बाहेर पाणी न जाऊं देणें ही होत. कांहीं लोक पावसाळा सुरू झाल्यावर तण मारण्याकरिता नांगरट करितात. परंतु असें करण्यापासून फायदा न होता कित्येक प्रसंगीं उलट तोटाच होतो. कारण खालीं असलेलें मीठ वर येतें व तें जमिनींत मिसळून पिकाला अपायकारक होतें. निदान पहिलीं कांहीं वर्षें तरी नांगरटीच्या भानगडींत पडूं नये. जास्त पाणी झाल्यास तें मात्र बाहेर काढून टाकण्याची खबरदारी घेतली पाहिजे. अशा जमिनींत रोप करून लागण करीत नाहींत.दाट झाल्यास तें पातळ करून जेथें नागे असतील तेथें भरून काढितात. पीक तयार झाल्यावर त्याची कापणी, मळणी, उपसणी वगैरे नेहमीप्रमाणेंच करितात. सरासरी मानानें दर एकरी उत्पन्न २०फरे किंवा १खंडी होतें. बाजार भाव मुड्यास (१ मुडा = २५फरे) गेल्या दहा वर्षांत ३८ रुपयांपासून ५७ रुपयेपावेतों होता. व त्या वेळीं गोड्या जाड्या भाताचा भाव ४८ पासून ६० रुपये होता.

जमिनीची स्वाभाविक रीतीनें सुपीकता वाढवी म्हणून दर तीन वर्षांनी भातखाचरांत सुमारें सहा सहा फूट अंतरावर एक एक घनफुटाचे खाडे पाडावे. असें केल्यानें पावसाळ्यात डोंगरांतील पाण्यात येणारें खळमळ या खड्ड्यांत बसतें व जमिनीचा खत घातल्याशिवाय मगदूर वाढतो.

खाचरातील जमीन कांहीं वर्षांनीं सुधारते व ती गोड झाल्यावर चांगल्या जातीचें भातहि तींत पिकूं लागतें. जमीन गोड झाल्यावर तींत नारळ व आंब्याचीं झाडेंहि होऊं शकतात. परंतु यांनां गोड्या पाण्याची जरूरी आहे. तशी विहिरीची वगैरे सोय नसल्यास पावसावर होणाऱ्या भाताच्या पिकावर अवलंबून रहावें लागतें. खारींत भातच पिकणें असल्यास कुदळ, व पहार खेरीज करून बाकी दुसऱ्या आउताची किंवा बैलाची जरूरी पडत नाहीं.

खार पाडण्यात यश अपयश येणें हें सर्वस्वी बाहेरील बांधाच्या बांधबंदस्तीवर अवलंबून असतें. बांधाची दुरुस्ती निदान दोन तीन वर्षांनीं बांधाच्या बाहेरील बाजूला व वर नवीन चिखल घालून करावी लागते. व तो पावसात धुवून जाऊं नये म्हणून वर गवत, कचरा वगैरे घालण्याची खबरदारी घ्यावी. अशा दुरुस्तीला दर ५० फुटास सुमारें अर्धाच रुपये खर्च येतो. याशिवाय दर अवसेपोर्णिमेला थोडीशी दुरुस्ती करावी लागते. कारण खेकडे व इतर प्राणी बांधात भोंकें पाडतात व तीं मोठीं झालीं म्हणजे बांधातून पाणी पाझरूं लागतें व कित्येक प्रसंगीं बांधहि फुटतो. खेकड्यानें पाडलेल्या भोंकाला नेऊर असें म्हणतात. ह्या नेऊरांत पेंढा दडपून वर चिखल लाविला म्हणजे पाणी जाण्याचें बंद होतें. बांधाची आतील बाजू कांहीं वर्षांनीं गवत व इतर झाडझुडुपें आपोआप वाढून सुरक्षित रहाते. परंतु बाहेरील बाजू धुपून जाऊं नये म्हणून कांहींतरी उपाय केला पाहिजे. ज्या ठिकाणीं, तिवरांसारखीं झाडें आपोआप होत नाहींत तेथें तीं मुद्दाम लाविलीं पाहिजेत. केव्हां केव्हां अशा ठिकाणीं दगडांनीं बांधून काढितात, परंतु हें फार खर्चाचें काम आहे. बांधाच्या वरच्या बाजूचा बचाव व्हावा म्हणून गवत लावून त्याला खाचरातील माती द्यावी म्हणजे ते जोरानें वाढेल.

एकंदरींत खाऱ्या जमिनी वेळेवर पाऊस पडल्यास मोठ्या फायदेशीर आहेत. मात्र बांधाची चांगली व वेळेवर दुरुस्ती करून काढलेल्या खारींत पुन्हा खारें प्राणी शिरणार नाहीं अशी खबरदारी घेणें अवश्य आहे. [सुंदरराव दिनानाथ नवलकर यांनीं पाठविलेल्या माहितीवरून]

खारल—पंजाबांतील एक शेतकरी जात. हे सर्व मुसुलमान आहेत. लो. सं. (१९११) ३४,८५५. हे मुख्यतः मॉन्ट गॉमरी, मुलतान, झग, लाहोर व फेरोजपूरजिल्हे व भावलपूर संस्थान यांत आढळतात. ते रजपूत लोकांचे वंशज आहेत हें स्पष्ट दिसतें. वायव्य सरहद्दप्रांतांतहि वीस हजारावर खारल आहेत.

खारवा—खारवी. मुंबई इलाख्यातील एक जात. एकंदर लोकसंख्या (१९११) ४५,२८६. कच्छ, कांठेवाड, खंबायत, गुजराथ, ठाणें व मुंबई येथें हे लोक आहेत. यांना "खारपाटील" अशीहि एक मानाची पदवी आहे. आपण रजपूत आहों असें हे म्हणतात. हे नावाडी असून यांची सर्व हिंदुस्थानभर उत्तम पूल बांधणारे म्हणून ख्याति आहे. मुंबई व गुजराथमधील शहरात व खेड्यात घरें शाकारण्याचें बहुतेक काम जवळ जवळ हेच करतात. याच्या बायका काथ्याच्या दोऱ्या व मासे विकतात. याचे (१) रजपूत, (२) कोळी, (३) खंबाइती, (४) हानसोटी, (५) सुरती व (६) भडोची असे सहा पोट भेद असून त्यामध्यें बेटीव्यवहार होत नाहीं. रजपूत खारवाच्या चालीरीती रजपुताप्रमाणें आहेत. कोळी खारवी हे दक्षिण काठेवाड किनाऱ्यावरचे याच लोकाचे वंशज असून याच्या चालीरीती कोळी लोकाच्या प्रमाणेंच आहेत. इतर चार पोट भागांतील लोकाचीं नावें रहाण्याच्या ठिकाणावरून पडलेलीं आहेत. मुलामुलींच्या लग्नासंबंधीं नियम नाहींत; तरी मुली वयात आल्यानंतर लग्न करणें त्यांना पसंत नसते. मुलाचा बाप मुलीबद्दल ३० रु किंमतीचे दागिने देतो. होमाभोंवती प्रदक्षिणा घालणें हा लग्नातील मुख्य भाग समजला जाऊन, या संस्काराला ते "मंगलफेरो" असें नाव देतात. विधवाविवाह प्रचलित आहे परंतु तो बहुधा दिराशीं होतो. घटस्फोटाची चाल आहे. हे मास खातात व दारूहि पितात. अंबाजी, बहुचरा व हरसाद या देवींची ते मुख्यत्वेंकरून पूजा करितात. सुरतमधील खारवा लोकाच्या दोन तऱ्हेच्या पंचायती आहेत. समस्त नांवाच्या पंचायती स्थानिक आहेत. चोरासि पंचायती ह्या खेड्याच्या प्रतिनिधींच्या सार्वजनिक संस्था आहेत. सामाजिक खटल्यांचे निकाल पटेल देतो. अपराधाबद्दल १० रु. वर दंड होत नाहीं. परंतु दंड न दिल्यास जातीबाहेर टाकिलें जातें. जातीबाहेर टाकलेल्याना जातींत घ्यावयाचें असल्यास ३॥ रु. दंड भरावा लागतो. काठेवाड खारवांमध्यें कायमच्या मध्यवर्ती पंचायती असून त्यांमध्यें २–५ सभासद असतात. दंड पंचायतीच्या मुख्य अधिकाऱ्या कडे ठेवले जाऊन जातजेवण व धर्म याकडे ते खर्चिले जातात. पोरबंदर खारवा हे सर्वांत श्रेष्ठ समजले जाऊन, सर्व महत्वाचे खटले पोरबंदर येथील पंचायतीकडे येतात. या पंचायतीचे निकाल कायम समजले जातात व काठेवाडमधील सर्व खारवे लोक त्यांना मान देतात

खाराघोडा—मुंबई इलाख्यातील अहमदाबाद जिल्ह्याच्या विरमगांव तालुक्यांतील एक खेडेंगाव. कच्छाच्या रणाच्या सरहद्दीवर हें वसलेलें आहे. इसवी सन १८७५ साली खाराघोडा येथें एक मिठागर उघडण्यात आलें. पण मिठाची वाढती मागणी होऊं लागल्यामुळें १८८१–८२ मध्यें खाराघोडापासून ६ मैलावर ऊरू या गांवीं बरींच मिठागरें उघडण्यांत आलीं. १९०४–५ मध्यें खाराघोडा व ऊरू येथें २५,४५,५२१ मण मीठ तयार झालें व २३,१३,९६५ मण विकले गेलें. खाराघोडा येथें दोन असिस्टंट कलेक्टर असून त्यांच्याकडे या मिठागराची देखरेख करण्याचें काम आहे. या शहरामध्यें एक दवाखाना, एक लायब्ररी, एक धर्मशाळा व एक मार्केट अशा इमारती आहेत. शहराच्या उत्तरेस एक मैल अंतरावर असलेल्या तलावातून शहराला पाणीपुरवठा केला आहे.

खारान—बलुचिस्तानांतील कलात संस्थानाचा एक अर्धवट स्वतंत्र जातीचा मुलुख. याचें क्षेत्रफळ १४,२१० मैल आहे. हा मुलुख उंचसखल असून ईशान्येस समुद्रसपाटीपासून २५०० फूट व पश्चिमेस १६०० फूट उंच आहे. याच्या उत्तरेस रासकोटचा डोंगर, दक्षिणेस सिपाहान डोंगराचा राग व पूर्वेस गरचा डोंगर असून पश्चिमेस पर्शियाची व याची सरहद्द एकच आहे. या प्रदेशातून बदो व माल्केल या नद्या वहात गेल्या आहेत. या नद्याच्या काठच्या जमीनी लागवडीला योग्य आहेत. तसेंच डोंगराच्या पायथ्याशीं असलेली बरीचशी जमिनीहि लागवडीस योग्य आहे असें असलें तरी एकंदरीत हा मुलुख पडीकच आहे असें मानण्यांत येतें व त्यात बरेंच तथ्यहि आहे. कारण वरील लागवडीला योग्य असलेल्या थोड्याशा टापूशिवाय बाकीचा सर्व प्रदेश वालुकामयच आहे. बदो व माल्केल या दोन नद्याखेरीज गर्रक अथवा सराफ व कोरकान या दोन लहान नद्या या प्रदेशांतून वहात गेल्या आहेत. येथील हवा कोरडी पण आरोग्यदायक आहे. उन्हाळ्यात दिवसा फार उकाडा होतो पण रात्रीं थंडी पडते. या प्रदेशात फारच थोडा पाऊस पडत असून तो जानेवारी ते मार्चच्या मध्यंतरी पडतो.

१७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंतचा या प्रदेशाचा इतिहास अज्ञात आहे. यावेळीं खारानचा नौशेरवाणी संस्थानिक इब्राहिमखान कंदाहारच्या खिलजी घराण्याचा मांडलिक होता १७३४ त खारानच्या पुरदिल खानावर नादिरशहानें खरी केली. या काळांत खानारचा किर्मानमध्यें समावेश होत असे. पहिल्या नासीरखानानें हा मुलुख किलातच्या अमलाखालीं आणिला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकाळात खारानच्या अझादखानाला अफगाणिस्तानच्या हातात जावें लागलें. नंतर खानार ब्रिटिशांच्या संरक्षणाखालीं आलें. संस्थानिकाला दरसाल६०००रु.देण्यांत येतात. त्याशिवाय डोईपट्टी, जनावरपट्टी, दंड, बेवारसी संपत्ति वगैरेंचें

उत्पन्न त्याला मिळतें. सैन्य व पाहुण यांवर मोठा खर्च होतो. खारानांत वस्ती सुमारें २२००० आहे. बहुतेक लोक भटके आहेत. कायम गांवें सुमारें २० असून शहर—इ—कारेझ किंवा खारान कलात हें मुख्य ठिकाण आहे. मुख्य भाषा बलुची आहे. पुराच्या पाण्यावर कोरडवाहू शेती होते. खजुरांचीं झाडें पुष्कळ होतात. शेळयामेंढ्या, लोकर व तूप हा निर्गतीचा माल आहे.

खारिया—एक जंगली जात. कोलजातीची ही एक शाखा आहे. यांची वस्ती बिहार ओरिसांत सुमारें एक लाख आहे. बंगाल, आसाम, मध्यप्रांत यांतून प्रत्येकीं दहा पंधरा हजार आहे. हिंदुस्थानातील एकंदर १,४८,३५८(१९११) खारियांपैकीं ९७,६०१ हिंदु व बाकीचे वन्यधर्मीय आहेत. खारिया शब्दाची व्युत्पत्ति खरखरी म्हणजे पालखी या शब्दापासून झाली असावी असें हिरालाल (कास्ट्स अँड ट्राइब्स इन सी. पी.) म्हणतात. उडिया देशांत पालखी उचलणाऱ्या ओरावन लोकास खारियाच म्हणतात. व खरखरी याचाच अपभ्रंश खारिया झाला असावा असें वाटतें. हे लोक स्वतःला वडील भावाची संतति म्हणवितात व मुंडा लोक धाकट्या भावाची संतति आहे असें म्हणतात. व नागवंशी राजाच्या घरात हे प्रवेश सुद्धां करीत नाहींत. कारण त्यांच्या राण्या या यांच्या धाकट्या भावजया आहेत म्हणून यांनीं परस्परांचें तोंड पाहतां कामा नये. मुंड लोक मात्र यांच्या बरोबर अनुलोमसंबंध करतात. रिस्ले म्हणतो कीं, खारिया लोक मुंडालोकास वडील बंधु म्हणतात. बिहार ओरिसांत यांच्यात दोन पोटजाती आहेत. गोमांस खाणारे (चोट गोहंडी) व न खाणारे (बार गोहंडी) यांच्यांत एक कर्तोह असून तो बहिष्कृत खारियांना प्रायश्चित्त देऊन जातींत घेतो. बायकांनीं पुरुषाच्या कामाला मुळींच शिवावयाचें नाहीं. जर एखादी बाई नांगराला शिवली तर तिला नांगराला जोडून कांहीं पावलें नांगर ओढावयास लावितात. घरमालकाच्या वयांत आलेल्या मुलीनें किंवा बहिणीनें गोठयांत सुद्धां जावयाचें नाहीं. यांच्या जातींत निरनिराळ्या देवकांचीं अनेक कुलें आहेत. जसें कुलू (कांसव), किरो (वाघ), नाग, कंकुल (चित्ता), कुटो (मगर) इत्यादि. हीं कुलें आपापल्या देवकाच्या प्राण्यांचा घात कधीं करीत नाहींत. एकाच देवकाच्या लोकांत लग्नें जरी मना आहेत तरी कधीं कधीं होतातच. भावाच्या मुलीनें बहिणीच्या मुलास वरावें पण भावाच्या मुलानें बहिणीची मुलगी करूं नये. लग्नें बहुधा मोठेपणींच होतात. बारा बैलांचें शुल्क वधूस पूर्वी द्यावें लागे. पण यांची स्थिति आतां खालावलेली असल्यामुळें आतां १२ बैलाच्या कणकीच्या प्रतिमा करून पानावर ठेऊन वधूपक्षाकडे पाठवितात. वधूपक्ष दोन प्रतिमा सोडून १० परत करतो. गरीब लोक फक्त चारच रुपयावर दोन बैलांचें काम भागवतात. पुरुष मिरवणुकींत भाग घेत नाहींत. वराच्या ढेन्हाच्या (आतेच्या नवऱ्याच्या) खांद्यावर बसून वधू येते. वर तिला सामोरा जातो; तिला स्पर्श करतो व दोघेहि नाच करतात. वर नांगराच्या जुवावर उभा राहतो व वधू पाटयावर उभी राहते. व ढेन्हा त्यांच्याभोंवती आंब्याच्या पानानें पाणी शिंपीत ७ प्रदक्षिणा घालतो. हा लग्नाचा विधि होय. वधूवरास रात्रीं एका खोलींत एकांत करूं देतात. सकाळीं वधू नवऱ्याचे कपडे धुण्यास नदीवर जाते. ती परत आली म्हणजे कोंबडा बळी देऊन त्याच्या रक्ताचे दोन थेंब हळदीच्या पाण्यांत टाकून पितात. मग एक बकरा मारून त्याच्या रक्तात पाय भिजवून वधूवर घरात शिरतात. कोणत्याहि बाईनें वडील दिरास स्पर्श करूं नये व त्याचा स्वयंपाकहि करूं नये अशी चाल आहे. विधवाविवाह जातीला एक भोजन घातल्यानें व विधवेच्या कुटुंबांतल्या माणसास कांहीं पैसे दिल्यानें होतात. विधवेबरोबर तिचीं पहिलीं मुलें नव्या नवऱ्याकडे आलीं तर त्याच्या संपत्तीचा अर्धा वांटा त्यांस मिळतो. घटस्फोटाची जरी चाल आहे तरी व्यवहारात ती फारशी रूढ नाहीं. यांचा 'बंद' नांवाचा पूर्वज जातिदेव आहे. या लोकांनीं गोमांस खाणें सोडलें आहे. पूर्वी हे माकडें खात व टोपनोकुल जात अद्याप खाते. जर न्हावी किंवा धोबी यानें यांचे कपडे धुतले तर यांस बहिष्कार होतो. हिंदूलोक यास नीच समजत म्हणूनच यानींहि त्यास प्रत्युत्तर देण्याची ही पद्धति काढिली असेल. कायस्थ, मुसुलमान, कोष्टी व न्हावी यांची पालखी नेण्यानें किंवा ताबूत उचलण्यानेंहि बहिष्कार होतो.

यांच्या जातीच्या मुख्यास परधान म्हणतात. त्याच्या मदतगारास नेगी म्हणतात व बातमी पोंचविणार गांड असतो. परधान नेहमीं सामर कुलाचा असावा, नेगी सुमेर कुलाचा व गांड बर्हो कुलाचा असावा. परधानानें प्रायश्चित्तविधींत पतितास पाणी देऊन शुद्ध करावें, नेगीनें भोजनाची व्यवस्था करावी व गांडानें सर्वांस निमंत्रण करावें. याशिवाय द्रव्यदंड देखील घेतात व त्याचा अर्धा भाग जातींतल्या लोकास मुर्‍ा लाह्या सकाळीं घराच्या वाटेवर पुरण्यास देतात व अर्धा भाग परधान, नेगी व गांड लोक वाटून घेतात. पुरुष आपले केस उजवीकडे बांधून ठेवतात व बायका डावीकडे बांधून ठेवतात. यांचें नृत्य फारच मनोरंजक असतें. लग्नप्रसंगीं नृत्यांत स्त्रीपुरुष संगासंबंधीं अश्लील गाणीं म्हणतात व अभिनय करतात. त्या नृत्यातून वधूवरास त्यांचे दोन मित्र पाठीवर बसवून फिरावतात. यांचे नृत्य फार जोरदार व उल्हास उत्पन्न करणारें असतें. यांची भाषा मुंडर भाषेशीं संबद्ध आहे. पण आता ती फार जलद नष्ट होत आहे. यांची लिपीहि होती. [रसेल व हिरालाल; सेन्सस रि. (१९११) पु. ५].

खार्टुम—आंग्लो-इजीप्शियन सुदानची राजधानी. हें शहर ब्ल्यू नाइल व व्हाइट नाइल यांच्या संगमावर आहे. हें

पोर्ट सुदानच्या नैर्ऋत्येस आगगाडीनें ४३२ मैल आहे व कायरोच्या दक्षिणेस आगगाडीनें व आगबोटीनें १३४५ मैलांवर आहे. याची लो. सं. १९०७ मध्यें ६९३४९ होती.

या शहराची माडणी फार सुंदर आहे. बगीच्यांनीं व तालवृक्षांनीं वेष्टिलेल्या दगडी व विटांच्या इमारतींनीं शहराला फार शोभा आणली आहे. किल्लयापुढील मैदानाच्या मध्यभागीं गव्हर्नर जनरलचा राजवाडा आहे. ही भव्य इमारत तिमजली आहे. इमारतीच्या पुढच्या अंगास गॉर्डनचा ब्रॉंझ धातूचा उंटावर बसलेला पुतळा आहे. इमारतीच्या पूर्व बाजूस सुदानक्लब, लष्करी दवाखाना व गॉर्डन मेमोरियल कॉलेज इत्यादि इमारती आहेत. या ठिकाणीं अँग्लिकन चर्च, ग्रीकचर्च व आस्ट्रियन रोमन कॅथोलिक मिशन इत्यादि धर्मसंस्था आहेत.

खार्टुममधील लोकसंख्या संमिश्र प्रकारची आहे. जेवढे म्हणून व्यापारी आहेत तेवढे सारे ग्रीक लोक सीरिअन व कॉप्ट लोक आहेत. सुदानमधील सर्व राष्ट्रजातींचे निग्रो व अरब रहिवाशी हे प्रतिनिधी होत असें म्हटलें तरी चालेल.

ईजिप्तनें सुदान काबीज केलें त्यावेळीं खार्टुम हें एक लहानसें खेडें होतें. १८२२ त ईजिप्शियनानीं तेथें कायमची छावणी बांधली. या छावणीचें पुढें खार्टुम शहर होऊन १८३० त तें सुदानच्या राजधानीचें शहर करण्यांत आलें. १८९८ त किचनेरनें महादींचा पराभव करून हें शहर घेतलें.त्यावरून त्याला खार्टूमचा किचनेर अशी पदवी मिळाली (' किचनेर ' पहा). ब्ल्यू व व्हाईट नाईल याच्या संगमाजवळील भूशीराच्या हत्तीच्या धडासारख्या आकारावरून या शहराला खार्टुम (अरबी = हत्तीचें धड) हें नाव मिळालें आहे असें म्हणतात.

खालपा—मुंबई इलाख्यांतील एक चांभार जात. लो. सं. ९३५८. भडोच, सुरत व रेवाकाठा येथें हे लोक आहेत. हे कातडीं कमावितात व चामड्याचीं कामें करतात. रजपुतांनां शूद्र जातीच्या स्त्रियापासून झालेली ही संतति आहे असें म्हणतात. यामध्यें ६ पोटभाग असून त्यामध्यें बेटीव्यवहार होत नाहींत. यांमध्यें रहाण्याच्या ठिकाणावरून कुळें झालेलीं आहेत परंतु यामध्यें रजपूत नांवेंहि आहेत.वयात येण्याच्या अगोदर मुलींचीं लग्नें केली जातात व मुलाचीं लग्नें ५ वर्षांपासून होतात. पुनर्विवाह व घटस्फोट हे यामध्यें आहेत. हे मास खातात व दारूहि पितात. भंगी, मांग व इतर अस्पृश्य जातींतील लोकांखेरीज इतर उच्च जातींचे लोक हे आपल्या जातींत घेतात. गारुड किंवा कलातिया ब्राह्मण यांचे धार्मिक विधी करतात. महार, मांग व भंगी यांच्या हातची पक्की रसई हे खातात. हे रामानंदी, कबीर, रोहिदास या पंथांचे असून यांचा वारसाचा कायदा हिंदूप्रमाणेंच आहे. सुरत जिल्ह्यातील खालपा लोकांच्या खेड्याचे वर्ग (चौरा) केले असून त्याच्या अधिकाऱ्यांपुढें सामाजिक व घरगुती प्रश्नांचे निकाल दिले जातात.चौरांच्या सभेंत ५ पंच निवडले जाऊन ते सबंध जातीशीं संबंध असलेल्या खटल्यांचे निकाल देतात. पंचांचे निकाल अखेरचे असतात. भडोच जिल्ह्यांत १७५ खेड्यांची एक मध्यवर्ती संस्था आहे. खेडा जिल्ह्यांतहि सुरत जिल्ह्यांतील संस्थांप्रमाणें संस्था आहेत. [एन्थोवेन].

खालसा-पंजाबांतील एक जात. लो.सं.१६६१०.खालसा हें नांव फार जुनें आहे. त्याचा अर्थ गुरुगोविंदसिंग यांचा खरा शिष्य असा होतो. परंतु पूर्वी हा शब्द शीखधर्माच्या निरनिराळ्या जातींच्या लोकाच्या धर्ममताला लावीत असत. अगदीं अलीकडे स्वतंत्र जात या अर्थी या शब्दाचा उपयोग होऊं लागला आहे. खालसा पंथी जातीबंधनें मानीत नसून सर्व शीख लोकांचा सामाजिक दर्जा सारखा करण्याकरितां झटत आहेत. आपल्या निरनिराळ्या जाती न सांगतां ते आपणांस खालसा म्हणवून घेतात. याचा परिणाम असा झाला आहे कीं त्यांची एक नवीनच जात बनली आहे. शीख होण्याच्या वेळेस प्रत्येक मनुष्यास असें सांगण्यांत येतें कीं,गुरु गोविंदसिंग हा तुझा बाप आहे,मायसाहेब दिवाण हा आई, पाटणासाहेब जन्मभूमि आणि सोधभान ही तुझी जात. शेवटल्या आज्ञेप्रमाणें हलक्या जातीचे कांहीं लोक आपणांस खालसा सोधभान जातीचे म्हणूं लागले आहेत.ही जात अजून लहान आहे. आणि तिच्या मताचा प्रसार फारसा नाहीं.

खालसा दिवाण—नवीन मुलूख जिंकून घेतला म्हणजे तेथील वसूल गोळा करण्यास मोंगल बादशहा ज्या अधिकाऱ्याची योजना करीत त्याला खालसा दिवाण म्हणत. फौजदाराकडे लष्करी बंदोबस्ताचें व पोलिसचें काम, व दिवाणाकडे फक्त मुलकी कारभार अशी कामाची विभागणी केलली असे. एका सुभ्यांत कित्येक फौजदार असत व त्या प्रत्येकाच्या मदतीस एक एक दिवाण असे. दक्षिण हिंदुस्थानांत अवरंगझेबानें जे दिवाण नेमले होते ते फौजदाराच्या मदतीनें परगण्यांच्या (तालुक्याच्या) निरनिराळ्या देशमुखांनां किंवा देसायांना जमिनी इजाऱ्यानें देऊन मग त्याच्यापासून वसूल गोळा करीत असत [ग्रांटडफ. व्हॉ.१].

खाल्डिया—खाल्डिया व खाल्डियन हीं नांवें जुन्या करारांत बाबिलोनिया व बाबिलोनियन लोक यांच्याऐवजीं वारंवार योजिलेलीं आढळतात. खाल्डिया हें खरोखर एका देशाचें नांव असून तें द्व्यर्थी योजतात. एका अगदीं दक्षिणेकडील देशाला हें नांव लावीत. याची राजधानी बितयकीन असून तें प्रसिद्ध खाल्डियन बंडखोर मेरोडक बलादन याचें मुख्य निवासस्थान होतें. खाल्डियनांचा प्रदेश नक्की कोणता हें आज ठरवितां येत नाहीं. तरी पूर्वी निरनिराळ्या वहात असलेल्या तैग्रीस व युफ्रेटिस नद्यांच्या मुखाजवळच कोठें तरी हा अथांग प्रदेश असावा.

असीरियन राजा तिसरा रम्मानिरारी (ख्रि. पू ८१२ ते ७८३) याच्या वेळेला ' मतकाल्डू ' ही संज्ञा सर्व बाबिलोनियाला लावीत. बाबिलोनियन या खाल्डियन लोक

यांच्या वंशांतील फरक बरेच दिवस मानिला जात असे. त्याचप्रमाणें सेनाचेरिब (ख्रि. पू. ७०५–६८१) खाल्डियन लोक व अरब लोक आणि आर्मेनियन लोक यांच्यामध्यें फरक मानीत असे. असिरियाचा र्‍हास व नव–बाबिलोनियाचा उदय ज्या काळांत झाला त्या काळीं ' मत काल्डू ' हें नांव अखिल बाबिलोनियालाच लावीत असें नव्हे तर कांहीं परकीय राष्ट्रांनांहि या नांवाखालीं ओढीत. एझेकीलांत (२३.२३) या राष्ट्रांचा खाल्डियांत समावेश केलेला आहे.

खाल्डियन हे बहुतेक सेमिटिक वंशाचे लोक असावेत. अरबस्तानांतून आल्यानंतर त्यांनीं उरच्या जवळपास वसाहत केली असावी. हे लोक इतर सेमिटिक बाबिलोनियन लोकांवर हल्ले करून त्यांचे प्रदेश बळकावूं लागले. शेवटीं नॅबोपोलासर व त्याचा मुलगा यांच्या आधिपत्याखालीं खाल्डियन साम्राज्याचा उदय झाला. नेबोपोलासर हा स्वतः खाल्डियन होता किंवा नाहीं याची शंका आहे. तरी पण त्याचा मुलगा नेबुचद्रेझर याच्या अमलाखालीं खाल्डियन व बाबिलोनियन या भिन्नवंशीय लोकांचा पूर्ण मिलाफ झाला असावा. शिवाय खाल्डियन लोकांची भाषा सामान्य सेमिटिक बाबिलोनियन वाकप्रचारापेक्षां फारशी निराळी नव्हती. तेव्हां पुढील काळात ' खाल्डियन ' ही संज्ञा ' बाबिलोनियन ' या अर्थी उपयोजिण्यांत आली असल्यास नवल नाहीं.

खाल्डियन शब्दाची उपपत्ति अनिश्चित आहे. क्सेनोफोन ज्या काळ्या समुद्रावरील लोकांनां खाल्डियन म्हणतो ते व बाबिलोनियांतील खाल्डियन एक नाहींत. डॅनियल मध्यें व त्याचप्रमाणें हिरोडोटस, स्ट्रॅबो यांच्या ग्रंथांत खाल्डियन शब्द ' ज्योतिषी ' या अर्थानें योजीत. डॅनियलमध्यें हा शब्द दोन अर्थांनीं वापरला आहे. बाबिलोनियन लोकांबद्दल एक व दुसरा म्हणजे विशेष प्रकारचे अथवा सर्व सामान्य जादूगार या अर्थी. बॅबिलोनियन व खाल्डियन हे एकत्र झाल्यावर सुद्धां खाल्डियन हा शब्द ' ज्ञाते ' या अर्थानें योजीत. दक्षिण बाबिलोनियांतील उपाध्याय ' खाल्डियन ' या नांवानें प्रसिद्ध असून त्यांनां सर्व मोठमोठ्या शहरीं जावें लागे. पुढें बाबिलोनियांतील भिक्षुक वर्गाला हें नांव सामान्यतः लावूं लागले [' बाबिलोनिया ' पहा].

खाल्डून—(१३३२–१४०६) एक अरब इतिहासकार. याचें संबंध नांव अबुझइद इब्न महंमद इब्न महंमद खाल्डून होतें. हा ट्यूनिस येथें जन्मला. त्यानें अनेक विषयांचें अरबी भाषेवरून शिक्षण मिळविलें. वयाच्या विसाव्या वर्षी मारिनिड सुलतान अबु इनान याच्या हाताखालीं त्याला फेझ येथें नोकरी मिळाली. पण लवकरच त्याच्यावर कटाचा आरोप येऊन त्याला कैदेंत ठेवण्यांत आलें. सुलतान मरण पावल्यावर त्याची सुटका झाली व त्यानें सुलतान अबुसालेम याची चांगल्या प्रकारें नोकरी केली; पण मुख्य प्रधानाचा त्याजवर रोष झाल्यामुळें त्यानें स्पेन देशांत जाण्याची परवानगी मिळविली; स्पेनमध्यें असतांना राजाची अत्यन्त कृपा संपादन केल्यामुळें वजिराच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला व त्यास आफ्रिकेंत जावें लागलें. आफ्रिकेंत बोगीचा सुलतान अबु अबदल्ला यानें त्याचें प्रेमानें स्वागत केलें. अब्दल्ला पदभ्रष्ट झाल्यावर इब्न खाल्डून यानें जंगली अरबांचें सैन्य उभारलें व तो सुलतान स्लेमकेन याजजवळ नोकर राहिला. यानंतर कांहीं वर्षांनीं अब्दुल अझीज यानें सुलतानाचा पराभव करून इब्न खाल्डून यास कैद केलें. नंतर एका मठांत जाऊन तेथें तो अनेक विषयांचा अभ्यास एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणें करूं लागला. अब्दुल अझीजच्या मरणानंतर तो फेझ येथें राहूं लागला. इ. स. १३७८ सालीं तो ट्यूनिसच्या सुलतानाजवळ नोकर राहिला; तेथें त्यानें फक्त आपला अभ्यासक्रम चालूं ठेवून बर्बर देशाचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ केला. पण लवकरच त्यानें येथून मक्केस जाण्याची परवानगी मिळविली व वाटेंत त्याला कायरो येथें मलकाइट पंथाचा कादि करण्यांत आलें. या अधिकारावर असतांना त्यानें आपलें काम चोखपणें बजाविलें; याच वेळीं त्याची बायको व कुटुंब त्यास भेटण्यास येत असतां जहाज फुटून सर्व माणसें बुडून मरण पावलीं. कादीचा अधिकार निघाल्यामुळें व या दुःखामुळें त्यानें आपलें लक्ष्य इतिहास लिहिण्याकडे अधिक दिलें. यानंतर तीन वर्षांनीं तो मक्केस गेला व पुन्हां त्यास कादि नेमण्यांत आलें. (१४०० सालीं त्याला दमास्कस येथें तैमूर विरुद्ध स्वारीवर पाठविण्यांत आलें पण त्यास यश मिळालें नाहीं). तो ता. १४ मार्च १४०६ इ. रोजीं मरण पावला. ' जगाचा इतिहास लिहिणारा ' म्हणून तो प्रसिद्ध आहे.

खासगीवाले—यांचें मूळ उपनांव लिमये असून हे रत्नागिरीजिल्ह्यांतील मौजे करले येथील रहाणारे होत. याचा मूळपुरुष भानभार्ग नांवाचा होता. त्याचा पुत्र बाळाजी, त्याला गणेश व कृष्ण अशीं दोन मुलें होतीं. कृष्णाजी हे कोंकणांतून घाटावर आले. त्यांच्याचबरोबर इचलकरंजीकरांचे मूळपुरुष नारो महादेव व पटवर्धन घराण्याचे मूळपुरुष हरभट होहि निघाले होते. कोल्हापुराजवळ जोतिबाच्या डोंगरावर देवापुढें तिघांनीं शपथा घेतल्या कीं, ज्याचा अभ्युदय प्रथम होईल त्यानें बाकीच्या दोघांस सांभाळावें नारोपंतास कापशीकर सेनापति यांनीं आश्रय दिल्यावर त्यांनीं या दोघांनां आपल्याजवळ ठेविलें. कृष्णाजी व गणेश यांचीं मुलें शिवराम व जिवाजी हीं नारोपंताकडे होतीं. त्यांनां नारोपंतांनीं पेशव्यांच्या इकडे नोकरीस पाठविलें. श्रीमंतांनीं त्यांस मौजे पाडळीची कमावीस (स. १७३०) व साताऱ्च्या सरकारी वाड्याचें काम (स १७३१) सांगितलें. वरील काम शिवरामपंतांनीं चांगलें केल्यामुळें बाजीरावसाहेबांनीं त्यांस आपलें खासगीचें काम सांगून (१७३२) पुण्याच्या शनिवारवाड्याचेंहि काम सुपूर्द केलें. पुढें १७४१ त शिवरामपंत काशीस गेले; त्या

नंतर त्यांचे भाऊ जिवाजीआण्णा हे खासगीचा कारभार पाहूं लागले. शिवरामपंत हेच खासगीवाले घराण्याचे मूळ संपादक होत. ते काशीहून परत येऊन (१७४२) पंढरपुरास राहिले व तेथें त्यांनीं पांडुरंगाची एक चांदीची मूर्ति करून देवाचें संस्थान स्थापून (१७४८) त्याच्या खर्चाबद्दल पेशव्याकडून पंढरपूर तालुक्यांतील कौठळी गांव इनाम मिळविला. हल्लीं आषाढी व कार्तिकी शुद्ध एकादशीस याच पांडुरंगमूर्तीचा रथोत्सव होतो. खासगीवाल्यांचें हें खासगत देवस्थान असून त्यास सालीनां साडेसहा हजारांचें उत्पन्न आहे. शिवरामपंतांची बहीण ही परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या मुलाला दिली होती. शिवरामपंतांचा वडील मुलगा रघुनाथ हा तरुणपणीं वारला, तेव्हां त्याचा मुलगा शिवराम यांस राघोबादादा पेशवे यांनीं खासगीचीं वस्त्रें दिलीं (१७७३). सवाईमाधवरावांच्या कारकीर्दींत शिवरामभाऊस अंबारीसहित हत्तीचा मान मिळाला. तोपर्यंत वर सांगितल्याप्रमाणें जिवाजीपंतअण्णा हेच खासगीचा कारभार पाहत असत. हे घोड्यावर बसणारे फार पटाईत होते. निजामानें धाडलेल्या एका मस्त घोड्यावर यांनीं स्वारी करून त्याला नरम केल्याच्या व यांच्या दांडग्या आहाराच्या व अचाट शक्तीच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. थोरल्या शिवरामपंताचा दुसरा मुलगा गोविंदराव तात्या यांनीं बराच नांवलौकिक मिळविला. त्यांनीं सोळाव्या वर्षीच खासगीची समग्र माहिती मिळविल्यानें नानासाहेब पेशव्यांनीं त्यांस इंग्रज, होळकर, भोंसले, निजाम यांच्याकडे वकिलीच्या कामावर नेमिलें होतें. यांनांहि स्वारांचा सरंजाम व तैनात मिळाली असून, जुवाठी, हिपर्गी, पाढेठाण हीं इनाम गांवें व पैठणचें कुळकर्ण मिळालें होतें. राघोबादादा व थोरले माधवरावसाहेब यांच्यामधील मध्यस्थी हेच करीत असत. यांनीं पेशव्यांच्या बरोबर बऱ्याच मोहिमा केल्या. हे इ. स. १७७२ मध्यें वारले. यांचे सख्खे भाऊ हरिपंत हे पानपतांत पडले. गोविंदरावांनीं पुण्याचें रामेश्वराचें देऊळ बांधलें. यांची बायको सती गेली. यांनां नीळकंठ नांवाचा मुलगा झाला. त्याला दोन पुत्र गोविंद व हरि म्हणून होते. नीळकंठराव यांचीहि स्त्री सती गेली. गोविंद नीळकंठ यांस १७९२ त हत्ती मिळाला. हे खर्ड्याच्या लढाईत हजर होते. यांच्यावर पुढें यांची गैरमर्जी होऊन त्यांनीं यांचा अर्धा सरंजाम व साडेचोवीस हजारांची जहागीर आणि साडेसहा हजाराची खासगीची नेमणूक श्रीमंतांनीं जप्त केली गोविंदपंत १८४५ त वारले. यांनीं शुक्रवार पेठेंत रामेश्वराजवळ (पुण्यास) विष्णूचें एक देऊळ बांधलें शिवराम रघुनाथ यांचा भाऊ नारोपंत यांस सवाई माधवरावांनीं शिवरामाच्या मृत्यूनंतर खासगीचीं वस्त्रें दिलीं होतीं. गोविंद नीळकंठाचा मुलगा नीळकंठ नांवाचा असून त्यांच्यावर १८३८ त बंडाचा आरोप आला होता; ते त्यांतून १८४० त मुक्त होऊन १८५९ त वारले. गोविंद नीळकंठास हरिपंत नांवाचे एक भाऊ होते. त्यांना माधवराव नांवाचा पुत्र झाला. या माधवरावांना एकंदर आठ अपत्यें झालीं. त्यांतहि काशीनाथपंत तात्या हे पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे सभासद, पुणें येथील पर्वतीसंस्थानचे व पंढरपूरच्या देवस्थानकमेटीचे एक पंच होते. ते धार्मिक प्रवृत्तीचे असून गणेशोत्सवांत लो. टिळकांच्याबरोबर त्यांनीं प्रथम प्रथम भाग घेतला होता. पंचहौद प्रकरणांत हे व श्री. बाळासाहेब नातू हे प्रमुख होते. हे सन १९१९ त वारले. यांचे वडील चिरंजीव गोविंदराव हे दामोदरगुरू नांवाच्या प्रख्यात मल्लविद्याविशारदाचे शिष्य होते. हे स.१९००मध्यें वारले.यांचे धाकटे भाऊ हरिहरराव उर्फ नानासाहेब हे हल्लीं विद्यमान असून पंढरपुरास रहात असतात. जिवाजीपंतअण्णाचे वंशज अश्वविद्येंत निष्णात असून त्यांनां शिर्गेव वगैरे गांवचें उत्पन्न आहे. याच्या जागेंतच हल्लींच्या न्यू पूना कॉलेज व नूतन मराठी विद्यालय या संस्थांच्या इमारती आहेत. थोरल्या कृष्णाजीपंतास शिवरामपंताशिवाय रामचंद्र, ज्योतिपंत व बाळाजी असे तीन पुत्र (शिवरामास दत्तक घेतल्यानंतर) झाले. त्यांच्या वंशजास खासगीवाले हे नांव न मिळतां लिमये याच आडनांवानें ते हल्लीं प्रसिद्ध असून त्यांच्या शाखा सोलापूर, तासगाव, रामदुर्ग या भागांत आहेत. [श्री. हरिहर काशीनाथ खासगीवाले यांनीं पाठविलेल्या माहितीवरून].

खासपुर—आसाम. काचार जिल्ह्यांतील एक खेडें. उ. अ. २४ ° ५५′ व पू. रे. ९२ ° ५७′. १८ व्या शतकाच्या आरंभापासून १८३० त शेवटाचा राजा मृत्यु पावेपर्यंत हें काचार राजांच्या राजधानीचें शहर असे.याच ठिकाणीं काचारी लोकांवर हिंदुधर्माचा संस्कार झाला. व १७९० त राजा व त्याचा भाऊ तांब्याच्या गोयोनींतून बाहेर निघून क्षत्रियत्व पावले असें म्हणतात. चार देवळें, दोन इतर इमारती व तीन तलाव हींच कायती प्राचीन राजधानीचीं चिन्हें येथें दिसतात आज या गांवाला कांहीं महत्त्व नाहीं.

खासी— आसामांतील या जातीची लोकसंख्या १२०८९४ आहे. या राष्ट्रजातीचे लोक वार आणि सिन्टें राष्ट्रजातीप्रमाणें खासी व जैंटिआ डोंगरांतून राहतात. यांची भाषा मोन- ख्मेर भाषेप्रमाणें वाटते (याच लेखांतील खासी भाषा पहा). पण यांच्या सभोंवार असणाऱ्या मोंगोलाईड जातीशीं यांच्या शरीराच्या ठेवणींत मुळींच साम्य नाहीं. यांचा रंग पिंगट असून नाक जरा बसकें असतें. कपाळपट्टी रुंद असते. खासींचा आकार ठेंगणा असला तरी ते शरीरानें धष्टपुष्ट असतात. यांनां गाणें विशेष आवडतें. यांचा समाज मातृसत्ताक पद्धतीचा आहे. बापाचा मुलांशीं संबंध कांहीं नसतो; मुलें आईच्या कुळांत पडतात. बापानें मिळविलेलें सर्व त्याच्या स्वतःच्या आईच्या वंशांत जातें. ही जात हिंदु नसून हिंदुस्थानाबाहेरलि वाटते. हे बहुतेक शेतकी व मोलमजुरी करून रहातात. खासी लोक पूर्वी लोखंड तयार

करण्याचा धंदा करीत पण आतां तो बुडाला आहे. बायका देशी दारू गाळतात. यांचा राष्ट्रीय खेळ म्हणजे तिरंदाजीचा. यांचा मुख्य धर्म पितृपूजेचा आहे. शिवाय हे भुताखेतांचीहि आराधना करितात. यांच्यांत मृतांना जाळण्यांत येतें व त्यांची राख आणि हाडें जमा करून डोंगराच्या बाजूस लहान किस्त्वएनमध्यें ठेवितात. मृतांचीं स्मारकें म्हणून भले मोठाले दगड उभे करून ठेवितात.

गर्भवती स्त्रीस सहावा महिना लागल्यापासून तिला अपवित्र समजतात व तिच्या हातचें अन्न तिचे नातलग खात नाहीत. आठव्या महिन्यांत जन्माच्या पूर्वीचा विधि होतो. त्यांत नवराबायको मिळून पूजा करतात. गर्भवती बायकांचे कष्ट कमी करण्याचे निरनिराळे उपाय आहेत. (अ) नवऱ्यास अगदीं नग्न होऊन संगमाचें पाणी आणावें लागतें (ब) खून झालेलें हत्यार गर्भवतीच्या बिछान्यांत ठेवतात; (क) फांशी देण्याच्या दोराचा तुकडा (ड) अथवा अस्वलाचें जननेंद्रिय उशाखालीं ठेवतात; (इ) मुसळाची लोखंडी कडी चोरून त्याची आगठी गर्भवतीच्या बोटात घालतात; (फ) पुरुषानें शेंडी सोडून कांहीं गवत उपटावें व तें सुतानें गर्भवतीच्या कमरेभोंवती बांधावें. मुलाचें नाव उपाध्याय ज्योतिषावरून ठरवितो. नाळ पुरीत नाहींत परंतु घराचे अथवा कचेरीच्या दरवाज्यावर ठेवतात.

लहानपणीं मूल वाचल्यास पुरतात. बाळंतीण एकटी असते. तिच्या खोलींत विस्तव पेटविलेला ठेवतात. बाळंतिणीनें उडदाची दाळ, भाजीपाले, मांस खाऊं नये. मीठ बेतानें खावें. पेज खावी. बाळंतिणीनें पहिल्या, पांचव्या, सहाव्या, सातव्या, नवव्या, अकराव्या व बाविसाव्या दिवशीं स्नान करावें.

मूल सहा महिन्याचें झाल्यावर अन्न खाऊं घालण्याचा विधि होतो. प्रथम मुलगा व नंतर मुलगी अशीं जुळीं मुलें निपजल्यास अपशकुन समजतात, परंतु मुलगी नंतर मुलगा अशीं जुळीं मुलें जन्मल्यास इतकें वाईट समजत नाहींत. मुलीस ऋतु प्राप्त तिच्या नवऱ्याच्या घरीं झाला पाहिजे. बापाच्या घरीं झाल्यास तिच्या भावांस दारिद्र्य येतें.

पहिलीं मुलें मेल्यास नंतर झालेलें मूल जोग्यास देऊन नंतर त्याच्यापासून विकत घेतात व त्याला जोग्या म्हणतात.

लग्नचाली.—बहुभर्तृत्व म्हणजे पुष्कळ नवरे करण्याची चाल तिबेटाच्या सरहद्दीपलीकडे आहे. जोहार, दर्म, चौडा व बेयान या भोटपरगण्यांत बहुभर्तृत्वाची चाल नाहीं. अस्कोट परगण्यांतील राजी लोकांमध्यें ही चाल आहे. हिंदू लोकांमधील नियोग ही पुरातन चाल यांच्यांत आहे. हिच्या योगानें निपुत्रिक विधवेला मृत पतीच्या धाकट्या भावापासून पुत्रप्राप्ति करून घेतां येते. आल्मोरा जिल्ह्यातील जमीनदार लोकांत विधवा बहुधा मृत पतीच्या धाकट्या भावाची बायको होते; परंतु पुनर्विवाह संमत नाहीं.

बलात्कारानें लग्न.—दर्म, चौडा व बियान या परगण्यांतलि भोटिया लोक आपल्या तरुण मुलांमुलींना रंगभंग नांवाच्या जागीं एकत्र जमून नाचणें, गाणें व खाणेंपिणें करूं देतात व या ठिकाणींच वधूवर आपली निवड करतात. परंतु एखाद्यास झिडकारलें असेल तर तो व त्याचे मित्र त्या तरुणीची रात्रीं वाट पहातात व जबरीनें तिच्या तोंडांत मांस व मिठाई घालतात. नंतर ती त्याची कायदेशीर लग्नाची बायको होते. परंतु ती बायको न झाल्यास तिला मुक्त केल्याशिवाय दुसरीशीं लग्न करतां येत नाहीं.

रजपूत जमीनदार लोक खासिया आहेत. यांच्यामध्यें मामा कन्यादान करीत असे. कोणाहि इसमाची बहीण व त्याच्या बायकोच्या भावाची बायको एकच असते.

चुलत भावंडांचीं लग्नें.—बापाच्या भावाचीं आईच्या बहिणीचीं मुलें स्वतःच्या मुलाप्रमाणें मानलीं जातात व त्यांना परस्पर लग्न करण्याची मनाई आहे. परंतु बापाच्या बहिणीचीं मुलें व आईच्या भावाचीं मुलें स्वतःच्या मुलांप्रमाणें मानलीं जात नाहींत व त्यांना लग्न करण्याची मुभा असते.

कालिकैचा धबधबा, डिंगिंईचा डोंगर, रूपतिल्लीनदी वगैरे संबंधीच्या खासी लोकांत बऱ्याच आख्यायिका प्रचलित आहेत.

खासी भाषा.—खासी जिल्हा व जैंटिया टेंकड्या याचें मुख्य ठिकाण शिलाँग हें खासी भाषेचें मूळ ठिकाण होय. त्याशिवाय सिल्हेट व काचर या शेजारच्या जिल्ह्यांतहि ही भाषा बोलणारे लोक आहेत. सर्वांत शुद्ध खासी भाषा चेरापुंजीभोंवतालचे लोक बोलतात. याशिवाय गारो टेंकड्यानजीकची लिंगनगम् भाषा, शिलाँगच्या पूर्वेकडलि जोवई भागातील सिंटेंग उर्फ प्नार भाषा आणि सिल्हेटच्या बाजूच्या भागातील वारभाषा, अशा आणखी तीन भाषा या विभागांत आहेत. यापैकीं सिंटेंग भाषेचें खासीशीं सर्वांत अधिक साम्य आहे.

हिंदुस्थानातील इतर मूळ देशी भाषाहून खासी ही अगदीं स्वतंत्र निराळी भाषा आहे, यामुळेंच तिला फार महत्व आहे. शब्दांचे मूळ धातु व उच्चार या बाबतींत खासीचें मोंगोलियन भाषांशीं साम्य आहे; आणि शब्दांच्या रूपांच्या बाबतींत हिंदुस्थानांतील इतर भाषांहून ती फार भिन्न आहे.

खासी व हिंदुस्थानांतील इतर अनार्य भाषा यांत मुख्य फरक पुढीलप्रमाणें आहेः—

लिंगविचार खासी भाषेंत पूर्णतेनें आहे. प्रत्यक्ष स्त्रीपुरुष असा भेद त्या पदार्थांत असो वा नसो, प्रत्येक नामाचें (निर्जीव वस्तूंचें सुद्धा) स्त्रीलिंग किंवा पुल्लिंग असें विशिष्ट लिंग ठरलेलें असतें. असाच लिंगभेद त्यांच्या विशेषणांत व क्रियापदांतहि उपसर्ग लावून दर्शविला जातो.

हिंदुस्थानांतील अनार्य भाषांतल्याप्रमाणेंच शब्दांमधील संबंध शब्दयोगी अव्ययांच्या मदतीनें दर्शविले जातात. परंतु अनार्य भाषा व खासीभाषा यांत फरक

असा आहे कीं, खासी भाषेंत हीं शब्दयोगी अव्ययें शब्दांच्या पूर्वी उपसर्गाप्रमाणें जोडतात. परंतु द्रविडी मुंडा, तिबेटी-ब्रह्मी या भाषात तीं प्रत्ययाप्रमाणें पुढें जोडतात. खासीप्रमाणेंच इतर मोन—ख्मेर वर्गांतील भाषांत नियम आहेत. तसेंच दोन शब्दांतील षष्ठीचा संबंध दर्शवितांना खासी, तई, व इतर मोन-ख्मेर भाषांत षष्ठ्यन्त शब्द पुढें येतो; पण वर सांगितलेल्या द्रविडी वगैरे अनार्य भाषेंत तो अगोदर येतो. या सर्व प्रत्ययांचा असा परिणाम होतो कीं, खासीभाषेंतील वाक्यातील शब्दानुक्रम व तिबेटी-ब्रह्मी भाषेंतील शब्दानुक्रम यामध्यें फार मोठा फरक पडतो आणि शब्दानुक्रमावरूनच विचारानुक्रम निदर्शित होत असल्याकारणानें या निरनिराळ्या लोकांची विचारक्रमपद्धतीहि भिन्न भिन्न असली पाहिजे हें उघड आहे.

खासी भाषेंत कांबोर्ज, अनामी व तईप्रमाणें संबंधी सर्वनाम आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक अनार्य भाषांत हें सर्वनाम नाहीं. हा या दोन भाषावर्गांत मोठा फरक आहे.

खासीभाषा व मोन-ख्मेर भाषा यांचा परस्पर संबंध असल्याचें प्रथम १८५३ मध्यें लोगन यानें दाखवून दिलें. त्यानें " ब्रह्मी-तिबेटी,गंगाप्रदेशीय व द्रविडी या भाषांबद्दल सामान्य गोष्टी " असा एक निबंध लिहिला. पण त्यांतील मुख्य प्रमेयाकडे कित्येक विद्वानांचें दुर्लक्ष्य झाल्यासारखें दिसतें, कारण खासीभाषा इंडो-चिनी भाषांपैकीं एक असून ती दूर एका बाजूस पडलेली आहे असें मत पुष्कळ दिवस चालू होतें. पुढें १८८९ मध्यें कूहननें पुन्हां खासी व मोन-ख्मेर यांचा खरोखर संबंध आहे हें निखालस सिद्ध केलें.

[संदर्भ ग्रंथः—अॅड्मिनिस्ट्रेशन रिपोर्टः डाल्टन-डिस्क्रिप्टिव्ह एथ्नॉलॉजी ऑफ बेंगाल; मिल्स—रिपोर्ट ऑन दि खासी अॅंड जैन्टिया हिल्स. यूल—नोट्स ऑन दि खासी हिल्स अॅंड पीपल; गुर्डान—दि खासीज्; इं. ॲ. पु. ४०].

खासी आणि जैंटिया डोंगर—आसाम, सुरमा दरी व डोंगरविभाग यांतील एक जिल्हा. क्षेत्रफळ ६०२७ चौ. मै. येथील लोकसंख्या (१९२१) २,४३,२६३ आहे. या जिल्ह्यात एकसारख्या पूर्वपश्चिम डोंगरांच्या रांगा असून मधून मधून उंच पठारें आहेत. अति उंच डोंगरांवर मोठमोठीं सागवानी झाडें असतात; पण तीं कांहीं जुन्या धर्मसमजुतीमुळें तोडीत नाहींत. प्राचीन काळापासून तळबंगालला चुन्याचा सर्व पुरवठा खासी डोंगरातून होई. या ठिकाणीं कोळसाहि निघतो. ब्रिटिशांनीं १८३३ त खासी डोंगर जिंकून घेतले. यांतून खासी (पहा) लोक राहतात. खासी लोकांनीं निवडलेले राजे ब्रिटिश सरकारचे मांडलिक म्हणून वागतात. असे २५ राजे (सीम) असून ते स्वतंत्रपणें कारभार चालवितात. जैन्टिया डोंगर १८३५त एका छोट्या हिंदु संस्थानाकडून ब्रिटिशांनीं घेतले. सिन्टेंग लोकांची यांत वस्ती असून उत्पन्नावर कर बसविल्यावरून त्यांनीं १८६० व १८६२ या दोन सालांत बंड केलें; पण तें मोडण्यांत आलें. जिल्ह्याचें मुख्य ठिकाण पूर्वी चेरापुंजी होतें. तें शिलांग करण्यांत आलें. चेरापुंजीपासून गौहट्टीपर्यंत चांगला रस्ता आहे. १८९७ त या जिल्ह्यांत मोठा धरणीकंप होऊन बरींच घरें व रस्ते पडून गेले. व पुष्कळ प्राणहानि झाली.

खिचिंग.—बिहार-ओरिसा. मयूरभंज संस्थानांतील एक खेडें. उ. अ. २१° ५५ व पू. रे. ८५° ५०'. लो. सं. (१९०१) २६९. याठिकाणीं दगडी मूर्ती, खांब, समाधी व कित्येक दगडीविटांच्या देवळाचे अवशेष यांसारख्या पुराणवस्तू सापडतात. गावाजवळच असणारा देवालयसमूह फार महत्वाचा आहे. यांतील एक शिवालय अकबराचा सुभेदार मानसिंग याच्या वेळेस दुरुस्त केलेलें दिसतें. [आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, पु. १३].

खिजदिया—काठेवाड. गोहिलवाड जिल्ह्यातील स्वतंत्र खंडणी देणारा एक तालुका.या तालुक्यांत खिजदिया हें एकच गांव आहे. त्याचे पुन्हां दोन भाग असून एक एका सव्यदाकडे व दुसरा वालकाठीकडे आहे.

खि ज दि या डो सा जी.—गोहिलवाड जिल्हा. हा स्वतंत्र खंडणी देणारा दुसरा तालुका सोनगड ठाण्यांत आहे. तालुका एकाच गांवाचा असून तालुकदार लाठीचे भायाद व गोहिलरजपुतांपैकीं आहेत.

खि ज दि या ना गा नी.—लाखापादर ठाण्यांतल्या या स्वतंत्र खंडणी देणाऱ्या तालुक्यांत खिजदिया हें एकच गांव आहे. तालुकदार वालकाठी आहेत.

खिप्रो.—मुंबई, सिंधप्रांत थर आणि पारकर जिल्ह्यांतील एक तालुका. क्षेत्रफळ २२४९ चौ. मै. असून लो. सं. (१९११) ४६१७१ आहे. तालुक्यांत १२५ गांवें असून खिप्रो हें मुख्य ठिकाण आहे. जमीन महसूल व इतर पट्टया यांचें १९०३-४ सालीं उत्पन्न सुमारें २ लाख रुपये होतें. रानाहुतप या वाळवंटाखेरीज बाकीचा सर्व प्रदेश मिथराव कालवा व धोरो नारो यानीं भिजला जातो.

खिरणी-रायण—खिरणी अथवा रायणीचीं झाडें वाकुळीसारखींच असून तीं मुंबई इलाख्यांत बहुतेक सर्व ठिकाणीं होतात. विशेषतः गुजराथेंत रस्त्यांच्या कडेला खिरणीचीं झाडें पुष्कळच दृष्टीस पडतात. यांना उष्ण व कोरडी हवा चांगली मानवते. झाडें बीं लावून करतात व तीं बहुतेक सर्व प्रकारच्या जमिनींत होतात. फळ एप्रिल व मे महिन्यांत तयार होतें. गुजराथी लोकांनां हें फळ फार आवडतें. खिरणीचीं झाडें रस्त्याच्या बाजूला लावण्याला फार चांगल्यापैकीं आहेत. कारण एकदां लावल्यावर त्यांची पुन्हां काळजी घ्यावी लागत नाहीं, झाडाची पालवी झडत नाहीं. लांकूड उत्तम व कणखर असतें. फळहि रुचकर

असतें, यामुळें उन्हाळ्यांत व दुष्काळाच्या दिवसांत गरीब लोकांचा या फळांवर बराच गुजारा होतो. [वनौ. गुणा.]

खिरपई—बंगाल. मिदनापूर जिल्ह्यांतील एक शहर. उ. अ. २२° ४३' व पू.रे. ८७° ३७ लो. सं (१९०१) १०४५. येथें १८७६ त म्युनिसिपालिटी स्थापन झाली. लोकांच्या मालमत्तेवरील कराचें उत्पन्न म्युनिसिपालिटीला सर्वांत जास्त आहे.

खिरा—खिरा, कांकडी, वाळुक हीं नांवें काकडीच्या जातीच्या फळांस देतात. परंतु या नांवांमध्यें बराच घोंटाळा आहे. कोणी खिऱ्यासच काकडी म्हणतात व वाळुकहि म्हणतात. नांवांचा घोटाळा होण्यास निरनिराळे प्रकार निरनिराळ्या प्रांतांत होतात हें एक कारण असावें. पुण्यांत जे पांढरे खिरे उन्हाळ्यांत व पावसाळ्यारंभीं मिळतात, ती जात वुलऱ्या जिल्ह्यात करीत नाहींत म्हणून खिऱ्यास त्या जिल्ह्यांत होणाऱ्या कांकडीचें नांव देतात

हें फळ पांढरें अगर हिरवट पांढरें, तीन ते नऊ इंच लांब असून पिकल्यावर पिंवळें होतें. यास उंसाच्या शेतांत अगर निराळें लावितात. याचे वेल ६ फूट वाढत त. ते जमिनीवर पसरतात. ही जात पुणेंप्रांतीं व उत्तर हिंदुस्थानांत पिकवितात. पुण्यास वाळुकासहि खिरा हेंच नाव प्रचलित आहे. खिरे टिकाऊ नसतात. ते तोडल्यावर लवकर कासुसतात व नंतर सडतात. [वनौ गुणा.]

खिलचीपूर, संस्थान—मध्यहिंदुस्थान. भोपाळ एजन्सींतील एक मांडलिक संस्थान. क्षेत्रफळ २७३ चौ. मैल याच्या उत्तरेस कोटा संस्थान, पूर्वेस राजगड, पश्चिमेस इंदोर व दक्षिणेस नरसिंगगड आहे. हवा समशीतोष्ण असून पाऊस सरासरी ३२ इंच पडतो. संस्थानिक प्रसिद्ध चौहान वंशांतील खीची रजपूत आहेत. १५४४ त उग्रसेनानें गागौनच्या खीची राजधानींतून इकडे येऊन हें संस्थान स्थापिलें. खिरापूर व माचलपूर परगणे यांची जहागिरी दिल्लीच्या बादशहानें त्याला दिली. १७७० त या संस्थानचा कांहीं मुलूख कमी झाला. संस्थानिकांना रावबहादुर अशी पदवी आहे.

संस्थानची लोकवस्ती (१९०१) ३११४३. यांत खिलचीपूर हें एकच शहर असून बाकी २८३ गांवें आहेत. सोंधिया, धाकड, देसवाली, चांभार, डांगी, लोध व रजपूत या मुख्य जाती आहेत. संस्थानच्या नैर्ऋत्येकडील प्रदेश चांगला सुपीक आहे. मुख्य पीक ज्वारीचें आहे.

संस्थानांत एकंदर तीन तहसिली आहेत. मुलकी व जमाबंदीच्या बाबतींत संस्थानिकाला पूर्ण अधिकार आहेत. मोठया गुन्ह्याचे खटले भोपाळचा पोलि. एजंट चालवितो. संस्थानी उत्पन्न एक लाखावर आहे.

शहर—खिलचीपूर संस्थानची राजधानी. विंध्याद्रीच्या एका शाखेच्या पायथ्याशीं डोंगराळ प्रदेशांत हें वसलें आहे. याचें मूळ नांव खीचीपूर. लो. सं. (१९११) १८५८. एक ब्रिटिश पोस्ट ऑफिस, एक शाळा, एक तुरुंग व एक दवाखाना या गांवांत आहे.

खिलजी—किंवा घिलझइ. एक अफगाण जात. दक्षिणेस कलत-इ-घिलजइपासून उत्तरेस काबूल नदीपर्यंत आणि पश्चिमेस गुलकोह रांगेपासून पूर्वेस हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत ही जात पसरली आहे. अनेक ठिकाणीं या सरहद्दीहि ओलांडून पलीकडे हे खिलजी लोक गेलेले दिसतात. एकेकाळीं सिरदर्या नदीच्या उत्तर भागांतील जिल्ह्यांतून जे तुर्कवंशीय खिलजी रहात त्याच्यापासून ही जात निघाली व दहाव्या शतकांत सबक्तगीननें या लोकांस अफगाणिस्तानांत आणिलें असें एक मत आहे. कोणी अफगाणिस्तानांतील खल्ज गावावरून खिलजी नांव पडलें असें म्हणतात. खिलजी लोक लष्करी बल व व्यापारी धाडस या बाबतींत कोणालाहि हार जात नाहींत. हे लोक चांगले मर्दानी असून पोविंद व्यापाऱ्यांची मुख्य भरती याच्यांतील सुलेमानखेल, नासिरखेल, खरोती इत्यादि अतिशय वजनदार घराण्यांतूनच झालेली आहे. इ. स. १२८९ ते १३२० या अमदानींत हिंदुस्थानांत जें खिलजी घराणें राज्यारूढ होतें तें याच्यापैकींच होय. [सरदेसाई.]

खिलजी घराणें—या घराण्याचा संस्थापक जलालुद्दीन नांवाचा मुसुलमान सरदार होता. अफगाणिस्तानांतील खल्ज नांवाच्या प्रांतांतील रहिवाश्यांना खिलजी असें म्हणतात; त्या जातीचा हा जलालुद्दीन होता. गुलाम घराण्याच्या वेळीं राज्यांतील मोठमोठ्या जागा तुर्कांना मिळत. त्यामुळें तुर्कांचा व खिलजी जातीचा बेबनाव असे. बंगाल जिंकण्यात या लोकांनीं बरेंच शौर्य दाखविलें होतें. गुलाम वंशाच्या अखेरीस हे लोक बरेच शिरजोर झाले होते. कैकोबाद हा गुलाम घराण्याचा शेवटचा राजा होता. तो जुलुमी असल्यानें व त्याच्या वजीराचा शिरच्छेद झाल्यामुळें बंडखोर खिल्ज लोकांनीं त्याचा पुढारी जलालुद्दीन याच्या चिथावणीवरून कैकोबादचा निर्दयपणें खून केला. पुढें लोकांच्या डाळयावर येऊं नये म्हणून कैकोबादच्या अल्पवयी शम्सुद्दीन नांवाच्या मुलास जलाल यानें गादीवर बसविलें, परंतु थोड्याच दिवसांत त्याचाहि खून करून जलालनें तख्त बळकावून स्वतःस फिरोजशाह नांव घेतलें (फेब्रु- १२९०). यावेळीं त्याचें वय ७० होतें. या घराण्यांत सहा राजे होऊन त्यांनीं एकंदर तीस वर्षें राज्य केलें, त्यांत अल्लाउद्दीन हा प्रख्यात झाला.

जलालुद्दीनाबद्दल सरदारदरकदार व प्रजा यांचें चांगलें मत नव्हतें म्हणून तो घाबरून दिल्लीस न रहातां जवळच किलुखेडी येथें राजवाडा बांधून राहिला व त्या खेड्यास नौशहर (नवें शहर) असें नांव दिलें. त्याचा राज्यकारभार फार ढिलाईचा होता; वयमानानें त्याला कडक शिस्त राखतां आली नाहीं. त्यामुळें सर्वच बंडखोरांचा व लुटारूंचा सुळसुळाट झाला. इ. स. १२९१ त उत्तरेंत मोठा

दुष्काळ पडला असतां सिद्दी मौला नांवाच्या एका फकीरानें त्याचा जीव घेण्याचा कट केल्यानें यानें त्याला फाशीं दिलें. या विरहित त्यानें कोणास कडक शिक्षा केली नाहीं. पुढें १२९२त मोंगलानीं पंजाबवर स्वारी केली तेव्हां स्वतः जलाल त्यावर चालून गेला. लढाई होऊन दोघात तह झाला. स्मिथ म्हणतो कीं, जलालनें मोंगलास खंडणी दिली. कडामाणिकपुर येथील सुभेदार मलीक छज्जु यानें बंड केल्यानें तें मोडून जलालनें तेथें आपला पुतण्या व जांवई अल्लाउद्दीन यांस नेमलें (१२९१). जलालनें दोन वेळां रणथंबोरच्या किल्ल्यास वेढा दिला पण तो किल्ला पडला नाहीं; तेव्हां जलालनें माळव्यांत जाऊन लुटालूट करून व उज्जैनहि लुटून आणि माळव्यांतील देवळें फोडून तो परत दिल्लीस गेला (१२९१). वरील मोंगलांच्या स्वारींत चेंगीझखानाचा नातू उल्घूखान हा जलालच्या हातीं लागला असतां त्यास त्यानें त्याच्या तीन हजार मोंगल लोकांनिशीं दिल्लीस ठेविलें; या सर्वांनीं पुढें मुसुलमानी धर्म स्वीकारल्यामुळें त्यांना नवे मुसुलमान म्हणूं लागले. पुढें (१२९३) अल्लाउद्दीनानें पूर्वमाळवा जिंकल्यानें जलालनें त्याला अयोध्या (कडा माणिकपुर) प्रांताची सुभेदारी जहागीर दिली व त्याचा सुमारास आपला मुलगा अर्कलीखान यास मुलतानचा व नसरतखानास सिंधचा सुभेदार नेमलें. अल्लाउद्दीन पुढल्या वर्षी देवगिरीवर गेला. प्रथम माळव्यांतून निघून गेल्यावर खानदेशांतून तो देवगिरीवर उतरला. रामदेवरावाचा नाश होण्याची वेळ आली होती, पण त्याचा मुलगा शंकरदेव हा एकाएकी मदतीस आल्यानें अल्लाउद्दिनाचें कांहीं न चालतां त्यानें तह करून व खंडणी घेऊन परत माळव्याकडे प्रयाण केलें. या स्वारींत त्यानें बरीच लूट मिळविली व पुष्कळ सैन्य पदरीं ठेवलें आणि त्याची वार्ता जलालुद्दिनास लागूं न देण्याची खटपट केली. याबद्दल जलाल यांस पुष्कळ लोकांनीं सांगून पाहिलें परंतु त्याचा अल्लावरील विश्वास उडाला नाहीं. अल्ला हा परत कडामाणिकपुरास आल्यावर त्यानें जलालास भेटीस बोलावलें आणि जलाल हा इतरांचें न ऐकता भेटीस गेला. तेव्हा अल्लानें त्याची भेट घेत असता विश्वासघात करून मारेकऱ्याकडून त्याचा खून केला (जुलै १२९६). त्याचें डोकें भाल्यास खोंचून सर्व फौजेंत फिरविलें व फौजेला भरपूर बक्षिसें वाटलीं. जलाल हा दुर्बळ मनाचा राजा होता. तो चोरांनां अगर दरवडेखोरांनां कडक शिक्षा देत नसे. त्याच्या वेळीं ठगांनीं सर्वत्र सुळसुळाट केला असतां त्यानें एक हजार ठग लोकांनां पकडून त्यांना शिक्षा न करतां फक्त बंगालमध्यें हद्दपार केलें. त्यामुळें पुढें पुष्कळ शतकें बंगालमध्यें या ठगांचा व चोऱ्यांचा उपद्रव होत होता. चोरांनीं चोरी करणार नाहीं अशी नुसती शपथ घेतली कीं हा त्यांना सोडून देई. ही त्याची दुर्बळवृत्ति खिलजी लोकांसहि आवडली नाहीं. त्यानें विद्वानास आश्रय दिला होता. त्याच्या या वर्तनानें दरबारात व बाहेरहि त्याच्याविरुद्ध कट सुरू झाले व त्यांचा मुख्य अल्लाउद्दीन बनला. जलाल मेल्यावर त्याच्या बेगमेनें वडील पुत्र अर्कलीखान हा मुलतानास असल्यानें धाकटा पुत्र रुक्नुद्दीन इब्राहिम यांस गादीवर बसविलें. परंतु अल्लाउद्दीन हा दिल्लीस फौजेसह आल्यावर बेगम आपल्या मुलासह मुलतानास पळून गेली व अल्लाउद्दीन हा मुहम्मद-शहा हें नाव घेऊन २१ आक्टोबर १२९६ त तख्तावर बसला.अल्लाउद्दीन याचें चरित्र ज्ञानकोशाच्या सातव्या भागांत विस्तृत आलें आहे तेथें तें पहावें. त्याशिवाय विशेष मजकूर येथें दिला आहे. अल्लाउद्दीनानें मुलतानास आपला भाऊ उल्घुखा यास पाठवून व अर्कली रुक्नुद्दीन व (जलालुद्दीनचीं मुलें) यांना (वचन देऊन) पकडून आणवून त्यांचे डोळे काढले. पुढें १२९६ त मोंगलांनीं पंजाबवर स्वारी केली असतां जालंधर येथें त्यांचा उल्घुखान व झाफरखान यांनीं पराभव केला. याच उल्घुखानानें इ. स. १२९८ त गुजराथच्या स्वारींत सोमनाथाचें देऊळ लुटून व तेथील मूर्ति फोडून खंबायत व अनहिलपट्टण काबीज केलें. परत जातांना उल्घूनें फौजेजवळ लुटीचा एकपंचमांश भाग मागितल्यानें सैन्यानें बंड केलें. परंतु तें मोठ्या मुष्किलीनें मोडलें गेलें. याच वेळीं खंबायत येथें उल्घूनें पुढें फार प्रसिद्धीस आलेल्या मलिक काफर नावाच्या गुलामास कैद केलें. याच वेळीं (१२९८) पुन्हां मोंगलांनीं सल्दीच्या हाताखालीं सिविस्तानवर स्वारी केली, तेव्हां त्यांचा पराभव जाफरखानानें केला. रणथंबोरच्या लढाईत अल्लाउद्दिनाचा सरदार नसरतखान मारला गेला व मुसुलमानांचा पूर्ण पराभव झाला तेव्हा अल्लाउद्दिन स्वतः रणथंबोरवर गेला. याच वेळीं दिल्लीस त्याचा पुतण्या सुलेमानशाह आकतखान यानें बंड करून स्वतःस बादशहा म्हणून जाहीर केलें व अल्लाउद्दिनास ठार मारण्याचा कट केला तेव्हां अल्लाउद्दिनानें त्याला पकडून ठार मारिलें. पुढें रणथंबोरचा वेढा चालू असतां, मंगूखान व उमरखान या दोघां पुतण्यांनीं बदाऊन येथें व दिल्लीस हाजी मौलानें बंडें उभारलीं. अल्लाउद्दिनानें त्या सर्वांनां पकडून ठार मारून शांतता स्थापन केली. रणथंबोर पडल्यावर तेथें उल्घुखानाची नेमणूक केली पण तो पुढें सहा महिन्यांनीं मरण पावला. याचवेळीं (१३०२) दाऊद मोंगलानें लाहोरवर स्वारी केली होती. यानंतर (१३०३) अल्लाउद्दिनानें मलिक छज्जू व फकिरुद्दीन यांनां तेलिंगणावर पाठविलें व स्वतः चितोडला जाऊन (२८ जाने. इ. स. १३०३) किल्ल्यास वेढा दिला. परंतु मोंगल दिल्लीकडे आल्यानें त्याला परतावें लागलें. पुढें २५।८।१३०३ रोजीं अल्लाउद्दिनानें चितोड घेतलें व तेथें खिजरखान (वडील मुलगा) यास सुभेदार नेमलें. पुढल्याच वर्षी चितोडचा पकडून आणलेला राणा कैदेंतून पळून गेला. मोंगल हे ख्वाजा ताशाच्या हाताखालीं हिंदुस्थानांत अम्रोहपर्यंत चालून आले (१३०४) तेव्हां गाझीबेगनें त्यांचा पराभव केला; पुन्हां १३०५ त ऐबक

खान हा मोंगलासह चालून आला परंतु त्याचाहि गाझीनें पराभव केला. याच वेळीं अलपखान यानें कारेथचा किल्ला बांधला. नंतर अल्लाउद्दिनानें ३ जुलै १३०८ रोजीं सिवानला वेढा देऊन १० सप्टेंबर रोजीं तें घेतलें व तेथील राजास ठार मारिलें; याच सालीं त्यानें झालवाडहि घेतलें. पुढें मलिककाफूर यानें वरंगळास वेढा देऊन एक महिन्यानें तें घेतलें (१७ फेब्रुवारी १३१०) व तेथील प्रतापरुद्र राजाशीं तह करून व लूट घेऊन तो परत दिल्लीस गेला (१० जून); परंतु पुन्हां द्वारसमुद्रावर स्वारी करण्यास निघून तेथें तो २५ फेब्रु. १३११ रोजीं पोहोंचला. तेथचा राजा वीरबल्लाळ हा त्याला शरण आला तेव्हा तेथून काफूर हा रामेश्वरापर्यंत जाऊन व तेथें एक मशीद बांधून परत दिल्लीस गेला. याच सुमारास (१३१२) दिल्लीस राहिलेल्या नव्या मुसुलमानांनीं (पूर्वींचे मोंगल लोक), त्यांना अल्लाउद्दिनानें सैन्यातून कमी केलें म्हणून त्याचा खून करण्याचा कट केला, परंतु तो उघडकीस आल्यानें त्यानें त्या सर्वांची कत्तल केली. अल्लाउद्दिनाचा वडील मुलगा खिझरखान यानें मामेबहिणीशीं लग्न लाविलें. (१३१२) तेव्हां मलिक काफूरनें चिथावल्यावरून अल्लाउद्दिनानें त्यास कैद केलें व त्याच्या मेव्हण्यास गुजराथचा सुभेदार अलपखान यास ठार मारिलें. त्यामुळें गुजराथेंत बंड झालें; त्यावर कमालुद्दीन यास पाठविलें असतां, बंडखोरांनीं त्याला ठार मारिलें. पुढें अल्लाउद्दीन मरण पावला. याच्या पदरीं झियाउद्दीन नराणी म्हणून इसम होता, त्यानें याच्याबद्दल पुढील प्रमाणें लिहून ठेविलें आहे. राज्यावर बसल्यापासून तीन वर्षांच्या आंत त्यानें राज्याचा चांगला बंदोबस्त केला. त्यामुळें त्याला चैनींत दिवस घालवितां येऊं लागले. त्याच्या फौजेस भराभर जय मिळाले; दरेक वर्षी त्याला दोनतीन मुलें होऊं लागलीं; तिजोरींत भरपूर पैका जमला; हिरेरत्नांच्या पेट्या जमूं लागल्या व हजारो हत्ती पीलखान्यांत झुलूं लागले. त्यामुळें तो ऐश्वर्यमदानें उन्मत्त बनला; गर्वानें व अज्ञानानें त्याचें डोकें बहकून तो भलतीं कृत्यें करूं लागला. त्याला विद्येचा गंधहि नसल्यानें विद्वानांची संगति याला आवडत नसे. तो हट्टी निष्ठुर व उर्मट होता. परंतु त्याला दैव अनुकूल होतें. नवीन धर्म स्थापून आपण त्याचे पैगंबर बनावें असें तो म्हणूं लागला; त्यानें आपणास दुसरा शिकंदर (अलेक्झांडर) असें नांव धारण केलें. लोकांनीं बंडें उभारलीं तेव्हां त्यानें लोकांचा छळ केला हिंदूंनीं हत्यारें घेऊं नयेत, घोड्यावर बसूं नये, उंची पोशाख करूं नये असे नियम केले. त्याच्या या कडकपणानें राज्यांत वरवर स्वस्थता दिसत असे

अल्लाउद्दिनाच्या पश्चात काफूरनें त्याच्या बेगमेस हांकलून देऊन त्याचा मुलगा खिझरखान व त्याचा एक भाऊ यांना आंधळें करून शिहाबुद्दीन नांवाच्या त्याच्या एका भावास तख्तावर बसविलें (१३१६) परंतु पुढें एक महिन्यानें काफूर याचा खून त्याच्या जुलमानें त्रासलेल्या दरबारी मंडळींनीं पाइक लोकांच्या एका टोळीकडून करविला. तेव्हां मुबारकशहा म्हणून अल्लाउद्दिनाच्या दुसऱ्या एका मुलानें शिहाबुद्दिनास पदच्युत करून आपण तख्तारोहण केलें (१३१७). त्यानें गुजराथेंतील बंड मोडून तेथें आपला सासरा मलिक दिनार उर्फ शाफरखान यास सुभेदार नेमलें. देवगिरीकर शंकरदेवाचा मेव्हणा हरपालदेव यानें यावेळीं उचल केली; तेव्हां मुबारकानें त्याच्यावर स्वतः जाऊन त्याचा पराभव केला (१३१८). मुबारक दुर्व्यसनी व चैनी होता. त्यानें हलक्या लोकांस मोठमोठ्या जागा दिल्या हसन नांवाच्या आपल्या एका आवडत्या गुलामास त्यानें वजीर करून त्यास मलिक खुश्रू पदवी दिली. खुश्रूनें मलबारवर स्वारी करून पुष्कळ लूट आणिली (१३१९). अल्लाउद्दिनानें निष्कारण कैदेंत टाकिलेल्या लोकांना मुबारकनें मोकळें करून रयतेच्या जप्त केलेल्या जमिनी सोडल्या व जुलमी कर बंद केले. खुश्रूच्या हातीं सर्व कारभार आल्यानें त्यानें करडा अंमल गाजविला. मुबारक आळशी व व्यसनी बनला. राज्यांत दारूचीं दुकानें वाढलीं; सर्वत्र महागाई झाली; देशांत बंडें उठलीं; त्यामुळें बादशहानें दडपशाही सुरू केली; निरपराध्यांनां ठार मारिलें; शेवटीं मलिक खुश्रूनें आपल्या मदतनिसाकरवीं मुबारकचा खून केला (१३२०). येथें खिलजीघराण्याचा शेवट झाला.

मलिक खुश्रू हा मूळचा हिंदू होता. त्यानें १ वर्षपर्यंत दिल्लीचें राज्य केलें. त्याच्या मनांत पुन्हां दिल्लीस हिंदूचें राज्य स्थापावयाचें होतें. त्यानें आपल्यास नासीरउद्दीन हें नांव घेतलें होतें. त्यानें खिलजीघराण्यांतील लोकांची कत्तल केली व मुबारकाच्या मुख्य बेगमेशीं (ही सुद्धां मूळची हिंदु होता) लग्न लाविलें. मुसुलमानाविरुद्ध त्यानें एकदम उचल केल्यानें ते चिडले व त्यांनीं बंड केलें. शेवटीं गाझीबेग तघलख यानें (हा पंजाबचा सुभेदार होता) दिल्लीवर स्वारी करून, मलिक खुश्रूचा पराभव केला. लढाईत खुश्रू ठार होऊन गाझीबेग घियासुद्दीन तघलख नांव धारण करून तक्तावर बसला (१३२१). खुश्रूस जर त्या वेळच्या सर्व हिंदु राजांनीं मदत केली असती तर दिल्लीस हिंदूचें राज्य पुन्हां स्थापन झालें असतें.

[संदर्भग्रंथ-ताझीयतुल्-अम्सीर; झिआउद्दीन बिराणी-ता. ई फिरूझशाही; माबेल डफ--इंडियन क्रॉना०; स्टॅन्ले लेनपूल-मिडीव्हल इंडिया; मिरात ई अहमदी; तारीख ई अल्फ; तुहफत उल् कीरान; फेरिस्ता; व्हि. स्मिथ.].

खिलात—याचा मूळ अर्थ बहुमानाचा झगा किंवा पोषाख असा असून, तो बादशहाकडून सरदारास बक्षीस म्हणून मिळत असे. शिवाय त्याबरोबरच देणारा व घेणारा यांच्या दर्जाप्रमाणें घोडा, हत्ती, तलवार वगैरे युद्धोपयोगी वस्तु आणि पागोटें, पायजमा, अंगरखा, शेला वगैरे वस्त्रें व

शिरपेच,कंठा इ. जवाहीरहि देत. दिल्लीवर पातशहानें थोरल्या बाजीरावसाहेबांस जी खिलात दिली होती (१७३९). तींत वरील वस्त्राशिवाय, दोन शिरपेंच, एक मोत्याचा कंठा, एक घोडा व एक हत्ती इतक्या वस्तू होत्या. पुढें दिल्लीकरानें (१७९२) त सवाईमाधवराव यांनां वकील-इ-मुतलक या जागेची सनद पाठविली त्यावेळींहि पुढीलप्रमाणें खिलात पाठविली होती बहुमानाच्या पोषाखाचीं नऊ वस्त्रें, पांच बहुमोल जडावाचे अलंकार, ढाल, तलवार, कलमदान, शिक्का, दऊत, दोन मोर्चेलें, नालखी, पालखी व एक हत्ती आणि बादशाही निशाणाचे सहा हत्ती.[मोलस्वर्थ-डिक्श. व ग्रँटडफ. व्हॉ. १, व्हॉ. ३.]

खिळिगिला—कोल्हापूरच्या शिलाहार राजांपैकीं इ.स. १०५८ च्या सुमारास राज्य करणारा मारसिंह हा राजा खिळिगिला किंवा खिळिगिली या अद्रिदुर्गा(किल्ल्या)वर राज्य करीत होता असें एका शिलालेखांत म्हटलें आहे. या लेखांत गूवल किंवा गूहल हा या किल्ल्याचा किल्लेदार असल्याचेंहि नमूद आहे. या किल्ल्याचा दुसरीकडे कोठेंहि उल्लेख नाहीं. डॉ. सर भांडारकर यांच्या मतें खिळिगिला म्हणजे पन्हाळा होय. ते म्हणतात कीं, मारसिंहाच्या पूर्वींचे व नंतरचे शिलाहार पन्हाळ्यास राज्य करीत होते म्हणून खिळिगिला म्हणजे पन्हाळा होय. काहींच्या मतें खिळगिला म्हणजे खेळणा (विशाळगड) होय. निसर्गतः कांहीं बाबतींत खेळणा हा पन्हाळ्याहून श्रेष्ठ आहे. मारसिंहाच्या (गोंका नांवाच्या) बापानें बरेंचसें कोंकण जिंकिलें होतें; मारसिंह राज्यावर आल्यानंतर त्यानें कोंकण व देश दोन्हीं ठिकाणीं बंदोबस्त करतां यावा म्हणून खेळणा किल्ला पसंत केला असावा. गूहल हा त्याचा चुलता होता; त्यास त्यानें खेळण्याचा किल्लेदार नेमलें असावें. [डॉ. भांडारकर—अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन; विविधज्ञानविस्तार अंक जून १९१८].

खीवा—मध्य आशियांतील एक संस्थान. एके काळीं हें आशियांतील महत्वाचें राज्य होतें, पण सध्यां रशियावर अवलंबून असलेलें हें लहानसें खानराज्य (खानेट) आहे. याची दक्षिणोत्तर लांबी २००मैल असून पूर्वपश्चिम रुंदी १०० मैल आहे. क्षेत्रफळ २४००० चौ. मै. व लो. सं. सुमारें ६४६०००. ज्वारी, गहूं, तांदूळ, कापूस, द्राक्षें, वगैरे जिन्नस येथें उत्पन्न होतात. येथील रानटी लोक उंट, मेंढ्या, घोडे, गुरें, इत्यादि प्राण्यांची पैदास करतात. ऊसबेग, सार्ट टाजिक, तुर्कोमन व कारा कालपाकस, अशा चार प्रकारचे लोक येथें राहतात. कापड, रेशीम व कातडें यांवर कशिदा काढणें हा येथील महत्वाचा घरगुती धंदा होय.

सध्यांचें खानेट हें भूतकालीन वैभवशाली राज्याचा एक क्षुद्र अवशेष आहे. पूर्वीच्या राज्यास चोरासमिआ,खारेझम, उरगेंजी अशीं निरनिराळीं नांवें होतीं. हिरोडोटस यानें चोरासमिआचा उल्लेख केलेला आहे. त्या वेळीं तो इराणच्या ताब्यांतील एक प्रांत होता. ख्रिस्तानंतर ६८० या वर्षी अरबांनीं चोरासमिआ काबीज केलें. खलीपांची सत्ता नष्ट झाल्यानंतरचा पहिला ऐतिहासिक राजा मामुन–बिन्–महंमद हा होय. १०१७ त खारेझम हें गझनीच्या महंमदाच्या हातीं गेलें. पुढें तें सेल्जुक तुर्कांच्या ताब्यांत गेलें. १०९७ त कुतुबुद्दीन हा गव्हर्नर स्वतःच येथील राजा झाला. १३७९ मध्यें तैमूरनें खीवा जिंकिलें. १५१२ तें ऊझबेगसत्तेखालीं गेलें.

१७ व्या शतकांत रशियानें खीवाशीं हितसंबंध जोडले. कोसॅक्स लोकांनीं खीवावर बऱ्याच स्वाऱ्या केल्या. १७१७ पीटर दि ग्रेटनें खीवावर सैन्य रवाना केलें. त्या लढाईंत रशियाचा जय झाला. १९ साव्या शतकांत १८३९ त मास्को सरकारनें पुन्हा खीवावर स्वारी केली पण त्यांचें भयंकर नुकसान झालें. १८४७ त रशियानें सिरदर्या नदीच्या मुखाजवळ एक किल्ला बांधला. १८६९ त कास्पियन समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर रशियानें क्रॅनोव्होडस्क हें ठाणें बांधलें. १८७१–७२ त रशियन तुर्कस्तानकडून खीवाला जाणारे निरनिराळे रस्ते शोधून काढले. १८७३ त रशियन सैन्यानें खीवावर चाल केली, व तें कांहीं एक प्रयास न पडता काबीज करण्यात आलें. अखेरीस आक्ससच्या दक्षिणतीरावरील सर्व प्रदेश रशियास जोडण्यात आला.

खुइखदान संस्थान—मध्यप्रांत. २१ ° ३०' आणि २१ ° १८' उत्तर अक्षांश व ८० ° ५३' आणि ८१ ° ११' पूर्व रेखांश. क्षेत्रफळ १५४ चौरस मैल. खुई म्हणजे पांढरी माती व खदान म्हणजे खाण. या दोन शब्दावरून संस्थानाचें नांव बनलें आहे. या लहानशा संस्थानाचे चार तुकडे असून ते सर्व रायपुर जिल्ह्याच्या पश्चिमेस आहेत. त्या चार तुकडयांचीं नांवें:—खुइखदान, बोरतारा, बिहारा, सिमई. या संस्थानांत नद्या नाहींत. पावसाची सरासरी दर वर्षाची सुमारें ४० इंच असून हवा साधारण बरी आहे. हिंवाळ्यांत हिंवतापाची सांथ उद्भवते.

इ ति हा स.—संस्थानचा पूर्वीचा इतिहास अज्ञात आहे. पारमोडीचा जमीनदार व येथील संस्थानिक यांमध्यें बरेच दिवस शत्रुत्व होतें. अखेरीस नागपूरकर भोंसल्यांच्या मदतीनें तुळसीदास नांवाच्या इसमास ही जमीनदारी मिळाली. त्यावेळीं कोंडका हें मुख्य ठिकाण होतें. कोंडका पारमोडीच्या फार जवळ असल्यामुळें तुळसीदासानें खुइखदान हें आपलें मुख्य ठिकाण केलें. तुळसीदासाच्या मरणानंतर महन्त लछमनदासास गादी मिळाली व ब्रिटिश सरकारनें त्यास आपली मान्यता दिली. १८६५ सालची सनद त्यास मिळाली.

सन १८६७ सालीं किशोरदासास गादी मिळाली. परंतु यानें संस्थानची व्यवस्था बरी न ठेवल्यामुळें ब्रिटिश सरकारनें आपल्या वतीनें एक दिवाण नेमला. सन १८९६ सालीं हा मरण पावला व त्याचा मुलगा राधावल्लभ किशोरदास यांस गादी मिळाली. परंतु दोन वर्षानंतर

यास व त्याचा एक १२ वर्षांचा मुलगा यास त्यांच्या नातलगांपैकीं एकानें विषप्रयोग करून ठार मारलें. अपराध्यास व त्याच्या साथीदारास पकडण्यांत येऊन त्यास फांशी देण्यात आलें. व राधावल्लभाचा वडील मुलगा दिग्विजयी किशोरदास यास कायदेशीर वारस ठरविण्यांत आलें. परंतु त्यावेळीं तो अज्ञान असल्यामुळें सर्व व्यवस्था ब्रिटिश सरकारच्या ताब्यात होती. परंतु हा फार अशक्त असल्यामुळें इ. सन १९०३ सालीं मरण पावला; व त्याचा धाकटा भाऊ महन्त सुंदर किशोरदास यास गादी मिळाली. याचा जन्म इ. स. १८९१ सालीं झाला. येथें प्राचीन अवशेष फारसे नाहींत. लोकवस्ती (१९११)३११५०.येथील भाषा छत्तिसगड हिंदी आहे. शेंकडा पंचाहत्तर लोकांचा धंदा शेतकी आहे. बाकीचे नोकर व रोजावर काम करणारे आहेत. यांचा धर्म शाक्त आणि वैष्णव आहे. येथें राहणाऱ्या जाती गोंड, लोधी, तेली, अहीर या होत. सुमारें ११४ चौरस मैल जमीन स० १९०४ सालीं लागवडीखालीं होती. पैकीं ५३ चौरस मैल जमिनीवर कोदन, १९ चौ. मैल जमिनीवर गहूं व सुमारें ९००० एकरवर भाताचें पीक होतें. दर वर्षी लागवडीखालीं येणाऱ्या क्षेत्राची वाढ होत आहे. स्थानिक गुरें लहान बांध्याचीं व अशक्त आहेत. संस्थानात उद्योगधंदे मुळींच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. एकंदर जंगल सुमारें १५ चौरस मैल आहे. खनिज संपत्तीचा शोध कोणी केला नाहीं. इमारती दगड व पांढरी माती संस्थानात पुष्कळ सांपडते. संस्थानांत जमीनमहसूल, अबकारी, शिक्षण, तुरुंग वगैरे नेहमींचीं खातीं आहेत. जमा (इ. स. १९०८) ६३८००रुपये व खर्च ६५६०० रु. आहे. खंडणी १२००० रुपये आहे.

खुझदार—बलुचिस्तानातील कलात संस्थानच्या झलवान भागातील मुख्य शहर. या ठिकाणीं नेटिव्ह असिस्टंट व कलातच्या खानाचा नायब रहातो. सिंधी लोकांत या शहराला कोहियार असें नाव आहे. या शहराची रचना एका लांबट व अरुंद अशा दरीसारखी असून या दरीच्या वरच्या टोंकावर १८७० सालीं एक किल्ला बांधण्यात आला. उत्तरेकडून कलातहून, दक्षिण दिशेनें कराची व बेलाहून, पूर्वेकडून कच्चीहून, व पश्चिमेकडून मकान व खारानहून असे चारी बाजूनीं येणारे रस्ते या ठिकाणीं मिळाल्यामुळें या ठिकाणाला फार महत्त्व प्राप्त झालें आहे. उन्हाळ्यामध्यें या ठिकाणची हवा वाईट असते. येथें एक तोफखाना असून ७ गोलंदाज, एक तोफ व ४५ लोकांची लष्करी तुकडी आहे. नेटिव्ह असिस्टंटच्या हाताखालीं २० लोकांची लष्करी तुकडी आहे. खुझदारच्या नायबतीमध्यें भागवान, झिडी, कोलाची, नालीचें खोरें, कर्ख व चक्कु यांमधील जमीनीचा अंतर्भाव होतो.

खुटगांव—मध्यप्रांत. जिल्हा चांदा. क्षेत्रफळ १५७ चौरस मैल. उत्तरेस धनोरा आणि दूधमळा जमीनदारी, दक्षिणेस आहेरी जमीनदारी पूर्वेस झारवाप्रा जमीनदारी, पश्चिमेस चांदाल आणि गिलगांव जमीनदारी. एकंदर खेडीं ५६, पैकीं १८ओसाड. बहुतेक खेडीं ठेकेदारांकडे आहेत. लागवडीखालीं जमीन ३६०० एकर. जमीन साधारण प्रतीची आहे. जमीनदारींत जंगल बरेंच आहे. लोकसंख्या (१९०१) २३६९. एकंदर उत्पन्न २५५८. टाकोळी ७५ रु. इतर कर ७५ ते ८० रु. सन १९०९-१० पासून टाकोळी १००रुपये ठरविली आहे. घराणें राजगोंड जातीचें आहे.

खुंटी, पोटविभाग.—बंगाल इलाख्याच्या रांची जिल्ह्याचा आग्नेय पोटविभाग. या पोटविभागाचें क्षेत्रफळ ११४०चौ. मैल होतें.१९०५ मध्यें हा पोटविभाग पाडण्यांत आला. हा विभाग पठारावर वसलेला आहे. हें पठार मधून मधून तुटलेलें असून, मध्येंच मोठ्या टेंकड्या व दऱ्या आहेत. १९११ सालीं या पोटविभागाची लोकसंख्या, २२५५४७ होती. या विभागांत, बुंडू हें एकच शहर असून ५०९ खेडीं आहेत. खुंटी हें या पोटविभागाचें मुख्य ठिकाण आहे.

शहर.—खुंटी पोटविभागाचें मुख्य ठिकाण. याची लोकवस्ती १९०१ सालीं १४४६ होती. रांचीपासून चैबासला जाणाऱ्या रस्त्यावरील हें एक व्यापारी गांव आहे.

खुतबा—मशीदींत नमाज पढल्यानंतर दर शुक्रवारीं हा खुतबा मुसलमान लोक पढत असतात. महम्मद पैगंबर व त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसलेले चार पुरुष (खलीफ) यांची स्तुति या खुतब्यांत गाइलेली असते. त्याचप्रमाणें त्यावेळीं देशावर जो मुसुलमान राजा राज्य करीत असतो त्याचेंहि नांव वरील पांच नांवांमध्यें दाखल करण्याची चाल आहे. मुसुलमान पातशहा तख्तारूढ झाला कीं त्याच दिवशीं व त्याच वेळेस वरीलप्रमाणें खुतबा पढतात. आपलें नांव खुतब्यांत दाखल करावें या साठीं बऱ्याच मुसुलमान राजांनीं मुसुलमानी प्रजेस छळलें आहे असें मुसुलमानी इतिहासावरून दिसून येतें. हल्लीं तुर्केच तुर्कस्तानच्या लोकसत्ताक राज्यांत इस्तंबूलच्या मुख्य खलिफाचेंच उच्चाटण झालें आहे, त्यामुळें या खुतब्याच्या वेळीं खलिफाच्या नामोच्चारणाच्या प्रसंगीं काय करावें हा एक प्रस्तुतच्या मुसुलमानांना प्रश्नच पडत असेल. [मोलस्वर्थ–डिक्श; फेरिस्ता.]

खुताहन—संयुक्तप्रांतांतील जौनपूर जिल्ह्याच्या उत्तरभागांतील तहशील. हिचें क्षेत्रफळ १९११ सालीं ३६१ चौ. मै. होतें. या तहशिलींत उंगली, रारी, कर्यात, मेंढा व चादा हे पांच परगणे आहेत. प्रतापगड व सुलतानपूर जिल्ह्यांतील थोडासा भाग या तहशिलींतच मोडतो. या तहशिलीची लोकवस्ती १९११ मध्यें २५०८८९ होती. या तहशिलींत शहागंज हें एकच शहर असून७०० खेडीं आहेत. शहागंज हें या तहशिलीचें मुख्य ठिकाण आहे. १९०३–४ सालीं या तहशिलीचें साऱ्याचें उत्पन्न २,२७,००० होतें व करांचें उत्पन्न ५०,००० होतें. गोमती ही एकच नदी या

तहशिलींतून वहात जाते. तहशिलींतील कांहीं भागांत तांदूळ उत्तम पिकतो पण बराच भाग ओसाड आहे. एकंदर लागवडीची जमीन २८८ चौरस मैल असून १२९ चौरस मैलांस विहिरी व तलाव यांच्या मुळें पाणीपुरवठा होतो.

खुदागंज—संयुक्तप्रांतांमधील शहाजहानपूर जिल्ह्याच्या तिल्हर तहशिलींतील शहर. हें शहाजहानपूर शहराच्या वायव्येस २४ मैलांवर असून त्याची लोकसंख्या १९०१ त ६५३५ होती. १८ व्या शतकांत व्यापारासाठीं हें शहर वसविण्यांत आलें. १८५० पर्यंत हें तहशिलीचें मुख्य ठिकाण होतें. अद्यापीहि व्यापाराच्या बाबतींत हें फार भरभराटीचें शहर आहे. येथें एक माध्यमिक शाळा आहे. १८५६ च्या २० या कायद्याप्रमाणें याचा कारभार पाहिला जातो.

खुदियन—पंजाबमधील लाहोर जिल्ह्याच्या चूनियन तहशिलींतील शहर. मुलतान फेरोझपूर रस्त्यावर, कसूरच्या नैर्ऋत्येस १२ मैलांवर हें शहर वसलेलें आहे. या शहराची वस्ती १९११ सालीं २९९२ होती. हा मुख्यतः शेतकीचा प्रदेश आहे. सतलज नदीचा कटोरा कालवा हा या शहराच्या जवळून गेला आहे. १८७५ सालीं या शहराला म्युनिसिपालिटी देण्यांत आली. शहरात एक दवाखाना आहे.

खुरई त ह शी ल.—मध्यप्रांतांतील जिल्ह्याच्या वायव्य भागांतील एक तहशील. १९११ सालीं हिचें क्षेत्रफळ ९०० चौ. मै. होतें. लोकसंख्या १,११,०७० होती या तहशिलींत खुरई व एटवा हीं दोन शहरें असून ४७० खेडीं आहेत. या तहशिलींतील १२४ चौरस मैल सरकारी जंगल असून बाकीच्या उरलेल्या क्षेत्रफळापैकीं जवळजवळ निम्मा भाग लागवडीला योग्य आहे. १९०३–४ सालीं या तहशीलींतील २३८ चौरस मैल जमिनीची लागवड करण्यांत आली. जमिनीचा महसूल ७७,००० रुपये व कर ८००० रुपये होता. या तहशीलींतील जमीन उंचसखल असून उत्तरेकडील भागांत बरेच दगड आहेत; बीना व बेटवा नदीच्या काठीं जंगलें पसरलीं आहेत.

श ह र— खुरई तहशिलीचें मुख्य ठिकाण. बीना शहराकडे जाणाऱ्या रेल्वेच्या फांट्यावर हें वसलेलें असून सौगरशहरापासून ३३ मैल दूर आहे. याची लोकवस्ती १९११ सालीं ६८६८ होती या शहरांत एक जुना पुराणा किल्ला असून तेथेंच हल्लीं कचेऱ्या भरतात. येथें जैन लोकांची बरीच वस्ती आहे व जैनांचीं सुंदर देवालयें आहेत. १८६७मध्यें या शहराला म्युनिसिपालिटी देण्यांत आली. या ठिकाणीं दर आठवड्यास गुरांचा बाजार भरतो, व येथून ब्रह्मदेशास सुकें मांस रवाना होतें. येथें माध्यमिक शिक्षणाची शाळा असून दोन मुलींच्या शाळा व एक स्वीडिश ल्यूथेरन मिशननें चालविलेली एक शाळा आहे; शिवाय येथें एक दवाखाना आहे.

खुरासणी—या झुडुपास लॅटिनमध्यें गुइझोटिया अबिसिनिका; मराठींत कारळा रामतीळ, खुरासणी; गुजराथींत रामतळ: कानडी–गुरेलू; हिंदी–जगनी इत्यादि नांवें आहेत. मुंबई इलाख्यांतील गुजराथेंत कारळा फारसा होत नाहीं. पंचमहाल जिल्ह्यांत थोडथोडा होतो. देशावर व कर्नाटकांत सर्वत्र होतो. परंतु हें पीक नाशिक व विजापूर जिल्ह्यांत महत्त्वाचें आहे. कोंकणांत व मावळांत वरकस जमिनींत आणि मध्यप्रांत व तेलंगणांत डोंगराळ भागांत याचा पेरा जास्त असतो.

हें पीक हलक्या, भुसभुशीत अशा जमिनींत चांगलें होतें. कारळे कधीं स्वतंत्र व कधीं बाजरींत मिसळून पेरितात. मिसळीच्या पेऱ्यांत दर एकरी बियाचें प्रमाण एक पौंड अजून स्वतंत्र पेऱ्यांत चार ते सहा पौंड असतें. बीं पाभरीनें पेरितात. ओळीमध्यें अंतर सुमारें एक फूट असतें. पीक नोव्हेंबर डिसेंबरांत तयार होतें. काड्यांनीं झोडून बीं तयार करितात. याचें दर एकरी स्वतंत्र पीक अजमासें ८०० ते ५०० पौंड येतें व मिसळीचें पीक अजमासें ५० ते ७५ पौंड असतें. कर्नाटकांत कित्येक वेळा हें पीक तागाप्रमाणें हलक्या जमिनींत करून हिरवळ खताकरितां गाडितात. याचें तेल स्वयंपाकांत उपयोगी पडतें. पेंड गुरांना खाण्यास व खताकरितां उपयोगी आहे.

खुरिया—मध्यप्रांत. जशपूर संस्थानचा वायव्य भाग व्यापणारें पठार व इलाखदारी. उ. अ. २३ ° ०'ते २३°१४ व पू. रे. ८४ ° ३०' ते ८३ ° ४४'. या पठारावर मोठमोठीं कुरणें असल्यामुळें मिर्झापूरचे व इतर ठिकाणचे बरेच गोपाल व अहीर ढोरांचे कळपच्या कळप येथे चारावयास आणतात. अशा कांहीं अहीरांनीं येथें कायमची वस्ती केली आहे. येथील मुख्य वस्ती ‘ पहाडी कोरवा ’ लोकांची असून जमीनदार त्याच जातीचा आहे. कांहीं काळापूर्वी त्यास कोरवांचा ‘ माझी ’ असें म्हणत असत. त्यास ‘ दिवाण ’ ही स्थानिक पदवी आहे. परंतु तो बाघेला रजपूत व खुरिया राणीचा वंशज आणि रतनपूरच्या हैहयवंशी राजाचा संबंधी असून रतनपूरहून येथें आला असल्याचें सागतो. या जमीनदारींत ७९ गांवें असून ५६२ रुपये टाकोळी आहे.

खुर्जा, त ह शी ल—संयुक्त प्रांतांतील बुलंदशहर जिल्ह्यांतील दक्षिण तहशलि. हिचें क्षेत्रफळ १९११ सालीं ४६० चौ. मै. होतें. या तहशिलींत जेबर, खुर्जा व पहासू हे तीन परगणे आहेत. १९११ सालीं याची लोकसंख्या २,५८,८४० होती. तहशिलींत ७ शहरें व ३४८ खेडीं आहेत. १९०३–४ सालीं या तहशिलीचें उत्पन्न ५०,५०,०० रुपये व कराचें उत्पन्न ८२,००० रुपये आलें. तहशिलीमध्यें पूर्वकाली, करवन व पटवाहा बाहू या नद्या आहेत. पश्चिम सरहद्दीवरून यमुना नदी वहात गेली आहे. काली नदीच्या पूर्वेस व पटवाईच्या पश्चिमेस रेताड जमिनीचे पट्टे

आहेत. तहशिलीच्या मध्यभागांतील प्रदेश फार सुपीक आहे. या भागांत कापूस फार पिकतो. १९०३–४ सालीं ३४५ चौ. मै. जमीनीची लागवड करण्यांत आली होती. त्यांपैकीं १५२ चौ. मै. ला पाण्याचा पुरवठा विहिरी व कालवे यांच्यामुळें होत होता.

श ह र.—खुर्जा तहशिलीचें मुख्य ठिकाण. ईस्ट इंडियन रेल्वेच्या फांट्यावर हें वसलेलें आहे. या शहराची लोकसंख्या १९.११ सालीं २८३८७ होती. त्यांपैकीं हिंदू १४४८५ व मुसुलमान १२०४५ होते. या शहराचें नांव 'खारीज' (इनाम) या शब्दावरून पडलें. फिरोजशाह तघलखनें भाले सुलतान रजपुतांना हा प्रदेश इनाम दिल्यानंतर त्यांनीं हें शहर वसविलें असें म्हणतात. पुढें १७४० मध्यें भरतपूरचा राजा सुरजमल्ल यानें त्यांपैकीं बराच भाग हिरावून घेतला. व १८ व्या शतकाच्या अखेरीस दौलतराव शिंद्यानें त्यांतला बराच भाग परत घेतला. या शहरांत ४०० वर्षांच्या पूर्वीचें जुनें असें मखदुम साहेबाचें थडगें आहे. याशिवाय तहशिली दवाखाना व टाऊन हॉल अशा आणखी तीन इमारती आहे... या शहरांत केशरी, पठाण व चुरुवाल जातींचे वाणी यांची पुष्कळ वस्ती आहे. चुरुवाल वाण्यांचा जैन धर्म असून ते मोठे धनाढ्य आहेत. त्यांनीं चाळीस वर्षांपूर्वी आपल्या ज्ञातीच्या खर्चानें एक उत्कृष्ट जैन मंदिर बांधविलें आहे. त्यातील कलाकुसरीचें काम प्रेक्षणीय आहे. मंडई, धर्मशाळा, वगैरे इमारतीहि खोंदीव दगडानें बांधलेल्या आहेत. अमेरिकन मेथॉडिस्ट, झनाना बायबल व मेडिकल मिशन या संस्थांनीं आपल्या शाखा येथें उघडल्या आहेत.

खुर्जा शहराला १८६६ मध्यें म्युनिसिपालिटी देण्यांत आली. १९०३–४ सालीं या म्युनिसिपालिटीचें उत्पन्न ३८,००० व खर्च ४२,००० रुपये होता. जिल्ह्याच्या व्यापाराचें हें ठिकाण असल्यानें येथें कापसांतील सरकी काढण्याच्या व गठ्ठे बांधण्याच्या गिरण्या आहेत. तसेंच येथून धान्याची निर्गत बरीच होते. नीळ, साखर, तूप हेहि जिन्नस बाहेर गांवीं पाठविण्यात येतात. येथील भांडकामहि चांगलें होतें. इंग्लिश कापड, धातू, पितळेचीं भांडीं हीं बाहेरून या शहरात येतात. या शहरीं ८ शिक्षणाच्या शाळा आहेत.

खुर्दा, पो ट वि भा ग.—बंगाल इलाख्यांतील पुरी जिल्ह्याचा पश्चिम पोटविभाग. याचें क्षेत्रफळ १९११ सालीं ९७१ चौरस मैल होतें. लोकसंख्या ३६७६०४ होती. हा पोटविभाग छोटा नागपूर प्रदेशाच्या आग्नेय सरहद्दीशीं भिडलेला आहे. या भागांत पुष्कळ लहान टेंकड्या असून त्यांत जंबूर दगड मुबलक सांपडतो. या टेंकड्यांच्या मधील सपाट जमीनींत कुरुंद व पुळणी आहे. या पोटविभागांत १२९२ खेडीं आहेत व खुर्दा हें या पोटविभागाचें मुख्य ठिकाण आहे. भुवनेश्वर येथें लिंगराजाचें सुप्रसिद्ध देवालय असून शिवाय लहान लहान देवालयें पुष्कळ आहेत. खानगिरी व उदयगिरी डोंगरांमध्यें पुष्कळ दर्‍या व खडकांमध्यें खोदलेलीं देवालयें आहेत.

ओरिसाच्या हिंदुराजघराण्याच्या ताब्यांत शेवटपर्यंत असणारा मुलूख हाच होय. हा डोंगराळ व जंगलवजा टापू असल्यानें मराठ्यानां हा प्रदेश जिंकतां आला नाहीं. १८०४ पर्यंत येथील राजघराण्यानें आपलें स्वातंत्र्य राखलें पण १८०४ सालीं घराण्यातील राजानें ब्रिटिशसरकारविरुद्ध बंड केल्यामुळें त्या राजाच्या ताब्यांत असलेला प्रदेश जिंकून तो ब्रिटिशसरकारनें आपल्या ताब्यांत घेतला. १८१७–१८ मध्यें येथील शेतकरी वर्गानें बंड केलें पण तें लवकरच मोडण्यांत आलें व त्यांच्या मागण्या शक्य तितक्या मंजूर करण्यांत आल्या. हल्लीं या विभागात पूर्ण सुव्यवस्था व शांतता नांदत असून याचें उत्पन्न ३.७७ लाख आहे. खुर्दचा हल्लींचा राजा जगन्नाथच्या देवालयाची व्यवस्था पहातो.

श ह र.—खुर्दा पोटविभागाचें मुख्य ठिकाण. कटकपासून गंजमकडे जाणाऱ्या राजरस्त्यावर हें वसलेलें असून या गांवावरून बंगाल नागपूर रेल्वेचा फांटा गेला आहे. या खेड्याची लोकवस्ती १९०१ सालीं ३४२४ होती. १८१८–२८ पर्यंत पुरी जिल्ह्याचें हें मुख्य ठिकाण होतें. येथें एक छोटेखानी तुरुंग असून १० कैद्यांची व्यवस्था त्यांत होऊं शकते.

खुर्दादभाई—याचें संबंध नाव अबुल कासीम उबयदुल्ला बिन अहमद असें होतें. ह्या ग्रंथकारासंबंधीं यूरोपीय पंडितामध्यें फार वाद आहे. ह्या ग्रंथकाराचा आजा खुर्दाजिन हा जादूगार असून त्याला बॅरमॅसिडनीं मुसुलमानी धर्माची दिक्षा दिली होती. अबुल कासीमची जाबल पर्वताशेजारच्या प्रांतांत संदेशखात्यावर नेमणूक झाली. नंतर तो खलिफा मोलामिडच्या दरबारीं येऊन त्याचा एक प्रधान झाला. त्यानें पुष्कळ पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं लिहिल्याप्रमाणें:–(१) किताब अबाब–अस–समा (ह्या पुस्तकातूनच मसउदीनें मो टॅमिडच्या चरित्रांत उत्तम उतारा घेतला आहे) (२) किताब जमहुर अनसाब अल–फर्स, ह्यामध्यें पर्शियन लोकांच्या वंशाची फार उत्तम माहिती दिली आहे. (३) किताब—अल—मसालिक वाल–मुमालिक हें पुस्तक राज्यें व रस्ते ह्यासंबंधीं भौगोलिक माहितीचें आहे. (४) किताब–अल–शराब हें पुस्तक पेयासंबंधीं आहे. (५) किताब–अल–लहवल-मलाहि हें पुस्तक खेळ व करमणूक ह्यावर आहे. (६) किताब–अल–अनवा हें पुस्तक ताऱ्यांसंबंधीं आहे. (७) किताब–अल-नुदमा–वल-जुलसा हें पुस्तक दरबारी लोकांसंबंधीं आहे. ह्या ग्रंथकाराचें फक्त एक पुस्तक आपणास उपलब्ध होतें असें इलिअटनें म्हटलें आहे. तें इब्न–खुरदाझिबचा भूगोल हें होय. ह्याची फक्त एक प्रत यूरोपांत आहे त्याचें हस्तलिखित प्राचीन असून त्याच्यावर १२३२ हा सन आहे. पण त्याच्यावर भिन्नोच्चारदर्शक खुणा नाहींत. तें ऑक्सफोर्डच्या बॉड्लिअन लायब्ररींत

ठेवलें आहे. हा इम्न खुरदाझिब इ. स. ९१२ त मरण पावला.

खुलदाबाद, ता लु का.—हैद्राबाद संस्थानांतील औरंगाबाद जिल्ह्याच्या वायव्य भागांतील हा तालुका आहे. १९११ त या तालुक्याची लोकसंख्या २५०३३ होती. याचें क्षेत्रफळ १२९ चौरस मैल होतें. या तालुक्यांत ३८ खेडीं आहेत. खेड्यांपैकीं ९ खेडीं जहागीर आहेत. १९०१ त या तालुक्याचा महसूल ८३३०० रुपये होता. या तालुक्याचा पूर्वेकडील व उत्तरेकडील भाग डोंगराळ आहे.

गां व.—खुलदाबाद तालुक्याचें मुख्य ठिकाण. औरंगाबाद शहरापासून १४ मैलांवर हें ठिकाण असून तें २७३२ फूट उंचीवर बसलेलें आहे. १९०१ मध्यें याची लोकसंख्या २८४५ होती. येथें औरंगझेब, अझमशहा, हैद्राबादसंस्थानचा मूळ संस्थापक असफजाह, अहमदनगरचा निजामशहा नासीरजंग, मलिक अंबर, तानशहा इत्यादि प्रसिद्ध पुरुषांची व पुष्कळ साधूंचीं थडगीं आहेत. या खेड्याचें पूर्वीचें नाव रौझ होतें. पण औरंगझेबाच्या मरणानंतर औरंगझेबाला खुल्दमकान हा किताब देण्यांत आला त्यावरून खुलदाबाद हें नांव प्रचारांत आलें. या खेड्याच्या नजीकच्या पठारावर भद्रवन्ती या इतिहासप्रसिद्ध हिंदू शहराचे जीर्ण अवशेष अद्यापि पहावयास मिळतात. येथें तालुकाकचेरी, पोस्टऑफिस, शाळा व पोलिसठाणें आहे. हें खेडें आरोग्यस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

खुलना, जि ल्हा.— बंगाल इलाख्यांतील प्रेसिडेन्सी पोटविभागापैकीं एक जिल्हा. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ, दक्षिणेकडील सुंदरबनाचें क्षेत्रफळ सोडून देतां, १९११ सालीं ४७६५ चौ.मै होतें. या जिल्ह्यांत हुगळी व मेघना नद्यांच्या मुखामधील टापूच्या दक्षिणेकडील भाग येतो. या जिल्ह्याच्या उत्तरेस जेसोर जिल्हा, पूर्वेस वकरगंज, पश्चिमेस चोवीस परगण्यांचा मुलुख व दक्षिणेस बंगालचा उपसागर आहे. या जिल्ह्याचे वर्णनाच्या सोईसाठीं चार भाग पाडता येतील. ते वायव्य, ईशान्य, मध्य व दक्षिण या दिशेकडील भाग होत. वायव्य भागांतलि जमीन उन्नत आहे तर ईशान्य भागांतील जमीन सखल व दलदलीची आहे. मध्यभागांतील जमीन सखलच आहे व हल्लीं ती लागवडीखालीं आणण्यात आली आहे. दक्षिणेकडील भागांत नद्यांचें जाळेंच असल्यानें व दलदलीच्या जागा, फार असल्यानें त्या ठिकाणची जमीन लागवडीला अयोग्य झाली आहे. या भागांत स्थिर लोकवस्तीहि नसते. हा जिल्हा म्हणजे एक पुळणीयुक्त सपाट प्रदेश असून या प्रदेशांतून उत्तरेकडून दक्षिणेकडे पुष्कळ नद्या वहात गेल्या आहेत. मधुमती ही नदी या जिल्ह्यांतून वहात जाऊन व पुढें बालेश्वर हें नांव पावून, हरिणघात या मुखानें समुद्राला मिळाली आहे. याशिवाय इच्छामती, यमुना, कबदक, भैरव या नद्या प्रमुख असून छोटया छोटया नद्या तर पुष्कळच आहेत. या टापूंत सरोवर असें मुळींच नाहीं. पण दलदलीच्या जागा मात्र फार असून त्यांपैकीं बाययबिल या दलदलीच्या जागेची लांबी ८० मैल आहे. पण त्यापैकीं बराचसा भाग हल्लीं लागवडीखालीं आणण्यांत आला आहे. जिल्ह्याच्या वायव्यभागांत खजूरीच्या झाडांचीं वनेंच्या वनें आहेत. ईशान्येकडील भाग व मध्यभाग हे पावसाळ्यामध्यें पाण्यांत बुडून जातात. नदीचीं तीरें हीं उंचावर असल्यानें तेवढींच काय तीं पाण्यावर रहातात. या तीरावर मोठमोठीं दाट जंगलें आहेत व त्यांत अनेक प्रकारचे वृक्ष, व वनस्पती आहेत. बांबू, माड, ताड, इत्यादि झाडांची येथें समृद्धि आहे. पाण्यानें बुडलेल्या प्रदेशांत कांहीं ठिकाणीं तांदूळ पेरण्यांत आलेला दिसतो. पण बहुतेक भागांत शेवाळ, कमळें, इत्यादींचाच सुकाळ आढळतो. दक्षिणेकडील सुंदरबनाच्या टापूंत सागवान व इतर प्रकारचें लांकूड भरपूर मिळतें.

सुंदरबनामध्यें वाघ, चित्ते, रानम्हशी, डुकरें, हरिण, काळवीट, माकडें, इत्यादि पशू विपुल आढळतात. विशेषतः वाघाचा या भागात फार उपद्रव असल्यानें या भागांत जमीनीची लागवड करण्याला लोक फारसे धजत नाहींत. मधुमती, भैरव व सुंदरबनांतील सव नद्यांमध्यें सुसरी आढळतात. त्याप्रमाणें या जिल्ह्यांत निरनिराळ्या प्रकारचे सापहि भरपूर सांपडतात. या जिल्ह्यामध्यें पावसाचें वार्षिक प्रमाण ६५ इंच आहे. जिल्ह्यांत नद्यांचा सुकाळ असल्यानें वरचेवर मोठमोठे पूर येऊन नासधूस होते. अशा प्रकारचें पूर १८८५ १८९० व १९०० सालीं आले होते. हल्लीं, मधुमती नदीचे कालवे निघाल्यापासून व छोट्या नद्यांचे प्रवाह आटल्यामुळें पूर वरचेवर येण्याचें कमी झालें आहे.

इतिहासः—प्राचीन काळीं या जिल्ह्याचा वंगाच्या अगर समतताच्या राज्यात अंतर्भाव होत असे. पुढें बल्लाळसेनानें बंगालचे जे भाग पाडले त्यापैकीं बागरी पोटविभागांत हा जिल्हा मोडूं लागला. सुमारें पाच शतकापूर्वी, खानजी अल्ली नावाच्या एका सरदाराला गौरच्या राजानें हा जिल्हा जहागिर दिला. त्यानें सुंदरबनांतील बरींच झाडें झुडपें तोडून टाकून तेथें राहण्याजोगी व्यवस्था केली. तो या जिल्ह्याचा राजाच होता म्हटलें तरी चालेल. त्यानें आपल्या जहागिरींत असंख्य मशीदी व थडगीं बांधलीं. त्यांपैकीं कांहीं अद्यापि बाघेरहाट व मासिंजरकुर येथें जीर्णावस्थेंत असलेलीं पहावयास सांपडतात. बंगालचा शेवटचा राजा दाऊदखान याच्या विक्रमादित्य नांवाच्या आपल्या प्रधानानें दिल्लीच्या राजाकडून सुंदरबनची जहागिर मिळविली व ईश्वरीपूर नांवाचें एक शहर वसविलें. या शहरापासून हल्लींच्या जेसोर जिल्ह्याला 'जेसोर' हें नाव पडलें. विक्रमादित्यामागून त्याचा मुलगा प्रतापदित्य हा सुंदरबनचा कारभार पाहूं लागला. त्यानें दक्षिणबंगालमधील छोटया संस्थानिकांना आपल्या ताब्यांत आणलें. पण पुढें

अकबराचा सेनापति मानसिंग यानें त्याचा पराभव केला व त्याला बंदिवान केलें. हल्लींचा खुलना जिल्हा हा १८८२ मध्यें पाडण्यांत आला. ब्रिटिशांच्या ताब्यांत हा जिल्हा आल्यापासून त्यांनीं या जिल्ह्याच्या दक्षिण, मध्य, नैर्ऋत्य भागांतील लागवडीची जमीन वाढविण्यास सुरुवात केली व त्यामुळें या भागांतील लोकवस्ती वाढूं लागली. वायव्येकडील भाग मात्र फार दलदलीचा असल्याकारणानें त्या भागांतील वस्ती उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. उत्तरेकडील भागाची हीच स्थिति झाली. या भागांत हिंवतापाची साथ नेहमीं असते. याशिवाय अमांश, अतिसार, अग्निमांद्य या रोगाचाहि फैलाव येथें फार आहे. खुलना जिल्ह्यांत खुलना बाघेरहाट व सातखिरा या पोटविभागांचा समावेश होतो. या जिल्ह्यात एकंदर लोकसंख्या १९११ सालीं १३,६६,७६६ होती. खुलना, देभाट व सातखिरा हीं तीन मुख्य शहरें आहेत. जिल्ह्यांत हिंदु व मुसुलमानांची सारखीच वस्ती आहे. पूर्व-बंगाली उर्फ मुसुलमानी व बंगाली या भाषा प्रचलित आहेत. मुसलमानांत शेख, अजलाफ व जोलाह या जातींचे लोक पुष्कळ आहेत. यांतील बहुतेक मुसुलमान हे मुळचे हिंदु होते. हिंदूंमध्यें कायस्थ, कैवर्त व ब्राह्मण या जाती प्रमुख आहेत.

मथियाल जमीनींत तांदूळ पुष्कळ पिकतो. याशिवाय कडधान्यें, सुपारी, इत्यादि जिन्नस' दोआशिय ' जमीनींत पिकतात. खजुरीचीं झाडेंहि पुष्कळच होतात. जिल्ह्यांत कुरणें फारच थोडीं आहेत. गुरांना भरपूर चारा मिळणें देखील अशक्य होतें. येथील गुरांची निपजहि फारच हलक्या दर्जाची आहे. सुंद्री, पशुर, अमूर, केवडा, गराव, जोआ हीं झाडें सुंदरबनांतील जंगलांत मुबलक आहेत.

जिल्ह्यांतील मुख्य धंदा साखर व काकवी तयार करण्याचा आहे. कालीगंज येथील मातीच्या भांड्यांचा धंदा, तसेंच चाकू, कातऱ्या तयार करण्याचा धंदा व शिंगांपासून निरनिराळ्या वस्तू तयार करण्याचा धंदा प्रसिद्ध आहे. तांदूळ, भात, चणे, डाळ, जूट, तंबाखू, साखर, सरपण, सागवान, विड्याचीं पानें, नारळ, सुपारी, मासे इत्यादि जिन्नस बाहेर गांवीं जातात. कापूस, कांचसामान, परदेशी कापड, कातड्याचें सामान, कोळसा इत्यादि जिनसांची आयात होते. खुलना, दौलतपूर, फुलतला, अलिपूर, कपिलमुनी, चक्रनगर, चलवा, बाघेरहाट, जात्रापूर, बारदल, कालीगंज, देभाट, वसंतपूर वगैरे ठिकाणीं बाजारपेठा आहेत. खुलना, जेसोर कलकत्ता यामधून ईस्टर्न बंगाल स्टेट रेल्वेचा फांटा गेला आहे. खुलना जेसोर व बाघेरहाट यामधून एक मोठा रस्ता गेला आहे. १९०३–४ मध्यें या जिल्ह्यांत ४९० मैल रस्ता होता. पैकीं १२ मैलांचा रस्ता खडीचा होता. जिल्ह्यांतील मोठ्या नद्यांमधून बोटी जाऊं शकतात व जलमार्गानें व्यापार बराच चालतो.

राज्यकारभाराच्या सोयीकरितां जिल्ह्याचीं खुलना बाघेरहाट, साताखिरा हीं तीन मुख्य ठिकाणें केलीं आहेत. खुलना पोटविभागावर एक मॅजिस्ट्रेट व त्याच्या हाताखालीं चार डेप्युटी माजिस्ट्रेट असतात. बाकीच्या दोन पोटविभागांवर एक कलेक्टर व त्याच्या हाताखालीं एक डेप्युटी कलेक्टर असतो. सुंदरबन विभागाची व्यवस्था पहाण्याकरितां एक स्वतंत्र जंगलअधिकारी व त्याच्या दिमतीला दोन दुय्यम अधिकारी असतात व ते खुलना येथें रहातात. न्यायखात्यावर डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज हा मुख्य अधिकारी असून त्याच्या हाताखालीं, खुलना पोटविभागावर दोन मुनसफ व एक सबॉर्डिनेट जज्ज व इतर विभागांवर तीन मुनसफ असतात. जिल्ह्यामध्यें एकंदर १२ फौजदारी कोर्टें आहेत.

बंगालमध्यें ज्यावेळीं कायमधारापद्धति सुरू झाली त्यावेळीं या जिल्ह्याच्या पुष्कळ ' जमीनदारी ' पाडण्यात आल्या. या सर्व जमीनदारींचें मिळून ६.९ लाख उत्पन्न येतें. जिल्ह्याचें एकंदर उत्पन्न १९०३–४ सालीं १४,२३,००० रुपये होतें. खुलना, सातखिर व देभाट येथें म्युनिसिपालिट्या स्थापन झाल्या आहेत. जिल्ह्यांत एकंदर १३ पोलिसठाणीं आहेत: व त्याच्यावर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट हा मुख्य अधिकारी असतो. खुलना, बाघेरहाट व सातखिर येथें एक तुरुंग आहे.

शिक्षणाच्या बाबतींत खुलना जिल्हा बराच मागासलेला आहे. १९०३-४मध्यें या जिल्ह्यांत ३४००० मुलें व ३०० मुली शिक्षण घेत असून १००९ शिक्षणसंस्था होत्या. १९०३–४ सालीं जिल्ह्यांत ११ दवाखाने होते.

पो ट वि भा ग— क्षेत्रफळ ६४९ चौ. मै. लोकसंख्या ४,४३,२४५. या पोटविभागांत खुलना हें शहर असून ९२९ खेडीं आहेत. खुलना, अलीपूर, दौलतपूर, डमरिया, फुलतला कपिलमुनि या ठिकाणीं बाजारपेठा आहेत.

श ह र—खुलना जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. भैरव नदी ज्या ठिकाणीं सुंदरबन येथें शिरते त्या ठिकाणीं हें वसलेलें आहे. याची लोकसंख्या १९११ सालीं १,५९,८५० होती. खुलना हें सुंदरबनाची राजधानी असून हें व्यापारी शहर आहे. ईस्टइंडिया कंपनी ज्यावेळीं मीठ तयार करीत होती त्या वेळीं खुलना येथें मिठाचें कोठार होतें. येथून नारायणगंज, बारीसाल, मादारीपूर इत्यादि ठिकाणीं जलमार्गानें व्यापार चालतो. तांदूळ, साखर, सुपारी, नारळ इत्यादि जिनसांची येथून निर्गत होते. १८८४ सालीं खुलन्याला म्युनिसिपालिटी देण्यांत आली. येथें दिवाणी, फौजदारी व रेव्हेन्यु कोर्टें आहेत. याशिवाय जिल्हातुरुंग, शाळा व दवाखानाहि येथें आहे.

खुशातर—हें लखनौचा कायथ मुनशी जगन्नाथ ह्याचें टोपण नांव होतें. हा कवि उर्दू रामायणाचा कर्ता

असून हें रामायण तुळसीदासच्या रामायणाचें भाषांतर आहे. हें इ. स. १८५२ मध्यें केलें आहे.

खुशाब, त ह शी ल.—पंजाबमधील शहापूर जिल्ह्याची एक तहशील. या तहशिलीचें क्षेत्रफळ २५१२ चौरस मैल आहे. याच्या पूर्वेकडून झेलम नदी वहात गेली आहे. १९११ त या तहशिलीची लोकसंख्या १,७५,८२४ होती. खुशाब हें तहशिलाचें मुख्य ठिकाण आहे. या तहशिलींत एकंदर २०६ खेडीं आहेत. या तहशिलीचें उत्पन्न १९०३–४ सालीं २.४ लाख होतें. याच्या उत्तरभागांतून 'साल्ट-रेंज'ची टेंकडी पसरली असून त्या टेंकडीवर सकेशरचें शिखर आहे. झेलम नदीच्या कांठची जमीन बरीच सुपीक आहे.

श ह र.—खुशाब तहशिलीचें मुख्य ठिकाण. हें झेलम नदीच्या उजव्या तीरावर वसलें असून या शहरावरून नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचा सिंदसागर शाखेचा फांटा गेला आहे. या शहराची लोकवस्ती १९११ सालीं १०,५१९ होती. हें मोठें व्यापारी शहर आहे. या ठिकाणाहून बाहेर देशीं कापूस, लोकर, सुती कापड, तूप, गहूं हे जिन्नस जातात. या शहराला १८६७ सालीं म्युनिसिपालिटी देण्यांत आली. येथें इंग्रजी शिक्षणाची एक माध्यमिक शाळा असून एक दवाखाना आहे.

खुश्रुशेट मोदी—हा पारशी जातीचा असून पेशव्यांच्या दरबारीं असलेला इंग्रज रेसिडेंट क. क्लोज याचा एजंट होता. याचा उपयोग पेशव्यांकडील कामकाजांत होत असे. हा हुषार, धोरणी आणि लटपट्या होता. इंग्रजांना व पेशव्यांना दोघांनांहि खूष ठेवून आपला फायदा करावयाचा हें त्याचें धोरण असे. याला रावबाजी यांनीं १८०२ त गुजराथेंतलि राळेज वगैरे पांच हजाराचे गांव इनाम दिले होते. याचें सबंध नांव खुसरवानजी वल्लद जमशेटजी असें होतें. क्लोजचा याच्यावर फार भरंवसा असे. सर्व हिंदी कारभार तो याच्या मार्फतच करीत असे. पुढें रावबाजीचे दिवाण सदाशिव माणकेश्वर व विश्वासू हुजऱ्या बयाजी नाईक यांनीं खुश्रूशीं संधान बांधून रावबाजींची समजूत केली कीं, मोदीच्या तर्फे इंग्रजांशीं व्यवहार केल्यास फायदा होईल. पेशव्यांची बाजू इंग्रजांस समजावून देणारे सदाशिव माणकेश्वर होते. मोदी व माणकेश्वर यांनीं या प्रसंगाचा फायदा घेऊन स्वतः बरीच पुंजी मिळविली. रावबाजींचा कोणावरहि पुरा विश्वास नसे. तथापि त्याचा विश्वास मोदीवर जास्त बसत चाललासें पाहून माणकेश्वर हे मोदीचा द्वेष करूं लागले. पुढें खुश्रूस खूष ठेवण्यास कर्नाटकची सुभेदारी श्रीमंतांनीं त्याला दिली (१८१०). यावेळीं क्लोज जाऊन रसेल हा रेसिडेंट आला होता. परंतु त्यानें खुश्रूच्या या दोन्हीकडे नोकरी करण्याच्या पद्धतीला अडथळा केला नाहीं. पुढें माणकेश्वरानीं श्रीमंतांच्या सल्ल्यानें मोदीवर इंग्रजांकडे लांच खाल्ल्याची फिर्याद गुदरविली. परंतु यामुळें मोदी हा आपली बिंग इंग्रजांस सांगेल असें वाटून पुढें श्रीमंतांनींच फिर्याद काढून टाकण्यास रसेलला सांगितलें. यामुळें मोदी श्रीमंतावर फार खूष झाला त्याच्याच ताब्यांत १८०५ ते १८११ पर्यंत रेसिडेन्सी होती असें म्हटलें तरी चालेल. मात्र पुढें जेव्हां एलफिन्स्टन आला तेव्हां त्यानें शेटजींची मध्यस्थी काढून सर्व कारभार आपल्याच हातीं घेतला. त्या वेळीं शेटजीनें श्रीमंतांनां सावध केलें. परंतु तें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. पुढें पुन्हां माणकेश्वरांनीं मोदीवर लांच घेतल्याची फिर्याद रेसिडेन्सींत केली. तेव्हां पुन्हां मोदीचें रक्षण करण्याचें ठरवून श्रीमंतांनीं फिर्याद काढून टाकण्यास अल्पिष्टनला कळविलें व त्यानें त्याप्रमाणें ती काढून टाकली; पण या व इतर अनेक कारणानीं अल्पिष्टनला मोदीचा संशय येऊं लागला. पेशवाई नामशेष करण्याचे बेत अल्पिष्टनचे चालले होते, ते मोदीच्या तोंडून बाहेर पडण्याची त्याला भिती वाटूं लागली. शेटजीलाहि अल्पिष्टनचा स्वभाव समजला व त्यानें श्रीमंतास सावधगिरीच्या सूचना केल्या. त्याप्रमाणें त्यांनीं सैन्य गोळा करण्याची तयारी चालविली. पुढें अल्पिष्टननें मोदीस सरसुभेदारी अगर एजंटीकारभार या दोन हुद्यापैकीं एक हुद्दा सोडण्यास सक्तीनें सांगितल्यावर मोदीनें पेशव्यांपेक्षां इंग्रजांचा कारभार टिकाऊ या दृष्टीनें कर्नाटकची सरसुभेदारी सोडिली (१८१३). याच सुमारास गंगाधरशास्त्री पटवर्धन हा पुण्यास गायकवाडाचा तंटा तोडण्यास आला होता. त्यानें पाहिलें कीं आपल्या कामांत विब्बा घालणारा हा मोदी आहे. तेव्हा त्यानें अल्पिष्टनास मोदी हा पेशव्यांनां फितूर आहे असें सांगून त्याला नोकरीवरून दूर करण्यास सुचविलें. अल्पिष्टननेंहि त्याला तें पाहिजेच होतें—मोदीस कामावरून काढिलें. मात्र त्याची कामगिरी लक्षात घेऊन त्याला दरमहा पांचशें रु. चें पेनशन दिलें. वसईच्या तहानें इंग्रज बलाढ्य होऊन पेशवे हतप्रभ झाले हें शेटजीनें जाणलें होतें व पेशव्यांनीं पुन्हां स्वतंत्र व्हावें म्हणून प्रयत्न करण्यास त्यानें श्रीमंतांस व त्रिंबकजी डेंगळयास सुचविलेंहि होतें. त्याच्यावर फितुरीचा आरोप करून तो शाबीत करणें अल्पिष्टनास मुळींच शक्य नव्हतें. नोकरी सोडल्यावरहि शेटजी पुण्यास राहिल्यास भानगडी उपस्थित करील म्हणून अल्पिष्टननें त्याला खंबायतेकडे त्याच्या इनामगांवीं जाण्यास सांगितलें. शेटजीनें पेशव्यांकडे संधान बांधून पुण्यास रहाण्याचें योजलें होतें. मात्र पुढें मागें गुजराथेंत जाण्याचें ठरविलें. कारण श्रीमंत अनिश्चित, अल्पिष्टनचा जाण्याचा तगादा, गंगाधरशास्त्री वाईटावर टपलेला हें त्याला ठाऊक होतें. शेटजी थोड्याच दिवसांत निघणार इतक्यांत एके दिवशीं रात्रीं एकाएकी मरण पावला. विषप्रयोगानें तो मेला असें सर्वजण म्हणतात. परंतु विष कोणी घातलें याचा नक्की शोध लागत नाहीं. पेशव्यांनीं वांप देण्याचें कारण दिसत नाहीं. कारण तो पेशव्यांच्याच मर्जीतील होता असें इंग्रजच कबूल करीत होते. मॉडर्न रिव्ह्यूच्या १९२२ च्या मार्चच्या अंकांत (दि लास्ट ऑफ दि पेशवाज) खुद्द अल्पिष्टननेंच

विषप्रयोग केला असें स्पष्ट म्हटलें आहे. कारण त्याचे पेशवाई नष्ट करण्याचे सारे बेत शेटजी पेशव्यांनां सांगेल ही भीति त्याला होती. शेटजीस वाखा होऊन मेल्याचाहि उल्लेख एके ठिकाणीं आहे. यानेंच हल्लीं पुण्यास नारायण पेठेंत मोदीचा गणपति या नांवानें प्रसिद्ध असलेलें गणपतीचें देऊळ बांधिलें; याची बागहि पूर्वी पुण्यास होती.

[संदर्भग्रंथः--ग्रँटडफ. व्हॉ. ३; पेशवाईची अखेर; पेशव्यांची बखर; भा. इ. मं. अहवाल १८३८; दुसरे बाजीराव यांची रोजनिशी].

खुश्रू अमीर—हा हिंदुस्थानांतील एक प्रसिद्ध कवि होता. ह्यानें दिल्लीच्या पुष्कळ बादशहांच्या अमदानींत काम केलें. ह्यानें ९९ काव्यें लिहिलीं आहेत. ह्याचा बाप अमीर महमद सैफ उद्दीन हा एक तुर्क असून तो बल्खहून हिंदुस्थानात आला. व पतियाळा येथें राहिला. येथेंच खुश्रूचा इ. स. १२५३ त जन्म झाला. खुश्रू निजाम उद्दीन औलिआनंतर सहा महिन्यानीं मरण पावला. हा निजाम त्याचा पारमार्थिक गुरु होता. खुश्रूची कबर जुन्या दिल्लींत घायासपूर येथें औलिआच्या कबरीजवळ आहे. खुश्रू इ. स. १३२५ च्या सप्टेंबरमध्यें मरण पावला. एच्. एम्. इलीअट म्हणतो ' दुर्दैवानें खुश्रू अशा काळांत उत्पन्न झाला कीं, त्याकाळीं हिंदुस्थानांत दुर्गुणाचें साम्राज्य होतें.' त्यांतल्या त्यांत त्याच्या आयुष्याच्या शेवटीं शेवटीं दिल्लीच्या तख्तावर घियास उद्दीन तघलख हा न्यायी राजा बसल्यानें त्याला जरा आनंद झाला. ह्या राजाची हकीकत त्यानें आपल्या तघलखनामा नांवाच्या इतिहासांत लिहिली आहे. हा राजा खुश्रूच्या मरणापूर्वी थोडे दिवसच मरण पावला. त्याचीं काव्यें विशेषतः त्याच्या देशबांधवांना पसंत पडलीं होतीं, व तीं त्यावेळच्या इतर पार्शियन कवींच्या काव्याच्या तोडीचीं होतीं. त्याचीं मुख्य काव्यें:—तुआफत-अल-सघिअर, वस्ट-अल हयात, घुरत-अल-कमाल, बकिआ नकिआ, हष्त बेहिश्त, सिकंदरनामा व रिसल नस्र. ह्यांच्या शिवाय दुसरींहि पुष्कळ काव्यें आहेत. त्याचें नुह सिपेन्ह अथवा नऊ गोल नांवाचें एक अद्भुतकथात्मक काव्य आहे. याशिवाय त्याचीं पुढील काव्यें आहेत. किरान-अस-सैदान-नांवाचें काव्य सुलतान मुइझ उद्दीन कैकुबाद नांवाच्या दिल्लीच्या राजाच्या व त्याचा बाप नासिरुद्दीन भग्रखान, बंगालचा राजा, ह्याच्या स्तुतिपर आहे. मकाला नांवाचा ग्रंथ पहिल्या चार खलिपांसंबंधाचा आहे. इष्किआ नांवाचा ग्रंथ प्रेमविषयक आहे. त्याचा एक मट्ल-अल-अन्वर नांवाचा ग्रंथ असून तो सफी तत्वज्ञानविषयक आहे. त्याचा दिवाण नांवाचा ग्रंथ हिंदुस्थानांत सर्वमान्य असून तो दैवी प्रेमकथांनीं भरलेला आहे. त्यांतील कविता हिंदुस्थानांतील पुष्कळ सफीचे भक्त अजून गातात. खम्स नांवाचा खुश्रूचा एक ग्रंथ आहे.

खुश्रू सुलतान—हा बादशहा जहांगीरचा सर्वांत वडील मुलगा असून ऑगस्ट इसवी सन १५८७ त त्याचा जन्म लाहोर येथें झाला. त्याची आई राजा मानसिंगाची बहीण होती. खुश्रूच्या जन्मानंतर तिला शहा बेगम ही पदवी मिळाली. हा दक्षिणेंत असतां १६ जानेवारी १६२२ मध्यें मरण पावला. मरतांना त्याचें वय ३६ वर्षांचें होतें. मेल्यानंतर ह्याच्या अस्थी अलाहाबाद येथें नेऊन पुरण्यांत आल्या. त्याच्या आईस तेथेंच पुरलें असून त्या जागीं हल्लीं एक बाग आहे, तिला खुश्रूबाग असें म्हणतात. त्याच्या कबरीवर पुष्कळ पार्शियन भाषेंतील करुणरसपूर्ण कविता खोदल्या आहेत. तसेंच त्याच्या मरणाची तारीखहि खोदली आहे. 'माअसीर कुतबशाही' नांवाच्या ग्रंथांत शहाजहाननें रेझा नांवाच्या इसमाकडून खुश्रूस मारविलें असें म्हटलें आहे. [बील—ओरि. बायॉ. डिक्श.].

खेकरा—संयुक्तप्रांतांतील मीरत जिल्ह्याच्या बाघपट तहशीलींतील शहर. हें मीरतच्या पश्चिमेस २६ मैलांवर आहे. १९११ सालीं याची लोकवस्ती २४०२ होती. अहीर लोकांनीं हें शहर १६०० वर्षांपूर्वी वसविलें असें म्हणतात. या अहीर लोकांना जाट लोकांनीं हांकून लाविलें. १८५७ त जाट लोकांनीं इंग्रजांविरुद्ध बंड केलें. व त्यामुळें ब्रिटिशांनीं हें शहर आपल्या ताब्यांत घेतलें. या शहराचा कारभार १८५६ च्या २० व्या कायद्याप्रमाणें चालविला जातो. या ठिकाणीं धान्याचा व साखरेचा मोठा व्यापार चालतो येथे एक छोटीशी शाळा आहे.

खेजुरी.—बंगाल इलाख्यांतील मिदनापूर जिल्ह्याच्या कोंटाइ तालुक्यांतील खेडें. हें हुगळी नदीच्या कांठीं वसलेलें आहे. याची लोकसंख्या १९०१ सालीं १४५७ होती. या ठिकाणीं पूर्वी हुगळी नदींत येणारीं जहाजें नांगरत असत. हें यूरोपियन लोकांचें दफनस्थान होतें.

खेड, तालुका—मुंबई इलाख्यांतील पुणें जिल्ह्यांतील एक तालुका. या तालुक्याचें क्षेत्रफळ १९११ सालीं ८७६ चौ. मै. होतें. लोकसंख्या १,६८,६४८ होती. या तालुक्यांत अंबेगांव पेट्याचाहि समावेश होतो. तालुक्यांत एकंदर २ शहरें व २४३ खेडीं आहेत. १९०३-४ मध्यें या तालुक्याचें उत्पन्न २.३ लाख होतें. याच्या उत्तरेस व दक्षिणेस दोन डोंगरांच्या रांगा गेल्या आहेत. पूर्वेस डोंगरपठारें पुष्कळच आहेत. या तालुक्यांतील जमीन तांबडी अगर भुरी आहे. पुणें जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांपेक्षां या तालुक्यांत जंगल पुष्कळ आहे. हवा सर्वसाधारण बरी असते. वार्षिक पर्जन्यमान अदमासें २६ इंच आहे.

गांव—पुण्याच्या उत्तरेस २५ मैलांवर भीमातटाकीं खेड तालुक्याचें हें ठिकाण असून लो. सं. (१९११) ८०५६ आहे. येथें १६१३ सालीं बांधलेलें मोंगल सेनापति दिलेर खा ह्याचें थडगें आहे.

तुकाई देवीचें सिद्धेश्वराचें व विष्णूचें अशीं तीन देवालयें येथें आहेत. तुकाई देवीचें मंदिर तुकाईवाडींत आहे. तेथें महाशिवरात्रीस यात्रा भरते. भीमेच्या काठीं चंडीराम-बुवानीं बांधलेलें विष्णूचें देवालय आहे. तेथें श्रावण वा॥ अष्टमीस जत्रा भरते.

१७०७ मध्यें खेड येथें ताराबाई व शाहु ह्यामध्यें लढाई झाली होती. त्यावेळीं धनाजीनें पंतप्रतिनिधीस मदत करण्याचें नाकारलें.

खेड, तालुका.–मुंबई इलाख्यातील रत्नागिरी जिल्ह्याच्या ईशान्येकडील तालुका. याचें क्षेत्रफळ १९११ सालीं ३९२ चौ. मै. होतें. या तालुक्यात १४६ खेडीं आहेत. १९११ सालीं याची लोकसंख्या १,०१,१२६ होती. या तालुक्याचें उत्पन्न सुमारें ८६००० आहे. तालुक्यातील जमीन नापीक असून खडकाळ आहे. याच्या ईशान्येस महिपतगड, सुमारगड व रसाळगड असे तीन डोंगर असून वायव्येस मोठ्या खिंडी आहेत. हातलोट व अम्बोली हे घाटांतील प्रसिद्ध रस्ते आहेत. जगबुडी नावाची नदी या तालुक्यांतून वहात गेली असून तींतून नावा चालतात. या तालुक्याचें वार्षिक पर्जन्यमान १४३ इंच आहे.

गाव.---खेड तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें जगबुडी-कांठीं वसलेलें असून याच्या आसपास चोहोंबाजूनें डोंगराच्या रांगा पसरल्या आहेत. या खेड्याची लोकसंख्या १९०१ सालीं ५००३ होती. या गांवापासून हर्णैकडे जाण्याचा बैलगाडीचा रस्ता आहे. दाभोळ व अंजनवेलपासून या खेड्यापर्यंत नावा येतात व जातात. गांवाच्या पूर्वेस तीन खडकात खोदलेलीं देवालयें आहेत. गांवांत एक दवाखाना व दोन शाळा आहेत. येथें लुगडीं व भांडीं चांगलीं होतात.

खेड ब्रह्म.(किंवा ब्रह्मखेड)—मुंबई. महीकांठा. ईडरच्या (महीकांठा, मुं. इ.) उत्तरेस ३० मैलांवर हरनाय नदीच्या तीरावरील ठिकाण. हें बरेंच मोठें असून प्राचीन काळापासून यात्रेचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. शहराच्या उत्तरेकडील जंगलांत फार उत्तम नक्षींचें काम केलेलें एक देऊळ आहे. या देवळांतील एका खांबांतून बाहेर निघत आहे असें एका स्त्रीचें खोदीव चित्र काढलें आहे. तें इतर देवळांतून दिसणाऱ्या चित्रांपेक्षां अगदीं भिन्न आहे. येथें दरवर्षी फेब्रुवारींत जत्रा भरते.

खेडा, जिल्हा.—मुंबई इलाखा. उत्तर भागांतील एक जिल्हा. उत्तर अक्षांश २२° १४' ते २३° ७' व पूर्व रेखांश ७२°३०' ते ७३° २३'. क्षेत्रफळ १५९१ चौरस मैल याच्या उत्तरेस अहमदाबाद जिल्हा, महीकांठा; पश्चिमेस अहमदाबाद जिल्हा व खंबायतचें संस्थान; दक्षिणेस आणि पूर्वेस मही नदी व गायकवाडी मुलूख.

उत्तरेकडील कोपरा जरा डोंगराळ आहे. बाकी सर्व प्रदेश सपाट आहे. उत्तरेस व आग्नेयीस भातजमीन आहे. जिल्ह्याच्या मध्यभागीं 'चरोत्तर' नावाची जमीन फार सुपीक असून या भागांतील लागवड उत्कृष्ट असते.

या जिल्ह्यातील मही नदी प्रमुख आहे. व सुमारें १०० मैल ही नदी या जिल्ह्यातून वहाते. भूस्तरशास्त्रदृष्ट्या या जिल्ह्याची अद्यापि फारशी तपासणी करण्यांत आलेली नाहीं. मही नदीच्या काठावर ८०ते११० फूट खोलीवर पाणी लागतें. पूर्वी या भागात जवळ पाणी लागत असे. परंतु इ. स. १८१९ सालीं झालेल्या धरणीकंपानें पाण्याची खोली बरीच खोल गेली असें म्हणतात. त्यामुळें पुष्कळ जुन्या विहिरी फुकट गेल्या आहेत. कपडवंजच्या आग्नेयीस १० मैलांवर लसुंद्रा येथें दहा बारा उन्हाळीं आहेत. त्यांपैकीं एका कुंडाचें उष्णमान ११५° फ. पर्यंत असतें. या पाण्यांत गंधकाचा अंश असल्यामुळें खरूज वगैरे रोगावर हें पाणी फार गुणकारी आहे असें मानण्यांत येतें.

या जिल्ह्यांत जंगल मुळींच नाहीं. वाघ इत्यादि हिंस्र प्राणी या भागांत हल्ली फारच क्वचित् दिसतात.

येथील हवा उन्हाळ्यात जरा जास्त कडक असते. दरवर्षी पावसाची सरासरी सुमारें ३८ इंच आहे.

इ. स. १८०२ सालीं पेशव्यांशीं जो वसईचा तह झाला त्याअन्वयें कांहीं भाग ब्रिटिशाकडे आला. इ. स. १८०३ आणि १८१७ सालीं गायकवाडाकडून कांहीं भाग आला. तो मिळून हा जिल्हा बनविण्यांत आला आहे. या भागावर रजपुतांनीं इ. स. ७४६ ते १२९० पर्यंत राज्य केलें. चवदाव्या शतकाच्या अखेरीस खेडा अहमदाबादच्या मुसुलमान पातशहाकडे आला. इ. स. १७२० सालीं मराठ्याची दृष्टि या भागावर वळली व इ. स. १७१२ सालीं अहमदाबादची पातशाही लयास जाईपर्यंत येथें मराठे व मुसुलमान याच्यांत बऱ्याच चकमकी झाल्या. यांत मराठ्याचा अखेरीस जय झाला व इ. स. १७५३ सालीं हा मुलूख पेशवे व गायकवाड यानीं आपसांत वांटून घेतला. यापैकीं ब्रिटिशांकडे कांहीं भाग इ. स. १८०३ सालीं आला व बाकीचा इ. स. १८१७ सालीं आला.

या जिल्ह्यात हिंदु व मुसुलमानांनीं बांधून ठेवलेल्या पुष्कळ जुन्या इमारती आहेत. सजोळ येथील मुबारक सय्यद (हा इ. स. ९६६ सालीं येथें मरण पावला) याचा रोझा प्रेक्षणीय आहे. कपडवंज येथें बऱ्याच पुरातन इमारती असून रासमाला नांवाची सुंदर कमान, एक पवित्र कुंड, मशिद, एक विहीर व भुयारांत असलेलें महादेवाचें देऊळ इत्यादि पहाण्यासारखीं आहेत. अगदीं अलीकडे बांधलेलें एक मंदिर फार सुंदर आहे. लोकसंख्या (१९२१) ७१०९८२. इ. स. १८९९–१९०० सालीं पडलेल्या दुष्काळामुळें येथील लोकसंख्या शेंकडा १८ या प्रमाणांत कमी झाली आहे. या जिल्ह्यात ११ गांवें व ५९८ खेडीं आहेत. नडियाद, कपडवंज, खेडा, आनंद आणि मेहमदाबाद हीं गांवें प्रमुख होत. यांत सात तालुके आहेत त्यांचीं नांवें:–

कपडवंज, मेहमदाबाद, थासरा, मातर, नडियाद, आनंद बोरसद हीं होत.

या जिल्ह्यांतील शेतकरी आपल्या कामांत फार हुषार आहेत. एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ६७ लोक शेतकीवर अवलंबून आहेत. मुख्य पिकें—बाजरी, कोद्रा, भात, ज्वारी आणि गहूं. पश्चिम हिंदुस्थानांत खेडा जिल्ह्यांतील तंबाखूची लागवड फार प्रख्यात आहे. येथें तंबाखू, कापूस वगैरे पिकांचे निरनिराळे पुष्कळ प्रयोग करून पाहिले आहेत. काठेवाड व उत्तर गुजराथेंतील कांक्रेजमधून गुरें या जिल्ह्यांत शेतीकरितां आणावीं लागतात. इ. स. १९०३–४ सालीं एकंदर ११३१ चौरस मैल जमीन लागवडीखालीं होती. पैकीं ३७ चौरस मैल बागाइती होती. बागांस पाण्याचा पुरवठा विहिरीपासून होतो. कपडवंजजवळ पूर्वी खाणींतून लोखंड काढीत असत.

अहमदाबाद व नडियाद येथें गिरण्या सुरू झाल्यामुळें हातमागाच्या धंद्यास उतरती कळा लागली आहे. साबण व बांगडया तयार करण्याचे कारखाने या जिल्ह्यांत आहेत. या जिल्ह्यांत खडीचे रस्ते जिकडे तिकडे असून बी. बी. सी. आय. रेलवे या जिल्ह्यांतून गेली आहे. शिवाय लहान लहान फांटेहि या जिल्ह्यांत महत्त्वाच्या ठिकाणीं खेळवले आहेत. या जिल्ह्यांतील दहा गांवांत म्युनसिपालिटया आहेत. कैरा, कपडवंज, मेहमदाबाद, नडियाद, डाकोर, बोरसद, आनंद, उमरेठ, ओड आणि महुवा हीं तीं गांवें होत.

गांव–मुंबई इलाखा. खेडा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. उत्तर अक्षांश २२° ४५' व पूर्व रेखांश ७२° ४१'. जी. आय. पी. रेल्वेच्या मेहमदाबाद स्टेशनच्या नैर्ऋत्येस ७ मैलांवर व अहमदाबादच्या नैर्ऋत्येस २० मैलांवर हा गांव आहे. लोकसंख्या (इ. स. १९०१) १०३९२. खेडा हा फार पुरातन गांव असून या गांवाचा संबंध महाभारतांतील उल्लेखिलेल्या ठिकाणांशीं लावण्यांत येतो. येथें पांचव्या शतकांतील ताम्रपट सांपडले आहेत. इ. स. १७५३ सालीं दमाजी गायकवाडानें हा गांव सर केला. इ. स. १८०३ सालीं आनंदराव गायकवाड यानें हा गांव ब्रिटीशांच्या हवालीं केला. येथील हवा अलीकडे बरीच सुधारली आहे असें म्हणतात. धरणीकंपाचे धक्के इ. स. १८६० व १८६४ सालीं येथें बसले होते. इ. स. १८५७ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. येथें एक कांचेचा कारखाना आहे.

खेतूर—बंगाल इलाख्यांतील राजशाही जिल्ह्याच्या पोटविभागांतील एक खेडें. १९०१ मध्यें या खेडयाची वस्ती ४०० होती. चैतन्य या खेडयांत कांहीं दिवस राहिला होता, एवढयाच कारणाबद्दल हें शहर क्षेत्र मानिलें जात असून या खेडयामध्यें चैतन्याच्या प्रीत्यर्थ एक देवालय बांधण्यांत आलें आहे. या खेडयांत आक्टोबरमध्यें मोठी यात्रा भरते.

खेत्री—राजपुतान्यांतील जयपूर संस्थानांतील खेत्री जहागिरीचें मुख्य ठिकाण. हें जयपूर शहरापासून उत्तरेस ८० मैलांवर आहे. याची लोकवस्ती १९११ सालीं ७,१२२ होती. हें शहर चारपांच टेंकडयांच्या मध्यभागीं वसलेलें असून त्यामुळें शहराचा देखावा फार रमणीय दिसतो. या शहराकडे जाण्याला एक लहानसा गाडीरस्ता आहे. याच्या वरच्या बाजूस एका टेकडीवर एक किल्ला आहे. येथें एक हायस्कूल, एक माध्यमिक शिक्षणाची शाळा व एक दवाखाना आहे. याशिवाय ५ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा आहेत. या शहराच्या नजीक तांब्याच्या खाणी असून त्यांपासून १८५४ सालीं ३०००० रुपयांचें तांबें काढण्यांत आलें. पण पुष्कळ वर्षांत त्या खाणी खोदण्यांत आलेल्या नाहींत. तसेंच शहराच्या दक्षिणेस सात मैलांवर बबई येथें निकल व कोबाल्ट या धातूंच्या खाणी आहेत. खेत्री जहागिरीचा कांहीं भाग शेखवती व कांहीं भाग तोरावती निझामतीच्या हद्दींत आहे. या जहागिरींत खेत्री, चिराव व कोटपुतळी हीं ३ शहरें व २५५ खेडीं आहेत. १९११ मध्यें या जहागिरीची लोकवस्ती ६९९६२ होती. या जहागिरींतील प्रजा बहुतेक हिंदूच आहे. कोटपुतली हा परगणा ब्रिटिशसरकारकडून इनाम आहे. बाकीचा जहागिरींतील मुलूख जयपूरदरबारच्या ताब्यांतील असून या जहागिरीचा अधिपति जयपूरच्या राजाचा मांडलिक आहे. जहागिरीचें वार्षिक उत्पन्न ५.३ लाख रुपये असून खर्च ३.५ लाख आहे.

खेमकरन—पंजाबांतील लाहोर जिल्ह्याच्या कासूर तहशिलींतील एक शहर. कासूर शहरापासून सात मैलांवर नॉर्थ वेस्टर्न रेल्वेच्या फांटयावर हें वसलेलें आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ५७३२ होती. शहराजवळून बारीदोआब कालव्याचा फांटा गेला आहे. येथील लोकांचा शेतकी हा मुख्य धंदा असून लोक सुखी आहेत. या शहराला १८६७ सालीं म्युनिसिपालिटी देण्यांत आली. म्युनिसिपालिटीच्या खर्चानें येथें एक प्राथमिक शिक्षणाची शाळा उघडण्यांत आली आहे.

खेम सावंत—सांवतवाडीचा राजा दुसरा खेम सावंत हा पराक्रमी होता. याच्या बापाचें नांव फोंड सावंत होतें. हा इ. स. १६७५ च्या सुमारास गादीवर आला. यानें फौज फांटा वाढविला; मात्र त्याचा उपयोग शिवाजीमहाराजांविरुद्ध औरंगझेबाला मिळण्याच्या कामीं केला. यानें गोंवेकर फिरंग्याच्या मुलुखावर स्वाऱ्या करून आपलें राज्य वाढविलें. शाहुमहाराज गादीवर येईपर्यंत सातारकर छत्रपतींनां सावंताकडे लक्ष्य देण्यास सवड झाली नाहीं, त्यामुळें खेम यानें त्यांचा बराच मुलुख काबीज केला. पुढें ताराबाई व शाहु यांच्या भांडणांत यानें शाहूचा पक्ष घेतला होता. इ. स. १७०९ मध्यें हा वारला. [मराठी रियासत. भा. २].

खेराली—काठेबाड. वढवाण टाण्यांतील एक स्वतंत्र खंडणी देणारा तालुका. खेराली व वाडला अशीं दोन गावें यांत आहेत. जवळचें रेल्वे स्टेशन वढवाण कँप होय.

खेरालु, तालुका.—बडोदे संस्थानांतील कडी प्रांताचा ईशान्य भागांतील तालुका. या तालुक्याचें क्षेत्रफळ २४६ चौ. मै. आहे. १९११ सालीं या तालुक्याची लोकवस्ती ७०६४१ होती. या तालुक्यांत खेरालु, वडनगर व उमटा हीं तीन शहरें व ८८ खेडीं आहेत. या तालुक्यांत जंगल बरेंच आहे. या भागांतील जमीन बहुतेक रेताड असून फारच थोडी काळ्या मातीची आहे. खारी नदी या तालुक्यांतून पूर्वपश्चिम वहात गेली आहे. तालुक्याचें उत्पन्न १९०४-५ सालीं ४२००० रुपये होतें.

शहर.—खेरालू तालुक्याचें मुख्य ठिकाण. याची लोकसंख्या १९११ सालीं ६५७४ होती. शहरामध्यें मॅजिस्ट्रेट कोर्ट, दवाखाना, दोन धर्मशाळा, शाळा व इतर कचेऱ्या आहेत. वल्लभाचार्य हा येथें रहात असे व त्यानें येथें एक देवालय बांधविलें आहे. येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली असून तिला संस्थानकडून १६०० रुपये देणगीदाखल मिळतात.

खेरावाड—गुजराथ. महीकांठा एजन्सींतील व साबर कांठांतील एक संस्थान. संस्थानिक मकवान कोळी असून दरसाल गायकवाडाला घांसदाणा व ईदरच्या महाराजाला खिचडी म्हणून कांहीं रकम देतात.

खेरी, जिल्हा.—संयुक्त प्रांतांतील लखनौ विभागाच्या उत्तरभागांतील एक जिल्हा. याचें क्षेत्रफळ १९११ सालीं २९७६ चौ. मै. होतें. याच्या उत्तरेस मोहन नदी, पूर्वेस कौरियाल नदी, दक्षिणेस सीतापूर व हर्दोई जिल्हे व पश्चिमेस पीलीभीत व शहाजहानपूर जिल्हे आहेत. उल नदी या जिल्ह्याच्या मध्यभागांतून गेली आहे. या नदीच्या ईशान्येकडील भाग जंगलवजा असून उत्तरेस तर मोठमोठीं जंगलें आहेत. या जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवरून शारदा अगर चौका नदी वहात गेली आहे. उल नदीच्या नैर्ऋत्येस असलेला या जिल्ह्याचा भाग सपाट असून त्या भागांतून सरायन, कठना, गोमती इत्यादि पुष्कळ नद्या वहात गेल्या आहेत. जिल्ह्यामध्यें पुष्कळ सरोवरें आहेत. या जिल्ह्यांत दलदलीचीं बरींच ठिकाणें असल्यामुळें भाजीपाला खूप पिकतो. जंगलांत साल, आंब्याचीं झाडें, धाक इत्यादि झाडें मुबलक आहेत. जंगलामधून, वाघ, अस्वलें, लांडगे, चित्ते, रानटी कुत्रे, तरस, रानमांजरें, कोल्हे हे प्राणी आढळतात. नाना प्रकारच्या पक्ष्यांचीहि येथें समृद्धि आहे. तसेंच या जिल्ह्यांत माशांचाहि सुकाळ आहे. उल नदीच्या नैर्ऋत्येकडील भाग हवेच्या दृष्टीनें चांगला आहे. पण ईशान्येकडील भाग दलदलीचा असल्यामुळें हिंवतापाची सांथ येथें नेहमीं जोरांत चालू असते. या जिल्ह्यांतील पर्जन्यमान ४६ इंच आहे.

इतिहास.—प्राचीन काळीं या जिल्ह्याचा प्रदेश हस्तिनापूरच्या सोमवंशीय राजांच्या अंमलाखालीं होता अशी आख्यायिका आहे. पण ती कितपत विश्वसनीय आहे, याबद्दल जबरदस्त संशय आहे. १० व्या शतकांत या जिल्ह्याचा उत्तरभाग रजपुतांच्या ताब्यांत होता. पुढें मुसुलमानांची सत्ता या भागावर प्रस्थापित झाली. १४ व्या शतकांत, नेपाळी लोकांनीं या भागाला त्रास देण्यास सुरुवात केली. तेव्हां हा उपद्रव होऊं नये याकरितां जिल्ह्याच्या उत्तरसरहद्दीवर पुष्कळ किल्ले बांधण्यांत आले. अकबराच्या कारकीर्दींत हा जिल्हा खैराबादसरकारमध्यें मोडूं लागला. १८०१ मध्यें ब्रिटिशानां रोहिलखंड प्रांत देण्यांत आला. त्यावेळीं त्यांत या जिल्ह्याचा भाग ब्रिटिशांकडे आला. पण १८१४-१९ च्या नेपाळी युद्धानंतर हा भाग पुन्हा अयोध्यासरकारला परत देण्यांत आला. पुढें १८५६ मध्यें अयोध्या प्रांत खालसा झाल्यावर या जिल्ह्याच्या पश्चिम व पूर्वभागाचे महमदी, व मल्लानपूर असे स्वतंत्र जिल्हे बनवण्यांत आले. १८५७ सालीं महमदी जिल्ह्यातील लोकांमध्यें असंतोष पसरला व त्यांनीं तेथील ब्रिटिश सैन्याची कत्तल केली. पण पुढें लवकरच तो असंतोष शमवण्यात येऊन या दोन्ही जिल्ह्यांचा एक जिल्हा करण्यांत आला व लक्ष्मीपूर हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण झालें.

या जिल्ह्यात जागजागीं प्राचीन इमारतींचे अवशेष सांपडतात व त्यावरून प्राचीन खोदकामाची कल्पना आपल्याला करतां येते. अशा प्रदेशापैकीं, बलमियारबरखार व खैरीगड हे दोन प्रमुख अवशेष होत. खैरीगडापाशीं समुद्रगुप्ताचा एक शिलालेख सांपडला आहे. गोला येथें एक प्रसिद्ध देवालय आहे.

या जिल्ह्यांत ४ शहरें व १६७७ खेडीं आहेत. या जिल्ह्याची लोकसंख्या १९११ सालीं ९५९२०८ होती. महमदी, निघासन व लक्ष्मीपूर अशा तीन तहशिली आहेत. शेंकडा ८५ हिंदू असून बाकीचे मुसुलमान व इतर जातींचे लोक आहेत. पूर्व हिंदी भाषा ही मुख्य भाषा आहे. हिंदूंमध्यें ब्राह्मण, रजपूत, चांभार, कुर्मी, अहीर, लोध या जाती प्रमुख आहेत. मुसुलमानांत, जूलाह, पठाण, शेख इत्यादि जातींची संख्या अधिक आहे.

जिल्ह्याच्या नैर्ऋत्य भागांतील जमीन चिकणमातीनें युक्त आहे. कठना व उल नद्यांमधील टापूंतील जमीन फार सुपीक आहे. खेरी जिल्ह्यांत अयोध्याप्रांताप्रमाणेंच धारापद्धति आहे. जिल्ह्यांतील बहुतेक जमीन तालुकदारांच्या ताब्यांत आहे. गहूं हें जिल्ह्याचें मुख्य पीक आहे. त्याच्या खालोखाल तांदूळ, मका, चणे, कोदन, कडधान्य हीं पिकें आहेत. या जिल्ह्यांत ऊंसाचें उत्पन्नहि बरेंच होतें. संयुक्तप्रांतांतील इतर जिल्ह्यांपेक्षां या ठिकाणीं गुरांची निपज चांगली होते. बैल फार खुजे पण चपळ असतात. येथील घोडीं हलक्या जातींचीं असतात. शेळ्या व मेंढ्यांचीहि येथें मुबलक पैदास होते.

जिल्ह्यामध्यें कंकर येवढाच खनिजपदार्थ आहे. पण तो सुद्धां फार सांपडत नाहीं. या कंकराचा खडींचे रस्ते करण्याच्या कामीं उपयोग करतात. साखर तयार करणें हा मुख्य धंदा आहे. ओडाल येथें पितळेचीं भांडीं तयार होतात. धान्य, साखर, लांकूड, गुरें, तूप हे जिन्नस या जिल्ह्यांतून बाहेर जातात व कापड, धातु, मीठ या पदार्थांची आयात होते. नेपाळमधून तांदूळ, सागवान व मसाल्याचे पदार्थ या जिल्ह्यांत येतात. लक्ष्मीपूर, महमदी व गोला हीं तीन व्यापाराचीं मुख्य ठिकाणें आहेत.

उलच्या नैर्ऋत्य भागांतून लखनौ-बरेली स्टेट रेल्वे गेली आहे. या रेल्वेचे फांटे मैलानीपासून सोनारीपुरापर्यंत व घुडवा ते नेपाळच्या सरहद्दीपर्यंत गेले आहेत. या जिल्ह्यांतील रस्ते चांगले नाहींत. सीतापूर ते शहाजहानपुरापर्यंतचा रस्ता तेवढाच बरा आहे.

या जिल्ह्यावर डेप्युटी कमिशनर हा मुख्य अधिकार असून त्याच्या हाताखालीं तीन डेप्युटी कलेक्टर असतात. तहशिलीवरचा तहशीलदार हा मुख्य अधिकारी असतो. जंगलखात्याचा अधिकारी लक्ष्मीपूर येथें रहातो. या जिल्ह्याच्या न्यायखात्यावर सीतापुर जिल्ह्याचा डिस्ट्रिक्ट व सेशन्सजज्ज हा मुख्य अधिकारी आहे. खुद्द जिल्ह्यांत मुनसफ व सबॉर्डिनेट जज्ज हे न्यायकाम पहातात. या जिल्ह्यांतील गुन्ह्यांचें प्रमाण फार अल्प आहे.

१८५७ च्या बंडानंतर जिल्ह्याची 'समरी सेटलमेंट' करण्यांत आली. पण ती बरोबर न झाल्यामुळें १८९७ सालीं पुन्हां या कामास सुरुवात झाली व १९०० मध्यें हें काम झालें. १९०४-५ सालीं या जिल्ह्याचें १४,४७,००० रुपये उत्पन्न होतें.

शिक्षणाच्या बाबतींत हा जिल्हा फारच मागसलेला आहे. १९०३-४ सालीं या जिल्ह्यांत १६६ शाळा होत्या. यांपैकीं ३ शाळा सरकारच्या खर्चानें चालल्या असून बाकीच्या जिल्हा व म्युनिसिपल बोर्डातर्फे चालल्या आहेत. १९०३-४ सालीं या जिल्ह्यांत ८ इस्पितळें व दवाखाने होते.

श ह र.—खेरी जिल्ह्याच्या लक्ष्मीपुर तहशीलींतील एक शहर. याची लोकवस्ती १९११ सालीं ६९२४ होती. हें शहर फार जुनें आहे. सय्यदखुर्दचें येथें एक थडगें आहे. या शहराचा कारभार १८५६ च्या २० व्या कायद्यान्वयें चालविला जातो. येथें दररोज बाजार भरतो. या ठिकाणीं अमेरिकन मेथॉडिस्ट मिशनची एक शाळा आहे.

खेळ—खेळांचा प्रधान हेतु करमणुक हा असतो. मग करमणुक साधून व्यायाम झाल्यास उत्तमच. पण व्यायामाचा अंश त्यांत फार असतां कामा नये. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारचे खेळ असतात. खेळाची प्रवृत्ति मनुष्यामध्यें स्वभावतःच असल्यामुळें आपणांस अगदीं प्राथमिक अवस्थेंत असलेल्या मानवसमाजांत करमणुकीचे प्रकार व खेळ दृष्टीस पडतील. वैदिक काळांत फांशांचा खेळ फार प्रामुख्यानें दृष्टीस पडतो. ऋग्वेदांतील दहाव्या मंडळांत द्यूतकाराचें आत्मगत भाषण त्याची स्थिति उत्तम प्रकारें दाखविते. यज्ञामध्यें रथांच्या शर्यती, दोर ओढण्यासारखा चामडें ओढण्याचा खेळ वगैरे असत. (वेदकाळांतील शब्दसृष्टि, बुद्धपूर्व जग. प्र. ५ खेळ, पा ३५०-३५२ पहा). पुराणकालांत त्याबरोबर धनुर्विद्याहि दृष्टीस पडते. घोड्यांच्या शर्यती वेदकाळांत सुरू असाव्यात असें कांहीं ऋग्मंत्रावरून वाटूं लागतें. (ऋग्वेद १. ६३, ५; ९. ३२, ५; ४७, ५; १०. ६८, २); शिकार करणें हा व्यवसाय मानवोत्पत्तीच्या समकालीनच असून प्रथम हें वृत्तीचें साधन असून अलीकडे यास एका मर्दानी करमणुकीचें स्वरूप प्राप्त झालें आहे. प्राचीन ईजिप्तमधील लोकांत सोंगट्या बुदबळांसारखे खेळ असत. राणी हृतसूचा खेळण्याचा पट संशोधिला गेला आहे. वेदकालानंतर लवकरच हिंदुस्थानांत अर्वाचीन बुदबुळांच्या खेळाचें मूळ स्वरूप जो चतुरंग नांवाचा खेळ तो प्रचारांत आला असावा; त्यानंतर शतरंज आला. नवव्या शतकांतील अबुल आबास व दहाव्या शतकांतील फिरदौसी यांनीं बुद्धिबळाच्या खेळासंबंधीं आपल्या ग्रंथांतून माहिती दिली आहे. चीन, जपान, सयाम, ब्रह्मदेश वगैरे प्राच्य देशांतून हा खेळ पुरातन म्हणून गणला जातो. फांसे सोंगट्यांचा खेळहि राजवाडे, झनाने व सामान्य लोकांचे अड्डे यांतून रूढ असे. मोंगलकालीन हिंदुस्थानांत सोंगट्या व कवड्यांच्या खेळाला पचीसी म्हणत. फत्तेपूर शिक्रीच्या राजवाड्यांत अकबर बादशहा मोठ्या थाटानें खेळत असे असें रुसेलेट सांगतो (इंडिया अँड इट्स नेटिव्ह प्रिन्सेस १८७६) त्या राजवाड्याच्या फरशींत एक सोंगट्यांचा पट बसविला आहे. या पचीसचे चौरस व चौपट असे दोन प्रकार असत.

याप्रमाणें फार प्राचीन कालापासून खेळांची परंपरा सर्वत्र अव्याहत चालत आली आहे. सध्यांच्या प्रचलित खेळांचें वर्गीकरण आपणांस अनेक तऱ्हांनीं करतां येईल. उदाहरणार्थ स्त्रियांचे व पुरुषांचे खेळ, बैठे व मैदानी खेळ. तसेंच एकच खेळ लहानपणीं, तरुणपणीं व म्हातारपणीं उपयोगी पडत नाहीं तेव्हां या तीन अवस्थांतील खेळहि निरनिराळे असतात. तसेंच खोखो, आटयापाटया यांसारखे सांघिक, बुद्धीबळासारखे वैयक्तिक असेंहि खेळांचें वर्गीकरण करतां येईल.

(१) स्त्रियांच्या सध्यांच्या खेळांत मुलींचे (अ) फुगडी, झिम्मा, कवड्या, सागरगोटे, भातुकली, आंधळीकोशिंबीर, लपंडाव, खोखो हे खेळ दृष्टीस पडतात व (आ) बायकांमध्यें पत्ते, सोंगट्या, टेनिस, बॅडमिंग्टन व इतर पाश्चात्य स्त्रियांचे खेळ आढळतात. आपल्या समाजांत लग्न झाल्यावर सामान्य बायकांनां खेळावयास मिळत नसल्यानें त्यांच्यांत फारसे खेळ नाहींत. अलीकडे सुशिक्षित स्त्रिया खेळांत बहुधा इंग्रजी स्त्रियांचें अनुकरण करतात व बहुधा

पाश्चात्य खेळ खेळतात. तथापि पोहणें, धांवणें वगैरे शक्तीचे खेळ अद्याप खेळत नाहींत.

(२) पुरुषांच्या खेळांत (अ) मुलांचेः—विटीदांडू, गोटया, लगोऱ्या, खोखो हे खेळ प्रचलित असून (आ) तरुणांचेः-आटयापाटया, खोखो, बुद्धिबळें, पत्ते, क्रिकेट, टेनिस, हॉकी , फुटबॉल, मलखांब, कुस्त्या, दांडपट्टा, बोथाटी इत्यादि बैठे व मैदानी तसेंच शरीरसामर्थ्यवर्धक खेळ आढळतात. (इ) वृद्धांचेः-टेनिस, बिलियर्ड, गंजिफा, बुद्धिबळें, सोंगटया, पत्ते हे खेळ विशेष आवडीचे असतात. क्रिकेट, टेनिस, फुटबॉल वगैरे खेळ पाश्चात्य लोकांचे असून भारतीयांच्या आतां ते पूर्णपणें अंगवळणी पडले आहेत. आटयाटया, खोखो, दांडपट्टा या खेळांसहि व्यवस्थित स्वरूप, दिलें असून त्यांचे अलीकडे बरेच सामने वगैरे पहावयास सांपडतात. कुस्त्या, पळणें, पोहणें, लांब व उंच उडया मारणें यांसारखे मर्दानी खेळ सार्वराष्ट्रीय समान्याचे विषय झाले आहेत. मुष्टियुद्ध अद्याप आपल्याकडे सुरु झालेलें नाहीं. स्काउट (बालवीर अथवा बालचर) चळवळीमुळें नवीन नवीन बैठे खेळ मुलांत बरेच शिरले असून त्यांतील व्यावहारिकतेकडेहि बरेंच लक्ष देण्यांत येतें. मुलांकरितां विदेशी बैठया खेळांची माहिती बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररी खात्यानें प्रसिद्ध केली आहे. या ठिकाणीं केवळ खेळाविषयीं सामान्य विवेचन देऊन विशिष्ट खेळांवर स्वतंत्र लेख दिले आहेत.

पाश्चात्यांतहि सार्वजनिक व वैयक्तिक खेळांची परंपरा बरीच जुनी आहे.

सा र्व ज नि क खे ळ.—प्राचीन ग्रीक, रोमन लोकांच्या सार्वजनिक खेळांत मल्लयुद्धाच्या सामन्यांसारखे अनेक प्रकार व खेळ असून एखाद्या धार्मिक कृत्यांशीं अथवा सणाशीं त्या सर्वांचा संबंध असे. ग्रीक वाङ्मय व कला यांमध्यें आदर्शभूत होणारें राष्ट्रीय शील आणि शारीरिक व बौद्धिक सौंदर्य या गुणांचा विकास होण्याला जर कोणती गोष्ट कारणीभूत झाली असेल तर ती म्हणजे ग्रीक लोकांचे सार्वजनिक खेळ व सामने वगैरे गोष्टी होत. म्हणूनच प्राचीन खेळांची उत्पत्ति व वाढ कशी झाली हें जाणण्यास ग्रीक लोकांच्या इतिहासाचें अवलोकन केलें पाहिजे. रोमन लोकांच्या ' सरकस ' व ॲम्फीथिएटर ' वगैरे संस्था या जुन्या ग्रीकांच्या ' ऑलिंपिया ' व ' पायथिया ' वगैरे संस्थांच्या केवळ नकला होत यांत संदेह नाहीं.

ग्री क.—अगदीं आरंभीं ग्रीक खेळांचा धर्माशीं निकट संबंध असे. धार्मिक प्रार्थना, संकटनिवारण,यशप्राप्ति व प्रायश्चित्त वगैरे प्रसंगीं खेळाचे सामने होत असत व प्रत्येक खेळांच्या स्थानाःचा कोणी तरी एक देव किंवा एखादा पौराणिक वीर असे. ईलिअड व ऑडिसी या महाकाव्यांत उल्लेखिलेले खेळ पाहिले असतां त्याःकाळीं मुष्टियुद्ध, कुस्ती, ओझीं उचलणें, धांवण्याची शर्यत व रथांची शर्यत वगैरे खेळांच्या बाबतींत ग्रीकांची प्रगति झाली होती हें आढळून येतें. या एकंदर चार राष्ट्रीय उत्सवांत ऑलिंपिअन खेळांची फारः प्रसिद्धि होती. एलिअसच्या मैदानानजीक एका जागेला ऑलिंपिया असें नांव असून त्या ठिकाणच्या अलताइ उद्यानांत ऑलिंपिअन झीअस नांवाच्या देवाचें एक देऊळ असून यशस्वी वं प्रसिद्ध मल्लांचे त्या ठिकाणीं पुतळे ठेवलेले असत. तेथील देवळांत आयफिटस व लायकरगस यांचीं नांवें व खेळांचे नियम कोरलेले होते. ऑलिंपिअड हा एक राष्ट्रीय उत्सव असून तो दर चार वर्षांनीं पाळला जात असे. व त्यावेळीं अनेक खेळांचे सामने होऊन बक्षिसें दिलीं जात असत. या खेळांच्या सामन्यास सुरुवात झाली म्हणजे चोहोंकडे उत्साह दिसून येत असे. निर्णय देणारे १० न्यायाधीश असून खेळाडूंच्या तालमीमध्यें योग्य शिक्षण घेतल्याचा दाखला पुढें करावा लागत असे. खेळाडूंच्या कुलशीलाबद्दल विशेष चौकशी करण्याची पद्धत असून सामन्यांत कपटाचरण होणार नाहीं अशी त्यांनां शपथ घ्यावी लागत असे. सुरुवातीस शिंग फुंकून नंतर खेळास सुरुवात होत असे. (१) पळण्याची शर्यत, (२) कुस्ती, (३) उड्डाण मारणे, (४) मुष्टियुद्ध व (५) रथांची शर्यत इतके महत्वाचे खेळ व सामने त्याकाळीं अमलांत होते. रथांच्या शर्यतींत हल्लींच्या घोड्यांच्या रेसमधील जॉकीपेक्षां तत्कालीन सारथ्यास अधिक कौशल्य व चपळपणा अंगीं आणावा लागत असे. चाळीस पन्नास रथांची शर्यत लागे व या खेळांत राजे लोकांचें अंग असे. वरील कोणत्याहि खेळांत यशस्वी झालेला खेळाडू झिअसच्या देवळाकडे वाजतगाजत जातांना लोक त्याला अनेक देणग्या फुलें व अलंकार वगैरे अर्पण करीत असत. पिंडार, युरिपिडीससारखे कवी त्यांचा सन्मान करीत असत व त्याच्या नांवानें मोठीं स्मारकें बांधलीं जात. सिसेरो म्हणतो कीं, एखाद्या सेनापतीपेक्षांहि यशस्वी खेळाडूस अधिक सन्मान प्राप्त होत असे. वरील पांच प्रकारच्या खेळांप्रमाणेंच पिथिअन, नेमिअन व इस्थमिअन असे ग्रीकांचे तीन प्रकारचे खेळ होते. डेल्फी येथें होणाऱ्या पिथिअन अपोलो देवाच्या उत्सवांतच पीथिअन खेळाचें मूळ सांपडतें. या खेळांत गाण्याची चढाओढ असते. नेमिअन खेळ, नेमिअनझिअस नांवाच्या उत्सवापासून सुरू झाले असून त्यांत अनेक सामने होत असत. इस्थमिअन खेळ हे कॉरिन्थच्या संयोगभूमींत होत असून या खेळांत मल्लविद्या, संगीत वगैरेंचा अंतर्भाव होत असे.

रो म न.—ग्रीस देशाप्रमाणेंच रोममध्येंहि खेळांचा धर्माशीं निकट संबंध असे. प्रथमारंभीं देशाची सुरक्षितता रहावी म्हणून देवास खेळ नवसासारखे मागून घेतले जात व त्यांचा खर्च सरकारतर्फे होई. तथापि खासगी पैशांतूनहि लोक खेळाच्या कामीं पैसे खर्चून धार्मिक पुण्य व करमणूक या दोन्ही गोष्टी साधून घेण्यास कमी करीत नसत. सीझरनंतर जे राजे झाले त्यांनीं तर या कामीं फार खर्च केला.

रोमन इतिहासांत व रोमन लोकांच्या राजकीय व सामाजिक व्यवस्थेंत खेळांचें मोठें महत्व आहे हें खरें; परंतु मल्लयुद्ध व शर्यती वगैरे गोष्टींत समंजस मनुष्य सर्वदा अगदीं तल्लीन कसा होतो याविषयीं प्लिनीनें आश्चर्य प्रकट केलें आहे. ग्रीक व रोमन खेळ पाहून भिन्न विकार उत्पन्न होतात. याचें कारण असें कीं, ग्रीक लोक मूळचेच नाटकी व रोमन लोक हे केवळ प्रेक्षक असें त्यांचें वर्णन करतां येईल. झीनोफानीज म्हणतो कीं,एखाद्या मल्लाच्या देहसामर्थ्याचें एखाद्या तत्वज्ञाच्या ज्ञानापेक्षांहि त्या काळीं जास्त चीज होत असे. कितीहि उच्च दर्जाचा मनुष्य असला तरी ऑलिंपिक खेळांत भाग घेणें ग्रीकांला कमीपणाचें वाटत नसे. परंतु उच्च कुळांतील रोमन लोकांनां मात्र असल्या खेळांत भाग घेणें कमीपणाचें वाटत असे. रोमन खेळ हे बहुधा नवस म्हणून मागून घेऊन नंतर खेळले जात असत.तथापि त्यांचें वर्गीकरण स्थानाप्रमाणें अर्थात सरकस व अॅम्पीथिएटर या ठिकाणाप्रमाणें करण्यांत येतें. लूडी मॅग्नी हा उत्सव म्हणजे मूळचीं एका ज्युपीटर देवाला नवसार्थ केलेली मेजवानीच होय. सेनापती युद्ध करून परत आल्यावर ती करण्यांत येत असे. कॅपिटॉलपासून फोरमपर्यंत व नंतर सरकसकडे एक लष्करी मिरवणूक निघत असे व ह्या वेळीं खेळ होत असत. (१) रथांची शर्यत (२) लूडस ट्रेइ, (३) लष्करी पाहणी व (४) मल्ल युद्धें असे चार महत्वाचे खेळ होते. रथांच्या शर्यतींत पूर्वी दोन रथांची शर्यत होत असे. परंतु अनेक घोडे जुंपून अनेक रथांच्या शर्यती पुढें होऊं लागल्या. तत्कालीन सारथ्यास आधुनिक जॉकीपेक्षांहि फार मान मिळत असे. त्या सरकस नांवाच्या स्थानीं अनेक पक्ष असत. व ते सारथ्यांच्या कपड्यांच्या रंगांवरून ठरविले जात. लूडस ट्रेई या खेळांत पॅट्रिशियन लोक भाग घेत असत.अश्वारोहण करून एखादी खोटी लढाई देण्याचा हा खेळ आहे वरील खेळ सरकसमध्यें होत, परंतु अॅम्पिथिएटरांतांहि वरेच खेळ होत असत. " वेनाती ओ " नांवाच्या खेळांत पशूंची परस्परांत किंवा मनुष्य व पशू यांचीं युद्धें करविलीं जात असत. त्या ठिकाणीं मोठाले वाघ, सिंह, हत्ती, रेडे व बैल वगैरे आणून त्यांचे व मनुष्यांचे किंवा पशुपशूंचे सामने होत असत. "नॅऊमॅची " खेळांत समुद्रांतील खोटें युद्ध करण्याची पद्धत असे. परंतु अॅम्पीथिएटरांत विशिष्ट खेळ म्हणजे ' म्यूनस ग्लॅटिएटोरिम ' नांवाचा खेळ होय. मार्कस व डेसिमस ब्रूटस यांच्या स्मशानयात्रेच्या वेळीं होणाऱ्या खेळापासून वरील खेळ सुरू झाला. यांत मनुष्यांचीं युद्धें होत व गुलाम व कैदी यांची असहाय स्थिति कशी होती हें यांत दिसून येई. ' लूडि अपोलोनरीज ' व ' मेगॅलेन्सीज ' हे खेळहि प्रतिवर्षी होत असत.

खा स गी खे ळ.—यांचें वर्गीकरण बाहेर खेळण्याचे खेळ व घरगुती खेळ असें करतां येईल. जगांत मोठ्या माणसांच्या खेळांपेक्षां मुलांच्या खेळांत चोहोंकडे साम्य असलेलें आढळून येतें. होमरमध्यें मुलें वाळूवर किल्ले बांधीत असें वर्णन आहे. ग्रीक व रोमन मुलांचेहि बाहुल्या, चाकें, उड्या मारण्याच्या दोऱ्या, घोडे, पतंग, रस्सीखेंच, उन्हाळी पावसाळी, चेंडूफेक व लपंडाव इत्यादि अनेक खेळ होते. परंतु क्रिकेट, टेनिस, गोल्फ अथवा पोलोसारखे खेळ त्यावेळीं नव्हते. कोंबड्यांची झुंज हा खेळहि ग्रीस व रोम देशांत चालू असे. फाशासारखा ' टेसेरा ' म्हणून एक खेळ, जुगार, फांशांचा खेळ, ड्यूओ डेसिमस्क्रिप्टा व कॉटॅबस इत्यादि अनेक खेळ ग्रीस व रोम देशांत ख्रिस्तशकापूर्वीच्या काळांत चालू असत असें दिसतें.

कांहीं अर्वाचीन खेळांना राष्ट्रीय व सार्वराष्ट्रीय महत्व येत चाललें आहे. खेळांचे सार्वराष्ट्रीय सामने दरवर्षी होत असतात व त्यांत आपलें राष्ट्र मागासलेलें दिसूं नये म्हणून प्रत्येकाची खटपट असते व त्यामुळें खेळांकडे विशेष लक्ष दिलें जातें ही चांगली गोष्ट आहे.

खेळोजी भोंसले—शहाजीचा हा चुलतभाऊ असून विठोजीचा पुत्र होता. हा वेरूळकडे आपल्या जहागिरीच्या प्रांतीं रहात असे. त्याला निजामशाहींतून मनसब होती. शहाजहान जेव्हां निजामशाही बुडविण्याच्या नादीं लागला तेव्हां निरुपायानें जसा शहाजी हा शहाजहानला मिळाला तसाच खेळोजीहि आपले भाऊ मालोजी व परसोजी यांच्यासह शहाजहानला मिळाला (१६२९). शहाजहाननें त्याला पंचहजारी मनसब दिली. पुढें (१६३३) मोंगल हे जेव्हां दौलताबाद काबीज करूं लागले, तेव्हां खेळोजीनें त्यांची नोकरी सोडून आदीलशाहींत नौकरी धरली व मोंगलांशी लढूं लागला. या प्रसंगीं एकदां त्याची बायको गोदावरीवर स्नानास जात असतां तिला मोंगलांनीं पकडलें तेव्हां चार लाख रुपये दंड भरून त्यानें तिला सोडविलें. शहाजहानचा व आदिलशहाचा तह झाल्यावर आदिलशहानें खेळोजीस नोकरीवरून दूर केलें तेव्हां तो पुन्हां आपल्या जहागिरींत राहून मोंगलांच्या मुलुखांत धुमाकूळ घालूं लागला. तेव्हां दख्खनचा सुभेदार औरंगजेब यानें मोठ्या मुष्किलीनें खेळोजीचें गुप्त ठिकाण शोधून काढून युक्तीनें त्याला पकडून १६३९ च्या आक्टोबरांत ठार मारलें. खेळोजीचा वंश वेरूळ प्रांतीं अद्यापि आहे. [मराठी रियासत–पूर्वार्ध].

खैर--हा एक अरण्यवृक्ष आहे. यास संस्कृतांत खदिर, मराठींत खैर, गुजराथींत खेर, हिंदींत खदिर, इंग्रजींत काटेचू (कातांचें झाड) इत्यादि नांवें आहेत. लॅटिनमध्यें यास अकॅसियाकॅटेचु म्हणतात. या झाडाच्या तीन जाती आहेत.

खै र अ थ वा खो य रूः—हें झाड बहुतेक सर्वत्र आढळतें. यापासून फिक्या रंगाचा कात निघतो.

खै र, को यी र, अ थ वा शाः—बंगाल, आसाम व ब्रह्म देशांत हीं झाडें आढळतात, त्यांच्यापासून निघणाऱ्या काताला पेगूचा कात म्हणतात.

ला ल खै रः—हें झाड दक्षिणेकडे व पश्चिमेकडे सांपडते. या झाडांपासून उत्पन्न होणारा कात मद्रासी अथवा मुंबईचा कात या नांवानें प्रसिद्ध आहे.

या तिन्ही जातींच्या झाडांचे गुणधर्म व उपयोग सारखेच आहेत.त्यांसर्वांपासून गोंद, तुरट निर्यास व इमारतीस उपयोगी असें लांकूड मिळतें.गोंद, फिकट पिंवळया रंगाचा असून त्याचे खडे एक इंचपर्यंत जाडीचे असतात हा खाण्यास गोड असून पाण्यांत विरघळतो. व त्यापासून पिंगट रंगाचा चिकट द्रव पदार्थ बनतो. बाभळीच्या डिंकासारखा या झाडाच्या गोंदाचा उपयोग करतां येतो. हिंदुस्थानांतलि बहुतेक अरबी डिंक याच झाडापासून काढतात.

लां कू ड—सालीच्या खालच्या लांकडाचा रंग पिवळट पांढरा असतो व गाभ्याचा रंग गर्द किंवा फिकट लाल असून लांकड चांगलें कणखर टिकाऊ असून त्याला पॉलीश उत्तम बसतें. या लांकडाचीं शेतकीचीं आउतें करतात. ब्रह्मदेशांत घराच्या खांबांकरितां या लांकडांचा उपयोग करतात खैराचे कोळसे इतर लांकडाच्या कोळशापेक्षां फार उत्तम असतात. व रेल्वेच्या रुळाखालीं घालण्याकरितां स्लीपर करितांहि हें लांकूड चांगलें असतें. याचे कोळसे सोनारांच्या फार उपयोगी पडतात. पहिल्या जातीच्या खैराच्या लांकडाच्या दर घनफुटाचें वजन ५० ते ६० पौंड, दुसऱ्या प्रकारच्या लांकडाचें ६० ते ७० पौंड व तिसऱ्या प्रकारच्या लांकडाचें थोडेंसे अधिक वजन भरतें. या झाडास मुख्य महत्व त्यापासून मिळणाऱ्या कातामुळें आलें आहे. कातांचे औषधी उपयोगहि बरेच आहेत.(कात पहा).

खैर,त ह शी ल—संयुक्त प्रांत. अलीगड जिल्ह्याची वायव्य तहशील. या तहशिलींत खैर, चंडोसे, व टप्पल हे तीन परगणे आहेत. हिचें क्षेत्रफळ १९११ सालीं ४०७ चौ. मै. होतें. लोकसंख्या १,७९,१५२होती.या तहशिलींत ३ शहरें व २७२ खेडीं आहेत. खैर शहर हें तहशिलीचें मुख्य ठिकाण आहे. या तहशिलीचें उत्पन्न १९०३–४ सालीं ४,११,००० रुपये होतें.हिच्या पश्चिमेस यमुना नदी असून या भागांतील जमीन ‘ खादर ’ आहे. या जमीनींत गवताशिवाय दुसरें कांहीं पीक येत नाहीं. ‘ अपर गँजीस’चा ‘ माट ’ कालवा या भागांतून वहात गेला असून त्यामुळें या तहशिलींतील जमीनीला पाणीपुरवठा होतो.१९०३–४ सालीं या तहशीलींतील लागवडीच्या जमीनीचें क्षेत्रफळ २९२ चौ. मै. होतें.

खैरपूर, त ह शी ल.—पंजाबमधील बहावलपूर संस्थानच्या मिंचिनाबाद निझामतींतील तहशील. हिचें क्षेत्रफळ १९११सालीं२३००चौ. मै. होतें. लोकसंख्या ८७,२८६ होती. तहशिलींत खैरपूर व हासिलपूर हीं दोन शहरें असून १७८ खेडीं आहेत. १९०५–६ सालीं तहशिलीचें उत्पन्न २.२ लाख होतें.

श ह र.—खैरपूर तहशिलीचें मुख्य ठिकाण. हें बहावतपूर शहराच्या ईशान्येस ३८ मैलांवर आहे. याची लोकसंख्या १९०१ सालीं ५०१३ होती. या शहरांत एक शाळा व दवाखाना आहे. शहराला म्युनिसिपालिटी असून तिचें उत्पन्न ६२०० रुपये आहे.

खैरपूर शहर—पंजाबमधील मुझफरगड जिल्ह्याच्या अलीपूर तहशिलींतील शहर. हें मुझफरगड शहराच्या दक्षिणेस ५७ मैलावर असून सिंधु व चिनाब नद्यांच्या संगमावर वसलेलें आहे. याची लोकसंख्या १९०१ सालीं २२५७ होती, १९ व्या शतकांत बुखारी सय्यद जातीच्या खैर शहानें हें वसविलें असें म्हणतात. या शहराला १८७३ मध्यें म्युनिसिपालिटी देण्यांत आली. या शहरांतील लोक धाडसी व्यापारी असून सक्कर, मुलतान वगैरे शहरांशीं यांचा व्यापार चालतो. लोंकर, कापूस व धान्य यांची या शहरांतून निर्गत होते. कापड व इतर किरकोळ वस्तूंची आयात होते.

खैरपूर सं स्था न—सिंधमधील एक संस्थान. क्षेत्रफळ ६०५० चौ. मै. याच्या उत्तरेस सक्कर जिल्हा, पूर्वेस जेसलमीर संस्थान, दक्षिणेस हैद्राबाद, थर, व पारकर जिल्हे, व पश्चिमेस सिंधु नदी आहे. सिंधमधील इतर प्रदेशांप्रमाणेंच याहि संस्थानची जमीन सपाट व पुळणीची आहे. सिंधु नदीच्या कांठीं असलेली जमीन फार सुपीक आहे. पण नदीच्या कांठचा बहुतेक भाग जंगलाकरितां राखून ठेवलेला आहे. सिंधूनदीच्या कांठचा भाग सोडून दिल्यास बाकीचा सगळा भाग रेताड दगडांनीं भरलेला असून या भागांत पीक अजीबात येत नाहीं म्हटलें तरी चालेल. संस्थानच्या उत्तरभागांत चुन्याच्या दगडांची टेंकडी आहे. रोहरी येथून घार नांवाची एक डोंगराची रांग गेली आहे व त्या टेंकडीवर पश्चिमभागीं दिजी नांवाची एक टेंकडी आहे. संस्थानच्या ईशान्य भागांतहि चुन्याच्या दगडांच्या टेंकड्यांची रांग आहे. या टेंकड्यांवर पुष्कळ शिंपा सांपडतात. संस्थानांतील जंगलांत कांडी व ताली हीं झाडें विशेष दृष्टीस पडतात. याशिवाय, इतर झाडा झुडपांची हि समृद्धि आहे. तरस, लांडगा, कोल्हा, खेकडा, डुक्कर, हरिण, नीलगाय इत्यादि पशू व निरनिराळ्या प्रकारचे पक्षी या संस्थानांत आढळतात. खैरपूर संस्थानची हवा हिंवाळ्याचे चार महिने चांगली असते; पण बाकीचे आठ महिने येथील हवा फार उष्ण असते. येथें पाऊस फार कमी पडतो.

इतिहास.—१७८३ पूर्वीचा संस्थानचा इतिहास सिंधच्या इतिहासांत मिसळून गेला आहे. संस्थानच्या स्वतंत्र इतिहासाला यानंतर सुरुवात होते. १७८३ मध्यें कल्होरा राजघराणें संपुष्टांत आलें व तालपुर घराणें उदयास आलें. या वर्षी मीर फते अलीखान तालपुर हा

सिंधचा स्वामी झाला; व त्यानंतर थोड्याच दिवसांनीं अलीखानाचा पुतण्या मीर शोराबखान यानें खैरपूर येथें आपली गादी स्थापन केली. नंतर त्यानें मुलुखगिरी करून आसपासचा बराच भाग जिंकून घेतला. १८११ मध्यें शोराबनें आपला मुलगा रस्तुम यास गादीवर बसविलें. पुढें रस्तुम व त्याचा भाऊ अली मुराद यांच्यामध्यें गादी-संबंधानें भांडणें उत्पन्न होऊन इंग्रजांना आपला हात मध्यें घालण्यास चांगलीच संधि सांपडली. १८३२ मध्यें इंग्रजांनीं खैरपूर संस्थान स्वतंत्र असल्याचें कबूल केलें व संस्थानकडून सिंधुनदी व सिंधमधील रस्ते याची वहिवाट त्यांनीं मिळविली. काबूलच्या मोहिमेंत अली मुरादनें ब्रिटिशांना चांगलीच मदत केली. त्यामुळें काबूलच्या मोहिमेनंतर सिंधप्रांत इंग्रजांनीं खालसा केला असता फक्त खैरपूरचें संस्थान मात्र त्यांनीं खालसांत काढलें नाहीं. १८८६ मध्यें इंग्रजांनीं मीरला वारसाची सनद दिली. मीर अली हा १८९४ मध्यें मरण पावला व त्याच्या मागून मीर फैज महमदखान हा त्याचा मुलगा गादीवर बसला. याला स्वतःकरितां १७ तोफांचा व राजा या नात्यानें १५ तोफांचा मान आहे. संस्थानामध्यें १ शहर व १२६ खेडीं आहेत. लोकसंख्या १९११ सालीं २,२३,७८८ होती. मुसुलमान हे जवळजवळ हिंदूंच्या तिपटीनें आहेत. हिंदूंमध्यें लोहाणा जातीचे लोक फार आहेत. मुसुलमानांत अरब बलूची, जाट, मोहानो या जातीचे लोक विशेष आढळतात. संस्थानांतील बहुतेक लोकांचा शेतकी हा धंदा आहे. संस्थानांत मुख्यतः सिंधी, फारसी, सिरैकी व बलुची या भाषा प्रचलित आहेत.

१९०३–४ सालीं या संस्थानांतील लागवडीची जमीन १५५० चौ. मै. होती. ज्वारी, बाजरी, गहूं, कडधान्य हीं मुख्य पिकें आहेत. निळीचें पीकहि बरेंच होतें. आंबा, तुती, नारिंगें, डाळिंब, खजूर हीं फळें विशेष आढळतात. नवीन नवीन कालवे काढण्यांत आल्यापासून लागवडीची जमीन वाढत चालली आहे. संस्थानांत, उंट, घोडे, म्हशी, बैल, गाढव, खेचर, मेंढी हीं पाळीव जनावरें आढळतात. संस्थानांत कालवे पुष्कळ आहेत. हे सर्व सिंधुनदीचे आहेत. सर्वांत मोठा कालवा 'मीरवाह' हा होय. मीर शोराबच्या कारकीर्दींत तो काढण्यांत आला. याशिवाय अली मुरादनें आपल्या कारकीर्दींत सथीयोवाह व अबदुलवाह हे दोन कालवे काढविले. हल्लींच्या मीरच्या कारकीर्दींत यासाठीं एक स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलें असून त्या खात्यानें फैजवाह, फैजबक्ष, फैजगंज, फैजबहार, फैजमंज इत्यादि कालवे काढले आहेत. १९०३–४ सालीं २४६ चौ. मै. जमीनीला या कालव्यांमुळें पाणी मिळत होतें. संस्थानांत ३३१ चौरस मैल जंगल असून, त्यापैकीं २०० चौरस मैल मीरच्या शिकारीसाठीं राखून ठेवण्यांत आलें आहे. याच्यावर स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत आला आहे. १९०४ मध्यें या जंगलाचें उत्पन्न २६००० रुपये झालें.

संस्थानांत सर्व प्रकारचें कापड, चांदीचें सामान, लांकूड-काम, बूट, जोडे, जीन, तलवारी, मातकाम वगैरे धंदे आहेत. गोंबट येथें 'खैस' उर्फ पलंगपोस उत्तम होतात. खैरपूरमध्यें गालिचाचा कारखाना आहे. शिवाय येथें रंगाचें काम उत्तम तऱ्हेनें होतें. संस्थानांतून कापूस, लोंकर, धान्य, नीळ, कातडी, तंबाखू इत्यादि जिन्नस निर्गत होतात. खैरपूर-मध्यें कार्बोनेट ऑफ सोडा उत्पन्न होतो व तो सगळा मुंबईचे व्यापारी विकत घेतात. एकंदर निर्गत वस्तूंचें अंदाजी उत्पन्न ६ लाखांचें व आयातीचें उत्पन्न सहा लाखावर आहे. हैद्राबादहून रोहरीला जो रेल्वेचा फांटा जातो तो या संस्थानच्या हद्दींतून गेला आहे. याशिवाय किरकोळ रस्ते पुष्कळच आहेत. पोस्ट ऑफिसांची संख्या १० आहे. सिंधू नदीमध्यें संस्थानच्या मालकीच्या सहा बोटी आहेत.

संस्थानांतील राज्यपद्धति अनियंत्रित आहे. तरी पण हल्लींतींत बऱ्याच सुधारणा झालेल्या आहेत. कारभाराच्या सोईसाठीं संस्थानचे ५ तालुके पाडण्यात आले आहेत. प्रत्येक तालुक्यावर एकेक नायब वझीर नेमण्यांत आला आहे. मीरचा मुख्य वझीर हा ब्रिटिश सरकारनें नेमलेला असतो. सक्करचा कलेक्टर संस्थानवर देखरेख करण्याचें काम करतो. मीरला न्यायाच्या बाबतींत पूर्ण अधिकार आहेत; पण ब्रिटिश प्रजाजनांना पोलिटिकल एजंटच्या परवानगीशिवाय फांशी देण्याचा अधिकार नाहीं. वझीराला डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व सेशन्स जज्जाचे अधिकार आहेत. नायब वझीरांना सब-डिव्हिजनल मॅजिस्ट्रेटचे अधिकार आहेत. ब्रिटिश राज्यांतील फौजदारी कायदाच येथें रूढ आहे. संस्थानामधील महसूल बटई नांवाच्या जुन्या पद्धतीनें गोळा केला जातो. उत्पन्नाच्या एकतृतीयांश भाग मीर स्वतःसाठीं घेतो. १९०३-४ सालीं संस्थानचें उत्पन्न १३ लाख झालें व खर्च ११.६ लाख रुपये झाला. १९०२ पर्यंत संस्थानची स्वतःची नाणीं प्रचारांत होतीं पण हल्लीं ब्रिटिश नाणें चालू असून हेंच राजमान्य नाणें होऊन बसलें आहे. मीरला सरकारास कांहींहि खंडणी द्यावी लागत नाहीं. संस्थानचें लष्कर ३७७ शिपायांचें असून त्यात १६३ स्वार आहेत. १९०३-४ सालीं पोलिसांची संख्या २२० होती. कोटदिजी येथें एक मोठा तुरुंग व खैरपूर येथें एक छोटा तुरुंग आहे. खैरपूर संस्थान शिक्षणाच्या बाबतींत फार मागसलेलें आहे. १९०३-४ सालीं संस्थानांत ९५ शाळा होत्या व ४५८६ विद्यार्थी शिकत होते. खैरपूर येथील सर अलिमुराद टेक्निकल शाळेंत, सूत व रेशीम विणकाम नुकतेंच सुरू करण्यांत आलें आहे. त्या ठिकाणीं मुलांना सुतारकी, लोहारकी, कातकाम, कशिदाकाम व गालिचाकाम, तसेंच लाखरोगणाचें लांकूड करणें, चकचकीत भांडीं करणें व हात-मागावर विणणें हीं सर्व कामें शिकविण्यांत येतात. १९०३–४ सालीं संस्थानांत ३ इस्पितळें व ३ दवाखाने होते.

खैरपूर शहराकरितां शुद्ध पिण्याच्या पाण्याची नुकतीच सोय करण्यांत आली. ८६ फूट खोलींतून हें पाणी नळानें वर आणलें आहे. १९२० ते १९२३ च्या दरम्यान पाण्याच्या पाटाची बरीच दुरुस्ती व सुधारणा करण्यांत आली. अलीनवाझवाह नांवाचा एक नवीन कालवा सुरू करण्यांत आला. त्यास खर्च सुमारें १,००,००० रुपये झाला. १९२२ सालीं संस्थानांत एकच सामान्य कारखाना निघाला. धान्य दळणें, धान्य निवडणें, पाणी शुद्ध करणें, बर्फ करणें इत्यादि कामें या कारखान्यांत करण्यांत येतात.

जानेवारी १९२४ सालीं बर्मा ऑइल कंपनीला पेट्रोलियम तेलाकरितां धातूच्या खाणी शोधण्याचा परवाना देण्यांत आला. परंतु संस्थाननें इतर सांपडणाऱ्या खनिज पदार्थांवरील आपला हक्क कायम ठेविला. पांच वर्षांत कंपनीला जर तेल सांपडलें तर तिला तीस वर्षांचा कौल मिळावा व या मुदतींत कंपनीनें कच्या तेलाच्या प्रत्येक ४० गॅलनास आठ आणे दरानें राजकीय कर द्यावा असें ठरलें. हा परवाना देणें म्हणजे संस्थानच्या उत्पन्नवाढीच्या बाबतींत एक पाऊल पुढें टाकणेंच होय हें उघड आहे.

ब्रिटिश अधिकाऱ्यांशीं सहकार्य करून कारबोनेट ऑफ सोडा या पदार्थाची मोठी वखार पुनः वाढवावी अशा सूचना करण्यांत आल्या आहेत.

श ह र—खैरपूर संस्थानची राजधानी. याची लोकसंख्या १९११ सालीं १४९८९ होती. बहुतेक वस्ती मुसलमानांचीच आहे. शहरांतील घरें मातीचीं असून फार गचाळ आहेत. या शहरांत राजवाड्याची इमारत चांगली आहे. पण स्वतः मीर हा येथें क्वचितच रहातो. शहराच्या नजीक पीररुद्दन, झियाउदिन व हाजी जाफर सय्यद यांचीं थडगीं आहेत. शहरांत दोन इस्पितळें असून त्यापैकीं एक खास स्त्रियांकरितां आहे. तालपुर घराण्याच्या भरभराटीच्या काळीं या शहराला फार महत्व होतें पण हल्लीं तें महत्व कमी होत चाललें आहे. शहरांत कपडे रंगविण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर आहे. हल्लीं ज्या जागीं हें शहर वसलेलें आहे त्या जागीं १८८७ पूर्वी बोबरा नांवाचें एक खेडें होतें असें म्हणतात.

खैरवार—खरवार. बिहार-ओरिसांत यांची वस्तीसर्वांत जास्त(सुमारें ८५ हजार) आहे. मध्यप्रांतांत यांची संख्या २००० आहे. डाल्टनच्या मतें यांचा व चेरो लोकांचा फार निकट संबंध आहे. यांच्यांत परस्परविवाह होऊं लागला आहे. पलामऊ व रायगडचे राजे या प्रकारचे मिश्र लग्नसंबंध जोडतात व अलीकडे मोठा खर्च करून रजपूत मुली देखील करतात. यामुळें यांतील बरेच तुराणी अवशेष नाहींसे होत आहेत. ही जात एकंदर सुधारणेच्या मार्गावर आहे. यांचा व संताळ लोकांचाहि संबंध आहे असें डाल्टन म्हणतो. या जातींत ४ उपवर्ग आहेत. भोगता, माहतो, रावत व मांझी.माहतो म्हणजे गांवाचा मुख्य, रावत म्हणजे राजा,मांझी म्हणजे होडी वल्हवणारा. संताळ लोकांत गांवाच्या मुख्यास मांझी म्हणतात. बंगालमध्यें भोगता ही महत्वाची जात आहे. मध्यप्रांताचे जमीनदार लोक जानवें घालतात, स्वतःस सूर्यवंशी म्हणवितात व आपसांतच लग्नें करतात. दुसऱ्या वर्गाचें नांव दुवालबंधी असें आहे. हे लोक घराच्या भिंती बांधतात. पाटबंधी लोक रेशमाचे कोश पाळतात. वेलदा व माटकोरा हे मातीचें काम करतात. सर्वांत शेवटीं खैरचुरा वर्ग आहे. हाच कातकाम करतो.

यांची परस्परानिषिद्धविवाह कुलें बरींच झालीं आहेत. कुलांचीं नांवें पशुपक्षी व इतर पदार्थांवरून पडल्यामुळें ते ते प्राणी व पदार्थ त्यांचीं देवकें आहेत. वधुवराचें खरें लग्न होण्यापूर्वी दोघांचेंहि लग्न आंब्याच्या झाडाबरोबर झालें पाहिजे.व दोघांनीं परस्परांचें रक्त काढून त्यांत शेंदूर मिसळून कपाळाला लावला पाहिजे. खऱ्या लग्नांत फक्त शेंदूरच वधूच्या अंगाला लावतात. बिरहोर लोकांत तर वधुवरांचीं बोटें टोंचून त्यांतून निघालेल्या रक्ताचा तिलक वधूवर परस्परांस करतात.

बिलासपुरांत लहान मुलें आईबापांच्या प्रेतांचें थोडें मांस कापून खातात व त्यामुळें आईनें ९ महिने पोटांत वागविलें त्याबद्दल उतराई झालों असें समजतात. फ्रेजर म्हणतो कीं त्यांनां पिशाच्चाची बाधा न व्हावी म्हणून ते हा विधि करतात. [रसेल व हिरालाल. से. रि. १९११ (बंगाल)].

खैरागड, त ह शी ल— संयुक्त प्रांतांतील आग्रा जिल्ह्याची नैर्ऋत्य तहशील. इचें क्षेत्रफळ १९११ सालीं ३०९ होतें. लोकसंख्या १२११७६ होती. या तहशिलींत जगनैर हें एकच शहर असून १५२ खेडीं आहेत. खैरागड हें खेडें या तहशिलीचें मुख्य ठिकाण आहे. १९०३–०४ सालीं या तहशिलीचें उत्पन्न २८५००० रुपये होतें. या तहशिलीमधून उतनगान ही नदी वहात गेली आहे. या नदीच्या नैर्ऋत्येकडील भागांत विंध्यपर्वताची रांग गेली आहे व दक्षिण भागांत लहान लहान टेंकड्या पसरल्या आहेत. या टेंकड्या तांबड्या रेताड दगडाच्या आहेत. त्यांचा इमारतीला फार उपयोग होतो. या टेंकड्यांच्या पायथ्याशीं जमीन रेताड व नापिक आहे. उतनगान नदीच्या पूर्वेकडील मुलुखांतलि जमीन चिकण मातीनें युक्त असून सुपीक आहे. या भागांतून पुष्कळ खोरीं आहेत. जमीनीला पाणी मिळण्याचें साधन म्हणजे विहिरी होत. या तहशिलींत एक देखील कालवा नाहीं.

खैरागड, सं स्था न.—मध्यप्रांत. उ. अ. २१ ° ४' ते २१ ° ३४' व पू.रे. ८० ° २७' ते ८१ ° २२'. क्षेत्रफळ ९३१ चौरस मैल. लोकसंख्या १३७५५४. या संस्थानचे तीन निरनिराळे भाग आहेत. (१) खैरागड आणि डोंगरगड (२) खामारिया व (३) खोलवा. जंगलांत वाघ, चित्ते, नीलगाई, अस्वलें, लांडगे, गवे, डुकरें, वगैरे रानटी जनावरें दिसतात.गेल्या १९ वर्षांची पावसाची सरासरी ४४ इंच आहे.

संस्थानची हवा साधारण निरोगी आहे. उष्णमान ३८° पासून १०४° पर्यंत असतें.

इतिहासः—छोटा नागपूरचा नागवंशी रजपुतराजा सभासिंग या राजघराण्याचा मूळपुरुष होता असें मानण्यांत येतें. सभासिंगाचा श्यामधन नांवाचा वंशज सन १७४० सालीं खोलवाचा जमीनदार होता. पुढें खोलव्याच्या राजास भोंसल्यांचें मांडलिकत्व कबूल करावें लागलें व खंडणी ५०० (नागपूर नाणें) रुपये ठरली. संस्थानची राजधानी खोलवा होती परंतु यानें खैरागड येथें आपलें मुख्य ठाणें केलें. सन १७५५ सालीं खंडणी १५०० रुपये झाली. नंतर ८००० रुपयापर्यंत चढवली. सन १७८४ च्या सुमारास कवर्धांचे उजियारसिंग आणि सरदारसिंग यांचा खामारिया परगण्याच्या मालकीसंबंधानें तंटा उपस्थित झाला. खैरागडच्या राजानें सरदारसिंगास मदत केली व दिलेल्या कर्जाची फेड म्हणून तो परगणा मिळाला. यावेळीं भोंसल्यास ३५००० रुपये खंडणी द्यावी लागत असे. इ. स. १८१६ सालीं डोंगरगडच्या जमीनदारानें भोंसल्यांच्या विरुद्ध बंड केलें, त्याचा नाश संस्थानिक टिकाइतरायानें नांदगांवच्या संस्थानिकाची मदत घेऊन केला. त्यामुळें ती जमीनदारी खैरागड संस्थानांत सामील झाली व खंडणी एकंदर ४४००० रुपये करण्यांत आली.

सन १८५४ सालीं नागपुरचें राज्य ब्रिटिशांनीं खालसा केलें व या संस्थानची खंडणी ३९००० (कंपनी नाणें). ठरली सन १८६५ सालीं खैरागड मांडलिक संस्थान आहे असें ठरवून संस्थानिकास दत्तक वगैरेंसंबंधींची सनद देण्यांत येऊन सन १८६७ सालीं खंडणी ४७००० पर्यंत वाढविली गेली. तीच सन १८८८ सालीं ७०००० रुपये केली व १ एप्रिल सन १९०९ पासून पुढील ३० वर्षेपर्यंत खंडणी ८०००० रुपये ठरली.

पुराणवस्तुसंशोधनः—खैरागड येथें एक व डोंगरगड येथें एक अशीं दोन प्राचीन देवळें आहेत. खैरागड येथील देऊळ रुखरस्वामींचें आहे. (रुखरस्वामी शब्द पहा).

डोंगरगड येथील देऊळ तेथील राजा कामसेन यानें बांधलें आहे. हा उज्जनीचा राजा विक्रमादित्य याचा समकालीन होता. या देवळास बोमलाईचें देऊळ असें म्हणतात. डोंगरगड येथें कामकंदला नांवाचें तळें आहे. कामसेनाच्या रखेलीच्या नांवावरून तळ्यास हें नांव दिलें आहे. बोमलाई डोंगरावरील मोतियाबीर तलावाच्या कांठावर एक दहा फूट उंचीचा दगड सांपडला असून त्यावर एक फारसी लिपींत लेख आहे. देवरबीज येथें एक काळ्या दगडाचें महादेवाचें लिंग असून तें फार जुनें आहे. त्यावर मकरध्वज जोगी असें नांव खोदलेलें आहे.

या संस्थानांत खैरागड व डोंगरगड येथें म्युनिसिपालिट्या आहेत. या संस्थानांत एकंदर ५२१ खेडीं आहेत. पैकीं ४९६ मध्यें वस्ती आहे व बाकीचीं ओसाड पडलेलीं आहेत.

भाषाः—छत्तिसगड हिंदी भाषेची उपभाषा शेंकडा ९५ लोक बोलतात. मराठी भाषा बोलणारांची संख्या सुमारें ४००० आहे. लागवडीखालीं जमीन सन १८९४ सालीं सुमारें ७०० चौरस मैल होती. त्यापैकीं सुमारें ⅔ खरीफ व ⅓ रब्बी. मुख्य पिकें कोडन, भात, गहूं, हरभरा इत्यादि.

बंगालनागपूर रेल्वेचीं या संस्थानांत तीन स्टेशनें आहेत तीं:—डोंगरगड, बोरतलाव आणि मुसरा. डोंगरगड येथें मोठा व्यापार चालतो.

जंगलाचें क्षेत्रफळ सुमारें १६५ चौरस मैल असून सन १९०७ सालीं जंगलाचें उत्पन्न ४०००० रुपये होतें व खर्च ३५०० रुपये होता.

जमीनपहाणी, तुरुंग, अबकारी, पोलिस, रॅजिस्ट्रेशन, सार्वजनिक कामें, जंगल, शिक्षण, दवाखाना वगैरे खातीं संस्थानांत आहेत.

गां व.—मध्यप्रांत. खैरागड संस्थानच्या राजधानीचा गांव. बंगालनागपूर रेल्वेच्या डोंगरगड व राजनांदगांव स्टेशनपासून हा गांव पक्क्या सडकेनें २३ मैल आहे. क्षेत्रफळ १६५ एकर व लोकसंख्या ४६५६. येथें संस्थानिकाचा राजवाडा, व्हिक्टोरिया-हायस्कूल दवाखाना, कचेऱ्या, तुरुंग वगैरे आहेत. इसवी स. १९०० सालीं म्युनिसिपालिटि स्थापन झाली आहे. येथील तुरुंगांत उत्तम सतरंज्या होत असून गांवांत पिंवळेचीं भांडीं व लांकडी सामान तयार होतें.

खैरागली—वायव्य सरहद्दीवरील प्रांताचा हजारा जिल्ह्यांतील छोटासा कँटोनमेंट. उन्हाळ्याच्या दिवसांत ब्रिटिश लोकांचा डोंगरी तोफखाना येथें असतो.

खैराबाद—संयुक्त प्रांतांतील सीतापुर जिल्ह्याच्या सीतापूर तहशिलींतील शहर. लखनौ-बरेली रेल्वेच्या मार्गावर हें वसलेलें असून याची लोकसंख्या १९११ सालीं १२७६९ होती. पासी जातीच्या खैरा नांवाच्या एका पुरुषानें हें शहर ११ व्या शतकांत वसविलें असें म्हणतात. पण कांहींच्या मतें खैरानें वसविलेलें शहर हें नसून मसच्छत्र नांवाचें जें शहर खैराबादच्या नजीक आहे तें होय. हल्लींचें खैराबाद हें नांव मुसुलमानांनीं दिलें असें म्हणतात. दिल्लीच्या प्राचीन राजांनीं या शहरावर सुभेदार नेमला होता. अकबराच्या कारकीर्दींत खैराबाद हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होतें. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत खैराबाद हें औध निझामतीचें मुख्य ठिकाण होतें. पुढें औध स्वतंत्र झाल्यावर खैराबाद हा एक जिल्हा बनला. येथें देवालयें व थडगीं पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कांहीं अकबराच्या काळचीं आहेत. सन १८६९ सालीं खैराबाद म्युनिसिपालिटी स्थापन करण्यांत आली. येथें दररोज बाजार भरतो. जानेवारीमध्यें एक मोठी यात्रा भरते. येथें ५ शाळा व २ दोन दवाखाने आहेत.

खैरी—मध्यप्रांत. जिल्हा भंडारा. तहशील साकोली. साकोलीच्या उत्तरेस कांहीं मैलांवर ही लहानशी जमीनदारी आहे. हींत एकंदर ४ खेडीं असून क्षेत्रफळ १४ चौरस मैल

आहे. त्यापैकीं ¾ भाग जंगल आहे. रानटी पशूंचा नाश केल्याबद्दल हल्लींच्या मान घराण्याच्या पूर्वजांस ही जमीनदारी मिळाली असें म्हणतात. कदाचित् तुमीपुरीच्या जमीनदारीचा हा एक भाग असेल,कारण तेथील जमीनदार देखील मान घराण्यांतीलच आहेत. इ. स. १७७५ सालीं नागपूरच्या राजांनीं ही जमीनदारी याच घराण्याकडे कायम केल्याची सनद दिली आहे. हल्लींचा जमीनदार अनंतराम मान घराण्यांतील (वय ५५ वर्षें) असून अशिक्षित आहे.यास कर्ज फार आहे. त्यानें आपलें कर्ज फेडण्याकरितां गीदलपार नांवाचें खेडें विकून टाकलें. पहाणीच्या वेळचें उत्पन्न १६०० रु. होतें. टाकोळी ५५० रु. हल्लींचें अजमावलेलें उत्पन्न १३५० रुपये आहे.

खैरीमूरत—पंजाबमधील अटक जिल्ह्याच्या फतहजंग तहशिलींतील एक डोंगराची रांग. ही रांग सोहान व काळा चित्र या नद्यांच्या मधून गेली आहे. सिंधू नदीपासून ३० मैलांवर ही सुरू होऊन पूर्वेकडे २४ मैलपर्यंत ही पसरली आहे. या डोंगरांत रेताड दगड व चुन्याचे दगड सांपडतात. या रांगेच्या उत्तरेस मोठें पठार असून त्यांत मधून खोल दऱ्या आहेत. दक्षिणेस ५ मैलपर्यंत लहान लहान टेंकड्या व खिंडी आहेत. या डोंगरावर पूर्वी फार मोठीं जंगलें होतीं. पण हल्लीं तीं बहुतेक नाहींशी करण्यांत आलीं आहेत.

खैरुद्दिन—(खैरेदि॑नः याचा अर्थ धर्मानंद असा आहे). खैरुद्दिन हा तुर्कस्तानचा एक प्रसिद्ध मुत्सद्दी होऊन गेला. याच्या जन्मासंबंधीं व कुलासंबंधीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. हा सिरकेशियन वंशाचा होता. तूनेशियांतील गुलामांचा व्यापार करणाऱ्या एका गृहस्थाच्या ताब्यांत हा लहानपणीं होता. पुढें त्या व्यापारानें याला ट्युनिसमधील हमूदपाशा नांवाच्या एका सुभेदाराला विकलें. या सरदारानें खैरुद्दिन यास स्वतंत्र केलें व त्याला फ्रेंच भाषेचें शिक्षण दिलें. पुढें खैरुद्दिनचा शिक्षणक्रम आटोपल्यानंतर हमूदपाशा यानें त्याला आपल्या जिंदगीचा व्यवस्थापक नेमलें. हमूदपाशाचा दिवाण महमद बिन अयद यानें खजिन्यांतील द्रव्य लुटून फ्रान्सला पलायन केल्यावेळीं हमूदपाशानें त्याला धरून आणण्यासाठीं खैरुद्दिन यास फ्रान्समध्यें धाडलें. खैरुद्दिनच्या हातून ही कामगिरी पार पडली नाहीं तथापि तो फ्रान्समध्यें सहा वर्षें महमदाच्या शोधार्थ राहिला असतां, फ्रेंचांच्या शासनपद्धतीचें व त्यांच्या राजकारणविषयक कल्पनांचें त्याला चांगलें ज्ञान झालें. फ्रान्समध्यें तो सर्वांना परिचित झाला. खैरुद्दिन हा फ्रान्समध्यें असतांना हमूदपाशा मरण पावला. त्याच्या नंतर १८३७ मध्यें अहमदपाशा गादीवर आला. खैरुद्दिन हा तूनेशियांत परत आला व अहमदपाशानें त्याला चांगली अधिकाराची जागा दिली. अहमद, महमद व सदोक या तिन्ही सुभेदारांच्या कारकीर्दींत खैरुद्दिन हा तूनेशियांमध्यें चांगलाच मान्यतेस आला. यानें तूनेशियांत पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. तुर्कस्तानच्या सुलतानाकडून महमूदपाशाच्या वंशजांनां वंशपरंपरा सुभेदारी खैरुद्दिन यानें मिळवून दिली. तूनेशिया प्रांत आपल्या छत्राखालीं यावा अशी फ्रेंच सरकारची फार इच्छा होती पण या त्यांच्या महत्वाकांक्षेला खैरुद्दिन यानें जोराचा विरोध केला, पण सदोकचा दिवाण मुस्ताफाबिन इस्मायल नांवाच्या यहुद्याला फ्रेंचांच्या ताब्यांत हा प्रांत जावा असें वाटत होतें. त्यामुळें त्यानें सदोकच्या मनांत खैरुद्दिनाविषयीं वाईट मत भरवून दिलें. त्यामुळें सदोकच्या मनांतून खैरुद्दिन हा पूर्णपणें उतरला. पुढें अबदुल हमीर हा तुर्कस्तानचा सुलतान झाला. तेव्हां खैरुद्दिननें तुर्कस्तानमध्यें येण्याची आपली इच्छा हमीदपाशीं प्रदर्शित केली व त्याप्रमाणें तो १८७७ मध्यें तुर्कस्तानांत आला. याच सुमारास टोकेन येथें सुधारणा कमिटी बसली होती. त्या कमिटीवर सुलताननें याची नेमणूक केली. १८७९ मध्यें तो सुलतानचा मुख्य वझीर झाला. तुर्कस्तानमध्यें सनदशीर राज्यपद्धति अमलांत यावी यासाठीं त्यानें एक योजना तयार केली. पण त्या योजनेला संमति देण्याचें सुलताननें साफ नाकारलें. त्यामुळें १८७९ च्या जुलै महिन्यात त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला. सुलतानानें अनेकदां त्याला मुख्य वजीरीची जागा देऊं केली पण त्यानें ती नाकारली. त्यामुळें सुलतानचा त्याच्यावर रोष झाला. खैरुद्दिन हा १८९० मध्यें मरण पावला.

खोकंद—एशियाटिक रशियांतील एक शहर. हें फरघन प्रांतांत समरकंदपासून अंडिजानला जाणाऱ्या आगगाडीच्या रस्त्यावर आहे. येथील हवा फार रुक्ष असते. प्रतिवार्षिक पाऊस ३.६ इंच असतो. शहरांत मोठाले रस्ते, विस्तृत चौक व सुंदर बाजार आहेत. हें व्यापाराचें महत्त्वाचें केंद्रस्थान आहे. येथें ' रम्य खोकंद ' मुद्रालेख असलेलीं नाणीं पूर्वी प्रचारांत होतीं व अझूनहि आहेत.

१८ व्या शतकांत या खानेटचा उदय झाला. १७३२ त अबदुर रहीम यानें या शहराची स्थापना केली. याच्याहि पूर्वी म्हणजे १० व्या शतकांत खोकंद हें होकंद या नांवानें अरब व्यापाऱ्यांनां माहीत होतें. १७५८-५९ त फरघन येथील राजांनीं चीनचें मांडलिकत्व कबूल केलें. १८०७ किंवा १८०८ मध्यें नरबुताचा मुलगा अलीम यानें ताश्कंद व चिम्केंट हीं शहरें जिंकलीं व फरघनच्या राजांवर आपलें वर्चस्व स्थापिलें. त्याचा भाऊ ओमर याच्या अनुयायांनीं १८१७ त त्याला ठार केलें. ओमर यानें किरगिझ लोकांच्या स्वाऱ्यांपासून फरघन प्रांताचें रक्षण करण्याकरितां सिरदर्यावर एक किल्ला बांधिला. यामुळें रशियाशीं वैमनस्य उत्पन्न झालें. सिरदर्याजवळील प्रदेशाचें स्वामित्व मिळविण्याकरितां १८४७ नंतर रशियानें पुष्कळ लढाया केल्या. याचा परिणाम असा झाला कीं, १८६६ त बुखारापासून खोकंदचें खानेट वेगळें करण्यांत आलें. १८६० त अलीमकुल यानें रशियाविरुद्ध ' पवित्र युद्ध ' (गझावत), पुकारलें

परंतु तो १८६५ त मारला गेला. १८६८ त खुदायरखान यानें रशियाशीं व्यापारी तह केला. १८७५ त फिरून रशियाशीं युद्ध पुकारण्यांत आलें. याचा परिणाम खोकंदचें व बुखाराचें स्वातंत्र्य नष्ट होऊन, रशियाला नारयिन नदीच्या उत्तरेकडील सर्व मुलुख मिळाला. १८७६ त खोकंद खानेट रशियास जोडण्यांत आलें व यांतूनच रशियन फरघन प्रांताची उत्पत्ति झाली.

खोखार—पंजाबांतील एक जात. लो. सं. (१९११) ५९,९५७. हे मुख्यतः मुसुलमान असून फेरोजपूर, लाहोर, गुजराणवाला, शियालकोट जिल्हे, रावळपिंडी, मुलतान प्रांत व भावलपूर संस्थान यांत आढळतात. ते चांगले शेतकरी असून जाट, रजपूत लोक व आपण जवळ जवळ एकाच वंशांचे आहोंत असें त्यांचें म्हणणें आहे.

ग्रंथांमधून खोखार व गखार यांविषयीं जे उल्लेख येतात ते दोन्ही एका जातीविषयीं नसून निरनिराळ्या जातींविषयीं आहेत असें मत आतां प्रचलित झालें आहे.गुरुदासपूर येथील काटील रजपुतांपैकीं जे प्रथम मुसुलमान झाले ते खोखार होत असें या जातीच्या वृत्तांत लिहिलें आहे. काटील जातीच्या रजपुतांनीं जम्मू राज्यांत मंगलदेवीच्या किल्लयांत वसाहत केली आणि पुढें खैरपूर जिंकलें. त्या खैरपुरावरून पुढें महमूद गझनवीच्या काळांत ते मुसुलमान झाल्यानंतर खोखार हें नांव त्यांना मिळालें. महमद गझनवीच्या सहाव्या स्वारीच्या वेळेस ते हिंदूच होते आणि त्यांनीं गझनवीस आनंदपाळ (अनंगपाळ) याच्या नेतृत्वाखालीं अडथळा केला. इसवी १२०५ मध्यें यांनीं चिनाब आणि झेलम यांच्या दुआबांत धुमाकुळ केला व कांहीं काळ तो प्रांत कबजांत ठेवला. त्यावेळचा पुढारी " कोकर राई " यानें१२५९ मध्यें जम्मूच्या राजाविरुद्ध मुसुलमानांच्या साहाय्यानें बंड केलें. इ.स. १२२१ मध्यें सुलतान जलालुद्दीनास एका खोखार राजानें आपली मुलगी दिली व पुष्कळ फौजेसह तो त्यास मिळाला. १२४१ मध्यें खोखार व त्यांच्या बरोबर अनेक हिंदू 'गबर 'नीं लाहोर घेतली. १२४६–४७ मध्यें बलबन यास फौजेसह दिल्लीच्या बादशहानें पाठाविलें. खोखारांनीं लाहोर घेतल्याचा काळ दुसऱ्या एका तवारिखकारानें इ. स. १३९४ दिला आहे.

तैमूरलंगाच्या स्वारीच्या वेळेस दोन खोखारांशीं तैमूराचा प्रसंग पडला अशीं विधानें निरनिराळ्या ग्रंथांत आहेत. तैमूर जाल येथें असतां जवळच्या एका किल्लयावर खोखरांचा 'नूसरात ' रहात होता. त्याचा तैमूरनें पराभव केला व मलिक शैखाचाहि पराभव केला. शैखा यास'काफिरांचा सेनापति ' असें म्हटलें आहे. दुसऱ्या एका शैखास (नूसरातच्या भावास) दिल्लीवर स्वारी करतांना तैमूरलंगानें नोकरीस ठेवलें होतें. शैखाचा मुलगा जसरथ हा १४२० मध्यें रणभूमीवर आला. यानें सिंधवर चाल करून जाणाऱ्या काश्मीरच्या राजास लुटलें आणि दिल्लीवर चाल करण्याची व्यर्थ खटपट केली. यानें खोखार लोकांच्या सहाय्यानें लाहोरला वेढा दिला, त्यांत त्यास अपयश आलें. जम्मूच्या भीम राजानें तेरवेर किल्ला घेतला व एकदां याचा पराभव केला पण दुसऱ्या लढाईत भीमाचा मोड करून जसरथ यानें पुष्कळ युद्धसाहित्य मिळविलें. अकबराच्या वेळीं लाहोर प्रांताच्या ५२ महालांपैकीं पांच महाल खोखारांच्या ताब्यांत होते [रोजची ग्लॉसरी. से. रि. १९११ पंजाब)].

खोखो—एक महाराष्ट्रीय खेळ. आट्यापाट्याप्रमाणें या खेळास खर्च लागत नाहीं. शिवाय आट्यापाट्याप्रमाणें पाट्या आंखण्याचा यांत फारसा त्रास पडत नाहीं (आट्यापाट्या पहा). शिस्तीचा व चुरशीचा खेळ करावयाचा असेल तर मात्र पुढीलप्रमाणें जागा आंखून घ्यावी व गडी बसवावेत. पुण्याच्या डेक्कन जिमखान्यानें या खेळास बरेंच व्यवस्थित स्वरूप देऊन तो, त्याचे नियमबद्ध व व्यवस्थित सामने करता येतील असा केला आहे. या खेळात पळण्याचा व्यायाम चांगला होऊन चलाखीहि अंगीं येते. या खेळासंबंधीं पुढें दिलेले नियम, मापें व आकृती हीं डेक्कन जिमखान्यानें प्रसिद्ध केलेल्या नियमपुस्तकांतून घेतलीं आहेत. खोखोकरिता आंगण चौकोनी आंखून घ्यावें. बाहेरील चौकोन ८२×५१ चा करून कर्ण अजमासे ९६'—७" चा घ्यावा (आकृति पहा). नंतर पुढील जागेंत मापें घ्यावीं.

जा गा व मा पें—(१) 'ट' 'ठ' हीं अर्धवर्तुळें काढून त्यांचा व्यास प्रत्येकीं ५१ फूट घ्यावा.(२) 'क' 'ख' या छोट्या चौरसाच्या मध्यांमध्यें,खुंट पुरण्याच्या जागीं या वर्तुळांचे मध्यबिंदू घ्यावेत. (३) गडी बसण्याचा व खुंट पुरण्याचा प्रत्येक छोटा चौरस एक फुटाचा असावा (४) एका छोट्या चौरसाच्या मध्यापासून दुसऱ्या छोट्या चौरसाच्या मध्यापर्यंतचें अंतर ९फूट असावें (५) 'प ब' ह्यांमधील उभ्या पट्टयाची एकंदर लांबी १३२ फूट असावी. (६) आकृतीमधील आडव्या पाट्या प्रत्येकीं ५१ फूट लांब असून गडी बसण्याच्या छोट्या चौरसाच्या योगानें त्यांचे दोन बरोबर समानविभाग होतात.

ख्या ख्या व नि य म.—(१) खेळण्याची जागा आकृतींत दर्शविल्याप्रमाणें आंखावी. (२) प्रत्येक बाजूस ९ गडी असावेत. (३) ज्या बाजूचे गडी आंखून दिलेल्या चौरसांत बसतात व विरुद्ध बाजूच्या गड्यांनां धरण्याचा प्रयत्न करतात त्या पक्षास बसणारा, पिटाळणारा अथवा मारणारा पक्ष व उलट बाजूस खेळणारा पक्ष असें म्हणतात. (४) बसणाऱ्या गड्यांपैकीं ८ जणांनीं अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, या ठिकाणीं आखलेल्या छोट्या चौरसांत बसावें व बसल्यावर लगतच्या दोन गड्यांचीं तोंडें एकाच दिशेस असूं नयेत. (५) 'क' व 'ख' हे दोन लोखंडी खांब (खुंट) जमिनीपासून सुमारें ३ फूट उंचीचे पुरावेत व बसणाऱ्या गड्यांपैकीं नवव्या गड्यानें एका खुंटापाशीं पिटाळण्याकरितां उभें रहावें. (६) खेळणारे गडी ह्यांनां आंखलेल्या मर्यादेच्या आंत कोणत्याहि जागेंत उभे राहण्यास

हरकत नाहीं. (७) 'प' 'फ' 'ब' 'भ' ही एकंदर खेळण्याच्या जागेची मर्यादा आहे व खेळ चालू असतांना खेळणाऱ्या गड्यांपैकीं कोणीहि मर्यादा उल्लंघूं नये. (८) पिटाळणारा (मारणारा) जो गडी असेल त्यानें आपलें, दोन खुंट जोडणाऱ्या ' क–ख ' या पाटींत अगर पलीकडे एकहि पाऊल जाऊं देतां कामा नये. परंतु एका बाजूस उभे राहून दुसऱ्या बाजूकडील गडी हातानें मारण्यास हरकत नाहीं. (९) ' खो ' देणें झाल्यास तो बसणाऱ्या गड्याच्या पाठीकडूनच दिला पाहिजे. तसेंच ज्या गड्यास खो द्यावयाचा त्या गड्याशेजारीं पिटाळणाऱ्या गड्यानें येऊन नंतर खो द्यावा; लांबून खो म्हणून ओरडूं नये. खो देणें तो खेळणाऱ्या गड्यांनां ऐकूं येईल इतक्या मोठयानें द्यावा. खो दिल्याशिवाय कोणत्याहि बसणाऱ्या गड्यानें उठूं नये. ज्या गड्यास खो द्यावयाचा तो गडी सोडून, म्हणजे त्या गड्याच्या हद्दींत शरीराचा कोणताहि भाग न राहून, मारणारा गडी पुढें गेला तर त्यास खो देतां येणार नाहीं. (१०) ज्या गड्यास ' खो ' मिळेल त्या गड्यानें उठल्यावर ज्या दिशेस तो थोडा जाईल त्याच दिशेनें त्यानें पुढें गेलें पाहिजे, विरुद्ध दिशेस मुळींच परत जाता कामा नये. (११) पिटाळणाऱ्या गड्यानें एकदां ' क ' अगर ' ख ' या खुंटाकडे तोंड केलें म्हणजे, त्यानें त्याच दिशेस खुंटापर्यंत गेलें पाहिजे; अगर बसणाऱ्या गड्यांपैकीं कोणास तरी खो दिला पाहिजे. विरुद्ध दिशेस त्यानें मुळींच परत येऊं नये. तसेंच खुंटापासून निघतांना एकदा तो ' क–ख ' रेषेच्या एका बाजूला आला म्हणजे त्यानें दुसऱ्या बाजूला जातां कामा नये. पिटाळणाऱ्या गड्याचा हात अगर पाय खुंटास लागलेला असला तर तो खुंट सोडून निघाला असें होत नाहीं. (१२) मारणारा गडी ज्या दिशेस जात असेल, त्याच दिशेकडे त्याचें तोंड असलें पाहिजे; फार झालें तर त्या दिशेच्या काटकोनापर्यंत तोंड फिरविण्यास हरकत नाहीं. (१३) खुंटापलीकडील ' ट ' ' ठ ' या अर्धवर्तुळांत तोंड फिरविण्याबद्दल कोणतेहि नियम लागू नाहींत. (१४) खेळणाऱ्या गड्यानें बसणाऱ्या कोणत्याहि गड्याला केव्हांहि स्पर्श करूं नये, केल्यास तो गडी मेला असें समजावें; तसेंच तो जर ' प फ ब भ ' या मर्यादेबाहेर गेला तरीहि तो मेला असें समजावें. (१५) पिटाळणाऱ्या गड्यानें खेळणाऱ्या गड्यास हातानें स्पर्श केला म्हणजे खेळणारा गडी मेला असें समजावें.

खोजा—एक मुसुलमान जात. हिंदुस्थानांत यांची विशेष वस्ती पंजाब व मुंबई इलाखा यांतून आहे. एकंदर लो. सं. (१९११) १,२७,२१५. पैकीं अदमासें अर्धी अर्धी वरील दोन प्रांतांतून आढळते. हे मुसुलमान व्यापारी असून यांच्यात बऱ्याच हिंदू चाली अद्याप शिल्लक आहेत. हे शिया पंथाचे मुसुलमान आहेत. हे पूर्वी सिंधमधील लोहाना जातीचे हिंदू (बहुधा क्षत्री) असावेत. खोजा शब्द ख्वाजा म्हणजे ठाकुर शब्दाचा समानार्थक शब्द आहे. हे ईजिप्तच्या इस्माइल पंथाचे आहेत. ११ व्या शतकांत हसन सबाह नांवाच्या एका इराणी माणसानें फिदवी पंथ स्थापिला. यानें ईजिप्तच्या खलीफाची सत्ता झुगारून दिली व स्वतःला ' शेखुल जबल ' म्हणवूं लागला. लोक यास ' डोंगरांतील म्हातारा ' म्हणत. याचा तिसरा वंशज हसन नांवाचा होता (इ. स. ११६३). पुढें होणारा इमाम मीच आहे असें तो म्हणूं लागला व माझ्यावर विश्वास ठेवणारांचें कोणतेहि कृत्य कधींहि पाप असूं शकत नाहीं असें सर्वांनां शिकवूं लागला. याच्याच पंथापैकीं पीर सदरुद्दीन यानें लोहाना हिंदूंनां हसन हाच १० वा विष्णूचा अवतार (कलंकी) आहे व आदम हा विष्णू, महंमद हा शिव, पांच इमाम हे पांडव असा फेरबदल करून नवीन धर्म घेण्यास लाविला. इ. स. १८४५ सालीं आगा शाह हसन अली—जो आपणास पुढे होणारा इमाम मीच असें म्हणवी तो—हिंदुस्थानांत आला व यानें वस्ती केली. सध्याचे आगाखान हे याचेच वंशज आहेत [आगाखान पहा].

खोजांच्या मुलांचे कान टोचतात. हे शेंडी ठेवतात व पुढें कोणत्या तरी पिराच्या थडग्यावर ती अर्पण करतात. सुंता करणें किंवा दाढी ठेवणें हें खुशीवर आहे. करबल्याहून आणलेल्या मातीची १०१ मण्यांची माळ करून पिराचें नामस्मरण करतात. प्रत्येक शुद्ध द्वितीयेला उभें ठरवून आगाखानाला दक्षणा देतात. अंत्यविधींत सुद्धां आगाखानाला दक्षिणा मिळते. मरणोन्मुख माणसाची इच्छा असली तर त्याजपासून ५ ते ५०० रुपये घेऊन ' समर छंट ' विधि करून त्याच्या आत्म्यास शांति मिळेल असें करतात. एक अधिकारी करबल्याची माती पाण्यांत कालवतो व मरणोन्मुखाच्या ओठावर तिचा लेप करतो, कांहीं त्याच्या तोंडावर शिंपडतो गळ्याला व छातीला लावतो. जर मरणोन्मुख माणूस अगदींच म्हातारा असला तर त्याचे केस मेंदीनें रंगवितात, त्याच्या गळ्यांत करबल्याच्या मातीच्या पुतळ्यांची माळ घालतात, हुसेनच्या थडग्यावरील कापडाचे दोन तुकडे त्याच्या डोळ्यावर ठेवतात. सधन खोजे आपल्या प्रेताची पेटी हवा न जाण्यासारखी बंद करण्याची व्यवस्था करून समुद्र मार्गानें बगदादवरून करबल्यास पाठवून तेथें पुरतात. हे लोक मोठे व्यापारी आहेत. सिलोन, ब्रह्मदेश, सिंगापूर, चीन, जपान, इराणी आखातांतील बंदरें, अरबस्तान व पूर्व आफ्रिकेबरोबर हे व्यापार करतात. यांचीं मुलें दूरदूर देशीं उमेदवार म्हणून २०० पासून २००० रुपये दरसाल वेतनांवर जातात. हिंदुस्थानाबाहेर अरबस्तान व झांझिबार या प्रदेशांत खोजांची वस्ती आहे. [मुं. गॅ. रसेल व हिरालाल.].

खो जात—हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर चित्रळ खोऱ्यांत आणि पामिरच्या दक्षिणेस असलेल्या त्यालगतच्या प्रदेशांत रहाणारी एक जात. पूर्वेस यासीन आणि

गिलजिट आहेत. त्या ठिकाणीं शिन भाषा चालते. पश्चिमेस काफिरीस्तान असून त्यांत निरनिराळ्या हिंदू काफिरी पोटभाषा बोलतात. उत्तरेस पामीर पठार आहे. येथें इराणी भाषा आढळते; आणि दक्षिणेस अनेक लहान लहान, मुख्यतः शिन वंशाच्या व कांहीं पठाणी जाती आहेत. " खो " (वास्तविक हो) व गिलजिटचे शिन आणि काफिरिस्तानचे काफीर या सर्वांनां दरद असें नांव देण्यांत येतें; पण वास्तविक हें नांव फक्त शिन लोकांस लावतात. या तिन्ही जाती प्राचीन पैशाच्य जाती असाव्यात. हो भाषेचा उल्लेख चिनी बौद्ध वाङ्मयांत येतो. सिन (शिन) हा चीनवाचक शब्दहि अनेक ठिकाणीं येतो. तसाच दरदांचा उल्लेख महाभारत वगैरे संस्कृत वाङ्मयांत अनेक ठिकाणीं येतो. हे त्यावेळीं डोंगरी मुलुखांत रहाणारे लोक म्हणून प्रसिद्ध होते. खो लोकांचे पेहेराव व चालीरीती खऱ्या दरदांप्रमाणें असल्यानें प्रस्तुत लेखांत दरदांहून भिन्न अशा प्रश्नांचाच विचार केला आहे. (दरद पहा).

चित्रळमध्यें खो ही जात राजसत्ताधिष्ठित नाहीं. राज्य करणारांची जात यांनां तिरस्कारानें ' फकिर मुष्कीन ' किंवा " गरीब भिकारी " असें म्हणते. यांच्याहून वरच्या दर्जाची जात चित्रळचा राजा मेहतर याचे पगारी नौकरअसून त्यांनां ' एरबाब झादा ' (मालकाचे मुलगे) असें नांव आहे. या दोन दर्जांच्या लोकांमध्यें लग्नव्यवहार होतो. या प्रदेशाचे नुकतेच झालेले जेते जे ' अदमजादा ' (माणसांची मुलें) त्यांच्या उत्पत्तीविषयीं चांगलीशी माहिती नसून त्यांच्यांपैकीं कांहीं इ. स. १६ व्या शतकांत पामीर ओलांडून उत्तरेकडून आलेले दिसतात. खो यांनीं आपली भाषा त्यांच्यावर लादली.

दंतकथा, पौराणिक कथा वगैरेंवरून पाहतां एकदां सबंध चित्रळ खोरें काफिरांनीं व्यापिलें होतें. आतापहि कांहीं काफीर जाती (उदा० कलाशा) त्या ठिकाणीं राहतात. काफिर पोटभाषांवरूनहि हेंच दिसतें. पूर्वी एकदां काफिरिस्तान, चित्रळ आणि गिलजिट हा सबंध प्रदेश एकाच जातीच्या लोकांनीं व्यापलेला असून पुढें खो लोकांच्या धाडीमुळें त्यांचे दोन वर्ग पडले असा साहजिक तर्क होतो.

सातव्या शतकांत खरोष्ट्र शब्दाचा लोप झाला असावा आणि त्या प्रदेशास आणि तेथील लोकांस " होऊ" हें नांव त्या वेळेस मिळालें असावें.या सुमारास बौद्ध संप्रदायानें व हिंदु संस्कृतीनें परिवेष्टिलेलें यूएची राष्ट्र दुर्बल होऊन हा प्रदेश पुन्हां चीनच्या ताब्यांत गेला आणि पुन्हां चिनी नांवें सुरू झालीं.

" होऊ " या शब्दाखालीं चीनच्या सरहद्दीवरील अनेक जातींचा समावेश होई. अरल समुद्र, पामीर, पीत नदी, सैबीरिया इत्यादि प्रदेशांत संचार करणाऱ्या अस्थिर टोळ्यांस ' होऊ ' हें नांव मिळालें. होऊंमध्यें हिंदुस्थानांतील लोकांसहि चिनी लेखकांनीं जमा धरलें नाहीं याचें कारण म्हटलें म्हणजे हिंदुस्थान हा देश बुद्धधर्मी आहे हें होय. होऊ व हिंदू यांच्या चालीरीती जरी कांहीं बाबतींत चिनी लोकांस एक दिसल्या तरी होऊ व हिंदू यांतील भेद ते विसरले नाहींत. होऊ लोक गुडघे टेंकीत त्यामुळें " होऊ पद्धतीनें " असें चिनी लोक म्हणत. त्याविषयीं इत्सिंग म्हणतो कीं, ' होऊ पद्धति ' असें आपण उगाच म्हणतों, कां कीं हिंदु देखील गुडघे टेंकतात. [सि. ले. ही इं. अँ. १९०९].

बिडुल्फ (ट्राइब्स ऑफ दि हिंदुकुश, पान ७३) म्हणतो कीं, खो लोकांच्या ठिकाणीं त्यांच्या दरद आप्तांहून भिन्न अशीं कांहीं शारीरिक वैशिष्टयें आहेत. स्वरूपावरून त्यांनां इरदांप्रमाणेंच उच्च दर्जाचे आर्य म्हणतां येईल. पण ते ज्यास्त सुंदर, उभट चेहेऱ्याचे, चांगल्या ठेवणीचे आणि मोठाले सुरेख डोळे असलेले असे दिसतात; इतके कीं यूरोपांत सुद्धां सौंदर्यामध्यें त्यांचा उच्च दर्जा लागेल. लांब केसांविषयीं त्यांची प्रसिद्धि आहे व त्याबद्दल त्यांनां अभिमानहि वाटतो. उलट त्यांच्या काफिर शेजाऱ्यांनां ते ' टकले ' म्हणून संबोधितात. कारण त्यांचे केस आंखूड असतात. प्राचीन काळीं काबूल, पेशावर आणि बदकशान येथील गुलामांच्या बाजारांत खो स्त्रियांच्या सौंदर्यामुळें त्यांना अतोनात मागणी असे.

पुरुष टोपी घालून तिच्या भोंवती बारीकसा फेटा गुंडाळतात. अंगांत सदरा, पायांत अगदीं सैल विजार व खालीं रंगीत पायमोजे आणि मऊ कातड्याचे बूट घालतात. बायका डोक्याला पांढरी रेशमी कलाबतूची टोपी, अंगांत गुडघ्यापर्यंत पोहोंचणारा सैल खमीस आणि पायात रुंद विजार असा पेहेराव करतात. प्रवासाच्या वेळीं पुरुषांप्रमाणें त्या पायमोजे व बूट घालतात (बिडुल्फ पान ७५, ओब्रायन—ग्रामर ॲन्ड व्होक्याबुलरी ऑफ दि खोवार डायलेक्ट पान ६). यांच्यांत तरुण बायका व मुली शिंगांच्या कोळशाच्या पुडीनें आपलीं तोंडें काळीं करतात. त्यापासून उन्हाचा त्रास होत नाहीं व कातडेंहि मऊ पडतें असा त्यांचा समज आहे. वागणुकीमध्यें शिष्टाचारावर फार भर देण्यांत येतो. भेटीच्या वेळीं स्नेही एकमेकांनां आलिंगन देतात. वरिष्ठ मनुष्य भेटल्यास कनिष्ठ मनुष्य खालीं उतरून त्याच्या हाताचें चुंबन घेतो (बिडुल्फ पान ७५, ओब्रायन पान ८). चित्रळ नांवाच्या ग्रंथांत (लंडन १८९८) रॉबर्टसननें खो लोकांचें चांगलें वर्णन केलें आहे. विषयासक्ति, खून, भयंकर निष्ठुरपणा, विश्वासघात, भयकर मृत्यु हीं मानसिक पापें यांस शिवत नाहींत. यांच्याहून ज्यास्त साधे, सभ्य व आनंददायी स्नेही दुसरे कोणीहि सांपडणार नाहींत. प्रत्येकजण इतका सुखी दिसतो, लहान मुलें इतकीं गोजीरवाणीं असतात, व सर्वत्र नैसर्गिक शालीनता इतकी पहावयास मिळते कीं, जर अन्नान्नदशा झालेले गुलाम हे फळांवर रहात असलेले किंवा उपाशी मरत असलेले कोठें कोठें दिसतात ते दिसत

नसते,तर एखाद्या अनोळखी प्रवाशाला आपण एका हर्षोत्फुल्ल स्वप्नसृष्टींत आहों अशी कल्पना झाली असती. या लोकांचा पोलो हा राष्ट्रीय खेळ असून त्याच्यांत यांचें प्राविण्य दिसून येतें. गिलजिट येथील पोलोहून हा थोडा निराळा आहे. प्रत्येक गांवीं जनाली नांवाचें पोलोक्रीडांगण असतें. घोड्यावर बसून पोपटासारख्या पक्ष्यावर गोळ्या झाडणें हाहि एक यांचा आवडता खेळ आहे. गाणें व नाचणें हींहि करमणुकीच्या प्रकारांत येतात. सण, वाढदिवस, लग्न किंवा अशाच एखाद्या समारंभाच्या वेळीं नाच होतो. गाणें तर नेहमीं पोलो खेळण्याच्या वेळीं चालूंच असतें.

पूर्वीच्या काळीं या देशाचा धर्म बौद्ध असे. चित्रळच्या उत्तरेस वीस मैलांवर खडकांत एक बौद्ध मूर्ति सांपडली आहे. तीवरील संस्कृत किंवा पाली लेख इ. स. तिसऱ्या शतकांतील असावा. हल्लीं खो हे सुनी पंथाचे मुसुलमान आहेत. पण उत्तरखोऱ्यांतील लोक उत्तर गिलजिटांतल्या-प्रमाणें मौलवी पंथाचे आहेत. इस्लामी धर्माचा प्रवेश येथें चवदाव्या शतकाच्या सुमारास झाला, व हल्लींचा मुसुलमान वंश १६ व्या शतकांत खोरासानकडून इकडे आला. हे लोक सात दिवस वृद्धि पाळतात. कांहीं उच्च चित्रळ जातींतून प्रत्येक तान्ह्या मुलाला जातींतील प्रत्येक स्त्रीनें स्तनपान करविलें पाहिजे अशी चाल आहे. त्यामुळें जातींत एकी होण्याकडे चांगली प्रवृत्ति होते. लग्नसमारंभ शेजा-रच्या जातींतल्याप्रमाणेंच उरकण्यांत येतात. पण खालील कांहीं प्रकार चित्रळमध्यें नवीन आढळतात. मुल्लानें विवाह मंत्र म्हटल्यावर सासू जावयाच्या हातीं मुलीला देऊन त्याच्यापासून कांहीं पारितोषिक मिळविते. नंतर नवरा बायकोला घेऊन घरीं जावयास निघतो. हिंदुकुशच्या उत्त-रेस नवऱ्यामुलाला नवरीच्या घरीं आणण्यांत येतें. बहु-पत्नीत्वाची चाल यांच्यांत आहे. व नियोगपद्धति रूढ आहे पण सक्तीची नाहीं. गिलजिटमध्यें ती सक्तीची आहे. पातिव्रत्याकडे मुळींच लक्ष नसून पुरुष देखील आपल्या पत्नीविषयीं क्वचितच संशय घेतात. हुंझानगर या शेजा-रच्या संस्थानांत जारकर्म हा गुन्हा मानीत नसून आपली बायको पाहुण्याच्या उपयोगाकरितां द्यावयाची पूर्वापार चाल आहे. संस्थानच्या मुख्याच्या तर्जुदींत आपली बायको ठेवावयाची व त्यांचें तिजकडे लक्ष जात असल्यास अभिमान बाळगावयाचा ही यांच्यांत जुनी वहिवाट आहे. चित्रळमध्यें याच्याच जोडीला नवऱ्याला असा अधिकार देऊन ठेविला आहे कीं आपली बायको जारकर्म करीत असतांना नवऱ्यानें पाहिल्यास एकदम दोघांनाहि त्यानें ठार करावें. जर त्यानें एकाला मारून दुसऱ्याला सोडलें तर त्याच्यावर खुनाचा आरोप येत असे. [संदर्भग्रंथ लेखांत पहावेत].

खोंड—किंवा कंध. मुख्यतः बिहार—ओरिसा व मद्रास इलाख्यांत ही जात आहे. पूर्वी बरेचसे खोंड मध्यप्रांतांत दिसत असत पण उडिया भाषा चालू असलेला संबलपूर जिल्हा, पाटणा व कलाहंडी संस्थान मध्यप्रांतांतून ओरिसा हद्दींत गेल्यावर ओरिसामधील खोंडांची संख्या वाढली. १९११ च्या खानेसुमारींत यांची संख्या ६,७३,३४६ भरली. पैकीं ३,५५,१३७ मद्रासेंत ३०२८८३ बिहार ओरिसांत व बाकीचे बंगाल, मध्यप्रांत आणि आसाम यांतून होते. यांच्या नरमेधाच्या चालीमुळें पुष्कळ संशोधकांचें यांकडे लक्ष वेधिलें आहे. हे स्वतः आपल्यास कुइलोक किंवा कुइंजू म्हणवितात. याची व्युत्पत्ति तेलगू को किंवा कु शब्दाशीं जोडतात. कु शब्द डोंगर शब्दाचा वाचक आहे. कोणी खांड (खड्ग) शब्दाशीं याचा संबंध जोडितात.तेथील राज्यकर्ते यांच्या दंत-कथांवरून पूर्वी हे या प्रदेशांतील सत्ताधारी असावे असें दिसतें. अद्यापपर्यंत कलाहंडीच्या राजांचा अभिषेक खोंडाच्या मांडीवर बसून ते असे. खोंड जातीच्या वृद्ध-माणसाकडे राजास मांडीवर घेऊन राज्यारोहण करण्याचा अधिकार असे व केसरीसिंहदेव राजापर्यंत याचा हा अधि-कार चालू होता. केसरीसिंहाच्या पूर्वीचा राजा इंग्रजांनीं पदच्युत केला व केसरीसिंहास गादीवर बसविलें पण वृद्ध खोंड त्यास मांडीवर बसवीना; कारण तो म्हणाला कीं, एक राजा जिवंत असतां मी दुसऱ्यास अभिषेक करणार नाहीं. खोंडांत दोन मुख्य वर्ग आहेत (१) कुरिया खोंड, हे डोंगरातले लोक आहेत व यांच्यांत पुष्कळ जुन्या चाली शिल्लक आहेत. (२) मैदानांत रहाणाऱ्या खोंडांत पोटवर्ग आहेत. हे सर्व जरी सवर्गविवाही म्हणवितात तरी तो नियम ते कडकपणें पाळतातच असें नाहीं.

यांच्यांत राजखोंड म्हणून एक फारच श्रेष्ठ वर्ग आहे. हे लोक मालगुजर व जमीनदार आहेत व जमीन असल्या-खेरीज राजखोंड समजला जात नाहीं. पण राजखोंडानें नीच कुलांतील किंवा एखाद्या वर्गांतील मुलगी केली तर तो त्याच दर्जाचा समजला जातो व नीच वर्गांतल्या मुलीबरोबर लग्न केलें तर तो बायकोच्या जातीचा होतो. दलखोंड हे कदाचित पूर्वी शिपाई असावेत. यांनां आदिखोंड म्हणतात व यांनाहि दर्जा उच्च आहे. यांस वालुसुदिया म्हणतात. हे नेहमीं क्षौर करतात. व जातीचें पौरोहित्य यांच्याकडेच असतें. यांनीं कांहीं कांहीं हिंदु चालीरीती उचलल्या आहेत. हे कोंबड्यांचें व रेड्याचें मांस खात नाहींत व आपल्या देवांस तुळशी वाहतात. कंध लोक हळद पेरतात. नागला लोक नागवे असतात. उतार किंवा सतनईया लोक कमी दर्जाचे आहेत. ही गोळक संतति समजली जाते. यांस खोंड मुली देत नाहींत पण यांच्या मुली खोंड करतात. खोंडांचे ३२ अगोत्रविवाही वर्ग आहेत पण त्यांची संख्या आतां वाढली आहे. एका वर्गाचे लोक एका गावांत किंवा भोंवताली राहतात. यांच्या मुख्य वर्गाचे आणखीहि पोटभेद झाले आहेत व त्यांचीं निर-निराळीं देवकेंहि झालीं आहेत. कधीं कधीं दोन निराळ्या वर्गांत एकाच देवकाचीं फुलें असतात. एकाच कुलांत किंवा एकाच देवकाच्या कुलांत लग्नें करीत नाहींत. पण ह

प्रतिबंध पुरुषाकडून नातें असेल तेवढ्यांस (सपिंड, समानोदकांस)च फक्त लागू असतो. स्त्रियांकडून नातें असेल त्यांस (बांधव) लागू नाहीं. मामाची मुलगी व कलाहंडींत तर मावशी सुद्धां बायको करतां येते. लग्नें मोठेपणींच होतात. १२ पासून २० जनावरांपर्यंत वधूशुल्क देतात. वधूवर आपल्या मित्रांच्या खांद्यावर बसून लग्नास येतात. वर वधूला आपल्या जवळ ओढतो नंतर वधूवरांवर एक वस्त्र टाकून त्यांत दोघांस सुतानें सातदा गुंडाळून बांधून टाकतात. एक कोंबडा बळी देतात. जळक्या पोळीनें वधूवरांचे गाल चोळतात. त्या दिवशीची रात्र ते घराच्या सोप्यांत घालवितात. दुसऱ्या दिवशीं त्यांस तळ्यावर नेतात. तेथें वरास धनुष्यबाण देऊन गोवऱ्यावर बाण सोडवितात. प्रत्येक बाण सोडल्यावर वधू त्याचें कपाळ धुते व त्यास दात घासण्यास एक काडी देते. लग्नापूर्वी निषिद्ध असा नातेसंबंध नसलेल्या कोणत्याहि मुलानें मुलीबरोबर संग केला तर त्यास क्षमा करतात. कलाहंडी संस्थानांत तर असे संग बहुतेक नेहमींचेच आहेत.

मुलीनें एकाबरोबर संग केला व लग्न दुसऱ्याबरोबर झालें तर तिचा पहिला मित्र तिच्या नवऱ्यास ७ ते १२ रुपये देतो. संवलपुरांत मुलें व मुली शेतांत काम करतां करतां प्रणय करून एकमेकांस निवडतात. अशा लग्नास उधालिया म्हणतात. जर आईबापांनीं प्रतिबंध केला तर तीं दोघे पळून जातात व नवराबायको बनून परत येतात व जातीस एक भोजन घालतात. जर मुलगी कोणास दुसऱ्यास देण्याचा ठराव पूर्वीच झाला असला तर हा नवरा त्याची कांहीं तरी भरपाई करतो. अशा लग्नास ' पैसामोली ' म्हणतात. धाकट्या भावास त्याचें लग्न होईपर्यंत वडील भावाच्या बायकोशीं संग करतां येतो. विधवाविवाह व घटस्फोटाची पूर्ण परवानगी आहे.

प्रेतांना दहन करण्याची चाल हळू हळू वाढत आहे. प्रेतास पुरल्याबरोबर त्यानें परलोकास निर्धन जाऊं ये म्हणून त्याच्या बरोबर कपड्यांत एक पैसा बांधून देतात. १० व्या दिवशीं मृताचा प्राण परतविण्यास चौरस्त्यावर दाणे टाकून ते कोंबड्यानें खाल्ले तर मृताचा प्राण परत आला असें समजतात.

शेतकी, शिकार व युद्ध यांखेरीज इतर धंद्यांची खोंड लोकांस आवड नाहीं. हे लोक इतर रानटी लोकांप्रमाणें मद्याचे फार शौकी असून नेहमीं कफल्लक असतात. यांचीं शस्त्रें धनुष्यबाण, लांब पात्याची तरवार व एक कुऱ्हाड अशीं असतात. यांच्या देवतां अनेक असून त्यांस ते बळी वगैरे देतात

सर जेम्स फ्रेझरच्या गोल्डनबाऊ या पुस्तकांत यांच्या नरमेधाचें जें वर्णन केलें आहे तें फार मनोरंजक आहे. रोगनिवारणार्थ व सुबत्ता रहाण्यासाठीं ' तारी पेन्नु ' भूदेवीला मेरीहा लोक खोंडाकडून बळी दिले जात. १८८२ सालीं कलाहंडी संस्थानांत खोंड लोकांचें बंड झालें होतें. त्या बंडाचें कारण कलाहंडीच्या राजानें कोल्ट लोकांस आणून संस्थानांत वसविलें हें होय. हे लोक हुशार असल्यामुळें पुष्कळ खोंडांस यांनीं कर्जबाजारी केलें व त्यामुळें खोंड लोकांस आपली फार हीन अवस्था झाली असें वाटून एक गांठी बांधलेली दोरी त्यांनीं सर्व कोल्टांत पसरून वेडाची निशाणी दिली व जितके कोल्ट सांपडले तितके कापून काढले. बेरी नांवाचा इंग्रज ऑफिसर त्याचा बंदोबस्त करण्यास पाठविला. त्याला यांनीं आपलीं सर्व गाऱ्हाणीं सांगितलीं तीं हीं कीं, आम्हीं येथील जमिनींचे मालक असतां कोल्टांनीं आम्हांस अगदीं हीन अवस्थेस पोंचविलें व आमच्या जमीनी चोरल्या, त्या परत मिळविण्याकरितां आम्हीं प्रयत्न करीत आहों. पेरीनें यांच्यापैकीं ७ पुढारी फांशी दिले व याच्या सर्व तक्रारी ऐकून त्यांची व्यवस्था करून सर्वत्र शांतता केली. खोंड भाषा यापैकीं अर्ध्याहून अधिक लोक बोलतात. तिला लिपी नाहीं. ती गोंडी भाषेपेक्षां तेलगू भाषेची जास्त निकट संबंधी आहे.

[संदर्भग्रंथः—कॅंबेल—थर्टीन ईयर्स सर्व्हिस अमंग दि वाईल्ड ट्राईब्स ऑफ खोंडिस्तान; डाल्टन—एथ्रॉ. ऑफ बेंगाल; हंटर—ओरिसा; थर्स्टन् रसेल व हिरालाल; ऑप्पर्ट—ओरिजिनल इन् हॅबिटंट्स ऑफ भारतवर्ष.].

खोंडमाल्स—ओरिसा प्रांतांतील अंगुळ जिल्ह्याचा एक पोटभाग. क्षेत्रफळ ८०० चौ. मै. लोकसंख्या ७४,२१८. खोंडमाल्सचा टापू म्हणजे डोंगरपठार असून तें १७०० फूट उंचीवर आहे. या पठाराच्या मधून मधून छोट्या टेंकड्या पसरल्या आहेत. पठाराचा बराचसा भाग गर्द जंगल असून टेंकड्याच्या पायथ्याशी असलेली जमीन तेवढीच लागवडीला योग्य आहे. खोंडमाल्स व गंजम जिल्हा यांच्यामध्यें ३००० फूट उंचीचा एक डोंगर असून त्या डोंगरावरून पडणाऱ्या महानदीचा धबधबा आहे. या पोटजिल्ह्याचें मुख्य ठिकाण फुलवानीं हें असून या पोटजिल्ह्यांत १००२ खेडीं आहेत. या भागांत खोंड लोकांची पुष्कळ वस्ती आहे. या लोकांची भाषा, आचारविचार, धर्म हीं सर्व स्वतंत्र आहेत. या भागांतील राज्यव्यवस्था प्राचीन पद्धतीप्रमाणेंच अद्यापिहि चालू आहे. कांहीं घरें मिळून एक मठ होतो व प्रत्येक मठावर या घरांनीं निवडलेला एक मुख्य मठपति असतो व तो सर्व प्रकारची व्यवस्था पहातो. या सर्व भागावर खोंड लोक आपला मालकी हक्क सांगतात. बौद्ध राजांच्या सत्तेखालीं हे लोक होते, तरी पण ते जवळ जवळ स्वतंत्रच होते. यांच्यामध्यें मनुष्ययज्ञाची चाल असे; व या लोकांचे पान नांवाचे गुलाम आसपासच्या भागांतून बळी देण्याकरितां मनुष्य धरून आणीत. ही दुष्ट चाल मोडून टाकण्याकरतां इंग्रजसरकारला फार प्रयास पडले. खोंड लोक हे ब्रिटिश सरकारचे रयत असून ते कोणत्याहि प्रकारचा कर देत नाहींत. साऱूपेन्नू उर्फ पर्वतदेवता व ताऱूपेन्नू उर्फ भूदेवता असे यांचे दोन मुख्य देव आहेत.

यांच्यांत बालविवाह व प्रौढविवाह हे दोन्ही प्रकार रूढ आहेत.

खोंडमीर—(१४७५-१५३५) एक फारसी इतिहासकार. याचा हिरात येथें जन्म झाला. तो अमीर खावंदशाह (मिर्खोंद), याचा मुलगा असून "खुलासत्-उल अखबार" (१४९८) व "हबीब-उससियर" इत्यादि ग्रंथांचा कर्ता होता. इ. स. १५२६--२७ साली हिरात सोडणें भाग पडल्यामुळें तो मौलाना शिहाबुद्दीन, आणि मिर्झा इब्राहिम कानूनी यांच्यासह हिंदुस्थानांत आला. १५२८ साली हा आग्रा येथें येऊन पोहोंचला व बाबरच्या बरोबर मंदूवरील मोहिमेवर गेला असतांना मरण पावला.(बील; माबेल डफ)

खोत—कुलाबा व रत्नागिरि जिल्ह्यांत हे खोत लोक बरेच आहेत. यांचें काम खेड्यांतील शेतकऱ्यांपासून सारा गोळा करून तो सरकारांत एका ठराविक रकमेंत भरावयाचा. खोतीचा हक्क वंशपरंपरा चालत आलेला आहे. खोताला देशावरील देशमुख देशपांड्यांप्रमाणें कांहीं हक्क असतात, त्यास खोतवेठ म्हणतात. मोबदला न देतां बलुत्यांकडून चाकरी करून घेणें, धान्य वगैरे माल घेणें, शेतास वरवंड्या घालणें, गवत बेनणें, पेंढा तयार करणें, घराच्या छपराची शाकारणी करणें, पाटी, सूप, हवला, शिंपली, रवळी, वाढवण, हांतरी, हातर, तट्या, नागरजोत, लांकूडफांटी, मानाचा नारळ, बाबभांडे, अधोलीतिधोली वगैरे हक्क खोतांचे असतात. कांहीं ठिकाणीं शेतकऱ्यासहि खोत म्हणतात. पण सर्वसाधारण खोत म्हणजे जमीनदार मालगुजार या सारखा एक अधिकारी होय. हा अधिकारी सरकारहि नेमीत असे. कमी दरानें खोतानें लागवडीस दिलेल्या वैराण जमिनीस खोतखराबा म्हणतात. खोत हा कुळांकडून जो सारा घेतो त्यास खोतधारा असें नांव आहे. खोताच्या खाजगी साठीं जी पट्टी (कर) कुळें देतात तीस खोतपट्टी म्हणतात. खोतापासून ठराविक साऱ्यानें कीर्दीस घेतलेल्या जमिनीस खोतसज्जा असें नांव आहे. याच्या उलट रकमी जमीन असते व तिचा धारा प्रत्यक्ष सरकारांत भरावा लागतो. शेतकऱ्यांनां बीं बियाण्याकरितां खोत आगाऊ जें धान्य देतो त्यास वाढीदिढी म्हणतात.

इ. स. १८८० त ब्रिटिश सरकारनें खोती सेटलमेंट ॲक्ट नांवाचा एक कायदा पास केला व खोतांचे सरकारशीं व कुळांशीं असलेले संबंध निश्चित केले व खोतानें सरकारास वसूल किती द्यावयाचा व कुळांपासून किती घ्यावयाचा हें ठरवून टाकलें. या कायद्यांत वेळोवेळीं दुरुस्त्या करण्यांत आल्या. अगदीं अलीकडे म्हणजे १९१३ सालीं या कायद्यात कांहीं दुरुस्त्या झाल्या आहेत. जीं कुळें अनेक दिवस म्हणजे १८४५-४६ सालापूर्वीपासून एखादी जमीन वंशपरंपरा वहात होतीं त्यांनां कायमचीं कुळें म्हणून ठरविण्यांत आलें व त्यांचा ती जमीन वंशपरंपरा वहाण्याचा हक्क मान्य करण्यांत आला. याखेरीज जीं धारेकरी कुळें असत त्यांजजवळून खोतानें साऱ्यावर काय रक्कम घ्यावी हेंहि ठरविण्यांत आलें. जेव्हां एखाद्या गांवीं एकापेक्षां अधिक खोत असत तेव्हां त्यांपैकीं एक खोत सर्व वसूल देण्याबद्दल सरकारास कबुलायत लिहून देई व त्यास कबुलायतदार खोत म्हणत. तो इतर खोतांजवळून व धारेकऱ्यांजवळून सारा वसूल करून सरकारांत भरीत असे. अलीकडे ही कबुलायत काढून टाकण्यांत आली आहे व जेथें अनेक खोत असतील तेथें सरकार लोकांच्या संमतीनें अगर संमति मिळाल्यास आपल्या अधिकारानें एक वहिवाटदार खोत नेमून त्या मार्फत सर्व सारा वसूल करतो. जेव्हां एकाद्या गांवाचे धडेवाटप झालेलें असतें तेव्हां प्रत्येक खोतानें आपल्या धड्याचा सारा भरावयाचा असतो. खोत कुळाकडून आरंभीं पिकाची निमपट धान्यांतच वसूल करीत असत. याखेरीज फसकी, वेठ, वगैरे खोतांचे हक्क असत. परंतु आतां सरकारनें हे सर्व हक्क काढून घेतले आहेत व कोणत्याहि खेड्यातील लोकांनीं सरकारकडे अर्ज केल्यास प्रांत किंवा सरकारनें नेमलेला कोणी अधिकारी त्या अर्जाची चौकशी करून धान्याच्या ऐवजी नक्त पैशांत कुळाकडून घ्यावयाची रक्कम ठरवून देतो. ही नक्त रक्कम ठरवितानां पिकाच्या अर्धलीची सुमारें बारावर्षांची जी सरासरी किंमत येईल ती रक्कम सारा म्हणून ठरवावयाची असा नियम आहे व सरासरीनें ही किंमत भातजमीनीच्या बाबतींत साऱ्याच्या तिप्पट व वरकस जमीनीच्या बाबतींत साऱ्याच्या दुप्पट समजावी असें नमूद करून ठेवलें आहे. जेव्हां जेव्हां जमाबंदीची फेरतपासणी होईल तेव्हां तेव्हा या साऱ्यांतहि कमीजास्त वाढघट होईल असाहि नियम आहे.

जेव्हां एखाद्या गांवचा खोत स्वतः वहिवाट करून सारा भरणार नाहीं तेव्हां सरकार तो गांव जप्त करून त्यावर तलाठी नेमतें व सारा व तलाठ्यांचा पगार वगैरे खर्च वजा करून वसुलांतून जी रक्कम शिल्लख राहील ती खोतास देतें. खोतानें आपल्या गांवचे जमाबंदीचे हिशेब वेळचेवेळीं व बरोबर ठेवून ते सरकारचे अधिकारी तपासावयास येतील तेव्हां दाखवयाचे असतात व कुळांनां वसुलाच्या पावत्या द्यावयाच्या असतात. खोतीचा हक्क हा वंशपरंपरा व खरेदी विक्री अगर गहाण टाकतां येण्यासारखा समजला जातो. मध्यंतरी खोत हे जमीनींचे मालक असून सर्व कुळें उपरीं असून त्यांचा जमीनीवर कांहीं हक्क नाहीं असें खोताकडून पुढें मांडण्यांत आलें होतें परंतु खोत हे केवळ सारा वसूल करून सरकारांत भरणारे अधिकारी असून या कामाकरितां म्हणूनच त्यांनां विशिष्ट हक्क व खोतफायदा मिळतो असें ठरलें व त्यांनां कायमच्या कुळांस काढून टाकावयाचा हक्क नाहीं असेंहि ठरलें. कुळाचा जमीनवहिवाट करण्याचा हक्क वंशपरंपरा मान्य करण्यांत आला पण त्यास खोताच्या परवानगीशिवाय गहाण, विक्री वगैरे करतां यत नाही.

खोतान—पूर्वतुर्कस्तानमधील एक शहर. हें खोतान दर्या नदीवर क्यूनलन पर्वताचा उत्तर पायथा व टक्लमाकन वाळवंटाची एक बाजू यांमध्यें वसलें आहे. लोकसंख्या सुमारें ५००० आहे. शहरांतील रस्ते नागमोडीचे, अरुंद व गलिच्छ असे आहेत. या ठिकाणीं जवळ जवळ सहा विद्यालयें (मद्रसे), थोड्याश्या मशीदी व तितकींच मुसुलमान साधूंचीं थडगीं आहेत. खोतान हें कित्येक शतकांपासून मर्गज्ञ (जेड) नांवाच्या मौल्यवान रत्नाविषयीं फार प्रसिद्ध असे. या रत्नांच्या सुंदर पेट्या, सुबक पेले, व त्याचप्रमाणें बांगड्या करीत असत. अजून हा दगड चीनमध्यें पाठविण्यांत येतो.

खोतान याला संस्कृतांत कुस्तान व चिनी भाषेंत यूथान अथवा खीओतान अशीं नांवें आहेत. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांतील चिनी इतिहासांत याचा उल्लेख आला आहे. ख्रिस्तानंतर ७३ व्या वर्षी हें चीननें जिंकलें व तेव्हांपासून हें चिनी साम्राज्याचें मांडलिक आहे.

खोतानचा प्राचीन उल्लेख बौद्धवाङ्मयांत येतो. अशोकाच्या राज्याचा विस्तार या प्रांतापर्यंत झाला होता. खोतानी दंतकथेवरून अशोक हा गौतमबुद्धाच्या निर्वाणानंतर २५० वर्षांनीं झाला. खोतनी दंतकथा बऱ्याच संशयास्पद आहेत. तेथील राजवंशाबद्दल पुढील दंतकथा सांगतातः—अशोकानें आपला मुलगा कुनाल याला त्याच्या कांहीं वाईट कृत्यांत मदत केल्याच्या आरोपावरून तक्षशिला येथील कांहीं सरदार दरकदारांना हिमालयाच्या पलीकडील खोतान प्रांतांत हद्दपार केलें. या लोकांनीं आपल्यापैकीं एका पुरुषास राजा बनविलें; त्यानें पुष्कळ वर्षें राज्य केलें; पुढें त्याला चीनमधील एका अशाच हद्दपार केलेल्या राजपुत्रानें हांकलून देऊन आपण राज्य बळकाविलें. दुसरी अशी दंतकथा आहे कीं, खोतानच्या राजवंशाचा मूळ संस्थापक खुद्द कुनालच होता. त्यालाच तक्षशिलेहून अशोकानें हद्दपार केलें होतें. परंतु या कथेला फारसा ऐतिहासिक अधार नाहीं. एवढें मात्र खरें कीं, खोतान येथील संस्कृतीला मूळ अधार हिंदुस्थान व चीन येथील संस्कृतीचा होता. पुढें बौद्धधर्मीयांचा जेव्हां हिंदुस्थानांत छळ होऊं लागला तेव्हांच्या (७४) कांहीं दंतकथा खोतानमध्यें प्रसिद्ध आहेत. अशोकाच्या वेळीं व पूर्वीहि खोतान व तिबेट यांचा हिंदुस्थानाशीं निकटचा संबंध होता. मध्यंतरीं (स. ७३) चीनचा प्रख्यात सेनापति पनचौ यानें जो दिग्विजय करण्यास प्रारंभ केला, त्यांत प्रथमच खोतानचा राजा त्याला शरण येऊन चिनी बादशहाचा मांडलिक बनला होता. त्यानंतर कनिष्कानें सन९०च्या सुमारास काशगर व यारकंद यांच्या बरोबरच खोतानप्रांत जिंकून घेतला. ह्युएनत्संग हा हिंदुस्थानांतून आपल्या देशीं परत जातांना पामीर पर्वताच्या घाटांतून खोतानमध्यें गेला होता.

ख्रिस्तानंतर ४०० वर्षांच्या दरम्यानच्या काळांत ही फार महत्वाची व भरभराटीची जागा होती. नंतर इ. स. ४०० च्या सुमारास या ठिकाणीं बौद्धधर्म चांगलाच भरभराटला होता. ५ व्या शतकापासून बौद्धधर्मास उतरती कळा लागली. ८ व्या शतकांत अरबांनीं खोतान जिंकलें व तेथें इस्लाम धर्माचा प्रसार झाला. १२२० त मंगोल लोकांनीं त्याचा विध्वंस केला. १२७४ त मार्कोपोलो हा या शहरांतून गेला होता. त्याच्या लिहिण्यावरून येथील व्यापारधंदे त्यावेळीं फार भरभराटले होते. लोकांत शिपाईगिरी मुळींच नव्हती. इ. स. १८६४–७५ च्या चीन विरुद्ध झालेल्या डुंगन बंडानें या शहराची फार खराबी झाली. [चायना, स्टोरी ऑफ नेशन्स सेरीज; रॉकहिल—लाइफ ऑफ बुद्ध; शरच्चंद्रदास–तिबेटियन हिस्टरी; स्टीन–एन्शन्ट खोतान].

खोनोम—पूर्वबंगाल व आसाममधील ' नागाटेकडी ' जिल्ह्यांतील एक संपन्न खेडें. १८७९ मध्यें डॅमंट नांवाच्या एका इंग्रज अधिकाऱ्याचा या खेड्यांतील लोकांनीं खून केला. तेव्हां इंग्रजांनीं या खेड्यावर हल्ला करून हें खेडें आपल्या ताब्यांत घेतलें. पण या खेड्यांतील लोक जाप्वो नांवाच्या एका टेंकडीवरील आश्रयाच्या जागीं पळून गेले. १८८० च्या जानेवारीमध्यें या नागा जातीच्या लोकांनीं काचारमधील बालधान मळ्यावर अचानक छापा घालून तेथील ब्लिथ नांवाच्या अधिकाऱ्याला व १६ यूरोपीयन लोकांना गारद केलें. पण पुढें इंग्रजांच्या पुढें त्यांचा टिकाव न लागल्यामुळें त्यांना शरण यावें लागलें.

खोम्माण—चितोडच्या गुहिलोत राजघराण्यांत तीन खोम्माण राजे होऊन गेले. तिसरा खोम्माण हा महायकानंतर गादीवर बसला होता. प्राचीन शिलालेखांत खोम्माण याच्या पराक्रमाचीं विशेष वर्णनें आढळतात. आटपुरा लेखांत आणखी दोन खोम्माणांचा उल्लेख येतो. त्यांपैकीं एक कालभोजाचा व दुसरा सिंहराजाचा मुलगा असावा. यांतील कालभोजपुत्र खोमाणानें फार पराक्रम केला; त्यानें इ. स. ८२५च्या सुमारास अरबांशीं घनघोर संग्राम करून त्यांना हांकलून लाविलें. या कृत्यावर खोम्माणरासा नांवाचें एक काव्य प्रसिद्ध आहे. त्याच्या आधारानें टॉडनें या युद्धांत चितोडच्या बाजूनें कोणकोणत्या देशांचे राजे लढले त्यांची यादी दिली आहे व मुसुलमानांच्या निरनिराळ्या स्वाऱ्यांचाहि अहवाल दिला आहे. असल्या प्रकारची सर्व रजपुतांची एकी पुढें पृथ्वीराजाच्या वेळीं झाली होती. [वैद्य मध्ययुगीन भारत भा २].

खोरेमाबाद--खोरेमाबाद हें इराणांत लुरिस्तान प्रांताचें राजधानीचें शहर आहे. तें उत्तर अ. ३३ ° ३२′ व पू. रे. ४८ ° १५′ यांचे दरम्यान ४२५० फूट उंचीवर आहे. लोकसंख्या सुमारें ६००० आहे. हें शहर खोरेमाबाद नदीच्या उजव्या तीरावर इस्पहानपासून १३८ मैलांवर व कर्मनशाहाचे अग्नेयीस ११७ मैलांवर आहे. शहर व

नदी यांच्या दरम्यान एका अलग असलेल्या टेंकडीवर दिश्न-इ-सिया नांवाचा एक पक्का किल्ला आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीं गव्हर्नरचें निवासस्थान व विस्तृत सभामंदिरें व बगीचे आहेत. नदीच्या डाव्या किनाऱ्यावर शहराच्या समोर जुन्या साम्हा शहराचे पडके भाग आहेत. येथें ६० फूट उंचीचा एक मनोरा, एका मशिदीचे भाग, पाण्याचा नळ, इतर इमारतींच्या भिंती व एक चौकोनी एकाच दगडाचा खांब आहे. हा खांब ९½ फूट उंच, ३ फूट लांब व २⅓ फूट रुंद असून, सेल्जुक राजा मलिकशहाचा नातू महमूद याच्या स्मरणार्थ उभारलेला आहे. याच्यावरील खोदीव लेख कांहींसा अस्पष्ट आहे. पश्चिमेस असलेल्या शापूरखास्त या शहराकडे जाणारा रस्ता व साम्हा यांचेमधील नदीवरील पुलाच्या दहा कमानी अजून शिल्लक आहेत.

खोलापूर—वऱ्हाड. जिल्हा उमरावती. तालुका उमरावती. लो. सं. (१९११) ५५०१. उमरावतीच्या पश्चिमेस १८ मैलांवर हें गांव आहे. येथें दवाखाना, हिंदुस्थानी आणि मराठी शाळा, मुलींची शाळा हीं आहेत. येथील रेशमी कापड विणकरी बहुतेक नाहींसे झाले आहेत. लुगडीं व खादी विणण्याचे धंदेसुद्धां मागासत चालले आहेत. येथें एक सरकी काढण्याचा कारखाना असून दर बुधवारी आणि शनिवारीं बाजार भरतो. वार्षिक जत्रा ऑगष्ट महिन्यांत असते. पूर्वी या गांवाला बरेंच महत्व होतें. इ. स. १८०९ सालीं एलिचपूरचा सुभेदार विठ्ठल भागदेव यानें या गांवावर एक लाख रुपयांचा कर बसविला व गांव लुटला. त्यावेळेपासून या गांवाचें वैभव नाहींसें झालें.

खोलेश्वर—यादवकालीं बऱ्याच ब्राह्मणांनीं तरवार उचलली होती. त्यापैकीं खोलेश्वर ही एक प्रख्यात व्यक्ती होती. हा सिंघण यादवाचा सेनापति असून मुद्गलगोत्री ब्राह्मण होता. यानें गुजराथेवर पुष्कळदां स्वाऱ्या करून तेथील वाघेल राजसत्ताधाऱ्यांचा पराभव केला व बराचसा प्रांत सिंघणाच्या ताब्यांत आणला. याचा काल १२००--१२५० येतो. यानें संघकदेश (हल्लींच्या पूर्व खानदेशचा अजिंठ्याच्या डोंगरालगतचा भाग) जिंकून तेथें आपली वस्ती केली होती. पू. खानदेशांतील शेंदुर्णी या गांवीं या खोलेश्वरानें एक महादेवाचें देऊळ बांधिलें आहे, व देवाचें नांवहि खोलेश्वर असून तेथें खोलेश्वराच्या नांवाचा एक शिलालेख आहे. या खोलेश्वराचा एक पुत्र राम म्हणून होता व दुसरा बिच्चण (बिज्जल ?) म्हणून होता. हे दोघेहि यादवांचे सेनापती असून राम यानें गुजराथेवर स्वाऱ्या केल्या होत्या. व एका स्वारींत गुजराथचा वाघेलराजा वीरधवल याचा मुलगा वीसलदेव याच्या बरोबरच्या लढाईंत राम मरण पावला. बिच्चणानें दक्षिण महाराष्ट्र व कोंकण प्रांत जिंकिले व तो त्या देशाचा राजप्रतिनिधीहि होता. याप्रमाणें खोलेश्वराचें घराणें क्षात्रकर्मांत प्रसिद्ध होतें. [मराठी रियासत-पूर्वार्ध; विविध ज्ञानविस्तार, जुलै १८९६].

खोल्म—खोल्म हें पोलंडमध्यें एक शहर आहे. येथील लोकसंख्या १८९७ मध्यें १९२३६ होती. हें फार जुनें शहर आहे.

खोवई—आसाममधील नदी. ही हिल टिप्पेरा संस्थानांत उगम पावून वायव्य दिशेनें सिल्हेट जिल्ह्याच्या हबीगंज पोटविभागांतून वहात जाऊन हबीगंजनजीक बराक नदीला मिळते. या नदीच्या कांठीं मुचिकांडी, हबीगंज इत्यादि महत्वाची व्यापारी शहरें आहेत. या नदींतून पावसाळ्यांत ४ टन वजनाचीं जहाजें बाल्लानझारपर्यंत जातात व इतर ऋतूंतहि या नदींतून दोन टनी जहाजें जाऊं शकतात. या नदीची एकंदर लांबी ८४ मैल आहे.

ख्रिश्चिआना—ख्रिश्चिआना ही नार्वेची राजधानी आहे. येथील लोकसंख्या सुमारें २,६०,००० आहे. ही आग्नेय किनाऱ्यावर असून अकार नदीच्या पश्चिम तिरावर आहे. या शहराची ठेवण फार सुंदर आहे. हें शहर बहुतेक अलीकडेच वसलेलें आहे; कारण एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धातच हें शहर वाढलें. हें राज्यकारभाराचें, पार्लमेंटचें, मुख्य वरिष्ठ कोर्टाचें व विश्वविद्यालयाचें ठिकाण आहे. येथील बंदराचे दोन भाग आहेत व या दोन भागांच्या दरम्यान उंचवटयावर अकरशस नांवाचा किल्ला आहे. त्याचा तुरुंग व दारूच्या कोठारासाठीं उपयोग करतात. १७१९ पर्यंत त्याचा राजवाड्यासाठीं उपयोग होत होता. येथील विश्वविद्यालयास "फ्रिडरिसिआना युनिव्हर्सिटी" असें म्हणतात. हें विश्वविद्यालय डेन्मार्कचा राजा ६ वा फ्रेडरिक यानें १८११ सालीं स्थापिलें. या विश्वविद्यालयांत धर्मशास्त्र, कायदा, वैद्यक, इतिहास, भाषाशास्त्र, व गणित, सृष्टिशास्त्र ह्या पांच शाखा आहेत.

ख्रिश्चिआना येथें दोन रेल्वे स्टेशनें आहेत. हें शहर व्यापाराचें मुख्य ठिकाण असून प्रवाशांचें आवडतें ठिकाण आहे. हल, लंडन, न्यूकॅसल, हम्बर्ग, आमस्टरडॅम वगैरे ठिकाणांहून प्रवाशांच्या बोटी येथें येतात. येथें कापसाचा व लोंकरीचा माल, कागद, साबण, तेल, विटा, आगपेट्या, खिळे, तंबाखू, कमावलेलें कातडें, कांच, बंदुकीची दारू, रसायनें वगैरे तयार करण्याचे कारखाने आहेत. येथील आयात निर्गतीपेक्षां फार जास्त आहे. धान्य, कणीक, कापसाचा व लोंकरीचा माल, कॉफी, लोखंड, वगैरे माल मुख्यतः या देशांत येतो. इमारतीचें लांकूड, खिळे, कागद, लोणी, आगपेटया वगैरे माल परदेशीं जातो. येथील बंदर हिंवाळ्याचे ३।४ महिने बर्फाच्छादित असतें; परंतु त्याकरितां हिमछेदकांचा उपयोग करतात.

हल्लीं ज्याला आस्लो असें म्हणतात, तेथें अप्सलो नांवाचें जुनें शहर होतें. तें १०४८ त हॅराल्डनें स्थापिलें. १४ व्या शतकाच्या शेवटीं हें नार्वेचें मुख्य शहर झालें. या शहरांतील पुष्कळ घरें लांकडी बांधणीचीं होतीं. म्हणून येथें पुष्कळ अग्निप्रलय झाले. अशा एका प्रलयानंतर तें ६ व्या ख्रिश्चियन

राजानें पुन्हा वसवून त्याला ख्रिश्चिआना नांव दिलें (१६२४). आतां पुन्हा ऑस्लो नांव प्रचारांत आहे.

ख्रिश्चिआना.—१६२६-१६८९ ही स्वीडनची राणी व गुस्टॅव्हस आणि बँडेनबर्गची मराया यांची मुलगी असून स्टॉकहोम शहरीं १६२६ त जन्मली. ती सहा वर्षांची असतांच तिचा बाप वारला. तिचें शिक्षण मुख्यतः जोहॅन्स मॅथाई या विद्वानाजवळ शक्य तितकें मर्दानी पद्धतीनें झालें. व ऑक्झेंस्टजेर्ना यानें तिला राजकारणाची माहिती करून दिली. १८६४ मध्यें वयाच्या अठराव्या वर्षीच तिनें राजदंड हातीं घेतला आणि कौन्सिलबोर्डाच्या अध्यक्षस्थानीं बसूं लागल्यापासूनच तिनें मोठमोठ्या कसलेल्या मंत्र्यांनांसुद्धां आपल्या तीव्र बुद्धिसामर्थ्यानें दिपवून टाकलें. परंतु दुर्दैवानें या तिच्या अंगच्या तेजस्वी व भारदस्त गुणांवर तिच्यामधील गर्व व अहंकार या दोन दोषांमुळें सारवण पडलें. आपल्या घमेंडींत ती लोकमताला अगदीं तुच्छ लखूं लागली व प्रजेच्या गरजांकडे लक्ष न पुरवितां वाटेल तशी पैशाची उधळपट्टी तिनें सुरू केली. तिनें मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध असलेल्या आपल्या मुख्य प्रधानाला हलक्या दर्जानें वागविलें; पण लोकांत त्याचें वजन व कीर्ति कमी होईना, तेव्हां मत्सर बुद्धीनें तो जगांतून केव्हां नाहींसा होईल अशी ती वाट पाहूं लागली. यावेळीं त्रिंशद्वार्षिक युद्ध चालू असल्यामुळें त्याला कामावरून दूर करणें तिला शक्य नव्हतें. म्हणून तें लवकर संपावें असा प्रयत्न तिनें चालविला; आणि तहाच्या वाटाघाटींत प्रधानानें योजलेल्या खऱ्या फायदेशीर कारस्थानांत नसती ढवळाढवळ करून तिनें देशाचा तोटा मात्र करून घेतला. मंत्रीमंडळाच्या सभेंतहि ती प्रधानावरोबर हमरीतुमरीवर येत असे. प्रधानाचा मुलगा तिच्या पक्षाचा होता. तिनें बापलेकांत भांडण लावून दिलें होतें. मुलावर तिची प्यार मर्जी असे. ख्रिश्चिआनानें सुधारणाहि पुष्कळ केल्या. शहरांना नवे नवे हक्क दिले; व्यापार व उद्योगधंदे यांना उत्तेजन दिलें, विशेषतः वेल्सप्रांतांत खाणीच्या कारखान्यांची विशेष वाढ केली; सर्व राज्यांत शाळा स्थापन करण्याबद्दल फर्मान काढलें, परदेशीय विद्वानांना स्वीडनमध्यें रहाण्यास उत्तेजन दिलें व स्वदेशांत शास्त्रें व वाङ्मय यांच्या अभिवृध्द्यर्थ पूर्वींच्या सर्व कारकीर्दीपेक्षां जास्त सढळ हातानें साहाय्य केलें. प्रॉटेस्टंट धर्माचा ती द्वेष करी. तिनें स्पेन देशाशीं मित्रत्वाचा तह केला होता. ख्रिश्चिआना अद्यापि अविवाहितच होती, तेव्हां तिच्यामागून राज्याला कायदेशीर वारस असावा अशा हेतूनें सेनेटनें व लोकसभेनें तिला लग्न करून घेण्याचा आग्रह चालविला व तिच्या योग्य असा चार्लस गुस्टेव्हस हा तिचा चुलतभाऊ वर म्हणून सुचविला. याप्रमाणें सर्व मंत्र्यांनीं वरचेवर आग्रह चालविला. पण ख्रिश्चिनाला लग्न करून स्वतःवर पुरुषाचें वर्चस्व सुरू करून घेण्याचा उपजतच तिटकारा होता. अशा पेचांत तिनें गुस्टेव्हस याला वंशपरंपरेनें आपला वारस म्हणून जाहीर करून टाकलें व लग्नाची आपत्ति टाळली. राज्यत्याग करण्याच्या या गोष्टीचा पुन्हां नीट विचार करण्याबद्दल पुष्कळांनीं तिला सुचविलें पण तिनें आपला निश्चय बिलकुल ढळूं दिला नाहीं. पुढें दोनतीन वर्षांनीं तिच्या प्रजेचीहि खात्री पटली कीं, तिनें गादीवरून दूर होण्यामध्येंच राष्ट्राचें खरें हित आहे. व त्याप्रमाणें १६५४ त लोकसभेमध्यें तिनें राज्याचें जूं खालीं ठेवलें. तत्पूर्वी कांहीं काळ तिच्या कडक अमलामुळें व उधळपट्टीनें प्रजाजन तिच्यावर नाखुषच होत चालले होते; शिवाय तिला स्वतःलाच राज्यकारभाराच्या दगदगीचा कंटाळा येत चालला होता. विवाहाचा सीनेटनें आग्रह चालविल्यामुळेंहि तिला चीड आली होती; स्वस्थपणें काव्यशास्त्रग्रंथ वाचीत बसावे असाहि तिचा हेतु होता. आणि सर्वांत मोठें कारण हें कीं, तिच्यासारख्या बलाढ्य राणीनें आयुष्याच्या ऐन उमेदींत राज्यसंन्यासासारखें अश्रुतपूर्व कृत्य करून जगाला थक्क करून सोडणें या चमत्काराची नुसती कल्पनाहि तिच्या गर्विष्ठ मनाला अत्यंत रमणीय वाटत होती. वरील योजना मनांत आल्यापासूनच ती बेफिकीरपणें वागूं लागली होती. अखेरचीं दोनचार वर्षें तिनें केवळ आपल्या परदेशीय प्रेमीजनांबरोबर मनसोक्त चैनींत व उधळपट्टींत घालविलीं. शेवटीं राज्यत्याग केल्यावर कांहीं दिवस पॅरिसमध्यें व पुन्हां कांहीं दिवस स्वीडनमध्यें राहून शेवटीं ती रोम येथें कायम जाऊन राहिली व तेथेंच गरीबींत व एकांतवासांत १६८९ एप्रिल १९ रोजीं मरण पावली.

ख्रिस्त येशू—ऐतिहासिक दृष्ट्या पहातां ख्रिस्ती संप्रदायसंस्थापक जीझस याचें चरित्र फार थोडें माहीत आहे. कारण तत्कालीन ज्यू व रोमन इतिहासकारांच्या ग्रंथांत त्याच्या चरित्राला फारसें महत्व दिलेलें नाहीं. अर्वाचीन काळांत ख्रिस्ताचें विश्वसनीय चरित्र जाणण्याची इच्छा फार वाढली आहे, पण ती पुरी होण्याच्या मार्गांत दोन अडचणी आहेत. पहिली अडचण पुराणमतवादी लोकांच्या मनांतील पूर्वग्रह आणि दुसरी विश्वसनीय साधनांचा अभाव. ख्रिस्ताच्या चरित्राची माहिती मिळण्याचीं साधनें ख्रिस्ताच्या शिष्यांपैकीं चौघांनीं लिहिलेलीं 'गॉस्पेल' नांवाचीं चार पुस्तकें आहेत. हे चार शिष्य अनुक्रमें मॅथ्यू, मार्क, ल्यूक व जॉन हे होत. या पुस्तकांच्या हल्लीं उपलब्ध असलेल्या स्वरूपावरून पहातां त्यांपैकीं एकांतहि प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेल्या माणसानें लिहिलेली अशी एकहि गोष्ट नाहीं. सेंट जॉनचें गॉस्पेल हें लेखकानें स्वतः पाहून लिहिलेलें आहे असा सामान्य समज आहे, पण तें अधिक अर्वाचीन असावें असें संशोधकांचें मत आहे. आणि हें गॉस्पेलहि चरित्राचें ऐतिहासिक साधन या नात्यानें अयोग्यच आहे. कारण तें कल्पित गोष्टींनीं भरलेलें आहे. शिवाय या चार गॉस्पेलांत आजपर्यंत फार फरक झाले आहेत, आणि त्यांत शिष्यांनां वाटेल तशा प्रकारचा अर्थ लावून ख्रिस्ताचें चरित्र लिहिलें आहे. शिवाय त्यांत ख्रिस्ताचें चरित्र संगतवार

नसून मध्यें मध्यें बरीच खिंडारें आहेत. त्यामुळें या गास्पेल ग्रंथावरून आपणास निश्चयात्मक माहिती मिळूं शकत नाहीं.

च रि त्र.—येशू हा ज्यूडिया प्रांतांतील बेथ लेहेम येथें ज्यू लोकांचा राजा हेरॉड दि ग्रेट आणि रोमन बादशहा ऑगस्टस सीझर यांच्या कारकीर्दीत जन्मला. त्याचा बाप जोसेफ हा सुतार होता. येशू हा आपल्या आईच्या गर्भी तिच्या कौमार्यावस्थेंतच राहिला असा समज आहे. त्याच्या आईचें नांव मेरी. ही ' व्हर्जिन मेरी ' या नांवानें प्रसिद्ध आहे. ज्यू लोकांचा राजा हेरॉड याला पौरस्त्य देशांतील विद्वान लोकांनीं असें भविष्य सांगितलें होतें कीं, इस्रायल लोकांचा आधिपति बेथ लेहेम येथें उत्पन्न होईल. ह्या भविष्यकथनानें घाबरून जाऊन हेरॉडनें दोन वर्षांचीं व त्याहून लहान वयाचीं सर्व अर्भकें मारून टाकविलीं. तथापि जीझसच्या आईबापांनां या भावी आपत्तीबद्दल स्वप्नांत दृष्टांत झाला होता. व त्या सूचनेवरून तीं जीझसला घेऊन ईजिप्तमध्यें पळून गेलीं होतीं. पुढें हेरॉड राजा मरण पावल्यानंतर जीझसचे आईबाप परत येऊन गॅलिली प्रांतांतील नाझारेथ शहरीं राहिले. जीझसला लहानपणांतच ज्यू लोकांचें धर्मशास्त्र शिकविण्यांत आलें होतें; आणि या ग्रंथासंबंधीं त्याचें ज्ञान व अर्थ लावण्याची हुषारी पाहून त्याचे शिष्य थक्क होत असत. तो वयांत आल्यावर त्याला जॉन दि बॅपटिस्ट यानें बाप्तिस्मा दिला. त्यावेळीं एक खबूतर आकाशांतून खालीं उतरून जीझसच्या नजीक आलें व हा परमेश्वराचा पुत्र आहे अशी आकाशवाणी झाली ! त्यानंतर जीझसनें चाळीस दिवस व चाळीस रात्री उपवास करून चिंतन करण्यांत घालविल्या.

जीझसनें वयाच्या तिसाव्या वर्षी धर्मप्रचारक म्हणून कामास सुरवात केली असा समज आहे.त्यानें प्रथम गॅलिली समुद्राच्या किनाऱ्यावरील कॅपरनम शहरीं उपदेशाचें कार्य आरंभिलें. नंतर तो इतर शहरांत गेला, परंतु तेथें त्याला धर्मश्रद्धा फारशी आढळून न आल्यामुळें तो गॅलिली प्रांतांतील लहान सहान गांवांतहि हिंडला. याप्रमाणें फिनिशिया आणि समरिया यांच्या सरहद्दीपर्यंत फिरून त्यानें धर्मोपदेशाचें कार्य केलें व त्याच वेळीं अनेकांचे अनेक रोगहि बरे केले.त्यामुळें त्याच्यावर श्रद्धा बसून पुष्कळ लोक त्याचे अनुयायी बनले. हा ख्रिस्ताच्या धर्मोपदेशाचा काळ एक वर्षाहून कांहीं अधिक होता असें कित्येक म्हणतात, तर तो सुमारें तीन वर्षांचा होता असें इतर म्हणतात. धर्मोपदेशाच्या या कार्यामुळें ज्यू धर्मोपाध्याय वृद्ध गृहस्थ यांच्या मनांत मत्सर उत्पन्न होऊन ते त्याचा द्वेष करूं लागले. आणि अखेर त्यांनीं त्याला कैद करून त्या वेळचा ज्युडियाचा प्रोक्यूरेटर पॉंटियस, पायलेट (इसवी सन २६-३६,) याच्याकडे चौकशीकरितां पाठविलें. यावेळीं रोमन बादशहा टायबेरिस सीझर (इ. स.१४-३७)राज्य करीत होता. जीझसविरुद्ध मुख्य आरोप असा होता कीं, तो स्वतःला " ज्यू लोकांचा राजा " म्हणवितो. स्वतः पायलेट जीझसवर आरोप शाबीद करण्यास नाखूष होता. परंतु जीझसला आरोपी ठरवून क्रूसावर फांशी दिलाच पाहिजे अशी ज्यू लोकांनीं फार ओरड केली. तेव्हां स्वतःची लोकप्रियता नष्ट होईल अशी भीति वाटून पायलेटनें येशूला मरणाची शिक्षा सांगितली. तेव्हां जीझसला निळया रंगाचे कपडे चढवून व त्याची फजिती करण्याकरितां त्याच्या डोक्यावर कांटेरि मुकुट चढवून त्याचा अपमान करीत करीत व त्याच्या अंगावर थुंकत थुंकत शिपायांनीं व लोकांनीं मिळून त्याला वधस्थलापर्यंत नेला आणि तेथें त्याच्या अंगावरील सर्व कपडे काढून ठेऊन एका क्रूसवर त्याच्या शरीरांत खिळे ठोकून इतर दोन आरोपींबरोबर त्याचा प्राण घेण्यांत आला. येशू हा " ज्यू लोकांच्या" परमेश्वराचा धांवा करीत करीत मरण पावला. त्याच्या शवावर दगडी थडगें बांधण्यांत आलें. असें सांगतात कीं त्याला फाशीं दिलेल्या क्रॉसवर पॉंटियस पायलेटस यानें जे. एन. आर. जे. (म्हणजे येशू नाझारेथी, राजा, ज्यूंचा) हीं अक्षरें लिहून ठेविलीं होतीं.

ख्रि स्ता चा उ प दे श.—ख्रिस्तानें केलेल्या उपदेशास विशिष्ट उपपत्तीचें निश्चित स्वरूप नाहीं, किंवा फार विचारपूर्वक ठरलेलीं धार्मिक तत्त्वेंहि त्यांत नाहींत. त्याचा सर्व उपदेश त्याला प्रत्यक्ष आलेल्या अनुभवांतील सत्य गोष्टींनीं भरलेला आहे. त्यानें मोझेईक कायद्याला नांवें ठेविलीं नाहींत तर त्या कायद्याचा धर्मोपाध्यायांनीं व वृद्ध लोकांनीं जो संकुचित अर्थ केला होता त्याबद्दल त्याचें सर्व भांडण होतें. ज्यू लोकांच्या ओल्ड टेस्टॅमेंटमधील वचनांवर निरुपयोगी म्हणून हल्ला न करतां त्याच वचनांचा अधिक योग्य असा अर्थ सांगण्याचा त्यानें प्रयत्न केला. तसेंच त्या धर्मग्रंथांतील केवळ शब्दावर जोर न देतां त्यांच्या मूलभूत उद्देशांकडे लक्ष्य देण्याविषयीं त्यानें लोकांनां उपदेश केला. देवदूत आणि सैतान यासंबंधींच्या येशूच्या दृष्टांतांना ओल्ड टेस्टॅमेंटचाच आधार होता.ख्राइस्ट म्हणजे परमेश्वराचा पुत्र अशी पदवी त्यानें अगदीं नाखुषीनें व बऱ्याच वर्षांनंतर घेतली.

येशूच्या उपदेशांतील मुख्य गोष्टी सुप्रसिद्ध " डोंगरावरील व्याख्यान " या भागांत दृष्टांतरूप कथांत आलेल्या आहेत. त्यानें सांगितलेल्या दृष्टांतरूप कथा अगदीं अशिक्षित लोकांच्या मनावर फार परिणाम करीत असत.येशूनें धर्माच्या क्षेत्रांत व्यक्तिविषयक देव या गोष्टीला फार महत्त्व दिलें आहे.देव म्ह. आकाशांतील बाप असा उल्लेख तो नेहमीं करतो. ईश्वर आणि मनुष्यप्राणी यांच्यामधील संबंध दोन मनुष्यप्राण्यांतील परस्पर प्रेमासारखा आहे. मनुष्यांनीं स्वर्गातील देवाच्या राज्यांत प्रवेश होण्याकरितां खटपट करणें हें मनुष्यजातीचें धार्मिक ध्येय आहे. या स्वर्गातील राज्यांत नम्रपणा, दयाळुपणा, मनाचा पवित्रपणा आणि कळकळ या

गुणांना फार मान असतो. आणि उलट गर्व, ढोंगीपणा, द्रव्याचा गैरवाजवी लोभ या दुर्गुणांची फार निंदा करण्यांत येते. येशूनें मुख्यतः गुन्हेगार लोक आणि समाजबहिष्कृत लोक यांना उपदेश करण्यावर भर दिला आहे. त्यांना तो " इस्रायलचीं चुकलेलीं मेंढरें " असें संबोधितो. त्यानें संपत्ति आणि सामाजिक दर्जा यामुळें उत्पन्न होणारे भेदभाव यांकडे दुर्लक्ष करून सर्वांनां सारखेपणानें लेखिलें आहे. मोझेसच्या दहा आज्ञांचा त्यानें थोडक्यांत दोहोंमध्यें समावेश केला आहे. त्या दोन आज्ञा, ईश्वराबद्दल प्रेम आणि आपल्या शेजाऱ्याबद्दल प्रेम ह्या होत. त्यानें लोकांनां असा कळकळीचा उपदेश केला आहे कीं, शत्रूंनांहि क्षमा करावी, दान देणें तें गुप्तपणानें द्यावें आणि ईश्वराची प्रार्थना करणें ती जाहीर ठिकाणीं मोठ्यानें ओरडून न करतां कोणाला न समजेल अशा रीतीनें करावी. तसेंच प्रार्थना सोप्या शब्दांत करावी. साध्या प्रार्थनेचा नमुना म्हणून " दी लॉर्डस् प्रेअर " या नांवाची एक येशूची प्रार्थना प्रसिद्ध आहे. त्यानें सांगितलेल्या दृष्टांतरूप कथांमध्यें,बी पेरणारा आणि बी,खडकावर बांधलेलें घर, मोहरीचें बी आणि मूर्ख कुमारिका या कथा फार प्रसिद्ध आहेत.

अद्भुत चमत्कार—जीझसनें अनेकांचे रोग बरे केले. माणसांनां लागलेलीं भूतपिशाच्चें नाहींशीं केलीं आणि मृतांनां पुन्हां सजीव केलें अशा तऱ्हेच्या गोष्टी बायबलांत आहेत. पण या सर्व गोष्टी केवळ श्रद्धेमुळें झाल्या असें तो म्हणतो. याशिवाय दुसऱ्या कित्येक चमत्कारांच्या गोष्टी आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढीलप्रमाणें:—जीझसनें थोडेसे पाव आणि मासे एवढ्या अन्नानें शेंकडों लोक जेऊं घातले; एका विवाह-भोजनाच्या प्रसंगीं पाण्याची दारू बनविली आणि मोठें वादळ झालें असतां समुद्रावर तो चालत गेला. जीझसनें आपल्या हयातींत मूर्तिपूजकांनां ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याचा सुव्यस्थित प्रयत्न सुरू केला नव्हता. त्यानें फक्त ज्यू लोकांच्या धागणुकींतील गोष्टींचें अंतरंगपरीक्षण केलें. तथापि त्यानें आपल्या १२ शिष्यांनां ख्रिस्ती धर्माचा प्रचार कसा करावा याबद्दल सूचना दिल्या होत्या. इतकेंच नव्हे तर कित्येकांचें मत असें आहे कीं, त्यानें स्वतः सत्तर शिष्य धर्मोपदेशाच्या कार्याकरितां पाठविले. हिब्रू भविष्यकथनासंबंधानें जीझसनें असें जाहीर केलें होतें कीं, " स्वर्गांतील राज्यांत अब्राहाम, ऐझॅक व जेकब यांच्याबरोबर भोजन करण्याकरितां पूर्वेकडील व पश्चिमेकडील देशांतील पुष्कळ पुण्यवान पुरुष येतील. जीझसला क्रुसावर चढवून ठार मारल्यानंतर तिसऱ्या दिवशीं (ईस्टरसंडे) तो थडग्यांतून बाहेर आला आणि एका ढगामधून वर स्वर्गांत गेला. त्याला क्रूसावर चढविला तेव्हां सर्व आकाश ढगांनीं व्याप्त झालें होतें आणि येरूशेलम येथील देवालयावरील आवरण पायथ्यापासून शेंड्यापर्यंत फाटून गेलें असें सांगतात. जीझसचे अगदीं आरंभीचे अनुयायी ज्यू लोकांपैकीं होते. ते जीझस हा डेव्हिड राजाचा अनौरस वंशज होता असें मानीत असत. इतर धर्मांतीळ लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावर ते जीझस परमेश्वराचा अवतार होता असा उपदेश करूं लागले. सेंटजॉनच्या गॉस्पेलमध्यें जीझस परमेश्वराचा अवतार होता अशी जी उपपत्ति सांगितली आहे आणि जी उपपत्ति दुसऱ्या शतकांत ग्रीक चर्चनें मान्य केली होती ती तिसऱ्या शतकांत रोमन बिशपांनीं त्याज्य ठरविली. कारण तीमुळें अनेकेश्वरीमताचा पुरस्कार होतो असा त्यांचा आक्षेप होता. तथापि हीच उपपत्ति पुढें अधिकाधिक मान्य होत गेली. आणि ती निसा येथें इ. स. ३२५ मध्यें चर्च कौन्सिलनें मान्य केली. आणि तिलाच पुढें कॉन्स्टंटिनोपल येथें ३८१ मध्यें चर्च कौन्सिलनें कायमची मान्यता दिली.

ख्रिस्ताचें कार्य—कर्मवादाच्या विरुद्ध आरण्यकीय ब्रह्मवेत्यांनीं जी चळवळ केली तीप्रमाणेंच येशूची चळवळ होती. कदाचित् त्या चळवळीचा प्रेरक हेतु राजकीयहि असूं शकेल. ही गोष्ट मागें सविस्तर वर्णन केली आहे (बुद्धोत्तर जग पृ. २५,२९,३३). यहुदी लोकांनां त्यांच्या विधिविषयक धार्मिक कल्पनांमुळें जगाच्या धडपडींत अपयश येतें ही जाणीव असून शिवाय हा विधिविशिष्ट धर्म अध्यात्मिक उन्नतीस कारक होत नाहीं. आणि ही अध्यात्मिक उन्नति अधिक महत्वाची आहे असें त्यास वाटत असावें. शिवाय बोलून चालून तो सुताराचा मुलगा, त्यामुळें त्यास यहुद्यांच्या उपाध्यायांच्या भिक्षुकी उत्पन्नाचें रक्षण करावें ही आस्था नसणार. उलट त्याविषयीं त्यास तिटकाराच असणार. यामुळें त्याचे राज्यकर्ते व भिक्षुक हे दोन्ही शत्रु बनले आणि भिक्षुकांच्या लावालावीचें निमित्त होऊन त्यास शासनतंत्राकडून मरणाची शिक्षा झाली. या संप्रदायाला जर पालसारख्या प्रचारकी भिक्षुकी अकलेचा मनुष्य मिळाला नसता तर येशूचें नांव तरी आज ठाऊक असतें किंवा नाहीं याविषयीं संशयच आहे. [' ख्रैस्त्य ' पहा].

ख्रिस्तशक—इसवी सन. या कालगणनापद्धतीची सविस्तर माहिती ' विज्ञानेतिहास ' (ज्ञानकोश वि. ५ व. पा. १२१–१२२) या ग्रंथांत दिली आहे.

ख्रैस्त्य.—ख्रैस्त्य म्हणजे ख्रिस्ताचा संप्रदाय.याचा इतिहास द्यावयाचा म्हणजे ख्रिस्ताच्या उपदेशाचेहि अर्थ कसकसे निघत गेले, त्याच्या अनुयायांनीं आपल्या आवडीच्या कोणत्या गोष्टी घातल्या, अनुयायी मंडळींतील मुख्य कार्यकर्त्या अधिकाऱ्यांनीं चर्चची रचना कशी केली, आणि सत्ता मिळविण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न कसा केला, संप्रदायाचा प्रसार जगभर कसा केला इत्यादि गोष्टींचा इतिहास द्यावा लागेल. हा देण्यासाठीं या लेखाचे कांहीं भाग केले पाहिजेत ते असेः—

(१) चर्चचा इतिहास (२) प्रसाराचा इतिहास (३) मतांचा इतिहास. या सर्व गोष्टींवर क्रमवार विवेचन करूं आणि नंतर भारतीय ख्रिस्ती वर्गांकडे विशेष लक्ष देऊं.

च र्च चा इ ति हा स.—ख्रिस्ती संप्रदायाची व त्याच्या शासनसंस्थेची समग्र हकीकत सांगावयाची असल्यास तिचे सोईसाठीं तीन विभाग पाडतां येतील.(१) पुरातन चर्च-पासून तों ग्रेगरी दि ग्रेट पोपच्या कारकीर्दीपर्यंत (२) मध्य-युगीन चर्च आणि (३) आधुनिक चर्च.

पूर्वकालीन चर्च, उत्पत्ति आणि वाढः—येशू ख्रिस्ताला सुळावर चढविल्यामुळें त्याच्या अनुयायांमध्यें फाटाफूट झाली. परंतु थोडक्याच काळांत तो थडग्यांतून उठला आहे अशी त्यांची खात्री होऊन तो 'मेसाया'चें राज्य स्थापण्या-साठीं व अशा रीतीनें मेसायाचें अर्धवट उरलेलें काम तडीस नेण्यासाठीं लवकरच या जगांत अवतीर्ण होणार असा त्यांनां विश्वास वाटूं लागला. अशा प्रकारची श्रद्धा त्यांच्या मनांत उद्भूत झाल्यामुळें ख्रिस्त हाच मेसाया होय अशी लोकांनां खात्री पटवून देण्याची व आपल्या शुद्धाचरणानें व पश्चा-त्तापानें लवकरच अस्तित्वांत येणाऱ्या मेसायाच्या राज्य-स्थापनेची तयारी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. यामुळें यहुदी संस्कृतीचें राजकीय व धार्मिक केंद्र जें यरुशलेम त्याच ठिकाणीं हे ख्रिस्तानुयायी पुन्हां जमा झाले. ही नवीन चळवळ ज्या अर्थी यरूशलेम येथेंच सुरू झाली त्याअर्थी तेथील चर्च हें ख्रिस्ती जगाचें आद्य चर्च या नात्यानें प्रसिद्ध आहे हें योग्यच आहे. उपलब्ध माहिती-वरून यहुदी ख्रिस्त्यांचा जीवितक्रम त्यांच्या इतर बांधवां-प्रमाणेंच होता असें निश्चयेकरून सांगतां येतें. ते यहुदी उपासनामंदिरांत जाऊनच ईश्वरोपासना करीत असत. आपला नवा पंथ काढण्याचा किंवा इस्राएलच्या कुटुंबांतून विभक्त होण्याचा विचार त्यांच्या मनांत आला नव्हता. धार्मिक व नैतिक बाबतींत देखील त्यांच्यामध्यें व त्यांच्या इतर विचारी देशबांधवांमध्यें कांहीं भेद होता असें मान-ण्याला कांहींहि आधार नाहीं. येशू हाच मेसाया असून तो लवकरच मेसायाचें राज्य स्थापणार ही जी त्यांची श्रद्धा होती तेवढ्याच बाबतींत या दोघांत मतभेद होता. ख्रिस्त हाच मेसाया आहे हें सिद्ध करणें त्यांनां भाग होतें व या आपल्या मताचें मंडन त्यांनीं पुनर्जन्माच्या आधारावर केलें. मेसायाचें भविष्य पिकविण्याची व यहुदी बायबल हेंच ख्रिस्ती बायबल असें लोकांनां पटविण्याची त्यांच्यावर जबा-बदारी पडली. मेसायाचें राज्य लवकर येण्यासाठीं पश्चा-त्तापाचा व नीतिशुद्ध आचरणाचा पुरस्कार केला पाहिजे असें ते प्रतिपादन करूं लागले. उपलब्ध माहितीवरून येशूची जी शिकवणूक कीं ईश्वर सर्वांचा बाप आहे व आपण एकमेक बंधू आहोंत तीं पूर्वींच्या काळीं लोकांनां पटली नव्हती असें दिसतें.

मध्यंतरीं हीच चळवळ पॅलेस्टाइनच्या बाहेर पसरली व पुष्कळ यहुदी व यहुदी नसलेले या चळवळींत सामील झाले. यहुदी राष्ट्राबाहेरील लोकांमध्यें चळवळ पसरविण्याच्या कामीं पॉलनें अतिशय खटपट केली. पॉलचा संप्रदायप्रवेश ही गोष्ट प्राचीन चर्चच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाची आहे. यानें ख्रिस्ती संप्रदायास नवीन स्वरूप देऊन सर्व जगाला जुळतील असे त्यांत फेरफार केले व त्याचें संकुचित स्वरूप काढून टाकून त्यास व्यापक स्वरूप दिलें.म्हणजे यहुदी लोकांची राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा साधणारा संप्रदाय न बनवितां केवळ विशिष्ट आचारविचार पसरविणारा संप्रदाय बनविण्याची त्यानें खटपट केली.जुन्या मताप्रमाणें येशू हा यहुदी लोकांचा मेसाया होता व त्याचें राज्य स्थापणें हें मुख्य ध्येय होतें. पण ख्रिस्त हा ईश्वर आहे व तो पापी लोकांचा उद्धार करण्या-साठीं जगामध्यें आला होता असें तो प्रतिपादन करूं लागला. ख्रिस्ती संप्रदाय हा अमक्याचा नसून तो सर्वांचा आहे असें त्यानें सांगितलें. पूर्वींचे यहुदीलोक जें मेसायाचें राज्य स्थापन होणार असें म्हणत तें एखादें प्रत्यक्ष स्वराज्य नसून शुद्ध आचरणाचें, शांततेचें व आत्मानंदाचें स्वराज्य होय, असें पॉलचें मत होतें. शिवाय स्वतःच्या आत्मिक अनुभवानें व मोक्षतत्त्वाच्या आधारें त्यानें कोणत्याहि ख्रिस्त्याला यहुदी-लोकांचे कायदे पाळण्याची जरूरी नाहीं असें प्रतिपादन केलें. उदाहरणार्थ, मोठ्या वयांत लोक ख्रिस्ती होणार त्यांनां सुंतेची दुखापत सहन होणार नाहीं म्हणून त्यानें भौतिक सुंतेच्या ऐवजीं "आध्यात्मिक सुंता" उपदेशिली. अशा रीतीनें त्यानें यहुदी व यहुदी नसलेल्या लोकांमधील मुख्य भेद नाहींसा करून टाकला. ख्रिस्ती भक्ताला साक्षात्कार झाला असतां त्याला प्रीति, आनंद व शांति यांचाच अनु-भव येतो, या मुद्यावर बराच मतभेद व खटका उडाला होता. व दुसरींहि पॉलचीं तत्त्वें मान्य झालीं नाहींत.

ख्रिस्ती संप्रदायाचा रोमन साम्राज्यांत प्रवेश.—ख्रिस्ती संप्रदायाच्या नव्या व्यापक स्वरूपामुळें त्यानें अनेक विजय मिळविले, व रोमन जगामध्यें त्याची कायमची स्थापना झाली. यावेळीं लोकांची धार्मिक, सामाजिक, नैतिक वगैरे सर्व बाबतींत सुधारणा करण्याकडे मनोवृत्ति होती व या सर्व बाबींमध्यें ख्रिस्ती धर्मभावनांनीं त्यांची जी इच्छा होती ती तृप्त करून त्यांनां भासत असलेली उणीव भरून काढली. पूर्वींच्या शतकांत ही धार्मिक चळवळ केवळ मध्यम व हलक्या स्थितींतील लोकांच्या बाबतींतच चालू होती, पण ख्रिस्ती संप्रदायाची नैतिक उच्चता पाहून सरदार व वरिष्ठ दर्जाचे लोकहि या संप्रदायाच्या बाबतींत मन घालूं लागले, व अशा रीतीनें ही चळवळ व्यापक स्वरूपाची झाली.

पण ही यशस्विता मिळविण्यासाठीं ख्रिस्ती संप्रदायाला फार झगडावें लागलें. परंपरागत धार्मिक समजुतींमुळें, मत्सरामुळें, गैरसमजामुळें व इतर कारणांमुळें या संप्रदाया-वर अनेक संकटें आलीं व कांहीं वेळ तर खुद्द सरकारकडून हा संप्रदाय चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला गेला. या धर्माला चिरडून टाकण्याचा पद्धतशीर प्रयत्न डीशिअसच्या कारकीर्दींत (२५०-५१) झाला, व हेंच धोरण पुढें डायो-क्लीशिअननेंहि (३०३ पासून पुढें) स्वीकारिलें. तथापि या

विरोधाला न जुमानतां चर्चेची सत्ता हळू हळू वाढत गेली. ३११ साली गालेरिअस बादशहानें आपल्या मृत्यूसमयीं या संप्रदायाला अंशतः स्वातंत्र्य दिलें व त्याचा होत असलेला छळ बंद केला. ३१३ साली कॉन्स्टंटाईननें व लिसीनीयसनें ख्रिश्चन संप्रदायाला पूर्ण स्वातंत्र्य दिलें, व त्या अर्थाचा मिलान येथें एक शिलालेख कोरला. हा संप्रदायेतिहासांतील फारच महत्वाचा लेख होय. कॉन्स्टंटाईननें या संप्रदायाची वाढती भरभराट पाहून त्याला आपला पूर्ण आश्रय दिला, व मृत्युशय्येवर (३३७) असतांना त्यानें स्वतःहि ख्रिस्ती संप्रदायाची दिक्षा घेतली. अशाच प्रकारचा वाढता आश्रय फक्त जूलिअनखेरिज करून त्याच्या मागून गादीवर येणाऱ्या सर्व राजांकडून मिळाला. यामुळें ज्यूलिअनला ख्रिस्ती लेखकांनीं अनेक शिव्याशाप दिले आहेत. थीओडोशिअसच्या कारकीर्दींत या संप्रदायास राजदरबारीं मान्यता मिळाली, ख्रिस्तेतर लोकांवर बहिष्कार पडूं लागला. जेव्हां रोमन साम्राज्याचे तुकडे झाले तेव्हां या चर्चेचेहि तुकडे होऊन पूर्वेकडील भागांत ग्रीक कॅथोलिक व पश्चिमभागांत रोमनकॅथोलिक असे भेद पडले व त्यांनीं स्वतंत्र रीतीनें संप्रदायप्रसार करण्यास सुरुवात केली.

अशा रीतीनें ख्रिस्ती संप्रदायास राजदरबारीं मान्यता मिळाली तरी साम्राज्यांतील लोकांचा पैतृक धर्म नामशेष न होतां पुष्कळच भागांत तो प्रचलित राहिला. व कांहीं ठिकाणीं तर त्याचे अनुयायी ख्रिस्ती लोकांपेक्षांहि अधिक होते. तथापि नांवानें कां होईना ख्रिस्ती संप्रदाय हा सर्व राज्याचा संप्रदाय म्हणून गणला गेला. मध्यंतरीच्या काळांत तिसऱ्या शतकाच्या आरंभापूर्वी ख्रिस्ती संप्रदायाचा प्रसार आशियामध्यें झाला होता; व त्याचा पुढें एकसारखा प्रसार होत जाऊन तो चार पांच शतकांत आर्मेनिया, इराण, अरबस्तान व याच्याहि पुढें पूर्वेकडील प्रदेशांत पसरत गेला. चवथ्या शतकाच्या सुरुवातीसच गॉथ हे ख्रिस्ती झाले होते व इतर जातींचे रानटी लोकहि क्रमाक्रमानें ख्रिस्तीसंप्रदायांत शिरूं लागले. व ज्या वेळेस पाश्चात्य देशांचें पुढारीपण या रानटी लोकांकडे आलें त्यावेळींसुद्धां ही चर्चेची सत्ता अबाधीतच राहिली. तेव्हांपासून कित्येक शतकेंपर्यंत पाश्चात्य राष्ट्रांमध्यें चर्च हें केवळ पारमार्थिक साधनच नव्हे तर सुधारणेची व संस्कृतीची एक शक्तीच होऊन बसली होती.

ख्रिस्ती लोकांचा जीवनक्रमः— प्राचीन ख्रिस्ती लोकांची अशी पक्की समजूत होती कीं आपण दैवी प्रसादाचे अधिकारी आहोंत. त्यांच्या मतें चर्च ही मानवांनीं स्थापलेली संस्था नसून ती ईश्वरनियंत्रित आहे. हें जग नश्वर आहे व यांत आपलें कल्याण नाहीं असें त्यांनां वाटत असल्यानें त्यांनीं जगांतील व्यवहार सोडून एक प्रकारें संन्यासधर्मच पत्करला होता. प्रथमतः पुष्कळांची ख्रिस्त हा पुन्हां या जगांत येणार अशी खात्री होती. पण ही आशा पुढें लवकरच त्यांनीं सोडून दिली. पवित्र आत्म्याचें अस्तित्व निरनिराळ्या अद्भुत मार्गांनीं व्यक्त होतें अशी या लोकांची प्रथम कल्पना होती. पॉललाहि ही गोष्ट मान्य होती पण त्यानें ख्रिस्ती मनुष्याच्या प्रत्येक व्यवहारांत या आत्म्याचें अस्तित्व व्यक्त होतें अशी त्या कल्पनेस पुस्ती जोडली, व त्यामुळें ख्रिस्ती लोकांनां एक प्रकारची स्फूर्ति मिळाल्यासारखें झालें. पुढें कालांतरानें ही स्फूर्ति व उत्साह नाहींसा होत जाऊन प्रत्येक गोष्टींतील आत्म्याच्या अस्तित्वाबद्दलची त्यांची श्रद्धा कमी कमी होत चालली; व नास्तिकमतवाद्यांशीं झालेल्या झगड्यांमध्यें चर्च हें स्वतंत्र न राहतां अधिकाऱ्यांच्या ताब्यांत गेलें. मॉंटेनिझम या नांवानें प्रसिद्ध असलेली दुसऱ्या शतकाच्या अखेरीस झालेली चळवळ चर्चेची ही परवशता नाहींशी करून पूर्वीप्रमाणें त्यास ईश्वरनियंत्रित करण्यासाठीं झालेली होती. पण ती यशस्वी न होतां चर्चेची परवशता उत्तरोत्तर वाढतच गेली. या जगांतील चालीरीतींनां अनुसरून चर्चेनें आपली पुनर्घटना केली व अशा रीतीनें स्वतःला पुष्कळ काळ टिकविण्याचा प्रयत्न केला. याचा अर्थ चर्च ही अतिमानुषी संस्था नाहीं असें याच्या अभिमान्यांनां वाटत होतें असा नसून हा अतिमानुषीपणा चर्चेनें निराळ्या रीतीनें व्यक्त केला एवढेंच कायतें. चर्चेच्या या नूतन परिस्थितींत देखील प्रत्येक ख्रिस्ती मनुष्याला असेंच वाटत असे कीं, परमेश्वरी कृपा संपादन केल्याशिवाय मोक्ष मिळणें शक्य नाहीं; तसेंच या जगांतील आपल्या आयुष्यक्रमांत व पुढील स्वर्गांतील आयुष्यक्रमांत फार अंतर आहे. व ज्या मानानें चर्च ही संस्था लौकिक होऊं लागली त्या मानानें ही श्रद्धा 'संन्यास' रूपानें व्यक्त होऊं लागली. ही मठसंस्था म्हणजे परलोकींचें सुख अधिक सुलभ करण्याचा व अशा रीतीनें स्वतःला मोक्ष सुलभरीतीनें साध्य करण्याकरितां केलेला एक प्रयत्न होय. हें साध्य साधून घेण्यासाठीं प्रत्येकानें आपलें आचरण शुद्ध ठेवलें पाहिजे अशी प्रवृत्ति सुरू झाली. परंतु जगांतील या चर्चमध्यें राहून स्वतःला मोक्ष प्राप्त करून घेण्याचें ज्यांनां अवघड वाटूं लागलें त्यांनीं समाजापासून दूर जाऊन एकान्तवासांत राहून तें मिळविण्याचा क्रम चालू ठेवला. तिसऱ्या शतकामध्येंहि ख्रिस्ती भिक्षू झाले होते, पण चवथ्या शतकाच्या अखेरीस मात्र सर्व यूरोपभर ही भिक्षुसंस्था पूर्णपणें प्रस्थापित झाली. भिक्षूंस व भिक्षुणींस समाजांत फार मान मिळूं लागला व त्यामुळें धर्मगुरूंनांहि होतां होईल तो भिक्षु होणें भाग पडत असे. या भिक्षुसंस्थेनें लोकांपुढें एक उच्च नैतिक ध्येय ठेविलें होतें. ज्यांनां भिक्षू होतां येईना असे लोक सुद्धां आपापल्या परी आपल्या जिविताच्या मोक्षासाठीं खटपट करूं लागले. याचा परिणाम असा झाला कीं ब्रह्मचर्याचा बराच प्रसार झाला; व स्वतःची शुद्धि करून घेण्यासाठीं उपवास करणें,

दानधर्म करणें, अशा प्रकारचे प्रकार अस्तित्वांत आले. येशू ख्रिस्तानें सांगितलेलें प्रेमाचें तत्व जास्त व्यापक करून सर्व ख्रिस्ती बांधवांबद्दलचें प्रेम असा त्याचा अर्थ मानण्यांत येऊं लागला; अनाथांस मदत, अतिथिसत्कार वगैरे उदार तत्वें आचरणांत येऊं लागलीं; व स्वतःच्या धर्मबांधवांनां मदत करणें हें तर एक अत्यावश्यक कर्तव्यच होऊन बसलें.

उपासना.— परमात्मा हा आपल्या सान्निध्यांत असतो ही जी प्राचीन श्रद्धा होती तिचा परिणाम चर्चमधील उपासनेवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. उपासना हा खेळच होऊन बसला. प्रत्येकानें मनास वाटेल त्याप्रमाणें उपासना करावी व मी हें ईश्वराच्या प्रेरणेनेंच करीत आहे असें म्हणावें अशी स्थिति अस्तित्वांत आली. यामुळें वारंवार घोंटाळा होऊं लागला व अंदाधुंदी माजली. तेव्हां उपासनेसंबंधीं कांहीं नियम करण्यांत येऊन कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या हातांतच उपासनेचा अधिकार देण्यांत आला. या बाबतींत कसकशी वाढ होत गेली तें सविस्तर सांगणें शक्य नाहीं; परंतु उपासना जास्त कठिण, गुंतागुंतीची व अवडंबरयुक्त करण्याची एकीकडे प्रवृत्ति वाढत होती, तर दुसरीकडे उपासना जास्त गंभीर व गूढ करून पापी माणसाला त्या गूढोपासनेंत न घेण्याची मनोवृत्ति वाढत होती. असे गूढ प्रकार म्हणजे दीक्षाविधि व प्रभुभोजन हे होत. व यांना वाटेल त्या इसमास हजर राहतां येत नव्हतें. प्रार्थना म्हणण्याचेहि अशाच रितीनें दोन भाग पडले. एक सार्वजनिक व सर्वांनां खुला असा भाग व दुसरा गूढ भाग. यांपैकीं सार्वजनिक प्रार्थना दिवसेंदिवस जास्तच गुंतागुंतीची व अवडंबरयुक्त होत चालली.

चर्च व प्रभुभोजनादि संस्कार.—पॉलच्या मतें मनुष्य हा मांसादि वस्तूंचा गोळा असल्यानें तो नश्वर आहे. जेव्हां तो ख्रिस्ताशीं एकरूप होईल व अशा रीतीनें दैवी जीव होईल तेव्हां तो मुक्त होईल. तसेंच ख्रिस्ती चर्च हें शरीर असून ख्रिस्त हा त्याचा आत्मा आहे असेंहि कांहीं सूक्तांतून म्हटलें आहे. या दोनहि कल्पना एकत्र करून इग्नेशिअसनें असें प्रतिपादिलें कीं चर्चचा सभासद झाल्याशिवाय कोणत्याहि ख्रिस्ती मनुष्याला मुक्ति मिळणार नाहीं. हीच स्थिति संस्कारांची झाली. दुसऱ्या शतकाच्या सुमारास दीक्षाविधी हा एक महत्वाचा विधि गणला जात होता. दीक्षा घेतली असतां त्या मनुष्याला दुसरा ईश्वरी जीव प्राप्त होतो असें सर्वांनां वाटत असे, व प्रभुभोजन केलें असतां अमरत्व प्राप्त होतें असेंहि तत्व प्रसृत झालें होतें. पूर्वकालीं चर्च म्हणजे साधु लोकांची संस्था होती, व त्याचे सभासद पवित्र आहेत अशी भावना होती. अपवित्र लोकांनां चर्चमध्यें घेण्यांतच येत नसे. नंतर प्रत्येक व्यक्तीला तिची पूर्वीची पातकें नाहींशीं करण्यासाठीं दीक्षा द्यावी असें मत प्रचारांत आलें व यामुळें वाटेल त्या व्यक्तीला दीक्षा घेतल्यानंतर चर्चचा सभासद होतां येऊं लागलें. या संस्काराप्रमाणेंच धर्मगुरूबद्दलचे कांहीं विधीहि नवीन अस्तित्वांत आले. इग्नेशिअसनें धर्मगुरूच्या परवानगीशिवाय प्रभुभोजन करतां येत नाहीं असें प्रतिपादन केलें होतें. आणि हेंच तत्व दीक्षेच्या बाबतींतहि अंमलांत आलें.

ख्रिस्ती संप्रदायाची शिकवणूक.—पूर्वींच्या चर्चच्या विचारांत दोन भावना दृग्गोचर होत होत्या. ख्रिस्ती संप्रदाय हा मनुष्याच्या जीवितावर ताबा चालवून मोक्ष भावना प्राप्त करून देतो अशी एक भावना होती; व दुसरी हा संप्रदाय पापी मनुष्याला त्याचें पाप नाहींसें करून एक दैवी तनु प्राप्त करून देणारें साधन आहे अशी भावना होती. ही पहिली भावना नव्या करारांत व दुसऱ्या शतकांतील 'ॲपॉलोजिस्ट' लोकांत दृष्टीस पडते. दुसरी भावना पॉल, इग्नेशिअस इत्यादिकांचे लेख व शुभवर्तमान वगैरेंमध्यें दृष्टीस पडते. या दोन भावना परस्परावलंबी नव्हत्या असें मात्र नव्हे. पण प्रत्येक लेखांत अगर विचारांत यांपैकीं एक विशिष्ट भावना प्रामुख्यानें दृष्टीस पडत असे एवढेंच. दुसऱ्या शतकाच्या अखेरीस इरेनिअसनें या दोन्ही भावनांचें एकीकरण केलें. त्याच्या मतें मोक्ष म्हणजे सैतानापासून आपली सुटका करून घेणें व ईश्वराच्या कृपाप्रसादानें नवी तनु धारण करणें होय. ही त्याची कल्पना पुढील शतकांत चर्चमध्यें प्रसृत झाली. या दोनहि भावनांच्या दृष्टीनें ख्रिस्ती संप्रदाय हा अतिमानुष संप्रदाय आहे व त्याच्या मदतीशिवाय मोक्ष प्राप्त होणें अशक्य आहे.

या दोन्ही भावनांचा ख्रिस्तासंबंधीं भावनेवर परिणाम झाल्याविना राहिला नाहीं. ख्रिस्ताबद्दलची पहिली कल्पना म्हणजे साक्षात्कार करून देणारा हा देवदूत असून परमेश्वर व जग यांमधील हा दुवा आहे. परंतु वरील दोन भावनांचा परिणाम असा झाला कीं, ख्रिस्त व परमेश्वर हे एकच आहेत व ख्रिस्तरूपानें परमेश्वर जगांत अवतरत असून या अवतारानें तो मानवांची उन्नति करतो असें मत ख्रिस्ताविषयीं प्रचलित झालें. ही कल्पना तिसऱ्या शतकाच्या अखेरीस प्रसृत झाली. पण त्या वेळीं मूर्तिपूजा कोणीहि करीत नसत. तथापि शेवटीं चवथ्या शतकांत या प्रश्नावर रण माजून ३२५ सालीं नायसीआच्या कौन्सिलनें ख्रिस्ताच्या मूर्तीला पूर्णपणें परवानगी दिली व कांहीं काळानंतर तिचा जिकडे तिकडे प्रसारहि झाला. पुत्र या देवतेमध्यें परमात्मा, पिता व पुत्र हे तिन्ही अंतर्भूत असतात अशी समजूत होती व हेंच ट्रिनिटीचें (त्रैत्र) तत्व नायसिआच्या तत्वज्ञानांत दिसत होतें.

ख्रिस्त हा या पुत्राचा मूर्तिमंत अवतार आहे या समजुतीमुळें चवथ्या व पुढील कांहीं शतकांत असा वादग्रस्त प्रश्न निघाला कीं ख्रिस्तामध्यें असलेल्या मानवी अंशाचा व दैवी अंशाचा परस्पर संबंध काय आहे. सन ४५१ सालीं

भरलेल्या खाल्सीडॉनच्या परिषदेंत असें ठरलें कीं ख्रिस्तामध्यें दोन्ही अंश असून त्यांचा संयोग झाल्यावर सुद्धां त्यांचे गुणधर्म अबाधित रहातात. सन ६८० सालीं भरलेल्या कान्स्टांटिनोपल येथील मंडळानें ख्रिस्तामध्यें मानवी इच्छा व दैवी इच्छा या दोन्ही असतात असें ठरवून वरील मतास दुजोरा दिला. अशा रीतीनें ख्रिस्ताबद्दलचें त्रिमूर्तित्व पूर्णपणें प्रस्थापित झालें. मध्यंतरीं पश्चिमयूरोपांतील चर्चमध्यें पाप व प्रसाद यांसंबंधीं व मनुष्याला मोक्ष कसा मिळतो याबद्दलचा वाद होऊन ५२९ मध्यें ऑरेंज येथील दुसऱ्या बैठकींत असें ठरलें कीं, मनुष्य हा मूळचा पतित असून त्याला दीक्षेमध्यें दिल्या जाणाऱ्या प्रसादामुळें तो मोक्ष प्राप्तीचा अधिकारी बनतो व अशीच परमेश्वरी कृपा, चर्चमध्यें राहून मिळविल्याशिवाय त्याला मोक्षप्राप्ति होत नाहीं. दुसरा बोनिफेस या पोपनें याच निकालास पुष्टि दिली. मध्ययुगांत पश्चिमयूरोपमध्यें हें तत्व प्रचलित होतें. सारांश हिब्रू, ख्रिस्ती, पौर्वात्य, ग्रीक, रोमन इत्यादि धर्मांतून चर्चनें आपलीं तत्त्वें घेतलीं व तीं तत्वें ज्या स्वरूपांत प्रगट झालीं तें स्वरूप ग्रीक तत्वज्ञानापासून घेतलें.

संघटनाः—चर्चमधील संघटनेची उत्पत्ति किंवा वाढ कोणत्या प्रकारें झाली हें समजण्याला साधन नाहीं; कारण हें ज्ञान करून देणारी साधनसामुग्री अगदींच तुटपुंजी असून ती सुद्धां इकडे तिकडे विखुरलेली आहे. अगदीं प्राचीन काळीं चर्च ही अध्यात्मिक संस्था होती व प्रत्यक्ष परमेश्वराचाच तिच्यावर ताबा होता. त्या वेळची अशी समजूत होती कीं, परमेश्वर हा निरनिराळ्या भक्तांनां निरनिराळ्या विशिष्ट देणग्या देतो व त्यांचा भक्तानें लोकहितासाठीं उपयोग करावयाचा असतो. त्यांपैकीं प्रमुख देणगी म्हणजे उपदेशकाची होय व या उपदेशकांनां अपॉसल म्हणजे आद्य ख्रिस्तसंप्रदायप्रचारक अशी संज्ञा असे. हे लोक परमेश्वरी इच्छेचें व स्वरूपाचें ज्ञान देणारे मिशनरी लोक असत व असे संप्रदायप्रसारक पूर्वींच्या चर्चमध्यें पुष्कळ होते. तथापि ही संज्ञा फक्त पॉल व आणखी १२ जण यांनाच लावण्यांत आली. या लोकांनां चर्चमध्यें कांहीं अधिकाराची जागा मिळत असे असें नाहीं. तरी पण त्यांनां फार मान मिळत असे यांत शंका नाहीं. शिवाय त्यांच्या शिष्यांनीं त्यांनां एकदां अपॉसल म्हणण्यास सुरुवात केली म्हणजे तेंच नांव रूढ होत असे. या योगानें अर्थातच कांहीं ढोंगी व खोटे अपॉसल या वेळीं निर्माण झाले. अशा खोट्या लोकांचा निर्देश पॉलनेंच केला आहे. या अपॉसलांविषयीं डायाडोचीमध्यें एक सुंदर उतारा आहे. 'प्रत्येक अपॉसल हा तुमच्याकडे आला असतां त्याला तुम्हीं देवाप्रमाणें भजा पण तो जर एक दिवसापेक्षां जास्त दिवस एके ठिकाणीं वास करील तर तो खोटा आहे असें समजा.'

बिशपांचा उदयः—अपॉसल म्हणजे आद्य संप्रदायप्रचारक, वक्ते व उपदेशक यांमध्यें फारसा भेद दाखविता येत नाहीं. तथापि हे तीन वर्ग चर्चमध्यें होते. फार प्राचीन काळापासूनच पुष्कळ चर्चमध्यें कांहीं कामगारलोक नेमीत असत व दुसऱ्या शतकामध्यें आशियामायनरमध्यें बिशप म्हणजे धर्माध्यक्ष, प्रेसबिटेर व डीकन अशा तीन कायमच्या जागा अस्तित्वांत होत्या व यांचें काम अनुक्रमें चर्चच्या दानधर्माची व्यवस्था पहाणें, धार्मिक कृत्यांमध्यें अव्यवस्था असल्यास ती काढून टाकणें व पतित लोकांनां शिस्त लावणें हें होतें. अर्थातच हीं कामें ताब्यांत घेण्यासाठीं चर्चला धर्मप्रसारक, धर्मोपदेशक व धर्मशिक्षक यांची जरूरी भासली. पण हे लोक नेहमींच मिळत नसल्याकारणानें त्यांची जागा रिकामी पडल्यास दुसऱ्याला देण्यांत येत असे व अशा रीतीनें कायमचे कामगार नेमण्यांत येऊं लागले व क्रमाक्रमानें या कामगारांच्या ताब्यांत चर्चच्या सर्व चळवळी येऊं लागल्या. अर्थात या चर्चच्या कामगार मंडळाच्या ताब्यांतच सर्व सत्ता आली व या कामगारांवर पैशाची, शिस्तीची, व धर्माची व्यवस्था लावण्याची सर्व जबाबदारी येऊन पडली व नोकरशाही संप्रदायांच्या शासनसंस्थेंत पूर्णपणें प्रस्थापित झाली.

या चर्चचा सर्व अधिकार एकाच्या ताब्यांत होता कीं पुष्कळांच्या ताब्यांत होता हें नक्की सांगतां येत नाहीं. तरी पण जी कांहीं माहिती उपलब्ध आहे तीवरून दुसरेंच मत खरें असावें असें दिसतें. तरी पण ही पद्धत सार्वत्रिकच होती असें मात्र नाहीं. इमेशिअसच्या सूक्तामध्यें एकाच कामगाराच्या ताब्यांत चर्चची व्यवस्था असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे व त्याच्या हाताखालीं अनेक असल्याचा उल्लेख आहे. हीच व्यवस्था दुसऱ्या शतकाच्या अखेरीस सर्वत्र पसरली. ज्या चर्चमध्यें एक बिशप व पुष्कळ प्रेसबिटर व पाद्री असतील त्यावेळीं ते धर्मोपाध्याय धर्माध्यक्षाचें मंडळ असे व या धर्मोपाध्यायाच्या हाताखालीं पाद्री असत.

पण ज्ञेयवादाचा उदय व वाढ झाल्यावर दुसऱ्या शतकामध्यें चर्चची फार बिकट परिस्थिति झाली व चर्चमधील संघटनेवर त्याचा फार परिणाम झाला. या ज्ञेयवाद्यांचीं मतें ख्रिस्ती लोकांतील पुष्कळांनां गॉस्पेलवर घाला आणणारीं वाटलीं. हे ज्ञेयवादी लोक इतरांप्रमाणेंच आपल्याला ख्रिश्चन म्हणवून घेत त्यामुळें त्यांनां आपल्यांतून कोणत्या रीतीनें वगळता येईल याचा विचार करतां करतां कॅथोलिक चर्चची स्थापना करण्याची पहिली पायरी म्हणजे पॉल आणि त्याचे बारा अॅपासल्स यांची शिकवणूक मान्य करणें ही होय व हें जो मान्य करील तोच ख्रिश्चन होय असें ठरलें. याचा परिणाम नवा करार व दुसरे धर्मग्रंथ तयार करण्यांत झाला. ज्ञेयवादी आपल्याला देखील धर्मप्रसाराचा व उपदेशाचा पूर्ण हक्क आहे असें सांगत असत. त्याविरुद्ध धर्मप्रसारकत्वाचा खरेपणा ठरविण्यासाठीं दोन अटी घालण्यांत आल्या. तरी पण या दोन अटी अपुऱ्या पडल्या व त्यांच्यानें कार्यभाग झाला नाहीं. यासाठीं असें सांगण्यांत येऊं लागलें कीं

ॲपासलनीं आपला सर्व हक्क धर्माध्यक्षाच्या ताब्यांत दिला असून धर्माध्यक्ष हेच त्यांची शिकवणूक स्पष्ट व खरी सांगण्याला पात्र आहेत. हा वाद 'धर्मप्रसारकांच्या गादीच्या हक्काचा वाद' या नांवानें प्रसिद्ध आहे. अशा रीतीनें चर्च हें या अपॉसलच्या तत्वाच्या ताब्यांत जाऊन शिवाय त्या तत्वांचा प्रसार करण्यास नेमलेल्या कामगारांच्या ताब्यांत गेलें. ही कल्पना आणि संस्कारानी कल्पना या दोन्ही कल्पना एकत्र केल्या म्हणजे कॅथोलिक चर्चची पुरी कल्पना होते. चर्चच्या अस्तित्वाला बिशप कारणीभूत असून त्याच्या शिवाय अपॉसलचें तत्वसमजत नाहीं व त्यामुळें मोक्ष मिळणार नाहीं अशी या चर्चची रूपरेषा होऊन बसली.

प्रत्येक लहान अगर मोठया चर्चला बिशप हा असेच. व याचा निर्देश इग्नेशिअस व सायप्रियन यांनीं केला आहे. हीच पद्धति कित्येक वर्षे अमलांत होती. परंतु तिसऱ्या शतकाच्या मध्यास चर्चची सत्ता जास्त वाढत जाऊन व त्या मानानें बिशपाची ही सत्ता एका चर्चवर न राहतां अनेक चर्चोवर पसरल्यामुळें पूर्वीची बिशपची जागा धर्मोपाध्यायाकडे आली व बिशपची सर्व व्यवस्था यांच्याकडे आली. तरी पण बिशप याच्याप्रमाणें पूर्ण स्वातंत्र्य या धर्मोपाध्यायाला मिळालें नाहीं. फक्त तो बिशपाचा प्रतिनिधि या नात्यानें काम करीत असे; दीक्षा देण्याचा हक्क याला मिळाला नाहीं. अशा रीतीनें बिशपची सत्ता अनेक चर्चोवर चालू लागल्यामुळें त्याच्या हाताखालील चर्चमध्यें ऐक्य उत्पन्न होऊं लागलें व या एकीची कल्पना जास्तच वाढत जाऊन सर्व ख्रिस्ती जगांतील चर्चे एकत्र होऊन एक चर्च निर्माण झालें व चर्चला ख्रिस्ताचें शरीर असें मानण्यांत आलें व या चर्चमधील सर्व लोक परमेश्वराचे पुत्र आहेत असें मानण्यांत आलें. या ऐक्याचा अतोनात फायदा झाला. चर्चमधील आपापसांतील संघट्टण वाढत गेलें; एका चर्चमधील माणसें दुसऱ्या गांवीं गेली असतां तेथील चर्चकडून त्यांनां चांगली सहानुभूति मिळूं लागली; धर्मपुस्तकांचा झपाट्यानें प्रसार सुरू झाला व निरनिराळ्या भागांतील चर्चमधील वाढ एकाच पद्धतीनें होऊं लागली. दुसऱ्या शतकाच्या समाप्तीपूर्वी आशियामायनरमध्यें स्थानिक सभा भरत असत. तिसऱ्या शतकामध्यें प्रांतिक सभा भरूं लागल्या व निकेयाच्या मंडळानें त्या दोन वर्षांच्या अंतरानें भरत जाव्या असें ठरवलें. याहिपेक्षां मोठ्या सभा व सर्व पश्चिम यूरोपमधील धर्मसभा ही चवथ्या शतकांत अर्लसमध्यें भरली. ३२५ सालीं निकेया येथें अखिल ख्रिस्ती जगांतील चर्चनें धाडलेल्या प्रतिनिधींची सभा भरली या व अशाच इतर सभा सर्व बादशहाकडून बोलावल्या जात असत व त्यांत जे नियम ठरतील ते तो अमलांत आणीत असे. अशा रीतीनें चर्च ही राजाश्रित संस्था आहे अशी जी जुनी कल्पना तिचा येथेंहि प्रवेश झाला.

बिशप हे अपॉसलचे प्रतिनिधी असून त्यांनांच काय तो धर्माची गूढ तत्वें सांगण्याचा हक्क आहे असें जें ठरवण्यांत आलें त्यावरून हें उघडच सिद्ध होतें कीं सर्व बिशपांच्या मतांत एकी होती; पण हा समज चुकीचा आहे. त्यांच्यामध्यें पुष्कळ मतभेद होत असे व यांच्यामधील वाद मिटविण्यासाठीं एक सार्वत्रिक धर्ममंडळ अस्तित्वांत आलें व त्यांनीं अपॉसलचीं तत्वें अगदीं सत्य आहेत, त्यांत ढवळाढवळ करण्याचा कोणासहि बिलकुल अधिकार नाहीं असें जाहीर केलें.

या अखिल चर्चमधील ऐक्याचा परिणाम नगरपद्धतीच्या स्थापनेंत झाला. एका प्रांतांतील सर्व चर्चे एका बिशपाच्या ताब्यांत असून तो राजधानीमधील चर्चचा धर्माध्यक्ष असे व या पद्धतींत चर्चनें राजकीय विभागणीच्या पद्धतीचाच अवलंब केला. ही पद्धत पूर्वयूरोपमध्यें पूर्वीच अस्तित्वांत होती. पश्चिमयूरोपमध्यें मात्र ही पद्धत हळूहळू अमलांत आली. याच नगरपद्धतीचा विकास होऊन एकमेकालगत असणाऱ्या पुष्कळ प्रांतांतील चर्चचा संघ बनून त्या सर्व प्रांतांतील सर्वांत मोठ्या राजधानीच्या शहराच्या धर्माध्यक्षाच्या ताब्यांत बाकी सर्व चर्चे असावयाचीं अशी पद्धत निर्माण झाली. निकेयाच्या मंडळामध्यें अलेक्झांड्रियाच्या रोमच्या व अँटिओकच्या धर्माध्यक्षांची सत्ता पुष्कळ प्रांतांवर मानली गेली व दर बैठकींत आणखी कांहीं मुख्य मुख्य धर्माध्यक्षांनां सत्ता देण्यांत आली.

बिशपांत रोमच्या बिशपास प्रामुख्यः—पण या अवधींत रोमन धर्माध्यक्षांची सत्ता वाढत जाऊन तिचें पोपच्या सत्तेंत रूपांतर झालें. रोमच्या बिशपला अधिकाधिक अधिकार मिळत गेले याचें कारण रोमन बादशहा आपला सर्व धर्मविषयक पत्रव्यवहार रोमच्या बिशपांमार्फत करीत असत. यामुळें म्हणजे बादशाही अधिकाराच्या अंतेवासित्वामुळें रोमच्या बिशपला इतर बिशपांवर अधिकार मिळाला व सर्व ख्रिश्चन चर्चोवर त्यांनीं आपली सत्ता बजावण्याचा हक्क सांगण्यास सुरुवात केली व ५ व्या शतकांत पश्चिम यूरोपवर ती गाजवण्यास सुरवात केली. ही चळवळ आगस्टाइननें नेटानें चालविली व चर्च ही सर्वांत वरिष्ठ सत्ता आहे असें प्रतिपादन केलें. हें आगास्टिनचें तत्व पश्चिम यूरोपमध्यें मान्य झालें, व मध्ययुगांत चर्च हें निवळ मोक्षाच्या बाबतींतच नव्हे तर सर्व राजकीय व सामाजिक बाबतींत सत्ता गाजवूं लागलें.याच तत्वावर ऑगस्टिनच्या नंतर पोपची सत्ता स्थापित करण्यांत आली. देवाच्या खालोखाल रोमच्या धर्माध्यक्षाची सत्ता मानण्यांत येऊं लागली.

पूर्वकालीन चर्च हें रोमन साम्राज्याचें चर्च होतें. चवथ्या शतकापासून रोमन साम्राज्य सर्व बाजूंनीं पसरूं लागलें. तरी पण इराण अगर ॲबिसीनियामधील जीं चर्चे उदयाला आलीं तीं रोमन साम्राज्यामध्यें सामील झालीं नाहींत. वास्तव आपण त्यांचा विचार न करतां केवळ रोमन साम्राज्यांत

मध्ययुगीन चर्चेची स्थिति काय होती त्याचें ऐतिहासिक दृष्टीनें निरीक्षण करूं.

ज्याला आपण मध्ययुग म्हणतों त्यावेळीं लोंबार्ड, पश्चिमगॉथ, फ्रँक व अँग्लोसॅक्शन या लोकांनीं अनुक्रमें इटली, स्पेन, फ्रान्स व ग्रेटब्रिटन येथें आपलीं राज्यें स्थापन केलीं होतीं. ज्या आशियाखंडांतील व आफ्रिकेंतील प्रांतांवरील सत्ता पूर्वी अलेक्झांडरच्या हातांत होती ती नष्ट होऊन महंमदी सत्ता त्या प्रांतांवर या युगांत पसरलेली होती. तेव्हां अशा अनेक प्रचंड घडामोडींच्या युगांमध्यें चर्चची काय परिस्थिति होती हें पहाणें फार मनोरंजक होईल. या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी आपणाला हें लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे कीं, सर्व रोमन साम्राज्यान्तर्गत चर्चचा विचार यापुढें न करतां पूर्वयूरोपीय व पश्चिमयूरोपीय चर्चची स्वतंत्र रीतीनें परिस्थिति अवलोकन करणें अत्यावश्यक आहे. कारण या दोन्ही चर्चची वाढ अगदीं स्वतंत्र रीतीनें व विषमतेनें झाली.

पूर्वेकडील चर्चची स्थिति, (अ) पुराणमतवादी चर्च.— पश्चिमेप्रमाणें पूर्वेकडे पूर्व, प्राचीन व मध्ययुगांतील चर्चच्या परिस्थितींत फारसा बदल झाला नाहीं. कारण पूर्वेकडे रोमन साम्राज्य अजून अस्तित्वांत होतेंच. पूर्वकालीन चर्चमधील व्यवस्थाच हल्लींच्या चर्चमध्येंहि होती. बादशहाची सत्ता चर्चवर या युगांतहि होती हें त्याचें कारण नव्हे तर बादशहाची स्थिरता कायम होती व पुढें मुसुलमानी राज्य झालें हें होय. चर्चचा धर्माध्यक्ष हा स्वतंत्र नसून तो बादशहाच्या ताब्यांत होता.

कॉन्स्टंटाइनच्या कालानंतर झालेल्या चर्चच्या विकासाचें फळ म्हणजे पूर्वयूरोपीय चर्चचें पुराणमतवादित्व होय. मताबद्दलच्या झगड्यांत ग्रीक लोकांचें ज्ञानविषयक तत्व थोडें फार पटूं लागलें होतें व ज्ञानावरील विश्वास पूर्वयूरोपीय चर्चमधून अगदींच उडाला नव्हता. मध्ययुगाच्या सुरवातीस ग्रीक लोकांमध्यें इतर राष्ट्रांपेक्षां ईश्वरविषयक ज्ञानाचा व इतर ज्ञानाचा फार प्रसार झाला होता व या कालीं पश्चिमयूरोपमध्यें असा एकहि मनुष्य नव्हता कीं जो ज्ञानाच्या व कलाप्रावीण्याच्या बाबतींत फोटियसबरोबर स्पर्धा करूं शकला असता; परंतु ७ व्या शतकाच्या अखेरीस हा मताविरुद्ध चाललेला लढा शेवटास गेला. या वादविवादानंतर क्रीड व तत्वें निश्चित झालीं व तीं कायम ठेवणें हें आतां जरूरीचें होतें; ईश्वरविषयक ज्ञानाच्या शास्त्राचें काम पूर्वीच्या प्रमाणग्रंथाचें एकीकरण करून पुनः तें स्पष्ट लोकांपुढें मांडणें एवढेंच काय तें शिल्लक राहिलें. जॉन ऑफ डमॅस्कसनें इ. स. ६९९-७५३ मध्यें अशा प्रकारचा प्रयत्न केला. त्यानंतर युयेमिअस वगैरेंनीं अशाच धर्तीवर थोडे फार प्रयत्न केले व अशा प्रकारच्या प्रमाणभूत ग्रंथाच्या आधारें बनविलेल्या तत्वांना मानहि मिळूं लागला. तरी पण यांच्यापेक्षांहि धार्मिक वृत्तीचे लोक देवाच्या पूजेच्या प्रकारांना जास्त मान देऊं लागले व अशा प्रकारच्या पूजेमुळें आपल्याला ईश्वराची प्राप्ति लवकर होते अशी कल्पना त्यांच्या मनांत येण्याबरोबर त्यांनीं सर्व उत्साह या कामाकडे लावला; व ग्रीकमधील मोठमोठ्या विद्वानांचीं मनें या मूर्तिपूजेवरील वादविवादाकडे आकर्षिलीं गेलीं. हा वाद एक शतकपर्यंत चालून शेवटीं मूर्तिपूजेचें तत्व पूर्णपणें मान्य झालें. मूर्ति ही केवळ साधन अगर दृश्य चिन्ह नसून प्रत्यक्ष परमेश्वरच सगुणरूपानें या मूर्तींत अवतरला आहे अशी त्यावेळची भावना होती. ख्रिस्ताची मूर्ति केल्याशिवाय ख्रिस्ताचें दृश्य स्वरूपांत आपल्याला दर्शन मिळावयाचें नाहीं अशी त्यांची श्रद्धा होती. यामुळें मूर्तिपूजा अधिकच भरभराटीस आली. अशा प्रकारच्या कल्पना पसरल्यामुळें अर्थातच परमार्थविद्येचें मुख्य कार्य म्हणजे या मंत्रतंत्रांचा पूर्ण परिचय करून देणें हें झालें. पांचव्या शतकामध्यें एका ख्रिस्ती मनुष्यानें या कामाला सुरवात केली; त्या नंतर मॅक्सीमस कनफेसर (मृत्यु ६६२), सीमियन (मृत्यु १०४०) व निकोलस कॅबे सिलॅास (मृत्यु १३६१) वगैरे विद्वान या मांत्रिकतांत्रिक पद्धतीचे प्रतिनिधी होते. त्यांची महत्वाकांक्षा साक्षात्कार करून घेण्याची होती.

ही साक्षात्काराची तळमळ या मध्ययुगीन वैराग्य वृत्तीमधील एक विशेष होय. ५–६ व्या शतकामध्यें ईजिप्शियन पॅलेस्टाईन हें साधू व मठ यांचें आश्रयस्थान होतें. परंतु अरब स्वारीमुळें ख्रिस्ती जगाचा व याचा जेव्हां संबंध तुटला तेव्हां अर्थातच ही वैराग्यवृत्ति लोपली. मध्ययुगांत कॉन्सांटिनोपल व माउंट एथॉस यांनां बरेंच महत्व प्राप्त झालें. ग्रीसमध्यें ईश्वराला शरण जाणें व विरक्ति प्राप्त करून घेणें हीं दोन्हीं निश्रेयसाला अवश्य आहेत, असें मानलें गेलें.व अशा रीतीनें या वैराग्यवृत्तीला एकप्रकारचें गूढत्वाचें वळण लागलें.सिमिऑनचीं जीं तत्वें 'दिन्यूथिऑलॉजियन मध्यें ग्रथित केलीं होतीं तीं या मठांमध्यें प्रसृत झालीं व हेसिचॅस्टसनें १४ व्या शतकांत या सिमिऑनच्या तत्वावरून साक्षात्काराबद्दलचे एक सिद्धांतरूप मत प्रतिपादन केलें; व पुष्कळ वादविवादानंतर, ईस्टर्न चर्चनें त्याचा अंगिकार केला. सारांश या पूर्वेकडील चर्चनें मध्ययुगांमध्यें पूर्वीचेंच रूप कायम ठेवलें. पश्चिमेकडील चर्चप्रमाणें या चर्चमध्यें कोणताहि फरक घडून आला नाहीं. फक्त पूर्वीचींच मतें त्यांनीं निराळ्या स्वरूपांत पुढें ठेवून त्यांचा प्रसार केला. व अशा रीतीनें सर्व दिशेनें या मतांचा विकास झाला. यावरूनच हें पूर्वेकडील चर्च जिवंत होतें असें सहज कळून येईल. या चर्चचा विस्तार सारखा होऊं लागला. या मध्ययुगाच्या सुरवातीला. रशियन या सामान्य जातिनामाखालीं येणारीं बल्गेरिअन, सर्व्हिअन वगैरे अनेक लोकांचीं राष्ट्रें उदयाला आलेलीं होतीं व पूर्वेकडील चर्चला प्रयत्नांतीं हे सर्व लोक मिळाले; ग्रीकांच्या नंतर येणाऱ्या

लोकांत व या रशियन लोकांत कोणतेंहि साम्य नव्हतें. तरी पण त्यांच्यामध्यें ग्रीक धर्म व त्यांच्या भावना या अजूनहि दृष्टीस पडत होत्या. यावरून ग्रीक लोकांमध्यें परकीय तत्वें देखील आपल्यामध्यें शोषून घेऊन जिरवून टाकण्याची किती शक्ति होती हें दिसून येतें. याचा एक परिणाम असा झाला की, पूर्वेकडील चर्चचा पश्चिमेकडील चर्चशीं मिलाफ घडून आलाच नाहीं. दोघांनाहि हा वियोग इष्ट नव्हता पण पूर्वेकडील व पश्चिमेकडील चर्चची वाढ भिन्नभिन्न मार्गानें होत असल्याकारणानें त्याला इलाजच उरला नाहीं. कॉन्स्टांटिनोपल पडल्यापासून मात्र पूर्वेकडील चर्चमधील जो जिवंतपणा होता त्याला थोडा धक्का बसला.

(आ) नेस्टोरियन व एकप्रकृतीत वादाचा पुरस्कार करणारीं चर्चेः—जेव्हां पूर्व सीरियामधील चर्चनें सीरीयन वेदांत्यांनीं सांगितलेल्या—अर्थात नेस्टोरियनच्या शिक्षणपद्धतीला व तत्वाला चिकटून रहाण्याचें ठरवलें त्याच वेळेस पश्चिम सीरिया, ग्रीक व लॅटिन देशांत चर्चशीं त्याचा विरोध येऊन तें निराळें झालें, तरी पण त्याची सत्ता कमी झाली नाहीं. उलट त्यानें अपला मोर्चा पर्शियन चर्चकडे वळविला. पर्शियन चर्चनें कांहीं एक विरोध केला नाहीं व बाबीयसच्या (४९८–५०३) कारकीर्दीपासून पर्शियन चर्च हें नेस्टोरियन बनलें. तसेंच अरबी खिश्चन लोक व मध्यआशियामधील लोक यांनीं देखील नेस्टोरियन चर्चशीं संबंध ठेवला. नेस्टोरियन तत्वज्ञांनीं व वैद्यांनीं मध्य युगांमध्यें पुढें जे तत्वज्ञ उदयाला आले त्यांनां शिकविलें व मध्ययुगीन तत्वज्ञांनीं ग्रीक तत्वांचा सीरियन भाषेतील भाषांतरावरून अभ्यास केला.

मध्ययुगामधील राजकीय परिस्थितीमुळें नेस्टोरियन चर्चला अनुकूल परिस्थिति येऊन, अरब लोकांनीं ईजिप्त, पॅलेस्टाईन, सीरिया हे प्रदेश जिंकल्यामुळें तेथील ख्रिस्ती चर्चवर नेस्टोरियन चर्चनें आपलें वर्चस्व स्थापन केलें. याहीपेक्षां महत्वाचा फायदा हा झाला कीं, यामुळें मध्यआशिया व आत्यंतिक पूर्वेकडील देश यांच्यामध्यें दळणवळण वाढूं लागून नेस्टोरियन लोकांनां चीनमध्यें जावयास मार्ग मिळाला. सि गॅं फं (इ. स. ७८१) च्या शिलालेखावरून या देशांत नेस्टोरियन चर्चनें ख्रिस्ती विचाराचा केवढा प्रसार केला होता हें दिसून येतें. तसेंच दक्षिण सायबेरियामध्यें व मंगोलियामध्येंहि यांचा प्रवेश झाला होता. या प्रत्येक देशांत ख्रिस्ती धर्माला पुष्कळच अनुयायी मिळाले. तेराव्या शतकाच्या आरंभीं मंगोलियन साम्राज्य प्रस्थापित झाल्यानें नेस्टोरियन चर्चच्या सत्तेला कांहीं अडथळा आला नाहीं. परंतु मंगोलियन साम्राज्यास उतरती कळा लागून इस्लामी सत्ता उदयाला येत असतां इस्लामधर्मानें सर्व सत्ता बळकावली. परंतु नेस्टोरियन चर्चपेक्षां देखील एकप्रकृतिकवादाचा पुरस्कार करणाऱ्या चर्चला या मध्ययुगामध्यें फार वाईट दिवस आले. ईजिप्तमध्यें हा धर्म जास्त प्रचलित होता व सीरियामध्यें देखील थोडा फार पसरलेला होता. एडेसाच्या जाकोबमुळें ह्या धर्माचा रोमनचर्चपासून बचाव झाला व एवढ्याचसाठीं त्या धर्माच्या अनुयायांनीं आपल्याला जाकोबाइट्स असें म्हणून घेतलें. या रोमन चर्चच्या जुलुमापासून अरब सत्तेनें ६३५ नंतर सुटका केली व हें चर्च तसेंच जिवंत राहिलें. पुढें त्याची फारशी भरभराट झाली नाहीं. ईजिप्तमधील या धर्माच्या चर्चची अशाच स्थिति झाली. ६४१ मध्यें या ठिकाणीं देखील या धर्माची रोमन चर्चच्या जुलुमापासून अरब सत्तेनें सुटका केली पण या चर्चची देखील व्हावी तशी वाढ झाली नाहीं व या धर्माचे अनुयायी कॉप्टिक लोक यांची उत्तरोत्तर कमी संख्या होऊं लागली. १५१७ मध्यें टर्कीसत्तेचा उदय झाल्यावर या धर्माचे अनुयायी फारच कमी झाले होते व १८२० सालीं या अनुयायांची संख्या केवळ ६०,००,००० च होती. ॲबिसीनियामध्यें मात्र या कॉप्टिक चर्चनें आपला धर्म जिवंत ठेविला.

पश्चिमेकडील चर्च (अ) मध्ययुगाचा आरंभ कालः—पूर्वेकडील चर्चनें जरी मध्ययुगांत पूर्वीच्याच धर्मतत्वांनां चिकटून कांहीं कांहीं सुधारणा केल्या तरी पण पश्चिमचर्चला मात्र एका अतिशय भयंकर क्रांतीशीं झगडावें लागलें. ६ व्या शतकाच्या अखेरीस ख्रिस्ती जगाचे निरनिराळे प्रांत अलग होऊन त्यांनीं आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं होतीं व त्यांमध्यें जर्मनवंशीय लोकांची सत्ता बलाढ्य होती व त्यांत जर्मन रक्ताचींच राष्ट्रें पुष्कळ होतीं. फक्त रोमच्या ताब्यांत असलेला जर्मनीचा भाग व ईंग्लंड यांमध्यें मात्र टयूटन शाखेचें साम्राज्य होतें. इतर राज्यांमध्यें मात्र रोमन सत्तेनें या जर्मनवंशीय सत्तेला व्यापून आत्मसात् केलें. लॉंबार्ड, पश्चिमगॉथ, स्वाबियन, फ्रँक वगैरे जातींचे लोक हे रोमन संस्कृतीचे पूर्ण अभिमानी बनलेले होते. तरी पण या ख्रिश्चन चर्चला थोडा फार धक्का बसला यांत शंका नाहीं. जर्मन स्वाऱ्यामुळें यूरोपच्या इतिहासाच्या प्रवाहाला जरी अडथळा आला तरी पण त्यायोगानें ख्रिस्ती चर्चच्या प्रसाराला अडथळा आला नाहीं. फक्त ब्रिटनमध्यें मात्र ख्रिस्ती धर्माला अगदीं पश्चिमभागांत जावें लागलें व ऱ्हाईन व डान्यूब या नद्यांच्या प्रदेशांत कांहीं चर्चें बुडालीं. तरी पण यांचें फारसें महत्व नाहीं. कारण पुनः चर्चनें गमावलेला प्रांत काबीज करण्याचा निश्चय केला. मध्ययुगाच्या आरंभींच्या व मागील युगाच्या शेवटच्या काळाच्या सरहद्दीवर चमकणारी व्यक्ति ग्रेगरी ही होय. यानें ऑगस्टिन नांवाच्या साधूला इंग्लंडला पाठविलें व तेथील ॲंग्लो सॅक्सन लोकांचीं मनें ख्रिस्ती धर्माकडे वळविण्यास सांगितलें; व त्याच्या परिश्रमानें इंग्लंडमध्यें ॲंग्लो-सॅक्सन चर्चची स्थापना होऊन ख्रिस्ती धर्माचा प्रसार होऊं लागला. यूरोपमध्यें इतर ठिकाणींहि फ्रँकांची सत्ता वाढल्यामुळें ख्रिस्तीधर्म हा अधिकाधिक प्रसृत होऊं

लागला. पूर्वीच्या सर्व लुप्तप्राय झालेल्या चर्चची पुनः स्थापना होऊन बिशप नेमण्यांत आले इतकेंच नव्हे पण फ्रान्सनें मेन नदीच्या दोन्हीं बाजूला आपल्या वसाहती केल्यामुळें ख्रिस्तीधर्म खुद्द जर्मनीच्या मुलुखांत पसरला नाहीं. सरते शेवटीं स्वेबियन व बव्हेरियन लोक ताब्यांत आल्यावर फ्रेंचांनीं त्याहि मुलुखांतून ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला. या कामांत सेल्टिक मिशनऱ्यांनींहि फ्रेंचांनां मदत केली. इंग्लंड-मध्यें जुनीं ब्रिटिश व नवीं अँग्लो सॅक्सन चर्चें यांची दोस्ती जमली नाहीं. तरी पण सेल्ट लोकांनीं ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठीं जिवापाड श्रम केले व त्याबद्दल सर्व यूरोपखंडानें त्यांचें ऋणी राहिलें पाहिजे. सारांश मध्ययुगाच्या आरंभींचें पहिलें शतक संपण्याच्या पूर्वी ख्रिस्ती चर्चनें आपला पूर्वीचा सर्व प्रदेश मिळविला एवढेंच नव्हे तर आणखी दुसराहि मिळविण्यास सुरवात केली होती.तरी पण हें करतांना ख्रिस्ती धर्मानें आपलें जुनेंपण कायम टेवन त्यांत थोडेफार फेरफार केले होते. चर्चचें क्रीड (तत्वें, उद्देश) व मतें हीं पूर्वी-प्रमाणेंच कायम होतीं. पुराणकालीन चर्चनें जीं धोरणें आंख-लेलीं होतीं व जीं मतें प्रतिपादलीं होतीं तीं पूर्ण असून त्यांत फेरफार करण्याचें कांहींच कारण नाहीं असें ठरलें. उपास-नेचा प्रकार देखील अबाधितच राहिला. लॅटिनभाषा लोकांनां कळत नव्हती तरी देखील मंत्रतंत्रांमध्यें व प्रार्थनेमध्यें तीच भाषा ठेवली. चर्चची संघटना देखील पूर्ववतच होती व चर्चचें उत्पन्न व त्याचा दर्जा हीं देखील पूर्वीप्रमाणेंच राहून ख्रिस्ती मनुष्यानें आपलें जीवित पूर्ण करण्यास वैराग्य वृत्ति धारण केली पाहिजे हें पूर्वीचें तत्वहि जसेंच्या तसेंच राहिलें. तथापि जे कांहीं नवीन बदल करण्यांत आले त्यांचा चर्चवर बराच परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

रोमीचर्चच्या एकत्वास विघातक परिस्थितीचीं अंगें:--अँग्लो सक्सन व सेल्ट प्रचारकांतील द्वैत मागें सांगितलेंच आहे. लोंबार्ड, गॉथ, अँग्लो-सॅक्सन चर्च हीं आपल्याला कॅथोलिक म्हणवून घेत असत. परंतु कॅथोलिक चर्चची स्थिति फार बदललेली होती. तिच्यामध्यें संघटनेचा अभावच होता व त्यामुळें सार्वजनिक स्वरूप लयाला जाऊन त्याचें स्थानिक चर्चांत रूपांतर झालें होतें व सार्वत्रिक चर्चच्या बैठकीहि होत नव्हत्या. रोमच्या धर्माध्यक्षाला प्रत्येक चर्च जरी मान देत असे, तरी रोमच्या धर्माध्यक्षाचा इतर स्थानिक चर्चवर कोणताहि कायदेशीर हक्क राहिला नव्हता.

आर्थिक अधिकार आणि तात्विक अधिकारः—मतांतर आर्थिक स्थितीचा परिणाम व्हावयाचाच. ज्याचा पैसा त्याचें मत परिणामकारी व्हावयाचें हें सहज आहे. राजाचा अधिकार प्रत्यक्ष चर्चच्या तत्वावर जरी चालत नसला तरी एकंदर अंतर्बाह्य व्यवस्थेवर चालत होता. राजाच्या संमतीशिवाय कोणत्याहि बिशपची निवड होत नसे. स्थानिक धर्माध्यक्षांच्या एकत्र सभा होत असत व या सभा राजाच्या संमतीनें बोलावण्यांत येत होत्या व त्यांनीं केलेले ठराव राजा अंमलात आणीत असे.

अशा स्थितींत धर्मसभेच्या अधिकारांत राजाचा अंश असल्या मुळें त्यांत जर्मन परिस्थितीचा परिणाम कसा झाला हें सहज दिसून येईल. ख्रिस्ती जगांमध्यें सर्व चर्चें व त्यांची मालमत्ता ही धर्माध्यक्षांच्या ताब्यांत असे. पण जर्मन देशांत मात्र त्या त्या गांवचे सरदार हे त्या त्या गांवांतील चर्चचे मालक म्हणून समजण्यांत येऊं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, ते सरदार लोक उपाध्याय नेमण्याबद्दलचा आपला हक्क सांगूं लागले व त्या चर्चवरील उत्पन्नावरची मालकी दाखवूं लागले. कांहीं कांहीं चर्चचा हक्क त्यांनां मिळाला व ज्यांनां तो हक्क मिळाला त्यांनीं आपापले धर्माध्यक्ष निव-डले. हा जो फेरफार जुन्या चर्चच्या संघटनेंत झाला तो ख्रिस्ती चर्चमध्यें जें जर्मन वर्चस्व झालें त्याचा पहिला महत्-त्वाचा परिणाम होय व तोच आजवर चालूं असलेला दृष्टीस पडतो.

इंग्लंडची ख्रिस्ती इतिहासांत कामगिरी—मध्ययुगाच्या चर्चमध्यें सुधारणा करण्याचें काम प्रथमतः इंग्लडांत सुरू झालें. मध्ययुगांतील ख्रिस्ती वाङ्मयाचें व तत्वज्ञानाचें माहेरघर इंग्लंड होतें. ॲलडेलम (मृत्यु ७०९) व बीड (मृत्यु ७३५) हे या युगांतील पहिले विद्वान होते. विन फ्रिड बोनीफॅटियस (मृत्यु ७५७) हा इंग्लंडमध्येंच जन्मला. तो मुख्यतः मिशनरी म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु मध्यजर्म-नींतील लोकांनां ख्रिस्ती बनवणें हें जें काम त्यानें केलें तें त्याचें अगदींच कमी महत्वाचें काम आहे. याहीपेक्षां त्याची कामगिरी म्हणजे त्यानें केलेली बव्हेरियाच्या व फ्रान्सच्या चर्चांची पुनर्घटना ही होय. तसेंच इंग्लंडमधील धार्मिक वाङ्मयहि त्यानेंच प्रथमतः जर्मनीमध्यें नेलें.

फ्रान्सची कामगिरीः—अशा रीतीनें विनफ्रिडनें तयार केलेल्या पायावर पिप्पीन आणि शार्लमेन यांनीं आपली इमा-रत बांधली. शार्लमेननें महत्व त्यानें चर्चची सत्ता इतर प्रदेशावर वाढवली यांत नसून त्यानें फ्रेंच चर्चाला धर्मप्रसा-राचें काम व जबाबदारी ओळखावयास लावून तें करावयास लावलें यांत आहे. धर्मासंबंधींचे जे नियम त्यानें अमलांत आणले त्यांचा हेतू हाच होता. उपाध्यायांनां त्यानें लोकांना मनापासून शिकवण्यास व धर्मज्ञान देण्यास सांगितलें व धर्माध्यक्षांनां धर्मगुरूंवर चांगल्या प्रकारें देखरेख करण्यास सांगितलें. तसेंच उत्तम प्रकारचें धार्मिक वाङ्मय उत्पन्न करून चर्चची कामगिरी करण्याचेंहि काम वृद्धिंगत होऊं लागलें.

या कल्पना तडीस नेण्यासाठीं शार्लमेननें आपल्या पदरीं अनेक विद्वान लोकांचा संग्रह केला. सर्वांत ॲलक्युइन (मृ. ८०४) हा अँग्लोसॅक्सन विद्वान त्याचा विशेष सह-कारी होता. पण त्याशिवाय जोसेफस्कॉट्स व डंगल हे

सेल्टिक विद्वान, पॅालीनास व पॉलस डायाकोनस हे लॅाबार्डियन विद्वान व इतर फ्रेंच विद्वान हे देखील त्याचे सहकारी होते वे यांच्या देखरेखीखालीं तत्वज्ञानाची भरभराट झाली. त्यांत विशेष नावीन्य होतेंच असा भाग नाहीं. परंतु नवीन स्वरूपांत मात्र पूर्वीचेंच वाङ्मय लोकांपुढें मांडण्यांत आलें. तसेंच पूर्वेकडील चर्चमध्यें व या चर्चमध्यें मूर्तिपूजेवर जो वादविवाद झाला त्यावरून ह्या लोकांनां आपलें तत्वज्ञान ग्रीकाइतकेंच उच्च दर्जाचें आहे असें वाटत असावेंसें दिसतें व हें खरेंहि होतें.

खिस्ती संप्रदायाची प्राचीन जर्मन पांडित्याकडून सेवा.—या फ्रेंच विद्वांनांनंतरच्या दुसऱ्या पिढीनेंहि आपली कामगिरी योग्य तऱ्हेनें बजावली. रॅबॅनस हा विद्वत्तेमध्यें ॲलसुईनपेक्षां देखील श्रेष्ठ होता. जर्मनीचा हा पहिलाच तत्वज्ञ होता. स्ट्रॅबो नांवाच्या त्याच्या शिष्यानें ‘ग्लासा ऑर्डिनेरिया ’ नांवाचा ग्रंथ लिहिला व तो बायबल वरील एक प्रमाणग्रंथच या मध्ययुगामध्यें झाला.

फ्रान्समध्यें तर पुष्कळच विद्वान झाले. त्यांपैकीं मुख्य मुख्य असे हिंकमार (मृत्यु. ८८२), प्रुडेन्शस (मृत्यु. ८६१), सर्हेटसलपस (मृत्यु. ८६२), व आणखी कांहीं होत. या सर्व लोकांची प्रवृत्ति बायबलमधील विचारांची पुनरावृत्ति करण्याकडे दिसून येत असे. तरी पण त्या शतकामध्यें हिंकमार व गॉट सचॅाक यांमध्यें पुनर्जन्मासंबंधीं जो वादविवाद झाला त्यावरून त्या काळांत देखील बरेच बुद्धिमत्तादर्शक वादविवाद होत असत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रोमच्या धर्माध्यक्षांच्या मदतीनें धर्मासंबंधीं नियम ठरविण्यांत शार्लेमेननें आपल्या बापाचा कित्ता गिरवला यांत शंका नाहीं. त्यानें पिप्पिनची देणगी पुनः सुरू केली. ॲड्रिनय पोपपासून ‘ डॅायोनिसो ॲड्रियाना ’ नांवाचें धर्मनियमावरील ग्रंथभांडार मिळविलें. परंतु८०० नंतर रोमवर देखील फेंच साम्राज्य प्रस्थापित झाल्यावर सुद्धां फ्रेंच धर्मनियमांमधील ट्युटॉनिक वृत्तीची छटा अद्याप नष्ट झाली नव्हती. शार्लेमेननें साम्राज्य स्थापन केल्यामुळें रोमच्या धर्माध्यक्षाला फ्रँकांच्या राजधानींत रहावें लागे.

याला विरोधी अशा थोड्याफार चळवळी चालू होत्या, हें ९ व्या शककांत धर्मनियमांचा भंग केल्याबद्दल जे कांहीं खटले झाले त्यावरून दिसून येतें. परंतु ही चळवळ यशस्वी झाली नाहीं. परंतु याहूनहि महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे, पूर्वस्थितीची व पूर्वकालीन हक्काची रोमला जाणीव होऊं लागली ही होय. लिओ, गेलॅशिअस, ग्रेगरी यांच्या कल्पनांचा विकास करून निकोलस (८५८–६७) यानें रोमच्या धर्माध्यक्षाचा ईश्वरदत्त हक्क व अमर्यादित सत्ता यांचें सुंदर चित्र रंगविलें व त्यासाठीं खटपट केली पण अद्याप पोपच्या सार्वत्रिक सत्तेचा काळ यावयाचा होता. कारण जरी शार्लेमेनची सत्ता हळू हळू लयाला जाण्याच्या मार्गाला लागली होती तरी पण रोमच्या पक्षभेदांत धर्माध्यक्ष गुंतल्यामुळें धर्मसत्तेला एकप्रकारचें नादान स्वरूप प्राप्त होऊन ही सत्ता लयाला जाते कीं काय अशी भीति वाटूं लागली.

(आ) मध्ययुगांतील मध्यकाल व रोमन धार्मिक सत्तेचा कळस, राजनियुक्त धर्माध्यक्षः—सॅक्सनींचें घराणें राज्यारूढ झाल्यावर स्थानिक धर्माध्यक्ष नेमण्याची चर्चेची पद्धति जोरानें अमलांत आली. ९६३ त जर्मन राजाशीं ऑटोचा जो सलोखा जडला त्यामुळें रोममधील पद्धतीशीं जर्मन स्थानिक पद्धतीचा संसर्ग होऊं लागला. पण त्यायोगानें एकमेकांमध्यें केव्हांना केव्हां तरी खटका उडणार हें उघडच दिसूं लागलें; व हा विरोध धर्माध्यक्षाच्या जागेच्या निवडणुकीच्या बाबतींत दिसूं लागला. रोममध्यें धर्मनियमाप्रमाणें धर्माध्यक्ष निवडण्याची पद्धत होती. तर जर्मनींत राजानें धर्माध्यक्ष निवडण्याची पद्धत होती. धर्माध्यक्ष [illegible] निवडलाच जात असे. परंतु राजा जो धर्माध्यक्ष निवडून येईल त्याला एक आंगठी व दंड हे देत असे व अशा रीतीनें आपली संमति दाखवीत असे, व यांत वास्तविक गैर कांहींच नव्हतें.

जर्मनींत अमलांत असलेली ही पद्धत रोममध्येंहि अमलांत आली. अकराव्या शतकांतील रोमच्या धर्मसत्तेची फार विलक्षण पेंचाची स्थिति होऊन तिसऱ्या हेनरीला त्यामध्यें आपलें लक्ष घालावें लागलें. ज्यावेळीं धर्माध्यक्षाच्या जागेसाठीं तिघा उमेदवारांमध्यें तंटे सुरू झाले त्यावेळीं हेनरीनें या तिघानां ही धर्माध्यक्षाची जागा न देतां सुइडगर नांवाच्या बॅंबर्गच्या धर्मगुरूला धर्माध्यक्ष नेमलें व तें जर्मनींमधील पद्धतीला अनुसरून नेमलें, व हाच नियम पुढें प्रस्थापित झाला. हेनरीनें धर्माध्यक्ष निवडण्याची सत्ता आपल्या ताब्यांत घेतली व दुसऱ्या क्लेमेंट नंतरच्या धर्माध्यक्षांनां त्यानें नेमलें. अशा रीतीनें तो मध्यें पडल्यामुळें रोमची धर्मसत्ता संकटांतून बचावली. कारण त्यानें नेमलेल्या धर्माध्यक्षांमध्यें लिओ(नववा)सारखे चांगले सदाचरणी व उदार लोक होते व पूर्वे धर्माध्यक्षांप्रमाणें त्यांनीं वाटेल तसा अधिकार न गाजवितां मोठ्या विचारानें आपला हक्क बजाविला. अशी जरी स्थिति होती तरी पण हेनरीनें ही जी पद्धत अमलांत आणली ती फार वेळ टिकणेंच शक्य नव्हतें.

धर्माध्यक्षावरील राजकीय सत्तेचा संकोचः—पुढें लवकरच जी सुधारणेची चळवळ सुरू झाली तिची मुळें फार मागील काळांत रुजलेली होतीं. मागें सांगितलेंच आहे कीं शार्लेमननें आपल्या पदरीं निरनिराळ्या विद्वान साधूंनां आणून ठेवलें हा त्याचा प्रयत्न स्तुत्य होता पण यामध्यें साधूंचें व भिक्षूंचे जें वैराग्याचें ध्येय तें यामुळें कमी होत चाललें. पुष्कळ काळपर्यंत या शार्लेमेनच्या पद्धतीविरुद्ध चळवळ झाली नाहीं. पण ८०१ मध्यें बेनिडिक्टनें पूर्वीचीं भिक्षूंची ध्येयें शिकवून अमलांत आणण्याचा प्रयत्न केला. तदनंतरच्या शतकांत

क्लुनी येथील बर्गेडियन मठांमध्यें ही चळवळ फार फैलावली. व या मठामध्यें जी कर्तृत्ववान भिक्षूंची परंपरा निर्माण झाली तीमुळें ही चळवळ फ्रेंच मठांमध्येंहि पसरूं लागली अशा रीतीनें पुनः पूर्वीचीं ध्येयें स्थापित झालीं. क्लुनीच्या मठाला अनेक मठ जोडले गेले व यामुळें त्यांनीं पूर्वीच्या धर्माध्यक्षाच्या सत्तेला झुगारून दिलें. अशा रीतीनें क्लुनीच्या मठाचें महत्त्व वाढूं लागलें असतांना अशाच प्रकारच्या सुधारणेच्या चळवळी दुसरीकडेहि होऊं लागल्या व थोडक्याच काळांत या क्लुनीच्या मठाची सत्ता इटलीमध्यें जाणवूं लागली. या मताचा प्रतिपादक जर्मनीमध्यें पाप्पो (मृत्यु. १०४८) हा होता. व इंग्लंडमध्यें डन्स्टन हा होता. प्रथमतः या चळवळीचें लक्ष धार्मिक बाबतींत जीं कारस्थानें चाललीं असतात. तिकडे लागलें नव्हतें, पण धर्माचे कायदे धाब्यावर ठेवून जे अनाचार पाद्र्यांकडून केले जात ते कळून आल्यावर त्यांनीं तिकडे लक्ष्य देण्यास सुरुवात केली. 'धर्माच्या नियमाप्रमाणें वागा ' असा जिकडे तिकडे ध्वनि ऐकू येऊं लागला. सारांश या सुधारणेच्या चळवळीमुळें राजाच्या अधिकारापासून चर्चची सुटका, चर्चच्या मालमत्तेचें पुनश्च संपादन, व धर्माध्यक्षांची पूर्ववत सत्ता हे तीन महत्वाचे परिणाम घडून आले.

परंतु या नवीन चळवळीचा पुराणमतवाद्यांशीं विरोध आला. परंतु प्रत्यक्ष नववा लिओ हा सुधारणेला अनुकूल असल्यामुळें, हिलेब्रँट हंबर्ट वगैरेंच्या सहाय्यानें त्यांचीं तत्वें रोममध्यें प्रस्थापित झालीं. परंतु या सुधारणा अमलांत आल्यावर लगेच तंटया बखेडयास सुरुवात झाली व पहिला तंटा आज्ञापत्राच्या विक्रीसंबंधानें झाला.

आरंभीं सायमनी याचा अर्थ आज्ञापत्राची विक्री एवढाच होता. नवव्या शतकामध्यें कोणतीहि धर्मसंबंधींची वस्तु असा विस्तृत अर्थ करण्यांत आला. जमीनीच्या मालकांनीं चर्चेस अथवा त्यांतील अधिकाऱ्यांच्या जागा विकल्या अगर राजांनीं धर्माध्यक्षांच्या जागा अगर मठ यांची विक्री केली तरी कांहीं लोकांनां ही एक सायमनीच वाटूं लागली. यासाठीं अकराव्या शतकांत यांहि पेक्षा अधिक विस्तृत अशी व्याख्या करण्यांत आली व राजानें धर्मखात्यांतील जागा मनास वाटेल त्यास देणें अगर एखाद्या बड्या इनामदारानें याबाबत पैसे घेणें ही एका प्रकारची सायमनीच मानण्यांत आली. प्रथमतः चर्चनें या बड्या इनामदारांकडे लक्ष दिलें नाहीं तर वाटेल त्याला बिशप अगर धर्माध्यक्ष करण्याचा जो राजाला हक्क होता, त्याच्यावरच प्रथम हल्ला करण्यास प्रारंभ केला. १०५९ त नव्या तत्वाप्रमाणें दुसऱ्या निकोलसचीं, सुधारणेला अनुकूल अशा पोपला निवडण्याचीं लक्षणें दिसत होतीं. १०७८ त सातव्या ग्रेगरीनें अशा प्रकारच्या पोपच्या निवडणुकीला हरकत केली. यानंतर जे बखेडे झाले त्यांत ग्रेगरीचा उद्देश थोडा फार उच्च प्रकारचा होता.त्याची इच्छा म्हणजे पोपच्या हातांत सर्व धार्मिक सत्ता देऊन परमेश्वरी सत्तेच्या खालोखाल जगावर पोपची सत्ता चालविण्याची होती. हीच इच्छा आगस्टिनचीहि होती परंतु ती साध्य झालेली पहाण्याचें ग्रेगरीच्या नशीबीं नव्हतें. ११११ त या बखेड्याचा निकाल लागला व त्या निकालान्वयें त्याच्या सत्तेचे ऐहिक व धार्मिक असे दोन भाग केले. परंतु हें तत्व व्यवहारांत आणणें कठिण होतें व याच्यावर अनेक वादविवाद व भांडणें होऊन शेवटीं ११२२ त 'कंकार्डेट ऑफ वर्म्स ' नें या प्रश्नाचा निकाल समेटानें झाला. त्याचा सारांश असा कीं राजानें बिशपची धर्माच्या नियमाप्रमाणें निवडणूक व्हावी या म्हणण्याला संमति दिली व बिशपला अधिकारदर्शक अंगठी देण्याचा नागरिकांनां हक्क दिला. तसेंच चर्चनें बिशपची ऐहिक सत्ता राजाकडून स्पर्श करवून घेण्याला रुकार दिला. इंग्लंडमध्यें, जर्मनीमध्यें व फ्रान्समध्यें देखील वरील निकाल सर्वांना मान्य झाला व अशा रीतीनें राजानें धर्माध्यक्षाला निवडण्याचें जर्मन तत्व पार लयाला गेलें.

चर्च आणि जर्मन कामगिरीः—शार्लमेन राजाच्या काळापासून जर्मनांचें प्रस्थ पश्चिमेकडे फार माजलें होतें. ९ व्या शतकापासून तों १२ व्या शतकापर्यंत ख्रिश्चन धर्माची प्रगति करण्याचें सर्व श्रेय या टयूटन राष्ट्राकडे आहे. जर्मन पाद्री व धर्माध्यक्ष यांनीं ख्रिस्ती धर्माचा हंगेरींत पोल लोकांत प्रसार करण्यासाठीं अतोनात मेहनत केली. व स्वतःसाठीं व धर्मासाठीं एल्बे व ओडर या नद्यांमधील मुलूख मिळविला. तसेंच स्कँडिनेव्हियन देशांतील लोकांचें धर्मांतर करविणारे लोक जर्मनच होते व पुढें हें काम इंग्लिश पाद्र्यांनीं केलें.

चर्च आणि लॅटिन जातींची कामगिरीः—परंतु अशा रीतीनें टयूटन शाखेच्या लोकांनीं धर्मप्रसारार्थ जरी पुष्कळ मेहनत केली तरी पण लॅटिन शाखेच्या लोकांत देखील अशा प्रकारची जागृति उत्पन्न होऊं लागली होती. जर्मनांची संप्रदायसेवा, संप्रदायावर लौकिक सत्तेचा अधिकार वाढविणें आणि औत्सुक्यानें प्रसार करणें ही होती, तर लॅटिन राष्ट्रांची संप्रदायसेवा संप्रदायशुद्धीकरण, ज्ञानरचना, आणि लौकिक सत्तेचा अधिकार कमी करणें व संन्यासधर्मविकास या बाबतींत दृग्गोचर होते.मठामध्यें सुधारणा करण्याची चळवळ या लोकांनींच उत्पन्न केली; व त्यापेक्षांहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही एक नवीन 'स्कूलमेन'च्या संप्रदायाची स्थापना झाली ती प्रथमतः या लॅटिन देशांतच उत्पन्न झाली.

परमार्थ, श्रद्धा आणि विचारशक्तिः—आरिस्टॉटलची तर्कविद्या शाळेंतून शिकविण्यांत येत असे; व वेदान्तविषयक ज्ञानाला तर्क व श्रद्धा हीं दोन्हीहि अत्यंत आवश्यक आहेत असें त्यावेळपर्यंत मानण्यांत येत असे. नवव्या व दहाव्या शतकांत देखील हीच पद्धत अमलांत होती. तदनंतर बेरेंगर (मृत्यु १०८८) यानें तर्क व श्रद्धा या दोहोंची जरुरी नसून, सत्याचें ज्ञान होण्याला फक्त तर्काचीच आवश्यकता आहे असें प्रतिपादन केलें. यामुळें तर्क कीं श्रद्धा असा प्रश्न उपस्थित झाला. लोंबार्ड अनसेल्म यानें (मृत्यु

११०९) प्रथम या विषयाचें विवेचन केलें. त्यानें रूढीपरंपरागत श्रद्धा हीच वेदान्तज्ञानाला कारणीभूत होते अशी सुरवात केली. पण पुढें त्याची अशी खात्री पटली कीं, श्रद्धेमधील तत्वांचा अनुभव असल्याशिवाय तीं तत्वें मुमुक्षूला समजावयाचीं नाहींत. या पद्धतीप्रमाणें त्यानें ईश्वरविषयक ज्ञानाचा मार्ग विशिष्ट तत्वें युक्तिवादानें पटवून देणें हा ठरविला. अशा प्रकारची कल्पना अंधश्रद्धामूलक मध्ययुगामध्यें पचणें अवघड होतें व त्यामुळें ॲनसेल्मची पद्धति त्या वेळेस प्रमुख म्हणून गणली गेली नाहीं. स्कोलॅस्टिक पद्धतीचा जनक वास्तवीक हा नसून ॲबेलार्ड (मृत्यु ११४२) हा फ्रेंच विद्वान होता. त्यानें देखील प्रथम परंपरेवर भिस्त ठेवली पण परंपरागत तत्वांवरील श्रद्धेंतील दोष युक्तिवादांत काढून टाकून दोहोंचा मेळ बसविण्याचें काम त्यानें केलें, व अशा मतप्रतिपादनामुळें १२ व्या व १३ व्या शतकांतील स्कूलमेनच्या संप्रदायाचा पाया व सामुग्री तयार केली. पीटर लॅंबार्ड (मृत्यु ११६०),अलेक्झांडर ऑफ हेल्स (मृत्यु १२४५) ॲलबर्टस मॅग्नस(मृत्यु १२८०) व थॉमस ॲक्विनास (मृत्यु १२७५) हे या दोन शतकांतील नामांकित विद्वान होत. त्यांनीं ख्रिस्ती धर्माचीं तत्वें तर्कपद्धतीच्या कसोटीला लावून पाहिलीं व अशा रीतीनें त्यांनीं धर्ममतांची वाढ केली. संस्कारांबद्दलचें कॅथोलिक लोकांचें जें तत्व तें यांनीच प्रथमतः प्रस्थापित केलें.

मीमांसा व सूत्रें यांचा अन्योन्याश्रयः—मीमांसेसारखें तत्वज्ञान आणि सूत्रकाल यांचा ख्रिस्ती वाङ्मयविकासांत दिसून येणारा संबंध अन्यत्र सदृश वाङ्मयांचें पौर्वापर्य जुळवितांना विचार करण्याजोगा आहे. धर्मसूत्रें हीं स्कूलमेनच्या तत्वांची जुळी बहीण होय. ज्या वेळेस पीटर लॅंबार्ड हा बायबलमधील वाक्यें नीटनेटकीं लावण्यांत गुंतला होता, त्याच वेळेस ग्रेशियन हा सूत्रांचा नवा संग्रह करीत होता. त्यानें जी महत्वाची गोष्ट केली ती धर्मसूत्रांमध्यें जो परस्पर विरोधीपणा दिसून येतो तो आपण तर्कानें मिटविणें जरूर आहे असें प्रतिपादिलें व अशा रीतीनें धर्मसूत्रशास्त्राचा ग्रेशिअन हा जनक म्हणून प्रसिद्धीस आला.

सन्यासधर्माचा विकास.— नवीन वेदांतसंप्रदाय व नवीन धर्मसूत्रशास्त्राप्रमाणेंच या लॅटिन देशांत भिक्षुपंथाची स्थापना झाली. जे नवीन पंथ निर्माण झाले त्यांपैकीं पहिला पंथ सिस्टर्शिअनचा होता व त्यामध्यें पूर्वीचींच तत्वें अस्तित्वांत होतीं. ११२० मध्यें नॉरबर्ट यानें स्थापलेल्या प्रीमॉन्स्ट्रेटोन्शिअन पंथानें नवीनच तत्वें स्थापित केलीं. भिक्षूचें काम निवळ स्वतः मोक्ष मिळविण्याचेंच नसून, दुसऱ्यांनां ज्ञान देऊन त्यांची आत्मशुद्धि करणें हेंहि त्याचें काम होतें हीच कल्पना डॉमिनीकनें काढलेल्या (१२१८) पंथांत प्रामुख्यानें होती. तसेंच १२१० मधील फ्रान्सिस्कन पंथांतहि हीच कल्पना होती. कारण हा पंथ फिरत्या भिक्षूंचा स्थापन झालेला होता; व फ्रॅन्सिस्कनइतकी दुसऱ्यासाठीं झीज सोसण्याच्या आवश्यकतेची खात्री कोणालाच पटली नव्हती. दुसऱ्यांची आत्मशुद्धि करणें हेंच त्याचें ध्येय होतें. याच कल्पनेबरोबर प्रत्येक भिक्षूनें नम्रपणा व दारिद्र्यहि पत्करिलें पाहिजे ही कल्पना त्यानें आणली. पूर्वीपासूनच स्वतःची मालमत्ता भिक्षूनें टाकून देण्याची वहिवाट अस्तित्वांत होती. पण फ्रॅन्सिस्कनची एवढ्यावरच तृप्ति झाली नाहीं. त्याला भिक्षूला कोणत्याहि प्रकारची म्हणजे चर्चमधील देखील मालमत्ता असूं नये असें वाटत असे व या योगेंच ख्रिस्ताचा उपदेश पाळण्यासारखें होईल असें तो म्हणत असे. याचा परिणाम इतका प्रचंड झाला कीं, डॉमीनिकन पंथानें लगेच या पंथाचीं तत्वें स्वीकारिलीं.

यावरून, लॅटिन देशांमध्यें धर्माचें मूळ किती खोलवर रुजलेलें होतें हें कळून येईल. याचा आरंभ अकराव्या शतकांत झाला व १२ शतकांत या नवीन भूतदयामूलक चळवळीचा बर्नार्ड हा प्रमुख पुरस्कर्ता झाला. त्यानें लोकांनां ख्रिस्ताला भजण्यामुळें देव मिळतो असें शिकविलें. त्याच्या समकालीन ह्यू व रिचर्ड यांनीं दयामूर्ति असा जो ख्रिस्त त्याला शरण जाण्यास व परमेश्वरांशीं अशा रीतीनें तादात्म्य पावण्यास शिकवलें. अशा रीतीनें या भूतदयेचें तत्व फक्त चर्चमध्येंच पसरलें असें नाहीं तर त्याबाहेर देखील त्याचा फार प्रसार झाला.

भूतदयेचें तत्व चर्चच्या नियमाविरुद्ध अगर उपाध्या यांच्या धर्माविरुद्धहि नव्हतें. अथवा साधुपूजा संन्यास अगर इतर तत्वांनांहि त्यानें धिक्कारलें नाहीं. हें तत्व व्यवहारोपयोगी होतें. ह्या तत्वानेंच ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठीं अनेक युद्धें घडवून आणलीं. अकराव्या आणि बाराव्या शतकामध्यें, स्पेन व दक्षिण फ्रान्सनें मूर लोकांशीं ' धर्म-युद्ध ' केलें. इ. स. १०९६ मध्यें फ्रान्स, इंग्लंड इटलीमधील सरदार लोकांनीं नास्तिक लोकांनां हाकलून लावण्याच्या इच्छेनें लढाया केल्या व एका शतकापर्यंत अथवा अधिक, ख्रिस्तमय जग करण्याचा ध्वनी जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागला होता.

पोपच्या सत्तेचा अधिक विकास—या सर्वांचा अर्थ असा कीं, धर्मसत्ता या वेळीं इतकी प्रबळ झाली होती कीं, याइतकी पूर्वी कधींहि धर्मसत्ता शक्त झाली नव्हती. चर्चचें महत्व फार वाढलें. अर्थातच पोपच्या सत्तेवर याचा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. फ्रेडरिक (पहिला) व त्याचा मुलगा सहावा हेनरी या जर्मन बादशहांनीं, जर्मन साम्राज्याची सत्ता पोपवर देखील चालवण्याचा व पोपची सत्ता राजसत्तेहून खालच्या दर्जाची करण्याचा प्रयत्न केला.पण कर्मधर्मसंयोगानें फ्रेडरिकला अपयश येऊन ११७७ च्या व्हेनिसच्या तहानें पोपची सत्ता त्याला कबूल करावी लागली. अशा रीतीनें पोपची सत्ता, विरोधाला वाव झाल्यावर वाढूं लागली व तिसऱ्या इनोसेंटच्या कारकिर्दींत (११९८–१२०२) पोपच्या

सत्तेचा कळस झाला. इनोसेंट हा आपल्यास ख्रिस्ताचा प्रतिनिधि असें समजत असे व म्हणून ऐहिक व पारमार्थिक सत्ता आपल्या ताब्यांत आहे असेंहि तो समजे; व यासाठीं त्यानें राजा राज्यपदावर आरूढ होण्याच्या वेळेस, त्यास राजपदाचा अधिकार धर्मगुरूकडून मिळण्याची पद्धत अमलांत आणली. व जुने कायदे रद्द करण्याची व नवे करण्याची देखील सत्ता पोपला आहे असें त्यानें ठरवलें व वेळप्रसंगीं राजांनां पदच्युत करण्याचाहि पोपचा अधिकार आहे असें त्यानें प्रतिपादन केलें. या नवीन तऱ्हेच्या पोपच्या सत्तेला जुळतें घेण्यासाठीं कॅथोलिक धर्मपंथानें आपल्या धार्मिक कायद्यांत थोडाफार फरक केला. ११२३ पासून पुढें पोपनें साधारण सभा बोलावण्याची पद्धत सुरू केली व तिनें केलेले ठराव स्वतः संमति देऊन कायम करण्याची वहिवाट पाडली. धर्माध्यक्षाची सांप्रदायिक नियमांनीं निवडणूक न होतां धर्मोपदेशक मंडळीकडून त्याची निवड होऊं लागली. पुढें कलांतरानें पोपच्या हातांत फौजदारी सत्ता देखील आली.

अशा रीतीनें चर्चवर पोपची सत्ता पूर्णपणें स्थापित झाली. पण पोपची ऐहिक सत्ता कायम टेवणें कठिण जाऊं लागलें. फ्रेडरिक(दुसरा) याच्याशीं नववा ग्रेगरी व चवथा इनोसेंट यांनीं केलेल्या लढायांत ग्रेगरीला व इनोसेंटला यश आलें नाहीं; व राजाच्या सत्तेंत ढवळाढवळ करण्याचा पोपला मुळींच अधिकार नाहीं असें ठरलें. व पुढें बोनीफेस (आठवा) व चवथा फिलिप यांच्यांत राजसत्तेबद्दल भांडण सुरू झालें त्यावेळेस बोनीफेसला राजसत्तेचें उच्चाटण करणें अशक्य आहे असें स्पष्ट रीतीनें आढळून आलें.

मध्ययुगाचा शेवट व फाटाफूटः—अशा रीतीनें पश्चिम चर्चच्या सत्तेचा कळस झाला असतांना ज्या ऐहिक व पारमार्थिक सत्तेच्या ऐक्यामुळें पश्चिमेकडील चर्चेचें जीवित चाललें होतें त्यामध्यें बिघाड होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. व्यावहारिक राजसत्ता आपला योग्य तो हक्क मागूं लागली. साम्राज्यसत्ता यावेळीं मोडकळीस आली होती. तरी पण यामुळें छोटीं छोटीं राज्यें (विशेषतः इंग्लंड व फ्रान्स) स्थापन होऊन तीं भराभर वाढूं लागलीं. पूर्वेकडे व्यापारामुळें अगर धर्मयुद्धामुळें दळणवळण वाढल्यानें बौद्धिक कल्पना वाढूं लागल्या; प्राचीन तत्वज्ञान व वाङ्मयाचा अभ्यास पुनः जोरानें सुरू झाला आर्थिक अडचण चर्चच्या पुढें उभी राहिल्यामुळें चर्चवर याचा परिणाम झाला; व तो पोपच्या ' जगावरील सत्ते ' वरहि होण्याचा रंग अधिकाधिक दिसूं लागला. तात्विक दृष्टया ही सत्ता अद्यापि अढळ होती. किंबहुना थोडी फार जास्तच संमत झाली. पण आठव्या बोनिफेसनंतर येणाऱ्या धर्मगुरूंनीं ही सत्ता व्यवहारांत आणण्याबद्दल विशेष खटपट केली नाहीं व एका दृष्टीनें तशी सत्ता व्यवहारांत आणणें अशक्यच झालें होतें. कारण फ्रेंच साम्राज्यावर पोपला अवलंबून रहाणें भाग पडत असे. तरी पण आतां तत्वाला देखील हळू हळू विरोध होऊं लागला. फ्रान्समध्यें चवथ्या फिलिपच्या कायदे पंडितांनीं ऐहिक सत्तेचा पारमार्थिक सत्तेशीं कांहींच संबंध नाहीं असें जाहीर केलें. इटलीमध्यें डांटेनें राजसत्तेची कड घेतली. जर्मनींत चवथ्या लुईचे स्नेही मारसिग्लियो व जॉन यांनींहि शास्त्रीय रीत्या राजसत्तेचें वर्चस्व प्रतिपादन केलें व फॅन्सिस्कन विल्यमनें प्रसंग पडल्यास राजकीय सत्तेनें पारमार्थिक सत्तेंत हात घालावा असें म्हणण्यापर्यंत मजल मारली.

अशा रीतीचे विद्वान मंडळींचे विचार सुरू असतां या चर्चच्या सत्तेला विरोधी असणारा पक्ष बळावतच होताः व याला कारणेंहि बरींच होतीं. एक तर पोपची जमाबंदीची पद्धत फार वाईट होती, शिवाय धर्मसत्तेच्या संरक्षणाहि हक्कांचा दुरुपयोग होऊं लागला होता. धर्माच्या नांवाखालीं वाटेल त्या अन्यायाच्या गोष्टी होऊं लागल्या होत्या. तरी पण पोपवर सत्ता गाजवण्याला कोणताहि उपाय नव्हता. पण १३७८ मध्यें पोपच्या धर्मसत्तेंतच दुफळी होऊं लागली; व या पोपच्या जागेसाठीं धडपडणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांवरहि ताबा चालविणारी सत्ता असली पाहिजे अशी जरूर भासूं लागली. आणि पोपवर देखील एक अधिकार मंडळ असावें अशी तजवीज करण्याचें ठरलें. या मंडळाच्या हातांत सत्ता देण्यांत यावी, अशा प्रकारची तजवीज सुचविणारे कानराड (मृत्यु १३९०), हाइनरिक (मृत्यु १३९७) हे जर्मन, व पिरे व जीन हे फ्रेंच विद्वान होते. या करितां पिसा येथें बोलावलेल्या सभेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. १४१४ मध्यें भरलेल्या सभेनें हें भांडण मिटवलें. परंतु या सभेनें ठरवलेल्या सुधारणा यशस्वी झाल्या नाहींत. सारांश पोपची सत्ता पूर्वीप्रमाणेंच अबाधित राहिली. अशा रीतीनें कौन्सिलच्या योगानें चर्च सुधारण्याचा प्रयत्न फसला. परंतु या अपयशामुळेंच हें चर्च सुधारण्याची फार जरूरी भासूं लागली. तसेंच अनेक प्रसंगांमुळें ती चळवळ जिवंत राहिली असें म्हणतां येतें. पोप यूजेनियस (१४३१–४७)नें बॅसेलच्या कौन्सिलवर जय मिळवला. पण कौन्सिलनें मंजूर केलेले ठराव फ्रान्सनें व जर्मनीनें मुळींच सोडले नाहींत. अशा रीतीनें पोपची सत्ता थोड्या तरी अंशानें अमान्य केली गेली.

पोपची सत्ता अमान्य करणाऱ्या थोड्या फार चळवळी पूर्वीपासूनच झाल्या होत्या. पण पोपची सत्ता त्या वेळेला फार बलाढ्य असल्यानें या चळवळी जवळ जवळ नामशेषच झाल्या होत्या. उलट पक्षीं फ्रान्समध्यें, जर्मनींत व सर्वत्र थोड्या फार चळवळी पोपच्या ऐहिक सत्तेच्या विरुद्ध अद्यापि होत्या असें म्हटलें तरी हरकत नाहीं. इंग्लंडमध्यें ल्यूथरच्या पूर्वी पहिला विरोधक जॉन विक्लिफ यानें प्रथमतः उपाध्यायांवर व पोपच्या सत्तेवर कडकडीत टीका केली. पोपचें चर्च ही धार्मिक व मोक्षाचें ज्ञान देणारी संस्था राहिली नसून एक राजकीय संस्था झाली आहे असें त्यानें प्रथम सांगितलें. या विक्लिफच्या कल्पना यूरोपमध्यें प्रसार पावतांच

बोहेमियामध्यें एक प्रकारची खळबळ उडून गेली. कौन्सिल ऑफ कॉन्स्टन्सनें विक्लिफची शिकवणूक चुकीची आहे असें प्रतिपादून व हासचा शेवट करून ही चळवळ हाणून पाडण्याचा यत्न केला. पण याच्या योगानें कार्यभाग न होतां उलट त्या चळवळीला जोरच आला.

ही चळवळ अगदीं उघड उघड होती. पण याहीपेक्षां दुसरी एक चळवळ अस्तित्वांत होती तिनें कधीं उघडपणें विरोध केला नव्हता. ही चळवळ १४ व्या शतकांत इटलीमध्यें जन्मास आली. या चळवळीच्या पुरस्कर्त्यांचा उद्देश चर्चच्या सत्तेपासून आपले जगांतील व्यवहार सोडविण्याचा होता. त्यांनां ऐहिक शिक्षण मिळवून जगांत चैन करावी व जगाचा पूर्ण उपभोग घ्यावा अशी इच्छा होती. व अशा रीतीनें पोपच्या व यांच्या मतामध्यें पुष्कळसा विरोध होता. ह्या ' रेनायन्सस 'च्या चळवळीचें इटालीमधील स्वरूप उत्तरेकडच्या देशांतील या चळवळीच्या स्वरूपासारखें नव्हतें तरी पण या दोन्ही चळवळी पोपच्या सत्तेला नामशेष करण्याचा प्रयत्न करीत होत्या यांत शंका नाहीं.

डन्स स्कॉट्स (पृ. १३०८) च्या वेळेपासून ईश्वरविषयक शास्त्रावरील विद्वानांनां आरिस्टॉटलच्या तत्वज्ञानामध्यें व धर्ममतांमध्यें व्यंग आढळून आलें होतें. तर्कपद्धतीवरील श्रद्धा अशा रीतीनें उडूं लागली. व ' फिलासफिक नॉमिनॅलिझम ' नांवाचा एक सिद्धांत गृहीत धरणाऱ्या पद्धतीनें या तर्कपद्धतीचें उच्चाटन केलें. या पंथाचा मुख्य पुरस्कर्ता वुइल्यम ऑफ ओकॅम हा होता. पण हा सिद्धांत नवीन ईश्वरविषयक ज्ञानाची स्फूर्ति देणारा नव्हता.

याशिवाय गूढविद्या वगैरेसारख्या विद्याहि पूर्वींची पोपची सत्ता पुनः मिळवून देण्याला असमर्थच होत्या. १५ वें शतक निरनिराळ्या धार्मिक विषयांवर खल करण्यांतच गेलें; व अंतस्थ विसावा कांहीं मिळाला नाहीं.

कौन्सिलचे नियम पोपनें मोडून आपली सत्ता त्याच्यावर लादून आपलें स्वतःचें एक कौन्सिल त्यानें बोलावलें. त्याचें पहिलें कौन्सिल फेरारा येथें जमलें व दुसरें फ्लारेन्स येथें जमलें. फ्लारेन्सच्या कौन्सिलमध्यें त्याला पुष्कळच यश आलें. अकराव्या शतकामध्यें पूर्व व पश्चिम चर्चमध्यें भांडणें झाल्यामुळें रोम व कॉन्स्टांटिनोपलमधील धार्मिक बंधनें पार तुटलीं होतीं; व ही स्थिति १०५४ पर्यंत होती. पण फ्लारेन्समध्यें त्या दोन्ही चर्चेची एकी झाली. इ.स. १५१२मध्यें दुसऱ्या ज्यूलियसनें एक सार्वजनिक सभा बोलावून पोपची सत्ता ख्रिस्ती जगावर जाहिर केली.

परंतु या धर्मसत्तेचे या वेळचे प्रयत्न व पूर्वींच्या वेळचे प्रयत्न निराळे होते. आठवा इनोसेंट, दुसरा ज्युलियस ह्या जरी प्रसिद्ध व्यक्ती होत्या तरी पण त्यांनीं ख्रिस्ती संप्रदाय तत्वांकडे थोडें फार दुर्लक्षच केलें. १४९८ मध्यें फ्लारेन्समध्यें सॅव्होनॅरोलचा खून त्यांच्या चिथावणीमुळें झाला व ही अतिशय निंद्य गोष्ट पुढें फार भोंवली.

सॅव्होनॅरोलच्या मरणानंतर वीस वर्षांनीं मार्टिन ल्यूथरनें ' इंडलजन्सेस ' विरुद्ध लेख लिहिले. इंडलजन्स याचा अर्थ चर्चेला पैसा देऊन पातकें करण्यास मोकळीक मिळविणें असा होता. अशा रीतीनें 'सुधारणेची'चळवळ सुरू झाली. ही चळवळ एक तऱ्हेनें पोपच्या धर्मसत्तेला फायदेशीरच झाली. कारण त्या योगें तरी पोपच्या धर्मसत्तेला आपलीं खरीं कर्तव्यें ओळखणें भाग पडलें व ट्रेंटच्या कौन्सिलनें प्रॉटेस्टंट धर्मावरून अर्वाचीन कॅथोलिक धर्माची मध्ययुगीन मताच्या पायावर स्थापन केली.

अर्वाचीन चर्च.—ट्रेंट येथील कौन्सिलमध्यें म्हणजे १५६४ मध्यें जीं तत्वें निश्चित झालीं त्यांमुळें ख्रिश्चन चर्चच्या इतिहासाला एक नवीनच पण निश्चित असें धोरण लागलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळेपर्यंत पूर्वदेशीय चर्चमध्यें व पश्चिमदेशीय चर्चमध्यें जरी पुष्कळ भांडणें झालीं तरी सुद्धां चर्चच्या मूलभूत तत्वांची अगर संघटनेच्या दृष्टीनें सनातनत्वाची कल्पना दोघांनांहि पूर्णपणें होती. धर्मसुधारकांनां देखील कॅथोलिक धर्मांतील मध्ययुगीन व्यंगें काढून टाकण्याचीच इच्छा असल्याकारणानें त्यांनां दुसरा धर्म व दुसरीं चर्चे प्रस्थापित करण्याची इच्छा नव्हती. पश्चिम यूरोपमध्यें जी चर्चमध्यें फाटाफूट झाली ती या सुधारणेच्या चळवळमुळें झाली नसून राजकीय गोष्टींमुळें झाली होती. ज्यावेळेस प्रत्यक्ष तत्वांमध्यें कांहीं फेरबदल करण्याचा रोमन चर्चकडून रंग दिसेना, त्यावेळीं सुधारकांनीं राजे लोकांकडे धांव घेतली, व छोटया छोटया संस्थानच्या राजांनीं आपल्या देशकालपरिस्थितीला जुळेल त्या मानानें धर्माचा स्वीकार केला. अशा रीतीनें सर्व यूरोपभर कॅथोलिक चर्चचे लहान लहान स्वतंत्र व स्थानिक तुकडे होऊन चर्चचे निराळे घटक होऊं लागले व जसजसे राष्ट्राराष्ट्रामध्यें खटके उडत गेले त्या त्या मानानें त्या त्या राष्ट्रामधील चर्चांचा संबंध कमी कमी होऊं लागला. इ. स. १६४८ मधील वेस्ट फालिआच्या तहानें ही चर्चची स्थानिक घटना दृढमूल झाली. ही पद्धत इंग्लंड व स्कॉटलंडमध्यें पूर्वींच स्थापित झाली होती. दक्षिण-जर्मनीमध्यें, बोहेमियामध्यें व पोलंडमध्यें सुधारणेच्या चळवळीविरुद्ध मिशनरी लोकांनीं चळवळ चालू ठेवल्यानें ती पद्धत तेथें विजयी झाली नाहीं. तरी पण या पद्धतीला ट्रेंटच्या कौन्सिलनें ठरविलेल्या तत्वामुळें दुजोरा व चलन मिळालें. परंतु ट्रिडेन्टाइन येथें ठरलेल्या निकालामुळें नवीन व जुन्या धर्मामध्यें समेट होण्याची आशा राहिली नाहीं. रोमन चर्चनें या सुधारकांचा संप्रदायतत्वांत फेर करण्याचा हट्ट चालूं दिला नाहीं व स्कूलमेनचीं जीं कलमें होतीं तींच चर्चचीं तत्वें म्हणून अंगिकारण्यांत आलीं. रोमन ' मध्यवर्ती संघटने ' चें तत्व स्वीकारून व चांगलें

काम करून सर्व पश्चिम यूरोपभर ज्या लॅटिन चर्चनें आतांपर्यंत ताबा चालविला होता त्याचा सर्व वाङ्मय, शास्त्रें व कला या बाबतींत वाढत जाणाऱ्या संस्कृतीशीं विरोध वाढत चालला, व पुढें पुढें १८४४ मध्यें तर पोपनें त्या चर्चवरहि बहिष्कार घातला. जगाच्या व्यापक स्वरूपाच्या दृष्टीनें पहातां प्रॉटेस्टंट चर्चप्रमाणेंच पण फार मोठें वजन असलेलें असें रोमन चर्च आहे असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. व जगांतील प्रचंड चळवळींच्या घडामोडींत अर्वाचीन चर्च पूर्ववत भाग घेत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. अशी जेथें रोमन चर्चची स्थिति तेथें सुधारणेच्या चळवळीमुळें जे कांहीं किरकोळ पंथ अस्तित्वांत आले होते त्यांची काय स्थिति सांगावी? या पंथांतील अँग्लिकन चर्च कॅथोलिक संघटनेला चिकटून राहिलें व आपण कॅथोलिक चर्चच्या तीन शाखांपैकीं एका शाखेचे आहोंत असें त्यांनीं प्रतिपादन केलें पण रोमनचर्चनें तें मान्य केलें नाहीं. यूरोपभर पसरलेलीं दुसरीं कांहीं प्रॉटेस्टंट चर्चे होतीं; त्यांनीं तसा कांहीं आपला हक्क सांगितला नाहीं. पण त्यांचीं तत्वें जवळ जवळ रोमन चर्चच्या तत्वांसारखींच होती. त्यांनां बायबल काय तो प्रमाणभूत ग्रंथ होता व त्यांची संघटना, ही राजाच्या अंमलाखालीं होती; थोडक्यांत म्हणजे तीं स्थानिक चर्चे होतीं. याच्याहि पुढची ताजी वाट म्हणजे 'स्वतंत्र चर्चोची' स्थापना होय. ह्या नवीन कल्पनेचा गंध देखील पूर्वीच्या सुधारकांनां नव्हता म्हटलें तरी चालेल. या नवीन चर्चच्या मतें कॅथोलिक चर्च हें एका विशिष्ट पंथाचेंच नसून जगामध्यें जितक्या प्रकारचे 'श्रद्धावान धार्मिक लोक' आहेत त्यांचें आहे. कोणताहि मनुष्य वाटेल त्या मताचा असला तरी त्याला पुढें मार्गे इतर धर्मांमध्यें जातां येईल अथवा दुसऱ्या मतांचा स्वीकार करतां येईल असें या नवीन पंथाचें म्हणणें होतें. म्हणजे हा पंथ चर्चपेक्षां व्यक्तीला जास्त मान देत होता असें म्हटलें तरी चालेल. हें मत आजकाल अमेरिका, ग्रेटब्रिटन वगैरे देशांत फार मान्य आहे व त्यामुळें अनेक पंथ निर्माण झाले आहेत. वरील माहितीवरून हें सहज कळून येईल कीं, अर्वाचीन चर्चच्या इतिहासाची संगतवार माहिती देणें शक्यच नाहीं. कारण चर्चच्या इतिहासाचा प्रवाह हा फार भिन्न भिन्न झालेला आहे व त्याचे अनेक प्रवाह झालेले आहेत. फक्त हे सर्व पंथ 'ख्रिश्चन धर्म' या सर्वसामान्य नांवाखालीं मोडतात एवढेंच काय तें त्यांत साम्य आहे.

विचारघटना आणि मतप्रसार:—ख्रिश्चॅनिटी ऊर्फ ख्रिश्चन धर्म याची सुटसुटीत शब्दांत व्याख्या करावयाची म्हटल्यास असें म्हणतां येईल कीं ख्रिश्चन धर्म म्हणजे ख्रिस्तप्रणीत धर्म होय. पण ही व्याख्या दोषरहित नाहीं. कारण ख्रिश्चनधर्माची हल्लींची कल्पना ख्रिस्तानें प्रतिपादन केलेल्या धर्माहून अधिक व्यापक आहे. बौद्ध धर्माची व्याख्या 'बुद्धप्रणीत धर्म' एवढीच ज्याप्रमाणें करून भागणार नाहीं त्याचप्रमाणें ख्रिश्चन धर्माचीहि स्थिति आहे. कारण ख्रिस्तानें प्रतिपादन केलेल्या धर्मामध्यें इतर तत्वांची पुष्कळ भरती होऊन हल्लींचा ख्रिश्चन धर्म बनलेला आहे. हल्लींच्या खिश्चन धर्माची व्याख्या, 'ख्रिस्तद्वारां ज्यामध्यें मनुष्याचा व देवाचा संबंध निश्चित करण्यांत येतो अशा नीतितत्वांचें विवेचन करणारा, सार्वत्रिक, एकेश्वरी, जगांतील दुःखापासून सोडविणारा, ऐतिहासिक धर्म' अशी करतां येईल.

वर दिलेल्या व्याख्येंतील प्रत्येक शब्द महत्वाचा आहे; व प्रत्येक शब्दावर पृथक् विवेचन करतां येण्यासारखें आहे. ख्रिश्चन धर्म हा सार्वत्रिक धर्म आहे असें म्हणण्यांत येतें. एका अर्थानें हें म्हणणें खरें आहे व एका अर्थानें खोटेंहि आहे. ख्रिस्त या व्यक्तीनें प्रतिपादन केलेला हा धर्म असल्यामुळें याला सार्वत्रिक धर्म म्हणणें गैर होईल. बौद्ध धर्म, इस्लामी धर्म हे ज्याप्रमाणें सार्वत्रिक धर्म नाहींत त्याचप्रमाणें हा ख्रिश्चन धर्महि सार्वत्रिक नाहीं. पण यांतील मुख्य तत्वें जगांतील कोणत्याहि राष्ट्रांतील माणसांनां आपलीं जातीबंधनें न सोडतां स्वीकारतां येण्यासारखीं आहेत असें या ख्रिश्चन धर्मीयांचें म्हणणें असल्यानें या धर्माला सार्वत्रिक धर्म असें संबोधण्यांत येऊं लागलें आहे. वास्तविक कोणत्याहि धर्माचीं सामान्य तत्वें हीं सार्वत्रिक स्वीकार होण्याला योग्यच असतात व अशा रीतीनें विचार केल्यास खिश्चन धर्माला सार्वत्रिक धर्म असें नांव देण्यांत कांहींच वैशिष्टय उरत नाहीं.

कांहींच्या मतें ख्रिश्चन धर्म हा स्वाभाविक धर्म आहे; पण याहि म्हणण्यांत कांहीं तथ्य नाहीं. जगांतील कोणताहि पंथ स्वाभाविक नाहीं. परिस्थितीच्या खतांतच धर्मांचें बी रुजतें व वाढतें. ख्रिस्तानें जो धर्म प्रतिपादन केला तो केवळ स्वयंस्फूर्त असा धर्म नसून त्याच्या मुळाशीं त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या धर्मांतील तत्वें होतीं. ख्रिस्तानें परिस्थितीप्रमाणें व आपल्या दैवी स्फूर्तीनें त्याला नवीन वळण लावून त्यांत नवीन तत्वांची भर घालून तो ओजस्वी केला. आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या भविष्यवाद्यांचीं उर्फ धर्मस्थापकांचीं तत्वें व तीं विशद करण्याकरितां वापरलेले शब्द हे त्यानें जसेच्या तसे कायम ठेवले. फक्त त्या शब्दांचा त्यानें नवीन तऱ्हेनें उपयोग करण्यास सुरुवात केली. तात्पर्य ख्रिश्चन धर्माची भूमिका ही ख्रिस्तनिर्मित नसून ख्रिस्तपूर्व धर्मप्रतिपादकांच्या तत्वांची होती असें दिसून येतें.

ख्रिश्चन धर्माची प्राणप्रतिष्ठा आशियाखंडांत झाली. पण थोडयाच काळांत त्याचा प्रसार रोमनसाम्राज्यांत व त्याच्या पलीकडे असलेल्या रानटी जातींत झाला. चौथ्या शतकांत रोमन साम्राज्य हें ख्रिश्चनधर्मीय बनलें व त्याचा परिणाम असा झाला कीं सर्व पश्चिम जगानें ख्रिश्चनधर्म स्वीकारला व यूरोपियन लोकांनीं जेथें जेथें वसाहती केल्या तेथेंहि त्यांनीं

आपला धर्म बरोबर नेला. पण पौरस्त्य देशांत त्याच्या धर्माचा प्रसार झाला नाहीं व होणें शक्यहि नव्हतें. कारण या वेळीं आशियाखंडांत इस्लामी धर्माचें प्राबल्य होतें.

ख्रिश्चनधर्म हा व्यक्तिप्रणीत धर्म असल्यानें ख्रिस्त व त्याचें चरित्र याच्याशीं त्या धर्माचा निकट संबंध येणें स्वाभाविकच आहे. किंबहुना त्याचें चरित्र हें त्यानें प्रतिपादन केलेल्या तत्वांचा मूर्तिमंत आदर्शच होय असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. पण आपल्या इकडील अवतारी पुरुषांप्रमाणेंच त्याच्याहि चरित्रांत बऱ्याच अतिमानुष गोष्टी भरल्या असल्यानें, त्यानें प्रतिपादन केलेलीं धर्मतत्वें त्यांतील गोष्टीमुळें प्रामुख्यानें नजरेस येत नाहींत. खुद्द त्याच्या शिष्यांनांहि त्याचा दैवी संदेश कळला नाहीं. ख्रिस्ताचें गुन्हेगार या नात्यानें मरण व त्याचें पुनरुत्थान या गोष्टींमुळें ज्यू लोकांनां आपल्या धर्मांत सांगितलेला 'मेसाया' म्हणजे हाच असें वाटूं लागलें व हे ज्यू लोक त्याच्या तत्वांपेक्षां ख्रिस्त या व्यक्तीलाच मान देऊं लागले. ख्रिस्ताच्या तत्वावर सेंट पाल यानें प्रथमतः प्रकाश पाडला; पण त्याचें म्हणणें हें ज्यू लोकांनां पटेना व ज्यू लोकांनीं ख्रिश्चन धर्माचा त्याग केला.

अशा रीतीनें ज्यू लोकांनीं या धर्माचा त्याग केला तरी ख्रिश्चन धर्म हा खुंटला न जातां उत्तरोत्तर प्रसारच पावूं लागला; व रोमन साम्राज्यांत तर या धर्माचा फारच झपाट्यानें प्रसार झाला. पण त्याच्या प्रसाराबरोबरच त्या धर्मांतील तत्वांनांहि निराळें स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय राहिलें नाहीं. रोमन साम्राज्यांत त्यावेळीं ग्रीकांचा समावेश होत असे. ग्रीक लोकांत ख्रिस्ताच्या पूर्वींपासूनच तत्वज्ञानाचा उदय झाला होता. हें जग कोणी निर्माण केलें, ईश्वराचें स्वरूप काय आहे वगैरे अनेक गहन प्रश्नांवर त्यांच्यांत विचार चालू झालेले होते. प्लेटो, आरिस्टॉटल यांसारख्या तत्वज्ञांनीं ईश्वरप्राप्ति ही सामान्य माणसाच्या आटोक्यांत नसून ज्ञानी माणसालाच ती शक्य आहे असें प्रतिपादन केलें होतें. दुसऱ्या कांहीं तत्वज्ञांनीं ईश्वर हा सर्वत्र पसरला आहे असें प्रतिपादन केलें होतें. तात्पर्य ग्रीक लोकांत या काळीं अनेक तत्वज्ञानपंथ निर्माण झाले होते. ग्रीक लोकांची ही तत्वज्ञानविषयक चळवळ बौद्धिक होती; त्यामुळें सामान्य लोकांनां त्यांत विशेष आस्था वाटण्यासारखें कांहींहि नव्हतें. सामान्य लोक मनास पटेल त्या तऱ्हेनें एकेश्वरी पंथाचे अगर अनेकेश्वरी पंथाचे अनुयायी झाले होते. ग्रीक तत्वज्ञानांत श्रद्धेचा ओलावा नव्हता, व सामान्य लोकांनां आपलें म्हणणें पटवून देण्याचा सहेतुक प्रयत्न या गीक तत्वज्ञांनीं केला नाहीं. अशी स्थिति ग्रीक लोकांत व तत्कालीन रोमन साम्राज्यांत होती. अशा आणीबाणीच्या वेळीं ख्रिश्चन धर्माचा रोमन साम्राज्यांत चंचुप्रवेश झाला व त्याचा प्रसार झाला.

या झटपट प्रसाराचीं कारणें उघडच होतीं. रोमन साम्राज्यांत विचारी माणसें व सामान्य माणसें यांच्यांत वर सांगितल्याप्रमाणें फारकत झाली होती. सामान्य लोकांनां कोणता पंथ स्वीकारावा यासंबंधीं सुचेनासें झालें होतें. अशा स्थितींत 'तूं माझ्यावर विश्वास ठेव म्हणजे तूं माझ्याप्रत पोहोंचशील' असें ठांसून प्रतिपादन करणारा, सामान्य जनांच्या बुद्धीला पटणारा असा धर्म तत्काल लोकप्रिय व्हावा यांत आश्चर्य नाहीं. पण सामान्य जनांनां ज्याप्रमाणें हा धर्म प्रिय झाला त्याचप्रमाणें तत्वज्ञांनांहि या धर्मांत, त्यांनां भांबावून टाकणाऱ्या तात्त्विक प्रश्नांचें उत्तर आहे असें आढळून आलें. ईश्वराचा व मनुष्याचा परस्परसंबंध काय आहे, आत्म्याचा व जड देहाचा तसेंच परमात्म्याचा व जीवात्म्याचा कशा प्रकारचा संबंध आहे या गूढ प्रश्नांचें उत्तर ख्रिस्त धर्मांत त्यांनां सांपडलें. पॉलनें व त्याच्या काळच्या इतर विद्वानांनीं ख्रिस्त हा परमेश्वराचा मानसपुत्र आहे व त्याच्या द्वारें परमेश्वर हा जगाच्या उद्धारार्थ अवतीर्ण झाला आहे असें सांगण्यास सुरुवात केली होती. ग्रीक तत्वज्ञांनीं ही अवताराची कल्पना या धर्मांतून घेतली. परमेश्वर हा पृथ्वीपासून अमित अंतरावर आहे तो ज्ञानसागरच आहे या तत्वाच्या जोडीला, परमेश्वर हा मनुष्यप्राण्याच्या उद्धारार्थ, या पृथ्वीवर प्रकट होतो हें तत्व प्रतिपादन करण्यास त्यांनीं सुरुवात केली व परमेश्वर व भूत मात्र यांच्यामध्यें ख्रिस्त हा दुवा आहे असें सांगण्यास आरंभ केला. अर्थात याचा परिणाम पुढील ग्रीक तत्वज्ञांवर अतिशय झाला. पण त्याचबरोबर ग्रीकांच्या विचारसरणीचा परिणामहि ख्रिश्चन धर्मावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. तात्पर्य ख्रिश्चन धर्माचें अंतरंग म्हणजे ज्यू लोकांच्या धर्मस्थापकांची सुधारून वाढविलेली आवृत्ति होय. व ग्रीक विचारपद्धति ही त्या धर्माचें बाह्य स्वरूप होय असें म्हणावयास हरकत नाहीं.

त्रैतत्व (ट्रिनिटी मत):— ज्यू लोकांत परमेश्वर हा सर्व जगाचा पिता आहे असें मानीत असत. ख्रिस्त हा मेसाया अगर प्रेषित असून तो परमेश्वराचा मानसपुत्र होय, असें त्यांचें मत होतें. 'आत्मतत्व' हा शब्द देखील त्यांच्या ग्रंथांत वारंवार वापरलेला आढळून येतो. स्वतः ख्रिस्तानें 'आत्मतत्व' उर्फ स्पिरिट हा शब्द कधींच वापरला नाहीं. सेंट पॉलनें जरी हा शब्द वापरला होता तरी त्यानें हा शब्द कोणत्या अर्थानें वापरला हें स्पष्ट होत नाहीं. पण ग्रीक लोकांच्या तात्त्विक विचारसरणीचा ख्रिस्तमतानुयायांनां परिचय झाल्यामुळें त्यांनीं ग्रीक पद्धतीनें वरील प्रश्न सोडविण्यास सुरवात केली. 'परमेश्वर हा एकमेवाद्वितीयम्, अज, अनंत, असून, या नश्वर व सांत जगतांत तो अंशरूपानें अवतरला असून सर्व मनुष्यजातीमध्यें तो आत्मस्वरूपांत वास करतो' अशा तऱ्हेनें त्यांनीं परमेश्वर, पुत्र व आत्मतत्व या तीन्ही कल्पनांची सांगड घातली.

तात्त्विक दृष्ट्या अशा तऱ्हेनें तीन्ही तत्वांचा मेळ जमला व याला त्रैताचें तत्व असें नांव पडलें. धार्मिकदृष्ट्या

देखील या त्रैततत्वाचें महत्व कायम राहिलें. परमेश्वर हा ख्रिस्ताच्या रूपानें सर्व प्रण्यांच्या उद्धारार्थ आला आहे, व ख्रिस्ताच्या स्वरूपांत सर्वांनीं परमेश्वराला भजलें असतां जगांतील पापापासून मनुष्याचा आत्मा मुक्त होतो अशी धार्मिक दृष्टया उपपत्ति लावण्यांत आली. अशा रीतीनें तत्वज्ञांच्या तात्विक दृष्टीनें व श्रद्धाळू लोकांच्या धार्मिक दृष्टीनें हें त्रैततत्व दोषरहित व सर्वमान्य ठरलें.

त्रैततत्व ख्रिश्चन धर्मांतील सर्वांत महत्वाचें तत्व समजण्यांत आल्यामुळें त्या तत्वावर निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळीं भाष्यें करावींत हें स्वाभाविकच आहे. कांहींनां ख्रिस्ताच्या स्वरूपांत परमेश्वराला भजणें पसंत नाहीं. ख्रिस्त हा केवळ मार्गदर्शक महात्मा असून त्यानें जो मार्ग चोखाळला त्या मार्गानें म्हणजे शुद्ध आचारविचारानें वागलें असतां परमेश्वरस्वरूपीं लीन होतां येतें व हेंच मनुष्याचें अंतिम ध्येय होय असें त्यांचें मत आहे. इतर कांहीं लोकांच्या मतें, हीं तिन्हीं तत्वें स्वतंत्र असून परमेश्वराच्या ठायीं एकसमयावच्छेदेंकरून वास करितात.

मुक्तितत्व.—या त्रैततत्वाच्या इतकेंच किंबहुना कांहींच्या मतें अधिक महत्वाचें तत्व म्हटलें म्हणजे मुक्तितत्व होय. याला इंग्लिशमध्यें ' डॉक्ट्रिन ऑफ दि क्रॉस' असेंहि म्हणतात. ख्रिस्ताला सुळावर चढविण्यांत आलें व तें सुद्धां गुन्हेगार म्हणून. परमेश्वर हा जर सर्व जगाचा शास्ता आहे तर ही गोष्ट देखील त्याच्याच इच्छेनें घडून आलेली असली पाहिजे. ख्रिस्तासारख्या भक्ताला सुळी चढविण्यांत परमेश्वराचा काय हेतु असावा असे विचार प्रत्येकाच्या मनांत येणें स्वाभाविकच होतें. तेव्हां या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर देणें अत्यावश्यकच होऊन बसलें. अर्थात पुष्कळांनीं पुष्कळ तऱ्हेनें या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्यांतील महत्वाचें उत्तर म्हणजे ख्रिस्त हा स्वःच्या अपराधाकरितां मेला नसून मनुष्य जातीच्या पापांकरितां बळी गेला हें होय. ख्रिस्त हा पापी लोकांचें पाप वहाणारा देवाचा दूत आहे असें इसैयामध्यें म्हटलेलें आहे.

पण या उत्तरानें वरील प्रश्नांचा उलगडा समाधानकारक तऱ्हेनें होत नाहीं. परमेश्वर हा जर परमदयाळू आहे तर तो पापी माणसांनां क्षमा कां करीत नाहीं ? पापी माणसासाठीं ख्रिस्तानें सुळीं जावयाचें काय कारण? इत्यादि अनेक प्रश्न उद्भवतात व वरील उत्तरानें हे प्रश्न सुटले जात नाहींत. पण धर्मग्रंथांत या प्रश्नांनां उत्तरें देण्याचा प्रयत्नहि झालेला दिसत नाहीं. सेंटपॉलनें मात्र या प्रश्नांना निराळ्या तऱ्हेनें उत्तर देण्याचा प्रयत्न केला. स्वार्थत्यागाचा ख्रिस्त हा अत्युच्च आदर्श असून त्यागाची परमोच्च कल्पना ख्रिस्तामध्यें केंद्रीभूत झाली आहे; धर्मगुरु व त्याग हीं ख्रिस्ताचीं दृश्य स्वरूपें असून साक्षात्कार होण्याच्या समयाला हीं बाह्य स्वरूपें नाहींशी होतात असें सेंट पॉलनें वरील प्रश्नांचें धार्मिक दृष्टीनें उत्तर दिलें आहे. याशिवाय इतर विद्वानांनींहि ख्रिस्ताच्या मरणाविषयीं आपापले तर्क लढविले आहेत. ख्रिस्ताचें मरण म्हणजे वाईटावरील जय अगर सैतानाला संतुष्ट करण्याकरतां दिलेली लांच असं ओरिगेन म्हणतो, तर मनुष्याची जी च्युति झाली ती नाहींशीं करून मनुष्याला पुन्हां पूर्वीच्या स्थितींत आणण्याचें तें साधन आहे असें ह्रेनियस म्हणतो व मनुष्यानें परमेश्वराच्या आज्ञेचें उल्लंघन केल्याचें प्रायश्चित असें ॲनसेल्स आणि रिफॉर्मर्स म्हणतात. परमेश्वराचें राज्य पृथ्वीवर प्रस्थापित व्हावें यासाठीं मनुष्याला केलेली शिक्षा असें ग्रोटियसनें म्हटलें आहे. मनुष्याच्या स्थितीविषयीं परमेश्वराला वाटत असलेली सहानुभुति असा बुशनेलनें तर्क लढविला आहे. अशा एक ना दोन अनेक तऱ्हांनीं ख्रिस्ताच्या मरणाचें खरें रहस्य काय आहे हें उकलण्याचा विद्वानांनीं प्रयत्न केला आहे.

मुक्तीचा मार्ग व त्याच्यासंबंधींचे निरनिराळ्या विद्वानांनीं केलेले तर्क याबद्दलचें वर विवेचन केलें. आतां मुक्तिकल्पनेसंबंधीं थोडा विचार करणें जरूर आहे. रोमनसाम्राज्यांत ख्रिस्ती धर्माचा पूर्ण प्रसार होण्यापूर्वी ख्रिस्त हा मेसाया असून, त्याचें आदर्शभूत राज्य पृथ्वीच्या पाठीवर प्रस्थापित होणार या तत्वावर व ख्रिस्ताच्या पुनरुत्थानावर तत्कालीन लोकांचा पूर्ण विश्वास होता. पण रोमन साम्राज्याच्या काळांत या तत्वांवरील लोकांचा विश्वास उडत चालला. पृथ्वीवर देवाचें राज्य होणार व त्यामुळें सर्व जगाचा उद्धार होणार ही मुक्तीच्या संबंधींची कल्पना जाऊन साधु पुरुषाचें आकाशांतील बापाच्याकडे गमन म्हणजे मुक्ति होय अशी नवीन कल्पना उदयास आली. तसेंच 'ख्रिस्ताचें पुनरुत्थान ' याचा अर्थ ख्रिस्त हा पुन्हां खरोखर जिवंत होणार असा नसून, आत्म्याचें अमृतत्व सिद्ध करण्यासाठीं वरील शब्दयोजना रूढ झाली असा करण्यांत येऊं लागला. जगाच्या अंतीं सर्व लोक पुन्हां जिवंत होऊन त्यांच्या पापपुण्याचा निवाडा जगाच्या शेवटच्या दिवशीं होणार ही कल्पना मात्र नाहींशीं झाली नाहीं. ख्रिस्तीधर्मामध्यें जे विचार करणारे विद्वान होते त्यांनीं वरील मुक्तिकल्पनेचा लाक्षणीक अर्थ करण्यास सुरुवात केली. पृथ्वीवर देवाचें राज्य लवकरच होणार याचा अर्थ, ख्रिस्ताच्या तत्वांचा जगभर प्रसार होणार असा करण्यास त्यांनीं सुरुवात केली. पापी मनुष्याला नेहमीं यातना भोगावयास लागतात अशी कल्पना ख्रिस्ती लोकांत पूर्वी होती पण ही कल्पना हळू हळू नाहींशी होत चालली असून तिच्या जागीं परमेश्वर हा परमकारुणिक असल्यामुळें तो कोणालाहि कायम नरकांत टाकणार नाहीं ही कल्पना रूढ झाली. तसेंच स्वतःच्या आत्मोन्नतीपुढें सर्व जग हें तुच्छ आहे ही विचारसरणी अस्तित्वांत आली.

धर्मसंस्कारः—ख्रिश्चन चर्च हें ख्रिस्ताचें भौतिक शरीर असून त्यामध्यें ख्रिस्ताचा आत्मा वास करतो अशी

ख्रिस्ती लोकांची भावना असे. ख्रिस्ती लोकांची चर्चविषयीं अशी भावना असल्यामुळें चर्चसंस्थेला फार महत्व प्राप्त झालें. कालांतरानें या चर्च संस्थेनें ख्रिस्ती लोकांनीं कोणते धर्मसंस्कार पाळणें आवश्यक आहे याबद्दल नियम करण्यास सुरुवात केली. रोमन कॅथोलिक पंथाच्या मतें प्रत्येक ख्रिस्ती मनुष्याचे सात संस्कार झाले असले पाहिजेत. या सात संस्कारांमध्यें बाप्तिस्मा व प्रभुभोजन हे मुख्य संस्कार होत. या बाप्तिस्म्याच्या संस्कारामुळें मुलाच्या जन्माबरोबर जे कांहीं दोष आले असतील त्यांचा परिहार होतो असें रोमन कॅथोलिक पंथाचें मत आहे. प्रॉटेस्टंट लोकांच्या मतें हा संस्कार म्हणजे प्रत्येक मूल ख्रिस्ताच्या कृपेला पात्र आहे याची बाह्य खूण असून,आईबापांनीं आपलें मूल देवाला अर्पण केल्याचा हा संस्कार निदर्शक होय. प्रभुभोजनाच्या संस्कारामुळें मनुष्याच्या पंचमहाभूतात्मक देहाचें ख्रिस्ताच्या शरीरांत व रक्तांत रूपांतर होतें असें रोमन कॅथोलिक पंथांतील लोकांचें म्हणणें आहे. ल्यूथरच्या पंथाच्या मतें या संस्कारामुळें या भौतिक देहामध्यें ख्रिस्त हा वास करूं लागतो. कॅल्व्हीन पंथाचे लोक हा संस्कार ख्रिस्ताच्या कृपेची बाह्य खूण मानितात.

ख्रिस्ती धर्माचीं मुख्य तत्वें कोणतीं आहेत याचें आतांपर्यंत विवेचन केलें. त्यानंतर ख्रिस्ती धर्मामध्यें नीतितत्वें कोणतीं आहेत हेंहि सांगणें जरूर आहे. ख्रिस्ती धर्मांतील तत्वें धर्मपर नसून विशेषतः नीतिपर आहेत असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. कांहीं पंथांच्या मतें ख्रिस्ती धर्माचें महत्व ख्रिस्तानें प्रतिपादन केलेल्या नीतितत्वांवरच अवलंबून आहे. मनुष्यजात ही परमेश्वराची संतति असल्याकारणानें मनुष्यानें परमेश्वरावर अनन्यभक्ति केली पाहिजे व त्याबरोबरच आपल्या बांधवांवर व शेजाऱ्यापाजाऱ्यांवरहि प्रेम केलें पाहिजे हें अत्युच्च तत्व ख्रिस्तीधर्मांत आढळून येतें. परमेश्वराची अनन्यभक्ति करणें म्हणजे त्याला अनन्य भावानें शरण जाणें व अहंभावाची वृत्ति विसरून जाणें होय. येशू ख्रिस्त हा स्वतः या तत्वाचा मूर्तिमंत आदर्श होता. त्यानें हें तत्व प्रस्थापित करतांना स्वतःचा बळी देखील दिला. 'अनन्यभावानें तूं जगाचा स्वामी जो परमेश्वर त्याची भक्ति कर व आपल्या शेजाऱ्यावर प्रेम कर' असा ख्रिस्ताचा उपदेश आहे असें ख्रिस्ती सांप्रदायिकांचें म्हणणें आहे.

सर्व लोक हे आपले बांधव आहेत अशा प्रकारची बंधुत्वाची भावना चर्चच्या पूर्वेतिहासांत आपल्याला आढळून येते पण पुढें ही व्यापक व उच्च भावना हळू हळू लुप्तप्राय होत चालली व त्याच्या जागीं वैयक्तिक उन्नतीकडे लोकांचें लक्ष्य वेधलें. संसाराचा त्याग करून, भिक्षुवृत्तीनें एखाद्या मठांत राहून, स्वतःची आत्मोन्नति करण्यापलीकडे जगांत उच्च कर्तव्य नाहीं अशी कल्पना रुढ झाली. ख्रिस्ताच्या सार्वत्रिक प्रेमाची शिकवण मागें पडली, तरी पण भिक्षूलोकांचा वर्ग वाढत चालल्यानें लोकांच्या आचारविचारांत बरीच शुद्धता येत चालली. ख्रिस्ताप्रमाणें अगदीं निर्धन होऊन रहाण्यांत कित्येकांनां आपल्या जीविताचें ध्येय आहे असें वाटू लागलें; व तशा प्रकारचा उपदेशहि करण्यांत येऊं लागला.

उपासनाविधि—परमेश्वराची अनन्यभक्ति हें ख्रिस्तनीतीचें प्रमुख अंग आहे असें वर सांगितलें. ही भक्ति कशी करावयाची यासंबंधीं ख्रिस्ती धर्मांत कोणते विधी आहेत हें आपण पाहूं. परमेश्वर व भक्त यांमधील संबंध हा वैयक्तिक स्वरूपाचा असतो. ज्याला जसें वाटेल त्या प्रकारानें परमेश्वराला भजण्याची प्रत्येकाला मोकळीक असावी हें उचित होय. ख्रिस्ती धर्माच्या प्रारंभीं प्रत्येकाला परमेश्वराची उपासना करण्याच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असे पण पुढें उपासनेच्या बाबतींतील स्वातंत्र्य हळू हळू नष्ट होत जाऊन उपासनेच्या बाबतींत बरेच निर्बंध घालण्यांत आले व अशा रीतीनें उपासनेला सांप्रदायिक स्वरूप देण्यांत आलें. चर्चमधील धर्मगुरु ठरवितील त्या मार्गानेंच उपासना करण्याचा प्रघात अमलांत आला. रोम व ग्रीसमधील चर्चमध्यें उपासनेचे ठराविक नियम करण्यांत आले. इंग्लंडच्या चर्चनें आपला उपासनाविधि निश्चित केला. इतर चर्चनींहि आपापले उपासनाविधी ठरवून टाकले. सर्व लोकांनीं चर्चमध्यें जमून प्रभुभोजन केलें असतां मनुष्याला पुण्यप्राप्ति होते, सामुदायिक प्रार्थना केली असतां मनुष्याचें पाप परमेश्वर जाळून टाकतो अशा प्रकारच्या कल्पना धर्मगुरूंनीं प्रसृत केल्या व त्यामुळें या विधींनां एक प्रकारचें पावित्र्य प्राप्त झालें. या उपासनाविधींच्या विरुद्ध पुष्कळदां आक्षेप घेण्यांत आले पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं.

सारांश ख्रिस्ती धर्म हा भक्तीचा पंथ आहे. आपल्या देशांतील भक्तिमार्गाशीं याचें पुष्कळ साम्य दिसून येतें. ख्रिस्त हा देवाचा अवतार असून त्याची भक्ति केली असतां परमेश्वराची प्राप्ति होते,हें या धर्माचें मुख्य अंग आहे. विश्वप्रेम हें या धर्माचें नैतिक अंग आहे. इतर धर्मांतील तत्वांचा खरा अर्थ लावण्यासाठीं ज्याप्रमाणें पुष्कळ श्रेष्ठ पुरुषांनीं प्रयत्न केले त्याचप्रमाणें ख्रिस्ताच्या धर्मांतील मुख्य तत्वांसंबंधींचें विशदीकरण करण्याचा पुष्कळांनीं प्रयत्न केला. ख्रिस्ताच्या मूळ धर्मतत्वांमध्यें कालांतरानें कांहीं तत्वांची भर पडली. या धर्माचे आज अनेक पंथ झाले आहेत व पुढें आणखीहि होतील. पण या सर्व भूत व वर्तमान पंथांच्या मुळाशीं ख्रिस्त हा परमेश्वराचा अंश असून त्याच्या भक्तीमुळेंच परमेश्वराची प्राप्ति मनुष्याला करून घेतां येते हेंच सामान्य तत्व ग्रथित केल्याचें आढळून येतें.

ख्रि स्ती सं प्र दा य, शा स न सं स्था व मा न वी स्वा तं त्र्य.—ख्रिस्ती संप्रदायामध्यें जे शिरले ते ख्रिस्ती संप्रदायाच्या आद्य मताप्रमाणें रहावयास तयार झाले आणि संप्रदायाचीं आद्यमतें सर्वांस बंधनकारक आहेत असें त्याबरोबर गृहीत धरण्यांत येतें. संप्रदायानें ग्रंथ विशिष्ट आज्ञारूप किंवा

सूत्ररूप नसल्यामुळें ते ग्रंथ विधिनिषेधात्मक करण्यासाठीं त्याचा अर्थ काढणें अवश्य होतें. हे अर्थ काढावयाचे झाले म्हणजे वाटेल तो मनुष्य वाटेल तो अर्थ काढणार. या परिस्थितींत अर्थ काढण्यास कोणी अधिकारी मनुष्य पाहिजे अशा तऱ्हेचा युक्तिवाद कोणासहि पटणार. अर्थ काढण्याचा किंवा विधिनिषेधात्मक शेवटचे नियम देण्याचा अधिकार आमचा आहे असें रोमच्या पोपनें मांडण्यास सुरुवात केली. रोमचा पोप हा, इतिहास पाहतां केवळ रोमचा बिशप होता पण त्यास रोमन साम्राज्याच्या अस्तित्वामुळें धार्मिक प्रामुख्य प्राप्त झालें; आणि रोमचें साम्राज्य जरी लयास गेलें तरी रोमच्या पोपचें महत्व कायमच राहिलें. याचा परिणाम असा झाला कीं, सर्व पाश्चात्य जग बौद्धिक आणि अध्यात्मिक बाबतींत रोमच्या तावडींत सांपडलें, आणि राज्याचे म्हणजे पोलीसी अधिकार तेवढे राजाकडे राहिले. राजावर व त्याच्या प्रजेवर अध्यात्मिक अधिकार पोपचा. पोपनें वाटेल त्या राजावरहि बहिष्कार घालावा आणि प्रसंग पडल्यास राजाच्या प्रजेसहि राजाचे हुकूम न मानण्यास सांगावें अशा तऱ्हेची परिस्थिति उत्पन्न होऊन शासनसंस्था(म्हणजे राज्याधिकार) पोपच्या तावडींत पूर्णपणें सांपडल्या. शासनसंस्थांवरील पोपचें किंवा पंथाचें महत्व कमी करण्यास तीन पायऱ्यांनीं प्रयत्न झाले.

पहिला प्रयत्न प्राटेस्टांटिझम होय. यामध्यें धर्मग्रंथाचा आयुष्यावरील हक्क प्रधानतेनें झुगारला नाहीं;किंवा अधिकारयुक्त व्यक्ती किंवा संस्थांनीं लावलेल्या अर्थाचें महत्व कमी करण्यांत आलें नाहीं, तर केवळ पोपचें वर्चस्व झुगारून लावलें. पहिले जे प्रॉटेस्टंट पंथ होते ते व्यक्तिस्वातंत्र्यवादी आणि मतस्वातंत्र्यवादी मुळींच नव्हते. ते स्वतः जरी पोपच्या मतापासून भिन्न असले तरी त्यांच्या मतापासून भिन्न असलेल्या लोकांचा ते फारच छळ करीत.

अधिकारयुक्त अर्थस्पष्टीकरण मानावयास लावण्याची पद्धति जरी कांहीं दिवस चालू राहिली तरी लवकरच वैयक्तिक अर्थ लावण्याचा अधिकार सांगणारे नॉनकन्फरमिस्टांचे पंथ तयार झालेच. त्यामुळें चर्चचा पगडा बराच कमी झाला. तथापि ख्रैस्त्य हें शासनसंस्थेला आद्य कायदा आहे या प्रकारच्या समजास धोका पोहोंचला नव्हता. तथापि अमेरिकेनें जेव्हां आपलीं शासनसंस्थेचीं आद्यतत्वें लेखनिविशिष्ट केलीं आणि चर्चचा किंवा खैस्त्याचा शासनसंस्थेशीं संबंध तोडून टाकला तेव्हां शासनसंस्थेचें स्वातंत्र्य पूर्णपणें स्थापन केलें गेलें. अमेरिकेंत शासनसंस्थेशीं युक्त असा ख्रैस्त्य पंथ नाहीं एवढेंच नव्हे तर सार्वजनिक शाळांतून बायबलचें शिक्षण बंद केलें आणि बायबलास ' सेक्टेरियन ' म्हणजे पक्षविशिष्ट पुस्तक ठरविलें.

विवाहादि संस्कारांवर ताबा ठेऊन म्हणजे मनुष्याच्या आयुष्याला कृत्रिम तऱ्हेनें जखडून टाकून धर्माचें अध्यात्मिक स्वरूप कमी करण्याच्या प्रयत्नाचा शेवट अजून लागला नाहीं. अजून " ख्रिस्ती " लग्नें प्रचलित आहेतच. हा सर्व पाश्चात्य भिक्षुकशाहीचा प्रयत्न होय. ख्रिस्त स्वतः लग्नेंमुंजी लावणारा भिक्षुक नव्हता. त्या पंथाला ही भिक्षुकी पाश्चात्य देशांत जोडली गेली. ही जेव्हां नष्ट होईल तेव्हां धर्माचें खरें स्वरूप प्रगट होईल. हिंदुस्थानांत ख्रिस्ती मत वाढत आहे. आणि जर लग्नासारखे संस्कार भावी राष्ट्रीय ख्रिस्ती पंथांतून हिंदुस्थानानें अजीबात हांकलून लावले तर ख्रिस्ती संप्रदायाचें अत्युच्च स्वरूप हिंदुस्थानांत प्रगट होईल अशी जी जगाची आशा आहे त्या आशेस मूर्त स्वरूप येण्यास मदत होईल.

हिं दु स्था नां ती ल ख्रि स्ती स मा ज.—१९२१ सालीं एकंदर ख्रिस्ती लोक ४७,५४,०७९ होते. १९११ सालीं ३८,७६,२०३ होते. १८७२ते१९११ या ५ दशकांतल्या खानेसुमारीच्या आंकड्यांवरून पहातां ख्रिस्ती समाज कसा झपाट्यानें वाढत आहे तें दिसून येईल.

काल	हिंदी ख्रिस्त्यांच्या संख्येंतील फेरबदलाची शेकडेवारी
१८७२–१८८१	+२२.०
१८८१–१८९१	+३३.९
१८९१–१९०१	+३०.८
१९०१–१९११	+३४.२

१९११ च्या ख्रिस्ती लोकसंख्येंत ३५,७४,७७० हिंदी ख्रिस्ती म्हणजे शेंकडा ९२ हून अधिक व बाकीचे यूरोपियन आणि आंग्लोइंडियन होते. हिंदी ख्रिस्त्यांपैकीं अदमासें २/५ रोमन कॅथॉलिक व १/६ रोमो सिरियन होते. एकंदर संख्येच्या १/१० प्रत्येकीं आंग्लिकन व बाप्टिस्ट असून राहिलेल्या पंथांपैकीं शेंकडा सहा लुथरन, मेथॉडिस्ट व प्रेसबिटेरियन हे प्रत्येकीं शेंकडा पांचहून कमी व कॉन्ग्रेगेशनॅलिस्ट शेंकडा चार होते.

आतां प्रांतवार विचार करितां (१९११ च्या खानेसुमारीवरून) असें आढळून येतें कीं, हिंदी ख्रिस्त्यांच्या एकंदर संख्येपैकीं अदमासें ३/५ लोक मद्रास इलाखा व त्यांतील हिंदी संस्थानें यांतून रहातात. मद्रासेंतील कोचीन व त्रावणकोर संस्थानांत तर एकंदर लोकसंख्येच्या १/४ हूनहि जास्त ख्रिस्ती आहेत. खुद्द मद्रास इलाख्यांतील ख्रिस्त्यांपैकीं निम्मे ख्रिस्ती दक्षिण जिल्ह्यांतून आहेत. ते सेंट फ्रान्सिस झेवियर व स्वार्झ यांच्या अमदानींत झालेल्या ख्रिस्त्यांचे वंशज आहेत. इतर प्रांतांतील ख्रिस्तीमतप्रसार मद्रासेंतल्या प्रसारापेक्षां बराच मागाहूनचा आहे. मद्रासनंतर बिहार ओरिसा (२६८०००), मुंबई (२४६०००), ब्रह्मदेश (२१००००), पंजाब (२०००००) आणि संयुक्तप्रांत (१८००००) असा उतरता संख्यानुक्रम लागतो. प्रमुख प्रांतांत बंगाल (१३००००), वऱ्हाड मध्यप्रांत (७३०००) व आसाम (६७०२०) यांत ख्रिस्ती अगदीं थोडे सांपडतात.

निरनिराळ्या ख्रिस्ती मिशनरी पंथांचा वाढता प्रसार दृष्टीखालीं घातल्यास स्वसमाजबलवर्धनासाठीं प्रत्येक मिशनरी पंथ काय काय खटपटी करीत असेल याकडे लक्ष जाईल. १९०१-१९११ या दशकांत आंग्लिकन कम्यूनेअनची वाढ शें. ९ नें झाली या वाढींत बिहार-ओरिसानें शेंकडा ६६, पंजाबनें ४७ व मद्रासनें २१ मिळवून दिले. पुष्कळसे प्रॉटेस्टंट आंग्लिकन म्हणून गणिले जातात, त्यामुळें वरील आंकड्यांत जरा फेरफार होईल. बाप्टिस्ट पंथाचें मुख्य पीठ मद्रासेंत असून वरील दशकांत तो शेंकडा २२ नें वाढला. लुथरन शें. ४१ नें वाढले तर मेथॉडिस्ट दोन पूर्णांक एक चतुर्थांश पटीनें जास्त झाले. एकंदर मेथॉडिस्ट (१७२०००) पैकीं तीनपंचमांश संयुक्तप्रांतांत आहेत. प्रेसबिटेरियनांची १९११ मधील १,८१,००० ही संख्या १९०१ मधील संख्येच्या तिप्पट आहे. पंजाबांत १९०१ सालीं सारे ५००० प्रेसबिटेरियन होते; तर दहा वर्षांनीं पाहूं जातां ९५००० भरले. रोमन कॅथोलिकांची वाढ बिहार ओरिसांत शेंकडा ६८ झाली असून मद्रासेंत म्हणजे जेथें त्यांची संख्या सर्वांत अधिक (:६९४०००) आहे येथें सारी शें. ९चं बाढ झालेली दिसते. साल्वेशनिस्ट(मुक्तिफौज)लोकांची संख्या १९ हजारांवरून ५२ हजारांवर गेली. या वाढीचें मुख्य कारण गुन्हेगार जाती व अस्पृश्यवर्ग यांकडे या पंथाचें विशेष लक्ष आहे.

सरकारची ख्रिस्ती संप्रदायाच्या वाढीस मदत.—बऱ्याचशा प्रांतांतून या जातींनां ख्रिस्ती कळपांत ओढण्याला सरकारची मदत या पंथाला मिळते. पोलिसांच्या देखरेखीनें सुद्धां ज्यांची वाईट प्रवृत्ति कमी होत नाहीं त्या जातींनां ताळ्यावर आणण्याची विशेष व्यवस्था या पंथानें सरकाराकडून करून घेतली आहे. हलक्या जातींच्या लोकांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं उद्योगधंदे शिकविण्यांत येतात.

मलबार किनाऱ्यावर धर्मांतराचें कार्य करणारा सीरियन पंथ फार प्राचीन (इ. स. ६ वें शतक) असून त्यांत रोमोसिरियन, जॅकोबाईट, सिरियन व रीफॉर्मेड (सुधारलेले) सीरियन असे तीन मुख्य वर्ग आहेत. इ.स. १९०१-१९११ या दशकांत सीरियनांची एकंदर वाढ शें. २७ वर झाली. या समाजांतील ⅘ हून अधिक लोक खुद्द त्रावणकोर संस्थानांत आहेत.

एतद्देशीय ख्रिस्त्यांतील नवीन स्थानिक पंथ.—हिंदुमुसलमान बाटून ख्रिस्ती बनल्यावर पूर्वसंस्कारांमुळें किंवा अन्य कारणांनीं नवीन आचारविचार सुरू करितात किंवा पूर्वधर्मांतील कांहीं संस्कार व विचार कायम ठेवून त्यांनां ख्रिस्त्याला फारसें विसदृश दिसणार नाहीं असें वळण देतात. यामुळें त्यांच्यांत नवीन पंथ अस्तित्वांत येतात.

युगोमयम पंथ.—त्रावणकोर संस्थानामध्यें अशाच प्रकारचा एक पंथ गेल्या शतकाच्या अखेरीस अस्तित्वांत येऊन त्यांतील लोकांची संख्या (इ.स. १९११) ११२१ पर्यंत गेली आहे. उपासना, भोजन, विवाह, और्ध्वदेहिक वगैरे बाबतींत सामान्य ख्रिस्त्यांपेक्षां या पंथाच्या चालीरीती वेगळ्या आहेत. पंथसंस्थापकाच्या घराण्याहून जास्त श्रेष्ठ असा कोणीहि मानिला जात नाहीं. याचा हल्लींचा मुख्य उपाध्याय या घराण्यांतलि एक आहे. नवा व जुना करार यानां सारख्याच दर्जाचे मानण्यांत येतें. जाहीर उपासनेचें स्थळ यांनां लागत नाहीं. लग्नें घरांतल्या घरांत होतात. फक्त लग्नाचें रजिस्टर उपाध्यायानें ठेवावें लागतें. यांच्यांतील 'आशीर्वाद' संस्कार ब्राह्मणी धर्तीवर आहे.

अहल-इ-नसारा आणि आर. सी. दत्त पंथ.—पंजाबांतील प्रॉटेस्टंट ख्रिस्त्यांत वरील पंथ आहेत. नांवावरूनच ते नवीन म्हणून ओळखिले जातात. हे पंथ प्रेसबिटेरियन आहेत अशी माहिती मिळते.

गुलाबशाही पंथ.—पंजाबांत आणखी हा एक विचित्र नामाचा पंथ आहे. त्याचा समावेश रोमन कॅथोलिकांत करितात. गुलाबशाही नांवाचा एक मुसुलमान गुजर होता. तो बाटून ख्रिस्ती झाला. नंतर त्यानें हा पंथ स्थापिला. हा फकिरी पंथासारखा असून यांतील पुरुष व बायका दोघेहि मुंडण करून घेतात व ब्रह्मचारी वृत्तीनें राहतात.

ग—तिसरें व्यंजन. याचे संस्कृत भाषेत (१) गंधर्व, (२) गणपति, (३) गुरु स्वर व (४) तीन ही संख्या असे अर्थ असून गचे या अर्थी मराठींत योजतात; जसें, त्याला गची बाधा झाली आहे. समासांत शब्दापुढें जोडिला असतां त्याचा अर्थ -'नें गमन करणारा' असा होतो; जसें, उरग.

अक्षरविकास—या वर्णाची पहिली अवस्था काक पदाकृति असून ती इ.स. च्या ३ ऱ्या शतकांतल्या अशोकाच्या गिरनार शिलालेखांत दिसून येते. मोडींतहि ही अवस्था दिसते. वर्तुलांशासारखी दिसणारी 'ग' ची दुसरी अवस्था व बाराखडींतील दीर्घ ई (ी)चें चिन्ह वाटणारी तिसरी अवस्था इ. स. पहिल्या व दुसऱ्या शतकांतल्या मथुरा येथील लेखांत पाहावयास मिळते. चवथी अवस्था जपानांत होर्युजीच्या मठांत सांपडलेल्या 'उष्णीषविजयधारणी' च्या ताडपत्री पुस्तकांत संशोधिली गेली आहे. या पुस्तकाचा काल इ. स. ६ वें शतक मानितात. यानंतर एक दोन शतकांतच आजचा वळणदार 'ग' तयार झाला. [प्राचीन लिपिमाला]

गख्खर—इतिहासामध्यें या लोकांचा उल्लेख प्रथम बाबरच्या कालांत आढळतो. 'तबकात-इ-अकबरी' मध्यें यांचा प्रदेश सिंधु नदीवरील नीलाबप्रांत असल्याबद्दल म्हटलें आहे व यांच्या ताब्यांत शिवालिक पर्वतांपासून काश्मीरच्या सरहद्दीपर्यंतचा सर्व प्रदेश असून त्या प्रदेशांत यांच्या सत्तेखालीं खरी, जनूब, जत्रीय, भूक्याल व जाट वगैरे लोक रहात असत असें सांगितलें आहे. बाबर यानें 'तुझक-इ-बाबरी' मध्यें म्हटलें आहे कीं, नीलाब व बहूर (भेरा) प्रांतांत गख्खर लोकांची सत्ता असून तेथें जाट, गुजर लोकहि रहातात.

बाबरच्या कालीं या जातींची राजसत्ता तातार व हाती या दोन चुलतभावांच्या हातीं होती.

अबुल फजल म्हणतो कीं काश्मीरवर झै-नुल-अबिदिन याचा अम्मल असतांना गझनीचा एक सरदार मलिक कैद यानें झेलम व सिंधु या नद्यांमधील प्रदेश काश्मीरी लोकांपासून घेतला. याच्यानंतर त्याची वंशावळ खालील प्रमाणें आहे.

मलिक कैद
|
मलिक कलान
|

तातार हा परहाला किल्ल्यावर रहात असून हाती हा जवळील डोंगराळ मुलखांत रहात असे. पुढें हातीनें तातार यास ठार मारून त्याचें राज्य घेतलें. इतक्यामध्यें बाबरनें स्वारी करून परहाला घेतला, तेव्हां हाती हा त्यास शरण गेला. शीरशहानें हुमायुनास हांकून दिल्यावर मोंगलांच्या स्वाऱ्यांस अडथळा करण्याकरितां आणि गख्खर लोकांस दाबांत ठेवण्याकरितां त्यानें रोहट किल्ला बांधण्यास सुरवात केली. तेव्हां गख्खर लोकांनीं मजूर मिळण्यास अडथळे आणले. तेव्हां शीरशहानें गख्खरांचा राजा सारंग याजवर सैन्य पाठविलें व त्या सैन्यानें सारंगचा पराभव करून बलनी टेंकडी लुटली. रायासारंग याची मुलगी हस्तगत झाली; तिला शीरशहाचा सरदार खवासखान यानें बायको केली. रायसारंग हा कैदी झाला व त्याचें जिवंतपणीं कांतडें सोललें; व याचा मुलगा कमालखान यास कैद करून सिवालिक पर्वतांत ठेवलें. यावरून रोहट किल्ला इ. स. १५४० मध्यें अर्धवट बांधला गेला होता असें दिसतें; तो पुढें ८।१० वर्षांनीं पुरा झाला.

इ. स. १५४८ (हि. स. ९५५) मध्यें सुलतान इस्लाम उर्फ सलीम शाहसूर यानें पराभव केल्यामुळें नियाझी लोक गख्खर प्रांतांत सुलतान आदम यांजकडे आश्रयार्थ आले. तेव्हां सलीमशाहनें गख्खर प्रांतावर स्वारी करून सुलतान आदम यास शरण येण्यास भाग पाडिलें. सेलीमशाहनें कमालखान यास सोडून देऊन त्यास पंजाबच्या सुभेदाराच्या मदतीनें गख्खर ताब्यांत ठेवण्यास पाठविलें. इ. स. १५५२ मध्यें हुमायून यानें काबुलाहून हांकून दिलेला कामरान हा सारंगच्या नंतर गादीवर बसलेल्या सुलतान-आदम याजकडे आश्रयार्थ आला. परंतु त्यानें तो न दिल्यामुळें कामरान सलीमशाहकडे गेला. पुढें त्यास आश्रयार्थ

गख्खर प्रांतांत येणें भाग पडलें. त्यावेळीं सुलतान आदम यानें त्यास हुमायूनच्या स्वाधीन केलें व हुमायुनानें त्याचे डोळे काढले (इ. स. १५५३). नंतर हुमायुनानें भेऱ्याचा किल्ला घेऊन तो सुलतान आदम यास दिला. हुमायून गादीवर बसल्यानंतर त्यानें सारंग याचा मुलगा कमालखान यास सुलतान आदमचें अर्धें राज्य दिलें. हा हुकूम अमलांत आणण्याकरितां हुमायुनास सैन्य पाठवून आदम खान यास कैद करून कमाल याच्या स्वाधीन करावें लागलें. तो पुढें जन्मभर कैदेंतच होता. कमालखान हा सर्व गख्खर प्रदेशाचा मालक झाला. अकबराच्या कारकीर्दीत गख्खर (खोखार ?) लोकांच्या ताब्यांत लाहोरसरकारच्या सिंधसागर दुआबांतील ४२ महालांपैकीं ७महाल होते.

गख्खर यांनां खकर असेंहि नांव फेरिस्ता हा देतो. कै. नी. ज. कीर्तने यांच्या मतें वीरनारायण व वाग्भट चव्हाण यांच्या वेळेस या खकर लोकांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली होती. हे लोक मोंगललोकांचीच एक शाखा असून न्यायचंद्रसूरीच्या हम्मीर काव्यांत ज्या लोकांनां 'खर्पूरास ' असें नांव दिलेलें आहे ते हेच लोक असावेत असेंहि कीर्तने म्हणतात'खोखार'पहा.[इंडियन अँटिक्वरी. १९०७; रॉबर्टी; अर्स्किन; एलफिन्स्टन; स्मिथ].

गंग घराणें.—हें राजघराणें म्हैसूरप्रांतावर आठव्या शतकाच्या अखेरीस राज्य करूं लागलें. यावेळीं दख्खनमध्यें पल्लवघराणें मोडकळीस आलें होतें व चोलघराणें उदयास येऊं लागलें होतें. या गंगघराण्याची राजधानी कोलार व तलकद (तलकाड) या दोन ठिकाणीं निरनिराळ्या वेळीं होती. यांची व पांड्यराजांची नेहमीं झटपट होई. गंग हे पूर्वी राष्ट्रकूटांचे मांडलिक होते परंतु पुढें राष्ट्रकूटांची सत्ता विस्कळित झाल्यानें गंग हे स्वतंत्र होऊं लागले. त्यांनीं या पाण्ड्यांनां उत्तरेकडे राज्य वाढविण्यास अडथळा केला; तेव्हां वरगुण पांड्यराजानें गंगांचा कुंभकोणाजवळ तिरुप्पुरंबियें येथें पराभव केला. त्यामुळें चोल घराण्याला आपली सत्ता वाढविण्यास सोपें होऊन त्यांची सरहद्द गंगराज्याशीं येऊन भिडली. पुढें (९५०) राष्ट्रकूट कृष्णराज (तिसरा) यानें राजादित्य चोलावर स्वारी केली असतां पेरुमानदी बूतुग या गंगराजाच्या कारवाईनें राजादित्य हा त्या लढाईत मारला गेला, परंतु थोड्याच दिवसांत प्रख्यात राजराज चोलानें शत्रूंपासून आपले प्रांत परत मिळविले त्यावेळीं गंगराजांचा त्यानें पराभव केला. गंगांचा गंगवडी प्रांत (उत्पन्न ९६ हजार) चोलानीं काबीज केला. गंगघराण्यांत प्रख्यात असे पेरुमानदी बूतुग व मारसिंह हे राजे झाले. अकराव्या शतकाच्या मध्यांत या गंगराजांनीं चोलराज राजादित्य याच्या राज्यविस्तारास अटकाव करून तक्कोलम येथें त्याचेवर स्वारी करून त्याचा पराभव केला व नोळम्बवाडी ३२ हजार वसुलाचा मुलुख सांप्रतचे टुमकुर व चितळदुर्ग काबीज केला ही गोष्ट दुसऱ्या मारसिंहाच्या गंगराजाचे वेळीं घडली.

या घराण्याचा मूळपुरुष काश्यपगोत्री कण्वऋषी होय असें म्हणतात. त्यानंतरचा प्रख्यात पुरुष म्हणजे सिंहनंदी असून त्याच्या वेळीं या घराण्यास बरेंच महत्त्व प्राप्त झालें. नंतर या वंशांतील कोंगणी नांवाच्या एका राजानें कुवलालपुर (कोलर ?) ही आपली राजधानी केली. याच्या पुढें शिवमार स. ६६८ व त्याचा पुत्र पृथुयश यांचा अंमल बऱ्याच मोठ्या प्रांतावर असून अमोघवर्ष दिंडिकोंजेरिग या राजांनीं आश्रय घेतला. पृथुयशानें वरगुण पाण्ड्यराजाचा श्रीपुर येथें पराभव केला व त्याला कैद केलें. याच्या मागून याचा मुलगा मारसिंह(वरच्याहून भिन्न) गादीवर आला. याच्यानंतर त्याचा पुत्र केसरी अथवा पृथ्वीपति यानें आभीर राजाला आश्रय दिला होता. यानंतर या घराण्यांत पृथ्वीकोंगाणी अथवा श्रीपुरुष हा राजा झाला. स. इ. ७२७ त किग्गटनाड (कूर्गप्रांत)येथील शिलालेखावरून इ. स.८८७ मध्यें या घराण्यांत सत्यवाक्य कोंगुणीवर्मन परमानडी नांवाचा राजा होऊन गेला असें दिसतें. उदयेंदिरम येथील ताम्रपटावरून इ. स. ९०० च्या वेळीं गंगराज पृथ्वीपति हस्तिमल्ल हा हयात असून त्याला परांतक (चोल) यानें बाणराज्य काबीज करून तेथला कारभार सांगितल्याचें व हस्तिमल्ल हा परांतकाचा मांडलिक असल्याचें दिसतें. यापुढें आठकुरा येथील शिलालेखावरून पुढील माहिती निघते. सत्यवाक्य कोंगुणीवर्मन वरमानडी बूतुग हा राष्ट्रकूट कृष्ण राजा (तिसरा) चा माडलिक असून त्यानें इरेयप्पाचा मुलगा राचमल्लास ठार मारून गंगावडी प्रांत हस्तगत केला. (९४९). हेब्बाळच्या शिलालेखावरून बूतुग यानें (९११ ते ९४० च्या दरम्यान) अमोघवर्ष बड्डिग याच्या मुलीशीं लग्न लाविलें त्यावेळीं त्याला पुलीगर, बेळवोल, किस्सुकाड आणि बागेनाड हे परगणे हुंड्यामध्यें मिळाले असें ठरतें; पुढें तिसऱ्या कृष्णराजा (राष्ट्रकूट)नें, बूतुग यानें राजादित्य चोलास मारल्याबद्दल वनवासी नांवाचा आणखी एक परगणा जहागीर दिला.

वर आलेला इरेयप्पा हाहि एक गंगराजा होता. त्याचे संबंधीचा शिलालेख म्हैसूर प्रांतांत बेगूर येथें आहे; पण त्यावर काल दिलेला नाहीं. बूतुग याचा पुत्र मारसिंह होय. हा त्याचा सावत्र भाऊ रच्छ (?) याचे मागून गादीवर बसला (९६३). तो दहा वर्षे राज्य करून ९७४ सालच्या सुमारास मेला (मेलागनी व कारथ येथील शिलालेख). या मारसिंहानें गंगवाडी, पुलीनगर, बेळवोल, बनवासी, नोळंबवाडी व सांतळीग या प्रांतांवर राज्य केलें. त्यानें गुजराथेवर स्वारी केली होती, नोळंबवाडीच्या पल्लवांस जिंकून, मान्यखेट, गोनूर येथें मोठें विजय मिळविले (श्रवण बेळगोळचा शिलालेख). मारसिंहाचे नंतर पंचलदेव हा गादीवर आला (९७४ चा मुळगुंद शिलालेख); परंतु थोडेच दिवसांत पश्चिम चालुक्य दुसरा ... टार केलें (अदरगुंची व गुडूर येथील

शिलालेख). पुढें (९७८ चा किग्गटनाडचा शिलालेख) ९८० सालीं राचमल्ल हा गंगराजा गादीवर होता. त्याचे मागून (१०२१ बेलूरचा शि. ले.) परमानाडि हा राजा झाला. याच सुमारास (१०३८) पांचव्या कामार्णवाचा मुलगा, पांचवा वज्रहस्त गंगराज व सहावा मधुकामार्णव गंगराज यांचींहि नांवें आढळतात. पुढें १०५५ त (बंकापुर शि. ले.)परमानडी विक्रमादित्य हा राजा होता; यानें बनवासी व गंगवाडी येथें राज्य केलें होतें. पुढें १०७०त राजराजगंग हा त्याचा बाप. पांचव्या वज्रहस्तानंतर आठ वर्षे यानें राज्य केलें.याची बायको राजसुंदरी ही पहिल्या राजेंद्रचोळाची मुलगी होय. यानें वेंगीच्या विजयादित्याला आश्रय दिला.या ा मुलगा अनंतवर्ग चोडगंग होता. पश्चिमगंगकुलांतील (वर आलेला) परमानडी उदयादित्य हा पश्चिम चालुक्य दुसऱ्या सोमेश्वराचा मांडलिक होता. व तो बनवासी, सातळीग व मणदळी या प्रांतावर राज्य करीत होता (१०७५). वरील अनंतवर्मचोड हा १०७८ त गादीवर आला. याप्रमाणें या म्हैसूरकडील गंगघराण्याचा थोडासा इतिहास आहे. यांचा साग्र इतिहास अद्यापि उपलब्ध नाहीं या गंगघराण्याच्या शाखा हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांत राज्य करीत होत्या; त्यांचा उलेख त्या त्या प्रांतांच्या इतिहासाचे वेळीं करूं. [मॅबेल डफ; इं. अँ. व्हॉ. १३]

गंगटोक—बंगाल प्रांतांतील सिकीम संस्थानची राजधानी. उ. अ. २७ ° २०' व पू. रे. ८८ ° ३८'. लो. सं. (१९०१) ७४९.येथें राजवाडा व कांहीं सार्वजनिकइमारती चांगल्या असून तीस्ताव्हॅलीपर्यंत बैलगाडीचा रस्ता जातो.

गंगपूर—ओरिसाचे एक मान्डलिक संस्थान. क्षेत्रफळ २४९२ चौ. मैल. याच्या उत्तरेस जशपूर व रांची जिल्हा; पूर्वेस सिंधभूम; दक्षिणेस बोनई, सम्बलपूर व बाम्रासंस्थानें; पश्चिमेस मध्यप्रांतांतील रायगडचें संस्थान. हा प्रदेश डोंगरसपाटींचा असून कांहीं ठिकाणीं उंच डोंगर आहेत. गंगपूर व ब बाम्रा संस्थान यांच्यामध्यें महावीर नामक डोंगर आहे.

येथील नद्या इब, सांख व दक्षिणकोयेल या आहेत. पैकीं सांख व दक्षिणकोयेल यांचा गंगपूर येथें संगम होतो. या नदीस पुढें ब्राह्मणी हें नांव मिळालें आहे. ही जागा फारच रम्य आहे. असें सांगतात कीं, पराशर ऋषीनें मत्स्यगंधा नामक कैवर्तक कन्येशीं संभोग केला तें हेंच रम्य स्थान आहे. उन्हाळ्यांत बहुतकरून या नद्यांचें पाणी आटतें. येथील श्वापदें वाघ, चित्ते, लांडगे गेंडे वगैरे होत. हें संस्थान एकदां संबलपूरचें मांडलिक होतें. त्यावेळीं संबलपूरचा नागपूरच्या मराठे राजांच्या राज्यांत समावेश होत असे. देवगांवच्या तहाप्रमाणें १८०३ मध्यें तें ब्रिटिशसरकारांस देण्यांत आलें पण १८०६ मध्यें तें मराठा राजास परत मिळालें. १८२६ मध्यें हें ब्रिटिशांस पुन्हां परत मिळालें. १८५७ मध्यें येथील संस्थानिकास प्रथम सनद देण्यांत आली व त्यानंतर १८९९ मध्यें पुन्हां नवीन सनद करून देण्यांत आली. १९०५ मध्यें हें संस्थान छोटानागपूरमधून ओरिसामध्यें घेण्यांत आलें. याचें एकंदर उत्पन्न २,४०,००० रु. असून ब्रिटिशसरकारास खंडणीदाखल रु. १२५० द्यावे लागतात. येथील संस्थानिकावर ओरिसाच्या कमिशनरची देखरेख आहे. कारण तो ट्रिब्युटरी महालांचा सुपरिटेन्डंट आहे. येथील लोकसंख्या (१९११) ३,०३,८२९ आहे. येथील राष्ट्रजाती गोन्ड, ओरा ओन, खरिया, भूया, मुन्डा या आहेत. इब नदीचा दक्षिणेकडील प्रदेश अत्यंत सुपीक आहे. उत्तरेकडील जमीन जरा कमी सुपीक आहे.

गंगवाडी—म्हैसूरमधील गंगराजांची राजधानी. गंगराजांनीं दुसऱ्या शतकापासून तों अकराव्या शतकापावेतों येथें राज्य केलें. हिच्या उत्तरेस मरंडले, पूर्वेस तोन्डनाद, पश्चिमेस समुद्र, दक्षिणेस कोन्गू आहे. येथील लोकांस गंगडीकार म्हणतात.

गंगा—गंगा ही उत्तर हिंदुस्थानांतलि एक प्रमुख नदी आहे. हिचा उगम हिमालयाच्या दक्षिण उतरणीवर होतो. हिमालयांत ज्या अनेक हिमनद्या आहेत, त्यांपैकीं एका हिमनदीच्या शेवटाजवळ एका कोनाड्यांतून जो जलप्रवाह निघतो त्यास गंगा म्हणतात. गंगेचा प्रवाह येथून निघून तो पश्चिमेकडे वहात वहात व हिमालयाच्या दक्षिणेकडील रांगेंतील टेंकड्यांचा भेद करीत दक्षिणेकडे वळतो. तेथून हा प्रवाह आग्नेयीकडे जाऊन अलाहाबादेजवळ पूर्वदिशेस वळतो. अशा रीतीनें पूर्वेकडे चारशें मैल वहात गेल्यानंतर तो दक्षिणेकडे वळतो व अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळतो.संयुक्तप्रांतामधून वहात जात असता या नदीला रामगंगा, यमुना, गोमती, इत्यादि प्रमुख नद्या मिळतात. बंगालच्या हद्दीवर घोग्रा ही तिला मिळते. पाटणाजवळ शोण नदीचा तिच्याशीं संगम होतो. त्यानंतर गंडकीचा व तिचा संगम होऊन ती बंगालच्या उपसागराला येऊन मिळत असतां तिला ब्रह्मपुत्रा ही मोठी नदी येऊन मिळते. गंगेची लांबी १५५७ मैल असून तिच्या कांठीं, हरिद्वार, कनोज, प्रयाग (अलाहाबाद), काशी, पाटणा, शोणपूर, सागरबेटें इत्यादि प्रमुख क्षेत्रें आहेत. गंगेचा जो मुख्य फांटा पूर्वेकडे गेला आहे त्यास पद्मा असें म्हणतात व गंगेचा जो फांटा कलकत्याजवळून गेला आहे त्याला हुगळी हें नांव आहे.

इतर नद्यांचें पाणी ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत कमी होतें त्याप्रमाणें गंगेचें पाणी कमी न होतां या ऋतूंत तिला पूर येतो. याचें कारण गंगेचें मूळ हिमालय पर्वतांत असल्यामुळें, उन्हाळ्यांत हिमालयांतील बर्फ वितळून नेहमीपेक्षां जास्त पाणी वाहूं लागतें हें होय. समुद्रसपाटीपासून गंगेचा उगम जवळ जवळ १३०० फूट उंचीवर आहे. त्यामुळें ती उंचीवरून वहात येत असल्यानें तिच्या प्रवाहाला हरिद्वार वगैरे ठिकाणीं फार जोर आहे. बाकीच्या ठिकाणीं तिचा प्रवाह संथ आहे. तिचें पाणी शुभ्र असून तिच्या कांठचा भाग फार सुपीक आहे. गंगेचे अनेक कालवे काढलेले आहेत.

व ते बरेच रुंद असल्यानें मालाच्या वाहतुकीच्या कामीं त्यांचा फार उपयोग होतो. अशा अनेक दृष्टींनीं गंगेला महत्व प्राप्त झालें कांहीं विशिष्ट कारणांवरून तिला अनेक नांवें प्राप्त झालीं आहेत. ही नदी मूळची स्वर्लोकांत रहाणारी म्हणून हिला वियद्गंगा असें नांव आहे. कपिल ऋषींच्या शापानें जळून भस्म झालेल्या पूर्वजांचा उद्धार करण्याकरितां, भगीरथ नांवाच्या राजानें तिला स्वर्गलोकांतून पृथ्वीवर आणलें. यामुळें भगीरथाच्या नांवावरून तिला भागीरथी असें नांव पडलें. आकाशांतून तिचा प्रवाह विलक्षण गतीनें पृथ्वीकडे येत असतां हा वेग पृथ्वीला सहन होणार नाहीं हें जाणून शंकरानें तिला आपल्या जटेंत धारण केली व तेथून सात प्रवाहांनीं ती पृथ्वीवर वाहूं लागली म्हणून सप्तसिंधु हें तिचें नांव रूढ झालें. जन्हु राजा हा यज्ञ करीत असतां तिच्या प्रवाहानें यज्ञाला अडथळा आला म्हणून त्या राजानें तिला प्राशन केलें व नंतर लोकहितार्थ आपल्या कानांमधून सोडून दिली म्हणून तिला ' जान्हवी ' ही संज्ञा प्राप्त झाली. याशिवाय वरनदी, देवभूति, मंदाकिनी, त्रिपथगा, भोगवती किराती, भद्रसोमा, हरशेखरा इत्यादि अनेक नांवें आहेत.

वैदिक काळांत तिला महत्व प्राप्त झालें नव्हतें. ऋग्वेदांमध्यें चौथ्या व दहाव्या मंडलांत मिळून, अवघ्या दोनदांच तिचा उल्लेख आलेला आहे. पण वैदिक लोक ज्यावेळीं पूर्वेकडे गंगेच्या खोऱ्यांत पसरत चालले त्यावेळीं त्यांनीं गंगा व यमुना यानद्यामधील प्रदेश आपल्या निवासासाठीं निश्चित केला. त्यामुळें गंगेला महत्व प्राप्त होऊं लागलें. महाभारतकाळीं तर तिचें महत्व पूर्णपणें प्रस्थापित झालें होतें. बौद्ध वाङ्मयांत तिचें फारसें महत्व आढळून येत नाहीं. तथापि हिंदुधर्मांत मात्र तिला अलौकिक महत्व प्राप्त झालें इतकेंच नव्हे तर तें आजपर्यंत अवाधित रीतीनें टिकलेंहि आहे. मेगॅस्थिनीसच्या मार्फत तिची माहिती पाश्चात्यांनां झाली.

कोणत्याहि गोष्टीला महत्व प्राप्त झालें कीं त्या गोष्टीबद्दल निरनिराळ्या दंतकथा निर्माण होतात. गंगेच्याहि बाबतींत तोच प्रकार घडून आला. महाभारतकालीं गंगा ही पवित्र नदी मानली जाऊं लागल्यामुळें तिच्या माहात्म्यविषयक निरनिराळ्या कथा उत्पन्न झाल्या. आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्यासाठीं भगीरथानें गंगा खालीं आणिली व तींत आपल्या पूर्वजांची राख टाकून पूर्वजांनां स्वर्गाप्रत नेलें ही गंगेची पावित्र्यपर कथा रचण्यांत आली. पुढें गंगा ही एक देवता आहे असें मानण्यांत येऊन, तिला देवतास्वरूप प्राप्त झालें पुढें अनेक ठिकाणीं तिचीं देवालयें बांधण्यांत आलीं. हरिद्वार येथील गंगेचें देऊळ फार मोठें व प्रसिद्ध आहे. तिच्या मूर्ती पश्चिमेकडील भागांत खडकांतून कोरलेल्या आढळतात. दक्षिणहिंदुस्थानांत तिची एक मूर्ति असून त्या मूर्तीचा वरचा भाग स्त्रीचा व खालचा भाग माशाचा आहे. तिच्या डोक्यावर मुगुट असून तिचें कपाळ भस्मचर्चित दाखविलें आहे. तसेंच ती हात जोडून प्रार्थना करते आहे असा देखावा दाखविला आहे. बंगालमध्यें तिची मूर्ति एका शुभ्रवस्त्रावृता नारीची असून, ती मकरावर बसलेली असून तिच्या उजव्या हातांत कमळ व डाव्या हातांत वीणा असा देखावा आहे. रामनगर येथील तिची मूर्ति वरील प्रकारची असून शिवाय तिला चार हात आहेत असें दाखविलेलें आहे.

यच्चयावत् हिंदू लोक गंगा ही अत्यंत पवित्र आहे व ती सर्व पापांचा नाश करते असें मानतात. विशेषतः गंगेचा ज्या ज्या नद्यांशीं संगम होतो तीं संगमस्थानें तीर्थयात्रेचीं ठिकाणें होऊन बसलीं आहेत. यात्रेच्या प्रसंगीं गंगेवर लाखोंलोक स्नानाला आले असतांना, जो भव्य देखावा दिसतो तो खरोखरच अवर्णनीय होय यांत शंका नाहीं. जन्माला यावें व एकदा तरी गंगेंत स्नान करून पवित्र व्हावें अशी हिंदूंची समजूत असते. गंगेच्या तीरावर येऊन यात्रेकरू आपल्या पापक्षालनार्थ सक्षौर प्रायश्चित्त करतांना आढळतात. प्रयागास सुवासिनी स्त्रिया वेणीदान करतात. वैशाख शुद्ध ७ स व काशी येथें ज्येष्ठ शुद्ध ७ स गंगेच्या काठीं प्रचंड यात्रा भरते. ज्येष्ठ शुद्ध दशमीस गंगेचा जन्मदिन फार थाटांत साजरा केला जातो. कुंभ राशीस गुरु असतां हरिद्वार येथें मोठी यात्रा भरते. अशा आणखी पुष्कळ ठिकाणीं यात्रा भरतात.

मृताच्या अस्थी गंगेंत नेऊन टाकल्यानें मृतमनुष्याला स्वर्ग मिळतो अशी भाविक हिंदूंची श्रद्धा असते. यासाठीं पुष्कळ परप्रांतीय लोक देखील मृताच्या अस्थी गंगेत टाकण्यासाठीं पाठवितात. गंगेच्या काठीं बसून कित्येक गोसावी, साधू व मुमुक्षु स्वर्गप्राप्तीसाठीं तपश्चर्या करीत बसलेले आढळतात. अशा रीतीनें फार प्राचीन काळापासून तों आज तागायत गंगेचें माहात्म्य हिंदुलोकांत असलेलें आढळून येतें. [ॲट्किनसन-हिमालयन गॅझेटियर, अलाहाबाद १८८२-८४; डौसन-हिंदू क्लासिकल डिक्शनरी; स्किनर-एक्स-कर्शन्स इन इंडिया लंडन, १८३३; विष्णुपुराण; महाभारत.]

गंगाकालवा, व र चा (अ प र)—संयुक्त प्रान्तातील सर्वांत मोठा व अत्यंत महत्वाचा कालवा. गंगेच्या डाव्या तीराकडून हा घेतला असून अपर दुवाबचा सर्व प्रदेश ह्या कालव्यामुळें भिजतो.

वेगवेगळया शाखा.-याच्या (१) देवबंद (२) अनूपशहर (३)कानपूर व इटावा अशा तीन शाखा आहेत. या कालव्यानें भिजणारें एकंदर क्षेत्र (१९०३-४) ३८,००,००० चौरस एकर आहे. ह्या कालव्याचें लोअरगंगा व आग्रा कालव्यास पाणी मिळतें. हा कालवा नाव्य आहे. या कालव्यांतून धान्य, कापूस, गळीताचीं धान्यें, इमारती लांकूड वगैरे सामान जातें.

खा ल चा (लो अ र).—संयुक्त प्रान्तांतील दुआबाच्या पूर्व व दक्षिण भागांतील प्रदेशास पाणी देण्यासाठीं तयार केलेला एक कालवा. बुलंदशहर जिल्ह्यांमध्यें नरौरा येथें हा गंगानदीपासून घेतलेला आहे. याच्या शाखा—(१)फत्तेगड, (२) बिवर (३) कानपूर अशा तीन शाखा आहेत. ह्या कालव्यात १८७८ मध्यें पाणी येण्यास सुरवात झाली.

गंगाखेर—हैद्राबाद संस्थानांतील परभणी जिल्ह्याच्या एका जहागिरीचें मुख्य ठिकाण.गोदावरीच्या दक्षिणतीरावर हें आहे. लो. सं. (१९११) ५९९७. येथील नदीला घाट आहे.

गंगाझरी, ज मी न दा री.—मध्यप्रांत. जिल्हा भंडारा. तहशील टिरोरा. हींत एकंदर ७ खेडीं असून क्षेत्रफळ १८ चौरस मैल आहे. जमीनदार प्रधान आहेत. उत्पन्न ३४०० रुपये व टाकोळी १३०० रुपये.गंगाझरी गांव हें रेल्वेचें स्टेशन असून येथें शाळा आहे.

गंगाधर (१)—या गंगाधराचा काळ शके १३५६. यानें चांद्रमान नांवाचें तंत्र केलें आहे. श्रीशैलाच्या पश्चिमेस एकीकडे कृष्णावेणी आणि दुसरीकडे भागिरथी यांच्या मधील संगर नांवाच्या नगरांत गंगाधराचें वास्तव्य होतें. त्याचें गोत्र जामदग्न्य होतें. त्याचा पिता इत्यादिकांची नांवें चंद्रभट, भट्टार्य आणि विठ्ठल अशीं होतीं. याच वंशांत श्री चंदल नामक ज्योतिषी झाला. तो सौरमताभिमानी होता. विद्यापुरचा राणा श्रीचंदलावर प्रेम करीत असे. त्याचा मुलगा विश्वनाथ नांवाचा होता. गंगाधराचें चांद्रमान तंत्र फार कठिण म्हणून तेंच त्यानें सुबोध पद्यांत रचिलें; त्याचा काल उपलब्ध नाहीं. [दीक्षित कृत भा. ज्योतिःशास्त्र.].

(२) (१५०८)—मुहूर्तमार्तंडकार नारायण याचा गंगाधर हा मुलगा होय. प्रहलाघवावर गंगाधरानें मनोरमा नांवाची टीका केली आहे. याचें गोत्र कौशिक असून हा वाजसनेयीशाखीय होता. दौलताबादे (देवगिरी) जवळ धृष्णेश्वर या नांवाचें एक ज्योतिर्लिंग आहे. त्याच्या उत्तरेस टापर नांवाचें एक गांव आहे; गंगाधर तेथील मूळचा रहाणारा होता. जनार्दन हरि आठल्ये यांनीं मुहूर्तमार्तंड ग्रंथ मराठी भाषांतरासह शके १७७९ त छापला आहे. त्याच्या प्रस्तावनेंत ते लिहितात कीं, टापर गांवीं व आसपास शोध करविला त्यावरून समजतें कीं, ग्रंथकाराचा मातुलवंश मात्र हयात आहे. [दीक्षितकृत भा. ज्योति.].

गंगाधर कवि—एक संस्कृत कवि.बाप मनोरथ, आजा चक्रपाणी, पणजा दामोदर, चुलता दशरथ, भाऊ महीधर आणि चुलतभाऊ पुरुषोत्तम. इतक्या नांवांचा उल्लेख शके १०५९ च्या गोविंदपूर येथील शिलालेखांत आलेला आहे. हे कदाचित श्रीधरदासानें इ. स. १२०५ सालीं लिहिलेल्या "सदुक्ति कर्णामृत" या नांवाच्या बंगाली कवींचे वेंचे दिलेल्या ग्रंथांतले कवी असावेत.

गंगाधरशास्त्री पटवर्धन—'पटवर्धन' पहा.

गंगाधर सरस्वती.—१५ व्या शतकाच्या अखेरीस होऊन गेलेले प्रख्यात साधु नृसिंह सरस्वती, त्यांचा हा शिष्य. गुरुचरित्र म्हणून जो ओवीबद्ध ग्रंथ मराठींत प्रसिद्ध आहे तो यानेंच केलेला आहे. याचें आडनांव साखरे.

गु रु च रि त्र.—सरस्वती गंगाधरानें आपला ग्रंथ सिद्ध व नामधारक यांच्या संवादरूपानें दिला आहे. यांतील ओंव्या विवेकसिंधूंतील ओंव्यांशीं फार जुळतात. भाषा फारशी चांगली नसूनहि हा ग्रंथ महाराष्ट्रांत फार पूज्य झाला आहे. दत्तोपासकांनां याच्याशिवाय आपल्या देवतेच्या आराधनेकरितां दुसरा चांगला ग्रंथ नसल्यामुळें याची लोकप्रियता वाढली आहे. वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंभे स्वामी यानीं याचें संस्कृत भाषांतर थोड्या वर्षांपूर्वी केलें. [महा. सारस्वत; अ. कोश.].

गंगापूर.—(१) हैद्राबाद संस्थानांतील औरंगबाद जिल्ह्याचा एक नैर्ऋत्येकडील तालुका. क्षेत्रफळ ५४६ चौ. मै. लोकसंख्या (१९११) जहागिरींधरून ६४,६७२, खेडीं २००. जहागिरी १५.गंगापूर मुख्य ठिकाण. जमीन रिगर जातीची आहे.

(२) राजपुतान्यातील जयपूर संस्थानाच्या गंगापूर नामक निझामत व तालुक्याचें मुख्य ठिकाण. जयपूर शहराच्या आग्नेयीस ७० मैलांवर हें आहे.लोकसंख्या (१९११) ५७८०. येथें ३ शाळा आहेत.

(३) संयुक्तप्रांतांतील बनारस जिल्ह्याची एक पश्चिमेकडील तहशील. हिचा बनारस इस्टेटमध्यें समावेश होतो. क्षेत्रफळ ११८ चौरस मैल लो. सं. (१९०१) ८८३१. खेडीं २८९. वरुणनदीच्या दक्षिणेकडील प्रदेश सुपीक आहे.

गंगालूर.—मध्यप्रांत. बस्तर संस्थानांत बिजापूरपासून १४ मैलांवर हें एक म्वाफीगांव असून संस्थानच्या पट्टराणीकडेस आहे. लोकसंख्या १५८४ असून येथें प्राथमिक शाळा व पोलिस चौकी आहे.

गंगावती, ता लु का—हैद्राबाद संस्थानांतील रायचूर जिल्ह्यांतील एक तालुका. क्षेत्रफळ ४५९ चौ. मै. लो. सं. ६३७४०.यांत शहर गंगावती व खेडीं १४०;पैकीं ३७ जहागिरी आहेत. अनेगुंडी संस्थान ह्याच तालुक्यांत आहे. मद्रासच्या बरेली जिल्ह्यांत व ह्यामध्यें आग्नेय भागीं तुंगभद्रा नदी आहे.येथील जमीन काळी व कापसास योग्य आहे.ह्या तालुक्याच्या पश्चिमेस सालरजंग घराण्याकडे असलेला कोप्पळ नांवाचा जहागीर तालुका आहे.

गां व.—हैद्राबाद संस्थानांतील रायचूर जिल्ह्यांत गंगावती तालुक्याचें मुख्य ठिकाण. अनेगुंडीच्या उत्तरेस ५ मैलावर हें आहे. पूर्वेस दोन मैलांवर तुंगभद्रा नदी वहाते. लो. सं.(१९११) ६६६३. येथें एक शाळा, एक दवाखाना, व दोन जुनाट देवालयें आहेत.येथें धान्याचा व्यापार चालतो.

गंगाव पे टा.—अपर ब्रह्मदेशांतील पकोक्कू जिल्ह्याची उत्तरेकडील टौनशिप. क्षेत्रफळ १४०० चौ. मै. हींतून मिया व अपर चिंदविन नद्या वहातात. पश्चिमेस चिन टेंकड्या व पूर्वेस पाडौंग टेंकड्या असून मध्यें गंगावचें खोरें आहे. लोकसंख्या (१९११) ३०,७३९. खेडीं ९८. मुख्य गांव गंगाव हें मिथव नदीवर आहे.

गंगावन.—स्त्रियांचे केश हें एक महत्वाचें शिरोभूषण आहे. शोभा आणण्यासाठीं त्यांत जे कृत्रिम केश घालतात त्यास

गंगावन म्हणतात. हे केंस वनगाईच्या शेपटीचे असतात. या गाई नेपाळांत आढळतात. तेथून त्यांच्या शेपट्यांचे कांदे इकडे येतात. व त्यांचे केंस काढून त्यांची तिपदरी गंगावनें विक्रावयास ठेवतात. अंबाड्याची चाल रूढ झाल्यामुळें आतां गंगावन मार्गें पडत चाललें आहे. पाश्चात्य स्त्रियांमध्यें केंस सुंदर नसल्यास त्या कृत्रिम केंसांचा टोप घालतात. ही कृत्रिम केंस वापरण्याची चाल आपल्या इकडे पाश्चात्य लोकांच्या मानानें कमी आहे. क्वचितप्रसंगीं पाश्चात्य पुरुषहि कृत्रिम केंसांचा उपयोग करितात.

गंगासागर—बंगालमधील चोवीस परगणे जिल्ह्यांतलि एक द्वीप. ('सागर पहा').

गंगै कोन्डपुरम्—मद्रास इलाख्यांतील त्रिचनापल्ली जिल्ह्याच्या उदययार पालेयम् तालुक्यांतील खेडें. जयम कोन्ड चोलपुरम्च्या पूर्वेस ६ मैलांवर हें आहे. लोकसंख्या (१९०१) २७०२. इतिहासदृष्ट्या व प्राचीनवस्तुशास्त्र दृष्ट्या हें गांव फार महत्त्वाचें आहे. याच्या नांवाचा अर्थ 'गंगेच्या थडीवरील शहर' असा आहे. बाणासुराच्या भक्तीकरितां शंकरानें येथें गंगा आणली अशी कथा आहे. परंतु ह्या गांवाचें वास्तविक नांव 'गंगै कोन्ड चोलपुरम्' हेंच असावें. कारण हें गांव चोलवंशीय नृपानें स्थापिलें. शहराचा अवशेष अद्यापहि दृष्टीस पडतो. राजेन्द्र चोल ते कुलोत्तुंग चोल पर्यंतचे राजे १०११-१२ ते १११८ पर्यंत येथेंच रहात असत. येथें एक जुनाट पण मोठें देवालय आहे, ते राजेन्द्र चोलचा पिता व राजराजा ह्यानें बांधिलें असें म्हणतात. इलियटच्या मतें वीर राजेन्द्र चोल कोप्पर केशरीवर्मा यानें हें बांधलें असावें. फर्ग्युसन ह्या याचा काल १४ वें शतक ठरवितो. १८३६ मध्यें ह्या देवालयाचें आवार वगैरे पाडून त्याचें साहित्य कोलेरूनचा लोअर अनिकट बांधण्यास नेलें. [ब्रॅन्फिल-जे. ए. एस्. बी. पु. ४९. ए. रि. ए.].

गंगोत्री.—संयुक्तप्रान्तांतील गढवाल संस्थानच्या टिहरी जिल्ह्यांतील एक पहाडावरलि स्थान. हें हिंदूंचें प्रसिद्ध तीर्थस्थान आहे. उ. अ. ३१ व पू. रे. ७८° ५७'. उंची १०३१९ फूट. भागीरथी नदीच्या सव्यतीरावर हें आहे. येथून जवळ असणाऱ्या गौरीकुंडांत केदारगंगा व भागीरथी यांचा संगम होतो. देवालयांत गंगा, यमुना व सरस्वती यांच्या मूर्ती असून एकीकडे भागीरथी व दुसरीकडे शंकराचार्य यांच्या मूर्ती आहेत. गंगोत्री क्षेत्र हें गंगेचें उगमस्थान मानितात पण खरें उगमस्थान गोमुख असून तें येथून ८।१२ मैलांवर आहे. तेथें जाणें कठिण आहे. गढवालमधील गुरखा सेनापति अमरसिंगथप्पा ह्यानें १८ व्या शतकांत हें मंदिर बांधिलें. उन्हाळ्यांत यात्रेकरूंचे थवेच्या थवे दर्शनार्थ लोटतात. त्यांचे रहाण्याचे सोयीकरितां येथें बऱ्याच धर्मशाळा बांधण्यांत आल्या आहेत. पवित्र जलानें गंगोत्री येथें भरलेली व बंद केलेली भांडीं हिंदुस्थानच्या इतर भागांत भाविक लोक घेऊन जातात. हिंवाळ्यांत मंदिर बर्फाच्छादित असतें व पुजारी लोक मखब्यास जातात [स्किनर-एक्सकर्शन्स इन् इंडिया. ' हिमालयांतील तीर्थस्थानें (लोकशिक्षण, वर्ष ४); तीर्थयात्राप्रबंध].

गंगोह—संयुक्तप्रांतांतील सहारणपूर जिल्ह्याच्या नकूर तहसिलीचें एक गांव. गंगोह परगण्याचें मुख्य ठिकाण. लो. सं. (१९११) ११३७३. ह्या गांवाचे नवा व जुना असे दोन भाग असून जुना भाग राजा गंगनें वसविला व नवा भाग शेख अबदुल कद्दूस नांवाच्या मुसुलमान साधूनें वसविला. हुमायून बादशहानें बांधलेली (१५३७ सालीं) कद्दूसाची येथें कबर आहे. येथें जुनाट माशिदी (पैकीं दोन अकबरानें व जहांगिरानें बांधिलेल्या आहेत), शाळा व दवाखानाहि आहे. गांव फार स्वच्छ आहे.

गजकर्ण—(दद्रुरोग-रिंगवर्म) हा रोग होण्याचें कारण तीन अथवा चार तऱ्हेचे एकमेकांशीं साम्य असलेलें उद्भिज्ज बीज (बिड्ज) हें होय. हा डोक्यास झाल्यास अर्धा ते तीन चार इंच व्यासाच्या बहुधा वर्तुळाकार टक्कल पडलेल्या व वर तुळरक केंस असलेल्या जागा नजरेस येतात. त्यावरच पांढऱ्या कोंड्याप्रमाणें त्वचेपासून सुटलेल्या खवल्यांचें कीट जमलेलें असतें. रोगी अशक्त व दुबळें पोर असल्यास या केंसांच्या मूळात पू होऊन केंस चिकटतात, खवडा बनतो व वर खपली धरते. याचें बीज जें वर सांगितलें त्याचे असंख्य परिमाण केंसांच्या मुळांत प्रवेश करून असतात. आणि असला एखादा केंस उपटून तो लायकर पोटयाश या रासायनिक द्रवांत भिजवून सूक्ष्मदर्शक यंत्रानें तपासून पाहिला असतां त्या केंसाचा बहुतेक भाग या बीजपरमाणूंचा मध्यबिंदु स्पष्ट दिसत असलेल्या लांबच लांब रांगांनीं भरून गेलेला दिसून येतो. हे सर्व परमाणू अगदीं एकसारख्या आकाराचे असतात. हेच परमाणू कधीं कधीं दाढीच्या केंसांवर रोग उत्पन्न करितात. शरीराच्या बिनकेंसाळ भागालाहि गजकर्ण किंवा दद्रुरोग होतो हें सुप्रसिद्धच आहे. त्वचेवर लाल वर्तुळाकार जरा उचललेली एक कड व गांधी उठल्याप्रमाणें दिसणारा त्वग्रोग जर आपल्या पहाण्यांत आला तर तो हा गजकर्ण रोग आहे अशी शंका येणें साहजिक आहे. नायटे वगैरे त्वग्रोग यांपैकींच होत. हा रोग सर्वसामान्य आहे व पूर्ण बरा होण्यास अत्यंत कठिण आहे. म्हणून यांतून अर्धवट बरी झालेलीं, केंस गळत असलेलीं व टक्कल पडलेलीं माणसें बरींच पहाण्यांत येतात. हा रोग लवकर बरा न होण्याचें कारण हे जे रोगट व मृत केश डोक्यावर असतात ते समूळ काढल्याशिवाय हें बीजपरमाणूनाशक औषध अथवा मलम त्यांत भिनून त्या किडीचा नाश होत नाहीं. ते केंस गळून पडले तर तेथें औषध सहज भिनून गजकर्ण तेव्हांच बरें होतें. तसें डोकें, दाढी यांवरील होत नाहीं. हा रोग कित्येक महिनेपर्यंत (वर्षेहि) इलाज न केल्यास राहून मग आपोआप बरा होतो.

उ प चा र—केसांच्या पिंडांतील मूळांत रोगबीज परमाणूंची बेसुमार वृद्धि होत असल्यामुळें त्या पिंडांत मलम पोंचणें अवश्य पण अवघड आहे. यासाठीं जंतुघ्न मलम जें चोळावयाचें तें कडक व तीव्र शक्तीचें चोळल्यानें त्याच्या दाहामुळें केशपिंड सुजून फुगतो व त्यावरील त्वचाहि सुजते. पण त्यामुळें आंतील रोगट केस सुटून येतात व रोगबीज मरतें. या कामीं 'क्ष' किरणांचा उपयोग केल्यानें एकदशांश वेळांत हें कार्य होतें. पण हें यंत्र सर्वांसच उपलब्ध नसतें ही त्यांत अडचण आहे. जें कोणतें जंतुघ्न मलम लावावयाचें तें सकाळ संध्याकाळ तो भाग साबणानें स्वच्छ करून मग चोळचोळून लावावें. या कामीं पारदयुक्त मलमें विशेष उपयुक्त आहेत. त्यांचीं व अन्य प्रकारच्या मलमांचीं व द्रवांचीं नांवें पुढें दिलीं आहेत:—(१) हैड्रार्ज अमोनायाटाचें मलम. (२) शेकडा ३ पासून शेकडा १० प्रमाणांत हैड्रार्ज ओलिएट असलेलें मलम. (३) ग्लिसरीन ॲसिड कार्बोलिक. (४) आयोडीन टिंक्चर. (५) क्रीसारोबीन अगर गोवा पावडरचें मलम इत्यादि. रोग्याच्या फणी, रुमाल, टोपी इत्यादि वस्तु वापरल्यामुळें इतर माणसांत होणारा रोगप्रसार न होऊं देण्यासाठीं जपावें. टोपींत रोज नवा कागद घालून पहिला जाळावा. शरीरावरील इतर भागाचें गजकर्ण वरील मलमांच्या किंवा द्रवांच्या योगानें बरें होतें.

गजपती—वंग (बंगाल) व कलिंग (आंध्र व गंजम) या देशांत पूर्वी फार हत्ती असत, त्यामुळें तेथील राजांच्या पदरीं गजदळ पुष्कळ असे. त्यावरून त्यांच्या नांवांपुढें गजपति हें एक विशेष उपपद नेहमीं लावण्यांत येऊं लागलें. बंगालच्या पाल राजांनांहि गजपती म्हणत असत. सोळाव्या शतकांत गजपति प्रतापरुद्र म्हणून एक प्रख्यात राजा कलिंगदेशांत होऊन गेला. त्यानें कामशास्त्रावर ग्रंथ लिहिला असून कायदेकानूंवरहि एक ग्रंथ लिहिला. त्याला सरस्वतिविलास असें नांव आहे. याच्या पदरीं कदंब नांवाचा एक कवि असून तो दिवाण होता. [कविचरित्र; वैद्य—मध्ययुगीन भारत भा. २; पिटर्सन—रिपोर्ट व्हॉ. ४]

गजपतीनगरम्—मद्रास इलाख्यांतील विजगापट्टम् जिल्ह्यामधील एक तहशील. ही घांटाला लागून आहे. क्षेत्रफळ ३०२ चौ. मै. लो. सं. (१९२१) १४९३६१. खेडीं२२९. महसूल व इतर पट्टया मिळून वार्षिक उत्पन्न ४० हजार आहे.

गजबाहु—हा सीलोनचा राजा असून याचा काळ प्रो. गैगरच्या मतें स. १७३ किंवा १९१ हा आहे. हा पहिला पांडयराजा जो नेदुम–चेलियन त्याचा समकालीन होता. तसेंच पराक्रमी चेर राजा शेनगुत्तुवन व नेदुमुदी किल्ली चोलराज हेहि गजबाहूचे समकालीन होते. चेरराजा शेनगुत्तुवन यानें बोलाविल्यावरून गजबाहु हा वनजी येथील पट्टिनीदेवीच्या स्थापनेच्या वेळीं हजर होता. सीलोमी दंतकथेप्रमाणें याचा काळ स. ११३–१३५ असा येतो. याच्या कारकीर्दीतच शिलप्पदिकारम् हें तामील महाकाव्य निर्माण झालें. याच गजबाहूनें बहुधा तामीळराज्या (चोलांच्या)वर स्वारी केली असावी, कारण त्याच्या बापाच्या कराकीर्दींत चोलराजानें सीलोनवर स्वारी करून तेथील बारा हजार लोकांना कैद करून कावेरी नांवाची राजधानी वसविण्याच्या कामीं त्यांना मजूर म्हणून नेण्यांत आलें होतें. गजबाहूनें चोलांवर चढाई करून हे कैदी सोडविले व त्याबरोबरच पट्टिणी देवीच्या पायांतील एक नूपुर व बुद्धाचें भिक्षापात्र आणि इतर संस्मरणीय वस्तू (ज्या पूर्वी चोलराजानें नेल्या होत्या) तिकडून पुनरपि सीलोनमध्यें आणिल्या याच्याबद्दल महावंश या बौद्ध ग्रंथांत पुष्कळ माहिती आढळते. दुसरा एक गजबाहु सीलोनचा राजा झाला होता त्याचा काल अकरावें शतक होय. [महावंश; अय्यंगार–एन्शन्ट इंडिया; स्मिथ–अर्ली व ऑक्सफोर्ड हिस्टरी ऑफ इंडिया.]

गंजम, जिल्हा.—(छत्रपुर) हा मद्रास इलाख्यांतला सर्वांत उत्तरेकडचा जिल्हा असून बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यानें वसला आहे. याचें क्षेत्रफळ ४८३५ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस ओरिसा व कांहीं संस्थानें, पूर्वेस बंगालचा उपसागर आणि पश्चिमेस विजगापट्टम जिल्हा आहे. बहुतेक भाग डोंगराळ व खडकाळ आहे तरी पण इतस्ततः दरीखोरीं व सुपीक सपाट जमीनीहि आहेत.

या जिल्ह्यांतून पूर्वघांट जात असून त्यामुळें मालिया (टेंकड्या) व मैदानें असे याचे दोन स्पष्ट विभाग झाले आहेत. समुद्रापासून घांटापर्यंत जास्तींत जास्त अंतर ५० मैल व कमींत कमी १५ मैल आहे, आणि याच ठिकाणीं त्याची सर्वांत जास्त उंच शिखरें आहेत. तीं बरूव्हा जवळ असून त्यांचीं नावें सिंगाराझु आणि महेंद्रगिरी अशीं आहेत. दोहोंची उंची ५००० फुटांच्या जवळ आहे. देवगिरी शिखर (४५३५) यांच्या खालोखाल उंच आहे. मालिया (टेंकड्या) या एजंटच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांना गंजम एजन्सी असें म्हणत. ह्या भागांत रानटी लोकांची वस्ती असल्यामुळें कलेक्टरला जादा अधिकार असतात.

या जिल्ह्यांत तळीं व सरोवरें क्वचितच दिसतात. परंतु कोठें कोठें कांहीं गोड्या (तंपरास) व कांहीं खाऱ्या (सागरम्) पाण्याचीं तळीं आढळतात. उत्तरेच्या बाजूला चिल्का हें सर्वांत मोठें सरोवर आहे.

या जिल्ह्यांत तीन नद्या असून त्यांचा उपयोग कालवे काढून शेतीकडे करतात. ऋषिकुल्या ही जिल्ह्याच्या उत्तर भागांतून वहाते. महानदी आणि गोदावरी या हिच्याच शाखा आहेत. वंशधर आणि लांगुल्य या थेट दक्षिण मर्यादेपर्यंत वहात जाऊन चिकाकोलजवळ समुद्रास मिळतात. लांगुल्य ही शेवटचे ३० मैलपर्यंत गंजम जिल्ह्याची दक्षिण मर्यादाच आहे.

या जिल्ह्यांत किनाऱ्यापासून आंत गेल्यावर मोठ्या झाडांचीं अरण्यें आहेत व तेथें पाऊसहि पुष्कळ पडतो. गंजम जिल्ह्यांत शिकारहि साधारण बरी आहे. अस्वलें आणि तरस फार असून लांडगे, चित्ते व वाघ हेहि आढळतात

डोंगराच्या उतारावर हरिणाच्या वर्गांतले म्हणजे सांबर, चित्ळ व भुंकणारे आणि जंगली जातीचे हरिण आढळतात नीलगाईसुद्धां क्वचित् याच उतारावर दिसतात. मैदानांत काळवीट आढळतात पण चार शिंगांचे काळवीट, गवा व रानडुकर हीं कमी व विरळ आहेत. जंगली कुत्रे फार भयंकर आहेत व ते जमावानें श्वापदांवर हल्ले करतात.

किनाऱ्यालगतची हवा थंड व निरोगी (आरोग्यकारक) आहे व जिल्ह्यांतील बहुतेक शहरें याच भागांत वसलेलीं आहेत. खुद्द गंजम शहर मात्र मलेरियाचें माहेरघर आहे; व म्हणून तेथून जिल्ह्याचें मुख्य ठाणें केव्हांच उठाविलें गेलें आहे. मालिया (टेंकड्या) व बाजूचा भाग नेहमीं मलेरियानें दूषित असतो. येथें हिंवाळा फारच बहारीचा जातो. व पावसाळा चांगलाच असतो. सरासरी पावसाचें मान ४५ इंच असून पाऊस पडण्याचे दिवस ५९ भरतात.

इतिहास.— गंजम हा पूर्वीच्या कलिंगाचा एक भाग होता. २६० व्या वर्षी मौर्य राजा अशोक यानें हा जिंकून घेतला. नंतर कांहीं दिवस वेंगीच्या आंध्र राजांच्या ताब्यांत हा असावा. हे दोघेहि बौद्ध होते. अशोकानें जौगडा येथें एक शासन खोदून (आदेश) ठेवलें आहे.

इ. स. च्या ३ ऱ्या शतकांत आंध्र राजांच्या जागीं कलिंगांचे गंगवंशीय राजे आले. यांचें कालमान व त्यांचा वेंगीच्या चालुक्यांशीं असलेला संबंध याविषयीं कांहींच निश्चित सांगतां येत नाहीं. पण या चालुक्यांनीं सुद्धां गंजमच्या कांहीं भागावर तरी सत्ता गाजवली असावी. दहाव्या व अकराव्या शतकाच्या दरम्यान चोल राजांनीं वेंगी व कलिंग देश जिंकले तेव्हां त्यांतच गंजम अगर त्याचा पुष्कळसा भाग आला होता व मंहेंद्रगिरीवर प्रसिद्ध चोल राजा राजेंद्र याचे विजयाचे दाखले सांपडतात. चोलांची कलिंगावरील सत्ता किती काल व कितपत होती याविषयीं संशयच आहे. याच सुमारास गंगराजांची दुसरी एक शाखा उदयास आली व प्रथमतः चोलांचे मांडलीक म्हणून व नंतर स्वतंत्रपणानें त्यांनीं चार शतकेंपर्यंत कलिंगावर राज्य केलें. त्यांनीं आपली राज्यमर्यादा दक्षिणोत्तर बरीच विस्तृत केली पण शेवटीं त्यांना केवळ अंतःकलहास बळी पडावें लागलें. पंधराव्या शतकांत तत्कालीन प्रधान गजपती घराण्याच्या मूळ संस्थापकानें, आपल्या राजाचा वध करून तक्त बळकावलें. जिल्ह्याचा बराच भाग अद्याप गजपती घराण्याकडेच आहे. १५७१ च्या सुमारास गोवळकोंड्याच्या कुतुबशहानें त्यांना अधिकारच्युत केलें. पावणेदोनशेंपेक्षां जास्त वर्षेंपर्यंत चिकाकोलच्या मुसुलमानांनीं येथें अंमल गाजविला. त्याचें स्मारक म्हणून फक्त एक मशीद आज त्या गांवीं अवशिष्ट आहे.

१६८७ मध्यें औरंगझेबानें गोवळकोंड्याच्या राजास आपलें मांडलिकत्व कबूल करावयास लावलें व त्यानंतर चिकाकोलच्या सुमेदारांची नेमणूक दक्षिणचा सुभेदार करू लागला. दक्षिणच्या सुभेदारांना फ्रेंच लोकांनीं दिलेल्या मदतीबद्दल १७५३ मध्यें त्यांनां सुभेदाराकडून जो मुलुख मिळाला त्यांत चिकाकोलसरकारचा व गंजमचा समावेश झाला होता. १७५७ मध्यें तेथें व्यवस्था करण्याकरितां बुसी आला होता; परंतु मद्रासेस मदतीकरितां म्हणून त्याला लालीनें बोलावल्यामुळें तो परत गेला. त्यानंतर क्लाईव्हनें फोर्ड याजबरोबर बरेंच सैन्य देऊन पाठवलें. त्यानें फ्रेंच अधिकाऱ्यांचा पराभव करून त्यांचें मुख्य ठिकाण मच्छलीपट्टण हें १७५९ च्या जानेवारींत घेतलें. त्यानंतर दक्षिणेच्या सुभेदारानें फ्रेंचांची बाजू सोडून इंग्रजांशीं तह केला. फ्रेंचांस या भागांत वसाहत करूं न देण्याचें कबूल केलें. १७६५ मध्यें बादशाही फर्मानानें हा तह पक्का होऊन सुभेदाराशीं झालेल्या १७६६ मधल्या दुसऱ्या तहानें सगळा उत्तरसरकार प्रांत इंग्रजांच्या पदरीं पडला.

इलाख्यांतील सर्व भागांत गंजममध्येंच स्थिरस्थावर होण्यास फार वेळ लागला. सुमारें ७० वर्षेंपर्यंत तेथें कांहींतरी गडबड होतीच. पूर्वी गंजमचा विस्तार पुंडी नदीपर्यंत होता व या मुलुखांत बरेच जमीनदार ३० किल्ले व ३२००० सैन्य बाळगून होते. यांनीं आपसांतील भांडणें व शेजारच्या खेड्यांवर हल्ले चालवून सर्वत्र पुंडाई माजवून मागितलेला दंड व खंडणी देण्याचें ते नाकारीत. त्याच्यावर पुष्कळ वेळा स्वाऱ्या करून त्यानां कह्यात ठेवावें लागे पण ही शांतता कायमची व खात्रीची नसे.

१८०३ मध्यें गंजम जिल्ह्याला पार्लाकिमेडीच्या जमिनदारीसह चिकाकोल पोटविभाग जोडण्यात आला. या भागांत १८१२ पासून १८३२ पर्यंत अशांतताच होती व तिचें कारण म्हणजे तेथील अकरा छोटेखानी संस्थानिक अथवा जमीनदार यांची आपसातील दुही व भांडणें हें होय. या संस्थानिकांस बिसोई म्हणत. यांनां पूर्वीच्या जमिनदारानें कित्येक खेडीं बहाल केलीं होतीं. कारण सावरा जातीच्या डोंगरी लोकांचा बंदोबस्त करून त्याचे सपाटीवरील लोकांवर येणारे छापे बंद करण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें. ही अट तर बिसोई यांनीं पाळली नाहींच पण स्वतः त्यानींच पुंडपणा आरंभला आणि खेड्यांपाड्यांस सतावून सोडलें. १८१६ मध्यें जयपूरकडून ४।५ हजार पेंढार लोटले व सर्व प्रदेश जाळून पोळून फस्त केला. १८३२ मध्यें बिसोई लोकांनीं बरीच पुंडाई माजविल्यामुळें रसेल यास त्यांच्यावर नेमून त्यांचा बंदोबस्त करण्यांत आला. लवकरच खोंड लोकांतील नरमेधाची चाल बंद पडली.

१८३९ मध्यें स्वतंत्र कायदा पास होऊन गंजमच्या कलेक्टरला गव्हर्नरचा एजंट हा किताब व डोंगरी मुलुख व लोक यांजवर विशेष अधिकार मिळाले. त्या वेळच्या परिस्थितीचें व त्यावेळच्या गंजमचें वर्णन रसेलच्या लेखांत व मिरिआ एजंटच्या रिपोर्टांत वाचावयास सांपडतें.

जौगडा येथील शिलालेखाशिवाय वर्णनीय अशा प्राचीन वस्तू म्हणजे कित्येक पुरातन देवळें व कित्येक शिल्पशास्त्रीय व खोदकाम यांचे उत्कृष्ट नमुने येथें असून कलिंग घराण्याच्या पूर्वेतिहासावर प्रकाश पाडणारे लेखहि आढळतात. यांपैकीं श्रीकुर्मे येथील वैष्णवपंथी मठ व मुखलिंग येथील शैवमंदिर हीं दोन फार प्रसिद्ध आहेत.

लोकवस्ती.—लोकसंख्या १९२१ च्या खानेसुमारींत १८,३५,५९२ भरली. जिल्ह्यांत शहरें फक्त ९ असून बेरामपूर, चिकाकोल आणि पार्लाकिमेडी येथें म्युनिसिपालिटया आहेत. शहरें मैदानावर वसलीं असून तेथील खेडींहि टेंकड्यांवरील खेड्यांपेक्षां मोठीं आहेत. एकंदर खेडीं ६१४५ आहेत. सपाट मुलुखांत शेंकडा ९६ हिंदु आहेत. एजन्सीपट्टयांत शेंकडा ६६ च्या वर वन्य हिंदू आहेत. सखल प्रदेशांत वस्ती दाट असून टेंकड्यांकडे विरळ आहे. सपाटीवर दक्षिणेकडे तेलगू व उत्तरेस उरिया भाषा प्रचलित असून एजन्सीपट्टयामध्यें खोंड भाषा चालते व तेथेंहि दक्षिण भागांत मालियासावरा भाषेचा बराच उपयोग होतो. या जिल्ह्यांत मुसुलमान व ख्रिश्चन फारच कमी आहेत. मैदानावर बहुधा तेलगू व उरिया जातींचेच लोक आढळतात. तेलगूपैकीं शेतकाम करणारे कापु लोक (सुमारें दीड लाख) पुष्कळ असून त्यांच्या खालोखाल कलिंग (एक लाख) लोक येतात. कलिंगांची एवढी मोठी वस्ती दुसऱ्या कोणत्याहि जिल्ह्यांत नाहीं. उरिया जातींत ब्राह्मण बरेच असून एकंदर लोकवस्तीशीं त्यांचें प्रमाण जवळजवळ ८ पडतें.

उपजीविकेचें साधन सामान्यतः शेतीच असून सपाटीवर शेंकडा ६६ शेतकी कामांत गुंतलेले असून त्यांपैकीं बहुतेक शेतीचे मजूर आहेत. एजन्सीपट्टयांत बहुतेक सर्व लोक शेतीवरच रहात असून विणकामावर रहाणारे थोडे लोक आहेत.

जिल्ह्याच्या ४८३५ चौरस मैलांपैकीं ५२९८७० एकर जमीन रयतवारी व लहान इनामी गांवांतील लागवडींतील व सबंध इनामी एकर १९५९९८ आहेत. एजन्सी पट्टा, जमीनदारी व इनाम जमीन यांविषयीं सविस्तर माहिती संकलित नाहीं. तांदूळ व रागी हीं दोन मुख्य धान्यें होतात.

जंगलः—या जिल्ह्यांतील बहुतेक जंगलें इनाम जमिनींत आहेत आणि सरकारी ताब्यांतहि जीं जंगलें आहेत तींहि दुर्गम असल्यामुळें जंगलखात्याचा कायदा इकडे फारसा लागू केलेला नाहीं.

गंजममध्यें म्हणण्यासारख्या खाणी नाहींत. बोयिराणीजवळ थोडेसें मँगेनीज सांपडतें. गुमसूर तालुक्यांत व पार्लाकिमिडी येथें अभ्रक, ॲन्टिमनी व कुरुंद हीं सांपडतात. पण व्यापार करण्याइतका पुरवठा नाहीं. किनाऱ्यानें हुमा, सुरदा, नौपाडा आणि कलिंगपट्टम् येथें मीठ तयार करण्याचीं सरकारी मीठागरें आहेत.

व्यापार आणि दळणवळणः—शेतीशिवाय मुख्य उद्योग म्हणजे विणकामाचा होय. सपाटीवरील बहुतेक सर्व खेड्यांतून सामान्य तऱ्हेचा कपडा विणला जातो व बेरामपूर येथें रेशमी कापड तयार होतें.

गंजमचा निर्यात व्यापार मुख्यतः धान्य, कमावलेलीं कांतडीं, गळिताचें धान्य, हळद, लांकूड, खारे मासे आणि नारळ यांचा चालतो. मुख्य आयात माल म्हणजे तांदूळ, कपडा, कांचसामान, धातू व धातुसामान, मातीचें तेल, मसाल्याचे पदार्थ व गोण हा होय. गोपाळपूर, कलिंगपट्टम् व बारुव्हा हीं तीन बंदरें असून पहिलीं दोन मोठीं व परदेशाशीं व्यापार करणारीं आहेत.

बंगाल नागपूर रेल्वेची ईस्ट कोस्ट शाखा जिल्ह्यापासून दक्षिणोत्तर गेली असून नौपाडा येथून पार्लाकिमेडि जमीनदारींत एक अरुंद शाखा गेली आहे. येथून मिठागरापर्यंत एक फांटा काढला आहे.

१७६६ मध्यें इंग्रजांनीं हा जिल्हा आपल्या ताब्यांत घेतला.तेव्हां जमीनदारी व हवेली असे यांतील जमीनीचे दोन भाग होते. कंपनीच्या हुकमावरून एका अधिकाऱ्याची नेमणूक होऊन १८०४ मध्यें हा जिल्हा कायमधाऱ्याच्या पद्धतीखालीं आणला गेला. जमीनदारांना त्यांच्या वतनांची कायम धाऱ्यानें सनद देण्यांत आली व हवेली जमीन लिलावानें जास्तींत जास्त किंमतीस विकण्यांत आली. जमीनदार व खासगी लोक यांच्याकडे कायम धाऱ्याची बाकी फुगत चालली व १८०९ ते १८५१ च्या दरम्यान सर्व जमीन पुन्हा सरकारांत आली. त्याचे बेऱ्हामपूर, चिकाकोल व गुमसूर हे तीन तालुके करण्यांत आले. चिकाकोलमध्यें इ. स. १८१७ मध्यें जमिनीची पाहणी व विभागणी करून रयतवारी पद्धत सुरू करण्यांत आली. तथापि १८७८ पर्यंत हल्लींची समाधानकारक व्यवस्था करणें शक्य झालें नाहीं. १८६६ मध्यें सर्व सरकारी तालुक्यांतून मोजणी व १८७५ मध्यें आकारणी सुरू होऊन १८७८ मध्यें काम पुरें झालें. १९०६ मध्यें पार्लाकिमेडी एजन्सीमधील १२२ खेड्यांस लोकलबोर्डाचा कायदा लावण्यांत आला. चिकाकोल, पार्लाकिमेडी व बेऱ्हामपूर येथें म्युनिसिपल कमिटी आहे. चिकाकोल, बेऱ्हामपूर व गुमसूर येथें तालुकाबोर्डें आहेत. व तीन डिस्ट्रिक्ट बोर्डें आहेत. मात्र एजन्सी पट्टयावर यांचा ताबा नाहीं.

शिक्षण—जिल्ह्यांतील सपाटीच्या प्रदेशाचा नंबर इलाख्यांत शिक्षणाच्या बाबतींत १७ वा आहे. दर दहा हजारी ६ व ८ लोकांनां लिहितां वाचतां येतें. तसेंच दर १० हजार लोकांत शेंकडा फक्त १२५ सांना (पुरुष १२३ व स्त्रिया २) इंग्रजी येतें. तेलगू लोकांत इंग्रजी शिक्षण जास्त असून देशी भाषा शिक्षणांत उरिया लोक वरचढ आहेत.

श ह र.— (छत्रपूर) जिल्ह्याचें पूर्वीचें मुख्य ठाणें. उ. अ. १९° २३' व पू. रे. ८५° ५' असून ऋषि कुल्या

नदीच्या मुखाजवळ वसलें आहे. येथून मुख्य सडक व ईस्ट-कोस्ट रेल्वे जाते. लोकसंख्या (इ. स. १९०१) ४३९७. शहर व किल्ल्याचा अवशिष्ट भाग हीं उंचावर असून पूर्वी येथें बराच व्यापार चालत असे. येथील किल्ला इ. स. १७६८ मध्यें मराठ्यांच्या हल्ल्यापासून बचाव करून घेण्याकरितां बांधलेला होता. इ. स. १८१५ मध्यें येथें तापाची भयंकर साथ आली; तिनें पुष्कळ युरोपियन आणि एतद्देशीय यांचा संहार केला.तेव्हांपासून जिल्ह्याचें मुख्य ठिकाण बेऱ्हामपूर येथें नेण्यांत आलें व यामुळें शहराचें महत्व बरेंच कमी झालें. येथील कित्येक सुंदर इमारती कालगतीनें पडून गेल्या व कित्येक तर पाडून टाकण्यांत आल्या. पूर्वी हें बंदर होतें, पण व्यापार बंद झाल्यानें व तोंडाशीं गाळ बसत चालल्यानें१८८७ पासून ते बंद करण्यांत आलें. येथून ओरिसामध्यें तांदूळ फार जातो.

गजेंद्रगड—मुंबई, धारवाड जिल्हा. हें बदामीच्या पश्चिमेस २८ मैलांवर एक खेडें आहे. हें पूर्वी मुधोळच्या घोरपड्यांकडे होतें. येथें शिवाजीनें बांधलेला एक किल्ला आहे. येथील उंचगिरी नांवाचा दुसरा किल्ला १६८८ त दौलतराव घोरपडयांनीं बांधला. गांवापासून ३ मैलांवर एका खोऱ्यांत यात्रा भरत असते. या खोऱ्यांत शंकराची मूर्ति आहे. लोकसंख्या (१९११) ८३०९.

येथील घोरपड्यांनां हिंदुराव ही पदवी आहे. बहिरजी घोरपड्यानें शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत गजेंद्रगड व गुत्ती मिळविली. संताजी हा प्रख्यात सेनापति या बहिरजीचा भाऊ होय. संताजीला पुढें कापशी गांव इनाम मिळाल्यानें त्याचे वंशास कापशीकर नांव पडलें व बहिरजी हा गजेंद्रगडास राहिल्यानें त्याच्या वंशास गजेंद्रगडकर म्हणूं लागले. याचा वडील मुलगा हा बावीस वर्षांचा असतांनाच मुसुलमानांबरोबरच्या एका लढाईंत ठार झाला. त्याचा धाकटा भाऊ शिदोजी याला हिंदुराव ममलकतमदार जफ्तनमुल्क फत्तेजंग समशेर बहादूर सेनापति अशी पदवी होती. कोल्हापुरची देवी मुसुलमानांच्या भयामुळें मध्यंतरीं दुसरीकडे ठेविली होती, ती पुन्हां कोल्हापुरच्या राज्याची स्थिरस्थावर होतांच या शिदोजीनें स्थापिली. त्याबद्दल त्याला देवीच्या प्रधानकीचीं वस्त्रें व पांच गांवचीं सरदेशमुखी इनाम मिळाली.शिदोजी हा पेशव्यांनां अनुसरून वागे. याचे मुरारराव, दौलतराव व भुजंगराव असे तीन पुत्र होते. पैकीं भुजंगराव हा २० व्या वर्षी लढाईंत मरण पावला. मुरारराव हा पराक्रमी होता. हा जवळ जवळ स्वतंत्र वागे; याच्या पदरीं कवायती पलटणें असल्यानें त्याचा दरारा निजाम, टिपू व इंग्रज यांस त्या प्रांतीं चांगलाच असे. हा पेशव्यांच्या तर्फेनें तिकडे बंदोबस्त ठेवी. त्यांनीं त्याला सेनापतिपद दिलें होतें. हा बहुधा गुत्तीस राही. तीस पंचवीस लाखांचा प्रांत त्यानें काबीज केला होता. अनेक कारकीर्दी त्यानें पाहिल्या होत्या. इंग्रजांसहि यानें अडचणींत मदत केली होती. मुराररावाकडे गुत्ती व दौलतरावाकडे गजेंद्रगड अशी वांटणी पेशव्यांनीं करून दिली. मुरारराव शेवटीं टिपूच्या हातीं लागले.त्यानें त्याला शेवटपर्यंत रुप्याची बेडी पायांत घालून कपालदुर्गास कैदेंत ठेविलें होतें. टिपूनें गजेंद्रगडहि घेतला. पुढें हरिपंत तात्या टिपूवर चालून आले तेव्हां पेशव्यांच्या मदतीनें दौलतरावानें गजेंद्रगड हस्तगत केला.त्यावेळीं तीन लाखांचा सरंजाम किल्ल्याकडे चालत होता. परशुरामभाऊ पटवर्धन व दौलतराव यांची फार दोस्ती होती. दौलतरावहि शूर होता. निजामाशीं तह झाल्यावेळीं हरिपंततात्यांनीं दौलतरावाची पावणेतीन लक्षांची जहागीर निजामाकडे देऊन दौलतरावास पंचवीस हजारांची जहागीर खर्चास ठेविली. मध्यंतरीं थोरल्या माधवरावांनीं गलगले, इंगल वगैरे ५०१६० हजारांची जहागीर यांना दिली होती.रावबाजीच्या वेळीं पुन्हां घोरपड्यांच्या जहागिरीपैकीं कांहीं गांवें जप्त झाली. दौलतरावास बहिरजी म्हणून पुत्र होता. त्याचा पुत्र भुजंगराव. बहिरजी याच्या वेळीं इंग्रजी झाली. त्यावेळीं गजेंद्रगड संस्थान तेरा हजारांचें होतें. [डफ; कैफियती; विजापूर ग्याझे. राजवाडे. खं. ७, १०].

गझनी—अफगाणिस्तानांतील गझनी जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. हें काबूलपासून ९२ मैल व कंदाहारपासून २२१ मैल. समुद्रसपाटीपासून ७२७९ फूट उंचीवर वसलें आहे. गझनी हें गझनी घराण्याची राजधानी होय. महमद गझनवीनें हिंदुस्थानावर बऱ्याच स्वाऱ्या केल्या. त्यानें समरकंद इस्पाहानपासून लाहोरपर्यंत राज्याचा विस्तार केला पण त्याच्या मागून या शहरास उतरती कळा लागली. महमदाच्या वेळीं गझनी येथें भव्य इमारती होत्या व तें एक विद्येचें मुख्य पीठ होतें. ११५३ मध्यें अल्लाउद्दीन घोरीनें त्याचा विध्वंस केला. यापुढें गझनीला मूळचें स्वातंत्र्यमहत्व केव्हांहि प्राप्त झालें नाहीं व तें काबुलच्या कायमचें अंकित बनलें.

पहिल्या अफगाण युद्धामध्यें (१८३९) इंग्रजांनीं गझनी सर केलें.व १८४१ पर्यंत तसेंच होतें. १८४१ मध्यें येथील इंग्रज सैन्यास अफगाणांनां शरण जावें लागलें. १८४२ मध्यें पुन्हां इंग्रजी सैन्य तेथें गेलें होतें. गझनी हें आतां लष्करी दृष्टया मुळीच महत्वाचें नाहीं. तेथें फक्त १००० घरें आहेत. बाजूनें गझनी नदी वहाते. जुनाट तट वगैरे किल्ल्याचा पडित भाग आहे. येथें वस्ती अफगाण हझारा व हिंदुव्यापारी यांची आहे. मुख्य व्यापार धान्य, फळें, लोंकर वगैरेचा आहे. येथें हिवाळ्यांत फार बर्फ पडतें. उन्हाळा व पावसाळा यांत सांथीचे ताप होतात. तीन मैलांवर जुन्या शहराचे कांहीं अवशेष व दोन १०० फूट उंचीचे मनोरे आहेत.

गझनी घराणें—इराणांत सामानी नांवाच्या राजवंशानें सुमारें दोनशें वर्षें राज्य केलें; पुढें त्याच्या पडत्या काळांत तुर्क लोकांनीं आपलें महत्व पूर्वेकडे वाढविलें; सामानराज

अबदुलं मलीक याच्या पदरीं अल्प–तेगीन नांवाचा एक तुर्क गुलाम होता, त्याच्यावर अबदुलची मर्जी बसून त्यानें त्याला ९६७ त खुरासानप्रांताची सुभेदारी दिली. अबदूल हा ९६७ त मेल्यावर त्याच्या मनसूर नांवाच्या मुलाला गादी मिळू नये म्हणून अल्प–तेगीननें खटपट केल्यावरून मनसूरनें त्याला सुभेदारीवरून काढून टाकलें, तेव्हां तो पळून गझनीकडे आला व तिकडे त्यानें फौज जमा करून गझनी येथें राज्य स्थापन केलें. या राज्याची पूर्व सरहद्द पंजाबास भिडली होती. पंजाबचा त्या वेळचा राजा जयपाळ म्हणून होता; त्या दोघांत अल्प–तेगीनच्या कारकीर्दींत मोठासा प्रसंग झाला नाहीं. सन ९७४ त हिंदूलोकांनीं गझनीवर स्वारी केली होती पण ती निष्फळ झाली. अल्प तेगीन हा ९७६ त मेला.

स ब क् ते गी न.—हाहि एक तुर्क गुलाम असून अल्प तेगीनचा आवडता होता. त्यानें याला आपला जांवई करून आपल्या राज्याचा वारस नेमिलें होतें. माबेल डफ म्हणतो कीं अल्प तेगीन यानें गझनीस स्वतंत्र राज्य न स्थापतां तें सबक् तेगीननें स्थापिलें. शेवटचा सामानी राजा दुसरा नूह हा मेल्यावर सबक् तेगीन स्वतंत्र झाला (९७७). तावत्काल तो व अल्प तेगीन हे सामानीचे मांडलीकच होते. स्वतंत्र झाल्यावर त्याला फारशी स्वस्थता मिळाली नाहीं. पंजाबांतील हिंदूंनीं जयपाळाच्या हाताखालीं गझनीवर स्वारी केली (९७९). तेव्हां सबक् तेगीननें लघमान येथें हिंदूंनां तोंड दिलें. परंतु दोघांचा समेट होऊन जयपाळ परत फिरला. सबक्नें ९८० त बरत घेतलें. पुढें काबूल शाह गख्खर हा त्याच्या प्रजेनें बंड केल्यामुळें सबक्च्या आश्रयास आला (९८३). सबक् तेगीनची हिंदुस्थानावरील पहिली स्वारी सन ९८६ त झाली. त्या वेळीं कुशघर (काश्गर) घेऊन त्यानें फक्त सरहद्दीवर किरकोळ मोहीम करून थोडीफार लूट नेली. पुढें स. ९८८ त त्यानें मोठी स्वारी करून जयपाळाचा लघमानच्या लढाईंत पराभव केला. तेव्हां जयपाळानें त्याला गझनीच्या बाजूचे चार किल्ले व शंभर हत्ती देण्याचें कबूल केलें. यानंतर सबक् तेगीन यानें सिंधूपर्यंतचा प्रदेश ताब्यांत घेऊन पेशावर येथें आपला सुभेदार ठेविला. तो परत देशीं गेल्यावर त्याचा मुलगा महमूद यानें कांहीं उचल केल्यामुळें सबक्नें त्याला गझनीस एक वर्ष कैदेंत ठेविलें (९९०) होतें. पुढें बघ्राखानानें बुखाऱ्यावर चाल केली असतां, सबक्नें त्याचा पराभव केला (९९३). सामानी राजा दुसरा नूह याला हिरात, खुरासान व बल्ख या प्रांतांतील बंडाळी मोडण्यास सबक्नें मदत केली होती. त्यामुळें या तीन प्रांतांवर नूह यानें सबक् याला व त्याचा मुलगा महमूद याला निशापुर येथें सुभेदार नेमिलें (९९४). पुढें स. ९९७ च्या आगस्टमध्यें बल्खजवळ सबक् तेगीन मेला. त्यानें आपल्या मार्गे आपला मुलगा इस्माईल याला वारस केलें; कारण महमूद हा दासीपुत्र होता.

म ह मू द.—याचा जन्म १३ नोव्हेंबर स. ९७० त झाला. यानें इस्माईल याला पकडून कालंजरच्या अरण्यांत कैदेंत ठेवून आपण गादी बळकाविली (जानेवारी ९९९). त्यानंतर लागलीच त्यानें सामानी संस्थानिकांवर स्वारी करून बल्ख व हिरात हे प्रांत आपल्या कबज्यांत घेतले व मर्व्ह आणि निशापुर हे त्यांनां दिले (मे ९९९). खुरासानप्रांतहि त्याला थोडक्याच दिवसांत मिळाला; तेव्हां अल कादीर या खलीफानें त्याला त्या प्रांताचा सुभेदार केलें; त्याचवेळीं महमूदनें आपणास सुलतान म्हणवून घेतलें व बल्ख येथें आपली राजधानी केली(जुलै). पुढें त्यानें निशापूर हस्तगत करून सिजिस्तानवर चाल केली (१०००). प्रख्यात कवी फिर्दौसी व फरुखी हे महमूदचे चुलतभाऊ होते; त्यांचा बाप बुघ्राखान याला सिजीखानच्या खलफ सरदारानें ठार मारल्यानें त्याचा सूड घेण्याकरितां महमुद तिकडे गेला होता. त्यानें आपला भाऊ नसरखान यास सेनापति व अहमद मैमंदी यास वजीर नेमिलें. मैमंदी हा अठरा वर्षे वजीर होता. पुढें त्याचा अपमान करून महमुदनें त्याला कैदेंत टाकिलें असतां महमुदचा मुलगा मसूदनें त्याची सुटका केली, महमुदच्या दरबारीं टूसी, अस्जुदी, अझ्युरी, फिर्दौसी वगैरे कवी होते. महमुदानें पश्चिमेकडील प्रांत घेतल्यावर हिंदुस्थानाकडे दृष्टी वळविली. हिंदुस्थानांत धर्मवृद्धि करावी, सपाटून संपत्ति मिळवावी व पदरच्या मोठया फौजेचा खर्च परस्पर भागवावा या हेतूनें त्यानें यापुढें हिंदुस्थानावर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या. हिंदुस्थानांत त्यावेळीं अनेक लहान लहान राज्यें होतीं व त्यांत एकी नव्हती. त्यामुळें महमुदला बहुतेक यश येत गेलें. त्यानें आपल्या राज्याची सुव्यवस्था लाविली होती व सैन्याचें त्याच्यावर प्रेम होतें. त्यामुळें इतक्या स्वाऱ्या करण्यास त्याला सवड मिळाली. त्यानें गझनीहून आगस्ट १००१ मध्यें निघून हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली व पेशावर येथें काबूल व लाहोर येथील राजा जयपाळ शाहीय (काबूलच्या शाही घराण्यांतील ?) याचा पराभव केला (२७ नोव्हेंबर १००१). याच सुमारास तिकडे निशापुर हें सामानी संस्थानिकानें काबीज केलें. परंतु महमुदानें तिकडे जाऊन तें परत घेतलें व त्यामुळें त्याला सिबिस्तानचा राजा म्हणून लोकांनीं कबूल केलें. (१००३). त्याच वेळीं त्यानें टाक हा किल्लाहि घेतला. पुढें १००६ त त्यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली. (माबेल डफ अनेक मुसुलमानी तवारीखांच्या आधारें दुसऱ्या स्वारीचा सन १००६ देतो व रा. सरदेसाई १००४ देतात.). तत्पूर्वी त्यानें आपल्या ईलकखान नांवाच्या चुलतभावाशीं तह करून ऑक्सस व ट्रान्सकाकेशिआ या प्रांतांची वांटणी केली. या दुसऱ्या स्वारींत त्यानें भिराराए भटिआह (भट्टीराजा विजयराय) याचा पराभव

केला. अनंगपाळ खंडणी देई; परंतु त्याचा साथीदार विजयराज हा देईना म्हणून महमूद त्याचेवर चालून गेला. प्रथम रजपुतांनीं त्याचा पराभव केला. तेव्हां त्यानें सैन्यास धीर देऊन पुन्हां लढाई दिली, तींत मात्र विजयराज मुलतानजवळील भिटीच्या (भटिंडा?) किल्यांत गेला; तो किल्लाहि महमूदनें घेतल्यावर विजयराज सिंधमध्यें पळून गेला व भट्टीराज्य महमूदनें खालसा केलें आणि परत गेला. इतक्यांत त्याचा मुलतानचा सुभेदार अबूलफत्ते यानें अनंगपालाशीं सख्य करून बंड उभारलें; तेव्हां महमूद पेशावरवर चालून येऊन त्यानें अबूलला काश्मीरकडे पिटाळून बंड मोडलें. (१००६). ही त्याची तिसरी स्वारी होय. इतक्यांत खुरासानांत बंड झाल्यानें महमूदानें तिकडे जाऊन तें मोडलें (१००७). इकडे महमूदचा पेशावरचा सुभेदार सुकपाल (हा मूळचा हिंदु असून पुढें मुसुलमान झाला होता) यानें धुमाकूळ सुरू केल्यानें महमूद तिकडून निघून पुन्हां इकडे आला व सुकपालाला पकडून त्यानें कैदेंत टाकिलें (१००७). ही चौथी स्वारी होय. पुढील सालीं त्यानें आपला चुलतभाऊ (ईलकखान) यास त्यानें बंडाळी केल्यावरून पकडून कैदेंत ठेविलें. या वेळीं अनंगपाळानें पुष्कळ हिंदुराजे जमवून लढाईची तयारी केली; स्त्रियांनीं आपले दागीनेसुद्धां युद्धाकरितां देणगी म्हणून दिले होते. गख्खर वगैरे डोंगरीलोकहि हिंदूंच्या बाजूस होते; महमूदची ही पांचवी स्वारी असून तो भटिंडा येथें आला. तेथें हिंदूमुसुलमानांचें युद्ध झालें. प्रथम हिंदूंचाच जय झाला, परंतु शेवटीं अनंगपाळाच्या हत्तीस तीर लागून तो पळत सुटला; तेव्हां राजा ठिकाणावर नाहींसें पाहून हिंदू सैन्य पळालें व महमूद याला आपोआप जय मिळाला (१००९). त्यानें परत जातांना नगरकोटचें देऊळ भ्रष्ट करून अपार संपत्ति लुटली. फेरिस्ता म्हणतो कीं सात लाख सोन्याचे दीनार, सातशें मण दागिने, दोन हजार मण चांदी, दोनशें मण सोनें, वीस मण जवाहीर इतकी लूट त्याला मिळाली. अरबी मण दोन शेरांचा असे. तरी त्या मानानेंहि ही संपत्ती पुष्कळ होती. महमूदानें गझनीस मोठा समारंभ करून ही संपत्ती सोन्याचांदीच्या मेजावर ठेवून लोकांस दाखविली. पुढें १०१० त त्यानें सहावी स्वारी करून (मत्स्यदेशची राजधानी)नारैन(नारायण) काबीज केलें. राव्हर्टीच्या मतें भीमनगरच्या भीमनारायणावरील जी स्वारी ती हीच होय. याच सालीं घूर प्रांत महमूदनें खालसा केला. लगेच मुलतानवर येऊन(सातवी स्वारी) अबुल लोदीस कैद करून गझनीस नेलें. तिकडे जशजानन प्रांत बिनवारस म्हणून (१०११) व गुर्जिस्तान (१०१२) प्रांतानें बंड केल्यावरून महमुदानें ते दोन्ही खालसा केले. नंतर १०१३ त त्यानें हिंदुस्थानावर (आठवी स्वारी) व १०१५ त आपला मुलगा मसाउद याच्यासह घुर प्रांतावर स्वारी केली. पुढें त्याच सालीं (नववी स्वारी) त्यानें स्थानेश्वरवर येऊन तेथील देऊळ लुटून गझनीस प्रयाण केलें; त्याबरोबर देवालयांतील मुख्य मूर्ति नेली. पुनः थोड्या दिवसांनीं (दहावी स्वारी) तो काश्मीरवर चालून आला पण लोहकोट येथें हिंदूंनीं त्याचा पराभव केला. पुढच्या सालीं (१०१६) ख्वारीझम प्रांतांत बंड झालें. तें त्यानें मोडून तेथें आपला खोजा अल्तुन-ताश याला सुभेदार नेमलें. नंतर (१०१७) त्यानें आपल्या (मसउद) मुलाला आपल्या चुलत भावाची (ईलकखान) मुलगी करून त्याला खुरासानचा सुभेदार केलें व हिरात ही त्याची राजधानी केली व मसाउदला आपला वारस नेमलें. पुढें त्यानें हिंदुस्थानावर अकरावी स्वारी (१०१८) केली. इतके दिवस तो पंजाबच्या अलकिडे आला नव्हता; परंतु पंजाबच्या पुढें अनेक संपत्तिमान शहरें असल्याचें ऐकून बरोबर अफाट फौज घेऊन तो एकदम कनोजवर आला. तेथील राजा कुवरराय हा त्यास शरण गेला. तेथून त्यानें मथुरेस जाऊन तेथील व वार्टेतील मंज वगैरे गांवातील श्रीमंत मंदिरें लुटलीं व प्रदेश बेचिराख करून गझनीस परत गेला. तिकडे मसाउद यानें घूर प्रांतांत झालेलें बंड मोडून बर्तर, झरात, झरूस हीं ठाणीं व घर्जिस्तानांतील सर्व किल्ले काबीज केले (१०२०). याच सालीं शाहनामा ग्रंथाचा कर्ता व तूसचा रहिवाशी आणि महमूदच्या दरबारचा प्रख्यात कवि फिर्दोसी हा मेला (खल्फानें त्याचा मृत्यु १०२५ त दिला आहे). कनोजचा राजा महमूदचा मांडलिक बनल्यानें इतर सर्व हिंदुराजांनीं कालंजरच्या नंदराजाच्या हाताखालीं त्याच्यावर स्वारी केली, तेव्हां त्यानें महमुदास मदतीस पाचारण केलें; परंतु महमूद येण्यापूर्वीच नंदराजानें कनोजच्या राजास लढाईत ठार केलें (१०२१). महमूदनें कालंजरवर चढाई केली (बारावी स्वारी) परंतु तेथें त्याचा पराभव झाला. तेव्हां तो परत निघाला. जातां जातां त्यानें अनंगपालाचा मुलगा त्रिलोचनपाल (लाहोरचा राजा) याचा राहिब येथें पराभव केला. त्या लढाईत त्रिलोचन पडला व त्याचा मुलगा भीमपाल हा राजा झाला. लाहोर हें गांव महमूदनें खालसा करून हिंदुस्थानांत मुसुलमानी राज्याचा पाया घातला. पुढें (१०२२) महमूदनें नूर व किरात आणि लोहकोट यांवर स्वाऱ्या केल्या. पैकीं लोहकोट येथें त्याचा पराभव झाला (तेरावी स्वारी). दुसऱ्या वर्षी (१०२३ चौदावी स्वारी) त्यानें ग्वाल्हेर व कनोजवर स्वारी केली व तेथून खंडणी घेऊन तो परत गेला आणि (१०२४) अफगाण लोकांवर चालून त्यांना लुटलें. पुन. त्यानें अफगाणावर स्वारी केली व ६ आक्टोबर १०२५ रोजीं सोमनाथाच्या प्रख्यात (पंधरावी)स्वारीवर तो निघून मुलतानाकडे वळला. गझनीहून हें १ हजार मैल दूर आहे. येथील देवळाइतकें विख्यात व श्रीमान देऊळ त्या काळीं पश्चिम हिंदुस्थानांत नव्हतें. झकेरिया कझिनी या फारशी

माणसानें (१२६३ त) सोमनाथाचें वर्णन ऐकीव माहिती-वरून दिलें आहे (सोमनाथाची साग्र माहिती सोमनाथ या नांवाखालीं पहावी). या प्रवासांत उन्हानें व इतर आपत्तींनें त्याच्या सैन्याचा फार नाश झाला. वाटाड्यांनीं भलत्याच वाटा दाखवून त्याला फसवून सोमनाथाचा सूड उगविला. त्याच वेळीं हिंदू लोकांनीं केलेल्या हल्लयांना मोठ्या कष्टानें तोंड देत देत तो सिंधु उतरून मुलतानास जाऊन तेथून गझनीस गेला.

पुढें गझनीस मसाउदचें लग्न करून महमूद पुनः (सोळावी स्वारी) जाट लोकांवर चालून आला (१०२७). कारण या लोकांनीं सोमनाथाच्या स्वारींतून परत जातांना त्याचा खर-पूस समाचार घेतला होता. या वेळींहि जाटांनीं त्याचा परा-भव केला; परत जातांना त्यानें भक्कर, ठठ्ठा व सीस्थान येथें स्वाऱ्या केल्या. पुढें (१०२८) त्यानें नहर प्रांताची वांटणी स्वतः व तुर्कस्तान (आशियांतील) चा राजा या दोघांत करून इराक प्रांतावर स्वारी करून तो खालसा केला व मसा-उदच्या ताब्यांत दिला (१०२९). याच सालीं मसाउदची व धाकर रजपुतांची एक लढाई झाली (सतरावी स्वारी). यानंतर थोडक्याच दिवसांत (३० एप्रिल १०३०) महमूद हा मधुमेहाच्या विकारानें वयाच्या साठाव्या वर्षी मरण पावला. तो शूर, महत्वाकांक्षी, अत्यंत लोभी, चंचल, मद्यपि, साहसी, व्यवहारज्ञ व विद्याव्यासंगी होता. त्यानें जवळ जवळ पंचवीस वर्षे हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्यानें हिंदुस्थानांत येण्याची वाट मुसुलमानांच्या पायाखालची होऊन गेली. त्यानें पंजाब जिंकल्यानें पुढें आपल्याला हिंदुस्थानांत राज्य स्थापतां येईल असा मुसुलमानांना भरंवसा वाटूं लागला. महमुदाच्या लोभीपणाची पुढील गोष्ट प्रख्यात आहे. मरणा-पूर्वी त्यानें आपली सारी संपत्ती एकत्र पाहिली व हिचा आतां वियोग होणार हें पाहून तो रडला; पण त्यानें ती कोणास वाटली नाहीं. त्यानें गझनीस एक पाठशाळा व एक पदार्थसंग्रहालय स्थापिलें. काव्याचाहि हा भोक्ता होता. हिंदु-स्थानांतले कारागीर नेऊन त्यानें गझनीस सुंदर इमारती बांधल्या. त्याची लष्करी शिस्त कडक असून तो स्वतःहि हुषार सेनापति होता. त्याची खडी फौज ५०।६० हजार असे. हिंदुस्थानांत कायमचें राज्य स्थापण्याची त्याची इच्छा नव्हती. फक्त लूट करण्याचा त्याचा परिपाठ असावा. लाहोर प्रांत त्याच्या ताब्यांत होता. बाकीच्या हिंदुस्थानचा व त्याचा कांहीं संबंध नसे. त्याच्यानें जसा हिंदुस्थानांत राज्यप्रसार झाला नाहीं, तसा धर्मप्रसारहि झाला नाहीं. याच्या दरबारीं अल्बेरुणी हा प्रख्यात संस्कृत शिकलेला ज्योतिषी होता. फराबी (विद्वान् साधु) उत्बी व बैहाकी (इतिहासकार) हेहि त्याचे नोकर होते. विद्येच्या प्रसारा-प्रीत्यर्थ सालीना तो कांहीं लाख रुपये खर्च करी. गझनी शहरांत त्यानें कालवे, हौद व कारंजीं बांधलीं. तो राज्यावर बसला तेव्हां गझनीच्या आसपासचा थोडासा डोंगराळ प्रांत त्याच्या ताब्यांत होता; परंतु मरणसमयीं उत्तरेस आरल व व कास्पियनसमुद्र, पश्चिमेस तैग्रीस नदी, पूर्वेस लाहोर इतका प्रदेश त्याच्या राज्यांत मोडे. त्यानें आपल्या पश्चात राज्य टिकविण्याचे उपाय योजले नाहींत. तो मुत्सद्दीहि नव्हता. त्याच्या मागें त्याचें राज्य विस्कळित झालें. याची कांहीं नाणीं ब्रिटिश म्युझियममध्यें आहेत.

मह्म्मद व मसूदः—महमूदच्या मागून झालेल्या गझ-नीच्या सुलतानाचा हिंदुस्थानाशीं फारसा संबंध येत नाहीं; ते फारसे पराक्रमीहि नसून त्यांनीं हिंदुस्थानांत नवीन प्रांतहि काबीज केला नाहीं; उलट कांहीं गमावला. महमूदास दोन जुळे पुत्र होते, त्यांपैकीं महम्मदनें आपल्या मागें गादीवर बसवावें असें त्यानें ठरविलें होतें. परंतु त्याचा भाऊ मसूद यानें त्याच्याशीं तंटा सुरू केला. दोघांची गांठ तेगीनाबाद येथें पडली व महम्मदास त्याचे फितुरी सरदार हानीब व युसूफ यांनीं विश्वासघातानें कैद करून (१०३० सप्टेंबर २) मसूदचे हवालीं केलें. मसूद हा इस्पाहान येथें सुभेदार होता. त्यानें प्रथम महम्मदला इराणचें राज्य आपल्याला तोडून देण्याबद्दल सांगितलें होतें; परंतु त्यानें तें कबूल केलें नव्हतें. शिवाय प्रजा व फौज यांची मसूदवर प्रीति होती त्यामुळें महम्मद शेवटीं मसूदच्या हातीं सांपडला. त्यानें त्याचे डोळे काढून तक्त बळकाविलें. मसूद हा आडदांड असून त्यानें हिंदु-स्थानावर दोन स्वाऱ्या केल्या. पहिली स्वारी १०३३ त करून काश्मीरांतील सरस्वती किल्ला घेतला व दुसरी १०३९ त करून हंसी किल्ला (शिवालिक पहाडांतील) काबिज केला व लाहोरास मौदूद नांवच्या आपल्या पुत्रास सुभा नेमून परत गेला. तिकडे तुघ्रलबेग नांवाच्या खोरासानच्या एका सेल्जुक तुर्क सुभेदारानें बंड उभारलें (१०३९); त्यावर मसूद चालून गेला; मर्व्ह येथें लढाई होऊन मसूद पराभव पावून गझनीस परतला. तेथेंहि त्याच्या फौजेनें बंड उभारलें, तेव्हां तो लाहो-रास आला; इकडेहि त्याची फौज त्याच्यावर उठली; तिनें त्याला कैद करून आंधळया महम्मदला गादीवर बसविलें. त्याचा कारभार त्याचा मुलगा अहमद हा पाहूं लागला; त्यानें मसूदला १०४० त ठार मारिलें. मसूद भाग्यहीन होता; तो फार शूर, मद्यपि व शक्तिमान् होता; हत्तीसहि तो जेर करीत असे. विद्येचा व इमारतींचा तो शोकी होता. बैहाकी नांवाच्या त्याच्या एका समकालीन मुसुलमानानें त्याची हकीकत लिहून ठेविली आहे. पंजाबावर त्यानें शेवटीं तिलक नांवाचा एक विद्वान हिंदु सुभेदार नेमला होता.

मौदूद व इतर गझनीकर राजेः—हा मसूदचा मुलगा; बाप मारला गेला तेव्हां हा बलक प्रांतांत होता. तेथून तो निघून सर्व अफगाणिस्थान काबीज करून लाहोरास आला. दंतूर येथें लढाई होऊन महम्मद त्याच्या हातीं लागला. त्यास त्यानें ठार मारून तो परत गझनीस गेला. पुढें (१०४३) हिंदुस्थानांतील (उत्तरेचे) सर्व रजपूत एक होऊन त्यांनीं

हंसी, स्थानेश्वर, नगरकोट वगैरे ठिकाणें परत घेतलीं; फक्त लाहोर मुसुलमानांकडे राहिलें. मौदूद हा १०४९ त मेला. त्याच्या नंतर ५० वर्षें या घराण्यांत पुष्कळ घालमेली, तंटे व खून झाले. मौदूदनंतर त्याचा मुलगा मसूद व त्याचे मागून त्याचा चुलता अब्दुल हसन हा गादीवर आला. पुढें अब्दल रशीद, फर्रुखजाद, इब्राहिम हे राजे झाले. इब्राहिम यानें ४० वर्षें (१०९८ पर्यंत) राज्य केलें; त्यानें १०७९ त पंजाबावर स्वारी केली होती. याला ४० मुलगे व ३६ मुली होत्या ! यानंतर मसूद, अर्स्लान व बहराम हे राजे गादीवर आले. हे मधून मधून लाहोरास राहूं लागले; कारण गझनीचा बहुतेक प्रांत सेल्जुक तुर्कांनीं बळकाविला होता. बहरामनें १११८–५२ पर्यंत राज्य केलें. याच्या वेळीं तंटे सुरू होऊन त्यांत गझनी घराण्याचा शेवट झाला. पंजाबांतील रजपूतांनीं त्याला पुष्कळ त्रास दिला. त्यानें आपला जांवई कुत्बुद्दीन घोरी यास, उभयतांत वैर उत्पन्न झाल्यानें पकडून ठार मारिलें. तेव्हां त्याचा भाऊ सैफुद्दीन यानें गझनीवर चाल केली, त्यावेळीं बहराम हा कर्मानचे डोंगरांत पळून गेला. पुढें हिंवाळ्यांत बहरामनें स्वारी करून सैफुद्दीनचा पराभव केला व त्याला पकडून ठार मारिलें. त्यामुळें त्याचा भाऊ अल्लाउद्दीन यानें बहारामवर चढाई केली. लढाईत बहरामचा पराभव होऊन तो पळून हिंदुस्थानांत येऊं लागला; परंतु शेवटीं अर्ध्या वाटेंतच तो मरण पावला. अल्लाउद्दीनानें गझनी घेऊन गांवांत तीन दिवस अग्नि व तलवार यांचा प्रळय माजविला. सुलतानांचें सारें वैभव, संपत्ति व इमारती वगैरे यांचा त्यावेळीं सर्वनाश झाला. विद्वान निरुपद्रवी लोकांची कत्तल झाली. मार्जी सुलतानांची थडगीं उकरून त्यांतील हाडें कुत्र्यांनां खावयास घातलीं. यामुळें अल्लाउद्दीनास 'जहान सोझ' (जग जाळणारा) असें नांव पडलें. बहरामचा मुलगा खुश्रू हा लाहोरास मरेपर्यंत (११६०) राहिला. त्याचा मुलगा मलीक हा गझनी घराण्यांतील शेवटचा राजा होय. महंमद घोरीनें त्याच्यावर ११७८ त स्वारी करून व त्याचा पराभव करून त्याच्या मुलास पकडून नेलें. पुढल्या वर्षींहि त्यानें मलीकवर स्वारी केली; या वेळें मालिक यास गक्कर लोक साहाय्य करीत होते. त्यावेळीं महंमद घोरीनें मलीकशीं तह करण्याचें मीष दाखवून व त्याचा मुलगा त्याच्याकडे पाठवून तो बेसावध असतां त्यास कपटानें सर्व कुटुंबासुद्धां पकडून गझनीस पाठविलें. तेथें कांहीं दिवस कैद भोगल्यावर मलीकचा वध केला गेला व महंमद घोरीनें गझनीवंशाचें सर्व राज्य खालसा केलें (११८६). [फेरिस्ता; शाहनामा; माबेल डफ; सरदेसाई–मुसुलमानी रियासत. स्मिथ–अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया].

गटापर्चा—मलाया द्वीपसमूहांत आढळणाऱ्या कित्येक झाडांचा रस आटवून त्याचा पांढऱ्या रंगाचा रांधा तयार करतात त्यास गटापर्चा हें नांव आहे. मलाया भाषेंतील गटा (= गोंद) व पर्चा (= झाडाचें नांव) या दोन शब्दांचा मिळून हा शब्द तयार झाला आहे. टबन या नांवाच्या झाडापासून हा पदार्थ निघतो. याच्या दोन जाती आहेत. एक गटा टबनपेरा (तांबडा) व दुसरा गटा टबन सुत्रा (रेशीम). गटापर्चाचीं झाडें ७० ते १०० फूट उंच वाढतात व त्यांच्या खोडाचा व्यास २ ते ३ फूट असतो.

हें झाड मलाया द्वीपसमूहांत व त्याच्या आसपास सांपडतें. विषुववृत्ताच्या उत्तर व दक्षिण अक्षांश ६° व पूर्व रेखांश ९३° ते ११९° मध्यें जेथें उष्णतामान६६ ते ९० अंश (फॅ.) असतें तेथें हीं झाडें सांपडतात. झाडांचीं कलमें जगतात व बीहि रुजतें. हल्लीं आफ्रिकेच्या पश्चिमेस व सिलोनमध्यें या झाडांची लागवड करण्याचा प्रयत्न चालू आहे व तो यशस्वी होत आहे.

का ढ ण्या ची री त.—झाडांच्या फांद्या तोडून झाड पाडतात व त्यास चक्राकार रवे पाडतात. म्हणजे त्यांच्या अंतर्सालींतून गटा बाहेर येतो. एका झाडांतून १ ते २ शेर गटा निघतो. ३० वर्षांचीं जुनीं व पक्वदशेस आलेलीं झाडें हींच गटा काढण्यास उपयोगीं होत. अपक्व झाडांतून निघालेला गटा कमी दर्जाचा असतो व ३० वर्षांहून जास्त जुनाट वृक्ष २ शेरांहून जास्त गटा देऊं शकत नाहीं.

उ प यो ग.—पाण्यांत शिजविला असतां हा लवचीक होतो व वाळल्यावर पुन्हां कठीण होतो. याच्या चाकूच्या मुठी व हातीं धरावयाच्या काठ्या करतात. हा विद्युद्रोधक आहे, म्हणून पाण्याच्या खालून जाणाऱ्या तारा झांकण्याकरितां याचा उपयोग होतो. याचा दांत बसविण्याकडेहि उपयोग होतो व याचे ठसे करितात.

हिंदुस्थानांत बंगालमध्यें आढळणारें ॲक्रस सॅपोटा, हुशंगाबाद व तिन्नवेल्लीमध्यें होणारें बॉसिया लॅटिफोला व कॅलोट्रॉपिस गिगँटिया (मदर अथवा अर्कंद), आणि यूफोर्बिआ ट्रिकोना (कट्टिमण्डु) वगैरे झाडांपासून गटापर्चा मिळण्याचा संभव आहे. पण त्याचें प्रमाण फार थोडें असतें. इतर झाडांपासून निघालेला चीक गटाच्या ऐवजीं उपयोगांत आणितात, परंतु तो कमी दर्जाचा असतो. गंधक तेलांत मिसळून त्याचाहि एक प्रकारचा गटा तयार करितात . परंतु तोहि गटा इतका चांगला होत नाहीं.

गंडकी मो ठी.—उत्तर हिंदुस्थानांतील एक नदी. नेपाळच्या मध्यभागीं असलेल्या पहाडाच्या खोऱ्यांतून हिचा उगम होतो. हिच्या वेगवेगळ्या उगमांस 'सप्त गंडकी' हें नांव आहे. ही धवलगिरी व गोसैनथान ह्या पर्वतांतून वहाते. ह्यांतील मोठ्या प्रवाहास "त्रिशूल गंगा" हें नांव आहे. हे सर्व प्रवाह त्रिवेणी येथें एक होतात. ह्या नदीस नेपाळांत शालिग्रामी ही संज्ञा असून संयुक्तप्रांतांत हीस नारायणी म्हणतात. ग्रीक भूगोलशास्त्रज्ञ हीस कोन्डोचेटस म्हणत. महाकाव्यांतील सदानीरा ती हीच असें लासेन म्हणतो. त्रिवेणी मुक्कामीं ही ब्रिटीशसरहद्द ओलांडते. बंगालच्या चंपारण जिल्ह्याच्या व संयुक्त

प्रान्ताच्या गोरखपूर जिल्ह्याच्या सरहद्दीवरून वहाते. तद-नंतर ही पाटण्यास गंगेस जाऊन मिळते. ही नदी १९२ मैल लांब असून १२ महिने नावा नेण्याजोगी असते. इमारती लांकूड, धान्य, साखर वगैरे माल जलमार्गानें या नदींतून पाठविला जातो. ह्या नदीस कोठेंच उतार नाहीं. ह्या नदीपासून त्रिवेणी व सारण हे दोन कालवे काढले आहेत. कांठावरील महत्त्वाचीं गांवें हाजीपूर व शोण-पूर हीं आहेत.

ल हा न.—नेपाळच्या लहान पहाडांतून उगम पावणारी एक नदी. ही गोरखपूर जिल्ह्यांतून वहात जाऊन बंगालच्या सारण जिल्ह्यामध्यें घोग्रेस जाऊन मिळते.

गडचिरोळी, त ह शी ल—मध्यप्रांत. जिल्हा चांदा.उत्तर अक्षांश १९°२३' ते २०°५०' व पूर्व रेखांश ७९°५६'ते ८०°३७'. हल्लीं या तहशिलीचें क्षेत्रफळ खालसा १४५७ व जमीनदारी १४१३ चौरस मैल आहे. उत्तरेस भंडारा जिल्हा, पूर्वेस दुर्ग जिल्हा, दक्षिणेस शिरोंचा तहशील व पश्चि-मेस चांदा आणि ब्रह्मपुरी तहशील. या तहशिलींतील बहुतेक भाग डोंगराळ असून दाट जंगल आहे. डोंगर फार उंच नाहींत. हींत कांहीं चांगले तलाव असून जमीन सुपीक आहे. जंगल फार असल्यानें खेडीं फक्त नदीती-रावर वसलेलीं आहेत. या भागांत मुख्य पीक भाताचें आहे. लो. सं. (१९११) खालसामधील ९७७०५ व जमीनदारींतील ४६१७५. या तहशिलींत एकंदर ७४४ खेडीं आहेत. त्यापैकीं जमिनदारींत ४३२ व खालसांत ३१२.जमीनदारींत २०० ओसाड खेडीं असून खालसांत ६५ ओसाड आहेत.

सरकारधारा सरासरी१०आणे ९ पै दर एकरी. हींत शहर एकहि नसून तहशिलीचें मुख्य ठिकाण गडचिरोळी आहे.

खे डें.—गडचिरोळी तहशिलीचें मुख्य ठिकाण. वैन गंगा नदीच्या वामतीरापासून एक दोन मैलांवर हें खेडें आहे. इ. स. १९०१ सालीं लोकसंख्या २०७७ होती. तसर रेशमी किडयांची वाढ येथें करीत असून थोडेसें रेशीमहि येथें कातण्यांत येतें. परंतु गेल्या दुष्काळामुळें हा व्यापार बराच बसला आहे. शेती हा मुख्य धंदा असून भात हें पिक आहे. दर रविवारी येथें बाजार भरतो. या गांवाचे माल-गुझार नागपूरचे सर गंगाधरराव चिटणवीस हे आहेत.

गंडमाळा व अपची-नि दा न.—कांख, खांदे, मान, गळा आणि आडसंधी या ठिकाणीं आवळ्याएवढ्या किंवा बोराएवढ्या मेद व कफ दुष्ट होऊन सावकाश पिकणाऱ्या उंच, पुष्कळ व माळेप्रमाणें गांठी उत्पन्न होतात त्यांस गंड-माळा असें म्हणतात. ह्या गांठी पिकून फुटतात आणि पहिल्या बऱ्या होऊन त्यांच्या शेजारीं दुसऱ्या उठतात; त्या बऱ्या होऊन आणखी उठतात. असें होऊन पुष्कळ दिवस हा क्रम चालूं लागला म्हणजे त्यांसच अपची ('चयप्रकर्षा-[illegible]

उठतात. ह्या अपचीरोगांत माळेप्रमाणें गांठीं न उठतां मार्गे पुढें कोठेंहि गांठी येऊन पिकतात व फुटून बऱ्या होतात.

गंडमाळा व अपची हे दोन्ही विकार साध्य आहेत परंतु पडसें, बरगड्या दुखणें, खोकला, ताप, व ओकारी हीं लक्षणें झालीं असतां ते असाध्य असतात.

चि कि त्सा यावर वमनविरेचनाकरितां दंतीमूळ,निशोत्तर, कडू दोडका व देवडांगरी यांनीं सिद्ध केलेलें तूप प्यावें. कफ व मेद यांचा नाश करणारे धूम, गुळणे, व नस्य हीं करावीं. शीर तोडून रक्त काढावें व गोमूत्रांतून रसांजन प्यावें. कठिण गांठी सैंधवाच्या पुरचुंडीनें शेकाव्या व चोळाव्या.

पिकण्याच्या बेतास आलेल्या गांठी, त्यांतील रक्त काढून पित्तकफहारक औषधांनीं बऱ्या कराव्या. किंवा त्या पिकण्यापूर्वी शस्त्रानें कापून टाकून क्षारानें किंवा अग्नीनें भाजाव्या. करंजाचें तेल औषधांत कढवून प्यालें व नाकांत घातलें असतां गंडमाळा बरी होते. या उपायांनीं गंडमाळा बरी न झाल्यास ज्या बाजूस ती असेल तिच्या दुसऱ्या बाजूच्या पोटरींत टांचेपासून बारा अंगुळांवर इंद्रवस्ती नांवाचें जें मर्म आहे त्याच्या खालीं किंवा वर कापून मेद काढून अग्नीनें डाग द्यावा.

रोग्यास उभा करून घोंट्याच्यावर त्याच्या पावलाइतकें अंतर सोडून छेद करावा. आणि त्यांतील मेदाचे गोळे काढून टाकावे असें निमीचें मत आहे. या बाबतींत पुष्कळ मतांतरें आहेत ती वा. उ. स्था. अ. ३०मध्यें पहावीं.

गडवाल सं स्था न—अथवा केशवनगर. हैद्राबाद संस्थानांतील रायचूर जिल्ह्याच्या पूर्वेकडील एक संस्थान किंवा मांडलीक जमीनदारी. हींत गडवाल हा एकच गांव व ११८ खेडीं आहेत. क्षेत्रफळ ८१३ चौ. मै. लो. सं. (१९११) १,१३८,१८. एकंदर उत्पन्न तीन लाख. निझामास खंडणी-दाखल ८६८४० रु. द्यावे लागतात. हैद्राबाद संस्थान अस्ति-त्वांत येण्याच्या पूर्वींपासून गडवाल संस्थान आहे. ह्या संस्थानाचा पूर्वेतिहास उपलब्ध नाहीं. येथील किल्ल्यांत सध्यांचा राजा रहातो. हा किल्ला१७०३-१७१०च्या दरम्यान राजा सोमतादरीनें बांधिला. उत्तर व दक्षिण भागांतून अनु-क्रमें कृष्णा व तुंगभद्रा ह्या नद्या असल्यामुळें येथील प्रदेश फार सुपीक आहे. इतर भागाची जमीन 'मसब' आहे. येथें रेशमी साड्या, पागोटीं, उपरणीं व धोत्रें वगैरे तयार होतात. बराच माल बाहेर गांवीं जातो.

गां व.—गडवाल संस्थानचें मुख्य ठिकाण. हें रायचूर गांवाच्या पूर्वेस ३५ मैलांवर आहे. लो.सं. (१९११) १२०८२.

गडशंकर, त ह शी ल.—पंजाब.होशिआपूर जिल्ह्यांतला एक तालुका. उत्तरअक्षांश३०° ५९' ते ३१°३१'आणि पूर्वरे-खांश ७५° ५१' ते ७६° ३१'. हिचा ५११ चौरसमैल विस्तार असून लोकसंख्या (१९११) २३६८१४ आहे. ४७५ खेडीं [illegible]

एकंदर होशिआपूर जिल्ह्यापेक्षां येथल्या टेंकड्या सरळ उंच आहेत. व पाण्याचे प्रवाह कमी आहेत. गडशंकर शहर हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. सतलज नदी या तालुक्याची दक्षिणमर्यादा आहे.

श ह र.—होशिआरपूर जिल्हा. उत्तरअक्षांश ३१° १३' व पूर्वरेखांश ७६° ९'; लोकसंख्या (१९११) ४९२३. गडशंकर तालुक्याचें मुख्य ठिकाण. येथील वस्ती रजपुतांची आहे. येथें साखर व तंबाखू यांचा बराच मोठा व्यापार चालतो. येथें एक व्हर्नाक्युलर मिडलस्कूल व एक दवाखाना आहे. १८८२ त म्युनिसिपालिटी देण्यांत आली होती पण १८९१ त ती काढून घेतली.

गडहिंग्लज—मुंबई इलाख्यांतील कोल्हापूर संस्थानाच्या गडहिंग्लज तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें हिरण्यकेशी नदीच्या डाव्या तीरावर असून संकेश्वर-पारोळी खिंडीच्या रस्त्यापासून अगदीं नजीक आहे. लोकसंख्या (१९११) ५९०६. अंदाजें तीनशें वर्षांपूर्वी पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळें लोकांस येथून गांव हलवावा लागला होता असें म्हणतात. गांवाच्या मध्यभागीं कलेश्वराचें देवालय आहे. गांवाच्या उत्तरेस तीन मैलांवर बहिरी देवालय आहे. तेथें दरवर्षी मार्च महिन्यांत मोठी यात्रा भरते.

गंडा—कोष्टी मजूर जात. हिची वस्ती बिहार–ओरिसा व मध्यप्रांत यांतून आहे. एकंदर लो. सं. (१९११) ३६४८२६. बंगाल,बहार व ओरिसांत या जातीची लोकसंख्या २१३०३९ इतकी असून वस्ती बहुधा संबळपूर व ओरिसांतील संस्थानें यांतून आहे. ही एक कोष्टयांची अत्यंत हलकी जात असून या लोकांचा 'पाण' जातीशीं संबंध असावा असें दिसतें. परंतु वस्तुस्थिति उलट आहे. कापड विणण्याच्या धंद्याशिवाय गांधरखवाली व ढोलकीवाजंत्री वगैरे वाद्यें वाजविण्याचें काम हे ते करितात. ओरिसा, लारिया, कंधरिया व कबरिया असे त्यांचे चार पोटभेद आहेत. यांपैकीं, पहिल्या तीन विभागांचीं नांवें केवळ त्या त्या देशावरून पडलीं आहेत. कबरिया हें नांव या विभागांतील लोक कबीरपंथी असल्यावरून पडलें असावें. ओरिया व लारिया हे आपसांत रोटीबेटीव्यवहार करितात. परंतु कंधरिया व कबरिया यांच्याशी फारसा संबंध ठेवीत नाहींत. गंडा लोक परजातीच्या मनुष्यास स्वजातींत घेतात, परंतु चांभार, घासी, हरि, मनगन व मेहतर या जातींचा प्रवेश होऊं देत नाहींत. इतकेंच नव्हे तर या जातीपैकीं, कोणाचा स्पर्श झाल्यास ते स्नान करून स्वतःची शुद्धि झाली असें मानतात. वरील जातींच्या बरोबर किंवा हल्लीं अन्नव्यवहार करणाऱ्यांस अर्थातच बहिष्कृत केलें जातें. मध्यप्रांतात ही जाती अगदीं नीच व अस्पृश्य समजली जाते. त्या प्रांतांत हिची वस्ती दीड लाख असून हे रायपूर, बिलासपूर आणि रायगड संस्थानांत आहेत.

हे लोक पूर्वी मुलें चोरून नेत व कधीं कधीं तर स्वतःची मुलें सुद्धां बळी देण्याकरितां विकीत. छोटानागपूरच्या रानटी भागांत जेथें मजूर मिळणें कठिण तेथें स्वतःस विकून घेणें किंवा दुसरीं माणसें विकत घेणें ही चाल होती.

यांच्यांत इतर असंस्कृत जातींप्रमाणें, झाडें, पशू व पक्षी यांच्या नांवांवरून कुळांचीं नांवें पडलेलीं आहेत. कुळांतल्या कुळांत विवाह होत नाहींत. पण भावाचीं मुलें व बहिणींचीं मुलें यांचा आपआपसांत विवाह होतो. न्हाण आल्यावर सुद्धां कोणा मुलीस वर न मिळाला तर अंगणात भाला रोंवून त्याच्या बरोबर तिचें लग्न करतात. व मग जो तिला ठेवील त्याला ती देतात. स्वजातीयांशीं व्यभिचार करणाऱ्या मुलीचें लग्न विधवेसारखें होतें व तिच्या आईबापास एक जातिभोजन द्यावें लागतें. पण बाहेरच्या माणसाबरोबर व्यभिचार केल्यास पूर्ण बहिष्कार होतो.

लग्न करून वधूवर घरीं आले म्हणजे गवताचा हरिण करून वधूच्या कानामागें ठेवतात. वरानें गवताच्या बाणानें सात बाणांत त्याला उडवावा. न उडाल्यास वधूचा भाऊ तो हरिण घेऊन पळतो व वरानें त्याला धरून आणावा इतका लग्नांत विधी आहे. विधवांनीं पुनर्विवाह करावा पण दिरानें जर नाकारलें तरच इतरांस वरावें. जातीपंचाईती समोर नवऱ्यानें व्यभिचारिणी बायकोशीं काडी मोडावी आणि जर त्या बाईनें आपल्या जाराबरोबर लग्न केलें तर त्यानें नवऱ्याच्या लग्नाचा खर्च भरून द्यावा.

हे दुल्हा देवाची पूजा करतात. त्याला बकरीं बळी देतात. दसऱ्यास आपल्या वाद्यांची व हातमागांची पूजा करतात. तुळशी व वडाची पूजा हे लोक स्वतः अस्पृश्य असल्यामुळें करीत नाहींत.

गंडिकोट—मद्रास इलाख्यांतील कडाप्पा जिल्ह्याच्या जम्मलमडुगु तालुक्यांतील एक प्राचीन किल्ला. उंची समुद्र स. पासून १६७० फूट आहे. पायथ्याशीं पेन्नार नदी वहाते. प्राचीन काळीं येथील बोमनपल्लीच्या कप्प नृपानें गंडिकोट गांव वसविलें व येथें किल्ला बांधिला. हरिहर नामक पहिल्या विजयानगरच्या राजानें येथें एक मंदीर बांधिलें. फेरिस्ता म्हणतो. हा किल्ला १५८९ मध्यें बांधण्यांत आला.

गोंवळकोंड्याच्या सुलताननें हा काबीज केला होता व कर्नाटक बालाघाटच्या पांच सरकारांपैकीं एका सरकारचें हें मुख्य ठिकाण होतें. हैदरअलीचा बाप फत्तेनाईक पहिल्यानें येथेंच नांवलौकिकास चढला. १७९१त टिपूशीं झालेल्या युद्धांत कॅप्टन लिटलनें हा किल्ला घेतला.

गडिया पहाड—मध्यप्रांत. कांकर संस्थानच्या दक्षिणेस असलेली टेंकडी. हिच्या पठारावर असलेला किल्ला प्रसिद्ध असून येथें एक आंबराई व सोनादेही व रूपादेही नांवाचा तलाव आहे. किल्ल्यांत पूर्वी राहत असलेल्या राजाच्या कन्येच्या नांवावरून या तलावाचें हें नांव पडलें. किल्ल्यास दगडी दरवाजा असून आंत एक शिवालय आहे. या टेंकडीवर लोकांस

रहाण्यासारख्या प्रशस्त गुहा असून त्यांची द्वारें किल्ल्यांत आहेत; व पेंढारी लोकांच्या वेळीं राजा व त्याचे लोक या गुहांत लपून बसत असत.

गढमुक्तेश्वर—संयुक्तप्रांत. मीरत जिल्हा हापूर तालुक्यांतलें एक शहर. उ. अ. २८°४७' व पू. रे. ७८°६' औध रोहिलखंड रेल्वे व दिल्ली मुरादाबाद हे रस्ते यांतून जातात. लोकसंख्या (१९०१) ७६१६. प्राचीन हस्तिनापूरचा हा एक भाग होता असें म्हणतात. पण हस्तिनापूर म्हणून जो भाग दाखविण्यांत येतो तो येथून २५ मैल दूर आहे. येथें एक जुना किल्ला आहे. गांवात ८० च्या वर सतीचे दगड दाखविण्यांत येतात. गंगेचीं चार देवळें येथें आहेत. मुक्तेश्वर महादेवाचें एक मंदिर आहे. मंदिराजवळच एक पापविमोचनी कुंड आहे. कार्तिकी पौर्णिमेस येथें फार मोठी यात्रा (सुमारें २,००,०००) भरते व दर सहा, बारा व चाळीस वर्षांनीं येणाऱ्या यात्रेला भयंकर गर्दी होते. जत्रेचा खर्च गाड्या, ढोरें व दुकानें यांवर बसविलेल्या करांतून होतो. पूर्वी येथें उमदे घोडे फार येत असत. आतां त्यांची संख्या कमी होऊन खेचरें फार येतात. येथें १२८३मध्यें गियासुद्दीन बलबननें बांधलेली एक मशीद आहे. दून आणि गढवाल येथून नदीनें नांवांतून येणाऱ्या इमारती लांकडाचा व बांबूंचा बराच मोठा व्यापार येथें चालतो. ह्या गांवची व्यवस्था १८५६ च्या २० व्या कायद्याप्रमाणें चालते. उत्पन्न २००० आहे.

गढवाल, जिल्हा—संयुक्तप्रांतांत कुमाऊन विभागामध्यें हा उ. अ. २९° २६' ते ३१°५' व पू रे. ७८°१२' ते ८०°६' यांच्या दरम्यान असून क्षेत्रफळ ५६२९ चौ. मैल आहे. उत्तरेस तिबेट, आग्नेयीस अलमोरा व नैनीताल, नैर्ऋत्येस बिजनोर व वायव्येस तेहरी संस्थान. हिमालयाची मध्यशाखा यांतून गेली असून सतलज व गंगा यांच्या शाखा व उपशाखांच्या जाळ्यापर्यंत याचा विस्तार आहे. धवलगंगा, विष्णुगंगा, अलकनंदा व मंदाकिनी या मुख्य नद्या असून रामगंगा ही बरीच मोठी नदी आहे. हिमालयाची मध्यशाखा व दोन मोठाले फांटे मिळून कामेत (२५ ४१३ फूट), त्रिशूळ (२३३८२), बद्रीनाथ (२३२१०), दूनगिरी (२३१८१) आणि केदारनाथ (२२८५३) हीं मुख्य शिखरें आहेत. गोन्हा हें एकच साधारण नांव घेण्यासारखें तळें असून भावर नांवाचा अरण्याची निर्जल व २-३ मैल रुंदीची पट्टी एवढीच कायती जिल्ह्यांतील सपाट जमीन आहे.बाकी सर्वत्र टेंकड्या व दऱ्या आणि नद्या यांचें साम्राज्य आहे. उंची व हवामानास अनुसरून अनेक प्रकारचीं झाडें या जिल्ह्यांत आढळतात.

भावरमध्यें हत्ती व वाघ सांपडतात. चित्ते सर्वत्र आढळतात. अस्वल, लांडगा, कोल्हा व रानकुत्रा वगैरे हिंस्र प्राणीहि आहेत. सांबर व गुरल हेहि बरेच दिसतात. पक्षीहि विविध व मनोहर असून नद्यांतून मासेहि सांपडतात.

हवामानामध्यें स्थल व काल यांच्या मानानें फारच फरक पडतो. नद्यांजवळच्या दऱ्याखोऱ्यांतून उन्हाळ्यांत अत्यंत कडक उन्हाळा व हिवाळ्यांत अतिशय थंडी असते. खुल्या जागेंत साधारणतः समशीतोष्ण व एकस्वरूपाचें हवामान रहातें. पावसाचें मान बरेंच असून तें उंच डोंगर ज्या भागांत आहेत तेथें १०० इंचपर्यंत जातें. उन्हाळ्यांत १८००० फुटांपर्यंत बर्फ पडतें व हिवाळ्यांत ४ हजार पासून ५ हजारपर्यंत खालीं येतें.

इतिहासः—गढवालचा पुर्वेतिहास अत्यंत दुर्बोध व गुंतागुंतीचा आहे. ब्रह्मपुरराज्यांत याचा कांहीं भाग असावा. कलचुरी घराण्याचाहि येथें अंमल असावा. पुढें त्या घराण्यांत फूट पडून निरनिराळीं घराणीं झालीं. अजयपालानें त्यांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. पुढें महिपालानें १७ व्या शतकात श्रीनगर येथें गादी स्थापली.

गढवालच्या राजांचा इसवी सन १५८१ च्या सुमारास प्रथमच अल्डेमाराच्या चंदराजाशीं कलह झाला. तेव्हां चंदराजांनीं गढवाल घेण्याचे बरेच प्रयत्न केले. शहाजहाननें १६५४त या राज्यांतील डेहराडून प्रांत घेतला. चंदराजांनीं पुन्हां प्रयत्न करून तेथील राजाला हांकलून दिलें.पुढें नजीबखानानें तेथें आपला अंमल बसवला. थोडेच दिवसांत त्याचा पराभव होऊन गढवाल व कुमाऊन हे दोन्ही प्रांत प्रद्युम्न नांवाच्या राजाच्या ताब्यांत आले. पुढें गुरख्यांचा त्रास सुरू झाला. व १८०८ पासून १८१५ पर्यंत तेथें गुरख्यांचा अंमल होता. स.१८१५ मध्यें इंग्रज आले व तो प्रांत एका कमिशनरच्या हाताखालीं दिला. १८३७ त तो सबडिव्हिजन झाला व १८९१ मध्यें हल्लींचें जिल्ह्याचें स्वरूप त्याला देण्यांत आलें. या जिल्ह्यांत अनेक देवळें व क्षेत्रें आहेत. बद्रीनाथ, केदारनाथ, पांडुकेश्वर व जोशीमठ हीं त्यांत मुख्य होत. येथें नेपाळच्या राजाचें विजयचिन्ह म्हणून एक १० फूट उंचीचा त्रिशूळ आहे व ताम्रपट वगैरे ऐतिहासिक महत्त्वाच्या वऱ्याच वस्तू येथें मंदिरांतून ठेवलेल्या आहेत.

लोकसंख्याः–पावरी हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. यांत एकच तालुका असल्यानें पावरी तालुका असेंहि याला म्हणतात, पावरी हें साधारण खेडेंच आहे. लंडसडौन, श्रीनगर, कोटद्वार येथें लष्करी छावण्या आहेत. तीन शहरें व ३६०० खेडीं असून वस्ती (१९२१)४८५१८६ व क्षे.फ.५६२९ चौ. मै. आहे. शेती हाच मुख्य धंदा असून शेंकडा ८९ लोकांचा निर्वाह शेतीवर होतो. हिंदी सैन्यांतील दोन तुकड्या सर्वस्वीं गढवाली लोकांच्या आहेत.

शेतीः—यांतील शेती अर्थातच विखुरलेली आहे.नद्यांच्या बाजूनें व नद्यांचा प्रवाह बदलून गेल्यामुळें राहिलेल्या जागेवर शेती होते व डोंगराच्या उतारावर बांध घालून मळया करून शेती करतात. उत्तरेच्या बाजूला एकच पीक काढतात. बाकी सर्वत्र दोन पिकें होतात.

१९०३—४ मध्यें ४१० चौ. मैल जमीन लागवडीस होती. मुख्य पीक तांदूळ, गहूं, बार्ली, मरुआ, झंगोरा. राखीव जंगल ५७९ चौ. मैल आहे. पूर्वी येथें तांबें व लोखंड या धातू निघत असत. कोठें कोठें नद्यांतून सोन्याचे कण सांपडतात. शिवाय शिसें, गंधक, तुरटी वगैरेहि आढळतात.

व्यापार व दळणवळणः—या जिल्ह्यांत फारसे महत्त्वाचे उद्योगधंदे नाहींत. तागाचें जाडेभरडें कापड, दोऱ्या व कांबळें, चामड्याचें सामान, चटया, बांगड्या वगैरे स्थानिक खपापुरता माल येथें तयार होतो. एक दोन ठिकाणीं दगडी खोदकामहि होतें. याचा व्यापार मुख्यतः तिबेटाशीं चालतो. आयात माल मीठ, लोंकर, मेंढ्या, तट्टे व टाकणखार हा असून धान्य व कपडा बाहेर जातात. सर्व व्यापार भूतिया लोकांच्या हातांत असून फक्त त्यांनांच हद्दीवरून जाण्यायेण्याची परवानगी आहे. ते मालाची ने आण याक, जूवा, गाढवें, बकरीं यांच्यावरून व कधीं कधीं स्वतःहि करतात. पश्चिम भागाचा तेहरी संस्थानशीं व्यापार चालतो. तेथून धान्य येतें व तिबेटी मीठ तेथें पाठविलें जातें.

कोटद्वारपर्यंत औध रोहिलखंड रेल्वेचा फांटा नजीबाबादपासून जातो. रस्ते फार खराब असून ओझ्याचे प्राणी मोठ्या कष्टानेंच जाऊं शकतात. यात्रेकरूंचा मार्ग व कोटद्वार श्रीनगर रस्ता हे मुख्य रस्ते आहेत. येथें म्युनिसिपल कचेऱ्या नाहींत. दोन शहरें १८५६ च्या विसाव्या कायद्याप्रमाणें वसलीं असून जिल्ह्याचें लोकलबोर्ड आहे. कोटद्वार व श्रीनगर येथें पोलीस ठाणीं आहेत. यात्रेच्या वेळीं आणखी ६ ठिकाणीं पोलीस ठाणीं बसवितात. पटवाऱ्यांनां सबइन्स्पेक्टरचे अधिकार आहेत. १९०१ मध्यें शेंकडा ६.४ (१२ पुरुष व ०.२ स्त्रिया) वाचूं लिहूं शकत. दोन सरकारी व १०१ लोकल बोर्डाच्या शाळा आहेत. जिल्ह्यांत १० दवाखाने आहेत. [इंपीरियल ग्याझे. व्हॉ. १२; सेटलमेंट रिपोर्ट १८९६ नॉर्थवेस्टप्रॉव्हिन्स ग्याझे.].

गढाकोटा—मध्यप्रांत, सागर जिल्हा. रेहली तालुक्यांतील एक शहर. उ. अ. २३ ° ४६' व पू. रे. ७९ ° ९'. सागरपासून २८ मैलांवर दमोह रस्त्यानें गधेरी व सोनार नद्यांच्या संगमावर हें शहर वसलें असून येथील लोकसंख्या (१९०१) ८५०८ आहे. दोन नद्यांच्या मध्यें (दुआबांत) एक किल्ला आहे. शहरापासून दोन मैलांवर बुंदेल राजाचा ग्रीष्मर्तूंत रहाण्याचा राजवाडा असून तेथून सागर व दमोह दोन्हीं दिसावे अशा अंदाजानें तो बांधला होता असें म्हणतात. येथले स्थानिक स्वराज्याचे अधिकार काढून घेण्यांत आले असून शहरव्यवस्थेकरितां एक पट्टी बसविण्यांत आली आहे. येथें दरसाल फेब्रुवारीमध्यें ढोरांचा मोठा बाजार भरतो. येथें एक शाळा व दवाखाना आहे.

गढी इख्तीआरखान—पंजाबमध्यें भावलपूर संस्थानांत खानपूर तालुक्यांतील शहर. उ. अ. २८°४०' व पू. रे. ७०°३९'. भावलपूरपासून ८४ मैलांवर वायव्येच्या बाजूस हें आहे. लोकसंख्या (१९०१) ४९३९. पूर्वी येथें हत्यारांचे कारखाने असत. येथें खजुराचा मोठा व्यापार चालतो. येथील म्युनिसिपालिटीचें बहुतेक उत्पन्न जकातीचें आहे.

गढी यासीन—सिंधमधील सक्कर जिल्ह्यांत नौशारो अब्रो तालुक्यांतील एक शहर. उत्तर अक्षांश २७° ५४' व पूर्व रेखांश ६८° ३३'. लोकसंख्या (१९११) ६५४९. येथें गळिताच्या धान्यांचा मोठा व्यापार चालतो. येथें १८७० त म्युनिसिपल कमेटी स्थापन झाली. या शहरांत एक दवाखाना व शाळा आहे.

गढीवाल—पंजाब. होशियारपूर जिल्हा व तालुका यांतील साखरेच्या व्यापाराचें शहर. उत्तरअक्षांश ३१°४५' व पूर्वरेखांश ७५° ४६'. लोकसंख्या (१९०१)३६५२. १८६७ मध्यें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. येथें एक सरकारी दवाखाना आहे.

गढेमंडळ.—ह्या संस्थानापैकीं रेवा (नर्मदा) दक्षिणतीरचे सोळा महाल श्री. नानासाहेब पेशवे यांनीं नागपूरकर रघुजी भोसल्यास सरंजामासाठीं दिले होते. रघूजी हा पेशव्यांच्या मर्जीप्रमाणें त्यावेळीं वागत होता. म्हणून वरील महालांशिवाय चौरागड हा महालहि त्याला दिला होता. या एकंदर महालांचा वसूल चार लक्षांचा होता. यासाठीं रघूजीनें पेशव्यांच्या दरबारीं जो दरबारखर्च केला तो पुढीलप्रमाणें होता. पांच लक्ष रु. नाना, पन्नास हजार गोविंद भगवंत, पांच हजार नारायण बाबूराव (वैद्य, भोसल्यांचा वकील) व किरकोळ तीस हजार. हा प्रांत पूर्वी गडमंडला नांवाच्या संस्थानांत मोडत असे. हें संस्थान पुढें पेशव्यांनीं (सागरवाले बुंदेल्याकडून) काबीज केलें होतें. [राजवाडे खं. १०].

गणदेवी— बडोदा संस्थानांतील नवसरी भागांतील गणदेवी तालुक्याचें मुख्य ठिकाण. लोकसंख्या(१९११)६४८२. येथें हायस्कूल, दवाखाना वगैरे आहे. गांवांतील व्यापार बहुतेक जैनांकडे असून बाहेरगांवचा व्यापार पारशांमार्फत चालतो. सर्व तऱ्हेचीं धान्यें, गळिताचीं धान्यें, गूळ व तूप हे व्यापाराचे मुख्य पदार्थ आहेत. हातमागावरील कांहीं कापड व थोडी साखर येथें तयार होते.

गणपत कृष्णाजी.—गणपत कृष्णाजी हे (कोळी) भंडारी जातीचे होते. लहानपणीं विद्येचा संस्कार त्यांस झाला नाहीं, त्यामुळें चरितार्थाकरितां त्यास मेहनत, मजुरी करावी लागे. प्रारंभीं एका मिशनरी छापखान्यांत दोन रुपये दरमहावर टाईप घांसण्याच्या कामावर ते नोकर होते असें सांगतात. छापखान्यांत काम करतांना स्वतंत्र छापखाना काढण्याची कल्पना त्यांस सुचली असावी, असें मुंबई वर्णनांतील उताऱ्यावरून दिसतें. अमेरिकन मिशनरींनीं स. १८१३ त छापखाना घालून ख्रिस्तीधर्मप्रकरणीं मराठी

धर्मभाषेत शिळाछापावर पुस्तकें छापण्याचा कारखाना सुरू केला. हीं त्यांचीं पुस्तकें पाहून गणपत कृष्णाजी यांच्या मनांत (१८२५-३०) आलें कीं, आपणहि असाच कारखाना काढून हिंदुधर्मप्रकरणीं व दुसरीं पुस्तकें छापावीं. परंतु छापावयाचीं साधनें त्यांपाशीं कांहीं नव्हतीं, व तीं त्यावेळीं मुंबईत उपलब्धहि नसत. मग त्यांनीं अमेरिकन मिशनरींची कृति पाहून स्वतः आपल्या युक्तीनें प्रेस (छापखाना) तयार करण्याचे उद्योग मांडले. प्रथम त्यांनीं लांकडी यंत्र आपल्या हातानें तयार केलें, आणि लहान शिळांचे तुकडे इकडून तिकडून जमवून त्यांवर अक्षरें कशीं उठतात ही कृति पाहिली. मग शाई वगैरे कशी करतात त्याच्या शोधास ते लागले. प्रथम त्यांनीं आपल्या तर्कानें २१४ प्रकारची शाई करून पाहिली. मग त्यांनीं एक लोखंडी प्रेस करवून, मोठ्या शिळा विकत घेऊन लहान लहान ग्रंथ छापण्याचें काम सुरू केलें. इसवी सन. १८३१ त यांनीं आपण स्वतः लिहून त्या वर्षाचें मराठी पंचांग छापलें. त्यापूर्वी मराठी छापील पंचांग कोणासच ठाऊक नव्हतें. मग त्यांनीं (गणपत कृष्णाजींनीं) छापलेले कांहीं ग्रंथ नेऊन डॉ. विल्सन, पाद्री ग्यारेट व पाद्री अलब यांस दाखविले. ते पाहून त्यांच्या उद्योगास उत्तेजन द्यावें म्हणून ते आपणांकडून त्यांनां कांहीं छापखान्याचें काम देऊं लागले.

मराठी व्याकरणाचे कर्ते रावबहादुर दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनीं आपल्या मराठी व्याकरणाची पहिली आवृत्ति इ.स.१८३६ त छापली आणि त्याच्या १००० प्रती काढल्या. तो ग्रंथ गणपतकृष्णाजींच्या शिळाछापखान्यांत छापला होता असा उल्लेख त्यांच्या स्वरचित आत्मचरित्रांत सांपडतो. या वेळचीं इतर शालोपयोगी बरींच पुस्तकें इ. स. १८४० पर्यंत याच छापखान्यांत निघत असत.

इसवी सन १८४३ मध्यें त्यांनीं (गणपत कृष्णाजींनीं) टाईप करण्याचें कसब साध्य करण्याचा उद्योग केला. आणि मोठ्या प्रयत्नानें अक्षरांचे सांचे तयार करून ते ओतविण्याचा कारखाना घातला, आणि सर्व प्रकारचीं अक्षरें तयार करून टाइपांचा छापखाना चालू केला. याप्रमाणें त्यांनीं दोनहि छापखान्यांत हजारों गुजराथी व मराठी ग्रंथ छापले. इसवी सन १८६० मध्यें या गृहस्थांस देवाज्ञा झाली. परंतु हा त्यांचा कारखाना, त्यांचे चिरंजीव कान्होबा गणपत त्याचप्रमाणें चालवीत होते. १८६३ सालीं भायखळ्यास एज्युकेशन सोसायटीचा प्रेस, किल्ल्यांत एक्स्चेंज प्रेस, आणि डोंगरीवर गणपत कृष्णाजी प्रेस, हे छापखाने मोठे (मुंबईत) असून पाहण्याजोगे होते.

छापखाना.—स.१८६५ च्या सुमारास कान्होबा गणपत वारले तेव्हां त्यांचा मुलगा आत्माराम हा वयांत आला नव्हता. छापखान्याचा मालक आत्माराम हा वयांत येईपर्यंत त्याची देखरेख विश्वनाथ नारायण मंडलीक आणि गंगाधर गोविंद फडके या दोघां जिम्मेदारांकडे ट्रस्टी म्हणून सोंपविली. त्यांनीं त्या वेळीं मुख्य व्यवस्थापक जानारो कृष्ण धुमाळे म्हणून होता, त्यासच त्या कारखान्यावर कायम ठेवलें. आणि तो सर्व कच्चा कारभार वरील दोघा तपासनिसांच्या सल्ल्यानें करीत असे. त्याचा कारभार सुमारें ५।६ वर्षें (१८६५ते७०) चालला. या अवधींत जितके ग्रंथ या छापखान्यांत छापले त्यांवर वरील दोघां गृहस्थांचीं ट्रस्टी म्हणून आणि धुमाळे हे व्यवस्थापक म्हणून तीन नांवें नमूद केलेलीं सांपडतात.

पुढें स. १८७१-७२ सालीं आत्माराम कान्होबा वयांत आला. तेव्हां त्यानें कारखाना आपल्या ताब्यांत घेतला. व तो सुमारें दहा वर्षें (१८७१-१८८०) नीट चालवून त्याचें पूर्वीचें महत्व बरेंच कायम राखलें. या अवधींत त्याच्या मुद्रणालयांत बरेच चांगले चांगले ग्रंथ छापून निघाले. पण या कारखान्याच्या दुर्दैवानें स.१८८० त आत्माराम कान्होबा ऐन उमेदीच्या वयांत वारला. त्यावेळीं त्याची सोंपवण रा. मारूती तुकाराम गवाणे आणि पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांच्या स्वाधीन आत्माराम कान्होबा यांच्या हितचिंतकाच्या संमतीनें झाली. पण १९०० त नाडकर्णी वारले, तेव्हां पुन्हां ही घडी जी बिघडली ती मात्र पुढें सुधारली नाहीं. स.१९०० नंतर या कारखान्याची वाताहात होण्यास प्रारंभ झाला. स. १९१४ सालीं त्यांत कांहीं आक्षेपार्ह मजकुराचीं चोपडीं किंवा पत्रकें छापलीं. त्यामुळें हा छापखाना जप्त होऊन त्याचा लिलाव झाला. [विविधज्ञान विस्तार सप्टेंबर १९२२ अंक ९. पृ. ४१९-४२६].

गणपति नागराज—हा पद्मावतीचा राजा असून, याला प्रख्यात समुद्रगुप्तानें आपल्या मुलुखगिरींत जिंकून मांडलिक बनविलें होतें (स. ३४०). त्यावेळीं पद्मावती हें शहर प्रसिद्ध होतें. हल्लीं शिंदेशाहीमधलि नरवर नांवाचें जें गांव आहे तेंच हें पद्मावती होय. कांहींच्या मतें समुद्रगुप्तानें याचें राज्य खालसाच केलें असें आहे. [स्मिथ-अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया.].

गणपति राजे—वरंगळ येथील बाराव्या व तेराव्या शतकांत राज्य करणाऱ्या राजवंशास काकतीय अथवा गणपति राजे असें नांव आहे. त्यांच्याबद्दलची थोडीशी माहिती ' काकतीय ' या शब्दाखालीं ज्ञानकोशाच्या दहाव्या भागांत पहावी. तिच्याशिवाय जास्त माहिती येथें देतों.

या घराण्याबद्दल साग्र व खरी माहिती फारशी उपलब्ध नाहीं; आहे ती शिलालेख व मुसुलमानी बखरींवरून काढली आहे. डॉ. वॉकर यांच्या यादींत जीं नांवें आलीं आहेत त्यांचा मेळ इतर ठिकाणीं आढळणाऱ्या नांवांशीं बसत नाहीं. त्याच्या म्हणण्याप्रमाणें या वंशांतील मूळपुरुषानें (बेतराज?) चोळदेश जिंकून सीलोनराजकन्येशीं लग्न लाविलें. याचा मुलगा वेडा झाला तेव्हां याच्या दोघां नातवांनीं राज्य केलें. त्यांची राजधानी गोदावरीकांठीं नांदड येथें होती.

पुढें बराच काळपर्यंतची माहिती सांपडत नाहीं. मात्र खंदार (निजामशाहींतील) येथें एक राजवंश नांदत असल्याचें समजतें. याच वंशांतील प्रोलराज होय. या प्रोलला मूळपुरुष धरून डॉ. वॉकरनें दहा पुरुष दिले आहेत.

रे. टेलर यानें कांहीं बखरी तपासून व शुद्ध करून छापल्या आहेत, त्यांतहि निःसंदिग्ध अशी माहिती सांपडत नाहीं. त्याचप्रमाणें प्रिन्सेप याचीहि यादी या कामांत निरुपयोगी आहे.

अनुमकोंड शिलालेखावरून प्रोल याचा बाप त्रिभुवनमल्ल नांवाचा होता असें समजतें. यापेक्षां त्याची जास्त माहिती आढळत नाहीं. अनुमकोंड येथें प्रोल याच्या पूर्वीचे आठ राजे राज्य करीत होते. प्रोल यानें ती राजधानी बदलून वरंगळ शहर वसवून तेथें राजधानी केली. दंतकथेवरून समजतें कीं, प्रोल हा लहानपणीं गादीवर बसला. पुढें त्यानें ओळ्याप्रांताच्या गजपति राजांचा पराभव केला. शेवटीं हा आपल्या मुलाच्या हातून चुकीनें मारला गेला.याच्या वेळेस म्हैसूरकर शांतरघराण्यांतील जगदेवानें अनुमकोंड्यावर स्वारी केली होती, पण ती निष्फळ झाली. याचा पुत्र रुद्र किंवा प्रतापरुद्र (पहिला) होय. तो फार बलिष्ठ होता. अनुमकोंड्याचा शिलालेख (११६२) याच्या कारकीर्दीतील आहे; त्यांत तैलप (तिसरा) याच्या मृत्यूचा उल्लेख असून गणपति राजांनीं मिळविलेल्या विजयांचें वर्णन आहे. रुद्र याचा मुलगा गणपति पहिला होय. बर्नेल म्हणतो कीं, चोलांपासून गणपतीनें १२२८ च्या सुमारास कलिंगदेश काबीज केला. या गणपति देवाची राणी रुद्रम्मा ही प्रख्यात होऊन गेली. नवऱ्याच्या पश्चात तिनें मोठ्या हुषारीनें ३८ वर्षें सुयंत्रित राज्य चालविलें. इच्या कारकीर्दीच्या शेवटीं कृष्णाकांठीं मोतुपल्ली गांवीं मार्कोपोलो हा प्रवासी आला होता. तो इच्याबद्दल पुढीलप्रमाणें म्हणतो. "हिनें पतीच्या पश्चात् त्याच्यापेक्षांहि जास्त उत्तम रीतीनें सुमारें ३९ वर्षें राज्य चालविलें. तिच्या राज्यांत न्याय, समता व शांतता हीं नांदत असत व त्यामुळें हल्लींच्या इतर राजांपेक्षां हिच्यावर हिच्या प्रजेचें प्रेम जास्त आहे." हिला मुलगा नव्हता म्हणून तिनें आपल्या मुलीच्या मुलास गादीवर बसविलें; त्याचें नांव दुसरा प्रतापरुद्र. हा त्याच्या वेळच्या राजांमध्यें बलिष्ठ होता.याच्याच कारकीर्दींत मलिक काफूर हा वरंगळवर चालून आला (१३०९); पण त्या स्वारींत त्यास अपयश आलें. तेव्हां त्यानें थोड्याच दिवसांनीं दुसरी स्वारी करून प्रतापरुद्रास अल्लाउद्दीन खिलजीचा मांडलिक बनविलें. या स्वारींत मलिक काफूर नसून मलीक खुश्रु होता असें अमीर खुश्रूच्या बखरींत म्हटलें आहे. या वेळीं वरंगळास प्रथम एक मातीचा १२५४६ यार्ड घेराचा तट असून त्याच्या आंत दुसरा दगडी तट होता. शहरांत अग्निपूजक बौद्ध (जैन) होते असें एका बखरींत लिहिलेलें आहे. पुढें खिलजीघराणें जाऊन तघलख घराणें दिल्लीस स्थापन होण्याच्या गडबडींत वरंगळच्या वरील प्रतापरुद्रानें देवगिरीकर राजांशीं सख्य करून दिल्लीकरांचें वर्चस्व झुगारून दिलें (१३२२). पुढें दिल्लीकरानें उलुघबेगास वरंगळावर पाठविलें परंतु त्याचा हिंदूंनीं पराभव केला;परंतु पुन्हां मुसुलमानांनीं दुसरी स्वारी केली व प्रतापरुद्रास कैद केलें आणि वरंगळ घेतलें. पुढें प्रतापरुद्राचा मुलगा कृष्ण यानें हिंदूंची उठवणी करून मुसुलमानांनां देशाबाहेर हांकलून दिलें (१३४४). पुढें महंमदशहा बहामनीनें वरंगळावर स्वारी करून खंडणी घेतली (१३५८). या लढाईंत कृष्णदेवाचा पुत्र विनायक उर्फ नागदेव हा हजर होता. त्यानंतर नागदेव हा राजा असतांना (१३७१) बहामनी राजानें त्याच्यावर स्वारी करून व त्याचा क्रूरपणें वध करून वेलंपट्टम् किल्ला घेतला. परंतु हिंदूंनीं बहामनी सैन्याच्या पिछाडीवर सारखे हल्ले करून ⅔ सैन्य कापून काढलें. नागदेवाचा पुत्र (गणपतिदेव दुसरा) यानें पुढें राज्य केलें. त्यानें बहामनीविरुद्ध दिल्लीकराकडे मदत मागितली होती; परंतु ती मिळाली नाहीं. पुढें या दोघांत तह होऊन त्यांच्या हद्दी ठरल्या गेल्या. शेवटीं अहमदशाह बहामनीनें वरंगळवर स्वारी करून तेथील राजास (याचें नांव आढळत नाहीं) मारिलें (१४२४). येथपर्यंतच या राजांची माहिती आढळते. यांची वंशावळ सीवेलच्या साऊथ इंडियन डिन्यास्टिज् ग्रंथांत पुढीलप्रमाणें दिली आहेः—मूळ त्रिभुवनमल्ल, त्याचा मुलगा प्रोल किंवा प्रोलि; याची राणी मुप्पमादेवी. यांचा पुत्र पहिला प्रतापरुद्र, याचा पुत्र पहिला गणपतिदेव, याची राणी रुद्रम्म. (१२५७-९५).रुद्रम्माच्या मुलीचा मुलगा दुसरा प्रताप रुद्र (१२९५—१३२३). त्याचा पुत्र कृष्ण व त्याचा पुत्र विनायक किंवा नागदेव.

[स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑफ वरंगळ, १८९१; म्यॉकेंझीमॅन्सक्रिप्ट्स ३२; मद्रास जर्नल १०; जर्नल बॉम्बे ब्रँच रॉ. ए. सो. १०; इंडियन अँटिक्वरी १८८२, १०; साऊथ इंडियन पॅलिओग्राफी; इलियट. व्हॉ. ३; फेरिस्ता व्हॉ.१].

गणसत्ताक राज्य— गणसत्ताक राज्यांत राज्याचा प्रमुख (अधिपति) लोकांनीं निवडलेला असून सर्वांच्या हिताचे प्रश्न सर्वांनीं मिळूनच सोडविले जातात. पण हा व्यापक अर्थ अगदीं अर्वाचीन आहे. प्राचीन ग्रीक व रोमन राष्ट्रांतून सुद्धां सनदी अधिकार अल्पसंख्याकांच्या हातीं असून स्वतंत्र पण राज्यकारभारांत भाग नसणाऱ्या लोकांनीं व गुलामांनीं मिळून बनलेल्या बहुसंख्याकांवर ते राज्य करीत. राज्याचा अधिपति राजा असूनहि जर तो लोकांनीं केलेल्या कायद्याप्रमाणें चालत असेल व त्याची राज्यावर स्थापना आणि उच्चाटण कायद्याबरहुकूम होत असेल तर तेंहि राज्य प्रजासत्ताक म्हणावें असें कांहीं अर्वाचीन ग्रंथकार प्रतिपादितात. उदाहरणार्थ १५७७ त जीन बोडिननें 'रिपब्लिक' चा असा अर्थ केला आहे (त्याचा 'डि रिपब्लिका लिब्री सेक्स' हा ग्रंथ पहा). मध्ययुगीन इंग्रज जरी इंग्लंडच्या 'कॉमनवेल्थ' (सामान्य

मालकीचें राज्य) विषयीं बोलत तरी वंशपरंपरागत हक्क असलेल्या राजाखेरीज राज्य कसें चालवावयाचें याची त्यांनां मुळींच कल्पना नव्हती. प्रजेच्या संमतीनें राज्या-रूढ झालेला अधिपति ज्यावर आहे तें राज्य प्रजासत्ताक (रिपब्लिक) असाच आजपर्यंत सामान्य अर्थ लोक करीत आलेले आहेत. पोलंड, व्हेनिस, युनायटेडस्टेट्स, नेदर्लंड्स हीं राज्यें याच अर्थानें रिपब्लिक होत. तेव्हां या प्रजासत्ताक राज्याचे अनेक निरनिराळे प्रकार होऊ शकतील. म्हणून कोणतें राष्ट्र गणसत्ताक किंवा प्रजासत्ताक नाहीं हें सांगणें सोपें जाईल. ज्याचा राज्यकर्ता खरोखरच असें सांगू शकेल कीं, सर्व राजसत्ता माझ्या ठिकाणीं असून मी ईश्वरकृपेनें पूर्ण व स्वतंत्र राजा आहे, तें राज्य प्रजासत्ताक नाहीं एवढेंच ठासून सांगतां येईल.

ग्रेटब्रिटनमध्यें राजा तात्विकदृष्टया ईश्वरकृपेनें राज्य करीत असला तरी पार्लमेंटच्या सनदेनें व ॲक्ट ऑफ सेटलमेंटबरहुकूम राज्याधिष्ठित आहे; पण ग्रेटब्रिटनचें हें प्रजासत्ताक राज्य अद्वितीय असल्यानें त्याचें उदाहरण सर्वसामान्य होणार नाहीं. कॉमनवेल्थ व लोकमताहून श्रेष्ठ अशा एखाद्या हक्कावर उभारलेली शासनसंस्था यांना एकच मिलाफ करणें अगदीं अशक्य आहे. कारण एक तर राज्यकर्ताच प्रजेचे सर्व हक्क बळकावून बसेल किंवा प्रतिनिधीमार्फत राज्य चालविणारी प्रजा मुख्य शासनाधिपतीला अगदीं बांधून टाकील व तो ठराविक गोष्टींखेरीज कांहींच करूं शकणार नाहीं. पहिला प्रकार मध्ययुगाच्या अंतिमकाळीं बहुतेक यूरोपीयन राष्ट्रांतून घडून आला आहे.

ज्या प्रजासत्ताक राज्यांत असंस्कृत व रानटी जातीच्या लोकांखेरीज सर्व पुरुषांनां मताधिकार आहे असें राज्य प्राचीनांनीं किंवा मध्ययुगांत देखील कधींच पत्करिलें नसतें. कारण मनुष्याच्या राजकीय हक्कांची त्यांनां मुळींच कल्पना नव्हती. प्रख्यात स्कॉटिश सुधारणावादी जॉन नॉक्स यानें जेव्हां, आपण या राज्यांत जन्मलेला एक प्रजाजन आहों म्हणून राज्यकारभारावर बोलण्याचा आपणाला हक्क आहे असें प्रतिपादिलें, तेव्हां त्याच्या पिढींतील लोकांनां केवढें हें धाष्टर्य असें वाटूं लागलें पण या धाष्टर्यालाच पुढें मोठें महत्व प्राप्त झालें. अमेरिकेचा स्वातंत्र्याचा जाहीरनामा व १७८९ सालची फ्रेंच राज्यक्रांती यांतून केवळ समाजाचा घटक म्हणून व्यक्तीला समाजशासनाच्या कामीं असणारा जो अधिकार मानवी हक्कांत अंतर्भूत होतो तो मिळविण्याचा प्रयत्न दिसून येतो. अर्वाचीन यूरोप आणि अमेरिका यांतील प्रजासत्ताक राज्यांतून या तऱ्हेचे सर्व मानवी हक्क विचारांत घेतलेले आहेत.सर्व समाजाला लागूं असणाऱ्या बाबींत तत्वतः कां होईना, पण सर्व समाजाचा विचार घेण्यांत येतो.

आपल्या या हिंदुस्थान देशामध्यें प्राचीनकालीं राजसत्ताक राज्यपद्धतीच अंमलांत होती; येथें लोकसत्ताक सत्ताक राज्यपद्धतीचा मागमूसहि नव्हता, अशीं विधानें पुष्कळांकडून करण्यांत येतात. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' राजा हा परमेश्वराचा अंश आहे, तो राज्य करील त्याप्रमाणें त्याच्या अंमलाखालीं प्रजेनें नांदलें पाहिजे' अशी हिंदूंची भावना असे. या विद्वानांच्या म्हणण्यांत तथ्यांश बराच आहे यांत वाद नाहीं. पण त्याच्या बरोबर हेंहि लक्ष्यात ठेवलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांत कांहीं भागांत तरी लोकसत्ताक राज्यपद्धति अंमलांत होती. पुराणवस्तुसंशोधनशास्त्राच्या सहाय्यानें, कोणत्या कोणत्या भागांत ही लोकसत्ताक शासनपद्धति अस्तित्वांत होती हें आपल्याला समजून येतें.

वैदिक काळीं अशा प्रकारची गणसत्ताक शासनपद्धति अस्तित्वांत होती. ऐतरेय ब्राह्मणांत वैराज्यें उर्फ गणसत्ताक शासनपद्धतीचा उल्लेख आढळतो व महाभारत काळीं त्याचप्रमाणें अर्थशास्त्र रचिलें गेलें त्याकाळीं कांहीं कांहीं भागांत अशा प्रकारची शासनपद्धति होती हेंहि निर्विवाद आहे.पण त्यानंतरहि चवथ्या शतकापर्यंत कांहीं कांहीं भागांत अशाच प्रकारची राज्यघटना होती असें पुराणवस्तुसंशोधनशास्त्राच्या द्वारें सिद्ध करतां येतें.

चवथ्या शतकांत पंजाब, पूर्व राजपुताना व माळवा या देशांत गणसत्ताकशासनपद्धति अंमलांत होती असें दिसून येतें. पंजाबच्या मध्यभागात मद्रकांचें वरील प्रकारचें गणसत्ताक राज्य होतें. सतलज नदीच्या दोन्ही तीरांवर यौधेयांचेंहि अशाच पद्धतीचें राज्य होतें. चंबळा व बटवा यांच्या दरम्यान आभीर आणि मालव लोकांमध्यें अशाच प्रकारची शासनपद्धति अमलात होती. या वरील सर्व राष्ट्रांनां समुद्रगुप्ताच्या दिग्विजयापुढें हार खावी लागली व त्याच्या अंकित व्हावें लागलें. तरी पण त्यांनीं आपली शासनपद्धति टाकली नाहीं असें दिसून येतें.

पण ख्रि. पू. चौथ्या ते सहाव्या शतकच्या काळीं भारतवर्षांत पुष्कळच गणसत्ताक राष्ट्रें होतीं याबद्दल पुरावा मिळतो. डायोनिससपासून चंद्रगुप्ताच्या काळापर्यंत हिंदुस्थानांत तीन वेळ ही लोकसत्ताक शासनपद्धति प्रस्थापित झाल्याची आख्यायिका मेगॅस्थिनीसनें आपल्या पुस्तकांत नमूद केली आहे. माल्टेकोरो, सिंधो, मोरुनी, मरोहो, रुंगी हीं वैराज्यें होतीं असें त्यानें म्हटलें आहे.

ख्रि. पू. चौथ्या शतकांतहि अशा प्रकारचीं वैराज्यें होतीं. शिकंदराच्या स्वारीच्या वेळचा भारत देश हा वैराज्याचा भोक्ता होता. हल्लींच्या पाश्चात्य देशांतील लोकप्रतिनिधियुक्त सभांसारख्याच त्या काळींहि सभा होत्या व अशा लोकांनां जबाबदार असणाऱ्या संस्थांमार्फत त्या त्या शहरांचा अगर राष्ट्राचा राज्यकारभार चालविला जात असे असें तत्कालीन लेखकांच्या ग्रंथावरून नजरेस येतें. अराष्ट्रकांचें अशा प्रकारचें राष्ट्र होतें व जस्टिन नांवाच्या ग्रंथकारानें या लोकांनां लुटारू असें हीन नांव दिलें असलें तरी याच लोकांचा चंद्रगुप्ताला त्याच्या स्वारींत पुष्कळ उपयोग झाला ही गोष्ट निर्विवाद आहे. अशाच प्रकारचीं दुसरीं वैराज्यें म्हटलीं म्हणजे

मालव व क्षुद्रक या लोकांचीं होत. क्षुद्रकांना आपल्या वैराज्याचा फार अभिमान वाटत असे असें अरिअननें म्हटलें आहे. मालव व क्षुद्रक या दोन्ही जाती फार बलिष्ठ होत्या.पण त्या दोघांतहि नेहमीं शत्रुत्व असे.अशा स्थितींतहि शिकंदराच्या स्वारीच्या वेळीं दोन्ही जातींनीं आपापसांतील वैमनस्य विसरून जाऊन शिकंदराच्या हल्ल्याला तोंड दिलें असें डायोडोरसनें–शिकंदराच्या स्वारीच्या इतिहासकारानें–लिहिलें आहे.

याशिवाय शिकंदराच्या स्वारीच्या इतिहासकारांनीं वैराज्यें या नांवानें उल्लेख केलेलीं राष्ट्रें म्हणजे, संबस्तै, गेद्रोशी, ओरीटै, अबस्तनोइ, क्षत्रिय, अर्वितई या लोकांचीं होत. गेद्रोशी लोकांनीं राज्यकारभाराचा गाडा हांकण्यासाठीं एक मंडळ नेमलेलें असे असें डायोडोरस म्हणतो. संबस्तै लोक आपल्यापैकीं तिघांना लोकनायक नेमीत व त्यांच्या मार्फत कारभार चालविला जात असे असें कर्टियस म्हणतो. वर उल्लेखिलेल्या इतर लोकात आपापले नायक निवडण्याची पद्धत असे, असें अरिअनच्या हकीकतीवरून समजतें.

पण शिकंदराच्या सैन्याशीं ज्यांचा निकट संबंध आला तीं राष्ट्रें म्हणजे अगलसोई व नीशियन या लोकांचीं राष्ट्रें होत. अगलसोई लोक हाडाचे खरे क्षत्रिय होते. शिकंदराच्या सैन्यानें ज्यावेळीं त्यांचा पराजय केला त्यावेळीं शत्रूंकडून अपमान सोसण्याचें संकट टाळण्यासाठीं आपल्या गांवाला आग लावून सर्वांनीं आपल्या पोरांबाळांसह आपल्याला जाळून घेतलें ही गोष्ट संस्मरणीय आहे.नीशियन लोकांचें राष्ट्र हेंहि लोकसत्ताकच होतें. त्यांचा कारभार तीनशें शहाण्या माणसांकडून चालविला जाई. यांच्यावर एक अध्यक्ष नेमला जाई. वरील हकीकतीवरून पाहतां ख्रि. पू.चौथ्या ते सहाव्या शतकाच्या दरम्यान, भारतवर्षांत वैराज्यांची पद्धति दृढमूल झाली होती असें आपल्याला आढळून येईल. ख्रि. पू. पांचव्या व सहाव्या शतकांत कुलसंघशासितपद्धति अस्तित्वांत होती व हाहि एक वैराज्याचा जुना व अपरिणत प्रकार होता. अशा प्रकारचीं राष्ट्रें म्हणजे भग्ग, बूलि, कलम, मौर्य, कोलिय, मल्ल या लोकांचीं होत. पण या सर्वांत महत्वाचीं राष्ट्रें म्हटलीं म्हणजे शाक्य, विदेह व लिच्छवी या लोकांचीं होत. विदेह व लिच्छवी या दोन्ही लोकांचें पुढें वज्जि हें साधारण नांव पडलें.

शाक्य लोकांमध्येंहि लोकसत्ताकराज्यपद्धति प्रचलित होती. शाक्य लोक आपल्यामधील एकाला नायक म्हणून निवडीत असत. कांहीं गुंतागुंतीच्या प्रश्नांचा निकाल लावावयाचा असल्यास सर्व लोक एकत्र जमून त्या प्रश्नाचा विचार करीत असत. लोकनायकाला 'राज' ही पदवी लावली जात असे.

वज्जि लोकांचें राष्ट्र, आठ जातींच्या लोकांचें संयुक्त राष्ट्र होतें. वैशाली ही या राष्ट्राची राजधानी होती.या आठ जातींमध्यें विदेह व लिच्छवी या दोन जाती विशेष प्रमुख होत्या. या वज्जि लोकांचा कारभार लोकसत्ताकपद्धतीच्या अनुरोधानें चालत असे. प्रत्येक जातींतील एक एक असे आठ जणांचें मंडळ व त्यावर सर्व जातींनीं मिळून निवडलेला एक नायक अशा नऊ लोकांचें मंडळ असे व न्यायदानाचें काम त्यांच्याकडे असे. ग्रामव्यवस्थेच्या बाबतींत पुरुषाप्रमाणेंच बायकाहि भाग घेत असत. उद्यानांची व्यवस्था पहाणें, धर्मशाळा बांधणें इत्यादि कामावर बायकाच देखरेख करीत असत. अशा रीतीनें हिंदुस्थानामध्यें राजसत्ताकशासनपद्धतीप्रमाणेंच गणसत्ताकपद्धतिहि अस्तित्वांत होती हें वरील हकीकतीवरून आढळून येईल. लोकसत्ताकपद्धतीचा हिंदुस्थानांत अभावच होता हें म्हणणें सत्याला धरून नाहीं.उलट फार प्राचीन काळापासूनहि गणसत्ताकशासनपद्धतीचें मूळ हिंदू लोकांत नजरेस येतें व या प्रजासत्ताक राष्ट्रांत मोठमोठे पुरुष निर्माण झाले,व नवीन नवीन शास्त्रेंहि उदयास आलीं. याची ग्वाही हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास देतो. [बिनॉय कुमार सरकार व मुकुंदलाल यांचे 'मॉडर्न रिव्ह्यू' तील लेख (जानेवारी व मार्च १९२०); कौटिलीय अर्थशास्त्र; महाभारत; वेदसंहिता; ब्राह्मणें; स्मिथ; र्‍हीस डेव्हिड्स्—बुद्धिस्टिक इंडिया.].

गणितशास्त्र—भौतिक शास्त्रांतलि या अत्यंत महत्त्वाच्या शास्त्राचा विचार विज्ञानेतिहास खंडांत (ज्ञानकोश वि. ५.प्र. १३) स्वतंत्र प्रकरण देऊन केलाच आहे. गणितशास्त्राचें एक प्रमुख अंग जें संख्यालेखन त्याची माहिती त्या विभागांतच (प्र. ३ रें.) दिली आहे. गणितशास्त्रांतील निरनिराळ्या शास्त्रांवर (उदा. अंकगणित, गणितशास्त्र, भूमिति) स्वतंत्र लेख या कोशांतच दुसरीकडे असल्यानें या ठिकाणीं विस्तृत विवेचनाची जरूरी नाहीं.

गणेश किंवा **गणपति**—शिवाचे सेवक जे गण, त्यांचा अधिपति असा या नामाचा अर्थ आहे.हा शंकरास पार्वतीपासून झालेला पुत्र होय. पार्वतीच्या अंगच्या मळापासून हा निर्माण झाला अशी एक दंतकथा आहे. गणेश ही विद्येची देवता व संकटांचें निवारण करणारी देवता म्हणून प्रसिद्ध आहे. एखाद्या महत्कार्याच्या आरंभीं 'श्री गणेशाय नमः' म्हणून गणेशाची स्तुति व आराधना करण्याचा प्रघात आहे; त्याचप्रमाणें अध्ययनारंभीं गणेशाचा नामोच्चार करतात. व्यास यांनीं सांगितलेलें महाभारत गणपतीनें लिहिलें अशी समजूत आहे. अंगानें स्थूल, किंचित पिवळट रंगाचा, मोठ्या पोटाचा, चार हात असलेला व एकच दन्तयुक्त असें हत्तीचें डोकें असलेला असें गणेशाचें रूप पुराणांतरीं वर्णिलें आहे. त्यानें आपल्या चारहि हातांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें धारण केलीं आहेत. कधीं कधीं उंदरास आपलें वाहन करून त्यावर बसून चालला आहे असेंहि गणपतीचें वर्णन आढळतें. दक्षिण हिंदुस्थानांत गणपतीचीं असंख्य देवळें आढळतात. गणपतीस हत्तीचें मस्तक कां लागलें

याबद्दल अनेक दन्तकथा प्रचारांत आहेत. शनीच्या कटाक्षापासून होणारा दुष्परिणाम अजीबात विसरून पार्वतीनें एकदां शनीला गणपतीकडे बघण्यास सांगितलें. कारण तिला आपल्या पुत्राचा फार अभिमान असे. शनीनें गणपतीकडे दृष्टी फिरवतांच गणपतीचें मस्तक जळून खाक झालें. तेव्हां पार्वतीला अतिशय दुःख होऊन तिनें ब्रह्मदेवास ही हकीकत कथन केली. ब्रह्मदेवानें तिला सांगितलें "तुला पहिल्या प्रथम ज्या प्राण्याचें मस्तक मिळेल तें मस्तक धडाला लाव म्हणजे गणपति पूर्ववत् होईल " या ब्रह्मदेवाच्या सांगण्याप्रमाणें ती मस्तकशोधार्थ निघाली असतां प्रथम हत्तीचेंच मस्तक तिला मिळालें. याप्रमाणें गणपति गजवदन झाल्याची एक दन्तकथा आहे.

दुसरी एक दन्तकथा अशी आहे कीं, पार्वती एकदां स्नानास बसली असतां, तिनें गणपतीस दरवाजावर राखण करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें गणपति दारावर बसला असतां, शंकर तेथें आले. परंतु आंत जाण्यास गणपतीनें प्रतिबंध केल्यामुळें त्यांनीं गणपतीचें शिर उडविलें. त्यामुळें पार्वतीस फार दुःख झालें. तिचें सांत्वन करण्यासाठीं शंकरानीं पूर्वीच्या मस्तकाच्या जागीं हत्तीचें मस्तक बसवून गणपतीस सजीव केलें.

एकदां परशुराम शंकरांची भेट घेण्याकरितां कैलासास गेला असतां शंकर निद्रिस्थ होते. तेव्हां परशुरामास अन्तर्गृहात येण्यास गणपतीनें मज्जाव केला. त्यामुळें दोघांमध्यें बाचाबाची होऊन दोघांमध्यें युद्ध जुंपलें. गणपतीनें परशुरामास आपल्या सोंडेंत धरून गरगर फिरवितांच त्यास मूर्च्छा आली. सावध झाल्यानंतर परशुरामानें आपला परशु गणपतीवर फेंकला. आपल्या पित्याचा परशु फेंकला आहे असें समजून (शंकरानींच तो परशु परशुरामास दिला होता) गणपतीनें आदरानें तो आपल्या एका दन्तावर धारण केला. पण त्यामुळें तो दन्त गमावला. यामुळेंच गणपतीस ' एकदन्त किंवा एकदंष्ट्र' असें म्हणतात. ब्रह्मवैवर्त पुराणांत या सर्व दन्तकथा सविस्तर दिल्या आहेत.

गजानन, गजवदन, करीमुख, (हत्तीनें मुख असलेला) हेरंब, लंबोदर, द्विदेह, विघ्नेश, विघ्नहारी इत्यादि नांवानींहि गणपतीस संबोधितात. गणपतीचें स्वरूप चतुर्भुज म्हणून महाराष्ट्रांत एकसारखें प्रचलित नाहीं. शिवरामें दशभुज गणपतीचें नमन करतो. दहांपैकीं चार पुरुषार्थांना चार भुजा देऊन (१) परशु, (२) अंकुश, (३) मोदक, (४) बौद्धमन संकेतु, (५) अभयकर व (६) वरदहस्त, हे सहा हात तो उल्लेखितो. अलीकडील कांहीं लोक चतुर्भुज गणपतीचें स्तवन ज्ञानेश्वरानें केलें आहे असें मानतात. तें ह्या टीकेवरून चुकीचें आहे, असें कित्येक समजतात. (भा. इ. सं. मं. अहवाल शके १८३३).

ही देवता वेदकालापूर्वीची दिसते. ' गणानां त्वां गणपतिं ' हा वैदिक मंत्र (ऋ. २. २३, १) गणपतीला उद्देशून नाहीं. तरी मैत्रायणी संहितेंत (२. ९, १) स्पष्टपणें हस्तिमुख, एकदंत या स्वरूपाचा उल्लेख केला आहे. रामायण व इतर कांहीं प्राक्कालीन पुराणें यांतून गणपतीचा नामनिर्देश नाहीं. याज्ञवल्क्यांत (१.२७०, २८९, २९३) उल्लेख आला आहे. तेथें मनुष्यांनां झपाटणारा व त्यांच्या कार्यांत विघ्नें आणणारा राक्षस असें त्याचें वर्णन केलें आहे. याला गणांचा ईश किंवा अधिपति म्हणतात. वास्तविक हा मान नंदीकडे जातो. पण विनायक म्हणून एक राक्षसवर्ग होता त्याचा प्रतिनिधि ही नवीन गणेश देवता असेल. गणपतीच्या संप्रदायाची माहिती ' गाणपत्य ' या लेखांत आढळेल.

ग ण प ति दे व ते ची प्रा ची न ता.—यासंबधानें वि. विस्तार म्हणतें गणपति ही देवता १३ शें वर्षांचीच जुनी आहे. याला रा. राजवाडे आक्षेप घेतात आणि पुरावा आणतात तो असाः—

(१) बाणभट्टकृत हर्षचरित्राच्या तिसऱ्या उल्लासांत गणपतीच्या देवळाचा उल्लेख आहे. हर्ष हा शके ५६० त होता, हें राजवाडेच सांगतात. अर्थात हा पुरावा गणपतीस मागें ढकलूं शकत नाहीं.

(२) गाथा सप्तशतीच्या ५ व्या शतकाच्या ३ ऱ्या गाथेंत " गणपतीला सोंड आहे व त्याचा जयजयकार असो " असा उल्लेख आहे.

(३) आपस्तंबाच्या नारायणांत " तत्पुरुषाय विद्महे वक्रतुंडाय धीमहि, तन्नोदंती प्रचोदयात् " असें आहे. या उताऱ्यास रा. राजवाडे श्रुति समजतात व त्यावरून एक दाताचा गणपति २३०० पासून २५०० वर्षांचा प्राचीन ठरवितात. आणि 'एकदंताय विद्महे' ह्या गणपत्यथर्वशीर्षाचाहि आधार देतात (सरस्वतीमंदिर अंक २०). वि. ज्ञान विस्तारच्या १।१९०६ च्या अंकांत घुले शास्त्री राजवाड्यांवर टीका करतात व ५६० मध्यें गणपती होता हें मान्य करतात पण गाथेच्या पुराव्यावरून कांहीं सिद्ध होत नाहीं असें दर्शवितात. राजवाडे यांनी डॉ. भांडारकर, भागवत, काव्यमालाकार यांच्या मतें सप्तशतीकार हाल हा इ. स. १५० मध्यें झाला हें दाखविलें आहे व लासेन, विलसन, हाल वगैरेंचीं मतें डॉ. भांडारकरांच्या पूर्वीचीं आहेत तरी तीं पोषक आहेत असें दाखविलें आहे. याशिवाय राजवाडे यांनीं आणखी एक उतारा सप्तशतींतून दिला आहे. चवथ्या शतकाच्या ७२ व्या गाथेंत उच्छिष्ट (वाममार्गी) गणपतीचा उल्लेख केला आहे. नारायणोपनिषद् हें शास्त्रीबोवांच्या मतानें अर्वाचीन कालांतील आहे. कां कीं तें "खिलकांडरूप" आहे. शंकराचार्यांचें त्यावर भाष्य नाहीं आणि त्यांत रुद्र, दंति, नंदि, दुर्गि वगैरेंच्या गायत्री बनविल्या आहेत. परंतु "खिल" याचा अर्थ सायण 'किरकोळ' असा करतात व घुले कारण न देतां 'प्रक्षिप्त' असा करतात.

ऋग्वेदांत गणपतीचें अस्तित्व नाहीं म्हणून ही देवता अर्वाचीन आहे असा जो प्रचलित समज, त्या समजाविरुद्ध आम्हीं ही देवता वेदपूर्वकालीन आहे असें दिलें आहे. यांत प्रत्यक्ष प्रमाण दोघांचें एकच असून अनुमानें मात्र भिन्न आहेत. वेदांत मात्रसंस्कृतीच्या देवता आहेत व पुराणांत सूतसंस्कृतीच्या देवता आहेत. सूत. संस्कृति मांत्रसंस्कृतीहून जुनी आहे आणि मांत्रदेवता आणि मांत्रधर्म हा हिंदुस्थानांत रुजलाच नाहीं. तो नष्ट झाला आणि तो नष्ट होण्यापूर्वी श्रौतसंस्था या स्वरूपात विकास पावला आणि या विकासकाली मांत्रसंस्कृति आणि सूतसंस्कृति यांनें म्हणजे वैदिक धर्माचें आणि पौराणिक धर्माचें एकीकरण होत होतें आणि यामुळें मैत्रायणीसारख्या संहितांतून पौराणदेवतांचा उल्लेख येतो (बुद्धोत्तरजग पृ. ११२ पहा). पण त्या पौराण देवतांचें अस्तित्व त्याहूनहि जुनें आहे.

गणेशचतुर्थी—भाद्रपद शुद्ध चतुर्थीस (गणेश जन्म-दिवसापासून) या सणाला आरंभ होतो. गणेशदेवता व शेतीचा हंगाम यांचा अन्योन्य संबंध असावा; कारण पावसास उशीर झाल्यामुळे आगामी पीकपाण्याबद्दल अनिश्चितता वाटूं लागल्यावर 'विघ्नहर्त्या' गणेशाचें पूजन करणें हें प्रसंगोचित व जरूरहि आहे.

विनायकी व संकष्टी चतुर्थी या व्रतांचा संबंध चंद्राकडे नसून गणेशाकडेच आहे.परंतु गणेश व चंद्र याचाहि अन्योन्य संबंध आहे ही गोष्ट गणेशचतुर्थीस दिसून येते. कारण त्या दिवशीं चंद्र पाहणें अशुभ मानतात.कोणी चुकून चंद्र पाहिलाच तर त्यास शेजाराच्या घरावर धोंड मारून व चार शिव्या खाऊन तें अशुभ टाळतां येतें. 'चंद्रचवथिचा' पाहणें व विपद्ग्रस्त होणें या उभय गोष्टीं मराठींत समानार्थी मानल्या जातात. याविषयीं कथा अशी आहे कीं, एकदां गणेशाची स्वारी मूषकारूढ होऊन वेगानें जात असता खालीं आली. हें पाहून साहजिक चंद्र हंसला. पण कोपायमान होऊन गजानन शापवचन बोलला कीं, चंद्राचें कोणीहि मुखावलोकन करणार नाहीं.पुढें उःशाप दिल्यावर चतुर्थीची अट घालण्यात आली.

पेशव्यांच्या राजवाड्यांत प्रतिवर्षी भाद्रपद शुद्ध चतुर्थी ते दशमीपर्यंत गणेशोत्सव होत असे. त्याप्रसंगीं गणपतिरंगमहालांत मोठी आरास करण्यांत येई व सर्व कार्यक्रम तेथेंच होत असत. स्वच्छ हंड्या, झुंबरें, मोठाले आरसे व विविध चित्रें यामुळें त्या महालाचें सौंदर्य दुणावत असे व तेथील चकचकाटानें प्रेक्षकगण दिपून जाई. मध्यावर सोन्याच्या भरजरीचें काम जिच्यावर केलें आहे अशी पेशव्यांची 'मसनद' उर्फ गादी मांडलेली असे. दोन्ही बाजूंस मुख्य मराठे सरदार, शिलेदार व दरबारी हे भव्य पोषाख घालून आपापल्या दर्जाप्रमाणें रांगेनें बसलेले असतांना भालदार, चोपदार यांच्या ललकारींत स्वारी दरबारांत प्रवेश करून मोठ्या ऐटीनें सिंहासनारूढ होत असे. त्या समयीं दरबारस्थानांस वैचित्र्याची उत्कृष्ट तऱ्हेची खुलावट येत असे. गणपतिरंगमहालांत त्यावेळीं गाणें नाच व कथाकीर्तन वगैरे कार्यक्रम होत असत.

१७९१ सालचा गणेशचतुर्थीचा खर्च पाहतां, त्या साली राजवाड्यांत १८१ हरिदासांचीं कीर्तनें झालीं असून त्यांना दिलेल्या बिदागीचा खर्च शेलापागोट्याशिवाय २३५५ रुपये झाला आहे. ३९ गवयांचीं गाणीं झालीं व त्यांनां ३२९ रुपये मिळाले. नर्तकींचे एकंदर ४३ ताफे असून त्यांना १०२६ रुपये इनाम म्हणून देण्यांत आले. पखवाज वाजविणाऱ्या ४३ जणांना १२१ रुपये देण्यांत आले. वाजंत्र्यांच्या २५ ताफ्यांस २४० रुपये देण्यांत आले. या उत्सवांत सर्व नोकर चाकर मोठ्या हौसेनें मिसळत व त्यांना पेशव्यांकडून मिठाई वाटण्यांत येत असे. ब्राह्मणभोजनें बरींच होत असत. विसर्जनाच्या दिवशीं पुष्पांनीं शृंगारलेल्या पालखींतून थाटाची मिरवणूक काढून गणपतिविसर्जन होई, व त्यावेळीं पेशवे जातीनें हजर असत.

महाराष्ट्रांत अलीकडे गणेशोत्सवाला राजकीय वळण देण्याची एक नवी प्रवृत्ति उत्पन्न झाली आहे व विद्यार्थ्यांचें राजकारणाकडे अधिकाधिक लक्ष्य जाऊं लागल्यामुळें अखिल राष्ट्रीय चळवळीस गणेश देवतेचेंच अधिष्ठान देण्यांत आलें आहे. याचें कारण असें कीं, सर्व हिंदू जाती व पंथ गणेशाची पूजा करितात. गणांचा म्हणजे लोकांचा जो ईश म्हणजे पुढारी, तो गणेश,म्हणजे लोकपुढारी(विनायक म्हणजे विशेष नायक; म्हणजे अद्वितीय पुढारी असा विनायक शब्दाचा अर्थ लावितात). या उत्सवांत शाळेंतील विद्यार्थी रस्त्यांतून मिरवणुकी काढतात; सामाजिक व राजकीय विषयांवरचीं पदें म्हणणारे मेळे निघतात; व्याख्यानें होतात व अशा तऱ्हेनें दहा दिवसपर्यंत हा राष्ट्रीय सण पाळला जातो. अशा रीतीनें या उत्सवास मोठें राजकीय स्वरूप प्राप्त झालें आहे.

ग णे श च तु र्थी व्र त.—व्रतराज ग्रंथांत या व्रताचा उल्लेख येतो. भाद्रपद शुद्ध चतुर्थीस गणेशाची सुवर्णाची मूर्ति करून तिची प्राणप्रतिष्ठेपासून पूजा करून हवनादि विधी करावे व नंतर ती मूर्ति ब्राह्मणांस दान करावी इत्यादि विधि सांगितला आहे. या व्रताच्या कथेंत इतिहासभाग नसून पूजा व व्रत विधान कथन केलें आहे.

गणेश दैवज्ञ—हा मोठा नामांकित ज्योतिषी होऊन गेला. सांप्रत सर्व भरतखंडांत याचे ग्रहगणितग्रंथ जितक्या प्रदेशांत पसरले आहेत तितके दुसरे कोणाचे नाहींत. जन्म शक १४२०. याच्या पित्याचें नांव केशव; आईचें नांव लक्ष्मी, गोत्र कौशिक,वसतिस्थान नांदगांव. या दैवज्ञानें केलेले ग्रंथ ग्रहलाघव, लघुतिथिचिंतामणि, बृहत्तिथि-चिंतामणि, सिद्धांत शिरोमणि टीका, लीलावती टीका, विवाहवृंदावनटीका, मुहूर्ततत्त्वटीका, श्राद्धनिर्णय, छंदोर्णवटीका, तर्जनीयंत्र, कृष्णाष्टमीनिर्णय, होलिकानिर्णय

इत्यादि. बृहच्चिंतामणि व लघुचिंतामणि हे दोन ग्रंथ गणेश दैवज्ञकृत होत. वेधाच्या कामांत नर गणेश दैवज्ञ भास्कराचार्यापेक्षां श्रेष्ठ होता. केशव आणि गणेश यांच्या वंशांत आणखीहि विद्वान पुरुष उत्पन्न झाले. गणेशाचा धाकटा बंधु अनंत याची वराहमिहिरकृत लघुजातकावर टीका आहे. त्याचें अध्ययन त्याचा वडील बंधु गणेश दैवज्ञ याजपाशी झालेलें होतें. गणेशाचा पुतण्या नृसिंह याची ग्रहलाघवावर टीका होती. गणेश दैवज्ञाचा पणतु गणेश नांवाचा होता. त्याची सिद्धांतशिरोमणीवर शिरोमणीप्रकाश नांवाची टीका आहे. [दीक्षितकृत भारतीय ज्योतिःशास्त्र].

गणेशपुराण—अष्टादश पुराणांच्या उपपुराणांतील एक पुराण. या गणेशपुराणांतील साररूपानें वाचकांस घेण्यासारख्या कोणत्या गोष्टी आहेत.त्यांचा थोडक्यांत विचार करूं. गणेशपुराणाचे मुख्य दोन खंड;पहिला उपासना व दुसरा क्रीडा खंड. उपासनाखंडांत गणेश–उपासनेचे विविध प्रकार सांगितले असून, क्रीडाखंडांत गजाननांनीं वेळोवेळीं अवतार घेऊन कसकशा क्रीडा केल्या त्यांचें वर्णन दिलें आहे.

उ पा स ना खं ड.—उपासनाखंडांतील अध्याय १ ते ९ पर्यंत सोमकांत नामक राजाची कथा सांगितली आहे. त्यांतील ३ ऱ्या अध्यायांत राजानें पुत्रास केलेला नीतिशास्त्राचा उपदेश प्रत्येक राजपुत्रानें व सर्वसाधारण गृहस्थाश्रमी मनुष्यानें मनन करण्यासारखा आहे. त्याच प्रमाणें सुधर्मा राणीची पतिनिष्ठा व पतिप्रेम सर्व गृहिणींनीं लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. तसेंच न्यायनीतीचा त्याग करून अन्यायानें परधनासक्त झालेल्या मनुष्याच्या मनाची कशी स्थिति होते, व त्यामुळें त्याच्या हातून कशी महान् पातकें घडतात,आणि त्या पापांमुळें त्यास पुढें कशी दशा प्राप्त होते, हेंहि सोमकांत राजाच्या कथेंत उत्तम प्रकारें दाखविलें आहे. अध्याय १०,११ व १२ यांत व्यासाच्या गर्वाचें निरसन करून गणेशस्वरूपाचें वर्णन दिलें आहे, त्यांत श्रीगजानन ओंकारस्वरूप परब्रह्म असल्याचें दाखविलें आहे.अध्याय १३,१४ व १५ यांत गजाननानें आपल्या उदरांत अनंत ब्रह्मांडें दाखवून ब्रम्हदेवाच्या गर्वाचें निरसन केल्याची कथा व्यवहारांत मिथ्या अभिमान बाळगणारांस बोधामृताप्रमाणें होणार आहे. अ. १६ ते १८ पर्यंत मधु व कैटभ राक्षसांची कथा आहे. या कथेंत विष्णूसारखें सर्वमान्य देव सुद्धां प्रसंगीं इष्टकार्य साधण्यासाठीं हताश न होतां हवीं तीं कामें मानापमान बाजूस ठेवून करण्यास कसे उद्युक्त होतात त्याचा धडा घेण्यासारखा आहे. अध्याय १९–२१ यांमध्यें निपुत्रिक भीम राजाची कथा आहे. देवतेच्या पूजनानें पतितांचा उद्धार कसा होतो, हें या कथाभागावरून कळून येतें. अध्याय २२ ते २३ मध्यें आलेली बल्लाळ नामक महान् भगवद्भक्त वैश्यपुत्र या लहान बालकाची कथा अत्यंत मनोरम आहे. अध्याय २४–२७ मध्यें गजाननाच्या वरप्रदानानें दक्षाला आकस्मिक राज्यप्राप्ति कशी झाली, तो इतिहास आहे; पुढें अध्याय २८-३५ यांमध्यें दक्षवंशांतील रुक्मांगद राजाची हकीगत असून तो राजा एकदां शिकारीस गेला असतां रानांत त्याला वाचक्नवीऋषीचा आश्रम आढळला. राजाला पाहून त्याच्या मुकुंदा नामक पत्नीला प्रबल कामविकारानें पीडिलें, राजानें तिचा धिक्कार केल्यामुळें, तिनें रुक्मांगदाला 'कुष्ठी हो' असा शाप दिला. या कथाभागावरून अनुकरणीय असें रुक्मांगदाचें धैर्य व दुर्जन संगतीपासून होणारे तोटे यांचें स्पष्ट चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें. अध्याय ३६-३८ मध्यें दुराचरणी मुकुंदेच्या पोटीं इंद्रापासून जन्मलेल्या गृत्समदाची कथा आहे. त्यांत गजाननाच्या तपश्चर्येनें त्याला ब्राह्मणत्व कसें मिळालें ती हकीकत हृदयंगम आहे. अध्याय ३९ ते ४७ त त्रिपुरासुराची कथा आहे. गृत्समदानें त्याला 'गणांनांत्वा' या मंत्राचा उपदेश केल्यावर गजाननाच्या वरप्रसादानें तो पूर्ण ऐश्वर्यसंपन्न झाला, परंतु अहंकारानें उन्मत्त होऊन वाटेल तीं दुराचरणें तो करूं लागला, त्यामुळें शेवटीं त्याचा नाश झाल्याचा उल्लेख आहे. धन, ऐश्वर्य वगैरे सर्व असूनहि दुराचारी मनुष्यांचा अन्तीं कसा नाश होतो हें यावरून चांगलें लक्षांत घेण्यासारखें आहे. पुढें अध्याय ४८—५३ पर्यंत त्रिपुरासुराच्या भयानें शंकरांसह सर्व देव वाट सांपडेल तिकडे पळून गेले असतां, गिरिकंदरांत लपून राहिलेल्या विरही पार्वतीला तिचा पिता हिमवान् यानें केलेला उपदेश विशेषतः स्त्रियांनां फारच बोधप्रद आहे. या कथाभागांत हिमवानानें पार्वतीला इष्टहेतूच्या सिद्ध्यर्थ गणेशोपासना सांगून, त्याच्या उपासनेचे व पूजेचे प्रकार, तसेंच गणेशचतुर्थिव्रतमहात्म्य, गणेशाचें मूलपरब्रह्मस्वरूप, वरदगणेशाची कथा, नलराजाची दृढ गणेशभक्ति इत्यादि निवेदन केलें आहे; गणेशभक्तांनां ही विधिपूर्वक प्रतिपादिलेली माहिती विशेष उपयोगी आहे. अध्याय ५७—५८ मध्यें एका वाटमाऱ्या धीवराची कथा असून त्याला मुद्गलऋषींचें दर्शन झाल्यानें तो गणेशभक्तीला लागला व शेवटीं तपश्चर्येच्या शुद्धीमुळें भुशुंडी ऋषी कसा झाला, तें कथानक विचक्षणांस विचारणीय आहे. अध्याय ५९—६४ मध्यें संकष्टचतुर्थीमहात्म्य, अंगारकीचतुर्थिमाहात्म्य, दुर्गामाहात्म्य इत्यादिकांचें दृष्टांतासुद्धां विवरण असून गणेशदेवतेची नुसती चंद्रासारख्यानें कुचेष्टा केली असतां त्याला सुद्धां त्याबद्दल प्रायश्चित्त कसें भोगावें लागलें इत्यादि कथा मनोरंजक आहेत. अध्याय ६५ मध्यें दुष्ट अनलासुराचें हनन आहे. अध्याय ६६—६९ मध्यें मिथिला नगरीच्या जनक राजाचा वृत्तांत असून एकदां सिंधु नामक दैत्याच्या हननासाठीं पार्वतीच्या उदरीं गणनायकास अवतार धारण करावा लागला,तो कथाप्रसंग पुढील अध्यायांत आहे. अध्याय ७३ ते ८० पर्यंत सिंधुदैत्यानें स्वर्ग, भूमि व पाताळ इ. सर्व लोकांस जिंकून त्यांची विटंबना कशी चालविली याचें दिग्दर्शन आहे. अध्याय ८१–१०३

पर्यंत बालगजाननानें अनेक राक्षसांचा नाश कसा केला यासंबंधाचे पुष्कळ आश्चर्यजनक चमत्कार सांगितले आहेत. अध्याय १०४ यांत ब्रह्मदेवाचें गर्वनिरसन, १०५ यांत विष्णु व गणेश यांचें अभेदत्व, १०६ यांत सर्व गणांचा स्वामी म्हणून गजाननाला मिळालेलें 'गणेश' हे नामाभिधान व शंकरांनां आपल्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार, अ. १०७व १०८ मध्यें इंद्र आणि यम यांचें गर्वनिरसन, इत्यादि मनोरम कथाप्रसंग आहेत. पुढें अध्याय १०९–१२६ पर्यंत सिंधुदैत्याशीं झालेल्या युद्धाची हकीकत असून, गजाननाचा सिद्धि–बुद्धीशीं विवाह व अद्भुत गोष्टी यांचें रसभरित वर्णन आहे. सिंधूप्रमाणेंच सिंदुरासुराच्या नाशाकरितां द्वापारयुगांत गजाननाला अवतार धारण करावा लागला तो कथाप्रसंग अध्याय १२७—१३७ पर्यंत आहे. १३८ ते १४८ पर्यंतच्या १२ अध्यायांत गजाननानें वरेण्य राजाला गणेशगीता सांगितली आहे. शेवटीं अध्याय १४९ व १५० यांत कलियुगामध्यें पुढें उत्पन्न होणाऱ्या धूम्रवर्णावताराचा उल्लेख करून अखेरीस १५२—१५५ या अध्यायांत गणेशपुराणाच्या फलश्रुतीचें महात्म्य व तें कोणाकोणाला प्रत्ययास आलें तें सांगितलें; आणि याप्रमाणें गणेशपुराणाचें हें पहिलें सुमनोहर उपासनाखंड पूर्ण केलें आहे.

क्री डा खं ड.–क्रीडाखंडाच्या पहिल्या १ते४ अध्यायांमध्यें रौद्रकेतु ब्राह्मणाच्या देवांतक व नरांतक नामक पुत्रांची हकीकत आहे. मातापितर ब्राह्मण असूनहि त्यांच्या पोटीं दैत्य कसे निर्माण होतात हें या कथानकावरून कळून येतें; आणि दैत्य म्हणजे दुसरे कोणी नसून जे क्रियेनें घोर आचरण करतात, ते उच्च कुलोत्पन्न असले तरी दैत्यच होत हें या उदाहरणावरून स्पष्ट ठरतें. हे दैत्य महापराक्रमी असून त्यांच्या नाशासाठीं गणेशाला अवतार धारण करावा लागला आहे. त्याचप्रमाणें अदितीच्या स्तुतीला प्रसन्न होऊन तिला पूर्वी दिलेल्या वरास अनुसरून गजाननानें तिच्या पोटीं महोत्कटरूपानें अवतार धारण केल्याची अध्याय ५ व ६ मध्यें कथा आहे. पुढें अध्याय ७ ते ११ पर्यंत गजाननाच्या अनेक लीलांचें व चमत्कारांचें वर्णन आहे. यांत मुख्य गोष्ट अशी आहे कीं, जे अनन्य भक्तीनें गजाननाला परब्रह्मस्वरूपी जाणून नम्र होत, त्यांस त्यानें वैभवशिखरावर चढविलें; व उन्मत्तांचा नाश केल्याचें दाखविलें आहे. या कथेंत नम्रता व भक्ति यांची योग्यता दाखविली आहे. अध्याय २२ ते २८ पर्यंत शुक्ल ब्राह्मणाकडे महोत्कट भोजनास गेल्याची कथा असून, परमेश्वर दांभिक, डामडौली अशा लोकांचा मुळींच भुकेला नसून केवळ भक्तीचा व प्रेमाचा भुकेला आहे हें या कथेंत दाखविलें आहे.

पुढें २९ पासून ३८ पर्यंतच्या प्रत्येक अध्यायांत कथा सुरस व बोधप्रद आहेत. कश्यपऋषीला दिती व अदिती अशा दोन भार्यांच्या निरनिराळ्या आचरणानें त्यास अनुक्रमें दैत्य व देवसंतती झाल्याचा जो कथाभाग आहे, त्यांत सुसंतति होण्यास नीतिमार्गाची आवश्यकता दाखविली आहे व तो भाग प्रत्येक गृहिणीस उपदेशपर असा आहे. अध्याय ४८ पासून ५४ पर्यंत भूतलोक, दानवलोक, गंधर्वलोक, सिद्ध, चारण, यक्ष, यांची स्थानें अमरावती, अग्निलोक, यमलोक, इंद्रलोक, वरुणलोक, कुबेरलोक, वायुलोक, सूर्यलोक, चंद्रलोक, गोलोक, सत्यलोक आणि त्या सर्वांपेक्षां रमणीय असा वैकुंठलोक व अखेरीस गणेशलोक यांचें वर्णन आहे. त्या वर्णनापासून खगोल व भूगोलविद्या यांचा आस्थापूर्वक अभ्यास करणारास बरेंच साह्य होण्यासारखें आहे. अध्याय ५५–७७ पर्यंत नरांतक व देवांतक यांच्याशीं गजाननानें केलेल्या संग्रामाचें वर्णन व अनेक बोधपर गोष्टी आहेत. विशेषतः एकदां हट्टास पेटलेला दुष्कर्मी मनुष्य उत्तरोत्तर खड्यांतच कसा पडतो आणि अखेरीस कसा धुळीस मिळतो याचें स्पष्ट चित्र यांत दाखविलें आहे. शेवटीं अध्याय ७१ व ७२ यांत विनायकाची अवतारसमाप्ति ग्रथित केली आहे.

इंद्रासारख्यांचा गणेशानें सहज लीलेनें केलेला गर्वपरिहार सामान्य जनांस बोधप्रद आहे. अध्याय ७०–७२ यांमध्यें संकष्टचतुर्थिव्रताचें समग्र विधान आणि पार्वती, दमयंती, अगस्ती, चित्रलेखा, प्रद्युम्न, रुक्मिणी, श्रीकृष्ण, ब्रह्मदेव अशांसारख्या मोठ्यामोठ्या उत्कर्षेच्छु मनुष्यांनीं पूर्वी हें व्रत कशा प्रकारें केलें, व त्यांनां सिद्धी कशा प्राप्त झाल्या तें सांगितलें आहे. अध्याय ७३–८३ पर्यंत कार्तवीर्याची कथा आहे. जन्मतःच तो हस्तपादांनीं व्यंग असून गणेशोपासनेनें त्याला सहस्र हस्त व पाय प्राप्त झाले. त्यामुळें त्याला आपल्या पराक्रमाची घमेंड वाटून त्यानें जमदग्नि ऋषीला मारून टाकिलें. गणेशाच्या प्रसादानेंच त्याच्या परशुराम नामक पुत्रानें कार्तवीर्याला जिंकिलें. हा सर्व कथाभाग अत्यंत मनोरम असून, त्यांतच एका दुराचारी व वेश्यासक्त गौडपुत्राची उपकथा, नसत्या प्रकारच्या छंदी लोकांनां उपदेशपर आहे. अध्याय ८४–८८ मध्यें तारकासुराची कथा आली आहे. त्या दुर्जनाच्या वधासाठीं महादेवासारख्या वीर पुरुषांनां आणि पार्वती व मदनाची स्त्री रती यांच्यासारख्या स्त्रियांनां किती कष्ट सहन करावे लागले, त्याचें अश्रुतपूर्व वर्णन आहे. देवकार्यासाठीं मदनानें आपणांस जाळून घेतल्याची उपकथा सार्वजनिक देहयज्ञ किंवा मेहनत करूं इच्छिणाऱ्यांना खचित अल्हादकारक व प्रोत्साहनपर वाटेल. तसेंच या उपासनाकांडांतील शेवटच्या ८९ ते ९२ अध्यायांत गजाननाची स्तुति वर्णिली आहे.

गणेशपुराणाच्या प्रती अनेक असण्याचा संभव आहे. आम्ही महाराष्ट्रास परिचित अशा रा. दातार यांनीं मूळ म्हणून मान्य केलेल्या व भाषांतरलेल्या प्रतीवरून वरील मजकूर घेतला आ

गणेश वेदांती—हा महाराष्ट्रीय ब्राम्हण असून मराठयांच्या तर्फे अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला याच्या दरबारीं वकील होता. पानिपत झाल्यानंतर रणांगणावरील मराठयांच्या बाजूच्या शवांचा और्ध्वदेहिक संस्कार यानें व काशीराज पंडित यानें फार परिश्रम घेऊन केला. सुजानेंहि त्या कामीं यांनां मदत केली. हा दयार्द्र व परोपकारी असल्यानें याला वेदांती हें टोपण नांव पडलें असावें. [इतिहाससंग्रह; जुन्या ऐतिहासिक गोष्टी. भा. ३; मराठी रियासत मध्यविभाग. ३].

गणोजी शिर्के—हा शिवाजी महाराजांचा जांवई होय. महाराजांच्या मुलीचें नांव राजकुंवर असून ती याला दिली होती. याची आत्या (?) सोयराबाई ही महारजांनां दिली होती. तसेंच याची सख्खी बहीण जिऊबाई ही संभाजी छत्रपतींची बायको (येसूबाई) होती. गणोजी हा ज्या वेळीं संभाजीनें शिरक्यांचें शिरकाण केलें त्यावेळीं मराठयांनां सोडून उघडपणें मोंगलांस मिळाला. पुढें राजाराममहाराज हे जिंजीस वेढयांत सांपडले असतां, वेढा घालणाऱ्या औरंगझेबाच्या सैन्यांतच गणोजी होता. किल्ल्याच्या नैर्ऋत्येस याचें पथक व मोर्चा होता. त्याला आपल्याकडे वळविण्यासाठीं किल्ल्यांतून खंडोबल्लाळ त्याच्याकडे गेला. प्रथम गणोजीनें त्याचें म्हणणें कबूल केलें नाहीं. शिर्क्यांचें दाभोळचें वंशपरंपरागत वतन चिटणिसांकडे होतें. तें गणोजीनें मागितल्यावरून खंडोबानें तें त्याच्या स्वाधीन केलें. त्याशिवाय शिर्क्यांनां भोर प्रांतांत तीन व रत्नागिरी परगण्यांत पांच गांव इनाम मिळाले. तेव्हां आपल्या आप्तांचा कबिला या मिषानें गणोजीनें राजाराममहाराजांनां किल्ल्यावरून खालीं उतरवून आपल्या गोटांत घेतलें व दुसरे दिवशीं शिकारीच्या निमित्तानें त्यांना त्यानें कांहीं कोसांवर असलेल्या धनाजीच्या सैन्यांत नेऊन पोहोंचविलें (१६९७ दिसेंबर). पुढें गणोजी हा मराठयांकडे येऊन मिळाला. याचा मुलगा पिलाजी हाहि इतिहासांत प्रसिद्ध आहे.[मरा. रिया.पूर्वार्ध].

गंतूर, जिल्हा.—मद्रासइलाख्यांतील एक जिल्हा.१९०४ सालीं कृष्णा जिल्ह्याचा कांहीं भाग व नेलोरचा एक (ओनगोल)तालुका मिळून हा बनविला.गंतूर हें याचें मुख्य ठिकाण आहे. रेव्हेन्यूकरितां गंतूर, तेनाली, नरसराव पेठ व ओनगोल हे चार पोटविभाग पाडले आहेत. गंतूर सब डिव्हीजनमध्यें गंतूर व सत्तेनापाली हे दोन तालुके आहेत. पूर्वीचा हा जिल्हा१८५९ त मोडून गोदावरी व कृष्णा यांमध्यें विभागला होता. क्षेत्रफळ ५७३५ चौ. मैल. लोकवस्ती (१९२१) १८०९५. जमीनमहसूल व इतर पट्टया मिळून उत्पन्न सुमारें २० लाख आहे. दर दहा हजारीं ६६३ लोक साक्षर आहेत व १२० इंग्रजी जाणतात. लोकांचा मुख्य धंदा शेतकी आहे.

तालुका.—मद्रास. गंतूर जिल्हा. क्षेत्रफळ ५०० चौरस मैल.लो.सं. (१९२१) २५४९२३. गंतूर व मंगळगिरी हीं दोन शहरें व १०९ खेडीं आहेत. उंदवल्ली खेडें प्राचीन अवशेषांकरितां पहाण्याजोगें आहे. जमीनमहसूल व कर मिळून ६२४००० उत्पन्न आहे. दक्षिणभागाची जमीन काळी व सुपीक आहे, पण पाऊस थोडासा कमी पडला कीं अगदीं नापीक व ओसाड होते. तालुक्याच्या मध्यभागीं पुराचें भय असतें पण पूर गेल्यावर गाळाच्या योगानें ती जागा फार सुपीक होते. रस्ते वगैरे बरे आहेत. उत्तरेकडील भागांतून बँक कालवा जातो. एप्रिल व मेमध्यें उन्हाळा फार भयंकर असतो. एरवीं हवामान ठीक असतें.

शहर.—गंतूर जिल्ह्याचें मुख्य ठिकाण उ. अ० १६° १८′ व पू. रे. ८०°२८′. १८६६ पासून येथें म्युनिसिपालिटी आहे. वस्ती (१९२१) ८८१८४ होती. येथील हवापाणी अत्यंत आरोग्यदायक आहे. १७७८ मध्यें हा प्रदेश कंपनीसरकारनें बसालतसिंग यापासून मक्त्यानें घेतला व तो १८२३ पासून त्यांच्याकडे कायमचा राहिला. येथें मोठाले रस्ते मिळतात. त्यांत बेझवाड्यावरून जाणारा सीतापूर मद्रास रस्ता मुख्य आहे. येथें एक आर्टस् कॉलेज आहे. हिंदू व मुसुलमान शिक्षकशिक्षकिणींकरितां ट्रेनिंग शाळा आहेत. शिवाय शहर हायस्कूल, तालुका हायस्कूल, मुलींचें हायस्कूल यांसारख्या इंग्रजी शिक्षणाच्या शाळा आहेत. तेलगू व इंग्रजी भाषेंतलीं चार नियतकालिकें येथें प्रसिद्ध होतात. व्यापाराचें हें मोठें ठिकाण आहे. हें सदर्न मराठा रेल्वेचें एक स्टेशन आहे. येथें कापसाचा व तांदुळाचा व्यापार चालतो.

गदग, तालुका.—मुंबई इलाख्यांतील धारवाड जिल्ह्याचा एक पूर्वेकडील तालुका. क्षेत्रफळ ६९९ चौ. मै. ह्यांत मुन्डरगी परगण्याचा समावेश होतो. यांत गदग व गुलगुंड हीं २ गांवें व १०२२ खेडीं असून हवा समशीतोष्ण व आरोग्यदायक आहे. वार्षिक पाऊस सरासरी २५इंच पडतो. लो. सं.(१९११) १३१७४०. येथें कप्पट नांवाची डोंगराची ओळ आहे. हवा समशीतोष्ण व आरोग्यदायक आहे. पाऊस २५ इंच पडतो.

शहर—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा.गदग तालुक्याचें मुख्य ठिकाण.उत्तरअक्षांश १५° ९६′ व पूर्वरेखांश.७५°४३′. लोकसंख्या (१९११) ३०४२९.येथें कापसाचा व्यापार मोठा असून येथील लुगडीं प्रसिद्ध आहेत. दर शनिवारीं येथें बाजार भरतो. इ. स. १८५९. सालापासून येथें म्युनसिपालटी आहे. गदगच्या किल्ल्याभोंवतीं सुमारें १८ फूट तट असून कोठें खंदकहि दृष्टीस पडतो. इ. स. १७५० सालीं हा किल्ला चांगल्या स्थितींत होता असें वर्णन आढळतें. किल्यांत एक हौद व कांहीं विहिरी आहेत. गदग येथील मामलेदाराच्या कचेरींत कांहीं ताम्रपाट असून येथील देवळांत किंवा त्यांच्या जवळपास पुष्कळ शिलालेख आहेत. त्रिकुटेश्वराच्या देवळांत २० शिलालेख असून पैकीं १० इ. स. १००२ ते १५३९ च्या दरम्यानचे आहेत. वीरनारायणाच्या देवळांत असलेल्या ७ शिलालेखांपैकीं चार इ. स. १०३७ ते १५३० च्या दरम्यानचे आहेत.

इतिहास —याचें प्राचीन अगर संस्कृत नांव ऋटूक असें असावें. त्रिकूटेश्वर व वीरनारायण हीं देवळें दहाव्या अगर अकराव्या शतकांतील असावींत. व तेथें सांपडत असलेल्या निरनिराळ्या वेळच्या शिलालेखांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, हा भाग पश्चिमचालुक्य (९५३–११९०), कालचुरी (११६१–११८३), होयसल बल्लाळ (१०४७–१३१०), देवगिरीचे यादव(११७०–१३१०) आणि विजयानगरचे राजे(१३३६–१५८७)या निरनिराळ्या राज्यांच्या अमलखालीं होता. इ. स. १६७३ च्या सुमारास बंकापुर सरकारमध्यें गदग हा मुख्य जिल्हा होता. टिपूच्या बाजूनें लढणाऱ्या धोंड्या वाघानें गदग येथील किल्ला पेशव्यांच्या किल्लेदाराकडून घेतला होता. इ. स. १८१८ सालीं सर मनरो यानें दोन चार गोळे फेंकून किल्ला सर केला.

गदग ही कापूस, सूत यांची मोठी पेठ आहे.येथें कापडाच्या, सरकी काढण्याच्या व कापूस दाबण्याच्या गिरण्या आहेत.

गदरिया —गरेरी. यांची वस्ती संयुक्तप्रांत, मध्यहिंदुस्थान वगैरे भागांतून आहे. एकंदर लो. सं. (१९११) १३,६८,९९०. पैकीं संयुक्तप्रांतांतच ९,८३,०९९ आहे. गंगाधर अथवा कंदाहार या शब्दावरून गदरिया शब्दाची व्युत्पत्ति लावण्यांत येते. गदरिया ही एक धनगरांची व घोंगडी विणणाऱ्या लोकांची जात आहे. गुआल अथवा अहीर जातीशीं त्यांचा निकट संबंध असावा, कारण गुआल जातीच्या हातची कच्ची व पक्की रसोई ते खाऊं शकतात. संयुक्तप्रांतांत बाघेल, धाम्रनिया, चंडेल, धिनगर, हरनवाल, कच्छवाह, निखर, फुलसिंघिय, राठोर, रैटेल, सागर व सरस्वार अशा त्यांच्या बारा पोटजाती आहेत. यांपैकीं निम्मीं नांवें रजपुतांतलीं आहेत. बनारस येथें धिनगर, निख., जोनपुरी, अलाहाबादी, बकरकसाब, नामदावाला व चिकवा इत्यादि जाती प्रसिद्ध आहेत. यांपैकीं पहिल्या चार जाती धनगराचा धंदा करतात व कांबळीहि विणतात. बकरकसाब व नामदावाला हे हाच धंदा करतात. चिकवा हे मुसुलमान जातीचे आहेत. वरील पोटजातींशिवाय भररिया, बैकट, तासेल्हा, चाक, बारिया, पैवार व भैयातार अशाहि पोटजाती आहेत. पश्चिमेकडील गदरिया ग्वाल्हेरहून आल्यामुळें स्वतःस मराठे म्हणवितात व तेथील काली देवीच्या दर्शनार्थ जातात.गदरिया या ज्ञातीची एक पंचायत असते.बालविवाह, विधवाविवाह वगैरे गोष्टी या जातींत रूढ आहेत. त्यांच्या लग्नांतील चालींत वधूस कपटानें व बलात्कारानें पळवून नेण्याच्या जुन्या चालीचा थोडासा अवशेप अद्यापहि पहावयास सांपडतो. त्यांच्यांत कांहीं जन्मसंस्कार असून मृत्युसंस्कारांत पिंड व श्राद्ध वगैरे विधी पाळण्यांत येतात.

गदरिया हे जुन्या चालीचे हिंदू असून या जातीच्या मुसुलमान शाखेंत फारच थोडी संख्या आढळते. त्यांची काली हीच मुख्य देवता होय. त्याशिवाय चामार व जोखाइ या विशिष्ट देवता असून त्यांनां बकरें व डुक्कर यांचा बळी वहाण्यांत येतो. बिहारमध्यें गदरियांचा दर्जा अहीरांपेक्षां मोठा असतो. त्यांचा मूळ धंदा धनगराचा व घोंगडी विणण्याचा असला तरी कांहीं लोक शेती व व्यापारहि करतात. [कूक].

मध्यप्रांतांत यांची संख्या सुमारें ४०,००० आहे. ही मिश्रजात असून हे आपल्या उत्पत्तीबद्दल पुष्कळ दंतकथा सांगतात. यांच्या मुख्य निखार, धेन्गार व बारमैयान या तीन पोटजाती आहेत. यांशिवाय कांहीं स्थानपरत्वें नामांतरें व पोटजाती पडल्या आहेत. यांचीं लग्नें देवकांप्रमाणें होतात. निखार जात सर्वांत उच्च समजतात पण ते दुसऱ्या जातींतील मुलगी अडचणीच्या प्रसंगीं करतात. लग्नप्रसंगीं एक स्त्री नग्नावस्थेंत स्त्रियांमध्यें नाचत असते. यांचीं नैतिक बंधनें शिथिल आहेत. विधवेनें दिराबरोबर त्याची बायको हयात असतांहि लग्न करणें प्रशस्त मानतात. लग्नाची वयोमर्यादा निश्चित नाहीं. वरापेक्षां वधू वयानें मोठी असली तरी चालते. [रसेल व हिरालाल–कास्ट्स अँड ट्राइब्स इन सी. पी.].

गदाधरपंत प्रतिनिधी–शाहुमहाराज दक्षिणेंत यावयास निघाले असतां गदाधर प्रल्हाद नाशिककर हे ब्राह्मण गृहस्थ येऊन त्यांनां मिळाले.प्रथम जी मंडळी महाराजांनां मिळाली त्या (मोरोपंत सबनीस, कृष्णाजीपंत जोशी, परसोजी भोसले वगैरे) मंडळींतच गदाधरभट्ट हे एक होते. पुढें राज्याभिषेक झाल्यानंतर परशुरामपंत किन्हईकर हे ताराबाईच्या पक्षाकडे राहिल्यानें महाराजांनीं प्रतिनिधिपद गदाधरभट्टास दिलें (१७०८); परंतु हें पद पंताकडे फार दिवस राहिलें नाहीं. कारण ' गदाधरभट्टाचा भट्टीकारभार यथास्थित बंद न होय हें लक्ष महाराजांनीं समजून ' महाराजांनीं बाळाजीपंत (थोरले) पेशवे यांच्या सल्ल्यानें परशुरामपंतास सोडून त्यांनां प्रतिनिधीचीं वस्त्रें इ. स. १७११ त दिलीं [मराठी रियासत, मध्यविभाग].

गद्दी—संयुक्तप्रांतांत या जातीची वस्ती सर्वांत मोठी (५५,०२२) आहे. एकंदर लो. सं. (१९११) ६२,७८६. हे सर्व मुसुलमान आहेत. पंजाबांत हे करनाळ व दिल्ली प्रांतांत आढळतात. त्यांच्यांत व घोसीमध्यें फारच साम्य आहे व ते परंपरागत गवळी असल्यामुळें अहीरांपैकींच असावेत असें खात्रीनें वाटतें. करनाळमध्यें हे लोक पुष्कळ आहेत. येथें ते शेतकऱ्याचा धंदा करतात व शेतकरी म्हणून समजले जातात. कधीं कधीं यांनां गद्दी असें म्हणतात. परंतु यांचा डोंगरी गद्दीजातीशीं कांहीं एक संबंध नाहीं. [रोजग्लॉसरी. पंजाब, से. रि. १९११].

गद्दी—पंजाबांतील एक जात. लो. सं. २७,६१२. हे सर्व हिंदू असून कांग्रा जिल्हे आणि चांबा संस्थानें यांत आढळतात. ब्राह्मण, खत्री, रजपूत व डोंगराळ प्रदेशांतील राठी यांनां हें सर्वसाधारण नांव आहे. ते अर्धवट गुराखी व शेतकरी आहेत. त्यांची स्वतःची

स्वतंत्र भाषा (गाद्दी) आहे. कांग्रा जिल्ह्यामध्यें गद्दी ही शेतकऱ्यांची जात आहे असें मानण्यांत येतें. [रोज— ग्लॉसरी; पंजाब, से. रि. १९११; क्रूक].

गंधक—(परमाणु भारांक ३२.०७) एक अधातुरूप रासायनिक मूलद्रव्य. हें लोकांनां पुष्कळ दिवसांपासून माहीत असून याच्या ज्वालाग्राही गुणामुळें किमयागार लोक याला ज्वलनतत्व असें समजत असत. हें मूल द्रव्य स्वतंत्र व संयुक्त स्थितींत निसर्गांत पुष्कळ ठिकाणीं आढळतें. स्वतंत्र किंवा नैसर्गिक गंधक ज्वालामुखीजवळ सांपडतें.

सर्व जगांतील गंधकाच्या खाणींपैकीं सिसिली बेटांतील खाणी महत्वाच्या आहेत.यूरोपांत मायोसीन नांवाची चिकण-माती व चुनखडी ह्यांत कापूर, शिलाजित व इतर कांहीं खनिज पदार्थांबरोबर गंधक आढळतो. रशियांत विशेषतः दाघेस्तानमध्यें गंधकाच्या मोठमोठाल्या खाणी आहेत. जपान, चिली, पेरू व युनायटेडस्टेट्स् वगैरे देशांतहि गंधक पुष्कळ सांपडतो.

संयुक्त स्थितींत हें मूल द्रव्य मुख्यतः गंधाकिदें व गंध-कितें ह्या रूपांत आढळतें. पैकीं गंधकिदें हीं व्यापारी दृष्ट्या फार महत्वाचीं आहेत. कारण त्यांपासून तांबें, शिसें, जस्त, पारा वगैरे धातू निघतात. गंधकितांपैकीं कर्पूर, शिलाजित, भारायितें व मग्नगंधकितें हीं सांगण्यासारखीं आहेत. गंधक द्याम्लजिद व गंधकीकृतउज्जन हे वायुरूप पदार्थ ज्वाला-मुखींतून व खनिज पाण्यांतून निघतात. प्राणिज व वनस्प-तिज सृष्टींतहि गंधक आढळतो. केंस व लोंकर आणि प्राण्यांची बलकयुक्त शरीरें व लसूण आणि मोहरी यांच्या तेलासारखीं इतर कांहीं तेलें यांत गंधक असतो.

खाणींतून काढणें.—खाणींतून काढलेल्या नैसर्गिक गंधकाबरोबर चुनखडी, कर्पूर, शिलाजित, माती वगैरे इतर पदार्थ असतात; त्यांपासून गंधक निराळा करणें फार कठिण नसतें. कारण त्या सर्वांना उष्णता लाविली असतां गंधक वितळून वाहूं लागतो व इतर पदार्थ मागें रहातात.

गुणधर्म.—गंधकाचीं कित्येक रूपें आहेत.परंतु त्यांसं-बंधीं पद्धतशीर विचार करण्यापूर्वी नेहमींच्या गंधकाच्या गुणधर्मांचें विवेचन करणें बरें. बाजारी गंधकाचे पिवळे स्फटीक असून ते ११३° शतांश उष्णमानाला वितळतात. नेहमीच्या दाबाखालीं ४४४·५३° ला उकळूं लागतात. उकळूं लागल्यानंतर वाफेचा रंग प्रथम नारिंगी असतो; परंतु जास्त तापविल्यानंतर तो काळसर होत होत ५००° ला तांबडा लाल होतो. उष्णमान आणखी वाढविल्यास रंग फिका होत जाऊन ६५०° ला गवतासारखा होतो. रंग बदलण्याचें कारण अणूंचें विघटन घटन होतें हें होय. घन-रूप गंधकाचें विशिष्टगुरुत्व २.०६२ ते २.०७० असतें. तें उष्णता व विद्युद्वाहक नाहीं व घर्षणानें त्यावर ऋण विद्युत् उत्पन्न होते. तें हवेंत ३६३° ला व प्राणवायूंत २७५° ते २८९° पर्यंत पेट घेतें. त्याच्या ज्योतीचा रंग विशिष्ट तऱ्हेचा निळा असतो व ज्वलनापासून तीक्ष्ण वासाचें गंधकद्विप्राणिद तयार होतें. त्याच वेळीं थोडेंबहुत त्रिप्राणिदहि तयार होतें. गंधक बहुतेक दुसऱ्या सर्व मूलद्रव्यांबरोबर संयोग पावतें व त्यायोगें गंधाकिदें बनातात.

उपयोग.—कलाकौशल्यांत जे गंधकाचे उपयोग होतात, ते अत्यंत महत्वाचे आहेत. मिठापासून पापड-खार करणें, कपडे वगैरे रंगविणें व शुभ्र करणें, कातडीं कमाविणें, दारू करणें, गंधकाच्या काड्या करणें या व अनेक कामांस गंधक व त्याचे संयुक्त पदार्थ यांचा उपयोग होतो. गंधक जलद पेटतो म्हणून आगकाड्यांचीं टोंकें वितळ-लेल्या गंधकांत प्रथमतः बुडवितात. असें केलें नाहीं तर फास्फरस फार जलद जळून जात असल्यानें काडी पेटली नसती. याच धर्मामुळें दारू करण्यासहि गंधक घेतात. गंध-कामुळेंच दारू यत्किंचित् ठिणगीनें पेट घेते. जळत्या गंध-कापासून जी वाफ निघते, तिनें फुलें व रेशीम शुभ्र होतात. जहाजांत व कोंदट जागीं उंदीर व वाईट कृमी फार जमले तर त्यांचा नाश करण्यासहि गंधक जाळतात. विपाकक्रिया बंद करण्याचाहि गंधकाच्या अंगीं धर्म आहे. दारू ठेव-ण्याच्या पिपांस आंतून गंधकाची धुरी दिली म्हणजे त्यांतील बिअर वगैरे दारू विपाक पावत नाहीं. कपड्यांतील जंतू व घाण घालविण्यासाठीं त्यांस गंधकाची धुरी देतात व त्याचप्रमाणें घरांतलि खोल्यांतहि गंधक जाळून तेथील हवा स्वच्छ करतात. पदकें, नाणीं व दुसऱ्या पदार्थांचे ढाळ घेण्यास द्रवास्थितींत गंधकाचा उपयोग होतो. गंधकाच्या फुलांचा औषधांत उपयोग होतो. सल्फ्युरिक ॲसिड हा जाळणारा व खाणारा असा विषारी द्रव आहे, आणि तो दुसऱ्या पदा-र्थांबरोबर भट्यांत गंधक जाळूनच करितात.

गंधकाचीं दुसरीं रूपें—स्फटिकाकार, पिठूळ व कदाचित प्रतिस्फटिकाकार अशा रूपांत गंधक आढळतो. ऐतिहासिक दृष्ट्या समभुज चतुर्भुजात्मक व($ग_{अ}$) एकवलना-त्मक (मॉनॉक्लिनिक) ($ग_{आ}$) हे प्रकार महत्वाचे आहेत. कर्बद्विगंधकिदांत गंधकाचें द्रावण करून त्याचें स्फटि-कीभवन होऊं दिल्यास अथवा गंधकीकृत उज्जानें संपृक्त असें पायरिडाइन हवेंत ठेवून त्याचें प्राणिदीकरण होऊं दिल्यास समभुज चतुर्भुजात्मक गंधक मिळतो. तो पाण्यांत विरघळत नाहीं. पण कर्बद्विप्राणिद, गंधकहरिद व टरपेंटाईन ह्यांत द्रवतो. गंधकाचा रस अंशतः थंड करून व त्यावर बनलेली कवची फोडून आंतील रस ओतून टाकिला असतां भांड्याच्या आंतल्या बाजूला सुईसारखे स्फटिक तयार झालेले आढळतात. हे स्फटिक एकवलनात्मक गंधकाचे होत. $ग_{अ}$ प्रमाणें हा कर्बद्विगंधकिदांत विरघळतो. या गंधकाचे आणखी तीन प्रकार सांपडलेले आहेत.

पिठूळ गंधक किंवा $ग_{इ}$ हा दोन रूपांत आढळतो;पैकीं एक

कर्बद्विगंधकिदांत विद्राव्य व दुसरा अविद्राव्य आहे. अम्लानें बहुगंधकिदाचें विघटन केलें असतां गंधकाचें दूध मिळतें. त्यांत हे दोन्ही प्रकारचे गंधक असतात. गंधक हरिदाचें पाण्यानें विघटन केल्यानेंहि अद्रावणीय गंधक मिळतो. त्याचें हळू हळू समभुजचतुर्भुज गंधकांत रूपांतर होतें. जलमिश्रित गंधकीकृत उज्ज व गंधकद्विप्राणिद यांच्या अतःक्रियेपासून प्रतिस्फटिक गंधक ($ग_{उ}$) मिळतो.

गं ध का चा र स.—द्रवण बिंदूच्यावर गंधक तापविला असतां कित्येक चमत्कार आढळून येतात. रस प्रथम फिकट पिंवळ्या रंगाचा असतो, तो जास्त तापविल्यानंतर काळसर व चिकट होत होत १८०° उष्णमानाला काळसर तांबड्या रंगाचा व अत्यंत चिकट होतो. आणखी तापवीत राहिल्यास चिकटपणा कमी होतो. परंतु रंग कायम रहातो. चिकट प्रकारचा गंधक एकदम थंड केल्यास अथवा जास्त तापविलेला गंधक एकदम पाण्यांत टाकल्यास लवचीक गंधक मिळतो. हा पदार्थहि कांहीं वेळ ठेवल्यानंतर ठिसूळ होतो.

गं ध का चे सं यु क्त प दा र्थ, गंधकीकृत उज्ज ($उ_2 ग$):—उज्जच्या प्रवाहांत गंधक तापविल्यास २००° व ३५८° यांच्या दरम्यान त्यांचा संयोग होऊन हा वायू तयार होतो. निरनिराळ्या धातुरूप गंधकिदांवरील अम्लांच्या क्रियेनें (बहुधा लोहस गंधकिद व पातळ गंधकिकाम्ल यांचा उपयोग करितात)हि गंधकीकृत उज्ज तयार करतां येतो. गंधकयुक्त सेंद्रिय पदार्थ कुजत असतां हा वायू उत्पन्न होतो.

हा वायु रंगहीन असून त्याला अतिशय वाईट घाण येते. तो फार विषारी आहे. त्याच्या ज्वलनापासून गंधकद्विप्राणिद व पाणी हे पदार्थ तयार होतात. तो पाण्यांत अल्प प्रमाणांत द्रवतो व द्रावणाची प्रतिक्रिया अम्लासारखी असते. नैलादि उपधातू व निविष्ट गंधकिकाम्ल यांच्या योगानें त्याचें विघटन होतें. तो पुष्कळ धातूंशीं संयोग पावून गंधकिदें तयार होतात. तो धातव लवणांचेंहि विघटन करतो; या गुणामुळें रासायनिक पृथक्करणांत त्याचा फार उपयोग होतो. संस्कारक (रिड्यूसिंग एजंट)म्हणूनहि याचा वारंवार उपयोग केला जातो. प्राणिदीकारकांचा यावर ताबडतोब परिणाम होऊन पाणी व गंधक हे पदार्थ मिळतात.

याची गंधकद्विप्राणिद(ग, $अ_2$), गंधकत्रिप्राणिद (ग $अ_3$) इत्यादि प्राणिदें होतात. द्विप्राणिद पुष्कळ दिवसांपासून माहीत असून ज्वालामुखींतून निघणाऱ्या वायुरूप पदार्थांत सांपडतें. हवेंत किंवा प्राणवायूंत गंधक जाळला असतां किंवा कित्येक धातवप्राणिंद भाजलीं असतां हा वायु तयार होतो. तो रंगहीन असून त्याच्या योगानें मनुष्य गुदमरून जातो. तो स्वतः जळत नाहीं. व इतर पदार्थांच्या ज्वलनक्रियेला मदत करीत नाहीं. तो पाण्यांत व मद्याकांत (अल्कहलमध्यें) द्रवतो. द्रावणाची प्रतिक्रिया अम्लासारखी असते. प्रखर प्रकाशानें किंवा उष्णतेनें त्याचें विघटन होतें. पाण्याबरोबर याचा कित्येक वेळां विरंजक (ब्लीचिंग एजंट) निर्वर्णक म्हणून उपयोग करितात. व पुष्कळ वेळां (अम्लाबरोबर) त्याची क्रिया संस्कारकासारखी असते. उदाहरणार्थ याच्या योगानें परमंगलितानें (परमँगनेट) संस्करण होऊन मम्रसक्षार तयार होतात.

गंधकाम्लाकरितां, हार्ग्रीवच्या पद्धतीनें सिंधुगंधकित तयार करण्याकरितां व विरंजक, कृमिघ्न आणि नासूं न देणारा पदार्थ म्हणून उपयोगांत आणण्याकरितां हा वायु औद्योगिक प्रमाणावर तयार केला जातो. पदार्थ नासूं नयेत म्हणून थंड करण्याकरितां व हा अदाह्य असून ज्वलनक्रियेला मदत करीत नाहीं म्हणून आग विझविण्याकरितां दाबलेल्या वायूचा उपयोग करितात. ह्या वायूच्या पाण्यांतील द्रावणाला गंधकसाम्ल म्हणतात. त्याच्या अंगीं संस्कारक गुण आहेत. व हवेंत त्याचें हळू हळू प्राणिदिकरण होऊन गंधकाम्ल बनतें. याचे पुष्कळ क्षार माहीत आहेत.

त्रिप्राणिदः—(ग$अ_3$) सधूमगंधकाम्ल किंवा निविष्टगंधकाम्ल यांचें स्फुरपंचप्राणिदासह ऊर्ध्वपातन केल्यास अथव प्लातिनयुक्त असबस्टासारख्या एखाद्या सान्निध्यविकारी पदार्थाच्या सानिध्यांत, गंधकद्विप्राणिद व प्राण यांचा संयोग झाला असतां गंधकत्रिप्राणिद तयार होतें. पाण्याशीं त्याचा फार जलद संयोग होऊन गंधकाम्ल बनतें. त्यावेळीं उष्णता बरीच उत्पन्न होते. त्याचा गंधकाम्लाशीं प्रत्यक्ष संयोग होऊन तिग्मगंधकाम्ल तयार होतें. सेंद्रिय संयुक्त पदार्थांवर त्याची क्रिया फार जोरानें होऊन त्यांतील पाणी निघून जातें. पुष्कळ मूलद्रव्यांशीं आणि संयुक्त पदार्थांशीं त्याचा प्रत्यक्ष संयोग होतो; व कित्येक वेळा त्याची क्रिया बलवान अम्लजनीकारकाप्रमाणें असते. रंगाच्या कारखान्यांत याचा उपयोग होतो.

गंधकयुक्त गंधकाम्लः–($उ_2 ग_2 उ_3$) हें अम्ल स्वतंत्र स्वरूपांत करतां येत नाहीं. कारण त्याचें विघटन होतें. परंतु त्याचे क्षार स्थिर असून विशेषतः सिंधु क्षारांचा प्रकाशलेखनाकडे (फोटोग्राफीकरितां) फार उपयोग होतो. गंधकाच्या फुलाचें सिंधुगंधकाथितावरोबर पचन केलें असतां किंवा चुन्याच्या निवळीबरोबर गंधक उकळला असतां हा क्षार मिळतो. खनिज अम्लांच्या योगानें याचें ताबडतोब विघटन होऊन गंधकद्विप्राणिद निघून जातो व गंधक सांक्याच्या रूपानें खालीं पडतो. त्यांपासून पुष्कळ क्षार तयार होतात; व लोहिकहरिदाच्या द्रावणाबरोबर मिश्रण केल्यास त्यांचा रंग जांभळा होतो. मिश्रण कांहीं वेळ तसेंच ठेवल्यावर गंधकाचा सांका पडून रंग नाहींसा होतो.

नैसर्गिक गंधक व धातव गंधकिदें यांचा निरनिराळीं औषधें करण्याकडे उपयोग होतो. त्वग्रोगांवर गंधकाचा बाह्यतः उपयोग होतो. गंधकाच्या नुसत्या पुडीचा कातडीवर कांहींच परिणाम होत नाहीं; परंतु मलमांत औषधी गुण

पुष्कळ आहेत. खरजेवर यापासून फार गुण येतो. पोटांत घेतल्यास गंधक हें सौम्य रेचक आहे. यकृताचा संकुचितपणा, संधिवात व मुतखडा (किंवा सिकता) यांवर गंधकयुक्त पाण्याचा चांगला उपयोग होतो. धाकट्या श्वासनलिकेसंबंधीं फार दिवसांच्या जुन्या विकारांवरहि गंधक उपयोगी आहे. फार दिवसांच्या संधिवातावर गंधकाचें पाणी पोटांत घेतल्यास किंवा अंघोळीकरितां वापरल्यास चांगला परिणाम होतो. हवेंत किंवा अम्लजनांत गंधक जाळला असतां उत्पन्न होणारें गंधक ध्याम्लजिद, बलवान, कृमिघ्न आहे. याकरितां संसर्गजन्य रोगाच्या माणसांनीं वापरलेल्या खोलींत गंधकाचा धूर करतात.

गधका—मुंबई इलाख्यांतील काठेवाडमधील एक संस्थान. हा एक स्वतंत्र खंडणी देणारा तालुका असून राजकोट हद्दींतला भायाद आहे. यांत सहा गांवें आहेत.

गंधकाम्ल—हें सर्व औद्योगिक देशांत मोठ्या प्रमाणावर तयार केलें जात असून, त्याचा उपयोगहि पुष्कळ निरनिराळ्या कामांकडे होत असल्यामुळें सर्व रासायनिक द्रव्यांत तें अत्यंत महत्वाचें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तें निसर्गतः स्वतंत्र स्वरूपांत फारसें सांपडत नाहीं; व जरी याचे क्षार, विशेषतः खट व भार गंधकितें पुष्कळ ठिकाणीं बऱ्याच प्रमाणांत आढळतात, तरी स्वतंत्र अम्ल त्यांपासून केव्हांहि तयार करीत नाहींत. कारण, गंधक किंवा गंधकिदें जाळून तयार झालेल्या गंधकद्विप्राणिदाचा प्राणःबरोबर (व पाण्याबरोबर) संयोग केला असतां हें अम्ल फारच सुलभतेनें प्राप्त होतें. पूर्वी तुरटी, मोरचूद किंवा दुसरें एखादें गंधकित तापवून गंधकाम्ल तयार करीत. किमयागार लोकांनां त्याचा फार उपयोग होत असे. गंधकप्राणिद पाण्यांत मिळविलें असतां, गंधकप्राणिदाच्या जलयुक्त द्रावणाचें सावकाश प्राणिदीकरण झालें असतां, किंवा गंधक व सोरा यांचें मिश्रण कांचेच्या बरण्यांत जाळून व निघणारा धूर पाण्यांत शोषून घेऊन तें द्रावण निविष्ट केलें असतां सामान्य गंधकाम्ल, $उ_२ ग प्र_४$, तयार होतें (शेवटल्या रीतीला बेसिल व्हॅलेंटाईनची रीत असें म्हणत). डॉ. जॉन रूबेक यानें कांचेच्या बरण्यांऐवजीं शिशाच्या बरण्या वापरून अर्वाचीन कृतीचा पाया घातला.

गु ण ध र्म.—शुद्ध गंधकाम्ल ($उ_२ ग प्र_४$) हें रंग व वासरहित तेलासारखें द्रव असून १५° ला त्याचें विशिष्ट गुरुत्व १.८ असतें. तें ३३८° ला उकळतें, १०° ला तें गोठतें व त्याचा रंगहीन स्फटिकाकार गोळा होतो. तें फार आर्द्रताग्राही असून वातावरणांतील ओलावा फार जलद शोषून घेतें. यास्तव त्याचा शोषक म्हणून फार उपयोग केला जातो. तीव्र गंधकाम्लांत पाणी मिळविलें असतां पुष्कळ उष्णता उत्पन्न होते. चार भाग अम्लांत एक भाग पाणी मिळविलें असतां मिळणाऱ्या उष्णतेनें ०° पासून १००° पर्यंत उष्णमान चढतें (याचकरितां प्रयोगशाळेंत, अम्लांत पाणी न घालतां पाण्यांत अम्ल घालण्याची खबरदारी नेहमीं घेतली जाते). उष्णतेच्या उद्भवाखेरीज त्याचें आकारमानहि कमी होतें.

प्र ति क्रि याः—सर्व रासायनिक क्रियाकारकांत गंधकाम्लाचा व्यापारदृष्ट्या पुष्कळ उपयोग होतो. व्यापारी दृष्ट्या उपयुक्त अशाच प्रतिक्रिया येथें दिल्या आहेत. निरिंद्रिय रसायनांत त्याचा मुख्य उपयोग, त्याची धातू द्रवविण्याची शक्ति व इतर अम्लांच्या क्षारांतून तीं अम्लें काढून टाकण्याची शक्ती या दोन गुणांवर अवलंबून आहे. लोखंड किंवा जस्त आणि पातळ गंधकाम्ल, यांपासून विमानें भरण्याकरितां, जाळण्याकरितां, किंवा संस्करण करण्याकरितां लागणारा उज्ज तयार करतात. बहुतेक धातू थंड व पातळ गंधकाम्लांत द्रवतात; आणि उज्ज मोकळा होतो. परंतु, तांबें, पारा, ॲन्टिमनी, कथील, शिसें व रुपें ह्या धातू फक्त तीव्र व उष्ण अम्लांत द्रवतात; आणि त्यांपासून गंधकद्विप्राणिद मिळतें. उज्जहरत, उज्जस्तम्भ, उज्जशद, उज्जप्लव, नत्रक, स्फुर व दुसरीं पुष्कळ अम्लें, त्यांच्या क्षारांवर गंधकाम्लाची क्रिया करून तयार करतात. अल्क, हर आणि स्तम्भ व नैल यांच्या कारखान्यांत ह्या अम्लाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो.

गंधकाम्लाची पाण्यासंबंधीं रासायनिक प्रीति फार आहे. या गुणामुळें सेंद्रिय रसायनांतहि या अम्लाचा फार उपयोग होतो.

गंधकाम्ल हें द्विभस्मिक असल्यामुळें एकशक्तिक धातूबरोबर अम्ल गंधकितें व सामान्य गंधकितें असें दोन प्रकारचे क्षार बनतात. सामान्य गंधकितें महत्वाचीं असून खनिज सृष्टींत पुष्कळ प्रमाणावर आढळतात; उदा. अनार्द्र (अनाह्यड्राइट). कर्पूर शिलाजीत (जिप्सम), भारितें (बेराइटस), सेलेस्टाइट, व कायसेराइट सामान्यतः गंधकितें पाण्यांत विरघळतात व त्याचे चांगले स्फटिक बनतात; भार, स्वांत, व खट यांचीं गंधकितें पाण्यांत अद्राव्य आहेत. शिशाचें गंधकित पाण्यांत अत्यल्प द्रवतें. तीव्र गंधकाम्लांत द्रवतें आणि मद्यसारांत बहुतेक मुळींच द्रवत नाहीं.

सिंधुकर्बितमिश्रित क्षार (गंधकित) कोळशावर संस्कारक ज्वालेनें तापविल्यास सिंधुगंधकित तयार होतें; तें चांदीच्या तुकड्यावर ठेवून भिजविल्यास चांदीवर काळा डाग पडतो. या क्रियेनें गंधकितांचें अस्तित्व शोधून काढतां येतें. द्रावणांत तें शोधून काढण्याकरितां भारगंधकिताचा सांका पाडतात. तो पाण्यांत व सर्वसामान्य प्रतिकारकांत अद्रावणीय आहे.

बाहेरून लाविलें असतां गंधकाम्ल हें फार दाहक आहे. त्याच्या योगानें वल्काचा गोळा होतो अल्काच्या योगानें विषप्रयोग झाल्यास त्यावर उतार म्हणून

पातळ गंधकाम्लाचा उपयोग करतात. हें व सुगंधी द्रावण हीं दोन्हीं स्तंभक असल्या कारणानें विशेष दुःसाध्य अशा अतिसारावर उपयोगी आहेत. शिशाच्या कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांनां रोगप्रतिबंधक म्हणून व शिशानें विषप्रयोग झाल्यास उतार म्हणून थोड्या प्रमाणांत हें अम्ल दिलें जातें. त्यायोगें शिशाचे अद्रावणीय व म्हणून निरुपद्रवी असे गंधकित तयार होतात. क्षयी रोग्याच्या अंगाला रात्रीं येणारा घाम बंद करण्याकरितां गंधकाम्लाच्या अतिशय पातळ द्रावणानें अंग पुसून काढतात.

गंधकाम्ल जास्त प्रमाणांत पोटांत गेल्यास आंतड्यांचा दाह होऊन तोंडापासून पोटापर्यंत भाजल्यासारख्या वेदना होतात व वांत्या होऊन श्लेष्मल व कॉफीच्या रंगाचे पदार्थ बाहेर पडतात. या विषाचे परिणाम इतक्या जलद होतात कीं मरण एक दोन तासांतहि येण्याचा संभव असतो. चहाचा अर्धा चमचा तीव्र अम्ल पोटांत जाऊनहि मुलें मेलेलीं आहेत; परंतु अर्धा औंस अम्ल घेऊनहि वांचल्याचीं उदाहरणें आहेत. या विषावर उपचार म्हणजे त्याला शिथिल करण्याकरितां खडू, मॅग्नेशिया, साबण किंवा जो मिळेल तो अल्क पदार्थ ताबडतोब देणें हा होय. वांतिकारक औषध किंवा पोटाचा पंप यांचा उपयोग बिलकूल करूं नये. वेदना कमी करण्याकरितां अफूचा सत्वांश द्यावा. या अम्लानें विषप्रयोग झालेल्यापैकीं शें. ६० ते ७० लोक वाचत नाहींत. मृत्यूनंतर सर्व चिन्हें दाहक विषासारखीं दिसतात. अम्लाच्या दाहकगुणामुळें गालाची त्वचा करडी, पिंगट किंवा काळी होते.

गंधकिलाम्ल—(सल्फोनिक ॲसिड्स) सेंद्रिय रसायनशास्त्रांत इ.गप्र$_{३}$उ या घटनेच्या संयुक्त पदार्थांचा एक समूह आहे. या सारणींत इ = उत्कर्बिल किंवा आर्यिल (ॲरिल) मूलक समजावा.

च र्बी व र्गी ती ल गं ध कि ला म्लें (ॲलिफॅथिक सल्फोनिक ॲसिड्स).—या वर्गांतील हे पदार्थ कांहीं अस्नेहिन(पॅरॉफिन) वर गंधकिलीकरण (सल्फोनेशन) केल्यानें तयार होतात; तसेंच रसबंधकांवर (मरक्याप्टनस्) तीव्र नत्राम्लानें प्राणिदीकरणाची क्रिया (ऑक्सिडेशन) केली म्हणजे हे पदार्थ तयार होतात. हे निर्वर्ण तैलरूप किंवा स्फटिकरूप पदार्थ असून ते अत्यंत आर्द्रताशोषक असतात. हे पाण्यांत अतिविद्राव्य असून त्यांच्या अंगीं तीव्र अम्लधर्म (ॲसिड रिॲक्शन) असतो. जलयुक्त अल्क किंवा अम्ल यांबरोबर हीं उष्ण केलीं असतां तीं स्थिर रहातात, त्याचप्रमाणें तीव्र नत्राम्लाचीहि त्यांजवर कांहींहि क्रिया घडत नाहीं. स्फुरपंचहरिदानें (फास्फोरस पेन्टाक्लोराईड) त्यांचें रूपांतर अम्लहरिदांत (ॲसिड क्लोराइड्स) इ. गप्र$_{२}$ह होतें.

गं ध व र्गी ती ल (ॲरोमॅटिक) गं ध कि ला म्लें:—या वर्गांतील गंधकिलाम्लाचें साधर्म्य चर्बी वर्गातील गंधकिलाम्लांशीं असतें. हीं अम्लें—बहुतकरून गंधवर्गातील उत्कर्बें (हायड्रोकार्बन)—तीव्र गंधकाम्लाबरोबर उष्ण केलीं म्हणजे तयार होतात. या गंधकाम्लाऐवजीं कधीं कधीं धूम्रभावी (फ्यूमिंग) गंधकाम्लाची योजना करावी लागते. गंधकाम्लाची क्रिया पूर्ण झाली म्हणजे हीं अम्लें बहुतकरून त्यांत मीठ संपृक्त करून लवणक्रियेनें (सॉल्टेड आउट) निराळीं करतात. यांत अम्लें सिंधुक्षाराच्या रूपानें निराळीं होतात. गंधकिलभानलांचें(थियोफिनोल्स) गंधकसाम्लानें(सल्फ्यूरस ॲसिड)प्राणिदीकरण केलें म्हणजे किंवा गंधकसाम्लानें (सल्फ्युरस ॲसिड) द्यजीवीक्षारा (डाय ॲझोनियम) च्या पृथक्करणानें हीं अम्लें तयार होतात. असंयुक्त स्थितींत गंधकिलाम्लें (सल्फोनिक ॲसिड्स) बहुधा आर्द्रताशोषक, स्फटिकरूप, घन असतात व तीं पाण्यांत सहज विद्रुत होतात. तीव्र उद्धराम्लाबरोबर दाबाखालीं तीं १५०° उष्णमानावर उष्ण केलीं असतां बहुतकरून पृथग्भूत होऊन त्यांतील उत्कर्ब व गंधकाम्ल हीं निरनिराळीं होतात. क्षारांचें बहुधा चांगले स्फाटिक होतात. या अम्लांच्या अल्क धातूंच्या क्षारांचा उपयोग भानलें (फिनोल्स) तयार करण्याकडे करतात. हे क्षार दाहक अल्कांशीं उष्ण केले म्हणजे त्यांतील गंधकिलाम्लांचें रूपांतर भानलांत (फिनोलांत) होतें. पालाश कर्विदांबरोबर (पोट्याशिअम सायनाईड) या क्षारांचें पातन केलें म्हणजे त्यांपासून गंध वर्गांतील नत्रायिलें (नायट्राइल्स)तयार होतात. या वर्गांतील गंधकिलाम्लाचें स्फुरपंचहरिदानें (फास्फोरस पेन्टा क्लोराइड्स) रूपांतर गंधकसिल हरिदांत (सल्फोक्लोराइड्स) होतें. हीं गंधकिल हरिदें थंड पाण्यांत स्थिर असतात. अम्लक्रियेनें (ॲक्शन ऑफ अमोनिया) गंधकासिल अमिदें (सल्फोन–अमाईड्स) इ.गप्र$_{२}$.नउ तयार होतात. अल्कहलाच्या क्रियेनें गंधकिलाम्लांचीं संयुक्त इष्में (ईस्टर्स) तयार होतात.

ऊदिन गंधकिलाम्ल(बेंझिन सल्फोनिक ॲसिड) हें क$_{६}$उ$_{५}$.गप्र$_{३}$उ.१$\frac{१}{२}$उ$_{२}$प्र या घटनेचें असतें. याचे लहान चपटे पत्र्यासारखे चांगले स्फटिक होतात. हे फार आर्द्रताशोषक असतात. ऊदिन गंधकसिल हरिद क$_{६}$उ$_{५}$गप्र$_{२}$ह हा निर्वर्ण धूम्रभावी व रसरूप पदार्थ आहे. याचा उत्क्वथनबिंदु १२०° आहे. अमिन ऊदिन गंधकिलाम्लें (अमिनो बेंन्झिन सल्फोनिक ॲसिड्स) याचे मुख्यत्वेंकरून मित (मेटा) आणि पर (पॅरा)संयुक्त पदार्थ हे अत्यंत उपयुक्त पदार्थ आहेत. कारण यांचा उपयोग रंग तयार करण्याच्या कामीं फार होतो.

नीलीन (अनिलीन) चे साक्षात् गंधकिलीकरण केलें म्हणजे पर अम्ल (पॅराॲसिड), गंधकसिल अम्ल (सल्फॲनिलिक ॲसिड) क$_{६}$उ$_{४}$(नउ$_{२}$) (गप्र$_{३}$उ) हें अम्ल तयार होतें. याचे लहान चपटे स्फटिक असतात, व ते थंड पाण्यांत ईषद्विद्राव्य असतात. दाहक पालाशबरोबर हे वितळविले असतां त्यापासून नीलिन (अनिलीन) तयार होतें. आणि क्रुमाम्लानें (क्रोमिक ॲसिड) प्राणिदीकरण

केलें असतां उद्दोकिनन (बेंझोक्विनोन) तयार होतें. घटनेच्या दृष्टीनें पहतां यास चक्रवलयित (सायक्लिक) अमोनिक्षार पुढें दिल्याप्रमाणें समजतात:—

$$क_{६}उ_{४}<^{नऊ_{३}}_{गप्र_{३}}>$$

अम्लद्रवांत याचें द्विअजीवीकरण (डाय अॅझोटाइझ्ड) केलें आणि द्विमथील नीलीन (डाय मेथिल अनिलीन) शीं संयुक्त केलें म्हणजे त्यापासून "ट्रेलिअनथाइन" तयार होतो. हा सिंधुक्षारसूचक (इंडिकेटर) म्हणून वापरतात.

मितनीलिनाम्ल (मेटा अनीलिक अॅसिड) $क_{६}उ_{४}$ ($नउ_{२}$) ($गप्र_{३}उ$) (१:३) हें मित नत्रिलऊदिन (मेटा नायट्रोबेंझिन) गंधकिलाम्ला (सल्फोनिक अॅसिड) चें उज्जिदीकरण (रिडक्शन) केलें म्हणजे तयार होतें. याचे चतुष्कोणी स्फटिक असतात. याचा उपयोग विविध तऱ्हेचे अजीवि (अॅझो) रंग तयार करण्याकडे होतो.

गंधकसिलाम्ल (सल्फिनिक अॅसिड) याची घटना ह्मीं.गप्र $_{२}$उ अशी असते. गंधकिल हरिदांचे (सल्फो क्लोराइड्स) जशद(जस्त)चूर्णानें उज्जीकरण (रिडक्शन) केलें म्हणजे हीं अम्लें तयार होतात. हीं अम्लें असंयुक्त स्थितींत फार अस्थिर असतात. यांचें प्राणिदीकरण सहज होतें व त्यांचें रूपांतर गंधकिलाम्लांत होतें. उज्जीदीकरणानें रसबंधकांत (मरकॅप्टन) रूपांतर होतें.

गंधकिसल (सल्फोनल)—हा दारन (अॅसिटोन) द्विइथिल (डायएथिल) गंधकन (सल्फोन) ($कउ_{३}$)$_{२}$क ($गप्र_{२}$ $क_{२}उ_{५}$)$_{२}$आहे. हा अतिशय उपयुक्त, गुंगी आणणारा पदार्थ आहे. दारन(अॅसिटोन)चें घनीकरण (कंडेन्सेशन) इथिल रसबंधकाशीं (एथिल मरक्याप्टन) उज्जहराम्लाच्या (हायड्रोक्लोरिक अॅसिड) सान्निध्यांत केलें म्हणजे रसबंधल (मरकॅप्टोल) ($कउ_{३}$)$_{२}$क($गक_{२}उ_{५}$)$_{२}$ तयार होतो. नंतर त्याचे पालाश परिमंगलितानें (पोटयाशिअम परम्यांगनेट) प्राणिदीकरण करावें.

याचे चतुष्कोणी स्फटिक होतात. ते १२५° श वर वितळतात. हे थंड पाण्यांत बहुतेक अविद्राव्य असतात. परंतु १५ पट गरम पाण्यांत विद्रुत होतात. तसेंच ते अल्कहल व इथ्र यांतहि विद्रुत होतात.

यास अम्लऔषधीशास्त्रांत "सल्फोनॅलुम" व अमेरिकेंत "सल्फो मेथानुम" असें म्हणतात. निद्रानाशाच्या रोगांत यानें चांगली निद्रा येते. त्याच प्रमाणें वेडांत हें अत्युपयोगी आहे. बाभळीच्या डिंकाबरोबर हें औषध देतात किंवा ऊन पाण्यांत देतात. याची गुंगी आणण्याची शक्ति हरल (क्लोरल) इतकी नाहीं हें खरें, परंतु याच्या योगानें हृदयाची क्रिया मंद पडत नाहीं व श्वासोच्छ्वास क्रियेसहि अवरोध होत नाहीं. परंतु याची क्रिया फार सावकाश होते. हें झोपेच्या वेळीं घेतल्यानें तावडतोब झोंप येत नाहीं. कधीं कधीं दुसऱ्या दिवशींहि झोंप येते. हें लागोपाठ सतत घेणें हितकारक नाहीं.

गंधमादन.—मेरुपर्वताच्या पश्चिमेकडील पर्वत. हा दक्षिणोत्तर असून नील आणि निषध या दोन पर्वतांस क्रमानें स्पर्शून आहे.याच्या आणि पश्चिम समुद्राच्या मधील प्रदेशास भद्राश्ववर्ष असें नांव आहे. [भाग. स्कं.५.अ. १६].

(२) हिमालयाच्या एका शिखराचें नांव. युधिष्ठिर वनवासांत असतां येथें कांहीं काळ रहात असे. इंद्रलोकीं अर्जुन गेलेला परत आला असतां येथेंच युधिष्ठिरास येऊन भेटला होता. [भार. वन अ. १५८].

गंधमाळी—थानापत्ती; यांची मुख्य वस्ती बिहार ओरिसांत पांच सहा हजारांपर्यंत आहे. संबळपूर व उडिया संस्थानांत हे महादेवाच्या मंदिरांमधील पुजारी लोक आहेत. हे मूळचे माळी असून महादेवाच्या मंदिरांत काम करतात म्हणून यांचा निराळा वर्ग झाला आहे. हे आपला रजपुतांशीं संबंध जोडतात व जानवें घालतात व स्वतःस थानापत्ती म्हणवून घेतात. थानापत्ती आतां गंधमाळी वर्गाशीं लग्नसंबंध करूं नये अशी प्रवृत्ती दाखवूं लागले आहेत. यांच्यांत पुजारी, बांधादिया, मुंडझूल व सोमलाई असे वर्ग बनत आहेत. सोमलाईच्या आंगांत देवी येते व तो बळी घेत असतांना आंगांतील देवीच्या शक्तीनें बकऱ्याचें ताजें रक्त पितो. यांच्यांत सवर्ग लग्न होत नाहीं. वधू बोहल्याजवळ आली म्हणजे ती वराच्या गळ्यांत माळ घालते.कारण फुलमाळ्यांचा हा मुख्य धंदाच होता. ऋतुप्राप्तीच्या पूर्वी मुलींचें लग्न करतात. वर न मिळाला तर थानापत्ती लोक तिचें खोटें लग्न तिच्या मातामहाबरोबर किंवा बहीणीच्या नवऱ्याबरोवर किंवा झाडाबरोबर करतात. मग तो काडी मोडतो व ती विधवा होऊन पुन्हां कोणाशीं तरी संबंध करते. हे शैव आहेत, नागाची पूजा करतात, प्रेतें जाळतात व पुरतातहि. हे मांस खातात पण मद्य पीत नाहींत. हे श्राद्धें करतात. ब्राह्मण यांच्या हातचें पाणी पितात. [रसेल व हिरालाल].

गंधर्व—ही एक देवयोनि होती अशी समजूत आहे. यांचें ऋग्वेदांत कांहीं वर्णन आलें आहे तें वेदविद्या या विभागांत दिलें आहे (पृ. ३४२). अथर्ववेदांत अप्सरा व गंधर्व हे मनुष्यास भुरळ घालून वगैरे उपद्रव करतात, तो नाहींसा व्हावा म्हणून कांहीं मंत्रतंत्र दिले आहेत, त्यांचा उल्लेखहि वेदविद्या या भागांत (पृ. ५८) केला आहे. शिवाय गंधर्व व अप्सरावाचक शब्द व त्यांवरील टीपा बुद्धपूर्वजग या विभागांत वेदकालीन शब्दसृष्टीमध्यें (पृ. १६८) दिल्या आहेत. ऋग्वेदकालांतच गंधर्व ही जात काल्पनिक असावी अशी समजूत व्यक्त होते. गंधर्वांचा सोमाशीं संबंध जोडला आहे विवाहमंत्रांतहि वधू ही सोमापासून गंधर्वास गंधर्वापासून अग्नीस व अग्नीपासून चवथ्या वेळेस मनुष्यास प्राप्त होते असें म्हटलें आहे. गंधर्वांबद्दलची कल्पना इण्डो इराणी

काळाइतकी तरी जुनी दिसते. कारण अवेस्तामध्यें गंद्रेव याचा उल्लेख असून तो राक्षस होता व त्याला केरशास्प यानें मऊ दिवस युद्ध करून नंतर ठार मारलें असें म्हटलें आहे. रा. वि. का. राजवाडे गांधार देशाचा गंधर्वांशीं संबंध जोडूं पहातात, पण गंधर्व हा शब्द इंडोइराणी कालाइतका जुना असून गांधार शब्द बराच अर्वाचीन दिसतो. त्यामुळें हा संबंध सयुक्तिक दिसत नाहीं. रामायण, महाभारत व पुराणें यांमधून गंधर्वांबद्दलचे अनेक उल्लेख आढळतात. महाभारतामध्यें घोषयात्राप्रसंगीं चित्रसेनगंधर्वानें दुर्योधनाचा पराभव करून त्यास बद्ध केल्याचें व पांडवांनीं सोडविल्याचें वर्णन आहे. यानें अर्जुनास गान्धर्वविद्या दिली. अर्जुनाला चित्ररथगंधर्वापासून चाक्षुषी विद्या व संमोहनास्त्र प्राप्त झालें होतें व त्यानें अर्जुनास राजसूय यज्ञाकरिता घोडे दिले होते. कादंबरी व महाश्वेता या गंधर्वकन्या म्हणूनन वर्णन केल्या आहेत. अनेक गंधर्वांबद्दल ते ऋषिशापानें राक्षस अगर अन्य प्राणी झाल्याचीं वर्णनें पुराणांतून अनेक ठिकाणीं आढळतात. गंधर्वांबद्दल अनेक विचित्र वर्णनेंहि आढळतात. त्यांस पंख असून ते आकाशांत दृश्य अगर अदृश्य रूपानें संचार करतात, ते विमानांत बसून इतस्ततः संचार करितात, ते शरीरानें सुंदर व गायनवादन कलेंत निपुण असून इन्द्राच्या सभेंत त्यांच्याकडे गाण्याचें व वाजविण्याचें काम असल्याबद्दलहि वर्णन आढळतें. यांच्या स्त्रियांस अप्सरा असें नांव आहे (अप्सरा पहा). त्याहि गीत, नृत्यवाद्य इत्यादि कलांत कुशल असून रूपानें सुंदर असल्यामुळें मनुष्यांस मोह पाडतात व स्वर्गांत पुण्यवान पुरुषांचा यांच्याशीं समागम होतो असें वर्णन आढळतें. पुरूरवा व उर्वशी यांचा प्रेमसंबंध गंधर्वांस पसंत नसल्यामुळें त्यांनीं त्याचा व्रतभंग करून ऊर्वशीस पळवून नेल्याची संपूर्ण कथा शतपथ ब्राह्मणांत असून कथासूत्र ऋग्वेदांतहि आढळतें. पुराणांत विशेष आढळणारीं गंधर्वांचीं नांवें म्हणजे, अंगारपर्ण उर्फ चित्ररथ, विश्वावसु, चित्रांगद, चित्रसेन,हाहा, हूहू हीं होत. सामवेदाचा गांधर्ववेद अथवा गायनविद्या हा उपवेद मानला जातो. व गायन ही गंधर्वांची विद्या समजली जाते. अद्यापहि भरतखंडांत गायनावर उपजीविका करणारी गंधर्व या नांवाची एक जात आढळते.

जा त.—संयुक्तप्रांतांत बनारस, अलाहाबाद व गाझीपूर या भागांत गंधर्वजातीची अल्पशी संख्या असून ते लोक स्वतःस 'राई' म्हणवितात. अराख, सितळ, रामसी, शाहिमल, हिवान, पंचमैया, व उधोमन अशीं त्यांचीं समगोत्रें आहेत. त्यांच्यांत सगोत्रविवाह होत नसून बालविवाह रूढ आहे. इतर जातींच्या लोकांनां त्यांच्या जातींत घेत नाहींत. विधवाविवाहास मनाई असून बहुपत्नीत्व रूढ आहे. लग्नासंबंधी सर्व तंट्यांचा पंचायतीपुढें निवाडा करण्यांत येतो. बहिष्कृत स्त्रीस पुनर्विवाहाची मनाई असते. गंधर्व ही एक गाण्याचा धंदा करणाऱ्यांची व वेश्यांची जात आहे. या जातींत गाण्याकडे कल असलेल्या व सुंदर अशा मुलींचीं लग्नें न करितां त्यांस वेश्यांचा धंदा करण्याकरितां राखून ठेवण्यांत येतें. ज्ञातिच्या लोकांकडून अशा मुलीं वेश्या म्हणून ठरविल्या जातात व प्रथम एखाद्या हिंदु पुरुषाबरोबर त्याचे लग्नासारखे समारंभ व संस्कार करण्यांत येतात. या लोकांत हिंदु वारसाचा कायदा पाळला जातो व गृहस्थकुटुंबांतील मुलींनां वारसाहक्क प्राप्त होत नाहीं. परंतु नर्तकीवर्गांत मुलगी व मुलगा यांचे समानहक्क असून एखादी नर्तकी मयत झाल्यास तिच्या इस्टेटीचा समान हक्क तिच्या सख्या नातेवाहकास प्राप्त होतो. मद्रास व पश्चिमहिंदुस्थान येथील नर्तकीवर्गांत अशी चाल आहे कीं, नर्तकी मुलगी तिच्या आईचा धंदा चालविण्यास दत्तक घेतली जाते; व ती दत्तक घेणाऱ्या बाईच्या इस्टेटीचा वारसदारणिहि ठरते. गंधर्व हे वैष्णव धर्माचे आहेत. विवाहित स्त्रिया महादेवाची उपासना करितात व नर्तकीवर्ग गणेशाची पूजा करितो. ठाकूर देवतेचीहि गंधर्व हे पूजा करितात. या देवतांनां समर्पिलेला नैवेद्य बहुधा पंड्याकडे जातो. बाबा किन्नाराम म्हणून एक यतीहि पूज्य मानला जातो. बनारस जिल्ह्यांत रामगड येथें त्याचें स्थान आहे. गंधर्वांचे सर्व समारंभ ब्राह्मणकांडून होतात. त्यांचा मुख्य धंदा गाणें व नाचणें हाच होय. बनारस जिल्ह्यांत कित्येक गंधर्व शेती करून आहेत व खसखसीची लागवड करणें हाहि त्यांचा आवडता धंदा आहे. गंधर्व लोक मद्यमांसाशन करितात.

मुंबई इलाख्यांत गंध्रप अगर गवई बहुतेक सर्व दक्षिणगुजराथ प्रांतांत राहतात. ते तेथें उत्तरेकडून आले असून, आपण चित्रोद शाखेचे नागर ब्राह्मण असल्याचें ते सांगतात. पुरुषांच्या लांब सोंगे सोडलेल्या पागोट्यावरून व स्त्रियांच्या पोशाखांवरून ते पूर्वी उत्तरेकडे रहात असावेत असें कळून येतें. गंध्रप स्त्रीपुरुप सुंदर असतात. ते मांसमच्छर खात नाहींत व दारू पीत नाहींत पण त्यांच्यांत तंबाकू व तपकीर ओढण्याचें व्यसन फार आहे. ते अनेक वाद्यें वाजविण्यांत निष्णात असतात, व सर्व प्रकारच्या नाचांत नर्तकींनां साथ करतात. ते यज्ञोपवीत धारण करतात. औदीच ब्राह्मण हे त्यांचे उपाध्याय आहेत. त्यांचें मौंजीबंधन, लग्न, व जातक आणि अंत्यकर्म हे विधी ब्राह्मणांच्या विधींसारखेच असतात. त्यांची लोकसंख्या फार लहान असल्यामुळें त्यांच्यांत भावाभावांच्या व बहिणी बहिणींच्या मुलांत विवाहसंबंध होऊं शकतो. घटस्फोट व विधवाविवाह त्यांच्यांत होत नाहींत; ते सर्व हिंदू देवांना मानतात. त्यांच्यापैकीं कांहीं शैव आहेत व कांहीं वैष्णव आहेत. [क्रूक; मुं. गॅ.].

गंधर्वगड किल्ला—मुंबई इलाखा. बेळगांव जिल्हा. बेळगांवच्या पश्चिमेस सुमारें २१ मैलांवर पायथ्यापासून ४०० फूट उंचीवर हा एक किल्ला आहे. किल्ल्याचें क्षेत्रफळ सुमारें १००० फूट चौरस असून किल्ला इ. स. १७२४ सालीं सावंत

वाडीच्या फोंड सांवताचा मुलगा नाग सांवत यानें बांधला. हल्लीं किल्ला पडक्या स्थितींत आहे. इ. स. १७७८ सालीं कोल्हापूर सरकारनें हा किल्ला सर केला होता. परंतु इ. स. १७९३ सालीं शिंद्यांचें वजन पडल्यामुळें तो परत सांवतवाडीकरास देणें भाग पडलें. इ. स. १७८७ सालीं नेसरगीच्या सरदारानें कोल्हापूर सरकारविरुद्ध बंड केलें होतें. त्यावेळीं त्यानें इतर किल्ल्यांबरोबर हाहि किल्ला सर केला होता, परंतु लवकरच या बंडाचा मोड करण्यांत आल्यामुळें किल्ला परत कोल्हापुरकडे आला.

गधाड.—मुंबई इलाख्यांतील काठेवाडच्या भावनगर संस्थानांतलि एक गांव. लो. सं. (१९११)५०९९. सहजानंद नामक हिंदूनें संयुक्तप्रांतांतून येथें येऊन १८०४ मध्यें 'स्वामी नारायण' धर्मपंथाची स्थापना केली. ह्यानें बऱ्याच काठी, कोळी व भिल्ल लोकांस ह्या नूतनस्थापित धर्माची दिक्षा दिली. हा १८३० मध्यें ह्या गांवींच मरण पावला. ह्या लोकांचें येथें एक भव्य देवालय आहे.

गधाली.—काठेवाड. गोहिलवाडांतील स्वतंत्र खंडणी देणारी एक जहागीर. येथील ग्रासिया लाठीचे भायाद व लाठिया गोहिल आहेत.

गधिया—काठेवाड. लाखापादर ठाण्यांतील एक स्वतंत्र खंडणी देणारी जहागीर. हींत गधिया व पाटला अशीं दोन गांवें आहेत. ग्रासिया वाल जातीचे काठी आहेत.

गधुला—मुंबई इलाखा. काठेवाडमधील एक लहान संस्थान. हा स्वतंत्र खंडणी देणारा तालुका सोनगड ठाण्यांत आहे. ग्रासिया गोहिल व लाठींचे भायाद आहेत.

गंधोल—मुंबई इलाखा. काठेवाडमधील एक लहान संस्थान.चोक ठाण्यांतला एक स्वतंत्र खंडणी देणारा तालुका. ग्रासिया गोहील, रजपूत व फलिमणाचे भायाद आहेत. गंधोल गांव भादवो टेंकडीच्या पायथ्याशीं आहे.

गँबिया—ब्रिटिश वेस्ट आफ्रिकेंतील मांडलिक संस्थानांपैकीं अत्यन्त उत्तर टोंकास असलेलें एक संस्थान. यावर अवलंबून एक संरक्षित संस्थान आहे.दोहोंचें क्षेत्रफळ(१९११) सुमारें ४१३२ चौरस मैल होतें. लोकसंख्या १९११ सालीं केलेल्या अंदाजाप्रमाणें १४६१०१ हजार होती. वास्तविक वसाहतीचें क्षेत्रफल ६९ चौरस मैलच आहे. संरक्षित संस्थानांत पुष्कळ लहान लहान राज्यें आहेत. या संस्थानांत गॅम्बिया ही नदी आहे व सिंह, चित्ते, हरिण,वानर इत्यादि प्राणी, मेहोगनी व ताडाचीं झाडें आहेत.

ह वा मा न.—नोव्हेंबर ते जूनपर्यंत येथील हवा चांगली असते. प्रतिवर्षी साधारण पाऊस सुमारें ५० इंच पडतो. जुलै व आक्टोबर यांच्या दरम्यान खेरीज करून पाऊस क्वचितच पडतो. हींवताप उत्पन्न करणाऱ्या डासांनां नाहींसे करण्याचे प्रयत्न जोरानें चालू आहेत.

र हि वा शी—येथील रहिवाशी निग्रो वंशाचे आहेत. ते उद्योगी पण काटकसरी असतात. मँडिंगो जोलॉफ व गोला ह्या मुख्य जाती होत. ⅘ लोक मुसुलमान आहेत.

उ त्प न्न—भुइमुग, रबर, कापूस, तांदूळ हे जिन्नस मुख्यतः उत्पन्न होतात. तांदूळ व ज्वारी हें लोकांचें मुख्य अन्न आहे. हे जिन्नस येथील लोकांनां पुरेसे उत्पन्न होतात. बरेचसे लोक, मासे धरणें, बोटी बांधणें व सुती कपडा विणणें इत्यादि धंद्यांत गुंतलेले असतात. येथील भुइमुगाच्या धंद्याच्या एक विशेष असा कीं रोप लागवडीच्या सुरवातीस हजारों शेतकरी दूर दूर अंतरावरून या ठिकाणीं येतात. त्यांना रहावयास घरें, खावयास अन्न व लागवडीस एक एक शेत देण्यांत येतें. पिकें निघालीं म्हणजे अर्धे उत्पन्न त्यांस मालकांस द्यावें लागतें. हें पीक काढण्यास लागणाऱ्या श्रमाच्या मानानें हा धंदा व्हावा तसा किफायतशीर होत नाहीं. हल्लीं इतर देशांत वापरण्यांत येत असणाऱ्या यंत्राच्या साहाय्यानें जमीनीची मशागत करविण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न करण्यांत आले. पण ते सिद्धीस गेले नाहींत. १९१५ पर्यंत येथें होणारा भुइमूग बहुतेक फ्रेंच कारखानदार विकत घेत असत. पण १९१६ पासून ही स्थिति बदलत चालली व हल्लीं बहुतेक सर्व भुइमूग इंग्लिश कारखानदारच विकत घेतात. १९१९ सालीं गँबियामध्यें ११७९००० पौंडांची आयात व निर्गत १२००००० पौंडांची झाली. आयात मालांत मसाल्याचे पदार्थ, रिकामीं पोतीं,कापड, पीठ, धान्य हे जिन्नस मुख्य होत.रोंगण, कातडीं, खोबरें यांची गँबियांतून निर्गत होते.सर्व पडीत जमीन सरकारजमा करण्यांत येते.

रा ज्य व्य व स्था.—राज्यव्यवस्था पहाण्यासाठीं गँबियावर एक गव्हर्नर असतो. व त्याला सहायक म्हणून एक कार्यकारी व एक कायदेमंडळ आहे. कायदेमंडळांत सरकारनियुक्त बिनसरकारी सभासद असतात. १९१९ सालीं गँबियाचा वसूल १८०००० पौंड आला व खर्च १४३००० पौंड झाला. कोलनट व भुइमूग यावरील जकात या मुख्यतः उत्पन्नाच्या बाबी आहेत. बॅथर्स्ट येथें एक वरिष्ठ कोर्ट आहे. एक दिवाणी कोर्टहि आहे. प्राथमिक शिक्षणाच्या शाळा निरनिराळ्या धार्मिक पंथाच्या हातांत आहेत. येथें दुय्यम शिक्षणाच्या व धंदेशिक्षणाच्या कांहीं शाळा आहेत. येथील शिक्षण मुख्यतः ब्रिटिश मिशनऱ्यांच्या ताब्यांत आहे.

इ ति हा स.—गँबिआच्या प्राचीन इतिहासाविषयीं फारच त्रोटक माहिती उपलब्ध आहे. एके काळीं गँबिया हा क्रमानें घाना, मेली व सॉंघाय या संस्थानांचा भाग समजला जाई. ११ व्या शतकाच्या सुमारास हा प्रांत महमदी वर्चस्वाखालीं आला. १५ व्या शतकांत पोर्तुगीजांचे पाय या ठिकाणीं लागले. १५ व्या शतकाच्या आरंभीं गँबिया नद्दीच्या खालच्या भागामध्यें ते व्यापार करीत होते. पण याच शतकाच्या मध्याच्या सुमारास हा व्यापार बराच

खालावला. १५८८ मध्यें इलिझाबेथ राणीनें लंडन येथील कांहीं लोकांस गिनीमध्यें 'सेनेगा' व 'गँब्रा' येथें व्यापार करण्या-करितां सनद दिली. १६१८त पहिल्या जेम्सनें दुसऱ्या एका 'कंपनी ऑफ ॲडव्हेंचरर्स ऑफ लंडन ट्रेडिंग इन टु आफ्रिका' नांवाच्या कंपनीस सनद दिली. या कंपनीच्या गुमास्त्यांनीं गँबिया नदी चढून जाऊन बराच मुलूख शोधला. गँबियाच्या मुखाजवळ या कंपनीनें एक किल्ला बांधला.१६६४ त नदीमुखापासून २० मैलांवर फोर्ट जेम्स किल्ला बांधण्यांत आला. १७८३ च्या व्हरसेलीजच्या तहानें गँबियांत व्यापार करण्याचा हक्क ब्रिटनला मिळाला. सेनिगालमधील व्यापार मात्र फ्रान्सकडे ठेवण्यांत आला. इ. स, १८५७ त गँबिया नदीचा खालचा भाग निव्वळ ब्रिटि-शाधीन झाला. १७८३ व १८८५ च्या दरम्यान लहान लहान प्रांत एतद्देशीय राजांपासून विकत किंवा मागून घेण्यांत आले. १८०६ त सेंट मेरीज बेट मिळालें. १८२३ त मॅक् कार्थीज् बेट, १८२६ त सीडेड मिली, व १८४० व १८५५ च्या दरम्यान ब्रिटिश कॉंबो हे प्रांत मिळाले. १८१६ सालीं कांहीं ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं सेंट मेरीज बेटावर वखार घातली. गॅबिआ वसाहतीच्या स्थापनेचें खरें वर्ष हेंच होय. १८२२ त गँबिआ वसाहत सेरालोनला जोडण्यांत आली. १८४३ त गॅबिआ स्वतंत्र वसाहत करण्यांत आली. १८८८ मध्यें क्राउन कॉलनी या नात्यानें तेथील राज्य-कारभार पाहण्यांत येऊं लागला. सेनिगालपासून पुढें फ्रान्स ब्रिटिश सरहद्दीकडे सरकतो आहे असें दिसल्यामुळें दोघांच्या मुलुखाची सरहद्द आंखणें भाग पडलें. १८८९च्या आगस्टांत ही व्यवस्था झाली.१९०४च्या आंग्लो फ्रेंच करारानें यारबार्टेंडा फ्रान्सला देण्यांत आलें. १८९२ त फोडी काबा या गुलामांचा व्यापार करणाऱ्या टोळीच्या नायकाला ब्रिटिश मुलुखांतून हद्दपार केलें. हद्दपारीच्या जागेवरूनहि हा ब्रिटिश मुलुखास उपद्रव देऊं लागल्यामुळें १९०१ च्या मार्चांत त्याला ठार करण्यांत आलें. १९०६ मध्यें असा कायदा करण्यांत आला कीं गुलामांच्या पोटीं जन्मलेलीं मुलें अतःपर स्वतंत्र आहेत व धन्याच्या मरणाच्या दिवशीं सर्व गुलामांनीं आपण स्वतंत्र आहोंत असें समजावें.

सर जॉर्ज डेंटन (१९०१–१९११) या गँबियाच्या गव्हर्नरनें संरक्षित मुलुखांत शांतता प्रस्थापित केल्या-वर गँबियांत शांतता नांदू लागली. व्यापारधंद्याला उत्तेजन मिळूं लागलें. डेंटनच्या नंतर गॅलवे हा गॅंबियाचा गव्हर्नर झाला. याच्या कारकीर्दींत गँबियामध्यें बऱ्याच सुधारणा घडून आल्या. १९१४ मध्यें कॅमेरॉन हा गव्हर्नर झाला. याच्या कारकीर्दींत महायुद्ध सुरू झाल्यामुळें गँबियामधील आर्थिक परिस्थिति खालावली पण ती सुधारण्याचा कॅमे-राननें प्रयत्न केला. महायुद्धांत गँबियाच्या रहिवाशांनीं ब्रिटिशांना चांगली मदत केली. कॅमेरून व जर्मन पूर्व आफ्रिकेंत त्यांनीं चांगली कामगिरी बजावली. १९२० मध्यें कॅमेरॉनच्या बदलीं कॅप्टन आरमिटेन हा गव्हर्नर झाला.

गँबिया नदी— ही पश्चिम आफ्रिकेंतील एक महत्वाची नदी असून इच्या मुखांतून समुद्रांत फिरणारीं मोठीं जहाजें वर जाऊं शकतात. हिचा उगम उत्तर अ.११° २५' व प. रे. १२°१५' येथें आहे. गँबियाच्या धबधब्यापासून सुमारें ३० ४० मैलांजवळ हिला उत्तरेकडून नेरिको व दक्षिणेकडून कुलुंटू या नद्या मिळतात. हिची लांबी १००० मैल आहे. ह्या नदीच्या मुखाजवळ सेंट मेरी नांवाचें बेट आहे. ही नदी इंग्लंड व फ्रान्स यांच्या स्वामित्वाखालीं आहे. हिचा शोध बऱ्याच लोकांनीं केला पण १८१८ त गासपर्ड मॉलें या फ्रेंच मनुष्यानें तिच्या उगमापर्यंत प्रवास केला. याच्या नंतर पुढेंहि कांहीं भाग अधिक शोधला गेला आहे.

गॅम्बेटा, लीऑन (१८३८–१८८२)—या फ्रेंच मुत्सद्याचा जन्म काहॉर्स येथें झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी कांहीं अपघातामुळें त्याचा डावा डोळा गेला; तथापि काहॉर्स येथील शाळेंत नांव मिळवून कायद्याचा अभ्यास करण्याकरितां १८५७ सालीं गॅम्बेटा पारीस येथें गेला. १८५९ त तो बॅरिस्टर झाला आणि उदारमत-वाद्यांतर्फे सरकारवर कडक भाषणें करणारा म्हणून त्याची प्रसिद्धि झाली. १८६९ मध्यें ॲसेंब्लीमध्यें तो निवडून आला. जर्मनीशीं युद्ध करूं नये असें त्याचें प्रथम मत होतें. परंतु देशाभिमानानें प्रेरित होऊन फ्रेंच बावटा रक्षण करण्याकरितां तो पुढें सरसावला. नंतर प्रजासत्ताक राज्यातर्फे राष्ट्रसंरक्षक मंडळांत सामिल होऊन शत्रूस तोंड देण्यास त्यानें सुरुवात केली. पॅरिस सोडण्याचा त्याचा सल्ला कोणी न ऐकिल्यामुळें विमानांतून तो टूर्स येथें आला व लढाईचीं व कारभाराचीं सूत्रें त्यानें हातीं घेतलीं. ऑर्लि-अन्स येथें फ्रेंचांचा पराजय झाला व शेवटीं पॅरिसहि गेल्या-नंतर गॅम्बेटास प्रिन्स बिस्मार्कबरोबर तह करणें भाग पडलें. तावडतोब त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला पण पुढें पुनः निवडून आल्यानंतर त्याच्या मनाविरुद्ध तह झाला हें पाहून त्यानें निषेध प्रदर्शित करून स्पेन देशाची वाट धरिली.

कांहीं दिवसांनीं तो फ्रान्समध्यें परत आला आणि प्रजा-सत्ताक राज्यपद्धतिविषयीं त्यानें चळवळ करण्यास सुरवात केली. १८७१ सालीं त्यांनें 'ला रिपब्लिक फ्रँकेवा' नांवाचें एक नियतकालिक काढलें. त्याची ॲसेंब्लींतील भाषणांपेक्षां जाहीर व्याख्यानेंच अधिक परिणामकारक अशीं होत असत. मार्शल मॅक् महॉन नांवाच्या एका राजपक्षाच्या सभासदानें जेव्हां राज्यसूत्रें हातीं घेतलीं त्यावेळीं मोठया चातुर्यानें व धोरणानें गॅम्बेटा यानें नेमस्त धोरणाकडे आपल्या स्नेह्यास वळवून घेतलें व १८७५च्या घटनेला मतें मिळविलीं. प्रजासत्ताक राज्याच्या सुरुवातीला त्यानें हेंच नेमस्तपणाचें धोरण ठेवलें होतें व त्यास तो 'समयौचित्य-

वाद' असें नांव देत असे. पुढें क्लेरिकल पक्षानें पोपची ऐहिक सत्ता परत मिळावी म्हणून चळवळ करण्यास सुरवात केली त्या वेळीं 'क्लेरेकॅलिझम्' विरुद्ध त्यानें जोराचें भाषण केलें. पुढें मॅक्‌महॉन यास राजीनामा देणें किंवा अंतस्थ युद्ध माजविणें याशिवाय दुसरा मार्गच न राहिल्यानें नेमस्त प्रजासत्ताक प्रधानमंडळ ड्यूफ्यूरेच्या नेतृत्वाखालीं मॅक् महॉन यानें स्थापन केलें.

ड्यूफ्यूरेच्या प्रधानमंडळानें राजीनामा दिल्यावर मार्शल मॅक् महॉन यास अधिकारत्याग करावा लागला. त्यावेळीं गॅम्बेटानें चेंबर ऑफ डेप्यूटीजच्या अध्यक्षाचें काम स्वीकारलें. जवळ जवळ सर्व खातीं त्याच्या हातीं असूनहि अखिल प्रजासत्ताक राज्याचीं सूत्रें आपल्या हाती घ्यावीं असें त्याच्या मनांत होतें. तथापि त्यानें मौन स्वीकारलें होतें. त्याचे अंतस्थ हेतू गुप्त राहिल्यामुळें त्याच्यावर पुष्कळ टीका होऊं लागली व शेवटीं त्याचें प्रधानमंडळहि १८८२ सालीं मोडलें गेलें. जर तो अधिकारावर असता तर इंग्रजांशीं त्यानें स्नेह जोडून आणला असता यांत संशय नाहीं. परंतु ३१ डिसेंबर १८८२ रोजीं चुकून बंदुकीची गोळी लागून तो गतप्राण झाला.

गॅम्बेटानें फ्रान्स देशाची तीन प्रकारें अमोलिक सेवा केली. जर्मन युद्धाच्या वेळीं सैन्याची तयारी करून फ्रान्सचा स्वाभिमान त्यानें जागृत केला. अनेक पक्षभेद झाले असतांना नेमस्त प्रजासत्ताक राज्य त्यानें सर्वांची समजूत करून अस्तित्वांत आणलें. मॉर्शल मॅक् महॉन प्रभृतींनीं सत्ता बळकावण्याचा जो प्रयत्न केला तो त्यानें मोठ्या कौशल्यानें हाणून पाडला. वयाच्या ४४ व्या वर्षी घडून आलेल्या अकाली मृत्यूमुळें त्याच्या हातून मोठमोठ्या गोष्टी घडून आल्या नाहींत. वक्ता व खरा मुत्सद्दी म्हणून त्याची प्रसिद्धि आहे. लिऑनी नांवाच्या स्त्रीवर त्याचें अत्यंत प्रेम होतें. राजकारणासंबंधीं या बाईची त्यास फार मदत होत असे. एम् फ्रॅन्सिस लॉरच्या पुस्तकांत या बाईच्या कांहीं आठवणी प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या पुस्तकांत गॅम्बेटा व प्रिन्स बिस्मार्क यांची मुलाखत झाली असा उल्लेख आहे पण तो संशयास्पद आहे. फ्रान्स व जर्मनीमध्यें सलोखा व्हावा म्हणून वेषांतर करून जर्मनीची खरी स्थिति अवलोकिण्यास तो तेथें गेला असेल हें संभवनीय असलें तरी लॉरनें केलेलें वर्णन अतिशयोक्तीचें दिसतें. गॅम्बेटाचें यूरोपियन राजकारणासंबंधाचें विस्तृत धोरण व त्याचा दृष्टिकोण यासंबंधीं जास्त माहिती उपलब्ध होऊं लागली आहे. या थोर पुरुषाच्या मृत्यूमुळें फ्रान्स देशाची अत्यंत मोठी हानि झाली यांत शंका नाहीं.

गमाजी मुतालिक—औंधकर प्रतिनिधींच्या मुतालिक घराण्यांतील यमाजी शिवदेवाचा गमाजी हा मुलगा होय. यमाजीनें प्रतिनिधींचा पक्ष घेऊन पेशव्यांशीं वैर धरिलें होतें. त्याच्या पश्चात् गमाजीनेंहि तोच क्रम आरंभिला. हा पेशव्यांविरुद्ध निजामाशीं नेहमीं कारस्थानें करी व पेशव्यांच्या मुलुखांत बंडाळी माजवून लोकांकडून सक्तीनें पट्टी वसूल करी. राक्षसभुवनच्या लढाईंत हा निजामातर्फे पेशव्यांशीं लढत असतां लढाईंत मरण पावला (१७६३). हा स्वभावानें क्रूर असल्यामुळें 'यमाजीस (काळास) न भ्यालें तरी गमाजीस भ्यालें पाहिजे' अशी म्हण मराठी भाषेंत आली आहे. [मराठी रिसायत. मध्यविभाग ३].

गय, वै दि क.—ऋग्वेदांतील एक सूक्तद्रष्टा. याच्या संबंधानें माहिती बुद्धपूर्वजग विभाग ३ पृष्ठ ७३ व पृष्ठ ४८४ येथें पहा.

पौ रा णि क-(सो. वं) विजयकुलोत्पन्न मूर्ति अथवा अमूर्त याचा पुत्र. यानें वानिरमालिनी नदी आणि ब्रह्मसर यासमीप अनेक यज्ञ केले होते. व त्यांत यानें ब्राम्हणांस अपार दक्षिणा देऊन घृतकल्या मधुकल्या यांची समृद्धि करून दिली होती. अन्न तर इतकें होतें कीं, सर्वांचीं भोजनें झाल्यावर अन्नाच्या पर्वततुल्या अशी पंचवीस राशी अवशेष राहिल्या होत्या [भारत वनप. अ. ९५.].

गया जि ल्हा-बिहार-ओरिसा. पाटणा विभागांतील एक जिल्हा. क्षेत्रफळ ४७१२ चौ. मै. लो. सं. (१९२१) २१५२९३० जिल्ह्याचा दक्षिण भाग उंच आहे. या भागांत टेंकड्यांच्या बऱ्याच रांगा आहेत. दुर्वास, महाबर वगैरे टेंकड्या मुख्य असून जास्तींत जास्त उंची २२०२ फूट इतकी आहे. जेठवण टेंकड्या बुद्धगयेजवळ आहेत. उत्तरभागाला उंची कमी होत जाते व म्हणून बहुतेक नद्या उत्तरवाहिनी आहेत. धनराजी. तिलया, फल्गु, यमुना पुनः पुना ह्या मुख्य नद्या आहेत. यांपैकीं दोन गंगेला मिळतात. बाकिच्यांचें पाणी शेतीच्या उपयोगाकडे लाविलें जातें. फल्गु व पुनःपुना या नद्या तीर्थें म्हणून मानल्या असून बुद्धगयेची यात्रा यांचें स्नान केल्याशिवाय पूर्ण होत नाहीं. शोण नदी मोठी व विशाल आहे. पण ती उन्हाळ्यांत कोरडी व पावसाळ्यांत फार ओढीची म्हणून बहातुकीच्या फारशी कामीं येत नाहीं. बरून व देहरी हीं दोन गांवें दगडी फरशीनें जोडलीं असून फरशीच्या थोडें वर शोणकालव्याकरितां बांधलेलें धरण आहे व खालच्या बाजूस जगांतील अत्यंत लांब पुलांपैकीं एक रेल्वेचा पूल शोण नदीवर बांधिला आहे. यास १०० फूट रुंदीच्या ९८ कमानी आहेत. पूल बहुतेक लोखंडी असून खालीं आधाराला दगडी बांधकाम आहे.

उत्तरेकडील भागांत तांदूळाच्या शेतांत आढळणारीं गवतें आढळतात. खेड्यांच्या आसपास आंब्याची व इतरहि बरींच उपयुक्त झाडें असतात. येथें सरकारी राखीव जंगल नाहीं. तरी पण दक्षिण भागांत अत्यंत घनदाट अरण्यें आहेत. सर्पण विपुल आहे. लाखेच्या उद्योगापासून जमीनदारांना बरेंच उत्पन्न आहे. मुख्य झाडें पिंपळ, निंब, वड, मोह, जांभूळ शिसवी, चिंच, साग वगैरे आहेत. पावसाळ्यांनंतर चित्रविचित्र फुलझाडें उगवतात व एक प्रका-

रच्या रानमजुका आणि इतर फळझाडें उगवतात व कित्येक गरीब लोकांचा त्यांवरच निर्वाह होतो.

वाघ, अस्वल, रानडुक्कर, वगैरे प्राणी बरेच आहेत. सांबर, हरणांच्या कांहीं जाती, काळवीट वगैरेहि दिसतात. लांडगे अगदींच कमी आहेत. नीलगाई तुरळक आहेत. बदकांच्या बऱ्याच जाती आहेत.

समुद्रापासून दूर अंतरावर असल्यामुळें येथें ऋतुमान फार कडक असतें. मेमध्यें १५०° पर्यंत उष्णता जाते, व या महिन्यांत साधारण उष्णमान ९३° चें असतें. उन्हाळ्यांत हवेची आर्द्रता ५१° असते. पावसाचें मान ४२ इंच आहे. टेंकड्यांतून वगैरे पाऊस फार झाल्यानें नद्यांनां पूर येतात, कालवे फुटतात, व नद्यांच्या बाजूच्या खेड्यांना धोका येतो. १८९६ मध्यें साकरी व १९०१ मध्यें शोण नद्यांनीं असेंच नुकसान केलें.

पाटणा व शहाबाद जिल्ह्यांतील कांहीं भाग व हा जिल्हा पूर्वी मगधांच्या राज्यांत होता. मुसुलमानांच्या वेळीं बिहार सुभ्यांत याचा समावेश झाला होता व १७६५ सालीं तो इंग्रजांच्या हातांत आला व पाटणा हें मुख्य ठिकाण झालें. १८६५ सालीं पाटणापासून गया जिल्हा स्वतंत्र करण्यांत आला. सर्व जिल्हाभर जुने अवशेष सांपडतात. विशेषतः बौद्ध धर्मीयांचे त्यांत फार आहेत. ठिकठिकाणीं बुद्धाच्या सुंदर मूर्ती व गुहा असून बुद्धधर्मकालीन मोठीं व महत्वाचीं अशीं ठिकाणें या भागांत आहेत. जेठवन खेडें हें पूर्वीचें यष्टिवन व धांगरा टेंकडया म्हणजे प्राग्बोधीपर्वत होय. याच पर्वतांतील गुहेंत गयेला जाण्यापूर्वी बुद्धानें विश्रांति घेतली होती. वरार टेंकड्यांवर कोवाडोल येथें पूर्वीचा शिलाभद्र मठ असावा. इतरहि बऱ्याच ठिकाणीं कांहीं मोडकीं तोडकीं व कांहीं शाबूत बुद्धाचीं देवळें आहेत व कांहीं ठिकाणीं जैन आणि हिंदु देवळांचे अवशेष सांपडतात. गुणेरी येथें श्री गुणाचरित मठ होता. पुनावत (पुण्यवती) पासून दोन मैलांवर असलेला हसरा डोंगर हाच पूर्वीचा कुकुट पादगिरी असावा असें म्हणतात.

गया हें मुख्य ठिकाण असून तेथें तेकारी आणि दाऊदनगर येथें म्यु. कमेटया आहेत. औरंगाबाद नवाडा व जहानाबाद हीं मोठीं शहरें आहेत. मुख्य भाषा मागधी आहे. मुसुलमान लोक अयोध्येकडील हिंदी भाषा बोलतात. शेंकडा ६५ लोक शेती, १४ उद्योगधंदे, ०.६ व्यापार व १.९ इतर बौद्धिक धंद्यांवर रहातात.

उत्तरभागांतील जमीन सपाट असून ती बहुतेक लागवडीखालीं आहे. दक्षिणेकडे टेंकडया व जंगलें यामुळें शेती जोगी जमीन कमी आहे पण रेल्वे व दळणवळणाचीं इतर साधनें यांच्या वाढीबरोबर तिकडेहि जमीन सुधारणा व वाढ होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. ४७१२ चौ. मै. पैकीं प्रत्यक्ष लागवडीखालीं २७१५ चौ. मै. आहे व २००० चौ. मै. लागवडींत येण्याजोगी आहे. एकंदर लागवडीच्या जमीनीपैकीं ¾ इतकी सरकारी व खासगी कालवे पाट वगैरे साधनांनीं भिजत असून त्यांतील ८५ मैल सरकारी कालव्यांनीं भिजते. मुख्य उत्पन्न तांदूळ असून त्याखालीं अर्ध्याहून अधिक जमीन येते. येथें दुष्काळाची सहसा बाधा होत नाहीं. याचें कारण येथें कालवे, पाट वगैरे बरेच असून जमीनीची मशागत करण्यांत येथील लोक फारच श्रम घेतात.

येथील जनावरें आकारानें लहान पण मजबूत आहेत. दक्षिणेकडे वनचराईची जमीन पुष्कळ आहे. पण इतर ठिकाणीं बहुधा कडबा वगैरेच तोडून घालतात. गरेह जातीचे लोक मेंढ्या पाळतात. व त्यांच्या लोंकरीपासून गालीचे व घोंगड्या होतात. गया हें यात्रेचें ठिकाण असल्यानें तेथें व इतर ठिकाणीं गुरें बाजारांत येतात. गया येथें गुरांचा दवाखाना आहे.

सरकारी शोणभद्र कालव्याच्या पाटणा व मोंगीर कालवा अशा दोन शाखा आहेत. पश्चिमेकडेहि दोन शाखा आहेत. याशिवाय या ठिकाणीं हंगामी तलाव आहेत व त्यांतूनहि पाण्याचा बराच पुरवठा होतो. या पद्धतीला 'जेनराबंदी' म्हणतात. व त्याचाहि बराच उपयोग करतात.

खनिज पदार्थांत मुख्य अभ्रक आहे. याच्या बऱ्याच खाणी आहेत. एक जातीचा काळा दगड गयेचा म्हणून प्रसिद्ध आहे. तो कोरीव कामाला चांगला असून त्याच्या मूर्ती, भांडीं, दागिने वगैरे करतात. मातकामाची माती व चुन्याचा दगड हीं बऱ्याच ठिकाणीं सांपडतात व सोरा जहानाबादमध्यें तयार करतात. येथें लाख, साखर, कपडा, पितळी भांडीं व लोंकरी घोंगड्या वगैरेंचे कारखाने आहेत. अरवल येथें पूर्वी चांगला व पुष्कळ कागद तयार होत असे. आतां तो धंदा अगदीं नाहींसा झाला आहे व शुद्ध साखरेचा धंदाहि उतरत्या प्रमाणानेंच चालत आहे. मानपूर येथें रेशमी कपडा होतो. पूर्वी येथें खोदकाम उत्कृष्ट दर्जाचें होत असे व त्याचे नमुने जुन्या कामावरून दिसतात. पण आतां हें काम जाणणारे लोक अगदीं थोडे उरले आहेत. येथें दरसाल ५०००० मण लाख तयार होते व कलकत्याला जाते. निर्यात मालांत धान्यें, मिरीं, भांडीं, गूळ, तंबाखू, विड्याचीं पानें वगैरे मुख्य असून मीठ, कोळसा, कापूस, लांकूड, कपडा, फळें, राकेल, कागद, वगैरे जिन्नस आयात मालांत मुख्य आहेत. सर्व व्यापार कलकत्याशीं चालतो. पण गूळ मात्र मध्यप्रांत, वऱ्हाड, राजपुताना व मध्यहिंदुस्थान येथें फार जातो. नवे नवे रस्ते बनत आहेत व व्यापाराचा ओघ रेल्वेरस्त्याकडे साहजिकच येत आहे. अंतर्भागांत सपाटीवर गाड्यांतून व टेंकड्यांतून बैलांवरून व्यापार चालतो. रेल्वेच्या ६ लहान शाखा आहेत. बैलगाडीचे व पायरस्तेहि बरेच व चांगले आहेत. २०२ मैल पक्की सडक असून ७१५ मैल कच्ची सडक व ६२८ मैल साधा रस्ता आहे. पाटणा कालव्यांतून एक बोट दर आठवड्यास जाते. ठिकठिकाणीं नद्यांवर पुलांची योजना नसेल तेथें होड्यांची योजना केलेली आहे. गया जिल्ह्याचे ५ तालुके पाडले आहेत. तीन म्यु. कमिट्या

असून डिस्ट्रिक्ट व तालुकबोर्डे हीं आहेत. गया जिल्हा शिक्षणाच्या बाबतींत मागासलेला आहे. शेकडा ३-६ (७.२ पुरुष व ०.२ स्त्रिया) वाचणारांचें प्रमाण पडतें.

ता लु का.—गया जिल्ह्यांतील मुख्य तालुका क्षेत्रफळ ४२५ चौ. मै. लोकसंख्या इसवी सन (१९११) १९,१,४८४.

श ह र.—गया जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. उ. अ०२४ ° ४९' व पू. रे. ८५ ° १'. हें फल्गु नदीच्या कांठीं वसलें आहे. नदीच्या एका कांठावर विष्णुपद अथवा जुनी गया आहे व तीर्थक्षेत्राचा हाच भाग होय. येथें गयावळ लोकांची वस्ती आहे. हे वतनदार उपाध्ये आहेत. यांच्या आशीर्वचनाशिवाय यात्रा पुरी होत नाहीं व यामुळें यांना पुष्कळ वेळा बरीच प्राप्ति करून घेतां येते. विष्णुपद हें मुख्य देऊळ अष्टकोनी आहे. जवळच एक अहिल्याबाईनें बांधलेला सभामंडप आहे. नदीच्या दुसऱ्या तीरावर नवी गया अथवा साहेबगंज आहे. येथें सरकारी कचेऱ्या वगैरे आहेत. बाजार, शाळा, लायब्ररी व दवाखाने वगैरे सर्व या नव्या वस्तींत आहेत. नवी वस्ती जुन्या वस्तीपेक्षां अर्थातच रुंद, खुली, व ऐसपैस आहे. येथील तुरुंगांत बरेच जिन्नस तयार होतात. लोकवस्ती (१९२१) ६७५६२.

इतिहासः—गया हें फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध क्षेत्राचें ठिकाण असून त्यास विष्णुगया अथवा पितृगया असेंहि म्हणतात. या क्षेत्राच्या उत्पत्तीसंबंधीं इतिहास हरिवंशपर्व अध्याय १० मध्यें दिला आहे. सुद्युम्न किंवा इल याच्या गय नामक पुत्राला पूर्वेकडील देशाचें राज्य मिळालें. वर्तमान श्वेतवाराहकल्पात या गय राजर्षीनें आपली राजधानी गयानगरी ही वसविली व शेजारच्या गयपर्वतावर उग्र तपश्चर्या केली, व तेथें ब्रह्मसरनामक पवित्र तीर्थ निर्माण केलें (महाभारत वनपर्व). हा गय राजर्षि इक्ष्वाकूचा समकालीन मानितात. या कथेवरून गया नगरीचें प्राचीनत्व ध्यानांत येईल. गयाप्रदेश व उत्कलप्रदेश यास पूर्वी धर्मारण्य असें म्हणत असत. या धर्मारण्याच्या उत्पत्तीसंबंधीं स्कंदपुराणांत ब्रह्मखंडाचा पोटभाग धर्मारण्य खंड म्हणून ४० अध्यायाचा खंड आहे त्यात बरीच विस्तृत माहिती आहे. वायुपुराण (अ. १०८-७३) मध्यें गयानगरी, राजगृह, च्यवनाश्रम, पुनःपुना नदी वगैरे पुण्यकारक स्थानें कीकट देशांत आहेत असें म्हटलें आहे.

वायुपुराणांत गयेची गोष्ट अशी आहेः-गय नांवाचा एक राक्षस होता. तपाचरणानें तो पवित्र झाला. तो लोकांना पावन करी व त्यामुळें यमाचा दरबार रिता पडला. यमानें तक्रार केल्यावरून युक्ती लढवण्यात आली. यज्ञाकरितां गयाचा वध करण्यांत आला. व त्याच्या डोक्यावर धर्मशिला ठेवण्यांत आली व ती जागा 'गया क्षेत्र म्हणून पवित्र राहील, तेथें देव वस्ती करतील व तेथें जाणारे इसम पूर्वजांसुद्धा ब्रह्मलोकीं जातील ' असें वचन श्री विष्णूनीं त्याला दिलें व तेव्हांपासून गया क्षेत्र म्हणून प्रसिद्धीस आलें.

आर्यावर्तांतील गया, काशी व प्रयाग या त्रिस्थळी यात्रेचें महत्व फार मोठें मानितात. गयाक्षेत्रीं फल्गु नदीतीरावर श्राद्ध करून श्री विष्णुपदीं पिंडदान केल्यानें मनुष्य पितृऋणांतून मुक्त होतो अशी दृढ समजूत फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे.

द्वापारयुगात श्रीरामचंद्रांनीं आपल्या पितरांच्या प्रीत्यर्थ गयाक्षेत्रात तिलोदक, पिंडदान वगैरे अर्पण करून तेथील गयावळांस रुप्याचे व सुवर्णाचे चिरकाल टिकणारे दोन पर्वत व मधुपेयाच्या दोन नद्या अर्पण केल्या. परंतु तेथील द्रव्यलोभी ब्राह्मणांनीं मिथ्याचार केल्यामुळें पुढें ते पर्वत पाषाणाचे झाले व नद्या गुमोदकानें वाहूं लागल्या. मधु नदीच्या उगम स्थानाला हल्लीं मधुस्रावतीर्थ असें म्हणतात. वर सांगितलेल्यां पर्वतांना हल्लीं प्रेतपर्वत व रामपर्वत अशीं नांवें आहेत व फक्त त्यावरच रौप्य-सुवर्णाचें रेषाचिन्ह आहे. वायुपुराणाच्या अखेरीस (अध्याय १०५-११२) नारदाच्या विनंतीवरून सनत्कुमारांनीं गयामाहात्म्य व गयासुराचा वृत्तांत कथन केला आहे. ललितविस्तरांत गयेचा उल्लेख आहे. राजगृहाहून उरुविल्वेला जातांना गौतम येथें प्रथम उतरला. येथें गौतमानें ६ वर्षे घोर तपाचरण केलें व बोधिप्राप्ति करून घेतली हें जर खरें असेल तर इ.स. पू.५ व्या शतकांत गया हें एक मोठें बौद्ध धर्मस्थान असलें पाहिजे. इ. स. ५ व्या शतकांत फाहियानला हें अरण्यवत आढळून आलें;पण दोन शतकांनीं जेव्हां ह्युएनत्संग येथें आला तेव्हां त्याला हें शहर मजबूत नसलेलें पण थोड्या वस्तीचें असें दिसलें. पण त्यावेळीं सुमारें १०० ब्राह्मणांचीं घरें यांत असून हे ब्राह्मण अर्वाचीन गयावळाचे पूर्वज असावेत. यावरून गया हें प्रथम हिंदुक्षेत्र, नंतर बौद्धक्षेत्र व पुन्हां इ. स. ५ व्या ते ७ व्या शतकाच्या दरम्यान हिंदुक्षेत्र बनलें असावें असें दिसतें. बुद्धगयेची माहिती स्वतंत्र येईल. बौद्ध धर्मीयांवरील विजयाचें हें क्षेत्र केवळ एक चिरस्थाई स्मारक आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. या भागात बुद्धानुयायांचें साम्राज्य चांगलेंच जमलें होतें. व म्हणूनच विजयी हिंदुधर्मीयांनीं ही जागा शोधून काढली असावी असें वरील लोकांचें म्हणणें आहे.

येथें एक शिलालेख आहे. त्याचा काल ६१८ चा असावा. कामदेवसिंहाचा मुलगा व जयत्तुंगसिंहाचा नातू पुरुषोतम सिंह याचा हा लेख असून त्यांत सपादलक्षाचा राजा अशोकवल्लभ याचा उल्लेख आहे.

पेशव्यांनीं दिल्लीच्या बादशहापासून स.१७५४च्या सुमारास गया व कुरुक्षेत्र हीं दोन्हीं क्षेत्रें सोडवून आपल्या ताब्यांत घेतलीं व त्यांची कमाविस दामोधर महादेव हिंगणे यास सांगितली होती. [माबेल; डफ; राजवाडे खंड ६;महाभारत; पुराणें; राजेंद्रलाल मित्र-बुद्ध गया, कलकत्ता १८७८; मॅलेगॅझेटीयर ऑफ गया].

गरमल—ह्या झाडाचें दुसरें नांव माइनमूळ असें आहे. गरमलाचीं झाडें सुमारें दोन फूट उंच वाढतात. व पानें तुळशीसारखीं पण लांबट व जाड असतात. त्यांस मसाल्यासारखा तिखट वास येतो व तीं रुचीसहि तिखट लागतात. झाडाचीं मुळें पिंगट रंगाचीं, ४–६ बोटें लांब व करंगळी सारखीं जाड व झुपकेदार असतात. या मुळांचा लोणच्यांत घालण्यास उपयोग करतात. जसा लोणच्यांत आल्याचा स्वाद येतो तसाच गरमलाच्या मुळ्यांचा एकप्रकारचा स्वादिष्ट वास येतो. भाटे, गुजराथी वगैरे लोकांस याचा उपयोग माहीत आहे. झाडांची वाढ कलमें लावून होते. याचीं मुळें मुंबईच्या मार्केटांत विकण्याकरितां येतात.

गरमली, मो हो टी.—काठेवाड. लाखापादर ठाण्यांतील एक स्वतंत्र खंडणी देणारा तालुका. ग्रासिया वाल जातीचे काठी आहेत.

ना हा नी.—लाखापादर ठाण्यांतील एक स्वतंत्र खंडणी देणारा तालुका. मोहोटीच्या दक्षिणेस हा ५॥ मैलांवर आहे. ग्रासिया वाल जातीचे काठी आहेत.

गरमूर—आसाम. शिवसागर जिल्ह्यांतील एक खेडें. हें उ.अ.२६ ° ५९' व पू. रे. ९४ ° ९' यावर माजुली बेटांत असून आसामी लोकांनीं पूज्य मानलेल्या तीन सत्रांपैकीं एक आहे. या सत्रां(मठा)चे गोसावी लोकांवर बरेंच वजन असून ते राजनिष्ठ, सरकारला पाठिंबा देणारे व सुसंस्कृत आणि प्रागतिक आहेत असें सहज दिसून येतें. यांच्या चेल्यांकडून मिळणाऱ्या देणग्यांवर हे मठ चालतात. गरमूर येथील मठाला अहोमच्या राजाकडून एकंदर ४०,००० एकर जमीन साऱ्याच्या माफीनें मिळाली होती असें म्हणतात. परंतु सरकारी तपासणीच्या वेळीं हे "गोसांई" वृंदावनाला गेल्यामुळें व महत्वाचे पुराव्याचे कागद ब्रह्मी लोकांनीं नाहींसे केल्यामुळें त्यांपैकीं मठाला कांहीं एक राहिलें नाहीं. हिंदुस्थान सरकारनें मात्र आतां ३३१ एकर जमीन साऱ्याच्या माफीसह दिली आहे.

गरवा—बिहार–ओरिसा. पालामाऊ जिल्ह्यांतील दानरो नदीवरील शहर. येथें वस्ती सुमारें चार हजार आहे. जिल्ह्यांतील व सुरगुजा संस्थानांतील बाहेर जाणाऱ्या मालाचा व्यापार येथूनच चालतो. निर्यात मालामध्ये लाख,चामडीं, तूप, कापूस, लोखंड वगैरे असून आयात मालांत मुख्यतः धान्य, पितळी भांडीं, कपडे, ब्लँकेटें, मीठ, तंबाखू, मसाला वगैरे येतात. उन्हाळ्यांत दानरो नदीच्या वाळवंटांत बाजार भरतो.

गॅरिक, डेव्हिड (१७१७–१७७९)—हा प्रसिद्ध इंग्रज नट व नाटकाचा मॅनेजर एका फ्रेंच प्रॉटेस्टंट कुळांत जन्मास आला. लिचफील्ड येथील ग्रामर स्कूलमध्यें त्याचें प्राथमिक शिक्षण झाल्यावर एडिअल येथील सॅम्युअल जॉन्सनच्या शाळेंत त्यानें १७३६ त आपलें नांव घातलें. परंतु सहा महिन्यांतच ती शाळा बंद झाल्यामुळें जॉनसन व गॅरिक अशी ही गुरुशिष्यांची जोडी लंडन शहरीं गेली. त्याच सुमारास त्याचा बाप कॅप्टन गॅरिक वारला. पण त्याच्या चुलत्यानें हजार पौंड डेव्हिड यांस दिल्यामुळें लंडन व लिचफील्ड या दोन्ही ठिकाणीं त्यानें दारूचा व्यापार सुरू केला. त्यांत त्यास फारशी किफायत झाली नाहीं, उलट निम्में भांडवल डेव्हिड गमावून बसला.

गॅरिकला नाटकाचा अतिशय नाद लागला. नाटयचर्चा व नाटयनिर्मिति यांसबंधीं तो जास्त प्रयत्न करूं लागला. इसॉप इन् दि शेड्स नांवाची त्याची नाटयकृति १७४० मध्यें प्रथम रंगभूमीवर आली. १७४१ त तो प्रथम नट म्हणून रंगभूमीवर आला. नंतर एका नाटकमंडळीबरोबर तो इप्सविच् येथें गेला. तिथाल म्हणून त्यानें त्या ठिकाणीं भूमिका घेतली. त्यानंतर त्यानें तिसऱ्या रिचर्डची भूमिका घेतली व लोकप्रियता मिळविली. अबोअन, लिअर व ओटवेच्या एका नाटकांतील पेरी अशा भूमिका त्यानें चांगल्या वठविल्या. ड्यूक ऑफ अर्गाइल. कॉवहॅम, लिटलटन व पिट वगैरे पार्लमेंटच्या सभासदांनींहि त्याची वाहवा केली. दि लाइंग व्हॅलेट मधील प्रहसनांत त्यानें शार्पचें काम केलें. पोप, मरे, हॅलिफॅक्स, सॅंडविच् व चेस्टरफील्ड इत्यादि बड्या लोकांशीं त्याचा फार स्नेह जुळला.

त्याची सांपत्तिक स्थिति १७४२ च्या सुमारास बरीच सुधारली होती. डब्लिन शहरीं गेल्यावर त्याची नट म्हणून फार कीर्ति झाली. १७४२ ते १७४५ पर्यंत ड्रुअरीलेन थिएटरमध्यें त्याचीं नाटकें होत असत. त्यानंतर डब्लिन येथें जाऊन स्मोकअॅलीमधील थिएटर रॉयलचा तो शेरिडनबरोबर सहकारी व्यवस्थापक झाला. १७४७ मध्यें गॅरिकच्या ताब्यांत आलेल्या नवीन थिएटरमध्यें जॉनसननें केलेलें नाटक झालें. व त्यांत गॅरिकनें काम केलें. शेक्सपियरच्या सतरा नाटकांत व तत्कालीन ग्रंथकारांच्या अनेक नाटकांत त्यानें विविध भूमिका घेतल्या व त्यांच्या नाटकांस जास्त प्रसिद्धि मिळविली. व्यवस्थापक म्हणून त्यानें चांगलें काम केलें व अनेक नाटकांचीं रूपांतरें व नाटकांतून कमीजास्त दुरुस्त्या केल्या. १७६३ त तो पारिस येथें गेला व त्या ठिकाणीं त्यानें डिडरो व ही हॉलबॅच यांची भेट घेतली. लंडन येथें परत आल्यानंतर १७७९ मध्यें तो वारला. 'मिस् इन् हर टीन्स', 'आयरिश विडो' वगैरे त्याचीं नाटकें प्रसिद्ध आहेत. त्यानें रंगभूमीचा दर्जा वाढवून अनेक सुधारणा घडवून आणल्या.

गॅरिबाल्डि, गियुसेपे (१८०७–१८८२)—या इटालियन देशभक्ताचा जन्म नाइस येथें झाला. कारकुनी पेशाच्या शिक्षणाचा त्रास चुकविण्याकरितां तो लहानपणीं घरांतून पळून गेला पण पुढें तो बंदरावरील व्यापारधंद्यांत आपल्या बापाच्या मदतनीस म्हणून त्याच्याकडे जाऊन राहिला. सार्डिनियन आरमारखात्यांत काम करीत असतांना त्यानें आपल्या मित्रासह युरिडीस नावाचें जहाज

हस्तगत करून मॅझिनीचा पिडमाँट येथें प्रवेश होण्याच्या सुमारास जिनोआचा शिलेखाना काबीज करण्याचा कट केला. परंतु हा बेत उघडकीस आल्यामुळें त्यास देहान्त शिक्षा फर्मावण्यांत आली. पण १८३६ त तो दक्षिण अमेरिकेंत पळून गेला व त्यास ब्राझिलविरुद्ध बंड पुकारणाऱ्याकडून कांहीं पत्रें आलीं. शेवटीं तो पकडला जाऊन त्याचे फार हाल करण्यांत आले. परंतु स्वतंत्र होतांच त्यानें ब्राझिल विरुद्ध लढाई पुकारून पोर्टोअलेग्रो काबीज केलें. हें युद्ध चालू असतां त्याचें लग्न झालें व ॲनिटा ह्जिपासून त्यास पुढें तीन मुलें झालीं. रोसासच्या सैन्याशीं लढत असतांना ॲड- मिरल ब्राउन यानें त्यास हैराण केलें. त्यावेळीं दारूगोळा सांपडल्यामुळें जहाजास आग लावून पुढें १८४६ मध्यें युरु- गुएच्या स्वातंत्र्यप्राप्तीस मदत करून व तेथील सर्व मानमरा- तबाचा त्याग करून राज्यक्रांतीच्या चळवळीची बातमी ऐकतांच तो इटलीस परत आला.

नाइस येथें १८४८ सालीं परत आल्यानंतर चार्लस अल- बर्ट यांस तो जाऊन मिळाला व तीन हजार स्वयंसैनिक गोळा करून त्यानें युद्धाची तयारी केली. परंतु अपयश आल्यामुळें तो स्वित्सर्लंडमध्यें पळून गेला. तेथून रोम येथें आल्यावर प्रजासत्ताक राज्यानें त्याची फ्रेंच सैन्याविरुद्ध लढ- ण्याबद्दल नेमणूक केली परंतु रोमचा पाडाव झाला व चार हजार स्वयंसैनिकांनां घेऊन तो व्हेनिस येथें गेला. फ्रान्स, आस्ट्रिया, स्पेन व नेपल्स यांनीं त्याचा पाठलाग सुरू केला पण आपल्या कौशल्यानें त्यानें सर्वांस चकविलें. गॅरिबाल्डि, त्याची बायको ॲनिटा व कांहीं अनुयायी या सर्वांनां एका अरण्याचा आश्रय करावा लागला. आस्ट्रियन लोक त्यांचा पाठलाग करीत होतेच. कांहीं अनुयायांनां पकडून ठार कर- ण्यांत आलें व त्याची बायको ॲनिटा ही मेली. टस्कनि, पिड- माँट वगैरे देशांतून जातां जातां तो शेवटीं अमेरिकेस गेला. न्यूयार्क येथें कांहीं दिवस राहून व पैसे मिळवून तो फिरून १८५४ सालीं इटलीस आला. १८५९ त पुनः युद्ध उपस्थित झालें व त्यांत आस्ट्रियनांचा पराभव करून त्यानें अल्पाइन देशांस स्वातंत्र्य मिळवून दिलें.

वरील युद्ध चालू असतांना त्याला काउंटेस रेमाँडीची फार मदत झाली होती. परंतु कांहीं कारणामुळें या बाईशीं लग्न करण्याचें टाळून तो इटलीकडे वळला. कॅप्रेरा येथें जाऊन, क्रिस्पि व बर्टानी यांच्या साह्यानें सिसिलीवर स्वारी करण्याचा त्यानें बेत ठरविला. मारसालाच्या स्वारींत मदत करण्याचें आश्वासन त्यास इंग्रजांकडून मिळालें होतें. त्यानंतर 'सालेमी' येथें त्यास डिक्टेटर (अनियंत्रित प्रतिनिधि) नेमण्यांत आलें. पॅलेरमो येथें नीट बस्तान बसल्यानंतर नेपल्सची मुक्तता करून रोमवर चाल करून जाण्याकरितां त्यानें सैन्याची जमवाजमव केली. परंतु हा बेत काव्हूरच्या अनुयायांस पसंत नव्हता. इटालियन साम्राज्यास सिसिली देश तावडतोब जोडावा अशी त्यांची इच्छा होती. परंतु तीस न जुमानतां त्यानें मिलॅझो येथील निएपोलिटन यांचा पराभव केला. पुढें गुप्तपणें, सार्डिनियांतील अरॅन्सी बॅंकडे तो निघून गेला. त्याठिकाणीं बर्टानी हा पोपच्या संस्थानाविरुद्ध स्वारी करण्याच्या बेतांत होता. पॅलेरमोकडे जाण्यास त्या सैन्यास काव्हूरनें भाग पाडलें. पेसिना येथें परत आल्यानंतर, गॅरिबाल्डीस दुसरा व्हिक्टर इमॅन्युएल याचें पत्र आलें. त्यांत त्यानें नेपल्सचें राज्य घेण्यापासून परावृत्त होण्याचा त्यास उपदेश केला होता. परंतु अखेर नेपल्सवर स्वारी करून तो त्या स्वारींत विजयी झाला. मार्चेस, अम्ब्रिया व अब्रूझी वगैरे ठिकाणें मध्यंतरी इटालियन सैन्यानें घेतलीं होतीं. शेवटीं दोन्ही सिसिलींचा समावेश इटालियन साम्राज्यांत करण्यांत आला. नेपल्समध्यें व्हिक्टर इमॅन्युएलचा प्रवेश होत असतांना गॅरिबाल्डि त्याच्याबरोबर होता.

नाइस फ्रान्सला दिल्यामुळें व इटालियन सरकारनें त्याच्या अनुयायांची योग्य काळजी न घेतल्यामुळें रागावून गॅरीबाल्डीनें राजकारणांत प्रवेश करून घेतला. १८६१ सालीं त्याचें व काव्हूरचें भांडण झालें. विक्झिओनें समेटाचा प्रयत्न केला. गॅरिबाल्डीविरुद्ध असलेलें एक पत्र सिऑल्डिनीनें प्रसिद्ध केल्यामुळें त्यांची द्वंद्वयुद्धापर्यंत पाळी आली. परंतु ती गोष्ट टळली. नंतर २९ जून १८६२ त तो पॅलेरमो येथें गेला. रोमवर हल्ला होणार असें दिसतांच रॅटाझी यानें सिऑल्डिनी याजबरोबर सैन्य देऊन त्यास गॅरिबाल्डीवर पाठवून दिलें. युद्धांत गॅरिबाल्डीस कैद करण्यांत आलें परंतु युद्धतहकुबी झाल्यामुळें त्याची मुक्तता झाली व तो कॅप्रेरा येथें पुन्हां परत आला.

१८६४ मध्यें तो लंडन येथें गेला. तेथें त्याचें मोठें स्वागत करण्यांत आलें. इंग्लंडहून पुनः तो कॅप्रेरा येथें आला. १८६६ मध्यें पुनः लढाई उपस्थित होतांच त्यानें बेसिया सर करण्याकरितां लष्कराची तयारी केली. माँटेसॅलो, लोड्रोने, डार्सो, काँडिनो, ॲम्पोला व बेझेक्का वगैरे ठिकाणीं त्यानें ऑस्ट्रियन लोकांचा पराभव केला. ट्रेंट घेण्याच्या सुमारास त्यास सेनापति लॅमरमोरा यानें परत फिरण्यास सांगितलें. पुनः कॅप्रेरा येथें परत आल्यानंतर रोमवर चाल करून जाण्याचा त्याचा विचार ठरला. १८६७ मध्यें तो सैन्य घेऊन पोपच्या मुलुखांत शिरला परंतु त्यास इटालियन सरकारनें कैद केलें. पुनः हाच प्रयत्न करून पाहतांना त्यास फिगलाइन येथें पकडण्यांत आलें. नंतर तो फ्रेंचांस जाऊन मिळाला. व त्यानें, ग्रॅटिलॉन, ॲटन व डिजॉन येथें जर्मन सैन्याचा पराभव केला. व्हार्सेलिसच्या सभेचा तो सदस्य म्हणून निवडून आला परंतु फ्रेंचांशीं न पटल्यामुळें त्यास कॅप्रेरा येथें परत यावें लागलें. त्याची लोकप्रियता इतकी वाढत गेली कीं, ४०,००० पौंड देणगीदाखल व २००० पौंड पेन्शन म्हणून त्यास नजर करण्यांत आलें. तेव्हां ही देणगी व पेन्शन घेण्याचें त्यानें नाकारलें. परंतु

पुढें त्यास या दोन्ही गोष्टी स्वीकाराव्या लागल्या. रोममध्यें येणाऱ्या पुरामुळें जें नुकसान होतें तें टाळण्याकरितां टायबरचें धरण बांधावें म्हणून त्यानें फार श्रम केले. नंतर त्यानें पुनः आपलें लग्न करून घेतलें. १८८० सालीं मेन्टाना स्मारकाच्या उत्सवासाठीं तो मिलन येथें गेला होता. १८८२ मध्यें नेपल्स व पॅलेरमो या ठिकाणीं सिसिलियन व्हेपर्सच्या उत्सवाकरितां तो निघाला होता परंतु आजारी पडल्यामुळें जागेंच राहिले. ता. २ जून १८८२ रोजीं कॅप्रेरा येथें त्याचें देहावसान झालें आणि सर्व इटालियन राष्ट्र शोकसागरांत बुडून गेलें.

गरुड—हिंदु पुराणांतून विष्णुवाहन गरुडाचें बरेंच वर्णन आढळतें. विष्णूच्या देवळांतून गरुडांच्या मूर्तीहि दिसतात. तेव्हां हा पुराणांतील पक्षी कसा होता तें पाहूं. अर्धे मानव शरीर व अर्धे पक्ष्याचें शरीर असलेला गरुड सर्व पक्षांचा राजा होता. दक्षाची कन्या जी विनता, ती गरुडाची माता होय. गरुड हा सर्पांचा कट्टा शत्रु आहे. गरुडाच्या मातेचें तिच्या कद्रु नामक ज्येष्ठ सवतीशीं भांडण होऊन सर्पांच्या कपटामुळें तिला दास्यत्व पत्करावें लागल्यामुळें तिला सर्पांबद्दल (कद्रूच्या पुत्रांबद्दल) अतिशय द्वेष वाटे. तोच द्वेष गरुडाच्याहि मनांत वास करीत असल्यामुळें गरुड सर्पांचा कट्टा शत्रू झाला. गरुड इतका तेजस्वी होता कीं, तो जन्मतांक्षणींच अग्निसारखा भासल्यामुळें देवांनीं त्याची पूजा केली.गरुडाचें मस्तक, पंख,नखें व चोंच हीं गरुडपक्ष्याप्रमाणें व शरीर आणि अवयव माणसांच्या अवयवांप्रमाणें होते असें गरुडाचें वर्णन केलेलें आहे. त्याचें मुख पांढरें शुभ्र असून, पंख लाल व अंगकांति सुवर्णासारखी आहे. गरुडाच्या पत्नीचें नांव उन्नति अथवा विनायका असें असून तिच्यापासून गरुडास संपातिनामक एक पुत्र झाला. गरुडाच्या मातापितरांनीं गरुडास दुर्जनांचा नाश करण्याची मोकळीक दिली होती. परंतु ब्राम्हणास मात्र त्यानें स्पर्श करूं नये अशी अट होती, असें महाभारतांत सांगितलें आहे. एकदां गरुडानें ब्राह्मण व त्याची स्त्री या उभयतांस गिळिलें असतां, त्याचा घसा इतका भाजला कीं त्या दोघांसहि ओकून टाकणें त्याला भाग पडलें. गरुडानें देवांपासून अमृत चोरून नेलें अशी एक कथा आहे. अमृत परत मिळविण्याकरितां इंद्रानें गरुडाबरोबर घोर युद्ध केलें व त्यानें घेतलेलें अमृत परत मिळविलें. परंतु युद्धांत इंद्राचें बरेंच नुकसान होऊन इंद्राचें वज्र भग्न झालें.

गरुडास अनेक नामाभिधानें व विशेषणें आहेत. त्याच्या मातापितरांच्या नांववांरून त्यास ' काश्यपि' आणि ' वैनतेय अशीं नांवें मिळालीं. ' सुपर्ण ' असेंहि गरुडाचें नांव असून सर्व पक्ष्यांचा राजा म्हणून गरुत्मान असेंहि गरुडास म्हणतात. दाक्ष्य, शाल्मलिन व विनायक इत्यादि नांवांनींहि गरुडास संबोधितात. तार्क्ष्य, सितानन, रक्तपक्ष, श्वेतरोहित, सुवर्णकाय, गगनेश्वर, खगेश्वर, नागांतक व पन्नगनाशन, सर्पाराति, तरस्विन्, रसायन, कामचारिन्, कामायुस्, चिराद, विष्णुरथ, अमृताहरण व सुधाहर, सुरेन्द्रजित् आणि वज्रजित् अशीं गरुडाचीं प्रमुख विशेषणें आहेत.

गरुडपक्षी–एक पक्षी. गरुड हें नांव सामान्यतः गिधाडवर्गांतील मोठमोठ्या पक्ष्यांनां लावण्यांत येतें. गरुड दिवसा चपळ असणाऱ्या पक्ष्यांच्या वर्गांतीलच होत. बुझार्ड पक्ष्यांपेक्षांहि कांहीं ठिकाणीं लहान असे गरुड आढळतात. दक्षिण अमेरिकेंत आढळणाऱ्या हारपीया नांवाच्या पक्ष्यांनां जरी गरुड या नांवानें ओळखतात तरी बुझार्ड पक्ष्यांच्या वर्गांतच त्यांची गणना करण्यांत येते.

जगांतील कोणत्याहि प्रदेशांत अस्सल गरुडपक्षी आपली वस्ती करतात. यूरोपमध्यें गरुडांच्या सात अगर आठ जाती आढळून येतात. पैकीं दोन जाती ब्रिटिश बेटांत वारंवार दृष्टीस पडतात. इंग्लंड व स्कॉटलंडमधील सखल प्रदेशांत हे मधून मधून आढळतात. हे गरुड चोहोंकडे भटकतात. परंतु हायलंडस्‌मधील कांहीं भाग व हेब्राईड्स बेटांत अद्यापहि गरुडपक्षी एकत्र विपुल सांपडतात, व त्यांची संख्या कमी न होता वाढतच आहे असें दिसून येतें. गरुडांच्या अंड्यांनां बाजारांत चांगली किंमत येते हें पाहून धनगर व रानांतील इतर रानटी लोक गरुडांच्या घरट्यांचें संरक्षण करण्याची काळजी घेतात. अशीं घरटीं त्यांनां रानांत कधीं कधीं आढळतात.

ब्रिटिश बेटांत आढळणाऱ्या गरुडांच्या दोन जातींपैकीं 'अर्न' किंवा समुद्रतीरीं रहाणारा गरुड म्हणून एक जात आहे. या जातींतील पक्षी समुद्रतीरीं राहतात. ब्रिटिश बेटांमधील दुसरी जात डोंगरांत रहाणाऱ्या गरुडाची होय. या जातीच्या गरुडांचेंहि इंग्लंडमध्यें पूर्वी वास्तव्य होतेंसें दिसतें. समुद्रकांठीं रहाणाऱ्या गरुडापेक्षां हा अधिक चपळ असून उडतांना हा आपल्या चोंचींत आपलें भक्ष्य घेऊन उडतो. यूरोपमध्यें गरुड पाळून त्यास सावज मारण्यास शिकवितात. किरघिज तार्तर लोक याच जातीचे गरुड पाळून त्यांच्याकडून काळवीट, कोल्हा व लांडगा यांची शिकार करवीत असत असा पुष्कळांचा तर्क आहे. अशा शिकारीच्या वेळेस पारधी लोक गरुडास पिंजऱ्यांत घालून अरण्यांत नेतात व सावज दृष्टीच्या टप्प्यांत येतांच गरुडास त्याच्या अंगावर सोडतात. अशा प्रकारच्या शिकारींत निष्णात असलेल्या गरुड पक्ष्याची किंमत दोन उंटांच्या किंमतीबरोबर आहे असें पी. एस्. पल्लास विधान करतो. या कामीं एकापेक्षां अधिक जातींच्या गरुडांचीहि योजना करणें शक्य आहे. मध्य आशियामध्यें सांपडणाऱ्या ए. हेलिका व ए. मॉगिलनिक नामक जातींच्या गरुडांची शिकार करण्याच्या कामीं विशेष योजना केली जाते.

सर्वांत लहान परंतु अस्सल असा गरुडपक्षी म्हणजे ए. पेन्नाट जातीचा होय. दक्षिण यूरोप, आफ्रिका व हिंदुस्थान या प्रदेशांतून वरील जातीच्या गरुडांची वस्ती आढळते.

ए. ऑडाक्स नामक आस्ट्रेलियांत आढळणाऱ्या जातीच्या गरुडाची शेपटी इतर गरुडांच्या शेपटीहून वेगळ्या आकाराची असते. शेपटीशिवाय याच्या सर्व अवयवांचें इतर गरुडांच्या अवयवांशीं बरेंच साम्य असतें. तथापि शेपूट हें त्याचें वैशिष्ट्य होय. अखेरीस येथपर्यंत न सांगितलेला म्हणजे, लांब तंगड्यांच्या योगानें ओळखला जाणारा गरुडांचा एक लहानसा समुदाय होय. या समुदायांतील पक्ष्यांपैकीं एन्. फॅसिएट्स जातीचे गरुड यूरोपांत आढळतात.

सुवर्णासारख्या अंगकांतीच्या गरुडाचें वसतिस्थान म्हणजे आशिया व यूरोप या खंडांतील पर्वतश्रेणी होत. हिमालय पर्वतामध्यें अशा प्रकारचे गरुड बरेच सांपडतात. यांचा भव्य आकार, सुंदर, गर्द व पिंगट रंगाचा पिसारा, निर्भय मुद्रा, तीक्ष्ण दृष्टि, बळकट पंजे व वेगाचें उड्डाण इत्यादि गुणावरून त्यास 'खगेंद्र' असें सार्थ नांव मिळालें आहे. यांखेरीज 'क्राउन्ड' (मुकुटयुक्त) गरुड आफ्रिकेंत, 'सुपर्ब' (भव्य) मिनिआंत, 'चीला' हिंदुस्थानांत, 'रॉयल' आफ्रिकेंत आणि दक्षिण अमेरिकेंत व 'बल्चराईन' (गिधाडी) गरुड कॅफेरियांत सांपडतो. कित्येक राजवंशांच्या चिलखतांवर सामर्थ्याच्या निदर्शनादाखल गरुडाचें चिन्ह असतें.

गरुडपुराण – अठरा महापुराणांतील एक. हें पुराण वैष्णवपंथाचें आहे; यामध्यें गरुड पक्ष्यानें विष्णूच्या आज्ञेवरून या परमेश्वरा(विष्णू)च्या महिम्याचें तत्व वर्णन केलें आहे जगदुत्पत्ति, आदित्यरूपी विष्णूची भक्ति, विष्णूची अमूर्त पूजा, शिव व इतर दैवतांची पूजा व इतर समारंभ वगैरे गोष्टी यांत आल्या आहेत. यांत सूर्य व सोमवंशी राजांच्या वंशावळी दिल्या आहेत. रामायण, महाभारत व हरिवंशांतील माहिती यांत दिली आहे आणि इतर हरएक माहिती—वैद्यक, साहित्यशास्त्र, व्याकरण इत्यादि–दिली आहे. शिवाय सर्व प्रकारचीं माहात्म्यें—गयामहात्म्य(गयातीर्थाचें श्राद्धपक्षासंबंधीं महत्व) आणि प्रेतकल्प (मृतांच्या आत्म्यांविषयींचे विधी)-या पुराणांपैकीं होत असें मानतात. या गरुडपुराणाचे (१) आचारकाण्ड, व (२) धर्मकाण्ड असे दोन विभाग असून त्यांपैकीं आचारकाण्डांत एकंदर २४० अध्याय आहेत. धर्मकाण्डाचेहि (१) प्रेतखंड व (२) ब्रह्मखंड असे पोटविभाग पाडलेले असून प्रेतखण्डांत ४९ अध्याय व ब्रह्मखंडांत २९ अध्याय आहेत.

आ चा र कां ड.—मंगलाचरणानंतर नैमिषारण्यांत सूत पुराणिकास शौनकादिक ऋषींनीं नारायणकथांबद्दल विचारलें असतां पूर्वी गरुडानें कश्यपमहर्षीस व नंतर व्यासानें सूतास सांगितलेलें गरुडपुराण शौनकादिकांस सांगण्यास सूत प्रारंभ करितात. त्यांत विष्णूनें कुमार, सूकर, सात्वतमार्गप्रवर्तक देवर्षि, नंतर नरनारायण, सांख्यमतप्रवर्तक कपिल, दत्तात्रेय, यज्ञदेव, उरुक्रम, पृथु, मत्स्य, कूर्म, धन्वतरी, मोहिनी, नृसिंह, वामन, परशुराम, व्यास, दाशरथी राम, रामकृष्ण, भविष्यत् कालीं कीकटांत होणारा बुद्ध व विष्णुयशापासून कल्की अशा रीतीनें घेतलेले भगवंताचे अवतार वर्णन करून गरुडपुराणाच्या उत्पत्तीचे हेतू वार्णिले आहेत. दुसऱ्या अध्यायांत ऋषींनीं गरुडपुराणाची परंपरा विचारल्यावरून पूर्वी विष्णूपासून रुद्रास, ब्रह्मदेवास व नंतर त्याजपासून व्यासनारदयक्षांस व त्यापासून सूतांस हें पुराण कळल्याबद्दल सूत सांगतात. याला 'गरुड पुराण' हें नांव पडण्याचें कारण पूर्वी एकदा गरुडानें विष्णूस आपल्या विनता नांवाच्या आईस सोडविण्यास व आपल्या नांवाची पुराणसंहिता रचण्याविषयीं आपण समर्थ व्हावें म्हणून प्रार्थना केली. त्यावेळीं विष्णूनीं आपलें ध्यान करून त्यास पुराण रचण्यास सांगितलें. कश्यपानें 'गरुडपुराण' ऐकून त्या प्रभावानें वठलेल्या वृक्षांस फलपुष्पांनीं समृद्ध केलें. ३ ऱ्यांत मी तुम्हास पुराण सांगतों असें सूत शौनकादिकांस सांगतात. ४ थ्यांत रुद्रास विष्णु प्राकृत वैकृतिक सृष्टि सांगतो ती: प्रथम अनंतापासून अव्यक्त–आत्मा–बुद्धि–मन–ख (आकाश)–वायु–तेज पाणी–भूमि हीं तत्वें परंपरेनें उत्पन्न होतात. प्रभु हिरण्मय अंडांमध्यें शरीर धारण करतो व तोच प्रभु रजोगुणयुक्त ब्रह्मदेवस्वरूप धारण करून सृष्टिरचना, विष्णुस्वरूपानें पालन व कालस्वरूपानें नाश करतो. पहिली महत्सृष्टि, दुसरी तन्मात्रासृष्टि व तिसरी वैकारिक म्हणजे इंद्रियसृष्टि व चौथी स्थावरसृष्टि. पांच वैकृत सर्ग व तीन प्राकृत सर्ग, अशा रीतीनें चराचर सृष्टि उत्पन्न होते. ५ व्यांत ब्रह्मदेवापासून सप्तर्षी व मरीचाच्या आंगठ्यापासून दक्ष व त्याची पत्नी यांची उत्पत्ति, दक्षयज्ञामध्यें शंकराचा अपमान झाल्यामुळें सतीनें देहत्याग करून हिमालयापासून मेनकेच्या ठिकाणीं जन्म धारण व नंतर पार्वतीपासून विनायकोत्पत्ति दिली आहे. ६ व्या अध्यायांत स्वायंभुव–शतरूपा ह्यांच्यापासून प्रियव्रत व उत्तानपाद, उत्तानपादापासून सुनीति व सुरुचि ह्यांच्या ठिकाणीं ध्रुव व उत्तम ह्यांचें जन्म, त्याचप्रमाणें कश्यपास अदितीच्या ठायीं द्वादशादित्य व त्याचप्रमाणें दितीच्या वंशाचें वर्णन. ७ व्यांत तंत्रपद्धतीप्रमाणें सूर्य, सशक्तिक सरस्वती इत्यादींची पूजा कशी करावी हें सांगितलें आहे. नंतर वज्रनाभमंडल काढून विष्णूची पूजा करण्याचा विधि ८ व्या अध्यायांत वर्णन केला आहे. ९ व्यांत विष्णुदीक्षा देतांना गुरूनें व घेतांना शिष्यानें काय काय गोष्टी कराव्या ह्याचें वर्णन आहे. १० व्या अध्यायांत पद्मभंडलाची रचना कशी करावी व त्यांत देवतांची स्थापना करून समंत्रक महालक्ष्मीचें पूजन कशा रीतीनें करावें ह्याचें वर्णन आहे. ११ व्यांत नऊ व्यूह कोणकोणते व त्यांची अर्चा करण्याचा विधि काय ह्याचें विस्तृत विवेचन आहे. १२ ते ४८ या सदतीस अध्यायांमध्यें विष्णुपंजर, तसेंच विष्णुसहस्रनाम इत्यादि स्तोत्रें त्याचप्रमाणें विष्णु, सूर्य, शिव वगैरे देवतांचें तांत्रिक विधींस अनुसरून पूजन करण्याचे प्रकार, त्याचप्रमाणें साप, नाग ह्यांसारखें विषारी प्राणी चावले

असतां त्यांच्या विषाची बाधा निवारण करण्याचे मंत्र, ग्रहपीडा रोग निरसन इत्यादि करणारीं सुदर्शनचक्रासारखीं मंडलें व त्यांचे पूजनविधी, त्याचप्रमाणें द्विजांनीं संपूर्ण पापांचा नाश करण्याकरितां करावयाचे संध्याविधी इत्यादिकांचें वर्णन आहे. त्याचप्रमाणें ऋषि, देवता, गोत्र इत्यादींच्या विनियोगन्यासासह गायत्रीमंत्र जपण्याचा विधि इत्यादि वर्णन आहे. त्याचप्रमाणें विष्णुलोक प्राप्त करून देणारें सूर्यार्चन कसें करावें, कार्यांत सिद्धि मिळण्याकरितां दुर्गाजप कसा करावा, ज्या मंत्रांनीं पत्नीचा लाभ किंवा वध करतां येतो ते मंत्र, त्याचप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण करणारें ब्रह्ममूर्तीचें ध्यान कसें करावें, प्रावृट्कालीं विष्णूच्या पवित्रारोपणापासून वर्षभर विष्णुपूजा केल्याचें फल कसें प्राप्त होतें, त्याच प्रमाणें चारी पुरुषार्थ साधून देणारीं शालग्राममूर्तींचीं लक्षणें कोणतीं, घरें, राजवाडे, देवालयें, बागबगीचे इत्यादींचीं शुभाशुभ लक्षणें कोणतीं इत्यादि विविध विषयांचें वर्णन ह्या अध्यायांतून आलें आहे. ४९ते ५२ ह्या चार अध्यायांपैकीं पहिल्या अध्यायांत स्मृत्युक्त वर्णधर्म व आश्रमधर्म यांचें संक्षेपानें विवरण आहे व तदनंतरच्या अध्यायांत सर्व वर्णांनां सामान्य असा दिनचर्याविधि निरूपण केला आहे. ५१ व्या अध्यायांत दानविधीच्या नित्य, नैमित्तिक व काम्य अशा तीन प्रकारांचें विवेचन असून ५२व्यांत पांच महापातकें कोणतीं व त्यांस प्रायश्चित्तें कोणतीं ह्याचा विचार आहे. ५३ व्या अध्यायांत प्रश्नोत्तरादि नसतां एकदम निराळया विषयांचें विवेचन सुरू होतें त्यावरून हा प्रक्षिप्त भाग असावा. ह्यांतील विषय मार्कंडेय पुराणांतील ६६व्या अध्यायांतील आहे तो असाः—पद्म, महापद्म, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील, शंख, असे आठ दैविक निधी आहेत ते पूर्वपुण्याईनें मनुष्यप्राण्यास प्राप्त झाले असतां त्यास निरनिराळ्या प्रकारचीं फलें प्राप्त होतात. ह्या देवतारूप निधींपैकीं पद्म व महापद्म हे सात्विक, मकर व कच्छप हे तामस, मुकुंद व कुंद हे राजस, नील हा सत्वरजोयुक्त व शंख हा रजस्तमोयुक्त असतो असें वर्णिलें आहे.

५४ते५८या पांच अध्यायांत भूगोल व खगोलसंबंधीं सर्व पौराणिक कल्पनांचें वर्णन आलें आहे. स्वायंभुव वंशांतील प्रियव्रत यानें आग्नीध्रादि सात मुलांनां सात द्वीपें वांटून दिलीं त्यांपैकीं जंबुद्वीपाचा राजराजेश्वर आग्नीध्र यानें आपल्या नाभी प्रभृति नऊ मुलांनां नवखंडें विभागून दिलीं; भरतखंडामध्यें निरनिराळ्या दिशांस किरात, यवन, आंध्र, ब्राह्मणादिकांची वस्ती असल्याचें वर्णन आहे. त्यानंतर महेंद्रादिपर्वत व तापीपयोष्णी वगैरे नद्यांची माहिती आहे. ५६ व्या अध्यायांत इतर द्वीपें, त्यांचे अधिपती वगैरेंचें वर्णन आहे. ५७ व्यांत नागलोक, पाताळ लोक त्याचप्रमाणें पुष्करद्वीपांतील रौरवादि नरकांचें वर्णन आहे. ५८व्या अध्यायांत खगोलसंबंधीं म्हणजेसूर्य व चंद्र इत्यादींचा प्रवास, त्याच प्रमाणें सप्तर्षी वगैरे नक्षत्रांच्या परिभ्रमणासंबंधीं हकीकत आली आहे,

५९ ते ६७ या अध्यायांतील मुख्य विषय फलज्योतिष व सामुद्रिक इत्यादिकांसंबंधीं आहे. सत्तावीस नक्षत्रांच्या देवता कोणत्या, मोठमोठ्या इमारती बांधण्यास किंवा कार्यसिद्धि तत्काल होण्यास शुभमुहूर्त कोणते, नवग्रहांच्या दशा व त्यांचीं शुभाशुभ फलें व तन्निवारणीय उपाय कोणते, बाराव्या स्थानीं असलेल्या चंद्राचें फळ काय, लग्नकुंडली विज्ञानावरून शुभाशुभ योग कोणते, सामुद्रिक शास्त्राप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या हस्तरेषांचीं फलें काय, लक्षण काय, त्याचप्रमाणें स्वरोदयानुसार उजव्या व डाव्या नासिकेंतून स्वर वहात असतांना कार्यसिद्धीचीं शुभाशुभ लक्षणें कोणतीं इत्यादि गोष्टींचा उहापोह केलेला आहे.

६८–८० या तेरा अध्यायांतील विषय म्हणजे वज्र, मोतीं, पद्मराग, मरकत, इंद्रनील, वैडूर्य, पुष्पराग, कर्केतन, भीष्म, पुलक, रुधिराक्ष, स्फटिक व विद्रुम इत्यादि मूल्यवान रत्नांची उत्पत्ति कशी होते, त्यांच्या किंमतीची परीक्षा कशा रीतीनें करावी, त्यांचीं शुभाशुभ लक्षणें कोणतीं इत्यादि गोष्टींबद्दल उपयुक्त विवेचन आहे.

८१ते८६ यांत गंगाद्वार, प्रयाग, वाराणसी, कुरुक्षेत्र, प्रभास, द्वारका, सरस्वती, केदार, संभलग्राम, बदरिकाश्रम, श्वेतद्वीप, माया, नैमिषारण्य, पुष्कर तीर्थ, अयोध्या, चित्रकूट, गोतमी, रामगीर्याश्रम, कांची, तुंगभद्रा, श्रीशैल, सेतुबंध रामेश्वर, कामतीर्थ, उज्जयनी, कावेरी, चंद्रभागा, मथुरा, शोणनद, जंबूसर, महेंद्रपर्वत, कावेरी, गोदावरी, पयोष्णी, विंध्य, नर्मदा, गोकर्ण, गोवर्धन पर्वत, कृष्णवेणी, भीमरथी, गण्डकी, इरावती, बिंदुसरतीर्थ इत्यादि महातीर्थे प्रसिद्ध आहेत, परंतु त्या सर्वांत गया क्षेत्र अक्षय ब्रह्मलोक देणारें आहे. कारण अशी आख्यायिका आहे कीं पूर्वीं गयासुर नामक दैत्यानें देवांनां तपानें जिंकल्यामुळें सर्व देव विष्णूला शरण गेले, तेव्हां एकदां क्षीरसागर समुद्रांतून शिवपूजेकरितां कमलें आणून गयासुर कीकट देशांत विश्रांति घेण्याकरतां पहुडला त्यावेळीं विष्णूनीं आपल्या गदेचा आघात करून त्याचे प्राण हरण केले व तेव्हांपासून गदाधर विष्णू तेथें नेहमीं मुक्ति देण्यास उभे आहेत. ह्या ठिकाणीं प्राण्यांनीं श्राद्ध, दान इ. केल्यास त्यांनां मुक्ति मिळते असें सांगितलें आहे. ८६ व्या अध्यायांत एकंदर गयाश्राद्धाचा विधि सांगितला आहे.

८७ व्या अध्यायांत स्वायंभुव, स्वारोचिष, औत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्ण्य, दक्ष, सावर्ण्य, धर्मपुत्र, दक्षपुत्र मनु, रौच्य, भौत्य इत्यादि पहिले सहा गत मनू, सध्यां चालू असलेला मधला वैवस्वत व पुढील होणारे सात मिळून चौदा मनू, त्यांचे पुत्र, ऋषि, देव वगैरे दिले आहेत. ८८ व्या अध्यायांतील कथा म्हणजे रुचि नामक प्रजापति हा दारसंग्रह म्हणजे पापाचें

मूळ असें समजून अग्नीची पूजा न करतां फिरत असतां त्याच्या पितरांची गांठ पडली व त्यांनीं पुत्राशिवाय कोणासहि सद्गति मिळणार नाहीं असें सांगून ते अंतर्धान पावले. ८९ व्या अध्यायांतलि कथा भाग म्हणजे ह्या पितृगणांचा उपदेश ऐकून रुचीला दारापरिग्रह करावा असें वाटूं लागलें, परंतु कन्या मिळेना तेव्हां त्यानें ब्रह्मदेवास संतुष्ट करून निरनिराळ्या स्तोत्रांनीं पितरांस संतुष्ट केलें. नंतर त्याला सुंदरी नांवाची भार्या प्राप्त होऊन तीपासून मन्वंतरकर्ता पुत्र होईल असा वर मिळविला. ह्या पितृस्तोत्राच्या पठनानें कोणतें फळ मिळतें हेंहि मध्यंतरी सांगितलें आहे. ९० व्या अध्यायांत वरुणाचा मुलगा पुष्कर याच्या प्रम्लोचा स्त्रीच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या मानिनि नामक कन्येशीं रुचीचा विवाह होऊन तिच्यापासून रोच्यमनू उत्पन्न झाला. ९१ व्या अध्यायांत स्वायंभुवादि मनूंनीं भगवंताचें ध्यान कोणत्या प्रकारें केलें ह्याचें वर्णन आहे. ९२ व्या अध्यायांत भगवंताच्या व्यक्त व अव्यक्त उपासनांपैकीं व्यक्त उपासना कशी करावी हें सांगितलें आहे.

९३–१०४ यांतील पहिल्या अध्यायांतील मजकूर बहुतेक याज्ञवल्क्यस्मृतींतून अनुक्रमभेदानें घेतलेला आहे व शेवटचा १०७ वा अध्याय ह्या पराशरस्मृतीवरून घेतलेला दिसतो. प्रथम ९३ व्या अध्यायांत गर्भाधानादि संस्कार विवाहाशिवाय अमंत्रक करावे असें वर्णन आहे.९४व्या अध्यायांत ब्रह्मचर्याश्रम निरूपण व ९५व्या अध्यायांत गृहस्थाश्रम धर्मनिरूपिला आहे. ९६ त संकरजातींचीं कर्में सांगितलीं आहेत. ९७ व्यांत सौवर्णराजतताम्रादि पात्रांची शुद्धि करण्याचे प्रकार सांगितले असून ९८ व्यात दानधर्म व प्रतिग्रह घेण्यास अधिकारी कोण हें सांगितलें आहे. ९९ व्यांत अमावास्या वगैरेसारख्या पर्वदिनी करावयाचा श्राद्धविधि सांगितला आहे. १०० व्यांत विनायक नांवाच्या ग्रहाच्या पीडेचें निवारण कसें करावें हें सांगितलें आहे. १०१ व्यांत सूर्यादि नवग्रहांची शांति कशी करावी हें सांगितलें आहे. १०२ या अध्यायांत वानप्रस्थाश्रमधर्म व १०३ अध्यायांत संक्षेपानें याज्ञवल्क्यप्रणीत संन्यासधर्माचें निरूपण केलें आहे. १०४ मध्यें मानवी प्राण्याच्या पातकांमुळें त्याला नरकयातना कशा भोगाव्या लागतात व राहिलेल्या पातकामुळें निरनिराळ्या प्रकारचे रोग कसे होतात इत्यादि वर्णन आहे. १०५ अध्यायांत ब्रह्महत्यादि पांच महापातकें व त्यांचीं प्रायश्चित्तें ह्यांचें निरूपण आलें आहे. १०६ व्या अध्यायांत खनन व अग्निदहन करण्यास योग्य कोण व त्यांचें अशौच किती ह्याचें विवेचन आहे. १०७ अध्यायांत पराशरोक्त वर्णाश्रमधर्मांचें सामान्य निरूपण आहे.

१०८–११५ ह्यांपैकीं १०८ व १०९ ह्या दोन अध्यायांत सामान्य नीतिदर्शक सुभाषितांचा संग्रह केला आहे. ११० मध्यें राजनीतिवर्णन असून राजानें कसें वागावें ह्याबद्दल, त्याचप्रमाणें १११ व ११२ ह्यामध्यें राजपुरोहित, मंत्री, इत्यादि कशा प्रकारचे नेमावेत ह्याबद्दल विवेचन आलें असून पुढील तीन अध्यायांत स्त्रिया व पुरुष यांनीं सामान्य वागणूक कशी ठेवावी याबद्दल सुभाषितें ग्रथित केलेलीं आहेत.

११६–१३७ ह्या २१ अध्यायांत द्वादशमासांतील निरनिराळ्या व्रतांचें निरूपण आलें आहे.प्रथम ११६व्या अध्यायांत प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत असणारीं निरनिराळीं व्रतें व त्यांच्या देवता इत्यादिकांचें विवेचन असून नंतर पुढें क्रमाक्रमानें अनंगत्रयोदशीव्रत, अखंडद्वादशीव्रत, अगस्त्यार्घ्यव्रत, रंभातृतीयाव्रत, चातुर्मास्यव्रत आश्विन शुक्ल ११ पासून कार्तिक शुक्ल ११ पर्यंतचें मासोपवासव्रत, भीष्मपंचकव्रत, शिवरात्रिव्रत व त्या प्रसंगीं सुंदरसेनक नामक फासेपारध्याला अजाणतां हें व्रत घडल्यामुळें शिवलोकाची प्राप्ति कशी झाली ही कथा, एकादशी व्रत, नारायणार्चन विधि, माघ शुक्लैकादशीच्यावेळीं सुवर्णाच्या वराह देवतेचें पूजन करण्याचा विधि, एकंदर सर्वसामान्य व्रतांची परिभाषा, उद्धारपंचमी, मरीचसप्तमी, फलसप्तमी, ओदनसप्तमी, विजयसप्तमी, दूर्वाष्टमी, गोकुळाष्टमी व कृष्णजन्मोत्सव व्रत, बुधवासरयुक्त बौधाष्टमीला बुधाचें पूजन व वीरनामक ब्राह्मणाची कथा आहे ती अशी:—पाटलिपुत्रनगरांत वीर नामक ब्राह्मण रहात असून त्याची रंभा नांवाची पत्नी व कौशिक नांवाचा एक पुत्र व विजया नांवाची मुलगी होती. कौशिक आपल्या धनपाल नामक बैलास घेऊन गंगा नदींत क्रीडा करीत असतां कांहीं चोरटया गवळयांनीं बैल चोरून नेला त्यामुळें कौशिक दुःखित होत्साता अरण्यांत फिरूं लागला व विजयहि फिरूं लागली. एके ठिकाणीं सरोवराच्या कांठीं कांहीं समारंभ चालत असतांना क्षुधित झाल्यामुळें त्यांनीं अन्नाची याचना केली. तेव्हां त्या दिव्य स्त्रियांनीं त्यांनां बुधाष्टमी व्रत करण्यास सांगितलें. यानंतर १३३ अध्यायांत अशोकाष्टमी व्रत, महानवमी व्रत, दमनकनवमी व्रत, दिग्दशमी व्रत, ऋष्येकादशी व्रत, श्रवणद्वादशी व्रत, अनंगत्रयोदशी व्रत, धाम व्रत, व वारव्रतें हींहि सांगितलीं आहेत. ह्या आठ अध्यायांत एकंदर भूतभविष्य राजांचीं वंशवर्णनें आहेत. प्रथम विष्णूच्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव, ब्रह्मदेवाच्या आंगठयापासून दक्ष, त्यापासून आदिति, तिजपासून सूर्य व त्यापासून पुढें सूर्यवंशांतलि अनेक राजे झाले. ब्रह्मदेवाचा पुत्र अत्रि, त्यासून चंद्र, चंद्राचा गुरुपत्नी तारा हिच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला बुध, त्याचप्रमाणें पुढें कर्णसुत जो वृषसेन त्याच्यापर्यंत चंद्रवंशाची हकीकत आली आहे. त्याचप्रमाणें परिक्षित जनमेजयापासूनचे भावी राजे कोणकोण होणार हें थोडक्यांत सांगितलें आहे. पुढें विष्णूचे दहा अवतारवर्णन व त्याचवेळीं सीतेच्या पातिव्रत्याचें वर्णन करून त्या प्रसंगानें अनुसूयानामक पतिव्रतेनें मांडव्य ऋषीच्या मृत्युकारक शापापासून आपल्या कौशिक नामक कोड्या नवऱ्याचें कसें संरक्षण केलें ह्याचें वर्णन असून पुढें थोडक्यांत श्रीरामचरित्र व श्रीकृष्णचरित्र

हेंहि वर्णिलें आहे. त्याचप्रमाणें शेवटी समग्र भारतेतिहासाचा सारांशहि दिला आहे.

१४६-१९४ व्या अध्यायांतील विषय म्हणजे आर्यवैद्यकशास्त्राचें संपूर्ण विवेचन हा होय. ह्यांत निरनिराळे ज्वर, क्षयादि रोग, त्यांचीं लक्षणें, त्यांचे प्रकार, त्यांवर औषधोपचार इत्यादि सशास्त्र विवेचन आहे. ह्यावरून हे श्लोक कोठून तरी उद्धृत केले असावेत असें वाटतें. एकंदर सर्व आर्यवैद्यकप्रकरण धन्वंतरीनें सुश्रुतास सांगितलें असें दाखविलें आहे. प्रथम रोगांचें निदान सामान्यतः कसें करावें हें सांगून कफवातपित्त या त्रिदोषाप्रमाणें ज्वरभेद सांगितले असून नंतर रक्तपित्त, कास, श्वास, हिक्का, राजयक्ष्मा, अरोचक, आम्लपित्त, मदात्यय, अर्श, अतिसार, मूत्राघात, प्रमेह, विद्रधि, उदर, पाण्डुरोग, विसर्प, कुष्ठ, कृमि, वातव्याधिरोग इत्यादींचीं निदानें पृथक् अध्यायांत विवेचन केलीं असून सर्व सामान्य वैद्यशास्त्राची परिभाषा निरूपण केली आहे. व त्यानंतर निरनिराळे ज्वररोग, नाडीव्रणरोग, स्त्रीरोग, त्याचप्रमाणें रोग हरण करणारीं मधुरतिक्तद्रव्यें इत्यादींचें निरूपण आहे. १७४ व्या अध्यायापासून पुढें स्मरणशक्ति वाढवणारें ब्राह्मीघृत, नारायण तेल, अजमोदा तेल, टक्कलावर केशोत्पत्ति करणारें भृंगराजतेल, कर्णरोग हरण करणारें देवदारू तेल, लिंगबाहुस्तनकर्ण इत्यादि अवयवांची वृद्धि करणारे निरनिराळे लेप, कावीळ, भाजलेलें अंग, डास, पिसवा, ढेंकूण, इत्यादिकांचे नाश करणारे धूप व तेलें, स्त्रीपुरुष वशीकरणास उपयोगी असे धूप, तिलक, तांबूल वगैरे, त्याचप्रमाणें अग्निमांद्य, कुष्ठ, शूळ, निरनिराळ्या विषारी प्राण्यांचीं विषें उतरविण्याचे लेप इत्यादींचें सांगोपांग निरूपण आहे व सरतेशेवटीं सर्वरोग हरण करणारा विष्णुपूजाविधि व वैष्णव कवच यांचें निरूपण आहे. प्रथम वैष्णवकवचाच्या पठनानें चित्रकेतूला विद्याधराधिपत्य प्राप्त झाल्याबद्दल वर्णन असून नंतर मोक्षप्रद असा विष्णुधर्म सांगितला आहे. १९७ व्यांत एकंदर नागजाती वश करण्याचे गारुडमंत्र निरूपिले आहेत व नंतर नित्यक्लिन्नानामक विद्या सांगितली असून स्त्रीपुरुषांचें यशापयश सुचविणारें चूडामणिसंज्ञक यंत्रोद्धारकथन असून उजव्या व डाव्या नाकपुडींत श्वासोच्छ्वास होत असतां त्याचीं फलें काय हें सांगितलें आहे. २०१ अध्यायांत हत्ती, घोडे, यांच्या रोगनिवारणाबद्दल औषधक्रिया कशी करावी हें सांगितलें असून २०२ मध्यें स्त्रियांचा योनिशूल हरण करण्याचा उपाय, जराहरणाचा उपाय, वाजीकरणाचा उपाय हे सांगितले आहेत. पुढील दोन अध्यायांमध्यें चतुष्पाद जनावरें व वनौषधी यांच्या रोगावरील उपायांचें विवेचन आलें आहे.

२०५-२१२ ह्या आठ अध्यायांतील विषय म्हणजे व्याकरण, छंदःशास्त्र यांचें विवेचन होय. ह्यांपैकीं पहिल्या (२०५।२०६ ह्या) दोन अध्यायांत "सुप्तिङन्तं पदं ख्यातं" अशी पदाची व्याख्या देऊन सात विभक्ती कोणत्या, मुख्य व्यंजनसंधी कसे होतात, समासाचे प्रकार कोणते त्याचप्रमाणें संहिता ग्रंथांतील सिद्धप्रयोगाची उपपत्ति कशी लावावी हें विवेचन आहे. त्यानंतर पुढील सहा अध्यायांत छंदःशास्त्राचें विवेचन असून, आर्यावृत्तें, समविषमअर्धसमवृत्तें विवेचिलीं असून पुढील दहा अध्यायांत गृहस्थाश्रमी लोकांचे आचार व कर्तव्यकर्मे यांचें वर्णन केलें आहेः—उदाहरणार्थ, समंत्रक स्नानविधि कसा करावा, पंचमहायज्ञांची काय अवश्यकता आहे, ब्राह्मणांनीं संध्याविधि अवश्य कां केला पाहिजे, पार्वणश्राद्धें वृद्धिश्राद्धें, सपिंडीकरणश्राद्धें करण्याचे नियम इत्यादि गोष्टींचें विवेचन आलें असून चातुर्वर्णीय लोकांस सर्वसामान्य असे सदाचार नियम विवरण केले आहेत.

आचार काण्डांतील शेवटल्या १८ अध्यायांत कृतादि-चतुर्युगांमध्यें प्रचलित असलेल्या धर्माचें स्वरूप काय आहे, नैमित्तिक व प्राकृतिक प्रलय कोणते, प्राण्याला नानाविध देह धारण कां करावे लागतात, अष्टांग योगाचें स्वरूप काय, विष्णुभक्ति व विष्णुपूजा कशी करावी, शिवकृत नृसिंहस्तोत्रनिरूपण, त्याचप्रमाणें मृत्युसंसारविमोचक भगवत्ध्यान करावयाचा प्रकार, ब्रह्मज्ञानप्राप्ति व आत्मसाक्षात्कार कसा करून घ्यावा, अर्जुनास श्रीकृष्णानीं सांगितलेल्या गीतेचें सार, त्याचप्रमाणे ब्रह्मगतीचें सार व सरतेशेवटीं मंत्र, तंत्र, ज्योतिष, वैद्यक, व्याकरण इत्यादि विविध विषयांनीं युक्त अशा गरुड पुराणाच्या पठणाचें फल काय हेंहि सांगितलें आहे.

धर्मकांड, प्रेतखंडः—या धर्मकांडांतर्गत प्रेतखंडाचे एकंदर ४९ अध्याय आहेत. नांवाप्रमाणेंच अन्वर्थक असे यांतील विभाग आहेत. मनुष्य मृत झाला असतां त्याचे अंत्य संस्कार वर्णाश्रमधर्माप्रमाणें कोणते, त्याचप्रमाणें प्रेत स्थितींत गेलेल्या मनुष्यास भोगाव्या लागणाऱ्या स्वर्गनरकादि गोष्टींचें कल्पनाप्रचुर वर्णन वगैरे भाग फारच मनोरंजक आहे.

पहिला अध्याय हा एकंदर प्रेतखंडास प्रस्तावनेदाखल असून त्यांत शौनकादिक ऋषींनीं नैमिषारण्यांत सूतास एकदां नित्यकृत्यें समाप्त झालीं असतां असा प्रश्न केला कीं "हे सूता, कोणी म्हणतात कीं तृणजलौकन्यायानें देही हा अन्य शरीरें धारण करतो व कांहीं म्हणतात कीं देही हा मध्यंतरी स्वर्गनरकादि उपभोगून नंतर अन्यदेह स्वीकारतो; तर त्यांपैकीं खरी गोष्ट काय ?" त्यावर सूतांनीं उत्तर केलें कीं हे ऋषिगणहो, पूर्वी भगवान् विष्णु व वैनतेय ह्यांमध्यें ह्याच विषयाला अनुसरून संवाद झाला त्यावेळीं भगवंतांनीं गरुडास, मृतांच्या पुत्रादि आप्तेष्टांनीं मरणानंतर मृताची उन्नति कशी करावी, त्याचप्रमाणें मृतास कर्मांच्या गुणाप्रमाणें कशीं फलें मिळतात इत्यादि विषयांनीं युक्त असा 'प्रेतकल्प' नांवाचा विषय कथन केला तोच मी तुम्हाला सांगतो असें सांगितलें.

वरील गरुडप्रश्न ऐकून विष्णूनीं प्रेतकल्प सांगण्यास सुरवात केली. ह्या दोन अध्यायांत कोणतें कर्म केलें असतां कोणता परिणाम होतो, त्याचप्रमाणें मृताचें और्ध्वदेहिक कसें करावें हें सांगून नंतर रौरव, कालसूत्र, अतिशीत इत्यादि नरकांचें साधन कोणत्या पातकांनीं होतें व चौऱ्यांशीं लक्ष योनींची प्राप्ति कां होते याचें विवेचन आहे.

प्रथम मरणातुरानें दशदानें द्यावींत तीं गाय, जमीन, तीळ, सोनें, तूप, वस्त्र, धान्य, गूळ, रुपें, मीठ ह्यांपैकीं असावीत. नंतर यमाच्या वैतरणी नदींतून नीट पार पडण्याकरितां आतुरानें कपिली गाय, किंवा इतर दान केल्यावर मरणासन्न प्राण्यास शक्य तर संन्यास द्यावा, म्हणजे तो ब्रह्मत्वास जातो. प्राणी गतप्राण झाल्यावर त्यास पुत्रादिकांनीं स्नान घालून शुद्ध वस्त्रें, चंदन वगैरेनीं शरीर आच्छादित करावें, व मृताचे जागीं एकोद्दिष्ट श्राद्ध करावें. नंतर तिल, दर्भ, घृत, इंधन बरोबर घेऊन यमगाथा म्हणत मृतास आप्तांनीं न्यावें. दक्षिणदिशेस अरण्यामध्यें दहनभूमि करून वाटेंत पूर्वोक्त दोन श्राद्धें करून नंतर चिताभूमीवर प्रेताची स्थापना करावी व पुनः श्राद्ध करावें. नंतर सुतादिकांनीं स्वतः चितासंभार घ्यावा व यथाशास्त्र वेदी करावी. प्रेतवस्त्राचे दोन भाग करून एकानें प्रेताच्छादन करावें व एक स्मशानरक्षकास द्यावा. नंतर प्रेतहस्तांत पूर्वोक्त विधीनें पिंड द्यावा व प्रेतास मंत्राग्नि देऊन नंतर स्नान वगैरे करून पुनः पुत्रादि आप्तांनीं तर्पण करावें व गृहीं परत यावें व अश्रुपात न करतां संसाराची नश्वरता लक्षांत घेऊन त्याप्रमाणें वर्तन करावें असें सांगितलें आहे.

५–७ पांचव्या अध्यायांत आशौचाचे सामान्य नियम, अस्थिसंचयनकाल, त्याचप्रमाणें प्रेतसंबंधीं दानविधि, व प्रेतास परलोकीं त्रास न व्हावा म्हणून करण्यांत येणारा वृषोत्सर्गविधि, नवश्राद्धाचा काल कोणता, एक वर्षपर्यंत प्रेताच्या सुखाकरितां करण्यांत येणारे विधी, यमदूतांचे व वैतरणी नदीचें भयानक वर्णन इत्यादि विषय आहेत. साहाव्या व सातव्या अध्यायांत अनुक्रमें वृषोत्सर्गानें व विष्णुस्तुतीनें उत्तम गति कशी मिळते याबद्दल कथा सांगितल्या आहेत.

८–१० या अध्यायांत और्ध्वदेहिक क्रियेस अधिकारी नसतांनां जिवंतपणीं आपला आपण श्राद्धविधि कसा करावा त्याचें निरूपण आहे. क्रियाधिकारी आप्त नसल्यास राजास तो अधिकार आहे असें नवव्या अध्यायांत सांगितलें असून त्याबद्दल कथा सांगितली आहे ती अशीः—बभ्रुवाहन राजा मृगया करीत असतां मार्ग चुकला. तों त्याला एक प्रेत भेटलें. त्यावेळीं प्रेतानें त्या स्थितीचें कारण त्यास सांगितलें व त्याच्या निवृत्तीचा उपाय सांगितला; त्यावेळीं राजानें वृषोत्सर्ग विधि केल्यावर त्या प्रेतास मुक्ति मिळाली. १० व्या अध्यायांत श्राद्धांत विप्रास वाढलेलें अन्न द्विजशरीरांतून पितरांना कसें पोहोंचतें व त्यासाठीं श्राद्धविधि अत्यंतावश्यक कसा आहे याचें निरूपण आहे. पुष्करतीर्थावर श्रीरामचंद्र यांनीं दशरथाच्या श्राद्धाकरितां ब्राह्मण बोलाविले असतांनां सीता ब्राह्मणांस पाहून लाजली. श्राद्धसमाप्ति झाल्यावर श्रीरामानें लज्जेचें कारण विचारलें त्यावेळीं तिनें दशरथास पाहिल्याबद्दल सांगितलें असें वर्णन आहे.

यानंतर प्राण्यांनां उच्चनीच गती कशा प्राप्त होतात याबद्दल ११व्या अध्यायांत विवेचन आलें असून १२ व्यांत अण्डज, जारज, स्वेदज, उद्भिज्ज ह्या चार स्थित्यंतराप्रमाणें ८४ लक्ष योनींचें निरूपण केलें आहे; व हीं शरीरें मृत्युकालीं सोडावीं लागतात, एकटा धर्म प्राण्याच्याबरोबर असतो असें सांगितलें आहे. १३ व्यांत वृषोत्सर्गविधि, निरनिराळे दानधर्म व आत्मश्राद्धविधि यांचें निरूपण आहे. प्राणी आर्तदशेंत मृत्युशय्येवर पडला असतां त्याचीं कर्तव्यें म्हणजे हरिभक्ति, दानधर्म, वृषोत्सर्ग इत्यादि असल्याचें वर्णन आहे.

या नंतर १५ व्या अध्यायांत मरणसमयीं किंवा मरणानंतर पुत्रानेंच क्रिया करावी असें सांगून यमलोकाचा विस्तार केवढा आहे तें व त्यांतील प्राण्यांनां भोगाव्या लागणाऱ्या निरनिराळ्या यातनांचें वर्णन आहे. १६ व्यांत यातना भोगण्याकरितां धारण केलेल्या शरीराचा मृत्युसमयीं पुनः त्याग केल्यानंतर यमदूत प्राण्यास पुनः यमलोकास नेतात असें सांगितलें आहे. १७ व्यांत त्रैलोक्यामध्यें काय काय गोष्टी घडत आहेत त्यांजवर नजर ठेवण्याकरितां ब्रह्मदेवानें उत्पन्न केलेल्या श्रमणा नामक देवतांचें केवढें माहात्म्य आहे याचें निरूपण आहे. १८ व्यांत वृषोत्सर्ग, कुंभदान, शय्यादान इत्यादींचीं फलें मृतात्म्यास काय मिळतात त्याचें निरूपण आहे. नंतर जीव यममंदिरांत प्रवेश करतो व यमाज्ञेनें मनुष्य, पशु, पक्षी इत्यादि जन्म जीव कसे घेतो याचें विवेचन आहे. अशा रीतीनें ८४ लक्ष योनी फिरून पुढें प्राणी प्रेतपिशाच्चरूपानें आपल्या घरांतील किंवा मित्राच्या घरांतील आप्तांस कसें छळतात, त्यांचें खाद्यपेय कशा प्रकारचें असतें, इतरांस बाधा कशी देतात याचें २० व्या अध्यायांत सुंदर विवेचन आहे. २१ व्या अध्यायांत प्रेतपीडा अगर पिशाच्चबाधा होत असेल तर व प्रेतपिशाच्चांनां मुक्ति मिळावी याकरितां अयुत गायत्रीजप, किंवा विष्णुबलि किंवा वृषोत्सर्गविधि करावेत असें सांगितलें आहेत. २२ व्यांत जीवास प्रेतत्वास नेणारीं दुष्कर्में कोणतीं, याचें निरूपण असून आधारादाखल संतप्तक ब्राह्मणाचा इतिहास दिला आहे. २३ व्यांत प्रेतांचीं स्वरूपें, चिन्हें, निद्रा, विश्रांति या कशा असतात त्याचें विवेचन आहे.

नंतर २४ व्या अध्यायांत वेदांमध्यें प्राण्याचें आयुष्य शंभरवर्षें दिलें असतांनां अकालिक मृत्यूचें कारण काय असा ऋषींनीं सूतास प्रश्न केल्यावरून सूत सांगतात कीं निरनिराळ्या तऱ्हेचीं पातकें केल्यानें मनुष्य अल्पायुषी होतो व अशा रीतीनें अकालीं मेलेल्या बालकाचा अल्प संस्कार कसा करावा हें सांगितलें आहे. २५ व्यांत मृत बालकाची

अंत्येष्टि वृषोत्सर्ग वगैरेशिवायच करावी असें सांगितलें असून आईबापांची उत्तरक्रिया पुत्रादिकांच्या हातून होणेंच प्रशस्त आहे असें सांगितलें आहे. २६ व्या अध्यायांत सपिंडीकरणापूर्वी सर्व सगोत्रांस आशौच असतें, त्याचप्रमाणें सपिंडीकरणास योग्य काल कोणता व अधिकारी कोण याचें निरूपण आहे. २७ व्यांत बभ्रुवाहन राजा व प्रेत यांच्या संवादरूपानें प्रेतत्वाची निवृत्ति होण्यास खरा उपाय म्हणजे गृह,अनेक पदार्थांची दानें हे होत असें सांगितलें आहे. २८ त श्रीविष्णूंनीं गरुडानें केलेल्या, और्ध्वदेहिक क्रियेंत करावयाच्या अनेक दानांच्या फलांसबंधीं प्रश्नास उत्तरें दिलीं आहेत. २९ व्यांत जीवास परलोकसुखप्राप्ति व्हावी एवढ्यांकरितां पुत्रादिकांनीं अष्टदानें द्यावींत असें निरूपण असून ३०—३१ ह्या दोन्ही अध्यायांत कार्पास, सप्तधान्यें, मीठ, लोह, हेम, जमीन, वस्त्रें इत्यादि वस्तूंचीं दानें केलीं असतां निरनिराळीं कोणतीं फलें प्राप्त होतात याचें निरूपण आहे.

३२–३४ ह्या तीन अध्यायांत मृत्यु, यमलोकाची पौराणिक कल्पना, त्याठिकाणचीं काल्पनिक दुःखें व यातना, सप्तभुवनांचें स्वरूप, पुत्रशब्दार्थाचें विवेचन इत्यादि गोष्टी आल्या आहेत

३५ व्या अध्यायांत प्रथम पिन्डमेलनविधि कसा करावा, त्याचप्रमाणें शव स्मशानांत नेऊन दाह करण्याचा विधि हे सांगितले आहेत. ३६ व्यांत मरणसमयीं भगवंताचें पादोदक घेतल्यानें विष्णुलोकाची प्राप्ति होतें असें सांगितलें आहे. ३७ व्यात यमलोकांत जात असतां पुत्रादिकानीं दानधर्म केला असतां त्यास कमी यातना कशा होतात हें सांगितलें आहे. ३८ व्या अध्यायांत अयोध्यादि सप्तमोक्षपुरींत मृत्यु आला असतां, त्याचप्रमाणें ब्राह्मणाकरितां मरण आलें तर, स्त्रियांनीं सहगमन केलें तर, त्याचप्रमाणें अनाथ प्रेतसंस्कार केला तर, सत्पात्रीं दान, एखादी शिवलिंगपूजा इत्यादि केल्यानें मोक्षप्राप्ति होतें असें विवेचिलें आहे. ३९ व्यांत निरनिराळ्या वर्गांतील लोकांनां सूतककालप्रमाण निरनिराळ्या प्रसंगीं कोणतें असावें त्याचें विवेचन आहे. ४० व्यांत वाईट तऱ्हेनें मरण आलेल्या प्रेतास सद्गति मिळण्याकरितां नारायणबलि कसा करावा हें वर्णन आहे. ४१—४२ या दोन अध्यायांत वृषोत्सर्ग,गोभूमिदान इत्यादींचीं फलें निरूपण केलीं आहेत. ४३–४४ व्यांत जलांत बुडून, अग्नींत दग्ध होऊन मृत झालेल्या.स्त्रिया, मुलें इत्यादिकांची नैसर्गिक शुद्धि असल्याचें व वाईट रीतीनें मृत झालेल्या प्रेतांस सद्गति प्राप्त होण्याकरितां एक वर्षानंतर शुद्ध एकादशीस विष्णुदेवतेचें पूजन व पिंडदान कसें करावें हें विवेचन असून नाग वगैरे चावून मेलेल्यांची क्रिया करण्याचा विधि सांगितला आहे.

या शेवटच्या पांच अध्यायांपैकीं प्रथम ४५व्या अध्यायांत वार्षिक श्राद्धविधि, ४६ व्यांत शुभाशुभ फलें उपभोगून मृत्युलोकांत प्राणी पुनः आला म्हणजे त्याचीं देहचिन्हें कशीं असतात ह्याचें विवेचन आहे. ४७ व्यांत वैतरणीवर्णन व गोदानफल सांगितलें असून ४८ व्यांत भारतवर्षाची प्रशंसा व गर्भयातनांचें वर्णन आहे. ४९ आध्यायांत प्रथम मनुष्य शरीराचें दौर्बल्य, मोक्षधर्मवर्णन त्याचप्रमाणें ह्या प्रेतखंड श्रवणाचें फल सांगितलें आहे.

ब्रह्मखंडः—प्रथमारंभीं शौनकादिक ऋषी हे सूतास ग्रंथारंभीं विष्णु देवतेसच कां नमन करण्याची चाल पडली आहे असा प्रश्न करितात. त्यास सूत पौराणिक उत्तर देतो कीं अष्टादशपुराणांपैकीं कांहीं राजस, कांहीं तामस व कांहीं सात्विक असून त्यांत भागवत, विष्णुपुराण व गारुडपुराण हीं श्रेष्ठ आहेत. कारण विष्णु हा सर्वांत पूजनीय आहे. पुढील अध्यायांत प्रलयानंतर सृष्टिरचनाकालीं एकंदर देवांपैकीं विष्णूचा श्रेष्ठपणा कसा पूजनीय आहे हें वर्णिलें आहे.

१०-१४त वैकृतिक व प्राकृत सृष्टिवर्णन आहे.प्रथम विष्णु ब्रह्मदेव–महत्तत्व व त्यापासून इतर देवता उत्पन्न झाल्याचें वर्णन असून १४व्यांत देवाकरितां योग्य अन्न कसें असावें ह्या विषयावरून वस्तुसारासार निरूपण आहे. प्रथम विष्णूच्या असंख्य अवतारांतील मुख्य अवतार सांगितले असून १६व्यांत लक्ष्मीचे अवतार दिले आहेत. १७ व्यांत भारतीचे द्रौपदी वगैरे अवतार देऊन १८ व्यांत सूत्रनामक वायूपासून गरुडाची उत्पत्ति व शेषावतारवर्णन, त्याचप्रमाणें एकादशरुद्रवर्णन आलें आहे. १९ व्यांत हव्यवाहनकन्या नीला हिच्या तपश्चर्येनें संतुष्ट होऊन भगवंतांनीं तिचा अंगिकार कसा केला तें व २०व्यांत भद्रेनें केलेली भगवत्प्राप्ति,२१व्यांत सूर्यकन्या कालिंदी हिच्या तपानें प्रसन्न होऊन भगवंतांनीं तिचा केलेला स्वीकार,२२व्यांत श्रीकृष्ण लक्ष्मणा यांच्या विवाहाचें कारण, २३ व्यांत जांबवंतीची पूर्व कथा व त्याप्रसंगानें २४, २५ व २६ यांत श्रीव्यंकटगिरिवर्णन व महात्म्य आलें आहे. पुढील २७ व्यांत नंदानदीमाहात्म्य, कुमारीतीर्थमाहात्म्य, सोमपुत्रीचें निवासास पाहून तपाचरण व तीस जांबवंतीचा पुनर्जन्म आला असें वर्णन आहे.२८ व्यांत विष्णूखेरीज इतर देवता त्याज्य हें जीवाच्या सुबुद्धि व दुर्बुद्धि नामक भार्यांच्या संवादात्मक रूपकावरून दर्शविलें आहे. २९ व्यांत धर्माचें जगधारणाचें स्वरूप, भागीरथी वगैरे देवतांचें तारतम्य सांगून विष्णुसंतोषकर धर्मवर्णन व भगवत्तत्व निरूपण करून ग्रंथ समाप्ति केली आहे.

गरुडस्तंभ—हा ओरिसा प्रांतांत आहे. या ओढया प्रांतावर पूर्वी केसरी घराणें राज्य करीत असतां, तें घराणें ब्राह्मणी धर्माचें असल्यानें त्यानें आपल्या राज्यांत व राजधानीच्या जयपुर या गांवीं अनेक देवळें, इमारती वगैरे बांधल्या. त्यांतच हा प्रचंड व कलाकुसरीचा खांब आहे. हा हल्लीं अरण्यांत आहे. केसरी घराण्याचें राज्य गेल्यानंतर मुसलमानांनीं हा पाडण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं

त्याच्याभोंवतीं साखळदंड बांधून हत्तीच्याकडून तो उलथवि- ण्याचे बरेच श्रम केले परंतु तो पडला नाहीं. मात्र त्याच्या माथ्यावर बसविलेल्या गरुडाला त्यांनीं पाडून टाकलें. तथापि ज्यावर तो गरुड बसविला होता तो सुबक दांडा व खालचा सारा स्तंभ अजून शाबूत आहे. हा खांब खि. शकाच्या दहाव्या शतकांत उभारला गेला. याच्या जव- ळच अनेक प्रचंड मूर्ती (इंद्राणी, काली, वसुंधरा वगैरे) आहेत. त्या सर्वांवरून त्या काळचीं हिंदूंची उत्कृष्ट कारागिरी व कलाकुशलता दिसून येते. [वैद्य-मध्ययुगीन भारत पूर्वार्ध; हंटर-ओरिसा.].

गॅरेट्ट (१७९९-१८५४)—व्हिस्कौंडे डी अलमायडा. हा महान् पोर्तुगीज कवि १७९९ मध्यें ओपोर्टो येथें जन्मास आला. त्याच्या प्राथमिक शिक्षणास अँग्रा येथें सुरुवात झाली व तो लहानपणींच कविता करूं लागला. १८१६ त तो कोइंब्रा युनिव्हर्सिटींत बुद्धिमान्, तीव्र उदारमतवादी व वक्ता म्हणून प्रसिद्धीस आला. ' ल्यूक्रीशिया ' नांवाचें त्याचें शोकरसात्मक नाटक तेथें रंगभूमीवर प्रसिद्धीस आलें. त्याच सुमारास ' मिरोप ' व 'केटो' हीं त्याचीं अभिजात नाटकेंहि प्रसिद्ध झालीं. कायद्याची परीक्षा देऊन त्यानें कोइंब्रा सोडलें व लिसबन् येथें १८२२ सालीं त्यानें डी. लुईझा मिडोसी नांवाच्या स्त्रीशीं लग्न केलें. १८२० च्या रॅडिकल राज्यक्रान्तीच्या विरुद्ध चाललेली चळवळ त्यावेळीं शिख- रास पोंचली होती. त्यामुळें अॅबसोल्यूटीस्ट राजमंडळाच्या हुकुमावरून गॅरेट्ट यास पोर्तुगाल सोडून इंग्लंडास जावें लागलें. तेथें जर्मन व इंग्रजी अद्‌भुत वाङ्मयाशीं त्याचा परिचय घडून आला.

राष्ट्रीयत्वाच्या भावनेनें प्रेरित होऊन १८२४ मध्यें त्यानें ' कॅमोइज ' नांवाचें एक काव्य व ' डी ब्रँका' अथवा 'ऑल गार्व्हेची मोहीम' नांवाचें देशाभिमानपर एक गीत रचलें. १८२६ मध्यें वृत्तपत्रकर्त्याच्या व्यवसायांत पडून व ' ओ पोर्तुगीज ' नांवाचें पत्र काढून तत्कालीन राजकीय वातावर- णांत न दिसून येणाऱ्या उदात्त कल्पना प्रस्तुत करून व भाषेंत नेमस्तपणा राखून त्यानें वृत्तपत्रांचा दर्जा चांगल्या प्रकारें वाढविला. परंतु उदार तत्वांचा प्रसार करण्याबद्दल त्याला तीन महिन्यांची शिक्षा झाली व नंतर तो १८२८ त इंग्लंडांत आला. तेथें ' अॅडोझिंडा ' व ' बर्नाल फ्रॅन्सेझ ' अशीं काव्यें लिहून इतर चळवळींहि तो करूं लागला. पोर्तुगालच्या स्वातंत्र्याकरितां फ्रान्समध्यें सैन्य उभारलें जात आहे असें कळतांच डी पेड्रोच्या हाताखालीं स्वयंसैनिक होऊन तो १८३२ त एस्. मिग्युएल येथें गेला. मोअस- इनहो डा सिल्व्हेरा नामक मुत्सद्याचा सहकारी बनून त्यानें पोर्तुगीज सामाजिक घटनेंत क्रांति घडवून आणणारे कायदे तयार केले. ' फ्लोरेस सेम फरूक्टो ' नांवाच्या पुस्तकांत संकलित केलेलीं त्याचीं भावगीतें प्रसिद्ध आहेत. ' अर्को डी सॅंट अॅना ' नांवाच्या त्याच्या ऐतिहासिक कादंबरींत वॉल्टर स्कॉटची छटा दृष्टीस पडते. वरील वाङ्मयात्मक व्यवसाय सांभाळून त्यानें क्रिमिनल व कमर्शिअल कोड वगैरे कायद्याचे ग्रंथ रचले आहेत.

१८३४-३५ मध्यें पोर्तुगॅालचा परराष्ट्रीय वकील म्हणून त्यानें ब्रूसेल्स या ठिकाणीं बरेंच काम केलें. स्वदेशी परत आल्यावर नाट्यकला व राष्ट्रीय नाटकगृह यासं- बंधीं विधायक सूचना करण्याचें काम त्याजवर सोंपविण्यांत आलें. उत्कृष्ट नाटकांकरितां बक्षिसें ठेवून आपल्या नेतृत्वाखालीं नट व नाटककार यांचा एक संप्र- दाय त्यानें स्थापन केला. पोर्तुगीज इतिहासांतील कथा घेऊन नमुन्यादाखल गद्य नाटकें लिहिण्यास सुरुवात करून ' ऑटो डी गिल व्हिसेंट ', ' अलफाजेम डी सँटारेम ' व ' फ्रे लुइझ डी सूझा ' वगैरे नाटकें त्यानें लिहिलीं आहेत.

पार्लमेंटमध्यें १८३७ सालीं प्रवेश झाल्यावर वक्ता म्हणून त्याचा फार लौकिक झाला. त्यानें कॉपिराइट बिल पार्ले- मेंटांत आणलें व त्याचें १८५१ मध्यें कायद्यांत रूपांतर झाल्यावर इंग्लंड व प्राशिया देशांतहि असे कायदे पास झाले. राजकारणाचा उद्योग सुरू असतांनाच ' डी फिलिपा डी व्हिलहेना ', ' व्हायजेन्स ना मिन्हा टेरा ', ' सोब्रिनहा डो मार्क्विझ ' व ' रोमान्सिरो ' वगैरे ग्रंथ त्यानें लिहिले. १८५० सालीं त्यास व्हायकाउंट पद प्राप्त झालें. ' कॉन्सेलहो अल्ट्रा- मॅरिनो ', व ' लॉ ऑफ दि मिझरिकॉर्डिअस ' वगैरे कायदे- ग्रंथ १८५२ मध्यें त्याच्या लेखणींतून उतरले. नंतर तो परराष्ट्रीय खात्याचा प्रधान झाला. ' फॉलहस काह्डिास ' नांवाचें उत्कृष्ट भावनाप्रधान काव्य लिहून त्यानें मोठी कीर्ति मिळविली. त्याचें शेवटचें पुस्तक म्हणजे ' हेलेना ' नामक कादंबरी होय. परंतु ती ९ डिसेंबर १८५४ मध्यें गॅरेट्टनें इहलोक सोडल्यामुळें अपूर्णावस्थेंतच राहिली आहे. कवि, कादंबरीकार, नाटककार,वृत्तपत्रकार व वक्ता या दृष्टीनें गॅरेट्ट हा मूर्तिमंत वाङ्मयच होता असें म्हणण्यांत अतिश- योक्ति होणार नाहीं.

उत्कट धर्मश्रद्धेशिवाय गॅरेट्टमध्यें खोल विचार, स्वयंभु प्रतिभा, सदभिरुचि व विशाल सहानुभूति हे गुण वसत होते. त्याचा व्यापक मायाळूपणा, देशाभिमान, श्रीमंती डामडौल व दिमाख, त्याची भुरळ पाडणारी मोहकता, त्याचें बुद्धि- मत्व इत्यादि अष्टपैलूपणाचें मूळ त्याच्या विदग्धकलात्मक मनोरचनेंत असलेलें आढळून येतें. त्याचीं उत्कृष्ट, गंभीर व शोकपूर्ण भावगीतें त्याच्या नाट्यसृष्टींतील पूर्णता व वैचित्र्य, त्याच्या वक्तृत्वांतील तेज, विनोदांत चमकणारें सत्य व त्याच्या लेखनांत प्रगट होणारें सौंदर्य इत्यादि विविध गुणांचें अधिष्ठान त्याच्या नैसर्गिक कलात्मक मनोरचनेंत होतें. ' फोलहास कॉहिडास ' व 'फ्रेल्युइझ डी सूझा' हे त्याचे ग्रंथ वरील गुणांची साक्ष देऊं शकतील. एकंदर २४भागांत त्याचे सर्व ग्रंथ संपूर्ण झाले असून त्याच्या कित्येक आवृत्तीहि निघाल्या आहेत.

गरोठ—इंदूर संस्थानांतील रामपुरा—भानपुरा सुभायतीचें मुख्य ठिकाण. प्रथमतः हें भिल्लांनीं वसवलें असावें. पुढें १६ व्या शतकांत तें चंद्रावत रजपुताकडे आलें. ऐतिहासिक दृष्टया हें महत्त्वाचें आहे. कारण याच ठिकाणीं मॉन्सन यास यशवंतराव होळकर यांच्या पुढें माघार घ्यावी लागली. १८११ मध्यें गरोठ येथें यशवंतराव होळकरांस भानपुराहून आणलें होतें. कारण तेथें त्याला भूतबाधा होत असे असें म्हणतात. १८३४–४२ पर्यंत येथें महिदपूर कॉन्टिजन्टची एक तुकडी ठेवण्यांत आली होती. कारण त्या वेळीं सोंधिया लोकांनीं दंगेधोपे आरंभिले होते. सुभा आफिसरहि येथेंच रहातो. येथें एक शाळा, दवाखाना व इन्स्पेक्शन बंगला आहे. लोकसंख्या सारी (१९०१) ३४५५ होती. पण नागडा–मथुरा रेल्वे यावरून गेल्यामुळें अलीकडे वस्ती वाढत आहे. येथून १४ मैलांवर पोला डोंगरांत ८ व्या किंवा ९ व्या शतकांतली बौद्ध लेणीं आहेत.

गरोडा—या लोकांची वस्ती राजपुताना व बडोदें संस्थान यांतून आहे. लोकसंख्या (१९११) १७२३५. हे दक्षिण गुजराथ प्रांतांतील भंगी लोकांखेरीज करून इतर सर्व अस्पृश्य जातींचे उपाध्याय आहेत. ते आपल्याला ब्राह्मण म्हणवितात. आपल्या कुलपुरुषानें गुरुभगिनीशीं विवाह केल्यामुळें आपला ऱ्हास झाला असें सांगतात. त्यांच्या जातीविषयीं आणखी बऱ्याच कथा आहेत. त्यांच्यांत असलेल्या दवे, जोशी, नागर वगैरे नांवांवरून ते मूळचे ब्राह्मण असावेत असें दिसतें. पण गोहे व गांधिया हीं रजपूत नांवेंहि त्यांच्यांत आढळतात. हे धेडांच्या पंक्तीला जेवतात, व वाटेल तें खातात. ब्राह्मणांप्रमाणें ते रोज जेवणापूर्वी स्नान करतात. ते राम, देवी व तुळशी वगैरे देवतांनां भजतात, व ब्राह्मणांप्रमाणें व्रतोपवासहि करतात. कित्येक गरोडा लोक रामानंदी व परिणामी पंथाचे आहेत. लग्नांत बाजरीच्या पिठाचें स्थंडिल (साथियो) करून त्यावर एखाद्या सौभाग्य द्रव्यानें नवग्रह मांडण्याकरितां नऊ घरें करितात. अशा स्थंडिलास 'चौशी' (?) असें म्हणतात. चौशीजवळ एक गोधडी अंथरून तिजवर नवरानवरीस बसवितात. त्याच्यापुढें (चौशीजवळ) एक पाण्याचें भांडें, तुपाची वाटी व तुपाचा दिवा लावून ठेवितात. नंतर नवरीचा भाऊ किंवा आतेभाऊ त्या वधूवरांच्या हातांत मणगटाजवळ 'मींढळ' नांवाचें फळ सुताच्या नाड्यांत ओंवून तें बांधितो व एकमेकांचे हात एकमेकाच्या हातांत घालून त्या उभयतांकडून तुपाच्या दिव्याभोंवतीं चार प्रदक्षिणा करवितो. नंतर वधूचा बाप वधूच्या पदरीं व वराचा बाप वराच्या पदरीं एक एक पैसा बांधितो; आणि दोघांच्या वस्त्रांचे पदर एकत्र बांधून त्या जोडप्यास वराच्या आनवसघरीं नेतात म्हणजे लग्नविधि आटोपला. यांच्यांत मृतांना जाळतात व श्राद्धविधि करितात. जातींतील भांडणें तोडण्यासाठीं पंचायती असतात. [मु. गॅ. अलोनी–लग्नविधि व सोहळे].

गरौथा—संयुक्त प्रांत. झांशी जिल्ह्यांतलि एक तालुका. उ.अ. २५°२३. ते २५°४९' पू. रे. ७९° १ते७९°२५'. क्षेत्रफळ ४६६ चौ.मैल. लोकसंख्या (१९११)७२,६२६. एकंदर खेडीं १५० व एक शहर आहे. जमीन थोडीशी काळी असून बाकीची अगदीं कनिष्ठ दर्जाची आहे. साऱ्याचें उत्पन्न (१९०३–४) १,२५,००० व इतर कर २४,००० रुपये. १९४ चौ. मैल जमीन वहितीखाली होती. अलीकडे ३० वर्षें काण (?) नांवाच्या गवताच्या वाढीमुळें जमीन भराभर पडित होत आहे.

गरौली—बुंदेलखंड एजन्सींतर्ले एक लहानसें सनदी संस्थान. क्षे.फ. ३९ चौ. मै. लो. सं(१९११) ५२२२. १८१२ मध्यें दिवाण गोपाळसिंग बुंदेला याला दिलेल्या सनदेनें ब्रिटिश सरकारनें हें संस्थान मान्य केलें. अली बहादुराच्या स्वारीच्या वेळीं गोपाळसिंगनें कोत्री परगणा बळकावला होता. बुंदेलखंड घेतांना इंग्रजांनां यानें बराच अडथळा केला. पण अखेरीस त्यास शरण येणें भाग पडलें. पन्नाच्या महाराजानें त्याला १८ खेडीं बहाल केलीं. हल्लींच्या जहागिरदाराला १९०८ मध्यें अधिकार मिळाले. जहागिरींत १७ खेडीं आहेत. ११ चौरस मैल जमीन लागवडींत आहे व २५००० रु. वसूल आहे. मुख्य ठिकाण गरौली हें धसाण नदीच्या कांठीं आहे. तेथील वस्ती (१९०१) ८७८.

गर्ग(१)—वैदिक कालामध्यें गर्ग कुलाची स्थापना झाली व त्याचें श्रौत धर्मात थोडेसें वैशिष्ट्य स्थापन झालें. गर्गत्रिरात्र नांवाची एक सोमसंस्था वेदग्रंथांत वर्णिली आहे. या प्राचीन गर्गाचा ज्योतिषाशीं संबंध दिसत नाहीं. पुराणांत गर्गाचें स्वरूप निराळें दिसतें. कालयवन नांवाच्या एका परक्या जातीच्या शिष्याचा हा पुरस्कर्ता होता आणि त्यामार्फत कांहीं सामाजिक क्रांति घडवून आणणारा एक गर्ग दृष्टीस पडतो. याज्ञवल्क्याबरोबर वादविवाद करणारी प्रसिद्ध विदुषी गार्गी ही कोणत्या गर्गाची मुलगी असावी हें निश्चित होत नाहीं.

(२)एक प्राचीन ज्योतिषी, यादवांचा उपाध्याय गर्ग व हा एकच कीं काय हें सांगतां येणार नाहीं. कारण गर्ग नांवाच्या पौराणिक व्यक्ती अनेक आहेत. वराहमिहिरानें आपल्या ग्रंथांतून जागोजाग सर्व प्राचीन ग्रंथकारांच्या आधीं गर्गाचा उल्लेख केला आहे. यावरून गर्गसंहिता अत्यंत प्राचीन दिसते. हल्लीं गर्गसंहिता दोन तीन प्रकारच्या उपलब्ध आहेत. त्यांत मूळ कोणती हें ठरविणें कठिण पडेल. गर्गाला ज्योतिषी मुहूर्तांच्या बाबतींत प्रमाण मानितात. तेव्हां त्याच्या नांवावर वाटेल तीं विधानें दडपून देण्याची जुनी वहिवाट प्रचलित आहे. वृद्ध गर्ग नांवाचा ज्योतिषी वेगळा दिसतो. याचाहि वराहमिहरानें अनेकदां उल्लेख केला आहे. तो वराहापूर्वी दोन तीनशें वर्षें होऊन गेलेला दिसतो.

गर्गोव्हिआ—आरव्हरनी प्रांताचें राजधानीचें शहर. हें फ्रान्समधील पुई डोमपासून आठ मैलांवर असून एका टेंकडीवर वसलें आहे. इ. स. पूर्वी ५२ व्या वर्षी ज्युलीअस सीझरनें या शहरावर हल्ला केला. त्या वेळच्या कांहीं भिंतींचे अवशेष अजून दृष्टीस पडतात. गॉल प्रांत हातीं आल्यावर येथील रहिवाशांनीं या शहराचा त्याग केला. व आगस्टोनीमेटम या नवीन शहरांत जाऊन वस्ती केली.

गर्दभील—कुशान राजांपैकीं शेवटचा राजा वासुदेव. याच्या नंतर ख्रि. श. च्या तिसऱ्या शतकांत उत्तर हिंदुस्थानांत कांहीं वर्षे साम्राज्यसत्ता अशी कोणती एकच न राहतां, अनेक लहान लहान राज्यें सर्वत्र पसरलीं. पुराणांच्या आधारावरून त्यावेळीं वायव्येकडून ज्या बाह्य लोकांच्या टोळ्या इकडे अल्या व ज्यांनीं आंध्रांच्या साम्राज्याचा नाश झाल्यानंतर आपलीं राज्यें स्थापलीं, त्या आभीर, शक, यवन, बाल्हिक या लोकांबरोबरच गर्दभील यांचेंहि नांव सांपडतें. या गर्दभीलांनींहि आपलें एक छोटेसें राज्य स्थापन केलें होतें. वरील सर्व लोकांचीं राज्यें समकालीन असून ठिकठिकाणीं पसरलेलीं होतीं [स्मिथ-अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया.]

गर्भधारण, आयुर्वेदीय.—वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांची आर्तवव शुक्र हीं शुद्ध असून स्त्रीचा योनी व गर्भाशय हीं शुद्ध असतां गर्भधारणा होते. याशिवाय हृदयाची (मनाची) प्रसन्नता व वायूची समता, यांचीहि गर्भधारणेस आवश्यकता आहे. स्त्री सोळा वर्षांच्या पुढें व पुरुष वीस वर्षांच्या पुढें प्रायः वयांत येतात. या वयांत झालेली संततीच पराक्रमी व दीर्घायुषी निपजते.

वयाच्या बाराव्या वर्षापासून पन्नास वर्षेपर्यंत प्रायः दरमहा कफमिश्रित रक्त स्त्रियांच्या योनिमार्गांतून येतें. त्यास आर्तव म्हणतात. हें आर्तव वायु, पित्त व कफ या दोहानीं युक्त, तसेंच दुर्गंधी, गांठाळलेलें, पुवासारखें, कमी असलेलें व विष्ठेच्या रंगाचें असतां गर्भधारणेस अयोग्य असतें. पुरुषाचें शुक्रहि दुर्गंधी इत्यादिक व वातादिक दोषांनीं युक्त असतां बीज होण्याला असमर्थ असतें. लाखेच्या रसाप्रमाणें किंवा सशाच्या रक्ताप्रमाणें असून ज्याचा डाग वस्त्रास पडत नाहीं तें आर्तव शुद्ध समजावें. तूप, मध, व तेल यांच्या रंगासारखें असून जें पुष्कळ आणि स्निग्ध असतें तें शुक्र शुद्ध समजावें. मैथुनकालीं योनिमार्गानें पुरुषाचें शुक्र वायूच्या सहाय्यानें गर्भाशयांत जाऊन तेथील आर्तवांतील बीजांशी शुक्रांतील बीजभाग संमिश्र होऊन गर्भधारणा होते. शंखाला ज्याप्रमाणें वळ्या असतात. त्याप्रमाणें योनीलाहि तीन वळ्या (आवर्त) आहेत. त्या एकामागें एक अशा आहेत. त्यांपैकीं शेवटच्या वळीला गर्भाशय जोडलेला आहे. तो रोहित नांवाच्या माशाच्या तोंडासारखा असून आकारानें तेवढाच आहे. त्याचें तोंड योनीकडे असतें. या गर्भाशयांतच गर्भ वाढतो. गर्भधारणा झाल्यावरोबर स्त्रीस दमल्यासारखें वाटतें, तहान लागते, योनीचें स्फुरण होतें, ग्लानी येते, छातींत धडधडतें व रोमांच उभे रहातात. हीं लक्षणें चाणाक्ष स्त्रियांनाच समजतात. रजोदर्शन झाल्या दिवसापासून बारा दिवसच गर्भधारण होतें असें पुष्कळ आचार्यांचें मत आहे. परंतु बारा दिवसांनंतरहि गर्भधारणा होते असें सुश्रुतकारांचें मत आहे. रजोदर्शनानंतर पहिले तीन दिवस गर्भधारणा होत नाहीं. कारण योनिमार्गानें आर्तव पुष्कळ जात असतें. त्यामुळें आंत शुक्र रहात नाहीं. कदाचित् गर्भ राहिलाच तर तो रोगी, अल्पायुषी असतो. म्हणून पहिले तीन दिवस स्त्रीनें ब्रह्मचारिणी असावें. व दुधाचें किंवा सातूचें अन्न थोडें खावें. त्या योगें कोठ्याचें नीट शोधन होतें व गर्भधारणाला योग्य अशी गर्भाशयादिकांची शुद्धि होते. स्त्री पुरुषांची ज्या प्रकारची चित्तवृत्ति असते त्या प्रकारचें मूल होतें म्हणून आईबापांनीं नेहमीं विशेषतः संभोगकालीं उदार अशा विषयांचें चिंतन करावें म्हणजे संतति चांगल्या आचारविचारांची निपजते. गर्भ स्त्री किंवा पुरुष होणें हें सुद्धा स्त्रीच्या विचारांवर अवलंबून आहे असें वैद्यशास्त्रज्ञांचें मत आहे; व त्यास अनुसरूनच आपल्या सोळा संस्कारांत "पुंसवन" नांवाचा संस्कार सांगितला आहे. पुष्य नक्षत्र असेल त्यादिवशीं सोनें, चांदी किंवा लोखंड यांचा पुरुषाकृति पुतळा करून तो तापवून दुधांत विझवावा व तें दूध नुक्ताच गर्भ राहिलेल्या स्त्रीस पाजावें म्हणजे मुलगा होतो.

रजोदर्शन झाल्यापासून चार, सहा अशा समरात्रीं किंवा अकराव्या रात्रीं गर्भ धारण झालें असतां मुलगा होतो असें कांहींचें मत आहे. गर्भधारणाच्या वेळीं शुक्र जास्त असेल तर मुलगा व आर्तव जास्त असेल तर मुलगी आणि दोन्ही सारखीं असतां नपुंसक होतो असेंहि कांहीं लोकांचें मत आहे. गर्भधारणा झाल्यानंतर म्हणजे शुक्रार्तवांचा संयोग झाल्या नंतर सात दिवसांनीं त्याचा पातळ फुगीर ठिपका (कलल) होतो. नंतर एक महिन्यानें त्या ठिपक्याचा घट्ट गोळा, किंवा चापट पिशवीसारखा असलेला, अथवा अर्बुदाच्या आकाराचा पदार्थ बनतो. त्यापासून अनुक्रमें वाटोळा गोळा असल्यास पुरुष, चापट असल्यास स्त्री व अर्बुदाकार असल्यास तृतीयप्रकृति अशीं अपत्यें होतात. तिसऱ्या महिन्यांत दोन हात, दोन पाय व डोकें असे मधल्या अंगास पांच अवयव उत्पन्न होतात व सर्व अंगें, व प्रत्यंगें यांचे सूक्ष्म आकार होतात. चवथ्या महिन्यांत सर्व अंगें व प्रत्यंगें यांचे विभाग स्पष्ट होतात. व गर्भाचें हृदय उत्पन्न होऊन तें हालूं लागतें व आतांपर्यंत जें चैतन्य अव्यक्त होतें तें व्यक्त होतें. या चवथ्या महिन्यांतच गर्भाला इंद्रियार्थांच्या इच्छा होतात. सुख व दुःख जाणणारा जीवात्मा हृदयांतच असल्यामुळें ज्यावेळीं हृदय व्यक्त होतें त्यावेळीं जीवात्माहि इंद्रियांचे विषयांची इच्छा करतो म्हणून गर्भिणीस पूर्वी आवडत नसलेले

पदार्थहि गर्भाच्या इच्छेमुळें आवडूं लागतात.इतकेंच नव्हे तर त्याविषयींची इच्छा अनावर होते.यासच डोहाळे असें म्हणतात. डोहाळे लागले असतां जे पदार्थ गर्भिणी मागेल ते अनिष्ट असले तरी थोडे देण्यास हरकत नाहीं. यावेळीं जर तिची योग्य इच्छा पूर्ण केली नाहीं तर गर्भाला अपाय होतो. केव्हां केव्हां डोहाळे न पुरविल्यामुळें गर्भिणीलाहि अपाय होतो असें सुश्रुतकारांचें मत आहे. पांचव्या व सहाव्या महिन्यांत अंगादिकांची वाढ होत असून मन व बुद्धी यांची पूर्ण वाढ होते.

सातव्या महिन्यांत सर्व शरीर अंगप्रत्यंगांसह पूर्ण होतें. आठव्या महिन्यांत ओज स्थिर नसतें. केव्हां आईच्या हृदयांत तर केव्हां गर्भाच्या हृदयांत असतें. यामुळें प्रसूतीकाळीं आई किंवा मूल यांपैकीं जेथें ओज गेलें असेल तें जगतें व दुसऱ्याचें जीवित संशयावह असतें. ह्मणून आठव्या महिन्यांत प्रसूति होणें धोक्याचें आहे. नववा महिना लागल्यापासून योग्य प्रसूतिकाळ होतो.

प्रसूतिकाळ जरी नवव्या महिन्यापासून सुरू होतो तरी बहुतेक स्त्रियांस पूर्ण नऊ महिन्यांनींच प्रसूति होते. रजोदर्शन होण्याचें बंद झाल्या दिवसांपासून दोनशें सत्तर दिवसांनीं प्रसूति होते असा सर्वसाधारण नियम आहे. परंतु यासहि पुष्कळ अपवाद आहेत व जास्तींत जास्त एक वर्ष पर्यंतहि गर्भ राहून सुखप्रसूति होते व सातव्या अगर आठव्या महिन्यांतहि प्रसूति होऊन मुलें व बाळंतिणी यांस कांहीं एक इजा होत नाहीं. एक वर्षानंतर जर गर्भाशयांत गर्भ राहील तर मात्र तो स्त्रीस विकार उत्पन्न करतो व स्वतःहि विकृत होतो. आईच्या रक्त वहाणाऱ्या नाडीला गर्भाच्या बेंबीपासून निघालेली नाडी चिकटलेली असते. त्या नाडींतून आईचें रक्त गर्भांत येऊन गर्भाचें पोषण व वाढ हीं होतात. गर्भाचीं अंगें व प्रत्यंगें ज्यावेळीं नसतात त्यावेळीं म्हणजे निरवयव अवस्थेंत गर्भाशयांतील रक्तवाहिन्यांतून पाझरणाऱ्या रसानेंच गर्भाचें पोषण होतें.

गर्भाचें कोणतें अंग प्रथम उत्पन्न होतें याबद्दल ऋषींचीं निरनिराळीं मतें आहेत, प्रथम मध्यशरीर व त्यास लागून डोकें व नंतर हातपाय होतात असें गौतमाचें मत आहे. कृतवीर्याच्या मतें प्रथम हृदय उत्पन्न होतें, कारण तें चेतनास्थान आहे, म्हणजे शरीरांत हालचाल प्रथम तेथें उत्पन्न होते व बुद्धी आणि मन हीं हृदयाचा आश्रय करूनच असतात. अशीं निरनिराळ्या प्रकारचीं मतें आहेत. तथापि धन्वंतरीचें मत याहून निराळें आहे. त्याच्या मतें सर्व अंगें व प्रत्यंगें एकदम उत्पन्न होतात. कोणतेंहि एक अंग आधीं किंवा मग असा क्रम उत्पत्तिकाळीं नसतो. मात्र तीं सर्व प्रत्यंगें त्यावेळीं सूक्ष्म असल्यामुळें आपणांस दिसत नाहींत, पूर्णावस्थेंत तीं दिसतात. ज्याप्रमाणें आंब्यांतील केसर (रेषा), बांठ त्यांवरील आवरण इत्यादि भाग आंबा कोंवळा असतो त्यावेळीं दिसत नाहींत, कालांतरानें तीं व्यक्त होतात त्याप्रमाणें अंगप्रत्यंगांविषयीं समजावें.

ग र्भि णी प रि च र्या.—गर्भ राहिल्यापासून गर्भिणी स्त्रीनें नेहमीं आनंदित असावें. मनाला उद्वेग येईल असें कांहीं ऐकूं नये व पाहूं नये. कपडे वगैरेंची शुद्धता ठेवावी; अलंकार घालावे; देवता, गुरु इत्यादि पूज्य गोष्टींच्या संनिध असून त्यांची शुश्रुषा करावी.

शिळें, कुजलेलें व कोरडें अन्न खाऊं नये, ओझें उचलूं नये, तैलाभ्यंग वारंवार करूं नये. व फार श्रम करूं नये. वर सांगितलेल्या गोष्टी केल्या असतां गर्भपात होण्याचा संभव असतो. पातळ, गोड व स्निग्ध असें भोजन करावें, मृदु आसनावर बसावें व मऊ बिछान्यावर निजावें. सामान्यतः नऊ महिनेपर्यंत याप्रमाणें गर्भिणीनें वागावें.

पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या महिन्यांत गोड, थंड व पातळ असें भोजन करावें. तिसऱ्या महिन्यांत दूध भात जेवावा. चवथ्या महिन्यांत दूध, लोणी (जांगल) मांस असे आवडते पदार्थ खावे. पांचव्या महिन्यांत तूप, दूध जास्त खावें. सहाव्या महिन्यांत सराट्यांच्या काढ्यांत तयार केलेलें तूप व पेज, सातव्या महिन्यांतहि पिठवण इत्यादि औषधींमध्यें तयार केलेलें तूप प्यावें. याप्रमाणें सात महिने आहार ठेवल्यास गर्भ वाढतो. आठव्या महिन्यांत प्रथम आस्थापन बस्ती द्यावा. त्यानें मळाची शुद्धि होऊन वायू अनुलोम होतो. नंतर दूध व मधुर औषधांच्या काढ्यांत तयार केलेल्या तेलाचा अनुवासन बस्ती द्यावा. त्यानें प्रसूति सुखानें होते. आठव्या महिन्यांत तूप घातलेली कण्हेरी गर्भिणीस खाण्याकरितां द्यावी. अशा रीतीनें गर्भिणीस अंतर्बाह्य स्निग्धता आली म्हणजे कांहीं एक विकार न होतां प्रसूति होते व प्रसूतीनंतर थकवा येत नाहीं.

नववा महिना लागताच प्रसूतीची तयारी करून ठेवावी. बाळंतिणीची खोली प्रशस्त ठिकाणीं व अगदीं लहान नसलेली अशी असावी. तींत उजेड वगैरे योग्य तितका येईल अशी व्यवस्था असावी. भिंती व जमीन चांगली सारवून ढेकूण, चिलटें, वगैरेंचा त्रास न व्हावा म्हणून धूप घालावा. बाज, सुईण, शेगडी, शस्त्र, दोरा, औषधें वगैरे सर्व तयारी आगाऊ करून ठेवावी.

गर्भविज्ञान—मातेच्या गर्भाशयांत गर्भसंभव होऊन तो बाहेर पडेपर्यंत त्याची जी वाढ होते व मातापितरांच्या रूप, आकाराशीं साम्य होत जातें त्याचें विशेष परीक्षण म्हणजे गर्भविज्ञान होय. पण या विषयाचा व्याप यापेक्षां विस्तृत आहे. बारीक व मोठ्या सर्वच प्राण्यांचे गर्भ उत्पत्तिपासून क्षपाट्यानें वाढून त्यांच्या आकाररूप रचनेंत विलक्षण बदल होत जातो.या स्थितीमध्यें त्या गर्भास स्वतंत्र आयुष्य नसतें व त्यास .आपलें भक्ष्यहि मिळवितां येत नाहीं. म्हणून तो गर्भ गर्भाशयांत असतो अगर तो बाहेर पडून अंड्यामध्यें स्वस्थ पडून रहातो. मात्र डांस वगैरे कांहीं कीटकांच्या

गर्भास स्वतंत्रपणें जगण्याची पात्रता असल्यामुळें ते पूर्ण वाढ होईपर्यंत त्या स्थितींत असतात व त्यांस स्वतंत्रपणें जगण्यापुरतीं इंद्रियें असतात. या शेवटच्या प्रकारास सचेतन गर्भ असें नांव देऊं. हलक्या प्राण्याच्या गर्भाचें रूपांतर होऊन पूर्ण वाढ होईपर्यंत जे फरक होत जातात त्याची कांहीं बाबतींत फरक असलेली अन्य प्रतिमा म्हणजे मानवी गर्भाचें होणारें स्थित्यंतर होय व म्हणून मानवी प्राणी श्रेष्ठ असला तरी त्याच्या गर्भविज्ञानशास्त्राच्या अभ्यासासाठीं त्याची हीन प्राण्यांशीं गर्भविज्ञान संबंधीं तुलना करावी लागते. " जन्म होईपर्यंत होणाऱ्या स्थित्यंतरांचें ज्ञान" हीहि या विषयाची व्याख्या पुरेशी होत नाहीं. कारण, मूल जन्मलें तरी नुसत्या वाढीखेरीज त्याच्या शरीरांत पुष्कळच फेरफार व्हावयाचे असतात. त्याचप्रमाणें बेडूक अगर कोंबडीच्या पिलांचीहि स्थिति असते. तें पिलूं उपजल्याबरोबर हिंडू फिरूं व दाणे टिपूं लागतें तरी त्याचा पिसारा व अवयव पूर्ण वाढ झालेल्या कोंबड्याप्रमाणें नसतात. हाच प्रकार बहुतेक अन्य प्राण्यांविषयीं असतो. " जन्मापासून तारुण्यावस्थेपर्यंत होणाऱ्या फेरबदलाचें प्राण्यांचें शरीरविज्ञान" अशी जरी व्याख्या घेतली तरी पुनः मानवप्राणी व इतर उच्च कोटींतील प्राणी वगळले असतां तारुण्यावस्था म्हणजे कोणती हें निश्चित करणें अवघड आहे. प्रजोत्पादनक्षमता येणें हें त्या अवस्थेचें लक्षण म्हटलें तरी हें सामर्थ्य प्रगट झाल्यानंतरहि वाढ व बदल शरीरांत होतात असें कांहीं जलचर प्राण्यांच्या परीक्षणावरून दिसतें. येणेंप्रमाणें कोणतीहि व्याख्या केली तरी तिला बरेच अपवाद सांपडतात व म्हणून गर्भसंभवापासून मृत्यूपर्यंत प्राण्यामध्यें जे जे फेरबदल होतात त्यांचें ज्ञान ही व्याख्याच विशेष सयुक्तिक ठरते. हक्सले याच्याहि मतें हीच गोष्ट अनुभवास येते कीं मृत्यूपर्यंत प्राण्यांत वाढीचे अगर जरेचे बदल होत असतात व वाढ कोणत्या वर्षी थांबते व जरेमुळें होणारे बदलहि केव्हां थांबतात हें सांगतां येत नाहीं. या दोहोंच्या दरम्यान पूर्ण वाढीचा काळ धरला पाहिजे. प्रजोत्पादन दोन प्रकारांनीं होतें. एक जननेंद्रिय संयोगापासून व दुसरा या क्रियेविरहित होणारें प्रजोत्पादन. पहिल्या प्रकारामुळें अनेक व्यक्ती जन्मास येतात ऐवढेंच नव्हे तर व्यक्तींचे विविध प्रकारहि जन्मतात. परंतु दुसऱ्या प्रकारामुळें ज्या जातीच्या प्रथम व्यक्ती आहेत त्याच व्यक्तींच्या संततीनें त्या जातीची वाढ होते. त्यांत व्यक्तिवैचित्र्य व विविधता हे गुण आढळत नाहींत. पहिल्या प्रकारामध्यें जननेंद्रियपेशी नर आणि मादी या दोन जातींच्या असतात व त्यांना रेतपेशी व अंडपेशी म्हणतात. रेतपेशींमध्यें चलनवलन व अंडपेशींत पोषणक्षमता हे धर्म असतात व या दोहोंचा पूर्ण संयोग होऊन एक नवीन संयुक्त पेशी तयार होणें म्हणजेच अंडपेशीची सफलता अगर गर्भसंभव (नवीन व्यक्ति तयार होणें) होय. ही व्यक्ति कांहीं पोषणाच्या सांठयानें समद्ध व आकारानें अंडपेशीप्रमाणें असते खरी परंतु तीमध्यें रेतपेशी असल्यामुळें नवीन व्यक्तींमध्यें उभयपेशींचे गुणधर्म तिच्या वाढींत दिसून येतात.

यानंतर गर्भाची वाढ व्हावयाची परंतु ती ठरीवक्रमानें होण्यास अनुकूल परिस्थिती पाहिजे. त्याशिवाय मात्र ती होणार नाहीं, उलट गर्भपात होतो. झाडाचें बीं हवा व ओलावा न लागेल अशा स्थलीं ठेविलें तर. त्यापासून वृक्ष, व फलें यांचा उद्भव होणें अशक्य आहे. त्या बीजाला जमीन, पाणी, हवा इत्यादि अनुकूल परिस्थितीमध्यें ठेविलें तरच त्याची वाढ होते. तसेंच गर्भ वाढीस लागण्याचा व प्रसव होण्याचा निसर्गाचा जो ठरीव मार्ग व प्रकार आहे त्यास अनुसरून वाढ होते. त्यांत बदल करतां येत नाहीं. गर्भवृद्धीबरोबर बाह्य परिस्थितीहि आपोआप बदलून गर्भवृद्धीस मदत करीत असते असें हर्बर्ट स्पेन्सरचें सुद्धा मत आहे. कांहीं मर्यादेपर्यंत परिस्थितींत इष्ट बदल केल्यानें गर्भवृद्धीस मदत होते, परंतु अनिष्ट बदल झाल्यास उलट प्रकार व गर्भपातहि होतो. या गोष्टी ध्यानांत ठेऊन पक्षी वगैरे प्राणी पिंजऱ्यांत ठेवून हे प्रकार पहातां येतात. कांहीं जलचर प्राण्यांचें मात्र कांहीं मर्यादेच्या बाहेर येणेंप्रमाणें परीक्षण करणें शक्य नसतें. कांहीं प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं हीनप्राणीप्रजोत्पादनाचें एक नियमबद्ध शास्त्रच बनविलें आहे.

रेतस्खलनाच्या वेळीं जरी लक्षावधी रेतपेशी बाहेर पडत असल्या तरी गर्भसंभव होण्यासाठीं एकच रेतपेशीची व एकच अंडपेशीची जरूरी असते. अंडाशयांत सर्व जन्मांत ७०,००० अंडपेशी उत्पन्न होण्याची पात्रता असते. त्यांपैकीं १५ ते ४५ वयापर्यंत म्हणजे ३० वर्षांत फक्त ४०० अंडपेशी पक्क होऊन प्रतिमासीं स्त्रियांच्या रजाबरोबर २.४ जातात; यांपैकीं फारच थोड्या गर्भसंभवांत सांपडतात असा अंदाज केला आहे. अंडपेशीची सफलता अथवा गर्भसंभव कसा होतो हें वर सांगितलेंच आहे. या संयुक्त पेशींच्यामध्यें आणखी एक मध्यबिंदु उत्पन्न होतो व त्याचें कारण रेतपेशी होय. नंतर हे दोन्ही मध्य बिंदू जवळ व संयुक्त होऊन विभागत जाऊन त्या पेशींची संख्या वाढून त्यांचा एक गोळा बनतो. मानवी व इतर श्रेष्ठ प्राण्यांत यापुढील फेरबदल मातेच्या गर्भाशयांत होतात व त्यामध्येंही गर्भसंभव झालेली पेशी या स्थितींत लहान असते व मातेच्या शरीरांतून पोषक द्रव्य गर्भास मिळत असतें. परंतु हे पुढील फेरबदल पक्ष्यादि प्राण्यांत मातेच्या शरीराबाहेर व्हावयाचे असले तर पोषक द्रव्याचा बराचसा सांठा असलेलें अंडें बाहेर पडतें. हा साठा म्हणजे पिंवळा बलक होय. या बलकावर एक जीवनपेशीचा पांढरा ठिपका असतो व तेंच पुढें अंडें फोडून बाहेर निघणारें पिलूं होय. त्याचें, भोंवतालच्या पौष्टिक बलकावर वाढ व पोषण होत असतें. वर सांगितल्याप्रमाणें असंख्य पेशींचा गोळा बनल्यानंतर त्यास

आकार प्राप्त होऊन त्यास नळीचा पोकळ आकार येतो. प्रथम याची एकच थराची बनलेली रचना असते. परंतु नंतर ते दोन थर होतात. यांपैकीं बाहेरील थरास गर्भबाह्यास्तर व आंतील थरास गर्भांतरास्तर म्हणतात. कांहीं काळानंतर या दोहोंमध्यें आणखी एक थर उत्पन्न होतो त्यास गर्भमध्यास्तर म्हणतात. यावेळीं गर्भाच्या मधील नळीचा आकार वाढतो. गर्भमध्यास्तर या नळीच्या दोन्ही बाजूस चिकटून नंतर त्याचे दोन पापुद्रे होऊन बाहेरील गर्भबाह्यास्तराशीं संलग्न होतो. या थरांची वाढ होत असतांना मधील नळी पूर्ण होण्यास गर्भाच्या वरील म्हणजे मानेच्या बाजूस आरंभ होतो. या नळीमध्यें मज्जासंस्थेची मध्य नलिकाकार पोकळी असते.याशिवाय गर्भमध्यास्तराच्या दोन पापुद्र्यांतील पोकळी आणि गर्भांतास्तरांतील आंत्रपोकळी अशा दोन पोकळी असतात. नंतर नलिकाकार गर्भास दोरीनें आवळल्याप्रमाणें करकोचा पडून एक वरचा भाग (गर्भ)व एक खालील भाग(गर्भानुबंधी)बनतो. वरील म्हणजे गर्भाच्या पुढील भागास शीर्षपुट व गर्भाच्या मागील भागास पुच्छपुट म्हणतात.शीर्षपुटामध्यें याच वेळीं बनलेलें आद्यांत्र, पुच्छपुटामध्यें अंतांत्र व या दोहोंमध्यें मध्यांत्र असतें. जेथें करकोचा पडून गर्भाचे दोन भाग झालेले दिसतात तेथें भावी बेंबी असते व हें बेंबीचें छिद्र गर्भावस्थेंत बराच काळ उघडें असून त्या वाटें मध्यांत्र आंतड्याच्या भागांशीं जोडलें जातें. गर्भमध्यास्तराच्या पोकळीपासून हृदयावरण व अंत्रावरण या पोकळी निर्माण होऊन थोड्या अवधींत एकमेकांपासून अलग होतात. मज्जानलिकेची पोकळी बंद होण्याच्या अगोदर गर्भांतास्तराच्या खालील भागापासून मानेपर्यंत काठिण्य येत जाऊन तो भावी अस्थिपंजराचा कणा बनतो व नंतर मणके तयार होऊन त्याची पोकळी बंद होते. हे गर्भाचे मूलभूत तीन थर आहेत. त्यांपासून सर्व शरीर व इंद्रियें बनतात व म्हणून, निरनिराळ्या लहान मोठ्या प्राण्यातील कोणता भाग अथवा इंद्रिय कसा बनला असावा व त्याचें कार्य काय असावें याचा वाद सुरू झाला असतां त्याचा निकाल देणारें हे थर म्हणजे गर्भविज्ञानशास्त्रांतील वरिष्ठ कोर्टच मानलें गेलें आहे. कारण तो वादग्रस्त भाग अमुक थरापासून बनतो असें प्रयोगानें अगर परीक्षणानें सिद्ध करून दिलें म्हणजे त्याच्या शरीरांतील कार्याविषयीं संदेहच उरत नाहीं. यूरोपीय शास्त्रज्ञानामध्यें हें नवीन वाढतें शास्त्र असल्यामुळें असे प्रश्न वारंवार उद्भवतात. या तीन थरांपासून जे शरीराचे भाग निर्माण होतात ते असेः —

ग र्भां त स्त रा पा सू नः—(१) शरीराची बाह्यत्वचा, कोंडा, खवले इत्यादि. (२) मेंदु, कणा, व शरीरांतील सर्व प्रकारची मज्जासंस्था व तंतू. (३) नाककानादि पंचेंद्रियांची आंतील रचना व अंतस्त्वचा. (४) मुखांतील अंतस्त्वचा व दांतांच्या मिन्याचें शुभ्र कवच. (५) नाकांतील अंतस्त्वचा. (६) त्वचेंत असणाऱ्या स्वेदपिंडांतील आस्तरण. तसेंच मुख व नाकांतील ग्रंथींतील आस्तरण. (७) स्वेदपिंडांतील स्नायू व डोळ्यांतील कनीनिका (बाहुली) स्नायू.

ग र्भ म ध्या स्त रा पा सू नः—सर्व अस्थी आणि सर्व प्रकारची संधाय रचना. (२) स्वेदपिंडांमधील स्नायूखेरीज इतर सर्व प्रकारचे स्नायू. (३) सर्व प्रकारच्या शिरा, धमन्या, रक्तवाहिन्या व रसवाहक कोष व प्लीहा. (४) मूत्राशय व मूत्रमार्गाच्या अंतस्त्वचेखेरीज सर्व इतर मूत्रमार्ग व जननेंद्रियें. या थराच्या आंतील पापुद्र्यापासून अंतर्मार्गाची तंतुमय व स्नायुमय रचना सर्व रक्ताभिसरणसंस्था आणि लघवी व जननेंद्रियें. बाहेरील पापुद्र्यापासून शरीराच्या बाह्यबाजूची (यांतच त्वचेचा समावेश होतो.) अस्थिमय, तंतुमय व स्नायुमय रचना.

ग र्भ बा ह्या स्त र.—(१) दांतांपासून गुदद्वारापर्यंत सर्व अंतस्त्वचा. तसेंच सर्व पिंडाच्या आंतील सर्व अंतस्त्वचा (यकृत, प्यांक्रिया वगैरे). (२) श्वासमार्गाच्या आंतील सर्व अंतस्त्वचा. (३) कानांतील कर्णनलिका व पडद्याच्या आंतील अंतस्त्वचा (४-५) थायराइड ग्रंथीच्या आणि थायमस कप्प्यांतील अंतस्त्वचा. (६) मूत्राशय व मूत्रमार्गाच्या छिद्राजवळील भाग वगळून तेथील इतर सर्व अंतस्त्वचा. या तीनहि थरांवरून व त्यांच्या निश्चित रचनेवरून अनेक वादग्रस्त मुद्दे मिटवितां येतात असें वर म्हटलें आहे खरें; परंतु समुद्रांतील स्पंज व इतर प्राण्यांच्या गर्भाविषयीं विचार कर्तव्य असतां यासहि अनेक स्पष्ट अपवाद आढळून येतात. त्याचप्रमाणें मज्जासंस्थेचा नलिकाकार रचनेनें आरंभ होतो व त्याचें वरचें टोंक वळून त्याचा पुढचा मेंदू बनतो या दोन्ही क्रियांमध्यें मानवीप्राणी व गोगलगाय इत्यादि हीन प्राणी यांच्या या भागांच्या गर्भावस्थेंतील रचनेमध्यें फरक असतो. मानवी प्राण्यांत मेंदु, पृष्ठवंश व इतर सर्व मज्जासंस्था गर्भबाह्यास्तरापासून होतात. परंतु कांहीं इतर प्राण्यांत मेंदु व पृष्ठवंशाखेरीज इतर मज्जारचना अन्य थरापासून निर्माण होतात. असल्या व याहून सूक्ष्म व रूक्ष मुद्यावर तज्ज्ञ शास्त्रज्ञांत वाद चालतात. परंतु त्यांचा येथें विशेष विस्तार न करता फक्त मानवी गर्भाच्या पुढील स्थित्यंतरांचें वर्णन करून हा विषय संपवूं.

ग र्भ वे ष्ट णें:—गर्भसंभव होऊन गर्भाशयांत गर्भ येऊन पोंचल्यावर भोंवतालची गर्भाशयांतस्त्वचा सुजल्याप्रमाणें जाड झालेली असते व त्या पोकळीच्या बुडाशीं तो गर्भ जरासा रुतून व चिकटून बसतो व त्याच्या वरील या अंतस्त्वचेच्या वेष्टणानें तो खालीं व वर आच्छादला जातो. या वेष्टणामुळें गर्भाशयाचा अंडाशयाशीं संबंध जोडणारीं दोन्ही बाजूंचीं छिद्रें झांकलीं जाऊन या गर्भवेष्टणाचे तीन भाग होतात, ते असेः—(१) तलवेष्टण म्हणजे गर्भ व गर्भाशयाचा तळ यामधील वेष्टण (२) द्विगुणीभूत वेष्टण

म्हणजे गर्भ व गर्भाशयाची पोकळी यामध्यें आडवें असलेलें वेष्टण (३) गर्भाशयाच्या इतर भागांस चिकटलेल्या वेष्टणास वास्तविक वेष्टण ह्मणावें. त्याशिवाय गर्भ वाढून त्याच्या भोंवती आणखी दोन गर्भवेष्टणें थोड्या दिवसांनीं तयार होतात. गर्भवेष्टणाच्या बाहेरील पापुद्र्यास गर्भमध्यवेष्टण म्हणतात व त्यामध्यें रक्तवाहिन्यायुक्त शेंडे असतात ते गर्भाशयाच्या तलवेष्टणांत व मध्यवेष्टणांत घुसतात. याच्या आंत गर्भांतर्वेष्टणनामक गर्भास वेढून टाकणारें पिशवीसारखें व सगळीकडून बंद असलेलें वेष्टण असतें. व तें गर्भाच्या बेंबीशीं गर्भास चिकटलेलें असतें. त्यामध्यें जो द्रवपदार्थ असतो त्यांत गर्भ तरंगतो. नाभिरज्जुनामक रक्तवाहिन्यायुक्त बंधनानें गर्भ मध्यवेष्टणाशीं जोडलेला असतो. या रज्जूस गर्भांतर्वेष्टणाचा आवरणासारखा उपयोग होतो. शिवाय या रज्जूमध्यें वार, पोषणकोष व आंत्रनलिकेशीं संबंध जोडणारी नलिकाहि असते. गर्भाच्या वाढिबरोबर गर्भाशयमध्यवेष्टणाचीहि वाढ होऊन गर्भाशयाची पोकळी भरून जाते आणि तल व वास्तविक वेष्टण चिकटून दोन्हीं एकजीव होतात. या जाड थरामध्यें पिंड असतात. परंतु त्यांत रक्तवाहिन्यायुक्त गर्भमध्यवेष्टनाचे शेंडे मात्र घुसत नाहींत. हे सर्व थर स्पंजाप्रमाणें जाड होत जातात व प्रसूतिसमयीं येथेंच वेष्टणें सुटण्यास आरंभ होतो.

गर्भाशयाच्या तळाशीं बराच फेरबदल होऊन रक्त सांठणाऱ्या मोठमोठ्या स्पंजाप्रमाणें पोकळ जागा निर्माण होऊन त्यांत गर्भमध्यवेष्टणाचे रक्तवाहिन्यायुक्त शेंडे घुसतात आणि याचीच वार बनते. या रक्तवाहिन्या गर्भाच्या पश्चिम आंतड्याकडून येतात; व तेथील वेष्टणास (ॲलेन्टॉइस) म्हणतात. वार या इंद्रियाच्या योगानें गर्भाचें पोषण व मलविसर्जन या क्रिया चालतात. गर्भ बाहेर येण्याच्या वेळीं वारेची लांबी ७–८ इंच व वजन १ पौंड असतें. गर्भाशयधमनी त्यांत शुद्ध रक्ताचा पुरवठा करते व तिच्या जोडीची शीर अशुद्ध रक्त घेऊन जाते. येथील स्पंजाप्रमाणें रक्ताच्या मोकळ्या व मोठ्या फटींत गर्भाच्या रक्तवाहिन्यांचे शेंडे घुसल्यामुळें माता व गर्भ यांचे रक्तप्रवाह मिश्र न होतां झिरझिरीत रक्तवाहिन्यांच्या पडद्यांतून शुद्ध प्राणवायु व अशुद्ध कॅर्बानिक ॲसिड वायु आणि लघवी इत्यादि द्रव्यांची अदलाबदल होते. गर्भाचें रक्त नाभिरज्जूच्या योगानें वारेंत जातें व तेथून तें मातेच्या रक्तांतील शुद्ध वायू शोषतें व विषारी द्रव्यें बाहेर टाकतें. गर्भांतर्वेष्टणजल हें गर्भ व माता यांच्या रक्तवाहिन्यांतून द्रव पदार्थ झिरपून बनतें. त्यांत नैट्रोजनयुक्त पदार्थ लघवी, क्षार व गर्भ मोठा झाल्यावर त्याचें मूत्र असतें. त्याचें कार्य गर्भास आसरा देऊन धक्का न लागूं देणें हें होय.

येथपर्यंतची गर्भाची वाढ व यापुढील फेरबदल विहंगम दृष्टीनें व दर महिन्याचें वर्णन केल्यानें तें आटोपशीर होऊन हा विषय समजण्यास सुलभ जाईल.

प हि ला म हि ना.—बारा दिवसांच्या सफलित संयुक्तपेशीचा व्यास ३/८ इंच व गर्भाची लांबी एक दोरी असते. तिसऱ्या आठवड्यानंतर वरील व्यास २/३ इंच व गर्भाची लांबी दोन दोऱ्या होते. गर्भांतर्वेष्टण तयार होतें व पोषणकोषापासून गर्भास पोषण मिळतें. गर्भाची पाठ वक्राकार होते. व मस्तकाचा निदर्शक जाडपणा तयार होतो. गर्भरक्तवाहिन्यांचा संबंध गर्भमध्यवेष्टणाशीं जडूं लागतो. चवथ्या आठवड्यानंतर गर्भपेशीचा व्यास ७/८ इंच असून वजन २० गुंजा असतें व आतां वक्राकार झालेल्या गर्भाची लांबी १/३ इंच असते. डोळे, कान व छातींतील इंद्रियें बनण्यास नुकताच आरंभ झाल्याच्या खुणा दिसतात. तसेंच झाडास फुलाची बारीक कळी यावी तशा चार कळ्या दिसतात. त्या भावी हातापायांच्या निदर्शक होत. लहान आकाराचा पोषणकोष असतो. गर्भांतर्वेष्टण फुगलेलें व मध्यवेष्टणास चिकटून एकजीव झालेलें नसतें.

दु स रा म हि ना.—या कालाच्या शेवटीं गर्भपेशी १ ३/४ इंच व्यासाची असून व गर्भाची सरळ लांबी ३/४ इंच असते. पोषण कोष लहान असून एका धाग्यास लोंबता असतो. भावी वार तयार होण्याच्या जागीं पेशीवर्धन सुरू होतें गर्भाची नाळ सरळ असते. गर्भांतर्वेष्टण बरेंच फुगलेलें व बाहेरील गर्भमध्यवेष्टणास चिटकलेलें असतें. बेंबीचें छिद्र बहुतेक मिटलेलें असून त्यांतील आंतडें किंचित् दिसतें. खालील जबडा व गळपट्टीच्या हाडामध्यें दाढर्य येऊं लागतें. मुख व नाक हीं ओळखतां येतात. मूत्रपिंड तयार होतात.

ति स रा म हि ना.—या महिन्याच्या शेवटीं गर्भपेशी चार इंच लांब असते व वार तयार होते. गर्भमध्यवेष्टणांतील रक्तवाहिन्यांचे शेंडे हें लक्षण कमी होऊं लागतें व ते साधें वेष्टण होतें गर्भाच्या नाळीची लांबी वाढते. व ती पिळवटण्यास आरंभ होतो. गर्भाची लांबी सुमारें चार साडेचार इंच असते व वजन सुमारें अडीच तोळे असतें. डोकें आणि छाती यामधील भाग, मान, मुख आणि नाक यांमधील टाळू या रचना तयार होऊन ओंठहि पूर्ण बनतात व त्यांनीं तोंड मिटलें जातें. जननेंद्रियें संदिग्ध स्वरूपांत निर्माण होतात. परंतु लिंगभेददर्शक अवयव तयार नसतात. बेंबीमध्यें किंचित अडकलेलें आतडें उदरांत जाऊन बसतें. नखें व बोटें यांसुद्धां हातपाय तयार होतात; बहुतेक हाडांत दाढर्य येण्यास ठरीव स्थानीं आरंभ होतो.

च व था म हि ना.—याच्या अखेरीस गर्भाची लांबी साडेपांच इंच व वजन सुमारें तीन औंस असतें. स्त्रीपुरुषभेद दर्शक अवयव स्पष्ट तयार होतात. डोक्याच्या कवटीच्या हाडांमध्यें दाढर्य येण्यास आरंभ झाला असला तरी त्यामधील सांध्यामध्यें फटी व त्याच्या कोपऱ्यांत अपुऱ्या अस्थी असल्यामुळें अस्थिकोनरंध्र दिसतात. गर्भाच्या लांबीपैकीं एक चतुर्थांश मस्तकानें व्यापला जातो. शरीरावर किंचित् लव दिसण्यास प्रारंभ होतो. हातापायांमध्यें चळवळ करण्याची प्रवृत्ति सुरू

होते. तिसरा महिना पुरा होण्याच्या किंचित् अगोदर गर्भपात होण्याबरोबर गर्भ पाहिला तर हातापायांतील चळवळ दृष्टीस पडते.

पां च वा म हि ना.-याच्या अखेरीस गर्भाची लांबी नऊ इंच व वजन सुमारें अकरा औंस भरतें. शरीरावर तैलयुक्त चिकट स्निग्धता येण्यास आरंभ होतो. गर्भाच्या आकारापेक्षां अद्याप गर्भात वेष्टणजल अधिक असतें. यावेळीं उपजलेल्या गर्भांत हस्तपादादिकांचें चलनवलन जोरानें सुरू असतें व तें कांहीं तासपर्यंत टिकतें.

स हा वा म हि ना.—याच्या शेवटीं गर्भाची लांबी बारा इंच व वजन चोवीस औंस भरतें. भिवया व पापण्याचे केंस तयार होतात. शरीरांत जेथें वसा असावी अशा ठिकाणीं ती तयार होऊं लागते. परंतु ती थोडी असल्यामुळें एकंदरीत त्वचेस अंमळ सुरकुत्या पडलेल्या असतात. लघुआंत्रामध्यें पिंवळा मळासारखा पदार्थ असतो व काळसर रंगाचा तसलाच पदार्थ मह्यांत्रांत बनण्यास नुकताच आरंभ होतो. डोक्यावरील केंस लांब होतात.

सा त वा म हि ना.—याच्या शेवटीं गर्भाची लांबी सव्वा फूट व वजन पंचेचाळीस औंस भरतें. पापण्या उघड्या असतात. एका बाजूचें अंड (पुरुष गर्भ असल्यास) उदरांतून खालीं अंडाशयांत उतरतें. नखें जाड होऊं लागतात पण अग्रापर्यंत त्यांची वाढ व्हावयाची असते. अठ्ठावीस आठवडे पूर्ण भरल्याखेरीज उपजलेला गर्भ जगावयाचा संभव फारसा नसतो असें बहुमत आहे. याच्या अगोदर उपजलेलीं मुलें कांहीं तास अगर दिवसच फक्त जगतात. यास अपवादात्मक अशीं लहान मुलें जगल्याचीं उदाहरणें खरीं आहेत. पण त्यांतील गर्भाधानात्मक व त्याच्या अगोदरचा रजोदर्शन काल यांची माहिती आईबापांनीं जशी दिली असेल त्यावरून वर मोजलेलीं हीं उदाहरणें आहेत.

आ ठ वा म हि ना—याच्या अखेरीस साडेसोळापासून सतरा इंचापर्यंत गर्भाची लांबी व वजन साडेचारपासून सतरा पौंडांपर्यंत असतें. वसावृद्धि झाल्यामुळें सुरकुत्या जाऊन गर्भ पुष्ट दिसतो. अंडाशयांत एकच अंड उतरलेलें व तेंहि बहुधा डाव्या बाजूचें असतें. यावेळीं उपजलेलीं मुलें चळवळ करण्यांत जरा मंद व बरीचशीं झोंपाळू असतात. तशीं पुरे दिवस भरलेलीं मुलें नसतात. त्यांची विशेष निगा राखली नाहीं तर पूर्ण मास भरलेल्या लेंकरांपेक्षां या लेंकरांतील मृत्युसंख्येचें प्रमाण अधिक असतें.

न व वा म हि ना.-याच्या अखेरीस जन्मलेल्या मुलाची लांबी २१इंच व सात पौंड वजन भरतें. या कालापूर्वी उपजलेलीं मुलें वर्णानें यावेळीं जितकीं लाल दिसतात तसें हें नसतें; तर त्याचा वर्ण अंमळ पांढुरकाच गोरा असतो. हातापायांच्या नखांची पूर्ण वाढ होऊन हाताचीं नखें तर आणखी वाढून पुढें आलेलीं असतात. डोक्यावरील केंस एक दोन इंच लांब वाढून त्यांचा काळा रंग असतो. अंडाशयांत यावेळीं दोन्ही अंड उतरलेले असतात. याच्या अगोदर बेंबी कटिराच्या बाजूकडे खालीं असते ती यावेळीं शरीराच्या साधारण मधोमध येते. म्हणजे खऱ्या बिंदूपेक्षां ती फक्त पाऊण इंच खालीं असते. प्रसूतीस वेळ लागला तर मुलाचें तोंड व शरीर काळें निळें होतें. व तें मूल मुळींच अथवा फारसें रडत नाहीं. पण तसें नसलें तर उपजतांक्षणीं मोठ्यानें "टयाहां टयाहां" करीत रडतें व एकसारखें हातपाय हलवितें. थोड्या वेळानें त्यास लघवी व हिरव्या पिंगट काळसर रंगाची मलशुद्धि होते.

वर दिलेल्या वजनापेक्षां एक दोन पौंड अधिक वजनाचीं मुलें जन्मल्याचीं पुष्कळ उदाहरणें घडतात. पांच पौंडांपेक्षां कमी वजन असलेलें मूल जगण्याचा संभव एकंदरीनें कमी असतो, परंतु अशीं मुलें जगल्याचीं उदाहरणेंहि कांहीं थोडीं थोडकीं नाहींत. या वजनाचें मूल अपुऱ्या मासाचें जन्मलें तर तें जगण्याचा संभव अधिक असतो. दहा पौंड वजनाचीं मुलें क्वचित जन्मतात व त्याहून फारच क्वचित बारा पौंड वजनहि आढळण्यांत आलें आहे. बारापासून पुढें पंधरा व अठरा पौंड वजनाचीं मुलें झाल्याचा लेखी वृत्तांत विश्वसनीय डाक्टरांच्या हातचा आहे. पण हीं मुलें मृत उपजलेलीं अगर शस्त्रप्रसूतीनें व तींहि मृतावस्थेंत काढलेलीं होतीं. साडे चोवीस इंचापर्यंत गर्भाची लांबी नमूद आहे. मुलाचें वजन मुलीच्यापेक्षां उपजतांच जास्त असतें. मातेच्या मागाहूनच्या प्रसूतींमध्यें तिच्या लेंकरांचें उपजतां वेळचें वजन वाढतें. याचें कारण पंचवीस ते पस्तीस वयाच्या दरम्यान मातेस अधिक वजनाचीं मुलें होतात. या वयानंतर उपजलेल्या मुलांचें वजन पुनः कमी कमी होऊं लागतें. शस्त्रप्रसूतीची अवश्यकता कटिर प्रदेश चिंचोळा व निरुंद असल्यास अधिक असण्याची भीति असते. मूल उपजल्यानंतर दोन तीन दिवस म्हणजे मातेच्या स्तनांत दुग्धोत्पत्ति नीटशी होईपर्यंत मुलाचें उपजत वजन कांहींसें कमी होतें नंतर तें पुनः पूर्ववत होऊन यथाक्रमानें वाढत जातें. उपजत लेंकरांची मोठी संख्या अजमावून पहातां मुलें आणि मुली यांचें परस्पर तुलनात्मक प्रमाण १०६ मुलगे : १०० मुली असें पडतें.

मूल उपजण्यापूर्वी गर्भामध्यें रक्ताभिसरण कसें होतें:—वारेंतून शुद्धरक्तवाहक शीर निघते तिला नाभिशीर म्हणतात. ती यकृतांतील आडव्या भेगेंत प्रवेश करून नंतर तिच्या दोन शाखा होतात. यांपैकीं थोरली शाखा यकृत धमनीशीं संयुक्त होऊन यकृतास शुद्ध रक्ताचा पुरवठा करते व धाकटी शाखा अधस्थ महत्तम शिरेमध्यें प्रवेश करिते. म्हणजे शरीरांतील रक्तांत प्रवेश होण्यापूर्वी गर्भाच्या शुद्धरक्तास यकृतपिंडांतून प्रथम जावें लागतें. आणि गर्भावस्था वृद्धिंगत होतांना हें रक्ताभिसरणाचें प्रमाण वाढत जातें. हृदयाचें उर्ध्वस्थ दक्षिणपुटामध्यें याप्रमाणें शुद्ध व अशुद्ध

गर्भविज्ञान
१ महिन्याचा गर्भ.
३ महिन्यांचा गर्भ.
पूर्ण वाढलेला गर्भ.
गर्भाशय व त्याचे आनुषंगिक भाग. (पुढचें अंग.)
१
२
३
४
५
६
६
१ गर्भाशयाचें बूड. २ गर्भाशयाचें छिद्र ३ योनि ४ अंडाशय ५ अंडाशयाचें बंधन.
६-६ गर्भाशयाचीं बंधनें.

गर्भावस्थेचीतुलना. गर्भविज्ञान.

रेतपिंड

गोलक

अंड.

रजोवाहिनी

डुक्कर. गाय. ससा. मनुष्य.

रजोरेतसंयोग.

स्त्रीजननेंद्रिय.

१ रजोपिंड.
२ रजोवाहिनी.
३ गर्भाशय.
४ गर्भाशयमुख

रेतजंतु.

अशा मिश्र रक्ताचा प्रवाह अधस्थ महत्तम शिरेच्या वाटे येतो. त्या रक्ताचा वारेतून निघून हातापायांतील रक्तवाहिन्यांवाटे येणारा भाग व यकृतमार्गे येणारा भाग (म्हणजे रक्त) अशा रीतीनें ऊर्ध्वस्थ दक्षिणपुटांत येतो. गर्भाच्या आरंभावस्थेंत हा प्रवाह ऊर्ध्वस्थ दक्षिणपुटांतून गर्भावस्थेंत असलेल्या लंबवर्तुलाकार छिद्रांतून ऊर्ध्वस्थ वामपुटांमध्यें एका पडद्यानें लोटला जातो व त्यांतून तो अधस्थ वामपुटात लोटला जातो. शरीराच्या डोकें वगैरेवरील अवयवांतील अशुद्ध रक्त ऊर्ध्वस्थ महत्तम शिरेवाटे ऊर्ध्वस्थ दक्षिणपुटांत प्रवेश करून नंतर अधस्थ दक्षिणपुटांत व तेथून फुफ्फुसधमनींत जातें. त्यांपैकीं अल्प भाग फुफ्फुसांत जाऊन बहुतेक रक्त धमन्याकार नाडींतून वामस्कंधधमनीच्या उगमाजवळ महत्तम धमनींत प्रवेश करतें व नंतर खालील हातपाय वगैरे भागांत तें जातें. तात्पर्य हें कीं या आरंभावस्थेमध्यें हृद्दक्षिणपुटांत शुद्ध व अशुद्ध रक्तप्रवाहांचें मिश्रण होणें पडद्याच्या योगानें घडत नाहीं ही मौज आहे. तसेंच हात, दंड, मान व शिर यांस शुद्ध रक्ताचा पुरवठा होतो व कमरेखालील भागास बहुतेक अशुद्ध रक्ताचा पुरवठा होतो. म्हणून या अवस्थेंतील गर्भाचें डोकें इतर भागांपेक्षां मोठें दिसतें. गर्भावस्थेंतील मध्य कालापासून हा प्रकार बदलतो. दक्षिणपुटांतील पडदा बारीक होतो व छिद्राचा पडदा अधिक मजबूत होतो. म्हणून अधस्थ महत्तम धमनींतून येणाऱ्या शुद्ध रक्ताचा कांहीं भाग हृद्दक्षिणोर्ध्वस्थपुटांत स्थिर होतो. आणि तो धमन्याकार नाडीमार्गे महत्तम धमनींत प्रवेश करतो. म्हणजे असें घडूं लागल्यापासून गर्भशरीराच्या खालील भागास अशुद्ध रक्ताच्या ऐवजीं मिश्र रक्त मिळूं लागल्यामुळें या कालापासून खालील शरीरास अधिक पुष्टि येते. मान, डोकें, हात यांनां पूर्वीप्रमाणें शुद्ध रक्त मिळणें चालूं असतेंच.

मू ल उ प ज ल्या नं त र व री ल र क्ता भि स र ण प्र का रा म ध्यें हो णा रे फे र ब द ल.—पहिला श्वासोच्छ्वास सुरू झाल्याबरोबर फुफ्फुसांत हवेचा प्रवेश होतो; व नंतर फुफ्फुस धमन्या मोठ्या होऊन त्यांतून खूप रक्त फुफ्फुसांत शिरूं लागतें व तें पुन्हां ऊर्ध्वस्थ वामहृत्पुटांत परत येतें व म्हणून तेथील पोकळींतील दाब वाढतो. याच सुमारास वार सुटून मोकळी झाल्यामुळें तींतील रक्ताभिसरण बंद पडतें व म्हणून नाभीच्या शिरेमधील प्रवाह थांबल्यामुळें ऊर्ध्वस्थ दक्षिणहृत्पुटांतील दाब कमी होतो.या दोन्ही कारणामुळें अधस्थ वामहृत्पुटांतील दाब उजवीकडील हृत्पुटापेक्षां अधिकच असतो. तेथें जें दीर्घवर्तुळाकार छिद्र दोन्ही ऊर्ध्वस्थ हृत्पुटांमध्यें असतें त्याचा पडदा बंद होतो व उजव्या पुटांतील रक्तप्रवाह थेट डाव्या पुटामध्यें पूर्ववत् जाईनासा होतो. शिवाय अधस्थदक्षिणपुटांतील रक्त फुफ्फुसांत क्षणोक्षणीं खेचलें जाऊं लागल्याबरोबर धमन्याकार नाडींतील दाब कमी होतो व नंतर त्या नाडीचा आकारहि क्रमाक्रमानें बारीक होऊन तींतील पोकळीहि कांहीं दिवसांनीं बुजून जाते. तींतील रक्त गोठल्याशिवाय हें सर्व घडतें. दीर्घवर्तुळाकार छिद्राच्या मुखाशीं जो पडदा असतो त्याच्या कडा चिकटतात व एकमेकांशीं जुळून येतात. यानंतर कांहीं दिवस छिद्र जरी मिटलेलें नसलें तरी त्यांतून गर्भावस्थेप्रमाणें रक्तप्रवाह जाऊ शकत नाहीं. तें पुढें जर न मिटलें तर मुलाचा वर्ण काळवटलेला असतो. धमन्याकार नाडींतून अधस्थ महत्तम धमनीमध्यें रक्तप्रवाह जाईनासा झाल्याबरोबर त्या महत्तम धमनींतील दाब कमी होतो. नाभिधमन्यांतील रक्त गोठून त्या सुकून बारीक होतात व नंतर बुजतात.

ग र्भा ती ल य कृ ता चें का र्य.—हें अतिशय महत्त्वाचें असतें हें रक्ताभिसरण त्यांतून होतें यावरून लक्षांत येईलच.गर्भाच्या आकाराच्या मानानें गर्भावस्थेंत या पिंडाचा आकार पुष्कळच मोठा असतो. यावेळीं शर्कराहि तेथें अधिक प्रमाणांत असते. यकृताचें मधुशर्करासंचयाचें कार्य गर्भावस्थेंत विशेष जोरानें चालत असावें. हा पिंड तयार होण्यापूर्वी हें कार्य वार अगर दुसऱ्या एखाद्या भागाकडून होतें असा संभव दिसतो. पांचव्या महिन्यापासून यकृतामध्यें पित्ताची उत्पत्ति होऊन तें आपलें कार्य करूं लागतें.

ग र्भा ची म ज्जा सं स्था.—जन्मापर्यंत मेंदूंतील मज्जापेशी अगदींच बाल्यावस्थेंत असतात. परंतु त्यापासून मधूनमधून चलनवलनात्मक शक्तीचे वेगप्रवाह सुटत असावे असें गर्भाच्या हालचालीवरून व मातेच्या उदरास व शरीरास स्पर्श केल्यानें होणाऱ्या गर्भाच्या हालचालीवरून वाटतें. येणेंप्रमाणें मानव गर्भविज्ञानांत प्राधान्येंकरून इतर प्राण्यांच्या गर्भतुलनात्मक गर्भविज्ञानाचीहि माहिती दिली आहे. या विषयाला हल्लींचें शास्त्रीय व व्यवस्थित स्वरूप गेल्या शंभर सवाशें वर्षांतच आलें आहे. तथापि या आरंभीं रुक्ष व नीरस वाटणाऱ्या विषयाची लालसा यूरोपस्थ पंडितांमध्यें किती जुनी आहे. याचा अति संक्षिप्त इतिहास मनोरंजक व अनुकरणीय असल्यामुळें तो थोडासा या पुढें दिला आहे. अति प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता आरिस्टॉटल व यूरोपीय वैद्यशास्त्राचा आद्य ऋषि गॅलन यानें अंड्यांतील व इतर प्राण्यांतील गर्भावस्थेचें बरेच दिवस निरीक्षण केलें होतें. मागाहूनच्या पंडितांनीं त्याच्या शोधांत थोडी भर टाकली. परंतु सूक्ष्मदर्शक यंत्राचा शोध निघाल्यापासून सूक्ष्मगर्भ रचनेचा अभ्यास करतां येऊं लागल्यामुळें त्यांत झपाट्यानें प्रगति झाली. तोंपर्यंत म्हणजे १७ व्या शतकापर्यंत आपल्याकडील शारीर व वैद्यशास्त्रविषयक उपपत्तींमध्यें कल्पनाप्राधान्यच विशेष असे. कारण निरीक्षणाचीं साधनें तेव्हां नव्हतीं. रक्ताभिसरण शोधून काढणारा हार्व्हे यानेंच वरील अंड्यांतील गर्भाच्या व इतर गर्भांच्या स्थित्यंतराचें वर्णन अधिक शास्त्रशुद्ध रीतीनें केलें. सूक्ष्मदर्शक यंत्राच्या मदतीनें या ज्ञानांत

आधिक भर टाकणारा बलोना येथील मालपिघी हा व दुसरा ग्राफ हे दोघे पंडित होत. यांनीं शारीरशास्त्रांत शोध लावले असल्यामुळें शरीरांतील कांहीं सूक्ष्म रचनेस त्यांचीं नांवें दिलीं आहेत. अठराव्या शतकांत हॅलर नामक महापंडितानें (इ. स. १७५७–१७६६) इंद्रियविज्ञानशास्त्रावर मोठा ग्रंथ लिहून या विषयांत शोधांची भर टाकली व डार्विनच्या उत्क्रांतितत्वाच्या प्रास्ताविक उपपत्तीचा शोध यानें लावला असें म्हणण्यास हरकत नाहीं. वूल्फ नामक पंडित१७३३–९४च्या दरम्यान होऊन गेला. त्याच्या नांवावरून गर्भाच्या कांहीं रचनेस नांव दिलें गेलें आहे. गर्भावस्थेतील आंत्रोत्पत्तीवर शोध लावून प्रसिद्ध केला; त्याकडे कोणी इतर शास्त्रज्ञ लक्षहि देईनात व त्यावर विश्वास ठेवीनात. परंतु प्रसिद्ध शास्त्रज्ञ व अज्ञेयवादी हेकेल यानें त्या शोधास अनुमति देऊन त्या लेखाचें जर्मन भाषेत भाषांतर केल्यावर आधुनिक गर्भविज्ञानशास्त्राचा आद्य संस्थापक असें त्यास इतर पंडित म्हणूं लागले. १७७५ सालीं विल्यम हंटर व त्याचा बंधु यांनीं मानवी गर्भावस्था यावर एक उत्कृष्ट व सचित्र ग्रंथ तयार केला. त्यानें या शास्त्रासंबंधीं व शारीरविज्ञान व इंद्रियविज्ञानशास्त्रासंबंधीं प्रेक्षणीय व दुर्मिळ नमुन्यांचें व चिजांचें खाजगी कायम संग्रहालय केलें होतें व त्यांतील प्रत्येक वस्तूची वर्णनात्मक सूचीहि छापून तयार केली होती. हें संग्रहालय अमोल ठेवा म्हणून मानलें जातें हें युक्तच होय. याशिवाय वर निर्देश केलेला जर्मन पंडित हेकेल यानें व दुसऱ्या पुष्कळ शोधकांनीं १७८९ पासून १८१६ याच्या दरम्यान या ज्ञानांत भर टाकली.

बेयर नामक एक शोधक होऊन गेला; त्यानें आपल्या आत्मचरित्रांत प्यांडर या १७९४–१८६५ च्या दरम्यान हयात असलेल्या मित्राचा व शोधक गृहस्थाचा गौरवपूर्वक उल्लेख करून त्या दोघांपूर्वी डॉलिंजर नामक पंडितानें अर्धवट लावलेल्या शोधाचें अर्धवट काम लायक माणसाच्या अभावीं बंद पडलें होतें तें पुढें चालविण्यास हा मनुष्य योग्य आहे अशी खात्री करून देऊन त्याच्या गळ्यांत तें काम घातलें व प्यांडरनेंहि आपली जबाबदारी ओळखून नवीन शोध लावून ही जबाबदारी पार पाडली. प्यांडर व बेयर हे जर्मनींत वर्झबर्ग या गांवीं असत. बेयर हा डॉलिंजर नामक पंडितासाठीं प्रेतविच्छेदकार्याचें काम करीत असे व तो डॉलिंजरबरोबर तुलनात्मक शारीरविज्ञानाचा अभ्यास करी. म्हणून प्यांडरच्या शोधाच्या कामीं तो लायक असूनहि त्यांत मन घालण्यास त्यास तितपतच फुरसत मिळे व तेवढें अल्प लक्ष तो त्या शोधांत घाली. व म्हणूनच प्यांडरनें तें शोधाचें काम सोडल्यावर १८१९ सालीं बेयर यानें ते शोध पुढें सुरू ठेविले. कोनिग्सबर्ग येथील विद्यापीठामध्यें बरडाक व रथके या दोघा महान् योग्यतेच्या पंडितांचा तो समकालीन व समानव्यवसायी होता. बरडाकच्या नांवावरून मज्जासंस्थेतील कांहीं रचनेस त्याचें नांव दिलें आहे. शोधकावरून शरीररचनेस नांव देण्याची यूरोपांत चालच दिसते. येथें नामनिर्देश न केलेले असे अनेक शोधक होऊन गेले व त्यांनीं या ज्ञानांत आपआपली भर आणून टाकली आहे. बेयर यास आधुनिक शास्त्रज्ञच समजतात. यानें १८३९ च्या सुमारास या विषयावर मोठा ग्रंथ लिहिला आहे. त्यांतलि विशेष हा कीं त्यांतील शोधांची माहिती फार बिनचूक, पूर्ण मतें व उपपत्ति असलेली, सर्वांना पटणारी व पूर्ण शोधाअंतीं दिलेली अतएव अत्यंत विश्वसनीय अशी असे. त्याच्या कृतींत दोष राहिला तो हा कीं, मूलभूत ज्या ज्या प्राथमिक नाना पेशीपासून शरीराचे भाग व इंद्रियें बनतात तें अति सूक्ष्म रचना वर्णन त्या ग्रंथांत व त्याच्या पूर्वींच्या ग्रंथांत नाहीं. हें बिकट काम लीज येथील श्वॉन या पंडितानें १८३९ सालीं तयार करून या मूलभूत पेशींतील उद्भिज्ज व प्राणिकोटींत साम्य कसें आहे हें उघड करून दाखविलें. यानें प्रचलित केलेलीच उपपत्ति अद्याप या व प्राणिशास्त्राच्या पाठशालांतून चालू आहे. यानंतर कॉलिकर आणि मेचीन कॉफ् या महान् शोधकांनीं पेशीवर्धनक्रिया ही मूलजीवन पेशीपासून होऊन व तीहि नानाप्रकारानें होऊन त्यापासून इंद्रियादि शरीराचे भाग तयार होतात हें सिद्ध केलें. उपरिनिर्दिष्ट श्वॉन याच्या ग्रंथाचें इंग्रजींत भाषांतर इ. स. १८४७ त सिडनहॅम सोसायटी नामक संस्थेसाठीं हेनरी स्मिथ या गृहस्थानें केलें. बर्लिन येथील व्हॉन पुरकिंजे यानें नांव मेंदूंतील कांहीं प्रकारच्या मज्जापेशीस दिलें आहे. त्यानेंहि गर्भसंभव होताच सफलित संयुक्त पेशींत होणाऱ्या बदलाचा शोध लाविला. वर गर्भाचीं प्रतिमाभास अनुसरून स्थित्यंतरें दिलीं आहेत त्यांविषयीं बरेच शोध १८२० ते १८४० च्या दरम्यान भराभर लागले. यांत प्रिव्होस्ट व ड्यूमास यांनीं बरेच श्रम केले. व त्याचप्रमाणें म्यूलर व दुसऱ्या अनेकांनीं लहानमोठे ग्रंथ प्रकाशित करून गर्भविज्ञानवृद्धि केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८५० पासून पुढें लहानमोठे शोध पुष्कल शोधकांनीं इतके लावले कीं, नामनिर्देश कोणाचा करावा व कोणास वगळावें हें लेखनमर्यादेमुळें अवघड झालें आहे. ससा, कुत्रा, गिनीपिग व हरिण या प्राण्यांवर प्रयोग व निरीक्षण करून हे शोध लागले. रथके यानें याच काळांत सर्प व सरपटणाऱ्या प्राण्यांतील गर्भविज्ञानासंबंधीं शोध लाविले व रेमॅक यानें बेडूक व कोंबडा यांच्यासंबंधीं शोध लाविले. पुढें १८५९ मध्यें हक्स्ले यानें अस्थिपंजरसहित व अस्थिपंजररहित प्राण्यांमध्यें गर्भसंभवानंतर जे तीन थर होतात त्यांतलि साम्य दाखविलें. कारण यापूर्वी यांत कांहींहि साम्य नाहीं असेंच मत रूढ होतें. इ. स. १८५९ या सालीं डार्विनचा "नानाप्राणिविशेषोत्पत्ति पद्धति" हा प्रसिद्ध ग्रंथ निर्माण झाला. जीवनपेशीच्या शोधानें जी नवी क्रांति या शास्त्रांत घडविली तिला पुष्टिदायक अशी उपपत्ति या ग्रंथांत कथन केली आहे. व त्यामुळें शारीरशास्त्र, गर्भविज्ञानशास्त्र व तत्संबंधीं इतर विषयांची

परस्पर संगति लावणें कठिण जात होतें तेंया ग्रंथानें सुलभ झालें. या ग्रंथाच्या मतें प्राण्याच्या गर्भावस्थेंतील रचनेचा व स्थितीचा आपण तपास लावला तर त्याच्या पूर्वपिढीचा इतिहास व त्या जातींतून ' उत्क्रांतितत्वानें ' बदल होत जाऊन उत्तरोत्तर नवीन पिढींत 'मर्कटाचा मानव' या म्हणीप्रमाणें हळूहळू स्थित्यंतरें कशीं होत जातात हें स्पष्ट होतें. त्यामुळें प्राणिजातिवर्गीकरण करणें अधिक शास्त्रशुद्ध होतें. गर्भावस्थेंत नर व मादी कशी उत्पन्न होतात हें आपणांस कळत असल्याचा आव कांहीं बेजबाबदार व अशास्त्रीय ग्रंथकार आपल्या प्रजोत्पादन या विषयावरील ग्रंथांत आणतात व मनाप्रमाणें स्त्री अगर पुरुष संततीवर उपायहि ते सुचवितात. परंतु वरील सर्व जगमान्य शोधकांच्या मतानें ही गोष्ट आज पर्यंत सिद्ध झालेली नाहीं. म्हणून वाचकवर्गानें त्यावर विश्वास तितपतच ठेवावा. वरील इतिहास देण्याचें कारण यूरोपीय पंडित किती चिकाटीनें या व अशा विषयाची कास धरतात हें मनन करून आपल्या देशांत जुन्या चिकित्सा पद्धतींचें पुनरुज्जीवन करतांनां आधुनिक शोधांनां डोळ्यांपुढें ठेवून पूर्वपरंपरा व नवीन युग यांचा मिलाफ करावा; आपल्या देशास हल्लीं मानवेल व पटेल अशी चिकित्सापद्धति व अध्ययन व अध्यापनमार्ग रूढ करावेत. जुन्याचा अगर नव्याचा फाजील अभिमान धरूं नये.

गर्भाधान संस्कार.—सोळा संस्कारांपैकीं पहिला संस्कार. स्त्रीच्या ठिकाणीं पुरुषानें गर्भाची स्थापना करणें. या संस्कारास गर्भाधान संस्कार असें म्हणतात. गर्भाधान संस्काराचा प्रत्यक्ष उल्लेख संहिताग्रंथांतून नाहीं. परंतु गर्भधारणा कशी होते, गर्भाच्या देवता कोण यासंबंधीं कांहीं मंत्र ऋग्वेद (१०,१२४) व अथर्ववेद(५. २५) या संहितांतून आढळतात. पैकीं अथर्ववेदांतील उल्लेख जास्त स्पष्ट आहे. हल्लीं होत असलेल्या प्रयोगानुसारी गर्भाधान संस्कारास मूलाधार सूत्रग्रंथांचा आहे. बहुतेक सूत्रकारांनीं आपापल्या गृह्यसूत्रांत या संस्काराचा स्पष्ट उल्लेख केला आहे. आश्वलायन सूत्रांत या संस्काराचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळें आश्वलायन परिशिष्टकारांनीं तो सविस्तर दिला आहे. हा संस्कार ऋतुस्नात स्त्रीच्या पांचव्या दिवसापासून सोळाव्या दिवसापर्यंतच्या एखाद्या शुभदिनीं करावयाचा असतो. सत्याषाढ सूत्र या संस्कारास ऋतुमतीचा चवथा दिवसहि प्रशस्त मानितें. या संस्कारास उक्तदिन व त्याचीं शुभाशुभ फलें यांचें विस्तृत विवेचन मनु, याज्ञवल्क्य इत्यादि स्मृतिकारांनीं व धर्मसिंधु, निर्णयसिंधूकारांनीं केलें आहे. हा संस्कार करण्यापूर्वी त्याच दिवशीं रजोदर्शनकालीं असलेल्या दुष्टमास व दुष्टदिन यांच्या निरासार्थ भुवनेश्वरी नामक शांति करतात. ही शांति बौधायन सूत्रांत पठित आहे. गर्भाधान सस्कारांत मुख्य कर्म म्हणजे गृह्याग्नीवर प्राजापत्य स्थालीपाक करणें. भार्येच्या दक्षिण नासिकेंत अश्वगंधा वनस्पतीचा रस सेचन करणें व संभोगकालीं (प्रयोगकारांनीं दिलेले व संहिताग्रंथांत असलेले) मंत्र पठण करणें इत्यादि आहे. या विषींत भिन्न भिन्न सूत्रानुसार क्वचित फरकहि आढळतो. गर्भाधान संस्कार हा क्षेत्रसंस्कार असल्यामुळें एकवारच करावा, प्रतिगर्भास करूं नये असें कांहीं ग्रंथकारांचें मत आहे.

गऱ्हा—हें ग्वाल्हेरच्या रेसिडेंटाच्या नजरेखालील सेंट्रल इंडिया एजन्सीमधील एक छोटेखानी संस्थान आहे. क्षेत्रफळ ४४ चौरस मैल. लोकसंख्या (१९११) १२४०२. पूर्वी याचा समावेश राघूगड संस्थानांत होत असे पण अंतःकलहामुळें खिची घराणें विभक्त झालें व १८४३ मध्यें बिजयसिंग याला ५२ खेडीं मिळालीं. याप्रमाणें येथील राजा राघूगडच्या खिची चव्हाण रजपूतांपैकीं असून त्याला राजा हा किताब आहे. संस्थानचें उत्पन्न २२००० व खर्च १३००० आहे. जामनेर हें कारभाराचें मुख्य ठिकाण आहे. तेथें एक दवाखाना व शाळा आहे. खुद्द गऱ्हा हें मुख्य व महत्वाचें स्थळ असून तेथेंहि एक दवाखाना व शाळा यांची सोय केली आहे.

गऱ्हार्ट(१८१६-१८५६). -या रसायनशास्त्रज्ञाचा जन्म स्ट्रास्बर्ग येथें झाला. तेथील शाळेंतच त्याच्या शिक्षणक्रमास सुरुवात होऊन पुढें लाइझाक येथें ओटो एर्डमानजवळ तो रसायनशास्त्र शिकला. लीबिग, डुमास, चेवरूल इ. तत्कालिन शास्त्रज्ञांशीं याचा परिचय झाला होता व त्यांच्याजवळ त्यानें कांहीं दिवस कामहि केलें; परंतु तो स्वतंत्र विचाराचा असल्यामुळें त्याचें कोणाशींच पटेना. तो आपल्या बापाशींहि एकदोनदां भांडला. यानें कांहीं अम्लांचे अनार्द्र क्षार तयार केले. याचे शोध फारसे महत्वाचे नाहींत. त्यानें अणु, परमाणु, अणूंची घटना इत्यादिकांसंबंधीं नवीन कल्पना प्रचारांत आणल्या. हें त्याचें काम महत्वाचें होय. तो स्ट्रास्बर्ग येथेंच १८५६ त मरण पावला.

गलगनाथ—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. करजगीच्या ईशान्येस सुमारें २० मैलांवर तुंगभद्रेच्या वामतीरावर हा गांव आहे. येथें गर्गेश्वर आणि हनुमान यांचीं देवळें आहेत. गर्गेश्वर देऊळ वर्धा नदी व तुंगभद्रा नदी यांच्या पवित्र संगमावर बांधलें असून देवळांत इ. स. १०८० आणि ११४७ सालचे दोन शिलालेख आहेत. हनुमानाच्या देवळांत इ. स. १०११ सालचा एक वीरकल आहे.

गलगली—विजापूर जिल्ह्यांत कलादगीपासून उत्तरेकडे सात कोसांवर कृष्णा नदीच्या कांठीं हें गांव आहे. हें गांव बरेंच जुनाट असून याला गालवक्षेत्र म्हणतात. येथें गालव ऋषि इतर सहा ऋषींसह रहात असत असें सांगून, गांवाच्या दक्षिणेस डोंगरांत त्यांची आश्रमाची जागा अजूनहि दाखविली जाते. कृष्णेच्या पात्रांत एक जुनाट देऊळ आहे. तें एकदां (१८७६-७७) भयंकर दुष्काळ पडला असतां, कृष्णा आटली होती तेव्हां थोडेसें दिसलें होतें. तें १०० फूट

औरसचौरस आहे असें म्हणतात.तेथेंच येल्लमाचें व इतर दोन तीन देवळें आहेत. संभाजी महाराजांनां मारल्यानंतर मराठ्यांनां दक्षिणेंत कोंडून मारावें म्हणून औरंगझेब हा आपल्या प्रचंड सैन्यानिशीं ब्रह्मपुरीहून गलगलें येथें आला तो येथें सहा वर्षे (१६८९-९५) छावणी करून होता. त्यावेळीं (१६९५) गेमेली करेरी नांवाचा एक इटालियन प्रवासी गोव्याहून गलगलीस गेला होता. त्यानें औरंगझेबाची भेट घेतली होती. तो म्हणतो कीं, ही छावणी पंधरा कोस लांब पसरली असून तींत साठ हजार घोडदळ, दहा लाख पायदळ, पन्नास हजार उंट, तीन हजार हत्ती होते. म्हणजे तें एक पांच लाख माणसांचें चालतेंबोलतें शहरच होतें; अडीचशें तर नुसते निरनिराळे बाजार होते. इ. स. १७९० सालीं विजापूर सुभ्यांत गलगली परगणा असून त्याचें उत्पन्न १९ हजारांचें होतें. [राजवाडे खंड १८, चतुर्थसंमेलन भा. इ. मं;विजापूर ग्याझे; वेरिंग-मराठाज].

गलग्रंथिदाह—घशाच्या आरंभीं व टाळूच्या मागें प्रत्येक बाजूस एक एक अशा प्रत्येक माणसास दोन गांठी असतात व एरव्हीं त्या फुगलल्या दिसत नाहींत. परंतु थंडी अगर उष्णतेमुळें किंवा अशुद्ध हवेंत राहिल्यानें कित्येक माणसांमध्यें या पिंडांचा दाह होण्याची प्रवृत्ति दिसते. तसें झाल्यास हा पिंड सुजून फुगतो व लाल दिसतो व त्यावरच पिंवळे, पांढरे, पुवासारखे दिसणारे कण दृष्टीस पडतात. यांत पुष्कळ प्रकारचे जंतू सांपडतात व हे पिंड लाळीनें बरेच आच्छादित असतात.खालच्या जवड्याचा हाडकाळ कोपरा जो मान व कान यांमध्यें असतो तेथें ही सुजलेली गांठ हातास लागते. याहून तीव्र रोगांत लाल व पांढऱ्यापिंवळ्या दाट स्रावाचें प्रमाण अधिक असतें. व घटसर्प रोगाचा पापुद्रा घशांत अडकला आहे किंवा काय असा भास होतो. सूज बहुधा दोन्ही पिंडांस येते. व त्यावरोबर कसेंसेंच वाटणें, जिभेवर बुरशी, ताप, घशात दुखणें व कांहींहि गिळतांना अडचण हीं बहुतेक तापाचीं लक्षणें व इतर कांहीं लक्षणें रोग्यास होतात. मानेंतील रसग्रंथी मोटमोठ्या होतात. एकंदरींत या पिंडामध्यें जोराची दाहक्रिया सुरू होऊन तिचें पर्यवसान गळवांतहि होण्याचा पुष्कळ संभव असतो. गळू एका अगर दोन्ही बाजूंस होतें. आणि मग नेहमींपेक्षां फार लाल व दुप्पट आकाराचा हा पिंड दिसतो व फुगून घशाच्या मधोमध येऊन पडजिभेसहि चिकटतो. त्यावर श्लेष्मा फार असल्यामुळें तो पिंड चकाकतो व अति लाल म्हणजे काळानिळाहि होतो. जवड्यामागें फुगलेली गांठ हातास चांगलीच कळते व डोळ्यांनीं दिसतेंहि. मूळच्या नापांत थंडी फार बाजून वांतीहि होते. ताप१०३°-४° पर्यंत वाढून त्याबरोबर असणारीं नेहमींचीं इतर लक्षणेंहि तीव्रतर होतात. गिळणें व बोलणें जवळजवळ अशक्यच होतें. तोंडांत लाळ जमून ती वारंवार थुंकावी लागते. दोन ते चार दिवसांत गांठ पक्क होते, म्हणजे तींत पू होतो व गांठ बाहेरून दोन्ही हातांनीं तपासून पाहिली तर बिलबिलीत झालेली बोटास लागते. ही गांठ फोडली नाहीं तर आपोआप फुटून ताप उतरतो व चारआठ दिवसांनीं प्रायः रोगी लवकर बरा होऊं लागतो. गळू आंत फुटून मानेंत पू जाऊन इजा झाल्याचीं उदाहरणें फार क्वचितच घडतात. ताप अधिक असल्यामुळें हे गलग्रंथींचे गळू होत आहे नुसता दाह नव्हे असें ओळखतां येतें.

उ प चा र—गलग्रंथिदाह असल्यास कोयनेल द्यावें. रोगी फार अशक्त असल्यास पोर्ट नामक मद्य द्यावें. अंतुघ्न औषध घशास काडीच्या टोंकास कापूस गुंडाळून त्यानें लावावें. हें औषध तुरट व संकोचनशील असावें, म्हणजे सूज शमते. यांत गळू होत असेल तेव्हां करण्याचे प्रकारः—आरंभावस्थेमध्यें बर्फ घशांत चघळीत जावा व त्याशिवाय बाहेरूनहि लावल्यानें फायदा होतो. पोटामध्यें रोज तीन वेळां सोडा सॅलिसीलेट हें औषध देत जावें किंवा प्रत्येक वडीमध्यें ३ ग्रोस असलेल्या ग्वायाकम नामक औषधाच्या वड्या तोंडांत ठेवून त्यांपासून सुटणारा रस गिळीत जावा. पू झाला असें वाटूं लागलें कीं,शेकण्यानें व बाहेरून पोटीस लावण्यानें तें गळू पिकण्यास मदत होते. तें फोडण्यासाठीं चाकूचा शेंडा फक्त अर्धा इंच उघडा ठेवून त्याचा बाकीचा भाग गमप्लास्टरच्या पट्टीनें चिटकवावा. म्हणजे गळवांत तो चाकू भोंसकला तरी आंत मोठी धमनी आहे तिला इजा होत नाहीं. कापण्याच्या अगोदर घशास कोकेनचा तुषार उडवून बधिर करावें. पातळ अन्न व तेंहि कोमट करून रोग्यास द्यावें.उत्तेजक व शक्तिदायक औषधें मागाहून रोग्यास द्यावीं.

आ यु र्वे दी य.—गळयाच्या रोगांपैकीं नेहमीचा म्हणजे स्वरभेद किंवा घोगरेपणा, ओरडून भाषण केल्यानें किंवा पाठ म्हटल्यानें, विष, दुखापत, शैत्य यांपासून हा उद्भवतो. त्याचे सहा प्रकार असून कफवातादि रस, मेदवृद्धि व कफक्षय यानें तो उत्पन्न होतो. आवाज घोगरा, बारीक आणि कर्कश व गाढवाच्या ओरडण्यासारखा होतो, किंवा घशांत आग होते, किंवा खाकेरा सांचतो. शब्द उच्चारणें फार कठिण जातें किंवा धुरानें आवाज कोंडल्यासारखा, किंवा अगदीं बंद होतो किंवा घशांत शब्द अडकतात व अस्फुट होतात. यास कोमट पाणी, तूप व इतर स्निग्ध औषधें घालून प्यावीं. शिवाय वांतिकारक व जुलाबाचीं औषधें बस्ती व हुंगण्याचीं औषधें घ्यावीं असें चरकसुश्रुतादि ग्रंथांत सांगितलें आहे. रोहिणी, रोहिणीका (लालपणा) म्हणजे घशांत जिभेच्या मुळाशीं मोठी सूज येऊन फार दुखणें. यामुळें जास्तींतजास्त तीन दिवसांत मृत्यु येतो. पण हुषार वैद्य हा रोग बराहि तावडतोब करतो. मांस वाढल्यानें घसा बंद होऊन गुदमरल्यानेंहि मृत्यु येतो. या रोगाचे जरा कमी जाचक असेहि प्रकार आहेत. विशेषतः रक्तापासून झालेला रोग असतो त्यांत घशांत पुष्कळ लहान लहान फोड येतात. साध्य रोगी असतील त्यांच्यावर रक्तस्रांव, वांतिकारक औषधें, अंतःश्वास, मुखजल, वाफारे

वगैरे उपाय करावे. कंठांत खाकेरा दाटल्यानें गलग्रह उद्भवतो. त्याच्याशींच कंठशालुकाचें साम्य असावें; कारण त्यांतहि गळा सुजून कठिण व खडबडीत होऊन दुखूं लागतो. तें खाकेन्यानेंच उत्पन्न होऊन त्यामुळें कांट्याप्रमाणें टोंचूं लागतें, तें शस्त्रक्रियेनें बरें होतें. जिभेच्या टोंकाप्रमाणें जिभेवर सूज (पडजीभ) येत असते तिला अधिजीव म्हणतात आणि ती घातक असते. वलय म्हणून मोठी व पुष्कळ सूज येते तीहि असाध्य असते. तिच्यामुळें अन्न जाण्यालाच अडथळा येतो. हा श्वासोच्छ्वासप्रतिबंधक व त्रासदायक बलास रोग व अथर्ववेदांत उल्लेखिलेला बलास एकच किंवा काय याबद्दल संशय आहे; कारण त्याचेंहि कारण कफ असेंच सांगितलें आहे. शतघ्नी म्हणजे मांस वाढून कठिण व त्रासदायक सूज येणें, गलविद्रधि म्हणजे सुजीनें गळा बंद होणें, गलध म्हणजे गळ्यांत सूज येऊन खाणेंपिणें, श्वासोच्छ्वासाला अडथळा होणें, स्वरघ्न म्हणजे कफानें श्वासनलिका बंद होऊन घोगरेपणा, श्लेष्मा किंवा कोरड उत्पन्न होणें, आणि मांसतान म्हणजे ' मांसाचे गोळे' (कंठांतील) यांत सूज येऊन गालच्या बाजूस लोंबणें व त्यानें हळूहळू गळा भरून जाणें इत्यादि सर्व प्रकार प्रत्यक्ष घातकच असतात, किंवा निदान फार भयंकर तरी असतात. एकंदर गलरोगाचे पांच प्रकार (रोहिणींचे प्रकार धरून दहा) आहेत.या सामान्य वर्णनावरून यामध्येंच कप व घटसर्प (वलयरोग) यांचा अन्तर्भाव होतो किंवा नाहीं याचा निर्णय करतां येत नाहीं.

गॅलॉट्झ—रूमानियाच्या कोव्हर्लुईभागांतील मुख्य ठिकाण हें डान्यूब नदीच्या कांठीं आहे. येथील लो. सं. १९१४मध्यें ७२५१२ होती. पैकीं १२००० ज्यू लोक होते. हें आरमाराचें ठिकाण असून येथें फौजेच्या तिसऱ्या तुकडीचें मुख्य ठेकाण आहे व तिचें संरक्षण किल्ल्यांच्या रांगेनें केलें आहे. परंतु हें शहर व्यापाराकरितां विशेष महत्वाचें आहे. हें मोल्डेव्हियांत प्रवेश करण्याकरितां मुख्य बंदर आहे. कारण येथें डान्यूब, सेरेथ व पर्च हे तीन जलमार्ग मिळत असून शिवाय सर्व सुपीक प्रदेशांतून येथें आगगाडी जोडलेली आहे. येथें पुष्कळ सूत कातण्याच्या गिरण्या व कणिकेच्या गिरण्या आहेत.येथील बोटींचा व्यापार बहुतेक परकीयांच्या ताब्यांत आहे व त्यांत ब्रिटिश हे मुख्य आहेत.

गॅलिपोली—गॅलिपोली हें यूरोपीयन तुर्कस्तानांतील आड्रियानोपल विलायत (जिल्हा) मधील बंदर व मुख्य शहर आहे. हें दार्दानेलीसच्या वायव्य टोंकास असलेल्या एका अरुंद द्वीपकल्पावर अड्रियानोपलच्या दक्षिणेस ९० मैलांवर आहे. लोकसंख्या (१९०५) सुमारें २५०००. याच्या अगदीं समोर आशियाखंडांत लॅपसकी आहे. हें शहर दिसण्यांत प्रेक्षणीय नसून यांतील रस्ते अरुंद व घाणेरडे आहेत. फक्त बाजारांतील इमारती काय त्या चांगल्या आहेत. रोमन व बायझन्टाईन काळांतील कांहीं अवशेष मात्र महत्वाचे आहेत. खडकावर बांधलेलें दीपगृह फार मजेदार दिसतें. गॅलिपोलीला दोन बंदरें आहेत. हें तुर्की आरमाराचें मुख्य बंदर आहे. दार्दानेलीसचें नाकें म्हणून १८५४ त हें फ्रेंच व ब्रिटिश फौजेनें घेतलें होतें. दार्दानेलीसची सामुद्रधुनी मार्मोराच्या समुद्रास जेथें मिळते तितका भाग गॅलिपोली येथील तोफांच्या टप्प्यांत येतो. शहराची विशेष तटबंदी नसून जेथें दार्दानेलीस अरुंद आहे तेथें मात्र मजबुती केली आहे.गॅलिपोली जिल्हा (संजाक) फार सुपीक आहे. ह्याची लोकसंख्या १ लक्ष असून याचे चार तुकडे (भाग)पडतात ते येणें प्रमाणें.— (१) मैटास, हें सुंदर कापसासाठीं प्रसिद्ध आहे. (२) केशन–गुरांचा बाजार, धान्य, अळशी, कॅनरीच्या बिया वगैरे साठीं प्रसिद्ध आहे. (३) मायरिओ फायतो (४) शारकी. शारकी येथें लोखंड व पेट्रोलियम सांपडतें.शारकीच्या जवळपास पूर्वी चांगली दारू तयार होत असे. परंतु जबर करामुळें ती तयार करणें बंद झालें.

आड्रियानोपल व ईजियन समुद्र याना जोडणाऱ्या रेल्वेनें गॅलिपोलीचा बराच व्यापार बसला. १९०४ सालीं ८०,००० पौंडाच्या मालाची निर्गत झाली.त्यात गहूं, मका, जव, ओट अळशी, कातडीं वगैरे मुख्य माल होता. लोंकरीचें व सुताचें कापड, लोखंडी सामान, दोर, सर्पण, लोखंड वगैरे मालाची आयात होते.

ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकांत मॅसिडोनियन शहर कॅलीपोली याची स्थापना झाली. येथें ख्रिस्ती बिशपाची स्थापना होऊन मध्ययुगांत हें मोठ्या व्यापाराचें शहर बनलें व याची लोकसंख्या सुमारें एक लक्ष झाली. याचा व्यापार व लष्करी महत्व यांमुळें पूर्वेकडील रोमन बादशहांनीं याला तटबंदी केली. कॉन्स्टांटिनोपल लॅटीन लोकांच्या ताब्यांत गेल्याबरोबर (१२०४) गॅलिपोली हें व्हेनिसच्या ताब्यांत आलें. व्हेनेशियन लोकांचा पराभव करून१२९४ त हें शहर जिनोईज लोकांनीं घेतलें. १४ व्या शतकाच्या मध्यांत जेव्हां तुर्कांनीं यूरोपात स्वारी केली त्या वेळेस गॅलिपोली हेंच पहिलें शहर त्यांच्या हातांत गेलें. महायुद्धानंतर सार्वराष्ट्रीय विभागांत गॅलिपोली पडूं लागलें.

गॅलिली—हा रोमन प्रांत पॅलेस्टाईनमध्यें असून समेरियाच्या उत्तरेस आहे. ह्याच्या दक्षिणेस समेरिया व कार्मेल पर्वताची ओळ, पूर्वेस जार्डन नदी, उत्तरेस लेओन्टेस (लिटानी) व पश्चिमेस भूमध्यसमुद्र व फिनिशियाचा भाग आहे.

देशांतर करून परत आल्यावर यहुदी लोक जुडीयांत राहूं लागले त्यावेळीं गॅलीली हें मिश्रवर्णी लोकांच्या स्वाधीन करण्यांत आलें. रोमनसत्तेखालीं गॅलिली येथील हेरॉड घराण्यांतील सत्ताधीश रोमचे मांडलिक होते. ख्रिस्ताचें बालपण, उपदेश व चमत्कार गॅलिलींत झाले. यरुशलेमचा नाश झाल्यावर राबी लोक गॅलिलींत येऊन राहिले. गॅलिली प्रांताचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग आहेत.

येथील जमीन सुपीक आहे. या देशांत धान्य, दारू, तेल व साबु इत्यादि पदार्थ उत्पन्न होतात.

येथें बायझन्टाईन अंमल व धर्मयुद्ध या काळच्या पुष्कळ पडक्या इमारतींचे अवशेष आहेत. १२ व्या शतकांत गॅलिली हें यरुशलेमच्या ख्रिस्ती राज्याचें नाकें होतें. पवित्र भूमीपैकीं दक्षिण गॅलिली हाच कायतो भाग ख्रिस्त्यांच्या ताब्यांत होता. परंतु एकर त्यांच्या हातून गेल्यावर (१२९१) हा सर्व प्रदेश त्यांच्या हातून गेला. गॅलिलीची सध्यांची वस्ति मिश्र आहे.

गॅलिलीओ गॅलिली (१५६४-१६४२)—या इटालियन ज्योतिष्याचें चरित्र व शास्त्रीय शोध 'विज्ञानेतिहास' (ज्ञानकोश विभाग ५, प्र. ८, पृ. ३४५-३४७) ग्रंथांत दिले आहेत. यानें दुर्बिणीच्या शोधानें ज्योतिषशास्त्रांत महत्वाची भर घातली. याचे सर्व लेख प्रथम फ्लॉरेन्स येथें (१८४२-१८५६) १६ विभागांत प्रसिद्ध झाले. मिसेस ओलनेचें 'दि प्रायव्हेट लाईफ ऑफ गॅलिलीओ' (१८७०) हें त्याच्या खासगी आयुष्यक्रमावर प्रकाश पाडणारें पुस्तक आहे.

गॅलिलीचा उपसागर—पॅलेस्टाइनमधील सरोवर. याची लांबी १३ मैल, रुंदी ८ मैल व क्षेत्रफळ ६४ चौरस मैल आहे. या सरोवराची सर्वांत जास्त खोली १५० फूट आहे. हें एका बाजूस चिंचोळें आहे. हिब्रू धर्मग्रंथांत याचें नांव चिनेरेथ किंवा चिनेरोथचा समुद्र असें आहे. याची धर्मग्रंथांत गेनेसर, गेनेसारेट, टायबेरिआसचा समुद्र इत्यादि निरनिराळीं नावें आहेत.

या सरोवराच्या भोंवतालच्या प्रदेशांत पुष्कळ उष्ण झरे आहेत. या सरोवरांतहि एक उष्ण झरा आहे. या झऱ्यामुळें पाण्याच्या आंतील भागांत कधीं कधीं खळबळ सुरू होते; भोंवतालच्या प्रदेशांत भूकंप फार होतात. उपसागराचें पाणी काळसर व मलिन आहे. तथापि तें पिण्याच्या उपयोगीं आणितात. उपसागराभोंवती उंच डोंगर आहेत. पूर्वेकडील डोंगर २००० फूट उंचीचा आहे. उपसागराची स्वाभाविक रचना अशा नऱ्हेची असल्या कारणानें हवेमध्यें तात्काळ फरक होतो व त्यामुळें भयंकर वादळें होतात.

सरोवराच्या भोंवतालचीं जुनीं पहाण्याजोगीं ठिकाणें उत्तरेपासून पश्चिम दिशेला व दक्षिणेपासून पूर्व दिशेला आहेत. सरोवराच्या किनाऱ्यापासून २ मैलांवर ९०० फूट उंचीवर केराझेह हें स्थान आहे; पश्चिमेस एक मोठी खिंड आहे. या खिंडींत ज्यू लोकांच्या देवालयाचे कांहीं अवशेष आहेत. या देवळाच्या दक्षिण भागाला "हेलहम" नांवाची जुनी इमारत आहे. मिनयेह या इमारतीचे अवशेष जेनेसारेथ मैदानाच्या उत्तरेस आहेत. जेनेसारेथच्या दक्षिणेस मागदाल, टयुबारिया, केराक या स्थानांचे अवशेष सांपडतात. उपसागराच्या पूर्व भागाचा पश्चिम भागाइतका शोध लागलेला नाहीं. पूर्वभागांत हिप्पोस, कालाटेल होसन, केरसा इत्यादि ठिकाणचे कांहीं अवशेष आहेत.

गॅलिशिया—हा ऑस्ट्रियाच्या ताब्यांतील एक प्रांत असून त्याच्या पूर्वेस व उत्तरेस रशिया आहे. बुकोव्हिना व हंगेरी हे याच्या दक्षिणेस असून पश्चिमेस ऑस्ट्रियन व प्रशियन सायलेशिया देश आहेत. या प्रांताचें क्षेत्रफळ ३०,३२१ चौरस मैल असून गॅलिशिया व लोडोमेरिया नांवाचीं जुनीं राज्यें, ऑश्वित्झ व झॅटॉरच्या जहागिऱ्या व क्रॅकौची मोठी जहागिरी या सर्वांचा त्यांत समावेश होतो. कार्पेथियन पर्वताच्या उत्तर भागास हा प्रांत असून त्यांत व्हिस्चुला व नीस्टर अशा मुख्य दोन नद्या आहेत. गॅलिशिया व हंगेरी या देशांची सरहद्द दोहोंमध्यें असलेल्या कार्पेथियन पर्वतराजीनेंच ठरविलेली दिसते. क्रॅकौ या ठिकाणीं नौकागमनार्ह होणाऱ्या व्हिस्चुला नदीनें आपल्या तेथील अस्तित्वानें गॅलिशियाची वायव्यसरहद्दच तयार केली आहे. त्या ठिकाणीं पुष्कळ नद्या व उपनद्या व्हिस्चुलेस मिळतात. कार्पेथियनमध्यें उगम पावणारी नीस्टर नदी सॅबॉर येथें नौकागमनार्ह होते. प्रुथ नदीहि महत्वाची आहे. या प्रांतांत सरोवरें थोडीं आहेत 'झॉनिका' व 'क्रायनिका' येथें अल्क(अल्कली)चे झरे असून क्रुझेसझोविस, झक्लो व ल्युबिअन येथें गंधकाचे झरे आहेत. इवोनिक येथें आयोडाइनचे झरे आहेत. गॅलिशिया प्रांत हा ऑस्ट्रियांतील अत्यंत थंड प्रदेश होय. तेथील जमीन सुपीक असून मका, गहूं, ओट व सर्व कडधान्यें तेथें पिकतात. बटाटे, ताग, जवस, व तंबाखू हीं चांगलीं पिकतात. तेथील मुख्य खनिज द्रव्यें म्हटलीं म्हणजे कोळसा, मीठ व पेट्रोलियम हीं होत. त्याशिवाय जस्त, लोखंड व संगमरवरी दगड वगैरे पदार्थ विपुल सांपडतात. पक्का माल तयार करणारे कारखाने गॅलिशियांत फारसे वाढलेले नाहींत. कलालांच्या भट्टया, पेट्रोलियमची निपज, करवतकामाच्या गिरण्या, कागद करणें, साखरेचे कारखाने तंबाखूचे कारखाने, इत्यादि अनेक उद्योगधंदे तेथें चालू आहेत. शिवाय ताग व लोकरी कापड यांचेहि कारखाने आहेत. बहुतेक व्यापार ज्यू लोकांच्या ताब्यांत असून रशियाशीं व पौरस्त्य देशांशीं बराच व्यापार चालतो.

१९१० सालीं, गॅलिशियाची लोकसंख्या ८०,२५,६७५ भरली होती. पोल व रुथेनियन या लोकांच्या संख्येचें प्रमाण जास्त असून कार्पेथिअनमध्यें राहणाऱ्या पोल लोकांना गोरॅलिअन म्हणतात व रुथेनियन यांना हुझुलिअन म्हणतात. पोल हे रोमनकॅथॉलिक धर्माचे असून रुथेनियन ग्रीक कॅथॉलिक आहेत शिवाय ज्यू व आर्मिनियन यांचीहि मोठी संख्या असून ते कॅथॉलिक पंथीं आहेत. 'लॅंबर्ग' व क्रॅकौ हीं प्रसिद्ध विद्यापीठें असून क्रॅकौ येथें एक पोलिश शास्त्रीय विद्यालय आहे. या प्रांताचे ७८ जिल्हे असून लॅंबर्ग व क्रॅकौ हीं ठिकाणें स्वयंशासित आहेत.

१७७२ त पोलंडची विभागणी झाल्यावर गॅलिशिया व लोडोमेरिया हीं राज्यें ऑस्ट्रियास जोडलीं गेलीं, पण १८०९ च्या व्हिएन्नाच्या तहानें पश्चिम गॅलिशिया व क्रॅकौ हीं ठिकाणें वार्साच्या मोठया जहागिरीस जोडलीं गेलीं व १८१० त पूर्व गॅलिशियाचा भाग व हार्नोपोल रशियाच्या ताब्यांत देण्यांत आला. १८१४ च्या पॅरिसच्या तहानें टार्नोपोल ऑस्ट्रियास परत मिळाला व १८४६ क्रॅकौच्या प्रजासत्ताक राज्याची इतिश्री झाल्यावर पूर्व गॅलिशियाहि मिळाला. १८६१ ची घटना अमलांत आल्यावर, ऑस्ट्रियन साम्राज्यांतील कोणत्याहि प्रांतापेक्षां, गॅलिशियास जास्त स्वायत्तता प्राप्त झाली.

गॅले—गॅले हें सीलोनच्या नैर्ऋत्य किनाऱ्यावरील बंदर व शहर आहे. येथें झाडें अतिशय आहेत. या बंदरांत किनाऱ्याजवळ खोल पाणी आहे. परंतु नैर्ऋत्येकडील बंदरांत बोटींना वाऱ्यामुळें प्रवेश करणें फार कठिण आहे. १८६९ मध्यें सुएझचा कालवा सुरू झाला व कोलंबो येथें बंधारा घातल्यामुळें कोलंबो येथें व्यापारी जहाजें व डाकेचें जहाज हीं जाऊं लागलीं व त्यामुळें या बंदराचें महत्त्व कमी झालें. गॅले जिल्ह्याची सर्व निर्गत व आयात कोलंबोहून होते. येथील लोकसंख्या १९११ मध्यें ३९,९६० होती.

१४ व्या शतकाच्या मध्यांत हें शहर लहान होतें असा उल्लेख आहे. पोर्तुगीज लोक येथें आल्यापासून या बंदराला महत्त्व आलें आहे. पोर्तुगीज लोकांनंतर डच लोकांच्या ताब्यांत जेव्हां हें गेलें तेव्हां त्यांनीं येथें तटबंदी केली; इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लसच्या पोर्तुगालच्या राजकन्येशीं झालेल्या विवाहाच्या वेळीं असा तह झाला कीं, जर पोर्तुगीज लोकांनीं सीलोन पुन्हां मिळविलें तर गॅले इंग्रजांना द्यावयाचें; परंतु पोर्तुगीज लोकांनीं सीलोन मिळविलें नाहीं. सीलोन जेव्हां डच लोकांपासून इंग्रजांनीं जिंकलें तेव्हां १७९६ मध्यें हें इंग्रजांना मिळालें.

गॅलेशिया—(१) हें नांव ग्रीक लोकांनीं आशियामायनर मधील एका जिल्ह्याला दिलें होतें हा जिल्हा इ. स. पूर्वी ३ ऱ्या शतकांत गॉल जातींनीं व्यापून टाकिला. ह्याच्या उत्तरेस बिथिनिया व पॅफ्लागोनिया, पश्चिमेस फ्रिजीया, दक्षिणेस लिकॅओनिया व कॅपाडोसिया आणि पूर्वेस पान्टस हे प्रांत आहेत. साधारणतः सध्यांच्या अंगोरा प्रांताचा बराच भाग यांत येतो. गॅलिशिया हा आशियामायनरमधील एका मोठ्या पठाराचा भाग आहे. समुद्रसपाटीपासून २ ते ३ हजार फूट उंचविर हा जिल्हा आहे.

गॉल लोक आशियामायनरमध्यें इ. स. पूर्वी २७८–७७ च्या सुमारास आले.त्यांनीं फारच अंदाधुंदी माजविली.शेवटीं परगॅमनच्या पहिल्या अॅटलसनें त्यांचा पराभव करून त्यांनां अंकिरा, पेसिनस, टेव्हियमच्या भोंवतालच्या प्रदेशांत वस्ती करावयास लाविलें. अॅटलस मेल्यावर त्यांनीं रोमन प्रांतावर स्वाऱ्या केल्या. परंतु यांची चांगली खोड मोडली गेली. मिथ्रिडेटिक युद्धांत गॅलेशियन लोकांनीं रोमला चांगली मदत केली. पुढें सिसिरो व सीझर यांचा समकालीन जो डिओटेरस हा गॅलेशियाचा पहिला राजा झाला. तिसरा राजा अमिन्टास हा इ.स. पूर्वी२५ त मेल्यावर आगस्टसनें हा प्रांत आपल्या साम्राज्यास जोडिला.

गॉल लोक येण्यापूर्वी पश्चिमगॅलेशियांत फ्रिजिअन व पूर्व गॅलेशियांत कॅपाडोशियन व इतर लोक होते. लोकसंख्येंत यांचा भरणा विशेष असे. यांनां जिंकिल्यावर गॉल हे सत्ताधिकारी व वरिष्ठ दर्जाचे बनले. परंतु अंगांतील शौर्य कमी झाल्यावर गॉल लोक तेथील मूळ रहिवाश्यांत मिसळले. शेतकरी व खालच्या दर्जाच्या लोकात ग्रीक भाषा व संस्कृति यांचा प्रचार झाला नाहीं. परंतु ४ थ्या व ५ व्या शतकांत राज्यकारभाराचें मुख्य ठिकाण प्रथम निकोमेडिया व नंतर कॉन्स्टांटिनोपल येथें गेल्यामुळें ग्रीकसंस्कृतीचा चांगलाच फैलाव झाला.

(२) गॅलेशिया नांवाचा रोमन प्रांत इ. स. पूर्वी २५ त अस्तित्वांत आला. यांत गॅलेशिया, फ्रिजीयाचा कांहीं भाग (अपोलोनिया, अँटीओक व इकोनियम), पिसिडीया, लिकाओनियाचा भाग व इसारिया यांचा समावेश होई. हा १०० वर्षेपर्यंत सरहद्दीवरील प्रांत होता. यांत हळूहळू बरेच प्रांत सामील करण्यांत आले. इ. स. ७० त गॅलेशियाची जागा कॅपोडोशियानें पटकाविली. ११४ त ट्रॅजननें गॅलेशियाला कमी दर्जाचा बनविला. डायओक्लेटियननें गॅलेशियाचे दोन भाग केले. उत्तरेकडील भागाला गॅलेशिया नांव राहिलें (इ. स. २९५). नंतर अरब व इराणी लोकांच्या स्वाऱ्यांपासून गॅलेशियाला बराच त्रास झाला. ११ व्या शतकांत गॅलेशिया सेल्जुक तुर्कांनीं घेतला व १४ व्या शतकार्धांत तो ओटोमन तुर्कांच्या हातीं आला. सेंटपालनें ज्या 'गॅलिशियांतील ख्रिस्ती मंदिरांनां' पत्रें पाठाविलीं, तीं मंदिरें उत्तरभागांत होतीं कीं नाहीं याविषयीं बराच वाद आहे.

गल्ल—पूर्व आफ्रिकेंतील बलवान हॅमिटिक लोकांनां गल्ल म्हणतात. त्यांची लोकसंख्या ३० लाखांपेक्षां जास्त आहे. ते अबिसिनियाचे मध्यभागापासून ब्रिटिश पूर्व आफ्रिकेंतील सॅबस्की नदीपर्यंतच्या मुलुखांत रहातात. त्यांच्या प्राचीन वसतिस्थानाबद्दल निश्चयात्मक माहिती मिळत नाहीं. हल्लीं अबिसिनिअन साम्राज्याच्या मध्यभागाच्या दक्षिण प्रदेशाला गल्ल लोकांचा प्रदेश असे नांव आहे. कारण त्या भागांत गल्ल लोकांची वस्ती फार आहे. गल्ल लोकांचें कपाळ उंच, रंग पिंगट व केंस मऊ असतात. सर्वसाधारणपणें त्यांचे चेहरे युरोपांतील लोकांप्रमाणें आहेत.

गल्ल लोक पशुपालवृत्ति असून त्यांची संपत्ति म्हणजे त्यांचीं गुरेंढोरें होत. मांस, दूध, दही व मध हे त्यांच्या आहाराचे पदार्थ आहेत. त्यांच्यांत कोठें एकपत्नीत्वाची तर कोठें बहुपत्नीत्वाची चाल आहे. त्यांच्यांत पुष्कळ

प्रकारचे विवाहविधी आहेत. लढाईच्या वेळीं ते फार क्रूरपणानें वागतात. तरी ते आपलें वचन मोडीत नाहींत. भाला व दोनधारी चाकू हीं त्यांचीं हत्यारें होत. त्यांच्यांत मुसुलमानी व ख्रिस्ती धर्म प्रचलित असून शिवाय कांहीं मूर्तिपूजकहि आहेत. मनुष्याची उत्पत्ति सूर्यापासून झाली अशी त्यांची समजूत असून उत्तरेकडील गल्ल लोक सापांची पूजा करतात.

गॅल्वे, परगणा—पश्चिम आयर्लंडच्या कॅनाट प्रांतांत असून याच्या उत्तरेस मेयो व रॉस्कोमन, पूर्वेस रॉस्कोमन किंग्सचे परगणे व टिपेरारी, दक्षिणेस क्लेअर व गॅल्वे उपसागर आणि पश्चिमेस अटलांटिक महासागर आहेत. आयरिश परगण्यांतील कॉर्कच्या खालोखाल गॅल्वे परगण्याचें क्षेत्रफळ सुमारें १४६७८५०एकर आहे. लॉफकोरिबमुळें या परगण्याचे पूर्व आणि पश्चिम असे दोन स्वाभाविक विभाग झाले आहेत. पूर्वविभागाचा दक्षिण भाग सुपीक असल्याबद्दल फार प्रसिद्धि आहे. पश्चिमेकडे बालिना, किल व क्लेगन उपसागर आहेत. या परगण्यांत फार थोड्या नद्या असून शाननशिवाय सर्व लहान आहेत. लॉफकोरिबचें सरोवर येथील सरोवरांत सर्वांत मोठें असून याच्या पश्चिमेस सुमारें २५ लहान सरोवरें आहेत. लाफरी नांवाचें सरोवर याच नांवाच्या शहराजवळ आहे. हें सरोवराच्या आसपास असलेल्या सृष्टिसौंदर्याच्या देखाव्यानें फार मनोहर दिसतें. येथील किनाऱ्याच्या व अंतर्भागाच्या मनोरम देखाव्यामुळें या परगण्यांत उन्हाळ्यांत बरेच लोक येतात. गॅल्वे क्लिफडेन रेल्वेमुळें पश्चिमेकडील परगण्यांत जाण्याचा मार्ग सुगम झाला आहे. लीलानें रेन्व्हिलेहाऊस लेटर फ्राक, स्टीमर्स्टन, क्लिफडेन आणि कशेल हीं समुद्रकांठचीं आरोग्यकारक स्थानें आहेत. येथील लोकसंख्या (इ. स. १९११) १८२२२४ होती. गॅल्वे (राजधानी) टुआम, बलिन्स्लो, लॉघ्रिआ हीं या परगण्यांतील मोठीं शहरें आहेत. या परगण्याचे उत्तर, दक्षिण, पूर्व आणि कॉनेमारा असे चार पार्लमेंटरी विभाग केले आहेत.

१५७९ मध्यें आयर्लंडचा लॉर्ड सर हेनरी सिडने यानें गॅल्वेचा परगणा बनविला. १६९१ मध्यें आघ्रिम येथें आंग्ल राज्यक्रांतीच्या वेळीं लढाई झाली. या परगण्यांत प्राचीन शिलावर्तुळें सांपडतात. यांपैकीं किलमाकडुअघ येथील चांगल्या स्थितींत आहे. जुनीं स्मारकेंहि फार आहेत. टुआमपासून सुमारें ६ मैलांवर नाक मॉय येथें सांपडलेले अवशेष फार महत्वाचे आहेत. टुआमचा किल्ला आयर्लंडच्या रॉडरिक ओकोनार राजानें इंग्लिशांच्या स्वारीच्या वेळीं बांधला होता. अरन बेटांवर जुन्या मठांचे अवशेष आहेत.

शहर.—हें आयर्लंडच्या गॅल्वे परगण्याचें मुख्य शहर, पार्लमेंटरी बरो व बंदर गॅल्वे उपसागराच्या उत्तर किनाऱ्यावर, मिडलन्ड ग्रेट रेल्वेवर आहे. येथील लोकसंख्या (१९०१) १३४२६ लिंचचा महाल म्हणून एक प्रसिद्ध इमारत आहे. सेंट निकोलसच्या या देवळांत केम्ब्रान येथून आणलेली घंटा आहे. सेंट अगस्टाइनचें देऊळ अर्वाचीन आहे. या शहरांत रोमन कॅथोलिक बिशप रहातो. लोंकर, शेतकीचे जिन्नस व काळा संगमरवरी दगड हा मुख्य निर्गत माल आहे. येथें लोखंडाचे, दारू गाळण्याचे व कुंच्या व थैल्या तयार करण्याचे कारखाने आहेत. १८८५ पावेतों पार्लमेंटमध्यें दोन प्रतिनिधी निवडून जात होते. आतां फक्त एक प्रतिनिधी जातो. गॅल्वे शहराचे जुनें व नवें शहर असे दोन विभाग असून क्लेडाघ उपनगरांत कोळी लोक रहातात. यांच्या चालीरीती, कायदे, विवाहपद्धति फार विचित्र असून यांच्यांत धर्म व नीतीचें उच्च ध्येय आहे. गॅल्वे शहराच्या आसपासचा देखावा फार सुंदर आहे. रॉसकॉम हें सर्वांत उत्तम व मनोरम स्थान आहे. ओकोनॉर घराणें नामशेष झाल्यानंतर हें शहर डीबरगॉस याच्या हातीं लागलें. पुढें शहराची तटबंदी होऊन येथें बरेच व्यापारी येऊन राहिले व यामुळें व्यापाराच्या दृष्टीनें हें शहर फार प्रसिद्धीस चढलें. दुसऱ्या रिचर्डकडून पुष्कळशा हक्कांची सनद मिळाली. १५४५ मध्यें ह्या बंदराचा अधिकार आरान बेटावर चालावा, आणि ताग व लोंकर ह्याशिवाय कोणताहि माल बाहेर पाठविण्याच्या हक्काची सनद मिळाली. येथें क्रामवेलचे बरेच शिपाई राहिले होते. १६४१ च्या यादवींत हें शहर आयर्लंडतर्फे लढलें व सर चार्लस कूटच्या पार्लमेंटरी सैन्यास शरण आलें. यानंतर येथील जुन्या रहिवाश्यांस येथून काढून देण्यांत आलें. जेम्सच्या (२ रा) राज्यारोहणाच्या वेळीं या लोकांस पूर्वीचे हक्क मिळण्याची जी थोडीबहुत आशा होती ती विल्यम राजा आल्यामुळें पार नाहींशी झाली व जनरल गिंकेलच्या सैन्यानें दिलेल्या वेढ्यांत पुनः येथील लोकांना शरण जावें लागलें.

गवंडी.—गवंडीकाम करणाऱ्या लोकांची या नांवानें ओळखिली जाणारी जात फक्त मुंबई इलाख्यांतच आहे. लो. सं.(१९११) ३९४०९. सबंध मुंबई इलाख्याभर हे लोक पसरलेले आहेत. सागर व जिरे गवंडी मातीच्या देवाच्या मूर्ती करून विकतात. विजापूरमधील गवंडी पूर्वी मीठ तयार करीत असत. यांमध्यें (१) मराठे (२) जिरे (३) सागर अथवा कामाटी (४) कानडी व (५) चुनर, काडिया, संगर किंवा गुजराथी, अशा पांच पोटजाती असून एका पोटजातीचे लोक दुसऱ्या पोटजातीच्या लोकांशीं विवाहसंबंध करीत नाहींत.

मराठे गवंडी.— हे मराठी कुणबी असून त्यांच्या धंद्यावरून त्यांची वेगळी जात झालेली आहे.

जिरे गवंडी.—हे पंढरपूर व सोलापूर येथें आढळतात. विजापूरच्या राजाचा प्रसिद्ध गवंडी " जिरे " ह्याच्या नांवावरून यांचें नांव जिरे असें पडलें. हे मूळचे मराठे कुणबी असून विजापूरच्या आदिलशाहींत (१४९०–१६८०) त्यानीं मुसुलमानांच्या मशिदी बांधल्याबद्दल यांना १५० रु.

दंड केला गेला व तो न दिल्यामुळें हे जातीबाहेर टाकिले गेले असें म्हणतात.

सा ग र ग वं डी.—हे सोलापूर जिल्ह्यांत आढळतात. हे मूळचे बनारसचे रहिवासी असून ते प्रथम निझामच्या मुलुखांत सोलापूर जिल्ह्यांत आले. ह्या जातीचे कांहीं लोक हैद्राबादमध्येंहि आहेत.

का न डी ग वं डी.—ह्यांनां धारवाड प्रांतांत सागर चक्रवर्ती असेंहि नांव आहे. यांमध्यें लिंगायत संस्कार बरेच आलेले असून कधीं कधीं लिंगायत उपाध्ये यांचे उपाध्ये असतात.

का डि या ग वं डी.—यांचे संस्कार व चालीरीती इतर कारागीर लोकांप्रमाणें आहेत. अहमदाबाद जिल्ह्यांतील काडिया गवंड्यांची ४० सभासदांची एक मध्यवर्ती पंचायत असून तिचा अधिकार अहमदाबाद, प्रांतेज, वढवान, लिमडी, धंदुका व सुरत यांवर आहे. गुन्ह्यांबद्दल दंड होतो व जातीबाहेरहि टाकिलें जातें. काठेवाडमधील काडिया गवंड्यांची ४–६ सभासदांची एक मध्यवर्ती जात पंचायती असून ती अपराधाबद्दल दंड करते. दंडाचें उत्पन्न देवळांकडे व साधूंनां भोजन देण्याकडे खर्चिलें जातें.

गवत—बहुतेक देशांत रानमाळ जमिनीवर गवत उगवलेलें असतें; परंतु जेथें निबिड अरण्यें असतात व इतर वृक्षवनस्पती असतात अशा ठिकाणींहि गवत दृष्टीस पडतें. न नांगरलेल्या अशा शेताच्या कोणत्याहि भागात गवताची वाढ होते. तसेंच नांगरून पडिक झालेल्या जमिनीवरहि गवत रुजतें. कुरण हा शेतीचा एक महत्वाचा भाग आहे व धान्य जसें स्वस्त होईल तसें त्याचें महत्त्व वाढत जातें. गवताच्या विविध उपजाती त्यांचे विशेष, कुरणांची सुधारणा व कमी पिकाऊ अशा वहित जमिनींत गवताचीं कुरणें तयार करण्याची आवश्यकता इत्यादि प्रश्नांकडे तज्ज्ञांचें लक्ष्य लागलें आहे. बहुतेक शेतकऱ्यांची इच्छा जमिनींतील कांहीं भागांत तरी गवत असावें अशी असते. कायमच्या कुरणांतील गवताचा उपयोग गुरें चारण्याकडे व तें कापून त्याचें वाळलेलें गवत करण्याकडे होतो. तात्पुरतीं व कायमचीं अशीं दोन प्रकारचीं कुरणें असतात. सर्व प्रकारचें गवत, 'ग्रॅमिनी' नांवाच्या जातीचें असतें व निरनिराळीं धान्यें, बांबू, ऊंस व भात वगैरे वनस्पतीहि वरील मूळ जातीपासून निघाल्या आहेत असें म्हणतात. कुरणांतील व इतर वाळलेल्या गवताच्या उपजातींचे आंग्लवनस्पतिशास्त्रज्ञांनीं वर्गीकरण केलें आहे. त्यांपैकीं गवताच्या बियांस उपयुक्त अशा सहाच उपजाती असून त्यांचा तात्पुरत्या व कायमच्या कुरणाकडे उपयोग होतो. डॉ. डब्लू. फ्रेअॅम यानें इंग्लंडच्या कुरणांची तपासणी करून असें ठरविलें कीं, रायगवत व पांढरें गवत बहुतेक कुरणांस मुख्यतः असतें. याशिवाय इतर कित्येक प्रकारचें गवत व वनस्पति शेतांत असतात व त्यांचा उपयोग कुरणाकरितां संमिश्र बी तयार करण्याकडे होतो. अनेक जातींचें गवत शेतांत मुद्दाम लावण्यांत येतें व खत वगैरे घालून तें वाढेल अशीहि तजवीज करण्यांत येते. गवताच्या जातींपैकीं कोणत्या प्रकारची अधिक वाढ होते ही गोष्ट जमिनीची स्थिति,तेथील कामकाज व हवामान यांवरच अवलंबून असते. वहित जमिनींत उत्तम गवताचें कुरण करण्यास योग्य असें बीं कोणतें यासंबंधीं केंब्रिज येथें प्रयोग करण्यांत आले. तात्पुरतीं कुरणेंच साधारणतः फेरपालगवडीकरितां तयार करण्यांत येतात. व लवकर उगवणारें व लवकर नष्ट होणारें गवतच साधारणतः नेहमीं लावण्यांत येतें. गवताच्या उपजाती युरोपांत बऱ्याच आहेत. हंगेरिअनब्रोम, अमेरिकन प्रेरी केंटकी निळें गवत, अमेरिकन बफेलो ग्रास, कॅनेडिअन बफेलो ग्रास, बंच,स्किरलटेल ग्रास व अशाच अनेक जाती ब्रिटनदेशांत आढळून येत नाहींत. वरील सर्व प्रकार प्रेरी कुरणांत विपुल असतात. या प्रेरी कुरणांत अस्सल क्रॉच्ट्र गवताचा एकहि नमुना आढळत नाहीं. इंग्लंडमध्यें दाट माती असलेली जमीनच गवताच्या उत्पत्तीस योग्य असते. त्यांवर रूळ फिरवितात व ती जमीन लागवडीस योग्य अशी करण्यांत आल्यावर तेथें विपुल गवत उगवूं शकतें. गवताच्या जातींतील वनस्पती 'चारा' या लेखांत विवेचिल्या आहेत. हिंदुस्थानांत पुतनी, पवन्या, भातेण, उंडेण, घोडशाडा इत्यादि गवतांच्या जाती आढळतात.

रि हा अ थ वा चि नी ग व त.—रिहा हें एका चिनी गवताचें नांव आहे. चीनचें व मलायाचें गवत असे दोन प्रकार एकाच जातीचे आहेत. युरोपांत या गवताची लागवड होऊं शकते.या गवतांस चीनमध्यें चुमा,कोचीनमध्यें कायगाई, बंगाल येथें कंकुर, आसामांत रिहा उर्फ रिसा आणि ब्रह्मदेशांत गुन अशीं विविध नांवें आहेत. मलाई भाषेंतील नांवांशीं तुलना केली असतां कंकुर व रिहा हीं नांवें हिंदुस्थानी भाषेंतील आहेत असें दिसतें. ज्याला अलीकडे बनरिहा म्हणतात त्या झाडाचें नागभाषेंतील नांव रिक्षा असें असून त्यावरून चिनी गवताला रिहा हें नांव पडलें असावें. कंकुर किंवा रिहा याचा हिंदुस्थानांतील कोणत्याहि जुन्या सर्वमान्य ग्रंथांत मुळींच उल्लेख नाहीं. कांहीं लेखक रामी नांवाच्या गवतालाच रिहा असें चुकीनें नांव देतात. रामी हें प्रथम हिंदुस्थानांत आलें, तेव्हां त्यास अनेक नांवें मिळालीं व त्याचीं निरनिराळ्या देशांतील नांवेंहि अनेक आहेत. रिहा उत्पन्न होणाऱ्या प्रदेशांत हिंडून पाहिलें असतां असें दिसतें कीं, या जातीच्या सर्व प्रकारांत साम्य आहे. चीनमधील वैंचो येथून इकडे आणलेल्या रोपांप्रमाणें हिंदुस्थानांतलि स्थानिक रोपें फारसे जलद वाढीचे असत नाहींत. तथापि लखिमपुर व कांग्रा येथील रामबाग या ठिकाणचे रोपे जलद वाढीचे व तरतरीत असल्याचें आढळतें. रामबागेंतील रोपे फारशी मशागत न करिताहि यशस्वी व उत्पन्नदायक असे ठरले.

रिहा हें मुळचें हिंदुस्थानांतील झाड नसून येथें तें आपो-आप होत नाहीं. ज्याला बनरिहा म्हणतात त्यापासून ताग व तंतू निघतात. रिहाच्या लागवडीस विशिष्ट प्रकारची जमीन, प्रतिवार्षिक खत व ठराविक हवामान यांची जरूरी लागते. रिहा हें झाड शेतकी उत्पन्नाचें नाहीं. या झाडाचा वाख, मासे धरण्याचीं जाळीं व दोर करण्याकरितां उपयोगिला जातो व कोळी लोकच त्याची लागवड करितात. बंगाल व विशेषतः रामपुर येथील माळरानें रिहाच्या पिकास योग्य आहेत. फारशा फायद्याच्या अभावीं शेतकरी या पिकाकडे दुर्लक्ष करतात. पूर्व व उत्तर बंगाल येथील रिहाची लागवड करण्याची विशिष्ट पद्धत आहे. तंबाखूस जी हवा व जमीन योग्य असते तीच रिहासहि योग्य असून रिहाबरोबर आळींपाळीनें मिरची, तंबाखू रताळीं वगैरे पीक करितात. दिनाजपूर, बोग्रा व कुचबिहार येथें कांहीं ठिकाणीं रिहा उगवतो. बंगालमध्यें मुळें कापून तीं लावण्याची पद्धत आहे. दांडे तोडून तेहि लावतात. लावणीच्या दोन वेळा असतात. सामान्यतः तीन कापण्या होतात. पक्क झालेल्या बुंध्यांचीच कापणी करतात. हिवाळ्यांतील कापणीनें जोराची वाढ होते. आसामची परिस्थिति वरीलप्रमाणेंच आहे. तेथें फार मोठया प्रमाणावर रिहाची लागवड करावयाची म्हणजे चहाच्या मळेवाल्यांशीं टक्कर द्यावी लागेल. तरी पण रिहाचें मुख्य उत्पन्न त्याच ठिकाणीं होतें. आसामची जमीन जास्त सुपीक असल्यामुळें, शेतकऱ्यांची प्रवृत्ति रिहाकडे फारशी नसते हें खरें आहे. ब्रह्मदेशांतील रानरिहा म्हणजे एक प्रकारची खाजकुयरी होय. याच्यापासूनच पुष्कळ डोंगरी लोक वाख काढतात व त्यास निलगिरीची खाजकुयरी म्हणतात.

पंजाबमध्यें बंगाल व आसाम या प्रांतांप्रमाणें रिहाची मशागत स्वाभाविक नसली तरी कांग्राची हवा रिहाला योग्य आहे. संयुक्तप्रांतांत बरेच प्रयोग करण्यांत आले व अनुभव असा आला कीं रिहाची मशागत करणें खर्चाचें काम आहे. तेथें दरवर्षीं दोन कापण्या करून खत घालावें लागतें. दक्षिणहिंदुस्थानांतहि युरोपियन लोकांनीं रिहाची लागवड केली परंतु खर्चापुरतेंसुद्धां उत्पन्न निघेना. वरील सर्व प्रांतांतील अनुभवावरून असेंच ठरतें कीं, हिंदुस्थानांत रिहा उत्पन्न होणें शक्य नाहीं. तिरहुत व आसाम येथील कांहीं प्रयोग अलीकडे यशस्वी होऊं लागले आहेत. हिंदुस्थानापेक्षां इतर ठिकाणीं रिहाचें चांगलें पीक होतें व तें कमी खर्चांतहि होतें; तेव्हां येथील मशागतींत कोणते फरक करावे हा विचारार्ह असा प्रश्न आहे.

पूर्वी नूतन अंकुर खुडल्यानंतर ते पाण्यांत भिजवून त्यांच्या सालीपासून वाख तयार करीत असत, परंतु आतां या पद्धतींत फरक पडला आहे. पाण्यांत कार्बोनेट ऑफ सोडा घालून दीड दोन तास बुंधे उकळत ठेवितात. नंतर वाहत्या पाण्यांत एखाद्या तक्त्यावर ते बडवून काढतात व पुनः एक तास उकळून वाहत्या पाण्यांत बुडवून काढतात म्हणजे साल व गोंद हीं भिन्न होतात. याप्रमाणें एक मणभर अंकुराचा एका तासांत शे. २॥ प्रमाणें कच्चा माल तयार होतो. बुंधे पाण्यांत कुजत घालणें हें वाइट आहे परंतु अलजीरियन लोकांची पद्धत अशी आहे कीं, ते साध्या पाण्याऐवजीं समुद्राचें पाणी वापरतात. ही पद्धति चांगली आहे असें मानण्यांत येतें. आसाम व बंगालमधील ताग काढण्याची रीत खालीं वर्णन केल्याप्रमाणें आहे. प्रथम अंकुराचीं पानें काढून नंतर ते तासून टाकतात व त्या पानांचा नंतर खतासारखा उपयोग होतो. एक आठवडा बुंधे वाळविल्यावर तंतू पांढरे होतात. त्यानंतर त्यांचें पृथक्करण करण्यांत येतें. बंगाली लोक प्रथम बुंधे तासून नंतर त्यापासून तंतू वेगळे काढतात. चीन देशांत प्रथम साली काढून नंतर तंतूंची फीत करतात. फीत कुजत ठेऊन नंतर साल व गोंद हीं वेगळीं काढतात. रेशमांत मिसळण्याकरितां रिहांच्या तंतूंचा फार उपयोग होतो. बंगाल व आसाम येथें या तंतूपासून जाडाभरडा दोरा व मासे धरण्याचीं जाळीं तयार करतात.

गवती चहा—गवती चहास कोठें कोठें हिरवा किंवा ओला चहा म्हणतात. बंगाल्यांत या चहास बंधबेन व हिंदुस्तानींत गंधतृण म्हणतात. संस्कृतांत यास भूस्तृण असें नांव आहे. गवती चहा एक जातीचें गवत आहे. हें गवत हिरवेंगार असून खरबरीत असतें. पूर्वेकडील आर्चिपेलेगोतल्य पुष्कळ बेटांत, सिलोनांत व हिंदुस्थानांत गवती चहा मुद्दाम बागात लावितात. या गवतास क्वचित फूल येतें. सिंगापूर व सिलोन येथें सुवासिक तेल काढण्याकरितां गवती चहा पुष्कळ लावितात. या गवताचा सुवासिक तेल काढण्याकडे विशेष उपयोग होतो. 'कोलन वॉटर' तयार करण्यांत या तेलाचा फार खप होतो. तापांत घाम येण्यासाठीं गवती चहाचा काढा करून पाजतात.

गवररा—मध्यप्रांत. जिल्हा चांदा. भांदकच्या दक्षिणेस दीड मैलावर हें एक लहानसें खेडें आहे. येथें कांहीं लेणीं असून त्यांत एक यौवनाश्वाचें देऊळ आहे. त्यांत एका खांबावर एक लेख असून त्यावर संवत् ११६६ (सन ११०९) आहे. जवळच एक लहानसें दुसरें देऊळ असून त्यांत गणेशाची मोठी मूर्ति आहे.

गवळी—दुधदुभत्याच्या धंद्यावरून 'गवळी' हें नांव पडलेली जात फक्त मुंबई इलाख्यांतच आहे. अहिरांची माहिती स्वतंत्र दिलेली आहे. लो. सं. ३८५४२. दक्षिणहिंदुस्थान, कोंकण व कर्नाटक या प्रांतभर हे लोक आहेत. धनगर, कुरुबा, मराठा कुणबी इत्यादि लोकांचा भरणा या जातींत बराच असून त्यांच्या धंद्यावरून ही एक स्वतंत्र जात झालेली आहे. यांमध्यें आठ पोटभेद असून त्या

पोटभेदांतील लोक एकमेकांशीं रोटीबेटीव्यवहार करीत नाहींत. यांखेरीज कानडी ' गोपाल किंवा गोला ' हाहि गवळयांचाच एक पोटभाग आहे असें म्हणतात. या लोकांच्या पुष्कळ चालीरीती लिंगायतांप्रमाणें असून कांहीं खास लिंगायत झालेले आहेत. एक आडनांव असलेल्या लोकांमध्यें विवाहसंबंध होत नाहींत. पुनर्विवाह व घटस्फोट या दोन्ही चाली यांमध्यें रूढ आहेत. हे लोक मांसाहारी असून त्यांचा सामाजिक दर्जा कुणब्यांहून वरचा आहे. यांची मुख्य देवता कृष्ण ही होय. यांच्या कुलदेवता महादेव, खंडोबा, विठोबा इत्यादि आहेत. जंगम व ब्राह्मण हे त्यांचे उपाध्ये असतात परंतु लग्नाच्या वेळीं ब्राह्मण असावाच लागतो.

ग व ळा जा त— आसामांतील गवळी लोकांची संख्या सुमारें चाळीस हजार आहे. बिहारमध्यें ब्राह्मण, गवळयाच्या हातचें पाणी घेतात. बंगाल्यांत ह्या लोकांनां नवसखा लोकापेक्षां हलके समजतात. परंतु ओरिसामधील गवळी आपणाला उच्च जातीचे समजून बंगाल व बिहारमधील गवळयांनां ते तुच्छ मानितात. ब्रह्मपुत्रा नदीच्या थडीवरील गवळी बहुतेक सर्व बाहेरून आलेले आहेत व तसेंच सिलहट् व काचरमधील फारच थोडे गवळी स्थानिक आहेत. [सेन्सस रिपोर्ट अहीर पहा].

गवा—ही बैलांची रानटी जात असून कपाळाचा रुंद भाग, लांब अवयव, भरदार डोकें, डौलदार वशिंड आणि सशक्त स्नायू इत्यादि गोष्टी यांत विशेष असतात. गव्याला चौदा बरगड्या असतात व त्याचें डोकें व मान काळसर व पिंगट केसांनीं आच्छादिलेलीं असते. यूरोपांतील गव्याची ' आयाळ ' ग्रीष्मऋतूंत नष्ट होते असें म्हणतात. यूरोपांतील गवा सुमारें दहा फूट लांब व सहा फूट रुंद असतो. प्राचीन काळीं असले प्राणी अनेक होते याची साक्ष गेंडे व गवे यांचे सध्या जे लांब रुंद अवशेष सांपडले आहेत, त्यांवरून पटते. जर्मनी व बेलजम मधील आरण्यात रानटी बैलांप्रमाणेंच गवे असत असा सीझरनें उल्लेख केला आहे. त्या काळीं रोमन ॲम्फीथिएटरमध्यें जिवंत गव्यांचें प्रदर्शन होत असे. सोळाव्या शतकांतील हर्बेर्स्टेनच्या उल्लेखावरून त्या काळीं मध्ययुरोपांतहि बरेच गवे असावे. सध्यां गवा हा प्राणी फक्त कॉकेशस पर्वतांतच आढळतो; व रशियन सरकारनें या प्राण्याचें रक्षण करण्याचें मनावर घेतलें आहे. साधारणत: गवे हे एखाद्या सुगंधी वनस्पतीवर किंवा पानें, झाडांचीं मुळें, साली व डहाळ्या यांवर उपजीविका करतात. अमेरिकन गवा हा युरोपियन गव्यापेक्षा थोडा भिन्न असतो. तेथील गव्याचा पार्श्वभाग थोडासा कमकुवत असतो. त्याच्या डोक्यावर, मानेवर व पृष्ठभागावर काळसर व पिंगट केस बरेच असतात. त्याचें डोकें व शिंगेंहि जरा भिन्न असतात. त्याचीं शिंगें आंखूड असून तीं बरींच वाकलेलीं व अणकुचीदार अशीं असतात. त्याचे डोळे वाटोळे असून डोकेंहि भव्य असतें. पूर्वी या जातीनें उत्तर अमेरिकेचा सुमारें एक तृतीयांश भाग व्यापिला होता, परंतु हल्लीं तेथें गवा हा प्राणी जवळ जवळ नामशेष झाला आहे. इंग्लंडांत गव्यांचे लहान कळप पाळलेले आहेत. अमेरिकेंतील गव्यांच्या दोन जाती प्रसिद्ध आहेत व त्या जवळ जवळ सारख्याच आहेत.

म्हैसूर जवळच्या जंगलांत व मध्यप्रांतांत गवे आढळतात. त्यांच्या शिंगांच्या अनेक नक्षीदार वस्तू करतात.

गवार—ह्या झाडास लॅटिनमध्यें सीमॉप्सिस प्सोरेलिऑइडिस कोंकणांत गवार, गवारी, गुवार व बावची. देशावर गवार, गवारी; मुंबईकडे गुवार, गोवार अशीं निरनिराळया ठिकाणीं निरनिराळीं नांवें आहेत. गवारीच्या चार जाती आहेत. शेतगवार ही जात कोरडवाहू शेतांत पावसाळ्यांत तुरीप्रमाणें पेरतात व तुरीसारखींच शेतगवारीचीं झाडें होतात. पावसाळ्याच्या शेवटीं शेंगा पिकून वाळल्या म्हणजे सबंध झाडें कापून खळ्यांत आणतात व दाणे तयार करतात. दाण्यांचा उपयोग भरडून, भिजवून जनावरांस घालण्याकडे करतात. कोंवळेपणीं शेंगांची भाजी करतात. हें पीक गुजराथ व मारवाडांत करितात. बागाईत गवारीच्या १ माखणिया, २ सडी अगर सोटिया व ३ लेंकुरवाळी अशा तीन जाती आहेत. २ व ३ या जाती मुंबईच्या उत्तरभागांत व गुजराथेंत करतात. महाराष्ट्रांतील लोकांस तिसरी जात माहीत आहे. अलीकडे दुसरी व तिसरी या जाती कोठें कोठें करावयास लागले आहेत.

सडी अगर सोटिया गवारीचीं झाडें उंच वाढतात. त्यांस फांद्या फुटत नाहींत. शेंगांचे झुबके पानांजवळ वाढतात. या जातीची वाढ लवकर होते व शेंगाहि लवकर वाढतात. झुबके सबंध काढून बाजारांत नेतात. ही जात ठाणें व सुरत जिल्ह्यांत आल्याच्या वाफ्यांत सावली करण्याकरितां करतात. आलें जोरावलें म्हणजे सावलीची जरूरी नसते. तेव्हां गवारीच्या शेंगाहि खपत येतात व झाडें उपटून टाकितात. आलें लावण्याच्या अगोदर वाफ्यांत बीं फेकीतात. ह्या शेंगांची भाजी माखणीयाच्या शेंगांपेक्षां कमी लज्जतदार होते.

माखणिया गवारीचें बीं जाड असतें. झाडें उंच वाढतात. पानें मोठालीं असतात. फांद्या फुटतात व शेंगा करंगळीसारख्या रुंद ३।४ इंच लांब व मासाळ होतात. त्यांची भाजी शिजल्यावर लोण्यासारखी मऊ होते. शेंगा जून झाल्यावर शेंगांतील दाण्याभोंवतीं कवचदार पडदा कठिण होतो व तो दांतांखालीं लागतो. लेंकुरवाळी गवार देशावर उसांत अगर स्वतंत्र करतात. सरीचे वाफे करून १ते१॥ हाताच्या अंतरानें बीं टोंचून लावितात. झाडें तुरीसारखीं वाढतात. ह्या झाडास खालपासून पुष्कळ फांद्या फुटतात. म्हणून या जातीस पुण्याकडे " लेंकुरवाळी " हें नांव प्रचलित आहे. या जातीच्या शेंगा लहान व अरुंद असून पानाजवळ झुबके थोड्या शेंगांचे येतात. त्या लवकर जून होतात. त्यांची भाजी वरील दोन जातींप्रमाणें लोण्यासारखी शिजत नाहीं व लज्जतदार

आणि रुचकर होत नाहीं. भाजीस थोडा उग्र वासहि येतो. गवारीची भाजी पौष्टिक आहे. जून शेंगांची उसळ होते. सुकलेले दाणे शिजवूनहि उसळ होते. वाळलेल्या दाण्यांची भरडून चुणी करतात, ती जनावरांस पुष्टिकारक असते. ती जनावरांस शिजवून अगर बराच वेळ भिजवून ठेवून घालितात. गवारीच्या चुणीपासून जनावरांस संधिवातासारखी बाधा होते असें म्हणतात. गवारीचें ताजें बीं कधीं कधीं उगवत नाहीं. तें सडून लाविल्यानें उगवतें; अगर आधणाच्या पाण्याचा चटका देऊन मग पेरल्यानें उगवतें.

गोवारीचें पीक गोराड व बेसर जमीनींत चांगलें होतें. जमीन दोन वेळ नांगरून वर समार (फळी) फिरवितात. नंतर २ पाळ्या घालून जून महिन्यांत गोवारीच्या बाजरीच्या शेतांत ओळी पेरतात. केव्हां केव्हां गवारी स्वतंत्रहि पेरितात. भाजीकरितां जेव्हां बागाइतांत पेरितात तेव्हां दर एकरीं शेणखताच्या २० गाड्यांपावेतों खत देतात. कोरडवाहूंत फारसें खत देत नाहींत. दर एकरीं मिसळीच्या पिकांस ६ पौंड पावेतों बीं लागतें. स्वतंत्र पिकांस २५ पौंड लागतें. गवारी आक्टोबर महिन्यांत तयार होते. झाडें कापून आणून खळ्यांत वाळवितात व नंतर वरून बैलाच्या गाड्या फिरवून दाणे तयार करतात. चाकानें हें काम चांगलें होतें.

उत्पन्न सरासरीं दरएकरीं १००–१५० पौंड मिसळीचें पीक. ८००—१००० पौंड स्वतंत्र पीक.

गव्हला—हें झाड फार मोठें होत नाहीं. याची उत्पत्ति उत्तरहिंदुस्थानांत होते. यास संस्कृतमध्यें प्रियंगु, लॅटिनमध्यें अॅग्लिआ रिक्सबर्घिआना, हिंदींत व मराठींत गव्हला अशीं नांवें आहेत. यांत एक सुगंधी जात आहे. तिचा सुवासिक तेलें, उदबत्त्या अगरबत्त्या वगैरे करण्याकडे उपयोग होतो. गव्हला तुरट, शीतल, केशांना हितावह, वांति, दाह, पित्त, ज्वर, मोह, तृषा वगैरे व्याधी दूर करणारा आहे. आम्लपित्तावर गव्हल्याचें चूर्ण साखरेबरोबर द्यावें.

गहरवार घराणें—कनोजचें गहरवार किंवा गहडवाल हें घराणें गौतम बुद्धाच्या वंशाची एक शाखा आहे असें दंतकथेवरून मानतात. पहिल्यानें गहरवार राजघराणें अस्तित्वांत असून याच घराण्यापासून राठोड घराणें उत्पन्न झालें. गहरवार राठोड घराण्याची वंशावळ खालीलप्रमाणें आहे. (१) महेन्द्रपाल (इ. स. ९२१), (२) दुसरा भोजदेव (९२५-५०), (३) विनायक पालदेव (९५०-७५),(४) जयपाल, (५) यशोविग्रह (विग्रहपाल) सुमारें ९९१–१०५८, (६) महीचंद्र (महीपाल), (७) चंद्रदेव, (८) मदनपाल, (९) गोविंदचंद्र (१०) पुत्र (गोविंदचंद्राचा), (११) जयचंद्र.

१० व्या शतकांत गहरवार घराण्याच्या राजकारणांत बराच फेरबदल झाला. गहरवारवंशीय महीपालानें कलचुरी घराण्याच्या मदतीनें बनारस शहर हस्तगत केलें. कनोज शहर कलचुरी घराण्याच्या ताब्यांत गेलें. त्यानंतर महीपालाचा पुत्र चंद्रदेव यानें कलचुरीवंशीय कर्णापासून कनोज शहर घेतलें व तेथें नवें राज्य स्थापन केलें. त्यामुळें पुन्हां कनोजची भरभराट झाली (१०९०). या नूतन राज्य स्थापन करणाऱ्या म्हणजे स्वतःच्या घराण्यास त्यानें राठोड हें नांव ठेविलें. त्यानें कनोजप्रमाणें अयोध्या, काशी व दिल्ली प्रांतहि हस्तगत केले.

गहरवार घराण्याचे गहरवार व राठोड असे दोन भाग होण्याचें कारण असें कीं, हें घराणें महीपाल राजापर्यंत बौद्धधर्मीय होतें. परंतु चंद्रदेवानें ब्राह्मणीधर्माचा स्वीकार केला त्यामुळें या घराण्यांत दुफळी पडून चंद्रदेवानें नवें राज्य स्थापिलें. गहरवार घराण्यापासून दुसरीहि एक शाखा उत्पन्न झाली. तिचें नांव बुंदेले हें होय. हें कनोजचें घराणें शिहाब-उद्-दीन यानें ११९४ त नाहींसें केलें. चंद्रदेवाचा नातु गोविंदचंद्र यानें ११०४–११५५ पर्यंत राज्य केलें. त्याच्या आढळणाऱ्या अनेक ताम्रपट व नाण्यांवरून त्यानें पुष्कळ प्रांत जिंकल्यानें व कनोजची भरभराट केल्याचें दिसून येतें. गोविंदचंद्राचा नातू जयचंद्र (यालाच हिंदी काव्यांतून व लोककथांतून राजा जयचंद राठोड म्हणतात) याची मुलगी संयुक्ता ही प्रख्यात अजमेरच्या राय पिठोरा राजानें (पृथ्वीराज) हरण केली. (११७५). या जयचंद्राचें राज्य फार मोठें होतें. चीन देशापासून माळव्यापर्यंत व आरबी समुद्र ते लाहोरपर्यंत तें पसरलेलें होतें असें सांगतात. मुसुलमान याला बनारसचा राजा म्हणतात. त्यावरून त्यावेळीं काशी ही त्याची राजधानी असावी. शिहाबउद्दीननें त्याचेवर (इटावा जिल्ह्यांतील) यमुना कांठच्या चंद्रावर गांवीं स्वारी करून त्याला लढाईत ठार मारून, काशी लुटून चौदाशें उंट भरून लूट नेली. येथें कनोजच्या या गहरवार घराण्याचा शेवट झाला. याच्यानंतर महोबा येथील चंदेलराजांनीं कनोज येथें आठ पिढ्यांपर्यंत राज्य केलें. यावेळीं गहरवार वंशांतील जे लोक राजपुतान्यांत आश्रयार्थ पळून गेले त्यांपैकींच एका पुरुषानें जोधपुर येथें राज्य स्थापन केलें. या सर्व लोकांनां पुढें राठोड हें नांव मिळालें.

[इंडियन अँटिक्वरी. व्हॉ. १४, १८; इंपीरियल ग्याझे. व्हॉ. १४; इलियट डॉसन. व्हॉ. २; स्मिथ—अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया; इंडियन म्युझियम कॉइन्स कॅटलॉग व्हॉ. १; जर्नल एशिआटिक सोसायटी. १८८१, १८८५].

गहाणाचा कायदा भा र त व र्षी य.—प्राचीन संस्कृत ग्रंथांत गहाणाला आधि हें पारिभाषिक नांव आहे. आधि याची व्याख्या नारदस्मृतींत 'अधिक्रियते इत्याधिः' अशी केली आहे. नारदानें आधी दोन प्रकारच्या सांगितल्या आहेत. (१) कृतकालापनेय आणि (२) यावद्देयोद्यत यावद्देयोद्यताचे गोप्य व भोग्य असे दोन प्रकार नारदानें सांगितले आहेत. याज्ञवल्क्य स्मृतींत, कालकृत व फलभोग्य असे आधीचे दोन प्रकार वर्णन केले

आहेत. नारदानें सांगितलेला कालापनेय आधि व याज्ञवल्क्याचा कालकृत् आधि हे एकच आहेत. गहाणदारानें एखादी वस्तु सावकाराजवळ कांहीं ठराविक मुदतींत कर्ज फेडण्याच्या शर्तीवर गहाण ठेवली व ठराविक मुदतींत त्यानें आपलें कर्ज फेडलें तर गहाणदाराला त्याची वस्तु परत मिळते व गहाणांतून गहाणदार मोकळा होतो. अशा प्रकारच्या गहाणास कालकृत् गहाण असें म्हणतात. यावद्देयोद्यत गहाणाचा अर्थ गहाणदार कर्ज फेडीपावेतों गहाण वस्तु सावकाराकडे राहणें व ती त्यानें संरक्षण करणें अगर तिचा उपभोग घेणें होय. जेव्हां गहाण वस्तु नुसती संरक्षण करून ठेवावयाची त्यावेळीं त्या गहाणाच्या प्रकाराला गोप्य यावद्देयोद्यत असें म्हणतात, व गहाण टाकलेल्या वस्तूचा ज्यावेळीं सावकार हा उपभोग घेतो त्यावेळीं त्याला फलभोग्य गहाण असें म्हणतात.

याज्ञवल्क्यस्मृतीप्रमाणें ज्यावेळीं गहाणदाराच्या कर्जाची दामदुप्पट होते तरी देखील गहाणदार आपलें कर्ज फेडीत नाहीं त्यावेळेस गहाण नष्ट होऊन सावकार त्या गहाण वस्तूचा मालक होतो. 'कालकृत्' गहाणांत विशिष्ट मुदतीच्या आंत गहाणदारानें कर्ज न फेडल्यास तें गहाण नष्ट होतें. पण फलभोग्य गहाणांत मात्र गहाण कधींच नष्ट होत नाहीं. फलभोग्य 'गहाणांत' मुद्दलावर व्याज चालू रहात नाहीं. सावकाराजवळ असलेली गहाणवस्तु जर दैववशात किंवा युद्धादि राजव्यापार या कारणांशिवाय अन्य कारणानें म्हणजे स्वतःच्या हलगर्जीपणानें अगर दुरुपयोगामुळे अर्धवट अगर पूर्णपणें नष्ट झाली तर सावकारानें ती वस्तु गहाणदाराला भरून दिली पाहिजे असें याज्ञवल्क्य म्हणतो. गहाणवस्तु सावकारानें स्वीकारीपावेतों गहाण पूर्ण झालें असें म्हणतां येत नाहीं. गहाणवस्तु जर फलभोग्य नसेल म्हणजे त्या वस्तूपासून सावकाराला कांहींच फायदा होत नसेल तर गहाणदारानें दुसरी वस्तु गहाण ठेवली पाहिजे, अगर एक वर्षाच्या व्याजासहित मुद्दल तरी देऊन टाकलें पाहिजे असें याज्ञवल्क्य म्हणतो (या. स्मृ. व्यवहाराध्याय प्रकरण ३, श्लोक ६०) जेव्हां स्वतःच्या जबाबदारीवर म्हणजे स्वतःचें चरित्र गहाण टाकून गहाणदार सावकाराकडून कर्ज घेतो त्यावेळीं गहाणदारानें, मूळ मुद्दल व्याजासह सावकाराला दिलें पाहिजे. गहाणदारानें रकम परत केल्यास गहाणवस्तु सावकारानें गहाणदाराला परत केली पाहिजे, नाहींतर तो स्तेन म्हणजे परकीय वस्तु अपहार करणारा ठरतो व शिक्षेस पात्र होतो असें याज्ञवल्क्य म्हणतो. सावकार हा गहाणदारानें कर्ज फेडण्यापूर्वी मरण पावला असेल तर गहाणदारानें त्याच्या वारसाजवळ आपलें कर्ज देऊन टाकून त्याच्यापासून गहाणवस्तु घ्यावी पण सावकार जर परगांवीं गेला असेल तर गहाणदारानें व्याजासहित आपल्या कर्जाच्या रकमेचें मूल्य ठरवून ती सर्व रकम सावकाराच्या वारसाजवळ द्यावी व सावकार गांवीं आल्यावर गहाणवस्तु अगर वस्तूची किंमत सावकारापासून घ्यावी अशी चाल असे. स्वतः कर्जदारच जर जाग्यावर नसेल अगर त्याचे वंशज जर सांपडत नसतील तर सावकारानें कांहीं लोकांनां साक्षी ठेवून गहाणवस्तु विकून त्यांतून आपली रकम फेडून घेण्याची वहिवाट असे. ज्यावेळीं गहाणदारानें कर्जाच्या दुप्पट रकमेइतका फायदा उपभोगण्याची शर्त पुरी होईतों गहाणवस्तु ठेवण्याचें कबूल केलें असेल त्यावेळीं तितक्या रकमेच्या इतका फलभोग होताच सावकारानें ती वस्तु गहाणदाराला परत केली पाहिजे असें याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे.

याज्ञवल्क्य स्मृतीच्या पूर्वी होऊन गेलेल्या स्मृतींपैकीं पुष्कळ स्मृतींत गहाणासंबंधीं सांगोपांग विचार केलेला आढळत नाहीं. मनु अगर कौटिल्य यांच्या ग्रंथांतहि गहाणासंबंधीं फारसा उल्लेख आढळत नाहीं. खुद्द याज्ञवल्क्य स्मृतींत गहाणासंबंधीं पूर्ण विवेचन आढळत नाहीं. तथापि तत्कालीन परदेशीय कायद्यांपेक्षां याज्ञवल्क्याच्या वेळीं हिंदुस्थानांत गहाणासंबंधीं अधिक विचार झाला होता असें आपणाला म्हणतां येतें.

ब्रि टि श हिं दु स्था नां ती ल ग हा णा चा का य दा.— ब्रिटिश हिंदुस्थानांतील गहाणाच्या कायद्यांत इंग्लंडमधील गहाणाच्या कायद्याचीं तत्वें दृष्टीस पडतात; व असें होणेंहि अपरिहार्य आहे. ब्रिटिशांचें येथें राज्य सुरू झाल्यावर इकडे जे यूरोपियन अगर इंग्रज न्यायाधीश आले त्यांनां इंग्लिश कायद्यांची पूर्ण माहिती असे व त्या कायद्यांतील तत्वांशीं त्यांचा परिचय असल्यामुळें न्याय देतांना ते हिंदुस्थानांतील पूर्वकायद्यांकडे फारसें लक्ष न देतां आंग्लकायद्यांतील तत्वांच्या व कायद्यांच्या आधारें न्यायनिवाडा करीत. त्यामुळें हल्लींचा गहाणाचा कायदा हा हिंदू व इंग्लिश 'गहाणासंबंधींच्या' कायद्याची भेसळ आहे असें आपल्यास म्हणतां येईल.

हल्लींच्या गहाणाच्या कायद्याप्रमाणें गहाणाचे मुख्यतः पांच प्रकार आहेत, ते असे. साधें गहाण (सिंपल मॉर्टगेज); शर्तीचें खरेदीखत (मॉर्टगेज बाय कंडिशनल सेल) मोगवट अगर वहिवाटगहाण, अगर कबजा गहाण (युसुफ्रक्टयुअरी मॉर्टगेज); इंग्लिश पद्धतीचें गहाण (इंग्लिश मॉर्टगेज); व इक्विटेबल मॉर्टगेज.

साधें गहाण अगर सिंपल मॉर्टगेजमध्यें, गहाणदार स्वतःच्या अंगावर आपली जिंदगी सावकाराला गहाण टाकतो. या प्रकारांत जिंदगीचा कबजा सावकाराकडे जात नाहीं. ठराविक मुदतींत जर गहाणदारानें कर्जाची रकम परत केली नाहीं तर कोर्टाच्यामार्फत या जिंदगीची विक्री करून त्यांतून आपली रकम सावकाराला फेडून घेतां येते अगर त्याच्या मनांत असल्यास गहाणदारावरच खुद्द फिर्याद करून त्याला अडकवून ठेवतां येतें. तशी स्थिति शर्तीचें खरेदीखत अगर (मॉर्टगेज बाय कंडिशनल सेल) मध्यें होत नाहीं.

या खरेदीखताच्या प्रकारांत गहाणदार हा सावकाराला गहाणवट वस्तु तात्पुरती विकतो; पण ठराविक मुदतींत कर्ज फेडल्यास गहाणदाराला वस्तु परत मिळते. तसें न झाल्यास मात्र सावकार हा त्या वस्तूचा कायमचा मालक बनतो. कबजागहाणांत सावकाराच्या ताब्यांत गहाणवट वस्तु जाते व कर्ज फिटेपावेतों तो तिचा उपभोग घेतो. कबजा गहाणांत कर्जावर बहुधा व्याज चढत नाहीं. कर्जफेड झाल्यावर सावकाराकडून ती वस्तु गहाणदार परत घेतो. इंग्लिश पद्धतीच्या गहाणाविषयीं व इक्विटेबल मॉर्टगेजविषयीं खालीं विवेचन आलेंच आहे. 'इक्विटेबल मॉर्टगेज' हें कराची, मूलमिन, रंगून, वसई व अक्याब, मुंबई, मद्रास, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं प्रचारांत आहे.

ग हा ण दा रा चे ह क्क—गहाणदाराच्या हक्कांमध्यें प्रमुख हक्क म्हणजे वेळेवर रक्कम फेडून गहाण सोडविणें हा होय. गहाणवट वस्तु ही सावकाराच्या कबजांत असेल तर गहाणदाराला ती कर्जफेडीनंतर परत मागण्याचा हक्क आहे. दोन वस्तू निरनिराळ्या कर्जासाठीं गहाणदारानें गहाण टाकल्यास यापैकीं कोणतीहि एक वस्तु त्या वस्तूवरील कर्ज फेडून टाकून सोडविण्याचा त्याचा हक्क आहे. दोन्ही वस्तु एकसमयावच्छेदें-करूनच सोडविल्या पाहिजेत असा सावकाराला आग्रह धरता येणार नाहीं. गहाणाच्या मुदतींत जर गहाणवट वस्तूची वाढ झाली असेल व ती विभाज्य नसेल तर त्या वाढीचा मोबदला घेऊन वाढीसकट ती वस्तू सावकारानें गहाणदाराला दिली पाहिजे. पण जर वाढ विभाज्य असेल तर ती सावकाराला आपल्याकडे ठेवतां येते अगर त्याची इच्छा असल्यास गहाणदाराला विकतां येते. गहाण वस्तु सोडविण्याच्या बाबतींत अतिशय जाचक अटी घालणें हें बेकायदेशीर आहे. गहाणवट वस्तु ऐन जिनसी सोडविली पाहिजे. खंडशः रकमेची फेड करून त्या त्या प्रमाणात गहाणवट वस्तूवरील बोजा गहाणदाराला कमी करतां येत नाहीं. १०० रुपये किंमतीहून अधिक किंमत असलेलें गहाणखत नोंदविलेंच पाहिजे असा नियम आहे.

ग हा ण दा रा ची जो खी म—गहाणदारानें जी वस्तु गहाण टाकली असते ती त्याच्या मालकीची असली पाहिजे. ती जर तशी नसेल तर सावकाराला आपली रक्कम नुकसान-भरपाईसकट भरून घेण्याचा हक्क पोहोंचतो. गहाण वस्तूची मालकी सिद्ध करण्याकरितां लागणारा सर्व खर्च गहाणदारानें सोसला पाहिजे. गहाण वस्तूवर सरकाराला सारा, कर वगैरे द्यावयाचा उरला असेल तर तोहि गहाणदाराला द्यावा लागतो. गहाण वस्तु तत्पूर्वी दुसऱ्या सावकाराला गहाण टाकली असेल तर त्या वस्तूवरील व्याज वगैरे वेळेवर देणें हें गहाणदाराचें कर्तव्य आहे.

सा व का रा चे ह क्क व क र्त व्यें.—मुदत टळल्यानंतर गहाण वस्तूची विक्री करण्याचा अगर शर्तींत ठरल्याप्रमाणें आपल्याकडे ठेवण्याचा सावकाराला हक्क असतो. कर्जाबद्दल फिर्याद करण्याचा, कोर्टाच्या परवानगीशिवाय कांहीं बाबतींत गहाण वस्तूची विक्री करण्याचाहि सावकाराला हक्क आहे. गहाण वस्तु जपून वापरणें, त्याच्यावरील सरकारी कर देणें, गहाणाचा चोख हिशेब ठेवणें व कर्जफेडीनंतर गहाण वस्तु ज्याची त्याला परत देणें हीं सावकाराचीं कर्तव्यें आहेत.

इं ग्लि श ग हा णा चा का य दा.—गहाण म्हणजे जिंदगीच्या तारणावर अशा रीतीनें कर्ज काढणें कीं ठरलेल्या मुदतींत कर्जदारांनीं कर्ज न फेडलें तर गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करण्याचा किंवा जिंदगी विकून आपलें कर्ज फेडून घेण्याचा हक्क सावकारास प्राप्त होतो. इंग्रजी कायद्यांत गहाणाचें कार्य शर्तीच्या खरेदीनें करण्याची योजना आहे. म्हणजे मूळचा व्यवहार खरेदीचा धरून ठरलेल्या मुदतींत कर्ज परत केलें तरच गहाणासारख्या खरेदींतून जिनगी मुक्त करून घेण्याचा हक्क ठरलेला असतो. परंतु गहाण ठेवण्याचा व खरेदी देण्याचा यापैकीं मूळचा हेतु कोणता याविषयीं लबाडी करण्यास जागा राहूं नये म्हणून कायद्यानें या बाबतींत पुष्कळसे निर्बंध घातले आहेत.

या विषयावरील रोमन लोकांच्या कायद्यांत तीन अवस्था स्पष्टपणें दिसून येतात. पहिल्या अवस्थेंत, कर्ज फेडल्यावर जिनगी फिरून मूळ मालकाच्या नांवावर चढवून देईन या अटीवर खरेदीचा व्यवहार होत होता. दुसऱ्या अवस्थेंत, जिंदगी सावकाराकडे जात नसे. फक्त ताबा मात्र त्याजकडे जाऊन वेळवर कर्ज न फिटलें तर जिंदगी विकण्याचा वगैरे हक्क सावकारास प्राप्त होत असत. तिसऱ्या अवस्थेंत जिंदगीचा ताबाहि सावकाराकडे न जातां मुदतींत कर्ज न फिटलें तर जिंदगी कोणाच्याही ताब्यांत असली तरी तिला विकावयास काढण्याचा सावकारास हक्क प्राप्त होत असे.

गहाणाचा इंग्रजी कायदा हा दोन परस्पर भिन्न कायद्यांतून निघाला आहे. त्याचें मूळ व स्वरूप हें सामान्य कायद्यांतून घेतलें आहे. गहाण टाकलेली जिंदगी ही कर्जाबद्दल तारण होय अशाविषयीं घातलेले निर्बंध न्यायबुद्धीच्या (इक्विटी) कायद्यांतून घेतलेले आहेत. सामान्य कायद्या(कॉमनलॉ)च्या दृष्टीनें गहाण टाकलेल्या जिंदगीचा सावकार हा मालक असतो. न्यायबुद्धीच्या कायद्यानें गहाणदार हा मालक राहून सावकाराचा फक्त जिंदगीवर बोजा असतो. गहाणखताच्या शर्तीप्रमाणें रद्द झालेला गहाण सोडविण्याचा हक्क यास "न्यायबुद्धीच्या कोर्टानें दिलेली गहाण सोडविण्याची सवलत" असें म्हणतात. आपआपसांत केलेला कसलाहि करार या गहाण सोडविण्याच्या कोर्टाच्या सवलतीच्या आड किंवा गहाणदाराच्या अशी सवलत मागणें यांच्या आड येऊं शकत नाहीं. ही न्यायबुद्धीच्या

कोर्टानें दिलेली सवलत जरी पहिल्यानें गहाणदारास मिळत असे तरी ती पुढें गहाणदाराच्या वारसांसहि मिळूं लागली. गहाणखतांत कसलीहि भाषा वापरली असली तरी गहाणदार हाच मूळ जमिनीचा मालक रहातो व सावकार यास त्यानें दिलेल्या कर्जामुळें कांहीं हक्क प्राप्त होतात. व्यवहार खरेदीचा होता कीं गहाणाचा होता असा प्रश्न उपस्थित झाला तर कोर्टानें व्यवहाराच्या एकंदर सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन जर त्यास जिंदगी ही कर्जाबद्दल तारण म्हणून लावून दिलेली होती असें आढळून आलें तर तो व्यवहार गहाणाचा होता असा निकाल द्यावा. याप्रमाणें जर(१) मिळकतीची किंमत व दिलेली रक्कम यांत कांहींच मेळ नसेल (२) पैसे देणारास एकदम ताबा देण्यांत आला नसेल (३) कर्जावरील व्याजायेवढी रक्कम बाद करून जर जिंदगीच्या उत्पन्नाचा हिशेब देण्यांत येत असेल (४) खतपत्राचा खर्च जर जिनगी देणारानें सोसला असेल तर तो व्यवहार खरेदीचा दिसत असला तरी गहाणाचा असला पाहिजे असें धरण्यास जागा आहे. आणि " एक वेळ गहाण तें कायमचेंच गहाण " या तत्त्वास बाध येत नाहीं. पुढील करारांनीं त्यास कोणताहि बाध येऊं शकत नाहीं. ठरलेल्या मुदतींत कर्ज न फिटलें तर, अमुक एका मुदतींत व्याज व खर्चेंवेच यांसह कर्ज परत न केलें तर गहाण सोडविण्याची सवलत रद्द होईल अशा तऱ्हेची मागणी सावकारानें करावी. याउपर दिलेल्या मुदतींत कर्ज न फिटलें तर त्यायोगें सावकार जिंदगीचा मालक होईल; परंतु गहाण सोडविण्याची सवलत रद्द करण्याच्या फिर्यादींत कोर्टानें कोणत्याहि एका पक्षाच्या विनंतीला अनुसरून जिंदगीचा लिलाव करण्याविषयीं हुकूम करावा. अशा रीतीनें जिंदगीची विक्री झाल्यावर जी किंमत वसूल होईल तिच्यांतून मुद्दल, व्याज व खर्च सावकाराच्या पदरांत टाकून उरलेली रक्कम अर्थात गहाणदाराची असते. खतांत नमूद केलेल्या वेळेच्या आंत सावकारास कर्ज परत घेण्यास भाग पाडतां येत नाहीं. व ठरलेल्या वेळीं जर कर्ज परत केलें नाहीं तर कर्ज परत करण्याचा आपला विचार असल्याबद्दल सावकारास सहा महिन्यांची अगाऊ नोटिस द्यावी लागते. त्यायोगानें सावकारास आपली रक्कम कोठें व्याजी लावावी याची योजना ठरवून ठेवितां येते.

जेव्हां एकच जमीन निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या सावकारांकडे गहाण टाकलेली असेल त्यावेळीं त्यांचे हक्क त्यांच्या व्यवहारांच्या कालक्रमाप्रमाणें अस्तित्वांत येतात. परंतु गहाणाच्या कायद्यांत जीं न्यायबुद्धीच्या कायद्याचीं तत्त्वें प्रविष्ट होतात त्यायोगानें वरील नियमांत महत्वाचा बदल झाला आहे. जेव्हां एकामागून एक अशा अनेक सावकारांचे बोजे एखाद्या जिंदगीवर चढतात तेव्हां आद्य सावकाराचा बोजा तेवढा कायदेशीर असतो. त्याचप्रमाणें जेव्हां दोन सावकारांचे हक्क इतर बाबतींत अगदीं तंतोतंत असतील तेव्हांहि न्यायबुद्धीच्या कायद्याच्या तत्वाला अनुसरून कालगणनेनें पहिल्या सावकाराचा हक्कच तेवढा शाबीत धरला जातो. जसें:—कर्ज देतांना नं. २ च्या गहाणदाराच्या गहाणाच्या अस्तित्वाबद्दल जर नं. ३ च्या गहाणदारास नोटीस नसेल तर दोघांचे हक्क सारखेच समजण्यांत येतात व दुसरी एखादी गोष्ट आड येत नसेल तर कालगणनेनें ज्याचा व्यवहार आधींचा त्याच्या तर्फे निकाल देण्यांत येतो. परंतु जर नं. ३ च्या गहाणदारानें नं. १ च्या गहाणदाराचा हक्क बेचन करून घेतला असेल तर त्याला आपल्या व्यवहाराचा संबंध पहिल्याशीं चिकटवून नं. २ च्या गहाणदारावर नंबर पटकावितां येतो आणि जर नंबर एकचा गहाणदार नं. २ च्या गहाणदाराच्या गहाणाची माहिती नसतां अगोदर दिलेल्या कर्जापेक्षां अधिक कर्ज देईल तर नं. २ च्या गहाणदाराच्या आधीं त्याच्या सर्व बोजाचा हक्क धरण्यांत येतो.

अशाच तऱ्हेचा परिणाम जेव्हां निरनिराळीं तारणें एकत्रित करतात तेव्हांहि दिसून येतो. उदाहरणार्थ एकाच गहाणदारानें एकाच सावकाराकडे निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या कर्जांकरितां दोन स्वतंत्र जिंदग्या गहाण टाकल्या तर त्या दोन्ही जिंदग्यांच्या गट केला जातो. (कन्सॉलिडेटेड) म्हणजे एकंदर कर्जाबद्दल दोन्ही जिंदग्या मिळून तारण होतात व दोन्हीं कर्जें फेडीपर्यंत गहाणदारास कोणतीच जिंदगी सोडवितां येत नाहीं. जर गहाणदारानें एखाद्या जिंदगीवर तिच्या किंमतीपेक्षां अधिक कर्ज काढलें असेल तर अपुरें तारण असलेल्या सावकारानें नं. १ च्या गहाणाचें बेचन घेऊन तें आपल्या व्यवहाराशीं सांधून टाकावें आणि अशा रीतीनें नं. २ च्या गहाणदारावर मात करावी.

मालकीहक्काच्या कागदपत्रांच्या ठेवीवर कर्ज काढलें तर त्यास ' न्यायबुद्धीस मान्य असलेलें गहाण ' (एक्विटेबल मॉर्टगज) असें म्हणतात. कायद्याप्रमाणें तर गहाणाच्या व्यवहाराबद्दल लेखी खत केलेंच पाहिजे असा निर्बंध आहे, तर मग केवळ कागदपत्रांच्या ठेवीवर हें गहाण कसें मान्य झालें ? सामान्य कायद्याच्या कोर्टांत अशा तऱ्हेनें तारण म्हणून ठेवलेले मालकीहक्कदर्शक कागदपत्र परत मिळविण्यास मार्ग नसे; त्याकरितां न्यायबुद्धीच्या कोर्टांत मात्र मार्ग मोकळा होता व तेथें फिर्याद केली असतां कर्ज परत केलें तर कागदपत्र परत मिळतील असा निकाल देण्यांत येई. अशा तऱ्हेनें कागदपत्र ठेवीस ठेवून कर्ज काढलें आहे असें माहीत असून जर एखाद्या सावकारानें एखादी जिंदगी खत करून गहाण ठेवली तर अशा कायदेशीर सावकारापेक्षां कागदपत्रांच्या ठेवीवर कर्ज देणाऱ्या सावकाराचा हक्क अधिक धरला जातो. कायदेशीर गहाणदारानें जरी कागदपत्रांचा तपास केला नसला तरी जर तपासाअंतीं त्यास ते कागदपत्र कोठें ठेव

म्हणून ठेवले आहेत हें माहीत होण्यासारखें होतें म्हणून तसलें ज्ञान कोर्टे त्याच्या माथीं मारतें.

गहूं—वैदिक कालीं गव्हाचा उल्लेख आलेला आढळतो. (ज्ञानकोश वि. ३ पृ. २९४ पहा.) यास संस्कृतांत गोधूम असें नांव आहे.

इतिहासः—गव्हाची लागवड फार प्राचीन कालापासून म्हणजे जगांतील सर्वांत जुन्या भाषा तयार होण्याच्या पूर्वीपासूनच होत असून त्या सर्व भाषांत गव्हाला निरनिराळीं व स्वतंत्र नांवें अढळतात; उ. चिनी भाषेंत "मै" व हिब्रूंत 'चिट्टा' अशीं गव्हाला नांवें आहेत. चिनी लोक इ.स. पूर्वी २७०० वर्षे गव्हाची लागवड करीत होते. हिंदुस्थानांतील आर्य लोकांनां वेदकालापासून गव्हाची माहिती होती. कारण गोधूमाचा उल्लेख यजुर्वेद संहिता ब्राम्हण वगैरे ग्रथांत आढळतो.

ईजिप्तमधील दाशूर मनोऱ्याच्या एका विटेंत डंगर नांवाच्या गृहस्थाला गव्हाचे दाणे आढळले होते; व डंगरच्या मते त्या मनोऱ्याचा काल इ. स.पू. ३३५९ वर्षे असावा. त्याच्याहि अलीकडचा गहूं स्वित्झर्लंड व इटालींतील कांहीं ठिकाणीं सापडला होता. बायबलांत गव्हाचा निर्देश आहे.

बेरोसस नांवाच्या खाल्डियन धर्मोपाध्यायाच्या लिहिण्यावरून मेसापोटेमियांत वन्य अथवा आपोआप होणारा गहूं होता असें दिसतें. व सिंधूच्या खोऱ्यांतहि तसल्या प्रकारचा गहूं आढळत असे असा समज आहे; परंतु वन्य गहूं आढळल्याचें कोणताहि अर्वाचीन वनस्पतिशास्त्रज्ञ नमूद करून ठेवीत नाहीं हीं गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. यावरून ज्याला वन्य गहूं म्हणतात, तो व अर्वाचीन गहूं हे एकच नव्हेत एवढें तरी म्हणण्यास हरकत नाहीं.

आशिया, यूरोप, आफ्रिका व अमेरिका या चारहि खंडांत याची लागवड होते. मिसर देशांत नाइल नदीच्या भोंवतालच्या प्रदेशांत उत्तम प्रतीचा गहूं पैदा होतो. तो नाइल नदीला पूर येऊन जो गाळ जमतो त्यांत उत्पन्न होतो. त्या देशांत गव्हाची एक जात आहे तिचें पीक इतकें येतें कीं, एका दाण्यापासून पायली दीड पायली गहूं उत्पन्न होतात. सर्व एकदल धान्यांत गव्हांत पौष्टिकपणा जास्त असतो. म्हणून त्यास धान्यराज असें नांव मिळालें आहे.

गव्हाचे प्रकार व जाती.—खरीप व रब्बी हे गव्हाचे दोन स्वतंत्र प्रकार आहेत असें मानतां येत नाहीं. कारण हवामान व देशमान बदलल्यास अथवा एकाच ठिकाणींहि पेरणी करण्याच्या हंगामाप्रमाणें एका प्रकारचा गहूं दुसऱ्या वेळीं काढतां येतो. उदा० खरीप गहूं दरवर्षी थोडा थोडा उशीर करून अथवा रब्बी गहूं थोडा अगोदर पेरीत गेल्यास, खरीपाचें पीक रब्बीच्या वेळीं, व रब्बीचें खरिपाच्या वेळीं घेतां येतें.

हिंदुस्थानांतून लंडनला पाठविलेल्या गव्हाच्या असंख्य नमुन्यांचें परीक्षण करून डॉ. फोर्बस वॅटसन यानें गव्हाचें पुढीलप्रमाणें वर्गीकरण केलें:—(१) पांढरा मऊ. (२) पांढरा कठिण. (३) तांबडा, मऊ (४) तांबडा कठिण. नरम अथवा मऊ गव्हाला सामान्यतः पिशी गहूं म्हणतात. हे चारी प्रकारचे गहूं थोड्याबहुत प्रमाणांत एकाच ठिकाणींहि आढळतात; परंतु उत्तर हिंदुस्थानांत मुख्यतः पिशी गहूं व दक्षिण हिंदुस्थान आणि बंगालमध्यें कठिण गहूं होतो. उत्तम पिशी गव्हाची लागवड मुख्यतः गंगा, सिंधू व नर्मदा या नद्यांच्या वरच्या खोऱ्यांत होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. नर्मदेच्या दक्षिणेकडे पिशी गहूं बहुतेक मुळींच आढळत नाहीं. संयुक्त प्रांतांत व बहार आणि तिरहुतच्या कांहीं भागांत पांढरा पिशी व पंजाबांत तांबडा पिशी गहूं पिकतो. दख्खन, वऱ्हाड व बंगालचा कांहीं भाग यांत कठीण गहूं होतो; मुंबई इलाख्याचा बराच भाग व दक्षिणेस म्हैसूर आणि मद्रासपर्यंतचा प्रदेश यांत होणारा गहूं अतिशय कठीण असतो. त्याला खपली गहूं म्हणतात.

गव्हाचें झाड सुमारें २॥ ते ४ फूट उंच वाढतें. गव्हाच्या एका बुडख्यापासून त्याला अनेक फरगडे फुटतात. व प्रत्येक फरगड्याच्या शेवटीं सुमारें बोटदीड बोट लोंबी येते. लोंबींतील दाणे पातळ फोलांत असतात व ते खपले गव्हाखेरीजकरून इतर सर्व जातींत मळणीच्या वेळीं सुटतात.

संयुक्तप्रांतांत दौडी गहूं सर्वांत उत्तम समजला जातो. त्या प्रांतांत पांढऱ्या, मऊ व बिनकुसळाच्या गव्हाला मुंडिया म्हणतात. मध्यप्रांतांतील मुख्य गव्हाचे प्रकार म्हणजे पिसी, जलालिया, (हावरा) दौडिया, काठिया व बनसी हे होत. पैकीं पहिल्या तीन प्रकारचे पांढरे व मऊ असून दुसऱ्या दोन प्रकारचे तांबडे व कठीण असतात. या सर्व प्रकारच्या गव्हांना कुसळें असतात. बिनकुसळाच्या गव्हाला पक्ष्यांपासून फार त्रास पोंचतो. म्हणून शेतकरी लोक त्याची लागवड करीत नाहींत.

कठिण अथवा मऊपणा व रंग या प्रमाणें वर्गीकरण करण्यापेक्षां कुसळाचे व बिनकुसळाचे असें वर्गीकरण करणें अधिक बरें असें जी. ए. ग्यामी यांचें मत दिसतें. त्यानें गव्हाचे सहा प्रकार केले आहेत. पैकीं पहिले दोन बिन कुसळाचे असून पांढऱ्या रंगाचे, कठीण अथवा मऊ असतात. तिसऱ्या प्रकारचे म्हणजे काळी कुसळ अथवा बक्षी हे कुसळाचे असून त्याचे दाणे कठिण, पांढरे, पिंवळे किंवा तांबडे असतात. चौथा पोपटिया गहूं मुख्यतः मुंबई व मध्यप्रांतांत होतो. तो कठीण असून पिंवळ्या किंवा तांबड्या रंगाचा असतो. दाऊदखानी गव्हाचीं कुसळें आंखूड असून दाणा नरम, पांढरा अथवा कठिण असून पांढरा किंवा तांबडा असतो. ग्यामीच्या सहाव्या प्रकारांत निरनिराळ्या प्रकारचे खपली गहूं मोडतात.

गुणधर्म व उपयोगः—भिन्न भिन्न प्रांतांत गव्हाचे निरनिराळे जिन्नस खाण्यांत येतात. गव्हाचें पीठ तीन

प्रकारचें असतें. ओलवलेले गहूं दळून चाळल्यावर चाळणीवर जें कणदार पीठ रहातें त्यांतील भुसा अथवा कोंडा काढून टाकला म्हणजे शुभ्र रवा रहातो; चाळणींतून खालीं पडलेल्या बारीक पिठाला मैदा अथवा सपीठ म्हणतात. गहूं नुसते दळल्यास त्या पिठाला कणीक असें नांव देतात. गहूं ओलवल्याशिवाय दळल्यास रवा तांबूस वर्णाचा होतो. निरनिराळ्या प्रकारचीं पक्वान्नें उदाहरणार्थ करंज्या, पुऱ्या, फेण्या, मांडे, शिवर, चिरोटे वगैरे करण्याकरितां साध्या कणकेऐवजीं रवा वापरतात. जिलब्या, पुरणाच्या पोळ्या वगैरेंकरितां सपीठ घेतात; व सर्वसाधारणपणें नेहमीं खाण्याच्या पोळ्या अथवा चपात्या कणकेच्या करतात. पंजाबांत कणकेचे रोट करून खातात. हिंदुस्थानांतील ज्या भागांत गहूं खाण्याचा प्रघात आहे तेथें पोळ्या अथवा चपात्या हाच जेवणांतील मुख्य जिन्नस असतो. गव्हाचे पदार्थ नुसतेच म्हणजे तुपाशिवाय खाल्ले असतां पचण्यास जड जातात याकरितां त्यांनां बहुतकरून तूप माखून खातात. कांहीं ठिकाणीं नुसत्या गव्हाची कणीक न करतां दळण्यापूर्वी गव्हांत जव अथवा हरभरा मिसळतात;व यावरूनच गव्हाबरोबर दुसरें मिश्र पीक काढण्याची चाल पडली असावी. मोठमोठ्या शहरांत अलीकडे गव्हाचे पाव व बिस्किटेंहि बरींच होऊं लागलीं आहेत. तांदुळाप्रमाणें गव्हाची निकी चुन्यांत मिसळून विशिष्ट प्रकारचें सिमिट तयार करतात. गहूं दळण्याकरितां अलीकडे पिठाच्या चक्क्या अथवा गिरण्या निघाल्या असून त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

ग व्हां ती ल भे स ळ.—देशी पद्धतीनें व देशी आउतांनीं तयार केलेला गहूं युरोप, अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशांत होणाऱ्या गव्हाप्रमाणें निर्भेळ नसतो. त्यांत शेंकडा २ पर्यंत माती व इतर भेसळीचे पदार्थ असतात. त्याचप्रमाणें गव्हांत हरभरा, तुर, जव, वगैरे धान्येंहि आढळतात. हे सर्व भेसळीचे पदार्थ रहाणार नाहींत अशा रीतीनें गहूं गोळा करून मळण्याची पद्धति निघाली पाहिजे; किंवा हल्लींच्या पद्धतींत बरीच सुधारणा झाली पाहिजे. तरच हिंदी गव्हास चांगला भाव येईल व त्याविषयीं झालेला वाईट ग्रह नाहींसा होईल.

ला ग व ड.--हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतील भिन्न हवामान व परिस्थितीला अनुरूप असे गव्हाचे निरनिराळे प्रकार झाले आहेत. याचें प्रत्यंतर म्हणजे आपण हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत प्रवास केल्यास एकाच ऋतूंत निरनिराळ्या ठिकाणीं गव्हाची लागवड निरनिराळ्या स्थितींत आढळेल. उदाहरणार्थ जूनमध्यें पंजाबांतून निघून दक्षिणेस यावयास निघाल्यास, उत्तरेकडे शेतकरी लोक सप्टेंबरांत पेरणी करण्याकरितां जमिनीची पूर्व मशागत करण्यांत गुंतलेले आढळतील; मध्यभागीं कोंकणांतील तयार झालेल्या खपली गव्हाची राखण चालली आहे असें दिसेल. व दक्षिणेस म्हैसूर व मद्रास इलाख्याच्या कांहीं भागांत ज्यांनीं कापणी सप्टेंबरांत करावयाची त्या गव्हाची पेरणी चालली असेल (वॉट, अग्रिक. १८९५ नं. ३, ३८). सामान्यतः दक्षिणेकडून उत्तरेकडे म्हणजे आर्द्र वातावरण व मळईच्या जमिनी सोडून वर जावें तसतशी गव्हाची लागवड जास्त झालेली दिसते. हिंदुस्थानांतील बहुतेक गव्हाची पेरणी शरदृतूंत होऊन वसंतऋतूंत कापणी होते. म्हणजे बहुतेक पीक रब्बीचें असतें.

उ त्प न्न.—सामान्यतः बीं आक्टोबरांत पेरल्यानंतर ३॥ किंवा ४ महिन्यांत पीक कापणीस येतें. पीक चांगलें असल्यास दर एकरीं १० मण (वजनी) उत्पन्न होतें; परंतु पाटाचें पाणी देण्याची सोय असलेल्या जमिनींत मुबलक खत घातल्यास दर एकरीं १५ ते २० मण उत्पन्न होण्यास बहुधा हरकत नाहीं.

गव्हाबरोबर फेरपाळीनें जवस, हरभरा किंवा दुसऱ्या एखाद्या कडधान्याचें पीक घेतात. खाद्य धान्याबरोबर फेरपाळीनें कडधान्याचें पीक काढण्याचें महत्व इकडील लोकांस पूर्णपणें माहीत असून त्याचा ते फायदाहि घेतात.

ग व्हा चे रो ग.—गेरू, गेरवर, जेरू अथवा तांब हा गव्हाचा मुख्य रोग आहे. पाटस्थळाखालच्या जमिनींतील गव्हावर पिकाच्या प्रथमावस्थेंत पाऊस बेसुमार झाल्यास अथवा आकाश आभ्राच्छादित असल्यास किडा पडत असतो (अग्रि. लेजर १८९५, नं. २० मध्यें दोन प्रकारच्या तांबेचें सचित्र वर्णन दिलें आहे). काळी, पिवळी व नारिंगी अशा तीन रंगाची तांब असते असें बटलर व हेमन यांनीं एका लेखांत लिहिलें आहे.

गव्हाचा दुसरा रोग म्हणजे काजळी अथवा काणी (स्मट) हा होय. हा रोग पिकास झाल्यास ओंब्यांत दाणा धरत नाहीं; त्यांत नुसती काळी भुकणी आढळते व ओंबीला कुसळ रहात नाहीं. हा रोग संसर्गजन्य असल्यामुळें कापणीच्या वेळीं रोगट ओंब्या प्रथम काढून टाकाव्या व नंतर बाकीचें पीक गोळा करावें. नाहींतर पुढील सालीं तें बीं (काजळी लागलेलें) पेरल्यास पुनः रोग उत्पन्न होतो.

ग व्हा चा चीं क किं वा स त्व.–गव्हाची कणीक पाण्यांत पुष्कळ वेळ धुतली असतां पाण्यांत न विरघळणारा जो पदार्थ शिल्लक रहातो त्याला सत्व किंवा चीक म्हणतात. हा टणक व चिकट असतो.ओढला असतां तुटत नाहीं.याला चव मुळींच नसते असें म्हटलें तरी चालेल. याचा रंग पिंवळसर असून त्यावर थोडी करड्या रंगाची झांक मारते. वाळल्यावर याचें दोनतृतीयांश वजन कमी होतें व तो थोडा ठिसूळ व पारदर्शक होतो. तापविल्यावर फट्फट् असा आवाज करतो. त्याची फुगून लाही होते व नंतर तो जळूं लागतो. याचें पृथक्करण केल्यावर यांत शेंकडा ५३ भाग कर्ब (कोळसा), ७ भाग उज्जवायु, १५ ते १८ भाग नत्रवायु, थोडासा प्राणवायु, आणि सरासरी १ भाग गंधक हीं द्रव्यें सांपडतात. बाजरी, राय आणि यांच्या पिठांत हें सत्व नसतें म्हणून त्यांच्या

पिठांत गव्हाच्या पिठासारखी चिकणाई नसते. या सत्वाचा उपयोग मधुमेहाच्या रोग्यासाठीं भाकरी, बिस्कुटें वगैरे करण्याकडे करतात; याचा चाकोलेटहि करतात व चहा, काफींत याची भेसळ करतात.

गहोइ—बुंदेलखंड व मोरादाबाद येथें मुख्यत्वें आढळून येणारी ही एक बनियांची पोटजात आहे. पेंढारी टोळयांच्या उपद्रवामुळें आपण बुंदेलखंडाहून देशांतर करून येथें राहण्यास आलों असें मिर्झापूरचे गहोई स्वतःसंबंधी माहिती देतात. गहोई लोक विपत्तींत असतांना त्यांच्या कुटुंबांचें एका बियापानरी ब्राह्मणानें रक्षण केलें व या जातीची द्वादशगोत्रांत विभागणी केली. हाच ब्राह्मण गहोई लोकांचा उपाध्याय असून त्याचें चित्र लग्नकार्यांत भिंतीवर काढून त्याची पूजा करण्यांत येते. मिर्झापूर येथील गहोई जातीचीं वासिल, गोइल, गांगल, बांदल, जैताल, कौन्थिल, काछिल, बाछल काश्यप, भारल व पतिया अशीं गोत्रें आहेत. पतिया गोत्राचे लोक भाटांचा धंदा करतात. गहोई जातीत सगोत्रविवाह होत नसून विधवाविवाहास मनाई असते. हे लोक वैष्णव धर्मानुयायी आहेत. श्रीकृष्ण अथवा बिहारीलाल हाच त्यांचा उपास्य देव होय. आगरवाल व परवाल लोकांप्रमाणेंच गहोईचा बनियांमध्यें मोठा दर्जा आहे. ते मद्यमांसाशन करीत नाहींत. बुंदेलखंडचे भार्गव ब्राह्मण हेच त्यांचे उपाध्याय होत. व्यापारधंदा व अडतीचा धंदा करणें इत्यादि त्यांचे उद्योग असतात.

गळिताचीं धान्यें-हिंदुस्थानांत गळिताचीं धान्यें अजमासें अकरा आहेत. त्यापैकीं जवस, सरसव, मोहरी, तीळ, भुइमुग, करडई, एरंड, हीं मुख्य होत. यांशिवाय मोहा, करंज, निंब, बिब्बा, काजू, वगैरे झाडांच्या बीजापासून तेल काढतात. खोबरें व सरकीचें तेल हीं स्वच्छ करून त्यांचा अमेरिकेंत लोण्याप्रमाणें उपयोग करतात. हिंदुस्थानांत दरवर्षी वीस कोटी पंचाहत्तर लक्ष किंमतीचीं गळिताचीं धान्यें व तेलें काढितात. यांपैकीं अजमासें एकतृतीयांश माल परदेशी रवाना होतो व बाकीचा माल या देशांत खपतो. लढाई सुरू होण्यापूर्वीच्या माहे मार्च सन १९१४ अखेर पांच वर्षांची सरासरी पहातां दरवर्षी परदेशीं रवाना झालेल्या मालाची किंमत २४३६ लक्ष रुपये होती. अलीकडे परदेशी भुइमुगाच्या जातींचा बराच फैलाव झाला आहे. याचें मुख्य कारण जास्त उत्पन्न व या जातींना रोगांची फारशी बाधा होत नाहीं हें होय. सन १९००–०१ व १९०४–५ च्या दरम्यान भुइमुगाखालीं सरासरीनें ४,३१,००० एकर क्षेत्र होतें. तें सन १९१४–१५ सालीं २४१३००० एकरांपर्यंत गेलेलें आहे. हें पीक मद्रास, मुंबई इलाखा, ब्रह्मदेश या ठिकाणीं फार महत्वाचें आहे व इतर प्रांतांत यांचा पेरा जुजबी आहे. संयुक्तप्रांत, मध्यप्रांत व म्हैसूरचें राज्य येथें भुइमुगाचा थोडथोडा प्रसार होऊं लागला आहे. अलीकडे मलबार व त्रावणकोर येथील खोबऱ्याचा व्यापार वाढत्या प्रमाणावर होऊं लागला आहे. सन १९१४—१५ सालीं नारळ, खोबरेल, तेल, दोरखंडें, वगैरे मिळून सुमारें दोन कोटी पंचवीस लक्ष रुपयांचा माल दक्षिण हिंदुस्थानांतून परदेशीं रवाना झाला. सन १९१४—१५ सालीं सर्व हिंदुस्थानांत गळिताच्या धान्याखालीं खालीं नमूद केल्याप्रमाणें क्षेत्र होतें.

धान्याचें नांव.	क्षेत्र एकर.	धान्याचें नांव.	क्षेत्र एकर.
जवस	२५२६,०००	सरसव व मोहरी	४१४४०००
तीळ	४४७८,०००	इतर धान्यें	४१८५०००

वरील सर्व क्षेत्राची बेरीज १५३३३००० एकर आहे. या क्षेत्रापैकीं शेंकडा २२ क्षेत्र मद्रास इलाख्यांत असून शेंकडा १७ मध्यप्रांतांत व वऱ्हाडांत; शेंकडा १२ बहार, ओरिसा व बंगाल, शेंकडा १० ब्रह्मदेश; शेंकडा ९ पंजाब व शेंकडा ६ संयुक्तप्रांत व बाकी शेंकडा६ भाग क्षेत्र इतर ठिकाणीं होतें;

मुंबई इलाखा.		मध्यप्रांत.	
धान्याचें नांव.	एकर	धान्याचें नांव.	एकर
जवस	११८२९०	जवस	११७०२५६
तीळ	२६२३७९	तीळ	८४३९९२
सरसव-मोहरी	८१०७	सरसव-मोहरी	४३७८३
भुइमुग	२२२०४६	भुइमुग	३६८६
इतर	३२०५२२	इतर	४१४१५८

वऱ्हाड.

जवस	५१,५३३	भुइमुग	२,६५३
तीळ	८१,७४२		
सरसव-मोहरी	१,४२२	इतर	६६,८६८

गळिताच्या धान्यांच्या पेऱ्यापैकीं कांहीं खरीप, कांहीं रब्बी व कांहींचा पेरा दोन्ही हंगामांत करतात. तीळ व एरंडी हीं पिकें दोन्ही हंगामांत पेरितात. भुइमुग, काराळा, व सूर्यफूल हीं खरीपांत पेरीत असून जवस, सरसव, मोहरी, जंबो, करडई, खसखस हीं रब्बीच्या हंगामांत पेरतात. अंबाडी बहुतकरून खरिप पिकाशीं मिसळून पेरतात. देशावर गळितांच्या धान्याचा पेरा जास्त होत असून कोंकणांत तो अगदीं कमी प्रमाणांत होतो. सर्व पिकांत भुईमुगाचें बीं दर एकरीं जास्त लागत असून त्याला जास्त खर्च येतो. लहान दाण्याच्या लवकर तयार होणाऱ्या जातीचें बीं दर एकरीं जास्त लागतें. कारण या जातींत रोपें पसरत नसून, मुळयाच्या झाडांसारखीं उभीच वाढतात. तीळ, सरसव-मोहरी, खसखस, जंबो यांचें बीं अगदीं कमी लागतें. उत्पन्नावरून पाहिल्यास दर एकरीं भुईमुगाच्या उत्पन्नाइतकें उत्पन्न कोणत्याच गळिताच्या धान्याचें येत नाहीं.

गळिताच्या धान्यांतील तेलाचें शेंकडा प्रमाण खालीं दिलें आहे.

पिकांचें नांव	शेंकडा प्रमाण	पिकाचें नांव	शेंकडा प्रमाण
जवस	३८–४०	करडी	२५–२९
सरसव–मोहरी	३२–४०	जंबो	२५–२८
तीळ	४६–४८	खसखस	३०–३३
भुइमूग	४२–४९	सरकी	१५–२१
कारळा	४१–४३	खोबरें	५२–५७
एरंडी	२६–३६		

तेल डोक्याला व अंगाला लावितात. मद्रास इलाख्यांत अंगाला तेल लावण्याचा विशेष प्रघात आहे. तिकडील लोक दर आठवड्यास अभ्यंगस्नान (ऑइल बाथ) घेतात. याशिवाय स्वयंपाकांत, दिव्यांतून जाळण्यास यंत्रें गाडया ओंगण करण्यास व रंगाच्या कामीं उपयोगाचें असून कांहीं ठिकाणीं तें भाकरीवर घेऊन खातात. साबण व मेणवत्त्या करण्यांत तेलाचा फार उपयोग होतो. जवस, तीळ, भुइमूग, कारळा, करडी, सरकी, खोबरें, अंबाडी वगैरेंची गोडी पेंड गुरांस चारतात व एरंडी, करंज, जंबो, उंडी वगैरेंची कडू पेंड खतास वापरतात. गोड्या पेंडीनाहि खतासाठीं चांगला उपयोग होतो. हल्लीं भुईमुगाच्या पेंडींत गव्हाचें पीठ मिसळून त्याचीं बिस्किटें तयार करण्याचे प्रयोग चालू आहेत. गोडया गळिताच्या धान्यांची चटणी करतात.

गळूं (विद्रधि)—शरीराच्या कोणत्याहि लहान मोठया भागांत पूयसंचय होणें म्हणजे गळूं होणें व तें होण्याचें कारण विकृतशरीरविज्ञानशास्त्राच्या मतानें त्यांत होणारा पूयोत्पादक जंतूंचा प्रवेश हें होय. हे जंतू सर्व तऱ्हेच्या गळवांतून सांपडतातच. शरीरास कांहीं इजा होऊन त्वचेंतील सूक्ष्म छिद्रांतून त्यांचा प्रवेश आत होत असावा अगर रक्तप्रवाहमार्गें ते गळवांत येत असावे. गळूं होण्याच्या अगोदर कांहीं लक्षांत येण्याजोगी इजा त्या भागास होऊन त्याची रोगप्रतिकारकशक्ति अंमळ हीन झालेली असते. अगर शरीरांतच एखाद्या जबर व्याधीचें बिऱ्हाड असल्यामुळें रोगजंतू पचविण्याच्या शरीराच्या स्वाभाविक शक्तीचा ऱ्हास झालेला असतो. आणि असें झालें म्हणजे त्या ठिकाणीं विशेष रक्तसंचय होऊं लागून रक्तवाहिन्यांतून त्या भागांत लशीचें उत्सर्जन व संचय होऊं लागतो व हीच लस मग गोठते आणि तो भाग लाल व दांडरल्यासारखा कठीण लागतो. याचा मधील भागाची मात्र बिलबिलीत होण्याची प्रवृत्ति असते. व पुढें हा बिलबिलीतपणा वाढत जाऊन त्यावरील त्वचा अगदीं पातळ होते व तिच्या मध्यभागीं कांहीं भाग कुजून काळसर होऊन छिद्र पडून पू बाहेर आपोआप येऊं लागतो. नंतर तो भाग हलका होऊन ठणका थांबतो. या सुजेंतील बराच भाग पूयजंतूंनीं फस्त केल्यामुळें मृत होऊन पुवाचे रूपानें निघून जातो. कांहीं विद्रधींमध्यें ही मांसनाशकक्रिया फार तीव्र असते व त्या सुजलेल्या भागांतील सर्वच गांठ निःसत्व होऊन कुजते व छिद्रांतून संबंध पडून जाते अगर कापून काढावी लागते (उदाहरणः– काळपुळी). पण असें नेहमीं न होतां बहुधा तें गळूं फुटलें असतां अथवा फोडलें असतां दाट पिवळा पू बाहेर येतो व त्या जागेच्या आंतील मांसल भाग कुजून पुवाच्या रूपानें बाहेर पडतो व गळवाचें एक पोंकळ विवरच बनून त्याच्या आंत पूयजंतूंच्या नाशकक्रियेस बळी न पडलेला लाल भाग असतो. एखाद्या पूयव्रणाचा अगर क्षताचा तळ जसा लाल व दाणेदार दिसतो, तसाच हा भाग असतो व हेच लाल दाणेदार मांसपेशी वाढत जाऊन ती पोकळी भरून येते. या क्रियेस व्रण राहून जखम भरून येणें असें म्हणतात. कधींकधीं एखादा सांधा अगर त्यांतील स्नायू, मस्तक, उर, अगर उदर यांच्या पोकळ जागेंत पूयसंचय होतो व तसा तो झालेला आहे ह्याचें निदान खास झालें म्हणजे ही स्थिति सुधारण्याचे मार्ग दोनच. (१)कापून पू बाहेर येऊं देणें व(२) जखम भरून येईतोंपर्यंत आंतील पू बाहेर पडण्यास मार्ग ठेवणें. हीं गळवें कांपतांना आंतील लाल दाणेदार मांस जरा खरवडून घेऊन जंतुघ्न औषधानें धुवून काढण्याची वहिवाट आहे. आणि येणेंप्रमाणें पुवाचा निकाल होत असण्याची उत्तम तजवीज राखल्यास पू उत्पन्न होणें बंद होतें व गळवांतून पाण्यासारखी लस येते तीहि कमी होत जाऊन गळवाची पोकळी संकोचित होत जाते. असें होऊं लागलें म्हणजे पुवाचा निचरा होण्यासाठीं जी रबरी अगर कांचेची नळी ठेवितात ती आंखुड आंखुड करीत जातात व शेवटीं काढूनहि टाकतात. आणि मग गळवाचें तोंड बंद होतें. मान, पाठ अथवा कंबर यांतील कण्यास हाडीव्रण झाला असता अशा तऱ्हेचा पुवाचा मोठा संचय होऊन मोठें विद्रधी तयार होतें व त्याचा निकालहि याच तत्वानुसार करतात. पण क्षयसंबंध असल्यामुळें जंतुघ्नसम्प्रदायाप्रमाणें कांहींच न चुकण्याविषयीं अधिक काळजी घेतात. गळवाच्या अगदीं खालच्या भागांत शस्त्रानें चीर पाडतात म्हणजे निचरा उत्तम होतो. गळूं कापल्यावर जर ठणका सुरू राहिला तर नवीन पू होत आहे अगर पूयोत्सर्जननलिकेंत कांहीं अडकलें आहे असें समजून जें कारण असेल तें काढून टाकावें. आणि लवकरच पुनः खरवडणें, धुणें, व पूयोत्सर्जननलिकेमार्गें पुवाचा निकाल करून घ्यावा लागतो.

घ र गु ती उ पा य—गळूं मऊ होण्यासाठीं शेकानें अथवा पोटिसानें त्यांतील पू बाहेर वाहून जाण्यास मदत करावी. आळशीचें, गव्हाच्या पिठाचें, कांद्याचें, कडुलिंबाच्या पानाचें अगर दुसऱ्या कित्येक पदार्थांचें पोटिस करावें. एक उबदार पण पातळ फडकें दुहेरी करून त्यांत हें पसरून गळवावर बांधावें व तें वरचेवर बदलीत जावें. म्हणजे गळूं लवकर पिकतें. तें चिरतांना आडव्या तऱ्हेनें न फोडितां उभ्या दिशेनें चिरलें असतां एखादि रक्तवाहिनी कापली गेल्यास ती सहज बरी होते व फाजील

रक्तस्राव होत नाहीं. गळूं फोडण्यापूर्वी रोग्यास स्नान घालून कांपावयाचा जो भाग असेल तो साबणानें व नंतर जंतुनाशक द्रव्यानें धुवून काढावा. (१) रसकापूर १ ग्रेन व पाणी ४ औंस, अथवा (२) कॅर्बॉलिक ॲसिड १ भाग व पाणी ४० भाग, किंवा (३) बोरिक ॲसिड ५ ग्रेन व पाणी १ औंस. यांपैकीं कोणतेंहि औषध गळवा-बाहेरील व आंतील भाग जंतुरहित करून शस्त्रक्रिया यशस्वी करण्यास उपयोगी पडतें. रोग्याचा बिछाना, चादर, टेबल हीं सर्व निर्मळ असावीत. उपकरणें, शस्त्रें, डॉक्टर व मदतनीस यांचे हात व नखें या औषधांनीं स्वच्छ व जतुंरहित करतात.

गाई व म्हशी, गा ई.—सर्व जनावरांत गाय व बैल हे प्राचीन कालापासून माणसाळलेले प्राणी आहेत. आपल्या भरतखंडांतील अतिशय प्राचीन वाङ्मय म्हणजे वेद. यांत निरनिराळ्या ऋचांत निरनिराळ्या प्रसंगाला अनुसरून गाय व तिजपासून होणारें दूध, दहीं, तूप वगैरे जिन्नस यासंबंधानें उल्लेख आले आहेत. गाईच्या मांसाचा उपयोग जरी प्राचीन काळीं होई तरी गोरक्षणाचें महत्वहि प्राचीन काळीं होतेंच. याला अनुलक्षून वेदांत पुष्कळ ऋचा सांपडतात. त्यांपैकीं ऋग्वेदांतील एका ऋचेचा भावार्थ पुढें दिला आहे.

" रुद्र–रुद्रपुत्र मरुत–याची माता, वसूंची दुहिता, आणि आदित्यांची भगिनी व अमृतरूप दुधाचें केवल निवासस्थान अशी जी पापरहित गाय तिचा वध करूं नका; असा जाणत्या लोकांनां मी उपदेश करतों" (ऋ. ८.९०,१५)

वेदकालीं संग्रहीं असणाऱ्या गाईंच्या आधिक्यावरून गृहपतीच्या स्थितीचा अजमास करावयाचा असा प्रघात होता असें मंत्रार्थावरून आढळून येतें.

" हे दिव्य धेनुनों, रोड झालेल्या मनुष्यांस तुम्ही पुष्ट करतां आणि ज्यांच्या तोंडावर अगदीं कळा नाहीं त्यांनां तजेलदार करून सोडतां. तुमचा स्वर मंगलकारक आहे, तर तुम्ही आमचें घर मंगलमय करा. ह्या तुमच्या महान् सामर्थ्याची वाखाणणी लोकसभेंतून सुद्धां होत असते". (ऋ ६.२८,८).

वरील उल्लेखावरून प्राचीनकाळीं गोसंवर्धनाचें महत्व आर्यलोक पूर्णपणें जाणत असत हें सिद्ध होतें. भागवत वगैरे पुराणांत गाईंच्या कळपांचीं सुंदर वर्णनें व धार्मिक दृष्ट्या गाईचें महत्व दाखविणारीं अनेक वचनें सांपडतात. भागवतांतील दशम स्कंधांत पूर्वार्धांतील तेराव्या अध्यायांत श्रीकृष्णाच्या बालपणाचें वर्णन करतांना श्रीवेदव्यासांनीं फार बहारीचे प्रसंग दिले आहेत व त्यांतील गोपगीतांत गोपाल व गाई यांच्या संबंधानें फार सुंदर काव्य पदोपदीं आढळतें. उदाहरणार्थः—

गावस्ततो गोष्ठमुपेत्य सत्वरं हुंकार घोषैः परिहूत संगतान् ।
स्वकान् स्वकान् वत्सतरानपाययन् मुहुर्लिहन्त्यःस्रवदौधसंपयः॥

× × × समेत्य गावोऽधोवत्सान्वत्सवत्योप्यपाययन् ।
गिलंत्य इव चांगानि लिहंत्यः स्वौधसंपयः ॥

कौटिल्याच्या अर्थशास्त्रांतहि गोरक्षण व संवर्धन यांच्या संबंधीं उल्लेख आलेला आहे. त्यावेळीं या कामाकरितां एक निराळें खातें अस्तित्वांत होतें; त्यावर एक अधिकारी नेमलेला असे. त्याचें काम जनावरांचें वर्गीकरण करून तीं सुस्थितींत आहेत कीं नाहींत व त्यापासून सरकारला होणारें उत्पन्न बरोबर व योग्यवेळीं मिळतें कीं नाहीं, इत्यादि गोष्टीसंबंधानें देखरेख करणें. अलीकडील सर्व हिंदुराजांस गोब्राह्मण प्रतिपालक ही संज्ञा असे व गाईचें संरक्षण करणें हें आपलें मुख्य कार्यच आहे असें ते समजत व अद्यापहि समजतात.

एवंच इतर देशापेक्षां हिंदुस्थानांत गुरांचें महत्व अधिक आहे. या देशात आउताचे बैल हें मुख्य शेतकीचें साधन होय. बैल चांगले तर शेती चांगली. बैल आउताला, गाडीला, मोटेला व कित्येक ठिकाणीं स्वारीकरतां वर, बसून जाण्यालाहि उपयोगी पडतात. हिंदुस्थानांत गाई मुख्यत्वेंकरून शेतकीला लागणाऱ्या बैलांकरितां पाळितात. गाईचें जें थोडें बहुत दूध निघतें तें घरखर्चास उपयोगी पडतें. गोऱ्हा मोठा झाला म्हणजे तो शेतीच्या कामीं येतो. हिंदुस्थानदेशांतील निरनिराळें हवामान, चाऱ्याचा कमजास्त पुरवठा, निरनिराळ्या प्रकारच्या कमजास्त कसाच्या जमीनी व त्यांवर होणारीं निरनिराळ्या प्रकारचीं गवतें व पिकें, या मानानें गाईच्या अनेक जाती आढळतात. त्या जातींत कित्येक पुष्कळ दूध देणाऱ्या, कित्येक कमी पण कसदार दूध देणाऱ्या व कित्येक तर फारच देखण्या आहेत. कित्येकांची प्रजा जड ओझीं वाहण्यास, नांगरटांस मजबूत व बळकट असते. कित्येक जास्त काटक व जास्त वर्षे काम देणारी व कित्येकांची अवलाद गाड्या, तांगे वगैरेस घोड्यांप्रमाणें ओढणारी असते. फार पावसाळी भात पिकणाऱ्या भागांत गुरें अगदीं लहान असतात. चांगल्या गुरांच्या जाती उष्ण व समशीतोष्ण भागांतच आढळतात. त्यांपैकीं मुख्य, नेलोरी—मद्रास ईलाख्यांत, अमृतमहाल—म्हैसूर संस्थानांत, मॉंटगॉमरी व हांसी-पंजाबांत; सिंधी–दक्षिण सिंधप्रांतांत; माळवी—सातपुड्यांत व मध्यहिंदुस्थानात;गीर अगर सोरटी—काठेवाडांत; कॉंकेजी–गुजराथेंत; गौळाऊ–मध्यप्रांतांत; खामगावी—वऱ्हाडांत; खिलारी–सातपुड्यांत व आठपहाडी महालांत;व कृष्णाकाठी—कर्नाटकांत; अशा जाती आढळतात.

सर्व हिंदुस्थानांत जास्त दूध देणाऱ्या गाईंच्या जाती फक्त पांच आहेत.(१)सिंधी, (२) शहिवाल किंवा मॉंटगॉमरी (३) हांसी किंवा हिसार, (४).गीर अगर सोरटी,(५) ऑंगोल अगर नेलोरी. हिंदुस्थानांत आढळणाऱ्या मुख्य गाईंच्या म्हशींच्या जातींचें वर्णन पुढें दिलें आहे.

मॉंट गॉमेरो, शहीवाल अगर तेली जात:—ही पंजाब प्रांतांतील उत्तम दुभती जात आहे. या जातीचीं उत्तम गुरें गुंजीबारांत (बार = दोन नद्यांमधील प्रदेश)पैदास होतात. या प्रदेशांत गवत बेताचेंच होत असलें तरी पडीक जमीन मुबलक आहे. पाऊस सरासरी दहाबारा इंच पडतो. या गुरांची पैदास मुसुलमान लोक करतात. साधारणपणें येथील परिस्थिति कराची गाय जेथें पैदा होते तशा तऱ्हेची आहे. या जातीनें कराची गाईशीं पुष्कळ साम्य आहे. या गाईचा प्रसार चिनाब कॉलनींत लाहोर,मुलतान,अमृतसर वगैरे ठिकाणीं झाला असून शिवाय त्या हिंदुस्थानभर आढळतात. त्या परदेशींहि गेलेल्या आहेत.मॉंटगॉमेरी जात रंगांत पिंवळी, तांबडी, पांढरट किंवा करडी असते. जनावर लहान, सुबक असून डोकें, शिंगें व कान लहान असतात. मान पातळ असते. जनावर पुढच्याच्या बाजूला जरासें उंच असतें. कांस मोठी असून आंचळांची ठेवण चांगली असते. अंगावरील कातडी पातळ असून केंस तुळतुळीत असतात. गाय रोज सरासरी सोळा पौंड दूध देते. साधारण गाईला शंभर सव्वाशें रुपये किंमत पडते.

हिसार-हरियाना अगर हांसी:— या जातींतील उत्तम जनावरें गुजराथी व काकेजीसारखीं दिसतात. हीं रंगांत पांढरीं व करडीं असून पंजाबांत रोहटेक, हिसार या जिल्ह्यांत पैदा होतात.या जातीच्या विशेष चांगल्या गाई संपळा व गोहाना तालुक्यांत आढळतात. यांचें तोंड लांब व सुबक दिसतें; कपाळ रुंद उठावदार, डोळे पाणिदार व पोळीला वळकट्या असतात. बैलाचें वशिंड मोठें असतें. एकंदरींत बैल बांधेसूद व मोठा असून तो शिंगानें भव्य दिसतो. जनावर चपळ व ताकदवान असतें. या जातीच्या गाई पुढच्याकडे उंच असून खांद्याकडे उतरत्या असतात. कांस मोठी असून आंचळ आकारात मध्यम असल्यामुळें दूध काढण्यास सोपें जातें व दूधहि पुष्कळ निघतें. या गाई मिळण्याचीं ठिकाणें पंजाबांत हिसार, भिवानी, शिरसा व जहाजगड हीं होत. येथें दरवर्षी मोठ्या यात्रा भरतात. जनावराची उंची साधारणपणें ५२ इंच असून छातीचा घेर सुमारें ८० इंच असतो. पुढच्या पायाची नळी ७ इंच असते. हिसार येथील पैदाशीच्या गोशाळेंतून उत्पत्तीसाठीं बियाणू व मिलिटरी खात्यासाठीं मोठमोठ्या गाड्या ओढण्यास बैल पुरविले जातात.

नागेरी:—या जातीचें मूलस्थान राजपुतान्याच्या पश्चिमेस असलेला नागोर प्रांत होय.या जातींतील गुरांचा रंग पांढरा, तोंड सरळ, कपाळ रुंद, डोळे पाणीदार, मान लांब व बारीक व कान मोठे असून लोंबते असतात. एकंदरींत जनावरें उंच व चपळ असतात. या जातीच्या गाई पुष्कर, हिसार, हांसी व बालोत्रा येथील वार्षिक यात्रेंत मिळतात. गाईची कांस मोठी असून त्या रोज सुमारें २० पौंड(१० शेर)पर्यंत दूध देतात. या जनावराची उंची सुमारें५२ इंच असते. पुढच्या पायाची नळी ७ इंच असते.

मेवार, मथुरा अगर कोशी.—या जातीचें मुख्य उत्पत्तिस्थान मेवार होय. हा प्रदेश, कोशी तालुक्याचा कांहीं भाग, पंजाबांतील गुरगांवपैकीं कांहीं भाग, भरतपूर व अलवार संस्थानचा कांहीं भाग मिळून झालेला आहे. या जातीच्या गाई रंगांत पांढऱ्या अगर करड्या असून चेहेऱ्याची लांबी हिसार जातीहून कमी असते. डोळे पाणीदार असून कान मोठे व लोंबते असतात. या गाई रोज १०–१६ पौंड दूध देतात. या गाई मथुरा जिल्ह्यांतील कोशीच्या यात्रेंत विकत मिळतात. बैल आकारानें मध्यम असून कामाला चांगले असतात. यांची उंची सुमारें ४९ इंच व छातीचा घेर ६२इंच असतो.

खेरी.–ही जात खेरीगड, पन्हैर, मांजरा या ठिकाणीं पैदा होते. या जातीचे बैल कामाला चांगले असतात पण खादाड असतात. या जातीस वळण लावण्यास अगर शिकविण्यास कठिण जातें. गाई फारसें दूध देत नाहींत.

पिलिबिट (पनया):–ही जात पुरानपूर जिल्ह्यामध्यें पैदा होते. बैल कामाला फार चांगले असतात. गाई फारसें दूध देत नाहींत.

कनवरिया.—ही जात बुंदेलखंडात पैदा होते. बैल कामाला चांगले असतात. गाई फारसें दूध देत नाहींत.

नेल्लोर (ऑंगोल):—या जातीचा उत्पत्ति मद्रास इलाख्यांतील नेल्लोर, कृष्णा व गंतूर जिल्ह्यांत होते. जनावरांचा दुधाविषयीं व कामकरी बैलांविषयीं प्रसिद्धि आहे. हें जनावर उंच असून दिसण्यांत सुंदर दिसतें. या जातीचीं जनावरें कांहींशीं कृष्णातीरच्या जनावरांसारखीं दिसतात. दोघांचें मूळ एकच असावें असें दिसतें. मध्यप्रांतांतील आर्वी जात आकारांत, बांध्यांत व रंगात नेल्लोरसारखींच दिसते, पण या जातीच्या गाई फारसें दूध देत नाहींत. नेल्लोर जातीच्या गाई हिंदुस्थानातील मुख्य दुभत्या जनावरांत गणल्या जातात.या गाई स्वभावानें गरीब असून त्या १४ते२५ पौंडपर्यंत दूध देतात. बैल फार चपळ नाहींत व फार लठ्ठहि नाहींत. ते शेतकींच्या सर्व कामीं उपयोगी पडतात. नेल्लोर जातींत रंग पांढरा, करडा व केव्हां केव्हां पिंगटहि असतो. चेहरा आंखूड, कपाळ रुंद, जबडा मोठा व डोळे पाणीदार असतात. मान जाड व आंखूड असून पोळी व बेंबट फार वाढलेलें असतें. शिंगें आंखूड व खुरटलेलीं असतात. जनावर पायांत नरम असून दगडाळ किंवा रेंवट जमिनींत व खडीच्या रस्त्यावर यांचे पाय लवकर उभळतात, परंतु काळ्या व खोल जमिनी नांगरण्यास हे बैल फार उपयोगी आहेत. साधारण गाईची किंमत ८०ते१५० रुपयेपर्यंत पडते. उत्तम गाईला २०० रुपये पडतात. साध्या बैलांच्या जोडीला १२५ ते १५० रुपये पडत असून जोडीची किंमत ३५०रुपये पर्यंत असते.

कांगायम.—ही जात दक्षिण कोइमतूर जिल्ह्यामध्यें पैदा होते. या भागांतील शेतकरी आपल्या शेताचा एक

भाग चारण्याकरितां वेगळा राखून ठेवितात. गवत लहान असतांना आंत गुरें सोडीत नाहींत. तें खाण्याजोगें उंच झालें म्हणजे शेताचे भाग करून ते थोडे थोडे चारतात. या जातीचीं गुरें मद्रास इलाख्यांत बरींच आढळतात. जनावर आकारांत मध्यम व बांध्यांत मजबूत असून स्वभावानें फारसें तापट नसतें. ही जात शेतीच्या सर्व कामाला फार उपयोगी आहे. या जातींतील गाई दुभत्या नसतील तेव्हां नांगरास जवण्याची तिकडे चाल आहे. यांचीं उंची सुमारें ५२ इंच असते. जोडीची किंमत १००ते१५० रुपये पर्यंत असते.

सिलोनी गुरें:—सीलोनमध्यें दोन जातींचीं गुरें आढळतात. एक गावठी व दुसरी समुद्रकिनारी. समुद्रकिनारी जात म्हैसुराकडून आलेली आहे. गांवठी जात एडनसारखी आकारांत लहान असून ती दिसण्यांत सुरेख दिसते. या गुरांचें डोकें लांबट असून कान लहान असतात. शिंगें आंखूड, जाड व खुरटी असतात. पाय आंखूड व खूर काळे असतात. हीं गुरें साधारणपणें विलायती गुरांसारखीं दिसतात. बैल चपळ व काटक असतात. गाई फारसें दूध देत नाहींत. उंची ४१ इंचापर्यंत असते. सिलोनांत गुरें डागण्याची फार चाल आहे. गेल्या दहा वीस वर्षांत सिलोनात दुभत्याकरितां कराचीहून बऱ्याच सिंधी गाई नेलेल्या आहेत.

लाखाभोंडा. (लाखा म्हणजे तांबडी. भोंडा म्हणजे तोंडावर पांढरी)—या जातीचें उत्पत्तिस्थान तेलंगणांत आहे, म्हणून तिला तेलंगी असेंहि म्हणतात. वऱ्हाडात या जातीचीं जीं जनावरें आहेत तीं बहुतकरून निजामच्या राज्यांतून आणलेलीं आहेत. तथापि त्यांची पैदास यवतमाळ जिल्ह्यांतील केळापूर व वणी तालुक्यांत बरींच होते. याचें डोकें उठावदार असून चेहेरा थोडासा आंखूड व अरुंद असतो. शिंगें व कान आंखूड असतात. या जनावरांचें हाड कणखर असून त्यांची मागची बाजू मजबूत असते. मागील धड पुढील भागापेक्षां थोडेंसें उंच असतें हें यांच्यांत एक विशेष लक्षण आहे. उंची सुमारें ४२ ते ५० इंच असते. एकंदरींत जनावर कणखर असून शेतीच्या फार उपयोगी पडतें. साधारण जोडीला सुमारें १२५ ते १७५ रुपये किंमत पडते.

खुरगांवः—खुरगांव म्हणून होळकरांच्या संस्थानांत एक जिल्हा आहे. या जातीच्या जनावरांचें हें उत्पत्तिस्थान असल्यामुळें तिला हें नांव मिळालें आहे. हीं जात इंदूर, पंचमहाल व नर्मदा नदीच्या उत्तर भागांत दृष्टीस पडते. या जातीचीं जनावरें नेमाडी गुरांपेक्षां सावकाश पण अवजड काम करण्यास अधिक उपयोगीं पडतात. या जातीच्या जनावरांच्या अंगावर पांढऱ्या रंगाचे ठिपके अगर पट्टे असतात व तीं निमाडीपेक्षां आकारानें मोठीं असतात. त्यांची उंची वशिंडामागें सुमारें ५० ते ६० इंच असून छातीचा घेर सुमारें ७० इंच असतो. उत्तम जोडीला १५० ते ३०० रुपये किंमत पडते; पण साधारण बैल ६० रुपये पर्यंत विकत मिळतो.

सांकराः—या जातीचीं जनावरें सिवणी, छिंदवाड, याच्या उत्तरेकडील प्रदेशात मंडला, जबलपूर व दमोह या जिल्ह्यांत पैदा होतात. हीं जनावरें माळवीच्या खालोखाल असून चपळ असतात. हीं आकारानें लहान असल्यामुळें त्यांनां खावयास कमी पुरतें व तीं हलक्या जमिनी नांगरण्याच्या कामीं उपयोगी पडतात. यांची वशिंडामागें उंची सुमारें ४० इंच असून छातीचा घेर सुमारें ६३ इंच असतो. एकंदरींत सांकरा जात माळवीप्रमाणेंच असून ती आकारानें मात्र लहान असते.

शेरी अगर खेराटः—हीं जात रजपुतान्यांतील शिरोही संस्थानांत पैदा होते व अबूच्या पहाडाच्या आसपास पुष्कळ आढळते. ही माळवीसारखीच पण थोडी उंच असून शिंगांची ठेवण वेगळ्या प्रकारची असते. हिचीं शिंगें एकावर एक दोन वळसे घेऊन उंच होत जातात.

माळवी.—या जातीची खरी पैदास हुशंगाबादच्या उत्तरेस व सागरच्या पश्चिमेच्या प्रदेशांत म्हणजे मध्यहिंदुस्थानांत होते. यांचें मुख्य वसतिस्थान होळकर व शिंदे यांचें राज्य व कांहीं अंशीं पंचमहाल होय. यांची पैदास गवळी, अंजनी, खाटीज, सेंडाज या जातींचे लोक करतात. माळवी जातीचीं गुरें शेतकीच्या कामीं फारच उपयोगी पडतात. तीं कष्टाळू, स्वभावानें गरीब व गवळाऊ एवढी मोठीं नसली तरी सुटसुटीत व सुदृढ असतात. या जातीचा प्रसार दक्षिणगुजराथ, खानदेश, देश व नर्मदेच्या कांठचा सपाट प्रदेश व वऱ्हाड प्रांत यांत मोठ्या प्रमाणांत झाला आहे. या जातीचीं गुरें रंगानें पांढरीं करडीं, आकारानें मध्यम, मजबूत व वाटोळ्या आंगलोटाचीं आणि मध्यम उंचीचीं असतात. चेहेरा आंखूड व नाकाचा भाग किंचित् वर उचललेला असतो. डोकें थोडें खोलगट असतें. शिंगें वर जाऊन व पुढें येऊन कमानदार होतात. एकंदरींत जनावर रुंदट असून लांबीला कमी असतें. पाय सुबक असून खूर काळे कणखर असतात. उंची सुमारें ५४ इंच असून छातीचा घेर सुमारें ७० इंच असतो. गाई दूध कमी देतात व त्यांचीं तीन वर्षांत दोन वेतें होतात.

उंबरडा (डिग्रजा) जात.—मूर्तिजापूर जिल्ह्यांत उंबरडा म्हणून एक गांव आहे, हें गांव या जातीच्या गुराचें मूलस्थान होय. हल्लीं हीं गुरें यवतमाळ, उमरावती, व अकोला या जिल्ह्यांत फार आढळतात. या जातींत दोन रंगाचीं गुरें आढळतात. कांहीं पांढरीं कांहीं तांबडीं आणि कित्येकांत या दोन्हीं रंगाचें मिश्रण असतें. या जातीचे बैल मध्यम आकाराचे असून त्यांच्या शरिराचा बांधा सुदृढ असतो. चेहेरा सुबक, कपाळ रुंद व किंचित् उठावदार असतें. जबडा रुंद व काळसर रंगाचा असून नाकपुड्या मोठ्या असतात. मान आंखूड व जाड असून गळ्याखालची पोळी फारशी वाढलेली नसते. शिंगें मध्यम आकाराचीं असतात. पाठ सरळ असून जनावर एकंदरींत सुबक, मजबूत, चपळ

रांकट असतें. या जातीचे बैल सवारीच्या गाडीला रोज ३० ते ४० मैलपर्यंत प्रवास करूं शकतात. साधारण जोडीला १२५ ते २०० रुपये पडतात.

गवळाऊ(अरव्ही)जात:—ही जात नागपूर वर्धा जिल्ह्यांच्या उत्तरभागांत व शिवणी जिल्ह्याच्या दक्षिण भागांत पैदा होते. अस्सल जातीचीं गुरें नागपूर जिल्ह्यांत जेतपूर, रामटेक व सावसर येथें दृष्टीस पडतात. या जातीचा रंग बहुतकरून पांढरा असून शिंगें वर येऊन मागील बाजूस वांकलेलीं असतात. चेहेरा लांबट व डोकें उठावदार असतें. शरीर हलकें, कमरेंत साधारण कमजोर, पुठ्ठा जरा उतरता असून जनावर उंच व पायांत मजबूत असतें. ही जात चपळ असून पळण्यांत चांगली असते. कित्येक वेळीं ते एका दिवसांत ५० मैलपर्यंत मजल मारतात वशिंडामागें उंची सुमारें ५ फूट असून छातीचा घेर सुमारें ७५ इंच असतो. साधारण जोडीची किंमत २०० ते ४०० रुपयेपर्यंत असते. या जातीच्या गाई चांगलें खावयास घातलें तर ४ ते ८ शेरांपर्यंत दूध देतात.

मेळघाट जात:—वऱ्हाडांत अतिसर्वांत लहान जातीचीं गुरें मेलघाट अथवा पहाडी हीं होत. या जातीचे बैल काटक व चपळ असून पहाडी मुलुखांत फार उपयोगी आहेत. यांत अनेक रंग असतात, पण मुख्य तांबडा-पांढरा, काळा-पांढरा व दोन्ही मिश्रित हे होत. यांचें कपाळ सपाट असून मध्यें उभट खांच असते. पोळी गळ्याबरोबर असते. पुठ्ठयाकडचा भाग चिंचोळा असतो. एकंदरींत बांधा मजबूत असून जनावर गुटगुटीत दिसतें. हे बैल मोठ्या बैलांपेक्षां गरीब लोकांस सोईचे पडतात. साधारण जोडीची किंमत शंभरपासून दीडशें रुपयेपर्यंत असते.

खामगांव जात.—ही जात पश्चिम वऱ्हाडांत बुलढाणा जिल्ह्यांत पैदा होते व खामगांव बाजारांत विकली जाते. त्यावरून या गुरांस हें नांव पडलें. हीं अस्सल जात उंद्री जवळच्या भागांत पैदा होते. या जातीचे बैल पूर्वी लढाईचे सामान वहाण्यास व तोफा ओढण्यास उपयोगी पडत असत. हल्लीं निजामच्या राज्यांत यांचा उपयोग तोफा ओढण्याकडे करतात. या जातीचे उत्तम बैल बुलढाणा जिल्ह्यांतील खामगांव, मलकापूर आणि जळगांव ह्या तालुक्यांत जेथें उत्तमप्रतीच्या जमीनी आहेत तेथें आढळतात व त्यांचा भारी जमिनी नांगरण्याच्या कामीं उपयोग होतो. या जातीचा बैल मोठा, मजबूत व लांबट असून मिश्रित रंगाचा असतो. त्याच्या अंगावर तांबड्या रंगाचे ठिपके असतात; खूर, जबडा, शिंगें व कानाच्या आंतील भाग भुरकट लाल रंगाचे असतात. शिंगें लांबीला मध्यम असून बुडाजवळ जाड असतात. डोकें रुंद व थोडें उंच असून वशिंड बरेंच वाढलेलें असतें. गळ्याच्या खालील पोळी व बेंबट: हीं दोन्ही लोंबतीं असतात. चांगल्या बैलाची उंची वशिंडाच्या मागें सुमारें ५२ इंचांपर्यंत असते. डोक्यापासून शेपटीपर्यंत लांबी ६ फूट असून शरिराचा परिघहि जवळ जवळ तितकाच असतो. एकंदरींत जनावर मजबूत व दमदार असतें व त्याचा उपयोग विशेषतः नांगर ओढण्याच्या कामीं होतो. पण वऱ्हाडांतील लहान जातीच्या बैलापेक्षां पळण्याच्या कामांत ही जात कमी असते. यांचे खूर नरम असल्यामुळें पक्क्या सडकेवर ते लवकर झिजतात. साधारण जोडीला १५० ते २५० रुपये किंमत पडते व उत्तम जोडीला ३०० ते ३५० रुपयेपर्यंतहि किंमत येते. या जातीच्या गाई फारसें दूध देत नाहींत; दररोज सरासरी २-४ शेरपर्यंत दूध निघतें.

बैतुल जात:—ही जात माळवी आणि खामगांवी या जातींपासून उत्पन्न झालेली मिश्र जात आहे. या जातीचें जनावर फारच चपळ असतें. सामान्यतः माळावरील व डोंगरावरील जनावरें लहान असतात. यांची उंची सुमारें ४० इंच व छातीचा घेर सुमारें ५५ इंच असतो.

कृष्णातीरी (सोरटी अगर देसुरी):—या जातीची पैदास कृष्णा व तिला मिळणाऱ्या मोठ्या नद्या यांच्या कांठीं होते. कृष्णाकांठ कऱ्हाडजवळ सुरू होऊन मिरज, सांगली, कुरुंदवाडवरून पुढें बेळगांव जिल्ह्यांत शिरतो. या जातीच्या उत्तम गुरांची पैदास भिलवडी, दुधगांव, डिग्रज, सांगली, कर्नाळ, अंकली, यडूर, मांजरी, कागवाड आणि सत्ती - सवदी येथें होते. पैदास करणारे लोक गुरांची फार काळजी घेतात. खोंडांना मक्याचीं कणसें व भोपळे चारतात व कित्येक तर आवडत्या गुरांना तूप सुद्धां पाजतात. या जातींत गुरांचा रंग मुख्यत्वेंकरून पांढरा असतो. तथापि ही जात निर्भेळ नसल्यानें केव्हां केव्हां तींत काळे, तांबडे, करडे, पट्टयाचे असे सर्व रंग आढळतात. या जातींत कपाळ मोठें, चेहेरा लांबट व मांसल, शिंगें मध्यम व खुरटलेलीं, कान मोठे व लोंबते, मान आखूड, जाड व मांसल, पोळी मोठी व सुरकुतलेली व पोटाखालील कातडी लोंबती असते. एकंदरीत सर्व जनावरांचा आंगलट लांब, जाडा व मोठा असून जनावर मोठें, उंच व भव्य दिसतें. जनावर बळकट असून चपळाईत जरा कमी असल्यामुळें नांगरटीला व ओझें वहाण्याला तें फारच योग्य असतें. या जातीच्या गाई नदीकांठीं चारा व पाणी मुबलक मिळत असल्यामुळें साधारणपणें सिंधी किंवा कांक्रेजीप्रमाणें दूध देतात.

सोरटी (सांगलीकडील):—या जातीचें जनावर स्थूल व भारदस्त दिसतें. यांच्या अंगीं चपळपणा कमी असून काटकपणा मुळींच नसतो. यांचा बांधा ढिला असतो, रंग तांबडा, गवळा अगर काळा असून शिंगें दिवटी व लहान असतात. यांचें कपाळ पसरट व उठावदार असतें. या जातीच्या गाईस दूध बरेंच असतें. कृष्णातीरी या जातीचीं गुरें अमेरिका व फिलीपाइन बेटापावेतों गेलीं आहेत.

देशी (डेक्कन):—डेक्कनी ही जात निव्वळ अशी महाराष्ट्रांत नाहींशी झाली आहे. देशी जनावरें हें एक

अठरा धान्यांचें कडेबाळें बनलें आहे. याला अनेक कारणें आहेत; त्यांपैकीं वेळेवर पाऊस न पडणें व वरचेवर दुष्काळ पडणें हीं मुख्य होत. पावसाच्या अनिश्चितपणामुळें गुरांच्या खाण्यापिण्याचे फार हाल होतात. एखाद्या वर्षी भरपूर चारा व दुसऱ्या वर्षी कांहींच नाहीं अशा परिस्थितीमुळें, महाराष्ट्रांत माळव्यांतून माळवी, खिलारी व इतर ठिकाणांहून बैल येत असल्यामुळें भेसळ होऊन 'डेक्कनी' निर्भेळ जातीचा लोप झालेला आहे. याकरितां हल्लीं जी डेक्कनी जात म्हणून म्हटली जाते ती लहान, आंखूड, बांधेसूद, चपळ व कणखर अशी असते. पाय लहान असून खुरांत मजबूत असे असतात. बैल हलक्या वाहतुकीला, नांगराला व पळण्याला योग्य असतात. अपुऱ्या व मिळेल तसल्या चाऱ्यावर राहणारी देशाला योग्य अशी ही जात बनली आहे. ही जात साधारणपणें खोडकर, हट्टी व शिकविण्यास जरा कठिण अशी आहे. या जातींतील गाई म्हणण्यासारखें दूध देत नाहींत.

कोंकणी:—ही जात डेक्कनी सारखीच असून आंगलोटांत लहान असते. यांत काळे, पांढरे, लाल व पिंवळे वगैरे बरेच रंग आढळतात. या जातीची शेंपटी जमिनीवर लोळण्याइतकी लांब असून शेंपटीच्या शेवटीं केंसांचा झुपका असतो. कोंकणांत जनावराचें हें शेंपटीचें लक्षण फार उत्तम असें मानलें जातें. घाटांवरून जे बैल गाडी वगैरेंना खालीं कोंकणांत जातात त्यांची शेपटी मागील पायांच्या ढोंपरापर्यंतच असतें. अशीं जनावरें कुंभारली व आंबे घाटानें गाडीस जोडून व मळया व कुंडी घांटानें गोणीला घालून खालीं कोंकणांत येतात.

डांगी अगर डोंगरी—या जातीची पैदास नाशिक, अहमदनगर व ठाणें जिल्ह्यांतील मावळी भागांत होते. या जातीचीं गुरें डेक्कनी गुरांपेक्षां थोडीशीं मोठीं असतात. मानेखालची पोळी व बेंबटाजवळील कातडी फार वाढलेली असते. अंगावर काळे, पांढरे ठिपके असतात. बैल कामाला मजबूत असतात पण चपळ नसतात. गाई फार करून दुधाळ नसतात.

सोनखेरी:—ही जात नाशिक जिल्ह्यांतील सटाणा व खानदेशांतील साकरी पिंपळनेर या भागांत पैदा होते. हिचा रंग तांबडा अगर पिंवळट असून हिच्या सर्वांगावर पांढरे ठिपके असतात, त्यांच्या डोळ्याच्या पापण्या व जबडा यांचा रंग मांसाच्या रंगासारखा असतो. ही जात शेतकामाला बरी असते व या जातीच्या गाई दूध बरें देतात.

खिलारी (माणदेशी):—या जातीच्या गुरांची पैदास होळकर राज्यांत सातपुडा पर्वतांत, औंधसंस्थानांतील आठपाडी महालांत, माण व खानापूर (सातारा) व त्याचप्रमाणें सोलापूर जिल्ह्यांतील कांहीं भागांत व जमाखिंडी, मुधोळ, जत आणि सांगली संस्थानांत होते. या जातींत म्हैसुरी जातीची भेसळ झाली असल्या कारणानें तिचें म्हैसुराशीं बरेंच साम्य आहे. हीं गुरें लवकर माणसाळत नाहींत. यांचें डोकें, शिंगें व डोळे हीं विशेष प्रकारचीं असतात. चेहेरा लांबट असून कपाळ जरा वर उचलल्यासारखें असतें. चेहरा डोळ्यांपासून जबड्यापर्यंत खोलगट असतो. शिंगें सुरवातीला जवळ निघून पुढें जरा मागें व उंच जाऊन त्यांचीं टोंकें कमानी सारखीं पुढें आलेलीं असतात. डोळे लाल, पाणीदार व रागीट दिसतात. यांचा जबडा, पायांचे खूर व डोळ्यांच्या पापण्या गाजरी रंगाच्या असतात. एकंदरींत ही जात रंगांत पांढरी, जागोजाग पिंवळट झांक मारणारी, मान आंखूड व भरलेली, उंचीला मध्यम पण डेक्कनीपेक्षां मोठी, लांबट व बांधेसूद असून गाडीच्या कामाला फारच उत्तम असते. यांचा शेतकीकडे साधारणपणें सर्व कामांस उपयोग होतो. या जातीचा स्वभाव तापट व रागीट असतो. गाईहि आकारानें लहान असून चपळ व मारकट असतात. त्या दूध फारसें देत नाहींत. यांचीं शिंगें बैलांपेक्षां लांब व अणकुचीदार असतात. सातपुड्यांतील खिलारी बैल जास्त चपळ व रंगानें पांढरे असतात. यांच्या गळ्याखालची पोळी फारशी वाढलेली नसते. या जातीचे बैल चपळ असल्यामुळें नांगरटीच्या कामाला लवकर थकतात.

म्हैसुरी—या जातीची पैदास म्हैसुरांत व भोंवतालच्या प्रदेशांत होते. हींत पुष्कळ प्रकार आढळतात. त्यांपैकीं महत्वाची जात म्हटली म्हणजे म्हैसुरांतील अमृतमहाल खात्यांत ठेविलेल्या गाईपासून पैदास होते ती होय. ही पैदास हैदर व टिपू सुलतान यांच्या अमदानीपासून व्यवस्थित रीतीनें चाललेली आहे. या जातींत दुसऱ्या रक्ताची भेसळ नसल्यामुळें गुरें रंगांत व बांध्यांत एकसारखींच असतात. त्यांची पैदास बहुतेक अर्धवट रानटी स्थितींत असल्यासारखी आहे.

अमृतमहाल खात्यांत शंभर गाईंचा एक कळप केलेला असतो. एका कळपांत बहुतकरून सारख्याच वयाच्या गाई असतात. हे कळप एका कुरणांतील चारा संपला म्हणजे दुसऱ्या कुरणांत नेतात. थंड भागांतील कुरणें उन्हाळ्यांत चारण्यासाठीं राखून ठेवतात. कळपांतील गुरांना बांधीत नाहींत, पण कुरणांतील गवत कमी पडल्यास सांठवून ठेवलेल्या गवताचा उपयोग करितात. यांस दाणा कधींच देत नाहींत. एका कळपाबरोबर दोन बियाणू असतात. आपआपसांतील वीण टाळण्यासाठीं हे बियाणू एका कळपांतून दुसऱ्या कळपांत बदलतात. बियाणूखेरीज सर्व गोऱ्हे दोन महिन्यांच्या आंत खच्ची करतात. या जातीच्या कालवडी लवकर वयांत येत नाहींत. गाई फारसें दूध देत नाहींत. गाय आटेपर्यंत सर्व दूध वासरें पितात म्हणून तीं चांगलीं पोसतात. अमृतमहाल गुरें आकारांत सारखी असून त्यांचीं हाडें ओबडधोबड अशीं नसतात. यांचा रंग करडा व पांढरा मिश्र असून त्यांच्या तोंडावर केव्हां केव्हां पुसट पांढरे ठिपके असतात. बैलावर जास्त काळी झांक असते. चेहरा लांब व अरुंद असून डोक्यापासून जबड्यापर्यंत मध्यें खोलगट असतो. डोळे मोठे व काळे असून त्यांच्या पापण्या म्हसवड खिलारीसारख्या मोठ्या असतात.

गाई म्हशी
लांबशिंगीगाय
आखुडशिंगीगाय
ब्राह्मणीगायववासरूं
टोणगा
ऑल्डर्नेगाय
गॅलोवेगाय

विशिष्ट प्राणी

गरुड.

गोगलगाय

गोगलगायीचीशरीररचना

१ तोंड. २ पाय. ३ फुप्फुस. ४ कोठा. ५ आंतडें. ६ काळीज. ७ हृदय. ८ एओर्ता धमनी. ९ जाठररससंबंधी धमनी. १० पायाची धमनी. ११ काळिजाची धमनी. १२ पोटाचीखांच. १३ फुफुसाकडे रक्त नेणारानळ. १४ फुफुसांतूनहृदयाकडे रक्त नेणारी शीर.

गेंडा

खोखो पटांगण (पान १२१)

ट

९ फूट { क

अ

आ

इ

ई

भ उ

ऊ

ए

ऐ

ख

ठ

च

फ

१११ फूट

शिंगें साधारणपणें खिलारीसारखींच असतात. गळ्याखालची पोळी व बेंबटावरील कातडी फारशी वाढलेली नसते. पाय मजबूत व खुरांत सारखे असतात. एकंदरींत या जातींत बांधा लांबट असून अरुंद असतो.

म्हैसुरीचाच आणखी एक प्रकार आहे त्याला मधेस्वरनबेत्ता अगर अलमडी असें म्हणतात. यांची पैदास म्हैसूरच्या आग्नेयीकडील डोंगरांत होते. या जातीचीं गुरें अमृतमहालपेक्षां मोठीं असून साधारण बोजड दिसतात. या जातींत पोळी बरीच वाढलेली असून डोकें जड असतें. शिंगें जाड, मान आंखूड व जाड, पाय बोजड व खुरांत नरम असून अंगावरची चामडी जाड असते. हीं जनावरें कामाला जड असून कर्नाटकांत यांचा शेतकीच्या कामीं फार उपयोग होतो. बेळगांवांत या जातीचे बैल तेल्याच्या घाण्याला व धमनीला फार करून अधिक आढळतात.

नंदी येथें दरवर्षी मोठी यात्रा भरते. हें ठिकाण बंगलोरपासून २२ मैलांवर आहे. येथें म्हैसुरी चांगले बैल विक्रीस येतात. तेथें पनिांग, स्ट्रेट सेटलमेंटस्, मलाया, ब्राझिल (अमेरिका) वगैरे ठिकाणांहून पुष्कळ परदेशी अडत्ये दरवर्षी बैल खरेदी करण्यासाठीं येतात. जोडीला २५० ते ४०० रुपये किंमत पडते.

हुणम्—ही म्हैसुरीची एक पोटजात असून तिची पैदास सांगली संस्थानांत व कर्नाटक प्रांतांत फार होते. या जातीच्या गाई लहान असून अंगानें बारीक, फार चपळ व रानटी गाईसारख्या दिसतात. त्यांचीं शिंगें बरींच लांब असतात. गाईचा रंग पांढरा असून कांहीं जनावरांत मानेवर तांबूस व कांहींत सर्व अंगावर पांढरे ठिपके असतात.

या जनावरांचा बांधा सडक असतो. शिंगें नीट व अणीदार असतात. तोंड लांबट असतें. जनावर जातीनें चपळ, खणखणीत, बळकट व रागीट असतें.

एडन—ही जात आकारांत लहान असून ती अरबस्तानांत पैदा होते. या जातींत दुभत्या जनावरांचे गुण बऱ्याच प्रमाणांत आढळतात. एडन गाई विक्रीकरितां इकडे येत नाहींत. ज्या कांहीं इकडे आढळतात त्या युरोपियन लोकांनीं तिकडून येतांना आणल्या आहेत. आकाराच्या मानानें या गाई बरेंच दूध देतात; व त्या गरीब असल्यामुळें रोज दोन तीन वेळ दूध काढलें तरी देतात. या जातीच्या कालवडी लवकर वितात व गाई फार दिवस भाकड रहात नाहींत. यांचा रंग तपकिरी असतो; व चेहेरा, कान, पाय, पायाचीं हाडें, खूर व आकार यांचें बारीक रीतीनें निरीक्षण केल्यास जनावर साधारणपणें हरिणासारखें दिसतें. बैल शेतकीच्या हलक्या कामाला योग्य असून साधारणपणें दक्षिणी बैलाची बरोबरी करतात.

सिंधीः—या जातीचें वसतिस्थान मुख्यत्वेंकरून सिंधप्रांतांतील कराची जिल्हा होय. या जातीची पैदास कराचीच्या आसपास पांच पन्नास मैलांत होते. रानांत चरावयास बेताचेंच असतें. परंतु थोड्या चाऱ्यावर ती गुबगुबीत असतात. पैदास करणारे लोक मुख्यत्वेंकरून मुसुलमान असून ते बियाण्याची निवड करण्यांत जास्त काळजी घेतात व गोऱ्हे लहानपणींच खच्ची करतात. या दोन कारणांमुळें सिंधी जात बहुतेक निर्भेळ राहिली आहे. या गाई दूध देण्याच्या अगदीं ऐन भरांत असतांना रोज २०-२४ पौंड दूध देतात. खऱ्या अवलादीचा रंग तांबूस किंवा तांबडा असतो. परंतु कित्येक जनावरांत काळा, अगर गांवरीं पांढरे ठिपके असलेला असाहि असतो. तोंड मोठें व अवजड असतें. कान लांब असून लोंबते असतात. मान जाड व आंखूड असते. शिंगें लांबीला मध्यम असतात. गळ्याखालची व पोटाखालची चामडी बरीच लोंबती असते. एकंदरींत सर्वांग लांबट, उंच व सुंदर असें असून तें आंखूड पायावर तोललेलें असतें. कास साधारण मोठी व मांसल असते. कालवडी लवकर माजावर येतात. गाई स्वभावानें गरीब असून दूधहि बरेच दिवस देतात. या जातींत खुबे, खांदे व पुठ्ठा हे बरेच मांसल असून त्यांत चरबीहि बरीच असते. पाश्चात्य देशांत हे गुण मांसासाठीं निवडलेल्या जातींत आढळतात. या गुणांमुळें या गाई बऱ्याच प्रमाणांत बाहेर देशीं जाऊं लागल्या आहेत. या जातीचा प्रसार सर्व हिंदुस्थानांत मिलिटरी डेरी फार्मवर व सिलोनमध्येंहि दुधासाठीं झाला आहे. यांचा विलायतेतील 'आयरशायर' जातीच्या बियाणूबरोबर संकर होऊन झालेली गाय साधारणपणें दीडपटीनें दूध देते असा अनुभव आला आहे. हल्लीं या गाईंना कराची मुक्कामीं १२५ ते १५० रुपयेपर्यंत किंमत पडते. बैल फारसे चपळ नसले तरी साधारणपणें सर्व शेतीच्या कामास उपयोगी पडतात.

गीर (सुरती अगर सोरटी).—या जातीची पैदास रबारी, भाखड, व चारण लोक दक्षिण काठेवाडांत गिरनारचे अरण्यांत करितात. या अरण्यांत चारा भरपूर असून पाण्याचा पुरवठा मुबलक आहे. जनावरें रात्रीं बांधीत नाहींत. दूध काढण्याच्या वेळीं एके ठिकाणीं जमा करतात. या जातींत त्यांचें डोकें, कान व शिंगें विशेष प्रकारचीं असतात. कपाळ मोठें व पुढें आलेलें असतें. शिंगें जाड, मोठीं, मागें वळून वेटाळलेलीं अशीं असतात. कान मोठे, लांब व लोंबते असून शेंडे वळलेले असतात. रंग तांबडा अगर रंगीबेरंगी तांबडा अगर पांढरा असतो. यामध्यें पांढरा अगर तांबडा या रंगाचा बारीक शिडकाव मारल्यासारखा विचित्र असतो. आंगलट ओबडधोबड, पाठ लांब, सपाट, पाय मोठे, खूर नरम असून जनावर बरेंच उंच असतें. कास मोठी लोंबती व मांसल असते. आंचळ मोठे व पिळण्यास कठिण असतात. ही जात मोठाड (थोराड) असल्यामुळें खावयास लागणाऱ्या खर्चाच्या मानानें गिरनार अरण्याशिवाय इतर ठिकाणीं फायदेशीर ठरत नाहीं. या जातीच्या गाई काठेवाडांत बरेंच दूध देतात परंतु दुसरीकडे नेल्यास दुधाळा कमी येतात. या गाई बरेच महिने भाकड राहतात;

व लवकर आटतातहि. काठेवाडांत या गाईला ६०–७५ रुपये किंमत पडते. बैल मोठे धिप्पाड असतात. वशिंड गाईपेक्षां बैलांत मोठें वाढलेलें असतें. हे बैल जोराच्या कामाला फारच उत्तम असतात. ही जात सर्वत्र पसरलेली आहे. या जातीच्या गाई मारवाडी, गुजर, वाणी व इतर व्यापारी लोक जेथें जेथें व्यापाराकरितां जातात व रहातात तेथें तेथें ते बरोबर घेऊन जातात.

काक्रेजी (वढीयाल).— या जातीचें मुख्य वस्तिस्थान पालनपूर संस्थानापैकीं कांक्रेज हें होय. हें जनावर दिसण्यांत मोठें उमदें असून त्याची नेहमीं उभें रहाण्याची ठेवण ताठ, डोकें वर केलेली अशी असते. कपाळ जरासें खोलगट असतें व उंच, पिळदार व उभ्या शिंगांमुळें हें जनावर एकंदरींत सुरेख व मनांत भरण्यासारखें असतें. शिंगांचें बूड एक दोन इंच केसांनीं वेष्टिलेलें असतें. रंग पांढरा किंवा करडा असतो. जनावर थोडेंसें उंच असतें; पण बाकीचा एकंदर बांधा, पाय, चेहरा वगैरे रेखीव असतो. कान मोठे व लोंबते असतात. गळ्याखालची पोळी व बेंबटाजवळची कातडी बऱ्याच प्रमाणांत वाढलेली असते. वशिंड फारच भव्य असतें. एकंदरीत जनावराचें शरीर स्थूल, कान लांब, कपाळ पसरट, शिंगें दिवटीं व चाल डुलकी यामुळें हें जनावर दिसण्यांत गंभीर दिसतें. तें चपळ व सहनशील असल्यामुळें हलक्या व भारी दोन्ही प्रकारच्या शेतीच्या कामाला योग्य असतें. या जातीच्या गाई गुजराथेंत सिंधी गाईइतकें दूध देतात. या जातीची पैदास करणारे लोक रब्बारी होत. ते बियाणूंची, गाईंची व वांसरांची फार काळजी घेतात. गोऱ्हे सहा महिन्याच्या आंतच खच्ची करतात. या जातीची पैदास जेथें होतें तेथें मुबलक चराऊ जमीन व भरपूर पाणी आहे. ही जात निर्भेळ असल्यामुळें ओळखण्यास पंचाईत पडत नाहीं. सर्व जनावरें सारखींच दिसतात. या जातीचीं जनावरें अमेरिकेपर्यंत गेलेलीं आहेत.

गुजराथी—या जातीचीं गुरें अहमदाबाद, खेडा व बडोदे सरकारचें राज्य येथें पैदा होतात. हीं गुरें काक्रेजीसारखीं दिसत असून कित्येक वेळां तीं त्यांपेक्षांहि मोठीं असतात. त्यांची पैदास करणारे लोक बियाणूंची फारशी काळजी घेत नाहींत. यात माळवी व खानदेशी जातींची बरीच भेसळ झालेली आढळते.

तलबदा.—दक्षिण गुजराथेंत व सुरत जिल्ह्यांत या नांवाची जात आढळते. ती दिसण्यांत काक्रेजसारखीच दिसते; पण आंगलटांत जरा लहान व त्यांची पोळी व पोटाखालची कातडी कमी वाढलेली असते. शिवाय कान लहान, खूर मजबूत आणि शेपूट लांब व जाडीला कांक्रेजीपेक्षां कमी असते.

म्हशी.—हिंदुस्थानांत दुधासाठीं म्हशी पाळीतात. कांहीं कांहीं ठिकाणीं पावसाळी भागांत टोणग्यांचा उपयोग शेतकामाकडे करतात. टोणगा बैलापेक्षां फार मजबूत असतो. पखालीकरितां बहुतेक टोणगाच वापरतात. म्हशीचें मूळ स्थान तिबेट असावें. हिंदुस्थानांत, आरचीपेलेगो, मेसापोटेमिया व दक्षिण यूरोपांत कांहीं ठिकाणीं हें जनावर आढळतें. म्हशीच्या जातीला पाणी फार आवडतें. तथापि जातवान म्हशी बेतशीर पावसाळी भागांतच आढळतात. त्यांची चामडी रंगानें काळी व दिसण्यांत चकचकीत असते. ह्या जनावरास उन सहन होत नाहीं. त्यांना रोज एक दोन वेळ धुवावें किंवा नदींत बसवावें. त्यांच्या अंगावरील केंस पातळ असल्यामुळें त्यांत नेहमीं गोचिड, उवा, सुळे वगैरे प्राणी उत्पन्न होतात. यासाठीं म्हशींना वर्षांतून दोन वेळ भादरावें व नेहमीं त्यांचें अंग घांसून पाण्यानें धुवावें. म्हशीच्या व गाईच्या जातींत बराच फरक आढळून येतो. म्हशीचें दूध गाईपेक्षां जास्त सत्वशील असतें. म्हशीला वशिंड किंवा कोळें नसतें. त्यांचा अवाज गाईपेक्षां वेगळा असतो. म्हशी गाईपेक्षां फार खोडकर असतात. वासरूं मेल्यास, गवळी बदलल्यास किंवा इतर क्षुल्लक कारणानेंहि कांहीं दिवस त्या दूध देत नाहींशा होतात. गाईपेक्षां म्हशीच्या जाती कमी आहेत. (१) दिल्ली. (२) जाफराबादी, (३) सुरती, अगर नडियादी (४) नागपुरी अगर वऱ्हाडी (५) दक्षिणी (६) गवळी अगर होळेसाळ, (७) शिरगुजी. शिरगुजी ही जात देशी म्हैस व जंगली टोणगा यांची अवलाद असावी. ही जात मध्यप्रांतांतील जमीनदारी व छत्तीसगड भागांत आढळते. हें जनावर मानेंत जाड असून याचीं शिंगें व खांदा अगदीं जंगली टोणग्यासारखा असतो. टोणगा ताकदवान असून, म्हैस दुभत्याच्या कामीं अगदीं कमी प्रतीची असते

हिंदुस्थानांत आढळणाऱ्या म्हशीच्या जातीचें वर्णन पुढें दिलें आहे:—

दिल्ली अगर मुरा.—या जातीचें मुख्य वसतिस्थान रोहटक हें दिल्लीजवळ पंजाबांत आहे. या जातीच्या म्हशी दिल्लीहून दुसरीकडे जातात म्हणून या जातीस दिल्ली हें नांव प्राप्त झालें आहे. या जातींत शिंगें गुंडाळलेलीं असतात. म्हणून त्यांना ' खुंदी ' असेंहि म्हणतात. दिल्ली म्हशी विकण्याकरितां मुंबईंत आणितात; व त्यांचा 'मिलिटरी डेरी फार्म'मध्यें सर्वत्र प्रसार झाला आहे. या जातीच्या म्हशी मोठाड (थोराड) असून लांबीला कमी असतात. पाठीमागील भाग रुंदट असून पुढें निमूळता झालेला असतो. कांस मोठी व चांगल्या आकाराची असते. या जातींत दुभत्या जनावरांचे गुण बरेच आढळून येतात. त्या नियमितकाळीं वितात व दूधहि पुष्कळ देतात. जनावर मोठें असल्यामुळें त्यास खाणें जास्त लागतें म्हणून या जातीच्या म्हशी गरीब लोक क्वचितच पाळतात. चांगल्या अवलादीची म्हैस रोज २५ ते ३५ पौंडपर्यंत दूध देते. म्हशीची उंची सुमारें ५३ इंच असून छातीचा घेर १०३ इंचपर्यंत असतो.

सुरती अगर नडियादी.—ही जात उत्तरगुजराथेंतील खेडा जिल्हा, बडोद्याचें राज्य व मुख्यत्वेंकरून चरोत्तरांत आढळते. या म्हशी दक्षिणी व वऱ्हाडीपेक्षां थोड्या मोठ्या असून त्यांची शिंगें त्या दोहोंपेक्षां आंखूड असतात. हें जनावर एकंदरींत आकारमानांत मध्यम, बांधेसूद व आटपसर असतें. मागील भाग रुंद असल्यामुळें कांसेला भरपूर जागा मिळून तिची ठेवण सारख्या प्रमाणांत असते. ही जात दुधाला चांगली असून मध्यम प्रतीच्या लोकांनां बाळगण्याजोगी आहे. हिची उंची सुमारें ५३ इंच असून छातीचा घेर ७४ इंचांपर्यंत असतो.

जाफराबादी—गीरगाई व या जातीच्या म्हशी यांचें मूलस्थान दक्षिण काठेवाड होय. या पूर्वी जाफराबाद बंदरांतून रवाना होत असत म्हणून त्यांना 'जाफराबादी' हें नांव प्राप्त झालें असावें. मुंबई इलाख्यांतील दुभत्या जनावरांत हें मोठाड (थोराड) जनावर होय. या म्हशी अवजड असून त्यांच्या कपाळाचें हाड रुंद व पुढें आलेलें असतें. या जातींत शिंगें, कान व डोकें हीं विशेष प्रकारचीं असतात. यांचा पुढचा भाग, मागच्या भागाच्या मानानें जास्त अवजड असतो. ही जात गिरनार प्रदेशांत पुष्कळ दूध देते. परंतु ती बाहेर देशीं नेल्यावर दुधाचें प्रमाण कमी पडतें. या म्हशी फार दिवस भाकड रहातात व लवकर आटतात. त्यांच्या मोठ्या आकारामुळें त्यांनां खाणें जास्त लागतें व दुधाचें उत्पन्न बेताचेंच असतें. म्हशीची उंची सुमारें ५७ इंच असून छातीचा घेर अजमासें ८८ इंच असतो.

दक्षिणी.—ही जात देशावर, कर्नाटकांत, खानदेश, निजामचें राज्य व वऱ्हाड या ठिकाणीं सर्वत्र आढळते. कोंकणांतील म्हशी याच जातीच्या असून त्या बऱ्याच लहान असतात. दक्षिणी म्हशींचा एकंदरीनें आकार सुरती म्हशींपेक्षां लहान असून शिंगें मात्र फार लांब असतात. कांस लहान असून दुधाचें मानहि फार कमी असतें.

वऱ्हाडी अगर नागपुरी.—या जातीच्या म्हशी मध्यप्रांतांतील वर्धा, यवतमाळ, इलिचपूर इत्यादि जिल्ह्यांत व लगतच्या निजामच्या राज्यांत गवळी लोक पाळतात. या म्हशी खानदेशांत व सोलापुरांत फार नेतात. वऱ्हाडी म्हशी दक्षिणी म्हशींपेक्षां थोड्या मोठ्या असून त्यांचीं शिंगें दक्षिणीपेक्षां मोठीं, लांब व अणकुचीदार असतात. या दक्षिणीपेक्षां दूध जास्त देतात पण लवकर आटतात. या जातीचे टोणगे वसुदेव खरेदी करून छत्तीसगड व तेलंगण येथें नेऊन विकतात.

गवळी व होलेसाळ.—बेळगांव व धारवाड जिल्ह्यांत दोन जातींच्या म्हशी आढळतात. त्यांना गवळाऊ आणि होलेसाळ अगर जवारी (जवारी = गांवठी) म्हणतात. पहिल्या जातीच्या म्हशी सोलापूर, पंढरपूर व निजामच्या राज्यांतून आणतात व दुसऱ्या जातीच्या म्हशींची पैदास कृष्णा व घटप्रभा नद्यांच्या कांठीं होते. या दोन्ही जाती आकारांत व ठेवणींत मध्यम असून गवळाऊ, मात्र थोडीशी मोठी असते व तिचीं शिंगें लांब व पसरट असतात. या म्हशी रंगांत बहुतेक काळ्या असून पुष्कळ जनावरांत कपाळावर पांढरा ठिपका असतो. या जातीच्या म्हशींत घाऱ्या डोळ्याच्या म्हशी फार आढळतात. या म्हशी होलेसाळपेक्षां जास्त दूध देतात.

होलेसाळ यांची ठेवण लहान असून त्या सामान्यतः शेतकरी लोक पाळतात. या दूध थोडें देतात व लवकर आटतात. कृष्णाकांठीं वगैरे जेथें यांनां चरावयास भरपूर मिळतें तेथें त्या बरेंच दूध देतात. या जातीचे टोणगे कोंकणांत शेतकामाला चांगले समजले जातात.

दु भ त्या ज ना व रां चीं ल क्ष णें.—जनावर जातिवंत असून खोडकर किंवा रोगी नसावें. त्याचप्रमाणें तें शांत स्वभावाचें असावें; कारण तापट स्वभावाची गाय अगर म्हैस लवकर बिथरते व दूध देत नाहीं. जनावर अंगानें सडपातळ असून त्याचा आकार पुढ्याकडे जाड व रुंद असून पुढें निमुळता असावा. पुढ्याकडील भाग असा असल्यास गर्भास पोटांत रहाण्यास मुबलक जागा सांपडते. व तेथें त्याची वाढ चांगली होते. तोंड लहान, जबडा मोठा, कपाळ रुंद, मान बारीक, छाती लांबट, कोठा मोठा व मागील भाग जरा उचललेला असावा. मोठया जबडयाचीं व मोठया कोठयाचीं जनावरें पुष्कळ खातात व पुष्कळ दूध देतात. अंगावरील कातडें पातळ व केंस नरम असणें हें सुद्धां दुभत्या जनावराचें एक चांगलें लक्षण आहे. गुडघ्याखालील पायांचीं हाडें आंखूड असावीं, कांस फार लोंबती नसावी व आंचळांचा एके ठिकाणीं झुबका नसावा. त्यांची ठेवण चार कोंपऱ्यांवर व सारख्या अंतरावर असणें चांगलें. आंचळ मुके नसावे. चारहि आंचळांतून दूध येत असावें. कांहीं जनावरांनां चोहोंपेक्षां अधिक आंचळ असतात. खडकी (पुणें) येथील गोशाळेंत एका म्हशीला सहा आंचळ असून त्या सर्वांतून दूध येत असे. दुधाचें प्रमाण कांसेवर अवलंबून नसून पोटाखालून जाणाऱ्या दूधवाहिन्यांच्या आकारावर असतें. या वाहिन्या पोटाखालून जात असतांना वांकडया वांकडया जात असल्यास चांगलें. हे वर निर्दिष्ट केलेले गुण सर्व दुभत्या जातींत सांपडतात असें नसून त्यांपैकीं बरेच गुण उत्तम दुभत्या जनावरांत आढळून येतात. उदाहरणार्थ सिंधी, एडन गाईंच्या जाती व दिल्ली आणि सुरती म्हशींच्या जाती.

बि या णू (पोळ, सांड, वळू)चीं लक्ष णं.—चांगली पैदास होण्यास गाय व बियाणू हीं दोन्ही जातिवंत व निर्मळ अवलादीचीं असलीं पाहिजेत. असें असतांहि त्यांतल्या त्यांत पैदाशीच्या दृष्टीनें बैलाचें महत्त्व अधिक आहे. कारण गाय जर वाईट अवलादीची असेल तर तिचें वासरूं मात्र वाईट

निघेल; परंतु जर वियाणू वाईट असेल तर सर्व कळपच वाईट निपजेल. याकरितां बियाणूची पूर्वपीठिका माहीत असणें जरूर आहे. तो सुदृढ व बांधेसूद असावा. तो अशक्त अगर रोगी असल्यास त्यापासून होणारीं वांसरेंहि तशींच निपजतील. त्याचा पुढील भाग रुंद असावा; असें असल्यानें त्याच्या काळजाला व फुप्फुसाला भरपूर जागा सांपडते. त्याच्या बरगड्या मजबूत असून त्याचीं हाडें कणखर असावीं. त्याचप्रमाणें तो चपळ असून दिसण्यांत सुंदर असावा. बियाणूची निवड करतेवेळीं त्याची अवलाद कोणत्या कामाकरितां उपयोग करण्यांत यावयाची आहे त्याप्रमाणें त्याचीं लक्षणें पाहून निवड करावी.

(१) आउताच्या कामीं बैलांची पैदास करणें असल्यास वळू धष्टपुष्ट, मजबूत बांध्याचा, कणखर खुरांचा व हाडांचा असून त्याची मान व खांदा मजबूत व आंखूड असावीं.

(२) पळण्याच्या किंवा गाडीच्या कामीं उपयोगी पडणाऱ्या बैलाची निपज करावयाची असल्यास वियाणू सडपातळ, लांबट बांध्याचा, जरासा उंच पातळ व नरम कातडीचा व चालण्यास चपळ असावा.

(३) दुभत्या जनावरांची पैदास करावयाची असल्यास बियाणू जास्त दूध देणाऱ्या गाईचा असावा; कारण जास्त दूध देणें हें आनुवंशिक संस्कारांचें फल असून, पूर्वी निवड करूनच उत्पन्न झालें असलें पाहिजे. खाण्यापिण्याच्या व्यवस्थेनें सुद्धां दुधांत थोडा बहुत फरक होतो. उत्तम गाय व उत्तम बियाणू असल्यास त्यांची अवलाद उत्तम होऊन त्यांत आईबापांचे गुण जास्त उतरून प्रजा जास्त दूध देते. सुमारें पन्नास गाईच्या कळपांत एक बियाणू ठेवावा व तो दर पांच वर्षांनीं बदलावा.

का मा च्या बै लां चीं ल क्ष णें.—काम करणारे बैल मजबूत व धष्टपुष्ट असावे. त्यांचा खांदा व मान आंखूड असावी, डोळे पाणीदार असावे, पाय उभे, सरळ, काळ्या खुरांचे कणखर, व आंखूड नळीचे असावेत. गाडीच्या बैलांच्या पायाची नळी लांब असावी. पुढ्याकडील भाग उतरता असल्यास बैल बहुतकरून चपळ असतो.

गाडीच्या कामास बैल लांबट असावा. तो बुजरा नसावा, पोळी व बेंबटावरील कातडी फारशी वाढलेली नसावी. कारण ही कातडी चालतांना अडचण करिते. खुऱ्या काळ्या असाव्यात, त्या मजबूत असतात. गाजऱ्या खुरीचे बैल पायांत नाजूक असतात. ते लवकर झिजतात. अशा खुरींचीं जनावरें ढेकळें असलेल्या शेतांत काम करतांना लवकर लंगडी होतात. गाई म्हशींचें दूध व त्यांचे गुणधर्म यासंबंधानें माहिती ' दूध दुभतें ' या लेखाखालीं मिळेल.

गागाभट्ट व त्याचें घराणें—गागाभट्टाचें घराणें हें मूळचें पैठणचें होतें. दुर्गादेवीच्या दुष्काळांत (इ. स. १४६८–७५) पैठण व पुणतांबें येथें मोठीं प्राचीन संस्कृत विद्यापीठें होतीं. त्यांचा आश्रय बंद पडून महाराष्ट्रांतील जीं अनेक पंडित घराणीं देशत्याग करून काशीस जाऊन राहिलीं त्यांतच गागाभट्टाचेंहि घराणें असावें. सन १४५० च्या सुमारास गोविंदभट्ट नांवाचा विश्वामित्रगोत्री ऋग्वेदी ब्राह्मण (आश्वलायन सूत्री) पैठणास रहात होता. गोविंदभट्टाचा पुत्र रामेश्वरभट्ट याचें पैठणास विद्यापीठ असून तें शिष्यवर्गानें गजबजून गेलेलें असे. या विद्यापीटास गाधिजवंशानुचरित्रांत ' श्रीरामचंद्राच्या सैन्याची छावणी ' अशी उपमा दिली आहे. निजामशहानें रामेश्वरभट्टाचा बहुमान केला होता. पण त्याजवर लवकरच दुष्काळामुळें देशत्याग करण्याची पाळी आली. तो विजयानगरच्या कृष्णदेवरायास भेटून द्वारकेस जात असतां रस्त्यांत त्यास नारायणभट्ट नांवाचा पुत्र झाला (इ. स. १५१४). द्वारकेस शिष्यशाखा व विद्यापीठ स्थापून तो परत पैठणास येऊन चार वर्षे राहून मग काशीस गेला. काशीस गेल्यावर ह्या घराण्यांत अनेक विद्वान पुरुष निपजले. त्यांपैकीं पुष्कळांचे हिंदुधर्मशास्त्रावरील ग्रंथ हल्लीं उपलब्ध आहेत. रामेश्वराचे शिष्य हिंदुस्थानांतील सर्वप्रांतीय होते. रामेश्वर हे रामोपासक होते. गोविंदभट्ट व रामेश्वरभट्ट यांनीं पुष्कळ ग्रंथ लिहिले पण ते हल्लीं उपलब्ध नाहींत. नारायणभट्टाचा लौकिक काशींत मोठा आहे. काशींतील विश्वेश्वराचें मंदिर नारायणभट्टानेंच बांधिलें. नारायणभट्ट काशीस असता मोठा दुष्काळ पडला तेव्हां भट्टानें भागीरथींत अनुष्ठान करून विपुल पाऊस पाडविला, त्यामुळें मुसुलमान अधिकाऱ्यानें त्याचा हा प्रभाव पाहून विश्वेश्वराचें पाडलेलें मंदिर पुन्हां बांधण्याची त्यास परवानगी दिली असें सांगतात. हा मोठा मीमांसक होता. त्याचे बारा ग्रंथ मार्तंड नांवानें प्रसिद्ध असून त्यांतील मुहूर्तमार्तंड हा स. १५७१ त लिहिलेला आहे. यानें बंगाल व बहार येथील पंडितांनां जिंकिलें. गया, काशी व प्रयाग या तीन क्षेत्रांत तीर्थविधि कसा करावा याबद्दलचा त्रिस्थळीसेतु नांवाचा ग्रंथ यानें लिहिला. राजा तोडरमल्लाचा व याचा चांगला स्नेह होता. त्यानें बंगालचा सुभेदार असतां बंगालचा (नवद्वीप) विद्यानिवास वंगोपाध्याय व मिथिला येथील इतर विद्वान पंडित यांचा व नारायणभट्टाचा वादविवाद करविला, त्यांत भट्टानें सर्व पंडितांस जिंकिलें. याचा धर्मप्रवृत्ति हा ग्रंथ दाक्षिणेंत व प्रयोगरत्न ग्रंथ उत्तरेकडे प्रमाणभूत मानितात. प्रयोगरत्नालाच नारायणभट्टी नांव आहे. (याचें गुजराथी भाषांतर बडोद्यास झालें आहे). यानें वेदांतविषयांत अनेक संन्याशांशीं वाद करून त्यांनां जिंकिलें. अकबराच्या दरबारीं याची मोठी प्रतिष्ठा होती. त्याचे मुलगे रामकृष्णभट्ट व शंकरभट्ट हे विद्वान असून त्याचे ग्रंथ सर्वमान्य आहेत. तंत्रवार्तिकव्याख्या, ज्योतिष्टोमपद्धति व जीवत्पितृकनिर्णय हे रामकृष्णाचे व द्वैतनिर्णय आणि आचाररत्न हे शंकराचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. प्रख्यात सिद्धांतकौमुदीकर्ता भट्टोजी दीक्षित हा शंकराचा शिष्य होय.

शंकरभट्ट याचा पुत्र नीलकंठभट्ट हा व्यवहारमयूख इत्यादि बारा मयूखांचा कर्ता आहे. रामकृष्णभट्टास दिनकरभट्ट (दिवाकरभट्ट), कमलाकरभट्ट व लक्ष्मणभट्ट असे तीन पुत्र होते. हे तिघेहि मोठे मीमांसक म्हणून प्रसिद्ध आहेत. पैकीं दिनकरभट्टाचे बारा ग्रंथ दिनकरोद्योत संज्ञेचे आहेत. कमलाकरभट्टानें कमलाकर संज्ञेचे बारा ग्रंथ लिहिले. पैकीं निर्णयकमलाकर यासच निर्णयसिंधु असें म्हणतात.

हा ग्रंथ त्यानें स. १६१२ त रचला. याचे पूर्तकमलाकर, शांतिकमलाकर, शूद्रकमलाकर, विवाहकमलाकर हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. लक्ष्मणभट्टाचे आचाररत्न वगैरे ग्रंथ आहेत. कमलाकराचे अनंत, प्रभाकर व श्याम असे तीन पुत्र होते. अनंताचा रामकल्पद्रुम ग्रंथ प्रसिद्ध आहे. वर आलेला नीलकंठभट्ट हा १७व्या शतकाच्या आरंभीं बुंदेलखंडांत सागरवंशी भगवंतदेवाच्या दरबारीं होता आणि त्याच्या आज्ञेवरूनच नीळकंठानें १२ मयूख केले. याचा भाऊ दामोदर यानें द्वैतनिर्णय परिशिष्ट वगैरे ग्रंथ लिहिले. नीलकंठाचा मुलगा शंकर याचे व्रतार्क वगैरे बारा ' अर्क ' प्रसिद्ध आहेत.

गागाभट्ट हा दिनकरभट्टाचा पुत्र असून त्याला बापानें गागा असें लाडकें नाव दिलें व तेंच पुढें प्रसिद्ध झालें. त्याचें खरें नाव विश्वेश्वर होतें. त्यानें उत्कृष्ट विद्या संपादन करून आपल्या घराण्याचा लौकिक वाढविला. काशीस राहिल्यावरहि ह्या घराण्याचे शरीरसंबंध दक्षिणेंत होत असत. शिवदिननाथाचा गुरु केसरीनाथ हा गागाचा मामा होता. मीमांसा, न्याय, अलंकार व वेदान्त या विषयांत गागाभट्टाची प्रवीणता विशेष होती. दिनकरोद्योत ग्रंथांत त्याच्या बापानें पुष्कळ विषय सोपे म्हणून सोडून दिले होते त्यांची पूर्तता गागाभट्टानें केली. त्यामुळें हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणीप्रमाणेंच दिनकरोद्योताची योग्यता मोठी आहे. जैमिनी सूत्रांवर गागाभट्टाची टीका आहे. शिवाय न्यायशास्त्रावरील भट्टचिंतामणि व कायस्थधर्मप्रदीप उर्फ गागाभट्टी हे त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. गागाभट्ट शके १५९५ (स. १६७३) त दक्षिणेंत आला व शके १५९६ च्या हिंवाळ्यांत काशीस गेला असा अंदाज आहे. या सुमारासच बाळाजी आवजीनें गागाभट्टाकडून कायस्थधर्मप्रदीप उर्फ गागाभट्टी रचून घेतला. तो बहुधा शके १५९६ तील ज्येष्ठ शु. १३ व वद्य ९ यांच्या दरम्यान संपूर्ण झाला असावा. छत्रपतींच्या ग्रंथालयांत न्यायाधीश व पंडितराव या पोथीचा उपयोग करीत. कायस्थांचे धर्म, आचार व संस्कार बाळाजी आवजीच्या संमत्तीनें गागाभट्टानें ठरवून दिले. यांत महाराजांच्या राज्यारोहणाचा उल्लेख आहे. यांत वेदमंत्रांचे अर्थ संस्कृत अनुष्टुप्छंदांत आणून ठेविले असून सर्व संस्कार अमंत्रक दिले आहेत. राजवाडे यांनां सातारकर महाराजांच्या दप्तरांत एक पोथी सांपडली तींत हा कायस्थधर्मप्रदीप व शिवराजप्रशस्ति अशीं दोन प्रकरणें आहेत. काव्य ह्या दृष्टीनें प्रशस्तीची किंमत तसल्याच इतर प्रशस्त्यांहून अधिक नाहीं. ती शके १५९५ च्या मार्गशीर्षानंतर रचलेली दिसते. प्रशस्तींत मुसुलमानांचा निर्देश दैत्य शब्दानें केला आहे व महाराजांनीं ब्राह्मण्यरक्षण व श्रुतिस्मृतिशास्त्रांचा उद्धार केला असें म्हटलें आहे. तसेंच विजापूरकर बहलोलखानाची छाती फोडल्याचा (पराभव केल्याचा शके १५९५ चा) हि उल्लेख आहे.

गागाभट्टाच्या विद्वत्तेसंबंधानें दक्षिणेंत मोठा लौकिक असून दक्षिणेंतील ब्राह्मणवृंदावर त्याची छाप मोठी होती. त्यास मराठी राज्याचा व दक्षिणी पंडितांचा विशेष अभिमान असून शिवाजीचा लौकिक माहित होता. त्याच्या मनांत शिवाजीविषयीं आदर असल्यामुळें त्यानें मुद्दाम दक्षिणेंत येऊन आणि पैठण वगैरे ठिकाणच्या अनेक विद्वानांचें अनुमत घेऊन शिवाजीचा राज्याभिषेक नेटानें पार पाडला, शिवाय महाराष्ट्रराज्यसंस्थापना ही महाराष्ट्रीय पंडिताकडून होण्यांत एक प्रकारें औचित्यहि होतें.

सोळाव्या व सतराव्या शतकांत हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांच्या व मुसुलमान बादशहांच्या दरबारीं या घराण्यांतील विद्वान् पुरुषास मोठा मान मिळत असून धर्मकृत्याच्या प्रसंगीं त्यांस बोलावण्यांत येत असे. अद्यापीहि बनारस येथें त्या घराण्यास अग्रपूजेचा मान मिळतो. भट्टघराण्यास " तें जनतेचें (सेवा करणारें) घराणें होतें " असें कै. मंडलिक म्हणतात.

लोकांच्या धर्मव्यवस्थेचे निबंधग्रंथ या भट्टांनीं लिहिले म्हणून मोठ्या धर्मकृत्यांच्या प्रसंगीं भट्ट घराण्यांतील पुरुषास अध्यक्षस्थान देण्याचा रिवाज सर्वत्र आहे. या ग्रंथांत जुन्या स्मृती जमेस धरून व ठिकठिकाणचे आचार संकलित करून त्यांनीं व्यवस्थित पद्धती बांधून दिल्या. एकाच घराण्यांत असे एकसारखे विद्वान पुरुष निपजल्याचीं उदाहरणें फारच थोडीं आढळतील. कमलाकर भट्टाचे वंशज कांतानाथभट्ट (मिर्झापूर येथील संस्कृत पाठशाळेचे अध्यापक) यांनीं भट्टवंशकाव्य नांवाचा ग्रंथ लिहिलेला आहे. [मराठी रियासत पूर्वार्ध, स. १९१५; विविधज्ञान विस्तार वर्ष ४५ अ. १२; भा. इ. मं. चतुर्थ संमेलनवृत्त.].

गांगेयदेव—हा चेदीदेशाचा राजा असून कलचुरीवंशाचा होता. याची कारकीर्द १०१५–१०४० पर्यंत असून हा मोठा महत्वाकांक्षी व शूर होता; त्याच्या मनांत उत्तरहिंदुस्थानांत साम्राज्यसत्ता स्थापण्याचें होतें व ती आपली मनीषा त्यानें बरीच पूर्ण हि केली होती. तिरहुतपर्यंत त्याचें राज्य वाढलें होतें; तिरहुत हा प्रांत त्याच्या ताब्यांत १०१९ त आला होता. याच्या पश्चात याचा मुलगा कर्णदेव यानेंहि आपलें राज्य गुजराथच्या भीमदेवाच्या सहाय्यानें वाढविलें. [स्मिथ—अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया.].

गाग्रा—पंजाबांतील एक जात. लोकसंख्या (१९११) ३१५५. हे मुख्यतः हिंदु व मुसुलमान आहेत. ते लाहोरच्या आसपास आढळतात. ते किडे धरीत गांवोगांव हिंडतात व

किडे खातात. परंतु त्यांचा परंपरागत धंदा जळवा पकडून त्या लावणें हा होय. या धंद्यावरून त्यांना जुकेश म्हणतात. [पंजाब से. रि. १९११].

गाग्रौन—राजपुताना. कोटा संस्थानच्या कनवास जिल्ह्यांतील एक किल्ला; व खेडें. अहू व कालीसिंध नद्यांच्या संगमावर हें वसलेलें आहे. हा किल्ला राजपुतान्यांत सर्वांत भक्कम असून दोड रजपुतांनीं बांधिला आहे. १२ व्या शतकाच्या अखेरीस त्यांच्याच ताब्यांत होता. त्यांच्या नंतर खीची चव्हाण आले. जेठसिंगच्या कारकीर्दीत अल्लाउद्दीननें १३०० सालीं वेढा दिला होता तो ह्या लोकांनीं मागें हटविला. राजा अचलदासाच्या कारकीर्दीत माळव्याच्या हुसंगशहानें हें स्थान घेतलें. मुसुलमान इतिहासकार म्हणतात कीं १५१९ मध्यें हा गांव कोणी भीमकरणाच्या ताब्यांत होता; व त्यावर महंमद खिलजीनें हल्ला करून त्यास कैद केलें व ठार मारिलें.लवकरच मेवाडच्या राणा संग्रामसिंगानें महंमदाचा पराजय केला व पुढें १५३२ पावेतों गाग्रोन रजपुताकडेच राहिलें. १५३२ मध्यें गुजराथच्या बहादूरशहानें हें गांव घेतलें. पुढें सुमारें तीस वर्षांनीं अकबर माळव्याच्या स्वारीवर जात असतां येथील किल्लेदार त्यास शरण आला. गाग्रोन हा माळव्याच्या सुभ्याचा एक सरकार होता असें ऐने इ अकबरींत म्हटलें आहे. १८ व्या शतकाच्या सुरवाती पर्यंत तो त्याजकडेसच राहिला. ह्या वर्षी तो महाराव भीमसिंग (कोटा) ह्यास बादशहाकडून इनाम मिळाला. नंतर ह्याची डागडुजी वगैरे करण्यांत आली. गांवाभोंवतीं व किल्ल्याभोंवतीं एक उंच भिंत असून शिवाय खंदक आहे. हा गांव प्राचीन आहे. ह्यास गर्गाशास्तर म्हणत असत. कारण श्रीकृष्णाचा पुरोहित गर्गाचार्य येथें रहात असे अशी समजूत होती. कोणी म्हणतात ह्या गांवास गर्गरातपूर म्हणत असत. गर्गनामक हिंदु ज्योतिषानें येथूनच रेखांश मोजण्यास सुरुवात केली. कोटा दरबारची पूर्वी येथें टांकसाळ होती. येथून आग्नेयीस ११ मैलांवर मऊ नांवाचें खेडें आहे. हें सुरवातीस खीची रजपुतांच्या राजधानीचें शहर होतें. पश्चिमेस एक मोठा पडका वाडा आहे. तो पृथ्वीराज चव्हाणाचा आहे असें म्हणतात.

गाजर—यास लॅटिनमध्यें डॉकस कॅरोटा, इंग्रजींत कॅरट, संस्कृतमध्यें गर्जर, पिंडमूल, मराठींत गाजर इत्यादि नांवें आहेत.

मू ल स्था नः—या रोपाचें मूलस्थान काश्मीर आहे. पश्चिम हिमालयावरहि ५००० फुटांपासून ९००० फूट उंचीवर हें रोप वाढतें. युरोप, अॅबिसीनिया, उत्तर आफ्रिका, मदिरा, अझोर्स बेटें व उत्तर आशिया हीं देखील या रोपाचीं मूलस्थानें आहेत असें मानण्यांत येतें.

सबंध हिंदुस्थानभर या रोपाची लागवड होते. कित्येक भागांत हिरवट पांढुरकें गाजर पसंत केलें जातें. याचें रोप जमिनीवर दोन किंवा तीन इंच वाढतें, व मूळ खडबडीत असून त्याला यूरोपीय गाजराची चव नसते. कडक उन्हाळ्यांत देखील हें रोप जिवंत असूं शकतें, आणि कांहीं कांहीं भागांत तर बाराहि महिने होऊं शकतें. गाजर कंदासारखें जमिनींत होतें. झाड हात सवा हात वाढतें. ह्याचें उत्पन्न बाराहि महिने होतें.

इतिहासः— सर जॉर्ज वर्डवूड यानें गाजराचा इतिहास लिहिला आहे. हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून लोक याचा उपयोग करीत आहेत. बाबरच्या आत्मचरित्रांत, ऐने इ अकबरींत, टेरी व फ्रायर यांच्या ग्रंथांत गाजराचा नामनिर्देश व त्याचें वर्णन आलें आहे. हें रोप मध्यआशियामधून यूरोपांत नेण्यांत आलें. जेव्हां यूरोपमध्यें या रोपाविषयीं कांहींच माहिती नव्हती तेव्हां हिंदुस्थानांत या भाजीची लागवड करून ती खाण्याचा प्रघात रूढ होता.

गाजर कंदासारखें जमिनींत वाढतें. हें लांबट असून त्याचा रंग तांबुस असतो. गाजराचें झाड हात सवा हात वाढतें. दिल्लीकडे गाजरें सर्वोत्कृष्ट असतात. गाजराच्या पिकास मध्यम, काळी किंवा मिश्र जमीन चांगली असते, गाजराच्या लागवडीच्या जमिनींत नांगरटीच्या पूर्वी दर एकरीं सुमारें १०–१२ गाड्या शेणखत देतात. जमीन चांगली तयार झाल्यावर आगष्ट सप्टेंबरांत सुमारें पांच ते सात पौंड बीं पाभरीनें पेरतात. कित्येक वेळीं तें फेंकून पेरितात. ओळींत अंतर सुमारें नऊ ते बारा इंच ठेवितात. बीं फार बारीक असल्यामुळें तें पेरण्यापूर्वी त्यांत राख अगर बारीक माती मिसळतात. या पिकाला दोनतीन खुरपण्या व पांच सहा वेळ पाणी द्यावें लागतें. ओल भरपूर असल्यास हें पीक कोरडवाहूंतहि करितात. बीं पेरल्यापासून सुमारें चार महिन्यांत पीक काढण्यास तयार होतें. दर एकरीं सरासरी उत्पन्नः—पाणभरतें. उत्पन्न १६ हजार ते२० हजार पौंड व कोरडवाहू ५ हजार ते १० हजार.

हिरवीं गाजरें भाकरीबरोबर खातात व त्यांची भाजीहि होते. गाजरें उकडूनहि खातात. गरीब लोक दुष्काळांत गाजरांवरच दिवस काढतात. गाई म्हशी वगैरे जनावरांस गाजरें चारलीं असतां तीं पुष्ट होऊन दूध बरेंच देतात. रोज सुमारें दर जनावरास २० पौंडांचा रतीब देण्यास हरकत नाहीं.

गांजा व भांग,—या झाडास संस्कृतमध्यें विजया; लॅटिनमध्यें कॅनॅबिस सॅटिव्हा,इंग्रजींत इंडियनहेंप, हिंदुस्थानींत भंग, गांजा, सबझी, इत्यादि नांवें आहेत. हें झाड रानटी स्थितींत अनेक ठिकाणीं सांपडत असल्यामुळें याचें मूलस्थान नक्की समजत नाहीं.

' भंग शब्दाचा उल्लेख अथर्ववेदांत असून तेथें त्याचा ' पवित्र ' गवत या अर्थी उल्लेख सांपडतो. सोम, कुश, भंग, यव व सह या हवनीय वनस्पतींत भांग आहे. याचा औषधी म्हणून उल्लेख प्रथम सुश्रुतांत आहे (८ व्या

शतकांपूर्वी). नंतरच्या चार शतकांत रोप म्हणून भांगेचा उल्लेख संस्कृत कोशांत आहे.१०व्या शतकांत भांगेचा मादक गुण माहीत झाला असावा. परंतु १४व्या शतकांत तो खात्रीनें माहीत होता. १० व्या शतकांत 'इंद्राशस' (इंद्राचें अन्न) हा शब्द प्रथम वाङ्मयांत आढळतो.भांगेच्या उत्पत्तीसंबंधीं एक पौराणिक कथाहि प्रचलित आहे ती ही कीं, देवांनीं समुद्रमंथन केलें त्यावेळीं अमृताच्या रूपानें भांगेची उत्पत्ति झाली. ' बॉवर मॅनस्क्रिप्ट ' मधील औषधी भागांत भांगेचा उल्लेख नाहीं. ही हस्तलिखित प्रत ८ व्या शतकाच्या अखेरीस वाळवंटांत गडप झालेल्या कुच (खोतानमधील) शहरीं सांपडली. हाच वैद्यकावरील सर्वांत जुना असा उपलब्ध ग्रंथ असावा.

कैलासवासी डॉ. नणेश कृष्ण गर्दे पुणें, यांनीं ड्रॅपड्रग्स कमीशनपुढें खालील साक्ष दिली होती. "प्राचीन हिंदु वाङ्मयांत भांगेच्या मादक गुणांविषयीं बिलकूल उल्लेख नाहीं. पाणिनी म्हणतो कीं हें रोप शेतांत पिकत असे. यापासून वाख निघत असे असें मनुस्मृति व कौपीतकी ब्राह्मणांत लिहिलें आहे. पुढील संस्कृत टीकाकार व कोशकार भंग म्हणजे शन असा अर्थ देतात, हें सण रोप बंगाली सण असून यापासून वाख निघतो. याची फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत माहिती असावी." गांजा व चरस याला संस्कृत भार्षेत शब्द नाहीं. सर्व शब्द नवीन बनविलेले आहेत. असें डॉ. पार्करचें मत आहे.

गु ण ध र्म व उ प यो ग—भांगेपासून मुख्यतः तीन प्रकारचें उत्पन्न होतें. त्यासंबंधीं वेगळा विचार केला आहे. आंतील साल:—हिचा उपयोग दोर, दोरखंड, व जाडें भरडें कापड तयार करण्याकडे करितात. खाद्य बीं:—याच्यापासून तेल काढतात. मादक पदार्थ:—यापासून भांग,चरस व गांजा हीं तयार होतात. व यांत राळेसारखा पदार्थ व बाष्पभावी तेल असतें.

भांगेचें बीं पक्ष्यांना दाणा म्हणून घालतात, व हिंदुस्थानांत दुभत्या गाईला ह्या बिया याव्या असें म्हणतात. यांचे तेलहि निघतें.

तेल:-भांगेच्या बियांतून शेंकडा १५ते२५ प्रमाणांत फिकट व शुद्ध तेल निघतें. प्रथम याचा रंग हिरवट पिंवळा असून नंतर तें हवेंत ठेविलें तर त्याचा फिकेपणा जातो. याची चव चांगली नसून वास साधारण असतो. याचें विशिष्टगुरुत्व .९२५ पासून .९३१ पर्यंत असतें. व हें १५° वर घट्ट होतें. याच्या अंगीं सुकविण्याचे गुणधर्म आहेत. इंग्लंडमध्यें रंगात हें टाकीत नाहींत. परंतु यूरोपखंडांतील ज्या देशांत हें विशेष प्रमाणांत होतें त्या देशांत याचा रंगांत उपयोग करतात. या तेलाचा दिव्यांत जाळण्याकडे उपयोग करीत असून त्याचा मऊ साबण होतो. पुष्कळदा आलशीच्या तेलांत या तेलाची भेसळ सांपडते. ढेप गुरांना घालतात. संयुक्त संस्थानांत एकराला २० ते ४० बुशेल बीं तयार होतें. झाड पिकण्यापूर्वीच कापणी करतात. नाहीं तर त्याच्यापासून तुसस्या बिया निघतात. या बिया फार दिवस राहिल्यास पेरण्याच्या कामीं येत नाहींत. म्हणून फक्त एकच वर्षभर त्या ठेवितात. रशियांत दरवर्षी ५ लक्ष टन बियांची पैदास होते.

वा खा ची भां ग, (लागवड केलेलीं व रानटीं रोपें:)—हिंदुस्थानांत भांगेची लागवड दोन कारणांसाठीं करतात. (१) मादक पदार्थांचा पुरवठा व (२) वाख. हिंदुस्थानच्या सपाटीच्या प्रदेशांत भांगेंत मादक द्रव्य लवकर तयार होतें. परंतु वाख चांगलासा होत नाहीं. कांहीं रोपांत मादक द्रव्य कडक व जास्त प्रमाणांत असतें. हिमालयाच्या पायथ्याच्या प्रदेशापेक्षां मैदानांत झालेली भांग अधिक चांगली समजतात. वाखासाठीं भांगेची लागवड वायव्य हिमालयांत करीत असून मादक पदार्थासंबंधीं तेथें विशेष पर्वा करीत नाहींत. कोठें गांजा, कोठें चरस व कोठें भांग यांकडे लक्ष देतात. सिंधमध्यें या रोपांपासून चांगला वाख निघून भांगहि बरीच उत्पन्न होते.

भांगेचें झाड सुमारें तीन हात उंच वाढतें.यास तुरे येतात त्यास गांजा म्हणतात. तो सुकविल्यावर जो चुरा राहतो त्यास भांग म्हणतात. भांग वाटून पितात. गांजा चिलमींतून ओढल्यानें व घोटा पिण्यापासून मनुष्यास निशा येते. याची लागवड अहमदनगर, सातारा आणि खानदेश जिल्ह्यांत व मध्यप्रांतांत नेमाडांत होते. याची लागवड कैफी पदार्थांकरितां करितात. कोंवळ्या पाल्याची भाजी करितात. नेपाळांत याच्या वाखाच्या पिशव्या व दोऱ्या करतात.डोंगरी लोक याचीं पांघरुणें तयार करितात. बीं खातात व त्याचें तेल काढितात, किंवा पक्ष्यांनां खावयास घालितात. याच्या लागवडीस खोल, काळी, भुसभुशीत जमीन, कोरडी हवा व पाऊस थोडा पण वरचेवर पडणारा पाहिजे. गांजासाठीं जमीन एक वेळ नांगरतात व वरचेवर कुळवून तयार करितात. दर एकरीं शेणखत सुमारें १५–२० गाड्यांपर्यंत देतात. पेरणी जून–जुलई महिन्यांत करितात. बीं दर एकरीं सुमारें ८–१० पौंडपर्यंत पेरितात. ओळींमध्यें अंतर अडीच ते तीन फूट असतें.रोपें नऊ इंच उंच झाल्यावर पातळ करितात. या पिकाला एक खुरपणी व दोन तीन कोळपण्या देतात. सप्टेंबर आक्टोबर महिन्यांत रोजच्या रोज नर झाडें उपटून काढावीं लागतात. जर स्त्रीकेसर व नरकेसर यांचा संयोग होऊं दिला तर कैफाचें प्रमाण कमी पडतें. फूट व्हावी म्हणून बुंध्याजवळ झाडें जराशीं मुरगळतात. म्हणजे झाडें ठेंगणीं होऊन फूट जास्त होते. पुढें पाऊस कमी पडल्यास २।३ पाणी द्यावीं लागतात. पीक तयार झालें म्हणजे फुलांचे गोंडे काढतात व खळयांत नेऊन रात्रभर ठेवतात. दुसऱ्या दिवशीं त्याचे लहान लहान ढीग करतात. व फुलांचे शेंडे मध्यें आणून ते ढीग रोज पायानें थोडथोडा वेळ चार दिवस मळतात. या तुडवण्यांत फुलें चेपलीं जाऊन जो पदार्थ

तयार होतो त्याला गांजा म्हणतात व लहान फांद्या, पाला व तुटलेलीं फुलें यांच्या मिसळीला भांग असें म्हणतात.

बाजारांत मिळणारी सुकीं पानें ही एक तऱ्हेची पूड असून तिला सिद्धि म्हणतात. हींत फक्त पानांचे तुकडे अथवा तुरे असतात व कित्येक वेळां बियाहि असतात. याला कित्येक वेळां पत्ति म्हणतात. भांग शब्द फार व्यापक असून तो फक्त पानांनांच लावतात असें नाहीं. सपाटीच्या प्रदेशांत व डोंगराळ भागांत रानटी झाडांपासून सिद्धि काढतात. परंतु बहुतकरून सर्व ठिकाणीं घराजवळच लहान तुकड्यांत भांगेची अर्धवट लागवड केलेली सांपडते. या पानांची बारीक भुकणी करून तिच्यापासून वसंगाळ पेय तयार करतात व त्यांत चव येण्यासाठीं पुष्कळ वेळां साखर, मसाला, वेलदोडे, कलिंगडाच्या बिया किंवा दूध घालतात. या पेयाला निरनिराळीं नांवें आहेत. तीं अशीं:—बंगाल:-भंग, सिद्धि. संयुक्तप्रांत:- सिद्धि, थंडाई. मध्यप्रांत:— घोटा. सिंध: —घोटा, तडहूल, पंग. मद्रासमध्यें अशाच तऱ्हेच्या पेयाला रामरस अथवा रामरसम् असें म्हणत असून पुण्याकडे ज्वारी व भांगेपासून केलेल्या पेयाला भोज म्हणतात. वाईट वास पेयाला येऊं नये म्हणून त्यांत कस्तुरी किंवा इतर सुगंधी पदार्थ घालतात व जास्त मादक व विषारी होण्यासाठीं त्यांत अफू, धोत्र्याच्या बिया, सोमल, बचनाग, कुचला इत्यादि विषारी पदार्थ टाकतात. कित्ये . तांदूळ व ज्वारी यांचीं मुळें मुद्दाम घालतात. भांग व मद्यार्क यापासून तयार केलेल्या पेयाला लुरकी नांव असून मुद्र नांवानें त्याचा बलुचिस्तान व पंजाबमध्यें उपयोग होतो. या पेयांत भांग, अफू, मद्यार्क व धोत्रा असतो. याच्या पेयापासून माजूम नांवाचा गोड पदार्थ करतात व तो सर्व ठिकाणीं खातात. बाबरनें आपल्या आत्मचरित्रांत स्वतः माजूम किती वेळां खाल्ला हें लिहिलें आहे.

च र स—थंड व रुक्ष देशांत लाविलेल्या भांगेचीं पानें, दांडे, तुरे व फलें यांवर एकसमयाच्छेदेंकरून दिसणारा राळेसारखा पदार्थ म्हणजे चरस होय. हा भांग व गांजा यांच्यापेक्षां जास्त परिणामकारक असतो. सर्व वायव्य हिमालयांत म्हणजे नेपाळपासून तुर्कस्तानपर्यंत विशेष प्रकारचा मादक पदार्थ म्हणून चरस तयार करतात.

काश्मीर व कुलूमधून चरसाचा पुरवठा होतो. चरस व गांजा कसे तयार होतात याची खरी हकीकत अद्यापि चांगली कळली नाहीं. प्रेन म्हणतो कीं एकदा चरस पृष्ठभागावर दिसूं लागला व त्या ठिकाणीं पक्का बसला म्हणजे बियाच्या वाढीपासून त्यावर कांहींच परिणाम होत नाहीं.

दक्षिण हिमालयांतील चरस व मध्य आशियांतील चरस यांत एवढाच फरक आहे कीं, पहिला झाड हिरवें असतानाच तें तोडण्यापूर्वी काढतात; आणि दुसरा सुकलेल्या झाडापासून घेतात. मध्यआशियांतील चरसांत धूळ व झाडाचे इतर भाग यांचें मिश्रण असल्यामुळें शुद्ध हिंदी चरसाला जास्त किंमत येते. कांहीं चांगल्या जातीचा चरस मात्र औषधींत घालतात. चरस हा भांग व गांजा यांच्यापेक्षां जास्त अपायकारक आहे. तयार झालेल्या मालांत पान नसलें तर त्याला जास्त किंमत येते. रंग व वास यांवर गांजाची किंमत अवलंबून असते. गांजाचे तीन प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणें:—

चापट गांजा:—जमिनीपासून ६ इंच भाग सोडून रोपाचा दांडा कोयत्यानें कापतात. नंतर टोकें एकत्र बांधून तीं रोपें बाबूंवर ठेवितात व तीं कारखान्यांत घेऊन जातात. नंतर तुरे एकामागून एक जमिनीवर ठेवितात व त्यांना पायाखालीं इतकें तुडवितात कीं, पक्की चिकटलेलीं फुलांचीं टोकें व लहान पानें एक होऊन चापट होतात. देठांच्या लांबीच्या डोक्याच्या आकारावरून मग त्याना मोठा चपटा, फांदी चपटा इत्यादि नांवें देतात. त्याच्या गांठी करतात.

गोल गांजा.—वरचीं डोकीं न तुडवितां तीं पायाखालीं घालून वळवितात. तीं चिकटून बसत नाहींत, आणि त्यांना गोल आकार येतो. गोल गांजाची लहान लहान पेंडकीं तयार करतात.

चुर (बारीक) गांजा अथवा रोटा. लहान फांद्यापासून काढलेले तुटके तुकडे अथवा फुलांचे शेंडे हे चापट अथवा गोल या दोन्ही गांजापासून निघत असून यांना ' चुर ' म्हणतात. छाटण्याच्या वेळेस त्याचे तुकडे फार निघतात. बंगाली गांजाला इतर प्रांतांत ' बलुचर ' म्हणतात. बलुचर हें एका खेड्याचें नांव असून तेथें प्रथम गांजा झाला असा समज आहे. ग्वालेर व मध्यप्रांत येथील गांजाला ' पथर ' नांव आहे. गांजा तयार केल्यानंतर राहिलेला केरकचरा ' भांग ' म्हणून विकतात.

औ ष धी व रा सा य नि क गु ण ध र्म.—गांजानें वेड लागतें हा समज अतिशयोक्तिरूप आहे असें हॅंपड्रग्स-कमीशनच्या रिपोर्टांत लिहिलें आहे. गांजाचा नियमित उपयोग केला तर कोणताहि नैसर्गिक तोटा होत नाहीं. शुद्ध व नियमित प्रमाणांत हें औषध घेतलें तर उन्मादवायू उत्पन्न होऊन त्यापासून बुद्धिभ्रंश होईल असा गुणधर्म यांत फारच थोडा असतो अथवा मुळीच नसतो असें म्हटलें तरी चालेल. कोणत्याहि तऱ्हेच्या भांगेचा उपयोग केला तर मानसिक अस्थैर्य वाढतें. यामुळें मन दुर्बळ होऊन मनुष्य वेडा होण्याचा संभव असतो एवढें मात्र खरें आहे. हॅंपड्रग्स कमीशन बसलें होतें त्या सालीं हिंदुस्थानांतील पागलखान्यांत भांगेमुळेंच खरोखर वेडे झालेले असे फक्त शेंकडा ७·३ लोक होते. भांगेनें आलेल्या वेडेपणावर उपाय होण्यासारखा असून या मादक पदार्थाची आसक्ति होत नसल्यामुळें हें घेणें एकदम बंद केलें तर चालण्यासारखें असतें व बंद केल्याबरोबर गुण दिसूं लागतो.

व्या पा र व स र का री क रा चें उ त्प न्न.— गांजासाठीं या झाडांची लागवड करावयाची असल्यास हिंदुस्थानांत परवाना घ्यावा लागतो. शिवाय मुदतीनें पिकाची तपासणी होऊन उत्पन्नाचा अंदाज करण्यांत येतो. व्यापाऱ्यास माल विकण्यास कांहीं आडकाठी नसते. परंतु माल विकल्यावर तो मुद्दाम केलेल्या सरकारी कोठारांत अथवा सरकारनें नेमलेल्या गोदामांत ठेवितात. या गोदामास दोन किल्ल्या असून एक किल्ली सरकारी अधिकाऱ्याजवळ असते व दुसरी शेतकऱ्याजवळ असते. येथून माल नेतांना ठरीव कर द्यावा लागतो व शेतकऱ्याचा अंदाज व विक्रीपत्र याला धरून नेलेल्या मालाची नोंद ठेवितात. घाऊक व किरकोळ दोन्ही व्यापाऱ्यांना परवाने घ्यावे लागतात. गांजाचा सर्व व्यापार अधिकाऱ्यांच्या नजरेखालीं चालतो. चरससंबंधीं सर्व आयात मालाला मणाला कमींत कमी ८० रु. कर द्यावा लागतो. पसंत केलेल्या कोठारांत चरस ठेवतात व तेथून तो नेतांना पुन्हां कर द्यावा लागतो. शक्य तेथें भांगेवर सुद्धां कर लादतात. विक्री व व्यापार यानां कायदा लावतात. परवाना घेतल्याशिवाय यापैकीं कोणताहि मादक पदार्थ लागवड केल्यास अथवा विकल्यास गुन्हा समजला जातो.

तिन्ही मादक पदार्थांना वेगळाले परवाने घ्यावे लागत असून किरकोळ विकणाऱ्यानें लहान मुलांस अथवा वेडसर मनुष्यास हा पदार्थ विकण्याची मनाई असते. हा पदार्थ एका वेळीं किती विकावयाचा अथवा एका मनुष्यानें किती जवळ बाळगावयाचा याविषयीं मर्यादा ठरविलेली आहे. हा पदार्थ जुना झाल्यास खराब होतो असा व्यापारी व याचें सेवन करणाऱ्या लोकांचा समज आहे. अफूच्या बाबतींत मात्र याच्या उलट असतें. वरील कारणामुळेंच यूरोपांत भांगेवर केलेले प्रयोग बरोबर वठले नाहींत.

क्षे त्र फ ळ व म हू सू ल.—हॅंपड्रग्स कमिशन रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर हिंदुस्थानसरकारनें आपला ठराव केला. त्यावेळीं (१८९५) भांगेच्या लागवडीचें क्षेत्रफळ ६००० एकर होतें. त्यानंतरची माहिती येणेंप्रमाणेः—

वर्ष	लागवडीचें क्षेत्र एकर	करमहसूल पौंड.
१९००–१	४०९६	२०१३४४
१९०१–२	२४९६	२१३२२४
१९०२–३	१९४०	२२५३५२
१९०५–६	२६४५+	
	४१९ (देशी संस्थानें)	

वरील आंकड्यांवरून लागवडीचें क्षेत्रफळ एकसारखें कमी होत असून उत्पन्न वाढत चाललें आहे असें दिसतें. सरकारी कायदे व अधिकाऱ्यांची अंमलबजावणी यामुळें वरील उत्पन्न वाढलें असावें असें उघड दिसतें.

किं म त व क र.—भांग व त्याचे इतर प्रकार यांच्या किंमतींत इतका फरक आहे कीं, तिचे आंकडे देण्यांत विशेष फायदा नाहीं. मालाचा दर्जा, तयार करण्याची रीत, कर वगैरे गोष्टींवर त्याची किंमत अवलंबून असते. एका शेराच्या किरकोळ किंमतीचा तक्ता हिंदुस्थानसरकारनें प्रांतिक सरकारांकडे पाठवून त्या किंमतीबरोबर दर ठेवण्याचा प्रयत्न करण्यास सांगितलें. त्यांतील कांहीं किंमती येणेंप्रमाणेः—

पदार्थांचें नांव.	प्रांत	दर शेरास कमींत कमी किंमत रु.	दर शेरास जास्तींत जास्त किंमत रु
गांजा	आसाम	१५	४०
,,	मुंबई	६ आणे	५
चरस	पंजाब	४	११
,,	बंगाल	३५	४०
भांग	पंजाब	२ आणे	८ आणे
,,	बंगाल	१	६

करामुळें वरील किंमतींत फरक असेलच. परंतु पदार्थांच्या दर्जाप्रमाणेंहि हा फरक बराच असावा. कारण दोन प्रांतांत होणाऱ्या मालांत फरक तर आहेच; परंतु एकाच प्रांतांतील दोन जिल्ह्यांतील मालांतहि फरक असतो.

गाजीउद्दीनखान, प हि ला.—एक मुसुलमान सरदार याला अलमगीर बादशहानें फीरोझजंग हा किताब देऊन अमीर पदावर चढविलें (इ. स. १६८७). याचाच मुलगा हैदराबादच्या गादीचा संस्थापक प्रख्यात निझाम-उल-मुल्क होय. बहादुरशहाच्या कारकीर्दीत गाजीउद्दीन गुजराथचा सुभेदार झाला. व पुढें अमदाबाद येथें १७१० मरण पावला.

दु स रा.—हा प्रख्यात निझाम उल्मुल्क आसफजाचा वडील मुलगा असून, याला मुहंमदशहानें नादिरशहाच्या स्वारीनंतर व खानडौरान मेल्यानंतर अमीर-उल् उमरा करून फिरोझजंग हा किताब दिला होता. निझाम याला दिल्लीस ठेविलें होतें. व आपण दक्षिणेंत आला होता त्यावेळीं त्यानें बादशहाकडून याला मीर बक्षीगिरी (सेनापति) देवविली. निझाम-उल-मुल्क हा इ. स. १७४८ त मरण पावल्यानंतर दक्षिणेंत जाऊन हैद्राबादचा नबाब होण्याची याची फार इच्छा होती; परंतु इ. स. १७५२ पर्यंत महम्मदशहानें त्याला परवानगीच दिली नाहीं याचें मराठ्यांचें चांगलें सख्य होतें. हा दिल्लीस वजीर असल्या मराठ्यांच्या विरुद्ध इतर मुसुलमान कांहीं करूं शकले नाहींत यानें आपल्यास मदत करण्यासाठीं मराठ्यांशीं जें बोलणें लाविलें होतें त्यावरून असें दिसतें कीं, त्याच्या इतर भावांनीं दिल्लीदरबारास लांच दिला असावा. इकडे मराठेहि निजामास शह देण्यासाठीं नेहमीं गाजीउद्दीनाचा उपयोग करून घेत. पुढें नासिरजंग मरण पावल्यावर गाजीउद्दीन हा दिल्लीहून मराठ्यांच्या हिंमतीवर निघाला तो औरंगाबादेस आला. त्याच्या बरोबर बुऱ्हाणपुरचें मोंगल सैन्य, त्याचें खासगी सैन्य व मराठ्यांच्या मदतीस आले

सैन्य मिळून दीड लाख फौज होती. खुद्द श्री. नानासाहेब पेशवे हे त्याच्या मदतीस आले होते; शहागडास त्यांची भेट झाली होती; निजाम उल्मुल्काचा हा वडील मुलगा असल्याकारणानें त्याच्या हक्काबद्दल कोणी शंका घेत नव्हते. पेशव्यांचा उद्देश त्याच्याकडून उत्तर दक्षणचे नाना प्रकारचे कार्यभाग उरकून घ्यावयाचे होते. व खास भागानगरप्रांत मिळवावयाचा होता. गाजींनें पेशव्यांनां, आपल्याला मदत केल्याबद्दल तापी व गोदावरी यांमधील सर्व प्रदेश देऊं केला होता व तो पुढें सलाबतजंग यानें दिलाहि. परंतु गाजीउद्दिनचें नशीब निराळेंच होतें. त्याचा सावत्र भाऊ निजामअली याच्या आईनें त्याला मेजवानीस बोलाविलें असतां, हा तेथें गेला; त्यावेळीं त्याला विषप्रयोग करण्यांत आला. याप्रमाणें हा १६ आक्टोबर १७५२ रोजीं मरण पावला. त्याचें शव दिल्लीस नेऊन तेथें पुरलें. श्री. नानासाहेबांची मोठ्या कुशलतेनें निजामाला काबूंत आणण्याची योजना यामुळें फसली व हा मोठा व्यूह ढांसळून पडला. पुढें याचा मुलगा शहाबउद्दीन यास अमीर-उल्-उमरा व गाझीउद्दीन हे किताब मिळाले.याच्या नांवचें गाजिउद्दीन नगर म्हणून एक गांव उत्तरेकडे आहे. तेथें अबदाली व बुंदेले यांची लढाई झाली होती.

ति स रा.—दुसऱ्या गाजीउद्दीनखानाचा मुलगा.बापाच्या मृत्यूनंतर (१७५२) दिल्लीच्या अहमदशहा बादशहानें याला अमीर-उल्-उमरा नेमून इमाद-उल-मुल्क गाजी-उद्दीनखान अशी पदवी दिली. यानेंच पुढें दिल्लीचा वजीर होऊन अहमदशहास कैद केलें व त्याचे डोळे काढले ('अहमदशहा पहा') दुसऱ्या अलमगीरचा खून करविणारा हाच गाजीउद्दीन होय. याची बायको गन्ना किंवा गुन्नाबेगम हिंदुस्थानी कवयित्री म्हणून फार प्रख्यात आहे. गाजीउद्दीन कधीं वारला तें समजत नाहीं; पण गुलजार इब्राहिम कवीनें तो १७८० त हालांत दिवस काढीत होता असें लिहिलें आहे. 'मासिर-उल्-उमरा' ग्रंथावरून पहातां तो १७७३ त दक्षिणेंत जाऊन माळव्यांत एक जहागीरदार बनला; नंतर सुरतेला जाऊन कांहीं दिवस इंग्रजांसमवेत राहिला व शेवटीं मक्केच्या यात्रेला गेला असें आढळतें. कोणी म्हणतात तो १८०० त कराची येथें मरण पावला. गाजीउद्दीन प्रख्यात फारशी कवि व ग्रंथकार होता. [बील; मु. रियासत; राजवाडे खंड १; ग्रँट डफ; इ.].

गाजीउद्दीन हैदर—एक अयोध्येचा नबाब (१८१४-१८२७). 'अयोध्या प्रांत' पहा.

गाझा—(आधुनिक घुझे) ५ फिलिस्टाइन शहरांपैकीं अगदीं दक्षिणेकडचें शहर. हें समुद्राजवळ असून ईजिप्त, अरबस्तान, पेट्रा व सीरिया या देशांकडे जाणारे प्राचीन व्यापारी रस्ते येथें मिळालेले होते. इस्रायली लोकांच्या ताब्यांत हें शहर फार थोडे दिवस होतें. त्यानंतर असुरी-सत्ता येथें सुरू झाली. शिकंदर बादशहानें गाझाला पांच महिनेपर्यंत वेढा दिला होता (इसवी सन पूर्वी ३३२). इ. स. पूर्वी ९६ त हें शहर अलेक्झांडर जेनिअसनें धुळीस मिळविलें होतें.२ ऱ्या व ३ ऱ्या शतकांत गाझा हें फार भरभराटींत आलेलें ग्रीक शहर होतें. ६३५ त हें शहर मुसुलमानांच्या हातीं आलें व व्यापाराखेरीज इतर बाबतींत त्याचें महत्त्व फार कमी झालें. नेपोलियननें हें शहर १७९९ त काबीज केलें होतें.

सध्यांच्या शहराचे चार भाग केले असून लोकसंख्या१६००० आहे. पूर्वेस सॅम्सनची कबर अझून दाखवितात. येथील लोकांचा पेहराव ईजिप्शियन पद्धतीचा आहे.

गाझिआबाद, त ह सी ल.—मीरत जिल्ह्यांतील एक तालुका. जलालाबाद, लोणी, दास्ना हे तीन परगणे आहेत. यांत ३३४ खेडीं व ८ शहरें आहेत. क्षेत्रफळ ४९२चौ. मै. लोकसंख्या (इ. स १९११) २,७८,७४८. १९०३-४ मध्यें सान्याचें उत्पन्न ४,८५,०००व पटयांचें उत्पन्न ८०,०००होतें. जमीन एकंदरींत हलक्या दर्जाची आहे. पण दळणवळणाचीं साधनें, रेल्वे व रस्ते हीं वाढलीं आहेत. अप्परगंगा व पूर्वयमुना कालव्यानें येथें पाणी पुरवितात. १९०३-४ सालीं ३४९ चौ. मै. लागवडी जमीनीपैकीं १८० चौ. मै. वरील पाण्यानें भिजत असे. येथें निळीचें पीक मुख्य असून उंसाचें पीक कमी आहे.

श ह र.—मीरत जिल्ह्यांतील गाझीआबाद तालुक्याचें मुख्य ठिकाण. कलकत्ता-पेशावर रस्त्यावर वसलें आहे. हें ईस्ट इंडिया, नॉर्थ वेस्टर्न व औंध—रोहिलखंड रेल्वेवरचें जंक्शन स्टेशन आहे. लो.सं(१९११)११२०४.हें १७४० मध्यें वजीर गाझीउद्दीन यानें वसवलें. १७६३ मध्यें येथें सुरजमल जाटाचा खून झाला. १८५७ च्या बंडांत येथेंहि एक चकमक झाली होती. येथील बाजाररस्त्यावर चांगलीं घरें असून एकंदर रस्ते सुरेख आहेत. पोलीस स्टेशन व टाऊनहॉल यांच्याकडे जाणाऱ्यांस सराईचा उपयोग होतो. १८६८ मध्यें येथें म्युनिसिपल क. स्थापन झाली. धान्य, कातडें, कमावलेलें चामडें यांचा व्यापार चालतो. येथें ८-१० मुलांमुलींच्या शाळा आहेत.

गाझीपूर जि ल्हाः—संयुक्त प्रांत. बनारस विभागामध्यें हा जिल्हा आहे. क्षेत्रफळ १३३९ चौ. मैल. या जिल्ह्यांत डोंगर अथवा टेंकड्याहि नाहींत. याच्या मधून गंगा जाते. नदीच्या दोन्ही बाजूंस विस्तीर्ण सपाट जमीन आहे. तथापि उंच व सखल मैदान असे भाग दोन्ही बाजूंस आहेत. बहुतेक सर्व जमीन शेतीखालीं आहे. वस्तीहि फारच दाट आहे त्यामुळें या भागाला जंगली जनावरें बहुतेक नाहींतच. गर्द जंगलेंहि फारशीं नाहींत. बहुतेक झाडें आंबा, बांबू व इतर नेहमींचीं फळझाडें वगैरे आहेत. पाउस साधारणतः ४० इंच पडतो. लहान लहान नद्यांचे प्रवाह बरेच आहेत. गोमती, मंगाई व छोटी शरयू या बऱ्या मोठ्या नद्या आहेत.

जिल्ह्यांत खडकाळ जमीन नाहींच. सर्व जमीन गंगेच्या गाळाची बनलेली आहेत.

हा जिल्हा पूर्वी गुप्तांच्या मगध साम्राज्यांत होता. याचा सविस्तर प्राचीन इतिहास सांपडत नाहीं. प्रसिद्ध चिनी प्रवाशी ह्यूएनत्संग यानें या जिल्ह्यांतील जमीन सुपीक व बहुतेक लागवडीखालीं असल्याचें लिहिलें आहे. ११९४ मध्यें गुलाम घराण्याचा पहिला राजा कुतुबुद्दीन यानें बिहार वगैरे सर्व मुलुख, कनोज येथें जयचंद राजाचा पराभव करून जिंकला. १३३० मध्यें मसाऊद गाझी यानें गाधीपूरच्या राजाचा खून केला व शहराचें नांव गाझिपूर केलें.१३९४–१४७६मध्यें शर्की घराण्याचा येथें अंमल होता. त्यानंतर मोंगल साम्राज्य येथ-वर पसरलें. मध्यंतरीं शीरशहा सूर या अफगाणांचा अंमल होता. अकबरानें त्याचा समावेश सुभा अलाहाबाद-मध्यें केला होता. १७२२ त सादतखान हा अयोध्येचा नबाब म्हणून स्वतंत्रपणेच कारभार पहात होता. त्यानें अबदुल्ला नबाब नांवाचा एक गाझीपूर येथें सुभा नेमला. पुढें राजा बळ-वंतसिंग (बनारस) यानें हा भाग बळकावला. याच बळवंत सिंगाला इंग्रजांनीं त्याचें राज्य त्याच्या दासीपुत्राला देण्यास भाग पाडलें व जेव्हां चेतसिंग पैसे देण्यास असमर्थ झाला व स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करूं लागला तेव्हां वॉरन हेस्टिंग्जनें त्याला गादीवरून काढून टाकलें. १७७५ मध्येंच बनारस प्रांत इंग्रजाच्या अधिकाराखालीं आला.

१८५७ च्या गडबडींत हाहि जिल्हा सामील झाला होता. पण फारशी दंगल या बाजूला झाली नाहीं. जिल्ह्यांत प्राचीन महत्त्वाचीं स्थानें व वस्तू बऱ्याच आहेत. त्या बौद्धांच्या व हिंदूंच्या वेळच्या आहेत. भिशी येथें गुप्तांचा शिलालेख व शिक्कामोर्तब सांपडले आहे व पहालादपूर (प्रल्हादपूर) येथें एक शिलालेख सांपडला आहे.

या जिल्ह्याची लोकसंख्या (१९२१) ८३२२८९. यांत २५४९खेडीं व शहरें आहेत.१९११सालीं ८३९७२५ लोका-पैकीं २५३०२ लोकांनां लिहितां येत होतें. शेकडा ९० हिंदु व १० मुसुलमान आहेत. भाषा बिहारीची पोटभाषा भोज-पुरी. शेंकडा ७१ लोक शेतीवर व ६ सामान्य मजुरीवर रहा-तात. जिल्ह्यांत सर्व प्रकाराची जमीन आढळते.

या जिल्ह्यांत कंकर फार सांपडतो. त्याचा उपयोग रस्त्यां-वरील खडीकडे करतात. सोरा व सज्जीखार हीं काढतात. उद्योगधंदे फारसे नाहींत. साखर तयार करतात व जाडाभरडा कपडा होतो; अफू व अत्तरें गाझीपुरांत होतात. निर्यात माल साखर, कांतडी अफू, अत्तरें व क्वचित धान्य. आयात माल कपडा, सूत, कापूस, मीठ, मसाला, धातु सामान. बंगाल–नॉर्थ वेस्टर्न व इतर रेल्वे-मुळें घोग्राच्या पलीकडचा आणि दुआबमधला व्यापार तिकडून होऊं लागला. सैदापूर, झमानिआ व गाझीपूर हीं व्यापाराचीं मुख्य ठिकाणें आहेत. व्यापाराचा ओघ रेल्वे-कडे स्वाभाविकच जात आहे. गाझीपूर जिल्ह्यांत रेल्वेलाईन बरीच आहे. ईस्ट इंडियन रेल्वे, प्रॉव्हिन्शिअल रेल्वे व बंगाल–नार्थवेस्टर्नच्या दोन शाखा यांतून जातात. ५७६ मैल सडकेपैकीं ९५ मैल पक्की आहे. या जिल्ह्याला दुष्का-ळाची बाधा फारशी झालेली नाहीं. १८७३ व १८७८ सालीं बराच दुष्काळ पडला होता.पण लोक दुष्काळी कामावर आले नाहींत. १८९४त अतिवृष्टि व १८९५–९६त अनावृष्टि यांनीं भाव चढले होते. १८९७ सालीं पिकें फारच चांगलीं आलीं व शेतकऱ्यांनां भाव चांगला मिळाला. शिवाय येथून पुष्कळ लोक नेहमीं मजुरीकरितां बाहेर प्रांतीं जातात.

त ह शी ल—हा तालुका गाझीपूर जिल्ह्यांतला आहे. याच नांवाचा तालुका फत्तेपूर जिल्ह्यांतहि आहे. याचें क्षेत्र-फळ३९५ चौ.मै. व लो. सं.(१९११)२४६८५१. ८४७ खेडीं व एक शहर आहे. साऱ्याचें उत्पन्न २६६००० व इतर कर ४९०००रु. येथल्या इतकी दाट वस्ती जिल्ह्यांतील दुसऱ्या तालुक्यांत नाहीं. ४१५ नद्या या तालुक्यांतून वहातात. तांदु-ळाचें पीक मुख्य आहे. ओसाड जमीनींतून सज्जीखार बराच सांपडतो. २३६ मैल जमीनीपैकीं १४३ मैलांना पाणी-पुरवठा होतो. पैकीं ⅔ विहिरींनीं व बाकीचें तलावांनीं पुरवलें जातें.

श ह र—गाझीपूर जिल्हा व तालुका यांचें मुख्य ठिकाण. दंतकथेवरून हें शहर राजा गाधी यानें गाधीपूर या नांवानें वसविलें. व १३३० च्या सुमारास मसाउद मलिक उस-सादात गाझी यानें पूर्वीच्या राजास पराभूत करून याला गाझीपूर बनवलें. या जुनाट शहराचा विस्तार २ ते ३ मैलांचाच आहे. जुनाट तट व इमारती आणि मशिदी कांहीं पडीत व कांहीं शाबूद आहेत.लॉर्ड कार्नवालिसचें थडगें येथेंच आहे. अफूचें सरकारी मुख्य ठिकाण हेंच आहे व सर्व ठिकाणाहून अफूचें कच्चें पीक येथें येतें.

चीनकरितां व मध्यप्रांत, संयुक्तप्रांत वगैरेकरता लाग-णारी अफू, डॉक्टर व सरकारी दवाखाने याकरतां मॉर्फिआ वगैरे येथें तयार होतात. चीनमध्यें येथली अफू बनारसची अफू म्हणून प्रसिद्ध आहे. अफूशिवाय अत्तरें करण्याचा धंदा मुख्य आहे. अफूच्या कामावर हंगामाप्रमाणें ५०० पासून ३५०० पर्यंत माणसें काम करतात. येथें १८६७ पासून म्यु. कमेटी आहे. येथें १४ शाळा आहेत.

गाझीपूर तहशील–संयुक्तप्रांत.फत्तेपूर जिल्हा. क्षेत्रफळ २८४ चौ. मै. लो. सं ९३७५२. खेडीं १४४. शहर नाहीं. साऱ्याचें उत्पन्न १५५०००. इतर कर ३१००० रु. जमीन बहुतेक हलकीच आहे. फत्तेपूर कालव्याचें पाणी येथें येतें. व स्थानिक तळीं व झील (झरे ?) यांचा उपयोग करतात. विहिरी क्वचितच दिसतात. १५८ चौ. मै. पैकीं ३९ मैल जमीन पाटाच्या पाण्याखालीं आहे.

गॉटिंजेन—प्रशियाच्या हॅनोव्हर प्रांतांतील एक शहर. लोकसंख्या (१९०५) ३४०३०. हें कॅसेलला जाणाऱ्या आगगाडीच्या रस्त्यावर हॅनोव्हरच्या दक्षिणेस ६७ मैलांवर

आहे. लीनेचा कालवा ह्या शहरामधून जातो. शहराभोंवतीं कोट असून त्यावर लिंबाचीं झाडें लावलीं असल्यामुळें सहल करण्यास तें एक रम्य स्थान झालें आहे. विश्वविद्यालयाच्या बऱ्याच इमारती, मध्ययुगांतील एक नगरभवन आणि दोन प्रॉटेस्टंट धर्माचीं देवळें खेरीजकरून ह्या शहरांत सार्वजनिक महत्त्वाच्या दुसऱ्या इमारती नाहींत प्रसिद्ध जॉर्जिआ ऑगस्टा विश्वविद्यालय दुसऱ्या जॉर्ज राजानें १७३४ त स्थापिलें. १८२३ त येथील विद्यार्थ्यांची संख्या १५४७ होती. परंतु विद्यार्थी व अध्यापक राजकीय चळवळींत पडल्यामुळें १८३४ त ती ८६० झाली. १८३३ ची उदार राज्यपद्धति हॅनोव्हरच्या अर्नेस्ट ऑगस्टस राजानें बदलली; म्हणून त्याच्या विरुद्ध भाषणें केल्यावरून जेव्हां सात अध्यापकांना काढून टाकलें तेव्हां तर ती संख्या आणखी कमी झाली. परंतु हॅनोव्हर प्रशियाला जोडलें गेल्यापासून ह्या विश्वविद्यालयाची सारखी भरभराट होत आहे. १९१४ मध्यें येथें १६३ अध्यापक व २२६३ विद्यार्थी होते. येथील ग्रंथसंग्रहालयांत ५ लक्ष ग्रंथ व ५३०० हस्तलेख आहेत. जर्मनींतील आधुनिक वाङ्मयाचा एवढा मोठा संग्रह दुसरीकडे कोठेंहि सांपडणार नाहीं. ह्या विश्वविद्यालयांत रसायनशास्त्राची एक उत्तम प्रयोगशाळा, त्याचप्रमाणें प्राणिशास्त्र, मानवजातिशास्त्र व खनिजशास्त्रांतील वस्तूंचा मोठा संग्रह आहे. याशिवाय शारीरशास्त्रांतील कवटींचा प्रसिद्ध संग्रह, शेतकीसंस्था, वनस्पतिबाग, एक मोठी वेधशाळा व कित्येक रुग्णालयेंहि आहेत. गुटिंजी किंवा गोडिंग नांवाच्या खेड्याचा उल्लेख ९५० त प्रथम केलेला आढळतो. हें शहर इ. स. १५३१ त यूरोपांतील धार्मिक सुधारणेंत पडलें. पुढच्याच शतकांत झालेल्या युरोपांतील 'तीस वर्षांच्या लढाईंत' ह्याचें अतोनात नुकसान झालें. एक शतकपर्यंत त्याचा एकसारखा ऱ्हास होत गेला. परंतु विश्वविद्यालयाच्या स्थापनेमुळें त्याला बरेंच महत्त्व आलें आहे. अलीकडे अलीकडे तर व्यापारांत व उद्योगधंद्यांतहि तें पुष्कळ पुढें आलें आहे.

गाडरवाडा, तहसिल.—मध्यप्रांत. नरसिंगपूर जिल्ह्याची एक पश्चिमेकडील तहसील. क्षेत्रफळ ९०८ चौ. मै. लो. सं. (१९११) १७२१९५. हींत १ शहर (गाडरवाडा) व खेडीं ४५१. सरकारी जंगल ६३ चौ. मै. ही तहसील नर्मदा नदीच्या खोऱ्यांत असून जमीन काळी व सुपीक आहे तसेंच सातपुड्याच्या कांहीं टेंकड्याहि ह्या तहसिलींमध्यें आहेत.

गांव.—गाडरवाडा तहसिलीचें मुख्य ठिकाण. मराठ्यांचे अमदानींत हा गांव जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होतें. लो. सं. (१९०१) ८१९८ व (१९११) ४७१५. एका दशकांत एवढी लोकवस्ती कमी झाली. म्यु. स्थापना १८६७त झाली. निर्गत माल तूप व धान्य. येथें १ मिडलस्कूल व १ दवाखाना आहे.

गाणपत्य—हिंदूंत जे अनेक उपासनापंथ निर्माण झाले त्यांमध्यें 'गाणपत्य' हा एक पंथ आहे. गाणपत्यांचें दैवत गणपति होय. गणपति हा देव हिंदू म्हणविणाऱ्या प्रत्येक माणसाच्या घरीं पूजिला जातो. हा देव सकळ विघ्नांचा हर्ता, विद्यादाता व मंगलमूर्ति असा मानला जात असल्यामुळें या देवाचें पूजन प्रत्येक हिंदूच्या घरीं होतें. ('गणेश' पहा.)

इतर देवतांप्रमाणें गणपतीची मुख्यतः उपासना करणारा एक संप्रदाय हिंदुस्थानांत आहे. या पंथाला अगर संप्रदायाला गाणपत्य अशी संज्ञा आहे. या संप्रदायाचे लोक पुष्कळ आहेत. गणपति हाच परमात्मा असून त्यानेंच हें सर्व ब्रह्मांड निर्माण केलें असें या पंथाचे अनुयायी मानतात. या गणपतिस्वरूपी परब्रह्मापासूनच सर्व किरकोळ देव उत्पन्न झाले. गणपति हा मात्र अनाद्यंत, अजर, अमर, निर्गुण व निराकार असा देव आहे असें या संप्रदायाचें तत्त्व आहे. हें तत्त्व प्रचलित करण्यासाठीं या पंथाच्या आचार्यांनीं निरनिराळे ग्रंथ लिहिले व हे सर्व ग्रंथ त्या पंथाच्या अनुयायांनीं प्रमाण मानले आहेत.

वाङ्मय.—या संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ म्हटले म्हणजे वरदतापनीय अगर गणपतितापनीय उपनिषद्, गणपत्युनिषद्, गणेशसंहिता, गणेशपुराण, मुद्गलपुराण व ब्रह्मवैवर्त पुराणाचा गणेशखंड हे होत. गणेशसंहितेंत अगर गणपत्युपनिषदांत गणपति व ब्रह्म हे एक असून गणपति हा जगताचें आदिकारण होय असें सांगितलें आहे. गणेशपुराणामध्यें गणेशासंबंधींच्या निरनिराळ्या कथा दिल्या असून त्याची पूजा व उपासना कशी करावी हें सांगितलें आहे. तसेंच गणपत्युपासनेचा एक मंत्रहि यांत आहे (पहा). गणेशखंडामध्यें देखील अशाच प्रकारच्या कथा वर्णन केलेल्या आहेत. ब्रह्मवैवर्तपुराणामध्यें एका अध्यायांत राधा ही गणेशाची पूजा करीत असे असें सांगितलें आहे हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. गणेशखंडांत शिवानें गणपतीला प्रसन्न करून घेण्यासाठीं दहा वर्षें घोर तपश्चर्या केली व त्याच्यापासून त्रिपुरासुराच्या वधाचा वर प्राप्त करून घेतला असें वर्णन आलेलें आहे. गणेशगीता नांवाचाहि एक ग्रंथ आहे पण तो जवळ जवळ भगवद्गीतेसारखाच आहे. फक्त कृष्णाबद्दल गणेश नांव घालण्यांत आलें आहे. याखेरीज गणपतिकल्प, गणपतिकवच, गणपतिपंचरत्न, गणपतिपंचांग, गणपतिपंचावरण स्तोत्र (शंकराचार्यकृत), गणपतिपुरश्चरणविधि, गणपतिपूजा, गणपतिमंत्रविधान, गणपतिमानसपूजा गणपतिरत्नप्रदीप गणपतिरहस्य, गणपतिवेदपादस्तोत्र (जैमिनीकृत ?), गणपतिसहस्रनाम, गणपतिसूक्त, गणपतिस्तवराज, गणेशमाहात्म्य इत्यादि अनेक गणपतिपूजनाचे ग्रंथ आहेत.

गाणपत्युपासनेचा उदय.—गणपतिदेवतेचें वेदपूर्व प्राचीनत्व आहे तरी गाणपत्य पंथाचा उदय केव्हां झाला हें पाहूं गेल्यास तो जास्त अर्वाचीन काळीं झाला असावा असें दिसून येतें. या पंथाचा उदय होण्यापूर्वींहि 'गणेश'

देवतेला बरेंच प्राधान्य होतें यांत शंका नाहीं. तथापि गाणपत्यपंथाचा उगम पांचव्या शतकानंतर ते नवव्या शतकाच्या पूर्वी केव्हांतरी झाला असला पाहिजे असें डॉ. भांडारकर यांचें म्हणणें आहे. या काळांत रचल्या गेलेल्या याज्ञवल्क्य स्मृतींत व भवभूतीच्या मालतीमाधवांत गणेशाची प्राधान्येंकरून स्तुति करण्यांत आलेली आहे. आठव्या अगर नवव्या शतकांतील शिलालेखांतहि या गाणपत्यांचा व गणेश देवतेचा उल्लेख आढळतो. गणपत्युपासनापर सर्व ग्रंथ याच काळांत निर्माण झाले असें म्हणावयास हरकत नाहीं.

गा ण प त्यां ती ल पो ट भे द.—आनंदतीर्थांनीं लिहिलेल्या शंकरदिग्विजयामध्यें या गाणपत्यासंबंधींचा व त्यांच्या तत्वांचा उल्लेख आला आहे. हा ग्रंथ दहाव्या शतकामध्यें लिहिला गेला असावा. या ग्रंथामध्यें गाणपत्यांचे सहा पोटभेद होते असें सांगितलें आहे. हे पोटभेद म्हणजे महागणपतिपथ, हरिद्रागणपतिपंथ, उच्छिष्टगणपतिपंथ, नवनीतगणपतिपंथ, स्वर्णगणपतिपंथ व सनातनगणपतिपंथ हे होत. या पंथापैकीं उच्छिष्टगणपतिपंथ थोडासा चमत्कारिक आहे. या पंथाचे अनुयायी गणपतीची डाव्या हातानें पूजा करितात. हे लोक गणपतीला हेरंब हें नाव देतात. या पंथात जातिभेद पाळण्यांत येत नाहीं व विवाहविषयक निर्बंधांना या पंथांत थारा नाहीं. वाटेल त्या स्त्रीशीं संभोगादि व्यवहार करण्याची यांच्यांत चाल दिसते. चंद्राकृति तांबडें गंध लावणें ही गाणपत्यांची मुख्य खूण होय.

गणपत्युपासनेचें माहात्म्य विशेषतः दक्षिणहिंदुस्थानांत आढळून येतें. द्रविड लोकांचा हा मूळचा देव असावा असें दिसतें. या देवाचें वहान उंदीर आहे व द्रविड लोकांची ओरौन म्हणून जी एक जात आहे त्या जातीचें उंदीर हें प्रमुख दैवत आहे. त्रावणकोर संस्थानांत होमपुरे उर्फ गणतीची देवळें पुष्कळ ठिकाणीं असून त्या ठिकाणीं गणपतीच्या निमित्त दररोज होम केला जातो. कांहीं ठिकाणीं क्वचित प्रसंगीं महागणपतिहोम नांवाचा बऱ्याच खर्चाचा होमहि करण्यांत येतो. पुण्याजवळ चिंचवड येथें गणपतीची स्वयंभू मूर्ति असून तिच्यानिमित्त मार्गशीर्ष वद्य प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत मोठा उत्सव करण्यांत येतो. येथील मोरया गोसावी नांवाच्या साधूनें गणपतीला प्रसन्न करून घेतलें व गणपतीनें 'मी तुझ्या शरीरांत व तुझ्यामागून होणाऱ्या सहा पुरुषांत अंशरूपानें वास करीन' असा त्याला वर दिला व त्याप्रमाणें मोरया व त्याचे सहा वंशज यांच्यामध्यें गणपति वास करितो अशी समजूत असून या सातजणांच्या समाधींची गणपति या नात्यानें दररोज पूजा करण्यांत येते. या गणपतिसंस्थानाला निरनिराळ्या भाविक भक्तांनीं देणग्या दिल्या असून खुद्द औरंगझेब बादशहानें देखील आठ खेडीं इनाम दिलीं आहेत. [याशिवाय 'अष्टविनायक' पहा.].

गात्रसंकोचन-(गात्रक्षय, इं. ॲट्रोफी). हा शरीररोगविज्ञानशास्त्रांतील पारिभाषिक शब्द असून त्याचा अर्थ शरीरांतील एका किंवा अनेक भागांच्या पोषणक्रियेमध्यें बिघाड उत्पन्न होऊन तो भाग शुष्क व क्षीण होणें, असा आहे शरीरांतील भागांची झीज प्रतिक्षणीं होते ती भरूनहि पण तितक्याच जलदीनें यावी अशी नेहमीं योजना असते.त्यामुळें झिजलेल्या भागाचें पोषण व वाढ होऊन झीज एरवीं दिसून येत नाहीं;म्हणून प्राण्यांच्या जीविताचें रक्षण होतें व जगणें शक्य होतें. म्हणजे नेहमीं पोषण व झीज यांमध्यें आपोआप असा समतोलपणा रहातो कीं, त्यामुळें रोगोत्पत्ति होत नाहीं. पण कधीं असें घडतें कीं, विवक्षित भागाची जितकी झीज होते त्याच्या मानानें त्यास फारच अथवा फाजील पोषक द्रव्य व रक्तपुरवठा होतो व त्यामुळें तो भाग एकदम पोसलेला व लठ्ठ होतो; यासच पोषणवृद्धि अशी संज्ञा आपण देऊं. याचीं उदाहरणें: प्रसूति कालानंतर मूल पाजणें आवश्यक होतें तेव्हां स्तनांची एकदम वृद्धि (वाढ) होते, अथवा गरोदरपणामध्यें गर्भधारणेसाठीं गर्भाशय नऊ महिन्यांत नेहमीच्या १५-२० पट वाढणें इत्यादि होत. याच्या उलट प्रकार म्हणजे पोषण कमी झालें अथवा केलें असतां त्याचा परिणाम तो भाग झिजणें व शुष्क होणें हा होय. किंवा पोषणद्रव्यें यथास्थित मिळत असून तीं पचविण्याची शक्ति जर कमी झाली तरीहि तोच परिणाम होतो. कांहीं विकृतींमध्यें (उदाहरणार्थः—वार्धक्य) सर्व शरीरास झीज येऊन तें सर्व क्षीण होऊं लागतें. तेव्हां फक्त हृदय मात्र झिजत नाहीं. ही झिजेची क्रिया कधीं कधीं शरीराच्या एखाद्या भागापुरती अथवा इंद्रियापुरतीच असलेली दिसून येते. असें घडण्याचीं कारणें अनेक आहेत. (१)एखाद्या शरीराच्या भागाचा उपयोग करणेंच सोडून दिलें, अथवा त्या भागाकडून होणारी क्रिया पुढें चालू राहिली नाहीं तर तो भाग लहान दिसण्यास आरंभ होतो. अर्धांगाचा झटका येऊन लुलेपणामुळें अगर संधिवात होऊन, हाताची अगर पायाची हालचाल नेहमीप्रमाणें होणें व त्याच्याकडून व्यायाम होऊन त्यास अधिक मिळणाऱ्या रक्तानें त्याचें पोषण व वृद्धि होणें हें कमी झाल्याबरोबर हे अवयवहि लहान दिसूं लागतात. (२) बुद्धिहीनत्वामुळें अर्धवट माणसांचे मेंदूहि लहान असलेले आढळतात; व तसेंच अंध माणसांमध्यें वीक्षणमज्जाहि वाळून जाते. कारण तिचा उपयोग केला जात नाहीं. (३) बालक गर्भाशयांत असेपावेतों त्यास थायमसपिंड आणि कांहीं विशिष्ट धमन्या आणि शिरा मातेपासून रक्ताभिसरणाच्या योगानें पोषण मिळविण्यासाठीं जरूर असतात. पण पुढें तें मूल उपजल्यावर त्या रक्तवाहिन्या व पिंड यांची जरूर रहात नाहीं म्हणून ते शुष्क होऊन नाहीसे होतात. (४) बाळंतपणानंतर गर्भाशय जें अतिशयच मोठें झालेलें असतें, तें त्याची फाजील पोषणक्रिया व वृद्धि आपोआप बंद पडून पुन्हां बहुतेक पूर्ववत

पाहिल्या आकाराचें होतें. (५) स्त्रियांस उतारवयांत मुलें होईनाशीं झालीं म्हणजे त्यांच्या ओटीपोटांतील अंडसदृश पिंड शुष्क होतात व त्यांची गर्भधारणशक्ति नाहींशी होते. (६) एखाद्या भागास रक्ताचा पुरवठा करणारी धमनी बांधून टाकिली तर पुढील भाग शुष्क होतो. (७) यकृत आणि मूत्रपिंड यांचे जे जुनाट रोग असतात त्यामध्यें या इंद्रियांत विकृत-द्रव्य सांचत जातें व त्यामुळें त्या इंद्रियाच्या पोषणास अडथळा येऊन तीं बारीक होतात. (८) एखाद्या शरीरांतील इंद्रियांवर चोहोंकडून, शेजारी रोगाचें आवाळूं (अर्बुदग्रंथि) उत्पन्न होऊन दाब पडल्यास तें इंद्रिय त्या दाबानेंहि लहान होतें. याचें दुसरें उदाहरण म्हणजे चिनी श्रीमंत बायका शोभेसाठीं आपले पाय लोखंडी पट्यांनीं बांधून ठेवून मुद्दाम बारीक करतात हें होय. ह्या गात्रसंकोचनाची क्रिया सुरू झाली म्हणजे त्या विवेक्षित भागातील पेशी नष्ट होऊन तो भाग लहान होतो. पण कधीं असेंहि घडतें कीं, जरी त्या भागांतील पेशी नष्ट होऊन ही क्रिया सुरू झाली तरी त्याच्या बदली विकृतमलद्रव्य सांचतें व त्यामुळें दिसण्यात तो भाग बारीक झालेला दिसत नाहीं. उदाहरणार्थ हृदय म्हणजे रक्ताशयात ही क्रिया सुरू झाली असतां त्याचे मासपेशी कमी कमी होत जातात व त्याच्या ऐवजीं निरुपयोगी अशी मेदवृद्धि हृदयाच्या मांसल भागांतून होते यामुळें हे विकृत हृदय झिजलेलें व लहान न दिसतां उलट थोडे मोठेंच दिसतें. बहुधा या क्रियेची प्रगति अगदीं सावकाशपणें होते. (१०) पण गरोदर स्त्रियांनां विशेषतः होणारा यकृताचा एक चमत्कारीक रोग आहे. त्यांत थोड्या दिवसांत यकृत अर्ध्या किंवा तृतीयांश आकाराचें होऊन रोगी मृत्यु पावतो. (११) वर्धमानस्नायुक्षय नांवाचा रोग पृष्ठवंशरज्जूपासून पुढील बाजूकडे जाणारे मज्जातंतू विकृत होऊन हळू हळू होतो व त्यामुळें कांहीं विविक्षित मांसपेशी अगर त्यांचे समूह झिजून बारीक दिसतात व नंतर लुले पडतात. आरंभ बहुधा उजव्या हातास पंजामध्यें होतो व हाताची शक्ति कमी होत चालली आहे असें रोग्यास समजूं लागतें. नंतर आंगठ्याच्या मुळाशीं जो मांसल भाग आहे तोहि शक्तिहीन व बारीक होतो. नंतर बाहु व पाय यांचेहि स्नायू क्रमाक्रमानें बारीक व कमकुवत होत जातात. कधीं कधीं या रोगाची प्रगति येथपर्यंत मजल गांठून थांबते. पण बहुशः शरीरांतील इतर बऱ्याच स्नायुसमूहावर असाच विकृत परिणाम उत्तरोत्तर होत जाऊन शेवटीं रोग्यास मरण येतें. (१२) त्वचा हें एक इंद्रियच आहे व म्हातारपणामुळें यामध्येंहि शुष्कता येऊन त्वचा रुक्ष व खरखरीत दिसून सुरकुत्या पडतात. कधीं कधीं पहिला वर्ण थोड्या फार प्रमाणांत बदलून जागजागीं काळ्या अगर पिंगट रंगाचे चट्टेहि दिसतात. त्वचेचे पोषक मज्जातंतु बिघडून त्वचेस तकतुकी व सूजहि दिसून येते व त्वचेंत आग अगर मुंग्या आल्याप्रमाणें भास होतो. अगर महारोगांत स्पर्शज्ञान कमी होऊन बोटांचीं अग्रेंहि कुजून गळून पडतात.

गात्रोपघात—याचा प्रचारांतील अर्थ हलवण्याची इच्छा असतांना हातपाय वगैरे अवयवांची चलनशक्ति नष्ट होणें, असा आहे. परंतु वैद्यकीय दृष्टीनें पहातां, स्पर्शज्ञान, रुधिराभिसरण, इत्यादि शक्ती नष्ट होणें या लक्षणाचा गात्रोपघातांतच समावेश केला पाहिजे. यास स्वतंत्र रोग न समजतां स्नायू किंवा मज्जास्थानांच्या ठिकाणीं विविक्षित व्याधी अगर इजा होऊन अगर वातामुळें तात्कालिक त्यांची क्रिया बंद होऊन (उदाह० उन्माद रोगांत) हें लक्षण रोग्यास होतें असें समजावें. हा रोग कधीं एक दोन स्नायूपुरता असतो. व कधीं अर्धांगासहि होतो व कधीं छाती अगर कमरेखालील सर्वांगास होतो. तो कां व कसा होतो हें समजण्यास मज्जातंतू, मेंदू व पृष्ठवंशरज्जूपासून निघून कोणत्या मार्गानें स्नायूंत शिरतात व कोणत्या मार्गानें स्पर्शसंवेदना-शीतोष्णादि भावनांचें मेंदूस ज्ञान होतें या इंद्रियविज्ञानशास्त्रांतील भागाचें मनन लक्षपूर्वक केलें असता समजेल; तें येथें देणें शक्य नाहीं. परंतु पुढील रोगलक्षणें संभवतात तीं अशीं:— (१) मेंदूच्या वरील भागास रोग अगर इजा झाली तर इच्छाशक्तिपूर्वक स्नायूंची चलनशक्ति नष्ट होते (२) मेंदूचा खालील भाग वरीलप्रमाणें विकृत झाल्यास चलनशक्ति नष्ट होऊन शिवाय स्नायू क्षीण होऊन बारीक होऊ लागतात. या रोगांचे अनेक भेद आहेत. मेंदूंत विकृतीमुळें होणाऱ्या रोगांपैकीं अर्धांगवाताचें वर्णन पूर्वी दिलेंच आहे (अर्धांगवायु पहा). बाकीच्या मुख्य प्रकारांचें त्रोटक वर्णन पुढें दिलें आहे.

पृष्ठवंशांतील मज्जास्थानें बिघडून होणारे रोग (पंगुवायु) कारणें:— पृष्ठवंशरज्जूंतील चलन अगर स्पर्श, वेदनादि संदेशग्राहकमार्ग रोगामुळें अगर दुखापतीमुळें त्या पृष्ठवंशरज्जूंतील भागांत दाह सुरू होऊन त्याच्या खालील भागांत म्हणजे छाती अगर कमरेखालील दोन्ही बाजूंचें सर्वांग लुलें पडतें; चलनशक्ति व त्यांतील स्पर्श, वेदना शीतोष्णादि ज्ञान रोग्यास नसतें. इच्छाशक्ति नसल्यामुळें न कळत लघवीस व शौचास होतें. स्नायुपोषण अनैच्छिक रीतीनें आपोआप होणें बंद झाल्यामुळें अंथरुणांत पडून राहिल्यामुळें शय्याक्षतें होण्याची प्रवृति असते. तथापि पृष्ठवंशरज्जूंचा थोडा भाग बिघडला असल्यास स्नायू फारसे क्षीण होत नाहींत. या प्रकारचा पंगुवायु, मग तो रोगामुळें होवो अगर अपघातामुळें पाठीचा कणा दुखावून होवो—बरा होण्याचा संभव असतो. त्यासाठीं रोग्यास उताणें निजवून दररोज त्याचे हातपाय चोळून परिचारकाकडून त्याच्या चलनक्रिया बळेंच करीत जाव्या. स्वच्छता राखून शय्याक्षतें होऊ देऊ नयेत. मूत्र कोंडून नंतर नकळत वाहूं लागण्याचे अगोदर दिवसांतून दोनतीन वेळां मूत्रशलाकेनें लघवी काढीत जावी. म्हणजे इष्ट हेतु साध्य होईल.

बा ल पं गु त्व रो ग.—लहान मुलांमध्यें वरील रोगासारखा रोग आपोआप झालेला पहाण्यांत येतो. कांहीं देशांत तर सांथीप्रमाणें पुष्कळ मुलांनां एके काळीं हा रोग होतो, व तेथें सांथ नसली तर हा रोग नेहमीं वारंवार आढळतो व यावरून एखाद्या विवक्षित रोगजंतूमुळें हा संसर्गकारीरूपानें रोग होत असावा. या रोगांत पृष्ठवंशरज्जूंतील गाभ्याच्या मध्यभागी शिंगाच्या आकाराची धूसरवर्ण मज्जास्थानें असतात तीं विकृत होऊन अंग लुलें पडतें. हा रोग क्वचित् मोठ्या माणसांतहि होतो. मुलाची एकाएकीं प्रकृति बिघडते. परंतु कदाचित् त्याचा एखादुसरा हात अगर पाय अंमळ लुला, अशक्त झाला आहे इकडे कोणाचें लक्ष न जाईल इतकी थोडी विकृति प्रथम होते. नंतर एकदम ज्वर, ओकारी, आंचके येणें आणि मुलास बोलतां येईल इतके वय असल्यास हातपाय बधिर होऊन मुंग्या येत असल्याचें त्यास कळतें. व ज्या अवयवास असें होतें तो पुढें लुला पडतो. येणेंप्रमाणें एकापेक्षां अधिक अवयवहि लुले पडतात. परंतु त्यांत विशेष हा असतो कीं, त्यांची चलनशक्ति नष्ट झाली तरी स्पर्श, वेदना, शीतोष्णज्ञान शाबूत असतें. कांहीं विवक्षित स्नायूंचा समूह अगर एकाच बाजूचा हात व पाय अशा रीतीनें लुला पडला तरी त्यात अर्धांगवाताप्रमाणें अगदीं बरोबर निम्में अंग निखालस निर्जीव झाल्याप्रमाणें स्थिति होत नाहीं. हे विकृत स्नायू तीव्र रोग असल्यास भराभर क्षीण होतात व त्यांना विजेची पेटी लाऊन संवेदना होत नाहीं. सौम्य रोग असल्यास फक्त एखाद्या स्नायूचा समूह—हाताचा किंवा पायाचा—लुला पडून ते स्नायू बारीक व क्षीण होतात; पण नष्ट झालेली चलनशक्ति परत येण्याची बरीच आशा असते. त्याबरोबरच रक्ताभिसरणक्रिया मंदगतीनें चालल्यामुळें तो लुला भाग काळवंडलेला, तेजोहिन व थंडगार होतो. आंतील हाडांचें व मांसाचें पोषण न झाल्यामुळें त्यांची वाढ खुंटून दुसऱ्या बाजूच्या हात अगर पायापेक्षा तो आखुड होतो. यामुळें व स्नायूंचा हाडावरील दाब कमी होऊन हाडें वांकडीं होऊन त्यांना निरनिराळ्या प्रकारचें व्यंगत्व येतें. या रोगांत नकळत लघवीस अगर शौचास होत नाहीं. किंवा शय्याक्षतेंहि पडत नाहींत व बहुधा रोगी दगावत नाहीं. रोगास प्रारंभ झाल्या दिवसापासून एक महिन्यानें क्षीण झालेले स्नायू चोळण्यास सुरवात करावी. म्हणजे त्यांतील रुधिराभिसरणक्रिया वाढून व्यंगत्व कमी होईल. त्यावा उपयोग न झाल्यास शस्त्रवैद्यास दाखवून व्यंगत्व हरण करावें.

व र्ध मा न क्षी ण स्ना यु स्तं भ.—या रोगास २५ ते ४५ वर्षांच्या सुमारास आरंभ होऊन प्रथम हाताचे तळवे, करांगुली व अंगठ्याखालीं जे मांसल उंचवटे आहेत ते, झिजून क्षीण होण्यास सुरवात होते. हा रोग पुरुषांत विशेष आढळतो. याचें कारण वरील रोगाप्रमाणेंच आहे. परंतु हा रोग अतिसावकाशपणें येतो व बरा होत नाहीं. क्रमाक्रमानें बोटें व हात यांचे मांस कृश होऊन ते अवयव बारीक होतात. नंतर बाहु, खांदा, छाती यांची गति सावकाश पणें होते. हे स्नायू क्षणमात्र एकदम थरथरतात हा एक यांतं विशेष आहे. लघवी व मलशुद्धीच्या क्रिया बिघडत नाहींत. कफ, फुप्फुसदाह होऊन श्वसनशक्तीचा ऱ्हास झाल्यामुळें मृत्यु येतो. कित्येकांनां पुढील प्रकारचा जिव्हौष्ठस्तंभरोग होऊन मरण येतें.

जि व्हौ ष्ठ स्तं भ.—पुढील क्रिया करणाऱ्या स्नायूंना संदेशवाहक मेंदूतील मज्जातंतू बिघडून बोलणें, गिळणें, आवाज उत्पन्न करणें व चर्वणक्रिया, या क्रिया एकएकीं दुबळ्या होतात किंवा अगदीं बंदहि पडतात. चाळीस ते साठ उमरीच्या माणसामध्यें असा रोग हळूहळू आलेला दृष्टीस पडतो. प्रथम तालव्य व्यंजनाचा उच्चार करताना जरा बोबडेपणा वाटतो. नंतर पवर्गांतील ओष्ठस्थान असलेलीं अक्षरें उच्चारतांना बोबडेपणा दिसतो. नंतर तालुस्थानाचा मागील भाग लुला पडल्यामुळें बोलणें गेंगाणें—नाकांतील स्वरांत येतें; यानंतर जीभ लटकी पडत गेल्यामुळें तिच्या योगानें घांस घशांत लोटतां न येऊन अन्न गिळतां येत नाहीं. व मग तें अन्न गालफडांत सांचून बसतें. तसेंच तो घांस घशांतील गिळण्याच्या स्नायूंनीं चटकन् पकडून गिळण्याची क्रिया आपोआप सुरू व्हावी, परंतु त्यांमध्येंहि जडत्व आल्यामुळें तसें कांहींएक न होता उलट तें अन्न नाकपुड्यावाटें—अन्न पातळ असल्यास—परत येतें. यापुढें कंठांतील स्नायूंनां जडत्व येऊन भाषण अगदींच अस्पष्ट येऊं लागून अन्न गिळण्याची फार पंचाईत पडूं लागते. कंठांतील स्नायूचें स्पर्शज्ञान कमी होऊन अन्न अगर पाण्याचे थेंब श्वासनलिकेंत जाऊन खोकल्याचा ठसका सुरू होतो. यानंतर चर्वणक्रियेच्या स्नायूंना स्तंभ होऊन ते लुले पडतात व मागाहून श्वसनक्रियेचे स्नायू लुले पडून रोगी मधून मधून गुदमरतो. रोग्यास शुद्धि अगदीं चांगली असते स्नायू लुले पडून तोंड बावळें दिसतें व मनोविकार विशेष नाजूक स्थितींत असल्यामुळें रोग्यास रडें अगर हसूं चटकन येतें. व त्यावरून रोग्यास वेड लागल्याचा संशय येतो; पण वस्तुतः तसें कांहीं नसतें चेहऱ्याचा खालील भाग विकृत होतो; पण वरील भाग नीट असतो. या रोगांत अन्नकण श्वसनमार्गांत शिरल्यामुळें फुप्फुसदाह होऊन मेंदूंतील महत्त्वाचीं स्थानें बिघडल्यामुळें थोड्या दिवसांत रोगी दगावतो. तथापि प्लेगच्या तापांत कांहीं रोग्यांना अशा प्रकारचा स्तंभ होऊन फक्त बोबडेपणाचें व्यंग राहून ते रोगी बरींच वर्षे जगल्याचीं उदाहरणें दृष्टीस पडतात.

हातपायास हलविणारे मज्जातंतू बिघडून होणारा गात्रोपघात मज्जातंतुदाह होऊन एखादा स्नायु, स्नायूंचा समूह, किंवा सबंध हात अगर पाय अगर अवयव लुला पडणें संभवनीय असतें. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अर्दित

वायूमध्यें चेहऱ्याचे स्नायू हलविणाऱ्यास मज्जातंतूवर दाब पडून दाह उत्पन्न होऊन एका बाजूचा चेहरा वांकडा होतो हें होय. वातप्रकृतीच्या माणसास गारठा बाधून अगर वारा फार लागल्यामुळें असें होतें. तसेंच कुबडीचा साहाय्यानें चालणाऱ्या माणसांमध्यें कुबडीचा दाब मज्जातंतूवर पडल्यामुळें हात लुला पडतो हें दुसरें उदाहरण. पोटांत नकळत शिसें जाऊन तेलाचे रंग देणाऱ्या लोकांना विषबाधा होते; कारण या रंगांत शिशाचे क्षार असतात व त्यापासून मनगट लुलें पडतें. वातप्रकृतीच्या माणसास ओल्या जागेवर बसून अगर गारठ्यानें मांडीतील मज्जातंतूचा दाह होऊन ऊरुस्तंभ नांवाचा वायु होतो.

हस्तपाद मज्जातंतु दाहः—रक्तदोषामुळें अगर शिसें, सोमल, अति मद्यपान, मधुमेह, घटसर्प, बेरीबेरी इत्यादि रोगांचें विष रक्तांत भिनून त्यामुळें या प्रकारचा जो दाह होतो त्याचीं सामान्य लक्षणें पुढें दिलीं आहेत:—अगोदर शरीरांत कांहीं व्याधि असून त्यात दीर्घकालीन बेसुमार दारूच्या व्यसनाची भर पडून रक्त दुषित होतें. रोग फार तीव्र असल्यास रोग्याच्या छाती अगर कमरेखालील दोन्ही कडचा भाग लुला पडतो. परंतु पृष्ठवंशरज्जुदाहामुळें पंगुवायु होऊन शौचमूत्राच्या क्रियेवर रोग्याचा दाब रहात नाहीं. तसें लक्षण या रोगांत रोग्यास भ्रम झाला तरच होतें; एरवीं होत नाहीं. दुसरा फरक हा कीं त्या रोगात त्या स्नायूंचें स्पर्शज्ञान नष्ट होतें. पण या रोगांत स्नायू दाबले तर ते फार दुखतात; व ते स्नायू क्षीण होऊन बारीक होतात. कांहीं रोग्यामध्यें पायमोजे घातले असतां पायाचा जेवढा भाग आच्छादला जातो तेवढ्या भागातील स्पर्शज्ञान व वेदनासंवेदनज्ञान नष्ट होतें. रोग अधिक तीव्र झाल्यास याच प्रकारचा लुलेपणा हातांनाहि येतो; व हृदयहि दुर्बल होतें. व शरीरांतील इतर स्नायूहि केव्हां लुले पडतील याचा नेम नसतो. मानसिक स्थितीहि फारच बिघडून रोग्यास चित्तभ्रम व भुरळ पडते. त्यास काळवेळ हें कांहींच कळेनासें होऊन ओळखीच्या माणसास भलतेंच माणूस समजण्याचा भ्रम होतो. विशेष चमत्कार हा कीं, रोग्यास अगदीं लहानपणच्या गोष्टी आठवतात परंतु नुकत्या घडलेल्या गोष्टींचें विस्मरण पडतें.

मिथ्यास्नायुपुष्टिस्तंभः— जन्मतः कांहीं आनुवंशिक संस्कारामुळें मज्जास्थानांत कांहींहि विकृति न होतां एकाच कुटुंबांतील माणसे वयाच्या ठराविक वेळीं या रोगामुळें स्नायुदुर्बलतेमुळें लुलीं होतात. कित्येक कुटुंबांत पुरुषांनां मात्र हा रोग होतो. कधीं मुलांनां व मुलींना हा रोग होतो. तरी पण एकंदरींत स्त्रियांपेक्षां पुरुषांनां होणें अधिक संभवनीय असतें, व स्त्रिया फक्त हा आनुवंशिक रोग पुढील पिढींस सादर करतात. रोग्याचें वय स्नायुसमूह व स्नायुपुष्टि अगर क्षीणता यांच्या मानानें या रोगाचे अनेक पोटभेद केले आहेत. या रोगांत ध्यानांत ठेवण्यासारखी मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे जरी स्नायू पुष्ट दिसले तरी वस्तुतः त्यातील संकोचन पावणारे तंतू क्षीण व कमी झालेले असतात; व वसा व इतर निरर्थक तंतुवृद्धि होऊन अवयव विनाकारण पुष्ट दिसतो; व त्यावरून ह्या रोगाचें नांव सार्थ आहे असें म्हणावें लागतें. वयपरत्वें (१) बालस्नायुस्तंभ व (२) युवास्नायुस्तंभ असे याचे दोन भेद पडतात.

मुलांमध्यें बाह्यतः स्नायू क्षीण किंवा अतिपुष्ट असे दोन्ही भिन्न प्रकार भिन्न रोगांत नजरेस पडतात. अगोदर स्नायू क्षीण होऊन पुढें मुलांस अशक्तपणा आला म्हणजे कार्यकारणसंबंध लक्षांत येतो. परंतु मूल जन्मतः ढुंगण, मांड्या, पोटऱ्या, दंड वगैरे भीमसेनाप्रमाणें पुष्ट असून त्याचा निःशक्तपणा आईबापांच्या लक्षांत आल्यानें त्यास फार आश्चर्य वाटतें. मूल उभें राहूं लागलें म्हणजे सावधगिरीनें पाय बरेच फाकटून उभें रहातें. चालतांना फेंगडत व फरफरडत चालतें; वारंवार आपटतें; एकदां पडलें म्हणजे पुनः उठण्यास त्यास अडचण पडते व हात भुईवर टेंकून जपून पुनः उभें रहातें. उभें रहातांना गुडघा, कंबर वगैरे ठिकाणीं हात ठेवून तोल संभाळून सावधगिरीनें उभें रहातें. हा रोग असाध्यच आहे व असलीं मुलें मध्यम वयापर्यंत सुद्धां वाचत नाहींत.

कंपवायु.—हा रोग मनुष्यास उतारवयाच्या सुमारास होऊन त्यात मुख्य लक्षणें म्हणजे स्नायूंचा अशक्तपणा, कंप ताठरपणा, उभे रहाण्याची व चालण्याची विशिष्ट तऱ्हेची ढब हीं होत. प्रथम अशक्तपणा येऊन एका हातासच कंप सुटतो. कातगोळ्या वळतांना जसें मनुष्य आंगठा व तर्जनी हालवितो किंवा पखवाज हळूहळू एकसारखा वाजवितांना जशीं बोटें हलतात तशाच प्रकारचा कंप एका हातास सुरू झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं दुसऱ्या हातास, व नंतर पायाच्या घोट्याच्या ठिकाणीं कंप सुरू होतो. कांहीं रोग्यांचें मस्तक कंपामुळें सदा हलत रहातें. हा कंप दर सेकंदास सुमारें पांच झटके या वेगानें येतो हा कंप झोपेंत अगदीं थांबतो. चालण्याची व उभें रहाण्याची ढबहि चमत्कारिक असते. रोगी मान खालीं घालून जवळ जवळ अंतरावर पावलें टाकीत प्रथम सावकाश व नंतर झपझप वेगानें व अंमळ धांवल्याप्रमाणें तुरतुर चालतो. चेहरा जसें एखादें चित्र अगर पुतळा शून्यदृष्टि असतो तद्वत् दिसतो; परंतु त्या रोग्याची बुद्धि शाबूत असते. रोगी पुष्कळ वर्षे जगतो पण त्यावर उपाय फारसे चालत नाहींत म्हटलें तरी चालेल. फक्त हातपाय आंखडूं नयेत म्हणून दररोज दुसऱ्याकडून त्यांचें चलन करवून व चोळून घेऊन बरें वाटतें. वरील कित्येकप्रकारचे स्तंभरोग एकत्र दिले आहेत. त्यांची चिकित्सा कांहीं ठरीव सामान्य धोरणावर करावयाची असते. त्याची माहिती पुढें दिली आहे.

(१) रोग्यास बिछान्यांत निजवून ठेवावें; व मलमूत्रादींचें विसर्जन नियमितपणें होत जाईल अशी तजवीज राखावी.

त्याचप्रमाणें रोग्याची हृदयक्रिया, श्वसनक्रिया व पुरेसें अन्न यांत बिघड न होईल अशी व्यवस्था ठेवावी. औषधें व उत्तेजक पदार्थ द्यावेत किंवा नाहीं याचें ज्ञान डॉक्टरास नाडीवरून होतें. पडून राहिल्यानें फुप्फुसदाह होण्याचें भय असतें. याचें एक मुख्य कारण रोग्याच्या घशाच्या ठिकाणीं बधिरता उत्पन्न झाल्यामुळें त्यास अन्नपाणी घालते वेळीं दोहोंचे कण श्वसनमार्गांनें श्वासनलिकांत लोटले जातात व त्या बधिरत्वामुळें ते आगंतुक कण ठसका येऊन बाहेर खोकून पडावे तसें कांहीं एक न होतां फुप्फुसदाह उत्पन्न करितात. या दुखण्याच्या आरंभीं जर नाडी भरलेली व सशक्त असेल तर एकदां जुलाबाचें औषध देऊन कोठा साफ करावा. नाडी अशक्त असली तरी नियमितपणें मळशुद्धि होणें जरूर आहे. लघवी कोंडेल अशी वेळ येऊ देऊं नये.त्यासाठीं मूत्रनलिकेचा उपयोग जरूर तर अगोदरच करणें चांगलें. पण ती शलाका जंतुरहित राहील अशी काळजी घेणें जरूर आहे. नाहीं तर मूत्राशयांत जंतूंचा प्रवेश होऊन मूत्राशयदाहरोग उत्पन्न होतो. रोग्याची पाठ दररोज तपासून त्यास तेथें अगर अन्य ठिकाणीं दाब पडून शय्याक्षतें न पडतील अशी खबरदारी घ्यावी. तीं होण्याची खूण म्हणजे त्या भागावरील त्वचा स्वच्छतेच्या अभावामुळें कुजूं लागते. म्हणून दाब पडत असलेल्या जागीं अगोदरपासून कोलनवाटर किंवा स्पिरीट रोज चोळून तींत काठिण्य आणावें. त्वचा कुजण्याचें पूर्वचिन्ह पाठ किंवा कुल्ला या जागीं त्वचेवर लाल डाग दिसूं लागतो. असें झालें म्हणजे झिंकऑक्साइडची पूड अगर मलम त्या जागीं लावून त्या जागीं भार न येईल अशा नवीन स्थितींत रोग्यास निजवावा. किंवा आंगठीप्रमाणें वर्तुळाकार अशा गिरद्या त्या जागीं रोग्याखालीं ठेवाव्यात. रोग्यास कधीं शेकावें लागतें व रोग्याचें स्पर्शज्ञान कमी अगर नष्ट झाल्यामुळें शेकताना फोड उठेपर्यंत शेकलें तरी त्यास कळत नाहीं व अशा तऱ्हेनेंहि शय्याक्षतें पडतात. यासाठीं शेकण्याकरतां ज्या बाटल्यांचा उपयोग करावयाचा त्यांवर नेहमीं गरम कपडा गुंडाळून मग शेकीत जावें. असे फोड शेकतांना उठले तर ते बरे होण्यास जड जातात. छातीखालील दोन्ही बाजूंचें सर्वांग लुळें पडल्यास दोन्ही पायांत हातांनीं विणलेले जाड लोंकरीचे मोजे घालावेत. नंतर दोन्ही पायांवर त्याच्या लांबीच्या आकाराची चौकट ठेवून चौकटीवरून पांघरुणें घालावीत. म्हणजे पांघरुणाचा सदा भार पायावर पडून पाऊल लुळें पडतें तें पडणार नाहीं. रोगाची प्रथमावस्था संपतांच लगेच परिचारकाकडून हातापायाच्या चलनक्रिया बळें करविण्याच्या उद्योगास लागावें. व त्याचवेळीं ते अवयव चोळविण्याचा परिपाठ ठेवावा. कांहीं रोग्यांनां विजेची पेटी लावून फायदा होतो पण पेटीपासून वेदना होतात व खरोखर उपयोग चोळणें व कृत्रिम चलन यापेक्षां अधिक होतो किंवा नाहीं याचा वानवाच आहे. म्हणून निदान मुलांचे बाबतींत हा उपचार मुळींच करूं नये. हात अगर पाय परिचारक हलवीत असतां ती क्रिया आपण होऊन बुध्या करीत आहों अशा भावनेनें रोग्यानें त्यांत मन व लक्ष घालून हौसेनें या क्रिया कराव्यात व करून घ्याव्या. म्हणजे तुटलेले मज्जामार्ग दुरुस्त होऊन अगर नवीन मार्ग निर्माण होऊन मेंदू व स्नायू यांचा पूर्ववत् संबंध जडून चलनादि व्यापारांचे संदेश स्नायूंना पोंचल्यानें रोगी हिंडू फिरूं लागतो.

गॉथ लोक—गॉथ हे टयूटन वंशाचे लोक होत. ख्रिस्ती शतकाच्या पहिल्या शतकामध्यें व्हिश्चुला नदीच्या तीरावरील प्रदेशाच्या मध्यभागांत त्यांची वस्ती होती. टयूटन वंशाच्या लोकांपैकीं, गॉथ हे अगदीं पूर्वेकडील प्रदेशांत रहाणारे लोक होते असें म्हणावयास हरकत नाहीं. बेरिग राजाच्या नेतृत्वाखालीं हे स्वीडनहून सरकत सरकत गॉथिस्कॅन्डिझा येथें आले असें जोर्डेन्स यानें म्हटलें आहे. यांचा सहावा राजा फिलिमर याच्या कारकीर्दींत सिथियाच्या प्रदेशांत यांनीं आपली वस्ति केली. यापूर्वी त्यांनीं उलमेरुगी व व्हॅंडाल या लोकांनां जिंकून त्यांवर आपला अंमल बसविला.वर दिलेल्या गॉथ लोकांच्या स्थानांतराची हकीकत ही प्रमाण मानतां येत नाहीं असें पुष्कळांचें मत आहे व अद्यापिहि विद्वानांत यासंबंधीं चर्चा सुरू आहे तथापि एक गोष्ट खरी दिसते कीं ख्रिस्ती शतकाच्या आरंभीं ते मारोबुडुस या मारकोमॅनिक राजाच्या सत्तेखालीं होते. तिसऱ्या शतकांत त्यांचा रोमन लोकांशीं संबंध आला. या काळांत त्यांनीं डान्यूब नदीपर्यंतच्या सर्व टापूवर आपला दरारा बसविला होता. रोमन लोकांवर देखील त्यांनीं स्वाऱ्या करण्यास कमी केलें नाहीं. आस्ट्रोगॉथा व नीवा या राजांच्या कारकीर्दींत गॉथ लोकांनीं रोमन लोकांचा पुष्कळ ठिकाणीं पराजय केला होता असें जोर्डेन्सनें म्हटलें आहे. रोमचा बादशहा गॅलस हा गॉथला खंडणी देत असे. डान्यूब नदीच्या कांठच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर, गॉथ लोकांनीं काळया समुद्राकडे आपला मोर्चा वळविला, व १५।२० वर्षांच्या अवधींत आशिया मायनर व ग्रीसच्या समुद्रकांठच्या प्रदेशाला त्यांनीं शह देण्यास सुरुवात केली. कॉन्स्टंटाईन दि ग्रेटच्या अमदानींत गॉथ लोकांनीं थ्रेस आणि मोडाशिया हे प्रांत लुटले. पण कॉन्स्टंटाईननें त्याचा पराभव करून इ. स. ३३६ मध्यें त्यांनां तह करण्यास भाग पाडलें.

पण अशा रीतीनें गॉथ लोक दक्षिणेकडे व पूर्वेकडे नवीन मुलुखांवर स्वाऱ्या करून ते प्रांत आपल्या घशाखालीं घालीत होते तरी त्यांनीं व्हिश्चुला नदीच्या कांठचा प्रदेश सोडला होता असें दिसत नाहीं. कारण कान्स्टंटाईनें राजाच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं ऑस्ट्रोगॉथा यानें जेपीडेचा राजा फॅस्टिडा याजवर व गेबेरिक यानें व्हॅंडलांचा राजा विसिमर याजवर मोठे विजय मिळविले असें जोर्डेन्स यानें म्हटलें आहे. गेबेरिकच्या मागूनचा हर्मनरिक हा गॉथ लोकांचा प्रसिद्ध राजा होय. यानें रशियाच्या दक्षिण

भागांतील, हरूली, ईस्टी, व्हेनेडी इत्यादि जाती जिंकल्या. पश्चिमेस होल्स्टीनपर्यंत याची सत्ता प्रस्थापित झाली होती. असें अँग्लो सॅक्सन लोकांच्या इतिहासावरून समजतें. इ. स. ३७० मध्यें हूण लोकांनीं याच्या मुलुखावर स्वारी केल्यामुळें यानें आत्महत्या करून घेतली असें म्हणतात. आस्ट्रोगॉथ या नांवानें प्रसिद्ध असलेल्या गॉथ लोकांच्या राज्याचा बराच भाग हूण लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतला. व्हिसीगॉथ लोकांना डान्यूब नदीच्या पलीकडे मोडाशिया प्रांतांत वसाहत करण्याला परवानगी देण्यांत आली. गॉथ लोकांपैकीं पुष्कळ लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला. पण रोमन सुभेदारांनीं गॉथ लोकांवर जुलूम करण्यास सुरवात केल्यामुळें सन ३७८ मध्यें अँड्रियानोपल येथें व्हॅलेन्सचा पराजय होऊन त्यांतच त्याचा अंत झाला.

इ. स. ३७० च्या सुमारासच गॉथ लोकांचे पूर्वगॉथ व व पश्चिमगॉथ असे दोन भाग झाले. पूर्वगॉथ लोक डान्यूबच्या उत्तरेकडील प्रदेशांत रहात असून त्याच्यावर हूणांचें राज्य होतें. पश्चिम गॉथ लोकांनीं डान्यूब नदी ओलांडून रोमन प्रांतांत वास्तव्य केलें होतें. व रोमच्या इतिहासांत आपलें नांव पुष्कळ वेळां गाजाविलें.

प श्चि म गॉ थ.—रोमनलोकांनीं या पश्चिमगॉथ लोकांना फार त्रास देण्यास सुरुवात केल्यामुळें, रोमन लोकांत व या पश्चिमगॉथ लोकांत वारंवार खटके उडू लागले. याचें पर्यवसान युद्धांत होऊन सन३७८मध्यें गॉथ लोकांनीं अँड्रियानोपल येथें रोमन सरदार व्हॅलेन्स याचा पूर्ण पराभव केला. पुढें व्हॅलन्सनंतर थीओडोशिअस यानें यांच्याशीं तह करून त्यांना शांत केलें व पुष्कळशा गॉथ लोकांना आपल्या पदरीं नोकऱ्या दिल्या.

पण सन ३९५ मध्यें थीओडोशियस वारल्यानंतर रोमन साम्राज्यांत व पश्चिमगॉथ लोकांत पुन्हां बेबनाव उत्पन्न झाला, तेव्हां या गॉथ लोकांनीं रोमन साम्राज्याशीं असलेलें मांडलिकत्वाचें नातें झुगारून देऊन आपली स्वतंत्र सत्ता स्थापित केली व अॅलॅरिक यास आपला राजा निवडलें. अॅलॅरिक हा मोठा कर्तृत्ववान माणूस होता. याच्या कारकीर्दींत पश्चिम गॉथ लोकांनीं स्वातंत्र्य मिळविलें. रोमन लोकांनीं अॅलॅरिक व त्याचे अनुयायी यांनां पुष्कळ आमिषें दाखविलीं. बहुमानाच्या पदव्या व जागा देऊं केल्या व अॅलॅरिकनें प्रसंग विशेषीं त्या स्वीकारल्याहि. तथापि त्यानें आपलें स्वातंत्र्य जाऊं दिलें नाहीं. आपलें कायमचें राज्य कोणत्या तरी भागात स्थापन करण्याची कल्पना अॅलॅरिक यास फार मागाहून सुचली. आफ्रिकाखंडांत आपलें राज्य स्थापण्याची त्याची इच्छा होती असें दिसतें.

३९५-९६मध्यें अॅलॅरिकनें ग्रीसवर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली.तसेंच त्यानें४०२-३त इटलीवर स्वाऱ्या केल्या व इटलीची दुर्दशा करून टाकिली. अॅलॅरिक हा ४१० त मरण पावला.

अॅलॅरिकच्या मरणानंतर आटाल्फस हा गादीवर आला; व त्यानें आपल्या पराक्रमानें पश्चिम युरोपमध्यें गॉथ लोकांचें राज्य स्थापन केलें. आटाल्फस हा महत्वाकांक्षी असल्यानें त्यानें रोमनसाम्राज्य आपल्या घशाखालीं घालण्याचा बेत केला होता. पण रोमन लोकांची संस्कृति उच्च दर्जाची असल्याचें त्याला आढळून आल्यामुळें त्यानें रोमनराज्य जिंकण्याचा बेत सोडून दिला व रोमन लोकांशीं मैत्री संपादन करून रोमन लोकांनां रानटी लोकांच्या स्वारीचा जो त्रास होत असे त्यापासून त्यांची मुक्तता केली. या त्याच्या उपकाराबद्दल रोमन बादशहांनीं त्याला स्पेन व गॉलमधील पुष्कळ प्रदेश दिला. पश्चिमगॉथ लोकांच्या थिओडॉरिक राजानें रोमन लोकांच्या वतीनें हूण लोकांशीं लढाई केली पण त्यांत तो स्वतः मरण पावला. पुढें युरिकच्या कारकीर्दींत पश्चिमगॉथ लोकांची सत्ता स्पेनभर पसरली. याच सुमारास फ्रँक लोकांनीं कॅथलिक धर्माची दीक्षा घेतल्यामुळें त्यांनीं कॅथोलिक धर्माचा प्रसार करण्यासाठीं पश्चिमगॉथ लोकांवर स्वारी केली व त्यांचा पाडाव केला. यामुळें पश्चिमगॉथ लोकांची सत्ता डळमळली व स्पेनमधून व गॉलमधून पश्चिमगॉथ लोकांच्या सत्तेचें उच्चाटण होतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली पण पुढें उल्लेख केलेल्या पूर्वगॉथ लोकांच्या थीओडॉरिक राजानें पश्चिमगॉथ लोकांचें स्पेनमधील अस्तित्व कायम राखिलें.

पू र्व गॉ थ लो क.—याच सुमारास पूर्वगॉथ लोकांनीं रडगैससच्या आधिपत्याखालीं इटलीवर स्वारी केली होती. हे लोक जरी आपल्याला हूण लोकांचे मांडलिक म्हणवीत असले तरी वस्तुतः ते स्वतंत्रच होते. हूणसत्तेचें ज्यावेळीं उच्चाटण झालें त्यावेळीं हे लोक स्वतंत्र झाले. पांचव्या शतकाच्या उत्तरार्धांत या पूर्वगॉथ लोकांनीं आपली सत्ता वाढवण्याचा उद्योग आरंभला होता व अमाली घराण्यांतील राजांच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं तत्कालीन राजकारणांत महत्वाचा भाग घेतला होता असें दिसतें. या घराण्यांतील इतिहासप्रसिद्ध राजा थिओडॉरिक दि ग्रेट हा होय. हा पहिल्या प्रतीचा मुत्सद्दी होता. तो वरपांगी रोमन लोकांशीं सख्य दाखवीत असे व त्यांचें सहाय्य घेत असे. ४८८ सालीं त्यानें झेनो बादशहाच्या आज्ञेवरून ओडोएकर राजापासून इटली जिंकून घेण्याकरितां स्वारी केली. या स्वारींत पश्चिम गॉथ लोकांनींहि त्याला मदत केली होती असें दिसतें. या लढाईत थीओडॉरिक हा विजयी झाला व त्याची सत्ता इटली, सिसली, डाल्मेशिया इत्यादि देशांवर पसरली. पुढें पश्चिमगॉथ लोकांची सत्ता संपुष्टांत आल्यावर स्पेनवर व गॉलच्या बऱ्याच भागावर यानें आपली सत्ता प्रस्थापित केली.

थिओडॉरिक राजानें पूर्वगॉथ लोकांच्या सत्तेखालीं स्पेनप्रमाणेंच पुष्कळ मुलुख आणलेला होता व आपल्या बुद्धिमत्तेनें त्यानें आपल्या हयातींत उत्तम प्रकारें राज्य

केलें, पण त्याच्या मरणानंतर पूर्वगॉथ व पश्चिमगॉथ हे पुन्हां अलग झाले. थिओडॉरिक राजाच्या मागून आलेल्या राजांत थिओडॉरिकची तडफ नव्हती. त्यामुळें पूर्वगॉथ लोकांच्या सत्तेला पुन्हां उतरती कळा लागली. जस्टिनियन बादशहानें पूर्वगॉथ लोकांपासून इटली परत बळकावून घेतला. त्यामुळें पूर्वगॉथ लोकांची सत्ता जवळ जवळ नष्टच झाली. पण पश्चिमगॉथ लोकांनीं मात्र आपली सत्ता कांहीं कालपर्यंत नष्ट होऊं दिली नाहीं. पश्चिमगॉथ लोकांची सत्ता अद्यापि गॉल व स्पेनवर होती. आसपासच्या मुलुखांत मात्र कॅथोलिकपंथी गॉल लोकांचें वर्चस्व होतें. या लोकांनीं हलके हलके पश्चिमगॉथ लोकांची सत्ता नष्ट करून रोमन साम्राज्याचा विस्तार करण्याचा खटाटोप सुरू केला. तरी पण स्पेनमध्यें पश्चिमगॉथ लोकांची सत्ता पुष्कळ काळपर्यंत चालू होती. लियोव्हिजील्ड (५६८–५८६) च्या कारकीर्दीत पुन्हां पश्चिमगॉथ लोकांनीं आपल्या सत्तेचा विस्तार करण्यास सुरवात केली. त्याचा मुलगा रिकेर्ड याच्या कारकीर्दीत गॉथ व रोमन लोकांमध्यें ऐक्य करण्याचा प्रयत्न झाला. पुष्कळ गॉथ लोकांनीं कॅथोलिक पंथ स्वीकारला. गॉथभाषेपेक्षां रोमन भाषेला प्राधान्य देण्यांत आलें. तरी पण गॉथलोकांमध्यें व रोमन लोकांमध्यें संस्कृतिभेद व वर्णभेद हा कायमच राहिला. गॉथ सरदारांनीं अद्यापि रोमन आचारविचारांचा अवलंब केला नव्हता. त्यामुळें गॉथ लोकांचें वैशिष्ट्य कायमच राहिलें. स्पेनमध्यें गॉथ लोकांचाच राजा राज्य करीत असे. पुढें मुसुलमानी सत्तेशीं स्पेननें जो झगडा कित्येक शतकें चालू ठेवला त्यांत या गॉथ लोकांचें पुष्कळच साहाय्य झालें. हल्लींच्या स्पॅनिश लोकांतहि गॉथ लोकांचें रक्त अद्यापि खेळत असल्याचें दृष्टोस पडतें. अशा रीतीनें इटलीमधून जरी गॉथलोकांचें पूर्ण उच्चाटन झालें तरी स्पेनमध्यें गॉथलोकांचें अद्यापहि अस्तित्व दिसून येतें.

गॉथिक वाङ्मय—गॉथ लोकांमधील वाङ्मयाचा विचार केल्यास, गॉथिक भाषेंत उलफिलासनें जें बायबलचें भाषांतर केलें आहे त्याचा प्रामुख्यानें निर्देश करणें जरूर आहे. याशिवाय गॉथिक भाषेंत लिहिलेले धार्मिक ग्रंथ संपूर्ण नाहींत, तरी तुटक तुटक असे उपलब्ध झालेले आहेत. इ.स ५००च्या सुमारास थीओडोरिकनें काढलेलें आज्ञापत्र लॅटिन भाषेंत उपलब्ध आहे. त्यावरून व थीओडोरिक व त्याच्या मागून होणाऱ्या राजांच्या राजकीय पत्रव्यवहारावरून गॉथ लोकांचे कायदेकानू काय होते याचेंहि आपल्याला ज्ञान होतें. इ. सन. ६५४ सालीं रेसेसविंथ राजानें आपल्या पूर्वींच्या गॉथ राजांचे कायदेकानू एकत्र करून एक कायदेसंग्रह (कोड) तयार करविला. गॉथ लोकांच्या इतिहासावर जोर्डेन्स यानें ग्रंथ लिहिला आहे. त्याशिवाय इसिडोरनेंहि सातव्या शतकापर्यंतचा पश्चिम गॉथ लोकांचा इतिहास लिहिलेला आढळतो. पांचव्या शतकांत होऊन गेलेल्या सॅल्व्हियन नांवाच्या ग्रंथकारानें, 'डेग्यूबर नेशने डी' नांवाचा ग्रंथ लिहिला असून त्यांत गॉथ लोकांची सांगोपांग माहिती दिली आहे. या ग्रंथांत रोमन लोकांच्या दुर्गुणांची निंदा व गॉथ लोकांच्या नीतिमत्तेची फार स्तुती केली आहे.

भाषा.—वर सांगितलेंच आहे कीं, गॉथिक भाषेंत उलफिलासनें बायबलचें भाषांतर केलें. याशिवाय बायबलवरील टीकाग्रंथहि गॉथिक भाषेंत उपलब्ध आहेत. या ग्रंथांवरून गॉथिक भाषेचें स्वरूप आपणाला कळून येतें. या भाषेंतील बरींचशीं अक्षरें, ग्रीक अन्शल लिपीपासून घेतलेलीं आढळतात. कांहीं अक्षरें, रूनिक लिपि अगर लॅटिन लिपीपासून घेतलेलीं दिसतात. ग्रीक व लॅटिन ग्रंथांत मधून मधून गॉथिक भाषेंतील विशेषनामें सांपडतात. तसेंच सहाव्या शतकांतील साल्झबर्ग येथील हस्तलिखित ग्रंथांत बुखियो येथें सांपडलेल्या धातूंच्या बनविलेल्या हरावर व कोव्हेल येथें सांपडलेल्या भाल्याच्या मुठीवर गॉथिक भाषेंत लिहिलेले लेख आढळतात. त्यावरूनहि गॉथिक भाषेचें स्वरूप काय होतें याची कल्पना आपल्यास करतां येते. तत्कालीन ट्यूटनवंशीय लोकांच्या भाषांपेक्षां या भाषेंत एक प्रकारचें वैशिष्ट्य आढळतें. चौथ्या शतकांत व्हँडॉल व जेपीडे लोकहि हीच भाषा बोलत होते असें प्रोकोपियसनें म्हटलें आहे. चौथ्या व पांचव्या शतकांत यूरोपमधील पुष्कळ राष्ट्रें व आफ्रिका खंडाच्या उत्तर भागांतील लोक हीच भाषा बोलत असल्याचें दिसतें. पण ही जरी एके काळीं लोकप्रिय भाषा होती तरी ती फारच थोड्या काळांत लुप्तप्राय झाली. मध्ययूरोपमध्यें ही भाषा अधिक काळ टिकाव धरून होती. ९ व्या शतकांत लोअर डान्यूबच्या कांठच्या प्रदेशांतील चर्चमध्यें हीं भाषा प्रचारांत होती असें स्ट्रेबो म्हणतो. क्रिमियामध्यें मात्र १५ व्या शतकापर्यंत ही भाषा बोलली जात होती असें इतिहासावरून सिद्ध करतां येतें.

[संदर्भ ग्रंथ—टी हॉड्‌गकिन–इटली अँड हर इन्व्हेडर्स (ऑक्सफर्ड १८८०–१८९९); मिलमन–हिस्टरी ऑफ लॅटिन ख्रिश्चॅनिटी (१८६७), ब्रॅडले–हिस्टरी ऑफ गॉथ्स (स्टोरी ऑफ नेशन्स सीरीज); राइट–ए ग्रामर ऑफ गॉथिक लँग्वेज (ऑक्सफर्ड १८९२)].

गांधार देश—या देशाबद्दल वैदिककालीन माहिति ज्ञानकोश विभाग ३ रा पृ. २०९ येथें आली आहे. महाभारतांत गांधार देशाचा उल्लेख पुष्कळदां येतो. धृतराष्ट्राची पत्नी गांधारी ही या देशाच्या सुबल राजाची मुलगी होती व शकुनी नांवाचा त्याचा मुलगा होता. हा प्रांत सांप्रतच्या वायव्यसरहद्दीवरलि कंदाहार प्रांत होय. यांत काबूल (प्राचीन कुभा) नदीच्या दक्षिणेकडील खोरें, तेथून सिंधूनदीपर्यंतचा प्रदेश, दक्षिणेस सफेत कोह आणि कोहात पर्वत यांच्यापासून उत्तरेस स्वातच्या खोऱ्यापर्यंतचा प्रदेश इतक्या भागाचा समावेश होतो. म्हणजे प्रस्तुतचा पेशावर जिल्हा, कोहातचा कांहीं भाग, मोहंमदचा

प्रदेश, स्वात, बाजौर व बुनैर (उद्यान) हे प्रांत होत. या प्रांताभोंवतीं सर्वत्र डोंगर आहेत. या देशाची प्राचीन राजधानी तक्षशिला होती. तसेंच पुष्कलावती, पुरुषपूर व उद्भांडपूर हीं गांवेंहि राजधान्या होत्या. येथील लोकांनीं दरायसला ग्रीसवरील स्वारींत मदत केली होती. गांधार देशांत बौद्धधर्म बराच प्रचलित होता. येथें फाहिआन, ह्युएनत्संग व यूकोन्ग हे तीन चिनी प्रवासी आले होते. फाहिआन म्हणतो कीं, मगधाच्या खालोखाल येथेंच बौद्धधर्म जास्त पसरला होता. गांधारीचा बाप सुवल हा शैलूष गंधर्वाचा वंशज होता असें म्हणतात. बृहत्संहितेंत हा देश उत्तर विभागांत दिलेला असून तेथील लोकांनांहि गांधार हेंच नांव दिलेलें आहे. अशोकाच्या एका शासनांत गांधार हें नांव येतें. त्यांत गांधार लोक हे अशोकाची प्रजा असल्याचें म्हटलें आहे. कनिष्काचें घराणें गांधारावरच राज्य करीत असून त्यांची राजधानी पुरुषपूर(पेशावर)होती. ह्युएनत्संगच्या वेळीं गांधारदेश काबूलच्या शाही राजांच्या अंमलाखालीं आला. त्याच्या आधीं सिंहपूर (लवण गिरीचा प्रांत) व उरशा (हजारा प्रांत) हीं राज्यें गांधार देशांत मोडत होतीं. गांधार देश हें हूणांचें मुख्य ठाणें होतें. अलेक्झांडरच्या पूर्वी (खि. पू ५ वें शतक) उत्तरहिंदुस्थानांत जीं स्वतंत्र सोळा राज्यें होतीं त्यांत गांधार राज्य एक होतें. सुर्त्तामांतील उल्लेखाप्रमाणें अलेक्झांडरच्या सुमारास गांधारची राजधानी तक्षशिला होती. पेशावर (पुरुषपूर) येथें कनिष्कानें एक चैत्य उभारला होता. या चैत्याची माहिती सुंगयून. फाहिआन, ह्युएनत्संग व अल्बेरूणी यांनीं दिली आहे एम्. फौशेर यानें गांधारदेशाबद्दल कांहीं माहिती लिहिली असून त्याच्या सांगण्यावरून सरकारी पुराणवस्तुसंरक्षकखात्यानें पेशावरजवळील वरील चैत्य उकरून काढला आहे. त्यांत कनिष्काची मूर्ति व लेख कोरलेला एक करंडा व इतर जिन्नस सांपडले होते. गांधार देशांतील कोरीव मूर्तिकाम हें ग्रीस व रोमन या दोन मिश्रणांचें होतें असें व्हि. स्मिथ म्हणतो. हीं कोरीव व कलाकुसरीचीं कामें पेशावरनजीकच्या प्रांतांत विपुल असून तीं कनिष्क व त्याचे वंशज यांच्या कारकीर्दींत खोदलीं गेलीं आहेत. तीं बहुधा बौद्धधर्मविषयक व्यक्ती अगर प्रसंगांचीं आहेत. त्यावरून तत्कालीन बौद्ध धर्माच्या इतिहासावर व लोकस्थितीवर बराच उजेड पडतो. या खोदकामाचा अत्युत्तम नमुना दुसऱ्या शतकांतील होय. त्यावेळीं या कलेचा या प्रांतांत कळस झाला होता. कनिष्काच्या कुशान घराण्यानंतर हूणांनीं गांधार देशावर हल्ले करून तो काबीज केला (४६५). या हूणांनीं फार अत्याचार केले असें सुंगयून म्हणतो. त्यानंतर बहुधा काबूलचें शाही राज्य गांधारावर झालें असावें. पुढें बंगालच्या पालघराण्यांतील धर्मपाल राजानें कनोजच्या चक्रायुध राजास गादीवर बसवितांना आसपासच्या ज्या भोज, मत्स्य, कुरु, यदु वगैरे नऊ राजांची संमति घेतली होती त्या राजांत गांधारराजाचेंहि नांव येतें. ही गोष्ट सन ८०० च्या सुमाराचा होय. समुद्रगुप्तानें येथील कुशान राजाशीं मित्रत्वाचा तह केला होता असा उल्लेख आहे. हल्लीं या देशांत ओरकझाई, आफ्रिडी व मोहंमद लोक राहतात. यांत काबूल व स्वात या दोनच नद्या आहेत. प्राचीन वर्णनांत या देशाच्या भरभराटीची जी माहिती आढळते ती हल्लीं आढळत नाहीं. आतां सर्वत्र रुक्षपणा पसरलेला आहे. मात्र जुने अवशेष पुष्कळ आहेत. गांधारशिल्पाची माहिती शिल्पशास्त्रांत आढळेल. [बृहत्संहिता ५, ९, १०, १४; इंडियन अँटिक्वरी पु.२०; इंपीरिअल ग्याझे.१२; प्राचीन कोश; स्मिथ-अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया; साचौ-अल्बेरूणी; बील-रेकार्ड्स व्हॉ.१; आर्किआलॉजिकल रिपोर्ट १९०८-०९; अय्यंगार-एन्शन्ट इंडिया].

गांधारी—गंधाराधिपति जो सुबल त्याची कन्या. गांधारी धृतराष्ट्राची पत्नी असून तिला धृतराष्ट्रापासून शंभर पुत्र झाले. तिचा पति अंध असल्यामुळें गांधारीहि सम दुःख भोगण्याकरितां म्हणून आपल्या डोळ्याभोंवतीं पट्टा बांधीत असे. तिच्या पित्याच्या नांवावरून तिला सौबाली आणि सौबालेयी अशीं नांवें पडलीं. व्यासाच्या वरप्रसादानें तिला शंभर पुत्र झाले अशी कथा आहे. कुंतीस आधीं पुत्र झाल्याचें समजल्यावरून हिनें आपला गर्भ बलात्कारानें पाडला असतां एक मोठा मांसाचा गोळा पडला तेव्हां तिला फार दुःख झालें. परंतु व्यासानीं तो आकारहीन गोळा घेऊन त्याचे १०१ तुकडे केले व ते सर्व निरनिराळ्या तुपाच्या रांजणांत ठेविले. योग्य कालानंतर गांधारीचा प्रथम पुत्र दुर्योधन जन्मास आला. नंतर एक महिन्यानें दुसरे ९९ पुत्र व एक कन्या दुःशला यांचा जन्म झाला. बालपणांत रुद्राचें तिनें आराधन केलें होतें. त्यावेळीं शंकरानें शंभर मुलांचा तिला वर दिला होता. हिनें दुर्योधनाची पांडवांचा विनाकारण छळ करण्याबद्दल पुष्कळच कानउघाडणी केली होती, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. युद्धानंतर आपल्या मुलांच्या नाशास श्रीकृष्णच कारण आहेत अशा समजुतीनें हिनें त्यांना यादवकुळाचा नाश लवकरच होवो असा शाप दिला होता.धर्मराज गादीवर बसल्यानंतर धृतराष्ट्र व ही कांहीं काल पांडवांच्या जवळ होती. पुढें वानप्रस्थाश्रम स्वीकारून हीं दोघे विदुरासहित अरण्यांत निघून गेलीं.त्यांच्याबरोबर कुंतीहि गेली.पुढें कांहीं कालानें अरण्यास वणवा लागून त्यात धृतराष्ट्रासह गांधारीचा नाश झाला. तिची पतिव्रता म्हणून ख्याति आहे. [महाभारत, आदि-उद्योग-स्त्रीपर्व].

गाधि—(सो. वं.) विजयकुलोत्पन्न कुशांबु राजाचा पुत्र. हा कान्यकुब्ज देशाचा राजा असून यास एकच प्रथमतः सत्यवती नांवाची कन्या होती. या सत्यवतीची ऋचीक ऋषीनें यासमीप भार्यार्थ याचना केली असतां, तिला यानें

त्यास विवाहविधीनें दिलें. पुढें यास विश्वामित्र नांवाचा पुत्र झाला. [महाभारत, आदि प. अ. १७५; वन. अ. ११५; शल्य. अ. ४०].

गानिगा—म्हैसूर संस्थान, मद्रास व मुंबई इलाखा यांतून यांची वस्ती आहे. एकंदर लो. सं. (१९११) ६१३५.३. मुंबई इलाख्यांत, कर्नाटक व कानडा प्रांतांत हे लोक आढळतात. यांचे हिंदु व लिंगायत असे दोन पोटभेद आहेत. हिंदुलोकांच्या चालीरीती लिंगायतांप्रमाणेंच असून ते जानवें व लिंग हीं दोन्हीं घालतात. बहुतेक लोक तेली आहेत;कांहीं शेतकरी व लहान व्यापारीहि आहेत. हिंदु गानिगांमध्यें आठ पोटभाग असून वैष्णवांखेरीजकरून एका पोटभागांतील लोक दुसऱ्या पोटभागांतील लोकांशीं विवाहसंबंध करीत नाहींत. आडनांवांवरून यांचीं कुळें ठरलीं जातात. संजन व पास्टी या पोटभागांतलि लोकांत पुनर्विवाह व घटस्फोट या दोन्ही चाली आहेत. कानडामध्यें विधवा स्त्रियांचें केशवपन करतात. वैष्णवखेरीजकरून सर्व पोटभागांतील लोक मांसाहारी आहेत. हे लोक आपल्याला उच्च वैश्य समजतात व हाविक ब्राम्हणांखेरीज इतरांचें अन्न घेत नाहींत. हे वैष्णव व शैव असून यांचा वारसासंबंधी कायदा हिंदुप्रमाणेंच आहे. घाण्याला लावलेल्या बैलांचे डोळे बांधणें हें पाप आहे असा यांचा समज आहे.त्याचप्रमाणें बैलांनां जोडीनें कामास लावणें हेंहि ते पाप मानितात. कर्नाटकी गानिगा जंगमाबरोबर जेवतात व त्यांनां मान देतात. कर्नाटकी गानिगांचे उपाध्ये हाविक ब्राह्मण आहेत. लिंगायत लोक प्रेतें पुरतात. इतर त्यांनां अग्नि देतात. मेलेल्या माणसांचे कपडे घरीं आणून त्यांची ७ वे दिवशीं पूजा करून नंतर ते जंगमांना दिले जातात.

म्हैसूर संस्थानांत यांचा मुख्य धंदा तेल काढण्याचा आहे; त्यांच्या वस्तीच्या ठिकाणावरून व त्याच्या चालीरीतींवरून त्यांनां निरनिराळीं नांवें पडलीं आहेत. त्यांच्या मुख्य जातीस जोतिनागर असें नांव आहे. याच्यांत 'सज्जन'म्हणून एक लिंग धारण करणारी पोटजात आहे; या लोकांचा इतर पोटजातींशीं कोणत्याच प्रकारचा व्यवहार नाहीं विधवाविवाहास या जातींत मोकळीक नाहीं. या जातींत जर एखादा तरुण अविवाहित वारला तर त्याचा अंत्यविधि करण्यापूर्वी त्याचा अर्क वृक्षाशीं विवाह लावतात. [सेन्सस रिपोर्ट १९११ मुंबई व म्हैसूर].

गावत—मुंबई इलाख्यांतील महिकांठा एजन्सींतील एक लहान संस्थान. हें नानी मारवाडांत असून यांत ६ गांवें आहेत. गावत हें संस्थानचें मुख्य ठिकाण आहे.

गावती—या जातीची लोकसंख्या (१९११) २४८१८. रत्नागिरी व कानडा जिल्ह्यांतील समुद्रकांठचा प्रदेश व सांवतवाडी संस्थान येथें हे लोक आढळतात. यांचीं गाबीत किंवा प्राबती अशींहि दुसरीं नांवें आहेत.गावती हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं शिवाजी महाराजांनीं आरमार तयार केलें त्यावेळीं त्यांत तिर्कटीतारू, गलबत, मचवा, पडाव, शिबाड, होडी, डोण, पगार व प्राब अशीं निरनिराळीं गलबतें होतीं. प्राबजहाज हें लढाऊ असे. त्यावर तोफा असत. प्राब (गुराब) हा आरबी शब्द आहे. त्याचा अर्थ गनबोट होय. या प्राबावर जे लढाऊ मराठे कोंकणी नोकर राहिले ते हे प्राबती होत. गाबीत हा शब्द खरा नाहीं (हा सेन्सस रिपोर्टांत येतो.). प्राबती व गावती एकच. आम्हीं कोंकणी मराठे असून आमचे पूर्वज पूर्वी शिवाजीच्या आरमारखात्यांत नोकर होते असें हे म्हणतात. म्हणून जैतापूर, विजयदुर्ग, देवगड, मालवण, वेंगुर्ले या पूर्वीच्या आरमाराच्या ठिकाणीं यांची वस्ती जास्त आहे. पेशवाई बुडाल्यानंतर त्यांनीं कोळ्याचा धंदा सुरू केला असें म्हणतात. १७६० च्या अगोदर व त्यानंतर सुमारें ४० वर्षेपर्यंत हे लोक दर्यावर्दीपणाचा धंदा करीत होते. यांच्या बायकामुलांनीं (पुरुष आरमारावर नोकर असल्यामुळें) शेजारी रहात असलेल्या कोळ्यांचा धंदा व मोलमजुरी करण्यास प्रारंभ केला. त्यामुळें मराठे व या लोकांचा संबंध दुरावला. साठसत्तर वर्षांपूर्वी मराठ्यांचा व यांचा रोटीबेटीव्यवहार असे पण हल्लीं नाहीं. त्यावेळीं मालंडकर परब (प्राबती) यांची मुलगी विजयदुर्गाच्या धुळपांकडे दिली होती असें म्हणतात. यांचीं आडनांवेंहि मराठ्यांच्या आडनांवांचीं आहेत. वेंगुर्ले येथें कुबल आडनांवाचीं पांच घराणीं असून त्यांपैकीं चार मराठे व एक गावती आहे. मानमरातब पांचांनांहि सारखाच मिळतो. ह्यांचीं दर्शक आडनांवें यांच्यांत आहेत तीं:—तांडेल, साततांडेल, पडतांडेल, फडतांडेल, तिळतांडेल, मायनाक, नाईक, पडनाईक, फडनाईक, महालनाईक, मुकनाईक, सारंग, मोठेसारंग, बुडये इत्यादि. या लोकांमध्यें कुळें व देवकें आहेत व त्यावरून ते मूळचे मराठे असण्याचा फार संभव दिसतो. मासे पकडून विकणें व दर्यावर्दीपणा करणें हे त्यांचे परंपरागत धंदे होत. यांमध्यें गोत्रेंहि आहेत. परंतु त्याचा उपयोग होत नाहीं. विवाहाच्या चालीरीति वेगवेगळ्या आहेत. यांच्या गलबतांवरील विशिष्ट दोऱ्यांचीं नांवें शिवाजी, संभाजी, शाहू, गाई, वासरूं अशीं असतात. पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत यांच्या गलबतावर तोफा असत. त्यावेळीं महादू बुदबाराव कुबल नांवाच्या गृहस्थाच्या हातून तोफेच्या अपघातानें एक बाई मेल्यामुळें तेव्हांपासून तोफा ठेवण्यास बंदी झाली. प्राब ठेवण्याच्या जागेस गुराब देवणें म्हणतात. यांचीं कुलदैवतें महादेव व पार्वती होत. याच्या सर्व चालीरीती मराठ्यांप्रमाणेंच आहेत असें म्हणतात. कुळांवरून लग्नें ठरतात. कळंब, आंबा वगैरे देवकें यांच्यांत आहेत.आतेबहिणींशीं लग्न करण्यास उलट सांखळी म्हणतात. लग्नाच्या वेळीं नवऱ्याच्या डोक्यावर उलट धार करून शस्त्र धरतात.लग्नानंतर वधुवर कोण्या तरी इष्ट मित्राच्या घरीं पाहुणचारास जातात. तेथें रात्रीं एकांतांत वरास आपली अंगठी वधूस द्यावी लागते. लग्नाच्या वेळीं वरास जानवें देतात. पुढें

धंद्याच्या गैरसोयीमुळें तें खुंटीस ठेवतात. विवाहादि सर्व संस्कार ग्रामजोशी ब्राह्मण उपाध्याय करतो. या जातीच्या रखेलीपासून झालेली संतति मराठा जातींत मोडते; त्यांची निराळी जात नाहीं.मात्र अशा पहिल्या पिढीस वंदा म्हणतात व त्यापुढील संतति आस्ते आस्ते पक्क्या मराठ्यांत मोडते. त्यांच्यांपैकीं कांहीं वारकरी व रामदासी पंथाचे आहेत.यांच्या गांवोगांवीं पंचायती होत्या व सर्वसाधारण पंचायत मालवणास होती. तिचा अध्यक्ष वंशपरंपरेचा असतो. हल्लीं फार थोड्या पंचायती शिल्लक आहेत. पूर्वी निवाडे लिहून ठेवण्याची पद्धति होती. निकाल न पाळल्यास गुडगुडी, पाणी, बिस्तव, रोटीव्यवहार हे बंद करणें किंवा दंड करणें या शिक्षा असत. कांहीं गांवीं जातीचीं मालकीचीं देवस्थानें आहेत. जातीचा कर नाहीं. ब्राह्मण, मराठे व वाणी यांच्या बरोबर यांचा अन्नोदकव्यवहार चालतो. यांच्यांत पोटजाती नाहींत. संकेश्वर मठ हा या जातीच्या धर्मगुरूचा मठ होय. यांच्यांत दोन शिक्षणविषयक फंड आहेत. या जातीबद्दल एथ्नॉलॉजिकलसर्व्हे डिपार्टमेंटकडून चौकशी होत असतां "आमच्या जातीपैकीं कोणाहि गृहस्थाचा सल्ला घेण्यांत आला नाहीं; उलट प्रतिस्पर्धी जातीकडून भलती नालस्ती करणारी चुकीची माहिति मिळवून सरकारनें मोनोग्राफ छापला. तो छापला गेल्यावर जातींतील पुढाऱ्यांनीं एथ्नॉ.डिपार्टमेंटला अर्ज करून त्यांत केलेल्या खोट्या विधानांबद्दल तक्रार केली व खरीखुरी माहिती पुराव्यानिशीं सादर केली. परंतु मोनोग्राफ पूर्वीच छापून निघाल्यामुळें त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं." असें रा. कृ. वि. कुबल म्हणतात. [सेन्सस ऑफ इंडिया १९११ व्हॉ. ७; रा. कृ. वि. कुबल यांनीं पुरविलेली माहिती.].

गाम वक्कल—याची बहुतेक वस्ती मुंबई इलाख्यांतच आहे. लो. सं.(१९११)१२१३२.कानडी जिल्ह्यांतील गंगावती व शिरवती या नद्यांमधील खेड्यांत हे लोक आढळतात.यांचा सामाजिक दर्जा हालवाक्कि वक्कल यांबरोबर असून ते शेतीचा धंदा करितात.

गायकवाड—या गायकवाडांचें मूळ गांव पुणें जिल्ह्यात धावडी हें होय. या घराण्याचा पूर्वज दमाजी हा खंडेराव दाभाड्याच्या सैन्यांतील एक सरदार होता. इ. स. १७२० मध्यें बाळापूर येथें निजामाशीं झालेल्या लढाईत दमाजीनें विशेष नांवलौकिक मिळविल्यामुळें खंडेरावाच्या शिफारसीवरून शाहू महाराजांनीं त्याला समशेर बहाद्दर असा किताब देऊन त्याची सेनापतीच्या मुतालिकीच्या जागीं नेमणूक केली. दमाजी हा १७२० त मरण पावला.त्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुतण्या (जनकोजीचा पुत्र) पिलाजी याची नेमणूक झाली (१७२१). पिलाजी हा खानदेशांत नवापूर येथें प्रथम रहात होता. परंतु पोवारांनीं हरकत घेतल्यामुळें त्यानें सोनगड येथें किल्ला बांधून तेथें आपलें ठाणें दिलें. हें ठिकाण बरेच दिवस गायकवाडांची राजधानी होतें. पिलाजीनें राजपिंपळ्याच्या राजाच्या मदतीनें १७२० त प्रथम सुरत प्रांतांवर स्वारी केली व चौथ मिळविली व अहमदाबाद येथें आपला गुमास्ता ठेवला.

इ. स. १७२४ मध्यें पिलाजीनें गुजराथचा नायब सुभेदार हमीदखान यास सरबुलंदखानाच्या (नवीन सुभेदार) विरुद्ध मदत करून, त्याच्याकडून मही नदीच्या पूर्वेकडील मुलखांत चौथ बसविण्याचा हक्क मिळविला. पुढें १७२५ सालीं पिलाजीनें पुन्हां हमीदखानास मदत करून अहमदाबादेजवळ अदालेजजी येथें सरबुलंदचा पराभव केला. तेव्हां पिलाजीशीं सख्य ठेवण्याकरितां सरबुलंदखानानेंहि गुजराथेंत चौथ बसविण्याचा अधिकार त्यास दिला. कंठाजीकदम बांडे यानेंहि हमीदखानास मदत केली होती. त्यामुळें चौथाईबद्दल त्यालाहि कांहीं हक्क मिळाले होते. त्या संबंधांत पिलाजी व कंठाजी या दोघांत तंटे माजले. त्याचा निकाल हमीदनें लावला. कंठाजीनें महीच्या पश्चिमेकडील व पिलाजीनें पूर्वेकडील प्रांतांची चौथ गोळा करावी असें ठरलें. नंतर पिलाजी सोनगडास गेला. पुढें सरबुलंद यानें गुजराथची सरदेशमुखी व चौथाई थोरले बाजीरावासच दिली (१७३१). बाजीराव व दाभाडे यांच्यांत डभई येथें युद्ध झालें. त्यांत पिलाजी दाभाड्यांकडून लढत होता. या युद्धांत बाजीरावाचा सरदार आवजी कवडे याचा पिलाजीचा मुलगा दमाजी यानें पराभव केला. डभईच्या लढाईत पिलाजीचा एक मुलगा मारला गेला व पिलाजीहि जखमी झाला. पुढें यशवंतराव दाभाड्यास सेनापतीचीं वस्त्रें मिळालीं, तेव्हां पिलाजीस त्याच्या मुतालकीच्या जागीं कायम करण्यांत येऊन 'समशेरबहाद्दर' या किताबाशिवाय सेनाखासखेल हा नवीन किताब त्यास देण्यात आला. डभईच्या लढाईच्या वेळीं डभई व बडोदें हीं दोन्हीहि शहरें पिलाजीच्या ताब्यांत होतीं. सरबुलंदखानानें मराठ्यांस चौथाई सरदेशमुखीच्या सनदा करून दिल्यामुळें बादशहाची त्याच्यावर खप्पामर्जी होऊन त्याच्या जागीं जोधपूरचा राजा अभयसिंग याला गुजराथच्या सुभेदारीचें काम देण्यात आलें. अभयसिंगानें थोड्याच दिवसांत बडोद्याचा किल्ला मराठ्यांकडून काबीज केला. परंतु पिलाजीनें इतरत्र बरेच जय मिळवून कित्येक मुख्य मुख्य ठाणीं बळकाविलीं होतीं, म्हणून अभयसिंगानें पिलाजीशीं कायमचे करारमदार करून टाकण्यासाठीं त्याच्याकडे आपले वकील पाठविले व त्यांच्याकरवीं डाकोर येथें त्याचा एके दिवशीं विश्वासघातानें खून केला (१७३२).

पिलाजीच्या मृत्यूमुळें अभयसिंगास कांहींच फायदा झाला नाहीं. कारण पिलाजीचा दोस्त पाद्र्याचा (बडोद्याजवळील एक गांव) देसाई दिल्ला याच्या चिथावणीवरून सर्व देशभर कोळी व भील लोकांनीं बंड केलें. अभयसिंगाचें सैन्य त्यांचें बंड मोडण्यांत गुंतलें आहे असें पाहून पिलाजीचा भाऊ महादजी (हा जंबूसर बळकाऊन बसला होता) यानें बडोद्यावर स्वारी करून तें

घेतलें (१७३२). येथपासून बडोदें ही गायकवाडांची राजधानी झाली. पिलाजीचा वडील मुलगा जो दमाजी त्यानेंहि याच सुमारास सोनगडाहून निघून गुजराथेंतील पश्चिमेकडचे बरेच मुख्य मुख्य जिल्हे पादाक्रांत केले. त्याच्या स्वाऱ्या जोधपूरपावेतों जेव्हां जाऊं लागल्या तेव्हां आपल्या दुय्यम अधिकाऱ्याच्या स्वाधीन अहमदाबाद करून अभयसिंग हा जोधपूरच्या रक्षणार्थ तिकडे निघून गेला (१७३२).

पुढें दमाजीनें कंठाजी कदम बांडे यास गुजराथेंतून हांकून लावलें (१७३४); म्हणून कंठाजीनें पुढच्या सालीं मल्हारराव होळकरासह गुजराथेंत अकस्मात स्वारी करून बनास नदीपावेतों खंडण्या वसूल केल्या व ईदर, पालनपूर वगैरे कित्येक शहरें लुटलीं. या स्वारीनंतर लवकरच गुजराथच्या सुभेदारीचें काम अभयसिंगाकडून काढून नजीब उद्दौला मोमीनखान याच्याकडे देण्यांत आलें. पण अभयसिंगाच्या वतीनें गुजराथचा कारभार पहाणारा नायब सुभेदार हा अहमदाबाद सोडण्यास तयार नव्हता. तेव्हां मोमीनखानानें त्याला हांकून लावण्याकरितां दमाजीची मदत घेतली(१७३५). व ते दोघे पगडीभाई झाले. याप्रमाणें अहमदाबाद हस्तगत झाल्यावर तेथली सत्ता व वसूल या दोघांनीं वांटून घेतली (१७३७). बाजीराव उत्तरेस गेला आहे असें पाहून दमाजीनें माळव्यांत स्वारी केली (१७४२).

मोमीनखान हा १७४३ त (फेब्रुवारी) मेला. तो जिवंत होता तोंपर्यंत दमाजीनें गुजराथेंतील व काठेवाडांतलि आपले सर्व हक्क बिनहरकत वसूल केले. मोमीनच्या मरणानंतर अबदुल अझीझ याची नेमणूक झाली; पण तो औरंगाबादेहून गुजराथेंत येत असतां, मार्गांतच दमाजीनें अंकलेश्वर येथें त्यावर हल्ला करून त्याची सर्व फौज कापून काढली. यानंतर फकीरुद्दौला यास दिल्लीहून गुजराथेंत पाठविण्यात आलें (१७४४). यावेळीं दमाजी साताऱ्यास गेला होता;तथापि त्याचा सरदार रंगाजी यानें फकीरुद्दौल्यास विरोध करून गुजराथचा कारभार आपल्या हातीं घेऊं दिला नाहीं. दमाजीस खंडेराव नांवाचा एक भाऊ होता. दमाजी गुजराथेंत नसल्यामुळें त्याला कारभारांत ढवळाढवळ करण्यास संधि मिळाली. त्यानें रंगाजीस अहमदाबादेहून काढून तेथें दुसऱ्या माणसाची नेमणूक करून फकीरुद्दौला यासहि कांहीं मदत दिली. परंतु रंगाजीस ही बातमी लागतांच तो लागलीच परत आला; व त्यानें खंडेराव व फकीरुद्दौला यांचा संबंध तोडून खंडेरावास संतुष्ट राखण्यासाठीं, त्यास बुरसत (बोरसादचा) किल्ला व नडियाद जिल्हा दिला व बडोदें येथें त्याला आपला प्रतिनिधि म्हणून नेमलें. १७४४ त दमाजी गायकवाड साताऱ्यास आला होता. या वर्षी रघूजी भोंसले व बाळाजी बाजीराव यांच्यामध्यें शाहूच्या मध्यस्थीनें जी तडजोड झाली, तींत असें ठरलें होतें कीं, दमाजीनें माळव्यांतून कांहीं दिवसांपूर्वी जी खंडणीची रक्कम वसूल केली, तिचा हिस्सा त्यानें पेशव्यास द्यावा. शाहूनें आपल्या मरणापूर्वी दमाजी गायकवाडास साताऱ्यास हजर होण्याविषयीं हुकूम पाठविला होता; परंतु त्यावेळीं तो गेला नाहीं (१७४८).

दमाजी हा ताराबाईस पेशव्यांच्याविरुद्ध मदत करण्याकरितां १५००० सैन्य घेऊन साताऱ्याकडे आला व त्यानें पेशव्यांच्या पक्षाच्या मंडळीचा नींब येथें पराभव केला. (१७५१). परंतु ही बातमी नानासाहेबांनां लागतांच ते मोठमोठ्या मजला करीत दक्षिणेकडून साताऱ्यास आले. पेशव्यांशीं बोलणें लावून तडजोड करून घेण्यासाठीं दमाजीनें खटपट चालविली पण ती सफळ झाली नाहीं. अखेर दमाजीवर पेशव्यांनीं अचानक हल्ला करून त्यास पकडून बंदोबस्तानें पुण्यास आणून ठेविलें व त्याच्या कुटुंबास कैदेंत ठेविलें.

भडोचच्या वसुलाचा व जकातीचा हिस्सा गायकवाडास नक्की केव्हां प्राप्त झाला हें कळत नाहीं. इ. स. १७४७ सालीं सुरतच्या अधिकारासंबंधीं मुसुलमानी निरनिराळ्या पक्षांत तंटे उपस्थित होऊन त्यापैकीं सय्यद अचीनखानानें दमाजीचा चुलतभाऊ केदारजी यास आपल्या मदतीस बोलावलें. याबद्दल तीन लक्ष रुपये केदारजीस देण्याचें ठरलें. परंतु केदारजीच्या मदतीवांचूनच अचीनखानाचें कार्य झाल्यानें तो ती रक्कम देण्यास टाळाटाळ करूं लागला. त्यावर केदारजीनें सुरतच्या आसपास लुटालूट करण्यास आरंभ केला. तेव्हां अचीननें नाइलाज होऊन त्या रकमेची फेड होईपर्यंत सुरतच्या वसुलाचा एकतृतीयांश हिस्सा केदारजीनें घ्यावा असें ठरविलें व तें केदारजीनेंहि दमाजीच्या सल्ल्यानें मान्य केलें. दमाजी पुण्यास पेशव्यांच्या कैदेंत होता त्यावेळीं (इ.स.१७५२–१७५४). पुनः सुरत येथें बरीच बेबंदशाही माजली होती. तिचा फायदा घेतां यावा म्हणून पुढें दिल्याप्रमाणें दमाजीनें पेशव्यांशीं करार करून आपली सुटका करून घेतली (१७५४). यावेळीं असें ठरलें कीं दमाजीनें १५ लक्ष रुपये देऊन मागील बाकीचा फडशा करावा; गायकवाडाकडे गुजराथेंत जो मुलूख आहे त्याचा अर्धा वांटा पेशव्यांस मिळावा व पुढेंहि त्यांनीं नवीन मुलूख जिंकल्यास त्याचाहि अर्धा हिस्सा पेशव्यांस मिळावा. अतःपर स्वाऱ्यांमध्यें जो कांहीं पैसा मिळेल त्यांतून स्वारीचा खर्च वजा जातां बाकी राहिलेल्या रकमेचा अर्धा हिस्सा पेशव्यांस देत जावा. दहा हजार फौज चाकरीस ठेवून गरज पडेल तेव्हां पेशव्यांस मदत करावी, दाभाडे सेनापतीचे मुतालिक या नात्यानें गुजराथ प्रांताच्या वसुलांतून दरसाल सवापांच लक्ष रुपये सरकारांत द्यावे आणि छत्रपतींच्या इतमामासाठीं दरवर्षी कांहीं रक्कम पाठवीत जावी वगैरे. कैदेंतून सुटण्यासाठीं दरबारखर्च म्हणून दमाजीनें दहापंधरा लक्ष रुपये खर्च केले. सुटका झाल्यानंतर (१७५४) पावसाळ्याच्या अखेर राघोबादादांच्या गुजराथच्या स्वारींत दमाजी त्यांस येऊन मिळाला व ते दोघे खंडण्या गोळा करीत अहमदाबाद शहरीं

(१७५५)आले.त्यांनीं शहरास वेढा देऊन तें हस्तगत केलें. येथील अधिकारी जवानमर्दखान बाबी याची नेमणूक मोमीनखान याच्या भावानें केली होती. त्यानें कित्येक दिवसपर्यंत शहराचें रक्षण केलें, परंतु शेवटीं पट्टण, वडनगर, राधनपूर, विजापूर आणि साबरमती व बनास या नद्यांमधील अहमदाबादच्या उत्तरेकडचे गुजराथेंतील कांहीं जिल्हे स्वतःस जहागीर घेऊन (एप्रिल महिन्यांत) त्यानें तें शहर मराठ्यांच्या स्वाधीन केलें. अहमदाबाद हस्तगत झाल्यावर त्याचा वसूल गायकवाड व पेशवे यांनीं अर्धा अर्धा वांटून घ्यावा असें ठरलें. वरील बाबीच्या जहागिरीपैकीं बराचसा मुलूख पुढें १० वर्षांनीं दमाजीनें परत मिळविला.

इ. स. १७६० मध्यें भाऊसाहेब हिंदुस्थानात जावयास निघाले तेव्हां चंबळेच्या अलीकडेच पेशव्यांच्या आज्ञेवरून दमाजी त्यांस जाऊन मिळाला. पानिपतच्या अखेरच्या घनघोर लढाईंत दमाजी व इब्राहिमखान हे दोघेहि बरोबरच रोहिल्यांशीं लढत होते. नंतर मल्हारराव होळकरानें रणभूमीवरून पाय काढल्यावर दमाजीनेंहि त्याचेंच अनुकरण केलें. पुढें (१७६३) निजामाशीं झालेल्या तादुळज्याच्या लढाईंत (पेशव्यांतर्फे) दमाजी हजर होता. नंतर (स. १७६८) दमाजीनें आपला मुलगा गोविंदराव याजबरोबर फौज देऊन त्याला थोरले माधवराव यांच्याविरुद्ध राघोबादादास मदत करण्यास पाठविलें. इ. स. १७६८ च्या सुमारास दमाजी मरण पावला. त्याला सयाजी, गोविंदराव, मानाजी व फत्तेसिंग असे चार मुलगे होते. यांपैकीं सयाजी सर्वांत वडील होता पण तो पहिल्या बायकोचा नव्हता. गोविंदराव पहिल्या बायकोचा होता पण धाकटा होता. दमाजी मेला तेव्हां गोविंदराव हा राघोबादादास मदत केल्यामुळें पुण्यास अटकेंत होता. त्यानें सुटकेसाठीं भुर्दंड व नजर मिळून ५०॥ लक्षांवर रुपये देऊन, ७ लक्ष ७९ हजार रुपये दरसाल खंडणी देण्याचें आणि पुण्यास नेहमीं ३ हजार फौज व लढाईच्या वेळीं ४ हजार फौज ठेवण्याचें कबूल करून सेनाखासखेल हें पद मिळविलें सयाजी स्वतः वेडा होता पण फत्तेसिंगानें त्याचा हक्क पुढें मांडून पेशव्यांकडूनच (१७७१)आपल्या भावासाठीं सेनाखासखेल ही पदवी मिळविली व आपण त्याचा मुतालिक झाला. यामुळें गोविंदराव व फत्तेसिंग यांच्यामध्यें वैमनस्य आलें. तेव्हां गोविंदरावानें बंड केल्यास गुजराथेंत शांतता राखतां यावी म्हणून फत्तेसिंगानें पेशव्यांनां दरसाल ६॥ लक्ष खंडणीचा करार करून आपलें सैन्य पुण्याहून काढलें. पुढें दादासाहेबांस पेशवाई मिळाल्यावर त्यांनीं गोविंदरावास पुन्हां 'सेनाखासखेल' केलें. तेव्हां गोविंदरावानें लागलीच गुजराथेंत स्वारी केली. पुढें दादासाहेब हे त्याची मदत घेण्याकरितां बडोद्यास आले (३ जाने. १७७५). तेव्हां त्यानें फत्तेसिंगास (बडोदे येथें) वेढा दिला होता. यावेळीं गोविंदरावाचा चुलता व नडियादचा जहागीरदार खंडेराव हा गोविंदरावाच्या मदतीस आला. परंतु पुण्याच्या कारभाऱ्यांनीं त्याला आपल्या बाजूस वळवून घेतलें. हरीपंत फडके दादांच्या पाठोपाठ आले. तेव्हां गोविंदराव बडोद्याचा वेढा उठवून दादाबरोबर नदीच्या पलीकडे गेला. तेथें महीतीरीं वासद खेड्याजवळ हे छावणी देऊन राहिले असतां फत्तेसिंग व हरीपंत यांनीं नदी उतरून यांच्यावर अचानक हल्ला केला व यांचा पराभव केला (१७ फेब्रु.). तेव्हां दादा हे इंग्रजांकडे खंबायतेस गेले व गोविंदराव पालनपुराकडे गेला.

पुढें (१९ एप्रिल) राघोबादादा हे कीटिंगसह गोविंदरावाच्या सैन्यास खंबायतच्या ईशान्येस ११ मैलांवर दरमज येथें येऊन मिळाले. गोविंदरावांच्या विनंतीवरून इंग्रजांनीं बडोदें घेण्याचें ठरविलें. तेव्हा फत्तेसिंग इंग्रजांशीं तह करण्यास कबूल झाला. या तहानें इंग्रजांनीं दादासाहेबांमार्फत गोविंदराव व फत्तेसिंग यांचा समेट करून देण्याचा प्रयत्न केला. परंतु पुढें गोविंदरावानें हा तह पाळला नाहीं. फत्तेसिंगानें ३००० स्वारांनिशीं दादांच्या चाकरीस रहावें; थोरले माधवराव पेशवे यांच्याशीं केलेल्या कराराप्रमाणें, गोविंदरावासाठीं गुजराथेंत ३ लक्षांची जहागीर आतां त्यानें राखून ठेवू नये; कारण दादा हे दक्षिणेंत १० लक्षांची जहागीर गोविंदरावास देण्यास कबूल होते. फत्तेसिंगानें दादांनां २६ लक्ष रुपये द्यावे व त्यानें भडोचच्या वसूलावरील आपले हक्क व दुसरीं कित्येक खेडीं इंग्रजांस द्यावीं असें या तहान्वयें ठरलें. या तहानें इंग्रजाचा पुष्कळ फायदा झाला. पुरंदरच्या तहात (१७७६) असें एक कलम होतें कीं, पेशव्यांच्या संमतीशिवाय गायकवाडास आपला मुलुख दुसऱ्यास तोडून देतां येत नाहीं; तसें सिद्ध झाल्यास, इंग्रजांनीं फत्तेसिंगाचा मुलुख त्यास परत द्यावा.

आपण पेशव्यांचे अंकित आहोंत हें फत्तेसिंग कबूल करी, परंतु त्यांच्या संमतीवांचून आपणांस आपला मुलुख दुसऱ्यास देतां येत नाहीं हें मात्र त्यास मान्य नव्हतें. आपला मुलूख परत द्यावा हें त्याचें देखील इंग्रजांपाशीं मागणें होतें. परंतु याचें कारण तो असें सांगे कीं, ज्याकरितां हा मुलूख इंग्रजांस दिला तें कार्य राघोबादादा हे साध्य करूं शकले नाहींत. म्हणून तो प्रांत इंग्रजांनां देण्याचें आतां कांहीं प्रयोजनच राहिलें नाहीं. पुढें (१७७८) त्यानें पेशव्यांनां मागील सर्व बाकी, साडे दहा लक्ष रुपये खंडणी व ५ लक्ष रुपये नजर देऊन सेनाखासखेलीचीं वस्त्रें मिळविलीं. त्यामुळें गोविंदरावाचा हक्क कायमचा नष्ट झाला.

फत्तेसिंगानें गॉडर्ड याशीं तह करून, पेशव्यांशीं चाललेल्या तत्कालीन युद्धांत त्याच्या मदतीस ३००० फौज देण्याचें कबूल (२६ जाने. १७८०) केलें. तथापि युद्ध चाललें असतांहि गायकवाडानें आपली शिरस्त्याची खंडणी

श्रीमंत सयाजीराव गायकवाड, संस्थान बडोदें.

लक्ष्मीविलास राजवाडा, बडोदें.

श्री. सौ. चिमणाबाईसाहेब गायकवाड.

नझरबाग राजवाडा, बडोदे.

पेशव्यांस देण्याचें बंद करूं नये अशीहि एक अट होती. यावेळीं इंग्रजानें त्याला महीच्या उत्तरेकडील प्रांत देण्याचें कबूल केलें व त्याबद्दल त्यानें इंग्रजांनां सुरत व भडोच प्रांत दिले; आणि वर सांगितल्याप्रमाणें फत्तेसिंग हा इंग्रजांचा हस्तक बनला. पुढें इंग्रजांनीं पेशव्यांशीं तह केला (१७८१), त्यांत फत्तेसिंगाजवळ असलेला मुलुख तसाच असावा, त्यानें पेशव्यांनां नेहमीप्रमाणें खंडणी द्यावी असें ठरलें. यापुढें मरेपर्यंत फत्तेसिंगानें राज्य सुरळीतपणें चालविलें.

शेवटीं(१७८९ डिसेंबर २१)फत्तेसिंग आपल्या वाड्याच्या वरच्या मजल्यावरून खालीं पडून मरण पावला. मरेपर्यंत फत्तेसिंग हा सयाजीचा मुतालिकच होता. त्याच्या मरणाच्या वेळीं त्याचा धाकटा भाऊ मानाजी हा बडोद्यासच होता. त्यानें लागलीच सयाजीस आपल्या ताब्यांत घेऊन जहागिरीचा अधिकार बळकाविला. या वेळीं गोविंदराव हा पुण्याजवळ अज्ञातवासांत रहात होता. त्यानें संस्थानचा अधिकार आपणांस मिळावा अशी नाना फडणविसास विनंति केली. परंतु मानाजीनें पुणें दरबारास३३,१३,००१रुपये नजर करून व फत्तेसिंग गायकवाडाकडे राहिलेल्या ३६ लाखांची मागील बाकीची भरपाई करण्याचें अभिवचन देऊन आपला अधिकार कायम करविला. हें पाहून महादजी शिंद्यांनीं गोविंदरावाची बाजू घेऊन मानाजीची नेमणूक पेशव्यांकडून रद्द करविली. तेव्हां मानाजी इंग्रजांकडे गेला व गॉडर्ड व फत्तेसिंग यांच्या तहाच्या आधारावर त्यांनीं आपणांस मदत करावी असें म्हणूं लागला; परंतु सालबाईच्या तहानें मागचा तह रद्द झाला असें सांगून इंग्रजांनीं ह्या वादांत पडण्याचें नाकारलें. नाना फडणवीस तडजोड करण्यास तयार होते; पण गोविंदरावाच्या हट्टामुळें तडजोड झाली नाहीं. इतक्यात एकाएकीं (१ आगष्ट १७९३) मानाजीचें देहावसान झालें. मानाजी मेला तरी गोविंदरावास बडोद्यास जाण्याची परवानगी मिळाली नाहीं. पुण्यांतील कारभारीमंडळ गोविंदरावास म्हणूं लागले कीं तुम्ही पूर्वीच्या सर्व अटी कबूल करून शिवाय सन १७८० सालीं इंग्रजांनां देऊं केलेला तापीचा दक्षिणेकडील स्वतःचा प्रदेश व सुरतच्या वसूलांतील आपला वांटा सरकारांत द्या. इंग्रजांनीं यावर हरकत घेतली कीं, सालबाईच्या तहान्वयें गायकवाडाचें कोणतेंहि काम न केल्यामुळें त्यांचा मुलूख घेण्याचा पेशव्यांस अधिकार नाहीं. पुढें गोविंदराव बडोद्यास गेला. तेथें त्याला खंडेरावाचा मुलगा मल्हारराव याच्याशीं लढाई करावी लागली; तींत मल्हारराव पराभव पावला व गोविंदराव सयाजीचा मुतालिक म्हणून राज्यकारभार पाहूं लागला.

आबा शेलूकर नांवाचा इसम गुजराथेंत पेशव्यांतर्फे सुभेदार होता. तो दौलतराव शिंद्याकडे गेला असतां तेथें त्यास कैद करण्यांत आलें. हें कृत्य रावबाजीच्या सांगण्यावरून झालें. त्यांत गोविंदरावाचा हात होता. परंतु शेलूकरानें दहा लाख रुपये देण्याचा दौलतरावाशीं करार करून आपली सुटका करून घेतली व परत येऊन तो अहमदाबादचा कारभार पाहूं लागला. शेलूकर हा नाना फडनविसाच्या पक्षाचा असल्यामुळें बाजीरावानें गुप्तपणें गोविंदरावास त्याच्या विरुद्ध पुन्हां उठविलें. याच सुमारास शिंद्यानेंहि रकमेच्या भरपाईचा तगादा लावल्यामुळें शेलूकरानें गायकवाडाच्या कांहीं गांवांपासून पैसा उकळला. त्यामुळें दोघांमध्यें पुन्हा भांडणें सुरू झालीं. इ. स. १७९९ सालीं सुरतचा नबाब मरण पावला. तेव्हां सुरतेच्या चौथाईचा गायकवाडाचा हिस्सा प्राप्त करून घ्यावा असा इंग्रजांनीं मनसबा ठरविला व त्याप्रमाणें त्यांनीं गोविंदरावास विनंति करून तो हक्क तर मिळविलाच; परंतु त्याबरोबर चौऱ्याशी जिल्हाहि आणखी पदरांत पाडला. वास्तविक १७९३ सालीं पेशव्यांनां जशी या सुरतेच्या हक्काबद्दल इंग्रजांनीं हरकत घेतली तशी या वेळेस पेशव्यांनांहि घेतां आली असती. पण पेशवे सध्या निर्बळ झाले होते. या देणगीबद्दल इंग्रजांनां गोविंदरावानें शेलुकराविरुद्ध मदत मागितली पण इंग्रजांनीं त्याबद्दल टाळाटाळच केली. तथापि थोडक्याच दिवसांनीं अहमदाबाद गायकवाडच्या हातीं आलें, आबा शेलूकर कैद झाला व पेशव्यांनीं गायकवाडास आपला गुजराथेंतील हिस्सा वार्षिक पांच लाख रुपयांवर पांच वर्षांकरितां इजाऱ्यानें दिला (१८०० आक्टोबर). इकडे गोविंदराव सप्टेंबरांतच मरण पावला. त्याच्या मागून त्याचा मुलगा कान्होजी हा मुतालकीचा कारभार पाहूं लागला. परंतु त्याच्या उद्दाम वागणुकीनें थोड्याच दिवसांत आरबसैन्यानें त्याला पदच्युत करून आनंदराव (त्याचा भाऊ) यास कारभारी केलें. त्यामुळें आनंदराव व त्याचा चुलता मल्हारराव यांत वैर माजलें. तेव्हां आनंदरावाचा दिवाण रावजी आप्पाजी यानें इंग्रजांकडे मदत मागितली व ती त्यांनीं दिली. यावेळीं सर्व सत्ता आरबांच्या हातीं गेली होती. इंग्रजांच्या मदतीनें आनंदरावानें मल्हाररावाचा पराभव करून त्याला नडियादकडे (कडी प्रांतांत) कांहीं जहागीर दिली. या सुमारासच गणपतराव व मुरारराव गायकवाड यांनीं बंडाळी माजविली होती. त्यांचा पराभव होऊन ते धार येथें पळून गेले. या दोन तीन प्रसंगीं केलेल्या मदतीबद्दल इंग्रजांनीं आपली तैनातीफौज गायकवाडावर रावजीआप्पाजीच्या तर्फे लादली; व तिच्या खर्चासाठीं बराचसा प्रांत घेतला;तसेंच स्वारीखर्चाबद्दलहि भरपूर पैसा मिळविला. लागलीच डंकन (गव्हर्नर) यानें रावजीशीं त्यानें केलेल्या या गोष्टीबद्दल गुप्त तह करून त्याचें व त्याच्या वंशजांचें रक्षण करण्याचें वचन दिलें. पुढें (१८०२). गायकवाडांचें आरबसैन्य काढून टाकण्याबद्दल इंग्रजांनीं आनंदरावास लकडा लाविला. परंतु आपली बाकी दिल्याशिवाय आरब जाईनात. उलट त्यांनीं आनंदरावास कैद केलें. तेव्हां इंग्रजांनीं त्याची सुटका करून आरबांची रक्कम देऊन टाकून त्यांनां काढून लाविलें. यानंतर

कान्होजीनें बंड उभारलें पण तें इंग्रजांनीं मोडलें व तो उज्जनीकडे पळून गेला. इतक्यांत मल्हाररावानें पुन्हां उचल केली. पण विठ्ठलराव नांवाच्या सरदारानें त्याला कैद करून त्याचें बंड मोडलें. रावजी आप्पाजीनें गायकवाडीराज्याची सर्व सत्ता इंग्रजांच्या ताब्यांत दिल्यानें, प्रजा त्याला घरभेद्या म्हणूं लागली. परंतु इंग्रज म्हणतात कीं त्यानें दूरवर दृष्टी देऊन योग्य मार्ग स्विकारला. यापुढें काठेवाड आपल्या तब्यांत असावा अशी हांव इंग्रजांस उत्पन्न होऊन त्यांनीं गायकवाडाशीं १८०५ त तशा प्रकारचा एक तहहि केला.

वास्तविक सर्व काठेवाडावर गायकवाडाचा हक्क होता. रावजी मेल्यानंतर दिवाणपदाच्या बाबतींत त्याचा भाऊ बाबाजी व पुत्र सीताराम यांत भांडणतंटे सुरू झाले. (इ. स. १८०७). बाबाजीस इंग्रजांची मदत होती. यानंतर आबा शेलूकरास सोडून देऊन मेजर वॉकर यानें काठेवाड आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं तिकडे स्वारी केली. वाह्यतः काठेवाडांतील गायकवाडांच्या मांडलिक संस्थानिकांनीं त्यांना द्यावयाच्या खंडणीची सुव्यवस्था लावण्यासाठीं ही स्वारी आहे असें सांगण्यात आलें. त्याप्रमाणें झालवाड, मुचकुंद, हलर, बरडा, गोहिलवाड वगैरे संस्थानिकांच्या खंडणीची कायमची व्यवस्था त्यानें लाविली. यानंतर आनंदरावानें उखामंडळांतील बंडाळी मोडली. या सुमारास सीतारामानें इंग्रज व रावजी आप्पाजी यांच्या गुप्त तहाच्या आधारावर आपल्याला दिवाणगिरी मिळविण्याबद्दल खटपट केली; परंतु वॉकरनें तहाचें भाषांतर चुकलें आहे असें कारण दाखवून सीतारामाचा दावा काढून टाकला. कान्होजी हा यावेळीं बडोद्यास आला, तेव्हां त्याला कांहीं नेमणूक ठरवून पाद्रा येथें ठेविलें (सन १८०८). त्याचप्रमाणें मुकुंदराव (गोविंदरावाचा दासीपुत्र) व मुरारराव (गोविंदरावाचा औरस पुत्र) यांनाहि नेमणूका ठरवून दिल्या. वॉकरनें सन १८१८ तील आपल्या खलित्यांत स्पष्ट म्हटलें होतें कीं, आपण कधीं कधीं गायकवाडांच्या खासगी गोष्टींतहि हात घातलेला होता. नवानगरच्या जामनें इंग्रजांविरुद्ध राजकारण केल्यानें इंग्रजांनीं गायकवाडाची मदत घेऊन त्याच्यावर स्वारी केली (सन १८१२) व पोरबंदर आणि उखामंडळ यांतील बंडाळीहि मोडली. या सुमारास सीताराम यास पगाराबद्दल फौजेनें अडविलें असतां ती रक्कम इंग्रजांनीं देऊन त्याची मुक्तता केली. आणि या उपकाराची फेड सीतारामानें आनंदराव व इंग्रज यांच्यात झालेल्या पूर्वीच्या सर्व तहाचे अस्सल कागद इंग्रजांनां परत देऊन केली. कान्होजीनें पुन्हां उचल केल्यावरून त्यास पकडून मद्रासेस पाठविलें. या वेळच्या रेसिडेंटच्या खलित्यावरून इंग्रजांचें गायकवाडाकडे असलेलें कर्ज फिटल्याचें समजतें; परंतु गायकवाडींतून इंग्रज अधिकारी काढून घेण्याचा प्रसंग आला तेव्हां त्याच रेसिडेंटानें कंपनीस कळविलें कीं, सन १८१६ पर्यंत कर्ज फिटणार नाहीं. या वेळींच गंगाधरशास्त्री पटवर्धन हा दिवाण होता. त्याची या रेसिडेंटानें फार तारीफ केली आहे. पुढें पालनपूर, राधनपूर, ध्रांगध्रा, जुरिया येथील संस्थानिकांनीं गायकवाडाशीं नवीन तह केले. यानंतर पेशवे व गायकवाड यांच्यांत तेढ आली. गुजराथचा इजाऱ्याचा करार संपल्यानें तो पुन्हां करून घेण्यास गंगाधरशास्त्री पुण्यास गेला. पेशवे व गायकवाड या प्रत्येकांनीं परस्परावर (१ कोटी) कर्ज काढलें. अहमदाबाद गायकवाडास पुन्हां देण्याची पेशव्यांची इच्छा नव्हती म्हणून प्रकरण चिघळत चाललें व शेवटीं गंगाधरशास्त्री यांचा खून झाला. सीतारामाचें व शास्त्र्याचें फार वांकडे होतें त्यामुळें कांहीं लोकांचें म्हणणें असें कीं, सीतारामाच्या पक्षाकडून शास्त्र्याचा खून झाला असावा. यावेळीं सीतारामानें धार येथें सैन्याची जमवाजमवहि केली होती. पेशव्यांनां शास्त्र्याचा खून करण्यांत मुळींच फायदा नव्हता. कारण यामुळें गुजराथ हातची जाण्याचा संभव होता. उलट त्यास बक्षीस देऊन आपलासा करण्यांत फायदा होता असें कर्नल वॉलेस म्हणतो. सीतारामास लागलीच इंग्रज शिपायांच्या देखरेखीखालीं ठेवण्यांत आल्यावरून वरील म्हणण्यास पुष्टी मिळते. इंग्रजांचें कर्ज या सुमारास फिटल्यानें कंपनीनें आपला संबंध कमी करण्याबद्दल कार्नाक यास कळविलें, पण तें त्यानें जुमानलें नाहीं. गंगाधरशास्त्र्याचा दाब फत्तेसिंगावर फार होता; आतां फत्तेसिंग स्वतंत्रपणें वागूं लागला व त्यास आपल्यावरील इंग्रजांची सत्ता खपेना. त्यानें पसंत केलेला दिवाण न नेमतां कार्नाकनें आपण ठरवलेला प्रधान त्याच्यावर लादला, त्यामुळें फत्तेसिंगाचें मन फार खट्टू झालें. पुन्हां उखामंडळांत बंड उद्भवलें, तेव्हां गायकवाडास त्या प्रांतांत सतत शांतता ठेवतां येत नाहीं या सबबीवर इंग्रजांनीं (द्वारकेशिवाय सर्व) उखामंडळ स्वतः खालसा केलें. व काठेवाडांतील सर्व संस्थानिकांच्या खंडणीवसूलाच्या कामांहि त्यांनीं आपला अधिकार यापुढें गाजविण्यास प्रारंभ केला. पुन्हां (सन १८१७) गायकवाडाशीं तह करून इंग्रजांनीं त्यांच्याकडून तैनाती फौजेच्या वाढीबद्दल बराचसा मुलुख हस्तगत केला. याचवेळीं गायकवाडी फौजेनें इंग्रजांस पेंढाऱ्यांविरुद्ध सैन्याची मदत केली. पुढें (सन १८१८) फत्तेसिंग व आनंदराव (सन १८१९) दोघेहि मरण पावले. नंतर सयाजीराव वारस ठरून तो गादीवर बसला. फत्तेसिंग हा शेवटपर्यंत कारभारीच होता. सयाजी हुषार होता. यानें इंग्रजांकडे आपलें सैन्य, त्यांनीं माळव्याच्या लढायांत वापरल्याबद्दल रकमेची मागणी केली. तेव्हां इंग्रजांनीं उत्तर केलें कीं तुमच्या सैन्यानें आम्ही देशांत शांतता राखली, यांत तुमचाच फायदा झाला असल्यानें मोबदला कसला मागता ? उलट आपलें सैन्य आम्हापाशीं माळव्यांत ठेवावें, कारण तुम्हाला त्यावरील खर्च कोठेंहि

करावाच लागणार. मध्यंतरी आनंदरावाच्या राणीनें व सयाजीच्या दोन सावत्र आयांनीं आपापल्या मुलांबद्दल खटपट चालविली होती. पेशव्यांनीं इंग्रजांकडे काठेवाडांतील जमाबंदीवसुली दिली होती. त्याचा फायदा घेऊन गायकवाडांचा तो हक्क इंग्रजांनीं एकीकडे ठेवला. एवढेंच नाहीं तर खास गायकवाडांचीं जीं मांडलिक संस्थानें होतीं त्यांतहि त्यांनीं ढवळाढवळ सुरू केली. राजपिंपळा संस्थानांत वारसाच्या तंटयाचा फायदा घेऊन इंग्रजांनीं तेथची सारी व्यवस्था आपल्या ताब्यांत घेतली व फक्त दरसालची खंडणी गायकवाडांनीं घ्यावी असें ठरविलें. तसेंच गायकवाडास या संस्थानांच्या बाबतींत कठीण प्रसंगीं मदत न देतां इंग्रजांनीं आपला मात्र फायदा साधून घेण्याचा क्रम आरंभिला. पुढें एलफिन्स्टनची व सयाजीची जी भेट झाली (१८२०—२१) त्यावेळीं त्यानें सयाजीस (१) कर्जफेड करणें, (२) इंग्रजांशीं खुला व्यापार व व्यवहार ठेवणें; आणि (३) परराष्ट्रांशीं इंग्रजाच्या संमत्तीशिवाय व्यवहार न करणें,या तीन अटी सांगितल्या व या पाळल्यास गायकवाडींतील अंतर्गत कारभारांत आपण हात घालणार नाहीं असें सांगितलें. सयाजीनें हें सर्व कबूल केलें. दौलतीस यावेळीं जवळ जवळ एक कोटीचें कर्ज होतें. या सुमारास सीतारामानें पुन्हां दिवाणगिरीची खटपट इंग्रजांजवळ चालविली. परंतु ती त्यांनीं फेंटाळून लाविली. महिकांठ्यामधील गायकवाडाची जमाबंदी वसूल करण्याचें काम इंग्रजांनीं काठेवाडाप्रमाणेंच सयाजीची पर्वा न करतां आपल्या हातीं घेतलें. एवढेंच नव्हे तर महिकांठ्यामध्यें असलेलें गायकवाडी सैन्य काढून टाकण्याचा तगादा त्यांनीं त्याच्या मागें लावला. काठेवाडालगत व महिकांठयाशेजारी आपली हद्द असल्यानें व तुमच्या प्रांतांत नेहमीं बंडें उत्पन्न होतात त्यामुळें ही व्यवस्था करणें आम्हास भाग आहे असें इंग्रज म्हणत. या वेळीं फत्तेसिंगाच्या बायकोनें आपल्या दत्तक पुत्राबद्दल खटपट चालविली, परंतु ती इंग्रजांनीं हाणून पाडिली. या सुमारास बडोद्याच्या रेसिडेंटास जो वरिष्ठ सरकाराचा हुकूम आला होता त्यांत सयाजीवर नजर ठेवावी व त्यानें दिलेल्या सर्व वचनांवर लक्ष्य ठेवावें, मात्र आपलें वर्चस्व उघडपणें दाखवूं नये असा मजकूर होता. पुढें (१८२१) एलफिन्स्टननें गायकवाडावर पुन्हां वीस लाखांचें कर्ज काढलें. खंबायतच्या नबाबानें वार्षिक पंचवीस हजारांची खंडणी द्यावी असें गायकवाड म्हणत व तो नाकारीत असे; शेवटीं इंग्रजांनीं मध्यस्थी करून ही रकम साडेचार हजार ठरविली. पुढें सयाजीरावाचें व बडोद्याच्या रेसिडेंटाचें भांडण झालें. दौलतीला जें कर्ज होतें त्या कर्जाबद्दल सावकारांनां इंग्रज हे जिम्मेदार राहिले होते. कर्ज फिटेना म्हणून रेसिडेंटानें तें सयाजीरावानें आपल्या खानगींतून द्यावें अगर सावकारांनां राज्यांतील महाल सात वर्षांच्या मक्त्यानें कर्जफेडीस लावून द्यावे असें ठरविलें. याबद्दल सयाजीनें थेट वरपर्यंत भांडण नेलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट ही व्यवस्था अंमलांत न आणल्यास आम्हाला सर्व राज्याचा वसूल करण्याचें काम जबरदस्तीनें हातांत घ्यावें लागेल असा एलफिन्स्टननें सयाजीस दम भरला. पुढें इंग्रजांनींच नऊ महाल (पांच वर्षांपुरते) आपल्या ताब्यांत घेऊन ही कर्जाची खटपट वारली (१८२८). ह्याशिवाय (१८२९ त) तैनाती फौजेच्या खर्चाकरितां आणखीहि कांहीं महाल इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतले. इंग्रजांचें व सयाजीरावाचें जास्त फाटत चालल्यानें खुद्द बडोद्यास सयाजीराव यांनां पदच्युत करून त्याचा मुलगा गणपतराव यास गादीवर बसविण्याचा एक कट झाला (१८३१) होता; परंतु तो उघडकीस येऊन त्याचा बीमोड करण्यांत आला. याच सुमारास मालकम हा जाऊन त्याच्या जागेवर लॉर्ड क्लेअर हा गव्हर्नर होऊन आला व त्यानें पूर्वीचें धोरण सोडून नवें सलोख्याचें धोरण स्वीकारलें. त्यावर लागलीच सयाजीरावानेंहि तडजोड करून व आपल्या खानगींतून २५ लाखांची भरती घालून कर्जदारांची फेड केली. त्यामुळें क्लेअर यानें नऊ परगणे (जे पूर्वी कर्जफेडीकरितां तारण घेतले होते) गायकवाडास परत दिले (१८३२ एप्रील). पोलिटिकल कमीशनर याच्या मनांत पांच वर्षांची मुदत भरली तरीहि ते परगणे आणीक पांच वर्षे ठेवण्याची इच्छा होतीच; पण क्लेअरनें तें ऐकलें नाहीं. तैनाती फौजेच्या खर्चाबद्दल सयाजीरावांनीं दहा लाख रु. इंग्रजांच्या स्वाधीन अगाऊच करून ठेवले (१८३३) होते. या वेळीं पुन्हां इंग्रज व सयाजीराव यांच्यांत खटके उडावयास लागले. वल्लभदास नांवाच्या अफुविक्याचा पक्ष घेऊन मुंबईचा गव्हर्नर ग्रांट यानें सयाजीरावांनां कांहीं जबरीच्या मागण्या केल्या होत्या. इंग्रजांच्या जिम्मेदारी माणसांनां त्रास दिल्याच्या आरोपावरून गायकवाडाच्या अंतर्गत कारभारांत ग्रांट हा वाटेल तसा हात घालूं लागला व सयाजीरावासहि नाइलाजानें त्याचें म्हणणें ऐकावें लागलें. पुढें कार्नाक हा गव्हर्नर झाला. त्यानें हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें सयाजीरावांनां कळविलें कीं, तुम्ही आमच्या हक्कांस व मागण्यास नाकबूल झाल्यास तुम्हांस पदच्युत करून तुमच्या मुलास गादीवर बसवूं. असें सांगूनहि इंग्रजांनीं गायकवाडाचा पेटलाद प्रांत आपल्या कबजांत घेतला (१८३८). आणि तैनाती फौजेपैकीं गुजराथ घोडदळ (सयाजीराव यांस शिक्षा म्हणून) वाढविण्यांत येऊन त्याचा सालीना तीन लाखांचा बोजा गायकवाडावर लादला (१८३९). याबद्दल सयाजीरावांनीं पुष्कळ तक्रार केली पण इंग्रजांनीं ती ऐकिली नाहीं. सयाजीरावांनीं १८४० त सतीची चाल बंद करून पुढें गुलाम विकण्याची पद्धत बंद केली (१८४७). इंग्रजांनीं अखेरीस (१८४०–४१) आपल्या अठ्ठावीस मागण्या गायकवाडांकडून कबूल करविल्या व ही बहांदारी (इंग्रजांनीं गायकवाडी प्रजेपैकीं कांहींची घेतलेली जिम्मेदारी) पद्धत एकदाची बंद केली.

(१८४५ सुमार). या पद्धतीमुळें इंग्रजांनां अनायासें व वाटेल तसा आपला हात संस्थानी कारभारांत शिरकवितां येत असे. या वेळीं तत्कालीन इंग्रज अधिकारी लांच घेत. यामुळें गुजराथेंत असें लोकमत झालें होतें कीं, प्रत्येक इंग्रज लांचखाऊ असतो (रूलर्स ऑफ बडोदा. पृ. २२७). या लांचलुचपतीस त्यावेळीं 'खटपट' असें दरबारी नांव मिळालें होतें. हा प्रकार सर जे. औटरम यास बंद करण्यास फार त्रास पडला. त्याच्या आड त्याचेच मित्र व वरिष्ठ अधिकारीहि आले होते (कित्ता). यानंतर थोड्याच दिवसांत सयाजीराव मरण पावले (दिसेंबर १८४७).

टीपः—ज्यांच्या शेजारीं अथवा खालीं * अशी खूण आहे ते पुरुष गादीवर बसले होते असें समजावें.

(रूलर्स ऑफ बडोदावरून)

सयाजीराव हे नांवाजण्यासारखे राजे होते. प्रजेचे ते आवडते होते. इंग्रजांच्या पकडींतून सुटण्याचा त्यांनीं फार प्रयत्न केला. तत्कालीन इंग्रजांच्या अधाशीपणामुळें त्यांचा स्वभाव हट्टी बनला असें रूलर्स ऑफ बडोदा या पुस्तकाच्या कर्त्यांचें मत आहे(पृ२३२). इंग्रजांनीं निरनिराळ्या सबबींवर जप्त केलेला सर्व मुलूख त्यांनीं पुन्हां सोडविला.त्यांनीं आपले बेत बहुतेक पार पाडले. लष्कर, सरदार, सावकार, मुत्सद्दी व प्रजा या सर्वांवर त्यांचें वजन होतें आणि शेवटीं त्यांनीं इंग्रजांच्या,

आपल्या संस्थानांत ढवळाढवळ करण्याच्या कृत्यास बांध घातला. त्यांनां पांच औरस पुत्र होते. पैकीं वडील गणपतराव हे गादीवर आले. हे स्वभावानें गरीब व नाकर्ते असून फारसे शिकलेले नव्हते. राज्यकारभार बहुधा दिवाणाच्या सल्लयानेंच चालत असे. यांनीं प्रवास बराच केला होता. यांच्यावेळीं गुजराथेंत आगगाडी सुरू झाली. गणपतरावांनीं प्रजेच्या जमीनींची नुकसानभरपाई व संस्थानाचा मार्गावरील जकातीचा तोटा हे भरून मिळण्याच्या अटविर आपल्या राज्यांतील जमीन आगगाडीस देऊं केली (१८५६). यांचें व यांचा भाऊ खंडेराव यांचें चांगलेंसें सूत नव्हतें. तांबवेकर नांवाच्या दिवाणावरून गणपतराव व रेसिडेंट औटरम यांचेंहि बिनसलें होतें. हें भांडण गव्हर्नर जनरलपर्यंत गेलें होतें (१८५४). त्यापुढें विशेष कांहीं न घडतां गणपतराव हे १९ नोव्हेंबर १८५६ त मरण पावले. त्यांनां पुत्र नसल्यानें त्यांच्या पश्चात त्यांचे धाकटे भाऊ खंडेराव हे गादीवर बसले (खंडेराव गायकवाड यांचें चरित्र मागें येऊन गेलें आहे तें पहा). त्यांच्या नंतर मल्हारराव हे त्यांचे भाऊ गादीवर बसले (त्यांचें चरित्र पुढें मल्हारराव पहा) आणि त्यांच्या पश्चात विद्यमान सयाजीराव महाराज हे गादीवर आले.

याप्रमाणें या बडोद्याच्या गायकवाड घराण्याची साधारण माहिती आहे. याशिवाय ग्वाल्हेर, अंतापुर, सनखेडा, कडी, खानदेश वगैरे ठिकाणीं या गायकवाड घराण्याच्या शाखा आहेत. अशा शाखांपैकीं एका खानदेशच्या शाखेंतील पिलाजीच्या प्रतापराव नांवाच्या मुलाच्या वंशांतीलच प्रस्तुतचे सयाजीराव महाराज हे दत्तक घेतलेले आहेत.

[कर्नल वॉलेस-गायकवाड ॲन्ड हिज रिलेशन्स विथ दि इंग्लिश गव्हर्नमेन्ट, दि रूलर्स ऑफ बडोदा १८७९; ग्रँट डफ, तिन्ही भाग.].

गायत्री— (१) ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलांतील ६२ व्या सूक्ताच्या विश्वमित्रानें दृष्ट अशा १०व्या ऋचेला गायत्री म्हणतात. प्राचीन कालीं मंत्रपाठकांचे गायत्र, अर्की वगैरे वर्ग होते. याबद्दलची माहिती ज्ञानकोश वि. २ मध्यें आली आहे. गायत्री हें वेदांतील अष्टाक्षरी वृत्ताचें नांव आहे. व वैदिक वाङ्मयांत(ब्राह्मण ग्रंथांतून)याच अर्थानें गायत्रीचा उल्लेख येतो. ऐतरेय ब्राह्मणाच्या तिसऱ्या पंचिकेंत याच अर्थी गायत्रीची कथा आली आहे. संध्याकर्मांतील जो गायत्री मंत्र गायत्री छंदांत आहे त्या गायत्री मंत्रास ब्राह्मणग्रंथापर्यंत वैशिष्टय आलेलें आढळत नाहीं, परंतु विशिष्ट गायत्री मंत्र हाच होय याबद्दल सूत्रांत पुरावा मिळतो. उपनयनसंस्कारांत या गायत्री मंत्राचा उपदेश होत असतो. सत्याषाढसूत्रांत उपदेशप्रसंगीं या मंत्राचा विनियोगदृष्टया प्रत्यक्ष पाठ प्रथमच केलेला आढळतो. त्यावरून गायत्री मंत्र हाच होय हें सिद्ध होतें. सविता देवतेच्या उपासनेकरितां सर्वत्र हाच मंत्र कां रूढ आहे याचें निश्चित कारण देतां येत नाहीं. कदाचित् उपलब्ध ऋक्संहितेंतील सवितृ देवतात्मक गायत्री छंदांतील हा पहिलाच मंत्र आहे हें कारणहि असेल. सर्व स्मार्त सूत्रकारांनीं या मंत्रास गायत्री असें नांव न देतां सावित्री असें नांव दिलें आहे. आश्वलायन गृह्यपरिशिष्टांत संध्याकर्मांत गायत्री मंत्राचे छंदर्षी देतांना या मंत्राची देवता गायत्री असल्याचा उल्लेख केला आहे व संस्काररत्नमाला, संस्कारकौस्तुभ वगैरे प्रयोगकारांनींहि गायत्र्युपदेशप्रकरणीं या मंत्राचा गायत्री म्हणूनच उल्लेख केला आहे. आश्वलायन गृह्यपरिशिष्टांत संध्याकर्मांत गायत्री जपाच्या आरंभीं गायत्री ही देवता कल्पून तिचें प्रातःकाळ,माध्यान्हकाल व सायंकाल या तीनहि कालीं संध्येंत करावयाचें एकच ध्यान प्रथम देऊन त्यापुढें तीन वेळचीं निरनिराळीं ध्यानें दिलीं आहेत. त्यामध्यें वरील तिन्हीं कालांच्या अनुक्रमें ऋक्, यजु व सामरूपीं गायत्रीचें वर्णन असून कालपरत्वें गायत्रीचे वर्ण, वाहन,देवता,वसन इत्यादिकांचे निरनिराळे प्रकार दिले आहेत. गायत्रीजपाच्या पूर्वी गायत्री मंत्राचा न्यास परिशिष्टकारांनीं दिला आहे. परंतु त्याच ठिकाणीं हा न्यासविधि अवैदिक आहे असें म्हटलें आहे. वरील विवेचनावरून गायत्रीमंत्राचा जप करण्याची चाल सूत्रकालांत सुरू झाली असावी व त्या मंत्राचे सावित्री हें नांव रूढ असून सूत्रकालानंतर गायत्री हें नांव रूढ झालें असावें. त्रैवर्णिकांत या मंत्राचें महत्त्व अतिशय मानिलें जातें. गायत्री मंत्राच्या संध्येंतील जपाशिवाय गायत्री पुरश्चरण नांवाचा आणखी एक विधि आहे. त्याचें विवेचन गायत्री कल्प वगैरे ग्रंथांतून आढळतें. शंकराचार्यांनीं गायत्री मंत्रावर बरीच विस्तृत टीका लिहिली आहे.

भू, अंतरिक्ष व स्वर्लोक यांच्या आठवर्णासाठीं गायत्री मंत्राच्या अगोदर व्याहृतींचा उच्चार करण्यांत येतो. " तें सवित्याचें वरेण्य भर्ग (तेज) आम्ही स्तवितों, जें आमच्या बुद्धीस प्रचोदना देईल " असा गायत्री मंत्राचा भावार्थ आहे गायत्रीमंत्र ही सूर्याची एक साधी स्तुति आहे व याच अर्थानें हा मंत्र प्राचीन लोक जपत असत असें एक मत आहे. या मंत्राचें महत्त्व इतकें स्थापन झालें आहे कीं, आर्य आणि व्रात्य किंवा शूद्र यांतील मुख्य फरक या मंत्राचा उपदेश किंवा त्याचा अभाव यावर अवलंबून राहिला.

[संहिता व ब्राह्मणें; डौसनकृत हिंदु क्लासिकल डिक्शनरी].

(२) ब्रह्मदेवाची सावत्र मुलगी व पत्नी जी शतरूपा तिलाहि गायत्री नांव लावतात. हरिवंशांत शिवाच्या स्त्रीलाहि गायत्री नांव दिलें आहे.

गार पगारी.—मध्यप्रांतांत आढळणारी एक जात. लोकवस्ती सुमारें ९ हजार. हे शेतावर पडणाऱ्या गारांचें निवारण करतात अशी समजूत आहे व तारा, ओतारी,

धानकर, हरण्या, बाघ, देवडे अशीं यांचीं नांवें आहेत. मावशीच्या मुलास नातें आठवतें तोंपर्यंत परस्पर लग्नें करतां येत नाहींत. यांचीं लग्नें कुणब्यांप्रमाणें होतात. विधवाविवाह सुद्धां होतात पण कोणी कोणी बायका 'भगत' बनतात, त्या पुरुषाचा पोषाख घालून यात्रा करतात. घटस्फोटाची जरी मोकळीक आहे तरी बायकांच्या कमतरतेमुळें हे घटस्फोट करीत नाहींत आणि "दमडीची भाजी जर कोणी फुकट दवडीत नाहींत तर ३॥ हाताची बायको कशी टाकावयाची" असें म्हणतात. गारांचें भविष्य वर्तविण्यास व त्यांचें निवारण करण्यास हे अनेकप्रकारचे मंत्रतंत्र व जादूटोणे करतात व प्रसंगीं आपल्या मुलांचा वधहि करून त्रागा करतात. गारपगारी गावांत नसला तर त्याची बायको गारांचें निवारण व्हावें म्हणून मारुतीपुढें लुगडें सोडून उभी रहाते व त्या ब्रह्मचारी देवाला आपल्या दिगंबर स्वरूपानें भेडसावते असें रसेल व हिरालाल वर्णन करतात. छत्तीसगडांत बैगा व बरई लोक गारपगारीचें काम करतात.

ग्रीक लोकांतील गारपगाऱ्यांस शलाझो फुलक्स म्हणत व तो आपलें रक्त काढून त्यांचे निवारण करी. ख्रिस्ती लोकांत देखील त्यांचे उपाध्याय फ्रान्स देशांत ही कामगिरी करीत असें फ्रेझर म्हणतो. आजकाल यांच्यावरून लोकांचा विश्वास उडाल्यामुळें यांची वृत्ति बुडाली. आतां नवार विणण्याचा धंदा व शेतकी हे लोक करतात. कुणबी लोक यांच्या हातचें पाणी पीत नाहींत. यांच्या नांवामागें नाय शब्द असतोच.

गारफील्ड जेम्स अब्रॅम (१८३१–१८८१).—अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा हा विसावा अध्यक्ष, १८३१सालीं ओहिओंतील ऑरेंज नामक शहरीं जन्मास आला. त्याचें प्राथमिक शिक्षण सामान्य शेतकऱ्याप्रमाणें जिल्ह्यांतील शाळेंत झालें व त्या ठिकाणीं रॉबिन्सन क्रूसोसारखीं जलपर्यटनाचीं अद्भुत कथानकें वाचल्यामुळें त्याला खलाशी होण्याची इच्छा झाली. क्षाराच्या कारखान्यांत काम करीत असतांना एकदां त्या कारखानदाराच्या मुलीनें त्याचा उपमर्द केला व ते सहन न झाल्यामुळें तो घरीं आला व शिक्षक होण्याची इच्छा धरून त्यानें चेस्टर येथील एका शाळेंत अभ्यास केला. शिक्षक, सुतार व शेतकरी या नात्यानें कामें करून विल्यम्स कॉलेजांत नांव घालून व परिस्थितीशीं झगडून त्यानें १८५६ सालीं हिरॅम येथील इक्लेक्टिक इन्स्टिट्यूटमध्यें प्रथम विद्यार्थी या नात्यानें व नंतर प्राचीन भाषा व वाङ्मय यांचा प्रोफेसर म्हणून व पुढें त्याच संस्थेचा प्रिन्सिपाल म्हणून चांगलें नांव मिळविलें.

त्यानंतर लवकरच तो राजकीय चळवळींत पडला. प्रजासत्ताक पक्षाच्या आरंभकाळीं व १८५७ आणि १८५८ च्या मोहिमांच्या वेळीं उत्कृष्ट वक्ता व गुलामगिरीचा निषेधक म्हणून तो पुढें आला. १८५९ सालीं आपल्या कर्तृत्वाच्या बळावर तो ओहिओसिनेटमध्यें निवडून आला. फटकून राहिलेल्या संस्थानावर दडपशाही गाजविण्याचा सरकारचा हक्क आहे असें त्याचें मत होतें. मिलियन वॉर बिलाचें त्यानें समर्थन केलें आहे. जेव्हां युद्ध उपस्थित झालें त्यावेळीं तो लेफ्टेनंटच्या पदास चढला व आपल्या पूर्वीच्या विद्यार्थ्यांतूनच त्यानें रिक्रूट भरती केली. १८६२ त तो स्वयंसेवकांचा ब्रिगेडियर जनरल झाला. त्याच सालीं तो काँग्रेसचा सभासदहि झाला. पुढें १८६३ मध्यें आपलें लष्करी कमिशन सोडून देऊन त्यानें हाउस ऑफ रिप्रिझेंटेटिव्हजमध्यें आपला प्रवेश करून घेतला. रिपब्लिकन पक्षांतील रॅडिकल लोकांच्या बाजूस तो असे व त्यानें अनेक कमिटयावर महत्वाचीं कामें केलीं. १८६३ ते ७३ च्या दरम्यान गुलामगिरीविरुद्ध त्यानें अनेक व्याख्यानें दिलीं. १८७४ सालीं रिपब्लिकन पक्षांस वाईट दिवस आले व गारफील्डवर अनेक दोषारोप करण्यांत आले; परंतु १८७६ मध्यें तो पुनः निवडून आला. १८७७ त तो हाऊस ऑफ रिप्रिझेंटेटिव्हजचा पुढारी झाला. परंतु डेमोक्रॅट लोकांचें संख्याबल जास्त असल्यानें त्याचा पराभव झाला. १८८० सालीं रिपब्लिकन पक्षाला एक उमेदवार अध्यक्ष म्हणून नेमावयाचा होता. जेम्स जी. ब्लेन आणि जॉन शरमन यांच्या तर्फेच्या लोकांमध्यें अहमहमिका सुरू झाली. त्यांतच जनरल ग्रँट यास हाणून पाडण्याचाहि प्रयत्न सुरू होता. अशा वेळीं गारफील्ड याचें आयतेंच फावलें. लोकसभेंतील अनेक वर्षांची सेवा, स्वपक्षाचा पुढारीपणा, वक्ता म्हणून झालेला बोलबाला व संयुक्त संस्थानाच्या सीनेटमध्यें त्याची नुकतीच झालेली निवडणूक या सर्व गोष्टींमुळें साहजिकच योग्य मनुष्य म्हणून जनतेचें त्याच्याकडे लक्ष वेधलें. दुर्दैवानें स्वपक्षांतील तीव्र मतभेद काढून टाकणें त्यास जड जाऊं लागलें. प्रेसिडेंट झाल्यावर ब्लेन यांस त्यानें सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणून नेमलें. त्यामुळें विरुद्ध पक्षांत मोठीच खळबळ उडाली. न्यूयॉर्कच्या सीनेटरांची संमति न घेता त्यानें रॉबर्टसनची न्यूयॉर्कच्या कलेक्टरच्या जागीं नेमणूक केली त्यामुळेंहि बराच असंतोष माजला. त्यावेळीं पक्षद्वेष इतका माजला होता कीं, एका विरुद्ध बाजूच्या मनुष्यानें वॉशिंग्टन रेल्वे स्टेशनावर त्यास गोळी घातली. १९ सप्टेंबर १८८१ सालीं गारफील्डचें प्राणोत्क्रमण झालें.

१८८२ सालीं दोन मोठ्या विभागांत, बोस्टन येथें बर्क ए. हिन्सडेल यानें प्रेसिडेंट गारफील्ड याचे ग्रंथ प्रसिद्ध केले.

गारिसपूर—ग्वालेर संस्थानांत हें खेडेगांव आहे. हल्लीं जरी याचें महत्व फारसें नाहीं तरी पूर्वी ह्याच ठिकाणावरून माळवा ते बुंदेलखंड हा रस्ता जात होता. हें ठिकाण प्रथम गोंड लोकांनीं घेतलें व नंतर मोंगल लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतलें व त्या ठिकाणचीं सर्व देवळें पाडून टाकलीं. पूर्वीच्या भव्य इमारतींपैकीं कांहीं अवशेष शिल्लक आहेत. त्यांपैकीं 'अष्टखांब' हा प्रचंड देवळाचा अवशेष आहे. मालदेवी नांवाच्या जुन्या देवळाचाहि हल्लीं एक पडित

भाग सांपडतो. ह्या इमारतीशिवाय मानससरोवर व आणखी एक अशीं दोन तळीं आहेत.

गारुडी— धंद्यावरून बनलेली या नांवाची जात मुंबई इलाख्यांत आढळते. ही साप खेळविणाऱ्यांची व जादूटोणा करणाऱ्यांची एक जात आहे. ठाणें जिल्ह्यांत यांची घरगुती बोली गुजराथी आहे. कृष्णवर्णी सदृढ व काटक असे हे लोक आहेत. हे स्वभावतः शांत, अतिथिपूजक असले तरी फार आळशी व कट्टे दारूबाज असतात. यांची रहाणी गलिच्छ असते. उपाध्याय ब्राह्मण असून तो लग्न चालवितो. हे लोक ब्राह्मणांना मान देतात व देवी भवानीची पूजा करतात. एकादशीच्या दिवशीं व नवरात्रांत उपोषणें करतात. यांच्यांत जातिसभा नाहीं. विधवाविवाह संमत आहे. मृताच्या बाराव्या दिवशीं कावळ्याला बली अर्पण करतात. हे सापाचे खेळ करून पोट भरतात.

सातारा जिल्ह्यांत मुसुलमान गारुड्यांची वस्ती असून त्यांचें मुख्य ठिकाण मिरज आहे. कोल्हाटी जातींतील कांहीं माणसें बाटून या जातींत आलीं असावीत. यांच्या चालीरीती मुसुलमानी दिसत नाहींत [मुं. गॅ.].

गारुलिया—बंगालच्या बराकपूर पोट जिल्ह्यांतील एक शहर. लोकसंख्या (१९११) ११,५८०. येथें ताग व कापूस यांच्या गिरण्या आहेत. शामनगर नांवाच्या खेड्याचा समावेश या शहरांतच झाला आहे. १८९६ मध्यें याला स्थानिक स्वराज्याचे अधिकार स्वतंत्रपणें मिळाले. १८९६ पर्यंत याचा समावेश नॉर्थ बराकपूर म्युनिसिपालिटींतच होत असे.

गारो टेंकड्या—आसाममधील अगदीं नैर्ऋत्येकडच्या जिल्ह्याचें गारोहिल्स असें नांव आहे. याचें क्षेत्रफळ ३१४० चौ. मै. आहे. यांतील बहुतेक मुलुख टेंकड्यांनीं व्याप्त आहे. या जिल्ह्यांच्या मधोमध, या टेंकड्यांच्या तुरा व अर्बेला अशा दोन समांतर रांगा झालेल्या आहेत. नोरकेक हें सर्वांत उंच शिखर आहे. या जिल्ह्यांत सोमेश्वरी नदी मुख्य असून ती तुरा टेंकडीच्या उत्तरेस उगम पावून कांगसा नदीला मिळते. सर्व टेंकड्यांवर जंगल पसरलेलें असून तें नेहमीं हिरवें असतें. जंगलांत साल वगैरे झाडें व उंच वेतासारख्या वनस्पती यांची वाढ होते. वाघ, हत्ती, अस्वलें, हरणें, इत्यादि पशूंची समृद्धि आहे. सर्व जिल्हा मलेरियानें दूषित आहे. पावसाचें प्रमाण सरासरी १२५ इंच आहे.

इ ति हा स.—या जिल्ह्याच्या पूर्वेतिहासाविषयीं म्हणण्यासारखी माहिती नाहीं. गारो लोक बहुधा जुन्या हिंदू राजांनीं त्यांना बंगालमधून हांकून दिल्यावर ते इकडे आले असावेत. बंगाली जमीनदारांचें गारो लोकांवर फार वर्चस्व असे व त्यांच्या जुलुमामुळें हे लोक फार त्रस्त झाले होते. त्यांनीं हें जमीनदारांचें वर्चस्व कमी करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण त्यांत त्यांनां यश आलें नाहीं. १८४८ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीच्या एका कामगाराला या लोकांनीं मारल्यामुळें कंपनीनें त्यांच्यावर सैन्य पाठविलें व जिल्ह्यांतील पुष्कळ खेडीं आपणच होऊन त्यांच्या स्वाधीन झालीं. १८७० सालीं गारोटेंकड्या हा स्वतंत्र जिल्हा पाडण्यांत आला.

या जिल्ह्याची लोकसंख्या १९११ सालीं १५८९३६ होती. या जिल्ह्यांत एकंदर १९३७ खेडीं आहेत. या जिल्ह्यांतील लोकांत वन्य, हिंदू व मुसुलमान लोकांची संख्या बरीच आहे. गारो, रभा, इत्यादि भाषा येथें प्रचलित आहेत. हे गारो लोक आपणांस डोंगरी लोक म्हणवितात. यांच्या सुमारें १५ जाती आहेत व त्या स्थलविभागावरून बनलेल्या आहेत असें दिसतें. गारो लोक दिसण्यांत ठेंगणे पण जाडे व दणकट गडी असून त्यांचे डोळे तिरवे व डोकें मोठें असतें. हे दिसण्यांत भव्य दिसतात. यांचा स्वभाव जात्या आनंदी व ममताळू आहे. यांचीं घरें झोंपडीवजा असतात. घरें टेंकडीच्या उतारावर वसलेलीं असल्यानें, झोपड्यांची एक बाजू टेंकडीवर वसलेली असते. यांचीं घरें बांबूंचीं असतात. गारो लोक फक्त लंगोटीवजा एक लांब पट्टीच नेसतात व तीच कमरेभोंवतीं गुंडाळतात. स्त्रिया गुडघ्यापर्यंत परकरासारखें वस्त्र वापरतात. स्त्रियांच्या कानांत पितळेचीं कर्णभूषणें असतात. भाला, ढाल व दुधारी तरवार हीं गारोंचीं हत्यारें होत. यांचें खाण्याचें मुख्य धान्य तांदूळ आहे.

गारो लोक, समान कुलाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कुलाशीं बेटीव्यवहार करतात. लग्नाच्या वेळीं कोंबडाकोंबडीचा बळी देण्यांत येतो. घटस्फोट व पुनर्विवाह यांच्यांत रूढ आहेत. गारो स्त्रिया नीतिसंपन्न व सदाचरणी असतात. यांच्यांत मृतांनां जाळण्याची चाल आहे. मृताच्या अस्थी घराच्या आसपास पुरण्यांत येतात व मृताचें स्मारक म्हणून घराच्या आवारांत एक खांब पुरतात. गारो लोकांचा परमेश्वरावर व पुनर्जन्मावर विश्वास आहे. भुताखेतांवर यांची श्रद्धा असून, त्यांचेंहि गारो लोक पूजन करतात. गारो लोक चांगले सुखवस्तू व श्रीमंत आहेत.

गारो लोकांत झूम नांवांची शेतीची पद्धत आढळते. यांनां नांगर वै पावडें यांचा उपयोग माहीत नाहीं. जिल्ह्यांत तांदूळ, कापूस, बटाटे, नीळ, हळद इत्यादि जिन्नस पिकतात. कालवे वगैरे पाणीपुरवठ्याची सोय नाहीं. गुराढोरांचा उपयोग गारो लोक दुभत्याकडे करीत नाहींत. ढोरांचा उपयोग खाण्याकडे करतात. जिल्ह्यांतील जंगलामध्यें साल वगैरे वृक्ष आहेत. हीं झाडें तोडून तीं विकण्याला यांनां परवानगी आहे. विक्रीवर यांनां कर मात्र द्यावा लागतो. जिल्ह्याच्या वायव्य भागांत कोळशांची खाण आहे. सोमेश्वरीच्या दरींत पेट्रोलियमच्या खाणी लागल्या आहेत. चुन्याचा दगड व चिकण माती या जिल्ह्यांत आढळून येते. गारोटेंकड्या जिल्ह्यांत नांव घेण्यासारखा कोणताच उद्योगधंदा होत नाहीं. मातकाम, विणकाम, इत्यादि साधे धंदे येथें प्रचारांत आहेत. कापूस, जंगलांतील लांकूड, मिरच्या,

लाख इत्यादि जिन्नस येथून बाहेर जातात व तांदूळ, गुरेढोरें, कपडा इत्यादि मालाची आयात होते. तुरा येथून ब्रह्मपुत्रा नदीच्या रोनमारी घांटाकडे व मैमनसिंग जिल्ह्याकडे असे दोन गाडी रस्ते जातात. डांबुजगला ते डामरापर्यंत २४ मैलांचा नवीन गाडीरस्ता १९०० च्या सुमारास तयार झाला.

या जिल्ह्याचे दिवाणी फौजदारीचे अनियंत्रित अधिकार या जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरकडेच आहेत. चीफकमीशनरच्या परवानगीनें या डेप्यूटीकमिशनरला फांशी देण्याचा अधिकार आहे. येथील व्यवस्थेकरतां चीफकमीशनरचें स्वतंत्र कोड केलें आहे. या जिल्ह्यांत तालुके वगैरे पोट विभाग नाहींत. तुरा येथें एक मुख्य एंजिनीयर व एक जंगल कामागार असतो. लास्कर नांवाच्या ग्रामाधिकाऱ्यांनां किरकोळ गुन्हे व दिवाणी लष्करी यांचा निकाल लावण्याचा अधिकार असतो. पोलीसचीं कामेंहि यांनांच करावीं लागतात. येथें एक लष्करी अधिकारी असतो व त्याला मॅजिस्ट्रेटचे अधिकार असतात. या जिल्ह्यांतील खेड्यांची रचना लोकसत्ताक तत्वावर झालेली आहे. जिल्ह्यांच्या बंदोबस्तासाठीं एक जिल्हासुपरिंटेंडेंट असून त्याच्या हाताखालीं कांहीं अधिकारी व शिपाई असतात. तुरा येथें एक तुरुंग आहे. गारो जिल्हा शिक्षणाच्या बाबतींत अत्यंत मागासलेला आहे.

गारोडी—जिल्हा पुणें. तळेगांव दाभाडयाच्या दक्षिणेस सुमारें दहा मैलांवर ही ५०० फूट उंचीची टेंकडी आहे. टेंकडीवर ख्रिस्ती शकाच्या आरंभीं खोदलेलीं कांहीं लेणीं आहेत. त्यांपैकीं एका लेण्यावर आंध्र अथवा दक्षिणी पाली लिपींत इ. स. १०० च्या सुमारास खोदलेला एक लेख आहे.

गार्गी—वचक्नु ऋषीची कन्या म्हणून हिला गार्गीवाचक्नवी असें नांव ग्रंथांत आहे. ही परम ब्रह्मनिष्ठ असून परमहंसाप्रमाणें पृथ्वीवर संचार करीत असे. हिचा दैवराती जनकाच्या सभेंत याज्ञवल्क्याशीं वाद झालेला, बृहदारण्यकांतील मधुकांडांत प्रसिद्ध आहे.

गार्डा—यूरोपांतील लॉम्बर्डे सरोवरांपैकीं गार्डा हें एक विस्तृत सरोवर असून जिनीव्हा व कॉन्स्टन्स हीं दोनच सरोवरें त्याहून मोठीं आहेत. याचें थेट उत्तरेकडील टोंक रिव्हायाच्याखेरीज याचा सर्व भाग इटलीच्या ताब्यांत आहे. हें आदिजे नदीच्या खोऱ्याच्या दक्षिणेस आहे. व आदिजे नदीच्या व याच्या दरम्यान मॉन्ट बॉल्डो आहे. यास उत्तरेकडून सार्का नदी येऊन व दक्षिणेस मिन्सिओ नदी उगम पावून पो नदीस मिळते. याचें क्षेत्रफळ १४३ चौ. मै. आहे. हें सरोवर समुद्रसपाटीपासून २१६ फूट उंच आहे व जास्तींत जास्त १९१६ फूट खोल आहे. हें उत्तरेकडे अरुंद होत गेलें आहे परंतु पूर्वेकडे गार्डा व पश्चिमेकडे सॅलो यांच्या मध्यें याचा आकार वर्तुळ असून, सर्मियोन नांवाच्या भूशिराच्या योगानें दक्षिण किनाऱ्याचे दोन भाग झाले आहेत. या रचनेमळें यामध्यें वादळें फार उत्पन्न होतात. बोरिया अथवा सूअर या नांवाचें एक उत्तरेकडून वादळ येतें तें अत्यंत भयानक असतें. शिवाय ओरा इत्यादिकांसारखीं अनेक वादळें या सरोवरांत उपस्थित होतात. पूर्वेकडील मॉन्ट बाल्डोवरील चुनखडी व पश्चिम व दक्षिण किनाऱ्यावरील सुंदर बागाइत यांचा विरोध फारच विलक्षण होय. गार्ग्नानो व सॅलो यांमधील पश्चिम किनाऱ्याचा प्रदेश उष्ण असून तेथें लोक हिवाळ्यांत राहण्याकरितां येतात. पश्चिम किनाऱ्यावर सॅलो, टॉस्कोलॅनो, गार्ग्नानो व लिमोन हीं शहरें असून पूर्वेकडे फक्त बार्डोलिनो व गार्डा हीं दोनच आहेत. उत्तरेकडील टोंकावर रिव्हा आहे.

गार्डिनर, सॅम्युएल रासन (१८२९–१९०२)—एक अर्वाचीन इंग्लिश इतिहासकार. याचा जन्म आलरेस फोर्ड जवळ झाला. लंडन येथील किंग्ज कॉलेजमध्यें तो कांहीं दिवस इतिहासाचा अध्यापक होता. त्याला प्युरिटन् लोकांनीं घडवून आणलेल्या क्रांतीचा इतिहासकार समजतात. त्याच्या पुस्तकांतील माहिती बिनचूक असून ती बऱ्याचश्या हस्तलेखांवरून मिळविलेली आहे. मानवजातीच्या नैतिक, धार्मिक व राजकीय प्रगतीची माहिती ज्यापासून होईल अशा गोष्टींनां आपल्या ग्रंथांतून तो फार महत्व देतो. त्यानें सविस्तर माहिती आपल्या पुस्तकांतून दिल्यामुळें तीं बरींच मोठीं झालीं आहेत. तरीपण ती सर्व माहिती त्यानें निःपक्षपातानें दिली आहे. त्याची भाषा जरी जोरदार नसली तरी पण समजण्यास सोपी आहे. तिचा वाचकांच्या मनोविकारांवर परिणाम न होतां विचारांवर जास्त परिणाम होतो. त्यानें इतर पुस्तकें लिहिलीं आहेत. तरी पण त्याच्या इग्लंडच्या इतिहासामुळेंच त्याचें नांव नेहमीं लोकांच्या तोंडीं राहील. 'दि इंग्लिश हिस्टॉरिकल रिव्ह्यू' चा तो संपादक असून 'डिक्शनरी ऑफ नॅशलन बायॉग्रफी' त त्याचे बरेच लेख आहेत. ऑक्सफोर्ड, एडिंबरो व गॉटिन्जेन विश्वविद्यालयांनीं त्याला बहुमानार्थी पदव्या दिल्या होत्या.

गॉल—आल्प्स, भूमध्य समुद्र, पीरीनीज, अटलांटिक महासागर व ऱ्हाईन इत्यादींनीं मर्यादित असलेला व केल्टिक भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश. इ. स. पूर्वी सुमारें २१८ त रोमन सैन्यानें या प्रदेशांत प्रवेश करण्यास सुरुवात केली. इ. स. पूर्वी १२१ त माँट पेलीअर पासून पीरीनीज पर्यंतचा किनारा व नारबोचें बंदर यांचा गॅलीआ नारबोनेसिस म्हणून एक प्रांत बनविण्यांत आला. हळू हळू या प्रांतानें आपली मर्यादा मॅसॉलिआच्या उत्तरेपर्यंत वाढविली.

गॉल प्रांताविषयीं अत्यंत प्राचीन असा उल्लेख ज्युलीअस सीझरच्या 'कॉमेंटरीज' मध्यें सांपडतो. या पुस्तकाप्रमाणें गॉल हा त्यावेळीं तीन प्रकारच्या लोकांत विभागला गेला होता. ॲक्वीटानी, गॉल व बेल्जी हे ते लोक होत या तीन

मुख्य जाती खेरीजकरून हेलवेटी, सेक्वानी, आरव्हर्नी वगैरे पोटजाती होत्या.

सीझरनें इ. स. पू. ५८–५१ पर्यंत केलेल्या लढायांनीं सबंध गॉल प्रांत रोमच्या ताब्यांत गेला. आगस्टसच्या अमदानींत राज्यकारभाराच्या सोयीकरितां म्हणून गॉलचे जे विभाग करण्यांत आले तेः—(१) नारबोनेसिस; या ठिकाणीं सीनेटनियुक्त रोमन प्रतिनिधि राज्यकारभार पाहूं लागला. येथील गॉल लोकांचा इटालीयन संस्कृतीकडे जास्त ओढा दिसून आल्यामुळें हळू हळू त्यांचा जुना केल्टिक आयुष्यक्रम व रीतीभाती नाहींशा होऊन इ. स. नंतर ७० च्या सुमारास तो संस्कृतीनें पूर्ण इटालियन बनला. (२) अॅक्वीटेनीआ, (३) ल्युग्डुनेसिस, (४) बेलजिका; या प्रांतांतील लोकांस नारबोनेसिसच्या लोकांपेक्षां राज्यकारभारांत जास्त स्वातंत्र्य देण्यांत आलें होतें. येथील लोकांनींहि रोमन संस्कृतीचा स्वीकार करून थोडक्याच वेळांत ते देखील पूर्ण इटालियन बनले; परंतु या तिन्हीं प्रांतात आपलेपणाची भावना अजून शिल्लक होती ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. केल्टिक देवतांची पूजा ते अझूनहि करीत असत व खेड्यापाड्यांतून केल्टिक भाषेचाच प्रसार विशेष रूढ असे. (५) गॉल प्रांताचा पांचवा विभाग म्हणजे ऱ्हाईन नदीची सरहद्द होय. या सरहद्दीला प्रांताचें स्वरूप टायबेरियस यानें दिलें. हा प्रांत मुख्यतः लष्करी दृष्टीनें वसवला असल्यामुळें या ठिकाणीं प्रथम राजकीय संस्था मुळींच अस्तित्वांत नव्हत्या. परंतु पुढें एक दोन स्थानिक स्वराज्यसंस्था स्थापण्यांत आल्या.

इ. स. नंतर ४०० पर्यंत गॉल रोमच्या ताब्यांत असून सुरक्षित होता. इ. स. ४०० मध्यें फ्रँक्स, व्हंडालस वगैरे लोकांची गॉलवर टोळधाड येऊन रोमनसत्ता ही बहुतेक नामशेष झाली व व्हिजीगॉथ्स, बरगंडियन्स व फ्रँक्स यांचीं राज्यें अस्तित्वांत येऊं लागलीं. सेनापति अॅटीअस हा गॉलवरील शेवटला सत्ताधारी पुरुष होय. इ. स. ४८६ त गॉलमधील रोमचें स्वामित्व पूर्णपणें लयास गेलें.

गालगुंड, नि दा न.—गळयाला थोडी किंवा फार सूज येऊन ती लोंबल्यासारखी दिसते त्यास गालगुंड (गलगंड) म्हणतात. वायु व कफ हे दोष आणि मेद धातु दुष्ट होऊन गळा किंवा मान यांच्या ठिकाणीं आपापल्याला म्हणजे जो दोष जास्त दुष्ट असेल त्याच्या लक्षणांस घेऊन सूज उत्पन्न करतात. म्हणून हीं गालगुंडें तीन प्रकारचीं आहेत. वातिक, कफजन्य व मेदोजन्य. ठणका फार असणें, त्यावरील शिरा काळ्या असून त्यांनीं जणूं काय बांधलें आहे असें दिसणें, त्या गालगुंडाचा रंग काळा असणें, किंवा अरुण असणें, त्याची वाढ सावकाश होणें व न पिकणें हीं वातिक गालगुंडाचीं लक्षणें होत.

सूज स्थिर असणें, त्वचेचा रंग न बदलणें, जड असणें, कंडू फार असणें, सूज पुष्कळ व थंड असणें, तोंड गोड असणें व आटाळा व गळा कफानें लिप्त होणें हीं लक्षणें कफजन्य गालगुंडाचीं असून हें गालगुंड सावकाश वाढतें, यांत दुखवा फार नसतो व बहुतकरून पिकत नाहीं. गालगुंड तेलकट दिसणें, जड असणें, पांढुरकें असणें, त्यास कंड असणें व मुळाशीं लहान असून पुढें दूधभोपळयाप्रमाणें मोठें होऊन लोंबणें आणि शरीराच्या बारीक होण्यानें बारीक व लठ्ठ होण्यानें जाडी होणें, दुखवा थोडा असणें, तोंड नेहमीं स्निग्ध म्हणजे तूप किंवा तेल खाल्ल्याप्रमाणें असणें, गालगुंड झालेल्या माणसाचा आवाज घोगरा असणें हीं लक्षणें असतील तर गालगुंड मेदोजन्य समजावें.

श्वासोच्छ्वास मोठ्या कष्टानें होणें, सर्व शरीर मृदु होणें, अरोचक असणें आणि आवाज बसलेला असणें, हीं लक्षणें असून गालगुंड झालेला रोगी जर क्षीण असेल आणि गालगुंड होऊन एक वर्ष होऊन गेलें असेल तर तें बरें होत नाहीं.

चि कि त्सा.—वातजन्य गालगुंड शेकून रक्त काढावें आणि तीळ, करडई, अळशी यांचें पोटीस बांधावें. कफजन्य गालगुंडावरहि हीच चिकित्सा करावी. परंतु स्वेद व विम्लापन हीं त्यांहून फार करावीं. कफघ्न औषधांनीं तयार केलेलें तेल प्यावें. तसेंच कफनाशक धूम, वमन व नस्य वगैरे उपचार चालू करावे. मेदोजन्य गालगुंडावर शीर तोडावी, कफनाशक उपाय करावे आणि असाणातिवस इत्यादि मेदोनाशक औषधांचें चूर्ण गोमूत्रांतून प्यावें. या उपायांनीं बरें न झाल्यास फोडून सर्व गालगुंडाचा व्रणाप्रमाणें चिकित्सा करावी. गालगुंड फार मोठें नसल्यास शेकून चिकट औषधें वर लावून पट्टी बसवावी म्हणजे त्या जाग्यास ओढा बसून गालगुंड बरें होतें.

गालव—गालव नांवाचा एक ब्रह्मर्षि होता. दुसरा गालव म्हणून विश्वामित्राचा एक पुत्र होता; दुष्काळांत दर्भरज्जू बांधून त्याला विकावयास काढल्यामुळें हें त्यास नांव मिळालें होतें. तिसरा गालव हा विश्वामित्राचा शिष्य होता. विश्वामित्रानें गुरुदक्षिणा म्हणून याच्याजवळ ८०० श्यामकर्ण घोडे मागितले असतां हा ययातीकडे गेला. त्याच्याजवळ घोडे नसल्यानें त्याच्या माधवी नांवाच्या मुलीस घेऊन सूर्यवंशीय हर्यश्व राजाकडे तिला एक पुत्र होईपर्यंत ठेवून त्याच्यापासून त्यानें दोनशे घोडे घेतले. पुढें सोमवंशी दिवोदास व भोजराज उशीनर या प्रत्येकाजवळ एक एक मुलगा होईपर्यंत माधवीस ठेऊन त्यांच्याकडूनहि त्यानें दोनदोनशे घोडे आणले. नंतर एकंदर सहाशे घोडे व माधवी यांना घेऊन तो विश्वामित्राकडे गेला व घोडे त्यास दिले. विश्वामित्रानेंहि दोनशे घोड्यांऐवजीं एक पुत्र होईपर्यंत माधवीस ठेऊन घेऊन तिला गालवाकडे परत केली. त्यानें तिला ययातीकडे नेऊन देऊन स्वतः तपाचरणास निघून गेला; याप्रमाणें त्यानें गुरुदक्षिणेची फेड केली. गालव नांवाचा चौथा एक पुरुष कुंतल राजाचा पुरोहित होता. आठव्या सावर्णिमन्वतरांत सप्तर्षीमधील एका ऋषीचेंहि नांव गालव असें

आहे. [देवी भागवत. अ. १०; महाभारत उद्योग पर्व अ. १६, १०८–१९]

गालापागास बेटें—पॅसिफिक महासागरांतील हा लहानमोठा द्वीपसमूह विषुववृत्ताच्या खालीं आहे. दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यालगतचें बेट इक्केडोरच्या पश्चिमेस ५८० मैलांवर असून हीं बेटें इक्केडोरच्या ताब्यांत आहेत. सोळाव्या शतकांत स्पॅनिश लोकांनीं या बेटांचा शोध लावला. त्यावेळीं तेथें मनुष्यांची वस्ती नव्हती. कित्येक बेटांचीं इंग्रजी नांवें चांचे लोकांनीं दिलेलीं असावीं. अलबेमारले अथवा इसाबेला, नारबरो, सँटाक्रूझ, चॅथॅम, जेम्स व चार्लस इत्यादि या द्वीपसमूहाचीं कांहीं नांवें आहेत. या बेटांचें एकंदर क्षेत्रफळ २८७० मैल असून तेथें कित्येक ज्वालामुखी आहेत. चॅथॅम बेटावर ३०० गुन्हेगारांची एक वसाहत असून तेथील व्यवस्था इक्केडोरचा पोलिस अधिकारी पहातो. १८३२ सालीं हा द्वीपसमूह इक्केडोर देशाला जोडला गेला. त्यावेळीं तेथें फ्लोरिआना हें गांव वसविण्यांत आलें. १८८५ सालापासून तेथें एक गव्हर्नर नेमण्यांत आला. कारण पनामा कॅनालमुळें या बेटांस महत्व आलें. चार्लस बेटावरहि थोडीशी वसाहत आहे. येथील द्वीपसमूहामध्यें घोडे, माकडें, डुकरें, बकरीं व कुत्रे वगैरे बरेच प्राणी आहेत. येथें उंच वृक्ष, हिरवीगार झुडुपें व बहुविध वनस्पतीहि, बऱ्याच आहेत. तथापि तेथील सपाट बाजूच्या जमीनी खडकाळ असून किनाराहि चांगला नाहीं या बेटांचा सपाट प्रदेश व झाडाझुडुपांनीं गजबजलेला डोंगराळ प्रदेश यामध्यें बराच फरक दिसून येतो. हीं बेटें विषुववृत्ताच्या खालीं असलीं तरी येथील हवा फारशी कडक नाहीं. कारण ॲन्टार्टिक समुद्राकडून वाहत येणारे शीतवारे हवा समधात करून टाकतात. गालापागॉस बेटें इक्केडोर देशास व्यापाराच्या दृष्टीनें महत्वाचीं वाटतात. कारण त्या बेटावर सांपडणारा ग्वानो व आर्चिला नांवाचें शेवाळ यूरोपांत पाठविलें जातें. चार्लस बेटाखेरीज अन्यत्र फारशी मनुष्यवस्ती नाहीं. डार्विननें या द्वीपसमूहास भेट दिल्यापासून त्यांचें महत्व वाढलें आहे. ह्या द्वीपसमूहांत सात जातींचे प्रचंड कासव असून ते सर्वच स्थानिक आहेत. सरड्यांच्याहि दोन जाती असून तेथील पक्षी निराळयाच तऱ्हेचे असलेले आढळून येतात.

गालिचे—वाफेच्या यंत्रांनीं गालिचे विणण्याची कला जरी सर्वस्वीं पाश्चात्य आहे तरी फार प्राचीन काळापासून पौरस्त्य देशांतून हातानें विणलेले सुंदर गालीचे तयार होत. आपल्याकडील रिवाजाप्रमाणें प्राचीन ईजिप्तमध्येंहि राजवाड्यांतून व देवळांतून जमीनीवर व आसनांवरून हांतरण्याकरितां हांतऱ्या असत. अशा गालिचांत सुयांनीं बारीक नक्षीकाम करीत. इ. स. च्या ३ ऱ्या किंवा ४ थ्या शतकांतील ईजिप्तोरोमन गालिचे साउथ केन्सिंग्टन म्युझियममध्यें ठेविले आहेत.

फू ल गा लि चे—तुरेदार किंवा फुलाचे गालिचे करण्यांत इराण, तुर्कस्तान या पौरस्त्य देशांची बरीच ख्याति आहे. सूत, ताग, लोंकर किंवा रेशीम यांची उभी वीण घालून त्यांत रंगीत लोंकर, बकरीं किंवा उंट यांचे केंस किंवा रेशीम यांचें चित्र आंखून त्याप्रमाणें धागे भरतात व उभ्या विणीवर आडवें सूत घेतात. नंतर पुन्हां याप्रमाणेंच रंगीबेरंगी लोंकरीची आणखी एक ओळ भरून पुन्हां एक आडवा दोरा घालतात. अशा रीतीनें फूल गालिचे विणतात. या गालिच्यांत दोन पुरातन गाठींचा उपयोग केला जातो;एकीला तुर्की किंवा घिऑर्डेस(या नांवाचें ब्रुसाजवळ एक प्राचीन शहर आहे.) गांठ व दुसरीला पर्शियन किंवा सेहना गांठ म्हणतात. सेहना, किर्मात आणि ताब्रिझ येथें होणाऱ्या पर्शियन गालिच्यांत ताणा रेशमाचा असल्यानें फूल फार उठावदार दिसतें. पूर्वेकडे असे गालिचे कधींपासून करण्यांत येऊं लागले याचा अंदाज लागत नाहीं. मखमलीसारखें हे कापड असल्यानें अगोदर कोणतें व मागाहून कोणतें तयार होऊं लागलें हें समजत नाहीं. सतरंज्यासारखे गालिचे फूल गालिच्याच्या फार आधींचे यांत शंका नाहीं.

पौ र स्त्य गा लि च्यां ती ल न क्षी का मा चें र ह स्य.—व्यापक दृष्टि योजिल्यास पौरस्त्य गालिच्यांच्या नमुन्यांत दोन प्रकार दृष्टीस पडतील. एक सुनी पंथी व दुसरा शिया पंथी. पहिल्यांत रुक्ष भूमितीच्या व कोन साधलेल्या आकृती असून शिवाय गुंतागुंतीची नक्षी, गूढ चिन्हें वगैरे असतात. त्यांत सुनींची संन्यस्त वृत्ति दिसून येते. उलट दुसऱ्या प्रकारांत शिया किंवा सुधारक पंथाचे स्वतंत्र विचार दृष्टीस पडतात. शिया प्रकारांत मोठया कल्पकतेनें काढलेलीं फुलें व वेलबुट्टया, वनस्पती व प्राणी यांचे आकार, कुफी लेखाभोवतीं बसविलेली मह्रिराप वगैरे कामें केलेलीं असतात. अफगाणिस्तान, तुर्कस्तान, बुखारा, हिंदुस्थानचा वायव्य सरहद्द प्रांत यांतून सुनी तऱ्हेचे व इराणांत शिया तऱ्हेचे गालिचे होतात.

हिं दु स्था नी गा लि चे.—इराण, तुर्कस्तान व हिंदुस्थानचा वायव्यसरहद्दप्रांत यांच्या खालोखाल फूलगालिचे होणारा, ऐतिहासिक महत्वाचा देश म्हणजे हिंदुस्थान होय. हिंदुस्थानांत चौदाव्या शतकाच्या उत्तरभागांत, फुलाचे गालिचे विणण्याची कला प्रथम मुसुलमान लोकांनीं आणिली. परंतु मोंगल वंशाच्या स्थापनेच्या कालापर्यंत ह्या कलेस म्हणण्यासारखें महत्व मिळालें नव्हतें. मोंगल वंशाची स्थापना झाल्यावर बाबरानें १६ व्या शतकाच्या आरंभीं या कलेस नांवारूपास आणिलें. त्या काळीं हिंदुस्थानांत तयार झालेल्या गालिचावरलि नक्षीकाम इराणी गालिचांच्या धर्तीवर केलेलें असे. तथापि मूलप्रतिमेसारखें सौंदर्य हिंदुस्थानांत तयार झालेल्या गालिच्यांच्या ठायीं क्वचितच दिसे. गालिचे तयार होणारे हिंदुस्थानांतील ऐतिहासिक दृष्टया प्रमुख प्रांत म्हटले म्हणजे काश्मीर, पंजाब

व सिंध हे होत. आग्रा, मिर्झापूर, जबलपूर, वरंगळ, मलबार आणि मच्छलीपट्टण हीं गालिचे होण्याचीं मुख्य स्थळें आहेत. बनारस आणि मुर्शिदाबाद या ठिकाणीं सोनेरी व रुपेरी कलाबतूचें नक्षीकाम केलेले गालिचे होतात. हे गालिचे फक्त उत्सवप्रसंगींच वापरावयाचे असतात. तंजावर आणि सालेम या ठिकाणीं रेशमानें विणलेले फूलगालिचे तयार होतात.हिंदुस्थानांतील सर्वोत्कृष्ट असे लोंकरी गालिचे हे हिंदुस्थानांतील राजेरजवाडे, मोठमोठे अमीरउमराव, धनिक लोक यांनीं मुद्दाम गालिचे करण्यांत वाकबगार अशा कारागिरांनां पदरीं ठेवून त्यांच्याकडून तयार करून घेतलेले आहेत. हे गालिचे राजवाड्यांतून शोभेकरतां हांतरण्याचा प्रघात असे. वरील प्रकारच्या कुशल कारागिरांचा धन्याच्या खासगी आश्रितांत समावेश होत असून त्यांनां ठराविक वेतन मिळत असे. दुसऱ्या एखाद्या गिऱ्हाईकाचें काम करण्याचीहि त्यांनां मुभा असे. एकोणिसाव्या शतकांत, सरकारी तुरुंगांतून गालिचे बनविण्यांत येऊं लागले. तुरुंगांतील गालिचे, कारखान्यांत तयार झालेल्या गालिच्यांपेक्षां कमी सुबक व मृदु असतात. कारण तुरुंगांत ते मोठ्या प्रमाणावर काढावे लागतात. फूलगालिच्यांपेक्षांहि अतिशय प्राचीन काळापासून सतरंजीवजा पातळ सुती गालिचे हिंदुस्थानांत तयार होत असत. हे गालिचे निळ्या व पांढऱ्या अथवा निळ्या व तांबड्या पट्ट्यांनीं विणलेले असून त्यांची वीण अगदीं साधी व सोपी असे. यांना दरी अथवा सतरंजी म्हणतात. बनारस (काशी) शहरीं व उत्तर हिंदुस्थानांत मुख्यत्वेंकरून सतरंज्या तयार होतात. दक्षिणेमध्येंहि सतरंज्या होतात. विशेषतः निलगिरी पर्वतांतील तोडा लोकांसारखे मूळ रहिवाशी या कामांत प्रवीण आहेत.

यू रो प म धी ल गा लि चे.—कॅस्टाईलची राणी एलेनॉर हिनें तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडमध्यें प्रथमच गालिचे उपयोगांत आणिले असें म्हणतात. हे गालिचे स्पेनमधून आणविलेले असत. कारण, त्यावेळीं स्पेनच्या दक्षिणभागांत सॅरसीन किंवा मूर लोक गालिचे तयार करीत. उलटपक्षीं सॅव्हॉनेरी येथील पीअर दुपॉन्ट नामक गालिचे करणारा कारागीर (इ. स. १६३२) म्हणतो कीं, फ्रान्समधील गालिचे तयार करण्याच्या कृतीचें ज्ञान हें इ. स. ७२६ त चार्लस मार्टेल यानें केलेल्या सॅरसेन लोकांच्या पराभवाचें फळ होय. कारण फ्रेंच लोकांनीं सॅरसेन लोकांपासून गालिचे करण्याची कला उचलली. १३ व्या शतकांत व्हेनिस शहरीं सुंदर नक्षीकाम करणारे असे कुशल विणकर गालिचे तयार करण्याच्या कामीं वेतन देऊन नेमिले होते. त्याकाळीं व्हेनिस हें गालिचे वगैरे सामानाच्या निर्गतीचें मुख्य ठिकाण होतें. येथूनच पश्चिम यूरोपभर गालिच्यांचा प्रसार होत असे.

स्पे नि श गा लि चे.—आतां सॅरसेनिक व इराणी गालिच्यांहून भिन्न अशा प्रकारच्या स्पेनमध्यें तयार झालेल्या गालिच्यांचा उल्लेख केला पाहिजे. सुमारें पंधराव्या शतकाच्या शेवटीं अगर सोळाव्या शतकाच्या आरंभीं स्पेनमध्यें गालिचे करण्याची कृति प्रचलित असावी. अगदीं अलीकडच्या काळांतच या प्राचीन गालिचांचे नमुने सांपडले आहेत. स्पेनमध्यें हे गालिचे करण्याचे कारखाने कोठून आले याविषयीं नक्की माहिती उपलब्ध नाहीं. या फूलगालिच्यांचा एक प्रेक्षणीय नमुना व्हिक्टोरिया आणि आलबर्ट म्यूझियममध्यें पहावयास सांपडतो. या गालिचांच्या मध्यभागांतील नक्षीकाम मूर लोकांनीं विणलेल्या गालिचांच्या धर्तीवर असून गालिचाच्या कडांवर सर्पाकृति प्राण्याप्रमाणें नक्षीकाम केलेलें आहे. फूल गालिचांशिवाय १७ व्या व १८ व्या शतकांत स्पेनमध्यें तयार झालेल्या सतरंजीवजा गालिचावर स्पॅनिश नांवें व कोरीव लेख आढळून येतात.

पो लि श गा लि चे.—उत्कृष्ट फूल गालिचांचा आणखी एक चमत्कृतिजन्य वर्ग म्हटला म्हणजे पोलिश गालिचांचा होय. या प्रकारचे गालिचे आधुनिक काळामध्येंच ज्ञात झाले आहेत. हे गालिचे बहुशः रेशमानें विणलेले असून अतिशय मृदु असतात. जमिनीवर हांतरण्याकरतां केलेले गालिचे सोनेरी व रुपेरी कलाबतूनें विणलेले असून सतराव्या शतकांतील ब्रुसाफॅब्रिक्सच्या धर्तीवर बनविलेले आहेत. पुष्कळ प्रकारच्या शोधांवरून हे पोलिश गालिचे, कॉन्स्टांटिनोपल व दमास्कस या दोन शहरांपैकीं कोणत्यातरी एका शहरीं प्राचीनकाळीं तयार होत असावे असें सिद्ध होतें.

फ्रा न्स म धी ल गा लि चे.—१६६७त फ्रान्समध्यें लूव्हर येथें चौथ्या हेनरीनें या कलेस उत्तेजन देण्याकरतां म्हणून राजकीय कलाभवनें स्थापिलीं. या कलाभवनांतून निरनिराळ्या प्रकारचीं कलाकुसरीचीं कामें केलीं जात असत. याच ठिकाणीं स. १६०४ मध्यें पौरस्त्य (ओरिएन्टल) गालिचे तयार करण्याकरतां एक उद्योगशाळा स्थापन झाली. पुढें सुमारें दहापंधरा वर्षांनीं पीअरडुपॉन्ट आणि सायमन लोर्डेट या दोघां गृहस्थांनीं चिलॉट (पॅरिस) येथें फूलगालिचे करण्याचा धंदा सुरू केला. लूव्हर येथील गालिचे बनविणारे कारागीर इ स. १६३१ मध्यें चिलॉट येथें बदलले जाऊन सदर ठिकाणीं गालिचे तयार करण्याचा धंदा, प्रत्यक्ष फ्रान्सच्या राजाच्या हुकमतीखालीं व राजाश्रयानें पुढें कैक वर्षे चालू होता.

इं ग्लं ड म धी ल.—१७व्या शतकाच्या अखेरच्या काळांत तुर्की फूल गालिचे करणारे फ्लेमिश कारागीर इंग्लंडमध्यें येऊन निरनिराळ्या ठिकाणीं गालिचे तयार करण्याचा उद्योग करूं लागले. या गोष्टीला खात्रीलायक पुरावा असल्यामुळें याबद्दल कांहीं वाद नाहीं. ॲक्समिन्स्टर आणि विल्टन या येथील गालिचे विणणारांनां १७०१ सालीं तिसऱ्या विल्यमकडून संरक्षक सनद (प्रोटेक्टिव्ह चार्टे) मिळाली. १८ व्या शतकाच्या आरंभीं हेनरी, अर्ल ऑफ पेम्ब्रोक नामक गृहस्थानें विल्टन येथील गालिच्यांच्या व्यापारांत मन घालून फ्रान्समधून कांहीं कुशल कारागीर आणविले व

त्यांनां विल्टन येथें नेमिलें. त्यामुळें फूलगालिचांच्या व्यापारांत क्रान्ति होऊन इंग्लंडमध्यें सर्वांगसुंदर फूलगालिचांची निपज होऊं लागली. १७५१ सालीं फुलहॅम शहरीं पॅरिसॉट नामक एका तज्ज्ञानें फूल गालिचे विणण्याचा कारखाना काढला. पुढें १७५५ सालीं हा कारखाना विकला गेला. नंतर एक्झीटर येथें दुसरा एक कारखाना काढण्याचा त्याचा विचार होता. पण तो तडीस गेला नाहीं. विल्टन येथील गालिचांच्या कारखान्यांची उत्तरोत्तर भरभराट झाली तेथें तयार होणारे गालिचे व फूल गालिचे सर्व लोकांच्या आवडीस पात्र होतीलसे आहेत. १८ व्या शतकाच्या अखेरीस ॲक्समिन्स्टर येथील कारखाने मात्र ठार बुडाले. सॅव्होनेरी प्रमाणेंच ॲक्समिन्स्टर हें नांव गालिचांच्या प्रसिद्धीकरतांच निव्वळ शिल्लक राहिलें आहे.

अ र्वा ची न यं त्रा नें वि ण ले ले गा लि चे.—वाफेच्या यंत्रांनीं गालिचे विणण्याची कला इंग्लंडमध्यें अस्तित्वांत येण्यापूर्वी गालिचे विणणार लोक फ्रेंच लोकांनीं घालून दिलेल्या उदाहरणाचें अनुकरण करीत; म्हणजे गालिचे विणण्याच्या कामीं जॅकार्डच्या यंत्राचा (ॲपरेटसचा) मुख्यतः उपयोग करीत. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत व पुढें कांहीं काळ ही स्थिति होती. परंतु पुढें लवकरच इंग्लंडमध्यें थोड्या वेळांत पुष्कळ गालिचे तयार होऊं लागल्यामुळें इंग्लंडमध्यें गालिचे करण्याच्या कामाची गति अतिशय वाढली. त्यामुळें बेल्जममधील टूर्ने व फ्रान्समधील नाईम्स, ॲबेव्हिले, ब्यूव्हेस, टॉरकोईंग आणि लॅनॉय इत्यादि शहरांतील गालिचे करणाऱ्या कारखानदारांस जबर धक्का बसला. अमेरिकेमधील इरॅस्टस् बी. बिगलौ व इंग्लंडमधील विल्यम वुड नामक दोन गृहस्थांनीं जॅकॅर्डच्या गालिचे विणण्याच्या वाफेच्या मागांत (लूम) सुधारणा करण्याच्या कामीं बरेच परिश्रम केले होते. त्यांनीं सुधारलेल्या यंत्रांत इंग्लंडमधील शोधकांकडून आणखी सुधारणा घडवून आणून गालिचे काढण्याच्या कामांत झपाट्याची प्रगति केली. त्यामुळें इंग्लंडाशीं स्पर्धा करणें सर्व यूरोपियन देशांनां अवघड झालें. पुढें १८८० सालापासून फ्रान्स देशांतील फूलगालिचे करणारे कारागीर इंग्लंडमधून वरील प्रकारचीं वाफेनें चालणारीं यंत्रें आणून, त्यांच्या साहाय्यानें गालिचे विणूं लागले आहेत.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत गालिचे विणण्याचे अनेक कारखाने असून ते फार महत्वाचे आहेत. ऑस्ट्रियामध्यें सर्वांत सुंदर फूलगालिचे तयार होतात. ह्या गालिचांवरील नक्षीकाम ऑबुसन गालिच्यांवरील नक्षीकामाच्या धर्तीवर आहे. जर्मनी, हॉलंड आणि बेल्जम या देशांतहि वाफेनें चालणाऱ्या यंत्रांवर गालिचे तयार होतात.

अ र्वा ची न हा ता नें वि ण ले ले गा लि चे.—विल्यम नामक एका इंग्लिशानें हातानें गालिचे विणण्याच्या श्रमपूर्वक प्रयत्न केले. त्याच्या प्रयत्नामुळें त्या फुलगालिच्यांत बरीच सुधारणा घडून आली. उत्तम नक्षीकाम केलेले, हातानें विणलेले कांहीं फुलगालिचे अर्वाचीन काळींहि तयार झालेले सांपडतात. अशा गालिचांपैकीं कांहीं खुद्द इंग्लंडमध्यें तयार झालेले आहेत. १८५० सालापूर्वी व तदनंतर कांहीं काळ, रंग व गालिचे यांवर रंगीबेरंगी होण्यानें जनावरांच्या व वनस्पतीच्या ओबडधोबड आकृति काढीत. अशा आकृती काढलेले गालिचे अद्यापहि कोठें कोठें आढळतात. ग्लासगो, मँचेस्टर व बर्मिंगहॅम येथील कलाविद्यालयांतून (स्कूल ऑफ आर्ट) गालिचावर अप्रतिम व रेखीव चित्रें काढण्याचें काम अद्याप मोठ्या कुशलतेनें केलें जातें. सबंध यूरोप व अमेरिकेंत चित्रें काढण्याच्या कलेंत बरीच प्रगति झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. फ्रान्समध्यें ऑबुसन आणि सॅव्होनेरी येथील हातानें विणलेले गालिचे पौरस्त्य गालिचाहून निराळ्या धर्तीवर विणलेले असून विशेष व सुंदर नक्षीदार असतात. यूरोपमधील प्रसिद्ध पदार्थसंग्रहालयांतून अनेक प्रकारचे पौरस्त्य गालिचे ठेविले आहेत.

[संदर्भग्रंथ.—ब्रिटिश मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (लंडन १८७६). व्हिन्सेंट जे. रॉबिन्सन-ईस्टर्न कार्पेट्स; हर्बर्ट कॉक्सॉन—ओरिएंटल कार्पेट्स; आस्ट्रेलियन कमर्शिअल म्यूझियमनें प्रसिद्ध केलेलें पौरस्त्य गालिचांवरचें पुस्तक; रिपोर्ट ऑन कार्पेट्स ॲट दि पॅरिस एक्झिबिशन, १९००; जॉन किंबर्ले मुंफोर्ड-ओरिएंटल रग्स; जर्नल ऑफ इंडियन आर्ट ॲंड इंडस्ट्री; इंडियन कार्पेट्स ॲंड रग्स (भाग ८७ ते ९४) लंडन १९०५ व १९०६; मार्टिन-ए हिस्टरी ऑफ ओरिएंटल कार्पेट्स बिफोर १८००.]

गावड—शेतकरी जात. लो. सं. (१९११) ६७५०. रत्नागिरी जिल्हा व सांवतवाडी संस्थान येथें हे लोक आहेत. गावड शब्द गांव या शब्दापासून झाला आहे असें मोलस्वर्थचें मत आहे. हे लोक मराठी बोलतात. ते बकल जातींहून अगदीं भिन्न आहेत. यांमध्यें पूर्वी देवकें होतीं व पुढें कुळें होऊन ब्राह्मणांप्रमाणें गोत्रेंहि झालीं आहेत. अजूनहि कांहीं गावड लोकांत देवकें असून ते त्या देवकांनां मान देतात काश्यप, वत्स, व भारद्वाज हीं फक्त तीन गोत्रें यांमध्यें असून काश्यप गोत्राखेरीज एकाच देवकांत व गोत्रांत विवाह होत नाहींत असें कांहींचें मत आहे. यांचा मूळचा धंदा मीठ करण्याचा होता. परंतु आतां पुष्कळसे लोक शेतकरी व मजूर आहेत. मीठ तयार करणारे लोक कमी दर्जाचे समजले जातात. आतेबहीण व मामेबहीण यांच्यांशीं विवाह करतां येतो. मावस बहिणींशीं विवाह होत नाहीं. धर्म व संस्कारांसंबंधीं चाली भंडाऱ्याप्रमाणेंच आहेत [से. रि. १९११ (मुंबई)].

गाविलगड.—वऱ्हाड. उमरावती जिल्ह्यांत मेळघाट तालुक्यामध्यें हा किल्ला आहे. हा कोणीं व केव्हां बांधला हें नक्की समजत नाहीं. याच्या बांधणी वगैरे वरून मुसुलमानांनीं हा बांधला असावा असें वाटतें. फेरिस्ता म्हणतो कीं बहामनी अहमदशहा (वली) यानें तो बांधला (इ. स. १४२५);

पुढें वऱ्हाडचा सुभेदार फत्तेउल्लाइमाद उलमुल्क यानें त्याची डागडुजी केली (इ. स १४८८) आणि पुढें तो जेव्हां स्वतंत्र बनला (१४९०) तेव्हां त्यानें येथेंच आपली राजधानी केली. त्यानंतर अहमदनगरच्या मुर्तझा निजामशहानें पुन्हां त्याची दुरुस्ती केली (इ. स. १५७७). याबद्दलचा एक शिलालेख तेथील एका पश्चिमेकडील बुरुजावर (बैरामखानाच्या उल्लेखाचा) आहे. अकबराच्या वेळीं अबुल फजल यानें हा किल्ला घेतला (इ.स.१५९८). येथें फार पूर्वी गवळी, अहीर वगैरे वन्य लोकांचा एक मातीचा लहानसा किल्ला होता व त्याचें पहिलें नांव गवळीगड असेंच होतें. खानदेशांतील गवळीगड व अहीर(असीर)गड या नांवारून हाहि त्याच लोकांचा किल्ला असावा असें म्हणतात. याच्या जवळच हल्लीं चिखलदरा हें वऱ्हाडांतील हवा खाण्याचें ठिकाण आहे. मोंगलानंतर भोसल्यांनीं हा घेतला. त्यांनींहि याची दुरुस्ती केली होती. हा किल्ला वऱ्हाडच्या इतिहासांत फार प्रसिद्धीस आला. कारण याची मालकी म्हणजे वऱ्हाडची मालकी समजली जाई. इमादशाहीचा व भोसल्यांचा खजिना व जडजवाहीर येथें असे. भोसल्यांनीं वऱ्हाड सोडलें असतां नरनाळा व गाविलगड मात्र सोडले नव्हते (१८०३). भोसल्यांच्या वेळचा एक मराठी शिलालेख येथें आहे. हा किल्ला सातपुड्याच्या एका टोंकावर असून याची उंची चार हजार फूट आहे. हा नरनाळ्यापेक्षांहि मजबूत आहे. याला खालून मारा करतां येत नाहीं. इंग्रजांनीं १८०३ मध्यें हा घेतला तेव्हां त्यांना फार त्रास पडला. खुद्द वेलस्ली हा सेनापति होता. अखेर एका गोंडानें विश्वासघात केल्यानें किल्ला पडला. किल्लेदार व बेनीसिंग यांनीं शेवटपर्यंत पराक्रम केल्यावर व ते मेल्यानंतर किल्ला इंग्रजांच्या हातीं लागला. त्यावेळीं तेथील रजपूत स्त्रियांनीं जोहार केला. देवगांवीं यावेळीं तह झाला; त्यांत पुन्हां हा किल्ला भोंसल्यांनां परत मिळाला. तेथें भोसल्यांचा खजिना होता; तो सर्व इंग्रजांनीं लुटला. या किल्ल्याच्या आंत एक बालेकिल्ला असून किल्ल्यास दुहेरी तट आहेत. पुढें १८२२ त हा किल्ला इंग्रजांस कायमचा मिळाला. किल्ल्यावर एक मशीद पाहण्यासारखी आहे. मुख्य वेशीवर इमामउलमुल्क याचा शिलालेख आहे व विजयानगरच्या हिंदू राजांच्या चिन्हांप्रमाणें सिंह, हत्ती, गरुड वगैरेंचीं चित्रें आहेत. फत्तेउल्ला इमादुल मुल्क हा बाटण्यापूर्वी मूळचा ब्राह्मण व विजयानगरचा रहिवासी असल्यानें त्यानें हीं विजयानगरचीं चिन्हें येथें कोरलीं असावीं. बाहेरचा किल्ला म्हणून एक किल्ल्याचा भाग आहे. तो भोंसल्यांनीं बांधला आहे. नरनाळ्याप्रमाणेंच येथेंहि एक नऊगजी तोफ आहे. किल्ल्याचा नाश १८५३ त करण्यांत आला. हल्लीं येथें गवळी लोक राहतात. किल्ला ज्या डोंगरावर आहे त्या सर्वच डोंगरास गाविलगडचा डोंगर असें म्हणतात. ऐने इ अकबरींत या किल्ल्याचा उल्लेख येतो. गाविल गड डोंगरास त्यावेळीं बंड म्हणत असत. ही सातपुड्याची ओळ बैतुल-मेळघांट–नेमाड मधून तापी–पूर्णा पर्यंत गेली आहे. मेळघांटाची उंची ३४०० फूट आहे; त्यांतील वैराट शिखर मात्र ३९८९ फूट उंचीचें आहे. याच्या पूर्वेस मल्हारघांट व पूर्वेस देऊळघांट व त्याच्या पलीकडे भिंगार घांट आहे. देऊळघांट व मल्हारघांट यांतून गाडीरस्ते असून मेळघांटांतुन तर दळणवळण चांगलेंच होतें. [काळे–वऱ्हाडचा इतिहास; इंपीरियल ग्याझे. व्हॉ. १२; उमरावती ग्याझे. व्हॉ. ए; रा. खंड १०].

गाळणा—मुंबइ इलाख्यांतील नाशिक जिल्ह्याच्या मालेगांव तालुक्यामध्यें या नांवाचा एक किल्ला आहे. समुद्र सपाटीपासून याची उंची २३१६ फूट असून किल्ल्यावर गाळणेश्वर महादेवाचें देऊळ आहे. तसेंच कांहीं कोरींव गुहा असून त्याजवळच एक अगदीं पडका रंगमहाल नांवाचा वाडा आहे. किल्ल्यास परकोट, लोखंडी, कोतवाल व लखा नांवाच्या चार वेशी आहेत. पैकीं लोखंडी वेस फार प्रेक्षणीय आहे. किल्ल्यावर बऱ्याच तोफा पडलेल्या आहेत. किल्ल्याचा डोंगर अगदीं उभट असल्यानें एका मार्गाशिवाय वर जाण्यास दुसरा रस्ता नाहीं. दक्षिणेकडील एका कमानीच्या बुरुजांत स. १५६९ चा एक फारशी शिलालेख आहे. दुसरा एक लेख उत्तरेकडील एका बुरुजांवर आहे. तो देवनागरी असून शके १५८० चा आहे. व त्याखालीं स. १५८३ चा दुसरा फारशी लेख तो बुरूज बांधणाऱ्याच्या नांवाचा आहे. तिसऱ्या एका बुरुजावर १५८७ चा फारशी लेख आहे. येथल्या मशीदींत एक जाळीदार खिडकी प्रेक्षणीय आहे. या किल्ल्याला केळणा असेंहि नांव आहे.

१५ व्या शतकांत ह्या किल्ल्यास बरेंच महत्त्व होतें. हा पुष्कळ दिवस मराठ्यांच्या हातीं होता. नंतर निजामशाही मुसलमानांच्या तर पुन्हा मराठ्यांच्या ताब्यांत तो होता.सन १६३४ मध्यें गाळणाचा मुसुलमान किल्लेदार महमदखान ह्याचा शहाजीस हा किल्ला देण्याचा विचार होता. पण शहाजहानकडून इनामाची मोठी लालूच मिळाल्यामुळें त्यानें तो बादशहास दिला. सन १६७९ मध्यें शिवाजीनें हा किल्ला घेतला. पुढें औरंगझेबानें ह्या किल्ल्यास एक वर्ष वेढा देऊन तो घेतला (१७०५). रावबाजीच्या वेळीं या किल्ल्याच्याच नांवाचा एक प्रांत (सरकार) बनला असून त्यांत सात परगणे व त्याचा वसूल २ लक्ष १० हजारांचा होता. आणि खानदेशसुभ्यांत तो मोडत असे. पुढें कर्नल वालेसनें हा किल्ला घेतला (१८०४). किल्ल्यावर बरींच थडगीं आहेत. इंग्रजांनीं खानदेश घेतल्यावर कांहीं दिवस गाळणा हें खानदेशांतील एक उत्तम हवेचें ठिकाण म्हणून उपयोगांत येत होतें. पायथ्याशीं गांव असून त्याला पूर्वी तटबंदी होती. १८१८ नंतर कांहीं वर्षे ह्या गांवीं मामलेदारकचेरी होती [नाशिक ग्याझेटियर]

गिगासारण—काठेवाड. लाखापादर ठाण्याच्या अंमलांतील एक स्वतंत्र खंडणी देणारा तालुका. येथील ग्रासिया कोटिला जातीचे बाभ्रिया आहेत.

गिधिया—या गिधिया लोकांची वस्ती आग्रा व संयुक्त प्रांतांत आहे. बघारिया या राष्ट्रजातीची ही एक शाखा असावी. गिधिया लोक " अथपाह्यरिया " नांवाच्या क्षत्रिय वंशांतील असून मूळचे गुजराथचे रहिवाशी होते. व ते हारेवाला या प्रांतातून आले. त्यांचा वंशपरंपरागत धंदा म्हटला म्हणजे पक्षी धरण्याचा होय. मुरादाबाद प्रांतांतील ठाकुरद्वार व अलमोरा या तहसिलींत आणि नैनीताल, तराई व बिजनोर या प्रांतांत हे लोक अढळतात. या जातींत एक कायमची पंचायत असते व या पंचायतींची हद्द कांहीं खेड्यांपर्यंत नेमलेली असते. प्रत्येक पोटजातीची वेगळी पंचायत असते.या पंचायती कज्जा,मारामारी,गोहत्या व इतर सामाजिक गुन्ह्यांची चवकशी करितात. पोटजातींमध्यें फक्त स्वज्ञातिविवाहच प्रचलित आहेत. ही जात एकदां गुन्हेगार समजली जात असे. ह्या जातींतील लोक आता शेतकीचा धंदा करूं लागले आहेत.

गिधौर—बिहार, ओरिसा.मोंगिर जिल्ह्यांतलें एक खेडें. येथें बिहारमधील पुरातन घराणीं अद्याप आहेत. त्यांचें मूळ ठिकाण जवळच खैरा खेड्यापाशीं आहे. त्याचे अवशेष दिसतात. जवळच नवलाखगड आहे. या घराण्याचा मूळपुरुष वीर विक्रमसिंग हा तेराव्या शतकाच्या सुमारास इकडे आला व येथील दोसाद राजाला मारून त्यानें गिधौर घराण्याची स्थापना केली. राजा पुरणमल यानें वैधनाथाचें (वैजनाथ ?) देऊळ बांधलें.

गिनी—भूमध्यरेषेवरील आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याच्या कांहीं भागाचें हें साधारण नांव आहे. हा गिनी किनारा गॅंबियापासून केपनिग्रोपर्यंत पसरला आहे. गाबून, लोॲंगी, नैर्ऋत्यकिनाऱ्यावरील पोर्तुगीज मुलुख इत्यादिकांचा समावेश दाक्षिणगिनींत होतो. उत्तरगिनी कासामांसी नदीपासून कामेरूनपर्यंत पसरला आहे. पूर्वी उत्तरेकडे केपनुनपासून गिनीची सुरुवात मानण्यांत येई. या नांवाची व्युत्पत्ति फार अनिश्चित आहे. तथापि घिनीआ या शहराच्या नांवांवरून हें नांव पडलें असावें असें म्हणतात. गिनी हें नांव १४ व्या शतकांतील नकाशावर आढळतें. पण १५ व्या शतकाच्या अखेरीस तें साधारण उपयोगांत आलें. गिनीचा किनारा इतका सखल आहे कीं, तो नाविकांनां जवळ आल्याशिवाय दिसत नाहीं. बाइट ऑफ बैफ्रा येथें मात्र किनारा थोडा उंच व भव्य आहे.हा किनारा अनेकविध वनस्पतींनीं नुस्ता फुलला आहे. शुद्ध निग्रो वंशाचे रहिवाशी या ठिकाणीं रहातात.

प्राचीन व्यापारी उत्तर गिनी प्रदेशास तेथें उत्पन्न होणाऱ्या जिन्नसांवरून नांवें देत असत. सेरालोनपासून पूर्वेस केपपाल्मासपर्यंत ५०० मैल पसरलेल्या गिनी किनाऱ्यास हे व्यापारी ग्रेनकोस्ट असें संबोधीत असत. हें नांव या भागास १४५५ त देण्यांत आलें. कारण या ठिकाणाहून नानाप्रकारचीं बीबियाणें बाहेरदेशीं पाठविण्यांत येत असत. आतां हें बी पाठविण्यांत येत नसल्यामुळें हें नांवहि लुप्त झालें आहे. आयव्हरीकोस्ट या नांवाचा इतिहासहि असाच आहे. दक्षिण गिनीच्या अनेक भागांपैकीं गाबूनच्या दक्षिणेस असणाऱ्या व कॉंगो नदीच्या उत्तरेकडील भागास लोॲंगो हें नांव असे. आतां लोॲंगोचा फ्रेंचकांगोमध्यें समावेश होतो. कांगो नदीच्या दक्षिणेकडील देशास कांगो हेंच नांव लावीत. आतां कांगो पोर्तुगीज वेस्ट आफ्रिकेचा एक पोटविभाग आहे. १२७० त लॅन्सलॉट मॅलोसेलो हा जिनोआ येथील गृहस्थ क्यानरीज बेटापर्यंत जाऊन पोहोंचला. १२९१ त पुनः जिनोआमधीलच कित्येक गृहस्थांनीं केपनन ओलांडलें. पण यापलीकडे त्यांनीं काय केलें हें मात्र माहीत नाहीं. इ. स. १३४६ त कॅटलान येथून कांहीं प्रवाशी गिनीकिनाऱ्यावरील ' सुवर्णनदीच्या ' शोधार्थ निघाले, पण त्याचें काय झालें तें ठाऊक नाहीं. १३६४ व १४१० या वर्षांच्या दरम्यान डीपे येथील लोकांनीं गिनी येथें पुष्कळ सफरी केल्या असें फ्रेंचांचें म्हणणें आहे. १४०२ त जेन डी बेथेन कोर्ट यानें कॅनरीज बेटांच्या दक्षिणेकडील प्रदेश शोधून काढला. शेवटीं पोर्तुगॉलच्या प्रिन्स हेनरी यानें नियुक्त केलेल्या नाविकांच्या संघटित प्रयत्नानें गॅंबियापर्यंतचा किनारा शोधून काढण्यांत आला व पंधराव्या शतकाच्या अखेरीस सबंध गिनी कोस्ट यूरोपियनांच्या परिचयाचा झाला.

पो र्तु गी ज गि नी.—पश्चिम आफ्रिकेंतील एक पोर्तुगीज वसाहत. ही वसाहत समुद्रकिनाऱ्यावर असून केपरोक्झोपासून कांगोच्या नदीमुखापर्यंत पसरली आहे. हिच्या उत्तरेस सेनिगॉलचा कॅसामॅंसे हा प्रांत व पूर्वेस व दक्षिणेस फ्रेंच गिनी आहे. वसाहतीचें क्षेत्रफळ १३,९४० चौरस मैल आहे व लोकसंख्या २,८९,००० आहे. येथील हवा रोगकारक आहे. पाऊस फार जोराचा पडतो. येथील जंगलांत खजूर, एबनी, मेहोगनी इत्यादि प्रकारचीं झाडें आहेत. पेरू, ॲपल, नारिंग व आंब्यांचीं झाडेंहि आहेत. अन्तर्भागांतलि लोक बहुतेक मॅंडिगो व फ्युला या राष्ट्रजातींचे आहेत. बेटें व समुद्रकिनाऱ्याजवळच्या भागांत निग्रो राष्ट्रजात राहते. या जातीची कौटुंबिक जीविताविषयींची आदरबुद्धि व पूर्वजांविषयींची धर्मबुद्धि फार जागृत आहे. मॅंकोआ व कोचीओ यांमधील भागांत मंजक नांवाची जात रहाते. हे लोक फार आस्थेवाईक, हुशार व एकवचनी आहेत अशी त्यांची ख्याति आहे. या लोकांत एक प्रकारची लष्करी जादूगिरीची पद्धत आहे. कोंबड्यांची आंतडीं कापून तीं तपासून भविष्य वर्तविण्याचा यांच्यांत प्रघात आहे. बिसगॉस या बेटावर स्वतंत्र व युद्धविशारद बिझिओगॉस ही राष्ट्रजात रहाते.

१४४६ त गुलामा बेट पोर्तुगीज नाविकांनीं शोधून काढलें. १७५२ च्या सुमारास पोर्तुगॉलनें बिसॅओ येथें वखार घातली. याच्याहि अगोदर म्हणजे १६६९ त पोर्तुगॉलनें रायओग्रँडी हें काबीज केलें होतें. पोर्तुगीज अंमलाखालील मुलखाच्या अन्तर्मर्यादा १८८६ मध्यें फ्रान्सच्या सहकारितेनें ठरविण्यांत आल्या. व १९००-३या काळांत सरहद्द आंखण्यांत आली. १९१७-१८ सालीं वसाहतीचें उत्पन्न ७,२३,४१८ एस्क्युडो असून खर्च ७,०८,७०० एस्क्युडो होता. १९१७ त वसाहतीची निर्गत २८,८१,१८७ एस्क्युडोची होती. भुईमुग, रबर, मेण, हस्तिदंत इत्यादि निर्गत व्यापाराच्या वस्तू होत.

स्पॅ नि श गि नी.—याचें क्षेत्रफळ ९४७० चौरस मैल असून लोकसंख्या सुमारें दोन लाख आहे.

फ्रें च गि नी.—पश्चिम आफ्रिकेंतील एक फ्रेंच वसाहत. हिच्या पश्चिमेस अटलांटिक महासागर, उत्तरेस पोर्तुगीज गिनी व सेनीगाल, पूर्वेस अपर सेनीगाल व आयव्हरी कोस्ट व दक्षिणेस लायबेरिया व सिएरालिओनी आहे. ही वसाहत पूर्वेस ४५० मैलपर्यंत सरळ पसरली आहे व हिची दक्षिणोत्तर रुंदी जवळजवळ ३०० मैल आहे. एकंदर क्षेत्रफळ सुमारें ९५००० चौरस मैल.लो. सं. (१९१६) १८०८८९३.

हवामानः—किनाऱ्यावरील हवामान उष्ण, सर्द व रोगट आहे. मेपासून नोव्हेंबरपर्यंत अति पाऊस पडतो. सबंध वर्षभर हवेंत फारच ओलावा असतो. नायबर नदीकांठच्या प्रदेशाची हवा साधारण आरोग्यकारक असते.

वनस्पती व प्राणीः—समुद्रकिनारा व नदीतीरावरून आंबराया लागल्या आहेत. समुद्रकिनाऱ्यावरील महत्वाचें झाड म्हणजे तैलोत्पादक ताडाचें होय. जंगलांत रबराची झाडेंहि विपुल आहेत. फुटाजेलनच्या दक्षिणेस सिंह आढळतात. बानरांच्याहि पुष्कळ जाती आहेत. सर्प तर पुष्कळच सांपडतात.

रहिवासीः—कोंगोनच्या तीरावर टँडाज व आयओलाज ह्या प्राचीन निग्रो जाती रहातात. बागा, नालू, लँडुमन व टिमनी या जातींचेंहि येथें वास्तव्य आहे. नुनेझच्या दक्षिण किनाऱ्यास व फुटाजालनपर्यंतच्या अन्तर्भागांत सुसा नांवाची जात रहाते. सुसा ही मुसलमानी जात आहे. बागा व इतर कांहीं जाती वन्य आहेत. गौरकाय असे फारच थोडे लोक आहेत व ते सर्व फ्रेंच आहेत.

शहरेंः—कोनाक्राय, बोके, डुब्रेका, बेंटी, टिंबो व लाबी हीं मुख्य शहरें होत. यांपैकीं कोनाक्राय हें राजधानीचें शहर आहे. याची लोकसंख्या २०,००० आहे. नायगरला जाणारी आगगाडी येथूनच निघते.

उद्योगधंदेः—येथील जमीन फार सुपीक आहे. रबर, ताडाचें तेल, कापूस, डिंक, भुईमूग हे जिन्नस विशेषेंकरून येथें होतात. फुटाजालन येथें गुरें पाळणें, विकणें हा धंदा चालतो. कातड्याचा व्यापारहि बऱ्याच मोठ्या प्रमाणांत चालतो. कापसाचा माल, तांदूळ, तंबाखू, ह्या मुख्य आयात वस्तू होत. १९१६ त ९६८९२९१ फ्रँकची आयात व १६२४०४८८ फ्रँकची निर्यात होती.

इतिहास.—गिनी किनाऱ्याचा हा भाग पोर्तुगीज शोधकांनीं प्रथम पंधराव्या शतकांत शोधून काढला. गिनीच्या इतर भागांतून उचलबांगडी झाल्यामुळें गुलांमाचे व्यापारी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत येथें येऊन राहिले. १८३८ त फ्रान्सचें लक्ष्य या भागाकडे वेधलें. १८५४ त जनरल फेडहरबी याला सेनीगॉलचा गव्हर्नर नेमण्यांत आलें. फ्रेंच सत्तेचा पाया मजबूत करण्यासाठीं नालु जातीशीं १८४८त तह करण्यांत आला व १८४८ ते १८६५ च्या दरम्यान निरनिराळ्या किनाऱ्यावरील जातींनां फ्रान्सनें आपल्या संरक्षणाखालीं घेतलें. १८८१ मध्यें फुटाजालन येथील मुख्यानें आपला देश फ्रान्सच्या शासनाखालीं दिली. १८८२ मध्यें ग्रेटब्रिटननें फ्रान्सच्या दक्षिणेस मेलाकोरीच्या पाण्यापर्यंतच्या प्रदेशावरील हक्क मान्य केला. १८८६ मध्यें पोर्तुगालशीं तह होऊन उत्तरसरहद्द ठरविण्यांत आली (१८९९). अपर नायगर प्रांत देखील कॉलर्नीत समाविष्ट करण्यांत आले. १९०४ मध्यें लॉस बेटें ग्रेटब्रिटननें कांहीं अटींवर फ्रान्सला दिलीं. १८९१ मध्ये फ्रेंच गिनी सेनिगॅालपासून वेगळा करण्यांत आला. गिनीला बरेच स्वराज्याचे हक्क मिळाले आहेत. तेथील राज्यकारभार लेफ्टनंट-गव्हर्नर पहातो. बऱ्याचशा भागावर एतद्देशीय संस्थानिक नेमण्यांत आले आहेत. अर्थातच फ्रेंच अधिकाऱ्याची त्यांच्यावर देखरेख आहे.

गिबन एडवर्ड—(१७३७-१७९४) या आंग्ल इतिहासकाराचा जन्म पुटने (सरे) येथें झाला. लहानपणीं हा नेहमीं आजारी असे.घरगुती काळजी व प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्याच्या आईनें त्याच्याकडे थोडें फार दुर्लक्षच केलें; परंतु गिबनच्या मावशीनें त्याला लहानाचा मोठा करून वाचावयास व लिहावयास शीकाविलें. एकंदरींत या मावशीचे गिबनवर फार उपकार झाले व गिबन ते स्मरतहि असे. तो नेहमीं आजारी पडत असल्यामुळें त्याचें लहानपणाचें शिक्षण चांगलें सुरळीत झालें नाहीं. तरी पण त्या वयांतच इतिहासाची त्याला गोडी लागली. वयाच्या १६व्या वर्षापासून त्याची प्रकृति सुधारत चालल्यामुळें त्याला शिक्षणाकरितां स्वित्झर्लंड येथें पाठविलें. तेथें पॅव्हिलिआर्डच्या देखरेखीखालीं त्याचें शिक्षण उत्तम तऱ्हेनें झालें. फ्रेंच भाषेंत तर त्यानें थोडक्याच वेळांत इतकें प्रावीण्य मिळविलें कीं त्याला विचार सुद्धां फ्रेंच भाषेंतच करावयाची संवय लागली. पास्कलचीं ' प्राव्हिन्शिअल लेटर्स ' तर त्याला इतकीं आवडलीं कीं तीं तो दरवर्षी एकदां वाचीत असे व त्यामुळें स्वतःच्या ज्ञानांत प्रतिवर्षी बरीच भर पडली असें त्याला वाटे. स्वित्झर्लंडमधील शिक्षण पांच वर्षांत संपल्यावर १७५८ त तो इंग्लंडला परत आला. परकीय भाषेच्या

शिक्षणामुळें तो इंग्लिश चालीरीतींनाहि बराच परका झाला होता. आणि म्हणूनच तो फारसा समाजांत मिसळत नसे. बोलतांना स्वकीय व परकीय भाषेची भेसळ न होऊं देतां शुद्ध स्वदेशी भाषा बोलतां यावी म्हणून त्यानें पुष्कळ प्रयत्न केले. परंतु ते सर्व निष्फळ ठरले. स्वदेशाभिमानानें त्यानें हॅम्पशायरच्या फौजेंत १७५९ सालीं कॅप्टनचें काम पत्करिलें. हें काम करीत असतांना सुद्धा त्यानें आपला अभ्यास सोडून दिला नाहीं. या नोकरीमुळें त्याची प्रकृति सुधारून तो पहिल्यासारखा भिडस्त राहिला नाहीं. तीन वर्षांनीं लष्करी नोकरींतून सुटल्यावर १७६३ च्या जानेवारींत तो देशपर्यटण करण्याकरितां निघाला. फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली वगैरे देशातून त्यानें प्रवास केला व त्याच्या इटालीमधील प्रवासांतच त्याला 'रोमच्या साम्राज्याचा ऱ्हास व नाश' असें एक ऐतिहासिक पुस्तक लिहिण्याची इच्छा झाली. १७७६त त्यानें या पुस्तकाचा पहिला भाग लिहिला व पुढें अकरा वर्षांत तें पुस्तक त्यानें संपाविलें. या पुस्तकाचे विषयानुसार दोन विभाग करतां येतात. पहिल्या विभागांत ४६० वर्षांची (इ. स. १८०-६४१) सविस्तर माहिती फारच चांगल्या तऱ्हेनें दिली आहे. दुसऱ्या विभागांत यापुढील ८०० वर्षांची त्रोटक माहिती असून त्यांमधील कांहीं गोष्टींबद्दल मतभेद आहे. या इतिहासाचीं पंधरावें व सोळावें हीं प्रकरणें फार लोकप्रसिद्ध आहेत. या प्रकरणांतून गिबननें ख्रिस्ती धर्माचा उत्कर्ष व रोमन साम्राज्याचें तत्संबंधीं धोरण याचा सविस्तर इतिहास दिला आहे. मानव जातीच्या सुखावरून प्रगति व सुधारणा यांचें मान तो ठरवीत असे. मानवी सुखाला राजकीय स्वातंत्र्य हें जरूर पाहिजे असें त्याचें मत असून गुलामगिरीच्या तो अगदीं विरुद्ध होता.

त्यानें लिहिलेल्या इतिहासाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला तेव्हां तो पार्लमेंटचा मेंबर होता. लॉर्ड नॉर्थला राजकारणांत बरीच मदत केल्यामुळें तो कांहीं दिवस व्यापार व वसाहती यांवरील कमिशनरचें काम करीत होता. हा प्रसिद्ध इतिहासकार १७९४ सालीं मरण पावला. लॉर्ड शेफील्डनें गिबनचे निरनिराळे ग्रंथ, आत्मचरित्र व इतर लिखाण दोन खंडांत प्रसिद्ध केलें आहे (१७९६).

गिब्ज (१८२२-१९०८)—हा अमेरिकन रसायनज्ञ न्यूयार्कमध्यें जन्मला. याच्या शिक्षणास १८३७ त कोलंबिया विद्यालयांत सुरुवात झाली व पुढें तो जर्मनींत लीबिग, रोज वगैरे शास्त्रज्ञांजवळ व पॅरिसमध्यें डुमास, रेग्नॉल्ट वगैरे शास्त्रज्ञांजवळ शिकण्यास गेला. परत आल्यावर त्याला हार्वर्ड विश्वविद्यालयांत अध्यापकाची जागा मिळाली. निरिंद्रिय रसायनशास्त्रांत कोबाल्ट अमाइनें, प्लाटिनम धातू इत्यादींवर प्रयोग करून यानें कांहीं शोध लावले आहेत. हा अति उत्तम शिक्षक होता.

गिब्स जोसिआ विलिअर्ड (१८३९-१९०३)—हा एक अमेरिकन गणिती आणि पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता होऊन गेला. याचा जन्म अमेरिकेंतील न्यू हेव्हन शहरीं झाला. इ. स. १८५४ सालीं याचा युले कॉलेजांत प्रवेश झाला व सन १८५८ सालीं तेथील पदवी घेऊन त्यानें आपलें शिक्षण तसेंच पुढें चालू ठेवलें. इ. स. १८६३ सालीं त्याला त्याच कॉलेजांत शिक्षक नेमण्यांत आलें. प्रथमतः त्यानें लॅटिन शिकविलें व पुढें नैसर्गिक तत्वज्ञान शिकविलें. पुढें १८६६ ते ६९ पर्यंतचा काल त्यानें यूरोपखंडांत घालविला. १८६९ सालीं तो परत आला व त्याला युले कॉलेजांत गणितात्मक पदार्थविज्ञानशास्त्राचा प्रोफेसर नेमण्यांत आलें. या ठिकाणीं त्यानें मरेपर्यंत अध्यापकाचें काम केलें इ. स. १८७३ सालीं त्यानें 'प्रवाही द्रव्यांच्या गत्युष्णतेविषयीं रेखागणितात्मक पद्धति' या नांवाचा लेख लिहिला. व दुसरा असाच एक लेख लिहिला. या वेळेपासून त्यानें लेख लिहिण्यास सुरुवात केली. पुढें १८७६-७७ सालीं त्यानें 'विभिन्न द्रव्यांचा समतोलपणा' या नांवाचा लेख लिहून रसायनशास्त्रांत एक उपशास्त्र उत्पन्न केलें. यानें गणितावर कित्येक लेख लिहिले आहेत. १९०१ सालीं त्याला रॉयल सोसायटीनें कोपले पदक नांवाचें पारितोषिक दिलें.

गिरनार.—काठेवाड या टेंकडीला ५ मुख्य शिखरें आहेत. त्यांपैकीं सर्वांत उच्च जें गोरखनाथ त्याची उंची ३६६६ फूट आहे. येथें अंबामातेचें मंदिर व जैन मंदिरें पुष्कळ आहेत. गोमुखी, हनुमानधारा व कमंडलुकुंड हीं मुख्य कुंडें होत. भैरवजप नांवाच्या खडकावरून चांगला जन्म यावा म्हणून तपस्वी लोक खालीं मुद्दाम उडी घेत असत असें सांगतात. गिरनारचीं उज्जयंताद्रि किंवा रैवत हीं जुनीं नांवें आहेत. या टेंकडीच्या पायथ्याशीं अशोकाच्या शासनांच्या खोदलेल्या नकला व सुदर्शन तळें बांधल्याबद्दलचा रुद्रदामन् (सुमारें इ. स. १५०) चा एक लेख असून दुसरा एक लेख या तळ्याचा नाश व दुरुस्ती (इ. स. ४५८) याबद्दलचा आहे. (स्मिथ-'अशोक,' व 'अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया' पहा.) वाघेश्वरी दरवाज्यांतून गिरनारला रस्ता जातो. वाघेश्वरी टेंकडीवर एक देवीचें देऊळ असून जवळच दामोदरकुंडाकडे जाण्याचा रस्ता आहे. येथील पाण्यांत हाडें विरघळतात म्हणून हिंदू लोक आपल्या नातेवाइकांचीं हाडें येथें आणून टाकतात. जवळच रेवतीकुंड आहे. वाघेश्वरी दरवाज्यांतून वाघेश्वरीच्या देवळाकडे जातांना रस्त्यानें अशोक, रुद्रदामन व स्कंदगुप्त यांच्या वेळचे अंकित लेख असलेले बरेच खडकाचे कडे लागतात. दामोदरकुंडापासून सुमारें दीड मैलांवर भावनाथ महादेवाचें देऊळ आहे. येथें माघ महिन्यांत जत्रा भरते. नेमिनाथाच्या देवळांतील तळमजल्यांत पार्श्वनाथाचा पुतळा आहे. त्याच्या हनवटींतून थेंब थेंब सारखें पाणी पडतें असें म्हणतात. नवीन वधूवरांना एकमेकांच्या

वस्त्राला गांठ मारून अंबामातेच्या दर्शनाला नेण्याची चाल आहे.

या क्षेत्राचें माहात्म्य प्रभास खंडांत वर्णिलें असून त्याचे तीस अध्याय केले आहेत. यांत गिरनार येथील ब्राह्मणांच्याच हातून क्रिया करून घेण्यांत काय पारमार्थिक फायदे आहेत तें दाखविलें आहे. आणि हे ब्राह्मण हिमालयाच्या पायथ्यापासून आलेले आहेत. प्रभास क्षेत्र सर्व क्षेत्रांत थोर आहे आणि गिरनार हें त्याहूनहि थोर आहे. कैलासस्थ शंकरावर सहज प्रसन्नतेबद्दल व दैत्यांवरहि कृपा केल्याबद्दल विष्णु रागावला. शिव गुप्त झाला आणि गिरनारावर अदृश्यरूपें वास करूं लागला. पार्वतीसह सर्व देव तेथें आले पार्वतीच्या गायनानें संतुष्ट होत्साता शंकर देवांस दृश्य झाला. देवांनीं स्तुति करून कैलासीं परत जाण्यास विनंति केली. 'तुम्ही जर येथें रहाल तर मी कैलासीं जातों ' असें शंकर म्हणाला. तेव्हांपासून सर्व देव व शंकरहि अंशेंकरून या स्थलीं राहिले. येथें शंकर शरीररूपी वस्त्राशिवाय राहिले होते. म्हणून यास वस्त्रापथ असें नांव आहे. गिरनारनंतर दातर (उंची २७७९ फूट) नांवाची दुसरी टेंकडी महत्त्वाची आहे. हिच्या शिखरावर जामिलशहाचें थडगें असून मुसुलमान लोक ही टेंकडी पवित्र मानतात. महारोग्यांना या टेकडीवर गुण येतो असें म्हणतात. गिरनार टेंकड्यांतून निघणाऱ्या जलप्रवाहांत सुवर्णरेखा, गुडाजली व कालवो हे मुख्य आहेत.

[सं. ग्रं. बर्जेसच्या ' रिपोर्ट ऑन दि ॲंटिक्विटीज ऑफ काठेवाड ॲन्ड कच्छ ' या लेखांत (आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया पु. २ पान ९३ पासून पुढें) गिरनारचें विस्तृत वर्णन आढळेल. प्रोग्रेस रिपोर्टस ऑफ दि वेस्टर्न सर्कल' यांतूनहि मधून मधून बरींच माहिती दिलेली आहे; शिवाय बील—बुद्धिस्ट रेकॉर्ड्स ऑफ दि वेस्टर्न वर्ल्ड: कूक—पॉप्युलर रिलिजन ॲन्ड फोकलोअर ऑफ नार्दर्न इंडिया.].

गिरसप्पा—होनावर तालुक्यात होनावर व गिरसप्पा धबधबा यांच्या मध्यावर शरावतीच्या काठीं सुंदर जाग्यावर वसलेला एक गांव. हें नारळाचें आगर आहे. येथून जवळच नगरबस्तिकेरे शहराचे अवशेष आहेत. एका काळीं तेथें १ लाख घरें व ८८ देवळें होतीं असें सांगतात. येथें जैनांचें एक फुली (चौफुली ?) सारखें देऊळ पहाण्यासारखें आहे. त्यांत ४ मूर्ती आहेत. महावीरस्वामी वर्धमानाच्या देवळांत महावीराची काळ्या दगडाची मूर्ति आहे व ४ शिलालेख आहेत. अशी दंतकथा आहे कीं विजयानगरच्या राजांनीं गिरसप्पा येथील एका जैन घराण्यास अधिकारारूढ केलें. १४०९ मध्यें गिरसप्पाच्या वडेरू इच्छाप्पानें मंकीजवळील गुणवतीच्या देवळाला देणगी दिल्याचा उल्लेख आहे. इच्छाप्पाची नात विजयानगरपासून स्वतंत्र झाली. या घराण्यांत पुष्कळ वेळां स्त्रियांनीं अधिकार चालविलेला दिसतो. १७व्या शतकाच्या अखेरीला बेदनूरच्या नाईकानें भैरादेवीचा पराभव केला. १६२३ मध्यें डेलाव्हॅली हा इटालियन प्रवाशी लिहितो कीं ' गिरसप्पा ही पूर्वी एका प्रांताची राजधानी व प्रसिद्ध शहर असून तेथें राणीचें राज्य होतें. ' त्यावेळीं कांहीं झोंपड्यांखेरीज तेथें कांहीं राहिलें नव्हतें व अवशेष भाग जंगलांत नाहींसा झाला होता. येथें मिरीं इतकीं होतात कीं पोर्तुगीज लोक गिरसप्पाच्या राणीला मिऱ्यांची राणी म्हणत.

गिरसप्पा धबधबा—उ. अ. १४°१४' व पू. रे. ७४°४९' मुंबई म्हैसूरच्या हद्दीवर हा आहे. होनावर व गिरसप्पा येथून हा पहाण्यास जातात. अंतर अनुक्रमें ३५ व १८ मैल आहे. जवळच्या जोग नांवाच्या खेड्यावरून तेथले लोक त्याला जोगचा धबधबा असेंहि म्हणतात. हा धबधबा ज्या नदीच्या प्रवाहानें झाला आहे त्या शरावती नदीचें पात्र या धबधब्याच्या तोंडाशीं २३० फूट रुंद आहे व तें ४ धारांनीं ८३० फूटांवरून खालीं उडी घेतें. एवढ्या उंचीचा मोठा व गंभीर सुंदर धबधबा हिंदुस्थानांत तर नाहींच पण जगांतहि क्वचितच सांपडेल. हा पहाण्याची उत्तम वेळ म्हणजे डिसेंबर महिना होय. जून ते नोव्हेंबरपर्यंत तो धुक्यानें आच्छादित असतो. गिरसप्पा गांवापासून १० मैलपर्यंत चांगला चढाव असून गिरसप्पा व मालेमणी घांटाच्या माथ्यावर जाईपर्यंत रस्ता भव्य व गंभीर अशा जंगलातून जातो. सूर्यप्रकाशानें नेहमीं इंद्रधनुष्याची शोभा दिसते व चंद्राच्या प्रकाशांत रुपेरी झकाकीनें पाण्याच्या धारा चकाकतात. रात्रीच्या वेळीं पेटत्या चुडी वगैरे दरींत सोडल्या असतांना दिसणारी शोभा कांहीं विशेष व कांहींशी भयंकर असते. आडवें पडून व डोकावून खोल दरीची शोभा पहावी लागते. म्हैसूर बाजूनें सर्वोत्कृष्ट देखावा दिसतो. म्हैसूरबाजूनें जंगलांतून एक दोन रस्ते गेले असून त्यांपैकीं एकानें वर नदीच्या पात्राकडे जातां येतें व माथ्यावरचा मुलुख दिसतो. कांठावरून पाहिलें असतां धबधब्याची शोभा, कडे तुटलेल्या त्या दरीची भयानकता व खोल आणि वळणें घेत जाणाऱ्या व युगानुयुगें न बदललेला व न थांबलेला प्रवाह हीं सर्व उत्तम दिसतात.

गिरिधर राजा बहादुर—उत्तर मोंगलशाहींत जे थोडे हिंदु कामदार स्वपराक्रमानें प्रसिद्धीस आले त्यांत राजा गिरिधरच्या कुटुंबाची गणना होते. हे नागर ब्राह्मण अलाहाबादेकडे रहात होते. राजा गिरिधरचा बाप दयाराम उर्फ दयाबहादूर व चुलता छबिलाराम हे बहादुरशहाचा दुसरा मुलगा अजीमुश्शान याच्या पदरीं होते. ते मोठे शूर व मुत्सद्दी असून त्यांनीं आपल्या धन्याची सेवा उत्कृष्ट बजाविली. अजीमुश्शान बंगालचा सुभा असतां त्यास व त्याचा मुलगा फार्रुखसेयर यास दयारामाच्या कुटुंबाची चांगली मदत होत असे. लाहोर येथें बहादुरशहा स. १७१२ त वारला. तेव्हां त्याच्या मुलांत गादीविषयीं लढाया

झाल्या. या लढायांत दयाराम नागर आपल्या धन्यासाठीं लढून समरांगणीं मरण पावला. राजा मुहकमसिंग, केशरसिंग, राजसिंग, पृथ्वीराज व दयाराम एकमतानें वागून, अजीमुश्शानचा पक्ष उचलून धरीत होते. परंतु अजीमुश्शान मारला गेला आणि दयारामाचा भाऊ छबिलाराम जहांदरशहाच्या पक्षास मिळाला. त्यास जहांदरशहानें कडा माणिकपूरचा फौजदार नेमिलें. त्याजवळच दयारामाचा मुलगा राजा गिरिधर हाहि कामास असे. छबिलाराम व गिरिधर यांनीं कडा माणिकपुर येथें असतां द्रव्यसंचय करून फौज वाढविली. जहांदरशहा गादीवर बसल्यानंतर सहा सात महिन्यांनीं फर्रुखसेयर बंगाल्यांतून सय्यद बंधूंची मदत घेऊन आग्र्यावर चालून आला तेव्हां छबिलाराम व गिरिधर त्यास जाऊन मिळाले. त्यांनीं त्यास पुष्कळसा पैसा कर्जाऊ देऊन फौजेचीहि मदत चांगली केली. ता. १० जानेवारी स. १७१३ रोजीं आग्रा येथें निकराची लढाई झाली. तींत छबिलारामानें स्वतः मोठा पराक्रम करून जिवावर उदार होऊन लढण्याची शिकस्त केली, म्हणूनच फर्रुखसेयर यास त्या दिवशीं जय मिळाला. या कामगिरीबद्दल फर्रुखसेयरनें त्यास प्रथम खालसा दिवाणाचें म्हणजे वसुलाचें काम देऊन पुढें आग्र्याच्या सुभ्यावर नेमिलें. आग्रा येथें असतां त्यानें चूडामण जाटास वठणीस आणिलें. नंतर कांहीं दिवसांनीं त्याची बदली अलाहाबादच्या सुभ्यावर झाली. सवाई जयसिंग व छबिलाराम यांचें संगनमत असल्यानें सय्यदांचें व बादशहाचें वांकडें आलें. तेव्हां या दोघांची सय्यदांस मोठी धास्ती वाटे. शेवटीं सय्यदांचीं कारस्थानें सिद्धीस जाऊन फर्रुखसेयर पदच्युत झाला. लवकरच सय्यदांनीं छबिलारामावर शस्त्र धरिलें. प्रथम त्यांनीं गिरिधर बहादुर यास दिल्लीस बोलावून आणून कैदेंत ठेवलें. तेथें त्यास सय्यदांचा बेत समजतांच तो पळून अलाहाबादेस छबिलाराम यास जाऊन मिळाला. तेव्हां सय्यदांनीं त्या दोघांवर फौज रवाना केली. इतक्यांत छबिलाराम अर्धांगवायु होऊन मरण पावला (नोव्हेंबर १७१९); आणि गिरिधर हा चुलत्याच्या उत्तरक्रियेची सबब सांगून एक वर्ष प्रयागास राहिला; आणि त्या अवधींत त्यानें तेथील किल्ल्याचा वगैरे चांगला बंदोबस्त केला. या वेळीं बुंदेले रजपूतहि बादशहाशीं लढत असून त्यांचा राजा भगवंतसिंग हा गिरिधर बहादुरास आलाहाबाद येथें सामील झाला. सय्यदांनीं त्याजवर मोठी फौज रवाना केली. या फौजेवर महंमदखान बंगश वगैरे सरदार मुख्य होते. गिरिधरसारखा पराक्रमी, अनुभवी व शूर सरदार आणि अलाहाबादसारखा महत्त्वाचा किल्ला जोंपर्यंत आपल्या कबजांत नाहीं तोंपर्यंत सय्यदांस चैन पडेना. किल्ला कबजांत येईना, तेव्हां सय्यदांनीं आपल्या भरंवशाचा सरदार रतनचंद यास गिरिधरवर पाठविलें. रतनचंदानें गिरिधरची खासगी रीतीनें भेट घेऊन त्याजबरोबर सल्ला टरविला. गिरिधरनें लाख रुपये व अयोध्येचा सुभा घ्यावा आणि अलाहाबादचें ठाणें सोडून द्यावें, असा तह ठरून राजा गिरिधर अयोध्येस गेला आणि रतनचंद सय्यदांकडे परत आला (मे स. १७२०). पुढें सय्यदांचा पाडाव झाला आणि अयोध्येच्या सुभ्यावर बादशहानें सादतखानास नेमिलें. तेव्हां तेथून गिरिधर बहादुराची बदली माळव्यावर बहुधा स. १७२१ त झाली; परंतु निजामहि तेथें हक्क सांगत होता. निझामास अडविण्याकरितांच गिरिधरची माळव्यावर बादशहानें नेमणूक केली होती. पुढें सवाईजयसिंग व गिरिधर यांच्यांत तेढ येऊन जयसिंगानें मराठ्यांनां माळव्यावर स्वारी करण्यास बोलाविलें. व त्याप्रमाणें चिमाजी आप्पा व मल्हारराव होळकर हे चालून आले. त्यांची व गिरिधरची देवासच्या ईशान्येस २५ कोसांवरील सारंगपूर गांवीं लढाई होऊन तींत राजा गिरिधर मरण पावला (१७२४). उज्जनीच्या तटास गिरिधरांचें नांव चालतें असें म्हणतात. पुढें गिरिधरचा चुलत भाऊ दयाबहादूर हा माळव्याचा सुभेदार झाला. [बील; मराठी रियासत, मध्यविभाग].

गिरिधर रामदासी—यांचें मूळचें नांव गिरमाजी. हे समर्थ रामदास यांची शिष्यीण जी वेणाबाई, तिच्या बायजाबाई नांवाच्या शिष्यीणीचे शिष्य होत. त्यांनीं समर्थांनां प्रत्यक्ष पाहिलें होतें व त्यांचा समागम यांनां कांहीं काल घडला होता. त्यांचा मठ मोंगलाईत बीड येथें आहे. यांचा मुख्य ग्रंथ समर्थप्रताप नांवाचा असून त्यांत समर्थांचें बरेंचसें चरित्र (जें गिरधरानीं स्वतः पाहिलें तें) आलेलें आहे. समकालीनत्वामुळें या ग्रंथास समर्थचरित्रांच्या इतर ग्रंथांत बरेंच वरचें स्थान आहे. याशिवाय यांचे चाळीस ग्रंथ व हजार पंधराशें इतर कविता उपलब्ध आहे. रामायणावर यांचे पांच सहा ग्रंथ आहेत. यांनीं रामाशिवाय इतर दैवतांवरहि काव्य केलें आहे. याचा निवृत्तिराम हा ग्रंथ फार सुंदर आहे. यांनीं आपल्या आयुष्यांतील आठवणी एका छोटया ग्रंथांत लिहून ठेवल्या आहेत. यांनीं काशीयात्रा केली होती व तिचें वर्णनपर एक प्रकरणहि त्यांनीं लिहिलें आहे. हे शके १६५१त समाधिस्त झाले. हे मिरजेकडील रहाणारे होते. [समर्थ प्रताप. संतकविसूचि].

गिरिया—मुर्शिदाबाद जिल्ह्यांतील एक जुनें रणक्षेत्र. येथें दोन प्रसिद्ध लढाया झाल्या. एक १७०० मध्यें आलिवर्दीखान यानें नबाब सर्फराजखां याचा पराभव करून बंगालचें राज्य घेतलें, ती व दुसरींत १७६३ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीनें मिरकासीमचा पाडाव करून मीरजाफरला राज्यदान केलें.

गिरिव्रज—ही मगधदेशाची प्राचीन राजधानी होय. हिची स्थापना उपरिचरवसु यानें केल्यावरून हिला वसुमति असेंहि एक नांव होतें. पांडवांच्या वेळीं हींत जरासंध रहात असे. पुढें या शहरास राजगृह असें म्हणूं

लागले. पाटलीपुत्राच्या दक्षिणेस हें ठिकाण होतें. विल्सन म्हणतो कीं मगधाच्या डोंगराळ भागांत हें शहर होतें. परंतु पुढें त्यानेंच याचें साम्य राजगृहाशीं दाखविलें आहे. गिरिव्रज म्हणजे तद्देशीय असाहि अर्थ कर्न करतो. बृहत्संहितेंत हें नांव येतें. कोठें कोठें ही केकय देशाची राजधानी म्हणून सांगितलें आहे. विष्णुपुराणांतहि याचा उल्लेख येतो.

फाहियान म्हणतो कीं राजगृहाच्या दक्षिणेस पाऊण मैलावर पांच टेंकड्यांच्यामध्यें हें आहे. ह्युएनत्संगहि तेंच सांगतो. रामायणांतहि असेंच वर्णन आहे. यांस हल्लीं पुराना राजगिर म्हणतात. महाभारतांत या पांच टेकड्यांचीं नांवें वैहार (सांप्रतचे बैभार), वराह (विपुलगिरी), वृषभ (रान), ऋषि (उदय) व चैत्यक (सोनागिरी) अशीं आहेत. बैभार टेकडीवर जैन शिलालेख आहेत. बौद्धांची पहिली समिति येथेंच भरली (खि. पू. ५४३). येथें अनेक उन्हाळीं व कुंडें आहेत.

[बृहत्संहिता. १०; विष्णुपुराण भा. ४; वाल्मिकी रामायण, बालकांड अ.३३, अयोध्या कां. अ. ६८; भारतवर्षीय भूवर्णन].

गिरिष्क—गिरिष्क या नांवाचें अफगाणिस्तानांत एक खेडें व किल्ला आहे. हें हेल्मंड नदीच्या पूर्वतीरावर असून कंदाहारच्या पश्चिमेस ७८ मैलांवर समुद्रसपाटीपासून ३६४१ फुट उंचीवर आहे. येथील किल्ल्यांत कंदाहारची शिबंदी असून या जिल्ह्याच्या अधिपतीचें निवासस्थान आहे. या किल्ल्याला लष्करी महत्व नाहीं. पहिल्या अफगाण लढाईंत ब्रिटिश लोकांनीं प्रथम हें शहर काबीज केलें. दश्त–इ–बक्वा हें रुंद मैदान गिरिष्कच्या पलीकडे फराकडे पसरलेलें आहे.

गिरीदीह—बिहार–ओरिसा हजारीबाग जिल्हा. गिरीदीह सबडिव्हिजनचें मुख्य ठिकाण. उ. अ. २४°१०' व पू. रे. ८६° २२' लो. सं. (१९११) १०६६८. येथें १९०२ पासून म्यु. क. आहे.

गिलगांव जमीनदारी—मध्यप्रांत. चांदा जिल्हा. क्षेत्रफळ ६० चौरस मैल. पैकीं ३४ मैल जंगल असून त्याची पहाणी झाली नाहीं. पूर्वेस खुटगांव आणि पोटेगांव जमीनदारी. दक्षिणेस पैमुरंदा, उत्तरेस आणि पश्चिमेस खालसा भाग. ही बरीच जुनी आहे. हींत एकंदर खेडीं २२, पैकीं ७ ओसाड आहेत. एकंदर उत्पन्न २०००रु., टाकोळी ७५ रु. व इतर कर ४३–११–०. घराणें राजगोंड. जमीनदार पैका बापु. इस्टेट साधारण बऱ्या स्थितींत आहे.

गिलजित—काश्मीरच्या सरहद्दीवरील जिल्ह्यापैकीं हा एक जिल्हा आहे. हा काश्मीर प्रांताच्या उत्तरेला आहे. इ. स. १९०१ च्या पूर्वी गिलजित जिल्ह्यांत चित्रळ, दीर, इत्यादि मुलुखांचा अंतर्भाव होत असे पण इ. स. १९०१ नंतर वायव्य सरहद्दीवरील मुलुखांचा एक स्वतंत्र प्रांत बनविण्यांत आल्यापासून गिलजित जिल्ह्यांतून पूर्वीचा बराच मुलूख गाळला. इ. स. १९११ सालीं या जिल्ह्याचें क्षेत्रफळ ३११८ चौ. मै. होतें.

गिलजित जिल्हा हा बाल्टिस्थानापेक्षांहि सखल जागेवर वसलेला आहे. या जिल्ह्यांतील मुख्य शहर गिलजित हें होय. हें सिंधु नदीच्या उत्तरेला असून ४८०० फूट उंचीवर वसलेलें आहे. गिलजित जिल्ह्यांत गिलजित व अॅस्टोर या दोन तहशिली आहेत. गिलजित जिल्ह्याची लोकसंख्या १९११ सालीं ३१,००० होती.

या जिल्ह्यांत गिलजित ही प्रमुख नदी आहे. या नदीला यासीन, अष्कुमन व इतर छोटया नद्या मिळालेल्या आहेत. या नद्यांचीं खोरीं फार मोठीं असून नेहमी बर्फाच्छादित असतात. गिलजित व चित्रळ यांच्यामध्यें एक मोठी सडक गेलेली आहे या जिल्ह्यांत दरकोट, गझर, कोरबोहर्ट, किलिक, मिंटक इत्यादि मोठमोठे घांट असून, त्यांची सर्व साधारण उंची १५००० फूट आहे. बंजी ठिकाणापासून थोड्या मैलांवर गिलजित नदी ही सिंधुनदीला मिळाली आहे व त्या ठिकाणीं हलता पुल बांधलेला आहे. बंजीच्या थोडेसें खालीं गेल्यावर अॅस्टोर ही नदी सिंधूला मिळाली असून, या नदीच्या खोऱ्यांत ट्रगबल व बर्झिल हे मोठे घांट आहेत व या घांटामधून काश्मीरकडे जाणारा रस्ता आहे. याशिवाय गिलजितहून पंजाबमध्यें येण्यासाठी एक स्वतंत्र सडक आहे.

इतिहास.—गिलजित हें नांव किती जुनें आहे हें नक्की सांगता येत नाहीं. गिलजितचें प्राचीन नांव गहलट होतें असें कित्येक विद्वान् म्हणतात. याला पूर्वी सर्गिन हें नांवहि प्रसिद्ध होतें. शीख व डोग्रा लोकांनीं यास गिलिट हें नांव दिलें व त्याचेंच पुढें गिलजित हें नांव बनलें असें दिसतें. काश्मीरांतील मार्तंड व पंड्रेशन येथील मोखकळीस आलेल्या मंदिराप्रमाणें कांहीं जुन्या इमारतींचे अवशेष अद्यापिहि येथें सापडतात. या जिल्ह्यांत पूर्वी दरदा लोकांची वस्ती होती असें टॉलेमीच्या ग्रंथावरून समजतें. हा प्रदेश डोंगराळ असून, त्यांत अनेक घांट व दऱ्या आहेत. त्यामुळें एकव्या दुकव्या प्रवाश्याला या ठिकाणीं प्रवास करणें फार धोक्याचें असतें पण अशा भयाण प्रदेशांतून फाहिआन व ह्युएनत्संग या दोन चिनी प्रवाशांनीं प्रवास केला होता व त्यांनीं या प्रदेशाचें वर्णन लिहून ठेवलेलें आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं अशा दुर्घट प्रदेशांतहि ह्युएनत्संगाच्या काळीं बुद्धाच्या मूर्ती व बुद्धविहार आढळून येत असत. प्रख्यात प्रवासी अल्बेरूणी यानें या प्रांताचें वर्णन लिहून ठेवलेलें आहे. त्यांत तो म्हणतो ' काश्मीरकडे जाण्याला जी दरी लागते ती दरी सोडून देऊन पुढें जाऊं लागल्यास दोन तीन दिवसांच्या प्रवासानंतर बोलर व शमिलान पर्वत लागतात. या पर्वताच्या आश्रयानें,तुर्क लोकांच्या जाती रहातात. या जातींनां भत्तवर्यन असें नांव आहे. त्यांच्या नायकाचें नांव भत्तशाह (भट्टशाह) असें आहे.

या लोकांची गिलजित, अस्थिर व शिलतश हीं प्रमुख ठिकाणें आहेत. या जाती तुर्की भाषा बोलतात. काश्मीरच्या मुलुखांत या जाती फार धुडगूस घालतात.

गिलजितवर पूर्वी ट्रकेन घराण्याचे पुरुष राज्य करीत होते असें तत्कालीन दंतकथांवरून समजतें. हें घराणें निर्वंश झाल्यावर पुष्कळ काळपर्यंत 'दळी नो कान पिळी' अशी या प्रदेशाची स्थिति होती. १८४२ पर्यंत या प्रदेशावर पांच घराण्यांनीं राज्य केलें. या घराण्यांपैकीं एका घराण्यांत, गौर रहमान नांवाचा एक प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. इ.स. १८४२ मध्यें शीख लोकांनीं गिलजितप्रांत आपल्या ताब्यांत घेतला व तेथें आपलें लष्कर ठेवलें. इ. स. १८४६ मध्यें ब्रिटिशांनीं हा प्रांत जम्मूचा महाराजा गुलाबसिंह यास दिला. पण या प्रांतांत शांतता ठेवणें हें गुलाबसिंगासारख्या कर्तृत्ववान व शूर पुरुषालाहि जड गेलें. गौर रहिमान यानें अचानक बंड करून गुलाबसिंगाच्या डोग्रा रजपूत शिपायांनां सळो कां पळो करून सोडलें. सुमारें आठ वर्षे या रजपुतांनीं आपली नजर या प्रांताकडे वळविली नाहीं. गुलाबसिंगाचा मुलगा रणबीरसिंग हा गादीवर येतांच त्यानें गिलजित प्रांत पुन्हां आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं कंबर बांधली. इ. स. १८६० मध्यें त्यानें गिलजितवर आपली फौज पाठविली. सुदैवानें याच सुमारास गौररहमन हा वारल्यामुळें, गिलजितप्रांत आपोआपच रजपुतांच्या हातीं लागला. यानंतर डोग्रा लोकांनीं दोनदां यासीन संस्थानावर स्वारी करून तें जिंकून घेतलें. १८६६ मध्यें त्यांनीं डरेल संस्थानावर स्वारी करून तेथील दरद लोकांचा पराभव केला. रशियाचा हिंदुस्थानांत हात शिरूं नये यासाठीं ब्रिटिशसरकारानें गिलजित जहागीर निर्माण केली. इ. स. १९०१ सालीं वायव्य सरहद्दीवरील प्रदेशाचा स्वतंत्र प्रांत बनविण्यांत आला व गिलजित जिल्हा हा काश्मीरमध्यें मोडूं लागला.

या जिल्ह्याची व्यवस्था पहाण्याकरितां काश्मीर संस्थाननें एक वझीर नेमलेला असतो या वझीरावर देखरेख ठेवण्याकरिता ब्रिटिशसरकारतर्फे एक पोलिटिकल एजंट नेमण्यांत आलेला आहे. गिलजित जहागिरीमध्यें अनेक प्रकारचे लोक पूर्वी रहात असत. व त्या सर्व लोकांना दरद हें साधारण नांव होतें पण हल्लीच्या गिलजित जिल्ह्यांत, मुसलमान लोकांची वस्ती फार आहे. याशिवाय येथें शीख लोकांचीहि बरीच वस्ती आहे. हे लोक पैशाची भाषा बोलतात. या जिल्ह्यातील लोक, पायघोळ लोकरी अंगरखा व पायजमा वापरतात. वर वर पहाणाऱ्याला येथील लोक खुल्या दिलाचे व आनंदी असावेसे दिसतात पण यांच्याशीं ज्यांचा निकट संबंध येतो त्यांनां हे लोक खुनशी व क्रूर आहेत असें आढळल्यावांचून रहात नाहीं.

गिलबर्ड विल्यम (१५४४—१६०३)—विल्यम् गिलबर्ड याचा जन्म इंग्लंडांतील कोलचेस्टर गांवीं झाला; पुढें त्याच गांवच्या शाळेंत त्याचें शिक्षण झाल्यानंतर त्याचा केंब्रिज येथील सेंटजॉन कॉलेजांत प्रवेश झाला व तेथून त्यानें बी. ए.; एम्.ए.आणि एम् डी; या पदव्या संपादन केल्या. इ. स. १५७३ सालापासून त्यानें लंडन शहरीं वैद्यकीचा धंदा सुरू केला. पुढें निरनिराळ्या खात्यांत कित्येक अधिकाराच्या जाग्यांवर काम केलें.

गिलबर्ट यानें चुंबकत्वावर एक प्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथांत त्यानें कित्येक वर्षांचें अनुभवजन्यज्ञान संगृहित करून ठेविलें आहे. विद्युल्लतेविषयींहि बरेचसें ज्ञान या पुस्तकांत उपलब्ध करून ठेविलें आहे. रसायनशास्त्रावर यानें बरेच परिश्रम केले होते परंतु त्यावरील याचे लेख उपलब्ध झाले नाहींत.

गीझो(१७८७–१८७४)—या फ्रेंच मुत्सद्याचें नांव फ्रँक्वा पेरी असें असून हा वक्ता व मुत्सदी होता. हा नीमीस येथें १७८७ मध्यें एका प्रॉटेस्टंट घराण्यांत जन्मला. फ्रान्समध्यें १७८९ च्या राज्यक्रान्तीपूर्वी प्रॉटेस्टंट लोकांचे बरेचसे हक्क काढून घेतल्यामुळें गीझोच्या आईबापांनां आपला विवाह चोरून गुप्तपणें उरकून घ्यावा लागला. उलटपक्षीं तें कुटुंब उदारमतवादी असूनहि क्रांतीच्या दिवसांत गीझोच्या बापाचा वध करण्यांत आला (१७९४). त्यामुळें गिझोच्या शिक्षणाची जबाबदारी त्याच्या आईवर पडली. ती साधी, पण मोठी करारी व दृढनिश्चयी होती; तिची धार्मिक मतें १६ व्या शतकांतील ह्युगुनॉट्सनां शोभण्यासारखीं होतीं. अशा या बाईनें आपल्या पुत्राला उत्तम वळण लाविलें. ती नेहमीं साधी रहात असे. गीझो हा प्रधान झाला असतांहि ती आपल्या पतीच्या स्मरणार्थ सुतकी वेषांतच राही. मात्र मोठमोठ्या राजकारणी पुरुषांच्या बैठकींत नेहमीं भाग घेई. पुढें १८४८ मध्यें गीझोच्या हद्दपारींत (लंडनमध्यें) ही मरण पावली. पतीच्या वधानंतर ही मुलासह जिनेव्हाला जाऊन राहिली, व तेथेंच गीझोचें शिक्षण झालें. ती उदारमतवादी असून एमिली ग्रंथांत प्रतिपादिलेल्याप्रमाणें प्रत्येकानें कांहीं तरी पोटाचा धंदा शिकलाच पाहिजे हें मत तिला पटल्यामुळें तिनें गीझोला सुतारकाम शिकविलें. त्यावेळीं गीझोनें स्वतः केलेलें एक टेबल अद्याप ठेवलेलें आहे. तथापि गीझोचें उच्च शिक्षण कोठें झालें याबद्दल साग्र माहिती आढळत नाहीं. त्यानें स्वतःच्या आठवणी म्हणून जो ग्रंथ लिहिला त्यांतहि लहानपणाची माहिती मुळींच दिली नाहीं. पुढें पॅरिसला तो परत आला व तेथें कायद्याचा अभ्यास करूं लागला. त्यावेळीं त्याचें वय १८ वर्षांचें असून त्यानें एका बड्या मंत्र्याच्या घरीं शिकवणी मिळवून वर्तमानपत्रांत लेखहि लिहिण्याचें सुरू केलें. त्यामुळें वाङ्मयप्रेमी संस्थांशीं त्याचा परिचय झाला. त्यानें २२ व्या वर्षी शॅटू ब्रियांड याच्या मार्टीस या पुस्तकावर परीक्षणात्मक लेख लिहिला. पुढें स्टुअर्ड या संपादकाच्या मार्फत त्याची पॉलिन म्यूलन नांवाच्या लेखिकेशीं ओळख झाली. ही कुलीन व ज्ञानसंपन्न असून वयानें गीझोपेक्षां १४ वर्षांनीं वडील होती. राज्यक्रान्तीच्या वेळीं

तिच्यावर आपत्ति कोसळल्यामुळें ती लेखनव्यवसायावर पोट भरीत असे. तिनें सुअर्डच्या पत्रांत एक लेखमाला सुरू केली असतां मध्येंच तिच्या आजारीपणामुळें तींत खंड पडला. परंतु गीझोनें ती माला पुरी केली. या प्रसंगामुळें त्या दोघांतील परिचय वाढून पुढें गीझोशीं तिनें लग्न लाविलें. विवाहोत्तरहि तिनें स्त्रीशिक्षणविषयक पुष्कळ पुस्तकें लिहिलीं. शेवटीं ती १८२७ त वारली. पुढें १८२८ त गीझोनें तिच्या भाचीशीं विवाह केला. तिला एक मुलगा होऊन ती १८३३ मध्यें मरण पावली. गीझोचा मॉरीस ग्युलेम नांवाचा मुलगा पुढें नांवाजलेला लेखक बनला. नेपोलियनच्या कारकीर्दींत गीझोनें केवळ वाङ्मय व्यवसायासच वाहून घेतलें. त्यानें ललितकलांवर थोडेंसें लिहून गिबनकृत रोमच्या इतिहासाचेंहि भाषांतर केलें. त्यानंतर तो इतिहासाचा प्रोफेसर झाला. त्यावेळीं त्यानें इतिहास–संशोधनाच्या कामास फार उत्तेजन दिलें. पुढें १८ व्या लुईच्या वेळीं सेक्रेटरीच्या जागेवर त्याला नेमिलें. पण नेपोलियन परत येतांच त्यानें राजीनामा देऊन पूर्ववत लेखनव्यवसाय पत्करला. यानंतर जेव्हां दोस्त राष्ट्रें नेपोलियनवर चालून आलीं त्यावेळीं गीझो हा घेंट येथें लुईकडे गेला. हें कृत्य देशद्रोहाचें होतें असें ठरवून, पुढें लोक गीझोचा घेंटचा माणूस म्हणून उपहास करीत असत. पुढें १८१६त पुन्हां राजशाही सुरू होऊन,गीझोला न्यायमंत्र्याच्या सेक्रेटरीची जागा मिळाली. या काळांत तो नियंत्रित राजशाहीचा पुरस्कर्ता होता. मध्यम वर्गास मताधिकार देण्यांत तो अनुकूल असून निर्भेळ लोकशाहीच्या, तसेंच लष्करशाहीच्या व जुन्या बोर्बोन घराण्याच्या जुलमी राजेशाहीच्या तो विरुद्ध होता. नंतर १० व्या चार्लसनें पूर्ववत सुलतानी सुरू केल्यामुळें गीझोला सरकारी नोकरी सोडावी लागली; तेव्हां त्यानें 'लोकनियंत्रित राजपद्धति' या विषयावर व्याख्यानें व लेखांची झोड उठविली.त्यानें १८३० पर्यंत इंग्लंडच्या इतिहासांतील व फ्रान्सच्या इतिहासांतील संस्मरणीय गोष्टी प्रसिद्ध केल्या व यूरोपांतील सुधारणेचा इतिहास या विषयावर महत्त्वाचीं व्याख्यानें दिलीं. त्यामुळें फ्रान्स व सर्व यूरोपमधील उत्तम लेखकांत त्यांची गणना होऊं लागली. १८३० मध्यें तो लिसी शहरातर्फे डेप्युटी सभेचा सभासद निवडून आला. त्या सभेंत एकदां चार्लस राजाच्या धमकीवजा भाषणाचा त्यानें जोरानें निषेध केला.राज्यक्रांतीचीं पुन्हां चिन्हें दिसूं लागलीं तेव्हां गीझो हा हुजूरपक्षास मिळून अठरा वर्षें सतत लोकशाहीविरुद्ध झगडत राहिला. या नंतर इ. स. १८३२ त गीझोला शिक्षणमंत्र्याची जागा मिळाली. त्यावेळीं त्यानें आपल्या देशाची उत्कृष्ट सेवा बजावली. प्राथमिक शिक्षणाच्या शाळा वाढवून शिक्षणबोर्ड स्थापलें; दुय्यम शिक्षण संस्था, युनिव्हर्सिट्या व इतिहाससंशोधन या सर्वांस भरपूर सरकारी मदत दिली. राजकीय व सामाजिक शास्त्रसंस्था नेपोलियननें बंद पाडली होती ती पुन्हां यानें सुरू केली. पुढें (१८३९) गीझो हा लंडनला वकीलीच्या जागेवर गेला. येथें त्याचा खुद्द व्हिक्टोरिया राणीनें मोठा सत्कार केला. त्याच्या ग्रंथांबद्दल, आचरणाबद्द व वकिलातीच्या कामाबद्दल त्याची मोठी वाहवा झाली. नंतर सीरियन प्रकरणामुळें राजानें गीझोस परत बोलावून प्रधानमंडळ बनविण्यास सांगितलें याप्रमाणें १८४० मध्यें गीझो मुख्य प्रधान बनला, तो आठ वर्षें त्याच जागेवर होता या वेळीं इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत गीझोच्या चातुर्यामुळें सलोखा झाला होता. लुई राजा व व्हिक्टोरिया राणी यांची परस्पर भेट झाली होती.

प्लेट नदीवर फ्रेंच व ब्रिटिश फौज खांद्याला खांदा लावून प्रथमच लढली.पण १८४६ मध्यें इंग्लंडचें प्रधानमंडळ बदललें. इतक्यांत स्पेनच्या तरुण राणीच्या विवाहाचा प्रश्न निघाला. त्या बाबतींतील इंग्लंडच्या प्रयत्नाचा भलताच अर्थ करून गीझोनें व लुई राजानें मध्यें पडून स्पॅनिश राणीचा एका हलक्या बोर्बोन वंशजाशीं व तिच्या बहीणीचा लुईच्या धाकट्या मुलाशीं असे विवाह घडवून आणले. यामुळें फ्रेंचांचें ब्रिटिशांशीं विनाकारण वाकडें आलें व दोघांमधील मैत्रीचा करार रद्द झाला. मात्र फ्रेंच पार्लमेंटांत गीझोचें वर्चस्व अबाधित होतें. तो स्वतः लांचलुचपतीपासून पूर्ण अलिप्त होता. तो गरीबींतच अखेरपर्यंत राहिला. पण हाताखालील लोकांच्या दुराचरणाला त्यानें कडक प्रतिबंध न केल्यामुळें त्याच्या प्रधानमंडळाबद्दल मात्र ओरड सुरू झाली. तथापि त्याच्या भाषणशैलीची व वक्तृत्वाची छाप विलक्षण होती. अनेक बाबतींत तो पिटसारखा होता. मताधिकार विस्तृत नसल्यामुळें व स्वतः गीझो राजशाहीचा भक्त असल्यामुळें व त्यानें पार्लमेंटची लोकमतानुवर्ती सुधारणा न केल्यामुळें त्याच्या विरुद्ध देशांत बराच असंतोष माजला. त्याची दृष्टि तत्त्वज्ञाप्रमाणें थोर होती. सूक्ष्म व्यवहार त्याला कळत नसे. जमाबंदी, व्यापार, लष्कर व आरमार या बाबतींत तो गैरमाहीत असल्यानें हाताखालच्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें त्याला वागावें लागे. वरील सर्व गोष्टी गीझोच्या तोट्यास कारण होऊन १८४८ त खुद्द राजानेंच त्याला राजीनामा देण्यास लाविलें.पुढें लोकशाही स्थापन झाल्यानंतर गीझो हा लंडनला जाऊन राहिला. तेथें इंग्लिश राजानें त्याचा मोठा सत्कार केला. त्यानंतर तो २६ वर्षें जगला. त्यांत शेवटपर्यंत पुस्तकें लिहून त्यानें आपला निर्वाह केला. फ्रान्सच्या प्रधानपदावरून सर्व यूरोपच्या राजकारणाचीं सूत्रें हालविणारा हा मुत्सद्दी शेवटीं तत्त्ववेत्याप्रमाणें शांतवृत्तीनें आपलें आयुष्य घालवूं लागला. अधिकारलालसेनें पुन्हां राजकारणांत पडण्याची इच्छा त्याला झाली नाहीं. कांहीं दिवसांनीं लंडनहून तो आपल्या लिसी नांवाच्या गांवीं परत आला. फ्रान्समधील अनेक शास्त्रीय संस्थांचा तो सभासद होता. अखेर लिसी येथें तो अगदीं म्हातारपणीं मरण पावला (१८७४.)

गीता—महाभारतांतील सर्व बोधप्रद भागांत जर एखाद्याची ख्याति व लोकप्रियता अतिशय वाढली असेल तर ती भगवद्गीतेचीच होय. श्रीमद्भगवद्गीता हें आजच्या धर्मग्रंथांतील अतिशय तेजस्वी व निर्मल रत्न आहे. भगवद्गीता म्हणजे ईश-काव्य. भरतखंडामध्यें भगवद्गीतेसारखा अतिशय मौल्यवान लोकप्रिय ग्रंथ क्वचितच सांपडेल. वैष्णव पंथाच्या भागवत धर्माच्या लोकांचे भगवद्गीता हें पवित्र धर्मशास्त्र आहे इतकेंच नव्हे तर भारतीय धर्मांतील प्रत्येक पंथांतील लोकांचा हा भक्तिग्रंथ आहे. कल्हण (राजतरंगिणी ५; १२५) नांवाचा इतिहासकार काश्मीरचा राजा अवंतिवर्मन् याची अशी गोष्ट सांगतो कीं, इ. स. ८८३ मध्यें जेव्हां अवंतिवर्मन् राजा मरण्याच्या पंथास लागला तेव्हां त्यानें भगवद्गीतेचे अथपासून इतिपर्यंत वाचन करविलें व विष्णुपदांचे चिंतन करून मोठ्या आनंदानें प्राण सोडला. केवळ अवंतिवर्मन् राजालाच मरणसमयीं आत्मशांति मिळाली नसून पुष्कळ लोकांनां गीतेच्या वाचनानें शांति मिळाली आहे. आज हिंदुस्थानांत भगवद्गीता मुखोद्गत असणारे पुष्कळ शिकलेले लोक सांपडतील. अद्यापीहि गीतेच्या हजारों हस्तलिखित प्रती उपलब्ध आहेत.

आवृत्त्या व भाषांतरें.—इ. स. १८०९ मध्यें कलकत्ता शहरीं प्रथम भगवद्गीता छापली. तेव्हांपासून हा ग्रंथ छापला गेला नाहीं असें क्वचितच एखाददुसरें वर्ष सांपडेल. भगवद्गीतेचें भाषांतर हिंदुस्थानांतील सर्व प्रचलित भाषांत केलेलें सांपडतें. यूरोपखंडामध्यें गीतेचें भाषांतर प्रथम इंग्रजीमध्यें चार्लस विलकीन्सनें इ. स. १७८७ मध्यें लंडन शहरीं प्रसिद्ध केलें. आगस्ट विलम्हेल्म व्हॉन श्लेगल यानें प्रथम भगवद्गीतेची बिनचूक आवृत्ति प्रसिद्ध केली व नंतर त्याच आवृत्तीला लॅटिन भाषांतर जोडण्यांत आलें.त्याच आवृत्तीवरून विल्हेल्म व्हॉन हुम्बोल्टनें गीतेचें पारायण केलें. हा ग्रंथ त्यास इतका आवडला कीं, त्यानें लुक्रेशिअस, पॅरमेनाइडस् व एंपिडोक्लीस यांच्यापेक्षां भगवद्गीता ग्रंथ फार महत्वाचा आहे असें ठरविलें इतकेंच नव्हे तर आज सर्व देशांच्या उपलब्ध वाङ्मयांमध्यें महाभारत महाकाव्यासारखें सुंदर व तत्वज्ञानानें ओथंबलेलें महाकाव्य सांपडत नाहीं असे त्यानें स्पष्टपणें नमूद केलें आहे. या काव्याचा विलहेल्म व्हॉन हुम्बोल्ट यानें फार बारकाईनें १८२५–२६ सालीं बर्लिनच्या ॲकेडेमीकमध्यें विचार केलेला आहे. या काव्याचें जर्मन भाषेमध्येंहि अनेकवार भाषांतर झालें आहे. इ. स. १८३४ मध्यें सी. आर, एस्, पीपर; १८६९ मध्यें लॉरिन्सर व १८७० मध्यें वॉ बॉपस वगैर यांनीं भाषांतर केलें. अत्यंत शुद्ध भाषांतर आर. गार्बे व पी. डॉयसेन यांचें आहे.

प्रसंग व उपदेश–भीष्मपर्वामध्यें महायुद्धाचें वर्णन सुरू होण्यापूर्वीच भगवद्गीतेला अचानक प्रारंभ होतो. उभय पक्षांकडील योद्धे जेव्हां युद्ध करण्यास प्रवृत्त होऊन एकमेकांसमोर उभे राहिले तेव्हां श्रीकृष्णानें अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं नेऊन उभा केला; व युद्धाच्या इच्छेनें उभे राहिलेले कौरव व पांडव वीर त्याला दाखविले. तेव्हां अर्जुनानें वडील, आजे, गुरु, मामा, भाऊ, मुलगे, नातू, मित्र, सासरे व आपले हितकर्ते हे दोन्ही सैन्यांत उभे आहेत असें पाहिलें, तेव्हां अर्जुन करुणेनें अत्यंत पीडित झाला. आपल्याच आप्तांबरोबर युद्ध करावयाचा विचार मनांत येताच अर्जुनाच्या शरीरास कंप सुटून रोमांच उभे राहिले. ज्यांच्या हिताकरितां लढावयास तयार झालें पाहिजे असे जे स्वजन त्यांचा घात करणें मूर्खपणाचें आहे व त्यापासून पाप मात्र लागेल असें त्यास वाटलें. तेव्हां कृष्णानें अर्जुनाचा साशंकपणा व मनाचें दुबळेपण पाहून त्याची निर्भर्त्सना केली. तेव्हां अर्जुनानें "युद्धामध्यें जय मिळवून काय फायदा ? व माझें कर्तव्य काय आहे हें मला समजत नाहींसें झालें आहे तरी निश्चयेंकरून कल्याणकारक असेल तें मला सांगा" अशी श्रीकृष्णाची प्रार्थना केली. नंतर श्रीकृष्णानें परिणामाकडे लक्ष न देतां युद्ध करण्यास उभें रहाणें हें प्रत्येक वीर पुरुषाचें कर्तव्यकर्म आहे अशी अर्जुनाची खात्री करून देण्याकरितां उत्तरादाखल अतिशय तत्वज्ञानानें भरलेलें भाषण केलें.श्रीकृष्ण म्हणालेः–"तूं गोष्टी तर सांगतोस पांडित्याच्या आणि जे शोक करण्यास योग्य नाहींत अशाबद्दल शोक करीत बसला आहेस. पण जे खरे पंडित (आत्मज्ञानी) आहेत ते मेलेल्याचाहि शोक करीत नाहींत, आणि जिवंताचाहि शोक करीत नाहींत. कारण मी पूर्वीं केव्हांहि नव्हतों किंवा तूंहि कधीं नव्हतास किंवा हे राजेहि नव्हते असें नाहीं व आपण सर्वजण यापुढें कधीं असणार नाहीं असेंहि नाहीं. आपण नित्य आहों. या सांप्रतच्या देहास जशा बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तीन अवस्था येतात व जातात तशीच आत्म्याला दुसऱ्या देहाची प्राप्ति होते.परंतु या अवस्थांतरांमुळें किंवा देहांतरांमुळें आत्मा अनित्य असेल असली भूल खऱ्या पंडिताला पडत नाहीं. या नित्य अविनाशी व अप्रमेय आत्म्याचा उपाधिभूत जो देह तो विनाशी आहे; याकरितां हे भारता, तूं युद्धपराङ्मुख होऊं नकोस. जो असें समजतो कीं आत्मा मारणारा आहे, तसेंच जो आत्मा मरणारा आहे असें समजतो ते दोघेहि अज्ञानी आहेत. कारण हा कोणास मारीतहि नाहीं व कोणाकडून मारलाहि जात नाहीं. हा आत्मा कधींहि जन्मत नाहीं व कधींहि मरत नाहीं; किंवा हा मागें अस्तित्व पावला नसून पुनः मृत्यु पावणार असेंहि नाहीं. कारण, हा जन्मरहित, नित्य, शाश्वत व अनादि आहे आणि शरीराचा वध झाला तरी ह्याचा वध होत नाहीं. जसा पुरुष जीर्ण झालेलीं वस्त्रें टाकून दुसरीं नवीं घेतो, तसा आत्मा जुनीं शरीरें टाकून नव्या शरीराशीं संगत होतो ह्या आत्म्याला शस्त्रें तोडीत नाहींत, याला अग्नि जाळीत नाहीं, याला पाणी भिजवीत नाहीं व याला वारा सुकवीत नाहीं. आत्मा अशा प्रकारचा आहे असें

समजल्यावर शोक करणें योग्य नाहीं. आत्मा हा कोणत्याहि देहांत असला तरी तो कधींहि वध पावत नाहीं; म्हणून कोणाहि भूतांच्याबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं. धर्मयुद्धाहून क्षत्रिय वीराला दुसरें कांहींहि कल्याण नाहीं. पार्था, यदृच्छेनें प्राप्त झालेला युद्धप्रसंग म्हणजे स्वर्गाचें उघडलेलें द्वारच होय. असलें युद्ध भाग्य शाली क्षत्रियांनांच प्राप्त होतें. जर तूं धर्मयुद्धाचा त्याग करशील तर मरणापेक्षांहि अति दुःखकर अशी तुझी अपकीर्ति होईल. जर तूं युद्धांत मारला गेलास, तर तुला स्वर्ग प्राप्त होईल, अथवा युद्धांत जय पावलास तर पृथ्वीचें राज्य भोगशील. एवंच उभयपक्षीं युद्ध इष्टच आहे म्हणून अर्जुना युद्धाविषयीं निश्चय करून ऊठ. कृष्णानें योद्धा या नात्यानें केलेलें भाषण व पुढें धर्मगुरु व परमेश्वर या नात्यानें केलेलें भाषण यामध्यें वरवर पहाणाऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस असंबद्धता येते. कांहीं ठिकाणीं तर भगवद्गीतेंत श्रीकृष्णानें अर्जुनाशीं परमेश्वर या नात्यानें केलेलेंच भाषण आढळून येतें. भगवद्गीतेंतील कर्मयोगावरील विवेचनांतील आतिशय उच्चतम पराकाष्ठेचें तत्व म्हटलें म्हणजे फलाची इच्छा टाकून जय किंवा अपजय याचा विचार न करतां नेहमीं विहित कर्म करावें हें होय. कारण असल्या प्रकारचें निष्काम कर्म ऐहिक संसाराचा परित्याग, कर्म व संन्यास या तत्वांमध्यें समाविष्ट झालेलें जें उच्चतम नीतितत्व (कर्मयोग) त्या तत्वांत अंशतः तरी समाविष्ट होतें. संन्यासमार्ग व कर्मयोग यांमध्यें वरवर पहाणारास जो विरोध दिसतो, तो वास्तविक तसा नसून मोक्षशास्त्रदृष्ट्या हे दोन्हीहि एकच व समान फलदायी आहेत हें दाखविण्याचा गीतेमध्यें प्रयत्न केलेला आढळतो. गीतेचें मत मात्र कर्मयोगाकडे निःसंशय झुकलेलें दिसतें. वस्तुतः कृष्णानीं भगवद्गीतेंत मोक्ष मिळविण्यास कर्ममार्ग व ज्ञानमार्ग अथवा कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे दोन्हीहि मार्ग कथन केलेले आहेत. आत्मा हा जोंपर्यंत शरीरानें बद्ध झालेला आहे तोंपर्यंत कर्मसंन्यास करणें शक्य नाहीं व तो केला असें म्हणणें (म्हणजे कर्म न करता जगणें) ढोंगीपणाचें आहे. कारण प्रकृति सत्व-रज-तम या त्रिगुणांनीं युक्त असल्यामुळें कर्म हें नैसर्गिक व आवश्यक आहे. म्हणून मनुष्याला फक्त निष्काम बुद्धीनेंच कर्म करणें शक्य आहे. जसा धुरानें अग्नि, मळानें आरसा व गर्भाशयानें गर्भ आच्छादिलेला असतो. तसें हें शुद्ध ज्ञान ज्ञान्याचें नित्य वैर करणाऱ्या कामानें झांकून टाकलें आहे. म्हणून निष्काम बुद्धीनें कर्म करणारा ज्ञानमार्गाचें जें उच्चतम ध्येय त्याप्रत पोचतो. चौथ्या अध्यायांतील ३६ व्या श्लोकांत ज्ञानानें अति शय पापीहि तरेल अशी महती भगवद्गीतेंत वर्णिलेली दिसते.

अपिचेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥

भगवद्गीतेंत प्रसंगीं जो ऐहिक संसाराचा त्याग करून ध्यानस्थ होऊन ज्ञान संपादन करतो तो योगी असें म्हटलें आहे. योगी हा शीत, उष्ण, सुखदुःख तसेंच मानापमान हीं सारखीं मानतो व आपलें मन स्थिर ठेवतो; माती, दगड व सोनें हीं सारखीं समजतो; मित्र व शत्रू, आप्त व परकी यांच्या ठिकाणीं व साधूंच्या ठिकाणीं तशीच पाप्यांच्या ठिकाणींहि समबुद्धि ठेवतो. साधकानें एकांतवासांत एकाग्र होऊन आपल्या नासाग्रीं दृष्टि ठेवावी. निवाऱ्यांत ठेविलेला दिवा हालत नाहीं. हीच पुरातन उपमा आत्मविषयक योग करणाऱ्या स्थिरचित्त झालेल्या योग्याला लागू पडते.

उपनिषदांमध्यें मोक्ष व ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्यास चिंतन व ध्यान एवढेच कायते दोन मार्ग सांगितले आहेत. परंतु भगवद्गीतेमध्यें आणखी एक तिसरा भक्तिमार्ग सांगितला आहे. अर्जुनानें जेव्हां श्रीकृष्णाला ज्याला आपलें चित्तसंयमन करितां येत नाहीं तो नाश पावतो काय? असा प्रश्न विचारला तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले बा पार्था ! जो कोणी शुभकर्म करूं लागला. तो दुर्गतीला किंवा हीन गतीला कधीं जात नाहीं.ज्यानें कर्तव्य बजावलें आहे तोच केवळ नव्हे तर योगभ्रष्टहि मरणानंतर फिरून पवित्र व श्रीमंत पुरुषांच्या कुलांत जन्मास येतो व वरेच जन्म घेतल्यानंतर योगी बनतो. निखिल योगी जनांतहि जो आपला अंतरात्मा माझ्या ठिकाणीं ठेवून श्रद्धेनें मला भजतो तोच मला सर्व योग्यांत श्रेष्ठसा वाटतो. भक्तिमार्गानें खरा मोक्ष मिळतो. व ब्रह्मज्ञान उत्पन्न होतें, हेंच तत्व वारंवार श्रीकृष्णानें शिकविलेलें आढळतें. ईश्वरावरील श्रद्धेनें व भक्तीनें योग्याच्या पुण्यकर्माला व सद्गुणाला महती मिळते. भगवद्गीतेंतील नैतिक शिक्षणाचें वर्चस्व किंवा सार ज्याला टीकाकार रहस्य असें म्हणतात ते अकराव्या अध्यायाच्या पंचावन्नाव्या श्लोकात आहे ते असें कीं सर्व कर्मे परमेश्वराचीं होत या बुद्धीनें कर्म करणारा, व परमेश्वरपरायण संगविरहित व सर्व भूतांच्या ठायीं निर्वैर असा जो परमेश्वराचा भक्त तो हे पांडवा मला येऊन पोंचतो.

ईश्वराशीं तादात्म्य हेंच उच्चतम ध्येय किंवा मोक्ष आहे असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. ईश्वराशीं तादात्म्य किंवा ब्रह्मस्वरूपीं लीन होणें म्हणजे जीवात्म्याला परमात्मस्वरूपी बनविणें .व चिरकाल ईश्वराच्या सन्निध राहणें होय.

हें ध्येय संपादन करण्याचे तीन मार्ग आहेत. पहिला कर्ममार्ग, दुसरा ज्ञानमार्ग व तिसरा भक्तिमार्ग. हे तिन्हींहि मार्ग एकच आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न गीतेंत केलेला आहे व तो पुष्कळ अंशीं सफलहि झालेला दिसतो. कर्ममार्गाची व भक्तिमार्गाची सांगड जुळते व भक्तिमार्गानें ज्ञानमार्गाची प्राप्ति होते म्हणून तीनहि मार्ग एकच आहेत. अशा रीतीनें भगवद्गीतेंतील एकंदर उपदेशाची एकवाक्यता करतां येते. ईश्वराच्या अस्तित्वाच्या कल्पनेशिवाय ईश्वर सर्वत्र भरलेला आहे अशा उपनिषदांतील ब्रह्मात्मवादांतील तत्वांचा उल्लेख मधून मधून सांपडतो. सगुण-मूर्तिपूजा किंवा अवतारी पुरुषाची श्रद्धेनें भक्ति करणें हा मार्ग अज्ञानी लोकांकरितां

आहे, व ईश्वर सर्वत्र भरलेला हें तत्त्व ज्ञानी व ऋषी वगैरे लोकांकरितां आहे; व ईश्वराचें अवतारदृष्ट अस्तित्व, व ईश्वर सर्वव्यापित्व ह्या दोन्ही लोकपरिचित तत्वांचें ऐक्य, अथवा परमात्मा व इहलोकीं मानवरूप धारण करणारा जीवात्मा किंवा अवतारी पुरुष सगुणेश्वर हे दोन्ही एकच आहेत, अशा तऱ्हेचीं तत्वें जशीं इतर ग्रंथांतून सांपडतात तशीं भगवद्गीतेंतहि सांपडतात. व अशा रीतीनें 'सगुणोपासना व निर्गुणोपासना या परस्परविरोधी भासणाऱ्या तत्वांची भगवद्गीतेंत सुसंगति लावलेली आहे. श्रीकृष्ण आपणास परमात्मा व विश्वकर्ता ज्यांत म्हणवितो असे श्लोक भगवद्गीतेंत एकामागून एक आलेले आढळतात,व त्या श्लोकांमध्यें वेदांतील व उपनिषदांतील व त्याप्रमाणेंच ब्रह्म व परमात्मा—यांविषयींचीं तत्वें वर्णलेलीं दिसतात. यावरूनच भगद्गीता हें वेदांततत्वानुसार रचलेलें एक निर्गुण भक्तीचें काव्य असावें व नंतर त्यास वैष्णवांनीं सगुण भक्तीचेंहि समर्थन करणारें काव्य बनविलें असावें' असें कांहीं पाश्चात्य विद्वानांचें म्हणणें आहे.

गार्बेच्या मतें भगवद्गीता प्रथम सगुण भक्तीचेंच एक काव्य असावें असें आहे व हें मत सिद्ध करण्याचा गार्बेनें केलेला प्रयत्न कित्येकांच्या मतें सफल झाला आहे.

ईश्वर सर्व चराचरांत भरलेला आहे असे सर्वभूतात्मैक्यदर्शक श्लोक भगवद्गीतेंतून सहज निवडून काढतां येतात. भगवद्गीतेंतील सातशें श्लोकांतील निदान एकशें सत्तर श्लोक गार्बेच्या मतें ब्राह्मणी धर्मानुसार व वेदांततत्वानुसार मागाहून घातले असावेत. जर गार्बेनें छापलेली भगवद्गीता वाचली तर त्यांत बारीक अक्षरांत लिहिलेले श्लोक वगळले तर बिलकुल विसंगतपणा अगर तुटकपणा दिसून येत नाहीं. उलट कांहीं ठिकाणीं असे बारीक टाइपांत छापलेले श्लोक वगळले तर तुटकपणा नाहींसा होतो असें विंटरनिट्झनें म्हटलें आहे. याच्या उलट होल्ट्झमन नांवाच्या एका विद्वानानें, गीता ही, परमेश्वर हा निर्गुणनिराकार व ज्ञानगम्य आहे या मताचें प्रतिपादन करणारी आहे, असें म्हटलें आहे; व त्यानें गीतेंतील सगुण परमेश्वरासंबंधीचे जे श्लोक आहेत ते प्रक्षिप्त म्हणून ठरविले आहेत. अशा प्रकारचीं हीं पूर्णपणें परस्परविरुद्ध व धाडशी विधानें दृष्टीस पडतात. मोकळ्या मनानें व बारकाईनें जर मूळ भगवद्गीता हा ग्रंथ वाचला तर आपणास आशिया व यूरोपखंडांत भगवद्गीतेची प्रशंसा व तिजविषयींचा आदर इतका कां दिसून येतो याचें कित्येकांनां आश्चर्य वाटतें त्याचा उलगडा होईल. पण आत्मविद्येचीं गूढ व पवित्र तत्वें थोडक्यांत पण असंदिग्ध रीतीनें सांगून त्यांच्या आधारें मनुष्यमात्रास आपल्या आध्यात्मिक पूर्णावस्थेची म्हणजे परमपुरुषार्थाची ओळख करून देणारा आणि त्याबरोबरच भक्तीची ज्ञानाशीं व अखेर या दोहोंचीहि शाश्वत: प्राप्त होणाऱ्या व्यवहाराशीं सोपपत्तिक व सुंदर जोड घालून संसारांत भांबावून गेलेल्या यतांस शांति व निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा यासारखा दुसरा बालबोध ग्रंथ संस्कृतांतच काय पण जगांतील इतर वाङ्मयातहि सांपडणें दुर्मिळ होय. या दृष्टीनें गीचेी जी जगांत प्रशंसा झाली ती अगदीं योग्यच आहे.

बोधलिंग म्हणतो कीं भगवद्गीतेंत ज्याप्रमाणें उच्चतम सुंदर विचार ग्रथित केलेले आढळतात, तशींच दोषस्थळें, असंबद्धता, पुनरुक्ति, अतिशयोक्ति, विक्षिप्तपणा दिसून येतो. पण केवळ काव्य या दृष्टीनें जरी आपण त्याचें परीक्षण केलें तरी सुद्धां तत्वज्ञानाचीं गूढ तत्वें, इतक्या सुलभ व प्रासादिक भाषेंत, समजून सांगणारा दुसरा ग्रंथ नाहीं, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. गीता ग्रंथ कांहीं काव्यदृष्टीनें लिहिला नाहीं हें उघड आहे. पण बायबलची भाषा जितकी प्रासादिक आहे त्यापेक्षा गीतेंतील भाषा अधिक प्रासादिक आहे हें कोणालाहि कबूल करावें लागेल. यूरोपीय पंडित व हिंदुस्थानांतील भाषाशास्त्रज्ञ यांच्या मतें केवळ विचारप्रागल्भ्य व अगाध ज्ञान भगवद्गीतेंत दिसून येतें म्हणूनच या ग्रंथाचा लौकिक सर्व यूरोपखंडांत भरतखंडांत झाला असें नाहीं तर या ग्रंथांत काव्यसौंदर्य, भाषेचा जोरदारपणा, सुंदर उपमा, पावित्र्य व गांभीर्य सांपडतें व ग्रंथाविषयीं पूज्यबुद्धि असल्यानें वाचकाचें मन वळतें व त्यायोगेंच सर्व जगभर या ग्रंथाची थोरवी वाढली आहे.

आज ज्या स्वरूपांत भगवद्गीता ग्रंथ उपलब्ध आहे त्या स्वरूपांतच पहिल्या शतकापासून आजतागायत हा ग्रंथ वेदांत, तत्वज्ञान व धार्मिक कल्पना यांच्या साठ्यासारखा होता असें नाहीं व त्यामुळेंच भरतखंडामध्यें अतिशय लोकप्रिय धार्मिक ग्रंथ म्हणून नांवाजला गेला असेंहि नाहीं. तो ग्रंथ प्रथम विशिष्टमतप्रधान असून नंतर अनेकमत—संगतिपर बनला असावा असें वाटतें. एका संशोधकानें सिद्ध केल्याप्रमाणेंच प्राचीन भगवद्गीता ग्रंथ सांख्य तत्वानुसार रचिला असेल. सांख्ययोगांत प्रकृति आणि पुरुष यांमधील पूर्ण भेद सांगितला आहे. आत्म्याचें विविधत्व व प्रकृतीचें नित्यत्व व अनावलम्बित्व त्यांत मानलें आहे. हें सर्व विश्व मूलप्रकृतीच्या विकृतीपासून उत्पन्न झालें आहे. व उपनिषदांप्रमाणेंच प्रकृतिपुरुषाच्या यथार्थ ज्ञानानेंच मोक्ष प्राप्त होतो असें यांत मानिलें आहे. उपनिषदांतील एकेश्वरवादतत्वाशीं हीं सर्व तत्वें बिलकुल जुळत नाहींत. परंतु वेदांततत्वज्ञानाला भगवद्गीतेंत वेदांततत्वें दृष्टीस पडतात सांख्य व योग यांच्या यांतील विवेचनांत बरेंच साम्य सांपडतें. दोन्हींही पंथांचीं मूलतत्वें जवळ जवळ एकच आहेत. मानसशास्त्र, तर्कशास्त्र, अध्यात्मविद्या व ज्ञानसंपादन सांख्ययोगांत जास्त लागतें. व योगामध्यें विशिष्ट प्रकारचें आचरण करावें लागतें. भगवद्गीतेंत "कर्तव्यकर्मानुसार योग्य आचरण करणें" यास "योग" म्हटलें आहे; व सांख्य म्हणजे यथार्थ ब्रह्मज्ञान संपादन करणें होय.

भगवद्गीता-काव्य हा एक कर्मयोग शिकण्याला मुख्य ग्रंथ आहे. सांख्ययोग हें एक उत्कृष्ट प्रकारचें तत्वज्ञान आहे असें भगवद्गीतेंतच काय पण सर्व महाभारतांत कथन केलेलें आहे. कांहीं ठिकाणीं भगवद्गीतेंत योग म्हणजे केवळ आचार-नीतिशास्त्र होय असें दिसतें. परंतु भारतीय वाङ्मयामध्यें योग म्हणजे मन एकाग्र करून ब्रह्मचिंतन करणें किंवा ध्यानैकाग्रतेनें समाधि लावणें असें मानलेलें आहे. भौतिक स्थूल शरीरांतून जडात्म्याला सोडवून विश्वव्यापी जो परमात्मा त्याशीं तादात्म्य पावण्यास लावण्याविषयीं जे मार्ग कथन केले आहेत ते योग शब्दांत समाविष्ट होतात. योगमार्गाचा सांख्याप्रमाणें वेदांताशींहि निकट संबंध आहे. सर्व धर्माच्या लोकांची, योगी म्हणजे सज्जन लोकांनीं ठरविलेली सर्वोत्कृष्टपणाची अनुकरणीय प्रतिमा किंवा एक नमुनेदार यंत्र अशी कल्पना आहे. आजच्या भगवद्गीतेस सांख्य किंवा वेदांत पक्षाचा ग्रंथ न म्हणतां अनेकमतसंगतिपक्षाचा ग्रंथ म्हटल्यास अधिक योग्य होईल. भगवद्गीतेंत जरी वेदांतील यज्ञयागादि आचार वर्णन केलेले नाहींत व त्यापासून मुक्ति मिळते असें जरी कथन केलें नाहीं तरी वैदिक पद्धतीनुसार ठरविलेले यज्ञ व त्यांच्यासंबंधीं वेदांतसूत्रें घालून ब्राह्मणी यज्ञाची गीतेंत शिफारस केलेली आढळते. सर्व प्रकारचे तत्वज्ञानी व निरनिराळ्या पंथाचे लोक भगवद्गीतेकडे का ओढ घेतात हें वरील गोष्टीवरून सहज लक्षांत येतें. एखाद्या ब्रह्मावर विचार करणाऱ्याची जितकी महती भगवद्गीतेच्या दृष्टीनें आहे तितकीच महति एखाद्या कर्मठ ब्राह्मणाला सुद्धा भगवद्गीतेंत दिलेली आहे. महाभारतांतील इतर सर्व तत्वज्ञान शिकवणारे बोधप्रद भाग भगवद्गीतेप्रमाणेंच महत्वाचे आहेत. सांख्ययोग व कर्मयोग यांचींच तत्वें प्रामुख्यानें भगवद्गीतेंत बारकाईनें वर्णिलेलीं आढळतात व उच्चतम ज्ञान मिळविण्यास हेच दोन मार्ग आहेत अशी शिफारस केलेली आहे. महाभारतांत उद्योगपर्वामध्यें एकेचाळीस ते शेचाळीस या अध्यायांतून सनत्सुजातानें प्रतिपादिलेलीं तत्वें बहुतेक वेदांतपर आहेत, व अनुगीता हें भगवद्गीतेचेंच एक अनुकरण आहे. हा ग्रंथ मागाहून लिहिला गेला व यांत बऱ्याच तत्वांची भेसळ केलेली आहे. भगवद्गीतेशीं तुलना करितां तत्वज्ञानानें भरलेल्या भारतांतील इतर भागांपैकीं कोणताहि भाग काव्यदृष्ट्या कमी प्रतीचा ठरेल.

भगवद्गीता ग्रंथाची अल्पावधींतच लोकमान्यता झाल्यामुळें, त्याचें अनुकरण सर्वत्र होऊं लागावें यांत आश्चर्य नाहीं. अशा प्रकारची अनुकरणप्रियता आपल्याला सर्वत्र आढळून येते. कालिदासाच्या मेघदूताचें अनुकरण करून नेमीदूत, काकदूत, पिकदूत इत्यादि अनेक काव्यें लिहिलीं गेलेलीं आढळतात, तीच स्थिति गीतेसंबंधींहि दृष्टोस पडते. खुद्द महाभारतांतच शांतिपर्वान्तर्गत मोक्षपर्वाच्या कांहीं फुटकळ प्रकरणांस पिंगलगीता, शंपाकगीता, मंकिगीता, बोध्यगीता विचख्युगीता, हारीतगीता, वृत्रगीता, पराशरगीता व हंसगीता अशीं नांवें दिलेलीं असून अनुगीतेच्या एका भागास ब्राह्मणगीता अशी निराळी विशिष्ट संज्ञा आहे. या खेरीज अवधूतगीता, अष्टावक्रगीता, ईश्वरगीता, उत्तरगीता, कपिलगीता, गणेशगीता, देवगीता, पांडवगीता, ब्रह्मगीता, भिक्षुगीता, यमगीता, रामगीता, व्यासगीता, शिवगीता, सूतगीता, सूर्यगीता वगैरे दुसऱ्याहि गीता प्रसिद्ध आहेत. अवधूत, अष्टावक्र वगैरे गीता कोणत्या पुराणांतील आहेत अथवा पुराणांतील नसल्या तर त्या स्वतंत्र रीतीनें कोणीं व व केव्हां रचिल्या याचा पत्ता लागत नाहीं. तथापि हे सर्व ग्रंथ भगवद्गीता सर्वमान्य झाल्यावरच रचिले गेले असें उघड दिसतें.

गी ता का ल नि र्ण य—कोणत्याहि ग्रंथाचे बहिरंग व अंतरंगपरीक्षण असे सामान्यतः दोन भाग पडतात. अंतरंग परीक्षण हा भाग या दोहोंत अधिक महत्वाचा असला तरी बहिरंगपरीक्षणाचें महत्व कांहीं कमी आहे असें नाहीं. गीतेच्या बाबतींत तर हें बाहिरंगपरीक्षण फार महत्वाचें आहे. बाहिरंगपरीक्षणात गीताकालनिर्णयाचा प्रामुख्यानें अंतर्भाव करणें जरूर आहे. गीताकालनिर्णय झाल्यास गीतेंतील अंतरंगावर पुष्कळच प्रकाश पडण्यासारखा आहे. गीता ही ख्रिस्ती शकानंतर रचिली गेली असावी असें बहुतेक पाश्चात्य विद्वान् व त्याप्रमाणेंच आपल्या इकडील कांहीं विद्वानांचें मत आहे. गीता जितकी अर्वाचीन ठरेल तितकी ठरविण्याचा या पाश्चात्य विद्वानांचा हेतुपुरःसर प्रयत्न असतो हें डॉक्टर लॉरिन्सर अगरडे व्हीडा यांच्या ग्रंथांवरून दिसून येतें. गीता अर्वाचीन ठरवून नंतर तींत ख्रिस्ताचीं भक्तिमार्गाचीं तत्वें आलीं आहेत व ख्रिस्ताच्या भक्तिमार्गाचा गीतेवर फार परिणाम झाला आहे असें ठरविण्याचा या विद्वानांचा प्रयत्न असतो. पण सुदैवानें गीता ही कांहीं झालें तरी ख्रिस्ताच्या पूर्वी रचिली गेली असल्याचें अनेक प्रमाणांनीं सिद्ध करता येतें. डॉ. भांडारकर, के. तेलंग इत्यादि विद्वानांनीं हल्लींच्या गीतेचा काल ख्रिस्ती शकापूर्वी ठरविला आहे. हल्लीं नुकतीच जीं भासाचीं नाटकें सापडलीं आहेत त्यावरून देखील हेंच अनुमान दृढ होतें. भासकवीचा काल अगदीं अलीकडे ओढला तरी ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकाच्या पुढें नेता येत नाहीं हें निर्विवाद आहे. त्याच्या कर्णभार नाटकांत बारावा श्लोक पुढीलप्रमाणें आहे.

हतोऽपि लभते स्वर्गं जित्वातु लभते यशः ।
उभे बहुमते लोके नास्ति निष्फलता रणे ॥

हा श्लोक गीतेंतील 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं' या श्लोकाशीं समनार्थक आहे. भासाला महाभारताचा पूर्ण परिचय होता हें त्याच्या नाटकांवरून दिसून येतें; त्याअर्थी वर लिहिलेला श्लोक रचतांना त्याच्या डोळ्यापुढें गीतेचा श्लोक असावा असें अनुमान करतां येतें; पण सर्वांत बलवत्तर प्रमाण म्हणजे बौधायन गृह्यशेषसूत्रांत 'देशाऽभाव

द्रव्याऽभावे साधारणे कुर्यान्मनसा वाऽर्चयेदिति। तदाह भगवान् ॥ पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मन इति ॥ असा गीतेतील नवव्या अध्यायांतील २६ वा श्लोक ' यथाह भगवान् ' म्हणून स्पष्ट घेतला आहे. त्याचप्रमाणें याच गृह्यशेषसूत्राच्या तिसऱ्या प्रश्नाच्या शेवटीं ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हा द्वादशाक्षरी मंत्र जपला म्हणजे अश्वमेधाचें फल मिळतें असें स्पष्ट म्हटलें आहे. यावरून बौधायनाच्या पूर्वी गीता व वासुदेवभक्ति सर्वमान्य झालेली होती असें दिसतें. याशिवाय बौद्धग्रंथांमध्यें गीतेतील श्लोकांशीं सदृश अशीं कोणतीं वाक्यें आढळतात व मूळ बौद्धधर्म हा निवृत्तिपर असतांना गीतेच्या शिकवणीमुळें लोकप्रिय झालेल्या कर्मयोगाची छाप कशी पडलेली आहे हें लो. टिळकांनीं आपल्या गीतारहस्यात सप्रमाण सिद्ध केलेलें आहे. या वरील सर्व प्रमाणावरून गीता ही ख्रिस्तीशकापूर्वी तीन शतकें तरी अस्तित्वांत होती असें निर्विवाद सिद्ध होतें.

गीता ही उपनिषदें व वेदान्तसूत्रें यांच्याप्रमाणेंच धार्मिक तत्वज्ञानाची पूर्ति करणारा ग्रंथ या नात्यानें प्रस्थानत्रयीमध्यें गणली जाऊं लागल्यामुळें वैदिक धर्माच्या निरनिराळ्या संप्रदायाच्या आचार्यांनीं आपापल्या संप्रदायांची वेदमूलकता व प्रामाण्य सिद्ध करण्यासाठीं गीतेवर भाष्यें लिहिण्यास सुरुवात केली. याशिवाय इतर पुष्कळ पंडितांनींहि स्वतंत्र रीतीनें गीतेवर भाष्यें लिहिलीं आहेत. पण हल्लीं असलेल्या गीतेवरील भाष्यांमध्यें व टीकांमध्यें बहुतेक भाष्यें व टीका, सांप्रदायिक आचार्यांच्या अगर पंडितांच्या आहेत. या संप्रदायांपैकीं अतिशय प्राचीन संप्रदाय म्हणजे शंकराचार्यांचा होय. यांची ' गीताभाष्य ' म्हणून गीतेवरील टीका प्रसिद्ध आहे. यानंतर रामानुजाचार्यांनीं गीतेवर एक भाष्य दहाव्या शतकांत लिहिलें. त्यांत त्यांनीं शंकराचार्यांच्या अद्वैत मताचें खंडण करून विशिष्टाद्वैत मताचें प्रतिपादन केलें आहे. रामानुजाचार्य हे भागवतधर्मी असल्यामुळें भागवत धर्मात विशिष्टाद्वैत मत शिरण्यास यांचेच ग्रंथ कारणीभूत झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतर द्वैती संप्रदायाचे प्रसिद्ध प्रवर्तक मध्वाचार्य उर्फ आनंदतीर्थ यांनीं ' भगवद्गीता तात्पर्यनिर्णय ', ' भगवद्गीताभाष्यविवरण ' इत्यादि ग्रंथ लिहून जीव व शिव हे दोन्हीहि भिन्न असून त्यांचें पूर्ण ऐक्य होणें शक्य नाहीं असें तत्व प्रतिपादन केलें. वल्लभाचार्यांनीं १५ व्या शतकांत शुद्धाद्वैत मताचें प्रतिपादन करण्यासाठीं गीतेवर भाष्य लिहिलें. रामानुजाचार्यांनंतर पण मध्वाचार्यांच्या पूर्वी होऊन गेलेले निंबार्काचार्य यांनीं जो संप्रदाय काढला त्या संप्रदायांतील केशव काश्मीरिभट्टाचार्य यांनीं ' तत्वप्रकाशिका ' नांवाची एक टीका लिहिली आहे. या संप्रदायास 'द्वैताद्वैती संप्रदाय' हें नांव देतां येईल. यांच्याशिवाय गीतेवर इतर भाष्यें पुष्कळच आहेत. त्यांपैकीं श्रीधराची सुबोधिनी, हनुमद्भाष्य; आनंदाची 'स्वात्मानंदविवर्धिनी' जयतीर्थांची ' प्रमेयदीपिका ' व ' न्यायदीपिका,' जगद्धराची ' गीतार्थदीप ' टीका, नीलकंठाची ' भावदीपिका,' मधुसूदनाची ' गूढार्थदीपिका,' राघवेंद्रकृत ' भगवद्गीतार्थसंग्रह ' वनमालीकृत ' गूढार्थचंद्रिका ', विज्ञानभिक्षुकृत गीतेवरील टीका; वेदान्ताचार्यांची ' भगवद्गीतातात्पर्यचंद्रिका ', शंकरानंदाची ' भगवद्गीतातात्पर्यबोधिनी ', क्षीरस्वामीकृत ' सुबोधिनी ', सदानंद व्यासकृत ' भावप्रकाश ' सूर्यपंडितकृत ' परमार्थप्रभा ', श्रीकृष्णानंदस्वामीकृत ' गीतार्थपरामर्श ' इत्यादि टीका प्रसिद्ध आहेत यांशिवाय निरनिराळ्या भाषांत टीका व भाष्यें झालीं आहेत तीं वेगळींच. मराठींत ज्ञानेश्वरमहाराजांनीं गीतेवर भावार्थदीपिका नांवाची एक टीका लिहिली आहे. हीसच ज्ञानेश्वरी असें म्हणतात. वारकरी पंथाचा हा सर्वांत महत्वाचा व परमपूज्य ग्रंथ होय. त्यांत त्यांनीं गीतेचें भक्तिपर विवरण केलें आहे. याशिवाय वामनपंडिताची ' यथार्थदीपिका ' नांवाची गीतेवर एक ओवीबद्ध विस्तृत टीका असून त्यानें गीतेचें समश्लोकी भाषांतरहि केलें आहे. महानुभावांनाहि गीता मान्य आहे परंतु त्यांनीं त्यांतील तत्वांचें आपल्या संप्रदायानुरूप निराळें प्रतिपादन केलें आहे. त्यांनीं " संभवामि युगेयुगे " याचा अर्थ चार युगांत ईश्वराचे चार अवतार होणार आहेत. पैकीं दत्त, हंस व कृष्ण हे अनुक्रमें कृत, त्रेत आणि द्वापर युगात होऊन गेले असून कलियुगांत प्रशांत हा अवतार व्हावयाचा आहे असें प्रतिपादलें आहे. अलीकडे गीतेवर गद्य व पद्य अशा टीका थोड्या फार झाल्या आहेत. पद्यात्मक टीकेंत बाबा गर्दे कृत ' पंचदशी,' विष्णुबुवा ब्रह्मचारीकृत ' भगवद्गीता सेतुबंधिनी ' पद्बोधिनी गीता, देसाईकृत ' भगवद्गीता यथार्थबोधिनी ' (यथार्थदीपिकेचें गद्य स्वरूप) इत्यादि अनेक टीका प्रसिद्ध झाल्या आहेत. गद्यात्मक टीकेमध्यें कै. लो. टिळक यांच्या गीतारहस्याला अग्रस्थान देणें जरूर आहे. गीतारहस्यावर टीका करण्याच्या निमित्तानें य. व्यं. कोल्हटकर यांनीं गीताधर्म हें पुस्तक लिहिलें आहे. परशुराम गोविंद चिंचाळकर उर्फ गोविंदसुत यांनीं रहस्यनिरीक्षण पुस्तक लिहिलें आहे. याशिवाय चिं. ग. भानूकृत भगवद्गीता (षडाध्यायी-प्रथम, द्वितीय, तृतीय व उपसंहार), सातवळेकर कृत ' भगवद्गीतासार ', गुंजीकरकृत ' भगवद्गीता सुबोधचंद्रिका ' हंसकृत ' भावार्थसारगीतासुधा ' इत्यादि टीका प्रसिद्ध आहेत. समाजशास्त्र व नीतिशास्त्र दृष्ट्या गीतार्थविवरणाचा प्रयत्न म्हणून पाश्चात्य तत्वज्ञानादि शास्त्रांचें गीतेंत मूळ दाखविण्याचा गीताभाष्यांत रा.शं.रा. राजवाडे यांनीं प्रयत्न आरंभला आहे.गीतारहस्याचा व तदनुरोधानें गीतेचा अभ्यास करण्याकरतां नुकतेंच कै. लो. टिळक यांचे नातू ग. वि. केतकर यांनीं ' गीता-धर्म-मंडळ ' स्थापन केलें आहे.

[संदर्भग्रंथ. - गॉर्बे—इंट्रोडक्शन टु दि भगवद्गीता—मॅकीकनकृत इंग्लिश भाषांतर (१९१८ मुंबई);हॉपकिन्स—

दि ग्रेट एपिक; रिलिजन्स ऑफ इंडिया; वेबर—इंडिया स्टुडिओ; बार्थ–रिलिजन्स ऑफ इंडिया; होल्ट्झमन् ' दि महाभारत अँड इट्स पार्ट्स';न्या तेलंग–'गीता' (सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट सीरिज); सतिनाथ तत्वभूषण–कृष्ण अँड गीता; डॉ. भांडारकर–'शैविझम, वैष्णविझम अँड अदर सेक्ट्स'; चिं. वि. वैद्य–'महाभारताचा उपसंहार'; बा. गं. टिळक-श्रीमद्भगवद्गीतारहस्य (चतुर्थ आवृत्ति १९२३); डॉ. कुर्तकोटी–'हार्ट ऑफ दि गीता'; प्रो. डॉयसेन–'फिलासफी ऑफ दि उपनिषद्स'; फरकहर–'रिलिजन्स ऑफ इंडिया';]

गुइमे—हा फ्रेंच औद्योगिक रसायन शास्त्रवेत्ता व्हारॉन येथें १७९५ त जन्मला. याचें शिक्षण पॅरिस येथें झालें. वैडूर्य नांवाच्या रत्नापासून त्यानें समुद्रपार (अल्ट्रामरीन) नांवाचा पदार्थ तयार केला व तो पदार्थ मोठ्या प्रमाणावर तयार करण्याकरितां त्याचा कारखानाहि काढला.तो १८७१ त मरण पावला.

गुगेरा, त ह शी ल.—पंजाब. मॉंटगॉमेरी जिल्हा.हींतून रावी नदी जाते. क्षेत्रफळ ७८० चौ. मै. वस्ती (१९११) ९७७७०. खेडीं-२९८. मुख्य ठिकाण-गुगेरा गांव. सारा व कर मिळून उत्पन्न (१९०३–४) १,३३,००० रु. दक्षिण भागांत रावी व बिआसचें जुनें वळण यांच्यामध्यें सतलज खोरें आहे. रावीच्या दोन्ही बाजूच्या पट्टयांनां कालव्यांनीं पाण्याचा थोडासा पुरवठा होतो.देग नांवाचा प्रवाह वेगानें व खोल वहात येऊन गुगेराजवळ रावीला मिळतो.

गुग्गुळाचें झाड—हा एका कांटेरी झाडाचा सुगंधी निर्यास आहे. या झाडाच्या सुमारें ८० जाती आहेत, यास लॅटिनमध्यें कॉम्मिफेरा म्हणतात. कांहीं झाडापासून गुग्गुळ, कांहीं झाडापासून उटणें व कांहीं झाडापासून हिराबोळ उत्पन्न होतो.

कॉ म्मि फो रा अ गा लो चा.—ह्याला गुगळ, म्हशाबोळ हीं नांवें आहेत. पूर्वबंगाल, सिलहट व आसाम यांमध्यें हीं झाडें होतात. ह्या झाडापासून गुग्गुळ होतो असा पूर्वी समज होता परंतु या झाडापासून निघालेला पदार्थ गुग्गुळ नसून त्याची हिराबोळांत भेसळ करतात.

कॉ. मु कु ल.—ह्याला गुग्गुळ, गुक्कल,मुकुल, मैशाक्षि हीं नांवें आहेत. हीं झाडें काठेवाड, राजपुताना, वऱ्हाड, खानदेश व सिंध प्रांतांतील रुक्ष प्रदेश यांमध्यें होतात. या झाडावर हिंवाळ्यांत खोचा कराव्या लागतात. याच्या चिकाचा रंग हिरवट व उदी असतो. उमरावती प्रांतांत गुग्गुळ पुष्कळ होतो. गुग्गुळ चुन्यांत मिसळून उत्तम सिमेंट तयार होतें. महारोग, संधिवात इत्यादि रोगांवरहि याचा उपयोग करतात. याचा ठोक भाव ४ रुपयास १ मण असतो. किरकोळ ६ आणे शेर विकतात. पुष्कळसा गुग्गुळ परदेशांतून येतो. तो आफ्रिका, अरबस्तान व मक्का येथून बहुधा हिंदुस्थानांत येतो.करम अथवा बंदाकेरम या प्रकारचा गुग्गुळ उत्तम असतो.त्याच्या खालोखाल चिनईबोळ हा आहे. गुग्गुळ आफ्रिका व अबिसिनीयामधून लंडन शहरीं जातो. मुंबईहून लंडन येथें जाणाऱ्या गुग्गुळाला 'रेड झांझीबार' हें नांव देतात. गुग्गुळाच्या धूपाकरितां धूप पहा. [वाट].

गुंज—या वेलीस लॅटिनमध्यें ॲब्रस पिकेटोरिअस संस्कृतांत काकजंघा, शिखंडिनी, गुंजा, भीलभूषणा, श्यामालचूडा, मराठींत गुंज अशीं नांवें आहेत. संस्कृत काव्यांत गुंजाचें वर्णन आढळतें उदा. " किं जातु गुंजाफलभूषणानां। सुवर्णकारेण वने चराणाम् ॥" असें विक्रमांकदेव चारिताच्या प्रारंभीं बिल्हण वर्णन देतो. ही सुंदर वेल हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांतील सपाटीच्या प्रदेशांत, तसेंच हिमालय व इतर डोंगराळ मुलुखांत ३००० फूट उंचीपर्यंत आढळते. ह्या वेलीच्या चकाकणाऱ्या लहान लाल बियांचा म्हणजे गुंजांचा सोनार लोक चांदी व सोनें तोलण्याकडे वजनासारखा उपयोग करतात. आठ गुंजांचें वजन एक माशाबरोबर धरतात व बारा मासे म्हणजे एक तोळा याप्रमाणें सोन्याचें वजन करण्याचा प्रघात आहे. प्रत्येक गुंजेचें वजन अजमासें १॥। ग्रेन असतें. लाल गुंज अतिशय विषारी आहे. व तिचा केव्हां केव्हां फार वाईट रीतीनें प्राणघात करण्याकडे उपयोग केला जातो. थंड पाण्यांत लाल गुंजा भिजवून गंधासारख्या बारीक वाटून त्यांपासून एक सुईसारखी काडी तयार करतात. ती बैल अगर मनुष्याच्या कातड्यांत खुपसली असता, थोड्याच वेळांत मृत्यु येतो. हें विष सर्पाच्या विषाच्या जातीचें आहे परंतु त्याच गुंजा पाण्यांत उकळल्या असतां त्यांतील विष नाहींसें होऊन मग त्या खाल्ल्या असतां अपाय होत नाहीं असें म्हणतात.

गुंजा लाल व पांढऱ्या अशा दोन जातीच्या आहेत. यांचीं पानें साधारण चिंचेच्या पानांसारखीं बारीक लांबट असतात. गुंजेच्या दोन्हीहि जातींचे वेल सारखेच दिसतात. पांढरी गुंज औषधीकामाकडे जास्त उपयोगी पडते.

औ ष धी उ प यो ग.—गुंजेचें मूळ बाजारांत कित्येक वेळां ज्येष्ठमधाऐवजीं देतात. [वाट].

गुजर—या जातीच्या नांवाच्या उत्पत्तीबद्दल विद्वानांत फार मतभेद आहेत. कनिंगहॅम, कॅंबेल, स्मिथ हे पाश्चात्य यांनां परकीय बाह्य, यूएची, शक, गूर्ग, खजर, जुजू किंवा गोरे हूण म्हणतात व आपल्या इकडील चिंतामणराव वैद्यादि विद्वान त्यांनां मूळचे आर्यच म्हणतात.

गुजर म्हणजे गाई राखणारा (गोचिर किंवा गौचार) अगर गाई चोरणारा (गोचार) अशीहि या नांवाची व्युत्पत्ति परकीय इतिहासकार देतात. फारशी भाषेंतील गुर्ग (लांडगा) या नांवाचा गुजर नांवाशीं संबंध आहे असाहि त्यांचा एक तर्क आहे. हे परकीय बाह्य लोक ख्रि. श. च्या पहिल्या पांच शतकांत इकडे आले असावेत असें वरील तर्कवाद्यांचें म्हणणें आहे.कुशान सत्तेचा नाश होईपर्यंत गुजर(किंवा गुर्जर) यांचा कोठेंहि उल्लेख येत नसल्यानें ते कुशानवंशीय होत हें

कानिगहॅमनें म्हणणें लटकें ठरतें. तसेंच हूणांच्या विजयांत खजरांचें नांवहि येत नाहीं म्हणून गुजर हे खजरहि नाहींत. सारांश प्रचलित दंतकथांवरून यांची खरी माहिती फार थोडी मिळते. सिंधुनद ते गंगानदी व हजारापर्वत ते गुजराथपर्यंतच्या भागांत मुख्यतः यांचा भरणा असून शिवाय वायव्येकडील प्रांत (इ.स.१९११च्या खानेसुमारीप्रमाणें वस्ती ११३८७१), पंजाब (६१०४७२),संयुक्त प्रांत(३६६१९१), राजपुताना (५०००४६),वऱ्हाड मध्यप्रांत (५५७९८), मध्यहिंदुस्थान (१८५७२८)अजमेर (३५०५९), याप्रमाणें सर्व देश मिळून यांची एकंदर लोकसंख्या २१,९९,१९८ आहे. दिल्लीच्या दक्षिणेकडील रिवारीचा राजा गुजर आहे. शिखांचा मोठा भरणा या गुजरांपैकींच आहे. गुजर हिंदु व मुसुलमान दोन्हीहि आहेत.

जाट, गुजर व अहीर या जाती एकाच वंशापासून झाल्या असें इबेटसन म्हणतो. कारण हल्लीं या तिन्ही जाती एकमेकांच्या हातचें खातात. यांचा रजपुतांशींहि संबंध असावा असें त्यांच्यांतील बरागी, चंदेल, चव्हाण व तोमर वगैरे आडनांवांवरून वाटतें. त्यावरून पंजाब व पश्चिमेकडील प्रांत इकडील गुजर हे उच्चवर्णीय असावेत असें दिसतें. गुजर व जाट यांचा दर्जा समान असून त्यांच्या रंगारूपांतहि फरक नसतो. जिप्सी लोक यांच्यापासूनच फुटून निघून पश्चिमेकडे गेले असावे असें त्यांच्या भाषेतील साम्यावरून दिसतें.

खानेसुमारीवरून त्यांच्यांत अनेक गोत्रें अगर कुळ्या आढळून येतात.हिंदु गुजरांच्या११७८व मुसुलमान गुजरांच्या ३८० कुळ्या आहेत. तत्रापि मुख्य कुळ्या ८४ च आहेत. तसेंच भट्टी, तगारी, नद्दवासी, खाप्राई, राटी, दापू वगैरेहि कुळ्या आहेत.

पंजाबांत बड (वडे = मोठे) गुजर व भट्टीगुजर या दोन पोटजाती प्रमुख आहेत. श्रीकृष्ण ज्या कुळींत जन्मले ती आपली बडगुजरांचीच कुळी होय असें हे लोक सांगतात. इकडे मुसुलमान झालेलेहि गुजर आहेत. यांचा धंदा शेतकीचा व गुरें राखण्याचा असून कांहीं लोक सैन्यांतहि दाखल होतात. इकडील शिखांतहि पुष्कळसे गुजर आहेत.

काश्मीरमधील बहुतेक गुजर बाटये मुसुलमान असून ते धनगराचा, व शेतीचा धंदा करतात. तिकडे रणबीरसिंगपुर, रामपुर, राजारी व पंच या प्रांतांत हे राहतात. पंजाबमधील बाटये व हे एकच होत.

कच्छ प्रांतांतील गुजर हे तिकडे वाघेल रजपुतांबरोबरच गलेले आहेत. यांच्याच मदतीनें वाघेलांनां तिकडे राज्यप्राप्ति झाली व त्याबद्दल त्यांनीं यांना शेतीच्या बाबतींत कांहीं हक्क दिले. येथील गुजर स्त्रियांनां गोषा नाहीं. इकडे मकाना, चुनेसर, चावडा, चौहान, गोहेल, डुडिया वगैरे पोटजाती यांच्यांत आहे.

राजपुताना—मारवाडांतील भाटी हे मूळचे गुजर असावेत. कारण त्यांनां भाटी गुजर असें म्हणतात. इकडे चंदेल, भगरावत, चारण, चाप, चेची, झाल्वा, कल्हेणिया, कोर,कुसान गेह्लोट, परिहार, खंड्ग, लोर, मेर,नागरी, नेकाडी, रिंद व सिसोदिया या गुजर पोटजाती आहेत. ज्यानें गुजरस्त्रीचें दूध प्यालें नाहीं तो कोल्हा होय अशी राजपुतान्यांत एक म्हण आहेत.

गुजराथेंत तर यांचा भरणा फार आहे. येथील वाणी, लोहार, कणबी यांनां गुजर म्हणतात; परंतु ते त्यांनां आवडत नाहीं, हें कमीपणाचें दर्शक होय असें ते मानतात. येथील मारवाडी ओसवाल हेहि गुजरच होत. हे गुजर लोक पूर्वी धनुर्विद्येंत फार प्रवीण होते. तसेंच सुंदर इमारती व देवळें वगैरे बांधण्यांतहि ते तरबेज आहेत; पूर्वी हे दर्यावर्दीपणाहि करीत असत.

खानदेशांतहि हे लोक आहेत. त्यांनां तिकडे कुणबी अगर मराठे यांच्याप्रमाणें मानतात. तेथें हे लोक बागाईत करून भाजीपाला विकतात. त्यामुळें कदाचित भाजीबाजारास गुजरी हें नांव मिळालें असावें. हे व्यापारीहि आहेत. गुजरांत गुर्जर ब्राह्मणहि आहेत. हे पूर्वी कोठले रहिवासी होते याच्याबद्दलहि वाद आहेत. पाश्चात्यांच्या मतें बाह्य हूणांनीं (गुजरांनीं) हे आपले उपाध्याय आपल्याच बरोबर आणले. हल्लीं हे श्रावक व इतर गुजरांचे उपाध्याय व देवळांतील पुजारी म्हणून आहेत. बुंदी, अलवारकडील रजपूत ब्राह्मण, मारवाडकडील गौड ब्राह्मण व मेर ब्राह्मण यांचा या गुर्जर ब्राह्मणांशीं थोडाफार संबंध येतो. तसेंच पुष्कर ब्राह्मण व गुजराथेंतील नागरब्राह्मण यांचाहि या गुजर ब्राह्मणांशीं संबंध आहे. नागर हे बुद्धिवान व देखणे असून, गुजराथच्या राज्यकारभारांत ते गेल्या हजार वर्षांत प्रसिद्धीस आले आहेत. नागर याचा अर्थ वेदाचारतर्पानें सुधारलेले असा (ते स्वतः) करतात. नेपाळांतहि नागर ब्राह्मण थोडकेसे आढळतात.

गुजर लोक फार धर्मभोळे असून त्यांनां चारण किंवा भाट यांचा फार धाक असतो व त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धीहि असते. राजा लक्ष्मणसिंह म्हणतो कीं, बुलंद जिल्ह्याकडे पूर्वी (बालहत्याप्रतिबंधक कायद्याच्या आधीं) यांच्यांत मुलींनां लहानपणीं मारण्याची चाल असल्यामुळें—स्त्रियांच्या कमतरतेमुळें बहुपतीत्वाची चाल प्रचारांत होती; कुटुंबांत अनेक भाऊ मिळून एकच बायको असे. पंजाबकडील गुजर हे शैव व शाक्तपंथी असून सीतलाभवानी, चमार या देवतांची व प्याराजी आणि बाबा सोभाराम या साधूंच्या समाधीची पूजाअर्चा करितात. इकडील व राजपुताना—गुजराथ इकडील गुजर हे गुरें चोरणें व पुंडाई करणें यांबद्दल प्रसिद्ध असत. बाबरनें यांच्या या उपसर्गाचा उल्लेख करून ठेविला आहे. जाटांनीं व यांनीं १८५७ मध्यें इंग्रजांनां पुष्कळच त्रास दिला होता.

अयोध्या व मीरत इकडील मुसुलमान बाटये गुजर हे तैमूरलंगाच्या वेळीं बाटलेले आहेत. ते सुनी संप्रदायी असून

त्यांच्या चालीरीती मात्र अगदीं हिंदूंसारख्या आहेत. निका लावण्याचा मुहूर्त वगैरे ठरविण्याचें काम ब्राह्मण करतो. गाझीमिय्या, मदारशहा या मुसुलमान अवलियांप्रमाणें बुद्धिचंद्रबाबासारख्या हिंदु संताचीहि ते पूजाअर्चा करितात. होळी व नागपंचमी हे सण पाळून दर शुक्रवारीं पितरांच्या नांवानें अन्नदान करितात.

मध्यप्रांतांत नेमाड व हुशंगाबादकडे यांची वस्ती जास्त आहे. हे लोक गरीब व मागासलेले असून मुख्यतः शेतीचा धंदा करितात. येथें त्यांच्या लेखा, मुंडल (रेवे) व जादम अशा तीन पोटजाती आहेत. लेखा हे जेवतांना डोकीवर पागोटें ठेवून जेवतात. जादम हे स्वतःस यादववंशी म्हणवितात. कापूस दाबण्याचे कारखाने निघण्यापूर्वी हे कापूस पिंजण्याचा धंदा करीत असत, त्यामुळें त्यांनां लोंढारी म्हणत. हुशंगाबादेकडील ताग पिंजणारे लोन्हा हे यांच्याचपैकीं असावेत. इकडे केकरे अथवा कनवे म्हणून जी पोटजात आहे तिला हलकी समजतात. सोहागपूरकडील लिल्होरिया गुजर म्हणतात कीं श्रीकृष्णाच्या कपाळाच्या घामापासून आमची उत्पत्ति असून आम्हींच पहिल्यानें मुरली वाजविल्यानें मुरेलिया हें आमचें दुसरें नाव पडलें. बडगुजर हे आपल्यास यांचेच वंशज म्हणवितात. याच्यांतील लग्नविधींत अग्नीऐवजीं एका तांब्याच्या पाणी भरलेल्या घागरीभोंवतीं वरास पुढें करून चार, व वधूस पुढें करून तीन, अशा सात प्रदक्षिणा घालणें हा मुख्य विधि आहे. पाट लावण्यापूर्वी मालगुजारास सव्वा रु. कर द्यावा लागतो. हे लोक अविवाहितांचीं प्रेतें पुरतात. लग्नापेक्षा उत्तरक्रियेंत हे फार खर्च करितात. यावेळीं जें जेवण होतें त्यास गुजरवाडा म्हणतात. याच्यांतील कुलदेवतेसाठीं घरांत एक ओटा तयार करावा लागतो व प्रत्येक घरांत असा ओटा असतो. त्यावरील देवतेची पूजा कुटुंबाबाहेरील दुसऱ्या माणसास करतां येत नाहीं. अविवाहित मेलेल्यास मुंजा म्हणून त्याचें श्राद्ध माघ महिन्यांतील सोमवारीं व शुक्रवारीं करितात. याचे गुरु बहुधा गोसावी असतात. गुरु न केलेल्यास गुग्रा (निगुऱ्या) म्हणतात आणि उठल्याबरोबर त्याचें तोंड दिसणें हा अपशकुन मानतात.

नेमाडांत यांचा हिंदुमुसुलमानमिश्रित असा एक पीरजादा पंथ आहे. इकडील गुजरांचा पोशाख हिंदुस्थानी पद्धतीचा असतो. यांच्यांपैकीं कांहीं मालगुजारी करितात. म्हैसूर संस्थानांत बंगलोर येथें यांची वस्ती असून ते बहुतेक इंग्रजांच्या पलटणींत नौकर आहेत. यांच्यापैकीं पुष्कळसे मुसुलमान झालेले आहेत.

[बॉम्बे ग्याझे. पु. १,९; आर्किऑलॉजिकल रिपोर्ट पु २; क्रूक-ट्राइब्ज अॅन्ड कास्टस; सेन्सस रिपोर्ट; १८८१-९१; रोज-ग्लॉसरी २ पु.; इंडियन अँटिक्वरी पु. ५; रसेल अॅन्ड हिरालाल-सी. पी. ग्याझे.; इबेटसन—पंजाब सेन्सस रिपोर्ट].

गुजरखान—पंजाब.रावळपिंडी जिल्ह्याचा एक तालुका. क्षेत्रफळ ५६९ चौ. मै. झेलमच्या कांठानें कांहीं टेंकड्या आहेत. बाकी सर्वत्र मैदान असून त्यांत ओहोळ व नाले बरेच आहेत. लोकसंख्या (१९११) १४८५७१. खेडीं ३८० गुजरखान हें तालुक्याचें मुख्य ठिकाण.

गुजराणवाला, जि ल्हा.—पंजाब. लाहोर विभागांतल एक जिल्हा. क्षेत्रफळ ३१९.८ चौ. मै. सर्व मुलूख सपाट मैदान असून टेंकड्या, खोरी, नद्या, ओढे वगैरे कांहीं एक म्हणण्यासारखें यांत नाहीं. जिल्ह्याची आरोग्याबद्दल ख्याति आहे. येथील रहिवाशी निरोगी व दांडगे आहेत. पावसाचें साधारण मान १८ इंच आहे.

असरुर येथें जुने बौद्धकालीन अवशेष, जुनीं नाणीं व विटा वगैरे सांपडतात. ह्युएनत्संग यानें या खेड्याचा टाकी असा उल्लेख केला आहे. यानंतर मुसुलमानी अमलापर्यंतचा इतिहास संगतवार मिळत नाहीं. मुसुलमानी अमलाखालीं या जिल्ह्याची भरभराट झाली. अकबरापासून औरंगझेबापर्यंतच्या दिवसांत सर्वत्र खेडीं व विहिरी होत्या. बारमध्यें त्यांचे अवशेष अद्याप सांपडतात. पुढें रणजितसिंगानें सर्व प्रदेश आपल्या ताब्यांत आणला. शीख अमलापासून गुजराणवाला जिल्ह्याला उत्कृष्ट प्रतीचा फायदा झाला १८४७-४९ मध्यें येथें इंग्रजी सत्ता स्थापन झाली. या जिल्ह्यांत १७४३ खेडीं व ६ शहरें आहेत. लोकसंख्या (१९२१) ६२३५८१ आहे. याचे ५ तालुके पाडण्यांत आले आहेत.शेंकडा सुमारें ६७ मुसुलमान व सुमारें २३ हिंदु आहेत जमीन हलक्या दर्जापासून मध्यम दर्जापर्यंत आहे परंतु कालव्यांमुळें सर्व भागात पिकाचें मान जवळ जवळ सारखें झालें आहे; व पंजाबच्या अत्यंत सुपीक जिल्ह्यांपैकीं हा एक बनला आहे. गव्हाचें पीक मुख्य आहे. हरभरा, जवस कापूस, तांदूळ, कडधान्य वगैरेहि पिकें आहेत.

थोड्याशा शिसवांच्या झाडांखेरीज विशेष महत्वाचीं झाडे नाहींत. कंकर (चुनखडीचा दगड) हाच काय तो खनिज पदार्थ सांपडतो. रेशमी कपडा थोड्या प्रमाणावर तयार होतें व सुती कापड मात्र बरेंच होतें. गहूं, इतर धान्यें, कापूस गळीतांचीं धान्यें, पितळी भांडी व तूप याची निर्गत होते व लोखंड, साखर व कापड यांची आयात होते. वझीराबाद येथें चिनाबकालव्यांतून येणाऱ्या हिमालयांतील लाकडाचा व्यापार चालतो.

जिल्ह्याचा एकंदर वसूल १४७९०००. जिल्ह्यांत ६ म्युनिसिपल कमेटया, पांच नोटिफाइड एरिया, जिल्हा बोर्ड, वगैरे आहेत पोलिस, दवाखाना, देवी काढणें वगैरेची व्यवस्था इतर ठिकाणाप्रमाणेंच आहे. शेंकडा ३.५ लोक साक्षर आहेत.

त ह सी ल.—गुजराणवाला जिल्ह्याचा एक तालुका. क्षेत्रफळ ७५६ चौ. मै. व लो. सं. (१९११) २९८३५२. यांत दोन शहरें व ४३९ खेडीं आहेत. तालुक्याच्या पूर्वभागची जमीन उत्तम आहे.

शहरः—गुजराणवाला जिल्हा व तालुका यांचें मुख्य ठिकाण. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचें हें स्टेशन असून मोठ्या सडकेवर वसलें आहे. उ. अ० ३२°९' व पू. रे. ७४°११'. लोकसंख्या (१९११) २९४७२. शहर जुनें आहे तरी त्याचें सध्याचें स्वरूप केवळ नवीन आहे व त्याचें श्रेय रणजितसिंगाच्या वडिलांकडे आहे. रणजितसिंगाचा जन्म येथेंच झाला. १८६७ पासून येथें म्यु. कमिटी आहे. धान्य, कापूस, तेल, पितळेचीं भांडीं, लोखंडी पेट्या, हस्तिदंती सामान, कपडा, कुंभारकाम वगैरे माल तयार होतो. व्यापार वाढता आहे. सहासात हायस्कुलें व इतर शाळा आहेत.

गुजराथ, जिल्हा—पंजाब. रावळपिंडी विभागांतला एक जिल्हा. क्षेत्रफळ २०५१ चौरस मैल. चिनाब व झेलम यांच्या मधील हा प्रदेश पंजाबच्या सपाट मुलुखाचा उत्तरेकडचा शेवटचाच भाग होय. उन्हाळ्यांत सुद्धां पर्वतसांनिध्यानें येथील हवा असह्य होत नाहीं. लोकांची प्रकृति उत्तम रहाते. परंतु चिनाब व झेलम कांठानें मलेरिया असतो. पावसाचें मान २५ इंच आहे व या भागाला तें पुरेसें आहे. या जिल्ह्यांत पुराणवस्तू व जागा बऱ्याच आहेत. मोंग हें या बाबतींत विशेष महत्वाचें ठिकाण आहे.

हा भाग प्रथम पोरसच्या राज्यांत होता. नंतर मौर्य घराणें येथें सत्ताधीश झालें. पुढें ग्रीक (बॅक्ट्रीअन) आले व त्यांच्यामागून येथें पठाणी अंमल बसला. मधल्या बऱ्याच शतकांचा इतिहास सापडत नाहीं. पण या मुलुखावर श्वेतहूणांच्या बऱ्याच स्वाऱ्या झाल्या असाव्या. पुढें येथें गुर्जरराज्य झालें. ९ व्या शतकाच्या अखेरीला शंकरवर्मा (काश्मीर) यानें हा भाग पादाक्रांत केल्याचें राजतरंगिणी सांगते. पंधराव्या शतकांत लोदी घराण्याचा अंमल येथें होता. शीरशहा व अकबर यांच्या राज्यांत जमिनीची मोजणी वगैरे झाली, त्या वेळच्या कागदपत्रांवरून असें दिसतें कीं या जिल्ह्यांत त्यावेळीं २५९२ खेडीं होतीं व वसूल १६ लाखांचा होता. नादिरशहा व अहमदशहा यांच्या स्वाऱ्यांपासून या भागाला अत्यंत उपद्रव पोंचला. १७६५ पासून शीख सत्तेचा उदय होऊन मोठा विस्तार झाला. नंतर शीख लोकांची सत्ता नाहींशी होऊन ती इंग्रजांच्या हातांत गेली (१८४९). १८९३ त जिल्ह्याला हल्लींचें स्वरूप आलें. या जिल्ह्यांत ४ शहरें व १३२९ खेडीं आहेत. लोकसंख्या (१९११) ८२४०८६. याचे तीन तालुके पाडले आहेत. शेंकडा ६३ लोक शेतीवर रहातात. जमीन साधारण सुपीक आहे. यांत मोठ्या जमिनदारी नाहींत. १९०३-४ सालीं १९२२ चौरसमैलांपैकीं १३३२ लागवडींत होती. गुरेंढोरें साधारण प्रतीचींच आहेत. घोडे साधारण बरे आहेत. गुजराथ शहरीं वर्षांतून एकदां घोड्यांचा बाजार भरतो. ८३ चौरसमैल राखीव जंगल आहे. गुजराथ येथें उत्कृष्ट प्रतीचें लांकूडकाम तयार होतें. इंग्लिश चेकच्या धर्तीवर सुती कापड निघतें. तागाचीं तरटेंहि येथें तयार होतात. जलालपूर येथें हलक्या जातीच्या शाली आणि साखर तयार होतात. गुजराथ येथें भांडीं व जोडे तयार होतात. गहूं, गळिताचीं धान्यें, कापूस, तेल, तूप आणि कातडीं बाहेर रवाना होतात. कपडा, लोखंड, साखर, मीठ, तांदूळ, भांडीं, लोकर, मसाला हे आयात होतात. गुजराथ हें एक महत्वाचें व्यापारी ठिकाण आहे. या जिल्ह्यांतून नॉर्थवेस्टर्न रेल्वेची शाखा जाते. चिनाब आणि झेलम ह्यांतून नावा चालतात. या जिल्ह्यांत १७८३, १८१५,-३१,-६३,-६९,-७८,-९६,-९७,-९९ व १९०० सालीं दुष्काळ होते. जिल्ह्यांतील रहि शहरीं म्युनिसिपालिट्या आहेत. इतरत्र जिल्हा-बोर्ड काम पहातें. पोलिस व दवाखाने वगैरेंची भामुल व्यवस्थाच आहे. लिहितां वाचतां येणाऱ्यांचें प्रमाण शेंकडा तीनें पूर्णांक तीनदशांश (सहा पूर्णांक एकदशांस पुरुष आणि तीन दशांश बायका) आहे.

तहशील.—गुजराथ जिल्ह्याचा एक तालुका. क्षेत्रफळ ५६९ चौ. मै. उत्तरेकडचा भाग डोंगराळ असून त्यांत ओढे बरेच आहेत. लो. सं. (१९११) ३०४७७८. गुजराथ (मुख्य ठिकाण); जलालपूर व कुंजा हीं तीन शहरें व ५१२ खेडीं या तालुक्यांत आहेत.

शहर.—पंजाब. गुजराथ जिल्ह्याचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण. उत्तरअक्षांश ३२° ३४' व पूर्वरेखांश ७४° ५'. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचें हें स्टेशन आहे. लो. सं. (१९११) १९०९०. इ. स. पूर्वी ५व्या शतकांत बचनपाल रजपूत यानें उदयनगरी या नावानें हें शहर स्थापलें. इ. स. १२०त राणी गुजराण हिनें याची पुनर्रचना केली व ९ व्या शतकांत अलाखान यानें या शहराला पुन्हां उर्जितावस्थेस आणिलें. पुढें या शहराचा पडता काळ आला व नंतर शीरशहा व अकबर यांनीं हल्लींचें शहर वसवलें. जाट लोकांची वस्ती असून येथील सर्व शिबंदी गुजरांची होती. शहाजाहानच्या वेळीं येथें पीर शहादौला रहात असे. येथील किल्ल्याला व शहराला गुजराथ-अकबराबाद म्हणत. या मोंगली अमलाचे अवशेष येथें बरेच आहेत. पुढें येथें शिखांचा अंमल आला व याच ठिकाणीं इंग्रज व शीख यांचे दोन हात होऊन इंग्रजी सत्ता या भागांत कायमची रोंवली गेली (१८४९). येथें म्यु. कमेटी आहे. हें जिल्ह्यांतील व्यापाराचें केंद्र आहे. येथून जिल्ह्यांतला शेतीचा माल बाहेर जातो व त्याबदली विलायती कापड, लोखंड वगैरे माल येतो. येथील प्राचीन व प्रसिद्ध असा शालींचा धंदा पार बुडाला. बुटांचा मात्र मोठा व्यापार आहे. येथें ६ हायस्कुलें, एक इंजिनियरिंग शाळा व बऱ्याच प्राथमिक शाळा आहेत.

गुजराथ प्रांत—हा प्रांत मुंबई इलाख्याच्या ईशान्येस असून, त्याच्या पश्चिमेस आरबी समुद्र, वायव्येस कच्छचें आखात, उत्तरेस छोटेरण व मेवाड, ईशान्येस अबू व अरवलीचे डोंगर व पूर्वेस विन्ध्य व सातपुडा आणि दक्षिणेस तापी नदी आहे. गुजराथचें क्षेत्रफळ ७२ चौ. मै. व लो. सं.

९२ लाखांपर्यंत आहे; पैकीं ५ प्रांत अहमदाबाद, खेडा, पंचमहाल व भडोच या जिल्ह्यांत असून सुमारें ५ हजार चौ. मै. बडोदें संस्थानांत व बाकीचा मुंबईसरकारच्या देखरेखीखालीं असणाऱ्या इतर लहानमोठया संस्थानांत विभागला आहे. पालनपूर, रेवाकांठा, महिकांठा व खंबायत अशा चार एजन्सींत हीं संस्थानें सामावतात. गुजराथचे गुर्जरराष्ट्र (खास गुजराथ) व सौराष्ट्र (काठेवाड) असे दोन मुख्य भेद आहेत. साबरमती, मही, बनास, सरस्वती, नर्मदा व तापी या नद्यांच्यामुळें गुजराथ देश फार सुपीक बनला आहे; त्यांतल्या त्यांत मध्यभागाची जमीन फारच सुपीक आहे. उत्तर, पश्चिम व पूर्व या बाजूस असलेल्या डोंगरांच्या कांठची जमीन रेताड आहे. डोंगराच्या आसपास जंगलेंहि बरींच आहेत. जंगलांतून वाघ, वनगायी, काळवीट, चित्ते वगैरे जनावरें आढळतात. हा प्रांत अत्यंत सुपीक असल्यानें याच्यावर परकीयांच्या व स्वकीयांच्या अनेक वार स्वाऱ्या झाल्या आहेत. त्यांचें ठोकळ कालमान पुढील प्रमाणें होय; पौराणिक यादव, यवन (ग्रीक, शक वगैरे) ख्रि. पू. ३०० ते इ. स. १००; आश्रयार्थ आलेले पारशी व त्यांचे पाठलागी आरब (स. ६००-८००); संगनियन चांचे (९००-१२००); नवायत मुसुलमान (१२५०-१३००); पोर्तुगीज व तुर्क (१५००-१६००); अरब व मुसुलमान चांचे (१५००-१८००), डच, फ्रेंच, आर्मेनियन व्यापारी (१६००-१७५०) व इंग्रज (१७५०-१८१८). हे बहुतेक सारे समुद्राच्या मार्गानें आले. उत्तरेकडून खुष्कीनें हूण, शक (ख्रि. पू. २००-इ. स. ५००); गुर्जर (४००-६००); जाडेजा व काटी (७५०-९००); अफगाणादि मोंगल व तुर्क (१०००-१५००) हे आले. ब्राह्मणांच्या वसाहती उत्तरेकडून होत होत्या (११००-१२००). तसेंच पूर्वेकडून मौर्य (ख्रि. पू. ३००) शकक्षत्रप (ख्रि. पू. १०० -स. ३००); मोंगल (१५३०) व मराठे (१७५०) आले तर दक्षिणेकडून शालिवाहन (१००); चालुक्य; राष्ट्रकूट (६५०-९५०); मुसुलमान; पोर्तुगीज; मराठे व इंग्रज हे आले.

इतिहास--गुजराथ नांव संस्कृत गुर्जरराष्ट्र या नांवापासून बनलेलें आहे. नवव्या शतकांतील लेखांत गुर्जरराष्ट्र असें नांव येतें. येथील प्राचीन राजांना गुर्जरराजे असें म्हणत. हे मूळचे मथुरेकडील असून पुढें गुप्तराजांबरोबर ते राजपुताना-माळवामार्गें गुजराथेंत उतरले. गुप्त घराणें नष्ट झाल्यानंतर हे राज्य करूं लागले. हल्लींच्या गुजराथेंत प्राचीन आनर्त, सुराष्ट्र व लाट या देशांचा समावेश होतो. आनर्त(हल्लीचा उत्तर गुजराथ)ची राजधानी आनंदपूर (वडनगर) होती. गिरनारच्या रुद्रदामनच्या लेखांत आनर्त व सुराष्ट्र हे जुनागडच्या पल्हव सुभेदाराच्या ताब्यांत असल्याचा उल्लेख आहे. सुराष्ट्राला हल्लीं सोरट म्हणतात. लाट म्हणजे मही-तापीकडील दक्षिण गुजराथ होय. हें नांव संस्कृत दिसत नाहीं. महाभारतादि जुन्या ग्रंथांत तें आढळत नाहीं. कदाचित (राष्ट्रकूट) रट्टराजांवरून व जनपदावरून लाट नांव पडलें असावें.

गुजराथेंतील कांहीं स्थलांचा निर्देश पुराणांत आढळतो. बलरामाची बायको रेवती ही आनर्त राजाची कन्या होती. श्रीकृष्णानें मथुरा सोडून द्वारका राजधानी केली, प्रभास व गिरनार येथें यादव यात्रेस जात असत, गिरनारच्याच यात्रेंत सुभद्राहरण झालें, प्रभास येथेंच यादवी झाली व पुढें ओसाड द्वारका समुद्रात बुडाली, वगैरे कथा पुराणांत येतात. या यादवनाशानंतर मौर्यांच्या राजवटीपर्यंत गुजराथची माहिती आढळत नाहीं. मौर्य घराणें (ख्रि. पू. ३१९)राज्य करावयास लागल्यापासून गुजराथच्या इतिहासास प्रारंभ झाला असें म्हणतात. गिरनारच्या लेखांवरून चंद्रगुप्त व अशोक यांची सत्ता गुजराथेवर होती व गिरिनगर(जुनागड)ही त्यावेळची राजधानी होती असें ठरतें. अशोकानंतर दशरथ व नातू संप्रति हे गुजराथचे सम्राट होते. संप्रतीच्या पश्चात मौर्य सत्ता नष्ट होऊन बॅक्ट्रियन ग्रीकांची सत्ता स्थापन झाली. त्यावेळची युक्रेटिडीस (ख्रि. पू. १८०-१५५) मिन्यांडर व अपोलोडोटस यांचीं नाणीं गुजराथेंत सांपडतात. अपोलोडोटसनंतर क्षत्रपांची सत्ता स्थापन होईपर्यंत (स.१००) च्या एक शतकाची माहिती आढळत नाहीं.

क्षत्रपः--हे परकीय होते. पुढें त्यांनीं हिंदुधर्म स्वीकारला. गुजराथेंतलि क्षत्रपांस पश्चिमक्षत्रप घराणें म्हणत. त्यांचा पहिला राजा नहपान हा होता. त्यानें काठेवाड-वलसाड-डांग नाशीक हा मुलुख पादाक्रांत केला. याची कारकीर्द स. १००-१२० पर्यंत होती. कदाचित् आंध्र हेहि त्याचे मांडलिक असावेत. उत्तरगुजराथ मात्र त्यांचे ताब्यांत नव्हता. याच्या नाण्यांवर ग्रीक अक्षरें व त्यांचें नागरीरूपांतर असतें. यानें आपल्यास क्षत्रप उपपद लाविलें नाहीं. त्याच्या नंतर (पुत्र नसल्यानें) त्याचा जावई उषवदात ऋषभदत्त गादीवर आला. त्यानें धर्मशाळा, अन्नछत्रें, घाट, लेणीं, वगैरे अनेक लोकोपयोगी कामें केलीं. हा आपल्यास स्पष्टपणें शक म्हणवी. शालिवाहनशक म्हणजे वस्तुतः नहपानानें गुजराथ ज्या सालीं जिंकला त्या सालापासून सुरू झालेला शक होय. त्यास प्रथम वर्ष, शकवर्ष, शकसंवत्सर म्हणत. त्यालाच हजारअकराशें वर्षांनीं शालिवाहनशक असें नांव पडलें. याचा प्रारंभ इ. स. ७८ या वर्षी होतो. उषवदातापासून (शातकर्णी) आंध्रभृत्यांनीं राज्य घेतलें. चष्टन महाक्षत्रपानें उलट त्यांच्यापासून पुन्हां राज्य परत मिळविलें. याच्या नंतर गुजराथच्या क्षत्रपराजांच्या नाण्यांवर राजाचें, त्याच्या बापाचें नांव व वर्ष हीं दिलेलीं असतात. या सर्वांत रुद्रदामन हा पराक्रमी होऊन गेला. याची माहिती गिरनारच्या शिलालेखावरून बरीच मिळते. सुदर्शन तलावाला त्यानें एक बांध घातला होता; आनर्त व सौराष्ट्र या देशांवर त्याचे सुभेदार

होतें. याची राजधानी बहुधा गुजराथेच्या बाहेर असावी. भिलसा ते सिंध व अबू ते उत्तरकोंकण इतका प्रांत (काठेवाड सुद्धां) त्याच्या ताब्यांत असे. हा फार विद्वान होता. याचा राजकाल स १४३–१५८असावा. याच्या नंतर याचे वंशांतील सोळा जणांनीं राज्य केलें.या वंशांतील शेवटचा राजा विश्वसेन होय (स. ३००). यापुढें (२५०–४५०) गुजराथेवर त्रैकूटक राजघराण्यांचा अंमल होता. त्यांच्या ताब्यांत सबंध गुजराथ नव्हता. त्यांची राजधानी जुन्नर (पुणें जिल्हा) होतें. हे मूळचे आभीर असून पुढें स्वतःस हैहय म्हणवीत. विश्वसेन क्षत्रपाच्या नंतर यांनीं त्याच्या राज्याचे निरनिराळे भाग वांटून घेतले. दक्षिणगुजराथ यांच्या राज्यांत होतें. पुढें (४९५) यांना गुप्त किंवा मौर्य यांनीं नामशेष केलें.

गुप्त व वल्लभीः—गुप्तांनें मूळ राज्य गंगायमुनाअंतरवेंदींत होतें.या वंशांतलि दुसरा चंद्रगुप्त यानें प्रथम गुजराथ जिंकला (४१०). त्याचा मुलगा कुमारगुप्त हा गुजराथचा पहिला गुप्तराज होय. काठेवाडांत याचीं नाणीं फार आढळतात. याचा मुलगा स्कंदगुप्त यानें श्वेतहुणांचा पराभव करून सुराष्ट्रावर पर्णदत्त नांवाचा सुभेदार नेमला. स्कंदानंतर गुप्तघराणें दुर्बळ होत चाललें; तें कसेंबसें हर्षवर्धनापर्यंत जीव धरून होतें. गुप्तानंतर वल्लभी राजे गुजराथेवर राज्य करू लागले. सेनापति भट्टार्क यानें या घराण्याची स्थापना केली (५०९). याच्या पूर्वी गुजराथेंत कोठें कोठें श्वेतहूण सत्ताधारी होते असें म्हणतात. वल्लभी हे गुर्जर क्षत्रिय असून त्यांच्यावरून गुजराथेस गुर्जरराष्ट्र नांव मिळालें असावें. ह्युएनत्संग गुजराथेंत आला होता त्यावेळीं (६४०) या वंशांतील दुसरा ध्रुवसेन राजा (बालादित्य) राज्यावर होता. गुप्त व वल्लभी यांच्या राजवटींत गुप्तशक चालू असे. यांची राजधानी वल्लभीपुर (वाले) होती. त्यांनीं २५० वर्षेपर्यंत (७६६) राज्य केलें हे शैव होते. वरील बालादित्य हाच या घराण्यांतील प्रख्यात पुरुष होता.

चालुक्यः—नंतर हे गुजराथचे राजे झाले. ऐहोळ शिलालेखावरून दुसरा पुलकेशी चालुक्य यानें गुजराथ घेतला. या वंशांतील प्रख्यात पुरुष जयसिंहवर्मा (६६६–६९३) होता. यांची राजधानी नवसरी येथें होती. या वंशांत आठ पुरुष होऊन, पुढें राष्ट्रकूटांनीं यांचें राज्य काबीज केलें (७५७).

गुर्जरवंशः—हे मूळचे उत्तरहिंदुस्थानांतील असून गुजराथेंत सहाव्या शतकांत आले. वल्लभी व चालुक्य यांचा अंमल चालू असतां यांचें लहानसें राज्य मही व नर्मदा यांच्या दरम्यान असून त्याची राजधानी नांदिपुरी (नांदेड) होती. यांच्यांतील तिसरा जयभट हा पराक्रमी होता. हे वल्लभी किंवा चालुक्यांचे मांडलिक असत. ह्युएनत्संगाच्या वेळीं यांच्यांतील दद्द हा राजा होता. स. ७३५ नंतर यांचा फारसा उल्लेख आढळत नाहीं. ताजीक किंवा अरब यांनीं अगर गुजराथेंतील राष्ट्रटकूांनीं यांचा नाश केला असावा. हे आपल्याला पुढें पुढें (७००) भारतीय कर्णाचे वंशज म्हणवीत. चालुक्य पुलकेशीच्या एका ताम्रपटांत (७३८) त्यानें गुजराथ घेतल्याचा उल्लेख आहे.

राष्ट्रकूटः—राष्ट्रकूटांचा गुजराथशीं संबंध (इ. स. ७४३ते ९७४ पर्यंत होता.राष्ट्रकूट–ध्रुव यानें गुजराथेंत राज्य स्थापिलें. त्याच्या नंतर त्याचा पुत्र गोविंद व नातु कक्क हे राजे झाले. पुढें दक्षिणराष्ट्रकूटांनीं या गुजराथी घराण्याचा अंतर्भाव आपल्यांत करून घेतला. या घराण्यांत घ्रुव हा पराक्रमी होऊन गेला (७९५). यानें आपल्या मुला(तिसऱ्या गोविंदा)स गुजराथ स्वतंत्र तोडून दिला. त्याच्या मागें त्याचा भाऊ इंद्र हा राजा झाला (८०८). हा गुजराथी राष्ट्रकूट दुसऱ्या शाखेचा मूळपुरुष होय; याला लाटेश्वर म्हणत. या घराण्यांतील कर्कानें उत्तर कोंकणांतील कांहीं प्रांत काबीज केले. याचा मुलगा ध्रुव (८६७) याचें व दक्षिणेंतील मुख्य राष्ट्रकूट घराण्याचें वांकडें येऊन त्या दोघांमध्यें झालेल्या लढाईत ध्रुव मरण पावला. याचा नातू, दुसरा ध्रुव हा पराक्रमी होता. त्यानें आपला गेलेला मुलुख सर्व परत मिळविला व दक्षिणेंतील राष्ट्रकूटांचा पराभव केला. काठेवाडच्या मिहिर राजाचाहि त्यानें पराभव केला होता. पुढें या वंशांतील अकालवर्ष कृष्ण (८८८) यानें खानदेशांतील बराच भाग जिंकला. याचे नंतरची या घराण्याची माहिती आढळत नाहीं. पुढें (९१४) मान्यखेटच्या इन्द्र राष्ट्रकूटानें गुजराथ काबीज केलें. यांची सत्ता गुजराथेवर किती दिवस होती हें नक्की समजत नाहीं. परंतु पश्चिमचालुक्य तैलप्प यानें त्यांचा मोड करीपर्यंत (९७२) ते तेथें अंमल करीत होते हें निर्विवाद आहे. तैलप्पानें गुजराथ घेऊन तेथें आपला द्वारप्प (बारप्प) नांवाचा सुभेदार नेमला.

मेर–मिहिर अथवा मेर यांचा काल स.४७०-९००चा आहे. गुप्त घराण्यांतील बुद्धगुप्ताच्या सुभेदाराचा मैत्रक नांवाच्या जातीनें मोड करून गुजराथचा कांहीं भाग काबीज केला. हेच मिहिर अथवा मेर होत. अद्यापिहि काठेवाडांत हे आढळतात. यांच्या निशाणावर माशाचें चिन्ह असे व गुप्तांच्या निशाणावर मोराचें असे. मेर हे आपल्याला मारुतीचा पुत्र मकरध्वज याचे वंशज म्हणवितात. यांच्या एकंदर ठेवणी व पोषाखावरून हे उत्तर हिंदुस्थानांतून काठेवाडांस आले असावेत. गुप्तांचा विध्वंसक तोरमाण (४७०–५१२) याच्याबरोबर हे खालीं आले असावेत.यांची सत्ता५०९-५२० च्या सुमारास चांगलीच स्थिर झाली होती. भट्टारकानें ५२० त त्यांना हुसकावल्यामुळें ते मोरबी येथें जाऊन राहिले. ते वल्लभीचे मांडलिक असत. वल्लभीच्या नाशानंतर यांनीं सर्व काठेवाडांत आपली सत्ता वाढविली. व गुजराथेवर स्वाऱ्यांस प्रारंभ केला (८६०). गुजराथेंत ९०० च्या सुमारास त्याचा बराच अधिकार चालत होता. पुढें जाडेजा व चूडासमा या

रजपुतांनीं त्यांच्यावर हल्ले केल्यानें त्यांनीं धुमली ही आपली राजधानी सोडून पोरबंदराजवळ श्रीनगर येथें वास्तव्य केलें. यांच्यांतील प्रसिद्ध राजा महिपाल हा १०व्या शतकाच्या प्रारंभीं झाला. मेर हे मूळचे श्वेतहूण होत असें कांहींजण म्हणतात.

चूडासमा यांनीं काठेवाडांत आपली सत्ता स. ९०० च्या सुमारास स्थापिली. यांची राजधानी वनथाली (वनस्थली) असून तेथील या वंशाचा पहिला राजा चूडाचंद्र नांवाचा होता. त्याच्यावरूनच या वंशास चूडासमा म्हणतात. यांच्या मांडलिकांत जेथव व झाला हे लहानसे जहागीरदार येत असत. हेहि काठेवाडांतच रहात होते.

अनहिलवाडचें चावडा घराणें (७२०-९५६)—अनहिलवाड येथें राज्य स्थापण्यापूर्वी हें चावडा घराणें पंचासरप्रांतीं (गुजराथ व कच्छ यांच्या दरम्यान) एक लहानसें जहागीरदार म्हणून होतें. या घराण्यांतील जयशेखर राजाचा वध कल्याण कटकच्या भुवड राजानें केला (६९६). या जयशेखराचा पुत्र वनराज हाच अनहिलवाड्याचा संस्थापक होय. पंचासरवर अरब किंवा भुवड चालुक्यानें स्वारी करून चावडांचा विध्वंस केला (७२०). वनराजाला पुष्कळ दिवस वनवासामध्यें काढावे लागले. पुढें त्याचा मामा सूरपाल याच्या मदतीनें त्यानें अनहिलवाड्यास गादी स्थापिली (७६५). त्यानें ७८० पर्यंत राज्य केल्यानंतर त्याचा मुलगा योगराज, नातू क्षेमराज व पणतू चामुंड हे राजे झाले. चामुंडाचा मुलगा धागड हा ९०८मध्यें त मेल्यावर त्याचा पुत्र (याचें नांव आढळत नाहीं) गादीवर आला. हाच या वंशांतील शेवटचा राजा होय. हा ९६१ त मरण पावल्यानंतर त्याचा भाचा मूळराज हा राजा झाला.

सोळंखी अथवा चालुक्य राजे (९६१—१२४२):—मूळराज हा या वंशांतील मूळपुरुष होय. यानें आपल्या मामाच्या राज्याचा बराच विस्तार केला. याच्यावर तेलंगणच्या राजानें स्वारी केली होती. मूळराजानें सोरटच्या आभीर राजावर स्वारी केली. हा मोठा दानशूर असून यानें बरींचशीं देवळें बांधिलीं. यानें शेवटीं अग्निकाष्ठें भक्षण केलीं (९६१ ते ९९६). याचा मुलगा चामुंड यास तीन मुलें होतीं. याला मुंज राजानें पदच्युत केलें. त्याचा सूड म्हणून याचा मुलगा वल्लभ यानें मुंज राजावर स्वारी केली पण तो वाटेंतच मरण पावला. तेव्हां त्याचा भाऊ दुर्लभ हा गादीवर बसला (१०१०). दुर्लभानें मारवाडांतील कांहीं राजांवर स्वारी केली आणि शेवटीं आपला पुतण्या भीम यास राज्य देऊन आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारला (१०२२). भीम हा फार पराक्रमी होता. त्यानें चेदि आणि सिंध येथील राजांचा पराभव करून त्यांनां मांडलिक बनविलें. पण तो तिकडे गुंतला असतां माळव्याच्या राजानें अनहिलवाड लुटलें. याच्याच कारकिर्दीत गझनीच्या महंमुदानें सोमनाथावर स्वारी केली. नंतर यानें अबूच्या राजाचा पराभव केला. याच्यानंतर याचा मुलगा कर्ण हा गादीवर बसला (१०६४). याची कारकीर्द शांततेची झाली. यानें लोकोपयोगी बरींच कामें केलीं. हा १०९४ त वारल्यानंतर याचा मुलगा प्रसिद्ध सिद्धराज जयसिंग हा गादीवर बसला. तो अज्ञान असतांना त्याची आई मैनलदेवी ही कारभार करीत असे. गुजराथमधील सर्व राजांत हा फार प्रख्यात असून शूर, धार्मिक व दानशूर होता. द्व्याश्रय काव्यामध्यें बर्बक म्लेंच्छांचा यानें पराभव केल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें सौराष्ट्रांतलि अहीर राजा व गिरनागरचा खिगार राजा आणि माळव्याचा यशोवर्मा या सर्वांचा पराजय करून त्यानें त्यांचे प्रांत आपल्या राज्यास जोडले आणि त्यांच्या स्मरणार्थ सिंहसंवत्सर या नांवाचा एक शक सुरू केला. हा शैव असून यानें सिद्धपूर येथें रुद्रमाळ नांवाची इमारत व पाटण येथें सहस्रलिंग या नांवाचें सरोवर बांधिलें. हा विद्वानांचा पोशिंदा असून प्रख्यात जैनाचार्य हेमचंद्र हा याच्या पदरीं होता. यास मूल न झाल्यामुळें गादीचा वारसा याच्या मांडलिक त्रिभुवनपाल याच्याकडे गेला. त्यास तीन मुलें होतीं. त्यांतील कुमारपाल नांवाचा मुलगा हा गादीवर बसला. (११४३) यानें आपले जुने अधिकारी काढून नवे नेमल्यामुळें याचा प्राण घेण्यासाठीं एक गुप्त कट करण्यांत आला व माजी मंत्र्याचा मुलगा अरभट्ट यानें सांबरच्या राजाच्या मदतीनें कुमारपालावर स्वारी केली असतां कुमारानें त्याचा व माळव्याच्या राजाचा पराभव करून माळव्याचें राज्य खालसा केलें.

यानंतर कुमारपालानें कोंकणावर स्वारी केली. व सौराष्ट्रावरहि स्वारी करून तो प्रांत खालसा केला. तसेंच चंद्रावती संस्थानहि त्यानें खालसा केलें. यावेळीं याचें राज्य उत्तरेस तुर्की मुलूख, पूर्वेस गंगा, दक्षिणेस विंध्य व पश्चिमेस सिंधु या चतुःसीमेंत पसरलेलें होतें. यानें सोमनाथाचें देऊळ पुन्हां बांधिलें आणि बऱ्याचशा देवळाचा जीर्णोद्धार केला. याच्या पदरीं बरेचजैन पंडित असत. त्यात रामचंद्र व उदयचंद्र हे दोन प्रख्यात होते. वर आलेला हेमचंद्र हा याचा गुरू. असून यानें अगदीं शेवटीं शेवटीं जैनधर्म स्वीकारला होता. हा स. ११७४ त वारल्यानंतर याचा पुतण्या अजयपाल गादीवर आला. तो जैनधर्माचा द्वेष्टा असल्यानें त्याच्या कारकीर्दीत जैनांचा फारच छळ झाला. ११७७ त त्याचा खून झाल्यानंतर दुसरा मूळराज हा राजा झाला. त्याच्यानंतर ११७९ मध्यें दुसरा भीम गादीवर आला. हा दुर्बळ असल्यानें सर्वत्र अंदाधुंदी माजून वाघेल लोकांनीं याचें राज्य बळकाविलें (१२००).

वाघेल राजे (इ.स.१२१९ ते १३०४):—कुमारपालाचा भाचा अर्णवराजा हा या घराण्याचा संस्थापक होय. याच्या जहागिरीचें गांव व्याघ्रपल्ली असें होतें आणि त्यावरून त्याच्या वंशास वाघेल हें नांव मिळालें. त्याचा मुलगा लवप्रसाद हा दुसऱ्या भीमाचा प्रधान होता. हा शूर असून यानें माळव्याच्या व मारवाडच्या राजांचा पराभव केला. यानें १२३३ त राज्यत्याग केल्यानंतर याचा मुलगा वीरधवल गादीवर आला. त्यानें वनस्थळी व भद्रेसर येथील

राज्यें खालसा केलीं. व पूर्वगुजराथ खालसा करून महाराष्ट्रापर्यंत आपलें राज्य वाढविलें. महमुद घोरीचाहि यानें पराभव केला होता. १२३८ त हा वारल्यावर याचा मुलगा विसलदेव हा राजा झाला. यानें अनहिलवाड येथें दुसऱ्या भीमाचा पराभव करून आपली राजधानी स्थापन केली. हा फार शूर असून यानें माळवा, देवगिरी व मेवाड येथील राजांचा पराभव केला होता. याच्या कारकीर्दीत गुजराथेंत तीन वर्षे दुष्काळ पडला असतां लोकांच्या दुःख निवारण्याची यानें बरीच खटपट केली. याच्या नंतर याचा पुतण्या अर्जुनदेव हा गादीवर बसला. नंतर सारंगदेव (१२७४–१२९६) व त्यानंतर कर्णदेव (१२९६-१३०४) यांनीं राज्य केलें. यांच्यांतलि कर्णदेव हा अतिशय दुर्बळ होता. याच्या कारकीर्दींत १२९७ मध्यें अल्लाउद्दीन खिलजीचा भाऊ अलफखान यानें अनहिलवाड काबीज केलें. व कर्णदेव देवगिरीकडे पळून गेला.

मुसुलमानी अंमल (१२९७-१७६०):–अल्लाउद्दीन खिलजीनें गुजराथ जिंकल्यापासून १२९७ मध्यें मराठयांनीं तो काबीज करीपर्यंत साडेचार शतकें गुजराथ मुसुलमानी अमलाखालीं होता. त्यांत (१) दिल्लीच्या सुलतानाचा अंमल (१२९७-१४०३); (२) अहमदाबाद येथील शहांचा अंमल (१४०३–१५७३); आणि (३) मोंगल बादशहांचा अंमल (१५७३–१७६०):अशा तीन कारकीर्दी झाल्या. या अंमलांत गुजराथचे राजकीय दृष्टया दोन भाग असत; एक खालसा (यावर खास मध्यवर्ती सरकारचा अंमल असे) व दुसरा संस्थानी (यांत मांडलीक राजे असत). खालसाचे सरकार(जिल्हा)निहाय भाग पाडले होते; आणि सरकाराचे परगणे (तालुका) असत. प्रत्येक परगण्यावर अमीन किंवा तहसीलदार असे व त्याच्या हाताखालीं पाटील असत. सरकारांपैकीं कांहीं सरकारें खास मध्यवर्तीसरकारांच्या ताब्यांत असत व कांहीं सरंजामदार यांस फौजीतैनातीसाठीं दिलेले असत.

अकबरानें या व्यवस्थेंत थोडा फरक केला. जकात व जमीनमहसूल हीं खातीं वेगळीं करून त्यांवर निरनिराळे (अमीन, अमील, फैल, मुशरीफ वगैरे) अधिकारी नेमिले. मांडलीक, जहागीरदार, वगैरे लोकांपासून खंडणी वसूल करणारा अधिकारी निराळा असे. त्याला सरकारी वसुलापैकीं शेकडा २½ टक्के मनोती मिळे. न्यायाच्या कामीं काझी (मुसुलमानासाठीं) व सदर अमीन (मुसुलमानेतरासाठीं) यांचीं कोर्टें असत; त्यावरचें अपील अहमदाबाद येथील न्यायाधीशाकडे चाले आणि त्याच्याहि वर काझी–-उल्–कुझ्झत आणि सदर--उल्--सुदुर यांच्याकडे अपील चाले.

इनामदारांचे दोन वर्ग असत. मुसुलमानी अंमलापूर्वीचे (हे सारे हिंदूच होते) व नंतरचे. पहिल्यांनां जमीनदार व दुसऱ्यांना जहागीरदार म्हणत. जहागीरदारांना खंडणी द्यावी लागे. कांहींजणांना सरंजामी फौज ठेवावी लागे. कांहीं इनामदारांचीं इनामें सरकार हळू हळू संपुष्टांत आणीत असे. त्यामुळें हे इनामदार (बहुतेक हिंदू) मुसुलमानाविरुद्ध मराठयांनां मिळत असत.

जमीनमहसुलाच्या बाबतींतहि अकबरानें पुढील सुधारणा केल्या. (१) नवीन मोजणी व धारेबंदी (२) पाटील कुळकर्ण्यांना सरकारी पगार, (३) गांवच्या हक्कदारांनां पूर्वी मिळत असलेले व मुसुलमानी अंमलांत बंद केलेले हक्क पुन्हां सुरू करणें वगैरे.

वर सांगितल्याप्रमाणें अल्लाउद्दिनानें गुजराथ जिंकल्यावर तेथें उलुघखानाची सुभेदारीवर नेमणूक केली. यानें २१ वर्षे कारभार केला. परंतु शेवटीं अल्लाउद्दिनानें त्याला मलीक काफरच्या चिथावणीवरून सुळावर चढविलें व ऐनउल्मुल्क यास सुभेदार केलें. यानें तिकडील बंडें मोडलीं.त्याच्या नंतर दोन चार सुभे झाले; पण ते महत्वाचे नाहींत. महंमद तुघलुकाच्या वेळीं (१३४६) गुजराथेंत बंडें झालीं. तीं त्यानें स्वतः गुजराथेंत येऊन मोडलीं. व बंडाचा पुढारी मलीक-तुघन याचा मोड करून निजाम–उल्–मुलक यास सुभेदार नेमिलें. पुढें रास्तीनखान नांवाचा एक सुभेदार आला. तो फार दुष्ट व जुलमी होता. त्याच्या मागून (१३९१) झाफरखान हा सुभा झाला. यानें ईदरच्या राजापासून (१३९३) व जुनागडच्या राजापासून (१३९४) थकलेल्या खंडण्या वसूल करून सोमनाथाच्या देवळाचा पुन्हां विध्वंस करून मांडूचा किल्लाहि काबीज केला.

अहमदाबादचे शहा. (१४०३—१५७३):–यांची सत्ता गुजराथेवर १७५ वर्षेपर्यंत होती. वरील झाफरखानानें दिल्लीच्या बादशहाची सत्ता झुगारून आपल्या तातारखान नांवाच्या मुलास नासीरुद्दीन महंमदशहा ही पदवी देऊन स्वतंत्र राज्य स्थापन केलें (१४०३). हा नासीर दिल्लीवर स्वारी करण्यास गेला असतां वाटेंतच मेला. यानें आपल्या बापास कैदेंत टाकल्यामुळें त्याच्या मित्रांनीं नाझीरचा खून केला असें म्हणतात. पुढें झाफरखानच मुझफरशहा नांव घेऊन गादीवर आला (१४०७). यानें माळव्यावर स्वारी करून तेथील हुशंगशहास कैद केलें व मांडु किल्ला मुसाखानापासून काबीज केला. पुढें मुझफरचा नातू अहमद यानें याला विषप्रयोग करून आपण गादीवर आला (१४११). हा फार शूर होता. यानें याच्या चुलत भावानें केलेलीं बंडें मोडून आशावल येथील भिल्ल राजाचा पराभव करून तेथें अहमदाबाद गांव वसविलें (१४१३). पुन्हां एकदां (१४१५) चुलतभावानें ईदरच्या राजाच्या मदतीनें बंड उभारलें; परंतु तेंहि यानें मोडलें. याच वेळीं त्यानें गुजराथेंतील बारीकसारीक संस्थानिकांनां आपले मांडलिक बनविलें व माळव्यावर स्वारी करून तेथील शहाचा पराभव केला (१४१७). आपल्या जहागीरदारांची कोट किल्यांचीं ठाणीं त्यानें पाडून टाकिलीं आणि त्यांच्या जागीं स्वतः किल्ले बांधले. पुढें ईदरच्या राजाचा पराभव

पराभव करून त्यानें राज्यांत अन्तर्गत सुधारणा फार केल्या. सैन्यास पगार अर्धा रोख पैशाच्या रूपानें व अर्धा जमीनीच्या रूपानें देण्याची त्यानें नवीन पद्धत पाडली. पुढें माहीमबेट (१४२९), बागळाणचे किल्ले (१४३१) व नागोरचा किल्ला हीं ठाणीं यानें काबीज केलीं आणि शेवटीं हा १४४१ त मरण पावला; हा न्यायी व दयाळु असे. याच्यानंतर त्याचा मुलगा दुसरा महमद हा गादीवर आला. हा फार चैनी व भित्रा असे. याच्यावर माळव्याच्या सुलतानानें स्वारी करून याचा पराभव केला. शेवटीं याच्या सरदारांनीं याला ठार मारून, याच्या कुतुबुद्दीन नांवाच्या मुलास गादीवर बसविलें (१४५२). यानें माळव्यावर व चितोडवर स्वाऱ्या केल्यानंतर हा मरण पावला (१४५९). नंतर त्याचा चुलता दाऊद गादीवर आला,पण प्रजेनें त्याला त्याच्या मूर्खपणाच्या कृत्यामुळें पदच्युत करून, दुसऱ्या महमदाचा मुलगा फत्तेखान यास महमूदशहा (बेगडा) नांव देऊन गादीवर बसविलें (१४५९ याचें चरित्र महमूद बेगडा या शब्दाखालीं पहावें) त्याच्या मागून दुसरा मुझफर तख्तारूढ झाला. त्यानें ईदरवर (१५१४)व माळव्यावर (१५१७) स्वारी करून मांडूच्या मेदिनीरायाचा पराभव केला. मुझफर हा विद्वान, संगीतप्रिय, धार्मिक व शूर होता. हा १५२६ त मेल्यानंतर त्याचा मुलगा शिकंदर गादीवर आला (स. १५२६). शिकंदराचा थोड्याच महिन्यांत खून होऊन त्याचा भाऊ दुसरा महमूद गादीवर बसला पण त्याचाहि वध करून बहादूरखान हा गादीवर आला (१५२७ या बहादूरशहाचें चरित्र बहादूरशहा या नांवाखालीं पहावें) त्याच्या पश्चात त्याचा भाचा गादीवर बसला, पण तो लगेच मेल्यामुळें बहादूरचा भाऊ महमूदशहा राजा झाला (१५३६). हा अज्ञान असल्यानें दर्याखान व इमादुल्मुल्क या सरदारांनीं सत्ता बळकाविली. शेवटीं महमूदनें त्यांचा पराभव करून अहमदाबाद घेतलें. पुनः इमादुल्मुल्कानें बंडाळी माजविली, पण ती शहानें मोडली. यानें रजपूत सरदारांचीं वतनें जप्त केल्यामुळें त्यांनीं बंडें उभारलीं, त्याचा फायदा घेऊन बुऱ्हाण नांवाच्या नौकरानें शहाचा खून केला (१५५४). पुढें अहमदशहा हा गादीवर आला. हा लहान असल्यानें सर्व कारभार इतिमादखान हा पाही. त्यानें गुजराथचे तुकडे करून ते निरनिराळ्या सरदारांनां वांटून दिले. याचें व इतर सरदारांचें जमेना आणि यांच्यांत भांडणें झालीं, तेव्हां हा खानदेशच्या राजाकडे पळाला व त्याच्याकडून यानें गुजराथेंतील नंदुररबार वगैरे प्रांत काबीज करविले. तेव्हां अहमदानें याला पुन्हां बोलाविलें, परंतु पुन्हां अहमदानें त्याच्या जाचांतून मुक्त होण्याची खटपट चालविली असतां त्यानें शहाचा खून करून तिसऱ्या मुझफरास गादीवर बसविलें (१५६१). इतक्यांत चेंगीजखानानें इतिमाद याचा पराभव करून त्याला हांकलून, सर्व सत्ता आपल्या ताब्यांत घेतली. परंतु बिजलीखान नांवाच्या एका हबशानें याचा खून करून सत्ता बळकाविली. यानंतर हबशाची सत्ता सुरू झाली. इतक्यांत अहमदाबादेवर शेरखान नांवाचा अहमदशहाचा एक सरदार चालून आला असतां हबशांनीं इतिमाद यास मदतीला बोलाविलें व इतिमादनें अकबराची मदत मागितली; त्याप्रमाणें मोंगल सैन्यानें येऊन अहमदाबाद काबीज केलें व गुजराथच्या राजघराण्याचा शेवट होऊन तेथें मोंगली सत्ता प्रस्थापित केली(१५७२).

मोंगलांचा अंमल (१५७३—१७५८).—वरीलप्रमाणें गुजराथी सरदारांतील दुहीच्या फायद्यामुळें अकबरास गुजराथ मिळालें. त्याचा पहिला सुभेदार मिर्झा अझीझ कोकलताश नांवाचा होता. यानें खोरासानच्या मिर्झा या राजपुत्राची बंडें मोडलीं. नंतर राजा तोडरमल्लानें गुजराथची जमाबंदी केली. इतक्यांत गुजराथचा पूर्वीचा शहा मुझफर हा कैदेंतून पळून जाऊन त्यानें बंड उभारलें व अहमदाबाद, भडोच वगैरे प्रांत हस्तगत केला (इ. स. १५८३). परंतु अकबरानें मिर्झा अबदुल यास त्याच्यावर पाठविलें व त्यानें मुझफरला पिटाळून लावून सर्व प्रांत परत मिळविला, त्याबद्दल त्याला खानखानान ही पदवी मिळाली (१५८७). परंतु पुन्हां मुझफरनें सोरठांत बंड केलें (१५९१). तेव्हां फिरून खानखानानें त्याचा पराभव केला असतां, तो कच्छचे रावाकडे पळून गेला. रावानें खानखानाच्या हवालीं त्याला केलें; त्यानें त्याला दिल्लीस पाठविलें असतां, मुझफरनें वाटेंतच आत्महत्या केली. पुढें मुझफरचा मुलगा बहादुर यानें बंड केलें (१५९४). पण त्यावेळीं गुजराथचा सुभेदार शहाजादा मुरादबक्ष होता त्यानें तें तत्काळ मोडलें. मुराद (१६००) मेल्यामुळें पुन्हां कोकलताश यास सुभेदार नेमलें. जहांगीर गादीवर आल्यानंतर त्यानें गुजराथेंतील कांहीं जुलुमी कर रद्द करून सर्वत्र दवाखाने उघडले. या वेळीं बहादूरनें पुन्हां बंड केलें, परंतु तेंहि लवकरच मोडलें. पुढें मांडव्याच्या संस्थानिकानें मुसुलमानी सत्ता झुगारण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. या वेळीं गुजराथचा सुभेदार मुर्तुझा बुखारी होता. याच्याच वेळीं इंग्रजाला गुजराथेंत शिरण्याची संधि मिळाली. त्यानें कॅ. हॉकिन्स याला सुरतेंत माल विकण्यास परवानगी दिली (१६०८). मलिक अंबरनें सुरत लुटल्यामुळें (१६०९) शहाजादा शहाजहान यानें अहमदनगरवर स्वारी केली (१६१६). यावेळीं गुजराथचा सुभा मुकरबखान होता. पुढील वर्षी जहांगीर हा गुजराथेंत शिकारीस आला असतां ईदर, नवानगर, कच्छ येथील राजांनीं त्याचा फार सन्मान केला (१६१७). त्यानंतर शहाजादा शहाजहान हा गुजराथचा सुभा झाला (१६१८).पण त्यानें बापाविरुद्ध बंड केल्यानें त्याला काढून खुश्रूचा पुत्र सुलतान दावरबक्ष यास सुभेदार केलें. पुढें शहाजहान गादीवर आल्यानंतर गुजराथचा सुभेदार निराळा नेमला गेला. पुढें(१६३१–३२) गुजराथेंत भयंकर दुष्काळ पडल्यानें शहाजहाननें

सुरत व अहमदाबादेस अन्नछत्रें उघडलीं.या दुष्काळास तिकडे (संवत्)' सत्याशीनो काळ ' म्हणतात. शहाजहाननें या वेळीं कोळ्यांचें व काठी लोकांचें बंड मोडून नवानगरच्या जामाकडून थकलेली खंडणी वसूल केली. पुढें (१६४२) सुभेदार मिर्झा तर्खान यानें गुजराथच्या जमाबंदींत पुष्कळ सुधारणा केल्या. यानंतर (१६४४) अवरंगझेब हा सुभेदार बनला. त्यानें हिंदूंवर अत्यंत जुलूम केला, देवळें भ्रष्ट केलीं, गाई मारल्या (मुं.गॅ. भा. २ पु. १). त्यामुळें त्याला परत बोलावून शास्ताखानास सुभेदार नेमिलें (१६४६).परंतु त्याच्यानें कोळ्यांचीं बंडें मोडवेनात म्हणून दाराशुकोह यास सुभेदारीवर पाठविलें. तो कंदाहारच्या सुभेदारीवर गेल्यानें(१६५२)पुन्हां शास्ताखान आला. नंतर (१६५४) शहाजादा मुराद हा सुभेदार झाला. त्यानें कोळ्यांच्या नायकाचा पराभव केला. इतक्यांत शहाजहान बादशहा आजारी पडल्यामुळें मुरादनें आपणास बादशहा म्हणून जाहीर केलें. शहाजहाननें जसवंतसिंगास त्याच्यावर पाठविलें परंतु त्याचा पराभव होऊन मुराद व अवरंगझेब आग्र्यास गेले. अवरंगझेब गादीवर आल्यानंतर दारानें गुजराथवर स्वारी केली, तेव्हां तेथील सुभेदार शहानवाझ हा त्याला मिळाला. परंतु अखेरीस दाराचा पराभव झाला व शहानवाझच्या जागीं जसवंतसिंग हा सुभा आला. तो दक्षिणेंत शिवाजीमहाराजावर गेल्यामुळें मोहबत सुभा झाला (इ.स.१६६२). यानें नवानगर खालसा केलें व दाराच्या तोतयाचा पराभव केला. यावेळीं औरंगझेबानें गुजराथेंत अनेक जुलमी कर लादले व सुरत अहमदाबादच्या इंग्रज आणि डच लोकांवर जकात बसविली. इतक्यांत शिवाजीमहाराजांनीं सुरत लुटली. तेव्हां गावास तट घातला; पण पुन्हां (इ. स. १६६६) महाराजांनीं सुरतेवर हल्ला केला.याच सालीं शेतकऱ्यांना तकावी (नगाई?) देण्याची पद्धत सुरू झाली. पुन्हां मराठ्यांनीं (१६७०) सुरतेवर स्वारी केली, तेव्हां जसवंतसिंगास सुभेदार नेमलें (१६७१). तो काबूलच्या सुभेदारीवर (१६७४) गेल्यावर अहमद अमीन हा सुभा झाला, यानें कांकरेजच्या कोळ्यांचें बंड मोडलें. पुढें उदेपुरकर युवराज भीमसिंह यानें औरंगझेब मारवाडकडे गुंतलेला पाहून गुजराथेवर स्वारी केली, इतक्यांत इदरच्या राण्यानेंहि बंड उभारलें. परंतु अमीननें तें मोडलें. तेव्हां औरंगझेबानें गुजराथेंत (व सर्वत्र त्याच्या साम्राज्यांत) जिजियापट्टी बसविली. इतक्यांत गुजराथेंत भयंकर दुष्काळ पडला; (इ. स. १६८१) अहमदाबादेस बंडाळी झाली. त्यावेळीं बंडाचा पुढारी अबूबकर यास सुभेदारानें विषप्रयोग केल्यानें बंड मोडलें. पुन्हां (१६८४) गुजराथेंत दुष्काळ पडला. पुढें (१६९१) दुर्गादास राठोडच्या युद्धाचा फायदा घेऊन गुजराथेंत मातिया व मोमना या बाट्या मुसुलमानांनींहि बंड उभारलें व भडोचचा किल्ला घेऊन तेथील सुभेदारास ठार केलें. परंतु गुजराथचा सुभेदार करतलब यानें त्यांचा मोड करून (१६९२) काठी लोकांचीहि बंडाळी मोडली. यानें अहमदाबादेस उत्तम इमारती बांधल्या. सन १६९८त गुजराथेंत पुन्हा दुष्काळ पडला. पुढें सुलतान महंमद अज्जम हा गुजराथचा सुभेदार झाला (१७०३). त्यानें दुर्गादास राठोडाला पाटणची सुभेदारी दिली. परंतु बंडाची तयारी चालविल्यामुळें त्याला पकडण्याची तजवीज झाली. पण तो पळून गेला. याचवेळीं अवरंगझेबानें हिंदूंनां मुसुलमान नौकर ठेवण्याची मनाई केली. पुढें सुलतान अज्जम परत गेला व धनाजी जाधवानें गुजराथेवर स्वारी केली(१७०५-६). हीच मराठ्यांची गुजराथेवरील पहिली स्वारी होय. रतनपूर येथें धनाजीनें मोंगलांचा फडशा पाडला; बाबापीरच्या लढाईंत पुन्हां मराठ्यांनीं मुसुलमानांचा पुरा धुव्वा उडविला. सर्व गुजराथेंतून चौथ वसूल करून व गुजराथचा सुभा हमीद याला कैदेंतून सोडण्याबद्दल खूप मोठा दंड करून मराठे परतले. त्यांच्यावर शहाजादा बेदरबख्त चालून आला पण त्याचा मोड झाला; तोच पुढें गुजराथचा सुभेदार बनला. मराठ्यांच्या गडबडीचा फायदा घेऊन दुर्गादासानेंहि बंडाळी माजविली होती. यापुढें (१७०१–१७५७) मात्र मुसुलमानी सत्ता कुमकुवत होऊन मराठ्यांच्या स्वाऱ्या गुजराथेंत जास्त होत चालल्या.

मराठ्यांच्या स्वाऱ्या.—प्रथम बाळाजी विश्वनाथ यांनीं अवरंगझेब मेल्याबरोबर लागलीच गुजराथवर स्वारी करून सुभेदार इब्राहीम याच्यापासून दोन लाखांची खंडणी घेतली (१७०७); पुन्हां मराठ्यांनीं गुजराथेवर स्वारी केली (१७११) व चौथ वसूल केली. पुढें अमदाबाद येथें कांहीं धार्मिक स्वरूपाची बंडाळी माजली होती (१७१४). या वेळीं दाऊदखान पन्नी हा सुभा होता. त्याची शिस्त कडक असे. दिवाणी कारभार त्यानें दक्षिणीब्राह्मणांच्या सल्ल्यानें चालविला होता. पुढें (१७१६) महाराज अजितसिंह हा सुभा झाला; त्यानंतर गुजराथेंत दुष्काळ पडला (१७१९). अजितसिंहास आपल्या बाजूचा करण्यासाठीं सय्यदबंधूंनीं त्याचा फार मानमरातब ठेवला होता. याच वेळीं पिलाजी गायकवाडानें गुजराथवर स्वारी करून सोनगड काबीज केलें; येथपासून गुजराथेंतील मोंगली सत्ता नष्ट झाली व मराठ्यांची विशेषतः गायकवाडांची सत्ता तेथें प्रस्थापित झाली. अजितसिंहानेंहि त्यांनां मदत केली आणि मारवाडच्या लगतचा गुजराथीप्रांत आपल्या हाताखालीं घालण्यास प्रारंभ केला. यावेळीं हैदरकुली हा गुजराथचा सुभा झाला; तो दिल्लीची सत्ता जुमानीनासा झाला. त्यानें बादशाही घोडे पकडले. रयतेच्या मिळकती तो जप्त करून स्वतःच्या आवडत्या लोकांनां वांटून देऊं लागला; तेव्हां बादशहानें त्याला काढून निझाम उल्मुल्क याला सुभेदारी दिली (१८२२). पण तो तेथें न रहातां हैद्राबादेस गेला व गुजराथेंत सर्वत्र अंदाधुंदी माजली. तिचा फायदा घेऊन पिलाजीनें स्वारी

केली (१७२३) व चौथ वसूल केली; आणि या वर्षापासून मराठयांनीं गुजराथची चौथ नियमितपणें वसूल करण्यास प्रारंभ केला. यापुढील मराठयांची हकीकत ' गायकवाड ' (घराणें) या नांवाखालीं पहावी.

[संदर्भ ग्रंथ.—बॉम्बे ग्याझे. पु. १. भा. १; राजतरंगिणी; बील—बुद्धिस्ट रेकार्डस्; आर्कीऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट्स. २, ४; रासमाला; इलियट; हरिवंश; महावंशो; पेरिप्लस; टॉलेमी; वायुपुराण; विष्णुपुराण वगैरे].

गुजराथी वाङ्मय—गुजराथी वाङ्मयाचें विहंगम दृष्टया परीक्षण केलें असतां जी एक गोष्ट प्रामुख्यानें वाचकांच्या नजरेस आल्यावाचून रहात नाहीं ती म्हणजे या वाङ्मयांत कालिदास, शेक्सपीयर, मिल्टन, गोएटे यांसारखीं कवि रत्नें आढळून येत नाहींत. गुजराथी वाङ्मयांतील नरसीमेथा, प्रेमानंद, दयाराम इत्यादि कवींच्या काव्यांचें अवलोकन केल्यास जगप्रसिद्ध कवींच्या मालिकेंत यांनां स्थान देण्याइतके उच्च प्रतीचे हे कवी नाहींत असेंच वाचकांचें मत पडेल. अशी जरी स्थिति असली तरी वर सांगितलेले गुर्जर कवी हे गुजराथी वाङ्मयाच्या इतिहासांत श्रेष्ठ होऊन गेले व यांचीं काव्यें गुजराथी ग्रंथांमध्यें अद्यापीहि सर्वतोमुखीं आहेत, ही गोष्ट नाकबूल करून चालावयाचें नाहीं. हे कवी आपापल्या काळामध्यें प्रसिद्धीस आले व त्यांनीं आपलें नांव गुजराथी वाङ्मयाच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें. या दृष्टीनें त्यांच्या काव्यांचें व त्याबरोबरच गुजराथी वाङ्मयाचें आलोचन करणें आवश्यक आहे.

गुजराथमध्यें नामांकित व पहिल्या दर्जाचा एखादा कवि सुद्धां कां निर्माण होऊं नये असा प्रश्न सकृद्दर्शनीं वाचकांच्या पुढें उभा रहाणें स्वाभाविक आहे. या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें असल्यास आपणाला गुजराथच्या ऐतिहासिक, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचें अवलोकन करणें भाग आहे. कितीहि श्रेष्ठ दर्जाचा माणूस घेतला तरी परिस्थितीच्या चक्रांतून जाण्याशिवाय त्याला गत्यंतरच नसतें. ज्याकाळीं तो जन्माला येतो, त्या काळच्या परिस्थितीचीं बंधनें त्याला जखडून टाकण्याचा प्रयत्न करीत असतात. शेक्सपीयर, वर्डस्वर्थ, गोएटे यांसारखे शककर्ते कवी, परिस्थितीचीं बंधनें तोडून टाकण्याचा शक्य तितका प्रयत्न करीत असतात. पण त्यांच्या हातूनहि ती गोष्ट साध्य होत नाहीं. मग सामान्य माणसाची गोष्ट दूर राहिली. गुजराथी कवींच्या बाबतींत हीच गोष्ट आढळून येते. राजकीय घडामोडींत गुजराथवर अनेक दुर्धर प्रसंग ओढवले होते. रजपूत, मुसुलमान, मराठे या लोकांनीं अनुक्रमें गुजराथवर अंमल बसविला होता. स्वतः गुजराथनें आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलाच नाहीं म्हटलें तरी चालेल. गुजराथी लोक जात्या, शांत वृत्तीचे, शेतकी व व्यापार यांवर आपला चरितार्थ चालविणारे, व धार्मिक वृत्तीचे लोक होते. रजपूत अगर मराठयाप्रमाणें स्वातंत्र्याची हौस व पराक्रमाची आवड त्यांच्यांत नव्हती. त्यामुळें पारतंत्र्यांत देखील ज्याप्रमाणें रजपुतांमध्यें वीररसपूर्ण काव्यें झालीं तशीं गुजराथी लोकांत झालीं नाहींत. स्वातंत्र्यलालसा ही काव्याची जननी होय. पण गुजराथी लोकांत स्वातंत्र्यलालसा दृष्टोत्पत्तीस आली नाहीं व स्वातंत्र्याची तुतारी वाजवून लोकांत स्वातंत्र्यरवीची ज्योत पाजळत ठेवणारे शाहीर कवीहि गुजराथमध्यें झाले नाहींत. पण राजकीय घडामोडी चालू असतां गुजराथमध्यें कवीच निर्माण झाले नाहींत असें मात्र नाहीं. या अशा उलाढालीच्या काळांतच मोठमोठे कवी निर्माण झाले पण त्यांचीं काव्यें स्वातंत्र्योद्दीपक व चित्ताची खळबळ उडविणारीं नव्हतीं. मुसुलमान सुलतानांनीं गुजराथवर व त्याच्या आसपास ज्यावेळीं मुलखगिरीचा धूमधडाका चालू ठेवला होता त्यावेळीं नरसी मेथा राधाकृष्णाच्या शृंगारविलासावर आपलीं कवनें रचीत होता. गुजराथी समाज हा जात्या धार्मिक असल्यानें गुजराथी कवींचा धर्म हा आवडता विषय होऊन बसला होता. गुजराथमध्यें धर्माचें पीक पुष्कळ येतें असें म्हणतात. पावसाळ्यांतील छत्र्यांप्रमाणें गुजराथेंत धर्मसंप्रदाय निर्माण होतात व नष्ट होतात. नेहमीं परकीयांच्या अंमलाखालीं असणाऱ्या कमकुवत लोकांनां धर्माशिवाय दुसरा विसावा कोठून मिळणार ? गुजराथी कवींच्या काव्यांत हीच स्थिति नजरेस येते. धर्म, शृंगार, शांति इत्यादि विषयांच्या बाहेर या कवींची दृष्टि गेली नाहीं. अशा रीतीनें गुजराथी काव्याचें क्षेत्र फारच मर्यादित होतें. पण या क्षेत्रांतच आपल्या प्रतिभेनें लोकांनां स्तिमित करणारे कवी गुजराथेंत निर्माण झाले. गुजराथी वाङ्मयाचे मुख्यतः तीन भाग पाडतां येतात (१) दहाव्या ते चौदाव्या शतकापर्यंतच्या काळांतील वाङ्मय, (२) पंधराव्या शतकापासून ते सतराव्या शतकाच्या अगदीं अखेरीपर्यंतचें वाङ्मय व (३) अठराव्या शतकानंतरच्या अर्वाचीन काळांतील वाङ्मय.

दहावें ते चौदावें शतकः—या काळास जुन्या गुजराथीचा काळ असें म्हणतां येईल. या काळांत हल्लींच्या शुद्ध गुजराथी भाषेचीं बीजें पेरलीं गेलीं. या काळांतील गुजराथी वाङ्मय फारच थोडें व तें सुद्धां अशुद्ध स्वरूपाचें आहे. इ. स. ७४६ पासून १२९८ पर्यंत रजपूत लोकांची सत्ता गुजराथवर स्थापित झालेली होती. ब्राह्मण व जैन हे आपापले ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहीत असत. पण सुमारें दहाव्या शतकाच्या सुमारास भाट आणि चारण यांनीं रजपूत राजांच्या स्तुतिपर रासा आपल्या देशी उर्फ अपभ्रंश भाषेंत रचिण्यास सुरुवात केली. या रासांमधील भाषा म्हणजे व्रज, मारवाडी व इतर देशी भाषांची खिचडीच होती. प्रथम प्रथम ब्राह्मण व श्रेष्ठ वर्णाचे लोक या भाषांकडे दुर्लक्ष करीत. पण पुढें दहाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळांत देशी भाषांनां व त्यांच्याबरोबर गुजराथीलाहि बरीच मान्यता मिळूं लागली. पण मान्यता मिळाली

तरी पुढें दोनतीन शतकें गुजराथी भाषेत फारसें वाङ्मय झालें नाहीं.

पंधराव्या शतकाच्या आरंभापासून गुजराथी वाङ्मयाला खराखुरा प्रारंभ झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. या वाङ्मयाचें यथार्थ स्वरूप काय होतें हें समजण्याला तत्कालीन परिस्थितीचें ज्ञान असणें अत्यावश्यक आहे. मीराबाई व नरसी मेथा हे ज्यावेळीं आपल्या मधुर कवनांनीं गुजराथी समाजाला वेड लावीत होते त्यावेळीं गुजराथवर एका नवीन धर्ममताची लाट येऊन आदळली होती. दक्षिण हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली भक्तिमार्गाची चळवळ या सुमारास गुजराथपर्यंत येऊन पोंहोचली होती. बौद्धधर्मातील तत्वज्ञानाचा आद्य शंकराचार्यांनीं धुव्वा उडवून वैदिक धर्माची स्थापना केली होती. शंकराचार्यांनीं स्थापन केलेल्या या वैदिक धर्मांत पुढें बौद्धधर्मांतलि चांगलीं तत्वें घुसडण्यांत आलीं बुद्धालाहि हिंदु धर्माच्या अवतारी पुरुषांच्या मालिकेंत स्थान मिळालें होतें. अशा रीतीनें हिंदुधर्म व वैदिक धर्म यांची सांगड जमली असतां, दक्षिण हिंदुस्थानांत रामानुजाचार्य, मध्वाचार्य इत्यादि महान् धर्माचार्यांनीं भक्तिमार्गाचा प्रसार करण्यास सुरवात केली होती. गुजराथनेंहि या मार्गाचा स्वीकार करण्यास विलंब लावला नाहीं. थोडक्याच काळांत सर्व गुजराथभर ही भक्तिमार्गाची चळवळ फैलावली.

भक्ति याचा अर्थ परमेश्वराचें भजन करणें असा आहे. पण निर्गुण, निराकार अशा परमेश्वराचें भजन तरी कसें करावयाचें ? अशी स्थिति उत्पन्न झाल्यामुळें, परमेश्वराला सगुण स्वरूप देऊन त्याला सगुण स्वरूपांत भजावयाचें, त्याचे गुण गावयाचे अशी भक्तीची व्याख्या करण्यांत येऊं लागली. आपल्या मनाला आवडेल त्या स्वरूपांत परमेश्वराला भजलें असतां आपल्याला मोक्ष मिळूं शकतो ही भावना प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या मनांत या नूतन भक्तिमार्गानें उत्पन्न केली. हा मार्ग ब्राह्मणांप्रमाणेंच शूद्र, पतित, स्त्रिया इत्यादिकांनां सरास खुला होता. भक्तीच्या साम्राज्यांत स्त्रीपुरुष, उच्चनीच असा भेद नव्हता. कीर्तनाच्या प्रसंगीं उच्च जातीचा ब्राह्मण व हलक्या जातीचा महार अगर धेड यांच्यांत स्पृश्यास्पृश्यतेची अडचण येत नसे. अशा प्रकारच्या भक्तिमार्गाची लाट गुजराथभर १५ व्या शतकाच्या आरंभीं पसरली होती. दक्षिण हिंदुस्थानांत रामभक्ति प्रचारांत होती तर महाराष्ट्रांत विठ्ठल भक्तीचें प्रस्थ माजलें होतें. उत्तर हिंदुस्थान-बंगालमध्यें कृष्ण भक्तीचा फैलाव झाला. अगोदरच कृष्णाचें चरित्र म्हणजे अनेकांगी; ज्याला ज्या अंगाची गोडी वाटत असेल त्याला तें आवडतें अंग कृष्णामध्यें दृष्टीस पडे. मग काय ! गुजराथमधील स्त्रीपुरुषांनीं आपल्याला रुचेल अशा स्वरूपांत कृष्णभक्ति करण्यास सुरवात केली. कुणी कृष्णाला कन्हय्याच्या स्वरूपांत भजूं लागला तर कुणी राधारमणाच्या स्वरूपांत श्रीकृष्णाचें चरित्र गाऊं लागला. कृष्णभक्तीचा पंथ स्थापन करणारा वल्लभाचार्य हा गुजराथेंतच जन्मास आला व त्यानें या कृष्णभक्तीचा प्रसार गुजराथमध्यें झपाट्यानें केला.

मीराबाई (इ.स.१४०३-१४७०):—गुजराथमध्यें मीराबाई व नरसी मेथा हे कवी उदयास येण्याच्या वेळची परिस्थिति वर वर्णन केल्याप्रमाणें होती. मीराबाई ही १४०३ मध्यें जन्मास आली. हिचा मेवाडचा राणा कुंभ याच्याशी विवाह झाला. विवाह होण्यापूर्वीच हिला कृष्णभक्तीचें वेड लागलेलें होतें. तिनें मनानें कृष्णाला वरलें होतें. पण तिच्या इच्छेविरुद्ध तिचा कुंभाशीं विवाह लावण्यांत आला. कुंभ हा शिवभक्त होता. लग्नानंतर ज्यावेळीं कुलदेवतेला नमस्कार करण्याचा प्रसंग आला त्यावेळीं मीराबाईनें शिवाला नमस्कार करण्याचें साफ नाकारलें. एका कृष्णाशिवाय दुसऱ्या कोणापुढेंहि मी माझें डोकें नमविणार नाहीं असें तिनें आपल्या सासरच्या मंडळींनां बजावून सांगितलें. कुंभानें मीराबाईचें मन कृष्णभक्तीपासून वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण व्यर्थ. उलट मीराबाईनेंहि कुंभाचें मन कृष्णभक्तीकडे वळविण्याचा प्रयत्न केला पण त्यांत तिलाहि यश आलें नाहीं. ती नेहमीं कृष्णभक्तींत तल्लीन असे. कुंभाचें व तिचें अशा रीतीनें पटत नसल्यामुळें ती द्वारकेला जाऊन साधूंच्या संगतींत आपला काळ घालवूं लागली. अर्थातच तिच्याविषयीं नाना प्रकारच्या कंड्या पिकल्या. तेव्हां कुंभाला फार राग येऊन त्यानें तिला विषाचा पेला पाठवून दिला. मिराबाई त्या पेल्यांतील विष प्याली पण तिला कांहींहि झालें नाहीं. राण्यानें तिचें मन वळविण्याचे कसे कसे प्रयत्न केले हे तिनें एका पद्यांत सांगितलें आहे. मिराबाई ही जातीनें गुजराथी नव्हती. द्वारकेस आल्यानंतर तिनें गुजराथीचें ज्ञान संपादन केलें असावें. तिनें पुष्कळ गाणीं हिंदीभाषेंत रचलेलीं आहेत. खास तिचीं अशीं २५० गाणीं असावींत. बाकीचीं कांहीं जरी तिच्या नांवावर विकलीं जातात तरीं तीं गाणीं दुसऱ्यांचीं असून तीं त्यांनीं लोकप्रिय व्हावींत या हेतूनें मिराच्या नांवाखालीं दडपून दिलीं असावींत असें दिसतें.कारण कांहीं कांहीं घुसडून दिलेल्या गाण्यांत अर्वाचीन गुजराथी शब्दप्रयोग आढळतात.हिचें गाणें ऐकावयास अकबर आला अशी एक कथा प्रचलित आहे. ती चुकीची असावी किंवा ही मीराबाई कुंभराण्याची बायको नसावी.

पर्शियन शफीला ज्याप्रमाणें परमेश्वर हाच आपली बायको, आपली आई, आपला बाप किंबहुना आपलें प्रेमसर्वस्व वाटतो, त्याचप्रमाणें मिराबाईला कृष्णाशिवाय दुसरें कांहींहि सुचत नसे. तिनें आपलें तन व मन परमेश्वराला अर्पण केलें होतें. खालील ओळींमध्यें तिनें आपलें अंतःकरण उघड केलेलें आहे:—

प्रेमनी प्रेमनी प्रेमनो रे मने लागी कटारी प्रेमनी
जळ जमुनामां भरवा गयांतां हती गागर माथे हेम-
नीरे । मने

काचे ते तांतणे हरिजी ए बांधी, जेम खेंचे तेम तेमनी रे मने ।

मीरा कहे प्रभु गीरिधर नागर, शामळी सुरत शुभ एमनी रे मने ।

दुसऱ्या एका कवनांत ' गोविंदो प्राण अमारो रे, मने जग लाग्यो खारो रे, मने मारो रामजी भावे रे, बीजो मारी नजरे न आवे रे ' असें तिनें म्हटलें आहे.

वरवर विचार करणाऱ्याला मिराबाईच्या कवनांत उत्तान शृंगाराशिवाय कांहीं दिसावयाचें नाहीं. पण वस्तुस्थिति तशा प्रकारची नाहीं. मिराबाईला श्रीकृष्णाचें वेड लागलेलें होतें व त्याच्याशीं एकरूप होण्याकरतां तळमळणाऱ्या जीवाचे मानवी प्रेमाच्या स्वरूपांत व्यक्त केलेले बोल म्हणजे तिचीं कवनें होत. तीं कवनें गायलीं जात असतांना श्रोत्यांचें मन तात्पुरतें तरी तल्लीन झाल्याशिवाय रहात नाहीं. हीं शृंगारपूर्ण कवनें राजरोस गातांना गुजराथी नायकांनां कोणत्याहि प्रकारची लाज वाटत नाहीं. अद्यापिहि गुजराथमध्यें, गर्भ्यांमध्यें हीं कवनें तरुणी गात असतात. गुजराथमध्यें ज्या ज्या कवींचीं अगर कवयित्रींचीं कवनें गुजराथी आबालवृद्धांच्या तोंडीं बसलेलीं आहेत अशा कवींमध्यें व कवयित्रींमध्यें मिराबाईची प्रामुख्यानें गणना करण्यास हरकत नाहीं.

नरसी मेथा (१४१५–१४८१).—मीराच्या समकालीन व मीरापेक्षांहि श्रेष्ठ दर्जाचा कवि नरसीमेथा होय. हा जुनागड येथील नागर ब्राह्मण होता. लहानपणींच त्याचे आईबाप वारल्यामुळें त्याच्या चुलतभावानें त्याचें लालनपालन केलें होतें. नरसीची जात शिवोपासक होती. पण नरसीचा ओढा बालपणापासूनच कृष्णभक्तीकडे असे. साधूंच्या संगतींत भजन करण्यांत त्याचा वेळ जात असे. कांहीं वेळां तो स्वतः स्त्रियांच्या वेषांत स्त्रियांबरोबर गर्भ्याचा नाच करीत असे. त्यामुळें त्याच्या जातींतील लोक त्याच्यावर व त्याच्या कुटुंबावर रुष्ट झाले व त्याच्या कुटुंबीयांनां वाळींत घालण्यापर्यंत त्यांची मजल गेली. त्याचें लग्न एका मुलीशीं ठरलें होतें पण वरील वार्ता त्याच्या भावी श्वशुराला कळतांच त्यानें आपली मुलगी नरसीला देण्याचें नाकारलें. पण पुढें त्याचें दुसऱ्या एका गृहस्थाच्या मुलीशीं लग्न झालें. याचा व याच्या बायकोचा खर्च याच्या भावावरच पडत असे. एक दिवस त्याची भावजय त्याला टाकून बोलली. त्यामुळें त्याला राग येऊन त्यानें आपल्या घराला रामराम ठोकला व समुद्रकांठच्या महादेवाच्या देवळांत जाऊन तपश्चर्या करण्यास सुरवात केली. शिव संतुष्ट झाला व त्यानें नरसीला द्वारकेस नेलें आणि कृष्णाची सोळासहस्र गोपींशीं झालेली रासक्रीडा त्याला दाखविली. त्यामुळें नरसीला अपरिमित आनंद झाला; व त्यानें कृष्णभक्ति हें आपलें अंतिम ध्येय ठरविलें. तो घरीं परत आला व आपल्या भावजयीच्या दुरुत्तरांमुळें कृष्णाचें दर्शन झाल्याबद्दल त्यानें तिचे आभार मानिले. (कालिदासाच्या संबंधीं अशीच आख्यायिका प्रसिद्ध आहे). घरीं आल्यावर त्यानें आपलें वेगळें बिऱ्हाड केलें. दिवसभर कृष्णभक्तींतच त्याचा वेळ जात असल्यामुळें त्याला अतिशय हालांत व दारिद्र्यांत दिवस काढावे लागले. त्याला एक मुलगा व मुलगी झाली. पुढें कांहीं दिवसांनंतर त्याची बायको व त्याचा मुलगा काळाच्या भक्ष्यस्थानीं पडली. मुलीचा विवाह झाला होता. त्यामुळें तो प्रपंच्याचा उपाधींतून मोकळा झाला. त्यामुळें त्याला जो आनंद झाला, तो 'एवा रे अमे एवा रे एवा, तमे कहोछे वळी तेवा रे । भलूं थयुं भांगी जंजाळ, सुखे भजीशुं श्रीगोपाळ ।' या सर्वमान्य पद्यांत वर्णन केला आहे.

भक्तीच्या साम्राज्यांत जातिभेद आडवे येत नाहींत याची नरसीला पक्की जाणीव झाली होती. धेड लोकांच्या पंक्तीला त्यांच्या आमंत्रणावरून तो गेला व त्यांच्याबरोबर त्यानें जेवण केलें. यामुळें त्याच्या ज्ञातिबांधवानीं त्याला वाळींत टाकिलें. पण पुढें नरसीच्या ज्ञातीच्या लोकांनीं ज्यावेळीं भोजनसमारंभ केला त्यावेळीं श्रीकृष्णानें आपल्या मायेनें त्या ज्ञातीच्या गृहस्थांमध्यें धेड जेवायला बसले आहेत असा देखावा ज्ञातींतील गृहस्थांनां दाखविला व पुढें नरसी मेथा तेथें येतांच तो देखावा नाहींसा झाला. यामुळें त्याच्या ज्ञातीचे गृहस्थ खजील झाले व त्यांनीं नरसीला पुन्हां आपल्या जातींत घेतलें.

अशा प्रकारच्या वीस तरी अद्भुत गोष्टी कै. इच्छाराम देसाई यांनीं दिल्या आहेत. त्यांपैकीं कुंवरबाईनो मामेरूं, नरसिंह मेथांना बापनूं श्राद्ध, शामळदासनो विवाह, नरसिंह मेहेतानी हुंडी, हे चार चमत्कार प्रसिद्ध आहेत. नरसिंह मेहेतानी हुंडी, या गोष्टीवर स्वतः नरसीनें एक काव्य रचलें आहे.

नरसी मेथाच्या ग्रंथाचे दोन भाग पाडतां येतात. (१) शृंगारपर काव्यें व (२) भक्तीपर काव्यें. याच्या शृंगारपर काव्याचें पर्यवसान भक्तींतच झालेलें आहे. तथापि शुद्ध शृंगाराचींहि कांहीं कवनें आपल्याला आढळून येतात. उदाहरणार्थ, ललिता नांवाच्या एका दूतीला कृष्णानें राधेचें मन आपल्याकडे वळविण्याकरितां पाठवलें असतां ललितेनें राधेला कृष्णाकडे आणिलें व त्यानंतरची राधाकृष्णाची प्रणयलीला कवीनें पुढील पद्यांत वर्णिली आहेः—

कुंजसमीपे आवीया कुंवरीने तेडी कुमार

एकान्तस्थाने रची शय्या मळी करी रे विहार ।

भूधरे भीडीं हृदेशुं चुंबन लीधुं गाल

रसीओ ते रस प्रीते पीदा कंद्रप रस रसाळ ॥

अशाच प्रकारचीं शृंगारपर कवनें आणखींहि उद्धृत करून देतां येतील. पण या शृंगारपर कवनांत देखील आचरट शृंगार आढळून येणार नाहीं. राधाकृष्णांची रास म्हणजे जीवात्म्याची परमात्मस्वरूपांत विलीन पावण्याची अनावर

लालसा होय. स्वतः श्रीकृष्णाला सोळा सहस्र बायका असून तो ब्रह्मचारीच होता. नरसीनें कृष्णाच्या तोंडांत एके ठिकाणीं असे शब्द घातले आहेत.

'सुणो तमे नारी, अमे ब्रह्मचारीअमने ते कोई एक जाणे रे ।
वैद भेद लहे नहि मारो सनकादिक नारद व खाणे रे ।
एक जाणे छे व्रजनी गोपी, फेरस जयदेवे पीधोरे ॥
(शृंगारमाला.)

हीं कवनें करूनच तो राहिला नाहीं तर त्यानें आपल्या स्त्रीपुरुष भक्तांकडून रासामध्यें हीं पदें गावविलीं. पुष्कळ निंदकांनीं या त्याच्या कृत्याबद्दल त्याला नांवें ठेविलीं पण त्याला त्याची पर्वा वाटली नाहीं. मीरा व नरसी याच्या शृंगारपर काव्याची तुलना केली असतां, मीराबाईचीं पदें नरसीपेक्षां मधुर व अधिक उच्च भावनापूर्ण वाटतात व त्यामुळें मीराचीं पदें गुजराथी समाजात सर्वतोमुखीं झालेली आहेत.

पण भक्तिपर काव्यात नरसी हा मीरापेक्षा अधिक श्रेष्ठ कवि आहे. तत्कालीन कृष्णभक्तीचें परमोच्च स्वरूप या भक्तिपर काव्यात दृष्टीस पडतें. शिवाय काव्यात, तत्वज्ञान देखील जागोजागीं भरलेलें आढळतें. शंकराचार्यांच्या चर्पटपंजरीतील विचाराप्रमाणें ' सुमरने श्रीहरी मेल्य ममतापरी, जोने विचारीनो मूळ तारूं । तूं अल्या कोण ने कोने वळगीर ह्यो, वगर समजे कहे महारूं महारूं ।' या पद्यांतील विचार आहेत. प्रभातकालीं म्हणता येतील अशीं तात्विक व भक्तिपर गाणींहि यानें केलेलीं आहेत. हीं तुकारामाच्या अभंगासारखींच व भक्तिरसपूर्ण आहेत.

नरसीची भाषा पुराणी नाहीं व हल्लींच्या कवींच्या पद्धतीप्रमाणें बोजड व कृत्रिम नाहीं. तात्विक विवेचन देखील तो सोप्या भाषेंत करतो. शृंगारपरकाव्यात त्याच्यापेक्षां दयाराम हा श्रेष्ठ आहे व अंतःकरणांतील भावना व्यक्त करण्याच्या बाबतींत मीराबाईइतका त्याचा हातखंडा नाहीं. तथापि त्यांच्या काव्याचें सामुदायिक पर्यालोचन केल्यास तो सर्व कवींत श्रेष्ठ होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

भालनः—मीरा व नरसी मेथा हे पंधराव्या शतकांतील दोन महान् कवी होते. दुय्यम दर्जाच्या कवींत भालन, भीम व पद्मनाभ यांची गणना करतां येईल. भालन हा पाटणचा राहणारा असून जातीचा श्रीमाली ब्राह्मण होता. त्यानें बाणाच्या कादंबरीचें गुजराथींत भाषांतर केलें. याशिवाय राम, कृष्ण, शिव इत्यादिकांच्या चरित्रांतील प्रसंगांवर त्यानें काव्यें रचलीं. रामकृष्ण अगर शिव यांपैकीं कोणाचेंहि भजन केलें असतां परमेश्वराचें भजन केल्याप्रमाणेंच आहे हा त्याच्या काव्यांतील उपदेशाचा भाग आहे. चंडी-आख्यान व नलाख्यान हीं काव्यें त्यानें लिहिलीं पण त्यांत विशेष वर्णनीय असें कांहीं नाहीं.'सांभळ रे तुं सजनी मारी रजनी क्यां रमी आवीजी ' हें त्याचें गाणें फार प्रसिद्ध आहे. दशमस्कंध, सप्तशती, रामायण, शिवभिलडीसंवाद, हीं त्याचीं इतर काव्यें आहेत.

भीमः—भीम हा सिद्धपूर पाटणचा मोध ब्राह्मण होता. त्यानें बोपदेवाचें भागवत गुजराथींत भाषांतरिलें आहे.

पद्मनाभः—पद्मनाभाचें नांव त्यानें लिहिलेल्या ' कह्नानद दे प्रबंध ' या ऐतिहासिक काव्यामुळें प्रसिद्ध आहे. हा विशाळनगरचा नागर ब्राह्मण होता. त्यानें १४५६ मध्यें झालोर येथें हें काव्य लिहिलें. या काव्यातील कथाभाग अल्लाउद्दीन खिलजीचा सरदार अलफखान यानें केलेल्या गुजराथवरील स्वारीसंबंधींचा आहे. अनहिलवाडपट्टणाची रांखरांगोळी कशी झाली, सोमनाथ पाटण कसें लुटलें गेलें, हिंदू राजांनीं तीनचारदा अलफखानाच्या सैन्याचा कसा पराभव केला, शेवटीं एका रजपूत राजाच्या विश्वासघातामुळें गुजराथ परतंत्र कसें झालें, यासंबधींचीं वर्णनें यांत आलेलीं आहेत. हें काव्य वाचीत असतांना, मधून मधून वीररसपूर्ण पद्यें आढळतात व गुजराथी वाङ्मयात एक तरी कवि स्वातंत्र्यमहिमा गाणारा झाला याबद्दल आनंद वाटतो. हें पद्मनाभाचें काव्य डॉ. बुल्हरनें १८७५–७६ सालीं शोधून काढलें. काव्याच्या नावातील प्रबंध या शब्दावरून हें काव्य जैन कवीचें असावें अशी लोकांची कल्पना होती, पण ती हल्लीं नाहींशी झाली आहे. पद्मनाभाचें हें काव्य त्यानीं जसें लिहिलें तशा भाषेंतच उपलब्ध आहे. मीरा व नरसीमेहताच्या काव्याची भाषा त्यानीं लिहिल्यासारखी राहिली नसून त्यांत फेरफार झालेले आहेत, व त्यामुळें त्यांची भाषा कशी होती हें आपल्याला कळून येत नाहीं.

पंधराव्या शतकांतील जे मुख्य कवी झाले त्यांचें वर वर्णन केलें. या कवींच्या काव्यांत मुख्यतः कृष्णभक्तीचें स्तोम आढळून येतें. या काळांतील भक्तीचें स्वरूप मिराबाई व नरसिंह मेहेता यांच्या काव्यांत आपणाला दृष्टोत्पत्तीस येतें. पुढील शतकांत ज्या ज्या कवींनीं कृष्णभक्तिपर काव्यें लिहिलीं त्यांमधील मुख्य कल्पना यांच्या काव्यांतूनच घेतलेली आढळून येते. या कवींच्या काव्यांचा परिणाम तत्कालीन समाजावर फार झाला व अद्यापिहि त्यांच्या काव्यानें गुजराथी समाजाला वेड लावलें आहे. या कवींच्या काव्यांत अप्रत्यक्ष रीतीनें जागजागीं, तत्कालीन समाजाचें स्वरूप काय होतें याची अस्फुट कल्पना आपल्याला करतां येतें. पण एकंदरीनें या काळांतील कवींचें काव्यक्षेत्र बरेंच संकुचित होतें असें म्हणावयास हरकत नाहीं.

सोळाव्या शतकांतील कवी.—या शतकांत वाङ्मयाला ओहोटी लागली. चांगल्या प्रकारचें वाङ्मय उत्पन्न होण्याला जी परिस्थिति लागते ती या शतकाला लाभली नाहीं. या काळांत नांव घेण्यासारखे कवी म्हणजे वस्तो, वच्छराज व तुळशी हे होत.

वस्तोः—वस्तो हा खेडा जिल्ह्यांतील बोरसद गांवचा पातीदार होता. त्यानें सर्वसंगपरित्याग करून साधू व संन्याशी यांचा सहवास पत्करला. यानें नरसीमेथाच्या धर्तीवर शुकदेवाख्यान व सुभद्राहरण हीं काव्यें रचिलीं आहेत.

वच्छराजः—हा भडोचजवळील जंबुसारचा राहणारा. हा कबीरपंथी होता. त्याचें मुख्य काव्य म्हणजे रसमंजरी होय. यांत त्यानें पुष्कळ गोष्टी एकत्र केल्या आहेत.

तुळशीः—हा जुनागडनजीकच्या कुटियन गांवांत राहणारा सारस्वत ब्राह्मण. यानें ध्रुवाच्या कथेवर एक काव्य रचिलें.

स त रा व्या श त कां ती ल क वी.—सोळावें शतक वाङ्मयाच्या दृष्टीनें जवळजवळ वांझ होतें असें म्हटलें असतां चालेल. पण सतराव्या शतकांतल्या वाङ्मयाचा या शतकानें पाया घातला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. या सतराव्या शतकांत ज्याला खरें काव्य म्हणतां येईल असें वाङ्मय निर्माण होऊं लागलें. या कालापर्यंत काव्य म्हणजे धार्मिक काव्य अशी स्थिति होती. काव्यामध्ये देखील धर्माचा वर्चष्मा होता. पण सतराव्या शतकांतील कवींच्या काव्यांत काव्य हें धर्माच्या तावडींतून सुटलें व काव्याचें क्षेत्र विस्तृत झालें. अशा प्रकारचें काव्य निर्माण करण्यांत ज्या ज्या कवींनीं पुढाकार घेतला त्यांत आखोभगत हा अग्रेसर होय.

आखोः—हा जातीचा सोनार होता. लहानपणापासूनच त्याला जगाचा वीट आला होता. त्याचा पहिला गुरु वल्लभपंथी होता. तो फार लुच्चा आहे असें आखोला आढळून आलें म्हणून तो दुसऱ्या गुरूंच्या शोधार्थ निघाला व काशीस त्याच्या मनाप्रमाणें त्याला एक गुरु मिळाला. त्याच्याजवळ त्यानें वेदान्ताचें अध्ययन केलें. शंकराचार्यांचें अद्वैत तत्वज्ञान हेंच खरें तत्वज्ञान होय अशी त्याची खात्री झाली होती. त्याचे प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे आखोगीता, चित्त विचारसंवाद, गुरुशिष्यसंवाद, पंचीकरण, अनुभवबिंदु, कैवल्यगीता, ब्रह्मलीला, परमपदप्राप्ति व पंचदशीतात्पर्य हे होते. आखोच्या काव्यांत वेदान्त भरलेला आहे. त्याच्या काळीं जे नानाप्रकारचे पोटपंथ निर्माण झाले होते त्या सर्वांचा त्यानें परामर्ष घेऊन ते सर्व झूट आहेत म्हणून ठरविलें. ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' हेंच तत्व त्यानें आपल्या ग्रंथांत प्रतिपादन केलेलें आहे. आखो हा मोठासा सुशिक्षित माणूस नव्हता. त्याची भाषा ओबडधोबड आहे. समर्पक कोटया करणें, एखाद्या मतावर टीका करणें, समाजांतील अनाचारावर झणझणीत वाक्प्रहार करणें या बाबतींत त्याचा हातखंडा होता. आपल्या पहिल्या गुरूच्या ढोंगावर टीका करतांना तो म्हणतो ' गुरुकीधा मे गोकुलनाथ,घरडा बळदने घाली नाथ, धन हरे धो को नव हरे, ए गुरु कल्याण शूं करे '. यात्रा करण्याच्या धार्मिक समजुतीवर त्याचा विश्वास नव्हता. ' तीर्थ कोडी, हरिजनने चरण ' असें त्यानें म्हटलें आहे. संस्कृत काय अगर प्राकृत काय, दोन्ही भाषा विचार व्यक्त करण्याच्या दृष्टीनें सारख्याच योग्यतेच्या होत असें तो म्हणत असे. आपले विचार व्यक्त करण्यासाठीं त्यानें योजलेल्या उपमा व परिचित गोष्टी फारच समर्पक असतात. तो स्वतः आपल्याला कवि म्हणून घेत नसे. तत्वज्ञ अगर ज्ञानी म्हणून घेण्यांत त्याला फार आनंद वाटत असे. काव्य लिहितांना त्यानें वृत्तांकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. त्यानें काव्याच्या योगानें समाजांतील वाईट चालींचा विध्वंस करण्याचें काम केलें. त्याच्या पूर्वीच्या काव्यवाङ्मयांत जें कृष्णभक्तीचें स्तोम माजलें होतें तें यानें नाहींसें केलें व काव्याला एकप्रकारचें नवें वळण लाविलें.

प्रेमानंद (१६३६–१७३४).—तथापि गुजराथी भाषेला व वाङ्मयाला जर कोणी उच्च दर्जाचें स्थान प्राप्त करून दिलें असेल व संस्कृताइतकीच, प्राकृत भाषा गहन विचार व्यक्त करण्याला समर्थ आहे अशी जर कोणी लोकांची खात्री पटवून दिली असेल तर तो कवि म्हणजे प्रेमानंद होय. गुजराथींत चांगलें वाङ्मय निर्माण केल्याशिवाय पागोटें न वापरण्याची त्यानें प्रतिज्ञा केली होती. प्रेमानंदानें संस्कृत भाषेचा व पुराणांचा चांगला अभ्यास केला होता. तो स्वतः कवी होता. एवढेंच नाहीं तर त्यानें काव्याचा स्वतंत्र पंथ निर्माण केला. जॉन्सनप्रमाणें त्याच्याभोंवती नेहमीं कविवृंद जमत असे, व प्रेमानंद हा आपल्या स्फूर्तीनें त्यांना निरनिराळीं काव्यें लिहिण्याला उत्तेजन देत असे. त्याचे जवळ जवळ ३७ शिष्य होते. त्यापैकीं एकाला तात्विक कविता तर दुसऱ्याला ऐतिहासिक काव्यें रचण्यास तो सांगत असे. स्वतः प्रेमानंदानें पुष्कळ काव्यें व नाटकें लिहिलीं. त्याच्या नाटकांमध्यें एकप्रकारचें वैशिष्टय दिसून येतें. त्याचें काव्यभांडार फार मोठें आहे. त्यानें एकंदर ३२।३३ काव्यें लिहिलीं. संस्कृतमधून गुजराथीमध्यें पुराण सांगणाऱ्या पंडितांची त्याला फार चीड येत असे. याकरितां प्रेमानंदानें गुजराथींतच पौराणिक प्रसंगांवर काव्यें लिहिण्यास आरंभ केला व रामायण, महाभारत यांमधील प्रसंगावर त्यानें काव्यें रचिलीं. पण ' केवळ पुराणांचें भाषांतर करणारा माणूस हा कसला कवि ' अशी त्याचा प्रतिस्पर्धी सामळ यानें त्याची चेष्टा केल्यानें त्यानें सामाजिक विषयांवरहि काव्यें लिहिण्याचा निश्चय केला. नरसीमेथाच्या चरित्रांतील तीन चार प्रसंग घेऊन त्यानें त्यावर इतकी उत्कृष्ट काव्यें रचिलीं कीं, तीं आजतागायत गुजराथमधील आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. 'सामळदासनी विवाह' व 'कुंवरबाईनुं मामेरू' या काव्यांत नरसीमेथाच्या दारिद्र्याचें वर्णन, मेथाच्या घराचें वर्णन हीं हुबेहुब साधलीं आहेत. तसेंच ' नरसिंह मेहतानी हुंडी ' या काव्यांत श्रीकृष्ण हा मेथाची हुंडी पटवण्याकरितां वाण्याच्या रूपांत हिंडत असतांना द्वारकेच्या बाजाराचें जें वर्णन दिलें आहे तेंहि फारच सुंदर आहे. हीं मेहतावरील

काव्यें दर रविवारीं पुष्कळ गुजराथी भक्तिभावानें वाचतात. त्याचप्रमाणें दर शनिवारीं प्रेमानंदाचें सुदामचरित्र वाचतात. उखाहरण, दशमस्कंध, नलाख्यान हींहि काव्यें नेहमीं म्हटलीं जात असतात.

दशमस्कंधामध्यें कृष्णाच्या बाललीलांचें वर्णन आलें आहे तें फारच वाचनीय झालें आहे. नलाख्यानांत दमयंतीविलापाचें वर्णन फार बहारीचें साधलें आहे. हें वर्णन वाचलें असतां मनुष्यस्वभावाची पारख प्रेमानंदाला फार मार्मिक होती असें दृष्टोत्पत्तीस आल्याविना रहात नाहीं. उखाहरणांत प्रेमानंदाची कल्पनाशक्ति किती अनिवार होती हें प्रत्ययास येतें. रणयज्ञ हें काव्य रावणा-संबंधींचें आहे. सुदामचरित्रांत सुदामाची कथा आली आहे. नरसीच्या सुदामचरित्रात, सुदाम्याचें भक्तिपूर्ण चरित्र पहावयास सांपडतें; पण प्रेमानंदाच्या सुदामचरित्रांत काव्य-प्रतिभा दृग्गोचर होते.

प्रेमानंदाला छंदःशास्त्राची विशेष माहिती नव्हती व या मुळें त्याच्या काव्यांत वृत्ताचे नियम पाळले जात नाहींत असा एक आक्षेप घेण्यात येतो. पण तो खरा नाहीं. द्रौपदी-हरणांत त्यानें वृत्तांचा उपयोग केला आहे. त्यावरून वरील आक्षेप निर्मूलक ठरतो. प्रेमानंदाच्या काव्यांत मानवी स्वभाव अलंकाराच्या सहाय्यानें उत्तम रीतीनें रेखाटलेला आढळतो. कित्येक ठिकाणीं त्याच्या काव्यांत उपमा, रूपक, उत्प्रेक्षा यांचा घोटाळा झालेला आढळून येतो व हा एक प्रेमानंदाच्या काव्यांत दोष आहे असें त्याचे टीकाकार म्हण-तात. प्रेमानंदानें एकंदर ११ नाटकें लिहिलीं असें रावबहा-दुर हरगोविंदास कांतावाला यांनीं म्हटलें आहे. त्यापैकीं रसदर्शिका सत्यभामाख्यान, पांचालीप्रश्नाख्यान, तपत्याख्यान हीं तीनच सध्यां उपलब्ध आहेत. या तीन्ही नाटकां-मध्यें अगदीं अलीकडचे शब्दप्रयोग आढळतात व त्यावरून हीं नाटकें प्रेमानंदाचीं नव्हेत असें पुष्कळ विद्वानांचें म्हणणें आहे. सत्यभामा नाटकाच्या शेवटीं जें भरतवाक्य आहे त्यावरून गुजराथी भाषेची प्रेमानंदाला किती आवड होती हें दिसून येतें. हें भरतवाक्य असें आहे. ' सागोपांग सुरंग व्यंग अतिशे, धारो गिरा गुजरी । पादेपाद रसाळभूषणवती थाओ रूडी ऊपरी । जे गिर्वाण गिरा गणाय गणता, ते स्थान एल्योवरी । थाये श्रेष्ठ सहु सखी जन थकी, ए आश पूरो हरि.'

सामळभटः—प्रेमानंदाचा प्रतिस्पर्धी सामळभट हा इ. स. १६४० मध्यें जन्मला. हा श्रीगोडमालवी ब्राह्मण जातीचा होता. त्याला संस्कृत, हिंदी, फारसी इत्यादि भाषा उत्तम अवगत होत्या. व्रजभाषेंतील वृत्तांचा याच्या काव्यांत फार उपयोग केलेला आढळतो. प्रसंगविशेषीं दोहरा, चौपाई, छप्पा हीं गुजराथी वृत्तें देखील त्यानें उपयोगांत आणलेलीं आहेत. सामळ हा प्रथमतः पुराणांतल्या प्रसंगांवर कवनें करीत असे पण त्याकाळीं गुजराथमध्यें धर्मासंबंधीं लोकांची आस्था नव्हती. त्यामुळें सामळलाहि आपल्या कवनांचे विषय तत्कालीन समाजाला पटतील असे निवडावे लागले. त्याच्या काव्यांची गोडी प्रथम समाजाला समजली नाहीं. पण रखीदास नांवाच्या एका कुणबी पाटलाला त्याच्याबद्दल फार आवड असे. त्यानें सामळला आपल्याकडे बोलावून त्याला काव्यें करण्यास उत्तेजन दिलें. तसेंच गमानजी नांवाच्या एका भाटाच्या संगतीचा सामळला फार फायदा झाला. सामळनें एकंदरींत २६ काव्यें रचिलीं. त्यापैकीं पद्मावती, रावणमंदोदरी संवाद, उद्यमकर्मसंवाद, सामळरत्नमाला, मदनमोहना, रखीदासनें चरित्र इत्यादि काव्यें फार प्रसिद्ध आहेत. सामळच्या काव्याचे वर्णना-त्मक व नैतिक असे दोन भाग पडतात. नैतिक काव्यां-मध्यें जागजागीं उत्कृष्ट प्रकारचीं नीतिवचनें आढळून येतात. उदाहरणार्थ पोटामुळें आपल्यावर काय काय अनर्थ घडून येतात तें वर्णन करतांना कवि म्हणतो. ' पेट करावे वेठ, पेट वाजा वडवावे; पेट उपडावे भार, पेट गुण सौनागावे; पेट भमे परदेश; पेटथी पाप करे छे पेट करे छे जार पेटथी सत्य हरे छे' इ. अशाच प्रकारचीं सत्यप्रमेयें जाग-जागीं सामळच्या काव्यांत आढळून येतात. मदनमोहना हें अतिसुंदर, विनोदप्रचुर व शृंगारिक असें वर्णनात्मक काव्य आहे.

कथाभागांत निरनिराळ्या प्रकारचे प्रसंग फारच बहारीनें सामळनें वर्णिले आहेत. या काव्यांतील प्रत्येक श्लोक सुंदर आहे असें स्वतः सामळनें म्हटलें आहे. या काव्याची भाषा फार सोपी व मनोहर आहे. जागजागीं कूट श्लोक घालण्याची सामळला फार खोड असे. त्यामुळें त्याच्या काव्याला एकप्रकारचें क्लिष्ट स्वरूप प्राप्त झालें आहे. सौंदर्यवर्णनात प्रेमानंद सामळाहून वरचढ आहे. सामळाच्या काव्यांतील नायिका, नायकापेक्षां अधिक सुंदर तऱ्हेनें रेखाटलेल्या आढळतात. सामळच्या नायिकांमध्यें साहस, पातिव्रत्य, सुशिक्षण, इत्यादि गुण आढळून येतात. सामळच्या काव्यावरून त्याची स्त्रियांबद्दलची काय कल्पना होती हें नीटसें समजत नाहीं. कांहीं प्रसंगीं तो स्त्रियांची फार प्रशंसा करतो तर कांहीं ठिकाणीं तो स्त्रियांबद्दल अनुदार-पणाचे उद्गार काढतो. ' ए जीवती जात छे जक्षणी, जोर जोरावरना हर्या ' अगर ' घडी एकमा कहे वीर, कंथ घडीमा करी थापे ' असे त्यानें स्त्रियांबद्दल वाईट उद्गार काढले आहेत. तर अन्यत्र ' जोबनमां दे रंग, संगसुख टाटक मननी, व्हालपणे करी वात, मटाडे पीडा मननी... चतुरा चित्र हरनार, सार उरमा मदमाती......छेनीच कोइजो नारियो, स्वभावे सहुं नहि सरखी ' असे प्रशंसापर उद्गार काढले आहेत.

सामळ हा उत्कृष्ट कवि होता व त्याचे विचार तत्कालीन समाजाच्या फार पुढें गेले होते. त्याचें अनुकरण करणारा

दुसरा कोणीहि कवि गुजराथी वाङ्मयांत आढळत नाहीं. त्याच्या काव्यांत फारसी भाषेंतील शब्द वारंवार येतात.

या प्रमुख तीन कवींशिवाय १७ व्या शतकांत नाकर, मुकुंद, देवीदास, शिवदास, विष्णुदास, विश्वनाथज्ञानी, मुरारि, श्रीधर स्वामी, नरहरी, वल्लभ, वृज, रत्नेश्वर, हरिदास, द्वारकादास, धनदास, गोपाळदास, रत्नाजी आनंदघन, नेमिविजय इत्यादि अनेक कवी होऊन गेले व त्यांनीं गुजराथी वाङ्मयांत पुष्कळ चांगल्या काव्यग्रंथांची भर घातली.

१७व्या शतकांतील काव्याचें संकुचित क्षेत्र नाहींसें करून काव्याचें क्षेत्र व्यापक केलें. आखो, प्रेमानंद व सामळ यांनीं गुजराथी भाषा लोकप्रिय केली. या तिन्ही कवींचे मार्ग निरनिराळे होते. आखोच्या काव्यांत तत्वज्ञानावर भर दिलेला आढळतो तर प्रेमानंदाच्या काव्यांत मानवी स्वभावाचें उत्कृष्ट चित्र रेखाटलेलें पहावयास सांपडतें. सामळच्या काव्यांत, कथानिवेदनाची अप्रातिम हातोटी दिसून येते. पण अशा रीतीनें या तिघांचे मार्ग जरी निरनिराळे असले तरी या तिघांच्या काव्यामुळें गुजराथी भाषेला उच्च दर्जाचें स्थान मिळालें यांत संशय नाहीं.

अठराव्या शतकांतील कवी—अठराव्या शतकाच्या उदयाच्या वेळीं गुजराथच्या राजकीय परिस्थितींत स्थित्यंतर घडून आलें होतें. मुसुलमानी सत्तेला उतार लागून मराठी साम्राज्याचा रवि तळपूं लागला होता. मराठ्यांनीं आपली सत्ता चोहोंकडे प्रस्थापित करण्याचा खटाटोप मांडला होता. गुजराथवर त्यांनीं स्वाऱ्या करण्यास सुरवात केली होती. अर्थात अशा मुलुखगिरीच्या धामधुमीच्या काळांत, गुजराथी समाजांत एकप्रकारची चलबिचल व्हावी यांत आश्चर्य नाहीं. याचा परिणाम गुजराथी वाङ्मयावर घडून आला. सतराव्या शतकांत ज्या गुजराथमध्यें आखो, प्रेमानंद, सामळप्रभृति कवी निर्माण झाले त्याच गुजराथेंत अठराव्या शतकांतील वरील कवींच्या जोडीचा एकहि कवि निर्माण झाला नाहीं. उत्कृष्ट प्रकारच्या काव्याचा या शतकांत जन्म झाला नाहीं. सतराव्या शतकांत काव्याला स्वैर संचार करण्याकरितां जें क्षेत्र मिळालें होतें तें नाहींसें होऊन धर्माचें जूं काव्याच्या मानगुटीवर बसूं पहात होतें. कृष्णभक्तीच्या संप्रदायानें वर डोकें काढण्यास सुरवात केली होती. वल्लभपंथाचे उपदेशक खेड्यापाड्यातून आपल्या धर्माचा उपदेश करीत होते. अशा परिस्थितींत, गुजराथमधील कवीहि या धर्माच्या खड्या सुरांशीं आपल्या काव्यांच्या तुतारीचा आवाज मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. काव्याचें क्षेत्र पुन्हां संकुचित होऊं लागलें होतें. काव्याला सांप्रदायिक स्वरूप येत चाललें होतें. या शतकांत प्रसिद्धीस आलेल्या कवींपैकीं सुमारें बारा कवींनीं या संप्रदायाचीं तत्वें काव्यद्वारें जनतेपुढें मांडण्यास सुरुवात केली पण: या कवींच्या काव्यात नरसीमेथाच्या अगर मीराबाईच्या काव्यांत असलेला भक्तीचा उमाळा व उदात्त प्रेमाची जागती ज्योत आढळत नाहीं. यांच्या काव्यात दृग्गोचर होणारें भक्तीचें स्वरूप हिणकस आहे.

वल्लभभाट कवींचीं काव्यें अंबादेवीच्या भक्तीपर आहेत. वल्लभाचा भाऊ धोला यानेंहि अंबामातेच्या स्तुतिपर कवनें रचिलीं आहेत. या दोघांहि कवींचीं काव्यें फार लोकप्रिय आहेत. वल्लभानें इतरहि गर्बे लिहिले आहेत. 'कजोडूं' म्हणजे जरठ तरुणी जोडप्यावर त्यानें एक सुंदर गर्बा लिहिलेला आहे. यांतील प्रत्येक शब्द हृदयाला पाझर फोडणारा आहे. द्वारकेची (जन्म १७१०) कविता कृष्णचरित्रावर आहे. त्यांत जागजागीं सुंदर नीतिवचनें आहेत. भानदास (जन्म १७२१) कवीनें शंकराचार्य व हस्तामलकाचार्य यांमधील संवाद रचिला असून त्यात हस्तामलकाचार्योनीं शंकराचार्यांना अद्वैत, द्वैत यांतील तत्वें विशद करून सांगितलेलीं आहेत. कालिदास (जन्म १७२५) या नागर ब्राह्मण कवीची, त्याच्या प्रल्हादाख्यान काव्यामुळें फार प्रसिद्धि आहे. याशिवाय सीतास्वयंवर, ध्रुवाख्यान, ईश्वर विवाह इत्यादि त्याचीं काव्यें आहेत. त्रिकमदास (जन्म १७३४) या नागरब्राह्मणानें रुक्मिणीविवाह, व डाकोरनाथ या विषयांवर काव्य रचिलें आहे. प्रीतमदास (जन्म १७३०) हा संदेहार येथें राहणारा भाट जातीचा कवि होता. त्याचा गुरु गोविंदराम नांवाचा होता. सद्गुरूची कृपा झाल्याशिवाय मोक्षाचा मार्ग सुलभ होत नाहीं असें यानें ठाम मत झालें होतें व गुरूच्या महतीबद्दल त्यानें पुष्कळ कविता लिहिल्या आहेत. याशिवाय सारस गीता, ज्ञानकक्को, गुरुमहिमा, ज्ञानमास इत्यादि त्याचीं प्रसिद्ध काव्यें आहेत. याशिवाय कृष्णाच्या लीलांवर त्यानें पुष्कळ पदें रचिलीं आहेत. त्यांपैकीं ' हे जसोदाजी आवडो-लाडकवायो लालन कीजे ', ' हे बासलडी वेरणथई लागी रे व्रजनी नारने, ' ' मनमोहनलाल मारगडो मूको तो मथुरा जइए, ' व ' हरिभजन थकी छोटा होए, ते सौथी मोटा थाए ' हीं पदें नेहमीं लोकाच्या तोंडीं असतात. शिवानंद (१७४४ जन्म) हा सुरतेचा नागर ब्राह्मण. यानें शिव-पार्वतीच्या स्तुतिपर काव्यें रचिलीं आहेत. नर्भेराम (जन्म १७५२) हा पिहिजी येथें राहणारा मोढ ब्राह्मण होता. त्यानें कृष्णभक्तीपर वीस पंचवीस पदें रचिलीं आहेत. हरिदास (जन्म १७७४) हा कुंतलपूर येथें राहणारा क्षत्रिय जातीचा कवि होता. यानें ' शिवविवाह ' नावाचें काव्य व वेदान्तपर पदें रचिलीं आहेत. याच्या भाषेत उर्दू शब्दांचा भरणा पुष्कळ आहे. गोविंदराम (१७८१-१८१४) या कवीनें कलीयुगांत मनुष्यजातीचा कसा अधःपात होत चालला आहे यासंबंधीं,सुंदर व परिणामकारक कविता लिहिली आहे. उदयरत्न (जन्म १७१२) हा जैनधर्मी कवि होता.त्यानें स्त्रियांच्या संगतीपासून होणारे दुष्ट परिणाम काय होतात ते आपल्या काव्यांत वर्णन केलेले आहेत.

रत्नो (१७३९) हा जातीचा रंगारी होता. यानें कृष्णवियोगामुळें गोपींनां जें दुःख झालें त्यावर काव्य रचिलें आहे. जीवराज नांवाच्या कवीनें 'जीवराज सेठ' या प्रवासवर्णनात्मक काव्यांत प्रेमानंदाच्या विवेकवंझारा या कवितेचें अनुकरण केलेलें आहे. बन्यनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस'च्या धर्तीवर हें काव्य आहे. माधवदास नांवाच्या कवीनें (जन्म १७२१) दशमस्कंध, रुक्मिणीहरण इत्यादि विषयांवर कविता लिहिली आहे पण त्याची कविता अगदींच साधारण प्रतीची आहे.

एकोणीसाव्या शतकांतील कवी.—१९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत जे कवी उदयास आले त्यांपैकीं बहुतेक कवींचा जन्म, १८ व्या शतकांतच झाला होता. त्यामुळें त्यांची गणना कांहीं विद्वान अठराव्या शतकांतच करतात. या कवींनीं आपलीं काव्यें एकोणिसाव्या शतकांत लिहिलीं. या दृष्टीनें त्यांची गणना १९ व्या शतकांतच करणें अधिक इष्ट आहे असें कांहीं विद्वानांचें मत आहे. पण तें कसेंहि असो १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत अठराव्या शतकामधील परिस्थितीच कायम होती असें म्हटलें तरी चालेल. १८ व्या शतकांत जे धर्मसंप्रदाय निर्माण झाले त्यांतच या शतकाच्या पूर्वार्धांत सहजानंदस्वामींच्या संप्रदायाची नवीन भर पडली. या संप्रदायामध्यें पुष्कळ कवयित्री निर्माण झाल्या व त्यांनीं मीराबाईच्या भक्तिमार्गाची विझती ज्योत पुन्हां प्रज्वलित करण्यास सुरवात केली. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत जे कवी झाले त्यांमध्यें कालानुक्रमानें धीरो भगत हा पहिला होय. हा बडोदें संस्थानांतील गोथडा गांवचा रहाणारा होता. हा ब्रह्मभाट जातीचा होता. त्यानें एका संन्याशाला आपला गुरु केलें होतें. गुरुभक्तीवर त्यानें पुष्कळ गीतें केलीं आहेत. आत्मज्ञानावर त्याची फार मदार होती व आत्मज्ञानाच्या महतीवर त्यानें पुष्कळ पद्यें रचलीं आहेत. आपली कविता लोकप्रिय व्हावी या हेतूनें त्यानें एक नवीनच युक्ति लढविली. नदीवर स्नानाला जाण्याच्या वेळेस तो एका वेळूच्या नळकांड्यामध्यें आपलीं काव्यें कागदावर लिहून तीं ठेवीत असे व त्या नळकांड्याचें तोंड बंद करून तें नळकांडें नदींत सोडून देत असे व तें नळकांडें ज्याला सापडेल तो तीं पदें वाचीत असे. धीरोचीं रणयज्ञ, स्वरूपनी काफीओ, मतवादी, आत्मबोध,ज्ञानकक्को,योगमार्ग, प्रश्नोत्तरमालिका, अवतवाणी, छूटकपदो, गरीबओथोळ, हीं काव्यें मोठीं आहेत. हीं काव्यें त्यानें काफीवृत्तांत लिहिलीं आहेत. या वृत्तांत त्याचा हात धरणारा अद्यापि कोणीहि झाला नाहीं. आखाप्रमाणेंच जनतेच्या डोळ्यांत तो क्षणक्षणीत अंजन घालतो पण तें कठोर शब्दांनीं न घालता आपल्या पदलालित्यांनीं तिला खुष करीत करीत घालतो. धीरोचे पुष्कळ शिष्य होते. त्यांत बापूसाहेब गायकवाड हे एकच काय ते शिष्य कवि या संज्ञेला पात्र आहेत.

बापूसाहेब गायकवाड (इसवीसन१७७९-१८४३):—हे सरदार घराण्यातील गृहस्थ होते. लहानपणापासून धर्मांकडे त्यांचा ओढा असे. बापूसाहेबांनां भजन करण्याचा फार नाद असे. गुजराथी लोकांत अशी चाल आहे कीं, एखादा घरचा मुख्य माणूस मेला कीं, शोकगीतें म्हणण्यासाठीं भाडोत्री बाया आणावयाच्या व मग या बायांनीं ऊर पिटून रडण्यास सुरवात करावयाची. एकदां बापूसाहेबांनीं अशा प्रकारच्या भाडोत्री बाया शोकगीतें म्हणतांना पाहिल्या तेव्हां त्या शोकगीतांमध्यें राम नाहींसें वाटून त्यांनीं स्वतः एक 'रामराजिओ' नांवाचें शोकगीत तयार केलें. त्यांत कामक्रोधादि षड्विकारांचें त्यांनीं वर्णन केलेलें असून त्यापासून मनुष्यानें अलिप्त राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे असें त्यांत सांगितलेलें आहे. हें शोकगीत हल्लीं पुष्कळ ठिकाणीं पूर्वीच्या शोकगीताऐवजीं म्हणण्यांत येतें. बापूसाहेबांच्या काव्यांत मानवी स्वभावाचें यथार्थ स्वरूप वर्णन केलेलें दृष्टीस पडतें. रामरहिम एकत्र आहेत. तेव्हां हिंदु व मुसुलमान यांनीं परस्परांत भांडत बसणें गैर आहे अशा प्रकारची शिकवण त्यांच्या काव्यांत दृष्टीस पडते.

प्रेमानंद स्वामीः—(इ. स.१७७९--१८४५)—हा काठेवाडांतील गधडा येथील राहणारा. त्यानें कृष्णलीलांचें वर्णन काव्यांत केलें आहे स्वतःला राधा समजून व कृष्णाला आपला वल्लभ समजून त्यानें हें काव्य लिहिलें आहे व यावरून त्याला प्रेमानंद सखी हें नाव पडलें आहे. सहजानंदस्वामीच्या समाधीनंतर त्यांच्यावर यानें कांहीं कविता केल्या आहेत, व त्या फार उत्कृष्ट साधल्या आहेत. याशिवाय 'थल' नांवाची त्याची कविता प्रसिद्ध आहे.

भोज भगत (इ. स. १७८५--१८५०):—भोजभगत हा काठेवाडचा राहणारा असून जातीनें कुणबी होता. लहानपणींच एका तपस्व्यानें त्याला भक्तीचें महत्व समजून दिलें होतें. व त्याच्या मनावर त्याचा फार परिणाम होऊन तो विरक्त बनला. पुढें फत्तेहपूर येथें १२ वर्षे त्यानें तपश्चर्या केली. तो खरा साधु आहे किंवा नाहीं याची परीक्षा करण्याकरता विठोबा दिवाणजी नांवाच्या एका मराठा अधिकाऱ्यानें त्याचा फार छळ केला. भोजाच्या काव्यामध्यें त्याचें 'चाबख'उर्फ फटके हे फार प्रसिद्ध आहेत. हे फटके उपदेशपर आहेत. दयारामाची ज्याप्रमाणें गर्भ्यांबद्दल प्रसिद्धि आहे, अगर सामळची त्याच्या 'छप्पा' बद्दल ख्याति आहे त्याचप्रमाणें भोजाचें नाव त्याच्या 'चाबखा'बद्दल प्रसिद्ध आहे. याशिवाय त्यानें इतर काव्येंहि लिहिलीं आहेत. पण तीं संपूर्ण नाहींत. त्याचें 'सलैय्याख्यान' काव्य प्रसिद्ध आहे. याशिवाय त्यानें कांहीं होरी लिहिल्या आहेत. त्यांपैकीं 'कृष्णप्रार्थना' ही होरी फार लोकप्रिय आहे. 'चाबखां'मध्यें त्यानें ढोंगी साधूवर फार टीका केला आहे. या ढोंगी बावांचें लक्ष्य परमेश्वराकडे नसून त्यांनां नमस्कार करण्यास येणाऱ्या

बायकांकडे असतें असें त्यानें म्हटलें आहे. भोज भगताची भाषा असंस्कृत व कर्णकठोर आहे तरी त्यामध्यें ओज व मनाची तळमळ दृष्टीस पडते. त्याची भाषा फार मर्मभेदक आहे.

मनोहरस्वामीः—(१७८८–१८४५) हा जुनागड येथील रहाणारा. हा संस्कृत व पर्शियन भाषेचा पंडित होता. वैष्णव व शैव पंथांमध्यें जे वरचेवर कलह माजत असत त्यामुळें त्याचें मन विटून जाऊन त्यानें आपणांस नूतन नांव सच्चिदानंद असें धारण केलें. वल्लभाचार्यांच्या तत्वाविरुद्ध त्यानें कविता रचिल्या होत्या. मूर्तिपूजा, तीर्थाटण, इत्यादिकाचा त्याला फार तिटकारा असे. गुरुकृपेशिवाय खरें ज्ञान होणें शक्य नाहीं असें त्याचें मत होतें. ' दृढ विश्वास धरीने कोई सद्गुरु शरणे जाय। तेना संशय, विपर्यय हृदय ग्रंथी भेदाय। मनोहर जन्ममरण भय भांगे संशय पलाया' असें त्यानें एका कवितेंत म्हटलें आहे. त्याच्या काव्याची भाषा सुसंस्कृत व जोरदार असते. तात्विक विषयावर लिहितांनां त्याची भाषा गंभीर व दुर्बोध असते.

गिरिधर कवि हा गुजराथींमधील छंदोबद्ध रामायणाबद्दल प्रसिद्ध आहे. त्याशिवाय त्याचे इतर ग्रंथ तुळशीविवाह राजसूय यज्ञ, गोकुळलीला, राधाविरह, अश्वमेध, कृष्णलीला हे होत. गिरिधरानंतरचा कवि रणछोड गार्चा, रामायण, राधाविरह, रणछोडजीनी गर्बो इत्यादि काव्यें प्रसिद्ध आहेत. रणछोडजी दिवाण (१७६८–१८४१) हा कवि काठेवाडांत फार प्रसिद्ध आहे. हा मूळचा नागरब्राह्मण आहे. तरी पण त्याला युद्धकला चागली अवगत होती व आपला पराक्रम त्यानें पुष्कळ ठिकाणीं गाजविला होता. पुढें १८०५ त कर्नल वॉकरने काठेवाडमधील बंडाळी मोडल्यानंतर, रणछोडजीनें आपला शिपाई बाणा सोडून देऊन लेखनाचा व्यवसाय पत्करला. हा अतिशय बुद्धिवान व विद्वानांचा आधार होता. उर्दू भाषेंत त्यानें 'तारीख ए सोरठ' व 'रुकात ए गुणागुण' हे दोन ग्रंथ लिहिले आहेत. शिवरहस्याचें व्रजभाषेंत त्यानें भाषांतर केलें आहे. 'शिवगीता,' 'चंडीपाथना न गर्भो' इत्यादि त्यांचीं गुजराथी भाषेंतील काव्यें प्रसिद्ध आहेत. हरिराम कवीची सीतास्वयंवर इत्यादि काव्यें बरींच लोकप्रिय आहेत. हरिभट (१८२९) हाहि बऱ्यापैकीं कवि होऊन गेला. त्याचें कृष्णचरित्रावरील काव्य बरें आहे. वीरविजय हा जैन यति, त्याच्या बोधप्रद, कवितांबद्दल प्रसिद्ध आहे. त्यानें एकंदर ३६ उपदेशपर कडवीं रचिलीं, तीं फार सुंदर आहेत.

या वर वर्णन केलेल्या कवींशिवाय या कालांत पुरुषोत्तम, मिथो, मुकुंद, दयाळ, रत्नदास, रघुनंदन, हरगोवन, रघुनाथदास, कृष्णरायंदवसाहेब दुंगर वारोट, शांतीदास, भवानभक्त दुर्गादास, नाथास्वामी, धनविजय इत्यादि दुय्यम दर्जाचे कवी होऊन गेले. या काळांतच स्वामी नारायण पंथाची भरभराट झाली होती. या पंथाच्या अनुयायांतहि ब्रह्मानंद, मुक्तानंद, चित्कुलानंद, केशानंद, देवानंद, मुलजी भट इत्यादि कवी प्रसिद्ध आहेत.

पण या काळांमध्यें पुष्कळ कवीच तेवढे निर्माण झाले असें नाहीं तर पुष्कळ कवयित्रींहि निर्माण झाल्या. मीराबाईप्रमाणें जरी या कवयित्रींची ख्याति नसली तरी त्या आपल्या काळीं बऱ्याच लोकप्रिय होत्या यात शंका नाहीं. दिवाळीबाई, राधाबाई, कृष्णाबाई, पुरीबाई, गौरीबाई या कवयित्री या काळांतील मुख्य होत. दिवाळीबाईची रामचरित्रावरील कविता रसाळ व सुंदर आहे. राधाबाई ही दाक्षिणी बाई असून तिनें गुजराथींत कृष्णचरित्रांतील कित्येक प्रसंगांवर कविता लिहिली आहे. पण तिच्या कवितांमधून हिंदी व मराठी शब्द वारंवार आढळतात. तिची कविता जोरदार व परिणामकारक आहे. कृष्णाबाईची 'कृष्णना हालरडा' व 'सीताजीनी कांचळी' या कविता प्रसिद्ध आहेत. पुरीबाईचें सीतामंगल काव्य लोकप्रिय आहे. गौरीबाईनें जवळ जवळ ६५० पदें रचिलीं असून त्यात वेदांत ओतप्रोत भरलेला आढळतो.

दयारामः—गुजराथी भाषेचे जे तीन मुकुटमणी म्हणून मानले जातात त्यांमध्यें, नरसीमेहता, प्रेमानंद, यांच्याच बरोबर दयारामाची गणना केली जाते. या तीन कवींच्या काव्यांत गुजराथी भाषेचें परमोच्च स्वरूप दृष्टीस पडतें. अभिजात काव्याचे मेहता. प्रेमानंद व दयाराम हे तीन प्रमुख कवी होत असें म्हणावयास हरकत नाहीं. दयाराम याचें मूळचें नांव दयाशंकर असें होतें. पुढें वल्लभाचार्यांच्या संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर त्यानें दयाराम असें आपलें नाव जाहीर केलें. हा चाडोदचा राहाणारा होता. चांडोद येथील बायकांची सौंदर्याबद्दल व नखरेपणाबद्दल फार प्रसिद्धि आहे. लहानपणीं आपल्या इतर सवंगड्यासह, बायकांच्या खोड्या करण्याची दयारामाला फार खोड असे. एकदां दयारामानें एक सोनारीण बाई नर्मदेच्या घाटावरून घागर भरून घेऊन जात असता, खडा मारून फोडली. तेव्हा या बाईच्या नवऱ्यापासून आपले रक्षण करून घेण्यासाठीं तो चाडोर पासून एका हाकेच्या अंतरावर असलेल्या एका खेड्यांत दडून बसला. तेथें त्याची व एका साधूची भेट झाली दयारामानें आपल्याला उपदेश देण्यास त्या गुरूला सांगितलें. पण तूं तरुण आहेस असें सांगून त्याला उपदेश देण्याचें त्या साधूनें नाकारलें पण पुढें कांहीं दिवसांनीं त्या साधूनें त्याला एकांतांत नेऊन कृष्णाचें प्रत्यक्ष दर्शन करविलें व तेव्हांपासून दयाराम हा कृष्णभक्त बनला. पुढें कांहीं प्रसंगांनीं त्याची व बडोद्याच्या राणीची ओळख झाली व त्याला दरबारकडून आमंत्रण आलें. दयाराम हा फार रंगेल असे. त्याचा पोषाख ऐटबाज असे. तो दिसण्यांत फार देखणा असल्यामुळें बायका त्याच्यावर झटकन भाळत असत. वयाच्या ४० व्या वर्षापर्यंत, त्यानें आपला काल चैनींत घालविला. लहानपणापासून त्याची व सोनार जातीच्या

बालविधवेची मैत्री होती. हा जरी ब्राह्मण होता तरी त्यानें तिला आपल्या घरीं ठेवून तिचें पालन केलें होतें. तिच्याशीं त्याचा वाईट संबंध होता असें लोक म्हणत व तें खरेंहि होतें. तरीपण लोकांच्या निंदेची पर्वा न करता तीं दोघेंहि शेवटपर्यंत एकत्रच राहिलीं. दयारामाच्या शेवटच्या दुखण्यांत तर या बाईनें त्याची अतिशय काळजीपूर्वक शुश्रुषा केली.

दयारामाची स्त्रियांच्याबरोबर अतिशय सलगी असल्यामुळें त्याच्याविषयीं लोक वाईट उद्गार काढीत पण त्याचें दयारामाला कांहीं वाटत नसे. त्याच्या इच्छेविरुद्ध बायका त्याला देवासमान मानून त्याचे पाय चोळीत व त्याची अन्य प्रकारें सेवा करीत. एका काव्यांत त्यानें आपण कृष्णाशीं व्यभिचारी आहों असें म्हटलें आहेः—"ःदयानी प्यारी कृष्णजी कहावे, कृष्णनी प्यारी आदासी। रमुं, रमाडूं, प्रेमे पोढूं, जारी कृष्ण सुं, नहि तो उदासी। ए व्यभिचार नित्य मरीए रे, एथी भवसागर तरी ए रे." चाळीसाव्या वर्षापर्यंत नेहमीं तीर्थाटणें, यात्रा वगैरे करण्यांत दयारामानें आपला काळ घालविला. डाकोर येथें गोमती नदीच्या कांठीं तो गाणें गात असतां इच्छाराम भट या गृहस्थानें तें ऐकलें व दयारामावर तो प्रसन्न झाला व त्यानें त्याला तूं उत्तम कवि होशील असा आशीर्वाद दिला असें म्हणतात. दयाराम हा नरसीमेहेताचा अवतार आहे असें तो म्हणत असे. वल्लभाचार्य पंथाच्या महाराजांवर दयाराम हा नेहमीं चिडत असे. या महाराजांचीं वाईट कृत्यें त्याच्या दृष्टीस पडल्यामुळें त्याच्या तोंडावर त्याची नालस्ती करण्याला तो मागें पुढें पहात नसे. पण या महाराजावर जरी त्याचा राग असे तरी वल्लभाचार्यांच्या संप्रदायाचीं तत्वें त्याला पूर्णपणें मान्य होतीं. त्याच्या काव्यातून या वल्लभ सांप्रदायासंबंधींचे चांगले उद्गार आपल्याला आढळून येतात.

दयारामाचा आवाज फार मिष्ठ असे. त्यामुळें त्याच्या भक्तिपर गाण्यावर लोक फार खूष असत. दरवर्षी दयारामाला त्याच्या गाण्यावर दोनशें रुपये तरी मिळत असत, पण तो उधळ्या असल्याकारणानें ते पैसे तो थोडक्याच दिवसात खर्च करून टाकीत असे. त्याच्या मनांत आलें असतें तर त्याला सहज राजाश्रय मिळवितां आला असता पण राजाच्यापुढें सुद्धां शिर नमविण्याचें त्याच्या जिवावर येत असे. कृष्णाशिवाय दुसऱ्या कोणापुढेंहि मी डोकें नमविणार नाहीं असें तो मोठ्या अभिमानानें म्हणत असे. दयारामाचा शिष्यवर्ग फार मोठा असे. गुजराथच्या निरनिराळ्या भागांतून सर्व दर्जाच्या लोकांमधून त्याचे शिष्य पसरले होते. अमृतराम पाड्या व दयाभाई साभोद्रा नागर हे त्याचे दोन आवडते शिष्य होते. पुढें रणछोड नावाच्या एका १५ वर्षांच्या मुलाला त्यानें त्याच्या गोड आवाजावरून आपला शिष्य करून घेतलें; व या शिष्याचीहि गुरुजीवर अलोट भक्ति असे.

दयारामाचा काव्यसंग्रह फार मोठा आहे; पण त्यापैकीं उत्कृष्ट असें काव्य फार थोडें आहे. त्यानें कृष्णभक्तिपर जे गर्भे लिहिले ते फारच सुंदर आहेत. गुजराथीमध्यें त्यानें ४८ काव्यें व व्रजभाषेंत ४१ काव्यें लिहिलीं. याशिवाय गुजराथीमध्यें त्यानें ७००० पदें; व्रजभाषेंत १२००० पदें, मराठींत २००, पंजाबीमध्यें ४० व संस्कृतमध्यें व उर्दूमध्यें अनुक्रमें १५ व ७५ पदें रचिलीं. यांपैकीं फार थोडीं पदें उपलब्ध आहेत. कांहींच्या मतें त्याच्या ग्रंथांची संख्या १३५ आहे. तर इतराच्या मतें २०८ आहे. तो बसल्या बसल्या पदें करीत असल्यामुळें, त्याच्या पदांची संख्या फारच आहे. हीं सर्व पद्यें अद्यापि एकत्र करण्यांत आलेलीं नाहींत. त्याचे गुजराथी ग्रंथ म्हणजे, गीतामाहात्म्य, रसिकवल्लभ, अजामिळाख्यान, वृत्रासुराख्यान, प्रेमरसगीता, प्रबोधबावनी, कालज्ञानसार, प्रश्नोत्तरमालिका, श्रीकृष्णनाममाहात्म्यमंजरी, श्रीकृष्णनाममाहात्म्यमाधुरी, श्रीकृष्णस्तवनचंद्रिका, श्रीहरिभक्तचंद्रिका, श्रीहरिभक्तरत्नमाला, श्रीहरिनामवेली, श्रीगुरुदेव चंद्रिका, प्रेमप्रशंसा, शिक्षा तथा परीक्षा, भक्तिपोषण, भक्तिदृढत्व, स्तवनमाधुरी, सत्यभामाविवाह, रुक्मिणीविवाह, दशमलीला, रासपंचाध्यायी, भ्रांतिभंजन, अन्यायमर्दन, मोहमर्दन, ईश्वरनिरीक्षण, चिंताचूर्णिका, नरसिंह मेहेतानी हुंडी, उखाहरण इत्यादि होत.

शतशैया या त्याच्या हिंदी ग्रंथांत त्याचें संस्कृतग्रंथासंबंधींचें अगाध ज्ञान प्रगट होतें. वल्लभसंप्रदायाच्या तत्वाचा त्यानें पुरा अभ्यास केला होता हें या ग्रंथावरून दिसून येतें. या ग्रंथावर त्यानें स्वतःच गुजराथी भाषेंत टीका लिहिली आहे.

त्याच्या काव्यग्रंथाचे (१) धार्मिक (२) नैतिक, (३)शृंगारिक असे तीन भाग पडतात. धार्मिक ग्रंथाची संख्या त्याच्या इतर ग्रंथांपेक्षां मोठी आहे. हरिभक्ति हें या ग्रंथांतील मुख्य तत्व आहे. हाफीज अगर रूमी या शफी पंथाच्या कवीच्या काव्यांमध्यें ज्याप्रमाणें, ईश्वरविषयक शुद्ध प्रेमाचें स्वरूप दृष्टीस पडतें त्याचप्रमाणें दयारामाच्या काव्यांतहि दृष्टीस पडतें. हरीशीं पूर्णपणें एक होणें हें सर्व धर्मांचें सार आहे असें तो म्हणतो. ' दयारामनो अक्षरदेह ' या ग्रंथांत त्रिपाठी या विद्वान पंडितानें दयारामाच्या धार्मिक तत्वांचा विस्तारपूर्वक विचार केला आहे. दयारामाच्या नीतिविषयक कल्पना फारच साध्या आहेत. हरिभक्ति करणें व शुद्धाचरणानें रहाणें हा उपदेश त्यानें आपल्या काव्यांत केलला आढळतो. हीं काव्यें सुंदर विचारांनीं भरलेलीं आहेत. हीं पदें अद्यापिहि कित्येक भक्तांच्या तोंडून ऐकावयास मिळतात. (१)"वैष्णव नथी थयो तुं रे, शीद गुमानया घूमे, हरिजन, नथी थयो तुं रे; (२) फूल्यो शुं करे छे रे, भूल्यो भवकूपमां पड्यो; मनुष्य देह मोंघी रे, खोयो पाणि हाथे वह्यो;"इत्यादि पदें फार बहारीचीं आहेत.

त्याच्या शृंगारिक काव्यांनीं त्याचें नांव अजरामर केलें आहे. त्याचीं शृंगारिक पदें गर्भी चालीवर आहेत. भावना गीतांप्रमाणें हीं पदें चित्ताची खळबळ करून टाकणारीं आहेत. ' व्रज व्हालुं रे वैकुंठ नहि आवूं । मने न गमे चतुर्भुज थावुं । जे कोई प्रेम अंश अवतरे प्रेमरस तेना-' उरमा ठरे;" इत्यादि गीतें फार सुंदर आहेत. शारीरिक प्रेमाची त्यानें फार स्तुति केलेली आढळते. पण त्यांच्या-मध्यें गूढ अर्थ भरलेला आहे असें त्याचे भक्त म्हणतात. त्यारूपांत त्यानें आपल्या प्रिय देवाचीच स्तुति केली आहे असें त्याचे भक्त सांगतात. कृष्ण व राधा यांच्या शृंगाराचें त्यानें फार मनोहर वर्णन केलें आहे. त्याच्या शृंगारिक कवितांचे मासले खालीलप्रमाणें आहेत.

" आवोनी मारे घेर माणवा होजी, राज आवोनी मारे
घेर माणवा.
प्रेमरस प्यालो पीवा ने पावा, जोबन तुरीने पलाणवा
होजी
पडती राते पधारजे प्रीतम कोई नथी वेठु जाणवा. "

' हे राजपुत्रा तूं माझ्याकडे ये. प्रेमरसाचा आस्वाद घेण्याकरतां तूं माझ्या दाराकडे ये. मला देखील तो प्रेमरस पिऊं दे; तूं माझ्याकडे रात्रीच्या वेळीं ये म्हणजे तुला कोणी ओळखूं शकणार नाहीं.'

" रमीशुं रातडी रे, आवनो अलबेलाजी घेर
कहे जेमातेनर गाय एक खोवाणी छे आज'
जाऊ शुं शोधवारे बांभ जो पाणी पहेली पाज,
सासरीआं थकी रे मारो आवास छे एकांत
रांखीश दीवडो रे माणांशुं मनमानी मोज. "

"प्रियकरा तूं माझ्या घराकडे ये, म्हणजे आम्ही रात्रीं प्रेमात तल्लीन होऊं. तूं तुझ्या आईला सांग कीं, गाय चुकली आहे व तिच्या शोधाला मी जातो व अशा रीतीनें थाप मारून तूं माझ्याकडे ये. माझी निजावयाची खोली अगदीं एकीकडे व स्वतंत्र आहे. मी तुला मार्ग कळावा म्हणून दिवा जळत ठेवते. तूं आलास म्हणजे मग मानेल तशी आपण मजा मारूं."

अशीं कित्येक शृंगारिक पदें येथें उद्धृत करतां येण्यासारखीं आहेत. या पदांची भाषा शुद्ध, सुंदर व मधुर आहे. पद्यलालित्याच्या बाबतींत त्याचा हात धरणारा कोणी नाहीं. तीं पदें ऐकल्याशिवाय त्यांच्यामधील गोडी कळत नाहीं. हीं पदें ऐकतांना क्षणभर तरी मन तल्लिन झाल्याशिवाय रहात नाहीं.

दयारामाच्या काव्यांचें परीक्षण पुष्कळांनीं केलें आहे. त्या सगळ्यांत नवलरामनें केलेलें परीक्षण फार मार्मिक आहे. दयारामची कविता भावप्रधान व प्रेमपूर्ण असते. पण त्याच्या काव्यांत मानवी स्वभावाचें सत्यस्वरूप रंगविलें गेलेलें आढळत नाहीं. शृंगाररसाच्या बाबतींत प्रेमानंद दयारामापेक्षां श्रेष्ठ आहे. नवलरामच्या मतें दयाराम याची जितकी स्तुति केली जाते तितकी त्याची योग्यता नाहीं पण गोवर्धनराम त्रिपाठींचें मत याच्या उलट आहे. यांच्या मतें दयारामाची भाषा फार सुंदर व परिणामकारक असून त्याचें काव्य फार श्रेष्ठ प्रतीचें आहे. कांहीं विद्वानांनीं दयारामाला हफीझच्या जोडीला तर कांहींनीं बायरनच्या जोडीला नेऊन बसविलें आहे. कांहींनीं तर त्याची सूरदासाशीं तुलना केली आहे. अभिजात वाङ्मय लोकप्रिय करणाऱ्या कवींमध्यें दयारामाची योग्यता फार मोठी आहे. दयारामाच्या काळीं अभिजात काव्याला उतरती कळा लागली होती. पण ही दुःस्थिति नाहींशी करून दयारामानें अभिजात काव्याला नरसीमेहेता व प्रेमानंदाच्या वेळेप्रमाणें लोकप्रिय करून टाकलें. दुर्दैवानें दयारामाच्यानंतर ही स्थिति टिकली नाहीं ही गोष्ट निराळी.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत गुजराथी काव्याला एक प्रकारचें नवीन वळण लागलें असें म्हणावयास हरकत नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वभागातील काव्यांवर १८ व्या शतकामधील काव्याच्या स्वरूपाचीच छाप पडलेली होती पण उत्तरार्धांत ज्या वेळीं वर्डस्वर्थ, शेले, टेनिसन इत्यादि कवींच्या काव्यांचा अभ्यास सुरू झाला त्यावेळीं काव्याचें स्वरूप हळू हळू पालटूं लागलें.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धामधील दोन प्रसिद्ध कवी म्हणजे दलपतराम (१८१७–१८९८) व नर्मदाशंकर (१८३३–१८८६) हे होत. इंग्लिश शिक्षणामुळें हिंदू लोकांच्या आचारविचारांत हळू हळू क्रांति घडून येत चालली होती. हिंदु समाजातील व्यंगें लोकांच्या नजरेस येत चालली होतीं. महाराष्ट्राप्रमाणेंच गुजराथेंत सामाजिक सुधारणेचें कंकण बांधणारे, समाजवीर निर्माण झाले होते. या समाजसुधारणेच्या चळवळीचा परिणाम वाङ्मयावरहि झाल्यावांचून राहिला नाहीं. दलपतराम व नर्मदाशंकर या कवींनीं याच विषयावर काव्यें लिहिण्यास सुरुवात केली. दलपतराम हा धीरे धीरे सुधारणा व्हावी या मताचा होता, तर त्याच्या उलट नर्मदाशंकर हा आगरकरी बाण्याचा म्हणजे ताबडतोब सामाजिक सुधारणा झाली पाहिजे असें म्हणणारा होता. वेनचरित्र नामक आपल्या काव्याच्या दुसऱ्या भागांत 'सज्जन सांभाळाव जो रे धीरे धीरे सुधारानो सार, लाखो कीडीभर लाडवो, आखो मेलीये तो मरी जाय, भूको करी भभरावीये, तो ते खासी रीतेथी जाय, " अशा रीतीनें धीरे धीरे समाजसुधारणा घडवून आणण्याची लोकांना दलपतराम कवीनें इशारत दिली आहे. पण उलटपक्षीं नर्मदाशंकरनें "या होम करीने पडो फतेह छे आगे" अशा गंभीर शब्दांत एकदम समाजसुधारणा करण्याचा संदेश त्यानें लोकांना पाठविला आहे. दलपतराम हा श्रीमाळी ब्राह्मण होता त्यानें व्रज व संस्कृत भाषेचा चांगला अभ्यास केला होता. तो सद्या येथील पोलिटिकल एजंटच्या कचेरींत दफ्तरदार

होता. पुढें फोर्ब्सनें आपल्याला ग्रंथ लिहिण्याच्या बाबतींत सहाय्य करण्याविषयीं दलपतरामाला लिहिलें. तेव्हां त्यानें आपल्या नोकरीला रामराम ठोकला व आपलें आवडतें कार्य पार पाडण्यासाठीं तो फोर्ब्सच्या हाताखालीं राहिला. गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटीमध्यें त्याने आपलें नांव दाखल केलें. त्या ठिकाणीं काम करीत असतां त्यानें पुष्कळ ठिकाणीं हिंडून गुजराथी वाङ्मय एकत्र केलें. पुढें त्याची दृष्टि क्षीण झाल्यामुळें त्यानें ही सोसायटी सोडली व सरकारनें त्याला शेवटपर्यंत २० रुपयांचें पेन्शन दिलें.

दलपतरामचा काव्यसंग्रह मोठा आहे. याशिवाय बुद्धिप्रकाश नांवाचें एक मासिक त्यानें चालविलें होतें. यानें कांहीं नाटकेंहि लिहिलीं आहेत. सामाजिक विषयावर त्यानें पुष्कळ काव्यें लिहिलीं. त्याच्या ग्रंथांत भुतावरील निबंध, जातीवरील निबंध, लक्ष्मीनाटक, कथनसप्तशती, पुनर्विवाह, स्त्रीसंवाद, बालविवाहनिबंध, गुरुशिष्यांचीं परस्परकर्तव्यें, शहरसुधारणेवरील निबंध, विजयक्षम, काव्यदोहन, हंस. काव्यशतक, श्रावणाख्यान, हुन्नरखाननी चढाई. यंत्रखान, मिथ्याभिमान नाटक इत्यादि ग्रंथ प्रमुख होत.

दलपतरामाच्या काव्यात (१) आस्ते सुधारणा व्हावी या मताचा पुरस्कार, (२)स्वातंत्र्यलालसा व(३) देशाभिमान हे तीन गुण दिसून येतात. सुधारणेसंबंधींचें त्याचें मत वर दिलेल्या उताऱ्यावरून दिसून येतें. स्वातंत्र्यलालसादर्शक उतारा खालीलप्रमाणें आहे. ' आ शाणी सरकारनो निर्मळ छे शुभ न्याय । पण बोल्यावीण कोईनां बार नहि वेचाय, मागे तेने तो मळे अदल रूडो इन्साफ, ए अंतरजामी नथी केम करे दरयाफ ' या उताऱ्यांत सरकारशीं सनदशीर रीतीनें भांडून, स्वातंत्र्य मिळविण्याचें तत्व त्यानें प्रतिपादन केलें आहे. ' स्वदेशनुं सर्व प्रकार सारूं, तमे करो ते गणिनेतमारुं जरूर एमा जन धर्म जाणो अरे स्वदेशी अभिमान आणो' या कवितेंत त्याची स्वदेशभक्ति दिसून येते.

काव्यदृष्ट्या विचार केल्यास दलपतराम हा श्रेष्ठ दर्जाचा कवी होता असें म्हणतां येत नाहीं. त्याच्या वर्णनांत नाविन्य अगर प्रतिभा दिसून येत नाहीं. त्याच्या काव्यांत आढळून येणारें सृष्टिवर्णन अगदीं साधें आहे. फोर्ब्सचें गुजराथी कवींवर फार प्रेम असे. त्यामुळें दलपरामनें ' फोर्ब्स विलास ' नांवाचें एक काव्य लिहिलें. हें काव्यहि अगदीं सामान्य आहे. दलपतरामचें वेनचरित्रपर काव्य मात्र फार बहारीचें आहे. वेनचरित्राच्या प्रसंगानें त्यानें सामाजिक सुधारणेवर आपले विचार प्रगट केलेले आहेत. दलपतरामची भाषा सामान्य माणसांनांहि कळण्यासारखी असते. तो व्रज व संस्कृत भाषेंत निपुण होता. तरी त्याच्या काव्यांत संस्कृत भाषेंतील शब्द फार आढळून येत नाहींत. त्यामुळें त्याचें काव्य सुबोध व लोकप्रिय झालें आहे. नवलरामनें त्याच्या संबंधीं असे उद्गार काढले आहेत की, दलपतरामची कविता गंभीर, अर्थपूर्ण, चतुराईयुक्त, व ' सभारंजनी ' अशी आहे. त्याच्या काव्यांत सर्व प्रकारचे रस आढळतात. पण, त्यांत अतिशयोक्ति बिलकूल दिसून येत नाहीं. निःपक्षपातीपणानें जगांतील व्यवहाराचें निरीक्षण करून नंतर व्यवहारांतील प्रसंग वर्णन करण्याची त्याची पद्धत आहे. त्यामुळें त्याच्या काव्यांत भावनेची उत्कटता दिसून येत नाहीं. त्याची लेखनशैली सूक्ष्मविनोदप्रचुर, मधुर व खुसखुशीत असते. याच्या अनुयायांत बुलाखीराम, चकुभाई, रणछोड गलुराम, नन मियन हे प्रमुख होत. बुलाखीरामाचें काव्यकौस्तुभ प्रसिद्ध आहे. रणछोड गलुरामचें रणछोडकाव्यसुधा हें काव्यहि बऱ्या प्रकारचें आहे. यांशिवाय, हरजीवन कुबेर, कवि भवानी शंकर, दलपतराम दुर्लभराम, गणपतराम, राजाराम हे कवीहि याच्याच शिष्यवर्गांत मोडतात.

नर्मदाशंकर—हा गुजराथी लोकांचा आवडता कवि होय. यानें गुजराथी गद्यग्रंथहि पुष्कळ लिहिले. गुजराथी वाङ्मयांत त्यानें स्थित्यंतर घडविलें. हा नागरब्राह्मण जातीचा होता. याचें शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें झालें. त्यानें इंग्लिश भाषेंतील बहुतेक कवी वाचून काढले होते. याशिवाय मराठी, हिंदी, संस्कृत इत्यादि भाषांचाहि त्यानें अभ्यास केला होता. लहानपणीं तो मोठा रंगेल व चैनी असे. स्वच्छंदी आचारविचार हे काव्याला पोषक आहेत असें त्याचें मत होतें. पुढें आयुष्याच्या उत्तरार्धांत मात्र त्याचें मत बदललें व तो नियमितपणानें राहूं लागला. त्याचे शेवटचे दिवस दारिद्र्याशीं झगडण्यांत गेले.

नर्मदाशंकरमधील मोठा गुण म्हणजे त्याचा स्वच्छंदी स्वभाव होय. परंपरागत आचारविचाराप्रमाणें वागणें त्याला कधींच पसंत पडलें नाहीं. आपल्याविषयीं त्यानें जी हकीकत लिहून ठेवली आहे तीवरून तो चैनी व गर्विष्ठ मनुष्य असावा असें दिसतें. बायकांच्या बाबतींतील त्याची वागणूक आक्षेपार्हच होती. उत्तरवयांत मात्र नर्मदाशंकरमध्यें मोठी क्रांति घडून आली. जुनें तें सारें कुचकामाचें अशी त्याची पूर्वीची समजूत उत्तरोत्तर पालटत चालली. धर्माकडे त्याचें लक्ष हळुहळू वेधूं लागलें. धर्मविचार नावाच्या त्याच्या ग्रंथांत त्याचे धर्मासंबंधाचे विचार आढळून येतात.

वाङ्मयसेवा पत्करावयाचा त्यानें निश्चित केल्यापासून त्यानें संस्कृत, हिंदी, इंग्लिश भाषेंतील ग्रंथाचें सूक्ष्म अध्ययन केलें. अलंकारशास्त्राचा व छंदःशास्त्राचा त्यानें चांगला अभ्यास केला. त्यानें काव्यापेक्षां गद्यग्रंथच अधिक निर्माण केले. नवलरामनें त्याचें चरित्र लिहिलें असून त्यांमध्यें नर्मदाशंकरानें कोणकोणते ग्रंथ लिहिले याची साग्र माहिती त्यानें दिली आहे. १८५८–१८६५ च्या दरम्यान नर्मदाशंकरनें पुष्कळच ग्रंथ लिहिले. आपल्या कवितेचे खंड जसजसे त्यानें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली तसतशी त्याची लोकप्रियता शुक्लेंदुप्रमाणें वाढत चालली. १८६६ मध्यें त्यानें 'नर्मकविता' या नांवाखालीं आपलें काव्य प्रसिद्ध केलें. आपल्या काव्यांतील

चमत्कृतीची लोकांनां कल्पना येत नाहीं असें त्यानें म्हटलें आहे. त्यानें स्वतःच आपल्या काव्याचें वर्गीकरण केलेलें आहे व त्यांतील गुणांचें वर्णन केलें आहे.

त्याच्या काव्याचें क्षेत्र फार विस्तृत आहे.सामाजिक सुधारणाविषयक निरनिराळ्या विषयांवर व धार्मिक, नैतिक,ऐतिहासिक अशा सर्व विषयांवर त्यानें काव्यें रचिलीं आहेत. याशिवाय अलंकारप्रवेश, रसप्रवेश,नायिकाप्रवेश, इत्यादि काव्यें त्यानें लिहिलेलीं आहेत. भावगीतें लिहिणारा हा पहिलाच कवि होय असें म्हणावयास हरकत नाहीं. त्याची काव्याची कल्पना वर्डस्वर्थच्या व्याख्येप्रमाणेंच होती. ऋतुवर्णन काव्यांत, भावनेच्या उत्कंटतेमुळें आपोआप बाहेर पडलेल्या कविता पुष्कळ आढळून येतात.

बालविधवांची दुर्दशा अवलोकन करून त्याचें मन अतिशय कष्टी होत असे. वैधव्यचरित्रांत त्याला वाटत असलेली विधवा विषयींची चिंता उत्तम रीतीनें निदर्शनास येते. विधवाखेद ही कविता लिहितांना स्वतः रडल्याचें त्यानें लिहिलें आहे. पण कांहीं कांहीं ठिकाणीं त्यानें अतिशयोक्तीचें वर्णन केलें आहे. हाच दुर्गुण त्याच्या इतर काव्यांतहि आढळतो.ऋतुवर्णनपर काव्यांत अश्लील शब्दांची रेलचेल आढळते. आपल्या प्रत्येक कवितेवर त्यानें टीका लिहिलेली आहे व त्यांत तर अश्लील वाक्यांनां नुसतां ऊत आलेला दिसतो लोकांच्या पापी अचरणाची पूर्ण फोड करून त्यांनां नीतिमान बनविण्यासाटीं आपण मुद्दाम इतक्या स्पष्ट शब्दांत टीका लिहिलेली आहे असें त्यानें म्हटलें आहे. पण त्याचा इष्ट परिणाम होण्याऐवजीं अनिष्टच परिणाम होण्याचा संभव आहे.

निसर्गाचें वर्णन करण्यांत मात्र त्याचा हातखंडा आहे. लहानपणापासून त्याला निसर्गनिरीक्षणाची फार आवड होती. निसर्गामध्यें गूढतत्व भरलेलें आहे असें तो म्हणत असे. 'जेने बीजा पथरा कहे तेने कविजन हीरा लेहे, बलीहारी छे कुदरत तणी, कवि जुए छे खुबी घणी, बीजा पण संस्कारी जेह, पीए ए प्रेमामृत तेह ' असें त्यानें निसर्गाचें वर्णन केलें आहे. प्रवासवर्णन नामक आपलें काव्य शुद्ध शांतरसपूर्ण आहे असें त्यानें म्हटलें आहे. निसर्गवर्णनाचे कांहीं मासले खालीं दिले आहेत; त्यावरून तें किती उत्कृष्ट साधलें आहे याची कल्पना येईल. नर्मदा नदीचें वर्णन त्यानें केलें आहे ते असें:— 'नर्मदा शु गाढ शोभा सांजनी । हारे पवन पाणी बादळ रंगना सुसाजनी । होजीरे ॥...हारे गुलाबी घेरो तेवंग आसमानने हारे गुलाबी फुलोना पाणीनो मेदाननो। होजिरे ॥

अर्थः—नर्मदे सायंकाळच्या तुझ्या शोभेचें मी किती वर्णन करूं ? वारा, वादळाचा रंग व पाणी, यांची शोभा यासमयीं एकवटली आहे आकाशाचा रंग गुलाबी असून तुझ्या पाण्याचा रंग गुलाबाच्या फुलासारखा आहे. पर्जन्यासंबंधीं वर्णन करताना नमर्दाशंकर म्हणतो ' पर्जन्यराजाचे भाट कावळे हे पर्जन्यराजाची स्वारी आली, चूप बसा चूप बसा अशी ललकारी ठोकीत आहेत, वारा हा अगदीं शांत आहे, व सर्वत्र गंभीर शांतता पसरली आहे या देखाव्याचें यथार्थ वर्णन मी कसें करूं ? ही पहा मेघराजाची स्वारी आली. वृक्षर जींनीं आपलें डोकें त्याच्यापुढें लवविलें आहे. व अशा रीतीनें त्याचें स्वागत केलें आहे.' अशा प्रकारचे सुंदर उतारे आणखीहि देतां येतील.

निसर्गवर्णनापेक्षाहि ऐतिहासिक विषयांचें वर्णन करण्यांत त्याचें कौशल्य अधिक नजरेस येतें. विद्या, धर्म, वहेम, देशीराज, परदेशीराज, नीति इत्यादि बाबतींत हिंदुसमाजाची अधोगति चाललेली होती तिचें वर्णन 'हिंदुओनो पडती' या काव्यांत केलें आहे. त्याचप्रमाणें उत्तरेकडील, व दक्षिणेकडील हिंदु राज्यांमधील प्रसिद्ध व्यक्तींचीं वर्णनेंहि त्यानें बहारीचीं दिलीं आहेत. गुजराथीमध्यें एक महाकाव्य लिहिण्याचा त्याचा विचार होता. हिंदुस्थानची स्थिति वर्णन करतांनां तो म्हणतो ' हिंदु देशनो हाल थया छे भुंडो आजे सत्ता मोटी खोइ नीचुं ते जोडा लाजे '. ' आज हिंदुस्थानची स्थिति फार वाईट झाली आहे, त्याचें पूर्व वैभव आज नष्ट झालें आहे व लज्जेनें त्यानें मान खालीं घातली आहे.' पुराणमतवादीपणा, ब्राह्मणांचें वर्चस्व,देशी राजाचा अदूरदर्शीपणा, जातिद्वेष इत्यादि कारणांमुळें हिंदुस्थानला वाईट दिवस प्राप्त झाले असें तो म्हणतोः— " विना देश अभिमान, देश उत्कर्ष न थाये । देशी राज समसान जे हतो खावा धाये । राज समंधी ऐक्य नथी अहिंना लोकोमां । जाति बंधनो खुब जनो वाधोना मोमा ". पोरसची शिकंदराविरुद्ध लढाई, महंमद गझनीच्या विरुद्ध भामदेवाची लढाई, पानपत येथें पृथ्वीराजानें घोरीशीं केलेलें युद्ध अशा प्रकारचे सहा प्रसंग त्यानें बहारीत वर्णन केले आहेत व सरतेशेवटीं ' कोनुं मोढुं मे जोयुं, अंगमा रंगरमे छे ' उछळी उछळी लोही ऐकियां खूब करे छे अर्थ, याचा ' आज सकाळीं मी कोणाचें शुभ मुख पाहिलें आहे नकळे; माझ्या नसानसांतून आज अपूर्व उत्साह दाटला आहे. माझें रक्त ताज्या दमानें उसळी मारीत आहे ' असे उत्साहपूर्ण शब्द त्यानें काढले आहेत.गुजराथसंबंधींचें त्याचें राष्ट्रगीत तर आज प्रत्येकाच्या तोंडीं आहे. व तें अत्यंत स्फूर्तिदायक आहे. 'जय जय गरवी गुजराथ । जय जय गरवी गुजराथ । दीपे अरुणु प्रभात । ध्वज प्रकाशे झळळळ कुसुंबी प्रेमशौर्य अकीत। तूं भणव भणव निज संतति सडने प्रेम भक्तिनी रीत " अशा स्फूर्तिदायक रीतीनें या गीताचा प्रारंभ झालेला आहे. सुरतेच्या प्राचीन वैभवावरील त्याची कविता अशीच स्फूर्तीनें नटलेली आहे. धर्मविषयांवरील त्याचीं काव्येंहि भक्तिपूर्ण अशींच आहेत.

वर्ड्स्वर्थचे 'धुइ आर सेव्हन' 'ल्यूसी ग्रे' व राबर्ट सौदेचें 'लार्ड नेल्सन, हीं तीन काव्यें त्यानें भाषांतरिलीं आहेत. याशिवाय प्रेमसंबंधी त्यानें कांहीं कविता लिहिण्याचाहि

प्रयत्न केला. सामाजिक सुधारणेसंबंधीं त्याचीं काव्येंहि फार बोधपर आहेत. त्याच्या प्रीतिसंबंधीच्या काव्यांत, दिव्य प्रेमापेक्षां, शारीरिक प्रेमासंबंधीचेंच वर्णन केलेलें जास्त आढळतें.

नर्मदाशंकराच्या भाषेंत प्रसाद आढळून येत नाहीं. दलपतरामच्या काव्यांत जो स्वाभाविकपणा आढळतो, तो याच्यांत आढळून येत नाहीं. अश्लील भाषा याच्या काव्यांत पदोपदीं आढळून येते. नवलरामानें त्याच्या काव्याची फार स्तुति केलेली आहे पण त्यांत अतिशयोक्ति आहे. रावबहादूर रमणभाईनीं त्याच्या काव्याविषयीं जे उद्गार काढले आहेत ते अधिक समर्पक आहेत. ते म्हणतात. "नर्मदाशंकरची कविता भावप्रधान आहे. कांहीं प्रसंगीं त्याची कल्पनागति अप्रतिहत आहे तर कांहीं ठिकाणीं फारच मर्यादित आहे. त्याच्या भावनामध्यें नाविन्याची छटा फारशी आढळत नाहीं."

याशिवाय नर्मदाशंकरानें लिहिलेला नर्मकोश व नर्मकथासंग्रह हे ग्रंथ फारच महत्वाचे आहेत व यामुळें त्यानें आपलें नांव गुजराथी वाङ्मयात अजरामर करून ठेवलें आहे. त्याचा कोश १८३७ मध्यें प्रसिद्ध झाला.

नर्मदाशंकराच्या अनुयायात सवितानारायण हा मुख्य होय. त्याचा 'सविताकृत कविता' हा काव्यसंग्रह बऱ्यापैकीं आहे. पण त्याहिपेक्षा त्यानें व्रजभाषेंत ज्या कविता केल्या आहेत त्या अधिक चांगल्या आहेत. याशिवाय अलंकार चंद्रिका व नीतिसुधातरंगिणी हे त्याचे ग्रंथहि बरे आहेत. विजयशंकर त्रिवेदि यांचें 'विजयवाणी' हें काव्य त्याच काळीं प्रसिद्धि पावलें पण हल्लीं तें मागें पडलें आहे. कवि हिराचंद कानजी हा नर्मदाशंकराच्या काळचा कवि होता. नर्मदाशंकरापेक्षां आपला दर्जा श्रेष्ठ आहे असें याचें मत होतें. त्याचें मिथ्याभिमानमतखंडन हें काव्य बऱ्यापैकीं आहे. नर्मदाशंकराला काव्याचे तत्त्व कळलेंच नाहीं असें तो म्हणत असे व नर्मदाशंकराच्या पिंगलप्रवेश, अलंकार प्रवेश, रसप्रवेश इत्यादि ग्रंथांवर त्यानें फार टीका केली आहे. स्वतः यानें, 'गुजराथी अनेकार्थकोश,' 'सुधरेल शास्त्र,' 'गुजरातनी गांगई,' 'भाषाभूषण' 'मानमंजरी,' 'वैराग्यबोध,' इत्यादि काव्यें लिहिलीं आहेत.

भोलानाथ साराभाई—रायबहादुर भोलानाथ साराभाई या कवीचें नांव त्याच्या भक्तिपर काव्याबद्दल फार प्रसिद्ध आहे. हे प्रार्थनासमाजिष्ट होते. गुजराथमध्यें जे सगुणोपासनेचें प्रस्थ माजलें होतें तें कमी करण्याचा व एकेश्वरी पंथाचा प्रसार करण्याचा यांनीं प्रयत्न केला. यांचें ईश्वरप्रार्थनामाला हें काव्य फारच उत्कृष्ट आहे. त्यामध्यें भोलानाथांचा भोळाभाव व परमेश्वरासंबंधीं अनन्य भक्ति हे गुण दिसून येतात. ईश्वरप्रार्थनामालेंतील त्यांचीं गीतें गातांना अंतःकरण भक्तिमय व तल्लिन होतें. त्यांचीं पदें अर्थगंभीर व रसपूर्ण असतात. त्यांच्या पदांचे एकदोन मासले पुढें दिलेले आहेत:—

'दिननो दयाल छोडी कोने शरण जाऊं। मात तात जाणी प्रभुचरण प्रतें धाऊं' तसेंच 'विधाता धन्य छे तारी रचना जगतनी अनंत। अतर्क्य अगोचर रूप तमारूं। व्यापी रह्या सत्ता थकी भगवंत॥' ही ईश्वरीप्रार्थनामाला गुजराथमध्यें अतिशय लोकप्रिय आहे.

कलापी (१८७४–१९००):—कलापी या टोपण नांवाखालीं प्रसिद्ध असलेले कवी हे काठेवाडमधील लाठी देशाचे टाकोरसाहेब श्री सुरसिंहजी तख्तसिंहजी गोहेल हे होत. यांचें शिक्षण राजकुमार कॉलेजमध्यें झालें. नंतर त्यांनीं हिंदुस्थान व काश्मीर येथें प्रवास केला. १८९५ मध्यें ते गादीवर बसले. त्यांनां १६ व्या वर्षी दोन बायका होत्या. त्यांपैकीं रमा ही आवडती बायको होती. हिच्या दासीजनांत एक सहासात वर्षांची दासी होती. हिनें कलापीचें मन आकर्षण करून घेतलें होतें. हिचें शोभना असें नांव त्यांनी ठेवलें होतें. ही वयांत आल्यावर तिचें त्यांनीं लग्न करून दिलें. पण शोभनेचें आपल्या नवऱ्यावर प्रेम नव्हतें. कलापीचें तर हिच्यावर अलोट प्रेम होतें. तेव्हां प्रेमाच्या पाशांत सांपडून जनापवादाला न भितां त्यांनीं तिच्याशीं उघडपणें विवाह केला. या कृत्याचा फार वाईट परिणाम होणार ही गोष्ट ते जाणून होते. हृदयत्रिपुटी नामक आपल्या प्रणयकाव्यात त्यांनीं आपला व शोभना व रमा यांचा संबंध कशा प्रकारचा होता हें सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या काव्यांतील प्रेम उच्च तरुणाच्या प्रेमाच्या स्वरूपाचें आहे.

लहानपणापासून इंग्लिश, संस्कृत, उर्दू व गुजराथी वाङ्मयाचा त्यांनीं अभ्यास चालू ठेवला होता. काव्य व तत्वज्ञान यांच्याकडे त्यांचा फार ओढा असे. शेले, वर्डस्वर्थ, इमर्सन, स्वीडनबर्ग हे त्यांचे आवडते ग्रंथकार होते व त्यांच्या काव्यांत या ग्रंथकारांच्या ग्रंथांतील कल्पना जागोजागीं आढळतात. संस्थानांतील कारस्थानांची त्यांना फार चीड असल्यामुळें ते या कारस्थानापासून नेहमीं अलिप्त रहात. गोवर्धनराम त्रिपाथी, मणिलाल द्विवेदी, मणिशंकरभट यांच्यासारख्या विद्वानांशीं सहवास वाढविण्यांत त्यांना नेहमीं आनंद वाटे. ते या विद्वानांशीं नेहमीं पत्रव्यवहार करीत. मोठेपणीं त्यांनां संसाराचा अगदीं वीट आला होता व आणखी कांहीं काल ते जगले असते तर त्यांनीं गादीचा त्याग करून वानप्रस्थाश्रम पत्करिला असता असें पुष्कळांचें म्हणणें आहे.

कलापीच्या प्रणयकवितांना 'प्रणयगीता' असें एका ग्रंथकारानें नांव दिलें आहे. यांच्या प्रणयसंबंधी कविता, उर्दू कवींच्या गझल वृत्तांत रचिलेल्या आहेत व या उर्दू कवींची प्रेमगीतांचीं छटा यांच्या काव्यांत दिसून येते. 'कमलिनी' हें काव्य शेलेच्या 'मेघ' या कवितेच्या धर्तीवर आहे. उर्दू कवींच्या विशेषतः हाफी कवींच्या कविता कलापीनें भाषांतर केल्या आहेत व त्या बऱ्या साधल्या आहेत. काश्मीरच्या प्रवासाच्या वर्णनपर काव्य फारच उत्कृष्ट साधलें

आहे. यांचें हमीरकाव्य हें ऐतिहासिक प्रसंगावरील काव्यहि सुंदर आहे. शुद्ध गुजराथींतील कलापीचें काव्य, मिश्र गुजराथी भाषेंतील त्यांच्या कवितापेक्षां सरस आहे. यांची प्रेमासंबंधींची कांहीं कडवीं गुजराथी लोकांत फार लोकप्रिय झालीं आहेत. यांची कीट्स कवीशीं नेहमीं तुलना करण्यांत येते. कांहीं विद्वान यांची शेले कवीशीहि तुलना करतांना आढळतात पण ह्यांत बरींच अतिशयोक्ति आहे. कलापीच्या गझलाप्रमाणेंच पुष्कळच गुजराथी कवींनीं गझलें रचण्याचा प्रयत्न केला आहे, पण त्यांत त्यांना जितकें यश यावें तितकें आलें नाहीं.

प्रो. मणिलाल द्विवेदीः—यांनीं काव्यापेक्षां गद्यवाङ्मयांत आपलें नांव गाजविलें. तरी पण त्यांचें काव्यहि श्रेष्ठ दर्जाचें आहे. त्यांच्या कवितेंत वेदांत भरलेला आहे. आत्मनिमज्जन, अभेदोर्मि, प्रेमजीवन इत्यादि त्यांच्या तत्वज्ञानात्मक कविता प्रसिद्ध आहेत. याशिवाय 'कही लाखो निराशामा अमर आशा छुपाई छे' हें त्यांचें गझल फार लोकप्रिय आहे.

बलशंकरः—मणिलाल द्विवेदी यांच्यापेक्षां बलशंकर यांचें काव्य अधिक सरस आहे. त्यांतल्या त्यांत त्यांची गझलकाव्यें उत्कृष्ट आहेत. यानें हाफीजचीं कांहीं गझल भाषांतरें केलेलीं आहेत.

गोवर्धनराम त्रिपाठीः—हा सुप्रसिद्ध विद्वान असून त्याची काव्यापेक्षां गद्य बद्दलच अधिक प्रसिद्धि आहे. त्याचें स्नेहमुद्रा हें काव्य चांगलें आहे. याशिवाय इतर पुष्कळ कविता त्यानें लिहिल्या आहेत. आपल्या गद्यकादंबऱ्यांत मधून मधून त्यानें कविता घुसडून दिली आहे व ती कविताहि फार सुंदर आहे.

देरसारी या कवीचें 'बुलबुल' नामक गझल अतिशय प्रसिद्ध आहे. हरिलाल ध्रुव या कवीचीं, आर्योत्कर्ष, पूर्वामंघ, कौमोदिमाधव इत्यादि काव्यें लोकप्रिय आहेत. याच्या काव्यांत जलदद्देशाभिमान दिसून येतो. याच्या काव्यानें गुजराथी भाषेंत बरेंच वरचें स्थान पटकावलेलें आहे.

या शतकांत पारशी कवीहि पुष्कळच उदयास आले. मंचरजी शापूरजी या कवीचा कवितासंग्रह फारच मोटा आहे. शोराब आणि रुस्तुम यांच्यामधील युद्धावरील काव्य, फार सुंदर असून तें वाचलें असतां डोळ्यांतून अश्रू न येणारा वाचक विरळाच सांपडेल. याच्या काव्यावर दलपतरामच्या काव्याची छाप पडलेली दिसते. फरदुमजी मर्झबाजी यांचाहि काव्यसंग्रह मोटा आहे. यांनीं सादीच्या गुलिस्थानचें 'फुलेस्थान पोथी' या काव्यांत भाषांतर केलेलें आहे. जमशेटजी पेटिट हे विशेषतः त्यांच्या निर्यामक कवितांबद्दल प्रसिद्ध आहेत. 'मोहरी मडोह तथा बीजी कविताओ' या त्यांच्या काव्यसंग्रहांत पुष्कळ चांगल्या कविता आढळतात. बहिरामजी मलबारी यांचें 'नीतिविनोद' हें काव्य उत्तम आहे. यांत तरुण विधवांच्या स्थितीवर, व जरठतरुणी विवाहावर पुष्कळ कविता लिहिलेल्या आढळतात. याशिवाय विल्सनविरह, अनुभविक, संसारिक इत्यादि त्यांचीं काव्यें फारच लोकप्रिय झालीं आहेत. खबरदार या कवीचीं, काव्यरसिका, विलासिका, प्रकाशिका, भारतनो टंकार हीं काव्यें प्रसिद्ध आहेत. यानें 'गुणवंती गुजराथ' नामक एक राष्ट्रगीत लिहिलें असून तें 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या तोडीचें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. याचें काव्य मुख्यतः भावनाप्रधान असल्याचें आढळतें. हमनजी फरोज (१८४८—१९२०) याची कविता फार थोडी आहे पण याच्या काव्यांतील प्रत्येक ओळींत त्याचें फारशी काव्यांवरील प्रभुत्व दिसून येतें. त्याचें 'सखुने राहत' हें काव्य प्रसिद्ध आहे.

नरसिंहराव दिवेटिया यांनीं गुजराथी कवितेला नवीन प्रकारचें स्वरूप प्राप्त करून दिलें म्हटलें तरी चालेल. हे गुजराथी भाषेंतील एक जाडे विद्वान होत. कुसुममाला हें त्यांचें पहिलें काव्य होय. यांत निरनिराळ्या विषयावरील भावगीतांचा संग्रह आहे. या गीतांतील निसर्गवर्णन फारच बहारीचें आहे. 'हृदयवीणा' या कवितासंग्रहांत त्याची विशाल कल्पना व हृदयाची तळमळ हे गुण प्रामुख्यानें दिसून येतात. याच्या काव्यावर पाश्चिमात्य कवींची छाप फार पडली आहे असा आक्षेप घेण्यांत येतो पण तो खरा नाहीं. नूपुरझंकार, स्मरणगीता हीं त्याचीं काव्यें फारच उत्कृष्ट आहेत. रवबहादूर कातवाला यांचें पानिपत काव्य काव्यदृष्ट्या विशेष श्रेष्ठ दर्जाचें नसलें तरी त्यांतील भाषा जोरदार व भारदस्त आहे. मणिशंकरभट्ट यांचीं 'वसंत विजय' व 'चक्रवाकमिथुन' हीं काव्यें विशेष प्रसिद्ध आहेत.

पण हल्लींचे सर्वांत उत्कृष्ट कवि म्हणजे नानालाल दलपतराम हे होत. यांचें 'जय व जयंत' हें नाटक फारच उत्कृष्ट आहे. त्यांच्या काव्यांत नवनिच तत्वें प्रतिपादन केलेलीं आढळतात. काव्यदृष्ट्या यांचीं काव्यें उच्च दर्जाचीं आहेत. यांचीं भावगीतें वाद्यांच्या साहाय्यानें गाता येण्यासारखीं आहेत. दिल्लीदरबारच्या वेळीं बादशहा येथें आले असतांना त्यांच्यावर एक सुंदर स्वागतपर पद्य यांनीं रचलें आहे. याशिवाय त्यांचीं 'ग्राम गीतें' कल्पनाप्रचुर, रसपूर्ण व प्रासादिक आहेत. यांनीं भगवद्गीतेचें कवितावद्ध भाषांतर केलें आहे.

नानालालशिवाय हल्लीं दौलतराम पांड्या, भीमराव, जयशंकर वच, रमणबाई निलकंठ हेहि नांवाजलेले कवी आहेत. कवयित्रींमध्यें सुमतीबाई ही लल्लुभाई सामळदास यांची कन्या प्रसिद्ध आहे. हिचें 'दिव्यमेघपालयालक' हें काव्य फार हृदयस्पर्शी आहे. ही कवयित्री अधिक वर्षे जगली असती तर तिनें आपलें नांव केलें असतें; पण ती तरुणपणींच मृत्युमुखीं पडली. विजयालक्ष्मी हिचें 'प्रेमयाचना' नांवाचें एक काव्य आहे. यांत स्त्रियांच्या पतिव्रताधर्मावर तिनें आपले विचार प्रगट केलेले आहेत.

सारांश, दयाराम नंतरच्या काळांतील काव्यसृष्टींत दलपतराम व त्याचा संप्रदाय व नर्मदाशंकर व त्यांचा संप्रदाय हे प्रमुख सांप्रदाय होत. याशिवाय नरसिंहराव दिवेटिया व नानालाल या कवींनी निर्माण केलेला तिसरा संप्रदाय होय. हे तिन्ही संप्रदाय आपापल्या परीनें श्रेष्ठ असून त्यांनीं गुजराथी काव्याला श्रेष्ठ प्रकारचें स्वरूप आणून दिलें आहे यांत शंका नाहीं.

काठेवाडमध्यें एक स्वतंत्र प्रकारचें वाङ्मय आपल्याला दृष्टीस पडतें. तशा प्रकारचें वाङ्मय, गुजराथी वाङ्मयामध्यें आढळून येत नाहीं. या वाङ्मयाचें नांव दुहावाङ्मय असें आहे. या दुहावाङ्मयाची भाषा गुजराथीहून निराळी आहे. या वाङ्मयांत तत्कालीन काठेवाडी समाजाचें प्रतिबिंब फार उत्तम तऱ्हेनें दृष्टीस पडतें. हें दुहावाङ्मय संकलित करण्याचा अद्यापि व्हावा तसा प्रयत्न झाला नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. दुहा याचा अर्थ कडवें. कडव्यामध्यें हीं काव्यें लिहिली गेल्यामुळें त्यांनां दुहावाङ्मय हें नांव पडलें. या दुहावाङ्मयामध्यें, लिहिलेल्या काव्यांत हलामन जेथवा; उजली व मेहा, राणकदेवी, सिद्धराज, इत्यादि विषयांवर लिहिलेलीं काव्यें फार प्रसिद्ध आहेत. हीं काव्यें फार सुंदर असून तीं तेजस्वी भाषेंत लिहिलेलीं आहेत.

गुजराथी गद्यवाङ्मय.—ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रसार करण्यापूर्वी गुजराथी भाषेंत गद्यवाङ्मयाचा जवळ जवळ अभावच होता असें म्हटलें तरी चालेल. गुजराथमधील शिलालेख, ताम्रपट, सनदा, गहाणखतें इत्यादींमध्यें जें कांहीं गद्य भाग सांपडतील तेवढेच. याशिवाय नाहीं म्हणावयाला मंत्रतंत्र अगर हितोपदेश यांमधील कांहीं भागाचें भाषांतर झालेलें दृष्टीस पडतें. बाणाची कादंबरी मूळ संस्कृतांत गद्यामध्यें असून तिचें गुजराथीमधील भाषांतर पहावें तो कवितेमध्यें झालेलें आढळतें. अशी स्थिति १८५० च्या पूर्वी होती. पुढें १८५० नंतर रणछोडदास, गिरिधरभाईसारख्या कांहीं गुजराथी गृहस्थांनीं व कांहीं पारशी गृहस्थांनीं शालोपयोगी अशीं पुस्तकें लिहिण्यास सुरवात केली. अर्थातच हीं पुस्तकें गद्य होतीं व त्यांमधील भाषा अगदीं सोपी असे. हीं पुस्तकें गुजराथी भाषेंत गद्यवाङ्मय तयार करण्याच्या हेतूनें झालेलीं नसून शाळेंतील विद्यार्थ्यांसाठीं म्हणून तीं लिहिलीं गेलीं होतीं. कांहीं मिशनऱ्यांनींहि गुजराथीमध्यें बायबल वगैरे ग्रंथांचें भाषांतर केलें होतें.

गुजराथीमध्यें गद्य लिहिण्यास खरी सुरवात नर्मदाशंकर यानें केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. नर्मदाशंकर हा ज्याप्रमाणें चांगला कवि होता त्याचप्रमाणें तो उत्तम गद्यलेखक होता. त्यानें इतिहास, तत्त्वज्ञान, धर्म इत्यादि विषयांवर गद्य ग्रंथ लिहिले. त्याची भाषा साधी पण मुद्देसूद व जोरदार असे; त्याच्या भाषेंत क्लिष्ट शब्दरचना व अलंकार आढळून येत नाहीं. संस्कृत भाषेचा त्यानें जरी खोल अभ्यास केला होता तरी त्यानें गुजराथी गद्यांत संस्कृत शब्द न कोंबण्याची शक्य तितकी खबरदारी घेतली होती. त्याचा सर्वांत प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे 'राज्यरंग' हा होय. हा ग्रंथ ऐतिहासिक आहे. या राज्यरंग ग्रंथांत त्यानें जगांतील प्रमुख राष्ट्रांचे इतिहास लिहिले आहेत. या ग्रंथांत त्यानें प्राचीन ग्रीसमधील महान पुरुषांनीं केलेलीं पराक्रमाचीं कृत्यें त्याचप्रमाणें बाबिलोनिया, ईजिप्त, रोम, ग्रीस, पर्शिया, या राष्ट्रांतील विभूतींचीं चरित्रें वर्णनें केलीं आहेत. आपल्या इकडील राम, लक्ष्मण, संग, प्रताप इत्यादि महापुरुषांचींहि चरित्रें या ग्रंथांत आलेलीं आहेत. या ग्रंथाची भाषा भारदस्त, सोपी पण सुंदर आहे. नर्मदाशंकरनें या राज्यरंगानंतर जो धर्मविचार नांवाचा ग्रंथ लिहिला त्यांमधील भाषा खोंचदार, गंभीर व मर्मभेदक आहे. त्यानें आपल्या ग्रंथाला 'नर्मगद्य' असें नांव दिलें आहे.

पण नर्मदाशंकरपेक्षांहि गुजराथीमधील गद्यभाषेला ओजस्वी वळण लावण्याचें श्रेय, नवलराम यांसच आहे. किंबहुना नवलरामाच्या तोडीचा खंदा गद्यलेखक, अद्यापिहि झाला नाहीं असें म्हणण्यास फारसा प्रत्यवाय नाहीं. यानें नर्मदाशंकरचें चरित्र लिहिलें आहे. नर्मदाशंकर या कवीच्या चरित्रांतील भाषेमध्यें यत्किंचितहि कृत्रिमपणा आढळून येत नाहीं. त्याचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'इंग्लिश लोकांचा इतिहास' हा होय. गुजराथी भाषेंत इंग्लिश लोकांचे इतिहास पुष्कळ नीं लिहिले आहेत. पण त्या सर्वांत नवलरामानें लिहिलेला इतिहास उत्कृष्ट आहे.

पण नवलरामाची प्रसिद्धि त्यानें केलेल्या निरनिराळ्या ग्रंथांच्या परिक्षणामुळें झालेली आहे. त्यापूर्वी गुजराथमध्यें वाङ्मयासंबंधीचें मार्मिक परीक्षण करणारे विद्वान् नव्हते म्हटले तरी चालेल. नवलरामाच्या नंतर मणिलाल द्विवेदी, मनसुखराम त्रिपाठी, नृसिंहराव दिवेटिया व प्रो. ध्रुव इत्यादि प्रसिद्ध परीक्षणकार झाले. तथापि या सर्वांहूनहि परीक्षणाच्या बाबतींत नवलराम हा श्रेष्ठ आहे. करण घेलो, कांता इत्यादि ग्रंथांचें त्यानें केलेलें परीक्षण फारच मार्मिक व मुद्देसूद आहे. इंग्लिश काव्याचा खोल अभ्यास त्यानें केलेला नव्हता. तथापि त्यानें केलेलें काव्यग्रंथाचें परीक्षण नेहमीं मार्मिक असे. नवलरामाची भाषा व लेखनपद्धति स्फूर्तिदायक व परिणामकारक आहे. पण ज्याप्रमाणें नर्मदाशंकर, दलपतराम व नवलराम यांची भाषा शास्त्रशुद्ध व सुलभ अशी आढळून येते तशी नवलरामाच्या नंतरच्या परीक्षणकारांची आढळून येत नाहीं. यांच्यानंतरच्या टीकाकारांची भाषा क्लिष्ट असून तीमध्यें संस्कृत शब्दांचा भरणा फार असे. त्यामुळें हीं परीक्षणें खालच्या वर्गांतील लोकांनां समजण्याला अवघड जाऊं लागलीं. याचा परिणाम असा झाला कीं, नवलरामानंतरच्या टीकाकारांनीं गुजराथी भाषेला जें बोजड वळण लावलें तें वळण पारशी लोकांनां अनुसरण्यास जड जाऊं

लागलें त्यामुळें साहजिकच पारशांच्या गुजराथी भाषासरणींत व या नूतन भाषासरणींत बरीच तफावत पडूं लागली. या नूतन भाषासरणीला 'हिंदूगुजराथी' व पारशांच्या भाषासरणीला 'पारशीगुजराथी' असें संबोधण्यांत येऊं लागलें या नवीन भाषापद्धतीचे प्रमुख पुरस्कर्ते गोवर्धनराम त्रिपाठी, मणिलाल मनसुखराम त्रिपाठी व छगनलाल पंड्या हे होत. यांच्या भाषेंत संस्कृत शब्दांचाच अधिक भरणा आढळतो.

नवलरामानें आपल्या 'संस्कृतमय गुजराथी' या निबंधांत अशा प्रकारच्या संस्कृतप्रचुर भाषापद्धतिवर बरेच कोरडे ओढले आहेत. संस्कृतभाषेंतील शब्द मुळींच गुजराथींमध्यें येऊं नयेत असें त्याचें म्हणणें नव्हतें. पण नेहमीं व्यवहारांत लागणाऱ्या वस्तूंना गुजराथींत सोपा शब्द असतांना मग तो दुसऱ्या भाषेंतून का आलेला असेना मुद्दाम संस्कृतांतील अगडबंब वापरण्याच्या तो अगदीं विरुद्ध असे. गुजराथींमध्यें रूढ झालेले संस्कृत शब्द वापरले असतांना देखील ज्यांची लेखनपद्धति अगदीं सुलभ असते असे ग्रंथकार म्हणजे रावबहादूर भोलानाथ सारभाई हे होत.

या संस्कृतमय गुजराथी भाषासरणीविरुद्ध बंड म्हणून रावबहादूर, हरगोवनदास कांतावाला यांनीं प्राकृत गुजराथी भाषा वापरण्यास सुरवात केली. 'अंधेरी नगरीनो गर्धवसेन' या कादंबरीला लिहिलेल्या प्रस्तावनेंत ग्राम्य गुजराथी भाषा वाङ्मयांत प्रचारांत आणणें अत्यावश्यक आहे; तसेंच गुजराथी भाषेची श्रीमंती वाढविण्यास गुजराथमधील निरनिराळ्या प्रांतांतील रूढ झालेल्या शब्दाचा वाङ्मयांत उपयोग करण्यांत येणें जरूर आहे असें त्यांनीं म्हटलेलें आहे.

रावसाहेब महीपतराम रूपराम यांची भाषा दलपतराम प्रमाणेंच सुबोध व शुद्ध असते. पण ती अभिजात नसते. त्यांच्या ग्रंथांत सुंदर कल्पनांचा व समर्पक अलंकारांचा पूर्णपणें अभाव दिसून येतो. उत्तम ग्रंथकाराला लागणारी प्रतिभा यांच्या ग्रंथांत दिसून येत नाहीं.

वृ त्त प त्रें व ग द्य वा ङ्म य.—वर ज्या दोन भिन्न भाषासरणींचा उल्लेख करण्यांत आलेला आहे त्याचें प्रतिबिंब गुजराथी वृत्तपत्रें व मासिकें यांमध्येंहि दृग्गोचर होतें. मुंबईमध्यें पारशी लोकांनीं जीं वृत्तपत्रें व साप्ताहिकें चालविलेलीं आहेत त्यांमधील भाषापद्धति ही गुजराथी लोकांनीं चालविलेल्या वृत्तपत्रांतील भाषापद्धतीहून निराळ्या स्वरूपाची आहे. पहिल्या प्रकारच्या भाषापद्धतीला 'मुम्बाइगिरी गुजराथी' असें विशिष्ट नांव रूढ झालें आहे. मुम्बाइगिरी गुजराथी ही साधी व जुन्या गुजराथी भाषेच्या वळणावर असलेली आढळते. त्याच्या उलट 'हिंदुगुजराथी' ही संस्कृतप्रचुर व बोजड अशा प्रकारची आहे. शिवाय इंग्लिश भाषेच्या शिक्षणाचा प्रसार झाल्यापासून एक तिसरीच भाषापद्धति प्रचारांत येऊं लागली आहे. पण अलीकडे कांहीं वर्षांत इंग्लिश तऱ्हेनें विचार करण्याची जी अनिष्ट पद्धत आढळते तिच्या विरुद्ध चळवळ दृष्टीस पडूं लागली आहे. पण इंग्लिश भाषेच्या ऐवजीं गुजराथी भाषाशिक्षण माध्यम होईपावेतों वरील अनिष्ट पद्धतींत तावडतोब फरक करणें शक्य नाहीं असें वाटतें. अलीकडील ग्रंथकारांमध्यें संस्कृतप्रचुर गुजराथी भाषा लिहिण्याची जी पद्धत रूढ झालेली आहे तिला महात्मा गांधी व त्यांच्या वर्तुळांत असणाऱ्या त्यांच्या अनुयायांनीं पहिला धक्का दिला असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. गांधींच्या साध्या, स्पष्ट, व परिणामकारक भाषापद्धतीची छाप तरुण लेखकांच्या मनावर बसली. साधा विचार सुद्धां अगडबंब भाषेंत व्यक्त करण्याची पूर्वीची अनिष्ट पद्धत या नवीन लेखकांनीं टाकून देण्यास सुरवात केली व गांधींच्या भाषापद्धतीचा अवलंब करण्यास सुरवात केली. गांधींनीं अशा प्रकारें गुजराथी भाषेला नवीन वळण लावलें म्हटलें तरी चालेल. नवजीवन कार्यालयातर्फे राष्ट्रीय विषयासंबंधीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध झालीं म. गांधींच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील कामगिरीचें विवेचन करणारीं पुस्तकें लिहिलीं गेलीं. गांधींचे प्रसिद्ध पट्टशिष्य महादेव भाई देसाई. काका कालेलकर यांनीं असहकारितेच्या चळवळींत जे निरनिराळे लेख लिहिले, ते एकत्र करून छापण्यांत आले आहेत.

का दं ब री वा ङ्म य.—गुजराथींमध्यें कादंबरी वाङ्मय इंग्लिश शिक्षण अंमलांत आल्यानंतर निर्माण होऊं लागलें. कादंबरीला गुजराथींत नवलकथा हें नांव आहे. या वाङ्मयाचा जनक नंदशंकर मुळजीशंकर हा होय. १८६८ मध्यें याची 'करणघेलो' ही ऐतिहासिक कादंबरी प्रथम प्रसिद्ध झाली. तींत तत्कालीन समाजस्थितीचें वर्णन, दसरा वगैरे सण कसे पाळले जात होते, याचें वर्णन, माधवाच्या राजवाड्याचें वर्णन इत्यादि वर्णनें सुंदर आहेत. करणघेलो ही कादंबरी अद्यापिहि लोकप्रिय आहे. गुजराथ व काटेवाड या राष्ट्रांत पुष्कळ वीर पुरुष निर्माण झाले. त्यांनीं केलेलीं पराक्रमाचीं कृत्येंहि स्फूर्तिदायक आहेत या सर्व कथांचें एकीकरण करून प्रिमजी बोमनजी नांवाच्या पारशी कादंबरीकारानें 'गुजराथ अने काठीवाड देशनी वार्ताओ' नांवाचा एक ग्रंथ १८७५ त प्रसिद्ध केला. यांतील गुजराथी भाषा शुद्ध व सुबोध आहे. अशाच प्रकारचा 'गुजराथी वार्ताओ' हा ग्रंथ मणिलालभट्ट यानें लिहिला. यांत पृथ्वीराज चव्हाण, झाशीची लक्ष्मीबाई इत्यादि पुरुषांचीं व स्त्रियांचीं चरित्रें आलीं आहेत. रावसाहेब महिपतराव यांच्या 'वनराज चवडो' व 'सिद्धार्थ जयसिंग' या कादंबऱ्याहि फार प्रसिद्ध आहेत. यांतील भाषा उत्तम नसली तरी सुबोध आहे. अनंतप्रसाद वैष्णव यांची 'राणकदेवी' ही कादंबरीहि चांगली आहे. रावबहादूर

कांतबाला याची 'अंधेरी नगरीनो गर्धवसेन, एक उटंग वार्ता' हिला कादंबरीपेक्षां कथासंग्रह हेंच नांव अधिक शोभेल. यांत प्रांतिक शब्दांचा भरणा पुष्कळ असून ग्राम्य शब्दांची भरती आहे. नलेयारखान नांवाच्या पारशी ग्रंथकाराच्या रत्नलक्ष्मी व मुद्रा आणि कुलिन या कादंबऱ्या फार लोकप्रिय आहेत. यांतील पात्रें उत्कृष्ट रंगविलीं गेलीं असून भाषाहि शुद्ध व जोरदार आहे. इच्छाराम देसाई यांच्या 'गंगा' कादंबरींत शिवाजीनें केलेल्या सुरतेच्या लुटालुटीचें वर्णन आलें आहे. इच्छाराम देसाई यांनीं स्वतः लिहिलेल्या कादंबऱ्यांपेक्षा त्यांनीं गुजराथी प्रिंटिंग प्रेस काढून, आपल्या छापखान्यातर्फे कादंबरीकारांच्याकडून कादंबऱ्या लिहून घेऊन त्या दरवर्षी आपल्या ग्राहकांनां बक्षीस देण्याच्या निमित्तानें छापून काढल्या व कादंबरीकारांनां उत्तेजन दिलें यामुळें त्यांचें नांव कादंबऱ्यांच्या इतिहासांत अजरामर राहील. त्यांच्या छापखान्यातर्फे हिंदु अने ब्रिटानिया, दिल्लीपर हल्लो, चाणक्य नंदीनी, नूरजहान, चक्रवर्ती हमीर इत्यादि लोकप्रिय कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. इच्छारामाचें अनुकरण अहमदाबादेच्या प्रजाबंधु व गुजराथी पंच या वृत्तपत्रांनीं केलें आहे, व त्यांनीं पुष्कळच ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या आहेत. पण हल्लीं गुजराथी भाषेतील कादंबरीवाङ्मयामध्यें पहिल्या प्रतीचा कादंबरीकार या नात्यानें ज्याला संबोधितां येईल असा कादंबरीकार कन्हय्यालाल मुनशी हा होय. हा प्रथम घनश्याम या टोपण नावाखालीं पुष्कळ कथा लिहीत असे. त्याची 'पाटणनी प्रभुता' ही पहिली ऐतिहासिक कादंबरी प्रथम टोपणनांवाखालींच एका साप्ताहिकांत प्रसिद्ध झाली. ही कादंबरी फारच लोकप्रिय झाली. लगेच गुजराथनो नाथ ही त्याची दुसरी कादंबरीहि प्रसिद्ध झाली. थोड्याच कालानंतर वाचकांच्या आग्रहावरून पृथ्वीवल्लभ ही तिसरी कादंबरीहि त्यानें लिहिली. याच्यापूर्वी गोवर्धनराय त्रिपाठी याची सरस्वतीचंद्र ही कादंबरी फार लोकप्रिय होती. पण मुनशीनें आपल्या कादंबऱ्या प्रसिद्ध केल्यापासून सरस्वतीचंद्र ही कादंबरी मागें पडली. मुनशीच्या कादंबऱ्यांतील पात्रांचीं स्वभाववर्णनें हुबेहूब साधलीं असून त्यांतील कथानकाचा विकास, स्वाभाविकरीतीनें झालेला आहे. निरनिराळ्या प्रसंगांचीं अनुरूप वर्णनें करण्यात याचा हातखंडा आहे. त्याची भाषा जोरदार, भेदक व वस्तुस्थितिनिदर्शक अशी आहे.

गोवर्धनराय त्रिपाठीची सरस्वतीचंद्र ही कादंबरी म्हणजे एक ज्ञानकोशच आहे म्हटलें तरी चालेल. हिचे ४ भाग असून त्यांत राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक व तात्विक विषयांचीं खूप वर्णनें आलीं आहेत. ही कादंबरी आदर्शभूत झाली आहे यांत शंका नाहीं. यांतील भाषा नमुनेदार असून ओजस्वी व प्रतिभासंपन्न आहे. गुजराथचा बंकिमचंद्र चतर्जी असें याला संबोधण्यांत येतें.

याशिवाय भोगींद्रलाल दिवेटिया यांच्या अलक्ष्यज्योति (१९०७), मधुकर, पद्मनाभ (१९०८), ज्योतिपुंज (१९०९), प्रियकांता इत्यादि कादंबऱ्या, तसेंच गिरिधरलाल कोठारी यांची 'नवी प्रजा' कृष्णराव दिवेटियारचित मुकुलमर्दन, राजेंद्रलालरचित विपिन आणि मोगल संध्या, चंद्रशेखर पंड्यारचित 'पांच प्रेमकथा' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. गुजराथी कादंबरीवाङ्मयांत भाषांतरित कादंबऱ्यांचा भरणाच अधिक आहे.

गुजराथी नाट्यवाङ्मय—गुजराथी वाङ्मयांत नाट्यवाङ्मयाची स्थिति फार शोचनीय आहे म्हटलें तरी चालेल. अलीकडे गुजराथीमध्यें जरी थोडींफार चांगलीं नाटकें प्रसिद्ध झालीं आहेत तरी त्यांची संख्या अल्प आहे. एकंदर गुजराथी नाटकांतील संख्या शंभरसवाशें आहे. पण त्यांत उत्कृष्ट नाटकें हातावर मोजण्याइतकींदेखील मिळण्याची मारामारच पडेल. गुजराथी भाषेंत इतर प्रकारचें वाङ्मय उच्च दर्जाचें व नांव घेण्याजोगें निर्माण झालें असतां नाटकांच्या बाबतींतच गुजराथ पाठीमागें कां असावा याचीं कारणें समजणें कठिण आहे. तथापि नाट्यवाङ्मयाची अशी स्थिति असणें ही मात्र लाजिरवाणी गोष्ट आहे. गुजराथी नाट्यवाङ्मयाचा आरंभ मराठी नाट्यवाङ्मयाच्या आरंभाबरोबरच झाला, असें असता मराठींत ज्याप्रमाणें नाट्यवाङ्मयांत चांगलीं चांगलीं नाटकें वरीच सांपडतात तशीं गुजराथी भाषेंत सांपडत नाहींत. मुंबई हें गुजराथी भाषेचें एक केंद्र आहे असें मानण्यात येतें व या ठिकाणीं पुष्कळसे गुजराथी विद्वान सांपडतात. पण अशा गुजराथींच्या केंद्रस्थानी देखील मराठी नाटकमंडळ्यांच्या व मराठी नाटकांचीच चलती दिसून येते. मराठी नाटकांवर महाराष्ट्रीय प्रेक्षकांच्याच उड्या पडतात असें नाहीं तर गुजराथी लोकांच्या झुंडीच्या झुंडी या नाटकांना जात असतांना व गुजराथी नाटकांच्यापेक्षां या मराठी नाटकांची स्तुति करतांना आढळतात. ही स्थिति मराठी नाटकमंडळ्यांनां जितकी भूषणावह तितकीच गुजराथी नाटकमंडळ्यांनां लाजिरवाणी आहे असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

गुजराथी भाषेंत नाट्यवाङ्मयाची उत्पत्ति अगदीं अर्वाचीन आहे. गेल्या ५० वर्षांपूर्वी गुजराथी भाषेंत या नाट्यवाङ्मयाचा पूर्ण अभाव होता असें म्हटलें तरी चालेल. यापूर्वी गुजराथेंत नाटकमंडळ्यांची जागा भवाई, रासधरी व मानभट हे भरून काढीत असत. महाराष्ट्रातील हरिदाससंस्थेप्रमाणें गुजराथेंत मानभटांची संस्था असे. शेक्सपीयरच्या पूर्वी जी आंग्लनाट्यवाङ्मयाची व रंगभूमीची स्थिति होती तीच गुजराथेंत एका शतकापूर्वी होती म्हटलें तरी चालेल. गुजराथेंतील मानभट अगर रासधरी संस्थेपेक्षांहि अधिक प्राचीन संस्था म्हणजे 'भवाई' संस्था ही होय. भवाई संस्थेच्या सदृश अशी आपल्याकडील ललितांची संस्था होय. या भवाईमध्यें अश्लीलपणाची चंगळ दिसून येते.

शाक्तसंस्थेमधून ही संस्था उदयास आली असावी असा कित्येकांचा तर्क आहे. या भवाई अनेक प्रकारच्या असतात. भवाई करणाऱ्या लोकांनां भवय असें नांव आहे. हे भवय लोक, खालच्या वर्गांतील असल्याकारणानें त्यांच्या खेळात अश्लील शब्द व हावभाव यांची रेलचेल असे. हे लोक गाणारे चागले असत व त्यामुळें प्रेक्षकांची चांगली करमणूक होत असे. यांच्या खेळांत रंगलो उर्फ विदूषक हा प्रमुख असे व त्याचें मुख्य काम म्हणजे असंबद्ध भाषण करून प्रेक्षकांना पोट दुखेतों हंसविणें हें असे. अशाप्रकारें या भवयाची निकृष्ट स्थिति होती. ती स्थिति पालटवण्याकरतां रावसाहेब महिपतराम यांनीं फार खटपट केली.

इंग्लिश वाङ्मयाचा प्रसार गुजराथेंत झाल्यापासून मात्र ही स्थिति बदलूं लागली. भवाई संस्थेला उतरती कळा लागून रंगभूमि संस्था उदयास येत चालली. गुजराथेंतील रंगभूमि संस्थेला चलन देण्याच्या बाबतींत दक्षिणी नाटक मंडळ्यांना अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. किर्लोस्कर नाटक मंडळी, सांगलीकर नाटक मंडळी, रामभाऊ नाटक मंडळी या नाटक मंडळ्यांनीं गुजराथमध्यें आपलीं नाटकें करून दाखविण्यास सुरवात केल्यापासून गुजराथी लोकांनीं हि त्यांचें अनुकरण करण्यास सुरवात केली; व गुजराथी लोकांचें लक्ष्य गुजराथी रंगभूमीची सुधारणा करण्याकडे वेधूं लागलें. गुजराथी लोकांप्रमाणेंच पारशी लोकांनींहि गुजराथी रंगभूमि सुधारण्याचा प्रयत्न सुरू केला. कुंवरजी नाझर मंडळी,नाटक उत्तेजक मंडळी इत्यादि पारशी नाटकमंडळ्या गुजराथी खेळ करूं लागल्या. कबराजीसारख्या पारशी नाटककारांनीं व रणछोडभाईसारख्या गुजराथी नाटककारांनीं या कंपन्यांसाठीं नाटकें लिहून देण्यास सुरवात केली. या कंपन्या आपले बरेचसे खेळ उर्दूमध्यें करीत असत, कारण गुजराथी पेक्षां उर्दू भाषाच त्यांनां सुलभ जात असे. थोड्याच काळांत या पारशी कंपन्यांप्रमाणेंच गुजराथी कंपन्या स्थापन झाल्या व त्यांनीं गुजराथी नाटकांचे प्रयोग करून दाखविण्यास सुरवात केली. या कंपन्यांमध्यें मोर्वी आर्य सुबोध नाटक मंडळी, देशी समाज नाटक मंडळी, वांकानेर नाटक मंडळी वगैरे कंपन्या नांवाजलेल्या आहेत. गुजराथींतील सर्वांत पहिलें नाटक कवि दलपतराम यांचें लक्ष्मीनाटक (१८५१) हें होय. ॲरिस्टोफेनीस या ग्रीक विनोदी कवीच्या 'प्लूटस'चें हें इंग्लिश भाषांतर आहे. हें गद्य नाटक आहे. गुजराथी नाट्यवाङ्मयाचा जनक ज्याला म्हणतां येईल असा नाटककार म्हणजे रणछोडभाई उदयराम हा होय. पण याला गुजराथी लोक नाट्यवाङ्मयाचा पितामह असें संबोधतात. गुजराथी भवाईचा त्याला वीट आल्यामुळें त्यानें नवीन तऱ्हेची गुजराथी नाटक कंपनी स्थापून या भवाई संस्थेचा नाश करण्याचा विचार केला. खालच्या वर्गांतील लोकांच्या रुचीप्रमाणें नाटक लिहिणें हें नाटककारांचें वास्तविक ध्येय नसून, खालच्या वर्गांची उन्नति करण्याचें ध्येय नाटककारानें आपल्या डोळ्यांपुढें ठेवलें पाहिजे असें रणछोडभाईचें मत होतें, व तें तत्त्व नाटकें लिहितांना त्यानें आपल्या डोळ्यांपुढें ठेवलें. त्यानें एकंदर ११।१२ नाटकें लिहिलीं. याच्या नाटकांत, कथानकाचा सहज विकास आढळून येत नाहीं. विचारसौष्ठवाचा व कविकल्पनेच्या भराऱ्यांचा याच्या नाटकांत बराच अभाव आहे. पण रणछोडभाईची नाटककार या नात्यानें लोकप्रियता जर कोणत्या नाटकामुळें झाली असेल तर ती त्याच्या 'ललितादुःखदर्शक नाटक (१८६६) या नाटकामुळेंच होय. हें नाटक शोकपर्यवसायी आहे. हिंदुसमाजामध्यें वधूची संमति न घेतां, व वराच्या अंगच्या गुणांकडे लक्ष न देतां, केवळ त्याच्या पैशाकडे बघून मुलगी वराच्या गळ्यांत बांधावयाची ही जी दुष्ट चाल आहे त्या चालीला अनुसरून ललिता नावाच्या एका मुलीला एका श्रीमंत पण दुर्गुणी तरुणाच्या गळ्यात तिच्या आईबापांनीं अडकविली व पुढें सासरच्या जाचामुळें तिनें आत्महत्या करून घेतली असा या नाटकांतील कथानकाचा सारांश आहे. हें नाटक फार लोकप्रिय झालें व या नाटकाचा इष्ट तो परिणाम गुजराथी समाजावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. वाङ्मयदृष्ट्या या नाटकात बरेच दोष आहेत. पण नाटकांतील भाषा साधी व मनोहर आहे. रणछोडभाईला नाट्यवाङ्मयाच्या उपयुक्ततेची खात्री पटली होती व आपलें सर्व आयुष्य चांगलीं नाटकें लिहिण्याच्या कामीं व रंगभूमीची स्थिति सुधारण्याच्या कामीं त्यानें खर्च केलें.

रणछोडभाईनंतरचे नाटककार प्रो. मणिलाल नभुभाई द्विवेदी हे होत. यांचें 'कान्ता' (१८८४) नांवाचें नाटक प्रसिद्ध आहे.गुजराथी नाट्यवाङ्मयामध्यें चांगल्या नाटकांची भर घालून रंगभूमीला तेजस्वी वळण देण्याचें कार्य जर कोणी केलें असेल तर तें मोर्वी आर्य सुबोध नाटक मंडळीचे मालक व्हागजी आशाराम, देशी समाज कंपनीचे मालक दयाभाई धोळशाजी, मूळशंकर नंदराम व बॅरिस्टर विभाकर यांनीं होय. व्हागजी आशाराम हे या चतुष्टयांतील पहिले नाटककार होत. यांनीं मोर्वी आर्य सुबोध नाटक मंडळीच्याकडून आपले धार्मिक व पौराणिक खेळ रंगभूमीवर आणविले. दयाभाई धोळशाजी यांचीं नाटकें सामाजिक व काल्पनिक आहेत. दयाभाईनें पुष्कळ नाटकें लिहिलीं. त्यांमध्यें पवित्रलीलावती, अश्रुमति, उमादेवडी, रामवियोग इत्यादि नाटकें महत्त्वाचीं आहेत.दयाभाईचें सर्वांत उत्कृष्ट नाटक अश्रुमति हें होय.

मोर्वी कंपनी व देशी समाज कंपनी यांच्या तोडीची तिसरी नाटक मंडळी म्हणजे वांकानेर कंपनी ही होय. या कंपनीचे मालक त्र्यंबकलाल नांवाचे दोघे बंधू होते. हे

दोघेहि उत्कृष्ट प्रकारचे नट असल्याकारणानें त्यांनीं उत्तम नाटकें रंगभूमीवर आणून तीं यशस्वी करून दाखविलीं. नरसीमेथा व शिवाजी हीं नाटकें तर या बंधूंनीं आपल्या उत्कृष्ट अभिनयानें अतिशय लोकप्रिय केलीं.

नथूराम सुंदरजी नांवाचा एक नाटककार याच सुमारास झाला. हा शृंगारिक नाटकें लिहिण्यांत तरबेज होता. त्याची कंपनी काठेवाडांत फार लोकप्रिय होती. त्याच्या नाटकांपैकीं कुमुदचंद्र, माधवोनल व सौभाग्यसुंदरी हीं नाटकें फार प्रसिद्ध आहेत.

मुंबईमधील गुजराथी नाटककारांतील पहिला नाटककार म्हणजे मूळशंकर नंदराम हा होय. मूळशंकरचीं अतिशय प्रसिद्ध अशीं नाटकें म्हणजे, अजबकुमारी व जुगलजुगारी हीं होत. शांतरस व शृंगाररस रेखाटण्यांत मूळशंकरचा हातखंडा आहे. गुजराथी नाटयवाङ्मयाला उच्च दर्जा प्राप्त करून देण्याऱ्या चार नाटककारांपैकीं शेवटचे नाटककार बॅ. विभाकर होत. यांचें पहिलें नाटक "सिद्धार्थकुमार" हें होय. हें गुजराथी नाटयवाङ्मयांतील एक उत्कृष्ट प्रकारचें नाटक आहे असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. या नाटकाशिवाय स्नेहसरिता, सुधाचंद्र, मधुबंसरी, मेघमालिनी अज्जोनो बंधन, हींहि विभाकरांचीं नाटकें फार प्रसिद्ध आहेत. या निरनिराळया नाटकामध्यें विभाकरांनीं मानवी आयुष्याचें व समाजाच्या निरनिराळ्या चळवळींचें चित्र रेखाटलें आहे. विशेषतः हल्लींच्या राजकीय व सामाजिक चळवळींचें चित्र नाटकांमधून पुढें मांडण्याचें कार्य विभाकरांशिवाय दुसऱ्या कोणीहि केलें नाहीं; व या दृष्टीनें यांच्या नाटकांचें विशेष महत्व आहे. गुजराथी नाटयवाङ्मयांत विभाकरांच्या नाटकांना उच्च दर्जाचें स्थान दिलें पाहिजे.

कवि नानालाल यानें लिहिलेलीं जयजयन्त व इंदुकुमार हीं नाटकेंहि वाङ्मयाच्या दृष्टीनें उच्च दर्जाचीं आहेत. हीं नाटकें रंगभूमीवर आलेलीं नाहींत व येण्यास रखींहि नाहींत. या नाटकांतील मुख्य गुण म्हणजे, नाटककाराची संपन्न प्रतिभा होय. नानालाल हा उत्कृष्ट कवि असल्यामुळें त्याच्या या नाटकांत काव्यकल्पनाची रेलचेल आहे.

मणिशंकर रत्नजी भट यानीं 'कांत' या नांवाखालीं 'असालिया तुलिया' नांवाचें एक नाटक लिहिलें आहे. रावसाहेब रमणभाई महिपतराम यांचें 'राईनों पर्वत' हें नाटकहि नांव घेण्याजोगें झालें आहे.

गुजराथी भाषा—गुजराथी भाषा ही पश्चिम हिंदुस्थानांतील जवळ जवळ एक कोट लोकांची भाषा आहे. हिंदी, पंजाबी, बंगाली व मराठी यांच्या खालोखाल संख्येच्या दृष्टीनें गुजराथीचाच नंबर लागतो. ही भाषा केवळ हिंदूच वापरीत नसून पारशी व मुसुलमानहि ही भाषा वापरतात.

भूगोलदृष्टया गुजराथ व काठेवाड हे परस्परांपासून अलग असले तथापि या दोन्हीं प्रदेशांतील भाषा थोड्या फार प्रांतिक भेदांखेरीज एकच आहे. अर्वाचीन गुजराथी भाषेचे दोन पोटभेद आहेत. एक कच्छी-गुजराथी व दुसरा मारवाडी-गुजराथी. कच्छी लोक कच्छी-गुजराथी वापरतात व मारवाडी लोक दुसरी भाषा बोलतात. या मारवाडी-गुजराथींत व्रज भाषेंतील शब्दांचा फार भरणा आढळतो.

गुजराथी भाषा ही फार सोपी भाषा आहे. ही बोलण्याला फारसे सायास पडत नाहींत. या भाषेंत शब्दांचा भरणा पुष्कळ नाहीं. तथापि ती जोरदार व तेजस्वी भाषा आहे. गहन विचार व्यक्त करण्यासाठीं जितके शब्द योजितात तितके शब्द या भाषेंत आढळत नाहींत. त्यामुळें या भाषेला संस्कृतमधून पुष्कळच शब्द उसने घ्यावे लागतात. गुजराथी भाषेचें व्याकरण सोपें आहे. या भाषेंत उपसर्ग, उपपदें, साहाय्यक क्रियापदें, प्रत्यय यांचा फारसा घोटाळा नाहीं. गुजराथी अक्षरें संस्कृत अक्षरांपासूनच घेतलीं आहेत व कांहीं ठिकाणीं त्यांत फेरफार झालेला आहे. प्रत्येक अक्षरावर संस्कृतमध्यें अगर मराठीमध्यें जी रेघ मारण्याची पद्धत आहे तिचा गुजराथींत पूर्ण लोप झालेला आहे.

हल्लींचा गुजराथी भाषा लिहिण्याची पद्धत दोन अवस्थांमधून उत्क्रांत झाली आहे. प्रथम गुजराथी भाषा देवनागरी उर्फ बालबोध लिपींतून लिहिण्यात येत असे. पुढें प्रत्येक अक्षरावर रेघ देण्याऐवजीं एकदम एक लांब रेघ मारून नंतर मग त्या रेघेखालीं अक्षरें लिहावयाची मोडी पद्धत अंमलांत आली. यानंतरची अवस्था म्हणजे, अजीबाद रेघ न काढतां लिहिणें ही होय.

संस्कृत भाषेपासूनच गुजराथी भाषा निघाली आहे. कांहींच्या मतें गुजराथी भाषा ही शौरसेन भाषेपासून निघाली. पण कांहींच्या मतें ती महाराष्ट्रीचा एक प्रकार आहे. पुष्कळदां तिचा 'अपभ्रंश' म्हणून उल्लेख करण्यांत येतो. चंडानें आपल्या 'प्राकृत लक्षण' ग्रंथांत या भाषेसंबंधीं नियम दिलेले आहेत. हेमचंद्राचार्यानें अपभ्रष्ट गुजराथीचा आपल्या ग्रंथांत समावेश केला आहे गुजराथी भाषेंत संस्कृत, प्राकृत इत्यादि भाषांतून वरेच शब्द आले आहेत. संस्कृतांतून जे शब्द गुजराथींत आले आहेत अशा शब्दांपैकीं विजोग, धीरज, कारय हे उदाहरणादाखल देतां येतील. प्राकृतांमधून गुजराथींत जे शब्द आले त्यामध्यें, हुईड्ड सुडो, घेलो, आप, घऊ, मेलुं इत्यादि शब्द येतात. याशिवाय पोर्तुगीज, फ्रेंच, मराठी, पारशी, अरबी इत्यादि भाषांमधून थोडेफार शब्द आलेले आहेत.

[संदर्भग्रंथ.—कृष्णलाल मोहनलाल जव्हेरी—माइल स्टोन्स इन गुजराथी लिटरेचर (गुजराथी प्रिंटिंग प्रेस); 'फरदर माइलस्टोन्स इन गुजराथी लिटरेचर (ब्रिटिश इंडिया प्रेस १९००); गोवर्धनराम त्रिपाठी—क्लासिक पोएट्स ऑफ गुजराथ. दिवेटिया—गुजराथी लँग्वेज अँड लिटरेचर (वुइल्सन फायलालॉजिकल लेक्चार्स); साटीना साहित्यनुं दिग्दर्शन, दलपतकाव्य, नर्मगद्य, नर्मकविता; रावबहादूर रमणभाई—कविता अने साहित्य; इंदूलालदेव-पेपर ऑन दलपी; गुजराथी दिवाळी इशू (१९१०).]

गुंजीकर, रामचंद्र भिकाजी (१८४४–१९०१)— एक महाराष्ट्रीय ग्रंथकार. यांचा जन्म बेळगांवनजीक जाबोटी गांवीं एका कुलीन सारस्वत–ब्राह्मण घराण्यात झाला. यांचें मूळ उपनाव कंकरे; परंतु वतनगावावरून त्यांचें घराणें ' गुंजीकर ' या आडनावानें प्रसिद्धीस आलें. एलफिन्स्टन हायस्कुलामध्यें उपगुरु, हुबळी येथील इंग्रजी शाळेचे हेडमास्तर, बेळगाव जिल्ह्याचे असि० डे. ए. इन्स्पेक्टर अशा जागांवर त्यांनीं कामें केलीं व १८९८ मध्यें पेन्शन घेऊन मुंबईस राहिले.

गुंजीकर हे मराठी भाषेंतील एक मार्मिक ग्रंथकार होते. ज्यावेळीं मराठीमध्यें ज्ञानप्रसारक हेंच एक मासिक पुस्तक होतें त्यावेळीं म्हणजे १८६७ सालीं यानीं कांहीं मित्रांच्या साह्यानें विविधज्ञानविस्तार चालू केला. वि. ज्ञा. विस्ताराची टीकाकार म्हणून जी प्रसिद्धी आहे ती त्यास मूळ रामभाऊ मुळेंच प्राप्त झाली. ' मनोरमा, ' 'प्रेमबंधन', 'राजा शिवाजी' वगैरे अनेक पुस्तकावरील त्याचे टीकालेख वाचण्याजोगे आहेत. त्यांची मोचनगड ही कादंबरी प्रसिद्ध आहे. शाकुंतल नाटकाचें त्यांनीं केलेलें सुरस भाषांतर आज दुर्मिळ आहे.

रामभाऊंना संस्कृत, प्राकृत, इंग्लिश, बंगाली, कानडी, गुजराथी आणि उर्दु या भाषा चांगल्याच अवगत होत्या. १८७७ सालीं त्यांनीं रा. रा. काशीनाथ पांडुरंग परब यास मदतीस घेऊन " कौमुदी महोत्सव " नावाचें भट्टोजी दिक्षीत यांच्या सिद्धांत कौमुदीचें भाषांतररूप त्रैमासिक सुरू केलें. परंतु दोन वर्षे चालवून आश्रयाच्या अभावामुळें तें त्यास बंद करावें लागलें. ' रामचंद्रिका ' म्हणून संस्कृत शब्दरूपावली त्यांनीं लिहून प्रसिद्ध केली. भगवद्गीतेचें सुबोध भाषांतर त्यांनीं प्रसिद्ध केलें. शेक्सपियरकृत ' रोमिओ अॅन्ड ज्युलिएट ' या नाटकाचें त्यांनीं ' रोमकेतु विजया नाटक ' हें नांव देऊन भाषांतर करून वि. ज्ञा. विस्तारांतून प्रसिद्ध केलें आहे. कानडी भाषा शिक्षकाच्या मदतीशिवाय शिकता यावी म्हणून त्यांनीं कन्नडपरिज्ञान' म्हणून एक पुस्तक लिहिलें आहे. तसेंच पिट्मनच्या लघु-लेखन पद्धतीवरून त्यांनीं मराठींत लाघवी लिपी अथवा अतित्वरेनें लिहिण्याची युक्ति काढली. मराठींतील त्यांचीं दुसरीं प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें 'महाराष्ट्र भाषेची लेखन शुद्धि' (आवृत्ति दुसरी) आणि ' मराठी सुबोध व्याकरण ' हीं होत.

ब्राह्मण ज्ञातीचा आणि त्यांतहि स्वशाखेचा त्यांस मोठा अभिमान असे. आणि याचेंच फळ ' सरस्वतीमंडल अथवा महाराष्ट्र देशांतील ब्राह्मण जातींचें वर्णन ' हें होय. [वि. विस्तार, पु. ३२ अं. ३–४].

गुंटकळ—मद्रास. अनंतपुर जिल्ह्यातलें खेडें. लो. सं. ६०५९. हें सदर्नमराठा रेल्वेवरचें महत्वाचें जंक्शन आहे. सरकी काढण्याचे व कापूस दाबण्याचे कारखाने येथें आहेत. तरी येथें व्यापार फारसा नाहीं. आग्नेयीला कांहीं पुराणवस्तू सांपडल्या आहेत.

गुडघेमोडीचा ताप (डेंग्यु)— हा ज्वर उष्णकटिबंधांतील व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत प्रचलित असतो; अन्य ठिकाणीं आढळत नाहीं. थोडे दिवस टिकणारा ज्वर, अंग व सांधे या ठिकाणीं ठणका; नंतर ज्वररहित अशा थोड्या कालानंतर पुनःज्वर उलटणें व अंगावर तापाची लाली गोवरादि ज्वराप्रमाणें दिसणें व क्वचित्प्रसंगीं दोन अगर तीन वेळाहि ज्वर उलटणें हें या सांथीच्या ज्वराचें मुख्य स्वरूप होय. या ज्वराच्या साथी हिंदुस्थान, ब्रह्मदेश, इराण, मिसरदेश, आफ्रिका, उत्तर व दक्षिण अमेरिकेंतील विवक्षित टापू व वेस्ट इंडिया बेटें या ठिकाणीं बहुधा मधून मधून प्रचलित असतात. या सांथीचा प्रसार होण्याचें साधन एका विशिष्ट जातीच्या डासांचा दंश होय. व जेथें या प्रकारच्या डासांची वाढ होते त्या ठिकाणीं सांथ उत्पन्न होते; व त्या टापूपुरती ती सांथ मर्यादित असते. रोग्याचें रक्त निरोगी माणसाच्या शिरांत टोंचून घातल्यानें हा ताप त्यास येतो असा अनुभव घेऊन पाहिला आहे.

लक्षणें:—तीन ते सहा दिवसपर्यंत हा ज्वर गर्भावस्थेमध्यें असतो. यानंतर ताप प्रगट होऊन माथेशूळ होतो व एकदम एखाद्या पोटामध्यें अथवा सांध्यामध्यें वेदना सुरू होते. ही वेदना एका सांध्यांतील बरी होते न होते तों दुसऱ्या साध्यांत प्रवेश करिते व ती सांध्यांत व त्या लगतच्या स्नायूंतहि भासते. डोळ्यांचीं बुबुळें फार दुखतात. ज्वर १०२°, १०३° पासून १०५° पर्यंतहि असतो व नाडीच्या ठोक्यांचें प्रमाण दर मिनिटास १०० किंवा अंमळ अधिक असतें. बहुतेक रोग्यांमध्यें या प्रथमज्वरांत सुद्धा चेहऱ्यावर अगर कधीं सर्वांगावर ज्वराचें लाल पुरळ दिसूं लागतें; व घसा दुखतो. बहुधा हा पुरळ एका दिवसात मावळतो व त्याच सुमारास ज्वर कधीं सावकाशपणें तर कधीं एकदम पुष्कळ घाम येऊन जलद निघतो. वेदनांचें शमन होऊन रोग्यास तीन चार दिवस बराच अशक्तपणा वाटला तरी रोगी ज्वरांतील वेदनायुक्त स्थितीच्या मानानें रोगी बऱ्या स्थितींत असतो. यानंतर पुनः ज्वर व पुनः पुरळ येतें. हें पुरळ कधीं नुसते लालसर तर केव्हां ठिपकेदार असतें. लाली गोंवरांत दिसते त्यासारखी व कधीं पित्ताच्या लाल गाधी उठतात त्याप्रमाणें असते. याशिवायहि त्यांत भिन्न प्रकार असूं शकतात. त्यापासून थोड्या फार प्रमाणांत रोग्याच्या अंगास कंड सुटते व ती कधीं कांहीं तासपर्यंत टिकते अगर कांहीं रोग्यांना त्यापासून दोन तीन दिवसपर्यंत पीडा होते व त्यानंतर पुरळ आल्या जागच्या त्वचेपासून खवले, कोंडा निघून जातो. या द्वितीय ज्वरावस्थेमध्यें सांध्यांतील वेदना पुनः प्रगट होउन अंमळ अधिक वेळ टिकतात; अगर ज्वर निघाल्यावरहि पुनः वेदना सुरू होतात. या लक्षणावरून आपल्या देशांत त्यास गुडघेमोडीचा

ताप हें नांव पडलें आहे. ज्वर दुसऱ्यांदा उलटला नाहीं अगर सांध्यांतील ठणका, सूज, हीं फार दिवस टिकून राहिलीं नाहींत तर या दुखण्याची मुदत सुमारें एक आठवडा असते. सांध्यांतील दर्द लांबला तर त्यांत व्यंग उत्पन्न होऊन तो आंखडल्याचींहि उदाहरणें घडतात. अगदी तान्हीं मुलें व वृद्ध माणसें मात्र या ज्वरामुळें मृत्युमुखीं पडतात. सौम्य रोगामध्यें अंग मोडून येऊन रोग्याचा घसा दुखतो व अंगावर एकदां अगर दोनदां थोडें फार पुरळ येतें. ज्वराचें स्वरूप भयंकर असल्यास रोग्याचा ज्वर अतिशय वाढून त्यास गुंगी येते. नाक, तोंड, गुदद्वार, अथवा गर्भाशय इत्यादि मार्गावाटें रुधिरस्राव कमी अगर अधिक प्रमाणांत होतो. हृदयाची क्रिया मंद चालून शेवटीं ती ज्वराच्या कडकीमुळें बंद पडते. चेहरा काळा निळा दिसतो. फुप्फुसांत सर्दी होते. अगर फुप्फुसदाह, फुफ्फुसावरणदाह, हृदयावरणदाह, अगर हृदयांन्त्रावरणदाह हा मोठा ज्वर व दाहयुक्त रोगांपैकीं एखादा रोग आगंतुक रीतीनें उत्पन्न होतो. या रोगाच्या जंतूचा शोध लागला नाहीं व शरीरांत इतर कोणत्या विकृती होतात हेंहि अद्याप कळलेलें नाहीं.

उ प चा र.—कोठा सौम्य रेचक अगर एनिमा देऊन साफ ठेवावा व नंतर पोटामध्यें क्षारयुक्त औषधें व सौम्य प्रकारचीं स्वेदक औषधें दिल्यानें रोग्याच्या दाहयुक्त स्थितीचें शमन होतें. पोटांत क्किनाइन दिल्यानें रोगाची मुदत अमळ कमी होते म्हणून तें द्यावें. सांध्यांतील वेदनांसाठीं पुढील कोणतेंहि एक औषध उपयुक्त आहे; (१) बेलाडोना अर्क १०–१५ थेंब प्रमाणांत; (२) डोव्हर्स पावडर; (३) किंवा थोड्या प्रमाणांत फिनासिटीन अगर अँटिपैरिन. शरीरदाहासाठीं ओल्या बोळ्यानें सर्वांग पुसावें व नंतर तें कोरडें करावें. कर्पूरमिश्रित तेल पुरळावर लावतात. शक्ती येण्यासाठीं क्किनीन, लोहयुक्त औषधें उत्तम असतात.

गुंडयाली–मुंबई, काठेवाड. वढवाण ठाण्यांतील स्वतंत्र खंडणी देणारा एक तालुका. या तालुक्यांत गुंडयाली व बाला अशीं दोन खेडीं आहेत. तालुकदार झाल रजपूत असून वढवाणचे भायाद आहेत.

गुंडलुपेठ—म्हैसूर म्हैसूर जिल्ह्यांतला एक तालुका. क्षेत्रफळ ५४७ चौ. मै. वस्ती (१९११) ७८९३५. यांत गुंडलुपेठ हें एक शहर व १२८ खेडीं आहेत. दक्षिण व पश्चिम भागाला दाट अरण्यें आहेत. अरण्य व वस्तीचा भाग यांच्यामध्यें डोंगर आहेत. गुंडल नदीचें पाणी शेतकामाला घेतात. त्याकरितां बंधारा घातला आहे. चोलम व रागी येथें पिकते. विजयपूर तलावाच्या पाण्यानें उत्तम भाताचें पीक निघतें. येथील विड्याचीं पानें प्रसिद्ध आहेत. नदीकांठानें रानखजूर फार होतो.

गुंडा—काठेवाड. नवानगरच्या अंमलाखालील खेडें. येथें एक सिंहशिला लेख मिळाला आहे. त्यांतच शान, जयदाम, रुद्रादामन् व रुद्रसिंह या क्षत्रपांचीं नांवें असून त्यांनां स्वामी ही पदवी जोडण्यांत आलेली आहे.

गुडियात्तम ता लु का.—मद्रास. उत्तर अर्काट जिल्हा. या तालुक्यांत गुडियात्तम हें एक शहर व १८३ खेडीं आहेत. वस्ती (१९२१) २१३५७९५ व क्षेत्रफळ ४८१ चौ. मै. सारा व इतर पट्ट्या मिळून उत्पन्न सुमारें ३॥ लाख आहे. यांतील जमीनींत पूर्वघाटांच्या शाखा पसरल्यानें डोंगराळ आहे व मधून खोरीं आहेत. जमीन साधारणतः चांगली आहे. माती तांबडी व रेतीमिश्रित आहे.

श ह र.—गुडीयात्तम तालुक्याचें मुख्य ठिकाण. उ. अ. १२°५८' व पू. रे. ७८°५३'. येथून रेल्वेस्टेशन ३ मैल आहे. मद्रासपासून ९६ व कालीकतपासून ३१८ मैलांच्या अंतरावर आहे. वस्ती (१९११) २२८०३. येथें १८८५ पासून स्थानिक स्वराज्याचे अधिकार दिले आहेत. हा गांव सुंदर व स्वच्छ असून सर्व घरें कौलारू आहेत. येथें मुख्यतः विणकाम चालतें. लब्बाई लोक कातडीं, मिरच, तंबाखू, तूप वगैरेंचा व्यापार करतात व कानडी लोक दुकानदारी व सावकारी करतात. येथें ढोरांचा बाजार राणीपेठच्या बाजाराएवढा दर मंगळवारीं भरतो.

गुडीवाडा, ता लु का.–मद्रास इलाखा. कृष्णा जिल्ह्यांतील तालुका. क्षेत्रफळ ३१३ चौ. मै. वस्ती (१९२१) १७९५५६. जमीनमहसूल व कर सु. ९ लाख रुपये. बहुतेक जमीन कृष्णा कालव्याखालीं आहे. कोलार सरोवर यांतच आहे. कैकलूर येथें डेप्युटी तहसीलदार आहे. गुडीवाडा शहर हें मुख्य ठिकाण आहे.

श ह र.—गुडीवाडा तालुक्याचें मुख्य ठिकाण. उ. अ. १६° २७' व पू. रे. ८१° ०' हें जुनाट शहर आहे. येथें एक जुना बौद्ध स्तूप आहे. पश्चिमेस जैनमूर्ति व शहराचा जुना उंचवटा आहे. येथें जुने भक्कम कुंभारकामाचे अवशेष, धातू दगड व कांच यांचे विविध प्रकारचे मणी व जुनीं आंध्र नाणीं सांपडलीं आहेत.

गुडूर, ता लु का.—मद्रास. नेलोर जिल्हा. क्षेत्रफळ ६५८ चौ. मै. व लोकसंख्या (१९२१) १०६८८२. यांत गुडूर हें एक शहर व १२४ खेडीं आहेत. सारा व कर मिळून उत्पन्न सुमारें ३ लाख. श्रीहरिकोटी बेट यांतच मोडतें. कारोमांडल किनाऱ्यावर ज्या ठिकाणीं इंग्रजांचे पाय प्रथम लागले व वसाहती (सेटलमेंट) वसल्या त्यांतलें आरमागांव यांतच आहे. पश्चिमेची जमीन कडक व खडकाळ आहे. पूर्वेकडील जमीन बरी आहे. वर काळी माती व खालीं रेती सांपडते. स्वर्णमुखी, सैदापुरम, कंदलेरू या नद्या आहेत. येथें नीळ बरीच तयार होत असे पण तिचा भाव उतरल्यानें हा व्यापार बसला.

श ह र.—मद्रास, नेलोर जिल्हा. गुडूर तालुका व सबडिव्हिजन यांचें मुख्य ठिकाण. वस्ती (१९११) ८००६. मुख्य धंदा शेतीचा येथें म्युनिसिपल युनियन आहे. नवकऱ्याच

बीर रेडीपाली खेड्यांत चटया होतात. तांदूळ व मिरच्या बाहेर पाठविनात.

गुणवंत गड—सातारा जिल्हा. पाटणच्या नैर्ऋत्येस ६ मैलांवर १००० फूट उंचीच्या टेंकडीवर गुणवंतगड किंवा मोरगिरी किल्ला आहे. याचा आकार निजलेल्या सिंहासारखा दिसतो म्हणून यास मोरगिरी नांव पडलें. मोरगिरी खेड्याचा कांहीं भाग या किल्ल्याच्या नैर्ऋत्य बाजूखालीं आहे. अठराव्या शतकांत या किल्ल्यावर पेशव्यांची फौज होती आणि दातेगडावर पंत प्रतिनिधींचे लोक रहात असत; व जेव्हां विरुद्ध पक्षाकडील हुकूम सुटत तेव्हां त्यांच्या अंमलबजावणीस ते बराच अडथळा करीत. सन १८१८ त हा किल्ला बिन लढाईनें ब्रिटिशांच्या ताब्यांत आला.

गुणाढय—यानें पैशाच भाषेंत बृहत्कथा नामक एक ग्रंथ लिहिला आहे.गुणाढ्याच्या नांवाचा एकदांच उल्लेख उपलब्ध ग्रंथांत आढळून येतो. गुणाढ्य म्हणून एक कवि होता यांत शंका नाहीं. कारण हें दंतकथेवरून निश्चित होतें. या कवी संबंधानें अनेक रसभरित आख्यायिका आहेत तथापि खरी माहिती उपलब्ध झाली नाहीं. प्रतिष्ठान येथें त्याचा जन्म झाला असें मानण्यांत येतें. शातवाहन राजाचा तो प्रधान होता अशीहि दंतकथा आहे. गुणाढ्याचा काळ ख्रिस्ती शकाच्या सातव्या शतकापूर्वी असावा. त्यास कांबोजांतील एका लेखांत 'प्राकृतप्रिय' म्हटलें आहे. बृहत्कथेचें थोडेसें विवेचन 'कादंबरी' या लेखांत आढळेल. फेलिक्स लाकोतेनें गुणाढय व बृहत्कथा यांवर फ्रेंच ग्रंथ लिहिला आहे. आणि त्यांत गुणाढय कथापर नेपाळ माहात्म्यांतील चार अध्याय दिले आहेत (पारीस १९०८).

गुणि—सिंधमधील एक तालुका. क्षे. फ. ९८७ चौ. मै. वस्ती (१९११) ९१३६६. तांडी महमदखान हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे.याशिवाय यांत१७९ खेडीं आहेत.जमीनमहसूल व कर मिळून उत्पन्न २.२५ लाख. सर्व प्रदेश सपाट असून दोन टेंकड्या आहेत. मुख्य पिकें बाजरी, गहूं, ऊंस इ.

गुणुपुर—विजगापट्टम जिल्ह्यांतला हा एजन्सी तालुका आहे. क्षेत्रफळ ११८८ चौ. मै. वस्ती (१९२१) १२२०७७. येथें खोंड लोक व साबरा उरिया ब्राह्मण व थोडेसे तेलुगु आहेत. खेडीं ११३८. व मुख्य शहर गुणुपुर. हा तालुका वंशधरेच्या खोऱ्यांत असून तांदूळ व खरीपाचीं यांत पिकें होतात. कांहीं भाग कुरुपम व कांहीं जयपूरच्या जमीनदारींत मोडतो.

गुणे, पांडुरंग दामोदर—एक महाराष्ट्रीय भाषापंडित. हे अहमदनगरचे रहिवासी असून, एम्. ए. झाल्यावर फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर झाले. भाषाशास्त्राचें अध्ययन करण्यासाठीं रा. गुणे कांहीं वर्षे जर्मनींत होते. तेथेंच त्यांनां भाषाशास्त्रनैपुण्याबद्दल पी. एच्. डी. ही पदवी मिळाली होती. यांनीं भाषाशास्त्रावर एक इंग्रजी पुस्तक लिहिलें आहे. मराठी मासिकांतून यांचे विद्वत्ताप्रचुर असे बरेच लेख आहेत. भांडारकर रिसर्च इन्स्टिटयूटचे ते एक प्रमुख चालक होते. १९२२ सालीं वारले.हे मराठी मासिकांत लिहीत असत.

गुंतुपल्ली—मद्रास. कृष्णा जिल्हा. एलोर तालुक्यांतील एक खेडें. हें एलोरपासून २४ मैल उत्तरेस आहे. पश्चिमेला बौद्धांच्या गुहा वगैरे टेंकड्यांतून बऱ्याच आहेत. येथील चैत्याच्या दर्शनाला बऱ्याच लोकांची यात्रा लोटते. येथें पूर्वी जैनपूरम् नांवाचें शहर होतें असें म्हणतात.

गुत्त—इ. स. च्या सहाव्या शतकांत कोंकण प्रांतांत सूर्यवंशांतील एक घराणें राज्य करीत असे. हें घराणें पाटलीपुत्र येथील मौर्यवंशाची शाखा असावी. (आंध्र पहा). मूळ मौर्य घराणें चंद्रगुप्तानें स्थापन केलें. व गुत्त घराणें हें त्याचीच एखादी अलीकडील शाखा असावी. हें आपणास बाराव्या व तेराव्या शतकांत महामण्डलेश्वर असें म्हणवून घेत असत.हे चालुक्य राजांचे मांडलिक असून धार व म्हैसूर प्रांतांत रहात असत.

गुत्तांची वंशावळ

मागुत्त. उर्फ महागुत्त.
|
गुत्त १ ला.
|
मल्ल अथवा मल्लिदेव (इ. स. ११७५.)
|
वीर विक्रमादित्य १ ला.
├── जोम, जोम्म अथवा जोयिदेव १ ला. (इ. स. ११८१)
└── गुत्त २ रा.
  |
  आहवादित्य-वीर-विक्रमादित्य २ रा. (इ. स. ११८२–१२१३.)
  ├── तळुवलदेवी.
  ├── जोयिदेव उर्फ जोयिदेव २ रा. (इ. स. १२३८)
  └── विक्रमादित्य ३ रा.
    ├── गुत्त ३ रा. (इ. स. १२६२–६५)
    ├── हिरियदेव
    └── जोयिदेव ३ रा.

अशोकाचा नातू चंद्रगुप्त व संवत्कर्ता विक्रमादित्य हे दोघेहि गुत्त राजांचे पूर्वज समजले जातात; परंतु फ्लीट याच्या मतें गुत्त हा शब्द गुप्त याचा अपभ्रंश असून माळव्यावर राज्य करणाऱ्या जुन्या गुप्त राजांचेच हे वंशज असावेत. या गुप्त राजांपैकीं पहिला चंद्रगुप्त व त्याचा नातू दुसरा चंद्रगुप्त यांनां विक्रमादित्य हेंहि दुसरें नांव असल्यामुळें गुत्त

हे संवत्कर्त्या विक्रमादित्याच्या वंशांतील असावे असा समज चुकीनें प्रचलित झाला असला पाहिजे असें ते म्हणतात. धारवाड जिल्ह्यांत करजगी तालुक्यामध्यें गुत्त वोलल गुत्त राजांची राजधानी असून तिच्या आसपासच्या मुलखावरच ते राज्य करीत असत. [फ्लीट. मुं ग्या. पु. १भा. २ पृ. ५७८-७९].

गुत्तल—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. करजगीच्या पूर्वेस सुमारें १२ मैलांवर एक गांव. इ. स. १८६२ पर्यंत हा गांव एका पेट्याचें मुख्य ठाणें होता. येथील चुंड (चूडा?) शेखराच्या देवळांत दोन शिलालेख आहेत. इ. स. ११८१ च्या कळचुरी शिलालेखांत उल्लेखलेले गुत्तवोळाल हेंच गुत्तल असावें असें वाटतें.

गुत्ती, (गुटी) ता लु का—अनंतपूर जिल्ह्याच्या उत्तरेकडील तालुका. क्षेत्रफळ ८९६ चौ. मै. लो. सं. (१९२१) १३४३५५. शहरें ३. खेडीं १४२. गुत्ती हें मुख्य ठिकाण येथील डोंगरी किल्ल्याबद्दल प्रसिद्ध आहे. पामिडी येथें चिटें तयार होतात. सारा व कर मिळून वसूल २॥ लाख रु. आहे. दक्षिण व पश्चिम भागीं कापसालायख काळी जमीन आहे. उत्तर व पूर्वभागीं ती तांबडी व रेताड आहे. या तालुक्यांत फक्त पेन्नार ही एक नदी आहे. व तिच्या पाण्याचे पाट काढून शेतीकडे उपयोग करतात. प्रत्येकजण दर एकरामागें एकेका दिवसाकरिता एकएक मजूर देऊन ते पाट नेहेमीं साफ ठेवतात. चोलम् आणि कापूस कोरडवाहू जमीनींत पिकतात व रागी ही ओल्या जमीनींत पिकते.

श ह र :—मद्रास. अनंतपूर जिल्ह्यांतील गुत्ती तालुक्याचें मुख्य ठिकाण. उ. अ. १५° ७' व पू. रे. ७७ ° ३९'. लोकसंख्या९६८२.मध्यभागीं जुना डोंगरी किल्ला आहे.शहराभोंवतीं चुन्याचा एक भक्कम तट आहे. पश्चिमेकडील भाग सर्वांपेक्षां उंच असून नुसत्या खडकाचा आहे. त्यावर बालेकिल्ला आहे. येथून किल्ल्यावरून जाण्याला मार्ग आहे. आणि ह्या मार्गानें वाटेंत ठिकठिकाणीं दरवाजे व चौक्या आहेत. किल्ल्याची उंची समुद्रसपाटीपासून २१०५ फूट आहे. पाण्याच्या सांठ्याकरितां खडकांत बरींच टाकीं खोदलीं आहेत. किल्ल्यात शिल्पशास्त्रदृष्ट्या महत्त्वाच्या अशा जुन्या इमारती वगैरे कांहीं नाहींत. एका कड्याच्या टोंकावर मुरारावाचा सभामंडप आहे. येथून खालीं शहराचा चांगला देखावा दिसतो. किल्ला व इमारती यांची दुरुस्ती सरकार ठेवतें. जुनें गुत्ती शहर फार दाट वसलेलें आहे. येथें उन्हाळा कडक भासतो. आतां तटाबाहेर वस्तीची वाढ होत आहे. बहुतेक सरकारी ऑफिसें बाहेरच आहेत.

किल्ल्याविषयीं साग्र इतिहास मिळत नाहीं. किल्ल्यावरील शिलालेखांवरून ११ व्या शतकांत हें महत्त्वाचें ठिकाण होतें असें दिसतें व विजयानगरच्या घराण्याचा शेवट होईपर्यंत तो मुसलमानांनां सर करितां आला नाहीं. १७४६मध्यें मुरारराव यानें तो दुरुस्त केला. १७७५ मध्यें हैदरनें घेतला.१७९९ मध्यें तो निजामाच्या ताब्यांत गेला व १८०० पासून तो इंग्रजांच्या ताब्यांत आहे.

गुंथली—मुंबई. कच्छ. भुजच्या वायव्येस ३६ मैलांवर असलेलें लहान खेडें. येथें एका प्राचीन शहराचा अवशेष आहे. देवळें व घरें असल्याच्या खुणा पुष्कळ ठिकाणीं दिसतात. १८२८ त या खेड्यांतील लोकांस जुनीं भांडीं, गाढवाचा मुखवटा असलेलीं नाणीं व कांहीं पैशाच्या पेटया सांपडल्या.

गुंदिआली—मुंबई. काठेवाडमधला एक स्वतंत्र खंडणी देणारा तालुका. यांत गुंदिआली व बाल हीं दोन गांवें असून तालुकदार वढवाणचे भायाद आहेत.

गुना—ग्वाल्हेर संस्थानांतलें आग्रा-मुंबई रस्त्यावरील बीनाबारण रेल्वेचें स्टेशन. येथें ब्रिटिशांची लष्करी छावणी आहे. नुसती शहरची वस्ती (१९११) ६५८६. रेल्वे झाल्यापासून शहर व शहरचा व्यापार वाढता आहे. शहर व छावणी दोन्ही ठिकाणीं पोस्ट, शाळा वगैरे आहेत.

गुन्नौर, त ह सी ल.—संयुक्त प्रांतांतील एक तालुका. क्षेत्रफळ ३६४ चौ. मै. लो. सं.(१९११) १६३९७०. यांत खेडीं ३२१ व शहर एक (गुन्नौर) आहे. बराच भाग जंगलात आहे.

श ह र :—गुन्नौर तालुक्याचें मुख्य ठिकाण. उत्तरेला ४ मैलांवर बब्राला स्टेशन (औ. रो. खंड रेल्वेचें) आहे. लो.सं. (१९११) ७११९. अकबरच्या वेळीं हें एका परगण्याचें मुख्य ठिकाण होतें. येथून बब्राला स्टेशनाशीं व्यापार बराच चालतो. येथें शाळा वगैरे आहेत.

गुप्त घराणें—गुप्त घराण्याची बरीचशी माहिती बुद्धोत्तर जग (विभाग ४ था) या विभागांत (पृ.३२०-३२५) दिलीच आहे व तेथें गुप्तकालीन हिंदुस्थानची माहिती देणारा नकाशाहि दिला आहे. हें घराणें कुशानानंतर उदयास आलें. याचा वंश पुढें दिल्याप्रमाणें आहे. गुप्त हा मूळपुरुष, त्याचा पुत्र घटोत्कच, त्याचा पहिला चंद्रगुप्त, त्याचा समुद्रगुप्त त्याचा दुसरा चंद्रगुप्त, त्याचा कुमारगुप्त व त्याचा स्कंधगुप्त, होय. या राजांचे अलाहाबाद, एरण, उदयगिरी, मथुरा, गढवा, सांची, भिलसार, मानकुवर, मंदसारे, जुनागड, कहौन, इंदोर व भितारी या ठिकाणीं असलेल्या शिलालेखांवरून यांची साग्र माहिती उपलब्ध झाली आहे. पाहिला चंद्रगुप्त हा मगधचा राजा होता. त्याची राणी लिच्छवीवंशीय असून, तिच्या संबंधामुळें चंद्रगुप्ताची सत्ता अयोध्या, मगध, प्रयाग वगैरेकडे पसरली (चवथें शतक प्रारंभ). या उपकारास जाणून चंद्रगुप्तानें आपल्या नाण्यांच्या बाबतींत लिच्छवीवंश व राणी कुमारदेवी यांचा संबंध आणला. यानें आपल्या नांवाचा शक सुरू केला (२६ फेब्रुवारी सन ३२०) होता. चंद्रगुप्त ३३० मध्यें मेल्यानंतर त्याचा पुत्र समुद्रगुप्त गादीवर आला;

तत्कालीन सर्व हिंदुराजांत हा अत्यंत बलाढ्य व आदर्शभूत होता. त्यानें गंगानदीकांठचे राजे, मध्यदेशांतील राजे, कांचीचा राजा, पश्चिमेकडील राजे यांनां जिंकून साम्राज्य स्थापलें; याचा दिग्विजय ११ वर्षे चालला होता. त्यानें हीं राज्यें खालसा न करितां त्यांच्या राजांनां नुसतें मांडलिक बनविलें होतें. नंतर त्यानें अश्वमेध करून सोन्याचें नाणें पाडिलें. याचें साम्राज्य उत्तरेस हिमालय, दक्षिणेस नर्मदा, पश्चिमेस चंबळ, पंजाब, माळवा आणि पूर्वेस कामरूप आसामपर्यंत पसरलें होतें. शेजारचे नेपाळ, शक, सिंहली वगैरे राजे त्याचे मित्र होते. सिंहलद्वीपच्या राजानें याच्या परवानगीनें बुद्धगयेच्या जवळ एक विहार बांधविला होता. समुद्रगुप्त हा अलौलिक कर्तबगार, विद्वान, कवि व कलामंडित होता. याच्या नाण्यांवर हातांत वीणा असलेलें याचें चित्र कोरलेलें आहे; त्यावरून तो संगीतज्ञ होता हें ठरतें. यानें स्वतः काव्यें व अनेक ग्रंथ रचिले असून त्याच्या पदरीं अनेक विद्वान होते; त्यांत वसुबंधु हा बौद्ध पंडितहि होता. याच्या राणीचें नांव दत्तदेवी होतें. हा केव्हां वारला तें समजत नाहीं; त्याच्या पश्चात त्याचा पुत्र दुसरा चंद्रगुप्त गादीवर आला. त्यानें आपल्यास विक्रमादित्य हें बिरुद लाविलें. त्यानें शकांच्या ताब्यांतून माळवा, गुजराथ व काठेवाड स. ३८८ च्या सुमारास सोडविले. त्यामुळें भडोच, सोपार व खंबायत हीं बंदरें त्याच्या ताब्यांत येऊन व्यापाराची भरभराट होऊन त्याला पुष्कळ फायदा झाला. त्याची शिस्त कडक असे त्याला लष्करी बिरुदें स्वतःस लावण्याची फार हौस असे. सिंहाशीं युद्ध करीत असल्याचीं अगर निरनिराळ्या मर्दानी खेळांत प्रावीण्य मिळवीत असल्याचीं चित्रें त्यानें आपल्या नाण्यांवर कोरलीं आहेत. याच्या राणीचें नांव ध्रुवदेवी. समुद्रगुप्त हा प्रख्यात राजा चाळीस वर्षें राज्य करून ४१६ त मरण पावला. याच्या अमदानींत फाहिआन हा चिनी प्रवासी इकडे आला होता. त्यानें खालीलप्रमाणें देशविषयक माहिती लिहून ठेवली आहे.

मगधांतील शहरें मोठीं भरभराटलेलीं असून लोक सुखी व श्रीमंत असत. मोफत चाललेल्या संस्था पुष्कळ असून मार्गांत यात्रेकरूंच्या सोईसाठीं ठिकठिकाणीं धर्मशाळा बांधल्या होत्या. राजधानींत एक मोठें मोफत औषधालय होतें. पाटलीपुत्रांत यावेळीं महायान व हीनयान या दोन्ही पंथांचे मोठे विहार होते. शहरांत अशोकाच्या वेळचे राजवाडे,महाल वगैरे इमारती शाबूत होत्या. त्यांचें कौशल्ययुक्त काम पाहून फाहिआन यास त्या दैवी वाटल्या. कोणाहि माणसास सर्वत्र राज्यांत वाटेल तेथें परवाना दाखविल्याशिवाय जातां येत असे. लुटालूट वगैरे अपराधास अवयवछेदनाची शिक्षा होई. देहांतशासन फार क्वचित असे जमीनमहसूलाची पद्धत उत्तम असून सैन्य व शिबंदी यांनां नक्त पगार देत असत. राज्यांत बौद्ध चालीरीती प्रचारांत असून हिंसा, मद्यमांससेवन होत नसून गुरें ढोरें विकीत नसत. जे अस्वच्छ असून वरील नियम पाळीत नसत त्यांची वस्ती स्वतंत्र असे. अशोककालापेक्षांहि यावेळीं अहिंसा जास्त प्रसृत झाली होती. मात्र जातीभेद कडक होते. लौकिकव्यवहारांत सरकार ढवळाढवळ करीत नसे. रस्तेलुटी होत नसत.

दुसऱ्या चंद्रगुप्तानंतर पहिला कुमारगुप्त गादीवर आला. याचें बिरुद महेंद्रादित्य असून त्याच्या राणीचें नांव अनंतदेवी होतें. समुद्रगुप्तानंतर पाटलीपुत्र ही राजधानी जाऊन कनोज झाली होती. कुमाराची फार माहिती आढळत नाहीं. यानें अश्वमेध केला व कांहीं प्रांतहि पादाक्रांत केले होते. त्याच्यामागून स्कंधगुप्त राजा झाला. याच्या कारकीर्दींत मध्यआशियांतील रानटी हूणांनीं स्वाऱ्या केल्या परंतु यानें त्यांचा पराभव केला. याच्यानंतर या घराण्यांत बरेच राजे झाले. हाहि या घराण्यांतील प्रख्यात असा राजा होय. पुढें हें घराणें दुर्बळ झालें व त्याचीं छोटीं छोटीं अनेक संस्थानें निर्माण झालीं. स्कंधगुप्तानंतर परगुप्त राजा झाला. याचीं नाणीं उत्कृष्ट असत. त्यावर प्रकाशादित्य असें नांव आढळतें. याची राणी वत्सदेवी होय. परगुप्तानंतर त्याचा पुत्र नरसिंहबालादित्य गादीवर आला (४८५). यानें नालंदास तीनशें फुटांपेक्षां उंच असें एक विटांचें देऊळ बांधलें. हें अत्यंत सुंदर, सोन्यारत्नांनीं खचित होतें असें ह्युएनत्संग म्हणतो. यानें हूणांचा व मिहिरांचा अनेकदां पराभव केला. याच्यानंतर दुसरा कुमारगुप्त राजा झाला याचीच चांदीची मुद्रा भीतरी येथें सांपडली. हाच शेवटचा गुप्तसम्राट होय. याची राणी महादेवी नांवाची होती. याचें राज्य सर्व हिंदुस्थानभर होतें. याच्यानंतर पुष्कळ काळ गुप्तांची माहिती आढळत नाहीं. मात्र पुढें एकदम अकरा गुप्तराजांची माहिती मिळते. हे राजे फक्त मगध देशावरच राज्य करणारे होते. सम्राट नव्हते. या अलीकडील राजांत आदित्यसेन हा प्रख्यात राजा होता; याची राणी कोणदेवी होती. त्यानें हर्षाच्या मरणानंतर पुन्हां आपलें स्वातंत्र्य स्थापन करून अश्वमेध केला; याचा बाप माधवगुप्त होता. या शाखेंतील शेवटचा राजा जीवितगुप्त होय; हा आठव्या शतकाच्या पहिल्या भागांत राज्य करीत होता. या शतकाच्या अखेरीस बंगालच्या पालराजांनीं मगध खालसा केलें.

मध्यहिंदुस्थानांत बुद्धगुप्त नांवाचा एक राजा राज्य करीत होता (४९०) परंतु त्याचा वरील गुप्तघराण्याशीं काय संबंध होता तें समजत नाहीं. तसेंच ५१० मधील एका भानुगुप्ताचाहि उल्लेख येतो पण त्याचाहि संबंध वरील मोठ्या घराण्याशीं काय होता तें आढळत नाहीं.

गु प्त का ल.—या घराण्याच्या अंमलाखालच्या काळास हिंदुस्थानचें सुवर्णयुग म्हणतात. कोणी त्याला ग्रीसमधील पेरिक्लीसचा काळ संबोधितात; कोणी हिंदूंच्या पुनरुज्जीवनाचा काळ म्हणतात. या काळांत वाङ्मय, कला, शास्त्रें, वगैरेंचा अभ्युदय झाला होता. अशोकानें बौद्धधर्माचा जरी प्रसार जोरानें केला तरी हिंदु किंवा जैनधर्म हे अस्तंगत

झाले नव्हते. गुप्तराजे हे सनातनधर्मी होते तरी त्यांनीं बौद्ध किंवा जैन धर्माचा द्वेष केला नाहीं. त्याच्या वेळीं धार्मिक आचारविचारांनां पूर्ण वाव होता; तत्तद्धर्मीयांनां या राजांनीं त्रास दिला नाहीं किंवा त्यांच्या तीर्थक्षेत्रांचा उच्छेदहि केला नाहीं. सूक्ष्मपणें पाहिल्यास या (पांचव्या) शतकांत हिंदुधर्माचा पगडा बौद्ध व जैनधर्मावर हळू हळू बसत चालला होता.

सनातन धर्माच्या पगड्याबरोबर संस्कृतभाषेचेंहि महत्व वाढूं लागलें. अशोकाचें दफ्तर पालीभाषेंत असे. आंध्राजेंहि प्राकृत भाषाच राजदरबारीं वापरीत. मात्र गुप्तराजवटींत ही रीत बदलली. संस्कृतभाषेला राजमान्यता आली. त्यांच्या नाण्यांवरहि संस्कृत लेख कोरले गेले. त्यावेळचें वाङ्मय संस्कृतांत होऊं लागलें;मृच्छकटिक (समुद्रगुप्तकाल),मुद्राराक्षस (चंद्रगुप्तकाल), वायुपुराण वगैरे वाङ्मय या काळांत झालें. कालीदास (कांहींच्या मतें), वसुबंधु हे विद्वानहि या काळांतीलच होते. गणितशास्त्र, ज्योतीष, फलज्योतीष यांचाहि उगम या वेळीं झाला असून प्रख्यात विद्वान आर्यभट्ट (४७६) वराहमिहिर (५०५-५८७) व ब्रह्मगुप्त (५९८) हे या वेळीं चमकले. संगीतकलाहि चांगलीच उदयास आली असावी (समुद्रगुप्त संगीतज्ञ होता यावरून). समुद्रगुप्ताच्या पदरीं या शास्त्रांतील तज्ज्ञ बरेच असावेत. शिल्पकला, खोदकाम, चित्रकला यांचाहि या वेळीं कळस झाला होता. गुप्तांच्या नंतर मुसुलमानांची स्वारी हिंदुस्थानावर आल्यामुळें व त्यांनीं या सुंदर (देवळें, स्तूप, स्तंभ वगैरे)इमारतींचा उच्छेद केल्यामुळें तत्कालीन अवशेष फारच थोडे पहावयास सांपडतात.

उपलब्ध इमारतींत सर्वांत महत्वाची इमारत ललितपूर तालुक्यांतील देवगडचें दगडी देऊळ होय. हें पांचव्या शतकाच्या शेवटीं बांधलें असून त्याच्या भिंतींवर गुप्तकालचें खरें कलाकौशल्य पहावयास सांपडतें. कानपूर जिल्ह्यांतील भितरीगांवचें प्रचंड विटांनीं बांधलेलें देऊळ (दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या वेळचें) हेंहि खोदीव कामाचा उत्कृष्ट नमुना आहे. सारनाथ येथें पुष्कळ तत्कालीन देवळें होतीं. या काळीं धातूंवरहि उत्कृष्ट कामें होत. प्रयाग येथील समुद्रगुप्ताचा एक लोखंडी स्तंभ (विजयलेख) पाहण्यालायख आहे. तांब्याचे उत्तम तऱ्हेचे मोठमोठे पुतळेहि यावेळीं होत असत. नालंदा येथें ८० फूट उंचीचा बुद्धाचा एक पुतळा होता तो, तसेंच सुलतानगंजचा ७॥ फुटांचा बुद्ध पुतळा (दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळचा) हल्लीं बर्मिंगहॅम येथें असलेला, हे या कामांतील उत्कृष्ट नमुने होत. दुसरा चंद्रगुप्त व कुमारगुप्त यांच्या वेळीं ही कला उच्चांतेस गेली होती. अजंटा येथील लेणीं हीं याच काळचीं असून तीं अत्युत्कृष्ट कलाकुसरीचीं म्हणून प्रसिद्ध आहेत. स्कंधगुप्ताच्या वेळीं तर गिलाव्यावर सुंदर कुसरकाम होत असे.

या वेळच्या शिल्पांत एक विशेष असतो. चित्रांची ठेवण, त्यांच्या शरीराचे नाजूक अवयव, हुबेहूब आकार, अंगावरील झिरझिरीत पोशाख, त्यांतून दिसणारे आंतील भाग, मुंडणपद्धति वगैरे अनेक विशेषांवरून गुप्तकालीन मूर्ती व शिल्पकला तात्काल ओळखून काढतां येते.

गुप्तकाळामध्यें पूर्वपश्चिम यांचा संबंध जास्त प्रमाणावर झाला. या काळांत दहा हिंदुस्थानी शिष्टमंडळें चीनमध्यें गेलीं. तसेंच बौद्ध भिक्षूंचीं धार्मिक मंडळें इकडून चीनमध्यें व तिकडून इकडे येत जात असत. कुमारजीव नांवाचा प्रख्यात भिक्षु इकडून तिकडे गेला होता (३८३). इकडील बंदरांचा व कांबोज, सयाम वगैरे देशांतील बंदरांचा व्यापारी संबंध असे. जावामध्यें बौद्धधर्माचा प्रसार या सुमारास होत होता. अजिंठ्यामधील लेण्यांतील चित्रांवरून इराण व हिंदुस्थान यांचें दळणवळण होतें असें ठरतें. तसेंच रोमच्या बादशहाकडेहि इकडून शिष्टमंडळें गेल्याचा पुरावा आढळतो (३३६, ३६१, ५६० या सालीं) व नाण्यांवरून या विधानाला बळकटीहि येते; दीनार हा रोमन शब्द इकडील सोन्याच्या नाण्याला लावीत असत.

मगधाचें धार्मिक महत्व गुप्ताच्या उतरत्या काळातहि कायम होतें. चीनच्या एका बौद्धधर्मी राजानें (स. ५३९) मगधांत एक भिक्षुमंडळ, महायानपंथाच्या धर्मग्रंथप्राप्तीसाठीं व त्यांच्या भाषांतरासाठीं पाठविलें होतें. गुप्तराजानें त्याचा सन्मान करून परमार्थ नांवाच्या आपल्या एका भिक्षूला चीनमध्यें पाठविलें. याच सुमारास बोधिधर्म नांवाचा एक हिंदी राजपुत्र चीनमध्यें जाऊन (५२०) तिकडेच कायमचा राहिला.

गुप्तशकाबद्दल माहिती विज्ञानेतिहास (विभाग ५) यांत (पृ. ११२) दिलीच आहे ती पहावी.

[संदर्भग्रंथ—स्मिथ-अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया; भांडारकर कॉमेमोरेशन व्हॉल्युम; इंडियन अँटिक्वरी, पु. १५, १७; फ्लीट-गुप्त इन्स्क्रिप्शन्स; एपिग्राफिआ इंडिका. पु. १०; हिंदु बुद्धिस्ट मॉन्युमेन्ट्स रिपोर्ट १९१५; डॉ. भांडारकर-नोट ऑन दि गुप्त इरा; बॉम्बे ग्याझे. पु. १. भा. २; माबेल डफ; बील-जर्नल रा. ए. सो. पु. १३].

गुब्बी तालुका:—म्हैसूरच्या तुमकूर जिल्ह्यांतील एक तालुका. क्षेत्रफळ ५५२ चौ. मै. लो. सं. (१९११) ९६८२०. गुब्बी (तालुक्याचें मुख्य ठिकाण) व कडाबा हीं दोन शहरें व बाकी ३५४ खेडीं आहेत. जमीनमहसूल (१९०३-०४) १,९२,०००.रु यांतून शिमशा नदी वहाते. यांत हागलवाडी टेंकड्या आहेत. जमीन तांबडमातीची उथळ व रेताड आहे.

शहर:—गुब्बी तालुक्याचें शहर. लो.सं. (१९११) ३४६४.तुमकूरपासून अंतर १३ मैल. हें रेल्वेस्टेशन व व्यापाराचें मुख्य ठिकाण आहे. कोमटी व लिंगायत हे व्यापारी आहेत. सुपारीच्या व्यापाराचें हें केंद्रस्थान आहे व येथून नगर, मालनाद, वालाचा पेठ वगैरेकडे सुपारी जाते. येथें

कपडा, घोंगड्या, धान्य आणि विविध जिन्नस यांचा वारंवार होणाऱ्या यात्रांच्या वेळीं खप फारच असतो.

गुमला पोटविभाग-- बंगाल. रांची जिल्ह्याचा हा एक पोटविभाग आहे. क्षेत्रफळ ३५०५. चौ. मै. छोटा नागपूरच्याच माळाचा (प्लेटो) हा एक भाग आहे. तरी यांतील कांहीं भागांत टेंकड्या सरळ उंच व दऱ्या खोल आहेत. लोकसंख्या (१९११) ५११७११. यांत १३९६ खेडीं आहेत. गुमला तालुक्याचें क्षे. फ. २०८ असून लो. सं. (१९११) ४६५५१ आहे. गुमला तालुक्याचें मुख्य ठिकाण गुमला हें एक खेडेंच आहे.

गुमसूर तालुका—मद्रास. गंजमजिल्ह्यातील अगदीं उत्तरेकडचा तालुका. क्षेत्रफळ ८२४. चौ. मै. लो. सं. (१९२१) १६१९६२. खेडीं ५३९. मुख्य ठिकाण रसेलकोंड. सारा व कर मिळून वसूल ३२८ हजार. अर्ध्याहून अधिक भागांत जंगल आहे व तें सगळ्या जिल्ह्यात अधिक महत्वाचें आहे. जमीन सुपीक आहे. ऋषिकुल्य कालव्याची सोय आहे तरी बरीच जमीन पडीत आहे. पैका नांवाचे लोक जुन्या सरंजामी पद्धतीप्रमाणें जरूर पडेल तेंव्हां नौकरीवर येण्याच्या करारानें जमीन करतात. पहारेकरी किंवा चपराशी म्हणून हे लोक रहातात.

गुरखा—नेपाळमध्यें ज्या अनेक राष्ट्रजाती आहेत त्यांमध्यें गुरखा ही एक प्रमुख जात आहे. हल्लींचें नेपाळचें राजघराणें याच जातीचें आहे. गंडकी नदीच्या खोऱ्याच्या पूर्वेस त्रिशूलगंगा व मत्स्यगंगा या नद्यांच्या मध्यभागीं गुरखा नांवाचा एक जिल्हा असून या जिल्ह्याची राजधानी गुरखा ही होती. हें शहर हल्लींची राजधानी जें खाटमांडु शहर त्या शहरापासून पश्चिमेस ५६ मैलावर आहे. या गुरखा जिल्ह्यांत रहाणाऱ्या लोकानां गुरखा अशी संज्ञा पडली आहे. 'गुरखा' याचा अर्थ 'गोरक्षक' (गो+रक्ष) असा होतो; व गाईचें रक्षण करणाऱ्या लोकांनां 'गुरखा' हें नांव पडलें असावें असें दिसतें. कित्येकाच्या मतें, गोरखनाथ या नांवाचा जो नेपाळामध्यें एक प्रसिद्ध साधु होऊन गेला त्याच्या नांवावरून गुरखा हें नांव रूढ झालें असावें. गुरखे लोक स्वतःला रजपूत लोकांचे वंशज म्हणवितात. मुसलमानांनीं ज्या वेळीं चितोडवर स्वाऱ्या केल्या त्यावेळीं त्यांच्या भयानें कित्येक रजपुतांनीं नेपाळमधील कुमाऊन प्रांताच्या सभोंवतालच्या डोंगराळ प्रदेशाचा आश्रय केला. नंतर त्यांनीं आसपासच्या मुलुखावर स्वारी करून गुरखा, नवकोट इत्यादि प्रांत जिंकून घेतले व त्या ठिकाणीं त्यांनीं आपलें राज्य स्थापन केलें. त्यावेळेपासून तो आजपावेतों नेपाळवर त्यांची सत्ता अबाधित चालली आहे.

अशा रीतीनें ज्या रजपूत लोकांनीं नेपाळमध्यें गुरखा जिल्ह्यांत वस्ती केली व नेपाळ देश जिंकून घेतला त्यांनां गुरखा हें नांव जरी पडलें असलें तरी खश, गुरंग, मंगर इत्यादि जातींचाहि समावेश या गुरखे लोकांतच होतो. ब्रिटिशांच्या गुरखा पलटणीमध्यें विशेषतः याच जातीच्या लोकांचा भरणा आहे. अशा रीतीनें गुरखा हें नांव खास रजपूत लोकांच्या नेपाळमधील वंशजानांच तेवढें लावण्यांत येत नसून वरील जातीचाहि त्यांत समावेश होतो असें दिसून येतें.

गुरखे लोक नेपाळांतील इतर जातींच्या लोकांपेक्षां दिसण्यांत अधिक चांगले आहेत. हे लोक अंगानें सडपातळ असून उंच असतात. गुरखे लोकांत क्षात्रतेज दृष्टीस पडतें. त्यांचा पेशा लष्करी शिपायाचा असून सैन्यांमध्यें यांचीच संख्या पुष्कळ असते. कृषिकर्म अगर व्यापार या बाबतींत ते मागसलेले आहेत. ते ऐदीपणांत आपला सारा वेळ घालवितांना दृष्टीस पडतात. इतर लोकांपेक्षां नीटनेटकेपणांत गुरखे लोक अग्र आहेत. हे लोक निळ्या रंगाचे कपडे वापरतात. निळा पायजमा, निळें कुडतें, निळें शिरस्त्राण घालून कमरेभोंवतीं ते कित्येक हात लांबीचा निळा कमरबंद गुंडाळतात व त्यांत एक मोठा सुरा लटकावून देतात. या सुऱ्यास 'कुकरी' असें म्हणतात. थंडीच्या दिवसांतहि गुरखे लोक हेच कपडे परिधान करतात. फक्त या कपड्यांच्या आंतील अंगास कापूस लावलेला असतो. श्रीमंत लोक आपल्या कपड्यांचा आंतला भाग बकऱ्याच्या केसांनीं मढवून घेतात, व डोक्यास चित्रविचित्र रंगाच्या कापडाच्या तुकड्यांची टोपी घालतात. अधिकारी लोकांच्या टोप्यांनां कलावतूची फीत लावलेली असते.

गुरखे लोक मांसाहारी आहेत. नेपाळच्या उत्तरेकडील पहाडांतील व तराईतील बकऱ्यांचें मास हे लोक मोठ्या आवडीनें खातात. याशिवाय शिकारीचा यांनां फार नाद असल्यानें रानडुकरें, ससे, इत्यादि प्राण्यांची शिकार करून त्याचें मांस हे लोक खातात. रानडुकरें पाळून त्यांनां धष्टपुष्ट करून नंतर त्यांचें मांस खाण्याची पद्धत श्रीमंत लोकांत आढळते.

गुरखे लोक हिंदूधर्मीय आहेत. अर्थातच यांच्या बऱ्याचशा चालीरीति हिंदुस्थानांतील लोकांप्रमाणेंच आहेत. यांच्यांत जातिभेदाचेंहि थोडें फार वर्चस्व आढळून येतें. बहुपत्नीकत्वाची चाल यांच्यामध्यें आढळून येते. गुरखे लोक आपल्या बायकांवर करडा अंमल गाजवितात. आपली बायको व्यभिचारी आहे असा एखाद्या गुरख्याला संशय आला तर तो तिला भयंकर शासन करतो. जो पुरुष आपल्या स्त्रीशीं वाईट संबध ठेवतांना आढळेल त्याला गुरखा आपल्या सुरीनें ठार मारितो. विधवाविवाहाला गुरखे लोकांत पूर्ण मनाई आहे. नेपाळचें राजघराणें गुरखा जातीचें असल्यानें, या राजघराण्यांतील लोक हिंदूधर्मीय आहेत. अर्थात् नेपाळांत हिंदूधर्मांतील उत्सव व यात्रा मोठ्या थाटांत साजऱ्या केल्या जातात. या यात्रांमध्यें इंद्रयात्रा रथयात्रा, शिवरात्र्युत्सव प्रमुख आहेत. याशिवाय, दुर्गापूजा, पशुपतिनाथ यात्रा, रामनवमीचा उत्सव व हिंदूधर्मा-

तील इतर उत्सव गुरखे लोकांत भक्तिभावानें साजरे करण्यांत येतात.[संदर्भ ग्रंथ—राइट-हिस्टरी ऑफ नेपाल १८७७; ज. रा. आजगांवकर-नेपाळवर्णन १९०६; कॅप्टन व्हॅन्सीटार्ट-नोट्स ऑन दि गुरखाज (१८९८);].

गुरगांव जि ल्हा.—पंजाबमधला एक जिल्हा. क्षेत्रफळ १९८४ चौ. मैल. दक्षिणेकडून अरवली पर्वताचे दोन फांटे उत्तरेकडे जातात. सामान्यतः ऋतुमान कडक नसतें, तरी तापाची साथ नेहमी असते. पावसाचें मान सामान्यतः२५इंच आहे.पूर्वी हा भाग यादव व शाही रजपुतांकडे होता. ११९६ पासून दोन शतकापर्यंत त्याचा मुसुलमानांशीं झगडा चालू असे. पुढें मुसुलमानी सत्ता झाली. नंतर मराठयाचा भगवा झेंडा येथें फडकला. १७९३ च्या सुमारास कोणा जॉर्ज थॉमसच्या ताब्यांत फिरोजपूर परगणा गेला होता. त्यानें गुरगांव लुटलें. मराठयांनीं रेवारी येथें अहीर वंशाचा तेजसिंग याची स्थापना केली. १८०३ मध्यें शिंदे यांच्या मार्फत हा सर्व भाग इंग्रजांकडे आला. तरी तेथें पुष्कळ वतनदार कायम होतेच. हलके हलके या वतनदारापैकीं एकेकाचें वतन तो कोणत्या तरी कटांत, बंडांत अगर खुनांत सामील झाल्याबद्दल म्हणून जप्त झालें व हा पूर्ण ब्रिटिश जिल्हा बनला. रेवारी, पलवल, होडल वगैरे ठिकाणीं प्राचीन अवशेष पहाण्याजोगे आहेत. जिल्ह्यात ५ तालुके आहेत. ७ शहरें व ११८० खेडीं आहेत. लोकवस्ती (१९२१) ६८२००३. सहा शहरीं म्युनिसिपालिटया आहेत. गुरगाव हें एक लहान शहर आहे. भाषा हिंदुस्थानी, मेवाडी, व्रज या चालतात. यमुनेच्या दोन्ही बाजूंची जमीन चांगली आहे. त्याचप्रमाणें टेंकड्याजवळचीहि जमीन बरी आहे. आग्रा कालव्याचें पाणी इकडे येतें. या जिल्ह्यांत जंगल फारसें नाहीं. रेवारी तालुका तर उजाड आहे. फक्त पलवल तालुक्यांत थोडेसें जंगल आहे. मिठाच्या खाणी बऱ्याच जुन्या आहेत व पुरवठाहि बराच होतो. सुलतानपुरी मीठ प्रसिद्ध आहे. सोरा, अभ्रक, लोखंड, तांबें वगैरे धातूंच्या खाणी आहेत. पण फारशा चालू नाहींत. डोंगरी प्रवाहांच्या रेतींत सोनें सांपडतें. रेवारी येथें स्लेटीचे दगड सांपडतात. सुती, लोंकरी हलका कपडा तयार होतो. रेवारीला थोडीशी मलमल होते. रेवारी येथेंच पितळेचीं भांडीं होतात. बांगडया, लोखंडी भांडीं, जोडे हींहि होतात.व्यापाराचें मुख्य ठिकाण रेवारा हें आहे.राजपुताना व उत्तर हिंदुस्थान यांच्याशीं व्यापार चालतो. आयात माल सांबरचें मीठ व लोखंड, निर्गत माल साखर, धान्य व विलायती कपडा वगैरे. राजपुताना माळवा रेल्वे, जी. आय. पी.ची आग्रादिल्लीलाईन व १२ लहान लाइनी यांतून जातात. कच्च्या (८१ मैल) पक्या (५०९ मै.) सडकाहि बऱ्याच आहेत. शिवाय यमुना नदींतून होड्या चालतात. शिक्षणाच्या बाबतींत प्रांतांतील जिल्ह्यांत या जिल्ह्याला शेवटचेंच स्थान मिळेल.

त ह शि ल.—पंजाब. गुरगांव जिल्ह्यांतली एक तहशील. क्षेत्रफळ ४११ चौ. मै. लो. सं. (१९११) ११२३१२. हींत ३ शहरें व २०५ खेडीं आहेत. सारा व कर मिळून २.५ लाखांचा वसूल आहे. टेंकडयांतून येणाऱ्या प्रवाहांनां बंधारे घालून शेतीकरितां पाणी अडविलें आहे. उत्तरेकडे जमीन चांगली आहे. दक्षिणेकडे रेताड आहे.

श ह र.—गुरगांव जिल्हा. तालुक्याचें मुख्य ठिकाण. उ. अ. २८° २८' व पू. रे. ७७° २०' रेल्वेस्टेशन ३ मैलांवर आहे. वस्ती (१९११) ५४६१. यालाच हिदायतपूर असेंहि म्हणतात. येथें झांशी येथील राणी सैन्यावर नजर ठेवण्याकरितां एक पलटण असे. जवळच गुरगांव मसाणी येथें शीतळा देवीचें देवालय आहे. दरसाल ६० हजार पर्यंत लोक दर्शनाला येतात.

गुरमतकाल—हैद्राबाद संस्थानचा एक तालुका होता. १९०५ सालीं त्याचीं १९१ खेडीं व ३२० चौ. मै. जमीन दुसऱ्या तीन तालुक्यांत विभागून दिली.

गुरव—महाराष्ट्राबाहेर ही जात फारशी आढळत नाहीं. महाराष्ट्रांत ह्या जातीची संख्या अत्यंत अल्प आहे. मध्यप्रांत वऱ्हाडांत यांची संख्या १९११ च्या खानेसुमारीप्रमाणें सुमारें १४००० आहे. व मुंबई इलाख्यांत ती ६५,५३८ आहे. हैदराबाद संस्थानांत यांची संख्या १७५२२ आहे. आपल्या मूळपुरुषाचें शिवार्चनांत अंतर पडल्याकारणानें महादेवाच्या शापामुळें वैगुण्य प्राप्त होऊन त्यांतच अज्ञान व दारिद्र्याची भर पडल्यामुळें उच्च वर्गापासून आपण च्युत झालों असें सुशिक्षित गुरवांचें म्हणणें आहे. ऋषीपासून गुरवांची उत्पत्ति असल्याचें शिवपुराणावरून दिसून येतें. वेतन घेऊन पूजा करणारे ब्राह्मण हव्यकव्य व श्राद्धकर्मी निषद्ध आहेत असें स्मृतिकार व धर्मशास्त्रकार यांनीं ठरविल्यामुळें स्मृतिकालापासून गुरवांच्या अवनतावस्थेस आरंभ होऊन शिवपुराणकालीं गुरव ही निराळी जात बनली असावी. गर्भाधान, उपनयनादि सर्व संस्कार, गायत्र्याधिकार वगैरे बाबतींत व सामान्यः आचारविचारात श्रेष्ठ प्रतीच्या गरवांत व इतर ब्राह्मणांत सकृद्दर्शनीं कांहीं एक भेद दिसून येत नाहीं. श्रीशिवगंगापीठाच्या श्रीमच्छंकराचार्यांची स्वारी १९१२ सालीं वैदर्भ प्रांतीं संचारार्थ गेली असता त्यांनीं गुरव हे ब्राह्मण असल्याबद्दल आपला अभिप्राय दिल्याचें सांगतात. गुरवात सांप्रत बालविवाह व पुनर्विवाह रूढ झालेला आहे. परंतु त्याला वरिष्ठ गुरवसमाजाकडून गौणस्थान देण्यांत येतें. गुरवांत उपनयन, गर्भाधान, विवाहादि सर्वच संस्कार यथासाग आहेत. त्यांनां फक्त इतर श्रेष्ठ ब्राह्मणांच्या हातचें अन्नोदक चालतें. मुंबई इलाख्याकडे गुरव जातीचे स्वतंत्र उपाध्याय कित्येक ठिकाणीं असून ते गुरवांच्या लग्नमौंजी लावितात. हे एखाद्या ठिकाणीं उपलब्ध नसल्यास ब्राह्मण भटजींची योजना होते. वऱ्हाडांत असले

शैव भटजी पूर्वी असत, पण आज नाहींसे झाले आहेत. मध्यप्रांतांत शैव भटजी केव्हांच अस्तित्वांत नसून ब्राह्मणच सर्व कर्मे करतात.

पो ट जा ती.—नागपूर मध्यप्रांतीय गुरवांत देशकर, वऱ्हाडे, झाडे वगैरे पोटभेद निरनिराळ्या वसतिस्थानांवरून पडलेले दिसतात. वऱ्हाडे म्ह० मूळचे वऱ्हाडांत राहणारे. झाडे म्ह० जंगली झाडीच्या प्रदेशांतील वगैरे. या पोटजातींत रोटीबेटी व्यवहारांची कांहीं तुरळक उदाहरणें देशस्थकोंकणस्थ विवाहाप्रमाणें केवळ अपवादादाखल असून सामान्यतः रोटीबेटी व्यवहार रूढ नाहीं. मध्यप्रांतांत देशकरांहून निराळा असा एक लहानसा पोटभेद असून त्यांनां कित्येक वऱ्हाडे म्हणतात. कांहीं अपवाद खेरीजकरून वऱ्हाडकरांशीं त्याचा विशेषसा संबंध नाहीं. सामान्यतः वऱ्हाड मध्यप्रांतांतील गुरव इतरांपेक्षां शिक्षण वगैरे सर्वच बाबतींत पुढें गेलेले असल्यामुळें श्रेष्ठतेचा बराच अभिमान त्यांच्या अंगीं सकारण वसत आहे. सातारा, सोलापूर, खानदेश वगैरे प्रांतांतील गुरव जातींत हलक्या सलक्या पोटभेदाचा पुष्कळच भरणा आहे. तिकडे नगरे व जुन्नरे असे २ मुख्य भेद आहेत. त्यांत नगरे उच्च प्रतीचे मानिले जातात. खानदेशांतील पार पट्टींत तापी कांठीं खाडव्याकडे अहीर गुरव आहेत. तेथें सही नांवाचाहि एक पोटभेद असल्याचें कळतें. खानदेशांतील स्थिति अत्यंत निकृष्ट आहे. कोंकणांत लिंगायन गुरव आहेत. हेच नीलकंठ गुरव होत. ते गळ्यांत लिंग अडकवितात. यांचा भरणा कोंकणपट्टीकडे आहे. शिवाय जैन गुरव निराळेच आहेत. मराठे गुरव म्हणजे मराठा जातीचे पुजारी. वासुदेव, कडू वगैरे शूद्रजातीपैकीं होत. त्यांच्या चालीरीती शूद्रांप्रमाणें असतात.

वरील पोटजातींशिवाय कांहीं वाजंत्र्यांचा धंदा करणारे लोक स्वतांस 'गुरव' म्हणवितात. यांनीं फक्त देवळांत व राजदरबारांत वाजवावें असा निर्बंध असल्याचें समजतें. ह्या वाजंत्री गुरवांचा वरील कोणत्याहि पोटजातीशीं संबंध नाहीं. मुंबईकडे शूद्र देवतांची पूजा घेणारे कोळी आणि मराठे देखील स्वतांस गुरवच म्हणवितात. कांहीं जैन देवतांची पूजा घेणारेहि गुरवच बनले आहेत. यांस नागपूर प्रांतीं वस्ईवाले म्हणतात, पण हे खरे गुरव नव्हत. यांच्यावरून सर्व गुरव जातीची कल्पना केल्यामुळें पाश्चात्य ग्रंथकारांच्या चुका झालेल्या आहेत व त्यामुळेंच समाजांत गुरवांसंबंधीं गैरसमज पसरलेला आहे असें सुशिक्षित गुरव म्हणतात.

पा श्चा त्य ग्रं थ का रां चें म त — रसेलकृत कास्टस् अँड ट्राईब्स् ऑफ दि सेंट्रल प्राव्हिन्सेस अँड बेरार्स (पु. ३ पा. १७६) यांत पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे: 'गुरव आपली धर्मशिष्या जी कलावंतीण तिच्या पाठीमागें वाद्यें वाजवितात. गर्भाधानप्रसंगीं वेश्या गुरवाची पूजा करते व तो तिच्या दांताला मिस्सी लावतो. तिला मूल होण्यापूर्वी तिनें हा विधि उरकून न टाकल्यास तिला जातीबाहेर टाकतात......कोठें कोठें गुरव कुणब्यांच्या हातचें अन्न खातात'.

उ प जी वि के चीं सा ध नें:—पूजेकरितां देवतेला दिलेल्या शेतावर व दक्षिणादि सर्व उत्पन्नावर गुरवाची मालकी असते. जागृतेश्वर (नागपूर); महाकाली (चांदा), खंडोबा (जेजुरी) याठिकाणीं गुरवच या उत्पन्नाचे मालक आहेत. अलीकडे बहुतेक ठिकाणीं देवस्थान कमिट्या नेमून सर्वच पुजाऱ्यांप्रमाणें गुरवांच्या वंशपरंपरा हक्कास बाध आला आहे. महाकाली या देवस्थानावरून गुरवाचें आडनांवहि महाकाळे असें पडलें आहे. आळंदी येथें ज्ञानेश्वर महाराजाच्या उत्पन्नासंबंधानें गुरव व देवस्थानकमिटी यांचा तंटा कोर्टांत बरेच दिवस चालून गुरवांस अपयश आलें. या जातींत शिक्षणप्रसार कमी असून गरीब लोकांचाच भरणा फार आहे. बहुतेक लोक नोकरी व शेतीवर उपजीविका करीत आहेत. खेड्यापाड्यांतील दरिद्री गुरव क्वचित् बेलफुलें व पानपत्रावळी विकून उदरभरण करतात. सामान्यतः बोलावयाचें म्हणजे गुरव हे पांढरपेशे बनले आहेत. पूर्वी जातिपंचायती असत पण आता त्या नष्ट झाल्या आहेत.

जा तीं तील कां हीं आ ड नां वें.—हीं आडनांवें बहुधा स्थलावरून किंवा धंद्यावरून पडलेलीं असावींत. कित्येकदां व्यंग्यार्थानें एखाद्यास नांव ठेवण्यात येतें व तेंच पुढें आडनांव होऊन बसतें. पूर्वी भाट लोक आडनांवें ठेवीत असत असें ऐकिवांत आहे. नागपूर कडील:— रामेकर, पंडे, सोंगाडे (दळवी), सुंभ, आस्कर (फत्तेपुरी), सौरंगपते, राणे, सोनटक्के, मार्कंडेय, महाकाळे, वाशीमकर, फुलझेले, क्षीरसागर, वऱ्हाडे. वऱ्हाडांतील:—सातोकर, देवरणकर, अंबुलकर, अंजनकर, अलंकारे, ग्वतकर, डांगे, दलाल, खंडेराव. पुण्याकडील:— वेंदरे, काळे; उपाध्ये, महाबळ, क्षीरसागर, गोरक्ष, डोळे, इ. काळे, क्षीरसागर, वानखेडे, पंडे, सोनटक्के वगैरेसारखीं आडनांवें वरील तिन्ही पंथीयांत दिसतात.

मध्यप्रांतांतून पश्चिमेस महाराष्ट्राकडे जसजसें जावें तसतशी या जातीची निकृष्टावस्था अधिकाधिक दिसून येते. मराठे कुणबी (जखाई जोखाईचे पुजारी), कोळी, वासुदेव वगैरे पुजारी लोकहि स्वतांस गुरव म्हणतात. त्यांच्यावरून व विशेषतः वाजंत्र्यांवरून सर्वच गुरव जातीची कल्पना बसविल्यामुळें त्यांच्यासंबंधीं पश्चिममहाराष्ट्रांत बराच गैरसमज दिसून येतो. यांत शिक्षणाचा अभाव असून गरीब लोकांचाच भरणा फार आहे. एकंदर संख्या पाऊण लाखाच्या आंत बाहेर आहे. कै. रा. आबाजी दामोदर रामेकर, काशीनाथ भगवंत उपाध्ये, सीताराम दाजीबा पंडे वगैरे गृहस्थांच्या प्रयत्नानें गुरवांत जागृति उत्पन्न होत आहे. १९१६साली सातारा येथें पहिली शिवब्राह्मण परिषद भरली तिचे रा. रा. सीताराम

दाजीबा पंडे हे अध्यक्ष होते. [लेखांत रा. रा. दा. रामेकर, वकील, (अकोट) यांजकडून आलेल्या माहितीचा उपयोग केला आहे. शिवाय मुं. गॅ.; सेन्सस रिपोर्ट; रसेल व हिरालाल व एन्थोवेन पहा.].

गुरु—सूर्यमंडळांतील सर्वांत मोठा ग्रह. गुरु हा शुक्राच्या खालोखाल तेजस्वी आहे. जेव्हां त्याच्या अस्तोदयाची संधि असते तेव्हां मात्र तो बारीक दिसतो.इतर वेळीं तो सहज ओळखितां येतो. याच्या अस्ताचा काल मंगल कार्यांत वर्ज्य केला जातो.

गुरूची आणि सूर्याची युति झाल्यापासून पुनः तशीच युति होण्यास सुमारें ३९९ दिवस लागतात. गुरु आपणास डोळ्यांनीं लहानसा बिंदु दिसतो परंतु तो एवढा मोठा आहे कीं, आपल्या पृथ्वीएवढाले १३९० गोल एकत्र करावे तेव्हां गुरूएवढा एक गोल होईल. गुरूंतील द्रव्य पृथ्वीच्या सुमारें ३००पट आहे; अर्थात् पृथ्वीच्या३०० पट त्याचें वजन असलें पाहिजे. त्याची घनता सरासरीनें पृथ्वीच्या चतुर्थांश आहे. पृथ्वीच्या दोन अक्षप्रदक्षिणा जेवढ्या कालांत होतात तेवढ्या कालांत गुरूच्या पांच अक्षप्रदक्षिणा होतात. यामुळें गुरूवरील दिवस आपल्या ९ तास ५५॥ मिनिटां एवढा आहे. परंतु त्याचें वर्ष फार मोठें आहे. आपलीं बारा वर्षें होतात तेव्हां गुरूचें एक वर्ष होतें. सूर्यापासून पृथ्वीच्या पाचपट अंतरावर गुरु आहे. त्याचा दक्षिणोत्तर व्यास पूर्वपश्चिम व्यासापेक्षां सुमारें ५००० मैल कमी आहे. त्यामुळें ह्याचा आकार ध्रुवाकडे किंचित् चापट आहे.

गुरूच्या पृष्ठावर स्थाईक खुणा नाहींत असें म्हटलें तरी चालेल. इसवी सन १८७९ मध्यें त्याच्या दक्षिणगोलार्धांत एक तांबडा टिपका दिसूं लागला. तो तसाच इसवी सन १८८३ पर्यंत दिसत होता व तो दीर्घवृत्ताकार होता. त्याचा बृहदक्ष विषुववृत्ताशीं समांतर व लघ्वक्षाच्या चौपट होता. त्याचें क्षेत्रफळ सुमारें आपल्या पृथ्वीएवढें होतें. त्यावरून गुरूचा अक्षप्रदक्षिणाकाळ काढिला आहे. त्यांत असें दिसून आलें आहे कीं, गुरूचा विषुववृत्तावरील भाग जितका जलद फिरतो त्यापेक्षां ध्रुवाकडील भाग कमी वेगानें फिरतो. या गोष्टींत गुरूचें सूर्याशीं साम्य आहे. वर उल्लेखिलेला मोठा तांबडा टिपका यानंतर गुरूवर बऱ्याच वेळीं दिसून आला. गुरूवर विषुववृत्ताशीं समांतर असे कांहीं पट्टे आहेत कीं, ते चकचकीत दिसतात. विषुववृत्तावरच एक चकचकीत पट्टा दिसतो. त्याचा रंग बहुतकरून मोत्यासारखा दिसतो. त्याच्या उत्तर व दक्षिण भागीं जे पट्टे दिसतात त्याचा रंग तांबूस दिसतो. कधीं कधीं त्यांत जांभळया रंगाची झांक मारते. हे पट्टे त्याच्या ध्रुवापर्यंत गेले आहेत. ध्रुवाजवळचे प्रदेश बहुधा किंचित निळे दिसतात. गुरूचा पृष्ठभाग सतत सारखा असा दोन दिवस देखील नसतो. गुरूवरच्या कांहीं भागांचा रंग वारंवार बदलतो.

ज्याप्रमाणें पृथ्वीला चंद्र हा एक उपग्रह आहे त्याप्रमाणें गुरूला आठ उपग्रह आहेत.पैकीं मोठ्या चारांचा शोध ग्यालिलिओनें लावला (१६१०). ह्या चोहोंच्या आंत एक पांचवा उपग्रह आहे. त्याचा शोध सन १८९२ च्या आगष्ट महिन्यांत लागला. जगांतील अति मोठी दुर्बीण अमेरिकेंत हॅमिल्टन पर्वतावरील लिक नांवाच्या वेधशाळेंत आहे. तींतून हा ५ वा उपग्रह प्रथम दिसला. १९०४ सालीं आणखी दोन लहान उपग्रह संशोधिले गेले. आठवा उपग्रह २८ फेब्रुवारी १९०८ रोजीं पी. जे. मेलोटे यानें संशोधिला.

गुरूवरून पहाणारास पहिल्या उपग्रहाची अक्षप्रदक्षिणा होण्यास १ दिवस, १८ तास, २८ मिनिटें व ३६ सेकंद इतका काल लागतो असें दिसतें. दुसऱ्याच्या अक्षप्रदक्षिणेस काल ३ दिवस १३ तास लागतो. तिसऱ्याच्या अक्षप्रदक्षिणेस काल ७ दिवस, ४ तास लागतो आणि चवथ्याच्या अक्षप्रदक्षिणेस काल १६ दिवस१८तास लागतो. ह्या उपग्रहांच्या छायेनें गुरूला ग्रहण लागतें व गुरूच्या छायेनें उपग्रहांस ग्रहणें लागतात.दुर्बिणींतून तीं ग्रहणें वारंवार पाहण्याची मोठी मौज असते. गुरूची कक्षा, त्याच्या उपग्रहांच्या कक्षा, आणि पृथ्वीची कक्षा यांमध्यें सुमारें ३ अंशांचे कोन असतात. यामुळें उपग्रहांचीं ग्रहणें वारंवार होतात. कोणत्याहि पदार्थाचा प्रकाश आपल्या डोळ्यांवर येईपर्यंत त्यास मधला मार्ग आक्रमण्यास कांहीं काल लागतो, असा शोध गुरूच्या उपग्रहांच्या ग्रहणावरून लागलेला आहे. गुरूच्या उपग्रहांस सूर्यापासून प्रकाश आणि उष्णता फार थोडी म्हणजे आपल्या पंचविसाव्या हिश्शानें मिळते. गुरू आणि त्याचे उपग्रह ही एक लहानशी सूर्यमालाच म्हणण्यास हरकत नाहीं. गुरूच्या उपग्रहाची घनता गुरूपेक्षां जास्त आहे. गुरूच्या उपग्रहांवर वस्ती असावी असें अनुमान करतात.

गुरु—या विषयावर विवेचन करतांना शिल्पी वर्गाचें शिक्षण देणाऱ्या वर्गाचें विवेचन वगळलें आहे, आणि ब्राह्मण व क्षत्रिय या वर्गाचें शिक्षण देणारा वर्गच अनुलक्षिला आहे. या शिक्षक वर्गाचें ऐतिहासिक विवेचन करतांना मंत्रकालाकडे प्रथम लक्ष जातें. मंत्रकालांत गुरु ही कल्पना फारशी विकसित झालेली दिसत नाहीं, कां कीं, मंत्र स्वयंस्फूर्तीनें तयार होत किंवा अनुकरणानें होत. परंतु त्याच्या वाढीसाठीं पद्धतशीर शिक्षण देणाऱ्या वर्गाचें अस्तित्व शक्य दिसत नाहीं. बृहत्यज्ञसंस्थेचा म्हणजे संहितीकरणाचा काल आला तेव्हां मोठ्या वाङ्मयसंग्रहाचें अध्ययन, पठण, अभ्यास व विनियोग यांचें शिक्षण देणाऱ्या वर्गाची अवश्यकता उत्पन्न झाली. कारण यज्ञांची घटना अशी होऊं लागली कीं, तींत पुष्कळ दिवस परिश्रमपूर्वक शिकविणारा वर्ग असल्याशिवाय त्या विषयांत प्रावीण्य शक्य नव्हतें. यामुळें विशिष्ट आचार्याच्या अस्तित्वास अवश्यक अशी परिस्थिति उत्पन्न झाली. यावेळच्या संहितीकरणकालीन

अनेक आचार्यांची नांवें आज उपलब्ध आहेत. आणि त्यांपैकीं ज्यांच्या नांवांवर विशिष्ट याग किंवा कोणतें तरी प्रचलित कर्म रूढ झालें त्यांचीं नांवें वेदविद्या विभागांत२१०व्या पृष्टांत दिलीं आहेत.त्यांत अंगिरस, गर्ग,अत्रि, कुसुरुबिंदु, बृहस्पति, नाचिकेता, वसिष्ठ इत्यादि नांवें प्रामुख्यानें सांगतां येतील. या आचार्यवर्गामध्यें होत्याच्या किंवा अध्वर्यूच्या किंवा सामकाच्या कर्मांच्या शिक्षणाना उपक्रम असावा. अथर्व्यांची गुरुपरंपरा इतरांच्या गुरुपरंपरेइतकी बलवान् दिसत नाहीं. ज्यावेळीं यज्ञसंस्था जोरानें चालू होती त्यावेळेसच वादाचे अनेक प्रसंग येत व शिक्षणहि अधिक कारणमीमांसापूर्वक देणें अवश्य होई. त्यामुळें त्रैविद्यांच्या आचार्यपरंपरेतूनच शिक्षादि सहा वेदांगें निर्माण झालीं आणि त्या वर्गातूनच पुढें भारतीय शास्त्रीय शिक्षण देणारांचा वर्ग निघाला व तो आजपर्यंत चालत आला आहे आणि कदाचित् आजचाच वर्ग हा परंपरेचा शेवट म्हणतां येईल

श्रौतकर्माविषयीं अनास्था किंवा जुगुप्सा ज्या वर्गांत उत्पन्न झाली तो वर्ग म्हटला म्हणजे आरण्यकांचा होय. या वर्गामध्यें अध्यात्म विषयाची जोपासना होऊं लागली आणि अध्यात्मविषय परंपरेनें सांगणारे शिक्षक उत्पन्न होऊं लागले. या शिक्षकांमध्यें जनक, याज्ञवल्क्य, यांचीं नांवें मुख्यत्वें देतां येतील. अध्यात्म ज्ञानासंबंधींच्या अशा प्रकारच्या गुरुशिष्य परंपरा ब्राह्मणकालांतहि होत्या हें शतपथ ब्राह्मण, जैमि. उ. ब्राह्मण यांतील गुरुशिष्यपरंपरांवरून दिसून येतें. या परंपरांची माहिती बुद्धपूर्व जग (विभाग३ पृष्ट४३७) या भागांत दिली. या वर्गानेंच पूर्वमीमांसेखेरीज इतर दर्शनांची जोपासना केली. व त्यामुळें विशिष्ट दर्शनांचे आचार्य उत्पन्न झाले. श्रौताचा आचार्यवर्ग आणि आरण्यकाचा आचार्यवर्ग हे एकमेकांपासून अगदीं पृथक् नव्हते. उदाहरणार्थ, याज्ञवल्क्य जैमिनि यांचीं नांवें दोहींकडेहि येतात. आणि त्याचा परिणाम ज्ञानविकासावर झालाच आहे. तो इतका कीं, मीमांसा हें शास्त्र जरी श्रौतयांच्या परंपरेंतील आहे तरी तें आरण्यकीयांच्या दर्शनपरंपरेंत योजिलें गेलें आणि जेव्हां श्रौतसंस्था बंद पडल्या तेव्हां वेदांगें व दर्शनें मिळून होणारा शास्त्रसमुच्चय हा एका सामान्य वर्गास अभ्यासविषय झाला आणि श्रौती व पाठ म्हणणारे वैदिक एवढ्यांच्याच हातीं श्रौतज्ञानाची परंपरा राहिली. या स्थितींत हे दोन्ही अद्याप चालू आहेत.

आतां पुराणदृष्ट गुरुपरंपरेविषयीं विचार करूं. मांत्र संस्कृतीपासून निराळी असलेली जी सूतसंस्कृति त्या संस्कृतींतील वाङ्मयाचें मांत्रसंस्कृतीचा स्पर्श होऊन जें रूपांतर झालें तें आज आपणांस इतिहासपुराणवाङ्मय म्हणून उपलब्ध आहे. या वाङ्मयाकडे लक्ष्य देतां आपणास दोन, तीन प्रकारच्या गुरुपरंपरांची कल्पना येते. सूतवर्ग आपला व्यवसाय गुरुपरंपरेनें चालवीत असे याविषयीं संशय नाहीं. परंतु दैत्यगुरु व देवगुरु यांचीं वर्णनें जीं येतात त्यांवरून तें गुरुत्व कोणत्या प्रकारचें असावें याविषयीं कल्पना करतां येत नाहीं. ते आध्यात्मिक गुरु असतील असें म्हणवत नाहीं. आणि असल्यास ते अध्यात्मशिक्षण कोणत्याप्रकारें देत असावेत याची कल्पना होत नाहीं. दैत्यासुरांच्या अध्यात्मिक परंपरेची ओळख आपणांस इतिहासपुराणें करून देत नाहींत. आणि देवांचीहि जवळ जवळ तीच कथा आहे. देवगुरु जो बृहस्पति म्हटला आहे त्याचें नांव जर एखाद्या विचारपरंपरेशीं संयुक्त असेल तर तें लोकायताशीं म्हणजे नास्तिक्याशीं होय. महाभारतामध्यें गुरुगृहाच्या संघटनेविषयीं बरेंच विवेचन आहे. म्हणजे अनेक वर्षे विद्यार्थी गुरुकडे अभ्यास करतो, त्याच्या घरचीं अनेक कामें करतो आणि विद्यार्जन करून गुरुदक्षिणा देऊन निघून जातो हें चित्र आपणांस धर्मसूत्रकालाचेंच दिसतें व यावरून हें सूतसंस्कृतींतील गुरुपरंपरेचें चित्र नसून श्रौतोत्तरकालाचें आहे व श्रौतोत्तरकालीन ब्राह्मणांकडून इतिहासवाङ्मयावर जो संस्कार झाला त्याचें हें द्योतक होय. शिवाय महाभारतांत हजारों शिष्य बाळगणाऱ्या कुलपतीचा उल्लेख आहे. म्हणजे महाभारतांत गुरुकुलघटनेविषयीं बरेंच विवेचन दिलें आहे. पण शिक्षणक्रमाविषयीं विवेचन फारसें नाहीं. पण असें समजण्यास हरकत नाहीं कीं, शिक्षणविषयक जी माहिती सूत्रग्रंथ देतात तीच शिक्षणक्रम महाभारताच्या संपादकांस अभिप्रेत असावा.

षड्दर्शनांचे सूत्रग्रंथ तयार झाले आणि त्यानंतर देशांत विशिष्ट मार्गानें मोक्ष मिळविण्यास साधक असे संप्रदाय तयार झाले. कोणी योगमार्गी तर कोणी भक्तिमार्गी. हे संप्रदाय मुसलमानी स्वाऱ्यानंतर हिंदुसंस्कृतीचा उच्छेद झाल्यामुळें तर फारच बळावले. कारण हिंदु विद्या शिकावयाची तरी कशाला; तिच्या योगानें राजाश्रय मिळत नाहीं. अशा स्थितींत हिंदु विद्या पारमार्थिक मार्गांचीच उपशाखा बनली व सर्व तऱ्हेचें ज्ञान हें मोक्षसाधन मार्ग या नात्यानेंच जिवंत राहूं लागलें. या परिस्थितींत गुरूंचें महत्त्व तर फारच बळावलें. शास्त्रीय ज्ञान देणारा गुरुवर्ग मोक्ष साधन करून देण्याचा बाणा बाळगूं लागला. परंपरेनें जी बादरायण सूत्रें आलीं, त्यांवर भाष्यें होऊन निरनिराळे पारमार्थिक संप्रदाय त्यांच्याशीं संबद्ध होऊं लागले. जे संस्कृत ग्रंथ देशी भाषांत होऊं लागले त्यांतूनहि गुरूचें महत्त्व सांगणारे क्षेप येऊं लागले. उदाहरणार्थ, ब्रह्मोत्तरखंड घ्या. याचाच अनुवाद श्रीधरानें शिवलीलामृत म्हणून केला आहे. ब्रह्मोत्तरखंडांत गुरूचें प्राबल्य नाहीं पण शिवलीलामृतांत गुरुमुखाशिवाय गति नाहीं वगैरे वाक्यें उच्चारलीं गेलीं आहेत. मोक्षसाधनास विद्वत्तेची जरूर लागत नाहीं आणि व्यक्तीचें मोक्षसाधन हें ध्येय झालें व विद्वत्ता हें ध्येय राहिलें नाहीं. त्यामुळें लफंग्या लोकांस गुरुपद मिळविण्याची आकांक्षा उत्पन्न झाली. शिष्य विद्वान व सदाचारी असला तरी त्यानें एखादा गुरु हा केलाच पाहिजे, आणि तो गुरु दुराचारी असला तरी हरकत नाहीं.

असलींहि वाक्यें उद्गीर्ण झालेलीं दिसतात. लिंगायतांसारख्या व जैनांमारख्या अपसृष्ट संप्रदायांमध्यें तर गुरूंचें स्तोम फारच होतें. सांप्रदायिक कालामध्यें गुरूनें वाढलेलें महत्त्व समाजाच्या शैक्षणिक अधोगतीचें दर्शक आहे. सांप्रदायिक गुरूंपैकीं फारच थोड्यांस उच्च विचार किंवा ज्ञान यांच्या इतिहासांत स्थान देतां येईल.

गुरु व आचार्य या उपदेष्ट्यांशिवाय पुरोहित हाहि एक वर्ग अस्तित्वांत होता व याच्याकडे कुलगुरुत्व असे. रामायणकाळीं वसिष्ठ हा रामचंद्राचा कुलगुरु होता व धनुर्वेद शिकविणारा गुरु विश्वामित्र होता.

गुरु शब्दाचा वैदिक वाङ्मयांत सूत्रांपासून उल्लेख आढळतो. पारस्कर गृह्यसूत्रांत शिष्यानें गुरूच्या सन्निध उपाकर्म, उत्सर्जनादि कर्म करावीं. व गुरूच्या आज्ञेनें समावर्तन करावें वगैरे उल्लेख आहेत. बौधायन गृह्यसूत्रांतहि अशाच प्रकारचे उल्लेख येतात. आश्वलायन गृह्यसूत्रांत और्ध्वदेहिकप्रकरणीं गुरूचा उल्लेख आहे. पारस्कर गृह्यसूत्रांतील उल्लेखावरून गृह्यसूत्रकालीं गुरुगृहीं अध्ययन करणें पूर्ण रूढ असून बरेच शिष्य एका ठिकाणीं अध्ययन करीत असलेलीं गुरुकुलें बरींच होतीं असें दिसतें. अध्यापकास गुरु शब्दापूर्वी आचार्य शब्द असावा असें दिसतें. देशोपनिषदांपैकीं नारायणोपनिषद् यामध्यें शिष्यानें गुरूजवळ कसें वागावे व कोणते नियम पाळावे याचा उल्लेख आहे. गुरु कसा असावा याबद्दल मनु, याज्ञवल्क्य या स्मृतींत बरेंच विवेचन आढळतें. पूर्वी उपनयन संस्कार गुरूच करीत असावा. परंतु पुढें गुरूच्या अभावीं पित्यानें तो संस्कार करण्याची चाल रूढ झाली. अध्ययन समाप्तीनंतर गुरुदक्षिणा देण्याबद्दल सूत्रांत उल्लेख येतो. गुरुदक्षिणेच्या पौराणिक गोष्टी उत्तंक, कृष्ण बलराम वगैरेंच्या प्रसिद्धच आहेत. गुरूच्या शिष्यावरील अधिकारासंबंधानें विवेचन फारसें स्पष्टपणें करता येत नाहीं. शिष्याचें गुरूसंबंधीं कर्तव्य अमर्यादित दाखविण्याचा प्रयत्न दिसतो. पण त्याबरोबर शिष्यासंबंधीं गुरूचें कर्तव्यहि व्यापक दाखविलें आहे.प्राचीन शिक्षणविषयक माहितीसाठीं "शिक्षण" पहा.

गुरुकुल—आर्यसमाजपंथी लोकांची गुरुकुल ही एक शिक्षणसंस्था आहे. कनखलपासून ह्या संस्थेचें ठिकाण तीन मैलांवर आहे. बहुतेक रस्ता गंगानदीच्या पात्रांतूनच जातो. लाहोरच्या आंग्लोवैदिक दयानंदसरस्वती कॉलेजच्या चालकांत व दुसऱ्या कांहीं समाजपंथी लोकांत मतभेद होऊन ही संस्था अस्तित्वांत आली. ह्या संस्थेचे आद्यजनक लाला मुनशीराम किंवा हल्लींचे श्रद्धानंद हे होत. ह्यांनीं आपलं तीस पस्तीस हजार रुपयांची इस्टेट संस्थेप्रीत्यर्थ देऊन ह्या संस्थेचा पाया घातला. हल्लीं ही संस्था पंजाबच्या आर्यप्रतिनिधि सभेच्या ताब्यांत आहे. ह्या ठिकाणीं दरवर्षी आर्यसमाजपंथी लोकांचें संमेलन भरतें. गुरुकुलाच्या आंतील व्यवस्थेकरितां एक अंतरंग सभा म्हणून लहान कमिटी आहे, तीच गुरुकुलाच्या आचार्याची नेमणूक करते. हा आचार्य तेथील सर्व व्यवस्था पाहतो.

गुरुकुल विद्यालय ही शिक्षणसंस्था मुख्यतः वेद व संस्कृत भाषेच्या अध्ययनाकरितां आहे. तरी पण तेथें इंग्रजी वाङ्मय, अर्वाचीन शास्त्रें व तत्वज्ञानशास्त्रें ह्यांचें शिक्षण दिलें जातें. विद्यालयांतील शिक्षकांनां दयानंदसरस्वतींनीं स्थापन केलेल्या आर्यसमाजाचीं तत्वें मान्य असलीं पाहिजेत. ज्यांचा उपनयनविधि झाला आहे अशा सर्व ब्रह्मचारी विद्यार्थ्यांस विद्यालयांत घेतलें जातें. मात्र विद्यार्थ्यांचें वय सहा ते आठच्या दरम्यान असावें. अध्ययनास लागणारी सर्व सामुग्री गुरुकुलच पुरवितें. येथें जातीजातींत भेदभाव मानला जात नाहीं.

या विद्यालयाचा शिक्षणक्रम १६ वर्षांचा आहे त्याच्या तीन पायऱ्या आहेत. पहिला क्रम दहा वर्षांचा असून त्याच्या शेवटीं अधिकारी परीक्षा होते. या परीक्षेनंतर विद्यार्थ्याला महाविद्यालयांत दाखल होता येतें. तेथील अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. महाविद्यालयांतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला 'स्नातक' ही पदवी देण्यांत येते यापुढें आणखी दोन वर्षांचा अभ्यासक्रम आहे.यांत विद्यार्थ्याला स्वतःसंशोधन करून निबंध लिहावा लागतो. या कसोटीला जो उतरेल त्याला 'वाचस्पति' ही पदवी मिळते.

ह्या विद्यालयांत दानत व शरीरसामर्थ्य हीं वाढविण्याकडेहि चांगलें लक्ष पुरविलें जातें. या विद्यालयांत जुन्या नव्यांचा संगम घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. ही संस्था आर्यसमाजाकरितां उपाध्याय व उपदेशक तयार करते.

गुरुंग जात—ही जात विशेषतः बंगाल—आसामांत आहे. आसामांतील या जातीची लोकसंख्या सुमारें २० हजार आहे. नेपाळांतील उत्तम लढाऊ राष्ट्रजातींपैकीं ही जात असून हे लोक आसामांतील प्रत्येक जिल्ह्यांतून सांपडतात- जेंटिआ व खासी टेंकडयांतून ह्या लोकांची वस्ती जास्त असल्यामुळें तेथें एक गुरखा लोकांची तुकडी ठेविली आहे.

गुरुगोविंद.—शीखांचा दहावा गुरु. तेघबहादरनंतर त्याचा मुलगा गुरुगोविंद हा गुरुपदावर आरूढ झाला. हा धोरणी व चलाख असून याच्या वेळेपासून शीखांच्या पंथांत नवीन मन्वंतर सुरू झालें. लष्करी पद्धतीवर शीखांचें एक नवीन प्रजासत्ताक मंडळच त्यानें स्थापिलें असें म्हटलें तरी चालेल. गुरुगोविंद हा उत्कृष्ट उपदेशक व शूर योद्धा होता. आपल्या लोकांस शिकविण्याकरितां त्यानें नवीन प्रघात घातले. जातिभेद साफ नाहींसा करून सर्व लोकांस सारखें वागविण्याचे नियम केले, आपल्या अनुयायांस एक नवीन लष्करी पोषाख दिला व शिपाईगिरीची खूण म्हणून प्रत्येकानें आपल्याजवळ लोखंड बाळगावें, अंगावरील केंस न काढतां ते वाढूं द्यावेत असें त्यानें ठरविलें. हिंदूस खूप

ठेवण्याकरितां गोवधाची मनाई करून हिंदूंच्या देवतांस मान देणें व ब्राह्मणांची प्रतिष्ठा राखणें इत्यादि गोष्टी ठरवून दिल्या. आजतागाईत शीखाची शौर्याबद्दल जी ख्याति आहे, तिचा उत्पादक हा गुरुगोविंद होय. आदिग्रंथाचा 'दसम पादशाही' नांवाचा जो भाग आहे तो गुरुगोविंदसिंगाचा असून जहाल शीख या भागाला विशेष मानितात (आदि-ग्रंथ पहा). लढाईच्या प्रसंगीं 'वा: गुरुजीका खालसा,' 'वा: गुरुजीकी फत्ते,' अशा शब्दांचा उच्चार करण्याविषयीं गुरुगोविंदानें ताकीद दिली. 'खालसा' शब्दाचा अर्थ एको असा आहे. म्हणून आपण सर्व लोक एक असून गुरूशीं आपलें संगनमत आहे, असा वरील शब्दांचा अर्थ होतो. यावरूनच शीख फौजेस 'खालसा फौज' म्हणण्याचा प्रघात पडला. 'गुरमता' नांवाचें एक शीख सरदारांचें मंडळ गुरुगोविंदानें स्थापिलें. औरंगझेबाच्या लष्कराशीं लढतांना गुरुगोविंद अगदीं टेंकीस आला. अखेरीस मोंगल फौजेनें गुरुगोविंदाचीं सर्व ठाणीं घेतलीं आणि नानाप्रकारें छळ करून त्याच्या पक्षाची अगदीं वाताहत करून टाकिली. तो अगदीं तेजहीन व हतवीर्य होऊन रानोमाळ भटकत फिरूं लागला आणि शेवटीं दक्षिणेंत नांदेड येथें त्याच्या एका शत्रूनें त्याचा खून केला (१७०८). गुरुगोविंद हाच शिखांचा शेवटचा गुरु होय. [मु. रियासत; स्मिथ.]

गुरुत्वाकर्षण—कोणतेहि जड पदार्थ एकमेकांस एक-मेकांकडे ओढतात; या आकर्षणास गुरुत्वाकर्षण असें म्हण-तात. दोन पदार्थांमधील अंतराच्या वर्गाच्या व्युत्क्रम प्रमाणांत हें आकर्षण असतें आणि तसेंच हें आकर्षण त्या दोन पदार्थांमधील जडांशाच्या गुणाकाराच्या प्रमाणांत असतें हा नियम प्रथमतः न्यूटननें शोधून काढला आहे. तरी पदा-र्थांमध्यें आकर्षण घडत असावें अशा प्रकारचा तर्क न्यूट-नच्या पूर्वी कित्येकांनीं केला होता. जॉन केप्लरनें आपले तीन नियम प्रसिद्ध केले; हे नियम बसविले त्यावेळेस सूर्याक-डून कसलें तरी आकर्षण घडून येत असावें व त्यायोगानें ग्रह सूर्यासभोंवार प्रदक्षिणा करीत असावेत अशी त्याची समजूत होती. परंतु न्यूटनप्रमाणें पायाशुद्ध अशा रीतीनें या नियमाचें प्रतिपादन कोणींच केलें नाहीं. न्यूटनच्या सम-कालीन असलेले सी. हायगेंझ आणि आर. हूक यांनीं असें दाखवून दिलें कीं, केप्लरच्या तिसऱ्या नियमाचें वर्तन अंत-राच्या वर्गाच्या व्युत्क्रमप्रमाणास अनुसरून आहे; परंतु हा व्युत्क्रमप्रमाणाचा नियम सार्वत्रिक लागू होण्यास केप्लरच्या तिन्ही नियमांचें वर्तन व्युत्क्रमप्रमाणास अनुसरून झालें पाहिजे; परंतु केप्लरच्या साऱ्या नियमांस व्युत्क्रमाच्या नियमाची व्युत्पत्ति बसवितां न आल्यामुळें हा प्रयत्न त्यावेळीं तितकाच राहिला. वरील शास्त्रज्ञ-द्वयांनीं असेंहि दाखविण्याचा प्रयत्न केला कीं, ज्या नियमाच्या योगानें सूर्याचें ग्रहांवर आकर्षण घडतें त्याच नियमाच्या योगानें पृथ्वीचें चंद्रावर आकर्षण घडतें; परंतु या प्रयत्नास त्यांनां म्हणावें तितकें यश प्राप्त झालें नाहीं; या कामीं न्यूटननें प्रथमतः यश संपादन केलें.

या सृष्टींतील सर्व नियमांत गुरुत्वाकर्षणाचा नियम अगदीं अपवादरहित असा आहे. दोन पदार्थांतील आकर्षण त्याच्या जडांशांच्या गुणाकाराच्या प्रमाणांत आणि त्यांच्या अंतराच्या व्युत्क्रमप्रमाणांत असतें, असा जो गुरुत्वाकर्षणाचा नियम आहे त्याला अद्याप पावेतों एकहि अपवाद सांपडला नाहीं. दुसऱ्या सर्व प्रकारच्या आकर्षणांत परिस्थितीप्रमाणें फेर पडतो. उदाहरणार्थ, दोन पदार्थ विद्युत्संचारित झाले असतां त्यांचें आकर्षण घडतें; परंतु ज्या दोन पदार्थांत आकर्षण घडलें त्यांस सापेक्ष किंवा निरपेक्ष गति असल्यास त्यांच्यामधील आकर्षणांत फरक पडतो. जड द्रव्याची स्थिति बदलली किंवा दुसऱ्या कोण-त्याहि प्रकारच्या परिस्थितींत जड द्रव्यास ठेऊन दिलें तरी गुरुत्वाकर्षणाच्या नियमात रतीभरहि फरक पडत नाहीं. सूर्यमालेंतील ग्रहांपैकीं कित्येकांस अत्यंत वेगानें गति आहे. परंतु त्यांच्या या वेगामुळें गुरुत्वाकर्षणाच्या नियमांत यत्किंचित्‌हि फरक पडलेला आजपर्यंत दिसून आला नाहीं अशी आतांपर्यंत समजूत होती. परंतु सर्व निय-माप्रमाणें गुत्वाकर्षणाचा नियमहि सापेक्ष आहे असें आइ-न्स्टीन यानें सिद्ध केलें आहे व याचा प्रत्यय ग्रहांच्या गती-वरून विशेषतः सूर्यग्रहणप्रसंगीं घेतां येतो. आणखी एक असा प्रश्न उपस्थित झाला आहे कीं,गुरुत्वाकर्षण एका निमि-षमात्रांत सर्वत्र ताबा बसवितें किंवा प्रकाशाप्रमाणें त्याला जाण्यास वेळ लागतो;परंतु आतांपर्यंत ग्रहादिकांच्या विषयीं जें अवलोकन करण्यांत आलें आहे त्यावरून असें दिसून आलें आहे कीं, गुरुत्वाकर्षणाचा निमिषमात्रांत सर्वत्र प्रसार होतो. एकमेकांस आकर्षण करणाऱ्या दोन जड द्रव्यांच्या वस्तूंच्या दरम्यान तिसरी जडवस्तू किंवा पडदा आल्यास त्यांमधील आकर्षणास बाध येत नाहीं किंवा त्यांमधील आकर्षणाच्या नियमबद्ध प्रमाणांत फरक पडत नाहीं. उदाहरणार्थ पुण्यांत एक धातूचा गोळा आहे. आणि पाताळ लोकांतील (अमेरिकेंतील) पेरू देशांत दुसरा एक गोळा आहे तर दरम्यान पृथ्वी असतांनाहि त्या दोन गोळ्यांचें परस्परावर गुरुत्वाकर्षणाच्या नियमास अनुसरून आकर्षण घडतें व दरम्यान पृथ्वी नसतांना ज्या प्रकारचें आकर्षण घडलें असतें त्याच प्रकारचें आकर्षण दरम्यान पृथ्वी असतांनाहि घडतें.

यावरून हें उघड होतें कीं, आतांपर्यंत उपलब्ध अस-लेल्या सर्व सृष्टिनियमात गुरुत्वाकर्षणाचा नियम जास्त सर्व-व्यापी आणि मूलभूत असा आहे. अर्थात् आइन्स्टीन यानें यास अपवाद दाखविला आहे. दोन पदार्थांमधील आकर्षण अंतराच्या वर्गाच्या व्युत्क्रमप्रमाणांत असते हा जो गुरु-त्वाकर्षणाचा नियम आहे तो प्रत्यक्ष प्रयोगानें अद्याप पावेतों सिद्ध झाला नाहीं. खगोलशास्त्रवेत्यांच्या या दृष्टीनें झालेल्या अवलोकनावरून कांहींच अनुमान बांधता येत नाहीं

असल्याप्रकारचें अनुमान बांधतां येण्यास कित्येक शतकें किंवा सहस्र वर्षेंपर्यंत स्वस्थ ज्योतींचे वेध घेऊन अनुमान बांधलें पाहिजे. असें जरी आहे तरी बुधाची गति चमत्कारिक आहे व या चमत्कारिक गतीचा उलगडा होण्यास पुढील प्रमाणें गुरुत्वाकर्षणाच्या नियमांत किंचित् दुरुस्ति करावी लागते. त्याकरितां असें समजावें लागतें कीं, ग्रह जों जों सूर्याच्या सन्निध असतो तों तों ग्रह आणि सूर्य यांच्या दरम्यानचें आकर्षण वर्गाच्या व्युत्क्रमप्रमाणांत न होतां त्यापेक्षां कमी कमी प्रमाणांत होतें. बुधाच्या बाबतींत २ (द्विघात म्हणजे वर्ग) हें प्रमाण न रहातां २ ००००००१६१२ घात या प्रमाणात होतें.

परंतु हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, नुसत्या बुधाच्या उदाहरणावरून असें म्हणता येत नाहीं कीं, पदार्थांचें अंतर कमी झालें असतां आकर्षण कमी होतें; कारण याप्रमाणें दुसऱ्या ग्रहांच्या बाबतींत हेंच घडून आलें पाहिजे. पृथ्वी आणि चंद्र यांचे वेध घेऊन शास्त्रज्ञांनीं हें सिद्ध केलें आहे कीं, चंद्र आणि पृथ्वी यांच्या दरम्यानचें अंतर बुध आणि सूर्य यांच्यामधील अंतरापेक्षां पुष्कळच कमी झालें असतांहि त्यांच्या दरम्यानचें आकर्षण सूर्य आणि बुध यांच्या दरम्यानच्या आकर्षणापेक्षां कमी झालेलें दिसत नाहीं. यावरून शास्त्रज्ञांनीं असें ठरविलें आहे कीं बुधाच्या बाबतींत दुसऱ्या काहीं कारणानें आकर्षणाच्या विषयीं फरक पडलेला दिसतो. आणि दोहोंच्या अंतराच्या वर्गाचा नियम अबाधित असावा. पृथ्वीचें घनत्व आणि गुरुत्वाकर्षणाचे स्थिर (कान्स्टंट) परिमाण पुढें दिल्याप्रमाणें:—

गुरुत्वाकर्षणाच्या नियमांत असें सांगितलें आहे कीं, $ज_1$ आणि $ज_2$ हे दोन जडपदार्थ एकमेकांपासून ड अंतरावर असेल तर त्यांच्यामधील आकर्षण होतें तें:—

$$आकर्षण = \frac{ग \times ज_1 \times ज_2}{ड^2}$$

या प्रमाणात असतें; वरील सूत्रात्मक समीकरणात "$ज_1$" आणि "$ज_2$" हे त्या दोन वस्तूंचे जडांश आहेत. "ग" हें गुरुत्वाकर्षणाचें स्थिरपरिमाण आहे, व "ड" हें अंतर आहे. "$ज_1$" कडे "$ज_2$" ह्याची गति (वर्धमानता = ऑक्सिलरेशन)—$\frac{ज_1 \times ग}{ड^2}$ ह्या प्रमाणांत असते. निरनिराळ्या ग्रहांचें सूर्याकडे जें आकर्षण होतें किंवा निरनिराळ्या उपग्रहांचें ग्रहाकडे जें आकर्षण होतें त्या आकर्षणासंबंधानें ज्योतिर्विदांनीं जे वेध घेतले आहेत, त्यावरून वर्धमान परिमाणाचा नियम सिद्ध होतो; या योगानें गुरुत्वाकर्षणाचा नियमहि सिद्ध होतो. सूर्य आणि निरनिराळे ग्रह यांच्या दरम्यान जें आकर्षण होतें किंवा उपग्रह आणि ग्रह यांच्या दरम्यान जें आकर्षण होतें त्याच्या योगानें जें आकर्षणाचें प्रमाण येतें त्या योगानें पृथ्वीच्या जडांशाच्या किती पटीनें सूर्यमालेंतील ग्रहांचे आणि उपग्रहांचे जडांश आहेत हें काढतां येतें; परंतु पृथ्वीच्या ठिकाणीं किती जडांश आहे हे व्यावहारिक प्रमाणांत निघूं शकत नाहीं; त्याकरितां पुढील प्रकारचे प्रयोग करण्यांत आले आहेत; या प्रयोगांचे दोन प्रकार आहेत; पहिल्या प्रकारच्या प्रयोगांत क्षितिजाशीं लंबरेषेंत असणाऱ्या ओळंब्याच्या (प्लंबलाइन) रेषेशीं शेजारच्या पर्वताचा किंवा दुसऱ्या एखाद्या वजनदार पदार्थाचा किती परिणाम होतो हें पाहतात; नंतर त्या पर्वताचें किंवा त्या पदार्थाचें वजन काढून त्या योगानें पृथ्वीचें वजन काढतात. पृथ्वीचें वजन याप्रमाणें काढल्यावर गणितानें पृथ्वीच्या आकारमानावरून तिचें सरासरी घनत्व काढतां येतें. दुसऱ्या प्रकारांत दोन जडवस्तूंवर परस्पराचें किती आकर्षण होतें हें काढून त्या योगानें शास्त्रीय परिमाणांत पृथ्वीचें कोणत्या प्रमाणांत त्या पदार्थावर आकर्षण होते हें काढतात; त्या योगानें पृथ्वीचें वजन निघतें व या वजनाच्या योगानें पृथ्वीचें घनत्व काढतां येत.

पहिल्या प्रकारचा प्रयोग प्रथमतः बोगर यानें केला. हा प्रयोग प्रथमतः म्हणण्यासारखा यशस्वी झाला नाहीं. बोगर यानें हा प्रयोग इ स. १७४० सालीं केला. या शास्त्रज्ञाच्या मागून मास्केलीन (१७७४), फ्रान्सेस्को कार्लिनी (१८२१), सर. जी. बी. एअरी (१८५६), इ. इ. शास्त्रज्ञांनीं हा प्रयोग केला आहे. या तऱ्हेच्या प्रयोगाची सामान्य दिशा संक्षेपतः सांगून दुसऱ्या प्रकारच्या प्रयोगाकडे वळूं. या पूर्वपश्चिम असलेल्या एखाद्या पर्वताच्या रांगेच्या दाक्षिणोत्तर बाजूला एक एक लंबक टांगून ठेवतात. हे लंबक एकाच याम्योत्तर वर्तुलात असले पाहिजेत. कोणता तरी एक ठळक तारा घेऊन तो याम्योत्तर वृत्तांतून जात असतांना ओळंब्याच्या लंबरेषेशीं कोणता कोन करतो हें दोन्ही ठिकाणीं वेध घेऊन ठरवून त्यानें डोंगरानें किती आकर्षण घडवून आणलें हें काढतां येतें. नंतर त्या डोंगराची अतिशय काळजीपूर्वक पाहणी करून त्या डोंगराचें वजन काढतात व या वजनाच्या योगानें पृथ्वीचें वजन काय आहे हें काढतां येतें.

दुसरी पद्धत अशी कीं एक दांडी समतोल राहील अशा रीतीनें तिच्या मध्यबिंदूपासून टांगून ठेवतात. टांगण्याकरितां उत्तम स्थितिस्थापक तार घेतात. नंतर तिच्या दोन्ही टोंकांस असलेल्या दोन गोलकांच्या समीप दोन शिशाचे गोळे ठेवतात. या गोळ्यांच्या योगानें दांडीच्या टोंकांवरील गोलकांवर आकर्षण घडून दांडी किंचित हलते. याप्रमाणें हलण्याचा कोन अतिशय सूक्ष्म असतो. हा कोन सुलभ रीतीनें मापतां यावा म्हणून या दांडीच्या मध्यभागीं एक आरसा बसविला असतो. या आरशावर प्रकाशबिंदू पाडून त्यायोगानें जो कवडासा उत्पन्न होतो त्या कवडाशाचें अतिसूक्ष्म कोनाच्या योगानें सुद्धां जास्त चलन होतें.

याप्रमाणें कवडाशाच्या योगानें हा अति सूक्ष्म कोन मोजतात. नंतर ते शिशाचे दोन गोळे दांडीच्या टोंकांपासून जरा दूर अंतरावर ठेवतात. या स्थित्यंतरामुळें दांडीच्या टोंकाचे गोळे विरुद्ध दिशेनें आकर्षिले जाऊन कवडासा विरुद्ध दिशेनें हलतो. याप्रमाणें टोंकांच्या गोळ्यांवर शिशाच्या गोळ्यांचें होणारें आकर्षण मोजून काढतात. या आकर्षणाच्या योगानें पृथ्वीचें घनत्व काढतात.

तिसऱ्या पद्धतींत वरील दोन पद्धतीशिवाय आणखी एक पद्धत उपयोगांत आणली आहे.या पद्धतीला तुलापद्धति असें नांव आहे.हींत एक तराजू केलेली असते.या तराजूस जीं नेहमींचीं पारडीं असतात त्या पारड्यांच्या खालींच दुसरीं दोन पारडीं जोडलेलीं असतात. वरचीं पारडीं आणि तराजूची दांडी यांच्या दरम्यान अगदीं थोडें अंतर ठेवलेलें असतें व वरचीं पारडीं आणि खालचीं पारडीं यांच्या दरम्यान शक्य तितकें जास्त अंतर ठेवलेलें असतें. अगदीं सारख्या आकाराचे भरीव शिशाचे गोळे वरील पारड्यांत ठेवून तराजू समतोल करतात. नंतर एका पारड्यांतील वजन त्याच्या खालच्या पारड्यांत ठेवतात व दुसऱ्या पारड्यांतील वजन हलवीत नाहीं. असें केलें असतां पृथ्वी आणि हे दोन गोळे यांच्या दरम्यानचें पूर्वीचें समान अंतर नाहींसें होऊन त्याच्या ऐवजीं तें अंतर कमीजास्त होतें.त्यामुळें पृथ्वीचें त्या गोळ्यांवर कमजास्त प्रमाणांत आकर्षण घडून एक पारडें जड होतें. हें किती जड होतें तें काढतात. दोन पारड्यांतील अंतर मोजून त्या योगानें गुरुत्वाकर्षणाचें स्थिरपरिमाण काढतां येतें. या प्रकारचे प्रयोग प्रथमतः व्हान जेला यानें केले. परंतु जेलच्या प्रयोगांनीं पृथ्वीचें घनत्व काढतां आलें नाहीं. जेलीनंतर रिचार्झ, क्रिगार–मेंझेल, पायंटिंग इ. शास्त्रज्ञांनीं तुलापद्धतीनें प्रयोग करून पाहिले आहेत. या पद्धतीनें पृथ्वीचें घनत्व ५.४९३ इतकें आलें आहे. सारांशः वरील तिन्ही पद्धतीनें पृथ्वीचें जें घनत्व येतें त्याच्या दरम्यान थोडा थोडा फरक येतो. असा फरक कोणकोणत्या कारणांनीं येतो याचें शास्त्रज्ञांनीं सांगोपांग विवेचन केलें आहे. खालीं दिलेले आंकडे सध्याच्या शास्त्रीय मंडळांत प्रचारांत आहेत. ते असेः— पृथ्वीचें सरासरीचें घनत्व—५.५२७

$$\text{गुरुत्वाकर्षणाचें स्थिरपरिमाण} = \frac{६.६५८}{१०^{८}}$$

गुरुदासपूर, जिल्हा.—पंजाबमधील एक जिल्हा. क्षेत्रफळ १८२६ चौ. मै. याच्या उत्तरेला काश्मीर संस्थान आहे. रावीच्या पश्चिमेकडे जम्मू जवळचा कांहीं भाग सोडून सर्व प्रदेश ओसाड व रुक्ष आहे. रावी नदी गुरुदासपूर व जाफर संस्थान यांची २५ मैलांची सरहद्दच आहे. लहान मोठे बरेच पाण्याचे प्रवाह डोंगराळ मुलुखांतून वहात गेलेले आढळून येतात. माधवपूरपासून रावीमधून बारीदुआब कालवा काढला आहे. तो डोंगरी मुलुखांतून मैदानांत आल्यावर गुरुदासपूर शहरापाशीं त्याचे चार मोठाले विभाग होतात.

हवामान साधारणतः चांगलें असतें. पर्वतसान्निध्यानें उष्मा फार होत नाहीं तरी पटाणकोट तालुक्यांत मलेरिआ वगैरे आजार नेहमीं असतात.

रावीच्या कांठावर फार पुरातन कोरीव लेणीं आहेत तीं पांडवांचीं असावीं असें सांगतात. पटाणकोट येथें हिंदूंचें राज्य होतें. १५५५ मध्यें कलानौर येथेंच बहरामखानानें अकबराला गादीवर बसविलें. अकबरानें सूर वंशापासून हा भाग घेतला व जहांगीरचा बराच काळ याच भागांत जात असे. शहाजहाननें शहानहर (राजकालवा) काढला. डेरा नानक या शहराचें नांव नानकावरून पडलें आहे. बंदा यानें आपल्या विक्रमाला सुरवात याच भागांत केली व त्याच्या आणि मोंगलांच्या बऱ्याच झटापटी झाल्या.

यानंतर हा भाग कांहीं दिवस अदीनाबेग याच्या हातीं होता. त्यानें दिनानगर वसविलें. त्यानें अहमदशहा व दिल्लीचा बादशहा यांनां बरेच चकवलें. शेवटीं मराठ्यांच्या आश्रयानें व सहाय्यानें हा लाहोर भागाचा गव्हर्नर झाला. त्याच्यानंतर शीखांच्या विस्ताराला विशेष जोर चढला. शीख संस्थानांत आपसांत बरेच दिवस झगडे चालले होते. कधीं हा पक्ष तर कधीं तो पक्ष वरचढ होई. शेवटीं सर्व भाग रणजितसिंगानें एकत्र केले. १८११ मध्यें कनया संस्थान जप्त झालें व १८४६ मध्यें बराच भाग इंग्रजांस देण्यात आला. १८४९ मध्यें बाकीचा भाग जप्त झाला व सर्वत्र इंग्रजशाही सुरू झाली. या भागाच्या घटनेंत बरेच वेळां फरक झाले. १८५७ मध्यें येथें कांहींहि गडबड झाली नाहीं. १८६२ मध्यें जिल्ह्याची हल्लींची रचना झाली. कांहीं अर्वाचीन इतिहासकार म्हणतात कीं अलेक्झांडरचें संगल व कटईवा किल्ला हीं याच जिल्ह्यांत असावींत. पण हीं स्थानें निश्चित झालीं नाहींत. इतर प्राचीन वस्तू बऱ्याच आहेत.

या जिल्ह्यांत १० शहरें व २२३४ खेडीं आहेत. वस्ती (१९२१) ८५२१९२ गुरुदासपूर, शकरगड, पठाणकोट व बटाला हे चार तालुके आहेत.

जमीनमहसुलाच्या पद्धती भैयाचारा व पट्टिदारी या आहेत. गहूं, हरभरा, तांदूळ, मका हीं मुख्य पिकें आहेत. कालव्यांच्या वाढीबरोबर शेतीचीहि वाढ होत आहे. पण शेतीच्या पद्धतींत बियाण्याचा वगैरे फरक मुळींच होत नाहीं. गुरेंढोरें साधारण प्रतीचींच आहेत. शकरगड तालुक्यांतले घोडे बरेच चांगले आहेत. एकंदर १३३३ चौ. मै. जमीन वहीत आहे. पैकीं ३४४ चौ. मै. पाण्याखालीं आहे.

कंकर (एक प्रकारची चुनखडी) व सोरा हेच काय ते खनिज पदार्थ आहेत. पठाणकोटपर्यंत नॉर्थ वेस्टर्न रेल्वेची शाखा जाते. रावी व बियासवरून नेहमीं १५।२० ठिकाणीं होड्या चालतात; पण त्यायोगें व्यापार फारसा होत नाहीं. धारिवाल येथें न्यूइनर्टन नांवाची प्रसिद्ध लोंकरीची गिरणी आहे. हातमागावरहि लोंकरीचा बराच माल होतो.

शाली व इतर ब्लँकेटें वगैरे होतात पण यांत्रिक कामापुढें हा धंदा खालावत चालला आहे. सुती, रेशमी व लोकरीचें निर्भेळ व मिश्र अशा जातींचें कापड होतें. साबण, सतरंज्या व गालीचे, चामड्याचें सामान, जीन वगैरे, साखर, सुत.रकाम व दस्टोसी येथील दारू वगैरे माल तयार होतो. धान्य, गळिताची धान्यें, कापूस, लोंकरी कपडा, दारू वगैरे माल निर्गत होतो. धान्य, तूप, कापूस, लोखंडी माल व कपडा या मालाची आयात होते. बहुतेक व्यापार रेल्वेनेंच होतो. सियालकोट, जम्मू यांशीं सडकेनें व्यापार होतो. बटाला हें व्यापाराचें मुख्य ठिकाण आहे. हा जिल्हा शिक्षणाच्या बाबतींत बराच मागसलेला आहे.

त ह सी ल.—पंजाब. गुरुदासपूर जिल्ह्यांतला तालुका. क्षेत्रफळ ४९६ चौ. मै. लो. सं. (१९११) २२४५१५. यांत शहरें तीन व खेडीं ६६१ आहेत. सारा व कर मिळून उत्पन्न ५१७ हजारांचें आहे. रावी आणि बियास या नद्यांच्या बाजूची जमीन उत्तम आहे. मधलीहि जमीन सुपीक असून तिच्यावर थोडेंबहुत जंगलहि आहे. धारिवालच्या प्रसिद्ध लोंकरीच्या गिरण्या याच तालुक्यांत आहेत.

श ह र.—याच नांवांच्या जिल्हा व तालुक्याचें मुख्य ठिकाण. उत्तर अक्षांश ३२° ३' व पूर्व रेखांश ७५°२५'. लो. सं. (१९११) ६२४८. येथील किल्ला शीख लोकांचा नायक बंदा यानें १७१२ च्या सुमारास बांधला. तेथें हल्लीं सारस्वत ब्राह्मणांचा मठ आहे. जिल्ह्यांत हें मध्यवर्ती शहर आहे. पण व्यापारधंदा फार थोडा चालतो. बहुतेक व्यापारी धडामोडींचें बटाला हेंच मुख्य ठिकाण आहे. गुरुदासपूर येथें १८६७ पासून म्युनिसिपालिटी आहे.

गुरुहा (गरुहा).—वायव्य विभागांतील एक ग्रंथोल्लिखित (बृहत्संहिता १४,२३) नदी. गुलहा, गुलुहा व गुरुहा असे निरनिराळे याचे पाठ आहेत. आपल्या भाषांतरांत कर्न म्हणतोः—" गुरुहा (गरहादेखील) ग्रीकांनीं उल्लेखिलेले गॅरोइग लोक होत; ते नदीच्या जिल्ह्यास गोयैंआ म्हणत असत. लॅसेन ग्रीक नांवाचें गौरीशीं साम्य दाखवितो. गरुहा व गुरुहा या दोन्हीं नांवांशीं दोन्हीं रूपें बरोबर जुळतात.

गुर्दा—मध्यप्रांत. रायगड संस्थानांतील जमीनदारीचें गांव. ही जमीनदारी १२गांवांची असून गुर्दा गांव जमीनदाराचें रहाण्याचें ठिकाण असल्यामुळें जमीनदारीस हें नांव पडलें आहे. एकंदर क्षेत्रफळ ७३० एकर. लो. सं. २४०५. जमीनदार कंवार जातीचा असून त्यास ४६५४ रु. टाकोळी द्यावी लागते.

गुर्रमकोंडा—मद्रास. कडाप्पा जिल्ह्यांतला एक जुना किल्ला. हा गोंवळकोंड्याच्या सुलतानांनीं बांधला असावा. हा त्यावेळीं महत्वाचा व मजबूत होता. ५०० फूट उंचीच्या टेकडीवर हा बांधला आहे. याच्या तीन बाजू सरळ उंच आहेत व चवथ्या बाजूला तट व बुरूज वगैरे बंदोबस्त आहे. खालीं सपाटीवर जुन्या राजाचा वाडा आहे. त्याचा अधिकाऱ्याकरतां डाकबंगला म्हणून उपयोग होतो.

कर्नाटक बालाघाटचें हा किल्ला प्रथम मुख्य ठिकाण होता. १७६६ मध्यें मीरसाहेब याला मराठ्यांकडून जहागीर म्हणून हा मिळाला. मीर हैदर अलीचा मेव्हणा होता. १७९१ मध्यें किल्ला निजामानें घेतला व १८००मध्यें कडाप्पा जिल्ह्याबरोबर तो इंग्रजांच्या हवालीं केला.

याला गुर्रमकोंडा (घोड्याची टेंकडी) हें नांव कसें पडलें तें समजत नाहीं. एक दंतकथा (कदाचित नांवावरून रचलेली) सांगते कीं या किल्ल्यांत पूर्वी एक घोडा असे व तो किल्ल्यांत आहे तोपर्यंत किल्ला अभेद्य अशी समजूत होती. एका धाडसी व शूर सरदारानें तो किल्ला घेणें सोपें जावें म्हणून मागच्या सरळ कड्यावरून वर प्रवेश करून घेतला व त्याच मार्गानें घोडा नेला. अर्थात् पुढें तो किल्ला पडला. किल्ल्याजवळ मुसुलमानी थडगीं व इमारती आहेत. किल्लाहि सर्वथा मुसुलमानी बांधणीचाच आहे.

गुलछबू—यास निशिगंध असेंहि नांव आहे. हें एक सुवासिक फुलाचें झाड आहे. याचे कंद असतात. त्यांपासून याची उत्पत्ति होते. या झाडास कांद्यासारख्या पाती येतात. त्यांतून एक दांडा २–२॥ हात लांबीचा निघतो व त्यास जो तुरा येतो त्या तुऱ्याला फुलें येतात. हीं संध्याकाळीं फुलतात. हीं फुलें लांबट, सफेत रंगांचीं, फार मधुर व देंठाजवळ थोडीं वाकडीं असतात.

गुलतुरा—हें एक फुलझाड आहे. त्यास संस्कृतमध्यें शंखोदरी, गुजराथींत गुलतुरी व मराठींत गुलतुरा म्हणतात. याचीं पानें रानतरवडाच्या पानासारखीं असून यास पिंवळ्या किंवा तांबड्या रंगाचीं झुपकेदार फुलें येतात. त्यास शंकराचीं फुलें म्हणतात. याचें लांकूड फार बळकट असतें व त्याचे जात्याकरितां खुंटे तयार करतात. हें झाड बुंधापासून तोडलें तरी पुन्हां पूर्ववत् जोरानें फुटतें. या झाडाचा विस्तार सर्व बाजूंनीं सारखा पसरतो व खांद्या जरा खालीं वांकतात. यामुळें हें झाड फार शोभिवंत दिसतें व छाया गर्द होऊन जाते. या झाडास बोटाइतक्या जाड चपट्या व चार पांच अंगुलें लांबीच्या शेंगा येतात. त्यांत ७।८ दाणे असतात. हे दाणे बरेच रुचकर असल्यामुळें मुलें आवडीनें खातात. या झाडास कांटे असतात. व झाडें बियांपासून व कलमें लावून तयार होतात. याच्या फुलांस वास नसतो. फुलांचा हंगाम आषाढ, श्रावण व भाद्रपद या महिन्यांत असतो. एरवींहि बारमहा यास फुलें येतात. या झाडास शंकेश्वर, संकासुर, रासतुरा, कुंकुमकेशर, असेंहि म्हणतात.

गुलबाशी—हें एक लहान झाड आहे. त्याच्या मुळाच्या वरच्या बाजूस एक कांदा होतो. त्यापासून किंवा बियापासून झाडाची उत्पत्ती होते. या झाडास संस्कृतमध्यें नक्ता, मराठींत व पर्शियनमध्यें गुलबाशी हीं नांवें आहेत. हीस

" सायंकाळीं " असेंहि म्हणतात. या झाडाचीं पानें लांबट व मृदु असतात. गुलबाशींत पांढरी, गुलाबी, पिंवळी, तांबडी, केशरी वगैरे अनेक रंगांचीं फुलें येणाऱ्या जाती आहेत.

गुलबुर्गा. वि भा ग—हैद्राबादसंस्थानांतील एक विभाग, यालाच दक्षिणविभाग असें म्हणतात. सुभेदार गुलबर्गा येथें रहातो. क्षेत्रफळ २२११० चौ. मैल लोकसंख्या (१९११) ३६७३१७१. शेंकडा ८८ हिंदु, ११ मुसुलमान व बाकी इतरधर्मीय लोक आहेत. ह्यांत गुलबर्गा, उस्मानाबाद, रायचूर व बेदर हे जिल्हे आहेत. या विभागांत ३२शहरें व ५५९२खेडीं आहेत. गुलबुर्गा, रायचूर हीं मोठीं शहरें आहेत. गुलबर्गा, रायचूर, लातूर, तुळजापूर वगैरे व्यापाराचीं ठिकाणें आहेत. गुलबुर्गा, रायचूर, कल्याणी, उदगीर, अनागोंदी हीं इतिहासप्रसिद्ध शहरें आहेत.

जि ल्हा—हैद्राबाद गुलबुर्गा विभागांतील जिल्हा. क्षे. फ. ६७१९ चौ. मैल.मुसुलमानी अमलापूर्वी हा जिल्हा वरंगळच्या काकतीयांच्या अंमलाखालीं होता. १४ व्या शतकांत महंमद तघ्लकाच्या ताब्यांत गेला. पुढें बहामनी राज्याचा अंमल कांहीं दिवस राहून ह्याचा समावेश विजापूरबादशाहींत झाला. औरंगजेबाच्या स्वारीनंतर कांहीं दिवस येथें मोंगलाची सत्ता होती. पुढें असफजहानें त्याचा समावेश हैद्राबाद संस्थानांत केला.गुलबुर्ग्याच्या किल्ला राजा गुलचंद ह्यानें बांधला व मुसुमानानीं त्याची बरीच सुधारणा केली. हा किल्ला लष्करीदृष्ट्या महत्वाचा होता. औरंगजेबानें बांधविलेल्या कांहीं मशीदी येथें आहेत. चितापुर येथें पोर्तुगीजाचें चर्च आहे.

शहरें व खेडीं मिळून गांवसंख्या १५९५ आहे. लोकसंख्या ११५०९८३. शेंकडा८१ हिंदु, १५ मुसुलमान, शेंकडा ५३ कानडी भाषा बोलतात.२५ तेलगु, १४ उर्दु व ६ मराठी भाषा बोलतात. १९०५ मध्यें इतर जिल्ह्यांशीं मुलुखांची अदलाबदल झालेली आहे. शेंकडा ५८ लोक शेतीवर रहातात. कर्नाटकमध्यें कापसालायक काळी जमीन विपुल आहे. तेलंगणांमध्यें रेताड जमीन बरीच आहे व काळी थोडी आहे. कर्नाटकांत पांढरी ज्वारी, गहु, हरबरा, कापूस आणि जवस, हीं पिकतात. तेलंगणात पिंवळी ज्वारी, बाजरी, तांदुळ, जवस, एरंड आणि ताग ह्यांचें उत्पन्न होतें. तेलंगणांत भातलागवडीकरितां तलावाच्या पाण्याचा उपयोग करितात.

येथें जमाबंदीची रयतवारी पद्धत आहे. २४२८ चौ. मैल.पैकीं (१९०१सालीं)१५५५ लागवडीखालीं होती. १३८ मैल लागवडीलायक असून पडीत होती.१२६मैल जंगलाखालीं आणि २०९ लागवडीलायक नसल्यामुळें पडीत होती. ज्वारी हें मुख्य पीक असून शेंकडा ६४ इतकी जमीन या पिकाखाली होती. बाजरी, गळिताचीं धान्यें, कापूस, तांदुळ आणि गहूं हीं दुसरीं महत्वाचीं पिकें होत. येथील जनावरें साधारणतः बळकट आहेत. अंदोला तालुक्यांतील तट्टें चांगल्या प्रतीचीं आहेत.

चिंचोली तालुक्यांत ५१ चौ. मैल संरक्षित जंगल आहे. त्यांत साग व इतर इमारती लांकूड आहे. एकंदर जंगल (संरक्षित व इतर मिळून) १२६ मैल आहे. शहाबाद, चितापूर वगैरे ठिकाणीं फरशीचे शहाबादी दगड सांपडतात. सुती व रेशमी साड्या आणि जरीचें कपडे व इतर कपडा हातमागावर तयार होतो. अंदोला व चिंचोली तालुक्यांत धनगरलोक टिकाऊ व निगळत्या घोंगड्या तयार करतात. गुलबुर्गा येथें कापड तयार होतें.

निर्गत माल.–ज्वारी,बाजरी इ. धान्य व कडधान्य,कातडी, कापूस गळीताचीं धान्यें व तरवडाची साल. आयात माल.– मीठ,मासे,अफू,सोनें,रुपें, साखर,सूत, धातू (लोखंड) वगैरे माल. व्यापाराचें गुलबर्गा हे केंद्र आहे लिंगाइत वाणी,कोमटी, मोमीन, मारवाडी आणि भाटिया यांच्या हातात व्यापार आहे. या जिल्ह्यांतून जी. आय. पी. रेल्वे ५० मैल व निजाम रेल्वे ११५ मैल गेली आहे. एकंदर रस्त्याची लांबी ८९ मैल आहे. मुलखाच्या व्यवस्थेकरितां ह्या जिल्ह्याचे तीन भाग केले आहेत; व त्या प्रत्येकात दोन तीन तालुके आहेत. प्रत्येक तालुक्यावर तहशीलदार आहे नाझिम इ-दिवाणी हा मदत न्यायाधीश (जॉइंट मॅजिस्ट्रेट) आहे. गुलबर्गा हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. या जिल्ह्यात साधारणतः मोटाले गुन्हे होत नाहींत. परंतु दुष्काळात घरफोडी व गुरांच्या चोऱ्या होतात.साऱ्याचें उत्पन्न (इ.स.१९०८)१७लाख आहे.गुलबर्गा येथें डिस्ट्रिक्टबोर्ड व म्युनिसिपालिटी आहे. इतर तालुक्यांत तालुकबोर्डें आहेत. पहिला तालुकदार हा पोलिसचा मुख्य अंमलदार आहे.

गुलबर्गा येथील तुरुंगांत सतरंज्या, टॉवेल व इतर कपडा आणि तंबू वगैरे सामान तयार होतें. शिक्षणाच्या बाबतींत हा जिल्हा अत्यंत मागासलेला आहे. शेंकडा फक्त २ लोकांना (३.८ पु. ४.११ स्त्रिया) लिहितां वाचतां येतें.

ता लु का.—हैद्राबाद संस्थान गुलबर्गा जिल्ह्यांतील तालुका क्षे. फ.(१९१०) ७७३ चौ. मैल. आणि लो. सं. १९२०३४. गुलबर्गा हें तालुक्यांचें मुख्य ठिकाण आहे. तालुक्यांत २४९ गांवें असून ३७ जहागीर आहेत. याचें साऱ्याचें उत्पन्न २.८ लाख. १९०५ मध्यें महागांव तालुका यांतच सामील करण्यांत आला. या भागांत कापसाची उत्कृष्ट काळी जमीन आहे.

श ह र.—ही ब्राह्मणीराज्याची राजधानी होती. उ. अ. १७°२१' व पू. रे. ७६° ५१'. राजधानी होण्यापूर्वी या गांवाचें नांव कुलबुर्गा असें होतें. तें पुढें हसनगंगु या शहानें अहसनाबाद किंवा हसनाबाद असें ठेविलें; परंतु कुलबुर्गा हेंच प्रसिद्ध राहिलें. हल्लीं याला गुलबुर्गा–गुलबर्गा असेंहि म्हणतात. फारशी लिपींत 'क' आणि 'ग' यांचा नेहमीं घोटाळा होतो. निजामाच्या राज्यांत हल्लीं हें गांव असून तिकडील सरकारी कागदपत्रांत गुलबुर्गा असेंच लिहितात. कलबुर्गा, कुलबर्गा आणि कुलबुर्गा असें

नांवाचे प्रकार आढळतात. मराठे लोक कलबुर्गे असें म्हणत. फिरोझ बहामनीनें येथें पुष्कळ मोटमोठ्या सुंदर इमारती बांधल्या. त्यांत एक प्रख्यात मशीद आहे. ही सान्या हिंदुस्थानांतील मोठी मशीद असून ती स्पेनमधील कार्डोव्हाच्या मशीदीच्या नमुन्याप्रमाणें आहे. फिरोझच्या मरणानंतर (१४२२) कलबुर्गा येथून राजधानी हालली व बेदरास गेली. त्यामुळें तें गांव अनेक शतकें मागें पडलें. हल्लीं मात्र ती एक व्यापाराची मोठी उतारपेठ झाल्यामुळें बरेंच भरभराटलेलें आहे.

येथें १७५७ मार्चच्या सुमारास नबाब सलाबतजंगाचा मुक्काम होता. उदगीरच्या लढाईनंतर १७६० च्या मार्चे एप्रीलांत निजाम आपल्या दोन्ही भांवांसह कलबुर्ग्याकडे होता व त्यावर दाब म्हणून दादासाहेब गंगाकाठीं होते (रा. खं. १. ११३, २७०). स. १७९५ त कलबुर्ग्याच्या किल्लेदारानें किल्ला लढविण्याच्या तयारीनें तयार केला होता. खंदकांत पाणी वगैरे सोडून ठेविलें होतें. (खं. ५. ११३). हें शहर बहामनी राज्याची राजधानी असून तें विजयनगरच्या उत्तरेस व वरंगूळच्या पश्चिमेस ७५ कोसावर आहे. याचें नांव हसन गंगूनें " हसनाबाद " असें ठेविलें होतें. येथें सरकारी कचेऱ्या, शाळा, तुरुंग वगैरे असून हें व्यापाराचें एक मुख्य ठिकाण आहे. २ मैलांवर रेल्वे स्टेशन आहे. जुन्या इमारती, मसजिदी व किल्ले शहरच्या बाजूनें आहेत. बहुतेक सर्व भाग पडका आहे. बालाहिसार किल्ला व अपुरी राहिलेली मसजिद ही पहाण्याजोगी आहेत. येथें १९२४ सालीं मुसुलमानांनीं मूर्तींची मोडतोड केली व बराच अत्याचार केला. येथें दोन कापसाच्या कापडाच्या गिरण्या आहेत. पाण्याची कमताई आहे. येथें महाराष्ट्रीय हिंदूंनीं एक हायस्कूल चालविलें आहे.

गुलाब—या झाडास लॅटिनमध्यें रोझा सेंटिफोलिआ इंग्रजींत रोझ, फारसी भाषेंत गुलाब हीं नांवें आहेत.

हें सरळ वाढणारें अथवा वेलीप्रमाणें वर चढणारें झुडुप असून याच्या वेगळाल्या तीस जाती आहेत. शिवाय लागवडींत असलेल्या अशा पुष्कळ उपजाती व तऱ्हा आहेत. एतद्देशीय भाषेंत सर्वांनां गुलाब म्हणतात. हिंदुस्थानांत रानटी गुलाब व लाविलेला गुलाब अशा दोन जाती आहेत. गुजराथमध्यें गुलाबाच्या ७८ जाती होत्या असें कांहीं ग्रंथकारांचें म्हणणें आहे.

बाबरनें गुलाबाची लागवड करून त्यांत सुधारणा करण्याची संधी केव्हांहि दवडली नाहीं. जहांगीर बादशहाच्या वेळेस हिंदुस्थानांत सर्व तऱ्हेचे गुलाब असून त्यांतल्या त्यांत कस्तुरी व दमास्क गुलाब हे प्रसिद्ध होते. शतपर्ण हा एक कोबीच्या आकाराचें फूल येणारा गुलाब आहे. तो मूळ काकेशस व असीरीयांतील होय. परंतु बऱ्याच प्राचीन कालापासून हा हिंदुस्थानांत लावतात. या गुलाबापासून इराणमध्यें अत्तर व गुलाबपाणी तयार करतात. परंतु हिंदुस्थानांत दमास्क गुलाबाचाच या कामीं जास्त उपयोग होतो.

दमास्क—रोझा दमास्क या जातीस दमास्क बसरा अथवा पर्शियन (इराणी), गुलाब, गुलाह, सुदबुर्ग इरोजायु, इत्यादि नांवें आहेत. ह्या जातीचें फूल हिंदुस्थानांतील बहुतेक बागेंत दृष्टीस पडतें. यापासून गुलाबी अत्तर काढतात. गुलाबाच्या अत्तराचा शोध नूरजहाननें १६१२ सालीं लाविला असें म्हणतात. गेल्या शतकाच्या आरंभापासून अत्तराच्या व्यापाराला सुरुवात इग्लंडांत झाली. बल्गेरिया, जर्मनी वगैरे युरोपियन देशांतून इंग्लंडला अत्तराचा पुरवठा होतो. हिंदुस्थानांतील माल येथेंच खपतो व त्याची निर्गत होत नाहीं. अत्तराचे मुख्य कारखाने गंगातीरावरील गाझीपूरला सुमारें दोन शतकांपासून आहेत

गुलाबी अत्तर.—गुलाबाचीं फुलें व पाणी एकत्र ठेवून ऊर्ध्वपातन यंत्रानें अनेक वेळां ऊर्ध्वपातन करून काढतात. अत्तराचा मुख्य उपयोग सुगंधी सामान, तपकीर व साबू इत्यादि तयार करण्याकडे होतो. हिंदुस्थानांत अत्तराचा उपयोग लग्नाच्या व इतर समारंभाच्या वेळीं फार करतात. उत्तम अत्तराला दर तोळयास रु.१० पडत असून हलक्या तऱ्हेस रु. २ पडतात. गुलाबाचें उत्तम अत्तर इस्तंबूल किंवा कान्स्टॅंटिनोपल येथें तयार होतें. त्याची किंमत भारंभार सोन्याइतकी कधीं कधीं असते.

गुलकंद करण्याची कृति—उंची गुलाबाचीं फुलें घेऊन त्यांच्या पाकळ्या काढाव्या व दुप्पट खडीसाखर घेऊन बरणींत किंवा लाखलोटया मडक्यांत पाकळ्याचे व साखरेचे थरावर थर घालावे व त्याचें तोंड बांधून भांडें ८ दिवस उन्हांत ठेवावें. म्हणजे गुलकंद तयार होतो. ही बरणी किंवा मडकें रोज हालवीत जावें म्हणजे खडीसाखर सारखी मिसळून जाईल.

गुलाबी अत्तर काढण्याची जुनी पद्धत—पुष्कळ फुलें एका भांड्यांत घालून उकळावीं. मग त्यास कढ आला म्हणजे तें भांडें खालीं उतरून ठेवावें व थंड झाल्यावर अत्तराचा तवंग पाण्यावर येईल तो काढून कुपींत भरून ठेवावा. एक मण फुलांपासून या कृतीनें एक तोळाभरहि अत्तर निघत नाहीं, यामुळें हें अत्तर फार महाग पडतें. तसेंच अलीकडील रासायनिक शोधानें निघालेल्या कृत्रिम अत्तराच्या व्यापारी प्रसारामुळें अत्तरें फुलांपासून काढण्याची जुनी कृति लुप्तप्राय होत चालली आहे.

गुलामकादर—हा नजीबउद्दौल्याचा पुत्र झाबिताखान याचा मुलगा. शिंद्यांच्या व यांच्यामधील हाडवैर वंशपरंपरेनें चालत आलेलें होतें. जोंपर्यंत महादजी शिंद्याची सरशी होत होती तोंपर्यंत हा मुकाटपानें बसला, पण सन १७८७ सालीं जयपूर प्रकरणांत महादजीचा मोड झालेला पाहतांच यानें प्रथम दिल्लीला येऊन तेथील मराठ्यांच्या शिबंदीस हांकून लाविलें, व तिच्या जागीं आपले

लोक ठेविले. मग त्यानें अलीगडास येऊन किल्ल्यास वेढा देऊन तो हस्तगत केला. नंतर तो आग्र्याला इस्मायल बेगच्या मदतीस गेला (१७८८). ता. २४ एप्रिल रोजीं जाटांच्या व शिंद्यांच्या सैन्याचा इस्मायल बेग व गुलाम कादर यांनीं भरतपूरजवळ पराभव केल्यावर शिंद्यांचा सरदार राणेखान यानें शांख व जाट यांनां कादरच्या जहागीरी मुलखांत धुमाकूळ घालण्यास पाठविलें. तेव्हां त्यांच्या बंदोबस्तासाठीं गुलाम कादर इस्मायलला सोडून निघून गेला. आग्र्याच्या लढाईंत शिंद्यांनीं इस्मायलबेगचा पराभव केल्यानें तो दिल्लीस गेला; त्यावेळीं गुलाम कादरहि तेथें त्याच्या मागोमाग गेला; पण या दोघांनांहि बादशहानें किल्ल्यांत येऊं दिलें नाहीं. तेव्हां गुलाम कादरानें किल्ल्यांतील एका नोकरास लांच देऊन आपला आंत प्रवेश करून घेतला. येथें पुढें दोन महिनेपर्यंत गुलाम कादरानें जो अत्याचार केला, त्यासारखें दुसरें उदाहरण इतिहासांत कोठेंहि आढळून येणार नाहीं. त्यानें शहाअलम बादशहाजवळून होता नव्हता तेवढा सर्व पैसा लुबाडून घेतला, त्याची नाना प्रकारें विटंबना केली, त्याला पदच्युत केलें, व शेवटीं त्याचे डोळेहि काढले (१० आगष्ट १७८८). तसेंच बादशहाच्या बेगमा, मुली, मुलें व त्यांचे दुसरे नातेवाईक यांची देखील यानें विटंबना केली सरतेशेवटीं त्यांची सुटका करण्याकरितां मराठ्यांचें सैन्य दिल्लीस आलें. या अत्याचारास इस्मायल बेगची संमति नव्हती. पुढें मराठ्यांकडून त्याला जहागीर मिळण्याचें आश्वासन मिळतांच तो त्यांनां जाऊन मिळाला. शहाअलम यास पदच्युत केल्यावर कादरानें बेदरबख्तास तख्तनशीन केलें. मराठे दिल्लीनजीक येतांच तो बेदरबख्तास घेऊन पळाला. राणेखानानें त्याच्या पाठलागास फौज रवाना केली. तेव्हां कादरानें मिरतच्या किल्ल्याच्या आश्रयानें कांहीं दिवसपर्यंत मराठ्यांपासून स्वतःचें संरक्षण केलें. परंतु शेवटीं अन्नसामुग्रीच्या तुटवड्यामुळें तो एकटाच एका चपळ घोड्यावर स्वार होऊन किल्ल्यांतून पळून गेला. परंतु वाटेंत घोड्यावरून पडल्यामुळें तो बेशुद्ध झाला असतां कांहीं शेतकऱ्यांच्या दृष्टीस पडला. शेतकऱ्यांनीं त्याला ओळखून तावडतोब मराठ्यांच्या छावणींत नेऊन त्यांच्या स्वाधीन केलें. त्याला प्रथम मोठ्या बंदोबस्तानें कैदेंत ठेवलें व नंतर त्याचे हात, पाय, नाक, कान इत्यादि अवयव छाटून त्याला दिल्लीस बादशहाकडे पाठवलें; परंतु तो वाटेंतच मरण पावला (डिसेंबर). त्याचें बडगें आग्रा जिल्ह्यांतील औल गांवीं आहे. [डफ; बील—ओरि. बायॉ. डिक्श.]

गुलामगिरी, उत्पत्ति.—एका मनुष्याला दुसऱ्या मनुष्यावर केवळ मालमत्तेप्रमाणें अधिकार चालविण्यास परवानगी देणारी जी समाजव्यवस्थेंतील पद्धति तिला गुलामगिरी म्हणतात. तथापि मालकाचा गुलामावरील हक्क व अधिकार केवळ मालमत्तेवरील हक्काइतका अमर्यादित नसतो. जुन्या रोमन कायदेपद्धतींत व रोमनोत्पन्न आधुनिक यूरोपीय गुलामपद्धतींत मालकाचा गुलामावर पूर्ण अधिकार नसून केवळ गुलामापासून श्रम किंवा काम करून घेण्याचाच फक्त हक्क आहे. वेस्टर्नमार्कनें म्हटल्याप्रमाणें गुलामपद्धति ही केवळ औद्योगिक संस्था आहे. या अर्थानें आद्यकालीन व मागासलेल्या समाजांत विवाहित स्त्रियांची स्थिति गुलामासारखीच असते;आणि ज्या समाजांत स्त्रियांना गुलामाप्रमाणें राबविण्यांत येतें त्या समाजांत बहुधा गुलामपद्धतीचें अस्तित्व नसतें. पुढें प्रगत समाजांत एकदां गुलामपद्धति सुरू झाली म्हणजे मात्र स्त्रियांनां गुलाम बनविण्यांत मालकाचा हेतु श्रम घेण्याचा नसून स्त्री या नात्यानें तिचा उपयोग करून घेण्याचा असतो. तसेंच प्राचीन व मागासलेल्या समाजांत कुटुंबांत जो एक मुख्य कर्ता इसम असतो तो स्त्रियांप्रमाणें कुटुंबांतील मुलांनां व इतर कौटुंबिक व्यक्तींनांहि गुलामाप्रमाणेंच वागवितो. तथापि दोहोंत बराच फरक असतो. दुसरी गोष्ट अशी कीं राजकीयदृष्ट्या जित देश किंवा मानवसमाज आणि जेता देश किंवा मानवसमाज यांचा संबंधहि केवळ गुलामाप्रमाणें नसतो. तसेंच यूरोपांत प्रचलित असलेली 'सर्फडम' व गुलामपद्धति यांतहि बराच फरक आहे. प्राथमिक अवस्थेंतील जनसमाजात गुलामगिरीचीं दोन स्वरूपें असतात. एक समाजांतर्गत व्यक्तींनां गुलाम बनविण्याची पद्धति व दुसरी समाजबाह्य व्यक्तींना गुलाम बनविण्याची पद्धति. यांपैकीं समाजबाह्य व्यक्तींनां गुलाम करण्याची पद्धति ही कालदृष्ट्या अगोदरची होय. कारण प्राथमिक अवस्थेंतील समाज समतेच्या नात्यानें बद्ध असतात. ते बहुतेक एकाच हाडामासाचे म्हणजे एकमेकांचे नातेवाईक असतात; आणि एका समाजांतील किंवा टोळींतील इसमांनीं आपसांत एकमेकांस गुलाम बनवूं नये असा सक्त नियमच केला जातो. अशा स्थितींत प्रथम गुलाम बनविण्याचा प्रसंग युद्धामुळें उत्पन्न होतो. युद्धांत कैद केलेले लोक हेच प्रथमचे गुलाम होत. मात्र आद्यकालान मानवसमाज हे सदासर्वदा एकमेकांत लढत राहात असत. कधींच गुण्यागोविंदानें वागत नसत अशी जी समजूत प्रचलित होती ती मात्र खरी नाहीं. प्रागैतिहासिक पुराणवस्तुसंशोधनशास्त्र आणि रानटी समाजांचें मानववंशशास्त्र यांतील शोधांवरून असें सिद्ध झालें की प्राथमिक अवस्थेंतील समाजहि शांततामय जीवनक्रमाचा उपभोग खास घेत असत. हॉबहाऊस व त्याचे सहकारी यांनीं परिश्रमपूर्वक माहिती मिळवून असें सिद्ध केलें आहे कीं, 'अयुध्यमान' समाज या सदराखालीं अगदीं अप्रगतावस्थेंतील मृगयावृत्तीनें राहणारे समाज येतात. आणि गुलामपद्धतीचें अस्तित्वहि नेमकें याच प्रकारच्या समाजांत नसतें असें सिद्ध झालेलें आहे. परंतु कालांतरानें निरनिराळ्या मानवसमाजांत लढाया होऊं लागल्यावर युद्धांत कैद केलेल्या लोकांनां गुलाम बनविण्याची पद्धति सुरू झाली. अशा तऱ्हेच्या

गुलामांनां वागविण्याची रीत जेत्यांनां सोयीची पडेल अशी अमलांत आली हेंहि उघड आहे. अशा प्रकारच्या कैद्यांची जिवंत न ठेवतां कित्येकदां पूर्ण कत्तलहि करून टाकीत असत. किंवा अशा जित लोकांनां हाल हाल करून मारून खाणें किंवा खंडणी घेऊन सोडून देणें, किंवा कैद्यांची अदलाबदल करणें किंवा उदारपणानें अजीबात सोडून देणें, किंवा गुलाम बनवून ठेवणें वगैरे अनेक प्रकार सुरू झाले. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या रानटी जातींत हे सर्व प्रकार आजहि चालू आहेत.

तथापि कोणताहि मानवसमाज अर्थशास्त्रदृष्ट्या एका विशिष्ट प्रकारचा जीवनक्रम आक्रमूं लागल्याशिवाय गुलामपद्धति अमलांत आणीत नाहीं. उदाहरणार्थ, समाज जों-पर्यंत मृगयावृत्तीनें राहणारा आहे तोंपर्यंत गुलाम पाळण्याची पद्धति त्या समाजांत क्वचित् दृष्टीस पडते. कारण अशा समाजांत कोणतेहि उद्योगधंदे सुरू झालेले नसल्यामुळें गुलामांकडून करून घेण्यासारखें काम कांहींच नसतें. उलट उदर भरणाकरतां प्रत्येकाला शिकार करण्यांत जीवापाड श्रम करूनहि स्वतःचें व बायकामुलांचें पोट भरणें जेमतेम शक्य होतें. आणि शिकारीसारखें काम गुलामांकडून करून घेणें अशक्यच असतें. कारण अशा स्थितींत त्याच्यावर देखरेख करणें अवघड असतें. त्यास पळून जाण्यास पुष्कळ संधि असते व उत्तम शिकाऱ्याचे गुण त्याच्या अंगीं नसतात. यानंतरच्या गोपालवृत्तीच्या समाजांत गुलामपद्धतीची सुरुवात होऊं लागते. जनावरें माणसाळवण्याचें काम करणारांस मनुष्यांनांहि गुलाम बनवून त्यांकडून काम करून घेण्याचें कौशल्य साधूं लागतें. प्रत्यक्ष पुराव्यानें ही गोष्ट सिद्ध झाली आहे. पृथ्वीच्या पाठीवरील गोपालवृत्ती निम्याहून अधिक समाजात गुलामपद्धति अस्तित्वांत असल्याचें आढळून आलें आहे. तथापि असे समाज वायव्य व ईशान्य आफ्रिकेच्या भागात, काकेशसपर्वत व अरबस्थान एवढ्याच देशात असून सायबेरिया, मध्यआशिया, हिंदुस्थान व दक्षिण आफ्रिका या भागांतील गोपालवृत्ती समाजात गुलामपद्धति अस्तित्वांत नाहीं. समाजाच्या प्रगतींतील यापुढची पायरी म्हणजे कृषीवलवृत्ति. या पायरीला पोहोंचलेल्या पृथ्वीच्या पाठीवरील सर्व समाजांत गुलामपद्धति सर्वत्र रूढ असलेली आढळते. तथापि गुलामपद्धति जेथें नाहीं असेहि शेतकी करणारे पुष्कळ समाज आहेत. शिवाय ज्या देशांत बिनमालकीची पडीत जमीन पुष्कळ आहे तेथें कोणी कोणाचा गुलाम बनून न रहातां स्वतः स्वतंत्रपणें जमीन करून उपजीविका चालवितो. परंतु देशांमध्यें सर्व जमीन खाजगी मालकीची बनून मोठा जमीनदार वर्ग तयार झाला म्हणजे शेतकीचें काम करणाऱ्या मजुरांची किंवा गुलामांची जरूरी भासूं लागते, व अत्यंत कमी खर्चाचे मजूर उर्फ गुलाम मिळविण्याची खटपट जमीनदार वर्गांत सुरू होते आणि युद्धांत पाडाव केलेल्या लोकांस गुलाम बनविण्याची पद्धति जोरानें सुरू होते. समाजयाच्या व्यक्तींनां गुलाम बनविण्याची ही रूढी वाढतां वाढतां समाजांतर्गत व्यक्तींनांहि गुलाम बनविण्याचा मोह उत्पन्न होतो. असे गुलाम बनविण्याचे मुख्य मार्ग दोन. एक कर्जदारी व दुसरा गुन्हेगारी. कर्ज फेडूं न शकणाऱ्या ऋणकोला ठार मारण्याची चाल फार क्वचित आढळते. उलट अशा ऋणकोनां गुलाम म्हणून सावकाराच्या ताब्यांत देण्याची रूढी पुष्कळ आढळते. अश वेळीं ऋणको स्वतः गुलाम न बनतां स्वतःच्या बायकोला किंवा मुलांनां गुलाम बनविण्याची रूढी पाडतात गुन्हेगाराला किंवा त्याच्या नातेवाईकांनां गुलाम करणें हा एक मार्ग होय

गु ला मां ची स्थि ति व वा ग णू क.—तात्त्विक दृष्ट्या मालकाची गुलामावर पूर्ण सत्ता असते हें खरें. तथापि व्यवहारतः मालकाची ही सत्ता फार मर्यादित झालेली असते. रूढी व लोकमत यांच्या दडपणामुळें गुलामाच्या कित्येक हक्कांनां मान देणें मालकांना भागच पडतें. जिवंत ठेवणें किंवा ठार मारणें या हक्कासंबंधानें पाहतां युद्धांतील कैद्यांनां गुलाम बनविलेले असल्यास तो हक्क मालकांनां न्यायतःच प्राप्त होतो. तथापि मालकाशिवाय इतर कोणासहि गुलामास ठार मारण्याचा अधिकार नसतो, इतकेंच नव्हे तर गुलामाला ठार मारण्याच्या गुन्ह्याबद्दल मालकाला नुकसानभरपाई मागतां येतें. पुढें अशा गुलाम स्त्रीपुरुषांपासून जन्मास आलेल्या गुलामांनां ठार मारण्याचा अधिकार मालकाकडे उरत नाहीं. पाहिजे तर असे गुलाम दुसऱ्यास विकून टाकण्याचा हक्क मालकास असतो. यानंतरची पायरी म्हणजे गुलामांकडून कांहीं ठराविक मर्यादेपर्यंतच काम करून घेण्याचा अधिकार असतो. पुढें गुलामाला स्वतःच्या मालकीचें असें द्रव्यार्जन करण्याचा अधिकार प्राप्त होतो. इतकी मजल गेल्यावर उपार्जित द्रव्याच्या सहाय्यानें स्वतःचें स्वातंत्र्य गुलाम विकत घेऊं शकतो. कित्येक गुलामपद्धतींत एका मालकाच्या गुलामगिरीऐवजीं दुसऱ्या मालकाची गुलामगिरी पत्करण्याचा हक्कहि गुलामास दिलेला आढळतो. वागवण्यासंबंधानें पाहतां युद्धांतील कैद्यांचे बनवलेले गुलाम किंवा परकीय समाजातून विकत घेतलेले गुलाम आणि मालकाच्या घरांत जन्मास आलेले गुलाम यांनां मालक निरनिराळ्या प्रकारें वागवतात. घरांत जन्मलेल्या गुलामांनां इतरांपेक्षां फार सौम्यपणानें व सदयतेनें वागविण्यांत येतें. तसेंच गृहकार्ये करणाऱ्या गुलामांनां शेतकाम करणाऱ्या गुलामांपेक्षां फार अधिक सवलती मिळतात. आफ्रिकेंतील नीग्रो गुलामांनां अमेरिकेंत वागविण्याची अमेरिकडील रीती सर्वांत अधिक क्रूरपणाची असल्याचें सिद्ध झालेलें आहे.

गु ला म प द्ध ती चे प रि णा म.—गुलामपद्धतीपासून मानवसमाजाला बहुविध फायदे झाले असल्याचें कित्येक लेखक प्रतिपादन करतात. त्यांपैकीं एक मोठा फायदा असा झाल्याचें डीली व बॉर्ड हे लेखक सांगतात कीं, सतत शारिरिक कष्टानें काम करण्याची संवय मनुष्यजातीला गुलामपद्धतीमुळें लागली. मनुष्य स्वभावतः आळस्यप्रिय

असल्यामुळे त्याला दीर्घोद्योग करण्याची संवय लावण्याचे काम अत्यंत कठीण होतें; व हें कठीण काम गुलामपद्धतीनें केलें आहे. तथापि गुलामांनां सतत परिश्रम करण्याची लागलेली संवय त्यांच्या वंशजांत उतरून आतां मानवजात कष्टाळू बनली आहे हें विधान चुकीचें आहे. कारण जीविशास्त्राचा असा सिद्धान्त आहे कीं, जे गुण मनुष्यानें उपार्जन केलेले असतात ते वंशजांमध्यें संक्रमण पावत नाहींत. म्हणून दीर्घोद्योगिता हा गुण मानवजातीला गुलामपद्धतीमुळें लाभला हें म्हणणें शास्त्रसंमत नाहीं. गुलामपद्धतीमुळें अर्थशास्त्रांतील सुप्रसिद्ध श्रमविभागाचें तत्त्व अमलांत आलें हें म्हणणें खरें आहे. समाजामध्यें सत्ताधारी व मालक वर्ग आणि कामकरी व नोकर वर्ग असे दोन विभाग गुलामपद्धतीमुळें उद्भवले असें म्हणतां येईल. तसेंच या गुलामपद्धतीमुळें सत्ताधारी मालक वर्ग उत्तरोत्तर अधिक श्रीमंत होऊन मोठा बलाढ्य बनला. व समाजांतील वरच्या वर्गामध्यें प्रत्यक्ष स्वहस्तानें घरकाम, किंवा कोणतेंहि उद्योगधंद्याचें काम करण्याचा कंटाळा किंवा तिरस्कार या गुलामपद्धतीनेंच उत्पन्न केला.

वि स्ता र.— पृथ्वीच्या पाठीवर कोणकोणत्या देशांत गुलामपद्धतीचा प्रसार होता तें आतां पाहूं.

हिंदुस्थानः—पूर्वकाळीं दास होते किंवा नाहीं हा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. अंगमेहनतीचीं कामें बहुधा दास नांवाच्या विशिष्ट वर्गाकडून घेण्याचा संप्रदाय सर्व देशांत पूर्वकाळीं चालू होता. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतही वैदिककाळीं कदाचित् चालू असेल. ऋग्वेदामध्यें दास व दासी दान दिल्याचे उल्लेख आढळतात. त्रसदस्यूनें सोभरीस ५० स्त्रिया दान दिल्या (८. १९, ३६) पण दास हे गुलाम कितपत व केव्हां होते हें प्रत्येक वेळेस पुरावा तपासून ठरविलें पाहिजे.

शूद्राचा विशिष्ट धंदा म्हणजे त्रैवर्णिकांची अथवा जेत्या आर्यांची सेवा करणें हाच ठरविलेला होता. " परिचर्यात्मक कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् " असें भगवद्गीतेंत म्हटलें आहे. याशिवाय आर्य लोकहि जिंकिले गेले म्हणजे दास होत असत असें भारतीयुद्धकाळीं दिसतें. मग हें जिंकणें युद्धांत असो किंवा द्यूतांत असो. अर्थात् द्यूतांत जिंकणें म्हणजे स्वतःला पणाला लावून जिंकले गेले असतां दास होणें असाच प्रकार असे पांडवांनीं आपल्यास स्वतःस पणास लावलें तेव्हां ते दास झाले. या रीतीनें पणाला लावण्याचा प्रकार महाभारतकाळींसुद्धां असावा. कारण मृच्छकटिकांतहि असा प्रकार झालेला वर्णिला आहे. युद्धांत जिंकून शत्रूस ठार मारण्याच्या ऐवजीं त्यास दास करण्याचीहि चाल क्वचित् असावी. कारण वनपर्वांत भीमानें जयद्रथास जिंकून बांधून आणला आणि " यास पाण्डवांचा दास केला आहे असें द्रौपदीस कळवा. " असा निरोप पाठविला (वनपर्व अ. २७२). अर्थात् असा दास करण्याचा संप्रदाय क्वचित् असावा असें दिसतें. क्वचित् म्हणण्याचें कारण असें आहे कीं, याप्रमाणें आपल्याच भाऊबंदांस दास करण्याची आर्य लोकांस गोडी किंवा इच्छा नसावी. दास झाला म्हणजे त्यास सर्व प्रकारचें सेवारूप कर्म करावें लागे, इतकेंच नव्हे तर त्याची स्वतंत्रताहि जाई. किंबहुना वर्णजातहि भ्रष्ट होत असली पाहिजे. द्रौपदी दासी झाली असें मानलें तेव्हां तिला पाहिजे त्या रीतीनें किंबहुना वसिष्ठप्रमाणें वागविण्याचाहि हक्क उत्पन्न झाला असें समजलें जात असे. अर्थात् क्षत्रिय लोकांस किंबहुना एकंदर आर्यलोकांस दास करण्याची तऱ्हा भारतीयुद्धकाळींहि नव्हती. दोन्ही प्रसंगीं या जिंकलेल्या आर्य क्षत्रियांस दास्यापासून मुक्त करून सोडून दिलें आहे. यावरून असें दिसतें कीं, भारतीयुद्धकाळीं युद्धाचा जरी कडकडीत नियम कोठें कोठें चालू होता तरी तो हळूहळू बंद पडला. महाभारतकाळीं पाश्चात्य देशांप्रमाणें परदेशांतील लोकांस व स्वदेशांतील लोकांस जिंकून दास अथवा गुलाम बनविण्याची चाल हिंदुस्थानांत नव्हती. घरकामाकरितां दास व दासी ठेवण्याचा प्रघात प्राचीन काळापासून आपणांस पेशवाईपर्यंत आढळतो. तसेंच भडोच बंदरांत गुलाम व सुंदर स्त्रिया बाहेरून येत असत व येथून बाहेर जात असें पेरिप्लुसमध्यें वर्णन आढळतें (ज्ञानकोश विभाग १ पृ. २९९). ही चाल ग्रीस, रोम, इजिप्त वगैरे देशांत त्या काळीं चालू होती आणि त्या देशांचे इतिहास वाचले म्हणजे आज सुस्थितींत असलेले हजारो स्त्रीपुरुष उद्यां जिंकले गेल्यामुळें भयंकर दास्यत्वांत किंवा गुलामगिरींत कसे पडत हें वाचून आपल्यास सखेदाश्चर्य वाटतें. कोणत्याहि शहराला वेढा पडून शहर जिंकून हस्तगत झालें म्हणजे तेथील लढवय्ये पुरुषांची कत्तल व्हावयाची व त्यांच्या सुंदर स्त्रिया गुलामगिरींत जावयाच्या असा नियमच असे. होमरमध्येंहि असेंच वर्णन वारंवार येतें आणि ग्रीक लोक आपल्या वीरांस ट्रॉयमधील सुंदर स्त्रिया उपभोगास मिळतील असें प्रोत्साहन देत असत. प्रसिद्ध हेक्टरच्या पत्नीस आपलें शेष आयुष्य दास्यत्वांत घालवावें लागलें. असा प्रकार महाभारतकाळीं हिंदुस्थानांत मुळींच नव्हता असें म्हटलें असतां चालेल. हिंदुस्थानांत पाश्चात्य देशांतल्याप्रमाणें गुलामगिरी नव्हती हें पाहून ग्रीक लोकांस आश्चर्य वाटलें आणि त्यांनीं आपल्या ग्रंथात ही गोष्ट नमूद करून ठेविली आहे. " हिंदुस्थानांतील लोक स्वतःस किंवा परदेशांतील लोकांस दास अथवा गुलाम करीत नाहींत. ते स्वतः स्वतंत्र असून दुसऱ्याचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याची त्यांची इच्छा नसे असा ग्रीक इतिहासकाराचा पुरावा आहे. या जोडपुराव्यावरून महाभारतकाळीं दास अथवा गुलाम फारसे नसावेत. दास म्हणजे शूद्र असा अर्थ महाभारतकाळीं ठरीव दिसतो. ' (गौर्वोढारं धावितारं तुरंगी शूद्री दासं ब्राह्मणी याचकंच)' गाई पुत्रास जन्मेल तर तो ओझेंच ओढील,आणि

थोडी प्रसवेल त्यास धावावें लागेल. शूद्र स्त्री पुत्र प्रसवेल तर त्यास दास व्हावें लागेल आणि ब्राह्मणी पुत्र प्रसवेल त्यास भीकच मागावी लागेल. या श्लोकांत वर्णिलेलें मर्म फार मजेदार आहे. दास म्हणजे शूद्र असेंच यावरून दिसतें; आणि शूद्राचें कामहि परिचर्येचें असें ठरलें होतें. तरी सर्वच शूद्र सेवा करीत होते असें नाहीं. ज्याप्रमाणें सर्वच ब्राह्मण भिक्षा मागत नाहींत त्याप्रमाणें सर्वच शूद्र दास नव्हते. कित्येक स्वतंत्र धंदा करून पोट भरीत असत व त्यांजवळ द्रव्यसंचयहि होत असे. ते श्राद्धादि कर्में करण्यासही योग्य आहेत असें ठरलें होतें व दानहि करीत असत. पण त्यांस तपश्चर्या करण्याचा अधिकार नव्हता. सर्वच शूद्र दास नव्हते पण सर्वच दास शूद्र होते ही गोष्ट मात्र खरी होती शूद्रांशिवाय इतरांकडून नोकरांचीं कामें महाभारतकाळीं घेत नसत असें दिसतें. ब्राह्मण शूद्रांचीं कामें करूं लागतील हा कलियुगांतील भयंकर प्रसंग होय. अशा रीतीनें शूद्राचाहि दरजा पाश्चात्य देशांतील दासांपेक्षां अधिक श्रेष्ठ होता. त्यांस मारहाण करण्याचा मालकास हक्क नव्हता. त्यांचा प्राण घेईपर्यंत पाश्चात्य देशांत हक्क असे, परंतु येथें तशी स्थिति मुळींच नव्हती. किंबहुना येथें दास नव्हतेच असें मानलें पाहिजे. गृहस्थानें नोकरचाकरांस अन्न घालून नंतर आपण जेवावें येथपर्यंत नियम महाभारतांत आहेत. शूद्रास जुनें झालेलें वस्त्र द्यावें असा नियम होता. तसेंच जोडा, छत्री, पडदे, वगैरे जुन्या वस्तू द्यावें. शूद्राला द्रव्यसंचय करण्याचा अधिकार नाहीं. त्याचें द्रव्य म्हणजे मालकाचें. ही गोष्ट दासालाच लागू आहे. ब्राह्मणाकडे शूद्र आला असता त्याचें पोषण केलेंच पाहिजे; किंबहुना तो अनपत्य मरेल तर त्याला पिण्डहि द्यावा असें सांगितलें आहे (शां. प. अ. ६. भा. पु. ६ पान १२०). शूद्रानें म्हणजे दास नसेल त्यानें अमंत्रक पाकयज्ञ करावा वगैरे वर्णन आहे. अर्थात् दास्याचें स्वरूप शूद्राच्या परिस्थितीचें मुळींच नव्हतें. तथापि दास्य हें दास्यच होय. आणि समर्प यांच्या कर्येतील (अनु. अ. ९३) त्यांचा शूद्र सेवक शपथ वहातांना असें म्हणतो कीं, " मी पुन्हां पुन्हां दास जन्मास येवो, तर अशा घरच्या शूद्र सेवकांस व दासांस कोणतेंच वेतन देत नसत अन्नवस्त्र हें त्यांचें वेतन असे.

अशा शूद्र दासांशिवाय अन्य मजूर असलेच पाहिजेत व निरनिराळे धंदेवाले शिल्पीहि असलेच पाहिजेत. कोळी, कोष्टी, सुतार, वगैरे कारागिरीहि असलेच पाहिजेत. त्यांनां वेतन काय देत असत याचा खुलासा होत नाहीं. बहुधा शेतीच्या कामांत मजुरांचा उपयोग होत नव्हता. महाभारतकाळीं शेती करणारे खुद्द आर्यवैश्यच असत. अशाच लोकांपैकीं जाट वगैरे हल्लींचे लोक आहेत. व दक्षिणेकडील शेतकरी मराठे हेहि असेच आर्य आहेत. हे वैश्य शूद्रदासांच्या सहवासानें शेतांचा सर्व धंदा करीत. उद्यम, शिल्पें व शेती करणारे लोक शूद्र समजले जाऊं लागण्याचें मुख्य कारण असें कीं, शूद्रत्व आणि द्विजत्व यांतील भेद कर्ममूलक न राहतां संस्कारमूलकच झाला.

कौटिल्याच्या काळीं गुलाम म्हणून स्वतःला किंवा दुसऱ्याला विकतां येत असे, पण या गुलामांनां चांगल्या रीतीनें वागविण्यासंबंधीं व त्यांचे सर्व वारसाचे हक्क देण्यासंबंधीं सरकारी नियम असत. गुलामाला स्वतंत्रता मिळवितां येई. गुलामाची संतति 'आर्य' म्हणून समजली जात असे. गुलाम स्त्रीला यजमानापासून मूल झाल्याबरोबर ती व मूल स्वतंत्र म्हणून गणली जात. कोणाहि ' आर्य ' मनुष्याला गुलाम बनविण्याबद्दल कडक शिक्षा असे.

मनुष्य गुलाम बनण्याचीं कारणें मनुस्मृतींत सात व नारदस्मृतींत पंधरा सांगितलीं आहेत. त्यांत युद्धांतील कैद, कर्जदारी, गुन्हेगारी, दारिद्य, दुष्काळ, गुलाम आईबापांच्या पोटीं जन्म हीं प्रमुख आहेत. स्वतःच्या मुलांनां गुलाम म्हणून विकण्याची चाल प्राचीन समाजांत होती. हिंदुधर्मशास्त्रांतील दत्तकपद्धति ही याच चालीपासून निघाली असावी गुलामपद्धतीचा दुसरा एक प्रकार म्हणजे हिंदुसमाजांतील शूद्र व अतिशूद्र जाति हा होय. याप्रमाणें हिंदुस्थानांत गुलामपद्धति निरनिराळ्या स्वरूपांत ब्रिटिश अमदानीपर्यंत चालू असल्याचें आढळतें. ती कायद्यानें बंद करण्याचें काम ब्रिटिश सरकारनें हळूहळू केलें. १८११ मध्यें परदेशांतून आणलेले गुलाम येथें विकण्याची मनाई करण्यांत आली. १८४३ मध्यें सरकारी अधिकाऱ्यांनीं कोणत्याहि प्रकारची गुलामपद्धति कायदेशीर मानूं नये असें ठरलें. आणि १८६० पासून इंडियन पिनल कोडांत कोणत्याहि इसमाला गुलाम म्हणून विकणें किंवा खरेदी करणें गुन्हा ठरवून त्याला शिक्षा सांगितलेली आहे. गुलामपद्धतीशीं सदृश असलेल्या मुदतबंदी मजूरपद्धतीची माहिती स्वतंत्र लेखांत दिली आहे.

ग्रीस.—इतर देशांतल्याप्रमाणें ग्रीसमध्यें गुलामपद्धति दोन कारणांमुळें चालू झाली. एक कारण दारिद्र्य व दुसरें युद्ध. दारिद्र्यामुळें एकाच समाजांतील व्यक्ती एकमेकांचे गुलाम बनत असत युद्धामुळें परसमाजांतील व्यक्ती गुलाम बनत, युद्धांतील कैद्यांनां गुलाम बनविण्याची पद्धति समाज मृगयावृत्तींतून कृषीवलवृत्तींत गेल्यावर पडते. तथापि शेतकीचें कामहि वर्षभर पुरण्यासारखें नसल्यामुळें गुलामांनां सतत पोसणें मालकाला फार जड जातें. समाज जेव्हां उद्यमवृत्तिप्रत पोहोंचतो, तेव्हांच गुलामांकडून सतत काम घेऊन मालकांनां अपार संपत्ति मिळवावयास सांपडते. ऐतिहासिक काळांतील प्राचीन ग्रीस देश कृषिवलवृत्तींतून उद्यमवृत्तींत संक्रमण पावण्याच्या स्थितींत होता. त्या वेळीं गुलापद्धतीचा त्यानें भरपूर उपयोग करून घेतला. शिवाय स्पार्टासारखे कांहीं ग्रीक समाज सर्वस्वी क्षत्रिय ऊर्फ लष्करी पेशाचे असल्यामुळें अशा समाजांत युद्धेतर सर्व कामें करवून घेण्याची पद्धत असे. त्यामुळें प्रागैतिहासिक होमरच्या काळांत गुलामपद्धति ग्रीसमध्यें पूर्णपणें अमलांत असल्याचें होमरच्या काव्यांवरून स्पष्ट दिसतें. त्या काळांत शेतीचें काम व गुरें संभाळण्याचें काम पुरुष गुलामांकडून व

घरकाम स्त्रीगुलामांकडून करून घेत असत. यानंतरच्या ऐतिहासिक काळाबद्दलची माहिती तर भरपूर उपलब्ध आहे. त्यावरून ग्रीसमध्यें पुढील कारणांनीं गुलाम बनत असत असें दिसतें:—(१) जन्म. तथापि या मार्गानें गुलामांची संख्या भरपूर मिळत नसे, कारण एक तर स्त्रीगुलाम फारसे नसत, व दुसरें गुलाम मुलें जन्मल्यापासून त्यांनां पोसून काम करण्याइतकीं वयानें मोटीं होईपर्यंत वाढविण्यापेक्षां गुलाम आयते विकत घेणें कमी खर्चाचें असे. (२) विक्री. ग्रीक लोक स्वतःचीं मुलें विकीत असत व अशा मुलांनां मरणापेक्षां अधिक त्रासदायक अशा गुलामगिरींत आयुष्य कंठावें लागत असे. शिवाय दरिद्री ग्रीक लोक कर्जाचा बोजा भयंकर वाढला म्हणजे धनकोचे गुलाम बनत असत. (३) युद्धांतील कैद. गुलामांच्या पैदाशीचा हाच मुख्य मार्ग असे. आशियांतील ग्रीकेतर समाजांतलि लोकांनांच नव्हे तर प्रत्यक्ष निरनिराळ्या ग्रीक राज्यांतील लोक एकमेकांसहि लढाईंत कैद करून गुलाम बनवीत असत. तथापि ग्रीकांनीं एकमेकांस गुलाम बनवूं नये असें मत पुढें येऊन कांहीं अंशीं अमलांतहि आलें. (४) चाचेगिरी व चोरी. त्या काळांत समुद्रावरून किनाऱ्यावर उतरून लोकांनां पकडून पळवून नेणें व परराज्यांत नेऊन विकणें हा भयंकर धंदा चाचेलोक मोठ्या प्रमाणावर करीत असत. मात्र खरेदीची रक्कम रोख किंवा मजुरीच्या रूपानें फेडल्यावर सदरहू इसम पुनः स्वतंत्र समजावा असा अथेन्सचा कायदा असे. चोरी करणारे लबाड लोक लहान मुलांनां पळवून नेऊन गुलाम बनवीत असत. अशा लोकांच्या तडाक्यांत सांपडून कोण केव्हां गुलामगिरींत पडेल याचा कांहीं नेम नसे. (५) व्यापार. लढाईंतल्या कैद्यांशिवाय सीरिया, पॉंटस, लीडिया व थ्रेस प्रांतांतून, शिवाय इजिप्त, इथिओपिया, या देशांतूनहि गुलाम पकडून आणून विकण्याचा व्यापार या काळीं चालू होता. सर्वांपेक्षां आशियांतले लोक फार आज्ञाधारक व चैनीच्या कलाकुसरींत निपुण म्हणून त्यांनां बाजारांत मागणी फार असे. खुद्द अथेन्स शहरांत गुलामांचा मोठा व्यापार चालत असे. शिवाय सायप्रस, सॅमॉस, इफेसस व चिऑस येथें गुलामांचे मोठे बाजार भरत असत.

घरकाम व खासगी शेती, खाणी व कारखाने हीं कामें गुलामांकडून करवीत असत. त्याप्रमाणें सार्वजनीक सरकारी कामेंहि गुलामांनां सांगत असत. शहराच्या बंदोबस्ताचे पोलीस गुलामच असत. सैन्य व आरमार यांत हलकीं कामें करण्यास गुलाम ठेवीत. अथेन्समध्यें गुलामांनां पुष्कळ चांगल्या रीतीनें वागवीत असत. क्रूर वृत्तीच्या रोमन लोकांनां तर हें ऐकून आश्चर्य वाटत असे. ग्रीसमध्यें गुलामांनां स्वतःची खासगी मिळकत करण्यास सवड असे. लग्न करण्यास रूढीनें परवानगी असे. कांहीं खासगी स्वरूपाच्या धार्मिक विधींत त्यांनां भाग घेतां येत असे. शिवाय कोणी मालक निर्दयपणानें वागवीत असल्यास दुसऱ्या मालकाकडे विकून घेण्याचा गुलामाला कायद्यानें हक्क असे. गुलामावर लोभ जडल्यामुळें मरणोत्तर थडगें बांधून चांगलें स्मारक मालकानें केल्याचीं उदाहरणेंहि ग्रीसमध्यें घडत असत. शिवाय स्वतःचे पैसे जमवून गुलामांना स्वतःची गुलामगिरींतून सुटका करून घेतां येत असे. मालक खुष झाल्यास स्वतः होऊन तो गुलामास स्वातंत्र्यदान करीत असे. तथापि अशा प्रसंगीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कांहीं ठराविक नोकरी ठराविक काळपर्यंत घेण्याची अट मालक घालीत असत.

गुलामगिरीचें तात्विक दृष्ट्या समर्थन करणाऱ्या तत्ववेत्त्यांपैकीं खुद्द ॲरिस्टॉटल हा एक होता हें सुप्रसिद्ध आहे. पण गुलामांनां क्रूरपणानें वागविणें, ग्रीकांनीं ग्रीकांनांच गुलाम करणें ह्या दोन्ही गोष्टी त्याला संमत नव्हत्या. प्लेटोनें तर या पद्धतीला दोष दिला आहे. एपिक्युरीयन पंथांतले तत्ववेत्ते स्वतःच्या सुखाकरितां व चैनीकरितां गुलाम बाळगावे असें निःशंकपणें प्रतिपादन करीत असत. उलट स्टोईक पंथी तत्ववेत्ते असें म्हणत कीं, स्वातंत्र्य व गुलामगिरी हीं दोन्हीं ज्ञानी पुरुषाला सारख्याच किंमतीचीं. स्वतंत्र किंवा परतंत्र स्थिति असह्य झाल्यास आत्महत्या करणें हा मार्ग प्रशस्त होय.

रोम.—रोमन लोकांची राहणीच अशा प्रकारची होती कीं, त्याच्यांत गुलामगिरीची पद्धति उत्पन्न होणें स्वाभाविक होतें. त्यामुळें गुलामपद्धतीला सर्व बाबतींत पद्धतशीर स्वरूप येऊन गुलामपद्धति फार विस्तृत प्रमाणावर अमलांत आली. रोमन लोकांनीं देश जिंकण्यास आरंभ केला तेव्हांपासूनच ते गुलाम पाळूं लागले, परंतु आरंभीं त्यांच्या मालकीच्या जमिनी फारशा नसल्यामुळें रोमन इसमांजवळ गुलामांची संख्या अल्प असे. परंतु रोम येथें लोकसत्ता (रिपब्लिक) स्थापन होऊन जेव्हां रोमन साम्राज्य झपाट्यानें वाढूं लागलें त्यावेळीं प्रत्येक लढाईंत हजारों कैदी पकडून त्यांची विक्री होऊं लागली. एपायरसमध्यें जय मिळविल्यावर एमिलियस पॉलसनें १,५०,००० कैदी गुलाम करून विकले. तसेंच रोमन लोकांनीं ट्यूटन लोकांनां जिंकलें तेव्हां ९०,००० व सिंब्री लोकांनां जिंकलें तेव्हां ६०,००० गुलाम विकण्यांत आले. ज्यूलियस सीझरनें गॉलमध्यें एका प्रसंगीं ६३,००० कैदी गुलाम विकले. पुढें बादशाही अंमलाच्या वेळीं आफ्रिका, स्पेन, गॉल व आशियांतील देश यांमधून गुलाम आणून रोम येथें विकण्याचा व्यापार सतत चालू होता. शिवाय मनुष्याला गुलामगिरींत पाडणारी वर ग्रीससंबंधानें सांगितलेलीं सर्व कारणें रोममध्यें चालू होतींच.

रोममध्येंहि गुलामांनां पोलीसखातें, न्यायकोर्टें, तुरुंग वगैरे ठिकाणीं हलक्या दर्जाच्या कामावर नेमीत असत. रोममध्यें व इतर प्रांतोप्रांतीच्या शहरांत रस्ते तयार करणें, गटारें साफ करणें, वगैरे कामें गुलामांकडून करवीत असत.

खाजगी कुटुंबांत स्वयंपाक, कपडे धुणें व शिवणें, गुरें सांभाळणें, शेतकाम करणें, इतकेंच काय पण मालकाच्या करमणुकीकरतां गायन, वादन, नृत्य हीं कामेंहि गुलाम करीत असत. नाटकें, सर्कसी, द्वंद्वयुद्धें हीं सार्वजनिक करमणुकीचीं कामें गुलामच करीत असत. मोठमोठया रोमन अधिकाऱ्यांच्या, सरदारांच्या व धनिकांच्या पदरीं हिशेबनीस, गृहव्यवस्थापक, वैद्य, कारागीर, लेखक, वाचक, ग्रंथसंग्रहव्यवस्थापक व यापेक्षांहि मोठया योग्यतेचे विद्वान ग्रंथकार, वैय्याकरणी, तत्ववेत्ते असत, ते वास्तविक परतंत्र गुलाम असत. पदुआ येथील विद्यापीठांतील अध्यापक ग्रीक गुलाम असत. याप्रमाणें एक एका थोर रोमन गृहस्थाजवळ दोन दोन, चारचार हजारपर्यंत गुलाम असत. क्लॉडियसच्या कारकीर्दींत इटलीमध्यें एकंदर गुलामांची संख्या २,०८,३२,००० होती असें म्हणतात. अशा गुलामासंबंधानें तारण्यामारण्यासुद्धां सर्व सत्ता रोमन कायद्यानें गुलामांच्या मालकाला दिलेली होती गुलामांनां खाजगी धनसंचय करण्याचा हक्क नसे, तसेंच विवाह करण्याचा हक्क नसे; पण मालकाच्या सवलतीनें या दोन्ही गोष्टी गुलाम करीत असत. गुन्ह्याबद्दल गुलामांनां इतरापेक्षां फार कडक शिक्षा असत. गुलामाची संख्या आरंभीं कमी होती तेव्हां मालकाचा गुलामांशीं प्रत्यक्ष परिचय होऊन स्नेहभाव वाढत असे व गुलामांनां सवलतीनें व सौजन्यानें वागविण्यांत येत असे. पण पुढें एकेका मालकाच्या पदरीं शेकडों, हजारों गुलाम झाले तेव्हां परस्परांची कधीं गांटभेटहि नसे, व गुलामानां संभाळणें हें अवघड काम होऊन त्यांच्या हातापायात बिड्या पडूं लागल्या. पुढें खाणींतून व कारखान्यातून स्त्रीपुरुष गुलामांकडून अर्धनग्न स्थितींत व बिड्या अडकवून आणि चावकाचा उपयोग करून काम करून घेण्यापर्यंत मजल गेली, व रोमन गुलामपद्धतीला फार क्रूरपणाचें स्वरूप आलें. या कारणानें गुलाम आपापसांत गुप्त कट करून मालकाविरुद्ध मोठमोठीं बंडें व दंगे करूं लागले व मालकांच्या ताब्यातून पळून जाऊं लागले. रोमच्या इतिहासांत असे गुलामांच्या बंडाचे प्रसंग पुष्कळ आहेत. तथापि गुलामांनां स्वतःचें स्वातंत्र्य पुनः प्राप्त करून घेण्याच्या बाबतींत रोमन कायद्यानें अधिक सवलती ठेवलेल्या होत्या. सबब एवढया बाबतींत रोमनपद्धति ग्रीकपेक्षा श्रेष्ठ होती. रोमन मालक पैसे घेऊन गुलामांनां स्वतंत्र करीत असत व त्याच पैशांनीं दुसरे गुलाम खरेदी करीत. पुढें रोमन बादशहांच्या काळात लढायाचें मान कमी होऊन औद्योगिक युगाला आरंभ झाला. तेव्हां रोमन बादशहांनीं गुलामांनां कायद्यानें पुष्कळ सवलती दिल्या. मालकांच्या क्रूरपणाला पुष्कळ आळा घातला व गुलामांनां स्वतंत्र करण्याच्या कामीं स्वतः प्रत्यक्ष मदत पुष्कळ केली.

ख्रिस्ती धर्माचा परिणाम.—रोमन लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यापासून गुलामपद्धतीला सौम्य स्वरूप येऊन गुलामांची संख्याहि उत्तरोत्तर कमी होत गेली. ख्रिस्ती धर्मानें खुद्द धर्मग्रंथांत गुलामपद्धतीचा निषेध स्पष्टपणें केलेला नाहीं. तथापि ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं ख्रिस्ती बनलेल्या रोमन मालकांकडून, व विशेषतः ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या रोमन बादशहाकडून गुलामपद्धतींत प्रत्यक्ष उपदेशानें पुष्कळ सुधारणा घडवून आणली पुष्कळ गुलाम पदरीं असणें हें मोठेपणाचें लक्षण न मानणें, द्वंद्वयुद्धासारखे प्राणघातक खेळ गुलामाकडून न करविणें, युद्धकैद्याची खंडणी घेऊन ताबडतोब सुटका करणें, गुलामाना विशेष सवलती देऊन स्वतंत्र होऊं देणें, मनुष्यामनुष्यांमधील समानबंधुत्वाचें नातें ओळखून गुलामानां भूतदयेनें व सन्मानानें वागविणें इत्यादि गोष्टी धर्मोपदेशकानीं हळूहळू घडवून आणल्या. कॉन्स्टंटाइन, थिओडोशियस व जस्टिनियन या बादशहांनीं गुलामाच्या हिताचे असे अनेक कायदे केले.

गुलामपद्धतीचें कृषीदासामध्यें रूपांतर.—तथापि उपर्युक्त सुधारणानीं गुलामपद्धति बंद पडून एक स्वतंत्र समाज न बनतां मध्यंतरीं एक 'सर्फडमची' अवस्था उत्पन्न झाली. हें अवस्थांतर पुढील कारणांनीं झालें. (१) रोमन साम्राज्य पूर्ण वाढून जेव्हा युद्धें कमीं झालीं तेव्हां गुलामांच्या संख्येंत भर घालणारें साधन जें युद्धकैद तीं बंद पडून गुलामाचा पुरवटा कमी पडला. तेव्हां मालक गुलामांबद्दल जास्त काळजी व आस्था बाळगूं लागले व गुलाम स्त्रीपुरुषांपासून गुलाम संतति उत्पन्न करवून गुलामांची उणीव भरून काढूं लागले. (२) तथापि गुलामाची संख्या एकंदरीनें कमी कमी होत गेल्यामुळें स्वतंत्र मजूरवर्ग उत्पन्न होऊं लागला. प्रथम सरकारी, नंतर खासगी नोकऱ्यांत हळूहळू स्वतंत्र माणसें शिरूं लागलीं. श्रीमंत मालक कारखाने, खाणी व शेती यांत कामाला गुलाम लावीत असत. पण शेवटीं तेंहि बंद पडलें. (३) कारण रोमन साम्राज्याच्या उत्तर कालांत रोमन समाजाची स्थंध घडीच बदलली. स्वतंत्र रोमन नागरिकांचा वर्ग व गुलामांचा वर्ग ही पूर्वीची रचना हळूहळू नाहींशी होऊन सर्व समाजात वंशपरंपरागत धंदेवाईक जाती उत्पन्न झाल्या. हें स्वरूप हिंदुस्थानांतील जातिभेदासारखेंच होतें. (४) या अवस्थांतराला अनुसरून गुलामाचें अवस्थांतर होऊन त्यांनां खंडानें शेती करणाऱ्या कुळांचें स्वरूप प्राप्त झालें. अशी शेती करणाऱ्या लोकांच्या जागोजाग वसाहती वाढल्या. हे गुलामगिरींतून सुटलेले लोक जमिनदाराला दरसाल खंड भरून बाकीच्या शेतीच्या उत्पन्नावर स्वतंत्रपणें उदरनिर्वाह करून राहूं लागले. अशा नवीन वसलेल्या गांवांचा जमीनमहसूल सरकारांत भरण्याबद्दल जमीनदार मालक जबाबदार असे व तो कुळें लावून शेतें पिकवीत असे. या कुळांबद्दल पुढें कायद्यानें पुष्कळ बंधनें उत्पन्न केलीं. कुळानें गांव सोडून जातां कामा नये, इतकेंच नव्हे तर त्यानें विवाहसंबंध सऱ्या जमीनदाराच्या कुळाशीं करूं नये असा निर्बंध

कायद्यानें घातला. तसेंच कुळांनीं आपल्या मुलांना वंशपरंपरा तेथेंच ठेवून शेती केली पाहिजे असा कायदाहि झाला. उलट जमिनदारांनां खंड वाढविण्याचीहि कायद्यानें मनाई होती. कुळांनां खाजगी धनसंचय करण्याचा हक्क होता. याप्रमाणें शेतीच्या बाबतींत गुलामपद्धति बंद पडून कृषिदासपद्धति (सर्फडम) अमलांत आली.

अर्वाचीन गुलामपद्धति.—कृषिदासपद्धति स्थापन झाल्यावर गुलामपद्धति कायमची नामशेष होणार अशी अपेक्षा करणें गैरवाजवी नव्हतें. परंतु दुर्दैवानें गुलामपद्धति १५ व्या शतकांत पुन्हां सुरू झाली; इतकेंच नव्हे तर तिला प्राचीन रोमन पद्धतीपेक्षांहि भयंकर क्रूर स्वरूप प्राप्त झालें. हीच अमेरिकेंतील सुप्रसिद्ध नीग्रो गुलामपद्धति होय. हिचा थोडक्यांत इतिहास पुढीलप्रमाणें आहे: —१४४२ त सुप्रसिद्ध दर्यावर्दी पोर्तुगालचा प्रिन्स हेनरी याच्या हुकमतीखालीं पोर्तुगीज लोकांनीं आफ्रिकेच्या अटलांटिक महासागराकडील किनाऱ्याचें संशोधन करीत असतां पुष्कळ मूर लोक पकडून कैद केले. परंतु त्यांच्या मूर देशबांधवांनीं त्यांच्या मोबदला नीग्रो गुलाम व सोनें देऊन त्याची सुटका केली. यामुळें पोर्तुगीजांची द्रव्यतृष्णा वाढून त्यांनीं आफ्रिकेच्या किनाऱ्यावर ठिकठिकाणीं वसाहती करून नीग्रो लोक पकडून आणून स्पेनमध्यें विकण्याचा क्रम सुरू केला. पुढें हयटी बेट स्पेनच्या ताब्यांत आल्यावर तेथें त्यांनीं निग्रो गुलाम नेले. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, अमेरिकेकडील या नूतन संशोधित भूप्रदेशांत निग्रो गुलामपद्धति सुरू करण्यासंबंधानें ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं आक्षेप न घेतां उलट या गोष्टीला थोडें फार उत्तेजनच दिलें. या कार्यांतला प्रथमारंभापासूनचा वाटेकरी सुप्रसिद्ध बिशप बार्टोलोमि डी लास कासस हा होय. यानें उच्च नैतिक तत्वाकडे दुर्लक्ष करून हायटी बेटांतील गुलामांचे हाल प्रत्यक्ष पाहिले असूनहि प्रत्येक स्पॅनिश वसाहतवाल्यानें फक्त एकेक डझन गुलाम बाळगावे या अटीवर गुलामांच्या व्यापारास संमति दिली. अशा रीतीनें अमेरिकेंत आफ्रिकन निग्रो गुलामांचा व्यापार सुरू झाला. या व्यापारांत भाग घेणारा पहिला इंग्रज सर जॉन हॉकिन्स हा होय. प्रथम इंग्रज व्यापारी स्पॅनिश वसाहतींनाच गुलाम पुरवीत असत. १६२० मध्यें व्हर्जिनिया या इंग्रज वसाहतींतील जेम्स टाऊनमध्यें प्रथम निग्रो गुलाम डच व्यापाऱ्यांनीं आणून विकले. याप्रमाणें ब्रिटिश अमेरिकेंत शेतीकडे निग्रो गुलाम उपयोगांत येऊं लागून उत्तरोत्तर यांचें प्रमाण इतकें वाढलें कीं, १७९० मध्यें एकट्या व्हर्जिनिया संस्थानांत २,००,००० निग्रो गुलाम होते. इंग्लंडमध्यें प्रथम कांहीं विशिष्ट कंपन्यांनाच गुलामांचा व्यापार करण्याचा हक्क दिलेला होता. पण तिसऱ्या विल्यम राजानें हा निर्बंध काढून या व्यापाराची परवानगी सर्वांनां बिनशर्त दिली. यामुळें इंग्रज व्यापारी स्पॅनिश वसाहतींनांहि गुलाम पुरवूं लागले. हा व्यापार इतका फायदेशीर असे कीं, मोठमोठ्या युद्धांचे तह ठरतांना या व्यापाराच्या हक्काबद्दल राष्ट्राराष्ट्रांत रणें माजत. १७१३ तील युट्रेटचा तह हें अशा प्रकारांचेंच उदाहरण होय. सर राबर्ट वालपोलला केवळ याच प्रकरणावरून स्वमताविरुद्ध स्पेनबरोबर युद्ध पुकारावें लागलें. १६८० ते १७०० एवढ्या अवधींत एका आफ्रिकनकंपनी नामक व्यापारी मंडळानें १,४०,००० गुलाम नेऊन विकले व इतर व्यापाऱ्यांनीं १,६०,००० गुलाम विकले. १७०० ते १७८० या अवधींत एकट्या जमेका या इंग्रज वसाहतींत ६,१०,००० गुलाम विकले. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या सुमारास इंग्रजांचा हा व्यापार शिखरास पोंहोंचला होता, तो युद्धकालांत जरा मंदावला.युद्धानंतर हा व्यापार पुन्हां जोरांत सुरू झाला. त्यासंबंधानें पुढील विश्वसनीय आंकडे प्रसिद्ध आहेत. दरसाल ब्रिटिशांनीं ३८०००, फ्रेंचांनीं २००००, डचांनीं ४०००, डेन्सांनीं २०००,व पोर्तुगीजांनीं १०००० याप्रमाणें सालोसाल एकंदर ७४०००निग्रो गुलाम यूरोपियनांनीं अमेरिकेंत नेऊन विकण्याचा क्रम चालू ठेवला होता व त्यांपैकीं निम्म्याहून अधिक व्यापार ब्रिटिशांच्या हातीं होता.

आफ्रिकेंतून अमेरिकेंत निग्रो गुलाम नेण्याचें कारण एक तर स्पॅनिश लोकांनीं अमेरिकेंत वसाहती करतांना तेथील इंडियन लोकांची अत्यंत क्रूरपणानें बरीचशी कत्तल केली होती. आणि दुसरें कारण एक निग्रो गुलाम चार इंडियनां इतकें काम करीत असे.निग्रो पकडण्यापासून अमेरिकेंत नेऊन विक्रीपर्यंत सर्वच प्रकार अमानुष निर्दयपणाचा होता. यूरोपियन लोक निग्रोंनां पकडण्याचें काम निग्रो पुढाऱ्यांकडून करवीत असत. हे लोक खेड्याला प्रथम आग लावून देत आणि तेथील रहिवाशी बाहेर पळूं लागले म्हणजे त्यांनां कैद करीत. या झटापटींत कांहीं निग्रो मरत ते वगळले तरी शेंकडा १२॥ जहाजांतून अमेरिकेपर्यंत जातांना वाटेंत मरत, शेंकडा ४॥ बंदरांत उतरून विक्रीहोईपर्यंत मरत व शेकडा ⅓ तेथील हवापाणी न मानल्यामुळें गुलाम बनल्यावर मालकाच्या घरीं मरत. प्रत्येक गुलामाला सुमारें २० पौंड किंमत येत असे. हे गुलाम बाजारांत विकावयास बहुतेक नग्न स्थितींतच आणीत असत. खरेदी करतांना घोड्यांप्रमाणें त्यांच्या तोंडांतील दांत व सांधे तपासून पहात असत. निग्रो गुलाम दरसाल आफ्रिकेंतून अमेरिकेंत न्यावे लागत असत. कारण अमेरिकेंत त्यांची संख्या फारशी वाढत नसे. जमेकामध्यें १६९० सालीं ४०००० गुलाम होते आणि १८२० पर्यंत तेथें ८००००आणखी गुलाम आले;तरी त्या सालीं तेथें गुलामांची एकंदर संख्या अवघी ३४०००० कायती होती.निग्रोंची संख्यावृद्धि न होण्याचें कारण अर्थात् निग्रो स्त्रीगुलामांची कमतरता हें होय. जमेकामध्यें १७८९ सालीं स्त्रियांपेक्षां पुरुष निग्रो ३०००० अधिक होते. शिवाय निग्रो गुलामांनां त्यांचे गोरे मालक फारच निर्दयपणानें वागवीत असत.

व्यापारबंदीची चळवळ.—वरील एकंदर हकीगत इंग्लंडमध्यें लोकांच्या कानीं येऊन गुलामपद्धतीचे

भयंकर स्वरूप त्यांच्या लक्षांत येतांच सर्व थोर मनाच्या लोकांचें मत या व्यापाराविरुद्ध बनलें, अशा लोकांत पुढील प्रमुख इंग्रज होतेः-पोप, थॉमसन, सॅव्हेज, कौपर वगैरे कवी, हचेसन, जॉन वेस्ले, व्हिटफील्ड, आडाम स्मिथ, राबर्टसन, डॉ. जॉनसन, पॅले, ग्रेगरी, गिलबर्ट वेकफील्ड वगैरे लेखक व वक्ते. प्रथम १७२९ मध्यें ग्रेटब्रिटनमध्यें गुलामगिरी कायदेशीर आहे की नाहीं हा प्रश्न उपस्थित होऊन यॉर्क व टालबॉट या अटॉर्नी जनरल व सालिसिटर—जनरल कायदेपंडितांनीं आस्तिपक्षीं आणि चीफ जस्टिस होल्ट यांनीं नास्तिपक्षीं मत दिलें होतें. पुढें एक खटला प्रत्यक्ष कोर्टांत चालून १७७२ त सर्व बेंचतर्फे लार्ड मानसफील्ड यांनीं असा निकाल दिला कीं कोणत्याहि गुलामाचें पाऊल ग्रेट ब्रिटनच्या जमीनीला लागलें कीं तो त्या क्षणापासून स्वतंत्र होतो. तिकडे अमेरिकेंत गुलामपद्धतीविरुद्ध चळवळ क्केकर लोकांनीं अगोदर १६७१ पासूनच सुरू केली होती. तिची हळूहळू प्रगति होऊन १६८३ त त्यांनीं वेस्ट इंडीज बेटांतलि नीग्रो गुलामानां स्वतंत्र करण्याकरतां एक निराळी संस्था काढली. अमेरिकेंतल्या पेनसिल्व्हानियन क्केकर लोकांनीं यापेक्षां अगोदर प्रत्यक्ष कामास सुरवात केली होती. त्यांत जॉन वुलमन व अँन्थॉनी बेनेझेट हे प्रमुख होते. १७७४ नंतर या कार्याकरिता इतर अनेक संस्था स्थापन झाल्या. तथापि या चळवळीला प्रथम यश इंग्लंडमध्येंच आलें. १७८६ पासून या विषयावर वाङ्मय प्रसिद्ध होऊं लागलें. थॉमस क्लार्कसननें या विषयावर एक निबंध लिहून बक्षीस मिळविलें व पुढें पुस्तकरूपानें तो निबंध बराच खपला. गुलामांच्या व्यापाराची बंदी करण्याच्या उद्देशानें १७८७ त एक कमेटी स्थापन झाली. तींत विल्यम विलबरफोर्स, जोशिया वेजवूड, बेनेट लँग्टन (डॉ. जानसनचा मित्र), झाकारिया मेकॉले, हेन्री ब्रौघम व जेम्स स्टीफन हे इसम होते. पुढें पार्लमेंटकडे पुष्कळ अर्ज गेल्यामुळे गुलामांचा व्यापार या प्रश्नासंबंधानें चौकशी करण्याकरतां १७८८त प्रीव्हीकौन्सिलची एक कमेटी नेमण्यांत आली व कॉमन्ससभेनें या प्रश्नाचा विचार करावा असा पिटचा ठरावहि पास झाला. पुढें पार्लमेंटच्या कमेटीनें साक्षी पुरावा घेतला व तदनुसार १७९१ मध्यें वेस्ट इंडीजपैकीं ब्रिटिश बेटांत त्यापुढें गुलाम पाठवूं नये अशा अर्थाचा ठराव पार्लमेंटांत आला. पण १६३ विरुद्ध ८८ मतांनीं नापास झाला. १७९२ पासून सालोसाल विलबरफोर्स व त्याच्या इतर मित्रांनीं गुलामांचा व्यापार बंद व्हावा अशा अर्थाचे ठराव पार्लमेंटपुढें मांडले. पण ते कॉमन्ससभेंत किंवा लॉर्डांच्या सभेंत नापास होत गेले. अखेर १८०६ मध्यें लॉर्ड ग्रेनव्हिल व फॉक्स यांचें प्रधानमंडळ असतां बंदीचे ठराव पुढें येऊन अखेर १८०७ मध्यें असा ठराव पास झाला कीं, ब्रिटिश मुलुखांतल्या कोणत्याहि बंदरांतून १ मे १८०७ नंतर गुलाम नेण्याकरितां एकहि जहाज बाहेर जाऊं नये व ब्रिटिश वसाहतींत तारीख १ मार्च १८०८ नंतर कोणीहि गुलाम नेऊन उतरूं नयेत. हा कायदा मोडणारास फक्त दंडच ठेवलेला असल्यामुळें १८०७ च्या बंदीच्या कायद्यानंतरहि गुप्तपणें व्यापार चालू होता. त्याचा बंदोबस्त करण्याकरिता १८११ मध्यें गुलामांचा व्यापार करणें हा मोठा गुन्हा ठरवून त्याला हद्दपारीची शिक्षा ठेवण्यांत आली. या कायद्यामुळें सदरहू बंदी नीट अमलांत आली.

फ्रान्स—सेंट डॉमिंगो या फ्रेंच वसाहतींत १७९१ सालीं ४,८०,००० काळे नीग्रो, २४,००० म्युलॅटो (मिश्र) व ३०,००० गोरे लोक होते. १७८८ मध्यें गुलामांचा व्यापार व गुलामपद्धति पूर्णपणें बंद करण्याचा प्रयत्न करण्याकरितां काँडॉर्सेटच्या अध्यक्षतेखालीं एक सोसायटी स्थापन झाली. तिला मिराबोची सहानुभूति होती. पण त्यांचे प्रयत्न इंग्लंडांतल्याप्रमाणें धार्मिक दृष्टीचे नसून भूतदयेनें प्रेरित होते. तथापि १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या फ्रेंच सरकारनें व कायदे मंडळानें सेंट डॉमिंगो येथील गोऱ्या वसाहतवाल्यांच्या असंतोषास भिऊन गुलामांचा पक्ष घेण्याचें नाकारलें. तेव्हां तेथें म्युलॅटो व नीग्रो लोकांनीं मिळून बंड केलें. तेव्हां फ्रान्समधून कमिशनर पाठविण्यांत आले. त्यांचे तेथील गव्हर्नराशीं भांडण होऊन त्यांनीं नीग्रो लोकांच्या मदतीनें फ्रांकॉय शहरांतील रहिवाशांवर हल्ला करून त्यांची जाळपोळ व कत्तल केली, तेव्हां गोऱ्या वसातहवाल्यांनीं ब्रिटिशांची मदत घेतली. पण फ्रेंच रिपब्लिकन सरकारच्या सैन्यानें नीग्रो लोकांच्या मदतीनें ब्रिटिशांनां हांकून लाविलें व गुलामपद्धति पूर्णपणें बंद केली. पण पुढें बोनापार्टनें गोऱ्या वसाहतवाल्यांतर्फे नीग्रोनां जिंकण्याकरतां सैन्य पाठविलें; पण नीग्रोंनीं त्याचा पराभव करून तें हांकून लाविलें व आपलें राज्य स्थापन केलें. पुढें बोर्बोन राजांनीं तें बेट जिंकण्याचा व तेथें गुलामपद्धति सुरू करण्याचा प्रयत्न केला पण त्यांनां यश न येतां हें बेट इ. स. १८२५ पासून पूर्णपणें स्वतंत्र राहिलें आहे.

गुलामांनां स्वातंत्र्य देण्याची चळवळ.—गुलामांचा व्यापार बंद करण्याचा पहिला मान इंग्लंडला नसून डेन्मार्कला आहे. १६ मे १७९२ रोजीं निघालेल्या राजाच्या हुकुमानें डॅनिश वसाहतींत १८०२ पासून या व्यापाराला पूर्ण बंदी करण्यांत आली. पोर्तुगॉलनें १८१५ पासून बंदीच्या कायद्यास आरंभ करून १८२० मध्यें या व्यापारास पूर्ण बंदी केली. डच लोकांनीं हा व्यापार १८१४ त बंद केला, व स्वीडिश लोकांनीं १८१३ तच बंद केला होता. दक्षिण अमेरिकेंतले ला प्लाटा, व्हेनेझुएला, व चिली या देशांनीं स्वतंत्र होतांच हा व्यापार बंद केला. याप्रमाणें व्यापार बहुतेक बंद झाल्यावर गुलामगिरींत तत्पूर्वीपासून खितपत

असलेल्या नीग्रोंना स्वतंत्र करून गुलामपद्धति व अजीबात नष्ट करण्याचे उद्योग सुरू झाले. व्यापार बंद होऊन नवीन पुरवठा बंद झाल्यामुळें पूर्वीच्या गुलामाकडून मालक प्रमाणाबाहेर अतिशय काम घेऊं लागले व त्यामुळें गुलामांची मृत्युसंख्या फार वाढली. वेस्ट इंडीजमध्यें १८०७ सालीं ८,००,००० संख्या होती ती १८३० मध्यें ७००००० उरली. या सर्व गोष्टींना उपाय म्हणजे गुलामगिरींतून सर्वांची मुक्तता करणें हाच होय हें स्पष्ट दिसूं लागलें. तेव्हां या दिशेनें चळवळ विलबरफोर्स व बक्स्टन यांनींच सुरू केली. "गुलामाचे हाल दूर करण्याच्या योजना ब्रिटिश वसाहतींनीं आपापल्या कायदेमंडळामार्फत अमलांत आणाव्या अशी ब्रिटिश पार्लमेंटची शिफारस आहे." इतकाच कॅनिंगचा ठराव पास झाला. पण त्यामुळें गुलामांचा गैरसमज होऊन त्यांनीं मालकांचीं कामें करण्याचें एकदम नाकारलें. तेव्हां उभयपक्षात मारामाऱ्या होऊन लष्करी कायदा लागू करावा लागला व मोठे कडक उपाय योजून गुलामांची बंडें मोडण्यांत आलीं. तेव्हां काहीं वर्षें हा प्रश्न मागें पडून पुन्हां १८३३ मध्यें अर्ल ग्रेच्या प्रधानमंडळानें दृढनिश्चयानें गुलामांनां स्वातंत्र्य देण्याचा कायदा पास केला व मालकांना नुकसानभरपाई देण्याकरतां म्हणून२कोटी पौंड मंजूर केले पण स्वातंत्र्यप्राप्तीची तयारी म्हणून सात वर्षे गुलामांनीं मालकाची नोकरी दिवसाचे ३/४ तास करावी व त्याचा मोबदला मालकांनीं त्यांना अन्नवस्त्र द्यावें असें ठरवण्यांत आलें. सहा वर्षांच्या आंतील मुलें मात्र स्वतंत्र ठरवून त्यानां धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली. तथापि ब्रिटिश कामन्स सभेला ही सात वर्षांचीहि मुदत पसंत नव्हती. सबब तडजोड होऊन १८४० ऐवजी १८३८ मध्येंच सर्व गुलामांनां स्वातंत्र्य देण्यांत आलें. इंग्लंडचें उदाहरण पाहून फ्रान्सनें १८४८ सालीं, पोर्तुगालनें १८५८ सालीं व डच लोकांनीं १८६३ सालीं गुलामांनां दास्यांतून मुक्त करून स्वतंत्र केलें. मेक्सिकोनें तत्पूर्वीच १८२९ सालीं गुलामानां स्वातंत्र्य दिलें होतें. आयर्सनें त्याच्याहि पूर्वी कायदा करून ३१ जून १८१३ नंतर जन्मलेल्या गुलामांच्या सर्व मुलांनां स्वतंत्र समजण्याचें ठरविलें व कोलंबियामध्यें १६ जुलै १८२१ नंतर जन्मलेल्या सर्वांनां वयांत आल्यापासून म्हणजे अठराव्या वर्षापासून स्वतंत्र समजण्याचा कायदा पास झाला होता. यानंतर गुलामपद्धति चालू असलेले महत्त्वाचे देश तीनच उरले, ते दक्षिण युनायटेड स्टेटस, क्युबा व ब्राझिल हे होत.

युनायटेड स्टेट्स.—अमेरिकेंतील संस्थानांचें स्वतंत्र संयुक्त राष्ट्र बनवविणारे थोर थोर पुरुष यांनां गुलामपद्धति मान्य नव्हती. वॉशिंग्टननें आपल्या मृत्युपत्रांत स्वतःच्या गुलामांनां स्वातंत्र्य देण्याबद्दल लिहून ठेविलें होतें. जॉन अॅडाम्सनें गुलामपद्धति पूर्ण बंद करण्याची योजना अमलांत यावी असें जाहीर मत दिलें होतें. फ्रांक्लीन, मॅडिसन, हॅमिल्टन, पॅट्रिक हेनरी या सर्वांनीं गुलामपद्धतीचा निषेधच केलेला होता. जेर्सननें युनायटेडस्टेट्सच्या राज्यपद्धतीसंबंधानें जी लेखी योजना तयार केली तींत गुलामपद्धति बंद व्हावी असें स्पष्ट वाक्य घातलें होतें. या मतौघास अनुसरून १८०४ च्या सुमारास युनायटेड स्टेट्समधील उत्तरेकडील संस्थानांत व्यक्तिशः गुलामपद्धति बंद करण्याचे कायदे पास झाले होते. पण त्यांचा परिणाम एवढाच झाला कीं, उत्तरेकडील संस्थानांतल्या मालकांनीं दक्षिणेकडील संस्थानांत नेऊन गुलाम विकले. त्यामुळें गुलामांनां प्रत्यक्ष स्वातंत्र्य मिळालें नाहींच. उलट दक्षिणेकडील संस्थानांत गुलामपद्धति वाढत्या प्रमाणांत चालू होती. सर्व युनायटेड स्टेट्स राष्ट्रांत व्यापाराची बंदी होऊन गुलामांना स्वातंत्र्य मिळावें अशी चळवळ करणारा पहिला इसम बेंजामिन लुंडी (१७८९–१८३९) हा होय. त्याच्या शिवाय विल्यम लॉइड गॅरिसन (१८०५–१८७९), एलिजा पी. लव्हजॉय, वेंडेल फिलिप्स, चार्लस सम्नर, जॉन ब्राऊन हे या कार्यांतले प्रसिद्ध पुरस्कर्ते होते. आर्. डब्ल्यू. इमर्सन, ब्रायंट, लांगफेलो, व्हिटियर व व्हिटमन हे विद्वान ग्रंथकार व कवी यांनीं स्पष्ट शब्दांत सदरहू पद्धतीचा निषेध केलेला होता. उलट पक्षीं त्या पद्धतीच्या पक्षपात्यांनीं निषेधपर मतें प्रसिद्ध होऊं नयेत अशाबद्दल भगीरथ प्रयत्न चालविले होते. दक्षिणेकडील ख्रिस्ती चर्चेंहि या पद्धतीचा पुरस्कार करीत असत. तथापि हळुहळू विरुद्ध मत प्रगत होत चाललें होतें आणि १८५२ च्या सुमारास मिसेस हॅरिएट बीचरस्टौ हिनें लिहिलेल्या 'अंकल टॉम्स केबिन' या कादंबरीनें तर लोकमतांत फारच खळबळ उडवून दिली. तथापि दक्षिणेकडील लोकमत बिलकुल वळेना. तेव्हां लढाई शिवाय या प्रकरणाचा सोक्ष मोक्ष लागत नाहीं असें स्पष्ट दिसूं लागलें. इतक्यांत १८६० मध्यें अब्राहाम लिंकन प्रेसिडेंट निवडून आला. हें पाहून दक्षिणेकडील संस्थानांनीं स्वातंत्र्यप्राप्तीच्या युद्धाचें रणशिंग फुंकलें व उत्तरेकडील संस्थानांनीं दुफळी न होतां एकी कायम राहावी अशा हेतूनें शस्त्रें उचललीं. तथापि युद्धाचा मुख्य हेतु गुलामपद्धतीचें अस्तित्व चालू ठेवणें किंवा बंद करणें हा होता. १८६५ च्या एप्रिल ९ रोजीं आपोमाटॉक्स येथें दक्षिणेचें सैन्य शरण येऊन युद्धाचा निकाल लागला. काँग्रेसनें तत्पूर्वी १८६२ मध्यें कायद्यानें गुलामानां स्वातंत्र्य देण्याचें जाहीर केलेंच होतें. त्याचा अम्मल १८६३ पासून सुरू होऊन युद्ध संपतांच १८६५ डिसेंबर पासून सर्व युनायटेड स्टेट्स देशांत गुलामपद्धतीला कायमची मूठमाती मिळाली.

क्यूबा व ब्राझिल.—क्यूबा या स्पॅनिश वसाहतींत १७८९ मध्यें पास झालेल्या कायद्यानें गुलामांनां पुष्कळ सवलती दिलेल्या होत्या. परंतु त्याचा प्रत्यक्ष अम्मल न होतां उलट गुलामांचा व्यापार वाढत होता. जेथें १७९२मध्यें ८४,००० गुलाम होते ती संख्या १८४३ मध्यें ४,३६,००० वर गेली. अखेर १८७० मध्यें स्पॅनिश कायदे

मंडळानें गुलामांनां स्वातंत्र्य देण्याचा कायदा केला व तो हळूहळू अमलांत येऊन १८८५ च्या सुमारास सर्व गुलाम स्वतंत्र झाले. ब्राझिलच्या बादशहानें १८८० त गुलामांचा व्यापार बंद करण्याबद्दल हुकूम सोडला.तथापि चोरून व्यापार चालू राहून कित्येक वर्षे दरसाल ३४,००० गुलाम देशांत बाहेरून येत होते. १८५० मध्यें व्यापार पूर्ण बंद पडला. पण त्यामुळें तत्पूर्वीच्या गुलमांवर कामाचा बोजा फार पडून त्यांचे हाल वाढले. कारण पूर्वीचे घरकाम करणारे गुलाम शेतकामाला लावण्यांत आले. तथापि युनायटेड स्टेट्सच्या मानानें ब्राझिलमध्यें गुलामांवर जुलूम कमीच होत असे. अखेर १८७० मध्यें ब्राझिलच्या कायदेमंडळानें गुलामांना स्वातंत्र्य देण्याचा कायदा केला. तो हळूहळू अमलांत येऊन १८८८ मध्यें सर्व गुलाम पूर्णपणें स्वतंत्र करण्यात आले.

मुसुलमानी देश—मुसुलमानी देशात गुलामपद्धति आहे. पण ते गुलाम शेतकामाकरितां नसून घरकामाकरितां असतात. अर्थात् त्यांनां साधारणपणें कुटुंबांतल्या माणसाप्रमाणें समजून दयाळूपणानें व प्रेमानेंहि वागवितात. इराणमध्यें गुलामांनां इतकें चांगल्या तऱ्हेनें वागवितात कीं त्यांस स्वतंत्रता देणें हीच शिक्षा वाटते असें विल्स म्हणतो (इन दि लँड ऑफ दि लायन अँड सन). खुद्द कुराणामध्यें गुलामांनां इतक्या चांगल्या तऱ्हेनें वागवण्याबद्दल आज्ञा असून शिवाय त्यांना स्वतंत्र करावें अशीहि शिफारस केलेली आहे. गुलाम स्त्रीला झालेलें मूल स्वतंत्र दर्जाचें मानतात व त्या स्त्रीलाहि गुलामगिरींतून सोडवून स्वातंत्र्य देतात. तुर्कस्तानच्या बादशाहानें स्वतःच्या राज्यांत गुलामाचा व्यापार करणें हें बेकायदेशीर आहे असें पुनः पुनः जाहीर केलें व १८८९ मध्यें व्यापारबंदीचा कायदाहि केला. पण सरकारी नोकराच्या सामिलीमुळें व्यापार पूर्ण बंद होऊं शकला नाहीं. ईजिप्तमध्यें मात्र तो पूर्णपणें बंद झाला आहे.

रशियातील कृषिदासपद्धतिः—गुलामगिरीची पद्धति मोडून जिला सर्फडम उर्फ कृषिदासपद्धति म्हणतात ती रशिया मध्यें सुरू होऊन ती जवळ जवळ १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू होती. आरंभीं रशियांत शेतकाम करणारे (१) गुलाम, (२) शेतमजूर व (३) शेतकरी असे तीन वर्ग होते; परंतु पुढें १८ व्या शतकाच्या सुमारास वरील तिन्ही वर्गांचें रूपांतर कृषिदासांमध्यें झालें. हे लोक जमीनीच्या मालकांपासून जमीनी खंडानें कायमच्या पत्करून राहूं लागले. या कृषिदासानां जमिनी सोडून देण्याची परवानगी नसे इतकेंच नव्हे तर जनावराप्रमाणें हे दास मालकांना विकतांहि येत असत. पीटर दि ग्रेटनें या दासांवर डोईपट्टी बसविली होती व तिच्या वसुलीबद्दल जमीनदार हे जबाबदार असत. दुसऱ्या कॅथराईनच्या कारकीर्दीत ही पद्धति पूर्णावस्थेप्रत पोहोंचली. त्यावेळीं हे दास जमीनींबरोबर किंवा स्वतंत्रपणें विक्रीत असत, बक्षीस देत असत व कोणी बंडखोरपणा केल्यास त्याला दूर हद्दपार करीत किंवा आजन्म खाणींमध्यें कामास लावीत. पुढें पॉलच्या कारकीर्दींत (१७९६–१८०१) त्यांच्या मुक्ततेच्या चळवळीस सुरवात झाली दुसऱ्या अलेक्झांडरच्या कारकीर्दीत दासांना स्वातंत्र्य देण्यासंबंधानें सूचना करण्याकरतां एक कमेटी नेमिली गेली;व तिच्या सूचनांनुसार जमिनदारांचा विरोध असतांनाहि दासांनां स्वातंत्र्य देण्याचा कायदा ता. ३ मार्च १८६१रोजीं करण्यांत आला. यावेळीं दासांची एकंदर संख्या २,१६,२५,६०९ होती. याशिवाय सरकारी कामकाजाकरितां व राजघराण्यामध्यें मिळून दोन कोटींपर्यंत दास होते. वरील कायद्यानें या सर्वांनां म्हणजे चार कोटी दासांनां स्वतंत्र करण्यांत आलें.

आफ्रिका.—अमेरिकेमधील वसाहतींच्याकडे पाठविण्यांत येणारे निग्रो गुलाम मुख्यतः आफ्रिकेंतल्या कालाबार व बॉनी या दोन नद्यांच्या मुखाजवळील बंदरांतून जात असत. या बंदरांतून जाणाऱ्या गुलामांची संख्या आफ्रिकेच्या इतर सर्व भागांतून जाणाऱ्या गुलामांच्या संख्येच्या इतकी असे. ईजिप्त, तुर्कस्तान, अरबस्तान व इराण इकडे पाठविण्यांत येणारे गुलाम (१) मध्य सुदान, (२) अपर नाईल नदीचा मोठाल्या सरोवरापर्यंतचा प्रदेश, आणि (३) पोर्तुगीज ईस्ट आफ्रिका या तीन भागांतले असत. मध्य सुदानमधून दरसाल ४००० गुलाम जात असत व त्याबद्दल तेथील सुलतानाला सालीना जकातीचें उत्पन्न ४८०० पौंड होत असे. अलीकडे पश्चिम सुदानवर फ्रेंचांचा अम्मल सुरू झाल्यापासून या भागांतून होणारा गुलामांचा पुरवठा फार कमी झाला आहे.तथापि सुदानच्या सुलतानाच्या साम्राज्यांत गुलामपद्धति अद्याप चालूं आहेच. अपर नाईल नदीच्या प्रदेशांतून चालणारा गुलामांचा व्यापार बंद करण्याचें काम खदीव इस्मायलनें १८६९ पासून सर सॅम्युअल बेकरला व त्याच्यानंतर १८७४–७९ पर्यंत कर्नल सी. जी. गॉर्डन यास सांगितलें होतें. तथापि माहादी व खलीफा या सुलतानांच्या कारकीर्दींत तो व्यापार पूर्ववत् सुरू झाला. परंतु पुढें पूर्व सुदान अँग्लोईजिप्शियन सैन्यानें काबीज केल्यावर हा व्यापार कमी होऊं लागून अखेर १९१० च्या सुमारास मध्य सुदान फ्रेंचांच्या पूर्णपणें ताब्यांत आल्यावर हा व्यापार अगदीं बंद झाला. मादागास्कर व कोमोरो बेटांना होणारा गुलामांचा बहुतेक पुरवठा पोर्तुगीज ईस्ट आफ्रिकेंतून होत असे. शिवाय न्यासा सरोवराच्या प्रदेशांत सांपडणारे गुलाम झांझिबार बंदरांतून जात असत. पुढें झांझिबारला ब्रिटिश प्रोटेक्टरेट स्थापन झाल्यावर आणि बहुतेक पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील प्रदेश, ब्रिटिश, जर्मन व पोर्तुगीज यांच्या ताब्यांत आल्यावर गुलामांचा व्यापार बंद पडला व या यूरोपीय लोकाच्या ताब्यांतील प्रदेशांत गुलामांनां स्वातंत्र्यहि देण्यांत आलें.

कांगो नदीच्या कांठीं बेल्जमच्या दुसऱ्या लिओपोल्ड राजानें कांगोफ्रीस्टेट नांवाचें राज्य स्थापल्यावर तेथून व इतर देशी संस्थानांतून गुलाम पकडून रवाना करण्या

व्यापार पुष्कळ चालू होता. पण पुढें आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर ब्रिटिश, जर्मन व फ्रेंच यांचीं प्रोटेक्टरेट राज्यें स्थापन झाल्यावर व्यापार कमी होत जाऊन १९१० च्या सुमारास तो पूर्णपणें बंद झाला.

गुलामांचा व्यापार व गुलामपद्धति बंद करण्याच्या बाबतींत प्रयत्न करणारांपैकीं क्लार्क्सन व बक्स्टन हे प्रमुख होत. यांना व या बाबतींत प्रयत्न करणाऱ्या इतर सद्गृहस्थांनां हें पूर्णपणें कळून चुकलें होतें कीं, गुलामांचा व्यापार व गुलामगिरी बंद पडण्यास निग्रो लोकांत शिक्षण, उद्योगधंदे व व्यापार यांचा प्रसार करणें हा रामबाण उपाय होय. सिरिया लिओन व लायबेरिया या मार्फत सदरहू कार्याला चांगला आरंभ होईल असें एकदां वाटत होतें. परंतु अद्यापहि या दिशेनें चांगला उपक्रम कोठेंहि झालेला नाहीं.

गु ला म प द्ध ती चा प्र च्छ न्न अ व ता र.—यूरोपांतील अनेक देशांच्या वसाहतींत गुलामांचा व्यापार बंद करण्यांत आल्यावर त्याऐवजीं मागासलेल्या मानवजातींतील लोकांनां मोठमोठ्या मुदतीच्या करारावर मजूर म्हणून आणण्याची पद्धति सुरू झाली. या मुदतबंदी मजुरपद्धतीला हळुहळु इतकें क्रूर स्वरूप प्राप्त झालें कीं गुलामपद्धतीचा हा नवा अवतारच आहे असें म्हणण्याची पाळी आली. १८६७ च्या सुमारास दक्षिण महासागरांतील बेटांमध्यें, न्यू कॅलेडोनिया व फिजी बेटांमध्यें प्रथम या पद्धतीला सुरवात झाली. वास्तविक या मजुरांबरोबर कायदेशीर करार करून त्यांनां नेत असत, परंतु मजूर पुरविणाऱ्या व्यापारी कंपन्यांच्या लबाड्या व अत्याचारांमुळें या पद्धतीला पुढें गुलामपद्धतीचेंच हिडिस स्वरूप प्राप्त झालें. मजुरांनां कराराच्या अटी सर्व नीट समजाऊन सांगण्यांत येत नसत व कायदेशीर मुदतीपेक्षांहि अधिक मुदतीपर्यंत त्यांनां करारानें बद्ध करून घेत असत. याविषयीची संपूर्ण माहिती स्वतंत्र लेखांत दिली आहे.

[वाङ्मय.—याविषयावर वाङ्मय सपाटून आहे. थोडक्याच पुस्तकांचा उल्लेख येथें करतां येईल. भारतीय दास्यस्थितीसाठीं वेद, महाभारत, धर्मशास्त्रें व प्रवासवर्णनें हीं पाहिलीं पाहिजेत. यावर पद्धतशीर पुस्तक नाहीं. ग्रीसमधील गुलामगिरीवर ए. काल्डेरिनी यांचें पुस्तक आहे (मिलान १९०८). रोमन गुलामगिरीच्या कायद्यावर बक्लंड यांचें (केंब्रिज १९०९) पुस्तक चांगलें आहे. यूरोपांतील मध्ययुगीन गुलामगिरीवर द्वीपकल्पीय ग्रंथकार पुष्कळ आहेत पण इंग्रजी ग्रंथ चांगले नाहींत. तरी "स्टब्स" चें कान्स्टिट्यूशनल हिस्ट्री ऑफ इंग्लंड, हें पुस्तक वाचावें. अमेरिकन गुलामगिरीवर एच् विल्सनचें हिस्ट्री ऑफ दि राईझ ॲंड फॉल आफ दि स्लेव पावर इन् अमेरिका (बोस्टन १८७२); ड्यू बाईस-सप्रेशन ऑफ दि आफ्रिकन स्लेव्हट्रेड टु दि युनायटेड स्टेट्स (न्यूयार्क १८९६); ड्यू बाईस हा निग्रो थकार आहे.]

गुलाम घराणें (१२०६–१२८८)—तेराव्या शतकाच्या सुरुवातीपासून बाबरनें हिंदुस्थानावर स्वारी केली, तोंपर्यंतच्या काळामध्यें दिल्लीच्या तक्तावर एकंदर चौतीस मुसुलमानी राजे बसले. त्यांपैकीं महंमद घोरीचा वजीर ऐबक हा पहिला होय. हे चौतीस राजे पांच निरनिराळ्या घराण्यांपैकीं होते. त्यांपैकीं गुलाम घराण्यानें दिल्ली येथें राज्य केलें. इ. स. १२०६ पासून १२८८ पर्यंत या घराण्यांत एकंदर दहा सुलतान होऊन गेले. त्यांपैकीं कुत्बुद्दिन ऐबक, अल्तमश व बल्बन हे विशेष प्रसिद्ध आहेत.

ऐ ब क.—कुत्बुद्दिन हा गुलाम घराण्याचा संस्थापक होय. याचें चरित्र ज्ञानकोशाच्या अकराव्या भागांत (पृ. ५४७)आलें आहे तेथें तें पहावें. त्याचा हातांचें बोट तुटलेलें असल्यामुळें त्याला ऐबक म्हणजे हातानें अधू असें नांव पडलें. कुत्बुद्दीन न्यायी असला तरी हिंदूवर त्याची वक्रदृष्टीच होती. हिंदूंचीं देवळें पाडून तेथील दगडांनीं त्यानें मशीदी बांधिल्या होत्या.

अ ल्त म श.–ऐबकानंतर पावल्यावर त्याचा आराम नांवाचा पुत्र गादीवर बसला; परंतु राज्यकारभार करण्यास तो नालायक असल्यामुळें सर्वत्र अस्वस्थता व गोंधळ उडून गेला. कुबाचा नांवाच्या सरदारानें सिंधू व मुलतान आणि बखत्यार खिलजीनें बंगाल व बहार हे प्रांत बळकाविले व एल्डोज सरदाराचा डोळा लाहोरवर होता. अशा स्थितींत कुत्बुद्दीनचा जांवई अल्तमश यानें दरबारी मंडळीच्या साह्यानें आरामचा पराभव करून तख्त बळकाविलें. अल्तमश हाहि गुलाम होता. परंतु त्याच्या धन्यानें त्यास उत्तम शिक्षण देऊन कुत्बुद्दीनला विकलें होतें. हळू हळू तो कुत्–बुद्दीनला इतका प्रिय झाला होता कीं, त्यानें यास आपली मुलगी दिली होती. अल्तमशनें सिंधवर स्वारी करून कुबाचाचा पराभव करून त्याचा मुलुख पादाक्रांत केला. इ. स. १२२६ त त्यानें माळवा प्रांतावर स्वारी करून १२३१ त ग्वालेरचा किल्ला व उज्जनी घेऊन तेथील देवालयांचा नाश करून बहुतेक उत्तरहिंदुस्थान आपल्या अंमलाखालीं आणिलें. नंतर त्यानें बगदादच्या खलीफाकडून स्वतःसाठीं बादशाही वस्त्रें मिळविलीं. पुढें तो १२३६ त मरण पावला. अल्तमश हा मूळ थोर घराण्यांतील होता; तो हुषार, देखणा व बुद्धिमान असल्यामुळें द्वेषबुद्धीनें त्याच्या भावांनीं त्यास गुलाम म्हणून विकलें होतें अल्तमशनेंच प्रथमतः अरबी नाणीं हिंदुस्थानांत सुरू केलीं. व टंका (रुपायाच्या तोडीचें एक नाणें) हें चांदीचें नाणें पाडिलें. या नाण्याचें वजन १७५ ग्रेन होतें.

र झि या.–अल्तमशचे पुत्र दुर्बल व व्यसनी असल्यामुळें त्याच्या नंतर दहावर्षें राज्यांत सर्वत्र दंगेधोपे चालू होते. अल्तमशचा वडील पुत्र रुक्न उद्दीन यानें तख्त बळकाविलें, परंतु तो अत्यंत व्यसनी असल्यामुळें दरबारचे लोक त्याचा कंटाळा करूं लागले. त्याची बहीण रझिया हिला राज्यकारभार देण्याचें ठरवून रुक्न उद्दीन यास त्यांनीं कैदेंत

टाकिलें. रझिया इनें सुलतान रझिया-वुद्दीन (धर्मभक्त) असा स्वतःस किताब धारण केला. ती पराक्रमी असून आपल्या बापाची लाडकी होती. बापाच्या गैरहजीरींत ती सर्व कारभार पाहत असे. राज्यकारभार करण्यास लागणारे बहुतेक सर्व गुण तिच्या अंगीं होते. तिलाच गादी मिळावी अशी अल्तमशचीहि इच्छा होती. प्रत्येक काम ती स्वतः पाही. पूर्वींच्या वाईट चाली बंद करून तिनें कायद्यांची दुरुस्ती केली. परंतु स्त्रीनें राज्य करावें ही कल्पनाच त्यावेळीं पसंत नसल्यामुळें लोकांचें समाधान झालें नाहीं. निझामउल्मुल्क जुनैदी या वजीरानें तिचा अधिकार मान्य केला नाहीं. मलिक जानी, कोची, कबीर खान वगैरे सरदारांच्या मदतीनें त्यानें रझियाच्या विरुद्ध बंड केलें; परंतु तें रझियानें मोडून टाकिलें. अमीर जमलुद्दीन याकूत नांवाच्या हबशी गुलामावर तिचें प्रेम बसून त्याला तिनें आपला मुख्य कारभारी नेमिलें होतें. परंतु या कृत्यानें व ती नेहमी पुरुषवेष धारण करी यामुळें तुर्क सरदारांचीं मनें तिच्या विरुद्ध कलुषित झालीं. त्यामुळें लाहोरच्या सुभेदारानें बंड केलें. परंतु तिनें तें तत्काळ मोडलें. इतक्यांत पुन्हां (१२४०) तबरहिंदचा सुभेदार मलिक अल्तुनिया यानेंहि बंड केलें व त्याला अनेक सरदारांनीं मदत केली. हें बंड मोडण्यासाठीं ती स्वतः गेली असतां तुर्क सरदारांनीं तिच्यावर हल्ला करून अमीर याकूत या हबशाला ठार केलें व रझियाला पकडून कैदेंत टाकिलें. कांहीं दिवसांनीं या अल्तुनियाशींच तिनें लग्न लाविलें. तेव्हां या दोघांविरुद्ध इतर सरदारांनीं लढाई करून त्यांनां ठार मारिलें. राज्यकारभार करण्याचें चातुर्य तिच्या अंगीं होतें, परंतु स्त्रीनें राज्य करावें ही कल्पनाच तुर्क लोकांस आवडली नाहीं. आजपर्यंत फक्त तीन स्त्रियांनीं मुसुलमानी अमदानींत राज्य केलें. एक ही रझिया, दुसरी ईजिप्तची राणी शजारुद्दर व तिसरी इराणची राणी आबिश. रझियाचा भाऊ मोइझ-उद्दीन बहराम हा तिजविरुद्ध लढत होता. पुढें त्यासच राज्यपद मिळालें.

मो इ झ-उ द्दी न ब हा रा म (१२३९--४१):—बहराम राज्यकारभार करण्यास अगदीं नालायक होता. कित्येक लोकांस त्यानें कपटानें ठार केल्यामुळें त्याजविरुद्ध दरबारांत कट झाले. १२४१ त मोंगलांनीं लाहोरावर स्वारी केली असतां बहरामनें यखत्यार-उद्दीन नांवाच्या दिवाणास त्यांच्यावर पाठविलें. मोगलांचें पारिपत्य करून दिल्लीस परत आल्यावर यख्त्यार-उद्दीन यानें बहराम यास पकडून ठार मारिलें. बहराम हा क्रूर व हलकट असून त्याच्या दोन वर्षांच्या कारकीर्दींत जिकडे तिकडे खून, मारामाऱ्या वगैरे गोष्टी चालू होत्या.

अ ल्ला-उ द्दी न-म सा-ऊ द (१२४२-४६).—बहराम नंतर त्याचा पुतण्या मसा-ऊद हा गादीवर आला. याच्या वेळींहि दंगेधोपे चालूच होते. तो क्रूर व चैनी असल्यामुळें राज्यकारभाराकडे त्याचें लक्ष नसे. दरबारच्या लोकांनीं त्यास कैद करून त्याचा चुलता नासिरुद्दीन यास राज्यपद दिलें. मसा-ऊद कैदेंतच मरण पावला. याच्यावेळीं मोंगलांनीं हिंदुस्थानवर दोन स्वाऱ्या केल्या, परंतु दोन्ही वेळां त्यांस माघार घ्यावी लागली.

ना सि रु द्दी न म हं मू द (१२४६-१२६६)—नासिरुद्दीन महंमूद हा अल्तमशचा तिसरा पुत्र होय. याच्या कारकीर्दींत सर्वत्र शांतता नांदत होती. याच्या सावत्र-आईनें यास लहानपणीं बंदींत टाकिलें होतें. पुढें मसा-ऊदनें याची मुक्तता करून त्यास बैराकची सुभेदारी दिली. तें काम त्यानें उत्तम रीतीनें केलें. बंदींत असतां कुराण लिहून तो आपला उदरनिर्वाह करी. तोच धंदा राज्यावर आला असतांहि त्यानें चालविला. त्याची राहणी साधी होती; तो एकपत्नी होता. घरचीं सर्व कामें त्याच्या बायकोस स्वतः करावीं लागत. तो स्वतःस राज्याचा मालक न समजतां रक्षक समजे. स्वतःच्या खर्चाचा भार राज्यावर लादणें योग्य नव्हे अशा समजुतीनें स्वतः श्रम करून तो आपला खर्च चालवी. त्यानें राज्यांत चांगला बंदोबस्त ठेविला; मोंगलांचा बंदोबस्त केला; शेजारचीं लहान लहान स्वतंत्र राज्यें जिंकून आपल्या राज्यास जोडिलीं. उलुघखान उर्फ ग्यासुद्दीन बल्बन यास त्यानें आपला वजीर नेमलें. नासिरुद्दीन इ. स. १२६६ त मरण पावला. तो स्वभावानें शांत होता, परंतु राज्यकारभाराच्या कामीं इतका साधा मनुष्य नालायक असतो.

ब ल्ब न (१२६६-१२८६)-बल्बन हा एका तुर्क सरदाराचा मुलगा होता. परंतु लहानपणींच मोंगलांनीं त्यास पळवून हिंदुस्थानांत गुलाम म्हणून विकलें. अल्तमशनें त्यास विकत घेतलें. प्रथम नाईक, मग शिकारी, नंतर सेनापति व मुत्सद्दी व सरते शेवटीं सुलतान अशा रीतीनें केवल स्वपराक्रमानें व चातुर्यानें तो चढत गेला. रुक्नुद्दीनच्या कारकीर्दींत त्याला कारागृहवासहि भोगावा लागला होता. बहरामच्या वेळीं याला एक लहानशी जाहागीर मिळाली; बहरामच्या विरुद्ध झालेल्या बंडांत याचें अंग असल्यामुळें, तें बंड यशस्वी झाल्यावर हंसीचा राज्यकारभार याच्याकडे आला. १२४३ त याच्याच पराक्रमानें मोंगलांचा पराभव झाला. नासिरुद्दीन गादीवर बसल्यावर खरी सत्ता बल्बनकडेच आली. नासिरुद्दीन निपुत्रिक असल्यामुळें त्याच्या पश्चात् बल्बन यासच राज्य मिळालें. राजा झाल्यावर त्यानें बराच कडकपणा गाजविला. हिंदू लोकांवर त्याची वक्रदृष्टि होती. त्यांनां मोठमोठ्या जागा त्यानें दिल्या नाहींत. मुसुलमानी विद्येस त्यानें चांगलें उत्तेजन दिलें. मद्यपान न करण्याबद्दल त्यानें नियम केले व ते मोडणारास कडक शिक्षा दिल्या. तो डामडौलाचा भोक्ता होता. अल्तमशनंतर झालेले सुलतान कर्तृत्वशून्य निघाल्यामुळें हिंदू लोकांनीं चळवळ सुरू केली होती. परंतु ती बल्बननें दडपून टाकिली. हा हिंदूंचा फार द्वेष्टा होता. नासिरुद्दीनच्या वेळीं प्रत्येक वर्षीं तो हिंदू लोकांवर स्वाऱ्या करी. दरबारी

मंडळीच्या चुगल्यावरून एकदां नासिरुद्दीननें त्याला हद्दपार केलें होतें (१२५३). बल्बन हद्दपार झाल्यावर त्याची जागा रिहन (एक बाटघा हिंदु) यास मिळाली होती, परंतु त्याचा जुलूम लोकांस सहन न होऊन सर्वत्र असंतोष पसरला. तेव्हां दरबाऱ्यांनीं पुन्हां बल्बन यास परत आणवून त्यास पूर्वीचा अधिकार दिला (१२५४). यापुढें त्यानें वीस वर्षें पर्यंत मोंगल लोकांचे हल्ले परतविणें व हिंदु लोकांचीं बंडें मोडणें या दोन महत्वाच्या गोष्टी केल्या. या दोन गोष्टी करतांनां त्यानें पुष्कळ क्रूरपणाचीं कृत्यें केलीं. यावेळीं त्यानें अग्नि व तलवार यांचा प्रळय सुरू केला होता.

बंगाल्यांत तुघ्रलखानाचें बंड.—बंगाल शिरजोर झाल्यामुळें तिकडे बल्बननें तुघ्रलखानास त्याच्या कारभारावर पाठविलें होतें. त्यानें तेथील बंदोबस्त उत्तम केला; परंतु त्यानें स्वतंत्र होण्याचा उद्योग चालविल्यामुळें बल्बननें त्याच्यावर फौज पाठविली; तुघ्रलनें त्या फौजेचा पराभव केल्यामुळें बल्बन स्वतः बंगाल्यांत गेला व त्यानें तुघ्रलखानाचा पराभव करून त्याच्या लोकांची कत्तल केली. या स्वारीस एकंदर तीन वर्षें लागलीं (१२८०–८३).

एकंदरींत बल्बनचें आयुष्य धामधुमींत व युद्धप्रसंगांत गेलें. हा अत्यंत क्रूर व मनुष्यसंहारक होता. दिल्लीच्या आसपास नेहमीं बंडें मोडण्यासाठीं त्यानें एकंदर एक लाख लोक ठार मारिले. त्यामुळें जिकडे तिकडे रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या, प्रत्येक गांवाजवळ प्रेतांचे प्रचंड ढीग जमा झाले. आणि त्याच्या दुर्गंधीनें सर्व प्रदेश व्यापून गेला (सरदेसाई). बंगालच्या स्वारीहून परत आल्यावर, मुलतानावर मोंगलांनीं हल्ला केला होता, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यानें आपला मुलगा महंमूद यास रवाना केलें. महंमूदनें मोंगलांचा मोड करून सर्व मुलूख परत घेतला. परंतु देपाळपूर येथें झालेल्या निकराच्या लढाईंत महंमूद मारला गेला. (१२८५). या बातमीनें बल्बन आजारी पडून लवकरच मरण पावला (१२८६). बल्बन भपकेबाज दरबार भरवून व थाट करून लोकांवर छाप बसवी. लहानपणीं त्यास मद्यप्राशनाचा नाद होता, पण राज्यकारभार हातीं येतांच त्यानें आपले सर्व छंद टाकून दिले. त्यानें शेतीची सुधारणा केली. अनेक देशचे विद्वान गृहस्थ त्याच्या दरबारीं होते.

कैकुबाद(१२८६–१२८८).–आपला नातू कैखुस्रु (महंमदचा पुत्र) यानें आपल्या पश्चात गादीवर बसावें असें बल्बननें ठरविलें होतें. परंतु तें न जुमानतां त्याचा दुसरा मुलगा बोगराखान (बंगालचा सुभेदार) याच्या कैकुबाद नांवाच्या मुलासच दरबारी लोकांनीं गादीवर बसविलें. तो प्रथम सौम्य होता. परंतु हातांत अधिकार आल्याबरोबर तो विलासी बनून आपला सर्व वेळ चैनींत घालवूं लागला. त्यानें निजाम उद्दीन नांवाच्या सरदारास वजीर नेमून सर्व सत्ता त्याच्या हातीं दिली. स्वतःच राज्य बळकवावें अशी निजामाची इच्छा होती. कैखुस्रूनें राज्य घेण्याची खटपट चालविली असतां त्याचा पराभव करून निजामानें त्यास ठार मारिलें व सर्व जुन्या कामगारांस काढून टाकिलें; बोगराखाननें स्वतः आपल्या मुलास (कैकुबादास) उपदेशपर पत्रें पाठवून निजामानें राज्यावर काय काय संकटें आणलीं आहेत, त्याची जाणीव करून दिली. शेवटीं बोगराखान स्वतः दिल्लीस आल्यामुळें निजामाचें कपट बाहेर आलें; यामुळें निजामानें आत्महत्या केली. पुढें कैकुबाद व्यसनाधीन झाल्यामुळें आजारी पडला. त्यावेळीं खिलजी व मोंगल असे दोन पक्ष दरबारांत प्रबळ झाले. या दोन पक्षांचे तंटे विकोपास जाऊन जलालुद्दीन खिलजीनें कैकुबादचा व त्याच्या मुलाचा खून करून दिल्लीचें राज्य स्वतः बळकाविलें. अशा प्रकारें गुलामवंशाचा शेवट झाला (इ. सन १२८८.) आज गुलाम या शब्दास वाईट स्वरूप आलें आहे; परंतु त्यावेळीं तें तसें नव्हतें. लढाईंत पकडून आणलेल्या लोकांचा भरणा या गुलामांत होत असे. मुसुलमानी धर्म व राज्य यांच्या प्रसारास या गुलामांचा विशेष उपयोग झाला. तुर्क व अफगाणांच्या वेळीं गुलामांची ही संस्था नांवलैकिक मिळविण्याची एक शाळाच बनली होती. कित्येक सुलतानांचें प्रेम या गुलामांवर विशेष असे. महंमद घोरी व कुत्बुद्दीन हे स्वतःच्या मुलांपेक्षांहि आपल्या गुलामांवर अधिक प्रेम करीत. त्यावेळीं गुलामगिरी म्हणजे पराक्रमाची शाळा असे. येथून निभावून बाहेर येण्यास अंगीं योग्यताच लागे. महंमद घोरीचे एल्डोझ, कुबाचा, बखत्यार खिलजी व कुत्बुद्दीन हे चार मुख्य सरदार मूळचे गुलामच होते. गुलामगिरीचा जो निंद्य अर्थ पाश्चात्य लोकांत आहे तो तत्कालीन पूर्वेकडच्या मुसुलमानी अमदानींत नव्हता. (सरदेसाई). [लेनपूल कृत मिडिव्हल इंडिया; विल्यम जॅक्सन—महामेडन पीरियड पु. ५; सरदेसाई–मुसुलमानी रियासत].

गुलाल—गुलाल ही एक तांबूस किंवा अबाशाई रंगाची पूड असून तिचा उपयोग हिंदु लोकांत लग्नकार्याच्या वेळीं, होळी सणांत व इतर उत्सव व मंगलप्रसंगीं करतात. गुलाल तयार करण्यास तांदुळाचें अगर शिरगोळ्याचें पीठ लागतें खडीपासून मध्यम प्रतीचा गुलाल होतो व शाडूपासून केलेला गुलाल अगदी कनिष्ठ प्रतीचा समजला जातो.

गुलाल करण्याच्या कृती.—प्रथम खडी, शिरगोळे वगैरे ज्या जिनसांचा गुलाल करणें असेल ते जिन्नस मुसळानें कुटून बारीक करतात. नंतर मोठ्या जात्यानें दळून त्यांचें पीठ करतात. तसेंच हलक्या जातीचे तांदूळ दळून त्यांचेंहि पीठ करतात. नंतर तांबड्या रंगाचें दाट पाणी करून त्यांत तें पीठ भिजवितात व एक दोन दिवस तें तसेंच भिजूं देतात. चांगलें वाळल्यावर त्याची पूड करून ठेवतात. बाजारांत खारव्या रंगाचे डबे मिळतात तो रंग गुलाल तयार करतांना वापरल्यास त्यापासून उत्तम गुलाल होतो. तांदुळांचा गुलाल केल्यास महाग पडतो म्हणून खडी वगैरे

इतर पदार्थच उपयोगांत आणतात. म्हणजे गुलाल स्वस्त घावयास सांपडतो.

गुलावथी-संयुक्तप्रांतामध्यें बुलंदशहर तालुक्यांतलें शहर. उत्तरअक्षांश २८°३५' व पूर्वरेखांश ७७°४८'. वस्ती (१९११) ६०२७. मुख्य वस्ती सय्यद व बनिया लोकांची. मिहिरबान अली नांवाच्या एका सय्यदानें शहर सुधारण्याकरतां बरीच खटपट केली व बराच पैसाहि खर्च केला, व शाळा उघडली.

गुल्म, नि दा न.- गुल्म म्हणजे आमाशयापासून गुदद्वारापर्यंत हाताच्या स्पर्शानें समजणारी गांठ. संस्कृत भाषेत गुल्म शब्दाचा अर्थ शेंड्याकडे विस्तार असलेल्या लहान लहान झाडाचा एकवट दिसणारा समुदाय असा आहे. यासच जाळी असें मराठींत नांव आहे. या अर्थावरून पोटांत दोषामुळें अशीच जी जाळी बनते तीस गुल्म नांव दिलें आहे. ही वरून हाताला गांठीसारखी लागते म्हणून हिला गांठ असें म्हटलें आहे. परंतु शरीरांत इतर ठिकाणीं म्हणजे गळ्याला वगैरे ज्या गांठी होतात त्यांत आणि या गांठींत फरक आहे. तो असाः—शरीरांत इतर ठिकाणीं झालेल्या गांठी पिकतात, गुल्म पिकत नाहीं. इतर गांठी बहुतेक मांस, व मेद यांच्या बनतात. गुल्म दोषांनीं व रक्तधातु यानेंच बनतो.

ह्या गुल्म संज्ञक गाठी आंतड्याच्या आंतल्या भागांतच प्रायः होतात परंतु कित्येकवेळां आंतड्याच्या बाहेरच्या बाजूसहि होतात. त्यास बहिर्मार्गगत गुल्म म्हणतात. अंतर्मार्गातील किंवा बहिर्मार्गातील गुल्मांचीं लक्षणें सामान्यतः सारखींच असतात. हे गुल्म आठ प्रकारचे आहेत. ते वात, पित्त, कफ, वातपित्त, कफपित्त, कफवात, संन्निपात व रक्तज,(आर्तव दोषानें स्त्रियास होणारा) हे होत.

ताप, वांती, किंवा अतिसार इत्यादि रोगांनीं अथवा पंचकर्मे (ओकारी, रेचक, बस्ती दोनप्रकारचे [निरूह, अनुवासन] आणि नस्य) यांनीं क्षीण झाल्यावर वातकारक पदार्थ खाण्यानें, भूक लागली असतां थंडपाणी पिण्यानें, जेवल्यानंतर पाण्यांत पोंहणें वगैरे, लंघन, शक्ति कमी करणारीं व शरीरास खिळखिळीं करणारीं कामें केल्यानें, बळेंच ओकाऱ्या काढल्यानें, किंवा वातादिकांचे आलेले वेग थांबवून न धरल्यानें, शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें स्नेहन अगोदर व स्वेदन न करितां रेचक औषध घेतल्यानें, किंवा शोधन औषध घेतल्यावर लगेच विदाही व कफकारक (कफ पाझरवणारे-स्पंदन) पदार्थ खाल्यानें, महास्रोतांतलि म्हणजे आमाशय व पक्काशय यांतील वाताधिक दोष वेगवेगळे, दोन दोन, किंवा तीन्ही एकत्र अथवा रक्तासहित कुपित होऊन वरचा व खालचा दोन्ही मार्ग बंद करून हातास लागणारा वर उचललेला गांठीसारखा गुल्म नांवाचा रोग उत्पन्न करितात. हा उत्पन्न होण्यापूर्वी पोटांत शूळ होऊं लागतो. हा गुल्मरोग आमाशय किंवा पक्काशय (आंतडा) यांत कोठेंहि जरी होतो तरी हृदयाजवळचा भाग, पोटाच्या कुशी, बेंबीच्या जवळचा प्रदेश, मूत्राशय यांत विशेषें करून होतो.

वायु अमूर्त असल्यामुळें त्याची गांठ कशी होते अशी कोणास शंका येईल याचें उत्तर असें आहे कीं, धातुक्षयानें किंवा कफ, मल व पित्त यांनीं मार्ग बंद केल्यानें वायु कोठ्यांत घर करून रूक्षतेमुळें कठिण होतो. तो स्वस्थानीं म्हणजे पक्काशयांत असल्यास स्वतंत्रपणें दूषित होतो आणि परक्या स्थानीं म्हणजे आमाशयांत असतां पित्तकफाच्या तंत्रानें दूषित होतो तो एकेठिकाणीं गोळा झाल्यामुळें (थोड्या जागेंत पुष्कळ वायु चेंडूप्रमाणें साठल्यामुळें) साकार किंवा कठिण नसूनहि कठिण भासतो व हाताला गांठीसारखा लागतो म्हणून त्या साठलेल्या वायूस वातगुल्म म्हणतात. या वातगुल्मांत मान व डोकें यांत शूळ, ताप, पानथरी, आंतड्यांत कुजबुजणें, सुईनें टोंचल्यासारखें दुखणें, मलावरोध, वरचेवर दम लागणें, इंद्रियें ताठणें, तोंडास कोरड, कृशता, अग्नि अनियमित होणें, त्वचा, डोळे, नखें, वगैरे रक्ष व काळीं पडणें, आणि वायूच्या चंचलपणामुळें गुल्माचा आकार व स्थान बादणें, कमी होणें व वेदना, यांचा कोणत्याच प्रकारचा नियम नसणें, आणि गुल्म मुंग्या आल्याप्रमाणें स्फुरण पावणें व त्यांत टोंचणें हीं लक्षणें होतात. पित्तगुल्मांत दाह, आंबट ढेंकर, मूर्छा, जुलाब, घाम, तहान, ताप, त्वचा हिरवी होणें, गुल्मास स्पर्श सहन न होणें, गुल्म तापणें, दुखणें, पेटल्यासारखा होणें, कढत लागणें आणि त्याची जागा पोळल्यासारखी होणें हीं लक्षणें होतात. कफगुल्मांत अंगावर ओलें वस्त्र पांघरल्यासारखें वाटणें, अरुची, अग्निमांद्य, हिंवताप, पडसें, आळस, मळमळ, खोकला येणें, त्वचा, नखें वगैरे पांढरीं होणें आणि गुल्म खोल, कठिण, जड व स्तब्ध असून त्यावर हात ठेवला असतां रोग्याला न कळणें व वेदना कमी होणें हीं लक्षणें होतात. गुल्म बहुतकरून ज्या दोषांपासून उत्पन्न होतात ते त्या दोषांच्याच स्थानांत असतात. आणि त्या दोषांच्या पूर्वोक्त-प्रकोपकाळीं त्यांत शूळ होऊं लागतो. द्वंद्वज गुल्म तीन आहेत. त्यांत दोन, दोन, दोषांचीं लक्षणें होतात. सान्निपातिक गुल्मांत तीव्र शूळदाह होतो, तो लवकर पिकतो. आणि कठिण व उंच असतो. तो असाध्य आहे.

रक्तगुल्म फक्त बायकांसच होतो. जी स्त्री ऋतुकाळीं, बाळंतपणांत किंवा कांहीं योनिरोग झाला असतां वातूळ पदार्थ खाते त्यामुळें वायु कुपित होऊन तो दर महिन्यास सांचलेलें आर्तव (विटाळ) गर्भाशयांत कोंडून ठेवितो. त्या योगानें पोट फुगतें आणि मळमळ, डोहाळे, स्तनांत दूध येणें, अशक्तता वगैरे गर्भारपणाचीं लक्षणें प्रगट होतात. पुढें त्या सांचलेल्या रक्तांत वायूचा संसर्ग झाल्यामुळें तिला वातगुल्माची आणि रक्त हें पित्तापासून बनतें म्हणून पित्तगुल्मांची लक्षणें होतात. तीं पुढीलप्रमाणें:—

पोटांत दुखणें, ताठणें, दाह, अतिसार, तहान, ताप वगैरे. याशिवाय गर्भाशयांत दुष्ट रक्त जमून त्यांत फार शूळ होतो. योनींतून स्राव होतो. त्यास घाण येते. योनींत टोंचण होते. वेदना होतात आणि ती स्फुरण पावते. गर्भारपणाचीं सर्व लक्षणें या रक्तगुल्मांत होत असल्यामुळें पुष्कळ वेळां गर्भ किंवा गुल्म यांचा निश्चय करणें कठिण जातें. परंतु पुढील लक्षणांवरून बारकाईनें गुल्माचा निश्चय करतां येतो.

गर्भ जसा आपल्या अंगांनीं (हात, पाय, डोकें, वगैरे) पोटांत इकडे तिकडे चळवळ करतो त्याप्रमाणें रक्तगुल्म, त्यास अंगें नसल्यामुळें हालचाल करूं शकत नाहीं. परंतु त्यांत शूळ होतो. तो एकच गोळा असलेला कधीं कधीं स्फुरण पावतो. याशिवाय गर्भानें जसें पोट वाढतें तसें यांत न होतां गुल्मच वाढतो.

सर्व गुल्म ज्या एक किंवा अनेक दोषांपासून उत्पन्न होतात, त्यांच्याच आश्रयानें रहातात. म्हणून ते फार दिवसांनीं पिकतात किंवा मुळींच पिकत नाहींत. कारण पिकण्यास तिन्ही दोषांची जरूर असते. पोटांत गळूं (विद्रधी) झालें असतां प्रथम गुल्माचा भास होतो. परंतु विद्रधी दुष्ट रक्तानें होत असल्यामुळें लौकर पिकतो. यावरून गुल्म व विद्रधी यांतील भेद स्पष्ट होतो. मागें सांगितल्याप्रमाणें अंतर्भागगत गुल्म व बहिर्गत गुल्म यांचीं लक्षणें प्रायः जरी सारखीं असलीं तरी कांहीं लक्षणें मिराळीं असतात तीं येणें प्रमाणें.—

अंतर्गत (आंतड्याच्या आंतील) गुल्मांत मूत्राशय, कुशी, हृदय व कौलू यांत वेदना होतात, अग्नि मंद होतो, शरीराची कांती नाहींशी होते. शक्ती क्षीण होते आणि मळमूत्रादिकांचे वेग बंद होतात बहिर्गत गुल्मांत याच्या उलट लक्षणें होतात. बस्ति, हृदय, वगैरे कोष्टांगांत किंचित् शूळ उत्पन्न होतो. गुल्माच्या जागेवरील त्वचेचा रंग बदलतो व ती जागा बाहेरून अधिक ऊंच दिसते. फार ढेंकर येणें, मलावरोध, थोडें जेवलें तरी पोट भरल्यासारखें वाटणें, भरपोट जेवण सहन न होणें, आंतड्यांत कुजबुजणें, पोटांत गुरगुरणें पोट फुगणें व अग्निमांद्य हीं लक्षणें गुल्म होण्यापूर्वी होतात.

या गुल्मांतच आनाह या नांवाचा विकार फार होतो. वरून व खालून वायूचा अवरोध झाल्यानें पोट अतिशय फुगतें, आंत गुरगुरतें व अत्यंत तीव्र वेदना होतात हीं त्या आनाहाचीं लक्षणें होत.

जो गुल्म थोडा थोडा क्रमानें वाढत जाऊन मोठा झाला, (सर्व पोटभर पसरला) व ज्याच्यावर शिरांची जाळी झाली असून कासवासारखा उंच दिसूं लागला तसेच अशक्तपणा, अरुचि, मळमळणें, खोकला, ओकारी, अस्वस्थता व ताप, तहान, झांपड, आणि पडसें हीं लक्षणें दिसूं लागलीं तो गुल्म असाध्य असतो.

गुल्म झालेल्या रोग्याचे हात, पाय, हृदय व बेंबी यांस सूज असून ताप, दमा, ओकारी व अतिसार हीं लक्षणें झाली तर गुल्म असाध्य असतो. दमा, पोट दुखणें, तहान, अन्नद्वेष व गुल्माची गांठ एकदम नाहींशी होणें, व दुर्बलपणा येणें हीं लक्षणें झालीं असतां गुल्मरोगी वांचत नाहीं.

चि कि त्सा.—सर्व प्रकारच्या गुल्मांवर लंघन, वमन, विरेचन, स्वेदन, घृतपान, बस्ती, अरिष्टें, पथ्यभोजन आणि रक्त काढणें व डाग देणें हे उपचार आहेत. रुक्ष व शीतसेवनापासून उत्पन्न झालेल्या वातिक गुल्मांत मळाचा खडा, वायूचा अवरोध व तीव्र वेदना हीं लक्षणें असल्यास त्यावर तेलांचा उपयोग करावा. खाण्यांत, पिण्यांत, बस्तीच्या द्वारें व अभ्यंगानें तेलाचा उपयोग केल्यानें शरीर स्निग्ध झाल्यावर शेकावें. पोटफुगी, वेदना, ताठणें आणि वायू व मळ यांचा अवष्टंभ हे विकार असतां विशेष शेकावें. तें स्निग्ध झालेल्या रोग्यांचीं स्रोतें मऊ करून वायु व मळ यांचा अवष्टंभ मोडून गुल्म नाहींसा करतें. सामान्यतः सर्व गुल्मांवर व विशेषेंकरून बेंबीच्या वरच्या गुल्मावर स्नेहपान हितकर आहे. पक्काशयांतील गुल्मावर बस्ति आणि इतर भागीं पोटांतील गुल्मावर स्नेहपान व बस्ति हे दोन्ही उपाय हितकर आहेत. वातगुल्मांत वायु व मळ यांचा अवष्टंभ असून अग्नि प्रदीप्त असल्यास स्निग्ध व उष्ण अशीं पौष्टिक अन्नपानें द्यावीं आणि वरचेवर स्नेह पाजावा. वातगुल्मांत कफापित्ताचें पाठबळ असल्यास निरूह व अनुवासन बस्ती द्यावे. बस्तिकर्म उत्तम गुल्मनाशक आहे. कारण तें प्रथम वायूस त्याच्या स्वस्थानांत म्हणजे पक्काशयांत जिंकून गुल्माचा त्वरित नाश करितें म्हणून वरचेवर निरूह व अनुवासन बस्ती दिले असतां वातज पित्तज व कफज गुल्म बरे होतात. वातगुल्मांत कफ वाढून अग्नीस मंद करून जर तो अरुचि, मळमळ, जडत्व व झांपड हे विकार उत्पन्न करील तर रोग्यास वमन द्यावें.

वातगुल्मांत कफाचें पाठबळ असल्यास एरंडेल तेल सुरेच्या निवळीबरोबर आणि पित्ताचें पाठबळ असल्यास दुधांतून प्यावें. वातगुल्मांत पित्त अतिशय वाढून त्यापासून दाह उत्पन्न झाल्यास अनुलोमन करणारें स्नेहयुक्त रेचक द्यावें. यापासूनाहि दाह शमन न झाल्यास रक्त काढावें. कोंबडा, मोर, तित्तिर यांच्या मांसाचा रस, भात, मद्य, औषधांनीं तयार केलेलें तूप, बेताचें उष्ण, पातळ व स्निग्ध अन्न हीं सर्व वातगुल्मावर पथ्यकारक आहेत.

स्निग्ध व उष्ण सेवनानें उत्पन्न झालेल्या पित्तगुल्मावर रेचक हितावह आहे. रुक्ष व उष्ण सेवनापासून झालेल्या पित्तगुल्मावर तिक्तघृत, वासाघृत हीं घृतें द्यावीं.

दाह फार होत असेल तर शीतवीर्य औषधें वाटून तुपांत कालवून लेप द्यावा. गुल्माच्या पूर्वरूपांत विशेषतः पित्तगुल्मांत शूळ व अग्निमांद्य हीं झालीं असल्यास रक्त काढावें. गुल्माचीं मुळेंच कापलीं गेलीं म्हणजे त्यांचा पाक न होतां ते नाहींसे होतात. कारण आंतलें रक्त नासूनच पाक होतो. तेंच नासकें रक्त काढून टाकलें म्हणजे त्यापासून

होणारा व्याधी सहजच नाहींसा होतो. रेच होऊन रोग्यास ग्लानी आली असल्यास जांगल मांसरसांनीं त्याची तृप्ति करून तो हुशार झाला म्हणजे शिल्लक राहिलेला विकार काढून टाकण्यासाठीं घृताचें सेवन चालू ठेवावें. रक्त व पित्त अतिशय वाढल्यामुळें किंवा त्यावर आरंभीं औषधोपचार न झाल्यामुळें गुल्म पिकण्याच्या बेतावर आल्यास त्यावर पित्तविद्रधीप्रमाणें चिकित्सा करावी.

कफगुल्मांत प्रथम रोग्यास वमन द्यावें. तो वमन ओकारीचें औषध देण्यास योग्य नसल्यास उपास करवावे. नंतर कडू, उष्ण व तिखट औषधें पेयादि क्रमांत योजून त्यानें अग्नि प्रदीप्त करावा. खोल किंवा वर उभारलेला बधिर, टणक, स्थिर व आनाहादिकांनीं युक्त अशा गुल्माचें शोधनानें शमन करावें. कफगुल्मावर तीळ, एरंड्या, अळशी व मोहर्‍या यांचा लेप करून लोखंडाचें भांडें किंचित् तापवून शेकावें. या उपायांनीं स्वस्थानापासून सुटलेल्या कफगुल्माचें स्निग्ध रेचकें व दशमुळाच्या काढ्याचे बस्ती देऊन शोधन करावें. " दंती हरीतकी " या नांवाचें औषध यावर चांगलें आहे.घर करून बसलेला,मोठ्या घेराचा, टणक, बधिर, जड व मासांत खोल असलेला असा गुल्म क्षार, अरिष्टें, व डाग यांनीं बरा करावा. हे उपाय एक दिवस किंवा दोन दिवस किंवा तीन दिवस मध्यें सोडून शरीराची शक्ति वाढविण्याकडे व दोषांचा जोर कमी करण्याकडे लक्ष्य पुरवून करावे. क्षार आपल्या क्षारत्वानें मांसरस दूध व तूप खाणार्‍या मनुष्याच्या मधुर व स्निग्ध कफास तोडून त्याच्या आशयास फोडून खालीं पाडतो. अग्नि मंद होऊन अरुची उत्पन्न झाली असतां संवर्याच्या मद्यांबरोबर स्नेहयुक्त भोजन करण्यास स्रोतांचे मार्ग मोकळे होण्याकरितां जुनीं आसवें व अरिष्टें द्यावीं.

वरील उपायांनीं कफगुल्म बरा न झाल्यास स्थिरगुल्मावर डाग द्यावा. वैद्यानें गुल्मांवर शेवटपर्यंत वस्त्र घालून बेंबी, बस्ति, आंतडीं, हृदय पोटावरील रोमराजी यांस वचावून तापवून लाल केलेल्या बाणानें किंवा लोखंडाच्या डहाणीनें किंवा टेंभुर्णीच्या जळक्या लांकडानें फार जोरानें न दाबतां डाग द्यावा. नंतर आग कमी झाल्यावर व्रणाप्रमाणें थंड लेप वगैरेंची योजना करावी.

स्त्रीस रक्तगुल्म झाला असतां बाळंत होण्याच्या वेळी, म्हणजे नऊ महिने लोटल्यानंतर, तिचें स्नेहन स्वेदन करून तिला स्निग्ध रेचक द्यावें. स्त्रियाच्या रक्तगुल्मावर व रजोदर्शन बंद झालें असल्यास विटाळ आणणारीं औषधें द्यावीं. रक्तपित्तनाशक क्षार मध व तुप यांतून चाटावे. लसूण, तीक्ष्ण मद्य व मत्स्य हे पदार्थ खावयास द्यावे.

दशमुळांच्या काढ्यांत दूध, गोमूत्र व क्षार घालून त्याचा उत्तरबस्ति द्यावा. म्हणजे योनिद्वारें पिचकारी मारावी. यांपासून योनिद्वारां रक्तस्राव न झाल्यास गुल्म फोडावा. गुल्मरोगांत जुन्या साळींचा भात, कुळीथ, जांगलमांस, शेवगा, चित्रक, मुळा या भाज्या, हिंग, डाळिंब, ताक, तूप व तेल हे पदार्थ खावे. पाणी कमी किंवा मुळींच पिऊं नये. दह्याची निवळ, ताक, किंवा मद्य यांचाच उपयोग करावा. मिताहार करावा व बेताचा व्यायाम करावा व कोणत्याहि वेगाचें धारण करूं नये. पाण्याच्याऐवजीं द्राक्षासव अगर कुमारीआसव (योगरत्नाकरोक्त) यांचा उपयोग करावा.

गुस्टाव्हस तिसरा(१७४६-१७९२)—हा स्वीडनचा राजा १७४६ त जन्मला. त्याचें शिक्षण कार्ले गुस्टाफ टेसिन व कार्ल शेफर या दोन तत्कालीन अत्यंत नांवाजलेल्या मुत्सद्यांकडून झालें होतें. कारस्थानें व डावपेचांनीं भरलेल्या राजकीय वातावरणांत तो वाढल्यामुळें लहान वयांतच तो मुत्सद्देगिरींत तयार झाला. उपजत गुणहि त्याच्या अंगीं पुष्कळ होते. १७६६ त त्याचें डेन्मार्कच्या राजकन्येशीं लग्न झालें. १७६८ मध्यें बाप गादीवरून दूर झाल्यानंतर गुस्टाव्हस राजकारणांत प्रथम प्रत्यक्ष पडला; व त्यानें तत्कालीन बलिष्ठ " कॅप " पक्षास जादा डायटसभा भरविण्यास भाग पाडलें. त्या बैठकींत पूर्वीची राजघटना बदलून राजशाहीच्या वळणावर नवीन रचना करविण्याचें त्याच्या मनांत होतें. परंतु " हॅट " नांवाच्या पक्षानें तें जमूं दिलें नाहीं. तेव्हां तो पॅरीसमध्यें जाऊन राहिला; तेथें तो बराच लोकप्रसिद्ध झाला. व याचा फायदा घेऊन त्यानें आपले कांहीं राजकीय हेतूहि साधून घेतले. फ्रेंच सरकारनें दरसाल १५ लक्ष लिव्हर्स अशा हप्त्यांनीं त्याला लागेल तितकी पैशाची मदत स्वीडनमध्यें राज्यक्रान्ती घडवून आणण्याकरितां देण्याचें कबूल केलें. गुस्टाव्हसनें परत जातांना वाटेंत आपला मामा फ्रेडरीक दी ग्रेट याची गांठ घेतली. त्यावेळीं फ्रेडरीकनें त्याला प्रचलित स्वीडीश राजघटनेंत ढवळाढवळ न करतां सर्व राजकीय पक्षांशीं जमवून घेण्याचा उपदेश केला. स्वीडनला परत आल्यावर (१७७१) कॅप व हॅट या पक्षांमध्यें तडजोड करण्याकरितां आपल्या कारकीर्दीतील पहिल्या पार्लमेंटच्या बैठकींत त्यानें प्रयत्न केला. पण तो फुकट गेला. कोणताहि पक्ष स्वार्थ सोडण्यास तयार होईना. उलट अधिकाररूढ कॅप पक्षानें राजाचे हक्क अधिकच मर्यादित करण्यास सुरुवात केली. हा कॅपपक्ष रशियाच्या जाळ्यांत सांपडलेला होता. स्वीडनला मांडलिक बनविण्याचा रशियाचा विचार होता. तेव्हां देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याकरतां लष्कराच्या मदतीनें क्रांति घडवून आणण्याखेरीज गुस्टाव्हसला दुसरा मार्ग उरला नाहीं. त्यासाठीं त्यानें गुप्त कट रचला. त्याच्या स्प्रेंग पोर्टन नांवाच्या सरदारानें प्रथम फिनलंड हस्तगत करून तेथून अचानक स्टॉकहोमवर छापा घालून तेथील लोकसभांनां नवी राजसत्ता ही घटना तरवारीच्या जोरावर मान्य करण्यास लावण्याचें काम अंगावर घेतलें. नंतर ठरल्याप्रमाणें टोल नांवाच्या सरदारानें

(१७७२ आगष्ट) बंड उभारलें व स्प्रेंगपोर्टेननें फिनलंडहि घेतलें; पण तितक्यांत मोठें वादळ झाल्यामुळें त्याला स्टॉकहोमवर ठरलेल्या तारखेस छापा घालतां आला नाहीं. इकडे बंडाच्या बातमीमुळें खवळलेल्या "कॅप" पक्षाच्या कचाट्यांत स्टॉकहोम येथें गुस्टाव्हस एकटाच सांपडला. तेव्हां त्यानें प्रसंगावधान ठेऊन जवळ असलेल्या सैन्याच्या जोरावरच आपला बेत मोठ्या धाडसानें पार पाडला. तसेंच सेनेटचे सभासद व गव्हर्नर जनरल यांनां कैद करून आरमारावरहि ताबा मिळविला. नंतर दोन दिवसांनीं नवीन पार्लमेंट भरवून व राजवेशांत सिंहासनावर बसून आपल्या भाषणांत लोकसभेच्या सभासदांच्या मागील स्वैर वर्तनाबद्दल खरपूस समाचार घेऊन नंतर नवी घटना पुढें मांडून ती सर्वानुमतें पास करून घेऊन मग डायट सभा मोडून टाकिली. नंतर गुस्टाव्हसनें प्रत्येक सरकारी खात्यांत स्वतः लक्ष घालून सुधारणा केल्या. लांचलुचपतीचे प्रकार त्यानें बंद करवून लोकांस मुद्रणस्वातंत्र्य दिलें, आरमाराची वाढ केली, खुला व्यापार सुरू करून इतर संरक्षक जकाती हलक्या केल्या, लोकांनां पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य दिलें. परराष्ट्रीय धोरणाहि मोठ्या हुषारीनें व दक्षतेनें ठेविलें. व १७७८ मध्यें पार्लमेंट भरवून त्यानें आपण केलेल्या कारभाराचा अहवाल पार्लमेंटपुढें मांडला. त्यामुळें सभेवर त्याची विलक्षण छाप बसली. पण ती आठ वर्षांवर जास्त टिकली नाहीं. सन १७८६ त सभा त्याच्या विरुद्ध जाऊं लागली तेव्हां गुस्टाव्हसनेंहि पूर्ण अनियंत्रित राजशाही सुरू करून पार्लमेंटसभा भरविलीच नाहीं. १७९० मध्यें त्यानें रशियाचा मोठा पराभव करून आपल्याला फायदेशीर तह ठरवून रशियाशीं आठ वर्षांच्या मैत्रीचा करार केला. इतक्यांत फ्रेंच राज्यक्रांती सुरू झाल्यामुळें तिच्या विरुद्ध एक राजसंघ स्थापण्याच्या खटपटीस तो लागला. त्या कार्याला तत्कालीन युरोपियन राजांमध्यें तोच एकटा लायक होता. फ्रेंच राज्यक्रांतीची खरी मीमांसा तोच एक जाणत होता. पण तेथेंहि मत्सरानें घात केला, व तो ऑपेरा हौसमध्यें एका गुप्तकटवाल्याच्या पिस्तुलाला बळी पडला (१७९२). तो विद्वान् होता, त्यानें स्वतः नाटकें व कांहीं ऐतिहासिक निबंध वगैरे लिहिले असून काव्याची व कलाकौशल्याचीहि त्याला आवड असल्यानें त्या त्या लोकांनां त्याचा आश्रय असे.

गुह—शृंगवेर नामक पुरीचा किराताधिपति. हा दशरथाचा परम मित्र होता. राम अयोध्येहून निघून दंडकारण्यांत चालला असतां एक रात्र येथेंच राहिला होता व त्या वेळेस यानें रामाचें आतिथ्य करून त्यास गंगेपार उतरलें व पुढें भरताबरोबर चित्रकूटास रामाच्या भेटीस गेला.

गुहिलोट—हें घराणें मेवाडचें असून त्याचे वंशज आपल्यास सूर्यवंशी क्षत्रीय म्हणवितात. राजपुतान्यांत यांनां हिंदूंचे सूर्य अशी बहुमानाची पदवी लावितात. टॉडच्या मतें रजपुतांच्या ३६ घराण्यांत हें श्रेष्ठ घराणें होय. या घराण्याच्या कुळाचें नांव गुहिलोट अथवा घेलोट असून तें गुहिलपुत्र या संस्कृत नांवाचा अपभ्रंश आहे. चितोडच्या (सं. १३३५) एका शिलालेखांत मेवाडच्या एका प्राचीन सिंहद् नांवाच्या राजास गुहिलपुत्र म्हटलेलें आहे. दुसऱ्या एका शिलालेखांत गोभिलपुत्र असाहि उल्लेख आढळतो. इंसीच्या शिलालेखांत गुहिलोट असें प्राकृत रूप येतें. सारांश गुहिल नांवावरून हें वंशाचें नांव बनलें. व्यक्तीवरून कुळाचें नांव ठेवण्याची चाल राजपुतान्यांत सर्वत्र आढळते या घराण्याच्या उत्पत्तीबद्दल टॉडनें पुढील दंतकथा दिल्या आहेत. सूर्यवंशी शेवटचा राजा सुमित्र याच्या वंशांतील हा गुहिल होता. तसेंच वलभीवंशांतील शेवटचा राजा शिलादित्य याच्याशीं या गुहिलांचा संबध येतो. मुसुलमान तवारिखकार या घराण्याचा संबध ससन राजांशीं लावितात व कोणी येज्देगर्द या इराणी राजाच्या मुलीशीं यांचा संबंध जोडतात; परंतु या तर्कांनां सबळ पुरावा मुळींच नाहीं. हा वंश निःसंशय सूर्यवंशीय क्षत्रिय होय असें पं. गौरीशंकर ओझा व रा. चिंतामणराव वैद्य यांचें मत आहे.

रा. देवदत्त भांडारकर यांनीं अचलेश्वरच्या शिलालेखांत (संवत १३४२)बाप्पा या गुहिलोट घराण्याच्या मूळ पुरुषाचें जें वर्णन आलें आहे, त्यावरून या घराण्यास व बाप्पास नागर ब्राह्मण ठरविलें आहे. चितोडचा शिलालेख(सं.१३३१), मम्मदेवप्रशस्ति, रसिकप्रिया, एकलिंगमहात्म्य, शक्तिकुमाराच्या वेळचा एक शिलालेख (सन ९७७), तवारीखमाळवा इत्यादि लेख व बखरींवरून हें घराणें मूळचें नागर ब्राह्मण होतें व पुढें क्षत्रिय बनलें असें रा. देवदत्त भांडारकरांचें म्हणणें आहे. त्यांच्या मतें ह्या घराण्याचा मूळपुरुष आनंदपुरचा म्हणजे हल्लींच्या वडनगरचा रहाणारा होता. कुमारपालाच्या वेळच्या एका शिलालेखांत या आनंदपुरचा उल्लेख येतो. वैद्यांच्या मतें आनंदपुर म्हणजे आटपुरा होय वडनगर नव्हे.

रा. देवदत्त भांडारकर म्हणतात कीं, "आनंदपुरास नागरब्राह्मणांची फार वस्ती होती व बाप्पा हा जातीनें नागर ब्राह्मणच होता. त्याचें गोत्र वैजवाप होतें." गीतगोविंदावर कुम्भराण्यानें रसिकप्रिया नांवाची टीका लिहिली आहे. तींत हें गोत्राचें नांव आलें आहे. या गोत्राचे प्रवर तीन असून या घराण्याचा वेद यजुर्वेद होय, अशी माहिती भाटांच्या वंशावळीवरून समजते. परंतु भाटांच्या या वंशावळीवर कितपत विश्वास ठेवावा हा प्रश्न आहे. वैजवाप गोत्र, गोत्रप्रवर–निम्बध कदम्बम् या ग्रंथांत त्याच्या आत्रेय, गविष्ठिर व पौर्वातिथ या तीन प्रवरांसह आलेलें आहे या गोत्रप्रवरांचा उल्लेख कात्यायन व लौगाक्षी या सूत्रकारांनींहि केलेला आहे. सध्याच्या नागरब्राह्मणांतहि हें वैजवाप गोत्र आहे.

हें घराणें मूळचें नागरब्राह्मण असून क्षत्रिय कसें बनलें या बद्दल रा. भांडारकर म्हणतात कीं, " याचें कारण खात्रीनें सांगता येत नाहीं; परंतु (घराण्याचा मूळ पुरुष) गुहदत्त हा नागरब्राम्हण असून वडनगरचा रहिवाशी व मूळचा (मित्र प्रत्ययान्त नागरब्राह्मणांच्या नांवावरून) मिहिर किंवा मेर जातीचा होता. वलभी राजांनीं वडनगर किंवा आनंदपूरच्या अनेक नागरब्राह्मणांनां दानें दिलेल्या ताम्रपटांत त्या त्या ब्राह्मणांच्या नांवांच्या शेवटीं मित्र शब्द येतो; यावरून नागरब्राह्मणांनांच मित्र शब्द लावीत असें अनुमान निघतें. वलभीराजांनांहि मैत्रक म्हणत. तेव्हां मित्र किंवा मैत्रक हे मूळचे मेर किंवा मेहर होत. मेर ही जात आर्य नसून परकीय, एक विशिष्ट विदेशी असून तिनें हूणांबरोबरच सहाव्या शतकांत हिंदुस्थानांत प्रवेश केला होता. त्या काळीं हे परकी लोक हिंदुस्थानांत वस्तीस राहिल्यानंतर येथील चातुर्वर्ण्य उत्पलीत, त्यामुळें या मेरांतहि ब्राह्मण व क्षत्रिय वर्ण बनले. तेव्हां गुहिलोट घराणें मूळचें नागरब्राह्मण म्हणजे मेर असल्यानें विदेशीय ठरतें. बाप्पा ब्राह्मण असला तरी तो नागरब्राह्मण म्हणजे विदेशीयच होय; पुढें त्यानें ब्राह्मणधर्म सोडून क्षात्रधर्म स्वीकारल्यानें तो क्षत्रिय बनला असावा. " [जर्नल. ए. सो. बंगाल. पु. ५ अं. ६]. परंतु गौरिशंकर ओझा व चिंतामणराव वैद्य यांच्या मतें बाप्पा हा ब्राह्मण नसून सूर्यवंशी क्षत्रिय होता. वैद्य म्हणतात कीं, नरवाहनाच्या शिलालेखांतील ' रघुवंश कीर्तिपिशुनाः ' या विशेषणावरून हा वंश क्षत्रियच होय. देवदत्त भांडारकर यांनीं हें विशेषण आपल्या लेखांत गाळलें आहे. नुकेंच बाप्पाचें एक सोन्याचें नाणें सांपडलें असून त्यावरील लेखांवरूनहि ओझा यांनीं बाप्पा क्षत्रिय असल्याचें ठरविलें आहे. चितोड व अबू येथील लेखांत महिदेव व विप्र असे जे शब्द बाप्पास लावण्यांत आलेले आहेत व ज्यांवरून देवदत्त भांडारकर त्याला ब्राह्मण म्हणतात, ते शब्द लेखकाच्या चुकीनें खोदले गेले असेंहि ओझा म्हणतात. वैद्य म्हणतात कीं, अलीकडील भाटांनां क्षत्रियांची ब्राह्मण गोत्रें कशीं, याचें गूढ पडून तें उकलण्यासाठीं त्यांनीं रजपूतकुलांची उत्पत्ती नवीन कल्पून त्या त्या गोत्रर्षींच्या ब्राह्मणांपासून हीं कुलें उत्पन्न झालीं अशा कथा रचिल्या असाव्यात.

तसेंच गुहिलोत (मैत्रक-मिहिर-मेर) घराणें हें मूळचें हिंदु नसून बाह्य, परकीय, हूण वगैरे जातींचें होतें असें देवदत्त भांडारकरांचें म्हणणेंहि वैद्य यांना कबूल नाहीं. त्यांचें म्हणणें कीं, मित्रप्रत्ययान्त नांवावरून केलेला वरील तर्क साफ चुकीचा आहे. मित्र व मिहिर यांचा कांहींच संबंध नाहीं. अर्थात् गुहिलोत हे बाह्यपरकीय नसून अस्सल सूर्यवंशी क्षत्रीय होते. देवदत्त यांनीं ज्या शिलालेखावरून हा तर्क केला आहे, त्यांतील श्लोकांचा अर्थच त्यांनां कळला नाहीं व नरवाहन लेखांत बाप्पास स्पष्टपणें ' गुहिलगोत्र नरेन्द्रचन्द्र ' असें म्हटलें आहे त्यावरूनहि त्याचें क्षत्रियत्वच सिद्ध होतें, असें वैद्य यांचें मत आहे.

बा प्पा रा व ळ—या घराण्यांतील बाप्पापासून समरसिंहापर्यंतची हकीकत येथें देतों. त्यापुढील हकीकत ज्ञा. को. च्या नवव्या विभागांत उदेपूर नांवाखालीं आली आहे. बाप्पारावळाच्या जन्मशकाचा, तसेंच तो चितोडच्या गादीवर केव्हां अधिरूढ झाला व त्यानें राज्यपदाचा केव्हां त्याग केला याचा दन्तकथादिकांवरून विचार करतां (संवत ८२०) इ. स. ७६३ हा त्याच्या अधिकारत्यागाचा शक ठरतो व तो चितोडच्या मानमोरी लेखाशीं बराच जमतो. त्याच लेखांवरून बाप्पाची कारकीर्द ७१३ पासून ७६३ पर्यंत केव्हां तरी सुरु झाली असावी असें रा. चिं. वि. वैद्यांचें मत आहे. व त्यांच्या अंदाजें त्याच्या राज्यारोहणाचा काल स. ७३० असावा. मेवाड येथील दंतकथांप्रमाणें हा काल स. ७२८ असा टॉडनें दिला आहे. अरब लोकांनीं ७१२ सालीं सिंध प्रांत काबीज केला हें निश्चित आहे व त्यानंतरच त्यांनीं राजपुतान्यावर स्वाऱ्या केल्या. सारांश बाप्पाच्या राज्यारोहणाचा काळ सन ७३० धरला असतां सरासरी ३३ वर्षें त्यानें राज्य केलें असावें. राज्यारोहणाच्या वेळीं त्याचें वय काय असावें हें ठरविणें कठीण आहे. अगदीं किमान पक्षीं ३० वर्षांचें धरल्यास त्याचा जन्मशक इ. स. ७०० येतो. जुन्या दंतकथांवरून व मेवाडच्या गुहिलोतांच्या दृढ समजुतीवरून बाप्पाचा जन्म संवत १९१ मानतात. टॉडनेंहि याच समजुतीचा अनुवाद केला आहे. चिंतामणराव वैद्य म्हणतात कीं, भट्टार्कानें स ५०९ मध्यें वलभी राज्य स्थापलें, तेव्हांपासून हा संवत धरावा (५०९+१९१ = ७००) म्हणजे स. ७०० हा (७३० च्या जवळचा) शक येऊन ही तोंडमिळवणी होते. रा. वैद्यांच्या मतें बाप्पा हें एका व्यक्तीचेंच नांव आहे. बाप्पा शब्दाचा 'बाबा, साधुपुरुष व पिता ' असाहि अर्थ संभवतो; व ह्या अर्थावरूनहि बाप्पा हा गुहिलोत घराण्याचा मूळ पुरूष असावा. नेपाळ वगैरे ठिकाणीं कोरीव लेखांत मूळ पुरुष या अर्थी बाप्पा शब्दाचा उपयोग केलेला आढळतो. (उदा० बप्पपादानुध्यात). त्यावरून बाप्पा ह्या शब्दाचा व्यक्तिवाचक उपयोग पूर्वकाळीं प्रचलित होता. उदाहरणार्थ बप्पभट्टी हें तत्कालीन एका जैन आचार्याचें नांव प्रसिद्ध आहे व 'बप्पायें' अशा नांवाचा उल्लेख तत्कालीन कोरीव लेखांतहि सांपडतो. हें नांव क्षत्रियवाचक देखील आहे असें इ. स. ६५५ च्या बगुम्रा ताम्रपटावरूनहि दिसतें.

बाप्पानें स्थापन केलेलें चितोडचें गुहिलोट राजघराणें बाप्पाच्या काळापासून (७३०) आजतागायत म्हणजे सुमारें १२०० वर्षें अव्याहत चालू आहे; व त्या घराण्याचें ठिकाणहि जवळ जवळ पूर्वीचेंच आहे. सध्यां त्या घराण्याची राजधानी चितोड नसून उदेपूर आहे; पण चितोडहि अजून

त्यांच्याच ताब्यांत आहे व या घराण्यांतील अनेक राजपुरुष वीर्यशाली, स्वातंत्र्यप्रिय व स्वधर्मरत होते.

या घराण्याच्या निरनिराळ्या व परस्परांशीं विसंगत अशा बऱ्याच वंशावळी उपलब्ध आहेत. त्यामुळें बाप्पाच्या वंशजांचा अनुक्रम ठरविणें कठिण झालें आहे. त्यांतून नुकत्याच सांपडलेल्या आटपुरालेखांत (इं. अँ. पु. ३९) या वंशाचा बराच भिन्न असा क्रम आढळतो. टॉडला हा शिलालेख माहीत होता, पण या लेखांतील यादी टॉडनें दिलेल्या यादीहून बरीच भिन्न आहे. पूर्वीच्या लेखांत उल्लेखिलेल्या राजांची संख्या समरसिंहापावेतों तीस आहे. म्हणजे सरासरी प्रत्येक राजाची कारकीर्द १५वर्षांची(१२००—७३० = ४७०) ठरते. परंतु आटपुरालेखात बाप्पापासून फक्त शक्तिकुमारपर्यंत २० राजे होऊन गेले असें म्हटलें आहे. शक्तिकुमाराच्या स. ९७७ सालच्या एका लेखांत उल्लेख मिळतो. म्हणजे प्रत्येक राजाची कारकीर्द सुमारें ११ वर्षांची पडते. त्या काळीं अरबलोकांनीं सिंध प्रांत काबीज केला असून त्याच्या स्वाऱ्यांचा सपाटा सारखा चालू होता; व देशांत धामधूम व अशांतता होती म्हणून वरील ११ वर्षांची सरासरी पडत असावी. टॉडनें आपल्या यादीबद्दल असें म्हटलें आहे कीं, त्या यादींतील राजांचा अनुक्रमवारी नामनिर्देश एकाच शाखेचा नसून गुहिलवृक्षाच्या अनेक शाखांच्या समकालीन राजाचा संकलित क्रम आहे. आतां गुहिल घराण्याच्या बऱ्याच शाखा होत्या हें आपणास चितोडगड लेखावरूनहि समजतें. एकंदरीनें आज बाप्पाच्या वंशजाचा क्रम व कारकीर्द निश्चयेकरून ठरवितां येत नाहीं. तरी पण चितोडगड व अचलेश्वर येथील लेखांस अनुसरूनच हा क्रम साधारण ठरविता येतो.

बाप्पानंतर मेवाडच्या गादीवर गुहिल राजा आला. त्याची सर्व कारकीर्द शत्रूंशीं लढण्यांत गेली. मध्ययुगांतील सर्वच राजांनां आरबांशीं तोंड द्यावें लागे व त्या काळीं अरबाच्या स्वाऱ्यांचा व रजपुतांच्या उलट हल्ल्यांचा इतका कहर उडाला कीं, त्या प्रदेशभर सर्वत्र मांस व रक्त यांचा सडा शिंपला गेला व त्या देशास ' मेदपाट ' (प्राकृत मेवाड) असें अन्वर्थक नाव प्राप्त झालें. त्यावरून अरब व रजपूत यामध्यें किती घनघोर युद्ध चाललें होतें ते उघड होतें. गुहिलानें आपल्या पुढील वंशजांना आपलें नांव चालू केलें व ही शाखा गुहिलोट नावानें प्रसिद्ध झाली [गुहिलोत = संस्कृत गुहिलपुत्र; ओत (पुत्त) हा प्रत्यय वंशज या अर्थी राजपुतन्यांत प्रसिद्ध आहे].

गुहिलानंतर भोजराजा गादीवर बसला व भोजानंतर शीलास राज्यपद मिळालें. त्या दोघांसहि अरबांशीं तीव्र संग्राम करावा लागला, पण त्यांच्या मागून गादीवर आलेल्या कालभोजास तर अरबांशीं फारच दारुण युद्ध करावें लागलें. कालभोजानंतर त्याचा पुत्र भर्तृपट्ट यास राज्यपद मिळालें व भर्तृपट्टानंतर सिंहराजा राज्य करूं लागला. त्या सर्वांची कारकीर्द शत्रूंशीं लढण्यांतच गेली व हे सर्वेहि सारखेच रणगाजी निघाले. सिंहानंतर त्याचा मुलगा महायक गादीवर बसला व महायकानंतर खोम्माणास अभिषेक झाला. प्राचीन शिलालेखांत खोम्माणाच्या पराक्रमाची विशेष वर्णनें आढळतात. आटपुरालेखांत आणखी दोन खोम्माणांचा उल्लेख आहे. त्यापैकीं एक कालभोजाचा मुलगा असावा व दुसरा सिंहराजाचा मुलगा असावा. टॉडनें "खोम्माणरासा" नांवाच्या एका काव्याचा आधार घेऊन खोम्माण व अरब यांच्यांतील एका युद्धप्रसंगीं चितोडगडच्या बाजूनें कोणकोणत्या देशांचे राजे लढले यांची याद दिली आहे व त्याचप्रमाणें मुसलमानांच्या निरनिराळ्या स्वाऱ्यांचाहि अहवाल दिला आहे. तो विचारांत घेतां ती स्वारी ९ व्या शतकाच्या प्रारंभींच झाली असावी असें वाटतें. बाप्पापासून (स.७६४) त्या स्वारीच्या कालाची (स. ८२५) गणना केली तर सरासरी ६१ वर्षांचा काल येतो. एवढ्या कालांत पांच राजे होऊन जाणें स्वाभाविक आहे. अचलेश्वरादि लेखांत बाप्पा ते महायकपावेतों जीं नांवें आहेत त्यांहून अधिक नांवें आटपुरा लेखांत सापडतात. लेखाप्रमाणें पाहतां ८२५च्या सुमारास कालभोजाचा पुत्र खोम्माण राजा होता व त्यानेंच अरबांशीं घनघोर संग्राम केला असें सिद्ध होतें. तथापि खोम्माणरासांतील यादीवरून फक्त तिच्या कर्त्याच्या काळीं त्याला ज्ञात जाती अमुक होत्या एवढेंच ऐतिहासिक सत्य निघेल.

तिसऱ्या खोम्माणानंतर अल्लट नांवाचा अत्यंत पराक्रमी पुरुष गादीवर बसला. त्याच्या आईचें नांव महालक्ष्मी असून ती मूळची राष्ट्रकूट घराण्यांतलि होती. अल्लटाच्या मागून त्याचा पुत्र नरवाहन हा गादिवर बसला. नरवाहनाचा एक स्वतंत्र लेख मिळतो. नरवाहनानंतर शक्तिकुमार राज्य करूं लागला. परंतु आटपुरा लेखांत नरवाहन व शक्तिकुमार यांच्या दरम्यान शालिवाहनाची कारकीर्द झाली असा उल्लेख आहे. या शक्तिकुमाराच्याच वेळेचा ' आटपुरा ' लेख होय. व त्याचा शक विक्रम संवत् १०३४ (स. ९७७) असा आहे. शक्तिकुमारानंतर शुचिवर्म्याची कारकीर्द झाली. त्या शुचिवर्म्याचा १०३८ वि. सं. मधील शिलालेख उपलब्ध आहे.चितोडच्या लेखांत नरवाहनापर्यंतचीं नांवें दिलीं आहेत. अचलेश्वर लेखात मात्र समरसिंहापर्यंत (वि. सं. १३३८) सर्व राजांची वंशावळ दिली आहे. समरसिंहाच्या नंतरचा इतिहास उदेपूरसंस्थान या नांवाखालीं ज्ञानकोशाच्या नवव्या विभागांत आला आहे तेथें तो पहावा.

निरनिराळ्या लेखांतून वर्णिलेल्या गुहिलोट घराण्याची वंशावळ पुढीलप्रमाणें आहे:—

वंशावळ

आटपुरालेख (सं. १०३४)	अचलगडलेख (सं. १३४२)	बाणपुरालेख (सं.१४०९)
गुहादित्य	बाप्पा–राज (संन्यास सं.८२०)	बाप्पा
१ गुहिल	गुहिल	गुहिल
२ भोज	भोज	भोज
३ महेंद्र	०	०
४ नाग	०	०
५ शील	शील	शील
६ अपराजित	०	०
७ महेंद्र (२ रा)	०	०
८ कालभोज	कालभोज	कालभोज
९ खोम्माण	०	०
१० महायक	०	०
११ भर्तृभट्ट	०	०
१२ सिंह	सिंह	सिंह
१३ खोम्माण (२ रा)	०	०
१४ महायक	महायक	महायक
१५ खोम्माण (३रा)	खोम्माण	खोम्माण
१६ भर्तृभट्ट (२रा)		०
१७ अल्लट	अल्लट	अल्लट
१८ नरवाहन (सं. १०२८)	नरवाहन	नरवाहन
१९ शालिवाहन	०	०
२० शक्तिकुमार (सं. १०३४)	शक्तिकुमार	शक्तिकुमार
२१ शुचिवर्मा (सं. १०३८)	०	०

[मध्ययुगीन भारत, भा. २; राज-स्थान. टॉड; इंडियन अन्टिक्करी. पु. ३९; बॉम्बे ग्याझे. पु.९; जर्नल. ए. सो. बंगाल. पु. ५ अं. ६].

गुळदगुड—विजापूर जिल्हा. बदामी तालुक्यांतलें एक शहर. उ. अ. १६°३' व पू. रे. ७५°४७'. याला एक उपनगर आहे. दोन्हींची मिळून लोकसंख्या (१९११) १५२४९. येथें खण, सुती व रेशमी उत्तम कपडा तयार होतो. आसपास दगडाच्या खाणी आहेत. १८८७ पासून म्यु. क. आहे. येथें एक किल्ला आहे. तो १५८० मध्यें इब्राहिम आदिलशहानें बांधला. १७०६ मध्यें हें शहर वसलें. १७९७मध्यें तें टिपूनें घेतलें.१८२६मध्यें तें इंग्रजांकडे आलें.

गुळवेल—ही एक फार उपयुक्त व महत्त्वाची वेल आहे. हीस संस्कृतमध्यें गुडूची, अमृतवल्ली, ज्वरारि, अमृता, निर्जरा इत्यादि अनेक नांवें आहेत. कोंकणी भाषेंत हीस गरुडवेल, गरोल, मराठींत गुळवेल; गुजराथींत गळो, हिंदींत गिलोय, असें म्हणतात. लॅटिनमध्यें टिमोसपाओरा कॉर्डिफोलिया असें नांव आहे.

बहुतेक सर्व रोगांवर उपयोगी पडणारी ही वनस्पति आहे. हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत ती सांपडते. हिचा वेल पुष्कळ मोठा होतो व त्याचें कांडेंहि जाड होतें. कडूनिंबावरील गुळवेल सर्वोत्कृष्ट समजली जाते. कोंवळ्या वेलीची साल नाजूक, हिरव्या रंगाची व मृदु असते व ती ३।४ वर्षांची झाली म्हणजे साल मळकट, पांढरकी व खडबडीत होते. या वेलींचीं पानें साधारण पिंपळाच्या पानासारखीं असतात. परंतु त्यांचा शेंडा मात्र पिंपळाच्या पानाच्या शेंड्याइतका लांब नसतो. या वेलीस आंब्याच्या मोहरासारखीं पांढुरकी, पिंगट रंगाचीं फुलें पानांच्या कुशींतून येतात. व त्यास लहान लहान फळांचे घोस लागतात. तीं पक्व झाल्यावर लाल होतात. हा वेल कधीं कधीं खडकावरहि उगवतांना दृष्टीस पडतो. त्यास खडकी गुळवेल म्हणतात. गुळवेलीचें सत्व काढतात. तेंही अनेक रोगांवर चालतें व फार शक्ति-वर्धक आहे. औषधाकरितां गुळवेल घेणें ती विषारी झाडांवरील घेऊं नये.

औ प धी गु ण दो ष—गुळवेल तुरट, कडू, उष्ण, वीर्यो-द्दीपक, ज्वरहारक आहे. गुळवेलीचा अनेक रोगांवर काढ्यांत वगैरे उपयोग करतात. ही फार गुणकारी आहे.

गूटी—' गुत्ती ' पहा.

गूडलूर, ता लु का.—मद्रास. निलगिरी जिल्हा. जिल्ह्यां-तील इतर भागापेक्षां हा बराच सखल आहे. येथील वस्ती दिवसेंदिवस कमी होत आहे कारण येथील सोनें, अभ्रकाच्या खाणी व कॉफीचे कित्येक मळे बंद झाले आहेत. अद्यापहि नेल्लाकोट्टा व आक्टरलोनी खोरें येथें कांहीं मळे जीव धरून राहिले आहेत. क्षेत्रफळ २८० चौ. मैल. एकंदर लो. सं. (१९२१) २२०७९. तालुक्याचा वसूल ५५ हजार आहे.

गूळ—गूळ किंवा गुड म्हणजे गोळा. बंगाल प्रांताला प्राचीन नांव गौड देश आहे. गौड म्हणजे गुळाचा देश असा कांहीं व्युत्पत्तिकार अर्थ देतात. गुळाची प्राचीनता साखरेच्या आधींची असून साखरेच्या इतिहासाचा आरंभ गुळाच्या इतिहासानें होणारा आहे [' साखर ' पहा] गुळाला लागणाऱ्या उसाच्या लागव-डीची माहिती ' ऊंस ' या लेखांत येऊन गेलीच आहे. ऊंस तयार झाल्यानंतर तो गाळणें, गूळ रांधणें व ढेपी पाडणें या गूळ तयार करण्याच्या क्रिया देखील त्याच लेखांत विवेचिल्या आहेत.

गृहस्थाश्रम—हा आश्रम म्हणजे गृहस्थधर्माचा इतिहास. जेव्हां अपत्यसंरक्षणाची जबाबदारी बापावर पडावयास लागेल तेव्हां समाज मातृसत्ताक कुटुंबपद्धतींतून पितृसत्ताक कुटुंब-पद्धतीकडे वळूं लागला किंवा " कुल " संस्थेस गृहस्थ धर्मास सुरवात झाली असें समजावें. वैदिक काळांत गृहस्थ-धर्म अगोदरच स्थापित झालेला दिसतो, म्हणजे समाजाच्या

यूथावस्थेपासून गृहस्थधर्मापर्यंतचा विकासक्रम आपणांस वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासानें उपलब्ध होणार नाहीं सूतसंस्कृतीच्या प्राचीन अवशेषांचें भांडार जें महाभारत त्याच्या अभ्यासानें या दोन अवस्थांतील विकासक्रम शोधण्याचें कांहीं काम रा. वि. का. राजवाडे यांनीं करून चित्रमयजगत्मध्यें (पु. १४) लेख लिहिले आहेत. त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—

सोदर बहिणभावंडांचा, पितादुहितांचा व मातापुत्रांचाहि शरीरसंबंध अत्यंत प्राचीन आर्यकालीं होत असे. त्यावेळीं फक्त स्त्री व पुरुष हे दोन संबंध मात्र समाजाच्या लक्षांत आलेले होते. अनेक सपिंड पुरुषांचा एकाच सपिंड स्त्रीशीं संबंध दाखविणारीं वाक्यें भारतेतिहासांतून सांपडतात मद्रदेशांतील अनाचार कर्णपर्वांत स्पष्टपणें दिला आहे. त्यावेळीं दिवसाढवळ्या उघडया जागेंत स्त्रीसमागम होत असे, याला पराशर-मत्स्यगंधाकथेचा पुरावा आहे. तसाच वामदेव्यव्रताच्या वेळीं यज्ञभूमीवर उघड संभोग केल्याचीं महाभारतांत वरींच उदाहरणें आहेत. तेव्हां मैथुन एकांतांत करावें अशा प्रकारचें स्मृतिवचन घालण्याचें कारण पडलें असावें. यावरून हेंच सिद्ध होतें कीं मनुष्य वंशानें पाशव असून प्राथमिक वन्य मनुष्यांत कांहीं बाबतींत पशूंचें आचरण दृष्टीस पडल्यास नवल नाहीं.

वर उल्लेखिलेला संकीर्ण समागम व उघडा समागम यांखेरीज तिसरी एक वन्य चाल आर्यांत होती. ती म्हणजे देवांनां अग्रोपभोगाचा हक्क देण्याची होय. स्त्रियांनां अग्रोपभोगाकरितां देवांच्या स्वाधीन करण्याची ही पुरातन चाल सांस्कारिक अवशेषरूपानें आजहि आपणांत प्रचलित आहे. सोम, गंधर्व, अग्नि यांशीं विवाह होऊन नंतर व्यक्तीशी विवाह आजच्या ब्राह्मसंस्कारामध्यें होतो. तसेंच कन्यादूषण, कन्या-स्त्रीविक्रय, अनैसर्गिक संभोग वगैरे चाली आर्यसमाजांत रूढ होत्या. म्हणजे समाज यूथावस्थेंत असतांना त्यांत वरील चालीरीती असत व पुढें एकेक मोडत चालली.

मांत्रसंस्कृतीच्या व सूतसंस्कृतीच्या एकत्वाच्या, म्हणजे पारिक्षित जनमेजयाच्या कालापासून सूतसंस्कृतींत देखील गृहस्थधर्मसंस्थापनेच्या पूर्वींचे अवशेष दिसत नाहींसे होतात. गृहस्थधर्माचें विवेचन धर्मशास्त्रकारांनीं केलें आहे. त्यांत गृहस्थाचें स्त्रीशीं वर्तन कसें असावें हा भाग थोडासा आहे. तथापि बरेंचसें विवेचन श्रौत, गृह्य व आतिथ्य या धर्मांच्या विवेचनानें व्यापिलें आहे. या विवेचनांतील मुख्य विषय पुढीलप्रमाणें होत.

कोणत्या अग्नीवर कोणतें कृत्य करावें; गृहस्थाचे धर्म; दंतधावन; योगक्षेमाकरितां राजाश्रय करणें; वेदादि पठण; पंचमहायज्ञ; भूतयज्ञ; पितृमनुष्यादिकांनां अन्नदान; अवशिष्ट अन्नाचें सेवन; अतिथींनां भोजन व भिक्षेकऱ्यास भिक्षा; श्रोत्रियाचा सत्कार; प्रतिसांवत्सरिक अर्घ्यादि पूजन; अतिभोजन वगैरे वर्ज्य करणें; सायंसंध्यादि; ब्राह्ममुहूर्तावर उठून स्वतःचें हितचिंतन; वृद्धास प्रान देणें; योग्य वृद्धादिकांनां मार्ग देणें; द्विजातीयांचीं कर्में; क्षत्रिय व वैश्य यांचीं कर्में; श्रौतधर्माचरण; श्रौतकर्में; नित्यश्रौतकर्में; यज्ञाकरितां हीन जातीपासून द्रव्य न घेणें; धान्यसंग्रह करणें; आहुतिप्रक्षेप; पंचमहायज्ञावशिष्ट अन्नाची योजना; भिक्षा अर्पण करणें; अतिथिसत्कार; अर्भकादिकांनां अतिथींच्या पूर्वी भोजन देणें; अवशिष्ट अन्नाचें भोजन; केवळ स्वतःकरितां पाकाचा निषेध; राजादिकांचें पूजन; स्त्रीकर्तृक बलिहरण; धनसंचय; आपत्कालाव्यतिरिक्त जीवनक्रम; धान्यसंचय किती करावा; शिलोंच्छ वृत्ति; निंद्य कर्मादिकांचा त्याग; संतोषाची प्रशंसा; वेदोदित कर्मानुष्ठान; गृह्याग्नीची उपासना, गार्हस्थ्याचे दोन भेद; साधकाचीं कर्में; असाधकाचीं कर्में; इ.

गृह्यसूत्रें—स्मार्तधर्म म्हणजे गृह्यसूत्रोक्तधर्म होय. हा धर्म बराच जुना आहे. श्रौतसंस्था ज्या वेळेस तयार होत होत्या त्यावेळेस सामान्य जन कांहींहि कर्म नसलेला खास नव्हता. त्यास जीं कांहीं कर्में लागलीं होतीं तीं अथर्ववेदांत दिलीं आहेत. अथर्ववेद व गृह्यसूत्रें यांचा परस्परसंबंध दाखविणारें एक कोष्टक "वेदविद्या" मंथाच्या परिशिष्टांत दिलेंच आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं यज्ञसंकोचाच्या कालीं बेकार होऊं घातलेला श्रौतविद्याविभूषित असा वर्ग उपजीविकेसाठीं गृह्यकर्माकडे वळला व अथर्ववेदी वर्गाची बहुतेक विद्या आत्मसात करून घेण्याचा त्रैविद्यांनीं निश्चय केला व आपापल्या मंडळींसाठीं निरनिराळीं गृह्यसूत्रें तयार केलीं; तीं केलीं त्यावेळेस ब्राह्मण जात ही बऱ्याच अंशीं इतर धंदे करणारी व पोटजाती असलेली जात बनली असावी. नाहींतर प्रत्येक शाखाविशिष्ट निरनिराळें गृह्यसूत्र करण्याचें कारण नव्हतें. गृह्यसूत्रांचें सामान्य विवेचन वेदविद्या पृ. १८०-१८२ पृ. २१५-२२१ परिशिष्ट १२२-१२६ येथें दिलें आहे. बौधायन गृह्यसूत्राच्या टीकेंत शामशास्त्री यांनीं आग्निवेश्य सूत्रांतील दिलेल्या उताऱ्यांत बौधायन, अपस्तंब, सत्याषाढ, द्राह्मायण, शांडिल्य, आगस्त्य, आश्वलायन, शाभव, कात्यायन हीं नऊ पूर्वगृह्यसूत्रें व वैखानस, शौनकीय, भारद्वाज, आग्निवैश्य, जैमिनीय, वाधूल, माध्यंदिन, कौंडिण्य व कौषीतकी हीं नऊ अपरगृह्यसूत्रें होत असें म्हटलें आहे. परंतु हा आग्निवैश्यातील उतारा बराच संशयित दिसतो. कांहीं गृह्यसूत्रविषयक टीपा यापुढें देतों.

शां खा य न गृ ह्य सू त्र.—या सूत्राचा कर्ता शांखायन कुलोत्पन्न सुयज्ञ असला पाहिजे. इतर गृह्यसूत्रांत जे तर्पण विधी दिले आहेत त्यांवरून हें अनुमान निघतें. या तर्पण विधींत जीं ऋषींचीं नांवें दिलीं आहेत त्यांमध्यें सुयज्ञ आणि शांखायन यांचीं नांवें अगदीं जवळ जवळ आहेत. इतर गृह्यसूत्रांप्रमाणें यासहि श्रौतसूत्र आहे व त्याचा गृह्यसूत्रांत पुष्कळ वेळा उल्लेख आलेला आहे.

या गृह्यसूत्र व श्रौतसूत्राचा कर्ता एकच आहे कीं काय असा प्रश्न साहजिकपणें उद्भवतो. आंतील पुराव्यावरून निर्णयात्मक असें कांहीं सांगतां येत नाहीं. दोहोंचा कर्ता एकच आहे म्हणावें तर श्रौतसूत्रांत जीं सूत्रें यावयास पाहिजेत तीं गृह्यसूत्रांतच आलीं आहेत. कोणी असें म्हणेल कीं येवढ्या मोठ्या ग्रंथाचा कर्ता ज्यावेळेस एकच असतो त्या वेळेस असें चालावयाचेंच. परंतु दुसराहि एक मुद्दा विचारणीय आहे तो हा कीं, यांतील सूत्रें इतर गृह्यसूत्रांत सांपडतात. यावरून तीं सगळीं तिसऱ्याच एखाद्या नष्ट झालेल्या ग्रंथांतून घेतलीं असावीं असें अनुमान निघतें. तथापि एकंदरींत निर्णयात्मक असें कांहीं सांगतां येत नाहीं.

शांखायन गृह्यसूत्रांतील कांहीं भाग मागाहून लिहिला गेला आहे. याचा पांचवा अध्याय परिशिष्ट म्हणून जोडला आहे. टीकाकार नारायण यास 'परिशिष्टाध्याय' असें म्हणतो. पांचव्या अध्यायांतील मजकूरहि आपणांस तसाच दिसतो. या अध्यायांत पहिल्या चार अध्यायांत सांगितलेल्या मजकुराचाच अनुवाद आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं कांहीं नवी माहिती जोडली आहे. सहाव्या अध्यायाची देखील हीच स्थिति आहे.

पा र स्क र गृ ह्य सू त्र.—पारस्कराचें गृह्यसूत्र हें शुक्ल यजुर्वेदाचें एक सूत्र असून कात्यायनाच्या श्रौतसूत्राची ती पुरवणी आहे. प्रोफेसर स्टॅंझलर यानें त्याचें जर्मन भाषेंत भाषांतर केलें असून जयराम आणि रामकृष्ण या टीकाकारांवर विशेष भिस्त ठेविली आहे. पण याशिवाय आणखी एक टीका उपलब्ध आहे. परंतु तो स्वतंत्र ग्रंथ असा नसून त्यांतील मजकूर वऱ्याचशा ग्रंथांतून वाटला गेला आहे. प्रो. स्टॅंझलर यानें केलेलें भाषांतर एकांगी झालें असून कांहीं ठिकाणीं अर्थविपर्यासहि झाला आहे.

गो भि ल गृ ह्य.—हें सामवेदाचें गृह्यसूत्र आहे. सामवेदाच्या कौथुमी व राणायणी या दोन्ही शाखांनां हेंच सूत्र आहे. शांखायन, आश्वलायन, पारस्कर, सत्याषाढ या गृह्यसूत्रांहून गोभिल गृह्यसूत्र एका विशिष्ट बाबतींत अगदीं निराळें दिसतें. सर्व सूत्रें वेदसंहिता गृहीत धरतात त्याप्रमाणें गोभिलसूत्रहि धरितें, पण वेदसंहितांहून एक निराळा मंत्रसमुच्चय या सूत्राला आधारभूत असलेला दिसतो. तो समुच्चय म्हणजे ब्राह्मण ग्रंथांतील होय. विवाहादि गृह्यसंस्कारांच्या कामीं निवळ संहितेंतील मंत्रांवर भागणार नाहीं ही जाणीव गोभिल सूत्रकाराला होती म्हणून त्यानें ब्राह्मणांतील मंत्रांची सररहा मदत घेतली आहे. या सूत्रांतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यांत कांहीं आख्यायिकांचा भाग आलेला आहे.

खा दि र गृ ह्य सू त्र.—खादिर गृह्यसूत्र हा सामवेदांतील द्राह्यायण शाखेचा एक भाग आहे. याचा प्रसार हिंदुस्थानच्या दक्षिण भागांत दिसून येतो. ज्याप्रमाणें द्राह्यायण श्रौतसूत्र हें लाट्यायनाच्या सूत्राचें एक थोडेसें विकृत रूपांतर आहे त्याप्रमाणें खादिर गृह्यसूत्र हें गोभिलीय गृह्यसूत्राच्या आधारें लिहिलें आहे. खादिरानें त्यांतून बरींच सूत्रें घेतलीं आहेत. गोभिलाप्रमाणें खादिरानेंहि पूर्णमंत्र दिले नसून केवळ त्यांचीं प्रतीकें दिलीं आहेत.

अर्थातच खादिर गृह्यसूत्र हें गोभिलीय गृह्यसूत्राचें एक संक्षिप्त रूपांतर आहे. यांत गृह्यविधी थोडक्यांत दिले आहेत व गोभिलानें ते आपल्या सूत्रांत फार विस्तारानें दिले आहेत. त्याचप्रमाणें खादिरानें गोभिलाचें विषयांतरहि सोडून दिलें आहे. खादिर गृह्यसूत्रांतील कांहीं भागाचा संबंध लाट्यायनसूत्राशीं व द्राह्यायणसूत्रांशीं आढळून येतो. या ग्रंथानें गोभिलाच्या सूत्रावर चांगला प्रकाश पडतो. हा ग्रंथ फार लहान असून यावर रुद्रस्कंदाची एक टीका आहे. वरील गृह्यांखेरीज आणखी जीं कांहीं सूत्रें आहेत त्यांची माहिती त्या त्या लेखांत सापडेल.

गेउजीहळ्ळी—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. हनगलच्या दक्षिणेस दोन मैलांवरील एक खेडें. येथें बसवेश्वराचें देऊळ असून मूर्तिच्या दोन्ही बाजूस इ. स. ११०३ चे दोन शिलालेख आहेत.

गेडी (१).—काठेवाड. भोयका ठाण्यांतील निराळी खंडणी देणारा एक तालुका.येथून जवळचें लिंबडी रेल्वे स्टेशन ९ मैलांवर आहे.

(२) मुंबई. कच्छ. वागडच्या उत्तरेकडील खेडें. कच्छमधील हें फार जुन्या वस्तीचें ठिकाण असून प्राचीन विराटनगर तें हेंच असावें असा समज आहे. येथील जुन्या अवशेषांत गाढवाचा छाप असलेली नाणीं आढळतात. मुसुलमान, रजपूत, वाघेला व जाडेजा लोकांचा येथें अंमल होता.

महादेव अचलेश्वरांचें मंदिर, महावीरजींचें व लक्ष्मीनारायणाचें देऊळ, आशाबा पीराची पडित मशीद व मालन विहीर हीं येथील प्राचीन स्थळें आहेत. बाजरांत एक क्षेत्रपाळाची दगडी मूर्ति आहे. तिच्या चबुत्र्यावरील अंकित लेखावरून ती १२११ त घडविलेली असावी असें वाटतें.

गेबर—एक रासायन ग्रंथकार. रसायन शास्त्राच्या अनेक ग्रंथांतून "गेबर" या नांवाचा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख केलेला आढळतो. परंतु "गेबर" ही व्यक्ति कोण याचा अजून नीटसा तपास लागलेला नाहीं. लॅटिन भाषेंत रसायनशास्त्रावर जीं पुस्तकें आहेत त्यांतील कांहीं पुस्तकें गेबर नांवाच्या अरबस्तानांतील एका रसायनशास्त्रज्ञानें लिहिलेल्या पुस्तकांचीं भाषांतरें आहेत व तो गेबर इसवी सनाच्या आठव्या किंवा नवव्या शतकांत होऊन गेला असा "किताब-अल-फिरिस्त" मध्यें उल्लेख आहे. या ग्रंथांतहि तो कोण, व कोठला याविषयीं परस्परविरोधी विधानें पुष्कळ आहेत. बर्थेलोनें पारिसमधील ग्रंथसंग्रहालयांतील 'गेबर' च्या पुस्तकांचें निरीक्षण करून असा निष्कर्ष काढला आहे; कीं हीं लॅटिन भाषेंतील पुस्तकें लिहिणारा मनुष्य अरबस्तानांतील नसून तो यूरोपखंडांतीलच कोणीतरी

गेबर असावा. परंतु कांहीं पुस्तकें अरबी लोक व यूरोपियन लोक यांचा संबंध येण्यापूर्वी म्हणजे नवव्या व बाराव्या शतकाच्या दरम्यान अरबस्तानांत लिहिलीं गेलीं असावी.

या पुस्तकांतील भाषा अलंकारिक पण क्लिष्ट असून त्यांत मुसुलमानी धर्माचे उतारे आहेत; परंतु गंधक, पारा, व तालस यांपासून धातू उत्पन्न करतां येतात ही गेबरच्या नांवानें प्रसिद्ध असलेली कल्पना त्यांत नाहीं. बर्थेलो यास आणखी एक पुस्तक पॅरिस येथें मिळालें होतें व तें गेबरनें (अरबस्तानांत) लिहिलें असावें असें बर्थेलोचें मत आहे.

जर हीं पुस्तकें आरबी गेबरनें लिहिलीं नाहींत तर आजपर्यंत अरबांच्या रासायनिक ज्ञानांतील प्रगतीविषयीं जी कल्पना आहे ती खोटी ठरते व जर तीं पुस्तकें अरब गेबरनेंच लिहिलीं असें मानलें तर हल्लींपेक्षां प्राचीन काळीं अरबस्थानांत रसायनशास्त्रांत फारच प्रगती झालेली होती असें म्हणावें लागतें. परंतु या बाबतींत जास्त मुद्देसूद बातमी मिळेपर्यंत कांहींच मत देतां येत नाहीं.

गेरु-माटरगांव—वऱ्हाड—मध्यप्रांत. बुलठाण्याच्या पूर्वेस २२ मैलांवर गेरु-माटरगांव नांवाचें सरकारसंरक्षित जंगल आहे. त्यांत हें एक लहान खेडेगांव आहे. मोंगलाईत हें परगण्याचें मुख्य ठिकाण होतें त्यावेळीं कोळी लोकांचें हें मुख्य ठिकाण असून ते लोक लुटालुटीवर आपला निर्वाह करीत. येथें एक जुना दरगा आहे. कोळी आणि वंजारी लोकांची बहुतेक वस्ती असून ते गोणी (पोती) तयार करतात. येथें जंगलांतील विश्रांतीगृह असून आजूबाजूस चांगली शिकार मिळते. या गांवास चोरांचें माटरगांव असहि म्हणतात.

गेलुसॅक जासेफ लुई (१७७८-१८५०)—हा फ्रेंच रसायन व पदार्थविज्ञान यांचा शास्त्रज्ञ ता. ६ डिसेंबर १७७८ रोजीं जन्मला. ह्याचें लहानपणीचें शिक्षण बरेंचसें घरींच झालें. बर्थोलेला आपल्या संशोधनाच्या कामांत एका हुशार माणसाची जरूरी होती व त्याच्या हाताखालीं काम करण्याची गेलुसॅकला ही जागा मिळाल्यामुळें संधि मिळाली. परंतु बर्थोलेला याचा आपलीं अनुमानें सिद्ध करण्यांत फारसा उपयोग झाला नाहीं. तरी पण त्याला आपल्या शिष्याच्या बुद्धिमत्तेची बरोबर कल्पना आल्यावरून त्यानें त्यास 'सोसायटी ड आर्क्युइल'चा सभासद केलें. १८०२ मध्यें त्याला एकोल पॉलिटेक्निकमध्यें (विविधकलाशाळेंत) फोरक्रॉयचा डेमोन्स्ट्रेटर नेमलें व तेथेंच तो १८१०सालीं रसायनशास्त्राचा मुख्य अध्यापक झाला.

गेलुसॅकचें पहिल्याप्रथम सर्व लक्ष पदार्थविज्ञानशास्त्राकडेच होतें. वायु, बाष्प, आर्द्रतामापन, केशाकर्षण इत्यादि बाबतींत प्रयोग केल्यावर त्यानें बरेच महत्वाचे लेख लिहिले. तो उंचीवरील हवेंत पृथ्वीच्या लोहचुंबकाच्या जोरांत कांहीं फरक होतो कीं काय हें पहाण्याकरितां विमानांतून दोनदां फार उंच गेला होता, व त्यास तेथें लोहचुंबकाचा जोर असेल हें आढळून आलें. त्यानें, दोन वायूंच्या मिश्रणामें एखादें नवीन रासायनिक द्रव्य बनतें तेव्हां ते वायू एका ठराविक आकारमानांत मिश्रण पावतात. उदाहरणार्थ जेव्हां उज्ज आणि प्राणवायु मिळून पाणी होतें तेव्हां प्राणवायूच्या म्हणजे आक्सीजनच्या दुप्पट प्रमाणांत उज्ज उर्फ हैड्रोजन असतो हें दाखविलें.

ह्यानंतर गेलुसॅकनें पदार्थविज्ञानाचा व्यासंग सोडून दिला असें जरी नाहीं, तरी त्यानें रासायनिक संशोधनांतच काळ घालविला. १८०८मध्यें त्यानें पालिश धातु तयार केला. १८०९ मध्यें बोरिक अम्लापासून बोरान हें मूलद्रव्य वेगळें केलें. ह्या नंतर विपाक (आंबवण) ह्यावरहि त्यानें बरेच प्रयोग केले, प्रसिक अम्लाचे गुणधर्म शोधून काढले इत्यादि त्यानें बरेच सेंद्रिय रसायनशास्त्रांत संशोधनाचें काम केलें. यासमयीं याची रसायनशास्त्रवेत्यामध्यें प्रामुख्यानें गणना केली जात असे व त्यामुळें औद्योगिक धंद्यामध्यें त्याची सल्ला घेत असत. त्यातल्या त्यांत गन्धकाम्ल तयार करण्याच्या पद्धतींमध्यें त्यानें बरीच सुधारणा केली. गेलुसॅक हा धीर वृत्तीचा, चिकाटीचा व अतिशय टापटिपीचा होता. शिवाय तो संकोचवृत्तीचा असून आपल्या स्वतःमध्यें किती चांगले गुण आहेत याची त्यास जाणीव नव्हती. तथापि तो धाडशी व अतिशय उत्साही असे.

गेवराई—हैद्राबाद संस्थानांतील बीड जिल्ह्यातला तालुका. क्षेत्रफळ ५६४ चौ. मै. जहागीर मुलुखासुद्धां लोकसंख्या (१९११) ८६३११. यांत १६ जाहागिरी व १३५ खेडीं आहेत. १९०१ मध्यें साऱ्याचें उत्पन्न २.३ लाख होतें. तालुक्याचें मुख्य ठिकाण गेवराई असून वस्ती (१९११) ३५६५ आहे.

गेवर्धा जमीनदारी—मध्यप्रांत. चांदा जिल्हा. या जमीनदारीचे तीन परगणे आहेत; बेडगांव, रामगड आणि गेवर्धा. बेडगांव आणि रामगड परगण्यांत सातनाळा डोंगर आहेत. एकंदर खेडीं ७७. लोकवस्ती (सन १९०१) ७७१५, इस्टेट साधारण बऱ्या स्थितींतील आहे. जमीनदारीचें अस्तित्व अलीकडचेंच आहे. उत्पन्न ४५०० रु. टाकोळी व इतर कर रु. ८७२॥.

गेस्लर हेन्रिश—(इ.स. १८१४–१८७९) या जर्मन पदार्थविज्ञानशास्त्रवेत्याचा जन्म जर्मनींतील इग्लेशीब नांवाच्या गांवीं झाला. सन १८५४ सालीं यानें बॉन नांवाच्या शहरीं आपलें कायमचें वास्तव्य केलें. यापूर्वी याला कांच तयार करण्याचा धंदा शिकविला होता. पुढें बॉन शहरीं यानें रसायनशास्त्र आणि पदार्थविज्ञानशास्त्र यांच्या उपयोगीं उपकरणें तयार करण्यांत उत्तम नांव कमाविलें. यापूर्वी सन १८५२ सालीं जुलिअस प्लुइकर याच्या बरोबर काम करून त्यानें असें सिद्ध करून दाखविलें कीं ३.८° उष्णमानावर पाण्याचें जास्तीत जास्त दार्ढ्य असतें. –२४° ते –७° उष्णमान असताना बर्फाच्या वृद्धिमानाच्या गुणकाविषयीं त्यानें प्रयोग केले आहेत. शिरगोळा आणि टोपॅझ यांच्या आंत ज्या फटी अगर पोकळ जागा असतात

त्यांत कर्बद्विप्राणिद नांवाचा वायु असतो असें त्यानें सिद्ध करून दाखविलें व साध्या स्फुरावर विद्युत्प्रवाहाचें कार्य घडवून विशिष्ट प्रकारचा स्फुर तयार करितां येतो असें त्यानें दाखवून दिलें. परंतु त्यानें एका विशिष्ट प्रकारच्या कांचनलिका तयार केल्यामुळें तो जास्त प्रसिद्ध झाला आहे. अत्यंत विरल स्वरूपांत निरानिराळ्या मूलद्रव्यांची वाफ कांचेच्या नळींत घालून तींतून विद्युत्प्रवाह पाठविला असतां विशिष्ट प्रकारचा प्रकाश पडतो व हा प्रकाश प्रकाश-पृथक्करणयंत्रांतून पाहून कांहीं विशेष अनुमानें बसवितां येतात. या कांच-नलिकांस " गेस्लरच्या नलिका " असें नांव देण्यांत आलें आहे. पारदवाताकर्षक यंत्र, तुला, उष्णतामापक यंत्र इत्यादि अनेक शास्त्रोपयोगी उपकरणें त्यानें बनविलीं आहेत. सन १८६८ सालीं त्याला बॉन येथील विश्वविद्यालयांतून डॉक्टर आफ् फिलासफी ही बहुमानाची पदवी अर्पण करण्यांत आली. बॉन येथें याचा मृत्यु झाला.

गेळ—या झाडास संस्कृतांत मदन, लॅटिनमध्यें रेडिया, डयुमाटोनिअम; इंग्रजींत एमेटिक नट; मराठींत गेळ किंवा गेळफळ;कानडींत गेळ, हिंदींत मेणफल, करहर इत्यादि नांवें आहेत. हें झाड सर्व हिंदुस्थानभर जंगलांत आढळतें. यास दोन अंगुळेंपर्यंत लांबीचे लहान मोठे कांटे असतात. याचें फळ सुपारीएवढें असतें व तें पिकल्यानंतर पिवळें होतें. या फळाची भुकटी करून कोळी लोक नदींत टाकतात त्या योगें मासे लुब्ध होऊन पकडले जातात. गेळ पोटांत गेल्यास ओकारी येते. याचा गळवावर लेप केल्यास तें पिकतें.

गैबीनाथ—(१५२०—१५८०) ज्ञानेश्वरमहाराजांच्या परंपरेतील एक गुरु. यांची परंपरा ज्ञानेश्वर-सत्यात्मक-गैबी अशी आहे. यापुढील शिष्यपरंपरा (गैबी) गुप्तनाथ-उद्बोध-केसरी. यांचे ग्रंथ पंचीकृतविवेक, कांहीं अभंग व पदें. [सं. क. का. सू.]

गोएटे-(१७४९-१८३२) जोहान वूल्फ गँडा व्हॉन गोएटे हा जर्मनींतील एक कवि, नाटककार व तत्ववेत्ता होता. ह्याचा जन्म २८ आगष्ट सन १७४९रोजीं फ्रँकफोर्ट-ऑन-मेन मध्यें झाला. जन्माच्यावेळीं त्याची आई फक्त१८च वर्षांची असल्या-मुळें, तिच्या सान्निध्यानें गोएटेला चांगलें गृहशिक्षण मिळालें. त्याच्यावर पित्याच्या कडक स्वभावाचा परिणाम होऊन त्याचा स्वभाव स्थिर व धिमा बनला होता. त्याला बालपणीचें सर्व शिक्षण आपल्या पित्याकडून मिळालें. शिवाय फ्रँकफोर्ट-ऑन-मेन येथील त्याचा जीवितक्रम विविध तऱ्हेचा व मजेदार असल्यामुळें त्यापासूनहि त्यानें ज्ञानार्जन केलें. १७६५ च्या ऑगष्ट महिन्यांत गोएटे फ्रँक फोर्टहून लाइप्झिग येथें गेला; परंतु विश्वविद्यालयीन अभ्या-साची पूर्व तयारी या दृष्टीनें त्याचा फ्रँकफोर्ट येथील अभ्या-सक्रम विशेष समाधानकारक झाला नव्हता. येथें त्याची दृष्टि विस्तृत झाली व फ्रँकफोर्ट येथें केलेली अल्पस्वल्प साहित्यसेवा त्याला फारच कोती भासूं लागली. पुढें तो भावगीतें लिहावयास शिकला. छात्रवृत्तीची दगदग सहन न झाल्यामुळें तो आजारी पडला व लिप्झिगहून फ्रँकफोर्टला आला. हें दुखणें बरें होत असतां त्याचा दृष्टिकोण पार बदलला व तेथून त्याच्या आयुष्याला निराळेंच वळण लागलें व आपल्या बापाच्या इच्छेप्रमाणें त्यानें स्ट्रासबर्ग येथें कायद्याचा अभ्यास केला. येथें गोएटेची व हर्डरची ओळख झाली. स्ट्रासबर्ग येथें एका फ्रेडरिक ब्रायन नांवाच्या तरुणीवर त्याचें प्रेम बसलें. परंतु त्याचा परिणाम विवाहांत झाला नाहीं. १७७१ मध्यें त्यानें पदवी घेतली व आपल्या गांवीं येऊन धंद्यास प्रारंभ केला. त्याचें दोन चार तरुणींवर प्रेम बसलें होतें परंतु त्याचें लग्न त्यांपैकीं एकीशींहि झालें नाहीं. एका प्रेमकथेचा वृत्तांत त्यानें आपल्या 'वेर्टरचीं दुःखें' (वेटर्स लीटेन) यामध्यें दिला आहे. यांतील कांहीं भाग डा. गुणे यांनीं मनोरंजनांत अवतरिला आहे.

१७७४ त वीमरच्या चार्लस ऑगस्टसनें गोएटेला बोला-विलें व १७७५ त तो तेथें गेला. त्यापुढील त्याचें सर्व आयुष्य तेथेंच गेलें. अनुक्रमें १७७७ व १७७९ त तो हार्झ पर्वत व स्वित्झरलंड येथें जाऊन आला. त्यानें १७८६-८८ मध्यें इटलीमध्यें प्रवास केला. इटलींत असतांनां कलापेक्षां प्राचीन गोष्टींकडे त्याचें लक्ष विशेष जाई. या त्याच्या प्रवा-सामुळें कित्येक अज्ञात अशा गोष्टी त्याच्या प्रत्ययास आल्या. इटलीहून परत आल्यावर ख्रिस्तेन हुल्पीयस या बाईस त्यानें आपल्याजवळ ठेवलें.

त्याला सुख देण्यांत ही बाई फार तत्पर असे. १८०६ मध्यें या दोघांनीं आपला संबंध कायद्यानें संमत असा करून घेतला. १७९१ त गोएटेला वीमर येथील नाटकगृहाचा व्यवस्थापक नेमण्यांत आलें होतें. पुढें शिलर व गोएटे यांची दाट मैत्री जमली व जर्मनींतील या दोन प्रमुख कवींच्या स्नेहाचा परस्परांवर पुष्कळ परिणाम झाला. नवीन अद्भुत वाङ्मयविषयक चळवळीचे पुरस्कर्ते गोएटेला आपला गुरु समजत असत; कारण गोएटे स्वतः जरी प्रथम या चळ-वळीच्या विरुद्ध होता तरी त्याचे ग्रन्थ व त्याची कविता तिला अनुकूल अशीच होती. नेपोलियनविषयीं याचें मत चांगलें होतें. १८०५ त शिलर मृत्यु पावल्यामुळें गोए-टेचें फार नुकसान झालें. फॉस्टचा दुसरा भाग पुरा करून मग गोएटेनें आपला देह ठेविला. त्याचा अंत ता. २२ मार्च १८३२ रोजीं झाला.

गोएटेच्या मरणानंतर थोडे दिवस त्याची व्हावी तशी कीर्ति झाली नाहीं, परंतु पुढें तो लोकांच्या पुढें इतका प्रामुख्यानें आला कीं, त्याचा आयुष्यक्रम व त्याचे ग्रंथ यांवर लोकांनीं बरेंच मोठें वाङ्मय तयार केलें.एकंदर ग्रंथाच्या संख्येच्या मानानें पाहिलें असतां गोए-टेच्या काव्याचें नैसर्गिक महत्व वाखाणण्यासारखें नाहीं. त्याचें बरेचसें काव्य आत्मविषयक आहे; आणि तेंच त्याचें उत्कृष्ट

काव्य आहे; इतर विषयांवर त्यानें फारच थोडें लिहिलें आहे.

भावगीतें लिहिण्यांत त्याचा हातखंडा होता. जर्मन भाषेंतील बरेंच काव्य भावगीतात्मक आहे. परंतु त्या सर्वांमध्यें गोएटेचें काव्य उत्तम आहे. याच्या नाट्यग्रंथाबद्दल लोकमत फारसें अनुकूल नाहीं. तरी पण स्वभाववैचित्र्य रेखाटण्यांत त्याचा हात आधुनिक कवींपैकीं कोणीहि धरूं शकणार नाहीं. इतकें मात्र खरें कीं, नाट्यांतील निर्बंधांचा त्याला फार तिटकारा असे व त्यामुळें त्याचीं नाटकें प्रयोगाच्या योग्यतेचीं होत नसत.

गोएटे हा फक्त वाङ्मयाचाच भोक्ता होता असें नाहीं. मुत्सद्देगिरी, नाट्यगृहव्यवस्था, अर्थशास्त्रीय तत्वांचा व्यवहारांत उपयोग इत्यादि गोष्टी त्याच्या नानाविषयपटुत्वाबद्दल साक्ष देतात.

फॉस्ट हा गोएटेचा सर्वांत नांवाजलेला ग्रंथ होय. फॉस्ट नाटक क्रमाक्रमानें लिहिलें गेल्यामुळें गोएटेला तें त्याच्या आयुष्यभर पुरलें. त्यानें बरेच ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं कांहीं प्रमुख खालीं दिले आहेत. गोट्झ व्हॉन बर्लिशिंगेन, क्लॅव्हिगो, एगमाँट विल्हेल्म मीस्टर, हर्मन अँड डोरोथिया वगैरे. गोएटेनें आपलें आत्मचरित्रहि लिहिलें आहे.

गोकर्ण—मुंबई इलाखा. उत्तर कानडा जिल्हा. कुमठें तालुक्यांतलें एक शहर. उत्तर अक्षांश १४° ३२' व पूर्व रेखांश ७४° १९'. लो. सं. (१९११) ४८४१. हें एक यात्रेचें ठिकाण आहे. येथें महाबलेश्वराचें मंदिर द्राविडधर्तीचें आहे. हें द्वादशज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. येथें १०० च्या वर अखंड नंदादीप असतात. ब्रह्मा, विष्णु, शिव, अगस्त्य, राम आणि रावण यांचींहि देवळें येथें आहेत. याठिकाणीं स्नान केलें असतां ब्रह्महत्येचें पातकहि नाहींसें होतें असें स्थानमाहात्म्यांत सांगितलें आहे. शिवरात्रीस दरसाल यात्रा भरते. महाभारत व रामायण यांत सुद्धां या स्थानाचें माहात्म्य वर्णिलें आहे. कालिदासानें याचा उल्लेख केला आहे. डॉक्टर जॉन फ्रायर या आद्य यूरोपियन प्रवाशानें १६७५ त या स्थानाला भेट दिली व याचें रसभरित वर्णनहि लिहून ठेविलें आहे. तें व गोकर्णमहाबळेश्वराच्या देवळाचें वर्णन मुंबई ग्याझेटियरच्या कानडा विभागांत (१५. २) आढळेल.

गोकर्णी—हा एक फुलाचा वेल आहे. याच्या फुलाच्या रंगावरून पांढरी व काळी अशा गोकर्णीच्या दोन जाती आहेत. या झाडास लॅटिनमध्यें क्लिटोरिआ टर्नाटिआ; संस्कृतमध्यें अपराजिता, गोकर्णी; मराठींत गोकर्णी; गुजराथींत गुरणी वगैरे नांवें आहेत. गोकर्णीस लांबट शेंगा येतात. हिचीं फुलें आकारानें गाईच्या कानासारखीं असतात यामुळें या वेलास गोकर्णी हें नाव प्राप्त झालें आहे. हीं फुलें देवास वहातात. पांढरी गोकर्णी जास्त गुणावह आहे. गोकर्णीस "सुपली" व "काजळी" असेंहि म्हणतात. या वेलीचे अनेक औषधी उपयोग आहेत.

गोकाक ता लु का.—मुंबई. बेळगांव जिल्ह्याचा पूर्वेकडील तालुका. क्षेत्रफळ ६७१ चौ. मै. यांत गोकाक हें एक शहर व ११३ खेडीं. लोकसंख्या (१९११) १२३२२५. सारा व कर मिळून उत्पन्न सुमारें ।॥ लाख रु. याची हवा हिवाळ्यांत मलेरियादूषित व उन्हाळ्यांत भयंकर तलखी करणारी आहे. पावसाळा कायतो साधारण बरा असतो. पाऊसहि फार पडत नाहीं. गोकाकच्या टेंकड्यामुळें पलीकडील मैदानांत पाऊस कमी पडतो. गोकाकच्या दोन कालव्यांनीं २८ चौरस मैल जमीन भिजते. कालव्यांनां पाणी घटप्रभेचें घेतात. गोकाकचा प्रसिद्ध धबधबा याच नदीवरचा होय.

श ह र.—बेळगांव जिल्हा. गोकाक तालुक्याचें मुख्य शहर. उ. अ. १६°१०' व पू. रे. ७४°५३'. बेळगांवच्या आग्नेयीस सुमारें ३० मैलांवर हा गांव आहे. इ. स. १९११ त लोकसंख्या ७३२६ होती. हा गांव कागद व लांकडी कामें यांकरितां प्रसिद्ध आहे. गांवाभोंवतीं एक भिंत असून सभोंवार एक खंदकहि आहे. येथें दोन मशिदी, गंजीखाना व जैन देऊळ हीं जुनीं कामें आहेत. गोकाकच्या किल्ल्यास पंचमीगुड असेंहि म्हणतात. हा किल्ला गोकाकच्या पश्चिमेस असून विजापूरच्या आदिलशाही बादशहांपैकीं एकानें बांधला असावा असें म्हणतात.

धबधबा—:गोकाकच्या वायव्येस सुमारें साडेतीन मैलांवर गोकाकचा धबधबा आहे. हा उ. अ. १६°११' व पू. रे. ७४°५०' यावर आहे. घटप्रभा नदी सह्याद्रि पर्वतांतील अंबोली नामक खिंडींत उगम पावते. तिला मध्यंतरी ताम्रपर्णी व हरणकाशी या मोठ्या नद्या मिळतात. सुमारें ८५ मैल ही नदी वाहात आल्यावर गोकाकजवळ १७० फूट उंचीवरून उडी घेते. नदीच्या आसपासचा प्रदेश दगडाळ असून रुक्ष आहे. आक्टोबर ते डिसेंबर या महिन्याच्या दरम्यान धबधब्याची शोभा अवर्णनीय असते.

नदीकांठीं पुष्कळ देवळें आहेत. पैकीं एकांत इ. स. १०४७ सालचा शिलालेख असून महालिंगेश्वराच्या देवळांत इ. स. ११९३ सालचा जुन्या कानडी लिपींत लिहिलेला एक शिलालेख आहे. जवळच मार्केडेय नदीतीरावर मल्लाप्पा व निर्वाणप्पा अशीं दोन देवळें असून तेथें पुष्कळ लोक दर्शनास जातात.

इतिहासः—इ. स. १०४७ सालच्या एका शिलालेखांत गोकाजे म्हणून या गांवाचा उल्लेख केलेला आढळतो. इ. स. १७१९ सालीं गोकाक शाहूच्या राज्यांत मोडत होतें. इ. स. १७१९ व १७५४ यांच्या दरम्यान कधीं तरी सावनूरच्या नबाबकडे हा गांव गेला व त्याचवेळीं मशीद व गंजीखाना त्यांनीं बांधला. इ. स. १७५४ सालीं गोकाक पेशव्यांनीं जिंकलें. इ. स. १७७८ सालीं कित्तुरकर देसायांनीं गोकाकचा ताबा घेतला होता. परंतु इ. स. १७७९ सालीं परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं तें पुन्हां जिंकलें व देसायास कैद केलें. या वेळेपासून इ. स. १७८३ पर्यंत पेशव्यांकडे

गोकाक होतें. त्यासाली पटवर्धनांच्या सरंजामांत गोकाक पटवर्धनांकडे गेलें. इ. स. १७८९ सालच्या मराठी दप्तरांत गोकाक हें परगण्याचें मुख्य ठिकाण असून त्याचें उत्पन्न ११२५०रुपये होतें असा उल्लेख सांपडतो. इ.स. १७९७साली कोल्हापूर सरकारनें गोकाककडून १२०००० रुपये खंडणी सक्तीनें वसूल केली होती. इ. स. १८३६ साली तासगांवचे गोविंदराव पटवर्धन निपुत्रिक वारल्यामुळें गोकाक ब्रिटिश मुलुखांत खालसा होऊन गेलें. इ. स. १८७६-७७ सालच्या दुष्काळांत येथील विणकरी वर्गाचें अतोनात नुकसान झालें व तो धंदा बराच खालावला. या ठिकाणीं लुगडीं वगैरे स्त्रियांनीं वापरण्यायोग्य माल बराच तयार होत असे.

गोकुळ—संयुक्तप्रांत. मथुरा जिल्ह्यांतील एक शहर. उ. अ. २७°२६' व पू. रे. ७७°४६'. याच्या जवळून यमुना नदी वहात जाते. कृष्णाच्या बाळपणीच्या लीलांचें स्थान या नात्यानें गोकुळ हें फार पवित्र स्थान मानलें गेलें आहे. या ठिकाणीं गोकुळाष्टमीच्या दिवशीं मोठी यात्रा जमते. याशिवाय वल्लभाचार्यांचें हें रहाण्याचें ठिकाण म्हणूनहि हें प्रसिद्ध आहे. रमणरेती व ब्रह्मांडतीर्थ हीं गोकुळांतील स्थानें फार पवित्र मानिलीं जातात.

मराठ्यांच्या इतिहासांत गोकुळवृंदावनासंबंधीं पुढील उल्लेख सांपडतो "पठाणच्या लोकांनीं मथुरेवर हल्ला केला. नंतर त्यांनीं अलमशहाच्या नांवें द्वाही फिरविली व पंचवीस लक्ष विघ्न घेऊन आपला अंमल बसवून मथुरेहून फौज गोकुळवृंदावनास पाठविली कीं लुटून घेणें" (रा. खं. १ पृ. १११).

गोकुळ जाट—अवरंगझेबानें गादीवर आल्यानंतर थोड्याच वर्षांत हिंदूवर सर्वच बाजूंनीं अत्यंत जुलुम केल्यामुळें त्यांच्यांत असंतोष फैलावला. उत्तरहिंदुस्थानांत अवरंगझेबाच्या खुनापर्यंतहि प्रयत्न झाले.कांहीं काझींचे खून पडले (१६६९). मथुरा, अयोध्या व आग्रा या प्रांतांतील जमीनमहसूल गोळा करण्यास नेहमी त्रास पडे व शिपायांची मदत घ्यावी लागे; याचें कारण तेथील मुसुलमानी फौजदार हिंदु शेतकऱ्यांवर फार जुलूम करीत. यांपैकीं हिंदूंचा पोपाख करून त्यांच्या बायका पळवीत (१६३८ त मुर्शीदकुली फौजदारानें हा प्रकार केला होता), पैसे खात. त्यामुळें तिकडील जाट शेतकऱ्यांनीं तिलपतच्या गोकुळ जाटाच्या हाताखालीं बंड केलें. त्यानें मथुरेच्या फौजदाराला लढाईत ठार मारून, सदाबाद परगणा लुटला (१६६९). त्यावर सफशिकन, रणदुल्लासारखे बडे सरदार पाठवूनहि भागेना. तेव्हां खास अवरंगझेब चालून गेला. प्रथम गोकुळाला माफी देण्याची लालूच दाखविली, परंतु तो ऐकेना; तेव्हां लढाई झाली. गोकुळ व त्याचे जाट मोठ्या शौर्यानें लढले; पण सैन्याच्या कमतरतेमुळें त्यांचा पराभव झाला. गोकुळाला पकडून आणून आग्रा येथें त्याचा एकेक अवयव तोडून काढून मग ठार मारलें, व त्याच्या कुटुंबास बाटविलें. तरी पण हीं शेतकऱ्यांचीं बंडें थांबलीं नाहींत. १६७०, १६८१ व १६८८ मध्यें तीं उद्भवलीं व १६८८ तील पुढारी चूडामण जाट याचा पराभव अवरंगझेब अगर त्याचे वंशज यांच्या हातूनहि झाला नाहीं. पुढें तर (१६९१) या जाटांनीं मोंगल बादशहांनां फार त्रास दिला. एवढेंच नाहीं तर त्यांनीं अकबराचें थडगें फोडून त्यांतील त्याचीं हाडेंहि जाळलीं होतीं (स्मिथ). [जदुनाथ सरकार—अवरंगझेब; स्मिथ—ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया.]

गोकुळाष्टमी—श्रावणांतील वद्य अष्टमीस गोकुळाष्टमी किंवा जन्माष्टमी म्हणतात. या दिवशीं मध्यरात्रीं वसुदेव देवकीच्या पोटीं कृष्णाचा जन्म झाला असें भागवतांतील दशमस्कंधांत वर्णन आहे. हा दशावतारांपैकीं आठवा अवतार होय (कृष्ण पहा). गोकुळाष्टमीचें माहात्म्य वैष्णव संप्रदायांत विशेष आहे. गोकुळाष्टमीचें व्रतहि आहे. त्याचें भविष्यपुराणांतील विधान व्रतराज ग्रंथांत दिलें आहे.

गोखरू—(सराटे) या वनस्पतीस लॅटिनमध्यें ट्रिब्युलस टेरिस्ट्रिस;संस्कृतमध्यें गोक्षुर, इक्षुगंधा; मराठींत व गुजराथींत गोखरू, सराटे इत्यादि नांवें आहेत. गोखरूचें झाड लहान असून जमिनीवर पसरतें. हीं झाडें पावसाळ्यांत उगवतात व त्यांस लहान फळें येतात त्यांवर चार बाजूनें चार कांटे असतात. या झाडाची एक लहान जात आहे. तीस सराटे म्हणतात. औषधांत गोखरूच्या अभावीं सराटे घेतात. कारण दोहोंचे गुणधर्म एकच आहेत. गोखरू पौष्टिक असून नाना प्रकारें त्याचा औषधी उपयोग आहे.

गोखले, गोपाळ कृष्ण (१८६३-१९१५)— एक हिंदी राजकीय पुढारी. चिपळूण तालुक्यांत ताम्हणमळा गांवीं यांचा जन्म तारीख ९ मे सन १८६६ रोजीं झाला. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कुलांत व राजाराम कॉलेजांत शिक्षण घेऊन हे मुंबईस एलफिस्टन कॉलेजांत गेले. १८८४ सालीं बी. ए. झाल्यानंतर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीस हे जाऊन मिळाले. १८८४ पासून १९०२ पर्यंत गोखले डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सभासद व फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर होते. कॉलेजांत ते गणित, इंग्रजी वाङ्मय, अर्थशास्त्र व इतिहास शिकवीत असत. १८८७ सालीं गोपाळराव सार्वजनिक सभेचे चिटणीस व त्या संस्थेतर्फे निघणाऱ्या त्रैमासिकाचे संपादक झाले. १८८८ सालापासून सुधारक पत्राचें संपादकत्व गोखल्यांच्याकडे आलें. १८९५ सालीं राष्ट्रीयसभा पुण्यास भरली होती त्यावेळीं गोखले तिचे सेक्रेटरी म्हणून काम करीत होते. याप्रमाणें १८९० सालापासून अध्यापनाचें काम संभाळून गोपाळराव सार्वजनिक कामांत भाग घेऊं लागले. १८९७ सालीं हिंदुस्थानच्या वतीनें विलायतेस गेलेल्या प्रतिनिधींपैकीं गोखले हे एक होते. तेथें गेल्यावर त्यांनीं वेलबी कमिशनपुढें उत्कृष्ट साक्ष दिली व चांगला लौकिक मिळविला. १९०० सालीं गोपाळराव हे मुंबईच्या प्रांतिक कायदेकौन्सिलचे सभासद

झाले. लँड रेव्हेन्यूसंबंधी सरकारी धोरणावर गोखल्यांनीं कौन्सिलांत खूप टीका केली व शेवटीं त्यांनीं फेरोजशहामेथाबरोबर निषेधप्रदर्शनार्थ कौन्सिलांतून उठून जाण्याचें धैर्य दर्शविलें. फेरोजशहामेथानें वरिष्ठ कायदेमंडळांतील आपली जागा सोडल्यामुळें इ.स.१९०२ सालीं गोखले वरिष्ठ कायदेकौन्सिलचे सभासद झाले व तेथील काम त्यांनीं आमरण केलें. इ. स. १९०३ सालीं त्यांनीं बजेटावर वरिष्ठ कौन्सिलांत विद्वत्ताप्रचुर भाषणें केलीं. इ. स. १९०४ सालीं कर्झनच्या अमदानींत शिक्षणप्रगतीच्या गळ्यास नख लावणारे इंडियन युनिव्हर्सिटी बिल ज्यावेळीं पुढें आलें त्यावेळीं गोखल्यांनीं शिकस्त केली परंतु उपयोग झाला नाहीं. त्याच सालीं गोपाळरावांनां सी. आय. ई. असा सरकारकडून किताब मिळाला. १९०५ ते १९०८ हीं वर्षें हिंदी राजकारणांतील मोठ्या चळवळींचीं व अस्वस्थतेचीं दिग्दर्शक होत. बंगालच्या फाळणीमुळें व कर्झनशाहींतील एकंदर दडपशाहीमुळें लोकांचीं मनें बिथरून गेलीं होतीं. अशा समयीं राष्ट्रीय सभेस १९०५ मध्यें गोखल्यासारखा कर्णधार प्राप्त झाला व त्यासालची बनारसची काँग्रेस गोखल्यांच्या अध्यक्षतेखालीं उत्तम रीतीनें पार पडली. याच वर्षी मुंबई युनिव्हर्सिटीच्या फेलोशिपचा व पुणें म्युनिसिपॅलिटीच्या अध्यक्षत्वाचा मान त्यांनां मिळाला व त्यांच्या सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचा जन्महि १९०५ मध्येंच झाला. नंतर इंग्लंडांत लिबरलपक्ष अधिकारारूढ झाल्याचें पाहून गोपाळराव विलायतेस गेले. स्वदेशीं परत आल्यावर सनदशीर चळवळीवरील जनविश्वास नाहींसा झाल्याचें त्यांनां आढळून आलें व लगेच त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत व्याख्यानांचा दौरा काढला. पण काँग्रेसमध्यें दुफळी व्हावयाची ती झालीच. पुन्हां १९०८ मध्यें विलायतेस जाऊन त्याच सालीं प्रसिद्ध करण्यांत आलेल्या मोर्ले-मिंटो सुधारणेच्या योजनेबाबतींत गोखल्यांनीं बरीच मेहनत घेतली. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व मोफत करावें म्हणून १९१० सालीं त्यांनीं चळवळ सुरू केली. याच वेळीं दक्षिण आफ्रिकेंतील सरकारच्या दडपशाहीच्या धोरणास आळा बसावा व नाताळांत मुदतबंदीनें मजूर पाठविण्याचें बंद करावें असें त्यांनीं सरकारास सुचविलें. १९११ मध्यें प्राथमिक शिक्षणाचें बिल त्यांनीं वरिष्ठ कौन्सिलांत आणलें. १९१२ त दक्षिण-आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या प्रश्नाबद्दल तडजोड करण्याकरितां गोपाळराव विलायतेस गेले व तेथून ते आफ्रिकेंत गेले. तेथेंहि त्यांचा मोठा सन्मान झाला. यानंतर पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्यें गोपाळरावांची नेमणूक झाली, व १९१३मध्यें त्याच्या कामास सुरवात झाली. यावेळीं दक्षिण आफ्रिकेंतील लढा विकोपास गेला होता. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं सत्याग्रहास सुरवात झाली व गोखले गांधींच्या चळवळीकरितां फंड जमवूं लागले. १९१३ त ते पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामाकरितां विलायतेस गेले. परत आल्यावर त्यांची प्रकृति जी ढांसळली ती कायमचीच. १९१४ सालचा सर्व काळ वरील कामांतच गेला व या वर्षीहि ते पुनः विलायतेस जाऊन आले. त्यानंतर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांनां पुण्यास राहावें लागलें. अशा रीतीनें आपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें व निरलस रीतीनें देशसेवा करणाऱ्या या प्रसिद्ध देशभक्तानें पुणें येथें ता. १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं देह ठेविला.

लोकनायकाच्या अंगीं असणारे अनेक गुण गोपाळरावां मध्यें होते. देशाच्या स्थितीचें व राजनीतिशास्त्राचें यथार्थ ज्ञान, अंगीकृत विषय व्यवस्थित मांडण्याची शैली, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, अप्रतिम वक्तृत्व, नियमित वेळांतहि श्रोत्यांच्या मनावर परिणाम करण्याची कला, देशाभिमान व स्वाभिमान आणि जबाबदारीची तीव्र जाणीव इत्यादि उत्कृष्ट गुण त्यांच्या ठायीं वसत होते. आपल्या सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या कामाचें पांच प्रकाराचें स्वरूप गोपाळरावांनीं ठरविलें होतें, (१) दुःखनिवारण, (२) समाजसेवा, (३) सहकारित्वाचा प्रसार, (४) समाजशिक्षण, (५) राजकीय चळवळ. सनदशीरपणा हाच त्यांच्या राजकारणाचा कीलक होय. थोडक्या हयातींत गोपाळरावांनीं अनेक कामें केलीं व कीर्ति मिळविली.

[संदर्भ ग्रंथ—आपटेकृत—गोखले घराण्याचा इतिहास; नटेसन, मद्रास—गोखल्यांचें चरित्र; अभ्यंकरांचा लेख (विविधज्ञानविस्तार १९१५); कै. प्रि. पटवर्धनांचा लेख (मासिक मनोरंजन १९१५); न. चिं.केळकरकृत-टिळकांचें चरित्र.]

गोखले घराणें—गोखल्यांचें घराणें मूळचें रत्नागिरी जिल्ह्यांतील वेळणेश्वर गांवचें होय. रा. आबा चांदोरकर यांच्या संग्रहांतील शके १४१० तील (स. १४८८) एका अस्सल कागदावरून वेळणेश्वर येथें त्यावेळीं गोखले घराण्यांतील पुरुषांनां धर्माधिकारीपणा व उपाध्येपणाची वृत्ति होती असें ठरतें. परंतु शके ११०० पासून गोखले यांची वस्ती होती असें रा. गोविंदराव आपटे लिहितात (गोखले घराण्याचा इतिहास, पा. २२८). राजापूर तालुक्यांतील धाऊलवली गांवची वसाहत शके १३४३ त गोखल्यांनीं केल्याची माहिती मिळते.

गोखले-रास्ते घराण्याच्या मूळपुरुषाकडे आदिलशाहींत वेळणेश्वर महालची रसद पोहचविण्याचें काम असल्यानें त्या घराण्यास रसदे असें नांव मिळालें; याचेच पुढें रास्ते बनलें. या पुरुषाचाच वंश वाई, पुणें व जमखंडी येथील रास्ते घराण्यांत नांदत आहे. शाहूनें ज्याला रास्ते पदवी दिली तो भिकाजीपंत याच घराण्यांतील होता. याचीच मुलगी श्री. नानासाहेब पेशवे यांची पत्नी गोपिकाबाई (पद्मा) होय.

गोखल्यांच्या शाखा पुढील ठिकाणीं आहेत. ताम्हणमळा (रत्नागिरी जि.) येथील चौगुलेगोखले या घराण्यास येथील चौगुलकीचें वतन थोरल्या आनंदराव रास्त्यांनीं दिलेलें

आहे. या घराण्यांतील पुरुषानें ताम्हनभर रुपये देऊन मळा गांव पेशव्याकडून इनाम मिळविलें अशी दंतकथा आहे. या घराण्यांतच नामदार गोखले यांचा जन्म झाला. मालवण नजीक कांदळ गांवीं एक घराणें असून तेथील कृष्णंभट्ट गोखल्यास शाहूनें इनाम दिलेलें आहे. पुणें येथें एक नळ-वाले गोखले घराणें आहे. शेवटच्या बाजीरावांच्या वेळीं नळाच्या कामावर यांचा मूळपुरुष यशवंत आप्पाजी नांवाचा होता. त्यावरून हें नांव या घराण्यास मिळालें. पुण्यांत घर-मोडे गोखले म्हणून एक घराणें आहे. या घराण्यांतील विनायक नारायण गोखले ह्यांनें व्यापाराच्या जोरावर पुण्यांत जुनीं घरें घेऊन तीं मोडून नवीं बांधण्याचा क्रम सुरू केला होता. वेंगुर्ला येथेंहि गोखल्यांची एक शाखा आहे. इंदूर येथें बडे गोखले म्हणून एक घर आहे. पोंबुर्ले येथें भुते–गोखले घराणें आहे. यांशिवाय औंध, अंबेर, सांगोलें, कल्याण, कागवाड, नाधवडे, नाशिक, जुवाटी, मिरज, शिरहट्टी, मुटाट, सोमेश्वर, गराड, कोल्हापूर, नागपूर, बडोदें वगैरे ठिकाणीं गोखल्यांची घराणीं आहेत. [गो वि. आपटे— गोखले व रास्ते घराण्याचा इतिहास].

गोखले, बापू—बापूंचें मूळ गांव तळेखाजण हें होय. जवळच्या पिरंदवण गांवीं बापूंनीं मल्लिकार्जुनाचें देऊळ बांधलेलें आहे. तळेखाजणास हल्लीं बापूंच्या वाड्याचा फक्त चौथरा शिल्लक आहे. बापू यांचें नांव बापूजी असेंच आज-पर्यंत समजत असत परंतु रा. गोविंदराव आपटे यांनीं नाशिकच्या तीर्थोपाध्यायांच्या वह्यांतून त्यांचें खरें नांव नरहर गणेश असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. यांचे चुलते धोंडोपंत ह्यास प्रथम परशुरामराव भाऊ पटवर्धनांच्या हाता-खालीं सरंजाम मिळाला. नंतर ते बदामीच्या लढाईंत प्रख्यातीस आले. टिपूवरील लढाईंतहि त्यांनीं तरवार गाज-विली होती (१७९०). त्यामुळें पेशव्यांनीं त्यांनां कांहीं दिवसांनीं स्वतंत्र सरदार बनवून दक्षिणेंत धारवाडच्या सुभ्यावर नेमलें. यांनीं धोंडजी वाघाचा बऱ्याच वेळां पराभव केला होता; कित्तूरकर देसायांचें बंड मोडलें होतें व सुरापुर-कर नाईकाचा मोड केला होता. कोल्हापुराकडील रत्नाकर-पंत राजाज्ञा यानें पेशव्यांच्या हुबळी, सावनूर वगैरे प्रांतांवर स्वारी केली असतां धोंडोपंत दादा यांनीं कारडगी येथें त्याचा पराभव करून तोफा, साहेबी नौबत, जरीपटका वगैरे त्यांचा सारा सरंजाम लुटला. ही मोहीम दोन अडीच महिने चालली होती. धोंडोपंतास या लढाईंत जखमा लागल्या होत्या (१७९८ आक्टोबर). टिपूवर दाब राखण्यासाठीं धोंडोपंतांस कर्नाटकांत ठेविलें होतें. शिंद्यांच्या बाया व कोल्हापुरकर हे एक होऊन पेशवाई प्रांत लुटीत असतां परशुरामभाऊंच्या हाताखालीं धोंडोपंतांनीं सौंदत्ती येथें त्यांचा पराभव करून बराच मुलूख सोडविला (१७९९). यापुढें टिपूचा नाश झाल्यानंतर धोंडोपंतांनीं सोंधे व बिदनूर इकडील प्रांत काबीज केला. याच सुमारास धोंड-जीचा उपद्रव पुन्हां सुरू झाला. तेव्हां पडूण जवळ धोंडो-पंतांनें त्याचा पराभव केला (१७९९). वेलस्लीनें वाघाचा पराभव करून त्यास तुंगभद्रापार हांकलल्यानें त्यानें मरा-ठ्यांच्या राज्यांत धुमाकूळ घातला. तेव्हां त्याच्यावर धोंडो-पंत व बापू हे चालून गेले; कित्तूरजवळील हालिहाळ येथें त्याच्याशीं तोंड देण्याचें त्यांनीं ठरविलें, परंतु कित्तूरकर देसायानें वाघास फितूर होऊन धोंडोपंतांस वाट चुकवून झाडींत नेलें व वाघास खबर दिली. त्यानें येऊन अकस्मात हल्ला केला. धोंडोपंतांची फौज पुढें निघून गेली होती; जवळ फारच थोडे लोक होते. नाल्यांत अडचणींत सांपडले असतांहि त्यांनीं शौर्यानें वाघावर चाल केली. परंतु अखे-रीस धोंडोपंत या लढाईंत कामास आले. पुढें बापू यांस धोंडोपंतांची सरदारी मिळाली. हे मराठी राज्याचे शेवटचे सेनापती होते. यांचा एक भाऊ आप्पा हाहि वाघाच्या वरील लढाईंतच मरण पावला होता. बापूंनां दोन पुत्र होते; पैकीं एक लहानपणीं वारला व दुसरा इंग्रजांच्या अष्टयावरील मोहिमेंत कामास आला. बापूंचे वडील गणेशपंत हे विजयदुर्गास दफ्तरदार होते. धोंडोपंत हे कर्नाटकांत असतांना बापू हे पुण्यास दरबारांत त्यांचे वकील म्हणून असत. हुनगुंदकडे असदअलीच्या बंडावा मोडण्यांस धोंडोपंतांबरोबर बापूहि होते. रत्नाकरपंत राजाज्ञानें कर्नाटकांत धुमाकूळ घातला त्यावेळच्या लढायांतहि बापू हजर होते. आप्पासाहेब पटवर्धनांची करवीर वरील स्वारी चालू असतां बापू व धोंडोपंत त्यांच्या मदतीस गेले होते (१८००). त्यावेळीं बापूंची पहिली स्त्री आनंदीबाई वारली. हालिहाळच्या लढाईंत बापूहि होते; त्यावेळीं त्यांनां जखमा झाल्या होत्या. शेवटीं त्यांनीं इंग्रजांच्या मदतीनें धोंडी वाघास ठार मारिलें. पुढें नगरप्रांतीं बारभाई व बावनपागे यांचें बंड बापूंनीं मोडलें व कित्तूर, नवलगुंद, सुरापुर इकडीलहि बंडें मोडून पेशव्यांच्या आज्ञेनें पटवर्धनांच्या सावनुर तालुक्यावर हल्ला करून पटवर्धनांचा मोड करून तो तालुका काबीज केला; शेवटीं पेशव्यांनींच पटवर्धन व बापू यांचा समेट केला. नंतर बापू हे प्रतिनिधीवर जाऊन व ताई तेलीण हिचा पराभव करून (१८०६) पुण्यास गेले. तेथें पेशव्यांनां कोणी चहाडी सांगितल्यावरून त्यांनीं बापूस त्यांच्याकडील सरंजामी प्रांताच्या सोडचिठ्ठ्या मागितल्या असतां, त्यांनीं त्या ताबडतोब दिल्यामुळें पेशवे खूष होऊन त्यांनीं बापूस १२ लाखांचा सरंजाम दिला व त्यांनां लढाईचें झालेलें १८ लाखांचें कर्जहि फेडलें. पुन्हां (१८०७) प्रतिनिधीनें बंड केल्यानें बापूंनीं तें मोडलें व प्रतिनिधीस थोडासा प्रांत ठेऊन बाकीची सर्व जहागीर त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतली. याच्या पुढें चतरसिंगाचें बंड बरेंच वाढल्यानें बापूंची नेमणूक तें मोडण्यावर झाली व त्यांनीं तें सन १८१२ त मोडलेंहि. त्यानंतर पेशव्यांनीं इंग्रजांशीं लढाईचें धोरण बांधलें. त्या वेळीं इंग्रजांचा लिंगो भगवान वकील बापूंनां फितूर करण्यास

आला असतां, त्यास बापूंनीं फारच बाणेदारपणाचें उत्तर देऊन प्राण जाईपर्यंत स्वामिद्रोह न करण्याचें ठरविलें. बापू हे पेशव्यांचे मुख्य सेनापति होते. त्यांच्याशिवाय (आप्पा निपाणकर सोडल्यास) दुसरा कोणीहि शूर पुरुष पेशव्यांच्या पदरीं शिल्लक नव्हता. गणेशखिंडीच्या पहिल्या लढाईंत बापूंचा घोडा ठार झाला. तरी त्यांनीं शेवटपर्यंत पायउतारा होऊन तरवार चालविली. नंतर गारपिरावर लढाई झाली. तींत बापूंचे लोक व विंचूरकरादि सरदार सुद्धां पळाले. तेव्हां श्रीमंतास सासवडास जाण्यास सांगून बापूहि सैन्याचा जथ कायम ठेऊन मागोमाग गेले. तेथून जेजुरी, देऊर, पंढरपूर, खेरीं, ब्राह्मणवाडी या भागांत पेशवे जात असतां त्यांच्या पिछाडीस वीस कोसांवर राहून व पिछाडी संभाळून बापू ठिकठिकाणीं इंग्रजाशीं लढाया देऊन त्याला थोंपवीत होते. ब्राह्मणवाडीजवळ बापूंचा मुलगा बाबासाहेब वारला, तेव्हां त्याची बारा वर्षांची स्त्री सती गेली.पुढें कोरेगांवासहि इंग्रजांशीं लढाई होऊन तींत दोहींकडील बरेच लोक कामास आले. पंढरपुरकडून एल्फिन्स्टन व कर्नाटकांतुन स्मिथ असे दोघे पेशव्यांवर चालून आले. त्या दोघांचेहि शह सांभाळून बापूनीं पेशव्यांनां सातान्याकडे सुरक्षित पोहोंचविलें. पुढें तेथून फलटणवरून परांड्याकडे पेशवे जात असतां, अष्टे गांवीं पेशव्यांचा व बापूंचा मुक्काम पडला.स्मिथ येणार हें ऐकून बापूंनीं श्रीमंतांस रात्रींच कूच करण्याचा सल्ला दिला. परंतु आप्पा निपाणकरानें दुसऱ्या दिवशीं निघण्यास सुचविलें व हल्ला आल्यास आपण परतविण्याची हमी दिली. बापूंनीं फार आग्रह केला पण श्रीमंतांनीं आप्पांचेंच म्हणणें ऐकलें. दुपारींच फौज परांड्याकडे निघून गेली होती. बापूजवळ फार थोडे लोक होते. दुसऱ्या दिवशीं (२० फेब्रुवारी १८१८) श्रीमंत सकाळीं भोजनास बसले असतां, स्मिथ चालून आला. त्यावेळीं बापूंनीं श्रीमंतास सावध केलें परंतु उलट पेशवेच त्यांनां टाकून बोलले तेव्हां बापू म्हणाले कीं " दुसऱ्याचें ऐकून कालचा बेत बिघडविला व आतां आमच्यावर रोष; आतां आम्हीं जातो, आपण सावकाश जेवावें. जय झाल्यास भेटूं नाहीं तर हें शेवटचें दर्शन " असें म्हणून बापू स्मिथवर तुटून पडले. आप्पा निपाणकर झाड्यास जाण्याच्या निमित्तानें व आपला निभाव लागणार नाहीं असें म्हणून मागें पळाला.तेव्हां बापूंनीं फक्त पन्नास लोकांनिशीं स्मिथवर जबरदस्त हल्ला केला. त्यामुळे त्याची एक तुकडी हटली. शेवटीं दहा बारा लोक राहिले असतां बापूंची व स्मिथची गांठ पडून द्वंद्वयुद्ध झालें. त्यांत बापू फार शौर्यानें लढले. परंतु शेवटीं रणांत ते कामास आले. पाच्छापुरकर बखरींत, " बापूंचा शेवट काय झाला याबद्दल पत्ता लागला नाहीं." असा मजकूर आहे. यावेळीं बापूंची दुसरी पत्नी यमुनाबाई ही बरोबर होती ती पुढें सातान्यास जाऊन राहिली. बापूंचा जन्म स. १७७७ त झाला होता; बयाच्या चाळीसाव्या वर्षी त्यांचा वरीलप्रमाणें शेवट झाला. ठाकुरदासबोवा हे बापूंचे गुरु होते. यमुनाबाईंनां शेवटपर्यंत थोडासा सरंजाम चालू होता. त्यांनां मूलबाळ न झाल्यानें हल्लीं बापूंचा औरस वंश नाहीं. [खरे-खंड ११; डफ. पु. ३; आपटे-गोखले घराण्याचा इतिहास].

गोखले रास्ते—' रास्ते पहा '.

गोगलगाय—या प्राण्याचा अंतर्भाव मृदुकायप्राण्यांच्या कोटींत होत असून त्या कोटींतील प्राण्यांचें शरीर मांसल, थंड व नरम असून त्यांवर कवच नसते. कांहीं प्राण्यांस लपून बसण्याकरितां शिंपा किंवा शंख असतात. ह्या कोटींत शिंपा (लॅमेली ब्रँकिआटा),गात्रपाद (गॅस्ट्रोपोडा) व मौलिपाद (सेफॅलोपोडा)ह्या तीन वर्गांचे प्राणी येतात.पहिल्या वर्गासंबंधीं पाहतां असें आढळतें कीं, शिंपले हे नद्या, तळीं, समुद्र व वाळवंट इत्यादि ठिकाणीं सापडतात. शिंपले हे आंतील प्राण्यांचीं स्वाभाविक आच्छादनें होत.दोन्हीं बाजूस शिंपल्याचे भाग असून त्यांच्यामध्यें प्राणी असतो. दोन्हीं शिंपले एका बिजागिरीनें जोडले जातात. शिंपला उघडून त्यांतलि प्राणी आपला पाय बाहेर काडतो व त्यानें हिसके देत वाळूंतून चालतो. या प्राण्यांनां डोकें नसतें व ज्ञानेंद्रियें नसतात. शिंपल्यांतील प्राण्यांवर उपजीविका करणारे कांहीं जंतु असतात, ते त्यांनां त्रास देत असतां त्यांना मारण्यासाठीं हे प्राणी त्यांवर शिंपल्याच्या द्रव्याचें वेष्टन घालतात. मोतीं हें अशा प्रकारचेंच वेष्टन होय (मोतीं पहा). तिसऱ्या वर्गाचा मौलिपाद हा प्राणी समुद्रांत राहतो. याची लांबी एक इंचापासून पन्नास फूट पर्यंत असते. ह्याच्या डोक्यास ८।१० पेक्षांहि जास्त पाय असतात व त्यांच्या योगें हा भक्ष्य पकडतो. याच्या डोक्यांवर दोन डोळे असतात. याच्या शरीरांत शाईसारख्या द्रव्याची पिशवी असते. या प्राण्यांत नर व मादी असे निरनिराळे प्राणी असतात.

मृदुकाय प्राण्यांच्या कोटींतील दुसरा वर्ग गात्रपाद हा होय. या वर्गांत शंख, कवड्यांतील प्राणी व गोगलगाईच्या जाती येतात. मृदुकाय प्राण्यांत शंखांची संख्या ¾ आहे. शंख हे प्राण्यांचें कवच असून त्याची वाढ शिंपाप्रमाणेंच होते. शंखांतील प्राणी शिंपल्यांतील प्राण्यांपेक्षां वरच्या दर्जाचे आहेत. ह्यांनां डोकें असतें व त्यावर दोन शिंगें व डोळे असतात. शंखांतील पाण्यांनां श्वासोच्छासाकरितां पिसांच्या सारखे कल्ले असतात. हे प्राणी मांसाहारी असून ते पुष्कळ शंख, शिंपल्याना भोकें पाडून त्यांचा फन्ना उडवितात. शंखांचे अनेक प्रकार आहेत. कांहीं शंखांनां कांटे उत्पन्न होतात. कवड्यांतील प्राणी याच जातीचे होत. शंख व कवड्यांप्रमाणेंच गात्रपाद नामक वर्गांत गोगलगाईचीहि गणना होते.

गोगलगाय ह्या पाण्यांतील व जमिनीवरील अशा दोन प्रकारच्या असतात. हा प्राणी प्रथम पाण्यांत राहणारा असून नंतर दलदलीच्या जमिनीवर राहूं लागला असें म्हणतात. पाण्यांतील गोगलगाय शंखाच्या जातीची

असून तिचें डोकें व पाय वगैरे भाग बाहेर असतात. डोक्यावर दोन शिंगें असून त्यांच्या शेवटीं डोळे असतात. हीं शिंगें आंत बाहेर करतां येतात. या प्राण्याच्या जिभेवर कांटे असून तोंड डोक्याच्या खालच्या अंगास असतें. तेथें उजव्या बाजूस एक भोंक असतें. त्यांतून गोगलगाईस हवा मिळते. भोंकाच्या आंत एक पिशवी असते तें फुप्फुस होय. त्यांत रक्तवाहिन्या आलेल्या असतात. पाण्यांत असतांना हवा घेण्यास वर येऊन व नंतर तोंडाजवळील भोंक बंद करून गोगलगाई पुनः पाण्यांत जातात. जमिनीवरील गोगलगाईस चार शिंगें असतात व त्यांतील दोहोंवर डोळे व दोहोंवर घ्राणेंद्रियें असतात. ह्या पावसाळ्यांत बाहेर पडतात. उन्हाळ्यांत कवचांत शिरून आपलें तोंड बंद करून घेऊन त्या थंड जागीं पडून राहतात. त्यांच्या शरीराचा एखादा भाग कापून काढला तर तो पुनः फुटतो. हा प्राणी उभयलिंगी आहे. म्हणजे दोन्ही जननेंद्रियें एकाच असतात. जमिनीवरील गोगलगाय पावसाळ्यांत अंडीं घालते. अंड्यांची रचना शेंगेसारखी असून त्यावर एक पारदर्शक कवच असतें व त्यांतून आंतील रुधिराभिसरण पाहतां येतें. बिनशिंगांच्या गोगलगाईस पिकळी किंवा स्लग म्हणतात. हिला कवच अगर घर असतें. परंतु तें प्रथमावस्थेंत असून पुढें गळून जातें. हिचीं अंडीं झाडांच्या कुंड्यांत सांपडतात.

पा ण गो ग ल गा य अ थ वा खु बे.—(खाण्याजोगे समुद्रांत सांपडणारे जंतू) हा प्राणी भूमध्यसमुद्राचा किनारा, पूर्वेकडील द्वीपसमूह (ईस्टर्न आर्चिपेलेगो), आस्ट्रेलिआ, मॉरिशस, सिलोन, झांझिबार, इत्यादि ठिकाणीं सांपडतो. ब्रह्मदेशांत वगैरे हे खुबे धरून व वाळवून चीन देशांत पाठवितात. ओहोटीच्यावेळीं हे चिखलावर पडलेले असतांना त्यांना धरतात आणि कढईत टाकून ती कढई तापवितात. कढई तापूं लागल्यावर खुबे (ट्रिपाग) उष्णता सहन न होऊन आपलीं पचनेंद्रियें बाहेर काढून प्राण सोडतात व त्यांच्या त्वचावरणाच्या पिशव्या मात्र राहतात. या पिशव्या त्यांतील पाण्याचा अंश निघून गेल्यावर कांहीं वेळानें सुरकुततात. नंतर वीस मिनिटांनीं किंवा अर्ध्या तासानें तापविण्याचें काम बंद होतें. आणखी एक वेळ या प्रमाणेंच कृति केल्यावर खुबे पाठविण्यालायक होतात.

व्या पा र.—चीन आणि जपान देशांतील चैनी लोक ट्रिपांग फार हौसेनें खातात. यांचा चांगला रस्साहि बनतो. [बॅट. क. प्रॉ.]

गोगुंडा—राजपुताना. उदेपूर संस्थानांतलें गोगुंडा जजीनदारीचें मुख्य ठिकाण. अरवली पर्वतांत २७५७ फूट उंचीवर व उदेपूरपासून १६ मैलांवर हें वसलें आहे. वस्ती (१९११) ४७५७. यांत खेडीं ९६ आहेत व वसूल सालीना २४००० रु. आहे. पैकीं २००० उदेपूर दरबाराला खंडणी म्हणून दिले जातात. येथील राजा देलवाडच्या घराण्यांतला व झाला रजपुतांपैकीं आहे.

गोग्रा—(घोग्रा,) शरयू व देव्हा हीहि हिचींच नांवें होत. ही नदी तिबेटांत उगम पावून कर्नाली या नांवानें नेपाळमधून वहाते. सीशापाणी येथून ही डोंगर फोडून गिरवा नांव पावते व कर्नाली म्हणून हिचा एक भाग तेथूनच वहातो व गिरवा कर्नालींचा संगम पुन्हां लवकरच होतो. सुहेली, दहावार, शरयू वगैरे नद्या हिला मिळतात व ब्रह्मघांटापासून हिला गोग्रा व शरयू हीं दोन नांवें सामान्यतः दिलीं जातात. शरयूवरून सर्वेरिआ (शरयूपारिआचा अपभ्रंश) म्हणजे शरयूच्या तीरचे म्हणून एक ब्राह्मणांची जात झाली आहे. पुढें गोंदा व फैजाबाद यांच्या सरहद्दीवरून व अयोध्येपासून बस्ती, गोरखपूर, फैजाबाद, अझमगड, बलीया यांच्या ही हद्दीवरून वहाते. अझमगड येथें छोटी शरयू म्हणून हिचा एक फांटा फुटतो. तो बऱ्याच अंतरावर वाहून पुढें गंगेला मिळतो. व शेवटीं शरयू अथवा गोग्रा ही उत्तर अक्षांश २५° ४४′ व पूर्व रे. ८४° ८२′ यावर गंगेला जाऊन मिळते. या नदीमध्यें कौरिआला (कर्नाली) व गिरवा यांतून वर इंग्रजी हद्दीपर्यंतच होड्या चालूं शकतात. नॉर्थवेस्टर्न रेल्वे सुरू होईपर्यंत गोग्रावरचा व्यापार मोठा असे. ब्रह्मघांट, फैजाबाद, अयोध्या, तांदा, बऱ्हज, गोग्र, व रेवलगंज ही व्यापाराचीं लहानमोठीं ठिकाणें आहेत; पैकीं शेवटचीं दोन महत्वाचीं आहेत पाटणापासून अयोध्येपर्यंत उतारूंच्या व मालाच्या बोटींची येजा चालते. ब्रह्मघाटाजवळ ३६९५ फूट लांबीचा, एक व तूर्तीपार येथें (३९१२ फूट लांबीचा) दुसरा असे रेल्वेपूल आहेत. पहिल्या जागीं समुद्रसपाटीपासून उंची ३५० फूट व दुसऱ्या जागी १९११ फूट आहे. वेग दर सेकंदास दोन्ही ठिकाणीं अनुक्रमें ८७७ हजार व ११११ हजार घनफुटांचा आहे. अयोध्या येथें पावसाळ्यांत होड्यांचा पूल असतो.

गोघा—मुंबई. अहमदाबाद जिल्ह्यांतील एक शहर. हें खंबायत आखाताच्या किनाऱ्यावर वसलें आहे. लो सं. (१९०१) ४७९८. शहरापासून पाऊण मैलांवर एक उत्कृष्ट ओरवा (नांगरवाडा) आहे. वलभी राजांपासून हें बंदर प्रसिद्ध आहे.

इतिहासः—सौराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावर सांपडणाऱ्या गोधला नांवाच्या शिंपल्यावरून या शहराचें नांव पडलेलें आहे. मुझफर शहानें गुजराथचें राज्य स्थापिल्या नंतर गोघला हें गुजराथच्या राज्यांतील एक बंदर झालें. पुढें तें गोहेल घराण्याच्या ताब्यांत गेलें. नंतर तें पेशव्यांच्या ताब्यांत गेलें व अखेरीस ब्रिटिशांच्या ताब्यांत आलें व हल्लीं तें त्यांच्याच ताब्यांत आहे. सुरत बंदराची वाढ झाल्यापासून खंबायतच्या बंदराचें महत्व कमी झालें व अलीकडे गोघाचा व्यापार बसून गेला आहे. उत्तरदक्षिणभागीं खाऱ्या दलदली असून पूर्वपश्चिमभागीं उतार शेतजमीन लांबवर पसरली आहे. पिण्याचें पाणी बरेंच लांबून आणावें लागतें. म्यु. क. १८५५ मध्यें स्थापन झाली. दर्यावरचा

व्यापार (१९०३-४) १८७००० इतका झाला त्यापैकी १,०६,००० ची आयात व ८१००० ची निर्यात होती. सबजज्ज कोर्ट, दवाखाने, शाळा वगैरे येथें आहेत.

गोचीड—हा प्राणी गुरें व कुत्रे यांच्या अंगावर सांपडतो. उवा, गोचिडी, माकडाची गोचीड आणि पक्ष्यांची गोचीड हे वस्तुतः निरनिराळया वर्गांतील प्राणी होत. या सर्वांमध्यें कांहीं गोष्टी सारख्या आहेत. अंड्यांपासून त्वरित् उत्पत्ति, रूपांतराचा अभाव, आकार एकसारखा जलद वाढत जाणें व कातडीचे थर वाढत जाणें या क्रिया सर्वांसच होतात. विविध प्राण्यांवर ज्या गोचिडी होतात ते खरोखर निरनिराळया जातींचे प्राणी असतात.

गोझो—हें भूमध्यसमुद्रांतील बेट असून तें माल्टाच्या खालोखाल आहे. माल्टापासून हें बेट ३ ३/४ मैल असून त्याचा आकार लांबट आहे. त्यांचें क्षेत्रफळ सुमारें २५ चौ.मै. आहे. गोझो बेटांतील मुख्य शहर व्हिक्टोरिया असून त्याची लोकसंख्या इ. स. १९०१ सालीं ५०५७ होती. ह्या बेटाची परिस्थिति माल्टा बेटाप्रमाणेंच आहेत. १९०७ सालीं गोझो बेटाची लोकसंख्या २१९११ होती.

गोंड—मध्यप्रदेश व मध्यहिंदुस्थान यात असलेल्या एका पट्टयाला गोंडवण नांव आहे. येथें वस्तीस असलेल्या लोकाना गोंड हें नांव पडलें आहे. यांना गोंड हें नांव कसें मिळालें तें समजत नाहीं. गोंड हे गौड मधील लोक असावेत व गौडाचा अपभ्रंश गोंड झाला असावा. गोंड स्वतः आपणाला गोंड न म्हणवितां कोइतूर म्हणवितात. गौड हा शब्द शालिवाहन शकाच्या ४ थ्या किंवा ५ व्या शतकांतील शिलालेखात दिसून येतो.

१९११ च्या खानेसुमारींत यांची संख्या ३ लाखांपर्यंत गेली. पैकीं सुमारें दोन लाख तेहेतीस हजार गोंड मध्यप्रांतांत होते. द्राविड जातीपैकीं गोंड ही प्रसिद्ध व ऐतिहासीक महत्वाची शाखा आहे. कारण या शाखेनें पुष्कळ काळपर्यंत विशेषतः १३ ते १७ या शतकांत बहुतेक मध्यप्रांत आपल्या ताब्यांत ठेवला होता. त्यांचा अंमल शांततेचा व भरभराटीचा झाला. त्यावेळीं मांडलाचा वसूल १० लाखांवर होत असे. १५६४ मध्यें येथें अकबरास अगणित लूट मिळाली. चांद्याचें राज्यहि त्यावेळीं अतिशय भरभराटींत असून तेथें शिल्पशास्त्रहि अगदीं उत्कृष्ट स्थितीला पोंचलें होतें.

आठराव्या शतकांत याना उतरती कळा लागली व नवीनच उदयास आलेल्या मराठी सत्तेच्या विस्तारांत गोंड सत्ता अंतर्धान पावली. यानंतर गोंड लोक बऱ्याच निकृष्ट स्थितीस पोंचले व त्यांच्या स्वातंत्र्यांतील मर्दुमकीचें रानटी शौर्यांत रूपांतर झालें. पुढें इंग्रजी अंमलाखालीं तर त्यांचा शौर्यमद पूर्णपणें नाहींसा होऊन ते अगदीं भित्रे व गोगलगाईपेक्षां निरुपद्रवी प्राणी बनले.

गोंड लोकांच्या संख्याबाहुल्यामुळे व विस्तारामुळे त्यांच्यांत जाती उपजातीहि बऱ्याच पडल्या आहेत व त्यांत प्रत्यक्ष गोंड नाहींत अशा लोकांचाहि भरणा झालेला आहे. उच्च दर्जाच्या गोंड लोकांचा या खालच्या लोकांशीं रोटीबेटी व्यवहार होत नाहीं. या लोकांत कांहीं धंद्यामुळेंहि जाती पडल्या आहेत. उच्च वर्गात मुख्य दोन वर्ग आहेत; व राजगोंड हे वरिष्ठ व सत्ताधारी आणि धूरगोंड हे प्रजाजन अथवा सामान्य लोक होत.

राजगोंड हे जमीनदार गोंडांचे वंशज आहेत. यांनां हिंदू म्हटलें जातें. ब्राह्मण यांच्या हातचें पाणी घेतात व क्वचित् रजपुतांबरोबर त्यांचा शरीरसंबंधहि घडल्याचीं उदाहरणें आहेत. ब्राह्मणांप्रमाणें हे जानवें घालतात व यांची सोंवळ्याची कल्पनाहि विचित्र आहे. स्वयंपाकाकरितां हे सर्पणहि धुवून घेतात. चारपांच वर्षांनीं यांनां 'बूरा' देवाच्या दर्शनाला जावें लागतें व तेथें मांसभक्षणाची नक्कल करावी लागते. म्हणजे कपड्यांत मांस गुंडाळून ते तोंडापर्यंत नेतात. हा विधि न केल्यास भूतबाधा होईल असें ते मानतात. उत्तरेकडे खटौला गोंड म्हणून वरच्या दर्जाचे थोडेसे लोक आहेत. ते पूर्वीच्या बुंदेलखंडी 'खतोला' राज्यांतले असावेत.

ल ग्न री ती.—गोंडांच्या प्रत्येक पोटजातींत निरनिराळीं गोत्रें आहेत व प्रत्येक गोत्रास एक निराळें नांव असतें, तें त्या गोत्रांतील सर्व माणसांस सारखेंच लागू असतें. निरनिराळया गोत्रांत निरनिराळया देवांच्या पूजा करितात. (१) चार देवांची पूजा करणारे, (२) पांच देवांची पूजा करणारे (३) सहा देवांची पूजा करणारे व (४) सात देवांची पूजा करणारे अशीं ह्या गोंडांचीं गोत्रें आहेत. ज्यांचें गोत्र एक, अशा स्त्रीपुरुषांचा एकमेकांशीं विवाह होत नाहीं. त्यांच्यांत राक्षसविवाहपद्धति अद्यापि अस्तित्वांत आहे. एखाद्या पुरुषास लग्न करावें अशी इच्छा झाल्यास तो शेजारच्या खेड्यांत बायको करण्याजोगी कोणती मुलगी आहे, ह्याविषयीं माहिती मिळवितो. नंतर जेथें ती आपल्या सोबतिणीबरोबर काम करीत असेल, तेथें तो आपल्या मित्रांस बरोबर घेऊन जातो. ती मुलगी आपल्या मंडळींत मिळून आपल्या गांवात पळून जावयाच्या पूर्वी जर हा तिच्या हातांस स्पर्श करूं शकेल, तरच त्याचें मित्र त्याच्या मदतीस जातात. एखाद्या वेळेस त्या मुलीच्या सोबतिणींबरोबर ह्याची व ह्याच्या मित्रांची मारामारीहि होते व ती कित्येक वेळीं वराच्या हस्तस्पर्शानंतरहि होते. तथापि, एकदां हस्तस्पर्श झाला आणि मग जरी त्या बायकांच्या मदतीस त्यांच्या गांवांतले पुरुष आले तरी त्यांचें कांहीं एक चालत नाहीं. मग त्या स्त्रीपुरुषांचा विवाह झालाच पाहिजे अशी यांच्यांत चाल आहे.

रा ह णी व आ चा रः—गोंडांची राहणी साधी आहे. नवराबायको एके ठिकाणींच मजुरीनें काम करतात. ज्या ठिकाणीं चांगली ओळख झाली आहे अशा ठिकाणीं नवराबायको मजुरीनें निरनिराळया जागीं काम करतात. पण ज्या ठिकाणीं ओळख नाहीं अशांच्या घरीं अगर शेतींत काम करण्याचा प्रसंग आला तर ती कधींहि एकेकटे राहून

पुष्कळ मजुरी मिळाली तरी काम करीत नाहींत. थोडी मजुरी घेऊन दोघे मिळून एके जागींच काम करतात. पण यांत आळशी बरेच सांपडतात. जर घरांत एक दिवसापुरतें खाण्यास असलें तर ते कामावर जात नाहींत. आतांशा कांहींनां कळूं लागल्यानें शिल्लक ठेवण्याची प्रगति थोडी थोडी दिसूं लागली आहे. याचे सर्व आचार अलीकडे हिंदु-लोकांप्रमाणेंच झाले आहेत व होत आहेत. हे लोक रानडुक्करें खातात, म्हणून त्यांचा इतर हिंदु, मराठे, व कुणबी वगैरे लोकांबरोबर रोटीव्यवहार व बेटीव्यवहार होऊं शकत नाहीं. यांची मुख्य देवता देवी आहे.

स ण.—त्यांच्यांत शिमग्याच्या सणाचें महत्व फार आहे. दरसाल शिमगा फाल्गुन पौर्णिमेस येतो त्या दिवशीं सण न करतां अगोदर गांवचा पाटील अगर एखादा मुख्य इसम सर्व गांवकरी लोकांनां एकत्र जमवितो आणि सर्वांना विचारतो कीं, शिमग्याचा सण केव्हां करावयाचा? कोणच्याहि अडचणी नाहींत असा एक दिवस सर्वांच्या विचारानें ठरवितात. त्या दिवशीं तो शिमग्याचा सण सर्वजण मिळून करतात. मात्र गांवांतील कोणीहि इसम त्या दिवशीं गैरहजर राहिला तर त्यास जातीचा दंड द्यावा लागतो. म्हणून कोणीहि परगांवीं गेला असला तर त्या दिवशीं तो हरतऱ्हेनें परत येतो. सर्व गांव एक होऊन आनंद करतात. हा सण चैत्रमासापलीकडे सुद्धां लाबतो. प्रत्येक निराळ्या गांवच्या सोयी पाहून त्या सणाचा दिवस ठरवितात. तो दिवस सर्वजण दारू पिऊन घालवितात. स्त्रिया फेर धरून रात्रीं, दिवसा गाणीं म्हणतात. मलखांब रोवून त्यास एरंडेल तेल लावितात. मग त्या मलखांबाभोंवतीं स्त्रिया फेर धरून गाणीं म्हणतात. गांवांतील प्रमुख वृद्ध लोक एके ठिकाणीं बसून तरुण मुलांसाठीं शर्यती लावितात. जो कोणी बायकांच्या फेऱ्यांतून मलखांबावर खांबाच्या टोंकापर्यंत जाईल त्याला वर ठेवलेले दोन, तीन, चार, पांच रुपायांचें इनाम घेण्याचा अधिकार असतो. बायकांच्या हातीं हिरवे फोक असतात, ते मलखांबावर चढणाऱ्या इसमावर सपासप मारतात. त्यांच्या सपाट्यांतून जो बक्षीस मिळवितो त्याचे सर्वजण धन्यवाद गातात.

गोंड वन्यधर्मीय आहेत. वाघाचीहि ते पूजा करतात. देवीच्या रोगांकरितां मातादेवी, दांतांकरितां दंतेश्वरी यांच्या सारख्या देवतांची उपासना होते. दूल्हादेव ही सामान्य गृहदेवता होय. कांहीं पुढारलेले गोंड शिवकालचीहि भक्ति करतात व बुढादेव हा शिवस्वरूप आहे असें समजतात. गोंड गारगोटयांच्या रूपांत पूर्वजांची पूजा करतात.

गोंड लोकांतला अंत्यविधीहि चमत्कारिक आहे. दक्षिणेकडे पाय करून ते प्रेतें पुरतात. राजगोंड व सर्व वृद्ध यांस जाळतात. पूर्वी मृताला घरांतच पुरीत असत. ही वहिवाट आतां बंद पडली आहे. पांचव्या दिवशीं नदीच्या कांठीं जाऊन हे लोक मृताच्या आत्म्याला हांक मारतात व एखादा जिवंत मासा पकडून नेऊन तो खातात. अशाकरितां कीं, त्याच्या बरोबर आलेला आत्मा आमच्याच घरांत पुन्हां जन्माला यावा. गोंड लोक हे सामान्यतः शेतकीवर रहातात बहुतेक शेतकामावर नोकर अथवा मजूर असतात. कांहीं पोलिस व चपराशी आहेत. मोहपाणी येथील कोळशाच्या खाणींतले मजूर गोंडच आहेत. हे लोक काम चांगलें करतात, पण अल्पसंतुष्ट व आळशी असून दूरदर्शी मुळींच नाहींत. त्यांचा बांधा खुजट, कृष्णवर्णाचा पण बांधेसूद असतो. दिसण्यांत हे मोठेसे चांगले नसून वाटोळ्या डोळ्यांचे व जाड ओठांचे असतात. केस काळे व रांठ असून दाढीमिशा कमी असतात. मध्यप्रांतांतील कांहीं लोक अर्धवट हिंदी बोलतात. बाकीचे मूळ द्राविड भाषा बोलतात. तिला गोंडी म्हणतात. तामिळ व तेलगु यांचीच ही बहीण आहे. पण त्यांच्यांत तेलगूशीं तिचा संबंध थोडा जवळचा दिसतो बाकी साम्य विशेष नाहीं.

गों डी भा षा—गोंडी भाषा म्हणजे "गोंड" किंवा "कोयतोर" लोक जी बोलतात ती होय. हल्लीं ज्या प्रदेशांत गोंड लोकांची वस्ती आहे त्या प्रदेशास नकाशांत "गोंडवन" हें नांव दिलें आहे.

जरी गोंडी भाषा ही तामीळ, तेलंगी वगैरे चांगल्या सुधारलेल्या व प्रौढ दशेप्रत पावलेल्या दक्षिण हिंदुस्थानांतील अस्सल भाषांचीच सख्खी बहीण असावी असें दिसतें तरी ती हल्लीं अगदीं रानटी स्थितींत आहे. तिला "लिपि" हा शब्द मुळींच ठाऊक नाहीं. गोंडीची कानडी व तेलंगी भाषेशीं तुलना पुढें दिली आहे:—

गोंडी	तेलंगी	कानडी	मराठी
आंद	आदा	अवळू	ती
अव	आंवरू	अवरू	त्या
कडक	कंडळौ	कण्णु	डोळा
कवी	कवळू	किवी	कान
कई	चेई	कै	हात
काल	काळू	काल	पाय
आका	आकळू	येले	पान
कलतन	...	कळतन	चोरी
गोहक	गोधमळू	गोधि	गहूं
तंमू	तमो	तम्म	भाऊ
तोल	डोळू	तोगलू	कातडें
रंड	रोंड्ड	येरड्ड	दोन
पद	पदी	हत्तु	दहा
इंगा	...	इगळू	आतां

या शब्दसाम्यावरून गोंडी, तेलंगी व कानडी या भाषांचें परस्पर सादृश्य बरेंच आहे असें दिसतें. कोणत्याहि भाषेंतील सर्वनामें व अंक हीं दोन जर बरीच सदृश दिसतात तर त्या भाषांचा परस्पर निकट संबंध असून त्यांतील

जंगली स्थितींत राहिलेली त्या सर्व सुधारलेल्या व पक्क झालेल्या भाषांचें मूळ असावी असें अनुमान साहजिक ओघास येतें. यावरून गोंडी भाषेपासून तेलंगी व कानडी निघाल्या असाव्यात.

गोंडी भाषेंत गणितविद्येचें माहात्म्य फारसें नाहीं. पांच-पावेतों गोंडी अंकलिपी तेलंगी व कानडी यांच्या अंकलिपीशीं बरीच चांगली मिळते; पुढें दहा पावेतों सरासरीनें मिळते व अकरा बारा यांचा मेळ मुळांच बसत नाहीं. शंभरांचा तेलंगीशीं बराच मिलाफ आहे.हा जो गणितविद्येचा अगदीं अभाव याचें कारण उघड आहे. हे लोक अगदीं जंगली व रानटी तेव्हां यांस संख्येची व मिळवणीची गरज काय पडणार? पुढें प्रसंग आलाच तर मराठी अथवा हिंदी या भाषेंत काम चालून निर्वाह होत असे. तेव्हां अर्थात् गोंडी भाषा या प्रमाणें गणितालिपींत पाठीमागें पडली.

कोणत्याहि भाषेंत गायनकला अगदीं नाहीं असें होत नाहीं. तेव्हां गोंडी भाषेंत वेडींवांकडीं तरी कांहीं गीतें असावीं असें साहजिक अनुमान होतें व हें अनुमान खरेंहि आहे. शोधाअंतीं गोंडी भाषेंतील गीतें फारशीं वर्णनीय, दुमदार, अनेक अलंकारादिकांनीं युक्त अशीं नाहींत असें समजतें. पण सर्व गीतांत यमक व प्रास यांचा थोडाबहुत भरणा नाहीं असें क्वचित् होतें.

गोंड लोकांत प्रधान म्हणून एक भेद आहे. हे गोंड लोक आपल्यांत मोठे ज्यांना म्हणतात त्यांच्या पदरीं असतात. राजपुतान्यांत जशी भाट लोकांची कीर्ति आहे, तशीच गोंडवनांत या प्रधान लोकांची आहे. यांच्या गीतांचे कांहीं मासले पुढील प्रमाणेः—

> अडकातें अडका कोसाता अडका.
> (मडक्यांतलें मडकें मशीचें मडकें.)
> नाडीमन्नो मडमी आता नाक जावा दासे.
> (परवां लग्न झालें मला पेज वाढ.)

भावार्थः—अत्यंत कृष्णवर्ण असून जिचें लग्न नुकतेंच मोठ्या कष्टानें झालें ती आता मोठा नखरा करून माझ्या भोजनादिकांकडे लक्ष देत नाहीं म्हणून मी तीस लावून बोलत आहे व भोजन मागत आहे.

> काडीना कड पिडता काडी बाडी बाता.
> (आंधळीचा डोळा फुटला आंधळी कां आली.)
> डेडानूर मांदीतून काडी इचके किता.
> (दीडशें पंक्तीचा आंधळीनें विचका केला.)

भावार्थः—जिचा डोळा फुटला असली एक विरूप आंधळी दीडशें मनुष्यांच्या पंक्तींत आल्यामुळें तिनें सर्व पंक्तीस अगदीं विरस करून टाकिलें.

> झिमुट झिमुट पिर वायता डोड्डा उसा वायता.
> (झिम पाऊस येतो नदीला पूर येतो.)
> तरा सागा झिणका बोट डपता लाता.
> (आण वहिनी गांवीं लहान मासे पळूं लागले.)

भावार्थः—बारीक बारीक पाऊस पडत आहे, नदीला पूर येत आहे, तर वहिनी गांवी लौकर आणून दे. मासळ्या पळून जाऊं लागल्या आहेत.

> चैक मैक मैजाधार बगाइ योड ‚अगाधार.
> (चक पक नखरेबाज जवानपट्ठ्यापुढें धांवतात.)
> विहुना आता पेडगी इगाडा चटरी पेकिंग.
> (अशा हल्लीं मुली आतांच्या छिचोर पोरी.)

भावार्थ—चक पक व्हावें, नखरा करावा, जवानपट्ठ्या पुरुषापुढें धांवून जावें, अशीं लक्षणें हल्लींच्या मुलींचीं झालीं आहेत. आतांशा पोरी फार छिचोर झाल्या आहेत.

[वि. विस्तार पु. ८, व ४३. कूक,थर्स्टन, रसेल व हिरा-लाल. बोस-छत्तिसगड (जे. ए. एस्. बी. ५९). चिनॉय-सेन्सस रिपोर्ट, बेरार; ग्रँट-गॅझेटीयर ऑफ सेंट्रल प्राव्हि-न्सेस; ग्रियर्सन—लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया.]

गोंड-उमरी ज मी न दा री.—जिल्हा भंडारा. साकोली तहशिलीच्या मध्यभागीं ही जमीनदारी असून तिचें क्षेत्र-फळ २८ चौरस मैल आहे. त्यापैकीं अर्धा भाग जंगल आहे. मांडल्याचा गोंड राजा निजामशहा (इ. स. १७५१) याच्या वेळेपासून ही जमीनदारी अस्तित्वांत आहे असें म्हणतात. जमीनदार कनोजा ब्राह्मण आहेत. यांचा मूळ पुरुष शंकर. हा पहिला रघोजी याच्या वेळेस हयात असून त्यास ही इस्टेट दिल्याबद्दलची इ. स. १७७५ सालांतील एक सनद पूर्वी यांच्या संग्रहीं होती. या जमीनदारींत एकंदर १० खेडीं असून लोकसंख्या (सन १९०१) ३१५० आहे. जयनारायण नांवाचा हल्लीं तेथें जमीनदार आहे. उत्पन्न ५००० रुपये. टाकोळी २१०० रुपये.

गोंड-गोवारी—ही मराठी जिल्ह्यांतील गुरें राखणारी जात गोंड व गोवारी यांच्या मिश्रणानें बनली आहे. हे लोक जास्त अपवित्र समजले जाऊन गोंड व गोवारी या दोहोंच्याहि खालीं गेले आहेत.१९०१ सालीं यांची संख्या २००० होती. व १९११ सालीं यांचा गोवाऱ्यांत समावेश केला. रानांत फिरणाऱ्या गोंड व गोवारी तरुण-तरुणींचा स्नेह जमून जी स्वैर संतति झाली तीच ही जात आहे. यांच्यांत उपजाती नाहींत. कुळांनीं नांवें गोंडांपासून घेतलेलीं आहेत. गोंडां-प्रमाणें यांची उपासनापद्धति आहे. लग्नाचा विधि गोंड व मराठी विधींच्या मिश्रणांचा आहे. विधवाविवाह दिव्याभोंवतीं साडेतीन प्रदक्षिणा घालून होतो. यांची वैवाहिक नीति फारच नीच प्रकारची आहे. अत्यंतच नीच जातीच्या पुरुषां-बरोबरच व्यभिचार केला तर गोष्ट निराळी,नाहींतर बायकोनें सर्व व्यभिचार नवरा क्षमा करतो. कुणबी वरई बाईकांस ह्या जातीत घेतात. गोंडांप्रमाणें यांच्याहि बायका नितंबां-पर्यंत गोंदतात, कारण न गोंदविलेल्या स्त्रियांस देवपूजा करतां येत नाहीं.

गोडबोले, कृष्णशास्त्री (१८३१-१८८६)—एक महाराष्ट्रीय ग्रंथकार व ज्योतिषी. यांचा जन्म वाई येथें झाला. विद्याभ्यास पुणें येथें मराठी शाळेंत नंतर संस्कृत पाठशाळेंत व पूना कॉलेजांत झाला. लहानपणापासून त्यांनां गणिताचा नाद असे. पाठशाळेंत त्यांनीं ज्योतिषाचें अध्ययन केलें. पुढें १८५५ सालीं नार्मल शाळेंत ते शिक्षक झाले. १८६४-६५ सालीं मुंबईच्या कुलावा वेधशाळेंत त्यांची नेमणूक झाली. सन १८८६ सालीं ते मरण पावले. सिंधप्रांतांत असतांना सिंधी भाषेचें चांगलें ज्ञान त्यांनीं संपादन केलें होतें. फारसी भाषाहि त्यांनां अवगत होती. ते सिंधी भाषेचे परीक्षक १८७१ ते ७९ पावेतों होते. सन १८७८ मध्यें त्यांनीं व वामन कृष्ण जोशी गद्रे यांनीं मिळून ग्रहलाघवाचें मराठी भाषांतर करून छापलें. हटनच्या बीजगणिताचें मराठी भाषांतर सन १८५८ त छापलें. सन १८७८ त त्यांनीं व गोविंद विठ्ठल करकरे यांनीं मिळून युक्लिडच्याभूमितीच्या पहिल्या ४ पुस्तकाचें भाषांतर केलें. सन १८८२ त 'वेदांचें प्राचीनत्व' या विषयावर कृष्णशास्त्री यांनीं इंग्रजी निबंध लिहून तो छापून काढला. १८६९ त त्यांनीं सिंधी भाषेंत अंकगणिताचें पुस्तक केलें; व १८६७ त मराठी भाषेचें एक चांगलें व्याकरण केलें. लघुचिंतामणीचें त्यांचें मराठी भाषांतर सोदाहरण आहे. [दिक्षितकृत भारतीय ज्योतिःशास्त्र].

गोडबोले, परशुरामतात्या (शके १७२१-१७९६).—एक महाराष्ट्रीय कवि आणि ग्रंथकार. गोडबोले यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील पावस गोळप होय. बळवंतराव (पणजे), परशुरामपंत (आजे,) नारायणराव (वडील) व परशुरामतात्या (चरित्रनायक), अशी त्यांची वंशावळ आहे. परशुरामतात्यांचा जन्म वाई येथें शके १७२१ मध्यें झाला. त्यांनीं लहानपणचा विद्याभ्यासहि तेथेंच केला. त्यांचें मोडी अक्षर फार सुरेख होतें व त्यांनां जमाखर्चाची माहिती उत्तम होती. त्यांनां दाजीबा नांवाचे वडील बंधु होते व त्यास मोरोपंतादि महाराष्ट्र कवींचीं काव्यें वाचण्याचा नाद असे. त्यांच्या सहवासानें तात्यास मराठी काव्यें वाचण्याची गोडी लागली. विद्याभ्यास पुरा झाल्यानंतर प्रपंचाच्या निर्वाहार्थ ते पुण्यास जोगाच्या पेढीवर कारकून राहिले. कारकुनीपेशांतहि तात्यांस काव्यें वाचण्याचा फारच नाद असे. व सवड काढून ते मराठी काव्यांचा भाषाशास्त्रदृष्ट्या अभ्यास करीत. त्यावरून मराठी भाषेच्या मार्मिकपणाविषयीं त्यांचा चांगला लौकिक होऊन त्यावेळीं बोर्ड ऑफ 'एज्युकेशन' ह्या मंडळीनें मराठी भाषेचा कोश तयार करण्याकरता जी विद्वान मंडळी नेमली त्यांत तात्यांची योजना झाली. मेजर कँडी आणि तात्या यांचा प्रथम परिचय याच वेळीं झाला. इ. स. १८५५ सालीं जेव्हां कँडीची मराठी ट्रान्सलटरच्या जागीं नेमणूक झाली तेव्हां त्यानें आपल्या खास पंडिताच्या जागीं परशुरामतात्यांची नेमणूक करून घेतली. ह्या जागेवर तात्या अखेरपर्यंत होते.

नोकरी संभाळून मिळणारा वेळ ते ग्रंथलेखनाच्या कामीं लावीत. तात्यांनीं मूळ संस्कृतावरून शाकुंतल, वेणीसंहार, उत्तररामचरित्र मृच्छकटिक, नागानन्द आणि पार्वतीपरिणय हीं नाटकें लिहिलीं. नवनीत भाग पहिला आणि दुसरा हीं त्यांचीं पुस्तकें तर सर्वप्रसिद्धच आहेत. "सर्वसंग्रह" चालविण्यास माधव चंद्रोबांनां तात्यांची पुष्कळच मदत झाली. दादोबांची 'यशोदा पांडुरंगी' सामान्य लोकांस समजण्यास फार जड जाऊं लागली, म्हणून तात्यांनीं "केकादर्श" नांवाचें पुस्तक लिहिलें. शिवाय रावबहादूर शंकर पांडुरंग पंडितांनीं सरकारच्या आश्रयानें इंदुप्रकाश छापखान्यांतून जी 'तुकारामाची गाथा' प्रथम छापून प्रसिद्ध केली, त्या कामींहि त्यांना परशुरामतात्यांची बरीच मदत झाली. त्याशिवाय मराठ्यांच्या इतिहासावर सोप्या कविता, नामार्थदीपिका, बालबोधामृत, कादंबरीसार, वृत्तदर्पण, पाठावली इत्यादि पुस्तकें त्यांनीं लिहून मराठी भाषेची उत्तमप्रकारें सेवा केली आहे. तात्यांनीं संस्कृत नाटकाचा परिचय मराठी वाचकांस प्रथम करून दिला. 'वेणीसंहार' हें मराठींतील पहिलें नाटक होय. हें इ. स. १८५७ मध्यें त्यांनीं प्रथम भाषांतरित केलें. त्यानंतर इ. स १८८१ पर्यंत त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या व आजपावेतों सुमारें २५।३० वर्षें तें बाजारात अप्राप्य झालें होतें. ही अडचण साहित्य प्र. मंडळानें लक्षांत आणून आतां वेणीसंहाराची चौथी आवृत्ति प्रसिद्ध केली आहे. वेणीसंहारानंतर इ. स. १८५९ मध्यें उत्तर रामचरित्र व इ. स. १८६१ मध्यें. शाकुंतल हीं नाटकें त्यांनीं लिहिलीं. तथापि त्यांनां वेणीसंहाराची सर आली नाहीं.

अखेर शके १७९६ (स. १८७४) मध्यें तात्या आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी परलोकवासी झाले. इंग्रजी अमदानींत जे मराठी भाषासेवक म्हणून थोडे लोक प्रसिद्धीस आले, त्यांपैकीं परशुरामपंत हे एक होत. यांचे एक चिरंजीव रामचंद्र परशुराम गोडबोले हे शाळाखात्यात इन्स्पेक्टरच्या हुद्यापर्यंत चढले होते. हेच पहिले हिंदी इन्स्पेक्टर होत.

गोंडल संस्थान.—मुंबई.काठेवाड पोलिटिकल एजन्सीमधील एक हिंदी संस्थान. या संस्थानचें क्षेत्रफळ १०२४ चौरस मैल असून एकंदर लोकसंख्या (१९२१) १६७०७१ आहे.

उत्पन्नाचीं साधनें व कालवे.—१९२१ सालीं ३,००,००० एकरांपेक्षांहि जास्त एकर जमीन लागवडींत होती व पडीक जमीन त्या सालीं १४१८१० एकर होती. ८२४०१ एकर जमीन जंगलानें व्यापलेली असून तींपैकीं, ३०९ एकर जमीन १९२१ सालीं लागवडींत आणिली. गोंडल व धोराजी या दोन विभागांकरितां पानेलीमोटी व गोंडल या ठिकाणीं दोन मोठीं तळीं कालव्यानें पाणी नेण्याकरितां बांधण्यांत आलीं व त्यांस १२४८१५९ रुपये खर्च आला. कालव्यामुळें

होत जितक्या अधिक जमिनीस पाण्याचा पुरवठा जाईल तितकी उत्पन्नांत अधिक वाढ होते असें दिसून आलें आहे. पूर्वी ६१३२५ विहिरी होत्या; परंतु १९२१ सालीं विहिरींची संख्या ६५७७ इतकी झाली. विहिरी खणण्याकरितां शेतकऱ्यांनां सवलतीनें कर्ज देण्यांत येतें.

उद्योगधंदेः—धोराजी व गोंडल या ठिकाणीं कापसाचें व लोंकरीचें कापड तयार करण्याचे हातमाग आहेत. लांकडी व हस्तिदंती फण्या, लांकडी खेळाचें सामान, तांबेपितळेचीं भांडीं करण्याचें काम व सोन्याचें नक्षीकाम वगैरे अनेक उद्योगधंदे या संस्थानांत चालू आहेत.तसेंच ७२३ कापसाचे, ६३ लोकरीचे व दोन रेशमाचे असे हातमाग आणि ८ सरकी काढण्याचे कारखाने व तीन कापसाचे गठ्ठे दाबण्याचे कारखाने १९२१ सालीं या संस्थानांत होते. अडकित्ते, चाकू व वस्तरे तयार करण्याचा एक खासगी कारखाना गोंडलमध्यें असून अपलेटा या ठिकाणीं कातडें कमावण्याचाहि एक कारखाना आहे.

आयात व निर्गतः—इ.स.१९२०—२१सालीं२१४५०४४ रुपयांच्या मालाची निर्गत झाली व २४२१५६९ रुपयांच्या मालाची आयात झाली.

आरोग्यरक्षणः—इ. स. १९२१ सालीं गोंडल, धोराजी व अपलेटा या तीन ठिकाणीं दवाखाने होते व भायावादर आणि सारसाइ येथेंहि दोन रुग्णालयें होतीं. याच्या शिवाय धोराजी येथें दोन तीन खासगी संस्थाहि होत्या. त्याच सालीं आजाऱ्यांची संख्या २६२९६ इतकी असून १०७ रोग्यांना दवखान्यांतच राहण्याची सोय करण्यांत आली होती. देवी काढण्याचा प्रसार जास्त झालेला असून १९२०—२१ मध्यें देवी-डॉक्टरांनीं १७४ खेड्यांमध्यें काम केलें. निराश्रितांकरितां एक फिरता दवाखाना व एक रुग्णालय गोंडलच्या ठाकूर साहेबांनीं प्रथम काठेवाडांत काढलें आहे. गोंडल, धोराजी, अपलेटा व भायावादर येथें म्युनिसिपालिटया असून नगर सुधारण्याचें कामहि सुरू आहे. गोंडलशहरात विजेच्या दिव्यांची सोय करण्यांत आली आहे. १९२८ सालच्या महापुरामुळें गोंडल शहराचा बराच भाग पाण्यात बुडाला होता परंतु पाणी कमी होतांच विजेचे दिवे पूर्ववत सुरू झाले. म्युनिसिपालिटीचें उत्पन्न असें कांहींच नाहीं. सर्व खर्च संस्थानाकडूनच चालतो. या संस्थानांत दोन तुरुंग आहेत व पोलिसांची एकंदर संख्या १९२१ सालीं १५८८ इतकी होती.

लोकस्थितिः—इ.स. १९११, १९१५, १९१८ व १९२० सालच्या अवर्षणांमुळें संस्थानांत दुष्काळ पडला होता; त्यावेळीं पगार वाढविण्यांत आले व भायाद, मूळगिरासी व जिवैदार यांनां कर्ज देण्यात आलें. महायुद्धाच्या वेळीं मजुरांची स्थिति बरी होती. गुरांना मोफत चारा मिळावा म्हणून संस्थानाकडून त्यावेळीं व्यवस्था करण्यांत आली. महर्गतेमुळें नोकर लोकांनां बढती देण्यांत आली. काठेवाडांतील कोणत्याहि संस्थानापेक्षां या संस्थानांतील कारकुनांचे पगार दुप्पट किंवा तिप्पट आहेत असें आढळून येतें. महायुद्धामुळें उत्पन्न झालेल्या महर्गतेच्या योगानें पुष्कळ पांढरपेशा वर्गांतील लोकांनीं व अब्रूदार कुटुंबांनी मुंबई, कराची, कलकत्ता व रंगून या ठिकाणीं देशांतर केलें; तथापि १९२० सालापेक्षां सालीं१९२१ सालीं शेकडा तीन या प्रमाणांत लोकसंख्येची वाढ झाली.

दळणवळण आणि पोस्टाची व्यवस्था.—येथील संस्थानिकांच्या उदार धोरणामुळें उत्तम रस्ते, उत्कृष्ट इमारती व भक्कम पूल या संस्थानांत चोहोंकडे दृष्टीस पडतात. एकंदर २३ पोस्ट ऑफिसें व ९ तार ऑफिसें असून गोंडल येथें एक बंगलाहि आहे. गोंडल रेल्वे ही संस्थानच्या मालकीची असून खिजादियवासी व जेतासर-राजकोट रेल्वेचा कारभार संस्थानच्याच मार्फत चालतो. शिवाय जेतासर-राजकोट रेल्वेमध्यें संस्थानाचा तीनअष्टमांश हिस्सा आहे. मुखत्यारी मिळाल्यापासून लोकोपयोगी कार्यांकरितां १८१०००००, रुपये व रेल्वेकरितां ८१४२२०० रुपये संस्थानिकांनीं खर्च केले आहेत.

संस्थानचें उत्पन्नः—१९२०—२१ सालीं शेतसाऱ्याचें उत्पन्न सुमारें २०,००,००० रुपये व खंडणीचे उत्पन्न १०७२१ रुपये इतकें झालें.सध्याच्या संस्थानिकांनीं आपल्या कारकीर्दींत सुमारें ४० कर बंद केले आहेत. जकातहि रद्द केली आहे.

शिक्षणः—१९२१ सालीं या संस्थानांत १५० शाळा होत्या व त्यांत १४६४८ विद्यार्थी शिकत होते व या कामीं खर्च १६३६४७ रुपये झाला. काठेवाडात स्त्रीशिक्षणाच्या कामीं गोंडल संस्थाननें आघाडी मारली आहे. १९२१ सालीं मोंघिबा गर्लस् हायस्कूलांत ३४७ विद्यार्थिनी होत्या. १९१४ पासून ५ विद्यार्थिनी मॅट्रिकची परिक्षा पास झाल्या. इंग्रजी तिसऱ्या इयत्तेच्या पुढें शिकणाऱ्या मुलींनां स्कॉलरशिप्स देण्यांत येतात व मॅट्रिकची परिक्षा पास होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीस ठाकूरसाहेब ५०० रुपयांचें बक्षिस देतात. १९१७ सालापासून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणास सुरवात करण्यात आली व १९२१ सालीं शाळेंत शिकणाऱ्या मुलींची संख्या ४९८५ इतकी होती.

संस्थानिकः—गोंडलचे अधिपति जाडेजा वंशांतले आहेत. याचा मूळपुरुष कुंभोजी होय. ऐने-इ-अकबरींत गोंडल हें सुरत सरकारातलें वाघेलांचें वतन म्हणून लिहिलें आहे. १८०७ मध्यें यांचा इंग्रज सरकारशीं तहनामा होऊन संबंध जडला. या घराण्याला दत्तकाच्या अधिकाराची सनद आहे. सध्यांचे संस्थानिक भगवंतसिंगजी हे एडिंबरो विश्वविद्यालयाचे पदवीधर आहेत. यांना११ तोफांच्या सलामीचा मान आहे.

शहर.—ही गोंडल संस्थानची राजधानी.गोंडावरीच्या पश्चिम तीरावर वसली आहे. लो. सं. (१९११) १५१४१. येथून राजकोट, जुनागड, माणिकवाडा वगैरे ठिकाणीं चांगले

रस्ते जातात; शिवाय राजकोट-जेतलसर रेल्वे शाखेचे हें एक स्टेशन आहे. शहराला तटबंदी आहे. दोन सरकारी बगीचे, गिरासिआ कॉलेज, दवाखाना आणि अनाथगृह हीं येथें आहेत. इतर माहिती वर संस्थानांत आलीच आहे.

गोंडा, जिल्हा.-संयुक्तप्रांत. फैजाबाद विभागांतील एक जिल्हा. क्षेत्रफळ २८१३ चौरस मैल. उत्तरेला हिमालयाचा खालचा भाग, पूर्वेला 'बस्ती,' दक्षिणेला गोग्रा, पश्चिमेला बहरेच. जिल्हा बहुतेक सपाट असून झाडी बरीच आहेआणि लोकवस्ती लहान लहान खेड्यांतून आहे.गोग्रा आणि राप्ती या मुख्य नद्या आहेत.उत्तरेकडे व मध्यभागीं संरक्षित जंगल आहे. कुवाना नदीच्या कांठचा बराच मोठा प्रदेश खाजगी मालकीच्या जंगलाखालीं आहे.या सर्व जंगलांत साल, असाणा व खैर हीं झाडें असून आंबा, मोह; शिसवी, वड, पिंपळ वगैरे झाडेंहि आहेत.पर्वताच्या पायथ्याजवळच्या प्रदेशांतील हवा रोगट आहे आणि ताप तर सर्व जिल्हाभर नेहमीं असतो पावसाचें मान सरासरी ४४इंच आहे. पूर्वी हा जिल्हा अयोध्येच्या सूर्यवंशीय राजांच्या ताब्यांत कोसल साम्राज्याचा भाग म्हणून होता. लवाची राजधानी सरस्वती म्हणून जें शहर होतें तेंच हल्लींचे सेतमहेत होय असें कांहीं लेखक म्हणतात; कांहीं अवशेषांवरून बौद्ध धर्माच्या वैभवकालीं हा सर्व भाग वसलेला असावा असें दिसतें.पण ५व्या आणि ७ व्या शतकाच्या दरम्यान चिनी प्रवाशांनां हा भाग जंगलमय दिसला होता.

मुसुलमानी काळामध्यें येथें रजपूत घराण्याचें वैभव एकसारखें आंदोलन खात होतें. मुसुलमानी सुभेदार बहरेच हा येथें रहात असे. त्याची सत्ता त्याच्या किल्ल्याबाहेर क्वचितच चाले. रजपुतांचा उदय १४ व्या शतकापासून झाला. १५ व्या शतकामध्यें कल्हण घराणें प्रमुख होतें. जनवार आणि बिसेन या घराण्यांनीं पुढें आपली सत्ता वाढविली. सादतखानाकडे अयोध्याप्रांत आला तेव्हां गोग्राच्या उत्तरेकडील राजे बहुतेक स्वतंत्रच होते. गोंडाच्या राजानें बहरेचा पहिला सुभा याचा वध केला पण पुढें त्याला मुसुलमानी सत्ता कबूल करून खंडणी द्यावी लागली व १८ व्या शतकाच्या अखेरीला बिसेन घराण्याची सत्ता नाहींशीं होऊन मुसुलमानांनां वसूल घेतां येऊं लागला. १८ व्या व १९ व्या शतकांत कारभाराच्या अंदाधुंदीमुळें गोंडाचें पुष्कळच नुकसान झालें व कित्येक मोठाले तालुके सावकार आणि अधिकारी यांनीं आपल्या हाताखालीं घातले. १८५६ मध्यें हा जिल्हा खालसा करण्यांत आला. १८५७ च्या दंगलींत गोंडाचा राजा अयोध्येच्या बेगमला मिळाला होता. पुढें गोंडाच्या राजाचा लापती येथें पराभव झाला व तो आणि तुळसीपुरची राणी यांनीं शरण येण्याचें नाकारल्यामुळें त्यांचीं संस्थानें खालसा करून बळरामपूर व अयोध्या येथील संस्थानिकांस बहाल केली.

सेतमेहत हें जुनें शहर पुराणवस्तुसंशोधनास्तव उकरून काढण्यांत आलें. वंशदीला, पालटीपूर, रयाकेथान आणि परास येथें व इतर ठिकाणीं जुने अवशेष बरेच आढळतात. देवीपाटण, आणि छपिया येथें हिंदूंचीं मुख्य देवळें आहेत.

या जिल्ह्यांत ८ शहरें व २७९४ खेडीं आहेत. वस्ती (१९२१) १४७३०९८ आहे. याचे ३ तालुके पाडण्यांत आले आहेत. येथील भाषा औधी (हिंदीची एक शाखा) आहे. शेकडा ६४ लोक शेतीवर व शेकडा ९ सामान्य मजुरीवर रहातात.

कंकर नांवाचा दगड येथें फार सांपडतो व त्याचा उपयोग सडका तयार करण्याकरितां व चुना बनविण्याकरितां होतो. कापसाचा हलका कपडा कित्येक ठिकाणीं तयार होतो. उत्रौला येथें नकशीचें कुंभारकाम होतें. निर्गत व्यापार फक्त शेतीच्या उत्पन्नाचाच आहे. तांदूळ, वाटाणे, मका वगैरे शेतांतील धान्यें व लांकूड आणि सरपण हें जंगलचें सामान बाहेर पाठविले जातात. कपडा, मीठ, धातू, साखर यांची आयात होते. नवागंज, कर्नलगंज, उत्रौला व तुळसीपूर हीं व्यापाराचीं मुख्य ठिकाणें आहेत. याचा नेपाळशींहि थोडाबहुत व्यापार होतो. पण रस्त्यांच्या अभावामुळें त्याची वाढ होत नाहीं. बंगाल नॉर्थवेस्टर्न रेल्वेचा मुख्य रस्ता जिल्ह्याच्या दक्षिणभागांतून गेला आहे.

ता लु का.—संयुक्त प्रांत. गोंडा जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ६११ चौ. मै. लो. सं. (१९११) ३९९२५८.यांत गोंडा हें शहर व ७७४ खेडीं आहेत. गोंडा हें तालुका व जिल्हा यांचें मुख्य ठिकाण आहे. हा तालुका सुपीक जमीनीच्या मध्यभागाच्या उंचवटयावर वसला आहे. सारा व करांचें उत्पन्न (१९०३-४) ५४१ हजार रुपये. बिसुहि ही मध्यभागांतून व तराइ ही दक्षिण भागांतून अशा दोन नद्या वाहतात. वहितीखालील ४२२ चौ. मै. जमीनींपैकीं १८७ मैल पाण्याखालीं होती.

श ह र.—संयुक्त प्रांत. गोंडा जिल्हा व तालुका यांचें मुख्य ठिकाण. बंगाल नॉर्थवेस्टर्न रेल्वेचें हें मोठें जंक्शन आहे व येथून बरेच रेल्वेचे फांटे फुटतात. गोंडा हें नांव 'गोठाण'या शब्दापासून आलें असावें व हें शहर अकबराच्या वेळीं मानसिंग नांवाच्या रजपुतानें वसवलें असें म्हणतात. हें दिसण्यांत विशेष चांगलें नाहीं पण दोन तलाव आहेत त्यांनीं जरा शोभतें. १८६९ पासून येथें म्यु. कमिटि आहे. शेतीच्या उत्पन्नाचा बराच व्यापार चालतो पण इतर कारागिरीच्या व कारखान्यांतल्या मालांचा व्यापार होत नाहीं. येथें सरकारी कोर्टें, दवाखाने, लायब्ररी शाळा वगैरे इमारती इतर स्थलाप्रमाणें आहेत.

गोंडार—अबिसीनिया देशांतील एक शहर. पूर्वी हें अम्हारिक राज्याच्या राजधानीचें शहर होतें. लोखंडासारख्या काळ्या व वाटोळ्या आकाराच्या दगडांनीं बनलेल्या खडकाच्या एका कड्यावर हें वसलें आहे. या कड्यांतून अँग्रेब व काहा या दोन नद्या निघून शहराच्या खालीं एकमेकींस मिळतात. नगिस सायसेनियस यानें

गोंडार हें १६ व्या शतकाच्या सुरुवातीस आपल्या राज्याच्या राजधानीचें शहर बनविलें. त्यावेळीं हें एक लहानसें खेडें होतें. पुढील बादशहांनीं येथें प्रासाद व दुर्ग बांधले. इ. स. १७३६ च्या सुमारास गोंडार वैभवाच्या शिखरास पोंचलें. तेथून पुढें त्याच्या उतरत्या काळास सुरुवात झाली. १८८७ सालीं माहदीच्या लोकांनीं हें शहर लुटून अग्नीच्या भक्ष्यस्थानी दिलें. १७७० मध्यें १०००० लोकवस्ती होती ती १९०५ सालीं ७००० वर उतरली. रहिवाशांत मुसुलमान लोक प्रमुख होत. कापूस, सोन्याचांदीचीं भांडीं, तांब्याचीं भांडीं, उत्तम खोगीर व जोडे इत्यादि वस्तू येथें तयार करण्यांत येतात.

गोत्रें—ही सध्या भारतीयांतली चालू संस्था होय. सध्यां अशी समजूत आहे कीं, एका गोत्रांतले लोक म्हणजे एका वंशांतले लोक.गोत्रांचा उच्चार धार्मिक विधींत ब्राह्मणांकडून व्यक्तिनिर्देश करतांना होतो, आणि सगोत्रीं विवाह आज रूढ नाहीं, कांकीं सगोत्रीं लग्न विहित नाहीं अशी समजूत आहे. आणि सगोत्रीं लग्न करावयाचेंच झालें तर मुलीला दुसऱ्या कोणाच्या मांडीवर देऊन करण्यांत येतें.प्राचीन इतिहास पहातां एका गोत्रांतील सर्व मंडळी एकाच वंशांतली आहेत ही गोष्ट पूर्णपणें खरी नाहीं. तशीच सगोत्रविवाह केव्हांच रूढ नव्हते ही गोष्ट खरी नाहीं. एवढेंच नव्हे तर गोत्रसंस्थाहि ब्राह्मणांत फारशी जुनी दिसत नाहीं. भारतीय ब्राह्मणांच्या गोत्रसंस्थेशीं प्रवरसंस्था संयुक्त झाली आणि प्रवरांचे ऋषी ते गोत्रसंस्थापकांचेहि पूर्वज असावेत अशी समजूत होऊन लग्न करतांना गोत्रांबरोबर प्रवरहि टाळूं लागले.

गोत्रसंस्थेचा इतिहास द्यावयाचा म्हणजे अनेक प्रकारचें विवेचन उत्पन्न होतें. एकतर (१) गोत्र, देवक वगैरे नांवांनीं जे बहिर्विवाह–युक्त समुच्चय सर्व जगभर दृष्टीस पडतात त्याची कारणमीमांसा करावयाची, आणि नंतर (२) गोत्र शब्दाच्या उपयोगाचा इतिहास देऊन ब्राह्मणी गोत्रप्रवरयुक्त जी परंपरा स्थापित झाली तिचा इतिहास द्यावयाचा.

गोत्रें स्थापित होणें ही आडनावें स्थापन होण्याप्रमाणेंच स्वाभाविक क्रिया आहे. आणि ' अपत्यं पौत्रप्रभृति गोत्रं ' असा पाणिनीनें जो नियम दिला आहे तो कुलनामनिर्देशांच्या स्पष्टीकरणास योग्य आहे. कुलांनां नांवें कशीं पडलीं येवढें स्पष्ट करावयाचें असेल तर पाणिनीचा हा नियम तें स्पष्ट करील. तथापि आपणास स्पष्ट करावयाची गोष्ट आडनांवस्वरूपी गोत्रें कशीं पडलीं एवढीच नसून बहिर्विवाहात्मक संस्था उत्पन्न कशी झाली आणि तिचा गोत्राशीं संबंध कसा जडला आणि गोत्रांचा प्रवरांशीं संबंध कसा जोडला गेला इत्यादि प्रश्न आपणांस विचारणीय आहेत.

ब हि र्वि वा हा ची मी मां सा.—बालहत्येच्या प्रघातावरून गोत्रांतरविवाहाची चाल अस्तित्वांत आली असें मॅक्लेननचें मत आहे. या प्रघातामुळें स्त्रिया दुर्मिळ होऊं लागल्या,व ज्ञातीपुरती बहुभर्तृत्वाची चाल रूढ झाली. व ज्ञातिबाह्य स्त्रिया धरून आणण्याचीहि चाल पडली. रानटी लोकांत, लहान मुलींनां ठार मारण्याची चाल आहे. व त्याचीं कारणेंहि उघड आहेत. समाज–घटनेच्या प्राथमिक अवस्थेंत असणाऱ्या जातींत स्त्रीजातीच्या नैसर्गिक कमकुवतपणामुळें, 'मुली म्हणजे आपल्या मार्गांतील कांटेच होत,' अशी समजूत होती. त्यांना पोसावें लागे, आणि शिकार करून क्षुधा शमविण्याच्या कामीं त्यांचा उपयोग होत नसे. मुली असल्या कीं, शेजाऱ्यास मोहहि उत्पन्न होत असे. हें मॅकलेननचें स्पष्टीकरण पटत नाहीं; कांकीं तो म्हणतो तितक्या जास्त प्रमाणांत बालहत्या रूढ होती हें सिद्ध झालेलें नाहीं. बलात्कारानें धरून आणलेल्या स्त्रीलाच ज्या प्राथमिक समाजपद्धतींत पत्नीत्व प्राप्त होत असे त्याच सामाजिक पद्धतींत गोत्रांतरविवाहाच्या चालीचा उद्भव झाला असावा हीच गोष्ट जास्त संभवनीय दिसते. मानवी समाजाच्या प्रथमावस्थेंत मुलांचें फक्त आईशींच नातें असे, व एखाद्या जातींतील स्त्रीवर्ग समाईक मिळकत अथवा धन म्हणून मानला जात असे. पुरुषास कोणत्याहि स्त्रीला पूर्णपणें बळकावितां येत नसे, किंवा तिच्यावर स्वामित्वहि त्याला गाजवितां येत नसे. परंतु अन्य जातींच्या स्त्रियांसंबंधीं मात्र निराळी गोष्ट होती. जो पुरुष अन्य जातींतील स्त्री बलात्कारानें पकडून आणील त्याला त्या स्त्रीवर स्वामित्व गाजवितां येत असे व त्याचा हक्कहि अबाधित राहत असे. बालहत्या, स्त्रीवर ताबा असावा म्हणून पुरुषास होणारी नैसर्गिक इच्छा, आणि कुटुंब करून रहावें असा एक प्रकारचा नैसर्गिक कल, अशा अनेक कारणामुळें गोत्रांतरविवाह जास्त रूढ होऊं लागले व स्वज्ञातींत विवाह कमी होऊं लागले. अगदीं थोडक्या पिढींमध्यें, निसर्गसहज स्फुरणाचें रूढी अथवा कायदा यांमध्यें रूपांतर होतें,व नंतर त्यांचा अतिक्रम करणें पाप मानलें जातें तसें झालें वाढत्या सुधारणेबरोबर व ज्ञातींच्या दळणवळणामुळें, बलात्काराची आवश्यकता नष्ट होऊं लागली आणि राक्षसविवाह हा स्त्रीपुरुषांच्या वैयक्तिक व कायमच्या संबंधाचा एक द्योतक होऊन बसला, अशीहि एक मीमांसा करण्यांत आली आहे. ऑस्ट्रेलियांतील लोकांत एकाच आडनांवाच्या दोन कुटुंबांत विवाह होत नाहींत. पूर्व आफ्रिकेंतहि वरील चाल असल्याचें समजतें. हिंदुस्थानांतील खासीया, वराली, ओरांओन व इतर अनेक वन्य जातींतहि गोत्रांतरविवाहच रूढ आहे. काल्मक, सरकॅसिअन, सैबेरियांतील याकुत व अमेरिकेंतील इंडियन यांच्यामध्यें गोत्रांतरविवाह चालू आहे. ब्रिटिश कोलंबियांतील सिमशियन इंडियन लोकांत देवमासा, बेडूक, गरुड व लांडगा इत्यादि देवकें आहेत व त्यांच्यांत सदेवकविवाह होत नाहींत.

आतां भारतीय गोत्रसंस्थेकडे वळूं.गोत्र हा शब्द ऋग्वेदामध्यें इन्द्राच्या पराक्रमांच्या वर्णनांत अनेक वेळां येतो. या शब्दाचा अर्थ रॉथ "गोठा" असा करतो तर गेल्डनेर गाईंचा

कल्पना असा करतो. मॅकडोनेलच्या मतें वरील दुसऱ्या अर्थावरून पुढें या शब्दास उत्तरकालीन वाङ्मयांत जो कुटुंब किंवा गोत असा अर्थ आला आहे त्याची उपपत्ति लावणें सोपें होतें. छांदोग्य उपनिषदांत [४. ४, १]कुटुंब या अर्थी गोत्र हा शब्द आलेला आहे.

गोत्र ही संस्था प्राचीन काळीं काय असावी हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. गो म्हणजे भूमि आणि त्र म्हणजे संरक्षक; यावरून गोत्र म्हणजे भूमिसंरक्षक वर्ग असा गोत्र या शब्दाचा अर्थ करून गोत्र हा शासनविषयक विभाग असावा अशीहि कल्पना व्यक्त झाली आहे; आणि दुसऱ्याच्या गोत्रांतील मुलगी पळविणें हें मर्दाचें काम, यामुळें गोत्राबाहेर लग्न करण्याची रीत उत्पन्न झाली असावी, असें गोत्राबाहेर लग्न लावण्याचें स्पष्टीकरण करण्यांत आलें आहे. वैदिक लोकांबद्दल हें स्पष्टीकरण लागू पडत नाहीं. या प्रकारच्या स्पष्टीकरणाच्या ग्रहणास अडचण येते ती ही कीं, गोत्र आणि विवाह या संस्थांचा संबंध वैदिकांत प्राचीनकाळीं नव्हता. हा संबंध केव्हां उत्पन्न झाला आणि कोणत्या प्रयोजनामुळें झाला हा बऱ्याच उत्तरकालीन इतिहासाचा प्रश्न आहे. सूतसंस्कृतींत गो म्हणजे जमीन आणि त्र म्हणजे संरक्षक असा अर्थ असणें शक्य आहेः आणि त्यामुळे गोत्र ही एक राजकीय संस्था असावी हेंहि शक्य आहे. परंतु ती तशी होतीच हेंहि आज निश्चयानें सांगता येत नाहीं.

'दुसऱ्याच्या टोळींतील मुलगी चोरून आणावयाची आणि स्वतःच्या टोळींतील मुलगी करणें म्हणजे नामर्दपणा होय' या तऱ्हेच्या कल्पनेचा मात्रसंस्कृतीच्या लोकांतील बहिर्विवाह स्पष्ट करण्यास उपयोग होत नाहीं; का कीं, मनुष्यसंघ म्हणून गोत्र शब्द वेदांत नाहीं तर सगोत्रविवाह दूषणीय आहेत असा आधार कसा सांपडणार. बौधायनासारख्या जुन्या स्मृतींतहि त्यास आडकाठी नाहीं, आणि वसिष्ठाच्या धर्मसूत्रांत देखील सगोत्रविवाह करण्यास जरी आडकाठी घातली आहे, तरी बापाच्या बाजूनें पांच पिढ्या सोडून लग्न करावें असें सांगितलें आहे. गोत्रमर्यादा जर जुनी असती तर बापाच्याकडील पांच पिढ्या टाकाव्या या नियमाचें प्रयोजनच नव्हतें. ज्या कांहीं स्मृतींमधून सगोत्र किंवा सप्रवर विवाहांचा निषेध केला असतो त्याबरोबरच बापाकडच्या सात पिढ्या टाकाव्या व आईकडच्या पांच पिढ्या टाकाव्या असाहि उल्लेख करण्यांत येतो. गोत्रसंस्था जर प्राचीन नव्हे तर आपणापुढें प्रश्न एवढाच उरतो कीं, ही समाजांत शिरली असेल तरी केव्हां? आणि वर धर्मशास्त्रकारांनीं दिलेले दोन नियम भिन्नकाळीं उपस्थित होऊन पुढें ते दोन्ही एकत्र मांडले गेले असें तर नसेलना? सात पिढ्यांपर्यंत अगोदरच नातेवाईकांचा हिशेब ज्यांस माहीत आहे अशा व्यक्ती विरळ्या. पांच पिढ्या आईकडच्या टाकाव्या हा नियम तर बऱ्याच जातींनीं धाब्यावर बसविला आहे. दाक्षिणेकडे अनेक जातींमध्यें मामाची मुलगी तर लग्नांत अधिक पसंत केली जाते. बापाकडून सात पिढ्या टाकाव्या हा नियम घेतला तर तो अनवश्यक ठरतो; कारण गोत्राबाहेर जर लग्न करावयाचें तर सात तर काय पण त्यामुळें शेंकडों पिढ्या वगळल्या जातात. वसिष्ठासारख्या जुन्या स्मृतिकारांनीं हे दोन्हीं नियम एकसमयावच्छेदेंकरून मांडले असूनहि त्यांत दिसून येणारी परस्परविरुद्धता ओळखून मनुस्मृतीनें फक्त गोत्राचाच नियम ठेविला आहे व बापाकडील सात पिढ्यांचा वगळला आहे. मनुस्मृतीचा "असपिंडाच या मातुः, असपिंडाच या पितुः" हा पाठ घेतला तर सपिंडाबाहेरचे सगोत्री विवाह्य ठरतील. विवाहविषयक नियम देणारे धर्मसूत्रकाराच्या पूर्वींचे ग्रंथकार म्हणजे गृह्यसूत्रकार हे होत. बऱ्याचशा गृह्यसूत्रकारांनीं तर गोत्राचा मुळींच आग्रह धरिला नाहीं. असेंहि शक्य आहे कीं ज्यावेळेस "गोत्र" याचा अर्थ गोठा असा मात्रसंस्कृतीच्या लोकांत होता त्यावेळेस "भूरक्षकवर्ग" हा अर्थ सूतसंस्कृतीच्या लोकांत असावा. आणि सूतसंस्कृतीच्या लोकांत भूरक्षक वर्ग गोत्रांतरविवाही असेल.

सेनार्ट हा सगोत्रविवाहाची निषिद्धता व सवर्णविवाहाची प्रशस्तता मूल गृहकालापर्यंत नेतो. परंतु असगोत्रविवाहाची चाल इण्डोयुरोपीय कालापासून अस्तित्वांत असावी असें समजण्यास साधन जें भारतीयांतील गोत्रप्राचीनता तेंच खरें दिसत नाहीं. शतपथ ब्राह्मणांत (१. ८, ३. ६) दोन्ही बाजूंनीं तिसऱ्या किंवा चवथ्या पिढीच्या आंतच विवाह करणें संमत असल्याचा उल्लेख आहे. गोत्रें ही संस्था फार प्राचीन नाहीं ही गोष्ट गोत्रें व श्रौतधर्म यांचा संबंध लक्षांत घेतला असता दिसून येईल. असें मात्र शक्य आहे कीं, सूतसंस्कृतीच्या आर्यन् लोकांत गोत्रांचें म्हणजे बहिर्विवाहाचें देवकरूपानें अस्तित्व असेल. रोमन लोकांत 'जेन्' नांवाच्या समुच्चयाबाहेर लग्न करण्याची पद्धत होती. जरी इंडोयुरोपीय काळांत बहिर्विवाह होत असला तरी मधल्या मात्रसंस्कृतीच्या लोकांत तो तात्पुरता नष्ट झाला असला पाहिजे असें वाटतें. जेव्हां त्यांत गोत्रसंस्था निर्माण झाली तेव्हां त्याचा प्रवराशीं संबंध जोडला गेला, आणि वेदविरुद्ध पण वैदिक परंपरेवर अशी समाजव्यवस्था प्रचलित झाली.

गोत्रांचें अस्तित्व पहाण्यासाठीं ऋग्वेद चाळून पाहिला तर त्यांत "गोत्र" या शब्दाचें "कुल" या अर्थानें अस्तित्व दिसत नाहीं आणि बहिर्विवाहनियमबद्ध समुच्चय तर मुळींच दिसत नाहींत. तर आपणांस ऐतिहासिक प्रश्न उत्पन्न होतात ते पुढील प्रमाणें:— (१) बहिर्विवाह ज्या समुच्चयांत नव्हते त्यांत उत्पन्न कसे झाले, (२) त्या समुच्चयांस एक किंवा अनेक प्रवरांनीं युक्त अशी परंपरा कशी उत्पन्न झाली; (३) आणि त्या परंपरेस धार्मिक महत्व कोणत्या क्रमानें उत्पन्न झालें.

ब्राह्मणी गोत्रें म्हणून आज जीं प्रचलीत आहेत तीं ऋषींचीं नांवें आहेत. त्या नांवांपैकीं कांहीं नांवें इतकीं जुनीं आहेत कीं तीं वेदांतील मंत्रद्रष्टे म्हणून दृष्टीस पडतात व त्यांपैकीं कांहीं ऋग्मंत्रांतच आलीं आहेत तर कांहीं नांवें सर्वानुक्रमणीकारांनीं उल्लेखिलीं आहेत. या दोन्ही प्रकारचीं नांवें तिसऱ्या विभागांत ब्राह्मण्याच्या इतिहासांत दिलीं आहेत. अगस्त्य, अघमर्षण, अत्रि इत्यादि गोत्रनामें आहेत, मंत्रद्रष्टे आहेत व ऋग्मंत्रांत उल्लेखित आहेत, तर उपमन्यु देवल आणि मधुच्छंद हीं गोत्रनामें आहेत व त्यांस सूक्तकर्तृत्व सर्वानुक्रमणीकारांनीं दिलें आहे पण त्यांचा प्रत्यक्ष उल्लेख ऋग्मंत्रांत नाहीं. अत्यंत प्राचीन ऋषींचे वंशसंबंध सर्वानुक्रमणीकारांनीं दिले आहेत. त्यांपैकीं कांहींस मंत्रांत प्रत्यक्ष आधार आहे व कांहींस नाहीं. त्या वंशसंबंधाचें विवेचन पुढें ब्राह्मण्याच्या इतिहासांतच (विभाग३) दिलें आहे. त्यावरून एवढें दिसतें कीं जीं सात प्रवरसंस्थापक ऋषींचीं कुलें झालीं व अनेक गोत्रें त्या प्रवरपरंपरेंत समाविष्ट करण्यांत आलीं त्यास एक कुलस्थापनपर आधार फार थोडा आहे पण अगदींच नाहीं असें नाहीं.

गोत्रें व श्रौत संस्था.—पशुयागांतर्गत वपायागापूर्वी जे प्रयाज व्हावयाचे असतात त्यांत कोणतीं आप्रीसूक्तें म्हणावयाचीं, आणि कोणत्या देवतांनां आहुती द्यावयाची हें यजमानाच्या गोत्रप्रवरांवरून ठरवावें इतकाच काय तो गोत्रांचा आणि श्रौत धर्माचा संबंध आहे, आणि तो देखील वेदोक्त नसून सूत्रोक्त आहे. मंत्रकालीं गोत्रें नव्हतीं व गोत्रांनुसार आप्रीसूक्त किंवा देवता यांचें भिन्नत्व स्थापित झालें नव्हतें. मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या संबंधानें आपणांस असें दिसतें कीं, प्रत्यक्ष ऋग्मंत्रांत कुलकल्पनेव्यतिरिक्त गोत्रकल्पनाच नसल्यामुळें अमुक ऋषी अमुक गोत्रांचे हें सांपडणें शक्य नाहीं. परंतु जे थोडेसे पितृविषयक उल्लेख सांपडतात त्यांचा उपयोग त्यांस विशिष्ट गोत्रप्रवरांत बांधण्याकडे सर्वानुक्रमणीकारांनीं केला ब्राह्मणग्रंथांत आप्रीसूक्तविषयक विवेचन करितांना प्रवरणार्ह ऋषित्र्याची कल्पना आली आहे. तथापि तेवढ्यावरून मंत्रवक्त्या ऋषींच्या ठायीं गोत्रकल्पना होती असें सिद्ध होणार नाहीं. ब्राह्मण ग्रंथांचा काल म्हणजे बृहद्यज्ञाचा काल आणि बृहद्यज्ञांचा काल म्हणजे देश्यांच्या वर मांत्रसंस्कृतीच्या संस्था दडपण्याचा काल. या कालांत देश्यांची विद्या स्वीकारणें किंवा आपली विद्या देश्यांस देणें या गोष्टी, होते, अध्वर्यू व हे उद्गाते करीत होते. केवळ ते विद्याच घेत होते असें नाहीं तर ते देश्यांच्या चालीरीती देखील स्वीकारीत होते. जर देश्यामध्यें गोत्रें असलीं तर त्या गोत्रांचा यज्ञसंस्थेशीं संबंध जोडण्याचें काम देखील अवश्य होतें. तर असें असणें शक्य आहे कीं देश्यांमध्यें गोत्रें आहेत असें पाहून त्यांची गोत्रसंस्था मांत्रसंकृतीच्या लोकांनीं घेतली असावी. त्या गोत्रांचा उपयोग काय करावयाचा याविषयीं मात्र त्यांचा निश्चय तात्कालीक झालेला दिसत नाहीं. ऋग्मंत्रांत जशी गोत्रकल्पना नाहीं तशी प्रवरकल्पनाहि नाहीं. तसेंच ज्या सत्रकल्पनेच्या आश्रयानें श्रौतसूत्रकारांनीं गोत्रप्रवरकल्पनेची मांडणी केली आहे त्या सत्रांचाहि उल्लेख ऋग्मंत्रांत नाहीं. जे सत्रविषयक उल्लेख आलेले आहेत त्यांचा अर्थ अनेक व्यक्तींची एकत्र स्थिति यापलीकडे पोहोंचूं शकत नाहीं. ऋग्वेदांतच सत्रें नाहींत व यजुर्वेदाच्या अनेक शाखांतहि सत्रें नाहींत तर सत्रें होतीं तरी केव्हां? सत्रांच्या भरभराटीचा काल असा वैदिकवाङ्मय वाचल्यास कोणताच दिसत नाहीं. हौत्राच्या ऋचांत सत्र शब्द ऐकूं येत नाहीं आणि ब्राह्मणांमध्यें जर सत्रें पुसटलेलीं दिसतात तर सत्रें वैदिक परंपरेंत मूळचीं नव्हतीं पण वेदबाह्य परंपरेंतून निघून वैदिकांनीं तीं मान्य केलीं असावीं असें म्हणण्यास काय हरकत आहे? म्हणजे देश्यांच्या उपासनापद्धतींत सत्रें असावींत आणि गोत्रेंहि त्यांच्या आश्रयानें धर्मविधींत प्रचलित असावींत आणि त्या दोहोंचाहि स्वीकार मात्र संस्कृतीच्या लोकांनीं केला असावा.

गोत्रांची उत्पत्ति मांत्र कीं देश्य संस्कृतींत?—गोत्रें म्हणजे ज्या समुच्चयातील लोकांनीं आपआपसांत विवाहसंबंध करतां कामा नये असे पुंज, अशी लोकांत आज कल्पना रूढ आहे. असले समुच्चय मात्रसंस्कृतीच्या लोकांत होते असें मंत्रामधून तर मुळींच सिद्ध होत नाहीं. आणि प्रवरहि मंत्रात नाहींत तर ही गोत्रप्रवरात्मक सृष्टि आली कोठून? ही उत्तरकालीं त्याच संस्कृतींतून विकास पावली असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. कां कीं मांत्रसंस्कृतीच्या लोकांचें वाङ्मयरूपी साहित्य आपणांजवळ भरपूर आहे. जर गोत्रसंस्था मांत्रांस परकी नसली म्हणजे मांत्रांच्या गोत्रविहीन समाजापासून गोत्रसंस्था तयार होत गेली असती तर या विकासाच्या मधल्या पायऱ्या दाखविणारे वाङ्मयरूपी किंवा शब्दरूपी उल्लेख आपणांस खास सांपडले असते.परंतु तसे उल्लेख आपणांस आरण्यकान्त वाङ्मयांत कोठेंच सांपडत नाहींत. ज्या समुच्चयाबाहेर लग्न केलें पाहिजे असे समुच्चय काश्मीरपासून द्राविडपर्यंत अनेक जातींत सांपडतात, एवढेंच नव्हे तर रशियापासून आस्ट्रेलियापर्यंत देखील सांपडतात.कांहीं समुच्चयांत बहिर्विवाहाची सक्ति जास्त असते व कांहींत कमी असते एवढेंच. या तऱ्हेचा बहिर्विवाह समाजांत उत्पन्न झाला तो कां याविषयीं मानववंशशास्त्रज्ञांनीं बरींच कारणें पुढें मांडलीं आहेत.त्यातील एक कारण असें कीं समुच्चयासमुच्चयांतच लग्न करणें 'नामर्दपणाचें आहे; खरे मर्दाचें ' काम म्हणजे शत्रूच्या गोटांतील मुलगी पळवून आणावयाची ही कल्पना समाजांत अत्यंत बाल्यावस्थेंत कदाचित खरीहि असेल. पण या कल्पनेच्या साहाय्यानें भारतीय ब्राह्मणांमध्यें बहिर्विवाह कां उत्पन्न व्हावा याचें स्पष्टीकरण होणार नाहीं.कां कीं,परसमुच्चयांतून मुलगी पळवून आणण्याचें महत्त्व किंवा त्या क्रियेस अनुकूल परिस्थिति ही जो देश वसलेला आहे व ज्या देशांत राजसंस्था स्थापित

झाली आहे. अशा देशांत नसते.आणि परमुच्चयांतून मुलगी पळवून आणण्याचें महत्व हौत्रांत किंवा औद्गात्रांत तयार झालेल्या भिक्षुकांत कोठून उत्पन्न होणार ? अर्थात बहिर्विवाहाचीं स्वाभाविक कारणें उत्पन्न होऊन बहिर्विवाह मांत्रसंस्कृतीच्या लोकांत स्थापित झाला हें शक्य नाहीं. जर स्वाभाविक कारणामुळें उत्पन्न झाला नसेल तर त्याच्या अस्तित्वाची उपपत्ति अनुकरणाशिवाय दुसरी कशांत सांपडणार ? याचा थोडक्यांत अर्थ असा कीं ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांचें किंवा मांत्रांनीं देश्यांचें अनुकरण केलें.पण तुझ्यावर माझी कडी पाहिजे असा प्रकार मात्र केल्याशिवाय ते राहिले नाहींत. त्यांनीं लौकिक गोत्र व अध्यात्मिक गोत्र असा निराळा भेद उत्पन्न करून आपलीं गोत्रें ब्राह्मणेतरांवर लादलीं आणि पुष्कळ प्रसंगीं आपल्या शिष्यांस (उदाहरणार्थ रजपुतांस) अशी शिकवण दिली कीं, लौकिक गोत्रांचें विवाहादि प्रसंगांत अध्यात्मिक गोत्रांपेक्षां महत्व कमी ["देवक" पहा].

प्रवरांशीं गोत्रांचा संबंध सूत्रकालीन होय. सूत्रकारांनीं प्रवरऋषी हे व्यक्तीचे गोत्रसंस्थापकापूर्वीचे पूर्वज बनविले आहेत. पण त्या विधानास वेदांतप्रमाण नाहीं.

वेदांत प्रवरासारखा उल्लेख काय तो एकच आहे. तो आर्षेयवरणविषयक होय. (तै. सं. २. ५, ८). म्हणजे अशी कल्पना होते कीं, श्रौती मंडळींचे आठ संप्रदाय स्थापन झाले आणि त्यावेळचे आचार्य किंवा विद्याभासी या आठांपैकीं कोणत्याना कोणत्या संप्रदायांत समाविष्ट होत. वरण या शब्दाचा अर्थच निवड, स्वीकारणें असा आहे. म्हणजे त्यावेळचा शालंकायन किंवा बौधायन हा अगस्त्य किंवा वसिष्ठ इत्यादि कोणत्या तरी ऋषीपासून जे संप्रदाय स्थापन झाले त्यांपैकीं एकाचा स्वीकार करी. म्हणजे ते त्याचे प्रवर झाले.

गोत्रमंडळामुळें ज्या संप्रदायांचें अस्तित्व कळून येतें ते संप्रदाय म्हटले म्हणजे गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भारद्वाज, वसिष्ठ. जे ऋषी कोणत्याच मंडळांत किंवा संप्रदायांत नाहींत असे मंत्रद्रष्टे पहिल्या, आठव्या व दहाव्या मंडळांत घातले आहेत. प्रवरसंस्थापक ऋषी म्हटले म्हणजे कश्यप, अत्रि, भरद्वाज, विश्वामित्र, गोतम, जमदग्नि, वसिष्ठ व आठवा अगस्ति असे धरले जातात. अनेक ऋषींच्या नांवाचीं गोत्रें आहेत तीं सर्व वरील ऋषींच्या नांवावर स्थापन झालेल्या प्रवरांशीं जोडलीं जातात. या प्रवरसंस्थापकांमध्यें आंगिरसाचें नांव दिलेलें नाहीं. आंगिरस हा तर अत्यंत प्राचीन काल्पनिक पुरुष अगर प्रत्यक्ष अग्नि होय. असें शक्य आहे कीं जे ऋषी कोणत्याच पुरुषास आपला संप्रदायप्रवर्तक म्हणून मान्य करीत नसतील ते आंगिरसवरण करीत असावेत. या अनेक संप्रदायांची तोडमिळवणी करून सर्वसामान्य श्रौतधर्म तयार करण्याची खटपट चालू असे. त्या खटपटीचीं अंगें अनेक होतीं. एक अंग म्हटलें म्हणजे अनेक संप्रदायांतील विध्यंश घेऊन कर्मकल्पना करणें, दुसरें अंग म्हटलें म्हणजे कर्मांमध्यें काहीं संप्रदायांचें वैशिष्ट्य रहावें म्हणून ऐच्छिक क्रिया ठेवणें. या दोन्ही क्रियांचें परिणाम यज्ञसंस्थेवर झाले आहेत.

काहीं संप्रदायांमध्यें विशिष्ट कर्में रूढ होतीं. उदाहरणार्थ, अंगिरसामध्यें द्विरात्र, गर्गांत त्रिरात्र, अत्रींत चतुरात्र. जमदग्नीमध्येंहि एक तऱ्हेचा चतूरात्र होताच. उद्दालक पुत्र कुसुरबिंद याच्या नांवावर सप्तरात्र इत्यादि संस्था व्यक्तीच्या किंवा संप्रदायाच्या दिसतात. सोमयागसंस्था पूर्ण होऊन यजुर्वेद व ब्राह्मणें तयार होण्यापूर्वीच्या या संस्था ज्या क्रियेनें सामान्य एक क्रतु झाला त्याच क्रियेनें या इतर संस्था झाल्या असाव्यात. जेव्हां अनेक संप्रदायांचें एकीकरण झालें व अनेक गोत्रांमधून ज्याप्रमाणें हौत्र तयार झाले त्याचप्रमाणें सामान्य यज्ञघटना बनवितांना प्रत्येक वरील संप्रदायापाशीं देवघेव करून यज्ञाची मांडणी सर्वमान्य करण्यांत आली असावी. अध्वर्युवर्गानें संस्थांचें एकीकरण केलें तर होत्यांनीं अनेक सूक्तवान् कुळांचें एकिकरण केलें. त्या क्रियेंत विशिष्ट ऋषींस प्राधान्य मिळालें. आणि ते प्रवरांचे ऋषी होण्यास मदत झाली.

गोत्रमंडळामुळें प्राधान्य पावलेल्या ऋषींचें संप्रदायांच्या इतिहासांत स्थान येणेंप्रमाणें दर्शवितां येईल. गोत्रमंडळांत दृष्ट होणारे संप्रदाय व तैत्तिरीय शाखेंत वर्णिलेले संस्थास्थापक हे समकालीन होत.या दोहोंचा उपयोग पुढील सप्तसंस्थाकारांनीं केला. प्रवरांचे ऋषी आणि गोत्रमंडळांचे ऋषी यांत काहीं ऋषी एक दिसतात. प्रवराचा उल्लेख सत्रप्रकरणांत व सत्रांतील आप्री सर्वांच्या सारख्या असाव्यात या हेतूनें आला आहे. आप्री गोत्रांवरून आंखलेल्या आहेत. पण गोत्रें हजारों. त्यांचा थोडक्या आप्रींसाठीं उल्लेखिलेल्या गोत्रांशीं संबंध जोडण्यासाठीं काहीं तरी योजना हवी होती म्हणून सर्व गोत्रांचा विशिष्ट आप्रीशीं संबंध जोडण्याकरितां प्रवरांची यादी तयार होणें अवश्य होतें. ऋग्वेदांतील अनेक ऋषी काहीं विशिष्ट कुलांत घालण्याचा प्रयत्न झाला गोत्रांस प्रवरान्वयी बनवावें ही योजना भिक्षुकी स्वरूपाची आहे. म्हणजे भिक्षुकी कारणाकरतां काल्पनिक इतिहास तयार होण्याचा संभव येथें आहे म्हणजे बऱ्याचशा लोकांस गोत्रप्रवरसंबंधानें एका कुलांत दडपण्याची खटपट यांत दिसते. तथापि काहीं मूळची परंपरा असल्याशिवाय आणि ती सर्वमान्य असल्याशिवाय नवीनांस त्यांत दडपतां येणार नाहीं. यावरून असें असणें शक्य आहे कीं काहीं आर्षेययुक्त गोत्रें व त्यामुळें काहीं प्रवरसंबंध मूळचेच निश्चित झाले असावेत. प्रवर म्हणून जी आर्षेयपरंपरा प्रत्येक उपासक बाळगी ती श्रौतसंस्था प्रचारकांनीं व इतर समाजांतहि पसरविली असावी.

गोत्रांचा म्हणजे ऋषींच्या घराण्यांचा विकास मंत्रकालांत व ब्राह्मणकालांत झाला असेल पण तोपर्यंत त्यास काहीं संप्रदायवैशिष्ट्य नव्हतें. अमुक गोत्राचा अमुक वेद किंवा शाखा असें काहीं नव्हतें, व ही गोष्ट 'गोत्र आणि वेदाध्याय'

या परिच्छेदाखालीं ब्राह्मण्याच्या इतिहासांत दाखविली आहे. म्हणजे कुलाचा श्रौतसंस्थांशीं संबंध अगदीं आगंतुक व उत्तरकालीन आहे असें दिसून येईल.

पूर्वोक्त विवेचनाचा सारांश येणें प्रमाणेः —

(१) मांत्रसंस्कृतींत गोत्रें नव्हतीं, व सत्रेंहि नव्हतीं.

(२) सूतसंस्कृतींत गोत्रें होतीं व सत्रें होतीं.

(३) सूतसंस्कृति व मांत्रसंस्कृति यांच्या एकीकरणाचा काल म्हणजे ब्राह्मणरचनाकाल होय. या कालांत सत्रें श्रौतसंस्थांत शिरलीं; पण गोत्रप्रवर त्याच वेळीं शिरले नसावेत.

(४) सूतसंस्कृतींत गोत्रें कशीं उत्पन्न झालीं हें वैदिक साहित्याच्या साह्यानें सांगणें शक्य नाहीं. ज्या अर्थी तीं इतर इंडो यूरोपीय लोकांत होतीं, त्याअर्थी त्यांचा उगम वेदपूर्व हजारों वर्षांपूर्वींच्या काळांत लपला आहे. व एकंदर वन्य लोकांतील संस्थांचें अवलोकन करून गोत्रांतरविवाहाची मीमांसा तयार झाली आहे. ती प्राचीन इंडोयूरोपीय गोत्रांचेंहि स्पष्टीकरण करूं शकेल.

(५) सूतसंस्कृतींतलि गोत्रपद्धति पाहून तिला कांहीं तरी धार्मिक अर्थ उत्पन्न करण्याची क्रिया मांत्रांनीं केली. म्हणजे देवताग्रहण व पशुयागांग प्रयाजांत आप्रीसूक्तग्रहण हीं कांहीं अशीं गोत्रप्रवरावर अवलंबून ठेऊन त्यांस श्रौतसंस्थांत स्थान दिलें.

(६) देश्यांमध्यें गोत्रसंस्था होती पण गोत्रें अनेक होतीं. तीं गोत्रप्रवरपरंपरा तयार होऊन श्रौतसंस्थांशीं संबद्ध झालीं.

(७) प्रवर हे संप्रदाय होते. त्या संप्रदायांचा संबंध ऋग्वेदमंडळाशीं किंवा आकाशांतील सप्तर्षिकल्पनेशीं असल्यामुळें ते महत्त्व पावले; आणि मांत्रसंस्कृतींतील पुरोहितवर्ग त्यांशीं संबद्ध असावा किंवा संबंध जोडूं लागला असावा. त्यामुळें देश्य लोकांचीं कुलें त्या सात अगर नऊ प्रवरांत घालणें सोपें झालें.

(८) देश्य आणि मांत्र या दोघांसहि गोत्रें आहेत व प्रवर आहेत अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यानंतर देश्यांचा गोत्रांतर विवाहाचा नियम मांत्रांसहि चिकटला गेला असला पाहिजे.

[संदर्भग्रंथ.—ज्ञानकोश भाग ३ ब्राह्मण्याचा इतिहास].

गोथा—जर्मनी. सॅक्सेकोबर्ग आणि गोथा या प्रजासत्ताक राज्यांतील एक शहर. लोकसंख्या (१९१०) ३९५५३. हें लाइन कालव्यावर वसलेलें आहे. मध्यवर्ती फ्रायडेस्टीनचा किल्ला आहे. त्यांत २ लक्ष पुस्तकें असलेलें ड्यूकचें ग्रंथसंग्रहालय असून त्यांत कित्येक दुर्मिळ ग्रंथ व सुमारें ६९०० हस्तलेख आहेत. येथें एक मोठें पदार्थसंग्रहालय असून इजिप्शिअन, एट्रुस्कन, रोमन व जर्मन पुरातन वस्तूंचा संग्रह केला आहे. येथें कित्येक भव्य इमारती, मनोहर उद्यानें व शास्त्रीय संस्था असल्यामुळें शहर प्रेक्षणीय झालें आहे. गोथा हें शहर विमा उतरणाऱ्या मंडळींकरितां प्रसिद्ध असून येथें प्रेतांचें दहन करण्याची चाल प्रचलित आहे. हें शहर व्यापारामुळें भरभराटीस आलेलें आहे. येथील बशा फार प्रसिद्ध आहेत. ह्याशिवाय येथें तमाखू, साखर, यंत्रें, शस्त्रक्रियेचीं हत्यारें, वाद्यें, जोडे व खेळणीं ह्यांचे कारखाने आहेत. गोथा हें शार्लेमानच्या वेळीं एक खेडें होतें; परंतु इ. स. १२०० पासून तें शहर म्हणून प्रसिद्धीस येऊं लागलें. गोथा येथील ड्यूकांच्या वंशाचा मूळपुरुष जो ड्यूक अर्नेस्ट दि पायस याकडे हें शहर ड्यूक जॉन फ्रेडरिकच्या पुत्राच्या मरणानंतर आलें. परंतु हा वंश खुटल्यानंतर संस्थानासुद्धां हें शहर कोबर्ग संस्थानांत सामील करण्यांत आलें. (इ. स. १८२५) १९१८ त सॅक्सेकोबर्ग आणि गोथा प्रजासत्ताक राष्ट्रें झालीं.

गोंद—अरबी. गोंदाच्या एकंदर तीन जाती आहेत. (१) युरोपियन व्यापारांतील खरा अरबी गोंद. (२) दि ईस्ट इंडिया अरबी गोंद. (३) हिंदुस्थानांत होणारा अरबी गोंद ऊर्फ घाटी गोंद खरा अरबी गोंद. अकॅशियासेनेगाल नांवाच्या झाडापासून निघतो; याचे दोन किंवा तीन प्रकार आहेत.

(१) खरा अरबी सेनेगाल—याला नीग्रो लोक व्हेरेक असें म्हणतात. हा आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सेनेगाल नांवाच्या फ्रेंच वसाहतींतून येतो. (आ) कॉर्डोफन अथवा तुर्की गोंद. मध्यआफ्रिकेच्या पूर्व प्रदेशांत यास हशब म्हणतात. वरच्या नाईलच्या कांठच्या कॉर्डोफन प्रदेशांतून हा येतो. याचे गोल गोळे असतात किंवा तुकडेहि असतात. हा गोंद पांढऱ्या रंगाचा असून वरून त्यास भेगा पडलेल्या असतात. या गोंदाचा औषधाच्या कामीं उपयोग करतात. इंग्लंड, हिंदुस्थान किंवा अमेरिका येथील अरबी गोंदासारखाच हा गोंद आहे. (इ) हलक्या प्रतीचा गोंद. ह्याला स्वाकीम गोंद, सेन्नार, ब्ल्युनाईल, बार्बेरी अथवा मोरोक्को व मोगॅदाट गोंद वगैरे नांवें आहेत.

(२) ईस्ट इंडिया अरबी गोंद—एडन व तांबड्या समुद्रावरील बंदरें येथून हा गोंद मुंबईस येतो. हिंदुस्थानांत हा गोंद उत्पन्न होत नाहीं. यांत दोन जाती आहेत. मक्के गोंदाचे पांढरे, पिवळे किंवा तांबडे खडे असतात. हा गोंद सेनेगाल गोंदासारखाच असतो व त्यावर भेगा मात्र अधिक असतात. मकालिया बंदरांतुन हा गोंद पाठवितात हे दोन्ही जातीचे गोंद पाण्यांत विरघळतात. हा गोंद निवडून त्याचें वर्गीकरण करतात व मुंबईहून ईस्ट इंडिया अरबी गोंद या नांवानें परदेशीं पाठवितात. अलीकडे हे गोंद मुंबईहून न पाठवितां परस्पर बाहेर देशांत पाठविले जात असल्यामुळें ह्याचा व्यापार दिवसेंदिवस कमी कमी होत चालला आहे.

(३) घांटी गोंदः-मुंबईस जलमार्गानें न येतां आगगाडीनें घाटावरून येणाऱ्या गोंदास घांटी गोंद म्हणतात. घांटी गोंद या नांवानें आजकाल विकला जाणारा गोंद पुष्कळ प्रकारचा असतो, एवढेंच नव्हे तर त्यांत भेसळहि झालेली असते.

गोंद गोळा करण्याची रीतः—झाडावर गोंद दिसला कीं, मुलें व बायका तो गोळा करून दुकानदारास

विकतात. अशा रीतीनें निरनिराळ्या माणसांनीं निरनिराळ्या ठिकाणांहून आणलेला गोंद एकत्र केला जातो. व्यवस्थित रीतीनें गोंद गोळा करण्याची पद्धति कोठेंच अस्तित्वांत नाहीं; व एकाच जातीच्या गोंदाचा विपुल सांठा सतत पुरवितां येईल इतकीं झाडेंहि कोठेंच नाहींत. यामुळें एकाच जातीचा निर्मळ गोंद मिळणें फार मुष्कील झालें आहे. दक्षिणेस तुतिकोरिन येथें अलीकडे गोंदाचा व्यापार सुरू झाला आहे.

हिंदुस्थानांत गोंदाचा पुरवठा आफ्रिका, अरबस्थान वगैरे ठिकाणांहून जलमार्गानें होतो व त्याचप्रमाणें देशाच्या निरनिराळ्या भागांतून गोंद येतो. व येथून देशी व परदेशी गोंदाची निर्गत होते. हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या गोंदाची १९०६-०७ सालीं मुंबईहून ३५०४४ हंड्रेडवेट व सिंधमधून ५१ हंड्रवेट निर्गत झाली. मुंबईहून आयात मालापेक्षा पुनर्निर्गत अधिक असते.

गोंदाचे औद्योगिक उपयोगः—गोंद हा पाण्यांत वितळल्यानंतर सरसाप्रमाणें चिकट होतो. यामुळें पुष्कळ कामाकडे त्याचा उपयोग होतो. कापडाच्या गिरण्यांत कपडा व सूत यांस खळ लागते त्या खळीच्या मिश्रणांत गोंद घालतात. साखरेपासून तयार होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या मिठाईत गोंदाचें पाणी चिकटपणा येण्याकरितां घालतात. चित्रें छापण्याच्या कारखान्यांत, रंगारी कामाकडे, चितारयास लागणाऱ्या रंगाच्या मिश्रणांत, पत्र पाठविण्याचीं पाकिटें व इतर कागद चिकटविण्याकडे वगैरे नाना प्रकारच्या औद्योगिक कामाकडे गोंदाचा उपयोग करतात. बहुतेक जातींचे गोंद गंधहिन,स्वादहीन,व स्वच्छ बिनरंगाचे असतात. त्यांपैकीं पुष्कळ जाती पाण्यांत विरघळून त्यापासून चिकट द्रव उत्पन्न होतो. परंतु कांहीं जातींचे गोंद न विरघळतां लाह्यांप्रमाणें फुलतात. पातळ गोंद विघडूं नये म्हणून त्यांत कार्बालिक असिड वगैरे जंतुविनाशक पदार्थ सूक्ष्म प्रमाणांत घालून तें गोंदाचें पाणी गाळून त्याच्या बाटल्या भरून बाहेर देशांतून येथें येतात. व त्यांचा खप बराच होतो. गोंदाचे (डिंकाचे) लाडू फार पौष्टिक असतात.

गोंदणें—शरीराच्या कातड्यावर निरनिराळ्या प्रकारचीं चित्रें, आकृत्या, अक्षरें किंवा शब्द सुईसारख्या तीक्ष्ण टोंकाच्या हत्यारानें किंवा इतर साधनांनीं टोंचन घेणें व त्या आकृतीस कायमचें स्वरूप येण्याकरितां त्यांत तांबडा किंवा काळा रंग भरणें यास गोंदणें असें म्हणतात. ही चाल फार प्राचीन काळापासून जगांतील बहुतेक देशांत प्रचलित आहे. आफ्रिकेंतील किंवा आस्ट्रेलियांतील असंस्कृत लोकांत सर्व शरीरभर चित्रविचित्र आकृती गोंदून घेतात. व याप्रकारें ते आपलीं शरीरें भूपवितात. अगदीं जंगली जातीपासून तो आधुनिक सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या लोकांपर्यंत या चालीचा प्रसार आहे. हिंदुस्थानांत ब्राह्मणेतर जातींच्या स्त्रियांत;गोंदण्याचा प्रघात फार आहे. देवादिकांचीं नांवें, आपलें स्वतःचें, नवऱ्याचें किंवा प्रेमांतल्या माणसाचें नांव, तुळशीचें झाड वगैरे नाना प्रकारचीं चित्रें हातावर किंवा शरीराच्या निरनिराळ्या भागांवर स्त्रिया गोंदून घेतात.

यूरोपियन, यूरेशियन लोक, विशेषेकरून सोल्जर लोकांस गोंदून घेण्याची फार हौस वाटते. व त्यांस लढाईमध्यें जखमी अगर मेलेल्या माणसांचा नांव गांव वगैरे पत्ता लावण्यास या गोंदण्याचा उपयोगहि होतो. गोंदण्यांत जपानी लोक फार कुशल आहेत. ते कोणताहि नमुना दाखविला असतां त्याबरहुकूम चित्र अंगावर गोंदतात. ईजिप्त वगैरे प्राचीन देशांत सुद्धां स्त्रियांच्या शरीरांवर गोंदण्याचा प्रघात होता. शिक्षणप्रसारामुळें हिंदुस्थानांतील सुशिक्षित स्त्रियांमध्यें गोंदण्याची चाल बहुतेक बंद होत आली आहे.

गोंदण्याचीं हत्यारें प्रत्येक देशांत किंवा जातींत निराळीं असतात. सुया किंवा बाभळीचा मजबूत कांटा बहुतकरून उपयोगांत आणतात व गोंदल्यानंतर विशिष्ट झाडपाल्याचा रस वरून लावतात. किंवा काजळासारखे काळे रंग कातडींत भरतात. म्हणजे कायमचा हिरवा रंग येतो. अलीकडे विजेच्या साहाय्यानें फार जलद व कमी वेदना करून वाटेल त्या आकृतीप्रमाणें गोंदण्याची सोय झाली आहे.

गोदावरी जिल्हा—मद्रास इलाखा. उत्तरेकडील किनाऱ्याचा जिल्हा. क्षेत्रफळ २५४५ चौ. मै. गोदावरी नदी जिल्ह्याच्या थेट मध्यावरून वहाते. या जिल्ह्याला समुद्रकिनारा १७२ मैल आहे. पण कोकोनाड हेंच कायतें एक अगदीं थोड्याशा व्यापाराचें बंदर आहे. गोदावरी व साबरी यांच्याशिवाय नद्या वगैरे नाहींत. उंचवटयावर कांहीं ओढे आहेत त्यांचा शेतीकडे उपयोग होतो. हवामान सामान्यतः चांगलें असतें पण बहुधा सर्वत्र व विशेषतः एजन्सीपट्यांत ताप व मलेरिआ नेहमीं असतात. प्राचीनकाळीं हा जिल्हा कलिंग आणि वेंगी या दोन राज्यांत विभागला होता. ज्यांच्याविषयीं कांहीं माहिती मिळते असे राजे म्हणजे आंध्रवंशांतील होत. २६० ख्रि० पु० च्या सुमारास अशोकानें यांनां जिंकलें. होतें. पण पुन्हां ४०० वर्षेपर्यंत पुढें त्यांनीं आपलें राज्य कायम राखून विस्तृतहि केलें. त्यांच्या मागून क्रमानें पल्लव व चालुक्य आले. चालुक्य हे वैष्णव असून बाकीचे बौद्ध होते. कांहीं दिवस चालुक्य हे चोल साम्राज्याचे मांडलिक होते. इ० स० १२०० च्या सुमारस चौल सत्तेचा ऱ्हास झाला व वरंगळचें गणपतिघराणें सत्तारूढ झालें. १३२४च्या सुमारास कांहीं काल मुसुलमानी सत्ता होती. पण त्यांनां लौकरच हांकून देण्यांत आलें व राजमहेंद्रीच्या रड्डी घराण्याच्या ताब्यांत सर्व मुलूख गेला. १५ व्या शतकांत ओरिसाच्या गजपति घराण्याचा अम्मल येथें आला. १४७०मध्यें गुलबर्ग्याच्या सुलतानाला राजमहेंद्री व कोंडपल्ली हीं ठिकाणें त्यानें केलेल्या मदतीबद्दल देण्यांत आलीं आणि थोड्याच वर्षांत गजपतीचें राज्य त्यानें आपल्या सत्तेखालीं

आणलें. गुलबर्ग्याच्या राज्यांत अंदाधुंदी माजल्यामुळें गजपतींनीं पुन्हां आपली सत्ता मिळविली. १५१५ मध्यें विजयानगरच्या कृष्णदेवराजानें त्यांनां आपले मांडलिक केले. १५४३ मध्यें गोवळकोंड्याच्या सुलतानानें पुन्हां उचल खाल्ली व गोदावरीपलीकडे त्यांनीं आपली सत्ता पसरली व १६८७ मध्यें अवरंगझेबाच्या स्वारीपर्यंतहि त्यांची सत्ता कायम होती. बादशाही अमलाचा चांगला जम न बसून मोठाले जमीनदार स्वतंत्र होऊं लागले व अवरंगझेबानंतर बादशाहीला जो विस्कळितपणा आला त्यांत दक्षिणचा सुभेदार असफजाह यानें दक्षिणेंतील मुलखांत एकतंत्रीपणा व शांतता प्रस्थापित केली.

यापूर्वीच पुष्कळ दिवस या जिल्ह्यांत यूरोपियन लोक येऊन राहिले होते. पालकोल्लु येथें १६५२ मध्यें डच लोकांची वसाहत होती. जगन्नाथपुरम येथेंहि त्यांनीं आपलें ठाणें दिलें. मदपोल्लम्, वीरवासरम् व आणखी दोन ठिकाणीं इंग्रज लोकांनीं वसाहती केल्या. यानाम येथें फ्रेंच होते व तें ठिकाण अद्यापहि त्यांच्याकडे आहे. नरसपूर व उत्तर सरकार त्यांना दक्षिणच्या सुभेदाराकडून मिळालें (१७५३). १७५७ मध्यें कोंडोर येथें लढाई होऊन सरकारप्रांतात इंग्रजाचें वर्चस्व प्रस्थापित झालें. १७६५ मध्यें हा मुलुख इंग्रजांना देण्यात आला. तेव्हांपासून १८५९ पर्यंत या जिल्ह्याच्या व्यवस्थेंत पुष्कळ फेरफार करण्यात आले. १८३० मध्यें ज्या वखारीमुळें सरकारप्रांत मिळाला त्या वखारी नाहींशा करण्यात आल्या. त्यामुळें व महर्गतेमुळें जिल्ह्याला बरीच दैन्यावस्था प्राप्त झाली व नदीवर एक मोटा बंधारा बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. १८५० मध्यें तें काम पुरें झालें व जिल्ह्याच्या भरभराटीचें तें एक साधन झालें. १८७९–८१ मध्यें रंप बंड चालू होतें. व तें मोडण्याकरिता तुकडीची मदत घ्यावी लागली. गुंटुपल्ली येथें बौद्धकालीन अवशेष बरेच आहेत. आणि इतर ठिकाणीं बौद्धकालीन व हिंदु अवशेष सांपडतात. राजमहेंद्री येथील मशीदीवरील १३२४ तील लेखांत त्यावेळच्या मुसुलमानी सत्तेचा उल्लेख आहे. १९२१ मध्यें या जिल्ह्याची लोकसंख्या १४७०८६३ होती. राजमहेंद्री, पेद्दापुरम व कोकोनाड या तीन विभागांत ६ तालुके व २ जमीनदाऱ्या आहेत. १८९१ त ख्रिस्ती लोक ९०६४ होते ते १९०१मध्यें१६७९५ झाले. पैकीं १५८३६ हिंदी ख्रिस्ती आहेत. शेंकडा ९६ लोक तेलगू असून बहुतेक शेतीवर उदरनिर्वाह करतात. कोलार सरोवराच्या सभोंवतालच्या प्रदेशांत कापसालायक काळी जमीन आहे. बाकीची जमीन रेताड आहे. मुखप्रदेशामध्यें गोदावरीच्या पाण्याचा फार उपयोग केला जातो. नदीमधील गाळानें बनलेल्या लंका बेटांची जमीन अत्यंत सुपीक आहे. येथील तंबाखू फार प्रसिद्ध आहे. उंचवट्यावरच्या तालुक्यांत जमीन लाल दिसून येते.

जिल्ह्यामध्यें एकंदर जमीनीपैकीं ६५२१२१ एकर जमीनदारी व सर्वंध इनामी गांवांची असून ७११०२५ एकर रयतवारी गांवांतील लागवडींत असलेली आहे. जिल्ह्यांतील एकपंचमांश जमीनींत जंगल आहे. मुख्य पीक तांदुळाचें आहे. एजन्सीमध्यें चोल आणि रागी हीं पिकें मुख्य आहेत. तंबाखू सगळीकडे पिकते. कांहीं ठिकाणीं ऊंसहि पिकतो. बागाईत जमीनहि बरीच आहे. अमलापुर व नरसपूर येथें ३२००० एकर जमीनींत नारळ होतात. एकंदर जमीनीपैकीं शेंकडा ६२ जमीन पाण्याखालीं आहे. सरकारी कालव्यांनीं ९३८ चौ. मै. जमीन भिजते व बाकीची तळीं आणि इतर साधनांनीं भिजविली जाते. रथसगंपल्ली येथें कोळशाच्या खाणी आहेत. पेराकोंडा येथें ग्राफाइट सापडतो. एल्लोर येथें चांगले गालीचे तयार होतात. सर्वांत मोठा व महत्वाचा कारखाना म्हणजे सामलकोट येथील साखर शुद्ध करण्याचा व दारू गाळण्याचा होय. या कारखान्याच्या अस्तित्वानें लोकांनां ताडी घेण्याचें व्यसन लवकर जडविलें असून त्याकरतां ४ लक्षांच्यावर झाडें उपयोगांत आणलीं जातात. भाताचें टरफल कांढणें, एरंडाचें तेल काढणें, कातडीं कमाविणें, लोखंडाचें काम वगैरे उद्योगधंदे आहेत. निळीचे कारखाने व मीठ तयार करण्याचीं खाजगी व सरकारी ठिकाणें व चिरूटाचा कारखाना वगैरे ध्यानांत घेण्याजोगे धंदे आहेत.

निर्यात बहुतेक शेतकीच्याच उत्पन्नाची असते. तांदूळ व इतर धान्यें, तंबाखु, गळिताचीं, धान्यें, नारळ, फळफळावळ, तूप व कातडीं हे मुख्य जिन्नस बाहेर जातात. कापूस इंग्लंड व फ्रान्स आणि बेलजमकडे जातो. तांदूळ सिलोन, मॉरिशस येथें; गळिताचीं धान्यें फ्रान्स, इंग्लंड (युनायटेड किंगडम) व ब्रह्मदेशांत व तंबाखू ब्रह्मदेशांत याप्रमाणें माल रवाना होतो. राजमहेंद्री व अंबाजीपेट हीं व्यापाराचीं दोन मुख्य ठिकाणें आहेत. अद्यापहि दर १००० माणसांमागें ११ पौंड अफू खपते. पूर्व किनाऱ्यानें जाणारी मद्रास रेल्वेलाइन या जिल्ह्यातून राजमहेंद्री–सामलकोटवरून जाते. सामलकोटाहून कोकोनाडा येथें एक शाखा जाते. गोदावरीवर बांधलेला एकपूर्णांक एकद्वितियांश मैल लांबीचा पूल सुंदर व भक्कम आहे. या जिल्ह्यामधील तीन शहरीं म्युनिसिपालिटया आहेत. २५ लहान शहरीं युनियन पंचायती आहेत. जिल्हाबोर्ड, पोलिस, जेल, दवाखाने, देवीडॉक्टर वगैरे मामुल व्यवस्था आहे. शिक्षणाच्या बाबतींत आरंभीं हा जिल्हा बराच पुढें होता. दर दहा हजारीं ७५५ लोकांस लिहितांवाचतां येतें.

गोदावरी नदी—दक्षिण हिंदुस्थानांतील एक मोठी नदी. गोदावरीचा संस्कृत अर्थ पाणी किंवा गाई देणारी असा आहे पण दख्खनला बिभागणारी म्हणून 'गोदे' (मर्यादा) या तेलगू शब्दावरून हिला हें नांव पडलें असावें असें कांहीं भाषापंडित म्हणतात. ही गंगा, सिंधू यांच्या खालोखाल आहे. लांबी ९०० मैल असून उगम पश्चिम

घाटांत नाशिकजवळ त्र्यंबक येथें आहे. रामचंद्राचा वास हिच्या तीरीं बराच काळ झाल्यामुळें हिला पावित्र्य प्राप्त झालेलें आहे. सिंहस्थांत गोदेचें महात्म्य विशेष मानितात व त्यावेळीं नाशिक–त्र्यंबकास फार मोठी यात्रा जमते. हिला नांदेड येथें धरण बांधलें आहे व नेवासें येथें प्रवरा व मुळा हिला मिळतात. पैठणनंतर पुढें ही१७६ मैल हैद्राबाद संस्थानांतून जाते. हिला पूर्णा, मांजरा, मानेर, वर्धा, वैनगंगा वगैरे नद्या मिळतात. वैनगंगा वर्धेच्या द्वारें सातपुडा व नागपूरभागचें पाणी घेऊन गोदावरीला मिळते. पुढें प्राणहिता, इंद्रावती व तालमा नद्या मिळतात. १०० मैलपर्यंत गोदावरी नदी मध्यप्रांत व हैद्राबाद संस्थान यांची सरहद्द आहे. पुढें १५–१५ मैल लांबीचे दोन खडक पात्रांत आहेत ते फोडून काढण्याचा प्रयत्न फसला. नाहींतर वरपर्यंत बोटी येण्याची सोय झाली असती. पुढें मद्रास इलाखा व हैद्राबाद यांच्या हद्दीवरून वहाते.या भागांत हिला सबरी मिळते. नंतर मद्रास इलाख्याच्या कृष्णा गोदावरी जिल्ह्याच्या हद्दिवरून सपाट प्रदेशांतून संथपणानें वहाते व पुढें घाट फोडून बाहेर निघाल्यावर पुन्हां संथपणानें वहाते. या भागांत लंका नांवाचीं गाळानें बनलेलीं बेटें सुपीक व तंबाखूबद्दल प्रसिद्ध आहेत. राजमहेंद्री येथें १॥ मैलाचा रेल्वेचा पूल आहे. पावसाळ्यांत पूर येऊन बाजूचा भाग जलमय होण्याचा संभव असल्यानें धक्के बांधावे लागतात. राजमहेंद्रीच्या नंतर कांहीं मैलांवर गौतमी व वशिष्ठा असे हिचे दोन फांटे होतात. व या दुआबामध्यें नदीच्या गाळानें बनलेली अत्यंत सुपीक जमीन आहे. व या भागांत गोदावरीच्या पाण्याचा शेतीकडे उपयोग मोठ्या प्रमाणावर करतात. धवलेश्वराच्या देवळाजवळ धरण बांधून कालवे काढले आहेत (कालवे पहा). गोदावरी व तिचे कालवे यांतून बऱ्याच अंतरापर्यंत बोटी चालतात पण पुढें खडक आल्यामुळें त्या फार वरपर्यंत येत नाहींत. यानाम ही फ्रेंच वसाहत गोदावरीच्या कांठीं आहे. हिला वृद्धगंगा असें म्हणतात. ही गंगेसारखीच पवित्र मानतात व गंगा आणि गोदा एकच होत अशी समजूत आहे. नाशकास हिला गंगाच म्हणतात. दर १२ वर्षांनीं राजमहेंद्री येथें पुष्कर नांवाचा स्नानमहोत्सव होतो. त्र्यंबक, कोटिपल्ली, राजमहेंद्री व भद्राचलम् हीं गोदावरीचीं पवित्र क्षेत्रें आहेत.

कालवे.—गोदावरी नदीचा मुखप्रदेश म्हणून जो एक भाग आहे त्याला धवलेश्वरपासून सुरुवात होते व येथूनच गोदावरीचे दोन प्रवाह होऊन वरील प्रदेशाचे तीन विभाग होतात. पूर्वमुखप्रदेश, पश्चिममुखप्रदेश व मध्यमुखप्रदेश हा सर्व प्रदेश सुपीक, मळीच्या जमिनीचा व सपाट असून समुद्राकडे दर मैलीं एक फूट याप्रमाणें उतरता आहे. धवलेश्वर येथें नदीस धरण बांधलें आहे व या धरणांतून तीन स्वतंत्र कालवे वरील तीन भागांकरितां काढले आहेत. हे कालवे बरचे मोठे म्हणजे ४९३ मैल होडया व लहान बोटी चालण्याजोगे असून १९२९मैल लहान शाखा आहेत. मुखप्रदेशाच्या सर्व भागावर पाणी खेळवतां येण्याची सोय करण्यांत आली असून ६६२००० एकर जमीन या कालव्यांनीं भिजते. १९०३—४पर्यंत ऐन खर्च १३५ लाख झाला. व त्या सालीं ३३ लाख वसूल झाला. चालू खर्च वजा जातां शेकडा १७।१८ पर्यंत निव्वळ नफा रहातो. या कालव्याच्या कामाच्या खालोखाल गुन्नावरम् येथील नहर (आक्विडक्ट) आहे व त्यानें वैनतेय या गोदावरीच्या शाखेनें नगरम्पर्यंत पाणी जातें. १८४५—४७ या दोन वर्षांत या कालव्यांचें मुख्य काम झालें. धरणाची उंची १० फूट आहे. लांबी एकंदर २। मैलपर्यंत आहे व त्याचें ४ विभाग असून मध्यें तीन ठिकाणीं बेटें आहेत.

गोंदिया—मध्यप्रांत. भंडारा जिल्हा. टिरोरा तहशील. उत्तर अक्षांश २१° २८′ आणि पूर्व रेखांश ८०°१३′. नागपूरपासून ८१ मैलांवर हें बंगाल-नागपूर रेल्वेचें जंक्शन आहे. येथूनच जबलपूरला रेल्वेचा फांटा फुटतो. लोकसंख्या (१९११) ५८८७. धान्य व जंगलांतील सामान यांचा येथें बराच व्यापार चालतो. दर मंगळवारीं येथें बाजार भरत असून गांव भराभराटत आहे. येथें पोस्ट ऑफिस, पोलिस कचेरी, दवाखाना, हिंदी व मराठी शाळा आहेत. मालगुझार पोवार रजपूत आहे.

गोड्डा पोटविभाग—बिहार–ओरिसा. परगणा जिल्हा. क्षेत्रफळ ९१५ चौ. मै. याचे निसर्गतः दोन भाग पडतात. पश्चिम व दक्षिण भाग डोंगराळ आहे. व पूर्वभाग मऊ गाळाच्या सुपीक जमिनीचा आहे. लोकसंख्या (१९११) ३८७१६० खेडीं १७३०.गोड्डा हें मुख्य ठिकाण शहर नसून खेडेंच आहे.

गोंधळी—या जातीची विशेष वस्ती हैदराबाद संस्थान आणि वऱ्हाड–मध्यप्रांत या भागांतून आहे. मुंबई इलाख्यांत गुजराथखेरीज करून सर्व इलाख्याभर हे लोक पसरलेले आहेत. पण एकंदर लोकसंख्या हजाराच्या आंत आहे. यांचें मूळ वसतिस्थान माहूर व तुळजापूर हें असून आपण २००–३०० वर्षांपूर्वी दक्षिणेंत आलों असें हे सांगतात. हे अंबाबाई भवानीचे सेवेकरी असल्यामुळें खालच्या जातीच्या लोकांत यांनां चांगला मान मिळतो. मराठ्यांच्या सत्तेच्या आरंभीं गोंधळी लोक आपले पोवाडे गाऊन अशिक्षित लोकांमध्यें देशाभिमान जागृत ठेवीत असत. हे लोक "गोंधळ" करून व भवानीच्या नांवावर भिक्षा मागून आपलें पोट भरतात.मुंबई इलाख्यांत (१) मराठे, (२)कुंभार, (३) कडमराय, (४) रेणुकराय, (५) ब्राह्मण, (६) अकरमाशे अशा सहा पोटजाती यांमध्यें आहेत. संस्कार व रीतिरिवाज या बाबतींत मराठे कुणब्यांप्रमाणें वागतात. यांचा दर्जा मराठ्यांहून खालीं आहे. मध्यप्रांतांत यांच्या जाती पुढीलप्रमाणें आढळून येतातः—ब्राह्मण, मराठे, माने,

कुणबी, खैरेकुणबी, तेली, महार, मांग व विदुर तसेंच देशकर, गंगापारे व हिजडे लोकहि यांच्यांत मिळसतात. यांचीं गोत्रें, डोकेफोड, सुक मुके, जवल, पंचांगे इत्यादि होत. लग्नांत वराच्या गळ्यांत त्याच्या जातींतील ५ विवाहित लोक कवड्याची माळ घालतात; हाच गोंधळी होण्याचा विधि आहे. उच्च जातींच्या लग्नाकार्यांत किंवा नवमाचा गोंधळ करण्यास यांस बोलावतात. गोंधळास चार माणसें लागतात. कोणी लोक नवसांकरितांहि गोंधळी होतात. स्वतःची जात न सोडतां त्यांस ही दीक्षा घेतां येते. [सेन्सस रिपोर्ट, सन १९११ (मुंबई); रसेल व हिरालाल]

पूर्वी मराठेशाहींत सरकारी गोंधळी नेमिलेले असत. त्यांचीं कामें पुढील जाबत्यावरून कळतील.

गों ध ळी जा ब ता.—१ गोंधळी यांनीं दरमहा पौर्णिमेस प्रातःकाळीं अंघोळ करून, गंध लावून वस्त्रपात्र स्वच्छतेनें सरकार वाड्यांत येऊन तख्तापुढें गोंधळ रात्रीं नेमानें करून जात जावें. लिहिल्याप्रमाणें आपलें काम हुशारीनें करावें. यांत अंतर पडूं नये. पौर्णिमेस अगर जेव्हां हुकूम होईल त्या वेळेस जमत जावें. सदरहू लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त हुशारीनें सरकार चाकरी करून दाखवील, त्याजवर सरकारमेहेरबानी होईल. हें समजोन हुशारीनें वागावें.

सरकारांतून चालवयाचे जाबतेः—

१ दरमहा पौर्णिमेस व चंपाषष्ठीच्या गोंधळाबद्दल रुपया एक व खण पावतो. त्याप्रमाणें पावेल.

१ पोतास खादी व ओंवाळणीबद्दल रुपया एकपावतो म्हणोन कलम. त्यास शिरस्त्याप्रमाणें पावेल, व राजमुरा दोन ताफ्यांस पावतो त्याप्रमाणें पावेल.

१ दसऱ्याच्या पूजेस चौंडक्यास पागोटीं दोन व दिपवाळीबद्दल तेल व फराळाचें सालाबादाप्रमाणें पावत जाईल.

या जाबत्याप्रमाणें प्रतापसिंह छत्रपति सातारकर यांची व्यवस्था होती. [इतिहाससंग्रह पु. ६; अं. ११].

गोध्रा, ता लु का.—मुंबई. पंचमहाल जिल्ह्यांतील उत्तरेकडचा तालुका. क्षेत्रफळ ५८४ चौ. मैल. यांत एक शहर व २२२ खेडीं आहेत. लो.सं. (१९११) ११७४६६. सारा व कर मिळून वसूल (१९०३-४) ९२००० रु. येथें शेती फार हलक्या दर्जाची आहे व झुडपें आणि जंगल पुष्कळ आहे. हवा प्रकृतिस अपायकारक अशी आहे. पावसाचें मान सरासरी चाळीस इंच आहे. मही व पानम या दोन नद्या या तालुक्यांत आहेत व मका हें मुख्य पीक निघतें.

श ह र.—गोध्रा हें तालुक्याचें मुख्य ठिकाण. पंचमहाल जिल्ह्याचेंहि हेंच मुख्य ठिकाण आहे. गोध्रारतलाम रेल्वे येथून जाते. लो. सं. (१९११) २२१४४. मुसुलमानांच्या वेळीं अमदाबादचा सुभेदार येथें रहात असे. रेवाकांठा पोलिटिकल एजंट येथेंच असतो. गोध्रा शहरीं म्यु. कमेटी आहे. चामडें कमावण्याचे बरेच कारखाने आहेत. गोध्रा हें जळाऊ व इमारती लांकडाच्या व्यापाराचें मुख्य ठिकाण आहे. शहराजवळ एक मोठा तलाव आहे. गोध्रा येथें सरकारी कचेऱ्या, दवाखाने, हायस्कूल व मुलांमुलींच्या शाळा वगैरे आहेत.

गोप—हा शब्द मूळचा विशिष्ट लोकांचा वाचक असावा. नाग म्हणजे जसे डोंगरी लोक तसे गोप म्हणजे सपाट देशांतील लोक म्हणजे गुराखी. यांचा गुराखीपणा संस्कृतीच्या इतिहासांत डोंगरीपणाच्या नंतरचा आहे. गोप म्हणजे स्थायिक लोक नसून हिंडणारे होते हें " व्रज " (गोपांच्या वसाहती) म्हणजे चालतागांव यावरून दिसतें असें रा. राजाराम भागवत म्हणतात.

गोपांमध्यें वीरपूजा होती ती ब्राह्मणांनीं उचलली आणि कृष्ण हा क्षत्रिय व ब्राह्मणांच्या पाया पडणारा बनविला, आणि त्यास क्षत्रिय वसुदेवाचा परागंदा मुलगा बनविलें. कंस यादवाचा मोड करण्यासाठीं वसुदेव यादवानें गोपांची मैत्री केली एवढेंच मूळचें तथ्य असेल. कन्हा, कन्ह अगर कन्हर हें मूळचें नांव असून ब्राह्मणांनीं त्यास "कृष्ण" बनविलें असेल. गोपी नाचणाऱ्या व गाणाऱ्या असून कृष्ण इत्यादि गोप वाजविणारे असतील. गोप शब्दाचा अगर कृष्णाचा ज्या स्थलांशीं संबंध आहे अशीं स्थलें म्हटलीं म्हणजे (१) गोदावरी, (२) गोपपूर (गोवें), (३) गोमंतक, (४) गोवर्धन, (५) कृष्णानदी, (६) कान्हेरी, (७) कन्नड. प्राचीन काळीं गोप हें केवळ वर्गवाचक नसून राष्ट्रवाचक नांव असावें असें दिसतें. गोपराष्ट्र हरिवंशांत उल्लेखिलें आहे. महाभारतांतहि (भीष्मपर्व ९) गोपराष्ट्राचा उल्लेख आहेच.

गोपराष्ट्र हा शब्द शालिवाहनाच्या ६ व्या शतकाच्या पहिल्या पादांतील ताम्रपटांत येतो. या शब्दाचे संबंधी शब्द भारतीय भाषांत अनेक आहेत. भंडाऱ्यामध्यें गांवड हा एक पोटभेद आहे. गावडे नांवाची एक जात गोव्यांत व कोंकणांत आहे. गौडा हा पाटलाचा वाचक शब्द आहे. तोहि याशीं संबद्ध असावा. गुर्जर ही गोपांप्रमाणेंच गवळ्यांची जात असावी.

गोप या शब्दाचा संबंध परदेशांतील जातींशीं लावण्याचा प्रयत्न रा. भागवत यांनीं केला आहे. ते म्हणतात कीं, मिसरी लोकांचें अति प्राचीन नांव गोपथ होय. गोपथ शब्दाचा हल्लीं काप्ट असा अपभ्रंश होतो. ईजिप्त हेंहि नांव गोपथ शब्दाचेंच रूपांतर होय. त्याचा खरा उच्चार " ऐगुप्त " असा होय. ग्रीक गोमांस खात म्हणून त्यांच्या भांड्यास मिस्र शिवत देखील नसत. " काप्ट " पैगंबराचे शिष्य झाल्यामुळें गोघातक झाले. (वि. वि. पु. २३ पृ. ५१-५२.)

या भागवती चर्चेवर कांहीं अनुकूल व प्रतिकूल टीपा देतां येतील त्या येणें प्रमाणेः—

(१) काप्ट हे लोक मुसलमान नसून ख्रिस्ती आहेत. (२) काप्ट हा गोपथ याचा अपभ्रंश असो अगर नसो काप्ट हें आपणांस ईजिप्शियन समजतात. (३) ईजिप्त याचें ग्रीक

नांव ईजिटॉस किंवा ऐजिप्टॉस आहे. 'जी' चा उच्चार ग्रीक मध्यें ग असा आहे आणि ' वाय् ' चा उच्चार उ असा आहे. (४) " ऐगुप्त " या ईजिप्तच्या ग्रीक नांवाची व्युत्पत्ति लागत नाहीं. त्यामुळें भागवत यांची सूचना उपयुक्त आहे. (५) ईजिप्तला तद्देशीय लोक केमि म्हणजे कृष्णभूमि म्हणत आणि ईजिप्तमधील लोक आपणांस रोमि म्हणत असें ब्रिटानिका म्हणते.

परक्या देशासंबंधानें विवेचन सोडून केवळ हिंदुस्थानाकडेच लक्ष दिलें तर असें दिसेल कीं, देशांतील प्रत्येक भागांत गोपसदृश जात आहे. अहीर, गोलाल (बंगाल) गोवारी, गवळी, गोपाळ इत्यादि नांवाच्या जाती पुष्कळ आहेत. या जातींचा एकमेकांशीं कांहीं संबंध होता किंवा नव्हता हें या जातींतील पोटजाती, गोत्रें व देवकें पाहून ठरविलें पाहिजे. जातीचें राष्ट्र होणें व राष्ट्राची पुन्हां जात होणें या क्रिया या जातींत अनेकवेळ झाल्या असाव्यात. या जातीचें रक्त प्रत्येक ठिकाणीं अनेक स्थानिक जातींत मिसळलें असावें आणि स्थानिक जातीचें यांच्यात मिसळलें असावें. या जातींशीं सदृश जाती (गवळी, अहीर व आभीर) मागें दिल्या आहेत आणि आतां उरलेल्या कांहीं जातीकडे लक्ष देतों.

गो वा री.—यांची जात फक्त वऱ्हाड मध्यप्रांतांतच आहे. लोकसंख्या सुमारें दीड लाख आहे. जेथें हे लोक आहेत तेथें गवळी व अहीर लोक कमी आहेत. यांचें बहुमानाचें नांव धारे आहे. यांची जात गोंड व अहीर याच्या मिश्रणानें बनली असून त्यांना गोंड रक्ताचा भाग बराच आहे. गोवाऱ्यांचे ३ वर्ग आहेत. गायगोवारी, इंगा व मारिया गोवारी. गाय गोवारी हे फार उच्च आहेत. यांच्यांत गवळीरक्त जास्त असावें. इंगा व मारिया तर प्रत्यक्ष गोंडापासूनच जन्मले आहेत. याना गायगवाऱ्यांच्या हातचें अन्न चालतें व इंगांच्या हातचें गायगवारी व गोंडगवारी यास चालतें पण गोंडगवाऱ्यांच्या हातचें इंगास चालत नाहीं. यांचीं कुलनामें पशुपक्षी, झाडें व इतर पदार्थ या नांवांवरून पडलीं आहेत. कोडे कोडेवान हा यांचा देव आहे. त्याची पूजा लग्नांत व मोठया उत्सवांत करतात. जातीच्या सभेच्या अध्यक्षास शेव्या म्हणतात. याची निवड झाली कीं तो मरेपर्यंत बदलत नाहीं. त्याला गुन्हेगारास जातींत परत घेतांना प्रथम त्याच्या बरोबर जेवावें लागतें.

पुरुषांच्या कपाळावर एक उभी रेघ गोंदतात. याशिवाय तो गोवारी समजला जात नाहीं. बायका आपल्या उजव्या हाताच्या कोपराखालीं सुद्धां नागमोडी रेघा गोंदतात व त्यास सीतेचा हात म्हणतात. गोवाऱ्यांचा मुख्य धंदा गुरें चारण्याचा आहे. कांहीं शेतकीहि करतात. [रसेल व हिरालाल.]

गो पा ळ बो र क र—हे वऱ्हाडांत रहातात. यांचे पांच वर्ग आहेत. मराठी, वीर, पांगुळ, पहलवान (खाम) व गुजराथी गोपाळ. मराठी गोपाळांचा दर्जा उच्च असतो. पण वीरगोपाळ फार नीच समजले जातात. गांवाबाहेरं झोपड्या बांधून रहातात व त्यांचा मुख्य एक दोन वर्षांनंतर त्या झोपड्या काढून दुसरीकडे बांधण्यास सांगतो. बोरकर लोक चटया विणतात. पांगुळ झाडाखालीं धोतर आंथरतो व झाडावर बसून भीक मागतो. मृताशौचांतच हे क्षौर करतात. इतर दिवसात केश व दाढी लांब वाढवितात दावलमालिक हा यांचा देव आहे. हे प्रेतें झोळींत टाकून नेतात व मांडी घालून पुरतात. खाम गोपाळ हैद्राबादेकडील लोक आहेत. हे दोऱ्यांवर खेळ करतात. गुरें चोरण्यांत पटाइत आहेत. आतां हे शेतकी करतात.

गो ल्ला.—यांचा मूळचा धंदा गवळ्याचा आहे. आतां बहुतेक लोक शेती व मजुरी करतात. यांची वस्ती मुख्यतः मद्रास, म्हैसूर व हैदराबाद संस्थानांत आहे. लोकसंख्या सुमारें १५ लाख आहे. म्हैसूर संस्थानांत या जातींत उरुगोल्ला आणि कडूगोल्ला असे दोन भेद असून ते परस्परापासून भिन्न आहेत. उरुगोल्ला जातींत अनेक पोटभेद आहेत. त्यांपैकीं येरा अथवा किलाटी गोल्ला ही जात मुख्य आहे. यांच्यातील नांवें प्राणी, वनस्पती किंवा इतर वस्तूंवरून पडलेलीं आहेत. त्यांची मूळची भाषा तेलगू असावी. पण कानडी मुलुखांत रहाणारे लोक कानडी भाषाच वापरतात. जांवयास आपल्या सासऱ्याच्या मालमत्तेचा हिस्सा मिळूं शकतो व त्यास मुलगा नसल्यास जांवईच वारस समजला जातो.

यांच्यात विधवाविवाहास मोकळीक नाहीं. स्त्रीपुरुषांस घटस्फोट करतां येतो. ' बसावी ' ची वहिवाट नाहीं. हे वैष्णव असून कृष्णपूजक आहेत. कित्येक शिवपूजकहि आहेत. यासय ' म्हणून आपलें आयुष्य परमेश्वरास अर्पण करण्याची यांच्यांत विशेष वहिवाट आहे. कडुगोल्ला हे आपण मूळचे उत्तरेकडील आहों म्हणून सांगतात. त्यांच्यांत एकंदर तीन पोटभेद आहेत. स्त्रीनें अविवाहित मरतां कामा नये असा त्यांचा समज आहे. विधवांनां विवाह करण्याची मोकळीक नाहीं. प्रत्येक भागांत एक ' यजमान ' असून त्यास पुष्कळ अधिकार असतात. हे लोक विष्णुपूजक आहेत. जंजाया ही त्यांच्या जातीची मुख्य देवता मानली आहे.

मुंबई इलाख्यांत सुमारें ५००० गोल्ला आहेत. कळपवाले, फिरते गुराखी व वैदू लोकांची ही एक मिश्र राष्ट्रजात बनली आहे. बेळगांव जिल्ह्यांत यांनां गोपाळ हें नांव आहे. ते तेलगू बोलतात. तेलंगणांत दुष्काळ पडल्यामुळें हे लोक उत्तरेस आले असें म्हणतात. औषधें विकणाऱ्या गोल्ला लोकांमध्यें मराठा, वैदू इत्यादि जातींचा बराच भरणा आहे. यांमध्यें मोरे, पवार, शिंदे इत्यादि आडनांवें असून त्यांच्या चालीरीती व संस्कार मराठ्यांप्रमाणेंच आहेत. औषधें विकणाऱ्या गोल्ला लोकांच्या ६ पोटजाती असून एका

जातींतील लोक दुसऱ्या पोटजातींतील लोकांशीं विवाह-संबंध करीत नाहींत. गुराखी गोल्लांतहि सहा पोटजाती आहेत. ते लिंगायतांप्रमाणें आचारविधी करितात व मृतांनां पुरतात. वऱ्हाडमध्यप्रांतांत यांच्यांत उपजाती नाहींत. सिवनी जिल्ह्यांत हे आपलीं व गोंडांचीं कुलनांवें एकच आहेत असें सांगतात. व यामुळें त्यांचा वास्तविक संबंध नसतां कांहीं तरी संबंध असावा असें भासतें. हे कानडी भाषेची एक पोटभाषा बोलतात. तिचीं गोलारी, गोलिया व कोमडू अशीं नांवें आहेत. [रसेल व हिरालाल; थर्स्टन; सेन्सस रिपोर्ट १९११].

गोपथ ब्राह्मण—हें अथर्ववेदाचें एक ब्राह्मण आहे. अथर्ववेदाच्या अनेक शाखांपैकीं 'शंनोदेवी' या मंत्रानें आरंभ होणाऱ्या संहितेचें हें ब्राह्मण असावें. कारण ' शंनोदेवी ' या मंत्रानें अथर्ववेदाचा आरंभ होतो असा या ग्रंथात उल्लेख आहे (१. २९). या ब्राह्मणग्रंथाचे दोन भाग असून पहिल्या भागांत अध्याय पांच आहेत व दुसऱ्या भागांत सहा आहेत. पहिल्या भागांतील विषय श्रौतविषयास सोडून असून दुसऱ्या भागांत श्रौतविषयाचें विवेचन आहे. परंतु त्यांतील बराच भाग ऐतरेय, शतपथ व पंचविंश या ब्राह्मणग्रंथांतून घेतलेला आहे. ऐतरेय ब्राह्मणांतील तर संबंध खंडेंच यांत उद्धृत केलीं आहेत. ब्राह्मणग्रंथ हा संहितेंतील मंत्रांचा विनियोग दाखविणारा ग्रंथ असतो. परंतु गोपथ ब्राह्मणांत तसा प्रकार आढळून येत नाहीं. या ग्रंथांत ब्रह्मा या ऋत्विजाच्या कर्माचें विशेष विवेचन असून त्रैविद्यांनीं वगळलेल्या अथर्ववेदाचें महत्व जास्त वर्णिलें आहे. इतर ब्राह्मणग्रंथाप्रमाणें ब्रह्मा या ऋत्विजाचें कर्म तीन वेदांनीं करावें, हें मत या ग्रंथास मान्य असून या ग्रंथात ब्रह्मा ऋत्विजाचें कर्म अथर्ववेदानें करावें असें अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. आणि अथर्ववेदाव्यतिरिक्त कर्म असंस्कृत होय असें म्हटलें आहे. या ग्रंथांत अथर्ववेदाला ब्रह्मवेद असें पुष्कळ ठिकाणीं म्हटलें आहे या ग्रंथाचा काल बराच अलीकडील असावा असें यांतील पहिल्या भागांतील उल्लेखावरून दिसून येतें. अध्याय २ खंड २३ यांत गर्भाधानापासून उपनयनापर्यंतच्या संस्कारांचा उल्लेख आहे. तसेंच पाकयज्ञांचा उल्लेख अनेक स्थलीं आला आहे. पुत्र शब्दाची व्युत्पत्ति देतांना नरकाचा उल्लेख आलेला आहे. तसेंच अध्याय १ खंड २९ मध्यें व्यासाचा उल्लेख आहे. या ग्रंथाच्या उत्तर भागांतील दुसऱ्या अध्यायांत दशावतारांचा उल्लेख आहे. वरील अनेक पुराव्यांवरून हें ब्राह्मण वेदेतर वाङ्मयाच्या कालांतील असावें असें ठरतें. इतर संहितांना जशीं ब्राह्मणें आहेत तसें अथर्ववेदासहि एक ब्राह्मण असावें या दृष्टीनें बऱ्याच अर्वाचीन काळांत या ग्रंथाची रचना झाली असावी असें दिसतें.

गोपालगंज—बंगालच्या फरीदपूर जिल्ह्यांतला एक पोटविभाग. क्षेत्रफळ ५३८ चौ. मै. लोकसंख्या (१९११) ४३०२४९. यांत १०८० खेडीं असून मुख्य ठिकाण गोपालगांव आहे.

गोपालपूर—गंजम जिल्ह्याचें मुख्य बंदर. उ. अ. १९°१६' व पू. रे. ८४°५३'. किनाऱ्यानें जाणाऱ्या बोटी येथे लागतात. निर्गत माल मुख्यतः धान्य, कातडीं, ताग, काथ्याचे पदार्थ, गळिताचीं धान्यें वगैरे. मुख्य आयात साखर, कपडा, राकेल, दारू, धातुसामान वगैरे. १९०३–४ सालीं निर्गत व्यापार १४३२००० चा व आयात २५७००० चा झाला. ब्रह्मदेशांत ७४०० लोक गेले व तेथून ८४०० आले. येथें दोन दीपगृहें आहेत व हें बंदर बहुधा बारा महिने उघडें व चालू असतें. पण दिवसेंदिवस हें बंदर खराब होत आहे. व्यापारहि खालावत असल्यानें तें दुरुस्त ठेवण्याकरितां सरकारहि खर्च करूं इच्छित नाहीं.

गोपिकाबाई पेशवे—ही भिकाजी नाईक रास्ते यांची कन्या. हिचा जन्म १७२५ च्या सुमारास झाला. भिकाजी हा साताऱ्यास शाहूच्या वेळीं मोठा सावकार होता; त्याच्या सचोटीमुळें शाहूची त्याच्यावर मर्जी असे. एका दिवाळींत नाइकानें शाहूस मेजवानी केली, तेव्हां गोपिकेस पाहून महाराजांनीं तिच्या लग्नाचें स्वतःच ठरविलें व पुढें बाजीराव साताऱ्यास आला असतां त्यास आज्ञा करून नानासाहेबांशीं गोपिकेचें लग्न लाविलें. लग्न वाईस झालें (१० जानेवारी १७३०). लग्नास खर्च ३४३२५ रुपये झाला. स्वतः शाहूनें लग्नात प्रमुखपणें भाग घेतला होता. ही नेहमीं नानासाहेबा बरोबर स्वाऱ्याशिकाऱ्यांत हजर असे. ही फार कारस्थानी असे व राजकीय आणि दरबारी कामांतहि तिचा कारभार चाले. सवाईरावसाहेबांस तिनें केलेला उपदेश पाहिल्यास हिची योग्यता आढळून येईल. नानासाहेबांनीं १७३७ त काशी प्रयाग सोडविण्यासाठीं उत्तरेंत जी मोठी स्वारी केली, तींत गोपिकाबाई बरोबर होती; परंतु खानदेशांत आल्यावर तिला दोनतीन महिने गेलेले दिसतांच भाऊसाहेबांबरोबर तिला पुण्यास परत पाठविण्यांत आलें. ती पुढें जुलईत प्रसूत होऊन मुलगा झाला; तोच विश्वासराव होय. पुढें नानासाहेबास नाटकशाळेचा नाद लागला (१७५५) त्यामुळें गोपिकाबाई ही पेशव्यांवर रुष्ट असे. रामराजाच्या राज्यारोहणप्रसंगीं गोपिकाबाई मुलांसह (विश्वासराव व माधवराव) साताऱ्यास गेली असतां, ताराबाईनें तिला व मुलानां बहुमानाचा पोषाक दिला दिला (१७५०). सदाशिवरावभाऊची चढतीकळा बाईला पसंत न पडून तिनें नानासाहेबांचें मन भाऊबद्दल कलुषित केलें व भाऊला पानपतावर पाठविण्यासहि बाईच कारण झाली असे आरोप तिच्यावर केले जातात, पण त्याची नक्की शहानिशा अद्यापि होत नाहीं. मराठी दरबारांत निरनिराळे पक्ष झाले व मुत्सद्दी एकमेकांचा मत्सर करूं लागले. त्यांतहि नानासाहेबांच्या विरुद्ध रामचंद्र शेणवी, महादोबा पुरंदरे, गोविंदराव चिटणीस व प्रत्यक्ष भाऊसाहेब हे मधूनमधून जात म्हणून

कदाचित् गोपिकाबाईनेंच नानासाहेबांचें मन या सर्व मंडळी विरुद्ध विघडविलें असा प्रवाद त्या वेळीं पसरला असावा. रामराजाच्या दत्तकप्रकरणांत ताराबाईनें गोपिकाबाईचाहि सल्ला घेतला होता. उदगीरच्या लढाईच्या प्रारंभीं भाऊसाहेबांवर मुजफरखानानें मारेकरी घातले होते (निजामाच्या चिथावणीवरून हें कृत्य झालें असाहि तत्कालीन एक तर्क आहे). त्यास बाईची प्रेरणा होती असें डफ म्हणतो; पण त्यास आधार नाहीं. पानपतावर भाऊसाहेबांच्या मदतीस नानासाहेब निघाले असतां त्या स्वारींत बाई होती. श्रीमंतांनीं अब्दालीचा सूड घेण्याचा निश्चय करून पुढें चाल केली असतां दरबारी मंडळींनीं व बाईनें बोध करून त्यांनां परत फिरविलें (१७६१ मार्च). नानासाहेबांच्या अंतकाळीं बाई जवळच होती. नानासाहेबांनीं मृत्युपूर्वी सहा महिने नवीन लग्न केल्यानें बाईचा त्याच्याशीं खटका उडाला होता. नानासाहेबांच्या मृत्यनंतर थोडे दिवस बाईचें, राघोबादादाचें व दोघा कारभाऱ्यांचें एकचित्त झालें होतें. परंतु, पुढें बिघाड पडत जाऊन बाई नाशिकजवळ गंगापूर या गावीं जाऊन राहिली. थोरल्यामाधवरावाची बायको रमाबाई हिचें व गोपिकाबाईचें विशेष सख्य नव्हतें, त्यामुळेंहि ती कदाचित् गंगापुरीस गेली असावी. नारायणराव हे गादीवर बसले त्यावेळीं बाई पुण्यास आली होती. तिच्या मनांत सर्व कारभार आपण आटोपावा असें होतें परंतु तें जमलें नाहीं. पुढें हिचें व आनंदीबाईचें भांडण फार वाढलें, आणि त्याचा शेवट नारायणरावाच्या खुनांत झाला. बाईचा गंगापूरचा सालीना खर्च ३४ हजारांचा होता थोरले माधवराव मातृभक्त असल्यानें त्यांनीं महत्वाचा कारभार बाईस कळवूनच केलेला आहे. बाईला बाळबोधी लिहितां येत असे. तिच्या संमत्तीनें मोटमोठीं राजकारणें होत. राघोबादादावरहि हिचा वचक फार असे. तेहि तिला प्रथम प्रथम बहुतेक राजकारणें कळवीत असत. पण पुढें (नारायणरावाच्या वधानंतर) मात्र परस्परांचें पराकाष्ठेचें वांकडें आलें. या वेळीं पुण्यास सूर्यग्रहण लागलें असें ती म्हणत असे. सवाईरावसाहेबांवर हिचें फार प्रेम असे. त्या वेळचे मराठे मुत्सद्दी व सरदारहि तिला वचकून असत. नाना फडणिसावर तिचा लोभ असे. शेवटी गंगापूर येथेंच गोपिकाबाई वारली (३ आगष्ट १७८८). तिच्या उत्तरकार्यास (नक्त ७७९५० रु. व ५५७९ चें कापड मिळून) ८३५२९ रुपये खर्च झाला. क्रियाकर्म नाशीक येथें बाईचा बंधु गंगाधर मिकाजी यानें केलें व पुढें पुण्यास पेशव्यांनीं केलें. एकंदरीत गोपिकाबाई ही शहाणी, राजकारणी, महत्वाकांक्षी, मानी, इख्तदार व अधिकारी स्त्री होती. हिला विश्वासराव, माधवराव, यशवंतराव, नारायणराव, व आणखी एक असे पांच पुत्र झाले होते. [मराठी रियासत. भा. २. ३; का. इ. सं. पत्रें. ४५२; नानासाहेब रोजनिशी. ९. १३६; रामराजे चरित्र पृ. २९; राजवाडे खंड. १.२८९; ३.१५६; ६.१७०.]

गोपचेट्टिपालैयम—मद्रास. कोइमतूर जिल्हा. सत्यमंगलम् तालुक्याचें मुख्य ठिकाण एरोड (रेल्वे स्टे.) पासून २५ मैल आहे. लो. सं.(१९११) १०१६३. येथील जमीन पिकाला उत्तम असून लोक सुखवस्तु आहेत. सत्यंमंगलम्‌पेक्षां हें शहर मोठें आहे. येथें कुरुंदाचा दगड पुष्कळ सांपडतो.

गोपीचंद—कांचनपुरचा राजा जो त्रैलोक्यचंद्र त्याचा पुत्र. यानें आपल्या स्त्रीच्या सांगण्यावरून जालंदरनाथ नामक एका सिद्धपुरुषास खळींत लीद भरून तींत पुरून टाकलें होतें. पुढें गोपीचंदाच्या मैनावती नामक आईस हें वर्तमान कळतांच तिला फार दुःख झालें. कांहीं काळ लोटल्यानंतर जालंदराचा शिष्य कानिफनाथ हा फिरत फिरत आपल्या गुरूस जेथें पुरलें होतें त्या ठिकाणीं आला. तीन वेळां कानिफानें आपल्या गुरूस हांक मारिली तेव्हां जालंदरनाथ खळींतून सजीव व निर्मळ देहानें बाहेर पडला. पुढें मैनावतीच्या विनंतीवरून जालंदरनाथानें गोपीचंदास अभय देऊन कृतकर्माची क्षमा केली. गोपीचंदानें पुढें विरक्त होऊन योगदीक्षा घेतली व मैनावतीसह तो जालंदरनाथाच्या भजनीं लागला. गोपीचंदाची कथा फार गातांना आढळतात.

गोपीनाथ दीक्षित ओक—हे काशीचे रहिवाशी असून तेथें यांचे वंशज असतात. यांचें घर पुण्यासहि नेनेघाटावर होतें. याचे वडीलहि फार विद्वान होते. श्रौतांत त्यावेळीं त्यांची कीर्ति बरीच असल्यानें बहुतेक यज्ञकर्मांत त्यांना अध्वर्युवाचा मान मिळे. दीक्षित याज्ञकींत तरबेज असत. वडिलांच्या मागें लहानपणींच त्यांनीं एकदां एक आध्वर्यव यथासांग पार पाडल्यामुळें त्यांचें नांव प्रसिद्ध झालें. यांनीं संस्कार रत्नमाला नांवाचा ग्रंथ लिहिला आहे (शके १६८७). यांनीं रघूजी आंग्रे यांनां एक पत्र लिहिलेलें भा. इ. मं. च्या १८३५ च्या इतिवृत्तांत छापलें आहे. हे अग्निहोत्री असून गाणपत्य होते. हे मधून मधून दक्षिणेंत येत असत. [अर्वाचीन कोश; भा. इ. सं. अहवाल १८३५].

गोपीनाथपंत बोकील—यांस पंताजी गोपनाथ असेंहि म्हणत. हा शहाजीच्या पदरीं होता; जिजाबाईबरोबर सोंगट्या खेळण्याइतपत याचा शहाजीच्या घरीं घरोबा असे. याला पंताजीकाका असें त्यावेळीं म्हणत. हा हिवरें (जि. सातारा) गांवचा कुळकर्णी होता. अफजलखानाकडे याला शिवाजीनें आपला वकील म्हणून पाठविलें होतें. त्यानेंच अफजलचें मन शिवाजीची भेट दोन माणसांनिशीं घेण्यासाठीं वळवून त्याला प्रतापगडावरील माचीवर आणलें. अफजलच्या वधानंतर महाराजांनीं याला हिवरे गांव इनाम दिलें. तत्पूर्वी हा सुभेदारीवर होता. याचें आडनांव बोकील. याचाच वंशज प्रख्यात शहाणा सखारामबापू बोकील होय. [राजवाडे खं. ४; प्रस्तावना; खं. २०; अफजलखानाचा पोवाडा.].

गोमंतक—किंवा गोमांतक. ' गोवें ' पहा.

गोमती—संयुक्त प्रांतांतली एक नदी. हिचा बृहत्संहितेंत उल्लेख आहे (१६. १२). आरंभीं २० मैलपर्यंत हिचें पात्र फार उथळ आहे व ते उन्हाळ्यांत आटतें. पुढें ११२ लहान नद्या मिळाल्यावर ३५ व्या मैलापासून तिला नेहमीं पाणी असतें. शाहाजहानपूरखेरी रस्त्याच्या जवळ २५० फूट रुंदीचें पात्र झालें आहे. या पट्टयांतुन ती मंद गतीनें जाते. सीतापूरपर्यंत २१३ नद्या येऊन मिळाल्यानें तिचें पात्र रुंद व खोल आणि.प्रवाह जोराचा होतो. लखनौ येथें या नदीस४ पूल आहेत. जोनपूरला ही ६०० फूट रुंद होते. तेथें ६५७ फूट रुंदीचा पूल आहे. तेथून पुढें साई नदी मिळते तेथपर्यंत ही ३५० मैल वहात येते. नंतर बनारसमधून जाऊन एकंदर ५०० मैलांचा प्रवास करून ही नदी गंगेला गाझीपूर येथें मिळते.

गोमतीला वारंवार पूर येऊन नेहमीं नुकसान होण्याचा संभव असतो. लखनौ जोनपूर भागांत नदीला उतार फारच थोडा म्हणजे मैलामागें '५१० इंचाचा आहे. त्यामुळें पुराचें पाणी वाहून जात नाहीं १८७१ मधल्या पुरानें जोनपूर व आसपास मिळून १३,००० घरें वाहून गेलीं. महमदीपर्यंत बोटी जातात पण व्यापार फारसा नाहीं. धान्य, सर्पण, गवत हीं खालीं जातात व दगड वर आणतात. या नदीचें पाणी शेताकडे उपयोजिलें जात नाहीं.

गोमल घाट—हा गोमल नदीच्या खोऱ्यानें अफगाणिस्तान बलुचिस्तानच्या हद्दीवरून अफगाणिस्तानांत जातो. हा व्यापाराचा जुना व मुख्य मार्ग होय व अद्यापहि या रस्त्यानें दरसाल हजारों सशस्त्र व्यापाऱ्यांचे तांडेच्या तांडे उतरतात.

गोमाटी –गोमेटी झेनेरिया अंबेलाटा. ही एक जंगली भाजी आहे. तिचे वेल पावसाळ्यांत सह्याद्री पर्वताच्या जंगलांत उगवतात. त्यांस भाद्रपद आश्विन मासांत फळें येतात. तीं तोंडल्यायेवढीं पण दोडक्यासारखीं कवेंदार असतात. कव्यांची शीर गोल असते. रुची तोंडल्यासारखी अगर कांकडीसारखी असते. फळ पिकलें म्हणजे मधाप्रमाणें गोड लागतें. गोमाट्यांची भाजी बाजारांत येण्याइतकी पुष्कळ निघत नाहीं.

गोमेद (अगेट)—कित्येक वालुकामय पदार्थांनां हें नांव लावण्यांत येतें. पुष्कळवेळां ज्वालामुखींतून निघालेल्या रसाचे हे बनलेले असतात. म्हणून या दगडांत मध्यावर पोकळी असते. ब्राझिलमध्यें एकदां एक ३५ टन म्हणजे १४० खंडी वजनाचा गोमेद सांपडला होता.

सुपीरिअर सरोवर व ओंटेरिओ सरोवर यांच्या आसपास अमेरिकेच्या संयुक्तसंस्थानांत हा सांपडतो. हिंदुस्थानांत राजमहाल, दख्खन व राजपिंपळ्यामध्यें रतनपूर येथेंहि सांपडतो. खंबायत येथें याचा कारखाना पुष्कळ दिवसांपासून आहे. जबलपूर येथेंहि याचा कारखाना आहे. हा दक्षिण आफ्रिकेंत सांपडतो व इंग्लंडांत ब्रिस्टल जवळ व चेविअट डोंगरांत सांपडतो.

उ प यो ग.—हा कठिण असल्यामुळें रसायन शाळेंत लागणाऱ्या अति नाजुक तराजूमध्यें याचा उपयोग होतो. तसेंच रासायनिक शाळेंतील खलबत्ते याचेच असतात. शिवाय छत्र्यांच्या मुठी, कागद कापण्याच्या सुऱ्या वगैरे अनेक किरकोळ जिनसा याच्या करता येतात. याला रंग देता येतो. यास काळा रंग देणें असल्यास प्रथम साखरेच्या पाण्यांत याला बुडवून ठेवितात म्हणजे तो साखर शोषून घेतो. नंतर गंधकाम्लात त्यास घालतात म्हणजे साखर जळून काळी पडते व या दगडास रंग चढतो. तांबडा रंग देणें झाल्यास लोहप्राणिदा(फेरिक ऑक्साइड)चा उपयोग करतात. निळा किंवा हिरवा रंग देणें झाल्यास प्रथम कोणत्याहि लोहाच्या क्षारांत भिजवून मग पालाशलोहि कर्वनश्रिद किंवा पालाश लोहोकर्वनत्रिद याच्या पाण्यांत भिजवितात व पिंवळा रंग देण्याकरिता उद्हराम्लांत भिजवितात.

गोरखचिंच—या झाडास संस्कृतमध्यें गोरक्षी, मराठींत गोरखचिंच, गुजराथींत गोरख आमली इत्यादि नांवें आहेत. हीं झाडें मोठीं होतात. त्यांचीं पानें फांद्यांशीं सांवरीच्या पानासारखीं असतात. या झाडावर सुमारें वीतभर लांबीचीं दुध्या भोपळ्याप्रमाणें फळें येतात. या फळाची बाहेरील साल कठिण असते व फळांत गिराचे गोळे असतात. हा गीर फार आंबट असतो. ह्याचा चिंचेसारखा उपयोग करितात. हा पित्तशामक, रुचिकर व पथ्यकारक आहे. ह्या झाडास चोरचिंच असेंहि कित्येक प्रांतांत म्हणतात.

गोरखनाथ—कानफाटे-योगीपंथाचा हा संस्थापक गणला जातो(' कानफाटे ' पहा). ' गोरक्षनाथ ' या संस्कृत नांवाचें हिंदीरूप गोरखनाथ आहे. याचा काल निश्चित नाहीं; कारण यासंबंधीं प्रचारांत असणाऱ्या आख्यायिका एकमेकींशीं बऱ्याच विसंगत आहेत. नेपाळांत इ. स. ७ व्या शतकांत होऊन गेलेल्या नरेंद्रदेव राजाशीं याचा संबंध जोडण्यांत येतो. (सि. लेव्हीचें ' ले नेपाल ' १. ३४७); तर उत्तर हिंदुस्थानात त्याला १५ व्या शतकांतल्या कबीराचा समकालीन प्रतिस्पर्धी म्हणून लेखितात (विल्सन—रिलिजिअस सेक्ट्स ऑफ दि हिंदुज, १. २१३). आणि पश्चिम हिंदुस्थानांत १४ व्या शतकाच्या शेवटीं कच्छमध्यें कानफाटे पंथ सुरू करणारा जो धर्मनाथ त्याच्या गुरूचा मान गोरखनाथाला दिला जातो. गोरखनाथाचें अल्प चरित्र व त्याचा महाराष्ट्राशीं संबंध पुढीलप्रमाणें आहे:—

हा मच्छेंद्रनाचा शिष्य होय. हा जातीनें ब्राह्मण होता. गाईच्या शेणाच्या ढिगाऱ्यांत याचा जन्म झाल्यानें याला गोरक्ष नांव मिळालें असें म्हणतात. यानें मच्छेंद्रनाथास स्त्रीराज्यांतून परत आणल्याची कथा ऐकिवांत आहे. याचें नेहमीचें ठिकाण गोरखपुर जिल्ह्यांत गोरखपूर येथें होतें

असें म्हणतात. याचे संस्कृत व प्राकृत असे दोन्ही ग्रंथ आढळतात. व्रजभाषेंतहि याची काव्यरचना थोडीफार आहे. रसायनशास्त्रावर गोरक्ष किमयागर नांवाचा यानें एक ग्रंथ केला आहे व मराठींतहि एक छोटासा 'अमरनाथसंवाद' नांवाचा ग्रंथ असून, शिवाय हिंदी स्फुट कविता बरीच आहे. याचीं कांहीं वाक्यें गोरखमत या नांवाखालीं कांहीं चोपड्यांत प्रसिद्ध झालेलीं आहेत. (महा. सारस्वत) याचा शिष्य गैनिनाथ व गैनिनाथाचा निवृत्तीनाथ (ज्ञानेश्वराचा भाऊ) होय. ज्योतिषावरहि याचे कांहीं ग्रंथ असावेत; मुहूर्त वगैरेवर गोरखमत म्हणून एक स्वतंत्र मत आहे. हा नवनाथांपैकीं एक असून याचें चरित्र नवनाथभक्तिसारांत आलें आहे.

ज्या गुरखासंस्थाननें नेपाळ जिंकून आपल्या कक्षेंत आणिलें त्या गुरखासंस्थानची गोरखनाथ संरक्षक देवता म्हणून मानण्यांत येते. नेपाळची संरक्षक देवता पूर्वी मत्स्येंद्रनाथ असून पुढें या मत्स्येंद्रनाथाचें शिष्यत्व•गोरखनाथाच्या गळ्यांत घातलें असावें. तिबेटांत गोरखनाथाला एक बौद्ध मांत्रिक म्हणून समजण्यांत येतें. हिंदुस्थानांत आजहि पुष्कळ ठिकाणीं गोरखनाथ सर्व शक्तिमान परमेश्वर मानिला जातो. सत्ययुगांत तो पंजाबांत अवतरला; त्रेतायुगांत गोरखपुर येथें, द्वापार युगांत हुर्मुज (?) गांवीं, आणि कलियुगांत काठेवाडांतल्या गोरखमढींत तो राहिला असें त्याचे भक्त सांगतात. राजा भर्तृहरीला गोरक्षनाथानें संन्यासदीक्षा दिली अशी एक कथा आहे. कोठें कोठें या भर्तृहरीच्या जागीं गोपीचंदाला बसवितात. मराठी, हिंदी, बंगाली वगैरे वाङ्मय आधाराला घेऊन असें म्हणतां येईल कीं गोरखनाथ हा एक प्रमुख शैवधर्मप्रचारक असून उत्तर हिंदुस्थानांतील मध्ययुगीन भक्तिमार्गाच्या प्रगतीला अडवून धरण्याचें काम यानें केलें.

गोरखनाथासंबंधीं सुसंगत विवेचन व शोध अद्याप कोणी केलेले नाहींत. ही काल्पनिक व्यक्ति होती कीं नाहीं याविषयीं निश्चित सांगता येत नाहीं. महायानी बौद्धसंप्रदायाचें नेपाळांतील वर्चस्व झुगारून देण्याचें त्याचें महत्कार्य नेपाळच्या इतिहासकारांनां चांगलें दिसून येणार आहे. गोरखपंथाविषयीं विवेचन 'कानफाटे' या लेखांत केलेलेंच आहे.

गोरखपूर, जिल्हा—संयुक्तप्रांत. गोरखपूर विभागाचा पूर्वेकडचा जिल्हा.याचें क्षेत्रफळ ४५३५चौ. मै. आहे. मुलुख साधारणतः सपाटच आहे. नद्या, ओढे, तळीं व दलदली बऱ्याच आहेत. पश्चिम-दक्षिण भागांत नेहमीं पूर येण्याची भीति असते. गोग्रा ही मोठी नदी आहे. नारायणी (अथवा गंडकी) ही दुसरी नदी बाजूनें वहाते नहर, रामगड, नरहर, रामभार, भिवरीनाल वगैरे तलाव आहेत. या जिल्ह्यांत थोडाफार अल्युमिनम सांपडतो.

येथें उन्हाळा फारसा नसतो, पण हवा तरतरी आणणारी नसून शिथिलता आणणारी आहे. तराई व जंगलाचा भाग यांत नेहमीं मलेरिआ असतो. इतरत्र आरोग्य नांदतें. पावसाचें मान साधारण ४५इंच असून. उत्तरभागीं जास्त(५४) व दक्षिण भागीं कमी (४४) पडतो.

गोरखपूर जिल्ह्याचा जुना इतिहास म्हणजे केवळ असंबद्ध दंतकथावरून काढावयाचा आहे. गौतमबुद्धाची जन्मभूमी उत्तरसीमेजवळ आहे. पांचव्या शतकांत मगधच्या गुप्तांच्या राज्यांत दक्षिण भाग होता. दंतकथेवरून उत्तर भागीं भार लोक होते व त्यांनां रजपुतांनीं हुसकून लावलें असें दिसतें. चिनी ह्युएनत्संग सातव्या शतकांत तो भाग ओसाड होता असें म्हणतो. १२ व्या शतकांत हा भाग कनोजच्या राज्यांत होता तरी प्रत्यक्ष अंमल रजपुतांचाच होता. अकबराच्या वेळीं गोरखपूर सरकार अयोध्येच्या सुभ्यांत होता अकबरनंतर अवरंगझेब गादीवर येईपर्यंत हा भाग पुन्हां जवळ जवळ स्वतंत्रच होता. अयोध्येच्या नबाबानें येथील छोटेखानी रजपूत राजांपासून बरीच खंडणी वगैरे घेऊन आपला वचक बसविला होता. १८०१ मध्यें येथें इंग्रजी सत्ता आली.नेपाळी लोकांनीं आपली हद्द वाढवण्याचा प्रयत्न केल्यामुळें नेपाळचें युद्ध आलें. १८५७-५८ च्या दंगलींत थोडावेळ येथेंहि अस्वस्थता माजली होती.

बौद्धकालीन स्तूप, देवळें वगैरे बरींच आहेत. जुने ताम्रपट बरेच सापडले आहेत. संशोधन अद्याप चांगलें व पूर्ण झालेलें नाहीं. गोरखपूर जिल्ह्यांत १५ शहरें व ७५५० खेडीं आहेत. लोकसंख्या (१९२१) ३२६६८३०. येथून बरेच लोक परप्रांतीं व परदेशीं जातात. यांत सहा तालुके आहेत. हिंदू शेंकडा सुमारें ९० व मुसलमान सुमारें १०. शेंकडा ९४ लोकांची भाषा बिहारी आहे. शेंकडा बहात्तर लोक शेतीवर रहातात. संयुक्त प्रांतांत दिसणारी रेताड, चिकण वगैरे सर्व जातींची जमीन यांत आढळते. पूर्व व मध्य भागची जमीन अत्यंत सुपीक आहे वायव्येला तांदूळ व ईशान्य कोपऱ्यांत कोदन नावाचें धान्य होतें. जमाबंदीच्या वेळीं जमीनदारी, पट्टीदारी व भैयाचारा अशा तीन पद्धती होत्या. तांदूळ, गहूं, वाटाणे, चणे इत्यादि पीकें मुख्य आहेत. कापूस, ताग वगैरे पिकें काढण्याचा प्रयत्न केला पण यशस्वी झाला नाहीं. निळीचे मळे यूरोपियनांचे आहेत. शिक्षणाच्या बाबतींत हा जिल्हा मागसलेला आहे. शेंकडा २.८ (५.५ पुरुष २.१ स्त्रिया) लोक साक्षर आहेत.

तहशील:—गोरखपूर जिल्ह्यांतला तालुका. यांत तीन परगणे आहेत. क्षेत्रफळ ६५२ चौ. मै. लोकसंख्या (१९११) ५३३६१३. दोन शहरें व १०८९ खेडीं. काळीचें उत्पन्न ३१४ हजार व कर ६५ हजार. राप्ती, अमी, रोहिणी वगैरे नद्या आहेत. वहितींत ४८० चौ.मै. जमीन असून १९७ मैल जमीनीला पाणीपुरवठा होतो.

शहर.—संयुक्तप्रांत. गोरखपूर जिल्ह्याचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण. उ. अ. २६° ४५' व पू. रे. ८३° २२'. हें रेल्वे स्टेशन आहे. लोकसंख्या (१९११) ५६८९२. शहर १४०० मध्यें वसलें. अकबराच्या वेळीं हें एका सरकारचें मुख्य ठिकाण होतें.

गोरखपूर शहर हें दिसण्यांत मोठेसें सुंदर शहर नाहीं. वस्ती तुटक आहे म्हणजे बरींचशीं खेडीं जवळ जवळ असून मध्यंतरीं बगीचे व शेती पसरली आहे. जिल्हा व डिव्हिजन व बंगाल नॉर्थवेस्टर्न रेल्वेचीं मुख्य ऑफिसें येथें आहेत. एक मोठा बगीचा व टाऊनहॉल आहे. येथें हिंवाळ्यांत गुरख्याच्या सैनिक भरतीकरिता डेपो उघडतात. येथें उद्योग धंद, व्यापार वगैरे म्हणण्यासारखें कांहीं नाहीं. तरी येथील सुतार व कातारी प्रसिद्ध आहेत. एक कॉलेज, दोन हायस्कुलें, व एक औद्योगिक शाळा आहे. १८७३ पासून येथें स्थानिक स्वराज्याचे अधिकार मिळाले. येथें गोरखाची गादी आहे. येथें प्रथम गोरक्षनाथाचें एक भव्य देवालय होतें तें अल्लाउद्दीन बादशहानें मोडून त्यावर एक मशीद बांधिली. नंतर पुन्हा नाथसंप्रदायिकांनीं मशीद मोडून देऊळ बांधिलें. पुन्हां अवरंगजेबानें तें मोडून मशीद बांधली. तेव्हां संप्रदायिकांनीं दुसरीकडे देऊळ बांधलें. तें हल्लीं कायम असून गोरखपुराच्या पश्चिमेस कांहीं अंतरावर आहे. या देवळाच्या दक्षिणेस एक महादेवाचें व एक मारुतीचें अशीं दोन देवालयें आहेत.

गोरखमठी—मुंबई. काठेवाड. सरस्वती नदीच्या तीरावरील पाटणापासून सुमारें ९मैल पूर्वेस असलेलें ठिकाण. कानफाटया जोग्याचें हें मुख्य स्थान आहे. दरींत गोरखनाथ व मच्छेंद्रनाथ यांच्या मूर्ती आहेत.

गोरक्षण—या चळवळीचा इतिहास दोन तऱ्हांनीं दिला पाहिजे. एक तर गोरक्षण ही धार्मिक चळवळ म्हणून इतिहास द्यावयाचा व ती आर्थिक चळवळ म्हणून द्यावयाचा. धार्मिक चळवळीस प्रारंभ फारच प्राचीनकाळीं झाला असावा. गाईसंबंधानें पूज्य बुद्धि व तिचें देवत्व हीं स्थापित कशीं झालीं यासंबंधानें प्रो. राजारामशास्त्री भागवत असें स्पष्टीकरण करतात कीं भागवत या ग्रंथाचाच हेतु गोरक्षण धर्म गोघातकी ब्राह्मण समाजावर लादावयाचा होता. कांहीं जरी असलें तरी हें खास कीं सूत्रकालीं गोहननजुगुप्सा समाजांत वाढत चालली होती (वेदविद्या पृ. २२० पहा). गाईच्या पूज्यतेविषयींची वृत्ति हिंदु संस्कृतीचा मुसुलमानांनीं पाडाव करीपर्यंत होती आणि जेव्हां शिवाजीसारखे हिंदूंचे पुरस्कर्ते पुढें झाले त्यावेळेस ते गोब्राह्मणप्रतिपालक हें नांव धारण करीत असत. हिंदु राजे सामान्यतः गोवधास मनाई करीत असत व मुसुलमान राजे परवानगी देत. ब्रिटिश राज्यामध्यें गोरक्षणाची चळवळ गेल्या पन्नास वर्षांत बरीच दिसून येते. परंतु ती कोणत्याहि तऱ्हेनें व्यवस्थेशीर चालू नसल्यानें कधींकधीं गोरक्षणफंड, फंडगुंडास किंवा कसायास श्रीमंत करण्यास योजिले जातात किंवा पांगळ्या गाई पोसण्यास उपयोगी पडतात. या चळवळीकडे सर्व हिंदुस्थानचें थोडेंबहुत लक्ष लागलें आहे हें खरें. १९२४ डिसेंबरच्या काँग्रेसआठवड्यांत बेळगांवास भारतीय गोरक्षण परिषद्हि भरली होती.

गोरक्षण ही धार्मिक चळवळ या नात्यानें चालणें राजकीय परिस्थितीच्या विरुद्धतेमुळें शक्य नाहीं. आर्थिक चळवळ म्हणून चालविली तर ती देशांतील पशुसंपत्ति सुधारणें व वाढविणें हें ध्येय असलेली चळवळ म्हणून चालविणें आणि महत्वाची करणें शक्य आहे. व निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं हिला सहानुभूति दाखविली आहे. तथापि पद्धतशीरणानें ही संपत्ति वाढविण्याकडे सर्वच प्रांतिक सरकारांनीं जवळ जवळ सारखेंच औदासिन्य दाखविलें आहे.

गोराकुंभार.—हा भगवद्भक्त सर्व संतमंडळांत पोक्त असल्यामुळें यास गोरोबा काका किंवा नुसतें काका म्हणत. हा जसा भगवद्भक्त तसाच स्पष्टवक्ताहि होता. हा बालेघाटांवर तेरढोकी म्हणून गांव आहे, तेथील रहाणारा. हा रात्रंदिवस विठोबाचें भजन करण्यांत निमग्न असे. त्यानें बरेच अभंग केलेले आहेत. नामदेवाच्या डोक्यावर मडकीं घडण्याचें थापटणें मारून गोऱ्या कुंभारानें त्यास गुरूस शरण जाण्यास लाविलें अशी कथा आहे. उद्धवचिद्घन यानें याचें ओवीबद्ध चरित्र मराठींत लिहिलें आहे. त्याचें देहावसान हा पन्नास वर्षांचा असतां पंढरपूर मुक्कामीं झालें. याचा जन्म शके ११८९ मधील होता. तेरढोकी येथें त्याला इनाम होतें. नामदेवाच्या ठिकाणीं याचें प्रेम फार होतें. [मराठी रियासत पूर्वार्ध]

गोराडू.—यास नांवें गुजराथी–रताळू, मराठी–कोनफळ किंवा गोराडू, कानडी हेग्गेणसू. लॅटिन–डायोस्कोरा बल्बिफोरा अशीं आहेत. गोराडू हा कंद असून तो जमिनींत तयार होतो. वर चौधारी किंवा सहाधारी वेल येत असून त्याला करद्यासारखीं पानें येतात. कित्येक वेळा पानांवर व देंठांवर रंगीबेरंगी झांक असते. कंदाची विशेष लागवड गुजराथेंत, हळद व आल्याच्या पिकांत करतात. व ती दक्षिणगुजराथेंत जास्त प्रमाणांत आढळते. कंदाचे लहान तुकडे करून तीन फूट अंतरानें वाफ्याच्या कडेनें लावितात. लागण मे महिन्यांत होत असून कंद नोव्हेंबर डिसेंबरांत काढण्यास तयार होतात. कोंकणांत वेलाटींत कोठें कोठें हे कंद करितात. यांच्या बऱ्याच जाती आहेत;

गोराडूच्या मुख्य जाती.—(१) लांब अळू. याच्या प्रत्येक वेलाला २।३ लांब मुळ्या येतात. मुळांतील मगज पांढऱ्या रंगाचा असतो. (२) छपरी अळू. याच्या मुळ्या आकारानें वाटोळ्या असतात व आंतील मगज पांढरा असतो (३) लाल अळू (तलबदा रताळू). याच्या मुळ्या दोन्ही टोकांनां बारीक असून मध्यें जाड्या असतात. आंतील मगजाचा रंग जांभळा पांढरा असतो. दर एकरीं सरासरी उत्पन्न ६००० ते ८००० पौंडपर्यंत येतें व कित्येक

वेळां एकएका कंदाचें वजन १० ते २० पौंडपर्यंत भरतें. कंद भाजून किंवा उकडून उपासाला खातात व गुजराथेंत यांची भाजी करितात. पूर्वीच्या पावसाळयांत तयार झालेले कंदाचे लहान लहान तुकडे करून निवाऱ्याच्या जागीं वैशाख महिन्यांत पसरून ठेवावे व त्यांवर माती टाकून ती ओली होईल इतकें तीवर पाणी शिंपडावें.थोड्याच दिवसांनी पावसाळयाच्या प्रारंभास त्या तुकड्यांस धुमारे फुटतात. कोनफळाचे कंद अवसर मिळाल्यास १–१॥ हातहि वाढतात व त्यांस आजूबाजूस फरगडे फुटतात म्हणून हे कंद लावण्याची जागा खोल व भुसभुशीत पाहिजे. खत दिल्यास कंद चांगले पोसतात. हे कंद २।३ वर्षे सुद्धां जमिनींत ठेवितात. थंडीच्या दिवसांत वेल मरून जातात; पण जमिनींत असलेल्या कंदास पावसाळयांत पुन्हां धुमारे फुटून वेलाची व कंदाची वाढ पुन्हां सुरू होते. एका पावसाळयाची वाढ कमी असते. दर वेलास २ ते ५ शेर वजनाचे कंद तयार होतात. दोन वर्षांच्या वेलास दहा ते वीस शेरपर्यंत वजनाचे कंद काढले आहेत. कांद्याचा कोंवळा भाग कापून खाण्यास उपयोग करावा. जून भाग पुढील सालच्या बेण्याकरितां निवाऱ्याच्या जागीं राखेंत पुरून ठेवावा. कोनफळ उपासास खातात. बारीक तुकडे करून त्याची भाजी करितात. याचें किसून थालिपीठ करण्याकरितां दुसऱ्या पिठांत मिळवण घालतात. याचा फुपाट्यांत भाजून त्यांत साखर अथवा गूळ घालून गोड पदार्थहि करितात.

गोराण—या झाडास लॅटिनमध्यें सेरिओप्स कँडोल्लिआना व रॉक्सबरधिआना; इंग्रजींत मँग्रिव्ह; देशी भाषेंत गोराण किंवा गराण, किरारि, किरि, चंबरि अशीं निरनिराळीं नांवें आहेत. सेरिऑप्स कॅन्डोलिआना व रॅाक्सबुरघियाना या दोघांनाहि गोराण, गरण, किंवा चवरी असें म्हणतात. यांपैकीं पहिलें नेहमी हिरवें असणारें झाड असून दलदलीच्या किनाऱ्यावर व खाडीच्या किनाऱ्यावर आढळतें. विशेषतः सिंधमध्यें हीं झाडें पुष्कळ आहेत. दुसऱ्या प्रकारचें झाड सुंदरवन आणि चितागाँग किनाऱ्यापासून तों थेट खालीं तेनासरीमपर्यंत होतें. दोघांच्याहि वाढीला परिस्थिति सारखीच लागते. ह्या दोन्हीहि झाडांच्या सालीचा कातडीं कमाविण्याकडे चांगला उपयोग होतो. निरनिराळया सालींच्या नमुन्यांतून टॅनिन् अम्ल (कातडीं कमाविण्याचें द्रव्य) शेंकडा सुमारें १३ पासून ३१ पर्यंत निघतें. या झाडापासून होणाऱ्या अर्काचा कपड्यांना तपकिरी लाल रंग देण्याला चांगला उपयोग होतो. हा अर्क नीळींत मिसळल्यास त्यापासून उत्तम काळा अथवा जांभळा रंग तयार होतो. या झाडाच्या सर्व भागांचा स्तंभकासारखा उपयोग होतो. सालीचा काढा रक्तस्रावावर देतात. आफ्रिकेंत कोंवळ्या अंकुरांचा उपयोग क्विनाइनच्यां ऐवजीं करितात. याचें लांकूड कणखर असून त्यापासून उत्तम कोळसा तयार होतो.

व्यापारः—कलकत्त्यास सुमारें १० पासून बारा हजार मण साल दर वर्षी विकली जाते. वाळलेल्या सालीचा खप फार मोठया प्रमाणावर होतो.

गोरी बिदनूर—म्हैसूरच्या कोलार जिल्ह्यांतला तालुका. क्षेत्रफळ ३४३ चौ. मै. लो. संख्या (१९११) ९०५१६. गोरिबिदनूर हें एकच शहर व २१७ खेडीं आहेत. १९०३–४ सालीं साऱ्याचें उत्पन्न १६०,०००. पेन्नार नदी यातून वहाते. जमीन फार सखल आहे. शहराभोंवतीं बरीच सुपीक जमीन आहे. इकडील विहिरी फार खोल नसतात तरी आंत नाहींत ऊंस, तांदुळ, हळद, भुइमुग, नारळ वगैरेंची पुष्कळ लागवड होते. या जिल्ह्यांत टेंकड्यांतून लोखंडहि विपुल आहे.

गोरी—हें आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक बेट. सेनिगॉलच्या फ्रेंच वसाहतीचा एक भाग आहे. केपव्हर्ड द्वीपकल्पानें बनविलेल्या नैसर्गिक बंदराच्या मुखाशीं हें बेट आहे. हें बेट९०० यार्ड लांब,३३० यार्ड रुंद व मुख्य भूविभागापासून ३ मैल अंतरावर असून बहुतेक रुक्ष खडक आहे. याचा बराच भाग एका शहरानें व्यापलेला आहे. हें शहर पूर्वी भरभराटीचें व्यापारी ठिकाण व मजबूत लष्करी ठाणें होतें. १९०६ सालापर्यंत हें स्वतंत्र बंदर होतें. जवळच डकर शहराची भरभराट झाल्यामुळें येथील व्यापार मंदावला. १९०५ मध्यें येथील जोलोफ लोकांची संख्या १५०० होती. येथील निरोगी हवेमुळें याचा रुग्णालयासारखा उपयोग होतो. येथील रस्ते अरुंद आहेत व घरें काळसर तांबड्या दगडांचीं बांधलेलीं असून त्यांचीं छपरें सपाट असतात. सेंटमायकलचा किल्ला, गव्हर्नरचें गृह, इस्पितळ व लष्करी चाळी या इमारती याच्या पूर्वमहत्वाची साक्ष पटवितात. किल्ल्यांत एक विहीर आहे. हिचें पाणी व पावसाचें सांठविलेलें पाणी हाच येथील पाणीपुरवठा होय. सातव्या शतकाच्या आरंभीं डच लोकांनीं या बेटाचा ताबा घेतला व त्यांनींच याला हें नांव दिलें. याचें एतद्देशीय नांव बिर बीर म्हणजे पोट. याचा आकार पोटासारखा आहे. १६६३ मध्यें हें इंग्लिशांनीं घेतलें होतें. परंतु डि रूटरनें पुढल्या वर्षी परत घेतलें. १६७७ मध्यें फ्रेंच लोकांनीं डच लोकांनां कायमचें हांकून लावलें. लागलीच गोरी इंग्लिशांच्या हातीं पडलें. परंतु फ्रेंचांनीं याचा १८१७ मध्यें ताबा घेतला.

गोर्डियम—गोर्डियम हें फ्रिजियातील प्राचीन शहर सँजेरियस नदीजवळ असून पेसिनसपासून अँसिराला जाणाऱ्या इराणी 'राजमार्गावर' हें शहर होतें. गोर्डियस नांवाच्या एका फ्रिजियन शेतकऱ्यानें हें शहर स्थापिलें. चार चाकांच्या गाड्यांत बसून देवळापर्यंत जो पुरुष पहिल्यानें येईल त्याला राजा निवडावें अशी देववाणी झाली व त्याप्रमाणें गोर्डियस राजा झाला. त्याच प्रमाणें येथील गोर्डियम गांठ जो सोडील त्यास आशीयाचें साम्राज्यपद मिळेल अशी देववाणी असल्यामुळें शिकंदर बादशहानें तरवारीनें

ती गांठ कापली. इ. स. पूर्वी १८९ त हें शहर गॉल लोकांनीं काबीज केलें व याचा नाश केला.

गोलपाडा जिल्हा.—आसाममधील एक जिल्हा. ब्रह्मपुत्रेच्या दोन्ही बाजूंस पसरला आहे. ब्रह्मपुत्रेच्या आसाम-बंगालच्या वळणाच्या बाजूचा(२३१९ चौ. मैलाचा) प्रदेश.हा कायमधाऱ्याच्या पद्धतीखालीं आहे.पूर्वद्वाराचा प्रदेश भूतानच्या डोंगराच्या पायथ्याशीं आहे (क्षे.१५७० चौ.मै.). जिल्ह्याचें एकंदर क्षेत्रफळ ३९६१ चौ. मै. भूतान पर्वतातून उतरणाऱ्या नद्यांतून बहुधा वर्षभर होड्या चालतात. खालून गारो पर्वतातून दोन नद्या येतात. ह्या प्रदेशातील बहुतेक जमीन वालुकायुक्त मातीची बनलेली असून आसामपेक्षा येथील थंडी (हिंवाळा) कमी व उन्हाळा जास्त कडक असतो. उष्णतामान साधारणतः ८३° च्या वर जात नाहीं. पूर्वद्वार व तराई हीं मलेरियादूषित आहेत. इतरत्र पावसाचें मान ८०।९० इंच आहे. पण पूर्वद्वारात ६०।७० पडतें. ह्या बाजूच्या सर्व प्रदेशाप्रमाणेंच ह्या भागात बरेच वेळा भूकंप होतात. त्याचप्रमाणें पुरापासूनहि या भागाला भय असतें.साधारणतः घरें बांबूंच्या कुडाचीं करतात. या प्रदेशाचा पूर्वेतिहास ज्ञात नाहीं.१६ व्या शतकात कोच जातीचा विश्वसिंह याचें व नंतर त्याच्या वंशजाचें राज्य होत. त्यापुढें मोंगलाची सत्ता येथें प्रस्थापित झाली. १७६५ मध्यें बंगालच्या दिवाण-गिरीबरोबर हा इंग्रजाकडे आला. पूर्वद्वार तर १८६५ पर्यंत भूतिया लोकाकडे होतें.त्या सालीं तो भाग इंग्रजाकडे आला. उत्तर व दक्षिण टेकड्यातल्या रानटी जाती नेहमीं त्रास देत व हल्ले करीत. १८६६ मध्यें त्यांचा बराच बंदोबस्त करण्यात आला.१८७४ मध्यें ह्याला व्यवस्थित स्वरूप देऊन आसामला जोडला. १९२१ मध्यें लो. सं. ७६२५२३ होती. शेंकडा ६९ बंगाली भाषा बोलतात. बोडो भाषा व बोडो लोक यांचा भरणा बराच आहे. या जिल्ह्याचे धुब्री व गोलपाडा असे दोन भाग पाडले आहेत. शहरें २ व खेडीं २१३५ आहेत. शेती हाच मुख्य धंदा असून शेंकडा ८४ लोक शेतीवर रहातात. जमीन साधारण प्रतीचीच आहे. पूर्व-द्वारात टेकड्यांमधून वहाणाऱ्या प्रवाहावर भातशेती करतात व पीक उत्तम येतें. येथें पुराचें भय नाहीं.पण दुसऱ्या (पश्चिम धान्याच्या) भागांत पुराचें भय असून पिकाचीहि खात्री नसते. इकडील जंगल फार दाट व महत्त्वाचें आणि पैदाशीचें आहे. कनिष्ठ प्रतीचा कोळसा गारो टेकड्यांत आढळतो. उद्योगधंदेहि महत्वाचे व मोठाले नाहींत. पितळेचीं भांडीं, मातीचीं भांडीं व टोपल्या वगैरे होतात. रेशमी सुती कपडा स्थानिक खपापुरताहि होत नाहीं. परदेशी मालाच्या व्यापारालाहि चांगली जागा आहे. सर्व व्यापार कलकत्यापासून चालतो. आयात माल कापड, मीठ, बरण्या, तेल, तंबाखू,डाळी, चटया वगैरे. निर्यात माल मोहरी, ताग, लांकूड, धान्य, पानें वगैरे. बिलासीपारा येथें इमारती लांकडाचा व्यापार चालतो. भूतानमधून तट्टें व रबर येतो. रेल्वे अद्याप चांगली वाढली नाहीं. व्यापार बोटींनीं होतो. ब्रह्मपुत्रेतून बोटी चालतात व लहान नद्यांतून होड्या येतात. रेल्वे होत आहे (१९०८). ४६४ मैल कच्ची सडक आहे. नद्यांवर पूल नाहींत; होड्या व बोटी चालतात.

शहर.—१८७९ पर्यंत जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होतें. उ. अ. २६°१०' व पू. रे. ९०°३८'. लो. सं. (१९११) ५९६४. पूर्वी हें कंपनीच्या सरहद्दीवर होतें. व येथें वस्ती करून राहिलेल्या यूरोपियनांनीं (इंग्रजांनीं) केवळ जबर-दस्तीनें बंगालचा व्यापार आपल्या ताब्यांत घेतला. १८९७ च्या भूकंपानें येथें बरेंच नुकसान झालें. १८७८ त येथें म्यु. क. स्थापन झाली. येथें मिशनरी आहेतच. हें व्यापाराचें ठिकाण आहे. येथें बोटी येतात. ताग, मोहरी, कापूस, साल याचा व्यापार दांडगा आहे. मीठ, धान्य, तेल, कापडा वगैरेची आयात होते. ठोक व्यापारी मारवाडी व किरकोळ दुकानदार मुसुलमान आहेत.

गोलमापक—या यंत्रास इंग्रजींत (स्फेरोमिटर) असें नांव आहे. या यंत्राच्या सहाय्यानें कोणत्याहि गोलकाची किंवा गोलकाच्या तुकड्याची त्रिज्या काढतां येते. तसेंच एखाद्या पदार्थाची जाडी सूक्ष्म प्रमाणात काढतां येते.

या यंत्रास तीन पाय असतात. मध्यंतरीं एक मलसूत्र (स्क्रू) बसविलेलें असतें. या स्क्रूचा एक फेरा ५ मिलिमि-टरइतका असल्यास वरील तबकडीच्या वर्तुलाचे ५०० भाग केलेले असतात. यामुळें एका भागाच्या योगानें ·००१ मिलिमिटर इतकें अंतर मापतां येतें. एक इंच म्हणजे सुमारें २५·४ मिलिमिटर होतात अर्थात् वरील यंत्रानें [illegible] इंचाइतक्या सूक्ष्म प्रमाणांत अंतराचें मापन करतां येतें. या यंत्रानें गोलकाची त्रिज्या कशी काढतात हें सांगण्या-पूर्वी अंतराचें मापन कसें करितात हें प्रथमतः देतों. समजा कीं आपणास एका काचेच्या तुकड्याची जाडी मोजावयाची आहे, तर प्रथमतः हें यंत्र एका सपाट पृष्ठ-भागावर ठेऊन मध्य स्क्रू किंचितसा चिकटेल असा ठेवून नंतर तो स्क्रू वर उचलतात. नंतर काचेचा तुकडा ठेवून फिरून एकवार तो स्क्रू त्या काचेच्या तुकड्यास स्पर्श करील असा आणून ठेवतात.सपाटीवर स्क्रू असताना व सध्यांच्या स्थितींत असतांना किती फेऱ्याचा फरक असतो हें मोजून काढतात; व त्यावरून काचेची जाडी काढतां येते.

आतां गोलकाची त्रिज्या कशी काढतात तें पाहूं. प्रथ-मतः पायांचें अंतर मोजतात. या यंत्राचे तीन पाय मिळून एक समभुज-त्रिकोण होतो. नंतर एका सपाट पृष्ठ-भागावर हें यंत्र ठेऊन मध्य स्क्रू सपाटीपर्यंत आणतात. नंतर स्क्रू वर उचलून घेऊन यंत्र इष्टगोलकावर किंवा गोल-काच्या तुकड्यावर ठेवितात. व स्क्रू खालीं आणून तो गोलकाच्या भागास किंचित चिकटेल असा ठेवतात. यामुळें त्या तीन पायांच्या दरम्यान त्या गोलकाची किती उंची

आहे ह कळतें. समजा कीं ही उंची ' ह ' आहे; आणि त्या दोन पायांमधील अंतर ' अ ' आहे; तर र =(त्या गोलकाची त्रिज्या) पुढील नित्य-समीकरणानें काढतां येतेः-

$$र = \frac{(अ^2 + ३ ह^2)}{६ ह}$$

याप्रमाणें वरील समीकरणाचा उपयोग होतो. वरील समीकरण गणिताच्या आधारें सिद्ध झालें आहे.

गोला—मुंबई इलाख्यांत यांची लो. सं. १३७९१ आहे. राणा नांवाचे गोला लोक सर्व गुजराथ व काठेवाड प्रांतभर आहेत. यांचा परंपरागत धंदा तांदूळ कांडण्याचा असून आपण रजपूत आहों असें ते म्हणतात व आपल्या नांवाला राणा हा शब्द जोडतात. हे काश्यप व वाजसनी गोत्रांचे असून यांमध्यें पुष्कळ आडनांवें आहेत. औदिच, रायकवाल, मेवाड अथवा श्रीमाळी ब्राह्मण हे यांचे उपाध्ये आहेत.

सुरत शहरामधील गोला लोकांमध्यें मूळचे नवापुरा व बेगमपुरा असे दोन वर्ग होते. पुढें कांहीं दिवसांनीं नवापुरा लोकांचे १५ व बेगमपुरा लोकांचे ७ पोटवर्ग झाले. या पोटवर्गांचेहि लहान लहान तुकडे झालेले आहेत. प्रत्येक पोटवर्गाची वेगळी पंचायत असून तिचा अधिकार त्या पोटवर्गातील सर्व तुकड्यांवर असतो. जातीच्या सर्व लोकांची एक कायमची मध्यवर्ती पंचायतहि आहे. हींत २२ पटेल व २२ मोहोलदार असून हिचा मुख्य पटेल सुरत येथील गोला लोकांमधून निवडला जातो. मुख्य पटेलाच्या हाताखालीं नवापुराचा एक व बेगमपुराचा एक असे दोन अधिकारी असतात. पोटवर्गाच्या अधिकाऱ्यांच्या निकालावर मध्यवर्ती पंचायतीकडे अपील करतां येतें. पोटवर्गाची पंचायत बोलाविण्याबद्दल (फिर्याद आणणाराला) ८ आण्यापासून ५ रु. पर्यंत फी भरावी लागते. पटेलाला पंचायत बोलवावयाची असल्यास फी लागत नाहीं. मध्यवर्ती पंचायत बोलविण्याबद्दल ७ रु. ८ आ. भरावे लागतात. बोलविण्याचें काम ब्राह्मण करितो. व त्याबद्दल त्याला ८ आणे मिळतात. मध्यवर्ती पंचायतीच्या सभेस सर्व पटेल मोहोलेवाले हजर असावे लागतात, मध्यवर्ती पंचायतीच्या सभेस सर्व गोला लोकांनां येण्याची परवानगी आहे. परंतु सभेंत बोलण्याची व मतें देण्याची मनाई आहे. अंत्यविधीला न जाणें, ठरलेला हुंडा न देणें इत्यादि जातिनियमभंगाबद्दल पोटवर्गाच्या पंचायती दंड करतात. लग्न मोडणें, दारू पिणें व मांस खाणें परजातीय स्त्रीशीं संबंध ठेवणें इत्यादि विशेष मोठ्या गुन्ह्यांचा निकाल मध्यवर्ती पंचायत करितें. दंडाचें उत्पन्न जातजेवणाची भांडीं विकत घेण्याकडे साधू व ब्राह्मण भोजनाकडे खर्चिलें जातें. बंगाल-बिहार-ओरिसांत गोलांची बरीच वस्ती आहे. [से. रि. १९११].

गोला—संयुक्तप्रांत. खेरी जिल्हा. महमदी तालुक्यातलें एक शहर. लखनौ बरेली रेल्वेचें स्टेशन. याची लो. सं. (१९०१) ४९१३. हें ठिकाण बरेंच जुनें असून बौद्धकालीन लेणीं व मातीच्या पक्क्या मूर्ती आसपास सांपडतात. जवळच साल जंगल आहे. पूर्वेला गोकर्णनाथाचें मंदिर आहे. तें सर्व अयोध्याप्रांतांत प्रख्यात आहे. गोला हें व्यापाराचें एक मुख्य ठिकाण आहे. धान्य व साखर हीं बाहेर जातात. येथें शाळा व दवाखाना आहे. गोरखपूर जिल्ह्यांतहि एक गोला नांवाचें गांव आहे.

गोलाघाट—आसामच्या शिवसागर जिल्ह्यांतील गोलाघाट पोटविभागाचें मुख्य ठिकाण. धनसीरी नदीच्या उजव्या तीरावर उ. अ. २६ ° ३१' व पू. रे. ९३ ° ५९' वर वसलें आहे. लो. सं. (१९०१) २३५९. येथें ' युनिअन ' आहे. व्यापार वाढता आहे. मुख्यतः तो मारवाड्यांच्या हातीं असून ते जवळच्या चहाच्या मळ्यांच्या मालकांशीं व्यापार करतात. कापूस, मोहरी व गूळ हीं बाहेर जातात व कापसाचा कपडा, धान्य, डाळी, राकेल, मीठ, तेल वगैरे आंत येतात. पावसाळ्यांत गोलाघाटपर्यंत लहान आगबोटी येतात. पण उन्हाळ्यांत त्या शिकारी घाटपर्यंत (१८ मैलांवर) येतात. रेल्वे स्टेशन ८ मैलांवर कमरबंदअली म्हणून आहे. खासगी हायस्कूल व इतर कचेऱ्या, दवाखाना, पोलिस वगैरे नेहमींप्रमाणें व्यवस्था आहे.

गोलुंदो—बंगाल. फरीदपूर जिल्ह्यांतला एक पोटविभाग. क्षेत्रफळ ४६६चौ.मैल. यांत खेडीं१२३३आहेत. पैकीं राजवारी हें मुख्य ठिकाण आहे. जमीन उत्तम सुपीक आहे. हवामान वाईट आहे. नेहमीं मलेरिया असतो. ईस्टर्न बंगाल स्टेट रेलवे यांतून जाते व आगबोटीहि (नद्यांतून) चालतात. मुख्य ठिकाण गोलुंदो हें रेल्वे व आगबोटी यांचें स्टेशन आहे. उ. अ. २३°५१' व. पू. रे. ८९°४६.' हें व्यापाराचें केंद्र आहे.पांगसा व बेलगाची हीं व्यापाराचीं ठिकाणें आहेत. येथून आसामांत मजूर रवाना होतात.

गोलेर—पंजाब. कांग्राजिल्हा. डेरा तालुक्यातलें एक वतन. क्षेत्रफळ २५ चौ. मैल. हें कांग्राचा राजा हरिनंदानें स्थापलें. अकबर व शहाजहान याच्या वेळीं या घराण्यांतील पुरुषांनीं बादशाहीस बरेंच साहाय्य केलें. १८१२ मध्यें या घराण्याचें संस्थान जप्त करण्यांत आलें व हल्लींचे २० खेड्यांचें वतन पुन्हां चालू करण्यांत आलें. याचा वसूल २६००० रु. आहे.

गोल्ड कोस्ट—पश्चिम अफ्रिकेंतील गिनीकोस्टचा एक भाग. हा भाग पश्चिमेस असीनीपासून पूर्वेस व्होल्टा नदीपर्यंत पसरला आहे. येथील नद्यांतील वाळूंत सोनें सांपडतें म्हणून या प्रांताला गोल्डकोस्ट हें नांव पडलें आहे. सध्यां हें नाव साधारणपणें ब्रिटिशांच्या गोल्डकोस्ट वसाहतीला लावतात. हिच्या पश्चिमेस आयव्हरी कोस्ट वसाहत (फ्रेंच), पूर्वेस टोगोलँड (जर्मन) व उत्तरेस अशांटी व ब्रिटिशांचा मुलूख आहे. गोल्ड कोस्ट वसाहतीचें क्षेत्रफळ २४,२००

चौरस मैल असून लोकसंख्या दहा लक्षांहून जास्त आहे. प्रा, व्होल्टा, अँकोब्रा ह्या येथील मुख्य नद्या होत.

किनाऱ्याच्या बाजूनें मधून मधून चुनखडीचे खडक आहेत; पण ते वाळूच्या थराखालीं झांकलेले आहेत. अंतर्भागांत चिकणमातीचा व सुवर्णप्रसव गारगोट्यांचा मोठा संचय आहे. किनाऱ्यावरील हवा फार उष्ण,सर्द व रोगकारक आहे. एप्रिलपासून ऑगस्टपर्यंत जोराचा पाऊस पडतो. डिसेंबरच्या अखेरीपासून मार्चपर्यंत कडक उन्हाळा असतो.

वसाहतीचा तीनचतुर्थांश भाग अरण्याच्छादित आहे. महोगनी, टेंबुरणी, शेंवरी वगैरेंचीं झाडें या जंगलांत पुष्कळ आहेत. काळवीट, चित्ते, कोल्हे, म्हशी, वानर, वगैरे प्राणी या जंगलांत संचार करीत असतात. एतद्देशीय लोक हे निग्रो जातीचे आहेत. फांटी ही पुष्कळ जातींपैकीं एक प्रमुख जात होय. फांटी भाषा वसाहतींत सर्वत्र चालते. हे लोक उत्तरेकडून आले व किनाऱ्यावरील जातींनां यांनीं जिंकलें. फांटी खेरीज करून आकीम, आक्रा, आक्वपिम वगैरे जातीहि या ठिकाणीं वास करितात.

गोल्डकोस्ट येथें बोलण्यात येणाऱ्या भाषेचीं, क्री, च्वी किंवा ची अशीं निरनिराळीं नांवें आहेत. हींत फांटी, अक्याम वगैरे पुष्कळ प्रांतिक भाषांचा समावेश होतो. गोल्ड कोस्टच्या आग्नेय भागांत गा अथवा आक्रा ही भाषा बोलतात.

महमदी व खिस्ती या दोन्ही धर्मांचा प्रसार येथें होत आहे. मिशनऱ्यांनीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळा घातल्या आहेत. सरकारनें चालविलेल्याहि कांहीं शाळा आहेत. एतद्देशीय लोक बुद्धिमान आहेत. या लोकांत प्रेताला घराच्या आवारांत पुरण्याची चाल होती पण ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं १८७४ ती बंद केली.

येथील जमीन फार सुपीक आहे. लोकांच्या गरजा फार थोड्या असल्यामुळें त्यांची प्रवृत्ति आळसाकडे विशेष दिसून येते. नुसत्या जंगलाचेंच उत्पन्न पुरून उरेल इतकें होतें. कापूस, वाटाणे, कांदे, भुईमूग इत्यादि पिकांची लागवड होते. सोनें, ताडाचें तेल, कोको, रबर, इमारतीचें लांकूड इत्यादि वस्तू येथून बाहेर देशीं व्यापाराकरितां जातात. तांदूळ, साखर, तंबाखू, कापसाचा तयार केलेला माल वगैरे जिन्नस बाहेरून या ठिकाणीं येतात.

वसाहतींत सरकारनें बांधलेला व सरकारच्या मालकीचा एक लोहमार्ग आहे. शिवाय बैलगाडीचे रस्ते, नद्या, तारायंत्रें वगैरे दळणवळणाचीं साधनें आहेतच. गोल्ड कोस्ट ही बादशाही वसाहत (क्रौन कॉलनी) आहे. येथील राज्यकारभार गव्हर्नर पाहात असून त्याला मदतगार म्हणून एक कायदेमंडळ आहे. त्यांत सरकारी व सरकारनियुक्त—निमसरकारी सभासद आहेत. एतद्देशीय कायद्यांनां व चालीरीतींना सरकार होतां होईतो हात लावीत नाहीं. हे कायदे फार विस्तृत व गुंतागुंतीचे आहेत. जमीनीवर व्यक्तीची मालकी फार करून नसते. कुटुंबाचा किंवा जातीचा जमीनीवर सार्वजनिक ताबा असतो. कुटुंबाच्या किंवा जातीच्या प्रत्येक माणसाला आपल्या उपयोगापुरता जमीनीचा कोणताहि भाग तोडून घेण्याचा हक्क आहे. मनुष्याच्या मरणानंतर त्याची मालमत्ता त्याच्या बहिणीच्या मुलांनां मिळते. प्रत्येक जातीचा राज्यकारभार त्या त्या जातीचा राजा पहात असतो. राज्यकारभाराकरितां वसाहतीचे तीन प्रांत केले आहेत. प्रांताचे जिल्हे पाडले आहेत. प्रत्येक जिल्ह्यावर कमिशनर असून तो न्याय व अंमलबजावणी हीं दोन्हीं कामें करतो. वसाहतींतून गुलामगिरी मोडण्यांत आली आहे. जकात व रेल्वे ह्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी होत.

गोल्डकोस्ट फ्रेंच नाविकांनीं शोधून काढला कीं पोर्तुगीज लोकांनीं शोधून काढला हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. इतकें मात्र खरें कीं डायओगोडी आझांबुजा याच्या नेतृत्वाखालीं पोर्तुगीजांच्या तांड्यानें १४८१–८२ या वर्षी एलमिना काबीज केलें. १५५३ त इंग्रजी जहाजांनीं गिनीमधून १५० पौंड वजनाचें सोनें आणलें. यामुळें गोल्डकोस्टच्या सुवर्णभूमीची कीर्ति यूरोपमध्यें सर्वत्र पसरून यूरोपीयन राष्ट्रांच्या झुंडीच्या झुंडी या ठिकाणीं लोटूं लागल्या. पोर्तुगीजांना एलमिना येथून डच लोकांनीं हुसकून लावलें. १६५१ च्या आधींच इंग्रजी कंपनीनें कॉरमॅंटाईन येथें एक किल्ला बांधला होता. पुढें दहा वर्षांनीं केप कोस्ट कॅसल बांधण्यांत आला. १६६४–६५ मध्यें इग्लंड व हॉलंडमध्यें झालेल्या युद्धांत केप कोस्टचा किल्ला बचावला. १६७२ त दुसऱ्या चार्लसनें दिलेल्या सनदेच्या आधारावर रॉयल आफ्रिकन कंपनीनें पुष्कळ ठिकाणीं किल्ले बांधले. १७०० मध्यें रॉयल ऑफ्रिकन कंपनी मोडण्यात येऊन तिची जागा १७५० त आफ्रिकन कंपनी ऑफ मर्चन्टसनें घेतली. १८२१ त तीहि मोडण्यांत येऊन किल्ल्याचा ताबा प्रत्यक्ष राजेसाहेबांनीं आपल्याकडे घेतला. १८१७ त अशांटीनें किनाऱ्यावरील शहरांतील देश्य लोकांवर ब्रिटिशांचा ताबा मान्य केला. १८२४ त फांटी व अशांटी यांत कलह लावून आपलें वजन अन्तर्भागांत स्थापण्याचा सर चार्लस मॅकूकार्थी या इंग्रजी गव्हर्नरानें प्रयत्न केला. पण त्यांत त्याला यश न येऊन तो मारला गेला. १८२६ त दोहोंवा येथें इंग्रजांनीं अशांटीवर जय मिळविला. १८२८ त येथील सर्व किल्ले एका व्यापारी कमीटीकडे सोंपविण्यांत आले. या कमीटीनें जार्ज मॅक्लीअन याला आपला गव्हर्नर नेमलें. या गृहस्थानें बिटिश सत्ता अन्तर्भागांत अबाधीतपणें स्थापिली, १८४३ त वसाहत कचेरीनें येथील कारभार स्वतःच्या हातांत घेतला. १८४४ त एतद्देशीय अधिकाऱ्यांशीं करार होऊन गोल्डकोस्ट वसाहतीवरलि अपराध्यांची चवकशी करण्याचा व नरबली अर्पण करण्याच्या चालीचा उच्छेद करण्याचा हक्क ब्रिटिशांस मिळाला. १८५० त डॅनिश किल्ला व १८७१

त उच किंवा विकत घेऊन ब्रिटिशांनीं किनाऱ्याकडील आपली सत्ता अधिक कायम केली. १८७३-७४ च्या अशांटी युद्धानें तर ब्रिटिश वर्चस्वाचें क्षेत्र अधिकच वाढलें. १८७४ त गोल्डकोस्ट लेगॉस येथील ठाण्यांची मिळून स्वतंत्र बादशाही वसाहत (क्रौन कॉलनी) करण्यांत आली. पण १८८६ त गोल्डकोस्टपासून लेगॉस वेगळें काढण्यांत आलें.

गोल्ड-स्टकर, प्रोफेसर-हा एक संस्कृत पंडित एका यहुदी कुळांत जन्मास आला होता. त्याचें उच्च शिक्षण बॉन येथें झालें. बर्लिन येथें अध्यापकाचें काम करण्यास जरूर तेवढें शिक्षण त्यानें मिळविलें. त्यानें प्रथम अमर-कोशाच्या प्रास्ताविक श्लोकांवर लेख लिहून तो प्रसिद्ध केला.

यानंतर त्यानें 'प्रबोध चंद्रोदय' या पुस्तकाचें भाषान्तर प्रसिद्ध केलें. व 'मानव कल्पसूत्र' या हस्तलिखित पुस्तकास प्रस्तावना लिहिली. ती पुढें पाणिनि व त्याचें संस्कृत वाङ्मयांत स्थान या नांवानें प्रसिद्ध झाली आहे. डॉ. विल्सन याच्या संस्कृत कोशाची सुधारलेली आवृत्ति तो तयार करीत होता पण त्याच्या अनपेक्षित मृत्यूमुळें हें काम अपुरें राहिलें. त्याला हिंदी वैद्यकाचीहि माहिती होती.प्रोफेसर गोल्डस्टकर घरचा श्रीमंत होता. लंडन येथें विद्यालयांत त्यानें संस्कृत भाषेच्या अध्यापकाचें काम केलें होतें.

मृत्यूसमयीं तो भाषाशास्त्रविषयक मंडळाचा अध्यक्ष व रॉयल एशियाटिक सोसायटी मंडळाचा सभासद होता.कोणतीहि गोष्ट लिहीत असतां त्याला लेखांत येणाऱ्या विधानांच्या सत्यतेची चाड विशेष असे. त्यामुळें त्याचीं कांहीं पुस्तकें अपुरीं राहिलीं.

गोल्डस्मिथ ऑलिव्हर (१७२८-१७७४)—एक आंग्ल कवि. याचें बी. ए. पर्यंत शिक्षण झालें होतें. द्रव्या-र्जनाकरितां त्यानें पांच सहा धंदे करून पाहिले, परंतु दुर्दैवानें त्या सर्वांत त्याला अपयश आलें. शेवटीं त्यानें परदेशगमन केलें. त्याच्या परदेशच्या प्रवासांत त्याच्या उपजीविकेचें साधन बांसरी होतें. १७५६ सालीं तो इंग्लंडला परत आला. तेथें आल्यावर पुस्तकें विकण्याच्या दुकानांतून नोकरी केली व अखेर या सर्व उद्योगांना कंटाळून त्यानें लेखक होण्याचें ठरविलें. गोल्डस्मिथचें ज्ञान फार तुटपुंजें होतें. त्याला एकाहि विषयाची पूर्ण माहिती नव्हती, परंतु स्वतःच्या ज्ञानाचा त्यानें लोकांनां आश्चर्य वाटेल असे लेख लिहिण्यांत उपयोग करून घेतला. त्याचीं काल्पनिक संविधानकें चांगलीं नाहींत परंतु त्यांची मांडणी चांगली केलेली आहे. 'दि ट्रॅव्हलर '(प्रवासी) नांवाच्या काव्यांत त्यानें एका प्रवाशाचें वर्णन दिलें असून शेवटीं सुख हें राजकीय संस्थांवर अवलंबून नसून मनाच्या स्थितीवर अवलंबून असतें असें दाखविलें आहे. ' डेझर्टेड व्हिलेज ' नांवाच्या त्याच्या दुसऱ्या काव्यांत त्यानें पुष्कळ असंबद्ध विधानें केलीं आहेत. परंतु केवळ काव्य या दृष्टीनें त्याच्याकडे आपण पाहिल्यास त्याची किंमत कमी ठरत नाहीं. त्याच्या ' दि व्हिकार ऑफ वेकफील्ड ' नांवाच्या पुस्तकांतील कथानकाचें इंग्लिश राहणीशीं साम्य असल्याचें संभवत नाहीं तरी पण त्याच्या पहिल्या प्रकरणांतून खेड्यांतील लोकस्थितीसंबंधीच्या साध्या गाण्यांतलि गोडी व आनंदपर्यवसायी नाटकांतून दिसून येणारा उत्साह हीं आढळतात. गोष्टीच्या पूर्वार्धाच्या मानानें उत्तरार्ध फारच फिका पडतो, व उपसंहाराच्या सुमाराला तर असंबद्धता आढळून येते. त्यानें लिहिलेल्या 'शी स्टूप्स टु कॉंकर ' (मराठी भाषांतर-'समजुतीचा घोंटाळा ') नांवाच्या लोकप्रिय आनंदपर्यवसायी नाटकांत तर त्यानें विक्षिप्तपणाची कमालच केली आहे. याशिवाय त्यानें निरनिराळ्या देशांचे इतिहास लिहिले आहेत. त्याची लेखनपद्धति साधी व समजण्यास सोपी आहे. गोल्ड-स्मिथ १७७४ सालीं मरण पावला. शेवटपर्यंत त्याची सांपत्तिक स्थिति निकृष्ट होती.

गोंवर—अंगावर लाल अगर गुलाबी रंगाचा पुरळ उठणें, पडसें, खोकला या लक्षणांसह असलेल्या सांसर्गिक ज्वरास हें नांव आहे. याची बहुधा गांवांत अगर शहरांत सांथ येऊन प्रौढ माणसांपेक्षां लहान व तरुण माणसांत ती लवकर पसरते. याचें कारण प्रौढ माणसांनां बालपणीं एकदां गोंवर येऊन गेला असल्यामुळें तितका प्रतिबंध होतो; अगर सर्वस्वी प्रतिबंध न झाल्यास नवीन आलेला गोंवर फार सौम्य असतो. अति कोंवळ्या अर्भकांनांहि याचप्रमाणें गोंवर येत नाहीं व आलाच तर सौम्य प्रकारचा येतो. मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांत कोठल्याना कोठल्यातरी मोहल्यांत थोडाबहुत गोंवर सतत असतो म्हटलें तरी चालेल. थोडा वेळ बंद झाला तर दुसऱ्या मोहोल्यांत गोंवर प्रगट होत असतो. परंतु ज्या गांवीं अगर ज्या ठिकाणीं पूर्वीं कधीं गोंवर नव्हता अगर बरींच वर्षें आला नाहीं अशा ठिकाणीं लहान अगर प्रौढ वयाच्या सर्वच माणसांनां साथींत गोंवर येण्याचा संभव असून तो गोंवर आला तर तो उग्र स्वरूपाचा असतो. या प्रकारें फेरो नामक बेटांत १८४६ सालीं या साथ्या दुखण्यानें तेथील रहिवाश्यांत अनर्थ करून सोडला व फार माणसें मेलीं. रोग्याशीं अन्य लोकांचा संसर्ग घडून अगर त्या दूषित हवेनें किंवा कपडे व रोग्याच्या खोलींतील इतर पदार्थ बाहेर दुसऱ्या ठिकाणीं जाऊन त्याच्यामुळें संसर्ग पसरतो. गोंवराची उगवण होण्याच्या अगोदर नाकांतून जें पाणी वहातें तें चिकट पाणी महासांसर्गिक असतें; तें घेऊन दुसऱ्या माणसाला गोंवर उत्पन्न केल्याचा प्रयोग करून पाहिला आहे.

रोगलक्षणें.—या ज्वराची गर्भावस्था दहा अकरा दिवस फारतर असते. ताप व पडसें येऊन दुखण्यास आरंभ होतो. तापाचें उष्णतामान १०२° पर्यंत असतें. मुलास चैन पडेनासें होऊन कांहीं न खातांपितां गुंगी व झांपड येऊन मूल आजारतें. थोडी थंडी वाजते अगर वांती होते. मूल लहान असल्यास झटके येतात; डोळ्यांतून व नाकांतून पाणी

गळूं लागून पापण्यांनीं खालचीं वरचीं पोटें भरून आल्याप्रमाणें फुगीर दिसतात. श्वासनलिका, कंठ व श्वासमार्गांत सर्दीकफ होतो. दुसऱ्या दिवशीं ताप निघतो अगर एक दोन दिवस असला तर फार कमी असतो व नंतर अंगावर लाल रंगाचा अगर पित्त उठल्याप्रमाणें पुरळ उठतो. चवथ्या दिवसापासून अगर त्याच्या आदल्या दिवशीं तोंड, मस्तक, कपाळ, कानशील येथें गोंवराचा पुरळ येऊन नंतर भराभर कान, गळा, मान, छाती, पाठ, पोट व हातापायांवर तो पसरतो. पुरळाचे वर्तुळाकार अगर लंबवर्तुळाकार अगर अनियमित आकाराचे गुलाबी, लाल रंगाचे डाग उठतात. ते एकमेकांत मिसळून त्या वर्तुळाकार डागांच्या समूहाच्या एका बाजूस चंद्राकृति कडा दिसतात व त्याच्या पुढें पुरळरहित अशी थोडी साधी त्वचा असते. या डागांमध्यें सूक्ष्म रक्तवाहिन्या फुटून तो रक्ताळलेला भाग अगर त्या गांधींच्या मधोमध पुटकुळी बनलेली कांहीं ठिकाणीं आढळते. त्यामुळें तोंड व चेहरा फुगलेला आणि सुजलेला दिसतो. पाठीवर तसेंच हातापायांवर गोंवराचा पुरळ एकसारखा व बराच उठलेला असतो. तो पूर्णत्वास पोंचण्यास एकपासून तीन दिवस लागतात. नंतर तो भराभर मावळूं लागतो. जेथें तो प्रथम दिसतो तेथूनच तो मावळण्यास आरंभ होतो. मावळल्यावरहि त्याचे पिंगट व काळसर डाग कांहीं दिवस रहातात. रक्ताळलेल्या पुरळाचे डाग फार दिवस मागाहून रहातात. याशिवाय सर्वांगावरून कोंडा निघून तो गळून पडतो. पुरळ दिसूं लागतांक्षणीं आरंभीं कमी झालेला ताप १०२°–१०३ पर्यंत वाढतो अगर कधीं जास्तहि वाढतो. नंतर तो दोन ते चार दिवस टिकून पुरळ मावळण्याच्या सुमारास ताप एकदम कमी होतो व एक ते दीड दिवसांत साफ निघतो. पडसें, खोकला चालू असतो; सर्दीमुळें कपाळ दुखतें. कांहीं रोग्यांनां श्वासनलिकादाह होऊन छाती सूंसूं वाजते; घसा बसतो; श्वास लागतो व खोकल्याची ढांस सुरू होते. टाळू व घसा पाहिला तर तो सर्व अगर ठिकठिकाणीं लाल झालेला दिसतो. जिभेस बुरशी व तोंडास थोडी दुर्गंधी येते. ज्वरानंतर जीभ साफ होऊन अन्नपाण्यास रुचि येते व झोंप चांगली लागते.

आ गं तु क दो ष व दु ष्प रि णा म.—श्वासमार्गांपैकीं सर्व प्रकारचा फुप्फुसदाह अगर कंठदाह होऊन गुदमरणें या आगंतुक कारणानें बरेच रोगी मरतात. अक्षिपुटदाह, अक्षिकांचदाह, कनीनिकादाह यामुळें डोळे बिघडतात. मुखदाह, गालगुंड, कान फुटणें व ठणकणें, आल्ब्यूमिनमेह, आतड्यांतून रक्तस्राव, मुखकोथ (सडणें) हेहि आगंतुक रोग उत्पन्न होतात. दुष्परिणामांपैकीं खोकला जुनाट होऊन फुप्फुसें बिघडणें, डोळे बिघडणें, गलग्रंथि मोठ्या होणें, कान वाहणें, व त्याचे दुष्परिणाम क्षय, हृद्रोग, कृशता वगैरे होत.

गों व रां चे प्र का र.—पडसें व पुरळ यांशिवाय गोंवर येतो असें कोणी डॉक्टर म्हणतात. पण याविषयीं बरीच शंका वाटते. उग्र भेदांमध्यें पुरळ रक्ताळतो व श्लेष्मल त्वचेंतूनहि रक्तस्राव होतो. ज्वरप्रधान भेदांत पुरळ काळवंडतो अगर तो नीट येतहि नाहीं अगर येऊन तो नीट बाहेर पडत नाहीं. अशा वेळीं ताप वाढून नाडी बिघडते, रोगी वातानें बडबडतो. जिभेस दाट बुरशी येऊन विषमज्वराच्या रोग्याप्रमाणें रोग्याची स्थिति होते.

ज्व र नि दा न.—(१) विषमज्वरामध्यें तोंडावर लाली व सूज येत नाहीं.पडसें नसतें.(२) देवीच्या तापामध्यें प्राथमिक गुलाबी पुरळ कांहीं रोग्यांमध्यें येतो. पण या रोग्यांनां पडसें नसतें त्याऐवजीं कंबर व डोकें फार दुखणें आणि वांति होणें यावरून गोंवर नाहीं असा तर्क करावा.

सा ध्या सा ध्य वि चा र.—शेंकडा एक दोन रोग्यांपेक्षां अधिक रोगी दगावत नाहींत. उग्र सांथ अगर ज्वरप्रधान भेद अगर फुप्फुसदाहादि आगंतुक दोष या आपत्ती वगळल्या असतां हा सुसाध्यच ज्वर आहे असें मानतात.

उ प चा र.—रोग्यास ऊब असेल अशा खोलींत ठेवावें. परंतु ती कोंदटहि नसावी व अंगावर झुळुक न येईल अशी बेताची ताजी हवा आंत यावी. म्हणजे दुसऱ्या मुलांमध्यें रोग फार पसरणार नाहीं.पुरळ येईपर्यंत मूल अमळ हिंडलें फिरलें तरी हरकत नसावी परंतु गोंवराचा पुरळ दिसूं लागल्यावर मात्र रोगी अंथरुणावर पडून असलेलाच बरा. खाण्यास मुख्यतः दूध, पिठूळ पदार्थ वगैरे अगदीं हलकें अन्न द्यावें. सर्दी घालविण्याची व कफ पातळ होऊन तो पडण्यासाठीं औषधयोजना करावी. दिवसांतून तीन चार वेळ टाळू व घसा या ठिकाणीं बोरीक ॲसीड व ग्लिसरीन यांचें मिश्रण लावल्यानें तें ठिकाण जंतुरहित व शुद्ध होऊन त्यामुळें श्वासमार्ग व कानांत होणारे दुष्परिणाम टळतात. शेंकडा १० प्रमाणांत रिसॉर्सीन पाण्यांत विरवून तें अगर पोटयाश परमँगनेटच्या पाण्यानें पिचकारीच्या साह्यानें धुणें हेहि इलाज यासाठीं योजतात. ताप फार वाढल्यास थंड पाण्यांत फडक्याचा बोळा भिजवून त्यानें अंग चोळावें अगर रोग्यास ९०°ते९५° उष्णमान असलेल्या पाण्यांत बसवून त्यांत आणखी थंड पाणी मागाहून रोग्यास त्रास न होईतोंपर्यंत घालीत जावें. हा इलाज १००°ते१०३° ताप असला तरी करावा. म्हणजे १०५° सारख्या तापाचें भावी संकट टळतें. व हें संकट रोग्यास न येईल तितकें बरें. ताप उतरल्यावर अंथरुणांत पडून रहाण्याची गरज नाहीं. तरी पण आणखी आठ दहा दिवस रोग्यानें वाऱ्यांत हिंडूं फिरूं नये हें चांगलें. उग्रप्रकारांत ब्रँडी वगैरेसारख्या उत्तेजक औषधांची गरज क्वचितच पडते दुखण्यांतून उठल्यानंतर लोह, कॉडलिव्हर तेल वगैरे पौष्टिक औषधें सुरू करावीं. रोग्यास हवापालट करण्यासाठीं कांहीं कालपर्यंत अन्यस्थलीं पाठवावें. दुष्परिणाम (कान वहाणें इत्यादि) झाले असतील त्यांवर जरूर ते उपचार योजावेत.

गोवर्धन—संयुक्तप्रांत. मथुरा जिल्हा व तालुका यांतील एक शहर. हें मथुरा डीग रस्त्यावर गिरिराज पर्वताच्या पायथ्याशीं मानसीगंगा तीर्थाच्या भोंवतीं वसलें आहे. लो. सं. सुमारें तीन हजार. श्रीकृष्णाचें हें आवडतें ठिकाण होतें असें सांगतात. येथें श्रीहरीचें एक जुनाट देऊळ आहे. येथें बरीच ऐतिहासिक स्थळें आहेत. यांची व्यवस्था १८५६ च्या २० व्या कायद्यान्वयें होते.

गोवर्धन-गंगापूर—हें ऐतिहासिक ठिकाण नाशीक जवळ आनंदवल्लीच्या पश्चिमेस सुमारें तीन मैलांवर आहे. गोवर्धन हें फार प्राचीन स्थळ असून याचा उल्लेख लेण्यांतील शिलालेखांमध्यें पांच वेळां आलेला आहे. त्यावरून हें आंध्रभृत्य राजांच्या प्रतिनिधींचें 'आहार' म्हणजे रहाण्याचें ठिकाण होतें असें दिसून येतें. येथें जुन्या इमारतींचे कांहीं शेषभाग अद्यापि आढळून येतात. येथील गोवर्धनेश्वर व इतर मंदिरें प्रसिद्ध आहेत. येथील नदीचा घाट प्रेक्षणीय आहे. गोवर्धनापासून अगदीं नजीक गंगापूर आहे. येथें गोपिकाबाई पेशवे यांनीं आपलें शेवटचें आयुष्य घालविलें. नदीच्या कांठीं त्यांनीं एक सुंदर वाडा बांधून नदीस घांट बांधिले. व तेथेंच नदीचा देखावा अवलोकन करण्यासाठीं लहान लहान आराममंदिरें बांधिलीं. येथें 'दुधस्थळी' या नांवाचा एक सुंदर धबधबा आहे. गोपिकाबाई या येथें इ० स० १७६४ मध्यें राहण्यास आल्या, तेव्हांपासून त्या मरेपर्यंत येथेंच रहात असत. हल्लीं येथील त्यांचा वाडा अगदीं पडला असून फक्त जोतें मात्र कोठें कोठें शाबूत आहे. [इतिहाससंग्रह. पु. ६ पृ. ९२].

गोवर्धन गिरी—म्हैसूर, शिमोगा जिल्ह्यांतील एक पर्वत. यावर किल्ला व तटबंदी आहे. उ. अ. १४°१०' व पू. रे. ७४°४०'. उंची १७२० फूट. यावरून गिरसप्पा खेडें दिसतें. येथील किल्ला जिनदत्तराय यानें आठव्या शतकांत बांधला. आतां तो पडीत आहे व त्याच्यावर जंगल वाढलें आहे. जैनांचें येथें एक देऊळ आहे. त्यासमोर गिरसप्पाच्या व्यापाऱ्यांनीं १६ व्या शतकांत उभारलेला एक धातूचा स्तंभ असून त्यावर एक लेख आहे.

गोवर्धन पर्वत—वृन्दावनांतील एक पर्वत. इन्द्रानें एकदां गोकुलावर अतिशय जोराची वृष्टि केली असतां, कृष्णानें सर्व गोकुलवासी गोपगोपींनां इन्द्राच्या पूजेऐवजीं या पर्वताची पूजा करण्यास सांगितलें. या कृत्यामुळें इन्द्रास अनावर क्रोध येऊन त्यानें सर्व गोकूल वाहून जाण्यासारखी प्रचंड वृष्टि केली. तेव्हां सर्व गोकुलवासीयांचें रक्षण करण्याकरितां कृष्णानें सात दिवसपर्यंत अहोरात्र तो पर्वत आपल्या करंगळीवर उचलून धरिला. अशा रीतीनें त्या प्रचंड वृष्टीपासून कृष्णानें गोकुलाचें रक्षण केलें, तेव्हां पराभूत होऊन इन्द्रानें वृष्टि बंद केली, व नंतर कृष्णाशीं सख्य केलें. या पराक्रमाबद्दल कृष्णास 'गोवर्धनधारी' असें विशेषण मिळालें असें भागवतांत वर्णन आहे.

गोवर्धन ब्राह्मण—महाराष्ट्रांतील एक प्रादेशिक जात. देशस्थादि ब्राह्मणवर्गाप्रमाणें याचे आचार व राहणी असल्यानें या ठिकाणीं फक्त ही ब्राह्मण जात विशिष्ट कशी आहे येवढेंच दाखविलें आहे. " गोवर्धनब्राह्मणज्ञाति " ही गोळक या नांवानें कधीं कधीं ओळखली जाते. तेव्हां तिच्याविषयींचा मुख्य ऐतिहासिक प्रश्न म्हटला म्हणजे ही ज्ञाति मूळची ब्राह्मण आहे कीं व्यभिचारोत्पन्न एका ज्ञातीनें आपणांस गोवर्धन हें नाव वर्णविषयक महत्वाकांक्षेनें लावून घेतलें आहे. याची छाननी करण्यासाठीं आपणांस पहावयाचें तें हें कीं, (१) गोवर्धन ब्राह्मणांच्या अस्तित्वाबद्दलचा आधार कितपत जुना आहे. व (२) ज्या ज्या काळीं त्याचा उल्लेख सनदांतून केला जातो त्या काळीं त्यांचा अंतर्भाव ब्राह्मणांत होत होता काय ?

आमच्यापुढें जीं अनेक पत्रें व सनदा आल्या त्यांत शालिवाहन शक १६८१ सालचें पत्र जुनें आहे. याहून जुनें अस्सल पत्रें आमच्यापुढें आलें नाहीं. त्यांत लक्ष्मण नरहर भट उपाध्ये यास गोवर्धन म्हणून धर्माधिकार दिलेले आहेत. म्हणजे बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत गोवर्धन हें नांव रूढ होतें, त्यांस ब्राह्मण म्हणत होते, आणि त्यांस धर्माधिकार होते एवढें निश्चित होतें. आदिलशाहींतील सनद आणि त्या सनदेवर पेशवाईंतील ठराव हीं दोन्हीं अस्सल आमच्यापुढें न आल्यामुळें जमेस धरलीं नाहींत. पण तो पुरावा खरा ठरणें अशक्य नाहीं.

गोवर्धन हा शब्द महाराष्ट्राच्या बऱ्याच भागास लावीत असत ही गोष्ट निश्चित आहे. तसेंच गोवर्धन हे आज अनेक जातींचें व ठिकाणांचें उपाध्येपण व जोशीपण करतात ही गोष्टहि निश्चित आहे. आगळे ज्ञातिकडून ज्ञानकोश मंडळास आलेल्या माहितींत ही गोष्ट नमूद केली आहे. आज ब्राह्मणांचे सर्व कर्माधिकार गोवर्धनांस आहेत. शिवाय उत्तरकोंकणांतील माध्यंदिनांच्या प्रसिद्ध सनदांत त्यांनीं आपली वृत्ति गोवर्धनांपासून बिंबामार्फत घेतली असा पुरावा आहे. यावरून गोवर्धन ही ब्राह्मणांची जुनी जात असावी असें दिसतें.

गोवर्धनांनीं ज्ञानकोश ज्ञातिनिर्णायक कमिटीपुढें मांडलेल्या पुराव्यांत असें सांगितलें आहे कीं ते अधर्मसंतति नाहींत. ते तसे असते तर त्यांचीं आडनांवें इतर ब्राह्मणांतलीं असतीं. पण त्यांचीं आडनांवें इतर ब्राह्मणांतलीं नाहींत. प्रस्तुत विधान अयथार्थ आहे. गोवर्धनांतहि बिवलकर, मंडलिक, खरे, साठ्ये, फाटक वगैरे कोकणस्थांत असलेलीं आडनांवें आहेत. भालेराव, दास्ताने, डांगे वगैरे देशस्थांतील आडनांवें आहेत. तथापि गोवर्धनांतील बरींचशीं आडनांवें, (उदाहरणार्थ, विश्वासे, शूल, टापरे, कंथे इ.) बहुतेक निम्याहून अधिक अगदीं स्वतंत्र आहेत यांत शंका नाहीं. निराळ्या आडनांवांच्या पुराव्यावरून यासंबंधानें कांहीं निर्णय करतां येईल तर हा कीं ही जात

इतर ब्राह्मण जातीपासून अगदीं पृथक् आहे. सदृश आड-नांवांवरून निर्णय दोन प्रकारचे निघतील ते हे कीं, कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मण, प्रभु, मराठे यांत अनेक आडनांवें ज्या कारणामुळें सामान्य असतील त्याच कारणांमुळें कांहीं आडनांवें देशस्थादि ब्राह्मणांत व गोवर्धनांत असतील. दुसरा असा संभव आहे कीं अन्य जातींतील माणसें गोवर्धनांत शिरलीं असतील व त्यास कारण शिरलेल्या व्यक्तींचा जन्म विधवेपासून झाला असावा. याखेरीज अन्य कारणेंहि असणें अशक्य नाहींत. भिन्न ब्राह्मण जातींतील माणसें गोवर्धनांत शिरलीं असल्यास व विधवा-संततीहि गोवर्धनांनीं स्वीकारली असल्यास जातीची कांहीं कालपर्यंत ज्ञातिनियमनविषयक नीति मात्र स्पष्ट होईल. तेवढ्यावरून जातीच्या स्वतंत्र अस्तित्वास बाध येत नाहीं.

गोवर्धनांशीं इतर ब्राह्मण आज उघडपणें अन्नव्यवहार करीत नाहींत असें आक्षेपकांनीं पुढें आणलें आहे व गोवर्धनांनींहि ही गोष्ट मान्य केली आहे. ही गोष्ट त्यांच्या ब्राह्मण्यास बाध आणूं शकत नाहीं असें अनेक ब्राह्मणांमध्यें असलेला अन्नोदकव्यवहाराचा अभाव पुराव्यादाखल मांडून दाखविलें आहे. गोवर्धनांनीं याचें कारण व्यावहारिक स्पर्धा असावी असें मांडलें आहे व तें अशक्य नाहीं. आज गोवर्धन ब्राह्मण ज्ञातींत ऋग्वेदी गंगातीरवासी व उत्तर कोकणांतील यजुर्वेदी असे दोन भेद दिसतात. या ज्ञातीची साधार माहिती ज्ञातीच्या संजीवन मासिकांत आढळेल. मासिकाचे संपा. दे. वि. नाईक.

गोवर्धनाचार्य (इ. स. १०७५-११२५)—वंग (बंगाल) देशाचा राजा वल्लाळसेन याचा पुत्र जो लक्ष्मणसेन याच्या पदरीं हा कवि होता. याच्या बापाचें नांव नीलांबर असून याचे शिष्य उदयन व सहोदर बलभद्र होते. याच्या नांवाचा उल्लेख कवीनें आपल्या सप्तशतींत केला आहे. वाल्मीकि, व्यास, गुणाढ्य, कालिदास, बाण, भवभूति या आपणापूर्वी होऊन गेलेल्या कवींचा उल्लेख कवीनें आपल्या काव्यांत केला आहे.

आपले समकालीन असे लक्ष्मणसेन राजाच्या दरबारीं शरण, जयदेव, उमापति व कविराज हे कवी होते असें एका पद्यांत सांगितलें आहे. जयदेव कवीनें गीतगोविंदांत या गोवर्धनाची स्तुति केली आहे. यावरून कालिदास, बाण व भवभूति यांच्या नंतर हा कवी झाला हें उघड आहे. तसेंच गीतगोविंदाचा कर्ता जयदेव याचा समकालीन किंवा याच्या किंचित पूर्वीचा हा कवि होता असें दिसतें. इ. स. ११ व्या शतकाच्या समाप्तिपर्यंत लक्ष्मणसेन वंग देशांत राज्य करीत होता असें इतिहासज्ञांचें मत आहे. यावरून त्यांच्या दरबारीं असणारा हा गोवर्धन कवि अकराव्या शतकांत असावा. याचा आर्यासप्तशती या नांवाचा एक ग्रंथ आहे. या ग्रंथांत एकंदर ७५६ आर्या असून पहिल्या ५४ आर्यांत उपोद्घात आणि शेवटच्या सहांत ग्रंथोपसंहार आहे. ग्रंथ श्रृंगाररसात्मक आहे. (वि. विस्तार. पु. २१. अं. ९-१०).

गोवळकोंडा—उ. अ. १७°२३'' व पू. रे. ७८°२४.'' हैद्राबादच्या पश्चिमेला पांच मैलांवर वसलेलें एक पडकें व जुनें शहर आणि किल्ला. हा किल्ला वरंगळच्या राजांनीं बांधला. १३६४ मध्यें तो बहामनी घराण्यांत गेला. १५१२ मध्यें कुतुबशाहीनें घेतला. १६८७मध्यें औरंजेबानें आठ महिनेपर्यंत येथें वेढा दिला होता. गोवळकोंड्याचा इतिहास 'कुतुबशाही' या लेखात आढळेल. किल्ला ग्रानाइटच्या खडकावर असून त्याच्या भोंवतीं बरेच तट आहेत. सर्वांबाहेर पक्क्या दगडांचा ३ मैल परिघाचा तट असून त्याला आठ दरवाजे व ८७ बुरूज आहेत. कांहीं बुरुजांत जुन्या तोफा वगैरेंचे मोठे तुकडे पडले आहेत. तटाच्या आंत मशिदी, घरें व इतर इमारती वगैरेंचे पडीत भाग सर्वत्र पसरलेले आहेत. फक्त बालाहिसार (बालेकिल्ला) मात्र अद्याप टिकला आहे. किल्ल्याभोंवतीं खंदक आहे पण तोहि बहुतेक बुजून गेला आहे. शहराच्या उत्तरेस बादशाही कबरस्तान आहे पण तेथील सर्व इमारतींना कालगतीनें व विशेषतः औरंगजेबाच्या तोफांनीं फारच हानी पोहोंचली आहे. गोवळकोंडा येथें हल्लीं थोडीशी अरब शिबंदी व गोवळकोंडाब्रिगेड हीं असतात. दक्षिणेकडून मूशी नदी वहाते. गोवळकोंड्याच्या आसपास पूर्वी हिरे सापडत असत व ते गोवळकोंड्याचे हिरे म्हणून प्रसिद्ध होते. खुद्द गोवळकोंडा येथें मात्र हिऱ्याच्या खाणी वगैरे कांहीं नाहींत.

गोविंद कवि—हा तेलंगी तंजावरच्या तेलगू राजाच्या वेळीं उदयास आला. त्यानें गुजराथची कन्या इंदुमति हिच्या स्वयंवरावर काव्य रचिलें. त्याला इंदुमतिपरिणय असें नांव दिलें. याशिवाय त्यानें द्राविड देशांतील अनेक देवालयांचा वर्णनात्मक इतिहास लिहिला आहे.

गोविंदगड—(१) रेवासंस्थनामधलें एक शहर. उ. अ. २४° २३' व पू. रे. ८१° १८'. कैमुरफड्याच्या टोंकांवर वसलें आहे. उंची १२०० फूट. लो. सं. (१९११) ४९१९. शहर उंचावर असल्यानें कड्यावरून खालच्या मुलुखाची व अरण्याची शोभा दिसते, व जवळच्या संरक्षित जंगलांत शिकार सांपडते. राजेसाहेबांचा येथें एक बंगला आहे. शाळा, पोस्ट, दवाखाना वगैरे मामूल गोष्टी आहेत.

(२)—अलवार संस्थानांतलि गोविंदगड तालुक्याचें मुख्य ठिकाण. येथील किल्ला महारावानें बांधला (१८०५). गोविंदपूर येथें म्यु. क. आहे. पूर्वी हा तालुका आग्रा सुभ्यांत मोगलांच्या हातीं होता. १८०३ मध्यें महाराव राजा बखतावरसिंग याच्या करितां मराठ्यांनीं घेतला. तेव्हांपासून तो अलवारकडेच आहे. तालुक्यांत लो.सं. २०,६४६. खेडीं ५७ व शहर एक गोविंदगड. त्याची लो. सं. (१९११)३८७९.

गोविंदगड (भटिन्डा)—पतियाळामधला एक तालुका. क्षेत्रफळ ८६८ चौ. मै. लो.सं (१९११)१६६२५७. सारा व कर यांचें उत्पन्न (१९०३-४) २.७ लाख. भटिंडा शहर हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. खेडीं २०२ आहेत.

गोविंद ठक्कुर—याचा बाप केशव, आई सोनादेवी बाई, वडिल भाऊ रुचिकर कवि, गुरु नारायण व धाकटा भाऊ श्रीहर्ष कवि होता. यानें दोन प्रदीप व दोन दीपिका केल्या होत्या असें एका पद्यावरून दिसतें. यानें मम्मटाच्या काव्यप्रकाशावर टीका केली आहे. याच्या टीकेला 'छाया टीका' म्हणतात. इतरहि टीकाकारांनीं मम्मटाच्या वृत्तीवर टीका केली आहे. यानें मम्मटाच्या कारिकांवर त्याच्या टीकेसारखीच वृत्ति स्वतः लिहिली आहे. म्हणून याची टीका ही मम्मटाच्या वृत्तीवर टीका नव्हे तर कारिकांवर स्वतंत्र वृत्ती असल्यामुळें मम्मटाच्या वृत्तीच्या छायेची उपमा देतात. मम्मटानें दिलेल्या पद्यांखेरीज यानें कांहीं अधिक उदाहरणपद्यें दिलीं आहेत. या टीकेंत भास्कर भट्टाचार्य व चंडीदास भट्टाचार्य यांचीं नांवें आढळतात. यानें एक काव्य केलें होतें व याचा धाकटा भाऊ श्रीहर्ष यानेंहि एक काव्य केलें होतें. असें त्यांतून उदाहरणादाखल घेतलेल्या श्लोकांवरून दिसतें. काव्यप्रकाशांतील (मम्मटाच्या) उदाहरणपद्यांवर उदाहरणदीपिका नांवाची टीका यानें केलेली आहे. याच्या प्रदीप नांवाच्या टीकेवर वैद्यनाथानें प्रभा नांवाची व नागोजी भट्टानें उद्योत नांवाची टीका केली आहे. हा तर्कशास्त्रज्ञ होता. [वि. वि. पुस्तक २२ अंक १-२].

गोविंदपंत बुंदेले—याचें मूळगाव रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवरें असून हा तेथील कुळकर्णी होता. हा तेराचौदा वर्षांचा असतांना याचा बाप (बाळाजी) वारल्यानें कुळकर्णाचें काम त्याच्यावर पडलें. याचें सबंध नांव गोविंद बल्लाळ खेर असून हा कऱ्हाडा ब्राह्मण होता. जातीनें हूड असल्यानें कुळकर्ण बराबर चालेना व भाऊबंदांनींहि त्रास दिला त्यामुळें व नेवरें येथील बर्व्यांचें उदाहरण पाहून हा तेथून देशावर आला व पुण्यास थोरल्या बाजीरावाजवळ त्यानें शागीर्दाची नौकरी धरली. पुढें त्याच्या अंगचे अनेक गुण दृष्टोत्पत्तीस आल्यानें बाजीरावानें त्याला नवीनच मिळालेल्या बुंदेलखंडाच्या कारभारावर नेमिलें (१७३३). तिकडे त्यानें शौर्यानें व धूर्ततेनें वागून रजपूत राजांवर दाब बसवून मराठी राज्याचा दरारा पसरविल्यानें त्याची प्रमुख मराठे सरदारांत गणना होऊं लागली. हळू हळू त्यानें नवीन किल्ले बांधून व ठाणीं घालून राज्यविस्तारहि केला. कुरईच्या नबाबाकडून त्यानें जो प्रांत हस्तगत केला त्यांत सागर म्हणून एक प्रचंड तलाव होता. त्याच्या कांठीं सागर नांवाचेंच शहर वसवून, तें त्यानें आपलें राहण्याचें मुख्य ठिकाण केलें (१७३६-३७). पुढें फर्रुकाबादच्या लढाईंत रोहिल्यांचा जंगी पराभव करून ज्या मराठेसरदारांनीं दिल्लीच्या बादशहास धाक बसविला व ज्या लढाईबद्दल "शाबास तुमच्या हिंमतीची व दिलेरी रुस्तुमेची" अशी शाबासकी पेशव्यांकडून मिळविली, त्यांत गोविंदपंतहि एक मुख्य सरदार होता (१७५१). राजवाडे यांनीं याला पानपतप्रकर्णी आपमतलबी म्हणून अपयशाचा बराच मोठा वाटा त्याच्या माथीं मारला आहे परंतु सरदेसायांच्या मतें तें चूक आहे. त्यांचें म्हणणें कीं, "त्याच्याहिपेक्षां मल्हारराव वगैरे दुसऱ्या अनेक व्यक्ती आपमतलबी होत्या, व पंत आपमतलबी नसता तरीहि तेवढ्यानें पानपतचा परिणाम कांहीं निराळा झाला असता असें नाहीं. पंताचीं २८ वर्षे त्या प्रांतांत गेल्यानें त्याला तिकडील सर्वत्रांची खडानखडा माहिती झाली होती. तो मूळचा कारकुनी पेशाचा असून प्रसंगानें शिपाईगिरीचें काम त्याच्यावर शक्तीबाहेर पडल्यानें त्यास यश आलें नाहीं. तिकडील कापड व निरनिराळ्या चिजा तो पेशव्यांस पुरवीत असे. त्याचा धाकटा भाऊ पुण्यास दरबारांत वकील असे. उत्तरेकडील कामाविशीचा पुष्कळ पैका तो पुण्यास धाडी; चौदा लाखांपर्यंतची ही रसद दरसाल नियमीतपणें धाडण्याबद्दल त्याची ख्याती होती. त्याला पालखीची नेमणूक १७५० त झाली. रोहिल्यांच्या युद्धापासून त्याच्या प्रांतांत दंगे फार होऊं लागल्यानें वसुलास अडचण पडली व त्याचा पानपतावर कळस झाला. अर्थात् यांत मुद्दाम लबाडी केल्याचा आरोप सिद्ध होत नाहीं. त्यानें आपल्या या अडचणी नेहमीं आपल्या भावास कळविल्या आहेत. सर्व कारस्थानांची माहिती ठेवून, कोणाशींहि विकोपास न जातां, सावधगिरीनें आपला मार्ग सुधारावा असा त्याचा स्वभाव होता. मात्र तो थोडा बहुत संशयी व कपटी असावा. हिंदुस्थानांत उत्तम व जय्यत अशी वीसहजार फौज सतत पाहिजे अशी त्याची पेशव्यांकडे सक्त मागणी आहे; नाहींतर "रांगडे लोक हरामजादे...फौज नसलिया बंदोवस्त राहणार नाहीं, वसूल येणार नाहीं, इयगय जालिया फजिती" असें तो स्पष्ट लिही (१७५५). पुढें शिंदेहोळकरांतील तंट्याबद्दल लिहून, 'पातशहांत व वजिरांत कलागत लागली, त्यामुळें सरकारी कार्य जें म्हणावें तें होणार असा समय कधीं येणार नाहीं' तरी आपण या, असा तो १७५६ त पेशव्यांना आग्रह करी. परंतु या संधीचा फायदा पेशव्यांनीं घेतला नाहीं. पंतानें बकुल्लाखानास बडवून सर्व कुराकडा प्रांत काबीज केला; परंतु राघोबादादानें तो आपला मेहुणा गोपाळराव बर्वे याच्या हवाली केला. त्यामुळें पंत व बर्वे यांचें वाकडें आलें. या कुराकडा प्रांतांत १८ परगणे होते. पुढें त्यानें अंतर्वेदी जिंकून इटावा येथें जबरदस्त लढाई देऊन अस्करअल्लीस ठार केलें (१८५६) व पुष्कळ प्रांत मराठी राज्यास जोडून १७५७ त देशीं परत आला. यानंतर अबदालीच्या स्वाऱ्यांमुळें उत्तरेस वसूल बरोबर जमत नसे व अशा तक्रारी पंतानेंच एकट्यानें केलेल्या नसून शिंदेहोळकरांनींहि केलेल्या आहेत. देशीं आल्यावर त्यानें वाईजवळील वाकेश्वराचा जीर्णोद्धार करून देवास बावधन येथें इनाम दिलें. बावधनास तो रहात असे. हल्लीं तेथें त्याचा पडका वाडा आहे. हिंदुस्थानांत परत जातांना पेशव्यांनीं त्याचा गौरव केला होता. कुंजपुऱ्याच्या (१७६०) अबदालीच्या लढाईंत पंत हजर होता.

उत्तरेंत आल्यापासून मरणपावेपर्यंत (१७५८-६०) पंत एकसारखा लढायांत खपत होता. त्याचे हिशेब तपासण्यास पुण्याहून सरकारांतून हिशेबतपासनीस गेले होते. परंतु रोहिल्यांच्या मोहिमा न संपल्यामुळें हिशेबाचें काम तसेंच राहिलें आणि पुढें तर पानपतच झालें. पंतावर काढिलेली कलमें (शक) इतर पुष्कळ सरदारासहि लागू होतीं. भाऊसाहेबांनीं पानपत मोहिमेंत पंताकडून तिकडील माहितीचें पुष्कळ सहाय्य घेतलें होतें (राजवाडे खंड १ पहा). नोव्हेंबरमध्यें पंतानें अब्दालीची रसद बहुतेक बंद पाडली व त्याला शहहि दिला (काशीरामाची बखर). तो उठविण्यास आताईखान हा शिकारीच्या निमित्तानें गाजिउद्दीन नगराजवळ पंतावर चालून आला; त्यावेळीं खानानें लबाडीनें होळकरांचें निशाण पुढें धरलें होतें; त्यामुळें पंत फसला. एकाएकीं कापाकापी झाली. तींन घोड्यावरून पडल्यानें पंत आताईखानाच्या हातीं लागला.खानानें त्याचें शीर कापून अब्दालीकडे व त्यानें तें भाऊसाहेबाकडे पाठविलें (२२ डिसेंबर १७६०). पंताचा मुलगा बाळाजी हा व त्याचे वंशज पेशवाई अखेर बुंदेलखंडप्रांतीं कारभार करीत असत. पुढें या घराण्याच्या सागरकर व जालवणकर अशा दोन शाखा झाल्या. [राजवाडे खं १; मराठी रियासत मध्यविभाग ३; इतिहाससंग्रह; भारतवर्ष पु. १].

गोविंदपुर—बिहार-ओरिसा मानभूम जिल्ह्यांतील हा एक तालुका आहे. यांत क्षेत्रफळ १२७चौ. मै. व लोकसंख्या (१९११) ४५०७५. शहर मुळींच नाहीं. खेडीं २४५. झेरिआच्या कोळशाच्या खाणी याच भागांत आहेत. त्यांच्या कामाच्या वाढीबरोबर लोकसंख्या वाढत आहे. मुख्य ठिकाण गोविंदपूर आहे.

गोविंदराव काळे—यांच्या वडिलाचें नांव कृष्णराव बल्लाळ असून ते काशीस रहात असत. त्यांनीं दक्षिणेंत येऊन बाबूजीनाईक बारामतीकराचे तर्फे नानासाहेब पेशवे यांच्या वेळीं मराठेदरबारीं प्रवेश मिळविला. पुढें राघोबादादांच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांत यांनीं कामगिरी केल्यानें यांना दहा हजारांची तैनात व पालखीची नेमणूक झाली. राक्षसभुवनाच्या लढाईच्या सुमारास यांना निजामाकडील पेशव्यांची वकिली मिळाली व तैनात पंधरा- हजारांची वाढवून एकंदर सरंजाम तीस हजारांचा दिला. तिकडे निजामानेंहि यांस पंधरा हजारांचा जातीस सरंजाम व चाळीस हजारांचा लष्करी सरंजाम दिला. पुढें कृष्णराव वारल्यानंतर त्यांचे पुत्र गोविंदराव यांस निजामाकडील वकिलातीचें काम मिळालें. खर्ड्याच्या लढाईस जीं कारणें घडलीं, तीं गोविंदरावांच्या कारकीर्दीत झालेली होतीं. गोविंदराव हा नानाफडणीसांचा प्रथम विश्वासु अनुयायी होता; परंतु तोच पुढें रावबाजींनां फितुर होऊन नानांना कैदेंत टाकण्यास तयार झाला. यावेळीं रावबाजींनां सल्लामसलत देणाऱ्या अमृतरावादि कारभारीमंडळांत गोविंदराव मुख्य होता. पुढें दौलतराव शिंद्यानें रावबाजीवर जरब बसविण्यासाठीं टिपूकडे वकील पाठविला असतां गोविंदरावाच्याच युक्तीनें दौलतरावाची ती मसलत फिस्की पडली. रावबाजीनें पुन्हां नानांना कैद करण्याकरितां खटपट चालविली असतां, तींत हा मुख्य होता; परंतु शिंद्यानें ही बातमी नानांना आगाऊ दिल्यामुळें त्यांनीं रावबाजीस खुलासा विचारला असतां, रावबाजीनें ही गोष्ट नाकारून उलट गोविंदरावास कैद करण्यास सांगितलें; त्याप्रमाणें नानांनीं त्यास कैदेंत टाकलें (१७९९); तरीहि त्यानें रावबाजीचें नांव सांगितलें नाहीं. यावेळीं त्याचा सव्वा लक्षाचा सरंजाम होता तो जप्त करण्यांत आला. टिपूवरील दुसऱ्या स्वारींतहि हा हजर होता; त्यावेळीं त्यानें उत्तम कामगिरी बजावल्याबद्दल इंग्रजांनीं त्यास दोन तोफा बक्षीस दिल्या होत्या. रावबाजीच्या शेवटच्या दिवसांत हा त्यांचेबरोबर अखेरपर्यंत होता. पुढें (१८१८) इंग्रजींत हा बारामतीस येऊन राहिला; त्यावेळीं त्यांस पेशवाईतील दोन गांव इनाम व पोलिटिकल पेनशन तीन हजार इंग्रजांनीं कायम केलें. यास कृष्णराव नांवाचा पुत्र होता. गोविंदराव १८२३ पर्यंत हयात होता. पेशवाई गेल्यानंतर इंग्रजीराज्याविरुद्ध एक गुप्त कट झाला होतो त्यात गोविंदराव सामील होता असें भासविण्याचा कांहीं- जणांनीं प्रयत्न केला, तथापि त्या म्हणण्यावर एल्फिन्स्टनचा विश्वास नव्हता. तथापि त्याला धरून आणण्यास शिबंदी गेली; परंतु त्याच वेळीं तिकडे गोविंदराव मृत्यु पावून त्याची प्रेतयात्रा चालली होती. तें ऐकून एल्फिन्स्टन म्हणाला कीं, "थोर मुत्सद्याची अब्रु मृत्यूनें बचावली." ही एक दंतकथा आहे. याचें निरीक्षण सूक्ष्म असे; त्यास एकदां निजामाचें उघडें शरीर पाहण्याची संधि आली होती. त्यावेळीं त्यानें तें बारकाईनें पाहून त्याचें वर्णन खुलासेवार नाना फडणिसांना कळविलें होते. [डफ; इतिहाससंग्रह. वर्ष १. अं. ४; व. ३. अं. ४ वाड-कैफियती.]

गोवें, प्रां त.— उत्तर अक्षांश १४ ° ५३' ते १५ ° ४८' व पूर्वरेखांश ७३ ° ४५' ते ७४ ° २४' यांच्या दरम्यान १३०१ चौ. मै. क्षेत्रफळाची ही पोर्तुगीज वसाहत पश्चिम किनाऱ्यावर आहे. याची दक्षिणोत्तर कमाल लांबी ६२ मैल व पूर्वपश्चिम कमाल रुंदी ४० मैल आहे पोर्तुगीजांनीं गोवा बेट १५४० मध्ये घेतलें व सांसष्टी १५४३ मध्ये घेतलें आणि बारदेश सन १५४३ मध्ये घेतलें हे दोन प्रांत मिळून जुनी काबिजात आणि पेडणें, वटग्राम, सतारी, फोन्डा, पंचमहाल व कनकोन हे जिल्हे व नवी काबिजात मिळून एकंदर गोवें प्रांत होतो. नवीन मुलुखाची संपादणी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत झाली. कारवारसमोरचें अंजिदिव बेट १५०५ मध्यें घेऊन तें गोवें प्रांतांत समाविष्ट केलें.

हा सर्व प्रदेश विशेषतः नवीन काबिजात, डोंगर व पहाड यांनीं पूर्ण आहे. सह्याद्री व त्याच्या शाखा यांतून

पसरल्या असून त्यांची उंची ३५०० ते ४००० फूट आहे. सोनसागर, दुधसागर वगैरे शिखरें आहेत. या प्रदेशांत नद्याहि बऱ्याच आहेत. त्यांत आठ मुख्य आहेत. त्यांतून बोटीहि चालतात. मांडवी वगैरे ३८।३९ मैल लांब असून त्यांच्या शाखा बऱ्याच फुटतात. या सर्वांतून होड्या चालतात.

या प्रदेशांत साष्टी व बारदेश यांच्या भूशिरांनीं एक छानदार बंदर बनलें आहे. या दोहोंच्या मध्यें गोवा बेटाचें भूशीर घुसतें व अग्वादा आणि मारमागोवा अशीं दोन उपबंदरें बनलीं आहेत. पैकीं पहिलें पावसाळ्यांत बंद असतें. दुसरें बाराहि महिने उघडें असतें. लॅटेराईट नांवाचा दगड सर्वत्र व मुबलक आहे. जमिनीची भूस्तरशास्त्रीय पहाणी अद्याप झाली नाहीं. हवामान उष्ण आहे. पावसाचें सरासरी मान ९० इंच आहे. सर्प, विंचू वगैरे विषारी प्राणी थोडे असून वाघांचा फारसा उपसर्ग होत नाहीं. ताप, आमांश वगैरे किरकोळ रोग चालू असतात.

पुराणांतरीं या देशाविषयीं विविध गोष्टी आहेत. पुराणांतील या प्रदेशाच्या नांवांपैकीं कांहीं नांवें शिलालेख वगैरेंतून आढळतात. गोमांतक हें त्यांतलेंच एक आहे. स्कंधपुराण सह्याद्रिखंड यांत असें लिहिलें आहे कीं, तिहोत्तरपूर (हल्लींचें तिरहूट) येथून परशुरामानें बरेच आर्यलोक येथें वसाहतीकरितां आणले. परशुरामानें गौड ब्राह्मणांचीं दहा कुलें बंगाल्यांतून आणिलीं व या ब्राह्मणांनीं सासष्टी, तिसवाड (यात तीस गांवें आहेत) या भागांतील ९६ गांवांत आपली वस्ती केली म्हणून यांनां शाणवी-शेणवी-म्हणूं लागले. कांहीं शिलालेख वगैरेंवरून १३१२ पर्यंत येथें बनवासीचें कदंब घराणें राज्य करीत होतें असें दिसतें. कदंबांनीं गोवें ही राजधानी केली होती. १३१२ मध्यें हा प्रदेश मुसुलमानांच्या हातीं गेला. १३७० मध्यें विजयानगरचा प्रधान विद्यारण्य माधव यानें येथें आपला अंमल बसवला; १४७० मध्यें बहामनी राज्यांत याचा समावेश महमद गव्हाण यानें केला; १४९८ च्या सुमारास आदिलशाहीनें आपला अंमल या प्रदेशांत बसवला. व १५१० मध्यें अल्बुकर्क यानें हा प्रदेश घेतला. इकडील ग्रामसंस्थांची रचना पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें. त्या वेळीं या फिरंग्यानें तीन दिवसपर्यंत गोवा शहरावर हरतऱ्हेचा जुलूम केला व १०।१२ लाखांची लूट केली. यापुढें गोवा येथें पोर्तुगीजांचें मुख्य ठाणें राहिलें व गोवा शहर चैनी व भपकेबाज लोकांचें ठिकाण बनलें व त्यामुळेंच त्याला पुढें उतरती कळा लागली. गोव्याला 'सुवर्ण खचित शहर' म्हणत इतकें वैभव तेथें भरलें होतें. लष्करी बाणा सुटला पण बडेजाव कायम राहिला. जुवेबाजी व इतर शोक वाढले आणि सर्वत्र आळस, चैन, व अनीति यांचा सुळसुळाट झाला व गोवानीज सत्ता व डामडौल यांचा डोलारा डच लोकांच्या आगमनानें डळमळूं लागला. फिरंग्यांनीं बाटविण्याच्या बाबतींत फार जुलूम केला. गांवांतील एखाद्या विहिरींत एखादें हाडूक टाकून गांवचागांव बाटविला जाई. अशा रीतीनें बाटयांची संख्या फार वाढल्यानें माधवतीर्थावर त्यांनां गुपचुप प्रायश्चित्तें देण्यास सुरुवात झाली, पण पाद्री लोकांनां ही बातमी पोहोंचतांच त्यांनीं तें तीर्थच हाडूक टाकून बाटविलें. त्यावेळीं शेंडीवर प्रत्येकीं आठ रु. प्रमाणें कर असे व त्याचें उत्पन्न तीन हजारांचें येई. फिरंग्यांच्या सहवासानें कोंकणी भाषेवरहि परिणाम होऊन बरेचसे फिरंगीभाषेचे शब्द या भाषेंत घुसले आहेत. १६०३ मध्यें डचांनीं गोव्याला वेढा दिला तो त्यांनां उठवावा लागला. पण हलके हलके थोडा थोडा पोर्तुगीज मुलूख त्यांच्या घशांत उतरत होता. १६३९ त तसाच दुसरा प्रयत्न त्यांनीं गोव्यावर केला पण तोहि फसला. "शहरभर चर्चे व सुंदर इमारती" आहेत. जगामध्यें दुसरीकडे क्वचितच दिसणारें वैभव पोर्तुगीजांच्या वाटयास हिंदुस्थानांत आलें आहे व गोवा हें प्रति रोम शहर आहे पण या सर्वांच्या मुळाशीं पोर्तुगीजांचा पोकळ डौल व खोटा अभिमान यांची कीड लागली आहे." अशा तऱ्हेचीं वर्णनें त्यावेळच्या कांहीं प्रवाशांनीं केलीं आहेत. गोव्याची त्या वेळची इतकी अनुकंपनीय स्थिति झाली होती कीं, स्थानिक स्वतंत्रतावादी मूठभर लोकहि निकरानें प्रयत्न करते तर गोवा लढवण्याचें सामर्थ्य व धमक पोर्तुगीजांत राहिली नव्हती. संभाजीमहाराजांच्या हातून हा प्रदेश स्वतंत्र होण्याचा योग अगदीं आलाच होता पण त्यांनां मध्येंच मोंगल सैन्याशीं टक्कर द्यावी लागल्यानें गोव्याचा बचाव झाला. यानंतर सावंतवाडीचे भोंसले व इतर मराठे यांच्याशीं फिरंग्यांच्या नेहमीं चकमकी होत असत व हे एकमेकांचे मुलूख व किल्ले घेत असत. वसईच्या मोहिमेच्या सुमारास व्यंकटराव घोरपडे यानें गोव्यावर स्वारी करून साष्टी प्रांत काबीज केला होता (१७३९ जानेवारी). इ. स. १७४१ त १२००० यूरोपियन शिपाई गोव्यास कुमकेस आले व त्यांनीं बऱ्याच लोकांची कत्तल करून वाडीकरांकडून किल्ले परत घेतले. व वाडीवर आपली अधिसत्ता बसविली. इतक्यांत वरिष्ठ सरकार (लिस्बन) कडून घेतलेले किल्ले व मुलूख वाडीकरास परत देण्यास व सावंत व मराठे यांच्याशीं वैर थांबविण्यास हुकूम आला पण त्याप्रमाणें घडलें नाहीं व हे खटके तसेच चालू राहिले.

गोवा शहरची निकृष्टावस्था वरिष्ठसरकारच्या नजरेस येऊन बराच काळ लोटला होता म्हणून यावेळीं त्यांनीं पणजी येथें नवीन गोवा शहर बांधण्याकरितां खर्च मंजूर केला. कारण जुनें शहर सुधारण्याची आशा नव्हतीच व त्यावर गैरवाजवी खर्च होऊन चुकला होता. या सुमारास मराठे व स्थानिक लोक मिळून आपलें स्वातंत्र्य मिळवू

पद्धतील म्हणून २००० यूरोपियन कवाइती सैन्य अय्यत ठेवावें लागे. यावेळीं चर्च वगैरेंचाहि बराच खर्च होता.

एतद्देशीय व्यापारी लोकांचा छळ करून त्यांनां त्यांच्या स्वतःच्या मुलुखांतून काढून देण्यांत आलें होतें व सर्व व्यापार जेसुइटांच्या हातांत गेला होता. लष्करी थाट व पदव्या यांचा डामडौल अद्याप सुटला नव्हता व ज्या कामावर एखाद्या साध्या माणसाची जरूर तेथें बड्या सरदाराची नेमणूक होणें जरूर वाटत असे.

इ.स.१७९४ ते १८१५त हिंदी पोर्तुगीज मुलुखाच्या व्यवस्थेकडे खुद्द वरिष्ठ सरकारचें लक्ष गेलें होतें. फ्रेंच लोकांचा हक्क होऊं नये म्हणून मध्यें इंग्रजी सैन्यहि मदतीला नेलें होतें. यानंतर सुमारें वीस वर्षे शांततेचीं गेलीं. पण १८४२त पुन्हां एकदां गडबड होण्याचा संभव दिसत होता. व इं. स. १८५२, १८७१, १८९५, १९०१, व १९१२ या साली सैन्यांत असंतोष व सतरी भागाच्या राणे लोकांची स्वतंत्र होण्याची इच्छा यामुळें थोडीबहुत गडबड उडाली होती.१९०१साली या स्वतंत्र होऊं पहाणाऱ्या राणे लोकांनां हद्दपार करून तिमोर येथें पाठवण्यांत आलें. १८७१ च्या गडबडींत सैन्याच्या कांहीं तुकड्या कमी करण्यांत आल्या. या बंडाची हकीकत पुढें दिली आहे. पुढें इंग्रजी बंदोबस्तावर भिस्त ठेवून पोर्तुगीज हद्दींत जास्त सैन्य ठेवण्याची जरूर नाहीं म्हणून पुन्हां भरती करण्यात आली नाहीं. १८०० त जुन्या काबिजातीची लो. सं. १७८४७८ होती. १८५१ त नव्या व जुन्या काबिजातीची मिळून ३६३७८८ होती.१९००मध्यें नव्या व जुन्या काबिजातींत मिळून३ शहरें (जुना मुलूख)व४०७ खेडीं होतीं. स. १९११ ची लोकसंख्या ५४८२४२ होती. गोवे सरकारांत ११५२६ लोक ब्रिटिश प्रजाजन आहेत,तर गोवे संस्थानचे नागरिक ब्रिटिश राज्यांत ६३ हजार आहेत. धर्माप्रमाणें २६८ हजार ख्रिस्ती व २७०हजार हिंदु व अवघे साडेआठ हजार मुसुलमान आहेत. जुन्या काबिजातींत शेकडा ९१ ख्रिस्ती आहेत. नवीन काबिजातींत जवळ जवळ तितकेच हिंदू आहेत. ख्रिस्ती लोक (धर्मांतरित हिंदु असल्यामुळें) जातिभेद वगैरे पाळतात. हिंदू लोक कोंकणी जिल्ह्यांतील लोकांप्रमाणें आहेत. येथें मराठीची पोटभाषा कोंकणी ही भाषा चालते व तींत पोर्तुगीज शब्दांचा बराच भरणा झालेला दिसून येतो. सरकारी कामकाजाची व उच्च सुशिक्षितांची भाषा पोर्तुगीज आहे.

ख्रिस्ती धर्मीयांकरितां प्रायमेट आणि पॅट्रिआर्क पदव्या धारण करणारा आर्चबिशप असतो. त्याची नेमणूक पोपच्या संमतीनें पोर्तुगालचा अध्यक्ष करतो. बहुतेक ख्रिस्ती हे रोमन कॅथोलिक आहेत.

१९११ च्या सुमारास खानेसुमारीप्रमाणें ख्रिस्त्यांत साक्षर पुरुष २५८८६ व स्त्रिया १३६०० आहेत. तर हिंदूंत १५०६८ पुरुष व २५९० स्त्रिया साक्षर आहेत. प्रौढविवाह, पुनर्विवाह वगैरे सुधारणा इकडे झाल्या आहेत.

हिंदूंचीं देवळें विशेषतः नवीन काबिजातींत दिसतात. जुन्या काबिजातींत आरंभीं पोर्तुगीज लोकांनीं धर्मसंबंधीं अतिशय छळ केला व ते कोणालाहि आपले विचार, आचार विधी वगैरे पाळूं देत नसत. सार्वजनिक देवळांतून पूजेला मज्जाव असे.

गोवा शहर व प्रदेश घेतल्यावर जमीनीसंबंधानें लोकांचे हक्कसंबंध पूर्ववत कायम ठेवण्याची खटपट करण्यांत आली. व त्यांच्या करासंबंधानें सवलती वगैरे होत्या त्या कायम ठेवण्यांत आल्या. परंतु मागाहून नवे नवे कर बसवण्यांत आले व त्यांच्या व्यवस्थेकरितां कामदार नेमले गेले. तेथें खेड्यांतून पाटील वगैरे नेमण्याची वहिवाट नाहीं. सर्वसामान्य प्रश्न पंचायत भरवून सोडविले जातात. जुन्या काबिजातींत बहुतेक जमीन समाईक असून सरकारी कर वगैरे वजा जातां सर्व खेड्यांतील लोक उत्पन्न वांटून घेतात. नव्या काबिजातींत तीच पद्धत आहे.पण खेड्यावारी नसून घराणेवारी आहे. अशीं घराणीं त्या मुलुखांत २२२ आहेत व तीं निव्वळ उत्पन्न आपसांत वाटून घेतात. १५२६ मध्यें त्यावेळच्या चालूहक्क सवलतींचें नोंदणीबुक तयार केलें होतें.

एकंदर जमीनीपैकीं सुमारें ⅓ लागवडीखालीं असावी. जमीन चिक्कण आहे पण कोठें कोठें थोडी वाळुकायुक्त व कमी अधिक प्रमाणांत कुजलेल्या वनस्पतींनीं बनलेली आहे. कित्येक ठिकाणीं पूर्ण खडकाळ आहे. राख, मासे व शेण हें इकडे मुख्य खत असतें. जुन्या काबिजातींत लागवड चांगली होते व एकाच्या मालकीचे १०। १५ एकर म्हणजे मोठें शेत असें मानतात.

मुख्य पीक तांदुळाचें आहे. तें दोनदां काढतात. सर्व पीक स्थानिक खपालाच आठ महिन्यांत खलास होतें. नारळ बरेच होतात. शिवाय नाचणी, उडीद, कुळीथ, मूग, तूर वगैरे धान्य होतें. फळझाडांत आंबा, काजू व फणस आणि भाजीपाल्यांत रताळीं, मुळा, कांकडी वगैरे होतात. जुन्या काबिजातींत शेतकऱ्यांची स्थिति बरी आहे. नवीन काबिजातींतील लोक दारिद्र्यानें गांजले आहेत. लिस्बनच्या नॅशनल बँकेची एक शाखा पणजी येथें आहे व मोठमोठे जमीनदार व धर्मादाय फंड यांतून पांच टक्क्यांच्या व्याजानें शेतकऱ्यांनां कर्जाऊ रकमा मिळतात. हिंदूंच्या जिल्ह्यांत व्याजाचा दर शे. १० आहे.

नवीन काबिजातींत मोठीं अरण्यें आहेत. संरक्षित व इतर मिळून ११६ चौरस मैल जंगल आहे व त्याची अंदाजी किंमत ७० लाख रुपये आहे. फिरत्या लागवडीच्या पद्धतीनें जंगलाचें नुकसान होतें म्हणून ती पद्धत सरकारच्या देखरेखीखालीं ठेवण्यांत आली आहे. उत्पन्न २४००० रु. व खर्च १०५०० रु. आहे. इकडे लोखंडाच्या खाणी आहेत पण त्या अद्याप सुरू झाल्या नाहींत [किर्लोस्कर बंधूंनीं मागें या प्रांतांत या दिशेनें कांहीं प्रयत्न करण्याचे

येजिलें होतें असें कळतें. संजय, तारीख ४ आगष्ट १९१८ पहा].

आपल्या वैभवाच्या दिवसांत गोवा हें व्यापाराचें केंद्र होतें. सर्व व्यापार पोर्तुगीजांच्या हातीं होता व इराणी आखाताशीं होणारा घोड्यांचा व्यापार येथूनच होत असे. आतां येथून व्यापार असा फारच थोडा होतो. तरी अद्याप येथील सर्वच कारागीर नष्ट झाले नाहींत. अद्यापि सोनार, लोहार, सुतार व चांभार हे चांगलें कौशल्याचें काम करतात. निर्गत माल मुख्यतः नारळ, सुपारी, आंबा, फणस, दालचिनी, मीठ, काथ्या वगैरे असून आयात माल तांदूळ, कपडा, साखर, दारू, तंबाखू वगैरे आहे. १९०३-४ सालीं कस्टमचें उत्पन्न ५ लाखांचें झालें.

कॅसलरॉकपासून ५१ मैलपर्यंत रेल्वे गेली आहे. १९ इतर रस्ते आहेत, शिवाय लहानमोठे मार्ग आहेत. पणजी हें पोस्टऑफीस (तार ऑफिससह) आहे.

या प्रदेशांत मोठे पूर क्वचितच येतात. अतिवृष्टीनें मात्र कांहीं जिल्ह्यांत बरेंच पाणी होतें. अवर्षण पडलें म्हणजे शेतकरी लोकांचें फार नुकसान होतें. पण इंग्रजी मुलुखांतून धान्य येतें व सामान्यतः महाग तरी पण मिळतें.

गोवा हा पोर्तुगीज साम्राज्याचाच एक भाग आहे असें मानण्यांत येतें व त्यावर गव्हर्नरजनरल ऑफ पोर्तुगीज-इंडिया म्हणून एक अधिकारी असतो. दिवाणी अधिकाराबरोबर लष्करी अधिकारहि त्याच्याकडे असतात. तरी प्रचलित राज्यव्यवस्थेंत कमजास्त करणें किंवा परराष्ट्रीयसंबंध वगैरेमध्यें त्याचे अधिकार मर्यादित आहेत. त्याच्या मदतीला एक लेजिस्लेटिव्ह कौन्सिल असतें. त्यांत ११ निवडलेले व ७ सरकारी सभासद असतात. शिवाय एक्झिक्युटिव्ह कौन्सिलहि आहे. शिवाय आणखी ५ कौन्सिलें आहेत. हल्लीं पोर्तुगालमध्यें लोकसत्ताक राज्य सुरू आहे व त्याचा थोडाबहुत फायदा गोव्यासहि मिळतो.

कारभाराच्या सोयीकरितां 'जुन्या काबिजातीचे' तीन व नव्याचे ७ विभाग पाडले आहेत. या प्रत्येकाचे पुनः पोटविभाग आहेत. प्रत्येक मोठ्या पोटविभागाला कौन्सिलें वगैरे आहेत. मोठ्या (जुन्या काबिजातीच्या) विभागांत म्युनिसिपालिटी आहे.

दिवाणी कामाकरितां गोवा प्रदेश एक विभाग मानतात. याचे कोमॅरकस म्हणून पुन्हां भाग पाडतात व त्याचेहि आणखी पोटविभाग आहेत. प्रत्येक ठिकाणीं स्वतंत्र न्यायाधीश आहे. एकंदर सर्वांवर हायकोर्टाची देखरेख व अधिकार आहे. हायकोर्टाला दिवाणी व फौजदारी हे दोन्ही अधिकार आहेत व तेंच अपीलकोर्ट असून १५०० पर्यंतच्या मालमत्तेसंबंधीं यांचा निकाल शेवटचा समजतात. १५०० वर पोर्तुगालच्या सुप्रीम ट्रिब्युनल पुढें अपील होतें.

१९०३-४ सालीं २० लाख उत्पन्न व तितकाच खर्च झाला. उत्पन्नाच्या बाबी जमिनीवरचा कर, कस्टम, पोस्ट, स्टँप, तंबाखू (लायसेन्सें), दारूवरील कर वगैरे. मीठाचें उत्पन्न म्हणण्यासारखें नाहीं. गोवा येथें टांकसाळ नाहीं.

१८७१ पासून एतद्देशीय सैन्य कमी करण्यांत आलें. त्यासालीं एक यूरोपियन तुकडी पोर्तुगालहून आली. १९०४ सालीं सैन्यसंख्या २७३० होती व पोलीस ३९०. होतें दोहोंसाठीं मिळून खर्च १ लाखाच्या जवळजवळ होता.

शिक्षणाची प्रगति होत आहे. १९१० सालीं शेंकडा १४ शिक्षित होते. १९०३-४ सालीं १२१ (९८ सरकारी व २३ खाजगी) शाळा प्राथमिक शिक्षणाच्या होत्या. सरकारी गॅझेटशिवाय १२ पोर्तुगीज भाषेमध्यें एतद्देशीयांनीं चालविलेलीं वृत्तपत्रें होतीं. एक पुराणवस्तुसंशोधक मासिक होतें. सरकारी, साधे व लष्करी दवाखाने आहेत व बऱ्याच धर्मादाय संस्था आहेत. त्यांतील ४१५ बऱ्याच मोठ्या व जुन्या आहेत.

गोव्यांतील एकंदर बंडें:—झुजितांनु किंवा पोर्तुगीज लोक यांचें ज्यावेळीं वैभव संपलें, त्याचवेळीं त्यांचें शहाणपणहि गेलें. पूर्वींचे गामा, आलेमदा, आलबुकर्क, दों, ज्युवावकास्त्र इ. मासल्याचे साहसी मुत्सद्दी, तसेच कामोंईससारखे कवी, डुकिद सालदान्यासारखे शूर इ. त्याच वेळीं गेले. आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस तर गोव्यास तीन वर्षांत आठ आठ गव्हर्नर जनरल झाले. यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं. त्यावेळीं पोर्तुगीज सरकारनें हें एक मासलेवाईक उदाहरण इतर राजांस घालून दिल्यासारखें होतें. स. १८९६ त जकात व कर मनस्वी वाढले होते. कलाकौशल्य, व्यापारउदीम वाढविण्याच्या हेतूनें बाहेरच्या मालावर शेंकडा ४० रु. प्रमाणें जकात वाढविली होती. त्या वेळीं गोव्यांत गिरणीचा धूरच दिसत नसे. तांदूळ, कपडा वगैरे त्यावेळीं बाहेरून येत असे. निर्गत माल म्हणजे नारळ, आंबे, सुपाऱ्या व खारी मासळी हा होता.

इ.स. १८९६ सालीं झालेल्या दंग्याच्या पायीं लोक हैराण झाले होते. त्या वेळीं बंदोबस्त एकाहि गव्हर्नराच्यानें झाला नाहीं. रा. रावजी राणे यांस मारल्याबद्दल इतर राणे खवळलेले होते, ते पोर्तुगॉलहून ड्यूक ऑफ पोर्टो यास पाठविलेल्या अर्जांच्या प्रत्युत्तराची वाट पहात होते. परंतु अर्जांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. बंड मोडतांना सरकारनें प्रजेचीं घरेंदारें, धान्यसांठा जाळून घरांचे दगडहि पणजीस पाठविले. त्यामुळें साठ हजार लोक त्यावेळीं निराश्रित झाले होते. पुन्हां त्यांनीं पोर्टोच्या ड्यूकास अर्ज पाठविला होता. त्याचाहि उपयोग झाला नाहीं. ही राणे मंडळी सत्तरी प्रांतांची होती. राण्यांनां पूर्वी सरकारनें त्यांचे हक्क कायम ठेवण्याबद्दल व त्यांनां सुशिक्षित करण्याबद्दल आश्वासनें दिलीं होतीं व अशीं आश्वासनें देऊन मग त्यांचा प्रांत खालसा केला होता. परंतु तें एकीकडे राहून त्यांचा शेतसारा चौपटीपासून दसपटीपर्यंत वाढविला गेला. तो देण्यास असमर्थ

शेतकऱ्यांची ८०० रुपयांची जमीन २५ रु. सारा्याकरितां जप्त व्हावी, त्यांची गुरेढोरें न्यावीं असा प्रकार झाला. व्हाइसरायाकडे अर्ज केला तर कांहीं परिणाम होईना म्हणून राणे लोकांनीं वरीलप्रमाणें थोडीशी उचल केली होती. मागें बादशहाचे भाऊ येऊन जी स्वस्थता झाली होती, त्याच्या उलट या वेळच्या फेरेरा या गव्हर्नरनें मुद्दाम मिनिस्टरच्या सांगण्यावरून ही दडपशाही केली म्हणतात. त्यामुळें १८९६ चा दंगा झाला.

स. १८९६ च्या पूर्वी जे दंगे झाले होते त्यांची त्रोटक हकीकत अशी आहे. इ. स. १८२१ त पोर्तुगॉलमध्यें राज्यासंबंधीं फेरफार झाल्यामुळें गोव्यांतील सैन्यानें बंड केलें आणि रियुदे।ार्द ह्या सुभेदारास काबऱ्या किल्ल्यात कैद करून चौघे असामी राज्यव्यवस्था राखण्यास नेमिले. इ. स. १८४४ सालीं वाडी संस्थानांतील फोंडसांवत नामक सरदारानें इंग्रजसरकाराविरुद्ध बंड केलें. त्यांत त्याचे आठ मुलगेहि सामील होते. बंडास विशेष बळकटी येण्याकरितां त्यानें आपला ज्येष्ठ मुलगा आण्णासाहेब याच्या साह्यानें मनोहर किल्ला आपल्या स्वाधीन करून घेतला. परंतु नंतर मेजर देलामोत यानें छापा घालून तो परत घेतला. त्या वेळीं निरुपाय होऊन ते गोव्याच्या सरहद्दीवर ३ सलकर व हवेलकर देसाई यांच्या आश्रयास जाऊन राहिले. त्यांनींहि त्या वेळीं मोठें बंड माजविलें होतें. मेजर जेकब सांवतवाडीचा पोलिटिकल एजंट यानें बंडवाल्यांस धरण्याकरितां ३००० रु. चें व फोंड सांवताचे मुलगे भीम सांवत, तान सांवत, हनुमंत सांवत, अप्पा देसाई आणि फोंड सांवत यांस धरण्याकरितां रु. २००० चें बक्षीस लाविलें होतें. हें वर्तमान समजतांच त्यांनीं अण्णासाहेबासहित पोर्तुगीज सर सुभेदार जुजे फेरेरा पेस्तान याकडे जाऊन आश्रय मागितला. फिरंगी सुभेदारानें त्यांचा चांगला इतमाम ठेऊन त्यांस पणजी येथें ठेविलें. हें वर्तमान इंग्रजांस समजताच मुंबईचे गव्हर्नर यांनीं कॅप्टन ऑर्थर यांस गोमांतकांत पाठविलें, परंतु त्याच्या वकिलीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर जेकब स्वतः पणजीस आला पण त्याचेहि श्रम व्यर्थ गेले. इ. स. १८४७ त अण्णासाहेब व दुसरे बंडवाले यांनीं जेकब यास फिरंगी सरकारच्या संमतीनें अपराधाची क्षमा करावी म्हणून पत्र लिहिलें, त्यास अनुमोदन मिळून माफी झाली. त्या सर्वांस फिरंगी सुभेदारनें सोडून बाकीच्या बंडवाल्यांस समुद्रपार केलें.

इ. स. १८५२ सत्तरींचे राणे व सरदेसाई यांच्या कांहीं मागण्या गोव्याचा सुभेदार बारांव दे वोरे यानें कबूल केल्या नाहींत; म्हणून त्यांनीं दिपाराण्याच्या हाताखालीं फिरंगीसरकारविरुद्ध बंड केलें. बंडवाले ५०० होते, ते प्रसिद्धपणें लढाईस तयार असत. ते श्रीमंतांस व गरीबांसहि त्रास देत. त्यामुळें सगळे लोक भयभीत होऊन गेले. अशा प्रसंगीं बांडे लोकांनींहि संधि साधून लूट सुरू केली. पथे म्हणून केरचे भट तेहि निष्ठूरपणें लोकांस त्रास देऊं लागले. ज्या वेळीं दिपाराण्यानें कुंभारजुवें बेट लुटलें, त्या वेळीं पथ्यांनीं बहुतेक घरें जाळून टाकिलीं.

राणे लोकांची रीत निराळी होती. त्यांनीं एकदम घरांत शिरून मालकास पकडावें व त्याच्या तोंडून माहिती काढून घेऊन लुटालूट करावी. 'राणा आला रे राणा आला' असें एकानें म्हटलें कीं सर्व लोक आपली चीजवस्त कोठें तरी लपवून डोंगरावर जाऊन दडत व उजाडलें म्हणजे घरीं येत. इकडे केरीचे भट यांनीं भरवस्तीचीं गांवें उध्वस्त करून टाकलीं. अशा तऱ्हेचा प्रजेचा छळ झाला तेव्हां फिरंग्यांनीं बंडवाल्यांपैकीं कित्येकांस पकडून अर्धे गाडून त्यांचीं डोकीं उडविलीं व इतरांस तोफेच्या तोंडीं दिलें व बहुतेक लष्कर बंडखोरांचा पाठलाग करण्यास पाठविलें. यावेळीं बहुतेक सैन्य काळ्या लोकांचें होतें. त्यांची बंडवाल्याशीं गांठ पडली कीं ते पळून जाई. त्यांत फोंडे महालांतील सेनाधीश 'माज्योर' यानें महत्प्रयासानें तें बंड मोडलें. या सरदारानें कांहीं जणांस फोंडेजवळच फांशीं देऊन इतरांस जेथें सांपडतील तेथें गोळी घालून मारलें.

नंतर बंडखोरांचा व सरकारचा सल्ला झाला; तेव्हां पेस्तान हा सुभेदार होता. त्यावेळीं दिपा राण्यास ५०० रु. वर्षासन करून द्यावें लागलें. तेव्हां राण्याच्या नांवावर जे लुटारू लोक बंड करीत होते ते अजीबात स्वस्थ बसले.

इ. स. १८७० त पेस्तानच्या कारकीर्दींत गोमांतकांत सर्वत्र शांतता होती. इतक्यांत फौजेनें एकाएकीं बंड केलें. हें बंड करण्याचें कारण असें झालें कीं, इ. स. १८६९ च्या डिसेंबर २ तारखेस पोर्तुगॉलच्या बादशहाकडून जें आज्ञापत्र आलें होतें त्यांत कांहीं लष्करी लोकांस बडतर्फ करून बाकीच्यांचा पगार कमी करावा असें होतें त्यावरून शिपाई लोकांनीं बंड उभारलें या वेळीं गोमांतकांत, मठग्राम, फोंडें, डिचोली, पणजी या शहरांत ३००० वर सैन्य होतें.

त्याशिवाय म्हापसें येथेंहि होतें, पणजीचें लष्कर म्हणण्यासारखें सरकारच्या ताब्यांत होतें. मठग्राम येथील पहिल्या पलटणींतील कांहीं शिपायांस बडतर्फ केलें, हें जिकडे तिकडे समजतांच सगळ्या लष्कराचा एकोपा झाला. प्रजा सगळी घाबरून गेली. गव्हर्नर पेस्तान हुशार होता. त्यानें त्यांचें मागणें मान्य करून त्यांस माफी दिली. चारीहि पलटणी फिरल्यावर त्याचा नाइलाज झाला. त्यानें त्यावेळीं निवडक मंडळी बंडवाल्यांचा काय उद्देश आहे हें समजून घेण्याकरितां पाठविली होती.

नंतर विस्कोंददे सां जानुआर याच्या कारकीर्दींत तसेंच बंड झालें. हा सुभेदार जात्या शूर शिपाई होता. त्यानें पणजी शहराभोंवतीं तोफा मांडल्या, पणजी शहर केवळ समरांगण होऊन गेलें होतें. सर्व पलटणा एकत्र झाल्या हें वर्तमान सर सुभेदार यांस समजताच, राजवाड्याकडे येण्यास जेवढे मार्ग होते, तेथें त्यांनीं चार मेढेकोट उभारले, आणि गोलंदाज लोकांस असा हुकूम सोडला कीं, जर

बंडवाले शहरावर चालून येतील तर त्यांवर एकदम तोफा सोडाव्या. नंतर शहरसंरक्षणार्थ जेवढे राजनिष्ठ लोक होते, त्यांकडून शपथ घेवविली. दुसऱ्या दिवशीं लोकांत जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो प्रसिद्ध होताच बंडवाले आपपल्या छावणींत परत गेले व बंड आपोआप मोडलें. यावेळीं दों आगुस्त हा त्यावेळच्या बादशहाचा भाऊ आला होता, त्यानें बंडवाल्यांनां माफी दिली. यानंतर सन १९१२ सालींहि राणे लोकांनीं बंड केलें होतें. [इंपेरियल ग्याझे. पु. १२; मेंदेस, पोर्तुगीज इंडिया; कुज्ज गोवा. केसरी. ३।३।१८९६, १२।८।१८९६.]

शहर.—उ. अक्षांश १५°३०' व पू. रेखांश ७३°५७'. पोर्तुगीज हिंदुस्थानची राजधानी. मांडवी नदीच्या मुखापाशीं हें शहर वसलें आहे. गोवा या नांवाचीं तीन शहरें होतीं. पहिलें अगदीं जुनें हिंदूंच्या वेळचें; याचा आतां मागमूसहि नाहीं, दुसरें मुसलमानांचें म्हणजे जुनें गोवें अथवा रोमन कॅथोलिक पंथाचें पूर्वेकडचें आद्यपीठ व तिसरें नवें गोवें अथवा राजकीय सत्तेचें मुख्य ठिकाण. नवें गोवें लोकसंख्या (१९००)२३०२ व घरें ५००.जुन्या गोव्याची लो. सं. ९३२५ व घरें १७३५.जुन्या गोव्यांत पूर्वी २००००० पर्यंत लोक रहात असत. ३।-३॥ शें वर्षांच्या अल्पकाळांत पूर्वीचा गोव्यांतील फरक केवळ कालमहिम्यानेंच घडून आला. त्याठिकाणीं आज कांहीं चर्चेस व कॅथेड्रल्स मात्र दिसतात व तेहि अद्याप धर्माची गादी तेथें आहे म्हणून. जुन्या ऐतिहासिक वस्तूंपैकीं व्हाइसरायचा बंगला, कॉलेज, चर्च वगैरे सर्व इमारती काळाच्या भक्ष्यस्थानीं पडल्या व त्यांच्या जागीं आतां रान व जंगल माजलें आहे. जुनें शहर हें नव्या गोव्याचें आतां केवळ उपनगरच झालें आहे. १७५९ पर्यंत जुनें गोवें शाबूद होतें. त्या सालीं जेसूइट लोकांनां हांकलून दिलें. नवीन गोवा शहरांत पणजी, जुना गोवा व रायबंदर असे तीन भाग आहेत. यांचें क्षेत्रफळ बहा चौ. मैल आहे. येथेंहि मुंबईप्रमाणेंच समुद्र हटवून व भर घालून जागा वाढवीत आहेत. पूर्वीपासून येथें फक्त एक किल्ला असे व हल्लीं तो व्हाइसरिगल लॉज म्हणून उपयोगांत आहे. नवीन शहर सुंदर, रेखीव व स्वच्छ आहे. अल्बुकर्कचा एक पुतळाहि येथें आहे.

मार्मागोवा बंदराची वाढ करण्यासाठीं एक इंप्रूव्हमेंट ट्रस्ट स्थापन करण्यांत आलें; या ट्रस्टच्या ताब्यांत २००० एकर जमीनीचे तुकडे असून त्यांचें क्षेत्रफळ प्रत्येकीं८००ते१६०० चौ. यार्ड आहे. हे जमीनीचे तुकडे कायमच्या भाडेपट्टीनें देण्यांत येतात. या तुकड्यांचें भाडें जागेच्या महत्त्वावर अवलंबून असतें. जागेचा तुकडा जर अगदीं एकीकडे असेल तर प्रत्येक चौरस मीटरला २ आणे भाडें आहे व तीच ऐन तिठ्यावर जर जागा असेल तर १ रुपया ८ आणे भाडें पडतें. याशिवाय प्रत्येक चौरस मीटरगणीक ४ पै ही पट्टी निराळी द्यावी लागतेच. या जागेपैकीं बराच भाग उद्योगधंदे व व्यापार यासाठीं राखून ठेवण्यांत आला आहे. आयात व निर्गत मालावर फार कमी जकात ठेवण्यांत आली असल्यामुळें, येथील व्यापार बराच वाढेल व मार्मागोवा हें व्यापाराचें केंद्र बनेल असें वाटतें.

सर केटनो गोनसाल्व्हज याला वरिष्ठ कोर्टाच्या न्यायाधीशाची जागा १९२४ मध्यें देण्यांत आली. हा स्वतः गोव्याचा रहिवाशी व गोआन असल्यानें गोव्यांतील लोकांनां त्याबद्दल फार समाधान वाटत आहे. गोनसाल्व्हज याचें शिक्षण कोइंब्रा विश्वविद्यालयांत झालें असून, मॅजिस्ट्रेटची जागा पटकाविणारा हा पहिलाच गोआन होय. १९१० त पोर्तुगीज रिपब्लिक जाहीर करण्यांत आलें, त्यावेळीं याला पोर्तुगीज वेस्ट आफ्रिकेचा गव्हर्नर जनरल नेमण्यांत आलें.

१९२४ त, पोर्तुगीज वसाहतपरिषदेचें दुसरें अधिवेशन लिस्बनमध्यें भरलें. त्यांत वसाहतींनां कायदेमंडळांत जे हक्क देण्यांत आले आहेत त्यापेक्षां अधिक हक्क देण्यांत यावेत असा ठराव पसार झाला. गोआन लोकांनां पोर्तुगीज लोकांच्या बरोबरीनें वागविण्यांत येत असल्यानें येथें ब्रिटिश हिंदुस्थानांतल्याप्रमाणें सरकार व प्रजा यांमध्यें फारसा बेबनाव दिसून येत नाहीं.

गोशीर्ष—ह्युएनत्सिंग् यानें गोशीर्ष पर्वताचें जें वर्णन दिलें आहे त्यावरून हा पर्वत व ह्युएनत्संग यानें वर्णिलेला गोशृंग पर्वत हे एकच असावे. गोशृंगाचा निषाद्भूमी म्हणून महाभारतांत उल्लेख आहे (सभा. ३२.५). या पर्वताचें माहात्म्य तिबेटी कन्जौरमध्यें सुरक्षित ठेवलेल्या (रि. ग्लान-रु-लुंग बस्तान) ' गोशृंग व्याकरण ' या ग्रंथांत वर्णन केलें आहे.

' नरेन्द्रयशः ' याच्या बुद्धपिठांच्या यादीच्या शेवटीं (सूर्यगर्भसूत्र याचें चिनी भाषांतर) असें म्हटलें आहे कीं यु-तिएँ या ठिकाणीं नदीजवळ एक तुटलेला कडा आहे. त्या ' निइओयु-तइओयु ' (गोशीर्ष) पर्वतावर एक चैत्य व ' किउ-मो सो-(सो) लो हि आंग ' (सुगंध) या साधूचा मठ आहे.

सूर्यगर्भसूत्राच्या तिबेटी भाषांतरांत असें म्हटलें आहे कीं, पृथ्वीवरील खश प्रदेशांत गोमति (ति-गो-म-ति) नदीच्या डोंगराळ तीरावर गोशृंग (ग्लान रु) पर्वताजवळ गोमषालंगंध रहातो.

यावरून गोशीर्ष व गोशृंग हे एकच आहेत याबद्दल संशय रहात नाहीं. या ठिकाणचा मॉ. ग्रेनर्ड यांनीं शोधून व त्याचें प्रयंतर डॉ. स्टेन यांनीं घेऊन असें ठरविलें आहे कीं हें गोशीर्ष म्हणजे हल्लींची जी 'करकष' नदी, तिच्या उजव्या तीरावरील उभा सुळका हमरी होय. यावरील गोमषालगन्ध साधू हा ह्युएनत्संग यानें वर्णन केलेला मैत्रेय याच्या आगमनाची वाट पहात असलेला विचारमग्न अर्हत असावा.

याच्याच गुहेंत इ. स. १८७२ मध्यें सांपडलेलें खरोष्ठी लिपींत लिहिलेलें ' धम्मपद ' हें पुस्तक सांपडलें असावें.

यांपैकीं कांहीं भाग डुट्रेल-द-हिन्स-मिशन द्नें व कांहीं भाग मि. पेट्रोव्हस्की यांनीं मिळविला [इं. अँ. १९०६].

गोसावी—गोसाई, गुसाई, गोस्वामी वगैरे अनेक नांवांनीं हा वर्ग ओळखिला जातो. गोसावी हा एक हिंदु यतींचा वर्ग असून त्यात शैव व वैष्णव असे दोन पंथ आहेत. वैष्णव गोसावी आसाम बंगाल्यात फार आहेत. वऱ्हाड, महाराष्ट्रांत बहुतेक शैवच आहेत. गोसावी वर्गात भटके (भिक्षेकरी) व गृहस्थ असे दोन भेद करतां येतील. भटके गोसावी देवाच्या नांवाखालीं वाटेल तसा अनाचार करतात हें सर्वत्रांस माहीत आहे. त्यांच्यापासून अनौरस संततीहि उत्पन्न होत असते. चेले करण्याकरितां ते कित्येकदा मुलें बाळगतात किंवा विकत घेतात. उन्हा-तान्हांत व जंगलांत राहून व विलक्षण कृती करून ते सशक्त व क्रूर बनलेले असतात.

त्यांनीं जर एकदां शस्त्र हातीं घेतलें तर त्यांनां दाबांत ठेवणें फार मुष्किलीचें होतें असा अनुभव आहे.प्राचीन काळीं निरनिराळया गोसाव्यांच्या संघांच्या आपआपसांत निकराच्या लढाया झाल्या आहेत. ते नेहमीं टोळया करून फिरत असत.व भिक्षेच्या नांवाखालीं लोकांपासून एक प्रकारचा करच वसूल करीत असत. जर त्यांनां भिक्षा घातली नाहीं, तर ते लोकांनां लुटीत असत व प्रसंग विशेषी खून करण्यास देखील त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. सशस्त्र गोसाव्यांच्या भट-कणाऱ्या टोळ्यांनीं पूर्वी समाजांत पशुतुल्य अत्याचार केले आहेत. पूर्वी गोसावी लष्करांत देखील भरती होत असत. मराठा लष्करांत गोसाव्यांनां घेण्याची चाल महादजी शिंद्यानें काढली. त्यानें त्यांची एक पृथक् तुकडी करून ती अंबाजी इंगळयाच्या हाताखालीं दिलेली होती. हिंमतबहादर नांवाचा मनुष्य या गोसाव्यांचा गुरु असून तो त्यांच्या तुकडीवरील अधिकारी होता. हे गोसावी लोक शिपाईगिरीच्या पेषांत पुढें पुढें तर इतके रुळले गेले कीं, नंतर कांहीं वर्षांनीं हिंमत बहादर शिंद्यास सोडून निघून गेला तरी त्याच्या तुकडीनें शिंद्याची नोकरी सोडली नाहीं. (डफचा इतिहास पहा) येथपर्यंत सामान्य गोसावी वर्गाचें विवेचन झालें; आतां गृहस्थ गोसावी जातीविषयीं माहिती देऊं.

' गोसावी ' ही निराळी जात मानली जाते. महा-राष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत व हिंदुस्थानांतील बराच भाग यांत या जातीचें वास्तव्य आहे. सबंध हिंदुस्थानांतील एकंदर गोसाव्यांची संख्या अडीच लाखावर आहे; पैकीं सुमारें ९४ हजार संयुक्त प्रांतांत, ४२ हजार वऱ्हाडमध्यप्रांतांत, ३० हजार हैद्राबाद संस्थानांत, २८ हजार राजपुतान्यांत, २५ हजार बिहार-ओरिसांत व २१ हजार मध्यहिंदुस्थानांत आहेत. ही जात श्रीशंकराचार्यांच्या अद्वैतमताची अनुयायी आहे. गिरी, पुरि, भारती इत्यादि यांचीं दहा आडनांवें आहेत. जातींत ' घरबारी ', ' मठधारी ' संन्यासी वगैरे भेद आहेत. मात्र कोणालाहि ' घरबारी ' म्हणजे ' गृहस्थ ' होतां येतें किंवा ' मठधारी ' किंवा संन्यासी राहतां येतें. हल्लीं कित्येक मठधारी लग्न करूं लागले आहेत. गुजराथेंत कांहीं ' मठधारी ' ' घरबारी ' झाले आहेत वऱ्हाडांतील वज्रेश्वरी संस्थानचे अधिपति 'घरबारी 'झाले आहेत (वज्रे-श्वरी संस्थानचा इतिहास ब. खं. पारख यांनीं लिहिला आहे.) ' मठधारी ' गोसाव्यांत ' महंत ' व ' परमहंस ' आहेत परंतु बहुतेक व्यवहार घरबाऱ्यांसारखाच आहे या 'मठधारी' मध्यें बरेच गोसावी ' नवकोट नारायण ' आहेत. मस्कामंडी, बुद्धगया, हैद्राबाद इत्यादि ठिकाणच्या गोसाव्यांत राजे, महाराजे किताब धारण करणारे आहेत.

शिक्षणांत ही जात बरीच मागें आहे. उदाहरणार्थ, मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून सरासरी चाळीस बेचाळीस हजार लोक आहेत.पण इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून या भागांत एकच ग्राज्युएट झाला. महाराष्ट्रातहि हीच स्थिति आहे. ज्ञातीची वंशावळ भाट लोकाजवळ आहे. त्यावरून व इतर ऐतिहासिक पुराव्यांवरून या जातींत ब्राह्मणांचा व सर्व वर्णांच्या लोकांचा भरणा आहे असें दिसतें. वऱ्हाडांत देशमुखांचीं मुलं कांहीं गोसाव्यांच्या घराण्यांत दिलेलीं आढळतात. यांचा मुख्य धंदा शेतीचा; त्याच्या खालोखाल व्यापार. कित्येक धर्मगुरूहि आहेत. वऱ्हाड व मध्यप्रांतांत ब्राह्मणेतर मंडळींत गोसाव्यांचे शिष्य पुष्कळ आहेत. कित्येकांस मोठ-मोठया जहागिरी मिळाल्या आहेत.

उत्तरहिंदुस्थानी व महाराष्ट्रीय पुष्कळ ब्राह्मण गोसाव्यांचीं पुरोहितपणाचीं कामें करतात. गोसावी मुख्यतः नारायण व शंक-राचे उपासक आहेत परंतु इतर देवांविषयीं त्यांच्यांत अनादर नाहीं. यांत त्रिकालसंध्या करणारे कित्येक आढळतात. गायत्री, महिम्न, गीता यांचा पाठ पुष्कळ करतात. वैदिक संन्यास संस्काराचा अवशेष 'विरजाहोम' मात्र राहिला आहे. बाकीचे बहुतेक पुराणोक्त होतात. संन्याशाप्रमाणें गृहस्थ मृतासहि पुरतात व श्राद्धाऐवजी पुण्यतिथि (' बरशी ') पाळतात. मध्यप्रांतांतील विवाह ' बहुतेक उत्तरहिंदुस्थानांतील 'भावरे' पद्धतीनें होतात व वऱ्हाडांत पुराणोक्त होतात. महाराष्ट्र व काठेवाड यांत कित्येक जागीं वेदोक्त संस्कार झालेले आहेत.

गोसाव्यांत पोटजाती नाहींत. गिरी, पुरी, पर्वत, सागर, बन, तीर्थ, भारती, सरस्वती, अरण्य व आश्रम हीं मुख्य १० आडनांवें आहेत. त्यांनांच इतराकडून पोटजाती म्हणून समजण्यांत येतें. लग्न वगैरे एकाच ' मठी ' च्या घराण्यांत होत नाहीं. एका मठीचे लोक हल्लीं ' मठी ' चा भेद पाळ-तात. गिरी गिरीमध्यें लग्नव्यवहार होतो परंतु एकाच ' मठी ' च्या गिरींत होत नाहीं. या मठी ५२ (कित्ये-कांच्या मतें ५३,) आहेत. पूर्वींच्या गोत्रप्रवरांचा विसर पडल्यानें हल्लीं ' मठी ' ही गोत्रासारखी समजली जाते. शारदा, ज्योतिर्मठ किंवा जोशी मठ, गोवर्धनमठ व

शृंगेरीमठ असे मुख्य चार मठ आहेत इतर तीन मिळून एकंदर ७ मठ आहेत. आणि मढी उर्फ मठी ५२ आहेत.

आपला सामाजिक दर्जा द्विजांप्रमाणें आहे असें सुशिक्षित गोसावी म्हणतात. यांनीं दशनामगोस्वामीमंडळ नांवाची एक संस्था काढिली आहे. पेशवाईत महानुभाव व गोसावी यांच्यांत सामाजिक दर्जाबद्दल भांडणें झालीं आहेत. त्यांत 'गोसावी' हे सनातनधर्माचे अनुयायी ठरले आहेत. मुंबई व मध्यप्रांत हायकोर्टाच्या ठरावांत गोसाव्यांत 'याज्ञवल्क्यस्मृति '--'दायभाग' लागू आहे असें मानलें गेलें आहे. पूर्वी जातीच्या पंचायती होत्या.आतां बहुतेक लुप्त झाल्या. [यवतमाळचे रा. पृथ्वीगीर हरिगीर यांजकडून आलेल्या माहितीचा या लेखांत संक्षेपानें उपयोग केला आहे. इतर संदर्भग्रंथः-विल्सन-रिलिजियस सेक्टस ऑफ दि हिंदूजः सेन्सस रिपोर्ट १८८१-१९११; क्रूक; रसेल व हिरालाल; एंथोवेन; जोगेंद्र नाथ भट्टाचार्य-हिंदु कास्ट्स अँड सेक्टस.]

गोसावीनंदन.—याचें नांव वासुदेव असून बापाचें नांव गोस्वामी (गोसावी) होतें. हा तंजावरकडील राहणारा असून याचे गुरु गोपाळाश्रमगजानन नांवाचे होते. अर्वाचीनकोशकार याच्या गुरूचें नांव निरंजनस्वामी असें देतात. याचा काल इ.स. १६५०-१७०० चा होय. याचा मुख्य ग्रंथ ज्ञानमोदक नावाचा असून शिवाय सीतास्वयंवर व अभंग, पदें वगैरे स्फुटकाव्य बरेंच आहे. यांचीं स्तोत्रें व अष्टकें लहान मुलांना शिकतां येतील अशीं सोपीं व साधीं आहेत; हा गाणपत्य होता. [महाराष्ट्रसारस्वत].

गोहद—ग्वाल्हेर संस्थानांतील तोंवरघांट जिल्ह्यांतील एक शहर. लो. सं. (१९०१) ५३८३. अठराव्या शतकापासून याचें नांव ऐकूं येतें. त्या वेळीं हें जाट लोकांनीं घेतलें. मध्यंतरी ३०।३२ वर्षें तें रजपुतांच्या ताब्यांत होतें. पण पुन्हां जाटांकडे आलें. १७७९ मध्यें इंग्रजांशीं त्यांनीं तह केला पण तहाच्या अटी न पाळल्या गेल्याच्या सबबीवर शिंद्यांपासून १७८४ मध्यें इंग्रजांनीं त्यांचें संरक्षण केलें नाहीं. १८०३ मध्यें शिंद्यांचा मुखत्यार स्वतंत्र झाला व त्यानें गोहद इंग्रजांच्या स्वाधीन केलें तें १८०४ मध्यें त्याला परत मिळालें व लवकरच इंग्रजांनीं मदत देण्याचें नाकारल्यामुळें तें शिंद्यांच्या हातीं गेलें. हें शहर वैसाली नदीच्या काठावर आहे. भोंवती तट आहेत. आंतील भागात एक भक्कम किल्ला आहे व त्यांतील जुन्या राजवाड्यांत कचेरी भरते. इतर इमारती व त्यांचें काम महत्त्वाचें नाहीं. लक्ष्मणताल नांवाचा तलाव व त्यातील देऊळ हीं पाहण्यासारखीं व शोभादायक आहेत. शाळा, डाकबंगला व पोलीस चौकी वगैरे आहेत.

गोहद येथें जाट घराण्याचा एक छोटासा राणा होता. थोरल्या बाजीरावानें त्याला आपलें मांडलिक बनविलें होतें. पुढें पानिपत झाल्यामुळें व मल्हारराव होळकर मेल्यामुळें या राण्यानें बंडाळी चालविली; त्या वेळीं राघोबादादा हे उत्तरेकडे होते. ते परत दक्षिणेत येतांना त्यांनीं राण्याचा मोड करून तीन लाख रुपये खंडणी घेतली. यानंतर (१७७९) जनरल गॉडर्डच्या मदतीस कलकत्याहून इंग्रजी पलटणें पुण्याकडे चालून येत असतां हेस्टिंग्जनें या राण्यास पेशव्यांविरुद्ध आपल्याकडे वळवून घेतलें होतें. सालबाईच्या तहानंतर महादजी शिंद्यानें याबद्दल राण्यास नतिजा देऊन त्याच्यापासून ग्वाल्हेरचा किल्ला काबीज करून त्याला कैद केलें (१७८४) आणि त्या ठिकाणीं आपला सरदार अंबाजी इंगळे यास २५।३० हजार फौजेसह, इंग्रजास शह म्हणून ठेविलें परंतु पुढें अंबाजी हा शिंद्यांच्या विरुद्ध इंग्रजांस फितला व त्यानें त्यांना ग्वाल्हेरचा किल्ला देऊन गोहदचा अर्धा प्रांत आपल्यास जहागीर मिळविला. तेव्हां बाकीचा अर्धा प्रांत इंग्रजानें राण्यास दिला. त्यावेळीं इतर रजपुत राजांशीं जसे तह इंग्रजानें केले होते तसेच अंबाजी व राण्याशींहि केले (१०८४). त्या तहान्वयें राण्यानें इंग्रजांचीं तीन पलटणें चाकरीस ठेवून त्याबद्दल दरमहा पाऊण लाख रु. त्यांना द्यावे असें ठरलें होतें. परंतु राण्याला आपलें राज्य चांगलें चालवितां येत नाहीं असें पुढें आढळून आल्यावर इंग्रजानें त्याला पदच्युत करून त्याचें सर्व राज्य व ग्वाल्हेरचा किल्ला शिंद्यास दिला (१८०५). आणि राण्याला थोडीशी नेमणूक करून दिली; तेव्हां शिंद्यानेंहि आपल्याकडून राण्यास कांहीं पैक्याची मदत केली. [राजवाडे खं. ६,१२; डफ. पु. २,३.].

गोहान, ता लु का.—पंजाब. रोहटक जिल्ह्यांतला एक तालुका. क्षेत्रफळ ७५३ चौ. मै. लो. सं. (१९११)१६१११. यांत १ शहर व ११६ खेडीं आहेत. उत्पन्न २६० हजार. तालुका सपाट आहे व पाण्याचा पुरवठाहि विपुल करतां येण्याजोगा आहे. झाडीहि बरीच आहे. मुख्य ठिकाण गोहन हें रोहटकपासून २० मैलांवर कालव्याच्या पश्चिमेस आहे. येथें पृथ्वीराजाचा किल्ला होता तो महंमद घोरीनें पाडला असें सांगतात. शाहझियाउद्दिन याच्या कबरीशीं वार्षिक जत्रा भरते. जैनाचीहि कांहीं देवळें आहेत. १८७३ पासून म्युनिसिपालिटी आहे. येथें शाळा व दवाखाना आहे.

गोहिलवाड—मुंबई, काठेवाडचा एक ' प्रांत '(भाग). खंबायतच्या आखाताच्या किनाऱ्यानें ४२०६चौ. मैलांचा पट्टा गोहेल लोकांची पुष्कळ वस्ती असलेला आहे. यांत भावनगर पालीठाणा वगैरे लहान संस्थानें आहेत. लो. सं. (१९११) ६२५७६१. वसूल ५५२७८७ रुपये.

गोळकोंडा—मद्रास, विजगापट्टम जिल्ह्यांतील तालुका; क्षेत्रफळ ४९३ चौ मै.लो.सं.(१९२१)१५७०४८.नरसपट्टणम् हें मुख्य ठिकाण आहे. सारा व कर मिळून वसूल(१९२१) सालीं) २१९००० होता. एजन्सी पट्टा अति डोंगराळ आहे व यातील सर्व पाणी मुचकुंद नदीनें गोदावरीस मिळतें. सुमारें २६० चौ. मै. जिल्ह्यांतलें महत्त्वाचें

संरक्षित आरण्य यांचे तालुक्यांत आहे. इ. स. १८३७ पर्यंत हा कायम धान्याच्या पद्धतीचा जमीनदारी तालुका होता. पण त्यासाली थकलेल्या बाकीच्या निमित्तानें त्याचा लिलाव करून सरकारनेंच विकत घेतला. मैदानी मुलखाचा पूर्वभाग नेहमीं लागवडीखालीं असतो, कारण त्याला 'कोमरवोलु अवाचें' पाणी मिळतें. घाटावर दोन रस्ते जातात. पैकीं कृष्णदेवी पेठवरून जाणाऱ्या रस्त्यानें धान्य मीठ व जंगलचा माल यांचा बराच मोठा व्यापार चालतो.

गोळिहळ्ळी.—मुंबई इलाखा. बेळगांव जिल्हा. बिडीच्या दक्षिणेस एक मैलावर हें खेडें असून येथें कळमेश्वर, रामलिंग आणि सिद्धलिंग यांचीं देवळें आहेत. कळमेश्वराच्या देवळाजवळ एक व गांवाबाहेर एक असे दोन कदंबाच्या वेळचे अकराव्या बाराव्या शतकांतील शिलालेख आहेत.

गोळे, महादेव शिवराम (१८५९–१९०६).—हे पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे लाइफ मेंबर असून आगरकरानंतर फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल झाले. प्रचलित शिक्षणपद्धतीवरचा उडत चाललेला यांचा विश्वास 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या ग्रंथांत दृग्गोचर होतो. हा ग्रंथ अत्यंत कळकळीनें लिहिला असल्यानें वाचनीय झाला आहे. गोळे मोठे मार्मिक लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. केसरींतील लेख, हिंदुधर्म आणि सुधारणा, शाळेचा अभिमान इत्यादि पुस्तकांतून त्यांचे लेखनगुण दृष्टीस पडतात.

गौड (गौर)—बंगाल, माल्डा जिल्ह्यांतलें एक पडकें व जुनाट शहर. उ. अ. २४°४' व पू रे. ८८°८' हें प्रथम केव्हां वसवलें गेलें याचा अंदाज बांधतां येत नाहीं. या शहराला अंग्रेझाबादच्या पूर्वेस ८ मैलांवर असणाऱ्या लखनौती किंवा लक्ष्मणावती गांवच्या नांवानेंहि संबोधिलें जातें. गौडबंगाल असें या प्रांतास पूर्वी या शहरावरून नांव पडलें होतें. प्राचीन हिंदुराजांची येथें राजधानी होती व हें संस्कृत विद्येचें केंद्र होतें. यास टॉलेमी उल्लेखित नाहीं. ११९८ मध्यें मुसुलमानांनीं बंगाल घेतला तेव्हांपासून ३०० वर्षे तें त्यांचें मुख्य ठिकाण होतें. मध्यंतरी फिरोझाबाद हें मुख्य ठिकाण करण्यांत आलें होतें. पण जलालुद्दीन महम्मदशहानें गौड येथें पुन्हां राजधानी आणली. आफगाणी अमलांत शीरशहानें पुन्हां येथून राजधानी हालवली (१५३९). अकबरचा सरदार मुनीम दाऊदखान यानें (१५७५) अकबरची सत्ता स्थापन केली. याच वेळीं एक प्रकारच्या रोगाची भयंकर सांथ येथें पसरली व सर्व शहर बेचिराख झालें. दाऊदखानहि मरण पावला. एकंदर मुसुलमानी अमलांत येथें बऱ्याच मसजिदी व इमारती बांधल्या गेल्या. १६५० च्या सुमारास सुलतान सुजाची राजधानी राजमहाल येथें होती पण तो स्वतः बरेच दिवस येथेंच रहात असे. ढाका आणि मुर्शिदाबाद येथें राजधानी गेल्यापासून मात्र हें शहर कायमचें मागें पडलें(१६७३). १६ व्या शतकांत पोर्तुगीज इतिहासकार फारियासूझा हा लिहितो कीं गौडांत १२ लाख वस्ती होती.

१७८७मध्यें बरो लिहितो. "या जुन्या सुंदर शहरांत आज पूर्ण व शाबूद अशी एकहि इमारत नाहीं; व केवळ हवापाणी व ऊन याच्यापेक्षां या शहराच्या नाशाचें श्रेय सर्वथा मनुष्यांनाच दिलें पाहिजे. राजमहाल, माल्डा व मुर्शिदाबाद या शहरांना कित्येक शतकें येथूनच दगड विटांचा व इतर इमारती जिनसांचा पुरवठा होत आहे." ग्रँट म्हणतो " निझामत दफ्तरला स्थानिक जमीनदारांकडून सुंदर इमारती पाडून तेथलें सामान नेण्याबद्दल कर म्हणून ८०० रुपये दरसाल मिळत. येथील इमारतींतून संगमवरी दगड व रंगीत फरशीच्या विटा वगैरे सामान जाई. गेल्या ३० ४० वर्षांत तेथील जंगल वगैरे तोडून या प्रकारास आळा घालण्यांत आला आहे. १८२० मध्यें अवशिष्ट भागांवरून कोणी इंग्रजानें या शहराचें वर्णन केलें आहे यावरून असें दिसतें कीं, मुख्य शहराचा विस्तार १३ चौ. मै. व इतर उपनगरें मिळून हा विस्तार २५–३०मैलांपर्यंत असावा. शहराच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण भागाला गंगा, महानदी व इतर प्रवाह यांचा वेढा असून उत्तरेला भक्कम किल्ले व तटबंदी होती. सर्व शहराला विस्तीर्ण तट होता. येथें बऱ्याच इमारती व मसजिदी आहेत. व त्या वेळोवेळीं निरनिराळ्या सुलतानांनीं वगैरे बांधलेल्या आहेत. शहर पूर्वी फार दाट वस्तीचें असावें. त्याच्या ७७ मैलांच्या लांबीच्या उपनगरांत खूब दाट वस्ती असावी. १८९८ च्या भूकंपांत कांहीं राहिलेल्या इमारती व दक्षिण तटाचा मध्य दरवाजा हीं कोसळून पडलीं. याला कोतवाली दरवाजा हें नांव असे.

१९०० पासून अवशिष्ट राहिलेल्या सुंदर व महत्वाच्या इमारतींचें रक्षण करण्याची सरकारनें व्यवस्था केली आहे. फिरोझ मिनार, लकाचुरी व दाखिल दरवाजा वगैरे इमारती अद्यापहि चांगल्या पहाण्यासारख्या आहेत.

आजच्या धार्मिक महत्त्वाच्या इमारतीः (त्यांचे अवशेष) म्हणजे (१) मखदूम अखी सिराज–उद्दीन–साधूची मशीद (काल १५१०), (२) जान जन मियान ही मशीद (१५३४–३५), (३) सादुल्लापूर घाट, स्मशान, (४) बाराद्वारी (१५२६). ही गौडमधील सर्वांत सुंदर इमारत आहे, (५) कादम–इ रसूल मशीद(१५३०): (६)मिनार (जयस्तंभ), याचा काल फर्ग्यूसनच्या मतें १३०२–१५ या मधला आहे. (७) तांतिपार (१४७५); (८) लट्टन ही मशीद यूसफशहा (१४७४–८१) यानें बांधिली असें मानतात, व (१०) छोटीशी सुवर्णकबर, याला शहराचें रत्न म्हणून मान देतात. यावरचा शिलालेख पुसून गेला आहे. हुसेनशहा (१४९४–१५२४) नें ही बांधली असें म्हणतात. या इमारतीवरील सर्व लेख तुघ्र लिपींत सुंदर लिहिलेले आहेत. इ. स. १३६९–१५३५ या काळांतले हे सर्व लेख असून बंगालच्या राजांचा काल नक्की करण्याच्या कामीं यांचा

फार उपयोग होतो. [रॅव्हेनशा–गौर, इट्स रुइन अँड इन्स्क्रिप्शन्स; कनिंगहॅमचे रिपोर्ट; फर्ग्युसन–हिस्टरी ऑफ इंडियन आर्किटेक्चर].

गौडपादाचार्य—शुकाचा शिष्य व शंकराचार्यांचा गुरु जो गोविंदाचार्य त्याचा गुरु. अनुगीताभाष्य. उत्तरगीताभाष्य, चिदानंद केलिविलास, देवीमाहात्म्यटीका, सांख्यकारिकाभाष्य व मांडूक्योपनिषत्कारिका यासारखी याची ग्रंथरचना आहे.

गौड ब्राह्मण—उत्तरेकडील पंचगौड ब्राह्मणापैकीं गौर अथवा गौड हा एक विभाग असून या नांवाच्या उत्पत्तीविषयीं बरींच निरनिराळीं मतें आढळतात. गौड हा उत्तरकौशिकाचा एक पोटविभाग असून, गौड अथवा गोंड जिल्ह्यांत श्रावस्ति शहराचे अवशेष उपलब्ध झाले आहेत. गौड हे या जिल्ह्याचेच मूळचे रहिवाशी असावेत. गौड या नांवाचे ब्राह्मण अयोध्या, जहांगिराबाद, गोंडजिल्हा व गोरखपूर वगैरे ठिकाणीं अद्यापीहि पुष्कळ आहेत. खानेसुमारीवरून पाहतां मीरत विभागांत गौर अथवा गौड ब्राह्मणांची वस्ती बरीच आहे.

या जातीच्या अनेक शाखा आहेत. केवळ गौड, आदिगौड, शुक्लवाल, सनाढ्य, श्रीगौड, गुजरगौड, टेकबारागौड, चामार गौड, हरियानागौड, किर्तानीयागौड व सुकाळगौड इत्यादि. संयुक्त प्रांतांत आदिगौड, जुगाडगौर, कैथालगौर, गुजरगौर, धरमगौर, व सिद्धगौर वगैरे ज्ञाती प्रसिद्ध आहेत. गुजरगौर, दधीच, सिखवाल, परीख, खंडेलवाल व सारस्वत असेहि विभाग प्रसिद्ध आहेत. दधीचाचा मुलगा पिप्पलायन म्हणून होता. त्याच्या बारा मुलांपासून गौड जातीची द्वादश गोत्रें प्रचारांत आलीं असेंहि म्हणतात. गुजरगौरांचीहि द्वादशगोत्रें आहेत. कनौजियांपेक्षां गौरब्राह्मण जास्त सुधारलेले असून बिहार येथें सारस्वत ब्राह्मणांशीं ते विवाह करूं लागले आहेत. असगोत्र विवाह त्यांच्यांत सर्वत्र रूढ आहे, व त्यांचे सर्व घरगुती समारंभ जुन्या पद्धतीप्रमाणेंच चालतात. गौडसारस्वतांसंबंधीं माहिती 'सारस्वत' या लेखांत आढळेल.

गौतम—(१) न्यायशास्त्रकर्ता ऋषि. यास अक्षचरण किंवा अक्षपाद असें नांव आहे (न्याय पहा). (२) शरद्वत ऋपीलाच गौतम असें म्हणतात. गौतम हा अहिल्येचा पति होय. अहिल्येस इन्द्रानें फसवून नेलें अशी कथा आहे. रजनीचें हरण, सूर्यानें केलें असा वरील कथेचा अर्थ केल्यास अहिल्या म्हणजे रजनी व इन्द्र म्हणजे सूर्य असा अर्थ होतो.

गौतमधर्मसूत्र—आपस्तंब धर्मसूत्राच्या मानानें पाहतां गौतमधर्मसूत्रासंबंधीं फारच थोडी माहिती मिळते. दोनच गोष्टींसंबंधानें आपणांस विचार करतां येईल. पहिली गौतमधर्मशास्त्राचा सामवेदाशीं संबंध व दुसरी इतर धर्मशास्त्रांशीं त्याचें आनुपूर्व्य. गौतम-धर्मशास्त्राचें बौधायन, हिरण्यकेशी आणि आपस्तंब यांच्याशीं बरेंचसें साम्य आहे. पुरातनकालीं प्रत्येक वेदशाखेचीं श्रौत, गृह्य आणि धर्म सूत्रें असत. त्यांपैकीं कित्येक नाहींशीं झालीं व बाकीचीं कालांतरानें एकमेकांत मिसळली गेलीं. गौतम ऋषींचें म्हणून जें धर्मसूत्र समजलें जातें तें त्याचें नसून एखाद्या गौतमचरणाचें असावें. सामवेदाच्या वंशब्राह्मणांत सामवेदी गौतमाची हकीकत आहे. ज्या गौतमानें धर्मसूत्रें रचिलीं तो सामवेदी होता हें अनेक प्रमाणांनीं दाखवितां येईल. कारण यांतील सव्विसावा अध्याय ज्यांत कृच्छ्रादिकांचें वर्णन आहे तो संपूर्ण अध्याय सामवेदाच्या 'सामविधान' ब्राह्मणांतून जसाच्या तसाच घेतला आहे. इतकेंच नव्हे तर ठिकठिकाणीं (१९.१२) सामवेदांतला भाग बराच आढळून येतो. परंतु अमक्या गौतमाचें हें धर्मसूत्र हें सांगतां येत नाहीं. सामवेदाच्या सर्व शाखांची माहिती अद्यापि उपलब्ध नाहीं, ती मिळेपावेतों या बाबतींत स्वस्थ बसणेंच बरें.

यानंतर दुसरा मुद्दा विचारासाठीं घेऊं. गौतम हा बौधायन आणि वसिष्ठ यांच्या पूर्वीचा आहे. कारण दोघांनींहि गौतमाचीं वचनें उध्दृत केलीं आहेत. (बौधायन सूत्र १.१–१७–२४) बौधायनानें एकोणिसावा अध्याय गौतमसूत्रातून घेतला. वसिष्ठ धर्मसूत्राची हीच स्थिति आहे. अर्थात् गौतम हा बौधायन आणि वसिष्ठ यांच्या पूर्वीचा असल्यामुळें त्याचें धर्मसूत्र अस्तित्वांत असलेल्या धर्मसूत्रांपेक्षां फार प्राचीन असलें पाहिजे. पण यावर संशय येण्यास एक जागा आहे व ती ही कीं, गौतम सूत्राची भाषा पाणिनीच्या व्याकरणाशीं फार जुळते व गौतमाच्या मानानें पाहतां पाणिनी फार अलीकडला आहे. या संशयाचें समाधान अशा रीतीनें करतां येईल कीं, जुने पंडित गौतमसूत्राला फार मान देत असत व तो प्रमाणभूत ग्रंथ मानीत असत. तेव्हां पाणिनीच्या व्याकरणाला जुळतील असे त्यांनीं भाषेंत फेरबदल केले असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु गौतम धर्मसूत्राची एकंदर रूपरेषा मात्र बदलण्यांत आली नाहीं.

बौधायन आणि गौतम हे कालानें जितके जवळ आहेत तितके वसिष्ठ आणि गौतम नाहींत. दुसरी अशी एक महत्वाची गोष्ट आहे कीं, कित्येक लोक गौतमाचा ऐतिहासिक कालाशीं संबंध जोडितात कां तर त्यांत एके ठिकाणीं 'यवन' शब्द आला आहे. गौतमाच्या मतें क्षत्रियास शूद्र-स्त्रीपासून जें अपत्य होतें त्यास 'यवन' म्हणतात. आतां 'अयोनियन्स' व ग्रीक या लोकांस 'यवन' म्हणत असत हें इतिहासप्रसिद्ध आहे. ग्रीक लोकांची आणि हिंदुस्थानवासी लोकांची परस्पर ओळख अलेक्झांडरच्या वेळी झाली. म्हणून गौतमधर्मसूत्राचा काल इसवी सनापूर्वी तीन शतकें हा होय असें अनुमान काढतात. परंतु मॅक्समुल्लरच्या मतें हें चुकीचें आहे. प्रथमतः धर्मसूत्राचें मूळ हेंच विश्वसनीय नाहीं. आणि पुनः एखाद्या शब्दावरून इतर प्रमाणें झुगारून देऊन एखाद्या

ग्रंथाचा कालनिश्चय ठरविणें हें जरा धोक्याचें आहे. गौतमधर्मसूत्रावरून वैदिक वाङ्मयासंबंधानें फार थोडी माहिती मिळते हें प्रथमारंभींच सांगितलें आहे. तैत्तिरीय आरण्यकांतून पंचविसाव्या अध्यायाचीं पहिलीं सहा सूत्रें घेतलीं आहेत. सामविधानब्राह्मणांतून सव्विसावा अध्याय घेतला आहे अथर्ववेदाच्या एका उपनिषदांतून कांहीं भाग घेतला आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे गौतमानें मनूचीं कांहीं वचनें उध्दृत केलीं आहेत (गौतम २१.७). म्हणजे गौतमाचें धर्मसूत्र जरी अत्यंत प्राचीन असलें तरी तें पहिलें खास नाहीं.

गौतमपुरा—इंदूर संस्थान. देपाळपूर परगण्यांतील एक शहर. इंदूरपासून अंतर ३० मैल, व राजपुताना माळवा-रेल्वेच्या चंबळ स्टेशनापासून तीन मैल. इतर गौतमपुरांपासून ओळखण्याकरितां याला रूणाजी गौतमपूर म्हणतात. लोकसंख्या सुमारें चार हजार. हें मल्हाररावाच्या बायको (गौतमाबाई)नें वसविलें व अहल्याबाईच्या कारकीर्दीत भरभराटीला आलें. गौतमपुरा येथें चिटाचें व रंगाचें काम चांगलें होतें. १९०५ मध्यें येथें म्युनिसिपल कमिटी स्थापन करण्यात आली. शहरांत गौतमाबाईनें बांधलेलें अचलेश्वराचें देऊळ व रामसनेही पंथाचे मठ आहेत. येथें शाळा व एक दवाखाना आहे.

गौरा-बऱ्हाज—संयुक्तप्रांत. गोरखपूर जिल्ह्यांतील एक शहर. जवळच बऱ्हाज शहर आहे त्याचें हें एक उपनगर आहे. याची लोकसंख्या (१९११) १२२९४ आहे. बऱ्हाज व गौरा यांची व्यवस्था १८५६च्या२० व्या कायद्याप्रमाणें चालते. येथें साखरेचे कांहीं कारखाने आहेत. इतर व्यापार कांहीं नाहीं.

गौरी—शिवपत्नी पार्वतीचें एक नाव. पूर्वी पार्वती श्यामवर्ण असल्यामुळें महादेवानें एकदां लीलेनें तिला काली असें म्हटलें. त्यावरून तिनें तप करून गौरवर्ण प्राप्त करून घेऊन हें नांव संपादन केलें (मत्स्य पु. अ. २५६). वरुणाच्या स्त्रीलाहि गौरी हें नामाभिधान आहे. (महा भा. उद्योग. अ. ११७).

गौरीपूर—बंगाल, गोलपारा जिल्ह्यांतील कायमधारा पद्धतीची एक जमीनदारी. क्षेत्रफळ ५८३ चौरसमैल. जमीनीचा खंड २,३४,००० रुपये असून सान्याचें उत्पन्न फक्त ५,३९६ च आहे व इतर करांचें २५,००० रु. आहे. दुध्री नदीपासून ६ मैलांवर गौरिपूर नांवाचेंच भरभराटीस आलेलें खेडें जमीनदाराचें रहाण्याचें मुख्य ठिकाण आहे. तेथें एक हायस्कूल व दवाखाना आहे आणि व्यापारहि चांगला चालतो. मारवाड्यांची वस्ती आहे व तेच ताग, धान्य व कपडा यांचा मोठा व्यापार करतात.

गौरीशंकर उदयाशंकर—हे काठेवाडचे दिवाण होते. यानीं १८७९ सालीं भावनगरची नोकरी सोडून चतुर्थाश्रम धारण केला. हे मोठे मुत्सद्दी होते. भावनगर संस्थान भरभराटीस यानीं आणलें व संस्थानाचे तंटे तोडून कांहीं गेलेले गांव परत मिळविले. यांनां सी. आय. ई. पदवी होती. यांचें चरित्र जव्हेरिलाल उमियाशंकर याज्ञिक यानीं इंग्रजींत लिहिलें आहे. हे १८९१ मध्यें वयाच्या ८६ व्या वर्षी वारले.

गौरीशंकर पर्वत—जगांतील सर्वांत उंच असा पर्वत. हें हिमालय पर्वताचें शिखर असून नेपाळांत आहे. त्रिकोणमितीनें अजमावतां त्याची उंची २९००२ फूट असावी असें दिसतें. कॅप्टन वुड, मेजर रायडर वगैरे शोधकांच्या एकंदर निरीक्षणावरून हिमालयांतील हेंच सर्वांत उंच शिखर आहे असें साधारणपणें निश्चित झालें आहे. त्रिकोणमितिनियमानुसार सर जॉर्ज एव्हरेस्ट नांवाच्या एका भूगोलज्ञानें या पर्वताचें निरीक्षण इ. स. १८४१ सालीं केलें. या गृहस्थाच्या स्मरणार्थ या शिखराचें नांव एव्हरेस्ट असें ठेविलें गेलें आहे.

गौ री शं क रा रो ह णा र्थ प्र य त्न.—इ.स.१९२१, १९२२ व १९२४ सालीं अनुक्रमें तीनदां गौरीशंकर अथवा एव्हरेस्ट शिखर गांठण्याचे प्रयत्न ब्रिटिश लोकांकडून करण्यांत आले. १९२५ सालीं त्यावर एक मोहीम करण्याचा अमेरिकन व जर्मन लोकांनाहि बेत आहे. हिमालयाच्या तिबेटाकडील बाजूचे लोक या शिखरास 'चोमोलुंगमा' (देशदेवी) म्हणतात, आणि हिमालयाच्या हिंदुस्थानाकडील बाजूस, एव्हरेस्टला 'नंदादेवी' (देवेश) अशी संज्ञा आहे.

१९२१ ची मोहीमः—कर्नल हॉवर्ड ब्यूरी यानें ही मोहीम केली व तो सिक्कीमच्या मार्गानें दार्जिलिंगहून तिबेटाकडे वळला. तारीख १६ मे रोजीं ही मोहीम निघाली. परंतु बरोबर न्यावयाचीं खेचरें नालायक ठरल्यामुळें ती अल्पकाळ रहित झाली. जुलैमध्यें या मोहिमेंतील डॉ. कैलास नांवांचा इसम मृत्यू पावला. या मोहिमेच्या हकीगतीवरून असें कळतें कीं, १६५०० फूट उंचीवर रोंगबक नांवाच्या दरींत एक मठ असून त्या ठिकाणीं ३०० ते ४०० पर्यंत साधू व जोगिणी रहातात. कड्याखालील प्रशांत गुहेंत त्यांचें निवासस्थान आहे व तें शिखरांवरून दृग्गोचर होतें. टिंग्रीक्षोमहून ही प्रवासी मंडळी खोंबू नांवाच्या बर्फाच्या डोंगरांवर गेली. १९००० फूट उंच असलेल्या खोंबू घाटाच्या शिखरास वरील बर्फाच्या डोंगरावरूनच रस्ता गेलेला आहे. टिंग्रीच्या साधारणतः ओसाड अशा प्रदेशांतून ही मोहीम रोंगशाहीदरीकडे गेली. ज्यावर सूर्यप्रकाश पडूं शकतो अशा या दरीचा एक भाग काटेरी झुडुपें व रानगुलाब यांनीं फुलून गेला होता व सावली असणाऱ्या दुसऱ्या भागांत साळुंज व भूर्जवृक्ष यांचें अरण्यच बनलें होतें. उपर्युक्त दरींतून खार्ताकडे एक रस्ता आहे. खार्ता सोडल्यावर १५००० फूट उंचीचा संजुम्ला घाट लागतो. तेथून १६००० फूट उंच असलेला चोगला घाट लागतो. या घाटाहून निघाले म्हणजे पुढें देवद्वारवृक्ष असलेला

प्रदेश दिसूं लागतो. या प्रचंड देवद्वारवृक्षांच्या खोडाचा घेर २० ते २५ फूट असतो. हा प्रदेश सोडला कीं, कामचू दरी लागते. येथील देवद्वारवृक्षांचा घेर वरीलप्रमाणेच असून कांहींची उंची १५० फूट असते. त्या ठिकाणचें सृष्टि-सौन्दर्य अप्रतिम आहे. अरुण नांवाची दरी ७५०० फूट उंचीवर आहे. व तेथें अनेक वनस्पती व झुडुपें उगवलेलीं असतात. कामाचू दरी, एव्हरेस्ट व मकालू यांच्या बर्फा-च्छादित प्रचंड कडयाला अगदीं लागून आहे. व तें स्थान अत्यंत दुर्गम आहे. २६००० फूट उंचीच्या ठिकाणाकडे जाण्याचा एक रस्ता ठरवून ही मोहिम आक्टोबरमध्यें परत फिरली.

या मोहिमेंत बारा हजार चौ. मैल इतक्या टापूची पहाणी करण्यांत आली व या कामीं कर्नल रायडर यानें १९०४ मध्यें तिबेटांत जाऊन केलेले नकाशे उपयोगी पडले. अनेक प्रदेशांचे फोटो घेऊन सर्व पाहणी झाली. ३३ अंशांइतकी थंडी असतांना २३००० फूट उंचीचा प्रदेश आक्रमितां आला. या मोहिमेस एकंदर ५००० पौंड खर्च आला.

१९२२ ची मोहिमः— जनरल ब्रूसच्या नेतृत्वाखालीं ही मोहीम मार्च महिन्यांत ऑक्सिजन वायूचें सर्व साहित्य घेऊन निघाली. प्रवासांत कांहीं वाहतुकीसंबंधीं अडथळे आले नाहींत व ऑक्सिजनच्या मदतीशिवाय २६००० फूट उंचीवर ब्रूस जाऊं शकला ही खरोखर आश्चर्योत्पादक गोष्ट होय. थोडका अवधी व हवामानाची अनिश्चितता अशा अडचणी मुख्य होत्या. नाकातोंडांतील लाळ गोठून गेल्या-मुळें ऑक्सिजनचा उपयोग करण्याची अडचण आली; परंतु ती ऑक्सिजनच्या यंत्रांस एक रबरी नळी जोडून व ती दातांत धरून ऑक्सिजनचा उपयोग करता येऊं लागल्यामुळें दूर झाली. एकदा या मोहिमेंत मोठें वादळ झालें व त्या योगानें आपल्या तंबूसह ही प्रवासी मंडळी दुसरीकडे जाऊन आदळली. ऑक्सिजनच्या उपयोगामुळें २७२०० फूट उंचीचें स्थान त्यांनां गाठतां आलें. जुलैमध्यें सात असामी हिमावसरणांत गतप्राण झाले व कडक थंडी-मुळें मोहीम मागें फिरली. या मोहिमेची हकीगत जनरल ब्रूस यानें आपल्या 'दि असॉल्ट ऑन माऊंट एव्हरेस्ट १९२२'नामक पुस्तकांत ग्रथित केली असून एडवर्ड अर्नोल्ड हा त्या पुस्तकाचा प्रकाशक आहे.

१९२४ ची मोहिमः— एव्हरेस्टगिर्यारोहणाचा तिसरा प्रयत्न जनरल ब्रूसच्या नेतृत्वाखालीं पुन्हां १९२४ मार्चमध्यें करण्यांत आला. कॅप्टन नोएल यानें या मोहिमेंत सिनेमा फिल्म्स घेतल्या व डॉ. सोमरव्हेल यानें तिबेटी गाण्याची माहिती मिळविली. सहा जुने व सात नवे लोक या मोहिमेंत असून तीन्ही मोहिमेंत मॅलरी हा गृहस्थ हजर होता. प्रारं-भींचा प्रवास यशस्वी झाला; नंतर हवामानांत एकदम फरक पडला. एक असामी ठार झाला व चौघांनीं बर्फमय प्रदे-शांतील रस्ता पाहूनच हातपाय गाळले. जूनमध्यें मॅलरी व आयर्व्हिन थंडीमुळें ठार झाले; हे दोन गृहस्थ कदाचित् एव्हरेस्ट नजीक गेले असावे. ही मोहिम जूनमध्यें परतली.

एकंदर निष्कर्षः— (१) अत्युच्चस्थळीं गेल्यानें मनु-ष्यावर होणारे परिणाम अनेक स्वरूपाचे आहेत. ऑक्सि-जनच्या साह्यानें १९२४ मध्यें २८२२७ फूट उंचीवर जाणें शक्य झालें, ऑक्सिजनशिवाय २८१२८ फूट उंचीचें ठिकाण मनुष्यांस गाठतां आलें. उंच मनुष्य फारसा थकत नाहीं. परंतु खुजा मनुष्य मात्र थकतो. लांबलचक असून ज्याचा पोटऱ्याचा आकार लहान आहे असा मनुष्य या मोहिमेला योग्य असतो. फार उंचावरचें हवामानहि अंग-वळणीं पडतें, असा अनुभव आहे. तथापि थकवा मात्र अतिशय येतो ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. अत्यंत उंचीवर असलेल्या प्रदेशांतून जातांना घसा बसतो, तहान लागते व पुढें दर पावलागणिक दहा वेळां दम घेणें जरूर असतें. १९२२ च्या मोहिमेंतील अनुभवावरून असें आढळून येतें कीं, मनुष्यास अत्युच्च ठिकाणींहि झोंप लागते. (२) जेथें वनस्पतीहि उगवूं शकत नाहीं अशा उंच ठिकाणीं प्राणी राहूं शकतो. २२००० फूट उंचीवर एक लहानसा काळा कोळी आढळला होता. रोगबक नामक बर्फाच्या डोंगरावर एक करड्या रंगाचा कोळी व कांहीं पतंग आढ-ळले. २१००० फूट उंचीवर एक फुलपाखरूं आढळलें व ३००० फूट उंचीच्या ठिकाणीं एक मधमाशी आढळल्याचें सांगतात. कावळ्यासारखा एक पक्षी २४००० ते २७००० फूट उंचीच्या प्रदेशांतून भराऱ्या मारतो. १५०००फूट उंचीवर मुंग्या आढळतात. हिमालयावरील वनस्पतीवर उपजीविका करून असणारे ससाएवढे व उंदराच्या किंवा खारीच्या जातीचे प्राणी २०००० फूट उंचीवर आढळतात. खारीहि त्यांच ठिकाणीं आढळतात. २०००० फुटांपेक्षांहि जास्त उंच असलेल्या ठिकाणीं मनुष्याच्या पावलांसारखीं पावलें उमट-लेलीं दिसून येतात. केसाळ जंगली माणसांचीं हीं पावलें असावीं असें म्हणतात. तथापि बबून जातीच्या वानरांचीं तीं पावलें असावीं हेंच जास्त संभवनीय दिसतें. (३) १८००० फुटांपेक्षां जास्त उंचीवर वनस्पति असल्याचें आढळत नाहीं. (४) सर जॉर्ज एव्हरेस्ट यानेंच प्रथम एव्हरेस्टची उंची अजमाविली व ती २९००२ फूट आहे असें त्याचें मत आहे. परंतु गौरीशंकर अथवा एव्हरेस्ट शिखराची उंची अलीकडे घेतलेल्या मापनावरून २९१४१ फूट आहे असें समजतें.

गौरीहार—मध्यहिंदुस्थान. बुंदेलखंड एजन्सीमधलें हें छोटेसें सनदी संस्थान आहे. क्षेत्रफळ ७३ चौ. मैल. पैकीं १२ लागवडीखालीं व ३९ लागवडीच्या लायक. बाकी सर्व जंगल व ओसाड आहे. लो.सं.(१९०१)७७६०. उत्पन्न २७०००. मुख्य ठिकाण गौरीहार. हें झांशी माणिकपूर रेल्वे वरील बांदा स्टेशनपासून १५ मैल आहे. लो.सं.१४५७.येथील संस्थानिक स्वतःच कारभार पहातो पण मुख्य व महत्वाच्या बाबी पोलीटिकल एजंटच्या मार्फतच व्हाव्या लागतात.

संस्थानिक जिझोटिया ब्राह्मण आहे. पूर्वी त्यांच्या पूर्वजांकडे महापूर (चारखिरी) खेडें असे. राजाराम तिवारी भूगडचा किल्लेदार होता. त्यानें बंड केलें. परंतु अखेरीस शरण आल्यावरून त्याला १८०७ मध्यें या गांवची सनद देण्यांत आली. त्याच्या मुलानें १८५७ च्या दंगलींत कित्येक युरोपिअनांचे जीव वांचवले. त्याबद्दल त्याला १००० ची खिलात व रावबहादूर हा किताब मिळाला. १८६२ मध्यें दत्तकाच्या हक्काची सनद मिळाली.

गौहत्ता, पो ट वि भा ग.—आसाम. कामरूप जिल्ह्याचा पोटवीभाग क्षे. फ. २५८४ चौ. मैल. याच्यामधून ब्रह्मपुत्रा जाते. लो. सं. (१९११) ५२८६७९. गौहत्ती हें एकच शहर जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. १५२१ खेडीं आहेत. १९०३–४ सालीं १०९७००० रु. उत्पन्न झालें. दक्षिणतीराची बाजू डोंगराळ व टेंकड्यांनीं व्यापलेली आहे. उत्तर तीरावर थेट भूतानपर्यंत सपाट मुलूख आहे. सपाट मुलखांत फार दाट वस्ती आहे व मध्यभागीं ती दर चौ. मै. ६१३ पर्यंत गेली आहे. सामान्यतः वस्तीचें मान दर चौ.मैलास १८२ पडतें. इतकी जिल्ह्याच्या इतर भागांत पातळ वस्ती आहे.पाऊस निरनिराळ्या ठिकाणीं ६५ पासून ८० इंचांपर्यंत पडतो. वस्ती मुख्यतः कालिता, किवट वगैरे उच्च शूद्रांची आहे. भूतानजवळील भागात मात्र फक्त काचारी नांवाचीच जात रहाते. १८९७ मधल्या भूकंपानें जमीनीचें स्वरूप फारच बिघडलें. साळीचें पीक मुख्य आहे. मोहरी, तांदुळाची 'वाव' नावांची जात व अलिकडेच पेरण्यांत आलेला ताग हीं पिकेंहि मोठीं आहेत. काचारी लोक पाटाचें पाणी डोंगरी प्रवाहांतून घेतात. इतर ठिकाणीं उलट पाणी काढून यावें लागतें व बांध घालावे लागतात चहाचीहि लागवड थोड्याशा प्रमाणावर होते. १९०३–४ सालीं १९ मळ्यांखालीं ३६५९ एकर जमीन होती. कामाख्य, वशिष्ठ अश्वक्रांत, उमानंद वगैरे क्षेत्रें आहेत. चित्राचल येथें नवग्रहाचें देऊळ आहे.

श ह र—कामरूप जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. ब्रह्मपुत्रेच्या दोन्ही तीरावर वसलें आहे. दक्षिण व उत्तर गौहत्ती मिळून लोकसंख्या (१९११) १२४८१ आहे. स्थानिक रहिवाशी फार थोडे असून बहुतेक भरणा परप्रांतियांचाच आहे. भगदत्ताची राजधानी प्राग्ज्योतिष्पूर तें हेंच असावें असें म्हणतात. सर्वत्र सांपडणाऱ्या जुन्या अवशेषांवरून हें पूर्वी फार मोठें वस्तीचें विस्तीर्ण शहर असावें असें दिसतें. सोळाव्या शतकांत कोच राज्यामध्यें याचा समावेश होता. १६८१ त अहोम राजांनीं आपली राजधानी येथें आणली. १८०९ मध्यें एक भिकार गांव असें याचें वर्णन एका इंग्रजानें केलें आहे. १८२६ मध्यें आसाम इंग्रजांकडे आल्यापासून तें आसाम पोटविभागाचें मुख्य ठिकाण होतें व अद्यापीहि आसाम व्हॅलीचे कमिशनर व जज्‌ तेथेंच रहातात. या शहराची जागा व आसपासचा भाग मोठा रमणीय असून एकीकडे दाट जंगल व एकीकडे मैलभर रुंदीच्या पात्राची नदी असा मनोहर देखावा दिसतो.पण त्याच्या या सौंदर्याला मोहून तेथें रहाणें धोक्याचें आहे. कारण सर्व भाग मलेरिआदूषित आहे व उन्हाळ्याचा फार त्रास होतो. १८९७ च्या भूकंपानें सर्व कचेऱ्या व इमारती पडून गेल्या होत्या. आतां शहर पुन्हां नव्यानें बांधलें गेलें आहे. व येथें देवळें वगैरे बरींच असल्यानें यात्रेचें ठिकाण आहे. १८७८ मध्यें गौहत्ती म्युनिसिपालिटी स्थापन झाली. येथें दोन हायस्कुलें व कॉटन कॉलेज आहे. एक कायदेशिक्षणाचें कॉलेज आहे.

ग्मोलेन (१७९२–१८६०).—जर्मनींतील टयूबिंजन कुलांतील कित्येक विद्वान शास्त्रज्ञ ग्मेलिन या नांवानें प्रसिद्ध आहेत. पैकीं क्रिस्टियन गोटलॉब यानें कृत्रिम समुद्रपार तयार करण्याची रीत शोधून काढली व लिओपल्ड (जन्म. १७८८ मृ. १८५३)नें पालाश लोहिकर्बनीत्रिद या रासायनिक द्रव्याचा शोध लाविला.

ग्यासबेग—खुरासानच्या सुलतानापाशीं ख्वाजामहंमद शरीफ नांवाचा एक वजीर होता. त्याच्या मुलाचें नांव ग्यासबेग होतें.हा नूरजहानचा बाप होता.त्यास मिर्झा ग्यासउद्दीन महंमद किंवा अयाझ असेंहि म्हणत. बाप मरण पावल्यावर त्यास कष्टदशा प्राप्त झाली, तेव्हां आपले दोन मुलगे व एक मुलगी बरोबर घेऊन बायकोसह तो इराणांतून पळून गेला. रस्त्यांत त्यास दरोडेखोरांनीं लुटलें.कंदाहार येथें पोंचल्यावर त्याची बायको प्रसूत होऊन (१५७६) मुलगी झाली, तिचें नांव मिहरुन्निसा (म्ह. स्त्रियांमधील सूर्य). हीच नूरजहान होय. मसूद नावाच्या अकबराच्या एका ओळखीच्या व्यापाऱ्याबरोबर तो हिंदुस्थानांत आला. अकबरानें त्यास प्रथम लहानशी मनसब देऊन काबुलांत वसुलीच्या कामावर नेमिलें. ग्यासबेगच्या बायकोचें वाड्यांत जाणें येणें असे. तिला चित्रें व कशिदा काढण्याचा नाद असे. ती फारशी भाषेंत कवनेंहि करी. जहांगीर तख्तावर आल्यावर त्यानें ग्यासबेग यास इतिमा दुद्दौला ही पदवी दिली. परंतु पुढें तो खुश्रूस सामील आहे असा संशय आल्यावरून जहांगीरनें त्यास कैदेंत ठेविलें. नूरजहानच्या लग्नापासून सर्व कुटुंबाचें भाग्य उदयास आलें. ग्यासबेग मुख्य वजीर बनून त्यास सहा हजारांची मनसब मिळाली. तो इ. स. १६२२ त मरण पावला. तो शांत, उदार, धार्मिक कवि व उत्तम लेखक होता. तथापि तो लांच मात्र सडकून घेत असे. त्याची कबर आग्ऱ्याजवळ आहे. त्याचा मुलगा मीर्झा अबुल्‌ हसन (आसफखान) हा पुढें फार प्रसिद्धीस आला. आसफखानाची मुलगी मुम्ताजमहाल ही शहाजहानाची बायको होय. तो इ. स. १६४२ त मरण पावला. त्याची कबर लाहोरास जहांगीरच्या कबरीशेजारी आहे. त्याचा सालाचा पगार चाळीस लाख रुपये असून शिवाय त्यास आणखी जहागिरी देखाल होत्या. मरणसमयीं त्याची संपत्ति अडीच कोटि रुपये होती. त्याचा लाहोरचा वाडा दाराशुकोह यास देण्यांत

आला. आसफखानाचा मुलगा मिर्झा आबू तालीब उर्फ शाय-स्तेखान, हा अवरंगजेबाच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आला. याशिवाय ग्यासबेगच्या कुटुंबांचा विस्तार अति मोठा होता. त्याचे कुटुंबानें पन्नास वर्षांवर मोगल बादशाहीचा कारभार केला. [मुसलमानी रियासत]

ग्योबिंगाक—हें शहर याच नांवाच्या लहान जिल्ह्यामध्यें खालच्या ब्रह्मदेशांत मुख्य ठिकाण आहे. या शहरीं उन्हा-ळ्यांत पाण्याचा दुष्काळ पडतो. हें शहर रंगून–प्रोम–रेल्वे लायनीवर तांदुळाच्या व्यापाराचें अतिशय महत्वाचें ठिकाण आहे. या शहरीं म्युनिसिपालिटी व इस्पितळें आहेत. म्युनिसिपालिटीचें उत्पन्न १९०४ सालीं ४१००० रुपये व खर्च ४५००० रुपये होता.

ग्रँट डफ—याचें सबंध नांव जेम्स फर्ग्युसन ग्रँट डफ असून हा इंग्लंडच्या उत्तरेकडील इडेन गांवचा रहिवासी होता. याचें शिक्षण बेताचेंच झालें होतें; प्रथम हा ईस्ट इंडिया कंपनींत नौकरीस राहिल्यानंतर क्रमानें वाढत वाढत पेशवाईअखेर सातारा येथें रेसिडेंट झाला. प्रतापसिंहाचा व याचा बराच स्नेह होता. साताऱ्यास असतांना यानें आपल्या मराठ्यांच्या (बखरवजा) इतिहासाचीं साधनें गोळा केलीं होतीं. खास प्रतापसिंहानेंहि आपल्या घराण्यांत व दप्तरांत असलेलीं अस्सल पत्रव्यवहारादि साधनें त्याच्या हवालीं केलीं होतीं. तो विलायतेस गेल्यानंतर त्यानें आपला मराठयांचा इतिहास हा ग्रंथ लिहिला (१८२६). त्या कामीं त्याला फार त्रास झाला. प्रथम तो इतिहास कोणीहि पुस्तकविक्या विकत घेईना; दुसरें त्या लेखनापायीं त्याला कर्जहि बरेंच (१५०० पौंड) झालें. त्याला डोकें दुखण्याची व्यथा असल्यानें पाण्याच्या घड्या डोकीवर ठेऊन त्यानें हें पुस्तक लिहिलें पण इतक्या अडचणींतहि त्यानें जो ग्रंथ लिहिला तो फारसा विश्वसनीय निपजला नाहीं. त्यांत पुष्कळशा चुका राहिल्या आहेत. कांहीं चुक्या अशा आहेत कीं त्यांची सुधारणा त्याच्या वेळीं त्याला खास करता आली असती. परंतु मराठयांचा खरा इतिहास देण्याची तीव्र इच्छाच त्याला नव्हती व मराठयांसंबंधानें त्याची आदरबुद्धि नव्हती. ज्यांचें राज्य आपण घेतलें त्यांची त्रोटक माहिती आपल्या लोकांस थोडीफार असावी अशा हेतूनें त्यानें ही बखर रचिली; लिहिण्यांत आत्मीयता नसल्यानें त्याच्या रच-नेस विकृत स्वरूप आलें आहे. त्याच्या ग्रंथावर कै. नीळकं-ठराव कीर्तने यांनीं प्रथम टीका केली व त्यानंतर कै. खरे, राजवाडे वगैरे संशोधकांनीं त्याच्या चुक्यांचे हमेच प्रसिद्ध केले. सारांश, त्याच्या इतिहासांत पुष्कळ सुधारणा झाल्या-शिवाय तो ग्राह्य मानतां येत नाहीं. विलायतेस गेल्यानंतर तो प्रतापसिंहास तिकडील सामान व निरनिराळ्या चिजा पाठवीत असे; व त्याच्याशीं पत्रव्यवहारहि ठेवीत असे. पुण्याचा पहिला कलेक्टर रॉबर्टसन यानें एल्फिन्स्टनच्या अनुमतीनें शनवारवाड्यांतील पेशव्यांचें सर्व दफ्तर डफच्या स्वाधीन केलें होतें. तसेंच सुरतच्या वखारींतील मुंबई सर-कारचीं, गोवेसरकारचीं, इंडिया हाऊसमधील व इतर पुष्कळ ठिकाणचीं दफ्तरें त्याला मिळालीं होतीं. त्याचा त्यानें भरपूर व खराखरा उपयोग केला असतां तरीहि फारशा चुक्या झाल्या नसत्या. विलायतेस १८२५ च्या सुमा-रास तो परत गेला. त्यानें गोल्डस्मिथ याला लिहिलेल्या पत्रावरून (१८४६) त्याच्या या लिहिण्याच्या बाबतींतील सर्व माहिती समजून येते. पुढें पुस्तकविक्यांनां नको असलेली माहिती काढून टाकून त्यानें दुसरी आवृत्ति प्रसिद्ध केली होती. त्यानें अखेरचे दिवस शेती करण्यांत घालविले. [डफचा इतिहास प्रस्तावना; भा. सं. मं. त्रैमासिक व. ४ जोडअंक; राजवाडे खंड, १ प्रस्तावना.].

ग्रँट, रॉबर्ट (१८१४–१८९२)—एक ब्रिटिश ज्योतिषशास्त्रज्ञ. यानें 'दि हिस्टरी ऑफ फिजिकल अॅस्ट्रॉनॉमी फ्रॉम दि अर्लिएस्ट एजेस टु दि मिडल ऑफ दि नाइन्टीन्थ सेंचरी ' (प्राचीनतम युगांपासून १९ व्या शत-काच्या मध्यापर्यंतचा भौतिक ज्योतिषशास्त्राचा इतिहास.) हा ग्रंथ खंडशः लिहून, १८५२ त सबंध पुरा केला. ज्योतिषवाङ्मयांत या ग्रंथाला पहिलें स्थान मिळून कर्त्याला रॉयल अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचें सुवर्णपदक मिळालें. याखेरीज ग्रँटनें बऱ्याच मासिकांतून शास्त्रीय लेख प्रसिद्ध केले. ग्लासगो विश्वविद्यालयाचा प्रोफेसर असतांना त्यानें बऱ्याच ताऱ्यांचीं स्थानें नक्की केलीं व त्यांचें कॅटलॉग छापले (१८८३–१८९२).

ग्रंथप्रकाशनाचा मालकी हक्क (कॉपी राईट)—मुद्रणकलेच्या उत्पत्तिपासूनच या प्रकारच्या हक्काच्या जाणि-वेस विशेष सुरुवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. या हक्काचें महत्व ज्या भाषेत ग्रंथप्रकाशन व्हावयाचें त्या भाषेच्या प्रसारावर अवलंबून असणार हें साहजिक आहे. तेव्हां इंग्रजी भाषेतील ग्रंथप्रकाशनाच्या मालकी हक्कास आज सर्वांत जास्त महत्व आहे.व त्यामुळेंच या हक्कासंबंधींचा कायदा विशेष स्पष्ट व सूक्ष्म करावा लागला. प्रथम या कायद्याच्या इतिहासाचें अवलोकन करून मग प्रत्यक्ष कायद्याकडे वळूं.

इ ति हा स, इंग्लंड.— इंग्लंडमध्यें ग्रंथ छापण्या-संबंधीं जे निर्बंध घालण्यांत आले त्यामुळें ग्रंथप्रकाशनाचे हक्क प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली. पुढें ' स्टेशनर्स हॉल ' म्हणून छापखानेवाल्यांनीं आपला संघ स्थापन केला, व सरकाराकडून त्याला १५५६ सालीं ' चार्टर ' किंवा सनद मिळाली. सन १५५६ पासून सन १६४० पर्यंत ग्रंथ छापण्याचे परवाने देण्याचा अधिकार स्टार चेंबरकडे होता; व छापलेल्या ग्रंथांची नोंद ठेवण्याची व्यवस्था वर दर्शविलेल्या ' स्टेशनर्स हॉल ' या संस्थेनें केली होती. सन १६३७ सालीं स्टार चेंबरनें फर्मान काढून या नोंदींत अना-धिकारी लोकांनीं छापलेल्या ग्रंथांची नोंद करण्याविषयीं मनाई केली. सन १७०९ सालीं स्टेशनर्स हॉल संस्थेनें

ग्रंथप्रकाशनाच्या हक्कास कायदेशीर स्वरूप मिळावें म्हणून पार्लमेंटकडे अर्ज केला. त्याच वर्षी ग्रंथप्रकाशनाच्या हक्कासंबंधी कायदा झाला. ह्या कायद्यानें कर्त्यास ग्रंथप्रकाशनाचा मालकी हक्क सन १७१० पर्यंत छापलेल्या ग्रंथांच्या बाबतींत त्या सालापासून एकवीस वर्षे, व १७१० सालानंतर छापलेल्या ग्रंथांच्या बाबतींत ग्रंथ छापल्यानंतर १४ वर्षे व यापुढें ग्रंथकर्ता हयात असल्यास आणखी चौदा वर्षे अशा मुदतीनें दिला होता. सन १८११ मध्यें ग्रंथप्रकाशनाच्या हक्काच्या मुदतींत कायद्यानें कांहींशी भर घातली; म्हणजे ग्रंथप्रसिद्धिच्या तारखेपासून २८ वर्षे, व ग्रंथकार त्यापुढें हयात राहिल्यास त्याच्या मरणापर्यंत, अशी ही मुदत ठरविण्यांत आली. पुन्हा १८४२ सालीं ह्या मुदतींत ज्यास्त भर घालण्यात आली. म्हणजे ग्रंथप्रकाशनाच्या तारखेपासून ग्रंथप्रकाशकाच्या निधनापर्यंत व त्यापुढें आणखी सात वर्षे, व जर ही मुदत ४२ वर्षांहून कमी भरली तर एकंदर ४२ वर्षे, अशी ग्रंथप्रकाशनाच्या हक्काची मुदत ठरली. १९११ सालीं झालेल्या कायद्यानें ग्रंथप्रकाशनाच्या हक्काची मुदत साधारणतः ग्रंथकर्ता हयात असेतोंपर्यंत व त्यापुढें पन्नास वर्षे, अशी ठरविलेली आहे. परंतु कर्त्याच्या मरणानंतर पंचवीस वर्षांच्या पुढें, व सन १९११ पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाच्या बाबतींत तीस वर्षांपुढें, ग्रंथाच्या प्रती करून विकण्याची मुभा इतरांस कांहीं अटींवर दिली आहे. पहिली अट अशी कीं, अशा रीतीनें प्रती काढणारानें ग्रंथकर्त्याच्या वारसाला अगाऊ नोटीस द्यावी, व ज्या प्रती विकल्या जातील त्यांच्या किंमतींतून त्यास स्वामित्वाबद्दल दहा टक्के द्यावे. तसेंच कॉपीराइटसाठीं स्टेशनर्स हॉलमध्यें ग्रंथ राजिस्टर करण्याविषयींची अट ह्या कायद्यानें काढून टाकली. सन १९११ च्या ह्या कायद्यास "इंपीरियल कॉपीराईट ॲक्ट" म्हणजे "साम्राज्यांतील ग्रंथप्रकाशनाचा कायदा" अशी संज्ञा आहे. कारण ब्रिटिश साम्राज्यांत अंतर्भूत होणाऱ्या सर्व देशांत त्याचा अंमल होईल असें ह्या कायद्यांत फर्माविलें आहे.

हिंदुस्थानः—हिंदुस्थानांत ग्रंथप्रकाशनाचा पहिला कायदा ईस्ट इंडिया कंपनीच्या अमदानींत सन १८४७ च्या २० व्या ॲक्टानें झाला. सन १८४७ चा २० वा ॲक्ट हिंदुस्थानाकरितां स्वतंत्र कायदा म्हणून करावा लागला. हा ॲक्ट म्हणजे जवळ जवळ इंग्लंडमधील सन १८४२ च्या कायद्याची नक्कल आहे. म्हणजे ह्या कायद्यानें ग्रंथप्रकाशनाच्या मालकी हक्काची मुदत ग्रंथप्रसिद्धीच्या तारखेपासून ग्रंथकर्त्याच्या निधनापर्यंत व त्यानंतर सात वर्षे व जर ही मुदत बेचाळीस वर्षांहून कमी भरली तर एकंदर बेचाळीस वर्षे अशी ठरविली व ग्रंथप्रकाशनाचा मालकी हक्क प्रस्थापन होण्याकरितां ग्रंथ सरकारांत रजिष्टर करावा असा निर्बंध घातला. हा ॲक्ट सन १९१२ तील आक्टोबर महिन्याच्या ३० तारखेपर्यंत अंमलांत राहिला. ह्या तारखेस हिंदुस्थान सरकारच्या प्रसिद्धी-पत्रकानें इंग्लंडांतील १९११ चा इंपिरियल कॉपीराईट ॲक्ट हिंदुस्थानास लागू करण्यांत आला व त्या वेळीं १८४७ च्या २० व्या ॲक्टाचा लोप झाला. पुढें सन १९१४ मध्यें इंग्लंडांतील ह्या कायद्यांत इकडील परिस्थितीप्रमाणें फेरफार करून हिंदुस्थानाकरितां ग्रंथप्रकाशनाचा कायदा म्हणून सन १९१४ चा ३ रा ॲक्ट पसार करण्यांत आला. सध्यां हिंदुस्थानांत ग्रंथप्रकाशनाचा हाच कायदा अमलांत आहे.

इतर देशः— आस्ट्रिया, जर्मनी, जपान व स्वित्झर्लंड या राष्ट्रांत ग्रंथकर्त्यांच्या हयातींत व त्यानंतर ३० वर्षे हा हक्क राहतो. बेल्जम, फ्रान्स, हंगेरी, नॉर्वे, पोर्तुगाल, रशिया, स्वीडन आणि डेन्मार्क या देशांत कर्त्याच्या हयातीपर्यंत व पुढें ५० वर्षे मालकी हक्क टिकतो. स्पेनमध्यें कर्त्याच्या मृत्यूनंतर ८० वर्षे टिकतो. हालंडमध्यें कर्त्याच्या हयातीपर्यंत किंवा ५० वर्षे, यापैकीं जो काळ जास्त असेल तेथपर्यंत हा हक्क रहातो. इटली देशांत कर्त्याच्या हयातीपर्यंत किंवा प्रकाशनानंतर ४० वर्षे मालकी हक्क टिकतो. ग्रीसमध्यें प्रकाशनानंतर फक्त १५ वर्षे हक्क असतो. अमेरिकेंत कर्त्याला प्रथम प्रकाशनाच्या तारखेपासून २८ वर्षे व या मुदतीनंतर कर्ता जिवंत असेल तर त्याला किंवा जवळच्या नातलगाला पुन्हा २८ वर्षेपर्यंत मालकी हक्क मिळविता येतो. एका देशात ग्रंथ नोंदण्यापासून मिळालेला हक्क दुसऱ्या देशात चालत नाहीं.

ग्रं थ प्र का श ना चे ह क्क.—ग्रंथस्वामित्वाचीं तीन अंगें आहेत. (१) ग्रंथ म्हणजे केवळ जंगम माल ह्या दृष्टीनें ज्या कागदावर ग्रंथ लिहिला असेल त्या कागदावरील मालकी. (२) ग्रंथाच्या प्रती प्रसिद्ध करण्याची व इतरांस प्रती करण्यास प्रतिबंध करण्याची सत्ता, म्हणजे कॉपीराइट् अथवा ग्रंथप्रकाशनाचा हक्क व (३) ग्रंथांतील (शब्दाविरहित) केवळ कल्पना, विचार किंवा माहिती याचा स्वतंत्र ग्रंथरचना करण्यात उपयोग करण्याचा अधिकार. ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतर देखील इतरास विक्रीकरितां त्याच्या प्रती करण्याविषयीं प्रतिबंध करण्याचा अधिकार ग्रंथकर्त्यास आहे. तथापि ग्रन्थात ग्रथित झालेल्या कल्पना, नमूद केलेले विचार किंवा दिलेली माहिती, स्वतंत्र ग्रंथरचनेनें प्रसिद्ध करण्याविषयीं इतरास प्रतिबंध करण्याची सत्ता ग्रंथकर्त्यास नाहीं. ज्या ठिकाणीं विश्वासघात किंवा दगलबाजी करून ग्रंथाचें कर्तृत्व कोणी पटकाविलें असेल तर त्या ठिकाणीं कॉपीराइट ॲक्टांतील नियमांस न जुमानतां असल्या विश्वासघातकी किंवा दगलबाजीच्या कृत्यास मनाई करण्याचा व त्यासंबंधीं कायद्यास अनुसरून मूळ ग्रंथकारास इतर दाद देण्याचा अधिकार कोर्टास आहे.

कोणत्याहि ग्रंथाच्या किंवा त्यांतील महत्वाच्या भागाच्या प्रती काढण्याचा किंवा ग्रंथ अप्रकाशित असल्यास तो ग्रंथ किंवा त्यांतील महत्वाचा भाग प्रसिद्ध करण्याचा कर्त्याचा

जो हक्क तो कॉपीराइट अशी ग्रंथप्रकाशनाच्या हक्काची व्याख्या आहे. ग्रंथप्रकाशनाविषयीं कायदा करण्याचा मुख्य हेतु विशेष उत्तेजन देणें हा होय. ग्रंथकर्त्यांवांचून इतरांस ग्रंथप्रती न करूं देण्याचा उद्देश ग्रंथलेखनास उत्तेजन मिळावें व चांगले ग्रंथ निर्माण होऊन विद्येचा प्रसार व्हावा हा आहे. परंतु ग्रंथकर्त्यांचे हक्क संरक्षणाच्या बाबतींत उपाय योजतांना, ज्ञानप्रसाराच्या मार्गांत प्रतिबंध न येण्याविषयीं खबरदारी घेणें अवश्य आहे. शाळेंतील विद्यार्थ्यांकरितां रचलेल्या जुन्या ग्रंथांतील उताऱ्यांच्या पुस्तकांत जरी आधुनिक ग्रंथकर्त्यांच्या ग्रंथांतून त्यांच्या ग्रंथप्रकाशनाच्या हक्कास बाध आणणारी वरील तऱ्हेचीं अवतरणें दिलीं, तरी तें क्षम्य आहे असें कायद्यानें ठरविलें आहे. फक्त त्याबद्दल दोन अटी प्रकाशकानें पाळल्या पाहिजेत. पहिली अट, पांच वर्षांच्या मुदतींत त्याच प्रकाशकानें त्याच ग्रंथकाराच्या ग्रंथांतून दोहोंहून अधिक अवतरणें घेऊं नयेत; व दुसरी अट, अवतरणें घेतल्याबद्दल ज्या ग्रंथांतून तीं घेतली असतील त्या ग्रंथांचा उल्लेख करून कबुली देण्यांत यावी. ग्रन्थप्रकाशनाच्या हक्कास तिसरा एक अपवाद आहे. कांहीं लोक उपजीविकेचें साधन म्हणून लहान किंवा मोठ्या जनसमूहापुढें निरनिराळ्या ग्रंथांतून चुटके किंवा उतारे किंवा पाठ बोलून दाखवितात. ह्यामुळें ग्रंथकर्त्यांच्या हक्काचें तात्विकदृष्ट्या उल्लंघन होतें खरें; परंतु जोंपर्यंत अशा रीतीनें उपयोगांत आणलेले उतारे बेसुमार नाहींत तोंपर्यंत त्याविषयीं ग्रंथकर्त्यास आक्षेप घेण्याचें कारण नाहीं असें कायद्यानें फर्माविलें आहे

प्रकाशित झालेल्या कोणत्याहि ग्रंथासंबंधीं कॉपीराइट उत्पन्न होण्यास, तो ग्रंथ सन १९११ च्या कॉपीराइट ॲक्टाचा अंमल असेल अशा ब्रिटिश साम्राज्यांतील देशांत प्रथम प्रकाशित झाला पाहिजे. मित्र, शिष्य, वृत्तपत्रांचे संपादक वगैरे निवडक मंडळींत ग्रंथ प्रसिद्ध केल्यानें ग्रंथप्रकाशन होत नाहीं. रंगभूमीवर प्रयोग केल्यानें ग्रन्थप्रकाशन होत नाहीं. ग्रंथप्रकाशन म्हणजे लोकांस ग्रंथ उपलब्ध करणें; मग ग्रंथ विक्रीसाठीं ठेवून हें घडो किंवा मोफत ग्रंथ वाटल्यामुळें हें होवो. परंतु प्रकाशन घडून येण्यास अमुक प्रती खपल्या पाहिजेत असा मात्र निर्बंध नाहीं. प्रकाशनाची क्रिया एक प्रत खपल्यानें देखील होते.

ग्रंथांसंबंधीं कॉपीराइट प्राप्त होण्यास तो ग्रंथ, ग्रंथकर्त्यांची मूळ कृति असली पाहिजे असा निर्बंध सन १९११ च्या कायद्यानें घातला आहे. अनेक जुन्या ग्रंथांतून जरी उतारे घेऊन ग्रंथ बनविला असला, ग्रंथांत कर्त्यांची कृति अगदीं अल्पांशानें जरी असली, ग्रंथांत वैचित्र्य किंवा नाविन्याचें नांव जरी नसलें व वाङ्मयदृष्ट्या ग्रंथ कुचकामाचा असला, तरी त्या ग्रंथाविषयीं कर्त्यास ग्रंथप्रकाशनाचे सर्व हक्क मिळतात. व्यापाऱ्यांनीं तयार केलेल्या विक्रीच्या जिन्नसांच्या यादयांविषयीं देखील कॉपीराइट प्रस्थापित करण्याकडे कोर्टांची प्रवृत्ति आहे. निरनिराळ्या ग्रंथांतील उतारे एकत्र छापल्यास त्या उताऱ्यांवर हक्क प्राप्त होत नाहीं. परंतु त्यांस स्पष्टीकरणार्थ टीपा जोडल्यास त्या टीपांवर कॉपीराइट राहतो असा प्रीव्ही कौन्सिलनें निकाल दिला आहे. परंतु कृतींत परिणामीं उतरणाऱ्या साम्यामुळें एकानें दुसऱ्याची नक्कल करण्यास कायद्यानें प्रत्यवाय नाहीं असें समजूं नये.

अनेकदां ग्रंथकार आपल्या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या काढतो. त्यापैकीं कांहीं आवृत्त्या ग्रंथकार स्वतः काढतो. व या निरनिराळ्या आवृत्त्या काढतांना त्यांत सुधारणा करतो किंवा भर घालतो. जर ही सुधारणा किंवा भर महत्वाची असली तर ती आवृत्ति मूळकृति म्हणून गणली जाते व त्या आवृत्तीसंबंधीं त्या ग्रंथकर्त्यास स्वतंत्र कॉपीराइट प्राप्त होतो. ग्रंथाच्या नांवासंबंधीं जरी ग्रंथकारास मालकी हक्क पोहोंचत नसला तरी ट्रेडमार्कचा हक्क पोहोंचतो. क्वचित् प्रसंगीं नावाच्या वैचित्र्यामुळें ग्रंथाचें नांव देखील कॉपीराइटचा विषय होणें शक्य आहे व अशीं कांहीं उदाहरणें झालींहि आहेत. मराठींत 'नवनीत' नांवानें कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. तें नांव ज्या अर्थानें योजिलें आहे, त्यांत वैचित्र्य आहे. त्यामुळें त्याविषयीं कॉपीराइट आहे असें मानल्यास तें अपवादात्मक होणार नाहीं.

हक्काची मुदत.—कॉपीराइटची अर्थात् ग्रंथप्रकाशनाच्या हक्काची मुदत हल्लींच्या कायद्यानें ग्रंथकर्त्याच्या हयातीपर्यंत व त्यापुढें पन्नास वर्षें इतकी ठरविली आहे. परंतु ग्रंथकर्त्यांच्या हयातींतील कॉपीराइट व त्याच्या मरणानंतरचा कॉपीराइट सारख्या दर्जाचे नाहींत. ग्रंथकर्त्यांच्या हयातींतील कॉपीराइट अगदीं पूर्ण किंवा अबाधित असतो; म्हणजे ग्रंथकर्त्याखेरीज इतरांस ग्रंथाच्या प्रती प्रसिद्ध करण्यास अजिबात प्रतिबंध असतो. ग्रंथकर्त्यांच्या निधनानंतरच्या पन्नास वर्षांपैकीं पहिलीं पंचवीस वर्षें (व सन १९११ च्या अगोदर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांच्या बाबतींत तीस वर्षें) कॉपीराइट तसाच अबाधित असतो. म्हणजे कॉपीराइटच्या मालकाशिवाय इतरांस त्या ग्रंथाच्या प्रती प्रसिद्ध करण्याचा पूर्ण प्रतिबंध असतो. परंतु शेवटल्या पंचवीस (१९११ साला अगोदर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाच्या बाबतींत वीस) वर्षांत कॉपीराइट मर्यादित स्वरूपाचा होतो. तो असा कीं, ह्या मुदतींत कांहीं अटींवर ग्रंथाच्या प्रती प्रसिद्ध करून विकण्याचा अधिकार इतरांस संपादन करणें शक्य असतें. त्या अटी अशा:—प्रती प्रसिद्ध करणारानें कॉपीराइटच्या मालकास आपण प्रती प्रसिद्ध करणार आहोंत ह्याबद्दल आगाऊ नोटीस द्यावी, व ज्या प्रती विकल्या जातील त्यांच्या किंमतींतून स्वामित्वाबद्दल म्हणून शेंकडा दहा टक्के त्यास द्यावे. नोटीस कशी द्यावयाची, नोटिशींत कोणता खुलासा करावयाचा, स्वामित्वाबद्दल रक्कम कशी व केव्हां आगाऊ किंवा पाहिल्यानें जामिन पटवून नंतर द्यावयाची वगैरे बाबींविषयीं नियम करण्याची

सत्ता कायद्यानें हिंदुस्थान सरकारकडे सोंपविली आहे. ग्रंथकर्त्याच्या हयातींतील कॉपीराइट व हयातीनंतरचा कॉपीराइट यांमध्यें दुसरा एक महत्वाचा फरक कायद्यानें केला आहे तो असा कीं, ग्रंथकर्ता हयात असतां आपला ग्रंथ आरंभीं प्रसिद्ध करणें किंवा न करणें हें त्याच्या मर्जीवर असतेंच; परंतु ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतर देखील ग्रंथाच्या अधिक प्रती छापून विकणें किंवा न विकणें तसेंच देशांत त्या छापून विकण्याची परवानगी देणें किंवा न देणें हें सर्वस्वी ग्रंथकर्त्याच्या अगर कॉपीराइटच्या मालकाच्या इच्छेवर अवलंबून असतें. ग्रंथकर्त्याच्या निधनानंतर हा प्रकार बदलतो तो असा कीं ग्रंथकर्त्याच्या हयातींत प्रसिद्ध झालेल्या कोणत्याहि ग्रंथाच्या अधिक प्रती छापून विकण्याचें किंवा इतरांस छापून विकण्याबद्दल परवानगी देण्याचें कॉपीराइटच्या मालकानें नाकारल्यामुळें लोकांस तो ग्रंथ मिळेनासा झाला तर प्रीव्ही कौन्सिलकडे अर्ज करून तो ग्रंथ छापून विकण्याचें लायसन्स—अर्थात् परवाना—संपादन करण्याचा हक्क इतरांस कायद्यानें ठेविला आहे. हा परवाना देतांना प्रीव्ही कौन्सिलनें कॉपीराइटच्या मालकास स्वामित्वाबद्दल काय द्यावयाचें वगैरेबद्दल अटी घालावयाच्या असतात.

अनेक लेखकांचे पृथक् पृथक् लेख एकत्र ग्रथित करून बनलेला ग्रंथ कायद्याच्या दृष्टीनें एक ग्रंथ नव्हे. परंतु जो ग्रंथ अनेक ग्रंथकार एकमेकांच्या सहकारित्वानें लिहितात व ज्यांतील अमका भाग अमक्याची पृथक् कृति म्हणून दाखवितां येणें शक्य नसतें, अशा ग्रंथास अनेक ग्रंथकारांनीं लिहिलेला एक ग्रंथ असें कायद्यानें मानिलें आहे. अशा ग्रंथाच्या कॉपीराइटची मुदत त्याच्या अनेक कर्त्यांपैकीं प्रथम जो मरण पावेल त्याच्या हयातीपर्यंत व त्यापुढें पन्नास वर्षें किंवा सर्वांच्या मागून मरणाऱ्या कर्त्याच्या हयातीपर्यंत, ह्या दोन मुदतींपैकीं जी मुदत ज्यास्त भरेल ती कॉपीराइटची मुदत असें कायद्यानें ठरविलें आहे. हा नियम कर्त्यांपैकीं एक किंवा अधिक हयात असतांना ग्रंथ प्रसिद्ध झाल्यास लागू पडतो. ग्रंथकर्त्यांपैकीं सर्वच मयत झाल्यानंतर जर ग्रंथ प्रसिद्ध झाला तर कॉपीराइटची मुदत प्रसिद्धीच्या तारखेपासून पन्नास वर्षें समजावयाची असते. १९११ सालच्या कायद्यानें भाषांतर करण्याच्या हक्काचा समावेश कॉपीराइटमध्यें केला आहे. हिंदुस्थान सरकारच्या १९१४ सालच्या ॲक्टानें हिंदुस्थानांत प्रथम प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांच्या बाबतींत भाषांतर करण्याच्या मालकी—हक्काची मुदत दहा वर्षें ठरविली आहे. परंतु हीं दहा वर्षें संपण्यापूर्वी ग्रंथकर्त्यानें अगर त्याच्या परवानगीनें कोणी भाषांतर प्रसिद्ध केलें तर भाषांतर करण्याविषयींच्या हक्काची मुदत कॉपीराइटमधील इतर हक्कांच्या इतकीच—म्हणजे ग्रंथकर्त्याची हयाती व त्यापुढें पन्नास वर्षें अशी होते. शिवाय भाषांतरकार आपल्या भाषांतराचा स्वतंत्र कृति ह्या नात्यानें मालक असल्यामुळें भाषांतररूपी ग्रंथाचा त्याला स्वतंत्र कॉपीराइट मिळतो, व इतरांस त्याची नक्कल करण्यास प्रतिबंध होतो.

कॉपीराइटच्या दृष्टीनें ग्रंथांचे दोन विभाग आहेत. पहिला विभाग, निरनिराळ्या कर्त्यांच्या पृथक् प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांचा; व दुसरा विभाग अनेक कर्त्यांनीं लिहिलेल्या अनेक लेखांचा समुच्चय करून बनलेल्या ग्रंथांचा. पहिल्या विभागांतील ग्रंथांच्या स्वामित्वावर प्रथम हक्क अर्थात् कर्त्याचा असतो. ह्या नियमास एक अपवाद आहे. तो असा कीं, जर कर्त्यानें ग्रंथरचनेची नोकरी पतकरून, नोकरींतील कामगिरी म्हणून ग्रंथरचना केली, तर त्या ग्रंथाचें स्वामित्व तत्संबंधीं निराळ्या ठरावाच्या अभावीं कर्त्याच्या मालकाकडे जातें. दुसऱ्या विभागांत वृत्तपत्रें, मासिकें, ज्ञानकोश वगैरे अनेक लेखकाचे पृथक् लेख एकत्र करून बनलेल्या कृतींना समावेश होतो. अशा अनेक लेखकांचें एक किंवा अनेक लेखकांचें पृथक लेख एकत्र ग्रथित करून बनलेल्या कृतीचें अथवा ग्रंथाचें स्वामित्व कायद्यानें ग्रंथप्रकाशकास दिलें आहे. कॉपीराइटची मुदत संपेपर्यंत प्रकाशक व कर्ता ह्यांनीं आपसांत तडजोड केल्यावांचून लेखसमुच्चयांतील कोणताहि लेख पृथक् ग्रंथरूपानें प्रसिद्ध होण्यास मार्ग नाहीं.

कॉपीराइट बेचन करून देण्याचा तसेंच मृत्युपत्रानें त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार कर्त्यास आहे. मृत्युपत्राच्या अभावीं कॉपीराइट कर्त्याच्या वारसामध्यें विभागला जातो

कोणताहि ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वी त्याच्या कॉपीराइटचें बेचन करतां येतें. परंतु केवळ ग्रंथाच्या हस्तलिखित किंवा मूळ प्रतीची मालकी मिळाल्यामुळें त्या ग्रंथाचा कॉपीराइट मिळत नाहीं.

१९१४ सालच्या कायद्यानें कॉपीराइटसाठीं सरकारांत ग्रंथ रजिस्टर करण्याविषयीं निर्बंध काढून टाकला आहे ग्रंथकर्त्याचें नांव व प्रकाशकाचें नांव ग्रंथाच्या छापील प्रतींतील मूळ पृष्ठावर देण्यांत यावें, व तचें कॉपीराइटकरितां प्रमाणभूत मानलें जावें, असें या कायद्यानें फर्माविलें आहे. [—वि. ज्ञा. विस्तार, ज्युबिली ग्रंथ पहिला; उत्तरार्ध निबंधावली " १९२३].

ग्रंथिरोग—पुरातन काळीं शरीरांत कोठल्याहि भागांत गांठ उत्पन्न झालेली दिसली अगर हातानें शरीर, उदर वगैरे चाचपतांना लागली म्हणजे तिला गांठ अगर गुल्म (अर्बुद) असें संदिग्ध नांव देत. याचें कारण ती कोणत्या प्रकारची आहे याचें निदान करण्याची माहिती हल्लींइतकी उपलब्ध नव्हती. म्हणून गंडमाळाच्या गांठी, पाणथरी एखादे पोटांतील गळूं अगर क्यान्सरसारखा असाध्य अगर अन्य तऱ्हेची सुसाध्य ग्रंथि शरीरांत उत्पन्न झाली तरी सामान्यतः सर्वच प्रकारच्या गांठींना वर सांगितले त्यांपैकीं एखादें नांव देत. परंतु हल्लीं जंतुशास्त्राची प्रगति व सूक्ष्म दर्शक यंत्रांचा निरनिराळ्या ग्रंथिरोगांची सूक्ष्म रचना कशी

आहे व तिचें शरीरांतील अस्थि, मांस, त्वचा इत्यादि कोणत्या रचनेशीं साम्य आहे हें पाहण्याच्या कामीं अधिक उपयोग करूं लागल्यामुळें पूर्वीइतकी या रोगाविषयीं संदिग्धता राहिली नाहीं. म्हणून या रोगाची व्याख्या व वर्गीकरण नवीन तऱ्हेनें करणें जरूर आहे. दाह, सूज, अथवा रचनावृद्धि या व्यतिरिक्त अगर यामुळें जी गांठ शरीरांत अगर शरीराबाहेर उत्पन्न होते व जी आपोआप अगर अंतर्बाह्य उपचारांनीं व औषधांनीं बरी होत नाहीं तिला ग्रंथि म्हणावें. यास पुरवणीदाखल असेंहि म्हणतां येईल कीं या ग्रंथीचा शरीरांतील आयव्ययादि व्यापारामध्यें कांहीं-एक उपयोग नसतो. वर्गीकरणाच्या अनेक प्रकारांपैकीं एक दोन प्रकारचें वर्गीकरण पुढें दिलें आहे. (१) दाहयुक्त अगर जंतुजन्य ग्रंथि (२) विशिष्ट शारीरिक रचनावृद्धिजन्य ग्रंथि (३) कोटर ग्रंथि (४) शुद्ध अगर यादृच्छिक ग्रंथि.

(१) दा ह यु क्त ग्रं थि—यांत कोणत्या तरी प्रकारच्या दाहजंतुप्रवेशाचें निमित्त होऊन त्यानंतर ती दाहक्रिया ठरीव क्रमानें सुरू होऊन संपते. म्हणजे त्या ठिकाणीं रक्तसंचय व लशींची उत्पत्ति फार होऊन दुखणारें,ठणकणारें व लाल गळूं सर्वांस परिचित असलेलें बनतें; व त्या ठिकाणीं शरीर रचना व आगंतुक जंतूमध्यें युद्ध असून त्यांत जंतूचा पराभव झाल्यास गळूं अगर सूज न पिकतां अगर न वाढतां ती जिरूं लागते. परंतु उलट प्रकार म्हणजे जंतु प्रबल झाल्यास रचनेंतील पेशी मृत होऊन पातळ होतात व त्याचा पू बनतो. असा प्रकार घडविणारे जंतू स्ट्रेप्टोकॉकस व स्टयाफिलोकॉकस या जातीचे असतात पू बनवीत नाहींत असे क्षय व उपदंश या रोगांचे जंतू आहेत. ते वरील प्रकारचा तीव्र व त्वरित संपणारा दाह उत्पन्न न करता अति दीर्घकालीन प्रकारचे फार थोड्या अगर बिन पुवाचे दाह सुरू करितात. पुवाच्या ऐवजीं त्यामुळें जाड पुटकळी (क्षय—उपदंश) रोगांमध्यें तयार होऊन ती सावकाश वाढून पुष्कळ महिने अगर वर्षें टिकते.दिसण्यांत या गांठीं जरी यादृच्छिक ग्रंथीसारख्या दिसल्या तरी सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिल्यास त्यांत शरीररचना पेशी न आढळतां दाहावस्थेंत असलेल्या पेशींचे अनेक समूह दिसून येतात. अशा प्रकारच्या ग्रंथींस पूयग्रंथि अगर विद्रधि अथवा गळूं म्हणतात व ती शरीराच्या कोणत्याहि कटिरउदरादि अंतर्बाह्य भागांत यकृत, फुप्फुसादि इंद्रियांत अथवा अस्थिमांसमज्जादि रचनेमध्यें होऊं शकते.

(२) शा रीरि क र च ना वृ द्धि ज न्य ग्रं थि:—एखाद्या स्नायूवर अगर अवयवावर अधिक काम अगर व्यायाम पडला तर तो अवयव कालांतरानें मोठा होतो. म्हणजे त्याची सूक्ष्मदर्शनीय रचना न बदलतां त्याचा आकार अगर क्षेत्रफळ मात्र वाढतें. हृदयाच्या पडद्यास विकृति होऊन हृदयांत अधिक रक्त सांचल्यानें त्यास श्रम अधिक पडून हृदयस्नायु मोठा होतो व म्हणून हृदयाहि मोठें होतें. पण यास कोणी ग्रंथि म्हणत नाहीं. तथापि तें नांव, हिमज्वरांत होणाऱ्या अति मोठया प्लीहेस अगर थायरॉइडवृद्धि नामक रोगांत आढळणारी त्या थायरॉइड ग्रंथीच्या वृद्धीस किंवा हॉजकिनच्या रोगांत शरीरातील सर्वच रसग्रंथींची वृद्धि होते, त्या वृद्धीस समर्पकतेनें देतां येतें. या रचनांपैकीं कोणतीहि सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिली असतां निरोगी स्थितींत असल्याप्रमाणेंच ती रचना असलेली दिसते. फक्त आकार एकंदर त्या सबंध रचनेचा वाढून ती रचना ग्रंथीप्रमाणें दिसते व चाचपल्यास हातास गांठीप्रमाणें लागते. रचनेंत विकृति नाहीं फक्त वृद्धि आहे तर या स्थितीस रोग तरी कां म्हणावें? तर या वृद्धीबरोबर रक्तांत व मज्जातंतूंत बदल होऊन ठराविक तऱ्हेचीं लक्षणें रोग्यास होतात म्हणून हे रोग ठरविले गेले आहेत. हें त्याचें उत्तर आहे. तथापि ही वृद्धि कांहीं प्रकारच्या जंतूंमुळें होते किंवा कसें याविषयीं अद्याप पुष्कळ वाद व अनिश्चितपणा आहे.

(३) को ट र ग्रं थि:—अर्बुद रोग अगर पोकळ गांठी यांतच गुल्मरोगाचा समावेश होतो. त्यांच्या आंत द्रव पदार्थ असून भोंवताली सालीप्रमाणें तंतुमय व अतिचिवट कोष अगर वेष्टण असतें. आंतील द्रवपदार्थांचें स्वरूप भिन्न जागीं भिन्न प्रकारचें आढळतें. अगोदर मूळची लहान पोंकळी असून ती विकृतीनें व आंतलि स्वाभाविक द्रवबिंदूची वृद्धि होत गेल्यानें बाहेरील वेष्टणास ताण पडून तें मोठें होतें व भरीव ग्रंथीप्रमाणें रोगग्रंथि दिसते, व हातास लागते.अशा पोकळ रचना शरीरांत मूळच्याच गांठी पुष्कळ असल्यामुळें लहान मोठ्या अशा अनेकप्रकारांच्या व आकाराच्या पोकळ गांठी शरीरांत झालेले रोगी पुष्कळ आढळतात व खरें पाहूं गेलें तर त्या खऱ्या गांठीहि नव्हेत; परंतु रोगनिदानामध्यें चूकभूल होऊं नये म्हणून त्यांनां येथें स्थान दिलें आहे. या कोटरग्रंथि रोगाचें असें वेगळें वर्गीकरण करण्यालायक तो विविधस्वरूपी रोग असल्यामुळें वैद्यकीय ग्रंथांत त्यास स्वतंत्र रोग समजतात. यासच अर्बुदरोग, गुल्मरोग (पहा) असें म्हणतात व बाह्य साम्यतेखेरीज ग्रंथिरोगाशीं त्याचा फारसा संबंध नाहीं.

(४) शे व ट चा प्र का र शु द्ध अ ग र या दृ च्छि क ग्रं थि:—या गांठींचा उगम मूळ एखाद्या जीवन पेशीचें अगर त्यांच्या समूहाचें वर्धितसंख्यामान सावकाशपणें अगर एकाएकीं होऊं लागून ती ग्रंथि:तयार होऊं लागते. याच्या भोंवतालच्या रचनेपैकीं या ग्रंथीचा सांगाडा जुळविण्यापुरती तंतुमय सामुग्री संधायक रचनेंतून घेतली जाते. भोंवतालची रचना हा वृक्ष आहे असें कल्पिलें तर ही नवग्रंथि तिचें अपत्य अगर शाखा होय; म्हणून कोठल्याहि ठिकाणचा ग्रंथिरोग ज्या प्रकारच्या (अस्थि, स्नायु इ.) रचनेंतून निर्माण झाला असेल त्या रचनेची हुबेहुब प्रतिकृतीच ती ग्रंथि असते. त्वग्ग्रंथीची रचना साध्या चामडीच्या रचने-

प्रमाणेंच असते. सुसाध्य स्तनग्रंथिरोगाचा पातळ पापुद्रा व स्तनरचनेचा पापुद्रा सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिल्यास फरक दिसून येत नाहीं. अगर फरक असलाच तर तो सूक्ष्म असून तो ओळखण्यास अडचण पडते. हे समान-रचनालक्षण पहिल्या म्हणजे दाहजन्य ग्रंथीपासून या ग्रंथींचें निदान निश्चित करण्यास उपयोगी पडतें. असा एक या रोगाचा नैसर्गिक नियम दिसतो कीं, संधायक अगर अन्य प्रकारच्या रचनेपासून त्या त्या विशिष्ट प्रकारचीच ग्रंथि उत्पन्न व्हावयाची. याच्या उलट सिद्धांतहि खरा आहे कीं सुसाध्य ग्रंथि अगर असाध्य बाह्यत्वग्ग्रंथि म्हणजे क्यान्सरची ग्रंथि ही फक्त बाह्यत्वचेपासूनच उद्भवणें संभवनीय असतें व संधायक रोगग्रंथि बाह्यत्वचेपासून कदापि निर्माण होत नाहीं. अनेक शोधकांच्या दीर्घकाल सूक्ष्म निरीक्षणानें हें आतां ठाम निश्चित झालें आहे. या प्रकारच्या रोगग्रंथींचा आणखी दुसरा विशेष हा आहे कीं शरीररचनेला जे नैसर्गिक निर्बंध आहेत व ज्यामुळें त्यांचें वर्धन, पोषण व झीज भरून येणें आपोआप चालतें तसले नियम व निर्बंध या नवग्रंथींना कांहींच नसल्यामुळें त्याची वाढ स्वतंत्रपणें व कशीतरी अव्यवस्थितपणें होते. या ग्रंथींपैकीं सुसाध्य नामक भेदातील ग्रंथी असे निर्बंध नसतांहि विशेष बेगुमारपणें वाढून शरीरहानि प्रायः करीत नाहींत ही गोष्ट जरी खरी असली तरी या ग्रंथीची बेशिस्त वाढण्याकडे प्रवृत्ति असते हें खास. ही प्रवृत्ति असाध्यग्रंथीमध्यें इतकी असते कीं, ग्रंथिवृद्धीकडेच रोग्याच्या शक्तीचा, रक्ताचा व अन्नाचा व्यय झाल्यामुळें इतर इंद्रियांची उपासमार होऊन रोग्याचें प्राण हरण झाल्याविना ही रोगग्रंथीची वाढ थांबत नाहीं. या असाध्य ग्रंथिवर्गांपैकीं क्यान्सर व सार्कोमा या भयंकर ग्रंथी होत.

या सुसाध्य व असाध्य दोन्ही प्रकारच्या ग्रंथी कोठेंहि शरीरांत होतात. तथापि कांहीं स्थानीं (स्तन, जननेंद्रियें, जीभ, गुद इत्यादि) त्या बहुतकरून होतात. मानवजाती व अस्थिपंजरसहित इतर हीन प्राण्यांमध्येंहि हे रोग आढळतात. सुधारणेचें हें फल असल्यामुळें यूरोपियन लोकांत हा रोग फार आहे असें एक मत फैलावलें होतें पण तें खरें नसावें.

सुधारणेबरोबर अशा असाध्य ग्रंथींची उदाहरणें लेखी नमूद करण्याचा परिपाठ अधिक पडतो व शुद्धतर व शास्त्रीय तत्त्वेनें शिक्षणपारंगत झालेला त्यांतील भिषग्वर्गांत अगर डॉक्टर लोकांत या व सुसाध्य ग्रंथीचें निदान करण्याची पात्रता अधिक वाढल्यामुळें हा रोग सुधारणेच्या मन्वंतरांत वाढत आहे असा भ्रम पसरला असावा. या रोगानें मृत होत असलेली माणसें पूर्वी पोटांतील रोग, म्हातारपण अगर अन्य सदराखालीं बहुधा नोंदली जात असत. म्हणून हल्लीं क्यान्सर रोगामुळें मृत्यू झालेल्या रोग्यांची संख्या डाक्तरांच्या वाढत्या ज्ञानामुळें रोगनिदानक्षमतेमुळें वाढली असावी. वरील मुख्य दोन भेदांपैकीं हा असाध्य ग्रंथि (क्यान्सर) रोग महा प्राणघातक असल्यामुळें सर्व शोधक शास्त्रज्ञांचें लक्ष त्याकडे अधिक वेधावें यांत नवल नाहीं. या प्राणघातकतेमुळें यास महत्व आलें असलें तरी या प्रकारच्या रोग्यांची संख्या नेहमीं सुसाध्य ग्रंथीमुळें पिडलेल्या रोग्यांच्या संख्येपेक्षां पुष्कळच कमी असते. असाध्यग्रंथि एका रोग्यास एके वेळीं एकच होते. (पुढें ती रक्तांतून अगर रक्तवाहिन्यांतून इतर ठिकाणीं पसरते ही गोष्ट निराळी आहे.) परंतु सुसाध्यग्रंथि एके वेळीं रोग्यास एक दोन अगर अधिकहि होतात. सुसाध्य आणि असाध्य ग्रंथींतील लक्षणें व प्रकार तुलनात्मक पद्धतीनें दाखविल्यास समजण्यास विशेष सुलभ पडेल म्हणून तसें पुढें केलें आहे.

सुसाध्य ग्रंथी.—(१) ज्या ठिकाणीं ही ग्रंथि उत्पन्न होते तेथेंच ती वाढते. भोंवतालच्या रचनेंत प्रवेश करून ती कुरतडून त्यावर हल्ला करीत नाहीं. भोंवतालची रचना फार तर दबली अगर बाजूस ढकलली जाते. या ग्रंथीच्या भोंवताली चिवट तंतुमय वेष्टण असतें. कारण भोंवतालच्या रचनेशीं जणू काय सौम्य कलहामुळें दाहक्रिया उत्पन्न होऊन कुंपणाप्रमाणें हें वेष्टण होण्यामध्यें असतें. यांचा उगम व वृद्धि सावकाशपणें होत असतात. आकार वाटोळा असतो, गांठ हलवितां येते व त्यावरील त्वचेशीं चिकटलेली नसते. गांठ भोंवतालच्या प्रदेशांत रुतून बसलेली नसते. (२) यापासून जिवास धोका नसतो, मात्र त्यांचा दाब मर्मस्थानीं, हृदय अगर मज्जातंतूवर पडल्यास मात्र फार वेदना होतात किंवा मृत्यु येतो. एरवीं वेदना व भीति नसते. शिरेवर दाब पडल्यास सूज येते. श्वासनलिकेवरचा दाब प्राण कासावीस करील. एरवीं त्यापासून धोका नसतो. (३) या गांठी रक्तांत शिरून इतर ठिकाणीं आपली वृद्धि करीत नाहींत. (४) शस्त्रक्रियेनें कापून काढिल्या असतां त्या पुनः उत्पन्न होत नाहींत. त्या भोंवतालीं वेष्टण असल्यामुळें कोठपर्यंत गांठ कापावयाची हें कळतें.

असाध्य ग्रंथी.—(१) उगमस्थानापासून ग्रंथि वाढून भोंवतालच्या, स्नायु, चरबी, अस्थि वगैरेंच्या रचनेमध्यें शिरते व भोंवताली हल्ला करून सर्व ठिकाणीं घर करून तेथें चिकटून बसते. या ग्रंथीभोंवतालीं वेष्टण नसतें. कारण हिच्या वृद्धीचा जोर अतिशय असल्यामुळें प्रतिकारार्थ दाहक्रिया उत्पन्न होऊन प्रतिबंधक कुंपण घालण्याइतकी शक्ति भोंवतालच्या रचनेंत नसते. यांचा उगम, वाढ व शेवट सुसाध्य ग्रंथीपेक्षां फार झपाट्यानें होतो. यापैकीं सार्कोमा ग्रंथीचा आकार सुताच्या चातीप्रमाणें लांबट असतो. इतर प्रकारचा आकार अनियमित असतो व त्यावरील त्वचेंत गांठ रुतलेली असते.

(२) यापासून—मग ती गांठ कोठें कां असेना—मृत्यु बहुधा येतो म्हणून या कष्टसाध्य अगर असाध्य असतात. यकृत, प्लीहा, मूत्रपिंड यांसारख्या इंद्रियामध्येंहि रोगानें बसाहत

केल्यावर हीं इंद्रियें निरुपयोगी होतात. अशा प्रकारें चोहोंकडे ग्रंथींची वृद्धि झाल्यानें मरण त्वरित येतें. शस्त्रक्रियेनें कदाचित् रोग काढून टाकतां येतो. क्यान्सर ग्रंथी रसग्रंथीमार्गे व सार्कोमाग्रंथि रक्तवाहिन्यांतून शरीरांत इतर जागीं पसरतात.

(३) कापल्या जागीं पुनः गांठ येते. ती येऊं नये म्हणून त्याजवळील रसग्रंथी दूषित न दिसली तरी कापून काढतात. त्यामुळें किती रसग्रंथी कापाव्या हें नीट कळत नाहीं. जेथें ही गांठ उत्पन्न होते तेथील रचनेहून भिन्न प्रकारची रचना या गांठीची असते.

वरील विवेचनावरून ध्यानांत येईल कीं क्यान्सरच्या शस्त्रक्रियेमध्यें जवळील म्हणजे जांघाड,काख व मानेंतील रसग्रंथीसुद्धा रोग कापून काढणें हें स्तन व जीभ या ठिकाणीं क्यान्सर झालें असतां इष्ट असतें म्हणून सूक्ष्मदर्शकयंत्रानें परीक्षा न करितां तें काढून टाकणें हा हल्लीं प्रघातच पडला आहे. त्वचेस क्यान्सर झालें असतां जवळील रसग्रंथि याप्रमाणें काढून टाकली म्हणजे बहुधा शरीरांतील इंद्रियांत रोगप्रसार होत नाहीं. बाकी सर्व ठिकाणच्या क्यान्सरमुळें तसें होतें व म्हणून, वेदना, शक्तिपात, रक्तस्राव इत्यादीमुळें मृत्यु येतो.

कांहीं वर्षें ग्रंथि सुसाध्य प्रकारची असून एकाएकी तिला असाध्य स्वरूप प्राप्त होतें हाहि एक प्रकार आहे. तसेंच त्वग्छिद्रितग्रंथिव्रण, चिबुकमनुदुष्टग्रंथि, या कष्टसाध्य ग्रंथिवर्गापैकीं असूनहि रसवाहिन्यामार्गें त्या शरीरांतील इंद्रियांत पसरत नाहींत. यावरून व इतर कारणांवरून कष्टसाध्य, असाध्य व सुसाध्य यामधील सीमा ठाम नाहीं व या सीमेमधील प्रांतांत मोडणाऱ्या या व अशा दुसऱ्या ग्रंथी असतात हें कळून येईल.

या रोगाचीं कारणें:—सर्वच ग्रंथी कोणत्या कारणानें झाल्या हें निश्चितपणें सांगता येत नाहीं. परंतु कांहीं ग्रंथी होण्यास मात्र (१) बरेच दिवस तो भाग घांसला अगर चोळवटला जाणें, (२) बरेच दिवस टिकलेली सूज व दाह, (३) दुखापत, हीं व अशा प्रकारचीं स्थानिक कारणें उघड दिसतात. परंतु अशीं कारणें असून सर्वच माणसांनां ग्रंथिरोग जर होत नाहीं, तर अगोदरच ज्या रोग्यांच्या शरीरांत ग्रंथीचा उद्भव होण्यास अनुकुल स्थिति असते तेवढ्याच रोग्यांनां हा रोग होतो हें अनुमान वावगें नाहीं. (४) गर्भवृद्धीमध्यें ज्या नवीन रचनापेशीपासून पूर्ण शरीर बनलें त्या गर्भपेशींपैकीं कांहीं पेशींचा लहान समूह शरीरांत कांहीं काल निद्रितावस्थेंत राहून त्यांनां अनुकूल वेळीं गर्भ झपाट्यानें मोठा होतो. तद्वत् एकाएकी ग्रंथि निर्माण करतात. परंतु हें कारण क्यान्सर ग्रंथीस लागू पडत नाहीं. कारण गर्भपेशी पूर्ण रूपांतर बनून झालेल्या रचनेंतून क्यान्सर तयार होतें व त्यांत गर्भपेशींपैकीं नवीन रचनापेशी कधीं आढळत नाहींत. सार्कोमा ग्रंथीमध्यें मात्र त्या पेशी आढळतात. (५) कांहीं प्रकारच्या जंतूपासून ही ग्रंथि होते असें एकमत आहे पण यास फारशी पुष्टि मिळाली नाहीं. (६) आनुवंशिकता, म्हातारपण, दुःख, काळजी, मानसिकश्रमातिरेक यामुळें आलेलें शरीरदौर्बल्य व रोगप्रतिकारदौर्बल्य हीं कारणें पुष्कळ रोग्यांत उघड दिसतात. तसेंच कांहीं विशिष्ट प्रांतांत तो रोग अधिक आहे असें दिसतें.

मागें ढोबळपणें वर्गीकरण केलेंच आहे. तथापि ग्रंथिरोगाच्या रचनेस अनुसरून केलेलें पुढील वर्गीकरण पाहिलें म्हणजे त्या ग्रंथींची बहुसंख्याकता, वैचित्र्य व विविधता ध्यानांत येईल.यापेक्षां अधिक वर्णनासाठीं त्या त्या रोगावरील स्वतंत्र लेख पहावे. आकार व वजन यांतहि फार वैचित्र्य आढळतें. म्हणजे लहान गुंज अगर पावटयापासून तो नारळ किंवा भोंपळयाएवढी ग्रंथि अगर आवाळू असूं शकतें.

रोगग्रंथींचें वर्गीकरण.

(१) शुद्धसंधायक रचनापेशीपासून होणाऱ्या ग्रंथी.

	ग्रंथींचें संभवनीय स्थान	स्वरूप
तंतुस्नायुग्रंथि	अस्थ्यावरण,जबडा, गर्भाशय,गुद, नाक, घसा, अंडाशय, मस्तक, त्वचेखालीं (चामखीळ).	वर्तुळाकार अथवा लंबवर्तुळाकार, न दुखणारी, हलणारी, लोंबणारी, मऊ अगर कठिण.
वसामयग्रंथि	खांदा, पाठ, ढुंगण,	वाटोळी,गांठाळ, बिलबिलीत,न दुखणारी, मऊ लहान मोठी.
कोमलास्थि-ग्रंथि	हाताचीं बोटें (क्वचित पायाचीं बोटें), जंघास्थीचें खालील टोंक,पादास्थि आणि दंडाच्या हाडाचें वरील टोंक.	अति कठिण, न दुखणारी, जास्त लक्षणें अस्थिरोगावरील ग्रंथांत पहावी.
अस्थिग्रंथि	हाडाप्रमाणें कठिण असून हाडापासून वाढतात. अस्थिरोगांत याविषयीं माहिती पहावी.	हाडाप्रमाणें भरींव अगर पोकळ, भुसभुशीत रचना.
श्लेष्मलत्वग्रंथि	नाक, त्वचेखालीं अस्थ्यावरण, हाडाच्या मगजांत.	दिसण्यांत वसा अगर तंतुग्रंथीप्रमाणें; नाकांतील मात्र ओळखण्यास सोपी.
शुद्ध आणि श्लेष्मलत्व-प्रोगोत्पन्न ग्रंथि	हे स्तनरोग, फिरंगोपदंश, मूत्राशय, गुद, कंठ, या रोगांत व या स्थानीं होतात. तेथील माहिती पहावी.	कालीफ्लावरच्या प्रमाणें मोठे अगर लहान, चिकट व सपाट, चपटे वगैरे प्रकार कांहीं कॅन्सर ग्रंथीप्रमाणें

(पुढें चालू)

(२) महाप्रधानसंधायक रचनापेशीनिर्मित ग्रंथि.

स्नायूमय ग्रंथि, मज्जानिर्मित ग्रंथि, रक्तवाहिनीनिर्मित ग्रंथि, रसवाहिनीनिर्मित ग्रंथि, रसग्रंथिनिर्मित ग्रंथि इत्यादिकांच्या नांवांवरून त्यांच्या रचनेचा व स्वरूपाचा बराचसा बोध होत असल्यामुळें येथें संक्षिप्त वर्णन दिलें नाहीं.त्याच्यासाठीं रस व रक्तवाहिन्यादि रोगांवरील ग्रंथ पहावे. येथें थोडक्यांत वर्णन करणें शक्य नाहीं.

(३) नवीन संधायक रचनोत्पन्न ग्रंथि उर्फ सार्कोमा.

	ग्रंथीचें संभवनीय स्थान	लक्षणें व स्वरूप
वर्तुलपेशी-विशिष्ट ग्रंथि	अस्थि, अंड, स्तन यांच्या रोगांवरील ग्रंथ पहावे	लवकर वृद्धि, त्यावर लाल त्वचा व शिरा, त्वचा फाटून व्रण, शक्तिपात, इंद्रियांत रोगप्रसार, मृत्यु हीं सर्व असाध्य लक्षणें.
वर्तुल पेशी-विशिष्ट ग्रंथि	स्नायू त्वचा यांच्या मध्यें.	यांत दाहलक्षणें नसून मऊ अगर अर्धवट मऊ ग्रंथि काढून टाकली तरी पुनः येणारी, इंद्रियात न पसरणारी.
विषमाकार पेशीविशिष्ट ग्रंथि	लांब हाडांच्या पोकळींत, जंघास्थि, खालील जबडा, वगैरे.	हाडाच्या रोगावरील स्वतंत्र ग्रंथ पहावा.

(४) सर्व संमिश्र प्रकार.

यांत वरील तीनहि प्रकारच्या पेशी रचनेंत सांपडतात. ही ग्रंथि कापली तर रक्तप्रवाह थांबविणें अवघड पडतें.

(५) रसोत्पादकपिंडपेशीसंभूत व बाह्यत्वचोत्पन्न ग्रंथी.

	ग्रंथीचें संभवनीय स्थान	लक्षणें व स्वरूप
सुसाध्य	स्तन, जिव्हामूल, ओठ, शिश्नमूलग्रंथि, थायराइड व अवज्यामागील गांठ, अश्रुग्रंथि, स्वग्रंथि.	यांचीं लक्षणें त्या त्या रोगांच्या सदराखालीं अगर स्वतंत्र ग्रंथांत पहावीं. या साध्य आहेत.
असाध्य (१) वर्तुल पेशीनिर्मित		
(अ) कठिण वर्तुलपेशी	स्तन व जठराच्या खालील छिद्र.	कठिण, गांठाळ, हळू वाढणारी, मध्यम आकाराची.
(आ) मृदु वर्तुलपेशी	अंडयकृत, मूत्राशय, मूत्रपिंड, स्त्रियांचे अंडाशय, स्तन.	चलद वाढणारी व मोठी.
(इ) श्लेष्मल वर्तुलपेशी	जठर, आंतडें, अंडाशय.	
(२) त्वचोत्पन्न	जुनाट व्रण, व्रण, जीभ, खालील ओठ, हिरड्या, अंडाशय, शिश्न, गुद.	खरवडींत पुटकुळी चरते व कडा फुगतात, शेजारील गांठी मोठया होतात अगर जांघेंत आरंभ, शेवटीं कालीफ्लावरचा आकार येणें.
(३) स्तंभाकार पेशीनिर्मित	गुद, आंतडें, गर्भाशय, स्तनांतील दुग्धनलिका.	त्या त्या रोगावरील सदरें अथवा ग्रंथ पहा.

उपचार—वरील सर्व ग्रंथींवर शस्त्रक्रिया हाच उपचार आहे. मात्र वर्तुलपेशीनिर्मित ग्रंथींत शक्य तेथें शस्त्रक्रिया व वेदनाशमनासाठीं अफू, शक्तिवर्धक व उत्तेजक औषधें द्यावीं व साधल्यास जवळील रसग्रंथीहि काढून टाकाव्या.

मृतगर्भावशेषग्रंथि.—ह्या प्रकारचा रोग फार क्वचितच आढळतो व त्यांत गर्भांचे दांत, केस, अस्थि व इंद्रियांचे अवशेष इत्यादि भाग सांपडतात. वरील वर्गीकरणावरून या ग्रंथिरोगाचे अतिवैचित्र्य, कष्टसाध्यता, असाध्यता व सुसाध्यता, स्वरूप, स्थानें, लक्षणें या सर्वांची विहंगमदृष्टीनें कल्पना करतां येईल. या वर्गीकरणावरून हेंहि कळेल कीं, कष्टसाध्य अगर असाध्य ग्रंथी दोनच प्रकारच्या आहेत. एकीचें नांव बाह्यत्वचोत्पन्न व दुसऱ्या प्रकाराचें नांव नवीन संधायकरचनोत्पन्नग्रंथि. हे भेद महत्वाचे असल्यामुळें वरील अल्प वर्णनापेक्षां त्याचें स्वरूप आधिक नीटपणें कळावें म्हणून खालील दोन्ही प्रकारांची तुलनात्मक पद्धतीनें मांडणी केली आहे.

(१) ज्या नूतनसंधायक पेशींच्या या सार्कोमा ग्रंथी बनतात त्यांत जीवनपेशी द्रव्य असून त्याभोंवती वेष्टण नसतें व त्यांस एक अगर दोन मध्यबिंदु असतात. (२) वरील पेशी व अन्यपेशी यांच्यामध्यें व भोंवतालीं संधायक प्रकारचा पदार्थ व तशा प्रकारची रचना अनियमित प्रकारची असते. परंतु क्यान्सरग्रंथींच्या रचनेंत जशा पोंकळ जागा ठिकठिकाणीं असतात तशा जागा या प्रकारच्या ग्रंथींत नसतात. (३) या पेशींमध्यें अति पातळ पापुद्र्याच्या रक्तवाहिन्या असतात; म्हणून या ग्रंथींमध्यें रक्तस्राव अतिशय होण्याचा संभव असतो. क्यान्सरग्रंथीमध्यें रक्तवाहिन्या संधायकरचनेमध्यें वेगळया असतात; म्हणून रक्तस्राव इतका होत नाहीं. (४) या ग्रंथींचा प्रसार शरीरांतील इंद्रियांत या रक्तवाहिन्यांच्या मार्गें होतो.

परंतु क्यान्सर ग्रंथींत हा प्रसार रसग्रंथी व रसवाहिन्यां-मुळें होतो. (५) या प्रसारामुळें होणाऱ्या अन्य ग्रंथी मूळग्रंथीप्रमाणें असातात. व त्या बहुधा फुप्फुसांत असतात. (६) भोंवतालच्या रचनेवर हल्ला चढवून या ग्रंथी मोठया होतात. व कापल्या असतां त्या जागीं कांहीं ग्रंथि-रचनापेशी कापतानां रहाणें साहजिकच असल्यामुळें तेथें पुनः तसली ग्रंथि उद्भवते. (७) त्या रसग्रंथींत प्रवेश करीत नाहीत. यास अपवाद अस्थ्यावरण, अंडगलग्रंथि अगर रसग्रंथि या ठिकाणीं हा रोग झाल्यास रसग्रंथीसहि रोग होतो. (८) बालपण, तरुणपण या वयांत निदान ४० वर्षांच्या वयाच्या आंतील मनुष्यास हा रोग होतो. परंतु क्यान्सर रोग ४० वर्षांच्या पुढें व उतारवयांत फार करून होतो व त्यामध्यें गांठीजवळील रसग्रंथी वाढतात असा नियमच आहे. (९) या कापल्या अगर खरडून काढल्या तर क्यान्सर ग्रंथींतून निघतो तसा पांढरा दुधासारखा पदार्थ त्यांतून निघत नाहीं. वरील दोन्ही प्रकारच्या वर्गीकरणांत आलेल्या ग्रंथी, दाहात्मकग्रंथि (गळुं), पोकळ व इतर सुसाध्य, असाध्य अशा अनेक प्रकारच्या ग्रंथी स्तन या इंद्रियांत होतात. सर्व ठिकाणच्या व सर्व प्रकारच्या ग्रंथींचें वर्णन या ठिकाणीं देणें शक्य नाहीं हें उघड आहे.तथापि या असाध्य क्यान्सर रोगाचें वर्णन व माहिती कळावी म्हणून ती स्तनाविषयीं पुढें दिली आहे. त्यावरून इतर स्थानीं हा रोग झाला असतां काय स्थिति होते याची कल्पना करतां येईल.

स्तनांतील कठिण रचनापेशीयुक्त ग्रंथी (क्यान्सर).– प्रथम स्तनांत फार जडपणा व गांठाळपणा उत्पन्न होऊन भोंवतालीं कवच लागत नसलेला एक गोळा स्तनांत बनतो. त्याचा आकार मध्यम असतो; परंतु त्या रोगाचे लांब फांटे स्तनाच्या आंत नाना ठिकाणीं घुसतात आणि रोग स्थापित झाल्यावर त्वचा व मांस यांत हे घुसतात. कापतांना या गाठींतून कुरकुर आवाज होतो व कापलेला अर्धा भाग वरील तंतुमय फाट्यांनी ओढ थाबल्या मुळें खोलगट दिसतो. कापलेला भाग घट्ट व कठिण असून काळसर पांढऱ्या रंगाचा व ठिकठिकाणीं गुलाबी छटा असलेला, कांहींसा कापलेल्या बटाट्याच्या रंगाचा असतो.व त्यांत चमकणारे पांढरे तंतू पिवळया रेघा व ठिपके दिसतात. गांठ कापतांना एक प्रकारचा पांढरा द्रव पदार्थ निघतो.

लक्षणें:—रोगाच्या आरंभी स्तनांत सावकाशपणें वाढत असलेली गांठ उत्पन्न होते. नंतर ती भराभर वाढूं लागते. व त्वचा व त्याखालील मांसांत घुसते. त्यामुळें त्वचा फाटून वेडावांकडा दिसणारा व दुर्गंधिमय व्रण तयार होतो. याच सुमारास कांखेतील रसग्रंथी वाढून त्यांचा दाब तेथील मोठ्या शिरेवर व मज्जातंतूवर पडल्यामुळें हातास सूज येते व वेदना होतात. यापुढें शरीरांतील बऱ्याच इंद्रियांत या क्यान्सरपेशींचा प्रवेश होऊन रोगाच्या आरंभीं रोग्याची प्रकृति दिसण्यांत बरी दिसत असली तरी या सुमारास ती बिघडून त्यावर क्यान्सरची कळा येते, वर्ण निस्तेज व फिकट अगर मातट होऊन रोगी खंगत जातो. व्रणांतून एकसारखा वाहणारा घाणेरा व पुष्कळ स्राव, शारीरिक व मानसिक दुःख व यातना व इंद्रियांत रोग झाल्यामुळें आलेली दुर्बलता यामुळें रोग्याचा भयंकर शक्तिपात होतो. नंतर मृत्यु येऊन रोगी यातनांतून मुक्त होतो. शस्त्रक्रिया केली नाहीं तर या रीतीनें रोग्याचा शेवट होतो.

रोगग्रंथि स्तनाच्या वरच्या व बाहेरील एक चतुर्थांश भागांत असते. अगर स्तनाग्राच्या खालीं असते. ती हातास कठिण, गांठाळ व उंचसखल लागून भोंवताली कोठें सुरुवात होते हें हातास नक्की समजत नाहीं. आरंभीं त्यावरील त्वचा चिमटींत धरली तर तेथें किंचित् खळगा आहे असे भासतें. नंतर तो खळगा वाढून स्पष्टपणें तेथें सुरकुत्या पडतात व कातडीस गांठ चिकटली आहे हें स्पष्ट दिसतें. प्रथम स्तनग्रंथि हलवून पाहिली तर ती छातीवर मोकळी व हलती आहे असें दिसतें; परंतु पुढें ती याप्रमाणें हलवूं जाता पहिल्याइतकी हलती व सुटी नाहीं हें दिसून येतें व नंतर ती छातीवरील मांसांत रुतून बसते; हालत नाहीं. जेथें स्तनाग्र असावयाचें तेथें खळगा होतो, कारण मागील ग्रंथि दुग्धनलिकांना आंत ओढते. परंतु स्तनाच्या परिघाच्या सुमारास रोग असल्यास असा खळगा पडत नाहीं; अगर तो अर्धवट पडतो. स्तनाग्रांतच रोगास आरंभ झाल्यास तें कठिण व नेहमींपेक्षां अधिक उन्नत दिसतें. कांख तपासून पाहिल्यास एक अगर अनेक दोरखंड हातास लागावे त्याप्रमाणें त्वचेखालील रसवाहिन्या रोगग्रंथीपासून निघालेल्या लागतात व रोग तितका वाढत असल्यास त्या पोकळ जागेंत अनेक मोठाल्या रसग्रंथीहि चांचपून पहाता येतात. या ग्रंथी प्रथम मोठया, मऊ व सुटया असतात; परंतु पुढील स्थितींत त्यांचा एकच कठिण व उंचसखल गोळा बनून तो शेवटीं तर गळयाजवळील हाडापर्यंत पोंचतो. त्वचा फाटून व्रण बनवल्यावर त्या व्रणाच्या कडा कठिण, वांकड्या, खालून पोकळ व बाहेर त्यांची लाली फिरलेली असते. व त्यांचा पृष्ठभाग छिद्रमय घाणेरडा व टणक असून त्यांतून अति घाण मारीत असलेला लाल स्राव गळत असतो. या व्रणाभोंवतालच्या त्वचेखालीं रोगग्रंथीमुळें कठिणपणा, टेंकाळें, गाठी, उंचसखलपणा भोंवतालीं सर्व बाजूस लागतो. किंवा एकटया दुकटया वाटोळ्या ग्रंथी भोंवतालीं हातानें चांचपल्यास हातास लागतात. इतकीं सर्व लक्षणें दिसल्यावर रोगाच्या प्रकाराविषयीं संशय रहातच नाहीं. परंतु रोगाच्या आरंभीं मात्र सुसाध्य अगर पोकळ ग्रंथी आहेत किंवा क्यान्सर ग्रंथी आहेत याविषयीं संशय येणें साहजिकच आहे. रोग्याचें वय त्यावेळीं ४० च्या वर असल्यास हा संशय वाढतो. व अशा वेळीं रोग्याची समजूत पाडून रोगानिदान

करण्यासाठीं गांठीमध्यें चीर पाडून तिचा पापुदरा सूक्ष्म दर्शकयंत्रानें तपासल्यास रोगनिदान ठरून त्याप्रमाणें पुढें जरूर ती शस्त्रक्रिया करण्यास बरें पडतें.

या रोगावर उपचारः—रोगाचें हें पुढील स्वरूप जरी माहीत आहे तरी रोग लहान असला तरी तो लवकर, रोगाच्या आरंभीच पूर्णपणें काढणें श्रेयस्कर आहे. म्हणजे तो पुनः तेथें उद्भवणार नाहीं अशी आशा करण्यास अल्पस्वरूप आधार असतो. पुनरुद्भव न झाला तर रोगी अनेक वर्षें जगण्याचा संभव असतो. रोग वाढल्यानंतर म्हणजे तो मांस व त्वचेंत शिरल्यावर मग शस्त्रक्रिया केल्यानें शस्त्रवैद्यकांच्या कीर्तीस बट्टा लागतो. कारण रोगी पुढें मरणार हें ठरलेलेंच असतें या मताचे कांहीं शस्त्रवैद्य पूर्वी व हल्लीं असण्याचा संभव आहे. कारण ते म्हणतात असे रोगी शस्त्रक्रियेनंतर दगावल्यानें आरंभावस्थेंतील रोगी—कीं जे लवकर इलाज केल्यानें खरोखरी बचावण्याचा संभव असतो तेहि—या उदाहरणामुळें शस्त्रक्रिया करून घेण्यास कचरतात. व हें थोडें बहुत खरें आहे ही गोष्ट नाकबूल करून उपयोग नाहीं. तथापि हेंहि खरें आहे कीं, अशा स्थितींत शस्त्रक्रिया केल्यानें जरी त्या व्रणाच्या जागीं पुनः रोगोद्भव झाला अगर शरीरांतील इंद्रियांत झाला तरी आयुष्य फारसें वाढत नाहीं. हें पतकरूनहि केवळ रोगाची अत्यंत घाण व शारीरिक व मानसिक दुःख व घोर यातना यांतून मृत्यु सोडवीपर्यंत तरी रोगी मुक्त होतो व त्यास मनःस्वास्थ्य मिळणें हाहि एक त्या यातना व ती दुर्गंधि माहीत असणारांनां व सहन न होणाऱ्या रोग्यानां मोठा फायदा वाटतो. म्हणून या स्थितींतहि रोग काढावा अशा मताचेहि शस्त्रवैद्य व रोगी असतात. तेव्हां शस्त्रक्रिया करणें न करणें हें अशा अत्यवस्थ स्थितींत रोग्याच्या व त्याच्या आप्तेष्ट व मित्रांच्या मर्जीप्रमाणें ठरवावें हा उत्तम मार्ग होय. शस्त्रक्रिया न करणें ठरल्यास अफू अगर मार्फीया देऊन वेदना कमी करून मृत्यु येईपर्यंत रोग्याचें हाल कमी करावे.

नूतन संधायक रचनोत्पन्न ग्रंथि (सार्कोमा):— यांचें सर्व वर्णन येथें देणें शक्य नाहीं. तथापि उपरिनिर्दिष्ट सार्कोमा नामक ग्रंथि क्यान्सरप्रमाणें महत्त्वाची व अनेक जागीं उत्पन्न होणारी असून कष्टसाध्य व असाध्य वर्गांतील असल्यामुळें तिचें वर्णन पुढें दिलें आहे. ती होण्याच्या अनेक स्थानांपैकीं लांब हाडाची पोंकळी अगर अस्थीचें बाह्यावरण यांपैकीं कोठून तरी ग्रंथीच्या वृद्धीस आरंभ होतो. अस्थिबाह्यावरणोत्पन्नग्रंथि जलद वाढणारी, असाध्य व दुसऱ्या प्रकाराची सावकाश वाढणारी व कष्टसाध्य असते. याखेरीज मिश्र भेदहि असतो. ग्रंथि हाडाच्या आंत व बाहेर मांसांत व त्वचेंत जलद वाढते. त्वचेबाहेर पडल्यावर तेथें मोठा व्रण पडतो व इतर इंद्रियांत रोगबीजे ग्रंथींतील रक्तवाहिन्यांमार्गें जाऊन रोगी मृत्युपंथास पुरा लागला नसल्यास हा व्रण पडल्याबरोबर तो मरणाच्या दारींच असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत ठणका व दुःख फारसें नसतें. ग्रंथीस हात लावला तर ती कोमट, गुजलेलीहि लागत नाहीं; बहुधा लाल असते व कधीं नसते, कांहीं ठिकाणीं बिलबिलीत, मऊ व अन्य ठिकाणीं कठिण लागते. तीवरील शिरा फुगून ताठ झालेल्या दिसतात. अर्थात ग्रंथिरोग आहे म्हणून जवळील रसग्रंथी मोठ्या होतात. इतर जागीं रोग असल्यास त्या मोठ्या होत नाहींत. हा रोग तरुण्या माणसास होतो व त्याचें वजन शरीरप्रकृति एकदम ढांसळल्याप्रमाणें उतरतें. कधीं ग्रंथी होणाच्या जागीं अगोदर कांहीं इजा झाली होती असा वृत्तांत आढळतो. अस्थ्यावरणापासून झालेली ग्रंथि अंमळ लंबवर्तुळाकार आणि मऊ अशी असते; अस्थीच्या पोकळींतून वाढलेली ग्रंथि वाटोळी व हातास कठिण लागते, व सावकाश वाढते.

रोग निदानः—ही असाध्य अगर कष्टसाध्य ग्रंथि असल्यामुळें चूकभूल होऊं नये याविषयीं दक्षता बाळगणें जरूर आहे. म्हणून यासारखे दिसणारे सुसाध्य ग्रंथिअस्थ्यावरणदाह, अस्थिदाह, हाडांतील व्रण, हाडांतील विद्रधि हे रोग नाहींत याविषयीं काळजीपूर्वक परीक्षा करावी. एखादे वेळीं ही परीक्षा करणें बिकट असतें. पण जर ज्वर व ग्रंथींत सूज, उष्णता, लाली, दुःख, ठणका हीं लक्षणें असून रोगी खंगत जाईल तर हाच रोग असण्याचा संभव अधिक असतो.

उपचार.—रसग्रंथी जर फार मोठ्या झाल्या नसतील तर आणि शरीरांतील इंद्रियांत हा रोग फैलावला नाहीं असें वाटत असेल तर ज्या भागास हा रोग असेल त्या हस्त अगर पायादिकांचें शक्य असेल तर जरूर गात्रच्छेदन करावें हें प्रशस्त होय. मस्तक व धड या ठिकाणीं असें करणें शक्य नसतें. अशा ठिकाणीं व अन्य अशा प्रसंगीं रोगग्रंथीच तेवढी जपून कापून काढावी व त्याखालील हाड पूर्णपणें खरवडून त्यास भाजून (म्हणजे दाहक औषधांचा चरका देऊन) काढावें म्हणजे पुन्हां वाढणारीं रोगबीजें नष्ट होतील. या शस्त्रक्रियेंत रक्तस्राव होण्याचा संभव असतो म्हणून तो थांबविण्याची भरपूर साधनसामुग्रीची अगोदर तरतूद करून मग शस्त्रक्रियेस आरंभ केल्यानें यशसिद्धीस मदत होते.

ग्रंथिरोग व गुल्मरोगाच्या प्रकारांची व ते होणाऱ्या स्थानांची संख्या मोठी असल्यामुळें त्यांचें संकलित स्थानपरत्वें संक्षिप्त नामनिर्देश उपयुक्त असल्यानें पुढें दिला आहे. कारण हे रोग शरीराच्या आंत असतांना ओळखणें कठिण असतें. व शरीरावर असल्यास रोगनिदान करण्यास सुलभ पडतें.

छातींतील ग्रंथी — धमनीविस्तरणग्रंथि, क्यान्सर, व सार्कोमा ग्रंथि, मोठाल्या, रसग्रंथि, विद्रधि, तंतुमय व वसामय ग्रंथि वगैरे. उराच्या पोकळींत होणाऱ्या ग्रंथींपैकीं महत्त्वाच्या तेवढ्या ग्रंथि:-(१) यकृतसंबंधीः—यकृतवृद्धि, विद्रधि, जंतोत्पन्नगुल्म, अवरोधित पित्ताशय. (२) प्लीहेसंबंधीः—वृद्धि, विद्रधि, क्यान्सर, जंतोत्पन्नगुल्म. (३) जठरसंबंधीः—क्यान्सर

विस्तरण (४) आंत्रसंबंधीः-क्यान्सर, अन्नरसपिंडग्रंथी, तिढा पडणें, एकांत एक घुसून दुहेरी तिहेरी घडी पडणें,आंत्रपुच्छ-दाह, डबा रोग (आंत्रक्षय) मळाच्या गांठी. (५) प्यांक्रिया संबंधीः-जुनाट दाह, क्यान्सरगुल्म. (६) मूत्रपिंडसंबंधीः — वृद्धिचलनशीलता विद्रधि, क्यान्सर जंतोत्पन्न गुल्म, मूत्र-गुल्म, पूयगुल्म, क्षयजंतुजनित गुल्म. (७) मूत्र पिंडस्थ ग्रंथिसंबंधीः —क्यान्सर, क्षयग्रंथि (८) आंत्रावरणसंबंधी-जुनाट दाह, क्षयादिकारणामुळें गुंतागुंत, विद्रधि, जठरव्रण, क्यान्सरजंतोत्पन्न व इतर प्रकारचा फुटलेला गुल्मरोग यांतून स्रवणाऱ्या दूषित घाणीमुळें स्थानिक दाह. (९) रसग्रंथि-संबंधीः-क्षय, क्यान्सर,(१०)गर्भाशय व तत्संबंधी रचनाः — तंतुस्नायुमय ग्रंथि, क्यान्सर, विशालबंधनोत्पन्न गुल्म, रक्त गुल्म, गर्भाशयदाहवृद्धि गरोदरपणा. (११) मूत्राशयसंबंधीः- कोंडलेलें मूत्र. (१२) एखादे वेळीं उदराचे स्नायू वाटोळे आकुंचन पावून ग्रंथिरोग अगर गरोदरपण आंत झालें आहे असा भास रोग्यास व परीक्षकास उत्पन्न करतात; या सर्वांचें निदान व ज्ञान तज्ज्ञांच्या सहाय्यानें करून घ्यावें लागतें.

अ न्य ठि का ण च्या.—मेंदू, पृष्ठवंशरज्जु, अंड, स्तन, मूत्राशय व जननेंद्रियें या व इतर जागीं ग्रंथि व गुल्मरोग होतो. या ग्रंथिरोगाचें बाह्यतः गुल्म रोगाशीं साम्य असल्यामुळें गुल्मरोगावरील लेख पहावा.

को ट र ग्रं थि (गुल्म रोग व अर्बुद रोग):-चामडी अगर अन्य रचनेचें वेष्टन असून त्याच्या आंत द्रव अगर अर्धवट द्रावक स्थितींतील पदार्थ असलेला जो फुगा शरीरावर अगर शरीराच्या आंत उत्पन्न होतो त्या व्याधीस हें नांव आहे. आकारावरून ही व्याधि एखाद्या भरीव गांठीप्रमाणेंच दिसते. परंतु हा रोग व ग्रंथिरोग हे भिन्न भिन्न वर्गांतील आहेत. तथापि त्यांच्या रोगनिदानाच्या वेळीं घोंटाळा होण्याचा संभव असतो. गळूं,गुल्म अगर ग्रंथि यापैकीं शरीरामध्यें काय झालें आहे हें अनभिज्ञ माणसास कळत नाहीं; व तज्ज्ञ माणसासहि जपून मत बनवावें लागतें. या गुल्म रोगाचे मुख्य तीन प्रकार आहेत त्यांचें क्रमशः वर्णन करितों.

(अ) नैसर्गिक पिंडोत्पन्न गुल्मः—(१) शरीरांत स्वाभा-विक लहान मोठ्या पोकळ जागा व त्यात किंचित जरूरीपुरता उपयुक्त द्रव स्निग्ध पदार्थ ठिकठिकाणीं असतो. यांचीं कांहीं उदाहरणेंः—स्नायु, स्नायुबंधनें, सांधे. यांच्या ठिकाणीं चलनादि क्रिया सुकर होण्यासाठीं लहान मऊ पिशवीप्रमाणें या पोकळ रचना असतात. (२) त्वचेंत तैलयुक्त अगर स्निग्ध पदार्थपिंड निसर्गतः असतात. तसेंच श्लेष्मलत्वचेंत श्लेष्मल पिंड पुष्कळ असतात. (३) लाळ, दुग्ध, पित्त, मूत्र, शुक्र, धातू हीं वाहून जाण्यासाठीं अनेक नलिका असतात. या सर्वांचें संकलित वर्णन हें कीं, त्यांतील द्रव पदार्थ बाहेरील नलिकांमध्यें अवरोध उत्पन्न झाल्यानें सांचतो व अर्थातच त्याचें पोकळ गुल्म बनतें. यांवर उपचारः—या गुल्मावरील त्वचा चिरून तिच्या वेष्टनासह साधल्यास ती कापून काढावी. तसें न साधल्यास खंडशः काढावी; अगर ती मधोमध चिरून आंतील मगज काढून टाकून आंतील अंगास दाहक औषध लाविल्यानें पुनः तेथें तो गुल्म उद्भवत नाहीं.

(आ) नवीनोत्पन्न गुल्मः—यांचीं कारणें, उदाहरणें संक्षिप्त वर्णें,व उपचारः—(१) शरीरांत कांहीं स्थळीं घर्षण दाबादि कारणांमुळें पाण्याप्रमाणें लस उत्पन्न होऊन तीभोंवती वेष्टण तयार होतें ती लस गुल्म होय.(२)मान,मस्तक व कान या ठिकाणीं कांहीं माणसांत शिरांशीं संबंध असलेले रक्तगुल्म पहाण्यांत येतात. यांस रक्तगुल्म म्हणतात. मार लागून इजा झाल्यानें व रक्त सांखळून गांठ बनतें तें एक यांचेंच उदाहरण आहे. (३) संमिश्र गुल्म म्हणजे स्त्रीतील अण्डा-शय व स्तन यातील रचनावृद्धि होत असतांना मध्यें पोकळी राहून गुल्म तयार होतो तो.(४) आगंतुक गुल्म म्हणजे हाताच्या पंजांत व इतर थोड्या ठिकाणीं छिद्राप्रमाणें खोल जखम होऊन तींत बाह्य त्वचेचे तुकडे घुसून तेथें त्यांतील स्निग्ध तैलपिंडाची वृद्धि होऊन गुल्म तयार होतो. (५) परोपजीवी चपट्या जंतांपासून होणारा गुल्मः- यांपैकीं एका प्रकारचे जंत डुकर, गाई, म्हशीचें बिघडलेलें मांस खाणारांना होतात. अन्य प्रकार कुत्र्यांनां होतो. या रोगानें पीडित कुत्र्याच्या विष्टेमध्यें या जंतांचीं सूक्ष्म अंडीं असतात व तीं अन्नपाण्याबरोबर माणसाच्या पोटांत जाऊन प्रसवतात व यकृतमार्गें शरीरांतील कांहीं अवयवांस त्यांचे गर्भ चिकटून त्याभोंवतीं दोन तीन पापुद्र्यांचा गुल्म तयार होतो व तो मोठ्या वाढीस लागतो. यांस प्रतिबंधक उपचार कुत्र्यास डुकर,मेंढी,यांची विष्टा खाण्याची संवय असते त्यास जपावें.त्याला जंत आल्यास जंतनाशक औषध व रेचक द्यावें. कुत्र्यास भ[illegible]ानें खावयाच्या अन्नाजवळ फिरकूं देऊं नये. माणसा[illegible] रोग झाल्यास पूर्णपणें हा गुल्म वेष्टणा-सह शस्त्रक्रियेनें काढला पाहिजे. नाहीं तर पुनः वाढीस लागतो. कापून काढल्यावर त्यांतील द्रवपदार्थ वगैरे काढून त्यांचें अंतर्वेष्टणहि साफ कापून काढलें पाहिजे. म्हणजे मग जखमेंत निचरा होण्यासाठीं कांहीं दिवस रबरी नळी ठेविल्यानें जखम मुळापासून चांगली भरून येते. या रोगाचीं लक्षणेंः—डोळ्यांनीं पहाण्याजोग्या व हातानें चांच-पण्यासारख्या जागीं या प्रकारचा गुल्म असल्यास वाटोळी, ताठ, दाबल्यावर दबणारी, नंतर पूर्ववत् होणारी पोकळ गांठ दिसते अगर हातास लागते. तीवर आडवें बोट ठेवून दुसऱ्या बोटांनें ठेंकून अगर टिचकी मारून तपासलें तर पाण्यावर तरंग अगर लाटांची हालचाल व्हावी तद्वत हालचाल झालेली भासते. हा रोग शरीरांत पुष्कळ ठिकाणीं होतो. व त्या त्या स्थानांप्रमाणें निरनिराळीं दुसरीं लक्षणें होतात.

(इ) गर्भावशिष्ट गुल्मः—(१) गर्भसंभव झाल्यानंतर त्याचे जे तीन थर होतात त्यांपैकीं बाह्य थर मधील थरांत गुरफटला गेल्यामुळें त्या भागांत पोकळी राहून, (२) गर्भावस्थेंत कांहीं पोकळी निर्माण होतात व प्रसूतीनंतर त्या आपोआप बुजतात. परंतु कांहीं माणासांत अशा कांहीं रचना न बुजल्यामुळें तेथें गुल्म होतो. वृषणरज्जुशोथवृद्धि नामक गुल्म हा रोग, थायराइडची नलिका न बुजण्यानें गळ्याच्या मधोमध होणारा गुल्म, व गर्भाशयाच्या डाव्या अगर उजव्या बाजूच्या विशालनामक बंधनांत उद्भवणारा गुल्म हीं या प्रकारांची व नेहमीच्या प्रचारांतील उदाहरणें होत. असल्याच कारणामुळें स्त्रीअण्डाशय व वृषण यांतून बनणारे गुल्म होतात. यांचीं स्थानें व लक्षणें:—वरील गर्भावशिष्ट गुल्म वर्गापैकीं त्वचोत्पन्न गुल्म डोळ्याच्या अस्थिरंध्राच्या बाहेरच्या बाजूस उत्पन्न होतो. तो टणक, वाटोळा, हलविला तर हलणारा, गुळगुळीत, जन्मतः लहान असून हळू हळू वाढणारा, मध्यम अगर लहान आकाराचा गुल्म असतो. याच्या आंत केस, तैलपिंड, धर्मापिंडादि त्वचारचनेचे अवशेष सांपडतात. यास उपचारः—मोठा वण मागून न राहील अशी शस्त्रानें गुल्मावर चीर पाडून तींतून रोग कापून काढावा. एखाद्या वेळीं त्याचे फांटे आंतील उगमापर्यंत गेलेले असतात. अगर हाडांतहि घुसलेले असतात. ते जपून कापावे. अंडाशयच्छेदन नामक महत्वाची शस्त्रक्रिया करून गर्भाशयालगत असलेला मोठा गुल्मरोग कापून काढतात. त्याच शस्त्रक्रियेनें त्या स्थानीं सार्कोमा अगर क्यान्सरग्रंथि हा रोग असल्यास तो काढतां येतो. उदर चिरूनहि शस्त्रक्रिया करावी लागत असल्यामुळें ती फार महत्वाची आहे. हा रोग शरीराच्या आंत असल्यास त्याचें ग्रंथिरोगापासून निदान करण्यास अडचण पडते. यासाठीं ग्रंथिरोगावरील लेख पहावा. कारण ग्रंथिरोगाचे व या रोगाचे नाना प्रकार नाना स्थानीं व नाना इंद्रियांमध्यें उद्भवतात.

ग्रॅफाइट—हा खनिज पदार्थ कोळशाचा दुसरा प्रकार आहे. रासायनिक दृष्टया कोळसा, ग्रॅफाइट व हिरा हे एकच आहेत; परंतु त्यांचा आकार व गुणधर्म यांत फार फरक आहे. ग्रॅफाइट काळा व मऊ असतो. याचें विशिष्ट गुरुत्व २.२ आहे. याच्या वड्या सांपडतात. हा बोटांनीं चुरडतो व चोळल्यास सर्व हात काळा होऊन जातो. लिहिण्याकरितां पेन्सिली शिशाच्या करीत नसून ग्रॅफाइटच्या करतात. परंतु त्यांस चुकीनें शिसपेन्सिली म्हणतात.

हा चुनखडीच्या खाणींत पुष्कळ वेळा सांपडतो. याच्या मुख्य खाणी न्यूयॉर्क, कानडा, आस्ट्रिया व सिलोनमध्यें आहेत. मेक्सिकोमध्यें सर्वांत मोठी खाण आहे. तेथील ग्रॅफाइट अमेरिका खंडभर पेन्सिलीस पुरतो.

हिंदुस्थानांत सांपडणाऱ्या ग्रॅफाइटचा उपयोग फक्त भांडीं साफ करण्याकडे करतात. विद्युत्प्रवाहाच्या सहाय्यानें कृत्रिम ग्रॅफाइट तयार करतां येतो. इ. स. १८९३ मध्यें ही युक्ति निघाली. फक्त कोळसा बारीक वाटून त्याची पूड करितात व विद्युत्प्रवाहांत ती पूड हळू हळू सोडतात, म्हणजे त्या कोळशाचा कांहीं भाग ग्रॅफाइट बनतो.

ग्रह—सूर्याभोंवती फिरणारे लहान मोठे ग्रह, त्यांचें गतिमान व कक्षा यांचें सविस्तर विवेचन 'सूर्यमाला' या लेखांत आढळेल. मंगळ, गुरु, शनि यांसारख्या मोठ्या ग्रहांवर स्वतंत्र लेख या कोशांत दुसरीकडे सांपडतील. ग्रहांविषयीं प्राचीन माहिती व शोध 'विज्ञानेतिहासाच्या' 'ज्योतिषशास्त्राचा इतिहास' या प्रकरणांत (ज्ञानकोश, वि. ५ प्र. ८) प्रथित केले आहेत.

ग्रहण—हा एक विश्वचमत्कार जगाच्या किंवा मनुष्योत्पत्तीच्या आरंभासून दृग्गोचर होत असावा असें मानण्यास हरकत नाहीं. ऋग्वेदांतलें सौरसूक्त नांवाचें सूर्याचें जें सूक्त आहे त्या सूक्तांत पुढील वर्णन (ऋ. ५ ४०, ६ ९) आहे:— "हे सूर्या, असुर स्वर्भानूनें तुला तमानें आच्छादिलें, तेव्हां कोणासहि आपलें स्थान दिसेना. सगळे लोक अगदीं भांबावल्यासारखे झाले. हे इंद्रा, तूं स्वर्भानूच्या मायांचा नाश करितोस. तमानें झांकलेल्या सूर्यास अत्रीनें ब्रह्मज्ञानानें मुक्त केलें, अत्रीनें स्वर्भानूच्या मायेचें निवारण केलें. अत्रि सूर्याला मिळविते झाले; इतर कोणी मिळवूं शकले नाहींत" महाभारतादिकांत ग्रहणांचें वर्णन पुष्कळ ठिकाणीं आहे. त्यांत बहुधा कांहीं विपरीत किंवा फारशी कधीं न घडणारी गोष्ट घडण्याच्या वेळीं ग्रहण पडलें होतें अथवा ग्रहण झाल्यावर विपरीत गोष्टी झाल्या असें वर्णन असतें. या देशांतील बहुतेक क्षत्रियांचा संहार करणारें कौरवपांडवांचें महाभयंकर युद्ध झालें, त्याच्या पूर्वी नुकतींच एका महिन्यांत चंद्राचें व सूर्याचें अशीं दोन ग्रहणें झालीं होतीं, आणि त्यांवरून त्या प्रळयाचें चिन्ह दिसून आलें होतें असें वर्णन आहे.

ता. १९ मार्च इ. स. ७२०, ८ मार्च इ.स.६१९ व १ सप्टेंबर इ. पू. ७१९ हीं अति प्राचीन चंद्रग्रहणें ग्रंथांतरीं उल्लेखिलेलीं सांपडतात. गेल्या सोळाशें वर्षांतले अनेक राजांचे शेंकडो ताम्रपट हल्लीं सांपडले आहेत. आणि त्यांवरून या देशाच्या प्राचीन इतिहासाचा पुष्कळ चांगला विश्वसनीय शोध लागत चालला आहे. बहुतेक ताम्रपट एखाद्या पुण्यकारक पर्वाच्या वेळीं ब्राह्मणास भूमि इत्यादिकांचें दान केल्याच्या संबंधाचे आहेत. त्यांत सूर्यग्रहण अथवा चंद्रग्रहण यांच्या वेळीं भूमिदान केल्याचा लेख पुष्कळ ताम्रपटांत आहे. ग्रहणाच्या वेळीं भूमिदान केलें असतां फार पुण्य लागतें, "चंद्रसूर्यग्रहणाच्या वेळीं दिलेलें दान अक्षय्य होतें" असें धर्मशास्त्रादिकांत सांगितलें आहे.

ग्रहणाच्या खऱ्या कारणाची कल्पना त्यावेळीं असावी असें दिसतें. महाभारतांत जागोजाग वर्णनें आहेत, त्यांतहि ग्रहण पाहून लोक भिऊन गेले असें वर्णन कोठेंहि नाहीं. ग्रहणाचे परिणाम वाईट होतील अशी मात्र भीति लोकांस

पडत असे. भारतीयुद्धाच्या वेळीं एका महिन्यांत दोन ग्रहणें आल्यामुळें तें लोकांनीं दुश्चिन्ह मानलें.

ग्रहणाच्या काळाचें एक चक्र आहे. १८ सौर वर्षें आणि ११ दिवस इतक्या काळांत जीं जीं ग्रहणें ज्या ज्या क्रमानें येतात तींच बहुधा त्याच क्रमानें पुढें तितक्या काळांत येतात. चांद्रसौरमानानें या काळांत कधीं १८ वर्षें होतात, तर कधीं १८ वर्षें आणि एक चांद्रमास होतो. सूर्यचंद्र हे राहुबिंदूंत एकदां आल्यापासून पुनः सुमारें इतक्या काळानें ते एकाच वेळीं फार थोड्या अंतरानें त्या स्थळीं येतात. त्यांच्या स्थितींत कांहीं कलाचें अंतर पडतें यामुळें, व चंद्राची स्पष्टगति थोडी कमजास्त होते, यामुळें एका चक्रांतलें एखादें ग्रहण पुढल्यांत कमी होतें आणि एखादें वाढतें. सुमारें १००० वर्षांनीं यांत पुष्कळ फरक पडतो. एका चक्रांत बहुधा ७० ग्रहणें होतात. त्यांत ४२ सूर्याचीं आणि २८ चंद्राचीं होतात. म्हणजे चंद्राच्या दीडपट सूर्याचीं ग्रहणें होतात. कधीं चक्रांत ७१ ग्रहणें होतात; तेव्हां चंद्राचीं २९ होतात. चक्रांत सूर्याचीं ग्रहणें पुष्कळ होतात, परंतु एकाच स्थळीं त्यांतलीं थोडींच दिसतात. तीं एकंदर जितकीं होतात त्यांचा सहावा हिस्सा म्हणजे सुमारें ७ ग्रहणें एका ठिकाणीं दिसतात. तींहि पृथ्वीवर अन्य स्थळीं खग्रास किंवा कंकणाकृति असलीं तर विवक्षित ठिकाणीं तशीं दिसतात असें नाहीं. बहुतेक खंडित म्हणजे अपूर्ण दिसतात. खग्रास किंवा कंकणाकृति फार थोडीं दिसतात. चक्रांतील २८ चंद्रग्रहणांपैकीं सरासरीनें १८ एका ठिकाणीं दिसतात. म्हणजे १८ वर्षांत पृथ्वीवर होणाऱ्या एकंदर ७० ग्रहणांपैकीं ७ सूर्यग्रहणें व १८ चंद्रग्रहणें एका ठिकाणीं दिसतात. ४५ दिसत नाहींत.

पृथ्वीभोंवतीं चंद्र फिरतो आणि चंद्राच्या पलीकडे सूर्य फार लांब आहे. पृथ्वी आणि चंद्र हे दोन्ही गोल अपारदर्शक आहेत. यामुळें सूर्याचा प्रकाश त्यांवर पडतो, तेव्हां सूर्य जिकडे असतो, त्याच्या दुसऱ्या बाजूस ह्यांची छाया पडते. रात्रीस पृथ्वीच्या ज्या अंगीं आपण असतो, त्याच्या दुसऱ्या अंगास खालीं सूर्य असतो. म्हणून आपल्या वरच्या बाजूस आकाशांत पृथ्वीची छाया पसरलेली असते. चांदणें नसलें तर ही छाया आपल्या अनुभवास येतेच. याप्रमाणेंच चंद्राची छाया पडते. अमावस्येच्या दिवशीं सूर्याच्या थेट समोर चंद्र असला म्हणजे चंद्राची छाया पृथ्वीवर पडली पाहिजे. या छायांमुळें चंद्रसूर्यांस ग्रहणें लागतात. सूर्य स्वयंप्रकाश आहे. म्हणून वास्तविक म्हटलें म्हणजे त्यास ग्रहण कधींच नाहीं. म्हणजे त्याजवर कोणाची छाया कधींच पडावयाची नाहीं. परंतु त्याच्या आड चंद्र येऊन चंद्राची छाया पृथ्वीवर पडली म्हणजे, जेथें ती पडते तेथील लोकांस सूर्य दिसत नाहीं. म्हणून सूर्यास ग्रहण लागलें असें म्हणतात पण जेथें छाया नसते तेथें सूर्य दिसतच असतो.

अमावस्येच्या वेळीं सूर्याच्या व पृथ्वीच्यामध्यें चंद्र कोठें तरी असतो. आणि सूर्य क्रांतिवृत्तांत कोठें तरी असतो व पृथ्वी क्रांतिवृत्ताच्या मध्यबिंदूंत असते. अर्थात् पृथ्वीची छाया क्रांतिवृत्तांतच समोर असते. ती छाया आणि सूर्य ह्यांमध्यें नेहमीं अर्ध्या परिघाइतकें म्हणजे ६ राशींचें अंतर असतें. पौर्णिमेच्या रात्रीं चंद्र जेथें असतो, त्याच्या आसपास भूछाया क्रांतिवृत्तांत असते. सूर्याइतकीच भूछायेची गति असते. तिच्याहून चंद्र जलद चालतो. तो पश्चिमेकडून पूर्वेस जातां जातां तो आणि भूछाया यांचें पूर्वपश्चिम अंतर शून्य होतें. तेव्हांच दक्षिणोत्तर अंतर शून्य झालें तर त्यास ग्रहण लागतें. परंतु दर पौर्णिमेस तें अंतर शून्य होत नाहीं. चंद्रकक्षा आणि क्रांतिवृत्त या दोहोंच्या पातळ्यांत ५ अंशांचा कोन आहे. त्या पातळ्या दोन ठिकाणीं परस्परांस छेदितात. त्या बिंदूंस राहु केतु म्हणतात. राहुकेतूंत किंवा त्यांच्याजवळ चंद्र असतो. तेव्हां चंद्राचा शर शून्य किंवा अगदीं थोडा असतो. म्हणजे क्रांतिवृत्ताच्या जवळच चंद्र असतो. यामुळें तेव्हां सूर्यहि तेथेंच असला तर त्याच्या आड चंद्र येतो. किंवा भूछाया तेथें असली तर तींत चंद्र सांपडतो यामुळें ग्रहणें होतात. राहूकेतूंपासून चंद्र लांब असला तर तो क्रांतिवृत्तापासून लांब असतो. यामुळें त्याचा शर सूर्यबिंब किंवा भूभाबिंब याहून जास्त होतो. यामुळें तो सूर्याच्या आड येत नाहीं किंवा भूछायेंत सांपडत नाहीं. यामुळें ग्रहण होत नाहीं. एकदा पौर्णिमेस किंवा अमावस्येस ग्रहण झाल्यापासून पुढें एक किंवा दोन पर्वांस ग्रहणें होतात. म्हणजे लगत दोन किंवा तीन होतात किंवा कधीं एकच होतें. व त्यापुढें पांच साडेपाच किंवा सहा चांद्र महिन्यांनीं पुनः ग्रहण होतें. चंद्रग्रहण नेहमीं पौर्णिमेस आणि सूर्यग्रहण अमावस्येस होतें. सूर्यग्रहण लागण्यापूर्वी सूर्याच्या पश्चिमेस चंद्र असतो. परंतु तो जलद चालणारा असल्यामुळें सूर्याचें बिंब ओलांडून कांहीं वेळानें सूर्याच्या पूर्वेस येतो. पश्चिमेकडून चंद्र येत। येतां सूर्याच्या पश्चिमकडेच्या आड तो येताच सूर्यास त्या दिशेनें ग्रहण लागू लागतें. तेव्हां ग्रहणाचा स्पर्श झाला असें मानतात. अर्थात् सूर्यग्रहणाचा स्पर्श सूर्यबिंबाच्या पश्चिमेकडून होतो. आणि पुढें सूर्यबिंबाचा अधिकाधिक भाग आच्छादित होऊं लागतो. नंतर कांहीं वेळानें तो कमी व्हावयास लागून सूर्याच्या पूर्व बाजूनें चंद्र सूर्यास मोकळा करतो, म्हणजे ग्रहण सुटतें. त्यावेळीं ग्रहणाचा मोक्ष झाला असें म्हणतात. मोक्ष याचा अर्थ सुटका असा आहे. ह्याप्रमाणेंच चंद्र भूछायेच्या पश्चिमेकडून येऊन पूर्वेस जातो. यामुळें त्याचा पूर्व भाग प्रथम आच्छादित होतो आणि पश्चिम भाग शेवटीं छायेंतून बाहेर पडतो. म्हणून चंद्रग्रहणाचा स्पर्श बिंबाच्या पूर्वेकडून आणि मोक्ष पश्चिमेकडून होतो. बिंबाचा जितका भाग आच्छादित होतो, तितका ग्रास झाला असें म्हणतात. स्पर्शापासून मोक्षापर्यंत जो काळ जातो त्यास पर्वकाळ म्हणतात. या काळाच्या मध्याच्या

सुमारास महत्तम ग्रास होतो. तेव्हां ग्रहणाचा मध्य झाला असें म्हणतात. त्यावेळीं जो भाग आच्छादित होतो तो ग्रास पंचांगांत देतात. आणि ग्रहणाची आकृति पंचांगांत काढितात तींत तो दाखवितात.

चंद्रसूर्यांचीं बिंबें विस्तारानें बहुधां सारखींच दिसतात. तरी पृथ्वी आणि चंद्र यांच्या कक्षा दीर्घवर्तुळ असल्यामुळें चंद्रसूर्यांचें पृथ्वीपासून अंतर नेहमीं समान नसतें; कमजास्त होतें. यामुळें बिंबें लहान मोठीं दिसतात. कक्षेंतला जो बिंदु मध्यवर्ती ज्योतीपासून लांब असतो त्यास उच्च म्हणतात आणि जवळ असतो त्यास नीच म्हणतात. चंद्र सुमारें २७॥ दिवसांत एकदां आपल्या कक्षेच्या नीचीं आणि एकदा उच्चीं येतो. चंद्रसूर्य उच्चीं असतात तेव्हां त्यांचीं बिंबें लहान दिसतात. आणि नीचीं असतात तेव्हां मोठीं दिसतात. चंद्र नीचीं आणि सूर्य उच्चीं असता सूर्यबिंबाहून चंद्राचें बिंब बरेंच मोठें दिसतें. अशा वेळीं ग्रहण झालें तर तें खग्रास होतें. सूर्यबिंबाहून चंद्रबिंब लहान असतें तेव्हां कंकणग्रहण होतें. खग्रास होतें तेव्हां चंद्राची छाया पृथ्वीवर पडतें. तिचा व्यास फार तर १८० मैल असतो. यामुळें इतक्या रुंदीचा पृथ्वीचा जितका पूर्वपश्चिम पट्टा, सूर्यबिंबावरून चंद्र पलीकडे जाईपर्यंत दैनंदिनगतीमुळें छायेंत येतो तेथें मात्र खग्रास ग्रहण होतें. कंकणग्रहणांत तें कंकण दिसण्याचा पट्टा सुमारें १०० मैल रुंद असतो. ह्या पट्टयांच्या उत्तरेस व दक्षिणेस तींच ग्रहणें खंडित मात्र दिसतात. यामुळें स्थलविशेषीं खग्रास किंवा कंकणसूर्यग्रहण फार वर्षांनीं दिसतें. खग्रास सूर्यग्रहणांत सूर्य अगदीं आच्छादिलेला असा फार तर ८ मिनिटें असतो आणि कंकणग्रहण फार तर ३१ पळें दिसतें. चंद्र जेथें असतो तेथें पृथ्वीच्या छायेचा व्यास चंद्रबिंबाहून पुष्कळ मोठा असतो. कधीं कधीं तो चंद्रबिंबाच्या तिप्पट असतो. म्हणजे ग्रहणाच्या वेळीं भूभा आणि चंद्र यांचे मध्यबिंदू एका ठिकाणीं आले तर चंद्राभोंवतीं चंद्रबिंबाच्या दीडपट रुंदीचें भूभावेष्टण असतें. यामुळें चंद्रास कंकणग्रहण कधींहि लागावयाचें नाहीं. भूछायेंत जाण्यास चंद्रास फार वेळ लागतो म्हणून खग्रास चंद्रग्रहण फार वेळ दिसतें. यावेळीं भूमेनें चंद्राचा ग्रास होऊन ख म्हणजे आकाश त्याचाहि होतो, म्हणून त्यास खग्रास ग्रहण म्हणतात. भूमेच्या भोंवतीं छायाकल्प असतो. त्यांत चंद्र येतो तेव्हां तो अंमळ निस्तेज दिसतो. यामुळेंच खग्रास चंद्रग्रहणांत स्पर्शापूर्वी व नंतर कांहीं वेळ चंद्र फिकट दिसत असतो. चंद्रग्रहणाच्या वेळीं पृथ्वीवर चंद्र जेथें जेथें दिसेल तेथें चंद्रग्रहण दिसतें व तें सर्वत्र सारखें दिसतें, कमजास्त दिसत नाहीं [दीक्षित ज्योतिर्विलास]

ग्रहणासंबंधीं पुढील गणितविषयक माहिती प्रसिद्ध महाराष्ट्रीय ज्योतिषशास्त्रज्ञ रा. वें. बा. केतकर यांच्या ' ग्रहगणितां 'तून घेतली आहे.

चं द्र ग्र ह ण.—पंचांगामध्यें दर पौर्णिमेस प्रातःकालचे सूर्य आणि राहू यांचे भोग दिलेले असतात. राहूमध्यें १८० अंश मिळविले म्हणजे केतूचा भोग होतो. सूर्य आणि त्याच्याजवळ असणारा राहू किंवा केतू यांच्यामध्यें अंतर १३ अंशांपेक्षां कमी असेल तर ग्रहणाचा मात्र संभव असतो. पण ९ अंशांपेक्षां कमी अंतर असेल तर ग्रहण खचित होतें असें समजावें. संभव असेल तर चंद्रगणितांत सांगितल्या रीतीनें पौर्णिमांताजवळच्या पूर्ण घटकेचीं पुढील मानें आणावीं. पहिलें उपकरण रविमंदकेंद्र असतें म्हणून त्यावरूनच सूर्याचें मंदफल, गति, बिंब वगैरे मानें साधावीं. त्याप्रमाणेंच स्पष्टसूर्य, सूर्यदिनगति, सूर्यबिंब, राहु, अयनांश, स्पष्टचंद्र, चंद्रदिनगति, चंद्रबिंब व चंद्रक्षितिजलंबन हीं मानें काढावीं.

पौर्णिमांत समयः—स्पष्टसूर्यांत १८० अंश मिळविले म्हणजे भूभाभोग येतो. भूभा म्हणजे भूछाया. भूछायेंत चंद्र शिरतो म्हणून चंद्रास ग्रहण लागतें हें ध्यानांत ठेवावें. भूभा आणि स्पष्टचंद्र यांच्या अंतराच्या कलांस ६० नीं गुणून गुणाकारास सूर्यचंद्रांच्या दिनगत्यंतरकलांनीं भागून घटिकादि चालनसंस्कार आणावा. चंद्रापेक्षां भूभाभोग जास्त असेल तर, चालन धन कमी असेल तर ऋण समजून गणित ज्या घटकेचें असेल त्या घटकेला चालनाचा संस्कार करावा म्हणजे पौर्णिमांत समय येतो.

दिनगतीच्या साहाय्यानें पौर्णिमांतीचा सूर्य आणून त्यांत १८० अंश मिळवावे म्हणजे पौर्णिमांतीचा चंद्र येतो. या चंद्रांत चक्रशुद्ध राहु आणि ०°·१५ मिळवून येणाऱ्या उपकरणानें चंद्राचा शर आणून तो आपल्या ३४ व्या हिश्शानें लहान करावा. म्हणजे आकर्षणस्पष्ट चंद्रशर येतो.

चंद्रशराची घटीगतिः—चंद्रदिनगतीला ६६७ नीं भागिलें म्हणजे कलादि घटीगति येते. ग्रहण राहु सन्निध असेल तर ही गति धन म्हणजे उत्तर व केतु सन्निध असेल तर ऋण म्हणजे दक्षिण असते. ग्रहणपरिलेख काढतांना पौर्णिमांत समयाच्या पुढील आणि मागील पांच पांच घटिकांस चंद्रशराची जरूरी लागते. म्हणून ५ घटिकांची शरगति आणून तिचा पौर्णिमांतीच्या चंद्रशराला संस्कार करावा. म्हणजे त्या त्या वेळचे चंद्रशर येतात.

ग्रहणमध्यकालः—चंद्रापासून जवळच्या राहु किंवा केतु संपातापर्यंत जें अंशात्मक अंतर त्याच्या दुपटीइतक्या पळांस पर्वसंस्कार म्हणतात. संपात चंद्राच्या पुढें असेल तर पर्वसंस्कार धन, मागें असेल तर ऋण समजून त्यांचा पौर्णिमांत कालाला संस्कार करावा म्हणजे ग्रहणमध्यकाल येतो. मग पुढील समीकरणसूत्राप्रमाणें गणित करून स्पर्श, संमीलन इत्यादि काल आणावे जसें:—

भूभाबिंब = ५१/५० (द्विगुणचंद्रक्षितिजलंबन—सूर्यबिंब)
मान्यैक्यखंड = १/२ (भूभाबिंब+चंद्रबिंब)
मानांतरखंड = १/२ (भूभाबिंब—चंद्रबिंब)
ग्रास = (मान्यैक्यखंड—चंद्रशर)

खग्रास = (मानांतरखंड–चंद्रशर)

$$\text{ग्रहणस्थितिघटी} = \sqrt{(\text{मान्यैकखंड}^2 + \text{चंद्रशर}^2) \times \frac{60}{\text{दिनगत्यंतर}}}$$

$$\text{मर्दस्थितिघटी} = \sqrt{(\text{मानांतरखंड}^2 + \text{चंद्रशर}^2) \times \frac{60}{\text{दिनगत्यंतर}}}$$

स्पर्शकाल = ग्रहणमध्यकाल – ग्रहणस्थिति
संमीलनकाल = ग्रहणमध्यकाल–मर्दस्थिति
ग्रहणमध्यकाल = ... ग्रहणमध्यकाल
उन्मीलनकाल = ग्रहणमध्यकाल + मर्दस्थिति
मोक्षकाल = ग्रहणमध्यकाल + ग्रहणस्थिति

ग्रास आणि बिंब यांचीं मानें अंगुलात्मक सांगण्याची प्राचीन ग्रंथकारांची वहिवाट आहे. त्याप्रमाणें तीन कलांचें एक अंगुल होतें. ग्रहणस्थितीच्या दुपटीस पर्वकाल म्हणतात. शर उत्तर असेल तर चंद्रबिंबाच्या दक्षिणेकडे ग्रास होतो. दक्षिण असेल तर उत्तरेकडे ग्रास होतो.

सू र्य ग्र ह ण, ग्रहणसंभवासंभव.—अमावास्येस राहु किंवा केतु यांच्यापासून पुढें किंवा मागें १९ अंशाच्या आंत सूर्य असेल तरच सूर्यग्रहणाचा संभव असतो. हें अंतर १३ अंशांपेक्षां कमी असेल तर पृथ्वीवर कोठें तरी सूर्यग्रहण दिसलेंच पाहिजे; पण तें इष्टग्रामीं दिसेल किंवा नाहीं, या गोष्टीचा निर्णय बरेंच गणित केल्याशिवाय करतां येत नाहीं. संभव असेल तर पंचांगांतील दर्शांताच्या जवळच्या पूर्ण घटिकेचीं पुढें लिहिलेलीं मानें आणावीं:–स्पष्टसूर्य, सूर्यदिनस्पष्टगति, सूर्यबिंब, राहु, अयनांश, मध्यमसूर्य, स्पष्टचंद्र, चंद्रदिनस्पष्टगति, चंद्रबिंब, चंद्राचें क्षितिजलंबन, चंद्रशर आणि चंद्रशर घटीगति. नंतर या मानांच्या सहाय्यानें सूर्यचंद्रांचा भोग समान होण्याची वेळ काढावी. ती उज्जयिनीची मध्यमवेळ येईल. तिला रेखांतरांचा संस्कार करावा म्हणजे इष्ट गांवचा दर्शांतसमय येईल.

सुमाराचा ग्रहणमध्यकाल व स्पर्शकाल काढण्याची पद्धति–दर्शांतकाल आणि १५ घटी यांचें अंतर करून त्यास नतकाल म्हणावें. दर्शांत पूर्वान्हीं असेल तर नतघटी ऋण, येरव्हीं धन समजाव्या. नतघटी ०,१,२,३, पर्यंत असतील तर त्यांचा दर्शांतघटीला संस्कार करावा. नतघटी तीनपेक्षां जास्त असतील तर चारच घटिकांचा संस्कार करावा. म्हणजे सुमाराचा ग्रहणमध्यकाल येतो. मध्यकाळांत ५घटिका वजा कराव्या. म्हणजे सुमाराचा ग्रहणस्पर्शकाल येतो. या स्पर्शकालापासून पुढें सुमारें दहा घटिकांपर्यंत दर दुसऱ्या घटिकेस सूर्यचंद्रामधील दृश्य अंतर काढण्यासाठीं गणित करावें लागतें.

सूर्यग्रहणीं स्पर्शमोक्षकाल, लंबन आणि नति या दोन संस्कारांवर अवलंबून असतात. लंबन व नति हे संस्कार, त्रिभोनलग्न आणि नतांश यांवर अवलंबून असतात. आणि त्रिभोनलग्न व नतांश हे गांवाचे अक्षांश आणि विषुवकाल यांवर अवलंबून असतात. मध्यम सूर्योदयीं सायन मध्यम सूर्याच्या घटिकात्मक भोगाएवढा विषुवकाल असतो. म्हणून औदयिक सायनमध्यमसूर्याचे अंश करून त्यांस ६ नीं भागावें म्हणजे औदयिक घटिकारूप विषुवकाल येतो. यांत सुमाराचा स्पर्शकाल मिळवावा. ही बेरीज समसंख्याक पूर्ण विषुवघटी नसेल तर तींत कांहीं भरती घालून ती तशी करावी आणि जी भरती घातली असेल ती मध्यमकालांतहि मिळवावी. म्हणजे इष्टघटीइतका विषुवकाल असतेवेळीं मध्यमकाल किती झाला असेल तें निघतें. त्या त्या मध्यमघटिकेच्या सायनसूर्यांतून त्या त्या घटिकेचें त्रिभोनलग्न वजा करावें म्हणजे विश्लेषांश येतात.

सूर्यचंद्रांचें दृश्य पूर्वापरांतर आणि दृश्यदर्शांतः—त्या त्या मध्यमघटीपुढें इष्टगांवची ग्रहणमध्यघटी मांडून त्यांच्या बैजिक अंतरघटीला चंद्रसूर्यांच्या घटीगत्यंतरानें गुणावें म्हणजे भूमध्यस्थ द्रष्ट्याला दिसणारें सूर्यचंद्रांच्या मध्यबिंदूमधील अंतर येतें. त्याला लंबनाचा संस्कार करावा. म्हणजे इष्टग्रामीं दिसणारें अंतर निघतें. हें पूर्वापरांतर होण्याची जी वेळ तोच येथील दृश्यदर्शांत. यावेळेच्या सुमारास परमग्रास असतो.

चंद्रसूर्यांचें दृश्य दक्षिणोत्तर अंतर, मध्यांतर आणि ग्रास चंद्रशराच्या घटीगतीच्या मदतीनें त्या त्या मध्यमघटिकेचे चंद्रशर आणून त्यांनां त्या त्या वेळेच्या नतीचा संस्कार करावा. म्हणजे त्या त्या वेळेचीं सूर्यचंद्रांमधील दृश्यदक्षिणोत्तर अंतरें, किंवा स्फुटशर निघतात. नंतर त्या त्या घटिकेचे दृश्य पूर्वापरांतराच्या वर्गांत दृश्यदक्षिणोत्तरांतराचा वर्ग मिळवून बेरजेचें वर्गमूळ काढावें म्हणजे मध्यांतर होतें. मध्यांतरांतून सूर्यचंद्रांचें बिंबैक्यार्ध वजा करावें म्हणजे ग्रास किंवा बिंबांतर येतें. हें जितकें ऋण असेल तितका त्यावेळीं ग्रास समजावा.

चंद्रबिंबवृद्धिः—आतां ग्रहण खग्रास होईल किंवा नाहीं तें ठरविण्यापूर्वी ग्रहणमध्यकालीं चंद्रबिंब केवढें असेल तें ठरविलें पाहिजे. कारण चंद्राच्या उदयापासून तो मध्यान्हीं येईपर्यंत चंद्रबिंब हळूं हळूं वाढत असतें. नंतर त्याचा अस्त होईपर्यंत पुनः घटत जातें. म्हणून इष्ट वेळेची चंद्रबिंबवृद्धि पुढील समीकरणसूत्रावरून आणून ती पूर्वी आणलेल्या चंद्रबिंबांत मिळवावी जसें:—

बिंबवृद्धि = ३१.० × नतांशकोटिज्या × विश्लेषांशकोटिज्या.

स्पर्शमोक्षस्थानेंः—शिराबिंदुसंबंधानें स्पर्शमोक्षस्थानें काढण्याची सोपी रीति पुढें सांगितली आहे. आपल्या खिशांतील घड्याळास सूर्यबिंब मानावें आणि या स्थानांशास ६ नीं भागून येणाऱ्या संख्येस मिनिटें मानावीं. मग धन मिनिटें उजवीकडे आणि ऋण मिनिटें डावीकडे मोजून जीं स्थानें येतील त्या स्थानीं स्पर्शमोक्ष होतील. मात्र घड्याळ पहातांना १२ चा आकडा उभ्या रेषेंत धरावा. उदा. + ११०° ÷ ६ = २०; म्हणजे घड्याळांत जेथें २० मिनिटांचें घर असतें तेथें सूर्यबिंबावर स्पर्श होईल असें जाणावें.

स्टँडर्डटाईमप्रमाणें स्पर्शादि काल काढणें:—वर जे घटिकादि स्पर्शादि काल आले आहेत ते स्थानिक मध्यम आहेत. त्यांस रेखांतराचा व्यस्त संस्कार करावा, म्हणजे रेखांतर मिनिटें धन असलीं तर ऋण समजावीं आणि ऋण असलीं तर धन समजून स्पर्शादि स्थानिकमध्यम कालांना संस्कार करावा म्हणजे उज्जयिनी मध्यमकाल येतात. त्यांत ६ अ. २७ मि. मिळवावीं. म्हणजे स्टँडर्ड टाईमप्रमाणें स्पर्शादिकाल येतील. जसें:-

स्थानिक काल-रेखांतर + ६ अ. २७ मि. = स्टँडर्डटा.

उदाहरणः—

	घ.	अ.मि.	मि.रेखा	अ.मि.	स्टँ. टा
स्पर्श =	१४.८ =	५ ५५.२,	—१३.० +	६ २७ =	१२ ९.
मध्य =	१८.८ =	७ ३१.२,	—१३.० +	६ २७ =	१ ४५.
मोक्ष =	२२.१ =	८ ५०.४,	—१३.० +	६ २७ =	३ ८.

ग्रहविप्र (गणक)—आसामांतील ह्या जातीची लोकसंख्या २१४८९ आहे. सुरमाथडी व बंगालमधील गणक लोकांपेक्षां ब्रम्हपुत्रा नदीच्या थडींतील गणक लोक अधिक उच्च वर्गाचे समजले जातात. त्यांच्या मधील झालेल्या बंडाळीनंतर ब्रम्हपुत्रा नदीच्या थडींतील गणकांनीं ' ग्रहविप्र ' हें नवीन नांव घेतलें. बंगाल्यांत ह्या लोकांना आचारजी अथवा दैवज्ञ ब्राम्हण म्हणतात. ब्रह्मपुत्रा नदीच्या थडींतील उच्च दर्जाचे ब्राह्मण ' ग्रहविप्र ' ह्या नांवाला उघडपणें आक्षेप घेतात. (से. रि.).

ग्रॉडनो—हें शहर रशियांतील ग्रॉडनो प्रांताची राजधानी असून ह्नेमन नदीच्या उजव्या तीरावर आहे. हें वार्सापासून ईशान्येस १८० मैल व्हिलनापासून नैर्ऋत्येस ९८ मैल आहे. सेंटपीटर्स बर्ग (पेट्रोग्राड, लेनिनग्राड)ला जाणाऱ्या मुख्य आगगाडीच्या रस्त्यावर आहे. येथील लोकसंख्या १९१३ मध्यें ६४१०० होती. पैकी ½ यहुदी होते. तंबाखूचे कारखाने व दारूच्या भट्टया हे मुख्य कारखाने असून यंत्रें, साबण, मेणबत्त्या वाहनें वगैरे येथें होतात. ग्रॉडनो १२व्या शतकांत वसलें गेलें. परंतु १२४१ मध्यें मंगोलांच्या स्वारीनें जवळ जवळ याचा नाश झाला. पोलंडचा राजा स्टिफन ब्याथोरी यानें १५८६ त हें शहर आपली राजधानी केली. १६७३ नंतर पोलिश लोकसभा नेहमीं येथें भरत असे व १७९३ मध्यें त्यांनीं येथें पोलंडच्या दुसऱ्या विभागणीवर सही केली. १७९५ मध्यें पोलिश राजा स्टॅनिशलास पाँनिआटोस्कि यानें येथेंच राजिनामा दिला.

ग्रानाइट, घ ट ना.-ग्रानाइट हा साधा व एकाच पदार्थाचा बनलेला असा खानिज पदार्थ नसून क्वार्टस् (स्फटिक), फेल्स्पार (चंद्रकांत) आणि अभ्रक हे तीन पदार्थ भिन्न भिन्न प्रमाणांनीं या दगडाच्या घटनेंत असतात. या तीन स्फटिकरूप पदार्थांचे कण अनियमीत रीतीनें एकत्र झालेले असतात व या घटक पदार्थांचे कण वेगवेगळे दिसतात व याच वरून यास इंग्रजीतील ग्रानाइट (ग्रेन म्हणजे कण दिसणारे) हें नांव पडलें आहे. निरनिराळ्या घटकांच्या परिणामावरून व रंगावरून ग्रानाइट दगडाच्या अनेक जाती होतात. स्फटिक बहुधा पांढरा, पण कधीं काळसर, करडा व तांबूसहि असतो. शुभ्र पांढऱ्यापासून तांबूस रंगापर्यंत, किंवा काळसर रंगापर्यंत अभ्रकाचा रंग भिन्न भिन्न असतो. या घटकांपैकीं ज्याचा अंश जास्त असेल त्याचा रंग सगळ्या दगडास प्राप्त होतो. त्यावरून करडे किंवा तांबडे असे ग्रानाइटचे वर्ग करितात. कधीं कधीं अभ्रक मुळींच नसून अभ्रकाच्याच जातीचा दुसरा एक घटक, ज्यास इंग्रजींत हॉर्न ब्लेड म्हणतात तो असतो.

ध र्म व उ प यो ग.—ज्या खनिज पदार्थाचा हा दगड बनला आहे, ते जाडे भरडे किंवा सफाइदार असतलि त्याप्रमाणें ग्रानाइट दगडाचे धर्म भिन्न असतात. बारीक कणदार जो दगड असतो तो फार कठीण व टिकाऊ असून, मोठमोठे पूल, उंच इमारतींचे पाये, मोठाल्या शहरांतील गाड्या जाणाऱ्या फरशा अशा ज्या बांधकामांत बळकटीची आवश्यकता असते, त्या कामास या दगडांचा उपयोग करतात. लंडनच्या सर्व रस्त्यावर या दगडांची फरशी केलेली आहे. व तेथील गोद्यांहि यांचीच फरशी व धक्के बांधलेले आहेत. हे दगड घट्ट असल्यामुळें यावर करवत वगैरे चालत नाहीं, व टाक्या, गिरणी व हतोडे यांनींच यावर काम करावें लागतें.

ठ्या प्ति.—ग्रानाइट नांवांचे दगड हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात. समुद्रापासून दूर अशा मध्यप्रदेशांतील डोंगराळ मुलुखांत ते सांपडतात. दक्षिण हिंदुस्थानात रायचूरच्या आसपास या दगडांचे खडकच्या खडक चोहोंकडे आहेत. दक्षिण हिंदुस्थानांत, मद्रास इलाख्यांतलि व म्हैसूर प्रांतातील जुनाट सुंदर देवळें व इमारती याच दगडांच्या बांधलेल्या आहेत. तंजावर प्रांतांत तेथील राजाचा वाडा, त्रिचनापल्ली प्रांतांतील सुंदर खोदीव काम केलेलीं देवळें, विजयानगर (हंपी) च्या सुंदर व भव्य प्राचीन इमारती याच दगडांनीं बांधलेल्या आहेत. त्याचप्रमाणें बंगाल व बहार प्रांतांत व ज्या प्रदेशांतून भागीरथी वाहत गेली आहे त्या प्रदेशांतहि हे दगड सांपडतात. गया येथील विष्णुपदाचें प्रसिद्ध देवालय, व बुद्धगयेंतील बौद्धांचीं प्रसिद्ध देवळें याच दगडांचीं बांधलेलीं आहेत. युरोपांतहि हा दगड बराच आढळतो. स्कॉटलंडांतील डोंगराळ प्रदेशांत इंग्लंडांत व कार्नवाल डेव्हन्शायर प्रांतीं हे दगड असून तिकडेहि याचा उपयोग करतात. हिंदुस्थानांत, नर्मदा, कृष्णा, भागीरथी व यमुना या नद्यांवरील प्रचंड पुलांच्या कामीं या दगडांचाच उपयोग केला आहे.

ग्राहाम (१८०५-१८६९)-हा इंग्रज रसायनशास्त्रज्ञ ग्लासगो येथें ता. २० डिसेंबर १८०५ रोजीं जन्मला. याचा बाप त्या शहरीं एक व्यापारी होता. तो १८१९ त

ग्लासगो येथील विश्वविद्यालयांत गेला. तेथील रसायनशास्त्राध्यापक थॉमस थॉमसन (१७७३–१८५२) याच्या संगतीनें त्याला पदार्थविज्ञान व प्रयोगशास्त्र यांची चटक लागली. १८२४ त त्याला पदवी मिळाल्यानंतर तो दोन वर्षें एडिंबरो येथें टी. सी. होप याच्या प्रयोगशाळेत राहिला. ग्लासगोस परत आल्यावर तो गणित व रसायन शास्त्र यांवर व्याख्यानें देऊं लागला व १८२९ त त्याला यंत्रशाळेत अध्यापकाची जागा मिळाली. १८३० त डॉ. अँड्र्यू उर याच्या पश्चात् अँडरसोनियन विद्यालयांत अध्यापकाची जागा मिळाली. १८३७ त डॉ. एडवर्ड टर्नर याच्या निधनानंतर त्याची लंडन येथील विश्वविद्यालयी विद्यालयांत बदली झाली. १८५५ त सर जॉन हर्शल याच्या नंतर टांकसाळीच्या व्यवस्थापकाच्या जागीं याची नेमणूक झाली व या जागेवर तो मरेपर्यंत राहिला. हा ता. १६ सप्टेंबर १८६९ रोजीं मरण पावला.

टांकसाळींत त्याला पुष्कळसें दप्तरी काम करावें लागे. यामुळें त्याच्या शास्त्रीय शोधांत व्यत्यय येत असे. तरी १८६१ ते १८६९ पर्यंत त्यानें लावलेले शोधच फार महत्त्वाचे आहेत. तो १८३६ मध्यें राजसंस्थेचा सभासद झाला. व १८४७ मध्यें तशाच फ्रेंच संस्थेचाहि सभासद झाला. त्यानें लंडनरासायनिक संस्था व कॅव्हेंडिश संस्था या स्थापन करण्याकरितां फार खटपट केली व त्या दोनहि संस्थांचा तो अनुक्रमें १८४१ व १८४३ त अध्यक्ष झाला. शेवटीं त्याला राजसंस्थेच्या अध्यक्षाची जागाहि देऊं केली होती पण त्यानें प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें ती नाकारली. त्याचे शोध स्वतःच्या कल्पनेवर व प्रयोगांवर बसविलेले असत. व याच्या निर्णय करण्याच्या रीती देखील सोप्या असत. याचा " वायूंचे द्रवांनीं " केलेलें शोषण हा लेख तत्वज्ञानेतिहासाच्या १८२६ सालच्या अंकांत प्रसिद्ध झाला. याच्या नांवानें प्रसिद्ध असलेला शोध म्हणजे वाय्वभिसरण (डिफ्यूजन ऑफ गॅसेस) हा होय. १८२९ त प्रसिद्ध केलेल्या त्याच्या ग्रंथांत वायूची चळवळ कोणत्या नियमान्वयें चाललेली असते याचें स्पष्टीकरण केलें आहे. डोबरेनरच्या भोंक पाडलेल्या घटाऐवजी यानें एका कांचेच्या नळीचें एक तोंड पारिसच्या प्लास्टरनें बंद करून त्या नळीचा उपयोग केला. याच नळीच्या सहाय्यानें " वाय्वभिसरणाचा वेग त्यांच्या विशिष्ट गुरुत्वाच्या वर्गमूळांशीं व्यस्त प्रमाणांत असतो " हा प्रख्यात शोध लावला. त्यानें ठरविलें कीं वायू तीन प्रकारांनीं पोकळींत जाऊं शकतात. (१) ग्रफाइटच्या दाबून तयार केलेल्या वडींतून. (२) प्लाटिनम धातूच्या तुकड्यांतील फटींतून (३) बारीक नळ्यांतून कांहीं विचित्र रीतीनें वायू जाऊं शकतात. परंतु या आण्याचा वेग त्यांच्या इतर कोणत्याहि धर्माच्या प्रमाणांत असलेला आढळत नाहीं. उदा० उज्ज वायू नत्र वायूच्या दुप्पट वेगानें जातो परंतु त्यांच्या विशिष्ट गुरुत्वाचें प्रमाण १:१४ असें आहे. रबर, कच्ची मातीची भांडीं व पलाडियमसारख्या धातूंचे तुकडे यांमधून वायू जातात कीं नाहीं व जात असल्यास त्यांचा वेग किती असतो यावराहि त्यानें प्रयोग करून पाहिले. त्याला आढळून आलें कीं कांहीं विवक्षित धातूंच्या सान्निध्यांत विवक्षित वायू ठेवले असतां त्या सान्निध्याच्या योगानेंच ते त्या धातूंतून पलीकडे जातात. या रीतीनें त्यानें प्राणवायूचा थोडासा भाग हवेंतून निराळा काढला होता.

वायूंच्या गतीनंतर त्याचें लक्ष द्रव्यांच्या गतीकडे वेधलें. त्यानें पदार्थांचे दोन भाग केले. एक मिठासारखा म्हणजे अनुस्फटिक (क्रिस्टलॉइड) व दुसरा सरसासारखा म्हणजे प्रतिस्फटिक (कोलॉइड). पैकीं पहिल्या वर्गाचें अभिसरण (डिफ्यूजन) फार होतें व दुसऱ्या वर्गाचें कमी होतें. तुरटीचे द्रावणाच्या अभिसरणानें दोन विभाग करतां येतात. १ पालाशगंधकित २ स्फटगंधकित. कारण पहिल्या लवणाचें अभिसरण फार होतें व दुसऱ्याचें कमी होतें. द्रावण पाणी घालून पातळ केल्यास अभिसरणाच्या वेगाच्या प्रमाणांत फरक पडत नाहीं. परंतु कांहीं मर्यादेच्या पलीकडे द्रावण पातळ केल्यास मात्र अभिसरणाचा वेग कमी होतो.

१८३३ त त्यानें दाखविलें कीं स्फुरिक प्राणिलाचे तीन आम्ल तयार होतात व यावरून बहुअनाम्लिक (पॉलिबेसिक) अम्लाचें अस्तित्व त्यानें सिद्ध केलें. या बहुअनाम्लिक आम्लांतील प्रत्येक उज्जअणूबद्दल एक एक धातूचा अणू येऊ शकतो. १८३५ त लवणांतील स्फटिकजलाचें त्यानें निरीक्षण केलें. यांत असा चमत्कार आढळला कीं कित्येक लवणांत पाण्याऐवजीं मद्यसारहि स्फटिकांत राहूं शकतो. अशा लवणांस " मद्यसारितें " म्हणतात. १८६३ त त्यानें एक " प्रकृतीच्या घटनेसंबंधीं विचार " या नांवाचा लेख लिहिला. त्यांत तो म्हणतो कीं जगांत असलेले निरनिराळे पदार्थ एकाच प्रकारच्या अणूंचीं निरनिराळीं रूपें आहेत. त्याच्या मरणानंतर जी शास्त्रीय प्रगति झाली त्यांतील विचारांचा अंकुर ग्राहामच्या विचारांत होता असें यावरून दिसतें व म्हणूनच हा लेख फार मजेदार वाटतो.

याचा रसायनशास्त्राचीं मूलतत्वें हा ग्रंथ १८३३ त प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्याच्या अनेक आवृत्या निघाल्या व अनेक भाषांत भाषांतरें झालीं. " पदार्थविज्ञान व रसायनशास्त्रांतील शोध " हा ग्रंथ १८७६ त प्रसिद्ध झाला.

ग्रीन जॉन रिचर्ड (१८३७–१८८३)—हा सुप्रसिद्ध इतिहासकार ऑक्सफोर्ड येथील एका व्यापाऱ्याचा मुलगा होता. मॅग्डेलन कॉलेजस्कूल व जीसस कॉलेज यांमध्यें त्याचा अभ्यासक्रम झाला. पुढें तो धर्मोपदेशकाचा धंदा करूं लागला.गरीब लोकांची दुःस्थिति निवारण करण्याकडे त्याचें नेहमीं लक्ष असे. इतिहास हा त्याचा आवडता विषय होता; व त्यानें त्याचा फार काळजीपूर्वक अभ्यास करण्यास सुरुवात केली होती. ' सॅटरडे रिव्ह्यू ' या सामाहिकाला त्यानें पुष्कळ

लेख लिहून दिले होते.प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे त्यानें धर्मोपदेशकाचा धंदा सोडून इतिहासाचें अध्ययन करण्यास सुरुवात केली. १८६८ मध्यें त्यानें लँबेथ येथें लायब्रेरिअनची जागा पत्करली. १८७४ मध्यें त्यानें 'शॉर्ट हिस्ट्री ऑफ दि इंग्लिश पीपल ' हें छोटेखानी पुस्तक लिहिलें. हें अतिशय लोकप्रिय झाल्यामुळें ग्रीननें यामध्यें बरीच माहिती घालून या पुस्तकाचे चार मोठे ग्रंथ केले. याशिवाय १८८२ मध्यें ' दि मेकिंग ऑफ इंग्लंड ' व १८८३ मध्यें ' दि कॉंक्वेस्ट ऑफ इंग्लंड ' हे महत्त्वाचे ग्रंथ त्यानें प्रसिद्ध केले. इतिहासाविषयीं भरपूर माहिती त्याच्या ग्रंथांत सांपडते. तो मेंटोन येथें मरण पावला.

ग्रीन थॉमस हिल (१८३६-१८८२)—हा इंग्लिश तत्वज्ञ यॉर्कशायरमधील बर्कनरेक्टरी येथें जन्मला. रुग्बी व बेलियल कॉलेज येथें त्याचें शिक्षण झाल्यानंतर तो ' नैतिक तत्वज्ञाना 'चा प्रोफेसर झाला. सामाजिक प्रश्नांचा त्यानें आस्थापूर्वक अभ्यास केला असल्यामुळें त्याचें तत्कालीन समाजावर मोठें वजन बसलें होतें.'इंट्रोडक्शन टु ह्यूम्स ट्रीटाइज ऑन ह्यूमन नेचर ' व ' प्रोलेगोमेना टु एथिक्स ' हे त्याचे दोन प्रसिद्ध ग्रंथ आहेत. मनुष्य हा आधिभौतिक शक्तींचा परिपाक होय हें जें ह्यूमचें म्हणणें तें त्यानें सप्रमाण खोडून टाकून आत्मतत्व हें दृष्टीच्या मुडाशीं आहे असें मत प्रतिपादन केलें आहे.

ग्रीन रॉबर्ट (१५६०-१५९२)—हा कवि नॉरविच येथें जन्मला.त्याचें शिक्षण केंब्रिज व ऑक्सफोर्ड येथें झालें. स्पेन, इटली इत्यादि देशांतून प्रवास करून आल्यानंतर त्यानें लेखनाचा व्यवसाय पत्करला. आंग्लनाटयवाङ्मयाचा हा एक जनक होता. त्यानें पुष्कळ नाटकें, कविता व लेख लिहिले. ' स्कॉटिश हिस्टरी ऑफ जेम्स दि फोर्थ ', ' ऑर्लेंडे फ्यूरिओसो ' हीं त्याचीं दोन नाटकें प्रसिद्ध आहेत.

ग्रीनलंड—डेन्मार्कच्या ताब्यात असलेली ग्रीनलंड ही एकच वसाहत होय. १९११ सालीं या वसाहतीचें क्षेत्रफळ ४६७४० चौ. मै. होतें व लोकसंख्या १३४४९ होती. ग्रीनलंडमधील सर्वांत मोठी वसाहत सिद्प्रोव्हन ही असून त्या ठिकाणीं ७८९ लोक होते. स्केन्सेन ही सर्वांत लहान वसाहत आहे. ग्रीनलंडचा बराचसा भाग ध्रुवप्रदेशात आहे. ग्रीनलंड आणि यूरोप व अमेरिका हे परस्पराशीं सागरांतर्गत कड्यांनीं जोडले गेले आहेत. ग्रीनलंडच्या पूर्वेस उत्तर अटलांटिक समुद्र, नॉर्वेजियन व ग्रीनलंडचा समुद्र, पश्चिमेस डेव्हीस व बाफिनच्या सामुद्रधुन्या, उत्तरेस ध्रुवसमुद्र व दक्षिणेस केप फेअरवेल हें लहानसें बेट आहे. ग्रीनलंडची सर्वांत अधिक लांबी १६५० मैल व सर्वांत अधिक रुंदी ८०० मैल आहे. ग्रीनलंडच्या शोधासंबंधींची माहिती 'उत्तरध्रुवप्रदेश' लेखांत दिली आहे.

ग्रीनलंडमधील सस्तन प्राणी, हे अमेरिकेंतील सस्तन प्राण्यांसारखे आहेत. कस्तुरीमृग, शहामृग, कुत्रीं, लांडगे, इत्यादि प्राणी यूरोपमधील त्या त्या प्राण्यांपेक्षा अमेरिकेंत सांपडणाऱ्या त्या त्या प्राण्यांशीं अधिक सारखे दिसतात. याशिवाय, अस्वल, कोल्हे, ससे इत्यादि पशुहि या ठिकाणीं आढळतात. सीलमासा व देवमासा यांची ग्रीनलंडच्या समुद्रांत समृद्धि आहे. ग्रीनलंडमध्यें ६८प्रकारचे पक्षी सांपडतात असें प्राणिशास्त्रकोविदांनीं म्हटलें आहे. वनस्पतिशास्त्रज्ञांच्या मतें ग्रीनलंडमध्यें ११३ प्रकारच्या वनस्पती सांपडतात. टसियुस्सक या अगदीं उत्तरेकडील वसाहतींत बाग तयार करण्याचे प्रयत्न झाले पण त्यांत यावें तसें यश आलें नाहीं. उमनक या अगदीं उत्तरेकडील वसाहतींत जी मोठी बाग आहे, तींत मुळा, टर्निप-फळें, लेटिस कोबी इत्यादि अनेक प्रकारचीं फळें व भाज्या दृष्टीस पडतात. जॅकोबशॅव्हन येथील बागहि सुंदर आहे. ग्रीनलंडमध्यें बटाटे, काकड्या, स्ट्राबेरी, इत्यादींहि जिन्नस होतात. फुलझाडांचीहि संख्या येथें बरीच आहे. ग्रीनलंडमधील हवामान अगदीं अनिश्चित स्वरूपाचें असतें. क्षणांत कडक ऊन तर क्षणात दाट धुकें, बर्फाचा वर्षाव आणि शीतसमीरण, असले देखावे तेथें नेहमीं पहाण्यास सांपडतात. ग्रीनलंडच्या मध्यप्रांताची हवा साधारणतः यूरोपांतील हवेप्रमाणें नेहमीं थंड असते. परंतु कांहीं ठिकाणची थंडी मात्र सैबीरिया येथील थंडीप्रमाणें कडक असते. तेथील जमीन बहुधा बर्फाच्छादित असते. मृगजळ व अरुणप्रकाश ग्रीनलंडमध्यें नेहमींच पहावयास सांपडतो.

व्या पा र व रा ज्य व्य व स्था.—ग्रीनलंडमधील सर्व व्यापारावर डच सरकारचें नियंत्रण असून कोपनहेगन येथील अधिकारी व ग्रीनलंडमध्यें असलेले सरकारी नोकर यांच्या ताब्यात व्यापारासंबंधीं सर्व कारभार असतो. राज्यव्यवस्था व व्यापार नीट चालावा म्हणून पश्चिम किनाऱ्याचे दोन विभाग करण्यांत आलेले आहेत व त्यास इन्स्पेक्टोरेट्स म्हणतात. कोपन हेगन येथील डायरेक्टर ऑफ दि बोर्डला जबाबदार असणाऱ्या दोन गव्हर्नरांच्या ताब्यांत वरील इन्स्पेक्टोरेट्स असतात. प्रत्येक इन्स्पेक्टोरेटचे अनेक जिल्हे असतात व प्रत्येक जिल्ह्यात कांहीं अधिकारी असतात. पश्चिम किनाऱ्याच्या बाजूस व्यापाराचीं मुख्य ठिकाणें ६० आहेत. देवमाशाची चरबी पैदा करणें व ती कोपन हेगनला पाठविणें हें काम मेपासून नोव्हेंबरपर्यंत मुख्यतः करण्यांत येतें. हिंवाळ्यात सील मासे मारण्याचा धंदा करण्यांत येतो. ग्रीनलंडच्या लोकांकडून कच्चा माल घेणें व त्यांना यूरोपांतील माल पुरविणें हें काम सरकारी व्यापारखात्याकडून मुख्यतः करण्यात येतें. दरवर्षी मालाच्या किंमती मुक्रर करण्यांत येतात आणि एस्किमो व डेन्मार्क येथील व्यापारी भाव सरकारी रीत्या प्रसिद्ध होतो. इन्स्पेक्टरनां व्यापारावर देखरेख ठेवण्याचा अधिकार असतो व त्यांनां मॅजिस्ट्रेटचीहि सत्ता असते.१८५७सालीं प्रत्येक जिल्ह्यांत एक कौन्सिल स्थापण्यांत आलें.त्यासालीं म्युन्सिपल कौन्सिलेंहि अस्तित्वांत आलीं.

प्रतिवर्षी दोन सभा भरतात व सर्व काम एस्किमो भाषेतूनच चालतें. वरील कौन्सिलांतील अधिकाऱ्यांना दिवाणी व फौजदारी अधिकार असतात.

ग्रीनलंडचे रहिवाशी साधारणतः दगडाच्या व गवताच्या झोंपड्यांत राहतात. परंतु तेथील डॅनिश रहिवासी लांकडाच्या इमारती बांधून त्यांत रहातात. पश्चिम किनाऱ्याच्या उत्तरेकडील भागांत जेडेसमिंडे, लिश्चन शाब व जेकब शाव्ह हीं व्यापाराचीं मुख्य ठिकाणें असून दक्षिणेकडील विभागांत ज्यूलिआनेहाब, फ्रेडेरिकहाब, सुकरटॉपेन व हॉलस्टेन्बर्ग हीं व्यापारी शहरें आहेत. पूर्वकिनाऱ्यास अँगमासालिक हें ठिकाण व्यापाराबद्दल तेथें मशहूर आहे. देवमाशाचें व सील माशाचें तेल काढण्याचा धंदा तेथें चांगला चालतो. सील माशाचें तेल, सीलमासे, कोल्हे, पक्षी, देवमाशाची चरबी व अस्वलांची कातडीं वगैरे माल परदेशीं पाठविण्यांत येतो. नॉर्स लोकांच्या वसाहतीच्या काळांत वॉलरस नांवाच्या प्राण्याचे दांत व कातडें परदेशांत पाठविलें जात असे, पण हल्लीं या मालास फारसें महत्व देण्यांत येत नाहीं.

इतिहास—इ. स. ९७२ मध्यें एरिक दि रेड यानें ग्रीनलंडचा शोध लावण्याकरतां सफर केली. ९८५ सालीं तो आईसलंड येथें परत आला व लगेच दुसऱ्या वर्षी त्यानें आपल्याबरोबर पुष्कळ लोक घेऊन ग्रीनलंडमध्यें वसाहत स्थापन केली. थोडक्याच अवधींत या मुलुखांत राहण्याकरतां पुष्कळ लोक येऊं लागले व त्यामुळें अवघ्या दोन वर्षांच्या अवधींत ऑस्टर बिग्ड व वेस्टर बिग्ड अशा दोन वसाहती अस्तित्वांत आल्या. यांपैकीं एक वसाहत हल्लींच्या ज्यूलियनेहाव जिल्ह्यामध्यें व दुसरी गोडथाब जिल्ह्यात होती. या ठिकाणीं लांकडांचीं थडगीं, मृताचे सांगाडे व रूनिक लिपीमध्यें लिहिलेले शिलालेख सांपडले आहेत व त्यावरून या वसाहती कोठें स्थापन झाल्या होत्या त्याविषयीं अनुमान काढतां येतें. दहाव्या शतकांत नॉर्वेमधून नॉर्स लोक ग्रीनलंडमध्यें वसाहत करण्यास आले परंतु तत्पूर्वी या भागांत मूळचे रहिवाशी जे एस्किमो लोक त्यांची वस्ती होती असेंहि ग्रीनलंडमध्यें सांपडलेल्या अवशेषावरून दिसून येतें. नॉर्स लोक धाडशी असल्याकारणानें त्यांनीं समुद्रावर पुष्कळ सफरी केल्या व उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत देखील ते गेले होते, असें १४ व्या शतकातील रूनिक लिपीमध्यें लिहिलेल्या एका शिलालेखावरून आढळून येतें.

नॉर्वेचा राजा ओलफ ट्रिग्व्हेसन याच्या कारकीर्दींत लीफ एरिकसन यानें ख्रिस्ती धर्माची या ग्रीनलंडमध्यें प्राणप्रतिष्ठा केली. बाराव्या शतकांत ज्यूलियनेहाब जिल्ह्यांत गरोलरगांवीं ग्रीनलंडमध्यें एक मोठें ख्रिस्ती चर्च स्थापन झालें होतें. याशिवाय नॉर्स लोकांनीं ग्रीनलंडच्या ज्या ज्या भागांत वसाहती स्थापन केल्या त्या प्रत्येक वसाहतीचें एक स्वतन्त्र चर्च होतें. तेराव्या शतकांत ग्रीनलंडची शासनपद्धति आइसलंडप्रमाणेंच गणसत्ताक असल्याचें आढळतें. १८१४ पर्यंत ग्रीनलंड हें नॉर्वेच्या ताब्यांत होतें पण त्यानंतर तें डेन्मार्कच्या राज्यांत मोडूं लागलें. ऑस्टर बिग्ड व वेस्टरबिग्ड या वसाहती १४ व्या शतकापर्यंत भरभराटींत होत्या. पण पुढें नॉर्वेच्या लोकांचें लक्ष या वसाहतींकडे कमी होत चालल्यामुळें या वसाहतींना उतरती कळा लागली व पुढें पुढें तर या वसाहतींकडे कोणीं ढुंकूनहि पाहीनासें झालें. १७२१ मध्यें यूरोपीयन लोकांचें पुन्हां इकडे लक्ष वेधलें व या वर्षी नॉर्वेच्या हन्स एगेडे नांवाच्या एका पाद्र्यानें गोडथाबजवळ एक वसाहत स्थापन केली. यावेळीं ग्रीनलंडमध्यें एस्किमो लोक रहात असत. त्या लोकांशीं डागेडे याला बरेंच झगडावें लागत असे पण शेवटीं मोठ्या चिकाटीनें त्यानें तेथें ख्रिस्तधर्माचा फैलाव केला. १८ व्या शतकांत या वसाहतींमध्यें रहावयास येणाऱ्या लोकांपैकीं बरेच लोक गुन्हेगार होते. १७७४ सालीं या वसाहतींशीं व्यापार करण्यासाठीं एक खासगी कंपनी स्थापन झाली होती. पण पुढें नॉर्वे सरकारनें सर्व व्यापार हातीं घेतला. १७७५ मध्यें ज्यूलियनेहाब शहर वसविण्यांत आलें. १८०८–१८१४ या अवधींत युद्ध सुरू झाल्यानें ग्रीनलंडचें नॉर्वे व डेन्मार्कशीं असलेलें दळण वळण बंद करण्यांत आलें होतें पण तें लवकरच पूर्ववत् सुरू झालें. त्यानंतर ग्रीनलंड येथील वसाहत हळूहळू भरभराटच पावत आहे.

[संदर्भग्रंथ—जोसेफ फिस्कर—दि डिस्कव्हरीज ऑफ दि नॉर्समेन इन अमेरिका (लंडन १९०३); हॅन्सएगेडे—डिस्क्रिप्शन ऑफ ग्रीनलंड (लंडन १७४५);क्रांट्झ—हिस्टरी ऑफ ग्रीनलंड (२ भाग लंडन १८५०);रिंक—डॅनिश ग्रीनलंड (लंडन १८७७); एच रिंक—टेल्स ऑफ दि एस्किमो (लंडन १८७५).]

ग्रीनिच—ग्रीनिच हें इंग्लंड देशांतील लंडनच्या आग्नेयीकडील मुख्य बरो. याच्या उत्तरेस थेम्स नदी, पूर्वेस वुलविच, दक्षिणेस ल्युविशॅम व पश्चिमेस डेप्टफर्ड आहे. लोकसंख्या (इ. स. १९२१) १०२०००.ग्रीनिचचा प्रथम उल्लेख एथेल्रेडच्या वेळीं येतो. या वेळीं डॅनिश आरमारचें येथें एक ठाणें होतें.

ग्रीनिचच्या फार महत्वाच्या इमारती म्हणजे इस्पितळ व वेधशाळा ह्या होत. ग्रीनिच इस्पितळ हें नांव अद्यापि कायम असून १८७३ त येथें रॉयल नेव्हल कॉलेज (आरमारी विद्यालय) स्थापन झालें. या ठिकाणीं ग्रीनिच हाऊस नांवाचा एक राजवाडा होता. ह्या ठिकाणीं आठवा हेनरी, मेरी व इलिझाबेथ यांचा जन्म झाला व ६ वा एडवर्ड येथेंच मरण पावला. चवथा एडवर्ड, आठवा हेनरी, पहिला जेम्स व पहिला चार्लस यांनीं राजवाड्यांत वेळोवेळीं सुधारणा केल्या. राजसत्ता स्थापन झाल्यावर दुसऱ्या चार्लसनें हा राजवाडा पाडून सध्याच्या इस्पितळाची पश्चिम बाजु

बांधली. अशाच अर्धवट स्थितीत ही इमारत विल्यम व मेरी यांनीं खलाशांसाठीं इस्पितळ म्हणून दिली. १७०५ मध्यें हें इस्पितळ सुरू झालें. त्या इस्पितळाला मिळणाऱ्या देणग्या सारख्या वाढत गेल्या. येथें रॉयल नेव्हल कॉलेजची स्थापना झाल्यावर इन्फर्मरी सीमेन्स हॉस्पिटल सोसायटीस देण्यांत आली. इस्पितळाच्या दक्षिणेस ग्रीनिच पार्क आहे. यांत प्रसिद्ध राजवेधशाळा आहे. हिची स्थापना इ. स. १६७५ त नौकानयन व नाविक ज्योतिष या शास्त्रांची प्रगति होण्यास केली. देशांतील प्रमुख शहरांस दररोज एक वाजतां विद्युतसंदेशानें बरोबर वेळ कळविण्यांत येते. ग्रीनिचच्या याम्योत्तर रेषेवरून बहुतेक ठिकाणीं याम्योत्तरवृत्तें (रेखावृत्तें) मोजण्याची पद्धत चालू आहे. पूर्वी त्या ठिकाणीं मंत्रिमंडळाची एक वार्षिक मेजवानी होत असे. १८९४ सालीं झालेली मेजवानी शेवटचीच होती. येथील धर्ममंदिरांत वुल्फ (क्विबेक १७५९) व गवई टॅलिस यांना पुरण्यांत आलें. ग्रीनिच बरोंतून पार्लमेंटांत एक सभासद निवडून दिला जातो.

ग्रीस—हा देश यूरोपखंडाच्या आग्नेय टोंकास व बाल्कन द्वीपकल्पाच्या अगदीं दक्षिणभागांत आहे. रोमन लोकांनीं प्राचीन देशाला दिलेलें हें नांव थोडेंबहुत मोघम होतें. पूर्वीचे ग्रीक लोक आपल्या देशाला व आपल्या जातिबांधवांनां हेलास, हेलेनेस या नांवानीं संबोधीत असत. त्यांचा देश म्हणजे थेसलींतील फिथओटिसमधील एक भाग (जिल्हा) होता.

प्राचीन ग्रीस देशाला हेलास म्हणत असत. हा देश जेव्हां पूर्णपणें भरभराटींत होता त्या वेळची त्याची मर्यादा म्हटली म्हणजे साधारणपणें पश्चिमेकडे अंब्रेसिआ आखाताच्या उत्तर किनाऱ्यापासून पूर्वेकडे पेनिअसच्या मुखापर्यंत गेलेल्या रेषेपर्यंतचा भाग होय. इ. सनापूर्वी ३८६ पर्यंत मॅसिडोनिआ आणि थ्रेस यांत मोडत नव्हते. येथील लोक नेहमीं व्यापारी गलबतें व आरमार बाळगीत असत. इजिअन समुद्र किंवा द्वीपसमूह हें त्यांच्या राष्ट्राचें केंद्रस्थान होय. हा देश फार डोंगराळ असल्यामुळें स्वाभाविकपणें त्याचे निरनिराळे भाग पडले आहेत. प्राचीन काळीं हे भाग १७ होते व प्रत्येक भागांत स्वतंत्र राज्य होतें.

भौ गो लि क व र्ण न.—थेसलीमधील कांहीं ठिकाणें सोडून या देशाचा कोणताहि भाग समुद्रकिनाऱ्यापासून ५० मैलांहून दूर नाहीं. याचें क्षेत्रफळ पोर्तुगालपेक्षां कमी आहे, परंतु समुद्रकिनाऱ्याची रेषा स्पेन आणि पोर्तुगालच्या समुद्रकिनाऱ्याच्या रेषेपेक्षां मोठी आहे. जमिनींत बरींच आखातें घिरलेलीं आहेत व समुद्रांत ठिकठिकाणीं बेटें आहेत. येथील पर्वतांच्या रांगांची संख्या बरीच असून या रांगांची बरीच गुंतागुंत झालेली आहे; त्यामुळें तेथील लोकांनां खुष्कीच्या मार्गानें दळणवळण ठेवण्यास कठिण पडतें पण त्यांनां समुद्रावर जाणें सुलभ असल्यामुळें ते आपलें दळणवळण जलमार्गानें चालू ठेवितात. देशाच्या या नैसर्गिक स्थितीमुळें तेथील लोक फार स्वदेशाभिमानी व एक प्रकारच्या विशिष्ट वळणाचे बनले. तेथील लोकांत व्यापारी धाडस व त्याचप्रमाणें काव्य आणि कला यांची अभिरुचि होती.

प र्व त.—पिंडस पर्वतांची रांग; माव्हरोव्हौनोषी रांग; फेथुनिअनपर्वत; हेलोरो पर्वत, कटावोथ्रपर्वत, एटोलिआ आणि अकारनेनिआ, किओना; हा सर्वांत उंच पर्वत आहे; व्हर्डुसि, लिआकौरा, पालाइओव्हौनो, एलाटजि, ॲटिकामधील पर्वत, मोरिआमधील पर्वत—झिरिआ, चेलमोस, ओलोनोस आणि व्हाइडिआ; आरगोलिड द्वीपकल्पांत शाजिआस एलिआस हें शिखर सर्वांत उंच आहे; व टेगेटस पर्वतांची रांग; हे पर्वत होत. जास्त तटबंदीचीं आणि महत्वाचीं ठिकाणें म्हणजे ॲक्रोकोरिन्थस, इथोम, लारिस्सा, ॲक्रोपोलिस, टिरिन्स, आणि कडमिआ हीं होत.

न द्या.—येथें फार थोड्या नद्या असून त्याहि अगदीं लहान आहेत. त्यांत सालंब्रिआ, मव्हरोपोटनो हेलदा, अस्प्रोपोटमो, रुफिआ आणि व्हासिलिको या मुख्य होत.

स रो व रें.—कर्ला, त्रिचोनिस, कोपैस, फेनिअस आणि स्टिम्फालस हीं सर्वांत मोठीं आहेत.

मै दा नें.—थेसलि, बोइओशिआ, मेस्सेनिआ, अरगास, एलिस आणि माराथन हीं मुख्य बदरें आहेत.

स मु द्र कि ना रा.—उपसागर आणि आखातें यानीं सर्व समुद्रकिनारा भरून गेला आहे. एजिना आणि लिपान्टो हीं आखातें मुख्य आहेत. याशिवाय मोरिआच्या किनाऱ्यावरहि आखातें आहेत.

ज्वा ला मु खी प र्व त.—येथें ज्वालामुखी पर्वत मुळींच नाहींत. तरी पण सांटोरिन बेटांतील ज्वालामुखी पर्वत जवळ असल्याकारणानें त्यांच्या स्फोटाचे व भूकंपाचे धक्के येथें नेहमीं बसतात. बोतुशिआमधील लाफिस्टिअम नांवाच्या पर्वताचें थंड झालेलें तोंड अजून अस्तित्वांत आहे.

व न स्प ती.—येथील वनस्पतींचें दक्षिण इटाली व आशिया मायनरमधील वनस्पतींशीं बरेंच साम्य आहे. समुद्रसपाटीपासून निरनिराळ्या उंचीच्या प्रदेशांत निरनिराळ्या प्रकारचीं झाडें व वनस्पती होतात. १५०० फूट उंचीपर्यंतच्या प्रदेशांत नारिंगें, खजूर, अंजीर, द्राक्षें, कापूस, तंबाखू वगैरे होतात.

प्रा णी.—आरिस्टॉटलपर्यंतच्या काळांत सिंह असे. हल्लीं अस्वल, लांडगे, कोल्हे, रानडुक्कर, हरिण, ससे, वगैरे जातींचे पशू असून ३५८ जातींचे पक्षी, ६१ जातींचे सर्पटणारे प्राणी व २४६ जातींचे मासे आढळतात.

ह वा मा न.—येथील हवा स्पेन आणि इटली येथील हवेपेक्षां जास्त उष्ण व थंड आहे. कांहीं ठिकाणीं हवेमध्यें एकदम फेरफार होतात. वसंतकाळ अगदीं थोडा असतो. मार्च महिन्यांत उन्हाळा कडक असतो. पण उत्तरेकडून

येणाऱ्या थंड वाऱ्यामुळें तो जास्त वाढत नाहीं. शरदृतूंतील हवा सर्व ऋतूंतील हवेपेक्षां जास्त रोगट असते. हिवाळ्यांतील हवा सौम्य असते. पावसाचे मान निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें असतें.

इ. स. १९१२ पर्यंत ग्रीसचें क्षेत्रफळ २५०१४ चौ. मै. होतें. पण बाल्कन युद्धांत ईजियन समुद्राच्या कांठचा मॅसेडोनिया, एपिरस, क्रेट इत्यादि मुलुख मिळाल्यामुळें ग्रीसचें क्षेत्रफळ १,८०,९९,९०८ चौ. किलोमीटर झालें. १९२१ सालीं ग्रीसची लोकसंख्या ६७,२७,८७७ इतकी होती.

ग्रीक लोकांची सायप्रस, ॲनाटोलिया, बाल्कन संस्थानें, ईजिप्त इत्यादि ठिकाणीं बरीच संख्या होती. अमेरिकेंतहि दरवर्षी पुष्कळच ग्रीक लोक वस्तीसाठीं जात असत. १९१४ सालीं ग्रीसमधून ४५८८१ लोक अमेरिकेंत गेले. व यानंतर १९१५-२० च्या दरम्यान ग्रीसमधून अमेरिकेंत जाणाऱ्या लोकांची सरासरी २६५०० होती.

लो क.-ग्रीक, अल्बेनिअन व व्ह्लाच या तीन वंशांचे लोक आढळतात. आणि ग्रीक लोकांची संख्या सर्वांत जास्त आहे व त्यांत इतर वंशाचे लोक मिसळून एक झाले आहेत. यूरोपांतील इतर राष्ट्रांप्रमाणें येथील हल्लींचे लोकहि मिश्र वंशाचे आहेत.यांच्या मूळ उत्पत्तीविषयींचा प्रश्न बराच वादग्रस्त आहे. हल्लींचे ग्रीक प्राचीन ग्रीक लोकांचे वंशज आहेत असा सर्वसाधारण समज आहे व ह्या समजुतीमुळें राष्ट्राची योग्यता जास्त वाढली आहे.उत्तरग्रीस आणि मोरिआमधील मूळच्या लोकांची जागा ८ व्या शतकाच्या शेवटीं स्लाव्ह लोकांनीं घेतली आणि हल्लींचे ग्रीक लोक बायझन्टाइन आणि स्लाव्ह यांच्या पासून बनलेल्या मिश्र वंशाचे आहेत असें कांहीं शास्त्रज्ञांचें मत आहे. या मतावर बरीच टीका होऊन हल्लीं साधारणपणें असें ठरलें आहे कीं ग्रीसचा मुख्य भाग आणि मोरिआ या दोन ठिकाणचे लोक स्लाव्ह वंशाचे नसून हेलेन वंशाचे आहेत.

ग्रीक लोक उच्च प्रकारच्या संस्कृतीचे होते व त्यामुळें इतर लोकांचा ते आपल्यांत अंतर्भाव करून घेत असत ही गोष्ट जरी खरी आहे तरी इतकें पूर्णपणें साम्य होण्याला हेलेन लोकांचीच संख्या त्यांत जास्त असावी. वाटोळें तोंड, लांब व थोडेंसें गरुडासारखें नाक, सारखी दंतपंक्ति, उत्साहपूर्ण आणि विशेष चमक मारणारे डोळे हा हल्लींच्या लोकांच्या तोंडवळ्याचा साधारण नमुना आहे. उत्तम शरीरप्रकृतीचे लोक आरकेडिआ, ईजिअन बेटें आणि क्रीट या ठिकाणीं सांपडतात.

अलबेनियन लोक स्वतःस श्किपेटर म्हणतात व ग्रीक लोक त्यांनां आरव्हानिटे म्हणतात. हे टोस्क वंशाचे आहेत. १४ व्या शतकाच्या पूर्वार्धांत त्यांनीं देशांतर केलें. अलबेनियन लोकांचें वसाहत करण्याचें काम तुर्की लोकांनीं बंद पाडलें. हे लोक हळूहळू हेलेन लोकांत मिसळले. आतां सर्व अलबेनियन लोक ग्रीक भाषा बोलूं शकतात. परंतु घरीं ते अल्बेनिअन भाषाच बोलतात. हे लोक बहुतेक शेतकरी पेशाचे आहेत.

व्ह्लाच लोक आपल्याला अरोमानि म्हणजे रोमन वंशाचे समजतात. यांच्यापैकीं बहुतेक धनगराचा किंवा ओझें वाहणाऱ्यांचा धंदा करणारे आहेत. व ते नेहमीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं हिंडत असतात. ह्या लोकांतील जे शहरांत रहाणारे आहेत त्यांच्यावर बहुतेक हेलेन संस्कृतीचा पूर्ण पगडा बसलेला आहे व ह्यांनां व्यापारकरण्याची जास्त चटक लागली आहे. डोंगराळ प्रदेशांतील भटकणाऱ्या लोकांनां आपला राष्ट्रीय बाणा व आपल्या चालीरीती कायम ठेवल्या आहेत आणि यांच्यापैकीं बरेच लोक जरी ग्रीक भाषा बोलूं शकतात तरी त्यांनीं आपली लॅटिन भाषा अजून सोडली नाहीं. ह्यांचे ग्रीक लोकांशीं फारच थोडे लग्नविवाहसंबंध होतात. हे बहुतेक अशिक्षित आहेत व त्यामुळें ग्रीक लोक त्यांनां तुच्छ मानतात. दहाव्या शतकाच्या सुमारास आयोनिअन बेटांत बऱ्याच इटालियन लोकांचा भरणा झाला व त्यामुळें तेथील उच्च दर्जाच्या ग्रीक लोकांच्या भाषेंत व धर्मांत बराच फेरफार झाला. इटालियन लोकांचे वरच्या वर्गांतील लोकांशीं लग्नसंबंधहि होऊं लागले. खालच्या वर्गाच्या किंवा शेतकरी वर्गाच्या लोकांवर इटालियन संस्कृतीचा अगदीं परिणाम झाला नाहीं. शेवटीं इटालियन लोकांचें ग्रीक लोकांशीं पूर्णपणें तादात्म्य झालें. स्वातंत्र्यासाठीं लढाई होण्यापूर्वी येथें तुर्की लोकांची संख्या७०००० होती. परंतु लढाईनंतर हे लोक येथून नाहींसे झाले.

रा ष्ट्री य गु ण ध र्म.—सांप्रतचे ग्रीक लोक सारख्या गुणधर्मांचे आहेत व त्यांचे गुणधर्म शेजारच्या राष्ट्रांतील लोकांपेक्षां अगदीं भिन्न आहेत. हे राष्ट्रीय ध्येय डोळ्यापुढें ठेवून जुटीनें काम करितात व स्वतःला इतर राष्ट्रांपेक्षां उच्च प्रकारचे समजतात. पूर्वेकडील भागांत हे नेहमीं जास्त सुधारलेले असल्यामुळें मॅसिडोनियन, रोमन आणि तुर्की लोकांनीं जरी त्यांनां जिंकलें तरी त्यांच्या सुधारणेची त्यांच्यावर छाप पडत असे. त्यांचें बुद्धिसामर्थ्यहि दांडगें असल्यामुळें पुढें होणाऱ्या राष्ट्रांच्या उलाढालींत त्यांनां बरची जागा मिळाली. यांच्या देशाभिमानाच्या कळकळीविषयीं विचार करतांना यांची हंगेरियन लोकांशीं तुलना करण्यास हरकत नाहीं. ह्या कळकळीचें कधीं कधीं उद्दामपणांत आणि असहिष्णुतेंत पर्यवसान होण्याचा संभव असतो व कधीं कधीं त्यांची विवेकबुद्धि नाहींशी होऊन त्यांनां अविवेकाचीं व धाडसाचीं कामें करण्याची बुद्धि होते. परंतु शेवटीं या कळकळीमुळें त्यांनां आपलें राष्ट्रकार्य साधेल ही पूर्ण खात्री असते. मोठ्यापासून लहानापर्यंत सर्व लोकांत राजकीय विषयांची चर्चा होते. प्रत्येकजण या बाबतींत आपलें स्वतंत्र मत देतो. त्यामुळें घोंटाळा उडतो व कोणतीहि गोष्ट प्रत्यक्ष रीतीनें घडून न येतां उलट शब्दावडंबरच माजतें. यांच्या पैकीं प्रत्येक

सैनिक सेनापति आहे व प्रत्येक खलाशी ॲडमिरल आहे असें म्हटलें आहे. यामुळें कोणतेंहि कार्य एका तत्वाला अनुसरून चालत नाहीं. यूरोपीय राष्ट्रांत हे लोकसत्ताक राज्य पद्धतीचे सर्वांत जास्त चाहाते आहेत. सामाजिक दृष्ट्या यांच्यांत जातिभेद मुळींच नाहीं. हे फार तीक्ष्ण बुद्धीचे, चौकस, प्रसंगावधानी आणि शोधक आहेत. पण यांचें ज्ञान फार खोल गेलेलें नसतें. यांनां अंगमेहनतीचा विशेष कंटाळा आहे. अलीकडील शास्त्रीय ज्ञान संपादन करण्याकडे त्यांची प्रवृत्ति नाहीं. हे उत्साहपूर्ण, आनंदी, कर्तबगार, दयाळु, परकीयांशीं मिळून मिसळून वागणारे, आतिथ्य करणारे, नौकरचाकरांवर दया करणारे, बेतानें व काटकसरीनें वागणारे, कुटुंबांत मिळून मिसळून वागणारे आहेत. त्यांच्यावर पारतंत्र्याचें जोखड नेहमीं राहत गेलें व त्यामुळें त्यांच्या अंगीं बरेच दुर्गुण आले. ते लवकर क्षुब्ध होऊन त्यांचा राग अनावर होण्याचा फार संभव असतो. हे धार्मिक आहेत पण त्यांच्यांत धर्मवेडेपणाचें खूळ नाहीं.

चा ली री ती.—शहरांत आणि खेड्यांत प्राचीन आचारविचारांचेंच वर्चस्व अजून आढळून येतें. शहरांतून उच्च दर्जाच्या लोकांची फ्रेंच चालीरीतीचें अनुकरण करण्याकडे जास्त प्रवृत्ति दिसून येते. खेडेगांवांतील बायका समाजांत मोकळ्या रीतीनें वावरत नाहींत व त्यांचे हक्क पुरुषांपेक्षां कमी दर्जाचे आहेत. जन्म, धर्मदीक्षा, लग्न, आणि प्रेताचें दहन करणें या विषयींचे विधी फार गमतीचे आहेत व कांहीं विधी फार पुरातन काळापासून चालत आलेले आहेत. सामान्यत. स्वच्छतेकडे आणि आरोग्याकडे दुर्लक्ष केलें जातें. नृत्यकला फार लोकप्रिय होती. जुना, सुंदर राष्ट्रीय पोषाख वरच्या दर्जाच्या लोकांनीं टाकून दिला आहे. बायकांच्या पोषाखांत बरेंच वैचित्र्य आढळतें.

रा ज्य का र भा र.—येथील कारभार राजाच्या हातीं असतो. गादी वंशपरंपरेनें पुरुषांच्याकडे चालत येते; परंतु वंशांत जर पुरुष नसला तर गादीचा वारसा स्त्रियांकडे जातो. आगष्ट १८६३ च्या लंडनच्या कॉन्फरन्समध्यें राजाला ' हेलेन लोकांचा राजा ' ही पदवी दिली गेली आहे. राजा अठराव्या वर्षी कायदेशीरपणें वयांत येतो. गादीवर बसतांना त्याला धर्मोपदेशकांपुढें शपथ घ्यावी लागते. राजकीय घटना २९ आक्टोबर १८६४ पासुन चालत आलेली आहे. राजा आणि लोकनियुक्त (एक) मंडळ यांच्यामध्यें कायदे करण्याचा अधिकार वांटून घेतलेला असतो. १९०६ सालीं या मंडळाचे १७७ डेप्युटी होते. १९११ सालीं कौन्सिल ऑफ स्टेटची पुनर्घटना झाली.सध्यां कार्यकारी सत्ता राजाच्या हातीं असते; पण या सत्तेची जबाबदारी त्याच्यावर नसून त्यानें निवडलेल्या मंत्र्यांवर असते. या शिवाय सरकारी नेमणूका करणें, कायदे करणें, नाणें पाडणें वगैरे अधिकारहि राजाकडेच असत.परराष्ट्रीय काम करणारे ७ प्रधान असतात. चेंबरमधील डेप्युटी सध्यां (१९१९) ३३२ आहेत.

स्था नि क रा ज्य का र भा र.—यासाठीं देशाचे २६ भाग केलेले असून, प्रत्येक भाग प्रिफेक्टच्या ताब्यांत आहे. २६ भागांचे ६९ पोटभाग आणि या पोटभागांचे ४४५ कम्यून केले आहेत. लोकनियुक्त डिपार्टमेंटल कौन्सिलची प्रिफेक्टला मदत असते. मेयरच्या अध्यक्षतेखालीं आणखी कम्युनल कौन्सिल असे.

शि क्ष ण. - येथील लोक बुद्धिवान आहेत व शिक्षणाच्या बाबतींत त्यांचें पाऊल बरेंच पुढें गेलेलें आहे. खेड्यांतील लोकांनांहि शिक्षणाची गोडी असल्यामुळें तेथें शाळा स्थापन केलेल्या आहेत. शेतकरी वगैरे लोकांची मुलें उच्च शिक्षणासाठीं अथेन्समध्यें येत, व तेथें मोलमजुरी करून राहिलेल्या वेळांत विश्वविद्यालयांत शिक्षण मिळविण्यासाठीं जात. ओथो हा राजा गादीवर आल्यानंतर लवकरच प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें गेलें. १९१०-११ सालीं ३५५१ प्राथमिक शाळा, ४१ हायस्कुलें, २८४ दुय्यम शाळा ६ व्यापारी शाळा व २ शेतकी शाळा होत्या. अथेन्समध्यें २ विश्वविद्यालयें होतीं. शेतकीच्या शास्त्रीय शिक्षणाकडे बरेंच दुर्लक्ष केलें जाई. धर्मशास्त्राच्या शिक्षणाच्या दोन शाळा होत्या. व्यापारी आणि औद्योगिक शिक्षणाची एक शाळा असून तिच्यापासून लोकांनां बराच फायदा होत असे. अथेन्समध्यें स्त्रीशिक्षणासाठीं एक मोठी शाळा होती व तींत १५०० मुली होत्या. या शिवाय इतर शाळा व विश्वविद्यालयें होतीं.

ध र्म.—धर्मासंबंधीं सर्व कारभार मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशनच्या ताब्यांत आहे. चर्चचा कारभार होली सिनॉडच्या कडे आहे. धर्माविरुद्ध वागणाऱ्याला दंड करण्यासाठीं चर्च सरकारी मदत मागूं शकतें.

शे ती.—हा देश मुख्यत्वेंकरून शेतीचा आहे. याची भरभराट शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून आहे आणि येथील अर्धेअधिक लोक शेती आणि तत्संबंधीं इतर धंदे यांवर आपली उपजीविका करतात. मैदानांतील आणि खोऱ्यांतील जमीन अतिशय सुपीक आहे आणि जेथें पाण्याचा पुरवठा पुरेसा असतो तेथें पिकेंहि उत्तम निघतात. आतांपर्यंत जे राजे होऊन गेले त्यांनीं इकडे दुर्लक्ष केल्यामुळें शेतकीची जुनी पद्धतच चालू आहे. सुधारलेल्या आऊतांचा आतां हळूहळू उपयोग करण्यास सुरवात झाली आहे. जमीन फार असली म्हणजे ती भागानें लावून देतात. थेसली प्रांतांतील जमीन विशेष सुपीक आहे.१९१८सालीं ग्रीसमधील पेरणीखालीं आलेल्या जमिनीचें प्रमाण १४१५६३३ हेक्टेर होतें. १९१८ सालीं या जमीनीचें उत्पन्न१५९१५२६०२४ ड्रक्मे झालें.गहूं, मका, मस्ट, ऑलिव्ह तेल, ओट इत्यादि मुख्य धान्यें ग्रीसमध्यें पिकतात. या सालीं शेतकीसुधारणा करण्यासाठीं स्थापना झालेल्या संस्थांची संख्या ७३० होती व त्या संस्थांच्या सभासदांची संख्या एकंदर २७०५१ होती.१९१४ सालच्या गणनेप्रमाणें ग्रीसमध्यें (बाल्कन युद्धानंतरचा संपा-

दित मुलूख धरून) १६००००० हेक्टेर जंगल होतें.या जंगलाचें उत्पन्न ३८०००००० ड्रॅकमे होतें. १९१८ सालीं ग्रीसमध्यें १५४४१२० ड्रॅकमे किंमतीचे मासे पकडण्यांत आले. १९१९ सालीं मासे पकडणाऱ्या जहाजांची संख्या १९४१ होती व मासे पकडणाऱ्या लोकांची संख्या ७६७९ होती.

खा णी.—चांदी, शिसें, जस्त, कॉपरमँगॅनीज, मॅगनेशिया, लोखंड, गंधक आणि कोळसा हीं मुख्य खनिजद्रव्यें येथें सांपडतात. कुरुंद, मीठ, चकीचा दगड आणि जिप्सम हीं बऱ्याच प्रमाणांत सांपडतात व हीं खोदून काढण्याचें काम सरकार स्वतः करतें.

व्या पा र आ णि उ द्यो ग धं दे.–ग्रीक लोकांची व्यापाराकडे नैसर्गिक प्रवृत्ति असल्यामुळें व नौकायनाची त्यांनां आवड असल्यामुळें लिव्हाटमधील बराच व्यापार त्यांच्या हातीं आला होता. तुर्कस्तानचा धान्याचा सर्व व्यापार ग्रीसच्याच ताब्यांत आहे. १९२० सालीं ग्रीसमध्यें २१३१०३८३२१ इतक्या ड्रॅकमेची आयात झाली व ६६४११२६४७ इतक्या ड्रॅकमेची निर्गत झाली. १९२० मध्यें ग्रीसचें नौकाबल २९८९०३ टन होतें. ग्रीसजवळ या सालीं२२८ आगबोटी व १०४८ जहाजें होतीं.

का र खा ने — इसवी सन १९२० सालीं ग्रीसमध्यें एकंदरींत २२११ कारखाने असून त्यांत काम करणाऱ्यांची संख्या ३६३१२४ होती. कारखान्यांत एकंदर ८७१४९४५०८ ड्रॅकमेचा माल तयार झाला. या कारखान्यांपैकीं ५७० कारखाने वाफेच्या जोरावर व ३८२ विजेच्या साहाय्यानें चालत होते. या कारखान्यांत तेल काढणें, कापड विणणें, चामडीं तयार करणें, इत्यादि धंदे चालू असतात. ग्रीसमध्यें लोखंडाची पैदास सर्व धातूंपेक्षा अधिक आहे. १९१८ मध्यें या खाणींतून ६८००० मेट्रिक टन लोखंड निघालें.जस्त१८०००टन निघालें व लिग्नाईट धातू २१४००० टन निघाला. १९१८त या खाणींतून बाहेर काढलेल्या धातूंची किंमत२०९२०००० फ्रँक्स झाली.येथें लिग्नाईट धातू काढणारी सोसायटे फायनॅन्सियरेड ग्रीस, इतर धातू काढणारी कँपेग्नी फ्रँकैस, ड माइन्स, ड लारियम, मॅग्नेसाइट काढणारी एल डेपियन, एन रफायल इत्यादि खोदकंपन्या प्रसिद्ध आहेत.

ग्रीसमध्यें मजूरांचा प्रश्न १९१८ पर्यंत फारसा बिकट नव्हता. पण १९१८ सालीं मात्र मजुरांमध्यें मजूरीच्या प्रश्नानें ग्रीसमध्यें थोडी फार खळबळ उडाली. १९१९ सालीं जवळजवळ ३०० संप झाले त्यांत २००सरकारनें सलोख्यानें मिटवले. १९१८ सालीं मजूरांच्या संस्थांची बेरीज ९१८ होती. महायुद्धानंतर सार्वराष्ट्रिक मजूरपरिषद वाशिंग्टन येथें भरली होती. त्यांत ठरलेल्या अटींनां ग्रीसनें पूर्ण मान्यता दिली. त्याप्रमाणें मजुरांचे तास आठ करण्यांत आले. १९१४ मध्यें मजुरांच्या हितासाठीं पुष्कळ कायदे करण्यांत आले होते.

द ळ ण व ळ ण.—१९१९ सालीं ग्रीक रेल्वेची लांबी २३०७.५ किलोमीटर्स होती. पुढें सॅलोनिका ते कॉन्स्टांटिनोपलपर्यंत रेल्वे झाल्यानंतर ७०० किलोमीटरची भर पडली. मार्च १९१९ च्या तहानें ३४० किलोमीटरची वाढ झाली. याशिवाय कवल्ला ते ड्रम इत्यादि ठिकाणीं रेल्वे बांधण्याचें काम चालूच आहे. ग्रीसमध्यें वैमानिक दळणवळण अद्यापि सुरू झालेलें नाहीं.

ल ष्क र.—ग्रीसची पूर्वीची लष्करी स्थिति समाधानकारक नव्हती. १८९७ सालच्या लढाईंत सैन्यांतील बरेच दोष उघडकीस आले व त्यामुळें लष्कराची पुनर्घटना करण्याची योजना तयार करण्यांत आली. या नव्या योजनेप्रमाणें शांततेच्या वेळीं १८८७ वरिष्ठ अधिकारी, बिनकमिशनाचे अधिकारी इतर लोक आणि ४०९९ घोडे व खेचरे ठेवण्याचें ठरविलें आणि लढाईच्या वेळीं कमीतकमी १२०००० सैन्य लढाईवर पाठवावयाचें आणि ६०००० स्वदेशी सैन्य ठेवावयाचें असें ठरलें. या योजनेस मूर्तस्वरूप देण्यास अतिशय खर्च लागत असल्यामुळें ही योजना अंशतः अमलांत आणावयाची नाहीं असें १९०६ सालांत ठरविलें. येथें लष्करी शिक्षण सक्तीचें आहे आणि या शिक्षणाची जबाबदारी वयाच्या २१ व्या वर्षापासून सुरू होते.

सां प त्ति क स्थि ति.—१८९८-१९१३ या काळाच्या दरम्यान ग्रीसनें पुष्कळदां कर्ज काढलें होतें. बाल्कन युद्धामुळें तर ग्रीसची आर्थिक स्थिति अधिकच खालावत चालली. पुढें महायुद्धाला सुरवात झाल्यावर तर, ग्रीसला पुष्कळच कर्ज काढावें लागलें. १९२१ सालीं ग्रीसचें एकंदर कर्ज ३००००००००० ड्रॅकमे इतकें होतें. १९२१ सालीं ग्रीसचें उत्पन्न ५९७०११००० इतकें ड्रॅकमे असून खर्च २००५३०४००० इतका होता.

प्रा ची न इ ति हा स.—ग्रीस देशाचा इतिहास म्हणजे कोणत्याहि एक जात अशा एकाच राष्ट्राचा इतिहास नसून तो भिन्न भिन्न व एकमेकांपासून अगदीं स्वतंत्र असणाऱ्या अशा राजकारणविशिष्ट ज्ञातींचा इतिहास आहे. म्हणून ग्रीक इतिहासांत घडलेल्या वृत्तांची जन्त्री देत न बसतां त्या वृत्तांची कारणमीमांसा करणें, या इतिहासापासून कोणते सिद्धांत काढतां येतील व काय बोध घेतां येईल हें पाहणें व त्याचप्रमाणें एकंदर जगाच्या सुधारणेंत ग्रीस देशाचें महत्व काय आहे याचा विचार करणें हेंच जास्त सयुक्तिक व फायदेशीर होईल.

अशा पद्धतीनें ग्रीसचा त्या देशावर रोमन लोकांचा अम्मल सुरू होईपर्यंतचा (ख्रि. पू. १४६) इतिहास चवथ्या विभागांत (बुद्धोत्तरजग, प्र. ४ थें–ग्रीक संस्कृतीची व्यापकता) दिला आहे. त्याचा सारांश पुढीलप्रमाणें आहे.

(१) पुराणवस्तुसंशोधनशास्त्रीय पुराव्यावरून ग्रीसच्या इतिहासाचा आरंभ ख्रि. पू. ३ ऱ्या किंवा ४ थ्या सहस्रकापासून धरला पाहिजे.

(२) मायसीनोयुग व होमरयुग यांचा संबंध जोडतां येतो. पण पुराणवस्तुयुग आणि ख्रिस्त पू. ८ व्या शतकापासूनचें ऐतिहासिक युग याच्यांमध्यें मोठें खिंडार आहे.

(३) ख्रि. पू. १२ व्या शतकाच्या सुमाराच्या माहितीला आधार होमरचीं काव्यें हा आहे

(४) ख्रि. पू. ८ ते ६ या शतकापर्यंतच्या काळांत ग्रीकांचा व्यापार व वसाहत यांची वाढ होत होती.

(५) ख्रि. पू. ७ व्या ते ४ थ्या शतकांत बेजबाबदार (टायरंट) राजे होऊन गेले. पण त्यांच्या ग्रीक संस्थानांनां अनेक फायदे झाले.

(६) ख्रि. पू. ६ व्या व ५ व्या शतकांत ग्रीकांचीं पर्शियन लोकांबरोबर युद्धें झालीं त्यांत अखेर ग्रीकांनां विजय मिळाला.

(७) ख्रि. पू. ४८० ते ३३८ पर्यंतच्या काळाला महायुग (ग्रेट एज) म्हणतात, त्यांत प्रथम अथेन्सचें, नंतर स्पार्टाचें व शेवटीं मॅसिडोनियाचें वर्चस्व होऊन एकंदर ग्रीस देशाची सर्व अंगानीं फार भरभराट झाली व ग्रीकसंस्कृति अनेक देशांत पसरली.

(८) ग्रीक लोकांचे लष्करी गुण व भौतिक शास्त्रांचें ज्ञान यांचा फायदा इराणी लोकांनीं करून घेतला.

(९) हिंदुस्थानांतील ज्योतिषशास्त्र, नाट्य, कलाकौशल्य वगैरेंवर झालेल्या ग्रीकसंस्कृतीच्या परिणामाबद्दलची माहिती पहिल्या विभागांत (हिंदुस्थान आणि जग, प्र. ११ वें) दिली आहे.

(१०) सीरियामध्यें भाषा व चालीरीती यांवर ग्रीकसंस्कृतीचा बराच परिणाम झाला.

(११) ईजिप्तमध्यें देश्य संस्कृतीनें ग्रीक संस्कृतीच्या प्रसारास फार अडथळा केला. फक्त अलेक्झांड्रिया हें शहर ग्रीक संस्कृतीचें केंद्र बनलें होतें.

अलेक्झांडरच्या स्वाऱ्यांमुळें ग्रीक संस्कृतीचा दूरवर प्रसार झाला. पण नंतर लवकरच सर्व ग्रीस रोमन सत्तेखालीं जाऊन ग्रीसच्या इतिहासास निराळें वळण लागलें.

रोमनकारकीर्दीचा काळ (ख्रि. पू. १४६ ते सन १८००):— ग्रीस रोमचें अंकित बनल्यावर रोमन सीनेटनें कमिशन नेमून ग्रीसची पुनर्घटना करण्याचा त्या कमिशनला हुकूम केला. कॉरिन्थ शहरानें सर्वांत जास्त विरोध केला असल्यामुळें तें शहर उध्वस्त करण्यांत येऊन तेथील रहिवाशी गुलाम म्हणून विकण्यांत आले. एका शहराचें दुसऱ्या शहराशीं असलेलें व्यापारी दळणवळण नियंत्रित करण्यांत आलें व सर्व साधारण लोकांच्या हातीं असलेली राजकीय सत्ता काढून घेण्यांत येऊन ती इस्टेटदार वर्गाच्या हातीं देण्यांत आली. अथेन्ससारखीं जीं जेत्यांच्या प्रीतींतील संस्थानें होतीं त्यांचे राजकीय हक्क कायम ठेवण्यांत आले. मॅसिडोनियाच्या गव्हर्नराला देखरेखीचा अधिकार देण्यांत आला.

यापुढें विरोध करणें व्यर्थ आहे असें पाहून ग्रीक लोकांनीं या व्यवस्थेस मुकाट्यानें मान्यता दिली. पारतंत्र्याच्या यातना किती भयंकर असतात याचा आतां ग्रीक लोकांनां चांगला अनुभव येऊं लागला. रोमन व्यापारी व भांडवलवाले यांच्या अपहारबुद्धीमुळें व अधाशीपणामुळें कित्येकांनां आपल्या अत्यंत आवडत्या अशा कलाकौशल्याच्या वस्तू विकाव्या लागल्या. सरकारी अधिकाऱ्यांच्या जबरदस्तीमुळें त्यांनां नजराणे देतां देतां व त्यांचा आदरसत्कार करतां करतां ग्रीक लोकांच्या नाकीं नव येऊं लागले. इटाली व लीव्हँट यांच्या दरम्यान प्रत्यक्ष दळणवळण सुरू करण्यांत आल्यामुळें ग्रीक व्यापाराला जबरदस्त धक्का बसला. पशुपालनाचा धंदा मात्र ग्रीक लोकांच्याच हातीं ठेवण्यांत आला होता. परंतु त्यापासून श्रीमंतांचाच तेवढा फायदा होऊं लागल्यामुळें भांडवलवाला वर्ग व गरीब वर्ग यांच्यांतील विरोध विकोपाला जाऊन गरीबांची फारच दैना होऊं लागली.

पांपे व ज्यूलिअस सीझर यांच्यांत झालेल्या युद्धांत ज्यूलिअस सीझरला जय मिळून ग्रीसचें आधिपत्य ज्यूलिअस सीझरकडे गेलें. सीझरच्या खुनानंतर ग्रीक लोकांनीं ब्रूटसची बाजू घेतली. ख्रि. पू. ३९ या वर्षी पोलापोनीज सेक्सटस् पॉंपीअसच्या ताब्यांत देण्यांत आलें. याच्या पुढील काळांत ग्रीसवर मार्क ॲन्टनीचा अंमल होता. लढायाचा खर्च भागावा म्हणून यानें ग्रीसवर जबरदस्त कर लादण्यास सुरवात केली. सैन्यांच्या खर्चाची तरतूद करतां करतां ग्रीसचें साधनबळ संपूर्ण खलास झालें व देशाचें दुष्काळापासून संरक्षण करण्याला फारच त्रास पडला.

आगस्टस बादशहाच्या अमदानींत थेसली संस्थान मॅसिडोनियांत सामील करण्यांत आलें व बाकीच्या सबंध ग्रीस देशाचा एक प्रांत बनविण्यांत येऊन त्याला अकेइआ हें नांव देण्यात आलें. रोमन साम्राज्याखालीं ग्रीसची आर्थिक स्थिति फारशी सुधारली नाहीं. रोमन लोकांच्या चैनी भागवितां याव्या म्हणून पुष्कळ नवीन धंदे काढण्यांत आले पण त्या धंद्यांपासून ग्रीकांचा फायदा न होतां इटालियनांचे खिसे गरम होऊं लागले. भांडवलवाले व जमीनदारवर्ग यांच्या हातांत सर्व संपात्ति जाऊन मध्यम वर्गाचे फारच हाल होऊं लागले व बऱ्याचशा लोकांनां उदरनिर्वाह चालविण्याची देखील पंचाईत पडूं लागली.

रोमन राज्यव्यवस्थाः—अकेइआ प्रांताची राज्यव्यवस्था सीनेटकडून काढून घेऊन ती बादशाही प्रतिनिधीकडे सोंपविण्यांत यावी अशी ग्रीक लोकांनीं टायबेरिअस बादशहाला इ. स. १५ मध्यें विनंति केली. ही नवीन व्यवस्था मान्य करण्यांत आली पण ती फार दिवस टिकली नाहीं. इ. स. ४४ मध्यें क्लॉडीअस बादशहानें फिरून अकेइआ प्रांत सीनेटच्या स्वाधीन केला. इ. स. ६६–६७ या वर्षी नीरो बादशहानें ग्रीसला भेट दिली. ग्रीक लोकांनीं केलेल्या

दिखाऊ आदरसत्कारानें खुष होऊन त्यानें खंडणी भरण्याच्या करारापासून ग्रीसला मुक्त केलें व आपल्या भेटीच्या स्मरणार्थ ग्रीसला स्वराज्याची देणगी बहाल केली. परंतु या देणगीपासून ग्रीक लोकांचा कांहीं फायदा होऊं शकला नाहीं. कारण व्हेस्पेशियन बादशहानें ही देणगी रद्द केली व अकेइआचा फिरून प्रांत बनवून त्यांवर जास्त करांचें ओझें लादलें. दुसऱ्या शतकांतील बादशहांनीं मात्र ग्रीसची सुबत्ता वाढविण्याचे मनापासून प्रयत्न केले. हॅड्रिअन बादशहानें राहिलेली खंडणी माफ करून निरनिराळ्या जाचक करांपासून ग्रीसची मुक्तता केली. ग्रीक लोकांत राष्ट्रीय भावनांचें पोषण व्हावें म्हणून त्यानें अथेन्स येथें ग्रीक संस्कृतीचें वर्धन करणारी एक कॉंग्रेस स्थापन केली व रोम येथेंहि त्या संस्कृतीचा सन्मान व्हावा म्हणून त्यानें कांहीं संस्था स्थापन केल्या.

तिसऱ्या शतकांत ग्रीसला परकीय स्वाऱ्यांपासून फार त्रास झाला. इ. स. १७५ मध्यें कॉस्टोबोसी नामक टोळी मध्य ग्रीसपर्यंत चाल करून गेली होती. परंतु स्थानिक तुजबी फौजेनें त्वरा करून टोळीवाल्यांनां हांकून लावलें. इ. स. २५३ त या टोळीनें फिरून ग्रीसवर चाल करून जाण्याचा प्रयत्न केला. पण थेसलोनिका शहरानें जोराचा विरोध केल्यामुळें या वेळींहि टोळीवाल्यांना यश आलें नाहीं. इ. स.२६७–२६८त गॉथिक टोळ्यांनीं अकेइआ प्रांतावर स्वारी करून अथेन्स व इतर कांहीं शहरें काबीज केलीं पण रोमन आरमाराची ऐन वेळीं कुमक आल्यामुळें स्वारीवाल्यांनां पिटाळून लावण्यांत आलें.

पहिल्या कॉन्स्टंटाइन बादशहाच्या अमदानींत ग्रीसचे हेलास, पेलापोनेरास, नीकापोलीस व इतर बेटें असे लहान लहान तुकडे पाडण्यांत आले. थेसली शहर मॅसिडोनियात सामील करण्यांत आलें. ज्या पद्धतीच्या योगानें मध्यवर्ती सरकारला बिनचूकपणें उत्पन्न मिळत जाईल अशी कर उकळण्याची पद्धत तयार करण्यांत आली. सर्व घटना रोम येथील म्युनिसिपालटीच्या धर्तीवर तयार करण्यांत आल्या.कॉन्स्टँटिनोपल हें राजधानीचें ठिकाण करण्यांत आलें. ईजिप्तपासून युक्झाइन व ईजिअन समुद्रापर्यंत पूर्वेकडे व्यापारी रस्ते खुले करण्यांत आल्यामुळें मंदावलेल्या व्यापाराला फिरून चलन मिळालें. ज्यांच्या मिळकती अल्प होत्या अशांची स्थिति फार हलाखीची झालेली होती. परंतु या वर्गाला निकृष्टावस्थेत ठेवण्यांत सरकारच्या हिताला बाध होता. सरकारचे वसूलविषयक हितसंबंध या वर्गाशीं निगडित झालेले होते व यामुळें या वर्गाची स्थिति सुधारणें सरकारला भाग पडलें. या कारणास्तव या वर्गाची स्थिति उत्तरोत्तर सुधारत जाऊन देशाची सुबत्ता व भरभराट यांचें साधारण मान वाढत्या प्रमाणांत राहिलें.

परंतु ही भरभराट फार वेळ टिकूं शकली नाहीं. इ. स. ३७५ त ग्रीस देशाला एकामागून एक असे भूकंपाचे धक्के बसूं लागल्यामुळें व इ. स. ३९५–९६ त व्हीजीगॉथ लोकांनीं स्वारी करून नेववेल तितकी संपत्ति लुटून नेल्यामुळें कित्येक शतकांपर्यंत ग्रीसला वर डोकें काढतां आलें नाहीं.

चवथ्या शतकांतील बादशहांनीं ग्रीक लोकांची खोटया धर्मावरील (पेगन रिलिजन)श्रद्धा उडून जावी म्हणून पुष्कळ प्रयत्न केले परंतु त्यांनां फारसें यश आलें नाहीं. इ. स. ६०० पर्यंत हा असद्धर्माचार (पेगॅनिझम) ग्रीसमध्यें चालू होता; पण ख्रिस्ती धर्माच्या पुष्कळ दिवसांच्या सहवासानें त्याचें स्वरूप बरेंच पालटलें होतें. पाद्री लोकांच्या मनमिळाऊपणानें नेहमीं लोकांचा पक्ष उचलून धरणाच्या खुबीदार युक्तीमुळें अगोदरच ग्रीक लोकांचें मन ख्रिस्तिधर्मोन्मुख होऊं लागलें होतें.हळू हळू हे लोक ख्रिस्ती धर्माच्या जाळ्यांत अडकूं लागले व शेवटीं सबंध ग्रीस देशानें या धर्माचा स्वीकार केला. ५ व्या व ६व्या शतकांतील बादशहांनां ग्रीकसंस्कृतीविषयीं मुळींच आदर नसे. कॉन्स्टन्स्टाईन व त्याच्यानंतर गादीवर आलेल्या बादशहांनीं सबंध साम्राज्यांत रोमन सुधारणा फैलावण्याचें धोरण स्वीकारलें होतें. या धोरणाप्रमाणें पहिल्या जस्टीनियन बादशहानें ग्रीसमध्यें रोमन कायदा लागू करून स्वराज्योपभोगी शहराचे हक्क काढून घेतले व अथेन्स येथील तत्त्वज्ञानाचीं सर्व पीठें बंद केलीं. याचा परिणाम असा झाला कीं लोकानां आपल्या प्राचीन संस्कृतीची विस्मृति पडली व हेलिनीज हें नांव टाकून देऊन त्यांनीं रोमन्स नांव स्वीकारलें. ग्रीकसंस्कृति अजीबात नष्टच झाली असती, परंतु साम्राज्यांतील प्रांतांचे पूर्व व पश्चिम असे वेगवेगळे भाग करण्यांत आल्यामुळें ग्रीक भाषेला व चालीरीतींनां पुनरपि त्यांचें अग्रस्थान प्राप्त होऊन, ग्रीक संस्कृतीवरील हा प्रसंग एकदांचा टळला.

सहाव्या शतकाच्या शेवटीं स्लाव्होनिक टोळ्यांनीं ग्रीसवर स्वारी केली. स्लाव्हानीम व वेंडस् या ज्ञातींनीं ग्रीसमध्यें प्रवेश करून पुढें त्या ठिकाणीं जें कायमचें ठाणें दिलें त्याचें ही स्वारी म्हणजे पूर्वचिन्हच होय. स्लाव्होनिक लोकांचा अंश वायव्य ग्रीस व पेलॉपोलेशस येथें जितका दिसतो तितका ग्रीसमध्यें दिसत नाहीं. इ. स. ७८३ मध्यें महाराणी आयरीनी हिनें या लोकांविरुद्ध सैन्य पाठवून, त्यांनां मध्यवर्ती सरकारला खंडणी भरण्यास भाग पाडलें. इ. स. ८१० मध्यें स्लाव्ह लोकांनीं पॅट्री काबीज करण्याचा प्रयत्न केला. पण तो सिद्धीस गेला नाहीं. यापुढें ते बादशहाचें एकनिष्ठ प्रजाजन होऊन राहिले.

बायझंटाईन काळः—७ व्या शतकांत ग्रीसचे ४ विभाग करण्यांत आले व प्रत्येक विभागावर एक वर्षाकरितां नेमलेल्या मुलकी व लष्करी अंमलदारांची नेमणूक करण्यांत आली. तिसरा लीयो याच्या मूर्तिभंजक आज्ञापत्रामुळें चिडून जाऊन ग्रीक लोकांनीं इ. स. ७२७ त बंड उभारलें पण

बादशाही आरमाराच्या जोरावर तें लष्करच मोडण्यांत आलें. ७ व्या शतकांत ग्रीसचा व्यापार व उद्योगधंदे फिरून भरभराटीस आले. इटालींत लोकसत्ताक राज्यांचा उदय होईपर्यंत सबंध यूरोपाला ग्रीस देशच रेशीम पुरवीत असे. १० व्या शतकांत बाल्कन द्वीपकल्पांतील टोळ्यांनीं फिरून ग्रीसवर स्वाऱ्या करण्याला सुरुवात केली. इ. स. ९२९ नंतर बल्गेरिअनांनीं ग्रीसवर स्वारी करून इस्थमसपर्यंत शिरकाव केला. परंतु इ.स. ९९५त बायझंटाईन सैन्यानें सार्कीअत येथें त्याचा पराभव करून त्यांनां पिटाळून लावलें. इ. स. १०८४ मध्यें व्हूलाक्स येथील पशुचारणानुसारी टोळ्यांनीं थेसली शहर काबीज केलें. त्याच वर्षी सिसिली येथील नॉर्मन लोकांनीं आयोनियन बेटांवर स्वारी करून तेथें आपला पाय रोंवून घेतला. इ. स. ११४५-४६ त याच लोकांनीं थीब्ज व कॉरिंथ हीं शहरें मनसोक्त लुटून काढलीं.

तुर्की विजय व तुर्क अंमलः—बायझंटाईन साम्राज्य ढासळून पडल्यानंतर नवीन मुलुख मिळविण्याच्या लालसेनें फ्रँकिश सरदारांनीं ग्रीसवर हल्ले करण्याला सुरुवात केली. ग्रीसचा वायव्य भाग काय तो या स्वाऱ्यांपासून सुरक्षित राहिला. हा भाग खेरीज करून बाकीचा सर्व देश फ्रँकिश सरदार, व्हेनिशीयन्स व इटालींतील साहसी लोक यानीं आपापसांत विभागून घेतला. इ. स. १३०८ पर्यंत थेसली शहरावर एपीरोट वंशशाखेचा अंमल होता. या वंशाच्या मृत्यूनंतर तें शहर ग्रँट कॅटलान कंपनीकडे गेलें. इ. स. ११३५० त सार्व्हियाचा राजा स्टीफनडूशान यानें तें काबीज केलें. १३९७ च्या सुमारास तुर्कांनीं तें आपल्या साम्राज्यास जोडून घेतलें.

मध्य ग्रीसमधील मुख्य सत्ता बर्गेडियन घराण्याकडे होती. इ.स. १२९६ त या घराण्याला फ्रान्सचा राजा नववा लुई यानें ड्यूकच्या पदाला चढविलें. इ. स. १३११ मध्यें ग्रँड कॅटलान कंपनीशीं झालेल्या युद्धात फ्रँक लोकांचा पराभव झाला व मध्यग्रीसचें स्वामित्व स्पेन येथील भाडोत्री सैनिकांकडे गेलें. कॅटलनानीं मध्यग्रीसमध्यें ७५ वर्षेपर्यंत मनसोक्त सुलतानी गाजविली व शेवटीं पेलापोनेशस येथील नेरीओ आक्कीआईऊओली या सरदारानें त्यांनां तेथून हांकून लावलें. इ. स. १४५६ त सुलतान दुसरा महंमद यानें या नवीन घराण्याला अधिकारभ्रष्ट करून मध्यग्रीस आपल्या साम्राज्यास जोडून घेतला. फ्रेंच नाईट जीऑफ्रे व्हीलीहार्डोइन यानें पेलापोनीज जिंकून तेथें स्वतंत्र वंशाची स्थापना केली. इ. स. १४०० च्या सुमारास बायझंटाईन राजपुत्रांनीं या घराण्यापासून पेलापोनीज काढून घेऊन तें आपापसांत विभागून घेतलें. इ. स. १४१५ मध्यें तुर्की सैन्यानें मोरियामध्यें शिरून, तेथील कित्येक रहिवाशांनां देश सोडून जाण्यास भाग पाडलें. बायझंटाईन राजपुत्र थॉमस यानें खंडणी देण्याचें नाकारल्यावरून दुसऱ्या महमदानें इ. स. १४५८ त फिरून मोरियावर स्वारी केली व थॉमसला खंडणी देण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं. इ. स. १४६० मध्यें मोरिया तुर्कस्तानला जोडण्यांत आला.

तुर्की राज्यव्यवस्थेखालीं ग्रीसचे सहा लष्करी विभाग करण्यांत आले ते येणेंप्रमाणेः—(१) मोरिया, (२) एपीरस, (३) थेसली, (४) युबोईआ, बोटिया आणि ॲटिक व (५) आईटोलिया, आकार्नेनिया, व (६) उरलेला मध्य ग्रीस. सुलतानाच्या सैन्याला मनुष्यबळ पुरविण्याच्या अटीवर प्रत्येक विभागांतील कांहीं जमिनी तुर्की रहिवाशांनां तोडून देण्यांत आल्या. स्थानिक राज्यव्यवस्था पाहण्याचें काम प्रत्येक ज्ञातींतील आर्चबिशपाकडे सोपविण्यांत आलें.

इ. स. १४६३-७९ व १४९८-१५०४ या वर्षांच्या दरम्यान टर्की व व्हेनिस यांच्यांत बऱ्याच लढाया होऊन भूखण्डावरील इटलीच्या ताब्यांतील मुख्य मुख्य ठाणीं तुर्क लोकांनीं काबीज केलीं. १५७० च्या सुमारास ईजिअन समुद्राच्या आसपासचा प्रदेश तुर्कांनीं पूर्णपणें काबीज केला. इ. स. १६८४ मध्यें तुर्कांचें लक्ष डान्यूबकडे गुंतलें असल्यामुळें व्हेनिशिअनानीं त्याचा फायदा घेऊन मोरियावर स्वारी केली. १६८७ मध्यें त्यांनीं अथेन्स व लीपँटो हीं शहरें देखील काबीज केलीं. १६९९ त कार्लोविट्झ येथें तह होऊन मोरिया व्हेनिसला देण्यांत आला. परंतु इ. स. १७१५ मध्यें तुर्कांनीं फिरून मोरियावर स्वारी केली व व्हेनिशिअनाचा पराभव करून तो प्रान्त त्यांच्याकडून हिसकून घेतला. तुर्कांच्या बेजबाबदार व जुलमी राज्यपद्धतीमुळें ग्रीक लोक नेहमीं असंतुष्ट असत. ' जेनीसरी ' नामक तुर्की शिपायाच्या पायदळात भरती होण्याकरितां मुलांची खण्डणी द्यावी लागत असते व ही खण्डणी फारच क्रूरपणें वसूल करण्यात येत असे. त्याचप्रमाणें तुर्की रहिवाशी एतद्देशीयाचा फार छळ करीत. या जुलमाला ग्रीक लोक फार त्रासून गेले होते. तथापि आरंभीं आरंभीं भीतीमुळें ते आपला असंतोष बाहेर प्रगट करीत नसत. ही निराशाजनक स्थिति १८ व्या शतकापर्यंत चालू होती. परंतु १८ व्या शतकांत नवीन शाळा व नवीन विद्यापीठांच्या द्वारें शिक्षणाचा झपाट्यानें प्रसार होऊं लागल्यामुळें लोकांनां आपल्या पारतंत्र्याची जाणीव हळू हळू उत्पन्न होऊं लागली व शिक्षणाचा लाभ झाला असल्यामुळें असंतोष बाहेर प्रगट करण्याचें धैर्यहि त्यानां प्राप्त झालें. वाढत्या शिक्षणामुळें आकांक्षाहि उत्तरोत्तर वाढूं लागल्या व तुर्की अंमलापासून स्वतंत्र होण्याची इच्छा दिवसेंदिवस बळावूं लागली.

ग्रीसच्या राजकारणात यूरोपियन राष्ट्रें फारकरून ढवळाढवळ करीत नसत. परंतु इ. स. १७६४ त रशियानें ग्रीकलोकांनां तुर्क सत्तेविरुद्ध चेतवितां आल्यास पहावें म्हणून कांहीं लोक मुद्दाम ग्रीसमध्यें पाठविलें. इ. स. १७६९ त रशियाचें सैन्य मोरियांत उतरलें पण तें ग्रीक लोकांच्या राष्ट्रीय भावना जागीत करूं शकलें नाहीं. इ. स. १७७४ त क्रुचककैनारजी येथें रशिया व टर्की यांच्यांत जो तह झाला

त्यायोगें ग्रीक व्यापार भूमध्यसमुद्रावर झपाट्यानें वाढूं लागला व वाढत्या दळणवळणामुळें लुप्तप्राय झालेली ऐक्य-भावना ग्रीक लोकांत फिरून उदित झाली. पूर्वजांनीं केलेल्या वैभवशाली कृत्यांचा व फ्रेंच राज्यक्रान्तीचा ग्रीक लोकांच्या मनावर विलक्षण परिणाम होऊन त्यांनीं स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न करण्याचा ठाम निश्चय केला. १८०० च्या सुमारास ग्रीसमध्यें १००००००लोकसंख्या होती. पैकीं २००००० अल्बेनियन्स होते. तथापि मुसुलमानी सत्तेचा ग्रीक व अल्बेनियन्स यांनां सारखाच तिटकारा असल्यामुळें या दोन जातींचें ऐक्य घडून येण्यास फार वेळ लागला नाहीं.

अ र्वा चीन इ ति हा स.—(१८००–१९२४) १९ व्या शतकाच्या आरंभीं ग्रीस तुर्की आधिपत्याखालीच होता. परंतु स्वातंत्र्याची उषा अगोदरच दिसूं लागली होती व राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग सुलभ करण्याचें कार्य सुरू झालेलें होतें. तुर्की साम्राज्याचा पाया ढासळूं लागण्याला १७ व्या शतकातच सुरुवात झालेली होती. १९ व्या शतकांत साम्राज्यांतील ख्रिस्ती प्रजेनें प्रथम बंड उभारलें. इ. स. १८०४ मध्यें सर्व्हिया व १८२१ त ग्रीस हे देश तुर्कांविरुद्ध उठले. या दोन्ही देशांनां बंडास प्रवृत्त करण्याला मुख्यतः रशिया कारणीभूत झाला. फार दिवसांपासून रशियाचा कॉन्स्टान्टिनोपलवर डोळा होता. ग्रीसमधील ख्रिस्ती लोकांनां तुर्कांविरुद्ध चिथावण्याच्या धोरणात प्रथम महाराज्ञी आना हिनें सुरवात केली व दुसऱ्या कॅथराईननें हेंच धोरण पुढें चालविलें इ. स. १७८१ त रशिया व ऑस्ट्रिया यांच्यांत संगनमत होऊन तुर्की मुलुखाची विभागणी करून त्या ठिकाणीं दुसऱ्या कॅथराईनचा मुलगा कॉन्स्टन्टाईन याच्या आधिपत्याखालीं बायझंटाईन साम्राज्याची पुनरुत्थापना करावी असें ठरलें.

फ्रेंच राज्यक्रान्तीनें ग्रीक लोकांच्या राष्ट्रीय भावनांनां चलन देऊन, त्यांच्यांत स्वातंत्र्यलालसा उत्पन्न केली. लोकांत स्वाभिमान व स्वदेशाभिमान उत्पन्न व्हावा म्हणून निरनिराळ्या संस्था स्थापन करण्यांत आल्या. इ. स. १८१५ त एक क्रान्तिकारक संस्था स्थापन करण्यांत आली व मॉस्को, बुखारेस्ट, ट्रीस्ट व ग्रीसमधील प्रत्येक शहरीं तिच्या शाखा निर्माण करण्यांत आल्या. इ. स. १८२० त आयोनिनाचा अलीपाशा यानें सुलतानच्या सत्तेविरुद्ध बंड उभारलें व तो या क्रान्तिकारक पक्षास जाऊन मिळाला. १८२१च्या मार्च महिन्यांत रशियाचा झार पहिला अलेक्झांडर याचा देहरक्षक व वरील क्रान्तिकारक संस्थेचा अध्यक्ष अलेक्झाडर सीलांटी हा लहानसें सैन्य घेऊन मोलडेव्हियांत शिरला व त्याच महिन्यात पेट्रासच्या आर्चबिशपनें मोरियांत बंडाचें निशाण उभारलें.

या स्वातंत्र्याच्या युद्धांत ग्रेटब्रिटन, फ्रान्स व रशिया हीं तीन बलाढ्य राष्ट्रें ग्रीसच्या बाजूनें लढत असल्यामुळें ग्रीसला या युद्धांत विजय मिळाला व स्वातंत्र्यप्राप्तीस्तव केलेल्या ग्रीक लोकांच्या प्रयत्नाला शेवटीं यश मिळालें. तारीख २० आक्टोबर १८२८ रोजीं नेव्हारीनो येथें तुर्की आरमाराचा पराभव झाला व ग्रीसमध्यें स्वतंत्र राजसत्तेची स्थापना करण्यांत आली. तारीख ७ मे १८३२ रोजीं लंडन येथील तहान्वयें ग्रेटब्रिटन, फ्रान्स व रशिया या राष्ट्रत्रयींच्या संरक्षणाखालीं ग्रीस हें स्वतंत्र राज्य आहे असें जाहीर करण्यांत आलें. बव्हेरियाचा राजा पहिला लुई याचा मुलगा ओटो याची ग्रीसच्या राजसिंहासनावर स्थापना करण्यांत आली. ओटो हा अनियंत्रितपणें व जुलुमानें राज्य करूं लागल्यामुळें सैन्यानें चिडून जाऊन तारीख १५ सप्टेंबर १८४३ रोजीं बंड उभारलें व ओटोला राज्यघटना स्वीकारण्यास भाग पाडलें. जबाबदार मंत्रिमंडळ, राजनियुक्त सीनेट व सार्वत्रिक मताधिकारानुसार निवडलेलें लोकसभागृह इत्यादि संस्था स्थापन करण्यांत आल्या. ओटो यानें प्रथम प्रथम या घटनेनुसार राज्यकारभार चालविला पण लवकरच तो फिरून बेजबाबदारपणें राज्य करूं लागला. यामुळें १८६२ त सैन्यानें फिरून बंड उभारलें व ' राष्ट्रीय सभेच्या ' संमतीनें ओटोला पदच्युत करण्यांत आलें. इ. स. १८६३ त श्लेजविग-हॉलस्टेन-सॉडरबर्ग-ग्लुक्सबर्ग येथील राजपुत्र विल्यम जॉर्ज याला 'राष्ट्रीयसभेनें 'ग्रीसच्या रिकाम्या झालेल्या राजपदावर अधिष्ठित केलें. तारीख १३ जुलै १८६३ रोजीं ग्रेटब्रिटन, फ्रान्स व रशिया या संरक्षक राष्ट्रांनीं या नूतन राजवंशाला आपली संमति दिली.

पहिला जॉर्ज हा गादीवर येतो न येतो तोंच कित्येक भानगडीचे राजकीय प्रश्न याच्यापुढें दत्त म्हणून उभे राहिले. इ. स. १८६४ त त्याला राष्ट्रीय सभेनें तयार केलेली अत्यंत लोकसत्ताक स्वरूपाची अशी राज्यघटना स्वीकारणें भाग पडलें. ग्रीसमध्यें अद्यापि हीच राज्यघटना चालू आहे. क्रीट बेटांतील राज्यक्रान्तीच्या प्रयत्नाला ग्रीक सरकारचा पाठिंबा असल्यामुळें टर्की व ग्रीस यांच्यांतील मित्रभाव दिवसेंदिवस कमी होत चालला होता. इ. स. १८६९ त क्रीट बेटांतील बंडाचा टर्कीनें बीमोड केला व पॅरिस येथें भरलेल्या यूरोपीयन राष्ट्रांच्या परिषदेनें टर्कीच्या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल लावून तो निकाल मान्य करण्यास ग्रीसला भाग पाडलें. रशिया व टर्की यांच्यांतील युद्धानें ग्रीसमध्यें चलबिचल उडवून दिली. आपली सरहद्द वाढविण्याची ग्रीसची फार दिवसांपासून इच्छा होती व म्हणून बर्लिन येथील कॉंग्रेसनें ग्रीसच्या आग्रहामुळें हा प्रश्न विचारांत घेतला. टर्की व ग्रीस यांनीं होतां होईतों या प्रश्नाचा गोडीगुलाबीनें आपसांत निकाल लावून घ्यावा व सलोखा न झाल्यास यूरोपीयन राष्ट्रांनीं मध्यस्थी करावी असें कॉंग्रेसनें ठरविलें. त्याप्रमाणें नवीन सरहद्द कोठून कोठपर्यंत आंखण्यांत यावी हेंहि कॉंग्रेसनें सुचवून ठेवलें. ग्रीस व टर्की यांनीं या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एका संयुक्त कमिशनची नेमणूक केली. पण बर्लिन कॉंग्रेसनें आंखून दिलेली

सरहद्द टर्की मान्य करीना. तेव्हां ग्रीसनें यूरोपियन राष्ट्रांनां मध्यस्थी करण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें इ. स. १८८१ च्या जुलै महिन्यांत सहा यूरोपियन राष्ट्रें, ग्रीस आणि टर्की यांचें संयुक्त कमिशन नेमण्यात येऊन त्या कमिशनच्या अनुमतें एक नवीन सरहद्द आंखण्यांत आली. यायोगें १३३९५ चौरस किलोमीटरांचें क्षेत्र व ३००००० लोकसंख्या ग्रीसच्या राज्याला जोडण्यांत आली.

या वेळीं ग्रीसच्या राजकारणांतील दोन विरोधी पक्षांचें पुढारीपण ट्रीकूप्स व डेलीआनीज या दोन पुढाऱ्यांकडे होतें. १८८२ मध्यें ट्रीकूप्स याला मुख्य प्रधानाची जागा देण्यांत आली. परंतु त्यानें राज्यकारभारांत घडवून आणलेल्या सुधारणा लोकांनां न आवडल्यामुळें त्याला लवकरच म्हणजे १८८५ त आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला व डेलीआनीज याला मुख्य प्रधान निवडण्यांत आलें. डेलीआनीज हा तुर्कद्वेषी धोरणाचा पुरस्कर्ता होता. बल्गेरि. याच्या संबंधांत कांहीं भानगड उपस्थित झाल्यामुळें त्यानें तावडतोब सैन्य व आरमार यांची लढाईकरितां हालचाल सुरू केली. परंतु इतर राष्ट्रांनीं या कृत्याचा कडक निषेध केल्यामुळें डेलीआनीज याचा नाइलाज होऊन त्याला आपल्या अधिकाराचा राजीनामा देणें भाग पडलें. ट्रीकूप्स याची फिरून मुख्य मंत्रिपदावर योजना करण्यांत आली. डेलीआनीज यानें युद्धाची तयारी करण्यांत बराच पैसा खर्च केल्यामुळें राज्याची वसूलविषयक परिस्थिति सुधारण्याचें काम आतां ट्रीकूप्सवर येऊन पडलें. अधिकारावर येतांच ट्रीकूप्सनें लोकांवर जबर कर लादण्यास सुरवात केली. याचा डेलीआनीज यानें फायदा घेऊन ट्रीकूप्सविषयीं लोकांच्या मनांत अप्रीति उत्पन्न करण्याच्या प्रयत्नास तो जारीनें लागला. कर हलके करण्याचें लोकांनां अभिवचन देऊन त्यानें लोकांचीं मनें आपल्याकडे वळवून घेतलीं. निवडणुकींत ट्रीकूप्स याचा पराभव झाला व फिरून डेलीआनीज याची अधिकारावर योजना करण्यांत आली. परंतु वसूलविषयक अडचणीला डेलीआनीज तोंड देऊं न शकल्यामुळें राजानें त्याला अधिकारावरून दूर करून ट्रीकूप्स याला मंत्रिपदावर बोलाविलें. ट्रीकूप्स अधिकारसूत्रें हातीं घेतो न घेतो तोंच त्याच्यांत व राजांत कांहीं गैरसमज उत्पन्न होऊन त्याला फिरून राजीनामा देणें भाग पडलें. यानंतर फक्त एकदांच ट्रीकूप्स यानें मुख्य मंत्र्याचें काम केलें. १८९५ त त्यानें आपल्या अधिकाराचा व त्याबरोबरच राजकारणाचा निरोप घेऊन तारीख ११ एप्रिल १८९६ रोजीं परलोकीं प्रयाण केलें.

तारीख २३ एप्रिल १८९६ रोजीं ट्रीकूप्सच्या प्रेताचा अथेन्स येथें मोठ्या समारंभानें दफनविधि करण्यांत आला. ऑलिम्पियन उत्सवाच्या वेळीं ज्याप्रमाणें शहर शृंगारून काढीत असत त्याचप्रमाणें यावेळीं पताका व तोरणें यांनीं सर्व शहराला शोभा आणण्यांत आली होती. प्राचीन ऑलिंपिक उत्सवाचें पुनरुज्जीव करण्यांत आल्यामुळें दूरदूरचे ग्रीक लोक उत्सवाकरितां अथेन्समध्यें एकत्र होऊं लागले व राज्याच्या बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीमुळें दडपून गेलेल्या ग्रीक लोकांच्या राष्ट्रीय भावना फिरून उद्दीपित झाल्या. १८९४ त स्थापन करण्यांत आलेल्या 'एथनिकी हेटेरिया' नामक गुप्त मंडळानें आतां जोराची चळवळ सुरू केली. बल्गेरियनांनीं मॅसिडोनियांत टर्कीपासून विभक्त होण्याची सुरू केलेली चळवळ व प्रिन्स फर्डीनंड याचा रशियाशीं झालेला सलोखा यामुळें मॅसिडोनिया ग्रीक संस्कृतीच्या तटांतून फुटून निघणार अशी कित्येकांनां भीती वाटून त्यांनीं त्या ठिकाणीं बंडखोरीच्या चळवळीची तयारी करण्याच्या उद्देशानें वरील मंडळ स्थापन केलें होतें. १८९६ त क्रीटमधील लोकांनां टर्कीनें कांहीं राजकीय सुधारणा दिल्या परंतु त्या अमलांत आणण्याचा प्रश्न दिरंगाईवर टाकण्याचा टर्कीचा निश्चय दिसून आल्यामुळें तेथील ख्रिश्चन लोकांचा धीर सुटला व वरील मंडळाच्या सभासदांनीं तेथें जाऊन त्यांनां बंड करण्यास प्रोत्साहन दिलें. तारीख ४ फेब्रुवारी १८९७ रोजीं कॅनिआ येथें दंगा होण्याचें दिसून येतांच तुर्की सैन्यानें ख्रिश्चन लोकांवर गोळीबार करण्यास सुरुवात केली व याप्रमाणें लोकांच्या असंतोषाच्या अग्नींत तेल ओतलें जाऊन तो जास्तच भडकला.

या वेळीं डेलीआनीज हा मुख्य प्रधानाच्या जागेवर होता. क्रीट येथील गोळीबाराचें वृत्त ऐकतांच त्यानें ग्रीकसरकार क्रीट प्रकरणासंबंधानें यापुढें मुग्धता धारण करणार नाहीं असें जाहीर करून कॅनिआ येथें दोन लढाऊ जहाजें रवाना केलीं. 'एथनिकी हेटेरिआ' मंडळानें प्रधानमंडळांतील बहुमत आपल्या बाजूस करून घेऊन राजाला टर्कीविरुद्ध युद्ध पुकारण्यास भाग पाडलें. यूरोपीय राष्ट्राकडे एक खलिता पाठवून ग्रीक सरकारनें त्यांनां आपला उद्देश कळविला. तेव्हां ग्रेटब्रिटन, फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रांनीं ग्रीक व तुर्क सरकारांकडे उलट खलिता पाठवून असें कळविलें की, सद्यःस्थितींत क्रीट हें ग्रीसच्या राज्याला जोडतां येणें शक्य नसल्यामुळें सुलतानाच्या आधिपत्याखालीं अन्तर्गत राज्यकारभारांत क्रीटला स्वातंत्र्य देण्यांत येऊन हा युद्धप्रसंग टाळावा. या उत्तराला ग्रीक सरकारनें प्रत्युत्तर पाठवून अन्तर्गत स्वातंत्र्यानें क्रीटचा कांहीं फायदा होणार नाहीं व आपण आपलें सैन्य क्रीटमधून हालवणार नाहीं असें कळविलें. यापुढें काय करावें यासंबंधीं यूरोपीयन राष्ट्रें भवती न भवती करू लागलीं. तोंच इकडे 'एथनीकी हेटेरिया' मंडळाच्या बाजारबुणग्या फौजेनें कित्येक तुर्की ठाण्यांवर हल्ला चढवून गोष्टी हातघाईवर आणल्या. तारीख १७ एप्रिल १८९७ रोजीं तुर्कांनीं ग्रीसविरुद्ध युद्ध पुकारलें. तुर्कांच्या लष्करी बलाबलाचा ग्रीकांनीं पूर्ण विचार केला नव्हता हें आरंभींच दिसून आलें. लवकरच ग्रीक सैन्य दबघाईस आलें व यूरोपीय राष्ट्रांच्या मध्यस्थीनें तारीख १९

मे रोजीं तात्पुरत्या तहान्वयें युद्ध थांबविण्यांत आलें. तारीख ६ डिसेंबर १८९७ रोजीं कॉन्स्टांटिनोपल येथें ग्रीस व टर्की यांनीं तहनाम्यावर सह्या केल्या. टर्कीला जेणेंकरून कित्येक लष्करी नाक्याचीं ठाणीं मिळतील अशा रीतीनें या दोन राष्ट्रांमधील सरहद्दींत थोडा फेरफार करण्यांत आला. यूरोपियन राष्ट्रांनां यापुढें क्रीट टर्कीच्या ताब्यांत ठेवणें योग्य होणार नाहीं असें वाटून त्यांनीं ग्रीसचा राजपुत्र जॉर्ज याजकडे क्रीट बेटाची राज्यव्यवस्था सोंपविण्याचें ठरविलें. हा निकाल तारीख २६ नोव्हेंबर १८९८ रोजीं अथेन्स येथें कळविण्यांत आला व तारीख २१ डिसेंबर रोजीं राजपुत्र जॉर्ज याचें क्रीट येथील लोकांनीं मोठ्या आनंदानें व उत्साहानें स्वागत केलें. इ. स. १८९९ च्या एप्रिल महिन्यांत ट्रीकूप्स पक्षाचा मुख्य आधारस्तंभ थीओटोकस याला मुख्य प्रधान नेमण्यांत आलें. यानें न्यायखात्यांत पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. राणीच्या इच्छेप्रमाणें बायबलाचें भाषांतर अर्वाचीन ग्रीक भाषेंत करण्याचें प्रधानमंडळानें ठरविल्यामुळें लोकांची माथीं भडकून गेलीं. पुराणमताभिमानी खिस्ती लोकांवरील ग्रीक वर्चस्व हाणून पाडणें हा या भाषांतराचा उद्देश आहे असें लोकांनां वाटून पुष्कळ लोकांनीं व विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं अथेन्स येथें १९०१ च्या नोव्हेंबरांत दंगे व मारामाऱ्या केल्या. थीओटोकस याच्या खुनाचा प्रयत्न करण्यांत आल्यामुळें त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला व अथेन्सच्या आर्चबिशपालाहि आपला अधिकार सोडावा लागला थीओटोकस याची जागा झेमीज याला देण्यांत आली. १९०२ मधील निवडणुकींत झेमीजचा पराभव झाला व डेलीयानीज याला प्रधान निवडण्यांत आलें. जून इ. स. १९०३ मध्यें डेलीयानीज यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला व थीओटोकस याला फिरून अधिकारावर घेण्यांत आलें. एका महिन्याच्या आंतच थीओटोकस याचें प्रधानमंडळ अधिकारभ्रष्ट झालें व ऱ्हालीज यानें नवीन प्रधानमंडळाची स्थापना केली. ऱ्हालीज याचें टर्कीविषयीं मित्रभावाचें धोरण होतें. १९०३ च्या डिसेंबरांत ऱ्हालीज यानें राजीनामा दिल्यामुळें थीओटोकसला फिरून प्रधान निवडण्यांत आलें. परंतु लोकांवर नवीन कर लादण्यास त्यानें सुरुवात केल्यामुळें त्याला लवकरच आपल्या जागेचा निरोप घ्यावा लागला व मुख्य प्रधानकीचीं सूत्रें फिरून एकदां डेलीयानीजच्या हातांत गेलीं. तारीख १३ जून १९०५ रोजीं डेलीयानीजचा खून करण्यांत आल्यामुळें मुख्य मंत्रिपदावर ऱ्हालीज याची पुनरपि योजना करण्यांत आली.

तारीख २६ सप्टेंबर १९०६ रोजीं राजपुत्र जॉर्ज यानें क्रीटच्या हाय कमिशनरच्या जागेचा राजीनामा दिला. १९०८ च्या आक्टोबरांत क्रीट येथील लोकसभेनें ग्रीसशीं एकत्र होण्याचा आपला निश्चय जाहीर केल्यामुळें तेथील मुसुलमानी लोकपक्षाचा क्षोभ होऊन युद्धाचा प्रसंग ओढवतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. ग्रीक सरकारनें संशयास्पद धोरण स्वीकारल्यामुळें सैन्यांत चळवळ सुरू झाली व १९०९ मध्यें या चळवळीला चांगलाच रंग चढला. या वेळीं थीओटोकस हा मुख्य प्रधानाच्या जागेवर होता. त्याचें क्रीटसंबंधींचें धोरण लोकांनां नापसंत पडल्यामुळें त्याला आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला व ती जागा ऱ्हालीज यानें भरून काढली. सैनिकांनां शांत करण्याकरितां ऱ्हालीज यानें आपला लष्करी व आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम जाहीर केला. परंतु सैनिकांचें समाधान न होऊन त्यांनीं स्वतः स्थापन केलेल्या 'लष्करी संघाच्या' एका पुढाऱ्याला ऱ्हालीजच्या जागीं मुख्य प्रधान नेमलें. यामुळें कांहीं काळपर्यंत सर्व कारभार 'लष्करी संघा'कडे जाऊन राजवंश ढांसळून पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. परंतु सैन्य व आरमार यांच्यांत एकसारखीं भांडणें उपस्थित होऊंलागल्यामुळें संघाचें वर्चस्व व शक्ति हीं नाहींशीं होऊन संघाचा पुढारी माव्होमायकेलस याला मुख्य प्रधानाची जागा सोडावी लागली. तारीख २९ मार्च १९१० रोजीं संघ मोडण्यांत आला व सर्वत्र स्थीरस्थावर करण्यांत आलें.

इ. स. १९१० च्या जानेवारी महिन्यांत लष्करीसंघानें आपली सत्ता पूर्णपणें ग्रीसवर प्रस्थापित केल्यानंतर व्हेनीझोलास याला सल्लागार या नात्यानें बोलावण्यांत आलें. १९१० च्या सप्टेंबरमध्यें राष्ट्रीय सभेची बैठक भरली. त्यावेळीं व्हेनिझोलास हा सभासद निवडला गेला असतांना देखील तुर्कस्तानच्या इच्छेला मान देऊन त्यानें राष्ट्रीय सभेला न जाण्याचें ठरविलें होतें. पण पुढें व्हेनिझोलास याचा व ड्रॅगूमेस या प्रधानाचा तंटा झाल्यामुळें प्रधानानें राजीनामा दिला व व्हेनिझोलास याला आपलें मंत्रिमंडळ बनविण्याची जॉर्ज राजानें आज्ञा केली. व्हेनिझोलास हा त्यावेळीं अतिशय लोकप्रिय झाला होता. त्याची सत्ता उत्तरोत्तर वाढत आहे हें पाहून जुन्या लोकपक्षाच्या पुढाऱ्यांनीं त्याचा नक्षा उतरविण्याचा निश्चय केला व त्याच्या कोणत्याहि बैठकीला न जाता ती बैठक कोरमच्या अभावीं बंद पाडण्याचें ठरविलें. अशी परिस्थिति दिसून येतांच व्हेनिझोलासनें राष्ट्रीय सभा बरखास्त करून लोकांकडे दाद मागण्याचा निश्चय केला. नवीन निवडणुकींत फिरून व्हेनिझोलास हाच प्रचंड मताधिक्यानें निवडून आला.

अशा रीतीनें राष्ट्रीय सभेंत आपलें बहुमत केल्यानंतर त्यानें ग्रीसमध्यें नवीन नवीन सुधारणा अमलांत आणण्यास सुरुवात केली. निवडणुकीच्या वेळीं जे लांचलुचपतीचे अनिष्ट प्रकार घडत, त्यांनां आळा घालण्याचें त्यानें ठरविलें. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करावयाची योजना त्यानें अमलांत आणली. ग्रीक भाषा ही राजभाषा करण्यांत आली. परराष्ट्रीय खात्याची पुनर्घटना करावयाचें त्यानें ठरविलें. कौन्सिल

ऑफ स्टेटचें पुनरुज्जीवन झालें. रुमानियाशीं राजकीय हितसंबंध पुनः सुरू करण्यांत आले.

१९१२ च्या जानेवारी महिन्यांत पुनः निवडणुकी होऊन त्यांत व्हेनिझेलासलाच मताधिक्य मिळालें. बल्गेरियाशीं सलोख्याचें धोरण ठेवण्यासाठीं त्यानें जॉर्ज राजाला मुद्दाम सोफियामध्यें पाठविलें होतें. त्याप्रमाणें १९१२ च्या मे महिन्याच्या २९ व्या तारखेस ग्रीस व बल्गेरियांमध्यें गुप्त तह झाला. त्यांत तुर्कस्तान व ग्रीस यांमध्यें लढाई सुरू झाल्यास तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं ग्रीस व बल्गेरिया यांनीं परस्परानां साहाय्य करावें अशा प्रकारचें कलम होतें.

तुर्कस्तानच्या सत्तेखालीं मॅसिडोनियाची स्थिति फार खालावत चालली होती. तुर्की लोक मॅसिडोनियांतील रहिवाश्यांनां फार त्रास देत असत. त्यामुळें १९१० च्या सप्टेंबरच्या ३० व्या तारखेस बाल्कन संस्थानांनीं कान्स्टांटिनोपलवर स्वारी केली. रशियाखेरीज सर्व यूरोपियन राष्ट्रांनीं बाल्कन राष्ट्रांनां धमकीवजा पत्र लिहून त्यांत तुर्कस्तानच्या सार्वभौम सत्तेला बाध न आणतां यूरोपीय तुर्कस्तानच्या राजकीय स्थितींत सुधारणा घडून आणण्यासाठीं आपण प्रयत्न करूं, त्यांत बाल्कन राष्ट्रांनीं ढवळाढवळ करण्याचें कारण नाहीं असें कळविलें. पण हा खलिता पोहोंचण्याच्यापूर्वींच मॉंटेनीग्रोनें तुर्कस्तानविरुद्ध युद्ध पुकारलें व ग्रीसनेंहि मॉंटेनिग्रो आपल्या राज्याला जोडून त्याला मदत करावयाचें ठरविलें. तुर्कस्ताननें ग्रीसविरुद्ध तेवढें युद्ध न पुकारतां त्याला आमीष दाखवून इतर बाल्कन राष्ट्रांशीं लढाई पुकारली. पण या आमिषाला बळी न पडतां व्हेनीझेलासनें बाल्कन राष्ट्रांनांच मदत करावयाचें ठरविलें.

लगेच ग्रीक सैन्यानें ग्रीसच्या युवराजाच्या आधिपत्याखालीं सरहद्द ओलांडून तुर्कस्तानचा सॅरांडोपोरान, सॅलोनिका इत्यादि ठिकाणीं पराजय केला. मॉंटेनिग्रो, बल्गेरिया, सर्व्हिया इत्यादि राष्ट्रांच्या सैन्यांनांहि तुर्कस्तानवर ठिकठिकाणीं जय मिळविले. तेव्हां तुर्कस्ताननें या बाल्कन राष्ट्रांशीं तह करावयाचें ठरविलें. बाल्कन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची व तुर्कस्तानच्या वकिलांची लंडनमध्यें तहाच्या वाटाघाटी करतां बैठक भरली त्यावेळीं ग्रीसनेंहि त्यांत भाग घेतला होता. ही तहाची वाटाघाट चालू असतां, तुर्कस्तानमधील राष्ट्रीयपक्षानें बंड करून, आपली सत्ता प्रस्थापित केली व पुन्हां बाल्कन राष्ट्राशीं लढाई सुरू केली. ग्रीक सैन्यानें यनीना शहरावर हल्ला करून तें काबीज केलें व बल्गेरियन व सर्व्हियन सैन्यानें ॲड्रियानोपल, स्कुटारी इत्यादि ठिकाणें काबीज केलीं. तेव्हां पुन्हां लंडन येथें तुर्कस्तान व बाल्कन राष्ट्रें यांच्यांमध्यें तारीख ३० मे इ. स. १९१३ रोजीं तह होऊन यूरोपमधील आपल्या ताब्यांतलि प्रदेशांपैकीं बहुतेक सगळा भाग तुर्कस्तानला सोडून द्यावा लागला. ग्रीक, बल्गेरिया व सर्व्हिया यांच्यांमधील सरहद्द देखील याच वेळीं निश्चित ठरविण्याचा या राष्ट्रांनीं बेत केला होता, पण आड्रियाटिक समुद्रकांठच्या मुलखांतून सर्व्हियाला वाट मिळावी हा जो आस्ट्रियाचा डाव होता त्याला इंग्लंडनें पाठिंबा दिल्यामुळें या बाल्कन राष्ट्रांत असंतोष पसरला. बल्गेरियानेंहि यावेळीं बाल्कनमध्यें आपलें सर्वांत अधिक वर्चस्व असावें असा हट्ट धरला व आपलें म्हणणें कबूल न झाल्यास लढाईचा प्रसंग आणण्याचेंहि ठरविलें. त्यामुळें ग्रीस व सर्व्हिया या राष्ट्रांनां बल्गेरियाचें वर्चस्व होऊं न देण्याकरतां, आपापसांत तह करणें भाग पडलें. शेवटीं बल्गेरियानें ग्रीक व सर्व्हियन सैन्यावर किल्की येथें हल्ला केला पण त्यांत बल्गेरियाचा पराभव झाला.

बल्गेरियाचा पराभव झालेला पहातांच व बाल्कन राष्ट्रांतच फुटाफुट झालेली पहातांच या संधीचा फायदा घेऊन तुर्कस्ताननें पुन्हा आड्रियानोपल काबीज केलें. शेवटीं बुखारेस्टच्या तहानें या सर्व बाल्कन राष्ट्रांमध्यें तात्पुरता समेट होऊन त्यांत ग्रीसला मॅसिडोनियाच्या सरहद्दीवरील बराचसा मुलूख घशांत टाकावयास मिळाला. पण बल्गेरिया, हे नूतन संपादित मुलूख आपल्याला पचूं देणार नाहीं अशी व्हेनांझेलासला सकारण भीति वाटत होती. त्यामुळें त्यानें सर्व्हिया व रुमानियाशीं तहाचें संधान जमविलें.

पण या बुखारेस्ट येथील तहामुळें ग्रीसला ईजियन बेटांवर जो ताबा प्राप्त झाला त्याला तुर्कस्ताननें संमति दिली नाहीं व त्यानें याचा सूड म्हणून ग्रीक जहाजांवर बहिष्कार घालून आशियामायनरमध्यें ग्रीकांचा छळ करण्यास सुरवात केली व ग्रीसला धमकी देण्यात सुरवात केली. अशी स्थिति पहातांच ग्रीसनें सर्व्हियाजवळ मदतीसाठीं याचना केली. सर्व्हियानें ती कबूल करून तुर्कस्तानच्या विरुद्ध आपली बाजू घेण्यासाठीं, यूरोपियन राष्ट्रांनां विनंति केली. पण तुर्कांच्या विरुद्ध ग्रीस व सर्व्हिया यांना कोणी मदत करण्यास तयार होईना व त्यामुळें यूरोपीयन राष्ट्रेंहि तुर्कस्तानविरुद्ध आपली बाजू घेण्यांत राजीखुषी नाहींत असें व्हेनिझेलास याला दिसल्यावरून त्यानें दोन अमेरिकन जहाजें खरेदी करून आपलें आरमारी सामर्थ्य वाढविलें. अर्थातच तुर्कस्तानला ग्रीक आरमारी सामर्थ्यापुढें आपला टिकाव धरणें अशक्य असल्याचें आढळून आल्यामुळें त्यानें तहाची वाटाघाट करण्यास संमति दिली. पण इतक्यांत महायुद्ध सुरू झाल्यामुळें या सर्व गोष्टींनां नवीनच वळण लागलें.

ग्रीस व महायुद्ध:—महायुद्ध सुरू होतांच जर्मनीनें ग्रीसला एक विनंतीपत्र पाठवून ग्रीसनें आपल्याला मदत करावी असें ग्रीसला कळविलें. पण कॉन्स्टंटाईन राजानें तें नाकारलें. व्हेनीझेलासनें बाल्कनसंघाचें सामर्थ्य वाढविण्याची खटपट केली. जर्मनीच्या आरमारी मदतीमुळें तुर्कस्तानला ओर चढून आशियामायनरच्या युद्धाचा वणवा पेटल्याखेरीज रहाणार नाहीं असें व्हेनीझेलास याला पक्कें वाटत होतें. यासाठीं त्यानें दोस्तराष्ट्रांच्या बाजूचें आपण राहूं असें जाहीर केलें. अर्थातच इंग्रज सरकारला ही गोष्ट पसंत

पडण्यासारखी होती. तेव्हां गॅलिपोलीचा टापू आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं ग्रीसशीं संगनमत करण्याकरतां इंग्रज-सरकारनें ॲडमिरल कर यास ग्रीस येथें पाठविलें. पण ग्रीसमध्यें येतांच कान्स्टंटाईननें तुर्कस्ताननें आपण होऊन कुरापत काढीतों आपण तुर्कस्तानशीं लढाई करण्याच्या विरुद्ध आहों असा कर यास खणखणीत जबाब दिला. व्हेनीझोलास यांचें मत राजाच्या उलट होतें. त्यानें राजाचें मन आपल्या निश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. शेवटीं व्हेनीझोलास यानें राजनिामा देण्याची धमकी घातली पण राजाच्या आग्रहावरून त्यानें राजीनामा दिला नाहीं. पुढें एक महिन्याच्या आंतच तुर्कस्ताननें दोस्तराष्ट्रांविरुद्ध लढाई पुकारली.

१९१५ सालच्या जानेवारीमध्यें इंग्लंडनें बाल्कन राष्ट्रांत जूट करून जर्मनीला शह देण्यासाठीं ग्रीसची मदत मागितली. पण कॉन्स्टंटाईननें तिकडे दुर्लक्षच केलें. व्हेनीझोलासनें वारंवार राजाला इंग्रजांना साहाय्य करण्यासाठीं विनंति केली. पण कॉन्स्टंटाईन हा त्याचें मुळींच ऐकेना. पुढें ब्रिटिशांनीं दार्दानेल्सचा समुद्र ताब्यांत घेण्यासाठीं ज्यावेळीं स्वारी करावयाचें ठरविलें त्यावेळीं त्यांनां साहाय्य करण्यासाठीं राजाचें मन वळवण्याचा व्हेनिझोलासनें अखेरचा प्रयत्न केला. त्यांत त्याला थोडेसें यश येण्याचा रंग दिसूं लागला. पण इतक्यांत लष्करी अधिकाऱ्यांचा नायक कर्नल मेटाक्सस यानें राजीनामा दिल्यामुळें राजाचें मन पुन्हां पालटलें. शेवटीं राजाच्या अध्यक्षतेखालीं ग्रीसमधील सर्व पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक भरून दार्दानेल्सवरील ब्रिटिशांच्या स्वारीला साहाय्य करण्यासाठीं म्हणून एक पलटण पाठविण्याचा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला. पण कॉन्स्टंटाईननें या सूचनेलाहि विरोध केला. त्यामुळें अखेर व्हेनीझोलास याला राजीनामा देणें भाग पडलें.

व्हेनीझोलासच्या जागीं गोनारेस याला मुख्य प्रधान नेमण्यांत आलें व त्यानें आपलें नवीन मंत्रिमंडळ बनविलें. ग्रीसनें या महायुद्धांत कोणताहि भाग न घेतां तटस्थ रहावें या मताचा गोनारेस हा होता. पण त्यानें ग्रीसचें बल्गेरियापासून संरक्षण करण्याच्या अटीवर दोस्तांनां आरमारी साहाय्य करण्यास संमति दिली व तसें फ्रेंच सरकारला कळविण्यांतहि आलें. पण कोणतीहि अट कबूल न करतां ग्रीस जर मदत करण्याचें कबूल करील तर ती स्वीकारण्यास दोस्त राष्ट्रें तयार आहेत असें फ्रेंच सरकारनें ग्रीसला कळविलें. कॉन्स्टंटाईन राजा हा जर्मनीच्या बाजूचा आहे हें फ्रेंच सरकारला पक्कें कळून चुकलें होतें व ग्रीसनें मदत करण्याचें कबूल करण्यांत कॉन्स्टंटाईनचा कांहीं तरी डाव असला पाहिजे अशी त्यांची कल्पना होती. जर्मन वृत्तपत्रकारांनीं तर कॉन्स्टंटाईन व त्याचा पक्ष यांनीं तटस्थपणा ठेवावा यासाठीं जोरानें चळवळ चालू ठेवली होती व व्हेनीझोलासच्या पक्षाविरुद्ध वाटेल तीं विधानें करून त्या पक्षाचें वजन कमी करण्याचा प्रयत्न चालविला होता. पण जून महिन्याच्या १३ व्या तारखेस जी नवी निवडणूक झाली तींत व्हेनीझोलासच्याच बाजूला अखेर अधिक मतें मिळून त्याचा पक्ष विजयी झाला. असें असून देखील राजा आजारी आहे व त्याच्या परवानगीशिवाय आपण प्रधानकी सोडणार नाहीं या सबबीवर गोनारेस व त्याच्या मंत्रिमंडळानें राजीनामा देण्याचें नाकारलें. पुढें आगस्ट महिन्यांत व्हेनीझोलास हा अधिकारारूढ झाला.

तथापि व्हेनिझोलास याला अनेक हितशत्रू उत्पन्न झाले होते. जर्मन वृत्तपत्रकारांनीं तर त्याची एकजात नालस्ती करण्याचाच विडा उचलला होता. व्हेनीझोलासनें अधिकारारूढ होतांच बल्गेरियापासून सर्व्हियाचें संरक्षण करण्याचें आपलें धोरण जाहीर केलें. बाल्गेरियानें ज्या वेळीं सर्व्हियावर स्वारी करण्यासाठीं आपलें सैन्य जमा करण्यास सुरुवात केली. त्यावेळीं नाइलाजास्तव व्हेनीझोलासनेंहि आपलें सैन्य गोळा करण्यास सुरवात केली. सर्व्हियाच्या हातून ग्रीसला जितकी मदत व्हावयाला पाहिजे तितकी मदत मिळणें अशक्य आहे, या सबबीवर राजानें व्हेनीझोलासला फ्रान्सनें व इंग्लंडनें बल्गेरियाविरुद्ध मदत करावी अशी विनंति करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें या सरकारास कळविण्यांतहि आलें व फ्रान्स व इंग्लंड यांनीं आपलें सैन्य व पलटणी सॅलोनिकाला पाठविल्याचें जाहीर केलें. पण या संधीस पुन्हां राजाचें मन पालटून त्यानें बल्गेरियानें आपण होऊन लढाई पुकारल्याशिवाय फ्रेंच व इंग्लिश पलटणींनीं कोणत्याहि प्रकारची हालचाल करतां कामा नये असें जाहीर केलें. त्यामुळें व्हेनीझोलासचा नाइलाज झाला. पुढें थोडक्याच दिवसांत, व्हेनिझोलासचें व राजाचें पटेनासें झाल्यामुळें व्हेनझिोलासला राजीनामा देणें भाग पडलें व त्याच्या जागीं झैमेसची नेमणूक झाली.

झैमेस हा ग्रीस व सर्व्हियांमध्यें जो तह झाला तो बाल्कन पुरताच आहे अशा मताचा होता. महायुद्धांत ग्रीसनें आपली बाहेरून तटस्थपणाची वृत्ति राखावी पण आंतून मात्र आपली जास्त तयारी ठेवावी असें त्यानें आपलें धोरण जाहीर केलें होतें. व्हेनीझोलासला जरी ग्रीसनें दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें युद्धांत पडावें असें वाटत होतें तरी पण राष्ट्रीय सभेमध्यें बखेडा होऊं नये यासाठीं, झैमेसच्या पक्षाच्या बाजूनें तो आपल्या पक्षाला मतें देण्यास सांगत असे. पण युद्धमंत्र्यानें कांहीं आगळीक केल्याच्या निमित्तावरून व्हेनीझोलासला फार चीड येऊन त्यानें एका प्रश्नावर प्रधानमंडळाचा पराभव केला. अर्थातच प्रधानाला राजीनामा देणें भाग पडलें. तेव्हां त्याच्या बदली राजानें स्कौलौडेस याला प्रधान नेमलें.

लवकरच नवी निवडणूक सुरू झाली, पण या निवडणुकीच्या वेळीं, व्हेनीझोलास व त्याचा उदार पक्ष यांनीं निवडणुकींत मतें न देण्याचें ठरविलें. यामुळें स्कौलौडिस

हाच पुन्हां अधिकारारूढ झाला. मे महिन्याच्या २३ व्या तारखेस जर्मनीनें ग्रीसला एक खलिता पाठवून त्यांत पूर्व मॅसिडोनियाकडे जातांना घाटामध्यें रूपेला नांवाचा जो किल्ला आहे तो आत्मसंरक्षणासाठीं आपल्या ताब्यांत जर्मनीनें घ्यावयाचें ठरविलें असून ग्रीसच्या सार्वभौमत्वाला यत्किंचित् कमीपणा न येईल अशा तऱ्हेची खबरदारी जर्मनी घ्यावयास तयार आहे असें लिहिलें होतें. स्कौलौडिसनें याला कबुली दिली पण भर सभेंत जर्मनीला आपण कबुली दिली नसल्याचें त्यानें प्रतिपादन केलें. पण जर्मनीला अशी सवलत दिल्याचा परिणाम असा झाला कीं, दोस्त राष्ट्रें व ग्रीस यांच्यामध्यें वैरभाव उत्पन्न झाला. कान्स्टंटाईन राजाविरुद्ध दोस्त राष्ट्रांतील पत्रांनीं टीका करण्यास सुरुवात केली. तर जर्मन पत्रकारांनीं त्याची पाठ थोपटण्यास सुरवात केली. कान्स्टंटाईन तर पूर्णपणें जर्मनीच्या बाजूचा झाला होता व जर्मनीचा जय व्हावा अशी त्याची मनापासूनच इच्छा होती.

शेवटीं जून महिन्यांत दोस्तराष्ट्रांनीं सालोनिका शहरावर लष्करी कायदा बजावला व तेथील ग्रीक सैन्य ताबडतोब काढून नेण्यांत यावें असें ग्रीसला कळविलें. स्कौलौडिसला या अटी जाचक वाटून त्यानें राजीनामा दिला. त्याच्या जागीं झैमेस हा प्रधान म्हणून नेमला गेला. त्यानें, सॅलोनिकामधून ग्रीक लष्कर दुसरीकडे नेण्याचें ठरविलें. पण या दोस्तांच्या कृत्यानें मात्र कॉन्स्टंटाईन हा पूर्णपणें जर्मनीच्या बाजूला झाला. इतक्यांत बल्गेरियन लोकांनीं मॅसिडोनियावर स्वारी केली. व त्यांनीं मॅसिडोनियाचा बराच मुलूख काबीज केला. हें पहातांच राजाचे डोळे उघडले व त्यानें दोस्तराष्ट्रांशीं बोलणें लावण्याकरितां झैमेसला हुकूम केला. रूमानियानें याच सुमारास जर्मनीच्याविरुद्ध लढाई पुकारली. हें पहातांच व्हेनीझोलास व त्याच्या अनुयायांनीं पुन्हां एकदां, जर्मनीविरुद्ध युद्ध पुकरण्यासाठीं राजाला विनंति करावयाचें ठरविलें पण राजानें व्हेनीझोलासनें पाठविलेल्या प्रतिनिधिमंडळाची भेटच घेतली नाहीं. अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें, व्हेनीझोलासच्या कांहीं प्रमुख अनुयायांनीं एक क्रांतिकारक मंडळ स्थापन केलें व राष्ट्रसंरक्षकमंडळ निर्माण करून त्यातर्फें ब्रिटिशांनां व दोस्तराष्ट्रांनां शक्य ती मदत करण्यास सुरवात केली. कांहीं दिवसांनंतर दोस्तराष्ट्रांनीं, ग्रीसमधील पोस्ट व तारऑफीसें आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें. यामुळें झैमेसनें प्रधान मंडळाचा राजीनामा दिला.

सप्टेंबरच्या २५ व्या तारखेला व्हेनीझोलासनें क्रीट येथें येऊन ॲडमिरल कौंटोरियोटिस व जनरल डँक्लस यांच्या साहाय्यानें क्रांतिकारक पक्षाची स्थापना केली. या पक्षाचा उद्देश ग्रीसमध्यें राजाच्या विरुद्ध चळवळ करून राजाला दोस्तांच्या बाजूनें लढाईंत भाग घेण्याला भाग पाडण्याचा होता. या त्रिमूर्तींनीं ग्रीसभर चळवळ करून सॅलोनिका येथें एक तात्पुरतें सरकार स्थापन करून दोस्तांच्या साहाय्यानें राष्ट्रसंरक्षक सैन्य उभारण्यास सुरवात केली. पुढें एक दोन महिन्यांत या नूतन सैन्याच्या जोरावर व्हेनीझोलासनें जर्मनी व बल्गेरियाच्या विरुद्ध युद्ध पुकारलें. पण दोस्त राष्ट्रांनीं व्हेनीझोलासच्या पक्षाला उघड मान्यता दिली नाहीं. अद्यापिहि ग्रीसमध्यें राजाच्या बाजूचे पुष्कळच अनुयायी होते व त्याचा शब्द झेलण्यास लोक तयार होते असें दोस्तराष्ट्रांनां वाटत होतें. दोस्त राष्ट्रें व्हेनीझोलासचा पक्ष मान्य करीत नाहींत हें पहातांच कॉन्स्टंटाईनला फार आनंद झाला व त्यानें व्हेनीझोलास व त्याचा पक्ष हे बंडखोर आहेत असें जाहीर केलें.

नोव्हेंबरच्या १९व्या तारखेस फ्रेंच ॲडमिरल डार्टिन यानें शत्रुराष्ट्रांच्या वकीलांनां अथेन्समधून हांकून लावलें व ग्रीक तोफखाना आपल्या स्वाधीन करून घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तो तोफखाना आपल्या स्वाधीन करून घेण्यास जात असतां ग्रीक सैन्यानें राजाच्या हुकुमावरून त्यास अडथळा केला व फ्रेंच सैन्याची कत्तल केली व व्हेनीझोलासच्या बाजूच्या अथेन्समधील नागरिकांचीहि कापाकाप केली. तेव्हां दोस्तराष्ट्रांनीं झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई करून देण्याबद्दल व ग्रीक सैन्य कमी करणें, बंदीवानांनां मुक्त करणें इत्यादि अटी कबूल करण्याबद्दल राजाला कळविलें. व्हेनीझोलासच्या पक्षाला दोस्तराष्ट्रांनीं पूर्ण मान्यता दिल्याचें जाहीर करण्यांत आलें.

राजाला या गोष्टी इतक्या थरावर येथील अशी कल्पना नव्हती. पण इतक्या निकरावर गोष्टी आलेल्या पहातांच त्यानें दोस्तांच्या अटी पाळण्याचें कबूल केलें व दोस्तांचें निशाणहि अथेन्सवर झळकूं लागलें. पण अद्यापिहि राजाला जर्मनीकडून आपल्याला मदत मिळेल अशी मनांतून खात्री वाटत होती. पण ती मिळण्याचा रंग दिसेना. इतक्यांत अमेरिकेनेंहि दोस्तांच्या बाजूनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याचें जाहीर केलें. तेव्हां निराश होऊन दोस्तराष्ट्रांशीं बोलणें लावण्याचें राजानें नक्की ठरविलें.

पण राजाच्या या बेताला दोस्त राष्ट्रांनीं संमति दिली नाहीं. राजा हा अद्यापि जर्मनीच्या बाजूचाच आहे असें त्यांनां नक्की वाटत होतें. तेव्हां राजानें व युवराजानें ग्रीसचें राज्यपद सोडून व आपल्यांपैकीं दुसऱ्या कोणालाहि राज्यपद देऊन, दुसरीकडे कोठेंहि निघून जावें असें त्यांनीं राजाला कळविलें. राजालाहि निरुपायास्तव हें कबूल करणें भाग पडलें. त्यानें अलेक्झांडर या आपल्या धाकट्या मुलास राज्यपद देऊन स्वित्झरलंडला प्रयाण करावयाचें ठरविलें. व्हेनीझोलास हा पुन्हां अथेन्समध्यें परत आला व त्यानें राजनिष्ठेची शपथ घेतली. त्यानें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याचें ताबडतोब जाहीर केलें. अशा रीतीनें ग्रीसमध्यें तात्पुरती शांतता झाली. तथापि अद्यापि कान्स्टंटाईनच्या बाजूचे लोक ग्रीसमध्यें पुष्कळच होते व कॉन्स्टंटाईन

हाहि स्वित्झर्लंडमधून अनेक कारस्थानें करून ग्रीसमध्यें आपल्या बाजूचें अनुकूल मत करून घेण्यासाठीं हरप्रयत्न करीत होता. व्हेनीझेलासनें ग्रीक सैन्याची वाढ करून दोस्त राष्ट्रांनां पुष्कळ ठिकाणीं चांगलें साहाय्य केलें. विशेषतः मॅसिडोनियामधील लढायांत तर दोस्तांनां ग्रीक सैन्याचें फारच साहाय्य झालें. या सैन्याच्या जोरावर २० सप्टेंबर इ. स. १९१७ रोजीं बल्गेरियाचा दोस्तराष्ट्रांनीं पूर्णपणें पाडाव केला.

महायुद्ध संपल्यानंतर शांततापरिषदेची बैठक भरली. तींत व्हेनीझेलास हा ग्रीसतर्फे प्रामुख्यानें भाग घेत होता. उत्तर एपिरस, थ्रेस, स्मर्ना हे प्रदेश आपल्याला मिळावे असें आपलें म्हणणें ग्रीसनें या परिषदेपुढें मांडलें. न्यूइली येथें ग्रीस व बल्गेरिया यांमध्यें तह होऊन बल्गेरियानें ईजियन बेटांवरील आपला हक्क सोडून दिला व बाल्कनमधील दोस्त राष्ट्राचे हितसंबंध राखण्याला त्यानें संमति दिली. तुर्कस्तानसंबंधींच्या प्रश्नाचा निकाल लावण्याला बराच अवधी लागला.

शेवटीं पुष्कळ वाटाघाटीनंतर ग्रीस व तुर्कस्तानांमध्यें सेव्हर्स येथें तह घडून आला. या तहान्वयें आड्रियानोपलपासून चटलजापर्यंतचा थ्रेसमधील प्रदेश, गॅलीपोली इत्यादि टापू ग्रीसला मिळाला. स्मर्नावर जरी तुर्कस्तानचा ताबा राहिला तरी तेथील राज्यकारभार पहाण्याचें काम ग्रीसकडे आलें.

अशा रीतीनें शांततापरिषदेचें काम संपल्यानंतर व्हेनीझेलास हा पॅरिस येथून अथेन्स येथें जाण्यास निघाला. त्याचा पॅरिस येथें खून करण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता पण तो सुदैवानें फसला. पुढें अथेन्समध्यें आल्यावर त्यानें ग्रीसमध्यें सुधारणा करण्याचें मनावर घेतलें. पण व्हेनीझेलासच्या गैरहजीरींत कॉन्स्टंटाइन राजानें व्हेनीझेलासचें वजन कमी करण्याचा प्रयत्न चालविला होता व त्याला यश येत चाललें होतें. याच सुमारास अलेक्झांडर राजा वारल्यामुळें ग्रीसवर कोणाला राजा नेमावें याविषयीं वाटाघाट सुरू झाली. कॉन्स्टंटाईनचा सर्वांत लहान मुलगा पॉल यास राजपदारूढ करावयाचें ठरलें पण कॉन्स्टंटाईन अगर युवराज यांनीं राज्यावरील आपला हक्क सोडल्याचें जाहीर करीतोंपर्यंत आपण ग्रीसचें राज्यपद स्वीकारणार नाहीं असें पॉलनें जाहीर केलें. नवीन निवडणुकींत या प्रश्नावर बराच वादविवाद होऊन व्हेनीझेलासच्या पक्षाचा पराभव झाला. व्हेनीझेलासनें व त्याच्या अनुयायांनीं ग्रीस सोडून परदेशीं जावयाचें ठरविलें. कॉन्स्टंटाईन राजा पुन्हां ग्रीसमध्यें आला व त्यानें राज्यपद स्वीकारलें. कॉन्स्टंटाईननें राज्यपद स्वीकारल्यामुळें दोस्त राष्ट्रांनीं ग्रीसला कोणतीहि मदत न करण्याचें ठरविलें. इकडे मुस्ताफा केमलपाशा यानें अनाटोलियामध्यें तुर्कस्तानची सत्ता वाढविण्याचा प्रयत्न चालविला होता. दोस्त राष्ट्रांनींहि कॉन्स्टंटाईन यानें राज्यपद स्वीकारल्यामुळें सेव्हर्सच्या तहाची पुनर्घटना झाली पाहिजे असें जाहीर केलें व केमालपाशाची बाजू घ्यावयाचें ठरविलें. लंडन येथें इंग्लंड, फ्रान्स, इटली या त्रिकूटाची बैठक भरली. त्या बैठकीला कान्स्टंटिनोपल व अंगोरा येथील दोन प्रतिनिधिमंडळें हजर होतीं. ग्रीसतर्फे कलोजरोपाऊलस हा हजर होता. या बैठकीमध्यें बराच वादविवाद झाला पण ग्रीसच्या प्रतिनिधींचें कोणत्याच अटींनीं समाधान होईना. तेव्हां या परिषदेनें ग्रीसच्या प्रतिनिधीला आपल्या अटी कळविल्या. त्यांतील मुख्य अटी अशा होत्या कीं, ग्रीसकडे थ्रेसमधील मुलुख रहावयाचा, स्मर्नाचा राज्यकारभार संयुक्तमंडळातर्फे चालवावयाचा व राष्ट्रसंघानें आपला एक गव्हर्नर या प्रांतावर देखरेख करण्याकरितां ठेवावयाचा. या अटींनां ग्रीसनें संमति दिली नाहीं. उलट थोडक्याच दिवसांत ग्रीसच्या सैन्यानें अंगोरा रेल्वे लाईनवरील हिसर व एस्कीशेहर हीं शहरें आपल्या ताब्यांत घेतलीं. एस्कीशेहरजवळ तुर्की सैन्यानें ग्रीक सैन्याचा मोठा पराभव केला.

यावेळीं गोनारेस हा ग्रीसचा मुख्य प्रधान होता. यानें ग्रीसच्या अंतस्थ कारभारात पुष्कळच सुधारणा घडवून आणल्या होत्या. कॉन्स्टंटाईन राजाला स्मर्ना आपल्या केव्हां ताब्यात घेईन असें झालें होतें. तुर्कस्तानमध्यें व इंग्लंडमध्यें कांहीं बाबतींमुळें वितुष्ट उत्पन्न झालें होतें. ही संधि साधून कॉन्स्टंटाईननें स्मर्नावर स्वारी करून तें आपल्या ताब्यांत घेतलें व कान्स्टांटिनोपलचा बादशहा असल्याचें जाहीर केलें. ग्रीस व तुर्कस्तानमधील या बेबंदशाहीला आळा घालण्याचा पुन्हां दोस्त राष्ट्रांनीं प्रयत्न केला. पण त्या प्रयत्नास यश आलें नाहीं. ग्रीसनें तुर्कस्तानविरुद्ध आपलें चढाईचें धोरण चालूच ठेवलें व एस्कीशेहर, हिसर, कुतहिया हीं शहरें काबीज केलीं. पण शेवटीं हिसर येथें तुर्कस्ताननें ग्रीक लोकांनां जोराचा प्रतिकार करून ग्रीसला थोपवून धरलें.

मे इ. स. १९२१ ते ऑगष्ट इ. स. १९२४ या कालाच्या अवधींत ग्रीसमध्यें पुष्कळ महत्वाचीं स्थित्यंतरें घडून आलीं. ग्रीसनें या काळांत इटली व तुर्कस्तान यांच्याशीं युद्ध केलें. खुद्द ग्रीसमध्यें क्रांति होऊन कॉन्स्टंटाईन व त्याचा मुलगा जार्ज या दोन्हीं राजांची उचलबांगडी करण्यांत आली व प्रजासत्ताक राज्याच्या कल्पनेला अनुकूल वातावरण तयार झालें.

तुर्कस्तानशीं लढाः—इ. स. १९२१ च्या मे महिन्यांत आशियामायनरमध्यें ग्रीक सैन्यानें बरेच दंगेधोपे सुरू केल्यामुळें त्याच्या त्या.पुंडाईबद्दल पोर्टेनें तक्रार केली. जूनमध्यें ग्रीकांनीं आशियामायनरमधील काळ्या समुद्रावरील एरेग्लो व इनेबोली या बंदरावर तोफांचा मारा केला. हा मुलुख सर्वांनां खुला असल्याचें दोस्त राष्ट्रांनीं ठरविलें होतें.

असें असतां, ग्रीकांनीं या तटस्थ मुलुखांतील शांततेचा भंग केला व दोस्तांच्या अटीविरुद्ध आचरण केलें अशी पोर्टेनें तक्रार केली. अर्थातच ब्रिटन, फ्रान्स व इटली यांनीं हा प्रश्न सोडविण्याचें मनावर घेतलें. ग्रीक लोकांनीं आशियामायनर वरील आपला हक्क सोडून द्यावा असें फ्रेंच सरकारचें म्हणणें होतें पण ग्रीक लोक त्या म्हणण्याला तयार होईनात. ग्रीस व तुर्कस्तान यांमध्यें शांतता प्रस्थापित करण्याचा युद्ध हाच काय तो उपाय आहे असें ग्रीकांचें म्हणणें होतें, पण तें कोणालाच पसंत पडलें नाहीं. तरी पण ग्रीसनें या टापूंत चढाई करून कुतहिया व एस्कीशेहर येथें जय मिळविले. या जयांनीं हुरळून जाऊन अथेन्समधील वर्तमानपत्रकारांनीं कॉन्स्टांटिनोपलवर ग्रीसचाच हक्क आहे व ग्रीसला तें परत मिळालें पाहिजे अशी जुनी हाकाटी पुन्हां मारण्यास सुरुवात केली. १९२१च्या ऑगष्टमध्यें अंगोरावर ग्रीकांनीं विमानांतून बॉंब फेंकण्यास सुरुवात केली व त्यामुळें केमलपाशाला तें शहर सोडणें भाग पडलें. पण सप्टेंबर महिन्यांत ही स्थिति पालटूं लागली. तुर्की सैन्यानें त्यांनां जोराचा प्रतिकार करून त्यांच्या सैन्याची दुर्दशा केली. त्यामुळें अंगोरा हस्तगत करण्याचा ग्रीकांचा बेत फसला. फ्रान्स व इटली या राष्ट्रांनीं या झगड्यांत भाग न घेण्याचें ठरविल्यामुळें ग्रीक लोकांनीं युद्धतहकुबी घडवून आणण्याबद्दल दोस्त राष्ट्रांनां विनंति केली. तुर्कांनां सारखे विजय मिळूं लागल्यामुळें, ग्रीक लोक नामोहरम झाले. हें पहातांच ग्रीक व बल्गेरिया यांच्या सरहद्दींवर ग्रीक व बल्गेरियन लोकांत चकमकी झडूं लागल्या. रुमानिया व जुगोस्लाव्हिया या राष्ट्रांनीं ग्रीसला मदत करण्याचें ठरविलें. पण आक्टोबरमध्यें ग्रीक लोकांची नांगी बरीच खालीं उतरली. आर्थिक व लष्करीदृष्ट्या हमी म्हणून ॲनटोलियाचा मुलूख आपल्या लष्कराच्या ताब्यांत रहावा असें ग्रीकचें म्हणणें पडलें. पण ही सुबुद्धि ग्रीकांना अगोदर सुचली नाहीं. तुर्क लोकांनीं याच्या म्हणण्याकडे लक्ष्य न देतां ग्रीकांच्या ताब्यांत असलेल्या शेंकडों खेड्यांचा विध्वंस केला व त्यांतील लोकांची कत्तल केली. तेव्हां ग्रीक लोक थोडेसे शुद्धीवर आले व १९२२ च्या एप्रिल महिन्यांत त्यांनीं तहाची वाटाघाट करण्यास सुरुवात केली. दोस्त राष्ट्रांनीं तहाचा कच्चा मसुदा तयार केला पण ग्रीस व तुर्कस्तान या दोन्ही राष्ट्रांनां तो पसंत पडला नाहीं. शेवटीं बरीच भवती न भवती होऊन १९२३च्या आगस्टमध्यें लॉसेन येथें दोन्ही राष्ट्रांत तह घडून आला.

१९२२ च्या एप्रिलमध्यें राजपक्ष व आशियामायनरमधील ग्रीक राष्ट्रसंरक्षक कमीटी यांमध्यें बेबनाव माजला. या कमीटींत व्हेनीझोलासच्या पक्षाचे पुष्कळ लोक होते. त्यांनीं अंगोरा सरकारच्या घटनेबरहुकूम आयोनियन सरकार स्थापन करण्याची धमकी घातली. सप्टेंबर महिन्यांत ग्रीक आरमारी व लष्करी सैन्यानें कॉन्स्टंटाईन राजाला पदच्युत करून त्याच्या जागीं काउन प्रिन्सला गादीवर बसविलें. कॉन्स्टंटाईन हा १९२३ च्या जानेवारींत मरण पावला. पण बंडखोर ग्रीक सैन्यानें कॉन्स्टंटाईनला पदच्युत करूनच न थांबतां माजी मंत्रिमंडळांपैकीं पुष्कळांचा शिरच्छेद केला. त्यामुळें दोस्तराष्ट्रांची ग्रीसविषयीची सहानुभूति नष्ट झाली.

१९२०–२३ च्या दरम्यान ग्रीसची आर्थिक स्थिति फारच वाईट झाली होती. १९२३ च्या फेब्रुवारींत ग्रीसनें राष्ट्रसंघाकडे एक कोटी पौंडांचें कर्ज मिळण्यासाठीं हमी राहण्याबद्दल विनंति अर्ज पाठविला. १९२३ मध्यें कम्युनिस्ट पक्षानें अथेन्समध्यें मोठा संप केला.

ग्रीस व इटली यांमधील लढायांची माहिती इटली या लेखांत आलीच आहे. इटलीनें नुकसानभरपाईखातर ग्रीसवर जबर अटी लादल्या होत्या व ग्रीसनेंहि त्या नाइलाजास्तव मान्य केल्या होत्या. पण इटलीचें निशाण ग्रीसमध्यें फडकत रहावयासंबंधींची अट मात्र ग्रीसनें अजीबात मान्य केली नाहीं.

ग्रीसमधील अंतस्थिति:—इ. स. १९२३ मध्यें, निवडणुकीमध्यें जो पक्षपात होत असे तो नष्ट व्हावा यासाठीं सैन्यानें बंड केलें, पण तें बंड मोडण्यांत आलें. इ. स. १९२३ च्या डिसेंबरमध्यें राष्ट्रीय सभेनें ग्रीसला कशा प्रकारची शासनपद्धति पाहिजे हें नक्की ठरेतोंपर्यंत ग्रीसच्या राजानें बाहेर कोठेंतरी रहाण्यास जावें असें ठरविलें. त्याचप्रमाणें ग्रीसचा राजा जॉर्ज यानें रुमानियाची वाट धरली. राजाच्या गैरहजेरींत ॲडमिरल कॉंडोरियोटिस याला रीजंट नेमण्यांत आलें. पुढें इ. स. १९२४ मध्यें व्हेनीझोलास याला मंत्रिमंडळ बनविण्यासाठीं विनंति करण्यांत आली. पण व्हेनीझोलासनें मंत्रिमंडळ बनवून थोडे दिवस लोटतात न लोटतात तोंच नवीन संकट उपस्थित झालें. प्रजापक्षानें ग्रीक राजघराण्याची सत्ता संपुष्टांत आल्याचें राष्ट्रीय सभेकडून वदविण्याचा घाट घातला. यामुळें व्हेनिझोलासच्या मंत्रिमंडळाला मार्चमध्यें राजीनामा देणें भाग पडलें. या अंदाधुंदींतून मार्ग काढण्यासाठीं, नेमस्त राजपक्षीयांचें एक मंडळ स्थापन झालें. त्या मंडळानें प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें जॉर्ज याला विधिपूर्वक पदच्युत करण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें. इ. स. १९२४ च्या मे महिन्यांत जॉर्जनें राजसत्ता स्थापित करण्याबद्दल मागणी केली पण त्या गोष्टीला लोकमत अनुकूल पडलें नाहीं.

मॅसिडोनिया प्रांत हा जुगोस्लाव्हियसच्या ताब्यांत आहे तो पुन्हां स्वतंत्र व्हावा या हेतूनें तेथें नवीन चळवळ सुरू झालेली आहे. सप्टेंबरमध्यें मॅसिडोनियांतील बंडखोर सैन्याचे अधिपति होडॉट अलेक्झांड्रोफ यांचा मॅसिडोनियांतील विरुद्ध पक्षाकडून खून करण्यांत आला. खुनी इसमांनां तात्काल पकडण्यांत येऊन त्यांचा शिरच्छेद करण्यांत आला.

इ. स. १९२४ च्या जुलै महिन्यांत एका ग्रीक सेनापतीनें ५१ बल्गेरियन शेतकऱ्यांची कत्तल केली. त्यामुळें

ग्रीस व बल्गेरियांत तंटा उपस्थित होऊन तें प्रकरण राष्ट्र-संघाकडे निकालाकरतां आलें. तेव्हां या तंटयाचा निकाल लावण्यासाठीं, राष्ट्रसंघानें एक न्यूझीलंडचा व एक बेल्जमचा तज्ज्ञ अशा दोन तज्ज्ञांची कमिटी नेमिली आहे.

[संदर्भग्रंथ-फेनले-अर्ली हिस्ट. ऑफ ग्रीस (ऑक्स.१८७७) ग्रोट्स-हिस्टरी ऑफ ग्रीस; महाफी-सोशल लाइफ इन ग्रीस; रँबल्स अँड स्टडीज इन ग्रीस; हिल-हँडबुक ऑफ ग्रीक अँड रोमन कॉइन्स; ग्रीनिज-हँडबुक ऑफ ग्रीक कॉन्स्टिटयूशनल हिस्टरी (मॅकमिलन १८९६); बेंट- मॉडर्न लाइफ अँड थॉट अमंग दि ग्रीक्स (लंडन १८९१); रॉड-दि कस्टम्स अँड लोअर ऑफ मॉडर्न ग्रीस (लंडन, १८९२); केनेथ ब्राऊन-कॉन्स्टंटाइन किंग अँड ट्रेटर (१९१७); कॅसाबेट्टी-हेलास अँड दि बाल्कन वार्स (१९१४); मॅरियट-दि ईस्टर्न क्श्चन (१९१८); मार्टिन-ग्रीस ऑफ दि ट्वेंटिएथ सेंचरी (१९१३); रँकीन-दि इनर हिस्टरी ऑफ दि बाल्कन वार्स १९१४].

ग्रीक वाङ्मय.—प्राचीन ग्रीक वाङ्मय हें स्वतःसिद्ध आहे. यामध्यें दुसऱ्या कोणत्याहि वाङ्मयाचा भाग भाषांतरानें अथवा रूपांतरानें आलेला नाहीं. हें वाङ्मय म्हणजे ग्रीक समाजाची बाल्यावस्था, तारुण्य व ऱ्हास यांचें चित्र आहे. हें सर्वांगयुक्त आहे. ग्रीक भाषेच्या ज्या तीन मुख्य उपभाषा 'आयोनियन' 'एओलियन' व 'डोरियन' या तिन्ही मिळून या वाङ्मयास पूर्णत्व आलें आहे.

सध्यां आपल्याला होमरच्या काव्यापासूनचेंच वाङ्मय उपलब्ध आहे. याच्या पूर्वी पुष्कळ गाणीं प्रचलित असावीं असें दिसतें. पहिलीं गाणीं निरनिराळया ऋतूंवर रचलेलीं असावीं. यानंतर निसर्गाच्या निरनिराळया शक्तींस दैवतें कल्पून त्यांच्या स्तुतिपर गाणीं प्रचारांत आलीं. हीं पारमार्थिक स्वरूपाचीं काव्यें झालीं, परंतु कांहीं विधींमध्यें म्हणावयाचे मंत्र वगैरे सुद्धां लौकिक स्वरूपाचे असत. लौकिक काव्यांस सामान्यतः आरंभ युद्धाच्या पोवाडयांपासून होतो. याच पोवाड्यांचें व वीरकथांचें पुढें ऐतिहासिक महाकाव्यांमध्यें रूपांतर झालें. होमरनें आपलें 'इलियड' हें महाकाव्य अशाच निरनिराळया वीरकथा एकत्र करून तयार केलें असें म्हणतात. होमरचा काल 'ॲरिस्टॉटल' व 'ॲरिस्टार्कस' यांच्या म्हणण्याप्रमाणें ख्रि. पू. १०४४ व 'हिरोडोटस' याच्या मतानें ख्रि. पू. ८५० हा आहे.

हेसिअड यांचीं काव्यें निराळया प्रकारचीं आहेत. एका काव्यांत त्यानें ऋतू व शेतकऱ्यांच्या कामांचें वर्णन करून शेवटीं शुभ व अशुभ दिवस कोणते तें सांगितलें आहे. 'थिऑगानी' या काव्यांत त्यानें देवांची उत्पत्ति वर्णन केली आहे. एकंदर याच्या काव्यात त्या वेळच्या प्रचलित दंतकथा, स्तोत्रें व विश्वोत्पत्तीच्या कल्पना यांचा संग्रह दृष्टीस पडतो. याचा काल अजमासें ख्रि. पू. ८५०-८०० हा असावा, परंतु कांहींच्या मतें तो ख्रि. पू. ७व्या शतकांतला असावा. कवि व ईश्वरप्रेरित भविष्यवादी हीं दोन्हींहि कामें यानें केली व हेंच तो कवीचें कार्यक्षेत्र समजत असे. होमरच्या वेळचीं जीं 'हिम्स' आहेत तीं प्रार्थनेचीं स्तोत्रें नसून महाकाव्यांस प्रस्तावनेदाखल म्हणावयाचीं आहेत.

वरील काव्यांवरून कवींचें हृद्गत स्पष्टपणें दिसून येत नसे. त्याबद्दल फक्त अनुमानें काढतां येत असत. हेसिअड याच्या काव्यामध्यें त्याची मनस्थिति कांहीं ठिकाणीं आपणास ओळखूं येते. ग्रीक काव्यांचा आरंभ महाकाव्यांपासूनच होतो. पुष्कळ वर्षेपर्यंत दुसऱ्या तऱ्हेचीं काव्यें कोणी लिहिलींच नाहींत. कारण त्यावेळीं साम्राज्यसत्ता एका बादशहाच्या अथवा कांहीं बडे लोकांच्या हातांत असे. त्यांना आपल्या पूर्वजांबद्दलचीं गाणीं आवडत असत व सामान्य जनतेसहि दुसरें कांहीं वाङ्मय नसल्यामुळें हींच बरीं वाटत. परंतु हळूहळू लोकसत्ताकपद्धतीचा जय होत जाऊन सर्व साम्राज्य सत्ता लोकांच्या हातांत आल्याबरोबर सामान्य जनतेचें महत्त्व व कार्यक्षेत्र वाढलें. त्याबरोबर लोकांच्या मानसिक व कर्तुत्व शक्तीची वाढ झाली व सामान्य लोकांस आपले विचार प्रकट करावेसें वाटूं लागलें; पण गद्यवाङ्मय प्रचारांत नसल्यामुळें हे विचार काव्यांतच प्रकट होऊं लागले व त्यामुळेंच 'एलेजी' व 'आयँबिक' या चालींच्या कविता प्रचारांत आल्या.

ग्रीक 'एलेजी' म्हणजे केवळ शोकगीतें नव्हत. या कवितांचे विषय निरनिराळे असून त्यांमध्यें कवीचे व त्याच्या मित्रमंडळीचे विचार प्रकट केलेले असत. 'आयँबिक' चालीचा प्रथम औपरोधिक काव्यांत उपयोग करीत असत. या चालीच्या काव्यांमध्यें 'एलेजी' पेक्षां जास्त स्पष्टरीतीनें कवीचें हृद्गत दिसून येतें.

'एलेजी' काव्यांचा उपयोग निरनिराळया ग्रंथकारांनीं निरनिराळया कामीं केला.प्रथम 'कॅलिनस' व 'टिर्टिअस' या प्राचीन कवींनीं लोकांत वीरश्रीचा प्रसार करण्याच्या कामीं केला.नंतर 'आर्चिलोकस' यानें याच काव्यांतून आपले मृतांबद्दलचे दुःखोद्गार काढले.आयोनियन लोकांचें स्वातंत्र्य गेल्याबद्दलचा शोक मिम्नरमायानें याच काव्यांत प्रगट केला. सोलन यानें याच काव्यांचा उपयोग राजकीय व नैतिक बाबतींत केला. थिऑग्निस यानें राजनीति व तत्वज्ञान याच काव्यांतून प्रचारांत आणलें. झेनोफेन्स यानें आपलें तत्वज्ञान याच काव्यांत सांठविलें आहे. सिमॉनिड्स यानें पुन्हां (सिऑस येथील) इराणी युद्धांत पतन पावलेल्या वीरांचें शौर्य याच काव्यांत वर्णन केलें. 'अमॉर्गस' येथील सिमॉनिड्स यानें या काव्यांचा औपरोधिक रीतीनें उपयोग केला.

यानंतर 'लिरिक' कविता प्रचारांत आल्या. या काव्यामध्यें कवीचें हृद्गत अधिक स्पष्टपणें दिसून येतें. या कालांत संगीताची व वाद्यांचीहि प्रगति बरीच झाली होती. 'लेस्बॉस' येथील 'लिरिक' काव्यामध्यें त्या वेळची समाजाची आंदोलनें व त्याबरोबर कवीची निरनिराळया प्रसंगीचीं मनस्थिति यांचें

स्पष्ट चित्र दिसतें. येथील प्रमुख कवि 'अलसीअस' हा होय. सॅफो या कवयित्रीची निरनिराळे मनोविकार वर्णन करण्याची शैली अप्रतिम आहे. वरील कवी 'एओलियन' होते. यांची चित्रें विशेषतः वैयक्तिक असत. डोरिअन कवींच्या 'लिरिक' कविता सामान्यतः सर्व समाजाचें वर्णन करीत व हीं काव्यें पुष्कळजणांनीं मिळून म्हणावयाचीं असत. सार्वजनिक देवतार्चनाच्यावेळीं व उत्सवप्रसंगीं हीं काव्यें म्हणण्याचा प्रघात असे. यांच्या स्वरूपांत निरनिराळ्या कवींनीं सुधारणा केली. 'सिमॉनिड्स्' व 'पिंडार' या दोन कवींनीं या काव्यांस पूर्णत्वास नेलें.

अॅटिकः—निरनिराळ्या समाजस्थितीस अनुरूप अशा प्रकारचीं काव्यें आतांपर्यंत तयार झालीं होतीं. यापुढें आणखी निरनिराळ्या प्रकारांची जरूर लोकांस भासूं लागली व त्याचें फळ म्हणजे नाटक हें होय. 'डायोनिसस' याच्या उत्सवाच्या वेळीं त्याच्या वेदीभोंवतीं लोक जमून त्याच्या पराक्रमाचें वर्णन करीत असत. त्यांचा पुढारी आपण 'डायोनिसस'याचा दूत आहों अशी कल्पना करून त्याच्या एखाद्या प्रसंगीच्या पराक्रमाचें वर्णन करी, व बाकीचे सर्व त्यास उत्तर देत. पुढें उत्तर देणारा दुसरा एक इसम निवडूं लागले. पुढें या दोहोंचे वाढतां वाढतां चार झाले व याप्रमाणे नाटकांचा आरंभ झाला.

'ट्रॅजडी' हें नांव मूळ बोकड (ट्रॅगॉस) या शब्दापासून निघालें व हें नांव बोकड बळी दिल्यानंतर जें गाणें म्हणावयाचें असे त्यास मिळालें. 'कॉमेडी' याचा अर्थ खेडवळ असा आहे व हें नांव वरील गाणें इतर प्रसंगीं म्हटलें असतां त्यास लावीत. 'ट्रॅजडी' या नाटकाचा खरा आरंभ 'इश्चिलस' यानें प्रथम दोन नटांस भूमिका देऊन केला. व यानें संभाषणास अग्रस्थान देऊन ताफ्याच्या गायनास गौणस्थान दिलें. याच्याच वेळेस डायोनिसचें नाटकगृह बांधलें. यानंतर 'सोफोक्लिस' हा नाटककार झाला. यानें नाटकांत पुष्कळ प्रगति केली. युरिपिडिस यानें वरील नाटककारांप्रमाणें पौराणिक नाटकें न लिहितां सामान्य विषयांवर लिहिलीं. या वेळेस या नाटकांची वाढ पूर्णत्वास पोंचली.

'ट्रॅजडी' ज्याप्रमाणें भारदस्त विषयांवर असत त्याचप्रमाणें सामान्य विषयांवर 'कॉमेडी' रचीत असत. पहिल्या प्रकारचीं नाटकें अॅटिकामध्यें विशेष झालीं तर दुसऱ्या प्रकारच्या नाटकांची वाढ डोरिअन लोकांनीं केली. मेगारा येथील सुझारिअन यानें कांहीं प्रहसनें लिहिलीं. सायराक्यूज येथील सोफ्रन यानें कांहीं 'कॉमेडी' लिहिल्या. परंतु या नाटकांसहि परिणत स्वरूप अॅटिका प्रांतांतच मिळालें. यांपैकीं अॅरिस्टोफेन्स हा प्रमुख नाटककार होऊन गेला. याचीं ११ नाटकें उपलब्ध आहेत.

यानंतर ' मिडल कॉमेडी ' (मध्ययुगीन नाटकें) प्रचारांत आलीं. यांमध्यें जी औपरोधिक टीका पूर्वी राजकीय गोष्टींवर होत असे तीच आतां सामाजिक गोष्टींवर व वाङ्मयावर होऊं लागली. या तऱ्हेचीं नाटकें विशेषतः ' अथेन्स ' येथील ' अँटिफेन्स ' व ' थुरी ' येथील ' अॅलेक्सीस' यांनीं लिहिलीं. यानंतर ' न्यू कॉमेडी ' अर्वाचीन सामाजिक नाटकांच्या धर्तीवर तयार झाली. या तऱ्हेचीं नाटकें विशेषतः मिनँडर यानें लिहिलीं.

यांपैकीं ' ओल्डकॉमेडी ' हीं नाटकें वैयक्तिक टीकांनीं भरलेलीं असत. व त्यांतील टीका ही फार कडक असे. हीं नाटकें धार्मिक व उत्सवाच्या प्रसंगीं करीत असत. त्यामुळें या नाटकांत केलेली टीका अगर गौरव हजारों मनुष्यांच्या तोंडीं एकदम होत असे.

ग्रीक भाषेत गद्यवाङ्मयाचा आरंभ होण्यापूर्वीच काव्याची वाढ पूर्ण झाली होती. पहिला गद्यग्रंथकार ' हिरोडोटस ' याचें नांव ऐकूं येण्यापूर्वीच नाटकांची वाढ पूर्ण होऊन गेली होती. ' हिरोडोटस' च्या पूर्वी कांहीं ग्रंथकारांनीं गद्यामध्यें ग्रंथरचना केली होती. परंतु अद्यापि गद्यवाङ्मय असें तयार झालें नव्हतें. ' हिरोडोटस ' याचा इतिहास हा ज्याप्रमाणें काव्यांमध्यें ' ईलियड ' त्याप्रमाणें गद्यामध्यें मूळ आधार आहे. याच्या इतिहासाचा विषय ग्रीस व आशिया यांच्या मधील लढाया हा आहे. हा पौराणिक गोष्टींना जरी ऐतिहासिक गोष्टींइतकें महत्व देत नाहीं तरी त्यांचा उल्लेख करणें अवश्य समजतो. यानें आपल्या इतिहासांत भूवर्णनहि केलें आहे. परंतु यानें राजनीतीच्या दृष्टीनें विचार केलेला दिसत नाहीं. यामुळें याच्या इतिहासांत राजकीय व शासनसंस्थांचा इतिहास आढळत नाहीं.

याचा समकालीन ' थुसिडाइड्स ' यानें 'पिलॉपोनिशियन' युद्धावर एक इतिहास लिहिला आहे. याच्या इतिहासांत विचारशक्ति जास्त दिसून येते. यानें कोणत्याहि गोष्टींवर आपलें मत दिलें नाहीं व निःपक्षपातीपणानें केवळ त्या वेळीं घडलेल्या एकंदर घडामोडींच्या महत्वाकडे लक्ष्य देऊन लिहिला आहे.

यानंतर याच्याच पुढील काळाचा खि. पू. ३६२ सालापर्यंतचा इतिहास झेनोफोन यानें लिहिला आहे. हा स्वतः योद्धा होता व त्यानें पुष्कळ लढाया व देश पाहिले होते व तो चांगला लेखकहि होता. परंतु याच्या इतिहासास वरील इतिहासांची सर येत नाहीं व तो स्पार्टाचा पक्षपाती दिसतो. यानें कांहीं विषयांवर निबंध लिहिले. याच वेळीं ' स्टेसिअस ' यानें इराणचा व ' फिलिस्टस ' यानें सिसिलीचा इतिहास लिहिला. यानंतर कांहीं किरकोळ इतिहासकार झाले.

अॅटिका प्रांतांत एकंदर गद्यवाङ्मयाची वाढ कशी झाली व गद्यलेखनपद्धतीमध्यें कसकशी सुधारणा होत गेली तें आपणांस वक्तृत्वामध्यें चांगलें स्पष्ट दिसतें. अथेन्समधील प्रत्येक नागरिकास राजकारणांत भाग घेणें असल्यास अथवा न्याय कचेरींत स्वसमर्थन करण्याकरितां तरी

निदान सभेमध्यें भाषण करण्याची विद्या अवगत करावी लागत असे. सार्वजनिक वादविवादप्रसंगीं नागरिकांचें वक्तृत्वांतील प्रावीण्य दिसून येत असे. यामुळें ग्रीसमध्यें वाङ्मयावर वक्तृत्वाचा परिणाम विशेष झाला. या वाङ्मयाचा आरंभ सिसिलीमध्यें सायराक्यूज येथील 'कोरॅक्स' यानें 'आर्ट ऑफ वर्ड्स' हा ग्रंथ लिहिल्यापासून झाला. 'कोरॅक्स' याचा शिष्य टिसिअस यानें हा ग्रंथ अथेन्स येथें आणला. पुढें 'सोफिस्ट' यांच्या शिक्षणामुळें व्याकरण व तर्कशास्त्र याजकडे लक्ष्य गेलें. जॉर्जिअस यानें एकंदर वक्तृत्वामध्यें ओजस्विता आणिली.

गद्यवाङ्मयास व लेखनशैलीस वळण देणारा पहिला ग्रंथकार अँटिफन हा होय. याची भाषासरणी गंभीर व भारदस्त असून तो परस्परविरुद्धार्थी क्रियापदांवर जोर देत असे. अँडोसाइड्स याचें महत्व फक्त ऐतिहासिक आहे. याची वर्णनशक्ति चांगली आहे. 'लिसिअस' यानें पूर्वीच्याप्रमाणें अपरिचित व क्लिष्ट भाषा वापरण्याचें सोडून सामान्य प्रचारांतील भाषा वापरण्यास सुरुवात केली. 'इसोक्रेटस' याची भाषा 'अँटिफन' व 'लिसिअस' यांच्या दरम्यानची आहे. यानें ऐकणारांपेक्षां वाचणारांकरितांच ग्रंथरचना केलेली दिसते. याच्याच भाषासरणीचें अनुकरण यानंतरच्या ग्रंथकारांनीं केलेलें दिसतें. सिसरोनें हिचाच अंगिकार केला व पुढील अर्वाचीन वाङ्मयास वळण लावलें. इसिअस याचीं कांहीं भाषणें महत्वाचीं आहेत व त्यांमध्यें 'लिसिअस'च्या भाषाशैलीची छटा मारते. डेमॉस्थेनीस हा गद्यवाङ्मयामध्यें आपल्या सर्वांगपरिपूर्णतेनें व अलौकिक वक्तृत्वशक्तीनें सर्वांवर ताण करतो. त्याचीं राजकीय व सामाजिक विषयांवरील भाषणें व कांहीं खटल्यांतील विषय प्रतिपादन यामध्यें त्याचें भाषेवरील प्रभुत्व स्पष्टपणें दिसून येतें. यानें गद्यवाङ्मयास पूर्णता आणली. याच्यानंतर साधारण नांव घेण्यासारखा असा हायपराइड्स हा वक्ता होऊन गेला. ॲरिस्टॉटलचा शिष्य फॅलेरम येथील डेमेट्रिअस याच्यापासून ग्रीक वक्तृत्वाचा ऱ्हास होत गेला. यानें कल्पित विषयांवर भाषणें करण्याचा प्रघात पाडला. यानें अलेक्झांड्रिया येथील ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली.

यानंतर वक्तृत्वाचा अभ्यास ग्रीसच्या किनाऱ्यावर एशियामायनरमधील वसाहतींत व विशेषतः ऱ्होड्स बेटांत चालू असे. तत्वज्ञानामध्यें ज्याप्रमाणें प्लेटो याला अग्रस्थान आहे त्याप्रमाणेंच ग्रीक वाङ्मयांतहि आहे. याच्या संभाषणांमध्यें सर्वांगपरिपूर्णता दिसून येते.

ॲरिस्टॉटल यांचीं भाषणें जर ग्रीक वक्तृत्वाच्या भरभराटीच्या काळांत प्रसिद्ध झालीं असती तर त्यांचा परिणाम ग्रीक वाङ्मयावर फार झाला असता. यानें विचारशक्तीस चालना देऊन एक नवीनच शास्त्राचा पाया घातला. याचा शिष्य थिओफ्रेस्ट्रस यानें वनस्पतिशास्त्रावर ग्रंथ लिहून संशोधन करण्यास व शास्त्रीय वर्गीकरणपद्धतीस उत्तेजन दिलें.

ऱ्हासकालः—ग्रीक लोकांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या अस्ताबरोबर ग्रीक वाङ्मयाच्या ऱ्हासास आरंभ झाला. जोंपर्यंत ग्रीक नगरसंस्था अस्तित्वांत होत्या तोंपर्यंत प्रत्येक मनुष्य हा नागरिक या नात्यानें त्या नगरसंस्थेचा एक अवयव समजला जात असे व त्या दर्जास योग्य असें त्याचें शिक्षण झालेलें असे. फिलिप राजानें जरी ग्रीक शहरांचे सर्व हक्क काढून घेतले नाहींत, तरी नगरसंस्थांच्या स्वातंत्र्यास फार मोठा धक्का बसला. व त्यामुळें ग्रीक नागरिकांमधील पूर्वीचें स्वतंत्रतेचें वारें अस्तंगत होऊं लागलें व त्यांचे हात, त्यांची जीभ व त्यांचीं कलाकौशल्याचीं हत्यारें हीं पूर्वीच्या स्फूर्तीनें उचलत नाहींशीं झालीं. ॲलेक्झांडर याच्या स्वाऱ्यांमुळें ग्रीक संस्कृतीचा पूर्वेकडे प्रसार झाला व त्यांच्या वसाहतींमध्यें प्राच्य संस्कृति व ग्रीक संस्कृतीचा मिलाफ झाला. ॲलेक्झांडर याचें साम्राज्य मोडल्यावर या वसाहतींमध्यें स्वायत्त शासनसंस्थांचें तेज राहिलें नाहीं. परंतु राहाणी मात्र बाह्यतः ग्रीक राहिली. ग्रीक देवळें, पुतळे, नाटकगृहें वगैरे सर्व तशींच चालू राहिलीं. ग्रीक भाषा बोलण्यांत येऊं लागली. ग्रीक पद्धतीनेंच उत्सव साजरे करूं लागले. परंतु हें एकीकरण निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या प्रमाणावर झालें. सीरिया प्रांत लवकर व पूर्णपणें ग्रीक संस्कृतीच्या कह्यांत आला. परंतु जुडिया प्रांत शेवटपर्यंत तीपासून अलग राहिला.

ईजिप्त देशामध्यें कित्येक ग्रीक सरदार, उच्च कुलांतील स्त्रीपुरुष व विद्वान लोक पुष्कळ दिवसांपासून रहात असत. अलेक्झांडरपासून ऑगस्टसपर्यंत अलेक्झांड्रिया हें वाङ्मयाचें व विद्वत्तेचें केंद्र होतें. तेथें पहिल्या टॉलेमीनें येथील पदार्थसंग्रहालय व विद्यालय यांची स्थापना केली. व त्यावेळीं दुसरी कोणतीहि जागा नसल्यामुळें सर्व विद्वान लोक तेथें जमा होऊं लागले. या कालामध्यें संशोधनाचें व वर्गीकरणाचें कार्य विशेषतः चालू होतें. या काळच्या काव्यामध्येंहि स्फूर्ति अथवा कल्पनेपेक्षां बाह्यांगाकडेच विशेष लक्ष्य दिलेलें असतें. याचीं उदाहरणें म्हणजे अपोलोनिअस ऱ्होडिअस याचें महाकाव्य व ॲरॅटस आणि निकॅंडर यांचीं ज्योतिष व वैद्यक यांवरील काव्यें हीं होत. या काळांतली शेरिअन गोपगीतें हीं फार आल्हादकारक आहेत. या प्रकारचीं काव्येंहि लिहिण्यांत थिऑक्रिटस हा अग्रगण्य आहे. परंतु याच्या काव्यांतहि कृत्रिमता दिसून येते. वर लिहिल्याप्रमाणें या कालांतलें संशोधनाचें काम व शास्त्रीय विषयांवरील वाङ्मय हीं फार महत्वाचीं आहेत. ॲरिस्टार्केस यानें पूर्वार्ध ग्रंथ तपासून शुद्ध करण्याचें काम केलें. याच्या मागून येणाऱ्या ग्रंथकारांनी यांचेंच काम पुढें चालवून व्याकरणशास्त्राचा पाया घातला. पहिलें ग्रीक व्याकरण डायोनेशिअस थ्रॅक्स याचें आहे. याच वेळेस

भाषांतरें करण्याचेंहि काम झपाटयानें चाललें होतें. जुन्या करारांचें भाषांतर याच वेळेस झालें. एरॅटोस्थेनीस यानें सनवार माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला व याचेंच परिणत स्वरूप मॅनेथोनें लिहिलेला ईजिप्तचा इतिहास व बेरॉसस यानें लिहिलेला खाल्डियाचा इतिहास होय. सोटर टॉलेमी याच्या कारकीर्दींत युक्लिड हा ॲलेक्झांड्रिया येथें होता. 'हेरोफिलस' व 'एरिसिस्ट्रेटस' हे प्रख्यात वैद्य व इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ते होते व यांनीं वैद्यकावर बरेच ग्रंथ लिहिले आहेत.

रोमन लोकांनीं ग्रीस देश जिंकल्यावर जरी रोमन संस्कृतीवर ग्रीक संस्कृतीचा पगडा पूर्णपणें बसला तरी ग्रीस हें कांहीं जगांतील विद्वत्तेचें केंद्र राहिलें नाहीं. रोमन साम्राज्याच्या कालांत अथेन्स येथील विद्यालयाची कीर्ति सर्वत्र कायम होती. परंतु हळूहळू विद्वान् लोक रोमकडे जाऊं लागले. रोममध्यें ग्रीक वाङ्मयानें ख्रि. पू. २ ऱ्या शतकांतच कायमचें ठाणें दिलें होतें. 'सल्ला' यानें कांहीं ग्रीक पुस्तकें रोममध्यें अथेन्स येथून आणलीं. सिसरो व ॲटिकस यांनीं ग्रीक पुस्तकांचा मोठा संग्रह केला. ग्रीक भाषेचें ज्ञान प्रत्येक रोमन नागरिकास अवश्यक झालें. सीझर यानें ज्या ग्रंथसंग्रहालयाची कल्पना काढली व ऑगस्टस यानें ज्याची स्थापना केली त्यांत लॅटिन व ग्रीक असे ग्रंथसमूहाचे दोन मुख्य भाग होते. टायबेरिअस वगैरे बादशहांनीं हा ग्रंथ-समूह बराच वाढविला. हळूहळू रोम शहर ॲलेक्झँड्रिया शहराचें प्रतिस्पर्धी झालें व तेथें विद्वान लोकहि चोहोंकडून जमा होऊं लागले व त्यांची तेथें चहा व सन्मान होऊं लागला व त्यांस उत्तेजन मिळूं लागलें. ग्रीक वाङ्मयाच्या विशेषतः वक्तृत्व, ग्रंथनिरीक्षण, इतिहास व तत्वज्ञान अंगांची वाढ रोम येथेंच झाली.

यांपैकीं लोकसत्ताक राज्याच्या अमदानींतिल कालांत प्रथम आपणास पॉलिबिअस याच्या रोमन स्वारीचा इतिहास आढळतो. यांच्यामध्यें ग्रीक नागरिकाचें पाणी आढळतें. यानंतरच्या शतकांत डायोडोरस सिक्युलस याचा जगाचा इतिहास बाहेर आला. या इतिहासांत केवळ हकीकत सांगण्यापलीकडे ग्रंथकारानें कांहीं केलेलें दिसत नाहीं. ऑगस्टसपासून जस्टिनिअनपर्यंतच्या कालांतलें रोमन साम्राज्यांतील ग्रीक वाङ्मय हें जास्त सर्वांगी दिसतें. यावेळीं ग्रीक भाषेचा प्रसार फार दूरवर झालेला होता. परंतु या वाङ्मयामध्यें एक गोष्ट दिसून येते ती ही कीं, यांपैकीं मूळ अथवा अस्सल असा एकहि ग्रंथ आढळत नाहीं. याला ल्युकन हाच काय तो अपवाद आहे.

या वेळच्या गद्यवाङ्मयांत (१) इतिहास, भूगोल व चरित्रें, (२) टीकात्मक व शास्त्रीय वाङ्मय, (३) वक्तृत्व व उच्च सारस्वत (४) आणि तत्वज्ञान इतके प्रकार आढळतात.

इतिहासांत डायोनिशिअस, कॅशिअसडायो वगैरे ग्रंथकार प्रमुख आहेत. भूगोलामध्यें निकाया येथील हिपार्कस, स्ट्रॅबो, टॉलेमी, वगैरेंचीं नांवें आढळतात. चरित्रें विशेषतः प्लुटार्च, डायोजिनस, लारटियस, फिलोस्ट्रेटस यांनीं लिहिलीं. ग्रंथसंशोधन व टीका लिहिण्याचें काम ॲलेक्झँड्रिया येथें चालूच होतें. यांपैकीं जुलिअसपोलक्स, हार्पोक्रेटिअन यांचे कोश, हेफिस्टिऑन याचा छंदःशास्त्रावरील ग्रंथ, गॅलन याच्या प्लेटोवरील टीका हे ग्रंथ प्रमुख आहेत. त्याप्रमाणेंच अथेनिअस, एइलियन व स्टोबिअस यांचे ग्रंथहि महत्वाचे आहेत. वक्तृत्वावर हरमॅगोरास, हरमोजिनिस, कशिअस लाँगिनस यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. सोफिस्ट लोकांपैकीं डायोक्रिसोस्टोम एलिअस, ॲरिस्टाइड्स वगैरे प्रसिद्ध आहेत. ल्यूशिअन याचेहि ग्रंथ प्रसिद्ध आहेत. तत्वज्ञानामध्यें एपिक्टेटस आणि मार्कस आरेलियस यांच्या नांवांचा उल्लेख करणें अवश्य आहे. यांचें तत्वज्ञान स्टोइक पद्धतीचें असे.

ग्रीक काव्यामध्यें या कालांत नांव घेण्यासारखें एकहि काव्य दिसत नाहीं. बेब्रिअस यानें ईसापच्या गोष्टी कवितारूपांत लिहिल्या. सिबिलाइन आरेकल्स याच सुमारास (ख्रि. पू. १५०-इ. स. ७००) तयार होत होतीं. या वेळचे कांहीं काव्यसमुच्चय फार नावाजण्यासारखे आहेत.

इसवी सनाच्या चवथ्या शतकांत ग्रीक वाङ्मयाचा ऱ्हास फार जोरानें सुरू झाला. दिवसेंदिवस ख्रिस्ती धर्मोपदेशकांची या प्राचीन ग्रीक वाङ्मयाकडे वक्र दृष्टी वळूं लागली. ख्रिस्ती सांप्रदायिक नवें ग्रीक वाङ्मय तयार होऊं लागलें होतें. त्यामुळें गृहस्थ वर्ग ग्रीक वाङ्मयापासून हळूहळू दूर होऊं लागला. ग्रीक भाषाहि रोमनसाम्राज्यकालापर्यंत शुद्ध राहिली होती ती दूषित होऊं लागली. शेवटीं इ. स. ५२९ च्या जस्टीनिअनच्या हुकुमानें सर्व ख्रिस्त संप्रदायाखेरीज असणारीं ग्रीक विद्यालयें कायमचीं बंद झालीं.

बायझंटाइन वाङ्मय.—रोमच्या पूर्वेकडील साम्राज्याच्या कालांत ग्रीक भाषेमध्यें जें वाङ्मय तयार झालें त्यास बायझंटाइन वाङ्मय हें नांव देतात. या वाङ्मयाचा आरंभ जरी कांहीं लोक जस्टीनिअन राजापासून धरतात तरी तसें समजण्यास पुरेसा आधार नाहीं. याचा आरंभ वास्तविक कॉन्स्टन्टाइन राजापासून होतो व १४५३ त कॉन्स्टांटिनोपल शहर तुर्कांच्या हातांत गेल्यावर अस्त होतो. या बादशहानें ख्रिस्ति संप्रदायाचा राजधर्म म्हणून स्वीकार करून कॉन्स्टँटिनोपल येथें नवीन गादी स्थापिली. याच सुमारास ग्रीक भाषेमध्येंहि फरक होऊन पूर्वींची संगीताच्या धर्तीवरची भाषा जाऊन साधी संभाषणासारखी भाषा प्रचारांत आली.

तथापि सामान्यतः देशाच्या राजकीय अथवा धार्मिक इतिहासामध्यें जसा कांहीं कारणामुळें एकदम फरक होतो तसा बौद्धिक परंपरेमध्यें एकदम होत नाहीं. याच कारणामुळें प्राचीन ग्रीक वाङ्मयाचें वर्चस्व बरेच दिवस कायम राहिलें. याप्रमाणें नवीन (ख्रिस्त) सांप्रदायिक वाङ्मयास व नवीन समजुतींस व कल्पनांस आपलें वर्चस्व सर्वत्र स्थापन

करण्यास बरींच शतकें लागलीं. अथेन्स येथील विद्यापीठ इ. स. ५२९ पर्यंत बंद झालें नव्हतें. याप्रमाणें ४ थ्या शतकापासून ७ व्या शतकापर्यंतचा काल हा प्राचीन व मध्ययुगीन कालांतील संक्रमणकाल होय. या कालांत यद्यपि नव्याजुन्या कल्पना एकत्र वावरत असून त्यांची चढाओढ चालली होती तरी नव्या कल्पनांचा उत्कर्ष स्पष्टपणें दिसत होता.

पश्चिम साम्राज्याप्रमाणें रोमनपूर्वसाम्राज्यांत संस्कृतींचा मिलाफ चांगला झाला नव्हता. पश्चिम साम्राज्यांत रोमन व ग्रीक संस्कृतींचा मिलाफ होऊन जी रोमन संस्कृति तयार झाली. तिचा प्रसार तेथील राज्यकर्त्यांनीं सर्व जित राष्ट्रांत करून सर्व साम्राज्याची भाषा लॅटिन व सर्वत्र रोमन संस्कृतीचा पूर्णपणें प्रसार केला. ख्रिस्त सांप्रदायिक प्रार्थना सर्वत्र लॅटिन भाषेमध्यें होऊं लागली व त्यामुळें हें एक जबरदस्त बंधन त्या सर्व देशांमध्यें ऐक्य घडवून आणण्यास कारण झालें. पूर्वसाम्राज्याची स्थिति याच्या उलट होती. तेथें ग्रीक संस्कृति सर्वत्र पसरली असून ग्रीक भाषा सार्वत्रिक असून राजभाषा मात्र लॅटिन होती पूर्वेकडील निरनिराळ्या जित राष्ट्रांनीं आपलें राष्ट्रीयत्व कायम ठेवलें होतें व तसें करण्यास ते समर्थहि होते. या साम्राज्यांतील निरनिराळे भाग जरी ख्रिस्त संप्रदायानुयायी होते तरी त्यांनीं बायबलचें आपआपल्या भाषात भाषांतर करून घेतलें होतें व त्यांच्या प्रार्थनाहि त्यांच्या जन्मभाषेंतच चालत. यामुळें पुढें ग्रीक संप्रदायामध्यें निरनिराळे पंथ निघाले. या लोकांनीं ग्रीक संस्कृतीचा पूर्णपणें स्वीकार केला नव्हता. त्यामुळें पूर्वसाम्राज्यास केव्हांहि एकत्व आलें नाहीं.

पूर्वसाम्राज्यामध्यें जरी ग्रीक संस्कृति विशेष प्रचलित होती व पुष्कळ काळपर्यंत राजा व मंत्री हे सर्व जरी ग्रीक होते तरी त्यांतील रोमन वर्चस्व पूर्णपणें केव्हांहि नष्ट झालें नाहीं. कायदेकानू व राज्यकारभाराची पद्धति हीं पूर्णपणें रोमन होती व हीच पद्धति साम्राज्यावरील बिकट प्रसंगींहि तशीच कायम राहिली. कांहीं ग्रीक लोकहि आपणांस हेलेन्सच्या ऐवजीं रोमन्स म्हणवूं लागले. ग्रीक भाषेमध्येंहि न्याय व राज्यकारभारासंबंधींचे रोमन शब्द शिरले वाङ्मयामध्यें मात्र यांचा उपयोग होतां होईल तों टाळून त्यांच्या समानार्थी ग्रीक शब्द वापरीत.

ग्रीक संस्कृतीवर विशेष महत्वाचा परिणाम ख्रिस्ती संप्रदायानें घडवून आणला. परंतु हा परिणाम एकदम न होतां फार सावकाश झाला. परंतु याची पूर्वतयारी जुन्या दैवतांवरील विश्वास हळू हळू नाहींसा होऊन स्टोइक तत्त्वज्ञानाचा प्रसार होऊन, 'निओप्लेटोनिझम' च्या कल्पना अस्तित्वांत येऊन अगोदरच झाली होती. ख्रिस्ती संप्रदायामध्येंहि कांहीं जुन्या चाली तशाच चालू ठेवून बरेंच जुनें वाङ्मयहि सामील करण्यांत आलें. शिक्षणपद्धति तर जुनीच कायम राहिली प्राच्य संस्कृतीचाहि परिणाम या काळच्या ग्रीक वाङ्मयावर विशेष झाला. ज्या प्राच्य संस्कृतीचा ग्रीक संस्कृतीशीं संबंध आला तिचा आरंभ अलेक्झांडर याच्या स्वाऱ्यांपासून होतो. ईजिप्तमध्यें या संस्कृतीची वाढ विशेष होऊन ती बरेच दिवस टिकली. अलेक्झांड्रिया शहराच्या स्थापनेपासून तें अरब लोकांच्या हातांत पडेपर्यंत सुमारें १००० वर्षें ही संस्कृति ईजिप्तमध्यें टिकाव धरून होती. या देशानें ग्रीक वाङ्मयामध्यें फारच मोठी भर टाकली आहे.

सिरिआ व पॅलेस्टाइन हे प्रांत ईजिप्तनंतर ग्रीक संस्कृतीखालीं आले. परंतु ख्रिस्ती सांप्रदायिक वाङ्मय हें येथेंच जन्म पावलें.

एशियामायनरमध्यें टार्सस, सीझरिया वगैरे शहरें ग्रीक संस्कृति व वाङ्मय यांचीं केंद्रें होतीं. याच प्रांतांतून कॅपॅडोशिया येथील तीन धर्मोपदेशक बाहेर पडले या काळीं झालेल्या एकंदर ग्रंथकारांपैकीं साधारणपणें $\frac{9}{10}$ ग्रंथकार आशिया व आफ्रिका खंडांतूनच आलेले दिसतात व बाकीचे $\frac{1}{10}$ यूरोपमधील ग्रीस देशांतील दिसतात. त्यामुळें याचेळच्या वाङ्मयावर प्राच्य संस्कृतीचाहि ठसा उमटलेला दिसतो.

प्राचीन कालानंतरच्या अर्वाचीन ऐतिहासिक कालापर्यंतचें वाङ्मय बहुतेक कॉइनें नावाची जी भाषा अलेक्झांडरच्या कालीं प्रचारांत आली त्याच भाषेंत लिहिलेलें आढळतें. हीच भाषा बहुतेक सार्वत्रिक असून सर्व वाङ्मयामध्यें आढळते. ही भाषा लेखनामध्यें पुष्कळ दिवसपर्यंत जरी उपयोगांत येत होती तरी तिच्यामध्यें अथेन्स येथील भाषेपासून तो तहत अर्वाचीन नव्या कराराच्या भाषेपर्यंतचीं निरनिराळीं रूपें आढळतात. यावरून जी भाषा लिहिण्यांत वापरीत असत तीच भाषा बोलण्याच्या प्रचारांत असावी असें वाटत नाहीं. कारण प्रत्येक चालू भाषेप्रमाणें ग्रीक भाषेची जी प्रचारांतील भाषा तिच्या रूपामध्यें वरचेवर फरक होत होता. व त्याबरोबर तिच्यांतील शब्द व तिचें व्याकरणहि बदलत होतें. व त्याचप्रमाणें व्यवहारांतील भाषा व ग्रंथांची भाषा यांमध्यें पुष्कळसें अंतर पडलें. डायोनिसिअस यानें ही ग्रंथांची भाषा पुन्हां ॲटिक भाषेच्या वळणावर नेण्याचा प्रयत्न केल्यामुळें त्या भाषेला उलट गति मिळाली. कांहीं ग्रंथकारांनीं 'प्रचारांतील' भाषेंतच ग्रंथरचना केली. परंतु या तऱ्हेचे ६ व्या शतकापासून १० व्या शतकापर्यंतचे सर्व प्रयत्न फुकट जाऊन जुन्या भाषांचा उद्धार करण्याची चळवळ ९ व्या शतकांत सुरू झाली; व 'काम्नेनी' व पॅलिऑलॉगी' पर्यंत तशीच ती जोरांत चालली. पश्चिमेकडे यावेळीं सिसरोच्या काळची लॅटिन भाषा प्रचारांत आणण्याची खटपट चालली होती. परंतु तिचा तादृश परिणाम झाला नाहीं. यामुळें या काळच्या (११ व्या पासून १५ व्या शतकापर्यंतच्या) सर्व ग्रंथकारांची भाषा प्राचीन ग्रीक आहे. यामुळें प्रचारांतील भाषा व ग्रंथांची भाषा यांमध्यें फार मोठा फरक पडला व त्याचा

परिणाम वाङ्मयावरहि झाला. बाराव्या शतकांत कांहीं ग्रंथकारांनीं देशी भाषेंत ग्रंथरचना केली. ग्रीक भाषेंतील ग्रंथांचीं भाषांतरें इटालियन, फ्रेंच वगैरे भाषांत केलीं. १६ व्या व १७ व्या शतकांत पुन्हां देशी भाषांस ऊर्जितावस्था आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. परंतु १९ व्या शतकांत पुन्हां जुन्या भाषेच्या जीर्णोद्धारार्थ चळवळ सुरू होऊन हा प्रश्न मागें पडला. यामुळें २० व्या शतकांतील ग्रंथांतहि कांहीं ग्रीक शब्दांचीं रूपें अशीं सांपडतात कीं तीं १० व्या शतकापूर्वीच प्रचारांतून गेलीं होतीं. याप्रमाणें ग्रीक वाङ्मयाची स्थिति अरबी अथवा चिनी वाङ्मयाप्रमाणेंच आहे. या कालामध्यें ख्रिस्त संप्रदायाचा सर्वत्र जोरानें प्रसार होत होता त्यामुळें या कालांतील वाङ्मयामध्यें ख्रिस्त सांप्रदायिक वाङ्मयासच अग्रस्थान मिळालें. याच्या खालोखाल ऐतिहासिक वाङ्मय येतें. त्या वाङ्मयाची वाढ साम्राज्याच्या अस्तापर्यंत सारखी चालू होती. इतर प्रकारच्या गद्य वाङ्मयाकडे म्हणजे भूगोल, तत्वज्ञान, वक्तृत्व व भौतिक शास्त्रें या विषयाकडे दुर्लक्ष्यच दिसून येतें. या विषयांवरील पूर्वीचें वाङ्मय मात्र यांनीं जतन करून ठेवलें. काव्यामध्येंहि ख्रिस्त सांप्रदायिक काव्यें अग्रगण्य आहेत. लौकिक काव्यामध्यें चुटक्यांची मात्र बरीच वाढ झालेली दिसते. इतराहि कांहीं चांगलीं काव्यें नजरेस पडतात.

ख्रिस्त सांप्रदायिक वाङ्मयाची वाढ ४ थ्या शतकामध्यें फार झाली. कारण यावेळीं ख्रिस्त संप्रदाय हा राजधर्म झाला व त्याच सुमारास ॲरिअस याच्या मताचा प्रचार होत होता व त्याच्या खंडनाकरितां 'ॲथॅनेशिअस' सारख्या ग्रंथकारांनीं बरेच ग्रंथ लिहिले. 'युसेबिअस' यानें सांप्रदायिक इतिहासास आरंभ केला व ॲंटोनिअस यानें ईजिप्तमध्यें मठांची स्थापना केली. यावेळीं प्लेटोच्या तत्वज्ञानाचा अस्त होत जाऊन ख्रिस्त सांप्रदायिक तत्वांचा प्रसार होत होता, हें विशेषतः 'सायरन' येथील 'सायनेशिअस' याच्या ग्रंथावरून स्पष्ट दिसतें. या कालांत कॅपॅडोशिआ येथील तीन धर्मोपदेकांनीं विशेष कार्य केलें. ते महात्मा बॅसिल, निस्सा येथील ग्रेगरी, व नॅझिॲंझस येथील ग्रेगरी होत.

चवथ्या शतकानंतर सांप्रदायिक वाङ्मयाचा हळू हळू ऱ्हासच होत गेला. यानंतर निरनिराळया नवीन निघणाऱ्या पंथांच्या मतखंडणार्थ कांहीं ग्रंथकारांनीं लेखणी उचललेली दिसते. ५ व्या ६ व्या शतकांत 'मोनोफिसाइट्स' पंथांतील लोकांनीं वाङ्मयामध्यें पुष्कळ भर टाकली. ७ व्या शतकांत 'मोनोथेलाइट्स' या पंथानें ही कामगिरी केली व ८ व्या शतकांत इकॉनोक्लॅस्टस यांनीं व नवीन महम्मदी संप्रदायानें ही कामगिरी केली. ६ व्या शतकामध्यें बायझंटाइन येथील 'लिओन्टिअस' या ग्रंथकारानें प्रथम या सांप्रदायिक वाङ्मयामध्यें ॲरिस्टॉटल याच्या व्याख्यांचा उपयोग केला. गाझा येथील 'प्रोकोपिअस' यानें ग्रंथसंशोधन व टीका लिहिण्याचें काम केलें. 'जोॲनिस क्लिमॅकस' यानें निवृत्तीपर वाङ्मय लिहिलें. जोॲनिस मॉस्कस याच्या ग्रंथावरून त्यावेळच्या मठांतील भिक्षूंची रहाणी त्यांच्याच शब्दांमध्यें वर्णन केल्याप्रमाणें दिसतें. दमास्कस येथील जॉन यानें इकॉनोक्लॅस्ट या पंथाविरुद्ध लेख लिहिण्याचें काम करून शिवाय 'ज्ञाननिर्झर' या नांवाचा एक विद्वत्ताप्रचुर ग्रंथ लिहिला. ग्रीक ख्रिस्त संप्रदायामध्यें हा ग्रंथ आदर्श मानतात. यानंतरचें सांप्रदायिक वाङ्मय म्हणजे पूर्वीच्याच ग्रंथावरील टीका व संशोधनात्मक स्वरूपाचें होतें. या कालच्या लेखकांमध्यें बादशहा सहावा लिओ, थीओडोरस, फोटिअस वगैरें नांवें प्रामुख्यानें पुढें येतात. कामेनी बादशहांच्या अंमलाखालीं सांप्रदायिक वाङ्मयास पुन्हा थोडेंसे चालन मिळालें. यावेळीं झिगॅबोनस याचा 'पेनोप्ली' हा ग्रंथ बाहेर आला. महंमदी संप्रदायाच्याविरुद्ध बादशहा मॅन्युअल दुसरा पॅलिऑलोगस यानें पुष्कळ चळवळ केली. शेवटीं शेवटीं सर्व सांप्रदायिक वाङ्मयाचा विषय रोमशीं ऐक्य करावें कीं नाहीं हा होता. ऐक्याच्या बाजूनें बेसॅरिअन हा असून त्याचा प्रतिस्पर्धी मार्कस युजेनिकस हा होता.

या कालांत साधुसंतांचीं चरित्रें व त्यांचीं कृत्यें वर्णन करणारें एक स्वतंत्रच वाङ्मय तयार झालें. यापैकीं बरेंचसें वाङ्मय सिंथियन मेटॅफ्रेस्टस यानें संपादन केलें आहे. अलेक्झांड्रिया येथील अथॅनॉशिअस यानें सेंट ॲंथनी याचें चरित्र लिहिलें आहे.

ग्रीक काव्यरचनेच्या ठराविक स्वरूपामुळें ख्रिस्त सांप्रदायिक काव्याच्या वाढीस आरंभीं बराच अडथळा झाला. याचा आरंभ अलेक्झांड्रिया येथील क्लेमेंटपासून त्याच्या पेडॅगॉग्सबरोबर जीं कांहीं हस्तलिखित स्तोत्रें चालत आलीं तेव्हांपासून होतो. यानंतर 'कुमारीचें गीत' बाहेर आलें. निझीॲंझस येथील ग्रेगरी यांचीं गीतें क्लिष्ट असल्यामुळें प्रार्थनेंत सामील झालीं नाहींत. यानंतर 'समगतिक' कविता प्रचारांत आल्या व या कविता प्रचलित भाषेस योग्य असल्यामुळें लोकांस आवडूं लागल्या. प्रथम स्तोत्रें अस्तित्वांत आलीं व त्यांची हळू हळू वाढ होऊन ६ व्या शतकामध्यें यांची वाढ पूर्ण होऊन या कालचीं विशेषतः रोमॅनोस याचीं स्तोत्रें सर्व स्तोत्रांमध्यें श्रेष्ठ पद पावलीं. ग्रीक संप्रदायामध्यें 'ॲकॅथिस्टस' हें कुमारीवरचें काव्य 'सर्गिअस' यानें लिहिलें होतें असें म्हणतात. यानंतर 'कॅनन्स' हीं गीतें प्रचारांत आलीं. हीं प्रथम क्रीट येथील आर्चबिशप ॲंड्रिअस यानें प्रचारांत आणलीं असें म्हणतात. दमास्कसचा, 'जॉन' व जेरुशलेम येथील 'कॉसमस' यांनीं या प्रकारचीं काव्यें पुष्कळ लिहिलीं. यांचीं काव्यें फार लोकप्रिय होऊन त्यांवर टीकाहि बऱ्याच झाल्या. यानंतर दुसरेहि कांहीं नांवाजण्यासारखे कवी झाले. रोमजवळील ग्रोटाफेरॅटा याचा मठ हें या काव्याचें आगर होतें.

लौकिक वाङ्मयामध्यें विशेषतः ऐतिहासिक वाङ्मयाची वाढ विशेष झाली. कारण ग्रीक लोकांनीं आपल्या निरनिराळ्या

पालटलेल्या स्थितीमध्यें आपला पूर्वीपासूनचा इतिहास लिहून ठेऊन तो पुढच्या पिढीच्या हवाली केला आहे. यामुळें यांचें ऐतिहासिक वाङ्मय हिरोडोटसपासून दुसऱ्या सुलतान महमुदापर्यंत अखंड चालू राहिलें. या ऐतिहासिक वाङ्मयाचे दोन भाग करतां येतात. (१) इतिहासकारानें आपल्याच कालाचा अथवा आपल्या पूर्वी नुकत्याच लोटलेल्या काळाचा लिहून ठेवलेला इतिहास; व (२)सर्व जगाचा संक्षिप्तरूपानें दुसऱ्या ग्रंथावरून तयार केलेला इतिहास या दुसऱ्या प्रकारचा खिस्ती सांप्रदायिक दृष्टीनें विशेष उल्लेख करण्यासारखा इतिहास म्हटला म्हणजे जस्टस टायबोरियस याचा होय. याचा आरंभ मोझेसपासून होत असून तो इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत लिहिला गेला होता. हा अनुपलब्ध आहे.

या कालांतील तत्कालीन इतिहास हे पूर्वीच्या इतिहासांप्रमाणेंच आहेत. मात्र यांमध्यें खिस्ती सांप्रदायिक छटा मारते. कॉन्स्टन्टाइनच्या कालापासून साम्राज्याचा इतिहास लिहिण्याचें काम—साम्राज्य जरी रोमन होतें तरी–ग्रीक लोकच करीत. यापैकीं ' युनॅपिअस ', ' ऑलिंपिओडोरस ' 'प्रिस्कस'वगैरेंच्या इतिहासांचे फक्त कांहीं भाग शिल्लक आहेत. ६ व्या शतकामध्यें या वाङ्मयास बरेंच चालन मिळालें. ' प्रोकोपिअस ' व ' अगॅथिअस ' यांनीं ' जस्टीनिअन'च्या कारकिर्दीचें वर्णन केलें व ' थिओफेन्स ,' ' मिनॅन्डर प्रोटेक्टर ' वगैरेनीं या शतकाच्या उत्तरार्धाचा इतिहास लिहिला. ' इव्हॅग्रियस ' यानें खिस्त संप्रदायाचा ४३१—५९३ पर्यंतचा इतिहास लिहिला. यानंतर दहाव्या शतकापर्यंत नांव घेण्यासारखा एकहि ग्रंथ तयार झाला नाहीं. सातवा कॉन्स्टंटाइन पोर्फिरो जेनिटस बादशहा यानें या वाङ्मयास उत्तेजन दिलें व याच्या कारकीर्दीत जोसेफ जेनेशिअस यानें ८१३—८८६ पर्यंतचा इतिहास लिहिला. ' जोसेफ कॅमेनिआटा ' यानें थेसोलोनिका शहराचा पाडाव कोर्सेयर्स यानें केल्याचें वर्णन केलें आहे. तें मानवेतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. यानंतरच्या कालाचा इतिहास लिहिण्याचें काम निरनिराळ्या ग्रंथकारांनीं केलें आहे. खिस्ती धर्मयुद्धांचा इतिहास निरनिराळ्या चार ग्रंथांत आढळतो. यानंतरचा इतिहास कांहीं ग्रंथकारांनीं लिहून ठेवला आहे. शेवटीं पूर्वसाम्राज्य व तुर्क यांच्या युद्धांचा इतिहास तीन निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळया पद्धतीनें लिहिलेला आढळतो.

बायझंटाइन कालांतील जगाच्या इतिहासाचें महत्त्व विशेषतः त्यांनीं पूर्वीच्या नष्ट झालेल्या इतिहासांत कायम ठेवलें या दृष्टीनें फार आहे.वाङ्मयदृष्ट्या यांचें महत्त्व फारसें नाहीं. परंतु भाषेच्या इतिहासाच्या दृष्टीनें हे ग्रंथ उपयुक्त आहेत. या ग्रंथांत कांहीं चित्रेंहि असत हे इतिहास बहुतकरून मठांतील जोग्यांनीं लिहिलेले असत. व त्यांचा उद्देश आपल्या अनुयायांमध्यें लहान लहान ग्रंथ लिहून ज्ञानाचा प्रसार करण्याचा होता. यामुळें या ग्रंथांचाहि प्रसार फार दूरवर झाला. यांच्यापैकीं सर्वांत जुनी बखर मलालास (६ वें शतक) याची आहे. ९ व्या शतकाच्या आरंभाच्या सुमारास जॉर्जिअस सिन्सेलस यानें एक जगाच्या आरंभापासून इ. स. २८४ पर्यंतच्या कालाची संक्षिप्त बखर लिहिली. याच्याच विनंतीवरून थिओफेन्स कन्फेसर यानें ही बखर इ. स. ८१३ पर्यंत आणली. यानंतर निरनिराळ्या ग्रंथकारांनीं हिचा धागा १०५७ पर्यंत आणल्यानंतर जॉर्जिअस सेड्रेनस यानें आपल्या जगाच्या बखरींमध्यें या सर्व बखरींचा समावेश केला. यानंतर जॉन झोनॅरस यानें आपली जगाची बखर लिहिली. मायकेल ग्लायकस याची बखर याच काळीं झाली. यानंतर मॅनॅलस यानें कवितात्मक बखर लिहिली. अशाच तऱ्हेची एक बखर एफ्रेअस यानें लिहिली आहे.

भूगोल व भूपृष्ठवर्णन या विषयांकडे रोमन लोकांप्रमाणें यांचेंहि दुर्लक्ष दिसतें. नौकानयन, प्रवास, यात्रांचे मार्गदर्शक वगैरे ग्रंथ आढळतात व कांहीं स्थळांच्या याद्या दिसतात. या काळांतील कॉसमॉस इंडिकोप्ल्युस्टस याचा ' खिस्ती भूपृष्ठवर्णन ' हा ग्रंथ उपलब्ध आहे. ' कॉन्स्टांटिनोपलचा प्राचीन इतिहास ' या ग्रंथांत कॉन्स्टांटिनोपलचें भूपृष्ठवर्णन आलें आहे.

ग्रीक तत्वज्ञानामध्यें रोमन साम्राज्याच्या काळांत दोन पंथ निघाले. ते 'निओपायथागोरिॲनिझम' आणि ' निओप्लेटॉनिझम'होत. यांपैकीं दुसऱ्या पंथानें खिस्ती धर्मप्रसारास बराच प्रतिबंध केला. त्यांच्यापैकीं शेवटचा तत्ववेत्ता प्रोक्लिअस हा अथेन्स येथें होऊन गेला (सु. ४८५). जस्टिनिअन यानें इ. स. ५२९ मध्यें अथेन्स येथील विद्यापीठ बंद केल्यामुळें या तत्वज्ञानाच्या प्रसारास जबरदस्त धक्का पोहोंचला. यानंतर तात्विक वाङ्मय ॲरिस्टॉटलचीं तत्वें खिस्ती संप्रदायास लागू करून त्यांस व्यवस्थित रूप देण्यामध्यें व पूर्वींच्या ग्रंथांवर टीका लिहिण्यामध्यें तयार झालें.बायझांटिअन येथील ' लिऑंटिअस ' यानें आधींच ॲरिस्टाटलचा प्रवेश केला होता.परंतु खिस्त सांप्रदायिक तत्वज्ञानाचा वास्तविक आरंभ दमास्कस येथील जॉन यानें केला. परंतु त्याचें हें काम लवकरच बंद पडलें. यानंतर ११ व्या शतकात या वाङ्मयाचें पुनरुज्जीवन झालें व मायकेल सेलस यानें प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या मताचा अभ्यास पुनः सुरू केला. वक्तृत्वाचें अध्यापनाच्या दृष्टीनें महत्व वाटून या काळांत वाङ्मयाच्या या अंगाची वाढ विशेष झाली. परंतु त्यांत कृत्रिमता अतिशय दिसून येते. भाषेची ठराविक पद्धति व नियम अक्षरशः पाळण्याची चाल पडल्यामुळें त्याचा इतर वाङ्मयावरहि अनिष्ट परिणाम झाला. व भाषेमधील वैयक्तिक वैचित्र्य व साधेपणा यांचा लोप झाला. तथापि ' फिलोपॅट्रिस ' 'टिमॅरिऑन' व ' जर्नी टु दि अंडर वर्ल्ड ' (पाताळाचा प्रवास) हे ग्रंथ नांवाजण्यासारखे आहेत. यांशिवाय ' मायकेल अकॉमिनेटस ' याचीं कांहीं भाषणें प्रसिद्ध आहेत.

या काळांत जें एकंदर टीकात्मक वाङ्मय तयार झालें त्याचें भाषाशास्त्रदृष्टीनें महत्व फार आहे. फेक्टिअस याचा

लायब्ररी हा ग्रंथ याचें उदाहरण आहे. यानंतर सुइडास याचा 'लेक्झिकन' हा ग्रंथ येतो. 'युस्टॅथिअस' व 'जोहॅनिस झेझस' त्यांचेहि ग्रंथ महत्वाचे आहेत. मात्र यांच्यामध्यें पूर्ण विरोध आहे. दुसरेहि कित्येक वैयाकरण व टीकाकार होऊन गेले.

जस्टिनिअन यानें सर्व कायदा एकत्र केल्यावर त्याचें मूळचें रोमन स्वरूप व भाषा जाऊन त्याचें रूपांतर होण्यास आरंभ झाला. इन्स्टिटयूट्स व डायजेस्ट यांचीं ग्रीक भाषांतरें होऊन 'नॉव्हेल्स' ग्रीकमध्यें निघूं लागलीं. परंतु मॅसिडोन घराण्याच्या कारकीर्दींत पुनः जस्टिनिअन याचा कायदा अमलांत आणण्याची प्रवृत्ति दिसूं लागली. परंतु सहावा लिओ व सातवा कॉन्स्टंटाइन याच्या कारकीर्दींत सर्व कायद्यांचें 'बॅसिलिका' या नांवानें एकीकरण होईपर्यंत तीस व्यवस्थित स्वरूप आलें नाहीं. पूर्व साम्राज्यामध्यें जस्टिनिअन याचें 'कार्पस ज्यूरीस' जाऊन त्याची जागा 'बॅसिलिका' कायद्यानें घेतली. निवळ सांप्रदायिक नियम प्रथम 'कॅनन'मध्यें असत. ते लौकिक कायद्यांमध्यें सामील केले जाऊन 'नोमो-कॅनॉन' हा ग्रंथ तयार झाला. 'थिओडोरस बेल्सस' यानें १०९० मध्यें संपादन केलेली याची प्रत फार महत्वाची आहे.

ग्रीक लोकांमध्यें गणित व ज्योतिष या विषयांच्या ज्ञानाचें पुनरुज्जीवन होण्यास इराणी व अरबी लोकांचा परिचय कारण झाला. 'टॉलेमी' याचा 'मेटसिंटॅक्सिस' हा ग्रंथ 'अलमॅगेस्ट' या नांवानें पूर्वेकडे प्रचलित होता. इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या अखेरीस ग्रीक लोकांस इराणी ज्योतिषाचें ज्ञान झालें. १४ व्या शतकाच्या आरंभीं 'जॉर्जिअस क्रिसोकोका' आणि 'ऐझाक जार्जिअस' यांनीं इराणी ग्रंथांच्या आधारें ज्योतिषविषयक ग्रंथ लिहिले. यानंतर ग्रीक लोकांचें लक्ष्य आपल्या मूळच्या ग्रंथाकडे गेलें. युद्धकलेमध्यें यांचें बरेंच प्राविण्य दिसतें. या विषयावर सहावा लिओ याच्या नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे.

लौकिक काव्यें सर्व पूर्वींच्या वळणावर गेलेलीं आढळतात. महाकाव्यें विशेषतः ग्रीक, प्रचलित भाषेमध्यें झालीं. परंतु त्यापूर्वीहि कांहीं काव्यास महाकाव्य हें नांव देतां येईल. 'नानस'याचें 'डायोनिससचें हिंदुस्थानास प्रयाण' हें काव्य व तोच क्रिस्ती झाल्यावर त्यानें सेंट जॉन याच्या शुभ वर्तमानावर लिहिलेली टीका हीं काव्यें या प्रकारचीं होत. 'जॉर्जिअस पिसिडस' याचें व 'थिओडोशिअस' याचें काव्यहि याच प्रकारचें आहे. अकराव्या शतकानंतर सांप्रदायिक व्याकरण, फलज्योतिष, वैद्यक, वगैरे विषयांवर व ऐतिहासिक आणि बोधपर कविता प्रचारांत आल्या. कांहीं अद्भुत काव्येंहि आढळून येतात. हीं विशेषतः १२ व्या शतकांत 'कॉम्नेनी' राजांच्या कारकीर्दींत आढळतात. या कालांत लौकिक काव्यांमध्यें 'लिरिक' काव्यांची मुळींच वाढ झाली नाहीं. चुटके मात्र पुष्कळ लिहिलेले आढळतात. सार्वजनिक नाटक प्रयोगांच्या अभावामुळें नाटकांची वाढ होणें या कालांत अशक्यच होतें. कांहीं बोधपर संभाषणें मात्र आढळतात. 'क्रिस्ताचा छळ' हा ग्रंथ काय तो नाटक या नांवास पात्र असा या कालांत बाहेर पडला.

या कालांत प्रचलित अथवा देशभाषेंत लिहिलें गेलेलें वाङ्मय हें अगदींच अलग दिसतें. यामध्यें आपणास नवीन कल्पना व नवीन मध्यकालीन विषय आढळतात. या वाङ्मयामध्यें काव्य हें गुणामध्यें व विपुलतेमध्यें अग्रस्थान पटकावतें. याचा आरंभ १२व्या शतकापासून झाला. पंधराव्या शतकाच्या अखेरीस यमक प्रचारात आलें. या काव्याचें विषय विविध आहेत. राजधानीमध्यें बोधपर, स्तुतीपर विनंतीपर काव्यें प्रचलित असत. या तऱ्हेची रचना 'स्पॅनिअस' या काव्यामध्यें व 'मायकेल ग्लायकस' व 'थिओडोरस पेट्रोमस' या कवींनीं केलेली आढळते. यानंतर शृंगारिक काव्यें आढळतात. याखेरीज वनदेवतांच्या गोष्टी, प्रार्थना, संतचरित्र वगैरे विषयांवर कविता आढळते. व कांहीं महाकाव्येंहि दिसून येतात. याशिवाय प्राण्यांच्या अद्भुत गोष्टींवर कविता रचलेली आहे. 'डॉयजेनिस ॲक्रिटस' याचें वीररसप्रधान महाकाव्य प्रसिद्ध आहे.

गद्य वाङ्मयामध्यें हिंदुस्थानांतील 'सात शहाण्यांचें पुस्तक' याचें भाषांतर अवश्य उल्लेखिलें पाहिजे. याखेरीज हितोपदेशाचें अरबी 'कलिल व दिम्न' ग्रंथावरून भाषांतरहि प्रमुख आहे. याशिवाय जेरुशलेम व सायप्रस येथील ग्रीक कायद्यावरील पुस्तकें आढळतात. परंतु लवकरच या वाङ्मयाचा ऱ्हास होत गेला. व प्राचीन पद्धतीवर ग्रंथ लिहिण्याचाच प्रघात चालू राहिला. बायझंटाईन वाङ्मयाचें जगाच्या इतिहासामध्यें फार महत्वाचें स्थान आहे. रानटी लोकांचे एकामागून एक सारखे हल्ले होत असतांना पूर्वसाम्राज्यानें पूर्वींची बौद्धिक परंपरा एक हजार वर्षांवर सारखी चालू ठेवली व त्यांनीं मध्यकालीन संस्कृतीचा व वाङ्मयाचा पाया घातला. त्यांनीं अवगत ज्ञानाचा सर्वत्र प्रसार केला. व त्यांनीं आपल्या शिक्षणानें एक पूर्वयूरोप संस्कृति नवी निर्माण गेली. अखेरीस तुर्कांच्या भीतीनें यांनीं पळून येऊन आपल्या सर्व ज्ञानाचा पश्चिमेकडे प्रसार करून पाश्चिमात्यांमध्यें संस्कृतीचें बीजारोपण केलें.

अर्वाचीन वाङ्मयः—तुर्क लोकांनीं कॉन्स्टँटिनोपल शहर घेतल्याबरोबर त्यांचा अंमल जेवढ्या प्रांतावर बसला तेवढ्या प्रांतामधून ग्रीक संस्कृति व वाङ्मय यांची पूर्णपणें हकालपट्टी झाली. या शहरांतून जे ग्रीक विद्वान पळून दुसरीकडे जाऊन राहिले ते तेथीलच भाषा बोलूं लागले व त्याच भाषेंत ग्रंथरचना करूं लागले. परंतु ग्रीक भाषेमध्येंहि कांहीं ग्रंथ लिहित असत. यामुळें ग्रीक संस्कृतीचा व बौद्धिक परंपरेचा लोप झाला नाहीं व तिच्यामध्यें विशेषसा खंडहि पडला नाहीं. ग्रीक लोक व पश्चिमेकडील लोक यांचें धर्मयुद्धापासून

बरेचसें संघटन होऊं लागलें होतें व फ्रँक लोकांचें लिव्हंट-मध्यें व कॉन्स्टँटिनोपल येथें राज्य असल्यामुळें त्यांचा संबंध वरचेवर जास्त येऊं लागला होता. ख्रिस्त संप्रदायाचे जे दोन मुख्य पंथ ' ग्रीक ' व ' लॅटिन ' त्यांतील विद्वानांनीं वादविवाद करून एकीकरण करण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता. कांहीं लोक आधींच इटालींत जाऊन राहिले होते. यांच्यापैकीं प्रमुख ग्रीक ग्रंथकार ' लिऑंटिओस पिलॅटोस ' अथवा लिऑन, ' जॉर्जिअस गोमिस्टस ' अथवा प्लेथो, मॅन्युअल वगैरे होत.

तुर्क लोकांनीं सपाट जमीन आक्रमण केल्यावर क्लेफ्ट व हैडुक वगैरे लोक डोंगरांत पळून जाऊन आपलें स्वातंत्र्य रक्षण करून राहिले. तेथें निसर्गाच्या सहवासामुळें त्यांस स्फूर्ति होऊन कांहीं अगदीं नवीन काव्यें, विशेषतः पोवाडे बाहेर पडले. यांच्यामध्यें निसर्गाचें वर्णन फार आढळतें.

कॉन्स्टांटिनोपल पडल्यानंतर पुष्कळ वर्षेपर्यंत क्रीट बेट व्हेनिसच्या अमलाखालीं होतें. येथें कांहीं ग्रीक कवींनीं काव्यरचना केलेली आढळते, पण तीवर रोमन ठसा स्पष्ट दिसतो. या काव्यांची भाषा कंडिओट लोकांची पोटभाषा असून तींत व्हेनिस येथील भाषेतीलहि बरेच शब्द आढळतात. ' व्हिसेन्स कोरनॅरो ' यानें लिहिलेले ' एरोटोक्रिटोस ' हें यांपैकीं आद्य काव्य असून त्यामध्यें त्या वेळची राहाणी चांगली वर्णन केलेली आहे. ' जॉर्ज चोरटॅकिस ' यानें ' एरोफाइल ' नांवाचें नाटक लिहिलें आहे. निकोलस ड्रिमिटिकॉस यानें ' शेपर्डेस् ' हें काव्य लिहिलें. याशिवाय ' ग्रेगोरोपौलस ' आणि ' मेलिसीनोस ' हे कवी होऊन गेले.

कॉन्स्टॉन्टिनोपल शहर तुर्कांनीं घेतल्यानंतर ग्रीक भाषेचा यूरोपमध्यें प्रसार करण्याच्या कामीं जॉन अर्गिरोप्युलोस, डेमेट्रिअस चॅलकॉंडाइल्स, कॉन्स्टन्टाइन व जॉन लॅस्कॅरिस व 'मार्कस मुसुरस' यांनीं बराच पुढाकार घेतला. यांनीं ग्रीक भाषा लोकांस शिकवून तिचा प्रसार केला. कांहींनीं ग्रीक व्याकरणावर ग्रंथ लिहिले. कांहींनीं जुने ग्रंथ संशोधन करून पुन्हां लिहून काढले. यांच्या श्रमामुळें व्हेनिस, रोम, पॅरिस, वगैरे ठिकाणीं ग्रंथसंग्रहालयें स्थापन होऊन संपन्न झालीं. यांची ग्रंथरचना प्रचारांतील भाषेंत नसून पूर्वीच्या ग्रंथांच्या भाषेंतच आहे. परंतु यांपैकीं कोणींहि वाङ्मयामध्यें नवीन भर टाकली नाहीं. १५ व्या शतकाच्या अखेरीस प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या तत्वज्ञानपद्धतीसंबंधीं जीं भयंकर रणें माजलीं होतीं त्यांमध्यें हेहि सामील झाले होते. वास्तविक हा वाद सांप्रदायिक असून तात्विक मुळींच नव्हता. ज्यांच्या मनांतून रोमन व ग्रीक पंथांचें ऐक्य करावयाचें होतें. ते प्लेटोची बाजू घेत व त्यांविरुद्ध असणारे ॲरिस्टॉटलची बाजू घेत असत. याप्रमाणें बायझँटाइन कालाची पुन्हां पुनरावृत्ति झाली. 'ऑर्सेनिअस' यानें 'ॲरिस्टोफेन्स व 'युरिपिड्स' यांच्या ग्रंथांवर टीका लिहिली. 'एमिलिअस पोर्टॉस' व लिओ 'अलॅटिओस' यांनीं पुष्कळ जुने ग्रंथ संपादन केले व टीका लिहिल्या. याखेरीज कांहीं किरकोळ कवीही होऊन गेले.

सोळाव्या शतकांत बरेचसे इतिहासकार होऊन गेले. १५ व्या शतकाच्या अखेरीस इंब्रोस येथील क्रिटोब्युलोस यानें दुसऱ्या महायुद्धाच्या कारकीर्दीचा इतिहास लिहिला. ' एमॅन्युअल मेलॅक्सॉस ' यानें ' पॅट्रिआर्चे ' यांचा इतिहास लिहिला. फ्रांझेस यानें ' पॅलिऑलागि ' राजाचा इतिहास लिहिला. 'थिओडोशिअस झिगोमॅलस' यानें १३९१–१५७८ पर्यंतचा कॉन्स्टॅटिनोपलचा इतिहास लिहिला. दुसरेहि कांहीं सायप्रास व क्रीटचे इतिहास, प्रवासवर्णनें, संतचरित्रें वगैरे ग्रंथ आहेत. याकाळीं कांहीं व्याकरण, कोश वगैरे ग्रंथ लिहिले गेले. परंतु उच्च सारस्वताचा बहुतेक लोप झाला.

१८ व्या शतकामध्यें पुनः वाङ्मयाचें पुनरुज्जीवन झालें. कान्स्टँटिनोपल येथें रहाणाऱ्या ' फॅनरिओट ' वगैरे घराण्यांतील पुरुषांच्या प्रयत्नानें व ग्रीक धर्मोपदेशकांच्या अध्ययनाच्या कामीं घेतलेल्या श्रमानें ग्रीक व्यापाऱ्यांनीं मिळविलेल्या संपत्तीनें व घरंदाज ग्रीक लोकांच्या दातृत्वानें शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारास फार सहाय्य केलें. लोकहि शिक्षणाविषयीं फार उत्सुक होते. यामुळें ग्रंथांचा व शिक्षणाचा प्रसार फार जारीनें सुरू झाला. याचेंच फळ त्यांस स्वातंत्र्यरूपानें मिळालें. १८ व्या शतकामध्यें सांप्रदायिक वाङ्मयच विशेष तयार झालें. पश्चिमेकडील विद्यापीठांतून शिकून आलेले तरुण धर्मोपदेशक अर्वाचीन संस्कृतीचा प्रसार करूं लागले. यावेळचे सांप्रदायिक ग्रंथकार म्हटले म्हणजे ' एलिअस मिनिएटस: ' यानें प्रचलित भाषेंत कांहीं प्रार्थना लिहिल्या. 'मेलेटिऑस' यानें सांप्रदायिक इतिहास, ग्रीसचा भूगोल वगैरे ग्रंथ लिहिले. थिओटोकस यानें सांप्रदायिक ग्रंथांशिवाय गणित, भूगोल, पदार्थविज्ञानशास्त्र वगैरे विषयावर ग्रंथरचना केली. 'वल्गेरस' यानें पुराणवस्तु-संशोधन, तत्वज्ञान, गणित, पदार्थविज्ञान, ज्योतिष वगैरे विषयांवर ग्रंथ लिहिले. यानें ' इनिअड ' व ' जॉर्जिक्स ' यांचें (दुसऱ्या कॅथराईनच्या विनंतीवरून) होमरच्या धर्तीवर भाषांतर केलें.

या वेळीं ' कॉन्स्टंटाईन व्हिगास ', ' क्रिस्टोपौलस ' व ' जेकोबस रिझोस ' वगैरे कवी होऊन गेले. यानंतर ग्रीसला स्वातंत्र्य मिळाल्यावर ' पॅनॅगिओटस ' व ' अलेक्झांडर ' ' सौटझोस ' बंधु आणि ' अलेक्झांडर रिझोस न्हॅगबस ' हे कवी प्रसिद्धीस आले. यांचीं स्वातंत्र्यगीतें नांवाजण्यासारखीं आहेत यांनीं निरनिराळ्या प्रकारची काव्यरचना केली आहे. या दोन बंधूंपैकीं पहिल्यानें 'लिरिक काव्यें' बरीच रचलीं व दुसऱ्यानें औपरोधिक काव्यें केलीं. अलेक्झांडर रिझोस यानें विविध काव्यरचना केली आहे. त्यांमध्यें पोवाडे, वर्णनें, नाटकें वगैरे असून शिवाय यानें कांहीं गद्यरचनाहि केली आहे.

गद्य वाङ्मयामध्येंहि या पुनरुज्जीवनाच्या काळांत पुष्कळ वाढ झाली. इतिहासामध्यें 'स्पिरिडन ट्रिकौपिस' याचा 'राज्यक्रांतीचा इतिहास' हें त्याचें अखंड स्मारकच झालें आहे. या ग्रंथकाराचें या काळच्या उलाढालींत बरेंच अंग होतें. दुसऱ्याहि कित्येक सरदारांनीं आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. के. पॅपॅऱ्हेगेपौलस याचा ग्रीक राष्ट्राचा इतिहास नामांकित आहे. सॅकेलॅरिऑस यानें सायप्रसचा इतिहास व भूवर्णन लिहिलें आहे. के. ॲसोपिऑस यानें ग्रीक वाङ्मय व इतिहास यांवर ग्रंथरचना केली. सांप्रदायिक वाङ्मयामध्यें 'ओइकोनॉमस' याचें नांव प्रामुख्यानें आढळतें. याखेरीज 'काँटोगनिस', 'फिलोथिऑस', 'कॅस्टॉर्कस' वगैरे ग्रंथकार होऊन गेले ग्रीक राज्याची स्थापना झाल्यानंतर कायदा, अर्थशास्त्र, गणित, भौतिक शास्त्रें, प्राचीनवस्तुसंशोधन वगैरे विषयांवर पुष्कळ निरनिराळे ग्रंथ बाहेर पडले.

परंतु या कालचा, ज्याची सर्व समकालीन ग्रंथकारांवर छाप पडलेली दिसते व ज्यानें पुढील सर्व ग्रीक वाङ्मयाचें धोरण आंखून ठेवलें असा ग्रंथकार 'ॲडॅमंटिऑस कोरेइस' हा होय. यानें भाषाशास्त्राचा अभ्यास करून पुष्कळ जुने ग्रंथ संपादन केले व यानेंच अर्वाचीन ग्रीक भाषेचा पाया घातला.

या कालच्या ग्रीक भाषेमध्यें दोन प्रकार दृष्टीस पडतात. एक लौकिक अथवा रूढ (प्रचारांतील) भाषा व दुसरी व्याकरणशुद्ध भाषा. पहिली बोलण्यांत वापरीत व दुसरीचा उपयोग ग्रंथलेखनामध्यें करीत असत. पहिली भाषा निरनिराळ्या प्रांतांत थोडी फार बदललेली असे पण दुसरी मात्र प्राचीन ग्रीक भाषेपासूनच थोड्या फार फरकानें चालत आली होती. या दोन भाषांच्या पुरस्कर्त्यांमधील लढा पूर्वीप्रमाणें अद्यापहि चालला आहे. यामुळें या वेळींहि ग्रीक वाङ्मयामध्यें गोंधळ झालेला आहे. बोलण्याची भाषा कोठेंहि शिकविली जात नाहीं, मात्र ही सर्वत्र बोलण्यांत आढळते. व ही प्राचीन भाषेपासूनच थोडथोडा फरक होऊन तयार झाली आहे. परंतु ग्रंथलेखनामध्यें या भाषेचा उपयोग करणारा कोणीहि मोठा ग्रंथकार न झाल्यामुळें ही मागें पडली. एकंदर ग्रीक ग्रंथकारांची प्रवृत्ति प्राचीन ग्रंथकारांचें व त्यांच्या भाषेचें अनुकरण करण्याकडेच विशेष असे. सुमारें पन्नास वर्षांपासून अर्धवट प्राचीन, अर्धवट अर्वाचीन अशीच भाषा शाळा, विद्यापीठें, लोकसभा व सरकारी कागदोपत्रीं चालू आहे. या भाषेचा परिणाम सुशिक्षित जनतेच्या बोलण्यांतील भाषेवर झालेला स्पष्ट दिसत आहे. या भाषेला जरी कायमचें स्वरूप अद्याप आलें नाहीं तरी तिचें सर्व श्रेय 'कोरेइस' याच्या कडे आहे. यानें लेखनाच्या भाषेपासून सुरवात करून तिच्यांतील बाहेरून आलेले शब्द काढून टाकून त्यानें कांहीं जुने व कांहीं ठराविक पद्धतीनें तयार केलेले नवीन शब्द घेऊन त्या भाषेचा शब्दसंग्रह वाढविला व अशा तऱ्हेनें मध्यम मार्ग स्वीकारून त्यानें ही भाषा प्रचारांत आणली.

अर्वाचीन कवींपैकीं पुष्कळांनीं बोलण्याच्या भाषेमध्येंच कविता केली आहे. 'डायोनिसिअस सॉलोमस' याच्या लिरिक काव्यांपैकीं स्वातंत्र्यावरचें काव्य फार सरस आहे. याच आयोनियन पोटभाषेमध्यें 'ॲड्रिअस कॅलव्होस,' 'जुलिअस टिपॅल्डॉस' वगैरे कवींनीं कविता केली आहे. याखेरीज व्हॅलॲोरिट्स याच्या काव्यांचा ग्रीक लोकांच्या मनावर फार परिणाम झाला. याशिवाय 'व्हिलॅरॅस,' 'झॅलो कोस्ट्स' वगैरे कवी होऊन गेले. याच वेळीं कॉन्स्टांटिनोपलमध्यें कांहीं कवींनीं प्रौढ भाषेंत काव्यरचना केली. यांपैकीं 'स्पिरिडिअन बॅसिलिॲड्स,' 'ॲंजेलॉस व्हॅल चॉस' वगैरे नामांकित आहेत. एकंदरींत प्रौढ भाषेमध्यें अलीकडे कोणी कविता करीनासें झालें आहे. अलीकडच्या काळांत नाटकें मात्र फार आढळतात. 'सौटझोस' बंधूंनंतर 'क्रिऑन ऱ्हँगबेस', ॲंजेलॉसव्हॅलॅचॉस,' डेमेट्रिऑस कोरोमेलास' वगैरेंनीं बरींच नाटकें रचलेलीं आढळतात. त्यांपैकीं 'रोमिओ आणि जुलिअट', ऑथेल्लो' 'हॅम्लेट' 'किंग लिअर' वगैरे इंग्रजी नाटकांचीं भाषांतरेंहि आढळतात.

'जॉर्ज सौरेस' हा औपरोधिक ग्रंथकार होऊन गेला. यानें सामाजिक व राजकीय प्रश्नांची चर्चा केली आहे. गद्यग्रंथकारांनीं मात्र सर्वत्र प्रौढ भाषेचाच उपयोग केलेला आढळतो. ऐतिहासिक ग्रंथलेखन व संशोधन बरेंच झालें आहे पण महत्वाचा असा ग्रंथ झालेला आढळत नाहीं. 'स्पिरिडिअन लॅंप्रॉस' यानें एक इतिहास लिहिला आहे व कॅरोलाइड्स् याचा १९ व्या शतकाचा इतिहास नुकताच बाहेर पडला आहे. याशिवाय दुसरेहि कांहीं इतिहास प्रसिद्ध झाले आहेत. कांहींचें इंग्रजींत ब्यूटच्या मार्किसनें भाषांतर केलें आहे. 'पीटर पर्पॅऱ्हेगोपौलस,' 'कॅलिगस' वगैरेंनीं कायद्यावर ग्रंथ लिहिले आहेत. 'ब्रेलस आर्मेनिस' व 'जॉन स्कॅल्टझोनेस' यांनीं तत्वज्ञानावर ग्रंथ लिहिले. यांतील दुसऱ्यानें डार्विनच्या विरुद्ध सिद्धांत काढले आहेत. 'डायोमिडिस किरिॲकोस' याचा ख्रिस्तसांप्रदायिक इतिहास व 'लाटास' येथील मुख्य धर्मोपदेशकानें लिहिलेले सांप्रदायिक ग्रंथ लक्षांत घेण्यासारखे आहेत.

भाषाशास्त्रावरील प्रमुख ग्रंथकार 'कान्स्टंटाइन कांटोस' हा होय. याखेरीज 'जॉर्ज हॉर्ट्झ डेक्स' 'थिओडोर पॅपॅडेमेट्र कोपौलोस' व जॉन सिचरि यांनीहि ग्रंथ लिहिलेले आहेत. प्राचीन वस्तुसंशोधनाच्या कामीं 'स्टीफन कौमॅनौडस' 'पॅनॅजिऑट्स कॅम्बॅडिअस' आणि 'क्रिस्टोस सौंट्स' हे प्रसिद्ध आहेत.

'जॉन स्व्होरोनोस' यानें नाण्यांच्या संशोधनांत प्राविण्य मिळविलें आहे. गणितामध्यें 'जॉन हॉर्टझडेक्स',

रसायनशास्त्रांत क्रिस्टोमेनॉस व ज्योतिषामध्यें डेमोट्रिअस एजिनेट्स हे पारंगत आहेत.

ग्रीस देशास स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या प्रथमच्या कालांत प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांमध्यें परकी लोकांशीं असलेल्या संबंधाचा बराच परिणाम झालेला दिसतो. अर्वाचीन ग्रीस देशांत नांवाजण्यासारखा कादंबरीकार कोणीच झाला नाहीं. कॅलिगस याचीं एक दोन पुस्तकें बरीं आहेत. नवीन कादंबऱ्या कोणीच लिहीत नाहींत. परंतु दुसऱ्या भाषांतील कादंबऱ्यांचीं भाषांतरें बरींच होतात. डी. बिकेलस यानें सुरवात केल्यापासून लहान गोष्टी प्रचारांत येऊं लागल्या आहेत. बोलण्याच्या भाषेंत गद्यग्रंथरचना 'जॉन सिचारि' यानें केली आहे. यापैकीं त्याचा ग्रीकचा प्रवास प्रसिद्ध आहे. एम्. पल्ली यानें इलियडचें भाषांतर केलें आहे. या भाषेचा शास्त्रीय ग्रंथ लिहिण्याच्या कामीं कोणीहि कधींच उपयोग केला नाहीं.

अथेन्स येथें कांहीं नियतकालिकें निघतात. त्यांत 'कॉन्स्टंटाईन कॉटॉस' यानें चालविलेलें अथेना, हारमोनिया आणि 'एथ्निके अगोगे' हीं प्रमुख आहेत. यांशिवाय 'पॅर्नासॉस' 'प्राचीनवस्तुसंशोधन' वगैरे संस्थांचीं नियतकालिकें निघत असतात.

[संदर्भग्रंथ.—ग्रीक वाङ्मयावर बरेच ग्रंथ आहेत, पण बहुतेक इंग्रजीतर यूरोपीय भाषेंत आहेत. पुढील कांहीं इंग्रजी ग्रंथ उपयुक्त दिसतील. मुरे–क्रिटिकल हिस्टरी ऑफ दि लँग्वेज अँड लिटरेचर ऑफ एन्शंट ग्रीस (१८५०-५७); महाफी–हिस्टरी ऑफ क्लासिकल ग्रीक लिटरेचर; सँडिस–हिस्टरी ऑफ क्लासिकल स्कॉलरशिप (१९०६-१९०८); गेलडार्ट–फोकलोअर ऑफ मॉडर्न ग्रीस (लंडन, १८८४)].

ग्रव्ह, सर विल्यम् रावर्ट (१८११-१८९६)—हा एक कायदेपंडित आणि शास्त्रज्ञ होता. याचा जन्म साउथ वेल्समधील स्वान्सी नांवाच्या गांवीं झाला. खाजगी शिक्षकामार्फत याचें शिक्षण होऊन हा आक्सफोर्ड येथें गेला; व त्या ठिकाणीं सन १८३२ सालीं त्यानें साधी पदवी घेतली. तीन वर्षांनीं त्यानें आपला वकीलीचा धंदा सुरू केला; परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्याला कांहीं काळ स्वस्थ बसावें लागलें. या रिकाम्या काळांत त्यानें भौतिकशास्त्राचा अभ्यास करून त्यांत प्रावीण्य संपादन केलें. सन १८३९ च्या सुमारास जस्तप्लाटिनमची विद्युद्घटमाला त्यानें शोधून काढली; हिला 'ग्रव्हची ब्याटरी' असें नांव देण्यांत आलें; व तज्जन्य विद्युद्धनुर्दीपा(आर्कलाइट)नें कित्येक स्थलें प्रकाशित करून दाखविण्यांत आलीं. याचा असा परिणाम झाला कीं, त्याला प्रायोगिक तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर नेमण्यांत आलें व त्यानें सुमारें सात वर्षेपर्यंत अध्यापकाचें काम केलें. विद्युद्रसायनशास्त्र आणि विद्युन्मालिका यावर त्यानें पुष्कळ परिश्रम केले आहेत व त्यांत त्यानें कांहीं शोध लावले आहेत. सन १८४६ सालीं त्यानें एक पुस्तक लिहिलें. त्यांत त्यानें शक्तिनित्यत्वाचा सिद्धान्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. याच वर्षी त्याला रायल सोसायटीकडून "रॉयलमेडल" नांवाचें पदक बक्षीस मिळालें. याप्रमाणें त्यानें शास्त्रांत प्रगति करून दाखविली तरी त्यानें आपला कायदेपंडिताचा धंदा तसाच चालू ठेविला. १८७१ सालीं त्याला जज्ज करण्यांत आलें. तारीख १ आगष्ट १८९६ रोजीं हा लंडन येथें मृत्यु पावला.

ग्रे, इलिशा (१८३५-१९०१)—या अमेरिकन विद्युच्छास्त्रवेत्याचा जन्म ओहिओ संस्थानांतल्या बार्नेसव्हिल गांवीं झाला. बालवयांत यानें सुताराच्या दुकानांत काम करून पदार्थविज्ञानशास्त्राचा अभ्यास केला; नंतर आबरलिन कॉलेजात अभ्यास केला व १८६७ त तारायंत्रोपयुक्त अशीं दोन उपकरणें तयार करून त्यांचीं पेटन्टें घेतलीं. नंतर ध्वनिवाहक अथवा तिरोभणण (टेलेफोन) यंत्राविषयीं बरेच परिश्रम करून एक यंत्र तयार केलें व त्याचें पेटन्ट मिळविण्याकरितां कोर्टाकडे योग्य अर्ज केला. हा अर्ज त्या कोर्टांत दाखल होण्यापूर्वी कांहीं तास अगोदर अलेक्झान्डर ग्राहाम बेल याचा अर्ज दाखल झाला होता. अर्थातच ग्रे याचा अर्ज नामंजूर झाला आणि बेल याचा अर्ज मंजूर झाला. परंतु ग्रे यानें हें यंत्र बसविण्याकरितां जे श्रम केले व जी बुद्धिमत्ता दाखविली ती सारी लक्ष्यांत घेऊन १८७८ सालीं पॅरिसच्या प्रदर्शनांत लिजन ऑफ ऑनर ही पदवी त्याला अर्पण करण्यांत आली. कोलंबियन प्रदर्शन नांवाच्या संस्थेमार्फत विद्युच्छास्त्रज्ञांची जी परिषद भरविण्यांत आली तिच्या अध्यक्षत्वाचा मान याला देण्यांत आला. त्यानें जीं विद्युद्यंत्रें शोधून काढलीं तीं तोच तयार करीत असे. म्यासाच्युसेट संस्थानांतील न्युटनव्हिले नांवाच्या गांवीं तारीख २१ जानेवारी १९०१ रोजीं तो मृत्यु पावला. एकाच तारेंतून अनेक संदेश पाठविण्याची युक्ति त्यानेंच शोधून काढली. हस्तलेखवाहक नांवाचें यंत्र त्यानेंच शोधून काढलें. यांशिवाय समुद्राच्या तळीं तारायंत्रानें घंटा वाजवून संदेश किंवा सांकेतिक माहिती पाठविण्याविषयीं त्यानें प्रयोग केले होते.

ग्रे कॅनॉल—पंजाब. फेरोझपूर जिल्ह्यांमधील कालवे. इ. स. १८७५मध्यें यांचें प्रथम काम सुरू झालें. इ. स. १९०८ पर्यंत एकंदर लहानमोठे १४ कालवे होते. यांची लांबी सुमारें १०३४ मैल आहे. या कालव्यांच्या संबंधांत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे ही कीं यांचें सर्व काम व बहुतेक खर्च सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं केवळ शेतकऱ्यांनींच केला आहे. थोडीबहुत सरकारी मदत, सरकारी अधिकाऱ्यांची देखरेख हीं आरंभीं घेतल्यानें नेहमीची देखरेख व चालू खर्च यांच्या तरतुदीसाठीं तीं सरकारच्या ताब्यांत असतात.

ग्रेटनाग्रीन—ग्रेटनाग्रीन अथवा ग्रेटनेग्रीस हें खेडें स्कॉटलंड देशांत डंफ्रिसशायर परगण्यांत आहे. ह्या गांवावरून

इंग्लंड व स्कॉटलंड देश विभागणारी (मर्यादा निश्चित करणारी) रेषा जाते. स्कॉटलंडमधील सर्वांत जवळचें हें खेडें असल्यामुळें ज्यांच्या लग्नास आई-बापांची अथवा पालकांची संमति मिळाली नसेल अशीं पुष्कळशीं जोडपीं पळून येथें येत. इ. स. १७५४ चा कायदा पास झाल्यानंतर पळून आलेल्या जोडप्यांस साक्षीदारासमोर लग्न करणें भाग पडे. ग्रेटनाग्रीन येथें बहुधा लोहार लग्न लावीत असे. इ. स. १८२६ च्या नंतर ग्रेटना हॉलमध्यें बरींच लग्नें लागलीं. लग्नाची फी कमीतकमी अर्धी गिनी असे. दरवर्षी सुमारें २०० लग्नें होत. इ. स. १८५६ पासून हीं लग्नें कमी होऊं लागलीं. कारण नवीन कायद्याप्रमाणें लग्न लावण्यास तयार असलेल्या पक्षांपैकीं कोणत्याहि एखाद्या पक्षास लग्नापूर्वी तीन आठवडे स्कॉटलंडांत रहावें लागे.

ग्रेटब्रिटन—इंग्लंड, स्कॉटलंड व वेल्स या तीन देशांचा यांत समावेश होतो. या देशांची माहिती त्या त्या देशनामाखालीं दिली आहे.

ग्रे थॉमस (इ. स. १७१६-१७७१)—याचें बालपण व शिक्षण याच्या आईच्या देखरेखीखालीं ईटन व केंब्रिज येथें झालें. यानें वालपोलबरोबर यूरोपमध्यें प्रवास केला व पुढें त्याच्या मांजरावर एक कविता लिहिली. याचें 'एलेजी' हें काव्य प्रसिद्ध आहे. याची एकंदर कविता फारशी मोठी नाहीं व आहे तीहि स्वयंस्फूर्त नसून दुसऱ्या कवींच्याच काव्यांतील भाषा उचलून एकत्र गोंवून केलेली आहे. याला राजकवीचा मान देऊं केला होता. पण तो यानें नाकारला. यानें केल्टिक वाङ्मयाचाहि, केंब्रिज येथें अर्वाचीन इतिहासाचा प्रोफेसर असतां, अभ्यास केला व'फेटल सिस्टर्स'आणि 'डीसेंट ऑफ ओडीन' हीं काव्यें लिहिलीं. यास अद्भुत काव्याच्या प्रभातकालचा कवि समजतात. [डी. सी. टोव्ही—ग्रे अँड हिज फ्रेंड्स (केंब्रिज १८९०); एडमंड गॉस लाइफ ऑफ ग्रे (मेन ऑफ लेटर्स सीरीज);]

ग्रेनाडा—ब्रिटिश वेस्ट इंडीजपैकीं विंडवर्ड बेटांत अगदीं दक्षिणेकडचें बेट. हें उत्तरअक्षांश ११° ५८' व १२° १५' आणि पश्चिम रेखांश ६१° ३५' व ६१° ५०' यांमध्यें आहे. हें बेट अंडाकृति असून याची लांबी २१ मैल, रुंदी १२ मैल व क्षेत्रफळ १३३ चौरस मैल आहे. दाट झाडी असलेली पर्वताची रांग उत्तरदक्षिण जात असून तिचें सर्वांत उंच शिखर कॅथेराईन (२७५० फूट) आहे. हें ज्वालामुखी पर्वतापासून बनलेलें बेट आहे. बेटाच्या मध्यभागीं ग्रँड एटँग नांवाचें एक सरोवर ज्वालामुखी पर्वताच्या मुखाशीं आहे. अँटाईन नांवाचें दुसरें सरोवर ईशान्येस आहे. व शिवाय लहान नद्या व ओढे, गरम पाण्याचे झरे या बेटांत आहेत. हवा चांगली आहे व पाऊस सुमारें २०० इंच पडतो. जमीन अतीशय सुपीक असून कोको व मसाले मुख्यत्वेंकरून उत्पन्न होतात. कोको, मसाले, लोंकर, कापूस, कॉफी, गुरेंढोरें, कातडीं, कांसवें, फळें व इमारतीचें लांकूड या मालाची परदेशांत, बहुतकरून ग्रेटब्रिटनमध्यें निर्गत होते. येथें साखर तयार करितात. १९१७ ची आयात ३५३९७८ पौंडांची असून निर्गत ४८०५५३ पौंडांची होती.

प्राथमिक शिक्षण वेगवेगळ्या संस्थांच्या हातांत असून त्यास सरकारी पैशांची मदत मिळते. याशिवाय सरकारी धार्मिक शाळा व मुलींसाठीं दुय्यम शाळा आहेत. सर्व शाळांवर देखरेख ठेवण्यासाठीं सरकारनियुक्त सभासदांचें एक शिक्षण-मंडळ आहे. शाळांची फी फार थोडी आहे. १९१७ सालीं ११ सरकारी व ४८ सरकारच्या मदतीनें चाललेल्या प्राथमिक शाळा होत्या. मुलांकरितां १ दुय्यम शिक्षणाची शाळा होती. विंडवर्डबेटांचा गव्हर्नर ग्रेनाडांत राहतो. कायदे-कौन्सिलांत १४ सभासद आहेत. १९१७-१८ सालचा वसूल १०५५४० पौंड व खर्च १०८७९२ पौंड होता. इंग्रजी भाषा सर्वत्र चालते. नैर्ऋत्येस सेंट जार्ज हें राजधानीचें शहर आहे. याशिवाय गुयाव्हे अथवा शार्लट टौन, व्हिक्टोरिया सौतुर्स व ग्रेनव्हिल हीं शहरें आहेत. बेटाची लोकसंख्या (१९११) ६६७५० होती.

कोलंबसानें हें बेट १४९८ त शोधून काढलें व त्याला कन्सेप्शन हें नांव दिलें. १६५० त फ्रेंचांनीं हें बेट विकत घेतलें व कॅरिब लोकांचा नायनाट केला. १७६२ त ब्रिटिशांनीं हें बेट घेतलें व पॅरिसच्या तहान्वयें त्यांच्याच ताब्यांत राहिलें. १७७९ त पुन्हां फ्रेंचांनीं हें बेट घेतलें परंतु व्हर्सेलीसच्या तहानें (१७८३) तें ब्रिटिशांना पुन्हां परत मिळालें.

ग्रेनाडाईन्स—ग्रेनाडाईन्स बेटांची रांग वेस्ट इंडीज मधील विंडवर्ड बेटांत आहे हीं बेटें व्हिन्सेंट व ग्रेनाडा यांच्यामध्यें ६० मैलपर्यंत पसरलीं आहेत. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं सेंटव्हिन्सेंट व ग्रेनाडा यांच्यांमध्यें ग्रेनाडाईन्स बेटें वांटून दिलीं आहेत. सेंटव्हिन्सेंटपैकीं बेक्विआ मुख्य असून त्याचें क्षेत्रफळ ६ चौ. मै. आहे. कॅरिआकु ग्रेनाडा द्वीपसमूहांत असून त्याची लांबी ७ मैल, रुंदी २ मैल व क्षे.फ. १३ चौ. मै. आहे. कापूस व गुरेंढोरें यांची निर्गत होते. सर्व समूहाची लोकसंख्या (१९०१) ६४९७ आहे.

ग्रोट जॉर्ज—(१७९४-१८७१) हा आंग्ल इतिहासकार केंटमध्यें १७९४ त जन्मला. त्याचें लहानपणचें शिक्षण घरीं आईनेंच केलें. पण पुढें त्याला विद्यालयांतील शिक्षण मिळालें नाहीं. १८१० सालीं बापानें त्याला एका पेढीवर नोकर ठेविलें. ही नोकरी करीत असतांनाच त्यानें अर्थशास्त्र, तत्वज्ञान, इतिहास व तसेंच ग्रीक, लॅटिन, फ्रेंच व जर्मन भाषांचें ज्ञान मिळविलें. लंडनचें पहिलें विश्वविद्यालय स्थापन करण्यांत (२८ आक्टोबर १८२८) यानें बरेच श्रम घेतले.

१८३२ सालीं तो पार्लमेंटचा सभासद झाला व सभासद असतांनाच त्यानें ग्रीस देशाचा इतिहास व तत्वज्ञान या

विषयांचा अभ्यास केला. १८४६ पासून १८५६ पर्यंत ग्रीस देशाचा इतिहास त्यानें १२ भागांत लिहून प्रसिद्ध केला. या भागांतून ग्रीस देशाची भरपूर माहिती संगतवार व सोप्या मार्षेत दिली असून ग्रीसच्या इतिहासाचा स्वतंत्र अभ्यास करणें या भागांच्या प्रसिद्धीपासून शक्य झालें आहे. ग्रोट हा प्रामाणिक, आत्मसंयमी, विचारी व सहनशील होता. तत्त्वज्ञानावर कांहीं ग्रंथ लिहीत असतांनाच१८७१साली तो मरण पावला.

ग्लॅडस्टन जॉन हॉल (१८२७–१९०२)—हा इंग्रज रसायनशास्त्रज्ञ लंडनमधील हॅकनी येथें जन्मला. लहानपणापासून त्याला शास्त्रीय विषयांची आवड होती. त्याला भूस्तरशास्त्र फार आवडत असे. परंतु त्याच्या बापाच्या मतानें त्यांत विशेष उत्कर्ष होण्यास वाव नसल्यामुळें त्यानें लंडन येथें थॉमस ग्राहाम याच्याजवळ रसायनशास्त्र शिकण्यास सुरवात केली. नंतर हा गीसन येथें लीबिगजवळहि शिकत होता. तेथें त्याला १८४७ त पी. एच्. डी. ची पदवी मिळाली. १८५० त तो सेंट थॉमसच्या दवाखान्यांत रसायनशास्त्राचा अध्यापक झाला व वयाच्या २६ व्या वर्षींच राजसंस्थेचा सभासद(फेलो)झाला. १८५८ ते १८६१ पर्यंत दीपगृहावरील कमिशनमध्यें राजमंडळांत त्यानें नोकरी केली व १८६४ ते १८६८ पर्यंत युद्धमंडळांत स्फोटक कापसा (गनकॉटन)संबंधीं काम केलें. १८७४ ते १८७७ पर्यंत तो अध्यापक होता. १८७४ त त्याला पदार्थविज्ञानशास्त्रमंडळाचा अध्यक्ष निवडलें व १८७७–१८७९ पर्यंत तो रसायनशास्त्रमंडळाचा अध्यक्ष होता. १८९७ त राजसंस्थेनें त्याला डेव्हीपदक देऊन त्याचा बहुमान केला. पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र यांच्या दरम्यान असलेल्या भानगडीच्या प्रश्नांसंबंधीं त्यानें शोध लाविले. त्यानें कित्येक पदार्थांचे प्रकाशगुणक ठरविले व एकाच पदार्थाला निरनिराळें अणुवक्रीभवन असतें कीं नाहीं हें त्यानें पाहिलें. ईथर, तेलांचें वि. गुरुत्व, रसायनिक घटना व प्रकाशासंबंधी वर्तणूक यांचा संबंध त्यानें जोडला. १८५६ तव त्यानें रसायनशास्त्रांत विच्छिन्नकिरणदर्शकाचें (स्पेट्रोस्कोप) महत्व किती आहे हें दाखविलें. सूर्योदय, सूर्यास्त व मध्यान्ह या वेळीं फ्रान्होफरच्या रेषांत फरक असतो व यावरून वातावरणाची घटना त्या त्या वेळीं वेगळी असावी असें त्यानें ठरविलें. पुढें प्राणवायू व पाण्याची वाफ यांच्या हवेंतील अस्तित्वावर त्या रेषा अवलंबून असतात असें ठरलें. यानें संग्राहक घटाना (स्टोअरेजसेल) शोध लावला व शिवाय ताम्रजस्त या जोडीचाहि शोध लावला. त्या जोडीच्या योगानें सेंद्रिय रसायनशास्त्रांतील कित्येक द्रव्यें विद्युत्साहाय्यानें तयार करतां येऊं लागलीं.

याशिवाय स्फुरासंबंधीं शोध, नत्रअदिद, स्फोटक कापूस व फल्मिनेट चूर्णे इत्यादि स्फोटकारक द्रव्यांचा शोध, रासायनिक प्रतिक्रियेंत पदार्थांच्या वजनाचें महत्व व कर्बाम्लाचें वनस्पतिसंवर्धनांत महत्त्व इत्यादि अनेक शोधांचा उल्लेख येथें केलाच पाहिजे. डॉ. ग्लॅडस्टन हा शिक्षणविषयक बाबतींत फार लक्ष घालीत असे. तो लंडन येथें ता. ६ आक्टोबर १९०२ रोजीं एकाएकीं मरण पावला.

ग्लॅडस्टन विल्यम इवर्ट (१८०९–१८९८).—हा ब्रिटिश मुत्सद्दी लिव्हरपूल शहरीं रॉडने स्ट्रीट नं. ६२ मध्यें २९ डिसेंबर १८०९ रोजीं जन्मला. त्याचे वाडवडील मूळ लानार्कशायरमधील रहिवाशी होते. जॉन व ॲन या दांपत्याला एकंदर सहा अपत्यें झालीं. पैकीं विल्यम ग्लॅडस्टन हें चवथें अपत्य होय. लहानपणापासून या मुलाचे गुण मनांत भरण्यासारखे असल्यामुळें तो घरांत सर्वांचा अत्यंत आवडता बनला. प्रथम लिव्हरपूल नजीकच्या सीफोर्थ गांवीं थोडेसें शिक्षण झाल्यावर विल्यम १८२१ मध्यें ईटन येथील शाळेंत जाऊं लागला. १८२८ मध्यें ईटन येथील अभ्यासक्रम संपवून तो ऑक्सफोर्ड येथील ख्राइस्ट चर्चमध्यें शिक्षण घेऊं लागला व इ. स. १८३१ मध्यें ग्लॅडस्टननें ग्रॅजुएट होऊन डबल फर्स्ट–क्लास मिळविला. पुढें ग्लॅडस्टन १८३२ सालीं इटलीमध्यें जाऊन तो पांच सहा भाषांचा व कलेचा अभ्यास करीत राहिला. इतक्यांत इंग्लंडांत नव्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली. तींत नीवॉर्कतर्फे तो सर्वांत अधिक मतें पडून पार्लमेंटचा सभासद झाला. या पार्लमेंटांत त्यानें पहिलें भाषण गुलामगिरीविरुद्ध केलें. पुढील बैठकींतहि एक दोन महत्वाचीं भाषणें ग्लॅस्टननें केलीं. १८३४ मध्यें पीलप्रधानमंडळानें ग्लॅडस्टनला ट्रेझरीच्या ज्यूनियर लॉर्डच्या जागीं नेमलें व १८३५ मध्यें वसाहतींचा अंडरसेक्रेटरी केलें. पण लवकरच पीलप्रधानमंडळ मोडलें अर्थात् ग्लॅडस्टनहि कामावरून दूर झाला.

सरकारी कामांतून मोकळा झाल्यामुळें फावणारा वेळ ग्लॅडस्टन होमर व डान्टे यांचीं काव्यें वाचण्यांत घालवूं लागला. शिवाय चर्चमध्यें होणारा धर्मोपदेश ऐकण्यासहि तो पुष्कळ वेळां हजर असे. १८३७ मध्यें ४ थ्या विल्यम वारल्यावर व्हिक्टोरियाच्या कारकीर्दीच्या आरंभींच पार्लमेंटची नवी निवडणूक झाली तींत ग्लॅडस्टन नीवार्कतर्फे पुन्हां निवडून आला. १८३८ सालीं त्यानें आपला 'धर्मव्यवस्थेचा राज्यव्यवस्थेशीं असलेला संबंध'(दि स्टेट इन इट्स रिलेशन्स वुइथ दि चर्च) हा विख्यात ग्रंथ प्रसिद्ध केला.

१८३९ जुलै २५ रोजीं हॉवर्डेन येथें मिस कॅथराईन ग्लीने या बॅरोनेट स्टीफन ग्लीनेच्या बहिणीशीं ग्लॅडस्टननें विवाह केला. स्टीफनच्या ईस्टेटीचा वारसाहि कॅथराईनच्या मुलाकडेच जावयाचा होता. १८४० मध्यें ग्लॅडस्टननें 'चर्चसंबंधाचीं तत्वें व त्यांचे परिणाम' (चर्च प्रिन्सिपल्स कान्सिडर्ड इन देअर रिसल्टस) हें पुस्तक प्रसिद्ध केलें. १८४१ मध्यें पार्लमेंटाची नवी निवडणूक झाली, तींत टोरीपक्षाचें ऐशीनें संख्याधिक्य

झालें व पुन्हां पीलप्रधानमंडळ अधिकारावर आलें. ग्लॅडस्टनला बोर्ड ऑफ ट्रेडच्या व्हाइसप्रेसिडेंटची जागा मिळाली व त्या जागेवर असतां त्यानें बऱ्याच आर्थिक प्रश्नांवर वादविवाद व भाषणें केलीं. पुढें १८४३ मध्यें लॉर्ड रिपनची बोर्ड ऑफ ट्रेडच्या प्रेसिडेंटची जागा मिळून ग्लॅडस्टनचा प्रधानमंडळांत प्रवेश झाला. परंतु १८४५ मध्यें आयर्लंडमध्यें बिनधर्मपंथी कॉलेजें काढण्याचा व मेनूथ येथील रोमन कॅथॉलिक कॉलेजला सरकारी मदत बरीच वाढविण्याचा प्रश्न प्रधानमंडळानें हातीं घेतला, त्या बाबतींत मतभेद असल्यामुळें ग्लॅडस्टननें आपल्या जागेचा राजीनामा दिला. पण त्याच सालीं प्रधानमंडळांत कांहीं उलथापालथ होऊन शेवटीं पीलच मुख्य प्रधान झाला व त्यानें ग्लॅडस्टनला वसाहतींच्या स्टेटसेक्रेटरीची जागा दिली. पण १८४६ च्या निवडणुकींत ग्लॅडस्टन उमेदवार म्हणून उभा राहिलाच नाहीं, व तें अत्यंत महत्वाचें वर्ष दीडवर्ष त्यानें घरीं स्वस्थ विश्रांतींत काढलें. १८४७ मध्यें ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीतर्फे तो निवडून आला.

१८५०—५१ मध्यें नेपल्समध्यें असतां त्यानें तेथील जुलमासंबंधीं जीं पत्रें प्रसिद्ध केलीं त्यांमुळें सर्व यूरोपांत खळबळ उडाली. व इटलीच्या स्वातंत्र्यास मदत झाली. १८५२ मध्यें मिलिशिया बिलावरील वादांत व्हिग प्रधानमंडळाचा पराजय होऊन लॉर्ड डर्बीचें प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें, त्यांत डिझ्रायली चॅन्सलर ऑफ एक्सचेकर झाला. १८५२ च्या निवडणुकींतहि तेंच प्रधानमंडळ कायम राहिलें. डिझ्रायलीनें केलेल्या बजेटावरील वादविवादांत ग्लॅडस्टननें केलेल्या जोरदार भाषणामुळें बजेट फेंटाळलें जाऊन डिझ्रायली पक्षाचा पराजय झाला. तेव्हां व्हिगपक्ष व पीलचे अनुयायी यांचें संयुक्त प्रधानमंडळ स्थापन होऊन आबर्डीन हा मुख्य प्रधान झाला व ग्लॅडस्टन चॅन्सलर ऑफ एक्सचेकर झाला. १८५३ मध्यें ग्लॅडस्टननें पहिल्याच प्रसंगीं बजेट तयार करून सभेपुढें मांडलें. त्यांत अनेकप्रकारें सामान्य लोकांचें जीवित कमी खर्चाचें व अधिक सुखकर होईल अशी योजना होती व उत्पन्नावर कर बसविला होता. याप्रमाणें त्यानें अनेक वर्षें फडनविशीचें काम केलें.

पुढें १८५८ मध्यें पामरस्टनच्या ऐवजीं डर्बी प्रधानमंडळ आलें. ग्लॅडस्टनला आयोनियन बेटांवर एक्स्ट्रा आर्डिनरी हाय कमिशनर नेमिलें. १८५९ मध्यें सौम्य स्वरूपाचें सुधारणाबिल प्रधानमंडळानें पुढें आणलें. पण तें नापास होऊन डर्बी प्रधानमंडळ मोडून पुन्हां पामरस्टन मुख्य प्रधान झाला व ग्लॅडस्टन फडणिशीवर रुजू झाला. परंतु वास्तविक आतां कामन्ससभेचा ग्लॅडस्टनच खरा पुढारी बनला होता. १८६० व १८६१मधील बजेटांतील महत्वाच्या गोष्टी म्हणजे फ्रान्सबरोबरचा व्यापारी तह व कागदावरील कराची बंदी या होत. १८५९ ते १८६५ पर्यंत अधिकारारूढ असलेल्या पामरस्टन प्रधानमंडळांतला अत्यंत हुषार व वजनदार मंत्री ग्लॅडस्टनच होता. त्या कारकीर्दीत मतदारीचा हक्क अधिक विस्तृत करण्यासंबंधानें व ऐरिश चर्चसंबंधानें बिलें सभेपुढें आलीं त्यावेळीं ग्लॅडस्टननें प्रतिपादिलेलीं मतें अत्यंत प्रागतिक म्हणजे रॅडिकल पक्षीयांनां शोभेशीं होतीं. पण त्यामुळें ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी मतदारसंघाचा ग्लॅडस्टनवरील विश्वास उडून त्यानें १८६५ च्या निवडणुकींत हार्डी नांवाचा इसम ग्लॅडस्टनच्या ऐवजीं निवडून दिला. तेव्हां ग्लॅडस्टन साऊथ लँकेशायरतर्फे उभा राहून निवडून आला. लवकरच पामरस्टन वारला व रसेल मुख्य प्रधान झाला, व ग्लॅडस्टनकडे ठराविक फडणिशी आली. कामन्स सभेचें नेतृत्वहि त्याच्या गळ्यात पडलें. त्यानें पूर्वीचें रिफार्मबिल पुढें मांडलें. व समारोपसमयीं मोठें उत्कृष्ट भाषण केलें. पण सर्व निष्फळ होऊन बिलावर प्रतिकूल मतेंच अधिक पडलीं; प्रधानमंडळ मोडलें, डर्बी मुख्य प्रधान झाला व डिझ्रायली फडणीस झाला. या अधिकारारूढ टोरी पक्षानें आपल्या तर्फेचें रिफॉर्म बिल पुढें आणलें. त्यांत बरोमधल्या (शहराव्यतिरिक्त गांवांत) सर्व घरवाल्यांनां मताधिकार देण्याचें योजिलें होतें. हें बिल बरेच फेरबदल होऊन अखेर १८६७च्या आगष्टमध्यें पास झालें.

१८६७ मध्यें रसेलनें राजकारणांतून कायमचें अंग काढून घेतलें, तेव्हांपासून ग्लॅडस्टन लिबरल पक्षाचा पुढारी बनला. विरुद्ध म्हणजे टोरी पक्षांत डर्बीच्या जागीं डिझ्रायली हा पुढारी व मुख्य प्रधान झाला होता. परंतु एकंदर पक्षांपैकीं ग्लॅडस्टनच्या पक्षाचें संख्याधिक्य होतें ही गोष्ट प्रत्ययास आल्यामुळें डिझ्रायलीनें व त्याच्या सहकाऱ्यांनीं राजीनामे दिले. अर्थात राणीनें ग्लॅडस्टनला विंडसर राजवाड्यांत बोलावून मुख्य प्रधानकीची माळ त्याच्या गळ्यांत घातली. या नव्या प्रधानानें प्रथम ऐरिश चर्चचा प्रश्न हातीं घेऊन राणीच्या सर्वस्वीं मतानुसार तो पार्लमेंटकडून पास करविला. १८७० मध्यें ऐरिश लँड ॲक्ट पास करून ठराविक खंड शेतकरी देत राहीतोंपर्यंत जमीनदारानें त्यांस काढूं नये व स्वतःच्या मेहनतीनें शेतांत केलेल्या सुधारणांची किंमत शेतकऱ्याला मिळावी अशी योजना केली. नंतर युनिव्हर्सिटयांतील धार्मिक अटी काढून टाकल्या; व खुद्द राणीच्या हुकुमानें कमिशनांची विक्री बंद करविली. १८७३ सालीं आयर्लंडमध्यें रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या दोघांच्या सोयीची युनिव्हर्सिटी स्थापण्याचें बिल त्यानें सभेपुढें मांडलें पण तें नापास झाल्यामुळें त्यानें प्रधानकी सोडली. राणीनें डिझ्रायलीला नेमण्याचा बेत केला पण त्यानें स्वपक्षाच्या संख्याहीनत्वामुळें प्रधानकी नाकारली. नाइलाजास्तव ग्लॅडस्टननें प्रधानकी पत्करली, पण लोकमत प्रतिकूल होतें. १८७३—७४सालीं राजीनामे व निवडणुकी या घोटाळ्यांत जाऊन अखेर टोरीपक्षाचें सेहेचाळीसनें मताधिक्य झालें; व ग्लॅडस्टननें अधिकार सोडला. या सुमारास त्याचें वय चौसष्ट वर्षांचें होतें व

उतार वयांत राजकारण सोडून देण्याचा आपला बेतहि तो जाहीरपणें बोलूं लागला. त्याप्रमाणें १८७४ सालीं कॉमन्स सभेच्या बैठकींना तो फारसा हजरहि नसे. १८७५ मध्यें लिबरल पक्षाचा पुढारीपणाहि त्यानें सोडला. पण स. १८७५ च्या पावसाळयांत बल्गेरियांत बंड झालें तें तुर्कांनीं जुलूम व कत्तली करून मोडलें. या जुलुमाचा प्रतिकार करण्याकरितां ग्लॅडस्टन मोठ्या आवेशानें पुढें सरसावला व लेख, जाहीर व्याख्यानें व पार्लमेंटांतील भाषणें यांनीं तुर्की सरकारविरुद्ध इंग्लिश लोकमत त्यानें खवळून सोडलें. डिझरायली तुर्की सरकारचा पक्षपाती होता. त्याच्याविरुद्ध ग्लॅडस्टननें १८७६—८० या सालांत भयंकर गहजब उडवून दिला. अखेर १८८० मध्यें होणाऱ्या निवडणुकींत डिझरायलीचें परराष्ट्रीय धोरण पसंत कीं नापसंत या एकाच मुद्यावर मतदारांनीं सभासद निवडून दिले व त्यांत टोरी पक्षाचा पूर्ण पराभव होऊन लिबरलपक्ष फार मोठ्या मताधिक्यानें अधिकारारूढ झाला. तेव्हां मुख्य प्रधानकीचा प्रश्न आला; राणीनें हॅरिंगटन, ग्रॅनव्हिल यांनां प्रधानकी देऊं केली: पण दोघांनीं ग्लॅडस्टनकडे बोट दाखविलें. त्यामुळें १८८० च्या एप्रिलमध्यें ग्लॅडस्टन पुनरपि मुख्य प्रधान झाला. या कारकीर्दींतील त्याची मुख्य कामगिरी म्हणजे शेतमजुरांनां मताधिकार देण्याचा कायदा करणें ही होय. त्यांत त्याला यश मिळालें, पण त्याच वेळीं आयर्लंड व इजिप्तसंबंधानें मोठे वादग्रस्त प्रश्न उपस्थित होऊन ते लिबरल पक्षास अत्यंत कमकुवत करण्यास कारण झाले. आयर्लंडांतील जमीनीबाबत हक्कांत सुधारणा करण्यासंबंधाचें व जमीनदारांनीं काढून टाकलेल्या कुळांनां नुकसानभरपाई देण्यासंबंधाचें अशीं दोन बिलें ग्लॅडस्टननें हातीं घेतलीं; पण त्यामुळें इंग्लंड व आयर्लंड या दोन्हीं देशांत बरेंच लोकमत त्याच्या विरुद्ध झालें. आणि बिलें नापास झाल्यामुळें आयर्लंडांत अनेक दंगेधोपे व खूनहि झाले, व पार्लमेंटांत ऐरिश पक्ष प्रधानमंडळावर नाखूष झाला. तिकडे ईजिप्तमध्यें अलेक्झांड्रियाचा किल्ला तोफांच्या माऱ्यानें उध्वस्त करण्यांत आला ही गोष्टहि बऱ्याच लिबरलपक्षीयांनां पसंत झाली नाहीं. पुढें लवकरच जनरल गॉर्डन हा अकाली मृत्युमुखीं पडला. त्यामुळें प्रधानमंडळाविरुद्ध क्रोधाग्नि भडकून विरुद्ध पक्षानें निषेधपर ठरावहि पुढें आणले. अखेर १८८५ च्या बजेटावर प्रधानमंडळाचा पराजय होऊन ग्लॅडस्टननें राजीनामा दिला व सॅलिसबरी मुख्य प्रधान झाला. नव्या निवडणुकींत टोरी व पार्नेल पक्ष हे दोन पक्ष मिळून लिबरलपक्षापेक्षां संख्याधिक्य होतें. पण अकल्पित चमत्कार असा झाला कीं, आयर्लंडला होमरूल देण्यास ग्लॅडस्टन अनुकूल असल्याचें प्रसिद्ध झालें. त्याबरोबर पार्नेलपक्ष ग्लॅडस्टनला मिळून टोरी पक्षाच्या संख्याहीनत्वामुळें सॅलिसबरीच्या जागीं १८८६ मध्यें ग्लॅडस्टन तिसऱ्यांदा मुख्य बनला. त्यानें ऐप्रिलमध्यें आपलें ऐरिश होमरूल बिल पुढें मांडलें; परंतु तें तीस मतांनीं नापास झालें. तेव्हां ग्लॅडस्टनच्या आग्रहाच्या विनंतीवरून राणीनें पार्लमेंटची नवी निवडणूक केली. तींतहि होमरूल बिलाविरुद्ध संख्याधिक्य झाल्यामुळें ग्लॅडस्टननें राजीनामा दिला. व पुन्हां सॅलिसबरी प्रधान झाला. या सुमाराच्या दोन खासगी महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे एक १८८९ जुलै २५ रोजीं त्यानें आपल्या विवाहाचा पन्नासावा वार्षिक दिनोत्सव केला. व १८९१ जुलै रोजीं त्याचा वडील मुलगा विल्यम हेनरी वयाच्या ५२ व्या वर्षी वारला.

१८९२ मध्यें नवी निवडणूक झाली, तींत होमरूल पक्षाचें चाळीसांनीं मताधिक्य झालें, त्यामुळें सॅलिसबरीच्या ऐवजीं पुन्हां ग्लॅडस्टन मुख्य प्रधान झाला. येणेंप्रमाणें प्रधानकीचा अधिकार त्याला चवथ्यांदा मिळाला व चार वेळां मुख्य प्रधान झाल्याचें इंग्लिश मुत्सद्यांमध्यें ग्लॅडस्टनचेंच पहिलें उदाहरण होय. १८९३ मध्यें त्यानें आपलें नवें होमरूल बिल पुढें मांडलें व कॉमन्स सभेंत तें पासहि झालें; पण लॉर्डांच्या सभेनें तें नापास केलें. ग्लॅडस्टनला आतां आपली राजकीय कामगिरी संपली असें वाटूं लागल्यामुळें त्यानें १८९२ मार्च १ रोजीं पॅरिस कौन्सिल्स बिलावर आपलें शेवटचें भाषण केलें व मार्च ता. ३ रोजीं राजीनामा राणीच्या हातीं दिला. त्यानंतर त्यानें कामन्ससभेंत मुळींच पाऊल टाकलें नाहीं.

राहिलेलें आयुष्य ग्लॅडस्टननें हावर्डेन येथें काढलें. तेथून लंडन, स्कॉटलंड व दक्षिण फ्रान्समध्यें मित्रांनां भेटण्यास तो कधींकधीं जात असे. रिकामा वेळ होरेसच्या ओडसचें भाषांतर करण्यांत, बटलरच्या ॲनॉलजी व सर्मन्स या पुस्तकांची सटीक आवृत्ति तयार करण्यांत व होमरविषयीं अभ्यासांत तो घालवीत असे. १८९५ मध्यें आर्मेनियांत तुर्कांनीं कत्तली केल्या तेव्हां मात्र पुन्हां त्या राजकीय प्रकरणांवर व्याख्यानें देण्याच्या व लेख लिहिण्याच्या कामांत १८९६—९७ सालीं तो पडला होता. तथापि सरकारी काम सुटल्यापासून त्याचें शारीरिक सामर्थ्य झपाट्यानें कमी होत गेलें, व १८९७ च्या उन्हाळ्याअखेर त्याच्या शरीराला कांहीं तीव्र वेदना होऊं लागल्या, व त्यांतूनच पुढें रोग उद्भवून १८९८ मे १० रोजीं हावर्डेन येथें मरण पावला. मे २५ रोजीं त्याचें प्रेत लंडनला नेऊन वेस्टमिन्स्टर हॉलमध्यें ठेवण्यांत आलें. तेथें दोन अडीच लाख लोक त्याच्या अखेरच्या दर्शनास येऊन गेले. २८ रोजीं प्रेत वेस्टमिन्स्टर ॲबेमध्यें पुरण्यांत आलें. प्रेतयात्रेला दोन्हीं सभांचे सभासद व इतर बडेबडे गृहस्थ वगैरे मोठा जमाव जमला होता. या ग्लॅडस्टन दांपत्याला ४ मुलगे व चार मुली झाल्या. वडील मुलगा पार्लमेंटचा सभासद होता, तो १८९१ त वारला व त्याचाच मुलगा पुढें ईस्टेटीचा वारस झाला. चवथा मुलगाहि पार्लमेंटचा सभासद होऊन व मोठ्या हुद्द्यावर चढून १९१० मध्यें दक्षिण आफ्रिकेचा गव्हर्नर–जनरल झाला. मुलींपैकीं शेवटची हेलन

ही कांहीं वर्षे केंब्रिज येथील न्यूहॅम कॉलेजची व्हाईस-प्रिन्सिपॉल होती.

ग्लॅडस्टनच्या स्वभावाविषयीं विचार करतां त्याच्या अंगच्या नैतिक गुणांतील मुख्य गुण म्हणजे धार्मिक बुद्धि हा होय. ही धर्मनिष्ठा त्याच्या अगदीं बालपणापासून अखेर नव्वद वर्षांपर्यंत कायम होती, व त्यामुळें त्याचें खाजगी व सार्वजनिक आचरण, साधी दूरदृष्टि किंवा व्यवहारचतुरता यांपेक्षां उच्च दर्जाच्या तत्वाला अनुसरूनच नेहमीं होत असे. त्याच्या स्वभावांतील दुसरा पण वरच्या इतकाच जोमदार गुण म्हणजे सत्ताप्रियता. परंतु ही महत्वाकांक्षा केवळ पैसा, मोठा हुद्दा व श्रेष्ठ सामाजिक दर्जा अशा क्षुद्र गोष्टींविषयीं नसून प्रत्यक्ष राज्यतंत्र आपल्या हातीं घेऊन परमेश्वरी सत्तेनें आपल्यावर सोंपविलेलीं राजकीय कर्तव्यें पार पाडण्याविषयींची होती. या अधिकारापेक्षेला निर्भयतेचीहि उत्कृष्ट जोड मिळाली. कोणत्याहि संकटांनां तो भीत नसे, अडचणीमध्यें डगमगत नसे व कोणत्याहि कार्यातील श्रमांनां कंटाळत नसे. स्वसामर्थ्यापलीकडचें असें कांहींहि त्यास वाटत नसे. अधिकारलालसा व निर्भयता यांच्याप्रमाणें त्याची अधिकार बजावण्याची कदराहि विलक्षण होती. पण तींतहि त्याच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो तो असा कीं, इतरांबरोबर बोलण्यासवरण्यांत व वागण्यांत तो अत्यंत आदरशील, मनमिळाऊ व नम्र असे. मात्र वरील कदर व मानीपणा सरकारी अम्मलबजावणींत, स्वमताभिमानांत, दृढनिश्चयांत, स्वमताच्या व सुसंस्कृत लोकांच्या मतांच्या एकवाक्यतेविषयींच्या आत्मविश्वासांत दिसून येत असे. तथापि त्याचें आत्मसंयमन इतकें विलक्षण असे कीं मोठ्या रागलोभाच्या भरांत केलेलीं विधानेंहि परत घेण्याचा प्रसंग त्याच्यावर कधीं आला नाहीं. वास्तविक ग्लॅडस्टन पुराणप्रेमीच होता. कारण जुन्या संस्था, चालीरीती व पद्धती प्रत्यक्ष अनर्थकारक होईपर्यंत कायम ठेवण्याकडे त्याचा नेहमीं ओढा असे. अनुभवानें ही पुराणप्रियता कमी होतां होतां उत्तर वयांत त्यानें राजकारणांत अनेक क्रांतिकारक गोष्टीहि केल्या हें खरें आहे. तथापि लोकसत्ताक राज्यपद्धति चालू असलेल्या देशांत केवळ हरएक बाबतींत क्रांति घडवून आणण्याच्या उत्कट भावनेनें प्रेरित झालेले इसम लोकनायक बनल्यानें, आणि उलटपक्षीं ग्लॅडस्टनसारखे योग्य कारणांनीं व सावकाश पूर्ण विचारांतीं मनाची खात्री पटल्यावर त्या त्या गोष्टींचा स्वीकार करून त्या योग्य मार्गांनीं अमलांत आणणारे लोकनेते लाभल्यानें लोकशासित राज्यावर अगदीं निरनिराळ्या प्रकारचे परिणाम घडत असतात, ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेविली पाहिजे. वक्तृत्व व जमाखर्चाच्या कारभारांतील कौशल्य या गोष्टी ग्लॅडस्टनमध्यें उत्कृष्ट होत्या हें तर खरेंच; पण मनाची एकाग्रता करण्याची शक्ति हा गुण इतर समकालीन मुत्सद्यांपेक्षां आपणांत विशेष आहे असें तो स्वतःच म्हणत असे. कोणतीहि गोष्ट एकदां हातीं घेतल्यावर तींत तो इतका व्यग्र होत असे कीं, बाकीचें जग तो साफ विसरून जात असे. लॉर्ड मोर्लेनें १९०३ सालीं प्रसिद्ध केलेल्या ग्लॅडस्टनच्या चरित्रग्रंथाहून जास्त सविस्तर व प्रमाणभूत संदर्भग्रंथ दुसरा कोणताहि आढळणार नाहीं.

ग्लॅसर—हा फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ १७ व्या शतकांत होऊन गेला. तो औषधें तयार करून विकीत असे. ब्रिनव्हिलीर्सच्या सरदाराच्या पत्नीकडून झालेल्या विषप्रयोगाच्या कटांत तो सामील होता असें म्हणतात. त्यानें पालाशगंधकित तयार करून त्याचा औषधींत उपयोग केला.

ग्लाबर—(१६०४–१६६८) हा जर्मन रसायनशास्त्रज्ञ बव्हेरियामध्यें कार्लस्टाड येथें जन्मला. याच्या जीवन चरित्राची फारशी माहिती उपलब्ध नाहीं. हा प्रथम व्हिएन्ना, मग साल्झबर्ग, फ्रांकफर्ट, कलोन इत्यादि ठिकाणीं राहून शेवटीं हॉलंडमध्यें स्थायिक झाला. तेथें तो रासायनिक औषधी द्रव्यें गुप्तपणें विकीत असे. याच्या ग्रंथांतून जुन्या द्रावकांचींच वर्णनें आढळतात. तरी यानें खऱ्या रसायनशास्त्राच्या ज्ञानांत थोडीशी भर टाकली आहे. साध्या मिठाशीं उज्जगंधकाम्लाचा संयोग करून उद्हराम्ल तयार करण्याच्या कृतीचा यानेंच शोध लावला. मिठाच्या ऐवजीं सोडा वापरल्यास नत्राम्ल तयार होतें हेंहि यानेंच दाखविलें. यानें शिसें, कथील, लोखंड, जस्त, ताम्र, ताल व अञ्जन यांचीं हरिदें व इतर पुष्कळ क्षार तयार केले. शिवाय द्विपृथक्करणाचे कांहीं प्रयोग यानें करून पाहिले. औषधें तयार करून किंवा रंग वगैरे औद्योगिक उपयोगाचे जिन्नस तयार करून किंवा जमीनीकरितां खतें तयार करून आपल्या ज्ञानाचा व्यवहारांत उपयोग करतां यावा अशी त्याची फार इच्छा होती. याचा एक ट्यूशलंड वूलफर्थ नांवाचा ग्रंथ आहे. त्यांत त्यानें फार आग्रहानें सांगितलें आहे कीं, जर्मनींतील नैसर्गिक संपत्तीचा राष्ट्रानें आपल्या फायद्याकरितां शक्य तितका उपयोग करावा. एतदर्थ त्यानें अनेक उपायहि आपल्या ग्रंथांत सुचविले आहेत.

त्याचे सरासरी ३० ग्रंथ फ्रांकफर्ट येथें १६५८त प्रसिद्ध झाले; ॲमस्टर्डॅम येथें १६६१ त प्रसिद्ध झाले व त्यांचे पॅकेनें इंग्रजींत भाषांतर करून लंडन येथें १६८९ त प्रसिद्ध केले. हा ॲमस्टर्डॅम येथें इ. स. १६६८ सालीं मरण पावला.

ग्लासगो—स्कॉटलंड देशांतील लॅनार्कशायर परगण्यांतलें मुख्य शहर, रॉयल बर्ग (सनदीगांव) व बंदर. हें शहर क्लाईड नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेलें असून नदीवर पुष्कळ पूल बांधिले आहेत.

इ मा र ती.—शहराच्या मध्यभागीं जॉर्ज स्क्वेअर नांवाची मोकळी जागा आहे तिच्या पूर्वेस म्युनिसिपालिटीची भव्य इमारत, पूर्वेस जनरल पोस्ट ऑफीस व पश्चिमेस स्कॉटलंडची पेढी व मर्चंट्स हाऊस (व्यापाऱ्यांचा अड्डा) या इमारती आहेत. व्यापारी देवघेवीची इमारत

(रायल एक्स्चेंज), ग्लासगो हेरल्ड वर्तमानपत्राची कचेरी, ललितकला–संस्था (फाइन आर्ट्स इन्स्टिटयूट) व कॉर्पोरेशनचें चित्रसंग्रहालय वगैरे इमारती आहेत. आर्गाईल हा फार रहदारीचा रस्ता असून त्यांत दुकानें आहेत. येथें आग्नेय भागांत सेंट मंगोचें प्रार्थनामंदिर (कथेड्रल) आहे. याची स्थापना १५ व्या शतकांत झाली फरपार्क नांवाच्या टेंकडीवर नेक्रोपोलिस नांवाची स्मशानभूमि आहे.

शि क्ष ण.—ग्लासगो विश्वविद्यालयाची स्थापना इ. स. १४५० मध्यें बिशप टर्नबुल यानें केली. विश्वविद्यालयाची सांप्रतची इमारत गिलमोअर टेंकडीवर आहे. ही इमारत १८७० सालीं पुरी झाली. येथील ग्रंथसंग्रहालयांत हॅमिल्टन व हंटर यांचे ग्रंथसंग्रह असून शिवाय नाणीं, पदकें, वगैरेंचा चांगला संग्रह डोवॅन टेंकडीवर आहे. या विश्वविद्यालयांत कला, धर्म, वैद्यक, कायदा व शास्त्र हे विषय शिकवितात. येथें सुमारें २००० विद्यार्थी असतात. ग्लासगो व ॲबरडीन ह्या दोन विश्वविद्यालयांनां पार्लमेंटसाठीं एक सभासद निवडण्याचा हक्क आहे. क्वीन मार्गारेट व म्यूरहेड हीं दोन विद्यालयें स्त्रियांसाठीं आहेत. प्राथमिक शिक्षणाची सोय, वसतीगृह असलेल्या शाळांतून केलेली आहे. दुय्यम, उच्च व धंदेशिक्षणाच्या बऱ्याच शाळा आहेत.

येथील व्यापारी व कारखानदार यांनीं कलेच्या उत्कर्षाला फारच सढळ हातानें मदत केली आहे. केल्व्हिन ग्रोव्ह पार्कमध्यें चित्रसंग्रहालय, ' ललितकलासंस्था ' व ' पीपल्स पॅलेस ' मध्यें असलेलीं चित्रांचीं प्रदर्शनें, विश्वविद्यालयाचें ग्रंथसंग्रहालय, हंटरपदार्थसंग्रहालय, यंत्रशिल्प, तत्त्वज्ञान व वैद्यक या विषयांचीं ग्रंथालयें, मायकेल मिचेल, स्टर्लिंग व बेली या गृहस्थांनीं देणगी देऊन स्थापिलेलीं ग्रंथालयें हीं मुख्य आहेत. येथें अनाथ, पंगू, वगैरे लोकांसाठीं संस्था असून बरींच इस्पितळें आहेत. येथील बहुतेक पुतळे 'जार्ज स्क्वेअर' मध्यें आहेत. यांत सर वॉल्टर स्कॉट, व्हिक्टोरिआ, पील, कॅंपबेल (कवि), मूर, लिव्हिंग्स्टन, बर्न्स, ग्लॅडस्टन, यांचे प्रमुख पुतळे आहेत. बाजारपेठेंत वेलिंग्टनचा पुतळा असून 'ग्रीन' वर नेल्सनचें स्मारक म्हणून एक निमूळता स्तंभ आहे.

येथें नाटकगृहें, सर्कशी, जलशांचीं गृहें, वेगवेगळे क्लब अशीं बरींच करमणुकीचीं साधनें आहेत येथें ग्रीन ही मुख्य विहारभूमि असून दुसऱ्या कित्येक विहारभूमी आहेत.

द ळ ण व ळ णा चीं सा ध नें.—येथें रेल्वेचे बरेच फांटे आहेत. याशिवाय जमिनींतून चालणारी रेल्वे आहे. त्याचप्रमाणें सर्व शहरभर ट्रॅमचे रस्ते आहेत.

व्या पा र.—कोळसा व लोखंड यांच्या खाणी जवळ असल्यामुळें व डोंगरांतून पाण्याचा चांगला प्रवाह वहात असल्यामुळें ग्लासगो शहराचा व्यापार वाढला. प्रथमतः विणकामाबद्दल ग्लासगोची प्रसिद्धि होती. अद्यापि देखील येथें बऱ्याच कापसाच्या गिरण्या आहेत. निरनिराळ्या तऱ्हेची मलमल, गिंघम जातीचें सुंदर कापड याबद्दल ग्लासगोची ख्याति आहे. कांहीं कारखान्यांत जाळीदार पडदे तयार होतात. धुणें, छापणें व रंग देणें हे धंदे चांगले चालतात. यांशिवाय बरेच किरकोळ धंदे चालतात. लोखंड गाळण्याचा धंदा येथें मोठ्या प्रमाणावर चालतो. येथें रेल्वेचीं इंजिनें तयार होतात. ग्लासगो येथें जहाजें बांधण्याचा सर्वांत मोठा धंदा चालतो व सर्व तऱ्हेचीं जहाजें तयार होतात.

ग्लासगो बंदरानें सुमारें ८॥ मैलपर्यंत धक्के पसरले असून येथें सध्या किंग्स्टन, क्वीन व प्रिन्स या तीन मुख्य गोद्या आहेत. पीठ, फळें, इमारतीचें लांकूड, अशुद्ध लोखंड, गुरेंढोरें व गहूं यांची आयात होते. सुती कापड, लोखंडी व पोलादी काम, यंत्रें, व्हिस्की, तागाचें कापड, कोळसा, लोकरीचें कापड वगैरे पदार्थांची निर्गत होते.

का र भा र.—शहराची आडवीउभी लांबी ५ मैल असून घेर २७ मैलांचा आहे. येथील कारभार कार्पोरेशनच्या ताब्यांत आहे. तींत ७७ सभासद असून त्यांच्यावर मुख्य मॅजिस्ट्रेट असतो. कार्पोरेशनच्या ताब्यांत पाणी, गॅस व विद्युत्शक्ति, ट्रॅमगाडी व म्युनिसिपालिटीचीं घरें आहेत. या सर्व कामांत ग्लासगो कार्पोरेशनची ख्याति आहे. गरीब लोकांच्या राहत्या घरांसंबंधीं कठिण प्रश्न कार्पोरेशनला आला होता तेव्हां सुमारें १०,००० घरें पाडून नवीन बांधण्याचा उपक्रम करण्यांत आला या सर्व सुधारणांबरोबरच नवीन गटारांची पद्धति सुरू करण्यांत आली. या शहराचे सात भाग केले असून प्रत्येक भागाला पार्लमेंटांत एक प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क आहे. ग्लासगोची लोकसंख्या १९व्या व्या शतकांत फार वाढली. १८०१ मध्यें ७७३८५ लोकसंख्या होती, १९२१ मध्यें १०३४०६९ भरली.

इ ति हा स.—१२ व्या शतकापासून ग्लासगो शहराची संगतवार माहिती मिळते. इ. स. १३००त वॅलेसनें हायस्ट्रीटच्या जागेवर इंग्लिशांचा पराभव केला. त्याचप्रमाणें 'रॉब्रायस्टन ' येथें दंतकथेनुरूप वॅलेस यास विश्वासघातानें इंग्लिशांच्या स्वाधीन करण्यांत आलें. येथील रहिवाशी राणी मेरीच्या विरुद्ध पक्षाचे असून त्यांनीं मुरेला लँगसाइडच्या (सध्यांचा क्वीनपार्क) युद्धांत मदत केली. याच युद्धामुळें तिचें राज्य गेलें. स्कॉटलंड व इंग्लंड या देशांचें एकत्र होणें ग्लासगो शहराला खपलें नाहीं. परंतु याच तहान्वयें स्कॉटिश बंदरांची योग्यता इंग्लिश बंदरांच्या बरोबरीनें झाली व ग्लासगोचा भरभराट फारच झपाट्यानें झाली. येथें तंबाखूचा व्यापार फारच वाढला. अमेरिकन युद्धापासून ग्लासगोचे सध्याचे मुख्य धंदे उदयास आले. इ. स. १७६४ त जेम्स वॅटनें वाफेचें एंजिन सुधारलें. व १९ व्या शतकांत जहाजें बांधण्याचा धंदा फारच मोठया प्रमाणावर वाढला.

ग्लिसरिन—तेलें व चरबी यांत सांपडणारा शर्करांश शुभ्रकारक क्रियेनें निराळा काढल्यावर ग्लिसरिन तयार

होतें. हें एक चिकट, रंगहीन, चवीस गोड असणारें पातळ द्रव्य आहे. तें पाण्यांत व मद्यार्कांत विरघळतें. परंतु ईथरमध्यें मात्र जलद विरघळत नाहीं. वैद्यक्रियेंत हें औषध फार उपयोगी पडतें. जखमेची आग किंवा वेदना कमी होऊन त्या मऊ रहाण्याकरितां तेलापेक्षांहि ग्लिसरिन जास्त गुणकारी आहे असें मानतात.कारण तें जखमेस आरामकारक असून जलदी धुतलें जातें. तसेंच शरीराचा कोणताहि भाग थंडीनें फुटल्यास त्यावर ग्लिसरीनचा फार उपयोग होतो. मुखरोगानें तोंडांत फोड आले असल्यास ग्लिसरीनच्या योगें विकार नाहींसा होतो. टॉनिक व कार्बालिक ॲसिड वगैरे पदार्थांची तीव्रता कमी करण्याकरितां त्यांत ग्लिसरीन मिसळतात. हवेंत कितीहि थंडी उत्पन्न झाली असतां न थिजणें, नेहमीं पातळ स्थितींत रहाणें व हवेंत उडून न जाणें या तीन गुणांमुळें ग्लिसरिनचा निरनिराळे धंदेवाले उपयोग करितात. याचा घड्याळासारख्या लहान यंत्रास वंगणासारखा उपयोग होतो. प्लास्टर ऑफ पारिस, चित्रकार यांस लागणारे पाण्यांतील रंग, चित्रें करण्याची नरम माती वगैरे ज्या पदार्थांस हमेष नरम व द्रवरूप ठेवण्याची जरूर असते त्या ठिकाणीं ग्लिसरीनचीच योजना होते.

ग्लूस्टर—इंग्लंडमधील ग्लूस्टरशायर प्रांतांतील बंदर व शहर. हें शहर लंडनहून ११४ मैल असून सेव्हर्न नदीच्या कांठीं आहे. या शहरांत म्युनिसिपालिटि असून या शहरातर्फे पार्लमेंटांत एक सभासद जातो. या शहरांत जाणारी "ग्रेट वेस्टर्न रेल्वे" व "मिडलॅन्ड रेल्वे" हे दोन आगगाडीचे रस्ते आहेत. लो.स. (१९२१) ५१३३०.

ग्लूस्टर शहराच्या उत्तरेस या प्रांतांतील मुख्य देवालय आहे. ह्या देवालयाची स्थापना ६८१ सालीं झाली असून १५४१ सालीं याकरितां एक जॉन वॅकमन नांवाचा पहिला बिशप नेमला गेला. हें देवालय फार सुंदर बांधलेलें आहे. या देवालयांत दुसरा एडवर्ड, बिशप वॉरबरटन, डॉ. एडवर्ड जेनर इत्यादिकांचीं थडगीं आहेत. प्रतिवर्षी या देवालयांत एक उत्सव होत असतो. या देवालयाखेरीज इतर चार मंदिरें या शहरांत आहेत. या शहरांतील घरें जुन्या पद्धतीवर बांधलेली आहेत तथापि जुन्या सार्वजनिक इमारती आतां राहिल्या नाहींत. नव्या इमारतींपैकीं मुख्य इमारती— अजबखाना, शाळा, तुरुंग, शायर हॉल व व्हाइटफील्ड मेमोरियल चर्च ह्या होत. शहराच्या दक्षिणेस एक बगीचा असून त्यांत एक खनिज झरा आहे. या खनिज झऱ्याचा शोध १८१४ सालीं लागला. या बगीच्याच्या पश्चिमेस "लॅनथोनी प्रायोरी" या जुन्या इमारतीचे कांहीं अवशेष आहेत.

या शहरांत काड्यांच्या पेटया, पाटया, रासायनिक द्रव्यें, रेल्वेचे डबे, एंजिनें, शेतकीचीं हत्यारें व जहाजें या जिनसांचे कारखाने आहेत. १८८२ सालापासून ग्लूस्टर हें बंदर झालें. बर्कले कालवा १८२७ त उघडला गेला होता. आयातीचा माल जळाऊ लांकूड व धान्य हा असून निर्गतीचा माल कोळसा, मीठ, लोखंड व विटा हा आहे. या शहरांत माशांचा व्यापार मोठा आहे. कायदेमंडळ ३१ सभासदांचें असून त्यांत १ मेयर, १० आल्डरमन व इतर सभासद असतात. पार्लमेंटांत एक सभासद पाठविला जातो.

इतिहास.—इ. स. ९६-९८सालीं ग्लूस्टर येथें रोमन लोकांनीं म्युनिसिपालिटीची स्थापना केली होती. ६८१ सालीं येथें एका मंदिराची स्थापना झाली. ११५५सालीं दुसरा हेनरी यानें येथील लोकांनां राजकीय हक्क दिले. त्यानंतर ११९४ सालीं पहिला रिचर्ड व १२०० मध्यें जॉन यांनीं जास्त हक्क दिले. १४८३ सालीं तिसऱ्या रिचर्डनें हें शहर आपल्या राज्यास जोडलें व १५६० त इलिझाबेथ व १६०४त पहिला जेम्स यांनीं येथील लोकांनां दिलेले हक्क मान्य केले. १२९५ ते १८८५ पर्यंत येथून पार्लमेंटांत दोन सभासद जात. परंतु १८८५ सालापासून फक्त एक सभासद पाठविण्याची परवानगी मिळाली. प्रतिवर्षी २८ सप्टेंबर रोजीं येथें एक यात्रा भरते.

ग्वा—ब्रह्मदेश (लोअर). सॅन्डोवे जिल्ह्यांतला एक परगणा.क्षेत्रफळ १२६४ चौ.मै. याचा विस्तार आराकान योमापासून बंगालच्या उपसागरापर्यंत आहे व समुद्रकिनाऱ्याला पक्का खडक आहे. १९०१ मध्यें लोकसंख्या १८४३७ म्हणजे दर मैलीं अवघे १५लोक होती. मुख्य ठिकाण ग्वा हें खेडें ग्वा नदीच्या मुखाशीं आहे. एकंदर खेडीं १७७.१९०३-४ सालीं लागवडीखालीं २२ चौ. मै. जमीन होती व काराचें उत्पन्न २२८०० रु. झालें. बहुतेक लोक बुद्धधर्मानुयायी आहेत. चिन लोक मात्र भूतपिशाच्च्यांची पूजा करतात.

ग्वाटेमाला,वि भा ग.–या नांवानें सध्यां फक्त ग्वाटेमाला या प्रजासत्ताक राज्याचा व त्याच नांवाच्या शहराचा बोध होतो. पण पूर्वी हें नांव स्पॅनिश अमेरिकेच्या एका विभागास दिलें होतें. यांत एकंदर पंधरा प्रांत होते.त्यांपैकीं चिआपास, सूचीटेपीक्यूस, सॉन्सोनेट हे प्रमुख होत. थोडक्यांत या नांवानें पनामाखेरीज करून बहुतेक सर्व मध्यअमेरिका व मेक्सिकोचा कांहीं भाग यांचा बोध होत असे. ग्वाटेमाला या शब्दाचा अर्थ 'जंगलाची जमीन' असा कांहीं जण करतात.

ग्वाटेमालाचें प्रजासत्ताक राज्य उ.अ.१३°४२'ते१७°४९' व पू. रे. ८८° १०' ते ९२° ३०' यांमध्यें वसलेलें आहे. याची लो सं. इ. स. १९०३ सालीं १८४२१३४ होती क्षेत्रफळ ४८२९० चौरस मैल आहे.

याच्या उत्तरेस व पश्चिमेस मेक्सिको, ईशान्येस ब्रिटिश हॉन्डुरास, पूर्वेस हॉन्डुरासचें आखात व हॉन्डुरासचें प्रजासत्ताक राज्य, आग्नेयीस सॅल्व्हाडॉर आणि दक्षिणेस पॅसिफिक महासागर आहे. या प्रांताची मेक्सिकोकडील सरहद्द ८ मे इ. स. १८९९ रोजीं भरलेल्या परिषदेंत निश्चित झाली. या प्रांताचे स्वाभाविक पांच विभाग पडतात. (१)

पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यालगतचा सखल प्रदेश, (२) सिएरा मॅड्रेमधील ज्वालामुखी पर्वत, (३) या पर्वतांच्या उत्तरेस असलेलें पठार, (४) अटलांटिक महासागराकडील पर्वत व (५) पेटनचें मैदान.

न द्या.— प्रांतांत बऱ्याच नद्या आहेत. सिएरा पर्वताच्या पश्चिमेकडील भागांत जरी नद्या बऱ्याचशा आहेत तरी पण त्या लहान आहेत. परंतु पूर्वेकडे बऱ्याचशा नद्या असून त्या मोठयाहि आहेत. मॉन्टेग्युआंतील रायोग्रॅन्डो नांवाची नदी सुमारें २५० मैल लांब असून ती राजधानीपासून जवळ जवळ ९० मैल पर्यंत नौकानयनाजोगी आहे. पॉलोचिक नांवाची १८० मैल लांबीची दुसरी एक नदी असून ती टेलेमान बंदराच्या वरच्या बाजूस सुमारें २० मैल पर्यंत नौकानयनास योग्य आहे. चेक्सॉय, ग्वाडेल्यूप व रायोडीला पॅशन व इतर कांहीं नद्या मिळून उसुमॅसिन्टा नदी होते.

स रो व रें:—या प्रांतांत विस्तृत सरोवरेंहि बरीचशीं आहेत. पेटनचे सरोवर २७ मैल लांब व १३ मैल रुंद आहे. मध्यिमेकडील एका बेटांत फ्लोअर्स नांवाचें सरोवर आहे. त्याच्या कांठावर जोबिटिसिनाळची गुहा असून स्थानिक उत्सवासाठीं तें स्थान प्रसिद्ध आहे. या तळ्यांत कॉर्टिस याच्या घोड्याचा दगडी पुतळा अजूनहि दिसतो अशी आख्यायिका आहे याशिवाय गोल्फो डलसे नांवाचें एक गोडया पाण्याचें सरोवर आहे;हें सुमारें३६ मैल लांब आहे.राजधानीच्या दक्षिणेकडे सुमारें ९ मैलांवर ॲमॅटिटलॅान नांवाचें सरोवर आहे. याशिवाय समुद्रसपाटीपासून अजमासें २१०० फूट उंचीवर ग्विजा नांवाचें २० मैल लांब व १२ मैल रुंद असें सरोवर आहे. तेथें नाना तऱ्हेचे पक्षी असून त्यांतील एका सुंदर पक्ष्याची ' राष्ट्रचिन्ह ' म्हणून योजना करण्यांत आली आहे.

ह वा.—समुद्रकिनारा खेरीजकरून इतर भागांत हवा आरोग्यकारक आहे. समुद्रकांठच्या प्रदेशांत मात्र सांथीचा ताप (मलेरिआ) असतो. मध्यप्रदेशांत पावसाळा मे महिन्यापासून आक्टोबरपर्यंत असतो; समुद्रकिनाऱ्यावर मात्र कित्येक वेळा डिसेंबर पर्यंत लांबतो.

येथें सोनें, चांदी, शिसें, कथील तांबें, पारा, कोळसा, क्षार, आणि गंधक वगैरे खनिज पदार्थ सांपडतात. लासक्रेमाडासयेथें सोनें सांपडतें.

इ. स. १९०४ सालीं येथील जंगल सुमारें २०३० चौरस मैल होतें. येथें रबर व बऱ्याच तऱ्हेचें लांकूड सांपडतें. फळें, धान्य व औषधोपयोगी वनस्पती येथें विपुल आहेत. याशिवाय या प्रांतांत कॉफी, कोको, ऊंस, नारिंगें, तंबाखू, नीळ वगैरे बरेच पदार्थ उत्पन्न होतात.

लो क व स्ती.—या देशांत जननाचें प्रमाण अधिक असून मृत्यूचें प्रमाण कमी आहे. यामुळें लोकसंख्या सारखी वाढत आहे. याच प्रमाणें परदेशीं जाणारे लोक देखील येथें थोडे आहेत. १९०३ सालीं येथील लोकसंख्या १८४२१३४ अथवा मध्यअमेरिकेच्या लोकसंख्येच्या एक-तृतीयांश होती. १९१४ सालीं ती २००३५७९ भरली. शेंकडा ६० लोक तद्देशीय रहिवाशी असून बाकीचे लॅटिन्स म्हणून ओळखले जातात. या लोकांची भाषा व राहाणी स्पॅनिश धर्तीची आहे. येथें सुमारें १२००० परदेशीय लोक आहेत. त्यांत यूरोपियन, अमेरिकन व ज्यू हे प्रमुख होत. तद्देशीय लोकांच्या संततीपैकीं सुमारें अर्धे व श्वेतवर्णीय संततीपैकीं सुमारें एकतृतीयांश अनौरस असतात.

येथें सुमारें अठरा भाषा प्रचारांत आहेत. येथील इंडियन लोक मय जातीपैकीं आहेत. सोळाव्या शतकांत मय व क्किशेन ह्या जाती सुधारलेल्या म्हणून गणल्या जात होत्या. बाह्यतः येथील निरनिराळ्या लोकांत फारच थोडा फरक दृष्टोत्पत्तीस येतो. हे इंडियन लोक साधारणपणें ठेंगणे पण मजबूत बांध्याचे आहेत. यांचें कपाळ अरुंद असून गालाची हाडें पुढें आलेलीं दिसतात व त्यांचे केस सडक व काळे असतात. स्वभावतः हे लोक शांतताप्रिय आहेत. परंतु स्थानिक राजकारणांत वारंवार ढवळाढवळ करणाऱ्या अनेक क्रान्त्यांत त्यांनीं भाग घेतला आहे. हे लोक अतिशय धार्मिक आहेत. ते साधारणपणें उधळे, आळशी व जुवेबाज आहेत. सार्वजनिक उत्सव, नाच, गाणें व नाटकें करणारे असे 'बंधुसमाज' आहेत. त्यांचीं नाटकें धार्मिक व ऐतिहासिक असतात. त्यांनां बैलांच्या टकरीचा व कोंबड्यां झुंजविण्याचा नाद आहे. ते गानप्रिय असून स्पॅनिश सारंगीवर गातात गंधकयुक्त अशी पिवळट रंगाची माती खाण्याचा त्यांच्यांत प्रघात आहे. पगाराच्या दिवशीं व सणाच्या दिवशीं ते अतिशय दारू पितात.

मु ख्य श ह रें.—ग्वाटेमाला हें शहर राजधानीचें असून १९१० सालीं येथील लोकसंख्या ९०००० होती. याशिवाय इतर प्रमुख शहरें, क्वेझॅलटेनँगो, टोटोनिकॅपम, कोबॅन, सोलोला व एस्किंटला हीं होत. लिव्हिंगूजटन हें बंदर आहे.

नौ का न य न व द ळ ण व ळ णा चीं सा ध नें.— न्यूयॉर्क, न्यू ऑर्लिन्स हॅम्बर्ग वगैरे ठिकाणांशीं ग्वाटेमालाचें दळणवळण आगबोटींनीं होतें. मोठमोठीं शहरें एकमेकांशीं रस्त्यांनीं जोडलेलीं आहेत. आणि ह्या रस्त्यांची डागडुजी वगैरे करितां प्रत्येक पुरुषानें दोन पेसॉस दिले पाहिजेत अगर त्याऐवजीं चार दिवस काम केलें पाहिजे असा नियम आहे. कित्येक सडकाहि आहेत. पण बहुतेक माल खेचरांच्या पाठीवरून नेतात. सर्व आगगाडीचे रस्ते इ. स. १८७५ पासून बांधण्यांत आले आहेत. मध्यअमेरिकेची सार्वराष्ट्रीय रेलवेसंस्था १९१२ सालीं स्थापण्यांत येऊन तिच्या वतीनें ग्वाटेमाला रेलवे (१९५ मैल), ग्वाटेमाला सेंट्रल रेलवे (१३९ मैल) वगैरे गाड्या देशांतून जातात. ग्वाटेमाला 'टपाल' संघांत इ. स. १८८१ सालीं सामील झालें. येथील सर्व ध्वनिवाहक यंत्रें (टेलीफोन) खाजगी

मंडळांच्या मालकीच्या आहेत. १९१७ त ४२३ पोष्ट ऑफिसें, ४३३७ मैलांच्या तारा व ५३१ मैलांचे टेलिफोन होते.

व्या पा र व धं दे.—येथें कच्चे पदार्थ विपुल आहेत. पण त्यांत वाढ होण्यास अजून बरीच जागा आहे. या देशांत लढाया, क्रांत्या व आर्थिक आपत्ती वारंवार येत असल्यामुळें पुरेसें भांडवल मिळत नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं या देशाचा निर्गत व्यापार मुळींच नव्हता. इ. स. १८२५ ते १८५० च्या दरम्यान येथून किरमिजी रंगाकरितां बरीच वनस्पति निर्गत होत असे पण शास्त्रीय पद्धतीनें तयार केलेल्या रंगापुढें तिचा टिकाव न लागल्यामुळें पुढें हा व्यापार बंद पडला.

या व्यापाराची जागा लवकरच कॉफीच्या व्यापारानें भरून काढली. परदेशीय व्यापाराच्या चढाओढींत कापसाचा व मिळीचा व्यापार टिकाव धरू शकला नाहीं.

इ. स. १८९४ च्या जमिनीच्या कायद्याप्रमाणें येथील जमिनीचे कित्येक भाग विक्रीकरितां काढले होते. परदेशीय लोकांस जमिनी फुकट देण्यांत आल्या. मळेवाल्यांकडे नोकर असलेल्या इंडियन लोकांची स्थिति गुलामगिरीच्या तोडीची आहे. कारण मळेवाले मजुरांस पैसे अगाऊ देतात. हे लोक आपली कमाई तात्काळ खर्च करून टाकतात व पुढें कर्ज काढतात आणि या कर्जाची फेड नोकरी करून करावयाची असते.

येथें दारूचे, साखरेचे व तंबाखूचे कारखाने आहेत. याशिवाय कापसाचे व लोंकरीच्या कापडाचेहि कारखाने आहेत. १९१७ सालची आयात व निर्गत अनुक्रमें १७९८३१४ पौंड व १५६१९४६ पौंड होती.

ज मा बं दी—१९१८ सालीं नॅशनल असेंब्लीनें एक बँक (नॅशनल बँक) उघडली. याखेरीज खासगी मोठया ४ बँका येथें आहेत. १९१७—१८ सालची जमाबंदी व खर्च अनुक्रमें १३५४७१५८५ डॉलर व १३१४१३२१८ डॉलर होता.

रा ज्य व्य व स्था.—इ. स. १८७९ सालीं येथील राज्यव्यवस्था ठरविण्यांत आली. ह्यावर इ. स. १८८५, १८८७, १८८९व१९०३या सालीं तींत सुधारणा करण्यांत आली. या कायद्याप्रमाणें कायदे करण्याचा अधिकार राष्ट्रीय सभेस देण्यांत आला आहे. या कायदेकारी मंडळांत ६९ प्रतिनिधी असतात (प्रत्येक २०००० स एक याप्रमाणें); ते चार वर्षांकरितां लोकांनीं निवडलेले असतात. या निवडणुकींत मताधिकार सर्वांनां असतो. या मंडळाचा अध्यक्षहि याचप्रमाणें निवडलेला असतो आणि तो पुढील निवडणुकींत पुन्हां उमेदवार म्हणून उभा राहूं शकत नाहीं. त्याला सहा मंत्र्यांची मदत असते. यांपैकीं प्रत्येकजण निरनिराळ्या खात्याचा मुख्य असतो. याशिवाय त्यास १३ जणांचें राष्ट्रीय सल्लागार मंडळ (कौन्सिल ऑफ स्टेट) मदत करण्याकरितां असतें. यांतील कांहीं सभासद अध्यक्षानें व कांहीं कायदेकारी मंडळानें नेमिले असतात.

स्था नि क रा ज्य व्य व स्था.—यांत एकंदर २१ खातीं असतात. प्रत्येक खात्यावर एक वेगळा अधिकारी असतो. याचे निरनिराळे जिल्हे पाडलेले असतात. या प्रत्येक जिल्ह्यावर मेयर (अध्यक्ष) असतो. त्याला मदत करण्याकरितां एक मंडळ असतें. हें मंडळ आणि अध्यक्ष लोकांनीं निवडलेला असतो.

न्या य खा तें.—येथील दिवाणी अधिकार सदर अदालतीस दिलेला आहे. यांत एक सर न्यायाधीश व याला मदतीस म्हणून चार लोकनियुक्त न्यायाधीश दिलेले असतात. या सहा अपील कचेऱ्या असून प्रत्येकींवर लोकनियुक्त तीन न्यायाधीश असतात.

याशिवाय येथें एकंदर२६कनिष्ठ दर्जाच्या कचेऱ्या आहेत. या प्रत्येकींवरील न्यायाधिशांपैकीं एक अध्यक्षानें व दोन वरिष्ठ कोर्टाच्या सरन्यायाधिशानें नेमलेले असतात.

ध र्म आ णि शि क्ष ण.—रोमन कॅथोलिक हा प्रचलित धर्म येथें आहे. १८९३ सालीं लोकसंख्येपैकीं शेंकडा ९० लोकांनां लिहितांवाचतां येत नसे; शेंकडा २ लोकांस फक्त वाचतां येत असे आणि शेंकडा ८ लोकांस लिहितां व वाचतां येत असे. मुलांनां ६–१४ वर्षें वयापर्यंत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें आहे. १९१७ सालीं येथें एकंदर १९४२सरकारी शाळा होत्या; पैकीं १८ किंडरगार्टन, ४९२ मुलांच्या प्राथमिक व ५१६ मुलींच्या प्राथमिक शाळा. ३४ मुलींसाठीं ट्रेनिंग शाळा, ४९ मजुरांसाठीं रात्रीच्या शाळा, ३ कलाशिक्षणाच्या शाळा व ३१७ खेड्यांतील शाळा होत्या. उच्च प्रतीचें शिक्षण राजधानींतील दोन राष्ट्रीय संस्थांतून दिलें जातें. या शिवाय धंदेशिक्षणाकरितां (उदा. कायदा, वैद्यक, यंत्रशास्त्र) खाजगी संस्था आहेत. १९१८ त ग्वाटेमाला विश्वविद्यालयाची स्थापना झाली.

सं र क्ष ण.—श्वेतवर्णीय व मिश्र लोकांकरितां लष्करी शिक्षण सक्तीचें आहे. अठरा ते तीस वयाचा पुरुषांस चालूं लष्करांत सामील करण्यांत येतें व तीस ते पन्नास वयाच्या पुरुषांस राखीव सैन्यांत सामील करण्याची पद्धत येथें आहे.

इ ति हा स.—हा देश स्पॅनिश लोकांनीं इ. स. १५२२ व १५२४ च्या दरम्यान काबीज केला. या लोकांनीं येथें रोमन कॅथोलिक धर्माचा प्रसार केला व स्पॅनिश भाषा प्रचारांत आणिली.

प्रारंभीं या देशांत निराळ्या पक्षांचे लोक होते. त्यांत संयुक्त प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या विरुद्ध असलेला एक पक्ष अस्तित्वांत होता. त्यानें संयुक्त प्रजासत्ताक राज्यपद्धति उलथून पाडून लोकसत्ताक राज्यपद्धति अस्तित्वांत आणिली. संयुक्त प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या पुरस्कर्त्यांनीं ती अमलांत आणण्याकरितां अनेक वेळां प्रयत्न केले. पण ते अयशस्वी

झाले. इ. स. १८५१ साली येथें एक नवीन तऱ्हेची राज्य-व्यवस्था अमलांत आली व तीप्रमाणें कॅरेरा यास अध्यक्ष नेमले व पुढें इ. स. १८५४ मध्यें कॅरेरा यानें आमरण अध्यक्ष असावें असें ठरलें.

कॅरेरा यास आपलें पद अढळ राखण्याकरितां लढावें लागलें पण शेवटीं तोच यशस्वी झाला. कॅरेराच्या मागून सेनापती केर्न हा अध्यक्ष झाला. पण इ. स. १८७० च्या सुमारास उदारमतवादी पक्ष प्रबल होत चालला व शेवटीं रुफीनो बॅरिऑस (१८३५–१८८५) यास १८७३ सालीं अध्यक्ष निवडण्यांत आलें. जरी त्यानें शिक्षण, आगगाड्या व उद्योगधंदे यांस अनेक प्रकारें मदत केली व मेक्सिकोची सरहद्द ठरविली तरी पण त्याची कारकीर्द लोकांस दुःखकारकच झाली. याच्यामागून मॅन्युअल बॅरिआस हा अध्यक्ष झाला. या वेळीं तात्पुरती शांतता झाली पण शेवटीं खून व क्रांती हे हेतू असणारे कट झाले.

इ. स. १८९२ सालीं जोसे मेरिआ रीना बॅरिऑस यास अध्यक्ष निवडण्यांत आलें. पण ता. ८ फेब्रुवारी १८९८ रोजीं तो मारला गेला. उपाध्यक्ष सेनॉर मॉरेल्स हा अध्यक्ष झाला; पण त्याच वर्षी इस्ट्राडा कॅब्रेरा यास १९०५ पर्यंत अध्यक्ष निवडलें. कॅब्रेरा यानें शिक्षण व व्यापाराची वाढ केली आणि दळणवळणाच्या साधनांची सुधारणा केली.

इ. स. १९०५ पासून १९११ पर्यंत त्यास पुन्हां अध्यक्ष निवडलें पण त्यामुळें बराच असंतोष माजला. माजी अध्यक्ष बॅटिलास यानें सॅनफ्रॅन्सिस्को येथील कित्येक साहसी लोक जमा केले व १९०६ सालीं मेक्सिकोमधून ग्वाटेमालावर स्वारी केली. बॅटिलॉस यानें चांदीचें नाणें प्रचारांत आणण्याचा आपला मनोदय प्रकट केला व त्यामुळें त्याला ब्रिटिश व जर्मन रहिवाशांची सहानुभूति मिळाली. बॅटिलॉसच्या लोकांनीं ऑकास हस्तगत केलें; पण कॅब्रेरा यानें आपली जागा यत्किंचितहि न सोडतां कित्येक जय मिळविले. पण अमेरिकन अध्यक्ष रूझवेल्ट व मेक्सकोचा अध्यक्ष डिआझ हे मध्यें पडल्यामुळें ता. १९ जुलै रोजीं तात्पुरती लढाई थांबली. शेवटीं ता. २८ सप्टेंबर रोजीं कायमचा तह करण्यांत आला. या तहांत लढाईच्या भागांत व्यापार व नौकानयनासंबंधीं सुधारणा करण्याची अट होती; आणि यापुढें कोणत्याहि भानगडीचा निकाल संयुक्त संस्थान व मेक्सिको यांच्या मध्यस्थीनें लावण्याचें ठरलें.

[संदर्भग्रंथ–सरकारी रिपोर्ट; ब्रिग्हॅम–ग्वाटेमाला; कीन–सेंट्रल अँड साऊथ अमेरिका; विंटर–ग्वाटेमाला अँड हर पीपल टु डे, बोस्टन, १९०९.]

शहर.—हें ग्वाटेमाला प्रजासत्ताक संस्थानाची राजधानी आहे. हें शहर सुमारें ५००० फूट उंचीच्या अफाट पठारावर वसलेलें असून याची एकंदर लोकसंख्या सुमारें ९०००० आहे. ' काऊ ' नांवाची नदी या पठारावर आडवी वहात जाते. या पठाराच्या कडेकडेनें बऱ्याच खोल दऱ्या असून त्याच्या पलीकडे चोहोंबाजूंस उंच पर्वतओळी आहेत. पर्वतांतील सर्वांत उंच अशीं शिखरें दक्षिण बाजूस आहेत. व्यापाराच्या दृष्टीनें हें शहर महत्वाचें आहे. मुख्यतः कॉफीचा व्यापार येथें चालतो. याखेरीज रेशीम, सूत, सिगारेटस्, कातडी जिन्नस, दारू वगैरेसंबंधीं बरेच कारखाने आहेत. परदेशचा व्यापार बहुतेक जर्मनांच्या हातीं असतो. शहराचे रस्ते रुंद व व्यवस्थित असे असून रस्त्यांच्या कडेकडेनें शोभेकरितां व सोयीकरितां मोठीं झाडें लाविलीं आहेत. शहराच्या आसपास बरींच खेडीं वसलेलीं आहेत. घरें प्रायः एकमजली असून मजबूत व सोयीचीं अशीं आहेत. घरांभोंवतीं बगीचे, खेळण्याच्या जागा वगैरे असतात. येथील " प्लाझा मेयर " नांवाचें मोकळें मैदान पाहण्यासारखें असून येथें ख्रिस्ती देवालय, सरकारी कचेऱ्या, टांकसाळ वगैरे इमारती आहेत. " रीफार्मा पार्क " व " प्लाझा डी ला कांकार्डिया " हे दोन रमणबाग (अगर पार्क) प्रसिद्ध आहेत. शहरांत शालागृहें, रुग्णालयें, अनाथवसतीगृहें, पदार्थसंग्रहालय वगैरे आहेत. येथील नाटकगृह मध्यअमेरिकेंत अप्रतीम असें आहे.

येथील दोन किल्ले (कॅस्टेलो मेटॅमोरॉस व कॅस्टेलो डीसान जोसे) प्रेक्षणीय आहेत. शहरांत विजेचे दिवे, टेलिफोन वगैरेंची सोय केलेली आहे. वाढतें महत्त्व व नगररचना या दृष्टीनें हें शहर मध्यअमेरिकेंतील " पॅरिस " समजलें जातें.

ग्वाडलक्विव्हर नदी.—दक्षिणस्पेनमधील नदी. हिचा उगम जेन प्रान्तांत होतो. हिला डावीकडून ग्वाडियाना मेनॉर व उजवीकडून ग्वाडलीमर या उपनद्या मिळतात. हिची लांबी ३६० मैल असून ही अटलांटिक महासागरास मिळते. ही स्पेनमधील लहान नदी आहे. तरी हिचें पाणी आटत नाहीं. सेव्हिलेपर्यंत हिच्यांत जहाजें चालतात.

ग्वाडा—ऱ्होडेशियांतील एक शहर.

ग्वाडेलोपी—फ्रेंच वेस्ट इंडीजमधील एक बेट. हें उत्तर अक्षांश १५°. ५९' ते १६°. २०' आणि ६१° ३१' ते ६१°. ५०' पश्चिम रेखांशांत आहे. ह्या बेटाचे बासटेरी व ग्रांडेटेरी असे दोन भाग होतात. ला सुफ्री नांवाचें सर्वांत उंच शिखर (४९०० फूट) आहे. बासटेरीमध्यें लहान नद्या पुष्कळ आहेत. ग्रांडटेरीला तळीं व हौद यांमधून पाण्याचा पुरवठा होतो. ह्या बेटांत भयंकर वादळें होतात. जमीन चांगली असून मुख्यत्वेंकरून साखर तयार होते. द्विदलधान्यें, कोको, कापूस, याम व रबर हे इतर पदार्थहि तयार होतात. बहुतेक निर्गत फ्रान्समध्यें होते. आयात मालांत फ्रान्स, संयुक्त संस्थानें, ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान यांच्याशीं संबंध येतो. या बेटांत कांहीं गोरे, फ्रेंचहद्दींतील कांहीं हिंदी व बाकीचे निग्रो व म्युलेटो लोक आहेत. म्युलेटो लोकांची सौंदर्याबद्दल प्रसिद्धि आहे. लो. सं. (१९१२) २१२४३०. बासटेरी (८६५६) येथें राजधानी

आहे. पॉइंट-आ पिटर (२२६६४) हें सर्वांत मोठें शहर व मुख्य बंदर आहे.

ग्वाडेलोपच्या भोंवतीं लाडेसिराद्, मेरी, गॅलांटी, लेस-सेंटीस, मार्टिन व सेंट बार्थोलोम्यू हीं मांडलिक बेटें आहेत. एक गव्हर्नर व लोकनियुक्त कौन्सिल याकडून राज्यव्यवस्था होते.

इतिहास.—ग्वाडेलोपी बेट १४९३ त कोलंबसानें शोधून काढिलें व स्पेनमधील एका मठावरून सध्यांचें नांव दिलें. १६३५ सालीं फ्रेंचांनीं हें बेट घेतलें. ब्रिटिशांनीं हें बेट १७५९ त मोठ्या शिकस्तीनें काबीज केलें. बोनापार्टनें १८०२ त व्हिक्टर ह्यूजेसनें मोडिलेली गुलामगिरी स्थापण्यासाठीं कांहीं सैन्य पाठविलें. १८१० त पुन्हां ब्रिटिशांनीं हें बेट घेतलें. परंतु १८१६ त मात्र त्यानां परत द्यावें लागलें. १८४८ त गुलामगिरी बंद करण्यांत आली.

ग्वादर—बलुचिस्तान,मकरानमधील एक बंदर. उ. अ० २५°७' पू. रे० ६२.१९'. लो. सं. (१९०३) ४३५०. कराचीपासून २९० मैल. १५८१ मध्यें पोर्तुगीजांनीं यावर स्वारी केली होती. कलात (खिलातच्या)खानानें तें जिंकून मस्कतच्या नबाबास दिलें. तेव्हांपासून ३०० चौ. मैलाच्या मुलुखासह तें त्याच्याच ताब्यांत आहे. व्यापार हिंदु व खोजा लोकांच्या हातीं आहे. आयात माल २ लाखाचा व निर्यात ५॥ लाख. ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीची बोट येथें दर पंधरवड्याला लागते.

ग्वाम—अमेरिका. मरिआना द्वीपसमूहांतील एक बेट. उ. अ. १३°२६' व पू. रे. १४४°४३'. बेटाची लांबी ३२ मैल व रुंदी ४ ते १० मैल आहे. क्षे. फ. सुमारें २२५ चौ. मै. आहे. लो. सं. (१९१८) १४,३४४, पैकीं बहुतेक 'नेटिव' आहेत. स्थानिक भाषा चामोरो आहे. पण इंग्रजी व स्पॅनिश भाषाहि प्रचारात आहे.

युनायटेड स्टेट्सच्या आरमारी खात्याकडे याचा कारभार असून हें एक आरमारी ठिकाण म्हणून गणण्यांत येतें. येथील गव्हर्नर एक आरमारी अधिकारी असून त्याची निवडणूक अमेरिकेच्या प्रेसिडेंटाकडून होते व तोच सर्व राज्यव्यवस्था पाहतो. स्पॅनिश वसाहती कायदे अद्याप अमलांत आहेत. आगना हें राजधानीचें ठिकाण आहे.

या बेटात प्राथमिक शिक्षण सक्तीचें आहे. शाळांतून इंग्रजी भाषा, कलाकुसरीचीं कामें व शेतकी यांचें शिक्षण देण्यांत येतें. मका, तांदूळ, बटाटे, कॉफी, कोको आणि साखर या ठिकाणीं होतें; उत्तम सागवानहि निघतें. १९१८ सालीं १३१७५७ डॉलरची निर्यात व ३५८१४६ डॉलरची आयात होती. येथील चलन (नाणीं) अमेरिकनच आहेत.

ग्वायना—हें नांव दक्षिण अमेरिकेच्या ईशान्येकडील उ.अ.८°४०' ते द.अ.३°३०' व पू. रे. ५०°ते ६८°३०'यांवर असलेल्या प्रदेशाला दिलें आहे. याची लांबी केबोडीनोर्टेपासून रायोक्साय व रायो नीग्रो या नद्यांच्या संगमापर्यंत १२५० मैल व रुंदी बॅरिमा पॉइंटपासून रायोनिग्रो व ॲमेझॉन नद्यांच्या संगमापर्यंत ८०० मैल आहे. क्षेत्रफळ ६९०००० चौरस मैल आहे. या प्रदेशांत व्हेनेझुएलिअन ग्वायना, ब्रिटिश ग्वायना, डच ग्वायना, व फ्रेंच ग्वायना हे प्रदेश आहेत. पैकीं ब्रिटिश, फ्रेंच व डच ग्वायना यांचें वर्णन येथें केलें आहे.

इ ति हा स.—१४९८ मध्यें कोलंबसला ग्वायनाचा समुद्रकिनारा दिसला व त्यानें ट्रिनिदाद बेट व पेरिआचें द्वीपकल्प शोधून काढिलें; पुढल्या वर्षी आलेंझो डिओजेडा व ॲमेरिगो व्हेस्पुसी यांनीं शोध लावला. व्हिन्सेंट यानेझ पिंझॉन यानें ॲमेझॉन नदीचा शोध लावला. काबीज केलेल्या जहाजांत सांपडलेल्या पत्रांवरून सर वाल्टर रॅले १५९५ मध्यें एल्डोरॅडो अथवा 'सुवर्णनगरी' याच्या शोधाकरितां ॲमेझॉन नदी उतरून गेला. इ. सन १५९८ मध्यें प्रथम डच लोक ग्वायनामध्यें आले. १६१३ मध्यें डेमेरेरा व एसेक्विबोच्या समुद्रकिनाऱ्यावर डचांच्या तीन चार वसाहती होत्या. १६१६ मध्यें झीलंडर लोक किक ओवर आल नांवाच्या लहानशा बेटावर वसाहत करून राहिले होते. ज्यावेळीं डच व्यापारी एसेक्विबो व डेमेरॅरामध्यें ठाणें बसविण्याची खटपट करीत होते त्याच वेळीं इंग्लिश व फ्रेंच व्यापारी ओयॅपॉक नदीवर कायेनी व सुरिनाममध्यें वसाहत करण्याचा प्रयत्न करीत होते. डच ईस्ट इंडिया कंपनीनें एसेक्विबोचा ताबा मिळवून १७९१ पर्यंत या लोकांनीं येथें सत्ता चालविली. १६२४ मध्यें बर्बाइस नदीमध्यें एक डच वसाहत झाली व हीपासून बर्बाइस नांवाची एक स्वतंत्र वसाहत झाली. १६५७ मध्यें झीलंडर लोकानीं पोमेरून, मोरूका व डेमेरॅरामध्यें आपला पाय कायमचा रोंविला; व १६७४ मध्यें डच लोक सध्या ज्याला ब्रिटिश व डच ग्वायना म्हणतात त्या सर्व प्रदेशांत वसाहत करीत होते. १७८१ मध्यें डेमेरॅरा, एसेक्विबो व बर्बाइस या तिन्ही वसाहती ब्रिटिशांनीं घेतल्या. परंतु १७८२ मध्यें फ्रेंचांनीं त्या घेऊन १७८३ मध्यें हॉलंडला परत दिल्या. १७९६ मध्यें ब्रिटिशांनीं पुन्हां या वसाहती घेतल्या व १८०२ पर्यंत त्या आपल्या ताब्यांत ठेविल्या व पुन्हां हॉलंडला दिल्या. १८०३ मध्यें ग्रेटब्रिटननें त्या पुन्हा काबीज केल्या व त्या वेळेपासून ब्रिटिश ग्वायनाच्या इतिहासास सुरुवात झाली.

ब्रि टि श ग्वा य ना.—ब्रिटिश ग्वायना हा दक्षिण अमेरिकेंतील ब्रिटिश लोकांचा मुलूख आहे. हा १८१४-१८१५ मध्यें दिला गेला. याचे बर्बाइस, डेमेरॅरा व एसेक्विबो असे तीन विभाग आहेत. १८४० मध्यें सर रॉबर्ट स्कोम्बर्ग यानें व्हेनेझुएला व ब्रिटिश ग्वायना यांच्यांमध्यें एक सरहद्दीची रेषा सुचविली होती. हिला स्कोम्बर्ग लाइन म्हणतात. या हद्दीच्या प्रश्नाचा निकाल आंतरराष्ट्रीय कमिशननें केला व १९०२ मध्यें ब्रिटिश ग्वायना व ब्राझिल यांच्यामधील

सरहद्दीच्या प्रश्नाचा निकाल इटलीच्या राजाच्या मध्यस्तीमुळें लागला. ब्रिटिश ग्वायनानें क्षेत्रफळ ८९४८० चौ. मैल आहे.

शहरें:—ब्रिटिश ग्वायनाची राजधानी जॉर्ज टाऊन हें शहर आहे. हें डेमेरॅरा नदीच्या उजव्या तीरावर असून याची लोकसंख्या सुमारें ५०,००० आहे. न्यु ॲमस्टरडॅम हें बर्बाइस नदीच्या उजव्या तीरावर असून याची लोकसंख्या सुमारें ७५०० आहे. प्रत्येक शहरांत एक मेयर असून कौन्सिल आहे व यांनां कर बसविण्याचा अधिकार आहे. एकोणीस खेडीं व स्थानिक स्वराज्याचा हक्क असलेलीं दुसरीं दहा क्षेत्र आहेत. यांचा कारभार खेड्यांतील कौन्सिल व अधिकारी चालवितात.

लोकसंख्याः—१९११ मध्यें येथील लोकसंख्या २९६००० (मूळचे रानटी लोक सोडून) होती. मूळचे रहिवाशी यांची संख्या १३००० होती.

ग्वायनांतील हिंदी मजूरः—या वसाहतींत एकंदर मजूर पुष्कळ आहेत. ईस्ट इंडियन मजूर एकंदर ६०।७० हजार आहेत. आणखी हिंदी लोक यावेत अशी वसाहतसरकारची इच्छा दिसते.

इ. स. १८३८ पर्यंत येथें गुलामगिरीची पद्धत चालू होती. त्यानंतर मुदतबंदीच्या मजुरांची पद्धत चालू होऊन एकप्रकारें गुलामगिरीच चालू ठेवण्यांत आली होती. ही मुदतबंदीची पद्धत इ. स. १९१७ सालीं कायद्यानें नष्ट करण्यांत आली. इ. स. १८३८ सालीं हिंदुस्थानांतील मुदतबंदीचे मजूर घेऊन हिंदुस्थानचें पहिलें जहाज तेथें गेलें. तेव्हांपासून मुदतबंदीच्या करारावर दरवर्षी हिंदुस्थानांतून मजूर जात असत व त्यांतील कांहीं लोकांनीं पुढें तेथेंच वस्ती केली. पण इ. स. १९१७ पासून मुदतबंदीची पद्धत बंद झाल्यामुळें हिंदुस्थानातून थेट ब्रिटिश ग्वायनात जाणाऱ्या बोटी बंद झाल्या आणि हिंदुस्थानचा व या वसाहतीचा संबंध तुटल्यासारखा झाला. हल्लीं या वसाहतीकडे जावयाचें असल्यास प्रथम इंग्लंडला जावें लागतें व तेथून ग्वायनाची बोट मिळते. कलकत्ता, मुंबईहूनहि ग्वायनाला जाणारी एखादी बोट कधीं काळीं मिळते. हा संबंध पुन्हां जोडण्याची ग्वायनाच्या सरकारची खटपट चालू आहे.

सरकारी मदत घेऊन हिंदुस्थानांतील कांहीं लोकांनीं ब्रिटिश ग्वायनामध्यें राहण्यास जावें अशा अर्थाची एक वसाहतीची योजना हिंदुस्थान सरकारपुढें विचारार्थ ठेवण्याकरितां स. १९१९ अखेर एक ब्रिटिश ग्वायना येथील शिष्ट मंडळ इकडे आलें होतें. इतर ब्रिटिश प्रजाजनांप्रमाणें हिंदी लोकांचा फायदा होईल किंवा नाहीं आणि त्यांचा योग्य दर्जा ठेवण्यात येईल किंवा नाहीं या प्रश्नांसंबंधीं खात्री करून घेण्याकरितां व तेथील स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या कमिटीनें एक शिष्ट मंडळ ग्वायनास पाठविलें. देशांतर करणाऱ्या हिंदी लोकांस समान राजकीय हक्क आम्हीं खुषीनें देऊं असें वसाहतसरकारनें १९२१ सालीं प्रसिद्ध केलें. १९२२ च्या एप्रिल मध्यें हिंदुस्थान सरकारनें, ग्वायनाहून परत स्वदेशीं आलेल्या ११६ हिंदी लोकांनां व त्याचप्रमाणें इतर वसाहतींतून परत आलेल्या १६७ इसमांनां पुनः ब्रिटिश ग्वायनास परत जाण्याची मंजुरी दिली. ब्रिटिश ग्वायना सरकारनेंहि लोकांच्या वाटखर्चाची व ते तेथें पोचतांच त्यांच्या निर्वाहाच्या साधनांची हमी घेतली. अशा रीतीनें डॉ. नूनन व बॅ. लक्कू यांची योजना १९२४ सालापर्यंत तरी यशस्वी झाली; व त्याच वर्षी जून महिन्यांत वरील गृहस्थ स्वदेशीं जाण्यास निघाले. हिंदुस्थानांतील प्रतिनिधींनें रिपोर्ट केल्यावर वसाहतीच्या योजनेची शिफारस करण्याचें येथील कायदेकौन्सिलच्या एमिग्रेशन कमिटीनें ठरविलें.

एप्रिल १९२४ मध्यें मजुरांचा मोठा दंगा झाला. तारीख १ एप्रिल १९२४ रोजीं धक्क्यावरील नीग्रो कामकऱ्यांनीं संप केला व दंग्यास सुरुवात झाली. संप करण्याबद्दल व जॉर्ज टाउन येथें जाऊन अधिक वेतन मिळविण्याच्या चळवळींत भाग घेण्याबद्दल डायमंड व प्रॉव्हिडन्स येथील ईस्ट इंडियन मजुरांचें मन चळवळ्या लोकांनीं वळविलें. जबरदस्तीनें दंगे थोपविण्यांत येतील असे जाहीरनामे ठिकठिकाणीं वाचण्यांत आले; तथापि ईस्ट इंडियन मजुरांनीं शहरांत प्रवेश केला. पोलिसांवर हल्ले झाले, त्यावेळीं गोळीबाराचा हुकूम देण्यांत आला, त्यामुळें नऊ ईस्टइंडियन मजूर ठार झाले आणि बारा जणांनां जखमा झाल्या.

भौगोलिक रचनाः—ब्रिटिश ग्वायनाचे भूपृष्ठभागाच्या विशिष्ट लक्षणांवरून चार भाग करतां येतील. (१) सपाट, 'हायवाटर'च्या खालचा समुद्रकांठचा मळईचा प्रदेश; (२) जंगलमय पट्टी, (३) सॅव्हाना (४) डोंगराच्या रांगा. या देशात पॅकॅरैमा व मेरुमे पर्वत या मोठ्या रांगा व कॅनुकू व ॲकराय या लहान रांगा आहेत. माऊंट रोरैमा माऊंट कुकेनाम, इबाल्करिमा, इलुवारिमा, इलुटिपू, वैआकापिआपु हीं उंच शिखरें आहेत.

नद्या.—वैनि, एसेक्विबो, मॅझॅरुनि, कुयुनि, डेमेरॅरा, बर्बाइस, कोरेन्टान, या मुख्य नद्या आहेत. कायेटुर, व सिपॅरुनि, बुरोबुरो, रेवा, कुयुविनी, कासीकूइनी या एसेक्विबोला मिळणाऱ्या साधारण नद्या आहेत. पोमेरून, मोरूका व बरिमा या नद्या अटलांटिक महासागराला मिळतात. अबारी, महैकानी व माहैका या इतर नद्या आहेत.

हवा:-हवा इतर उष्ण देशांप्रमाणें रोगिष्ट नाहीं. हिंवताप सर्वसाधारण आहेत. क्षयरोगहि आहे. देशाच्या आंतील भागांत रात्री थंड व ओलसर असतात. कधीं कधीं अवर्षणें पडतात. दोन पावसाळे व दोन उन्हाळे प्रत्येक वर्षांत येतात. देशाच्या निरनिराळया भागांत पाऊस निरनिराळ्या प्रमाणांत पडतो.

राज्यव्यवस्था.—पांच अधिकारी व राजानें निवडलेले तीन मेंबरांचें एक कौन्सिल यांच्या सहाय्यानें एक गव्हर्नर राज्यकारभार चालवितो. कायदे करण्याचा अधिकार "कोर्ट ऑफ पॉलिसी" च्या हातीं असतो. कोर्ट ऑफ पॉलिसी व सहा जमाबंदी मेंबर यांच्या संयुक्त कोर्टाचे हातीं कर बसवणें व खर्च करणें या बाबी असतात. कोर्ट ऑफ पॉलिसीचा सभासद होण्यास ८० एकर जमीन मालकीची अथवा २१ वर्षांच्या पट्टयानें मुदतीच्या मालकीची प्रत्येक इसमाजवळ असली पाहिजे. फडणीसी प्रतिनिधि होण्यास अशाच प्रकारची लायकी अथवा सालिना ८०० पौंडांचें उत्पन्न असलें पाहिजे. ज्याच्या जवळ लागवड केलेली तीन एकर जमीन असते अथवा ज्याचें उत्पन्न सालिना ८० पौंड असतें त्या प्रत्येक इसमाला मतदार म्हणून नोंदतात. संस्थानचा वसूल १९१७ सालीं ७३६४७३ पौंड असून खर्च ७३३६८९ पौंड होता.

व्यापार व उद्योगधंदे—या देशांतून गुळपेंड, साखर, दारू, गूळ, सागवान, सोनें, लांकडी तक्ते, गुरें हीं बाहेर पाठवितात. हिरे व इतर जवाहीर थोड्या प्रमाणावर सांपडतात. १९१७ सालची आयात व निर्गत अनुक्रमें ३२७१०१७ पौंड व ४३१५९३९ पौंड होती. येथें प्रचारांत डॉलर व सेंट हीं नाणीं आहेत. दोन बँका नोटा काढतात.

दळणवळणाचे मार्ग.—समुद्रकिनाऱ्यानें व मुख्य नद्यांच्या कांठानें सडका गेलेल्या आहेत. या संस्थानांतून ८७॥ मैल लांबीची रेल्वे जाते. ४५० मैलांच्या नदीमार्गें नौकानयन चालतें व ३२२ मैलांचे रस्ते आहेत. रॉयल मेल स्टीम पॅकेट कंपनीच्या बोटींनीं इंग्लंडहून ब्रिटिश ग्वायनाला सोळा दिवसांत येतां येतें. लंडन व ग्लासगोहून सरळ मार्गानें एकोणीस दिवसांत प्रवासी येऊं शकतो. कानडा, युनायटेड स्टेट्स, फ्रान्स व हॉलंड येथून नियमितपणें बोटी येतात.

इतिहासः—इ. स. १८०३ मध्यें ह्या वसाहती ब्रिटिशांनीं घेतल्या. या वेळेची स्थिति समाधानकारक नव्हती. साखर जास्त पिकल्यामुळें बाजारांत भाव चांगला येत नव्हता. व नेपोलियन बोनापार्टनें बंदरें बंद केल्यामुळें यूरोपांत माल पाठविण्याची सोय नव्हती व याच सुमारास इंग्लंड व युनायटेड स्टेटस यांच्यामध्यें लढाई उपस्थित झाल्यामुळें स्टेट्समध्येंहि माल पाठविणें शक्य नव्हतें. यावेळीं इंग्लंडांत गुलामगिरी बंद करण्याच्या प्रश्नाचा विचार चालल्याच्या बातम्या नीग्रो लोकांनां कळल्यामुळें त्यांनीं बंड करून आपल्या मालकांवर हल्ले केले होते. परंतु या बंडाचा लवकरच बंदोबस्त करण्यांत आला व लष्करी मदत मागविण्यांत येऊन नीग्रो लोकांच्या पुढाऱ्यांनां पकडून त्यांची लष्करी कोर्टापुढें चौकशी करण्यांत आली व त्यांनां जबर शिक्षा देण्यांत आल्या.

इ. स. १८२४ पासून १८३८ पर्यंत सर बेंजामिन डि अर्बन हा गव्हर्नर होता. याच्या कारकीर्दीतील मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे १८३१ मध्यें तिन्ही वसाहतींची एक वसाहत करून तिच्या बर्बाइस, डेमेरेरा, व एसेक्विबो अशा तीन कौंटी केल्या.

अर्बनच्या मागून १८३३मध्यें सर जेम्स कार्मायकल स्मिथ गव्हर्नर झाला. यानें जाहीर केलें कीं, राजाच्या मनांतून गुलामांची स्थिति सुधारण्याचा विचार आहे; पण गुलामांनीं कोणत्याहि प्रकारचा दंगाधोपा करतां कामा नये. कामन्स सभेनें १८३३ मध्यें दास्यविमोचनाचा कायदा पास केला. मळेवाल्यांनां अत्यंत दुःख झालें व गुलामांनां अत्यानंद झाला. देशाची स्थिति फार कष्टमय झाली; परंतु गव्हर्नरनें मोठ्या धोरणानें प्रसंग निभवून नेला व दंगेधोपे उपस्थित झाल्याबरोबर त्यानें स्वतः मोडून टाकले. हा गव्हर्नर १८३८ मध्यें कँप हाऊस येथें मरण पावला.

दास्यविमोचनाच्या नंतरच्या काळांत देशाची स्थिति फार शोचनीय होती. १८५० मध्यें नेमलेल्या कमिशनच्या रिपोर्टावरून असें आढळून आलें कीं देशाची खरोखरी नासाडी झाली होती; व मजूरलोक बाहेर देशाहून आणल्यामुळें मळे वांचले. १८५३ मध्यें वसाहत थोडी पुढें येऊं लागली व त्या वेळचा गव्हर्नर सर हेन्री बार्केली यानें असें बोलून दाखविलें कीं, देशाची प्रगति समाधानकारक आहे. याच्या कारकीर्दीत कायदेकौन्सिल व कार्यकारी मंडळ यांच्यामधील तंटेबखेडे मिटले. पण मजूर लोकांचा पुरवठा त्रासाशिवाय झाला नाहीं. १८४७ मध्यें बर्बाइसमधल्या नीग्रो लोकांनीं पोर्तुगीज मळेवाल्यांच्या मालमत्तेवर हल्ला केला व लष्करी साहाय्यानें हीं बंडें मोडण्यांत आलीं. १८६२ मध्यें अशाच प्रकारचे दंगे नवीन गव्हर्नर सर फ्रॅन्सिस हिंक्स यांच्या कर्तबगारीनें मोडण्यांत आले. हळू हळू १८८३ पर्यंत सर्व गोष्टींचा चांगला बंदोबस्त झाला. १८८४ मध्यें साखरेचा भाव देणग्या देऊन उत्पन्न केलेल्या "बीट साखरे" मुळें फार उतरला व सबंध वसाहतींतील बऱ्याच मळ्यांचें फार नुकसान झालें; व फार थोड्या मळ्यांच्या चालकांनीं केलेल्या काटकसरीमुळें व लागवडीच्या व पैदासीच्या शास्त्रीय शोधामुळें कांहीं थोडे मळे वांचले.

१८८९ सालीं जॉर्ज टॉऊनमध्यें रहाणाऱ्या पोर्तुगीज लोकांविरुद्ध तेथील नीग्रो लोकांनीं बंड केलें. बंडाचें कारण एका पोर्तुगीज मनुष्यानें आपल्या नीग्रो राखेचा खून केला होता व दुसऱ्या एका पोर्तुगीजानें एका नीग्रो पोराला चोरी केल्याबद्दल मारलें होतें. नीग्रो लोकांनीं ओरड केली कीं पोर्तुगीज लोकांनां शिक्षा न होतां नीग्रो लोकांनां ठार करतां येतें म्हणून नीग्रो लोकांनीं सूड उगवला पाहिजे. दोन दिवस सर्व शहरभर अव्यवस्था माजली होती. नंतर पोलीस

लोकांनीं हा दंगा मोडला व पोर्तुग्रीज लोकांनां नुकसान-भरपाई देण्यांत आली.

१८८४ त व्हेनेझुएला व ग्वायना यांच्यामधील सरहद्दी-बद्दल तंटा उपस्थित झाला. अखेरीस या प्रश्नाचा निकाल कसा झाला याचें वर्णन व्हेनेझुएला देशाच्या वर्णनाखालीं आलें आहे. १९०५ च्या शेवटच्या दोन महिन्यांत जॉर्ज टाऊन व डेमेररा नदीच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील नीग्रो लोकांची बंडाळी झाली. या लोकांनीं मळेवाल्यांच्या घरांवर हल्ले करून खिडक्या फोडल्या व गोरे लोकांवर हल्ला केला. पोलीस लोकानां बंडखोरांच्या जमावावर गोळ्या झाडाव्या लागल्या. अखेरीस साफो व डायमंड हीं जहाजें आलीं. बंडखोरांपैकीं पुष्कळ लोकांनां पकडून त्यांची चौकशी करण्यांत आली व अशा रीतीनें शांतता पुन्हां प्रस्थापित करण्यांत आली.

डच ग्वायना.—या देशाचें क्षेत्रफळ ४६०६० चौरस मैल आहे. याच्या पश्चिमेस ब्रिटिश ग्वायना व पूर्वेस फ्रेंच ग्वायना आहे. या देशांतील जमीन व उत्पन्न होणारे पदार्थ यांच्याप्रमाणें येथें रहाणारे निरनिराळे लोक यांची वांटणी झाली आहे. इंडियन लोक (कारिब, ॲरावाक, वारस) हे सॅव्हानामध्यें अथवा वरचा निकेरी, कोपनेम व मरोनि यांच्या कांठावर मळयांपासून फार दूर रहातात. हे लोक मनीऑकच्या शेतांची लागवड करतात व मासे धरतात आणि शिकार करतात. यांची संख्या सरासरी २००० आहे. बुशनीग्रो (मॅरॉन्स) हे बेटें व धबधबे यांच्याजवळ राहतात. यांची संख्या १०००० आहे. सोन्याच्या खाणीवर माणसें व माल पाठविणें, इंडियन लोकांशीं नदीच्या मार्गानें व्यापार करणें व पॅरॅमॅरिबो व मळे यांच्याकडे लांकूड नेणें हे यांचे धंदे होत. पळून गेलेल्या गुलामांचे हे वंशज आहेत व मिशनरी लोक यांच्यामध्यें जाण्यापूर्वी यांच्या पाखंडवादी धर्मामध्यें ख्रिस्ती धर्माचा संबंध दाखविणारीं बरींच चिन्हें होती. यांच्या मुख्य देवाला ग्रॅन गॅडो (ग्रॅंडगॉड) म्हणत व त्याच्या बायकोला मेरिआ व मुलाला जेसी किस्ट म्हणत. ॲम्युका (वनदेवता) व टोनी (जलदेवता) इत्यादि आणखी देवतांची पूजा हे लोक करीत. डच, पोर्तुगीज व दुसऱ्या कित्येक भाषांचें संमिश्रण होऊन बनलेल्या एका अशुद्ध भाषेवर बसविलेली यांची भाषा आहे. यांच्या नायकांनां ग्रमन अथवा मोठा मनुष्य म्हणतात; परंतु त्या लोकांची सत्ता व यांचें भाषाधर्मवैचित्र्य आतां डच व इतर लोकांशीं त्यांच्या झालेल्या दळणवळणामुळें बरेंच नाहींसें झालें आहे. पॅरॅमॅरिबो व मळे यांतील लोक, चिनी, जावानीज, हिंदुस्थानी व वेस्टइंडीजमधील मजूर, निग्रो व गोरे लोक हे आहेत. १२४८९ मुसुलमान, २०८५० हिंदु व ८४७ यहुदी आहेत. जंगलांतील निग्रो व इंडियन लोक सोडून १९१८ त येथील लोकसंख्या ९२२८४ होती. यांतील अर्धे लोक पॅरॅमॅरिबोमध्यें व बाकीचे जिल्ह्यांत रहातात.

मुख्य वसाहती सुरिनाम नदीच्या खालच्या दरींत किंवा सुरिनाम व पश्चिमेस सारामाका व पूर्वेस कोमेविने या नद्यांच्या मध्यें केल्या आहेत. देशाचा आंतील भाग बहुतेक लहान लहान टेंकड्यांचा बनलेला आहे. हिंटरलॅंड व टुमकहुमाक या भागांचा अद्याप शोध लागला नाहीं. ग्वायनाच्या इतर भागांप्रमाणें डच वसाहतीचे सखल समुद्रकांठची जमीन सव्हाना, अगम्य जंगल असे नैसर्गिक विभाग आहेत. पॅरॅमॅरिबो, कोरोनी, सोमेलशडिज्क, नियु निकेरी व ब्रोविंग्जेन येथें हवामानाचे फरक नोंदून ठेवण्यांत येतात. मोठा व छोटा उन्हाळा आणि थोडा पाऊस व जोराचा पावसाळा असें वर्षाचें ऋतुमान आहे.

व्यापारः—कोको, कॉफी, साखर, तांदूळ, मका व सोनकेळीं हे पदार्थ बाहेर देशीं पाठवितात. बहुतेक मोठे मळे सुरिनाम, कोमेविन, निकेरी व कोटिका या नद्यांच्या खालच्या प्रवाहावर आहेत. वरच्या सुरिनाम, सॅरमाका व मॅरोनी नद्यांच्या खडकांत सोनें सांपडतें. १९०६ त पॅरॅमॅरिबो व सोन्याच्या खाणीं यांच्यामध्यें रेल्वेरस्ता सुरू करण्यांत आला. शेतकी हा मुख्य धंदा आहे. १९१७ सालची आयात व निर्गत अनुक्रमें ७६४५९४१ गिल्डर व ८८५२१७० गिल्डर होती.

राज्यकारभारः— ही वसाहत एका गव्हर्नरच्या ताब्यांत आहे. व्हाईस प्रेसिडेंट व राजानें निवडलेल्या तीन मेंबरांच्या बनलेल्या कार्यकारी कौन्सिलचा हा गव्हर्नर प्रेसिडेंट असतो. कायदे करणाऱ्या मंडळाला स्टेट्स म्हणतात. यांचे मेंबर नऊ वर्षांकरितां निवडलेले असतात. या वसाहतीचे तेरा जिल्हे केले आहेत. न्याय देण्याकरितां तीन परगण्यांचीं कोर्टें, दोन जिल्हाकोर्टें व पॅरॅमॅरिबो येथील वरिष्ठ कोर्ट स्थापन करण्यांत आलीं आहेत. यांचा प्रेसिडेंट व कायमचे मेंबर राजानें निवडलेले असतात. सरासरी उत्पन्न २७६००० पौंड व खर्च ३१७००० पौंड आहे.

इतिहासः— ग्वायनाच्या इतिहासांत डच लोकांच्या इतिहासाचा उल्लेख केलेला आहे. १८२८ त सुरिनाम व वेस्ट इंडीजमधील डच बेटें यांचा राज्यकारभार पॅरॅमॅरिबो येथें राहणाऱ्या एकाच गव्हर्नराच्या हातीं दिला होता. परंतु १८४५ त हे अलग करण्यांत आले. १८६३ त गुलामगिरी बंद करण्यांत आली. मजूर मिळणें मुष्किलीचें झालें व १८७० मध्यें हॉलंड व इंग्लंड यांच्यामध्यें मजूर लोकांचा व्यापार नियमित करण्यासंबंधीं करार होऊन कलकत्त्याला एक डच सरकारचा एजंट नेमण्यांत आला. या प्रश्नाचा कधींच समाधानकारक निकाल लागला नाहीं. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या वीस वर्षांत हॉलंडचें लक्ष वसाहतीकडे जास्त वेधूं लागलें, व सुरिनाम ॲसोसिएशन, पॅरॅमॅरिबोला येणारी नॅव्हिगेशन कंपनीची सर्व्हिस, वनस्पतींची बाग,

भूगर्भशास्त्रविषयक व दुसऱ्या शास्त्रीय मोहिमा, व १८९८ मधील हार्लेम येथील प्रदर्शन वगैरे गोष्टी घडून आल्या.

फ्रेंच ग्वायना.—ही वसाहत डच ग्वायना व ब्राझील यांमध्यें आहे. फ्रान्सचा प्रदेश व नेदर्लंडचा देश यांच्या मधील सीमा १८९१ मध्यें रशियाच्या बादशहानें दिलेल्या निकालान्वयें निश्चित करण्यांत आली. मॅरोनी नदी ही सीमा असावी व आवा अथवा टॅपानाहोनीला मॅरोनीचा मुख्य प्रवाह समजावा अशी ही व्यवस्था होती. १९०५ त मॅरोनी व इटनीमधला प्रदेश फ्रान्सला डच व फ्रेंच सरकार यांच्या मधील करारान्वयें मिळाला. सोनें काढण्याच्या प्रश्नाचा निकाल फ्रान्स व हॉलंड यांनां मॅरोनी नदीची वांटून देऊन लावण्यांत आला. फ्रेंच ग्वायना व ब्राझिल यांच्या मधील ओयापोक नदी सीमा, स्विस सरकारनें ठरविली. १८९७ त रायोडिजेनिरो येथें एक करार होऊन फ्रेंच व ब्राझिल प्रदेश यांमधील सीमा ठरविण्यांत आली. फ्रेंच ग्वायनाचें क्षेत्रफळ ३२००० चौरस मैल आहे. लोकसंख्या (१९११) सुमारें ४९००९ आहे. कायेनी शिवाय सिनामारी, माना, रैरा व अॅप्रुएग्यु हीं इतर शहरें आहेत. १८९२ मध्यें फ्रेंच ग्वायनाचे मॅरोनी जिल्हा खेरीज करून १४ कॉम्यून करण्यांत आले तीन सेफ्टी बेटें (रॉयल, जोसेफ व डुडायबल), एन्फन्ट पेर्डुबेट व पांच रेमिरे बेटें हीं या वसाहतींपैकीं आहेत.

मुख्य नद्या मॅरोनी व ओयापाक या आहेत. शिवाय, माना, सिन्नामारी, कूरू, ओयॅाक या इतर नद्या आहेत. कायेनी हें राजधानीचें शहर ओयॅाकच्या मुखाजवळ आहे. व पुढेंच अॅप्रुएग्यु आहे. वनस्पती व प्राणी ग्वायनांतील इतर भागाप्रमाणेंच आहेत. वनस्पती फार विपुल आहेत. वाकापू, कामुट,वाऊ व इतर ताडाचीं झाडें येथें साधारणपणें उत्पन्न होतात. मॅनिऑक हा मुख्य खाण्याचा पदार्थ आहे, तांदूळ, मका, याम, आरारूट, सोनकेळीं, बनाना व ब्रेडफ्रूट (भाकरीचें फळ) येथें पिकतात. व्हॅनिला हें येथें होणारें रानटी झाड आहे. या देशांत फार थोडी जमीन लागवडींत आहे.

खाणींतून सोनें काढणें हा या वसाहतींतला मुख्य धंदा आहे. रुपें व लोखंड कित्येक जिल्ह्यांत सांपडतें; मॉट्‌-सिनेरीच्या मैदानांत केओलिन सांपडतें व कित्येक ठिकाणीं फॉस्फेट्स सांपडतात. शिवाय कापण्याच्या चक्क्या, दारू गाळण्याचे कारखाने, विटाचे कारखाने व साखरेचे कारखाने आहेत.

व्यापार व दळणवळणाचे मार्गः—दारू, कणीक, कपडे वगैरे जिन्नस बाहेर देशांतून या देशांत येतात. सोनें, फॉस्फेट, सागवानी लांकूड, कोको व गुलाबपाणी हे जिन्नस बाहेर देशीं रवाना होतात. कायेनी हें मुख्य बंदर आहे. मजूरांचा तोटा असल्यामुळें या वसाहतीची भरभराट होत नाहीं. एतद्देशीय मजूर मिळत नाहींत व हद्दपार केलेल्या लोकांनां काम करावयास लावणें फायदेशीर होत नाहीं. जमिनीवरील रस्ते पुष्कळ नाहींत. राजधानी व इतर शहरें यांमधील दळणवळण आगबोटींनींहि चालतें. कायेनी व ब्रेस्ट यांच्या मध्यें समुद्रांतील तारायंत्र आहे.

राज्यकारभारः—या वसाहतीचा कारभार एक कमिशनर–जनरल पहातो. याच्या मदतीला सेक्रेटरी–जनरल,न्याय, लष्कर, धर्म वगैरे राज्यकारभार खात्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांचें बनलेलें प्रिव्ही कौन्सिल असतें. १८७९ मध्यें सोळा मेंबरांचें एक लोकनियुक्त जनरल कौन्सिल स्थापन करण्यांत आलें. कायेनी येथें अव्वल दर्जाचें एक कोर्ट व एक उच्च प्रतीचें कोर्ट आहे. शिवाय चार जस्टिस ऑफ पीस आहेत. पैकीं एकाला इतर ठिकाणीं सत्ता चालवितां येते. १९१५ त ३३ प्राथमिक शाळा व ७ कॉंग्रेगेशनल शाळा होत्या. धर्मोपदेशकांवर एक अॅपोस्टोलिक प्रिफेक्ट मुख्य आहे. सैन्यांत एकंदर १५० यूरोपियन अधिकारी व सैनिक आहेत. इ. स. १८५२ च्या हुकुमान्वयें येथें कैदी लोकांची वसाहत स्थापन करण्यांत आली.

इतिहास.—१६०४ मध्यें चौथ्या हेनरीनें पहाणी करण्याकरितां पाठविलेल्या सिउर ला रेव्हार्डिरे यानें अनुकूल बातमी आणली. परंतु राजा मरण पावल्यामुळें वसाहत करण्याचे बेत रहित झाले. १६२६ मध्यें रूयेनच्या कांहीं व्यापाऱ्यांनीं सिन्नेमारी येथें वसाहत केली. १६३५ मध्यें अशाच एका टोळीनें कायेनीचा पाया घातला. १६५४ पासून कांहीं वर्षेपर्यंत ही वसाहत डचांच्या ताब्यांत होती. १६७४ मध्यें ही वसाहत फ्रान्सच्या ताब्यांत गेली व कोलबर्टची राज्यव्यवस्था देशाच्या प्रगतीला विघातक झाली.

१६७३ मध्यें मोठी आपत्ति आली. मुख्य प्रधान चोसील यानें पाठविलेल्या वसाहतवाल्यांनां अन्न व शेतकीचीं आउतें मिळत नव्हतीं. १८०० मध्यें व्हिक्टर हुजेसला गव्हर्नर नेमण्यांत आलें व यानें या वसाहतीची चांगली व्यवस्था लावली. परंतु १८०९ मध्यें पोर्तुगीज व ब्रिटिश लोकांनीं केलेल्या स्वारीमुळें या गव्हर्नरच्या कामाला अडथळा आला.

जरी १८१४ मध्यें फ्रेंच ग्वायना फ्रेंच लोकांनां परत देण्यांत आला होता तरी पोर्तुगीज लोकांनीं ही वसाहत १८१७ पर्यंत सोडली नव्हती. या वसाहतीची चांगली व्यवस्था करण्याचे प्रयत्न करण्यांत आले, परंतु मागें आलेल्या आपत्तीमुळें फ्रान्सांतील लोकमत कलुषित झालें होतें. १८२२ मध्यें साखरेचे कारखाने स्थापन करण्यांत आले; १८२४ मध्यें माना जिल्ह्यामध्यें शेतकीची वसाहत स्थापन करण्यांत आली. दास्यविमोचनामुळें शेतकीचें नुकसान झालें होतें, परंतु आफ्रिकेंतील लोक आणून ही स्थिति सुधारण्यांत आली. १८५५ मध्यें अॅप्रुएग्यूवर सोन्याच्या खाणीचा शोध लागल्यामुळें देशाच्या आर्थिक परिस्थितींत फरक पडला.

[सं द र्भ ग्रं थ.—ब्रिटिश ग्वायनाः—अंडर्सन—कॉपेंडियम ऑफ जनरल इन्फॉर्मेशन रिलेटिंग टु ब्रिटिश ग्वायना, १९१२; बेले—हँडबुक ऑफ ब्रिटिश ग्वायना; हॅरिसन—ब्रिटिश ग्वायना अँड इट्स रिसोर्सेस; इम् थुर्न—अमंग दि इंडियन्स ऑफ ग्वायना; रोडवे—हिस्टरी ऑफ ब्रिटिश ग्वायना; डच ग्वायनाः—पालम्रेन्ह—डच ग्वायना, लंडन १८७६. फ्रेंच ग्वायनावरचे चांगले संदर्भ ग्रंथ फ्रेंच भाषेत आहेत; ब्रिटानिकामध्यें यावर कांहीं माहिती सांपडेल].

ग्वायना बँकोआ—हॅवाना प्रांतांत क्यूबामधील हें एक प्रसिद्ध शहर असून त्याची लोकसंख्या १९०७ साली १४३६८ इतकी होती. ग्वायना बँकोआ व हॅवाना यांनां जोडणारा आगगाडीचा एक रस्ता आहे. उंच डोंगरावरील झाडींत हें शहर वसलेलें असल्यामुळें त्यांस फार शोभा आली आहे. या शहरांत व आसमंतात पाण्याचे झरे असून त्यांतील पाण्यांत औषधी धर्म आहेत. या शहरांतील वीथिका सुंदर असून तेथें कांहीं जुन्या चर्चेच्या इमारती आहेत. या शहराबाहेर पोटोसीचें चर्च असून तेथील देवालय व मूर्ती सुंदर आहेत. उन्हाळ्यांत हवा खाण्यास जाऊन राहण्याकरितां निसर्गमनोहर स्थान म्हणून हॅवाना प्रांतांत या शहराची फार प्रसिद्धि आहे. १८ व्या आणि १९ व्या शतकांत उपर्युक्त कारणामुळें तेथील लोकसंख्याहि वाढली आहे. १७४३ त तेथें एक कौन्सिल स्थापण्यांत आलें होतें. १७६२ मध्यें लिटिलमॉरो नांवाचा तेथील एक किल्ला इंग्रजांनीं हस्तगत केला.

ग्वाल्हेर सं स्था न.—हें संस्थान सेंट्रल इंडिया एजन्सीचा एक भाग असून त्याचा विस्तार चंबळपासून भिलसापर्यंत व बुंदेलखंड आणि झांशी येथून राजपुताना एजन्सीपर्यंत आहे. याचें क्षेत्रफळ २५०४१ चौ. मैल आहे. संस्थानच्या (१९२१) ३१८६०७५ या एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ८६ हिंदु, ४ मुसलमान, १ जैन व बाकी इतर जाती असून लो. सं. चें दर चौ. मैलास १२३ हें प्रमाण येतें. खुद्द ग्वाल्हेरची लो. सं. (१९२१) ८०३८७ आहे. संस्थानांत शहरें २३ असून भिलसा, मोणिया व गुणा हीं धान्याच्या व्यापाराचीं मुख्य केंद्रें आहेत.

रे सि डे न्सी.—सालबाईच्या (१७८२) तहानंतर शिंद्यांच्या दरबारीं रेसिडेन्ट नेमला गेला. मात्र वेळोवेळीं त्याच्या अधिकारक्षेत्रांत थोडाबहुत फरक पडलेला आहे. लहान वतनें व ब्रिटिश हद्दींतील रेल्वेवर त्याची देखरेख असते. रेसिडेन्सी हेड्क्वार्टर्सकरितां जागा स्वतंत्र आहे. त्यांतलि तीन खेड्यांचा वसुल रेसिडेन्सीच्याच कामाकरितां खर्च होतो. ग्वाल्हेर संस्थान हें उत्तरविभाग आणि माळवा अशा दोन विभागांत विभागलें गेलें आहे. एकंदर संस्थानचें उत्पन्न दीड कोटीचें आहे.

ग्वाल्हेरच्या पूर्व, उत्तर व पश्चिमेला मैदान आहे. ग्वाल्हेर, तावरगड भिंद आणि शिवपूर हे चार जिल्हे यांत येतात. हा भाग ५०० पासून ९०० फूटांपर्यंत उंचीचा आहे. दक्षिणेकडे जमीन झपाट्यानें उंच होत होत पुढें माळव्याचा माळ लागतो. तेथपर्यंत त्याची साधारण उंची १५०० फूट आहे. तिसरा भाग टेंकड्या व दऱ्या मिळून बनलेला अमझरा जिल्ह्यांत असून त्याची साधारण उंची १८०० फूट आहे. विंध्याचलाच्या दोन शाखा यांतूनच गेल्या असून त्यांतून ज्या बऱ्याच नद्या निघतात त्यांत चंबळा, क्षिप्रा वगैरे मुख्य आहेत. पण यांचा शेतीला कांहींच उपयोग होत नाहीं.

विशेषतः उत्तरेकडील जंगलांत वाघ, अस्वल वगैरे सर्व जातींचीं श्वापदें सांपडतात. माळावरील हवा साधारण समशीतोष्ण असते. मैदानांत मात्र उन्हाळा अत्यंत कडक असतो. पावसाचें मान साधारण मैदानांवर ४० व माळावर ३० इंच आहे. येथील राजघराणें शिंद्यांचें आहे. त्यांचा मूळगांव साताऱ्यापासून पूर्वेस १६ मैलांवरील कण्हेरखेड नांवाचा आहे. तेथची पाटीलकी शिंद्यांकडे होती. त्यांचा मूळ पुरुष राणोजी हा प्रथम पेशवे यांचा हुजऱ्या होता. पुढें त्याची मल्हारराव होळकराबरोबर उत्तरेकडे रवानगी झाली. तिकडे त्यानें बरीच कामगिरी केली (पहा). त्याला पांच मुलें होतीं. प्रथम शिंद्यांची राजधानी उज्जनी येथें होती. राणोजीच्या मागून जयाप्पा, जनकोजी, महादजी व दौलतराव असे पुरुष अनुक्रमें अधिकारारुढ झाले. महादजी व दौलतराव या दोघांनीं हिंदुस्थानच्या इतिहासांत बराच प्रमुख भाग घेतलेला आहे. थोरले माधवराव पेशवे वारल्यावर जी गडबड झाली त्या संधींत महादजीनें आपली सत्ता व वैभव यांची बरीच वाढ केली. राघोबादादांच्या निमित्तानें इंग्रज व शिंदे यांच्यांत बरेच वेळां लढाया झाल्या. १७८२ साली सालबाईच्या तहानंतर शिंद्यानें पुन्हां उत्तरेकडे सत्तेचा विकास केला, दिल्लीवर छाप बसवली व त्याकरितां इंग्रजी पद्धतीनें कवाईत वगैरे शिकवून सैन्य तयार केलें. थोड्याच दिवसांत वानवडी येथें महादजी वारला. इंग्रजी इतिहासकारांनीं सुद्धां महादजीबद्दल गौरवपरच लिहिलें आहे.

नंतर दौलतराव गादीवर आला. त्यानंतर त्याचें आणि होळकरांचें युद्ध झालें. वसईचा तह दौलतराव कबूल करीना म्हणून त्यांचीं व इंग्रजांचीं अनेक युद्धें होऊन शेवटीं सुर्जीअंजनगांव येथें तह झाला. पुन्हां मध्यंतरीं बरीच वाटाघाट व फेरफार होऊन १८१७–१८ मध्यें नवे तह झाले. दौलतरावाच्या मागून पुष्कळच अंदाधुंदी माजली व बायकांचा कारभार झाला. व पुढें इंग्रजी सैन्याच्या खर्चाकरतां बराच मुलूख तोडून द्यावा लागला.

दौलतरावानंतर जनकोजी गादीवर आला. तो तरुणपणींच वारल्यानंतर (१८४३) जयाजीराव गादीवर बसला. १८५२ मध्यें दिनकरराव दिवाण झाला; त्यानें सर्व खातीं व्यवस्थित व संघटित केलीं. १८५७ च्या बंडांत जयाजीरावानें इंग्रज सरकारला स्वतः बरीच झीज व तकलीफ सोसूनहि मदत केली. बंडानंतर जी शांतता झाली तीमुळें

संस्थानची सुधारणा करण्यास वाव मिळाला व रेल्वेला सवलती दिल्या गेल्या. १८८६ मध्यें झांशी शहर इंग्रजांनीं घेतलें व त्याबद्दल शिंद्यास ग्वाल्हेर, मोरार व कांहीं खेडीं दिलीं. १८८६ मध्येंच हल्लींचे महाराज माधवराव गादीवर आले व १८९४ मध्यें त्यांनां अखत्यारीचा अधिकार मिळाला. १९०१ मध्यें ते चीनमध्यें लढाईवर गेले होते. ते ब्रिटिश सैन्याचे सन्माननीय ले. जनरल असून, केंब्रिजचे एलएल्. डी. आणि ऑक्सफर्डचे डी. सी. एल् आहेत. त्यांनां २१ तोफांची सलामी आहे. संस्थानचा संबंध थेट हिंदुस्थान सरकारशीं येतो. मजलीस ई-खास नांवाच्या नऊ मंत्रीमंडळाच्या मदतीनें महाराज स्वतः संस्थानचा कारभार पहातात. हल्लीं (१९२१) महाराजांनीं ग्वालेर नॅशनल असेंब्ली म्हणून एक मंडळ नेमलें आहे.

या संस्थानांत ऐतिहासिक महत्त्वाचीं क्षेत्रें बरींच आहेत. उज्जयिनी तर प्रसिद्धच आहे. शिवाय भिलसा, उदयगिरी, बारो, नरोड, ग्वाल्हेर, चंदेरी, मंदसोर वगैरे ठिकाणीं हिंदु, जैन व मुसुलमान यांच्या धार्मिक व ऐतिहासिक इमारती बऱ्याच आहेत. त्यांपैकीं पुष्कळ कामें ख्रिस्ती शकाच्या पांचव्या शतकाच्याहि अगोदरचीं आहेत. कांहीं ठिकाणीं बौद्ध स्तूप आहेत. उज्जयिनीजवळ (कालियादोह) कालियादेह येथें क्षिप्रा नदीच्या पात्रांत बांधलेला राजवाडा व नदीचें पाणी ज्यांत खेळविलें आहे असें विविध प्रकारचें बांधकाम फार पहाण्यालायक आहे.

लोकसंख्येपैकीं १८९९-१९००च्या दुष्काळानें शेकडा १३ पर्यंत लोकसंख्या कमी झाली. संस्थानांत शहरें २३ आहेत. यांतील ९ मैदानांत व १४ माळावर आहेत. एकंदर गांवें ९५३८ आहेत. लोकसंख्येपैकीं शेकडा अडीच माणसें शिकलेलीं आहेत. क्षेत्रविस्तारामुळें भाषावैचित्र्य बरेंच आहे. शेकडा २५ माळवी भाषा बोलणारे, शेकडा १८ बुंदेली भाषा बोलणारे, शेकडा १८ उर्दू बोलणारे व शेकडा १३ तोवरगडी भाषा बोलणारे आहेत. जंगली लोकांत किराड, मीना व भील हे लोक (दीड लाखावर) आहेत. मैदानांत शेकडा ५७ व माळावर ४७ लोक शेतीवर रहातात. शे. २६ गवळ्याचा धंदा करतात. शेकडा १५ उद्योगधंदे व शेकडा तीन व्यापार करतात.

माळव्यामध्यें उत्कृष्ठ प्रतीची शेतजमीन आहे. तोवरगड व भिंडमध्यें साधारण प्रतीची आहे; इतरत्र विंध्याचलाच्या टेकड्या पसरल्यानें तेथील जमीन शेतीला निरुपयोगी आहे. शिवाय जेथें जमीन चांगली तेथें वस्ती पातळ असल्यानें सर्व जमीन लागवडीखालीं येत नाहीं. जमीनीचे (पिकाच्या मानानें) दहा भाग पाडले आहेत. पैकीं थोड्याश्या जमीनींत दोन पिकें निघतात. शेकडा २२ प्रमाणें जमीन इनाम आहे. सरकारी १९४५४ चौ. मैलांपैकीं ३६१ चौ. मैल जमीन पाण्याखालीं आहे. पाण्याबद्दल शेतकऱ्यांवर फारसा कर नाहीं. गहूं व ज्वारी हें मुख्य पीक असून शिवाय हरभरा, बाजरी, मका, गळिताचीं धान्यें. कापूस, अफू, डाळी, नील, ताग वगैरेंची लागवड होते. नवीन लागवड करणारांस बऱ्याच सवलती मिळतात. सरकार हें सावकारांपेक्षां कमी व्याजानें रयतेस कर्ज देतें.

संस्थानच्या क्षेत्रफळाचा एकनवमांश भाग जंगलानें वेष्टित आहे. जंगलापासून इमारती लांकूड, गवत, लाख, मोह वगैरे पाऊण लाखापर्यंतचें उत्पन्न निघतें. संस्थानांत लोखंड पुष्कळ ठिकाणीं सांपडतें. त्यामुळें पूर्वीं लोखंडाचे कारखाने उत्तम रीतीनें चालत असत. परंतु अलीकडे परदेशी माल जास्त स्वस्त पडूं लागल्यानें स्थानिक धंद्यांचा मागमूस राहिला नाहीं. त्यामुळें नवीन खाणी खोदल्या जात नाहींत. येथील दगड इमारतीकरितां पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे दगडांच्या खाणी चांभारांच्या मालकीच्या आहेत व त्यांनां दर इसमामागें ४ रुपये कर द्यावा लागतो. हल्लीं संस्थाननें खाणींच्याबद्दल पुनः प्रयत्न सुरू केले आहेत (१९२३). तसेंच दगडावरील नक्षीकामास सरकारकडून उत्तेजन मिळालें आहे. सिमेंटला लागणारा दगड संस्थानांत मुबलक असल्यामुळें सिमेंटचा धंदा हल्लीं सुरू झाला आहे. ग्वाल्हेरजवळील बनमोरच्या सिमेंटाच्या कारखान्यांत दरवर्षी ४० हजार टन सिमेंट निघतें. अभ्रक, जस्त व लोखंड यांच्या खाणी खोदण्याकडे सरकार लक्ष घालूं लागलें आहे.

संस्थानांत कापूस वटविण्याच्या व सुताच्या गिरण्याहि आहेत. चंदेरी येथें तलम कापड निघतें. मंदसोर येथें चीट निघतें. व शिवपूर येथें उत्तम लाखकाम होतें. निरनिराळ्या प्रकारचे एकंदर १९९ कारखाने संस्थानांत आहेत. साबणाचा, चामड्याच्या वस्तु करण्याचा व चिनी मातीच्या वस्तु करण्याचा हे तीन कारखाने चांगले चालले आहेत. धान्य, अफू, कपडा, तूप यांची निर्गत होते; तर आयात मालांत हत्यारें, यंत्रसामुग्री, रॉकेल, कागद, लोखंडी सामान हा माल येतो. लष्कर, उज्जैन, मंदसोर, निमच वगैरे व्यापाराचीं मुख्य ठिकाणें आहेत.

संस्थानांत आगगाडी बरीच पसरली आहे. इतर कंपन्यांशिवाय संस्थाननें स्वतःची रेल्वे म्हणून काढली आहे. हल्लीं माळव्यामध्यें नवीन नवीन फांटे काढण्याचें काम सुरू झालें आहे. इ. स. १९२३ सालीं आगगाडीचें उत्पन्न एकंदर वसुलाच्या शेकडा ४५.५६ होतें. सडकाहि बऱ्याच आहेत. १८८५ मध्यें संस्थानांत पोस्ट सुरू झालें. व्यवस्थेकरितां संस्थानचे दोन (ग्वाल्हेर व माळवा असे) भाग केले आहेत. ग्वाल्हेरमध्यें ७ जिल्हे व माळव्यांत ४ आहेत. प्रत्येक जिल्ह्याला एकेक सुभा आहे. तेच जिल्हामॅजिस्ट्रेट होत. परगण्याच्या ठिकाणीं कमाविसदार असतो. १८४४त न्यायकोर्टें सुरू झालीं. प्रांत अदालत हें सेशनकोर्ट असून अपीलें सदर अदालत व शेवटीं खुद्द महाराज यांच्या पुढें चालतात.

संस्थानच्या दीड कोटी उत्पन्नांत (यांतच जहागिरदारांचें अकरा लाखांचें उत्पन्न आहे.) सारा ८५, कस्टम ११, स्टँप २.८, अफू २.८, अबकारी १.४, रेल्वेव्याज २१ ३ व रेल्वे नफा ३ लाख असून खर्च एक कोटी तेहतीस लाख आहे. त्यांत ४१ लाख लष्करावर तर अडीच लाख शिक्षणाकडे खर्च होतात. शेतकऱ्यांचे ठाकूर, जहागिरदार, कायमसारा देणारे व माफीदार असे वर्ग असून साऱ्याचें प्रमाण जिराईत जमीनीवर आठ आण्यांपासून सहा रु. पर्यंत व बागायतीवर चार ते चाळीस रु. पर्यंत आहे. नवीन यांत्रिक उपकरणीं शेतकऱ्यांनां सरकारकडून पुरविण्याचा उपक्रम नुकताच (१९२३) सुरू झाला आहे. त्यासाठी शेतकी प्रदर्शनेंहि भरविण्यांत येतात. 'शिंदा नांगर' नांवाचा नांगर स्वस्त किंमतींत सरकार शेतकऱ्यास देत असते.

मिठाबद्दल संस्थानचा व ब्रिटिशांचा पुढीलप्रमाणें ठराव झाला आहे. संस्थानने १९३० टनांपेक्षां अधिक मीठ तयार करूं नये व ते ब्रिटिश मुलुखांत पाठवूं नये; आणि ब्रिटिश मुलखांतलें मीठ संस्थानांत येईल त्यावर (पूर्वी ब्रिटिश सरकारनें कर घेतलेला असतो म्हणून) संस्थानानें कर बसवूं नये, व यामुळें संस्थानचें जें नुकसान होईल त्याची भरपाई म्हणून इंग्रजांनीं ३.१ लाख रुपये संस्थानला द्यावे. हा ठराव १८७८ मध्यें झाला.

स.१८९९ पर्यंत अनेक प्रकारचें नाणें प्रचारांत होतें. हल्लीं सर्वत्र इंग्रजी शिक्का चालतो.

पूर्वीपासून शिंदे हे लष्करी खात्याकडे फार लक्ष देत आले आहेत. जवळ जवळ दहा हजारांपर्यंत लष्कर त्यांच्या पदरीं आहे. पोलीसखातें पूर्वी लष्करांत समाविष्ट होतें तें १८७४ पासून स्वतंत्र केलें.

जयाजीराव महाराज यांचें शिक्षणाकडे फार लक्ष असे. त्यांनीं शिक्षणावरचा खर्च वाढविला. १८६३ त शिक्षणखातें स्थापन झालें. स. १९२३ त एक आर्टस् कॉलेज, ६६ दुय्यम प्रतीच्या व ७९७ प्राथमिक शाळा होत्या. त्याशिवाय कामगारांच्या शिक्षणाची शाळा, सरदार शाळा, लष्करी शाळा, इंजिनिअरिंग वगैरे शाळाहि आहेत. शिवपुर येथें हल्लीं एक औद्योगिक शिक्षणाची शाळा सरकारनें काढिली आहे. ग्वाल्हेरीस एक नार्मल स्कूलहि आहे. उज्जन येथें व ग्वालेरीस स्त्रीशिक्षकिणींसाठीं शाळा आहेत. भील व अस्पृश्य यांच्याहि शाळा आहेत. खास मराठ्यांसाठीं लष्कर येथें एक हायस्कूल आहे.

जि ल्हा.—लष्कराभोंवतालचा १५१३ चौ. मै. क्षेत्रफळाचा जिल्हा. लोकसंख्या ३,२३,६९३ असून शहरें ३ व ६१४ गांवें आहेत. याचे तीन परगणे आहेत. साऱ्याचें उत्पन्न ५,१५,००० येतें. अंत्री येथें (रेल्वे स्टेशन जवळच) प्रसिद्ध अबुलफजलची कबर आहे. या जिल्ह्यांत नद्या वगैरे नाहींत. [इंपे. ग्वाल्हे. पु. १२].

श ह र.—ग्वाल्हेर शहर हा शब्द दोन शहरांचा वाचक आहे लष्कर म्हणून ज्याला म्हणतात त्यालाच इंग्रज लोकांनीं ग्वाल्हेर म्हणण्याची चुकीची वहिवाट पाडली आहे. खरें ग्वाल्हेर शहर हें लष्कराच्या उत्तरेला ग्वाल्हेर किल्ल्याच्या पायथ्याशीं जुन्या ग्वाल्हेर शहराच्याच जाग्यावर आहे. ग्वाल्हेरचें रेल्वे स्टेशन हें लष्करपासून तीन मैल व ग्वाल्हेरपासून दोन मैल अंतरावर आहे. ग्वाल्हेर, लष्कर व ब्रिगेड मिळून लोकसंख्या १ लाख २० हजार आहे त्यांत हिंदु शेकडा ७४ व मुसुलमान २३ आहेत. मुसलमानांच्या वेळीं १६ व्या शतकांत ग्वाल्हेर हें माळवा सुभ्यांतील ग्वाल्हेर सरकारचें (जिल्ह्याचें) मुख्य ठिकाण होतें. खुद्द ग्वाल्हेर शहर अगदीं लहान पडींत असून त्याला उतरती कळा लागली आहे. पूर्वी ग्वाल्हेर येथें दगडावर कोरीव व खोदकाम सुबक व नक्षीदार होत असे. अद्यापहि त्याचा हा लौकिक समूळ गेला नाहीं. मुंबईची आग्रारोड सडक होण्याच्या अगोदरचा आग्र्याचा हमरस्ता येथून जात असे. जुन्या शहरांत जिकडे तिकडे मोडके वाडे व पडक्या मशिदी आणि कित्येक इमारती आहेत. त्यांतच प्रसिद्ध तानसेन गवयाची कबर आहे. लष्कर हें १८१० पासून वसलें व राजवाडे वगैरे या भागांतच आहेत. ग्वाल्हेरचा किल्ला हिंदुस्थानांत प्रसिद्ध, मजबूत व महत्त्वाचा किल्ला होता. हा केव्हां व अर्थात् कोणी बांधला वगैरेचा मागमूस नाहीं. पण इसवीसनाच्या ६ व्या शतकापासून इतिहासांत त्याचा उल्लेख व संबंध बराच येतो. सूर्यसेन नांवाच्या राजाला असलेलें कोड ग्वालीप नांवाच्या साधूच्या प्रसादानें गेलें म्हणून त्यानें त्याच्या नांवानें हा किल्ला बांधला अशी दंतकथा आहे. शिलालेख वगैरेंतून याचा उल्लेख गोपाद्री, गोपगिरी, गोपाचल असा आहे. ग्वाल्हेर हें नांव त्यापासूनच आलें आहे.

६ व्या शतकांत येथें गुप्तांचें राज्य होतें. पुढें हा मिहिरकुलानें घेतला. नंतर तो कनोजच्या राजाकडे गेला. दहाव्या शतकांत येथें रजपुतांचाच अंमल होता. महेंद्रचंद्र (स.९५६), महिपाल (११०४), भुवनपाल, मधुसूदन, तोमरवंशीय धीरेंद्रदेव (१४४०) व निलंगदेव (१४१०) वगैरे राजे होऊन गेल्याचें त्या वेळच्या शिलालेखांवरून दिसतें. पुढें मुसुलमान, मोंगल व अफगाण यांच्या ताब्यांत तो होता. पानिपतच्या घनघोर संग्रामानंतर गोहदकरानें (जाट राणा) त्याला आपलासा केला. पण लवकरच तो महादजी शिंद्यानें आपल्या कबजांत घेतला. मध्यंतरीं इंग्रजांनीं मध्यें पडून तो राण्याला परत दिला होता; पण तो पुन्हां शिंद्याकडे आला. १८५८ मध्यें महाराणी लक्ष्मीबाई झांशीवाली हिनें हा काबीज केला होता परंतु पुढें सरह्यूरोज यानें तो राणीपासून परत घेतला पण त्यांतच महाराणीच्या हल्ल्यास तो बळी पडला. १८८६ पर्यंत तो इंग्रजसरकारच्या ताब्यांत होता. पुढें इंग्रज व शिंदे यांनीं ग्वाल्हेर व झांशी यांची परस्परांत अदलाबदल केली.

किल्ल्यामध्यें ऐतिहासिक व पुराण वस्तु बऱ्याच आहेत. तट मोठा व विशाल असून त्याचे बहुतेक दरवाजे हिंदू पद्धतीचे व एक मुसलमानी पद्धतीचा आहे. आंत हिंदूंचीं बरींच देवळें असून जैनांचेंहि एक देऊळ आहे. किल्ल्यांत जैनांच्या प्रचंड मूर्ती आहेत. त्यांत एक तर ५७ फुट उंचीची आहे.

मुसुलमानी मशीदी बऱ्याच आहेत ४ हिंदु पद्धतीचे व २ मुसुलमानी धर्तीचे राजवाडे आहेत.ते फारच सुंदर व मजबूत आहेत. किल्ल्यावर पाण्याचीं अनेक टांकीं आहेत. त्याचें पाणी कधीं आटत नाहीं. त्यांपैकीं सूर्यकुंड हें जुनें व प्रख्यात आहे. जोहार नांवाचा जो तलाव आहे तेथें १२३२ मध्यें आपल्या बायकामुलांचा प्रथम जोहार करून मग अजमशहाबरोबर किल्ल्यांतील रजपूत लोक लढले, अशी कथा सांगतात. [इंपे. ग्याझि. पु. १२; आर्किऑलॉजिकल रिपोर्ट, पु. २]

ग्विडो—हा प्रसिद्ध संगीतशास्त्रज्ञ ११ व्या शतकांत होऊन गेला. 'आधुनिक संगीताचा आद्यजनक' असें त्यास मानण्यांत येत असून अव्हेलेनाच्या मठांतील त्याच्या तसबिरीवरहि वरील उल्लेख आढळतो. त्याचें विश्वसनीय चरित्र उपलब्ध नसून, अरेझो येथील बिशप थिओडाल्ड व पॉपोसा येथील मिकाएल नांवाचा एक भिक्षु यांना लिहिलेल्या आपल्या ग्रंथाच्या समर्पणविषयक पत्रावरूनहि ग्विडोच्या अस्सल चरित्रांवर फारसा प्रकाश पडत नाहीं. समकालीन ग्रंथकारांच्या पुस्तकांतून या संगीताचार्याचा उल्लेख आढळतो. व त्यावरून ग्विडो हा दहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जन्मला असावा असें अनुमान निघतें. त्याचें जन्मस्थान कोठें होतें हेंहि अनिश्चित आहे. त्याच्या ग्रंथाच्या मुखपृष्ठावरून 'ग्विडो ॲरेटिनस' अथवा नुसतें 'ॲरेटिनस' असें नाव आढळतें. पॉंपोसा येथील मठांत तो गायनशिक्षकाचें काम करीत असे व त्याच ठिकाणीं त्यानें संगीत शास्त्रासंबंधीं एक नवीन संगीतलेखनपद्धतीचा शोध लाविला. जें शास्त्र शिकण्यास पूर्वी दहा वर्षे लागत असत तें शास्त्र आपल्या पद्धतीनें पांच महिन्यांत सहज अवगत होईल असें तो म्हणत असे. ग्विडोबद्दल पुढें लोकांचा मत्सर वाढूं लागला व त्यामुळें त्यास पॉंपोसा येथील मठ सोडून जाणें प्राप्त झालें. नंतर तो अरेझो येथें जाऊन राहिला. १०३० मध्यें त्याला पोपकडून निमंत्रण आलें व तो रोम येथें गेला. त्या ठिकाणीं असतांना पॉंपोसा येथील मठाकडे पुनः परत जाण्याबद्दल त्यास विनंति करण्यांत आली. १७ मे १०५० रोजीं ग्विडोनें इहलोक सोडला. १८८८ सालीं सांपडलेल्या जुन्या कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, ग्विडो हा फ्रान्स देशांत सेंट मेअर डेस फॉसेस नामक मठांत रहात असे व तेथेंच त्यानें आपल्या संगीतलेखनपद्धतीचा शोध लाविला. ग्विडोच्या पद्धतीला, आधुनिक गीतलेखन पद्धतीच्या इतिहासांत मोठें महत्व प्राप्त झालें आहे. यूरोपियन संगीतांतील पहिले सहा स्वर त्यानें शोधून काढले आहेत. त्या स्वरांचीं नांवें सेंट जॉन, बॅप्टिस्ट यास उद्देशून केलेल्या एका स्तोत्राच्या ओळींचीं आद्याक्षरें आहेत.

ग्वीक्चिआर्डीनी फ्रान्सिस्को (१४८३-१५४०)—हा प्रसिद्ध इटालियन इतिहासकार व मुत्सद्दी फ्लॉरेन्स येथें १४८३ मध्यें जन्मला. त्याचें घराणेंहि उच्च व सुप्रसिद्ध असून त्याच्या अनेक पूर्वजांनीं मोठमोठ्या सरकारी हुद्यांवर कामें केलीं होतीं. फ्रान्सिस्कोचें ग्रीक व लॅटिन भाषांचें प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यानें फेरारा व पडुआ या दोन युनिव्हर्सिटींत इ. स. १५०५ पर्यंत अभ्यास केला. ख्रिस्तीधर्म खात्यांतील कार्डिनलची जागा पत्करावी असा त्याचा हेतु होता, परंतु त्याच्या बापाला ती गोष्ट पसंत नव्हती व पांच मुलांपैकीं कोणालाहि धर्मखात्यांत शिरूं द्यावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें होतें. यामुळें फ्रान्सिस्कोनें पुढें कायद्याचा अभ्यास करून वकीली सुरू केली व त्यांत इतकी कीर्ति मिळविली कीं त्याला स्पेनचा राजा फर्डिनंड दि कॅथॉलिक याच्या दरबारीं वकील म्हणून पाठविण्यांत आलें. व तेव्हांपासून त्याच्या राजकारणी व मुत्सद्दि आयुष्यक्रमाचा प्रारंभ झाला. ग्वीक्चिआर्डीनी मूळचा महत्त्वाकांक्षी, लोभी व अधिकारलोलुप होताच व स्पेनच्या कामगिरींत त्याच्या अंगचे तत्कालीन राजकारणी पुरुषास लागणारे सर्व गुण निदर्शनास आले. विरुद्ध पक्षांचे कट फिसकटवून प्रतिकट रचणें, विश्वासघातक्यांनांहि फसविणें, मानवीप्राणी अत्यंत नीच हेतूंनीं प्रेरित असतो असें धरून चालणें आणि अत्यंत घोर गुन्ह्यांची सुद्धा त्यांतील चातुर्याबद्दल तारीफ करणें या गोष्टी राजकारणी बुद्धिमत्तेच्या उच्च कोटींत गणल्या जात असत. या गुणांमुळें रोमचा १० वा लिओ व पुढील एक दोघांनीं त्याला पोपच्या राज्यांतील प्रांतावर गव्हर्नर नेमलें. या नोकरीचा राजीनामा त्यानें १५३४ मध्यें दिला. या नोकरींतील अनुभवानें पोपच्या वर्तनाबद्दल त्याच्या मनांत पक्का तिटकारा उत्पन्न होऊन पुढें तो लूथरच्या प्रॉटेस्टंट पंथाचा अनुयायी बनला. पुढें फ्लॉरेन्स संस्थानचा ग्रँड वझीर होऊन राज्यकारभार पहावा असा त्याचा हेतु होता पण तो साधला नाहीं. म्हणून तो आपल्या गांवीं ग्रंथलेखनांत काळ घालवीत राहिला. तो १५४० मध्यें मरण पावला.

ग्वीलोटीन किंवा गीलोटीन—हें १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं फांशीची शिक्षा झालेल्या लोकांचा शिरच्छेद करण्याकरितां मुद्दाम तयार केलेलें यंत्र होय. या यंत्राची रचना अशी होती कीं, दोन उभ्या खांबावर एक आडवें लांकूड बसविलें होतें. तें असे कीं, त्यायोगानें एक मोठा सुरा वरखालीं करतां येत असे. व त्या सुऱ्याच्या वर इतकें मोठें वजन बसविलें होतें कीं,तो सुरा,दोरी सैल करतांच एकदम झटकन खालीं पडत असे. हें यंत्र मूळ इराणी लोकांनीं तयार केलें असें कांहीजण म्हणतात. पण एवढें मात्र खरें कीं फ्रान्समध्यें त्याचा विशेष दुर्लौकिक होण्यापूर्वीहि

तें ग्रेटब्रिटन व इतर यूरोपीय देशांत उपयोगांत आणलें जात होतें. स्कॉटलंडांतील एडिनबरोच्या म्यूझियममध्यें 'मेडन' नांवाचें एक जुनें यंत्र असून तें गीलोटीनच्या सारखेंच आहे. जर्मनमिध्यें हॅबेल नांवाचें असलेंच यंत्र होतें. आणि इटालींत मन्नाइआ नांवाचें असलें यंत्र उच्च घराण्यांतील गुन्हेगारांनां फांशी देण्याकरितां वापरीत असत.तथापि फ्रेंच राज्यक्रांतीच्या सुमारें एक शतकभर हीं जुन्या काळांतील यंत्रें रद्द पडलीं होतीं. पण गीलोटीन नांवाच्या कॉन्स्टिट्यूट असेंब्लीमधील सभासदानें १७८९ मध्यें या यंत्राचा उपयोग करावा अशी सूचना आणली. त्या सूचनेवर बराच वादविवाद होऊन अखेर १७९१ मध्यें असेंब्लीनें एक कमिटी नेमली व कमिटीचा पडलेला अनुकूल अभिप्राय पसंत करून एका जर्मन कारागिरांकडून तसलीं यंत्रें तयार करविलीं. १७९२ पासून १७९५ पर्यंत या यंत्रानें हजारों इसमांचीं डोकीं धडापासून झपाझप वेगळीं केलीं. आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या भयानक स्वरूपात या यंत्रानें मोठीच भर घातली. पुढें या यंत्राविरुद्ध फार गवगवा झाल्यामुळें इतर देशांत त्याचा उपयोग कोणी केला नाहीं. तथापि १८५३ मध्यें सॅक्सनीच्या राज्यांत तें उपयोगात आणण्यांत आलें. आणि तेव्हांपासून फ्रान्स, बेलजम व जर्मनीचा कांहीं भाग यांतहि तें फाशी देण्याच्या कामीं वापरण्यांत येऊं लागलें. या यंत्राचा खुद्द उत्पादक डॉ. गीलोटीनहि त्याला बळी पडला, असे मधूनमधून उल्लेख दृष्टीस पडतात पण ते चुकीचे होत. कारण तो पुढें १८१४पर्यंत जगून नैसर्गिक कारणानींच मरण पावला.

ग्वेनेव्हीअर—ऑर्थर राजासंबंधीं असलेल्या अद्भुत कथेवरून पहातां, ग्वेनेव्हीअर ही ऑर्थरची पत्नी होय. जिओफ्रे ऑफ मनमाउथच्या मतें ती एक रोमन स्त्री होती. परंतु दंतकथेवरून पहातां ती लिओडेग्रॅन्स नामक राजाची कन्या असून तिचा जन्म कॉर्नवाल येथें झाला. जिओफ्रेचें मत व उपर्युक्त दंतकथा वॅसे यास ठाऊक असल्यामुळें त्यानें दोहोंचाहि उपयोग आपलें मत बनवितांना केला आहे. ग्वेनेव्हीअरसंबंधीं वेल्स व फ्रान्समध्यें असलेल्या दंतकथा अत्यंत गुंतागुंतीच्या आहेत. इंग्लंडमध्यें ग्वेनेव्हीअरची माहिती लोकांनां आहे. पण ती लान्सेलॉटशीं नीतिबाह्य संबंध ठेवणाऱ्या ग्वेनेव्हीअरचीच होय. मॅलोरी व टेनिसन या प्रतिभाशाली लेखकांच्या कल्पनासृष्टींत या स्त्रीची हृदयस्पर्शी व चेतोहर अशीं भिन्न चित्रें पहावयास सांपडतात. फ्रान्समध्यें प्रचलित असलेल्या अद्भुत कथानकावरून पाहतां, आर्थर व ग्वेनेव्हीअर यांच्या कथानकांत लान्सेलॉटचा उल्लेख आढळत नाहीं. या कथानकांत लान्सेलॉटचा संबंध फार मागाहून जोडण्यांत आला आहे. मॉरड्रेडचा शेवटीं पराजय झाल्यानंतर ती जोगिण बनली. आर्थरच्या अद्भुत कथेंतील ग्वेनेव्हीअर ही एक व्यभिचारी स्त्री होती व लान्सेलॉटसारख्या सरदाराशीं प्रेमसंबंध ठेवणें तत्कालीन परिस्थिति पाहतां मोठें पाप गणलें जात होतें किंवा नव्हतें या मुख्य मुद्यावरूनच लान्सेलॉटचें चारित्र्य ठरविलें पाहिजे. ग्वेनेव्हीअरची गोष्ट दृष्टान्त स्वरूपाची आहे.

ग्वेरिक, आटोव्हान.—हा एक जर्मन प्रायोगिक तत्ववेत्ता होऊन गेला. याचा जन्म प्रशिअन साक्सनींतील माग्डेबर्ग नांवाच्या गांवीं तारिख २० नोव्हेंबर १६०२ रोजीं झाला. प्रथमतः त्यानें कायदा, गणित, यंत्रशास्त्र व भूमिति यांचा अभ्यास केला. सन १३४६ सालीं तो मागडेबर्गचा मेअर होता. त्यानें फावल्या वेळांत शास्त्रीय विषयांकडे लक्ष्य पुरविलें. विशेषेंकरून वायुशास्त्राकडे त्यानें जास्त लक्ष्य दिलें. ग्यालिलिओ, पास्कल आणि टारेसेली यांनीं निर्वात स्थल करण्यासंबंधानें जे प्रयोग केले ते ऐकून त्यानें त्या दिशेनें प्रयोग करून एक वाताकर्षक यंत्र तयार केलें. दोन पोकळ अर्धगोलक घेऊन ते एकमेकांवर बरोबर बसतील अशा रितीनें साफ करून त्यांच्यांतील हवा काढून घेतली; नंतर त्या अर्धगोलकांच्या दोहों अंगास पंधरा पंधरा घोडे जोडून त्यांच्या सहायाने ते अर्धगोल वेगळे करण्याचा प्रयत्न करण्यांत आला, परंतु ते गोल वेगळे करतां आले नाहींत. हा प्रयोग त्यानें तिसऱ्या फर्डिनान्ड बादशहासमक्ष करून दाखविला. या वाताकर्षक यंत्राखेरीज त्यानें एक विद्युद्यंत्र तयार केलें. याकरिता त्यानें गंधकाचा एक गोलक वापरला. खगोलशास्त्रांतहि त्यानें कांहीं शोध लावले आहेत. धूमकेतूंचें पुनःपुनः आगमन होतें असें त्यानें दाखवून दिलें. तारीख १० मे १६९ रोजीं तो ह्यामबर्ग येथें मरण पावला.

ग्वेर्नेसे—ब्रिटनच्या ताब्यांत असलेल्या 'चॅनेल बेटां' पैकीं हें एक बेट आहे. त्याचा आकार त्रिकोणासारखा असून या बेटाची लोकसंख्या १९०१ सालीं ४०४४६ इतकी होती. ग्वेर्नसेचें क्षेत्रफळ १५६९१ एकर अथवा २४.५ चौरस मैल इतकें आहे. पूर्व किनाऱ्यालगत, सेंटपीटर पोर्ट नांवाचें एक प्रसिद्ध शहर आहे. दक्षिण किनाऱ्याकडील वनश्री फार प्रेक्षणीय असल्यामुळें, उन्हाळ्यांत बरेच लोक ह्या ठिकाणीं जातात. तो सर्व प्रदेश अत्यंत खडकाळ असून तेथें पेटिट बॉट, सेंट्स व मालिन ख्रूएट नांवाचे उपसागर आहेत. त्या ठिकाणीं मोठाल्या दऱ्या व कडे आहेत. कोबो व बॅझॉन नामक उपसागर पश्चिम किनाऱ्याच्या बाजूस आहेत. पूर्व किनाऱ्याकडे सेंटपीटर पोर्ट नांवाचें शहर आहे. या बेटाचा अन्तर्भाग मोठाल्या दऱ्यांमुळें व विविध वनस्पतींमुळें फारच शोभिवंत दिसतो. भाजीपाला, बटाटे, द्राक्षें व फुलें इत्यादि वस्तू येथून बाहेर पाठविण्यांत येतात. सेंट सॅपसन शहरांतून ग्रॅनाइट जातीच्या दगडांची निर्गत होते. राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं हें बेट, ॲलडर्नी, सार्क व हर्मे या बेटांशीं जोडण्यांत आलें आहे. या बेटाचे दहा भाग पाडण्यांत आले असून प्रत्येक ठिकाणीं एक धर्मगुरु असतो. ग्वेर्नेसेमध्यें बऱ्याच पुराणवस्तू असून सेंट मिचेल व्हेल व पीटरपोर्ट येथील चर्चच्या जुन्या इमारती प्रेक्षणीय आहेत.